7

AYURVED PATRIKA

1955 G. K. U.

079410

COMPILED

Stock Verification 2024

C

079410

पाक्षिक वृत्तपत्र

COMPILED

82470
23-5-77
90

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

वर्ष ९ वें) नासिक, ता. १ जानेवारी १९५५ (अंक १ ला

आयुर्वेदीय रसशास्त्र संपूर्ण शास्त्रीय

नासिक येथें भरलेल्या आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेंत ता. १५-१०-५४ रोजीं सकाळीं रसशास्त्राचे अध्यापक वै. स. बा. दातारशास्त्री यांनीं परिषदेपुढें रसशास्त्रासंबंधीं कांहीं शंका मांडल्या. त्याला उत्तर देतांना लखनौचे आयुर्वेदाचार्य दत्तोपंत कुलकर्णी एम्. एस्. सी. म्हणाले:—(१) आयुर्वेदीय रसशास्त्र हें प्रत्यक्ष दृष्ट शास्त्र आहे. (२) याच्या वैशिष्टयाची कीर्ति दूरवर पसरलेली आहे. (३) आयुर्वेदाचे निंदकसुद्धां या विषयावर टीका करूं शकत नाहींत. (४) आयुर्वेदीय चिकित्सेच्या दृष्टीनें हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे.

१४ वर्षांच्या अनुभवाचा परिपाक

[illegible] आयुर्वेदाचार्य दत्तोपंत कुलकर्णी

एम्. एस्. सी. उत्तीर्ण झाल्यानंतर आयुर्वेदाकडे मी येण्याला आयुर्वेदाचें रसशास्त्रच कारणीभूत झालें आहे. सुप्रसिद्ध रसायनाचार्य प्रफुल्लचंद्र रॉय यांचें हिस्टरी ऑफ् हिंदू केमिस्ट्री या पुस्तकानें मला इकडे प्रवृत्त केलें. आयुर्वेदाचें अध्ययन करून मी स्वतः औषधीकरण केलें. १९३३ पासून १९४३ पर्यंत सतत १० वर्षें मी या संबंधीं विचार केला. आपण कोणतीं द्रव्यें वापरतो व तीं कां? त्याचें शोधन मारण असेंच कां करावयाचें असा मी विचार केला. १४ वर्षांच्या विचारानंतर आयुर्वेदीय रसशास्त्र हें प्राचीन दृष्टया व अर्वाचीन दृष्टयाहि पूर्णपणें शास्त्रीय आहे अशी [illegible] आहे. आयुर्वेदाला पूर्ण वैज्ञानिक दृष्टिकोण ला[illegible]ढ विश्वास आहे. आपण आयुर्वेदीय रसशास्त्र विद्यार्थ्यांना श्रद्धापूर्वक शिक[illegible]

079410

079410

तेलिया असाण्याचा एक सिद्धकल्प

असनादि अयस्कृति

आयुर्वेद पत्रिकेंत असाणा वनस्पतीसंबंधीं लेख प्रसिद्ध झाल्यापासून आयुर्वेद क्षेत्रांत असाणा-जलाचा वापर विशेष प्रमाणांत होऊं लागला आहे व यापासून झालेलें एखादें तयार औषध मिळावें अशी मागणी रुग्ण व वैद्य या दोहोंकडून होत आहे.

आयुर्वेदांत प्रमेहचिकित्सेंत मधुमेहासंबंधीं सविस्तर उपचाराची माहिती दिली आहे. प्रमेहचिकित्सेंत रोध्रासव व असनादि अयस्कृति हीं दोन सिद्धौषधें या विकारावर सांगितलीं आहेत. रोध्रासवापेक्षां असनादि अयस्कृति अधिक गुणकारी आहे असें तेथें म्हटलें आहे. म्हणून असनादि गणांतील व वत्सकादि गणांतील मिळतील तेवढीं, सर्व औषधें घेऊन ही अयस्कृति, तयार करण्यांत आली आहे.

असाण्याचें सिद्धौषध वापरूं इच्छिणाऱ्यांनीं ही अयस्कृति इतर आसवारिष्टाप्रमाणेंच सकाळीं व दोन्हीं जेवणानंतर अगर पूर्वीं वापरावी.

असन अयस्कृति

साधयेदसनादीनां पलानां विंशतिं पृथक् ॥
द्विवहेऽपां क्षिपेत्तत्र पादस्थे द्वे शते गुडात् ।
क्षौद्राढकार्धं पालिकं वत्सकादिं च कल्कितम् ॥
तत्क्षौद्रपिप्पलीचूर्णप्रदिग्धे घृतभाजने ।
स्थितं दृढं जतुसृते यवराशौ निधापयेत् ॥
खदिरांगारतप्तानि बहुशोऽत्र निमज्जयेत् ।
तनूनि तीक्ष्णलोहस्य पत्राण्यालोहसंक्षयात् ॥
अयस्कृतिः स्थिता पीता पूर्वस्मादधिका गुणैः ॥

असाणा, तिवस, भूर्जवृक्ष, अर्जुननार, घाणेरा-करंज, खैरनार, पांढराखैरनार, शिरीष, शिसव, मेढशिंगी, पांढराचंदन, रक्तचंदन, दारूहळद, पळस, अगरू, ताड, साग, शाल, सुपारी, धावडा, इंद्रजव, अजकर्ण, अश्वकर्ण प्रत्येकीं ४ शेर. पाणी ६४ द्रोण शेष २० द्रोण, गूळ ३ मण, मध १ मण.

आवाप द्रव्यें— कुडा, मोरवेल, भारंगमूळ, कुटकी, मिरे, निवडुंग, अतिविष, पिंपळमूळ, वेलची, पहाडमूळ, जिरे, टेंटू, गेळफळ, अजमोदा, शिरस, वखंड, शहाजिरे, हिंग, वावडिंग, रानतुळस, पिंपळी, चवक, चित्रक, सुंठ प्रत्येकीं १६ तोळे.

(१) काढ्यांचीं द्रव्यें ४ पातेल्यांत समभाग टाकून त्याच्यांत पाणी टाकून काढा तयार केला. (२) ४ द्रोण काढ्यांत लोहाचे तुकडे वारंवार तापवून विझविले. (३) सर्व काढ्यांत गूळ व मध टाकून मिश्रण पिंपांत भरलें. (४) आवाप द्रव्यें (व लोहाचे विझवून उरलेले तुकडे पिपांत सोडले.) हें औषध ८ महिन्यानन्तर तयार झालें.

हें औषध सेवासंघाच्या चिकित्साविभागांत वापरलें जात आहे.

संस्कृत अभ्यासाची व्यवस्था

शुद्ध आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमांत संस्कृत भाषेच्या अभ्यासाला प्राधान्य दिलें असल्यामुळें विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेच्या अभ्यासाच्या व परीक्षेच्या सोई करणें आवश्यक झालें आहे

नाशिक येथें आयुर्वेद सेवा संघातर्फे संस्कृतच्या अध्ययनाची व्यवस्था केली जात आहे. याचा लाभ घेऊं इच्छिणाऱ्यांनीं पत्रव्यवहार करावा.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या परीक्षा, स्वाध्याय-मंडळ पार्डी, तर्फे होणाऱ्या परीक्षा यांचीं केंद्रें नाशिक येथें आहेत. संस्कृतच्या परीक्षांना बसूं इच्छिणाऱ्या व्यक्तींनीं या सोईचा उपयोग करावा.

अमळनेर
येथें आयुर्वेद सेवा संघाचीं नवीन
सर्व प्रकारचीं औषधें मिळण्याचें ठिकाण—
श्रीकृष्ण वैद्य अँड ब्रदर्स
कुंभार टेंक, अमळनेर

पंचमहाभूतांच्या निर्मितीसंबंधींचा

.... एक आधुनिक दृष्टिकोन ....

लेखक- वैद्य श्री. द. जळूकर
आयुर्वेद सेवा संघ, नासिक

आकाशात् वायुः । वायोः अग्नि । इ. क्रमानें पंच महाभूतांची निर्मिति झालेली आहे, असें मानत असतांना त्यांत असलेलें उत्क्रांति तत्व आपणांस दिसून येतें, व त्यानुसार त्यांत गुणांची वृद्धि झालेलीहि आपणांस आढळते. "शब्दगुणकं आकाशम्। रूपरहितः स्पर्शवान् वायुः"। इ०. "एकोत्तरपरिवृध्द्या शब्दादय उत्पद्यंते"।

आकाशाच्या एका अणूंत पांचहि महाभूतांचें अस्तित्व असतें आणि म्हणून त्यांपासून तीं पुढें व्यक्त झालीं हेंहि म्हणणें योग्य आहे; व त्याचें सत्कार्यवादानुसार स्पष्टीकरण होतें. आजच्या शास्त्रालाहि त्याचा विरोध येत नाहीं असें दिसतें.

एवं व्योमानिलानलजलोर्वीणां परस्परप्रवेशकत्वा—नुप्रवेशकत्वे तावात्थितानां अन्योन्यानुप्रवेशकत्वमुक्तम्। (सर्व भूतें एकमेकांत अणुरूपानें राहतात.)

आकाशात् वायुः......अद्भ्यः पृथिवी इ० परंपरा ही आकाशस्थ विशिष्ट अणूंचे रासायनिक संयोगापासून बनत असावी असाहि अन्दाज त्या क्रियेचे प्रत्ययावरून बांधतां येतो. विशेषतः पूर्वाचार्यांनीं सृष्टींतील घडामोडींचें बारकाईनें (सूक्ष्म) निरीक्षण करून तें ठरविलें असावें कीं काय असेंहि वाटतें.

उष्णता ही प्रेरक शक्ति

रासायनिक संयोग होतांना उष्णतेची निर्मिति होत असते अथवा त्यांतून निर्माण झालेली ती उष्णता बाहेर फेंकली जाते; व त्या उष्णताशक्तिचा प्रत्यय शास्त्रज्ञांना येतो. अशा दृष्टिकोनांतून पाहतां असें वाटतें कीं, विभु व अतिदूरवर पसरलेल्या आकाशतत्वांत जेव्हां इतर महाभूतांचे अणूंचा संयोग झाला तेव्हां निर्माण झालेली उष्णता ही पुढील संयोगाची प्रेरणा बनली असावी, व "वायोः अग्निः" या संयोगास तिनें मदत केली असावी, अथवा अतिदूरतेमुळें तिचें प्रत्यंतर होऊं शकलें नसावें.

वायु हा अनेक प्रकारच्या अणूंचा बनलेला आहे. त्यापैकीं विशिष्ट अणु (हैड्रोजन व ऑक्सिजन) २:१ प्रमाणांत संयुक्त होऊन पाण्याची निर्मिति झाली, व त्या संयोगांतून निर्माण झालेली उष्णता, विद्युत् प्रकाशादि तेजःस्वरूप धारण करून व्यक्त झाली. तेव्हां या ठिकाणीं थोडा फरक निर्माण झाला कीं, वायूचे विशिष्ट संयोगानें पाणी बनलें तर 'वायोः आपः' असें वचन उद्धृत करावयास हवें व तें योग्यहि होईल, पण प्रकाशाचा (तेजाचा) वेग हा पाण्याचे वेगापेक्षां जास्त असल्यानें प्रथमतः तेजाचें दर्शन झालें व त्यानंतर जलाचें दर्शन झालें, आणि म्हणून 'वायोः अग्निः' व 'अग्नेः आपः' असें वचन आचार्यांनीं लिहिलें असावें.

पावसामुळें पार्थिव घटकांची वाढ

यानंतर 'अद्भ्यः पृथिवी' या वचनांत भूपृष्ठावर पाऊस पडल्यानंतर बीजांची वाढ, वृक्षांची वाढ इ. होऊन समृद्धता वाढते व अधिकाधिक पार्थिव घटकांची वाढ होते हें पाहून व पाऊस पडल्यानंतर पृथ्वीचे पोटांतून येणारी उष्णता व विशिष्ट गंध इत्यादि पाहून 'अद्भ्यः पृथिवी' या वचनाचा खुलासा होतो.

सृष्टींतील घडामोडीचें बारकाईनें निरीक्षण

एकूण सृष्टींतील क्षीज आणि भर इत्यादि घडामोडींचें बारकाईनें निरीक्षण करून व त्यांतलेल्यांत जास्त घडामोडीचा असा पावसाळा व सारा सृष्टिक्रम ह्या गोष्टींचें पूर्वाचार्यांनीं सूक्ष्मावलोकन करून हे निर्णय घेतले असावेत असें वाटतें.

या लेखांत मांडलेले विचार स्वतंत्र आहेत. ज्ञाते व सूज्ञ लोक यांच्याकडून त्याबावत मार्गदर्शनपर अथवा कांहीं स्पष्टीकरणपर सूचना आल्यास मला आनंद वाटेल. इति शम् ।

आयुर्वेद सेवा संघ, चिकित्सा विभाग

कर्णबाधिर्य, कर्णशूल, पूयकर्ण यांची चिकित्सा

(लेखकः— वैद्य श्री. कृ. करमरकर आयुर्वेदाचार्य)

या विकाराचे २ भाग पडतात (१) कर्णबाधिर्य व कर्णशूल (२) पयकर्ण. यापैकीं कर्णबाधिर्य व कर्णशूल ह्यांत वातकफात्मक दुष्टि असते. सबब क्षारतैल वा नारायणतैल यांनीं कर्णपूरण करण्यांत येतें व शारी वातकफदोषवृद्धि नाहींशी [illegible] 'अगस्तिप्राश' वयोमानाप्रमाणें १ तोळा स्वप्नकाळीं (रात्रीं निजतांना) देण्यांत येतो. जरूरीप्रमाणें महायोगराजगुग्गुळहि योग्य मात्रेंत पोटांतून स्वप्नेंकालीं मध व तूप यांच्या विषमप्रमाणमात्रेंतून देण्यांत येतो.

यानें कर्णशूल तावडतोब थांबतो. कर्णशूल गुंथजन्य असल्यास तेलानें मळ(गुंथ)सुटून शूल थांबतो.

वातप्रकृति व्यक्ति व पोहणें

कर्णबाधिर्य बरें झाल्यास ८ दिवसांत बरें होतें, अन्यथा बरेच दिवस चिकित्सा घ्यावी लागते. टेंटूसिद्ध तैल कर्णबाधिर्यहर म्हणून उपयोगी पडतें. क्वचित् लशुनसिद्ध तैल उपयोगी पडतें. वातप्रकृति व्यक्ति व पोहणें असा संगम घडला असतां बहुधा हा विकार होतो.

पूतिकर्णाचे दोष

'पूति-कर्ण' हा विकार प्राधान्यानें कफ-पित्तात्मक असतो. कफप्रधान असल्यास श्वेत व चिकट पूं असतो व कान सुजतो. पित्तप्रधान असल्यास पातळ व निळसर स्राव असतो. जोडीस ज्वर असतो. क्वचित् रक्तहि स्रवतें. व स्राव कानाचे अन्य भागास लागून फोड येतात.

अशा रोग्यांमध्यें कफपित्तवर्धक कारणें नित्य घडणारीं असून जत्रूर्ध्वभागांत कफसंचयाची प्रवृत्ति असते. (गिलायुवृद्धि वा पीनस असतें.)

पूतिकर्णाचीं कफपित्तवर्धक कारणें

म्हशीचें दूध सकाळीं पिणें, अति गोड खाणें, चहा वारंवार पिणें, दिवसां झोपणें, रात्रीं दही इ. खाणें, अशासारखीं कारणें घडत राहिल्यास कित्येक वर्षें हा विकार थांबत नाहीं.

कफप्रधान कर्णस्राव

कफप्रधान कर्णस्राव, क्षारतैल + मधु वा शोधनतैल + मधु, वा केवळ मधु यांचे कर्णपूरणानें व पोटांतून सितोपलादि चूर्ण दिल्यानें बरा होतो. १ महिन्यापेक्षां कमी वेळ सहसा लागत नाहीं.

पित्तप्रधान कर्णस्राव, चंदनबलालाक्षादि तैल कानांत टाकणें, व पोटांत प्रवाळभस्म (चंद्रपुटी) व गुळवेलसत्व वा गोदन्तिभस्म या उपचारांनीं बरा होतो.

वातज पूतिकर्ण

क्वचित् पूतिकर्ण हा वातजहि असतो. त्यावेळीं फक्त पाण्यासारखा स्राव असतो, व ठणका फार असतो. नारायणतेलानें व स्वेदनानें बरें वाटतें. ७।८ दिवस लागतात. क्वचित् निंबूरस १ थेंब टाकल्यानें ५।६ दिवसांत बरें होतें.

कान हें वातदोषाचें स्थान

समुद्रफेसचूर्ण टाकून निंबूरस टाकल्यानें एक आठवड्यांत कोणताहि स्राव बरा होतो, असाहि अनुभव आहे. कान (श्रोत्र) हें वाताचें स्थान आहे. त्यामुळें तेथील उपचार करतांना वायूकडे लक्ष पुरविणें आवश्यक असतें. अम्लरस (निंबूरस) हा त्यामुळें उपयोगी पडतो, अशी कल्पना आहे. समुद्रफेसानें चिकित्सा, ही व्याधिप्रत्यनीक चिकित्सा आहे.

कान कोणाचे फुटतात ?

पूतिकर्ण सामान्यपणें कफप्रकृतीमध्यें, मध्यम प्रमाणांत पित्तप्रकृतीमध्यें व क्वचितच वातप्रकृति लोकांत असा आढळतो.

सुवर्णराजवंगेश्वर रसाचाहि उत्तम उपयोग जुनाट पूतिकर्णांत झालेला आहे.

शारदीय ज्वरदाहावर

दूध-तुपाचा बस्ति

लेखकः-- वैद्य शं. य. मंगरूळकर
आयुर्वेदतीर्थ, नाशिक

रोगी-पुरुष, सार्वजनिक कार्यकर्ता, वय ३८ वर्षे.

ऑक्टोबर महिना प्रकृतीस त्रासदाय

१९५२ मध्यें दिल्लीस संतत ज्वराचा आजार. २ महिने सारखा ज्वर. पुढें नाशिक येथें ऑगस्टचे सुमारास आगमन. (यापूर्वी आजारी नाहीं.) तेव्हांपासून ऑक्टोबर महिना प्रकृतीस त्रासदायक जातो.

अलीकडील इतिहास

सप्टेंबरमध्यें प्रकृति उत्तम, वजन वाढलेलें, होतें व सर्व दृष्टीनें उत्साहित व आनंदवर्धक अशी परिस्थिति होती. (श्वशुरगृहीं १५ दिवस वास घडला होता, मेजवान्या, विश्रांति इ. मुळें प्रकृति आनंदांत होती.)

ऑक्टोबर ता. १ पासून २० पर्यंत यापैकीं पहिल्या दोन आठवड्यांत दररोज सकाळपासून सायंकाळपर्यंत पेठ तालुक्यांतील डोंगराळ भागांत (उन्हांत) १० ते १२ मैल दररोज प्रवास घडला. तिसऱ्या १० आठवड्यांतहि प्रवास झाला पण बेताचा. मात्र अनियमित वागणूक होती.

प्रथम निसर्गोपचार करण्यांत आले

ता. २२-१०-५४ रोजीं ज्वरास सुरुवात. २२ ते २६-१०-५४ पर्यंत निसर्गोपचार करण्यांत आले. प्रामुख्यानें पाण्याचा एनिमा व स्पांजिंग इ. देण्यांत येत असे. त्यानंतर २६ ते २९-१०-५४ पर्यंत वैद्यांच्या पोटांत घेण्याच्या औषधी उपाययोजना चालूं होत्या; तथापि आजाराचें प्रमाण वाढतच होतें.

ता. ३०-१०-५४ रोजीं दुपारीं ४ वाजतां खालील लक्षणें प्रामुख्यानें दिसून आलीं:-

या विकाराचीं लक्षणें

ज्वर १०३.५° पण दाह अतिशय; दोन्ही पायांच्या गुडघ्यापासून खालीं सूज. तोंडावर, डावा डोळा व त्या जवळच्या भागावर सूज. लघ्वी साफ न होण्याबद्दलची रोग्याची तक्रार असे. मधून रोगी शुद्धींत नसे. रोग्यास त्रास काय म्हणून विचारल्यास गुडघ्याखालील पाय अतिशय दुखतात व सर्व शरीर चितेवर ठेविलें आहे व शरिरांतील एक एक हाड जळत आहे, " आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां " याप्रमाणें रोग्याचे उद्गार असत. व या परिस्थितीमुळें कांहीं दिवस, जवळजवळ १ आठवडा, रोग्यास नीट शुद्धि नसे.

पित्तभूयिष्ठ संतत-ज्वर हें निदान

पित्तप्रधान [भूयिष्ठ]-संततज्वर - असें निदान ठरवून चिकित्सेस प्रारंभ केला. [दूष्य-रक्त व मूत्र]

२ गुं. मौक्तिकभस्म, ६ गुं. प्रवाळभस्म, ४ गुं. संशमनी यांच्या मिश्रणाचे ६ भाग करून दर तीन तासानें लोणी अगर तूप अगर दूध-खडिसाखरेंतून द्यावयास सुरुवात केली. त्याचप्रमाणें युरिया सल्फाझाअीड ५ c. c. ता. ३०-१०-५४ नंतर २ दिवसानीं अशीं दोन इंजेक्शनें दिलीं. तीन दिवसांत पायाची सूज कमी झाली. तोंडावरची सूजहि ओसरली. लघ्वीहि थोडी थोडी साफ व्हावयास लागली.

दुधाचा बस्ति दिला

तथापि अंगाचा दाह कमी नाहीं. हें कळल्यानन्तर चौथ्या दिवशीं दुधाचा बस्ति(एनिमा)[१ कप दूध + ३ कप पाणी] दिला. शौचास साफ झालें. दाह थोडा कमी आहे असें रोगी सांगूं लागला. ५ वें दिवशीं परत दुधाचा बस्ति दिला. दाह कमी व्हावयास सुरुवात झाली, पण रोगी शौचास साफ झाल्याबरोबर अतिशय थकून जाई. एनिमा घेण्याचा उत्साह तिसरे दिवशीं रोग्यास राहिला नाहीं, सबब ॥· औंस तुपाचा बस्ति दिला. त्यानें दुसरेच दिवशीं शौचानंतर येणारा थकवा गेला.

याप्रमाणें ३ दिवस तुपाचा बस्ति दिला. शिवाय वरीलप्रमाणें पोटांत औषधोपचार चालूं होते. ज्वर

ता.८-११-५४ला उतरला. याप्रमाणें ३।४ दिवस टेंपरेचर कमी राहिलें. मात्र रोगी अगदीं अस्थिपंजर झाला होता.

मध्यंतरींच ता. १२ ला घरांत लहान दोन मुलें आजारी. रात्रभर मुलें रडण्यामुळें झोंप नाहीं. परत ता. १३-११-५४ ला ज्वर. पण तो ज्वर १।२ दिवसांतच थांबला. नंतर ता. १५।११।५४ पासून सु. मा. वसन्त + प्रवाळ मिश्रण, सकाळीं दुपारीं सायंकाळीं देण्यास सुरुवात केली व तैलाभ्यंग सुरू केला. यामुळें ८।१० दिवसांतच रोगी घरांत स्वतःचीं निसर्गकर्में स्वतः उठून बसून दुसऱ्याच्या मदतीशिवाय करूं लागला. यानंतर रोग्याचे मनगटापासून पुढील हात मुंग्या येऊन दुखण्यास सुरुवात झाली. परन्तु त्यांस थोडा वेळ स्नेहन-स्वेदन दिल्यानंतर बरें वाटे.

ता. २-१२-५४ चे सुमारास रोगी कलेक्टर कचेरींत अर्धा तास सभेकरितां जाऊन आला. हल्लीं रोगी प्रामुख्यानें घरांत चांगला हिंडू फिरूं लागला आहे. व मधून मधून बाहेर कामासाठीं जात आहे.

दूध-तुपानें दाहशमन होते

वाग्भटांत ज्वर चिकित्सेंत वातपित्तोत्तर जीर्णज्वरावर तूप द्यावें असें सांगितलें आहे (सर्पिर्दद्यात् कफे मंदे वातपित्तोत्तरे ज्वरे। श्लोक ८१) तसेच ज्वरक्षिणं माणसाला दोषशोधनासाठीं वमन विरेचन न देतां दुधाचा उपयोग व बस्तीचा उपयोग करावयास सुचविलें आहे. ' प्लुष्टं वनमिवाग्निना ' दाहतृट्वतः अशा ज्वरी लोकासाठीं दूध हें औषध आहे. (श्लोक १०४ ते १०६) ज्वरांत स्नेहबस्तीचें विधान पुढें आहेच. ते सर्व लक्षांत घेऊन वरील प्रयोग केले व ते उपयुक्त ठरले.

तुपानें दोषस्तंभन होतें

तूप हें जोरदार दोषस्तंभन आहे याचा अनुभव या घृतबस्तीचे वेळीं आला. जुलाब जास्त होत असता अगर घाम जास्त येत असता तूप प्यावयास देतात. त्याचप्रमाणें घृतबस्तीनेंहि जुलाब बंद होतात व घाम येणें थांबतें. म्हणूनच ' न घृतं बहुदोषाय देयं यन्न विरेचनम्। ' या सूत्राची सत्यता पटते.

रोगावर जादूप्रमाणें तत्काल परिणाम करणारीं

'मार्तण्ड'चीं आयुर्वेदिक इंजेक्शनें

मार्तण्ड कंपनीच्या पूर्ण वैज्ञानिक साधनसंपन्न व आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज अशा प्रयोगशाळेंत, विद्वान् आयुर्वेदज्ञ व पाश्चात्य रसायनशास्त्रज्ञांच्या संपूर्ण देखरेखीखालीं तयार केलेलीं आयुर्वेदिक इंजक्शनें आपला प्रभाव तत्काल व कायम स्वरूपांत करतात. दीर्घकाळ राहिल्यासहि तीं कधीं बिघडत नाहींत. त्यांच्या तात्काळ गुणदायित्वाबद्दल हमी देण्यांत येते.

सूचिपत्र व संशोधनाचें आकर्षक वाङ्मय मोफत मिळेल. आजच मागवा.

मार्तण्ड फार्मास्युटिकल्स्, बडौत S. S. Rly. यू. पी.

(रिसर्च इन्स्टिटयूट ऑफ् इंडियन मेडिसिन्स)

आयुर्वेद सेवा संघांतील

स्वाध्यायवर्गाचा प्रथम वार्षिक अहवाल

सुरुवात —दि. १४ नोव्हेंबर १९५३ या पू. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या वाढदिवशीं.

उद्देश—(१) आयुर्वेदीय संहिता-ग्रंथांचें नित्य वाचन व्हावें.

(२) ग्रंथोक्त चिकित्सा विद्यार्थ्यांना शिकवावयाची असल्यानें ती चिकित्सा व्यवहारांत आणण्यास करावा, योग्य योग कोणते ते पाहून त्यांचा वापर करणें. व निदानाच्या अवस्था लक्षांत याव्यात.

(३) शुद्ध आयुर्वेदाचें अध्यापन करण्यासाठीं सर्व अध्यापकांचे विचार एकसूत्री व्हावेत, व आपलीं मत पक्कीं व्हावींत.

(४) सर्व सेवकांनीं एक तास तरी एकत्र येऊन एक कार्य करावें. संघवृत्ति वाढावी.

वेळ:— आयुर्वेद सेवाकार्याची सुरुवात अध्ययनकार्यानें करावी, या दृष्टीनं मंगल प्रभातचीं ५॥ ते ६॥ हींच वेळ योग्य वाटली.

पद्धति-प्रथम पाव तास वाचन-आवृत्ति बाकीच्या पाऊण तासांत सटीक वाचन.

आतांपर्यंत झालेला अभ्यास—(१) अष्टांगहृदय संपूर्ण एक आवृत्ति.

(२) सुश्रुतसंहिता ४० अध्याय सूत्रस्थान संपूर्ण.

(३) अष्टांगहृदय सूत्रस्थानाचे १९ ते ३० अध्याय सटीक वाचन.

१ वर्षानंतर प्राप्त झालेलें फळ

सतत मुंगीच्या पावलाप्रमाणें पाऊल टाकीत रोज १ तास सामुदायिक रीत्या केलेल्या या कार्यामुळें

(१) ब्राह्मे मुहुर्ते उत्तिष्ठेत् या आयुर्वेदाच्या उपदेशानुसार वर्तन घडलें. आयुर्वेदाचा आचार सुरूं झाला.

(२) आयुर्वेदीय चिकित्सेचें व स्वास्थ्यसंरक्षणाचें एक अंग असलेला नस्यविधि सुरूं झाला.

(३) वेळोवेळीं कर्णपूरण घडलें, त्यामुळें कर्णकण्डु कर्णशूल, बाधिर्य इ० चें प्रमाण कमी झालें.

(४) अंजनविधि मधून मधून आचरला गेला.

(५) मस्तु, मांसरस, गोमूत्र यांचा वापर करण्याची प्रवृत्ति वाढली.

(६) रक्तस्रुति, जलौका, शृंग या साधनांनीं दुष्ट रक्त काढून टाकून भावी शस्त्रकर्मापासून व दंतपुप्पुट उपकुश रोगांपासून स्वतःचें व जनतेचें संरक्षण करतां येईल असा आत्मविश्वास निर्माण झाला.

(७) पंचकर्मचिकित्सामंदिराची व आरोग्य-शालेची कल्पना व योजना ठरवून ठेवण्यांत आली.

(८) अश्विनीप्राश, नारायणचूर्ण, दीपकवटी, औदुंबरसार, कदलीक्षार अशा उपयुक्त औषधांचा वापर करण्याकडे प्रवृत्ति सुरूं झाली.

(९) त्रिविध दोषांचे तीन काढे नित्य तयार होऊं लागले. दैनिक चिकित्सेंत त्यांचा वापर करून स्वस्थातुरांच्या दोषांचें शोधन व शमन सुरूं झालें.

(१०) दैनिक व्रणचिकित्सेंत बँडेज, कॉटन, लिंट इ. शब्द किंवा इतर औषधें न वापरतां व्रणपट्ट, कार्पास, कवलिका, सीवनकर्म, इ. शुद्ध आयुर्वेदीय परिभाषा व शोधनतैल, मधु, रोपणतैल, निंबजल, यष्टिमधुजल इ. आयुर्वेदिक औषधें नित्य वापरलीं जाऊं लागलीं.

आणखीहि अनेकविधि फायदे, संस्थेच्या कामांतील गति, व्यवस्था, इ० वर्धनाच्या दृष्टीनें झाले.

एक सुंदर औचित्य

हा वार्षिक अहवाल, आयुर्वेदक्षेत्रांतील जवाहरलाल पं. शिवशर्माजी यांचेपुढें सादर करण्यांत एक सुंदर औचित्य साधलें आहे. आमच्या विनंतीला मान देऊन पं. शिवशर्माजी येथें उपस्थित झाले याबद्दल स्वाध्याय मंडळातर्फे त्यांचे आभार मानतो.

—आयुर्वेदाचार्य श्री. कृ. करमरकर

श्लेष्मांतकासव

लेखकः—श्रीकृष्ण शांताराम वैद्य, अंमळनेर

आमचे येथें परंपरागत वैद्यकीय व्यवसाय असलेमुळें आमचे वडील ती. शांताराम गोविंद वैद्य व आमचे चुलते ती॥ स्व. गदाधर गोविंद वैद्य हे नेहमीं पुढें देत असलेल्या आसवाचा नित्य उपयोग करीत असतात. व त्याचा आश्चर्यकारक गुण दिसतो आहे. म्हणून "आयुर्वेद सेवा संघा" नेंहि हें आसव तयार करून त्याचा उपयोग करावा व अनुभव प्रसिद्ध करावेत अशी विनंति आहे.

श्लेष्मांतकासवाचा पाठ

भोकरें (ओलीं असल्यास अधिक चांगलें)	११ शेर
भुईरिंगणीमूळ	१ शेर
मनुका (लाल) (बी काढून)	१ शेर
बाहव्याच्या शेंगेतला मगज	१ शेर

वरील रकमा ठेचून ४८ शेर पाण्यांत उकळाव्या. १२ शेर काढा शिल्लक ठेवावा. तो गाळून घ्यावा. नंतर त्यांत गूळ ६ शेर बारीक करून टाकावा. नंतर त्यांत मंजिष्ठ पावशेर (२० तोळे), धायटीचीं फुलें पावशेर (२० तोळे) बारीक वस्त्रगाळ करून टाकावीं व पंधरा दिवस तोंड बंद करून ठेवून नंतर त्याचा उपयोग करावा.

देण्याचें प्रमाणः-१-१ तोळा दुप्पट पाण्याबरोबर दिवसांतून तीन वेळ अगर जरुरीप्रमाणें.

उपयोगः-क्षय, क्षयज कास, यकृत्वृद्धि, श्लेष्मकसन्निपात (न्युमोनिया यावर) हें आसव गुणकारी आहे.

यांतील द्रव्यांचे गुणधर्म

भोकरः—थंड, तुरट, तिखट, मधुर, पाचक, कफस्रावी, कृमी व शूलनाशक आहे.

भुईरिंगणीमूळः— तिखट, उष्ण, दीपक, श्वास, खोकला, कफनाशक, ज्वरहारक आहे.

मनुकाः—हृद्य पौष्टिक, वातानुलोमी, स्निग्ध, दमा, कफ पित्त ज्वर नाशक आहे.

बाहूची शेंगः—मधुर, बलकर, संस्रन, रेचक, अरुचिहर, कोष्ठशुद्धिकारक, कफपित्त नाशक अशी आहे.

वाचकांचा पत्रव्यवहार

मुदतीच्या तापावर तक्र-प्रयोग?

"आमच्या गांवीं एका अ‍ॅलोपॅथिक चिकित्सकानें मुदतीच्या तापाच्या रोग्यावर तक्रप्रयोग केला. अलोपॅथींत मुदतीच्या तापावर तक्राहार सांगितला आहे का? असल्यास कोठें? तें प्रसिद्ध करावें.

आयुर्वेदांत संतत ज्वरावर तक्र देण्यास सांगितलेलें नाहीं. डॉक्टरांचा वरील प्रयोग पाहून मी चकित झालो.

रोगी पंचत्व पावला

उपरि उक्त रोगी पंचत्वाला गेला हें सांगणें नकोच. या तक्रप्रयोगाबाबत वैद्य--डॉक्टरांनीं विचार प्रदर्शित करावेत अशी विनंति आहे.

— प्र. ह. शर्मा

गुरांचे रोगांची माहिती

अनेक वेळां खेड्यांत मनुष्याच्या रोगाप्रमाणेंच गुरांच्या रोगावर औषधें विचारण्यासाठीं लोक येतात. सबब खेड्यांतील चिकित्सकास गुरांच्या रोगावरील औषधें व इंजेक्शनें माहिती असली पाहिजेत तरी तत्संबंधी कोणी तज्ञ पत्रिकेंतून लेख लिहील काय? अशा विषयावर उपयुक्त पुस्तक असल्यास माहिती प्रसिद्ध करावी. —बी. जे. महाजन

'आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार'

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदीय औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

मध्यप्रदेश विधान सभेंतील वैद्यकीय प्रश्नोत्तरें

श्री. लक्ष्मीशंकर भट्ट यांनीं विचारलेल्या प्रश्नांस स्वास्थ्यमंत्री माननीय कन्नमवारजी यांनीं दिलेलीं उत्तरें:—

(क) आर्थिक वर्ष १९५३–५४ मध्यें मध्यप्रदेश सरकारनें प्रांतांत आयुर्वेदिक औषधालयें उघडण्याचा निर्णय घेतला होता ही गोष्ट खरी आहे.

(ख) एकंदर ४० दवाखाने उघडणें शक्य झालें. त्यांची सूची सभेच्या टेबलावर पाहाण्यास ठेविली आहे.

(ग) प्रथम १२ व नंतर ८ दवाखाने उघडले गेले ही माहिती खरी नाहीं.

(घ) ४० दवाखान्यांपैकीं २६ दवाखाने ता. ३१ मार्च १९५४ च्या पूर्वी व त्यानंतर २ असे २८ दवाखाने उघडले गेले. १२ दवाखान्यांबाबत अद्याप माहिती हातीं आली नाहीं.

(ङ) दिनांक १५ ऑगस्ट १९५४ पर्यंत १९५३–५४ सालांत १३६ व १९५४–५५ सालांत १२इतक्या दवाखान्यावरील वैद्यांना मासिक वेतन६० रुपये व सर्वसाधारण खर्चाकरितां ३०० रुपये अनुदान (ग्रँट) देण्यांत आलें.

(च) सन १९५२मध्यें सरकारी आर्थिक मदत मिळालेल्या दवाखान्यांची एकूण संख्या १९१ होती.

(छ) पंचवार्षिक योजनेप्रमाणें ६० दवाखाने उघडण्याचा निर्णय घेतला होता. १९५३-५४ सालांत १२ दवाखाने उघडावयाचे होते. त्याशिवाय सन १९५२–५३ मध्यें १०० दवाखाने उघडण्याचा निर्णय घेतला होता, परन्तु फक्त ५९ दवाखानेच उघडले गेले. आणि म्हणून १९५३-५४ सालांत १२+४१=५३ दवाखाने उघडावयास पाहिजे होते. त्यापैकीं ४० दवाखाने उघडले गेले, व १३ उघडावयाचे शिल्लक राहिले. सन १९५४–५५ मध्यें १२+१३ असे एकूण पंचवीस दवाखाने उघडले जातील.

श्री. कृष्णराव नाईक यांच्या प्रश्नांचीं उत्तरें:—

(क) व (ख) बैहर तहसील (ज्याची लोकसंख्या १। लाख आहे) मध्यें ॲलोपथिक दवाखाना फक्त एकच आहे व तो बैहर ह्या तहसीलाच्या गांवीं आहे. ह्या तहसीलामध्यें आणखी दवाखाने उघडण्याचा सरकारचा विचार आहे.

(ग) सध्या गरही या गांवीं दवाखाना उघडण्यांत येईल.

श्री. श्यामसुंदर मुशरान यांच्या प्रश्नांचीं उत्तरें–

(क) नरसिंहपुर तहसीलांतील बरहटा या गांवच्या ६ मैलाच्या परिसरांत एकहि दवाखाना नाहीं हें खरें आहे.

(ख) सरकार या भागांत ॲलोपाथिक दवाखाना उघडण्याच्या सूचनेचा आस्थापूर्वक विचार करील.

श्री. नारायणसिंह जयवार यांच्या प्रश्नांचीं उत्तरें:--

[क] तारीख १६ जुलै १९५४ च्या मध्यप्रदेश सरकारच्या परिपत्रकांत ज्या ३४ टिंक्चर्संवर प्रतिबंध घालण्यांत आला त्या टिंक्चर्समध्यें अल्कोहोलाचें प्रमाण शेंकडा ४० टक्याहून अधिक आहे.

[ख] बाजारांत मिळणाऱ्या सर्वच टिंक्चर्संवर निर्बंध घालण्यांत आले नाहींत. तर जीं टिंक्चर्स नशा येण्याकरितां वापरलीं जात असत अशाच टिंक्चर्संवर निर्बंध घालण्यांत आले आहेत.

[ग] एकंदर टिंक्चर्सची संख्या सांगणें कठीण आहे, कारण वेळोवेळीं नवनवीन नांवाचीं टिंक्चर्स बाजारांत विक्रीला येतात. ज्या टिंक्चर्संचा दुरुपयोग केला जातो असें दिसून आलें त्याच टिंक्चर्संवर प्रतिबंध घालण्यांत आले.

[घ,ङ] ज्या टिंक्चर्संचा दुरुपयोग केला जातो अशाच टिंक्चर्संवर कायद्यानें प्रतिबंध घालण्यांत आले आहेत, मग त्या टिंक्चरमध्यें अल्कोहोलचें प्रमाण कितीहि असो, कमी असो अगर जास्त असो.

(च) हा टिंक्चरवरील निबंधाचा कायदा तारीख १६ जुलै १९५४ पासून ह्या राज्यांत अमलांत आला.

(छ) सोहागपुर तहसीलामध्येंहि हा कायदा ता. १६ जुलै १९५४ पासूनच अमलांत आला आहे.

(ज) सरकारी कायद्याच्या आदेशानुसार टिंक्चरची विक्री केली जाते. सर्व टिंक्चर्सवर निर्बंध नाहींत व कायद्यानें सर्व टिंक्चर्सवर निर्बंध घालतांहि येत नाहींत.

श्री. पांडुरंग पुनारकर यांच्या प्रश्नांचीं उत्तरें—

(क) तळोधी-बाळापुर येथें आयुर्वेदिक दवाखान्याची स्थापना दिनांक ११ मार्च १९५४ ला करण्यांत आली.

(ख) या दवाखान्याला फर्निचर व मदतनीस नोकराची जरूर आहे ही गोष्ट खरी आहे.

(ग) नुकतेंच जनपद-सभेनें १९५४-५५ चें आयव्यय-पत्रक संमत केलें आहे. त्यांत तरतूद केलेल्या रकमेंतून सदरहू दवाखान्याची गरज भागविण्यांत येईल.

श्री. दौलत लक्ष्मण खडसे यांनीं विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें:--

[क] राजस्व- उपमंत्री यांनीं सवना येथें दवाखाना उघडण्याकरितां अनुदान दिलें नाहीं. परंतु वनवाली येथील दवाखान्याच्या दुरुस्तीकरितां १५०० रु. अनुदान [ग्रँट] दिलें आहे.

[ख] सवना येथील लोकांनीं दवाखान्याची इमारत व वैद्यासाठीं घर बांधून देण्याचें कबूल केलें होतें, त्याचप्रमाणें वनवाली येथील लोकांनीं इमारतीची सोय केली होती.

[ग] वरील गांवांना लागणारीं औषधें व नोकरांचा पगार यांना लागणारा खर्च जनपद-सभा पुरवील असें तिनें सांगितलें होतें.

[घ] सवना येथील दवाखाना दिनांक २० जुलै १९५४ पासून उघडण्यांत आला आहे. वनवाली येथील इमारत पावसाळा संपल्यावर दुरुस्त करण्यांत येईल व त्यानंतरच दवाखाना सुरूं होईल. कारण हल्लींची इमारत गवती छपराची आहे.

श्री. लक्ष्मण कृष्णाजी वासेकर यांच्या प्रश्नांचीं उत्तरें—

(क) टिंक्चर पिण्यामुळें मध्यप्रदेशांत सन १९५३-५४ मध्यें तीन व्यक्ति व सन १९५४-५५ मध्यें आतांपर्यंत पांच व्यक्ति मरण पावल्या.

(ख) नशा आणण्याच्या हेतूनें टिंक्चर पिण्यावर सरकारनें बंदी घातलेली आहे. या संबंधीं उपबंध मध्यप्रदेश प्रोहिबिशन अधिनियम १९५३ च्या कलम २८ (आय्) मध्यें अंतर्विष्ट आहेत. जी व्यक्ती नशा आणण्याकरितां टिंक्चरचा पिण्याकडे उपयोग करील ती व्यक्ति शिक्षेला पात्र होईल.

एकंदर ५८ टिंक्चर्स उक्त कायद्याच्या कलम २८ (एच्) अन्वयें निर्बंधित म्हणून घोषित केलेले आहेत. त्यांची विक्री फक्त डॉक्टरच्या सर्टिफिकेटवर होऊं शकते. या निर्बंधानें टिंक्चर पिणें आटोक्यांत आणिलें आहे.

धर्मार्थ दंतयज्ञ, मिरज सांगली,

दि. २६।१२।५४ पासून २।१।५५ पर्यंत मिरज व सांगली येथें धर्मार्थ दंतयज्ञ चालू आहे. मिरज विद्यालयाचे प्रमुख श्री. फाळके हे मनःपूर्वक साहाय्य करीत आहेत. उद्घाटन डॉ. अरबटी सर्जन यांनीं केलें.

वैद्यासाठीं उपयुक्त ग्रंथ
ॲलोपॅथिक चिकित्सासंग्रह
सुमारें ७० रोगांवरील चिकित्सासूत्रें व ३४० प्रिस्क्रिप्शनें व इंजेक्शनें यांनीं युक्त. मराठींतील अभिनव ग्रंथ, आपल्या ॲलोपॅथिक ज्ञानांत वाढ होण्यासाठीं आजच मागवा. किं. ४॥ रु. ट. ख. निराळा.
१ वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक
२ डॉ. मोकाशी, ठाणें

डागपद्धतीचे कांहीं प्रयोग

(लेखकः— श्री. शिवराम मोरेश्वर घैसास, बोरीवली)

079510

डागपद्धतीवरील विवेचनात्मक असा माझा लेख, आयुर्वेद पत्रिकेमधून नुकताच प्रसिद्ध झाला आहे. आतां, डाग देण्याच्या पद्धतीवरील मी पाहिलेल्या कांहीं प्रात्यक्षिकांची माहिती, आज येथें देत आहे.:—

डाग देणें हें गांवचें वैशिष्ट्य

सुमारें आठदहा वर्षें झालीं असतील, त्या गोष्टीला! मी माझ्या मामाच्या गांवीं गेलों होतों सुट्टींत! सदर गांव म्हणजे अगदीं लहान खेड होतें. जेमतेम पन्नास उंबरा होता त्या गांवांत! वस्ती होती तीसुद्धां बहुतेक अशिक्षितांची. गांव शेतकी-प्रधान होता. डाग देणें, हें त्या गांवाचें वैशिष्ट्य असल्यास न कळे! म्हैस दरडीवरून पडली, द्या डाग! गाईच्या पाठीवरून भिरकवडा गेला, द्या डाग! बैलाची पोळी (घशा) सुजली, द्या डाग! असा उपक्रम चालू असे! पण मानवाच्या बाबतींत सुद्धां डागपद्धतीचा अवलंब पाहिल्यानंतर, मला आश्चर्य वाटलें, आणि ह्या डागपद्धतीची माहिती मिळविण्याचा मी कसून प्रयत्न केला.

सोरा (एक अभिनव डागपद्धति)

मामाच्या दाराशीं एक साठी उलटलेला म्हातारा गडी कामाला होता. वार्धक्यामुळें बिचाऱ्याला सांधेदुखीची व्यथा जडली होती. थंडीच्या दिवसांत पाय आंखडून राहात, अन् सांध्यांतून कळा मारत असत. शेवटीं त्याच्या एका नातलगानें सोऱ्याचे डाग देऊन सदर संधिवात बरा केल्याचें त्यानीं सांगितलें, आणि एका दुःखिताच्या बाबतींत, मला, सोरा ह्या डाग पद्धतीचें प्रात्यक्षिक पाहावयास मिळालें.

सुवर्णकार डागविद्याविशारद

सदर डाग देणारी व्यक्ति सुवर्णकार जातीची असून, हा इसम ‘डाग-विद्यापारंगत’ असल्याचें तेथील ग्रामवासी यांच्या तोंडून मला कळलें: त्यानें तर ही कला आपल्याजवळ वंशपरंपरागत चालत आल्याचें मिशीवर हात मारून सांगितलें.

प्रयोगाचें प्रात्यक्षिक

एक दिवस सदर इसम दुःखिताचे सांधे तपासून गेला व दुसऱ्या दिवशीं प्रभातकाळीं, डाग देण्याचें त्यानीं आश्वासन दिलें- दुसऱ्या दिवशीं सकाळीं येतांना त्यानें एक ओली बांबूची काठी आणली होती. सदर काठी त्यानें गवताच्या आगींत पेराच्या अलीकडे जाळली, व आंखडलेल्या पायाच्या सांध्यावर (ढोंपरावर) त्यानें प्रत्येक पायावर दोन दोन डाग दिले. ह्या डाग देण्याच्या विशिष्ट स्थानाबद्दल जास्त चौकशी केली असतां त्यानें ‘सांध्याचा डोळा’ हा शब्द वापरला. त्याचा अर्थ मात्र उमगला नाहीं. डाग दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशीं रोग्याचे सांधे सुटल्याचें मला कळलें.

विद्या गुप्त ठेवण्याची प्रवृत्ति

डाग दिल्यानंतर तीन दिवसपर्यंत सदर दुःखिताला कोंवळ्या सूर्यकिरणांत थोडा वेळपर्यंत बसण्यास त्यानें सांगितलें होतें. ह्याचा उलगडा मला झाला नाहीं. सदर डाग-विद्यापारंगतानें ही विद्या कोणाला शिकविली नाहीं. कोणी दुसरी व्यक्ति हा प्रयोग करण्याकरितां सिद्ध झाली, तर त्याच्याविषयीं हा मनुष्य भीति निर्माण करीत असे. ह्या कृत्यांत त्याचा धंदेवाईक दृष्टिकोन असल्यास न कळे! कांहीं दिवसापूर्वीं ह्या ‘डाग—विद्यापारंगताबरोबर,’ त्याची कलासुद्धां मृत्युमुखीं पडल्याची बातमी माझ्याकडे आली, व त्याच्या संकुचित दृष्टिकोनाबद्दल मला चांगली चीड आली. त्याचें स्वभावतंत्र संभाळून, मी ह्या उपायासंबंधीं माहिती मिळविण्याचा खूप प्रयत्न केला होता, पण त्यानें मला ‘मूळ स्वभाव जाईना’ ह्या म्हणीची सत्यता अखेर पटवून दिली.

यकृतावरील डाग

.. लिव्हर वाढल्यामुळें आजारी पडलेले रोगी अलिकडे बहुसंख्य दृष्टीस पडतात. लिव्हरच्या वाढीवर डाग दिला जातो, ही गोष्ट सुद्धां बहुश्रुत आहे. परंतु ‘ डाग ’ म्हटल्यानंतर ही गोष्ट शहर-वासीयांच्या पचनीं पडण्यासारखी नाहीं, किंबहुना अंगावर भीतीचे रोमांच उभे करणारी आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यामुळें डागाचा प्रयोग क्वचित् प्रसंगीं खेड्यांतूनच पहावयास मिळतो. अशा एका प्रयोगाची सत्य घटना, माझे एका मित्राचे तोंडून मला ऐकावयास मिळाली. त्याचा सविस्तर वृत्तांत, मी येथें सादर करतो.

माझे एक जिवलग स्नेही, श्री. काणे ह्यांना बालपणीं लिव्हरचा विकार होता. वयाच्या सहाव्या वर्षापासून चौदा वर्षांपर्यंत हे गृहस्थ ह्या दुखण्यामुळें जेरीस आले होते. आईवडिलांनीं नाना तऱ्हेचे उपाय करून पाहिले, पण तात्कालिक सुधारणेपेक्षां कायमचा फायदा कांहींच झाला नाहीं. कांहीं काळ अल्प सुखांत गेल्यानंतर, पुन्हां दुखण्याचें पुनरागमन होई व ‘ हातापायांच्या काड्या व पोटाचा गाडा, अशी दुखणेंकऱ्याची स्थिति होऊन, रोगी जर्जर होई. एक दिवस, अखेरचा उपाय म्हणून अपायावर डाग देण्याची कल्पना अंमलांत आणण्याचें श्री. काणे ह्यांच्या आईवडिलांनीं ठरविलें. त्याकरितां त्यांनीं एका ग्रामवासीय सुवर्णकाराचा सल्ला घेतला. सदर इसमानें ह्यापूर्वी असे डागाचे प्रयोग अनेक वेळां केले होते. यशस्वी हात म्हणून त्याची ख्याति होती. जणूं तो सुवर्णाचा तुकडा आपल्या भट्टींतून, तावून सुलाखून काढीत असे, तद्वत् मानवाच्या लिव्हरला-सुद्धां, तो डागाच्या भट्टींतून तावून सुलाखून काढीत असे, असें अलंकारिक भाषेत म्हणावें लागेल.

प्रथम दिवशीं चुन्याच्या रेघा व लंघन

डाग घेण्याचें, श्री. काणे ह्यांच्या आई व वडिलांनीं निश्चित केल्यानंतर, डाग देण्याच्या आदले दिवशीं सदर इसम आला, व त्यानें सुजलेल्या, टणक झालेल्या पोटावर चुन्यानें रेघा मारून ठेवल्या, व रोग्याला कांहीं खाद्य पेय न देण्याची सूचना करून तो निघून गेला.

डाग कसा दिला ?

दुसऱ्या दिवशीं सकाळीं, त्यानें डाग देण्याची तयारी केली. प्रथमतः त्यानें एक ओला रुमाल पोटावर पसरला. रोग्याचे डोळे घट्ट बांधून, त्याला क्षणकाल अंध बनविलें. तसेंच डाग देतांना त्याची हालचाल होऊं नये म्हणून त्याला दुसऱ्या दोघांनीं घट्ट धरून ठेवलें. अग्नींत टाकलेला तांब्याचा तुकडा लालभडक झाल्याबरोबर, डागविद्यापारंगतानें, पोटावर सणसणीत डाग दिला. डाग देतांना, तोंडानें त्यानें कांहीं अंक मोजले, त्याचा अर्थ न कळे ! डाग घेतल्यानंतर सदर रोगी दोन दिवसपर्यंत विव्हळत होता. डागावर फक्त ताकांत भिजवलेली रुमालाची घडी ठेवली जात असे. तसेंच रोग्याला वावडे, वातूळ खावयास देऊन, हा डाग आठ दिवसपर्यंत वाहू दिला, व नंतर योग्य खाद्य देऊन, बरा केला गेला. पंधरा दिवसांत पोटाचा टणकपणा जाऊन, पचन-क्रिया सुरळीत चालू झाली. आजतागायत सदर इसमाला लिव्हरतक्रार नाहीं. डागाचे शिक्कामोर्तब मात्र अद्याप खुणेमुळें दृश्य स्वरूपांत आहे.

शिष्याभावीं नष्ट झालेल्या ह्या कलेची, सर्वांगीण माहिती जर कोणाला असेल तर ती खरोखर हितप्रद आहे किंवा काय ? ह्याची चिकित्सा जरूर व्हावी !

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व औषधें
मुंबईंत मिळण्याचें आणखी एक नवें केंद्र
रामकृष्ण एजन्सी
आनंदजी लद्धा बिल्डिंग
लालबाग, मुंबई १२
* मागणी रोज वाढत आहे. *

वाचकांचा पत्रव्यवहारः—

रुई (अर्क)

ता. १ डिसेंबर १९५४ पान ३६७ च्या आयुर्वेद पत्रिकेच्या अंकांत वैद्यराज हरस्वरूप-शर्मा यांनीं वरील वनस्पतीच्या गुणधर्मांविषयीं लेख प्रसिद्ध केला आहे. त्या लेखांत थोडी भर घालावी या उद्देशानें खालीस माहिती देत आहे. आधुनिक तरुण वैद्यांनीं हे अनुभव घेऊन त्यांची खातरजमा पुन्हः एक वेळ प्रसिद्ध केल्यास मागील अनुभवास अधिक पक्केपणा उत्पन्न होईल.

(१) पोट दुखणेंः— विड्याचे ४ पानाचे विड्यांत रुईच्या पानाच तुकडा ।· अगर ·॥· (पानाचे आकाराचे मानानें) घालून विडा खाण्यास दिल्यास पोट दुखणें बन्द होतें.

(२) कोरडे त्रासदायक इसबः-पानें ठेंचून इसबावर रात्रीं बांधून ठेवावीं. एक दिवसाआड असें करावें. आठ दिवसांत अनुभव कळेल. अनुभवाप्रमाणें कमी अधिक दिवस उपयोग करावा. रात्रीं बांधलेलें सकाळीं सोडून टाकावें.

(३) प्लीहा, गुल्म, यकृत्, इ विकारांवरः— रुईचा चीक अर्धा शेर, साजूक तूप अर्धा शेर गाडग्यांत घालून त्यावर मातीचे परळ घट्ट बसवून त्यास सात मातकापडें करावीं. त्यास रानशेणीचें गजपूट द्यावें. वयमान पाहून त्या गाडग्यांतून निघणारा भाग ·॥· माशापासून २ माषेपर्यंत चाटावयास देऊन त्यावर आणखी १ ते १॥ तोळा साधें तूप खाण्यास द्यावें. वरील विकार व पोटांतील ग्रंथी वगैरे नाहींशा होतील. विकाराचे मानानें एक, दोन अगर ३ सप्तकें हें औषध द्यावें लागतें.

रक्तपिती व उपदंशजन्य व्रण वगैरे यांत या वनस्पतीचा उपयोग होतो.

आयुर्वेद—सेवक
भिषग्रत्न—गणेश कृष्ण पाटणकर

विंचूदंशावर मिठाचा प्रयोग

विंचवाचा दंश झाला असतां मिठाच्या पाण्याचा प्रयोग करावा. शेंकडा ९० रोग्यांना गुणलाभ होतो असा अनुभव आहे. लवणोदक 'पुढील-प्रमाणें तयार करावें. दोन तोळे पाणी व २ गुंजा मीठ घ्यावें व चांगलें मिश्रण करावें. या मिश्रणाचे ५ थेंब दंशजागीं लावावेत. ५-५ थेंब दोन्ही डोळ्यांत, दोन्ही कानांत व दोन्ही नाकपुड्यांत सोडावेत; व उरलेलें अंदाजें १ तो. पाणी त्या वृश्चिकदष्ट व्यक्तीस पाजावें.

या प्रयोगानें थोड्याच वेळांत विषाचा वेग शांत होतो. "आरोग्यदर्पण"

प्राचीन वैद्यक ग्रंथांत तूपमीठाचा प्रयोग लावण्यासाठीं व खाण्यासाठीं सांगितला आहेच. या प्रयोगांतील विशेष म्हणजे मिठाचा उपयोग कान, नाक, डोळ्यांत करावयास सांगितला आहे व तो तुपाऐवजीं पाण्यांत सांगून प्रयोग आणखी सोपा केला आहे. वाचकांनीं वरील दोन्ही प्रकारें मिठाचा प्रयोग कान, नाक, डोळे यांत करून अनुभव घ्यावा.

—संपादक

सेवा संघाचीं सर्व औषधें, तसेंच खातीचीं सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर, गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर, अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाबळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—
देशी सर्वौषधी संग्रहालय
पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

पवित्र नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

वाचकांचा पत्रव्यवहार

"सत्कार" असा असावा !

"आपल्या पत्रलेखकाचें अक्षर फारच सुन्दर व व्यवास्थित पाहून आनन्द झाला. त्याला तसें सांगावें व माझी 'शाबासकी' पोंचवावी.

हो! ही शाबासकी मी कोणी मोठी व्यक्ति म्हणून देत नाहीं हं. लेखक, मोहनच्या वयाचा असेल तर मातृभावनेनें, व तो माझ्या बरोबरचा असेल तर मित्रत्वानें—बंधुत्वानें कांहीं म्हणा !"

नवी दिल्ली —आक्का धोत्रे

(सेवासंघांतील पत्रलेखक श्री. य. वि. दांडेकर यांना उद्देशून वरील मजकूर आहे. नोकरीच्या कालांत त्यांनी आपले अक्षर सुधारून अक्षरामुळें जवळच्या दूरच्या सर्व लोकांना सहज आकर्षून घेतलें आहे. सुन्दर अक्षरांतील ही जादू वाचकांनीं आपल्या मुलांना व परिचितांना अवश्य ज्ञात करावी.
—संपादक)

पांचगणी सॅनिटोरियम्

मुंबई सरकारनें पांचगणी येथील वेल फेअर सॅनिटोरियममधील आणखी १५ खाटा क्षयरोग्यांवर मोफत औषधोपचार करण्यासाठीं राखून ठेवल्या आहेत. या सॅनिटोरियममध्यें यापूर्वी अशा रोग्यांसाठीं १० खाटा राखून ठेवण्यांत आल्या आहेत. अशा प्रकारें या सॅनिटोरियममधील २५ मोफत खाटांसाठीं सरकार सॅनिटोरियमला वार्षिक ४५००० रुपयांची ग्रँट देईल.

प्रवेश कोणाला मिळेल ?

मोफत खाटासाठीं प्रवेश देतांना मासिक रुपये २५० पर्यंत पगार असणाऱ्या सरकारी नोकरांना प्रथम पसंति देण्यांत येईल. त्यानन्तर पुढील क्रमानें पसन्ति द्यावी असें सॅनिटोरियमच्या अधिकाऱ्यांना सांगण्यांत आलें आहे-: १) सर्जन जनरलांनीं शिफारस केलेले सरकारी नोकर (२) सर्जन जनरलांनीं शिफारस केलेले गरीब रोगी आणि (३) इतर गरीब रोगी.

"आश्चर्य व्यक्त केलें"

संकेश्वर येथें, सुप्रसिद्ध दंतवैद्य पां. वि. जायदे यांच्या नेतृत्वाखालीं चाललेल्या धर्मार्थ दंतयज्ञास गुरुवार दि. २।१२।५४ रोजीं सायंकाळीं मुंबई राज्याचे मान्यवर मंत्री श्री. यशवन्तराव चव्हाण यांनीं बेळगांवचे कलेक्टर श्री. रानडे यांच्या समवेत भेट दिली. उभयतांनीं आस्थापूर्वक दंतयज्ञाचें काम पाहिलें व समाधान व्यक्त केलें.

दोन्ही हातांनीं दन्तोत्पादन

तसेंच शनिवार दि. ४।१२।५४ रोजीं सकाळीं मान्य मंत्री श्री. एम्. पी. पाटील यांनीं श्री. अण्णुगुरुजी व श्री. श्रीरंग कामत यांच्या समवेत दंतयज्ञांतील शूलरहित दंतोत्पाटनाचीं सव्यसाची (Ambidextrous) प्रात्यक्षिकें पाहून आश्चर्य व्यक्त केलें. 'या कलेला उत्तेजन मिळणें अवश्य आहे. आणि तसें झाल्यास आयुर्वेदांतील इतर अंगांचेंहि संशोधन झपाट्यानें होऊं शकेल.' असें मत त्यांनीं व्यक्त केलें.

प्रमाणपत्र

आपण जें जें औषध बनवितो व जनतेस देतो, तें तें प्रत्येक औषध सचोटीचें व गुण देणारे असलें पाहिजे; तरच त्याचें प्रमाणपत्र जनतेकडून आपणास मिळेल. तर अशा गुण देणाऱ्या खऱ्या, अस्सल व ताज्या औषधी खरेदी करण्यास विश्वासपात्र ठिकाण पाहिजे. त्याकरितां आपण

दि ऑल इंडिया करियाणा टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात.
अधिक माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

अद्भुत कुष्ठ-चिकित्सा

[लेखकः- वैद्यगुरु दा. अ. हळसीकर, हुबळी]

(श्वित्र हा कुष्ठरोगाचाच एक भाग आहे असें वैद्यराज हळसीकर यांचें निश्चित मत आहे व म्हणून पुढील कृष्णसर्पमषीप्रयोग कुष्ठरोगावर वापरावा असें त्यांनीं पत्रानें आग्रहपूर्वक कळविलें आहे. —संपादक)

आज भारतांत अनेक प्राणिसंग्रहालयें आहेत. त्यापैकीं पुष्कळ संग्रहालयांमध्यें कृष्ण-सर्प असून ते कालौघानें मरत असतात. श्वित्रचिकित्सेमध्यें प्राणिज औषधाचा एक लेप सांगितला आहे. सुश्रुतसंहितेंत श्वित्र-चिकित्सा दिली आहे, त्यांत कृष्णसर्पांची रक्षा (मषी) असलेला लेप सांगितला आहे. प्राणिसंग्रहालयांत कृष्ण-सर्प असतात. तरी प्रत्येक प्रांतीय सरकारी प्राणिसंशोधक मंडळानें हा लेप तयार करून त्यांनीं आपल्या संग्रहीं विक्रीसाठीं अवश्य ठेवावा.

मुंबई येथेंहि एक हाफ्किन्-इंस्टिट्यूट नांवाचें संशोधनात्मक प्राणिसंग्रहालय आहे.

वरील प्राणिज औषध उपरोक्त सरकारी संस्थांनीं अथवा अन्य खाजगी संस्थांनीं अगर व्यक्तींनीं आपल्या संग्रहीं ठेवून त्याचा चिकित्साप्रयोग करून काय परिणाम व फल प्रत्यक्षांत दिसतें याचा जरूर अनुभव पाहावा. हें प्राणिज औषध ऋषिप्रणीत असल्यानें याचे गुणहि अलौकिक असेच आहेत. तरी संशोधकांनीं विशेष आस्थापूर्वक याचा प्रयोग करावा अशी मी माझी इच्छा व्यक्त करतो.

कृष्णस्य सर्पस्य मषी सुदग्धा
बैभीतकं तैलमथ द्वितीयम् ।
एतत्समस्तं मृदितं प्रलेपात्
श्वित्राणि सर्वाण्यपहन्ति शीघ्रम्॥ १७ ॥
(सु. चि. स्था. अ.९)

अर्थ:— काळा साप मारून तो जाळून त्याची रक्षा करावी. व ती रक्षा (भस्म) बेहड्याच्या तेलांत खलून लेप तयार करावा. हा लेप श्वित्रास लावून चांगलें मर्दन केलें असतां यानें हरएक प्रकारचें श्वित्र त्वरित नाश पावतें.

वाचकांचा पत्रव्यवहार

कौतुक व आनंदाश्रु

"मी आयुर्वेद पत्रिका नियमानें वाचतो. व सेवा-संघाचीं औषधें कोल्हापूर येथें मिळतात तीं वापरतो. तीं गुणाला उत्तम असतात असा माझा अनुभव आहे.

आयुर्वेद सेवा संघाच्या सेवाकार्याचें मला व्यक्तिशः फारच कौतुक वाटतें, व स्मरण झालें कीं डोळ्यांतून आनंदाश्रु येतात.

सेवासंघ दीर्घायुषी होवो व असाच कार्यक्षम राहो.

कोल्हापूर —श्रीनिवास धर्माधिकारी वैद्य

शास्त्री धाष्टर्य

आयुर्वेद पत्रिकेच्या १६ डिसेंबर १९५४ च्या अंकांत वैद्य वा. स. अंदनकर, आयुर्वेदतीर्थ, चांदा यांचा 'टीकाकार आप्त मानावेत काय ?' शीर्षक लेख प्रसिद्ध झाला आहे.

त्याला विस्तृत उत्तर देण्यापूर्वी श्री. अंदनकरां-कडून खालील प्रश्नांच्या उत्तरांची अपेक्षा आहे.

(१) गुल्माचा पाक होतो काय ? होत असल्यास

स यस्मादात्मनि चयं गच्छत्याप्स्विव बुद्बुदः ।
अंतः सरति यस्माच्च न पाकमुपयात्यतः ।
सु. उ. ४२-६

या संहिताकारांच्या (टीकाकारांच्या नव्हे) वाक्याची संगति कशी लावावयाची ?

(२) व्रण व गुल्म हे एकच पदार्थ आहेत काय ? नसल्यास सुश्रुत सू. अ. २२ त वर्णन केलेला कोष्ठगत व्रणांतील स्राव

'कोष्ठगतोऽसृङ्मूत्रपुरीषपूयोदकानि स्रवति'

व पैत्तिक गुल्मांतील श्री. अंदनकरांनीं गृहीत ला (?) स्राव एकच असू शकती काय ?

आणि मग असं अशास्त्रीय विवेचन करून, वडाची साल पिंपळाला लावून, टीकाकारांना अनाप्त ठरविणे हें शास्त्रीय धाष्टर्य नव्हे काय ?

भि. वि. ढेग्वेकर वैद्य

मध्यप्रदेश अग्रगामी वैद्य मंडळ

ता. १५।१२।५४ रोजीं नागपूर येथें जानकीबाई धर्मशाळेंत मध्यप्रदेशांतील वैद्यांची सभा दुपारीं २ वाजतां झाली. या सभेकरितां रायपुर, जबलपुर बिलासपुर, तुमसर, गोंदिया, तिरोडा, बाराशिवनी, चांदा, चिमूर, आकोला, अमरावती, वर्धा, भंडारा, बालाघाट वगैरे ठिकाणचे शंभराचे वर वैद्य उपस्थित होते. श्री. वेणीमाधवशास्त्री, नागपूर विद्यापीठाचे आयुर्वेदिक संशोधनखात्याचे रीडर हे उपस्थित होते. त्यांना विशेष निमंत्रण देण्यांत आलें होतें. मंडळाचे संरक्षक गोवर्धनशर्मा छांगणी यांच्या अध्यक्षतेखालीं सभा सुरूं झाली.

संदेश व अहवाल वाचन

आरंभीं मंडळाचे मन्त्री श्री. वैद्य वझे यांनीं सदस्यांचीं आलेलीं पत्रें वाचून दाखविलीं व मंडळाची आतांपर्यन्तची प्रगति व आयव्यय यांची माहिती सांगितली. त्यानन्तर मंडळाचे दुसरे मन्त्री श्री. वै. हर्षूल यांनीं मागील बैठकीचा अहवाल वाचून दाखविला.

२७ वैद्यांचें कार्यकारी मंडळ

अध्यक्ष श्री. पं. छागाणी यांनीं मागील बैठकींत झालेल्या कार्याला सभेची संमति विचारली व सर्वांनीं एकमतानें मान्यता दिली. पं. वै. गुलराजजी शर्मा मिश्र यांनीं आपली कार्यकारी समिति २७ सदस्यांची जाहीर केली. पांच उपाध्यक्ष वै. पं. भिकाजी विनायक डेग्वेकर, जबलपुर, वै. पण्डित गुरुप्रसाद मिश्र, अमरावती, वै. पं. दा. मुळे, अमरावती, वै. पं. शिवकरणशर्मा छांगाणी, नागपुर, वैद्य पंडित शिवगुलाम वैद्य, आकोला. मंडळाचे मंत्री श्री. वैद्य गंगाधरराव वझे व वै. हर्षुलजी मिश्र. दोन उपमंत्री श्री. वै. पं. केदारनाथ शर्मा पुरोहित व शंकरदत्तशास्त्री गौड. कोषाध्यक्ष श्री. हरिराम वाघवानी, आयव्यय-निरीक्षक वै. हेमशंकर शुक्ल, व इतर पंधरा सभासद निरनिराळया जिल्ह्यांतून नियुक्त करण्यांत आले. यानंतर मंडळाचें घोषणापत्र श्री. हर्षुल वैद्य यांनीं वाचून दाखविलें व सर्वांनुमतें तें मंजूर झालें.

जानेवारींत नागपूर येथें वैद्य सम्मेलन

मध्यप्रदेश वैद्य परिषद नागपूरलाच भरविण्यांत यावी हा वै. वझे यांचा ठराव मंजूर करण्यांत आला. परिषदेचे अध्यक्षस्थानीं मुंबईचे सुप्रसिद्ध वैद्य व निखिल भारतीय आयुर्वेद महामंडळाचे अध्यक्ष पं. शिवशर्मा यांना बोलाविण्यांत यावें हा श्री. गुलराजशर्मा यांनीं मांडलेला ठराव मंजूर करण्यांत आला. परिषद जानेवारींत भरविण्याचें ठरलें. 'मध्यप्रदेश अग्रगामी वैद्य मंडळ' ही संस्था शक्य तितक्या लवकर रजिस्टर करण्याचें ठरलें.

आयुर्वेद महामंडळाशीं ही संस्था जोडावी

त्याचप्रमाणें ही संस्था निखिल भारतवर्षीय महामंडळाशीं संबद्ध करण्यांत यावी या सूचनेला सर्वानुमतें मान्यता मिळाली. मंडळाचे जे आजपर्यंत सभासद झाले त्या सर्वांना स्थायी समितीचे सदस्य म्हणून मान्यता देण्यांत आली. यानंतर पं. गुलराजजीशर्मा यांनीं सर्वांचे आभार मानल्यानंतर पानसुपारी होऊन सभा बरखास्त झाली.

बडोदा (गुजरात) येथें
आयुर्वेद सेवा संघ-नाशिक
या संस्थेचीं सर्व प्रकारचीं गुणकारी औषधें
मिळण्याचें ठिकाण
श्री. गणेश सिताराम जोशी
खेडकर फळिया, महंमदवाडी-बडोदा.
आपण एकवेळ अवश्य भेट द्या.

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद

लेखकः— वै. भि. वि. डेंग्वेकरशास्त्री
जबलपूर

आगामी अधिवेशनासाठीं कांहीं सूचना

महाराष्ट्र प्रान्तीय वैद्य संमेलनाचें १० वें अधिवेशन एप्रिल १९५५ मध्यें भुसावळ मुक्कामीं भरणार असून त्याला जोडून शुद्ध आयुर्वेदसंभाषा परिषद पण भरणार असल्याचें वाचून फार आनंद झाला.

या परिषदेंत कोणकोणते विषय विचारांत घ्यावे यासंबंधीं कांहीं सूचना करीत आहे.

नाशिक मुक्कामीं गेल्या ऑक्टोबर महिन्यांत जी परिषद भरली तिच्यांत शिक्षणासंबंधीं कांहीं निर्णय घेतले गेले. ते सर्व 'आयुर्वेद पत्रिकेच्या' अंकांतून क्रमशः प्रसिद्ध होत आहेतच. तरी पुढें विषयवार कोणते निर्णय घेतले जाणें, विद्यार्थ्यांना विषय शिकविण्याच्या दृष्टीनें, विचारांत घेणें जरूर आहे तें पाहूं.

शारीर व शारीरक्रियाविज्ञान

(अ) 'कला' या शब्दानें कोणत्या अवयवाचा बोध होतो, यासंबंधीं गत परिषदेंत कांहींच निर्णय घेण्यांत आला नाहीं. तरी त्या विषयावरील ग्रंथ-चतुष्टयांतील सर्व वाक्यें व टीकाकारांचे अभिप्राय एकत्रित करून त्यांची संगति लावून, त्याचप्रमाणें सुश्रुताच्या शारीरावर श्री. पटवर्धन यांनीं इंग्रजींत लिहिलेल्या भाषांतरांत या विषयासंबंधीं जें उद्बोधक विवरण केलें आहे तें पण संपूर्णपणें अध्ययन करून अंतिम निर्णय लावण्याच्या निश्चयानें सर्व शिक्षकांनीं या संमेलनास आलें पाहिजे. विषय जितका समजण्यास कठिण असतो तितकाच त्यासंबंधीं सूक्ष्म विचार शास्त्रीय आधारांसकट परिषदेंत झाला पाहिजे. याकरितां अभ्यासू शिक्षकांनीं आधारांचीं टांचणें व त्यावर अधिष्ठित विस्तृत विवरणांचे लेख (Papers) घेऊन परिषदेंत आलें पाहिजे. सायन्स कॉंग्रेसमध्यें जशीं निरनिराळीं लिखाणें वांचलीं जातात तशीं तीं वाचलीं गेल्यानन्तर परिषदेंत चर्चा होऊन नन्तर निर्णय घेतला पाहिजे. याला एक संपूर्ण दिवस द्यावा.

स्रोतस् शब्दाचा अर्थ

(ब) स्रोतस् शब्द आयुर्वेदीय शारीरांत फार महत्त्वाचा आहे. त्या संबंधांत चरकविमानस्थानांतील पांचवा अध्याय व इतर उतारे (ग्रंथचतुष्टयांतील) एकत्रित करून, विद्यार्थ्यांना तो विषय कसा पटवून देतां येईल, या संबंधीं पूर्ण विचार झाला पाहिजे. शारीर धातूंचे क्रमशः परिवर्तन करण्यांत भाग घेणारीं हीं यंत्रें किंवा शारीरावयव आहेत असें शास्त्रकार म्हणतात. इतक्या महत्त्वाच्या अवयवासंबंधीं विद्यार्थ्यांना कांहींच कल्पना निश्चित करवितां आली नाहीं तर त्यांना आयुर्वेदासंबंधीं आदर कसा वाटेल ? कांहींतरी सांगून वेळ मारून नेण्याची पद्धति ही गुरु व शिष्य या दोघांनाहि घातक असते. त्यापेक्षां प्रांजलपणें आपली अयोग्यता प्रगट करणें हा शुद्ध पक्ष जरी असला तरी तो गुरुबद्दल अनादर उत्पन्न करणारा होतो. सबब परिषदेंत झालेला निर्णय प्रसिद्ध झाला व निर्णित पद्धतीप्रमाणें शिकविलें म्हणजे तें पण आप्तवाक्यच म्हटलें जातें. यासंबंधींदेखील लिखाणें वाचलीं जावीत आणि ग्रंथचतुष्टयांत व त्यांवरील प्रसिद्ध टीकांत हे शब्द ज्या ज्या स्थानीं आले आहेत त्या सर्वांचें संकलन करून ज्या पद्धतीनें त्या सर्व वाक्यांचा समन्वय करितां येईल तो केला जावा. या कार्यासहि एक दिवस घालविण्यांत यावा.

विविधाशित-पीतीय अध्याय

[क] चरकांतील विविधाशितपीतीय अध्याय हा आयुर्वेदीय शारीरक्रियाविज्ञानाचा गाभा आहे असें म्हटलें तरी चालेल. त्यांतील एकेक वाक्य हें शरीरांत घडणाऱ्या अनेक क्रियांना स्पष्ट करणारें आहे. आधुनिक टीकाकारांनीं मात्र त्यांतील अर्थांचे अनर्थ केले आहेत असें मला प्रांजलपणें म्हणावें लागतें. अन्नपचनक्रियेंत उत्पन्न होणारे वात, पित्त, कफ हे मलरूप वात पित्त कफ आहेत. ते धारण करणारे नव्हत वैगेरे अनेक स्वकपोलकल्पित विचारधारा पुढें

आलेल्या आहेत.. आपल्या [illegible] ते विचार लिहून प्रसिद्ध करणें आणि परिषदेंत त्यावर चर्चा होऊन सर्व विद्वानांनीं एकमतानें किंवा बहुमतानें निश्चय झाल्यावर तो प्रसिद्ध होणें यांत जमीन अस्मानचें अंतर असतें. आपल्या विचारधारेंत जे दोष असतात ते दुसऱ्याला लवकर कळतात. ' निंदकाचें घर जवळ असावें ' या दासोक्तींत फार मोठा अर्थ भरलेला आहे. सबब या अध्यायांतील एकेक वाक्यांत ज्या अनेक शारीरक्रिया वर्णित आहेत त्यांचें स्पष्टीकरण झालें म्हणजे सबंध आयुर्वेदीय शारीर स्पष्ट समजणारें आहे. तरी एक किंवा दोन दिवस केवळ या अध्यायावरील चर्चेंत घालवावे.

चार दिवसांपेक्षां अधिक वेळ या परिषदेकरितां मिळणें कठिण जाईल. तरीपण मी वर लिहिलेल्या तीन विषयांचा स्पष्ट निर्णय घेतला गेला तर पुष्कळ कार्य झाल्यासारखें होईल.

भरपूर टांचणें आणावींत

या संबंधांत प्रांतांतील इतर विद्वानांचे विचार ' आयुर्वेदपत्रिकेंत ' प्रसिद्ध झाल्यानंतर पुढ या विषयासंबंधीं लिहीन. विषयांसंबंधीं भरपूर टांचणें करूनच शिक्षकांनीं परिषदेस यावें व आपले विचार साधार लेख (पेपर) रूपांत असावे हा दंडक मात्र प्रत्येकानें लक्षांत ठेवावा.

त्रिदोषासंबंधीं निश्चित विचार

अशा कितीतरी परिषदा भरविणें आतां अत्यंत आवश्यक झालें आहे. त्रिदोषांसंबंधीं निश्चित विचारधारा सर्वमान्य झाल्याखेरीज, शिक्षक व विद्यार्थी दोघांचीहि कशी कुचंबणा होत असेल, याची कल्पना हुशार व शिकलेले प्रौढ विद्यार्थी या गुरू-परंपरेंत पुढें येऊं लागल्यावर गुरूंना विशेषतः येत असावी. ती निश्चयानें दूर करणें हें प्रत्येक गुरूचें कर्तव्य आहे. अशा परिषदेंतील निर्णय हे त्याला आप्तवाक्यांप्रमाणेंच मदत करू शकतील.

अग्निकर्म—चिकित्सा

आपल्या आयुर्वेद पत्रिकेच्या मागील एका अंकांत अग्निकर्म चिकित्सा (डाग) या विषयावर एक लेख प्रसिद्ध झाला होता, तो मी वाचला. मी स्वतःहि अग्नि-कर्म चिकित्सा करतो व म्हणून मी माझी पद्धति आपणाकडे योग्य वाटल्यास प्रसिद्धीसाठीं पाठवित आहे.

पानथरीवर डाग देण्याची माझी पद्धति खालीलप्रमाणें आहेः—

पानथरीवर डाग देण्याची पद्धति

मी एक ओलें फडकें घेऊन त्याच्या ५।६ घड्या घालतो व तें पोटाच्या पानथरी भागावर पसरतो. नंतर एक करवंटी (नरोटी) बिनभोंकाची घेऊन त्यांत चांगला धगधगीत कोळसा (अग्नि) ठेवतो. मग एका कागदावर श्रीअग्निनारायणाय नमः। असें यंत्र लिहून त्या विस्तवावर टाकतो. तें जळत आलें म्हणजे डाग बसतो. सदर यंत्रानें त्यास चटका बसू न लागला तर परत श्री ॐआग्नि नारायणाय नमः। श्री शुभ कार्य लाभो असें यंत्र विस्तवावर टाकावें. खास पोटास चटका बसतो, फोड येतो, डाग बसतो.

सदर माहिती कै. नारायण महिपत वैद्य, रा. ब्राह्मणगांव ता. कोपरगांव यांनीं मला दिली. हे माझे गुरु होते. यांनीं हा प्रयोग मला शिकवून समक्ष करून घेतला होता. यांस सुमारें ३५।४० वर्षें झालीं. मी मधून मधून हा प्रयोग करीत असतो. मात्र रोग्याची प्रकृति व शक्तिमान पाहून कितपत डाग देणें हें ठरवितो.

नंतर वावडे पदार्थ खाण्यास देऊन फोड वाहूं देण्यास सांगतो, व त्यानंतर पथ्य करण्यास सांगतो. अशी माझी डाग देण्याची पद्धति (दंभ-चिकित्सा) आहे. यांत कांहीं सुधारणा करणें जरूर असल्यास कळवावें.

कोऱ्हाळे भगवती —वै. आर्. डी. क्षीरसागर

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ

— बृहन् मुंबई जिल्हा शाखेची स्थापना —

म. प्रां. वैद्य मंडळाचे बृहन् मुंबईतील सदस्यांची निमंत्रित सभा (पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणें) रविवार दि. १९-१२-५४ रोजीं दुपारीं आर्यन शाळा गिरगांव येथें भरली होती. या सभेंत मंडळाची ' बृहन् मुंबई जिल्हा शाखा " मंडळाचे भूतपूर्व अध्यक्ष वैद्यराज गणेशशास्त्री (ग.म.) अभ्यंकर यांचे अध्यक्षतेखालीं स्थापन करण्यांत आली. जिल्हा शाखेचे एकूण १३५ सभासद झाले आहेत. धन्वन्तरीस्तवनानंतर वै. रामभाऊ भोगे यांनीं निमंत्रण वाचून वै. अभ्यंकरशास्त्री यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी सूचना केली. वै. कानिटकर यांनीं जिल्हा शाखेसंबंधीं विस्तृत निवेदन केलें. त्याचा सारांश असाः-

जिल्हा शाखेनें हें कार्य करावें

" आयुर्वेद अभ्यास मंडळ, सुसज्ज ग्रंथालय, अर्थ व संज्ञा निश्चिति, औषधीकरण, धर्मार्थ दवाखाना, जिल्ह्यातील वैद्यांची संघटना, सरकार दरबारी प्रतिनिधित्व करणें, जिल्हा शाखेचे प्रतिनिधि प्रांतीय मंडळावर पाठविणें, दैनंदिन अडचणींचा परिहार करणें, आयुर्वेदीय विद्वान् व्यक्तींचा आदर--सत्कार करणें इतकीं कार्यें जिल्हा शाखेला करतां येतील. आपसांतील मतभेद व अधिकारासाठीं स्पर्धा यापासून शाखा संपूर्ण अलिप्त रहावी. सभासदाच्या कर्तृत्वाप्रमाणें त्याला संघटनेंत योग्य तें स्थान मिळावें. तसेंच सभासदाला राजिनामा देण्याची वा संघटनेबाहेर जाण्याची पाळी न यावी एवढी दक्षता प्रत्येकानें घेतली तरच शाखेचें भव्य व दिव्य स्वरूप, भविष्यकाळांत पहावयास मिळेल. शुद्धायुर्वेदीय पाठ्यक्रमाला या संघटनेची मदत व्हावी. तिचें कार्य आयुर्वेद यशोमंदिराचा पाया व्हावा व जिल्हा शाखेच्या सत्य, शिव, व सर्वतोपरि सुंदर अशा कार्याला वृद्ध वैद्यांचा आशीर्वाद असावा."

शुभसंदेश व मार्गदर्शन

वै. भोगे यांनीं आलेले संदेश वाचून दाखविले. प्रां. मंडळाचे अध्यक्ष जळूकरशास्त्री, भूतपूर्व अध्यक्ष व नागपूर विद्यापीठांतील आयुर्वेद संशोधन प्रमुख वैद्यराज वेणीमाधवशास्त्री, वैद्यराज वि. म. गोगटे नाशिक, खानदेश जि. शाखेचे अध्यक्ष वै. म. त्र्यं वैद्य, वै. मावळंकरशास्त्री यांचे संदेश आले होते. " सर्वांनीं या जिल्हा शाखेला सुयश चिंतून प्रत्येक जिल्ह्यातील वैद्यांना ही जिल्हा शाखा स्फूर्तिदायक ठरावी, अशी इच्छा व्यक्त केली.

वैद्य ना. ह. जोशी यांनीं असें सांगितलें कीं, " सर्वांनीं जास्तीत जास्त सभासद करण्याचा प्रयत्न करावा. संघटनेचीं साधनें, तिचें कार्य व तिची विचारप्रणाली यांचा पूर्ण विचार करून नंतर कोणत्याहि संस्थेचें सभासद होण्याची दक्षता प्रत्येकानें घ्यावी. मुंबई नगरपालिकेचा जो बृहन् मुंबई विभाग आहे तोच जिल्हा शाखेचा असावा व प्रां. मंडळाचा सभासदच या शाखेचा सभासद व्हावा."

वै. लक्ष्मीबाई बोरवणकर, वै. ज. रा. जोशी, वै. रामभाऊ भोगे यांनीं जिल्हा शाखेनें आपली सर्व शक्ति " आयुर्वेद अभ्यास मंडळ " स्थापन करून तें यशस्वी करण्याकडे खर्च करावी असें प्रतिपादन केलें. यानंतर अध्यक्षांनीं जिल्हा शाखा स्थापन झाल्याचें टाळयांच्या गर्जनेंत प्रकट केलें.

वैद्यराज वामनरावजी दिनानाथ, अ. महागुजरात वैद्यमंडळ यांनीं आशीर्वादात्मक भाषण केलें. शाखेचे अभिष्ट चिंतून त्यांनीं असें सांगितलें कीं, " आपला उपक्रम स्तुत्य आहे. सर्व संस्थांच्या एकीकरणामुळें या शाखेची प्रगति व्हावी व भरीव असें आयुर्वेदाचें कार्य या शाखेनें करावें. आमची सर्वतोपरि आपणाला मदत होईल.

१५ सदस्यांचें कार्यकारी मंडळ

सभेनें १५ सदस्यांचें कार्यकारी मंडळ निवडून घटनां तयार करण्याचें कामहि कार्यकारी मंडळावर सोपवलें.

डायरेक्टर नेमणुकीबद्दल अभिनंदन

मंडळाच्या अनेक वर्षांच्या मागणीप्रमाणें मुंबई राज्य सरकारनें आयुर्वेदीय कार्यासाठीं वैद्यराज हरिदत्तशास्त्री आयुर्वेदाचार्य यांची "डायरेक्टर ऑफ आयुर्वेद" म्हणून नेमणूक केली त्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव अध्यक्षांनीं मांडला. त्यानंतर वैद्य ना. ह. जोशी व वैद्यराज वामनरावजी (अध्यक्ष, शुद्ध आयुर्वेद समिति) यांचीं अभिनंदन-पर भाषणें होऊन सभेनें ठराव सम्मत केला.

वैद्य दे. ल. आनन्दे (जे. पी., म्युनिसिपल कौन्सिलर) शाखाध्यक्ष यांनीं सर्व सभासदांना सहकार्याची विनंति करून जिल्हाशाखेप्रमाणें तालुका शाखा लवकरच स्थापन करण्यांत याव्या, अशी इच्छा व्यक्त केली. सभाध्यक्षांचे आभार मानून त्यांना पुष्पगुच्छ देण्यांत आला.

नवीन कार्यकर्त्यांना आवाहन

अध्यक्ष आपल्या समारोपाच्या भाषणांत म्हणाले कीं, मीं आतां वृद्ध झालो आहे. ज्या मंडळाचा मी अध्यक्ष होतो, त्या मंडळाची जिल्हा शाखा माझ्याच अध्यक्षतेखालीं स्थापन होण्याचा सुयोग लाभला याबद्दल मला अत्यंत आनन्द होत आहे. मला सांगाल तें कार्य करण्याची माझी तयारी आहे. मात्र आतां पुढील कार्यासाठीं नवीन कार्यकर्त्यांनीं पुढें आले पाहिजे; तरच हें आयुर्वेदाचें कार्य जोरानें चालेल.

नागपूर येथें
'आयुर्वेद सेवा संघाचीं' सर्व प्रकारचीं
गुणकारी औषधें मिळण्याचें ठिकाण–
श्री. माधवराव परांडे
आयुर्वेदीय औषधांचे व्यापारी
महाल रोड, नागपूर

वैद्य कानिटकर यांनीं उपस्थितांचे आभार मानले व सभेचें कार्य समाप्त झालें. सभा अत्यंत शांततेनें व ठरल्या वेळांत समाप्त झाली.

म. प्रां. वैद्य मंडळाची

बृहन् मुंबई जिल्हा शाखा

कार्यकारी मंडळ

१ अध्यक्षः— वै. दे. ल. आनंदे (जे. पी. म्यु. कार्पोरेटर).

उपाध्यक्षः— [१] वै. रामभाऊ भोगे, [२] वै. ब. ल. वष्ट, [३] वै. बी. एस्. शितोळे, [४] वै. रामभरोसे उपाध्याय.

संयुक्त चिटणीसः— [१] वै. लक्ष्मीबाई बोरवणकर, [२] वै. रा. ना. आंबे.

खजिनदारः— वै. भाऊसाहेब सांडू

सभासदः— (१) वै. नारायण शिंदे, (२) वै. वि. म. पारकर, (३) ना. ह. जोशी, (४) वै. व्ही. डी. शिंदे, (५) वै. मोहनराव शिंदे, (६) वै. श्री. कृ. चन्हाटकर, (७) वै. अ. शा. बळसासी.

शहर वैद्य मंडळ, सिन्नर

या मंडळाच्या ता. १३।११।५४ च्या सभेंत पुढील प्रस्ताव मंजूर झाला व तो म. प्रां. वैद्य मंडळातर्फे मुंबई सरकारकडे रवाना केला आहे.

मुंबई सरकारला विनंति

ठराव—मुंबई सरकारनें मान्य केलेला आयुर्वेदीक पाठ्यक्रम ज्या विद्यालयांतून व मान्यगुरुकडे शिकविला जात असेल त्या विद्यार्थ्यांना, गुरुंना आणि विद्यालयांना आर्थिक व इतर आवश्यक तें सर्व साह्य करावे' अशी मुंबई सरकारास विनंति आहे.

मुंबई सरकार इकडे लक्ष देईल काय ?

१८ आक्टो. १९५४ रोजीं क्विलन येथील आयुर्वेदीय रुग्णालयाच्या उद्घाटनप्रसंगीं स्वास्थ्यमंत्री श्री. पी. के. कुंजु म्हणाले कीं, " त्रावणकोर-कोचीन सरकार आयुर्वेदीय चिकित्सापद्धतीला जास्तींत जास्त प्रोत्साहन देऊं इच्छितें.

४ नवीं आयुर्वेदीय रुग्णालयें

"या वर्षीं ४ नवीं आयुर्वेदीय रुग्णालयें व १४ नवीन आयुर्वेदीय दवाखाने प्रांतांत सुरूं व्हावयाचे आहेत. आयुर्वेदशास्त्र प्रोत्साहन देण्यास योग्य असेंच आहे, कारण त्यानें आजपर्यंत लक्षावधि जनतेची बहुमोल सेवा केली आहे. केवळ तें आपलें आहे म्हणून त्यास प्रोत्साहन द्यावयाचें असें धोरण नाहीं.

आयु. चिकित्सालयासाठीं १ कोटी रु.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ५४८ ग्रामपंचायतींच्या प्रदेशांत प्रत्येक पंचायतीस एक आयुर्वेदीय चिकित्सालय सुरूं करण्यासाठीं १कोटी रुपयांची तरतूद करण्याची भरीव योजना अन्तर्भूत केलेली आहे."

आमच्या सरकारचीं उत्तरें

शुद्ध आयुर्वेदाला मान्यता दिल्याबद्दल मुंबई सरकारला धन्यवाद दिले जातात. पण त्या धन्यवादांना दिलेलीं उत्तरें व वरील वार्ता यांची तुलना केली म्हणजे मात्र वाटतें कीं, ' खरें प्रेम ' व ' मानभावी प्रेम ' हीं जगांत अस्तित्वांत आहेत. " आम्ही फक्त मान्यता दिली, आर्थिक वा कोठलीच मदत आम्ही करणार नाहीं, " असें आमचें सरकार म्हणत आहे. तर त्रावणकोर-कोचिनसारखें सरकार वैशिष्टयपूर्ण सक्रिय उद्गार काढीत आहे. ते प्रांतीय-सरकार तसें कां करूं शकतें ? याला उत्तर एकच ! " पाहिजे तो कळवळा, मग बळा काय उणे ? "

वरील वृत्त बंगाल प्रांतांतील आयुर्वेदाच्या स्टेट फॅकल्टीतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'आयुर्वेद' (बंगाली व इंग्रजी) मासिकांत प्रसिद्ध झालें आहे.

दोघांच्या कार्यांतील फरक

बेंगॉलची ही फॅकल्टी स्वतःचें उत्कृष्ट मासिक चालविते. वेळोवेळीं सरकार जाहीर करीत असलेली माहिती प्रसिद्ध करते. शास्त्रीय व व्यवहारोपयोगी लेख आयुर्वेदीय जनतेला पुरवते !

मुंबईच्या फॅकल्टीचे व बोर्डाचे कारभाराची माहिती आयुर्वेद पत्रिकेंत नाहींतर अन्य विद्यालयीन मासिकांतून केव्हांतरी येते. बोर्डाचें स्वतःचें मासिक नाहीं.

—आयुर्वेदाचार्य श्री. कृ. कंरमरकर

सांडू
डायाबेटॉल
मधुमेहावर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्सः —
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते—मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

आयुर्वेदीय औषधी संशोधन
लेखकः—वैद्य पु. वि. धामणकर, आयुर्वेदभूषण
मराठी वां हिंदी आवृत्ति. किंमत १ रु.
मिळण्याचें ठिकाणः—
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

रिन्यूअल फीसंबंधीं कायदा व आमचें कर्तव्य !

आयुर्वेदाचार्य श्री. कृ. करमरकर
रजिस्टर्ड आयुर्वेदिक प्रॅक्टिशनर

रजिस्टर्ड वा एनलिस्टेड आयुर्वेदिक प्रॅक्टिशनर्सनीं दर तीन वर्षांनीं ५ रु. रजिस्टेशन फी भरण्याबाबतचा कायदा सरकारनें परभारें पास करून घेतला व गॅझिटहि करून प्रसिद्धीसाठीं सर्वत्र पाठविला.

बोर्डाचा खर्च भागविण्यासाठीं फी

गेल्या खेपेस अगदीं प्रथमतः ज्यावेळीं रिन्युअल फी आकारली गेली, त्यावेळीं अशा तऱ्हेची फी नसावी म्हणून आम्ही हाकाटी केली, व त्यावेळीं "आपल्याकरितां बोर्ड पाहिजे व बोर्डाचा चालू खर्च भागला पाहिजे म्हणून एकवेळ तरी रिन्युअल फी भरावी" अशी आपण निवडून दिलेल्या बोर्ड-सदस्यांपैकीं कोणीतरी विनंति केली. आपण ती त्यावेळीं मान्य केली. पण आतां ज्यावेळीं आमच्या मौनत्वाचा फायदा घेऊन कायदा करून आमच्यावर कायमचा हा कर लादण्यांत आला आहे, त्यावेळीं सर्व कर भरणारांनीं संघटितपणें आपला आवाज उठविणें हें आपलें कर्तव्य आहे.

आयुर्वेदाच्या बोर्डांत डॉक्टर नकोत

"बोर्ड आम्हाला पाहिजे ! पण बोर्डांत आमचे संपूर्ण सभासद पाहिजेत. वैद्य पाहिजेत ! इतर डॉक्टर अध्यक्ष वा कायद्याचे सल्लागार इ. कोणीहि आमच्यांत नको. आम्ही निवडून दिलेल्या प्रतिनिधींना आम्ही दिलेल्या पैशाचा योग्य वापर करण्याची संधि मिळाली पाहिजे. ती बोर्डाच्या चालू घटनेंत मिळत नाहीं. म्हणून यापुढें बोर्डाकडे केवळ कायदा म्हणून रिन्युअल फी भरतांना, बोर्डावर सर्वस्वी वैद्यच सभासद असतील तर आम्ही फी भरूं, नाहींतर भरणार नाहीं" अशा स्पष्ट शब्दांत बोर्डाकडे व आरोग्यमंत्र्याकडे प्रत्येकानें कळवावें, हें आपलें कर्तव्य आहे व त्याप्रमाणें सर्वजण करतील अशी आशा आहे.

चेहऱ्यावरील पुळ्या !

रक्तशुद्धीकरितां
नांवाजलेलें "रक्तदोषांतक" घेऊन
आपणांस हा त्रास वांचवतां येईल.

रक्त-दोषांतक

"आफालि"
आपल्या विश्वासाचें
प्रतीक

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड (आफालि) अहमदनगर.

EVEREST R. 53:4.

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नासिक

(आयुर्वेद पत्रिका पान नं. ३७९ पासून पुढें चालूं)

त्यानंतर वैद्य वि. म. गोगटे यांचें भाषण झालें. ते म्हणाले: —आचार्य वेणीमाधवजींचा व माझा ग्रहणीविषयक कल्पनांमधील मतभेद फार जुना आहे. शिरपूर येथील संयुक्त खानदेश वैद्यमंडळाच्या संमेलनांतहि तो मांडण्यांत आला होता. फक्त वाग्भटाच्याच वचनांचा आधार घेऊन ' ग्रहणी ' या अवयवाचें स्थान, कार्य, द्रव्य व गुणकर्म आपण पाहूं.—

१) ' ग्रहणी ' या शब्दावरूनच ' ग्रहण करणारा व सोडणारा ' या अर्थानें २ द्वारें असलेला हा अवयव असला पाहिजे, हें स्पष्ट होतें.

२ ग्रहण्या: बलमग्निर्हि । स चापि ग्रहणीबलः । अग्नि व ग्रहणी या दोघांचा घनिष्ट संबंध असला पाहिजे.

३) वाग्भटानें पक्वाधान व पक्वाशय हे दोन्हीं निराळे केलेले नाहींत (पक्वाशय कटी........... स्थानं वातस्य तत्रापि पक्वाधानं विशेषतः ॥

४ पक्वं सृजति पार्श्वतः । सृजन करण्यापूर्वीं ' बंधन ' असावयास पाहिजे.

५ बस्तीसाठीं पक्वाशयाची मर्यादा थोडी नाहीं, फार मोठी आहे. स्थिता पक्वाशयद्वारि—पक्वाशयाचें द्वार कोणतें ?

६) अधः नयति म्हणजे, आंतडींच्या अधोभागीं नेतो. या सगळ्या दृष्टीनें पहातां डिओडिनमपासून इलियोसिकल व्हाल्वपर्यंतचा सर्व भाग म्हणजे ग्रहणी होय.

या पूर्वपक्षावर वेणीमाधवशास्त्री यांनीं उत्तर दिलें तें असें. —' नामतः ग्रहणी आहे हें जर मान्य करावयाचें तर ग्रहणीची मर्यादा शेवटपर्यंत घेतली पाहिजे. पचनकार्य शेवटपर्यंत चालूं आहे. पाणीहि शोषले जावें लागतें ! शोष्यमाण अग्नीचें तें कार्य आहे.'बस्ति हा वामपार्श्वावर चांगला लागूं होतो, व पुरीषाशय व पक्वाशय निराळा आहे. मल पिंडित झाल्यावरच वायु निर्माण होतो. पुरीषधराकला व मलधराकला यांत थोडा फरक आहे. शारीर अवयवांच्या निर्णयाबाबत ' शारीरे सुश्रुतः श्रेष्ठः ' हें मानलेंच पाहिजे. तरच सगळ्या प्रश्नांचा उलगडा होतो.

नन्तर वैद्य अंतरकर मुंबई यांचें भाषण झालें.तें म्हणाले:-पित्तधराकला व ग्रहणी हे एकाच अवयवाचे बोधक आहेत. ' सैव ग्रहणी मता' पित्ताशयाची मर्यादा पित्तधराकलेच्या संपूर्ण व्याप्तीपर्यंत आहे. पित्तधराकलेचें कार्य पक्वशयांत नाहीं. पित्ताचें प्रमुख कार्य आंत्रांत (स्मॉल इंटेस्टाइनमध्येंच) आहे. म्हणून ग्रहणीची मर्यादा स्मॉल इंटेस्टाइन पुरतीच आहे. आशय–म्हणजे अवस्थानप्रदेश. चरकाचा आमाशय स्टमक व आमाशयाचा अधोभाग पित्ताशय म्हणजे स्मॉल इंटेस्टाइन. आमाशयाचें कार्य झालें तरच पुढें पित्तानें सम्यक् जरण होतें. स्मॉल इंटेस्टाइन्स ही ग्रहणी नाहीं. तर त्याच्या कलाविभागाला ग्रहणी म्हणतात. पाचन कार्य हें पित्तानेंच होतें, व तें पित्ताशयांतच होतें.पक्वाशयाचा व वन्हीचा संबंध फक्त एका वाक्याखेरीज नाहीं. म्हणून पक्वाशयांत वन्हि आहे, असें म्हणतां येणार नाहीं. म्हणून पित्तधराकला पक्वाशयापर्यंत जाऊं शकत नाहीं. अर्थातच ग्रहणीची मर्यादा पक्वाशयापर्यंत नाहीं. ग्रहणीरोगाच्या दृष्टीनेंहि विचार करतां, पक्व किंवा अपक्व असा अन्नांश रोग्याच्या मलांत असतो. सारभाग ग्रहण करण्याचें कार्य स्मॉल इंटेस्टाइनमधील कलाच करते. म्हणूनहि ग्रहणीची मर्यादा पायलोरिक एन्ड ते इलियोसीकल व्हाल्वपर्यंत आहे असें माझें मत आहे.

पं. वेणीमाधवशास्त्री यांचें उत्तर

वै. अण्णासाहेब गोगटे यांना जें उत्तर तेंच वै. अंतरकर यांना. थोडासा दृष्टिभेद वैद्य अंतरकर यांनीं मांडला. तो म्हणजे अग्निकार्याच्या स्थानमर्यादेसंबंधीं. पाचकपित्ताचेंच स्थान=ग्रहणी असा आग्रह कां पाचन, शोषण इ. सर्व कार्य समानाचें सर्व कार्य, म्हणजे ग्रहणीचें कार्य आहे. म्हणून सर्व प्रकारचें शोषण ज्या भागांपर्यंत होतें, त्या भागापर्यंत ग्रहणीची मर्यादा घ्यावयास पाहिजे.

वैद्यराज वि. म. गोगटे:— इलियोसीकल व्हाल्वपर्यंतच ग्रहणीचें प्रधान कार्य आहे. पुढचें कार्य महत्वाचें नाहीं. कोलेस्टॉमी केली तरी मनुष्य जिवंत रहातो.

वैद्यराज वेणीमाधवशास्त्रींचें उत्तरः— डिओडिनम कापलें तरी मनुष्य जिवंत रहातो. तेव्हां वरील मुद्दा उपयोगी पडत नाहीं.

पं. डेग्वेकरशास्त्री म्हणाले:— पं. वेणीमाधवशास्त्रींच्या मताप्रमाणेंच इतरांचीहि ग्रहणीबद्दलचीं मतें प्रसिद्ध करावीत, म्हणजे साधकबाधक चर्चा होऊन निर्णय होऊं शकेल.

नंतर म. प्रां. वैद्य मंडळाचे अध्यक्ष वैद्यराज जळूकरशास्त्री म्हणाले:— आतांपर्यंतच्या प्रश्नोत्तरावरून आयुर्वेदीय शारीरविषयक संज्ञांपैकीं स्त्रीलिंगी संज्ञाच व्यवहारांतील स्त्रीप्रमाणें वादाला कारणीभूत झालेल्या दिसतात. उदाहरणार्थ, ग्रहणी, धमनी, सिरा, कला इ....... असो !

पूर्वपक्षानें पक्वाशय निश्चित करून मग ग्रहणी निश्चित केली. कारण 'पक्वामाशयमध्यस्था'. ग्रहणीचें कार्य वर्णन करतांना, अपक्कं धारयत्यन्नं पक्कं सृजति पार्श्वतः ।' असें वर्णन केलें आहे. यावरून ग्रहणींत अन्न पक्व होईपर्यंत सृजन नाहीं, हें स्पष्ट आहे. व पचन हें फक्त ग्रहणींत आहे. पुढें पचन नाहीं. पुढील कार्य अग्नीचें आहे पण तेथें पचन नाहीं. तर 'शोष्यमाणत्व' आहे. तें कार्य समानवायूच्या कार्यांत सांगितलें आहे. पचति विवेचयति मुंचति ! म्हणून माझ्या मतें इलियोसीकल व्हाल्वपर्यंतच ग्रहणीची मर्यादा घेणें इष्ट वाटतें. धारण केलें जातें तेथपर्यंतचाच भाग घ्यावा.

वैद्यराज एकतारेशास्त्री:—त्रिविधशिष्यबुद्धिहित असा निर्णय घ्यावा. सगळीं कार्यें ज्या ठिकाणीं तेवढाच भाग घ्यावा. ९ इंची डिओडिनम पुरता भाग—यांत अग्निसंयोग फक्त आहे. पण खरें पचन कार्य, धातुपोषणकार्य स्मॉल इंटेस्टाइनभर आहे. डिओडिनमच्या भागांत सर्व पचन नाहीं. शोषण होण्यास लायक बनण्याची परिस्थिति फक्त लहान आंत्रांत आहे. पुढचा भाग अतिव्याप्त आहे. पण थोड्याशा कार्यांपुरताच तो मर्यादित आहे. पाण्याचेंच फक्त शोषण होतें. व कांहीं थोड्या द्रव्यांचें ! मधल्या भागांत मात्र पचन सर्व प्रकारचें आहे. म्हणून मधल्या भागालाच ग्रहणी म्हणावें हें युक्त.

वै. बिंदुमाधवशास्त्री पंडित:— सर्व आंत्राच्या मधल्या भागालाच ग्रहणी म्हणावें ! निसर्गानें सुद्धां रोधनासाठीं हा मधला भाग [लहान आंतडी] वरच्या आमाशय, व खालच्या मोठी आंतडी भागापेक्षां संकुचित ठेवला आहे. बारीक केलेला आहे, पाचनकार्य सर्वत्र असलें तरी आमाशय कफदृष्टीनें, व पक्वाशय वाताच्या दृष्टीनें प्रधान आहेत. म्हणून पित्ताचे दृष्टीनें स्मॉल इंटेस्टाइनलाच ग्रहणी म्हणावें.

अध्यक्ष पं. वेणीमाधवशास्त्री:— ग्रहणीसंबंधीं आपल्यापुढें २ भाग आहेत. (१) वचनांचा भाग (२) यापुढें व्यवहारार्थ आपण ठरवावयाचा भाग. दोषधातुमलासंबंधीं ज्याप्रमाणें विशेष संकेत आपण ठरविला त्याप्रमाणेंच या परिषदेपुरता " आमाशयाच्या अधोबंधापासून, लहान आंत्र व मोठें आंत्र यांच्या संगमाशीं असणाऱ्या बंधापर्यंत, ग्रहणी मानावी. " असा निर्णय घ्यावा.

024510

प्राणाचार्य गोडबोलेशास्त्री, (झांशी) यांनीं पुढील मांडणी दर्शविली:—

- ग्रहणी
  - ऊर्ध्वग्रहणी (डिओडिनमपर्यंत)
  - मध्यग्रहणी
    - परिवेष्टितग्रहणी (स्मॉल इंटेस्टाइन)
    - परिवेष्टनीग्रहणी (स्थूलांत्र, उण्डुक)
  - संग्रहणी (रेक्टम) .

आयुर्वेदाचार्य श्री. कृ. करमरकर यांनीं, १३-१०-५४ रोजीं दुपारीं, वैद्य अंतरकर [मुंबई] व वैद्य प्र. वा. दातार [नाशिक] यांचे सहाय्यानें बोकडाच्या शरीराचें क्रमशः संपूर्ण विच्छेदन करून शारीर अंगोपांगांचें प्रात्यक्षिक देता येतें, हें दाखविलें. हें कार्य ६ तास चालू होते.

दि. १४।१०।५४ रोजीं सकाळीं वैद्य करमरकर यांनीं शारीराच्या अध्यापनाची एक दिशा दाखविली. ते म्हणाले " प्रत्यक्ष दिसणारे अवयव व शास्त्रांत सांगितलेल्या गोष्टी यांचा उपयोग शारीर-विज्ञानार्थ करावयाचा असतो. आयुर्वेदीय शारीर म्हणजे केवळ प्रत्यक्ष शारीर नाहीं. तर त्यांत प्रत्यक्ष शारीर, मनोविज्ञान, इंद्रियविज्ञान, आत्मज्ञान, भौतिक, व गर्भावक्रांति इ. सगळ्याचा समावेश आहे. चिकित्सेला उपयुक्त असें शारीर तेवढेंच ग्रंथांत प्रामुख्यानें सांगितलेलें आहे. गर्भनिर्मितीपासून प्रसूतिपर्यंत सर्व ज्ञान आयुर्वेदीय शारीरांत येतें. शारीराबाबत सुश्रुतच श्रेष्ठ मानला पाहिजे."

वैद्य करमरकरांचें विवेचनानन्तर वैद्य अंतरकर यांनीं शारीरविज्ञान या विषयाच्या अभ्यासक्रमांतील विषय थोडक्यांत पुढीलप्रमाणें सांगितला:—

पेशी:— 'पेशी' याचा अर्थ मांसखण्ड Belly of the muscle हाच आहे, आवरण असा नाहीं. सबंध हाडावर लेपाप्रमाणें असणारे मांसाचे निरनिराळे संघात (पेशी) वायू निर्माण करतो. पेशी='मांसावयव-संघातः परस्परप्रविभक्तः पेशीति उच्यते' अशी स्पष्ट व्याख्या डल्हणाचार्यांनीं दिलेली आहे. शिवाय अनुप्रविश्य पिशितं पेशीर्विभजते तथा। असें सुश्रुतवचन आहे. पिशित म्हणजे मांस, व पेशी म्हणजे मांसखण्ड; परस्पर-प्रविभक्त नसतांना गर्भशरीरांतील मांस ' पिशित ' असते. तेंच विभक्त झालेलें असतें तेव्हां पेशी होत. पेशीचे आकार बहल, पेलव इ. दिलेले आहेत; ते पाहिले असतांहि 'पेशी' म्हणजे आवरण नसून मांसखण्डच आहे हें कळून येईल.

स्नायुः-मेदसः स्नेहमादाय शिरास्नायुत्वमाप्नुयात्। वायु हा कर्ता. तो मेदाचा स्नेह घेऊन सिरा व स्नायु तयार करतो. मृदुपाकानें सिरा व खरपाकानें स्नायू. संधी म्हणजे अस्थिसंधी. ते स्नायूंनीं एकत्र बांधले गेलेले आहेत. लिगॅमेंटस् म्हणजे स्नायूच होत. प्रतानवती स्नायू संधीच्या ठिकाणीं व शाखेंत असतात. गोलस्नायू= कंडरा. मांसाला बन्धन करून ठेवण्याचें कार्यहि स्नायु करतात. Muscle मधील शणाकार ताग्याच्या धाग्याप्रमाणें असणारा भाग स्नायू व इतर भाग मांस होय. मसलची टेंडन्स् शणाकार असतात. ते स्नायू व बेली हें मांस होय. संधिबंधनाचें कार्य पेशीमध्यें (मांसांत) नाहीं, ते स्नायूंचेंच आहे. टेंडनमध्यें-स्नायूंत वेदना फार व तेथील जखम भरून येण्यास फार वेळ लागतो. म्हणून शल्यतंत्रांत स्नायूंचें महत्व फार सांगितलें आहे. आयुर्वेदीय स्नायु हा ॲलोपॅथीचा फायब्रस टिशू असून त्यांत लिगॅमेंटस्, टेंडेन्स, रेटिनॅक्यूला; ॲपॉनुरोसिसच, डीपफेशिया इतके सगळे प्रकार येतात.

अस्थिविज्ञान— अस्थींची संख्या शिकवितांना विवेक करावा लागतो. श्रोण्यां पंच— नितंबास्थि (२) भगास्थि (१) गुदास्थि (१) त्रिकास्थि (१.)

पृष्ठे त्रिंशत्— खालच्या पृष्ठकशेरुकाः १० + कटिकशेरुका ५ + यांच्यामधलि तरुणास्थि १५ मिळून ३०.

. झर्झरास्थि, जतूकास्थि, अश्रुपीठास्थि, शुक्तिकास्थि, सीरिकास्थि, कंठिकास्थि, हीं नांवें वर्णन न केलेल्या अस्थींकरता श्री. गणनाथसेनांनीं आपल्या ‘ प्रत्यक्षशारीर ’ या ग्रंथांत वापरलीं आहेत तीं पहावीं.

पर्शुकास्थि ७२ म्हणजे २४ फासळया व त्यांची टेंगळें (स्थालकार्बुदानि) २४ स्थालक, २४ मूलसंलग्न.

तलकूर्चगुल्फसंश्रितानि दश— ५ शलाका, क्युनिफॉर्म १, क्युबॉइड १, नॅव्हिक्युलर १, टेलस १ कॅल्केनियम् १.

सिराधमनिस्रोतसः— सिरांचा वेध करावयास सांगितला. वेधनीय (Veins) नीला. सिरा रोहिणी, नीला, गौरी व अरुणा. यापैकीं रोहिणी= आर्टरी, नीला= व्हेन, गौरी= लिंफॅटिक्, अरुणा ? (कॅपिलरी)

सिरा नाभीतून उगम पावतात. पोषणात्मक कार्य त्यांचें आहे. त्या सर्वदोषवहाः आहेत.
(Vascular system)

धमनी नाभीपासून उगम पावतात. रस गोळा करवितात. प्रेरणा करतात. पंचेंद्रियं पंचसु भावयंति. स्वतःसाठीं त्यांचें कार्य आहे. ज्ञान करविणें व प्रेरणा देणें. (नर्व्ह)

स्रोतस्—मूलात् खात् अंतरं (पोकळी आहे.) ‘ सिराधमनिवर्जितं । अभिवहनं या पोकळींतून होतें. जल, वायु, अन्न इ. वाहक.

[‘ धमन्यो नाम केवलवातवाहिन्यो ’ असें वचन याज्ञवल्क्यस्मृतींत सांपडतें असें प्राणाचार्य गोडबोलेशास्त्री म्हणाले.]

सिरांमुळें असंशय असें स्पर्शज्ञान होतें. नुसतें स्पर्शज्ञान धमनीमुळें.

मर्मविज्ञानम्— सुश्रुतोक्त मर्मांचे प्रकार, प्रत्येक मर्माचें शरीरावरचे स्थानाचा निर्देश करून वैद्य अंतरकर यांनीं स्पष्ट केलें. हें विवेचन अतिशय बोधक मर्मविज्ञानाचें मर्म उकलून दाखविणारें झालें. प्रत्यक्षाचाच हा विषय असल्यामुळें हें मर्मस्थल म्हणजे अमूक स्थान हें सांगणें हेंच विवेचन आहे असें त्यांनीं सांगितलें. विशिष्ट स्थान मर्मस्थान होण्यास त्या ठिकाणीं सिरास्नायुधमनिस्रोतसांचा सन्निपात कसा झाला आहे तें त्यांनीं सांगितलें.

याप्रमाणें शारीरविज्ञानाच्या विषयांतील मनोविज्ञान व इंद्रियविज्ञान या खेरीज सर्व विभागावर चर्चा झाली. वैद्य नाटेलीकर यांनीं या मर्मज्ञानाचा प्रत्यक्षांत किती उपयोग होतो ? अशी शंका विचारली. वैद्य अंतरकर म्हणालेः— सद्यःप्राणघातक मर्मांचा अतिशय उपयोग होतो उरउदरांचीं मर्मे, शृंगाटक मर्म ह्यांचा अनुभव येतो.

वैद्य वेणीमाधवशास्त्री म्हणाले–क्षिप्रमर्माचा उपयोग व्यवहारांत विंचू उतरविण्याकरितां तावडतोब होतो. नंतर अध्यक्षांनीं पुढीलप्रमाणें या विषयाचा समारोप केला. अध्यक्ष म्हणालेः— “ वैद्य करमरकर व वैद्य अंतरकर यांनीं दोन दिवस पुष्कळ परिश्रम करून आयुर्वेदीय शारीरविज्ञानावर चांगला प्रकाश पाडला आहे मिश्र शिक्षणांतूनहि ज्याप्रकारें चांगलेंहि निर्माण होण्याची माझी आशा होती, त्याप्रकारें हे दोघे होतील. ते अधिक अभ्यास करतील. वै. गोडबोलेशास्त्री यांचें साहाय्य त्यांना होईल. चरकाच्या त्रिमर्मीय अध्यायांत

भारी ५

उन्माद अपस्मारादि विकारांत कशीं इंद्रियें विकल होत असावींत यांचा अभ्यास त्यांनीं करावा. पंचवायु व नर्व्हस सिस्टिम यांचा तुलनात्मक निबंध अभ्यासपूर्वक लिहावा. वैद्य करमरकर माझे शिष्यच आहेत. परन्तु वैद्य अंतरकरांचें मी हार्दिक अभिनंदन करतो. व त्यांनीं अधिक उत्साहानें आयुर्वेदाचा असाच अभ्यास चालू ठेवावा अशी त्यांना विनंति करतो.

ता. १५ रोजीं सकाळीं आयु. द. अ. कुलकर्णी, लखनौ यांच्या 'रसशास्त्र' या विषयावर झालेल्या भाषणानंतर वै. वेणीमाधवशास्त्री म्हणालेः-मी गुरुपरंपरेंतून शिक्षण घेतलें नसल्यामुळें आयुर्वेदाच्या या शाखेंत गुरु करावा अशी माझी फार इच्छा होती. व त्याप्रमाणें एकास मी गुरु मानलेंहि.पण माझ्या स्वभावदोषामुळें गुरुशीं माझें जमलें नाहीं. म्हणून ग्रंथ हेच माझे गुरु समजून औषधीकरणास प्रारंभ केला. व एकलव्या-प्रमाणें सुरवात केली. जसजसें यश प्राप्त होत गेलें तसतसा आनंद वाटत गेला. याच वेळीं एक विद्यार्थीहि मला उत्तम मिळाला होता. अभ्रकादींची जारणा केलेल्या पारदाचें भस्मच वीर्यवान् असें होईल हा आत्म-विश्वास आम्हाला वाटत होता- म्हणून पाऱ्यावर अष्टसंस्कार करावयास (नगरला) सुरवात केली होती. व त्यानंतर आतांहि नागपूरला पारदावरील संस्काराचेंच संशोधन करीत असल्यामुळें, या प्रश्नाचें यावच्छक्य उत्तर मी देईन. रसशास्त्रांतील माझी भूमिका थोडक्यांत आपल्यापुढें मांडल्यावर संस्काराचा अनुभव मांडतों. संस्काराकरितां हिंगुलोत्थ पारद घ्यावा. हिंगुलोत्थ पारद हा निर्दोष असतो. १०० तोळे हिंगुळां-तून ७५ तोळे पारा निघूं शकतो. अर्थात् हें प्रमाण हिंगुळाच्या प्रकारावर व महक्यावर अवलंबून आहे. रूमी हिंगूळ घ्यावा, दगडी हिंगूळ नको. हिंगुलोत्थ पारा मिळवितांना अग्नि किती दिला यालाहि महत्व आहे. किती उष्णतेनें सिसें (नाग) वरती येणार नाहीं हें ठरविणें महत्वाचें आहे. एकदां उडवूनहि नाग वरती येतें. मातीच्या भांड्यांत ऊर्ध्वपातन करणें युक्त. लोहाच्या भांड्यांत ऊर्ध्वपातन केल्यामुळें आधुनिक दृष्ट्या लोह + पारा यांच्या विशिष्ट संयोगानें होणारें द्रव्य त्यांत येणार. पण शास्त्रकारांनीं तप्त खल्व घ्यावयास सांगितला आहे. त्यामुळें आपण लोहपात्रेंहि घ्यावयास हरकत नाहीं.

आयुर्वेदाचार्य कुळकर्णी म्हणालेः— "लोखंडाचा खल मुळींच घऊं नये. लोखंडावर पाऱ्याचा जरी थोडा परिणाम दिसला तरी पाऱ्यांतून शिसें इ.चा परिणाम मात्र त्यांवर निश्चितपणें होतो. तीं द्रव्यें पाऱ्यांतून दूर होतील पण खलांत जरूर येतील. लोखंड हें अरिलोह आहे. तें कोणत्याहि धातूस आत्मसात् करणारच. दगडी खल घ्यावा हें उत्तम. शास्त्रकारांनीं कांतलोह सांगितलें आहे, पण तापविल्यावर त्यांत कान्तत्व रहात नाहीं. स्टेनलेस स्टीलचा घेतल्यास जस्त त्यांत असतें म्हणून तो नको. पण दगडी खल फुटतो. या शंकेचें उत्तर देतांना ते म्हणाले 'काल्चेट्टी' नांवाचे दगडी खल घ्यावे. (त्याच्या पूर्वी दगड्या करीत व त्या विस्तवावरहि टिकत असें वैद्य बिन्दुमाधव पंडित यांनीं सांगितलें.) 'पोर्सलीन खल (मॉर्टर) हा सर्वोत्तम. १५०० डिग्रीपर्यंत उष्णता सहन करतो." -श्री. कुळकर्णी

दगडी खल फुटतो कां ? सगळीकडे सारखी उष्णता लागत नाहीं म्हणून! इमारतीचे दगड सर्व-बाजूनें तापत असतांना फुटत नाहींत. '५००' चे वर उष्णता गेल्यास दगडी खल फुटेल. तप्तखलाकरितां खलाचें बूड पातळ असावें. कारण नुसता खल करावयाचा नाहीं. "खल तयार करतांना त्यांत स्टीम कॉइल्स घातले तर सर्व बाजूंनीं नीट उष्णता लागेल." (वेणीमाधवजी). यावर कुळकर्णीजी म्हणाले, "प्रथम आपण शास्त्रकारांनीं सांगितलेलेच प्रयोग अनेकवेळां करावेत. मग इतर शास्त्राप्रमाणें करावेत. मग रोग्यांत त्याचा परिणाम पाहावा व मग निर्णय घ्यावे. म्हणून शास्त्रकारांनीं दगडी खल सांगितला तोच आपण घ्यावा. पोर्सिलीनचा खल हा दगडी खलाप्रमाणेंच काम देईल.

ऊर्ध्वपातनानंतरहि घात कां आला ? १) कमी उंची २) किंवा नागाची वाफ होण्याइतकी उष्णता दिली. धातूंची वाफ फार कमी होते. म्हणून हिंगुलोत्थ पारदांत नागवंग येऊं नयेत. नॉर्मल हीट-७००° ते ८००° पर्यंत लाकडी अग्नीवर निर्माण होते. ७७०° चे वर पारा वर उडतो व वर जाऊन बसतो. त्या उष्णतेनें नाग वंग उडणार नाहींत. दुसरेंहि एक कारण असणें शक्य आहे. तें म्हणजे डमरू यंत्र फोडतांना हात इकडचा तिकडे लागला गेला असेल. थोडासा ट्रेस आला असल्यास पुढील स्वेदनमर्दनादि संस्कारांत निघून जाईल.

शंका— हिंगुळोत्थ पाऱ्यानन्तर खाली जें राहतें तें काय राहतें ? तें जड असतें. उत्तर–हिंगूळांतील शिसें असतें. म्हणून हिंगूळहि शुद्ध करूनच घेतला पाहिजे. बाजारांतला हिंगूळ कृत्रिम असतो. केवळ खानिज नाहीं. केवळ खानिज हिंगूळ मिळूं शकतो. पण त्याच्या नादीं आपण लागूं नये. कारण खाणींत मिळणाऱ्या हिंगुळांत पाऱ्याची मात्रा कमी असते. माझ्या मतें मर्कचा शुद्ध पारा घेऊन त्यांत गंधक मिसळून रससिंदूर करावा व त्यांवर शुद्धिसंस्कार करून डमरूयंत्रानें पारा काढून घ्यावा.

शंका – बाजारांतील हिंगुळ तलस्थ रससिंदूर वा ऊर्ध्वस्थ ? उत्तरः— ऊर्ध्वस्थच असतो मर्कच्या डबल डिस्टिल्ड पाऱ्यांत नाग- वंग नाहींत. मग आपण पुनः ऊर्ध्वपातन कां करावें ? अशी शंका निर्माण होईल. त्याचें उत्तर असें कीं, आपल्या पद्धतीप्रमाणें शुद्ध पारा – संस्कारित शुद्ध पारा-आपल्याला मिळावा. ‘ केमिकली प्युअर ’ पारा व संस्कारित पारा यांत केमिकली फरक नाहीं. पण गुणाचे दृष्टीनें फरक राहीलच. ” —कुलकर्णी

[अपूर्ण]

ग्राम सफाई शिबिर, सोमपुर

नाशिक जिल्ह्यांत बागलाण तालुक्यांतील कांही खेड्यांत सध्यां विकास योजनेचे कार्य चालूं आहे. मुंबई सरकारचे ग्रामसफाई विषयाचे सन्मान्य सल्लागार श्री. कृष्णदासजी शहा यांच्या नेतृत्वाखाली सोमपुर ता. बागलाण येथे ता. १२ ते २१ डिसेंबर दरम्यान ग्राम सफाई शिबिर भरलें होते. सॅनिटरी इन्सपेक्टर्स, सॅनिटरी सबइन्स्पेक्टर्स, व्हॅक्सिनेटर्स व ग्राम सेवक मिळून ९८ लोकांनी या शिबिरांत प्रत्यक्ष श्रम करून शिक्षण घेतले.

या दहा दिवसांच्या मुदतीत १८५ शोष खड्डे (सोकपिट्स), २ शोष नाल्या ६ गोपुरी संडास, ९ चराचे संडास, १६ मुताऱ्या, ६ सुधारलेले गोठे बांधले. २० बिन धुराच्या चुली घातल्या व १३६ उकीरडे साफ केले. ५ कंपोस्ट खताचे खड्डे भरले. ३७२६ फूट लांबीचे रस्ते दुरुस्त केले.

या शिबिरांत ता. १७ व १८ डिसेंबर रोजी वै. बिंदुमाधव पंडित यांची ‘ स्वास्थ्यासाठीं सुलभ वनस्पतीचा उपयोग कसा करावा? ’ या विषयावर ४ व्याख्यानें झालीं.

वैद्यासाठीं उपयुक्त ग्रंथ
ॲलोपॅथिक चिकित्सासंग्रह
सुमारें ७० रोगांवरील चिकित्सासूत्रें व ३४० प्रिस्क्रिप्शनें व इंजेक्शनें यांनीं युक्त. मराठींतील अभिनव ग्रंथ, आपल्या ॲलोपॅथिक ज्ञानांत वाढ होण्यासाठीं आजच मागवा. किं. ४॥ रु. ट. ख. निराळा.
१ वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक
२ डॉ. मोकाशी, ठाणें

भारी ८

आयुर्वेद संशोधन परिषद, मुंबई

निवेदन

श्रीयुत / श्रीमती ....यांशी विनंतिपूर्वक निवेदन करण्यांत येत आहे कीं मुंबईत 'आयुर्वेद संशोधन परिषदेची, स्थापना करण्यासाठीं पूर्व तयारी सुरू आहे. या परिषदेचें पहिलें अधिवेशन लौकरच मुंबईत होणार आहे.

ही परिषद यशस्वी होण्यासाठीं या परिषदत संशोधक व्यक्तींनीं भाग घेतला पाहिजे व आपल्या संशोधन कार्यांचा निष्कर्ष व अहवाल परिषदेकडे लिहून पाठविला पाहिजे ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. आपण या विनंतीचा स्वीकार कराल व ही परिषद सफल करण्यांत साहाय्यक व्हाल अशी आशा आहे.

संशोधनाचे मुख्य विषय

संशोधनाचे मुख्य विषय असे आहेतः—

१ वनस्पति २ रोग ३ आयुर्वेद सिद्धांत ४ मानव शरीर व पार्थिव द्रव्य ५ रस-रसायन ६ आयुर्वेदाचा इतिहास.

वरील विषयासंबंधीं अगर अधिक कांहीं माहिती पाहिजे असल्यास प्रारंभीं दिलेल्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

आपले नम्र

वैद्य शिवशर्मा
,, गजानन शर्मा
,, वामनराव दीनानाथ

वैद्य नानासाहेब पुराणिक
,, नारायण हरी जोशी
,, अन्तुभाई वैद्य

अधिकृत सूचना

१ सर्व निबंध आल्यानंतर १ महिन्याच्या आंत परिषद भरण्याची निश्चित तारीख जाहीर केली जाईल. मान्य झालेले निबंध या परिषदेंत वाचण्याची परवानगी वेळेनुसार दिली जाईल.

२ संशोधकांनीं आपला निबंध ३००० शब्दांत लिहावा त्यापेक्षां मोठा नसावा. निबंध मोठा असल्यास त्या सोबत त्याचा थोडक्यांत गोषवारा सांगणारा लेख पाठवावा.

परिषदेनंतर सर्व उत्कृष्ट लेखांचा एक ग्रंथ छापण्यांत येईल.त्याची एक प्रत लेखकाला मोफत दिली जाईल.

लेखकाचें संशोधन मान्य होण्यासाठीं रोगाचें संपूर्ण निदान (वैज्ञानिक प्रमाणासह) व प्रयोगाचा हितकर–अहितकर परिणाम व औषधी प्रयोगाचें वैज्ञानिक स्वरूप प्रगट केलें गेलें पाहिजे.

१ तोळ्याचें सुवर्ण–पदक देणार

पूर्वी सांगितलेल्या विषयापैकीं प्रत्येक विषयांत ज्याचा ज्याचा लेख सर्वोत्तम [उत्कृष्ट] ठरेल त्याला त्याला एकेक तोळा सोन्याचें सुवर्ण पदक दिलें जाईल. यामुळें भविष्यकालांत अशा संशोधकांचा उत्साह वाढेल.

संस्कृत, हिंदी, गुजराती, मराठी वा इंग्रजी यापैकीं कोणत्याहि एका भाषेंत लिहिलेला लेख [निबंध] स्वीकारला जाईल.

येणारे निबंध तपासण्यासाठीं एक समिति नेमली आहे. त्यांत पुढील व्यक्तींनीं काम करण्याचें मान्य केलें आहे.

पूज्य यादवजी त्रिकमजी आचार्य, वैद्य हरिदत्त शास्त्री, वैद्यराज भि. त्रि. डेग्वेकर, वै. पु. वि. घामणकर, वैद्य वल्लभरामजी, वैद्य लक्ष्मीशंकर रामकृष्ण शास्त्री, वैद्य नागरदास मोहनलाल पाठक, वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी. इतर विद्वानांशीं पत्र–व्यवहार चालू आहे.

निबंध कोणत्या विषयावर लिहाल अगर लिहित आहात तें आपण ११-१-५९. पर्यंत पुढील पत्त्यावर लिहून कळवावें. वैद्य वामनराव दीनानाथ ४५ कॅथेड्रल स्ट्रीट मुंबई२

आयुर्वेद संशोधन परिषद, नियम

१ संशोधनासंबंधींचा लेख ३००० पेक्षां अधिक शब्दांचा असा नसावा.

२ संशोधनाशीं संबंध नसलेल्या अन्य विषयांची चर्चा या परिषदेंत होणार नाहीं.

३ परिषदेच्या अध्यक्षांच्या संमतीशिवाय कोणीहि व्यक्ति कोणत्याहि विषयावर चर्चा करूं शकणार नाहीं.

४ परिषदेचा कार्यवाहकांचा निर्णय हा शेवटचा व निश्चित समजला जाईल.

५ ज्या विषयावर संशोधन केलें असेल तो विषय पूर्णपणें सिद्ध (प्रमाणित) करावा लागेल. पूर्णपणें सिद्ध न होऊं शकणाऱ्या लेखाला मान्यता मिळणार नाहीं.

६ कमींतकमी १० रोग्यांवर उपयोजलेले प्रयोगच मान्य धरले जातील.

७ संशोधनाचा लेख विद्वत् समितीकडून तपासला जाईल व समितीचा निर्णय लेखकास कळविला जाईल.

संशोधनात्मक लेख स्वीकारण्याची तारीख २५ फेब्रुवारी १९५५ ही आहे.

कोणत्याहि संशोधनांत वापरलेल्या औषधाचें पूर्ण नांव व कृति यांची सविस्तर माहिती दिली नसल्यास तो लेख स्वीकारला जाणार नाहीं.

निबंध कागदाच्या एका बाजूवर व सुवाच्य व सुस्पष्ट अक्षरांत लिहिलेला असावा.

'अमृत महोत्सव' समारंभ

दि. २३।१२।५४ रोजीं श्रीमंत दानशूर प्रतापशेटजी यांचा "अमृत महोत्सव" ना. दादासाहेब मावळंकर यांचे अध्यक्षतेखालीं उत्साहपूर्ण वातावरणांत पार पडला. येथील स्थानिक वैद्य मंडळातर्फे शेटजींना पुष्पहार समर्पण केला. तसेंच संयुक्त खानदेश वैद्य मंडळातर्फे मानपत्रहि देण्यांत आलें.

- वै. श्रीकृष्ण शांताराम वैद्य
अमळनेर

वै. जायदे अमेरिका प्रवासनिधि समिति

सुप्रसिद्ध दन्तवैद्य जायदे हे फेब्रुवारींत अमेरिकेस जात आहेत. त्या प्रवासासाठीं निधि जमवावा म्हणून वरील समिति स्थापन झाली आहे. या समितीतर्फे प्रकट निवेदन प्रसिद्ध झालें आहे. समितीच्या अध्यक्षपदावर मान्यवर श्री. आर्. एस्. हुक्केरीकर अध्यक्ष कौन्सिल ऑफ स्टेट (राज्य विधान-सभा) मुंबई, यांची योजना झाली असून श्रीमंत नानासाहेब (गं. वि.) पुराणिक (पनवेल-मुंबई) हे निधिसमितीचे सल्लागार आहेत. आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे [पुणें] व वै. मा. ग. शेंड्ये (पुणें) हे दोन मंत्री आहेत. कोषाध्यक्षपदीं वै. बिंदुमाधवशास्त्री पंडित, संपादक आयुर्वेद पत्रिका, यांना नेमण्यांत आलें आहे. या निधीसाठीं लहान मोठ्या देणग्या आनंदानें स्वीकारण्यांत येतील. देणगी पाठविण्याचा पत्ता:—

कोषाध्यक्ष, वै. जायदे अमेरिका प्रवासनिधि
C/o. आयुर्वेद पत्रिका नाशिक

आदर्श विद्यार्थी श्री. जायदे

अहमदनगर येथील आयुर्वेद महाविद्यालयाचे आयुर्वेदीय चिकित्सामंदिराचें उद्घाटन तेथील कलेक्टर श्री. देसाई यांच्या हस्तें झालें. आपल्या

भाषणांत श्री. म. वा. देसाई म्हणाले:—मी व हुबळाचे वैद्य पां. वि. जायदे हे हायस्कूलांतील वर्गबंधु आहोत. नगरच्या या आयुर्वेद महाविद्यालयाचे पदवीधर वैद्यराज जायदे यांनीं दंतविद्येचें विशेष अध्ययन करून आयुर्वेदाची कीर्ति भारतांत व परदेशांत वाढविली. येथील विद्यार्थ्यांनीं तो आदर्श आपल्या दृष्टीसमोर ठेवावा.

जाणत्या वैद्यांनीं या निधीस देणग्या पाठवून आरंभलेली ही योजना यशस्वी करावी-- मंत्री

सं. खानदेश वैद्य मंडळाचे

नवे अध्यक्ष

ता. ११-१२-५४ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेंत वैद्य बि. श्री. पाठक यांनीं पाठविलेला अध्यक्षपदाचा राजीनामा स्वीकारण्यांत आला व त्याजागीं पूर्वी उपाध्यक्ष असलेले धुळे येथील वैद्य भगवंतराव त्र्यंबक वैद्य यांची सर्वानुमतें अध्यक्ष म्हणून निवडणूक करण्यांत आली आहे, असें मंत्री श्री. चू. खं. चौधरी फैजपूर हे कळवितात.

महाराष्ट्र प्रां. वैद्य संमेलन, भुसावळ

निधिसमितीची स्थापना

ता. २५·१२·५४ रोजीं भुसावळ येथें पूर्वनियुक्त कार्यसमितीची व निमंत्रित वैद्यवर्यांची सभा भरली होती. सभेंत तालुकावार निधिसमितीची निवड करण्यांत आली. शिवाय चालू कार्यासाठीं-

वैद्य ब्रह्मदत्तशर्मा, भुसावळ- कार्याध्यक्ष
वैद्य चू. खं. चौधरी, फैजपूर-कार्यमंत्री
वैद्य भगवंत त्र्यंबक वैद्य धुळें- ,,

कविरा का. सी. भावे फैजपूर कोषाध्यक्ष असें अस्थायी कार्यकारी मंडळ नियुक्त करण्यांत आलें.

अनुक्रमणिका

असनादि अयस्कृति ४१२
पंचमहाभूतांच्या निर्मितीसंबंधींचा एक आधुनिक दृष्टिकोन ४१३
कर्णबाधीर्य, कर्णशूल, पूयकर्ण यांची चिकित्सा ४१४
शारदीय ज्वरदाहावर दूध-तुपाचा बस्ति ४१५
आयुर्वेद सेवा संघांतील स्वाध्यायवर्गाचा प्रथम वार्षिक अहवाल ४१७
श्लेष्मांतकासव ४१८
मध्यप्रदेश विधान-सभेंतील वैद्यकीय प्रश्नोत्तरें ४१९
डाग-पद्धतीचे कांहीं प्रयोग ४२२
रुई [अर्क] ४२३
अद्भुत कुष्ठ-चिकित्सा ४२५
मध्यप्रदेश अग्रगामी वैद्य मंडळ ४२६
आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद— आगामी अधिवेशनासाठीं कांहीं सूचना ४२७
अग्निकर्म चिकित्सा ४२८
महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ— बृहन् मुंबई जिल्हा शाखेची स्थापना ४२९
मुंबई सरकार इकडे लक्ष देईल काय ! ४३१
रिन्युअल फीसंबंधीं कायदा व आमचें कर्तव्य ४३२
ग्राम-सफाई शिबिर, सोनपुर ४३८
आयुर्वेद संशोधन परिषद मुंबई ४३९
वै. जायदे अमेरिका प्रवासनिधिसमिति ४४०

अपामार्गारिष्ट

नांवासंबन्धीं खुलासा

आयुर्वेद पत्रिकेच्या गेल्या अंकांत अपामार्गासव या शीर्षकाखालीं दिलेली माहिती 'अपामार्गारिष्ट' ची आहे. कारण तें औषध आघाड्याचा काढा करून बनविण्यांत आलें आहे. 'अरिष्टः क्वाथसिद्धः स्यात्' असें वचन आहे. त्याप्रमाणें तें नांव दिलेलें आहे. वाचकांचा गैरसमज होऊं नये म्हणून हा खुलासा केला आहे.

कारण हीं तशींच गुणकारी आहेत.

अभ्रक भस्म (शतपुटी) अनारक्तभावित तयार	तो. १	रु. ९
अजायकृत भस्म (रक्तवर्धक)	१	३॥
अजाफुफ्फुस भस्म (क्षयकाळ)	१	३॥
अजाअस्थि भस्म (अस्थिक्षय)	१	२॥
गांडूळ (भूनाग) भस्म दुग्धवर्धक	१	३॥
मयूरपुच्छ भस्म (उचकीवर)	१	२
हजरतबेर भस्म (विंचूयोग)	१	१।
हिंगूळ भस्म (सशारक्तभावित) अत्यंत कामोत्तेजक, उत्साहवर्धक	१	७
मिश्र शक्तिसागर गुटीका [illegible]ांड कस्तुरी इ. मिश्रित	१४ गो.	२
युनानी. तिळा (वाघाचे चरबींत)	१ बा.	२॥
कासवपृष्ठ भस्म	तो. ५	रु. २॥
कर्कट [खेकडा] भस्म	५	२॥
कुक्कुटांडतेल (अंड्याचें असली)	५	७॥
अकीक भस्म [ब्रेन-टॉनिक]	५	४
जवाहरमोहरा भस्म [हार्ट टॉनिक]	५	४
प्रवाळ भस्म [सूर्यपुटी]	५	४
,, ,, [अग्निपुटी]	५	४
मोती शिंप [शौक्तिक] भस्म	५	१॥।
मंडूर भस्म [गोमूत्रांत]	५	१।
सांबरशृंग भस्म	५	१॥
संगजराहत भस्म	५	१॥
गुळवेल सत्व असली	५	२
त्रिफळा चूर्ण [वस्त्रगाळ]	१ शेरास	११

मिश्रा महाराष्ट्र फार्मसी (रजि.) ब्रह्मपुरी (चांदा) म. प्र.

४० वर्षांवरील **अनुभव** आणि सर्व देशभर

पसरलेल्या नऊ वैद्यकीय प्रयोग शाळांतील वैद्यक शास्त्रीय पंडितांचें कार्य हा जम्मींच्या कीर्तीचा पाया होय.

* जम्मीचा आंकडेवारी-दर्शक रिपोर्ट मागवा



जम्मीचें लिव्हरक्युअर दरवर्षी हजारों मुलांचें यकृताच्या विकृतिपासून संरक्षण करून त्यांना पुनः आरोग्य प्राप्त करून देतें.

आतां सोयीस्कर आकाराच्या वड्या मिळतात

जम्मी वेंकटरमणय्या अॅन्ड सन्स

"जम्मी बिल्डिंग", मयलापूर, मद्रास ४ मुंबई शाखा: 'पारेख मॅन्शन', सॅन्डहर्स्ट रोड [illegible]

GURUKULA-KANGRI
DELY.
JAN 5
9
45

संपादक व प्रकाशक:—वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य बिवलकर कॉलनी, नाशिक
मुद्रक:—श्री. चिं. ओक, सकल प्रेस, नाशिक

गुरुकुल पत्रिका

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

वर्ष ८ वें) नासिक, ता. १६ जानेवारी १९५५ (अंक १४ वा

आयुर्वेदाचा संदेश रशियांत पोंचविला !

वैद्यराज त्र्यं. म. गोगटे यांची बहुमोल आयुर्वेदसेवा

अहमदनगर येथील आयुर्वेद विद्यालय संस्थेचे १९३४ सालचे पदवीधर वैद्य त्र्यंबक महादेव गोगटे, आयुर्वेदतीर्थ, हे १९५४ सालच्या अखेरीस रशियांत काबूल मार्गानें गेले. रशियांत १। महिना हिंडून त्यांनीं रशियन जीवनाचा आयुर्वेदीय दृष्टिकोनांतून विचार केला. मास्को मेडिकल कौन्सिलसमोर त्यांनीं ‘ भारतांतील प्राचीन वैद्यक चिकित्सापद्धतीचा दृष्टिकोन ’ या विषयावर इंग्रजीमध्यें व्याख्यान दिलें. तेथील विशाल लेनिन ग्रंथालयाची आयुर्वेदीय ग्रंथांसाठीं पहाणी केली. या सर्व कर्तबगारीबद्दल आयुर्वेद पत्रिकेच्या वाचकांतर्फे आम्हीं त्यांना धन्यवाद देतो. आयुर्वेदाच्या भावी प्रगतीच्या दृष्टीनें या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.



आयुर्वेदभक्ति व अभ्यासू वृत्ति

भारतांत इंडो--सोव्हिएट कल्चरल असोसिएशन नांवाची एक संस्था आहे. तिच्या अमरावतीच्या शाखेचे, वैद्य गोगटे हे, अध्यक्ष आहेत. त्यांची आयुर्वेदभक्ति, अभ्यासू वृत्ति इ. गोष्टी अनुकरणीय अशा आहेत. स्वतःच्या व्यवसायांत खंड पडूं देऊन व जवळचे सुमारें २००० रु. खर्च करून त्यांनीं हें देशाटन केलें व तेथेंहि रशियन संशोधनांत, ग्रंथालयांत, आचारविचारांत, आयुर्वेदीय सिद्धांत, आयुर्वेदाचे ग्रंथ सांपडतात कां असा शोध केला.

नाशिक येथील शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत ता. ३०।१२।५४ रोजीं सायंकाळीं त्यांचें स्वागत करण्यांत आलें. त्यांनीं आपल्या २ तास चाललेल्या भाषणांत, प्रवासांत केलेल्या आयुर्वेदीय निरीक्षणाचें धावतें समालोचन केलें व शेवटीं १-१॥ तासपर्यंत प्रश्नोत्तरें झालीं.

व्याख्यानाचा विषय, विद्यार्थी, अध्यापक व नासिक शहर वैद्यमंडळाचे सभासद या सर्वांनाच उद्‌बोधक असा झाला. हें संपूर्ण व्याख्यान लेखरूपानें पत्रिकेंत देण्यांत येणार आहे. त्यांच्या जागृत आयुर्वेद भक्तीबद्दल नासिकच्या वैद्यमंडळातर्फे आम्हीं त्यांचें पुनः एकवार अभिनंदन करतो.

" आयुर्वेद पारतंत्र्यांतच आहे "

ही घोषणा चालू ठेवा

आयुर्वेद व युनानी वैद्यक बोर्डाकडून पुनर्नोंदणी फी भरण्याबाबतची मुदत ता. ३१।१२।५४ ला संपत होती. ती आणखी तीन महिन्यांनीं वाढविण्यांत आल्याचें समजतें. ही पुनर्नोंदणी फी पाठवितांना बोर्डाकडे व आरोग्यमंत्री यांजकडे पुढील अर्थाच्या मजकुराचें एक पत्र पाठवून बोर्डाकडे, व सरकारकडे एक मागणी करावी.

हें अत्यंत अन्यायाचें आहे

" सध्यांचें बोर्ड हें वास्तवांत संपूर्णतः वैद्य व हकीम यांचें असावयास पाहिजे होतें, व तें तसें असणेंच न्याय्य आहे. दुसऱ्या कोणत्याहि वैद्यकाचा तज्ज्ञ या बोर्डावर असणें अन्याय्य आहे. आणि त्यांतहि तो अध्यक्ष म्हणून असणें तर अत्यंत अन्यायाचें आहे. सरकारनें आयुर्वेदाला मान्यता दिली असें म्हटलें जातें. तथापि बोर्डांत मात्र त्याला पारतंत्र्यांतच ठेवण्यांत आलें आहे.

निषेधपूर्वक फी भरणा

आमची निःपक्षपाती सरकारला अशी विनंति आहे कीं, सरकारनें लवकरांत लवकर हें बोर्ड संपूर्ण वैद्य-हकीमांचेंच होईल अशी व्यवस्था करावी. ही व्यवस्था होईंपर्यंत आम्ही पाठवीत असलेली पुनर्नोंदणी फी, निषेधपूर्वक पाठविलेली फी म्हणून समजण्यांत यावी. "

ज्यांनीं यापूर्वींच पुनर्नोंदणी फी पाठविली असेल त्यांनींहि पुढील दोन पत्त्यावर वरील मजकूर स्वहस्ताक्षरांत लिहून व त्याखालीं आपली सही करून पाठवावा. याचा यापुढें फार उपयोग होणार आहे. पुढील बोर्डाचा अध्यक्ष डॉक्टर नेमण्याचें धैर्य सरकारला होणार नाहीं. कारण त्यामुळें सरकारच्या लोकमत विरोधांत भर पडेल.

पत्रें पाठविण्याचे पत्तेः—(१) अध्यक्ष-दि बोर्ड ऑफ आयुर्वेदिक ॲन्ड युनानी तिब्बी सिस्टिम्स् ऑफ मेडिसिन. १४४ म. गांधी रोड, फोर्ट, मुंबई १

(२) नामदार शांतिलालजी शहा, आरोग्यमंत्री, मुंबई सरकार, सेक्रेटरीएट, मुंबई १

आरोग्यमंत्री शांतिलाल शाह यांची मुलाखत

आरोग्यमंत्री नामदार शांतिलालजी शहा यांचा मुक्काम नाशिकमध्यें असतांना, नाशिक शहर वैद्य मंडळातर्फे दिनांक ३।१।५५ रोजीं गोल्फक्लबवर मुलाखत घेण्यांत आली. या शिष्टमंडळांत नाशिक शहर वैद्य मंडळाचे अध्यक्ष वै. विष्णुशास्त्री दाते, सेक्रेटरी वै. ग. म. लोखंडे, वैद्यरत्न केळकरशास्त्री, वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित व वै. वि. म. गोगटे हे होते. शिष्टमंडळानें एकूण वैद्यवर्गाच्या अडचणी नामदार साहेबांच्यापुढें मांडल्या व एक लेखी म्हणणें सादर केलें. तोंडीं झालेल्या प्रश्नोत्तरांचा सारांश पुढीलप्रमाणें आहे.:-

प्रश्न:- (१) सन १९३८ चा वैद्यक कायदा घडवितांना माजी आरोग्यमंत्र्यांनीं असें आश्वासन दिलें होतें कीं, वैद्यांनीं सुरुवातीस एकदांच १० रुपये नोंदणी फी भरली म्हणजे त्यांना पुन: पुननोंदणी फी भरावी लागणार नाहीं. तथापि कायद्यांत नुकत्याच झालेल्या दुरुस्तींत वैद्यांची पुननोंदणी फी सक्तीची करण्यांत आली आहे, हें कसें ?

उत्तर:— बोर्डांचा खर्च वैद्यांकडून (व हकीमांकडून) मिळणाऱ्या या फीमधूनच व्हावयाचा असल्याकारणानें तो खर्च भागवावयाच्या हिशोबांतच ही आकारणी केली आहे. बॉम्बे मेडिकल कौन्सिलचा खर्चहि डॉक्टरांकडून मिळणाऱ्या फी मधून केला जातो. बोर्डाचा खर्च चालविण्याच्या दृष्टीनें ही फी आकारावी लागणारच.

प्रश्न:- [२] ॲलोपॅथिक प्रॅक्टिशनर्सना जसें नवीन रजिस्ट्रेशन करतांनाच केवळ एकच वेळ फी बसवली जाते, त्यांना पुननोंदणी फी नाहीं, तसें वैद्यांचे बाबतींत कां करतां येऊं नये ?

उत्तर:— दरसाल कमींत कमी ३०० डॉक्टर्स तयार होतात. प्रत्येकीं घेतलेल्या ५० रुपयांत कौन्सिलचा खर्च भागूं शकतो, तसे वैद्यांचे बाबतींत नाहीं. दरसाल तयार होणारे पदवीधर वैद्यांची संख्या कमी आहे. तथापि बोर्डाचा खर्च भागविण्याच्या दृष्टीनें एखादी दुसरी योजना सुचविल्यास त्याचा जरुर विचार करण्यांत येईल.

प्रश्न:- (३) आयुर्वेदिक बोर्ड व फॅकल्टी या संस्थांचे सभासद वैद्यहकीमनियुक्तच असावेत, अशी आमची मागणी आहे.

उत्तर:— मेडिकल कौन्सिलमध्येंही सरकारी सभासद असतात. तसेच येथेंहि असावेत.

प्रश्न:- (४) सरकारनियुक्त सभासदांत वैद्येतरांचा समावेश शाकरितां ? तेथें पक्षपाती गटाचे सभासद नसावेत. अध्यक्ष डॉक्टर नसावा.

उत्तर:-वैद्यडॉक्टर नसलेला मंत्री आपणास चालतो. मग डॉक्टर सभासद कां चालूं नये ?

प्रत्युत्तर:- तसा कोणीहि अन्य चालेल, कारण तो पक्षपाती नसतो. डॉक्टर मात्र विशिष्ट वैद्यकाचा पक्षपाती असतो. मेडिकल कौन्सिलवर वैद्य अगर हकीम नसतो, मग येथें डॉक्टर कशाकरितां ?

नामदार मंत्री:— याबाबत विचार करावा लागेल.

प्रश्न:- (५) आयुर्वेदीय औषधी करण्यास लागणाऱ्या, भारताबाहेरच्या कच्च्या औषधींवरील आयात कर रद्द तरी करावा, किंवा नाममात्र ठेवावा. अशी मुंबई राज्य सरकारनें मध्यवर्ति सरकारला सूचना करावी. याचा वैद्यांना औषधीकरणास चांगला उपयोग होणारा असल्यानें राज्य सरकार, मध्यवर्ति सरकारला तशी बिनंति करूं शकेल काय ?

उत्तरः- केंद्रसरकारनें आम्हाकडे चौकशी केल्याशिवाय राज्यसरकार तसें कांहीं करूं शकणार नाहीं.

प्रश्नः- (६) शुद्ध आयुर्वेद विद्यालयें व मान्य गुरू यांना सरकारनें मदत देण्याबाबत सरकारचें काय धोरण आहे ?

उत्तरः— सदर मदतीबाबत सरकार कांहींहि करूं शकणार नाहीं. सरकारच्या चालू आर्थिक परिस्थितींत याकरितां सरकारजवळ पैसा नाहीं.

प्रश्नः- (७) आसवारिष्टें हीं वैद्यांना नेहमीं उपयुक्त अशीं औषधें आहेत. शिवाय दारूची तहान हीं औषधें भागवूं शकत नसल्यानें त्यांचेवरील सर्व बंधनें (कर वगैरे) रद्द करावेत.

उत्तर— त्यावरील टॅक्स हा सेल्सटॅक्सच आहे तो भरला पाहिजे. तें खातें माझें नाहीं. दारूबंदीचा व आसवारिष्टावरील करांचा कांहीं संबंध नाहीं. सरकारचा खर्च भागविण्याकरितां हा हायर सेल्सटॅक्स बसविलेला आहे.

प्रश्नः- (८) सरकारनें प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणीं औषधी वनस्पतींचीं उद्यानें तयार करावींत व जंगलांतील वनस्पतींचें संरक्षण करावें. त्यांचा साठा करून वैद्यांना व कारखानदारांना त्या वनस्पति पुरविण्याबाबत सरकार कांहीं करूं शकेल काय ?

उत्तरः— याबाबत सरकार विचार करीत आहे.

प्रश्नः- (९) नाशिक व अन्य जिल्ह्याचे ठिकाणीं सिव्हिल हॉस्पिटलमधून प्रविष्ट व बाह्य रुग्णांना आयुर्वेदीय पद्धतीनें उपचार करण्यास परवानगी देण्याबाबत सरकारचें काय धोरण आहे ?

उत्तरः— तूर्त मुंबई, पुणें व अहमदाबाद येथें एक वर्षाकरितां हा प्रयोग करण्यांत येईल. प्रत्येक ठिकाणीं २० खाटा ठेवण्यांत येतील. त्या अनुभवावरून पुढील वर्षी पुढचा विचार करण्यांत येईल.

प्रश्नः- (१०) नासिक येथील शुद्ध आयुर्वेद विद्यालयासाठीं निदान चार एकर जागा तरी सरकार देऊं शकेल काय ? विद्यालयाच्या सर्व प्रकारच्या वाढीच्या दृष्टीनें याची आवश्यकता आहे.

उत्तर— सरकारी जागा देणे हा विषय रेव्हिन्यु डिपार्टमेंटचा आहे. माझा नाहीं.

प्रश्नः- (११) विद्यालयास जागा देण्यासाठीं रेव्हिन्यू डिपार्टमेंटकडे मागणी केल्यास आपण त्याबाबत शिफारस करूं शकाल काय ?

उत्तरः— योग्य वेळीं विचार करूं.

प्रश्नः- (१२) आयुर्वेदीय औषधांतील सर्वांत मूल्यवान् औषधी कमींतकमी खर्चांत व यंत्र-साहाय्याशिवाय बनविण्याचा सरकारचा इरादा असल्याचें नामदार मोरारजीभाईनीं सुचविलें होतें. तसा कारखाना काढावयाचा झाल्यास नाशिक शहर वैद्य मंडळ व आयुर्वेद सेवा संघासारख्या संस्था आपणास संपूर्ण सहकार्य देण्यास तयार आहेत. कारखाना चालवून संशोधनकार्यांतहि ह्या संस्था आपणास मदत करतील. तेव्हां सरकारचा याबाबत काय विचार आहे ?

उत्तरः- दुसऱ्या एका ठिकाणीं वरील प्रकारचा कारखाना काढण्याकरितां सरकारला धनिकाकडून आर्थिक साहाय्य मिळण्याचा संभव आहे. तें मिळाल्यास वरील प्रकारचा कारखाना तेथेंच काढणें इष्ट होईल.

या बाबत नासिक शहर वैद्य मंडळ व आयुर्वेद सेवा संघ सरकारला सहकार्य देण्यास तयार आहेत असें नामदारांना सुचविण्यांत आलें.

शिष्टमंडळाचें नेतृत्व वैद्य विष्णुशास्त्री दाते यांनीं केलें होतें. शेवटीं नामदार साहेबांचे आभार मानण्यांत येऊन ही मुलाखत संपली.

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन

दशम अधिवेशन, भुसावळ

या महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाच्या सिद्धतेसाठीं संयुक्त खानदेश वैद्य मंडळानें अत्यंत उत्साहानें प्रारंभ केला आहे. या संमेलनाचा विशेष हा आहे कीं, याला जोडून २ महत्त्वपूर्ण परिषदाहि व्हावयाच्या आहेत. प्रांतीय मंडळाध्यक्ष वैद्य जळूकरशास्त्री हे नुकतेच मुंबई, पुणें, नाशिक इ. ठिकाणीं जाऊन आले. तेथील कार्यकर्त्या प्रमुख व्यक्तींशीं त्यांनीं या संमेलनाबावत विचारविनिमयहि केला. विशेषतः अध्यापक परिषद ही केवळ १च दिवसांत आटोपणारी परिषद नसून ती निदान ४ दिवस तरी होणें इष्ट आहे. कांहीं विशिष्ट विषयांपुरतेच निर्णय घ्यावयाचा संकेत ठरवून संपवू म्हटलें तरी चर्चापूर्ण निर्णय व्यक्त होण्यास १–२ दिवस मुळींच पुरणार नाहींत, असा सूर सर्वत्र दिसून आला.

संमेलनाचें कार्य २ दिवसांत आटोपल्यावर बरेचसे संमेलन प्रतिनिधि आपापल्या गांवीं निघून जाण्याची शक्यता असली तरी शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम शिकविणाऱ्या विद्यालयांचे अध्यापक व राजमान्य गुरु व त्याबरोबरच शास्त्रीय चर्चेंत भाग घेण्याची पात्रता असणारे, आणि चर्चाश्रवणाची आवड असणारेहि रसज्ञ भिषक ही परिषद चालू असेतों निःसंशय थांबतील. अर्थात्च या सर्व दृष्टीनें विचार करतां हें दशम प्रांतीय संमेलन इतर पूर्व संमेलनाहून विशेष उपयुक्त ठरणार आहे व त्या दृष्टीनें अधिक खर्चाचेंहि होणार आहे. यद्यपि हें संमेलन संयुक्त खानदेश वैद्य मंडळाचे वतीनें होणारें असलें तरी त्याची सिद्धता मात्र सर्वस्वी त्यास मिळणाऱ्या आर्थिक साह्यावर आणि वैचारिक मार्गदर्शनावरच अवलंबून आहे, हें सांगणें नकोच !

लौकरच ह्या प्रांतीय दशम वैद्य संमेलनाचें स्वागतमंडळ स्थापित होऊन स्वागताध्यक्ष व इतर कार्यकारी समित्यांची विभागशः निवड करण्यांत येईल. प्रचारकार्यासाठीं ठिकठिकाणीं प्रचारकहि प्रतिनिधि शुल्क, स्वागत सदस्य शुल्क आणि भरीव देणग्या मिळण्यासाठीं प्रांतभर जातील. तरी त्यांस सर्वप्रकारचें यथाशक्य साह्य करण्यांत महाराष्ट्र व प्रांतीय वैद्य बंधु व आयुर्वेदप्रेमी सज्जन तसेंच धनिकवर्ग माघार घेणार नाहीं, असा पूर्ण विश्वास आहे.

संमेलनाध्यक्षाची निवड, अध्यापक परिषदेच्या अध्यक्षांची निवड, मुंबईराज्य वैद्य परिषदेच्या कार्यासाठीं, संमेलनापुढें यावयाचे प्रस्ताव, प्रदर्शन विभाग, अध्यापक चर्चा परिषदेच्या कार्यासंबंधीं सूचना व मतें एव्हांपासूनच व्यक्त होऊं लागणें इष्ट आहे.

हें संमेलन संयुक्तखानदेश वैद्यमंडळाचे वतीनें होणार असल्यामुळें संयुक्त खानदेशांतील सर्वहि वैद्यबंधूंनीं संयुक्त खानदेश वैद्यमंडळाचे सदस्य होणें ही सर्व प्रथम आवश्यक गोष्ट असून प्रान्तीय मंडळाचे सदस्य होणें हें त्यापुढील अत्यावश्य कर्तव्य ठरतें. संमेलनाचे प्रतिनिधि व स्वागतसभासद होणें हा तर संयुक्त खानदेशांतील प्रत्येक वैद्याचा हक्कच आहे. जवळजवळ १५–१६ वर्षांनंतर ही संमेलन पर्वणी आपल्या खानदेशांत आली आहे. प्रान्तीय संमेलनास जन्म देण्याचा मान संयुक्त खानदेशानेंच मिळविला आहे. व आतां १० वें अधिवेशन म्हणून ह्या बालकाचें गोड कौतुक करण्याची संधि संयुक्त खानदेश वैद्यवर्गास प्राप्त होत आहे. महाराष्ट्रांत संघटनेची आदर्श ठरलेली संयुक्त खानदेशांतील वैद्यसंघटना त्या प्रांतीय संमेलनाच्या रूपानें पुन्हां एकदां परीक्षिली जाण्याचा समय प्राप्त झाला आहे अशावेळीं सर्व वैद्यबंधूंनीं हें आपलें कार्य यशस्वी करण्यासाठीं अहमहमिकेनें पुढें यावें, अशी आग्रहाची विनंति आहे.

महाराष्ट्र प्रांतीय वैद्यबंधू मागें लिहिल्याप्रमाणें निरनिराळ्या गोष्टींत विचारांचें मार्गदर्शन, व सक्रिय साह्य करतील असा पूर्ण भरंवसा आहे.

आपले नम्र

वै. भगवंत त्र्यंबक वैद्य
वै. चूडामण खंडेराव चौधरी
कार्यमंत्री

वै. ब्रह्मदत्त शर्मा
कार्याध्यक्ष

महाराष्ट्र प्रांतीय दशम वैद्य संमेलन, कार्यालय, भुसावळ पू. खा.

वाचकांचा पत्रव्यवहार—

विंचूदंशावर स्त्री-दुग्ध

आयुर्वेद पत्रिकेंत पान २७४ मध्यें विंचूदंशावर स्त्री-दुग्धप्रयोग व विषहर म्हणून स्त्री-दुग्धाचा प्रयोग दिला आहे. त्याबाबत अधिक खुलासा हवा आहे.

१ इंजेक्शनसाठीं स्त्री-दुग्ध वापरतांना इतर दुधाप्रमाणें तें तापविण्याची गरज आहे काय ?

२ इतर दुधाच्या इंजेक्शनाप्रमाणें स्त्री-दुधाचीं इंजेक्शनें उपयुक्त होतील काय ?

३ इतर दुधाचें इंजेक्शन करतांना शुद्ध पाणी मिसळतात तसें यांत मिसळण्याची जरूरी आहे काय? जरूर असल्यास किती पाणी मिसळावें ?

४ या दुधाच्या ॲम्प्यूल्स भरल्या तर त्या टिकाऊ होतील काय ? —वासुदेव

१०-२० उपयुक्त कोरडी औषधें

घरांत वारंवार लागणारी अशी कांहीं औषधें मला संग्रहीं ठेवावयाचीं आहेत. तेव्हां मात्रा रसायनें चूर्णें वगैरेचा (पातळ औषधें नसावीत) एक १०-२० औषधांचा संग्रह शास्त्र माहितीसहित पाठवावा.

—वासुदेव

पत्रिकेच्या वाचकांपैकीं कोणी असा १०-२० औषधांचा संग्रह माहितीसह लिहून पाठविल्यास त्यास पत्रिकेंत प्रसिद्धि दिली जाईल. —संपादक

सुशिक्षित स्त्री-वैद्य पाहिजे

पत्रिकेच्या एक वाचक कार्यकर्त्या लिहितात, " माधान " करितां मला एक स्त्री-वैद्य आधुनिक पद्धतीनें शिकलेली अशी हवी. अशी स्त्री-वैद्य मिळूं शकेल कां ? ती वैद्यकीय दृष्टीनें जशी तज्ज्ञ व कार्यक्षम हवी, तशीच ती आपल्या संस्थेच्या एकूण जीवन-विचाराशीं समरस होणारीहि पाहिजे.

'माधान' ला १६ बेड्सचें प्रसूतिगृह व दवाखाना करावयाचा आहे. व त्या दृष्टीनें इमारत बांधणें चालूं आहे. आजहि तेथें माधानचें आरोग्य-सेवा कार्य बरेंच वाढलेलें आहे. व पार्वतीबाईंना प्रकृतीमुळें झेपत नाहीं. त्यांच्या बऱ्याच योजना वेळ व शक्तीच्या अभावीं अमूर्त राहतात. त्यामुळें आतांपासूनच एखादी तरुण सशक्त तज्ज्ञ व ध्येयवादी स्त्री-वैद्य त्यांची सहकारी म्हणून मिळविण्याच्या प्रयत्नांत मी आहे. "

-तारा मश्रूवाला

थंडगार
नेत्रांजन
डोळ्यांचे विकारावर उत्कृष्ट
कृष्णशास्त्री बिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

हे लेखक श्रीयुत वाटवे कोण ?

मुंबई सरकारनें १४ ऑगष्ट १९५१ रोजीं डॉ. म्हसकर यांच्या अध्यक्षतेखालीं आयुर्वेदांत संशोधन करण्यासाठीं एक बोर्ड नेमलें, त्याचा ३० नोव्हेंबर १९५४ अखेरचा अहवाल पत्रिकेकडे आला आहे.

या बोर्डाकडे (१) आयुर्वेदीय ग्रंथ निर्मिति (२) आयुर्वेदीय शब्दकोष (डिक्शनरी) (३) औषधांचें प्रामाण्य निर्णय (४) आयुर्वेदीय वाङ्मय, मानसशास्त्र व स्वस्थवृत्त यांचा अभ्यास (५) निदान चिकित्सेचा उपरुग्ण अभ्यास (६) आयुर्वेदीय औषधी पाठ-चिंतामणी तयार करणें (७) औषधी निर्माण व औषधी योजना यांचा अभ्यास इतकी कामें सोपाविली आहेत.

ग्रंथनिर्मिति

(१) शारीर रचना (२) रसशास्त्र व औषधी निर्माण (३) पदार्थविज्ञान (४) दोषधातुमल-विज्ञान (५) द्रव्यगुण (६) निदानपंचक व संप्राप्तिविज्ञान (७) स्वस्थवृत्त (८) विषतंत्र (९) रोगनिदान (१०) शल्य-शालाक्य (११) सौतिक, स्त्रीरोग, बालरोग (१२) आहारशास्त्र. या १२ विषयांवर ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा समितीचा विचार आहे. ग्रंथ संस्कृतमध्यें असावेत. त्यांना चरक, सुश्रुत, वाग्भट यांचा पूर्ण आधार असावा व त्यांचें इंग्रजी अगर हिंदी भाषांतर सोबत द्यावें.

आजवर पुढील पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत.

१) आयुर्वेदीय पदार्थविज्ञान

लेखकः— श्री. काशीकर

२) स्वस्थवृत्त (आयुर्वेदीय) भाग १ व २

लेखकः— डॉ. कृ. श्री. म्हसकर व श्री. वाटवे

स्वस्थवृत्ताचा तिसरा भाग मानासिक स्वास्थ्य व मानसोपचाराचीं तत्त्वें, या नांवानें डॉ. म्हसकर व श्री. वाटवे हे प्रसिद्ध करणार आहेत. या शिवाय जननेंद्रियव्यापत्-तंत्र, प्रसूतितंत्र, कौमारभृत्य हे तीन ग्रंथ डॉ. म्हसकर व श्री. वाटवे ही अलौकिक जोडी प्रसिद्ध करणार असल्याचें त्या पत्रकांत म्हटलें आहे.

मुंबई राज्यांत गेलीं ३० वर्षें आयुर्वेद महाविद्यालयें चालूं आहेत. त्यांतून आजवर शेकडों पदवीधर निर्माण झाले आहेत. निखिल भारतवर्षीय आयुर्वेद विद्यापीठाचे विशारद, आचार्यादि पुष्कळ आहेत. पुणें आयुर्वेद महाविद्यालयाचे अधिपति सुप्रसिद्ध मामा गोखले, यांच्या खास देखरेखीखालीं कित्येक वैद्य दरसाल आयुर्विद्या-पारंगत होत आहेत. वैद्यराज मामा गोखले हे आयुर्वेदाच्या संशोधन समितीचे एक प्रमुख वैद्य सभासद आहेत. असें असतां हे सर्व आयुर्वेदतीर्थ, आयुर्वेदाचार्य, आयुर्विद्या-पारंगत लोक आयुर्वेदाचे संशोधनात्मक ग्रंथ लिहिण्यास नालायक ठरले व समितीनें श्री. वाटवे नामक कोणी, अद्यापहि अज्ञात सद्गृहस्थ (कारण त्यांच्या नांवामागें वैद्य असें पद लावलेले नाहीं.) आयुर्वेदाचे सरकारच्या खर्चानें लिहिलेलें व सरकारच्या खर्चानें छापलेले ग्रंथ लिहिण्यास योग्य ठरविले व वैद्यराज मामा गोखले यांनीं त्याला मान तुकाविली, हें आयुर्वेदाच्या मुंबई राज्यांतील अध्यापन पद्धतीस लांछनास्पद आहे असें आमचें स्पष्ट मत आहे.

स्वस्थवृत्ताच्या ग्रंथावर लेखक म्हणून श्री. वाटवे यांच्या नांवापुढें पुढील आयुर्वेदीय पदव्या छापल्या आहेत. पी.एच्.डी., डी.सी.टी.,सी.डी.एफ. सी., आर. एम्. पी. व त्या पदव्यांच्या यादींतच R.M.P. हीं अक्षरें पदवीप्रमाणें जोडलीं आहेत. हीं अक्षरें आपल्या नांवापुढें अशीं लिहूं नयेत असा दंडक मुंबई-राज्याचे आयुर्वेदिक बोर्डानें जाहीर केला आहे व त्याला या संशोधन समितीनें हरताळ फांसला आहे.

स्वस्थवृत्ताच्या दुसऱ्या भागावर श्री. वाटवे यांचें नांव छापतांना पुढें आयुर्वेदालंकार (अयोध्या)

अशी खोटी (मुंबई-राज्य आयुर्वेद बोर्डाला व म्हणूनच मुंबई सरकारला अमान्य अशी) पदवी छापली आहे व अशा प्रकारें खोट्या पदव्यांना उत्तेजन दिलें आहे.

रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनरनें सरकारमान्य नसलेल्या पदव्या लावूं नयेत असें बंधन आहे. अनेक वैद्यपंचाननादि पदवीधरांना त्याबद्दल सरकारी आयुर्वेदीय बोर्डाकडून सूचना गेल्या होत्या हें जाहीर आहे. असें असतां सरकारी संशोधन बोर्डातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथावरील लेखकाच्या अशा अमान्य पदव्या कां छापण्यांत येत आहेत ? याला आयुर्वेदाचें बोर्ड जाब विचारूं शकत नाहीं काय ?

आयुर्वेदीय ग्रंथ लिहितांना केवळ चरक, सुश्रुत, वाग्भट यांचाच आधार घेण्यांत यावा असा स्पष्ट दंडक असतां पोप, प्लेटो यांचीं वचनें प्रथम दर्शनींच उध्दृत करून आयुर्वेदांत या तोडीचीं स्वास्थ्यबोधक वचनें नाहींत, असें दर्शविण्याचा उपद्व्याप कां करण्यांत आला ? व त्याला श्री. मामा गोखले आदि पारंगतांनीं पाठिंबा कसा दिला ?

सध्यांच्या आयुर्वेद संशोधन बोर्डांत वैद्य किती व डॉक्टर किती आहेत ? आमच्याकडे आलेल्या अहवालावर फक्त डॉक्टर म्हसकर व डॉ. हकीम या दोघांचींच नांवें आहेत. इतर सदस्यांचीं नांवें कां नाहींत ?

हें संशोधन नव्हेच

या संशोधन बोर्डातर्फे चाललेल्या कार्याविषयीं वैद्यराज डेग्वेकर लिहितातः—

" डॉ. म्हसकर पद्धतीचें संशोधन अगदीं निरुपयोगी आहे. त्याला संशोधन न म्हणतां संकलन म्हटलेलें जास्त योग्य होईल."

मुंबई राज्यांत डॉक्टर मंडळीनीं व त्यांच्या कच्छपी असलेल्या वैद्यांनीं आयुर्वेदाच्या नांवावर जो धुडगूस चालविला आहे तो सरकार आणखी किती दिवस चालूं ठेवणार आहे ?

वाचकांचा पत्रव्यवहार

आणखी दोन हृद्य औषधें

ता. १६-१२-५४ चे आयुर्वेद पत्रिकेंत आलेल्या 'आयुर्वेदीय हृद्य औषधें' लेखक-डॉ. चिं. व. खाडिलकर यांचे विचाराचे अनुरोधानें माझे विचार मांडले आहेत. 'स्वस्थस्य ओजस्करं आतुरस्य च रोगनुत्' अशीं हीं दोन औषधें आहेत.

आयुर्वेदीय हृद्य औषधें

हृद्य औषधांत आणखी दोन औषधें प्रामुख्यानें वापरण्यांत येतात अशी आमची पद्धति आहे. ही पद्धत मला दिल्ली येथें अध्ययन करीत असतां गुरुवर्य उपेंद्रनाथदास, आयुर्वेदाचार्य, सांख्यतीर्थ ह्यांची पहावयास मिळाली, ती कळवीत आहे. कोणत्याहि आयुर्वेदीय मात्रा, भस्में यांचे बरोबर हृद्य व योगवाही म्हणून दोषदुष्टीच्या सामान्य अवस्थेंत रससिंदूर १ गुंज, व विशेष दुष्टी झाली असतां सुवर्णसिंदूर वापरण्यांत येतो. रोग्यांचे अवस्थेप्रमाणें तत्रोगनाशक औषध देऊन शिवाय जोडीस वरील रस वापरण्यांत येतो.

रोगनाशक औषधास

सामान्य ज्वरांत त्रिभुवनकीर्ति, प्रवाळ, रससिंदूर सान्निपातिक ज्वरांत (न्युमोनिया, टॉयफाईड इ.)मध्यें दोषतारतम्य पाहून लक्ष्मीविलास, सुवर्णसूतशेखर, प्रवाळ, सुवर्णसिंदूर वापरण्यांत येतो. शीत अवस्थेंत कस्तुरीयुक्त तोच रस देण्यांत येतो व प्रदरांत मूत्रमेहांत -चंद्रप्रभा, सुवर्णराज वंग, रससिंदूर, (त्रिवंग) मज्जागतवात, तंतुदौर्बल्यांत बृहत् वातचिंतामणी, चतुर्मुख व सुवर्णसिंदूर. अपस्मारांतः- वातकुलांतक, सुवर्णसिंदूर. उन्मादांतः- सर्पगंधाचूर्ण १ मासा सुवर्णसिंदूर, पंडुरोगांतः-नवायस, रससिंदूर. अतिसारः-- संजीवनी, रसपर्पटी, रससिंदूर. इ. सर्व रोगांविषयीं समजावें. येथें फक्त दिग्दर्शन केलें आहे.

आष्टे —वै. क. ना. जोशी

आयुर्वेदांतील अलबते गलबते ?

नासिक येथें ऑक्टोबर ११ पासून १७ पर्यंत झालेल्या आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेचा विस्तृत अहवाल आयुर्वेद पत्रिकेंतून क्रमशः प्रसिद्ध होत आहे. त्यावरून ती चर्चा किती महत्वाची झाली हें वाचकांच्या लक्षांत आलें आहे. या परिषदेसाठीं जमलेल्या व्यक्ती कोणत्या दर्जाच्या होत्या हेंहि सांगण्याची आवश्यकता नाहीं.

या व्यक्तींबद्दल आयुर्विद्या मासिकाच्या संपादकीयांत पुढील मुक्ताफळें प्रगट झालीं आहेत.

“अबलते गलवते एकत्र करून व बोकड मारून कां शास्त्र पुढें जाणार आहे ?”

डॉ. लागू, डॉ. म्हसकर, डॉ. योध हेच ज्यांना खरे आयुर्वेदोद्धारक वाटतात व त्यांच्या कच्छपी राहूनच आपला उद्धार होत आहे, याचा ज्यांना पदोपदीं अनुभव येत आहे, अशा पारंगतांनीं समाजांतील प्रतिष्ठित व्यक्तींबद्दल अनादराचे उद्गार न काढले तरच नवल !

पुण्यांत ३० वर्षे आयुर्वेदाच्या नांवावर संस्था चालवून व त्यातर्फे खंडीभर ‘आयुर्विद्या पारंगत’ तयार करून शेवटीं संशोधनाचे ग्रंथ मात्र डॉक्टरांच्या व एखाद्या (अलबत्या गलबत्या नव्हे हं) आर.एम्.पी. बिरूदावली धारण करणाऱ्याच्या नांवानें प्रसिद्ध करण्यास ज्यांना कांहींच वाटत नाहीं, त्यांनीं वरील प्रमाणें भुभुःकार करणें यांत अस्वाभाविक असें कांहींच नाहीं. मोरोपंत म्हणतातः—

× × स्वपोषकाच्या सदनाच्या आश्रयें उभा राहे ।
जिकडे वनांत गर्जे शार्दूल तया दिशेकडे बाहे ॥

पदवीधर वैद्यांना त्यांनीं वेळोवेळीं दिलेला उपदेश पदवीधर वैद्य केव्हां विचारांत घेणार आहेत !

आयुर्वेद संशोधन समितीतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांत आयुर्वेदीय ऋषिमुनींचीं वचनें न आढळतां पोप, प्लेटो अशा विधर्मी लोकांचीं वचनें प्रमुख स्थानीं झळकतात, अशा ग्रंथांना मुंबई सरकार तरी कशी मान्यता देतें याचेंच आश्चर्य वाटतें.

डॉ. म्हसकर, डॉ. योध या व्यक्ती आयुर्वेदाचे मारेकरी आहेत ही गोष्ट अजूनहि मुंबई सरकारच्या लक्षांत आली नाहीं काय ? या व्यक्ति व त्यांच्या छायेखालीं वावरणारे वैद्य यापासून होणारे आयुर्वेदाचे हाल केव्हां थांबणार आहेत ?

वैद्य वि. मो. दातेशास्त्री यांच्या मातोश्रींचें निधन

नाशिक शहर वैद्यमंडळाचे एकनिष्ठ कार्यकर्ते व अध्यक्ष वैद्य वि. मो. दाते यांच्या मातोश्री गं. भा. यमुनाबाई दाते यांना शनिवार ता. १-१-५५ रोजी रात्रीं पक्षाघाताचे विकारानें देवाज्ञा झाली. वैद्यराज दाते यांची आयुर्वेदाबद्दलची निष्ठा व कळकळ एका गोष्टीनें स्पष्ट होते. वरील परिस्थिति घडली असतांहि दुसऱ्याच दिवशीं म्हणजे सोमवारीं सकाळी नामदार आरोग्य-मंत्र्यांची मुलाखत घेण्याकरितां गेलेल्या शिष्टमंडळाचें नेतृत्व वैद्य दाते यांनीं स्वीकारून वैद्यांच्या अडीअडचणी नामदार आरोग्य-मंत्र्यांपुढें मांडण्याचें कर्तव्य पार पाडलें.

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक या संस्थेची अत्यंत गुणकारी औषधें दादर (मध्यरेल्वे) येथें
मिळण्याचें एक विक्रीकेंद्र
“ गणेश औषधालय ”
अबदुल कादर बिल्डिंग, दुकान नं. १३
हिंदमाता सिनेमासमोर, मुंबई १४

केशर व कस्तुरी
या उपयुक्त व निर्भेळ वस्तु मिळण्याची व्यवस्था आयुर्वेद सेवा संघानें केली आहे.
व्यवस्थापक

आयुर्वेद चिकित्सामंदिर

अहमदनगर येथील आयुर्वेद महाविद्यालयाच्या आयुर्वेद चिकित्सा मंदिराचा उद्घाटन समारंभ नगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. द. वा. देसाई यांचे हस्तें झाला. आयुर्वेद महाविद्यालयाची पूर्वीची जागा फारच अपुरी असल्यामुळें आयुर्वेद महाविद्यालयाचे वर्ग व हॉस्पिटलचा आयुर्वेदिक विभाग नुकताच पूर्वीच्या मॉडर्न हायस्कूलच्या जागेंत नेला आहे व त्याच ठिकाणीं आयुर्वेदिक हॉस्पिटल सुरूं करण्यांत आलें आहे. आयुर्वेद शिक्षणाचा नवीन दर्जाचा शिक्षणक्रम (जी. एफ्. ए. एम्.) गेल्या दोन वर्षांपासून सुरूं केला असून असा आयुर्वेद चिकित्सेचा स्वतंत्र विभाग या शिक्षणक्रमास अत्यंत आवश्यक होता व या विभागाची अत्यंत व्यवस्थित अशी पूर्तता आतां करण्यांत आली आहे.

सुसज्ज चिकित्सा-मंदिर

या नवीन चिकित्सामंदिरांत २४ रुग्णांची सोय होणार आहे. या ठिकाणीं रुग्णावर आयुर्वेदिक पद्धतीनें उपचार मोफत केले जाणार आहेत. या चिकित्सामंदिराचा उपयोग आयुर्वेदिक पद्धतीचें संशोधन करण्याकडे होणार आहे. शुद्ध आयुर्वेद चिकित्सामंदिर सुरू करण्याची कै. गुणेशास्त्री यांची कल्पना होती. ती त्यांच्या निधनानन्तर थोड्याच काळांत फलद्रूप होत आहे याबद्दल त्यांच्या स्वर्गीय आत्म्यास फारच आनन्द वाटेल. वैद्य एकतारे व वैद्य जोग यासारख्या तज्ज्ञ आयुर्वेदिक वैद्यांची या ठिकाणीं नेमणूक केलेली आहे. या विभागामुळें नगरच्या वैभवांत नवीन भर पडली आहे.

संपूर्ण मोफत हॉस्पिटल

नगर शहरांत एकूण हॉस्पिटलांची संख्या फारच कमी आहे. त्यांत मोफत हॉस्पिटल असें नाहींच. सरकारी दवाखान्यांत जरी मोफत दवा मिळत असला तरी इंजेक्शन व भारी औषधें यासाठीं पैसे द्यावेच लागतात. या नवीन हॉस्पिटलमध्यें मात्र उपचारासाठीं व राहाण्यासाठीं कांहींहि पैसे घेतले जात नाहींत. म्हणून या चिकित्सामंदिराचा खरा लाभ होणार आहे तो गोरगरिबांना. याच ठिकाणीं दररोज येणाऱ्या रोग्यांनाहि औषधें देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. याठिकाणीं राहणाऱ्या रोग्यांना मोफत जेवण देण्याचाहि संस्थेचा विचार आहे. पण त्यासाठीं नगरच्या व नगर बाहेरच्या धनिकांनीं भरपूर साहाय्य करणें आवश्यक आहे.

कडुलिंबाचा स्राव (पाणी)

बोलठाण जि. नाशिक येथें जुनाट कडुनिंब वृक्ष आहे. त्यांतून सध्यां पाणी स्रवत आहे. हें पाणी धरून ठेवलें आहे. या पाण्याचा विशेष उपयोग कोणास माहित असल्यास तो पत्रिकेंतून प्रसिद्ध करावा. कडुनिंबाचें हें पाणी कोणास हवें असल्यास पाठविण्याची व्यवस्था करूं.

बोलठाण वैद्य सी. रं. जोशी आयुर्वेदाचार्य

सांडू ब्रदर्सचीं

शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.

वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.

पत्रव्यवहाराचा पत्ता:—

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
चेंबूर लि.

फॅक्टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नासिक

(आयुर्वेद पत्रिका पान नं. ४३८ पासून पुढें चालू)

आयुर्वेदाचार्य कुळकर्णी म्हणाले– " रसशास्त्रांत प्राचीनकाळीं जे प्रयोग केले गेले, ते हल्लीं तितके तसेच करावयासच पाहिजेत असें नाहीं. पूर्वी परदेशांतूनच (स्पेन) पारद इकडे येत होता. व तो भूमार्गानें येत असे. त्यामुळें रससिद्धांना त्याच्या शुद्धपणाची खात्री नव्हती. म्हणून त्यांना त्यावर खूप संस्कार करण्याची जरूरी भासली. पण हल्लीं *मर्क कंपनीसारखी अगदीं (केमिकली प्युअर) शुद्ध असा पारा देणारी कंपनी असतां, तिचा पारा घेऊन त्यावर पुढचे संस्कार करावयास हरकत नाहीं. तपःसिद्ध ब्राह्मण व साधा ब्राह्मण यांच्यांतील फरकाप्रमाणें या २ पारदांत फरक आहे. म्हणून रासायनिक शुद्ध पारदावरहि आपण संस्कार करावे. पण पारदशुद्धीकरितां करावयाचे संस्काराऐवजीं केमिकली प्युअर पारा घ्यावयास हरकत नाहीं. परन्तु असा पारा घेऊनहि त्यांत गंधक मिळवून उत्तम कज्जली करून त्याचा रससिंदूर करून घ्यावा. १०० तोळे पाऱ्यापासून ११६ तोळ्यापर्यंत रससिंदूर मिळाला पाहिजे. पण १०५ तोळ्यांपेक्षां कमी मिळतां कामा नये. व १०५ तोळ्यांपेक्षां अधिक असला तरी तो अशुद्ध रससिंदूर समजावा. या रससिंदूरांतून काढलेला पारा पुढें औषधीकरणासाठीं घ्यावा. हा पारा निःसंशय बुद्धीनें वापरावा. त्यावर बाकीचे संस्कार करावे. असा पारद अत्यन्त कार्यकारी होतो अशी माझी श्रद्धा व अनुभव आहे. अष्टसंस्कारित पारा व उपर्युक्त पारा यांचा वापर करून त्यांचे निरनिराळे परिणाम पहाणें हें एखाद्या संस्थेचें काम आहे. रुग्णानुभवाखेरीज रासायनिक रीत्या शुद्ध (केमिकली प्युअर) पारद व अष्टसंस्कारित पारद यांतील फरक समजण्याचें कोणतेंहि साधन आपल्याजवळ नाहीं.

आयुर्वेद रसशास्त्र हें शेवटपर्यंत ज्ञातव्ययुक्तच रहाणार. जितके जितके प्रयोग करूं तितकी तितकी नवीन शक्ति निर्माण होणारच. उत्तम औषधी तयार झाल्यामुळें वैद्यांना पैसे फार मिळाले व त्यामुळें वैद्यांनी औषधीकरण सोडून दिलें आहे. व आतां केवळ मजुरांनीं मजुरीच्या आशेनें तें चालू ठेवलें आहे. मजुरामुळें औषधींचें पावित्र्य अजिबात राहिलेलें नाहीं. तथापि आयुर्वेदांतील त्रिदोषसिद्धांत व रसप्रक्रिया हीं दोन्ही इतकी श्रेष्ठ आहेत कीं, त्यांत दोष आले तरीहि तीं गुणकारकच ठरत आहेत.

भावनांचा विचार,–योग्य तऱ्हेनें भावना कशी द्यावी ?

भावना ज्या द्रव्याला द्यावयाची तें द्रव्य ज्याची भावना द्यावयाची त्या द्रव्यांत बुडलें पाहिजे. व त्यांत तें वाळू दिलें पाहिजे. असें सात वेळां करावें, असा त्याचा अर्थ आहे. सात दिवस करावे, असा 'सप्तवारान्'चा अर्थ नाहीं. सात दिवस सात वेळां असा अर्थ पाहिजे तर घ्यावा.

भावना द्रव्य ओलें असावयास पाहिजे. ओलेंपणीं त्यांत शुष्कावस्थेपेक्षां पुष्कळच अधिक पाणी असतें. ताजें द्रव्य अपेक्षित आहे. कारण तें सर्व रसपूर्ण असतें. भावना द्रव्य जून घ्यावें. कोवळें घेऊं नये. पाऱ्यास ज्यांची भावना द्यावयाची तें प्रत्येक द्रव्य त्याच्या १/१६ वजनाइतकें घेऊन त्याचा काढा करून वापरावा. "काढा किती करावा, तें सांगितलें, पण पाऱ्यास काढ्याची भावना देतांना तितका सर्व तो वापरावा काय ?" अशी वैद्य त्र्यंबकशास्त्री दाते यांनीं शंका विचारली.

---

* मुंबई बाजारांत नुकतीच चौकशी केली असतां मर्क कंपनीचा पारा मिळूं शकला नाहीं. –संपादक

उत्तरः— पारा ३ प्रहरपर्यंत खलला असतां वाळूं नये इतका थोडा थोडा काढा घालावा.

प्रश्नः- लसूणरसांत पारा खलून घेतात त्याची पद्धत काय ?

उत्तरः- पारा बुडेल इतका रस घेऊन दुप्पट दिवस त्याचा खल करावा. रसाच्या बरोबर पारा यावा इतका त्याचा खल झाला पाहिजे. लसूणरस जसजसा घट्ट होतो तसतसा तो मूर्छित व पृथक् होऊं लागतो. अगोदर मूर्च्छन मग गाढ होतो व पुनः पृथक् होतो. पुनः मूर्च्छित होतो. (तप्तखल्वांत)

प्रश्न—खल करतांना ६ तास खल, याला कांहीं शास्त्रीय आधार आहे कां ? ऋतुदृष्ट्या यांत कांहीं बदल करावा लागतो कां ?

चौसष्टी पिंपळीसारखें द्रव्य करतांना सतत ६४ तास खल करावयाचा ? कीं थांबून थांबून असा एकंदर ६४ तास करावयाचा ? खंडित व अखंडित खलानें काय फरक होईल ?

या प्रश्नाला उत्तर वैद्य वेणीमाधवशास्त्री यांनीं दिलें तें असें:— पूर्वीहि 'सामान्यतः' खंडित खल असत व 'विशेषतः' अखंड खल असे. खल करावयाचा तो बारीक होण्याकरितां आहे. द्रव्य न सडेल अशा रीतीनें खल झाला पाहिजे. द्रव्य बुडेल व खल करतां करतां तो सुकेल असें झालें पाहिजे. अखंड खल करावयाचा असतो, त्याठिकाणीं तसा स्पष्ट निर्देश आहे. (त्रिदिनं वा मुहुः) त्याठिकाणीं तसा खल करावा. सूतशेखर किंवा इतर सिद्धौषधी, कीं ज्याच्यांत इतर काष्ठौषधी असतात, त्यांच्याबाबत हा विचार झाला. पण पारा कांहीं शिळा होणार नाहीं किंवा सडणार नाहीं. पण भावना द्रव्य सडेल. म्हणून भाव्य द्रव्य वा भावक द्रव्य दोन्हींहि सडणार नाहींत अशी काळजी घेऊन खल करावा हें उत्तम.

१५-१०-५४ शुक्रवार दुपार

आज पारदावरील अष्टसंस्कार या विषयावर पं. वेणीमाधवशास्त्री जोशी यांचें व्याख्यान झालें. ते म्हणाले " आज सकाळीं प्रश्नोत्तररूपानें बरीच चर्चा झाली. तशा रीतीनें आपण चर्चा करीत बसलो तर चर्चा उत्कृष्ट होईल परन्तु आपल्याला वेळ पुरणार नाहीं. म्हणून चर्चेची ही पद्धत आतां न स्वीकारतां ग्रंथोक्त अष्टसंस्कार, त्यांचें महत्व व ते करतांना येणाऱ्या अडचणी इ.चा ऊहापोह क्रमशः मी यावेळीं करणार आहे. तत्पूर्वी रसशास्त्राची भूमिका थोडक्यांत सांगतो.

वनस्पतिप्रमाणेंच धातूंचाहि उपयोग चिकित्सेंत करून घेण्यासाठीं त्यांचेवर विविध संस्कार क्रिया करून त्यांचें पार्थिवत्व, शल्यस्वरूप काढून टाकून त्यांना शरीरांशीं लवकर सात्म्य होण्यासारखें, त्यांचें स्वरूप बनविण्याचे प्रयत्न झाले.

मानवी शरीरांत पार्थिव धातु, धातु या स्वरूपांत पचविण्याची शक्ति नाहीं. म्हणूनच त्यांचें शोधनमारण करून भस्म बनविलें जातें, व त्यामुळें तें पुष्कळंच मऊ बनतें व आमाशयांत गेल्यावर त्याचेवर पाचकाग्नीच्या कफपित्तांचा संस्कार होऊन तें अधिक मृदु बनतें. त्याचवेळीं तें शरीरसात्म्य होण्यासाठीं त्याचेवर अमृतीकरण करावें लागतें. तूप मध व त्रिफळा यांच्याबरोबर धातुभस्म घेऊन हें साधतें.

पारद हा असाच एक धातु आहे. पण तो अतिशय गुरु व चल आहे. खानिज स्वरूपांत त्यांत विषें व इतर धातूहि असतात, म्हणून पारदाचेंहि शोधन करावें लागतें. व या दोषरहित पारदावर शरीरसात्म्य होण्यासाठीं पुढचे संस्कार करावे लागतात. नागो वंग इ. दोष गेल्यावर हवेच्या संपर्कानेंहि त्यांच्यावर येणारे दोष काढावे लागतात.

पारदावर स्वेदन संस्कार

मानवी शरीरावर जसे स्नेहन-स्वेदन संस्कार मळ सुटे होण्यासाठीं करावे लागतात, तसेच संस्कार

पाऱ्यावरहि करण्याची कल्पना आहे. [परंतु मानवी शरीरापेक्षांहि पारा स्निग्ध असल्यामुळें त्यांनी स्नेहन संस्कार टाळला असावा.] स्वेदनानें दोष शिथिल होतात. व पुढच्या संस्काराला मृदु असा पारद बनतो. [या क्रियेचा परिणाम आधुनिक शास्त्राला दाखवितां येईल कां? हा प्रश्न आहे. किंवा इतर दोष पारदापासून कसे ढिले होतात, हें दाखविणें वा अग्नि इ. दोषांचें दर्शन होणें हें आधुनिक शास्त्राचें साहाय्यानें शक्य आहे काय?] सेंट्रिफ्युगल यंत्रानें नाग वंगाचे अंश वेगळे होणें शक्य आहे. पण ती जर एकजीव असतील तर वेगळी होणार नाहींत.

मर्दनसंस्कारांत वनस्पतींच्या रसांशीं पारद मिश्र होतो. त्यांतील दोषांचें व वनस्पतींचें ॲमल्गम् बनतें. पाऱ्यांतलि नाग वनस्पती घेतील व प्रत्येक संस्कारानन्तर कांजीनें धुतल्यावर हे वनस्पतींच्या व मलांच्या संयोगानें तयार झालेले क्षार धुतले जाऊन शुद्ध पारद निर्माण होईल.

पूर्वीच्या रससिद्धांचें ध्येय विशेषतः किमयेसाठीं होतें. व तें करीत असतां, देहसिद्धीची कल्पना त्यांना स्फुरली. आजच्याप्रमाणें केमिकल लॅबोरेटरीज त्यांचेजवळ नव्हत्या. मायक्रोॲनॅलिसिस्चें शास्त्र आजच्या प्रमाणें प्रगत पावलेलें नव्हतें. म्हणून त्यांनीं थोडासासुद्धां दोष राहूं नये म्हणून एवढे प्रचंड संस्कार पारदावर केले. शिंहसुद्धां निसटूं शकणार नाहीं इतकें बलाढ्य बनल्यावर कोल्हा कसा निसटूं शकेल? मूर्च्छनसंस्कारानें पाऱ्याची चंचलता थोडी कमी होते. उत्थापनासाठीं सेपरेटिंग फनेल वापरतां येईल, पण गरम कांजीनें पारा धुतला जातो, शीत कांजीनें लवकर धुतला जात नाहीं, हें लक्षांत ठेवावें. पातनक्रिया करतांना स्वेदनयंत्रांत अगदीं कोरडी पिष्टी घालण्याची खबरदारी घ्यावी. अधःपातन व तिर्यक्पातन अगदीं आवश्यक आहे. कांहीं ग्रंथकार पूर्वोक्त सर्व संस्कार तप्त खल्वांत करावयास सांगतात. त्यामुळें ते लवकर होतात. तसेंच प्रत्येक संस्कार अनेक वेळां करावयास सांगितला आहे. त्याचा हेतु गुणवर्धन हा असला पाहिजे, केवळ शुद्धि नाहीं. रोधन, संयमन व प्रदीपन इतके मिळून आठ संस्कार होतात.

शंकाः–हिंगुलोत्थपारद कमी कां होतो?

उत्तरः–पारा प्रथम हंडीच्या छिद्रांत जाऊन बसतो म्हणून. परंतु पुढें तीच हंडी वापरली तर कमी होत नाहीं. हंडीला गोपीचंदन किंवा चुना आंतून लावल्यानेंहि पारा कमी होत नाहीं.

मडक्याची रचना कशी असावी हा मोठा प्रश्न आहे. पाऱ्याची वाफ सर्व दिशेनें उडतें व जिकडे थंड तिकडे पारा चिकटेल. वरच्या मडक्याचें तोंड मोठें असल्यामुळें वरती जाईल व इकडे तिकडे लागेल.

जारणसंस्कार करतांना पाऱ्याच्या १/६४ इतका ग्रास अभ्रकसत्वादींचा वा सुवर्णादींचा देतात. त्यानें त्याची भूक वाढते. मग दुसरा १/४० हिस्स्याइतका तिसरा १/३० चौथा १/२० पांचवा १/१६ इतक्या प्रमाणानें ग्रास देतात. ग्रासानें गर्भद्रुति होते. जारणासंस्कारांत धातु आंच दिल्याशिवाय पाऱ्यांत द्रवरूप होतात. ही गर्भद्रुतिजारणा शक्य आहे. जारणासंस्कारानंतर धातु पुनः काढून घ्यावा असें सांगितलें आहे.

जारणासंस्कारानें वजन वाढतें कीं नाहीं? पं. डेग्वेकरशास्त्री म्हणाले “ जारणासंस्कारानंतर वजन वाढतें. २ तोळे सुवर्ण + २ तोळे पाऱ्यांत जारणा केल्यानें पारा ४ तोळे भरतो.” संस्कारांची कोणतीहि प्रक्रिया पुस्तकांत संपूर्ण अशी लिहून ठेवलेली नाहीं. पण जेवढी लिहून ठेवली तेवढी खोटी आहे, असें नाहीं.

आयुर्वेदाचार्य कुळकर्णीजी म्हणाले, “ सुवर्णयुक्तमकरध्वज सिद्ध झाला असून पं. श्रीनिवासशास्त्री (काशी) यांनीं तयार केला आहे. पण त्याची कज्जली कशी करावी तें माहीत नाहीं. श्रीनिवासशास्त्रींनीं ४५० वेळां जारितपारदाचा रससिंदूर केला आहे. (व लहान मुलांची चिकित्सा करण्यासाठीं ते स्वर्णद्रावसंस्कारित शर्करागुटिका फुकट द्यायला तयार आहेत.)

रसोपरसनिश्चिति

या विषयीं आयुर्वेदाचार्य कुळकर्णी यांनीं पुढील खुलासा केलाः—

रसक? ज्याच्यापासून अधिक यशद निघते तो 'रसक'. या दृष्टीनें झिंक-कार्बोनेट = रसक Mineral Calamina, Zinc Blend, Zinc Sulphide यांना रसक म्हणतात. पण Calamina च्या आलेल्या अनेक सॅम्पल्सपैकीं एकांतहि Zinc नव्हतें. उत्कृष्ट दिसणारें खर्पर घेऊन त्याचें पृथक्करण केलें. पण Zinc सांपडलें नाहीं. बाजारांतील Calamina कॅलशियम कार्बोनेट आहे.

चपल— रसशास्त्रांत चपल याचा अर्थ निराळा होतो. अशय नागभस्म (ब्रह्मी शिसें) यांत १/२४ चांदी असते. पूर्वी त्यांतून चांदी काढूं शकत नव्हते, कारण तसें करतांना लेडऑक्साइड बनें. नागापासून जो चपल निर्माण होतो तो शुद्ध चांदी आहे.

कंपिल्ल= कंपिला. अग्नीवर टाकल्यावर जळतें. (Easily Combustible Carbon) ती कंपिला रसशास्त्रांत घेतात. याचा उपयोगः- इतर धातूंबरोबर मिसळून त्यांचीं लवकर भस्में करावींत.

अम्रिज़ार= अंबर.

प्रश्नोत्तररूप चर्चा

वैद्य वि. म. गोगटे-- असा पारा बेऊन आपल्या शारीर घटकांना त्रास पोंहोंचणार नाहीं कां? कारण आशुकारित्व हा विषाचा गुण आहे. पारदाला आशुकारित्व येतें म्हणजे विषत्व येतें. अशीं आशुकारी विषस्वरूपी सिद्धौषधें वापरून दोषधातुमल-सिध्दांताच्या आपण जवळ गेलों कीं लांब?

उत्तर- पाऱ्यावरील संस्कार त्याचें विषत्व कमी करणारे आहेत. ते त्याला विषस्वरूपी कसे बनवतील? अमृतांतहि विषसादृश्य गुण असून विषाचे परिणाम तें नाहींसें करतें. (समपीतेन मद्येन ते विकाराः शाम्यन्ति, ये हीनमिथ्यातिपीतेन मद्येन भवन्ति ।) सूक्ष्म स्रोतसांत जाण्याचे सामर्थ्य त्यानें येतें म्हणून अमृताला विष म्हणूं नये, तद्वत् असा पारा विषसदृश नाहीं.

प्रश्नः-सिद्धौषधीचिकित्सेंत दोषधातुमलात्मक सिध्दांत सुटला कीं नाहीं?

वैद्यराज विनायकरावजी एकतारे यांचें उत्तरः-

रसचन्डांशूंत 'दोषदूष्यविवेक केला नाहीं तरी चालेल, असें स्पष्ट सांगितलें आहे. तथापि प्रत्यक्ष चिकित्सा करतांना तो विवेक वैद्य करतोच. बल्य औषध कोणत्या प्रकृतींत, कोणत्या धातूला, असा दोषदूष्यविवेक आपण करतोच.

प्रश्न- वैद्यराज वि. म. गोगटे म्हणालेः- प्रभावीं औषधें वापरतांना, तीं जर प्रभावीं असतील तर दोषदूष्यविवेक रहात नाहींच. व आयुर्वेदीय चिकित्सेंत प्रभावी द्रव्यांचाच वापर करावयाचा असेल, तर नवीन निघालेलीं प्रभावीं द्रव्यें घेण्यास कांहींच हरकत रहाणार नाहीं.

उत्तरः- वेणीमाधवशास्त्री म्हणालेः —

सिद्धौषधीचिकित्सेंत प्रभावीं द्रव्यें वापरीत असतांनाहि दोषदूष्यविवेक करतां येतो. द्रव्यांचा अभ्यास, त्यांचे गुणकर्मांचा अभ्यास असतां, असा वापर विवेकपूर्वक होतो. केवळ प्रभावावरच दृष्टि रहाणें हा अध्ययन-अध्यापनांतील दोष आहे.

वैद्य वि. म. गोगटे म्हणाले,:- "कांहीं वेळां, 'मुस्तापर्पटकं ज्वरे तृषि जलं' इ. प्रमाणें व्याधिप्रत्यक चिकित्सेला स्थान आयुर्वेदांत आहेच. मग व्याधिप्रत्यनिक चिकित्साच कां आत्मसात् करूं नये?"

वैद्य वेणीमाधवशास्त्री म्हणालेः– 'दोषदूष्यविवेक असेल तर प्रभावावर फारसा भर राहणार नाहीं. व प्रभावावर भर दिला तर दोषदूष्यविवेक सुटतो, अशी स्पष्ट कल्पना शंकेंत आहे. त्याला उत्तर असें, मूळ निघण्टू-ग्रंथ व टीका आपल्याला पहावयास मिळाले नाहींत. वनस्पतींचाहि निघण्टु दोषप्रत्यानिक वा व्याधिप्रत्यनिक अशा विशिष्ट दृष्टीनें सांगितलेला नाहीं. प्रभावी सिद्धौषधींचाहि तसा नाहीं. खरे निघण्टू नष्ट झाले आहेत. दोषधातुपरंपरा नष्ट झाली आहे. हें मान्य करूनहि, (१) शास्त्र मरणोन्मुख असतांहि, १०च औषधें बटव्यांत घेऊन, अनुपानभेदानें दोषदूष्यविवेकपूर्वक चिकित्सा करतातच. (२) श्वित्रनाशक-मनःशिला माक्षिक व हरताळ तिन्ही प्रभावी असतां, अतिस्वेदी श्वित्रांत मनःशिला वापरूं; हरताळ कफभूयिष्ट श्वित्रांत, तर माक्षिक पित्तभूयिष्ठ श्वित्रांत असा, विवेक करावाच लागतो. म्हणून, दोषदूष्यविवेक जर नष्ट झाला तर प्रभावीं औषधेंसुद्धां आपला प्रभाव हमखास दर्शविणार नाहींत.

शुक्ति व मुक्ता यांचा वापर करतांना दोषदूष्यविवेक आहेच. वाग्भटाचार्यांनीं उपसंहार करतांना कांहीं प्रभावीं औषधें सांगितलीं तरी सबंध शास्त्रीय चिकित्सेची आवश्यकता त्यामुळें अनवश्यक होत नाहीं. उलट संपूर्ण चिकित्सेनंतरची ती एक अल्पबुद्धिहितार्थाय थोडक्यांत छोटी चिकित्सा सांगितली, असाच अर्थ निघतो.

नवीन प्रभावीं द्रव्यें वापरूं नयेत, कारण (१) त्यांचा वापर तत्वतःच अमान्य. तीं औषधें तीव्र, तात्पुरती विकारशामक असलीं तरी शरीराला अपायकारक होणारीं आहेत.

(२) आयुर्वेदीय दृष्टिकोनांतून तीं पचविलीं गेलीं नाहींत. तोंपर्यंत उपयोगीच नाहींत. त्यांच्या बाबतींतला दोषदूष्यविवेक संशोधनाचाच विषय राहील.

(३) आपण जर या औषधींचा वापर सुरूं केला, तर आतांपर्यंत निर्माण करून ठेवलेल्या प्रचंड रसयोगसागराचा उपयोग कोण करणार ?

(४) राष्ट्रीय विचारसरणींतून परकीय द्रव्यें न वापरणें इष्ट.

(५) औषधींची स्वायत्तताहि नष्ट होण्याची भीति त्यांत आहे.

वैद्यराज वि. म. गोगटे म्हणालेः– माझ्या शंकांनीं आपल्याला दुःख होऊं देऊं नका. केवळ विरोधकाची भूमिका घेऊन, विरोध म्हणून नव्हे, मी या शंका मांडीत आहे. आपल्यापुढें असणारे कूटप्रश्न आपल्याला सोडवितां यावे, हा त्यांत हेतु आहे.

प्रश्नः– एक वर्षाच्या आंतील मुलाला रसौषधी दिल्यानें दुष्परिणाम होतात काय ? होत असल्यास तो न व्हावा म्हणून काय खबरदारी घ्यावी ? (श्री. गोगटे)

उत्तर– हीं औषधें जरूर तीव्र आहेत. तीव्र औषधांचा उपयोग होतां होईल तों २० वर्षें वयापर्यंत जोपर्यंत शरीर वृद्ध होत आहे, तोंपर्यंत करूं नये. लहान मुलांत सात्मीकरण लवकर होतें. ४० वर्षेंपर्यंत तीव्र रसौषधीचा वापर करूं नये. धातू व पारदाचा उपयोग करूं नये. आपल्याकडील रसग्रंथांत दोष-चिकित्सा दिलेलीच आहे, तेव्हां वरील शंका विचारप्रवर्तक म्हणून मांडल्या असाव्यात असें वाटतें.

वैद्य गोगटे–'बाल' वगळले कीं, आपल्या रुग्णांपैकीं शें.४० चेवर रुग्ण वगळले. बालांप्रमाणेंच वृद्धहि वगळावे लागतील; व मग राहिलेले रुग्ण फारच थोडे मिळणार !"

उत्तरः– तथापि लहान मुलांना सिद्धौषधींपैकीं ज्यांत विषें आहेत, अशीं बचनागयुक्त औषधें देऊं नयेत. पारद धातूंचे दोष नाहींसे करतो, व धातू पारदाचे दोष नाहींसे करतात. हीं द्रव्यें (१) लहान मुलांना द्यावयाचींच असल्यास अतिशय कमी असे शर्कराकल्प–बारीक केलेल्या कल्पना मृदु कल्प द्यावे. (२) तीव्र औषधें सौम्य अनुपानांतून द्यावीं. (३) २० ते ४० वर्षें वयाची मर्यादा रसौषधींकरतां आहे.

प्रश्न ३रा–वै. वि. म. गोगटे– रसतंत्र प्रचारांत येत असतांना प्रथम अग्निसंस्कार अतितीव्र नव्हते. पण पुढें फार तीव्र होत गेले. अतिशय प्रखर तीव्र अग्नीवर तयार झालेलीं हीं द्रव्यें पचविण्यास कायाग्नि भौतिक अग्नीपेक्षां दुर्बल ठरून अहितकारी परिणाम होत नाहींत कां ?

उत्तर– (१) बाह्य जगतांत जितक्या उष्णतेनें द्रव्य तयार होतें तितकीच उष्णता शरीरांत त्यांच्या पचनाला लावावी लागते असें नाहीं.

(२) तितकीच उष्णता शरीरांत निर्माण होईल असें नाहीं. उदा. मीठ तयार करतांना बाहेर उष्णता फार लागते. पण शरीरांत मात्र तें मीठ आवश्यक प्रमाणांत उपकारकच ठरतें.

पूर्वपक्ष–बाह्य द्रव्यें मानवी अग्नीच्या कक्षेच्या बाहेरचीं आहेत. खरपाकी आहेत म्हणुन त्यांचा अग्नि तीव्र आहे, व त्याच्या अभिभव केल्यानंतरच शरीर तीं आत्मसात् करणार, असें नाहीं कां? मग त्यांचा दुष्परिणाम शरीरांतील कायाग्नीवर कां होऊं नये ?

उत्तरपक्ष - 'कुकूलखर्परभ्राष्ट्रकन्दुगाराविपाचितान्। एकयोनीन् लघून् विद्यात् अपूपान् उत्तरोत्तरं' या वचनांत पूर्वपक्षाचें खण्डन आहे. धातुद्रव्यांचे बाबतींतहि शास्त्रकारांनीं असा विचार केला आहे. त्यांनीं लावकपोतादींच्या शारीरपित्ताचे संस्कार ह्या द्रव्यांवर करून, शरीराला जवळचें रूप देण्याचे प्रयत्न केले आहेत. २) पारदभस्म करतांना गजपुट न देतां तुषाग्नि द्यावयास सांगितला आहे.

(३) खान्देशीयांना परिचित असणारे बट्या नांवाचें खाद्य पोळीपेक्षां लघु होतें.

(४) धातुद्रव्यें अतिकठीण. त्यांना आत्मसात् करण्याजोगी बनविण्यासाठीं तीव्र अग्निसंस्कार केल्यानें त्यांचा अग्नि वाढत नसून कमीच केला जातो. त्या अग्नीचा अभिभव झाल्यावांचून बाहेर बाह्य अग्नि किंवा शारीर जठराग्नि त्यांच्यांत रूपांतर करूं शकणार नाहीं. तसा अभिभव होतो म्हणून तीं द्रव्यें जठराग्नीवर दुष्परिणाम करीत नाहींत. दुसरें असें कीं जठराग्नीवर दुष्परिणाम होऊं नये म्हणून त्यांच्यावर अमृतीकरण संस्कार आहेतच.

(५) प्रत्यक्ष प्रमाणानेंहि त्यांचा वाईट परिणाम होत नाहीं. मंडूर तापवून पाण्यांत विरघळून पिण्यास सांगितलें आहे. इतक्या सूक्ष्मतेनें विचार केलेला आहे.',

वरीलप्रमाणें रसशास्त्रावर विशेषतः पारदसंस्कारावर चर्चा झाल्यावर पुढीलप्रमाणें ठरावविषयक चर्चा झाली.

वैद्यराज स. वा. दातार यांच्या सूचना (१) पारदाविषयींचे संस्कार विद्यार्थ्यांना शिकवावेत. पण परीक्षेला मात्र ते ठेवूं नयेत. व प्रॅक्टिकल आवश्यक ठेवूं नये.

(२) हीरकभस्म आदि सारखीं महाग द्रव्यें सामुदायिक स्वरूपानें मान्य गुरु व विद्यालयें यांना प्रदर्शनापुरतीं (Museum) सरकारनेंच पुरवावींत.

(३) वैद्य वि. म. गोगटे– विवाद्य वनस्पतींची एक यादी पाठ्यक्रमसमितीनें परीक्षकांना पाठवावी. व त्या वनस्पती परीक्षकांनीं विचारूं नयेत. कांहीं दुर्मिळ वनस्पती अभ्यासक्रमांतून गाळाव्या.

वैद्यराज द. अ. कुलकर्णी म्हणाले– 'सरकार हें करूं शकत नाहीं. जादवजी लल्लुभाईसारख्या मान्य औषधी दुकानदाराकडून ५० सेट्स् मागवून सेवासंघानें ते मान्य सेट म्हणून इतरांना समूल्य पुरवावेत.

वैद्यराज वेणीमाधवशास्त्रीं म्हणाले– वनस्पती गाळून भागणार नाहीं. औषधीकरणांत उपयुक्त अशा थोड्याच आहेत. त्याच विस्तारपूर्वक शिकवाव्या. बाकीच्यांचा नुसता परिचय व तात्विक विवेचन थोडक्यांत करून पुढें जावें. संस्कार गाळूं नये. त्यामुळें नांवें समजतात; खोल विचारांची संवय लागेल व

चांगल्या वस्तूंची परंपरा राखली जाईल. नाहींतर अगोदर नष्ट होऊं पहात असणारी आयुर्वेदाची ही जाज्वल्य बाजू गळून पडेल.

संशयी द्रव्यें असतील, त्यांचे नमुने मागवून परीक्षण करून तें पत्रिकेंत प्रसिद्ध करावें व मग निश्चित ठरवून सेवा संघानें ते सर्वत्र पुरवावेत.

स्वामी शरणानंद यांच्या फार्मसीमार्फत वनस्पतींचे फोटो पूर्वी प्रसिद्ध झाले होते. सगळयांना पुरविण्याकरितां जर ते मागविले तर उपयोग होईल.

प्राणाचार्य गोडबोलेशास्त्री म्हणाले:– प्रदर्शनार्थ नमुने पनवेल वैद्यसंमेलनांत ज्या व्यक्तींनें ठेवले होते, त्या व्यक्तीकडून मागवून घ्यावेत.

वेणीमाधवशास्त्री-सेवा संघांतील शिक्षकांनीं ब्लाटिंग पेपर्सचीं पॅड्स् तयार करून वनस्पतींची अल्बम्स् तयार करावींत. नॅचरल कलर्ससहित फोटोहि घेतां येतात; तसे घेऊन पुस्तक प्रसिद्ध करावें.

वै. कुळकर्णी–हीरकभस्म इ. कुठल्याहि शिक्षणसंस्थेंत तयार झालेलीं नाहींत. म्हणून तीं विद्यार्थ्यांकरितां प्रॅक्टिकलमधून गाळून टाकावींत.

१५।१०।५४ रोजीं दुपारीं चर्चेस सुरवात करण्यापूर्वी नाशिक येथील सुप्रसिद्ध आदिवासी कार्यकर्ते, श्री बगारामजी यांनीं परिषदेला पुढीलप्रमाणें एक उपयुक्त सूचना केली.

“आपण जेथून वनस्पती मिळवितां, तेथें जीवन व्यतीत करणारी, वेळेवर आपल्याला औषधी पुरविणारी आदिवासी जनता मात्र भूताखेतांवर व मंत्रटोण्यावर विश्वास ठेवते. या लोकांच्या भावनेवर आपण उपाय सुचवावे, व या भावनांच्या योग्यायोग्यतेचा वैद्यवर्गानें जरूर अभ्यास करावा.”

१५-१०-५४ रात्रीं

वैद्य वि. म. गोगटे यांनीं अष्टांगहृदयाच्या ९ व्या अध्यायावरील आपल्या विस्तृत अशा शंका परिषदेपुढें ठेवल्या व १५ व्या अध्यायावरील विचार मांडले. (हे विचार स्वतंत्र लेखरूपानें दिले जातील.)

१६।१०।५४ शनिवार सकाळीं

वैद्यराज विनायकरावजी डेग्वेकर यांनीं ‘पंचमहाभूतविषयक कल्पना’ विद्यार्थ्यांना कशी समजून द्यावी हें पुढीलप्रमाणें मांडलें:—

मानवीशरीर पंचज्ञानेंद्रियांनीं युक्त आहे. व प्रत्येक इंद्रिय, ज्ञानेंद्रिय, विशिष्टच अर्थ ग्रहण करतें. त्याचे प्रकार पुष्कळ असतात. पण मूल जितके अर्थ तितकेच सृष्ट पदार्थ मानले पाहिजेत. व असे ५ च अर्थ प्रकार आहेत. याप्रमाणें महाभूतें ५ कां? हें विद्यार्थ्यांना स्पष्ट समजून दिल्यावर त्यांचें वैशिष्ट्य नंतर सांगावें.

प्रत्येकाचें वैशिष्ट्य, उदाहरणार्थ आकाश म्हणजे पोकळी. त्याचा गुण, वैशिष्ट्य शब्दच! आकाशाला महाभूत कां? तर आकाशाशिवाय सृष्टीची वा इतर महाभूतांची उत्पत्ति नाहीं. कोणत्याहि वस्तूला आकाश, स्थान पाहिजेच. आकाशाचा शब्द गुण कां? हे सांगतांना आधुनिक ज्ञान सांगता आलें तर बिघडणार नाहीं. कणांना गति मिळाल्याशिवाय शब्द नाहीं व गतीसाठीं अवकाश, आकाश पाहिजेच. म्हणून आकाश शब्दगुणाचेंच आहे.

वायु— यांत शब्द + स्पर्श आहे. याकरितां उदा. म्हणून स्पष्टपणें बाह्यवायु व त्याचीं कार्यें सांगावी. माल हा बाह्यवायु-हवा-वायुप्रधान पांचभौतिक असला तर स्वतंत्र ‘वायु’ महाभूत नाहीं हें स्पष्ट सांगावें. बाह्य वायूंत हे २ गुण दिसतात. वायूरूपरहित रूक्षादिस्पर्शरहित व गंधरहित आहे. वायूबरोबर येणारा ‘गंध’ संयोजक आहे. तन्मात्ररूप तात्विक वायूंत गंध नाहीं.

तेज—म्हणजे अग्नि. या अग्नीचें वैशिष्ट्य शब्दस्पर्शरूप हें आहे. पण गंध व रस नाहीं; पांचभौतिक अग्नींतहि हे गुण आहेत.

आप्— 'रसवान्' यांत रस उत्पन्न होऊं शकतो. जलांत गति आहे, शब्द आहे, जल स्पर्शशीत आहे. जिव्हेद्वारां आकलनीय रस आहे. पण गंध नाहीं.

पृथ्वी— मातीचें उदाहरण उत्तम ५ गुणांनीं युक्त आहे. पाऊस पडल्यावर पृथ्वीचें गंधत्व कळतें.

याप्रमाणें सामान्य सोपें विवेचन करावें. फार तात्विक विवेचन नको. पण सामान्य विवेचन तात्विक विवेचनास विरोधी नको. त्याचप्रमाणें हें वरील आधुनिक विज्ञानाप्रमाणेंहि लागूं पडतें. शिक्षणक्रमांत प्रथमारंभीं एवढेंच विवेचन पुरें! तन्मात्रविषयक तात्विक विवेचन आरंभीं नको. ४ थ वर्षाचें शेवटीं पुनः पंचमहाभूतविषयक दृष्टिकोन द्यावा व त्यावेळीं तन्मात्रांचाहि विचार करावा.

वैद्य श्री. कृ. करमरकरः— " आपल्या या वाक्यावरून तर्कसंग्रह व सांख्यकारिका हे विषय व शारीरस्थानांतील तात्विक विचार शेवटच्या वर्षांत असावे असा दिसतो? " वैद्य डेग्वेकरजींनीं 'होय' असें उत्तर दिलें. वैद्य विष्णुपंत गोगटे म्हणालेः– " अनुमान प्रकरणांतील पंचावयव वाक्य प्रथम सांगावें मात्र! "

श्री. वेणीमाधवजी म्हणालेः— " वैद्यकीय व्यवहाराची भूमिका सांगावी. त्याचा आयुर्वेदाचा मेळ घालीत घालीत उलगडा करावा. मात्र हें शिकवतांना आयुर्वेदाच्या द्रव्यादि विषयक कल्पना व त्यांच्या कल्पना याच्यांतील मेळ व फरक स्पष्ट दर्शवितां आला पाहिजे.

वैद्य विनायकरावजी एकतारे म्हणाले— " विद्यार्थ्यांना विषय समजून देण्यापूर्वी कोणत्याहि विषयाची परिभाषा आपण अगोदर समजावून देतो. म्हणून सामान्य परिभाषा अगोदर शिकवावी, व विशेष विवेचन नंतर सांगावें. सामान्य परिभाषा आरंभीं शिकविल्याशिवाय सगळीकडे खटकणारच, म्हणून आरंभीं हे विषय शिकवावे. त्यामुळें पायाभूत ज्ञान सहज आकलन होऊं शकतें. पाश्चात्य वैद्यकांतहि ही रीत अवलंबिली आहे. मेडिसिनच्या विद्यार्थ्याला आरंभीं फिजिक्स केमिस्ट्री बायॉलॉजी इ. शिकवतात. कारण तीच परिभाषा शास्त्रांत येते. मागील वैद्यमंडळींत व आमच्यांत फरक पडला याचें कारण न्याय–मीमांसा इ. शास्त्रांचा अभ्यास आम्हीं अगोदर केला. त्यामुळेंच आम्ही थोडाफार आयुर्वेद समजूं शकलों. व विवेचन करूं शकलों. माझें म्हणणें तर असें आहे कीं, प्रत्येक अध्यापकानें सांख्य व न्याय यांचें अध्ययन अगोदर करावेंच व ते विषय समजून घ्यावे. द्रव्यगुण समजलेले असतील तर चरकाचार्यांना काय म्हणावयाचें तें कळेल, ऑस्मोसिस इ. नियम माहीत असतील तर फिजिऑलजी नीट कळेल, पण विद्यार्थ्यांना शिकवितांना मुख्य अट अशी कीं, हे विषय जितक्या प्रमाणांत आकलन होऊं शकतील तितक्या प्रमाणांतच शिकवावेत. "

वैद्य बिंदुमाधवशास्त्री म्हणालेः— " मला आनंद वाटतो कीं, आतांपर्यंत अनुल्लेखिलेल्या मीमांसेचाहि उल्लेख विनायकरावजींनीं केला. माझे मतें प्रत्येक अध्यापकानें मिमांसा अवश्य शिकावीच. मीमांसा शिकल्यानेंच उत्तम अध्यापन करतां येईल. आतां प्रश्न असा कीं, विद्यार्थ्यांनाहि मीमांसा शिकवावी कीं नाहीं? अभ्यासामर्थ्यैच तो विषय वाटून द्यावा, व तोहि पहिल्या १॥ वर्षांतच शिकवावा. कारण मीमांसाशास्त्र हें वेदाचा अर्थ लावण्याचें शास्त्र आहे. तो विषय समजला तर विद्यार्थ्यांनाहि एखाद्या सूत्राचा अमुकच अर्थ असा निघाला तें कळूं शकेल. मात्र हा विषय अगदीं सोप्या पद्धतीनें शिकवावा.

अध्यक्षः— " दोघांच्या मताचा निष्कर्ष असा कीं, प्रथम तर्कसांख्यमीमांसा, नंतर शास्त्र, असा क्रम घ्यावा. व शिक्षकांनींहि हे विषय प्रथम शिकावे, अभ्यासावे. मीमांसा प्रथम शिकवावी व मग १॥ वर्षांच्या शेवटच्या सहामाहींत तर्कसांख्य शिकवावें. अगोदर विषय मग शास्त्र शिकवावें हा अध्यापनांतील

नियम आहे. अगोदर विषयाचा फुलोरा व मग विषयांतील तात्त्विक भाग शिकवावयाचा असतो. अगोदरं तत्त्व सांगितल्यास आकलनास काठिण्य येतें. भूयोदर्शन अगोदर, मग प्रतिज्ञा.

वैद्य बिंदुमाधवशास्त्री—१९४० मध्यें डॉ. मडकमकरांकडे आयुर्वेदाच्या शिक्षणाविषयीं साक्षी झाल्या त्यावेळीं प्रथम मीमांसा शिकवावी असें मी मांडलें होतें. समितीच्या सदस्यांना सूचना कीं, त्यांनीं मीमांसा प्रथमारंभीं घालावी व तसा ठराव करावा.

अध्यक्षः—(१) वै. एकतारे, गोगटे व पंडित यांची कमिटी तर्क, सांख्य, मीमांसा, हे विषय किती व कसे शिकवावे याबाबत नेमतो. त्यांनीं परिषदेला सूचना करावी. (२) अध्यापकांनीं टीका वाचल्याच पाहिजेत. टीकेंत ज्या मुद्यांवर भर दिला पाहिजे त्या मुद्यांचें मार्गदर्शन पं. डेग्वेकरजींनीं करावें. ”

— दोषादिविज्ञानीयमध्यायम् —

विवेचक— पं. विनायकरावजी डेग्वेकरशास्त्री, जबलपूर

अन्न+पाचकपित्त=अन्नरस+मूत्र+शकृत्+वायु येथें वायुसंज्ञक द्रव्य तयार होतें. ‘द्रव्य’ असें ठासून सांगावें. पित्तं-पक्ति । पक्ति=पूर्णपाक । मेधा –ग्रंथाकर्षणसामर्थ्यम् । धी=प्रज्ञा वा बुद्धि. तात्काल उत्तर जिच्यामुळें देतां येते ती बुद्धि. बुद्धिस्तात्कालिकी ज्ञेया मतिरागामि गोचरा प्रज्ञा नवनवोन्मेषशालिनी प्रतिभां विदुः ॥ अशी व्याख्या— पं. लोकनाथशास्त्री न्यायाचार्य जबलपूर यांनीं सांगितली आहे. (वैद्यराज ह. वा. परांजपे, (पुणें) यावेळीं परिषदेंत आले. अध्यक्षांनीं त्यांचेविषयीं पुढीलप्रमाणें दखल घेतली. “आपल्यामधील शुद्ध आयुर्वेदाकरितां अत्यंत त्यागपूर्ण सेवा केलेली व्यक्ति आज आतां येथें उपस्थित झाली. यामुळें मला आनंद होत आहे. संपूर्ण आयुष्यभर शुद्ध आयुर्वेदाची सेवा करून ज्यांनीं त्याचें थोडेंहि श्रेय चाखलें नाहीं असे ते आहेत. अष्टांग आयुर्वेद विद्यालय पुणें या संस्थेचे ते प्रमुख आहेत. त्यांचे बुद्धिनिकषावर घासलेले विचार आपल्याला सांगावे म्हणून ते येथें उपस्थित आहेत असें मी समजतो. ”)

वैद्य ह. वा. परांजपे यांनीं पं. डेग्वेकरजींना अशी विनंति केली कीं, एकाच अवयवाचे बाबतींत वायु, पित्त, कफ यापैकीं प्रत्येकाचें कार्य काय काय होतें याचें मार्गदर्शन पंडितजींनीं करावें ”

वैद्य डेग्वेकरशास्त्री म्हणाले— श्लेष्मा हें सहकारी कारण, पित्त पचनाचें कारण, वात-करविता. शरीरांत सर्वत्र अशाच प्रकारें कार्य होतें.

विसर्ग	आदान	विक्षेप
तर्पणकार्य	दर्शन	पाख्व
सहकारी कारण (फ)	असाधारण कारण (पित्त)	कर्ता (वायु)

धातूंचीं कार्यें — प्रीणन-मनाची प्रीति. पण येथें सर्वशरीरधातुपोषण असा अर्थ आहे. जीवनं-ओजोवृद्धिकरं । ओज हेंहि द्रव्य आहे. रक्त ओज वाढवितें. बाहेर पडलेलें रक्त ओजोविहीन असतें. पूरणं-अस्थिपूरणं । मज्जेनें अस्थिपूरण होतें. रसानें पूरण निराळें !

दोषधातुमला मूलं सदा देहस्य —वृक्षाप्रमाणें असणाऱ्या शरीराचे दोष मूल आहेत. सदा आहेत. उत्पत्तीपासून अन्तापर्यंत आहेत मृत्यूनंतर मात्र ते नसतात. मृत्यूनंतर वातकफपित्त यांचें दोषरूपत्व नाहीं. मलरूप दर्शन होईल. तेथें क्रिया नाहीं. पंचमहाभूताविकाररूप फक्त शिल्लक राहतें.

शंकाः—संधिस्थ श्लेषक कफ दिसतो. ते घटक दोषधातुमल यांच्या वृद्धिशमनालाहि उपयुक्त आहेत. अशा रीतीनें प्रात्यक्षिकाला व दोषधातुमलांच्या वृद्धिशमनालाहि उपयुक्त असल्यावर मरणोत्तर दोषांची स्थिति नाहीं हें कसें ?

उत्तरः—आत्मलिंगें नाहींत. बाकी सर्व आहे. मृत शरीरांतील द्रव्येंसुद्धां वातपित्तकफ असतात. फक्त त्यांना आत्मलिंग नसते, असा निर्णय सध्यां घ्यावा.

वै. पंडितशास्त्री म्हणालेः— " धातूंचीं श्रेष्ठ कर्मे सांगितलीं आहेत. तेव्हां श्रेष्ठ कर्मे हींच कशीं ? व कनिष्ठ कर्मे कोणतीं ? अशी शंका आहे. वैद्य वेगांमावत्रशास्त्री म्हणालेः—हा ग्रंथ दोषप्रधान आहे, म्हणून धातूंकडे जरा दुर्लक्ष झालें आहे. म्हणून धातूंच्या कार्याचें अधिक स्पष्टीकरण व्हावें हें युक्त आहे. धातूंचीं इतर कर्मे धातूंच्या सारासार लक्षणावरून घ्यावीं. धातूंचीं द्रव्यतः मूर्त कर्मे आहेत. व गुणतः अमूर्त कर्मे आहेत. तो विषय या ठिकाणीं शिकवावा. त्याकडे दुर्लक्ष करूं नये, सार धातु म्हणजे "विशुद्धतरो धातुः" [Qualitatively & Quantitatively] द्रव्यतः व गुणतः या लक्षणांत लौल्यगुण कोणाचा ? पित्ताचा कां मांसधातूंचा ? हें कार्य दोषसापेक्ष कां धातुसापेक्ष ? चिन्हांत-दोषचिन्हें, धातुचिन्हें, मलचिन्हें, अवयवचिन्हें असा भेद करावा लागतो. उदा. अन्तः वा बहिर्दाह हा केव्हांहि पित्ताचाच समजला जाईल. पण पिंडिकोद्वेष्टन हें चिन्ह मांसधातूचेंच. वांति- हें अवयवाचें चिन्ह. याप्रमाणें सारासारावरून धातूंचीं इतर कर्मे कळतात. पण श्रेष्ठ कर्मे कशीं तें कळलें नाहीं. लेप हें मांसाचें कर्म ! मांससारवान् व्यक्तींत-मांस अस्थीचें तसेंच शरीराचें रक्षण करतो. कृश माणसास शीतता लवकर बाधते. पुष्ट माणसांचें तसें नसतें. याप्रमाणें केवळ मार्गदर्शन आहे, अधिक विचार करून पहा.

वैद्य गोगटेः— लेप हें कार्य मांसाचें कीं मेदाचें ?

उत्तरः—सुश्रुतानें अच्छिद्रता हें लक्षण मांसाचें सांगितलें ! यावरून लेप हें मांसाचें कार्य आहे. मेदाचें प्रधान कर्म लेपापेक्षांहि स्नेहनाचें आहे.

पंडित डेग्वेकरजी - " फार उत्तम चर्चा झाली ही. परन्तु या ठिकाणीं २ सूचना करूं या. (१) परिषदेनें समितीला कळवावें कीं, परीक्षकांनीं हे नियम पाळावे ! इतका विस्तृत अर्थ विद्यार्थ्यांकडून अपेक्षूं नये. व (२) प्रत्येक आयुर्वेदीय विचार, दोषवाद, धातुवाद, मलवाद इ० त्रिविध दृष्टिकोनांतून व्हावा. त्याचप्रमाणें माझी विनंति अशी कीं, शंका विवेचन चालू असतां विच नये त्या टिपून ठेवाव्या ! विवेचन संपल्यावर माझेजवळ द्याव्या. मग आपण योग्य ती चर्चा करूं ! "

महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीं यावेळीं परिषदेला भेट दिली. परिषदेनें त्यांचें स्वागत केलें व दुपारीं १ तास परिषदेच्या कांहीं शंकांचें निवारण करावें म्हणून त्यांना विनंति केली. त्याचप्रमाणें वै. ह. बा. परांजपे यांनींहि त्यांच्या संस्थेच्या भवितव्याचे दृष्टीनें महत्वाच्या कामाकरितां जायचें असल्यामुळें दुपारीं पं. डेग्वेकरजींचें विवेचन न होतां तर्कतीर्थ जोशी व वैद्य परांजपे या दोघांच्या विवेचनास वेळ देण्यांत आला व पं. डेग्वेकरजींचें विवेचन ता. १७ रोजीं पूर्ण झालें.

१६-१०-५४ दुपारीं

वैद्य ह. बा. परांजपे यांनीं अष्टांगहृदयांच्या सूत्र व शारीर या स्थानांत पाठ्यक्रमांतील ४ विषय शारीर, दोषधातुमलविज्ञान, स्वस्थवृत्त व द्रव्यगुणकर्म कसे अन्तर्भूत होतात तें सांगितलें व विवेचन करतांना त्यांनीं आपले विचार व शंका पुढील प्रमाणें परिषदेपुढें मांडल्या.

सूत्रस्थानांत दोषांचीं स्थानें व कर्मे वर्णिलेलीं आहेत. पण दोषस्थानांचा विषय शारीरांत जातो. व

दोषकर्मांचा विषय दोषधातुमलविज्ञानांत जातो. माझ्या कांहीं शंकाः--

[१] कटुविपाकानें परिपिंडित पक्वान्नापासून निर्माण होणारा वायु व 'प्राणवायु' एकच कां ?

[२] पंचज्ञानेंद्रियें व वायु यांच्या कार्यांत फरक काय ?

[३] वायूच्या बाबतींत 'स्थान' व 'संचार' व कर्म असें वर्णन केलें. उदा.-प्राण, प्राणोऽत्र मूर्धगः मूर्धा हें स्थान, उरःकण्ठचरः हा संचार, व बुद्धिहृदयेंद्रियचित्तधृक् हें कर्म. असेंच वर्णन पित्ताचें बाबतींत कां नाहीं ? नसले तरी वरील दिग्दर्शनावरून घेतां येईल कीं नाहीं ?

[४] शारीरदोषसंग्रहांतील दोषरूप प्राणवायु हा मानसप्रदेशांवर बुद्धिहृदयेंद्रियचित्तधृक् कसा ? मानसदोषांचें तें कार्य पाहिजे.

[५] अक्षाणां पाटव हें वायूचें कार्य. दर्शन हें पित्ताचें व अक्षतर्पण हें कफाचें. पण प्राणवायूचें इंद्रियधृक् कार्य व वरील तिघांतील फरक आयुर्वेदीय उदाहरणांनीं समजून द्यावा अशी विनंति आहे.

[६] स्नायूंना कार्य करावयास लावणारा वायु कोणता ? स्नायूंची संख्या मोजून कशी दाखवावी ?

[७] आहाररसाचें पंचमहाभूताग्नीनें होणारें पचन कोठें होतें ? त्याचें शारीर ?

[८] वैद्यांना प्रतिभा कमी आहे असा आक्षेप आहे. नवीन प्रचारांत आलेल्या आहारद्रव्यांच्या गुणकर्मांवर नवीन श्लोक रचले पाहिजेत.

[९] स्वस्थवृत्त म्हणजे दोषधातुमलांचें साम्य प्रस्थापक आहारविहार व क्रियाकर्म, अशी व्याख्या कितपत योग्य वाटते ?

[१०] रसधातु म्हणजे कोणता ? व्यानवायुकडून त्याचें विक्षेपण म्हणजे काय ? तें कसें होतें ? हें आयुर्वेदीय वचनें व उदाहरणांनीं कसें दाखवावें ?

पं. डेग्वेकरजी म्हणाले, "वरील शंकांचें उत्तर वा विवेचन म्हणजे एक एक स्वतंत्र व्याख्यान होईल. म्हणून त्यांचें उत्तर परिषदेंत न घेतां अगोदर अशा शंकांची यादी वैद्य परांजपे यांनीं पत्रिकेंतून प्रसिद्ध करावी. त्यांचीं निबंधात्मक उत्तरें, आपण मागवूं. निबंध साधार वचनयुक्त पाहिजेत. वचनेंहि पाहिजेत. सर्व सूत्रें पाहिजे. तेवढेंच नको ? निबंध आल्यावर कमिटी नेमून प्रत्येकांतील चांगला भाग एकत्र करूं ! समन्वय वा मतभेद प्रसिद्ध करूं. त्यावर विवेचन मागवूं. तेंहि प्रसिद्ध करूं. अशा रीतीनें सर्व शंका उत्तरोत्तर उत्तम रीतीनें सोडविल्या जातील."

अध्यक्ष- वेणीमाधवशास्त्री जोशी म्हणाले, "आयुर्वेदाचा विद्यार्थी कसा असावा ? तर उत्तरार्थ वै. परांजपे यांचेकडे पहावें लागेल. त्यांच्या शंकांतून त्यांची तळमळ व्यक्त होते. आपल्या शंका मांडण्यासाठीं व परिषदेंत सगळयांची भेट घेण्यासाठीं ते येथें आले. संस्थेचीं अगदीं महत्वाचीं कामें असतांना ते सैनिका-प्रमाणें येथें येऊन आपली रजा विचारून आज रात्रीं परत जात आहेत. म्हणून त्यांच्या शंकांचा विचार पं. डेग्वेकरजींनीं सुचविलेल्या रीतीप्रमाणेंच आपण करूं." यानंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचें भाषण झालें. (तें पुढाल अंकीं देण्यांत येईल.)

[अपूर्ण]

पवित्र नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोल
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ ने पाळ

डॉ. डी. ए. घाटगे यांचीं
इंजक्शनविषयक दोन प्रसिद्ध पुस्तकें
इंजेक्शनविज्ञान, आवृत्ति दुसरी, किं. ६ रु.
इंजेक्शन चिकित्सा, आवृत्ति, पहिली किं. ६रु.
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

रिन्यूअल फी ५ रु.

भरण्याची मुदत ३ महिन्यांनीं वाढली

१९३८ च्या वैद्यक कायद्यांत मुंबई सरकारनें नुकतेच कांहीं फेरफार कायदेमंडळांत केले. कायदेमंडळांत कोणीच वैद्य नसल्यामुळें त्याबाबत कांहींच साधकबाधक चर्चा झाली नाहीं, व वृत्तपत्रांनींहि त्याला महत्व दिलें नाहीं. कायदेमंडळांतील डॉक्टर-मंडळीनींहि त्याबावत चकार शब्द उच्चारला नाहीं. यावरून त्यांना आयुर्वेदाचें प्रतिनिधित्व करतां येत नाहीं हेंच पुनः एकवार सिद्ध झालें.

या रिन्यूअल फी बावत, प्रांतीय वैद्य मंडळें चळवळ कां करीत नाहींत ? असा प्रश्न वैद्यमंडळी आपसांत करीत असतात, असें दिसून आलें आहे व याबाबतं खुलाशाची अपेक्षा करीत आहेत.

'रिन्युअल फी, वैद्यांना बोजारूप होत आहे व ती भरण्यासाठीं मुदत पण फारच अल्प दिली आहे. ती खेड्यांतून राहणाऱ्या वैद्यांना बाधक आहे अशी तक्रार वैद्य--मंडळाच्या प्रतिनिधींनीं आरोग्यमंत्र्यांना भेटून केली होती, व या बाबतींत कायदेशीर रीत्या काय करणें शक्य आहे तें करण्याचें आश्वासन आरोग्य--मंत्र्यांनीं दिलें होतें. म्हणून या बाबतींत अधिक चळवळ करण्यांत आली नाहीं.

आश्वासनें पाळलीं जात आहेत

१९३८ पासून १९५१ पर्यंतचें मुंबईसरकारचें आयुर्वेदविषयक धोरण व १९५२ नंतरचें धोरण यांत बरेंच परिवर्तन घडून आलें आहे. सरकारनें तोंडीं दिलेल्या आश्वासनांपैकीं कांहीं सहृदयपूर्वक सरकारनें अंमलांत आणलीं आहेत. उदाहरणार्थ, शुद्ध आयुर्वेद अभ्यासक्रमास मान्यता, त्यासाठीं शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीची नेमणूक. पुणें, मुंबई, अहमदाबाद रुग्णालयांत आयुर्वेदासाठीं २०|२० खाटा. आरोग्य विमायोजनेंत डॉक्टराबरोबरीनें वैद्यांचा समावेश. स्वतंत्र डायरेक्टर ऑफ आयुर्वेदाची नेमणूक, हीं सर्व याचीं प्रत्यक्ष उदाहरणें आहेत.

वनस्पति मिळण्याची व्यवस्था होणार

वैद्यांना खात्रीच्या वनस्पति मिळाव्यात यासाठीं सरकारतर्फे वनस्पतींचा संग्रह व विक्रण्याची व्यवस्था होणार आहे. त्याच्या योजना तयार होत आल्या आहेत.

रिन्यूअल फीची मुदत वाढली आहे

या सर्व लिहिण्याचा उद्देश, अडचणी व अडथळे दूर करण्यासाठीं आतां चळवळ करण्याची आवश्यकता नाहीं, असा नाहीं. सरकारकडे अन्यायाची दाद मागून धीरानें प्रयत्न चालू ठेवण्याचा आपला मार्ग आहे याचें स्मरण ठेवलें पाहिजे. केवळ उग्रविरोधाऐवजीं सहकार्य व विधायक कार्याकडे प्रवृत्ति आवश्यक आहे. या नीतीचा अवलंब करून रिन्यूअल फी भरण्याची मुदत ३१ डिसेंबर ऐवजीं ३१ मार्च १९५५ पर्यंत वाढवून घेण्यांत आली आहे. आपण याची माहिती आपल्या वैद्य मित्रांना द्यावी.

महागुजरात वैद्यमंडळाचें पत्रक

वरील मजकुराचें पत्र महागुजरात वैद्य मंडळाचे मंत्री यांनीं काढलें आहे.

महागुजरात वैद्य मंडळाच्या कार्यालयाचा पत्ताः–
वैद्य सोमेश्वर मयाशंकर भट्ट, ८ भीम श्रॉफचाळ,
भुलेश्वर, मुंबई २ असा आहे.

तारेचा पत्ताः–Newbottle
के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुचें, कॅपसुल्स्
[हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

ॲलोपॅथिक दंतोत्पाटनांतील दोष

(लेखकः—दंतवैद्य पां. वि. जायदे, आयुर्वेदतीर्थ, हुबळी)

ॲलोपॅथिक दंतोत्पाटन पद्धति ही सदोष आहे, ती निसर्गाविरुद्ध आहे ही गोष्ट अनेक वेळां दंतयज्ञाच्या वेळीं संभाषणांतून तसेंच लेखन्दारां व "दंतरोगविज्ञान आणि चिकित्सा" या पुस्तकांतूनहि सप्रमाण सिद्ध केली आहे. थोर मनाचे ॲलोपॅथिक पाश्चिमात्य डेंटल सर्जन प्रामाणिकपणें ही गोष्ट कबूल करतात, परंतु आमच्याकडील कांहीं अहंमन्य डॉक्टर व स्वतःस 'अपटुडेट' समजणारे सुशिक्षित लोक हे जें जें पाश्चिमात्य तें तें सर्व चांगलें व भारतीय म्हणजे अशास्त्रीय असें समजतात, हें पाहून वाईट वाटतें.

तोंडांत स्फोट संभवतात

संमोहन देऊन दांत काढतांना चिमटे दांतांना लागतांच किटा उसळतात, स्फोट संभवतात, ही गोष्ट लंडन हॉस्पिटलमधील दोन तज्ञ डॉक्टरांच्या निदर्शनास आली आहे व तदनुसार त्यांनीं 'लान्सेट' नांवाच्या सुप्रसिद्ध ब्रिटिश वैद्यक मासिकांत गंभीर इषारा दिला आहे, तो असाः—

" Dental patients having their teeth extracted under an anaes-thetic, run the risk of an explosion in their mouths according to two anaesthetics. The display of sparks was obtained when fine root forceps were strongly applied to the crowns of molars. '

हा दोष ज्या डॉक्टरांना दिसला त्यांचीं नांवें डॉ. एच्. मॉर्टन् व जे.जी. बोर्न अशीं आहेत.

पाश्चात्त्य सदोष पद्धति

अगोदरच दांत सडलेले असतात व हिरड्या बिघडलेल्या असतात. त्यांतच हिरड्यांत इंजेक्शन देणें ही क्रिया अशास्त्रीय व निसर्गविरुद्ध आहे, हें एक नितांत सत्य अनेकांच्या लक्षांत येत नाहीं. त्यांतच तीक्ष्ण टोंकांचे चिमटे दांतांच्या रदिनास (Enamel) लावून दांत जोरानें हलवले जातात, त्यावेळीं इनॅमेल कापलें जातें, व दांतांत ठिणग्या उसळतात व तोंडांत स्फोट संभवतात. यामुळें रोग्याला असा जबरदस्त धक्का (Shock) बसतो कीं, दंतोत्पाटनं म्हणतांच रोग्याला घाम सुटतो, ब्रह्मांड आठवतें.

अधिक शास्त्रशुद्ध पद्धति

या दृष्टीनें विचार करतां आयुर्वेद पद्धत अधिक शास्त्रशुद्ध आहे. संमोहनें नाहींत व स्फोटहि नाहींत. (Explosions) त्यामुळें रोगी घाबरत नाहीं. व एकेका बैठकींत लीलेनें १०–१५ दांत काढवून घेतो, शूलरहित पद्धतीचें 'शास्त्रीयत्व' लेखकानें मान्यवर आरोग्यमंत्रिणी अमृत कौर यांना दिल्लींत प्रत्यक्ष भेटींत पटवून दिलें. परंतु 'सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं' या म्हणीचाच अनुभव आला.

धर्मार्थ दंतयज्ञ, मिरज

मिरज येथील सरकारी हॉस्पिटलमध्यें दंतवैद्य पां. वि. जायदे यांच्या नेतृत्वाखालीं चाललेल्या धर्मार्थ दंतयज्ञाची समाप्ति गुरुवार दि. ३०।१२।५४ रोजीं झाली. या दंतयज्ञांत सुमारें ३०० रोग्यांना मोफत उपचार करण्यांत आले. सुमारें ८०० दंतोत्पाटनें करण्यांत आलीं. सायंकाळीं आयुर्वेद सेवा संघातर्फे शांकर तत्वज्ञान मंदिरामध्यें सत्कार करण्यांत आला.

प्रतिष्ठितांच्या भेटी

दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आचार्य अत्रे, कवि सोपानदेव चौधरी, श्री. पुंडलीकजी कातगडे इत्यादि साहित्यिकांनीं, तसेंच श्रीमंत राजेसाहेब मिरज (सीनियर), सौ. राणीसाहेब, डॉ. हिराबाई जोशी F.R.C.S., वैद्यगुरु हलसीकर, हुबळी इत्यादि मंडळींनीं भेट देऊन समाधान व्यक्त केलें.

खरकुत [जनावरांचा रोग]

प्रतिबंधक व रोगहारक उपाय

हल्लीं आमच्या तालुक्यांत 'खरकुत' नांवाचा जनावरांचा रोग चालू आहे. या रोग्यास प्रतिबंधक म्हणून मी पुढील उपाय करीत असतो. सापाच्या कातीचा थोडासा तुकडा भाकरींत मिसळून देतो, त्यामुळें जनावरास हा रोग होत नाहीं.

खरकूत झालेल्या जनावरांस दांतवण (बायका दांतास लावतात तें, तंबाकूचें दंतमंजन) पावतोळा व कडुवृंदावण फळाचें चूर्ण १ मासा हें मिश्रण एका पिकलेल्या केळयांत भरून देतो. यापासून फायदा होतो. याप्रमाणें ६ दिवस सकाळीं द्यावें.

पायाचा खरकूत व तोंडाचा खरकून असे खरकुताचे २ प्रकार आहेत. हे दोन्ही प्रकार या उपायाने बरे होतात. जनावर वैरण खाऊ लागतें व दुभतें जनावर तिसरें दिवशी दूध देतें.

माझा हा पुष्कळ वर्षांचा अनुभव आहे व तो मी पत्रिकेच्या वाचकासांठीं निवेदन केला आहे.

जुन्नर (जि. पुणें) — वैद्य बी. एल्. गवळी

कुष्ठ उपचार केंद्र, वडनेरभैरव

नाशिक जिल्हा कुष्ठरोग निवारण-मंडळातर्फे वडनेरभैरव ता.चांदवड येथें ग्रामपंचायतीनें बांधलेल्या कुष्ठरोग उपचार केंद्राचें उद्घाटन रविवार तारीख २।१।५५ रोजीं रात्रीं ८ वाजतां आरोग्यमंत्री ना. शांतिलालजी शहा यांच्या हस्तें झालें. त्यावेळीं वैद्य बिंदुमाधव पंडित, वै. वि. म. गोगटे उपस्थित होते. केंद्राचे संचालक श्री.खैरनार गुरुजी बी.एस्सी. हे असून कुष्ठरोगोपचारांचें शिक्षण ते वर्धा येथें १ वर्ष राहून घेऊन आले आहेत. आयुर्वेदीय पद्धतीनें कुष्ठरोगाचे उपचार कसे करावेत अशी त्यांना उत्कंठा आहे, व तसे त्यांचे प्रयत्न चालू आहेत, असें कळतें.

---

१ तास शालेय शिक्षण

गांवोगांवीं सरकारी नव्हे, खाजगी, रोज फक्त १ तासाची शाळा असावी, ती सकाळा घ्यावी, अशी कल्पना मी लोकांसमोर मांडत आलो आहे, व ती लोकांना पटत चालली आहे.

या पाठशाळेंत लेखन, वाचन, गणित इ० विषय शिकवावेत.

याचप्रमाणें महाविद्यालयीन शिक्षणहि रोज फक्त १ तास द्यावें. ते वर्ग रात्रीं चालवावेत. त्यांत श्रवण, कीर्तन, भजन हे विषय असावेत.

विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनीं दिवसभर आपल्या मातापितरांना त्यांच्या कामांत मदत करावी. गुरुजनसुद्धां दिवसां आपलीं कामें करण्यासाठीं मोकळे. गुरुजींना वेतन दिलें जाणार नाहीं. वर्षाअखेर प्रत्येक शेतकऱ्याकडून २-४ शेर धान्य मिळेल.

— विनोबाजी भावे

.... गौरव ....

आपण आयुर्वेदिक औषधांचा गौरव वाढविला पाहिजे. ती एक आपल्या हिताची गोष्ट आहे. आपण प्रत्येक औषधी द्रव्य अस्सल-पैकीं व ताजें वापरून सिद्ध औषधें बनविलीं पाहिजेत. अशीं उत्कृष्ट औषधीं द्रव्यें मिळवण्याकरितां आपणः—

दि ऑल इंडिया करीयाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

मध्यप्रदेशाची आयुर्वेदाची पदवी बी. ए. एम्. एस्.

अमरावती येथील विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाचा पदवी-वितरण-समारंभ मध्यप्रदेश आयुर्वेद आणि युनानी बोर्डाचे अध्यक्ष प्राणाचार्य पंडित श्री. गोवर्धनदास शर्मा छांगाणी यांच्या अध्यक्षतेखालीं होऊन अंतिम परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना B. A. M & S. [Bachelor of Ayurved with modern Medicine & Surgery] या पदवीचें प्रमाणपत्र देण्यांत आलें.

जनसेवेचें कंकण

महाविद्यालयाचे प्राचार्य वैद्य पं. दा. मुळे यांनीं प्रास्ताविक भाषणांत सांगितलें कीं, ही पदवी-परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांनीं जनसेवेचें कंकण हातांत बांधून मानवतेची सेवा केली पाहिजे, तरच त्यांच्या शिक्षणाचें सार्थक होईल. प्राचीनकाळीं गुरुमुखानें ही विद्या गुरुगृहीं शिकविली जात असे. नालंदा तक्षशिला या ठिकाणीं या शास्त्राचा अधिक विकास झाला होता. मध्यन्तरींच्या काळांत आयुर्वेदाचा साधारण लोप होत गेला म्हणून आयुर्वेदाचें दिव्यत्व पटवून देण्याचें कार्य नवीन पिढीतील विद्यार्थ्यांनीं करणें अगत्याचें आहे.

त्यानंतर आचार्य जोशी यांनीं आपल्या जीवनांत आयुर्वेदाची उच्च परंपरा राखण्याचा व मातृसंस्थेला न विसरण्याचा विद्यार्थ्यांना उपदेश केला.

या संस्थेचे एक माजी विद्यार्थी व सुप्रसिद्ध समाजसेवक श्री. बाळासाहेब मराठे, संपादक "हिंदुस्थान" यांनीं या विद्यालयाच्या स्थापनेपासूनचा इतिहास सांगितला. स्वातंत्र्यपूर्वकालांत राजकीय कार्यकर्त्यांना आश्रय देणाऱ्या व स्वातंत्र्याच्या चळवळीला सैनिक पुरविणाऱ्या या संस्थेनें पूर्वी केलेल्या कार्यांची आठवण करून देऊन सांगितलें कीं, ज्यांनीं स्वातंत्र्य-संग्रामांत भाग घेतला होता अशा विद्यार्थ्यांना आयुर्वेदाचें शिक्षण देऊन माननीय वैद्यराज मुळे यांनीं त्यांच्या जीवनाचें सार्थक करून समाजांत एक उच्च दर्जा प्राप्त करून दिला आहे.

वैद्य म्हणवून घेण्यांत भूषण समजा

"आजच्या आयुर्वेदीय पदवीधरांना वैद्य म्हणवून घेण्यांत कमीपणा वाटून ते स्वतःला डॉक्टर ही पदवी लावण्यांत भूषण समजूं लागले. आहेत. आम्हीं "इंजेक्शन" देतों हें ते मोठ्या अभिमानानें सांगतात. वास्तविक पहातां त्यांचें आयुर्वेदाचें ज्ञान बेताचेंच असल्यामुळें ते "आयुर्वेदीय पद्धतीनें" यशस्वी होऊं शकत नाहींत." "वैद्यांचा" धंदा पोटभरूं लोकांचा नसून तो मानवतेची सेवा करण्याचा एक मार्ग आहे" असें सांगून त्यांनीं या संस्थेतील पदवीधर विद्यार्थी देशसेवा करतील अशी आशा प्रगट केली.

त्यानंतर आचार्य पु. र. तारे यांनीं अध्यक्षांना प्रमाणपत्रें व पारितोषकें देण्याची विनंति केली. हा कार्यक्रम झाल्यावर विद्यार्थ्यांना उद्देशून केलेल्या भाषणांत पं. छांगाणीजी यांनीं आयुर्वेदाची श्रेष्ठता निवेदन करून आज आयुर्वेदाचा व्हावा तितका विकास कां होऊं शकला नाहीं याचें थोडक्यांत विवेचन केलें व आयुर्वेदाची उच्च परंपरा ठेवून त्या शास्त्रांत भर घालण्याचा विद्यार्थ्यांना आदेश दिला.

कोणता वैद्य यशस्वी होतो ?

"वैद्यांनीं पुस्तकी शिक्षणाबरोबरच प्रात्यक्षिक अनुभव घेऊन आपल्या धंद्यांत निष्णात व्हावें व वैद्य हा प्राणसंरक्षक आहे ही म्हण यथार्थ करून दाखवावी. चारित्र्य, स्वाभिमान व मानवप्रेम हे गुण अंगीं बाळगणारा वैद्य यशस्वी झाल्याशिवाय रहात नाहीं असें सांगून पाश्चात्य वैद्यकाच्या मृगजळामागें न धांवण्याचा त्यांनीं सल्ला दिला. परदेशी औषधें वापरून डॉक्टरांची नक्कल करणाऱ्या वैद्यांच्या प्रवृत्तीवर त्यांनीं सडकून टीका केली.

आपले अनुभव निवेदन करीत असतां पाऱ्याच्या रसायनानें असाध्य समजले गेलेले रोगी साफ बरे झाल्यानें मोठमोठे डॉक्टरहि चकीत झाल्याचे त्यांनीं

सांगितले. “आयुर्वेदीय औषधाचा प्रभाव परदेशी औषधापेक्षांहि परिणामकारक असल्याचा आपल्याला अनुभव येईल,” असें त्यांनीं आत्मविश्वासपूर्वक सांगितलें. महाविद्यालयाच्या कामगिरीचा गौरव करून या संस्थेंतील आयुर्वेदीय शिक्षण देशांतील कोठल्याहि संस्थेपेक्षां कोणत्याहि बाबतींत कमी प्रतीचें नसल्याचा त्यांनीं निर्वाळा दिला. आणि उशीरा कां होईना मध्यप्रदेश सरकारनें संस्थेला मान्यता दिल्याबद्दल सरकारला त्यांनीं धन्यवाद दिले.

शेवटीं, आचार्य श्री. पु. र. तारे यांनीं उपस्थितांचे आभार मानल्यानंतर “वंदेमातरम्” हें राष्ट्रगीत होऊन हा कार्यक्रम पार पडला.

वाघाच्या मूत्राचे गुणधर्म

प्रश्नः— दमा व श्वास यावर वाघाचें मूत्र द्यावें असें आम्हांस कांहीं सर्कसमधील मंडळींनीं सांगितलें आहे. तरी ही गोष्ट खरी आहे काय ? वैद्यकांत असा उल्लेख आहे काय ? उल्लेख असल्यास केव्हां व किती प्रमाणांत त्याचा उपयोग करावा तें कळवावें.”

—के .जी. जोशी

उत्तरः— मूल ही अत्यंत गुणकारी औषधी वस्तु आहे. चरक ग्रंथांत आठ प्रकारच्या मूत्रांचे गुण दिले आहेत, पण त्यांत व्याघ्रमूत्राचा उल्लेख नाहीं.

उंटाच्या मूत्राचे गुण २ पपर्णे श्वासकासघ्न सांगितले आहेत ते असे- सतिक्तं श्वासकासघ्नमर्शोघ्नं च औष्ट्रम् उच्यते । उंटाचें मूत्र थोडें कडवट आहे, दमा खोकला घालविणारें आहे, मूळव्याधनाशक आहे.

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा

या मंडळीचा व तदंगभूत संस्थांचा वार्षिक समारंभ व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचें स्नेहसंमेलन रविवार ता. १६।१।५५ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां मुंबई राज्य विधिमंडळाचे अध्यक्ष नामदार आर्. एस्. हुकेरीकर एम्. ए. यांच्या हस्तें होणार आहे.

कंदर्पवृष्यपाकाचा चांगला गुण

कंदर्पवृष्यपाक ४० तोळे (२० तोळ्याचे दोन पुडे) आमच्या पत्त्यावर व्ही. पी. नें तावडतोब पाठविण्याचें करावें.

यापूर्वी कंदर्पवृष्यपाक ज्यांना ज्यांना दिला त्यांना त्याचा चांगला गुण दिसून आला आहे याबद्दल फारच आनंद वाटतो. पुनः आणखी लवकरच मागणी पाठविणार आहे.

मु. पो.××× ता. धुळें — एक वैद्य

आयुर्वेदीय विषारी द्रव्यें

वैद्यांना जवळ बाळगतां येतात किंवा नाहीं ?

बरेच महिन्यापासून हरताळ, मनशीळ मुरदार, रसकापूर वगैरे वैद्यांना औषधीकरणांत लागणारे विषारी पदार्थ जवळ बाळगण्याबद्दल माझें प्रकरण चालू आहे.

सदर वस्तू जवळ बाळगतां येतात, औषधी कामांत उपयोगांत आणतां येतात, असें माझें म्हणणें आहे. ह्या वस्तूंस लायसेन्सची जरूरी नाहीं, व त्या पोलिसांनें हर एकवेळीं पाहाण्यास येणें, तपासणें याची पण जरुरी नाहीं. या कामीं मी आपल्या आयुर्वेद पत्रिकेंतील लेख दाखविला व दोन अधिकृत पत्रेंहि दाखविलीं.

नगर एक्साइज ऑफिसरचें पत्र

मला थोड्या दिवसांपूर्वी एक्साईज ऑफिसर साहेब यांचेकडून खालीलप्रमाणें पत्र आलें आहे तें आपण सर्वांच्या माहितीकरितां प्रसिद्ध केल्यास चालेल.

—वैद्य आर. डी. क्षीरसागर

‘गव्हर्मेंट नोटिफिकेशन नंबर डी. डी. आर. १०५३ (सी) ता. २७।८।५४ गव्हर्मेंट गॅझेट पार्ट नंबर [सी] पान ८३६ यामध्यें तारीख ९।९।५४ रोजीं नमूद केलेल्या विषारी औषधांबद्दल नोटिफिकेशन दिलें आहे. तें आपण पाहावें व वागावें.’

महा-विदर्भ पदवीधर वैद्य मंडळ

या संस्थेचें विधेयक

महा-विदर्भांतील वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या पदवीधर वैद्यांचें संघटन करण्याच्या दृष्टीनें, व पुढें दिलेल्या उद्दिष्टांचे पूर्तीसाठीं आम्ही स्वाक्षरी करणार "महा-विदर्भ पदवीधर वैद्य मंडळ" नांवाची संस्था स्थापन करीत आहोत.

या संस्थेचीं उद्दिष्टें पुढें दिल्याप्रमाणें राहतील:-

(१) महा-विदर्भांतील पदवीधर वैद्यांचें व्यवसाय दृष्टीनें संघटन करणें.

(२) पदवीधर वैद्यांच्या व्यावसायिक अडचणीसंबंधीं शासन-संस्थेकडे प्रतिनिधित्व करणें.

(३) सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनें शासनसंस्थेला मार्गदर्शन व साहाय्यता करणें.

(४) भारतीय चिकित्साशास्त्राच्या वाढीसाठीं शासनसंस्थेला साहाय्य व मार्गदर्शन करणें.

(५) भारतीय चिकित्साशास्त्राच्या अंगोपांगांच्या अभिवृद्धीसाठीं प्रयत्न करणें.

(६) भारतीय चिकित्साशास्त्राचें अधिकृत असें धर्मार्थ रुग्णालय चालविणें.

(७) संशोधनादि कार्यें करणाऱ्या वैद्यांना यथाशक्ति आर्थिक व बौद्धिक सहाय्यता करणें.

(८) भारतीय चिकित्साशास्त्रास पोषक असें वाङ्मय प्रसिद्ध करणें.

(९) विदर्भांत एक आदर्श 'आयुर्वेद-महाविद्यालय' स्थापन होण्याच्या दृष्टीनें प्रयत्नशील असणें.

(१०) आपल्या उद्देशांचे पूर्तीसाठीं याच राज्यांतील असें कार्य करणाऱ्या संस्था, तसेंच भारतांतील घटक अशा अन्य राज्यांतील संस्था यांचेशीं पूर्ण सहकार्य करणें.

(११) वरील उद्दिष्टांचें पूर्तीसाठीं परिस्थितीनुसार आवश्यक असलेलीं कार्यें हातीं घेणें.

संस्थेचें पूर्व-वृत्त

वस्तुतः या संस्थेचा शुभारंभ दिनांक १-८-१९४७ रोजीं श्री. गोविंद लक्ष्मण देशपांडे आयुर्वेदतीर्थ, मेहेकर यांचे प्रयत्नानें झाला. त्यांनीं वऱ्हाडांतील बहुतेक पदवीधर वैद्यांना आमंत्रणें देऊन श्री. लक्ष्मणदास ठाकुरदास शहा, आयुर्वेद-तीर्थ, अकोला यांचे औषधालयांत सभा बोलावली. पदवीधर वैद्यांचें संघटन असणें आणि त्यांचें परस्पराशीं सहकार्य असणें आवश्यक असल्यामुळें सभेंत आवश्यक ते निर्णय घेण्यांत येऊन 'विदर्भ पदवीधर वैद्यमंडळ' नांवाची संस्था स्थापन करण्यांत आली.

या संस्थेच्या सभासदांपैकीं श्री. लक्ष्मणदास ठाकुरदास शहा आणि श्री. रा. ऊ. पद्मावार यांची मध्यप्रदेश राज्याच्या आयुर्वेद बोर्डाच्या समितीवर नेमणूक झाली. यांनीं आयुर्वेदांत वैदूगिरी शिरूं नये म्हणून सर्व तऱ्हेची दक्षता घेऊन बोर्डाला योग्य तें मार्गदर्शन केलें आणि आपलें कर्तव्य पार पाडलें.

दिनांक २६-८-१९५१ रोजीं मंडळानें भारताच्या आरोग्यमंत्रिणी मा. राजकुमारी अमृतकुंवर यांचें स्वागत करून आयुर्वेदशास्त्राचा दृष्टीकोन यांचे पुढें मांडला. मा. मंत्रिणींनीं योग्य तें सहकार्य करण्याचें आश्वासन दिलें. सरकारकडून उचित तें सहकार्य मंडळाला आजवर मिळत गेलें आणि पुढेंहि मिळत राहील असा विश्वास आहे.

दिनांक १६-८-१९५२ रोजीं मंडळाच्या सहकारी मंडळानें मध्यप्रदेशाचे राज्यपाल मा. पट्टाभिसितारामय्या आणि आरोग्यमंत्री मा. कन्नमवार

---

* कार्यालयाचा पत्ताः- अध्यक्ष, महाविदर्भ पदवीधर वैद्य मंडळ, अकोला (मध्यप्रदेश)

[हें मंडळ मध्यप्रदेश सरकारांत नोंदण्यांत आलें आहे. नोंद नं. ८६।५३-५४]

यांची भेट घेतली. त्यांनीं आयुर्वेदाच्या उन्नतीसाठीं उचित तें सहकार्य देण्याचें आश्वासन दिलें.

संस्थेच्या स्थापनेपासून १९५२ अखेरपर्यंत श्री. ल. ठा. शाह यांचें संस्थेला अध्यक्षीय मार्गदर्शन झालें. मंडळाचें प्रमुख कार्यालयहि त्यांचेंच औषधालयांत आहे. त्याचे नंतर कारंजाचे श्री. हेमचन्द्र रतनसा वैद्य, आयुर्वेदविशारद, [सातारा] यांनीं संस्थेच्या अध्यक्षत्वाची धुरा खांद्यावर घेतली. या अध्यक्षद्वयांच्या व त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नानें संस्थेला आजचें चिरस्थायी स्वरूप प्राप्त झालें आहे आणि अधिक जबाबदारीचीं कामें पार पाडण्याचें धैर्य व स्थैर्य संस्थेस आलें आहे.

व्यवसायबंधूंना व इतरांना प्रार्थना

विधेयकांत उल्लेखिल्याप्रमाणें संस्थेच्या कार्याचे दोन भाग कल्पिले आहेत.

[१] पदवीधर वैद्यांचें संघटन करून त्यांच्या व्यवसाया संबंधीं अडचणी दूर करणें आणि

[२] वैद्यकशास्त्राच्या संशोधनास हातभार लावणें.

संघटनेचें महत्व पदवीधर वैद्यांना सुचविण्याची आवश्यता नाहीं. आपलें वास्तविक अधिकार आणि आवश्यक त्या व्यावसायिक सवलती यांचें रक्षण आणि प्राप्ति यासाठीं संघटन असणें आवश्यक आहे.

आजवर मंडळाच्या सभानंतर होणाऱ्या अनौपचारिक संघायसंभाषा अत्यंत उपयुक्त ठरत गेल्या. ज्ञानाची देवाण-घेवाण करण्याचा तो एक सुअवसर असतो. ज्ञानांत भर पडते तशी आपल्या मित्रपरिवारांतहि भर पडते. ज्याला अधिक मित्र तो तो अधिक सुखी, ज्यास अधिक ज्ञान तो अधिक यशस्वी चिकित्सक. तरी महाविदर्भातील सर्व पदवीधर वैद्य--बंधूंनीं संस्थेकडे अधिक आपुलकीनें पहावें, संस्थेचे सभासद व्हावें आणि वर्षांतून निदान एक दोन दिवस एकत्र जमून आपल्या व्यावसायिक अनुभवाचा लाभ अन्य व्यवसायबंधूंना मिळूं द्यावा. महाविदर्भांत पदवीधर वैद्यांचे हितासाठीं झटणारी ही एकमेव संस्था आहे.

वैद्यकशास्त्राच्या संशोधनाच्या कार्यास संस्थेनें आतांच उत्साहानें प्रारंभ केला आहे. (१) आयुर्वेदातील क्षयरोगचिकित्सा हा तूर्तचा प्रमुख संशोधन विषय असून (२) आयुर्वेदातील जंतुनाशकें (अॅन्टीबॉयॉटिक्स) हा उपसंशोधन विषय आहे.

क्षयरोग संशोधनासाठीं (१) अकोला (२) खामगांव(३)जळगांव (जामोद) ह्या ठिकाणीं क्षयरोग-अन्वेषण-केंद्रें स्थापन करण्याचा संस्थेचा निर्णय असून यापैकीं कोणतेंहि एक केंद्र सर्व साहित्यांनीं परिपूर्ण करण्याचा संस्थेचा मानस आहे. संशोधन कार्यास सुव्यवस्थित रूप यावें म्हणून संस्थेच्या-मालकीचें "रुग्ण सेवा मंदिर" (हॉस्पिटल) आणि "विकृति विज्ञान शाला" (बायो-क्लिनिकल लॅबोरेटरी) असणें अत्यंत आवश्यक आहे. ह्या दोन गोष्टी विरहित संशोधनास पूर्णत्व येऊं शकत नाहीं.

या सर्व कार्यासाठीं जनतेकडून द्रव्य सहाय्याची अपेक्षा आहे. येत्या पांच वर्षांत संस्थेला दोन लाखाचा कायमनिधि जमवावयाचा आहे. कायम निधीचा [परमनंट फंड] सर्व पैसा, संस्था गव्हर्नमेंट सिक्युरिटीजमध्यें गुंतवेल आणि त्यावर सुटणाऱ्या व्याजांत आपलें कार्य जेमतेम करूं शकेल. संकल्पित स्थायी निधि इतका अल्प आहे कीं, इतर संशोधन

२ झुडुपें पाहिजेत

औषधी निर्मितीकरितां आम्हांस सर्पगंधा (हेडकी, छोटाचांद (अडकी) या नांवानें प्रसिद्ध असलली ओली वनस्पति हिचीं मूल पानासह २ झुडुपें पाहिजे आहेत.

तरी त्याबद्दल मजुरी व पाठविण्याचा खर्च काय पडेल ते पुढील पत्त्यावर पत्रानें कळवावें.

श्री. वैद्य भिमाजी सखाराम राजगुरव
मु. पो. मंचर जि. पुणें

संस्थांच्या पसाऱ्याकडे पाहिलें असतां आमचा आम्हांलाच संकोच वाटतो. पण महानदीचा उगम लहान ओहोळच असतो. तरी आमची नम्र विनंति कीं, भारतांतील सर्व प्रांतांतील धनिकांनीं या पुण्यकार्याला साहाय्य करावें.

ॲलोपॅथीय चिकित्सकांनीं देखील ह्या संस्थेकडे आपुलकीनेंच पहावें. निवेदनांत उल्लेखिल्याप्रमाणें ही संस्था समन्वयवादी आहे. विशिष्ट मतसंप्रदायाचा अभिनिवेश न बाळगतां जें जें चिकित्सोपयोगी असेल तें तें संशोधावें असा तिचा प्रयत्न आहे. जें जें कांहीं आतुरांना निरोगी करणारें असेल तें तें संशोधिलें जावें असें अन्यपंथीयांना देखील वाटणारच.

तरी आमची सर्व पंथीयांना नम्र विनंति कीं आमची भिक्षेची कटोरी आपणासमोर आली असतां आपण त्यांत यथाशक्ति दान अवश्य टाकवें.

मुंबई इलाख्यांत पदवीधर वैद्यांची स्वतंत्र संघटना असल्यानें आम्ही आमचें कार्य राजशासनाच्या पृथक् प्रविभागामुळें महाविदर्भापुरतेंच मर्यादित केलें आहे. असें जरी असलें तरी मुंबई इलाख्यांतील तसेंच अन्य शासनविभागांतील पदवीधर वैद्यांचें आणि वैद्यक व्यावसायिकांचें सहकार्य आम्हाला मिळावें असें नम्रपणें अपेक्षितो.

॥ इति शम् ॥

काष्ठ ज्योतिष्मति

चांदवड जि. नाशिक येथील सुप्रसिद्ध वैद्य श्री. नथुराम कोतवाल यांचा वडील मुलगा चि. भास्कर नथुराम कोतवाल यानें आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेंत गुरुवार ता. १४·१०-५४ रोजीं रात्रीं चांदवड जवळच्या जंगलांत मिळणारी काष्ठ ज्योतिष्मति दाखविली. कारवीच्या मऊ लांकडाप्रमाणें हे ३-४ तुकडे बोटभर जाडीचे व टीचभर लांबीचे असे होते. आजवर लोकांनीं तृण ज्योतिष्मतीच्या मुळ्या पाहिल्या होत्या, पण हें काष्ठ (लांकूड) चमकतांना पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले. सर्वांनीं आपल्या हातांत घेऊन ही वनस्पति रात्रींच्या अंधारांत पाहिली.

जाहीर निमंत्रण

अहमदनगर आयुर्वेद महाविद्यालयाचे आजी-माजी विद्यार्थ्यांचें स्नेह सम्मेलन ता. २३ व २४ जानेवारी १९५५ इ. रोजीं श्री. रँग्लर र. पु. परांजपे यांचे अध्यक्षतेखालीं होणार आहे. तरी सर्व माजी विद्यार्थ्यांनीं स्नेहसंमेलनास उपस्थित राहण्याची कृपा करावी (व्यक्तिशः आमंत्रण पत्रिका पाठवल्या जाणार आहेतच. जर कदाचित कोणाचा पत्ता बदलला असल्यास तें न मिळण्याची शक्यता आहे म्हणून हें जाहीर निमंत्रण देत आहो) कळावे ही विनंति

आपले नम्र

शेख बशीर वर्ष २ रें — वै. रं. का. मुळे
आ. वि. प्रतिनिधि — माजी वि. प्रतिनिधि

दुर्मिळ ग्रंथ

डॉ. घाटगेकृत उपयुक्त वैद्यकीय ग्रंथ लौकरच दुर्मिळ होणार. प्रति फारच थोड्या शिल्लक आहेत. पुन्हां लौकर छपाई होणार नाहीं. निराशा टाळण्यासाठीं आजच आपली प्रत मागवून ठेवा.

१ इंजेक्शन–चिकित्सा किं. ६ रु.
२ इंजेक्शन–विज्ञान किं. ६ रु.
३ स. श्रवणपरीक्षा यंत्र किं. २। रु.
४ स. उपनेत्र–विज्ञान किं. १॥ रु.

टपाल खर्च अलग पडेल. आजच ॲडव्हान्स पाठवून मागणी करा.

वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

वेड्यांची संख्या वाढत आहे

१९५३ साली मुंबई राज्यांतील सहा वेड्यांच्या इस्पितळांत मिळून एकूण २७५८ रोग्यांना (१८१३ पुरुष व ९४५ स्त्रिया) प्रवेश देण्यांत आला. अशा रीतीनें या इस्पितळांतील रोग्यांची एकूण संख्या ६६९८ झाली. (४२६२ पुरुष व २४३६ स्त्रिया) या पूर्वीच्या वर्षांचे आंकडे अनुक्रमें २५२९ आणि ६३५९ असें होते. अहवालांच्या सालीं या इस्पितळांत दैनिक सरासरी ३९८३ इतके रोगी होते तर १९५२ सालीं हाच आंकडा ३८३४ इतका होता.

हीं इस्पितळें पुढीलप्रमाणें आहेत:— ठाणें, रत्नागिरी, येरवडा, धारवाड, अहमदाबाद आणि बडोदा. धारवाड येथें १०४७, अहमदाबाद येथें ४३१, आणि बडोदे येथें ५१ रोग्यांना प्रवेश देण्यांत आला. एकूण १४७ रोग्यांना पुन्हां प्रवेश देण्यांत आला.

सर्व इस्पितळांत खूप गर्दी

बडोद्याव्यतिरिक्त इतर सर्व इस्पितळांत खूप गर्दी झाल्याचें दिसून येतें.

अहवालाच्या वर्षी ६९० रोग्यांना बरे झाले म्हणून, ४३१ रोग्यांना ते सुधारले म्हणून, १५७ रोग्यांना त्यांच्यांत सुधारणा झाली नाहीं म्हणून व ९९५ रोग्यांना इतर कारणांवरून इस्पितळांतून सोडण्यांत आलें. रोजच्या सरासरीशीं बरे झालेल्या रोग्यांचें प्रमाण १७·३ इतकें होतें. १९५२ सालीं तें १४.५ असें होतें.

निरनिराळ्या इस्पितळांत प्रत्येक रोग्यामागें वार्षिक खर्च पुढीलप्रमाणें आला .. ठाणें (रु.७८७) रत्नागिरी (रु. ५८२), येरवडा (रु. ९४०), धारवाड (रु. ५६८), अहमदाबाद (रु. ६७५) आणि बडोदे (रु. १००६).

यावर्षी प्रवेश देण्यांत आलल्या वेड्यांमध्यें गुन्हेगार वेड्यांची संख्या १९३ होती तर त्या अगोदरच्या वर्षी ही संख्या १७९ होती.

वयोमानाप्रमाणें वेड्यांचे गट

या इस्पितळांत प्रवेश देण्यांत आलेल्या रोग्याचे वयोमानाप्रमाणें पुढील गट पडतात. २० वर्षांखालील [२९२]; २१ ते ४० वर्षें [१८६२]; ४१ ते ६० वर्षें [५५२]; आणि ६० वर्षांवरील [५२]

वेड लागण्याचीं प्रमुख कारणें:— मानसिक श्रम [११११], टॉन्सिन्स [५६], पूर्वी वेडाचे झटके येणें [२६२], अनुवांशिक [२७१], अॅपिलेप्सी [१५४], शारीरिक आजार [१३१], वृद्धावस्था [९७], आणि गर्मी [१११].

कळवण येथें वैद्य नाहीं

पत्रिकेंत प्रसिद्ध झाल्याप्रमाणें कळवण [नासिक] येथें आयुर्वेदिक दवाखाना नाहीं, ही गोष्ट सत्य आहे. अधिक माहिती अशी:—

कळवण हा गांव सप्तशृंग गडाजवळ आहे. सप्तश्रृंग हें भगवतीचें अधिष्ठान असलेलें पवित्र स्थान आहे. गांवची वस्ती ४।५ हजार असावी. नासिक पासून ४९ मैलांवर असून एस्. टी. सर्व्हिस आहे. रोज येथून ३ गाड्या जातात. भाडे सुमारें २। रुपये आहे. ब्राम्हणवस्ती सुमारें २५।३० घरें असावी. गांवाजवळ नदी आहे. गावांत आड आहेत. लोकल बोर्डाचा एक व एक दोन खाजगी असे अॅलोपॅथिक दवाखाने आहेत. एक होमिओपॅथिक दवाखाना आहे. आयुर्वेदीय दवाखाना नाहीं. जाणारास ओळखपत्र मिळेल. लोक सुस्थितींत आहेत. —वैद्य ग. म. लोखंडे

धुळे (प. खा.) येथें

आयुर्वेद सेवा संघाचीं महत्त्वाचीं औषधें

मिळण्याची व्यवस्था

प्राणिसंरक्षक संस्था, धुळें

या औषधालयानें केली आहे.

याबद्दल सेवा संघ त्यांचा आभारी आहे.

भूक व अन्नपचन सुधारणारीं २ औषधें

दीपकवटी व पाचकगुटी

आयुर्वेदांत अन्नपचनाबावतच्या दोन कल्पना आहेत. १ दीपन व २ पाचन. जेवल्यानन्तर खाल्लेलें अन्न पचनासाठीं पाचकगुटी खावयाची व भूक लागत नसेल व अग्नि मन्द झाला असेल तर जेवणापूर्वी रिकाम्या पोटीं दीपकवटीच्या गोळ्या खाऊन अग्नि प्रज्वलित करावयाचा. आधीं भूक निर्माण करावयाची व मग जेवावयाचें.

आजवर वैद्यलोक अग्निकुमार, अग्नितुंडी आदि पारा, गंधक, व वचनाग, कुचला आदि विषयुक्त औषधाच्या योगानें हें दीपनाचें कार्य करीत. क्वचित् औषध घ्यावें लागे त्या कालांत हें ठीक होतें. पण आतां अग्निमांद्याची व्यथा ही नित्याचीच होऊन बसली आहे. त्यासाठीं पाचकगुटी या आवळ्याच्या गोळ्याप्रमाणेंच दीपकगुटी या लिंबाच्या सालीच्या गोळयाची उपयुक्तता पटू लागली आहे.

आरोग्यासाठीं आहार षड्रसांचा असला पाहिजे. आजच्या जेवणांत कडू बहुतेक खाण्यांत येतच नाहीं. व कडू खाण्याला अरुचकर लागत असलें तरी तें नियमानें थोडें खात गेल्यास तोंडास रुचि येते, पोटांत क्रिमी होत नाहींत. तहान फार लागत नाहीं. हा कडु खाण्याचा उद्देश लिंबाच्या सालीच्या गोळ्या दिपकवटी खाण्यानें उत्तम साधतो.

आयुर्वेद सेवा संघानें ही दीपकवटी तयार केली आहे.

अनुक्रमणिका

आयुर्वेदाचा संदेश रशियांत पोंचविला ४४३
आरोग्यमंत्री शांतिलाल शहा यांची मुलाखत ४४५
म. प्रां. वैद्यसंमेलन, दशम अधिवेशन, भुसावळ ४४७
हे लेखक श्री. वाटवे कोण ? ४४९
आयुर्वेदांतील अलवते गलवते ? ४५१
आयुर्वेद अध्यापक-चर्चा परिषद (पुढें चालू) ४५३
रिन्युअल फी भरण्याची मुदत वाढली ४६४
ॲलोपॅथिक दंतोत्पाटनांतील दोष ४६५
मध्यप्रदेशाची आयुर्वेदाची पदवी ४६७
महाविदर्भ पदवीधर वैद्यमंडळ (संस्थेचे विधेयक) ४६९
काष्ठ ज्योतिष्मति ४७१
वेड्यांची संख्या वाढत आहे ४७२

येथें आयुर्वेदीय कार्यकर्त्यांचा संच आहे

‘आयुर्वेद सेवा संघास आज सकाळीं भेट दिली. संघातर्फे चालू असलेल्या विविध कार्यांची माहिती घेतली.

ध्येयबुद्धीनें आयुर्वेद पद्धतीचा प्रसार करणाऱ्या आयुर्वेदीय कार्यकर्त्यांचा येथें एक संच दिसला.

ध्येयनिष्ठा, व्यासंग व सेवावृत्ति यांचा संगम झाल्यावर हळहळ कां होईना यशःप्राप्ति होईल यांत काय संशय !

माझ्या शुभेच्छा ! — यशवंतराव चव्हाण
(मुंबई सरकारचे स्थानिक स्वराज्यमंत्री)

नाशिक ६।१।५५

-: उपयुक्त वैद्यकीय ग्रंथ :-

अष्टांगसंग्रह	वाग्भटनिर्मित	२० रु.
आयुर्वेदीय व्याधिविज्ञान	वै. यादवजी त्रिकमजी	२॥ ,,
संक्षिप्त दोषधातुमलविज्ञान	डॉ. द. म. पटवर्धन	३ ,,
वनौषधी गुणादर्श भाग १ ते ७	वै. पदेशास्त्री	१० ,,
चिकित्सा प्रभाकर	श्री. प्र. बा. ओगले	२० ,,
सिद्धौषधी प्रकाश	वै. गणेशशास्त्री जोशी	६ ,,
आरोग्यासनें	डॉ. र. कृ. गर्दे	१॥ ,,
गृहवैद्य अथवा क्षारचिकित्सा	— ” —	३ ,,
विवेचनात्मक सूचिवेध पद्धति (हिंदी)	डॉ. प्रभाकर मिश्र	५॥ ,,
शारीरं तत्वदर्शनम्	वै. हिर्लेकरशास्त्री	६ ,,

मिळण्याचें ठिकाणः—**वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक**

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं

आयुर्वेदिक व युनानी वनौषधि

तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण !

☞ अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार, गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलट-कंबल, नागकेशर (अस्सली), ब्राह्मी, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य ! विशेष माहितीसाठीं आमचे साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम–आयुर्वेद

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

संपादक व प्रकाशकः—वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य चित्रलकर कारंजा, नाशिक
मुद्रकः—श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, नाशिक

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

२३-१०-९१

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

वर्ष ८ वें) नासिक, ता. १ फेब्रुवारी १९५५ (अंक १५ वा

प्राणाचार्य बिवलकर कारंजा, नाशिक



नाशिक शहरांतील महत्त्वाचें मध्यवर्ति ठिकाण, रविवार कारंजा या नांवानें प्रसिद्ध आहे. या कारंजावर पुढील मजकूर कोरलेला आहे.

प्राणाचार्य गोपाळ रामचंद्र बिवलकर वैद्य यांचें स्मारक

श्रावण शुद्ध १ शके १८३८ अनल नाम संवत्सरे जन्म शके १७७७ मृत्यु शके १८३६

याच चबुतऱ्यावर इंग्रजींत In memory of Pranacharya Gopal Ramchandra Bivalkar, Vaidya of Nasik 31 July 1916 अशीं अक्षरें कोरलीं आहेत.

वैद्य बिवलकरशास्त्री यांचे सच्छिष्य वैद्य पाटणकरशास्त्री यांनीं हें स्मारक बांधविलें असून व्यवस्थेसाठीं तें नगरपालिकेकडे दिलें आहे. नाशिक नगरपालिकेचे सदस्य वैद्यराज वि.म. गोगटे यांनीं ही गोष्ट नगरपालिकेच्या अध्यक्षांच्या व सभासदांच्या नजरेस आणली व कारंजावर ठळकपणें वैद्य बिवलकर कारंजा ही अक्षरें लिहिण्याची सूचना केली. नगरपालिकेचे लोकप्रिय अध्यक्ष श्री. यादवराव वाघ यांनीं ती मान्य करून अमलांत आणली याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.

ह्या कारंजाकरितां नाशिक नगरपालिकेला प्राणाचार्य बिवलकर यांच्या इस्टेटींतून रु. १२००० ची देणगी देण्यांत आली होती. नगरपालिकेच्या पाणी पुरवठा खात्याच्या समितीचे सभापति श्री. दळवी यांनींहि कारंजावर प्राणाचार्य बिवलकर यांचें नांव लिहून घेण्याचें कामीं साहाय्य केलें आहे. श्री. दळवी यांच्या आजोबांनीं या कारंजाची बांधणी केली आहे.

या चित्रांत कारंजाच्या उजव्या बाजूस वै. वि. म. गोगटे याचा दवाखाना दिसत आहे. हे छायाचित्र रसिक स्टोअर्सतर्फे घेण्यांत आलें आहे.

महाराष्ट्र प्रांतीय दशम वैद्य संमेलन, भुसावळ

आजवर मिळालेल्या देणग्या

म. प्रां. वै. संमेलनाच्या दशम अधिवेशनाची तयारी जोरांत चालू असून नियुक्त प्रचारकांचें निधी गोळा करण्याचें कार्यहि उत्तम प्रकारें चालू आहे. आतांपर्यंत हातीं आलेल्या, दहा रुपयांहून अधिक देणगी देऊन स्वागत सभासद झालेल्या, वैद्य व आयुर्वेदप्रेमी सज्जनांचीं नांवें खालीं देत आहोंत. यापुढेंहि हातीं येईल ती माहिती नांवासह आ. पत्रिकेंत प्रसिद्ध होईल. संयुक्त खानदेश आणि प्रांतीय वैद्यबंधूंनीं इकडे लक्ष देऊन आपापली वर्गणी लौकर पाठवावी अशी विनंति आहे.

आपला नम्र
वै. ब्रह्मदत्तशर्मा

मान्यवर देणगीदारांचीं नांवें

२०१ रु.	वै. जनार्दन वासुदेव मोकाशी,	भुसावळ	२१ रु.	वैद्य प्रभाकर शंकर वैद्य	यावल
१०१ ,,	वै. ब्रह्मदत्तशर्मा	,,	२१ ,,	शेठ जगन्नाथ देविदास	भुसावळ
५१ ,,	शेठ मांगीलाल केसरीमल कोटेचा	,,	११ ,,	श्री. माधव कृष्णाजी कुळकर्णी	,,
५१ ,,	,, देवकरण लक्ष्मीनारायण	,,	११ ,,	मुनसी शेखअब्बास शेखरोशन	,,
५१ ,,	,, राजमल नंदलाल	,,	११ ,,	वैद्य बन्सी श्रीपत चव्हाण	नशिराबाद
५१ ,,	,, सरूपचन्द केवळचन्द	,,	११ ,,	श्री. धनजी भोजू पाटील	कढगांव
५१ ,,	कविराज का. सी. भावे	फैजपूर	११ ,,	,, हरी धर्मा पाटील	,,
५१ ,,	वैद्य सुपडू नथू वाणी	यावल	११ ,,	,, एकनाथ गरबड पाटील	,,
३१ ,,	,, चूडामणी खंडेराव चौधरी	फैजपूर	११ ,,	,, पोपट नागो पाटील	,,
३१ ,,	शिवनारायण किसनलालशेट	भुसावळ	११ ,,	,, पुना भोजू पाटील	,,
२५ ,,	वैद्य एल्. पी. व्यास	,,	११ ,,	,, नारायण रामलालशेट	नशिराबाद
२५ ,,	,, नारायण लालजी इन्दूरकर	,,	११ ,,	वैद्य रामदास श्रीकृष्ण नाईक	,,
२५ ,,	,, रामदास कालीदासशास्त्री	यावल			

[पुढें चालू]

वैद्यराज डेग्वेकरजींचे दोन प्रश्न

(लेखकः—वैद्य वा. स. अंदनकर, आयुर्वेदतीर्थ, चांदा)

ता. १-१-१९५५ चे आयुर्वेद पत्रिकेच्या अंकांत श्री. वैद्यराज डेग्वेकरजी यांनीं मला दोन प्रश्न केले आहेत; त्यापैकीं १ ला प्रश्न असाः—

गुल्माचा पाक होतो काय ? होत असल्यास स यस्मादात्मनि चयं गच्छत्याप्स्विव बुद्बुदः ॥६॥ अन्तः सरति यस्माच्च न पाकमुपयात्यतः ॥ (सुश्रुत उत्तरतंत्र अ, ४२, गुल्मप्रतिषेधाध्याय) या संहिताकारांच्या (टीकाकारांच्या नव्हे) वाक्याची संगति कशी लावावयाची ?

ह्याचें उत्तरः—

विशेषमथ वक्ष्यामि स्पष्टं विद्रधिगुल्मयोः ॥२८॥
गुल्मदोषसमुत्थानाद्विद्रधेर्गुल्मकस्य च ।
कस्मान्न पच्यते गुल्मो विद्रधिः पाकमेति च ॥२९॥
न निबन्धोऽस्ति गुल्मानां विद्रधिःसनिबंधनः ।
गुल्माकाराः स्वयं दोषा विद्रधिर्मांसशोणिते ॥३०॥
विवरानुचरो ग्रन्थिरप्सु बुद्बुदको यथा ॥३१॥
एवं प्रकारो गुल्मस्तु तस्मात्पाकं न गच्छति ॥
मांसशोणितबाहुल्यात् पाकं गच्छति विद्रधिः॥३२॥
मांसशोणितहीनत्वाद्गुल्मः पाकं न गच्छति ॥
गुल्मस्तिष्ठति दोषे स्वे विद्रधिर्मांसशोणिते ॥
विद्रधिः पच्यते तस्माद्गुल्मश्चापि न पच्यते ॥३३॥

डल्हण टीकाः— न निबन्धोऽस्तीति निश्चित्य बध्नातीति निबन्धो मूलम्। तद्गुल्मानां मूलं नास्तीति, रसरक्तादिदूष्याणामभावत्वात् । ...... गुल्मश्चापि न पच्यत इति अपिशब्देन पच्यते गुल्म इति कायचिकित्सायामुक्तं गुल्मपाकित्वं समुच्चीयते ।

(सुश्रुत, विद्रधिनिदान अ. ९)

स्वदोषसंश्रयो गुल्मः सर्वो भवति तेन सः ॥
पाकं चिरेण भजते नैव वा, विद्रधिः पुनः ।
पच्यते शीघ्रमत्यर्थं दुष्टरक्ताश्रयत्वतः । ॥५६॥
अतः शीघ्रविदाहित्वाद्विद्रधिः सोऽभिधीयते॥५७॥

[अष्टांगहृदय निदानस्थान, अ. ११]

स्वदोषाधिष्ठानश्च सर्वो भवति गुल्मः। तस्माच्चिरेण नैव वा पाकमेति। भृशदुष्टरक्ताश्रयत्वात्तु विद्रधिः शीघ्रपाको भवतीति ॥

[अष्टांगसंग्रह, निदानस्थान अ. ११]

आम्ही आप्तवाक्यें वर उध्दृत केलीं आहेत. सुश्रुतसंहिताकारांचीं वचनें खालीलप्रमाणें आहेत.

न पाकमुपयात्यतः। गुल्मस्तु तस्मात्पाकं न गच्छति । गुल्मः पाकं न गच्छति । तस्मादुल्मश्चापि न पच्यते । विद्रधिः पाकमेति च हीं सर्व सुश्रुतोक्त वचनें आम्हीं वर रेखांकित केलीं आहेत. व अष्टांगहृदयकाराचें याच्या विरुद्ध वचन खालीलप्रमाणें आहे.

गुल्मः ... पाकं चिरेण भजते नैव वा। व अष्टांगसंग्रहांतहि याच अर्थाचें खालील वाक्य आहे. तस्माच्चिरेण नैव वा पाकमेति ।

[निदानस्थान अध्याय ११]

आपाततः विचार केल्यास सुश्रुत व वाग्भट यांचें वचनांत विरोध दिसतो. एक म्हणतात गुल्माचा पाक होत नाहीं, व दुसरें म्हणतात कीं गुल्माचा पाक होतच नाहीं असें नाहीं. केव्हां पाक होतो व केव्हां होत नाहीं असा विकल्प आहे. व दोघेहि संहिताकार प्रमाण असल्यामुळें या वचनांची संगति कशी हा प्रश्न उपस्थित होतो. आपणास ह्याची संगति लावणें आहे व तीच श्री. डेग्वेकरजी यांनीं विचारली आहे.

आतां परम आप्त असलेल्यां चरकाचार्यांची भेट घेऊं. चरकसंहिता चिकित्सास्थान अ. ५ पहा. या अध्यायांत वातगुल्माची चिकित्सा संपल्यानंतर पित्तगुल्माचे चिकित्सेला श्लोक ३३ पासून आरंभ केला आहे तो असाः—

स्निग्धोष्णेनोदिते गुल्मे पैत्तिके स्रंसनं हितम् ।
रूक्षोष्णेन तु संभूते सर्पिः प्रशमनं परम् ॥३३॥

पित्तं वा पित्तगुल्मं वा ज्ञात्वा पक्वाशयास्थितम् ।
कालविन्निर्हरेत् सद्यः सतिक्तैः क्षीरबास्तिभिः ॥३४॥
पयसा वा सुखोष्णेन सतिक्तेन विरेचयेत् ।
भिषगग्निबलापेक्षी सर्पिषा तैल्वकेन वा ॥३५॥

अर्थात् ' स्वदोषसंश्रयो गुल्मः ' । या वचनाप्रमाणें प्रस्तुत अधिकरणांत पित्तगुल्म हा पित्तदोषसंश्रयी असणार, व हा गुल्म ' अन्तःकोष्ठो महास्रोत आमपक्वाशयाश्रयः । तत्स्थानाः च्छर्द्यतीसारकासश्वासोदरज्वराः । अन्तर्भागं च शोफार्शोगुल्माविसर्प—विद्रधि ' । या कोष्ठाचे व्याख्येप्रमाणें कोष्ठांत आहे व ' शोधनं शमनं चेति द्विधा तत्रापि लंघनम् । या सूत्राप्रमाणें शमन चिकित्सा, विरेचन व बास्तिविधि श्लोक ३३ पासून ते श्लोक ३५ पर्यंत सांगितला. व एवढ्यानेंच जर पित्तगुल्माच्या संप्राप्तीचा नाश करितां आला तर पुढें चिकित्सापथ आक्रमण करण्याची कांहीं जरूरी नाहीं. पण ' पित्तं रक्तस्य विकृतेः संसर्गाद्दूषणादपि । ह्या सिद्धान्ताप्रमाणें ह्या प्रस्तुत पित्तगुल्माच्या प्रकरणांत रक्त ह्या दूष्याची दुष्टि होण्याचा संभव आहे. आतापर्यंत सुश्रुतोक्त वचनाप्रमाणें 'न निबन्धोऽस्ति गुल्मानां..'। व 'गुल्माकाराः स्वयं दोषाः...'। अशीच अवस्था होती. पण पित्तगुल्माच्या संप्राप्तींतील वृद्धपित्तदोष, ज्याच्या केवळ आश्रयानें आतांपर्यंत पित्तगुल्म हा व्याधि आहे, तो आतिवृद्ध झाला व रक्त ह्या दूष्याला दुष्ट करूं लागला म्हणजे आतांपर्यंत पित्तगुल्म हा अनिबन्धन जो होता तो सनिबन्धन व्हावयास सुरवात झाली; व डल्हणाचार्यांच्या टीकेवरून असें स्पष्ट होतें कीं, अनिबन्धनत्व असणें म्हणजे ' रसरक्तादिदूष्याणामभावत्वात् '। व याच्या विरुद्ध सनिबन्धनत्वम् म्हणजे ' रसरक्तादिदूष्याणां भावत्वात् '। तेव्हां प्रस्तुत पित्तगुल्माचा अतिवृद्ध दोषानें रक्त ह्या दूष्याचा आश्रय केला म्हणजे आतां सनिबन्धनत्व सुरूं झालें व अशीच जर संप्राप्ति पुढें चालूं दिली तर वृद्धपित्तदोषाच्या पाककर्मानें रक्त ह्या दूष्याचा पाक होणार व अर्थात् आतां यापुढें पित्तगुल्म ह्या व्याधीची गुल्म संज्ञा जाऊन अंतर्विद्रधि ही संज्ञा प्राप्त होणार व ह्या अंतर्विद्रधीच्या चिकित्सेंत श्रीवाग्भटाचार्य अध्याय १३ चिकित्सास्थानांत उच्चैः आक्रोश करून धोक्याची सूचना देतात.

पाकं च वारयेद्यत्नात् सिद्धिः पक्वे हि दैविकी
॥२६॥

निदानार्थकरो रोगो रोगस्याप्युलभ्यते ॥१८॥
ते पूर्वं केवला रोगाः पश्चाद्धेत्वर्थकारिणः ॥
[चरक निदानस्थान अ. ८]

या वरील चरकवचनाप्रमाणें पित्तगुल्माचें अवस्थानंतर पित्तज अंतर्विद्रधींत व विद्रधींचें पाकोत्तर अन्तर्व्रणांत, कोष्ठगतव्रणांत ह्याप्रमाणें परंपरेनें अवस्थान्तर. होणार ' स एव कुपितो दोषः समुत्थानविशेषतः । स्थानान्तराणि च प्राप्य विकारान् कुरुते बहून् ' ॥ [अष्टांगहृदय सूत्रस्थान अ. १२]

तेव्हां ही आपत्ति टाळण्याकरितां पित्तगुल्माच्या अतिवृद्ध पित्तदोषानें रक्तदुष्टि केली आहे काय ? तें ओळखलें पाहिजे. व त्याकरितां चिकित्सास्थानांत गुल्मचिकित्सेंत पुढील ३६ व्या श्लोकांत रक्तदुष्टीची लक्षणें सांगतात. तीं अशीः—

तृष्णाज्वरपरीदाहशूलस्वेदाग्निमार्दवे ।
गुल्मिनामरुचौ चापि रक्तमेवावसेचयेत् ॥३६॥

वरील श्लोकांत तृष्णादि लक्षणावरून वृद्धपित्तानें रक्त ह्या दुष्याची दुष्टि केली असें एकदां ज्ञात झाल्याबरोबर 'ते तूत्तरासु गतिषु भवन्ति बलनत्तराः' ॥३७॥ सुश्रुत सूत्र. अ. २१) ह्या सूत्राप्रमाणें सावध होऊन पाक करणाऱ्या वृद्धापित्तदोषाचें व पक्व होणाऱ्या रक्ताचें संशोधन करणें क्रमप्राप्त होय. म्हणून " रक्तौषधत्वेन सिराव्यधोऽपि ॥८७॥ (अष्टांगहृदय सूत्रस्थान अ. १९) ह्या सूत्रांचा अवलंब करून चरकाचार्य म्हणतात 'रक्तमेवावसेचयेत्' । व ही रक्तस्थ दोषाची त्याच्या पित्तदोषासह ही अग्र्य संशोधनक्रिया केल्यास काय फल मिळतें त्याचें उत्तर खालील श्लोकांत देतात.

छिन्नमूला विदह्यन्ते न गुल्मा, यान्ति च क्षयम्।
रक्तं हि व्यम्लतां याति तच्च नास्ति न चास्ति
रुक् ॥ ३७ ॥

बरें एवढीहि पूर्वकर्मांची चिकित्सकानें खटाटोप करून जर 'रक्तपित्तातिवृद्धत्वात् क्रियामनुपलभ्य च'। किंवा तसें जागरूक रीतीनें पाक निवारणाचें कर्म कोणाहि अडचणीमुळें घडून नच आलें तर यदि गुल्मो विदह्येत शस्त्रं तस्य भिषग्जितम्। येथें शल्यकोविदाचें क्षेत्र येऊन पोंहोचतें.

आमं विपच्यमानं च सम्यक् पक्वं च यो भिषक्।
जानीयात् भ सवेद्वैद्यः शेषास्तस्करवृत्तयः ॥७॥

(सुश्रुत सूत्रस्थान अ. १७)

ह्या सुश्रुतोक्तवचनाप्रमाणें प्रस्तुत पित्तगुल्माचें पित्तज अंतर्विद्रधींत रूपान्तर होत असतांना, त्या पित्तगुल्माची आतां संपूर्ण संज्ञा कोणास बदलावयाची असल्यास त्याहिप्रमाणें कां होईना त्या पित्तगुल्माची आमावस्था, पच्यमानावस्था व संपक्वावस्था ओळखली पाहिजे व त्याच एका उद्देशानें चरकाचार्यांचे पुढील श्लोक आहेत.

गुरुः कठिनसंस्थानो गूढमांसोऽन्तराश्रयः।
अविवर्णः स्थिरः स्निग्धो ह्यपक्वो गुल्ममुच्यते ॥४०॥
दाहशूलार्तिसंक्षोभस्वप्ननाशारतिज्वरैः।
विदह्यमानं जानीयाद्गुल्मं तमुपनाहयेत् ॥४१॥
विदाहलक्षणे गुल्मे बहिस्तुङ्गे समुन्नते।
श्यावे सरक्तपर्यन्ते संस्पर्शे बस्तिसन्निभे ॥४२॥
निपीडिते.न्नते स्तब्धे सुप्ते तत्पार्श्वपीडनात्।
तत्रैव पिण्डिते शूले संपक्वं गुल्ममादिशेत् ॥४३॥
तत्र धान्वन्तरीयाणामाधिकारः क्रियाविधौ
वैद्यानां कृतयोग्यानां व्यधशोधनरोपणे ॥४४॥
अन्तर्भागस्य चाप्येतत् पच्यमानस्य लक्षणम्।
हृत्क्रोडशूलताऽन्तः बहिःस्थे पार्श्वनिर्गतिः ॥४५॥
पक्वः स्रोतांसि संक्लिद्य व्रजत्यूर्ध्वमधोऽपि वा ॥
स्वयं प्रवृत्तं तं दोषमुपेक्षेत हिताशिनैः ॥४६॥

(चरक चि. अ. ४)

या सर्व विवेचनावरून हें सिद्ध होतें कीं, प्रस्तुत पित्तगुल्म हा व्याधि प्रथमच्या अवस्थेंत जरी रक्तदूष्य ह्या निबंधनाचा आश्रय घेत नसला तरी पुढें 'रक्तपित्तातिवृद्धत्वात्। ह्या प्रमाणवचनाप्रमाणें पुढें पुढें चिकित्सकाच्या क्रियेसहि न जुमानतां किंवा रोगीच जर पूर्वावस्थेंत चिकित्सकाकडे नच आल्यास तोच अतिवृद्धपित्तदोष रक्ताचा पाक करतो.

वातादृते नास्ति रुजा न पाकः
पित्तादृते नास्ति कफाच्च पूयः ॥
तस्मात् समस्ताः परिपाककाले
पचन्ति शोफांस्त्रय एव दोषाः ॥७॥

(सुश्रुत सूत्रस्थान अ. १७)

शूलं नर्तेऽनिलाद्दाहः पित्ताच्छोफः कफोदयात्।
रागो रक्ताच्च पाकः स्यादतो दोषैः सशोणितैः ॥

(अष्टांगहृदय सूत्रस्थान अ. २९)

अर्थात् या परंपरेप्रमाणें पित्तगुल्माचें पित्तज अन्तर्विद्रधींत रूपान्तर झाल्यावर, त्या अन्तर्विद्रधीचा कोष्ठांत पाक होऊन कोष्ठगत व्रण हा व्याधि होतो.

म्हणुनच श्रीवाग्भटाचार्यांनीं हें सर्व प्रकरण आपल्या चिकित्सास्थानाच्या अन्तर्विद्रधि या अधिकरणांत समाविष्ट केलें आहे.

पक्वः स्याद्विद्रधिं भित्वा व्रणवत्तमुपाचरेत्।
अंतर्भागस्य चाप्येतच्चिह्नं पक्वस्य विद्रधेः ॥२०॥
पक्वः स्रोतांसि संपूर्य स यात्यूर्ध्वमधोऽथवा।
स्वयं प्रवृत्तं तं दोषमुपेक्षेत हिताशिनः ॥२१॥

अष्टांगहृदय चिकित्सास्थान अ. १३

येथें कोणी म्हणतील कीं, पित्तगुल्माचें अवस्थांतर पित्तज अंतर्विद्रधींत होतें असें तुम्ही कशाला म्हणतां? पित्तगुल्माचाच पाक होतो असें कां म्हणत नाहीं? पित्तगुल्माचें रूपांतर पित्तविद्रधींत होतें व नंतरच पाक होऊं शकतो अशा पाकसिद्धिकरितां एवढा तुम्ही प्रयत्न करतां काय? त्याचें उत्तर असें कीं, केवळ पाकसिद्धिकरितां पित्तविद्रधि ही संज्ञा

घेण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. पित्तगुल्म, विद्रधि, वीसर्प, अर्शोभगंदर, पीटिका, मसूरिका, व्रणशोथ व पित्तकुष्ठादि रोगांत जेव्हां जेव्हां पाक होतो तो सर्व पाक 'न पाकः पित्तादृते । पाकः स्यादतो दोषैः सशोणितैः'। ह्या वचनानुसारच होतो. स्पष्ट सांगावयाचें म्हणजे जेथें जेथें पाक होईल तेथें तेथें ' आतिवृद्धपित्तदोषदुष्टरक्तत्वम्'। हें सामान्य (Common factor) राहीलच व तें असें सामान्यत्व प्रस्तुतच्या पित्तगुल्माच्या नंतरच्या अवस्थेंत प्राप्त होतें व पित्तगुल्माचा पाक होऊन अन्तर्व्रणत्व येतें. व चरकाचार्यांनीं ' ह्यापक्को गुल्पमुच्यते । विदह्यमानं जनीयाद्गुल्मं । संपक्कं गुल्ममादिशेत्'। अशींच वाक्यें घेतलीं आहेत. व पुढें फक्त ' अन्तर्विद्रधिवच्चास्य कार्यें शोधनरोपणे '। असें चिकित्सासामान्य निर्दिष्ट केलें आहे. तेव्हां पित्तगुल्माचें रूपांतर पित्तविद्रधींत होतें अशी वाक्ययोजना करण्यामध्यें कोणाचा शास्त्रीय प्रतिबंध असेलच तर आमचाहि आग्रह नाहीं. प्रस्तुत विषय एवढाच कीं, पित्तगुल्माचा पाक होतो एवढेंच आम्हांस सिद्ध करावयाचे आहे. व विद्रधीचा पाक होण्याकरितां ज्याप्रमाणें रक्तमांसादि दूष्यांची आवश्यकता आहे त्याचप्रमाणें पित्तगुल्मातहि जेव्हां पाक होतो तेव्हां रक्तदुष्याची दुष्टि होऊनच तो पाक होतो व यास सुश्रुताचार्य 'सनिबंधनत्वं' असें म्हणतात. गुल्माकाराः स्वयं दोषाः । या वचनाप्रमाणें प्रथमच्या अवस्थेंत पित्तगुल्म हा व्याधि जरी केवळ पित्तदोषाचा आश्रय करून असला, तरी पुढें रक्तपित्तातिवृद्धत्वात् ह्या चरकवचनानुसारें रक्तदूष्याची दुष्टि होऊन प्रथमचें 'न निबंधोऽस्ति गुल्मानां' । हें वचन दूर होऊन 'विद्रधिः सनिबंधनः । ह्या वचनाप्रमाणें पित्तगुल्मालाहि ' सनिबंधनत्वम्' । येतें व पाक होतो.

गुल्मोऽष्टध पृथग्दोषैः संसृष्टैर्निचयं गतैः ।
आर्तवस्य च दोषेणां नारीणां जायतेऽष्टमः ॥३२॥
[अष्टांगहृदय, निदानस्थान अ. ११]

वरील संख्यासंप्राप्तींत उल्लेखित केलेल्या आठहि गुल्मांचा पाक होतो काय ? असा कोणी प्रश्न केल्यास त्याचें उत्तर एवढेंच कीं, पित्तगुल्मांत व इतर संसृष्ट व सान्निपातिक गुल्मांत जेथें जेथें प्रथम पित्तदोषाची वृद्धि राहील व तदनन्तर तो पित्तदोष प्राथमिक चिकित्सेनें न सावरल्यास जर त्या अतिवृद्ध पित्तदोषानें रक्तदूष्याचा आश्रय करून त्या दूष्याचीहि दुष्टि होईल तर तेथें तेथें पाकसंभव आहे असाच शास्त्राचा सद्भाव आहे. एवढेंच काय तर आर्तवं शोणितं त्वाग्नेयं अग्नीषामीयत्वाद्गर्भस्य ॥७॥ (सुश्रुत, सूत्रस्थान अ. १४) ह्या सिद्धान्ताप्रमाणें ' आर्तव हें पित्ताचा आश्रय असल्यामुळें रक्तगुल्मासहि पाक होण्याचा संभव म्हणूनच काश्यपसंहितेंत पुढील वचन आहे.

रक्तगुल्मे प्रथमतो युक्त्या स्नेहोपपादनम् ।
शस्तं बाहुसिरायाश्च वेधनं पाकवारणम् ॥
[काश्यपसंहिता, खिलस्थान, अध्याय ९]

अर्थात् ह्याच कार्यकारणभावाप्रमाणें केवळ वातगुल्माचा किंवा कफगुल्माचा व इतर पित्तसंसर्गविरहित गुल्मांचा पाक होऊंच शकत नाहीं म्हणूनच 'स्वदोषसंश्रयो गुल्मः सर्वो भवति तेन सः । पाक चिरेण भजते नैव वा...'। असा शास्त्रकारांना गुल्मव्याधीचा पाकविकल्प सांगावा लागला. व तदनुसारच चरकाचार्यांनीं आपल्या गुल्मचिकित्सेच्या अध्यायांत कोठेंहि वायुगुल्माच्या किंवा कफगुल्माच्या पाकप्रपंचाचा उल्लेख न करतां फक्त त्याचा विस्तार पित्तगुल्माच्या अधिकरणांतच केला आहे.

पुणें येथें
' आयुर्वेद सेवा संघ, नासिक ' चीं
सर्व औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें २

महाराष्ट्र प्रां. दशम वैद्य संमेलन, भुसावळ

पत्रक २ रें

प्रदर्शनें नाविन्यपूर्ण कशीं होतील ?

प्रांतीय संमेलनास जोडून प्रदर्शनें भरविण्याची प्रथा रूढ आहे. तथापि हीं प्रदर्शनें उपयुक्ततेच्या दृष्टीनें नाविन्यपूर्ण कशीं होतील हा विचार करण्याची वेळ आतां आली आहे. प्रदर्शनांत आतापर्यंत निरनिराळ्या आयुर्वेदीय कारखान्यांचीं सुसज्ज दुकानें, पुठ्यावर डकवलेले कोरड्या वनौषधींचे नमुने, बाटल्यांतून मांडलेलीं उद्भिज्ज खनिज द्रव्यें हींच बहुतेक असतात. प्रत्येक वर्षी प्रेक्षक तीं पाहतातहि; परंतु त्यांतील त्यांच्या स्मरणांत टिकून किती राहात असतील नकळे! शिवाय प्रांत व व्यक्तिभेदानें अशा द्रव्यांतून निश्चित द्रव्यांबाबतींत साशंकता राहाते ती राहातेच. द्रव्यनिश्चयाचे दृष्टीनें दंती, रास्ना, कलखापरी इ. विषयीं अखिल भारतीय संमेलनांतूनहि प्रयत्न झाले, परंतु निर्णय कांहींच झाला नाहीं. आज तर अगदीं साध्या पण अत्युपयुक्त वंशलोचन, पिंपळी, काकडशिंगी, यासारख्या औषधांतहि कृत्रिमता घुसली आहे असें आढळतें. तात्पर्य, आमचीं हीं प्रदर्शनें इष्ट हेतु सफल करण्याचे बाबतींत अजून तरी सफल झालेलीं नाहींत असें खेदानें म्हणावें लागतें.

संभ्रम उत्पन्न होतो

प्रदर्शनांत आपापलीं दुकानें थाटणाऱ्या कारखान्यांच्या औषधांचे बाबतींतहि असाच संभ्रम निर्माण होतो. सिद्धौषधींचे घटक व प्रक्रिया शास्त्रोक्त असल्याचा दावा प्रत्येक फार्मसीचा असतो; परंतु एकच औषध निरनिराळ्या कंपन्यांचें पाहूं जातां वर्ण, रूप, आकार व किंमत याबाबतींत कितीतरी भिन्न आहे असें आढळून ग्राहकच काय, पण आयतीं औषधें वापरणारे वैद्यसुद्धां संभ्रमांत पडतात.

ह्या व अशा पुष्कळच गोष्टी प्रदर्शनाचे दृष्टीनें यापुढेंहि होत राहणें इष्ट नाहीं. म्हणून अशा संभ्रम निर्माणकारी गोष्टींच्या प्रदर्शनापेक्षां उपयुक्ततेच्या दृष्टीनें एक गोष्ट महाराष्ट्र प्रांतीय व इतर अखिल भारतांतूनहि विद्यमान असणाऱ्या आयुर्वेदीय कारखानदारांचे नजरेस आणावीशी वाटते; तिचा सहानुभूतिपूर्वक विचार व्हावा अशी प्रार्थना आहे.

कारखान्याचें वैशिष्ट्य दर्शवावें

प्रत्येक आयुर्वेदीय कारखान्याचें कांहींना कांहीं वैशिष्ट्य असतेंच. जनतेच्या व वैद्यांच्या नजरेस या प्रदर्शनांतून त्या कारखान्याचें वैशिष्ट्य लक्षांत यावें. उदाहरणार्थ औषधीकरणाच्या प्रात्यक्षिकाची अगदीं आद्यंत व्यवस्था जर या प्रदर्शनांतून करण्यांत आली तर शुद्धि, मारण, पुटें इ. सर्व गोष्टींचें प्रत्यक्ष ज्ञान वैद्यांना सहज प्राप्त होईल. जे वैद्य घरीं औषधें कधींच करीत नाहींत, त्यांना साध्या शरावसंपुट, गजपुट, दोलायंत्र, भावना, स्वरस इ. ची सुद्धां कल्पना नसते. कोरफडीचा रस काढणें, संजीवनीगुटीसारख्या औषधांत भिलावा मिश्रण करणें, या शिवाय अर्क, तैल, घनार्क इ. गोष्टीचीहि कल्पना नसते हें एक कटु सत्य आहे.

तेव्हां यांतून जी कोणतीहि गोष्ट आपल्या कारखान्याचें वैशिष्ट्य म्हणून असेल त्याचें प्रात्यक्षिक त्या त्या कारखान्यानें या संमेलनांत प्रदर्शनमंडपांत ठेवल्यास प्रेक्षकांना निश्चित नवीन कांहींतरी मिळाल्याचा आनंद वाटेल. त्या त्या कारखान्याचें वैशिष्ट्य लक्षांत राहिल्यानें कारखान्यासहि आपलें प्रचारकार्य झाल्याचें समाधान होईल. इतकेंच नव्हे तर एकाद्या कारखान्याला सुद्धां दुसऱ्याचें वैशिष्ट्य संपादून आपलें वैगुण्य नष्ट करण्याची स्फूर्ति निर्माण होईल !

गोळ्यांची प्रमाणबद्धता

अगदीं जुन्यांतील जुने कारखाने सुद्धां अगदीं ६ गुंजांच्या बाटलीपासून पौंडी बाटलीच्या बुचांत, वेष्टनांत सुद्धां सुधारणा करूं शकले नाहींत असें

व्यवहारांत पहावयास मिळतें; गोळ्यांची प्रमाणबद्धता अजूनहि कित्येकांची पाहावयास मिळत नाहीं, तर ह्या गोष्टी उत्तम असणाऱ्या कारखान्यांचीं औषधें, रंग, रूप, वर्ण, रुचि या दृष्टीनें शंका निर्माण करणारीं वाटतात.

तेव्हां या सर्व गोष्टी ध्यानीं घेऊन नमुन्या--दाखल सुचविलेल्या पुटें, भावना, यंत्रें इ. प्रमाणें आणखीहि सुचतील तीं प्रात्यक्षिकें या प्रदर्शनांतून व्हावींत अशी अपेक्षा आहे.

विचार प्रकट करावेत

वाचक, वैद्य व कारखानदार यांनीं याबाबतींत आणखी कांहीं उपयुक्त विचार प्रकट करावेत व संमेलनास जोडून असलेलीं हीं प्रदर्शनें बोधप्रद व्हावींत अशी पुन्हां एकदां विनंति आहे.

———

संक्रांतीचा समारंभ

अमरावती येथील विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाच्या धन्वंतरी मंडळातर्फे मकरसंक्रांतीचा उत्सव कविभूषण श्री. अण्णासाहेब खापर्डे, माजी प्राध्यापक बनारस हिन्दु विश्वविद्यालय, यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला.

ऋतुभेदानें आहार बदलावा लागतो

आचार्य श्री. पु र. तारे यांनीं आयुर्वेदीय दृष्टीनें मकरसंक्रांतीचें विवेचन करतांना सांगितलें कीं, आयु. दृष्ट्या ऋतुसंबंधीचें विशेष महत्व आहे. याला अनुसरूनच आयुर्वेदानें आहारविहारादि कार्यांत महत्त्वाचे फेरफार सांगितले आहेत. एका ऋतूमध्यें सांगितलेला आहार दुसऱ्या ऋतुमध्यें बदलावा लागतो. शरीराच्या आरोग्याच्या दृष्टीनें संक्रमण काल अत्यन्त महत्वाचा आहे. या कालांत मागील "दिनचर्येचें" सिंहावलोकन करून आपल्याला शारीरिक, मानसिक व बौद्धिक दृष्टीनें याचा विचार केला पाहिजे. पाश्चात्याचा शृंखला देशानें झुगारल्यानन्तर 'स्वदेशी' कार्याकडे आपलें सर्वांचें लक्ष वेधलें गेलें आहे हा काळ आयुर्वेदाच्या दृष्टीनें संक्रमणाचाच आहे. देशी औषधें कुचकामी आहेत असा होणारा जनतेचा गैरसमज आतां हळूं हळूं दूर होत चालला आहे. आयुर्वेदाचें राज्यकर्त्यांना महत्व पटूं लागलें आहे. आयुर्वेदाला अत्यन्त उर्जितावस्था कशी येईल याचा प्रत्यक्ष विचार या संक्रमणकालीं आपण केला पाहिजे.

आयुर्वेदाकडे कोणते विद्यार्थी येतात ?

यानन्तर अध्यक्ष श्री. अण्णासाहेब खापर्डे यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें कीं, ज्यांच्याकरितां एम्. बी. बी. एस्. कॉलेजचीं द्वारें बंद होतात असेच विद्यार्थी आयुर्वेद शिकण्याकरितां येतात. ही गोष्ट मला अनेक आयुर्वेदीय कॉलेजमध्यें आढळून आली आहे. बनारस हिंदु विश्वविद्यालयांत प्राध्यापक असतांना अनेक विद्यार्थी आयुर्वेदाचा केवळ नाममात्र अभ्यास करून ॲलोपॅथीचीं औषधें वापरतांना आपण प्रत्यक्ष पाहिल्याचा उल्लेख करून ते म्हणाले कीं, आयुर्वेदामध्यें अत्यंत प्रभावी औषधी असल्याचें मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. पुण्याचे महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांचें बी.ए.एल्.एल्.बी., एम्.बी.बी.एस्. इतकें शिक्षण झालें असून देखील त्यांचा आयुर्वेदीय उपचार पद्धतीवर विश्वास होता व त्यांनीं आपल्या आयुष्यांत आयुर्वेदीय उपचार पद्धतीचाच उपयोग करून इतर डॉक्टर्सनीं असाध्य असे सांगितलेले रोगी आयुर्वेदीय औषधोपचारानें बरे करून दाखविले हें आम्हीं प्रत्यक्ष पाहिलें आहे.

राष्ट्रपतींची आयुर्वेदावर श्रद्धा

राष्ट्रपति डॉ. राजेन्द्रप्रसाद यांची देखील आयुर्वेदावर निस्सीम भक्ती असल्याचें सांगून राष्ट्रपतींनीं स्वतःचे राजवैद्य म्हणून श्री. सत्यनारायणशास्त्री या विद्वान् वैद्याची नेमणूक केल्याचें त्यांनीं सांगितलें.

आभार मानतांना उपप्राचार्य वैद्य तार म्हणाले:- "सरकारनें ज्याप्रमाणें स्वदेशीवर जोर दिला, त्याचप्रमाणें आयुर्वेदावर लक्ष केंद्रित केलें त आयुर्वेद निश्चयानें प्रगति केल्या वाचून रहाणार नाहीं."

लातूर वैद्य संमेलनाचा अहवाल

लातूर (मराठवाडा, हैद्राबाद राज्य) येथें भरलेल्या म. प्रां. ९म वैद्य संमेलनाचा अहवाल छापून प्रसिद्ध झाला आहे. त्यांत संमेलनाचें वृत्त थोडक्यांत दिलें असून परिषदेंत मंजूर झालेले संपूर्ण ठराव दिले आहेत. परिषदेच्या स्वागतसभासदांची यादी, प्रतिनिधींची यादी, सन्माननीय देणग्या व आयव्यय-पत्रक व परिषदेंत स्टॉल ठेवणाऱ्या संस्था एवढीं परिशिष्टें अहवालास जोडलेलीं आहेत. शेवटीं प्रांतीय परिषदेंत उपस्थित असलेल्या वैद्यांचें सामुहिक चित्र दिलें असल्यानें अहवालास पूर्णता आली आहे. या संमेलनाचे निमंत्रक, स्वागताध्यक्ष व अहवालाचे प्रकाशक वैद्यराज वैजनाथ बालमुकुंद झंवर (व त्याचे सहकारी वै. जोहारी) यांनीं या संमेलनासाठीं तनमनधनपूर्वक घेतलेल्या परिश्रमाबद्दल आम्ही त्यांना मनःपूर्वक धन्यवाद देतो.

बाणेदार स्वागताध्यक्ष

प्रांतीय संमेलनाला आमंत्रण देऊन तें प्रत्यक्षपणें शेवटास नेणें किती कठीण काम आहे, याचा अनुभव नुकताच आपणा सर्वांस आला आहे. अशावेळींतर श्री. झंवर यांची ही कामगिरी विशेषच उठून दिसते. श्री. झंवर हे फारच कमी बोलणारे गृहस्थ आहेत पण दिलेला शब्द पूर्ण करण्यांत कितीहि कष्ट पडले तरीं माघार घ्यावयाची नाहीं या बाण्याचे आहेत. अत्यंत विरुद्ध वा उदासीन परिस्थितींतहि न बोलतां काम कसें पार पाडतां येतें, याचें वैजनाथ झंवर हे एक मूर्तिमंत उदाहरण आहेत. स्वतः भरपूर आर्थिक झीज सोसून त्यांनीं म. प्रां. वै. मंडळाची ध्वजा मराठवाड्यासारख्या दूरवर असलेल्या महाराष्ट्र भागांत उंच उभारली त्याबद्दल प्रत्येक महाराष्ट्रीय वैद्य त्यांना धन्यवाद दिल्याशिवाय राहणार नाहीं.

(वै. वैजनाथ बालमुकुंद झंवर)

संमेलनास आलेली म. प्रां. वैद्यमंडळी

९ वें महाराष्ट्र प्रां. वैद्य संमेलन, लातूर

आयव्यय-पत्रक १९५३

१०६१- ६-९	स्वागत सभासद फी	७०- ९-६	स्टेशनरी
२७९-१३-९	प्रतिनिधि फी	६७९- ०-३	छपाई
२१५४-११-६	सामान्य देणग्या	२४९-१४-६	टपाल-तार
१५०- ०-०	प्रदर्शनभाडें उत्पन्न	८४४- ५-३	प्रवासखर्च
		४०- ०-०	प्रचार, प्रसिद्धि
		१०३७-१२-०	भोजन
		३९७-१२-९	समारंभ व सत्कार
		२५७- ३-३	पगार, मजुरी
		४८- ०-०	दिवाबत्ति
		१- २-९	किरकोळ खर्च
		३६२५-१२-३	एकूण खर्च
		२०- ३-९	शिल्लक
३६४६- ०-०		३६४६- ०-०	

हे हिशेब हिशेबतनीसाकडून तपासलेले आहेत.

गुरूंना व आयुर्वेदीय शिक्षणसंस्थांना सरकारी मान्यता

शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम

[१० फेब्रुवारी १९५५ पूर्वी अर्ज करावेत]

शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम शिकविण्याची योग्यता धारण करणारे वैद्य व संस्था यांनी शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीकडून अर्जाचे नमुने मागवून ते १० फेब्रुवारीच्या आंत भरून पाठवावेत अशी जाहीर विनंति करण्यांत येत आहे. समितीचा पत्ताः— ३०-४० बॉम्बे म्यूच्युअल अनेक्सी, गनबो स्ट्रीट, फोर्ट मुंबई, असा आहे.

गुरु म्हणून मान्यता मिळविण्यासाठीं १९५३ पूर्वी २० वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असला पाहिजे अथवा, पुढीलपैकीं एखादी पदवी घेऊन शिवाय ५ वर्षे अध्यापन कार्य केलेलें असलें पाहिजे.

आयुर्वेदाचार्य—दिल्ली. आयुर्वेद उत्तमा—बडोदा
,, —बनारस. ,, विद्वान्—म्हैसूर
,, —जयपूर. ,, विशारद—दिल्ली
आयुर्वेदाचार्य धन्वन्तरी-दिल्ली. आयु.विशारद—बडोद
आयुर्वेदालंकार गुरुकुल कांगडी. आयु. विशारद साता
आयु.चिकित्सक—सातारा. आयु. पारंगत—पुण
आयुर्वेदरत्न—बडोदा. आयुर्विद्याविशारद— ,,
आयुर्वेदशास्त्री—जयपूर. भिषगाचार्य—जयपू
आयुर्वेदतीर्थ—अहमदनगर. ,, —कलकत्ता
भिषगाचार्य धन्वन्तरी—दिल्ली. भिषग्वर—जयपू
भिषग्वर—मुंबई. गृहीतायुर्वेद—अहमदनग
गृहीतायुर्वेदशास्त्र—पाटन. वैद्यभानु—तुंगभद्र
वैद्यभूषण—बडोदा. वैद्यगुरु—तुंगभद्र
वैद्यकलानिधि—त्रिवेंद्रम्. वैद्यरत्न—बडोद
वैद्यशास्त्री—जयपूर. वैद्यवाचस्पति—दि
वैद्यविद्याविशारद—पनवेल. L.I.M.—मद्रा
D. A. S. F.—मुंबई

महाविदर्भ पदवीधर वैद्य मंडळ

संस्थापकांचें निवेदन

आयुर्वेद— जीवितशास्त्र — सायन्स ऑफ लाइफ-यांचें अध्ययन आणि व्यवहार करणाऱ्या आपणा सर्वांना आमची संस्था स्थापन झालेली पाहून आनंद झाला असेल. विज्ञानाची यथाशक्ति सेवा करण्यासाठीं आमची संस्था जन्मास आली आहे.

भेद असावयास नकोत

वस्तुतः निसर्गाचे नियम सर्व दूर सारखेच असतात. ज्या जीवरासायनिक घटना-विघटनांनीं भारतांतील मनुष्यजीवन व्यतीत होतें, त्याच तशाच प्रकारच्या जीवरासायनिक प्रक्रियांनीं जगांतील सर्व मनुष्यप्राण्यांचा जीवनप्रवाह वाहत असतो. निसर्गाचे नियम सर्वदूर सारखेच लागू असल्यामुळें आणि मनुष्यप्राण्यांची शारीर-रचना मूलतः सर्वत्र सारखीच असल्यानें सर्वदूर एकाच प्रकारची चिकित्सा-पद्धति अस्तित्वांत असावयास पाहिजे. आयुर्वेद, ॲलोपथी, होमिओपथी इत्यादि भेद असावयास नकोत.

पण ज्याप्रमाणें जाणते लोक ह्या जगाचे एक कारण-परमेश्वर-सर्वांचा एकच आहे हें समजत असूनहि ह्या विश्वाकडे पाहण्याच्या भिन्न दृष्टिकोनामुळें वेगवेगळे धर्मपंथ मानतात, त्याचप्रमाणें मनुष्य शरीरांत घडुन येणाऱ्या प्रक्रियांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांतील वैचित्र्यामुळें वेगवेगळ्या पॅथीज-चिकित्सापद्धती-अस्तित्वांत आल्या आहेत. विशाल बुद्धीचा खरा धार्मिक मनुष्य अन्य धर्मांचा द्वेष न करतां त्यांतील उपयुक्त भाग आत्मसात् करतो-कारण त्यास आदितत्वाची जाणीव करून घेण्याची जिज्ञासा असते-त्याचप्रमाणें खरा चिकित्सक अन्य चिकित्सा-पद्धतींना तुच्छ न मानतां त्यांतील उपयुक्त तें ग्रहण करण्याचा प्रयत्न करतो.

खरा चिकित्सक विज्ञानद्वेष्टा असूंच शकत नाहीं. अंथरुणावर तळमळणाऱ्या रुग्णाचे कष्ट कमी होऊन तो पुनः आरोग्यसंपन्न कसा होईल, हेंच एकमेव त्याचें ध्येय साध्य करण्यासाठीं जेथून मिळेल तेथून उपयुक्त ज्ञान ग्रहण करण्याची त्याची नेहमींच उत्सुकता असते.

सर्व वैद्यकपद्धतींची जननी

आज भारतवर्षांत अनेक शतकापासून "आयुर्वेद" नांवानें ओळखली जाणारी चिकित्सा-पद्धति अस्तित्वांत आहे. ही चिकित्सापद्धति इतकी जुनी आहे कीं, चिकित्साशास्त्राचा इतिहास लिहिणारे तिला सर्व वैद्यक-पद्धतींची जननी समजतात. "जुनें तें सोनें" ह्या म्हणीप्रमाणेंच तिला अन्धश्रद्धेनें चांगलें म्हणा असें कोणीच तार्किक बुद्धीचा मनुष्य म्हणणार नाहीं. जेथें जीवनमरणाचा प्रश्न असतो तेथें अन्धश्रद्धेला मुळींच वाव नसतो. आणि वैद्यक-शास्त्रांत अंधश्रद्धेला आणि वृथाभिमानाला मुळींच थारा नसावा असें आमचेंहि स्पष्ट मत आहे.

पण ज्या कांहीं गोष्टी चांगल्या असतील त्या केवळ अनेक शतकांच्या जुन्या आहेत म्हणून पुरातनत्वाचा शिक्का मारून टाकून देणें योग्य होणार नाहीं.

विज्ञानावरील विध्वंसक आक्रमण

भारतीय समाजावर परकीयांचे अनेक आक्रमक आघात झाले. ह्या आक्रमांतील मुसलमानांचा आघात अत्यन्त भयंकर आणि विध्वंसक होता. बख्तियार खिलजी सारख्यांनीं नालंदा आणि तक्षशीला सारखीं विद्यापीठें नष्ट केलीं, अनेक ग्रंथालयें जाळण्यांत आलीं. मुद्रणकलेच्या अभावीं अनेक विद्यांना जिव्हा-कंठगत करणारे अनेक प्राचार्य, त्यांना कुराण येत नाहीं म्हणून मारले गेले. मानव्याला उपयोगी अशा विज्ञानशास्त्रांवरील तें विध्वंसक आक्रमण होतें. इतिहास ह्या सर्व गोष्टींना साक्ष आहे. ह्या कालांत

भारतीय समाज आपलें अस्तित्व कसें टिकून राहील ह्या काळजींतच चूर होता. जेथें स्वतःच्या अस्तित्वाचीच अनिश्चितता, तेथें विद्या आणि कला-शास्त्रांची भरभराट कोठून होणार ! विद्या आणि कलांची अभिवृद्धि होण्यासाठीं आवश्यक असलेलें सामाजिक आणि राजकीय स्वास्थ्य भारत स्वतंत्र होईपर्यंत लाभलें नाहीं.

भारताचें अधःपतन होण्याला जीं अनेक ऐतिहासिक कारणें झालीं त्याच कारणांनीं भारतीय वैद्यक शास्त्राची परागति झाली.

प्रत्येक भारतीयाचें उत्तरदायित्व

पण इतिहास कांहींहि असला तरी परागति पावलेल्या भारतीय वैद्यक शास्त्राला पुनः प्रगत करण्याचें उत्तरदायित्व जीवितशास्त्राचें अध्ययन आणि व्यवहार करणाऱ्या प्रत्येक भारतीयाचें आहे. मग तो आयुर्वेदपंथीय असो, वा ॲलोपॅथिक असो, किंवा अन्य कोणी असो.

भारतीय वैद्यकांतील चांगल्या गोष्टी

आपल्या देशाच्या राष्ट्रीयतेशीं एकनिष्ठ असलेला नागरिक आपल्या राष्ट्राच्या सांस्कृतिक आणि विज्ञानपरंपरेंत जें कांहीं चांगलें असेल त्या विषयीं खचित अभिमान बाळगेल. शून्याचा शोध, दशांश-पद्धति आणि बीजगणित ही भारतीय गणितज्ञांची प्रतिभा आहे. ध्वनि-अनुसार आदर्श लेखनपद्धति हा भारतीय आविष्कार आहे. वीणेसारखें वाद्य कीं ज्यानें पाहिजे तशी स्वररचना साधतां येते, भारतीय नृत्य कीं ज्यानें हृदयांतील भावनांचा उत्तान आविष्कार करतां येतो, ह्या आणि असल्याच राष्ट्रीय वैशिष्ट्याविषयीं भारतांतील चिकित्सकांना जर अभिमान वाटणें शक्य असेल तर त्यांच्या व्यवसायाशीं निगडित असलेल्या भारतीय वैद्यकांतील-आयुर्वेदांतील-चांगल्या गोष्टीविषयीं त्यांना अभिमान कां वाटू नये !

वैद्यवर्गाचें उत्तरदायित्व

आयुर्वेदांतील वैशिष्ट्यें शास्त्रीय जगापुढें मांडण्याचें उत्तरदायित्व प्राधान्यानें वैद्यवर्गांवरच आहे. ज्यानीं आयुर्वेदाचें अध्ययन केलें नाहीं असे ॲलोपॅथीय किंवा अन्य पंथीय चिकित्सक हें कार्य इच्छा असूनहि करूं शकणार नाहींत. आयुर्वेदाच्या संशोधनाचा भार वैद्यांनींच उचलला पाहिजे, आणि ह्या कर्तव्याच्या जाणिवेनेंच आम्हीं ही संस्था स्थापन केली आहे.

ह्या कार्यांत परमेश्वर आम्हांला यश देवो, आणि सर्व प्रकारच्या चिकित्सापंथीयांची आम्हाला सहृदय सहानुभूति मिळो हीच त्या जगदेककारणाजवळ नम्र प्रार्थना आहे.

आपले विनम्र (संस्थेचे प्राथमिक संस्थापक)

आर्. यु. पद्मावार	(आयुर्वेदतीर्थ)	यवतमाळ
त्रिं. म. गोगटे	,,	अमरावती
जी. डी. देशपांडे	,,	मेहेकर
सकळकळे	,,	चिखली
एस्. पी. पाठक	,,	खामगांव
देशपांडे	(आयुर्वेदाचार्य-बनारस)	,,
मठकरी	(आयुर्वेदतीर्थ)	शेगांव
एस्. व्ही. देशपांडे	,,	तेल्हारा
वसंतराव तोरे	,,	नांदुरा
ल. रा. गारूडी	,,	पुसद
र. शं. मुळे	,,	पाळोदी (मंगरूळपीर)
कुलकर्णी	(आयुर्विद्याविशारद)	बाळापूर
वास्कोहळे	(आयुर्वेदतीर्थ)	आलेगांव
जोशी	आयुर्विद्याविशारद	कारंजा
हेमचन्द्र आर्. वैद्य	(आयुर्वेदविशारद)	कारंजा
गणेश शं. घोंडसे	(आयुर्वेदतीर्थ)	अकोला
नारायण शं. घोंडसे	,,	,,
गं. ह पराडकर	,,	,,
ह. रा. पिंपळे	(आयुर्विद्याविशारद)	,,
प्र. ल. समुद्र	(आयुर्वेदतीर्थ)	,,
व्ही. जे. वडाळकर	(डी. ए. एस्. एफ्.)	नांदुरा
एस्. एस्. पट्टलवार	(आयुर्वेदतीर्थ)	परतवाडा

		अकोला
एल्. टी. शहा	,,	
पावडे	(डी. ए. एस्. एफ्)	,,
शंकरराव भोरकर	(आयुर्विद्याविशारद)	खामगांव
बाबुराव पारसनीस	(डी. ए. एस्. एफ्.)	,,
शांताराम करमरकर	(आयुर्विद्याविशारद)	,,
एम्. के. पळसोकर	डी. ए. एस्. एफ्)	मेहेकर
सि. वि. वडोदकर	(आयुर्वेदतीर्थ)	जळगांव जामोद
कुऱ्हेकर	(आयुर्वेदाचार्य-बनारस)	अमरावती
मधुसूदन काणे	,,	,,
गडकरी		
शास्त्री ना. रा.	(आयुर्वेदतीर्थ)	एलिचपूर
		बुलढाणा
जयस्वाल	,,	
वाकचवरे	,,	

महाविदर्भ पदवीधर वैद्य मंडळ घटना

१) या संस्थेचें नांव "महाविदर्भ पदवीधर वैद्य मंडळ" असें राहील.

२) संदर्भार्थाला बाध न येतां या घटनेंत उपयोगांत आणलेल्या पुढील शब्दांच्या व्याख्या व व्याप्ति पुढें दिल्याप्रमाणें राहतील.

अ) महा-विदर्भ या शब्दानें "सध्यांचा विदर्भ, मध्यप्रदेशांतील मराठी भाषिक प्रदेश आणि शासन-संस्थेकडून विदर्भास जोडला जाणारा प्रदेश."

आ) पदवीधर म्हणजे "राजशासनमान्य अशा विद्यालयांत कमींत कमी चार वर्षे प्रात्यक्षिक शिक्षणासह पदवी मिळविलेली व्यक्ति."

इ) पदवी देणारी संस्था भारतांतील कोणत्याहि घटक राज्यांतील शासनसंस्थेकडून मान्यता पावलेली असावी लागेल.

ई) "वैद्य" म्हणजे आयुर्वेदाला अधिकृत करून चिकित्साव्यवसाय करणारी पदवीधर व्यक्ति.

उ) मंडळ म्हणजे "महाविदर्भ पदवीधर वैद्य मंडळ."

सभासद

३) महाविदर्भांत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या आणि वार्षिक पांच रुपये वर्गणी देणाऱ्या कोणत्याहि पदवीधर वैद्यास या मंडळाचा सभासद होतां येईल.

सभासदांचे अधिकार

४) प्रत्येक सभासदास मंडळाचे सर्वसाधारण सभेंत एक मत देण्याचा अधिकार आहे.

५) सर्वसाधारण सभेंत टपालद्वारें किंवा प्रतिनिधिद्वारा (by proxy) मतदान करतां येणार नाहीं.

६) मंडळाचे अधिकारी आणि कार्यकारी मंडळाची सर्वसाधारण सभेंत निवडणूक करण्याचा अधिकार प्रत्येक सभासदास आहे.

७) वरीलपैकीं कोणत्याहि जागेचे निवडणुकीसाठीं उमेदवार म्हणून त्यास उभें राहतां येईल.

८) मंडळाचे कार्याला सर्व प्रकारें सक्रिय मदत केली पाहिजे.

अधिकारी

९) मंडळाचे पुढीलप्रमाणें अधिकारी राहतील–

(अ) अध्यक्ष- एक, (आ) उपाध्यक्ष- एक,
(इ) कार्यवाह- एक (ई) कोषाध्यक्ष- एक.

१०) या चार अधिकाऱ्यांची निवड सर्वसाधारण सभेंत बहुमतानें करण्यांत येईल व ते एका वर्षाकरितां पदाधिकारी राहतील.

कार्यकारी मंडळ

११) वर नियम ९ मध्यें सांगितलेले ४ पदाधिकारी व सर्वसाधारण सभेनें बहुमतानें निवडून दिलेले अन्य पांच सभासद मिळून ९ जणांचें कार्यकारी मंडळ राहील.

पदाधिकारी आणि कार्यकारी मंडळाचे अधिकार

१२) अध्यक्षः—

अ) अध्यक्ष हा मंडळाचा वैधानिक प्रतिनिधि राहील.

आ) मंडळाचे कार्याच्या सर्व प्रकारचें उत्तरदायित्व त्याचेवर राहील.

इ) तो कार्यकारी मंडळास उत्तरदायी राहील.

ई) त्यानें करावयाच्या प्रत्येक गोष्टीस कार्यकारी मंडळाची पूर्वसंमति किंवा दोन महिन्यांचे आंत उत्तर-संमति आवश्यक आहे.

उ तो कार्यकारी मंडळाच्या व सर्वसाधारण सभांचा आमंत्रक राहील.

ऊ) कार्यकारी मंडळाच्या आणि सर्वसाधारण सभांचा तो अध्यक्ष राहील.

१३) उपाध्यक्षः—

हा अध्यक्षास साहाय्यक राहील आणि अध्यक्षांचे अनुपस्थितींत किंवा त्यांचे संमतीनें अध्यक्षाचे सर्व अधिकार त्याला राहतील.

१४) कार्यवाहः—

अ) कार्यवाह हा अध्यक्षास उत्तरदायी राहील

आ) कार्यालयांतील दैनंदिन व इतर सर्व कार्यांचें उत्तरदायित्व याचेवर राहील.

इ) परिस्थितीनुसार याचे मदतीसाठीं एक किंवा अनेक साहाय्यक नियुक्त करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

ई) कार्यवाहानें सभांची सूचना सभासदास १० दिवसांचे अगोदर मिळेल अशा रीतीनें पाठवावी.

१५) कोषाध्यक्षः—

मंडळाचा निधि याचेजवळ राहील.

कार्यकारी मंडळाचे अधिकार

१६) अ) मंडळाचे अधिकाऱ्यांवर यांचें नियंत्रण राहील.

आ) मंडळाचे उद्दिष्टांचे पूर्तीसाठीं अध्यक्षाला सर्व तऱ्हेनें साहाय्य व मार्गदर्शन करणें हें कार्यकारी मंडळाचें कर्तव्य राहील.

इ) कार्यकारी मंडळाचे सर्व सभासद आणि मंडळाचे सर्व अधिकारी साधारणपणें निर्वेतन राहतील. पण यापैकीं कोणास वेतन द्यावयाचें असल्यास त्यास सर्वसाधारण सभेची पूर्वमान्यता आवश्यक आहे.

ई) मंडळाचे उद्दिष्टांचे पूर्तीसाठीं करावयाचीं सर्व कामें कार्यकारी मंडळ करील.

उ) मंडळाचे वार्षिक खर्चाचें अंदाजपत्रक तयार करून त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्याचें कार्य कार्यकारि मंडळ करील.

ऊ) अंदाजपत्रकापेक्षां अधिक खर्च करण्याचा अधिकार परिस्थितीनुसार कार्यकारी मंडळास राहील, पण त्याकरितां सर्वसाधारण सभेची पूर्व-संमति किंवा दोन महिन्याचे आंत उत्तर-संमति आवश्यक आहे.

ए) कार्यकारी मंडळाचे सभेस चार या गणसंख्येचें बंधन राहील.

ऐ) कार्यकारी मंडळाचे सभेस निमंत्रण आणि विषय १० दिवस अगोदर सभासदांना कळविले जातील.

सर्वसाधारण सभा

१७) (अ) आवश्यकतेनुसार वेळोवेळीं सर्वसाधारण सभा बोलाविण्याचा अधिकार अध्यक्षास राहील. मात्र वर्षातून कमींत कमी एक वेळ तरी अशी सभा त्यानें बोलाविलीच पाहिजे.

आ) सर्वसाधारणसभें पुढील कामें केलीं जातील.

१) पदाधिकारी व कार्यकारी मंडळाचे सभासदांची निवड करणें.

२) कार्यकारी मंडळानें मागील वर्षीं केलेल्या कामाचा आढावा घेणें व झालेल्या जमाखर्चाची तपासणी करून त्यास मान्यता देणें.

३) पुढील वर्षांत करावयाचे कामाची रूपरेषा ठरविणें व त्यासाठीं खर्चाचें अंदाजपत्रकावर विचार करून तें मान्य करणें.

इ) सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ आलेल्या प्रत्येक प्रश्नावर बहुमतानें निर्णय घेतला जाईल.

ई) सर्वसाधारण सभेसाठीं एकतृतीयांश सभासदसंख्या हें गणसंख्येचें बंधन राहील.

उ) घटनेंत बदल करावयाचा झाल्यास मात्र मंडळाच्या एकूण सभासदांपैकीं निम्याहून एक जास्त इतक्या सभासदांची गणसंख्या आवश्यक राहील व

या सभेंत बहुमतानें मान्य केलेले बदलच घटनेंत तर्भूत केले जातील.

१८) मंडळाच्या एकूण सभासदांपैकीं एकचतु- यापेक्षां कमी नाहीं, इतक्या सभासदांनीं लेखी गणी केल्यास अध्यक्षास सर्वसाधारण सभा बोलवा- व लागेल.

१९) एखाद्या सभासदाचें सभासदत्व योग्य रणासाठीं नाकारण्याचा अधिकार मंडळाचे सर्व- ारण सभेसच राहील.

२०) मंडळाचें स्थायी कार्यालय अकोला ऱ्हाड) येथें राहील.

२१) मंडळाचें वर्ष अश्विन वा। १३ पासून होईल.

सन्माननीय साहाय्यक

२२) आपल्या उद्दिष्टाचे पूर्तीसाठीं आवश्यक त्यास पदवीधर नसलेल्या वैद्यांशीं आर्थिक अगर क सहकार्य करण्याचा कार्यकारी मंडळास अधि- राहील. अशा तऱ्हेनें ज्यांचेशीं सहकार्य केलें ल त्यांना मंडळाचे सन्माननीय साहाय्यक मानलें ल. पण त्यांना सभासदत्वाचा किंवा मतदानाचा कार राहणार नाहीं.

२३) हें मंडळ भारताचें राष्ट्रीयत्वास एकनिष्ठ . आणि राजकारणाशीं याचा कोणत्याहि प्रकारें राहणार नाहीं.

ना. यशवंतराव चव्हाण

मुंबई राज्याचे स्थानिक स्वराज्य, पुरवठा व जंगल चे मंत्री नामदार यशवन्तराव चव्हाण यांनीं ार ता. ६ रोजीं सकाळीं ८ वाजतां आयुर्वेद सेवा स भेट दिली. आघल्या दिवशीं सायंकाळीं त्यांनीं ीसपॅलिटीनें बांधलेल्या आयुर्वेदीय दवाखान्याच्या रतीचें उद्घाटन केलें. त्यावेळीं त्यांनीं नाशिक येथील ुर्वेदीय उपचार करणारे वैद्य व उपचार घेणारी ा यांना धन्यवाद दिले. नासिक येथें रोगचिकित्सेंत आयुर्वेदाला एवढें महत्व व प्रतिष्ठा दिली जाते हें पाहून त्यांना जरा आश्चर्यच वाटलेंसें दिसलें.

चॅरिटी कमिशनर यांची भेट

मुंबई राज्याचे चॅरिटी कमिशनर श्री. प्रधान आय्. सी. एस्. यांनीं ता. ४-१-५४ रोजीं सायंकाळी ५ वा. 'आयुर्वेद सेवा संघ' या पब्लिक ट्रस्ट संस्थेस भेट दिली. त्यांनीं संस्थेच्या निरनिराळ्या विभागांचें निरीक्षण केलें व उपयुक्त सूचना केल्या. त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

सांडू
टोमॅटो कम्पाउंड
• व्हिटॅमिनयुक्त टॉनिक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द कृ सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्सः—
बी. पी. वर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते—मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

पवित्र
नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

सर्वोदय वृत्तीचे वैद्य माटे

[सर्वोदययोजना महाबळेश्वर केंद्र, याचा पंचवार्षिक अहवाल पत्रिकेकडे आला आहे. त्यास जोडलेल्या श्री. होमी तल्यारखान [सेक्रेटरी, मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्ली, कॉंग्रेस पार्टी] यांच्या इंग्रजी अहवालांत 'डॉक्टर्स स्पिरिट' या शीर्षकाखालीं पुढील महत्वाचें निरीक्षण दिलें आहे. —संपादक]

१८ मैलाचीं चाल झाली

" शिवाय याच [बामणोली] खेड्यांत मला एक आयुर्वेदीय चिकित्सक भेटले. त्यांचें नांव श्री. माटे (माट्टे). सर्वोदयाचे उद्देश व आदर्श यांचें तें मूर्तिमंत उदाहरण म्हणतां येईल. वैद्य माटे हे नऊ मैल दूर असलेल्या खेड्यावर जाऊन रोगी पाहून मला भेटण्यासाठीं त्वरेनें परत आले होते. ती रात्रीं १० वाजण्याची वेळ होती. त्याचवेळीं ६ मैल दूर असलेल्या दुसऱ्या एका खेड्यास रोगी पाहाण्यासाठीं या वैद्यांना नेण्याकरितां एक खेडूत त्यांच्या घरीं येऊन थांबलेला होता.

पुनः १२ मैल जाण्यास तयार

वैद्य माटे ७०वर्षें वयाचे गृहस्थ आहेत, तथापि त्यांनीं बिलकूल तक्रार केली नाहीं. १८ मैल चालून आले तरी विशेष कांहीं झालें असें त्यांनीं भासविलें नाहीं. आमच्या भेटीसाठीं थांबण्यास सवड नाहीं म्हणून त्यांनीं आमची माफी मागितली. कर्तव्यपालन करावयाचें असल्यामुळें त्यांचा नाईलाज झाला.

यदृच्छालाभसंतुष्टः

तेवढ्या रात्रीं त्यांनीं आपली काठी व कंदील उचलला, व रोग्याला उपचार करण्यासाठीं ते मार्गस्थ झाले. ते रोग्याला कधीं फी मागत नाहींत; रोगी जे देईल तें ते स्वीकारतात. कोणी त्यांना मापभर भात देतात, कोणी १-२ रुपये देतात, असें चालतें. "

सरकारी अहवालांत नोंद नाहीं

[भारतांत सर्वत्र खेड्यापाड्यांतून असा सेवावृत्तीचा वैद्यवर्ग आज हजारों वर्षें रहात आहे व ग्रामीण जनतेची पिळवणूक न करतां सर्वोदय वृत्तीनें सेवा देत आला आहे. मात्र पूर्वीच्या ब्रिटिश राजवटींत व आतांच्या स्वतंत्र भारतांतहि या निष्काम सेवेचा उल्लेख आरोग्यखात्याच्या जाडजूड अहवालांत अद्याप कोठेंच येत नाहीं. हें आमचें दुर्दैव आहे। मुंबईचे आरोग्यमंत्री इकडे लक्ष देतील काय ?

—संपादक]

उज्वल कीर्ति

आयुर्वेदीय औषधांची उज्वल कीर्ति बनविलेल्या सिद्ध औषधांच्या गुणावर आहे. औषधें गुण देणारीं असतील तर कीर्ति नेहमीं उज्वल राहील. तरी अशीं गुण देणारीं औषधें, अस्सल ताजी व स्वच्छ घटक औषधी द्रव्यें खरेदी करण्यावर अवलंबून आहे. औषधी द्रव्यासाठीं आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स
पायधुनी, मुंबई नं. ३
फोन नं. (३१८५८) यांचेकडे मागणी करा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि आषधांचीं तयार चूर्णेंहि मिळतात.
अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवा.

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व औषधें
मुंबईंत मिळण्याचें आणखी एक नवें केंद्र
रामकृष्ण एजन्सी
आनंदजी लद्धा बिल्डिंग
लालबाग, मुंबई १२
* मागणी रोज वाढत आहे. *

आमची तुंगारेश्वराची सहल

(लेखकः— विद्यार्थिनी कु. किशोरी परब)

शीव–मुंबई येथील शुद्ध आयुर्वेद-विद्यालयांतील विद्यार्थ्यांची वनस्पतिप्रात्यक्षिकाची सहल तुंगारेश्वरच्या डोंगरावर गेली होती. त्या सहलीचें वर्णन संक्षिप्त स्वरूपांत पुढें दिलें आहे. –संपादक)

हु...हु...हुं...हुं...

एकदम सर्वच जणांनीं चमकून मागें पाहिलें. तो विचित्र आवाज एका कोपऱ्यांतून येत होता, तो प्रकार पहतांच आमच्या हसतां हसतां मुरकुंड्या वळल्या. त्याचें असें झालें. आमची आयुर्वेदिक कॉलेजची सहल तुंगारेश्वरला निघाली होती. वसईची खाडी येतांच सर्वांनाच त्या सकाळच्या वेळेस थंडी भरून आली. मागच्या बाकावरचा एक पोरगा तर कुडकुडूं लागला. वरील विचित्र आवाज त्याचाच येत होता.

वैद्यकीय विद्यार्थ्यांचा आनंद

पण आम्ही मुलेंमुली मात्र त्या थंडीची पर्वा न करतां एकदम आनंदांत होतो. कारण आम्हांला आतां वनस्पति पहाण्यास मिळणार होत्या. ज्याप्रमाणें खलाशाच्या मुलांना समुद्र पाहून आनंद होतो, चित्रकाराला सुंदर वस्तू पाहून आनंद होतो, त्याप्रमाणेंच आम्हां वैद्यकीय व्यवसायांतील मुलांना वनस्पति पाहून आनंद वाटणें साहाजिकच होतें. कारण वनस्पति हेंच आमचें मुख्य जीवन होतें.

मिथ्यायोग कीं हीनयोग

आगगाडींत वादविवाद सुरूं होता. थंडीच्या दिवसांत पाऊस पडणें हा पावसाचा मिथ्यायोग व थंडीचा हीनयोग असें आमचें कांहीं मुलामुलींचें मत होतें, तर गुरुजींचें व इतर मुलांचे म्हणणें होतें कीं, तो थंडीचा मिथ्यायोग होय. मुलांच्या जोरजोराच्या प्रतिपादनामुळें वातावरणांत तंगपणा येत आहे असें दिसतांच व्यवहारकुशल मुलींनीं सर्वांना लेमनड्रॉप्स वाटल्या व तावडतोब खेळीमेळीचें वातावरण बनलें.

प्रवासाचा नैसर्गिक उत्साह

श्री. मावळणकर गुरुजी व श्री. जोशी वैद्य ह्यांच्या नेतृत्वाखालीं आम्हीं डोंगर चढण्यास सुरवात केली. पिवळें धमक ऊन पडल्यामुळें हिरवीगार पानें चमकत होतीं. आम्ही वनस्पति पहात व हंसत खेळत केव्हां मुक्कामावर पोंहचलो हें कळलेंसुद्धां नाहीं. मुलींनींहि मुलांच्या बरोबरीनें डोंगर चढून न दमतां मुक्काम गांठला व आपण वैद्यकीय व्यवसायास योग्य प्रकृतीचे आहोंत हें सिद्ध केलें.

जंगली लोकांचें साह्य

थोडा वेळ विश्रांति घेऊन आम्ही जंगल पहाण्यास निघालो. बरोबर असलेला गडी आम्हांला आपल्या भाषेंत त्या वनस्पतींना काय म्हणतात हें सांगत होता व गुरुजी आम्हांला त्या औषधी व त्यांचे उपयोग समजावून देत होते. आम्हा विद्यार्थ्यांपैकीं सर्वांचे त्या वनस्पतींसंबंधींचे गुण तोंडपाठ असल्यानें आम्हाला त्या वनस्पति पहातांना मुळींच त्रास झाला नाहीं.

घणसर, कातरवेल

घणसर (नागदंती), हें झाड पहातांच गुरुजी म्हणाले, ही नागदंती तीव्र रेचक आहे. तसेंच ही उंदराच्या विषावर, सुजेवर, गंडमाळेवर, पोटफुगीवर उगाळून लावतात व पोटांत देतात. हें कोशीमचें फळ आंबट असून कॉलऱ्यावर वापरतात. व हें झाड कातरवेलीचें बरं कां! ह्याचा पाला गांठीवर वाटून लावतात. आतां ह्या नारोडाचा उपयोग चमत्कारिक दिसतोंय. डोळ्यामध्यें फूल पडलें कीं, ह्याची मुळी कानांत बांधतात. तसेंच ही गाव्हाडी, सर्पदंशावर ही खावयास देतात. ही कडू असल्यानें उलटी होते व विष

नघून जातें. व ही कातरी जास्वंद हं ! मुलींनो, तिचें ूल डोक्यांत घालत नाहींत. हें गांठीवर (गळवावर) ावतात. त्यामुळें गळू पिकतें व फुटून जातें. ”

हेंद, वाकडी, काकडा

“ आणि ह्यो हेंद आसा ” गोविंदा गड्यानें ध्येंच माहिती पुरवली. ” ह्या हेदाचा पाला दम्या-- र अत्यन्त गुणकारी आहे. तसेच ही वाकाडी लहान ळांच्या बिछान्याकडे ठेवली कीं त्यांना स्वस्थ झोंप ागते. त्याप्रमाणें हा काकडा बरं कां! ह्यालाच मृगलिंडिका ’ म्हणतात. हा केवण ह्याच्या मुळानीं क थांबते. ”

डिकेमाली, ऐन, फांगळा

व गुरुजी हें काय ? मी एका उंच झाडाकडे ट दाखवीत विचारलें. ही तर डिकेमाली. ा डिकेमालीचा डिंक हा कृमिघ्न असून सर्व कारच्या अतिसारावर तो वापरतात. व ही गरमेल नस्पति पहा. उपदंशावर ह्याचा काढा देतात व रहि लावतात. ही हनवटी तापावर देतात. व हा गर्ज, काळपुळी आली असतां ह्याचा पाला लावतात, ती फुटली कीं वर आर्दानाचा व किंजणीचा ला लावतात. त्याचप्रमाणें हा फांगळा हा तेलामध्यें ाद्ध करून ह्याची उपदंशावर पट्टी लावतात. ”

रानभेंडी, मोचरस

“ गोविंदा, हे रे काय ? ”

“ ही नेळोशी ” गोविंदा म्हणाला “स्त्रियांच्या पणीवर वापरतात. ह्याचा पानाचा व सालीचा रस पणीवर गुणकारी आहे. ह्या रानभेंडीचें मूळ व गभस्म वाजीकरण प्रयोगांत देतात. व त्याप्रमाणें ा बिबळाचा चीकं सर्व प्रकारच्या अतिसारावर त्तम आहे. ही कांबू उष्णतेवर देतात, व हा मोचरस सा ठिसूळ व हलका आहे. हा सर्व प्रकारच्या तेसारावर देतात.

पायाखालची गोरखमुंडी

व ही पायाखालची वनस्पति पाहिलीत कां ? जमीनीलगतची बारीक लालसर रंगाचीं फुलें असलेली वनस्पति दाखवत गुरुजी म्हणाले, ही गोरखमुंडी काविळीवर ह्याचा काढा देतात. व ह्या दूर्वा ह्यांचा उपयोग तुम्हाला उत्तमपैकीं माहित आहेच.

“ व गुरुजी ही रिंगणी निळसर फुलाची आहे. ही विशेषतः मूत्रकृच्छ व कास-श्वासावर वापरतात ना” ? एका मुलानें विचारलें.

“ होय, तसेंच हा बाहवा. हा मृदुरेचक असून पित्त, हृद्रोग व ज्वराचा नाश करतो. व ही कुटकी दाह, पित्त व कृमिनाशक आहे.”

“ गुरुजी, आस्कंदाचें झाड हेंच काय ? ”

होय, गुरुजी म्हणाले. आस्कंद हा पुष्टिवर्धक, असून पांढरें कोड व क्षय ह्यांचा नाश करतो. हा रास्ना वातशूळ, सूज व वातरक्तनाशक असून तो आमपाचक आहे. ही धायटी विसर्प, कृमि व तहान ह्यांचा नाश करते.

बाहवा, खाजकुहिली

अशा रीतीनें आम्ही अनेक वनस्पति पाहिल्या. त्या दिवशीं निरनिराळ्या वनस्पतींचे नमुने घेऊन आम्ही निघालो. एक मुलगा बाहव्याची शेंग काढण्याच्या प्रयत्नांत असतांना गुरुजी विनोदानें ओरडले “ अरे संभाळ ” “ काय झाले गुरुजी ? ” तो घाबरा होऊन विचारूं लागला. त्याला वाटलें साप आला कीं काय ? पण गुरुजी मिस्किलपणे म्हणाले—

“ अरे पुढें खाजकुहिली आहे. नुसती तिचीं कुसें जरी अंगावर पडलीं तरी नाचायला लावतील. त्यापासून चार पावलें दूर रहावें. मुलें हसूं लागलीं. गोविंदा म्हणाला ह्या कुहिलीचें बीं वातशामक व उत्तम वाजीकरण औषध आहे. ”

१) शिवणीः– ही ज्वर व शूळ नाशक आहे. तिचें फूल वातकर, ग्राहक, रक्तपित्त व प्रदर ह्यांचा नाश करतें. फळ रसायन, केसांना हितकर व जड आहे.

२) टेंद्वः– ह्याला दिंडा असेंहि म्हणतात. तो ग्राहक व कटु असून वात, पित्त, कफ व कास ह्यांचा

नाश करतो. दिंड्याचें कोंवळें फळ रूक्ष, तुरट, मधुर, रोचक व दीपक आहे. टेंटूची शेंग हिरवागार रुंद व चांगली लांब असते. ती आम्ही तोडून बरोबर घेतली.

३) डोरली:- ही ग्राहक हृद्य व पाचक आहे. कफवातनाशक व उष्ण असून कुष्ठ, ज्वर, श्वास कास, अग्निमांद्य नाशक आहे.

४) रिंगणी:- ही दोन प्रकारची होती. एक सफेत फुलांची व एक निळसर फुलांची. रिंगणी सारक, कडवट हलकी असून ती पार्श्वशूल, पीनस, मूत्रकृच्छ, वगैरे रोगांचा धुव्वा उडवते. पांढरी रिंगणी विशेषतः गर्भधारणाकारक आहे.

५) एरंड:- एरंड हा मधुर, उष्ण, जड असून कटिशूल, बस्तिशूल, शिरोरोग, दमा, कफ, कुष्ठ व आमवात यांचा नाश करतो. फळ भेदक व वातनाशक आहे.

६) उपळसरी:- ही काळी व पांढरी दोन प्रकारची आहे. ह्या दोन्ही मधुर, स्निग्ध, शुक्रकारक असून त्या अग्निमांद्य, अरुचि, श्वास, ओकारी ह्यांचा नाश करतात. त्याचप्रमाणें त्रिदोष व ज्वरहारक आहेत.

७) गोरखमुंडी:- आमच्या पायाखालीं वायंगी रंगाची किती तरी गोरखमुंडी होती. ती कडू व पाककाळीं मधुर, हलकी व बुद्धिप्रद असून गलगुंड, अपची, मूत्रकृच्छ, योनिरोग व पांडुरोग ह्यांचा नाश करते.

८) बाहवा:- हा मधुर, शीतल व मृदु रेचक असून ज्वर, हृद्रोग, रक्तपित्त व शूल ह्यांचा नाश करतो. त्याचें फूल ग्राहक व पित्तकफनाशक आहे.

९) पिवळा (कांटे) धोत्रा- हा धोत्रा कडू, रेचक, मंदाग्नी व उत्क्लेदकारक असून तो कृमि, कंडु, कफ, विष व आनाह ह्यांचा नाश करतो.

१०) कांचन- हा थंड, ग्राहक, तुरट, कफपित्त, कृमि, कुष्ठ, गुदभ्रंश व गंडमाळा ह्यांचा नाश करतो.

११) टाकळा— हा कफ, कास, दद्रुनाशक असून ह्याचें फळ अतिशय उष्ण आहे. तें कुष्ठ व विषरोग ह्यांचा नाश करतें. ह्याचे पानांची भाजी कफकर, वातरक्तनाशक व लघु आहे.

१२) पित्तपापडा— हा रक्तपित्त, भ्रम, तृष्णा, कफ व ज्वर ह्यांचा नाश करतो.

इत्यादि बऱ्याच वनस्पति आम्ही पाहिल्या. गुरुजी म्हणाले, चला आतां उशीर झाला.

झपझप पावलें टाकीत आम्हीं मुक्कामावर आलो व जेवण केलें. त्या वनभोजनास फारच गम्मत आली. नंतर आम्ही पत्ते वगैरे खेळलो व सरबत पिऊन डोंगर उतरण्यास सुरवात केली.

संध्याकाळची रम्य वेळ, आजुबाजूचा नयन–मनोहर देखावा आमचीं मनें मोहित करूं लागला. तेथेंच उभे राहून ती शोभा पहात रहावी असें आम्हांस तीव्रतेनें वाटलें, पण उशीर होण्याचें भय असल्यानें आम्ही तो विचार रहित केला.

बसमध्यें खूप गर्दी होती पण मुलांनीं स्त्री–दाक्षिण्य दाखवून मुलींची प्रथम सोय करून दिली. बाहेर अंधार पसरला होता, व आजच्या दिवसाची मजा संपली, म्हणून आम्हाला वाईट वाटत होतें.

दादर स्टेशन आलें व आम्ही त्या दिवसाच्या अेकमेकांच्या सहवासांत ज्ञान संपादन करण्यांत घालवलेल्या गोड क्षणांची आठवण हृदयाच्या कप्प्यांत जपून ठेवली व एकमेकांचा निरोप घेऊन थोड्या व्यथित अंतःकरणानीं घरीं परतलो.

‘ डॉ. ’ लिहिण्यावर बंदी

दिल्लीच्या मेडिकल असोसिएशननें सरकारकडे अशी मागणी केली आहे कीं जे वैद्य, हकीम, वा दंत-चिकित्सक, आपल्या नांवामागें डॉ. असें लिहितात त्यावर बंदी घालण्यांत यावी. तसेंच नगरपालिका, विधानसभा यांत कांहीं लोक व्यवसायानें चिकित्सक नसतानाहि डॉक्टर शब्दप्रयोग नांवामागें करून प्रतिष्ठा मिळवितात. त्यावरही बंदी घालण्यांत यावी. या अर्धवट डॉक्टरांचा सुळसुळाट कमी करण्यासाठीं सरकारी मदत घेण्यांत येणार आहे असें कळतें.

'श्वान' वृत्तीवर मुनशी काढा

बैलगाडीच्या खालीं दोन्ही चाकाच्या मधून गाडी बरोबर कुत्रा चालत असतो. त्याला अशी घमेंड असते कीं गाडी त्याच्याच आधारावर चालत आहे. लखनौ येथें भरलेल्या डॉक्टर परिषदेचे अध्यक्ष डॉ. सेन यांनीं आपल्या भाषणांत याच वृत्तीचा परिचय करून दिला आहे. प्राणिमात्रांच्या स्वास्थ्या-साठीं ॲलोपथी ही एक संरक्षक स्वरूप आहे. बाकीचे चिकित्सापंथ व्यर्थ आहेत, असें त्यांचें म्हणणें आहे.

या भाषणाला उत्तर देऊन उत्तर प्रदेशचे राज्यपाल माननीय के. एम्. मुनशी यांनीं डॉ. सेन यांचें भाषण समूळ खोडून काढलें आहे. श्री. मुनशी वैद्य नाहींत कीं डॉक्टर नाहींत. त्रयस्थ आहेत. त्यामुळें त्याचे विचार निःपक्षपाती असणेंच संभवनीय आहे.

इतःपर कोणालाहि आयुर्वेदाविरुद्ध गरळ ओकण्याची प्रवृत्ति होईल त्यावेळीं माननीय मुनशी यांचा पुढील शाब्दिक काढा त्याला पाजावा.

"भारताची आधुनिक चिकित्सापद्धति पाश्चात्य पद्धतीचें अंधानुकरण करील तर ती गोष्ट दुर्भाग्याची ठरेल. आयुर्वेदीय चिकित्सा भारतांत प्राचीन काला-पासून होत आली आहे व आजहि देशांत सुविख्यात आयुर्वेदीय चिकित्सक आहेत. देशांत ॲलोपॅथीचा लाभ जितक्या लोकांना होतो त्यापेक्षां कित्येक लाख अधिक व्यक्तींना आयुर्वेदापासून आरोग्य--लाभ होत आहे."

—आयुर्वेद संदेश

वैद्यांच्या पगाराचें स्केल

[नगर येथें भरलेल्या प्रान्तिक लोकलबोर्ड कामगार परिषदेंत वैद्यराज भा. श्री. देसवंडीकर यांनीं मांडलेला व मंजूर झालेला ठराव पुढें दिला आहे. आपापल्या भागांत या ठरावाचा प्रचार वैद्यांनीं करावा अशी त्यांची विनंति आहे. -संपादक]

"सर्व लोकल बोर्डांतील वैद्यांच्या पगाराचें स्केल, कारकुनांचें स्केलप्रमाणें ठेवलेलें आहे. सरकारनें आतां शुद्ध आयुर्वेदाला मान्यता दिलेली आहे. परन्तु स्केल मात्र पूर्वीचेंच ठेवलेलें आहे. मॅट्रिकनन्तर चार वर्षे शिंस्टिट्यूशनमधून कोर्स घेतलेल्या वैद्यांवर हा अन्याय झालेला आहे. तरी नवीन स्केल ८० ते २२० हें पूर्वीच्या वैद्यांनाहि लागू करावें. यामुळें सर्व लोकल बोर्डांतील खेड्यांतून काम करणाऱ्या वैद्यांवर झालेला अन्याय दूर होईल."

केंद्र सरकारनें

तपास समिति नेमली

दिल्ली येथील केंद्रीय सरकारनें मिश्र वैद्यक शिक्षण पद्धतींचें निरीक्षण करण्यासाठीं ५ जणांची एक तपास समिति नेमली आहे असें कळतें. ही समिती भारतांतील सर्व मिश्र शिक्षणसंस्थांचा तपास करील. ही समिति १० जानेवारी रोजीं लखनौ येथें आली होती. ता. ११-१-५५ रोजीं तिनें श्री. द. अ. कुळकर्णी आयुर्वेदाचार्य (डेप्युटी डायरेक्टर) व स्टेट आयुर्वेदिक कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. याज्ञिक यांच्यासह एका मिश्र तिब्बी कॉलेजचें निरीक्षण केलें.

ही समिति सर्व भारतभर फिरून आल्यानन्तर आपला अहवाल सरकारला सादर करील. मिश्र शिक्षित वैद्यांना सल्फाड्रग्ज व इतर ॲलोपॅथिक औषधें वापरण्याचा अधिकार द्यावा किंवा नाहीं, दिल्यास कितपत द्यावा इ. गोष्टींचा सल्ला ही समिति सरकारला देणार आहे.

या समितींत पुढील व्यक्ति आहेत- १ डॉ. विहश, पंजाब. २ डॉ. चक्रवर्ति, कलकत्ता. ३ डॉ. वर्मा, बनारस. ४ डॉ. मल्होत्रा, न्यू दिल्ली. ५ हकीम मोहमद इलियासखां साहब, दिल्ली.

'श्याम' पाक्षिक

साने गुरुजी कथामालेचें मुखपत्र म्हणून वरी नांवाचें पाक्षिक २६ जानेवारी १९५५ पासून सु झालें आहे. वार्षिक वर्गणी २॥ रु. किरकोळ अं २ आणे. पत्ताः- c/o साने गुरुजी कथामाल रानडे रोड, दादर. मुंबई

१५ उपयुक्त कोरडीं औषधें

लेखकः- मा. या. व्यवहारे
बी. एससी. [फार्म-केम]

ता. १६ जानेवारींचे आयुर्वेद पत्रिकेंत, घरांत वारंवार लागणारीं कांहीं उपयुक्त कोरडीं औषधें यावर साग्र संग्रह माहिती पाहिजे अशी विचारणा केल्यावरून अशी माहिती लेखरूपानें पुढें दिली आहे, ती सर्वांस उपयुक्त होईल अशी आशा आहे.

घरांत वारंवार उत्पन्न होणारे व अनुभवास येणारे रोग म्हणजे आम्लपित्त, यकृतप्लिहावृद्धि व थंडीताप, आंव, अतिसार, अग्निमांद्य व पोटदुखी, बालकांचे सर्व किरकोळ विकार, गर्भाशय व योनीचे विकार, मूत्ररोग, संधिवात व वातविकार, गालगुंड व घशांतील रोग, गोंवर कांजण्या इ. विकार, हृदयांचे विकार, मूळव्याध नेत्ररोग, दाह व उष्णतेचे विकार, व आजारानंतरची क्षीणता हे होत. या रोगानुसारच उपयोगी पडणाऱ्या औषधांचा संग्रह खालीं दिला असून तो उपयुक्त असाच आहे.

१ सुवर्णसूतशेखर

या औषधांत एकूण द्रव्यें आहेत. तीं म्हणजे सुवर्ण, पारा, गंधक, ताम्रभस्म, शंखभस्म, बचनाग, धोत्राबी, टंकण, त्रिकटु, चतुर्जात, बेलगीर, व कचोरा हीं होत. या सर्वांना माकारसाची भावना देऊन त्याची मात्रा किंवा गोळया बनवितात.

उपयोगः- या मात्रेचा मुख्यतः आम्लपित्त, भोंवळ, जळजळ, डोके दुखणें, वांति व मळमळ करणें यांवर करतात. पित्तप्रकृतीच्या माणसास तर हें फारच आवश्यक व संग्राह्य औषध आहे. यालाच पित्ताची मात्रा म्हणतात. मात्रा (dose):- ·॥· ते १ गुंज आलेरस, तुळसरस अगर मोरावळ्याबरोबर देणें.

२ आरोग्यवर्धिनी व महासुदर्शन वटी

आरोग्यवर्धिनीमध्यें पारा, गंधक, लोहभस्म, अभ्रकभस्म, ताम्रभस्म, कुटकी हीं द्रव्यें आहेत. महासुदर्शन वटींत एकूण ५२ औषधें असून त्यांत निम्यानें काडेचिराईत चूर्ण आहे.

उपयोगः- या दोन्ही औषधांचा प्लिहावृद्धि, यकृतवृद्धि व त्यांचेपासून उत्पन्न होणारे रोग, कामला, पांडुरोग, थंडीताप, ज्वर नाहींसा करण्याकडे होतो. आरोग्यवर्धिनी मुलांना फारच हितावह आहे. मुलांचें यकृत व प्लीहा सुव्यवस्थित व कार्यक्षम राहतात.

मात्राः- आरोग्यवर्धिनी १ ते २ गुंजा दिवसांतून दोन वेळ कोमट पाण्याबरोबर देणें.

महासुदर्शनवटीः— ३ ते ६ गोळया वरील प्रमाणेंच.

३ अतिसारावर चूर्ण

हें अनुभविक व गुणकारी औषध आहे. याचा पाठः- कुडासालचूर्ण १ भाग, बेलगीरचूर्ण १ भाग, इंद्रजवचूर्ण १ भाग व अतिविषचूर्ण १।४ भाग एकत्र खल करून घेणें.

उपयोगः- अतिसार, हागवण, आंव, मुरडा इ. रोगांवर अनुभविक व गुणकारी आहे.

मात्राः- २ ते ३ गुंजा पाण्याबरोबर दिवसांतून २ ते ३ वेळ देणें.

४ भास्करलवण चूर्ण

यालाच कोणी लवण-भास्करचूर्ण संबोधितात. यांत वरींच द्रव्यें असून तीं लवणें, आम्लपदार्थ, त्रिकटु, डाळिंब इ. आहेत.

उपयोगः- हें चूर्ण वातकफनाशक, दीपक, पाचक, रूचकर असून पोटफुगी, अग्निमांद्य व बद्धकोष्ठ नाहींसे करते.

मात्राः- १/४ १/२ तोळा, दिवसांतून दोन वेळ कोमट पाण्याबरोबर घेणें.

५ बाळगोळी

ह्यांत बाळहिरडा, अतिविष, काकाडशिंगी, अक्कलकारा, सागरगोटा, मुरडशेंग, जेष्टमध, जायफळ इ. द्रव्यें आहेत.

उपयोग :- बालकांचे सर्व रोगांवर हें उत्कृष्ट व अनुभाविक औषध आहे. यांची मात्रा व गोळया

बनवितात. हें दिल्यानें सर्व किरकोळ रोगांचा नाश होऊन बालकाचें पचन व प्रतिकारक शक्ति वाढते. या औषधाचा ग्राईप वॉटरसारखा घरोघर वापर सुरू झाल्यास बालकाचें आरोग्य सुधारून तीं गुटगुटीत गोंडस व सशक्त बनतील. हें ७।८ वर्षांपर्यंतच्या मुलांनासुद्धां देण्यास हरकत नाहीं.

माला:- दुधांतून अगर पाण्यांतून उगाळून दोन वेळ देणे. ४ ते ८ वर्षांपर्यंत १ गुंज देणें.

६ अबला संजीवनी कल्प

यांत अशोक, शतावरी वडीशेप मंजिष्टा व पुनर्नवा इ. द्रव्यें वापरलेलीं आहेत.

उपयोगः— गर्भाशय व योनीचे विकारावर या कल्पाचा चांगला उपयोग होतो. यानें श्वेत वा रक्त प्रदर, धुपणी, कंबर दुखणें, हातपाय गळणें, डोके दुखणें नाहींसे होऊन स्त्रियांचें आरोग्य सुधारतें. स्त्रियांना ही एक संजीवनीच आहे.

मात्रा :— १ ते २ चहाचे चमचे दुधाबरोबर अगर पाण्याबरोबर घेणें.

७ चंद्रप्रभा

यांत बरींच द्रव्यें असून मुख्य म्हणजे शिलाजित, गुग्गुळ, लोहभस्म, सुवर्णमाक्षिकभस्म, देवदार, धने, त्रिकटु, क्षार व लवणें आहेत.

उपयोगः· ह्याचा उपयोग मूत्राशयाचे सर्व विकारावर म्हणजे मूत्रकृच्छ्र, मूत्राघात, प्रमेह, लघवींतून धातु जाणें इ. विकारार होऊन मूत्रपिंड कार्यक्षम होतात.

मात्राः- १ ते २ गुंजा सकाळ संध्याकाळ दूधखडीसाखरेबरोबर घेणें.

८ महायोगराजगुग्गुळ

यांत पुष्कळ द्रव्यांचा संयोग असून हा भस्मयुक्त आहे. गुग्गुळ, वंगभस्म, रौप्यभस्म, नागभस्म, कांतलोहभस्म, अभ्रकभस्म, मंडूरभस्म, रससिंदूर असून बाकीचीं बनस्पति द्रव्यें आहेत.

उपयोगः- हा तिन्ही दोषांचा शामक असून संधिगतवात (संधिवात), अर्धांगवात, आमवात इ. वातविकारावर उत्कृष्ट व गुणकारी आहे.

मात्रा - १ ते २ गुंजा तुपाबरोबर २ वेळ घेणें.

९. कांचनार गुग्गुळ

यांत कांचनसाल, त्रिफळा, त्रिकटु, वायवर्णा, त्रिजात व गुग्गुळ आहे.

उपयोग— ह्याच्या सेवनानें गळा व घशांतील सर्व विकाराचा नाश होतो. उ. गंडमाळा, गालफुगी, घशांतील सूज, अपची इ. चा नाश होतो.

मात्राः— १ ते २ गुंजा मध अगर कोमट पाण्याबरोबर दिवसांतून दोन वेळ घेणें.

१० गोरोचन मिश्रण

यांत गोरोचन, मृगशृंगभस्म, प्रवाळभस्म, व गुळवेलसत्व आहे.

उपयोगः- हें अनुभविक व गुणकारी औषध असून गोवर, कांजण्या, देवी व उष्णतेपासून होणारा ताप इ० विकारांवर चांगला उपयोग होतो. याने वरील रोग शरीराबाहेर पडून त्रास होत नाहीं.

मात्राः- ।- ते ॥- गुंज तुळसीचा रस अगर मधाबरोबर देणें.

११ लक्ष्मीविलास गुटी

यांत अभ्रक, कज्जली, कापूर, बला-बी, वरधारा-बी, धोत्रा बी, गोखरूं, भूईकोहळा, शतावरी, जळवेतस इ० द्रव्यें असून त्यास नागवेलाच्या रसाची भावना आहे.

मात्राः- ॥- ते १ गुंज आलेरस, तुळसरस यामध्यें देणें.

१२ अर्श योग

यांत सुरण, बिब्बा, चित्रक, तीळ, त्रिफळा, त्रिकटु, निशोत्तर इ० द्रव्यें आहेत.

उपयोगः- हें गुणकारी औषध असून ह्याच्या सेवनानें मूळव्याध, रक्तज मूळव्याध, बद्धकोष्ठाचे

सूज कमी होऊन शौच्यास सुलभ होते व मूळव्याधीचा त्रास कमी होतो.

मात्राः- २ ते ४ गुंजा जेवणापूर्वी ताकाबरोबर घेणें.

१३ नेत्रांजन

यांत सुरमा, पारा, शिसें, कापूर इ॰ द्रव्यें आहेत,

उपयोगः- डोळयांत सळईनें घातल्यानें डोळयांची आग, पाणी जाणें व डोळयांचे किरकोळ विकार नाहींसे होऊन दृष्टि स्वच्छ व तेजस्वी होते.

१४ चन्द्रकला

यांत पारा, गन्धक, ताम्रभस्म, अभ्रकभस्म असून नागरमोथा, डाळिंबरस, दूर्वारस, केवड्याच्या पानांच्या रस, सहदेवी, कोरफड रस, पित्तपापडा, मरवा व शतावरी रस यांच्या भावना देऊन नन्तर त्यांत कुटकी, गुळवेलसत्व वाळा, मधुमालती फुलें, चन्दन, उपळसरी इ॰ द्रव्यें टाकून पुन्हा चांगला खल करून गोळया करतात.

उपयोगः- अन्तर्दाहनाशक, रक्तातील उष्णता कमी करणें, वात पित्त कमी करणें हा होय. याचा सर्व ऋतूंत उपयोग होतोच, पण विशेषतः ग्रीष्म व शरद् ऋतूंत देण्यास जास्त उपयुक्त आहे. कारण त्यामुळें या ऋतूंतील उष्णता व दाह जाणवत नाहीं.

मात्राः— ॥- ते २ गुंजा, गुलाब जल, वाळा, जल याबरोबर घेणें.

१५ सुवर्णमालिनीवसंत

यांत सुवर्णभस्म, मौक्तिकभस्म, रससिंदूर, मिरी, कलखापरी हीं द्रव्यें असून गाईच्या लोण्याबरोबर खल करून लिंबाच्या रसाची भावना देऊन गोळया बनवितात.

उपयोगः- प्लिहा, यकृतविकार, सर्व ज्वरानंतर आलेली क्षीणता कमी होऊन शरीरांतील शक्ति व बुद्धि लवकर भरून येते. त्यामुळें हा वसंत शक्तिवर्धक बुद्धिवर्धक असून शरीरांत जोम, उत्साह व नवचैतन्य उत्पन्न करतो. सूक्ष्म प्रमाणात दूधसाखरेबरोबर घेतल्यानें हा रसायन आहे. त्यामुळें शक्तिपात व बुद्धिनाश होत नाहीं. हा वसंत उत्कृष्ट टॉनिक आहे.

मात्राः— अर्धा ते १ गुंज लोणीसाखर अगर दूधसायी बरोबर सकाळ संध्याकाळ घेणें.

नेत्ररोगावरील व्याख्यानें

धन्वन्तरी सेवा मंडळातर्फें लालबाग मुंबई येथें वैद्य दे. ल. आनंदे यांच्या दवाखान्यांत ही व्याख्यानमाला आरोग्य उपमंत्री जत्ति यांच्या हस्तें सुरू झाली आहे. दर बुधवारीं दुपारीं २ ते ३ ही व्याख्यानाची वेळ ठेवली आहे. पहिलें व्याख्यान डॉ. चरेगांवकर यांचें झालें.

आयुर्वेदाबरोबर शल्यतंत्र शिकवा

उत्तरप्रदेश सरकारचे नवे मुख्य मंत्री डॉ. संपूर्णानंद काशी येथील आपल्या भाषणांत म्हणालेः- ‘आमचे सरकार आयुर्वेदाची उपेक्षा करणार नाहीं. परंतु या पद्धतींबरोबर शस्त्रप्रणाली शिकविलीच पाहिजे. प्लॅस्टिक सर्जरीबाबत बोलतांना ते म्हणाले “पाश्चात्य इतिहासलेखक हे कबूल करतात कीं ही शस्त्रकर्म पद्धति सुश्रुतापासून त्यांनीं उचलेली आहे.

परदेशी औषधें वापरूं नका

आयुर्वेदीय चिकित्सक आयुर्वेदीय औषधाबरोबर ॲलोपॅथिक औषधेंहि देतात. हें योग्य नाहीं. त्यांनीं ही प्रथा तात्काळ सोडून दिली पाहिजे.”

दंतयज्ञ, शिरवळ

“शिरवळ जनरल हॉस्पिटल मंडळातर्फें तारीख २१।१।५५ रोजीं दंतयज्ञ करण्यांत आला. त्याचा अनेक दुःखितांनीं लाभ घेतला. रुग्णांचे दांत, तपासून भूल न देतां वेदनारहित दंतोत्पाटन पद्धतीनें काढण्यांत आले.

या कामीं या मंडळाला अखिल भारतीय डेंटल मिशनच्या पुणें शाखेचें सहकार्य लाभलें.”

—वैद्य पटवर्धन, आयुर्वेदतीर्थ

वैद्याचा चेहेरा कसा असावा?

अमरावती येथील विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाच्या धन्वन्तरी मंडळातर्फे प्राचार्य वै. पं. दा. मुळे यांनीं संतशिरोमणी प्रा. सोनोपंत दांडेकर यांचा सत्कार केला. त्याप्रसंगीं केलेल्या भाषणांत प्राचार्य दांडेकर म्हणालेः—

रोग्याच्या मनाचा विचार

" आयुर्वेदशास्त्राचा एकाग्रचित्त करून अभ्यास करा. या शास्त्रद्वारें जीवनाचा अभ्यास करा, अध्यात्मशास्त्राचा अभ्यास केला नाहीं तर हें शास्त्र अपुरें पडेल. मन, बुद्धि व आत्मा यांचे शरीरावर प्रभुत्व असतें. शरीरांत रोग झाला तरी रोग्याच्या मनाचा विचार केल्याशिवाय चिकित्सा पुरी होत नाहीं.

शरीर हा अग्निरथ आहे. आत्मा हा त्याचा अधिष्ठाता आहे. मन हा लगाम आहे. इंद्रियें हीं अश्वाप्रमाणें आहेत व हा रथ विषयरूपी रस्त्यावरून मार्ग आक्रमण करीत असतो. मन सुस्थितींत नसेल तर शरीरहि सुस्थितींत रहात नाहीं. जितकी अधिक जवळची वस्तु, तितकी दिसण्यांत कठिणतम असते. म्हणूनच मन, आत्मा व बुद्धि हे जवळ असून देखील दिसत नाहींत.

वैद्यानें मन प्रसन्न ठेवलें पाहिजे

वैद्यकीय व्यवसाय हा सर्वांत श्रेष्ठ व्यवसाय आहे. वैद्यानें रोगी तपासतांना आपलें मन प्रसन्न ठेवलें पाहिजे. वैद्याचाच चेहरा रडका असेल तर रोग्यावर त्याचा उलटाच परिणाम होईल. पाश्चात्यांनादेखील अध्यात्मशास्त्र पटलें आहे व ते त्याचा अभ्यास करूं लागले आहेत. पोटांतील विद्रधीहि मानसिक विकृतीमुळें होऊं शकतो याची पाश्चात्य वैद्यकांना संशोधनद्वारें खात्री पटली आहे. ते निश्चयपूर्वक म्हणाले "कोठल्याही शास्त्रांचा अभ्यास अध्यात्मशास्त्राशिवाय पुराच होऊं शकत नाहीं. याकरितां विद्यार्थ्यांनीं वैद्यकीय शास्त्राबरोबर अध्यात्मशास्त्राचा सखोल अभ्यास करावा."

पावसाचा मिथ्यायोग

आयुर्वेद पात्रिकेकडे पत्र पाठवून एका वाचकानें पुढील प्रश्न विचारला आहेः—

नुकताच थंडीच्या दिवसांत जो पाऊस पडला तो थंडीचा मिथ्यायोग कीं पावसाचा ?

पावसाळ्यांत पावसाचा हीनयोग, समयोग व अतियोग हे तीन योग संभवतात. हिंवाळ्यांत अगर उन्हाळ्यांत पाऊस पडला तर तो पावसाचा मिथ्यायोग होय असें समजावें.

मिथ्यायोगस्तु विज्ञेयः विपरीतस्वलक्षणः।

हिवाळ्यांत पावसाचा व उन्हाचा यापैकीं कोणताहि एक मिथ्यायोग संभवेल. याच प्रमाणें अन्य कालींहि समजावें. " हिवाळ्यांत पावसाचा मिथ्यायोग " असें परवाच्या पावसाचे वर्णन करावें लागेल. कमी थंडी, सम थंडी, अति थंडी व खोटा पाऊस (काळ) वा खोटा उन्हाळा असें शीत ऋतूंत ५ प्रकार संभवतील.

—संपादक

चिदंबरम् [गुजराती मासिक]

राजकोट येथील कैवल्यधाम स्वाध्याय मंदिराचे मासिक पूजा-पुष्प ' चिदंबरम् ' हें पात्रिकेकडे आले आहे. याचे तंत्री स्वामी दिगंबरजी (बक्षी) हे आहेत. इतःपर दरमहा १६ पानाचें हें मासिक गुजरातींत प्रसिद्ध होणार आहे.

नवीन उपयुक्त प्रकाशन

पाश्चात्य रामबाण औषधें

हरघडी उपयोगी पडणाऱ्या ७७६ अॅलोपॅथिक औषधांचा परिचय करून देणारा अभिनव ग्रंथ किं. २॥ रु. ट. ख. निराळा.

पत्ताः—व्यवस्थापक सुबोध वैद्यक ग्रंथमाला
मु. पो. कागल (कोल्हापूर)

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नासिक

(आयुर्वेद पत्रिका पान नंबर ४६३ पासून पुढें चालू)

ता. १६।१०।५४ रोजीं सकाळीं वाईचे सुप्रसिद्ध दार्शनिक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचें अध्यापक चर्चा परिषदेंत अस्खलित व्याख्यान झालें. परिषदेनें त्यांना विचारलेल्या शंकांचीं समर्पक उत्तरें त्यांनीं दिलीं. ते म्हणाले:—

" सर्वविदां समाजे विभूषणं मौनमपण्डितानाम् । " या वचनानुसार मी या सभेंत कांहींच न बोलणें युक्त. कारण मी आयुर्वेदाचा पण्डित नाहीं. तथापि माझा व आयुर्वेदाचा परंपरेनें संबंध आहे. कारण माझा विषय असलेलीं ' षड्दर्शनें–न्यायवैशेषिक दर्शनें ' यांचा आयुर्वेदाशीं परंपरेनें संबंध आहे.

१) ' प्रमाणविचार ' व ' तंत्रयुक्ति ' या दृष्टीनें गौतमीय न्यायशास्त्र व आयुर्वेद यांचा संबंध आहे.

२) ' कणादप्रणीत सूत्रांचा ' आयुर्वेदसूत्रांशीं संबंध आहे.

३) सांख्यांच्या तत्वांचा ऊहापोह चरकसंहितेंत पुष्कळ ठिकाणीं आलेला आहे.

४) वैशेषिक सूत्रांचा अनुवाद नसला तरी त्यांची छाया आयुर्वेदांत आहे व ती त्यांच्या शिस्तींत बसेल अशी नाहीं. गौतमीय सूत्रें (प्रमाणें) व सांख्य शास्त्राचेंहि बाबतींत तेंच आहे. पुष्कळसें साम्य त्यांचें आयुर्वेदाशीं असलें तरी कांहीं महत्त्वाचे फरक आहेत.

आयुर्वेदीय शारीरांतील ' प्रकृति ' व ' पुरुष ' इ. चा विचार करतेवेळीं, सांख्यकारिका बरोबर समजल्या असतील तर दोहोंचा फरक स्पष्टपणें लक्षांत येईल. सांख्यकारिकांचा उपयोग होत नाहीं असें नाहीं, आरोग्यानारोग्यासाठीं सबंध पुरुष समजावा लागतो. त्यावेळीं त्या उपयोगी पडतात.

संशोधन, ज्ञान, वादविवाद यासाठीं वैशेषिक दर्शन मदत करतें. न्याय, तर्क उपयोगी पडतो.

ऐतिहासिक दृष्ट्या विचार करतां या दर्शनांचें पूर्वस्थितींतील प्रतिबिंब चरकसंहितेंत आहे. गौतमीय सूत्रांचा उल्लेख मी करीत आहे. सांख्यकारिकांपेक्षां सांख्यसूत्रें हीं पश्चात् झालेलीं आहेत. कारण त्यांतील विचार व मांडणींत अस्पष्टता व घोटाळा आहे. कालकृत तो परिणाम आहे. नवा विचार हा अधिक महत्त्वाचा आहे. येवढी प्रस्तावना पुरेशी आहे.

विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें

आपण विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देतांना मी ' सूचिकटाहन्यायाचा ' उपयोग करतो. कारण लहान काम अगोदर व नन्तर मोठें काम! म्हणून तुमच्या क्रमानें मी उत्तर देत नाहीं.

' ते व्यापिनोऽपि हृन्नाभ्योरधोमध्योर्ध्वसंश्रयाः ' । व्यापिनो—व्यापून राहिलेले आहेत. व्यापनशील आहेत. ' हृन्नाभि ' इ॰ चा उल्लेख पुढें आहे. तो मर्यादादर्शी आहे. त्या मर्यादेच्या बाहेर सर्व शरीर ते व्यापतात. सर्वशरीरचराः असतात. म्हणजे त्या ठिकाणीं ते जातात, सर्व गतिशील असल्यामुळें जातात. असा अर्थ १ ल्या टीकेंत आहे. गतिशील, व्यापनशील यांतील ' शील ' शब्दामुळें सर्व शरीरांत ते सारखे जात असतात असा अर्थ होतो. व असे असले तरी,— हृन्नाभ्योरधोमध्योर्ध्वसंश्रयाः आहेत. हृन्नाभ्योरधो वायुः, हृन्नाभ्योः मध्ये पित्तं, हृन्नाभ्योरूर्ध्वं कफः, असा आश्रय आहे. यस्मिन्नाधिक्येन वर्तते तत् तस्य स्थानम् । आश्रयाचा निर्देश वैशिष्ट्यबोधक. वैशिष्ट्य कोणतें ? आधिक्य, प्रमाणाधिक्यवाचक. संख्या अधिक असली तरी तोच अर्थ. द्रव्यसंख्या वाढली कीं परिमाण वाढलेंच. याकरितां हृन्नाभिप्रदेश घेतलेला

आहे. ' उपलक्षितः ' असा आहे. हृन्नाभिप्रदेश हा मध्य आहे. त्याच्या अधः वायुः, त्याच्या ऊर्ध्वं कफ. व त्या प्रदेशांत पित्त. म्हणून हृदयाच्या वर कफ व नाभीच्याखालीं वायु.

दोषत्रय सर्व शरीरांत आहेत हें वाक्य ' तत्रास्थनि स्थितो वायुः ' या वचनाला विरोधी होतें. म्हणून व्यापिनः असें सांगितलें. पित्तं तु स्वेदरक्तयोः याला विरोध नाहीं. कारण स्वेद व रक्त व्यापिनौ आहेत. श्लेष्मा शेषेषु यांतहि कफाचें व्यापित्व आहेच.

धातुसाधित शब्दांत धातूची क्रिया असते. 'व्यापिनः' हा धातुसाधित शब्द आहे. व्याप्=व्यापणें. ह्या धातूच्या अर्थांत चरण-क्रिया आलीच. व धातूचा अर्थ टाकावयाचा असल्यास कांहीं बाधक प्रमाणें हवीं. व्यापन क्रिया आहे. व ती नित्य चालते. (वैद्य पंडितशास्त्री- " आक्रिया ही सुद्धा क्रिया आहेच ना ? ") तर्कतीर्थ-"कांहीं धातू जे क्रियाविराम दाखवितात, त्यांच्यांत ती उलटी क्रिया आहे, या धातूंत नाहीं.) म्हणून व्यापिनः म्हणजे त्याठिकाणीं ते सर्वकाल जाणारे असतात. व्यतिरेक नाहीं. कांहीं वेळा अभात्र असें नाहीं.

संश्रय म्हणजे सम्यक्, स्पष्ट आश्रय. ज्या ठिकाणीं लक्षणांचा लाभ, दर्शन आहे, तें ठिकाण.

न्यायशास्त्र व आयुर्वेद यांतील साम्यभेद

न्यायशास्त्र = न्याय दर्शन + वैशेषिक दर्शन

साम्य	भेद
१) ९ द्रव्यें आहेत.	१) गुणकर्मांचा संबंध सांख्याप्रमाणें नाहीं.
२) गुणकर्मांचा संबंध द्रव्याशीं आहे.	(सांख्य हे द्रव्यगुणांचा तादात्म्यसंबंध मानतात.)
३) वैशेषिकाप्रमाणें समवाय संबंध मानतात.	

आयुर्वेदाचा कल सांख्याकडेहि थोडासा आहेच. परन्तु वैशेषिकांकडे विशेष कल आहे, असें माझें अनुमान आहे.

सांख्यांप्रमाणें तादात्म्य संबंध जर द्रव्याचा व गुणकर्मांचा मानला तर अल्पगुण असतील तर द्रव्यहि, अल्प, अधिक गुण अधिक द्रव्य.

वैशेषिकांप्रमाणें समवाय संबंध मानला तर द्रव्य अधिक असतां गुण कमीहि असूं शकेल. व अत्युत्कट गुण असतांना द्रव्य कमीहि असूं शकतें. उदा.—उत्कट गंध-द्रव्य कमी, मोठें द्रव्य पण अनुद्भूत गंध गुण. यामुळेंच वैशेषिक दर्शन विचाराला मदत करतें.

कोणत्याहि एका दर्शनविचारसरणीशीं आयुर्वेद चिकटून नाहीं. आयुर्वेद-विचाराला ज्याची जेवढी मदत झाली, तेवढाच विचार त्याचा घेतला आहे.

गुणांची व्याख्या वैशेषिकांप्रमाणें आहे. पण शब्द थोडे संदिग्ध वाटतात. ' समवायि तु निश्चेष्टः कारणं गुणः । (चरक). वैशेषिक व्याख्येंत, समवेतं वा असमवेतं कारणं गुणः । समवायानें वा समवायांत रहातो तो गुण. (गमनत्व—कर्मसामान्य आहे. त्याच्यांत कांहीं रहात नाहीं. गोत्व—द्रव्यसामान्य आहे. रसत्व—रसवान् द्रव्यांत समवायानें आहे. पण गुण समवायि आहे. म्हणजे त्यांच्यांत जाति आहे. ते कशांत तरी समवायानें आहेत, म्हणून समवेत असें म्हणावयास पाहिजे. नित्य-द्रव्यें कशांतच समवायानें रहात नाहींत. पण उत्पन्न द्रव्यें मात्र समवायानें रहातात. द्रव्य हें समवायी कारण. म्हणजे ज्याच्यांत कार्यें उत्पन्न होतात तीं त्यांच्यांतील गुणामुळें उत्पन्न होतात. उदा.— तंतुसंयोगानें पटोत्पत्ति, गुणानें उत्पत्ति.)

आयुष्याची व्याख्या करतांना शरीरेंद्रियसत्त्वात्मसंयोगो धारि जीवितम्... ...इत्यादींत मन हा शब्द वैशेषिकांचा नाहीं. रज व तम हे आयुर्वेदानें मनाचे दोष मानले. वैशेषिकांनीं मनाचा

विचार रजतम दोषदृष्टीनें केलेला नाहीं. रज, तम, दोषांचा विचार हा सांख्यांचा आहे. पण त्यांनींहि सत्व, रज, तम, हे तीन घेतले. म्हणून प्रथित सांख्य, न्याय, वैशेषिक व आयुर्वेद यांच्यांत फरक आहे. आत्मा म्हणजे निर्विकार आत्मा । परमात्मा, (इंद्रियाणि पराण्याहुः, इंद्रियेभ्योः परं मनः। महतः परं अव्यक्तं इ०) 'परं' शब्द उपनिषदांत, श्रीमद्भगवद्गीतेंत आहे. तो इथें नाहीं.

वैशेषिकांचे वीस गुण

वैशेषिक सूत्रांत वीस गुण आहेत. आयुर्वेदांतहि २० च आहेत. कर्माचें लक्षण-प्रयत्नादि चेष्टितं कर्म उच्यते । प्रयत्न हा आत्मनिष्ठ गुण आहे, कर्म नाहीं. आत्मनिष्ठ चलनात्मक क्रिया आहे. संयोगविभागजं कर्म, असें तें नाहीं. यत्न चेष्टा तें आहे. श्वासोच्छ्वास अदृष्टयोनिज, अदृष्टाधीन, जीवनधारक यत्न आहे. व इच्छापूर्वक यत्न निराळा. हा जीवनधारक यत्न गेला, याचा अर्थ अदृष्टयोनियत्न संबंध सुटला. पूर्वादृष्टानें तो प्रयत्न चाललेला आहे. आत्मनिष्ठ अदृष्टपूर्वानें तो प्रयत्न चाललेला आहे. म्हणून संयोगें च विभाग च इति-कर्म नान्यदपेक्षते । कर्तव्याकरितां क्रिया तें कर्म. आयुर्वेदांत अनपेक्षित क्रिया तें कर्म, वैशेषिकाचें कर्म आयुर्वेदांत नाहीं. आयुर्वेदोक्त कर्माला अपेक्षा आहे ती फक्त संयोगविभागाची !

आयुर्वेदांत व वैशेषिकांत अशी विसंगति कां आली ? वैशेषिकांचा पुरुषार्थी संबंध आहे. आयुर्वेदाचा चिकित्सेशीं आहे म्हणून. अशा रीतीनें विसंगतीचा परिहार होतो.

बुद्धि, प्रज्ञा, मेधा, इ. चे अर्थ

या संज्ञांचा अर्थ संदर्भानेंच सांगावा लागेल.

चरकाचार्यांनीं प्रथमारंभीं या सगळ्या ज्ञानदेवता आहेत असें म्हटलें आहे. बुद्धिः— 'संशयात्मक' वा 'निश्चयात्मक' अशी दोन प्रकारची जाणीव व्यक्तींत असते. बोध, प्रकाश, किंवा जागृत-अवस्था, बोधावस्था. या सर्व जाणिवा आहेत. They are all states of Consciousness. पण या जाणि-वेला जीवनांत सिद्धीनें वैशिष्ट्य प्राप्त होतें. सिद्धि म्हणजे कार्यकारणभावाचें ज्ञान. त्याशिवाय जीवाला जगणें शक्य नाहीं. सिद्धि कशानें मिळते ? तर स्मृतीनें. स्मृति असेल तर, संचय असेल तर. साक्षात् स्मरण, अनुभव, पुढें चालूं रहाणें म्हणजे स्मृति. मेधा—स्मृति प्राप्त होण्यास, वाढविण्यास मेधा आवश्यक. मेधा—ग्रहणशक्ति Grasping Power मेधा=स्मृतिजननानुकूलो धर्मः । मेधा=आकलनशक्ति—जननकर्म. धृति—धारणशक्ति Retention. (धृतीचें कार्य स्मृति).

कीर्तिः- या सगळ्यांचें कीर्तन, भाषा, निरनिराळ्या अर्थांचे संकेत व त्याची भाषा निर्माण करणें. कीर्ति मानवेतर पिंडांत सांपडत नाहीं. शब्द हा आत्म्याचाच गुण आहे. त्यालाच 'सरस्वती' म्हणतात. म्हणून सरस्वती ही अत्यंत मूलभूत कल्पना. व शक्ति म्हणजे शब्द व अर्थ यांना जोडावयाचा गुण. शब्दार्थयोः सम्यक सहवासः साहित्यम् । साहित्यकारक शक्ति म्हणजे कीर्ति. मनुष्य दुसऱ्याना बोध केव्हां देऊं शकतो ? दुसऱ्या व्यक्तीवर अनुग्रह केव्हां करतो ? त्या व्यक्तीचे दोष सहन करण्याची शक्ति असेल तर किंवा तिची दया येईल तर, 'क्षमा' व 'दया' याहि पाहिजेत. या असतील तरच आयुर्वेदाचें संशोधन होईल. दुसऱ्या व्यक्तीस ती व्यक्ती शिकवील.संकटें सोसूनहि दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्याची वृत्ति त्याच्या ठिकाणीं राहील.

सहन करण्याची ताकद=क्षमा. क्षमा असेल तर दया आहे. वैद्याला मूत्रादि मलांचे दुर्गंध सहन करण्याची ताकद पाहिजे. क्षमा पाहिजे व रोग्याच्या मलांचें अपहरण करण्याची बुद्धि (दया) पाहिजे. असें झालें तर उत्तम वैद्य होईल म्हणून ह्या सगळ्या ज्ञानदेवता आहेत.

नैतिकता ही ज्ञानदेवता आहे, हा महत्त्वाचा विचार चरकाचार्यांनीं मांडला आहे. मति=ऊहापोहसामर्थ्य, मननसामर्थ्य, विवेचनसामर्थ्य. ऊह=भरणें, भर घालणें. अपोह=काढून टाकणें. म्हणजेच साधक प्रमाणें जवळ करणें, व बाधक प्रमाणें काढून टाकणें. म्हणून ऊहापोह म्हणजे विवेचन. व तें करण्याची शक्ति ती मति. प्रतिपत्ति—ऊहापोहापुढची स्थिति, क्रिया. निर्णय किंवा व्यवस्था लागल्यावरची स्थिति=दान म्हणजे चिंतना-नंतर प्रतिपादन. पात्रे प्रतिपादनम् प्रतिपत्तिः । योग्य असेल, सिद्ध असेल तें देणें म्हणून प्रतिपादन=देणें असा अर्थ आहे.

आतांपर्यंत सांगितलेले अर्थ परिभाषेनें घटित नाहींत. अर्थानुसार त्यांची जुळवणी कशी करावी व ह्या सगळ्या ज्ञानाच्या अवस्था-ज्ञानदेवता कशा आहेत तें फक्त सांगितलें. परिभाषा-घटित अर्थ किंवा कोणत्या ठिकाणीं निश्चित अर्थ काय हें परिभाषा सांगेल.

पंचमहाभूतांच्या उत्पत्तीचे दृष्टिकोन

पंचमहाभूताच्या उत्पत्तीचे तीन दृष्टिकोन आहेत. (१) वैशेषिक-स्वतंत्र स्वयंसिद्ध असेच परमाणु आहेत. (२) सांख्य-पंचतन्मात्रांपासून पंचमहाभूतें निर्माण होतात असें मानतात. (३) वेदान्त किंवा उपनिषदें-आत्म्यापासून आकाश-आकाशापासून वायु-वायूपासून अग्नि इ. वैशेषिक व सांख्य सकृद्दर्शनीं सारखेच वाटतील. पण तसें नाहीं. अणु हा स्वयंसिद्ध आहे. तर सांख्याची तन्मात्रा ही उत्पन्न झालेली आहे. अहंकारापासून तन्मात्रोत्पत्ति आहे.

वैशेषिकांचे अणुवादांत दोन अणूंची द्व्यणुक, तिघांचा त्र्यणुक इ. होतात. व त्यापासून पुढें उत्पत्ति होते. सांख्यांच्या अनेक ठिकाणीं अनेक उपपत्ति आहेत. महाभारतांत विविध उपपत्ति सांगितल्या आहेत.

चरकाचार्यांच्याहि तत्वविचारांत फरक आहे. ते कापिलच आहेत. पंचतन्मात्रांच्या सरमिसळीनें पंचमहाभूतें व वेदान्त्यांची पंचीकरणाची कल्पना यांत येथें साम्य आहे.

याप्रमाणें भेद-निर्देश मात्र केला. विशेष विवेचन येथें शक्य नाहीं.

मन हें भौतिक आहे कीं अभौतिक ?

चरकाच्या सूत्रस्थानांत मन अभौतिक आहे. (अणुत्वमथ चैकत्वं द्वौ गुणौ मनसः स्मृतौ । इ. विवेचन आहे.) ही उपपत्ति पूर्ववैशेषिकांची आहे. जुनी आहे, हल्लींच्या वैशेषिकांपेक्षां पूर्वीची आहे.

इंद्रियें— हीं उपनिषदें व वैशेषिकामताप्रमाणें भौतिक व सांख्यमताप्रमाणें अभौतिक.

मन हें ‘उभयात्मक’ आहे. लक्षणेनें ‘उभयात्मक’ याचा अर्थ घ्यायचा. कर्मेंद्रिय व ज्ञानेंद्रिय या दोहोंना अनुकूल. मनःषष्ठानि इंद्रियाणि-असें आहे. म्हणजे मन सहावें अशीं इंद्रियें असा अर्थ घेऊन एकादश इंद्रियांत मनाचा अन्तर्भाव केला. वैशेषिकांनीं मन उभयात्मक म्हणजे ‘बहिरिन्द्रिय’ व ‘अन्तरिन्द्रिय’ असें सांगितलें.

मन इंद्रिय कां ? वेदान्ती—ज्ञानकारण—इंद्रिय मानतात. आत्म्याशीं सुखदुःखांचा साक्षात्कार करणें म्हणजे ज्ञान. तें मनानें होतें. म्हणून मन हें इंद्रिय. हें ज्ञान फक्त बाह्येंद्रियांनीं होत नाहीं. कारण प्रत्येक इंद्रिय फक्त स्वतःच्याच विषयाचें ग्राहक आहे.

इंद्रिय ठरलें तरी मन भौतिक वा अभौतिक हें ठाम ठरत नाहीं. प्रत्येकानें निरनिराळे मानले. चरकांनींहि प्रत्येक भागांत निरनिराळें मन मानलें. मनाच्या अदृष्ट कर्माचा नाश होतो, किंवा मनसश्च क्षयो भवेत् । ही वैशेषिक कल्पना आहे.

द्रव्यगुणकर्मांचा आश्रयाश्रयीभाव

हा केवळ त्रिदोषांच्या व विशेषतः दोन दोषांच्या बाबतींतच पहावयाचा आहे. म्हणून सामान्य द्रव्यांचे नियम यावरून निघावयाचे नाहींत.

समान गुणांनीं समान द्रव्याची वृद्धि व्हावीच असा कांहीं नियम नाहीं. तें द्रव्य समानगुण असूनहि दोषप्रतिबंधकहि होईल. व तो गुण त्या द्रव्याचा प्रतिबंधकहि होईल. उदा. आमलकी अम्लगुणाची असूनहि (पित्तसामान्य गुण असूनहि) पित्तवृद्धि करीत नाहीं, पित्तशामक ठरते.

‘असति विरोधे सामान्यानां गुणवृद्धिः’ म्हणून ज्या गुणाच्या उत्कर्षाकरितां द्रव्य दिलें त्या गुणाचें द्रव्य वाढलें तरी तो गुण वाढतोच असें नाहीं. असें आपण सर्वत्र पहातो. —अर्थात् तद्‌तद् गुणांनीं द्रव्य वाढेल पण कांहीं गुणांनीं वाढणारहि नसल्यानें सर्व गुणांनीं वाढणारहि नाहीं. ‘लाघवन्याय’ या तंत्रयुक्तीनें हें सूत्र लावावें. (शस्त्र वा शास्त्र तंत्रयुक्तीनेंच उपकारक होतात). कार्यकारणभाव करतांना लाघवाश्रितयुक्ति पूर्वमीमांसेची आहे. लाघवाश्रित तर्क म्हणजे जेव्हां विचार करतांना अन्यप्रमाणें नसतील, ती लघुता असली तरी तो विचार सांगणें हें आवश्यकच असतें. व अशावेळीं तो तर्क विचार ‘लाघवाश्रित तर्क’ होय.

इतर गुण वाढतील कीं नाहीं ? हें सांगण्यास अधिक प्रमाणांची जरूरी पडेल. पण तोच गुण वाढेल कीं नाहीं याला प्रमाण आहे लाघवन्याय. बाधक प्रमाण आलें तर लाघवप्रामाण्य रद्द होतें. लाघव’ प्रमाण कल्पनेकरितां श्रेष्ठ. प्रत्यक्षांत कनिष्ठ.

अध्यक्ष वेणीमाधवशास्त्री जोशी म्हणाले:- “निरनिराळ्या स्थानांत निरनिराळें प्रकारचें मन मानलें या वाक्यावरून गोंधळ आहेसे वाटेल. पण तसें नाहीं. हें दर्शविण्याकरितां आणखी थोडें स्पष्टीकरण करतो.— पुरुष मानतांना खादयश्चेतनाषष्ठः धातवः पुरुषः स्मृतः। या वचनानुसार षड्धात्वात्मक मानला. त्याचप्रमाणें २४ तत्वांचाहि मानला. व केवळ चेतनाधातूहि मानला. याचें कारण ? चिकित्सा विविध प्रकारची आहे. (१) रोगनाशिनी (२) प्रकृतिस्थापक (३) रासायनी (४) नैष्ठिकीमोक्षार्थ. चिकित्सेच्या ह्या चतुर्विध क्षेत्राचें दृष्टीनें विचार करावा लागतो.

धी, धृति इ० चे अर्थ व पारिभाषिक संज्ञा चरकाचार्यांनीं विशिष्ट अशा केलेल्या आहेत. धृतिर्हि नियमात्मिका’ वगैरे! त्या महत्वाच्या आहेत. मन सुखदुःखकारणं, —गुणतो दोषतो यथा— इ. विवेचन चरकांत आहे, त्याचा आपण अधिक विचार करावा.

पाण्डित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीं येथें येऊन जे मौलिक विचार आपल्याला सांगितले ते आपल्या विचारांना अत्यंत परिपोषक, व संदेह दूर करणारे असे आहेत. त्याबद्दल परिषदेतर्फे मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

(अपूर्ण)

ग्रामपंचायत दवाखाना, डहाणू

या दवाखान्यासाठीं सुशिक्षित आयुर्वेदीय वैद्य व कल्पद (कंपौंडर) हवा आहे. त्यांस रहाण्यास दवाखान्यालगत बांधलेली जागा (फर्निचर नाहीं) मोफत मिळेल व विजेचे दिवेहि घेऊन दिले जातील.

वैद्यांस पगार मिळेल, खाजगी व्यवसायास परवानगी नाहीं. त्याऐवजींचा भत्ता मिळेल. वैद्य पूर्णकाल सेवा करणारा हवा. पंचायतीतर्फे करावयांचीं वैद्यकीय मदतीचीं व स्वच्छतेचीं कामें त्याबाबतींत देखरेख व मार्गदर्शन त्यांनीं करावयाचें आहे. कंपौंडरास पगार व महागाई नियमाप्रमाणें मिळेल.

आत्मीयतेनें कामकरू इच्छिणाऱ्या पदवीधर वैद्यांनीं व सुशिक्षित आयुर्वेदीय कल्पदांनीं वरील पत्त्यावर पत्र पाठवून माहिती घ्यावी.

धन्यः गृहस्थाश्रमः

वैद्य के. कृ. मानेकर (प्राणिरक्षक संस्था धुळें) यांचे जेष्ठ चिरंजीव वैद्य वसन्तराव बी.ए.एम्.एस्. (अमरावती) व चि. सौ. कां. कुमुदिनी जोशी बी.ए. (आग्रा) यांचा विवाह बुधवार ता. २-२-५५ रोजीं धुळें येथें होणार आहे. या विवाह--पत्रिकेंत पुढील सद्विचार प्रसिद्ध करून वैद्यराज मानेकर यांनीं योग्य मार्गदर्शन केलें आहे.

"भारतीय संस्कृतींतील 'गृहस्थाश्रम' हा मोक्षाकडे जाण्याचा एक मार्ग आहे. गृहस्थाश्रम म्हणजे संयमाची शाळा. दुसऱ्याचें सुख पहाणें, दुसऱ्याच्या आनंदांत आनंद मानणें, हें गृहस्थाश्रमाचें शिक्षण आहे.

अर्धनारीनटेश्वर हें माणसाचें ध्येय आहे. केवळ पुरुष अपूर्ण आहे. केवळ स्त्री अपूर्ण आहे. दोघांच्या मीलनांत पूर्णता आहे. गृहस्थाश्रम म्हणजे पतिपत्नींनीं पूर्ण होण्याची शाळा. सर्वांगीण विकास करून घेण्याचें स्थान.

समानी व आकूतिः समाना हृदयानि वः।
समानमस्तु वो मनः यथा वः सुसहासति ॥

तुमचा हेतु एक असो. तुमचीं मनें एक असोत. तुमचीं हृदयें एकरूप असोत. तुमच्या सर्व संघटनास सामर्थ्य येईल अशा रीतीनें वागा."

—साने गुरुजी

वनस्पति-प्रात्यक्षिकार्थ सहल

दि. ८-१-५५ रोजीं नासिक येथील आयुर्वेद सेवा संघाच्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयांतील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांची त्र्यंबकेश्वर येथील जंगलांत वैद्य श्री. भाऊशास्त्री जाईल, वैद्य वि. म. गोगटे यांचे मार्गदर्शनाखालीं इतर अध्यापकवर्गासमवेत वनस्पति प्रात्यक्षिकासाठीं सहल गेली होती.

सबंध दिवस तेथें घालवून अभ्यासक्रमांतील जवळ जवळ ७५ वनस्पतींच्या सर्व अंगप्रत्यंगाचें प्रात्यक्षिक विद्यार्थी व विद्यार्थिनींनीं मिळविलें.

याचवेळीं वैद्य भाऊशास्त्री जाईल यांचे गुरु-परंपरेंत अध्ययन करणारा शिष्यवर्गहि उपस्थित होता. वैद्य भाऊशास्त्री जाईल यांनीं इतर अध्यापकांशीं अध्यापनांतील विषयासंबंधीं चर्चा केली. सर्वांनीं विश्रांतीचा वेळ वैद्य भाऊशास्त्री यांचेकडेच घालविला.

दंतोत्पाटनाची आयुर्वेदीय पद्धत

अधिक फायद्याची !

मी दंतवैद्य पां. वि. जायदे यांच्या मिरज येथील धमार्थ दंतयज्ञांत जाऊन माझे स्वतांचे ९ दांत काढून घेतले. दि. २६ ला उद्घाटन प्रसंगीं ३ दांत, दि. २७ ला १ दांत, दि. २८ ला १ दांत, दि. २९ ला १ दांत, दि. ३० दंतयज्ञसमाप्ति दिवशीं ३ दांत असे त्यांनीं माझे ९ दांत काढले. परंतु मला कसलाहि त्रास झाला नाहीं. दांत काढल्यानंतर दोन तासांनीं मी खातपीत होतो.

रक्त लौकर थांबत नाहीं !

परंतु यज्ञांत माझे ४ दांत काढावयाचे शिल्लक राहिले. ते दिनांक २०-१-५५ रोजीं माझे गांवींच डेंटिस्ट गुळवणी यांचेकडून ॲलोपॅथिक पद्धतीनें काढून घेतले. ॲलोपॅथिक पद्धतीनें दंतोत्पाटन प्रसंगीं इंजेक्शनमुळें त्रास होत नाहीं तरी, नंतर दोन तासांनीं बराच त्रास होतो. लाळ, रक्त लवकर बंद होत नाहीं. दिवसभर बेचैन स्थिति येते, रात्रीं झोप लागत नाहीं. ॲलोपथीप्रमाणें दांत काढल्यानंतर प्रत्येक वेळीं २४।२४ तास त्रास झाला. दोन्ही प्रकारांनीं दांत काढल्याचा ताजा अनुभव मी कळविला आहे.

वैद्य आर. डी. कुळकर्णी, खेराडे बु॥ द. सातारा

दांतवण कोणतें ?

खरकुतावर दांतवण हें औषध बरोबर आहे. पण दांतवण म्हणजे तंबाखूची मिश्री नव्हे, आतार लोक दांतवण विकतात, बाळंतीण बाया तें दांतास लावतात त्यानें दांत काळे होतात तें दांतवण खरकुतावर वापरावे. —वै. बी. एल्. गवळी

वाचकांचा पत्रव्यवहार–

सं[illegible]काचें कोडें

पत्रिकेंतील [illegible] लेखक श्रीयुत वाटवे कोण' हें स्फुट वाचलें. ही [illegible]र्चा थोडी उशिरा सुरूं झाली असली तरी योग्य [illegible]च आहे. मला ऐकून असें कळलें आहे कीं, सदर संशोधन समितीकडे खालील विद्वान् वैद्य मंडळींनीं लिखाण पाठविलें होतें. पण तें समितीच्या साच्यांत बसलेलें दिसत नाहीं. त्यांत काय दोष होते ते न कळे !

वैद्य भि. वि. डेग्वेकर (जबलपूर); वै. श्री. कृ. करमरकर (पिंपळनेर); वै. गो. आ. फडके (सातारा); वै. जळूकरशास्त्री (नाशिराबाद); वै. पांडुरंगशास्त्री देशपांडे (पुणें) ; दि. वि. साठे (सातारा) इत्यादि अनेक आयुर्वेद तज्ञ लेखकवर्गानें पाठविलेले विचार समितीस कसे पसंत नाहींत व 'आयुर्वेदलंकार वाटवे' हेच त्यांचे साच्यांत नेमके कसे बसले ! जरा कोडेंच वाटतें आहे. ह्या कोड्याचें उत्तर संशोधन समिती-कडून मिळेल काय ?

—एक वाचक

....अनुक्रमणिका....

प्राणाचार्य चिवळकर कारंजा, नाशिक ४७५
म. प्रां. दशम वैद्य संमेलन, देणग्या ४७६
वैद्यराज डेग्वेकरजींचे दोन प्रश्न ४७७
म. प्रां. दशम वैद्य संमेलन, पत्रक २ रें ४८१
लातूर वैद्य संमेलनाचा अहवाल ४८३
गुरुंना व आयु. शिक्षण संस्थांना मान्यता ४८४
महाविदर्भ पदवीधर वैद्य मंडळ, अकोला ४८५
सर्वोदय वृत्तींचे वैद्य माटे ४९०
आमची तुंगारेश्वराची सहल ४९१
डॉ. लिहिण्यावर बंदी ४९३
श्वानवृत्तीवर मुनशी काढा ४९४
१५ उपयुक्त कोरडी औषधें ४९५
आयुर्वेदाबरोबर शल्यतंत्र शिकवा ४९७
वैद्याचा चेहरा कसा असावा ! ४९८
आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद ४९९
धन्यः गृहस्थाश्रमः ५०४
दंतोत्पाटनाची आयुर्वेदीय पद्धत फायद्याची ५०४

रोगावर जादूप्रमाणें तत्काल परिणाम करणारीं

'मार्तण्ड'चीं आयुर्वेदिक इंजेक्शनें

मार्तण्ड कंपनीच्या पूर्ण वैज्ञानिक साधनसंपन्न व आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज अशा प्रयोगशाळेंत, विद्वान् आयुर्वेदज्ञ व पाश्चात्य रसायनशास्त्रज्ञांच्या संपूर्ण देखरेखीखालीं तयार केलेलीं आयुर्वेदिक इंजक्शनें आपला प्रभाव तत्काल व कायम स्वरूपांत करतात. दीर्घकाल राहिल्यासहि तीं कधीं बिघडत नाहींत. त्यांच्या तात्काल गुणदायित्वाबद्दल हमी देण्यांत येते.

सूचिपत्र व संशोधनाचें आकर्षक वाङ्मय मोफत मिळेल. आजच मागवा.

मार्तण्ड फार्मास्युटिकल्स्, बडौत S. S. Rly. यू. पी.
(रिसर्च इन्स्टिटयूट ऑफ् इंडियन मेडिसिन्स)

" शुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण हें लक्ष्य "

" स्वार्थत्यागी जीवसदस्यांच्या संघटनेनें चालविलेली 'आयुर्वेद से[illegible]ंघ' ही संस्था पाहिली. रोगप्रतिकारापेक्षा स्वास्थ्यसंरक्षणावर येथील चालकांचा विशेष भर दिसला. शुद्ध आयुर्वेद हें यांचें लक्ष्य आहे.

संस्था स्वच्छ व व्यवस्थितपणें चालविली जात आहे असें दिसलें. संस्थेस वाढीसाठीं अधिक जागेची आवश्यकता आहे, व त्यासाठीं प्रयत्न चालू आहेत. संस्थेच्या भेटीचा हा काल अत्यंत आनंदांत गेला.

४-१-५५
नासिक

डी. आर. प्रधान
चॅरिटी कमिशनर, मुंबई राज्य

(मूळ इंग्रजी अभिप्रायाचा संक्षेप करून)

आपण शक्तीसाठीं

कोणता सुवर्णमालिनीवसंत वापरावा ?

' सर्वरोगे वसंतः ' अशी या सुवर्णमालिनीवसंताची कीर्ति आहे ! पण ती कोणत्या वसंताची ? ज्यांत पूर्णप्रमाणांत सुवर्ण (सोनें) व मोती घातलेलें आहे त्या ! असा सु. मा. वसंत आयुर्वेद सेवा संघानें तयार केला असून शास्त्रशुद्ध पाठाप्रमाणें औषधें वापरूं इच्छिणारे वैद्य यांची शिफारस करूं लागले आहेत. व रोगीहि आतां त्याचीच मागणी करतात.

सुवर्ण ऐवजीं सुवर्णभस्म वा सुवर्णमाक्षिकभस्म वापरून तयार केलेला वसंत इतका उत्तम गुणकारी होत नाहीं असा सर्वांचा अनुभव आहे. म्हणून केवल सुवर्ण व उत्तम मोती वापरून तयार केलेला पूर्णप्रमाण सुवर्णमालिनीवसंतच इतःपर वापरण्याचा आपण निश्चय करा.

देण्याचें प्रमाण:-१ ते २ गुंज
अनुपान:-मध पिंपळी, पिप्पल्यादिघृत
वेळ:-सकाळीं सायंकाळीं
पथ्य:-दूधभात

किंमत पावतोळा:-८ रु., ट. ख. निराळा

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नाशिक

संपादक व प्रकाशक:—वैद्य विंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य निवलकर कारंजा, नाशिक
मुद्रक:—श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, नासिक

४२५२६
६-११-९१

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. 1 अंकाची किंमत ४ आणे

वर्ष ८ वें) नासिक, ता. १६ फेब्रुवारी १९५५ (अंक १६ वा

"आयुर्वेद हें भौतिक शास्त्र आहे"

" कफ, वात, पित्त यांना धातु मानून आयुर्वेदानें आपलें निदान, शारीरक्रियाविज्ञान व चिकित्सा आंखलेली आहे. हे सिद्धांत पदार्थविज्ञानशास्त्रानुसार कसे कसाला उतरतात याची साग्र चर्चा मीं नुकत्याच छापावयास दिलेल्या Modern Sciences Vindicate Ayurved या प्रबंधात केलेली आहे.

रायपुर सायन्स कॉलेजमधील रसायनशास्त्राचे प्राध्यापक

आयुर्वेद = मेडिकल फिजिक्स

माझ्या मतें ज्याला आपण अलिकडे ' मेडिकल फिजिक्स, म्हणतो अशाच तऱ्हेचें आयुर्वेद हें भौतिक शास्त्र आहे. अन्य चिकित्साशास्त्रें रसायन व जीवशास्त्रांतर्गत घडामोडीवर अवलंबित आहेत. अर्थात् यांचा समन्वय होऊ शकतो. तीं एकमेकास साहाय्यक ठरतात. "

" दोष, लक्षणें, भावना, अगर रोगजंतु- हे सर्व प्रकार जमेस धरून जर रोगावर हल्ला केला तरच रोग लवकर नाहींसा होऊन आरोग्य मिळेल. एकं सत् विप्रा बहुधा वदंति । हेंच वचन शेवटीं खरें ठरतें. "

—डॉ. वि. वि. गोरे, डी. एस्सी.

महाराष्ट्र प्रांतीय दशम वैद्य संमेलन, भुसावळ

—कांहीं उपयुक्त सूचना—

भुसावळ येथें होणाऱ्या प्रान्तीय वैद्य संमेलनाच्या यशस्वितेच्या आणि उपयुक्ततेच्या दृष्टीनें कार्यालयांकडे उपयुक्त सूचना येत आहेत. त्या बाबतींत वैद्यबंधूंचे अभिप्रायहि व्यक्त व्हावेत आणि आणखीहि निरनिराळ्या उपयुक्त सूचनांचें मार्गदर्शन व्हावें या हेतूनें ह्या सूचनांस पत्रिकेंतून प्रसिद्धि देण्यांत येत आहे

१ वृद्ध वैद्यांचा आदरसत्कार

संपूर्ण महाराष्ट्र प्रांतांत आजपर्यंत ज्यांनीं शुद्ध आयुर्वेदीय चिकित्सेचा नंदादीप तेवत ठेवून शास्त्रसेवा व जनताजनार्दनाची सेवा केली आहे, अशा साठी उलटलेल्या वृद्ध वैद्यांविषयीं प्रांतीय संमेलनाचे द्वारें कृतज्ञता व्यक्त केली जाणें इष्ट आहे म्हणून सर्वहि वृद्ध वैद्यांस आग्रहपूर्वक निमंत्रणें देऊन संमेलनांत पाचारण करावे व त्यांचेविषयीं प्रकट आदर व्यक्त करून तरुणवैद्यास व सामान्य जनतेस त्यांचें दर्शन घडवावें. आर्थिक दृष्टीनें शक्य झालेतर अशा सर्वहि श्रद्धेय वैद्यांचे स्वल्प माहितीसह व त्यांच्या चित्रासह छायासा ग्रंथ प्रसिद्ध करावा.

(सूचना-आचार्य वेणीमाधवशास्त्री)

२ शुद्धीचे योगिक प्रयोग

वैद्यांना स्वास्थ्याचे दृष्टीनें योगिक शुद्धीचे व आसनांचे प्रयोग त्यावरील भाष्यासह प्रत्यक्ष करावेत या दृष्टीनें नागपूरचे वै. गो. गं. परांडे यांचे साह्य उत्तम होऊ शकेल. भाष्य मी करण्यास तयार आहे.

(सूचक- वै. वि. म. गोगटे)

स्वास्थ्याच्या दृष्टीनें प्रदर्शन

केवळ स्वास्थ्याचे दृष्टीनें एक प्रदर्शन विभाग उघडावा. तद्विषयक तक्ते चित्रे, प्रमाणें, ठेवावीत.

(सूचक- वै. वि. म. गोगटे)

(४)संमेलनास उपस्थित होणाऱ्या वैद्यांचें जवळ वैद्यकव्यवसायाशिवाय इतरहि कांहीं कला व गुण असतात उदा. गायन, करमणूक, जादूचे प्रयोग, वैद्यकीय श्लोक भेंड्यांचा कार्यक्रम इ. [कांहीं जादूचे प्रयोग मीहि दाखविन.] सूचना-वै. वि. म. गोगटे

ह्या सूचनांबद्दल आभारी आहो. ह्या व आणखीहि शक्य होतील त्या सूचनांचा अत्यंत आदरपूर्वक विचार केला जाईल एवढेंच आश्वासन तूर्त देणें शक्य आहे. स्वागतमंडळ लौकरच स्थापन झाल्यावर ह्यासंबंधीं अधिकृत निर्णय प्रसिद्ध होईल. तोपर्यंत आणखीहि सूचना याव्यात अशी विनंति आहे.

तारेचा पत्ताः–Newbottle
के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुचें, कॅपसुल्स्
[हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें व ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस व प्रदर्शनाकडून प्रशंसित
सहस्रपुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें
प्राइस लिस्ट मागवा.
श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर
मिरासी बोळ, पो. इचलकरंजी S. M. C.

निरनिराळ्या चिकित्सापद्धतींचा त्रिदोष-सिद्धांताप्रमाणें समन्वय

(लेखकः-डॉ. वि. वि. गोरे)

[रायपूर येथील विज्ञान महाविद्यालयांतील रसायनशास्त्राचे प्राध्यापक डॉ. वि. वि. गोरे डी. एस्सी. (डॉक्टर ऑफ सायन्स, जन्म १९०२) यांचा हा लेख सह्याद्रि मासिकाच्या जानेवारी १९५५ च्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. आधुनिक शास्त्रज्ञ आयुर्वेदांतील शास्त्रीयत्व शोधूं लागले आहेत, व त्यांना तें दिसूं लागलें आहे, असें या लेखावरून वाचकांच्या ध्यानांत येईल. —संपादक]

आयुर्वेदाबद्दल संशोधन चालू करण्याकरिता मुंबई सरकारनें नुकतीच एक योजना प्रसिद्ध केली आहे. त्याबद्दल तें सरकार अभिनंदनास पात्र आहे. हें संशोधन विविध प्रकारें होऊं शकतें. [१] इतर चिकित्सांनीं गुण न आलेल्या रोग्यास निव्वळ आयुर्वेदीय पद्धतीनें इलाज करणें व ते प्रयोग प्रसिद्ध करणें. (२) इतर पद्धतीनें उत्पन्न झालेले दोष आयुर्वेदीय सिद्धांतानें मापून त्यांची शहानिशा करणें व औषधी-योजना करणें. (३) इतर चिकित्सेंतील औषधांचे गुणधर्म त्रिधातु-त्रिदोष-सिद्धांतानें ठरवून तींच औषधें आयुर्वेदीय पद्धतीनें देणें. (४) आयुर्वेदाचा पाया कोणत्या शास्त्रावर आहे तें ठरवून त्याला आधुनिक प्रयोगांच्या सांच्यांत आणून बसविणें (अशा तऱ्हेचे प्रयोग माझ्या देखरेखीखालीं येथील रसायनविभागांत सुरू केलें आहेत). (५) भस्में, काढे, वनस्पति, इत्यादि आयुर्वेदीय औषधें यांचें सामुदायिक मात्रारूप (Standardization) ठरविणें.

कफवातपित्त यांना धातु मानून आयुर्वेदानें आपलें निदान, शारीरक्रियाविज्ञान, व चिकित्सा आखलेली आहे. हे सिद्धांत, पदार्थविज्ञानशास्त्रानुसार कसे कसाला उतरतात याची साग्र चर्चा मी नुकत्याच छापावयास दिलेल्या Modern Sciences Vindicate Ayurved या प्रबंधांत केलेली आहे.

माझ्या मतें ज्याला आपण आलिकडे Medical Physics म्हणतो, अशाच तऱ्हेचें आयुर्वेद हें भौतिक शास्त्र आहे. अन्य चिकित्साशास्त्रें रसायन व जीवशास्त्रांतर्गत घडामोडींवर अवलंबित आहेत. अर्थात् यांचा समन्वय होऊं शकतो. तीं एकमेकांस साहाय्यक ठरतात हेंच दाखविण्याचा या लेखाचा उद्देश आहे

निरनिराळ्या चिकित्सापद्धतींचा समन्वय करण्याकरितां आलिकडे प्रयत्न झालेले आहेत. नुकताच 'आरोग्य-मंदिर' या मासिकांत या विषयाबद्दल 'गृहवैद्य' या पुस्तकाचे लेखक डॉ. गर्दे यांचा एक लेख आला आहे. या लेखांत डॉ. गर्दे यांनीं आपल्या मुलाच्या मामुली आजाराची चर्चा करून वैद्यक समन्वय व्हावा अशी इच्छा प्रदर्शित केली आहे. या सर्व पद्धतींचा समन्वय करावयाचा म्हणजे प्रत्येक चिकित्सेंत असलेल्या तत्त्वांचा मेळ घातल्याशिवाय तो होणें शक्य नाहीं. तशा तऱ्हेचा प्रयत्न वरील लेखांत नाहीं.

डॉक्टरसाहेबांनीं लिहिलें आहे कीं, त्यांचा वातप्रकृतीचा मुलगा पोहावयास गेला. पावसाळ्याचे दिवस म्हणून त्याला ताप आला. त्यावर त्यांनीं फेरमफॉस, कालीमूर दिलें. ताप बरा झाला. परंतु मुलगा फिरून आजारी पडला. बारा क्षारांनीं गुण आला नाहीं, म्हणून अॅलोपॅथिक चिकित्सा सुरू केली. पेनिसिलिन टोचलें. ताप वाढला. दुसऱ्या दिवशीं पेनीस्ट्रेप्टो दिलें. ताप जास्तच चढला व पित्तहि वाढलें. त्यावर नेट्रमसल्फ दिलें व मॅगफॉस देऊन रोग्याला आराम वाटला. पेनिसिलिननें जें पित्त वाढलें व तें त्यांनीं नेट्रमसल्फ देऊन नाहींसें केलें. त्यांच्या मतें पेनिसिलिन पित्तकारक आहे. व तो दोष नेट्रमसल्फ देऊन नाहींसा होतो व अशा तऱ्हेनें अॅलोपॅथी व बाराक्षार यांचा समन्वय करतां येतो.

वातदोषावर औषधीप्रयोग झालाच नाहीं

याबद्दल चर्चा करण्यापूर्वी बाराक्षारानेंच मुलाला आराम वाटला असतां हें कसें, तें दाखविणें योग्य ठरेल. रोगी वातप्रकृतीचा, पाण्यांत डुंबला, ताप आला. थंड पाणी वातप्रकृतीला अयोग्य असतें. फेरमफॉस, कालीमूर देण्यांत आलें. अर्थात् वातदोषावर औषधी प्रयोग झालाच नाहीं.

१२ क्षारांचे दोषभेदानें गुणधर्म

त्रिदोषसिद्धांताप्रमाणें, १२ क्षारांचे गुणधर्म लक्षांत घेतां, फेरमफॉस पित्तदोषावर व कालीमूर कफदोषावर लागूं पडतात. तापातील दाहावर फेरमफॉस लागूं पडून ताप उतरला. परन्तु मूळ कारण तसेंच राहिलें, पोहण्यानें दूषित झालेल्या मूळच्या वातप्रकृतीवर इलाज झाला असता, तर पुनरपि ताप आलाच नसतां. १२ क्षारांत वातदोषावर नेट्रमम्यूर उत्तम लागू पडतें. अर्थात् ताप उतरल्यावर फेरमफॉसनंतर नेट्रमम्यूर दिलें असतें म्हणजे वातदोषशमन होऊन आरोग्य प्राप्त झाले असतें. किंवा नुसत्या नेट्रमम्यूरनेंच रोगी बरा झाला असतां. या आजारांत कालीमूर कां वापरला याचा बोध होत नाहीं. पावसाळ्याचे दिवस, पाण्यांत पोहणें, मुंबईची समुद्रकांठची क्षारयुक्त हवा, अशा परिस्थितींत पाण्याशीं संबंध असलेलें नेट्रमम्यूर व नेट्रमसल्फ हे क्षार, भावना लक्षांत घेऊन, द्यावयास हवे होते. तसेंच तापमान १०५ पर्यंत गेल्यावर वातदोषावरचें दुसरें औषध कालीफॉस दिलें असतें, तर ताप हळूहळू उतरला असतां व ताप उतरल्यावर वातप्रकृति म्हणून व्हिटामिन 'बी' दिलें असतें तर पूर्ण आरोग्य मिळालें असतें. त्या मुलाला १०४ पावेतों ताप असतांना दुपारीं ग्लिसरीनची पिचकारी देण्यांत आली. रात्रभर झोप चांगली घेऊन दुसरे दिवशीं ताप निघाला. या घटनेस काकतालीय न्याय म्हणतां येणार नाहीं. मुलाची वातप्रकृति. पोहण्यानें वातदोष वाढलेला होता. त्यांत ग्लिसरीन देऊन कोठा साफ करण्यांत आला. चरकानें सिद्धिस्थानांत व सुश्रुतानें शारीरस्थानांत वातप्रकोपदोषावर बस्ती द्यावा असें सांगितलें आहे. किंबहुना बस्तीलाच पूर्ण चिकित्सा मानण्यांत येते. या ग्लिसरीन देण्याच्या क्रियेंत वातदोषावरचा उपचार झाला व मुलाचा ताप हटला.

आयुर्वेदीय पद्धति व बारा क्षार

आयुर्वेदांत वात, पित्त, कफ दोषाचीं जीं वर्णनें आहेत व बारा क्षारांचीं, जीं लक्षणें आहेत त्यांचा नीट विचार करतां,

(१) वातविकार, वातदोष व वातप्रकोपावर, नेट्रमम्यूर, कल्केरियाफॉस्, मॅगफॉस व कालीफॉस हा गट,

(२) पित्तविकार, पित्तदोष व पित्तप्रकोपावर फेरम फॉस, नेट्रमफॉस, नेट्रमसल्फ व कालीसल्फ हा गट,

(३) कफविकार, कफदोष व कफकोपावर कालीमूर, कल्केरिया फ्लुओराइड, सिलिशिया व कल्केरिया सल्फ यांचा गट, असा आयुर्वेदीय दोषानुसार बारा क्षारांचा इलाज होऊ शकतो.

दोषांचीं वर्णनें व बारा क्षार

वातदोषाचें संक्षिप्त वर्णन—फेसाळ शौच, रूक्षत्व, शूळ, ठणका, काळेपणा, आंचके असें करतां येईल. हीं वर्णनें नेट्रमम्यूर, कल्केरियाफॉस, मॅगफॉस व कालीफास या क्षारांतील मुख्य मुख्य लक्षणांशीं जुळतात. पित्तदोषाचें संक्षिप्त वर्णन— पिवळेपणा, हिरवेपणा, आम्लता, ओलसरपणा, दाह हीं लक्षणें फेरमफॉस, नेट्रमफॉस, नेट्रमसल्फ व कालीसल्फ या क्षारांतील भावनाशीं जमतात. तसेंच कफदोषांत आढळणारी सूज, पांढरेपणा, चिकटपणा पू, रक्तमय पू, काठिण्य हीं वर्णनें कालीमूर, कल्केरिया फ्लोअर, सीलेशिआ, कॅल्केरिआ सल्फ क्षारांतील लक्षणांशीं संलग्न आहेत.

हे गट मीं आयुर्वेद व बाराक्षार चिकित्सा यांचें सूक्ष्म अवलोकन करून बसविलेले आहेत व त्याचा अनुभवहि पण पडताळून पाहिलेला आहे. रायपूर येथील सुप्रसिद्ध वैद्य नारायणदास ब्रह्मचारी, आयुर्वेदरत्नाकर, आयुर्वेदविचारानुसार, बाराक्षार व होमिओपॅथी औषधें देऊन असाध्य रोगी बरे करतात.

आयुर्वेदाची मांडणी

कोणत्याहि वैद्यकीय पंथाचा विचार “ स्वस्थस्य स्वास्थ्यसंरक्षणं, आतुरस्य विकारप्रशमनं च ” म्हणजे स्वास्थ्यसंरक्षण व रोग्यांचा रोग नष्ट करणें असाच असतो. परंतु प्रत्येक पंथांत रोगहेतु, लक्षणें व चिकित्सा निरनिराळ्या उपपत्तीनुसार भिन्न भिन्न आहेत.

आयुर्वेदानें ‘ धारणात् धातवः, दूषणस्वभावात् दोषाः, व मलिनीकरणात् मलाः । ’ अशी व्युत्पत्ति करून त्रिधातुत्रिदोष–मीमांसेच्या आधारानें जीवनविज्ञान सांगितलें.

निरोगी देहांत जे विविध व्यापार चालतात त्यावर परिस्थिति व हवामान यांचा परिणाम होऊन जी विकृति होते ती त्यांनीं त्रिदोषात्मक ठरविली व पदार्थांचें द्रव्यगुणवर्णन त्रिधातूंवर बसवून, दोषशमन करण्याचे इलाज सांगून आरोग्याचें मर्म सांगितलें.

त्रिधात्वात्मक भौतिक द्रव्यगुण

आयुर्वेदांत पदार्थांचे भौतिक द्रव्यगुण त्रिधात्वात्मक आहेत. वातशमन पदार्थ वातदोषावर, पित्तशमनवर्ग पित्तदोषांवर, व कफशमनवर्ग कफदोषांचा नाश करून साम्यावस्था निर्माण करतात, असेंहि सांगितलें आहे. धातुसाम्य प्रस्थापित करणें हाच मुख्य हेतु आहे. औषधी द्रव्यांच्या भौतिक गुणधर्मांचें त्रिधातुवर्गीकरण बसविलें आहे. देहाला धारणीभूत ठरणारें असें जें द्रव्य, औषधी व अन्न यांना भौतिक गुणानुसार धातु म्हणून उल्लेखिलें आहे.

शरीरांत त्या अन्नांची अगर औषधांचीं जीं रासायनिक परिवर्तनें होतात, त्यामुळें नवीन नवीन पदार्थ तयार होऊन त्यांच्या रासायनिक शक्तीचाहि उपयोग शरीरपोषणास होतो. परंतु कार्यकारी पदार्थांपासून उत्पादक पदार्थ अपुऱ्या परिस्थितींत उत्पन्न झाले (आम तयार झाला), अगर उत्पन्न झालेले पदार्थ शरीरास निरुपयोगी ठरले व त्यांचें उत्सर्जन योग्य रीतीनें झालें नाहीं, म्हणजे दोष उत्पन्न होऊन शारीरिक विकृति उत्पन्न होते व शरीर रोगांचें माहेरघर बनतें.

दोष नाहीसे झाले कीं साम्यावस्था प्राप्त होते व शरीर निरोगी राहतें. पंचमहाभूतें व त्रिधातु यावर बसविलेलें आयुर्वेदशास्त्र याची चर्चा मी अन्य ठिकाणीं केलेली आहे.

आयुर्वेद व जीवनरसायनशास्त्र

बटाटा हा पिष्टमय पदार्थ रक्तपित्तनाशक, पौष्टिक व वातुळ म्हणून आयुर्वेदांत सांगितला आहे. अर्थात् हें बटाट्याचें जीवभौतिक गुणवर्णन झालें.

शरीरपुष्टतेस उपयुक्त म्हणून हा बल्य ठरतो. त्यांतील पिष्टमय पदार्थांचें अंतिम परिवर्तन, पचनक्रियेनें मधुशर्करे (Glucose) मध्यें होतें. मधुशर्करेचें रूपांतर, स्नायूंत तक्राम्ल (lactic acid) मार्गें अपानवायु व ऊर्जा (energy) मध्यें होतें. हीच ऊर्जा शरीरास ताकद देते, अर्थात् बटाट्यानें शरीरास ताकद दिली; परंतु त्यापासून उत्पन्न झालेल्या अपानवायूचें उत्सर्जन नीट न झाल्यास शरीर दूषित होणार व रोग होणार. अपानवायूचें प्रमाण, भिन्न भिन्न पाचकशक्तीप्रमाणें कमीजास्त असणार व कांहीं प्रकृतींना यामुळें बटाटा वातुळ ठरणार. याचा परिणाम वातनाडीवर झाल्यास मज्जातंतूंचे विकार उत्पन्न होऊ शकतात.

मांसमय पदार्थ दूध, अंडी, मांस हे सुद्धा शरीरपोषणास आवश्यक आहेत. अंतिम पाचनक्रिया होऊन यांपासून शरिरास अनावश्यक असे यूरिआ, यूरिक आम्ल व युरेट्स् पदार्थ तयार होतात. यांचें मूत्रमार्गें नीट विसर्जन न झाल्यास संधिवात, अश्मरी वगैरे रोग उत्पन्न होतात. पौष्टिक अशा मांसमय पदार्थांपासून दूषित पदार्थ तयार झाले, या रासायनिक घडामोडीची दखल आयुर्वेद घेत नाहीं. कोणता रासायनिक घटक कोणता दोष उत्पन्न करतो याचा हिशोब आयुर्वेद देत नाहीं. त्यांतील कोणता रासायनिक घटक खराब किंवा चांगला याची माहिती त्याला नसते. मात्र भौतिक गुणधर्मवर्णन व रासायनिक परिवर्तनें यांत समन्वय निघतो. बटाटा रक्तपित्तनाशक आहे व आधुनिक शास्त्राप्रमाणें बटाट्यांत व्हिटॅमिन् 'सी' असतें. अर्थात् व्हिटॅमिन् सी व रक्तपित्तनाशक गुण यांत मेळ आहे. म्हणून आयुर्वेदांतर्गत गुणधर्मवर्णनें व रासायनिक घटनांची जीवरासायनिक गुणवर्णनें हीं तंतोतंत जमतात.

आयुर्वेद व ज्योतिष यांचा संबंध

वातपित्तकफात्मक वर्गीकरणाबद्दल येथें असें नमूद करावेसें वाटतें कीं, साधारणतः ज्या रोग्याला प्रामुख्यानें जो दोष असतो, त्याचा त्याच्या राशिनक्षत्राशीं संबंध असतो. विवाहप्रसंगीं अेकनाड म्हणून जें प्रकरण ज्योतिषांत सांगितलें आहे, याचा वातपित्तकफदोषांशीं संबंध आहे. आदि, मध्य, अंत्य या तीन नाड्या वातपित्तकफ या दोषअवस्थांचें द्योतक म्हणतां येईल.

आदिनाडी वातदोष दाखवितेः-अश्विनी, आर्द्रा, पुनर्वसु, उत्तरा फा., हस्त, ज्येष्ठा, मूळ, शततारका व पूर्वा भाद्रपदा हीं त्यांचीं नक्षत्रें होत.

मध्य नाडी पित्तदोष दाखवितेः—भरणी, मृगशीर, पुष्य, पूर्वा फा., चित्रा, अनुराधा, पूर्वाषाढा, धनिष्ठा, उत्तरा, भाद्रपदा हीं पित्तदोषात्मक नक्षत्रें होत.

अंत्य नाडी कफलक्षणात्मक आहेः-कृतिका, रोहिणी, आश्लेषा, मघा, स्वाती, विशाखा, उत्तराषाढा, श्रवण व रेवती हीं कफदोषात्मक नक्षत्रें होत.

म्हणजे रोग झाल्यास वरील राशीनक्षत्रें असलेल्या व्यक्तींची प्रथमतः त्या नक्षत्राशीं संलग्न असलेली दोषनाडी आढळून येईल. व त्या दोषाचें प्रथम शमन केल्यास रोग काबूंत राहील. एकनाड, एक दोष असलेल्या स्त्री पुरुषांचें लग्न लावणें म्हणजे त्या दोषाचा प्रकोप करणें होय. याकरितां आपल्या पूर्वजांनीं एकनाड विवाह निषिद्ध मानलेला असावा. माझा ज्योतिषशास्त्र व आयुर्वेद यांचा जो अभ्यास आहे, त्यावरून ही विचारसरणी मला सुचते.

ज्योतिष, आयुर्वेद व बारा क्षार यांचा समन्वय

सुश्रुतानें चंद्र, सूर्य व अनिल यांना जगताचा आधार मानले आहेत, व तोच प्रकार कफ, पित्त व वात या धातूंमुळें देहाला लागू केला आहे. पत्रिकेंतील चंद्र, सूर्य व शनि यांच्या स्थानाप्रमाणें देहांतील आरोग्य व विकार यांचा विचार करतां येईल. सायन पत्रिकेंतील रवीशीं डॉ. केरी यांनीं बाराक्षार जमविले आहेत. व तो तो क्षार दिल्यास ती रविराशियुक्त असलेली व्यक्ति निरोगी राहील असें त्यांनीं प्रतिपादलें आहे. कांहीं ज्योतिषी रवीचें स्थान व त्यापासून असलेलें शनीचें स्थान याचाहि बारा क्षारांशीं संबंध जोडतात. हा सर्वच विषय मोठा मजेदार आहे. व त्याचा अनुभवहि उत्तम मिळतो. ज्योतिष, आयुर्वेद व बारा क्षार यांचा असा समन्वय होऊ शकतो.

पंचमहाभूतविज्ञान, दोषविज्ञान, द्रव्यगुणविज्ञान, निदान व चिकित्सा या विषयांत यूनानी व आयुर्वेद यांत बरेंच साम्य आहे.

बारा क्षार चिकित्सा [भरणचिकित्सा]

बाराक्षार पद्धतींत रोग म्हणजे देहांतील पिंडाची बदललेली परिस्थिति. पिंडाच्या पोषणास आवश्यक असलेले क्षार योग्य प्रमाणांत न मिळाल्यास त्यांची उपासमार होऊन पिंड आक्रंदित होतात व तीं लक्षणें जमेस धरून ते क्षार दिल्यास विकृति नाहींशी होते, व शरीरास आरोग्य प्राप्त होतें. हवामान व इतर परिस्थितीशीं तोंड देण्यास पिंडांतील रासायनिक घटकांत फरक होऊन ते क्षार खर्च होतात व ते त्यास दिल्यास रोग नाहींसा होतो. उदाहरणार्थ, शरीरांत कोणत्याहि कारणानें आंचके उत्पन्न झाले कीं, मॅगफॉस हा क्षार कमी झाला असें समजावयाचें, व तो क्षार देहाला भरविण्यांत आला कीं आंचके थांबतात. या चिकित्सेस 'भरणचिकित्सा' असें नांव दिलेलें आढळतें. आंचके येणें वातदोषाचें लक्षण आहे. तरी अशा परिस्थितींत मॅगफॉस हें औषध या प्रकारच्या वातदोषावर लागू पडतें.

व्हिटॅमिन व वसा (तूप-तेल) (भरणचिकित्साशास्त्र)

व्हिटॅमिन – ओजो – द्रव्यें हीं सुद्धां शरिरांत कमी झालीं कीं निरनिराळे रोग उत्पन्न होतात व विवक्षित लक्षणें दिसूं लागतात व त्या परिस्थितींत ठराविक ओजोद्रव्य दिलें कीं तो रोग बरा होतो. अर्थात् हें सुद्धां एक भरण-शास्त्रच होय. शरीरसंवर्धनास नुसते क्षार, ओजोद्रव्यें यांचीच आवश्यकता नसते. पिष्टमय, वसामय व मांसमय (प्रोटिन) पदार्थ, हवा व पाणी यांचीहि गरज असते. हे रासायनिक घटक कमी झाल्यास निरनिराळे रोग उत्पन्न होतात व ते भरविण्यांत आले कीं आरोग्य मिळतें. वसामय पदार्थांत तूप व तेल जर शरिरास मिळालें नाहीं, तर त्यांतील असलेल्या लिनोलिक, लिनोलेनिक व आराकिडोनिक या अपरितृप्त वसाम्लांची उणीव शरीरास जाणविते व शरीर रोगी बनतें. व ते रासायनिक घटक तूप व तेल या पदार्थांचे अंतर्गत असल्यामुळें शुद्ध तूप व तेल दिल्यास ते रोग बरे होतात. अमेरिकन जीवनरसायनशास्त्रज्ञानें वरील प्रकारचे शोध लाविले आहेत. अर्थात् ही एकाच भरण-चिकित्सेचीं सर्व अंगें होत. त्रिधातु-त्रिदोषसिद्धांताप्रमाणें ओजोद्रव्याची वर्गवारी करतां येते ती अशी:—

वातदोषावर व्हिटॅमिन 'बी' पित्तदोषावर व्हिटॅमिन 'सी' व
कफदोषावर व्हिटॅमिन 'ए', डी व 'ई' उत्तम लागू पडतात.

ॲलोपॅथी (विकृति उत्पन्न करून कार्य)

ओजोद्रव्यांचा शोध ॲलोपॅथी-अंतर्गत संशोधनामुळेंच लागलेला आहे. ॲलोपॅथीमध्यें प्रायः रोगाची उत्पत्ति विषमीय कीटाणूंशीं संलग्न आहे. रोगोत्पादक जंतु नाहींसे झाले कीं रोग जातो असा त्यांचा दावा असतो. व त्याप्रमाणें जन्तु मारण्याकरितां नवीन नवीन रासायनिक पदार्थांचा शोध चालूं आहे. आयुर्वेदचिकित्सेंत दोषामुळें रोग उत्पन्न होतो. दोषामुळें अनावश्यक रासायनिक द्रव्यांचे शरीराबाहेर नीट उत्सर्जन झालें नाहीं कीं ते पिंडांत-देहांत सांचतात. व त्या त्या ठिकाणीं विषमीय रोगजन्तु निर्माण करतात. व ते मारण्याकरितां ॲलोपॅथी पेनिसिलिनसारखीं औषधें निर्माण करीत आहे. ॲलोपथीमध्यें रोगजंतु रोगाचें कारण धरल्यास ते नाहींसे करण्यास विवक्षित रासायनिक पदार्थ सुचविलेला असतो. टाइफॉईड हा आंत्रज्वर वातपित्तात्मक आहे. यावर क्लोरोमाअिसेटिन देतात. यानें आंतड्यांत असलेले ते जंतु मरतात. व आंत्रज्वर बरा होतो. विकृति उत्पन्न करून तें औषध कार्य करतें असा अनुभव चिकित्सकांना येतो.

हिंवताप (मलेरिया) जंतूमुळें होतो; पण त्यावर देण्यांत येणारीं औषधें दुष्परिणाम उत्पन्न करतात असा सर्वसाधारण अनुभव आहे.

अशा प्रकार त्रिदोषसिद्धांतांत अगर बाराक्षार पद्धतींत होत नाहीं. वैषम्य नाहींसें झालें की रोग जातो. क्षाराची उणीव भरून काढली, कीं रोग नाहींसा झाला.

विकृति उत्पन्न करून पण अचूक कार्य

क्लोरोमाअिसेटिन, पेनिसिलिन जरी विकृति उत्पन्न करतात तरी त्यांचें कार्य कांहीं रोगांवर फारच अचूक व उत्कृष्ट ठरतें, ही बाब नजरेआड करतां येत नाहीं. पेनिसिलिन पित्त उत्पन्न करीत असेल, परंतु न्यूमोनिआ, चरत असलेली अग्निदग्ध जखम आदि विकारावर तें रामबाण आहे. पेनिसिलिनचा योग्य उपयोग करावा व रोगाला शक्य तितक्या लवकर काबूंत आणावा, व उत्पन्न झालेले दोष अन्य चिकित्सेनें, नाहींसे करावे, यालाच समन्वय म्हणतां येअील. आंत्रज्वरानें दिवसेंदिवस अंथरुणावर खितपत पडण्यापेक्षा क्लोरोमाअिसेटिन देऊन होणारे दोष आयुर्वेदीय अगर बाराक्षार पद्धतीनें नाहींसे करावेत. आयुर्वेद जंतु हें रोगाचें कारण मानीत नाहीं. परंतु दोषामुळें जंतु उत्पन्न होतात हें तो मानतो. तरी पण जंतु मारणारे रासायनिक घटक देऊन रोगाचें कंबरडें मोडणें हेंच शहाणपणाचें ठरेल.

ज्या पद्धतीनें रोग्याचा रोग लवकर आटोक्यांत आणतां येअील तीच पद्धति प्रथम वापरावी व अितर पद्धतींचा नंतर विचार करावा.

होमिओपथींत भावनांना प्राधान्य

होमिओपथींत व बाराक्षार पद्धतींत लक्षणांना – भावनांना – प्राधान्य आहे. निरोगी मनुष्यास औषधी द्रव्यें यथेच्छ प्रमाणांत देऊन जी विकृति उत्पन्न होते तिचीं लक्षणें टिपून ठेवून तशाच भावना असलेल्या रोग्यास तेंच औषधी द्रव्य सूक्ष्म प्रमाणांत देऊन आरोग्य देण्यांत येतें. ‘ समः समं शमयति ’ असा त्यांचा दंडक आहे.

पिंडाला औषधी द्रव्यांचें अजीर्ण उत्पन्न करून त्यांत जी घडामोड होते, विकृति होते, अर्थात् विकृति झाल्यानंतर जो पिंडघटनेंत रासायनिक फरक होतो, तो तें औषध योग्य प्रमाणांत देऊन भरून काढणें असाहि अर्थ लावतां येईल. अशा तऱ्हेचे प्रयोग करीत असतांना त्या माणसाची वातपित्तकफात्मक नाडी पाहिली तर जे दोष आढळतील त्या दोषांवर सूक्ष्म प्रमाणांत दिलेलें औषध योग्य कीं अयोग्य याची शहानिशा लागूं शकेल.

आयुर्वेदाची भस्मचिकित्सा व होमिओपॅथी यामध्यें साम्य आढळतें. आयुर्वेदीय औषधी गुणद्रव्यांचा विचार केल्यास कोणत्या विशिष्ट रासायनिक घटकानें दोष शमन होतो याचा उलगडा होत नाहीं. कारण त्या भस्मांत अगर वनस्पतींत विविध रासायनिक, यौगिक द्रव्यें असतात.

परन्तु आजकाल जीवनरसायनशास्त्रांतर्गत जे शोध लागत आहेत त्या दृष्टीनें, आयुर्वेदीय औषधीसंग्रहाचा विचार केल्यास औषधींचे जीवभौतिक गुणधर्म व जीवनरासायनिक गुणधर्म यांत योग्य तो मेळ आढळतो. बाराक्षार [भरणचिकित्साशास्त्र], क्षारांची शरिरांतील उणीव व त्यानें प्रकट झालेल्या भावना यांचें साम्य दाखवितात. व तें साम्य आयुर्वेदीय दोषपद्धतींशीं जुळतें.

मतभेद होतो तो ॲलोपॅथिक औषधें व अन्य चिकित्साशास्त्रें यांचा. कारण त्यांची निदानपद्धति अगदींच निराळी आहे. परन्तु त्यांचाहि समन्वय घालतां येईल. खर्चाच्या दृष्टीनेंहि ॲलोपॅथिक औषधें फार महाग पडतात. त्या मानानें जडीबुटी, झाडपाला अत्यंत स्वस्त पडतो. आयुर्वेदीय पद्धतीनें याचा उपयोगहि उत्तम प्रकारें करतां येतो.

समन्वय-चिकित्सेचा एक नमुना

वैद्यकसमन्वय-चिकित्सेचा नमुना म्हणून एक अनुभव येथें देणें अप्रस्तुत होणार नाहीं. रक्तवाहिन्यांमध्यें रक्त वहात असतांनाच कोठें तरी त्याची गांठ बनते. यास एम्बोलिझम् म्हणतात. असा एक ॲलोपॅथिक औषधी देऊन असाध्य ठरलेला रोगी, माझ्या सांगण्यावरून कालीमूर व व्हिटॅमिन 'ई' देऊन या बाजूकडील एक प्रसिद्ध सिव्हिल सर्जननें आपल्या सरकारी दवाखान्यांत बरा केला.

बारा क्षारांत कालीमूर व ॲलोपॅथीमध्यें व्हिटॅमिन 'ई' या रोगांवर सांगितलेलीं आहेत. हीं दोन्हीहि औषधें आलटूनपालटून त्या रोग्यास देण्यांत आलीं. २४ तासांत रोग्याच्या परिस्थितींत फरक पडला व ८ दिवसांत रोगी बरा होऊन घरीं परत गेला.

सामुदायिक व सांघिक संशोधन चालू झालें पाहिजे

असे किती तरी अनुभव सांगतां येतील. यावरून एक गोष्ट प्रामुख्यानें स्पष्ट होते कीं, सर्व चिकित्सांचा समन्वय करण्याकरितां सामुदायिक व सांघिक संशोधन चालू झालें पाहिजे.

ॲलोपॅथी, १२ क्षार, व होमिओपॅथीमध्यें औषधी म्हणून विवक्षित रासायनिक द्रव्यें अगर घटक वापरतात. आयुर्वेदामध्यें भस्मांत, गुटिकेंत, अवलेहांत, काढ्यांत किती तरी रासायनिक घटक असतात. त्या सर्वांचा सामुदायिक उपयोग दोष निवारण्याकरितां होत असतो. दोष-लक्षणें, भावना अगर रोगजंतु सर्व प्रकार जमेस धरून जर रोगावर हल्ला केला तरच रोग लवकर नाहींसा होऊन आरोग्य मिळेल. रोगनाश हाच सर्वांचा हेतु "एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति" हेंच वचन शेवटीं खरें ठरतें.

अभ्यासक्रमासंबंधीं एक सूचना

अशी अेक सूचना करावीशी वाटते कीं, निरनिराळ्या पॅथींचा समन्वय करण्याकरितां व शारीरस्थान व शल्यतंत्र हें सर्व पद्धतींत अेकच असल्यामुळें प्रत्येक पंथाची निदान, शारीरक्रियाविज्ञान व चिकित्सा, सर्वच विद्यार्थ्यांस अेकाच विद्यालयांत शिकविण्यांत यावीं. त्यामुळें योग्य चिकित्सक निर्माण होऊं शकतील. शिक्षणक्रम १।२ वर्षांनीं वाढवावा लागेल इतकेंच. प्रत्येक पॅथीची शुद्ध निदान व शारीरक्रियाविज्ञानपद्धति व चिकित्सा अभ्यासक्रमांत ठेवावीं. व रोग्याला लवकर पूर्ण आराम मिळेल अिकडेच लक्ष द्यावें.

ज्ञान व विज्ञान हीं देशकाल, धर्म व जाती यांच्या बंधनापलीकडे आहेत. जें पवित्र तें आदरणीय व जें ग्राह्य तेंच घ्यावें.

चरकानें स्पष्ट म्हटलें आहे कीं, "तदेव युक्तं भैषज्यं यदारोग्याय कल्पते। स चैव भिषजां श्रेष्ठो रोगेभ्यो यः प्रमोचयेत् ॥" मनुस्मृतींत मनूनें आग्रहानें सांगितलें आहे कीं, "श्रद्दधानः शुभां विद्यामाददीतावरादपि। अंत्यादपि परं धर्मम्, स्त्रीरत्नं दुष्कुलादपि ॥ विषादपि अमृतं ग्राह्यं, बालादपि सुभाषितम्। अमित्रादपि सद्वृत्तममेध्यादपि कांचनम् ॥ स्त्रियो रत्नान्यथो विद्या धर्मः शौचं सुभाषितम्। विविधानि च शिल्पानि समादेयानि सर्वतः ॥"

देवनागरी लिपींत सुधारणा

लखनौ येथें नोव्हेंबर १९५३ मध्यें भरलेल्या देवनागरी लिपी सुधारणा परिषदेच्या शिफारसी मुंबई सरकारनें स्वीकारल्या आहेत. त्याप्रमाणें राज्यांतील हिंदी भाषेच्या देवनागरी लिपींत बदल करण्यांत येत आहे.

शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत प्रवेश

सरकारमान्य गुरुजवळ शुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास सरकारमान्य शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत प्रवेश मिळतो कां? असा प्रश्न एका विद्यार्थ्यानें विचारला आहे. हा प्रश्न सर्वच विद्यार्थी व विद्यालयें यांच्या दृष्टीनें महत्वाचा असल्यामुळें पत्रिकेंतून त्यांचे उत्तर प्रसिद्ध करीत आहोत.

सर्वसामान्य नियम येथेंहि लागू

साधारणतः दोन सरकारमान्य विद्यालयांतील विद्यार्थी एका शाळेंतून दुसऱ्या शाळेंत जाऊं शकतात हें सर्वांना माहितच आहे. तीच स्थिति येथेंहि आहे. फरक फक्त एवढाच कीं गुरुपरंपराशिक्षणांत एकच गुरुजी असतात व विद्यालयांत अनेक अध्यापक असतात. बाकी दोन्हीकडील विषय तेच परीक्षाहि एकच यामुळें कायदेशीर रीत्या गुरुजवळील विद्यार्थ्यांना पाठ्यक्रम समितीच्या संमतीनें केव्हांहि विद्यालयांत प्रवेश मिळूं शकतो.

अशी सोय नसेल तर विद्यार्थ्यांची कुचंबणा होईल. प्रकृति अस्वास्थ्यादि कारणास्तव सरकारमान्य गुरुजी अध्यापन करूं न शकले तर त्या विद्यार्थ्याला विद्याभ्यासच बंद करावा लागेल. ज्या गुरुंची अगर विद्यालयांची मान्यता रद्द होईल त्यांच्या विद्यार्थ्यांची व्यवस्था लागणें अशक्य होईल.

कांहीं सरकारमान्य गुरुंनीं आपल्या विद्यार्थ्यांना नासिकच्या शुद्ध आयुर्वेदविद्यालयांत पाठविलें आहे. येऊं इच्छिणाऱ्या सरकारमान्य विद्यार्थ्यांना नासिकच्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत प्रवेश मिळूं शकेल.

—वैद्य बिंदुमाधव पण्डित

प्रमुख, शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नासिक

वाचकांचा पत्रव्यवहार—

अध्यापक परिषदेच्या तारखा

वैद्य श्री. त्र्यं. म. गोगटे रशियास जाऊन आले व वैद्य श्री. जायदे अमेरिकेस जाणार आहेत; या दोन्ही गोष्टीबद्दल मला आनन्द व अभिमान वाटत आहे. मी त्या दोघांचें अभिनंदन करतो.

अध्यापक परिषद नासिकला झाली त्यावेळीं मी आलो असतो तर फार बरें झालें असतें. आतां भुसावळला मी निश्चित हजर राहण्याचें ठरविलें आहे. मात्र परिषदेच्या तारखा एप्रिलमध्यें नसाव्यात, एप्रिलअखेरपर्यंत परीक्षा सुरू असतात. म्हणून परिषद् मेच्या पहिल्या आठवड्यांत घ्यावी. इतर अध्यापकसुद्धा मेचा पहिला आठवडाच मान्य करतील. अध्यापकांची सोय पाहून तारखा निश्चित कराव्यात ही विनंति.

रायपूर वैद्य रा. वि. वाघ, आयुर्वेदतीर्थ

जाईल वाडा, त्र्यंबकेश्वर

त्र्यंबकेश्वरी जाणाऱ्या प्रत्येक वैद्यानें या वाड्यांत गेल्याशिवाय त्याची यात्रा पूर्ण झाली असें समजूं नये. त्र्यंबकेश्वर हें पूर्वीच्या काळचें वैदिक विद्यापीठ आहे. ती॥ भाऊशास्त्री जाईल यांनीं त्र्यंबकेश्वरीं आयुर्वेद शिक्षणाची परम्परा पुनः चालूं केली आहे.

शुभ विवाह

त्यांचे चिरंजीव वैद्य वसंतराव यांचा विवाह ता. १०-२-५५ रोजीं साजरा झाला. वधुवरांचे भावी जीवन आयुर्वेदाच्या प्रगतीला उपकारक होवो. वैद्य वसंतराव हे नासिक येथें भरलेल्या अध्यापक-परिषदेस उपस्थित होते.

सुप्रसिद्ध दंतवैद्य पां. वि. जायदे, आयुर्वेदतीर्थ,
हुबळी यांचीं विद्वान् वैद्य आणि डॉक्टर यांनीं
प्रशंसिलेलीं दोन उपयुक्त पुस्तकें

१) दंतरोगविज्ञान आणि चिकित्सा
किंमत ३ रु.

२) वैद्यसन्मित्र (हिंदी) भाग १ ला
किंमत २ रु.

मिळण्याचीं ठिकाणें:—
१ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक
२ पां. वि. जायदे, नारायण चौक, हुबळी

वै. डेग्वेकरजींचा दुसरा प्रश्न (मागील अंकावरून समाप्त)

(लेखकः —वैद्यराज वा. स. अंदनकर, चांदा)

श्री. वैद्यराज डेग्वेकरजींचा दुसरा प्रश्न खालीलप्रमाणें आहेः—

(२)' व्रण व गुल्म हे एकच पदार्थ आहेत काय ? नसल्यास सुश्रुत सू. अ. २२ त वर्णन केलेला कोष्ठगत व्रणांतील स्राव 'कोष्ठगतोऽसृङ्मूत्रपुरीषोदकानि स्रवति' व पैत्तिक गुल्मांतील श्री. अंदनकरांनीं गृहीत धरलेला (?) स्राव एकच असूं शकतील काय ? आणि मग असें अशास्त्रीय विवेचन करून वडाची साल पिंपळाला लावून, टीकाकारांना अनास ठरविणें हें शास्त्रीय धाष्टर्य नव्हें काय ?

या प्रश्नाचें उत्तर

वायुः पित्तं कफश्चोक्तः शारीरो दोषसंग्रहः ।
मानसः पुनरुद्दिष्टो रजश्च तम एव च ॥४६॥

(चरक सूत्रस्थान अध्याय १)

ह्यावर टीका करतांना श्री. चक्रपाणींनीं एक विवाद्य वाक्य घातलें आहे तें असें:–

दोषसंज्ञा तु पीडाकर्तृत्वसामान्याददोषेऽपि स्यात् यथा 'स्वयं प्रवृत्तं तं दोषमुपेक्षेत हिताशनैः ।

(चि. अ. ५ श्लोक ४६)

इत्यत्र पुरीषमेव दोषत्वेनोक्तम् ।

विवेचन पुनः वाचावें

हें वाक्य आम्हीं आयुर्वेद पत्रिकेच्या दिनांक १६-१२-५४ च्या अंकांत उध्दृत केलें आहे. त्यावरील आमचें विवेचन वाचावें, पुनः आम्हीं चर्वितचर्वण करीत नाहीं. आमचें म्हणणें एवढेंच कीं, 'इत्यत्र पुरीषमेव दोषत्वेनोक्तम् ।' ह्या वचनांत स्वयं प्रवृत्तं तं दोषमुपेक्षेत हिताशनैः । ह्या चरकोक्त वाक्यांतील दोष ह्या पदाचा अर्थ श्री. चक्रपाणीनें मला मूत्रशकृत्स्वेदादयोऽपि च । ह्या मलांचे व्याख्येंत अंतर्भूत होणाऱ्या अनेक मलांपैकीं पुरीषमेव । म्हणजे विष्ठाच होय असा केला आहे तो सर्वथा चूक होय. व आजहि आमचें तेंच ठासून म्हणणें आहे. आणि श्री. चक्रपाणीचा कैवार घेऊन श्री. डेग्वेकरजींनीं आमचे विरुद्ध कितीहि शास्त्रीय धाष्टर्य म्हणून असदारोप करून दंडपाणीची भूमिका घेतली तरीहि आम्हांस भिण्याचें कारण नाहीं.

अधिकरण

पक्वः स्रोतांसि संक्लिद्य व्रजत्यूर्ध्वमधोऽपि वा ।
स्वयं प्रवृत्तं तं दोषमुपेक्षेत हिताशिनः ॥ ४६ ॥

वरील श्लोक चरकाचार्यांच्या गुल्मचिकित्सेच्या ५ व्या अध्यायांतील पित्तगुल्मचिकित्सेच्या ३३ श्लोकापासून तो ४८ श्लोकापर्यंतच्या एकंदर १६ श्लोकांपैकीं ४६ वा श्लोक होय. आतां आपण अतिक्रान्तावेक्षणम् ह्या तंत्रयुक्तीप्रमाणें ह्या श्लोकांची वाक्ययोजना व अर्थयोजना करूं. या अधिकरणाच्या ४० व्या श्लोकांत, ४१ व्या व ४३ व्या श्लोकांत अनुक्रमें ह्यपक्वो गुल्मसुच्यते । विदह्यमानं जानीयाद्गुमं ...। संपक्वं गुल्ममादिशेत् । अशीं चरकाचार्यांचीं पूर्ववाक्यें आलीं आहेत व त्यानंतर 'पक्वः स्रोतांसि...'। हा ४६ वा श्लोक आला आहे. पदार्थ या तंत्रयुक्तीप्रमाणें पूर्वापरयोग (With reference to context) पाहून पदाचा स्पष्ट अर्थ करावा लागतो. त्याप्रमाणें पक्वः या पदाचा स्पष्ट अर्थ हाच कीं, आमगुल्माचा परिणाम पच्यमान गुल्मांत व तदनंतर पच्यमानगुल्माचा परिणाम पक्वावस्थेंत झाला. अर्थात् त्यानंतर पक्वगुल्माचा अंतिम परिणाम म्हणजे ज्या कोष्ठांत प्रथम पित्तगुल्म होता त्याच स्थानांत व्रण उत्पन्न झाला.

पाकानंतर व्रण उत्पन्न होतो

व्रणः संजायते प्रायः पाकाच्छ्वयथुपूर्वकात् ।

[अष्टांगहृदय सूत्र अ. २९]

येथें 'प्रायः' या पदानें आगंतु व्रणाची अव्याप्ति दूर केली आहे. अभिप्राय हाच कीं, पाकानंतर व्रण

उत्पन्न होतो. व चरकाचार्यांच्या पुढील श्लोकांतहि हाच ध्वनि स्पष्ट आहे.

तत्र धान्वतरीयाणामधिकारः क्रियाविधौ ।
वैद्यानां कृत योग्यानां व्यधशोधनरोपणे ॥४४॥
अन्तर्विद्रधिवच्चास्य कार्ये शोधनरोपणे ॥४८॥

अर्थात् शोधन व रोपण ह्या क्रिया व्रणाच्याच होत. तेव्हां पक्वगुल्माचाच येथें कोष्ठगत व्रण तयार झाला हें स्पष्ट सिद्ध होतें. येथें शल्यतंत्राचा अधिकार पोंहोचतो व म्हणूनच आम्हीं लेखांत मागील सुश्रुताच्या सूत्रस्थानांतील २२ व्या अध्यायांतलि वाक्यें उध्दृत केलीं होतीं.

त्वङ्मांससिरास्नाय्वस्थिसन्धिकोष्ठमर्माणीत्यष्टौ व्रणवस्तूनि । अत्र सर्वव्रणसन्निवेशः ॥ ३ ॥

ह्या वाक्याप्रमाणें प्रस्तुत व्रणाचा स्थानसंश्रय कोष्ठच होय.

अर्थात् व्रण ही संज्ञा ठरल्यानंतर व्रणास्राव सांगितले पाहिजेत. म्हणून सुश्रुतांनीं ‘अत ऊर्ध्वं सर्वस्रावान् वक्ष्यामः’ । असा उपक्रम करून ‘कोष्ठगतोऽसृङ्मूत्रपुरीषपूयोदकानि स्रवति।’ असें वाक्य दिलें आहे. व ह्याचें विवरण आम्हीं संपूर्णपणें मागील लेखांत केलें आहे. व हाच श्लोकोक्त स्रावच प्रस्तुत पित्तगुल्मपाकजन्य कोष्ठगत व्रणांत असतो. ह्या सुश्रुतवचनांचा व चरकचार्यांच्या ‘पक्वः स्रोतांसि संक्लिद्य’। ह्या श्लोकाचा सविस्तर समन्वय पूर्वलेखांत होऊनच गेला आहे. तेथें दोष या पदाचा अर्थ श्रीचक्रपाणि म्हणतात त्याप्रमाणें केवळ विष्टाच नव्हे ह्याचेंहि सोपपत्तिक विवरण होऊनच गेलें आहे.

व्रण व गुल्म

प्रश्नः · व्रण व गुल्म हे एकच पदार्थ आहेत काय ?

ह्या श्री· डेग्वेकरजींच्या प्रश्नाचें प्रासंगिक उत्तर, प्रस्तुत पित्तगुल्माच्या अधिकरणतंत्रयुक्तीस धरून एवढेंच कीं, मागें आम्हीं सिद्ध केल्याप्रमाणें प्रथम कोष्ठगत पित्तगुल्म व त्याचाच पाकोत्तर परिणाम म्हणजेच कोष्ठांत अन्तर्व्रण होय; दुसरें तिसरें कांहीं नाहीं. व ह्याच व्रणाचा स्राव सुश्रुत सूत्रस्थान अ. २२ यांत उल्लेखित केला आहे, असें आमचें बरोबर अत्यंत शास्त्रीय व सत्य उत्तर आहे. ह्याला आपण विस्तृत उत्तर काय देतां तें अवश्य द्या. आम्हांस भिवविण्याचें कांहीं कारण नाहीं.

‘स्वयं प्रवृत्तं तं दोषमुपेक्षेत... ’। यांतील दोषपदाचा अर्थ केवळ विष्ठाच कसा होत नाहीं, याचें विवरण पहिल्या लेखांत केलेंच आहे. पण तें जाऊं द्या ! पैत्तिक गुल्मांतील इतर कोणताहि स्राव असो तो तरी केवळ पुरीषमेव असतो काय हें आपण पाहूं.

विरेचनानें काय होतें ?

प्रस्तुत व्याधि पित्तगुल्म होय. ‘तद्वद्विरेचनं पित्ते’। (अष्टांग. सूत्र. अ. १८) या सूत्राप्रमाणें पित्तदोषाचें अग्र्य शोधने विरेचन होय. व त्याचप्रमाणें ही विरेचन शोधनचिकित्सा चरकाचार्यांनीं पुढील श्लोकांत पित्तगुल्माच्या अधिकरणाच्या आरम्भींच दिली आहे.

स्निग्धोष्णेनोदिते गुल्मे पैत्तिके स्रंसनं हितम् ।

व पित्तगुल्माचें प्रायः स्थान पच्यमानाशय होय असें अष्टांगसंग्रहकार म्हणतात. ... प्रायो नाभ्याश्रयश्च । (अष्टांग सं. निदान अ. ११) तेव्हां पित्तस्थानांतच हा पित्तगुल्म स्थानसंश्रय घेईल तर तेथें संपूर्णतः विरेचन–शोधन-चिकित्सा योग्य होय. व विरेचन योग दिल्यानंतर तें विरेचन कोण्या उद्देशानें दिलें जातें? ह्याचें उत्तर हेंच कीं, ज्या वृद्धपित्तदोषानें ही पित्तगुल्माची संप्राप्ति घडवून आणली, त्या प्रभूतपित्तदोषाचें शोधन होऊन त्या संप्राप्तीचा नाश व्हावा. व या शास्त्रीय उद्देशाप्रमाणें शास्त्रीय चिकित्सकानें जर पित्तगुल्मांत विरेचन दिलें तर काय नुसती विष्ठाप्राप्ति व्हावयाची? कीं, पित्तदोषाचें सम्यक् निर्हरण होऊन तें गुदमार्गानें बाहेर पडून त्याचें चाक्षुष प्रात्यक्ष व्हावयाचें ! या वेळेला तर ‘गुल्माकाराः स्वयं दोषाः।’ ही पित्तगुल्माची स्थिति आहे. ‘यदि गुल्मो विदह्येत,...’। हा ३९ वा श्लोक अद्याप यावयाचा आहे. तेथून आम, पच्यमान व पक्व गुल्माचें प्रकरण सुरू होतें.

निरूह बस्तीचा परिणाम

बरें यापुढें जाऊं. चरकाचार्य पुढें म्हणतातः–

'पित्तं वा पित्तगुल्मं वा ज्ञात्वा पक्वाशयस्थितम् ।
कालविन्निर्हरेत् सद्यः सतिक्तैः क्षीरबस्तिभिः ॥३४॥

कालविन्निर्हरेत् सद्यः सतिक्तैः क्षीरबस्तिभिः ॥३४॥ येथें पित्तगुल्माचा स्थानसंश्रय पक्वाशयांत असल्यामुळें मूळ पित्तदोषाचें, आसन्नमार्गत्वात् शोधन पित्तघ्न-द्रव्यांनीं साधित केलेल्या निरूहबस्तीनें केलें आहे.

पित्तं वा कफपित्तं वा पक्वाशयगतं हरेत् ।
स्रंसनं त्रीनपि मलान् बस्तिः पक्वाशयाश्रयान् ।
(अष्टांगहृदय ज्वरचिकित्सा अध्याय १)

तेव्हां हेंहि निरूहबस्तीचें शोधन दिल्यानंतर रोग्याच्या व चिकित्सकाच्या कपाळीं पुरीषमेव-एकमेवाद्वितीयम्...। एवढेंच ठेवलें आहे काय ?

रक्तविस्रुतीनें वृद्धपित्तनिर्हरण

यानंतर ३६ व्या श्लोकापासून जेव्हां पित्त-गुल्माचा अतिवृद्धपित्तदोष रक्तदूष्याचा संश्रय करून पाकोन्मुखता दाखवितो तेव्हां अस्रविस्रुतीचा आश्रय घेतला आहे. व रक्तविस्रुति केल्यानंतर, विरेचनकालीं किंवा निरूहबस्ति दिल्यानंतर पित्तदोष गुदमार्गावाटें बहिःप्रवृत्त झाला असतांच जर केवळ विष्ठामाईचें माहात्म्य कोणीहि गाजवूं शकत नाहीं, तर रक्तवाहि-न्यांतून वृद्धपित्तदोषासह दुष्टरक्त बाहेर पडल्यावर ह्या चक्रपाणीच्या अतिप्रियतमेला 'विचारणार कोण !

टीकाकाराचें अशास्त्रीय विवेचन

तेव्हां पाकाचा जेथें किंचित्हि संबंध नाहीं अशा पित्तगुल्माच्या अवस्थेंत किंवा पाकोत्तरकालींहि त्याचेंच रूपांतर कोष्ठव्रणांत होऊन दोष स्वयंप्रवृत्त असतांना किंवा स्वयंप्रवृत्त न होणाऱ्या पित्तगुल्माच्या वृद्धपित्तदोषाला विरेचन व निरूहविधीनें बळजबरीनें प्रवृत्त केल्यावर सुद्धां, 'इत्यत्र पुरीषमेव दोषत्वे-नोक्तम् । ' ह्या चक्रपाणीच्या पुरीषसूक्ताप्रमाणें केवळ विष्ठेचेंच दर्शन न झाल्यामुळें या टीकाकाराचेंच अशास्त्रीय विवेचन होय हें स्पष्ट सिद्ध होतें.

वडापिंपळाच्या सालींचे उपयोग

आमचें पूर्वलेखन व आजचेंहि विवेचन शास्त्रीय धाष्टर्य नसून तें शुद्ध शास्त्रीय सत्य होय. व न्यग्रोधादि वर्गातील वडाच्या व पिंपळाच्या सालीचा दुरुपयोग कोणी केलाच असेल तर तो श्रीचक्रपाणीनेंच केला आहे. आम्ही मात्र ह्या साली यथा योग्य, कषायरसात्मक म्हणून रोपणाक्रियाकरण्या-करितां दररोज सुयोग्य रीत्या, आमच्याकडे येणाऱ्या व्रणी रुग्णावर वापरतों ! व त्याच्या यथादोष आभ्यंतरहि प्रयोग करतो ! किंबहुना ह्या पित्तगुल्म-जन्य आभ्यंतर कोष्ठव्रणातच, प्रथम तिक्तसर्पिः दिल्या-नन्तर गुल्मांतील सामान्य स्रोतोरोधात्मक संप्राप्तीचा विरोध न आल्यास ह्याच शुद्ध व्रणांतच ह्यांच दोन्हीहि साली इकडे तिकडे न फेकतां त्यांचें सुन्दर घृत सिद्ध करून तेंहि देऊं !

कोष्ठगतव्रणांतील स्रावाचें स्वरूप

शेवटीं श्री. डेग्वेकरजींना नम्र सूचना हीच कीं, एखाद्या शस्त्रकर्मपटु शल्यकोविदाकडे (Surgeon) असा पक्वावस्थेंतील पित्तगुल्मी किंवा अन्तर्विद्रधीचा रुग्ण आला व त्यावेळीं कोष्ठगतव्रणांतून जो स्राव स्रवेल त्यांत किंवा Abdominal Surgery करून उदरगुहेचें पाटन करून प्रत्यक्ष व्रणवस्तु डोळ्यानें पाहून त्या व्रणांत श्रीचक्रपाणीच्या वचना-नुसारें एकमेवाद्वितीयं...। असें पुरीषमेव सांपडतें काय याचें आम्हांला Practical (प्रात्यक्षिक) द्यावें म्हणजे मग श्रीचक्रपाणींना अनाप्त कधींहि म्हणणार नाहीं. पण जोंपर्यंत हें चक्षुर्वै सत्यम् होत नाहीं, तोंपर्यंत ह्या प्रस्तुतच्या प्रकरणांत श्रीचक्रपाणि हे अनाप्त होत ह्यांत कांहींहि शंका नाहीं.

यान्यस्माकं सुचरितानि तान्येव त्वयोपास्यानि नो इतराणि ।

हेंच ब्रीद आम्ही ह्या टीकारांविषयीं बाळगणार !

पवित्र
नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः–नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

आयुर्वेद में दंतविज्ञान व उसकी सर्वोपरि विशेषतायें

अखिल भारतवर्षीय आयुर्वेदीय डेन्टल मिशन, मुंबई ४ या संस्थेचे प्रमुख वैद्य किशोरदास भागीरथ गुप्ता यांनीं ही ४८ पानांची १४ आणे मूल्य असलेली हिंदी पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. ही पुस्तिका वास्तविक अमूल्य आहे. व याची जाणीवहि स्वतः लेखकाला आहे. वैद्य किशोरदास लिहितातः–

"ही पुस्तिका लिहिण्याचा हेतु आयुर्वेदीय दन्तविज्ञानशास्त्राला समुन्नत करून राष्ट्रीय वैद्यकाचा मान प्राप्त करून देण्याचाच केवळ नसून अन्तर्राष्ट्रीय वैद्यकक्षेत्रांतहि त्याची सर्वश्रेष्ठता प्रस्थापित करून आमची आर्यसंस्कृति व तिची शिकवण सर्व विश्वभर पसरविणें हा आहे. तसेंच तिच्या द्वारा देश व शास्त्र दोघांचीहि प्रतिष्ठा वाढविण्याचा सुवर्णक्षण प्राप्त व्हावा हा आहे. परन्तु हें केवळ व्यक्तीकरितां, किंवा राष्ट्राकरितां किंवा संस्कृति व शास्त्राकारितां, सर्व प्राणिमात्राच्या हितार्चे साधनाकरतां आहे. आचार्यांनींहि असाच आदेश दिला आहे. "नात्मार्थं नापि कामार्थं अथ भूतदयां प्रति।"

१) पूयदन्त(पायोरिया)रोग नष्ट कां होत नाहीं? २) दन्तरोगांची उत्पत्ति व दन्तरोग्याची संख्या कमी कां होऊं शकत नाहीं? ३) दुष्टमांसार्बुदा[Cancer] सारख्या रोगाचा फैलाव कां होत आहे? या तिन्हीं प्रश्नांचीं उत्तरें गम्भीर विचार करणाऱ्या सज्जनांना या पुस्तिकेंत अवश्य मिळतील.

आयुर्वेदीय निदानचिकित्सेंतील 'रससिद्धान्त' 'धात्वाग्निसिद्धान्त' व 'लंघन' 'वमनादि' शमन शोधन उपचारार्चे महत्त्व या पुस्तिकेंत उत्तम रीतीनें दाखविलें आहे. व या सिद्धान्ताचा अवलंब केल्याविना (ॲलोपॅथीची) निदानचिकित्सा कशी भ्रममूलक आहे तेंहि स्पष्ट करण्याचा सफल प्रयत्न लेखकानें केला आहे.

योगसार अथवा योगरहस्य ग्रंथांत 'जालंधर' नामक योगक्रियेचा उपयोग करून आयुर्वेदीय शालाक्यतंत्रज्ञांनीं शूलरहित दंतोत्पाटनाची आश्चर्यकारक पद्धति आपल्या शारीरज्ञानावर कशी शास्त्रशुद्ध बसविली आहे हें वै. गुप्ताजींनीं दाखविलें आहे. परंतु या कलेच्या पाठीमागें असणाऱ्या वातदोषाच्या रहस्यपूर्ण कृतीच्या प्रत्यक्षाचें साधन जीवाणुवादाच्या प्रत्यक्षाच्या साधनासारखें नसून, अध्यात्मदृष्टिद्वाराच प्राप्त होणारें आहे असें त्यांना वाटतें.

हें आयुर्वेद सांगू शकतो

केवळ कार्बोहायड्रेट आदि दृष्टीनें आहाराकडे पहाण्यानंतरहि जें पहावयाचें शिल्लक रहातें तें म्हणजे 'नित्यं सर्वरसाभ्यासो बलकराणां श्रेष्ठतमः' हें होय. गूळ, साखर, व मध हीं सर्व शर्करा असलीं तरी त्यांच्या गुणकर्मांत कसा फरक आहे? बकरीचें मांस व इतर मांस ही सर्व प्रोटीन असली तरी त्यांच्या लाभांत किती अंतर आहे? तूप व तैल हीं फॅट्स् असली तरी त्यांच्या शरीरावर घडणारा परिणाम भिन्न कां होतो हें आयुर्वेद सांगू शकतो.

वैद्य गुप्ताजींच्या इच्छेनुसार मुंबई राज्य सरकारद्वारा अधिमांसकाच्या २०० रोग्यांवर आयुर्वेदीय पद्धतीचें प्रत्यक्ष संशोधनकार्य करण्यासाठीं ७००० रु. मंजूर केले गेले असून वरील प्रयोग जे. जे. हॉस्पिटलच्या सेट करीमभाई इ. मेमोरिअल डेन्टल कॉलेजच्या हॉस्पिटलमध्यें होणार आहे, असें या पुस्तिकेंत म्हटलें आहे.

मा. गुप्ताजींना प्रश्न

शूलरहित दंतोत्पाटनाच्या सर्व गुणांना योग्य तो मान देऊन वैद्यराज मा. गुप्ताजींना असें विचारावेंसें वाटतें कीं दंतोत्पाटनाची आवश्यकता आयुर्वेदीय दंतवैद्याला वाटतें कां? वाटत असल्यास केव्हां? हजारोंनीं दंतयज्ञ करून शूलरहित दंतोत्पाटन करण्याची आवश्यकता आयुर्वेदीय पद्धतीच्या आहारविहाराच्या प्रचारकाला आहे काय?

—आयुर्वेदाचार्य श्री. कृ. करमरकर, नासिक

निवडक रुग्ण चिकित्सा

(चिकित्सकः—वै. लक्ष्मीबाई बोरवणकर
आयुर्वेदविशारद, मुंबई २)

१ स्तनांत दुखावा

रुग्ण– स्त्री, वय वर्षें १९

स्तनांत अतिशय दुखावा असून स्तन ताठले आहेत व त्यांतून चिकासारखा पदार्थ निघत आहे अशी १९ वर्षांची कुमारिका उपचाराला आली.

भूक नाहीं, उत्साह नाहीं, थकवा, मन अत्यंत अप्रसन्न व एकप्रकारचें भयभीत, यामुळें ती अगदीं गोंधळून गेली होती. स्तनाला जराहि स्पर्श सहन होत नव्हता.

रसधातुवृद्धीचीं लक्षणें

रसवृद्धीचीं अग्निसदन, आलस्य, गौरव, श्लथांगत्व, अतिनिद्रता इ. स्पष्ट लक्षणें दिसत होतीं. म्हणून पोटांत प्रथम अग्नि प्रदीत करण्यासाठीं हिंगाष्टक १ मासा + शंख ३ गुंजा, याच्या ३ पुड्या गरम पाण्याबरोबर दिल्या व स्थानिक उपचार पाण्याच्या वाफेनें स्तनांना दोन वेळां शेक (स्वेद) दिला व शोथघ्न लेप लावण्यास दिला.

पहिल्याच आठवड्यांत स्तनांचा दुखावा अजिबात जाऊन ते सैल झाले व त्यांतून जाणारा स्रावहि बन्द झाला. स्तनांचा स्वाभाविक आकार येऊन रसवृद्धीचीं सर्व लक्षणें कमी होऊन १५ दिवसांत मुलगी पूर्ण बरी झाली.

२ खर पडणें (पिष्टमेह)

रुग्ण-मुलगा, वय वर्षें १

मुलाला नेहमीं खर पडते. पुष्कळ उपचार केले परन्तु खर पडणें कमी नाहीं, असें सांगण्यांत आलें. मुलगा गोरा, तेजस्वी, हुषार दिसत होता. पोटांत कांहीं विकृति आढळली नाहीं. मलशुद्धि चांगली, झोंप चांगली, खेळतोहि. तेव्हां खातो काय असें विचारतां फक्त अर्धाशेर दूध त्यांतहि पाणी घालून देतात. थोडीं बहुत बिस्किटें, अन्न बिलकूल नाहीं, एवढी माहिती मिळाली.

तेव्हां पोषणाच्या अभावीं निर्माण होणारी पित्तकफदुष्टि हें लघवींतून खर जाण्याचें कारण असावें असा तर्क करून प्रवाळपंचामृत (मौक्तिकयुक्त) ३ गुं. व गुळवेलसत्व ८ गुंजा याच्या ३ पुड्या दूधसाखरेंतून घेण्यास सांगितल्या. व अन्नाची सुरवात पेजेपासून करण्यास सांगितली. बिस्किटें कमी करा व दुधांतहि पाणी घालूं नका असें सांगितलें. खर पडणें ८ दिवसांत कमी झालें.

वाचकांचा पत्रव्यवहार—

खरकुतावर सापाची कात

आयुर्वेद पत्रिकेच्या १६ जानेवारी ५५ च्या अंकांत पान ४६६ वर खरकुत या जनावरांच्या रोगावर उपाय दिला आहे, त्यांत सापाच्या कातीचा उपयोग होतो असें म्हटलें आहे.

माझ्या ‘गृहवैद्य’ या द्वादशक्षार चिकित्सा पुस्तकांत पान २२ वरच्या कालीसल्फ या क्षाराच्या विवेचनांत अंदाज बांधला आहे कीं, कात टाकण्यासाठीं (म्हणजे नवी कातडी येण्यासाठीं) वरील क्षार अत्यावश्यक वाटतो. खरकुत हा त्वचेचा रोग असल्यास त्यावर कालीसल्फ उपयुक्त होईल. म्हणजेच सापाच्या कातींत हा क्षार प्रामुख्यानें सांपडतो कीं काय? कोणी यावर प्रकाश पाडूं शकेल तर आभारी होईन.

—डॉ. र. कृ. गर्दे

लिंबाच्या रसाऐवजीं सायट्रिक ॲसिड वापरावें काय?

ज्या ज्या औषधाला लिंबाच्या रसाच्या भावना सांगितल्या आहेत त्या त्या औषधांत सायट्रिक ॲसिड टाकलें तर गुणांत कांहीं फरक होईल काय?

टाकावयास कांहीं हरकत नसल्यास किती रसाबद्दल किती सायट्रिक ॲसिड घालावें? उन्हाळयांत लिंबें मिळत नाहींत त्या दिवसांत औषधें तयार करण्याचा प्रसंग येतो, सबब याविषयीं मत कळवावें.

—एक वाचक

श्री. वाटवे यांचा खुलासा

आयुर्वेद पत्रिकेंतील प्रश्नाला श्री. वाटवे यांनीं सविस्तर खुलासा पाठविला आहे, व तो श्री. कृ. श्री. म्हसकर यांच्या पुरस्कारपत्रासह आला आहे. त्यांत पुढील महत्त्वाचीं विधानें श्री. वाटवे यांनीं केलीं आहेत.

"मी आयुर्वेदाचा अभ्यास घरींच वडील व चुलते यांच्या देखरेखीखालीं वयाच्या ९ व्या वर्षी म्हणजे सन १९०७ पासून तो १९२० पर्यंत केला. मी १९२० सालीं मॅट्रिकची परीक्षा पास झालो व तोंपर्यंत माझें आयुर्वेदाचें शिक्षणहि संपलेलें होतें.

माझ्या पदव्यांच्या अक्षरांतील डी. सी. टी. ही 'डिप्लोमा इन केमिकल टेक्नालॉजी' आद्याक्षरें आहेत.

माझ्या 'संपूर्ण आयुर्वेदसंहितामूलतत्त्वानि' या निबंधाबद्दल अयोध्येच्या संस्कृत कार्यालय संस्थेतर्फे १९४२ सालीं 'विद्याभूषण' ही पदवी मिळाली. ही पीएच.डी.च्या समानार्थक आहे, असें मला सांगण्यांत आलें म्हणून मी विद्याभूषणच्या ऐवजीं पीएच.डी. लिहितो.

मी सन १९५३ च्या जानेवारींत डॉ. म्हसकर यांच्याशीं सहकार्य करण्याची इच्छा दर्शविली व आजपर्यंत हें सहकार्य चालूं आहे.

स्वस्थवृत्त प्रथम खंड बाहेर पडल्यावर अयोध्येच्या वरील संस्थेकडून मला गोवर्धनपीठाच्या शंकराचार्यांच्या सहीनें 'आयुर्वेदालंकार' ही पदवी देण्यांत आली आहे. व म्हणून ती द्वितीय खंडावर छापली आहे."

[वरील विधानें वाचून वाचकांना योग्य तो बोध होईलच. त्या संबंधीं अधिक लिहिण्याचें कारण नाहीं. अयोध्येचें संस्कृत कार्यालय व तिच्या पदव्या याविषयीं सविस्तर माहिती आम्ही लौकरच प्रसिद्ध करणार आहोत. त्यावेळीं 'विद्याभूषण' 'पीएच. डी.' व 'आयुर्वेदालंकार' या सर्व पदव्यावर प्रकाश पडेल.

वयाच्या नवव्या वर्षापासून आयुर्वेदाचें अध्ययन करणारे लोकच इतर आयुर्विद्या-विशारद-पारंगत-आचार्य यापेक्षां संशोधनकार्यांत अधिक उपयुक्त होतात असें डॉ. म्हसकर व त्यांच्या प्रभावळींतील संशोधक मंडळी यांच्या अनुभवास आलें असलें तर त्यांनीं आयुर्वेदाच्या फॅकल्टीला आपला हा अनुभव निवेदन करावा. म्हणजे आयुर्वेदाच्या संशोधनार्थ भावी अभ्यासक्रम आंखतांना तो उपयोगी पडेल.

— संपादक]

उपयुक्त कोरडी औषधें

दि. १६।१।५५ चें आयुर्वेद पत्रिकेंत श्री. वासुदेव यांनीं १०-२० उपयुक्त कोरडी औषधें संग्रही ठेवण्यासंबंधीं विचारणा केल्यावरून त्यांचीं यादी देत आहे.

१] पित्तावर (अम्लपित्त):- सूतशेखर, प्रवाळपंचामृत, कामदुधा.

अनुपानः- दूध खडीसाखर, मोरावळा पाक.

२] अतिसार, आमातिसारः-आनंदभैरव शंखभस्म.

अनुपानः- पाणी साखर, बेलफळ काढा.

३] प्रदर, प्रमेहः- सुवर्णमाक्षिक, चंद्रप्रभा, प्रदररिपु.

अनुपानः- लोणी खडीसाखर, तांदळाची पेज

४] जीर्णज्वरः- गुळवेलसत्त्व, लघुमालिनीवसंत, सीतोपलादि चूर्ण, आरोग्यवर्धिनी.

अनुपान: - मध, मोरावळापाक.

५] मलेरियाः- महाज्वरांकुश, महासुदर्शनचूर्ण, त्रिभुवनकीर्ति.

अनुपानः- ऊनपाणी साखर, धण्याचा काढा.

६] अग्निमांद्यः- भास्करलवणचूर्ण

अनुपानः- ऊनपाणी, ताक

७] जुलाब, वांतीः- संजिवनीगुटी

अनुपानः- लिंबाचें सरबत, ताक, ऊनपाणी

८] शौचशुद्धिः- सारक चूर्ण, स्वादिष्ट विरेचन चूर्ण अनुपानः- ऊनपाणी रात्रीं

९] खोकलाः- सीतोपलादि चूर्ण, कर्पूरादिवटी लवंगादिवटी. गोळी तोंडांत धरावी

जनावरांचा ढेंढाळ्या रोग

(बुळकांडी, किंवा कॉलरा)

जनावरांचा हा रोग सांसर्गिक असून तो अतिसूक्ष्म जंतूपासून होत असतो. जनावरांस होणाऱ्या इतर रोगांपेक्षां हा फार घातुक आहे. हा रोग फक्त रवंथ करणाऱ्या सर्व जनावरांना होतो. या रोगानें एकाचवेळीं सर्व जनावरें आजारी पडतात हा सांसर्गिक असल्यामुळें एका गुरापासून दुसऱ्यांस अशा रीतीनें पसरत जातो व एका गांवांहून दुसऱ्या गांवीं त्याचा प्रसार होत जातो. हा रोग आपल्या देशांतील कोणत्याना कोणत्या भागांत थोड्या फार प्रमाणानें हमेशा सुरूं असतो.

रोग ओळखण्याचीं लक्षणें व उपचार

प्रथम अवरोध होऊन ताप येतो. नंतर दोन तीन दिवसांत जुलाब सुरूं होतात. जुलाब प्रथम पातळ, नंतर पाण्यासारखे व नंतर रक्त व शेंवयुक्त होतात. शेणाची फार दुर्गंधी येते. जुलाब जोरानें व दिवसांतून पुष्कळ होतात. डोळ्याच्या कडा लाल होऊन चिपडतात. जनावर वैरण खात नाहीं. लवकर अशक्त होते. डोळ्यांतून व नाकांतून चिकटपाणी येतें. हिरड्या लाल होऊन त्यावर बारीक पुरळ येतो व तोंडहि लाल होते. जनावर कधीं कधीं खोकते, काळवंडते, पोट आकसून उभें राहते व सारखे जुलाब होऊन आठ दहा दिवसांत मरतें.

आजारी जनावर चांगल्या जनावरांपासून दूर बांधावें. त्याची चारापाण्याचीं भांडीं निराळी ठेवावीं. तोंड, डोळे, नाक तुरटीच्या पाण्यानें धुवावी. खाण्यास नाचण्याची अगर तांदळाची कांजी द्यावी.

(१) कवठीचा पाला ताकांत वाटून पाजावा (२) बेलफळाचा गीर पाण्यांत उकळून पाजावा. (३) चिंचेचा कोळ व तीन चार बिब्बे पाण्यांत वाटून पाजावेत. वरील सर्व औषधें काळजीपूर्वक केल्यास मुक्या जनावरांना भरपूर फायदा होतो.

—एम्. बी. काटीकर
पशुरोग-चिकित्सक, बार्शी

मिरजेचा यशस्वी दंतयज्ञ

सुप्रसिद्ध दंतवैद्य पां. वि. जायदे आयुर्वेदतीर्थ यांनीं डिसेंबरमध्यें मिरज येथें भरविलेला ४ दिवसांचा दंतयज्ञ अत्यंत यशस्वी झाला. त्यांत ५०० दांत काढण्यांत आले. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या मिरज शाखेचे अध्यक्ष डॉ. अरवटगी व सेक्रेटरी डॉ. करंदीकर, द. सातारा दंतवैद्य संघाचे अध्यक्ष दंतवैद्य कमलाकर शहा, सरकारी रुग्णालयाचे प्रमुख डॉक्टर आमोदकर, डॉ. सौ हिराबाई जोशी, मिरजचे श्रीमंत राजेसाहेब व सौ. राणीसाहेब या सर्वांनीं दंतयज्ञास भेटी दिल्या. व उत्कृष्ट कार्याबद्दल लेखी शिफारसपत्रें देऊन वै. जायदे यांचा गौरव केला आहे.

सुप्रसिद्ध सर्जन डॉ. अरवटगी लिहितातः— वैद्य जायदे यांच्या कुशलतेबद्दल आमची खात्री पटली आहे. या कृतीचें शास्त्रीय स्पष्टीकरण व संशोधन होणें अवश्य आहे. यामुळें शस्त्रकर्मांच्या पद्धतीवर विशेष प्रकाश पडेल. लोकप्रिय सरकार जनतेची अधिक सेवा घडण्यासाठीं वैद्य जायदे यांना साहाय्य करून उत्तेजन दिलें पाहिजे."

दंतवैद्य कमलाकर म्हणतात "दक्षिण सातारा दंतवैद्य संघाच्या बहुतेक सभासदांनीं हा दंतयज्ञ काळजीपूर्वक पाहिला. आमच्या विनंतीनुसार वैद्य जायदे यांनीं आमच्या शंका निरसन होतील इतके विविध प्रयोग दाखविले. वेदना व रक्तस्राव आढळलाच नाहीं.

निधीला मदत पाठवा

'सकाळीं दांत काढलेले रुग्ण, पुनः सायंकाळीं येऊन दुसरे दांत काढा अशी विनंति करत होते.' असें दृश्य डॉ. सौ. जोशी यांनीं पाहिलें.

वै. जायदे अमेरिका प्रवास निधीस देणगी पाठवून जायदे यांचें यश संवर्धित करणें हें आतां आपल्या हातीं आहे. आपल्याकडे कोणी मदत मागण्यास येण्याची वाट न पहातां वैद्यबंधूंनीं आपली देणगी मनिऑर्डर-द्वारा आयुर्वेद पत्रिकेकडे पाठवून द्यावी.

स्वागत गीत

स्वागत सुजनांचें ।
वैद्यवरांचें मानधनांचें ।
तनुमनसंजीवक भिषजांचें ॥ धृ ॥
आयुर्वेदविदांचा नेता ।
शक्ति-स्फूर्ति-उल्हास-प्रणेता ॥
अतुल-बुद्धिगुण-प्रकाश-सविता ।
धन्वन्तरी हें दैवत ज्यांचें ॥ १ ॥
अथांग-विद्या – कला-गुण-निधी ।
जमतिल तेव्हां अमृतसिद्धि ।
परमसुखाची सुवर्णसंधी ।
फुलेल नन्दनवन भाग्याचें ॥ २ ॥

— कवि वैद्यकुमार रायकर, चिपळूण

[मुंबई येथें ता. २८ मे १९५४ रोजीं भरलेल्या विशेषाधिवेशनात गाइलेलें स्वागतगीत]

आचार्यांचा राजीनामा

वैद्य जाधवजी त्रिकमजी आचार्य यांनीं मुंबई येथील पोद्दार मेडिकल कॉलेज [आयुर्वेद] व एम्. ए. पोद्दार हॉस्पिटल यांच्या सल्लागार मंडळाच्या सभासदत्वाचा राजिनामा दिल्यामुळें त्यांच्या जागीं बेळगांवचे वैद्य वामन नरसिंह ग्रामोपाध्ये यांची नेमणूक करण्यांत आली आहे.

या नेमणुकीचा अर्थ

[हा राजीनामा व ही नेमणूक वाचून वाचकांच्या मनांत अनेक विचार येतील. केवळ वार्धक्यामुळें हा राजीनामा दिला, कीं याच्या मागें दुसरी घटना आहे? शिवाय अशा महत्त्वाच्या जागीं नेमणूक करतांना शिक्षणक्षेत्रांत कार्य केलेली प्रभावी व्यक्ति निवडावयास हवी होती. डॉक्टर लागू-गिल्डरांच्या सूचनांना मूक संमति मिळविणें एवढाच या नेमणुकीचा अर्थ दिसतो. आजवर अनेक कमिट्यावर सरकारनें वैद्य ग्रामोपाध्ये यांची नेमणूक गेल्या १०-१५ वर्षांत केली आहे. पण त्यामुळें डॉक्टर-मंडळींना टेकू मिळण्यापलीकडे कोठेंच अधिक कार्य झालें असें दिसून आलेलें नाहीं. --संपादक]

गुरुंची मान्यता

शुद्ध आयुर्वेदाच्या गुरुंनीं व शिक्षणसंस्थांनी सरकारी मान्यता मिळविण्यासाठीं अर्ज करावेत अशी सूचना जाहीर झाली आहे. गतवर्षी १९५४ साली जे गुरु व ज्या संस्था मान्य झाल्या आहेत त्यांनी पुनः अर्ज करावयाचे कीं काय अशी शंका प्रत्येक गुरु व संस्थाचालक यांना उद्भवणें शक्य आहे. एका सरकारमान्य गुरुंनीं ही शंका पत्र पाठवून समितीला विचारली. त्याला पुढील अर्थाचें इंग्रजी उत्तर आलें आहे.

"जर गुरु म्हणून आपणास एकदां मान्यता मिळालेली असेल तर पुनः नवीन अर्ज करण्याची आवश्यकता नाहीं."

राजस्थान प्रां. वैद्य संमेलन

बीकानेर येथें श्रीराजस्थान प्रांतीय वैद्य संमेलनाचे बारावे अधिवेशन ता. २०-२१-२२ फेब्रुवारी रोजीं व्हावयाचें आहे. त्याला जोडून प्रदर्शन भरविण्याची व्यवस्था केली आहे. प्रदर्शनांत आयुर्वेद व स्वास्थ्य संबंधीं प्रसिद्ध होणारी वृत्तपत्रें, मासिकें ठेवण्याची चालकांची योजना आहे. कार्यालयाचा पत्ता:-श्रीस्वामी केवलराम आयुर्वेद सेवा निकेतन, बीकानेर.

याच संमेलनास जोडून नि. भा. आयुर्वेद महासंमेलनाचें जादा अधिवेशन भरवावें व त्यांत पूज्य आचार्य यादवजींचा विशेष सत्कार करावा असा विचार चालू आहे असें कळतें.

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक या संस्थेचीं अत्यंत गुणकारी औषधें दादर (मध्य रेल्वे) येथें
मिळण्याचें एक विक्रीकेंद्र
" गणेश औषधालय "
अब्दुल कादर बिल्डिंग, दुकान नं. १३
इंदमाता सिनेमासमोर, मुंबई १४

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नासिक

(आयुर्वेद पत्रिका पान नंबर ५०३ पासून पुढें चालू)

या परिषदेंत शिव (मुंबई) येथील शुद्ध आयुर्वेद विद्यालयाच्या अध्यापिका श्रीमती लक्ष्मीबाई बोरवणकर आयुर्वेदविशारद यांनीं मात्राशीतीय अध्यायावर विवेचन केलें तें असें:-

अन्नपानरक्षाध्यायानंतर मात्राशीतीय अध्याय सांगितला. कारण अन्नपानाचे विषापासून रक्षण केलें एवढ्यानें स्वास्थ्यसंरक्षण होत नाहीं. स्वास्थ्यासाठीं प्रमाणबद्ध आहाराची अत्यंत गरज आहे. प्रमाणबद्ध आहार नसल्यास निरनिराळे विकार होतीलच, परंतु जीविताचाहि नाश होण्याची शक्यता असते, म्हणून हा मात्राशीतीय अध्याय सांगितला.

कमी खाण्यामुळें वातरोग, ओजोनाश

ज्याला निरोगी रहावयाचें असेल त्यानें आहार अत्यंत प्रमाणबद्ध ठेवावा. कमी जेवल्यानें अनेक प्रकारचे वातविकार, पोषणाच्या अभावीं निर्माण होतील; तर अधिक खाण्यानें विषूचिका-अलसकासारखे भयंकर प्राणहारी रोगहि निर्माण होतील. कमी खाण्यानें बल, वर्ण आणि ओज यांचा नाश होतो, आणि अधिक खाण्यानें, न पचलेल्या अन्नापासून आमापासून विषारें निर्माण होऊन अनेक घोर व्याधी निर्माण होतात.

स्वास्थ्यसंरक्षणांत अग्नीचें महत्व

“ मात्राशी सर्वकालं स्यात् मात्रा ह्यग्नेः प्रवर्तिका । ” नेहमीं प्रमाणशीर खावें. प्रमाण म्हणजे ज्यामुळें भोजनाच्या दुसऱ्या वेळेस चांगली भूक लागेल तें. कॅलरींत अगर औंसांत आयुर्वेदीय प्रमाण सांगितलेलें नाहीं. तर सुखानें पचेल, दोषांची व रसादि धातूंची, साम्यावस्था यत्किंचितहि बिघडणार नाहीं, तेंच प्रमाण योग्य होय. जड द्रव्यें कमी खावीं लागतील, तर हलकीं द्रव्यें पोटभर खाल्लीं तरी चालतील. अर्थात् आहाराचें प्रमाण अग्नीवर अवलंबून आहे.

स्वास्थ्यसंरक्षणात अग्नीचें महत्व फार मोठें आहे. “ अग्निमूलं बलं पुंसाम् । ” शक्तीप्रमाणेंच जिवितहि अग्नीवरच अवलंबून आहे. म्हणून जठराग्नीची विशेष काळजी घ्यावी लागते.

विषूचिका व अलसक

पोटाचे चार भाग कल्पून दोन भाग अन्न, एक भाग पाणी व एक भाग दोषसंचलनासाठीं शिल्लक ठेवावा. अजीर्ण फार झाल्यास विषूचिका होते. यांत सारख्या उलट्या व जुलाब होतात. सर्व अंगभर सुया टोंचल्याप्रमाणें पीडा होते, म्हणून हिला ‘ विषूचिका ’ म्हणतात. दुसरा प्रकार अलसक. यांत अन्न पोटांत जसेंच्या तसेंच पडून राहतें. यांत उलटी अगर जुलाब होत नाहीं. तीनहि दोषांचा अत्यंत प्रकोप झाला व अन्नवाही स्रोतसें जर अत्यंत बिघडलेल्या अशा आमानें रुद्ध झालीं, तर हे दोष कोष्ठ, शाखा, अस्थि व मर्में यांत शिरून सर्व शरीर दांड्यासारखें ताठ करतात. ह्यास दंडकालसक म्हणतात. ही अलसकाची पुढची स्थिति होय.

आमदोषाची अवघड चिकित्सा

हा आमदोष अत्यन्त भयंकर आहे, कारण याची चिकित्सा करणें कठीण. हा आम विषरूप होतो, व त्याचे परिणामहि फार जलद होतात. आमदोषावर उष्ण चिकित्सा, विषरूप झाल्यानें चालत नाहीं, आणि विषाची शीत चिकित्सा आमवर्धनाला कारणीभूत होते, यामुळें ही चिकित्सा अत्यन्त अवघड होय.

यावर वमन देणें हितावह होईल

या विकारांत दोष थोडे असतील तर लंघन देऊन जोडीला पाचन द्यावें. आणि दोष फार असतील तर ते दोष शोधनानें काढून टाकणेंच हिताचें होय. कढत पाण्यांत मीठ, गेळफळ व वेखंड घालून उलटी करवून टाकावी, शरीरांतून घाम काढावा व मलवाताचें अनुलोमन करणारी वर्ति गुदद्वारांत ठेवावी. शेकानन्तर अंग गरम फडक्यानें गुंडाळून ठेवावें. यावेळीं पोटांत औषध देऊं नये. कारण असलेले पदार्थच पचत नाहींत, अशावेळीं नव्या पदार्थांची पोटांत भर करूं नये. जेव्हां पोटांतील दोष व अन्न बाहेर पडून जातील, किंवा पचून जातील, त्यानन्तर शेष दोषांच्या पाचनासाठीं व अग्नि प्रदीप्त करण्यास औषधें द्यावीं.

याप्रमाणें निदानपरिवर्जनानें चिकित्सा करावी, आणि तरीहि बरें वाटलें नाहीं तर मग व्याधी-विपरीत जसें ज्वरघ्न, अतिसारनाशक, अशी योजना करावी. किंवा तदर्थकारी म्हणजे अतिसारावर पाचक किंवा स्तंभक औषध न देतां पोटांतील घाण पुरी बाहेर जाण्यासाठीं प्रथम रेचक द्यावें व नन्तर पाचन व नन्तर स्तंभन औषध द्यावें.

एकदां दोषांची आमावस्था जाऊन ते पक्व झाले व अग्नि प्रदीप्त झाला म्हणजे मग अभ्यंजन, स्नेहपान, बस्ति वगैरे उपाय हितकर होतात.

आमाजीर्ण, विष्टब्धाजीर्ण व विदग्धाजीर्ण असे दोषभेदानें तीन प्रकार पाडले आहेत. आणि रसशेष नांवाचें चवथें अजीर्ण सांगितलें आहे. यांत अन्न पचल्यानें ढेंकर शुद्ध येतो पण अन्नावर वासना नसते. हृदयाचे ठिकाणीं जडत्व, किंचित् वेदनाहि असतात. यावर जेवणापूर्वी झोंपणें व भूक लागल्यावर हलके खाणें हा उपचार करावा.

कोणकोणतें अन्न पचत नाहीं ?

निव्वळ अति खाण्यानेंच अजीर्ण होतें असें नाहीं; तर नको असलेलें, अस्वच्छ, जळकें आणि शुष्क, अतिद्रव असेंहि अन्न खाल्लें असतां पचत नाहीं. शोकांत, क्रोधातहि अन्न पचत नाहीं.

पथ्यकर व अपथ्यकर अन्न मिसळून खाणें यास समशन म्हणतात. खाण्यावर खाणें यास अध्यशन म्हणतात. अवेळीं खाणें, कधीं खूप खाणें व कधीं कमी खाणें यास विषमाशन म्हणतात, हीं सर्व रोगांस कारणीभूत होणारी आहेत.

केव्हां जेवावें:- मलमूत्र शुद्धी चांगली झाली, हृदयाचें ठिकाणीं जडत्व नसलें (वरील रसशेष अजीर्ण नसेल), दोष स्वमार्गी आहेत, (जसें करपट ढेंकर जेवणापूर्वी येणें हें वातानुलोमन नव्हें, घशाशीं आंबट येणें वगैरे). ढेंकर आल्यास स्वच्छ यावा. भूक लागली असतां जेवावें, सर्व इंद्रियें निर्मळ असलीं पाहिजेत· त्यांचें ज्ञानग्रहण सामर्थ्य चांगलें असलें म्हणजे तीं निर्मळ समजावीं. (बोलूं नये डोळे उघडूं नये असें वाटणें हें इंद्रियें निर्मळ नसल्याचें द्योतक होय.) तसेंच शरीराला जाडय असल्यास जेवूं नये.

जेवण हें यज्ञकर्म आहे ही भावना ठेवावी

कसें जेवावें:- एकांतांत जेवावें, हातपाय स्वच्छ धुवून, प्रातःकाळीं स्नान करून, भूक लागल्यावर, सर्वांची काळजी घेऊन, गुराढोरांना खाणें घालून, स्वतःच्या प्रकृतीचा विचार करून, इष्टमित्रांसह, मोठमोठ्यानें वादविवाद किंवा हास्यालाप न करतां, हवें असेल तें, षड्रस, चतुर्विध, मधुरप्राय, स्निग्ध, उष्ण, हलकें व संवयीचें अन्न खावें. जेवतांना जेवणाकडेच संपूर्ण लक्ष द्यावें. उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म। या पवित्र भावनेनें आपला आहार घ्यावा' म्हणजे तो आरोग्याला कारणीभूत होतो.

वैद्यराज वि. म. गोगटे यांनीं ऋतुचर्याध्यायावर विवेचन केलें त्यांतील कांहीं मुद्दे असेः—

(१) निरनिराळ्या ऋतूंत वातादि दोषांचे चयप्रकोप कसे होतात हें समजून घेऊन ते नष्ट व्हावे व तज्जन्य रोग टळावे याकरितां म्हणजे स्वस्थ रहाण्याकरितां ऋतुचर्याध्यायाची, ऋतुचर्येची अत्यंत आवश्यकता आहे.

(२) ऋतुकाल गंगेचे अलीकडे निराळे, व पलीकडे निराळे.

(३) त्रिविध बलापैकीं कालज बल ऋतुचर्याध्यायानें समजतें.

(४) हेमंत-शिशिरांत अग्रबल. वर्षा व ग्रीष्मांत अल्प. वसंत-शरदांत मध्यबल असतें.

(५) हेमंतांत काल हा बलवर्धक व पित्ताच्या शमनाचा असतो. उलट वसंतांत कफप्रकोपकाल व त्याचबरोबर बलक्षीणतेचा काल सुरू होतो त्यामुळें वसंत ऋतूंत त्वरेनें उपचार करावे लागतात.

(६) व्यापन्न व अव्यापन्न ऋतूंचा विचार जनपदध्वंसाचें दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आहे.

हेमन्तऋतुः– (१) बलवान् माणसाचा अग्नि वाढतो. अबलाचा नाहीं.

(२) निसर्गाच्या दृष्टीनेंहि हा काल त्याच्या तारुण्यावस्थेचा, उत्कट बलाचा आहे. युक्तिकृतबलाचा सर्वोत्कृष्ट ऋतुहि हाच आहे.

(३) या ऋतूंत जितकें उत्तम बल निर्माण करतां येईल, तितकें दुसरें कोणत्याहि ऋतूंत नाहीं.

हेमन्ताचा शेवट	ग्रीष्माचा शेवट
(१) बलिनोऽत्राग्निः वर्धते ।	(१) आदानदुर्बले देहे पक्ता भवति दुर्बलः ।
(२) अग्निमूलं बलं पुंसाम् । म्हणून बल अग्र्य	(२) बल अगदीं कमी
(३) रोगी कमी. वैद्यकीय व्यवहार कमी	(३) रोगी जास्त, व्यवहार जास्त.

वसन्तः– या ऋतूंत कफाला त्वरेनें जिंकावें. कारण यापुढें कालानेंहि अग्नि ६ महिने कमी कमी होत जातो. (२) व कफानेंहि अग्नि मन्द होण्यास सुरुवात होते. म्हणून कफाला त्वरेनें जिंकून अग्नीची काळजी घेतली पाहिजे.

पाणी कसें प्यावें, याचीं सूत्रें या ऋतुचर्येंत आहेत.

शृंगवेराम्बु, सारांबु, मध्वंबु, जलदांबु वा । प्रमेही माणसांत अशा जलांचा उपयोग केल्यास त्याचा रोग वाढणार नाहीं. व लवकर बरा होईल.

चरकाचार्यांनीं या ऋतूंत दिनचर्याहि दिली आहे. व रात्रिचर्याहि दिली आहे.

[१] वर्षाऋतूंत सर्व प्रकारचीं शोधनाचिकित्सा आहे. शरद ऋतूंत रक्तस्रुति आहे. म्हणून पित्ताकरितां व पित्ताचा त्रास नसला तरी रक्तस्रुति करून थोडक्यांत दोषहरण करतां येतें.

[२] कोणत्या रसाच्या सेवनानें जीवनांत रस [बल इ.] वाढेल तें ऋतुचर्याध्याय सांगतो. थोडक्यांत सर्व चिकित्सासूत्रें सांगणारा हा अध्याय आहे. नित्यं सर्वरसाभ्यासः । ही गोष्टहि महत्वाची असल्याचें दाखविलें आहे, चिकित्सा जशी रसायनचिकित्सेशिवाय पुरी होत नाहीं, तद्वत् विशिष्ट रस जास्त सेवन करावयाचें असले तरी सर्वरससेवन सोडावयाचे नाहींत. कांही कमी करावयाचे. कांहीं वाढवावयाचे.

(३) स्वस्थवृत्ताच्या सर्व कल्पना ऋतुचर्याध्याय सांगतो.

(४) ऋतुसंधिकालांतील सूत्र महत्त्वाचें आहे. विशेषतः क्रमात् हा शब्द महत्त्वाचा आहे. चा गुण क्रमानें अंगीं आणावे लागतात, व वाईट गुणहि थोडेथोडे सोडावे लागतात. पहिले सोडून दुसरे घेण्य 'जुनें सोडून नवें घेण्याचा हा काळ असतो'. यांत उतावीळपणा उपयोगी नसतो. क्रमशः सर्व गोष्टी करा यांच्या असतात.

(५) वर्षभर आपलें शरीर संस्कारित करीत रहावयाचें असतें. बदलत्या कालाबरोबर आप बदललें पाहिजे, ही कल्पना या अध्यायांत आहे.

(६) रोग झाल्यावर, दोषोत्पत्ति झाल्यावर, काळजी घेण्यापेक्षां तो होण्यापूर्वींचे उपचार अध्यायांत आहेत.

(७) ऋतुसात्म्याचा विचारहि अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रत्येकाला सर्व ऋतु सात्म्य असतात नाहीं. कोणाला विशिष्ट ऋतु सात्म्य नसतो. त्यानें तो ऋतु येण्यापूर्वींच प्रतिबंधक द्रव्याचे, विपरीत द्रव्य संस्कार शरीरावर करावयास पाहिजेत.

(८) ऋतु ठरवावयाचा तो केवळ माघादि महिन्यावरून ठरावयाचा नसून सुश्रुतानें त्या ऋतूचीं जीं वर्णनें दिलीं आहेत, त्यावरून ठरवावयाचा असतो.

(९) भारताच्या निरनिराळ्या प्रदेशांत समकालीन निरनिराळ्या ऋतुचर्येचा अवलंब करा लागेल.

(१०) दोन महाभूतांच्या आधिक्यानें असा हिशेब धरल्यास रससंख्या पुष्कळ म्हणजे पंधरा हो असतां, रस सहाच कां याचें उत्तर वाग्भटोक्त ऋतुचर्येच्या सुरवातीच्या श्लोकांत दिलेलें आढळतें.

(११) संवत्सरात्मक कालचक्रांत पृथ्वीवरील प्राणिमात्रांचा चंद्रसूर्याशीं जसा निकटचा वा दूर संबंध येईल तसा प्राण्यांवरहि बदल घडत जातो. काल हा बदलत जातो. बदलत्या काळाला परिस्थित्यनु आपला बदल करून तोंड देण्याचें सामर्थ्य ज्यांत असतें तोच खरा स्वस्थ.

(१२) उपचारांतील क्रियाकाल टाकला जाऊं नये याकरितां शीतोष्णवृष्ट्यात्मक ऋतूंचाहि त्या काळीं प्रतिकार करून तो उपचार करावयास सांगितला आहे; याचा अर्थ ऋतूचे वाईट परिणाम आपण कांहीं प्रमाणांत टाळतां येतात असा आहे.

(१३) उत्तरायण व दक्षिणायन यांच्या मार्गस्वभावामुळें पृथ्वीवर भिन्न परिणाम घडतात.

(१४) वीर्य दोनच कां याचाहि उलगडा ऋतुचर्याध्यायांत मिळतो.

(१५) विसर्ग काल संपावयास लागला कीं, तुझें चंद्रराया सरें राज्य आतां । प्रतापी महाराज सूर्य येतां । याची जाणीव होऊं लागते.

[१६] विरुद्ध गुणांचा परिपोष होण्याला हीं दोन्ही अयनें उपयोगी आहेत.

(१७) ऋतुचर्याध्यांत काय करावें व काय करूं नये ह्या दोहोंचाहि उल्लेख ठिकठिकाणीं के आहे. ऋतूंचा वाईट परिणाम टाळणें ह्या उद्देशाबरोबरच चांगला उपयोग करून घेणें या दोन्ही गो साधण्यास वरील विधिनिषेध उपयोगी पडतात.

(१८) ऋतुचर्येंत दिनचर्येच्या तत्त्वास बाध येत नाहीं. तपशीलात फरक जरूर करावा लागतो.

(१९) ऋतुचर्या सांगतांना बलाचा श्रेष्ठ काल जो हेमन्त त्याचेपासून सुरुवात केली आहे.

(२०) उपचार केंद्रांपेक्षांहि आरोग्य केंद्रें काढावयास पाहिजेत, ऋतुचर्याध्याय हा एकटा अध्याय चीं केंद्रें चालविण्यास वैचारिक पाया पुरवील.

(२१) ऋतुज रोगकारक चयप्रकोपाचे परिणाम वेळींच नाहींसे करण्याचीं सूत्रें या अध्यायांत गोविलीं आहेत.

(२२) गुणांची अनुकूलता असतांहि दोषांचा प्रकोप न होतां, चयच कां होतो किंवा एखाद्या गुणाची जोड मिळाल्याबरोबर प्रकोप कां होतो आणि स्वयंशांति झालेली कां दिसते, याचें उत्तरहि या अध्यायांत मिळतें. निदान-चिकित्सोपयोगी महत्वाचें हें सूत्र यांत स्पष्ट केलें आहे.

(२३) अन्न तेंच पण निरनिराळ्या प्रकारचे संस्कार करून इष्ट परिणाम कारक करून घेण्याची कल्पना या अध्यायांत सर्वत्र पसरलेली आहे.

(२४) दिनचर्येप्रमाणें रात्रिचर्या व अन्नाप्रमाणेंच विहारांचा विचारहि यांत चांगला मांडला आहे.

[२५] केवळ शरिराचा विचार न करतां बदलत्या परिस्थितीचे मनावर जे हेलकावे होत असतात त्या मनोगुणांच्या परिपोषाचा विचारहि यांत केलेला आहे.

[२६] ऋतूंचा बदल जेथें उत्कटत्वानें होत असेल तेथें यांतील उपचारांचा पूर्णांशानें उपयोग करावा लागेल. तथापि सरासरीच्या आजुबाजूस जर हा बदल होत असेल तेथें ह्यांतील ऋतूंचर्येचा तपशील तंतोतंत पाळावयास पाहिजे असें नाहीं.

[२७] शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, ह्या पांचहि विषयांचा कमीजास्त उपयोग केलेला आपणांस दिसतो. महाभूतांचें व परंपरेनें दोषांचें साम्य टिकविण्यास ह्या विषयांचा उपयोग होतो.

[२८] नित्यं सर्वरसाभ्यासः । हें सूत्र स्वास्थ्याचें दृष्टीनें फार महत्वाचें आहे. तथापि त्या त्या ऋतूंतील गुणांचा फायदा मिळण्यास व त्रास टाळण्यास, तसेंच भावी ऋतूचा विचार आणि पूर्व ऋतूचा विचार करून ते ते रस आधिक्यानें घ्यावयास पाहिजेत.

(२९) ऋतुविपरीत लक्षणें दिसतांच हा ऋतूचा मिथ्यायोग असून तो अत्यंत हानिकारक आहे, कोणत्याच दृष्टीनें पूरक नाहीं, असें समजून त्याचा प्रतिकार सुरूं करावयास पाहिजे. पण कांहीं ठिकाणीं देशस्वभावानुसार असा काल नित्य निर्माण होतो, त्या ठिकाणीं 'रसायनानि स्निग्धानि वृष्ययोगांश्च कालवित् ।' या सूत्रानुसार प्रयोग करावेत.

(३०) कालचक्र वा ऋतुचक्र बदलतें का? सहसा नाहीं. बदललेलें दिसेल त्यावेळीं विशिष्ट कालांत त्या ऋतूंचीं लक्षणें नसतील तर त्या स्वभावाच्या नित्याच्या ऋतूचा तो मिथ्यायोग आहे असें मानलें पाहिजे.

या प्रमाणें विविध रीतीनें या अध्यायाचें महत्त्व विद्यार्थ्यांना सांगतां येईल.

मुंबईला हेमंत ऋतु नाहीं

अध्यक्ष वेणीमाधवशास्त्री म्हणाले:—[१] ऋतु हे देशानुरूपहि असतात. उदाहरणार्थ मुंबईला हेमंत ऋतु नाहींच. हा एक मुद्दा लक्षांत ठेवावा.

[२] हेमंतऋतूंत बलनिर्मिति केलीच पाहिजे. नाहींतर पुढील ६ महिनेपर्यंत शरीर टिकाव धरणार नाहीं हीहि गोष्ट महत्वाची आहे.

कोणत्या कालाचा मिथ्यायोग केव्हां होतो?

[३] ऋतूचा मिथ्यायोग म्हणजे ज्या दिवसांत जीं ऋतुलक्षणें दिसावयास हवींत, तीं दिसलीं नाहींत, तद्विपरित निराळी दिसलीं तर, तर तो त्या लक्षणांनीं होणाऱ्या ऋतूचा मिथ्यायोग आहे. त्या कालांत असावयास पाहिजे त्या ऋतूचा तो मिथ्यायोग नाहीं.

ऋतुचर्येचा पायाभूत नियम मनावर ठसवावा

[४] ऋतुचर्या ज्या एका नियमाच्या पायावर उभी आहे, तो नियम विद्यार्थ्यांच्या मनावर ठसवावयास, ठोकून पक्का करावयास पाहिजे व तो म्हणजे देशकालादिविपरीतगुणोपासनेन च हा होय.

[५] विद्यार्थ्यांना कसे हसत खेळत विनोद करीत महत्त्वाचा मुद्दा सांगत शिकवावें हें अण्णासाहेब गोगटे यांच्या अध्यापनपद्धतीवरून शिकण्यासारखें आहे. अत्यंत सुंदर रीतीनें, आकृतीचा उपयोग करून व अध्याप्य विषयाचा संपूर्ण अभ्यास करून त्यांतील सारसर्वस्व काढणें व विद्यार्थ्यांना बोजा न वाटेल अशा स्वरूपांत सांगणें हें उत्कृष्ट अध्यापकाचे गुण आपणा सर्वांना वैद्यराज अण्णासाहेब गोगटे यांचें अध्यापनांत दिसून आले असतील, ते आपण लक्षांत घ्यावेत.

ता. १६ रोजीं तीन प्रहरीं वैद्यराज वि. म. गोगटे यांनीं नाशिकच्या परिसरांत मिळणाऱ्या ताज्या औषधी वनस्पति परिषदेंत दाखविल्या. काहींच्या गुणधर्मांचा निर्देश केला. व संदिग्ध वनस्पतीबाबत चर्चा केली. जवळ जवळ ६५ वनस्पती दाखविण्यांत आल्या.

(१) बाहावा:- पानें व शेंग दाखविली. आरग्वधादि वर्गांत. व्रणशोधनासाठीं उपयुक्त. फुलें पिवळ्या रंगाचीं व सुगंधी असतात. शेंग पक्व झाल्यावरच स्रंसनार्थ उपयोगी.

(२) स्वर्णक्षीरी:- हेमन्तांतील विरेचनांत हें मूळ आहे. गूळ+एरंडेल+स्वर्णक्षीरीरस एकत्र शिजवून उपदंशासाठीं पोटांत द्यावें. व वर लावावें. एरंडेल व त्याच्या १६ पट या विलायती धोतऱ्याचा रस घेऊन तेल सिद्ध करून वरून लावावयाचें व आंतून उपयोग करावयाचा. उपदंशाच्या कोणत्याहि अवस्थेंतील रोग बरा होतो. असा अनभव सांगण्यांत आला.

(३) उत्कस्यार:- यासच ब्रह्मदण्डी म्हणतात. डांग्या खोकल्यांत याच्या मुळ्यांचा काढा साखर घालून देतात. पाक लेह तयार करतात. शनिवारीं निमंत्रण देऊन रविवारीं मुळी आणून गळ्यांत बांधतात. (वै. वे. बा. जोशी म्हणाले:- या प्रयोगांत आदले दिवशीं या झाडांच्या फांद्यावर लहान लहान दगड ठेवावेंत. व दुसऱ्या दिवशीं ज्याज्या फांद्यानीं दगड फेकून दिले असतील तीं झाडें घ्यावीं.)

(४) टाकळा:- बियांचा काढा करतात. कोवळ्या पानांची भाजी संधिवातघ्न म्हणून देतात.

(५) निर्गुंडी:- स्वेदनकर्मांत पाल्याचा उपयोग करतात. याचें बी रेणुकबीज म्हणून बाजारांत मिळतें. याचें कोवळे अंकुर खावयास दिल्यानें महारोग बरा होतो, असें एका नागपूरकडील साधूचें म्हणणें आहे. बेलाइतर्के महत्व दिला आहे.

(६) एरंडमूळ:- वातशामक म्हणून काढा वापरावा.

(७) मोगली एरंड:- एरंडाहून निराळा, याचें बी विरेचक आहे.

८) भृंगराज:- [काळा] जांभळट झांक असतें.

(९) सदाफल [कपित्थ]:- कवठ. उंदीर चावल्याच्या ठिकाणीं कवठीचा पाला वापरतात.

(१०) बावची:- बी सुकल्यावर काळें, सुगंधी होतें. श्वित्रनाशक म्हणून प्रसिद्ध.

(११) अश्वगंधा:— आस्कंद. ढोरगुंजेचें झाड.

(१२) उंदीरकानी:— आखुपर्णी.

(१३) तगर:— तगर. तगरीचें फूल व झाड प्रसिद्ध आहे.

(१४) नागरमोथा:— यास मेघाचीं सर्व नांवें आहे. लव्हाळयाच्या मुळ्याहि वापरतात.

(१५) जपाः— जास्वन्द. फुलें आपल्या रंगाप्रमाणें असणाऱ्या प्रदरावर उपयोगी. श्वेतावर श्वेत, व रक्तावर रक्त. तेलाला रंग म्हणून पानांचा उपयोग करतात.

(१६) शरपुंखाः- उन्हाळी. मूत्रल आहे. पानें तोडल्यास बाणाकृति तुटतात. मुळ्यांचा काढा प्लीहेसाठीं वापरतात.

(१७) मोहः- मधूक. षट्सर्पीत मधुकाचें बी उगाळून नस्य द्यावें.

(१८) बकाणनिंबः—याच्या शुष्क सालीचा उपयोग कृमींत करतात.

(१९) रुईः- अर्क. मुळीचें चूर्ण शीतपूर्वक ज्वरावर. सूर्याचीं नांवें यांस आहेत. [रुईच्या पानांचें श्वासावर भस्म पुढील पद्धतीनें करावें— परळांत पानांवर मीठ अंथरावें. पुनः पान, पुनः मीठ, ठेवावें. व पुटपाक करावाः- वैद्य जळूकरशास्त्री]

(२०) काकमाची १—पानांची भाजी अति विरेचक झाली. [नगरचा अनुभव]

(२१) अशोकः— लाल फुलें गुच्छ, आंब्याच्या झाडांच्या पानासारखीं पण नागमोडी कडा !

(२२) पारिजातकः— शेफाली. विषमज्वर, मधुमेहनाशक.

(२३) रक्तकांचनः- गंडमाळावर कार्यकारी.

(२४) करवीरः— कण्हेर-४ प्रकारची—विषारी द्रव्य, कफभूयिष्ठ विषारांवर [याची मुळी घोसाळयाच्या रसांत एकांगशोफावर लावण्यास देतात. — वै. वेणीमाधवशास्त्री]

(२५) कुमारीः- कोरफड. २६) बाभूळ

(२७) लहानपानांची दुधीः-डोळयांतील फुलावर रस उपयुक्त.

पोटदुखीवर उत्तम औषध

(२८) जेष्ठमधः—यष्टिमधु + ताम्रभस्म देतांच स्ट्रेचरवर घालून आणलेल्या रुग्णाचें पोट दुखणें तावडतोब थांबलें ! --[वै. वेणीमाधवशास्त्री] २] बृंहण म्हणून अत्युपयुक्त.

(२९) कोरांटीः-सहचर तेल. वातव्याधीवर [राजयक्ष्म्यावर याचें घृत रामबाण आहे.—वै. वेणीमाधवशास्त्री]

(३०) पोपईः- [दंतशूळावर कच्च्या पोपईचा रस स्थानिक उपयोग रामबाण. वै. डेग्वेकरजी]

(३१) उदुंबरः- उंबरांचीं पानें आणून दाट काढा करून त्यांत टांकणखार घालून ठेवावा. तो (उदुंबसार) शूलनाशक म्हणून अत्युपयुक्त.

(३२) पुदिनाः- अग्निदीपक.

(३३) पांगाराः- द्राक्षाचे वेल चढविण्याकरितां लावतात. पायांतील कुरुपांवर पाला वाटून लावावा. ४।५ दिवसांत बरें होतात.

[३४] वावडिंगः-त्र्यंबकेश्वर जंगलात फार आहे.

[३५] तुंवरुः- रंगासाठीं पोतीच्या पोती परदेशी जातात. [३६] धायटीः- आसवासाठीं फुलें.

[३७] गोजिह्वाः— गावजवान. भाजी करून रक्तशुद्धीसाठीं.

[३८] केळः— कदलीक्षार. पाणी वापरावें.

[३९] कुईः— पंचांगाचा काढा. मूत्रल आहे.

[४०] ईश्वरी (शिवलिंगी)- गर्भधारणा व वेणा येण्यावर उपयोगी.

[४१] शालिपर्णी, पृश्निपर्णीः— त्र्यंबकेश्वराच्या जंगलांत आहेत. रानगांजा, रानमाळ.

[४१] पुनर्नवाः- पांढरी असल्यास घेटुळी. शोथनाशक, मूत्रल.

[४३] स्नुहः— याचा रस रक्ती मुळव्याधनाशक म्हणून वापरतात.

[४४] बला:—४ प्रकार. पेटारी, चक्रभेंडी, चिकणा, मुद्रा. मुळांचा उपयोग. सहदेवीची [बलाविशेष] भावना आयुर्वेदप्रकाशांत सांगितली आहे. अतिबला सहदेवी झाडें मोठमोठी, ९ पाकळयाची,

महाबला:-पानें फुलें. सर्व बलांचीं फुलें पिवळीं.

नागबला:- पानाचा उपयोग मुडदुसावर होतो. पानें तळून साखरेबरोबर. शेंगा येतात. महाबलेचा उपयोग पारदसंस्कारार्थ आहे.

याशिवाय (४६) बेलमूळ ४७) डाळिंब ४८) कांगोणी (मकोयी) एकाच ठिकाणीं सुमारें १००-१०० ज्योति दिसतात, म्हणून ज्योतिष्मति म्हणत असावेत. ४९) द्राक्ष ५०) वज्रमुष्टी अगर रानसुरण अपानाचें कार्यांस उत्तेजक.

(५१) चन्दनः- [पांढरा-गांवठी,] व रक्तचन्दन निराळा.

(५२) गुळवेल, ५३) अडुळसा-फुलें सिंहाच्या मुखासारखीं.

(५४) अपामार्गः— २ प्रकारचा. श्वेत व तांबडा, अशीच दिसणारी पण लव असलेली वनस्पति 'काकजंघा',

(५५) रोहिसगवत. (५६) उपळसरी [सारिवा] अनन्तमूळ.

(५७) शतावरीः — [दिवसमावळा]

(५८) हिंगणबेटः — मूळ, कफज्वरावर विरेचक

(५९) कोळिस्ताः- तालीमखाना. कोकिलाक्षक. वातरक्तावर याचा काढा अग्रगण्य. काटे असतात. पण पौष्टिक आहे.

(६०) सुइकोहळा:— २ प्रकार, लांबट व गोल.

(६१) घासपापडा:— पित्तपापडा म्हणून त्याच गुणांकरितां वापरला जातो.

(६२) दूर्वा (६३) बोर

इ, वनस्पतींचे नमुने टिकाऊ तयार करावयास हवेत. यासाठीं ओलीं पानें ब्लॉटिंगपेपरमध्यें खल वरून दडपून ठेवावीं. थोडें सैल दडपण असावें.

वैद्य वेणीमाधव म्हणाले:-जलवेतसास तांबडा दांडा येतो. हा पाण्यांत असतो. कण्हेरीच्या पानासार पानें, रेषा तांबडसर, पानाचा शेवट पसरट होऊन शेंड्याला वळसा घालून निघतो, तुरा येतो, त्याला पांढ फळें येतात. पदेशास्त्रीजींच्या पुस्तकाप्रमाणें भांगेचें पांढरें बी असतें तशीं फळें येतात.

येवतेश्वराच्या डोंगरांत पांढऱ्या धोत्र्याचें मोठें झाड पहावयास मिळालें व त्यांस अतिशय मो फूल होतें.

(अपूर्ण)

उदर व मधुमेहसंशोधन

संशोधन बोर्डाची मान्यता

सुरत येथील आयुर्वेद महाविद्यालयाच्या रुग्णालयांत उदर व मधुरप्रमेह या दोन रोगाच्या चिकित्सेचें संशोधन करण्यांत येणार आहे. डॉ. म्हसकराच्या संशोधन बोर्डानें त्यास मान्यता दिली आहे. अर्थात् त्यासाठीं बोर्डाकडून द्रव्यसाहाय्य मिळणार आहे.

मधुमेहावर अन्य औषधाप्रमाणेंच तेलि असाणा (विजयसार) यांचाहि प्रयोग तेथें होण्या शक्यता आहे. पांढरा असाणा, लाल असाणा, तेलिया असाणा असे अनेक भेद असाण्याचे आहे मधुमेहांत तेलिया असाणाच उपयोगी पडतो. इत प्रकारांचा तितकाचा उपयोग होत नाहीं अ आमचा अनुभव आहे.

म. प्रां. वैद्य संमेलनाचें अध्यक्षपद

आलेल्या कांहीं सूचना

भुसावळ येथें होणाऱ्या महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाचे अध्यक्षांची निवडणूक लौकरच होणार आहे. १९५४ डिसेंबर अखेर पर्यंत प्रांतीय मंडळाची वार्षिक एक रुपया वर्गणी देऊन सभासद झालेल्या सर्वांहि वैद्यांना या निवडणुकींत मत देण्याचा अधिकार आहे. पहिल्या निवडणुकीनंतर क्रमशः मताधिक्यानें येणाऱ्या पहिल्या तीन क्रमांकाच्या व्यक्तींकडून आपसांत समजुतीनें एक व्यक्ति अध्यक्षपदीं निवडून देण्यांत येते.

तसें न झाल्यास पुन्हां जी एक निवडणूक होते त्या निवडणुकींत वरील सभासदांशिवाय संमेलनाची स्वागतसभासदवर्गणी देऊन, जे वैद्य स्वागत सभासद झाले असतील त्यांनाहि मतें देतां येतात व त्यानंतर या तीन व्यक्तींतून मताधिक्यानें अध्यक्षांची निवड होत असते.

तरीपण आजपर्यंत दुसऱ्यांदा अशी निवडणूक लढवून चुरशीचा सामना करण्याची पाळीच आली नाहीं. पूर्वीच्या नऊ संमेलनाध्यक्षांची निवड अविरोध अशीच होत आली आहे. या वर्षींहि ती तशीच व्हावी यांतच प्रांतीय मंडळाचें वैशिष्ट्य आहे.

योग्य व्यक्तींच्या नांवांच्या सूचना

हें कांहींहि असलें तरी अध्यक्षपदासाठीं योग्य व्यक्तींचीं नांवें अगोदर पुढें आलेलीं असलीं म्हणजे मग मतदारांना विचारास क्षेत्र मिळूं शकतें. या दृष्टीनें कांहीं नांवें सुचवून ठेवणें इष्ट वाटतें.

आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे, पुणें

पुण्याचे सुप्रसिद्ध वैद्य आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे यांचें नांव या वर्षाच्या प्रांतीय संमेलनाध्यक्षपदासाठीं सुचवितां येण्याजोगें आहे. वस्तुतः वैद्यराज देशपांडेशास्त्री यांना हा मान पूर्वींच मिळावयास हवा होता. कै० प्राणाचार्य पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर यांचे श्री. देशपांडेशास्त्री हे आवडते शिष्य होत. उत्तम वक्ते, उत्कृष्ट लेखक, प्रथितयश चिकित्सक व शुद्ध आयुर्वेद परम्परेचे कट्टे पुरस्कर्ते, शास्त्रीय वादविवादांत प्रतिपक्षाशीं संधायसंभाषा, प्रगृह्यसंभाषा, विगृह्यसंभाषादि पद्धतींचा कुशलतेनें उपयोग करणारे असे श्री. वै. पांडुरंगशास्त्री देशपांडे हे चतुरस्र कुशल वैद्य आहेत.

संस्कृत भाषेवरील प्रभुत्व

पनवेल वैद्य संमेलन प्रसंगीं गायनशास्त्राचाहि सखोल अभ्यास करून रोगचिकित्सेंत गायनशास्त्राचेंहि महत्व कसें आहे हें सप्रयोग प्रात्यक्षिक शास्त्रीबुवांनीं दिलेलें अजूनहि कुणाच्या स्मरणांतून गेलें असेलसें वाटत नाहीं. संस्कृतभाषेवरील श्री. देशपांडेशास्त्री यांचें प्रभुत्व वाखाणण्याजोगें आहे. प्रचलित बहुतेक सर्वहि वैद्यकीय नियतकालिकांतून शास्त्रीबुवांनीं आपल्या शास्त्रीय सोपपत्तिक लेखांचे द्वारें स्वतःचा परिचय करून दिलाच आहे.

कुशल संघटनाकार

" दोषक्षयेणापि रोगसंभवः भवति " हा वैद्य बागेवाडीकरशास्त्रीबुवांनीं उपस्थित केलेला शास्त्रीय वाद वै. पांडुरंगशास्त्री देशपांडे यांनीं केलेल्या उत्तरपक्षीय प्रतिपादनद्वारें सुप्त वैद्यांच्याहि विचारास चालना देणारा ठरला आहे हें कुणीहि कबूल

करील. प्रभावी वक्तृत्वामुळें संघटनाकार्यंहि शास्त्रीबुवा यशस्वी करूं शकतील असा विश्वास आहे.

सारांश, आजच्या परिस्थितींत अवश्य अशा सर्व गुणांनीं मंडित असे श्री. आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री दाभाडे हे या वर्षी प्रांतीय संमेलनाच्या अध्यक्षपदासाठीं योग्य आहेत असें आम्हांस वाटतें.

वै. म. भा. वाटवेशास्त्री, बेळगांव

श्री. वै. वाटवेशास्त्री हे प्रसिद्धिपराङ्मुख परंतु विद्वान् व संघटनाकुशल वैद्य आहेत. बेळगांवीं हे आपलें चिकित्साकार्य शुद्ध आयुर्वेदीय पद्धतीनें करीत असतात. शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमास सरकारमान्यता मिळाल्याबरोबर यांनीं बेळगांवीं स्वतः राजमान्य गुरुपद मिळवून ५ विद्यार्थ्यांचा शुद्ध आयुर्वेद शिक्षणवर्ग चालविला आहे, व बेळगांव येथें शुद्ध आयुर्वेद विद्यालय सुरू करण्याचे बाबतींत यांचे प्रयत्न बरेचसे कारणीभूत आहेत.

बेळगांवचें प्रांतीय वैद्य संमेलन

विनम्र भाव आणि 'राखावीं बहुतांचीं अंतरें' या नैसर्गिक स्वभावामुळें बेळगांव येथें वैद्यबंधूंची उत्कृष्ट संघटना यांनीं घडवून आणली असून बेळगांव येथें झालेलें महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन हे श्री. वाटवेशास्त्रीबुवांच्या स्वार्थत्यागपूर्वक परिश्रमाचें प्रतीकच होतें यांत शंका नाहीं. सारांश वै. वाटवेशास्त्री यांचेंहि नांव प्रांतीय संमेलन अध्यक्ष निवडणुकीचे वेळीं मतदान करतांना मतदारांनीं अवश्य दृष्टीपुढें ठेवावें असें कोणासहि वाटेल.

वै. स. ब. कुळकर्णी दुधगांवकर, कोल्हापूर

कोल्हापूर येथें झालेल्या वैद्य संमेलनाचे प्राण म्हणून संमेलनास आलेल्यांना यांची ओळख पटली असेल. कै. प्राणाचार्य बाळशास्त्री लागवणकरांच्या शिष्यपरंपरेंतील वै. दुधगांवकरशास्त्री हे एक वृद्धवैद्य आहेत. उतार वयांतहि यांचा ठिकाणचा कार्योत्साह व प्रभावी व्यक्तिमत्व तरुणासहि लाजवील असा आहे.

हेहि एक प्रसिद्धिपराङ्मुख परन्तु शुद्ध आयुर्वेदाचे कट्टे पुरस्कर्ते व संघटनाकुशल वैद्य आहेत. पुण्याचे वै. भू. गणेशशास्त्री जोशी, व कै. नानलशास्त्री यांचे हे सहाध्यायी असून उत्तम रसवैद्य म्हणून प्रसिद्ध आहेत. म. प्रां. वै. मंडळाला यांचेंहि नेतृत्व लाभलें पाहिजे.

वै. यशवंतराव उर्फ बाबासाहेब गुणे

कोल्हापूरच्या गुणे घराण्यांतील जुन्या पिढींतील हा एक दुवा आज अस्तित्वांत आहे. गुणे घराणें व शुद्ध आयुर्वेद परंपरा हे नातें श्री. बाबासाहेबांनीं अक्षुण्ण ठेवलें आहे. वयोमानपरत्वें शरीरानें थकले असतांहि बाबासाहेबांच्या व्यवसायांतील उत्साह वाखाणण्याजोगा आहे. शाहू आयु. औषधी कारखान्याचें संचालकत्व सध्यां वै. बाबासाहेब गुणे यांचेकडे आहे.

आयुर्वेदाचे निस्सीम वृद्ध सेवक

लौकरच कोल्हापूर येथें शुद्ध आयुर्वेद विद्यालय सुरूं करावें असा श्री. बाबासाहेबांचा विचार आहे असें कळतें. अशा त्या निःसीम आयुर्वेदाच्या वृद्ध सेवकाकडेहि महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ नेतृत्वाचे दृष्टीनें अवलोकन करीत आहे.

२० उपयुक्त वनौषधें

लेखक— [आयुर्वेदरत्न सुंदरराव भा. वैद्य, मुंबई २]

आपल्या ता. १६ जानेवारीच्या अंकांत श्री. वासुदेव यांनीं घरांत वारंवार लागणारीं अशीं कांहीं कोरडीं औषधें संग्रहीं ठेवण्याकरितां विचारलीं आहेत. आम्ही फक्त वनस्पतींचीं औषधें दिलीं आहेत. प्राणिज व खनिज नाहींत. पूर्वी प्रसिद्ध झालेल्या पत्रिकेंत ४० औषधांना जे आंकडे दिले आहेत तेच ह्यांतहि कायम ठेवले आहेत. सर्व औषधें सूक्ष्म पद्धतीनें घ्यावयाचीं आहेत. एक वेळीं एकच औषध घ्यावयाचें व तें वजनी अंदाजें एक मासा घेऊन सुमारें ६० तोळे पाण्यांत वाटून घालावयाचें म्हणजे पिण्याचें औषध तयार झालें. तें थोडेथोडें म्हणजे लहान चमचाभर ५।१० वेळ घ्यावें. पुढें घ्यावयाचें तें असेंच घ्यावें. एक घोंट घेतल्यावर थोडा वेळ मध्यें थांबून पुनः दुसरा घोंट घ्यावा; असें १० वेळ घ्यावें. थोडें घेतलें म्हणजे तें पोटांत न जातां हें थोडें पाणी रक्तवाहिन्या शोषून घेतात व रक्ताबरोबर औषध शरीरभर फिरूं लागतें. औषध टोचल्याप्रमाणें उपयोग होऊन गुण लवकर येतो. पुढील औषधांची चूर्णें करून संग्रहीं ठेवावींत.

औषधांचीं नांवें

४ आवळकाठी	५ आस्कंद	६ इंद्रजव
८ ओवा	१० कांडकिराईत	११ काळेमिरी
१४ गोखरूं	१५ गुळवेल	१९ ज्येष्ठमध
२३ धमासा	२४ धायटीफूल	२५ बडीशोप
२६ बेल	२९ मेथी	३१ लवंग
३४ वावडिंग	३५ वेखंड	३७ सुंठ
३९ दालचिनी		४० तेलिया असाणा

कोणत्या रोगावर कोणतें औषध घ्यावें

अंगावर कांटा ४. अग्निदीपक ११, २९.
अग्निमांद्य २५, ३७. अजीर्ण ८, ११.
अतिसार ६, २५, २६, २९. अंधेरी ४.
अन्नपाचक २५. अपस्मार ३१ अंजन, ३५.
अर्धशिशी ११, ३५, ३७
आवाज साफ १९. आमवात १५. आम्लपित्त ४.
आंकडी ३५. आंव २५, २६, २९, ३१, ३९.
इन्फ्लुएंझा ३९. उन्हाळे (मूत्रकृच्छ) १९.
उरांत जळजळ ८. उलटी ३७.
उष्णता १९. ओकारी २५, ३७.
ओकारी होण्यास ३५ (रनाळे + मीठ + गरम पाणी). कडकी ४. कफघ्न २९.
कळ ३७ चोळणें. कृमी ६, ११, ३१, ३४.
खवर १४. खरका ४.
खरूज कोरडी ४, ५, लेप ३४. खोकला ८, ११.
क्षय खोकला १९, २३, २९ ३१.
तोंडांत धरणें ३७, ३९. गर्भधारण ५.
गर्भिणी अतिसार २४. गर्भिणी ओकारी ३१.
गर्भिण प्रदर १४. गांठ पिकण्यास २३ वर लावणें.
घाम जाण्यास ८, ३७ चोळणें.
जखम भरण्यास ८ भरावा. जंत ८, ११, ३४, ३५.
छाती दुखणें २३, ३७. झोंप येण्यास २३.
ठणका कानांत ३७ पाण्यांत. डोकें दुखणें ३७ चोळणें.
डोकें शांत ४ लेप.
डोळे लाल १९ उगाळून आंत व बाहेर लावणें.
ढांस ३१. ढेकर ३७. तहान तापांत ३१.
ताप ६, ८, १०, ११, १५, २३, २६.
तोंड येणें २३. त्रिदोषशामक १९.
दमा ३१. दाह (लघवीस) ४.
दांतदुखी ८ धरावा, ११ गुळण्या, ३१ तोंडांत धरणें.
दूध पचण्यास ८. दूध येण्यास ५.
धातुवृद्धि ४, १४. नायटे ३४. नारू ५ लेप.
निरोगी रहाण्यास ३४ रोज.
प्रदर ४, ५, १४, १९, २४. पडसें ३९.
परसाकडे थांबण्यास ६, ३९.
परसाकडे साफ होण्यास ४ (मोरावळा रोज खावा).
पित्तशामक ४.

पोटदुखी ६, ११, २९, ३९. पोटफुगी ८, ३९.
पोटशूळ २९, ३९, ३७. प्लीहा २९.
फेफरे ११, अंजन ३५. बुद्धिवर्धक २९.
बेशुद्धि ३५ हुंगविणें जनावरासुद्धां.
मूत्र ८, ११, ३१, ३९. मोंवरी २३ लावणें.
मोंवळ, भ्रम ४, २३. मधुमेह ४०.
मुतणें बिछान्यांत ८.
मुलांस रोग होत नाहीं ३४ रोज देणें.
मूतखडा २३. मूत्रल ३५. मूळव्याध ११ १९.

[illegible]
नेत्रांजन
डोळ्याचे विकारावर [illegible]
कृष्णशास्त्री' बिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

उज्वल कीर्ति

आयुर्वेदीय औषधांची उज्वल कीर्ति बनविलेल्या सिद्ध औषधांच्या गुणावर आहे. औषधें गुण देणारीं असतील तर कीर्ति नेहमीं उज्वल राहील. तरी अशीं गुण देणारीं औषधें, अस्सल ताजी व स्वच्छ घटक औषधी द्रव्यें खरेदी करण्यावर अवलंबून आहे. औषधी द्रव्यासाठीं आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स
पायधुनी, मुंबई नं. ३
फोन नं. (३१८५८) यांचेकडे मागणी करा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचा तयार चूर्णेहि मिळतात.
अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवा.

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं
आयुर्वेदिक व युनानी वनौषधि
तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण !

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आंवळसार, गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (असली), ब्राह्मी, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्टय ! विशेष माहितीसाठीं आमचे साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम-आयुर्वेद

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी
२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

मध्यप्रदेश अ. वैद्य संमेलन

नागपूर येथें ता. २६-२७ फेब्रुआरी रोजीं मध्यप्रदेश अग्रगामी वैद्य संमेलन वैद्यरत्न पं. शिवशर्माजी यांच्या अध्यक्षतेखालीं थाटानें भरणार आहे. सर्व वैद्यबंधूंस उपस्थित राहण्याची विनंति आहे.

शुद्ध आयुर्वेद महाविद्यालय, शीव

विद्यालयीन विद्यार्थ्यांचें पहिलें स्नेहसंमेलन २६ जानेवारी या शुभ दिवशीं श्री. वै. नी. दे. देशपांडे यांचे अध्यक्षतेखालीं पार पडलें.

सकाळीं ९ वाजतां प्रा. द. रा. घारपुरे यांचे हस्तें ध्वजवन्दन व संमेलनाचें उद्घाटन झालें. त्यावेळीं अध्यापक वर्ग व श्रीमान् शेठ रतनचन्द हिराचन्द दोशी हेहि उपस्थित होते. तदनन्तर विद्यार्थ्यांचे १२ वाजेपर्यंत करमणुकीचे कार्यक्रम झाले. दुपारीं १२ ते २ सहभोजनाचा कार्यक्रम करण्यांत आला. त्यावेळीं मुंबई राज्याचे उपमंत्री श्री. डॉ. त्रिं. रा. नरवणे हे उपस्थित होते. भोजनोत्तर उपमंत्री यांचे हस्तें विद्यालयीन क्रीडांगणाचे उद्घाटन झालें.

दुपारीं ४ वाजतां विद्यार्थ्यांची “आधुनिक औषधें व उपकरणी वापरावींत कां?” या विषयावर वैद्य ज. रा. जोशी यांचे अध्यक्षतेखालीं चर्चा झाली.

‘आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार’

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदीय औषधी भांडार
२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

....अनुक्रमणिका....

आयुर्वेद हें भौतिक शास्त्र आहे. ५०७
प्रांतीय वैद्य संमेलन–कांहीं सूचना ५०८
चिकित्सापध्दतींचा त्रिदोषसिद्धांताप्रमाणें समन्वय ५०९
शुद्ध आयुर्वेद विद्यालय प्रवेश ५१५
डिग्वेकरांजींचा दुसरा प्रश्न ५१७
आयुर्वेद में दंतविज्ञान, उसकी विशेषतायें ५२०
स्तनशोथ - विष्टमेह - चिकित्सा ५२१
श्री. वाटवे यांचा खुलासा ५२२
जनावरांचा ढेंढाळ्या रोग ५२३
मिरजेचा यशस्वी दंतयज्ञ ५२३
आचार्यांचा राजीनामा ५२४
आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद (चालू) ५२५
म. प्रां वैद्य संमेलनाचें अध्यक्षपद ५३३
२० उपयुक्त वनौषधें ५३५

सांडू ब्रदर्सचीं

शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.

वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.

पत्रव्यवहाराचा पत्ताः—

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
चेंबूर लि.
फॅक्टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यांत येते कीं, अहमदनगर येथील मे. सिव्हिल जज्जसाहेब ज्यु. डी. यांचे कोर्टांत वादी **विठ्ठल रामचंद्र जोशी** यांनीं दाखल केलेल्या रे. मु. नं. ४१९।१९५४ मध्यें प्रतिवादी **' दि नगर फॉर्मास्युटिकल वर्क्स लि. अहमदनगर '** याचा मे. कोर्टाच्या हुकुमानें अव्वल जप्तीनें जप्त केलेल्या मालाची जाहीर लिलावानें विक्री करण्यासाठीं कमिशनर म्हणून माझी नेमणूक झाली आहे.

सदर जाहीर लिलावामध्यें फॉर्मसीतील **मौल्यवान् औषधें, रसायनें, भस्में, अरिष्टें व कच्चा माल, तसेंच औषधें तयार करण्याचीं उपकरणें,** रिकाम्या बाटल्या व फर्निचर विकणें आहे. वरील मालाचा जाहीर लिलांव **रविवार ता. २०-२-१९५५ रोजीं दुपारीं ३ वाजतां** कॉटन मार्केटसमोर सदर फॉर्मसीच्या जागेत होणार आहे.

तरी ज्या कोणास जाहीर लिलावामध्यें माल घेणें असेल त्यांनीं वरील ठिकाणीं दुपारीं ३ वाजतां हजर रहावें.

पत्ता:—
कॉटन मार्केटसमोर
स्टेशनरोड, अहमदनगर

रा. कृ. रत्नाकर
एलएल्. बी., वकील
कमिशनर

उन्हाळ्यांत कोणते शक्ति-स्फूर्तिवर्धक द्यावें ?

च्यवनप्राश, सुवर्णमालिनीवसंत हीं पौष्टिकें उन्हाळ्यांत सोसत नाहींत, म्हणून लोक प्रवाळभस्म (चंद्रपुटी), गुलकंद, मौक्तिकभस्म इ. घेतात; पण त्याहिपेक्षां गुणकारी असा उन्हाळ्यांत घेण्य जोगा अवलेह आयुर्वेद सेवा संघानें तयार केला आहे. त्याचें नाव

अश्विनीप्राश [ज्यांना अवलेह पसंत नसेल त्यांनीं दुधांतून कूष्मांडशर्करा द्यावी]

उन्हाळ्यांत उन्हामुळें माणसाचें बल कमी कमी होत जातें. व दुर्बलतेनें अनेक विकार उद्भवतात. ते विकार होऊ नयेत व बल टिकावें यासाठीं रोज सकाळीं अगर रात्रीं १ तोळा अश्विनीप्राश घ्यावा, व वर थोडें दूध घ्यावें, हें हिताचें आहे. क्षयरोग जडू नये यासाठीं अश्विनीप्राश हा रामबाण प्रतिबंधक उपाय आहे. किं. २० तो. २ रु.

आयुर्वेद सेवा संघ औषधी भवन, नासिक

संपादक व प्रकाशकः—वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विवलकर कारंजा, नाशिक
मुद्रकः—श्री चिं. ओक, पर्ल प्रेस, नासिक

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

गुरुकुल पत्रिका

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

वर्ष ८ वें) नासिक, ता. १ मार्च १९५५ (अंक १७ वा

मध्यप्रदेश स्वास्थ्य परिषद, नागपूर

स्वास्थ्यसंवर्धक आसनें व पंचकर्मे यांचे प्रयोग

आयुर्वेदांतील स्वास्थ्यविषयक विभागाला दिवसेंदिवस अधिक महत्व प्राप्त होऊं लागलें आहे ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. नागपूर येथें ता. २६-२७ फेब्रुआरी रोजीं प्रथम मध्यप्रदेश अग्रगामी वैद्य संमेलन भरलें होतें. या परिषदेचें उद्घाटन मध्यप्रदेश सरकारचे मुख्यमंत्री माननीय पं. रविशंकरजी शुक्ल यांनीं केलें. याच संमेलनांत ता. २७ रोजीं सकाळीं स्वास्थ्य परिषदेचें उद्घाटन स्वास्थ्यमंत्री कन्नमवारजी यांच्या हस्तें झालें. या स्वास्थ्य परिषदेंत नागपूर येथील आरोग्यमंदिर संस्थेचे संस्थापक व नाशिकच्या आयुर्वेद संघाचे सदस्य **वैद्य गोविंदरावजी परांडे** आयुर्वेदतीर्थ यांनीं आपल्या विद्यार्थ्यांसह योग व आयुर्वेदीय पद्धत्यनुसार आसनें, षट्क्रिया, पंचकर्मे इत्यादींची सप्रयोग माहिती दिली. या प्रयोगाचे वेळीं नाशिक येथील **वैद्य वि. म. गोगटे** यांनीं या प्रयोगाचें धावतें समालोचन करून योग व आयुर्वेद यांचा स्वास्थ्यसंवर्धनाचे बाबतींत किती मोठा उपयोग होण्यासारखा आहे याचें प्रत्यंतर आणून दिलें. एकंदर हा कार्यक्रम फारच उद्बोधक असा झाला.



वैद्य गोविंदराव परांडे, नागपूर

आयुर्वेदाच्या कागदी पदव्यांची विक्री !

आयुर्वेदाचार्य

पां. ह. देशपांडे आयुर्वेदीय चिकित्सालय

६३७ शुक्रवार, पुणें. १८।२।५५

स. न. वि. वि.

आपण ताज्या अंकांत वै. वाटवे यांच्या खुलाशानंतर अयोध्येच्या पदव्याबद्दलची माहिती लवकरच प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. पुढील पत्रक आपणास साहाय्यक झाल्यास पाहावें.

॥ जय दुर्गे ॥

अखिल भारतीय राजविद्वन्मान्य अयोध्या श्री संस्कृतकार्यालय, शाखा औरैया, इटावा यू. पी.

प्रतिष्ठापत्रविभाग

श्रीमन् पांडुरंग हरि देशपांडे (हैं हातीं) भारतके अनेकों विद्वानों महाराजाओं और धनिकों-द्वारा संरक्षित सुविख्यात संस्कृत-कार्यालयने अपने २५ वे वार्षिकोत्सवके अवसर पर जो उपाधिवितरणोत्सव किया था उसमें अन्य संभ्रांत लोगों की तरह आपको भी आयुर्वेदरत्न (हातीं) उपाधिसे सम्मानित किया था।

आपका प्रतिष्ठापत्र भेजनेके लिये मेरे पास प्रधान कार्यालय अयोध्यासे आ चुका है, जो कि श्रीमान् ११०८ जगद्गुरु शंकराचार्यमहाराज गोवर्धन-मठ पुरी और संस्कृतम् संपादक महोदयके हस्ताक्षरों और मुद्राओं आदि से सुसज्जित है।

कृपया कार्यालयीन सहायतार्थ सात (हातीं) रुपया भेजकर १ सप्ताह में अपना प्रतिष्ठापत्र मंगाने की कृपा करें। कार्यालयीन संस्कृत भाषा-प्रचारसंबंधी अन्य कार्य भी आपके पास भेजे जाते है। कृपया पत्रोत्तर शीघ्र दें। निवेदक

ता. १।६।५४ [हातीं] श्रीकालीशरण त्रिपाठी

मी पैसे पाठविलें नाहींत हे सांगणें नकोच.

झांशी विश्वविद्यालयाच्या पदव्या

झांशी आयुर्वेद विश्वविद्यालयाकडूनहि ता. १२।११।१९५३ला असेंच पत्र येऊन मला 'आयुर्वेद-वाचस्पति' [Master of Ayurveda) ही पदवी देण्यांत येईल म्हणून कळविलें गेलें. नियमाप्रमाणें शुल्क (?) पाठवा म्हणून कळविलें. मी आहेखर्चें पाठवा म्हणजे येतो म्हणून कळविलें होतें. आजवर उत्तर नाहीं. —पां. ह. देशपांडे

[स्वस्थवृत्त लेखक व डॉ. कृ. श्री. म्हसकरांचे सहकारी श्री. वाटवे (कल्याण), यांच्या 'आयुर्वेदालंकार' पदवीचें स्वरूप काय आहे हें वरील पत्रावरून लक्षांत येईल. कांहीं वर्षांपूर्वी आम्हांसहि अयोध्येहून असेंच पदवीदानासंबंधींचें पत्र आलें होतें. त्याला आम्ही कचऱ्याची टोपली दाखविली.

आयुर्वेदाच्या खऱ्या पदव्या कोणत्या व कागदी बाजारी पदव्या कोणत्या याची कांहींही माहिती नसलेलीं अतिवृद्ध माणसें आयुर्वेदाच्या भविष्याची घडण करणाऱ्या फॅकल्टी, बोर्ड, रीसर्च बोर्ड, इत्यादि संस्थावर सरकार कां नेमते व त्यांची अकार्यक्षमता लक्षांत घेऊनहि सरकारचा म्हणजेच जनतेचा पैसा व्यर्थ कां नासतें कळत नाहीं !

आयुर्वेद संशोधन परिषद

[कार्यालय पत्ताः-- वैद्य वामनराव दीननाथ ४५ आत्माराम स्ट्रीट मुंबई २]

या परिषदेतर्फे पूर्वी पुढील ६ विषयावर निबंध मागविले आहेत. (१) वनस्पति (२) रोग (३) आयुर्वेद सिद्धांत (४) मानवशरीर और पार्थिव द्रव्य (५) रस रसायन (६) आयुर्वेद इतिहास.

निबंध पाठविण्याची मुदत २५ फेब्रुवारी ऐवजीं २५ मार्च पर्यंत वाढविण्यांत आली आहे.

'शल्य-शालाक्य' हा एक निबंधाचा विषय वाढविण्यांत आला आहे.

आयुर्वेद--संशोधनाबाबत

वैद्य डेग्वेकर--डॉ. म्हसकर पत्रव्यवहार

जबलपूर दि. ५-२-१९५५

श्री. संपादक आयुर्वेदपत्रिका यांस—

सा. न. वि. वि.

आपलें दि. २९-१२-५५ चें पत्र आल्यानंतरचा माझा व डॉ. म्हसकर यांचा जो पत्रव्यवहार झाला तो सोबत पाठवित आहे.

तसेंच आयुर्वेद पत्रिकेच्या दि. १६-१-५५ च्या अंकांत आपण या संशोधनासंबंधींचें जें माझें मत प्रसिद्ध केलें, त्यासंबंधीं झालेला पत्रव्यवहारहि सोबत पाठवित आहे.

या सर्व पत्रव्यवहाराचा आपणास जो योग्य उपयोग करावयाचा असेल तो करावा. कारण आपल्या दि. २९।१२।५४ च्या पत्रांत 'वैद्यसमाजाला ही माहिती कळणें अवश्य आहे' असें आपण लिहिलें आहे. कळावें लोभ असावा ही विनंति.

आपला

(सही) भि. वि. डेग्वेकर

—×—

आयुर्वेद पत्रिका व आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

जा. क्र. ४८१३ २९-१२-५४

कृ. सा. न. वि. वि.

मुंबई राज्य आयुर्वेद संशोधन बोर्डानें आपणास 'दोष-धातु-मलविज्ञान' या विषयावर ग्रंथ लिहिण्यास सांगितलें होतें, असें मागें प्रसिद्ध झालें आहे. आतां संशोधन बोर्डाकडून आलेल्या अहवालांत आपल्या ग्रंथाचा उल्लेख नाहीं. तरी आपण ग्रंथ लिहिला कीं नाहीं ? नसल्यास कां लिहिला नाहीं तें सविस्तर कळवावें. वैद्यसमाजाला ही माहिती कळणें अवश्य आहे.

(सही) बिंदुमाधव पंडित

सं. 'आयुर्वेद पत्रिका'

श्री

आपल्या क्र. ४८१३ दि. २९।१२।५४ च्या पत्राची नक्कल श्री. डॉ. म्हसकरांना मी ता. ३।१।५५ ला पाठविली, व त्यांत त्याचें उत्तर देण्याची आपली परवानगी असल्यास, मी उत्तर देईन, असें लिहिलें होतें. त्याचें उत्तर त्यांचें दि. ४।१।५५ चें पत्र पुढें दिले आहे.

(सही) भि. वि. डेग्वेकर

—×—

Board of Research inAyurveda

Reg. No. 7/13/400 Bombay 11

Date:– 4-1-1955

Dear Vaidya Degwekar,

I have received your letter dated 3rd January 1955 and I thank you for the same.

I request you kindly to show me the reply you are writing to the authorities of the Ayurveda Seva Sangh Nasik. I shall be much obliged.

Yours Sincerely

(Sd.) K. S. Mhaskar

To,

Vaidya B. V. Degwekar

M. A. M. Sc, L L. B.

Jabalpur

—×—

(डॉ. म्हसकर यांना पाहावयास पाठविलेलें उत्तर)

श्री. संपादक आयुर्वेद पत्रिका, नाशिक यांसी

कृ. सा. न. वि. वि.

आपलें दिनांक २९।१२।५४ क्रमांक ४८१३ चें पत्र पावलें. आयुर्वेद संशोधन बोर्डानें मला 'त्रिदोष-विज्ञान' या विषयावर ग्रंथ लिहिण्यास सांगितलें होतें. परंतु तो लिहिणें सुरूं केल्यानंतर चार-सहा महिन्यांनीं मला तें काम बंद करावें लागलें, त्याचा वृत्तांत असा:—

लेखन-खर्चासाठीं ५० रु. चेक

' बोर्ड ऑफ् रिसर्च इन् आयुर्वेद ' या संस्थेचे चेअरमन श्री. डॉ. म्हसकर यांच्याकडून मला ता. २१ फेब्रुवारी १९५२ चें एक, व ता. १७ ऑगस्ट १९५२ चें दुसरें अशीं दोन छापील पत्रकें आल्यानंतर मी दि. १६।९।५२ ला डॉ. म्हसकरांना कळविलें कीं, त्रिदोष-विषयावर संशोधनात्मक लेखन करण्याची माझी इच्छा आहे. तद्विषयक पत्रव्यवहारांत असें ठरलें कीं, मी एक लेखक नियोजित करावा; व कागद वगैरे खर्च व लेखकाचें ठरलेलें, दर तासाचें एक रुपयाप्रमाणें वेतन, देण्याकरितां दि. १९।११।५२ ला ५० रु. चा चेक डॉ. म्हसकरांकडून आला.

पहिलीं ४० पानें पाठविलीं

दि. २१-२-५२ च्या प्रसिद्धिपत्रकांत 'The book is to be written in English or simple Sanskrit or Hindi' असे शब्द असल्यामुळें मी प्रथम हिंदींतच लिहिण्यास सुरुवात केली. पहिलीं ४० पानें (फूलस्कॅप हाफ् शीट्स्) लिहून तीं दि. ५-१२-५२ ला पसंतीकरितां (फॉर अप्रूव्हल) डॉ. म्हसकरांना पाठविलीं. त्या पत्रांतच लेखनकार्यांत २५ रु. खर्च त्या तारखेपर्यंत झाल्याचेंहि त्यांना कळविलें होतें.

हिंदुस्थानांत न समजणाऱ्या भाषेंत

ता. ९-१-५३ च्या पत्रांत डॉ. म्हसकरांनीं कळविलें कीं, मी लिहिलेलीं ४० पानें पसंत आहेत. परन्तु तीं हिंदींतच असल्यामुळें हिंदुस्थानांतील बऱ्याच लोकांना न समजण्यासारख्या भाषेंत आहेत म्हणून विशेष उपयोगी ठरणार नाहींत, सबब संस्कृत किंवा इंग्रजींत लिहावींत. आणि त्याकरितां 'नमुना म्हणून 'पदार्थ-विज्ञान' ग्रंथाचा छापला जात असलेला एक फॉर्म त्यांनीं पाठविला.

१०० पानें लिहून झालीं

या तारखेपर्यंत माझीं हिंदींतच १०० फूलस्कॅप पानें लिहून झालीं होतीं. सबब ता. १४।१।५३ ला मीं उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रांत कळविलें कीं, 'पदार्थविज्ञान' आणि 'त्रिदोष' हे दोन्ही विषय एकाच पद्धतीनें लिहिलें जाणें शक्य नाहींत. 'पदार्थविज्ञान' विषयांत सांख्य, वैशेषिक, न्याय इ० ग्रंथांतील आयुर्वेदविषयक पोषक जो भाग असेल तो संकलित करून एका विशेष व्यवस्थेनुसार पुनः लिहिणें (re-arrange) या पलिकडे कांहींच करावयाचें नसतें.

आधार द्यावे लागतील

परन्तु 'त्रिदोष' विषयांत प्रधानतया त्रिदोष हीं कोणतीं शारीर द्रव्यें होत, हें सिद्ध करण्याकरितां अनेक प्राचीन शास्त्रांतील आणि आधुनिक Physics chemistry, physiology या शास्त्रांतील आधार द्यावे लागतील. 'त्यक्तद्रवत्वम्' सारखा एकच पित्ताचा गुण समजून सांगण्याकरितां सबंध एक हाफ् शीट भरेल, इतकें विवरण लिहावें लागेल. आणि आपण तर अलिकडील १५० वर्षांत लिहिल्या गेलेल्या कोणत्याहि ग्रंथाचा आधार नको असा दंडक घातलेला; तेव्हां हा योग जमावा कसा !

आतां इंग्रजी व संस्कृतमध्यें लिहितो

तरीपण आपण सुचविल्याप्रमाणें मी इंग्रजी व संस्कृतमध्यें लिहिण्यास सुरुवात करतो. हिन्दी आतां राष्ट्रभाषा म्हणून मान्य असल्यामुळें हिन्दींतील माझें १०० पानी लिखाण पाठवित आहे, तें पसन्त असल्याचें कळवावें.

लिखाण पसंत पडलें

ता. १७।१।५३ ला ५० रु. चा चेक पुनः आला असे एकंदर १०० रु. लेखन कार्य खर्चाकरितां आले. त्यानंतर ता. २४।१।५३ ला संस्कृतमध्यें लिहिलेलीं २४ पानें पसंतीकरितां पाठविलीं. ता. ९।२।५३ च्या पत्रांत लिखाण पसंत असल्याचें लिहून आलें. ता. २७।२।५३ ला इंग्रजी भाषांतर पाठविलें ता. ५।३।५३ ला तेंहि पसंत असल्याचें कळलें. परंतु प्रत्येक पत्रांत पाश्चात्य वैद्यकाचा [Western medical Science] कोणताहि उतारा नको, हा उल्लेख राहातच होता.

पण कागद परत आले नाहींत

यानंतर माझ्या लिखाणाचे कांहीं कागद परत न आल्यामुळें ते परत करण्याची विनंति मी डॉ. म्हसकरांना केली. त्यावर त्यांचें उत्तर आलें कीं, ते कागद परत गेले आहेत. त्यामुळें मी चिंताक्रांत झालो, आणि परत न झाल्याचें कळविलें. तेव्हां डॉ. म्हसकरांनीं विशेष शोध केला, आणि बराबरी दोन महिन्यांत कागद परत आले. या भानगडींत मार्च ते जून हा काळ गेला.

पैसे परत करावयाचे आहेत

मी पुनश्च लिहिण्यास सुरुवात केली असतांना ता. ३१ जुलै १९५३ ला डॉ. म्हसकरांचें मला एक पत्र आलें. त्यांत त्यांनीं असें कळविलें " कीं, मला त्या तारखेपर्यंत खर्चाकरितां पाठविलेले १०० रु. हे पुस्तक-लिखाण संपल्यानन्तर परत करावयाचे आहेत, ते अनामत (ॲडव्हान्स) म्हणून आहेत. असा ॲडव्हान्स करण्याची सरकारकडून अनुज्ञा नसतांना केवल पुस्तक लवकर लिहिलें जावें म्हणून मी सर्व जबाबदारी स्वतःवर घेऊन ही रक्कम ॲडव्हान्स म्हणून देत आहे.

पुस्तक पुरें न झालें तर

जर दुर्दैवानें पुस्तक पुरें न झालें तर ही रक्कम मला आपल्या खिशांतून पुरी करावी लागेल. मी अशा रकमा दोन व्यक्तीस आगाऊ दिल्या आणि त्या गमावून बसलो आहे. मला हें अवगत आहे कीं, लेखकास अशा रकमा आवश्यक असतात, परन्तु त्याचा अर्थ असा नव्हे कीं, सरकारनें त्यानिमित्त झालेल्या खर्चांची पूर्ति केलीच पाहिजे. हें पत्र लिहिण्याचें कारण इतकेंच कीं, गैरसमज न व्हावा. "

पत्र वाचून चकित झालो

हें पत्र वाचून मी चकितच झालों. आणि असला व्यवहार आजपर्यंत कधीं केला नसल्यामुळें मीं लेखन बन्द केलें. डॉ. म्हसकरांनीं पाठविलेले १०० रु. लेखकाचें वेतन व इतर कागद वगैरेच्या खर्चांत व्यय झाले. ते परत करावे लागणार आहेत असें प्रारंभींच मला कळविलें गेलें असतें तर ते घ्यावे किंवा नाहीं याचा मी तेव्हांच विचार केला असता. परन्तु ते खर्च झाल्यावर परत करावयाचे आहेत, हें कळविणें मला पटलें नाहीं.

त्यांच्याच चुकीचा हा परिणाम

अशा परिस्थितींत ते डॉ. म्हसकरांना आपल्या खिशांतून द्यावे लागले तर तो त्यांच्याच पूर्वी केलेल्या चुकीचा परिणाम आहे असें समजून ते त्यांनीं सोसावे असें मला वाटतें. इतक्यावरहि ही माझी चूक आहे असें कोणी सिद्ध करून दिल्यास ती रक्कम परत करण्याची माझी तयारी आहे.

या पत्राची नक्कल पाठविली

या पत्राची एक प्रत मी डॉ. म्हसकरांना पाठविली आहे. कारण या संबंधींचें आपलें पत्र आल्यावर त्याची एक प्रतिलिपी [Copy] मी डॉ. म्हसकारांना पाठविली होती. त्यावर त्यांनीं आपल्या ता. ४।१।५५ च्या पत्र-क्रमांक ७।१३।४०० च्या पत्रांत, मी जें उत्तर आपणास पाठवीन तें त्यांना दाखवावें असें लिहिलें आहे. सबब याची नक्कल त्यांनाहि पाठवीत आहे. क. लो. अ. ही विनंति.

जबलपूर आपला
दि. २४।१।५५ भि. वि. डेग्वेकर

—×—

निरुपयोगी संशोधन

डॉ. के. एस्. म्हसकर रुईया कॉलेजजवळ
M.A., M.D., D.P.H. मुंबई १९
दिनांक २०।१।१९५५

वैद्य श्री. डेग्वेकर यांस- कृ. सा. न. वि. वि.

आयुर्वेद पत्रिकेच्या ता. १६।१।५५च्या अंकांत पान ४५० वर खालील मजकूर प्रसिद्ध झाला आहे:-

" हें संशोधन नव्हेच "

या संशोधन बोर्डातर्फे चाललेल्या कार्याविषयीं वैद्यराज डेग्वेकर लिहितात:—

" डॉ. म्हसकर पद्धतीचें संशोधन अगदीं निरुपयोगी आहे. "

आपण ह्याविषयीं मला जास्त माहिती द्याल आणि आपला ग्रह असा कसा झाला, हें मला समजावून द्याल तर मी आपला फार उपकृत होईन. म्हणजे आपल्या विचारसरणीप्रमाणें आमच्या संशोधन पद्धतींत सुधारणा करण्याचा मी प्रयत्न करीन.

पुस्तकें संकलनात्मक आहेत

आम्ही नुकताच संशोधन समितीच्या कार्याचा अहवाल प्रसिद्धीसाठीं लिहिला आहे. त्याची प्रत आपणास पाठवीत आहे. त्यावरून आम्हीं लिहित असलेलीं पुस्तकें आपण म्हणतां त्याप्रमाणें संशोधनात्मक नसून संकलनात्मक, विद्यार्थ्यांकरितां शालेय पुस्तक म्हणजे टेक्स्ट-बुक्स म्हणून लिहिविलीं आहेत.

आपण उत्तर पाठवावें अशी आग्रहाची विनंति आहे. क. लो. अ. ही विनंति. आपला

[सही] कृ. श्री. म्हसकर

—×—

हें पत्र मला ता. २०।१।५५ ला मिळालें. लगेंच मी पुढील उत्तर पाठविलें. भि. वि. डे.

जबलपूर

दि. २२।१।५५

श्री. डॉ. म्हसकरसाहेब यांस कृ.सा. न. वि. वि.

आपलें दि. २०।१।५५ चें पत्र मिळालें. तारीख १६।१।५५ च्या 'आयुर्वेद पत्रिकेच्या' अकांत पान ४५० वर खालील मजकूर प्रसिद्ध झाला आहे.

"डॉ. म्हसकर पद्धतीचें संशोधन अगदीं निरुपयोगी आहे. त्याला संशोधन न म्हणतां संकलन म्हटलेलें जास्त योग्य होईल."

आपल्या वर निर्दिष्ट केलेल्या दि. २०।१।५५ च्या पत्रांत प्रथम ओळ लिहिलेली असून दुसरी मात्र वगळली आहे. त्यामुळें गैरसमज होण्याचा संभव आहे.

याविषयीं आपणास कोणती जास्त माहिती पाहिजे तें मला कळवावें म्हणजे मी ती देईन.

ज्याअर्थी आपण स्वतःच लिहितां कीं, 'आम्ही लिहित असलेलीं पुस्तकें, आपण म्हणतां त्याप्रमाणें संशोधनात्मक नसून संकलनात्मक, विद्यार्थ्यांकरितां शालेय पुस्तकें म्हणजे टेक्स्ट-बुक्स म्हणून लिहिलेलीं आहेत, त्या अर्थी मी त्याला संशोधन न म्हणतां संकलन असें जें म्हटलें, तें सिद्ध झाल्याचें ठरतें.

संशोधन म्हणजे संकलन नव्हे

जें संशोधन नव्हेच, संकलन आहे असें आपण कबूल करतां त्याअर्थी संकलनास संशोधन नामकरण देणें आणि ही संस्था 'Board of Research in Ayurveda आहे असें म्हणणें विसंगत आहे.

संकलनात्मक टेक्स्टबुक लिहिणारी संस्था

सध्यांतरी ही संस्था एक 'text book writing committee' आहे असेंच वाटतें. पुढें कांहीं संशोधन झालेलें दिसून आल्यास 'आतां ती संशोधनकार्यांत परिणत झालेली म्हणून तिला 'Board of Research' म्हणूं लागूं.

अजून संस्थेच्या संशोधनाचीं पत्रकें प्रसिद्ध झाल्याचीं माझ्या पाहाण्यांत आलीं नाहींत. पत्रकें प्रसिद्ध झाली असल्यास पाठवावींत, म्हणजे 'आयुर्वेद पत्रिका'कारास मी त्याप्रमाणें कळवीन.

कळावे लो. अ. ही विनंति आपला

भि. वि. डेग्वेकर

—×—

बोर्ड ऑफ रिसर्च इन् आयुर्वेद, मुंबई

चेअरमन

डॉ. के. एस्. म्हसकर एम्. ए. एम्. डी.

ऑ. सेक्रेटरी

डॉ. के. एस्. हकीम, एम्. बी. बी. एस्.

दिनांक २९।१।५५

माझी चूक झाली

वैद्य श्री. डेग्वेकरजी यांस सा. न. वि वि.

आपलें दिनांक २४।१।५५ चें पत्र पाहिलें. आपण लिहिलेला मजकूर बरोबर आहे. आपणास मी पैसे दिले ती माझी चूक झाली, व म्हणून आपण ते पैसे परत करूं नयेत.

मुंबईस अगर पुण्यास आपण ज्यावेळीं याल त्यावेळीं सदरहु ठिकाणीं चालू असलेलीं संशोधनाचीं कामें मी आपणास दाखवीन.

संशोधनाचीं कामें खालीलप्रमाणें होत आहेत.

(१) पुणें येथील 'आयुर्वेद रसशाळेमध्यें कुटजारिष्ट, वासाकासव, कनकासव, इ. अरिष्टें व आसवें यांचें नियंत्रण होत आहे.

(२) पुणें येथील, 'इंडियन ड्रग्ज रिसर्च असोसिएशनमध्यें, प्रवाळ, शंख इ. भस्में यांचें परीक्षण व नियंत्रण (Standardization) होत आहे.

(२) येथील वरळीच्या 'आर. ए. पोदार मेडिकल कॉलेज (आयुर्वेदिक)' मध्यें पारदसंस्कार, क्षार यांचेंहि परीक्षण व नियंत्रण Standardization होत आहे.

आपणाकडून आलेली पत्राची प्रतिलिपी (Copy) सोबत परत करीत आहे. पोहचल्याचें कळवावें. क. लो. अ. ही विनंति. आपला

कृ. श्री. म्हसकर

———

[वर दिलेला वैद्य डेग्वेकर – डॉ. म्हसकर पत्रव्यवहार वाचून वाचकांच्या मनांत विषण्णता निर्माण होईल. त्रिदोषा सारख्या महत्त्वाच्या विषयावर अधिकारी व्यक्तिकडून ग्रंथ निर्माण झाला पाहिजे ही निर्विवाद गोष्ट आहे. व ग्रंथलेखनासाठीं व त्याच्या प्रति तयार करण्यासाठीं कांहीं कारकुनी खर्च आवश्यकच आहे. असें असतां या दोन विचारी व्यक्तींना यांतून मार्ग सुचूं नये व गाडी खर्चासाठीं अडून पडावी हें आयुर्वेदाचें दुर्दैव आहे.

आमच्या माहितीप्रमाणें १९५३ सालच्या प्रारंभीं पुणें येथील आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे यांच्या घरीं असेच लेखकाकरवीं 'स्वस्थवृत्त' या विषयावर आयुर्वेद संशोधन बोर्डासाठीं ग्रंथ लेखन चालू होतें, व बराचसा भाग लिहूनहि झाला होता. असें असतां त्याविषयावरील ग्रंथ त्याच्या नांवावर प्रसिद्ध न होतां, डॉ. म्हसकर व श्री. बाटवे यांच्या नांवावर प्रसिद्ध कसा झाला! आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री व डॉ. म्हसकर यांचा झालेला पत्रव्यवहार वा शब्द–व्यवहार जर वाचकासमोर आला तर हें गूढ उकलू शकेल!

आम्हीं याबाबत श्री. पांडुरंगशास्त्री देशपांडे यांना विनंति केली आहेच. इतर ग्रंथलेखकहि आपापला अनुभव जनताजनार्दनाला निवेदन करतील तर भावी कार्याच्या दृष्टीनें त्यांतून मार्ग सांपडू शकेल.

वस्तुतः जाणत्या वैद्य - डॉक्टर – मंडळीकडून आयुर्वेदाच्या संशोधनकार्याला प्रारंभ व्हावा म्हणून डॉ. म्हसकरांच्या अध्यक्षतेखालीं मुंबई सरकारनें आयुर्वेद संशोधन बोर्ड नियुक्त केलें. पण डॉ. म्हसकर यांना पदवीधर वैद्याखेरीज इतरच मंडळी व डॉक्टरापैकीं स्वतः डॉ. म्हसकर एवढेच लोक या कामीं लायक आढळून आले असें दिसतें. दुसऱ्या तरुण वरांसाठीं वधू संशोधनास वृद्ध पित्यानें निघावें व स्वतांचेंच लग्न उरकून यावें, असांतलाच तर हा प्रकार नाहींना? —संपादक]

सांड
गोल्ड टॅब्लेटस्
क्षयाच्या प्राथमिक अवस्थेवर
अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांड ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई
१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्सः—
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते—मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

केंद्रीय स्वास्थ्य परिषद

अधिवेशन तिसरें, त्रिवेंद्रम्

केंद्रीय स्वास्थ्यपरिषदेचें तिसरें अधिवेशन ता. २१ जानेवारीला त्रिवेंद्रम येथें भरलें होतें. सदर परिषदेचें उद्घाटन करतांना भारताच्या स्वास्थ्य-मंत्रिणी राजकुमारी अमृतकौर यांनीं आपल्या भाषणांत अनेक गोष्टीवर प्रकाशझोत पाडला. त्या म्हणाल्या कीं, “ ग्रामीण भागांत काम करण्यास डॉक्टरांची टंचाई तिव्रतेनें भासत आहे, व ह्याला मुख्य तीन कारणें आहेत. एक कारण असें कीं, डॉक्टराला पगार कमी मिळतो व त्यास राहण्यास स्वच्छ आणि नीटनेटकें घर खेड्यांत मिळत नाहीं. त्याशिवाय खेड्यांतील दवाखान्यांत आवश्यक औषधें आणि शस्त्रसामुग्री पुरीशी नसते. सबब असे ग्रामीण दवाखाने सुसज्ज असणें जरूर आहे.

नानाप्रकारचे भत्ते द्यावेत

दुसरी गोष्ट अशी कीं, पगाराखेरीज त्यांस खाजगी व्यवसायबंदी भत्ता व ग्रामवास भत्ता, आणि राहाण्यास स्वच्छ व चांगलें निवासस्थान मिळालें पाहिज. व तिसरी गोष्ट अशी कीं, त्यास हंगामी नोकर म्हणून न ठेवता राज्य स्वास्थ्यसेवा-सदस्य म्हणून कायम नोकरींत घेण्यांत यावे.

होमिओपॅथीचें शिक्षणकेंद्र काढणार

पुढें आयुर्वेद व युनानी संबंधांत बोलतांना त्या म्हणाल्या कीं, गेल्या वर्षी भरलेल्या बैठकींत आम्हीं आयुर्वेद व युनानी या दोन्हींचा संयुक्त पदवी पाठ्यक्रम (डिग्री कोर्स) पांच वर्षांचा असावा असा शिफारसवजा प्रस्ताव मंजूर केला होता. उमेदवारांची प्रवेश-पात्रता इंटर-सायन्स शिक्षणापर्यंतची ठेवण्यांत आली होती. मद्रास, मुंबई, उत्तरप्रदेश सौराष्ट्र व पतियाळा राज्यांत आयुर्वेद आणि युनानी चिकित्सापद्धतीचे ४।५ वर्षं मुदतीचे स्वतंत्र पाठ्यक्रम ठेवण्यांत आले आहेत. चालू सालीं जामनगर येथें आयुर्वेदाचें स्नातकोत्तर शिक्षाकेंद्र उघडण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. त्याचप्रमाणें होमिपॅथीचें शिक्षणकेंद्रहि स्थापन करण्याचा भारत-सरकारचा मानस आहे.

या कामीं वैद्य उपयुक्त वाटत नाहींत

स्वास्थ्य-मंत्रिणी राजकुमारी अमृतकौर यांच्या वरील विचारधारेवरून असें स्पष्ट दिसतें कीं, ग्रामीण भागांत काम करण्यास डॉक्टरांची उणीव भासत असली, तरी त्याजागीं काम करण्यास त्यांना आयुर्वेदिय वैद्यांची उपयुक्तता वाटत नाहीं. डॉक्टरांना नेमण्याची त्यांची इच्छा तीव्रतेनें दिसत आहे. परन्तु वैद्यांना मात्र कोणतेंहि स्थान देण्याची बिलकुल मनीषा दिसत नाहीं. —आयुर्वेद विज्ञान

* * *

मध्यप्रदेश बोर्डाची पदवी?

“ उमरावतीस जें एक खाजगी आयुर्वेद महाविद्यालय आहे याची परीक्षा बोर्ड घेते. त्याला बी. ए. एम्. एस्. पदवी आहे असें पत्रिकेंत वाचलें. रायपूर येथें असलेल्या सरकारी आयुर्वेद विद्यालयाची परीक्षाहि बोर्डच घेतें; पण येथील विद्यार्थ्यांना कोणती पदवी द्यावी तें अजून जाहिर झालें नाहीं, व अजून एकहि पदवीदानसमारंभ झाला नाहीं.

बोर्डाच्या सदस्यांना मी अशी सूचना दिली होती कीं आयुर्वेदाची पदवी इंग्रजी अक्षरांत नसावी, संस्कृत असावी. ” –वैद्य रा. वि. वाघ, रायपूर

* * *

सेवा संघाचीं सर्व औषधें, तसेंच खालीचीं सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर, गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर, अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाबळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—

देशी सर्वौषधी संग्रहालय

पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

अकोला जि. कुष्ठरोगी परिषद

मंजूर झालेले ठराव

ठराव १– अकोला जिल्ह्यामध्यें महारोग्यांची संख्या मोठ्या प्रमाणांत असूनहि सरकारतर्फे अकोला व आकोट या दोनच ठिकाणीं महारोग्यांच्या औषधाची व्यवस्था सरकारी चिकित्सालयांत करण्यांत येत आहे. ही परिषद सरकारला नम्र विनंति करीत आहे र्गी, जिल्ह्यांत असलेल्या प्रत्येक सरकारी किंवा स्थानिक संस्थांच्या चिकित्सालयामध्यें महारोगी लोकांना औषध मिळेल अशी व्यवस्था करण्यांत यावी.

बाजारगांवीं स्वतंत्र चिकित्सालयें

ठराव २– सार्वजनिक चिकित्सालयामध्यें औषधाकरितां आपण गेल्यास, लोकांना आपणास महारोग झालेला आहे याची जाणीव होईल, व त्यामुळें आपण समाजाच्या तिरस्कारास पात्र होऊं, या भीतीनें आरंभींचे महारोगी तेथें औषधोपचार करून घेण्यास येत नाहीत; म्हणून सरकार किंवा स्थानिक संस्थांनीं महारोग-निर्मूलनाचे दृष्टीनें स्वतंत्र अशीं चिकित्सालयें प्रत्येक तालुक्यांत बाजार असलेल्या ५।१० ठिकाणीं तरी काढावीत अशी शिफारस सरकार व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकाऱ्यांना ही परिषद करीत आहे.

मुंबई सरकारचें अभिनंदन

ठराव ३– मुंबई राज्यामध्यें प्रत्येक जिल्ह्याकरतां एक कुष्ठ प्रचारक नेमून त्याच्याकडे महारोगी लोकांच्या सुखसोईचें व महारोग-निर्मूलनाचें काम सोपविण्यांत आलें आहे, याबद्दल ही परिषद मुंबईचे आरोग्यमंत्री मा. शांतिलाल शहा यांचें अभिनंदन करते.

स्वामी कुष्ठग्राम, मूर्तिझापूर

ठराव ४– विदर्भ महारोगी सेवा मंडळ, अकोला जिल्ह्यामध्यें मुर्तिजापुर येथें स्वामी कुष्ठग्राम वसविणार आहे हें ऐकून या परिषदेस अतिशय आनंद होत आहे. दानशूर श्री. विठ्ठलराव जमादार यांनीं याकरितां ४०० एकर जमीन दिली, त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करते; व अशाच प्रकारें समाजांतील दानशूर लोक व इतर सरकार यांनीं हें कुष्ठ ग्राम स्वयंपूर्ण करण्याकरतां येथें राहणाऱ्या कुष्ठरोग्यांना सर्व प्रकारें मदत करावी अशी नम्र विनंति आहे.

ठराव ५– अमरावती येथें झालेल्या अखिल भारतीय कुष्ठ परिषदेच्या अधिवेशनांत संमत झालेल्या ठरावांना ही परिषद हार्दिक पाठिंबा देत आहे.

हा खास लहान मुलांचा रोग आहे

ठराव ६– महारोग हा खास लहान मुलांचा रोग आहे. दरवर्षी भारतांत कमीत कमी २० ते २५ हजार मुलें या रोगाला बळी पडत असतात. अशा मुलांच्या बद्दल सहृदयता वाटून जे विद्यार्थी महिना १ पैसा आपल्या प्रेमाचे व स्नेहाचे द्योतक म्हणून देत आहेत, त्यांचें ही परिषद सकौतुक अभिनंदन करीत आहे.

चार कुष्ठपीडित धर्मपुत्र

ठराव ७– इंग्लंडचे राजा व राणी हे भारतांतील चार कुष्ठ–पीडित बालकांना धर्मपुत्र मानून मदत करीत आहेत. हें ऐकून या परिषदेस कौतुक वाटत आहे. त्याच प्रमाणें आमचे राष्ट्रपति पूज्य डॉ. राजेंद्र–प्रसाद ह्यांनीं विदर्भांतील २ कुष्ठ-रोगी मुलांना धर्मपुत्र म्हणून मानलें व त्यांचे खर्चासाठीं ते मदत करीत आहेत याबद्दल परिषदेस अत्यंत हर्ष होत आहे.

मंडळ कला निकेतन काढणार

ठराव ८– कुष्ठरोगी मनुष्यास आपले पुढील जीवन स्वाभिमानी व स्वावलंबी घालविता यावें म्हणून मध्यप्रदेश सरकार कलानिकेतन काढण्यास विदर्भ महारोगी मंडळास मदत करीत आहे याबद्दल परिषदेस हर्ष होत आहे.

महारोगी-मित्र-संघ

ठराव ९– राष्ट्रहिताच्या व मानवतेच्या दृष्टीनें महारोग निर्मूलन करण्याची जरूरी आतां सर्वत्र लोकांना वाटूं लागली आहे. हें पवित्र कार्य करणाऱ्या लोकांना आपली सहानुभूति व्यक्त करण्याकरतां व या कार्याचा विस्तार व्हावा म्हणून महारोगी-मित्र-संघाचे

जे लोक सभासद झाले आहेत व होत आहेत, त्याबद्दल ही परिषद त्यांचें अभिनंदन करीत आहे.

महारोगनिर्मूलनासाठीं नेमणुकी

ठराव १०– राष्ट्रविकास व विस्तारयोजनेकरतां ग्रामसेवकाची ज्याप्रमाणें सरकारनें नियुक्ति केली आहे. त्याचप्रमाणें महारोग निर्मूलन कार्याकरतांहि सरकारनें महारोग निर्मूलन झालेल्या लोकांना नेमून महारोगाचें निर्मूलन करण्याची महात्मा गांधींची अपुरी राहिलेली इच्छा पूर्ण करावी, अशी सरकारला ही परिषद विनंति करीत आहे.

याबाबत अधिक माहितीसाठीं
पत्रव्यवहाराचा पत्ता:– श्री. शंकरराव देशपांडे
अ. भा. कुष्टरोग परिषद, अमरावती

———

धमनी -- नव्हे वाद

धमनी म्हणजे नव्हे का आर्टरी हा वाद विषय फार जुना आहे. डॉ. घाणेकर [बनारस] ह्यांनीं सुश्रुतशारीरावर जी हिंदी टीका लिहिली आहे, त्यांत त्यांनीं धमनी म्हणजे आर्टरी हें निश्चित सांगितलें आहे. त्याच मताचा हिंदी शिक्षक वैद्यवर्ग पुष्कळच प्रमाणांत आहे.

धमनीचर्चेचे वेळीं हा सर्व पूर्व-उत्तर-पक्ष अध्यापकपरिषदेच्या अहवालांत आला असता तर सर्व अध्यापकांस मार्गदर्शन झालें असतें. परिषदेचा अहवाल पुस्तकरूपानें प्रसिद्ध व्हावा अशी पुष्कळांची इच्छा आहे. —वैद्य रा. वि. वाघ, रायपूर

वाचकांचा पत्रव्यवहार

कानावर लव

तरुण, वय २० वर्षें. दोन्ही कानावर लव आहे. ती दिवसेंदिवस वाढत आहे. ती विचित्र दिसते. त्यावर उपाय सुचवावा.

उदबत्तीनें ती लव जाळून टाकावी असा उपाय एकानें सुचविला आहे. तो बरोबर आहे काय ?

— वाचक

रायपूर येथें व्याख्यानमाला

रायपूर आयुर्वेद विद्यालयांत दर शनिवारीं बाहेरील वैद्य--डॉक्टरादींचीं व्याख्यानें करण्याची प्रथा सुरू केली आहे. वै. डेग्वेकरशास्त्री जबलपूर, व नंदकिशोरशास्त्री झांशी, यांचीं व्याख्यानें झालीं. टी. बी. ब्लडप्रेशर, लेप्रसी, आयुर्वेद भौतिक शास्त्र आहे, या विषयावर डॉ. गोरे, डॉ. बानर्जी, डॉ. राजीनवाले यांनीं व्याख्यानें दिलीं. डॉ. गोरे "त्रिधातूंना पदार्थविज्ञानशास्त्राप्रमाणें मोशन, एनर्जी, इनर्शिया मानतात. दोषवैषम्य म्हणजे रोग न म्हणता धातुवैषम्यास रोग मानतात."

———

अभिप्राय—

जनावरांचे रोग

(पुस्तक लेखक:— डॉ. त्रिं. र. खळदकर
पशुरोग चिकित्सक)

या पुस्तकाचे लेखक हे सेवानिवृत्त यशस्वी पशुरोगचिकित्सक आहेत व पुणें कृषिमहाविद्यालयांत या विषयाचे अध्यापक म्हणून त्यांनीं काम केलें आहे. आपल्या दीर्घकालीन अनुभवाचें सार थोडक्या शब्दांत त्यांनीं या ग्रंथांत मांडलें आहे. सुमारें ५० रोगांची माहिती सुबोध भाषेंत दिली आहे. ५० पृष्ठांच्या या पुस्तकांची किंमत १२ आणे योग्य अशीच आहे. निरनिराळ्या रोगावर पाश्चात्य व देशी उपाय दिले आहेत. शेवटीं वर्गीकृत देशी विदेशी औषधांची परिशिष्टें जोडलीं आहेत लहान वासरांचे रोग स्वतंत्र दिले आहेत. रोगांचें वर्गीकरण चांगलें केलें आहे. जनावरें पाळणाऱ्या लोकांस, पांजरपोळासारख्या संस्थास व खेड्यांतील वैद्य--डॉक्टरांस हें पुस्तक उपयुक्त आहे.

पुस्तकाची छपाई स्वच्छ आहे. खेड्यांतील वैद्यमंडळींची अशा पुस्तकास मागणी असते म्हणून वैद्यक ग्रंथ भांडारांत हें पुस्तक मिळण्याची व्यवस्था केली आहे.

———

पंतप्रधान नेहरूजींच्या
आरोग्याचें व दीर्घायुष्याचें रहस्य

दिल्लीच्या सरकारी भवनांत राहणारे आमचे पंतप्रधान सकाळीं बरोबर ५ वाजतां अंथरूण सोडतात, व न चुकतां प्रातःकाळीं दाढी करतात. प्रातःकर्में आटोपलीं कीं घरींच कामाला लागतात. (सकाळीं कांहींहि खातपीत नाहींत.) वर्तमानपत्रें व टपाल पाहून झालें कीं ९ वाजतां नाश्ता (थोडें खानपान) करतात. त्यावेळीं कोणीतरी मेहमान, निदान मुलगी, नातू, तरी असतात.

कामाचा झटपट निकाल

९॥ वाजतां ते बाहेर पडतात. व सरकारी कार्यालयांत (सेक्रेटरीएट) जातात. कामाचा झटपट निकाल लावण्यांत ते कुशल आहेत. रोजचें काम त्याच दिवशीं पुरें करण्याचा त्यांचा आग्रह असतो. नजरेखालीं घालण्यासाठीं फाईलींचा ढीग बाजूस ठेवलेला असतो. तो पाहून आपल्या लेखकांना ते उत्तराच्या सूचना देतात. त्यांना ४।४ स्टेनोग्राफर पुरत नाहींत, इतकें काम चालू असतें.

जेवणाच्या वेळीं पण त्यांना आराम नसतो. त्या वेळींहि गांठीभेटी चालू असतात. दिल्लीस भेटावयास आलेले प्रधानमंत्री, राजे महाराजे, कॉंग्रेसचे पुढारी, पार्लमेंटचे सभासद वगैरे मंडळी यांत असतात. जेवतांनाच या सर्वांचा समाचार ते घेतात.

तिसऱ्या प्रहरीं भोजन

साधारणतः तिसऱ्या प्रहरीं १॥ वाजतां नेहरू भोजन घेतात. (कफप्रकृतीसाठीं योग्य आहार-काल हा आहे). जेवणानंतर आराम करण्याची नेहरूंना संवय नाहीं; पण थोडावेळ ते एकटे बसून चिंतन करतात. व पुनः ऑफिसच्या कामांत (फायली व मुलाखती) गर्क होतात. उशीरा संध्याकाळीं यांतून ते जरा फुरसत मिळवितात.

उशीरा चहापान

नियमाप्रमाणें संध्याकाळीं ६॥ वाजतां ऑफिसचें काम संपतें. त्यानंतर पाहुण्याबरोबर चहा होतो. पाहुणे नसतील तर आवडीचें पुस्तक वाचत चहा पितात. विज्ञान (सायन्स), साहित्य व राजकारण हे त्यांचे आवडीचे विषय. दैनिक जीवनाशीं संबंधित अशीं पुस्तकें मासिकें पण ते वाचतात.

रात्रींच्या पिछाडीला भोजन

रात्रीं ९ चा ठोका पडला कीं मग त्यांची जेवणाची वेळ होते. त्यावेळींहि पाहुणे असतातच, जेवतां जेवतां चर्चा होते, ती पुष्कळ वेळ चालते.

हें सर्व देशासाठीं, प्रजेसाठीं झालें. जेव्हां पाहुणे परततात, तेव्हां पं. नेहरू स्वतःच्या खोलींत जातात. तेथें मंत्र्यांनीं पाठविलेले महत्वाचे कागद व वर्तमानपत्रांचीं कात्रणें पहाण्याचें काम चालतें. इतरहि लक्षांत घेण्याच्या गोष्टी यावेळीं पहाण्यांत येतात.

राजधानींत असतात त्या वेळची ही दिनचर्या आहे. प्रवासांतहि या कार्यक्रमांत फारसा फेर-बदल होत नाहीं.

लहान मुलांचे समूह पाहिले कीं नेहरू आपले भान विसरतात, व बालक बनतात. मुलांत ते मनमोकळे हासतात. नातवंडे त्यांच्या खांद्यावर पाठीवर घोडा घोडा करतात. मुलांना फुलासारखे झेलत ते बागेंत फिरतात.

स्वच्छतेबाबत खास आग्रह

खर्चाळू वागणूक नेहरूंना पसंत नाहीं. त्यांची रहाणी फारच साधी आहे. हातसुताचा कपडा, पायजमा व अचकन, पायांत सँडल हा त्यांचा पेहराव आहे. मात्र स्वच्छतेबाबत त्यांचा खास आग्रह असतो. या व्यवस्थेंत चुकले कीं ते रागावतात.

गुलाबाची अर्धोन्मीलित कळी त्यांना आवडते. ती कोटाला लावून ठेवण्याची त्यांना संवय आहे.

"आरोग्य-सिंधु" वरून

दिनचर्येतील प्रमुख गोष्टी

नेहरूंच्या या दिनचर्येत प्रामख्यानें पुढील गोष्टी आहेत, असें वाचकांना दिसून येईल.

१ ते कमी झोप घेतात. कफप्रकृतीच्या लोकांनीं कमी झोप घ्यावीं असा आयुर्वेदाचा सिद्धांत आहे.

२ ते पहाटे उठतात.

३ सकाळीं ९ पूर्वीं ते खातपीत नाहींत. [कफ-प्रकृति लोकांनीं सकाळीं लौकर खाऊं पिऊं नये.

४ तिसऱ्या प्रहरीं ते भोजन करतात. [कफप्रकृती-लोकासाठीं योग्य भोजनकाल]

५ दुपारीं भोजनोत्तर झोपत नाहींत (स्निग्धं प्रस्वपनं दिवा ।)

६ सायंकाळीं उशीरा ६॥ वाजतां चहा पितात.

७ रात्रीं उशीरा ९ वाजतां भोजन करतात (पित्त-कालीं भोजन).

८ रात्रीं उशीरा झोपतात. (रात्रौ जागरणं रूक्षं)

९ त्यांना मुलें आवडतात (स्निग्धा एव सदा बालाः)

१० गुलाबाचीं फुलें [कडु, गोड, थंड] आवडतात

११ सतत उद्योग (निःसुखत्वं सुखाय च ।)

पं. नेहरूंना दम्याचा त्रास होऊं नये अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणून त्यांना घेऊन ते लोणावळा येथें आले होते. पं. नेहरूंनीं आपल्या कफपित्तनाशक आहारविहारानीं दम्यासारख्या अनेक रोगांना दूर ठेवलें आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

———

नयनामृतप्राशाचा बरा गुण

डिसेंबरमध्यें आपणाकडून नयनामृतप्राश हें औषध मागविलें होतें त्याचा गुण बरा दिसून आला; म्हणून आणखी ४०।४० तोळ्याचीं दोन पॅकिंग [बाटल्या] पाठविण्याची व्ही. पी. नें कृपा करावी.

—वि. अ. बळसासी, पु

—: मराठी ॲलोपॅथिक औषधी ग्रंथ :—

उपयुक्त ॲलोपॅथिक औषधें	डॉ. प्र. शं. गुप्ते	१॥ रु.
ॲलोपॅथिक औषधीसंग्रह	पं. जगन्नाथशास्त्री	६ "
ॲलोपॅथिक चिकित्सासंग्रह	"	४॥ "
इंजेक्शन–विज्ञान	डॉ. डी. ए. घाटग	६ "
इंजेक्शन चिकित्सा	"	६ "
पाश्चात्य समबाण औषधें	"	२॥ "
रोगविज्ञान भाग १ व २ (एकत्र)	डॉ. वि. म. भट	१२ "

स्टेथॉस्कोपसंबंधी माहिती असलेले ग्रंथ

स्टेथॉस्कोप व छातीची तपासणी (पूर्वार्ध)	डॉ. वा. कृ. जोशी	६ रु.
सचित्र श्रवणपरीक्षा यंत्र	डॉ. डी. ए. घाटगे	२। "

मिळण्याचें ठिकाण :—वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

फुरसेदंशावर उपचार

(लेखकः—वै. ग. म. लोखंडे, नाशिक)

रत्नागिरी जिल्ह्यांत फुरसें हा सर्पांच्या जातीचा अगदीं लहान प्राणी भयंकर विषारी आहे. याचे दंशानें पुष्कळ मृत्यु होतात. मु. नडगिरे, महाल कणकवली, जि. रत्नागिरी येथील एक सुखवस्तु गृहस्थ श्री. श्रीराम नारायण ठाकूर, वय ३० वर्षें, यांना वरील फुरसे जातीच्या सर्पांचा दंश झालेला असतां, त्यावर वनस्पतींचे उपचार करून ते पूर्ण बरे झाले. ही माहिती सांगतांना श्री. ठाकूर म्हणालेः— दिनांक २८-१२-५४ संध्याकाळीं ६-४० वाजतां बाहेरून परत येतांना घराजवळ त्या प्राण्याचा दंश झाला. त्याबरोबर स्थानिक सर्पविषतज्ज्ञ श्री. दिनकर बाळकृष्ण ठाकूर देसाई ह्यांना, व घोंडु महादु राजावकर यांना बोलावून आणण्यांत आलें. त्यांनीं उपचार केला तो असा:—

कुड्याचें पाळ (मूळ) घनसरीचें पाळ (मूळ) फांगळ्याचें पाळ (मूळ)- हीं तीनहि मुळें गोमूत्रांत उगाळून ते सुमारें १ ते १॥ औंस गरगट २४ तासांत २ वेळ प्यावयास दिलें. त्यानंतर २१ दिवस रोज एक वेळ ते दिले.

सदर मुदतींत त्याचा लेप सुजेवर लावण्यांत आला. लवंगी मिरची व सापसंदीचा पाला खाण्यास दिला. त्यानें लघवी व शौचास साफ झालें.

सूज जास्त असल्यास घनसरीचें पाळ उगाळून त्याचा लेप देतात.

वरील अनुभवाचा लाभ खेड्यापाड्यांतून असणाऱ्या वैद्यांनीं अवश्य घ्यावा.

एम्.बी.बी.एस्.(बडोदा) मान्य

बडोदे विद्यापीठाच्या एम्. बी. बी. एस्. व एम्. एस्. पदवीधरांना १९५२ च्या मुंबई वैद्यक व्यवसायीबाबतच्या कायद्याखालीं आपली नोंद करतां येईल असा मुंबई सरकारनें आदेश दिला आहे.

वाचकांचा पत्रव्यवहारः-

हा मिथ्यायोग कोणाचा ?

आयुर्वेद-पत्रिकेच्या १ फेब्रु. १९५५, पान ४९८ या अंकांत "हिवाळ्यांत पाऊस पडला तर त्याचें वर्णन 'हिवाळ्यांत पावसाचा मिथ्यायोग' असें परवांच्या पावसाचें वर्णन करावें लागेल असा खुलासा दिला आहे.

हिवाळ्याचा मिथ्यायोग

तथापि, हिवाळ्यांत पाऊस पडणें याचा अर्थ हिवाळ्याचा मिथ्यायोग होतो असा होय. पावसाचा नव्हे. ज्यावेळीं (उदा. हिवाळ्यांत) ज्या ऋतूचें लक्षण (थंडी) असावयास पाहिजे त्याचवेळीं (हिवाळयांत) त्या ऋतूहून भिन्न लक्षण असणें (थंडीहून भिन्न) म्हणजे त्या ऋतूचाच (हिवाळ्याचा मिथ्यायोग असणें असा स्पष्ट अर्थ आहे. 'मिथ्यायोगः स्वरूपाद्वैपरीत्यम् ।' अ. ह्द. टीका सू. स्था. अ. १/१९) व हाच अर्थ

'मिथ्यायोगस्तु निर्दिष्टो विपरीतस्वलक्षणः ।'

यांतून निघतो. एखाद्या ऋतूचें 'स्व-लक्षणाहून भिन्न तो त्याच ऋतूचा मिथ्यायोग; यावरील अरुणदत्ताचे टीकेवरूनहि हाच अर्थ संभवतो. 'तत्र यथा हेमन्ते शीतस्य अल्पत्वं हीनयोगः, तस्मिन्नेव हेमंते अतिशैत्यं अतियोगः,तस्मिन्नेव हेमंते औष्ण्यं मिथ्यायोगः ।' या तीनहि उदाहरणांत हेमन्ताचे हीन, अति व मिथ्या योग दिले आहेत. तेव्हां शीतकालीं औष्ण्य अगर पाऊस हे दोनही शीतकालाचेच मिथ्यायोगाचे प्रकार होत. —चन्द्रशेखर ग. जोशी, पुणें

म. प्रां. वैद्य संमेलन, भुसावळ

निबंधाची सूचना

'आयुर्वेदाची सद्यःस्थिति' या विषयावर निबंध मागवावेत. या निबंधास १०० रु. बक्षिस ठेवावें. ते निबंध भुसावळ येथें भरणाऱ्या वैद्य संमेलनांत वाचावेत.' अशी सूचना गिरगांव मुंबई येथील वैद्यराज श्री. स. म. पेंडसे, यांनीं पत्र पाठवून केली आहे.

अस्थिभंगावर आयुर्वेदीय बंध-प्रलेप

प्रदण्डास्थि (दण्डाचें हाड) भंग झालेला एक रुग्ण. काण्ड भग्न होतें. मोडलेल्या हाडाचें टोक त्वचेखालीं लागत होतें. शोथ आलेला होता. प्रथम हाडे जुळवून त्यावर

कांडसावरीचा रस	१ भाग
उंबराचा चीक	१ भाग
सालईनिर्यास	१ भाग

गरम करून लेहाप्रमाणें दाट झाल्यावर फडक्यास लेप करून बन्ध बांधला.

आठ दिवसांत पुष्कळ बरें वाटलें

८ दिवसांनीं बंध सोडण्यासाठीं रुग्णास बोलाविलें. प्रतिदिन वेदना व शोथहि कमी होत गेला. ८ दिवसांनीं ‘पुष्कळ बरें वाटतें, म्हणून रोगी सांगत आला. परन्तु हाडाची जुळणी कशी होत आहे हें पाहण्याचा मोह होऊन बंध सोडण्याचा प्रयत्न केला. बंध अगदीं चिटकून बसला होता. ऊनपाणी घालून तो सोडवला. शोथ कमी होऊन हाड पुष्कळसें सांधलेलें दिसलें. परन्तु दाबल्यावर वेदना होत होत्या, म्हणून बंधाची आणखी आवश्यकता आहे असें समजून पुनः बंध बांधण्यांत आला व १५ दिवसांनीं फिरून रुग्णास बोलावलें.

हात भारवहन समर्थ झाला

१५ दिवसानंतर वेदना इ. कमी झाल्या होत्या. पण त्या हातानें वजनें उचलूं शकत नव्हता. म्हणून पुनः बंध बांधून आणखी १५ दिवस ठेवला. या अवधींत भग्न पूर्ण बरें होऊन प्रदण्डास्थि पुनश्च भारवहन समर्थ झाला.

औषधींचे गुणधर्म

[वैद्य वसंतरावजी जाईल यांच्याशीं चर्चा करीत असतांना, त्यांनीं वरील बंध निवेदन केला. वरील बंधासाठीं वापरलेला लेप हा आधुनिक प्लॅस्टरप्रमाणें कार्य करतो. व प्लॅस्टरचे अंगीं नसलेले गुण त्यांत अधिक आहेत. उदुंबराच्या चिकासारखें शोथहर द्रव्य, त्याच्या जोडीला तत्कार्य- वृद्धिकर असा सावरीचा चीक, व याचा पक्का लेप तयार होण्याचे दृष्टीनें साळईच्या डिंकाची योजना, हा योग अतिशय मार्मिक त्रिदोषहर अस्थिसंधानकारी वाटला. क्षीरीवृक्षांचे रस व डिंक हे अस्थिसंधानकारी होतात. सर्वत्र करून पहाण्यासारखा हा प्रयोग वाटल्यावरून वै. वसंतरावजी जाईल, त्र्यंबकेश्वर, यांच्या परवानगीनें पत्रिकेच्या वाचकांसाठीं सादर केला आहे.

—आचार्य श्री. कृ. करमरकर]

एम्. बी. बी. एस्. [बडोदा]

बडोदे विद्यापीठाच्या एम्. बी. बी. एस. व एम्. एस. पदवीधरांना १९५२ च्या मुंबई व्यवसायींबाबतच्या कायद्याखालीं आपली नोंद करतां येईल असा आदेश मुंबई सरकारनें दिला आहे.

●○○● उत्तम धर्म ●○○●

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधेंच वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान—

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

आयुर्वेद औषधीभवनाच्या पथ्यकारक गोळ्या

धात्री-निशा-वटी (धा. नि. वटी)

मधुमेहावर तेलिया असाण्याच्या साराचें पाणी (असनसारांबु) देण्याचा प्रयोग सुरू होऊन १॥ वर्षांचा काल गेला. त्याचा परिणामहि रोग्यांना उत्तम अनुभवास आला. मध्यंतरीं कांहीं रुग्णांना असाण्याचा तितकासा लाभ वाटला नाहीं. याचें कारण त्यावेळीं जो असाणा मिळाला तो लाल रंगाचा होता, पण तेलिया जातीचा नव्हता. त्यांतून लाल पाणी निघे. पण त्याला मोबिल तेलाची निळसर झाक कमी प्रमाणांत होती. त्या असाण्याचा उपयोग तेलिया असाण्यासारखा होत नाहीं असें लक्षांत आल्यामुळें पुनः योग्य प्रकारचा तेलिया असाणा मिळवून तोच वापरण्याची व्यवस्था केली. तेव्हांपासून तेलिया असाण्याच्या गुणाबाबत कोठेंहि तक्रार दिसून आली नाहीं.

मधुमेही लोकांना पथ्यकर गोळ्या

मधुमेही रोग्याची साखर जाणें थांबल्यानंतर पुढें कोणता उपचार नेहमींकरतां चालू ठेवावा असा प्रश्न रोगी विचारतात. असें नेहमीं घेण्यासाठीं वापरावयाचें औषध सौम्य सोपें व सहज घेण्यासारखें परवडणारें असावयास पाहिजे, व ज्याच्या उपयोगानें शरीरांत विकृति उत्पन्न व्हावयास नको.

मूत्रविकारावर हळद (निशा)

प्रमेह-मूत्रविकारावर कार्य करणारी अशी वनस्पति म्हणजे हळद ही आहे. संस्कृतमध्यें हिला निशा म्हणतात. व रात्रींच्या वेळीं लघवीला जास्त वेळ जावें लागणें (निशामेह), अंथरुणांत लघवी होणें इत्यादि विकारांत ती गुणकारी आहे हें सर्वश्रुत आहे. प्रमेहचिकित्सेंत हिचा वापर मोठ्या प्रमाणांत करण्यांत आलेला आहे.

प्रत्येक विकारावर छोटें औषध

वाग्भटाचार्यांनीं अष्टांगहृदय ग्रंथांत शेवटच्या ४० व्या अध्यायांत जीं प्रत्येक विकारावर एक एक अशीं छोटीं औषधें सांगितलीं आहेत, त्यामध्यें प्रमेहावर (मेहेषु धात्रीनिशे ।) अशी आवळकाठी व हळद यांची जोडी सांगितलेली आहे. व ती अनेक दृष्टीनें उपयुक्त अशी आहे. आवळा व हळद हीं नित्य सेवनीय द्रव्यें आहेत. (वाग्भट सूत्र० अध्याय ८ श्लोक ४३ मध्यें आमलकीचें शीलन सुचविलें आहे. कडुद्रव्य तेथें पटोली हें घेतलें आहे.)

आहारांतील द्विरसत्रुटी

आयुर्वेदानें नित्यं सर्वरसाभ्यासः । स्वस्वाधिक्यं ऋतौ ऋतौ । असा नियम आहाराबाबत सांगितलेला आहे. पण प्रत्यक्ष व्यवहार घडतो तो असा कीं, गोड आंबट खारट व तिखट, एवढ्या ४ रसांचेच पदार्थ प्रामुख्यानें भोजनांत येतात, कडु व तुरट हे पदार्थ सेवनांत क्वचितच येतात. व त्यामुळें दोषामध्यें कफ, धातुमध्यें मेद व मलामध्यें मूत्र यांच्यामध्यें विकृति निर्माण होण्याची शक्यता सहज संभवते.

म्हणून त्यांना विकार जडतो

वातपित्त प्रकृति लोकांना चालू भोजनपद्धति तेवढीशी बाधक होत नाहीं. पण कफपित्त प्रकृतीच्या लोकांना व त्यापैकींहि बैठ्या व्यवसायाच्या, व्यापारी कारकून-मास्तर इ. व्यावसायिकांना ही मेदमूत्र विकृति लवकर जडते व मग त्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग धुंडाळावा लागतो.

धात्रीनिशावटी

आयुर्वेद-औषधी भवनानें आहारांतील हि त्रुटी दूर करण्याच्या उद्देशानें वरील धात्रीनिशावटिका बनविल्या आहेत. ५० तोळे आवळकंठी व ५० तोळे हळद यांच्या मिश्रणांत १ तोळा कज्जली मिसळली आहे. या मिश्रणाला आवळकंठी व हळद यांच्या काढ्याच्या ७ भावना दिल्या आहेत व १।१ गुंजेच्या गोळ्या बनविल्या आहेत.

मधुमेही लोकांनीं या गोळ्या वापराव्या

कफ- मेद- मूत्र यापैकीं प्रकृति - विकृति असणाऱ्या व्यक्तींनीं प्रत्येक जेवणामध्यें अगर नंतर पाण्याच्या घोटाबरोबर ही एक गोळी घ्यावी. यामुळें आहारांतील कडु तुरट रसाची उणीव भरून निघेल व फार लघवीस होणें, वारंवार लघवीस जावें लागणें, कोरड पडणें इ. लक्षणें होणार नाहींत. मधुमेही रोग्यांनाहि या वटिका वापरल्यानें फायदाच होईल.

' डायरेक्टर ऑफ आयुर्वेद '

आमदार श्री. म. जोशी यांनीं आपल्या भाषणांत ' डायरेक्टर ऑफ आयुर्वेद ' यांच्या नेमणुकीबाबत असेंब्लींत टीका केली होती, तिला उत्तर देताना आरोग्यमंत्री शांतिलाल शहा म्हणाले:—

या जागेवर या राज्यांतीलच इसम असावा असें म्हणणें बरोबर नाहीं.

नेमलेल्या मनुष्यास प्रादेशिक भाषा आलीच पाहिजे हेंहि म्हणणें बरोबर नाहीं.

नेमलेले गृहस्थ हिंद व संस्कृत जाणणारे आहेत. इंग्रजीहि त्यांना समजतें.

आयुर्वेदाचार्य परीक्षा ते पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले आहेत.

आयुर्वेदावर लिहिलेल्या ' प्रबंधाबद्दल, त्यांना सुवर्णपदक मिळालेलें आहे.

त्यांच्या सर्व गुणांचा व अनुभवांचा विचार करून सरकारनें या जागेसाठीं ते सुयोग्य गृहस्थ आहेत असा निर्णय घेतला, व पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या संमतीनेंच त्यांची नेमणूक केली.

होमिओपॅथीचें सरकारतर्फे शिक्षण

बडोद्याचे आमदार श्री. सुतरिया यांच्या प्रश्नांना उत्तर देतांना आरोग्यमंत्री श्री. शांतिलालजी शहा म्हणाले— १९५१ च्या मुंबई होमिओपॅथिक कायद्याच्या १७ व्या कलमानुसार मुंबई सरकारनें परीक्षक मंडळ (कोर्ट ऑफ एक्झामिनर्स) स्थापन केलें आहे. कायद्याच्या प्रकरण १ मध्यें नमूद केलेल्या परीक्षांचा अभ्यासक्रम निश्चित करण्याचें काम ते परीक्षक मंडळ करीत आहे. अभ्यासक्रम तयार झाल्यावर तो होमिओपॅथिक बोर्डाकडे पाठविला जाईल.

बोर्डाच्या सूचनासह तो अभ्यासक्रम सरकारकडे आला म्हणजे सरकार त्याचा विचार करील.

एफ्. सी. इ. एच् पदवीधरांसाठीं पदव्युत्तर अभ्यासक्रम ठेवण्याबाबत सरकार विचार करीत आहे.

वाचकांचा पत्रव्यवहार

गाईचें तूप

' मी ज्या भागांत आहे येथें गाईचें तूप फक्त भाद्रपद-अश्विन महिन्यांत विपुल असते. या भागांतील कोकणी शेतकरी प्रामाणिक असून तूप निर्भेळ विकतात. यंदा तुपाचा भाव ३॥ रु. [८० तोळे] शेर असा होता. पण गिऱ्हाईक नसते. गाईचें तूप पातळ असते, कणदार नसते, म्हणून व्यापारी भाव पाडूनच घेतात. ' — वा. ग. वैद्य, कोशिंबे

के. फ्लेमिंग कंपनीचें गुणकारी मलम
नारूवरील रामबाण
डबी किंमत १॥ रु. ट. ख. निराळा
लिहा- मे. काणे ब्रदर्स, टिळक चौक, कल्याण

आयुर्वेद सेवा संघ नासिकचीं सर्व औषधें मुंबईत मिळण्याचें आणखी एक नवें केंद्र
रामकृष्ण एजन्सी
आनंदजी लद्धा बिल्डिंग
लालबाग, मुंबई १२
* मागणी रोज वाढत आहे. *

वै. पां. ह. देशपांडे, पुणें

अध्यक्षपदासाठीं यांचें नांव सुचवा

आयुर्वेद पत्रिकेच्या गेल्या अंकात भुसावळ येथें भरावयाच्या म. प्रां. दशम वैद्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठीं ४ नावें सुचविण्यांत आलीं आहेत. ती निरनिराळ्या दृष्टीनें योग्य अशींच आहेत. तथापि सध्यां जे प्रश्न प्रांतीय वैद्यांच्या समोर आहेत त्यांची प्रभावी व योग्य रीतीनें मांडणी जनतेंत व सरकारकडेहि करूं शकेल असा अध्यक्ष आज वैद्यमंडळास हवा आहे.

मुंबई राज्यांतील नव्या घटना

लातूर येथे भरलेल्या नवव्या संमेलनानंतर व मुंबई येथें भरलेल्या विशेष अधिवेशनानंतर मुंबई राज्यात शुद्ध आयुर्वेदासंबंधींच्या बऱ्याच घटना घडून आल्या आहेत व येत आहेत. अशावेळीं १९२० सालापासून आयुर्वेदाच्या अध्ययन-अध्यापनासंबंधीं ज्या चळवळी झाल्या त्यांत प्रत्यक्ष भाग घेतल्यामुळें अनुभव असलेला असाच अध्यक्ष हवा आहे, आणि पुण्याचे वैद्य पांडुरंगशास्त्री देशपांडे हे या प्रकारची योग्य व्यक्ति आहेत असेंच कोणासहि वाटेल.

अध्ययन-अध्यापन

वैद्य पांडुरंगशास्त्री याची मला जी माहिती आहे त्यापैकीं कांहीं थोडी येथें देत आहे. त्यांचा जन्म १९०२ सालीं शिरवळ (जि. पुणें) या खेड्यांत झाला. १९२० सालीं ते मॅट्रिक झाले. १९२४ सालीं आयुर्वेदभिषक्, १९२५ सालीं आयुर्वेदविशारद, व १९२८ सालीं प्रथम श्रेणींत ते आयुर्वेदाचार्य झाले. त्यांनीं संस्कृत वैद्यक ग्रंथांचें उत्तम पाठांतर केलें आहे. उत्कृष्ट वक्ते, व लेखक (५०० पानाइतकें लेखन) असून १९३४ पासून आजवर अध्यापनकार्य चालूं आहे. द्रव्यगुण व रसशास्त्र हा त्यांचा मुख्य विषय आहे. एम्. बी. बी. एस्. एम्. ए., एल्एल्. बी. प्रोफेसर अशा लोकांना आयुर्वेद शिकविण्याचें काम त्यांनीं केलें आहे.

परीक्षक म्हणून अनुभव

परीक्षक म्हणूनहि पुणें वेदशास्त्रोत्तेजक सभा, नि. भारतीय आयुर्वेद विद्यापीठ, व स्टेट फॅकल्टी ऑफ् आयुर्वेद, मुंबई इ. ठिकाणचा अनुभव त्यांना आहे.

इतर विषयांचा व्यासंग

संगीत, धर्मशास्त्र, समाजशास्त्र, न्यायशास्त्र, वेदान्त, इतिहास, इ० विषयांचा त्यांचा व्यासंग आहे. भगवत्गीता १८ अध्याय मुखोद्गत आहेत. शांकरभाष्य व गीतारहस्य यांचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे. स्मृति, पुराणें यांचेंहि परिशीलन केलें आहे.

शुद्ध आयुर्वेदीय चिकित्सा व्यवसाय

चिकित्सा व्यवसाय— एकहि इतर पद्धतीचे औषध न वापरतां निव्वळ आयुर्वेदीय पद्धतीनें निदान चिकित्सा करून गेलीं २५ वर्षें पुणें येथें ते व्यवसाय करीत आहेत. औषधें स्वतः घरीं करून वापरतात. १८-२० आसवें करतात. त्यांनीं आपल्या अनुभविक काढ्यांचीहि कांहीं नवीन आसवें बनविलीं आहेत. त्यांच्या जोडीला चूर्णें, भस्में, रसायनें, गुटिका, अवलेह इ. अनुभवानें स्थिर झालेलीं मिश्रणें ते वापरतात.

प्रांतीय वैद्य मंडळाची धुरा

मुंबईचे सुप्रसिद्ध अप्पाशास्त्री साठे, प्राणाचार्य वासुदेवशास्त्री ऐनापुरे, व प्राणाचार्य हिर्लेकरशास्त्री यांचेजवळ राहून त्यांनीं आयुर्वेदशास्त्राचे गुरुपरंपरा पद्धतीनें अध्ययन केलें आहे. व म्हणून सध्यांच्या मुंबई सरकारच्या शुद्ध आयुर्वेदाच्या प्रश्नाला योग्य वळण लावण्यास व प्रां. वैद्य मंडळाची धुरा वाहण्यास आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे हे योग्य अध्यक्ष आहेत. महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाच्या सदस्यांनीं स्वतः यांना मत द्यावेंच, पण इतरहि सदस्यांना तशी विनंति करून एकमतानें निवडून आणावें अशी विनंति आहे.

— वैद्य वि. म. गोगटे

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नासिक

जमा

आयुर्वेद पत्रिका १६ ऑक्टोबरच्या अंकांत पान २५२ वर प्रसिद्ध झालेल्या यादीप्रमाणें	३२५ रु.
वै. द. अ. कुलकर्णी, लखनौ	२१ ,,
नासिक शहर वैद्य मंडळ	१५ ,,
वै. वि. दा. एकतारे, नगर	१५ ,,
वै. ल. भा. काळे, आयुर्वेदाचार्य	११ ,,
वै. अमृतलाल पंड्या, सौराष्ट्र	११ ,,
वै. रा. गो. जोग, नगर	११ ,,
वै. श्रीराम शर्मा, मुंबई	११ ,,
वै. द ब. वैद्य, ठाणे	११ ,,
वै. ना. ह. जोशी, मुंबई	११ ,,
वै. ब्रह्मदत्त शर्मा, भुसावळ	११ ,,
वै. ग. म. अभ्यंकर, मुंबई	११ ,,
वै. भू. गणेशशास्त्री जोशी, पुणें	१० ,,
वै. गं. ह. पराडकर, अकोला	१० ,,
वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर, नाशिराबाद	७ ,,
वै. सी. रं. जोशी, बोलठाण	७ ,,
वै. सौ. लक्ष्मीबाई परांजपे, मुंबई	५ ,,
वै. सदाशिवशास्त्री लवाटे, नाशिक	५ ,,
वै. लाखलगांवकर, त्र्यंबक	५ ,,
वै. शारंगपाणी, नाशिक	३ ,,
वै. गुळस्करशास्त्री, नाशिक	३ ,,
वै. गो. गं. तरटेशास्त्री, नाशिक	३ ,,
वै. आंबडेंकर ,,	२ ,,
ता. १७ रोजीं भोजनानिमित्त जमा	१० ,,
	५३४-०-०

खर्च

भोजनखर्च (मजुरीसह)	३७४-९-०
निवासस्थान भाडें	२५-०-०
दिवाबत्ती	१५-०-०
निमंत्रण पत्रिका छपाई पोस्टेजसह इत्यादि	२१ १-१
प्रात्यक्षिकासाठीं साहित्य व किरकोळ खर्च	२६-१३-६
फोटो व ब्लॉक	१०-४-०
७ दिवस लेखनखर्च व नंतर छपाईसाठीं पक्की प्रत तयार करणें	७५-०-०
अंदाजे छपाई खर्च	३००-०-०
खर्च	८४७-१२-०
जमा	५३४-०-०
येणें	३१३-१२-०

तर्कतीर्थांचा अभिप्राय

आयुर्वेद पत्रिकेचा ता. १-२-५५ चा अंक मिळाला. आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेतील माझ्या भाषणाचा अनुवाद लेखकानें चांगला दिला आहे. आभारी आहे.

९।२।५५ वाई —लक्ष्मणशास्त्री जोशी

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नासिक

(आयुर्वेद पत्रिका पान नंबर ५३२ पासून पुढें चालू)

ता. १७।१०।५४ रोजीं सकाळीं पं. डेग्वेकरशास्त्री यांनीं पुढीलप्रमाणें दोषधातुमलविज्ञानीय अध्यायाचें विवेचन केलें :—

दोष व धातु यांचा आश्रयाश्रयीभाव

दोष व धातु यांचा आश्रयाश्रयीभाव फक्त वाग्भटांनींच सांगितला आहे. चरकसंहितेंत वा सुश्रुतसंहितेंत नाहीं. तत्रास्थिनि स्थितो वायुः पित्तं तु स्वेदरक्तयोः । श्लेष्मा शेषेषु । तेनैषां आश्रयाश्रयिणां मिथः ।

वजनांत वाढ अगर घट होईल

वात, पित्त, कफ हे दोष रसादिधातूंच्या आश्रयानें राहतात. घरांतील मुलें ज्या प्रमाणें घरच्या कार्यकर्त्या माणसाच्या आश्रयानें राहतात त्याप्रमाणें ! ज्यामुळें आश्रयाची वाढ वा कमीपणा होईल, त्यामुळें त्या प्रमाणांत आश्रयीसुद्धां कमी अधिक होईल. दोन वस्तु आश्रयाश्रयी असतील तर त्यांत कोणतें परिवर्तन होईल हें त्यांनीं सांगितलें. दोष हे वृद्धि वा क्षय पावतील म्हणजे प्रमाणानें वृद्ध वा क्षीण होतील. १ तोळा असतील तर वृद्ध म्हणजे १। तोळा, वा क्षीण म्हणजे ०।।। तोळा होतील. प्रमाण = दोषांचें शरीरांतील वजन-माझी तरी अशीच समज आहे. प्रमाणाचें न्यूनाधिकत्व म्हणजे प्रत्यक्ष वजन कमी जास्त होणें; म्हणून पित्त वाढलें तर स्वेद व रक्त हे प्रमाणानें वाढतील व पित्त कमी झालें तर स्वेद व रक्त हे प्रमाणानें कमी होतील. स्वेद व रक्ताचे फक्त गुण वाढणार व कमी होणार असें नसून त्यांच्या प्रमाणांत वाढ वा घट होईल, असें माझें मत आहे.

आश्रयाश्रयिणां मिथः । याचा तक्ता तयार करून ठेवावा. या दोघांपैकीं एक वाढेल तर दुसरा वाढेल; पण अस्थिमारुतयोर्नैवम् । वात वाढला तर तदाश्रय अस्थि न वाढतां क्षीणच होईल. वायूच्या बाबतींत हें स्पष्ट कळावें म्हणून वाग्भटांनीं आश्रयाश्रयी भाव सांगितला. वाग्भटांनीं या अध्यायांत निरनिराळीं प्रकरणें घेतलीं आहेत तीं स्वतंत्रपणें लक्षांत ठेवावीं.

कायाग्नि व धात्वग्नि

स्वस्थानस्थस्य कायाग्नेः...कायाग्नि = पाचकपित्त = ग्रहणीस्थ अग्नि. एकंदर१३ अग्नि. १ कायाग्नि+७ धात्वग्नि + ५ पांचभौतिक अग्नि, पांचभौतिक अग्नि कायाग्नींतच अन्तर्भूत आहेत. नाभस, आग्नेय,आप्य इ. ५ द्रव्यें जर भिन्न आहेत तर ५ भिन्न भिन्न द्रव्यांना पचन करणारे अग्निहि भिन्न भिन्न असले पाहिजेत. म्हणून पांचभौतिकअग्नि; तसेंच रसादि धातूंना पचन करणारा अग्नि असलाच पाहिजे, म्हणून धात्वग्नि.

प्रधान द्रव्य व उपद्रव्य निर्मिति

ज्यावेळीं २ द्रव्यांचें रासायानिक मिश्रण होतें, त्यावेळीं एक प्रमुख द्रव्य व एक (बाय्प्रॉडक्ट) उपद्रव्य तयार होतें. हें उपद्रव्य वा अप्रधान द्रव्यच किट्ट वा मल आहेत हें अधिक चांगल्या रीतीनें समजावें म्हणून चरकाचार्यांचा विविधाशितपीतीय अध्याय पहावा. तो अध्याय संपूर्ण आयुर्वेदीय फिजिऑलॉजी आहे. तो नीट व संपूर्ण समजून घेतला पाहिजे. तेथें कोणकोणत्या द्रव्यापासून कोणकोणतीं द्रव्यें तयार होतात, तें सांगितलें आहे. चरकसंहितेंत कोठेंहि, वात-पित्त-श्लेष्माणः उत्पन्न होणारे व कार्य करणारे निरनिराळे, असें सांगणारा आधार नाहीं, म्हणून माझें मत असें कीं वातपित्तकफ कुठेंहि असले तरी तीं द्रव्यें अभिन्न आहेत.

पाचकपित्त= ५ पांच भौतिकअग्नि + ७ धात्वग्नि. पाचकपित्तांतच कायाग्नि आहे. म्हणून कार्या हा संयोगरूप आहे. त्या धात्वग्नींचा साद म्हणजे कमी होणें, प्रमाणापेक्षां कमी होणें व दीप्ति वाढणें. सादामुळे धातुवृद्धि व दीप्तीमुळें धातुक्षीणता होतें. पूर्वो धातुः परं कुर्यात् वृद्धः क्षीणश्च तद्विधम् ॥

विकाराबाबतचा महत्त्वाचा विचार

रसधातु चांगला तयार झाला तर पुढील धातु चांगला तयार होईल. दोषा दुष्टा रसैर्धातून् दूषयन्त्युभये मलान् ।

दोषांचें प्रमाणाधिक्य वा दुष्टि कां होते ? तर रसांनीं मधुरादि षड्रसांनीं. अन्नरसानें [षड्रसात्मक] पहिली दुष्टि दोषांत. दोष धातूंना दुष्ट करतात, व दुष्ट दोष व दुष्टधातु मलांना दुष्ट करतात, व म मलायनांना दुष्ट करतात म्हणून मलायनांतच व्याधि होतात.

स्वेदवहानि खानि, ख=नलिका, छिद्र. अधो द्वे यांत स्त्रियांचींहि (योनि व स्तनहि तीन अधिक) ध्यावीं. मलांचें स्थान व मल बाहेर जाण्याचीं स्थानें हीं लक्षांत ठेवलीं नाहींत तर, विकार कळणार नाही म्हणून हा महत्वाचा विचार वाग्भटाचार्यांनीं सांगितला.

ओज हेंहि पांचभौतिक द्रव्य आहे. पांचभौतिक द्रव्याचे गुण यांत आहेत. वास्तविक तें कोणते द्रव्य आहे ? एकाद्याच्या शरीरांतून रक्त बाहेर पडतांना रक्ताची चकाकी एकदम जाते. म्हणजे ओज नष्ट होते. शरीरांत रक्त असेंपर्यंत त्यांत ओज असतें. शरीराच्या प्रत्येक अंशांत ओज असतें व तें नष्ट होतें. शुद्ध स्वरूपांत तें ईषल्लोहितपीत आहे. तें नष्ट झालें तर मनुष्यदेहाश्रित कार्यें नष्ट होतात. ओजोवृद्धीसाठीं दूध तूप असे थंड पदार्थ खावयाला द्यावे. ध्यान = चिंतन, एकसारखा विचार. त्याचा परिणाम ओज क्षीण होण्यांत होतो. श्रम = शरीराला थकवा येईल इतकें काम करणें, इ. ओजक्षीणतेचीं कारणें सांगितलीं. ओजक्षीणतेचीं लक्षणेंहि सांगितलीं. विच्छायः=मलिन कांतिवान्. क्षामः=कृशांगः. चिकित्सा-जीवनीयगण, रस=मांसरस, दूध इ. घेणें. ओजोवृद्धिलक्षणें-तुष्टी, प्रहर्ष, २४ तास आनंदी असणें, पुष्टि शरीराची वाढ. बल = कर्मसामर्थ्य.

यदन्नं द्वेष्टि...... । ज्यावेळीं जी वस्तु रोगी इच्छितो, त्यावेळीं ती वस्तु दिल्यानें वृद्धि नाहींशी होते हें सांगण्याकरतां हा श्लोक आहे. मात्र ती वस्तु देतांना ती विरोधी नको. आजार वाढविणारी नको. उदा. रूक्ष गुण वाढला असतां तद्विपरीत स्निग्ध गुणाची इच्छा निर्माण होईल. म्हणून वात वाढला तर स्निग्ध गुणाची इच्छा निर्माण होईल. इच्छेवरूनहि दोषवृद्धि व क्षय कळतो. अबुध=विचार न करणारे लोक या गोष्टीकडे लक्ष देत नाहींत. अबुध लोकांचें लक्ष रोग्याच्या रुचीचा अर्थ समजून घेण्याकडे नसते.

य एव देहस्य... समदोष याचा अर्थ त्या त्या शरीरांत त्या त्या वयाला अनुसरून योग्य ते दोषांचें आवश्यक प्रमाण असा आहे.

अध्याय १२ वा-दोषभेदीयमध्यायम् व्याख्यास्यामः ।

दोषभेदीय शब्दानें दोष भिन्न भिन्न आहेत अशी कल्पना मनांत येणें शक्य आहे. वातपित्तकफ अशा भेदानें दोष भिन्न आहेत. परंतु पाचकादि भेदानें भिन्न भिन्न द्रव्यें आहेत अशी कल्पना आहे. ही ५ द्रव्यें भिन्न भिन्न आहेत कीं नाहीं याविषयीं ग्रंथकार व त्यांचे टीकाकार यांचे दृष्टीनें पहावयाचें आहे.

प्राणादिभेदात्पंचात्मा वायु । याचा अर्थ अरुणदत्त देतात तो असाः-वायु एकच आहे परन्तु त्याचें कार्यतः भिन्नत्व आहे. जसें बांसरी वाजतांना तिच्यांतील वायु, व पियानोतील वायु एक असूनहि भिन्न भिन, तद्वतच शरीरांत भिन्न भिन्न कार्यांनें, एक वायु भिन्न असल्यासारखा वाटतो.

नाभि

नाभीचा अर्थ टीकेंत नाहीं. म्हणून अन्य ग्रंथ पहावा लागतो. 'पक्वामाशयमध्यं पित्तस्य' म्हणून महास्रोतसूमध्य म्हणजे नाभि. पाचकपित्त = जाठराग्नि. तो पक्वामाशयमध्यग आहे. ग = जाणारा. म्हणजेच तो उत्पन्न एके ठिकाणीं होतो, व जातो दुसरीकडे. ही गोष्ट महत्त्वाची आहे, ती लक्षांत पाहिजे. पंचभूतात्मकत्वेऽपि — पंचमहाभूतें त्यांत उपस्थित आहेत. तैजसगुणोदयात्-त्यक्तद्रवत्वं-म्हणजे त्यक्तद्रव-स्वभावम्. केवळ पातळ करण्याचा धर्म सोडून दिला व तैजस कार्य करणें सुरूं केलें. सल्फ्युरिक ॲसिडप्रमाणें.

चयो वृद्धिः इ० या श्लोकांमधून कफाचें वैशिष्ट्य स्कन्नत्व नीट समजून घावयास पाहिजे. या प्रमाणें या अध्यायांतील महत्त्वाच्या विषयांचें दिग्दर्शन केल्यावर सतत २॥ तासाच्या विवेचनानें 'श्रांत' झाल्यानें व पं. हरिदत्तशास्त्री परिषदेंत आले त्यांनाहि विवेचनाची संधि द्यावी या हेतूनें पं. डेग्वेकर-शास्त्रीजींनीं आपलें विवेचन संपविलें.

पं. हरिदत्तशास्त्री यांनीं केलेलें विवेचन

पाचक पित्तके काममें साहाय्य करना समान वायुका काम है। वायु जलको हटा देता है। द्रवभाग है उससे वह 'सर' होकर आता है। समान वायुसे अन्नके साथ संपर्क, आमाशयसे अन्नके साथ संपर्क, आमाशयसे नीचे उतरना और पाचकपित्तका स्राव करना, उपरसे नीचे जाना, नीचेसे उपर जानेको रोकना उष्माको सहायता देना इ. होता है। समान वायुके कार्य लक्षण है अन्नं विवेचयति मुंचति। गतिमत्व वायुसेहि है। वायु पित्तको बदलता है। पित्तसे जलतत्व हटाता है। और आग्नेय तत्वकाहि संपर्क करके नीचे ले जानेमें सहाय्य करता है।

चयो वृद्धिः स्वधाम्न्येव—अन्तकोष्ठस्थ दोष स्थान मुख्य हैं। तोभी सर्व शरीरके स्थान भी हैं। दौडनेसे तंगडीमें दर्द होता है। वह वायुसंचय होनेसे। यद्यपि पक्वाशयमें वातस्थान है, तोभी तंगडीकोभी वातस्थान माननेसे कुछ मतभेद नहीं होता। गति वायुकीहि है। गतिवृद्धिसे वायु वृद्ध होगा। इसलिये वहा संचय स्थिर होता है। किन्तु इस प्रकारका संचय मालुम नही होता।

कफका प्रकोप अपने विपरीत उष्ण लक्षणके द्रव्यसे कैसा होता है? देशकालकी उष्णतासे होता है। हेमंतमें कफ जम गया। किन्तु वसंतमें कालसे सीमोल्लंघन न होने पाये तक प्रकोप नहि होता है।

अध्यक्ष वेणीमाधवशास्त्री

पण्डित हरिदासशास्त्री व पण्डित डेग्वेकरशास्त्री यांनीं उत्तम रीतीनें कल्पना मांडल्या आहेत. मी आणखी एक मुद्दा मांडतो.:—

पित्ताचें कार्य, पित्ताशयगतधमनीचें कार्य, समानवायूचें कार्य, यांच्याबरोबरच मलधराकलेचेंहि कार्य येते त्याचाहि विचार अवश्य आपण केला पाहिजे. व हें सगळें ग्रहणींत होते हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे.

त्रिदोष व पंचमहाभूतविचार

रविवार दि. १७।१०।५४ संध्याकाळीं वै. द. अ. कुळकर्णी आयुर्वेदाचार्य यांनीं 'त्रिदोष व पंचमहाभूतें' हा विषय विद्यार्थ्यांना कसा समजून सांगावा ह्या दृष्टीनें मांडला.

"त्रिदोष व पंचमहाभूतविषयक विचार आधुनिक शास्त्राला धरून पण प्राचीन शास्त्राशीं विरोध न येतां कसा आहे तें मी सांगतो. हा विचार ९ वर्षांपूर्वी मी केला होता, तोच आतां सांगतो.

प्रत्येक द्रव्य हें पंचमहाभूतांच्या पंचीकरणानें झालेलें आहे. 'पंचभूतात्मकं तत्तु' ही मूळ प्राचीन कल्पना आहे. आधुनिक शास्त्राप्रमाणें [physics, chemistry] सर्व प्रकारचीं द्रव्यें मूलतत्त्वांच्या परिमाणूनीं [९४पर्यंत ही संख्या गेली आहे.] बनलेलीं आहेत. हे सर्व मूल परमाणू प्रोटॉन व इलेक्ट्रॉन यांनीं घटित आहेत. पृथ्वीवरचे सर्व पदार्थ प्रोटॉन व इलेक्ट्रॉन घटित आहेत. मात्र त्यांची भिन्न भिन्न संख्या व विशिष्ट रचना यामुळें विशिष्ट परमाणु बनतात. सगळयात हलका हायड्रोजनचा परमाणु आहे. १ इलेक्ट्रॉन+ १ प्रोटॉन यांनीं घटित तो आहे. त्याच्यांत गतित्त्र फार आहे. ९४ क्रमांकाच्या परमाणूंत ९४ इलेक्ट्रॉन + ९४ प्रोटॉन आहेत. मध्यें प्रोटॉन असतो व त्याच्या भोवती इलेक्ट्रॉन फिरतो या प्रमाणें एकमेकाभोवतीं टक्कर न घेतां ते फिरतात.

अनेक इलेक्ट्रॉन्स प्रोटॉनभोवतीं फिरतात. प्रोटॉन हा ह्या कणाचा पार्थिव अंश आहे. त्याभोवतीं इलेक्ट्रॉन फिरतात. इलेक्ट्रॉन्स व प्रोटॉन्स एकमेकांना दूर जाऊं देत नाहींत. हेंच आप् तत्त्व (स्नेहनगुणी). त्यांची गति हें वायुतत्त्व. इलेक्ट्रॉन्स हे तेजस्वरूप. या सर्व क्रिया शून्य स्थानांत होतात. म्हणून आकाशतत्त्व आहे. याप्रमाणें द्रव्यपरमाणूंत पांचभौतिकत्व आहे. अशी माझ्या मताप्रमाणें व्यवस्था आहे.

माझी त्रिदोषाबाबतची कल्पना

त्रिदोष हे तीन रिझरव्हॉयर्स किंवा पॉवर हाउसेस आहेत. व सर्व शरीरांत ते व्यापी आहेत. म्हणजे प्रत्येक कणांत ते आहेत. धातु मलांच्या प्रत्येक कणांत आहेत. प्रत्येक सेल्मध्यें त्रिदोष आहेत. तिघांची कार्यें सारखीं चालूं असतात. श्लेष्मा-जवळ आणणें. पित्त-पचन करणें. वायु-वियोजन करणें. लहानांत लहान सेलमध्यें तो जिवंत असेपर्यंत हीं तीनहि कार्यें चालू आहेत. धरणें, वाढविणें, वियोजन करणें. ह्यांना पुरवठा करणारे कोष्ठस्थ हृन्नाभिअधोमध्योर्ध्वसंश्रयाः दोषाः आहेत. मुख्य कार्य तेथें आहे.

यानंतर 'मीमांसादर्शनाची आयुर्वेदशास्त्राध्ययनासाठीं आवश्यकता' या विषयावरची वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित यांचें केवळ भाषण झालें. वेळेच्या अभावीं त्यासंबंधीं चर्चा होऊ शकली नाहीं.

रविवार दि. १७।१०।५४ दुपारीं शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीचे मंत्री वैद्य ना. ह. जोशी, यांचें भाषण झालें. ते म्हणालेः—"अध्यापक परिषदेला माझी अशी विनंति आहे कीं, आपण सर्व प्रकारचे अभ्यासक्रमविषयक, राजकीय इ.- ठराव अगदीं निःसंदिग्धपणें व ठणठणीत शब्दांत मांडून, पाठ्यक्रम समितीकडे पाठवावेत. अभ्यासक्रमाची सद्यःस्थिति, तो कसा शिकवावा ? कोणता भाग गाळावा ? इ. सर्व कळवावें. कळविणें हें आपलें कर्तव्य आहे. समितीला कार्याची दिशा आपल्यामुळें मिळेल. समितीला आपण विचार व प्रयत्न करावयास लावला पाहिजे. यश येवो न येवो.

शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमसमितीचे अध्यक्ष वैद्यराज वामनराव दीनानाथ यांनीं सांगितलें कीं अध्यापक चर्चा परिषदेची उपयुक्तता शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमाच्या दृष्टीनें अतिशय आहे. पाठ्यक्रमसमिति अध्यापक परिषद भरविणाऱ्यांची आभारी आहे.

कार्यकारी मंडळाची नियुक्ति

यानंतर पुढील अध्यापक परिषदेपर्यंत कार्य करण्यासाठीं पुढील कार्यकारीमंडळ नियुक्त करण्यांत आलें

१] वै. वेणीमाधवशास्त्री जोशी (अध्यक्ष)
२] वैद्य भि. वि. डेग्वेकरशास्त्री
३] ,, वामनराव दीनानाथजी
४] वैद्य वि. म. गोगटे (कार्यवाह)
५] ,, बिंदुमाधवशास्त्री पंडित

पं. डेग्वेकरशास्त्री यांचें समारोपात्मक भाषण

आपली परिषद किती यशस्वी झाली तें काल ठरवीलच; पण आपण आरंभ मात्र फारच उत्तम केला आहे व त्याचा परिणाम आपल्या व इतर प्रांतावर फारच उत्तम तऱ्हेनें होईल.

आपल्या अध्यापकांनीं (मान्यगुरुंनीं) व विद्यालयांनीं उत्तम प्रकारें कार्य केलें पाहिजे. व बारकाईनें आज ठरविल्याप्रमाणेंच विषय शिकवण्याचा निश्चय करून येथून जावें.

आजचें कार्य सफल झालें याचें श्रेय अध्यक्षांना आहे. त्यांनीं सगळयांना वाव दिला. मी परप्रांतीय म्हणून आपलें अभिनंदन करतो. व आपली शास्त्रीय उन्नति अधिक व्हावी अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो.

वैद्य वेणीमाधवशास्त्री यांचा अध्यक्षीय समारोप

" वैद्य दातेशास्त्री, आचार्य ल भा. काळे, वै. गोगटे व सर्व अध्यापक वैद्य मंडळी यांनीं ही परिषद यशस्वी होण्यासाठीं सर्वतोपरी साहाय्य केलें याबद्दल आभार मानतो.

सभेची सर्व प्रेरणा शुद्ध आयुर्वेदीय कार्याची धुरा वाळगणारे पण्डित डेग्वेकरशास्त्री यांनींच दिली. त्याबद्दल त्यांचे आभार मानतों.

या परिषदेंत माझ्या कठोरपणामुळें जे कांहीं वाईट परिणाम झाले असतील ते सर्व विसरून जावे अशी विनंति करतों.

या परिषदेंत २ मुख्य गोष्टी झाल्या. (१) प्राचीन ग्रंथांचा अभ्यास. व (२) भावी कालाकरितां काहीं संकेत. या २ स्पष्ट गोष्टी आहेत. त्यांचें मिश्रण करून घोटाळा करूं नका. चरक व त्यांचे शिष्य यांनीं निरनिराळे निर्णय केले, त्याप्रमाणेंच या परिषदेचे कांहीं निर्णय आहेत. ही गोष्ट नीट लक्षांत ठेवावी.

परिषद ग्रंथकार आहे. तिचा अधिकार मोठा आहे. यावेळचे कांहीं निर्णय अमान्य असले तरी सुद्धां ते पाळावे. पुनः पाहिजे तर त्यावर चर्चा करावी. पुनः अभ्यास करावा. व निर्णय बदलून घ्यावे.

आपण सगळयांनीं कर्तव्यनिष्ठेनें काम केलें आहे. घड्याळाप्रमाणें ८च्या ठोक्याला सुरुवात व रात्रीं १० वाजेला बन्द. अशी कर्तव्यनिष्ठता आयुर्वेदाचा पाया निश्चित बळकट करील.

आपण मला अध्यक्ष निवडून मान दिला. माझी योग्यता मला माहित आहे. १०-१२ वर्षांपासून मी अध्यापकत्व सोडलें आहे. तरी तुम्ही प्रेमानें मला नेमलें, मी झालों.

आपण स्वैर वागतां कामा नये. आपल्या प्रत्येक कृतीचा परिणाम आयुर्वेदाच्या कार्यावर होतो हें लक्षांत ठेवावें. स्तुति-मान सर्वांनाच हवासा वाटतो. पण त्याबरोबर जबाबदारीहि पत्करावी लागते. अध्यापनाला वळण देणें ही सामान्य गोष्ट नाहीं. पं. डेग्वेकरजींनीं मार्गदर्शन केलें, त्याप्रमाणें झालें तर फारच उत्तम होईल.

शेवटीं सर्वांचे आभार मानून पुनः एकदां विनंति करतो कीं आपण येथें घेतलेले निर्णय बरोबर घेऊनच बाहेर जाऊ या !

वै. कान्तिस्वरूप वर्मा, बुलंदशहर (उत्तरप्रदेश)

या परिषदेनें आम्हाला फारच उत्तम ज्ञान प्राप्त झालें आहे. वनस्पतिदर्शन, शरीरअंगांचीं प्रात्यक्षिकें व आपली एकंदर संघटना पाहून अतिशय आनंद झाला. आपली ही संघटना यशस्वी होवो व आयुर्वेदाची उन्नति होवो असें मी इच्छितो व व्यक्तिशः परिषद-चालकांचे आभार मानतो. (हिंदी भाषण)

वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर यांचें भाषण

अध्यक्ष व बंधुभागिनींनो, दि. ११ ते १७ पर्यंत ७ दिवस ज्ञानसप्ताह झाला. श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ' असा ज्ञानयज्ञ श्रीगंगातीरावर आपण साजरा केला, ' श्रीबिंदुमाधवाजवळीं स्नान करा गंगेचें ' याप्रमाणें केलें. शेवटीं माझी इच्छा हीच कीं या ज्ञानयज्ञाची योग्य फलनिष्पत्ति व्हावी.

आमचे दोष आम्हाला कळत नाहींत, ते दुसऱ्यांनीं दाखवावे. टीकाकारांनीं दाखवावे. परमेश्वराने त्यांना दीर्घायुष्य द्यावें. म्हणजे आमची प्रगति होईल.

हीच परम्परा चालू रहावी अशी आमची सर्वांची इच्छा आहे. या परिषदेंत फारच थोड्या अध्यापकांनीं भाग घेतला, यापेक्षा अधिक अध्यापक जमले पाहिजेत. येथें झालेली चर्चा उच्च पातळींतून झाली. व आपणांपैकीं कांहींनीं अत्यंत संकोच बाळगला व कांहींनीं अल्पधाडस केलें, व कांहींनीं मौन राखलें. पण तसे जर आपण राहिलो तर परिषद सफल होणार नाहीं. म्हणून यापुढें जास्तीतजास्त अध्यापकांनीं परिषदेंत सक्रिय भाग घ्यावा अशी विनंति आहे.

चर्चापरिषदेमुळें चर्चापरिषदेचे प्रवर्तक भीष्माचार्य पं. डेग्वेकरशास्त्री, वै. हरिदत्तजी, वै. वेणीमाधवशास्त्री, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा दुर्लभ लाभ आम्हांला झाला. मी माझे वतीने व परिषदेचें वतीनें आभार मानतो. नाशिक शहर वैद्य मंडळ व आयुर्वेद सेवा संघ यांचे आभार मानतो.

आमच्या केलेल्या आतिथ्याबद्दल, व आमच्या सेवेबद्दल स्वयंसेवकांचे जितके कौतुक करावे तितके थोडेच आहे. अन्नविभागावरील नियोजित अधिकाऱ्यांना धन्यवाद अवश्य दिले पाहिजेत.

महाराष्ट्र प्रांतिक वैद्य मंडळातर्फे मी या परिषदेचें पुनः एकदा आभार मानतो.

वै. मरुलाध्यशास्त्री, विजापूर

यह परिषद यशस्वी हुई इसलिये मैं आभारी हूँ । मेरी तबीयत अच्छी नहीं थी। तोभी चर्चाके लिये आवश्यक समझके उपस्थित हुआ । क्योंकी मेरी संस्थासे कोअी अन्य प्रतिनिधी नहीं आया। इतने दूर आ रहे । किन्तु चर्चा सफल होगी या नहीं इसमें मुझे संदेह था । और सात दिनतक शास्त्रीय चर्चा सुनकर संदेह विरहित हो गया हूँ। बंबईमें बहुत झगडा हुआ था। वह भ्रम सब निकल गया। यह परिषद यशस्वी होनेका मुख्य कारण हमारे अध्यक्षकी निःपक्षपाती वृत्ति और पांडित्य। उसके साथ पण्डित डेग्वेकरजीकी वृत्ति। महाराष्ट्र और कर्नाटकके संबंध बढे जा रहे है। और आगेभी बढेंगे। यहांकी वैद्य संघटना देखकर संतोष पा गया हूँ। नासिकके इस कामको पूरा करनेमें नाशिक शहर वैद्य मंडळ के साथ आयुर्वेद सेवा संघके कार्यकर्तागण है। वै. गोगटेजी नही होते तो अच्छा नहीं होता। सेवा संघके सदस्योंमें पूर्णतया सेवाभाव है। आयुर्वेदीय दृष्टि है। यहांके एक सदस्यने मेरी वातप्रकृति और तज्जनित प्रतिश्याय देखकर मेरा मालिश भी (अभ्यंग) किया । नासिकके आयुर्वेद सेवा संघके वैद्य और हम दो नही है। हमेशा एकत्र रहके काम करेंगे कर्नाटक और महाराष्ट्र सदाहि एकत्रित रहेगा ।

महा गुजरात प्रांतीय वैद्य मंडळातर्फे आभार

महागुजराथ प्रांतीय वैद्य मंडळातर्फे परिषदेचे मी आभार मानतो. प्रवर्तक, अध्यक्ष व आपणा सर्वांचे आभार मानतो. मला आनंद वाटतो कीं गुजराथहून एकतरी प्रतिनिधी या परिषदेला उपस्थित राहिलेला आहे, असे उद्गार वैद्य वामनराव दीनानाथ यांनीं काढले.

परिषदेचा जमाखर्च

वैद्य विष्णुशास्त्री गोगटे, निमंत्रक आ. अ. चर्चा परिषद म्हणाले:- या परिषदेचा जमाखर्च मी

आपणास सांगतों. परिषदेकरितां जवळजवळ कमीत कमी २००० ते ७००० रुपये आपले सर्वांचे खर्च झाले आहेत, होणार आहे. शिवाय ४ ते ५ हजार रु. प्रॅक्टिसचे आपण घालविले व जमेकडे आपण येथें बसून जें बहुमोल सार काढलें आहे तें आहे. ह्या परिषदेच्या मागें तिच्याकरितां खटपट करणारे पुष्कळ वैद्य आहेत. वैद्य करमरकरांचें स्थायीकार्य बहुमोल आहे. त्यांनीं या परिषदेंत झालेली सर्व चर्चा ७ दिवसपर्यंत हाताचीं बोटें दुखूं लागेपर्यंत अक्षरशः टिपून घेतली आहे. जवळजवळ ६०००० शब्द त्यांनीं टिपले आहेत.

परिषदेला देणग्या देणारे देणगीदार, अभ्यास करून आलेले वैद्य, चित्पावन ब्राह्मण सभा कार्यालयाचे संचालक, आयुर्वेदाला उपकारक झाले आहेत. ब्राह्मण सभेची देणगी फार मोठी आहे. रोज २५ रुपये याप्रमाणें १५० ते २०० रुपयापर्यंतचा हा आंकडा आहे. त्या दृष्टीनें या कार्यालयाच्या रूपानें बहुमोल सहाय्य चित्पावन ब्राह्मण संघानें आपणास केलेलें आहे. इतरहि संस्थानीं साहाय्य केलें आहे.

नाशिक शहर वैद्य मंडळ, तिचे अध्यक्ष वैद्य विष्णुशास्त्री दाते, शु. आ. समितीचे सदस्य, प्रांतीय वैद्य मंडळाचे सदस्य, परप्रांतीय वैद्य मंडळी, सार्वजनिक वाचनालय, अभिनव भारत संस्था (कीं जी पहाण्यासाठीं भारतांतील सर्व दूरचे लोक येथें येतात, भावना उत्पन्न करणारी गोष्ट) तसेंच प्रेस ट्रस्ट आफ् इण्डियाचे बातमीदार, गांवकरी, भिषग्विलास, आयुर्वेद पत्रिका यांचे बातमीदार, प्रेस फोटोग्राफर व येथें येऊं शकत नसल्यानें संदेशरूपानें जे उपस्थित झाले व ज्यांनीं बहुमोल सूचना केल्या, त्या सर्वांचे व इतर कोणी राहिले असतील त्यांचे सर्वांचे मी आभार मानतों.

जे येथें आले नाहींत, किंवा विरोध केला नाहीं, त्यांचे व आपणा उपस्थितांचे आभार मानतों. आपण सर्वजण परिषदेला आलांत, सर्व प्रकारचा त्रास सहन केलांत, गंगाकाठच्या थंड व गरम वातावरणांत स्वस्थ राहिलात याबद्दल आपले सर्वांचे आभार मानतों.

सर्वांत महत्त्वाचें म्हणजे आपणा सर्वांच्या विनन्तीला मान देऊन परिषदेचें उद्घाटन व प्रवर्तन पण्डित हेर्वेकरशास्त्री यांनीं केलें व अध्यक्ष म्हणून पण्डित वेणीमाधवशास्त्री यांनीं जें कार्य केलें, परप्रांतांतून येऊन श्री. कुलकर्णी व श्री. गोडबोलेशास्त्री इ. नीं जें सहाय्य केलें, व वृद्ध वयांतहि जें ज्ञान दिलें याबद्दल त्यांचे आभार मानतों.

यानन्तर वंदेमातरम् होऊन ता. १७ ऑक्टोबर रोजीं रात्रीं परिषद समाप्त झाली.

सुप्रसिद्ध दंतवैद्य पां. वि. जायदे, आयुर्वेदतीर्थ,
हुबळी यांचीं विद्वान् वैद्य आणि डॉक्टर यांनीं
प्रशंसिलेलीं दोन उपयुक्त पुस्तकें
१) दंतरोगविज्ञान आणि चिकित्सा
किंमत ३ रु.
२) वैद्यसन्मित्र (हिंदी) भाग १ ला
किंमत २ रु.
मिळण्याचीं ठिकाणें:—
१ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक
२ पां. वि. जायदे, नारायण चौक, हुबळी

पवित्र
नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

जळगांव (पू. खा.) येथें
आयुर्वेद सेवा संघाचीं प्रभावी औषधें
मिळण्याचें प्रमुख ठिकाण
शहाणे मेडिकल स्टोअर्स, जळगांव

एक वेदनाहर मलम

रुक् नाशन हा वेदनाहर मलम केवळ आयुर्वेदीय द्रव्यांपासून बनवला असून त्यानें वस्त्रास डाग पडत नाहीं व त्वचा तडतडत नाहीं. रुक् नाशन मध्यें मुख्यतः मोहरी, बिब्बा, रुई व सैंधव वगैरे वातहारक व वेदनानाशक द्रव्यें आहेत. हें मलम दुखऱ्या भागांवर चोळून लावल्यानें चटकन् ठणका कमी होऊन सूज ओसरते. बिब्बा हा सर्व प्रकारचे वेदनावर प्रसिद्धच आहे. बिब्बा बाधक होऊ नये यासाठीं हळदीची जोड दिली आहे. मलम वेदनाहर विशेषतः संधिवात, आमवात, गृध्रसी वगैरे सर्व वातरोगांवर, उसण, बधिरणें, मुरगळणें, आखडणें, मुंग्या येणें इत्यादि विकारावर गुणदायी आहे.

लावण्याची पद्धति

आखडलेले किंवा दुसरे सांधे हात, पाय, कंबर वगैरे भागावर चांगले चोळून चोळून जिरवावें व नंतर तो भाग शेकावा आणि त्या भागावर गरम कापड गुंडाळून ठेवावें.

नाशिक येथील वैद्य आयुर्वेदाचार्य ल. भा. काळे यांनी ह्या मलमाचा पाठ बसविला आहे.

निबंध कोणी लिहावेत ?

चालूवर्षी होणाऱ्या संमेलनप्रसंगीं नेहमीप्रमाणें निबंधाच्या चढाओढी राहतीलच, पण अशा स्पर्धांत यापुढें केवळ नवीन वैद्यांनींच भाग न घेतां प्रथितयश व आयुर्वेदाधिकारी वैद्यांकडूनहि (आचार्य वेणीमाधव, बागेवाडीकर, करमरकर इ०) या विषयांवर निबंध लिहिले जावेत, म्हणजेच स्पर्धेस रंग येईल व खरी स्पर्धा होऊं शकेल व इतर वैद्यवर्गास आपण आपली कशा रीतीनें विचार करावयास हवा इ० माहिती त्यायोगें होईल.

विशेषतः शुद्ध आयुर्वेदीय मान्य गुरुंनीं तरी यांत अवश्य भाग घ्यावा अशी अपेक्षा आहे.

— वै श्री. द. जळूकर

रोगावर जादूप्रमाणें तत्काल परिणाम करणारीं

'मार्तण्ड'चीं आयुर्वेदिक इंजेक्शनें

मार्तण्ड कंपनींच्या पूर्ण वैज्ञानिक साधनसंपन्न व आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज अशा प्रयोगशाळेंत, विद्वान् आयुर्वेदज्ञ व पाश्चात्य रसायनशास्त्रज्ञांच्या संपूर्ण देखरेखीखालीं तयार केलेलीं आयुर्वेदिक इंजक्शनें आपला प्रभाव तत्काल व कायम स्वरूपांत करतात. दीर्घकाळ राहिल्यासहि तीं कधीं बिघडत नाहींत. त्यांच्या तात्काल गुणदायित्वाबद्दल हमी देण्यांत येते.

सूचिपत्र व संशोधनाचें आकर्षक वाङ्मय मोफत मिळेल. आजच मागवा.

मार्तण्ड फार्मास्युटिकल्स्, बडौत S. S. Rly. यू. पी.

(रिसर्च इन्स्टिटयूट ऑफ् इंडियन मेडिसिन्स)

.... सहा रसांचीं संस्कृत तेलें ....

आयुर्वेदांत संस्कारानें गुणवर्धन व दोषक्षरण करण्याची पद्धति अंगिकारलेली आहे. आपणाला हवे आहेत त्या गुणांची वस्तु न मिळाली तरी तशी वस्तु या पद्धतीनें तयार करून घेतां येते.

गोडें तेल

उदाहरणार्थ, व्यवहारांत आपणास दोन-तीन प्रकारचीं तेलें मिळतात. एक गोडें तेल, दुसरें कडु तेल, तिसरें तिखट तेल (हें क्वचित्च आढळतें पण शब्दप्रयोग मात्र तसा आहे खरा). गोड तेल म्हणजे काय ? तर तीळ, खोबरें, करडई, शेंगदाणे, खुरासणी खसखस इत्यादि पासून निघणारें तें.

कडु तेल, तिखट तेल

करंज, कडुनिंब, कडु कवठी यांच्या बियापासून आपणास कडु तेल मिळतें. मोहरीचें तेल विशेष तिखट असत नाहीं. पण त्याला ‘कडु तेल’ म्हणतात. आंबट तेल, खारट तेल, तुरट तेल हीं स्वाभाविकपणें मिळत नाहींत. तीं मुद्दाम तयार करावीं लागतात. तीं तयार करण्याची कल्पना आयुर्वेदांत आहे. इतकेच नव्हे तर गोड, कडु, तिखट तेल, संस्कारानें तयार करण्याची, योजना पण आहे.

संस्कृत गोड तेल, कडु तेल

द्राक्षें, जेष्ठमध, मोहाचीं फुलें इत्यादि मधुर द्रव्यांच्या काढ्यांत गोडेतेल (तिळतेल) सिद्ध करून आपणास मधुर तेल बनवितां येते. त्याचप्रमाणें कडुनिंबाचा पाला, कडुजिरें, गुळवेल, चंदन आदि द्रव्यांनीं तिळतेल सिद्ध करून आपणांस कडु तेल तयार करतां येतें.

संस्कृत तिखट तेल

सुंठ, मिरे, पिंपळी, मिरची, ओवा, हिंग, वावडिंग, चित्रक या तिखट द्रव्यांच्या काढ्यांत तेल सिद्ध केलें म्हणजे तिखट तेल तयार होतें. मरिचादि तेल, बृहन्मरिचादि तेल, हीं तिखट सिद्ध तेलेंच आहेत. कल्याणचे एक वैद्य लाल मिरचीच्या काढ्यांत सिद्ध केलेलें तेल [कडु तेल] वापरत असल्याचें म. प्रां. वैद्य मंडळाच्या दौऱ्याचे वेळीं आम्हांस समजलें.

संस्कृत लवण तेल

आयुर्वेदांत अनेक विकारांत लवण-तेलांचा उपयोग सांगितलेला आहे. श्वासचिकित्सेंत ‘ लवण-तैलाक्तं ’ स्निग्धैः स्वेदैः उपाचरेत् ’। असें विधान आहे. तेलाच्या चौपट पाणी व एक चतुर्थांश मीठ घालून उकळून तयार केलेलें तेल तें लवण-तेल. याच प्रमाणें निरनिराळीं क्षार तेलेंहि बनवितात. वातव्याधिचिकित्सेंतील माष- सैंधव- तैल प्रसिद्ध आहे.

संस्कृत आंबट तेल

गोड, कडु, तिखट, खारट रसांप्रमाणेंच आंबट व तुरट रसाच्या वस्तूंनीं सिद्ध केलेलीं तेलें निरनिराळ्या विकारांत वापरतां येतात, हीं घ फार थोड्यांना माहिती असेल. आंबट द्रव्यांनीं सिद्ध घृतें आपणा सर्वांना माहित आहेत. उदाहरणार्थं दाडिम-घृत, चांगेरी घृत पण आंबट संस्कार करून तें तेल रोग्यास देण्याची कल्पना कांहीं वैद्य आजहि अमलांत आणित आहेत. तसें पाहिलें तर मालेगांवी आवळेल हें आवळकंठी घालून केलेलें तेल म्हणजे आंबट तेलच आहे. पण तें केसांना डोक्याला बाहेरून लावलें जातें. पोटांत आंबट तेल द्यावयाचें ही कल्पना ग्रंथांत असली तरी आजच्या व्यवहारांत नवीन वाटणारी आहे

अपानवायूविकारावर अम्लतैल

आमचे एक वैद्यमित्र नेहमीं चिंचेच्या कोळांत (रसांत) सिद्ध केलेलें तेल बनवितात व रोग्यांना पोटांत घेण्यास देतात. उदावर्त, अपानवायूचा रोध, पोटात गॅस होणें या विकारावर तें उपयुक्त आहे असा त्यांचा अनुभव आहे.

पिण्यासाठीं व बस्तीसाठीं

वातज अर्श, ग्रहणी, गुल्म या विकारांत वाताच्या अनुलोमनासाठीं अम्लद्रव्यांनीं सिद्ध केलेली तेलें अपानकालीं पिण्यांस द्यावीत व अनुवासन बस्तीसाठीं वापरावीत असें सांगितलेलें आहे. व जुनी चिंच हें उत्तम वातानुलोमन द्रव्य आहे. ज्यांना शौचास खडा होतो, वायु नीट सरत नाहीं. पोटांत कळा होतात. त्यांना अम्लद्रव्यांनीं सिद्ध केलेले तेल १ ते २ चमचे, जेवणापूर्वीं १ घोट ऊन पाण्याबरोबर देणें हितावह होतें. जुनी चिंच ही पौष्टिकहि आहे. (मधुराम्ल) त्यामुळें शौचाला खडा झाल्यामुळें रोड रहाणाऱ्या लोकांनाहि त्यापासून निःसंशय लाभ होईल.

शुद्धरूक्षाशयं बद्धवर्चस्कं चाऽनुवासयेत् ।
दीपनीयाम्लवातघ्नसिद्धतैलेन तं ततः ।

बा. ग्र. चि. श्लोक २५

स्नेहोऽम्ललवणैर्युक्तो बहुवातस्य शस्यते ।

बा. ग्रहणी चि. श्लोक ६८

पावशेर चिंच अगर कोणतेंहि अम्ल अनुलोमन द्रव्य १ शेर पाण्यांत कोळावें व चोथा काढून टाकून त्यांत पावशेर तेल मंदाग्नीवर तयार करावें. स्नेहसिद्ध करण्याच्या सामान्य नियमाप्रमाणें हीं संस्कृत तेलें करावीत व विविध गुणासाठीं वापरावींत.

तुरट तेल, रोपण तेल

तुवरक तेल प्रसिद्ध आहे. तुवरक म्हणजे तुरट. खैर असाणा सारख्या वनस्पतींनीं सिद्ध केलेलें तेल तुरट होतें. व्रणरोपणासाठीं यांचा उपयोग करतात.

— वैद्य बिंदुमाधव पंडित

केशर व कस्तुरी

या उपयुक्त व निर्भेळ वस्तु मिळण्याची व्यवस्था आयुर्वेद सेवा संघानें केली आहे.

व्यवस्थापक

उन्हाळ्यासाठीं सरबतांची मागणी

वसंत ऋतूंत वमन घ्यावें

आतां वसंत ऋतु सुरू झाला आहे. हा कफप्रकोपाचा काल आहे. या दिवसांत गोड खाणें हितावह नाहीं. अनेक औषधी विक्रेते आमच्याकडे सरबतांची मागणी करीत आहेत. पण आयुर्वेद सेवा संघ हा नवीन औषधी कल्प तयार करण्याकडे विशेष लक्ष पुरवित असल्यामुळें नुसता धंदा मिळविण्याचा हा सरबताचा व्यवसाय करणें औषधीभवनास शक्य नाहीं याबद्दल क्षमा करावी.

शतावरीकल्प, आश्विनाकल्प

पुढें ग्रीष्म ऋतु येत आहे त्यावेळीं उन्हाळ्यामुळें माणसांना दुर्बलता येते. ती दुर्बलता येऊं नये यासाठीं उन्हाळ्यांत घ्यावयाचे बल्यकल्प सेवा संघानें तयार केले आहेत. व आणखी करणार आहे. उन्हाळ्यांत वापरण्यासाठीं योग्य तो कल्प म्हणजे शतावरी कल्प, कूष्मांड शर्करा, आश्विनीप्राश हे होत. औषधी भवनाच्या विक्री केंद्रातून ह्या कल्पांची माहिती जिज्ञासूंना मिळून शकेल.

मदनफलमज्जा वमनकल्प

वसंत ऋतूंत घेण्यासाठीं गेळफळाच्या गीरापासून केलेला वमनकल्प आतां वैद्यांना वापरतां येईल व शीतोद्भवं दोषचयं वसंते या । नियमानुसार कफ दोषाचें शोधन करून प्रकृति स्वस्थ करतां येईल.

— व्यवस्थापक औषधी भवन, नासिक

शेगांव (मध्य-प्रदेश) येथें

आयुर्वेद सेवा संघ नाशिक या संस्थेचीं अनेक ग्राहकांकडून प्रशंसिलेली सर्व प्रकारचीं औषधें मिळण्याचें ठिकाणः—

खेतान मेडिकल स्टोअर्स
शेगांव (म. प्र.)

नारूवरील औषध घेण्याची एक रीत

हें औषध अनशनपोटीं [अन्नपाणी न घेतां] गाईंच्याच दुधांतून घ्यावें. गाईचें सकाळीं सूर्योदयापूर्वीं ताजें दूध घेऊन त्यांतील निम्मे दूध पितळींत पावशेर दूध घेऊन त्यांत या औषधां-- अगर पहरट भ ज्यांत ओतावें व त्यांत या औषधां-- पैकीं निम्मे औषध सोडावें व बोटानें पूर्णपणें औषध दुधाशीं मिसळूं द्यावें. हें औषध लवकर दुधाशीं मिसळत नाहीं. जवळ जवळ अर्धातास लागतो नंतर तें औषधी दूध रोग्याला पिण्यास द्यावें. राहिलेलें अर्धे पुन्हां असेंच बाकी अर्ध्या पावशेरांत मिसळून पिण्यास द्यावें. यासाठीं प्रथम गाईचें शेर दोन शेर दूध मिळविण्याची व्यवस्था करून नंतर औषधास सुरवात करावी.

औषधानें पोटांत आग पडते

पथ्य:— हें औषध पोटांत गेल्यावर कांहीं वेळानें पोटांत आग पडते, व रोग्याला पाण्याची अत्यंत तहान लागते. अशा वेळीं पाणी पिण्यास न देण्याची खबरदारी घ्यावी लागते. नाहींतर औषधाचा कांहीं उपयोग होणार नाहीं. अशा तहानेच्या प्रत्येक वेळीं गाईचेंच दूध पिण्यास द्यावें. पाण्याचा एक थेंबाहि चोवीस तासांत पोटांत जातां कामा नये. गाईचे दुधाशिवाय दुसरें कांहींच द्यावयाचें नाहीं. संबंध दिवस रोग्यानें पडून राहावें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं भूक फार लागेल, तरी प्रथम दूधभात अगर दहीभात खाण्यास द्यावा व नंतर दररोजप्रमाणें खाण्यापिण्यास हरकत नाहीं. नारूच्या जागेवर शेक वगैरे देऊं नये. तो भाग उघडा ठेवावा. धागा बाहेर दिसत असल्यास ओढून काढूं नये.

रोग कसा बरा होतो ?

आठ दिवसांत या रोगाचा परिणाम दिसतो. एकतर सर्वभाग आपोआप बाहेर पडून जातो, अगर जंतु मरून जाऊन त्याचें पाणी पाणी होऊन बाहेर निघून जातें. सूज कमी पडून आराम वाटूं लागतो व पुन्हां या रोगाची भीति राहात नाहीं.

[नारूवर नारळांत हिंग घालून पुटपाक करून देतात. उडविलेला नवसागर देतात. चिञ्चा देतात. नारूवरील औषधें हीं साधारणतः तीक्ष्ण-तीव्र अशींच असतात. तथापि तीं घेत असतां दुधाचें पथ्य पाळ-- ल्यानें व पाणी वर्ज केल्यानें फायदा होतो. दूध कितीहि घेतलें तरी नुकसान होत नाहीं हे वरील पद्धतींत दाखविले आहे. —संपादक]

वि. आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती

बक्षीस समारंभ

अमरावती येथील विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयांत नगराध्यक्ष श्री. उमरलाल केडिया यांचा प्राचार्य वै. पं. दा. मुळे, यांनीं सत्कार केला. त्यानन्तर श्री. केडिया यांच्या अध्यक्षतेखालीं स्नेहसंमेलनांत, क्रीडास्पर्धेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना क्रीडा-पारितोषिकें देण्यांत आलीं.

आपल्या अध्यक्षीय भाषणांत श्री. केडिया यांनीं विद्यार्थ्यांना देशी खेळांत अधिक प्राविण्य मिळण्याचा उपदेश केला.

या प्रसंगीं उपप्राचार्य पु. र. तारे व आचार्य त्र्यंबकगुरुजी यांचीं भाषणें झालीं.

वै. जायदे अमेरिका प्रवास निधि

या निधीचे अध्यक्ष मान्यवर हुक्केरीकरजी यांनीं कर्नाटक लोकमान्य टिळक ट्रस्टमधून या निधीस एक हजार रुपये मिळवून देण्याचें आश्वासन दिलें आहे.

दे. भ. गंगाधररावजी देशपांडे (बेळगांव) यांनीं महाराष्ट्र टिळक ट्रस्ट मधून एक हजार रुपये देण्यांत यावेत अशी शिफारस केली आहे.

नाशिक शहर वैद्यमंडळानें वैयक्तिक देणग्यासह सुमारें १०१ रुपये पर्यंत देणगी देण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे.

मध्यभारत देशी औषधि परिषद

मध्य-भारत देशी औषधि परिषद के चुनाव संपन्न होकर-निम्न लिखित सदस्य निर्वाचित घोषित किये गये।

अभीतक सरकारद्वारा मनोनित सदस्य ही परिषद का कार्य चला रहे थे, उक्त परिषद ने हाल ही में मध्यभारत में वैद्य, हकीमों का रजिस्ट्रेशन (रजिष्ट्रीकरण) करके रजिस्टर्ड वैद्य-हकीमों में से यह चुनाव संपन्न किया।

मध्यभारत देशी औषध परिषद के नवानिर्वाचित परिषद का प्रथम अधिवेशन इन्दौर शहर में फरवरी ११, १२, १३, १४ को हुआ।

प्रथम दिन अध्यक्ष का चुनाव हुआ। सर्वानुमते से इस परिषद के अध्यक्ष राजवैद्य पं. रामेश्वरशास्त्री शुक्ल गवालियर (आप म. भा. आयुर्वेद विभाग के डेप्युटी डायरेक्टर भी है) चुने गये।

परिषद के अध्यक्ष पं. रामेश्वरशास्त्री

दूसरे दिन मध्यभारत स्वास्थ्य -मंत्री माननीय डॉ. प्रेमसिंह राठोर का उद्घाटन भाषण होकर परिषद की कार्यवाही आरंभ हुई। उद्घाटन भाषण में मंत्रीमहोदय ने प्रकट किया कि आयुर्वेद को समुन्नत बनाने के लिये शासन सचेष्ट है. और उसके ठोस सुझाव आने चाहिये।

प्रमुख कार्योंका स्वरूप

परिषद के सामने अनेक प्रस्ताव आये, जिसमें अत्यावश्यक प्रस्तावो को स्वीकार कर तथा शीघ्र ही कार्यान्वित करने के हेतु सब कमेटियों का निर्माण किया गया है जो कि अपना कार्य शीघ्र ही परिषद के विचारार्थ प्रेषित करेगी। प्रमुख कार्यों का उल्लेख इस प्रकार है (१) जिन वैद्यों का रजिस्ट्रेशन नही हुआ है ऐसे प्रकरणोंपर विचार कर निर्णय करना (२) रजिस्ट्रार पद के आवेदनोंपर विचार कर नियुक्ति के लिये अपना मत देना (३) म. भा. में समान आयुर्वेद अध्ययन के लिये पाठ्यक्रम तयार करना। (४) औषधि निर्माण करनेवाली संस्थाओं के संबंध में नियंत्रण आदिपर विचार.

निर्वाचित सदस्यों की नामावली

(१) राजवैद्य रामेश्वरशास्त्री शुक्ल, अध्यक्ष (२), श्री. सुरेंद्र बहादुरशास्त्री, गवालियार (३) सूर्यप्रसाद त्रिवेदी, भिन्ड (४) जानकीप्रसाद मिश्र, शिवपुरी, (५) भैरवसिंह, शाजापुर, (६) श्री. सीताराम अजमेरा, इन्दोर (७) अनन्तराय जैन, उज्जैन (८) सिद्धनाथ त्रिवेदी, सनावद (९) गोपाळराव श्रोत्रियधार, (१०) रामकृष्ण सिंह, भेलसा (११) माधवप्रसादजी, रतलाम (१२) व्यंकटशाचार्य, नीमच (१३) लक्ष्मणस्वरूप भटनागर, प्रिं. राजकीय आयुर्वेद कॉलेज, ग्वाल्हेर (१४) डॉ. सौभागमल पोरवाड, रा. आ. कॉ. इंदोर (१५) लक्ष्मीदत्तशास्त्री इन्दौर, (१६) पं. रामनारायण शास्त्री, इन्दौर (१७) श्री. बद्रीदत्त भट्ट, जावद (१८) हकीम रहमान गनीखां, रतलाम.

अरविंद आयुर्वेदिक इंजेक्शनांच्या
किंमती अतिशय कमी केल्या
ग्राहकांना विशेष सवलत

ता. १।३।१९५५ पासून नवीन नियम लागूं. 'सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन चिकित्सा' या पुस्तकाची किंमत ३ रु. ऐवजीं १॥ रु. केली आहे. पोस्टेज १० आणे निराळे. पुस्तक व्ही. पी. नें पाठविलें जाणार नाहीं. २ रु. २ आणे म. ऑ. नें आगाऊ आल्यावर पुस्तक रजिस्टर्ड पोस्टानें पाठविलें जाईल.

पत्ता- अरविंद केमिकल वर्क्स
छिंदवाडा [म. प्र.]

महाराष्ट्र प्रांतीय दशम वैद्य संमेलन

दहा रुपयाहून अधिक साह्य देणारांची नांवें

५१ रु.	वै.	दत्तात्रेय तोताराम पाटील	खिर्डी (रावेर)
५१ ,,	वै.	विठ्ठल मोतीराम पाटील, ,,	,,
११ ,,	वै.	के. डी. महाजन,	फैजपूर.
११ ,,	वै.	वामन विठू झोपे,	,,
११ ,,	श्री.	अनन्त भिकाजी केळकर ॲण्ड सन्स	,,
११ ,,	वै.	गो. स. जोग,	भुसावळ
२५ ,,	श्री.	शंकर सुपडूशेट,	फैजपूर
२५ ,,	वै.	जीवरामभाई दवे	चाळीसगांव.
११ ,,	श्री.	नाटू देवराम महाजन,	फैजपूर
२१ ,,	श्री.	छगन काशिदासशेट वाणी,	,,
२१ ,,	वै.	तोताराम हिरजी पाटील,	खिर्डी
१५ ,,	वै.	गदाधर गोविंद वैद्य,	अमळनेर
१५ ,,	श्री.	बळिराम बापु वाघुळदे,	फैजपूर
१५ ,,	वै.	विठ्ठल जगन्नाथ पाटील,	चाळीसगांव
११ ,,	वै.	देविदास यशवन्त देव,	,,
११ ,,	वै.	नथू सखाराम धामने.	जामनेर
११ ,,	श्री.	भगीरथ मेडिकल स्टोअर्स,	,,
११ ,,	श्री.	बद्रीलाल हिरालाल,	,,
११ ,,	श्री.	बन्डूलाल नथमल सराफ,	भुसावळ
११ ,,	श्री.	तुकाराम चौधरी आणि कं.	,,
११ ,,	श्री.	बाबूलाल ठाकुरदास,	,,
११ ,,	डॉ.	कृ. शं. पानट,	जळगांव
११ ,,	वै.	अनन्त वामन नाईक,	नशिराबाद
११ ,,	वै.	विठ्ठलदास नानाभाई मेहता,	,,
११ ,,	श्री.	मय्याजी रामचन्द्र गर्गे,	,,
११ ,,	श्री.	रामचन्द्र शंकर देशपांडे,	,,

म. प्रां. वैद्य संमेलन, भूसावळ

तयारी जोरांत सुरूं आहे

भुसावळ येथें भरणाऱ्या दशम प्रांतीय वैद्य संमेलनाची तयारी जोरांत सुरूं आहे. या संमेलनांत पारद-संस्कार-विषयक कांहीं प्रक्रियांचें प्रात्यक्षिक दाखविण्यांत येणार आहे. मे महिन्याच्या प्रारंभीं भरणाऱ्या आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेस आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापक व मान्यगुरु येणार असल्यामुळें ती परिषद आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमाबाबत निश्चित रित्या पुढें पाऊल टाकीत असा विश्वास वाटत आहे. भुसावळ हें स्थान प्रवासदृष्ट्या मध्यवर्ति असल्यामुळें मुंबई प्रांताप्रमाणेंच वऱ्हाड, नागपूर, जबलपूर, झांशी, लखनौ, बडोदा, सुरत, इ. ठिकाणची अग्रणी वैद्य मंडळी उपस्थित राहाणार आहेत अशी पत्रें येऊं लागली आहेत

सातपुडा पर्वत जवळ असल्यामुळें तेथील वनस्पतींचे प्रदर्शन हाही या संमेलनाचा विशेष आहे.

मुंबई राज्य परिषद याचवेळीं भुसावळ येथें होणार असल्यामुळें गुजराथ व कर्नाटक या प्रांतातील प्रमुख वैद्यांच्या गाठीभेटी होण्याचा हा सुयोग आहे. राज्य सरकारांतील प्रमुख लोकहि उद्घाटन कार्यांस येऊन संमेलन यशस्वी करण्यांत भाग घेतील असा अंदाज आहे.

– मंत्री, म. प्रां. वै. संमेलन

अनुक्रमणिका

मध्यप्रदेश स्वास्थ्य परिषद, नागपूर ५३९
वैद्य डेग्वेकर-डॉ. म्हसकर पत्रव्यवहार ५४१
केंद्रीय स्वास्थ्य परिषद ५४६
अकोला जिल्हा कुष्टरोग परिषद ५४७
पं. नेहरुंच्या आरोग्याचें रहस्य ५४९
फुरसे दंशावर उपचार ५५१
अस्थिभंगावर आयुर्वेदीय बंध-प्रलेप ५५२
आयुर्वेद औषधीभवनाच्या पथ्यकारक गोळ्या ५५३
वै. पां. ह. देशपांडे, पुणें ५५५
आयु. अध्या. चर्चा परिषद, नाशिक जमाखर्च ५५६
आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नाशिक ५५७
सहा रसांची संकृत तेलें ५६५
नारुवरील औषध घेण्याची एक रीत ५६७
मध्यभारत देशी औषधि परिषद ५६८

उन्हाळयांत शक्ती-स्फूर्तीसाठीं

शतावरीकल्प, सारिवाकल्प, यष्टिमधुकल्प घ्यावेत. रंगीबेरंगी सरबतांच्या महाग बाटल्या वापरण्यापेक्षां हे कल्प वापरणें अधिक हिताचें व स्वस्त आहे.

उन्हाळयांत सर्वांना घेण्यासाठीं योग्य

अश्विनीप्राश

ऋषिप्रणीत क्षयरोगप्रतिबंधक पौष्टिक कल्प.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नाशिक

चेहऱ्यावरील पुळ्या !

रक्तशुद्धीकरितां

नांणावलेलें "रक्तदोषांतक" घेऊन

आपणांस हा त्रास..वांचवतां येईल.

रक्त-दोषांतक

"आफालि"

आपल्या विश्वासाचें प्रतीक

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड (आफालि) अहमदनगर.

EVEREST R. 53.4

संपादक व प्रकाशक: —वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विवलकर कारंजा, नाशिक
मुद्रक:— श्री. चिं. ओक, पर्ल प्रेस, नाशिक

२७/२

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

वर्ष ८ वें) नासिक, ता. १६ मार्च १९५५ (अंक १८ वा

गुरुकुल पत्रिका

राष्ट्रपतींची राज्यसरकारांवर जाहीर टीका

" आज आयुर्वेदावर फारच थोडा खर्च केला जातो. "

भारतांत निरनिराळ्या संस्थांच्या उद्घाटनासाठीं भारताचे राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांना बोलाविण्यांत येतें व अनेक इमारतींचा पाया त्यांच्या हस्तें घातला जातो. हे सर्वच समारंभ त्यांना मनापासून पसंत असतात असें नाहीं. कांहीं गोष्टी भिडेखातर केल्या जातात. निरनिराळ्या प्रांतांत केवळ पाश्चात्य वैद्यक पद्धतीचीं रुग्णालयें व महाविद्यालयें उघडलीं जात आहेत ही गोष्ट त्यांना तितकीशी पसंत नाहीं. अशा प्रसंगीं आयुर्वेदासंबंधींचे आपले विचार ते बोलून दाखवित असतात.



राष्ट्रपति

नुकतेंच इंदूर येथें महात्मा गांधी स्मारक मेडिकल कॉलजचें उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्तें झालें, त्यावेळीं राज्य-सरकारांनीं व केंद्रीय सरकारनें आयुर्वेदाच्या अध्ययन, अध्यापन व चिकित्सा पद्धतीला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली. सध्यां देशांत सर्वत्र अंदाजपत्रकावर चर्चा चालूं आहे. या अंदाजपत्रकांतून वैद्यकीय खात्यावर जो प्रचंड खर्च होतो त्यांतील फारच थोडा भाग आयुर्वेदाच्या कारणीं खर्च केला जातो.

नागपूर येथील पाश्चात्यवैद्यक महाविद्यालयाच्या उद्घाटन प्रसंगींहि त्यांनीं असेच विचार व्यक्त केले होते. गेल्या कांहीं वर्षांत देशांत अनेक पाश्चात्य वैद्यकीय कॉलेजें निघालीं, परंतु त्यांनीं ग्रामीण भारतांतील कोट्यावधि जनतेच्या वैद्यकीय गरजा पुऱ्या होण्यास मदत झाली नाहीं. त्यासाठीं आयुर्वेदाला उत्तेजन देणेंच आवश्यक आहे असें त्यांचे मत आहे.

मुंबई राज्य सरकारकडून

शुद्ध आयुर्वेद शिक्षणाची अनपेक्षित उपेक्षा

१९५३ सालीं मुंबई सरकारनें एक जाहीरनामा काढून राज्यांत गुरुपरंपरा-पद्धतीनें वा शुद्ध आयुर्वेद विद्यालयें यामार्फत शुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण देण्याची परवानगी दिली. व सात जणांची एक शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समिति स्थापन करून तिच्याद्वारें अभ्यासक्रम-निश्चिति व परीक्षा घेण्याची व्यवस्था जाहीर केली.

पाठ्यक्रम समितीनें केलेलें कार्य

या समितीनें गेले दीड वर्षभर गुजराथ, महाराष्ट्र व कर्नाटक या तीनहि विभागांत दौरे काढून राजमान्य गुरु व शिक्षणसंस्था यांना मार्गदर्शन करण्याचें काम केलें. व या गुरूंना व शिक्षणसंस्थांना अध्यापन-कार्यार्थ लागणारें साहित्य खरेदी करण्यासाठीं आर्थिक मदत करावी अशी सरकारकडे ताबडतोब सूचना केली.

शिक्षणाप्रीत्यर्थ झालेला खर्च

त्याचप्रमाणें महाराष्ट्र, कर्नाटक, इत्यादि विभागांत सुरू झालेल्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयांनींहि आपल्या आर्थिक गरजा, आरोग्यमंत्री व पाठ्यक्रम समिति यांना वेळोवेळीं कळविल्या; व आपणांस चालू सालीं ३१ मार्चच्या आंत कांहीं ना कांहीं सरकारी आर्थिक मदत मिळेल या कल्पनेनें जरूर ते ग्रंथ, अध्यापनसाहित्य, जागा, अध्यापक, कार्यालय प्रयोगाचीं साधनें, नकाशे इ. गोष्टींवर उसनवार पैसे आणून खर्चहि केला.

रुग्णालय असेल तरच मान्यता

या खर्चाविषयीं कांहीं अवाक्षरहि न काढतां शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीनें आजच संस्थेचें स्वतःचें शुद्ध आयुर्वेद रुग्णालय असलें पाहिजे, तरच पुढील वर्षी नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश देतां येईल असा दंडक घातला आहे. व रुग्णालय आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं निरीक्षक मंडळ पाठविण्याची व्यवस्था केली आहे.

रोजचा १०० रुपयांचा खर्च

रुग्णालय म्हणजे प्रत्येक शय्येमागें ५-६ रु.चा दैनिक खर्च व अशा १६ शय्या ठेवावयाच्या म्हणजे रोजचा सुमारें १०० रु. खर्च या गरीब संस्थांचालकांनीं कोठून आणावयाचा ? याचा कांहींच मार्ग समिति दाखवित नाहीं. व जें सरकार दरसाल लाखों रुपये मिश्र आयुर्वेद शिक्षणसंस्थांना देतें त्याच सरकारला १९५५-५६ चें अंदाजपत्रक जाहीर करतांना शुद्ध आयुर्वेदाची आठवणसुद्धां होत नाहीं हें आश्चर्य नव्हे काय ?

समितीच्या मर्यादा व अपेक्षा

गुरूंना व शिक्षणसंस्थांना सरकारकडून द्रव्य साहाय्य मिळवून देणें ही गोष्ट आपल्या कार्यक्षेत्रांत येत नाहीं, असें पाठ्यक्रम समिति आतां सांगू लागली आहे. व त्याचवेळीं पुढील पांच वर्षांत तुमच्या संस्थेची वाढ करण्याच्या तुमच्या योजना काय आहेत व त्यांच्या खर्चाचा अंदाज काय आहे तो संस्थाचालकांनीं लिहून कळवावा अशी समितीची अपेक्षा आहे.

अंदाजपत्रकाचा संस्थावर परिणाम

आजच शुद्ध आयुर्वेदाचें अध्यापन करणारे मान्य-गुरु व शिक्षण-संस्था या डोईजड अभ्यासक्रमानें व त्यासाठीं कराव्या लागणाऱ्या खर्चानें जेरीस आल्या आहेत. मुंबईसरकार आर्थिक मदत अवश्य करील ही त्यांची वेडी आशा अंदाज पत्रकांतील उल्लेखाच्या अभावानें पार धुळीस मिळाली आहे. अशावेळीं पाठ्यक्रम समितीनें रुग्णालयाची व भावी योजनांची मागणी करणें म्हणजे ब्रम्हचारी माणसाच्या मुलाच्या मौंजीतील पक्वान्नाची चवकशी करण्याइत-

[पुढील मजकूर पान नं. ६०० वर पहा]

टीकाकार आप्त मानावेत काय ?

(लेखकः– वैद्य त्र्यंबकशास्त्री दाते, नासिक)

दिनांक १६-१२-५४ चे आयुर्वेद पत्रिकेंत आयुर्वेदतीर्थ श्री. वा. ग. अंदनकर यांचा 'टीकाकार आप्त मानावेत काय ?' या शीर्षकाखालीं एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यामध्यें चरकसूत्रस्थानामधील वायुः पित्तं कफश्चोक्तः शारीरो दोषसंग्रहः । या श्लोकावर श्रीचक्रपाणिदत्तांनीं केलेल्या 'आयुर्वेददीपिका' नांवाचे टीकेंतील एक वचन उद्धृत केलें आहे. अनेक वचनें विषयाशीं सुसंबद्ध नसलेलीं अशीं चरकसंहितेव्यतिरिक्त दुसऱ्या संहितामधील दिलीं आहेत. येन केन प्रकारेण श्रीचक्रपाणिदत्त या टीकाकारांस, पक्वव्रण व त्यांतील स्रावासंबंधीं अज्ञान होतें असें दाखवून त्यांच्या शारीरज्ञानाबद्दल शंका प्रदर्शित केली आहे. कांहींतरी अशास्त्रीय अशी टीका त्यानें लिहिली आहे, सबब या टीकाकारांना चरकोक्त आप्तलक्षण लावण्याचा मोह करूं नये, ज़रा जपूनच वागावें हें बरें, असा निष्कर्ष शेवटीं काढला आहे.

या लेखांतील निष्कर्षांचा विचार करण्यापूर्वी प्रथम या लेखाचें आपण विहंगमावलोकन करूं.

पित्तज पक्वगुल्माचें स्थान

लेखकानें पित्तगुल्माचा विचार करतांना सुश्रुतसंहितेंतील व्रणस्थानवचनें, सर्वस्राववचनें, व व्रणवर्णवचनें दिलीं आहेत, व स्थानाविचार करतांना अष्टांगहृदयाचा आधार घेतला आहे. सुश्रुताचार्यांचे मतानें गुल्माचा पाक होत नाहीं, इकडे मात्र जाणूनबुजून दुर्लक्ष केलें आहे.

उर्ध्वप्रवृत्ति कशाची होईल ?

यासंबंधीं विवेचन करतांना लेखकानें श्रीचक्रपाणींना पुरीषाचीच फक्त उर्ध्वाधः प्रवृत्ति माहिती होती, पूयादिकांची उर्ध्वाधःप्रवृत्ति माहीत नव्हती असें दाखवून टीकाकारांवर अज्ञानीपणाचा आरोप केला आहे नन्तर पुन्हां श्रीवाग्भटाचार्यांचें 'शकृत्रोधज मुखेन विट्प्रवृत्तिश्च' । हें वचन घेऊन टीकाकार हे असत्य विधान करणारे आहेत असें सांगून श्रीचक्रपाणीनें केलेलें, 'इत्यत्र पुरीषमेव दोषत्वेन उक्तम्' हें विधान पूर्ण असत्य होय असें ठासून सांगितलें आहे. शिवाय प्रस्तुत प्रकरणाला गैरलागू अशी "स्नेहाक्लिन्ना कोष्ठगा धातुगा वा" इत्यादि अष्टांगहृदयांतील श्लोक, व उपेक्षावचनें उद्धृत करून श्रीचक्रपाणिटीकाकारांस स्नेहस्वेदादिपंचकर्मांनीं यथासन्न दोषनिर्हरण कसें करावें व प्रभूतदोषांचें व स्वयंप्रवृत्तदोषांचें उपेक्षण कसें करावें हें माहीत नव्हतें, असा भाव उत्पन्न केला आहे. इतकें लेखाचें अवलोकन केल्यानन्तर आतां लेखांतील मुद्यांचा विचार करूं.

–लेखक–

या लेखांत महत्त्वाचा मुद्दा एकच आहे व तो म्हणजे श्रीचक्रपाणिटीकाकारांस त्यांच्या टीकेंतील 'इत्यत्र पुरीषमेव दोषत्वेन उक्तम्' या वचनाचे

आधारें टीकाकारांस अनाप्त व असत्य विधान करणारे ठरविणें हा आहे. याकरितां अनेक उपमुद्यांचें जाळें विणलें आहे व त्याकरतां आयुर्वेदीय संहिता ग्रंथांतील वचनांची वृष्टि केली आहे. या मुख्य मुद्याचा विचार केल्यानंतर बाकीचे लिखाणाचा परामर्श घेणेंची जरूरीच राहणार नाहीं.

अनाप्त ठरविणारें मूळ वचन

'स्वयं प्रवृत्तं तं दोषं उपेक्षेत हिताशनैः।
इत्यत्र पुरीषमेव दोषत्वेन उक्तम् । '

हें वाक्य टीकाकारांनीं वातपित्तकफ हेच दोष-संज्ञेला योग्य आहेत, रक्त हें दोषसंज्ञेला योग्य नाहीं, रक्ताला कांहीं ठिकाणीं लावलेली दोषसंज्ञा ही इतर द्रव्यांना लावलेल्या दोषसंज्ञेप्रमाणें संज्ञामात्रच आहे, अनुगतार्थ नाहीं, हें सिद्ध करतांना वरील वाक्य टीकेंत आलेलें आहे. या एका टीकावाक्यावरून विचार करून लेखकमहाशयांनीं न्यायाधीशाचा आव आणून इतर पुराव्याचा कांहींहि विचार न करतां एकदम निकाल दिला कीं, टीकाकार हे अनाप्त आहेत.

पुरीषाऐवजीं 'पूय' शब्द घालावा

या मुद्यासंबंधीं आम्ही लेखकांस असें सुचवूं इच्छितो कीं, त्यांनीं त्यांना व्यवहारतः घाणेरडे वाटणारे पुरीष काढून टाकून त्या स्थानीं त्यांचे दृष्टीनें कमी घाणेरडा असणारा 'पूय' शब्द घालावा व विष्ठा-माईचें हें पुरीषसूक्त थांबवावें, व नंतर ही श्री-चक्रपाणींची टीका वाचून पहावी म्हणजे टीकाकारांनीं केलेलें विधान कसें बरोबर आहे हें दिसून येईल. ' इत्यत्र पुरीषमेव दोषत्वेनोक्तं' । या टीकावचनामध्यें 'पुरीष'शब्द नसावा,'पूय' शब्द असावा, असें आम्हांस कां वाटतें याबद्दल अल्प दिग्दर्शन पुढें करीत आहोत.

मुद्रणाची सोय नसतांना टीकेसह संहिता हातानें लिहून घेतांना लिहून घेणाऱ्याच्या हस्तदोषा-मुळें व अर्धवट ज्ञानामुळें व नंतर ही सटीक पुस्तकें मुद्रित करतांना पूय शब्दाचे स्थानीं पुरीष असा जांवईशोध पूर्वीचे लेखकानें केला असावा. नंतरहि सटीक संहितांचें मुद्रण व पुनर्मुद्रण करतांना ही झालेली चूक अनवधानतः तशीच राहून गेली असावी, असें आम्हांस वाटतें. अशा तऱ्हेचीं अशुद्ध मुद्रितें व अपपाठ नवीं जुनीं मुद्रित व हस्तलिखित पुस्तकें पाहिलीं असतांना आपणांस दिसून येतात, व जरूरी असल्यास अशीं अनेकानेक उदाहरणें दाखवितां येतील. आमचे म्हणण्याचे समर्थनार्थ चरक संहिता चि. स्था. अ. ५ श्लोक ४२ ते ४७ यावरील श्री-चक्रपाणिदत्तांची टीका व यांच श्लोकांवरील श्रीगंगा-धर कृत जल्पकल्पतरु टीका खालीं उद्धृत करीत आहोंत. त्याचे अवलोकनानें दोष शब्दाचा अर्थ पुरीष असा मुळींच केलेला नाहीं हें स्पष्ट होईल. जर श्रीचक्रपाणींना पहिल्या अध्यायांतील श्लोकावर केलेल्या टीकेंत निश्चयानें पुरीष हाच अर्थ अपेक्षित असतां तर गुल्मचिकित्सेचे अध्यायांतील श्लोकांमधील दोष या शब्दावर निश्चित पुरीष हा पर्याय शब्द त्यांनीं दिला असता !

टीका श्रीचक्रपाणिदत्तकृत पहा—

विदाह लक्षणे इति दाहादिषु इत्यर्थः। बहिस्तुङ्गे इति बाह्यतः उन्नते । समत्वे इति समत्वेनोन्नते, न निम्नोच्च विभागेन । निपीडितानंतरमुन्नते निपीडितोन्नते । स्तब्धे इति वर्तुले । सुप्ते इति मंदवेदने इत्यर्थः । धान्वंतरीयाणामिति धन्वंतरितन्त्राध्यायिनां शल्यविदामित्यर्थः। कृता शस्त्रकर्मणि योग्या यैस्ते कृतयोग्याः । गुल्मस्य च पाकः सुश्रुते निषिद्धः "स यस्मात् आत्मनिचयं गच्छत्यप्सु इव बुद्बुदः । अंतः सरति यस्मात् च न पाकमुपयात्यतः । [उ. तं. अ. ४२] इति । तथापि इह कृतवास्तुपरिग्रहस्य गुल्मस्य पाकः उच्यते, यस्तु अकृतवास्तुपरिग्रहः स न पच्यते इतीहापि अनुमतं । यस्तु कृतवास्तुपरिग्रहतया पच्यते इति उच्यते तस्य विद्रधित्वेन पाको जायते इति संज्ञामात्रेण विसंवादः । अंतर्भागस्थितस्य इति कोष्टमध्यास्थितस्य । यद्यपि सर्व एव गुल्मः कोष्ठस्थः तथापि इह यो बहिरुन्नतश्रितो न भवति स इह तत्स्थोऽभिप्रेतः हृत्क्रोडशूनतान्तःस्थे इति अंतस्थ पाके हृत्क्रोडस्य शूनता भवति । बहिस्थे पार्श्वनिर्गतिः पार्श्वनिर्गतिर्गुल्म एव दृश्यते । व्रजत्यूर्ध्व-

मिति स शब्देन अंतस्थेन अभिप्रेतः उपेक्षेत हिताश-नैरिति हिताशनस्तिष्ठेत् न किंचित् भेषजं कुर्यात् रक्षन् उपद्रवान् इति उपद्रवे ज्वरादिभ्य ः रक्षन् इत्यर्थः। स विशोधनमिति विशेषेण शोधनं सर्पिःपानं तिक्तमिति तिक्तद्रव्यसाधितम्। ”

या श्रीचक्रपाणींचे टीकेवरून गुल्म पिकल्यानंतर होणारा स्राव पुरीषाचाच आहे अशी टीकाकारांची कल्पना होती असें म्हणणें टीकाकारास आयुर्वेद-शास्त्राचा गंध सुद्धां नव्हता असें म्हणण्यासारखें आहे. दुसऱ्या टीकेतील या श्लोकावरील टीकेचा उतारा—

चरकसंहिता जल्पकल्पतरु टीका

पक्वः सन् गुल्मः स्रोतांसि संक्लिद्य उर्ध्वमधो-पि वहति पूयमिति शेषः। यदि पक्वे गुल्मे दोषः पूयरूपः स्वयं प्रवर्तते तदा स्वयं प्रवृत्तं तं दोषं हिताशनैः दशाहं द्वादशाहं वा पूयस्रावावसानप्रायं यावत् अन्यान् उपद्रवान् रक्षन् यथान्ये तूपद्रवानभवंति तथा सन् उपेक्षेत न रोपणार्थं भेषजं दद्यात्। ततो निःशेषपूयस्रावप्रायं दृष्ट्वा उर्ध्वं सर्पिःपानं पूयशोधनं च भेषजं दद्यात्।

आणखी एक प्रमाण

श्रीचक्रपाणि, हे स्वरचित ‘ चक्रदत्त ’ ग्रंथांत गुल्मचिकित्सेंत लिहितातः-

दाहशूलानिलक्षोभस्वप्ननाशारुचिज्वरैः।
विदह्यमानं जानीयात् गुल्मं तं उपनाहयेत्॥
पक्वे तु व्रणवत् कार्यं व्यधशोधनरोपणम्।
स्वयमूर्ध्वमधो वापि स चेत् दोषः प्रपद्यते॥
द्वादशाहमुपेक्षेत रक्षन् अन्यानुपद्रवान्।
परं तु शोधनं सर्पिः शुद्धे समधुतिक्तकम्॥ इत्यादि

त्याचप्रमाणें चक्रपाणिदत्त- टीकाकारांना पुरीषाच दोष शब्द वापरला आहे असें उदाहरण द्यावयाचें असतें तरी अशीं निरपवाद पुरीषालाच दोषसंज्ञा दिलेलीं अनेक उदाहरणें श्रीचरकसंहितेंतून देतां आलीं असतीं. तसेंच श्रीचक्रपाणिदत्तांची सुश्रुतसंहितेवर भानुमती नांवाची टीका आहे त्यावरून त्यांना सुश्रुतोक्त व्रणवास्तु व व्रणस्रावांची माहिती नव्हती हें म्हणणें सुद्धां फोल ठरेल. वरील विवेचना-वरून श्रीचक्रपाणिदत्त टीकाकारांवर केलेले आरोप बरोबर नाहींत असें आम्हांस वाटतें.

आयुर्वेदाच्या अभ्यासकांस सूचना

टीकाकार हे आप्त का अनाप्त हा वाद बाजूस ठेवून (सुगमविषमपदानां अर्थप्रकाशिनी या सा टीका) या टीकालक्षणानें युक्त टीका आहे किंवा नाहीं व आमचे सारखे अल्पबुद्धीचे विद्यार्थ्यांना संहितार्थांचें सन्मार्गदर्शन घडून संहितामध्यें असलेले अनेक अर्थदुर्ग उल्लंघून आयुर्वेदामृताची प्राप्ति होते किंवा नाहीं तें पहावें. लेखकमहाशयांचे म्हणण्याप्रमाणें जपूनच वागण्याचें कांहीं कारण नाहीं. ते आपणाला कोठेंहि दुर्गम मार्गावर नेणार नाहींत, योग्य मार्गावर नेतील असें आम्हांस वाटतें.

लेखकांस विनंति

कोणाहि व्यक्तीवर असत्यपणाचा वा अनाप्ततेचा आरोप करण्यापूर्वी आपल्या शंका विद्वानांपुढें ठेवून किंवा तद्विद्य संभाषापरिषदेंत मांडून त्यांचा निर्णय करून नन्तर त्या प्रसिद्धीला द्याव्यात. मात्र या परिषदा-संधाय संभाषाच असाव्यात, विगृह्य संभाषा-परिषद् नसाव्यात. निदान हयात नसलेल्या व्यक्तीं-संबंधीं वा त्यांनीं लिहिलेल्या ग्रंथांसंबंधीं लिहितांना परकीयांनीं केलेला ग्रंथनाश व हस्तलेखकांचें लेखन-प्रमादादि दोषांचा विचार करून त्यांचेवर कोणत्याहि प्रकारें अन्याय होणार नाहीं अशा दृष्टीनें त्यांनीं लिहिलेले ग्रंथ व टीकांमधील वचनांचा पूर्वापर संबंध लक्षांत आणून मग त्यांचेवर आक्षेप घ्यावेत.

श्री. रा. वा. स. अंदनकर यांच्या आयुर्वेदाच्या सूक्ष्म अभ्यासाबद्दल आनन्द प्रदर्शित करून व त्यांचा आयुर्वेदाचा अभ्यास असाच वृद्धिंगत होवो व त्या अभ्यासाचा लाभ आमचेसारखे विद्यार्थ्यांस मिळो अशी ईश्वरचरणीं प्रार्थना करतो. वरील लिहिण्यांत कांहीं चुका झाल्या असल्यास तिकडे दुर्लक्ष करावें, व कांहीं गुणलेश असल्यास स्वीकृत करावा अशी नम्र विनंति करतो.

लिंबूरस व सायट्रिक ॲसिड

वाचकांचा पत्रव्यवहार या सदराखालीं आयुर्वेद पत्रिकेच्या १६ फेब्रुवारीच्या अंकांतील पान ५२१ वर विचारणा केल्यावरून लिंबूरसाऐवजीं सायट्रिक ॲसिड वापरावें काय याबाबतचें माझें मत कळवित आहे व तें उपयुक्त वाटेल अशा विश्वास आहे.

औषधाला लिंबाच्या रसाच्या भावनेऐवजीं सायट्रिक ॲसिड वापरलें तर गुणांत निश्चित फरक आढळून येईल. कारण लिंबूरस निसर्गनिर्मित असल्यामुळें त्यामध्यें जीवनसत्व 'क' [व्हिटॅमिन 'सी'], सायट्रिक ॲसिड, थोड्या प्रमाणांत शर्करा व लिंबूरस पिळून काढण्याचे वेळेस सालींतील सुगंधी तेलाचा अंश यांचा संयोग असतो. त्यामुळें ताजा रस वापरल्यानें वरील द्रव्यांचा गुण मुख्यत्वेंकरून मिळतो. लिंबूरस-युक्त औषधें नेहमीं थंड कोरड्या ठिकाणीं व उजेडापासून दूर ठेवल्यास रसाची वीर्यहानि होणार नाहीं.

त्यानंतर लिंबाचा टिकाऊ रस वापरला तर त्यांतील जीवनसत्वाचें शेंकडा ५० ते ६० टक्के प्रमाण कमी होतें, त्यामुळें तेवढा गुणहि कमीच येणार.

सायट्रिक ॲसिड टाळावें

रसाऐवजीं सायट्रिक ॲसिड वापरलें तर त्यांत जीवनसत्व नसतें; कारण एक तर तें रसापासून तयार केलेलें नसतें व रसापासून तयार केलेलें असल्यास त्यांतील जीवनसत्व व इतर द्रव्यांचा नाश झालेला असतो, त्यामुळें रसाचा अपेक्षित गुण ॲसिडमध्यें कसा येणार? म्हणून सायट्रिक ॲसिड वापरावयाचें टाळावें हें अधिक चांगलें.

दुसरें, सायट्रिक ॲसिडच वापरावयाचें झाल्यास ते ७ ते ८ टक्के वापरावें, म्हणजे १०० तोळे रस वापरावयाचा झाल्यास ७ ते ८ तोळे सायट्रिक ॲसिड पाण्यांत विरघळवून वापरावें म्हणजे रसांतील सायट्रिक ॲसिडचें प्रमाण बरोबर उतरेल.

—व्यवहारे मा. या.

नाशिक बी. एस्सी. [फार्म केम्.]

तुलनेच्या भानगडी

१६ फेब्रुवारीचा आयुर्वेद पत्रिकेचा अंक मिळाला. त्यांत पान ५२० वर 'हें आयुर्वेद सांगूं शकतो' अशा मथळयाखालीं गूळ, साखर, मध, बकरीचें मांस व इतर मांस, तूप व तैल यांचा शरीरावर घडणारा परिणाम भिन्न कां होतो, हें आयुर्वेद सांगूं शकतो, असें वै. करमरकर यांनीं दिलें आहे. कदाचित् त्यांना आधुनिक जीव – रसायनशास्त्र (Bio--chemistry) याची माहिती दिसत नाहीं. हें शास्त्र त्यांतील निरनिराळे रासायनिक घटक त्यांची अणु-सूत्रें यांची माहिती देऊन गुणधर्महि सांगतें. हें भिन्नत्व (रासायनिक) आयुर्वेद सांगू शकत नाहीं.

सर्व वैद्यांना नम्र विनंति

तरी माझी आपणां सर्व वैद्यवर्गास अशी नम्र विनंति आहे कीं, त्यांनीं या तुलनेच्या भानगडींत पडूं नये. चरक सुश्रुत यांनीं जें सांगितलें त्याचें अनुभव फक्त सांगावेत व आयुर्वेद जीवन्त ठेवावा. या तुलनात्मक भानगडी आमच्या सारख्या शास्त्रज्ञांकडे सोंपवाव्या.

सायट्रिक ॲसिड वापरूं नये

पान ५२१ वर लिंबाच्या रसाऐवजीं सायट्रिक ॲसिड वापरावें कां? असा प्रश्न आहे. उत्तरः— वापरूं नये. कारण लिंबाचे रसांत अन्य रासायनिक द्रव्यें आहेत व त्या सर्वांचा सामुदायिक उपयोग रासायनिक परिवर्तनाकरितां होतो. नुसतें सायट्रिक ॲसिड जास्त पोटांत गेल्यास रक्तस्राव करतें.

मूळपाठाप्रमाणें वागावें

रक्तस्रावावर उपाय व्हिटॅमिन 'सी' तें लिंबाच्या रसांतच असतें. तरी वैद्य लोकांनीं रासायनिक घटक याचेकडे दृष्टि देऊं नये. मूळ पाठांत जें दिलें आहे त्याचप्रमाणें वागावें.

— डॉ. वि. वि. गोरे

रसायनशास्त्र प्राध्यापक, म. म. विद्यालय, जबलपूर

निंबपीयूषासंबंधींचे माझे अनुभव

(लेखकः- सीताराम रंगनाथ जोशी, को. बो. दवाखाना, बोठवाण, जि. नाशिक)

आमच्या गांवीं असलेला, ८०।८५ वर्षांचा मदोन्मत्त "लिंबराज" मदस्राव करणाऱ्या मदोन्मत्त गजराजाप्रमाणें स्राव करण्यापूर्वी ३।४ दिवस अगोदर मन्द मन्द गर्जना करूं लागला. खेड्यांतील जनता भीति व आश्चर्ययुक्त होत्साती लिंबराजाची गर्जना कान देऊन ऐकूं लागली. कोणी म्हणे, लिंबांत पिशाच्चाचा संचार झाला. कोणी म्हणे, हा दैवी चमत्कार आहे. कांहीं कां असेना, ३।४ दिवसांत आवाज बंद होऊन लिंबराजानें आपल्या मन्दस्रावास सुरवात केली. पुष्कळसे लोक भावनेनें तें तीर्थोदक म्हणून प्राशन करूं लागले. व घरांत त्या रसाचा यथाशक्य सांठा करूं लागले. पण याचा उपयोग काय हें मात्र कोणीहि निश्चित सांगेना. अखेरला आरोग्याचा समन्वय करणाऱ्या धर्मशास्त्रकाराचे वचनाचा अवलंब करून स्रावाचा चिकित्सेंत उपयोग करण्यास मी सुरवात केली. नूतन वर्षारम्भींच धर्मशास्त्रकारांनीं लिंबपर्ण भक्षण करण्यास सांगून आधि-व्याधिपीडित दुःखीतांच्या दुःखनाशाची हमी घेतली आहे.

तैलाभ्यंगं स्नानमादौ च कृत्वा पीयूषोत्थं पारिभद्रस्य पत्रं । भक्षेत्सौख्यं मानवो व्याधिनाशं दीर्घायुः श्रीर्लभ्यते वर्षमूले ॥

जेथें लिंबपत्राला धर्मशास्त्रकारांनीं "पीयूषोत्थं" म्हटलें, तेथें हा स्राव पीयूष नाहीं कशावरून ? म्हणून प्रत्येक रुग्णास प्रथम १-१ तोळा हें पीयूष देण्यास सुरवात केली. शीतज्वर, जीर्णज्वर, पामा, विसर्प या रुग्णांना तर केवळ "लिंबस्रावच" दिला. यथाकाल सर्व रुग्ण व्याधिमुक्त झाले. लिंबस्रावाच्या गुणाबद्दल खात्री जास्त दृढ झाली, व नंतर जीर्णरुग्णावर प्रयोगास प्रारंभ केला.

जुनाट संग्रहणी गद

रुग्ण, वय ६० वर्षें, क्षीणबल, हात पाय व प्रेक्षणकूट शोथपीडित, चिरकालानुबंधी, गलज्जल घटीध्वनिः असा व १॥ वर्षपर्यंत संग्रहणीपीडित असा हा आमचा प्रथम रुग्ण. नानाप्रकारच्या पाश्चात्य चिकित्सा घेऊन शेवटीं डॉक्टरांनीं असाध्य (होपलेस) म्हटल्यावर सदर गृहस्थ आयुर्वेदीय चिकित्सेस तयार झाला. त्याला सकाळ सायंकाळ १-१ औंस लिंबस्राव देऊन दुपारला १ तोळा कुटजारिष्ट समभाग पाण्यांतून दिलें. पथ्य- ताजें ताक व पातळ कण्हेरी. दीडमहिना सारखा उपचार केल्यावर ३५ ते ४० वेळेचें शौचाचें प्रमाण ४ वर आलें, अग्नि प्रदीप्त होऊं लागला. आणखी १५ दिवस चिकित्सा चालूं ठेवून नंतर अन्न देण्याचें ठरविलें. शोथादि सर्व उपद्रव नष्ट झाले असून रुग्ण आतां ४ फर्लांगपर्यंत मोकळ्या हवेंत फिरूं शकतो.

मधुमेह व संज्ञाहीनत्व

रुग्ण- मधुमेही, वय वर्षे ४१ मध्यबल, मूत्रांतून सारखी शर्करा जात असे. मधून मधून एका बाजूला अर्धांगाप्रमाणें झटका, हृदयसाद व कांहीं वेळ संज्ञाहीनत्व येई. पाश्चात्य उपचार Intedon, Seclopen, Berin, Insuline, Coramine चीं सूचिकाभरणें निरंतर चालूं, निद्रल म्हणून १ दिवसाआड Soneril गोळी देत असत. एक वेळ रात्रौ एकाएकीं घाताचा झटका येऊन तें संज्ञाहीनत्व ४ तास टिकलें. अर्थातच हृदयावसाद होताच, म्हणून समीरपन्नग ·।।·गुंज, हेमगर्भ·।।·गुंज, महावातविध्वंस ·।।·गुंज, या प्रमाणाच्या ४ पुड्या ३-३ तासांनीं आल्याच्या रसाबरोबर दिल्या व त्याच बरोबर सकाळला बिल्वपत्र रस २ तोळे देण्यास सांगितलें. हा प्रकार २-३ दिवसाआड होत असे, व असा प्रकार घडला कीं, मूत्रपरीक्षणांत शर्करेचें प्रमाण वाढलेलें दिसे. वरील उपचारांनीं रोग्यास बरें वाटलें.

नंतर रुग्णाची व तदनुषंगींची आयुर्वेदीय उपचारावर श्रद्धा निर्माण करून पाश्चात्य सर्व उपाय बंद केले. व निघंटकारांनीं " व्रण-पित्त-कफ-छर्दि-कुष्ठ हृल्लास-मेहनुत् " असे निंबाचे गुणधर्म सांगितल्यामुळें एकवेळ बिल्वपत्ररस व एकवेळ लिंबस्राव १।१ औंस प्रमाणांत सकाळ-सायंकाळ सुरूं केला. मध्यंतरीं चंद्रप्रभा ४ गुंजा देत असे. तसेंच, समीर, वातविध्वंस अभ्रकयुक्त सर्व मिळून २ गुंजाची १ पुडी देऊं लागलो. व दररोज सकाळीं मूत्रपरीक्षणास सुरुवात केली. हळू हळू शर्कराप्रमाण घटलें. शर्करा बंद करून " क्षौद्रं माक्षिकमप्येवं विशेषान्मेहनाशनम् " म्हणुन साखरेऐवजीं मध देण्यास सांगितलें. रुग्णाला गाकर व लसणाची चटणी-हुरड्याचे, ओंब्याचे गाकर वगैरे देत असूं. झटके, हृदयावसाद वगैरे कमी झाले. पण, निद्रानाशविकार निर्माण झाला व मधून मधून सारखा शुक्रस्राव होऊं लागला. म्हणून रात्रौ झोपतांना एक Serpina Tablet सर्पगंधावटी देण्यास सांगितलें व शुक्रस्रावाकरितां मूत्राशयावर थंडपाण्याच्या घड्या ठेवण्यास सांगितलें. त्यामुळें हळू हळू शुक्रस्राव कमी झाला. शर्करा अगदींच नाहींशी झाली आहे. अर्थातच अनुषंगिक विकारहि नष्ट होऊन रुग्ण सुस्थितींत आहे. मात्र विशेष म्हणजे रुग्णास २ महिन्यांतहि इंशुलीनचें सूचिकाभरण्याची गरज पडली नाहीं.

नपुंसकत्वावर प्रयोग

कांहीं रुग्णांत शुक्रवृद्धीमुळें शुक्रस्राव होतो तसाच हा लिंबाचा मद असावा व त्याचा षंढत्वावर कांहीं उपयोग होतो कां म्हणून, पहाण्याचें ठरविलें अशा एका ३४ वर्षं वयाच्या रुग्णाकडे स्वतः जाऊन तो तयार नसतांहि त्याला बनवून उपचार करवून घेण्यास सांगितलें. मोठ्या कष्टानें एक महिना उपचार करवून घेईन, पुढें घेणार नाहीं अशा अटीवर उपचारास सुरवात केली. प्रथम यथाशक्य पंचकर्म करवून रुग्णास सकाळीं १ औंस लिंबस्राव देण्यास सुरवात केली. त्याबरोबरच " रसोनो बृंहणो वृष्यः " म्हणून लसूणाचा रस व " वर्ण्यं मेधाकरं वृष्यं मधु " म्हणून मध एक एक तोळा, २ तोळे तुपाबरोबर दुपारीं देण्यास सुरवात केली. रात्रौ झोपतांना लोणी खडीसाखर व पुन्हां लिंबस्राव अशी योजना चालली. पंधरा दिवस रुग्ण कांहींच सांगेना. पण पुन्हां विचारलें असतां पूर्वीपेक्षां ध्वजोत्थापन चांगलें होतें पण शुक्रस्राव मात्र त्वरित होतो असें त्यानें सांगितलें. अद्याप १५ दिवस बाकी होते व थोडाफार गुण दिसूं लागल्यावर आम्हालाहि बरें वाटलें. चिकित्सेंत बदल करण्यांत आला. लिंबस्रावाचें प्रमाण दोन्ही वेळ दोन दोन औंस व त्यांतच लसूणरस मध टाकून दिले व सूर्यतापी शिलाजित १ मासा व वंगभस्म ४ गुंजा सकाळीं १० व दुपारीं ४ वाजतां लोणीखडीसाखरेंतून दिलें. पथ्य-सात्विक अन्न. फक्त महिन्यानन्तर रुग्णास बराच फरक पडला. महिन्यानंतर रुग्णास उपचार बंद करण्याविषयीं विचारलें असतां त्यानें होऊनच आणखी १ महिना तरी उपचाराची मागणी केली.

रक्तप्रदर, रक्तार्श

यानंतर जो जो जीर्ण व हतबळ रुग्ण असेल त्यावर निंबस्राव चिकित्सेस सुरवात केली. त्यांत रक्तप्रदर, रक्तार्श या रोगांवर हमखास गुण दिसला.

नेत्रतेजोवृद्धीकर प्रयोग

लिंबस्राव १ तोळा, दारूहळदकषाय २ तोळे, भीमसेनीकापूर १ तोळा व मध १ तोळा यांचा चांगला खल करून बाटली भरून ठेवली. तिचा नेत्रतेजोवृद्धीवर उपयोग झाला. नेत्राभिष्यंद तर १।१ वेळेंतच नष्ट झाला.

विंचूदंशावर ओली पट्टी

लिंबस्रावाचा वृश्चिकविषावर, स्रावांत पट्टी बुडवून दंशस्थानीं ठेवली असतां, विषनाशक म्हणून चांगला उपयोग होतो.

'कृमिकुष्ठविषप्रणुत्' म्हणून कडूलिंब प्रसिद्ध आहे. सर्पविषबाधा झालेल्या मानव लिंबाचा पाला खायला देतात व तो जोंपर्यंत त्याला कडू लागत नाहीं तोंपर्यंत तो विषविद्ध आहे असें समज-

तात, सर्पविषावरहि प्रयोग करण्याची माझी अपेक्षा आहे पण तसा रुग्ण मिळावयास पाहिजे.

वरील विवेचनावरून धर्मशास्त्रकारांनीं जें म्हटलें कीं, "पीयूषोत्थं पारिभद्रस्य पत्रं" तें सिद्ध होतें.

[लिंबस्रावाचे याहिपेक्षां विशेष गुणधर्म कोणास माहित असल्यास ते त्यांनीं जरूर प्रसिद्ध करावेत. आतांपर्यंत कडूलिंबस्राव पुष्कळांना मोफत पुरवला आहे. माझ्याजवळचा सांठा संपुष्टांत आला तथापि इतर लोकांकडून तो विकत मिळवून देण्याचा मी अवश्य प्रयत्न करीन. —लेखक]

वाचकांचा पत्रव्यवहार—

उत्कट्यार व ब्रह्मदंडी कोणती ?

ता. १६ फेब्रुवारी १९५५ च्या आ. पत्रिकेंत पान ५३० वर उत्कट्यारलाच ब्राह्मदन्डी म्हणतात असें लिहिलें आहे.

उत्कट्यार व ब्रह्मदन्डी ही एक वनस्पति नसून त्या भिन्न आहेत.

उत्कट्यारचीं नांवें:- सं. उष्ट्रकण्ट, हिं. ऊंटकटीरा, म. उटकटारा, ऊतांटी, गु. उत्कन्टो.

उत्कट्यारीचे गुणधर्म

उत्कण्टकः कटुस्तिक्तः कफवातहरो लघुः ।
तन्मूलपानतः स्त्रीणां शीघ्रप्रसवकारकः ॥ (नि. र.)

ब्रह्मदंडीचीं नांवें:- सं. हिं. म. गु. ब्रह्मदण्डी.

ब्रह्मदंडीचे गुणधर्म

ब्रम्हदण्डी भवेदुष्णा तिक्ता कफविनाशिनी ।
वातरोगं च शोफं च नाशयेदिति कीर्तिता ॥ (नि. र.)

वरील दोन्हीहि वनस्पतींच्या पानावर व फळावर कांटे असतात. उत्कट्यारीचें फळ मोठें व ब्रम्हदंडीचें फारच लहान असतें. या वनस्पती जंगलांत आढळतात.

सुसावळ

वै. भाऊराव हरी बराटे
आयुर्वेदभास्कर, वैद्यविशारद

मिथ्या = भलत्या वेळीं योग

आपण शंका विचारल्या, त्याबद्दल आभारी आहे. टीकाकारांनीं केलेल्या टीकांशीं माझ्या म्हणण्याचा विरोध कसा येतो तें कळवावें.

ग्रीष्मादि ऋतूंत तदन्य ऋतूंचीं लक्षणें दिसणें हें ऋतु-वैपरित्य झालें व या विपरित [विषम] लक्षणीं ऋतूंचा त्या काळांत मानवी शरीराशीं योग होत असतो; अर्थात् तो त्या ऋतूचा मिथ्या योग होय. ज्याचा योग होत आहे, तो भलत्या वेळीं— अन्य ऋतुकाळीं— होत आहे, म्हणून त्याचा मिथ्या योग. मिथ्या योग जेव्हां होतो तेव्हां चालू ऋतूचा काळ असतो, पण चालू ऋतूच नसतो.

ज्याचा योग त्याचाच मिथ्या योग

"ऋतूचा अभाव असतांना त्याचा योग कसा घडेल ? ज्याचा योगसंयोग होईल, त्याचा नामनिर्देश होईल. योग्य ऋतूचीं तीव्र-अधिक प्रमाणांत लक्षणें झालीं तर त्याच ऋतूचा अतियोग; ऋतूचीं अगदीं सौम्य न्यून प्रमाणांत लक्षणें असलीं तर त्याच ऋतूचा हीन योग होतो. यांत गैरसमज कोठें, तें कळवावें. व तें कळवितांना माझीं वरील व आयुर्वेद पत्रिकेंतील वाक्यें हीं नमूद करून विरोध दाखवावा.

—वेणीमाधवशास्त्री

सुप्रसिद्ध दंतवैद्य पां. वि. जायदे, आयुर्वेदतीर्थ, हुबळी यांचीं विद्वान् वैद्य आणि डॉक्टर यांनीं प्रशंसिलेलीं दोन उपयुक्त पुस्तकें

१) दंतरोगविज्ञान आणि चिकित्सा
किंमत २ रु.
२) वैद्यसन्मित्र (हिंदी) भाग १ ला
किंमत २ रु.

मिळण्याचीं ठिकाणें:—
१ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक
२ पां. वि. जायदे, नारायण चौक, हुबळी

बिब्ब्याचे व्रणावर काय लावावें ?

बिब्बा उतला म्हणजे काय करावें ? हा प्रश्न अनेक वेळां उत्पन्न होतो. खोबरें खाणें, खोबरें जाळून उगाळून लावणें, खोबरेल तेल लावणें कोथिंबिरीचा रस लावणें पोटांत देणें, हे उपाय नित्याचे आहेत. यापेक्षांहि गुणकारी प्रयोगाची आवश्यकता आहे.

बिब्ब्याचें दुखणें

एक रुग्णाचे स्तनांत ठणका सुरू झाला, त्यावर उदुंबरसाराचा लेप द्यावयाचा, तो रोग्याकडून चुकून बिब्याच्या तेलाचा लेप दिला गेला. (बाटलीवर नांव नव्हतें व दोन्हीचाहि रंग लालसर काळा यामुळें ही चूक झाली.) थोड्याच वेळांत आग सुरू झाली. उदुंबरसार लवकरच कोरडा पडतो तसें लक्षण याचें दिसेना, त्यामुळें ही चूक लक्षांत आली. रोगाचा ठणका जाऊन त्यासाठीं बिब्ब्याचें दुखणें उत्पन्न झालें.

लगेच ती जागा कापसानें पुसून व पाण्यानें धुवून पुसून काढली गेली. तथापि आग चालूच राहिली. थोड्या वेळानें त्यावर पुरळ आला. कांहीं भागांत नंतर फोड आले. पुढें त्यांतून स्राव वाहूं लागला.

पुरळावर चन्द्रपुटी प्रवाळ भस्म

पुरळ आलेल्या भागावर प्रथम त्रिफळा थंड-पाण्यांत कालवून लावावा. त्यानें गार वाटलें. व्रणावर त्रिफळा लावल्यानें तो झोंबला. म्हणून ती जागा धुवून काढून पुसून त्यावर चन्द्रपुटी प्रवाळभस्म बसविलें. यानें आग तर झाली नाहीं. पण रुग्णास ताबडतोब झोप लागली. याच वेळीं पोटांतूनहि दूध-साखर + चद्रन्पुटी प्रवाळभस्म दिलें.

रोज स्नानानंतर स्तनावर प्रवाळभस्म (चन्द्रपुटी) लावण्याचा क्रम पुढें चालू ठेवला. ४।६ दिवसांत सर्व व्रण-पुरळ वगैरे मावळले.

ग्रीष्म ऋतूपूर्वी चन्द्रपुटी प्रवाळ घ्या

आतां उन्हाळा आला आहे. ज्यांना परवडेल त्यांनीं औषधीभवनाचें चन्द्रपुटी प्रवाळभस्म वाळयाच्या पाण्यांत घालून दुपारच्या वेळीं मान गळा काख इत्यादि स्वेदस्थानीं लावावें व पोटांत दुधांतून घ्यावें. असें केल्यानें उन्हाळा बिलकूल जड जाणार नाहीं.

भुसावळचें वैद्यसंमेलन

यंदाचें वैद्यसंमेलन 'भुसावळ' या गांवीं खानदेशांत आहे. खानदेशचा उन्हाळा बाधूं नये यासाठींहि वैद्यांनीं एप्रिलमध्यें चंद्रपुटी प्रवाळाचें सेवन करणें हितावह होईल. [शीत द्रव्यस्य पूर्वमेव अभिसंस्कृतिः ।]

गुलकन्द (प्रवाळयुक्त)

उन्हाळयांत पुष्कळ लोक गुलकन्द सेवन करतात, व तो प्रवाळयुक्त वापरतात. पण तें प्रवाळभस्म केवळ नांवाचेंच चन्द्रपुटी आहे कीं खरोखरच मातीच्या परळांत रोज चांदण्यांत ठेवून वाळविलेलें आहे इकडे लक्ष देत नाहींत. त्यामुळें गुण यथातथाच येतो व मग आयुर्वेदीय औषधाला दोष दिला जातो.

गुलकन्द सेवन करणाऱ्यांनीं यन्दा आयुर्वेद औषधी भवनाचा प्रवाळयुक्त गुलकन्द वापरून अनुभव घ्यावा, अशी विनंति आहे.

घरीं करणें शक्य आहे

असें चन्द्रपुटी प्रवाळभस्म वैद्यांना घरींसुद्धां करणें शक्य आहे. मात्र रोज सायंकाळीं खलांतून परळांत काढण्याची व चान्दण्यांत ठेवण्याची आणि सकाळी पुनः खलांत घालून खलण्याची तयारी पाहिजे, व असें २१ सतत दिवस केलें पाहिजे.

* * *



म. प्रां. दशम वैद्य संमेलन, भुसावळ

कांहीं उपयुक्त सूचना

मंगळवार १।३।५५ रोजीं मुंबई येथें स्थानिक वैद्य मंडळाची सभा महाराष्ट्र आयुर्वेदीय रुग्णालयांत झाली. खास निमंत्रणावरून म. प्रां. वैद्य मंडळाचे अध्यक्ष वैद्य दत्तात्रयशास्त्री जळूकर हेहि या सभेस उपस्थित होते. या शिवाय बरेचसे सदस्य आणि वै. श्रीमंत नानासाहेब पुराणिक, पुण्याचे आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे, हुबळीचे वैद्य पां. वि. जायदे हेहि उपस्थित होते. दुपारीं २॥ वाजतां सभाकार्यास प्रारंभ झाला. वै. ना. ह. जोशी यांनीं सूचना केल्यावरून भुसावळेस होणाऱ्या प्रांतीय दशम वैद्यसंमेलनाविषयीं वैद्य जळूकरशास्त्री यांनीं आतांपर्यंत झालेल्या कार्याची, संमेलनाचे कार्यालयाकडे आलेल्या उपयुक्त सूचनांची आणि संमेलनकार्यालयाच्या, संमेलन सर्वांगसुंदर होण्यासाठीं असलेल्या अपेक्षांची माहिती दिली. त्यांत मुख्यत्वें संमेलनाचे राजकीय आणि शास्त्रीय असे दोन विभाग संभवतात. राजकीय विभागांत वैद्यवर्ग आणि आयुर्वेदशास्त्रविषयक अपेक्षा व अडचणींचा ऊहापोह होतो व तद्विषयक प्रस्ताव संमत करून ते संबंधित संस्था, व्यक्ति व सरकारकडे पाठविले जाण्याचें कार्य होत असतें. त्या दृष्टीनें मुंबईच्या स्थानिक वैद्यमंडळानें आपले प्रस्ताव कार्यालयाकडे पाठवावेत असें सांगून शास्त्रीय विभागांत रुग्णपरामर्श, शास्त्रीय वाङ्मयविषयक ऊहापोह, आयुर्वेदीय प्रदर्शन या गोष्टींचा अंतर्भाव होतो. याहि बाबतींत उपयुक्त सूचनांची संमेलनकार्यालयास अपेक्षा आहे असें त्यांनीं सांगितलें.

प्रदर्शनाचें वैशिष्ट्य

केवळ औषधी कारखान्यांचे आकर्षक पद्धतीनें मांडलेले स्टॉल एवढेंच प्रदर्शनाचें स्वरूप असूं नये; तर तें नवीन व जुने वैद्य आणि सामान्य जनता यांनाहि कांहीं उपयुक्त होईल असें व्हावें, अशी कार्यालयाची अपेक्षा असल्याचें सुचविलें. त्या दृष्टीनें कांहीं विचार यापूर्वी आयुर्वेदपत्रिकेंतून प्रसिद्धहि झाले आहेत. औषधीकरणाचें वैशिष्ट्य सर्वांनाच साधत नाहीं. तद्विषयक प्रात्यक्षिक झालें पाहिजे, शक्य तर त्याचे चित्रपट दाखविण्याची योजना व्हावी असें ते म्हणाले. योगासनासारख्या व्यायामाचे साधनानें रोगमुक्ति होते असें म्हणतात. त्यासंबंधीं प्रत्यक्ष प्रयोगासह माहिती मिळावी. निःसंदिग्ध औषधी द्रव्याबद्दल माहिती यथासांग व्याख्यानद्वारां मिळावी. रोगासंबंधीं चर्चात्मक व्याख्यानें व्हावीं, व सर्व कार्यक्रमांनीं थकलेल्या मेंदूला पुन्हां ताजेतवाने बनविण्यासाठीं करमणुकीचे कार्यक्रम ठेवावे, अशा सूचना आतांपर्यंत आल्या आहेत. वैद्यकीय श्लोकांच्या भेंड्यांचाहि कार्यक्रम खास जुन्या नव्या वैद्यांसाठीं ठेवून एकप्रकारें करमणुकीबरोबरच ज्ञानाचीहि उजळणी होऊन पाठांतरप्रवृत्ति वाढण्यास उत्तेजन मिळावें अशीहि नाविन्यपूर्ण उपयुक्त सूचना आली असल्याचें वैद्य जळूकरशास्त्रींनीं सांगितलें.

अंगभूत परिषदा

संमेलनास जोडून आयुर्वेद अध्यापक परिषद आणि मुंबईराज्य वैद्य संमेलनाचें प्रथम अधिवेशन अशा दोन गोष्टी मुख्यत्वें व्हावयाच्या आहेत. पैकीं आयुर्वेद अध्यापक परिषदेबाबत ज्या मान्य गुरूंनीं वा विद्यालयीन गुरूंनीं आपल्या अध्यापनविषयक कांहीं शंका पाठविल्या असतील त्यांचें निवारण होणें आणि विद्यार्थ्यांस विषय कसा समजून द्यावा याचें थोडेंसें प्रत्यक्ष अध्यापनकार्य करून तज्ज्ञांनीं ही परिषद यशस्वी करावी. त्यासाठीं कांहीं विषय १ किंवा २ आरंभींच निश्चित करून घ्यावे. पुष्कळ विषय चर्चेला घेऊन कांहींच निर्णय न होण्यापेक्षां थोडेच

विषय निर्णयात्मक स्वरूपांत हातावेगळे झाले तर फार मोठें कार्य होणार आहे.

मुंबई-राज्य वैद्य संमेलन ही कल्पना ना. मुरारजी देसाई यांनीं मुंबईस वैद्य संमेलनापुढें आपल्या भाषणांतून मांडली व ती उपयुक्त वाटल्यामुळेंच मुंबई, महाराष्ट्र महागुजराथ आणि अखिल कर्नाटक या ४ ही प्रदेशिक विभागांतील वैद्यांनीं एकत्र येऊन गेल्या २ महिन्यापूर्वीच मुंबईस या मंडळाची स्थापना करून तात्पुरतें कार्यकारी मंडळही नेमलें आहे. नियमानुसार या मंडळाकडून निमंत्रण व परिषदेच्या अध्यक्षादींची निवड होऊन अधिवेशन पार पडलें जाईल. तरीपण तत्प्रीत्यर्थ सर्व व्यवस्था भुसावळ संमेलनाच्या कार्यवाहांनींच करावयाची आहे.

अशा तऱ्हेनें प्रांतीय संमेलन निदान दोन दिवस, अध्यापक परिषद कमींत कमी तीन दिवस, आणि एक दिवस मुंबई-राज्य परिषद, असा एकूण सहा दिवसांचा हा सोहळा भुसावळेस होणार आहे. सुमारें सहा हजार रु. खर्चाचा अंदाज मंडळानें ठरविला आहे. व त्यासाठीं भिक्षा मागण्याकरितां प्रचारक हिंडत आहेत, हिंडणार आहेत. मीहि आज सर्वांना संमेलनास येण्याचें आमंत्रण देत आहे. तसेंच उपयुक्त सूचनांचे द्वारें मार्गदर्शन करावें आणि प्रतिनिधि, स्वागतसदस्य व देणगी रूपानें साह्य करून उपकृत करावे अशी विनंति करून वै. जळूकरशास्त्री यांनीं आपलें भाषण संपविलें.

विविध सूचना

वै. देशपांडेशास्त्रीः— शास्त्रीय चर्चेचे दृष्टीनें अध्यापक परिषदेंत मुख्यतः त्रिदोषांची चर्चा २ प्रमुख वक्त्यांकडून ऐकणें एवढा जरी कार्यक्रम ठेवला तरी पुष्कळ कार्य होईल. असे प्रमुख वक्ते, वै पंडित शिवशर्माजी आणि जबलपूरचे वै. डिग्वेकरशास्त्री हे आपले हें उद्दिष्ट सफल करूं शकतील.

वै. ना.ह. जोशी:– (१) प्रदर्शनांतील औषधीकरण कांहीं केवळ वैद्यांनाच उपयुक्त गोष्टी ह्या केवळ वैद्यांसाठींच ठेवाव्यात; व सर्वसाधारण जनतेच्या उपयोगी विभाग स्वतंत्र ठेवण्यांत यावा. (२) अध्यक्षीय भाषणावर वैद्यांचे खाजगी बैठकींत मतें व्यक्त करूनं चर्चा घडवून आणावी.

वै. श्री. नानासाहेब पुराणिकः– “ लोकांना व्यावहारिक सूचना आरोग्यसंरक्षणाच्या दृष्टीनें उ. उपवास कसे करावेत, कोणते पदार्थ उपवासाला हितावह इ० माहिती देण्यात यावी.

वै. पां. वि. जायदे:– संमेलनाचा कार्यक्रम ६ दिवसांचा फार वाटतो. उन्हाळ्याचे दिवस, व्यावसायिक लोकांना इतके दिवस घालविणें गैरसोयीचें होईल, सबब संमेलन ४ दिवसांत संपवावें. अध्यापक परिषदेचे निरनिराळें विषय निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या ठिकाणीं ठेवले जावेत.

याप्रमाणें निरनिराळ्या सूचना पुढें आल्या. व सर्व उपस्थितांनीं संमेलननिधीस सढळ हातानें साहाय्य करण्याचीं आश्वासनें दिल्यावर सभेचें विसर्जन झालें.

वै. धामणकरशास्त्री यांची भेट

गेले ३ महिने क्षयाच्या गांठी पृष्ठवंशांत झाल्यामुळें आयुर्वेदभूषण वै. धामणकरशास्त्री मुंबईच्या युनिव्हर्सल हेल्थ इन्स्टिटयूटच्या रुग्णालयांत आयुर्वेद विभागांत शय्यास्थित आहेत. वैद्य पं. शिवशर्माजी आणि पण्डित हरिदत्तशास्त्री यांच्या विचारें उपचार चालू आहेत. यांची वैद्य जळूकरशास्त्री यांनीं मुद्दाम जाऊन भेट घेतली. अशाहि आजाराच्या स्थितींत शास्त्रीबुवांनीं भुसावळ संमेलनाविषयीं आस्थापूर्वक चौकशी करून कांहीं उपयुक्त सूचनाहि दिल्या. त्यांच्या ह्या स्थितप्रज्ञ वृत्तीचें फारच आश्चर्य वाटलें.

त्यांच्या सूचनाः– १ संमेलनानें प्रदर्शनांत औषधीकरणाचें प्रात्याक्षिक वा त्या त्या कारखान्याचें वैशिष्ट्य ठेवण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे. हे उत्तम आहे. परन्तु कोणत्याहि औषधाच्या सर्व प्रक्रिया साद्यंत दाखविणें अशा प्रसंगीं शक्य नाहीं. त्यापेक्षां

प्रत्येक प्रक्रियेची फिल्म घ्यावी व अशा सर्व प्रक्रि-यांच्या फील्म प्रदर्शनांत दाखविण्याची योजना करावी. ह्या बाबतींत कारखानदार जर मनावर घेतील तर फार उत्तम गोष्ट होईल, व त्यामुळें प्रदर्शनाचा हा हेतु सफल होईल.

आरोग्यविषयक कांहीं फिल्म्स मुंबई सरकारचें प्रचारखातें दाखवित असतें. पचनसंस्कार कसकसे होतात तें या फील्मचे द्वारें पाहावयास मिळतें. तसेंच निरनिराळ्या रोगांच्या माहितीच्याहि फील्म्स सरकारचें हें खातें दाखवित असतें. त्याहि फील्म्स दाखविण्याची योजना सरकारशीं पत्रव्यवहार करून घडवून आणणें शक्य होईल.

संमेलनाध्यक्ष

मुंबईस गेल्यावेळीं भुसावळच्या संमेलनाध्यक्षपदीं पुण्याचे आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे यांची योजना व्हावी असा सूर ऐकूं आला.

संमेलनाध्यक्ष हेच अध्यापक परिषदेचे अध्यक्ष असावेत अशीहि सूचना मुंबईस एका वैद्यबंधूंनीं केली आहे.

वै. भू. गणेशशास्त्री जोशी

मुंबईचा कार्यभाग आटोपून म. प्रां वै. सं. चे अध्यक्ष पुण्यास गेले. वै. भू. गणेशशास्त्री जोशी हे मधुमेहजन्य व्रणानें एकाएकीं आजारी झाले. शेवटीं सर्वानुमतें त्या व्रणाचें शस्त्रकर्म करण्याचें निश्चित करून सुप्रसिद्ध शस्त्रवैद्य डॉ. घारपुरे यांचे हातून पायाचे आंगठ्यावर त्या व्रणाचें शस्त्रकर्म करून आंगठा त्याच्या नलिकास्थीसह काढून टाकण्यांत आला. सध्यां शास्त्रीबुवा डॉ. घारपुरे यांचेच रुग्णालयांत असून प्रकृति सुधारत आहे, व गुडघ्यापर्यंत शस्त्रकर्म करण्याची भीति आतां उरली नाहीं असें तज्ज्ञांचे मत कळलें. अजून १॥-२ महिने तरी नीट चालतां येणार नसल्यानें भुसावळचे संमेलनास उपस्थित राहतां येणार नाहीं याबद्दल वै. भू. गणेशशास्त्री जोशी यांनीं खेद व्यक्त केला. संमेलनाविषयक चालू कार्याची आस्थेनें चौकशी केली. शुद्ध आयुर्वेदाच्या विद्यार्थ्यांना शिकविण्यांत खंड पडण्याबद्दलची शास्त्रीबुवांनीं हळहळ व्यक्त केली. पडल्या पडल्या सुद्धां वैद्यकीय ग्रंथांचें व अभ्यासोपयुक्त सांख्यकारिकादि पुस्तकांचें वाचन शास्त्रीबुवांनीं चालूच ठेवलेलें पाहून त्यांच्या तळमळीची पूर्ण कल्पना आली.

नाशिकच्या स्थायिकार्यालयास भेट

मुंबईस जातांना वाटेंत प्रथम नाशिक येथें उतरून म. प्रां. वै. मं. चे अध्यक्षांनीं स्थायी कार्यालयास भेट देऊन स्थायी मंत्री वै. बिंदुमाधवशास्त्री पंडित यांचेशीं भुसावळ संमेलनांतील कार्यक्रमाविषयीं चर्चा केली.

मंडळाचा निधी बँकेंत ठेवावा

महाराष्ट्र प्रांतीय वै. मं. चा निधि अधिकृत बँकेंत ठेवण्याविषयीं येत्या अधिवेशनांत विचार व्हावा अशी स्थायी मंत्र्यांनीं अध्यक्षांना सूचना केली आहे.

सांडू ब्रदर्सचीं

शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.

वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.

पत्रव्यवहाराचा पत्ता:—

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
चेंबूर लि.

फॅक्टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

भुसावळ संमेलनाबाबत सूचना

(१) अध्यापक चर्चा परिषद नाशिकला झाली त्याच पद्धतीची तशीच पण आतां पुढील विषयांबद्दल व्हावी, व ते विषय पूर्वी अध्यापकांना आगाऊ कळवावेत, म्हणजे त्यांना त्यासंबंधीं आपले विचार तयार करून ठेवतां येतील.

विषय कसे शिकवावेत ?

(२) आयुर्वेदीय विषय कसे शिकवावेत याबद्दल प्रात्यक्षिकें एखादें सूत्र देऊन किंवा घेऊन श्री. गणेशशास्त्री जोशी, श्री. वेणीमाधवशास्त्री यांचीं किंवा यांच्यासारख्यांचीं ठेवावींत, म्हणजे नव अध्यापकांना अध्यापन कसें करावें याची कल्पना येईल. शास्त्रीय विषयांची चर्चा, बंधनें न घालतां मनमोकळेपणानें व्हावी, वितंड नसावा. परस्पर विचारांची देवाणघेवाण व्हावी. दुसऱ्यांच्या ज्ञानाचा लाभ व्हावा.

नवीन शोध, नवीन औषधें

(३) वैद्यकीय धंदा करणाऱ्या वैद्यवरांना शास्त्रीय चर्चा गोड वाटत नाहीं. ती रूक्ष व निरस वाटते. यासाठीं त्यांना नवीन शोध व कोणतें औषध कोणत्या रोगांत उपयोगी पडतें, अशी संग्रला उपयुक्त माहितीच फक्त पाहिजे असते. यासाठी त्यांनाहि संमेलन आकर्षक वाटेल असा भाग ठेवावा लागतो. यास्तव रोग व त्यावर हमखास उपयोगी पडणारीं अनुभविक औषधें लागतात. अशी अनुभवश्रीमान् माणसें महाराष्ट्रांतील आपल्या संचारांत कैक आपणाला भेटलीं असतील. त्याहि व्यवहारकुशल वैद्यवरांना आपण संमेलनास अवश्य बोलवावें व त्या वृद्ध वैद्यांचा गौरव व्हावा त्यांची माहिती नव्या वैद्यांना लाभावी. अशा रीतीनें शास्त्र व वैद्यकप्रत्यक्ष अशा दुहेरी गोष्टींचा मिलाफ संमेलनप्रसंगीं आपण जरूर घडवून आणावा. (आणि म्हणजे यांत मीहि येतोच.) —वै. गो. आ. फडके, सातारा

अश्विनीप्राश उन्हाळ्यांत कां घ्यावा ?

शक्तिवर्धक औषधें घेण्याचें दिवस कोणते., असा प्रश्न कोणाहि विचारा ! ‘ हिवाळा ’ असें नेमकें उत्तर तो देईल. पण हें उत्तर पूर्ण बरोबर नाहीं. हिवाळ्यांत नैसर्गिक रीत्यच भूक वाढते व त्यामुळें अन्नपचन चांगलें होऊन बल वाढतें. शक्तिवर्धक औषधानें त्याला थोडी मदत मिळते एवढेंच !

ग्रीष्मे अपरान् अपि बृंहयेत् । –वाग्भट

शक्ति टिकविणाऱ्या व शक्ति वाढविणाऱ्या औषधाची खरी गरज उन्हाळ्यांतच असते. मनुष्याच्या शरीरांतील सर्व जीवनरस उन्हाळ्यानें सुकून जात असतात, त्यामुळें दुर्बलता वाढते, अशा वेळीं उन्हाचा बाधक परिणाम टाळणारी अश्विनीप्राश (टिकाऊ कूष्मांड व कुष्मांड पाक) यासारखी गोड, थंड पौष्टिकेंच, आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना चांगलीं मानवतात असा आमचा अनुभव आहे. किंमत २० तोळे २रु.

आयुर्वेद सेवा संघ, औषधीभवन, नाशिक

आयुर्वेद व युनानी वैद्यक बोर्ड, मुंबई

शेवटची सर्वसाधारण सभा

शुक्रवार ता. ४ मार्च १९५५ रोजीं दुपारीं ठीक १ वाजतां वरील बोर्डाची षाण्मासिक सर्वसाधारण सभा मुंबई येथें भरली होती. हकीम हैदर बेग यांचेशिवाय सर्व ११ सभासद उपस्थित होते. सभेपुढें विचाराकरितां एकूण पांच विषय होते.

सुरवातीस मागील ता. १०।५।५४ रोजीं भरलेल्या सभेचें इतिवृत्त मंजुरीकरितां मांडण्यांत आलें. वै. प्रतापकुमारजी व वैद्य वि. म. गोगटे यांनीं कांहीं दुरुस्त्या सुचविल्या. त्या मान्य करण्यांत आल्यावर हा वृत्तांत मंजूर करण्यांत आला.

मागील सभा स्थगित झाली होती

मागील सभा स्थगित केली आहे तेव्हां ही सभा मागील सभा म्हणजे त्या स्थगित सभेचा पुढचा भाग म्हणून समजावयास पाहिजे असा मुद्दा वै. गोगटे यांनीं उपस्थित केला. त्यावेळीं अध्यक्षांनीं, ती सभा अमुक तारखेपर्यंत स्थगित केली असा त्यावेळीं निर्णय दिला नसल्यानें आजची सभा ही सर्वस्वी नवीन सभा आहे असा आपला निर्णय दिला.

ठरावाला क्रमांक नसतात

बोर्डाच्या सर्व ठरावावर क्रमांक असावेत म्हणजे सन्दर्भाला सोयीचें जातें अशी वैद्य गोगटे यांची सूचना 'पुन्हा केव्हांतरी ही सूचना करा, आता नको,' असें सांगून तीहि बाजूस ठेवण्यात आली.

तिब्बी शब्द गाळला

तिब्बी म्हणजेच युनानी. तेव्हां युनानी व तिब्बी असे दोन्ही शब्द बोर्डाच्या नांवांत नकोत. अॅक्टांत असल्याप्रमाणें तिब्बी शब्द गाळण्यांत यावा ही गोगटे यांची सूचना मान्य करण्यात आली.

यानन्तर गव्हर्नर वाजपेयी, मध्यवर्ती मंत्री किदवाई व डॉ. जमनादासजी मेहता यांचे बद्दलचा दुखवटा सर्व सभासदांनीं उभे राहून मंजूर केला.

येत्या निवडणुकींत मत कोणाला ?

ता. ३१।३।५५ अखेर जे वैद्य रजिस्टर्ड होतील त्यांच्या नांवावर नवीन रजिस्टर छापण्यांत यावें असें दुसऱ्या ठरावानें निश्चित केलें. यावेळीं वैद्य गोगटे व वैद्य वेणीमाधवशास्त्री यांनीं अध्यक्षांना माहिती विचारली कीं, येत्या निवडणुकीकरितां मतदानाचा हक्क या रजिस्टरमधील नोंदल्या जाणाऱ्या सर्वांना आहे कीं कसें ? या प्रश्नावर अध्यक्षांनीं 'मी अधिकृत कांहीं सांगूं शकत नाहीं,' असें उत्तर दिलें.

छापील यादींतील चुका

छापल्या गेलेल्या यादींत बऱ्याचशा चुका आहेत. त्या दुरुस्त होणें आवश्यक असल्यानें त्यांच्या सुधाराकरितां एक कमेटी नेमावी, अशी सूचना वैद्य प्रतापकुमार यांनीं सुचविली. परंतु हा हक्क कार्यकारी मंडळाचा आहे, आपला नाहीं असें त्यांच्या निदर्शनास अध्यक्षांनीं आणलें व निदान अन्‌ऑफिशिअल समिति तरी नेमावी, या सूचनेस "तुम्ही वाटल्यास असें करा, मी तयार नाहीं" असें उत्तर अध्यक्षांनीं दिलें.

अध्यक्षांनीं सूचना फेटाळल्या

नंतर वैद्य प्रतापकुमार यांनीं सुचविलेल्या व वैद्य गोगटे यांनीं अनुमोदिलेल्या, व सभासदांकडून आलेल्या विषयांच्या चर्चेस सुरवात झाली. त्यावेळीं सभासदांनीं मांडलेल्या सूचना अध्यक्षांनीं नाकारल्यास त्याचें कारण अध्यक्षांनीं द्यावें व एक्झिक्युटिव्ह कमिटीच्या सभेची कार्यक्रमपत्रिका सर्वसाधारण सभेच्या सभासदांनाहि पाठविण्यांत यावी, या नं. ४ व ५ च्या दोन्ही सूचना अध्यक्षांनीं नियमबाह्य ठरविल्या. याशिवाय नं. १ ची सूचना मागें घेण्यांत आली

कारण ती व्यवस्था मागील प्रमाणेंच करण्याचें ठरलें. नं. २ व ३च्या सूचना व्यवस्थेला योग्य होत असल्यानें त्या स्वीकारण्यांत आल्या.

अध्यक्षावरील अविश्वासाचा ठराव

यानंतर शेवटचा ठराव अध्यक्षांवरील अविश्वासाचा होता. यावेळीं अध्यक्षांनीं समयोचित भाषण करून ही आपली व माझीहि शेवटचीच सभा असल्या कारणानें वैद्यांनीं व सभासदांनीं दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

‘मी यापुढें राहणार नाहीं’ बोध

याचवेळीं एका सभासदाच्या प्रश्नास उत्तर देतांना ‘मी पांच वर्षांपुरताच येथें होतो, आतां यापुढें मी राहाणार नाहीं’ असा खुलासा अध्यक्षांनीं केला.

अध्यक्षांनीं सभा सोडली

मागीलप्रमाणेंच अध्यक्षांनीं श्री. बाके यांना अध्यक्षपदीं नेमलें व आपण सभा सोडली. श्री. बाके हे अध्यक्षस्थानीं येऊन बसल्यावर श्री. मुनी यांनीं पॉइंट ऑफ ऑर्डर उपस्थित केला, व अध्यक्षांना असा दुसरा अध्यक्ष नेमतां येतो कीं कसें याबद्दल शंका उपस्थित केली.

सरकारनियुक्तांचा सभात्याग

त्यावर नवीन अध्यक्षांनीं असा अध्यक्ष नेमतां येतो असें सांगितलें. वैद्यराज नेसवी महाशयांनीं मागील दृष्टांत दिला, परंतु तो दृष्टांत याच प्रकरणाबाबतचा असल्यानें व तो संशयित असल्याकारणानें तो दृष्टांत उपयोगी पडूं शकणार नाहीं असें वैद्य प्रतापकुमार यांनीं सांगितलें. तेव्हां श्री. नेसवी यांनीं यांत मी भाग घेऊं इच्छित नाहीं असें सांगितलें व त्यांनीं सभा सोडली. पाठोपाठ वैद्य बागेवाडीकर, ना. व्यं. जोशी, श्री. वैद्य बारोट यांनींहि सभात्याग केला.

श्री. आपटेशास्त्री यांचें निर्गमन

वैद्यराज आपटेशास्त्री हे सभेंत होतेच. त्यांनीं लोकनियुक्त सभासदांना पृच्छा केली कीं, हे अध्यक्ष आपणांस मान्य आहेत काय? त्यावर ‘अन्डर प्रोटेस्ट’ म्हणून आम्ही हे मान्य करतो असें सर्वांनी सांगितलें, व सभा चालूं ठेवण्यास सांगितलें. तथापि काय झालें कोणास ठाऊक! श्री. आपटेशास्त्री यांनींहि काढतां पाय घेतला.

कोरम अभावीं सभा स्थगित

कोरम नसल्याकारणानें वीस मिनिटें सभा तशीच स्थगित राहिली. या मुदतींत लोकनियुक्त प्रतिनिधींनीं अध्यक्षांकडे अर्ज देऊन अविश्वासाच्या विषयाकरितां सभा बोलावण्यांत यावी असा अर्ज दाखल केला आहे. यानंतर पुन्हां सभा बेमुदत स्थगित करण्याचा निर्णय अध्यक्षांनीं दिला व सभाकार्य संपलें.

शेवटच्या सभेचा विपरीत शेवट

ही सभा बोर्डाची शेवटची सर्वसाधारण सभा होती. आतां यापुढील सर्वसाधारण सभा नवीन निवडून येणाऱ्या व सरकार नियुक्त सभासद व अध्यक्ष (वैद्य कीं डॉक्टर?) यांचीच होणार असें दिसतें.

[बोर्डाचे एकूण सभासद १४. त्यापैकीं श्री. हजरतबेग गैरहजर व डॉ. बोध सभा सोडून गेले, व वैद्य बाके अध्यक्षस्थानीं बसले. त्यामुळें वैद्य-नियुक्त बहुसंख्य (६) व सरकार व फॅकल्टीनियुक्त मिळून (५) असे ११ सभासद राहिले. यांत लोकनियुक्त बहुसंख्य (६) होते त्यामुळें अविश्वासाचा ठराव पास झाला असता. तो होऊं न देण्यासाठीं सरकार-नियुक्तांनीं पलायन करून गणसंख्या (कोरम) नाहींशी केली व सभा स्थगित करविली.] —संपादक

शेगांव (मध्य-प्रदेश) येथें
आयुर्वेद सेवा संघ नाशिक या संस्थेचीं
अनेक ग्राहकांकडून प्रशंसिलेलीं सर्व
प्रकारचीं औषधें मिळण्याचें ठिकाण:—
सेतान मेडिकल स्टोअर्स
शेगांव (म. प्र.)

आयुर्वेदाध्ययनाचें द्वार सगळ्यांना मोकळें !

लेखक— वैद्य श्री. द. जळूकर आयुर्वेदविशारद (मुं.), नाशिक

पूर्वीचे काळीं चातुर्वर्ण्य पद्धतीवर समाजाची रचना केलेली होती आणि त्यावेळीं त्या त्या वर्गाला अनुसरून ते ते लोक त्या त्या कार्यांत भाग घेत असत, पण पुढें त्याचा विपर्यास झाला व जातिभेद निर्माण झाले. येवढेंच नव्हे तर, पूर्वीचे काळीं द्रोणाचार्य ऋषींनींसुद्धां एकलव्याला तो कोळी असल्यानें धनुर्वेद्या शिकविण्याचें नाकारलें.

सर्व वर्णांस मुक्तद्वार

आयुर्वेदानें मात्र सर्व वर्णाचे लोकांना आयुर्वेदशास्त्र शिकण्यास मुक्तद्वार ठेवलें आहे. आणि समाजरचनेस अनुसरून त्यांतील कोणता भाग कुणास किती शिकविला जावा व प्रत्येकानें किमानपक्षीं आयुर्वेदाचें किती अध्ययन करावें, याविषयीं उल्लेख ग्रंथान्तरीं केलेला आढळतो.

हल्लीं जसे कांहीं लोक जातिभेद मानणाऱ्या (सनातनी) पक्षांतील आहेत, तसे कांहीं लोक पूर्वीसुद्धां होते येवढेंच.

श्रीसुश्रुताचार्यांनीं शिष्योपनयनीय अध्यायांत सांगितलें आहे कीं,

"ब्राह्मणक्षत्रियवैश्यानामन्यतममन्वयवयः शीलशौर्य... । अतो विपरीतगुणं नोपनयेत् ॥"

व पुढें म्हटलें आहे कीं, "शूद्रमपि कुलगुणसंपन्नं मंत्रवर्ज्यमनुपनीतमध्यापयेदित्येके ।

या सूत्रावरून व विशेषतः शेवटच्या 'एके' या शब्दावरून कांहीं लोक शूद्रांना आयुर्वेद शिकवावा या पक्षाचे होते असें दिसतें.

श्रीसुश्रुताचार्यसुद्धां सुधारणावादी

श्रीसुश्रुताचार्यसुद्धां सुधारणावादी पण जास्त थोडा सनातन्यांकडे असणाऱ्यांपैकीं होते. कारण त्यांनीं 'एके' हा शब्दप्रयोग वरील सूत्रांत केलेला आहे. "परमतं अप्रतिषिद्धं स्वमतमेव" या न्यायाचे सूत्राधारानुसार पाहतां शूद्रांना आयुर्वेद शिकवावा अशा मताचे श्रीसुश्रुताचार्य बनले, मुळांत नव्हते, असें दिसतें.

श्रीकाश्यपमहर्षींना शिष्यांचा प्रश्न

दुसरें उदाहरण श्रीकाश्यपमहर्षींचें आहे. त्यांना त्यांच्या शिष्य-वर्गानें प्रश्न केला कीं, गुरुजी, आयुर्वेद कुणी शिकावा ? केन चाध्येयः इति । त्यावर महर्षींनीं सांगितलें "ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्रैरायुर्वेदोऽध्येयः ॥ येवढेंच सांगून ते थांबले नाहींत, तर त्यांतील कुणी काय भाग शिकावा, कसा शिकावा हेंहि पुढें तेथें दिलें आहे.

पांच प्रकारचा अभ्यासक्रम

(१) तत्रार्थपरिज्ञानार्थं चात्मनः प्रजानुग्रहार्थं ब्राह्मणैः ।
(२) प्रजासंरक्षणार्थं क्षत्रियैः ।
(३) वृत्त्यर्थं वैश्यैः ।
(४) शुश्रूषार्थं इतरैः ।
(५) धर्मार्थं च सर्वैः ॥

स्वतःच्या रक्षणापुरता आयुर्वेद

अशा तऱ्हेचा उल्लेख करून किमानपक्षीं धर्माकरितां (सुखजीवितदानं हि सर्वधर्मस्याधिकं बुध्येते) आणि म्हणून सर्वांनीं जातिनिरपेक्षबुद्धीनें पण उद्देशानें स्वतःचे आरोग्यरक्षणापुरता तरी आयुर्वेद शिकणें जरूर आहेच.

'सब के लिये खुला है मंदिर यह हमारा ।'

"इति शम्"

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक या संस्थेचीं अत्यंत गुणकारी औषधें दादर (मध्य रेल्वे) येथें मिळण्याचें एक विक्रीकेंद्र

"गणेश औषधालय"

अब्दुल कादर बिल्डिंग, दुकान नं. १३
हिंदमाता सिनेमासमोर, मुंबई १४

अध्यापक परिषद, भुसावळ

तारखा अध्यापकांना सोईच्या असाव्यात

आयुर्वेद पत्रिकेच्या गेल्या अंकांत नाशिक येथें झालेल्या आयुर्वेद अध्यापक परिषदेच्या वृत्तांताचा शेवटचा भाग येऊन गेला आहेच. अध्यापक परिषदेची उपयुक्तता प्रत्यक्षांत जाणल्यानन्तर या परिषदेंत भाग न घेतां आल्यामुळें पुष्कळांना हळहळ वाटली. कांहीं अडचणी टाळतां न आल्यामुळें बरेचसे अध्यापक याला येऊ शकले नाहींत. तथापि यावेळीं अध्यापक चर्चा परिषदेच्या व्यवस्थापकांना (स्वागतसमितीला) अशी विनंति आहे कीं, आपल्या संमेलनाच्या तारखा श्रावण अध्यापकांना सोईच्या होतील अशा बेतानेंच ठेवाव्यात.

विषय अगोदर ठरवावेत

दुसरें असें कीं, नाशिक येथील परिषदेंत अगोदर विषय न ठरल्यामुळें अनेकांना तयारी करतां आली नाहीं. ती अडचण दूर होण्याचे दृष्टीनें कांहीं लोकांकडून सूचना आल्या आहेत त्यापैकीं कांहीं सूचना अशा:—

दोन दिवस त्रिदोषावर चर्चा

१) या चर्चा परिषदेंत पंडित शिवशर्मांची, वैद्यराज हेग्वेकरजी यांच्यासारख्या अधिकारी व्यक्तींची दोन दिवस केवळ त्रिदोष–विषयावर व्याख्यानेंच ठेवावीत. केवळ एवढाच कार्यक्रम ठेवण्यांत यावा.

१॥ वर्षांतील विषयांचा विचार

२) शुद्ध आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमाप्रमाणें जे विषय पहिल्या दीड वर्षांत पुरे व्हावयाचे आहेत त्या विषयांवरील चर्चाच पुरी व्हावी.

स्वास्थ्यासाठीं पंचकर्म

पंचकर्म हा स्वास्थ्याच्या व रोगोपचाराच्या दृष्टीनें महत्त्वाच्या विषयासंबंधीं प्रत्यक्ष प्रयोग व तात्त्विक चर्चा हा विषय चर्चेकरितां ठेवण्यांत यावा.

याशिवाय आणखी कांहीं सूचना येण्याची शक्यता आहे. तथापि यासंबंधीं नेमलेल्या समितीकडे कांहीं विधायक सूचना आल्यावर त्यावर विचार करून विषय जाहीर करणें सोयीचें होईल. तरी आपल्या सूचना लौकरांत लौकर पाठवाव्या अशी विनंति आहे.

—वैद्य वि. म. गोगटे

निमंत्रक, आयु. अध्यापक चर्चा समिति, नाशिक

उज्वल कीर्ति

आयुर्वेदीय औषधांची उज्वल कीर्ति बनविलेल्या सिद्ध औषधांच्या गुणावर आहे. औषधें गुण देणारीं असतील तर कीर्ति नेहमी उज्वल राहील. तरी अशीं गुण देणारीं औषधें, अस्सल ताजी व स्वच्छ घटक औषधी द्रव्यें खरेदी करण्यावर अवलंबून आहे. औषधी द्रव्यासाठीं आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स
पायधुनी, मुंबई नं. ३
फोन नं. (३१८२८) यांचेकडे मागणी करा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात.
अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवा.

पवित्र
नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोळा.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोळा.
तिब्बत कस्तुरी रु. १५ तोळा.
पत्ताः–नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. १।२०००।२००१ नेपाळ

दंतविकारावर उपाय सुचवा

"५-६-७ फेब्रुवारीला रत्नागिरी येथें माघी श्रीगणेशोत्सवासाठीं मी गेलो होतो. तेथें ३ दिवस धर्मार्थ दंतयज्ञ केला. हा दंतयज्ञ गांवांतील सर्व प्रमुख डॉक्टर पाहून गेले. कांहीं डॉक्टर स्वतःचे दांतरुग्ण घेऊन आले होते. वैद्यापैकीं फक्त एकच वैद्य आले. आलेल्या सर्वांना मी या पद्धतीची माहिती सांगून दांत काढून दाखविले. एकंदरींत डॉक्टरमंडळीमधील या विषयाचें औत्सुक्य वाढत आहे असें दिसून आलें. वैद्यवर्गाला या कलेचा लाभ करून देण्याची व्यवस्था होणें अवश्य आहे.

दंतसंरक्षण महत्त्वाचें आहे

दंतवैद्यकासंबंधांतील खरी महत्वाची गोष्ट दंतरक्षण ही आहे. दंतोत्पाटन ही नाइलाजाची गोष्ट आहे. पाश्चात्य विद्येपेक्षां-दंत उत्पाटनकलेंत आपण भारतीय निःसंशय पुढें आहोत. आतां इतर उपायांचा विचार वैद्यवर्यांनीं करावयास पाहिजे.

उदाहरणार्थ, टार्टरवर उपाय काय ? दांत भरणेंसाठीं कोणतें द्रव्य वापरावें व तें कसें? दांताची मुळेंहि मी हल्लीं विनादुःख आयुर्वेद पद्धतीनें ; काढतो. परन्तु अत्यंत आवश्यक असेल त्यावेळीं वापरण्यासारखें एखादे आयुर्वेदीय संमोहन द्रव्य आहे काय?

लहान मुलांचें दांत हल्लीं अत्यंत वाईट खराब आढळतात. ते काढतांहि येत नाहींत आणि मुलांचे दुःख त्वरित निवारतांहि येत नाहीं. त्याला काय करावें?" पुणें २

— डॉ. ग. वि. फडके

अर्कसार

[दांताच्या आरोग्यासाठीं रुई (वातासाठीं) उंबर, वड (पित्तकफासाठीं) वापरावेत. रुईचीं पानें वाटून वस्त्रगाळ करून तें दाट पाणी आटवावें व त्यांत थोडा टाकणखार घालून तें न नासेल अशा तऱ्हेचें अवलेहासारखें दाट करून ठेवावें. किडक्या व दुखऱ्या दांताला हा अर्कसार लावावा.

औदुंबरसार, वटसार

याचप्रमाणें उंबराच्या पानांपासून तयार केलेला औदुंबरसार मिळतो तो दातांस लावल्यानें १० मिनिटांत ठणका थांबतो. वडाच्या पानापासून असाच वटसार करतां येईल.

दंतकपालिकावर हळद

दांतावरील टार्टरसाठीं हळकुंड हें उत्तम औषध आहे. रोज १ लहानसा हळकुंडाचा तुकडा चघळून थुंकून टाकावा. असें कांहीं दिवस केल्यास टार्टर आपोआप निघून पडत असल्याचा अनुभव येईल.

दांतावर टार्टर जमणें हा मूत्रदोषाचा विकार आहे असा एक अंदाज आहे.

धात्रीनिशावटी

मूत्रविकारावर हळद उत्तम काम करते. मेहेषु धात्रीनिशे । आयुर्वेद सेवा संघानें धात्रीनिशावटी तयार केल्या आहेत. त्या रोज २।२ सकाळ संध्याकाळ पोटांत घेण्यासाठीं द्याव्यात.

गुळण्यासाठीं जेष्टमध कषाय

नाशिक येथें सेवा संघांत दांत काढण्यापूर्वी व नंतर जेष्टमधाचा काढा गुळण्याकरितां वापरतात.

सद्योव्रणावर जेष्टमध चूर्ण व तूप लावण्यास आयुर्वेदांत सांगितलें आहेच. —संपादक]

तारेचा पत्ताः–Newbottle
के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुचें, कॅपसुल्स्
[हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

सुरिंजन (युनानी) तत्त्व

(लेखकः— भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर, किन्हई)

सुरिंजन-तत्त्व हें कडु असतें व त्यांत बरेच उपयुक्त औषधी गुणधर्म आहेत.

सुरिंजनः—गुणधर्म-संशमनीय, स्रोतोविशोधन, सारक, मूत्रल आणि शीत आहे. तें सन्धिवातांत उपयोगी आहे. काळावोळ व सुरिंजन यांचें मिश्रण वातरक्त, यकृन्मान्द्य, शोथ, पानथरी यावर देतात.

उत्तेजक लेप

योग१- कोंबडीच्या अंड्यांतील बलक, केशर व सुरिंजन याचा लेप तयार करून जननेंद्रियावर घातल्यास त्यास उत्तेजकपणा येतो. श्वासनलिकाचा शोथ हें कमी करतें. आवरक्तांत वातहारक उपयोग होतो.

याशिवाय भूतोन्माद, अपतंत्रक, डांग्याखोकला, अपस्मार या विकारांत हें वातहरण करणारें आहे.

प्रमाणः— ४ गुंजा ते १ मासा. याचें चूर्ण किंवा, काढा याचा उपयोग करावा.

संधिवातावर वड्या

योग नं. २- सुरिंजन सोनामुखी, निशोत्तर, नीळ, बीज, हिरडा, बदाम, गुलाबकळी, सकुमुनिया, केशर, अजमोदा, दारुनजई, आकवी, शहाजिरे, चित्रक, मेन्दी, टेटू या सर्व वनस्पती समभाग (प्रत्येकाचें वस्त्रगाळ चूर्ण) घेऊन साखरेचा पाक करून त्यांत हें चूर्ण घालून वड्या करून त्यांचा उपयोग वातरक्त, संधिवात, बद्धविट्कता, व यकृताचा शोथ यांत करावा. गुणाचा प्रभावशाली अनुभव येईल.

सांधेदुखीवर चूर्ण

योग नं. ३- सुरिंजन तो.२, सोनामुखीपानें तो. २, हिरडेदळ तो. १, निशोत्तर मासे ९, बदाम मासे ९, मेन्दीचीं पानें मासे ६, केशर मासे ३, टेटू तो. १, हीं प्रत्येकीं वस्त्रगाळ चूर्ण घेऊन वरील प्रमाणांत पूर्ण मिश्र करावी. हें चूर्ण सकाळीं १ तोळा दोन घोट कोमट पाणी किंवा गार पाण्याबरोबर सांधे धरले असतील त्यांना द्यावें.

भारतांत नेत्ररोग बळावले !

अमरावती येथील जोग हॉस्पिटलमधील नेत्र-रोग-तज्ज्ञ डॉ. गो. दा. पाठक यांनीं जनतेंत नेत्ररोग्यांची संख्या वाढली आहे, व त्याला कारण 'वनस्पति' तुपाचें सेवन हें आहे, असें मत हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेच्या प्रतिनिधीजवळ व्यक्त केलें.

याला कारण 'वनस्पति'

ते म्हणालेः-वनस्पति हें तेलावर विशिष्ट संस्कार करून तयार होतें. तें तूप नव्हे. 'वनस्पती' तुपाच्या ज्वलनास आधिक प्राणवायु लागतो, त्यामुळें शरीरांत प्राणवायूची न्यूनता निर्माण होते. त्यामुळें श्वसनांची संख्या वाढते. वनस्पति तुपाचे पदार्थ खाल्यानें कांहीं लोकांना श्वासविकार जडतो.

वनस्पतीतुपाच्या सतत सेवनानें यकृतांतून अधिक पित्त पाझरल्यामुळें अम्लपित्त, अग्निमांद्य व पोटांत वायु भरणें हे रोग शरीरांत मूळ धरतात.

[मांसाहारी लोकांना वनस्पतितूप तेवढें बाधक होत नाहीं. शाकाहारी लोकांना मिळणारें प्राणिज अन्न म्हणजे दूध व खरें तूप. पण तें खरें तूप आज दुर्मिळ झाल्यामुळें योग्य प्राणिज आहाराच्या अभावीं नेत्र व मज्जा विकार जडणें स्वाभाविक आहे.

त्रिफला+मध+खरेतूप

नेत्रविकार जाण्यासाठीं व नवीन न होण्यासाठीं नियमाने रोज रात्रीं खरें तूप + खरा मध + त्रिफळा चूर्ण यांचें मिश्रण सेवन करावें.

आयुर्वेदऔषधीभवनानें तयार केलेला 'नयनामृतप्राश' हा कल्प वापरण्यासारखा आहे.

— संपादक]

पाश्चात्य रामबाण औषधें
लेखकः-डॉ. डी. ए. घाटगे, कागल
किंमत २॥ रु.
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

पं. नेहरूंच्या निवेदनाचा स्पष्टार्थ

पं. नेहरु मद्रास येथें पशु-चिकित्सा कॉलेजच्या स्वर्णयंती समारम्भाच्या उद्घाटनप्रसंगीं म्हणाले:—" डॉक्टरी, पशूचिकित्सा वगैरे वैद्यकीय शिक्षणाचा शिक्षणावधि अितका दीर्घ असतो कीं, हा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर डॉक्टर आम्हां ग्रामवासियांच्या सेवेस येतील व मग आमची सेवा होईल, इतका धीर आज लोक काढूं शकत नाहींत.

अशी शिक्षण योजना हवी

आज देशांत डॉक्टरांना मागणी पुष्कळ आहे व त्याकरितां तात्पुरत्या स्वरूपाची एखादी अशी योजना आंखली पाहिजे कीं ज्या योजनेंतून १।२ वर्षांच्या शिक्षणानन्तर उत्तीर्ण झालेले भिन्न भिन्न उमेदवार धंदेवाईक, ग्रामवासियांच्या सेवेस जाऊं शकतील व जे आपला व्यवसायात्मक संबंध शहरांतील उच्च शिक्षण घेतलेल्या व्यवसायींबरोबर ठेवतील.

भारताला सर्व क्षेत्रांत उच्चतर पातळीवर न्यावयाचें आहे, त्याला दुय्यम शिक्षित लोकांची अपेक्षा नाहीं. परन्तु उच्चतर शिक्षणावर भर देतेवेळीं ही गोष्ट विसरतां कामा नये कीं, आज देशाचे कित्येक भाग असे आहेत कीं, ज्यामध्यें उच्च नव्हे, दुय्यम नव्हे, प्राथमिक दर्जाचेहि शिक्षक लोक उपलब्ध नाहींत.

तज्ञांचा अभाव फार जाणवतो

दुसरी पंचवार्षिक योजना आंखतेवेळीं आम्हांस उच्च शिक्षण घेतलेल्या तज्ञ लोकांचा अभाव तीव्रतेनें भासत असून त्या प्रश्नास आम्हांस तोंड द्यावें लागत आहे. पैशाची उणीव तर आहेच परन्तु तो प्रश्न आम्हांस तितकासा भेडसावीत नाहीं. जितका उच्चतर शिक्षित तज्ज्ञांच्या अभावाचा वाटतो. आम्हांस फार मोठ्या प्रमाणावर म्हणजे लाखोंनीं अध्यापकांची, डॉक्टरांची, पशुवैद्यांची आज गरज आहे. तथापि सर्व भारतांतील कॉलेजांतून आज आम्हांस प्रतिवर्षी कांहीं थोडे हजारच असे लोक उपलब्ध होऊं शकतात, व ह्या प्रमाणानें पाहिल्यास आमची गरज पुरी होण्यास १०० वर्षे लागतील. "

त्या भाषणाचा वैद्यवर्गानें जरूर विचार करावा. या विधानावरून वैद्यांना असें दिसून येईल कीं, पं. नेहरूंनीं ॲलोपॅथीशिवाय देशातील अन्य चिकित्सापद्धतींचा विचारच केलेला दिसत नाहीं. जर तसा विचार त्यांनीं केलेला असता व आयुर्वेदाला संरक्षण देण्याचा त्यांचा मानस असतां, तर ग्रामीण भागांत जेथें डॉक्टरांची जरूर आहे असें ते म्हणाले त्या भागांत विशिष्ट कालपर्यंत शिक्षण घेऊन उत्तम तयार झालेले वैद्य काम करूं शकले असते. या काळांत ॲलोपॉथिक कंपौंडरहि शिक्षण घेऊन उत्तम रीतीनें तयार होऊं शकणार नाहीं. परंतु आयुर्वेदाबद्दल त्यांना आस्था दिसत नाहीं.

आयुर्वेद दृष्टिआड केला आहे

केंद्रीय स्वास्थ्य-मंत्रालयानें त्यांचा सल्ला घेऊन जी योजना बनविली व जी प्रांतीय सरकारांकडे पाठविली गेली आहे, त्यानुसार मुंबई सरकार एक महिन्याचें शिक्षण देऊन ग्रामीण कार्यकर्ते डॉक्टर बनविण्याचा विचार करीत आहे. ह्या एकंदर व्यवहारावरून व वक्तव्यावरून असें दिसतें कीं, आमचें कॉंग्रेस सरकार आयुर्वेदाला प्रोत्साहन व संरक्षण देऊ इच्छित नाहीं. आणि म्हणूनच वरील योजना आखणारांच्या दृष्टीआड वैद्यसमाज व आयुर्वेद झालेला आहे.

— आयुर्वेद-विज्ञान

———

पुणें येथें
' आयुर्वेद सेवा संघ, नासिक ' चीं
सर्व औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें २

मुंबई राज्यपालांचें भाषण

मुंबई कायदेमंडळाच्या १९५५ च्या पहिल्या अधिवेशनास प्रारंभ करतांना मुंबईचे राज्यपाल ना. मंगलदास पक्वासा यांनीं जें भाषण केलें त्यांतील वैद्यक विषयक भाग पुढें दिला आहे.

“ आतां वैद्यकीय मदतीसंबंधीच्या सुखसोयींत सुधारणा करण्यासाठीं केलेल्या कांहीं खास उपाययोजनांचा मी उल्लेख करतो. अशा उपाययोजनांत २ ऑक्टोबर १९५४ रोजीं बृहन्मुंबई आणि तिच्या आजुबाजूंचा प्रदेश या भागांत सुरू करण्यांत आलेली राज्य कामगार विमायोजना ही सर्वांत महत्त्वाची उपाययोजना होय. या योजनेची अंमलबजावणी केल्यामुळें राज्यांतील ४॥ लक्ष कामगारांना सामाजिक सुरक्षिततेची हमी मिळाली आहे. या योजनेखालीं कामगारांना पुढील फायदे मिळतात:—

कामगारांना मिळणारे फायदे

(अ) विमेदार व्यक्तींना वैद्यकीय उपचार,

(ब) आजारीपणाच्या दिवसांत विमेदार व्यक्तींना ठराविक मुदतीनें पैसे मिळणें,

(क) विमेदार स्त्रीला बाळंतपणाच्या काळांत ठराविक मुदतीनें पैसे मिळणें,

(ड) काम करतांना झालेल्या दुखापतीमुळें तात्पुरतें किंवा कायमचें अपंगत्व आल्यास विमेदारास ठराविक मुदतीनें पैसे मिळणें.

(इ) काम करतांना झालेल्या दुखापतीमुळें मृत्यु पावलेल्या विमेदाराच्या कुटुंबीयांना ठराविक मुदतीनें पैसे मिळणें.

या योजनेखालीं स्थापन झालेल्या कार्पोरेशननें या प्रचंड योजनेचा कारभार चालविण्यासाठीं एक प्रादेशिक कचेरी उघडली आहे. ही कचेरी विमेदार इसमांना आवश्यक तो सल्ला देते, आणि विमेदारांना दिले जाणारे पैसे व्यवस्थितपणें मिळतात किंवा नाहीं हें पाहातें.

गांधी स्मारक रुग्णालय, परळ

या समितीखेरीज बृहन्मुंबईंत व जवळपासच्या भागांत कामगार वस्तींत २४ स्थानिक कचेऱ्याहि उघडल्या आहेत. पैकीं प्रादेशिक कचेरीचें काम गेलीं तीन वर्षें चालू आहे. तसेंच राज्य कामगार विमायोजनेखालील कामगारांसाठीं परळ येथें गांधीस्मारक इस्पितळ बांधण्याचाहि विचार आहे. या इस्पितळांत सुमारें ३०० खाटांची सोय करण्यांत येईल. छोट्या गांवांतील लोकांच्या वैद्यकीय गरजा भागविण्यासाठीं सरकारनें अलिकडेच ग्रामीण वैद्यकीय मदतकेंद्रें सुरूं करण्यास मंजुरी दिली आहे.

आयुर्वेदासाठीं वेगळें खातें

आयुर्वेदासंबंधींचे प्रश्न हाताळण्यासाठीं माझ्या सरकारनें एक वेगळें खातें निर्माण केलें आहे. तसेंच आयुर्वेदासंबंधीं संशोधन करण्यासाठीं मुंबई, पुणें व अहमदाबाद येथें आयुर्वेदिक वॉर्ड सुरू करण्यासहि मंजुरी दिली आहे. या वार्डांतून २० खाटाची सोय करण्यांत येईल.

वस्तुसंग्रहालय व ग्रंथालय

तसेंच आर्. ए. पोदार मेडिकल कालेजांत एक वस्तुसंग्रहालय तथा ग्रंथालय स्थापन करण्याबाबतची एक योजना आंखण्यांत आली आहे. शीव येथील सरकारी होमिओपॅथिक हॉस्पिटलची आणखी वाढ करून तेथें होमिओपॅथीचें पदवीनंतरचें शिक्षण देण्याची सोय करावयाची आहे. या हॉस्पिटलास अखिल भारतीय शिक्षणकेंद्राचें स्वरूप आणून देण्याच्या दृष्टीनें जरूर ती उपाययोजना करण्यांत येत आहे.

अनेकांनीं प्रशंसलेलीं “ आयुर्वेद सेवा संघ,
नासिकचीं सर्व गुणकारी औषधें आतां
कऱ्हाडांत
मिळूं लागलीं.
औषधी भांडार
गुरुवार पेठ, पो. कऱ्हाड [सातारा]

'माझे' त्रिदोष-विचार

लेखकः—डॉ. दा. म. भोमेकर
हैद्राबाद

" उपाधीवीण जें आकाश । तोंचि ब्रह्म निराभास । तें निराभासी मूळमायेस । जन्म जाहला ॥१॥ तें मूळमायेचें लक्षण । वायुस्वरूपाचि जाण । पंचभूतें आणि त्रिगुण । वायु अंगीं ॥२॥

आकाशापासून वायु झाला । तो दों प्रकारें विभागला । सावधपणें विचार केला । पाहिजे श्रोतीं ॥१२॥ एक वार [वारा] सकळ जाणती । एक वायूपधील ज्ज्योती । [सर्वांचे प्राण धारण करणारा] जगज्योतीच्या अनंत मूर्ती । देव-देवतांच्या ॥१३॥ वायु बहुत विकारला । परंतु दो प्रकारें विभागला । आतां विचार ऐकिला । पाहिजे तेजाचा ॥१४॥ वायुपासून तेज जालें । उष्ण शीतल प्रकाशलें । द्विधा रूप ऐकिलें । पाहिजे तेजाचें ॥१५॥ उष्णापासून जाला भानु । प्रकाशरूप देदीप्यमानु । सर्वभक्षक हुताशनु । आणि विद्युल्लता ॥१६॥ शीतळापासून आप अमृत । चंद्र तारा आणि शीत । आतां परिसा सावचित्त । होऊन श्रोते ॥१७॥ तेज बहुत विकारलें । परंतु द्विधाच बोलिलें । आपहि द्विधाच निरूपिलें । आप आणि अमृत ॥१८॥ ऐक पृथ्वीचा विचार । पाषाण मृत्तिका निरंतर । आणिक दुसरा प्रकार । सुवर्ण परीस नाना रत्नें ॥१९॥

—श्रीदासबोध, दशक १०, समास ३ रा.

" आकाशापासून वायु होतो । हा तों प्रत्यया येतो । वायूपासून अग्नि जो तो । सावध ऐका ॥१॥ वायूची कठिण घिसणी [घर्षण] । तेथें निर्माण झाला वन्ही । मंद वायु शीतळ पाणी । तेथूनि जाहलें ॥३॥ आपापासून झाली पृथ्वी । ते नाना बीजरूप जाणावी । बीजापासून उत्पत्ति व्हावी । हा स्वभावचि आहे ॥१॥ पुढें सृष्टि करणेची । कल्पना आहे मुळींची । जयेपासून देवत्रयाची काया जाहली ॥४॥ निश्चळामध्यें चंचळ । तेचि कल्पना केवळ । अष्टधा प्रकृतीचें मूळ । कल्पनारूप ॥५॥ कल्पना तेचि अष्टधा प्रकृति । अष्टधा तेचि कल्पनामूर्ति । मूळाधारापासून उत्पत्ति । अष्टधा जाणावी ॥६॥ पंचभूतें तीन गुण । ऐसीं दोनीं मिळोन । म्हणोनि अष्टधा प्रकृति जाण । बोलिजे ते ॥७॥

भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ।
अहंकार इतीऽयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥

मुळीं कल्पनारूप झाली । पुढें तेचि फांपावली । केवळ जडत्वासी आली । सृष्टिरूपें ॥८॥ मुळीं झाली ते मूळमाया । त्रिगुण झाले ते गुणमाया । जडत्व पावली ते अविद्या माया । सृष्टिरूपें ॥९॥

—श्रीदासबोध दशक ११ समास १ ला ।

श्रीसमर्थांची योग्यता

वरील श्रीसमर्थ-वचनाप्रमाणें आपण आज आयुर्वेदीय त्रिदोषाबद्दल विचार करूं. श्रीसमर्थ हे पूर्णपुरुष, महात्मे, ज्यांना जग व जगाचा उत्पत्ति-लय यांचा सिद्धांत कळला व जो त्यांनीं जनतेच्या कल्याणाकरितां जगापुढें निःस्वार्थपणें मांडला, त्याचेंच [आप्त] वाक्य विश्वसनीय नाहीं, असें कोण म्हणेल ? अशाच महात्म्यांनीं ठरविलेल्या सिद्धांतांचेंच पुढें शास्त्र बनलें. तेंहि विश्वसनीय असेंच मानलें जाऊं लागलें. कारण अशा शास्त्रप्रचीति व गुरुप्रचीतीच्या बरहुकूम पुढें जाणाऱ्या विद्यार्थ्यांस आत्मप्रचीति आली म्हणजे त्याला मायाब्रह्माचा उलगडा होतो. पण तो अशा एकट्यालाच शक्य असतो, इतरांस नाहीं.

प्राण हा वासनामय आहे

प्राण हा वायूरूप आहे, असें आपण नेहमीं ऐकतो. प्राण व वायु हे स्वरूपतः सारखे असले तरी भेददृष्ट्या प्राण हा वासनामय आवरणयुक्त आत्मा किंवा जीव, तर वायु हा त्याचा मंत्री होय. सर्व कार्यकर्तृत्व वायुकडे असतें. हा वायु म्हणजे ब्रह्माची

इच्छाशक्तीच (प्रकृति). ही ब्रह्माशीं युक्तच असते. ही त्रिगुणमयी आहे. हे तिचे गुण तिच्या कार्यकर्तृत्वावरून दिसतात. एरवीं तिच्या गुणांत भेद नसतो. म्हणून तिचे तिन्ही गुण एकत्रित असतात. या त्रयीपासून पुढें पंचमहाभूतें व जड, चेतन पदार्थ निर्माण झाले असें जें सांगितलें तें तिच्या भिन्न भिन्न क्रियाशक्तिस्वरूपामुळें घडलें.

पृथ्वीची उत्पत्ति

दुसऱ्या प्रकारें पृथ्वीची उत्पत्ति, आप तेज वायु आकाश पृथ्वी आत्मा मन काल आणि दिक् या नऊ द्रव्यापासून झाली आहे असें सांगितलें आहे. आत्मा आणि मन सोडून सात द्रव्यांपासून अचेतन सृष्टि निर्माण झाली. पण अलीकडच्या शास्त्रज्ञांनीं असें सिद्ध केलें आहे कीं, अचेतनालाहि आत्मा व मन असतें त्यांच्यांतहि वाढ, विनाश व मनोविकार असतात. उदाः- डोंगर [एव्हरेस्ट शिखर] सारखा वाढत असतो व झाडांना संवेदना व मनोविकार होतात. अचेतन द्रव्यांचा आहार [औषधी] रूपानें सचेतनास उपयोग होतो. पदार्थांची उपयुक्तता त्यांच्या कार्यांवरून ठरते. या सात द्रव्यांपैकीं पंचमहाभूतें व त्यांतहि तीनच (प्रभावी) कार्यकारी आहेत. असें वायु, तेज, आप, किंवा वात, पित्त, कफ यांनाच त्रिगुण, त्रिधातु, किंवा त्रिदोष म्हणतात. शरीराची वाढ करतात म्हणून त्रिधातु, व नाश करतात म्हणून त्रिदोष म्हणावयाचे. हे त्रिदोष सर्व शरीरव्यापी आहेत म्हणजे त्यांचें अस्तित्व शरीरांतील प्रत्येक अणूंत [Cells] असतें त्यांच्या वेगवेगळया संचयस्थानांतून दोष शरीर व्यापतात किंवा स्थानाकडे परततात. यालाच कोष्ठगत दोष व शाखागत दोष असें म्हणतात.

महाभूतांचे ३ गट

दशक ११ तील श्रीसमर्थवचनावरून असें दिसतें कीं, वायु, तेज, आप हीं अति सूक्ष्म द्रव्यें व त्यांपासून थोडीं स्पष्ट झालेलीं पंचमहाभूतें (त्रिगुणद्रव्यें) व त्याचपासून पुढें अधिक सुस्पष्ट असे चेतन-अचेतन पदार्थ झाले. असे याचे तीन गट ठरतात. पहिला गट "मूळमाया"; अति सूक्ष्म गट, "गुणमाया" दुसरा थोडा स्पष्ट असा गट; तिसरा "अविद्यामाया" त्यानंतर जडत्व पावलेला, असे तीन गट झाले. म्हणजे त्रिगुणात्मक शक्ति ही तत्त्व-गुण-क्रियेची निदर्शक ठरते. त्याप्रमाणें आयुर्वेदीय त्रिदोषाचा उगम गुणमायेपासून पुढें झाला. म्हणजे अतिसूक्ष्म तत्त्व आणि स्थूल पदार्थ या द्रव्यसमूहांमधील त्रिदोष (गुणमाया) हा दुवा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

त्रिदोष दाखवितां येत नाहींत

पुढें त्याचेहि दोन भाग पडतात. जसे वायु, तेज व आप हें अव्यक्त व व्यक्त अशा स्वरूपाचें असल्याचें सांगितलें आहे. व्यक्त स्वरूपें बुद्धिगम्य आहेत तर सूक्ष्म स्वरूपें वैयक्तिक व स्वानुभवजन्यच असणार म्हणून त्रिदोष दाखवतां येत नाहींत. त्यांच्या तत्त्वाचें अस्तित्व पटवणें तर माया-ब्रह्मा-इतकेंच अनिर्वचनीय आहे. गुरूपदेश व बुद्धि, तर्क याच्या पलीकडील तीं तत्त्वें आहेत. पिंडब्रह्मांडाच्या उत्पत्ति, विनाशास जरी हीं कारणीभूत असलीं तरी तीं दृश्य किंवा सामान्यास पटविण्याजोगीं नाहींत; म्हणून त्रिगुण व त्रिदोष यांचें स्वरूप असेंच अगम्य आहे. सर्व सृष्टि व पिंडांतील घडामोड हिजमुळें होते.

दृश्य पदार्थांनीं चिकित्सा

रोगचिकित्सा दृश्य पदार्थांनीच दृश्य पदार्थांवरच (रोग्यावर) करावी लागत असली तरी त्रिविध अंशरूपी शक्तीस वगळतां येत नाहीं. तिच्या चर्चेचें स्वरूप त्रिविध दृश्य द्रव्यापुढें सुरू होतें. जिला, समर्थांनीं अविद्या म्हटलें आहे.

पुणें येथें
' आयुर्वेद सेवा संघ, नासिक ' चीं
सर्व औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें २

आप, तेज, वायु यांची क्रिया द्विविध प्रकारची मानली आहे. जसें संघटनात्मक तत्त्व वारा हें वायूचें स्वरूप; उष्णता, अग्नि, वीज हे तेजाचें रूप; शीतता, अमृत, पाणी, हें आपाचें रूप, उदा. तेज तत्त्व दाखविणारा 'O' हें प्रतीक मानलें तर 'H' हा आपाचें प्रतिक होईल. यांना जोडणाऱ्या शक्तीमुळें 'OH' हा पदार्थ झाला. (रॅडिकल). पण हा दाखवितां येत नाहीं, फक्त क्रियेवरून त्याचें अनुमान करतां येतें, तसेंच त्रिदोषाचेंहि आहे. प्रत्येक पदार्थांच्या अणूसही तीन तत्वें असतात कोणताहि पदार्थ त्याशिवाय होऊंच शकत नाहीं.

आधिक्यावरून ओळख

पदार्थांची ओळख त्यांतील एक तत्त्वाच्या आधिक्यावरून [कार्यकर्तृत्वावरून] पटते. म्हणजे सिद्धांत असा कीं, प्रत्येक पदार्थांतील अणु त्रिगुणास सोडून नाहीं. तरतमभावानें त्यांत अनेकता व भिन्नता निर्माण झाली. जसें O पेक्षां O_2 आणि H_2 जास्त स्थूल झाली. त्यावरून H_2O हा प्रत्यक्ष पदार्थ झाला. त्यांत शीतता अधिक आहे. O_2 पेक्षा O_3 जास्त तीक्ष्ण म्हणून उष्णताप्रधान होतो. एकंदरींत पदार्थांच्या ह्या विशिष्ट [अग्नि, सोम] गुणधर्मावरून दोन भेद तर वीर्य आणि प्रभाव यावरून पदार्थांचे तीन गट पडले. व्यवहारांतहि तीनच क्रिया प्रामुख्यानें दिसतात. जसें चंद्रसूर्यांच्या अस्तित्वामुळें पृथ्वी व ताऱ्यांचें भ्रमण, समुद्रास भरती ओहोटी, समुद्रांतील उष्ण व थंड पाण्याचे एकमेकांकडे वाहणारे झरे, पृथ्वीवरील आदान व विसर्ग काल, व दिवस रात्र व संधिकाल मिळून तीन प्रकारच्या क्रियाच झालेल्या आढळून येतात. गुरुत्वाकर्षणशक्ति व विद्युत्‌शक्ति ह्याहि तीनच गुण दाखवितात. विद्युत्‌शक्तींत Positive, Negative व करंट हे तीन गुण दिसतात. हे प्रकार व्होल्टेइक-सेलमध्यें दिसतात.

श्रीरामकृष्ण परमहंसाची व्याख्या

श्रीरामकृष्ण परमहंसांनीं आपल्या बोधवचनांत मायाब्रह्माची अशी व्याख्या केली आहे कीं, गत्यात्मक शक्ति म्हणजे माया, आणि स्थित्यात्मक शक्ति [Force in Potency] म्हणजे ब्रह्म. किती यथार्थ वर्णन आहे हें ! म्हणजे सर्व सृष्टीमध्यें शक्ति भरून आहे असें ठरतें. जगांतलें कोणतेंहि कार्य शक्तीशिवाय होत नाहीं. या त्रिविध शक्तीमुळेंच जगांतील सर्व जड पदार्थ झाले. ही शक्ति त्या पदार्थांत सुप्त रीतीनें असतेच. हिचें कार्यकारित्व विशिष्ट स्थितींतच दिसून येतें. उदा. पदार्थाचें भस्म होण्यांत. आगगाडीचें एंजिन, विस्तव व पाणी यामुळें चालतें असें म्हटलें तरी अग्नीच्या दाहकशक्तीमुळें पाण्याची वाफ होते व वाफेंत असलेल्या शक्तीमुळें एंजिनांतलि पहिल्या चाकास गति मिळते. एकूण शक्तीमुळेंच एंजिन चालतें, असें म्हणणें जास्त संयुक्तिक ठरतें; म्हणून त्रिदोष शक्तिरूपी न समजतां पदार्थरूपी आहेत असें म्हणणें फार विसंगत ठरतें. *

अद्रव्य चिकित्सा होऊं शकते

दुसरें कारण असें कीं, पदार्थानेंच शरीराची चिकित्सा करावयाची असली तरी पदार्थानें चिकित्सा होऊं शकत नाहीं. कारण ते पदार्थ शरीरामध्यें आत्मसात् (भस्मीभूत) (शक्तिमयी) व्हावे लागतात तरच त्यांतून होणाऱ्या शक्तीनें खरी चिकित्सा होते. तिसरें असें कीं, योगशास्त्रावरून पाहतां इडा, पिंगला नाडीच्या योगानें उद्भवणारे रोग त्यांच्याविरुद्ध नाडीच्या श्वसनक्रियेनें बरे करतां येतात, किंवा प्राणायामानें शरीर पूर्ण निरोगी होऊं शकतें असें सांगतात, व आपणहि पाहतो. येथें शरीर नीट करण्यास पदार्थांचा उपयोग कोठें झाला ?

असें यंत्र उपलब्ध नाहीं

खेदाची गोष्ट ही आहे कीं, असें त्रिगुण दाखविणारें यंत्र आज उपलब्ध नाहीं. पण त्रिगुणाचीं त्रिविध कार्यें दाखविणारें यंत्र पुढेंमागें उपलब्ध होऊं शकेल असें वाटतें, असो. सध्यांतरी तिच्या कार्यावरूनच तिला ओळखतात.

---

* [शक्ति नांवाच्या स्वतंत्र पदार्थांची कल्पना करणें गैर आहे हें तर्कसंग्रह टीकेंत स्पष्टपणें दाखविलें आहे. —संपादक]

३ श्रेष्ठ रस

सृष्टींतील सर्व औषधी पदार्थांच्या गुणधर्मांचें सहा रसांत रूपांतर केलें गेलें आहे. त्यांतहि तीनच रस श्रेष्ठ आहेत, जसें:— मधुर, आम्ल व तिक्त. कोणताहि पदार्थ अग्निषोमतत्त्वाव्यतिरिक्त नाहीं म्हणून या पदार्थांचे दोनच प्रमुख गट झाले. पुढें या दोघांतच वायूचाहि स्वतंत्र चालक म्हणून समावेश झाला. म्हणून या त्रिविध कार्यकारी पदार्थांस वात, पित्त, कफ असें समजण्यांत आलें.

वाताचा कल कफाकडे

वाताचें अस्तित्व पित्तामार्फत किंवा कफामार्फत सूचित केलें गेलें तरी तो स्वतंत्र आहे. त्याचा विशेष कल कफाकडे असतो. म्हणजे तो शीतगुणप्रधानच आहे. एंजिनच्या मुख्य चाकाला एक लोखंडी ठोकळा बसविलेला असतो. त्याच्या ओझ्यामुळें चाकाला गति मिळते. गति मिळतांच ती क्रिया सतत चालू ठेवण्यास त्याचा उपयोग होतो. कारण कफ व पित्त हे पंगु आहेत. वातच मुख्य कारभारी आहे. तो पित्तकफांना नाचवतो. पित्त, कफाची प्रकोपावस्था वाताला सोडून असत नाहीं. या दोन दोषांचें शमन त्यांच्या विरुद्ध गुणानें होतें. उष्णतेनें वातकफाचा नाश होतो तर शीततेनें त्यांचा उत्कर्ष होतो. पण केवळ वातक्षीणतेस स्निग्धशीत तर वातवृद्धीस स्निग्धउष्ण उपचार करावे लागतात. हें वाताचें वैशिष्ट्य आहे.

प्रभावाचे २ प्रकार

हा असा बदल पदार्थांच्या अंतर्गत असणाऱ्या प्रभावावरून होतो. म्हणून सर्व पदार्थांचे गुणधर्म त्यांच्या वीर्यप्रभावावरून ठरवले गेले आहेत. या प्रभावाचेहि दोन प्रकार आहेत. (१) चिंत्य (२) अचिंत्य. चिंत्य प्रभाव मनुष्याधीन आहे, तर अचिंत्य प्रभाव ईश्वराधीन असतो. म्हणजे चिंत्याचें अचिंत्यांत रूपांतर न होऊं देणें एवढेंच मनुष्याचें कर्तव्य ठरतें. तरीहि मनुष्य प्रयत्न अशा अचिंत्य प्रभावावरहि मात करतो. जसें महात्म्याची कृपादृष्टि, अंगारा इ. पण हें अपवादात्मकच असतें.

त्रिदोष सचेतन द्रव्य आहेत

वरील विवेचनावरून त्रिदोष शक्तिमयी गुण-क्रियादर्शक सचेतन द्रव्य असल्यामुळें दाखव येत नाहींत. ते रक्तामार्फत सर्व शरीरभर त्या स्थितींत फिरत असतात.

नाडीपरीक्षेंतहि त्यांच्या गुणक्रियेवरूनच त्यांची दोषनिश्चिति केली जाते. जसें नाडी चपल व ठा असली कीं पित्तदोष दाखवते, तरीपण पित्तदोष म्हणजे अचेतन पदार्थ नव्हे.

———

होली का उपहार

नागपूरच्या आयुर्वेद साप्ताहिकानें होळीनिमित्त आयुर्वेद क्षेत्रांतील काहीं व्यक्ति व पत्रकार यांना उप-धिदान केलें आहे. श्रीहरीदत्तजी शास्त्री यांना डायरेक्टर नेमल्याबद्दल मुंबई सरकारला गुणग्राही सरकार म्हटले आहे वैद्य प्रतापकुमार यांच्या पुढें निकॉनो माइक्रोफोन व वैद्य बिंदुमाधव यांच्यापुढें शुद्ध आयुर्वेद लिहिले आहे. आयुर्वेद पत्रिकेबाबत पुढील दोहा दिला आहे.

शुद्ध आयुर्वेद का करते सदा प्रचार।
‘खाडिलीनी’ कोशिका करते खूब प्रसार॥
मित्र तुम जीओ बरस हजार।

———

तारेचा पत्ताः-Newbottle

के. के. शहा अँड कंपनी

बाटल्याचे व्यापारी

(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)

रिकाम्या बाटल्या, बुचें, कॅपसुल्स् [हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे

ठोक व किरकोळ

विक्री करणारे व्यापारी

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, भुसावळ

भुसावळ येथील महाराष्ट्र प्रां. वै. मंडळाचे अधिवेशनाचे वेळींच आयुर्वेद अ. चर्चापरिषद घेण्याचें ठरत आहे. अध्यापकांना सोईचें व्हावें म्हणून अधिवेशनाची तारीख साधारणतः मे च्या पहिल्या आठवड्यांत घेण्यांत येईल.

अधिवेशनाच्या व चर्चापरिषदेच्या वेळा भिन्न भिन्न ठेविल्या म्हणजे एकाच तारखांना दोन्ही कार्यक्रम एकमेकांस अडथळा न आणितां पार पाडतां येतील. चर्चापरिषदेच्या वेळीं दररोज सकाळीं ६ ते ९ व दुपारीं २ ते ५ पर्यंत ठेवण्यांत येत आहेत. याप्रमाणें तीन दिवस मिळून अठरा तास चर्चा परिषदेकरितां मिळतील.

३ तासाचे ६ खंड

तीन दिवसाचे प्रत्येकीं तीन तासाचे असे ६ कालखंड पडतात. या प्रत्येक कालखंडांत एक एक विषय चर्चिला जाईल व तत्संबंधीच्या शंका अडीअडचणी याकरितां हा वेळ राखून ठेवला जाईल. या पद्धतीनें शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमाच्या सहा विषयांना वाव मिळेल.

आधिवेशन कोणत्याहि तारखांस झालें तरी प्रथम दिवशीं सकाळीं द्रव्यगुण दुपारीं, रसशास्त्र. दुसऱ्या दिवशीं सकाळीं शारीर व दुपारीं दोषधातुमलविज्ञान. तिसऱ्या दिवशीं सकाळीं व सायंकाळीं न्यायसांख्य-मीमांसा संस्कृत व सटीक अष्टांगहृदय स्वस्थवृत्त. याप्रमाणें अध्यापकचर्चा परिषदेचा कार्यक्रम ठरविण्यांत येत आहे.

संमेलनासाठीं १८ तास

याप्रमाणें चर्चापरिषेदचा कार्यक्रम ठेवूनहि अधिवेशनाकरितां चर्चेएवढाच म्हणजे १८ तासांचा वेळ लाभूं शकतो. या अठरा तासांत आधिवेशन व त्याचे अनुषंगिक कार्यक्रमहि होऊं शकतील.

सर्व अध्यापक यावेत ही अपेक्षा

चर्चापरिषदेला आयुर्वेदाचें अध्यापन करणारे सर्व अध्यापक यावेत अशी अपेक्षा असल्या कारणानें वेळ या पद्धतीनें विभागून निश्चित केला आहे. उद्देश असा कीं, सर्व परिषदेच्या कार्यक्रमास उपस्थित राहातां येण्याची शक्यता जरी नसली तरी त्या विषयापुरता तो अध्यापक उपस्थित राहूं शकेल.

अडीअडचणी शंका पाठवा

त्या त्या विषयाच्या अध्यापकांनीं आपआपल्या विषयाच्या अडीअडचणी, शंका इत्यादि तर अगोदरच कृपया पाठवाव्यात, पण शिवाय विशेष कांहीं गोष्टी आढळल्या असल्यास त्याहि कळवाव्यात.

या पत्रकान्वयें माजी व विद्यमान सर्व अध्यापकांना तसेंच त्या त्या विषयाच्या तज्ञांना या चर्चापरिषदेस उपस्थित राहाण्याची जाहीर विनंति करीत आहे.

आपला नम्र
वि. म. गोगटे, निमंत्रक

अधिक पशुडॉक्टर निर्माण करण्यासाठीं
तात्पुरता प्रमाणपत्र अभ्यासक्रम

भारतांत आवश्यकतेपेक्षां जनावरांचे चिकित्सक लोक फारच कमी आहेत. ही उणीव भरून काढण्यासाठीं २ वर्षांच्या अभ्यासक्रमाचे वर्ग राज्य सरकारनें चालवावेत अशा सूचना केंद्र सरकारनें दिल्या आहेत.

सध्यां देशांत १० पशुवैद्यक महाविद्यालयें आहेत. त्यांत दरसाल २५० लोकांना प्रवेश मिळतो.

होमिओपॅथिक वै. व्यवसायींना सूचना

पहिल्या मुम्बई होमिओपॅथिक रजिस्टरमध्यें रजिस्ट्रेशन ट्रायब्यूनलनें दिलेल्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निर्णयाबाबत ज्यांचें कांहीं गाऱ्हाणें असेल अशा होमिओपॅथीक वैद्यक व्यवसायींनी पांच रुपये फी भरून अपेलेट ॲथॉरिटी, सेक्रेटरी, होमिओपॅथिक रजिस्ट्रेशन ट्रायब्युनल, सूर्यमहाल, मिलिटरी स्क्वेअरलेन कॉर्नर, मेडोज स्ट्रीट, मुंबई १, यांच्याकडे ११ मार्च १९५५ पर्यंत अर्ज करावेत.

धर्मार्थ दंतयज्ञ, नागपूर

नागपूर येथें अग्रगामी वैद्य संमेलनाच्या प्रदर्शनांत अखिल भारतीय आयु. डेंटल मिशन संस्थेचे कार्याध्यक्ष दन्तवैद्य पां. वि. जायदे यांच्या नेतृत्वाखालीं प्रदर्शनाच्या आवारांत धर्मार्थ दंतयज्ञ यथासांग पार पडला. मध्यप्रान्त वऱ्हाडमधील सुमारें २००० वैद्य, डॉक्टर व सरकारी मंत्री यांनीं शूलरहित दन्तोत्पाटनें व विशेषतः सव्यसाची दन्तोपाटनें पाहून आश्चर्य प्रकट केलें.

‘ अँजायना पेक्टोरिसचे ’–दन्तोत्पाटन

“ या संमेलनाचा विशेष म्हणजे हृद्रोगाचा (Angina Pectoris) एक रुग्ण कीं ज्याचे दांत नागपूरमधील डॉक्टरांना काढणें अशक्यप्राय होते, अशा रुग्णाचे दांत शूलरहितपद्धतीनें काढून वैद्य जायदे यांनीं ॲलोपॅथिक सर्जनलोकांना आश्चर्याचा धक्काच दिला. दन्तोपाटनापूर्वी सदर डॉक्टरांनीं त्या रुग्णाबद्दल वैद्य जायदे यांना धोक्याची सूचना दिली होती. परन्तु हें दन्तोत्पाटन इतकें सुखावह झालें कीं, लगेच रुग्णानें आपला अनुभव लाउड स्पीकरवर सर्व वैद्यांना सांगितला. सदर रुग्ण स्वतः वैद्य आहेत (नांव श्री. अनवाणे). या प्रसंगीं, अनेक मंत्री, स्पीकर, व्हाईस चॅन्सेलर, पं. शिवशर्माजी इ. मंडळी उपस्थित होती. ”

मंत्र्याचे दांत काढणार

मान्यवर मंत्री ब्रिजलाल बियाणी व मंत्री कन्नमवार यांनीं आपले दांत या शूलरहित पद्धतीनें काढून घेण्याचें ठरविलें आहे.

‘टूरिस्ट’ लोकांशीं विचारविनिमय

मुंबईत सध्यां अमेरिकेकडून आलेल्या प्रवाशांबरोबर वैद्य जायदे तेथील परिस्थितीबाबत विचारविनिमय करीत आहेत. ”

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं
आयुर्वेदिक व युनानी वनौषधि
तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण !

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार, गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राह्मी, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य ! विशेष माहितीसाठीं आमचे साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६
टेलिग्रॅम–आयुर्वेद

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी
२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

ॲलोपॅथी व आयुर्वेद यांचा समन्वय

[लेखकः— डॉ. गो. गं. लिमये, पुणें ४]

१६-२-५५ चे आयुर्वेद पत्रिकेंत यासंबंधीं प्रो. डॉ. वि. वि. गोरे, डी. एस्सी. यांचा लेख आला आहे. ॲलोपॅथी व आयुर्वेद यांचा समन्वय करण्याची जरूरी नाहीं, कारण त्यांत भिन्नता नाहींच आहे. डॉक्टर-लोक लक्षणांवरून रोगाचें निदान करतात व त्याला अनुसरून औषध देतात. वैद्यहि असेंच करतात. दोघेहि लक्षणांच्या विरुद्ध गुणधर्मांची चिकित्सा करतात. ('लक्षणें' या शब्दांत, पूर्वीची हकीगत, दृश्य चिन्हें (मलमूत्ररक्त तपासणी वगैरे), व भावना, यांचा अंतर्भाव होतो.)

डॉक्टर म्हणतो नर्व्हज् बिघडल्या आहेत तर वैद्य म्हणेल वाताचा विकार आहे. आतां नक्की कुठें काय बिघडलें आहे तें डॉक्टरला कळतें; उदा. काळजाच्या धमनींत गांठळी बनली आहे. इतका तपशील वैद्याला कळत नाहीं; कारण त्याला शरीराची इतकी माहिती नसते. वैद्य म्हणेल पित्तदोष अगर कफदोष आहे. साधारणपणें असें गृहीत धरावयास हरकत दिसत नाहीं कीं, मेंदु, मज्जातंतू या मज्जागटाच्या विकाराला वैद्य सर्वसामान्यपणें 'वातविकार' समजतात. आंतडी, यकृत् वगैरे पचनगटाच्या विकाराला सरसकट पित्तदोष म्हणतात आणि नाकातील वगैरे स्राव, छातींतील कफ, सांध्यांतील 'वंगण' किंवा श्लेष्म, पाझरत्या विकृतीला कफदोषांत काढतात, असा माझा तरी समज झाला आहे.

दोघांचाहि सिद्धांत

नांव कांहीं का द्या ना अमुक लक्षणें असलीं तमुक रोग समजायचा, असाच डॉक्टर व वैद्य या दोघांचाहि सिद्धांत आहे. वर्षानुवर्षांच्या अनुभवानें (व प्रयोगावरून) दोघानाहि कळलें आहे कीं, अमुक रोगावर तमुक औषध लागूं पडतें. कार्यकारणभाव कितीहि छेडला तरी अखेर प्रत्यक्ष अनुभव काय यावरच दोघांचीहि मदार आहे.

औषधांत फरक असेल. उदा. डोकेंदुखीकरतां डॉक्टर ॲस्पिरिन देईल, वैद्य सुंठ चाळील किंवा दोघेहि मूळ बिघाडावर चिकित्सा म्हणून अन्य औषधें पोटांत देतील. पण वैद्यानें ॲस्पिरिन दिलें तरी गुण येईल आणि डॉक्टरनें सुंठ चोळली तरी डोके दुखी थांबायला नाकबूल करणार नाहीं. वैद्य म्हणेल हा वातविकार आहे तर डॉक्टर कदाचित् म्हणेल ट्रायजेमिनल न्युरॅल्जिया आहे तर आजी म्हणेल अर्धशिशी आहे.

लक्षणें पाहून औषध

डोळे बिघडल्यामुळें डोकें दुखेल, दांतामुळें दुखेल, किंवा पित्तामुळें दुखेल, परंतु सर्व लक्षणें पाहूनच दोघेहि औषध-योजना करतांत. विषमांत डोकें दुखेल पण विषमांतील अन्य लक्षणांवरून दोघांनाहि मूळ विकृति काय आणि आगंतुक किंवा उप-विकार काय हें कळतेंच.व योग्य तें निदान करून दोघेहि आपापली औषधयोजना करतील. आतां दोघांचेहि निदान चुकेल व त्यामुळें औषधयोजना चुकेल, ही गोष्ट निराळी.

मग वाद राहिला कोठें

तात्पर्य, अमुक लक्षणावर तमुक औषध, असें ठरल्यावर मग रोगाच्या नांवाशीं काय करावयाचें आहे? लक्षणांवर किंवा लक्षण-समुच्चयावर जोंपर्यंत रोगनिदान अवलंबून आहे व त्यावरील औषधें दोघांनाहि ठाऊक आहेत, तोंवर भांडण कशाला? भांडणाचा प्रश्न उत्पन्नच होत नाहीं. आजहि कित्येक तरी 'मराठी' औषधें ॲलोपॅथी 'कायदेशीरपणें' वापरीतच आहे. हिंग, अफू, पारा, सर्पिना हीं सारीं औषधें 'देशी' म्हणायला हरकत नाहीं. तीं अधिकृत औषधी-यादींत (फार्माकोपिया) आहेतच. मग वाद राहिला कुठें? माझें म्हणणें दोघांनीहि योग्य त्या औषधांची देवघेव करावी, तेढ वाढवूं नये.

[वर डॉ. लिमये यांनीं पूर्वपक्ष मांडला आहे त्याला वाचकांनीं उत्तर द्यावें. —संपादक]

[पान नंबर ५७२ वरून चालू]

कैंच हास्यास्पद आहे असें आम्हांस वाटतें.

सरकार व समितीस जाहीर विनंति

आम्हांस या प्रसंगीं सरकार व पाठ्यक्रम समिति यांना अशी जाहीर विनंति करावयाची आहे कीं, त्यांना जर शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमास तावडतोब सहाय्य करणें शक्य नसेल तर त्यांनीं हा साडेतीन वर्षांत डोईजड अभ्यासक्रम पार पाडण्याचा व विद्यार्थ्यांच्या व अध्यापकांच्या परिश्रमावर पाणी पाडण्याचा कार्यक्रम (विक्रम) सोडून द्यावा. कारण आर्थिक अडचणींमुळें हा अभ्यासक्रम मान्य-गुरु वा विद्यालयें यांना शेवटास नेणें कदापि शक्य होणार नाहीं असें आमचें निश्चित मत आहे. सरकार सर्वसमर्थ आहे व तें पुढें मदत करील या आशेनें या महागाईच्या काळांत जास्त दिवस संस्था-चालक, गुरु व विद्यार्थी तग धरूं शकणार नाहींत. मागाहून मोठी मदत मिळण्यापेक्षां तावडतोब थोडी कां होईना मदत मिळणें हें अत्यंत अवश्य आहे.

मुंबई सरकारचें मुख्य कर्तव्य

आज गुरुपरंपरा व शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत मिळून सुमारें २०० विद्यार्थी शुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण घेत आहेत व हा आंकडा पुढील ३-४ वर्षांत १००० वर जाईल. इतक्या विद्यार्थ्यांचें वैद्यकीय शिक्षण ही बाब उपेक्षणीय खास नाहीं. साध्या शालेय शिक्षणसंस्थासुद्धां सरकारी मदतीशिवाय चालवणें आजच्या युगांत कुणासहि शक्य होत नाहीं. वैद्यकीय शिक्षण ही तर अत्यंत खर्चाची गोष्ट आहे. आणि त्यामुळेंच अत्यंत आवश्यकता असूनहि देशांत पुरेशीं वैद्यक महाविद्यालयें निघू शकलीं नाहींत, शकत नाहींत. अशा वेळीं खाजगी प्रयत्नानें चाललेल्या या वैद्यकीय शिक्षणकार्याला सर्वप्रथम मदत करणें हें सरकारचें मुख्य कर्तव्य आहे, हें कुणासहि मान्य होईल.

* * *

म. प्रां वैद्य संमेलन, भुसावळ

अध्यक्षपदासाठीं सुचविलेलीं नांवें

नाशिक ता. १२- आज रोजीं सायंकाळीं वाजतां म. प्रां. वैद्य मंडळाच्या कार्यालयांत अध्य पदासाठीं आलेल्या सूचनापत्रांतील सूचनांची मोज तीन त्रयस्थ पंचासमक्ष सुरु करण्यांत आली. पा विण्यांत आलेल्या एकूण ५३२ जोड-पत्रां मुदतींत २२० सूचनापत्रें भरून आलीं. त्यांपैकीं दोन पत्रें सही नसल्यामुळें बाद झालीं. अध्यक्ष पदासाठीं सुचविलेल्या एकूण नांवांची संख्या होती.

सुचविलीं गेलेलीं पहिलीं ५ नांवें व मिळालेली मतसंख्या पुढीलप्रमाणें:—

आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे पुणे १४५
वैद्य वि. म. गोगटे ६३
वैद्य म. भा. वाटवे ४१

या पुढील २ नांवें वैद्य बिंदुमाधव नाशिक ३९ व वैद्य यशवंतराव गुणे कोल्हापूर अशीं आहेत.

सूचनापत्रांचा हा निकाल पहिल्या क्रमांकांना कळविण्यांत आला आहे.

मानवी शरीराशीं ऋतूचा मिथ्यायोग

आयुर्वेद पत्रिकेंत प्रसिद्ध झालेली मिथ्यायोग संबंधींची चर्चा वाचून नाशिकचे त्र्यंबकशास्त्री यांनीं वैद्य वेणीमाधवशास्त्री यांना पत्र पाठ होतें. त्याचें उत्तर पुढें दिलें आहे.

कडुलिंबाची गळ

कडुलिंबाचें जे पाणी गळतें त्यास कडुलिंबा गळ म्हणतात. माझेजवळ त्याची एक बाटली भर लेली १२ वर्षांपूर्वींची आहे व एक बाटली महिन्यापूर्वींची आहे. या पाण्याचा उपयोग कळ ठीक होईल. — डॉ. व्ही. पी. जोशी वैद्य

अनुक्रमणिका

राष्ट्रपतींची राज्य सरकारांवर जाहीर टीका ५७१
मुंबई राज्य सरकारकडून शुद्ध आयुर्वेदीय शिक्षणाची अनपेक्षित उपेक्षा ५७२
टीकाकार आप्त मानावेत काय ? ५७३
लिंबूरस व सायट्रिक ॲसिड ५७६
निवर्गीयूषासंबंधींचे माझे अनुभव ५७७
बिब्याचे व्रणावर काय लावावें ? ५८०
म. प्रां. दशम वैद्य संमेलन, भुसावळ ५८१
आयुर्वेद व युनानी वैद्यक बोर्ड, मुंबई ५८५
आयुर्वेदाध्ययनाचें द्वार सगळ्यांना मोकळें ! ५८७
अध्यापक परिषद, भुसावळ—सूचना ५८८
प. नेहरूंच्या निवेदनाचा स्पष्टार्थ ५९१
'माझे' त्रिदोष-विचार ५९३
आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, भुसावळ ५९७
ॲलोपॅथी व आयुर्वेद यांचा समन्वय ५९९

बालरोगावरील होमिओपॅथिक औषधें
नित्योपयोगी व गुणास उत्तम

(१, वर्म पिल्सः- वरचेवर पोटांत कृमि अगर जंत होणाऱ्या मुलांना गुणकारी. बाटली किं. ०-१२-०

(२) स्लीप पिल्सः- चिरचिऱ्या व स्वस्थ झोंप न येणाऱ्या मुलांना हितावह. मूल उत्तम झोंपूं लागतें व औषधाची संवय लागत नाहीं. बाटली किं. ०-१२-०

(३) डायरिआ पिल्सः- पुष्कळ वेळां शौचास होणें, पुष्कळ दुर्गंधयुक्त, कधीं पातळ कधीं घट्ट, अगर फेसाळ असें शौचास होत असल्यास उत्तम उपयोग होतो. बाटली किं. ०-१२-०

(४) ईअर पिल्सः- कान फुटणें, दुखणें, लाल होणें, सुजणें, पूं अगर पाणी येणें इ. विकारावर. बाटली किं. ०-१२-०

(५) स्किनो पिल्सः- सर्व तऱ्हेच्या त्वचारोगावर उपयुक्त व प्रमाता औषध. बाटली किं. ०-१२-०

(६ कफ पिल्सः- सर्दी, पडसें, खोकला, वरचेवर शिंक येणें, डांग्या खोकला यांवर उत्तम औषध. बाटली किं. ०-१२-०

(७) टॉनिक पिल्सः- शारीरिक व बौद्धिक वाढ प्रमाणशीर न होणाऱ्या मुलांना उत्तम. भूक व झोंप चांगली लागून मूल बाळसेदार होऊं लागतें. बाटली किं. १-०-०

(८) रिकेट्सः- हा रोग साधारणपणें मूल सहा महिन्यांचें झाल्यानंतर लक्षांत येतो. हाडें बारीक व मऊ, डोकें मोठें, शरीराच्या मानानें पोट मोठें, हाडाचीं टोकें मोठीं झालेलीं, टाळू नीट भरत नाहीं, डोक्यास घाम येतो, इत्यादि लक्षण दिसूं लागतात. ह्या औषधानें असें मूल चांगलें सुधारतें. बाटली किं. १-०-०

तज्ञ डॉक्टरकडून काळजीपूर्वक चिकित्सा केली जाते. चिकित्सा वेळः- दु. १ ते ४॥

होमिओ लॅबोरेटरी
१७८ न्यू चर्नीरोड,
प्रार्थनासमाज, मुंबई नं. ४

चंद्रकिरणांचा शुद्ध आयुर्वेदीय उपयोग

चंद्रकिरणांच्या ठिकाणीं आरोग्यदायी गुणधर्म आहेत व त्या किरणांनीं संस्कृत केलेलीं पित्तशामक औषधें घेतलीं असतां पित्तदोषाचें उत्कृष्ट शमन होतें असा आयुर्वेदाचा सिद्धांत आहे व आमचा अनुभव आहे. आयुर्वेद औषधीभवनाचें प्रवाळभस्म हें २१ दिवस चंद्राच्या शीतल किरणांत सुकावलें जातें व औषधीभवनांतच तयार केलेल्या गुलाबजल,त्या २१ भावना त्यांत दिल्या जातात.

२१ चंद्रपुटी प्रवाळभस्म

निवडक १ नंबरची न किडलेली बारीक प्रवाळकांडी यासाठीं वापरली जाते. इतक्या उच्च दर्जाचें हें चंद्रपुटी प्रवाळ वापरून तर पहा, एवढीच आमची नम्र विनंति आहे. दुसरें प्रवाळभस्म आपण हातांतसुद्धां धरणार नाहीं, अशी आमची खात्री आहे.

आयुर्वेद सेवा संघ, औषधीभवन, नाशिक

[लक्षांत असू द्या, ही लिमिटेड, कंपनी नाहीं]

— शुद्ध आयुर्वेदशास्त्राच्या शिक्षणाची प्रगतिपर संस्था —

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नासिक

मॅट्रिकच्या परीक्षेंत संस्कृत विषयांत ५० टक्के गुण असणाऱ्या (पास अगर नापास) विद्यार्थ्यांस प्रवेश दिला जातो. नवीन वर्ग १० जूनपासून सुरू. प्रवेश मिळवूं इच्छिणाऱ्यांनीं वरील पत्त्यावर अर्ज करावेत. तूर्त फक्त ३० विद्यार्थी घ्यावयाचे आहेत.

आरोग्यशाला (स्वास्थ्यशाला व रुग्णालय)

लौकरच संस्थेची आरोग्यशाला(स्वास्थ्यालय व रुग्णालय) सुरू होत आहे. त्यासाठीं चांदवडकर रस्त्यावरील प्रशस्त चांदवडकर वाडा ही जागा संस्थेनें घेतली आहे.

HARDWAR DELY SAHARANPUR

संपादक व प्रकाशकः—वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विवळकर कारंजा, नाशिक
मुद्रकः— बी. वि. ओक, [illegible] पेठ, नाशिक

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

वर्ष ८ वें) नासिक, ता. १ एप्रिल १९५५ (अंक १९ वा

82622

स्वामी केवलानंदांचें आदर्श दीर्घायुष्य

वाई येथील प्राज्ञ पाठशालेचे संचालक व धर्मकोशकार्यकर्ते स्वामी केवलानंद सरस्वति (पूर्वाश्रमींचे श्री. नारायणशास्त्री मराठे) हे ता. १ मार्च रोजीं वयाच्या ७८ व्या वर्षी ब्रह्मीभूत झाले. मनुष्यानें नियमित आचरणानें दीर्घायुष्य कसें मिळवावें? व तें दीर्घायुष्य सत्कारणीं कसें व्यतीत करावें? याचा उत्तम आदर्श त्यांनीं महाराष्ट्रासमोर ठेवला आहे.

दर्शनांच्या अभ्यासाची व्यवस्था

१८७७ सालीं त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील एका खेड्यांत झाला. १८९९ सालीं वाई येथें येऊन तेथील निरनिराळ्या विद्वान् मंडळीजवळ त्यांनीं व्याकरण, ऋग्वेद, यजुर्वेद व वे.मू. बाळशास्त्री डेग्वेकर यांच्याजवळ न्यायशास्त्र (तर्कशास्त्र) यांचें अध्ययन केलें. त्यांनीं आपलें सर्व जीवन अध्ययन-अध्यापनांत घालवून; महाराष्ट्रांत दर्शनांच्या अभ्यासाची उज्वल परंपरा निर्माण केली. उत्कृष्ट शिष्य तयार करून आजचा महाराष्ट्र प्रगत करण्याची फार महत्वाची कामगिरी स्वामीजींनीं बजाविली आहे.

मीमांसादर्शन, मीमांसाकोश

महाराष्ट्रांत मीमांसादर्शनाच्या अध्ययनाकडे अत्यंत दुर्लक्ष दिसून येतें. स्वामी केवलानंदांनीं इतर दर्शनाप्रमाणेंच मीमांसादर्शनाच्याहि अध्ययन-अध्यापनाची व्यवस्था वाई येथें केली, इतकेंच नव्हे तर स्वतः मीमांसादर्शन, मीमांसाकोश इत्यादि उपयुक्त मीमांसा ग्रंथ लिहिले.

त्यांचें आचरण अत्यंत निर्मल व सदाचारपूर्ण होतें. राजकारण, समाजकारण व धर्मकारण या तीनहि क्षेत्रांत त्यांनीं भरीव कामगिरी केली आहे. अकोला, अहमदनगर इ. ठिकाणीं भरलेल्या तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी धर्म परिषदांचे ते अध्यक्ष होते. आदर्श उपनयनविधि व विवाहविधि कसे करावेत त्याबाबतींत त्यांनीं उत्कृष्ट मार्गदर्शन केलें आहे. शुद्ध आयुर्वेदीय चिकित्सेवरील आपली भक्ति त्यांनीं आपल्या आचरणानेंच प्रगट केली आहे. अशा या महाराष्ट्राच्या आदर्श संन्यस्त ज्ञानोपासकांस पत्रिका आपली श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

आयुर्वेदापेक्षां ॲलोपॅथी हें फार मागासलेलें शास्त्र आहे !

[Allopathy is far behind Ayurved]

सेठ जी. एस्. मेडिकल कॉलेजमध्यें, इंडियन मेडिकल ॲसोसिएशन (मुंबई प्रांतीय शाखा) च्या द्वितीय वार्षिक संमेलनाचें उद्घाटन करते समयीं केलेल्या भाषणांत मुंबई राज्याचे मुख्य मंत्री ना. मोरारजीभाई देसाई यांनीं ‘आयुर्वेद हें उन्नत व पुरोगामी शास्त्र असून त्याच्या तोडीला ॲलोपॅथीला येण्यास दीर्घ काल लागेल’ असें सांगून संमेलनास उपस्थित असलेल्या सर्व ॲलोपॉथिक डॉक्टरांना एक आश्चर्याचा धक्काच दिला.

आजचें विकृत स्वरूप

त्यांनीं पुढे असेंहि सांगितलें कीं, सध्यां आयुर्वेदाची चिकित्सा त्याच्या शुद्ध स्वरूपांत देण्यांत येते किंवा नाहीं याबद्दल शंका आहे. आयुर्वेद हें स्वयंपूर्ण शास्त्र आहे, परंतु त्याच्या अज्ञ अनुयायांनीं त्याला सध्यांचें विकृत स्वरूप आणलें आहे.

मति गुंग करणारें विधान

राज्य-प्रमुखाच्या वरील विधानानें जमलेली बहुतेक डॉक्टर-मंडळी आश्चर्यचकित झाली व ‘मति-गुंगकारक विधान’ असें त्याच्या निवेदनास डॉक्टरांनीं संबोधिलें.

डॉक्टरांची सदोष मनोवृत्ति

मुख्य मंत्र्यांनीं होमिओपाथीला व आयुर्वेदाला तुच्छ लेखणाऱ्या ॲलोपाथिक डॉक्टरांच्या मनोवृत्तीला दोष दिला व प्रत्येक वैद्यक शास्त्राबद्दल आदर पाळणें हें सर्वांचें कर्तव्य आहे असें सांगितलें.

महागडी चिकित्सा पद्धति

स्वतःचा रोग बरा करण्यासाठीं गरीब जनतेला जर पाण्यासारखा पैसा ओतावा लागत असेल तर त्या चिकित्सापद्धतीची व्यवहारोपयोगिता कितपत आहे! व त्या चिकित्सापद्धतीची उन्नति ही सामान्य जनतेच्या दृष्टीनें काय उपयोगाची ? असेंहि उद्गार मुख्य मंत्र्यांनीं काढले.

महत्त्वाचे मुद्दे

आपल्या व्याख्यानांत त्यांनीं पुढील मुद्यांवर जोर दिला. १] तुमच्या रुग्णाकडून युक्तिप्रयुक्तीनें पैसे उकळूं नका, व २] शक्यतों कमी औषधें वापरावीं लागतील इकडे लक्ष ठेवा. ३] तसेंच दुसऱ्या वैद्यकपद्धतीबद्दल सहिष्णु असा. व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ४] तुमच्या रुग्णांना तुम्ही अशा प्रकारची चिकित्सा द्या कीं, त्यांना तुमच्याकडे चिकित्सा घेण्यास वारंवार येण्याचा प्रसंग पडणार नाहीं.

स्वागत मंडळाची सभा

भुसावळ येथें भरावयाच्या महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन (दशम अधिवेशन) च्या स्वागत मंडळाची सभा ता. २।४।५५ शनिवारीं ३॥ वाजतां भुसावळ येथें नवशक्ति आयुर्वेदालय (राम मन्दिराजवळ) मध्यें होणार आहे.

संमेलनाच्या तारखा

महाराष्ट्र प्रान्तीय दशम वैद्य सम्मेलन येत्या मे महिन्याचे ८-९-१० तारखेस होणार आहे असें कळतें.

.... मी रशियांत काय पाहिलें ? ....

(व्याख्यातेः—वैद्य त्र्यं. म. गोगटे, अमरावती)

(नाशिक येथील शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत ता. ३०।१२।५४ रोजीं झालेल्या व्याख्यानाचा सारांश पुढें दिला आहे. —संपादक)

प्रत्येकाच्या तनामनानें उत्पादन होऊं दे ।
गुणगोविंदें प्रत्येकाला विकास गांठूं दे ॥ —नानू गोगटे

देशाटन केल्यानें पण्डितांची मैत्री, सभासंमेलनांत संचार इ० गोष्टी घडतात. सोव्हिएट रशियाच्या यात्रेनें माझ्या ज्ञानाचें आणखी एक दालन उघडलें. रशियांतील वैद्यकीय व्यवसायासंबंधीं बरेंच वाचलें होतें. त्यामुळें सध्यांचें वैद्यकक्षेत्रांतील व्यापारयुग जाऊन समतेचें युग सुरूं होईल त्यावेळीं आयुर्वेदशास्त्राला पुनः वैभव प्राप्त होईल अशी माझ्या मनाची पक्की समजूत झाली होती.

राष्ट्राची संस्कृति आणि वैद्यक

देशाची संस्कृति म्हटलें कीं त्या देशांतलि वैद्यकांची बाजू पाहावीच लागते. वैद्यक हें संस्कृतीशीं-म्हणजेच मानवी जीवनाशीं अत्यंत निगडित असलेला एक समाजाचा पैलू आहे. आपल्या देशाच्या महान् संस्कृतिबरोबरच आपल्या देशाचें वैद्यकहि महान् परंपरेचें एक सांस्कृतिक अंग आहे. आपल्या वैद्यकाचा अभ्यास करतांना ह्या गोष्टी प्रत्ययास येतात. आपलें वैद्यक केवळ भौतिक शरीरासंबंधींच विचार करीत नाहीं; तर प्राणैषणा, धनैषणा, आणि थेट परलोकैषणा ह्या जीवनाच्या त्रिसूत्रीच्या प्रकाशांत श्रेष्ठ प्रकारें व्यतीत करावयाचें जीवन कसें साधतां येईल हें प्रतिपादण्याकडे आपल्या वैद्यकाची प्रवृत्ति आहे हें स्पष्टपणें दिसून येतें. आपल्या देशाची संस्कृति पाहात असतांना म्हणजेच जीवन तपाशीत असतांना तो आपल्या वैद्यकाप्रमाणें कितपत वागतो मग तो वैद्य असो किंवा सर्वसामान्य मनुष्य असो हें पाहावयास पाहिजे. वैद्यकांतील नियमांप्रमाणें तो जर वागत असेल तर तो आपली संस्कृति पाळीत आहे असें म्हणतां येईल. पण तशी स्थिति आज दिसत नाहीं. आपली संस्कृति आणि वैद्यक आज केवळ पुस्तकांत आहे. तें समजून घेण्यासहि आज लोक तयार नाहींत.

सोव्हिएट रशियाचा बोलबाला

आपला देश, संस्कृतीची महान् परंपरा उत्पन्न करतांना अनेक उलाढाली, क्रांत्या, जनपदउध्वंस पाहून तावून-सुलाखून, प्रगत होत होत, उत्क्रांत होत होत, अगदीं शिखराला पोंचला होता खरा. परन्तु ज्याप्रमाणें उत्कृष्ट प्रकृति असली तरी ऋतुमानाप्रमाणें बदल, ऋतुसंधीला संशोधन, वयोमानाप्रमाणें कायाकल्प ह्या गोष्टींशिवाय ती प्रकृति तशी उत्कृष्ट राखतां येत नसते, तद्वतच देशाला संस्कारांची जरुरी असते. आज सर्वसामान्य गोष्टींत सुद्धां शास्त्रवचन आणि शास्त्रव्यवहार यांत भांडवलशाही आणि समतावाद यांच्या इतकें अंतर आहे. सोव्हियत रशिया अशाच प्रकारच्या मानवी जीवनाच्या लांछनास्पद गर्तेतून 'उद्धरेत् आत्मनात्मानम्' याप्रकारें वर वर येत आहे, श्रेयसाला कवटाळीत आहे. सोव्हियतला आपल्या

संस्कृतीसारखा महान् परंपरेचा पाठिंबा नाहीं. पण समाजधारणेसाठीं अवश्य असलेल्या मूलभूत गोष्टी मा आत्मसात् करतां आल्या आहेत. आपल्याकडे उलट स्थिति आहे. चतुर्विध पुरुषार्थांचें शास्त्र उत्कृष्ट प्रकारें तयार असूनाहि आज मोक्ष तर दूरच, पण अर्थ, काम ह्या मूलभूत, मनुष्य म्हणून जगण्याला आवश्यक असलेल्या गोष्टींची सुद्धां तरतूद करतां येत नाहीं. अर्थ, काम या पुरुषार्थांची साधना समाजधारणेसाठीं कशी करावी हें सांगणारा धर्म आणि तोसुद्धां आपण ठसठशीतपणें तयार केला आहे. पण आपण आज त्या सर्वांचें विडंबन करीत आहोंत.

सोव्हियतचा बोलबाला आज जो होत आहे तो तेथील समाजव्यवस्थेंत म्हणजे समाजाच्या धारणेंत माणसाला अर्थ आणि काम हे पुरुषार्थ रीतसरपणें साधून अभ्युदयाकडे त्याला वाव देण्यांत येतो या गोष्टीमुळें आहे. थोडक्यांत म्हणजे माणसाला तेथें मनुष्य म्हणून जगतां येत आहे.

सोव्हियत रशिया आणि आयुर्वेद

सो. रशियांत आयुर्वेदाला काय स्थान आहे, तेथें आयुर्वेदीय रुग्णालयें आहेत कां, वगैरे प्रकारचे प्रश्न मला कोणी कोणी विचारतात. त्यावर मला असें म्हणावेंसें वाटतें कीं, तेथें आयुर्वेद आहे; आयुर्वेदीय रुग्णालयें नसलीं तरी आयुर्वेदशास्त्रांतील स्वास्थ्यचर्या तेथें आपल्यापेक्षां शतपटीनें प्रत्यक्ष आचरणांत आहे. आयुर्वेद तेथें मूर्तिमंतपणें वावरत आहे. स्वास्थ्यसंरक्षणाची चाड आणि सोय तेथें पुरेपूर आहे. गीतेंतील 'युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु । युक्तस्वप्नावबोधस्य' ह्या मानवी जीवनाच्या मूलभूत गोष्टी, अध्यात्माच्या पायाभूत गोष्टी आज तेथें सुरूं झाल्या आहेत. आयुर्वेदांतील स्वास्थ्य 'समदोषः समाग्निश्च' या पासून थेट 'प्रसन्नात्मेंद्रियमनाः' पर्यंतच्या गोष्टी मानवाला अनुभवावयास मिळत आहेत.

आम्ही विचारतो कीं, तिकडे आयुर्वेदीय रुग्णालयें आहेत कां ? पण खेदाची गोष्ट आहे कीं, इकडे ज्यांना शक्य आहे आणि शास्त्र माहित आहे अशांना वैयक्तिक वागणुकींत तरी आयुर्वेदाची दिनचर्या, ऋतुचर्या पाळावयाची अद्याप तरी बुद्धि होत आहे कां ? आयुर्वेद तिकडे शिकवावयाला अगोदर आयुर्वेद भातभाजीसींच खातात कीं जांगल मांसादि आवश्यक आहे हें समजावयास हवें ना ? मग सो. रशियांत आयुर्वेद आहे तो कोणत्या अर्थानें ? लेनिन लायब्ररी जगांतील फार प्रचंड आहे आणि सर्वगुणसंपन्न असें ग्रंथालय आहे. तेथें आणि इतरत्र माझ्या तपासांत आयुर्वेदीय बृहत्त्रयी मला आढळली नाहीं, मग आयुर्वेदाचें अध्ययन कोठून असणार ?

असें असतांनाहि तेथें मला आयुर्वेदाचीं पाऊलें उमटलेलीं दिसलीं. जणूं सो. रशियाच्या संस्कृतीच्या पडद्यामागें आयुर्वेदाची भारतांत निराशा झाल्यामुळें गुप्तपणें उभा राहून कौतुकानें पाहात आहे कीं, माझी तत्वें, माझी शिकवण, क्रमाक्रमानें कां होईना पण येथील भूमींत आज प्रत्यक्ष स्वरूपांत दिसत आहे. सो. रशियांत स्वास्थ्यसंरक्षणाला अग्रस्थान आहे. Prevention is the key-stone of soviet Medicine ही गोष्ट तेथील लोक स्वाभिमानानें सांगतात. त्यांनीं ही गोष्ट स्वाभिमानानें सांगावी आणि आम्ही ती निमूटपणें ऐकून घ्यावी ! जणूं स्वास्थ्याचें महत्त्व आम्हाला त्यांनीं शिकवावें ! संघशक्तीनें समाजधारणेची व्यवस्था करावयाला जर आम्ही लागलो तर स्वास्थ्यसंरक्षणासाठीं काय काय करावें हें जगाला आयुर्वेदापासूनच पुष्कळसें शिकावें लागेल.

सो. रशियांत स्वास्थ्य-संरक्षणाला अग्रस्थान

आतां प्रत्यक्षपणें तेथें काय काय आढळलें तें आपण पाहूं या. स्वास्थ्यसंरक्षणासाठीं आयुर्वेदानें जी त्रिसूत्री सांगितली आहे ती म्हणजे आहार, शयन आणि अब्रह्मचर्य. या तिन्हींची व्यवस्था तेथील

धर्माप्रमाणें कशी पाळली जाते तें आपण प्रत्यक्ष उदाहरणांनीं तपासूं. तेथील निरनिराळ्या भागांसंबंधीं सर्व वर्णन करणें तर येथें शक्य नाहीं. रशियाला स्वतःचें वैद्यक नाहीं. भारताला स्वतःचें वैद्यक ही एक भूषणावह गोष्ट आहे, इतकेंच नव्हे तर समाजधारणेसाठीं लागणाऱ्या इतर सर्व शास्त्रांचीहि परिणती भारतांत झालेली होती.

आहार

स्वास्थ्य-संरक्षणासाठीं आहार हा एक फार महत्त्वाचा मुद्दा. सो. रशियांत प्रत्येकाला वयांत आल्यानंतर काम हें मिळावयाचेंच, तसेंच त्या ओघानेंच पगार हा हक्कानें मिळावयाचाच. बेकारी नाहींच. कोठेंहि भिकारी, बेकार, लाचार, दुर्मुख असा कोणीहि आम्हांस पाहावयास मिळाला नाहीं. याचा अर्थ असा कीं, प्रत्येकाला वयांत येईपर्यंत शिक्षण आणि संस्कृतिवर्धन याच गोष्टी करीत सुरुवातीचें वय घालवावयाचें असतें. या वयांत बुट-पॉलिश, हॉटेलांत काम किंवा रस्त्यावर डबलरोटी विकीत वणवणपणानें असंस्कृत वातावरणांत जगावें लागत नाहीं; तोंपर्यंत आईबाप आणि सरकार यांच्या छत्राखालींच व्यक्ति वाढते. वयांत आल्यावर नोकरी व पगार मिळतो. लायकीप्रमाणें कामाचा दर्जा, पगारवाढ, पारितोषिकें वगैरे मिळवून विकास गांठतां येतो. योगक्षेमाची उत्कृष्ट सोय लागल्यानें गृहस्थाश्रमांत पदार्पण करण्यास आनंद वाटतो. आतां पगार जो मिळतो त्याप्रमाणें खर्च करावयाचा असा जो आपल्याकडील व्यवहार तसा तेथें नसतो. पायांची लांबी पाहून तेथें अंथरुण पुरविण्यांत येतें. रोजच्या खाण्याच्या गरजा जशा असतील आणि इतर खर्च जसे असतील त्याप्रमाणें पगाराचें किमान मान ठरविलेलें असतें. मनुष्याला मनुष्य म्हणून जगण्यास, शरीरांतील धातूंचा तो थेट सोब आणि मानसप्रकृति चांगली राहील असा आहार प्रत्येकाला मिळावयाचाच. चांगल्या, पद्धतशीर आहारानें पुष्कळशा रोगांचा प्रतिकार होऊनच जातो. आहार सरकारनियंत्रित संस्थेकडून, शास्त्रीय पद्धतीचा योग्य भावानें असा मिळतो. खाजगी धंदेवाले दुकानदार नसल्यानें आपल्यासारख्या आरोग्यकारक (!) वस्तु अन्नांत मिसळल्या जात नाहींत. स्वास्थ्यसंरक्षणाच्या दृष्टीनें आहाराचें महत्त्व आणखी उदाहरणें देऊन सूज्ञास समजावणें नकोच. आम्ही कारागिरांच्या, विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांतील खानावळींत जाऊन आमची खात्री करून घेतली. भाकर, कांदा, झऱ्याचें पाणी ह्या प्रकारच्या अन्नाची प्रशंसा करून दिशाभूल करण्याचें महापातक तेथें होत नाहीं, तर आयुर्वेदीय आहारच जणूं तेथें जनता सेवन करीत असते. खर्चाप्रमाणें पगार आंखण्यांत आणि देण्यांत येत असल्यानें पदार्थांच्या सकसतेविषयीं जनता-सरकार दक्षता ठेवीत असल्यानें 'मधुवाता ऋतायते।' हा सुपर्णांतील जयघोष तेथें जेवतांना चालूं असल्याचा भास होतो.

अन्नधान्याची विपुलता, फळभाज्यांची समृद्धता, आणि त्या सर्वांची रीतसर वाटणी यामुळें आणि खोलवरच पाहिजे तेथें आणि पाहिजे तितका पाऊस पाडण्याची 'काले वर्षतु पर्जन्यः' हा संकल्प शास्त्रीय संशोधनानें शक्य झाल्यानें आहाराचा प्रश्न, स्वास्थ्याचा एक स्तंभ, पक्का केला गेला आहे. कामधेनू-प्रमाणें वर्षानुवर्षें पीक देणारीं गव्हाचीं शेतें (Perineal wheat) बर्फाच्छादित प्रदेशाचीं मानवी प्रयत्नानें झालेलीं नंदनवनें पाहिलीं म्हणजे असें वाटूं लागतें कीं 'सुजलां सुफलां' अशी आपली भारत भूमि पूर्ण ब्रह्मस्वरूप अन्न आपल्या बांधवांना कधीं पुरविणार ?

शयन

दुसरा स्तंभ 'शयनाचा.' शयन याचा अर्थ विश्रांति, आहाराप्रमाणेंच विश्रांति हा एक जबरदस्त आहे. विश्रांति हा विहाराचा भाग आहे. सोव्हिएट सरकारनें कामाचे तास पूर्वींचे ८ होते, ते आतां

६ केले आहेत. आणि यापुढें त्यांच्या योजनेंत हे ६ चे ४ च तास व्हावेत असें आहे. जीवनासाठी जरूरीच्या वस्तु मिळविण्यास इतकेच तास माणसाला कष्टावे लागावे, बाकीचा वेळ विश्रांति, खेळ, संस्कृतिवर्धन, कला, विद्या, शास्त्रें यांचा विकास यांकडे वापरतां आला पाहिजे असा तेथील समाजधर्माचा दंड आहे. प्राण पणाला लावून धनैषणा साधावयास तेथें प्रोत्साहन मिळत नाहीं. काम करून घरीं आल्यानंत मनुष्य कंटाळलेला, थकलेला, पिचून जाऊन त्राषिक झालेला तेथें सांपडणार नाहीं. आम्ही कामगारांच्या वस्तींतून, घरांतून या वातावरणाचा पडताळा पाहिला. कामावरून आल्यावर पत्नीशीं, आप्तांशीं, इष्टमित्रांशीं गप्पागोष्टी करण्यास, कलाविकास साधण्यास लागणारा उत्साह तेथील कामगारांत असतो. कामगारांसाठीं प्रचंड राजवाडे ज्याला palace of culture for workers म्हणतात ते आम्ही पाहिले आणि तेथें सायंकाळीं सर्व प्रकारचे सर्व दर्जाचे लोक गुण्यागोविंदानें, लीलेनें भवजलांतून समतेच्या नावेमधून सहल करीत असतांना आम्हाला दिसले.

कोणत्या कामाच्या कामगाराला कोणत्या प्रकारच्या राहण्याच्या सोयी पाहिजेत, कोणत्या धंद्यां कोणत्या रोगाचा प्रादुर्भाव होतो, विश्रांति किती वेळानें आवश्यक आहे, कोणत्या हवामानांत काम करतांना थकवा येतो, कोणतें अन्न-पान दिलें असतां विशिष्ट झीज भरून येते, या संबंधाची एक, कामगारांसाठीं उघडलेली संशोधनशाला आम्ही कीव्हला पाहिली. विश्रांति हा महत्वाचा मुद्दा दीर्घायुष्य, अनारोग्य दृष्टीनें हाताळला जातो हें पाहिल्यावर स्वास्थ्य--संरक्षणाचा दुसरा स्तंभ रशियानें फार मजबूत केलेला आहे हें स्पष्टपणें दिसून आलें. काम करणाऱ्यांच्या जीवाचें संरक्षण ही बाब कायद्यानें आणि प्रत्यक्षांत फार चांगल्या रीतीनें अवलंबिली आहे. त्याला Labour protection scheme म्हणतात. [अपूर्ण]

.... उत्तम धर्म ....

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधेंच वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान -

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

सांडु
प्रेग-युटेरो
गर्भिणी-गर्भ-रक्षक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडु ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई

१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स.-
बी. पी. बर्वे अँड को., जळ
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

गु. स्वामी केवलानंदांची आयुर्वेदनिष्ठा

(लेखकः— वैद्य म. बा. दीक्षित, आयुर्वेदाचार्य, सातारा)

वाईचे गुरुवर्य स्वामी केवलानन्दसरस्वती नुकतेच ता. १-३-५५ रोजीं ब्रह्मीभूत झाले. ते आधुनिक कालांतील ऋषि होते. त्यांची अगाध विद्वत्ता, अध्यापनसातत्य, प्रचंड ग्रंथलेखन, सात्विक प्रवृत्ति, सोमनाथ प्रतिष्ठापनेच्या वेळीं दिसून आलेला अलौकिक स्वार्थत्याग इत्यादि बाबतींत त्यांचेसंबंधीं झालेल्या दुखवट्याच्या सभांतून, वर्तमानपत्रांतून वगैरे बरेंच विवेचन झालें आहे. मी या ठिकाणीं फक्त त्यांच्या आयुर्वेदनिष्ठेसंबंधीं चार शब्द लिहिणार आहे.

लेखक

प्राज्ञ पाठशाळा, वाई

स्वामीजींच्या देखरेखीखालीं चाललेल्या वाईच्या प्राज्ञ पाठशाळेंत सन १९२४ ते १९३० पर्यंत शिक्षण घेण्याचें भाग्य मला लाभलें आहे. त्यानन्तर देखील केव्हांहि मी वाईस गेलो तरी त्यांचें दर्शन घेतल्याशिवाय परत येत नसे. त्यांच्या परवांच्या शेवटच्या दुखण्यांत एक चिकित्सक म्हणून मी अनेक वेळां त्यांचेकडे जाऊन आलों आहे. तेव्हां त्यांचेसंबंधीं मी थोडेसें लिहिलें तर तें अयोग्य होणार नाहीं.

कफप्रकृति आणि अस्थिसारता

स्वामींची शरीरयष्टी ६। फूट उंच होती. सूर्यनमस्कार, आसनें, प्राणायाम, अत्यंत नियमित वागणूक इत्यादि कारणामुळें शरीर निरोगी, पुष्ट आणि भव्य होतें. मोठें कपाळ, तेजस्वी शरीर, दुसऱ्यावर छाप पाडणारी दृष्टि, शांत आणि मितभाषणी स्वभाव, प्रगल्भ बुद्धि, परिमित आहार करण्याचा नियम, आठ आठ तास एके ठिकाणीं बसून अध्यापनकार्य किंवा लेखन करण्याची स्थिरता, विद्यार्थ्यानें एकच प्रश्न पुनः पुनः विचारला तरी न रागवतां शांतपणानें समजावून सांगण्याची शैली, विद्यार्थ्यांशीं आणि इतर कोणाबरोबरहि प्रेमळ वागणूक इत्यादि गोष्टींवरून कफप्रकृतीचीं लक्षणें त्यांच्यांत पूर्णपणें होतीं हें दिसून येतें.

दांत ७८ वर्षांपर्यंत शाबूत

त्यांचे दांत शेवटपर्यंत- ७८ वर्षेपर्यंत-शाबूत होते. उत्साह दांडगा होता. दुःख, क्लेश सहन करण्याची हिंमत होती. सर्वसार मनुष्याचीं कांहीं लक्षणें दिसत असलीं तरी अस्थिसारता प्रामुख्यानें होती.

त्यांना पडसें येण्याचें कारण

स्वामींना मोठें दुखणें येऊन ते अंथरुणावर निजून राहिले आहेत असें कधीं झालें नाहीं. कारण त्यांची वागणूक अगदीं नियमित असे. फक्त त्यांना कधीं कधीं पडसें येत असे. याचें कारण अगदीं उघड होतें. त्यांचें निवासस्थान कृष्णानदीच्या अगदीं कांठावर एका माडीवर होतें. तेथें नदीकांठचा गारठा आणि भरभर येणारा वारा, पहांटेच्या वेळीं कृष्णेच्या थंड पाण्यानें स्नान, लुंगीसारखें भगवें धोतर आणि हातरुमालापेक्षां जरा मोठें असें खांद्यावर टाकलेलें उत्तरीय एवढाच पोषाख, इत्यादि कारणामुळें त्यांना पडसे येत असे.

औषध घेण्याची प्रवृत्ति कसी

जानेवारी १९५३ (शिशिरऋतु) मध्यें अवेंच जोरांत पडसें व त्यामुळें ताप आला असतां मी त्यांची प्रकृति पाहिली व औषध देतो म्हणून सांगितलें. त्यावर त्यांनीं उत्तर दिलें, " औषध घेण्याकडे माझी प्रवृत्ति सहसा नसते. औषधाची जरुरीच पडली तर अगदीं साधें व घेण्यास सोपें औषध मी घेतो. श्रीवेणीमाधवांनीं (आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी, नागपूर) मला अशा वेळीं जेष्ठमधाचें चूर्ण थोडें थोडें तोंडांत टाकून त्यावर कोमट पाणी घेण्यास सांगितलें आहे, तें पाठवून दिल्यास मी घेईन. " पडशावर हेंच औषध (जरूर वाटल्यास) ते घेत असत.

औषधांचा भडिमार नको

शेवटीं त्यांना हृदयविकार-(श्वास श्लेष्मपित्तात्मक) झाला. ताप नसतांनाहि हृदयाचे ठोके दर मिनिटास ११४ ते १२० असत. श्वासोच्छ्वास घेण्यास अतिशय त्रास होत होता; नाकांतून श्वास मावत नव्हता, त्यामुळें तोंड उघडें ठेवावें लागत होतें. निजतां येणें शक्य नव्हतें; लोडाला टेकून अर्धवट निजविले होते. पायावर थोडी सूज होती. लघवी लाल व थोडी होत होती. यावेळीं त्यांची आयुर्वेदावरील निष्ठा चांगली प्रत्ययास आली. त्यांनीं सांगितलें " माझेवर वाटेल त्या औषधांचा भडिमार करूं नका. फारतर मी आयुर्वेदीय औषध घेईन. " त्यांचे इच्छेप्रमाणें त्यांना आयुर्वेदीय चिकित्सा दिली गेली.

केलेली आयुर्वेदीय औषधयोजना

सुवर्णसूतशेखर ॥ गुंज, मृगशृंगभस्म २ गुंजा, सितोपलादि चूर्ण ४ गुंजा यांच्या मिश्रणाच्या २ पुड्या अडुळसा सरबतांतून. अर्जुनारिष्ट १ तोळा + पुनर्नवासव १ तोळा, समभाग पाण्यांतून २ वेळां. हृद्रोगावरील चिंतामणीरस, श्रीफलकुसुमगुटिका मधून मधून देत असूं.

वसंताच्या प्रारंभीं कफप्रकोप

आहार —लाजामण्ड, उत्तम द्राक्षांचा रस, साळींचें पाणी व दूध एवढाच होता. प्रकृतीची तपासणी अनेक नामांकित डॉक्टरांनीं केली; तथापि औषधयोजना प्रामुख्यानें वरील दिली गेली. त्यांना बरें वाटूं लागलें होतें, व ते आपले उद्योग हळूहळू पाहूं लागले होते; पण शेवटीं ता. १ मार्च रोजी त्यांचे शिष्यश्रेष्ठ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी रंगूनहून आल्यावर त्यांना प्रेमानें निरोप देऊन मध्यरात्रीं २॥ वाजतां मोठ्यानें ॐ काराचा उच्चार करून ते ब्रह्मस्वरूपांत विलीन झाले.

शुद्ध आयुर्वेदीय विचारसरणी व आचार

त्यांच्या दुखण्यामध्यें एका डॉक्टरांनीं प्ल्युरसीची शंका व्यक्त केल्यामुळें त्यांच्या छातीचा एक्सरे घेतला गेला; त्यांत प्ल्युरिसी नाहीं असें दिसून आलें. ही हकीगत मला सांगतांना स्वामीजी म्हणाले:- " रोगनिदान निश्चित होण्यासाठीं पाश्चात्यांनीं संशोधिलेल्या साधनांचा उपयोग आपणांस करण्यास मुळींच हरकत नाहीं, पण त्यामुळें आपल्या माधवनिदानाकडे दुर्लक्ष होतां कामा नये.

सटीक पंचनिदानाचें महत्त्व

विशेषतः पंचनिदान लक्षणांचें पहिलें प्रकरण टीकेसह नीट अभ्यासिलें पाहिजे. चिकित्सेच्या दृष्टीनें चरकसंहितेंतील चिकित्सातत्त्वें अमलांत आणावयास पाहिजेत. "

त्यांच्या या बोलण्यावरून इतर शास्त्राप्रमाणें आयुर्वेदाचाहि अभ्यास त्यांनीं केला होता असें दिसून आलें.

— — — —

" केवळ भारतातच नव्हे तर युरोप अमेरिकेतहि ज्यांच्या कौशल्याबद्दल औत्सुक्य निर्माण झालें आहे, अशा सुप्रसिद्ध दंतवैद्य पां. वि. जायदे यांचीं दोन संग्राह्य पुस्तकें:-
१) दंतरोग विज्ञान आणि चिकित्सा ३ रु.
२) वैद्यसन्मित्र (हिंदी) भाग १ ला २ रु.
मिळण्याचीं ठिकाणें:-
१) वैद्यक ग्रंथ भांडार- नाशिक
२) पां. वि. जायदे, नारायण चौक-हुबळी

आयुर्वेदाचें भवितव्य उज्वल आहे!

दि. १ मार्च १९५५ रोजीं सोलापूर येथील विद्वान् वैद्यराज नृसिंहाचार्य नागेवाडीकर(मान्य अध्यापक, शुद्ध आयुर्वेदपाठ्यक्रमसमिति-मुंबई,)यांचे नाशिक येथील शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचे विद्यार्थी व अध्यापक यांच्यापुढें व्याख्यान झालें. वाचकांसाठीं त्याचा सारांश देत आहे. —श्री. कृ. करमरकर)

"विद्वन् वैद्यबंधुंनो व माझ्या बाल- भावी-वैद्यांनो, मला आपल्या प्रधानाध्यापकांनीं माझे विचार आपल्यापुढें सांगण्याची संधि दिली याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. परन्तु मला बोलण्याची संवय नाहीं. लेखन व कृति याकडेच माझें लक्ष अधिक आहे; तथापि मी माझे विचार आपणापुढें मांडतो.

भाग्योदयाचा प्रभातकाल

मला असें वाटतें कीं, सध्यांचे दिवस आयुर्वेदाचे दृष्टीनें भाग्याचे आहेत. हें भाग्य टिकविणें कार्यकर्त्यांवर अवलंबून आहे. मला हा काळ कार्यकर्त्यांना अनुकूल सा वाटतो, याचें कारण असें कीं, धनवान् व सुशिक्षित वर्ग आयुर्वेदाकडे- वैद्यांकडे- झुकत आहे. १५० वर्षेपर्यंत पाश्चात्यांच्या संसर्गानें असलेला पगडा सुशिक्षित जनतेवरून आज दूर होत आहे. लोक डॉक्टर-कडे धांवत व वैद्यास नकार देत असत, असा माझ्या पूर्व आयुष्यांतील अनुभव आहे. परन्तु ज्या गोष्टींमुळें आज त्यांना आयुर्वेदाकडे यावेसें वाटलें त्या मी आपणांस सांगतो.

ही माझी दृष्टि आहे

आपणांस भावी कालांत आपल्या धंद्यांतील अडचणी कळाव्या व आपल्या हातून शुद्ध आयुर्वेदाच्या प्रचाराचें कार्य व्हावें ही माझी दृष्टि आहे. या परिस्थितीचें ज्ञान रोगी आपल्याकडे टिकण्याचे दृष्टीनें उपयुक्त आहे. एकदां पक्षाघाताच्या एका श्रीमंत रुग्णानें मला बोलाविलें. पण मी वैद्य आहे असें सांगितल्यावर त्यानें मला प्रकृति दाखविण्याचें नाकारलें. मी बाहेर आलों व यावर उपाय काय करावा असा विचार करीत होतो. तितक्यांत त्यांचें कुटुंब आलें. व तिला ही गोष्ट कळतांच ती मला आंत घेऊन गेली. तिनें पतीला सांगितलें कीं, "डॉक्टरी उपाय सर्वतोपरी पुष्कळ झाले आहेत, आतां वैद्यराज काय म्हणतात तें तरी ऐकून घ्या." त्यानंतर त्या रोग्यानें मला प्रकृति दाखविली.

रोग्यास विश्वासपूर्वक ठासून सांगा

मी प्रकृति तपासण्यापूर्वी त्याला सांगितलें कीं, माझ्या दोनच गोष्टी तुम्हीं लक्षांत घ्या. त्यावर ८ दिवस विचार करा. व मग वाटलें तर माझी चिकित्सा घ्या. (१) ॲलोपॅथी हा रोग बरा करूं शकणार नाहीं. या रोगावर त्यांचेकडे औषध नाहीं. (२) आमच्या शास्त्रांत यावर औषध आहे. ८ दिवसांनीं त्याच रुग्णानें मला पुनः बोलावून प्रकृति दाखविली व चिकित्सा घेतली. या उदाहरणाचा अर्थ इतकाच कीं, आपण आपल्या शास्त्रावर व औषधांवर विश्वास ठेवून ठांसून आत्मविश्वासपूर्ण पद्धतीनें जर रोग्यास सांगाल तरच त्याचे मनांत विश्वास उत्पन्न होईल. आयुर्वेदाचा सतत अभ्यास, चिंतन व तत्वांचा प्रत्यक्षांत बारकाईनें उपयोग

केल्यानेंच आपली व आयुर्वेदाची कीर्ति वाढेल व शास्त्राविषयीचे गैरसमज नाहींसे होतील.

तीव्र विकाराचींहि चिकित्सा

तीव्र विकारांत आयुर्वेदीय औषधें उपयोगी नाहींत असें समजणारा एक मोठा वर्ग उपलब्ध आहे. तीव्र ज्वरी रोग्याची नाडी सुटत चालली आहे, अशा वेळीं इंजेक्शन द्या असें ते म्हणतात. ५० वर्षांपूर्वींच जवळचे लोक मात्रा द्या, मात्रा द्या, असें म्हणत. म्हणजे तोंपर्यंत मात्रेनेंहि काम होत होतें. नाडी सुटलेला रोगी इंजेक्शन्सनीं कांहीं काळ जरी सुधारलासा वाटला तरी तो कायमचा सुधारत नाहींच. व असाध्य रोग्यांत इंजेक्शन्सहि अनुपयुक्त होतात. ही गोष्ट सुशिक्षित जनतेच्या लक्षांत आणून देऊन त्यांच्यावरील प्रवृत्तीला आळा घातला पाहिजे. मात्रांचेहि अनुभव फार चांगले येतात. नाडी चालल्यावर मात्रा देण्यापेक्षां अगोदरपासूनच मात्रा दिल्यास अधिकच कार्य उपयुक्त होतें. पित्तकालांत विरेचन देण्यानें आशुकारी विकारांचाहि जोर कमी होतो. ती चिकित्सा आपण केली पाहिजे.

आयुर्वेदांतील प्रचार्य गोष्टी

समाजाला योग्य आहार व योग्य विहार आपण शिकविला पाहिजे. त्यामुळें जनतेचा आयुर्वेदाकडे ओढा निर्माण होईल. हल्लीं आहाराचें शिक्षण प्रत्येकाला पाश्चात्य दृष्टिकोनांतून मिळतें. इतके प्रोटीन्स, इतके व्हिटॅमिन्स्, ही परिभाषा सामान्य माणसास कळत असली तरी त्याचें मोजमाप तो करूं शकत नाहीं. आयुर्वेदोक्त षड्रस आहार फार कमी लोक करतात. त्याचा अंमल केला तर व्हिटॅमिन्सची जरूरी पडणार नाहीं. तसेच भोजनाचा योग्य काल कोणता याचीहि माहिती जनतेला नाहीं; त्यांचा प्रचार आपण केला पाहिजे.

दाता मनुष्य निरोगी होतो

योग्य विहार व मानसिक आत्मिक उन्नतीचा आरोग्याशीं असलेला संबंध आपण जनतेला समजावू दिला पाहिजे. दाता क्षमावान् निरोगी होतो. या गोष्टी समाजांत प्रसृत करून आयुर्वेदावरील वाढविण्याचें कर्तव्य आजच्या विद्यार्थ्यांपुढें आहे.

आपल्या प्रत्येक आचारांत आयुर्वेद

आपल्या प्रत्येक वागणुकींत आयुर्वेदाचें प्रति पडलें पाहिजे. वैद्य म्हणवून घेण्यांत आपणांस भू वाटलें पाहिजे. डॉ. शब्दच नको. आपण वापर औषधें विलायती नकोच. 'तदेव युक्तं भैषज्यं यद् रोग्याय कल्पते' असें असलें तरी जोंपर्यंत तुमच्या द्रव्यांचे गुणकर्म तुम्हांस बोलतां येत नाहींत, तोंप इतर द्रव्यांचे गुणकर्म कसे कळतील? या सर्व गोष्टींची जबाबदारी आमच्यावर आहे, इतरांवर नाहीं हे लक्षांत ठेवलें पाहिजे.

शाश्वत सत्यास नक्कीच मान

आजची जनता व सरकारचा पाठिंबा मिळा नाहीं, तरीहि सतत अध्ययन व अध्यापन यां आयुर्वेद जिवन्त ठेवा. भारतीय नाहीं तर बाहेरचे शास्त्रीय लोक खास आपल्याकडे लक्ष देतील इत गौरव आयुर्वेदांत आहे. शास्त्रीय सत्यें नित्य मांडा कार्यकारणमीमांसेचा फार मोठा विचार आयुर्वेदा केलेला आहे. तो समजला तरच आयुर्वेद समजेल.

आतांपर्यंत सांगितलेल्या सर्व गोष्टी लक्षांत घेऊ आपण आयुर्वेदाचें भवितव्य उज्वल कराल अ आशा आहे.”

सेवा संघाचीं सर्व औषधें, तसेंच खालींची सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर, गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर, अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाबळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—

देशी सर्वौषधी संग्रहालय
पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

भुसावळच्या म. प्रां. वैद्य संमेलनाबाबत

[लेखकः— आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे पुणें २]

[हा लेख आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे हे म. प्रां. वैद्य संमेलनाच्या अध्यक्षपदीं निवडून येण्यापूर्वी १५ च दिवस लिहिला गेला आहे. —संपादक]

येत्या भुसावळच्या दहाव्या म. प्रां. वैद्य संमेलनासंबंधीं समजलेल्या प्रसिद्धाप्रसिद्ध सूचनांबाबत पुढीलप्रमाणें कांहीं विचार सुचतात.

संमेलनांतून केवळ पोषाखी समारंभ होण्यापेक्षां शास्त्रीय चर्चा व्हावी असें अलिकडे तीव्र मत होऊ लागलें आहे. पण त्यांतहि संदिग्धऔषधीनिर्णयापेक्षां व्यवहारांत हरघडी लागणाऱ्या द्रव्यांच्या निश्चितीकडे अधिक लक्ष्य देणें इष्ट ठरेल. खरोखर गुळवेल, कोरफड, अडुळसा, किराईत, कुटकी, नागरमोथे, पित्तपापडा यासारख्या नित्योपयोगी वनस्पतीकडेहि अजून आपण निश्चित गुणांचे दृष्टीनें पाहिलें नाहीं. २००-२५० तरी अशाच सामान्य वनस्पती आपण नित्य वापरतो. पण त्यांचीच सर्वांनीं निश्चिती केली आहे कां? सर्वांचे रस, वीर्य, विपाक, प्रभाव व कार्यकारी गुण निश्चित करून त्या अनुरोधानें आपण निःशंकपणें या वनस्पती वापरतों असें म्हणवत नाहीं.

कफावर कोरफड वा अडुळसा, ज्वरावर सरास गुळवेल, पित्तज्वरावर नागरमोथे वा पित्तपापडा, असा आपण वापर करीत असलों व वेळीं त्यांचा गुणहि येतोसा वाटला, तरी प्रतिद्रव्य स्वतंत्र गुण व कार्य असल्याची सृष्टीची योजना आहे. अर्थात् त्या त्या दोषांच्या वा विकारांच्या त्या त्या अवस्थांतच खरोखर या द्रव्यांच्या गुणांचा उपयोग होईल. मिश्र दोषांत व संकरज व्याधींत आणि अनेक उपद्रवयुक्त व्याधींत मग सदृशगुणी द्रव्यांचा संयोग करणें इष्ट होईल.

सचित्र वर्णन-ग्रंथाची आवश्यकता

पारंपारिक वैद्य बहुधा कोरफड तेथें कोरफडच, व अडुळसा तेथें अडुळसाच वापरतो. पण कसा तो कदाचित् त्याला सांगतां येत नसेल. असे सांप्रदायिक व हेतुवादाचा आश्रय करून विचार करणारे यांनीं मिळून असा विचार करणें आतां तरी अगत्याचें वाटतें. या नमुन्याच्या सचित्र ग्रंथाचीच आतां गरज आहे. आजवरचे ग्रंथ बरेचसे अनेक गुणांचा संग्रह या स्वरूपाच्या वनस्पतीवर्णनाचे आहेत. निघंटांतूनहि द्रव्यांचे पर्याय व अनेक गुण वर्णिलेले आहेत, त्यांतले क्वचित् सगळेहि प्रत्ययाला येणारे असतात असें मानलें तरी त्यांत तारतम्य असावयास हवें तें नाहीं. मग स्थानभेदानें क्षोभक, शामक असें एकाच द्रव्याचें गुणवर्णन त्यांत नाहीं यांत आश्चर्य नाहीं.

संमेलनानें हें काम हातीं घ्यावें

मूळांत प्रत्येक द्रव्याचे क्रमानें रस, वीर्य, विपाक प्रभाव पद्धतशीर सांगितलेलेच नाहींत. संशोधकबुद्धीनें ते जुळवून घ्यावे लागतात. प्रत्येक द्रव्याचें असें स्पष्ट वर्णन आतां तरी करावयास हवेंच, व हें काम म. प्रां. वै. सं. नें हातीं घ्यावयास हवें. दरसाल १०।५ द्रव्यांची निश्चिती करीत गेल्यास १५।२० वर्षांत तरी हें काम होईल. जरूर तर संमेलनानें नियतकालिकांतून त्या त्या वर्षी एवढ्याच वनस्पतींवर चर्चा चालूं द्यावी व मग संमेलनांतून निर्णय घ्यावेत. एकदां संमेलनाची निशाणी त्यावर पडली म्हणजे त्यांचा अधिकृत वापर सुरूं होईल. निर्णय होतील तसतसे विभागशः ग्रंथरूपानें छापूनहि काढणें मग सुकर होईल.

नवद्रव्यांचा उघड वापर

हें झालें चालूं द्रव्यां बाबत. पण नाहीं म्हटलें तरी लपूनछपून व उघडाउघडा कित्येक वैद्य नवद्रव्यें वापरूं लागले आहेत, त्यांचा विचार आतां डोळ्या-

आड करून चालणार नाहीं. शुद्ध आयुर्वेदाचे भूमिकेवरून पण हा विचार अगत्याचा आहे. आयुर्वेदानें जुन्या काळींहि कांहीं नवद्रव्यांचा संग्रह केला आहे व त्याच तऱ्हेवर म्हणजे दोषविवेक दृष्टीनें आपणहि अशा सारख्यांचा संग्रह करूं शकतों. नको म्हटलें तरी चहा, कॉफी सारखीं आहार्यद्रव्यें आता देवा-धर्मांपर्यंत पोंचली आहेत. तसेच सोडा-लेमन साबुदाणा, इ० व पाव-बिस्किटे इ० नवाहार्यकृती पथ्या अन्न म्हणून वैद्या आधींच लोक वापरूं लागले आहेत.

आधुनिक जन्तुनाशकांचा विचार

अफू, चोपचिनी हीं नवद्रव्यें ज्या तत्वावर संग्रहित झाली त्या दोषविवेकदृष्टीनें आपण कांहीं नवौषधेंहि संग्रहित करूं शकू अर्थात् जंतुनाशक हा आयुर्वेदीय दृष्टिकोन नसल्यानें नवनवीन जंतुनाशकें विचारांत घेतां येणार नाहींत. जन्तुनाशक द्रव्यें जंतूंत कांहीं दिवसांनीं प्रतिकारशक्ती येऊन उपयोगी पडेनाशी होतात. शिवाय ती प्रतिक्रियात्मक उपद्रवहि उत्पन्न करतात. म्हणून हीं वगळून व स्थिर झालेल्यांचा संग्रह रसादिविनिश्चय करून करण्याचा विचार संमेलनानें करावा असें मला वाटतें. ही कल्पना पटल्यास मी याबाबत करीत असलेला अल्प प्रयत्न पुढें ठेवीन.

अध्यापक चर्चा परिषद, नासिक

नाशिकला अध्यापकांनीं केलेली चर्चा चांगलीच उद्‌बोधक झाली हें तिच्या वृत्तांतावरून स्पष्ट दिसून आलें आहे: अनुभवी अध्यापकांतील ही चर्चा नवाध्यापकांना मार्गदर्शक होणारी आहे. भुसावळला "पुढें चालूं" आवृत्ती सरळच स्वागतार्ह, पण नाशिकच्या या चर्चेंत कांहीं ढळढळीत मतभेद आढळून आले. नामवन्त विद्वानांतील हे विरोध पाहिल्यावर नवाध्यापक गोंधळून गेल्यास काय आश्चर्य ? पण त्या विरोधाचें मागें विशिष्ट कारण असल्यास अनुकरण करणारे नवाध्यापक तें तें मत सकारण अवलंबतील पण तसें उघड व्हावयास हवें. मला वाटतें त्रिदोष या आयुर्वेदाच्या पायाभूत विषयाच्या निरानिराळ्या कल्पनामुळें हे मतभेद संभवतात. म्हणून केवळ त्रिदो षांवरच आणखी एकदां चर्चा झाल्यास हे मतभे कमी होतील, निदान ते संकुचित तरी होती तदवलंबी अध्यापक त्यांचा सहेतुक वापर करतील.

त्रिदोषनिर्णय व्हावा

आजवर पनवेल, बनारस, बेझवाडा, पाटणा ठिकाणीं मोठमोठ्या पंडितांच्या केवळ त्रिदोषा चर्चा परिषदा झाल्या; पुनः कशाला हा उद्योग असें वाटण्याचा संभव आहे. या (पाटण्याशिवा इतर) सर्व परिषदांना उपस्थित राहून अजून अ अनेक परिषदा झाल्या तरी त्यांची गरज आहेच अ मला वाटतें. कारण पुढच्या पुढच्या परिषदांतून निःसंशय प्रगति होत गेलेली आहे. आखिल भारती स्वरूपाच्या परिषदा होवोत वा न होवोत, आ आपल्यापुरता या संमेलनाद्वारें त्रिदोषांचा विचा करून ठेवावयास हवा.

स्थूल पण सुटसुटीत योजना

भुसावळ संमेलनानें अगदीं स्थूलपणें तरी प्रयत्न करण्यासारखा आहे. याबद्दलची सुटसु योजना सुचते तीच मी मांडीत आहे. दोनच मोठ पंडितांत ही चर्चा व्हावी. फार तर दोनदोन तीनती सहायक त्यांना असावेत. निर्णय देण्यासाठीं एक वै एक नैयायिक व वैज्ञानिक अशा तिघांचे निर्ण मण्डळ असावें. नैयायिक-वैज्ञानिक आयुर्वेदा परिचित असावेत. या चर्चेला तीन ते चार त फक्त द्यावेत. अर्थात् यांत तपशिलवार चर्चा हो नाहीं. पण एकदां तात्विक बैठक चर्चून झाली म्ह तपशीलाची चर्चा पुढें करतां येईल.

डेग्वेकर–शिवशर्मा चर्चा

नाशिक अध्यापक परिषदेचे उद्घाटन वि वैद्य पं. डेग्वेकरजी यांनीं त्रिदोषाचा तळसून वि केला आहे. तसाच पं. शिवशर्माजी यांनींहि आहे पं. डेग्वेकरजीहून पं. शिवशर्माजी आधु विज्ञानावर अधिक भर देतात त्याचीहि जोड मि दोघेहि आधुनिक पदवीधर व आयुर्वेदांत कु

असून उभयतांत चर्चेअन्तीं फारसा मतभेद राहणार नाहीं अशी आशा वाटण्यासारखे दोघांचे विचार वाटतात आणि म्हणून याच दोहोंची मुख्य चर्चा व्हावी व मग नाशिकलाच भाग घेतलेल्या पंडितांनीं उभयतांना जरूर तर सहाय्य करावें. दोघेहि चर्चेला कबूल होतील असें वाटतें. पं. शिवशर्माजी तयार असल्याचें मला समजलेंहि आहे. महाराष्ट्रापुरता त्रिदोषाचा प्रश्न या संमेलनानें सुटण्याच्या मार्गाला लावल्याचें श्रेय अवश्य घ्यावें असें मला वाटतें. मग मागील परिषदेची पुढें चालू चर्चा हवी तर पुढें ढकलावी.

प्रांताच्या आरोग्याबाबत जागरूकता

प्रांतीय वैद्य मंडळ हें आतां प्रांताच्या आरोग्याबाबत सतत जागरूक राहणारें मार्गदर्शक मंडळ व्हावें असें त्याच्या धुरीणांना आतां वाटूं लागलें आहे. त्या दृष्टीनें मंडळानें एक पोटमंडळ निवडून ह्या द्वारें नित्य नैमितिक व्रतवैकल्यें, उत्सव--समारोह, बदलते ऋतुमान, साथीचे रोग व इतर ' मरक ' आपत्ती [अस्मानी सुल्तानी] यांत आहार, विहार व उपचार यांच्या स्पष्ट सूचना वेळोवेळीं देण्याचें काम मंडळानें करावयास हवें.

मंडळानें मार्गदर्शन करावें

वैद्यांनाहि सतत वाहणाऱ्या नवनवीन प्रभावी पाश्चात्य औषधांच्या ओढाळ लोंढ्यापुढें आपण कसा टिकाव धरावयाचा व त्यांच्या महागड्या व उपद्रवकारक परिणामापासून कसें वाचावयाचे यांचेंहि याच मंडळानें मार्गदर्शन करावयास हवें. मंडळानें जिल्हा मंडळाला, त्यानें तालुक्याला, व तेथून गांवोगांव तें लोण वेळोवेळीं सभा भरवून संघटितपणें पोचविण्याचें काम व्हावयास हवें.

आयुर्वेदीय कवितांच्या भेंड्या

येत्या संमेलनांत आयुर्वेदीय कवितांच्या भेंड्या लावण्याचा एक कार्यक्रम घाटत आहे. संमेलनाला ही करमणूक होऊन पाठांतराला त्यानें चांगलेंच उत्तेजन मिळणार आहे. या दृष्टीनें हा कार्यक्रम - उपक्रम स्वागतार्ह आहे. मात्र त्याबाबत नीट नियम तयार होऊन हा कार्यक्रम आंखला पाहिजे. मराठीप्रमाणें आयुर्वेदीय श्लोकांच्या भेंड्या लावणें सुलभ नाहीं. एकाऐवजीं दोन अडीच वा तीन श्लोक एका भेंडींत म्हणावे लागतील. क्वचित् अर्ध्या श्लोकांतच काम भागेल. विषयांश पुरा होण्याच्या दृष्टीनें असेंच करावें लागेल. अंत्याक्षरांत म्, न्, स्मै, षु, ण, व विसर्ग आल्यास त्यांचें काय करावयाचें याचाहि विचार व्हावयास हवा. कारण यांनीं आरंभीत श्लोक सांपडणें कठीण आहे. तसेच निव्वळ पद्येंच घ्यावयाचीं कां गद्यभागहि घ्यावयाचा व मग संहितेप्रमाणें टीकाभागहि त्यांत समाविष्ट करावा यांचाहि विचार करावा लागेल. असा विचार होऊन तज्ज्ञ निरीक्षक मंडळाचे नियंत्रणाखालीं झाल्यास हा उपक्रम नावीन्यपूर्ण तितकाच उद्बोधक हि होईल.

———

वाचकांचा पत्रव्यवहार—

उपयुक्त औषधांची पुस्तिका

१ फेब्रुवारीच्या अंकांत आलेलें ' १५ उपयुक्त कोरडी औषधें ' हें सदर प्रकरण फार आवडलें.

आपणास विनंति करावीशी वाटते कीं अशाच प्रकारची आयुर्वेद सेवा संघाच्या उपयुक्त औषधांची १ पुस्तिका, जींत घटक, मात्रा, गुणधर्म, अनुपान वगैरेंचें ढोबळ वर्णन आहे, अशी छापलेली प्रत्येक डॉक्टरच्या हातांत पडावी.

आज डॉक्टर वर्ग पाश्चात्यांच्या अशाच पत्रिका वरून औषधें वापरत नाहीं कां ?

— डॉ. दा. म. मोघेकर

———

पाश्चात्य रामबाण औषधें
लेखकः-डॉ. डी. ए. घाटगे, कागल
किंमत २॥ रु.
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

नारूवरील अनुभविक व सोपें औषध

तुरटी--पिठीसाखर मिश्रण

अायुर्वेदरत्न सूचक सुं. भा. वैद्य, मुंबई२

आपल्या आयुर्वेद पत्रिकेच्या १ मार्च १९५५ च्या अंकांत नारूवरील अेक औषध दिलें आहे. मी अेक अनुभवी औषध देत आहे त्यांत पथ्य पाळावयास नको. अेक पैशाची फटकी किंवा तुरटी आणून तिची पूड करावी. तितकीच तींत पिठीसाखर घालून मिश्र करावी. ही पूड तीन बोटांच्या चिमटींत राहील इतकी घेऊन तिची एक पुडी तयार करावी. अशा सात पुड्या तयार कराव्या.

सकाळीं उठल्यावर एक पुडी

रात्रीं तांब्याच्या तांब्यांत थंड पाणी भरून ठेवावें. सकाळीं उठल्यावर एक पुडी सोडून जीभेवर ठेवावी व वर ह्या तांब्यांतून पाणी प्यावें. पूड पोटांत जाईल इतके पाणी प्यावें. थोडें जास्त प्याल्यास हरकत नाहीं. नंतर आपले नेहमींचे व्यवहार करावे. असें सात दिवस करावें. नारू नाहींसा होतो. नारू नाहींसा झाला नाहीं तर आणखी सात दिवस औषध घ्यावें.

सूक्ष्म पद्धतीचा दुसरा प्रयोग

हेंच औषध सूक्ष्म पद्धतीनें घेणें असेल तर २४ औंस थंड पाण्यांत अेका तीन बोटांच्या चिमटींत राहील अितकी किंवा अेक वालभर तुरटीची पूड घालावी. ती चांगली विरघळल्यावर बाटली हलवून पिण्यास सुरवात करावी. हें औषध थोडेंथोडें असें वारंवार सवडीप्रमाणें घ्यावें. अेक बाटली तीन दिवस पुरवावी. अशा तीन बाटल्या घ्याव्या. नारू नाहींसा होअील.

पवित्र नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहा:–नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

(ग्लासगो येथें १५ वर्षें प्रयोग करून असें शोधू काढलें आहे कीं कोणत्याहि औषधाची शक्ति तें वि करण्यावर नसून तें ज्ञनवितंतांना हलविण्यावर आहे.)

श्री. बाक्रे यांचा खुलासा

‘ असें मी सांगितलेलें नाहीं ’

आयुर्वेदपत्रिकेच्या १६ मार्चच्या अंकांत बोर्डाच्या सभेची माहिती आलेली आहे. त्यांत ‘श्री. बाक्रे अध्यक्षस्थानीं बसल्यावर श्री. मुनी यांनीं पॉ ऑफ आर्डर उपस्थित केला व अध्यक्षांना दुस अध्यक्ष नेमतां येतो कीं कसें याबद्दल शंका उपस्थि केली. त्यावर नवीन अध्यक्षांनीं असा अध्यक्ष नेमत येतो असें सांगितलें’ असें आपण छापलें आहे.

वरीलप्रमाणें मी सांगितलेलें नाहीं. ‘ अध्य च्या सूचनेप्रमाणें मी अध्यक्षस्थानी बसलो. त्य दुसरा अध्यक्ष येतो कीं नाहीं याचें उत्तर देऊन गेले, असें उत्तर मी दिलें आहे.

आपणास खरी माहिती कळण्याकरितां हें लि कळविलें आहे. — वा. म. बाक्रे, बेळ

नागपुरांत औषधी-भवनाचीं

३ विक्री–केन्द्रें

कळविण्यांत आनन्द वाटतो कीं नाग येथें नासिकच्या आयुर्वेद औषधी भवनाचीं शास्त्रशुद्ध औषधें मिळण्यासाठीं ३ केंद्रें सु करण्यांत आलीं आहेत.

महाल केन्द्र— श्री. माधव गंगाधर पा
चितारओळ केंद्र-- वैद्य गोविंद गंगाधर पा
सितावर्डी केंद्र-- वैद्य त्र्यंबक विष्णु गाडगी

आयुर्वेद सेवासंघ औषधीभवन. नाशिक

निवडक रुग्ण चिकित्सा—

(चिकित्सा विभाग, आयुर्वेद सेवा संघ, नासिक)

संतर्पणजन्य त्रिदोषात्मक मधुमेह

रुग्ण क्र. १४७६, पुरुष, वय ३५, दि. ७।१२।५४

प्रमुख तक्रारी

१) सारखी तहान लागते. तोंड कोरडें पडतें. १ घागरभर पाणी पिऊनहि थांबवत नाहीं. २) बहुमूत्रता. १।१ तासानें लघ्वी लागते. ३) क्षीणता फार वाटते. ६ महिन्यांत २० पौंड वजन कमी झालें.

रुग्णपरीक्षा

दर्शन– ताम्र नखनयनादि, केस पांढरे झालेले, गाल बसके, डोळे लालसर, दंत विरळ, हातापायाला भेगा, स्थूलपर्वादयः, उंची ५ फूट ६ इंच, वजन १४० पौंड, मुख पान खाऊन रंगलेलें, पण साका जिभेवर! बहुलोम शरीर, मध्य पुष्ट, मूत्र–इक्षुरसोपम, आविल व प्रभूत.

स्पर्शन

केस-गळणारे, रूक्ष, यकृत्स्पर्शासह, ९६ अंश F. उष्णतामान.

प्रश्न

जून १९५४ पासून दोन्हीं लक्षणें एकदमच सुरूं झालीं. केसहि या ६ महिन्यांतच पांढरे झाले, व गळूं लागले. वाढहि आहे. ऊन सहन होत नाहीं. गोडाची आवड असे. पण हल्लीं तिखट आवडूं लागलें. विडा१०।१२ वेळां. तंबाखू, सिगारेट भरपूर; चहा भरपूर वेळां. जेवणाचा काल अनियमित व झोंपहि अनियमित. असा एकंदर आहाराविहार! अम्लपित्त केव्हांतरी असतें. सकाळीं खाऊन कामावर जातों. लसूण भरपूर प्रमाणांत खातो. भूक भरपूर लागते. उन्हाळ्यांत घाम फार येत असे. परसाकडे अवरोध व लघ्वी भरपूर. सकाळीं उठल्यावर तोंडाची चव कडु व चिकट. ५।६ दिवस लिंबोटी (हिंकेमाली + हळद + सुंठ + मीठ घालून) घेतल्यानें तहान थोडी कमी.

वरील दर्शन-स्पर्शन प्रश्नावरून रुग्ण वातपित्त प्रकृति, क्षीणबल, मधुर व कटुसात्म्य (संचयी), तीक्ष्णाग्नि (पित्तदुष्टअग्नि), रक्तसार, मज्जाशुक्र मध्यम, मेद मध्यम, अस्थि असार, असा असल्याचें निश्चित केलें.

रोगपरीक्षा, निदान

गोड खाण्याची पूर्वीची आवड, सकाळीं खाऊन कामावर जाणें, चहा भरपूर वेळां पिणें ह्या गोष्टी कफवर्धक व मूत्रवर्धक होत्या; पान, तंबाखू, सिगोरट्स् व लसुणाचा उन्हाळ्यांतहि अत्युपयोग यामुळें पित्तवृद्धि. विधिवर्जित शयन, यामुळें मेदोमूत्रकफावहं अन्नपानक्रियाजातं यत्प्रायस्तत्प्रवर्तकम् नवधान्यसुरानूपमांसेक्षुगुडगोरसम्.॥ एकस्थानासनरतिः शयनं विधिवर्जितम् ॥३॥ वाग्भट– प्रमेहनिदान.

हीं प्रमेहाचीं कारणें घडलेलीं आहेत. पूर्वरूप– माधुर्यमास्ये, स्वेदः, शीतप्रियत्वं, करपाद–दाहः, गलतालुशोषः इ. लक्षणें सुरूं झालेलीं होतींच! रूपाणि– सामान्यं लक्षणं तेषां प्रभूताविलमूत्रता। या वचनाप्रमाणें प्रमेहाचीं सामान्य लक्षणें होतीं. इक्षुरसोपम मूत्र असल्यानें विशेष रूप इक्षुमेहाचें होतें.

उपशय

लिंबोटीच्या उपशयावरून वातप्रधान अवस्था कफपित्तज मेहामध्यें निर्माण झालेली दिसली. संप्राप्ति–वरील कफपित्तवर्धक आहारानें वृद्ध झालेल्या कफपित्तांना वातवर्धक विहारानें वृद्ध झालेला वायु बस्तीच्या ठिकाणीं नेता झाला. यामुळेंच बहुमूत्रता, व इक्षुमेहत्व निर्माण झालें. शुक्रधातु मज्जाधातु अल्पबल. त्यामुळें अपान अबल;त्यामुळें संप्राप्ति अपान-प्रदेशांत घडली. लसुणाच्या आहारामुळें व सकाळीं खाण्यामुळें समानहि विकृत होऊन मूत्रविवेचनाच्या कार्यात दुष्टि झाली. यकृत् प्रदेशांत स्पर्शासहत्व निर्माण झालें. अन्नाच्या द्रव मलाचें मलायन विकृत

झाल्यामुळें शरीरस्थ आप्य द्रव्येंहि त्या मलायनावाटे बाहेर जाऊं लागल्यामुळें 'तृषा' निर्मिति झाली. व ' स्नेहसारोऽयं पुरुषः ' असल्यानें आप्य धातू शरीरांतून बाहेर जाऊं लागतांच वजन कमी कमी होऊं लागलें. रक्तधातूवर परिणाम करणारा लसूण, चहा, तंबाखु हा आहार रक्तधातुघटित अशा यकृत्, बस्ति, गुद इ० अवयवांचें दौर्बल्य निर्माण करणार हें स्वाभाविकच आहे. (ततोऽस्यान्त्राणि जायन्ते गुदं बस्तिश्च देहिनः।) यामुळें बहुमूत्रताच निर्माण झाली व मलावरोध झाला. या कारणाबरोबरच मलवर्धक कारणें घडलीं असतीं तर अतिसार, व अधिक विदाही कारणें घडलीं असतीं तर रक्तपित्त निर्माण झालें असतें !

याप्रमाणें पंचनिदानाचा विचार करतां सदरहू रुग्ण ' इक्षुमेहाचाच ' असें निदान केलें.

अवस्थानिर्णय

दृष्ट्वा प्रमेहं मधुरं सपिच्छं !
मधूपमं स्यात् द्विविधो विचारः।
संतर्पणाद्वा कफसंभवः स्यात् ।
क्षीणेषु दोषेष्वनिलात्मको वा ।

याप्रमाणें अवस्था ठरवावयाचे वेळीं ही संतर्पणजन्य प्रमेहांतील वातवृद्ध अवस्था असें ठरविलें.

चिकित्सेची दिशा

निदानामुळेंच चिकित्सेची दिशा ठरली. मेदोधातु शैथिल्य दूर करून बल्य कफपित्तमूत्रसंशोषक अशी लंघन व बृंहण अशी उभयात्मक चिकित्सा ठरवावी लागली.—

चिकित्सा:—(लंघनचिकित्सा)

(१) रक्तयोगशर्करा शमनशोधन
(२) कुटकीकल्प— शोधन
(३) आरोग्यवर्धिनी— शोधन
(४) शेफालीकल्प— शमन
(५) नंदगुटी— शोधन
(६) इक्षुमेहारी— शमन
(७) असनादिजल— (असाणा + चन्दन+दारुहारिद्रा + हरिद्रा + आमलकी)
(८) प्रवाळभस्म—बृंहण व शमन
(९) प्लीहोदरारिचूर्ण— शोधन

बृंहणाचिकित्सा—

(११) वसन्तकुसुमाकर—मूत्रशोषक, बल्य, वृष्य,

शोधनचिकित्सा

फक्त विरेचन— शोधनच उपयोगांत आणलें. कुटकीकल्प, प्लीहोदरारिचूर्ण, नंदगुटी ही चिकित्सा कफपित्तदोष पुरीषाबरोबर बाहेर घालविण्यासाठीं वापरली.

हीं द्रव्यें तिक्तरसात्मक असून कफपित्तशोधक अशीं आहेत.

शमन शोधन चिकित्सा

१] रक्तयोगशर्करा २] आरोग्यवर्धिनी.

या योगांतील द्रव्यें दीपनपाचन करून कफपित्तदोषशामक व बृंहण करून वातशामक आहेत त्याचप्रमाणें पाचितदोषांचें शोधन करणारींहि आहेत.

रक्तयोगशर्करेंत कडू पडवळ, सारिवा, मुस्ता, पाठा हीं द्रव्यें शामक, तर कुटकी हें कफपित्तशोधक द्रव्य आहे. रक्तधातूवर कार्य करणारा हा योग असल्यानें यकृत् व बस्ति यावर कार्य करून तेथील कफपित्ताचें शोधन व शमन करतो. आरोग्यवर्धिनीतील कुटकी ताम्र इ० द्रव्यें शोधन करणारी तर लोह, अभ्रक इ० कफपित्तशामक आहेत.

शमनचिकित्सा--
शेफालीकल्प इक्षुमेहारि –
प्रवाळभस्म, व असनादि जल

पारिजातकांच्या पानांपासून तयार केलेला शेफालीकल्प मूत्रमलाचें संशोषण करून बहुमूत्रत्व कमी करणारा व वाताविरोधी आहे. असाणा + चंदन + दारुहारिद्रा + आमलकी + निशा [हळद] यांच्या भरडचूर्णाचें जल [शीतफांट] अनुपानाकरितां म्हणून वापरलें व जल म्हणून वापरलें. यामुळें तृषाशमन झालें. नवीन येणारें जल द्रव्य शरीरांतील जलद्रव्याचें पाचक संशोषण करणारें असें होतें. तिक्त व कषाय रसामुळें हें कार्य होतें.

बृंहणचिकित्सा

वसन्तकुसुमाकर- झपाट्यानें कमी होणारें वजन लक्षांत घेऊन, त्रिवंगभस्मयुक्त मूत्रशोषक व बल्य असा हा कल्प वातशमनाकरितां वापरला. त्यामुळें कफपित्तांना बस्तींकडे नेण्याचें वाताचें कार्य कमी होऊन मूत्राचा वर्ण इ. सुधारला.

चिकित्साकाल

दि. ७-१२-५४ ते ३०-१-५५ या १॥ महिन्याच्या अवधीत वरील चिकित्सा झाली. त्यानें प्रभूताविलमूत्रता कमी व मूत्रांतील माधुर्य कमी झालें. वरीलपैकीं कोणती ना कोणती तरी शोधनद्रव्यें पित्तकालीं म्हणजे दुपारीं व रात्रीं देण्यांत येत असत. अशनादिघन सबंध २४ तासांत केव्हांहि देण्यांत येत असे. व वसन्तकुसुमाकर १॥ गुंज पहाटे व संध्याकाळीं वातकाळीं देण्यांत येत असे.

निदानपरिवर्जनरूप चिकित्सा

अनेकवेळां चहा, अति पानें खाणें, अति गोड-खाणें, रात्रीं बेरात्रीं जागरण, सकाळीं खाणें इ. बंद करून रोग्यास रात्पाळीच्या कामापासून रजा घ्यावयाला लावली. चहा, दूध इ. बंद केलें व गव्हाचा फुलका बिनतुपाचा व मुगाचें वरण, कडू भाज्या, येवढाच आहार ठेवला. रात्रीं जागरण वर्ज्य करविलें. आयुर्वेद सेवासंघानें औषधीभवनांत तयार केलेले त्रिफळाभावित गहूं पोळीसाठीं देण्यांत आले व जांभळीच्या मधाचाहि उपयोग करण्यांत आला.

चिकित्सेचें वैशिष्टय

इतर वैद्यकाचे दृष्टीनेंहि मूत्रांत ४ प्रतिशत साखर [शुगर] असणाऱ्या या रुग्णास एकहि इंशुलिनचें इंजेक्शन न देतां १॥ महिन्याचें अल्पावधींत रोगमुक्त होता आलें. व अत्यंत बलक्षीणता निर्माण झालेला रोगी आपलीं कामें पूर्ववत् उत्साहानें करूं लागला. ३०।१।५५ नंतर २ महिने झाले तरी अद्यापही त्या रोगाचा पुनर्भव नाहीं. तो स्वास्थ्य पूर्ण आहे.

—आयुर्वेदाचार्य श्री. कृ. करमरकर

आयुर्वेदीय स्वास्थ्यसंरक्षणपद्धति

पिंपळनेर [प. खा.] येथील ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक वर्ग, व गांवांतील उत्साही सार्वजनिक कार्यकर्ते यांचे समोर 'जनतेचें आरोग्य व आयुर्वेद' या विषयावर 'सामोडे' ग्रामपंचायतीचे सदस्य व जनतेचे आवडते पुढारी श्री. लाडू पाटील यांचे अध्यक्षतेखालीं ता. २१-३-५५ रोजीं आयुर्वेदाचार्य श्री. कृ. करमरकर यांचें व्याख्यान झालें.

'आयुर्वेद सेवा संघ ही संस्था स्वास्थ्यसंरक्षणाबाबत पब्लिक हेल्थ डिपार्टमेंटच्यापेक्षां निराळ्या व वैशिष्टयपूर्ण अशा कार्यपद्धतीनें मार्गदर्शन व सेवा करण्यासाठीं प्रवृत्त झाली आहे. आयुर्वेदाच्या साहाय्यानें वैद्य हा जनतेच्या स्वास्थ्यविभागाचेंहि काम करूं शकतो; व त्या दृष्टीनें ग्रामपंचायती, नगरपालिका इ. प्रत्येक ठिकाणच्या कार्यकर्त्यांना वैद्यांच्या मार्गदर्शनाची जरुरी आहे, असें व्याख्यात्यांनीं आपल्या भाषणांत प्रतिपादन केलें.

खोट्या नांवानें खोटीं औषधें

डॉ. एच. स्मॉलपेज या नांवाच्या गृहस्थानीं 'कार्सिनोमायसीन' नांवाचें एक औषध तयार केलें असून त्यानें कॅन्सर बरा होतो अशी बातमी अनेक भारतीय वृत्तपत्रांतून कांहीं काळापूर्वी आली होती. हे गृहस्थ ऑस्ट्रेलियाच्या आंतरराष्ट्रीय कॅन्सर संशोधन संस्थेचे अध्यक्ष होत असेंहि त्यांत म्हटलेलें होतें.

ऑस्ट्रेलियन सरकारच्या आरोग्याधिकाऱ्यांकडे औषधाबाबत चौकशी केली असतां असें समजून आलें आहे कीं, हा दावा संपूर्णपणें निराधार असून, डॉ. स्मॉलपेज अध्यक्ष असलेली आन्तरराष्ट्रीय कॅन्सर संशोधन संस्था, ऑस्ट्रेलियांत अस्तित्वांतच नाहीं.

'कार्सिनोमायसीन' च्या आयातीसाठीं, औषधी कायद्याखालीं आयात परवाना देण्यांत येणार नाहीं व वैयक्तिक वापरासाठीं त्याची आयात करण्यासहि परवानगी मिळणार नाहीं, असें भारत सरकारनें जाहीर केलें आहे.

विद्या-श्रीनिवास विवाह

यथा वायुं समाश्रित्य वर्तन्ते सवजन्तवः।
तथा गृहस्थं आश्रित्य वर्तन्ते सर्व आश्रमाः।
— विवाहविधि

वैद्यबंधूस कळविण्यास आनन्द वाटतो कीं, महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचे अध्यक्ष आयुर्वेदप्रवर दत्तात्रयशास्त्री जळूकर व मंत्री वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित हे दुसऱ्या एका नात्यानें नुकतेच संबद्ध झाले आहेत.

चि. श्रीनिवास दत्तात्रेय जळूकर व चि. विद्या बिंदुमाधव पण्डित यांचा मंगल विवाह सोमवार दि. २१।३।५५ रोजीं नाशिक येथें श्रीरामवाडींत संपन्न झाला. त्याप्रसंगीं धर्म निर्णय मंडळानें [लोणावळा] प्रसिद्ध केलेल्या संपूर्ण विवाह प्रयोगाचें पालन करण्यांत आलें, आणि अनवश्यक व त्याज्य अशा सर्व रूढींना फाटा देण्यांत आला होता.

वधूवर अल्प परिचय

चि. श्रीनिवास जळूकर हे सातारा येथील आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असून मुंबई सरकारची आयुर्वेद युनानी वैद्यक समितीची [फॅकल्टीची] आयुर्वेदविशारद [डी. ए. एस्. एफ्.] परीक्षा १९५४ सालीं उत्तीर्ण झाले आहेत. आयुर्वेद सेवा संघानें जाहीर केलेली २ वर्षांची आयुर्वेद अभ्यासवृत्ति त्यांनीं स्वीकारली आहे.

चि. विद्या पंडित ही नाशिकच्या पुष्पावती रुंग्टा कन्या विद्यालयांतून एस्.एस्.सी. परीक्षा १९५४ सालीं उत्तीर्ण झाली आहे. गुणसंख्या शेकडा ६६ चे वर आहे. संस्थेकडून पहिल्या क्रमांकाला मिळणारीं ५० रुपयांचीं बक्षीसें तिला मिळालीं आहेत. सध्यां ती नाशिक येथील शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत आयुर्वेदशास्त्राचें अध्ययन करीत आहे

या वधूवरांकडून भावी काळांत शुद्ध आयुर्वेदाची सेवा होवो ही सर्वांची अपेक्षा आहे.

प्राध्यापक नामजोशी, मुंबई

प्राध्यापक श्री. अनन्त नारायण नाम
एम. एस्सी. (रसायनशास्त्र), एम. एस्सी. [
स्पतिशास्त्र] हे नुकतेच मुंबई विद्यापीठाच्या
केटवर म्हणजे सर्वोच्च कार्यकारी समितीवर नि
आले त्याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करतो.

संशोधनबोर्डाचे रसायनशास्त्री

प्रा. नामजोशी यांची १९४१
मुंबईच्या पोदार आयुर्वेदिक कॉलेजांत रसायन
व वनस्पतिशास्त्र या विषयांचे प्राध्यापक म्हणून ने
झाली. तें काम त्यांनीं ११ वर्षें केलें. या सर्व का
त्यांनीं आयुर्वेदाचा चांगला व्यासंग ठेवला व वै
क्तिक तऱ्हेचें संशोधनकार्य चालू ठेवलें;
पुढें आयुर्वेदिक संशोधन बोर्डानें त्यांना रसायनशा
व वनस्पतिसंशोधक म्हणून ठेवून घेतलें आहे.
ते पोदार कॉलेजांत जीवन-रसायनशास्त्र हा वि
शिकवितात.

पारदाचे अष्टसंस्कार

आतांपर्यंत त्यांनीं आयुर्वेदीय ग्रंथोक्त प
पारदाचे अष्टसंस्कार पुरे केले आहेत व त्या
संस्कारित पारदाचें रासायानिक संशोधन केलें
हा त्यांचा प्रबंध लवकरच प्रसिद्ध होणार
पारदावरील अशा तऱ्हेचें संशोधनकार्य या दे
प्रथमच होत आहे. याखेरीज आयुर्वेदिक क्षा
भेसळ शोधून काढतां यावी म्हणून सर्व क्षा
विश्लेषण त्यांनीं केलें आहे. आयुर्वेदिक खनिज द्र
संशोधन हाहि एक महत्त्वाचा विषय त्यांचे
असून वनस्पतिविनिश्चयाचें व आयुर्वेदिक द्र
तील भेसळ शोधून काढण्याचें स्वतंत्र तंत्र उपयो
आणून ते त्याचें संशोधनकार्य चालवीत आहेत.

इतकी स्वच्छता !

औषधीभवनांतील कार्यपद्धति व औषधीकरण
पाहून परम संतोष झाला. कारण इतकी स्व
फारच थोड्या ठिकाणीं पहावयास मिळते.
—वैद्य शं. भा. जोशी [पोय

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद—

आयुर्वेदाध्ययनासाठीं मीमांसाशास्त्राच्या — पूर्वाध्ययनाची आवश्यकता आहे

(आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेंत रविवार ता. १७आक्टोबर रोजीं वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित यांचें वरील विषयावर व्याख्यान झालें; त्याचा सारांश येथें दिला आहे. —संपादक)

शुद्ध आयुर्वेदाच्या पाठ्यक्रमांत तर्कसंग्रह–सांख्यकारिका आदि ग्रंथ ठेवलेले आहेत ते केवळ मूळ शिकवावेत कीं, सटीक शिकवावेत ? कां त्यापैकीं कांहीं आवश्यक तेवढाच भाग शिकवावा ? याबाबत आयुर्वेद अध्यापक परिषदेंत चर्चा चालू होती. कोणी म्हणत होते कीं प्रारंभीं हे विषय शिकवावे, तर कांहींचें मत ३॥ वर्षांपैकीं शेवटच्या वर्ष-सहामाहींत हे विषय घ्यावेत. कारण ते अध्ययन–अध्यापनाला कठीण आहेत, व गुरुपरंपरा शिक्षणाच्या दृष्टीनें सर्व गुरुंनीं पूर्वी त्यांचें अध्ययन केलेले असण्याची शक्यता कमी आहे. याबाबत बरीच चर्चा झाली. हे विषय समजण्यास जड आहेत, सबब यांचें अध्ययन यापेक्षां मोठा जो ५ वर्षांचा अभ्यासक्रम होईल, त्यांत ठेवावे असे म्हणणारेहि कांहीं अध्यापक वैद्य होते.

दर्शनें प्रारंभींच शिकविलीं पाहिजेत

अहमदनगर आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राध्यापक वैद्य वि. दा. एकतारे यांनीं आयुर्वेदाच्या अध्ययनासाठीं हीं दर्शनें प्रारंभींच शिकविलीं पाहिजेत असें जोरदार समर्थन केलें. ते म्हणालेः— आयुर्वेद-शास्त्राच्या अध्यायनासाठीं न्यायमीमांसाशास्त्राचें पूर्व–अध्ययन अत्यंत आवश्यक असें आहे. १९२३-१९२४ सालीं विद्यार्थी असतांना या शास्त्रांचें अध्ययन केलें त्यामुळेंच आम्ही या आयुर्वेदशास्त्राचा विचार कसा करावा हें समजू शकलो. तें अध्ययन आम्ही केलें नसतें तर आम्हाला या शास्त्रामध्यें गति करण्यासाठीं आवश्यक असलेली दृष्टि लाभली नसती.

तीन दर्शनांचा अभ्यास आवश्यक आहे

वैद्यराज एकतारे यांचें भाषण झाल्यावर वैद्य बिंदुमाधवशास्त्री बोलावयास उभे राहिले. ते म्हणाले-: “मला वैद्यराज एकतारे यांचें भाषण ऐकून अत्यंत आनन्द झाला आहे. त्यांनीं आपल्या भाषणांत आयुर्वेदाध्ययनासाठीं न्याय व मीमांसा या दर्शनाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. आपण पूर्वी फक्त न्याय व सांख्य यांसंबंधीं चर्चा करीत होतो. त्यांनीं त्यांत मीमांसा या आणखी एका दर्शनाची भर घातली आहे. याचा अर्थ असा कीं, आपणाला ३ दर्शनांचा पूर्वाभ्यास आवश्यक आहे. न्याय व सांख्य यांच्यापैकीं आयुर्वेदाला आवश्यक असा भाग अलग काढून तो शिकवावा. म्हणजे तो अध्ययनाला वा अध्यापनाला कठीण पडणार नाहीं, त्याचप्रमाणें पूर्वमीमांसा दर्शनांतीलहि आयुर्वेदाला उपयुक्त भाग अलग काढून शिकविला तर विद्यार्थ्यांना ग्रंथ लेखकाचा लेखनांतील गर्भित हेतु समजावून घेणें सोपें जाईल.

मीमांसा पूर्वाध्ययनाची आवश्यकता

साधारणतः लोकांना असें वाटतें कीं, संस्कृतांतील काव्य व व्याकरण यांचें अध्ययन पूर्वी केलेलें असलें म्हणजे आयुर्वेदाचे ग्रंथ समजणें जड जाणार नाहीं. स्थूल दृष्टीनें हें म्हणणें बरोबर आहे. कारण आयुर्वेदाचे ग्रंथ पद्यरचनेंत लिहिलेले आहेत व ते संस्कृत भाषेंत आहेत; पण सूक्ष्म दृष्टीनें पहाता एवढें पूर्वज्ञान पुरेसें नाहीं. त्यासाठीं न्याय, सांख्य, मीमांसा या दर्शनांची आवश्यकता आहे. न्याय व सांख्य

हीं दर्शनें कां आवश्यक आहेत हें सांगण्यांत मी कालहरण करीत नाहीं, कारण त्याची उपयुक्तता पाठ्यक्रम समितीला पटलेली आहे व म्हणूनच त्या दर्शनांचा अभ्यास तिनें पहिल्या १।। वर्षांत आवश्यक केला आहे. आज मीमांसा-अभ्यासाची आवश्यकता मी प्रतिपादन करणार आहे.

या दर्शनाची आवश्यकता कशी उत्पन्न झाली

मीमांसा- दर्शन कसें निर्माण झालें याची कुळकथा ऐकण्यासारखी आहे. आर्यांचे मूळ धर्म-ग्रंथ म्हणजे चार वेद. या वेदांत निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या ऋषींचीं उपदेशपर वचनें आलेलीं आहेत व त्यापैकीं कांहीं एकमेकाला विरोधी भासतील अशीहि आहेत. सर्व वेद हे आपले पूज्य ग्रंथ असता त्यांतील सर्व वचनांचा अर्थ कसा लावावयाचा व त्यांचा आचार कसा करावयाचा ? असा प्रश्न लोकांच्या पुढें निर्माण झाला व अशा वेळीं जैमिनी ऋषींनीं पुढें होऊन जुने ग्रंथ समजून घेण्याचा शास्त्रीय मार्ग शिस्त, पद्धति लोकांना दाखविली. त्या दर्शनाला म्हणतात ' पूर्वमीमांसा. '

आयुर्वेदालाहि तें दर्शन आवश्यक आहे

आयुर्वेदांतहि चरक-सुश्रुत-वाग्भटादि अनेक वैद्यक ग्रंथ निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या लेखकांनीं लिहिलेले आहेत व त्यांतील कांहीं कांहीं वचनें, सिद्धांत एकमेकाला विरोधी वाटतील असे आहेत. त्या सर्वांची अभ्यासपूर्वक व्यवस्था लावण्यास मीमांसा दर्शनाखेरीज उपयुक्त असें दुसरें दर्शन मला तरी माहित नाहीं.

ग्रंथ-वचनें लिहिण्याचा उद्देश

जैमिनी ऋषींनीं हें दर्शन कसे लिहिले व त्यांत काय लिहिलें आहे ? तें आपण पाहू या. वेदवचनें म्हणजे ऋषींना आलेले निरनिराळे अनुभव होत. आपले हे अनुभव आपल्यासमोर नसलेल्या (म्हणजेच भिन्न प्रांतांत व भिन्न कालांत रहाणाऱ्या) आपल्या बांधवांना माहित करून देण्यासाठीं त्यांनीं जीं वचनें उच्चारलीं तेंच वेद. आजहि मनुष्य याच उद्देशानें ग्रंथ लिहितो. कविता करतो. तो ग्रंथकार अगर कवि, उपस्थित नसतांना त्याच्या गैरहजेरींत आपण त्या ग्रंथांचा वा कवितेचा आशय समजून घेऊ शकतो व दुसऱ्याला समजावून सांगू शकतो. याचें कारण आपण तशाच प्रकारचे (ग्रंथ वा कविता) समजून घेण्याचे शिक्षण घेतलेले असतें. आपणास त्याची घडण मोडणी माहिती असते. प्राचीन ग्रंथकारांची ग्रंथपद्धति, वचन-पद्धति जर आपण समजून घेतली तर आपणास वेदाचा अर्थ, आयुर्वेदाचा अर्थ, सुद्धा लावणें सोपें जाईल. आयुर्वेदसुद्धां वेदाप्रमाणेंच प्राचीन कालीं लिहिला गेला आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. मीमांसादर्शन म्हणजे प्राचीन ग्रंथपद्धति समजण्याचें शास्त्र. एवढा अर्थ आतां आपल्या लक्षांत आला असेल. अर्थात् मिमांसेचा हा अर्थ लक्षांत आला म्हणजे नवीनांचे ग्रंथ वचनें चांगलीं समजण्यासाठीं व त्यांतील चुकीची विधानें समजण्यासाठींहि या ग्रंथार्थबोधक दर्शनाचा उपयोगी होईल—होतो.

एका वाक्यांत एकच विधान करावें

वेदामध्यें दोन प्रकारचीं वचनें आहेत. [१] ब्राह्मण वाक्यें, व [२] मंत्र वाक्यें; त्या पैकीं ब्राह्मण वाक्यें म्हणजे म्हणजे विधायक वाक्यें [विधायक वाक्यं ब्राह्मणम्] विधि कसा करावा हें सांगणारीं वाक्यें. वेदांत निरनिराळे प्रयोगविधि आहेत, तसे आयुर्वेदांतहि आहेत. उदाहरणार्थ, स्नेहविधि, स्वेदविधि, वमन-विरेचनविधि, बस्तिविधि इत्यादि. हीं जीं विधिबोधक वाक्यें असतात, त्यांचे प्रकार मीमांसेनें दिले आहेत. एका वाक्यांत एकच विधान करणें ही पद्धति सर्वोत्तम. उदाहरणार्थ-वमने मदनं श्रेष्ठम्। किंव

वातोल्बणेषु दोषेषु वाते वा वस्तिरिष्यते । कर्मोत्पत्ति वाक्य, गुणवाक्य, फलसंबंध-बोधक वाक्य, असे विधि वाक्याचे अनेक प्रकार आहेत. गुण म्हणजे अंग. कर्माचें अंग. उदाहरणार्थः- गेळफळ हें वमन कर्माचें अंग आहे. दही हें यज्ञाचें अंग आहे [दध्ना जुहोति]. म. गांधी लहान वाक्यें लिहित. त्यांची इंग्रजी भाषा उत्तम असें समजलें जाई. लहान लहान वाक्यें लिहिणे ही कला आहे.

कर्माचीं दोन अंगें

कोणत्याहि कर्माचीं दोन प्रधान अंगें असतात. [१] द्रव्य व [२] देवता. आयुर्वेदाच्या दृष्टीनें पाहता [१] औषध व [२] रोगी. रोगी ही वैद्यांची देवता व औषध हें त्याचें पूजाद्रव्य. कोणत्याहि कर्माचे तीन भाग असतात. एक पूर्वभाग, दुसरें प्रधानकर्म व नंतरचा उत्तरभाग. आयुर्वेदीय विधीमध्येंहि असेच वमन-कर्मापूर्वीचा आचार, प्रत्यक्ष वमनकर्म व नंतरची संसर्गीक्रिया दिलेली असते.

सर्व लेखन हें विध्यर्थी असतें

ऋषींनीं जें लिहून ठेवलें आहे तें मनुष्याला कर्मप्रवृत्त करण्यासाठीं आहे. क्वचित् कर्मापासून निवृत्त करण्यासाठींहि असेल पण तेंहि कर्मच आहे (अकर्मणि च कर्म यः पश्येत्). सर्व ग्रंथ हे विध्यर्थी आहेत, व म्हणूनच सर्व लेखन, सर्व ग्रंथ हे विध्यर्थी आहेत. कोणताहि विधि करावयाचा म्हणजे त्यांची अंगे समजलीं पाहिजेत. अनेक विधि व त्यांचीं अंगें व्यवस्थित समजण्यासाठीं मीमांसा (अर्थ बोधक) पद्धतीची आवश्यकता आहे. कोणते विधि केव्हां करावेंत हें समजण्यासाठीं विधीचा क्रम समजावा लागतो. केवळ आधीं सांगितलें तें आधीं व मागाहून सांगितलें तें मागाहून असें म्हणून भागत नाहीं. बोलणारा कित्येक वेळीं नंतरचा विधि आधी बोलून जातो व त्या आधीचा विधि नंतर सांगतो. तेव्हां अर्थावरून क्रम ठरवावा लागतो. कर्मांची अंगबोधक प्रमाणें ६ आहेत. तशीच क्रमबोधक प्रमाणेंहि सहाच आहेत.

अनेक कर्में एका सारखी एक असतात. त्यासाठीं लागणारीं साधनेंहि पुष्कळ वेळां सारखी असतात. त्यामुळें पुनः पुनः त्यांचा उच्चार न करतां दुसऱ्या कर्माचा हवाला तेथें दिलेला असतो. अशावेळीं अति-देशानें तेथील सर्व माहिती या कर्माला लागूं करावयाची असतें. वेदांतील यज्ञयागांत असें आहे, तसेच आयुर्वेदांतहि आहे. स्नेहविधी नंतर पाळावयाचा सर्व आचारविधी येथेंहि पाळावा. (स्नेहोक्तं आचारविधिं सर्वंशश्चानुपालयेत्)

निरनिराळ्या वेळीं केलेल्या कर्माचें सामुदायिक फल

कर्में (विधि) उत्तम रीतीनें पार पाडण्यासाठीं मधील अडथळे वेळच्या वेळीं दूर करावे लागतात. ज्यांचा उपयोग झाला तीं साधनें चट्चट् उचलून त्यांची व्यवस्था लावावयाची असते. ज्यांचा उपयोग आधी नसेल तीं साधनें मध्यें येऊन लुडबुड घडू नये म्हणून दूर ठेवावयाचीं असतात. ही सर्व रचना कर्मांच्या वेळीं कशी करावी याचें सुंदर विवेचन मीमांसाकारांनीं दिलें आहे. पूर्वकर्म, प्रधानकर्म व उत्तरकर्म या सर्वांनीं (सर्वांगसहित) मिळून प्रयोगविधि होतो असें मीमांसेंत सांगितलें आहे. पूर्वकर्में, प्रधानकर्में व उत्तरकर्में अलग अलग क्षणीं केली जात असतां त्या सर्वांना एक प्रयोग म्हणून कसें संबोधलें जातें ? त्याचें साहित्य (सहितस्य भावः) कसें होतें तें मीमांसेंत दिलें आहे.

नामधेयपद्धति, नांवें कशी ठेवतात ?

कोणतेंहि वाङ्मय लिहावयाचें म्हणजे त्यांत वस्तूंना नांवें द्यावी लागतात. ही नांवें ठेवण्याची पद्धति नामधेय प्रकरणांत दिली आहे. नांवें ठेवण्याचे एकूण ४ प्रकार आहेत. कोणत्याहि कर्माकडे, विधीकडे बन-

तेची प्रवृत्ति व्हावी एतदर्थ त्या विधीची स्तुति करणें अवश्य असते. याला अर्थवाद (जाहिरात); म्हणता ही जाहिरात कशी करतात ? जाहिरातीचे एकूण प्रकार किती ? त्यांची माहिती मीमांसेंत आहे.

माझ्या मतें आयुर्वेदाच्या अभ्यासकाला मीमांसेची सर्वप्रथम जरूरी आहे. मग तर्क व सांख्य यांच्या उपउक्ततेचा विचार. ही दृष्टी आम्हांस देणारे गु. गोपाळशास्त्री वायवारू राहणार हरदा (मध्यप्रदेश) हे होत.

मीमांसा हें दर्शन आहे

मीमांसेचे २ प्रकार आहेत. पूर्वमीमांसा कर्मकांडविषयक, व उत्तरमीमांसा उपनिषदविषयक. २ मीमांसा, योग, न्याय, वैशेषिक, व सांख्य ही अशीं ६ दर्शनें शास्त्रें आहेत.

जगांतील यच्चयावत् गोष्टींकडे पाहण्याचे ते डोळे आहेत. साधन आहेत, तर्कसंग्रह (वैशेषिक) प्रमाणांचा विचार करतात. सांख्य घटकांचा विचार करतात. तसेच मीमांसक हे अर्थाचा विचार करतात. शब्द असला तर त्याचा, व नसला तर त्यांचाहि [शब्दाभावाचाहि] विचार करतात.

कोणताहि धातु कर्मस्वरूप असतो, मनुष्य भाषा अगोदर जाणतो मग व्याकरण शिकतो. तद्वत् मीमांसा ही कर्म कां केलें जातें तें सांगतें.

मीमांसा म्हणजे कर्म-व्यवस्था

वेद [ज्ञान] अगोदर झालें व त्याप्रमाणें कर्माचें प्रतिपादन प्रत्येक जण करूं लागला. पण प्रत्येकानें कोणतें कर्म करावें व कां करावें तें कळण्यासाठीं मीमांसादर्शन उपयुक्त. मीमांसा म्हणजे कर्माची व्यवस्था आहे.

जगांतील प्रत्येक वस्तू विध्यार्थी आहे. म्हणजे प्रत्येक वस्तूंत आपण तिचा काय उपयोग करावा हें सांगण्याचा धर्म आहे. मीमांसक म्हणतात कीं, 'आमचा अंगत्वानें उपयोग करा.' असें तीं जागतिक द्रव्यें सांगतात.

कुठलीहि क्रिया [विधि] म्हटली म्हणजे त्यांत द्रव्य व देवता आल्या. कर्मांचे उद्दिष्ट म्हणजे देवता. व कर्मसाधनांचा विचार म्हणजे द्रव्यविचार.

मन् पासून मान्-विचारे यांपासून मीमांसा शब्द बनला आहे.

अशा तऱ्हेनें वेदांतील प्रत्येक वस्तूचा अर्थ, त्याचें उद्दिष्ट, त्याचीं साधनें व ज्या क्रिया करावा लागतात त्या कशा कराव्या हें सांगणारें मीमांसा हें एक दर्शन, शास्त्र आहे. आयुर्वेद समजण्या याच गोष्टी समजल्या पाहिजेत. प्रत्येक वस्तूचा उपयोग कां व कसा करून घ्यावयाचा ? प्रत्येक वस्तूचा उपयोग, त्याचा अर्थ, त्याची देवता म्हणजे उद्दिष्ट व त्यांचा अंगत्वानें अन्वय इ. इ. कळते. म्हणून मीमांसा दर्शन प्रत्येक आयुर्वेदीयानें अभ्यासिलें पाहिजे.

मीमांसाशास्त्रांत मी अगदीं बाल आहे. अतिशय लहान पुस्तक मीं वाचलें आहे. काशीस जाऊन मुद्दाम मी मीमांसा शिकलो. पण पुस्तक लहान असलें तरी गुरुजींनीं मीमांसेची दिलेली दृष्टि ही मात्र आयुर्वेदास अत्यंत उपयुक्त आहे हें नित्य वाटत असल्यामुळें मीमांसेचा समावेश आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमांत असलाच पाहिजे असें मी संधि मिळेल तेथे नित्य मांडीत आलो आहे. अध्यापक परिषदेनें या दर्शनाचा अभ्यासक्रमात समावेश केल्यास मला अत्यंत आनंद होईल.

हें व्याख्यान झाल्यानंतर अध्यक्ष आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री यांनीं व्याख्यात्यांच्या मतास पुष्टि देणारें भाषण केलें. व अभ्यासक्रमांत समावेश करतां येईल असा विषय लिहून काढण्याची सूचना केली. 'पूर्वमीमांसा हें इतकें उपयुक्त दर्शन आहे याची आपणास यापूर्वी कांहीं माहिती नव्हती' असें उद्गार अनेक तज्ज्ञ वृध्द वैद्यांनीं व्याख्यानानंतर खाजगी संभाषणांत व्यक्त केलें.

महाराष्ट्र प्रांतीय दशम वैद्य संमेलन, भुसावळ

दहा रुपयांहून अधिक साहाय्य देणारांचीं नांवें

रु.	२५१	श्री. धूतपापेश्वर इंडस्ट्रीज	पनवेल
,,	१०१	श्री द. कृ. सांडू ब्रदर्स	चेंबूर
,,	१११	आयुर्वेदाश्रम फार्मसी	अहमदनगर
,,	१२५	नांधवनी लल्लूभाई	मुंबई
,,	१०१	राजमल लखीचंदशेठ	जामनेर
,,	३१	वै. भगवन्त त्र्यंबक वैद्य	धुळें
,,	३१	वै. रामविलास बालाराम गुप्ता	विखरे
,,	२५	पुनमचंद ओंकारदास नाहटा	भुसावळ
,,	२५	खानदेश आयुर्वेदिक फार्मसी	जळगांव
,,	२५	वै. भालचंद्र शंकर जहागीरदार	जळगांव
,,	२५	अलीमहम्मद जीवाभाई	मुंबई
,,	२५	चरक भांडार	मुंबई
,,	२५	वै. सी. आर. मनोत्रा	मुंबई
,,	२१	वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर	नसीराबाद
,,	२१	मेसर्स शंकर अनंत जोशी	जळगांव
,,	२१	हुकुमीचन्द चोथमल	भुसावळ
,,	२१	शे. कन्हैयालाल बेहरा	भुसावळ
,,	११	शे. वंशीलाल मूळचंद अग्रवाल	भुसावळ
,,	१५	लक्ष्मी जिनिंग फॅक्टरी	जामनेर
,,	१५	सी. वसंतलाल कंपनी	जामनेर
,,	१५	शे. राधेश्याम मिश्रीलाल	भुसावळ
,,	१५	दिगंबर काशीनाथ चौधरी	भुसावळ
,,	१५	अमृतलाल ॲण्ड कं.	मुंबई
,,	११	वै. अ. वा. निं[illegible]कर	जळगांव
,,	११	वै. माधव बाळकृष्ण जोशी	जळगांव
,,	११	वै. गोविंद हरी वडींकर	जळगांव
,,	११	वै. मधुकर शांताराम सोनाळकर	,,
,,	११	भालचंद्र गोपाळ चांदोरकर	भुसावळ
,,	११	बाळकृष्ण मुरलीधर आचार्य	भुसावळ
,,	११	एम्. डी. पटेल ॲंड को.	भुसावळ
,,	११	से. कानजीसेठ [आर्यनिवास]	भुसावळ
,,	११	,, उत्तमचंद फूलचंद	भुसावळ
,,	११	,, मणीलाल हरषचंद	भुसावळ
रु.	११	शेठ भूरलाल शिवलालजी	भुसावळ
,,	११	वै. मो. दा. सन्त	पारोळे
,,	११	,, व्ही. के. पाटील	चोपडें
,,	११	,, चुनीलाल दामजी	मुंबई
,,	११	,, रतीलाल हरकिसनदास	मुंबई
,,	११	,, रविशंकर महू भाई	,,
,,	११	,, न. न. भगरे	धुळे
,,	११	,, ए. बी. मिरजकर	,,
,,	११	,, य. प्र. उपासनी	पांडळसे
,,	११	,, हरी शिवराम पाटील	,,
,,	११	,, शहाणे मेडिकल स्टोअर्स	जळगांव
,,	१०	,, यशवन्त पांडुरंग	चोपडे
,,	१०	,, अनंत बाळकृष्ण जोशी	जळगांव
,,	१०	,, दत्तात्रय बळवंत टिल्लू	चोपडे
,,	१०	,, एम. बी. गुजराथी	चोपडे
रु.	५१	वैद्य भानुदास बाळकृष्ण जोशी, सोनगीर	
,,	२१	,, दत्तात्रय अमृत फुरंग्रीकर, सारंगखेडे	
,,	११	डॉ. गेंदालाल भगनलाल हुंबड, सोनगीर	
,,	११	वैद्य रामकृष्ण शंकर शुक्ल, नरडाणे	
,,	११	डॉ. बी. आर. वैद्य, शिरूड ता. धुळे	
,,	११	श्री. अग्रवाल मेडिकल स्टोअर	,,
,,	११	,, चन्द्रकान्त वाडीलाल शहा	,,
,,	११	,, ओंकार कणीराम	,,
,,	११	डॉ. व्ही. आर. म्हसकर	,,

चुकीची दुरुस्ती

आयुर्वेद पत्रिकेच्या १ मार्च १९५५ च्या अंकांत पान ५६९ वर देणगीदारांच्या नांवांत चुकून ११ रु. वैद्य विठ्ठल जगन्नाथ पाटील, चाळीसगांव असें छापलें आहे. त्याऐवजीं वैद्य विठ्ठल जगन्नाथ पंडित, चाळिसगांव असें वाचावें.

वाचकांचा पत्रव्यवहार—

देश तसा आहारविहार

"नुकतेच पुण्यास एका ८१वर्षे वयाच्या वृद्ध वैद्यवर्यांनीं सप्रयोग योगासनें करून दाखविलीं. पूर्वीच्या पिढीलाच ही गोष्ट शक्य ! अलीकडची पिढी डाल्डा-मिलोवर वाढलेली पिढी, पन्नाशी तरी पाहील कां ! तत्प्रसंगीं त्यांनीं मोठ्या कळकळीनें सांगितलें कीं आपल्या या उष्णकटिबंधांतील देशांत चहाकॉफी-सारखीं उष्ण पेयें अत्यंत हानिकारक-कारण त्यांनीं भूक मरते. "अग्निमूलं बलं पुंसां" मग तोच निर्जीव झाला तर वर्धन-पोषण-आरोग्य कसें होणार !

सोईचें पेय हवें

चहा-कॉफी, आईस्क्रीम-कोल्डिंड्रिंक इत्यादि उष्ण व उष्णवीर्य पेयांचा सुळसुळाट कमी होण्यास आयुर्वेदीयांनीं हातभार लावला पाहिजे. रोज घेण्यास सोईचें असें एकादें पेय जरूरी आहे.

उन्हाळ्यांतील पाहुणचार

सर्वांना रुचेल, पचेल, परवडेल असेंच तें हवें, म्हणजे अल्पावधींत लोकप्रिय होऊन चहाची संवय कमी होईल. निदान उन्हाळ्यांत तरी दुपारच्या चहा-ऐवजीं लिंबाचें, वाळ्याचें किंवा गुलाबाचें शीतवीर्य असें पेय घ्यावें, व आल्यागेल्यासहि त्यानेंच पाहुणचार करावा. जमल्यास बरोबर थोडा गुलकंद, मोरावळा द्यावा.

अशी ऋतुकालोचित आरोग्यवर्धक प्रथा पाडण्याचा आरंभ वैद्यांनीं स्वतःच करावा. पुढें तेंच अंगवळणीं पडेल. आतांपर्यंत डोळे मिटून आंधळ्याचा कारभार झाला तेवढा पुरे ! परकीय राज्यकर्तेहि आतां नाहींत. कीं सर्व मिथ्याचारांचें खापर त्यांच्या डोक्यावर फोडावें.

बारिकसारिक गोष्टीकडे लक्ष

"आयुर्वेद" म्हणजे सर्व आयुष्याचाच वेद ! त्यानें या बारिकसारीक गोष्टींकडेहि लक्ष दिलें पाहिजे. कारण त्यांनींच पूर्णता येते व पूर्णतेला बारीक कोण म्हणेल !

येत्या अक्षय्यतृतीयेच्या शुभदिनींच हा क्षेमकर अल्पारंभ सुरूं करावा ही विनंति.

—ग. कृ. गर्दे

आयुर्वेद पत्रिकेची वर्गणी

आयुर्वेद पत्रिकेची वर्गणी प्रारंभीं ४ रु. होती. पुढें कागदाचे व छपाईचे भाव वाढल्यामुळें ती ६ रु. करण्यांत आली. आतां कागदाचे भाव साधारणपणें कमी झाले आहेत व लौकरच भारतांत नेपानगर येथें तयार झालेला वर्तमानपत्री कागद मिळूं लागेल असा काळ आला आहे.

४ रुपयांत २४ अंक

आयुर्वेद पत्रिकेस सध्या ८ वें वर्ष चालूं आहे. १ जुलैपासून नववें वर्ष लागेल. नवव्या वर्षापासून पुनः पत्रिकेची वर्गणी ४ रु. ठेवण्याचें आयुर्वेद सेवा संघानें ठरविलें आहे.

वास्तविक एवढ्या थोड्या वर्गणींत महिन्यांतून २ वेळ ३२ पानीं अंक वाचकांना पुरविणें हें परवडणारें नाहीं. तथापि ग्राहकांना या मंदीच्या काळांत पाक्षिक घेणें जड वाटूं नये, हा उद्देश समोर ठेवून वर्गणी कमी ठेवण्यांत आली आहे. ग्राहकांनीं या सवलतीचा लाभ घ्यावा व आपल्या मित्रमंडळींत पत्रिकेचा प्रचार करून शुद्ध आयुर्वेदाच्या कार्यास मदत करावी.

—व्यवस्थापक

'आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार'

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्व-प्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदीय औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

दंतवैद्य श्री. जायदे

यांचा चालू महिन्यांत अमेरिकेंत दौरा

हुबळीचे वेदनारहित दन्तोत्पाटनकुशल सव्यसाची दंतवैद्य श्री. पां. वि. जायदे आयुर्वेदतीर्थ, चालू एप्रिल महिन्यांत भारतीय दन्तवैद्यकाच्या प्रचारार्थ अमेरिकेच्या दौऱ्यासाठीं प्रयाण करणार आहेत. तेथें निरनिराळ्या संस्थांतून, या अनन्यसाधारण भारतीय शालाक्य चिकित्सेचें प्रात्यक्षिकहि देणार आहेत, त्या प्रीत्यर्थ त्यांना बराच खर्च येणार आहे.

या द्रव्यासाठीं राजसभाध्यक्ष ना. हुक्केरीकर यांच्या अध्यक्षतेखालीं एक निधि-समिति स्थापन झाली असून आतांपर्यंत तिचेकडे प्रत्यक्ष वा आश्वासन स्वरूपांत पुढील देणग्या मिळाल्या आहेत.

लोकमान्य टिळक ट्रस्ट कर्नाटकशाखा		रु.	१०००
„ „ „ (महाराष्ट्र शाखा)		„	१०००
आयुर्वेद सेवा संघ, नाशिक		„	१००
नाशिक शहर वैद्य-मंडळ		„	५०
एक वैद्य, नागपूर		„	१०
एक वैद्य (दन्तवैद्य), पुणें		„	१०
वै. मा. ग. शेंडये (दंतवैद्य) पुणें		„	२५
डॉ. र. बा. फडके	„ „	„	५५
आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे पुणें		„	१०
गोखले [होमिओपाथ]	„	„	१०
डॉ. चाफेकर	„	„	५
श्री. दा. न. शिखरे,	„	„	१

अजून बरीच मदत होणें अवश्य आहे. तरी वै. जायदे यांच्या दन्तोत्पाटनकौशल्याचें ज्यांनीं प्रत्यक्ष अवलोकन करून वा स्वतः दंतोत्पाटन करून घेऊन खात्री करून घेतली आहे त्यांनीं तरी या निधीला शक्य तेवढें साहाय्य करावें अशी विनंति आहे. प्रत्येक आयुर्वेदीयाचें तर थोडेंफार साहाय्य करणेचें कामच आहे. कारण वै. जायदे आयुर्वेदाचाच महिमा वाढविण्यास कारण होणार आहेत.

पां. ह. देशपांडे, आयुर्वेदाचार्य
(६३७ शुक्रवार, पुणें २)

मा. ग. शेंड्ये, आयुर्विद्याविशारद
(पत्र्या मारुतीजवळ सदाशिव पेठ पुणें २)
कार्यवाह

बिंदुमाधवशास्त्री पंडित, आयुर्वेदतीर्थ
(आयुर्वेद सेवा संघ, नाशिक)
कोषाध्यक्ष

वाचकांचा पत्रव्यवहार—

श्रीमत् भगवद्गीतेला स्थान

शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत जो संस्कृतचा अभ्यास चालतो, त्यांत श्रीमत्भगवत्गीतेला स्थान असेलच. गीता--थोडे ५.२५ श्लोक वगळले तर सहज सुभाषिताप्रमाणें समजण्यासारखी आहे, आणि ते ५-२५ श्लोकहि फार खोलांत न जातां अर्थग्रहण करण्यास कठीण पडणार नाहींत. एकदां सर्वसाधारण रीतीनें गीतार्थ कळला म्हणजे मग ज्याला त्याला सूक्ष्मार्थाच्या अभ्यासाला मार्ग मोकळा झाला.

संस्कृतच्या शुध्द पाठांतराकडेहि लक्ष द्यावयास पाहिजे असतें. —र. ग. पंडित, अकोला

परवानगी नाकारली

आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे व डॉ. म्हसकर, अध्यक्ष आयुर्वेद संशोधन बोर्ड मुंबई राज्य, यांच्या दरम्यान स्वस्थवृत्त ग्रंथाबाबत झालेला पत्रव्यवहार प्रसिद्धीसाठीं आयुर्वेद पत्रिकेनें मागविला होता.

“ आपल्यामध्यें झालेला पत्रव्यवहार प्रसिद्ध करण्याची परवानगी बोर्डाला देतां येत नाहीं ” असें उत्तर डॉ. म्हसकर यांनीं वैद्य पां. ह. देशपांडे यांना पाठविलें आहे असें कळतें.

मिरज येथें
आयुर्वेद सेवा संघाची औषधें
मिळण्याचें ठिकाण
आयुर्वेदिक मेडिकल स्टोअर्स
मिरज

लष्करी शुश्रूषा विभाग

परिचारिका पाहिजेत

लष्करी शुश्रुषा विभागांत नागरी परिचारिकांस सिस्टर [लेफ्टनंट] या श्रेणींत थोड्याच दिवसांत कांहीं हंगामी कमिशनें द्यावयाचीं आहेत.

या कमिशनांसाठीं अर्ज करणाऱ्या परिचारिकांजवळ कोठल्याहि सरकारमान्य रुग्णालयांत ३ ते ४ वर्षें शिक्षण घेतल्याचा दाखला असला पाहिजे. तसेंच त्यांची, सरकारकडे, पुरुष, स्त्रिया व मुलें यांची वैद्यकीय व शस्त्रक्रियाविषयक शुश्रुषा करण्याचें व सुईणीचें शिक्षण घेतले असल्याची, सरकारी नोंदणीही झालेली असली पाहिजे.

अर्ज करणाऱ्या परिचारिका अविवाहित, घटस्फोट घेतलेल्या, वा नवऱ्यापासून विभक्त झालेल्या, अथवा दुसऱ्या कोणाचीही जबाबदारी नसलेल्या विधवा, असल्या पाहिजेत. त्यांचें वय २० ते ३५ वर्षांच्या दरम्यान असलें पाहिजे.

या जागांची पगारश्रेणी रु. २२५-१०-२७५ असून पुढें बढतीची शक्यता आहे. पगार आणि महागाई भत्याशिवाय त्यांस आउटफिट व स्पेशल डिस्टरबन्स अलावन्सहि देण्यांत येईल. निवड झालेल्या परिचारिकांची राहण्याची व तदनुषंगिक बाबींची मोफत सोय होईल. या नेमणुकी प्रथमतः दोन वर्षांपुरत्याच असून नंतर दरवर्षी करारानें त्यांची मुदत वाढविण्यांत येईल.

अभिनंदन

वैद्य प्रभाकर नाना व्यवहारे डी. ए. एस्. एफ्. [मुंबई] हे नगर आयुर्वेद महाविद्यालयांतून गतवर्षी क्रमांक १ला उत्तीर्ण झाले असून त्यांची [बी. एम्. एस्. ३ क्लास मध्ये] नासिक येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्यें नेमणूक झाली आहे. त्याबद्दल पत्रिका त्यांचें अभिनंदन करीत आहे.

मुंबई सरकारनें अन्य सिव्हिल हॉस्पिटल्समधूनही अशा नेमणुका केल्याचें कळतें.

दुर्मिळ वैद्यक ग्रंथ

औषधी किंवा शस्त्रप्रयोगावाचून रोग बरे करण्याचें शास्त्र	डॉ. कुन्हे	४ रु.
चिकित्सा प्रभाकर	श्री. प्र. बा. ओगले	२० रु.
सार्थ माधवनिदान	वै. द. ब. बोरकर	५ रु.
न्यायवैद्यक	डॉ. मा. पु. जोशी	८ रु.
सार्थ रसचंद्रांशु	वै. द. ब. बोरकर	३ रु.

वनस्पतीविषयक ग्रंथ

वनौषधी गुणादर्श भाग १ ते ७	वै. पदेशास्त्री	१० रु.
सचित्र वनस्पती गुणादर्श [हिन्दी]	वै. हि. मो. जंगले	२ रु.
वनस्पतीप्रभाव	धन्वन्तरी	२॥ रु.

वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

अध्यक्ष पां. ह. देशपांडे

भुसावळ येथें भरावयाच्या १० व्या महाराष्ट्र प्रां. वैद्य संमेलनाच्या अध्यक्षपदीं पुणें येथील सुप्रसिद्ध वैद्य आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे हे अविरोधपणें निवडून आले आहेत. त्यांच्यासाठीं वैद्य वि. म. गोगटे नाशिक, व वै. म. भा. वाटवे ळगांव यांनीं आपलीं नांवें मागें घेतलीं आहेत असें मंत्री कळवितात.

निवडणुकीच्या नियमांत दुरुस्ती

मुंबई सरकार १९३९ च्या वैद्यक व्यवसायी-बंधींच्या नियमांत दुरुस्ती करणार असून त्यासंबंधीं नाच्या कांहीं हरकती किंवा सूचना असल्यास त्या ता. ७ एप्रिल पर्यंत स्वीकारण्यांत येतील. दुरुस्तीचा सुदा मुंबई सरकारच्या ता. २४ मार्चच्या गॅझेटमध्यें व भागांत प्रसिद्ध झाला असून त्या अन्वयें बोर्ड आयुर्वेदिक आणि युनानी सिस्टिम्स ऑफ डिसिनच्या निवडणुकीच्या कार्यपद्धतीबाबतच्या म ६ व ७ मध्यें दुरुस्ती करण्यांत यावयाची हे. हरकती आणि सूचना मुंबई सरकारचे स्थानिक आणि सार्वजनिक आरोग्य खात्याचे सेक्रेटरी, एट, मुंबई, यांच्याकडे पाठवाव्या.

अनुक्रमणिका

स्वामी केवलानंदांचें आदर्श दीर्घायुष्य ६०३
ॲलोपथी हें फार मागासलेलें शास्त्र आहे ६०४
मीं रशियांत काय पाहिलें ! ६०५
गु. स्वामी केवलानंदांची आयुर्वेदनिष्ठा ६०९
आयुर्वेदाचें भवितव्य उज्वल आहे ! ६११
भुसावळच्या म. प्रां. वै. संमेलनाबाबत ६१३
श्री. बाक्रे यांचा खुलासा ६१६
संतर्पणजन्य त्रिदोषात्मक मधुमेह ६१७
खोट्या नांवानें खोटीं औषधें ६१९
आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद ६२१
म. प्रां. दशम वैद्य संमेलन, भुसावळ
सहाय्य देणारांची नांवें ६२५
देश तसा आहार-विहार ६२६
दंतवैद्य श्री. जायदे निधि ६२७
लष्करी शुश्रूषा विभाग ६२८

शुद्ध आयुर्वेद

विद्यालयास मिळालेल्या देणग्या

रु.	१	श्री. दगडु आत्मारामशेट वाणी	पिंपळनेर
,,	१	वै. विष्णु रामचंद्र वैद्य	शिंदखेडे
,,	१	श्री. कमळाबाई पोपटभाई शहा	,,
,,	१	,, नामदेवराव दोधु पाटील	,,
,,	५	,, शंकरदास हरचरणदास	,,
,,	३	,, गमनलाल शिवदासजीशेट	,,
,,	१	डॉ. फडे एल. सी. पी. एस.	,,

" फक्त वैद्यासाठीं "

इंजेक्शन ट्रेनिंग क्लास मे महिन्याचे सेशनसाठीं प्रवेश देणें सुरू आहे. विशेष माहितीसाठीं २ आणे पोस्टेज पाठवा.

डॉ. जिल्लेदार, C. T. S. यवतमाळ (म.प्र.)

पांढऱ्या कोडासंबंधींच्या जाहिरातींनें रुग्णांची फसवणूक होत आहे, अशा तक्रारी आयुर्वेद सेवा संघाकडे आल्या आहेत, म्हणून

पांढऱ्या कोडाची शास्त्रशुद्ध चिकित्सा

करण्याची व्यवस्था आयुर्वेद सेवा संघानें केली आहे. पांढऱ्या कोडाचे आयुर्वेदानें केलेले प्रकार व त्यावर दोषभेदानें करावयाचे शोधन व शमन उपचार यासंबंधी शास्त्रीय विवेचन आयुर्वेद पत्रिकेंतून प्रसिद्ध करण्यांत येणार आहे.

KANGRI

आयुर्वेदीय आरोग्यशाला, नासिक

मधुमेहावर तेलिया असाणा-जल

श्री. माणिकराव शंकरराव सोमवंशी, बी. एस्सी. (शेतकी)

राहणार मोहाडी ता. दिंडोरी जि. नासिक कळवितातः—

" मला १९५१ च्या जानेवारींत मधुमेह झाला. त्यावर डॉक्टर-वैद्यांचीं औषधें घेतलीं. त्यांतच क्षयहि झाला. रुग्णालयांत राहून उपचार घेतले. एकूण १०-१२ हजार रुपये खर्च आला. क्षय बरा झाला, पण मधुमेह चालूच राहिला.

१९५४ च्या नोव्हेंबर मध्यें मी तेलिया असाण्याचें पाणी घेण्यास प्रारंभ केला. आतांपर्यंत ३ पौंड असाणा घेतला. आतां सकाळच्या लघवींत बिलकूल साखर नसते. रोज इन्सुलिन घेण्याचें प्रमाणहि पूर्वींपेक्षां पुष्कळच कमी झालें आहे. पथ्य पाळीत आहे. पुढें इन्सुलिनची बिलकूल जरूर राहणार नाहीं, असें वाटू लागलें आहे. "

असा अनुभव अनेकांना आला आहे. आजवर १५० हून अधिक लोकांनीं तेलिया असाण्याचा अनुभव घेतला, व तो निश्चित गुणदायी असा आहे.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

संपादक व प्रकाशकः—वैद्य विंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य बिवलकर कारंजा, नाशिक
मुद्रकः—वी. वि. ओक, वसंत प्रेस, नाशिक

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजी प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

वर्ष ८ वें) नासिक, ता. १६ एप्रिल १९५५ (अंक २० वा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची आयुर्वेदभक्ति

मध्यप्रदेशांतील मोझरी [जि. अमरावती] या गावीं वास्तव्य असलेले व प्रचारार्थ सर्वत्र संचार करणारे, राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनीं गुरुवार ता. ७ रोजीं सकाळीं नाशिक येथें आयुर्वेद सेवा संघास भेट दिली व आयुर्वेदाच्या भावी कार्याबाबत विचारविनिमय केला. असें समजतें कीं, नागपुर येथें सुरूं करण्यांत आलेल्या 'पक्षास समन्वय रुग्णालय' या संस्थेच्या अध्यक्षपदीं सध्यां महाराजांची योजना करण्यांत आली आहे. त्या ठिकाणीं त्यांनीं प्रामुख्यानें आयुर्वेद व होमिओपॅथी या दोन पद्धतींनेंच उपचार करण्याची व्यवस्था केली आहे व तें काम अधिक चांगल्या रीतीनें करण्याचे त्यांचे प्रयत्न सुरूं आहेत.

मध्य-प्रदेशांत मोझरी येथें आयुर्वेद महाविद्यालय काढावें अशा सूचना अनेक जबाबदार लोकांकडून महाराजांच्याकडे आल्या आहेत. परंतु अध्यापन-कार्यक्षम असा अध्यापकवर्ग उपलब्ध होईल त्या वेळींच तें करणें शक्य होईल असें महाराजांचें मत आहे.

महाराजांची आयुर्वेदावर नितांत श्रद्धा आहे. मोझरी येथें सेवाभावानें एक उत्तम औषधालय त्यांनीं चालविलेलें आहे. मद्रास प्रांतांत गुंटुर जिल्ह्यांत सीतारामशास्त्री यांच्या 'विनयाश्रम' नावाच्या संस्थेमध्यें त्यांना वडाच्या फळापासून पौष्टिक औषध बनविण्याची माहिती मिळाली. अशा रीतीनें ठिकठिकाणीं आयुर्वेदविषयक उपयुक्त माहिती मिळवून ती गुप्त न ठेवतां त्याचा लाभ लोकांना करून देण्याची व्यवस्था महाराजांनीं केली आहे. महाराज लौकरच जपानमध्यें भरणाऱ्या विश्वधर्म परिषदेंत भारताचे एक प्रतिनिधि म्हणून जाणार आहेत.

आयुर्वेदशास्त्राचा अभ्यास वाढावा व भारताचें राष्ट्रीय वैद्यक म्हणून त्याला गौरवाचे स्थान प्राप्त व्हावें, यासाठीं महाराजांचे विविध प्रयत्न चालू आहेत, हें जाणून सर्व आयुर्वेदप्रे वाचकांस अत्यंत आनंद वाटेल.

—× —×— ×—

आयुर्वेदानेंच देशाचें आरोग्य वाढेल

" आयुर्वेद सेवा संघ, नासिक " ही संस्था पाहून मला आनंद वाटला. सेवा भावनेनें व आतुर अंतःकरणानें येथें औषधें तयार करून दिलीं जातात. येथाल स्वच्छता उत्तम आहे.

आमच्या भारतांत आयुर्वेदीय औषधांच्या प्रगतीनेंच देशाचें आरोग्य वाढेल व घरोघरी औषधें मिळूं शकतील. मीं संस्थेला यश चिंतितो.

— तुकड्यादास

दोन तासांत चिंतामुक्त!

" आपल्या कन्येला स्नुषा करून दोन तासांत आपणांस कन्याविवाहाच्या दारुण चिंतेतून मुक्त केलें व ' समानयस्तुल्यगुणं वधूवरम्। ' असें कार्य घडवून आणलें याबद्दल आपले व जळूकरशास्त्री या उभयतांचें हार्दिक अभिनंदन "

- कन्याविवाहाची दारुण आंच अनुभविणारा

विद्या-विनय संपन्न घर

" चि. विद्येला विद्या - विनय - संपन्न घ मिळालें हें पाहून आनंद वाटला. "

गरिबांना धीर देणारें धोरण

" फक्त विवाहविधीला महत्त्व देऊन समारंभाला अजिबात फांटा देण्याचें जें धोरण आप अमलांत आणलें, तें गरिबांना धीर देणारें असल्यामुळें अभिनंदनीय आहे "

मुंबई राज्य आयुर्वेद व युनानी वैद्यक

बोर्डाच्या मतदारांना विनंति

लौकरच "बोर्ड ऑफ् आयुर्वेद अँड युनानी सिस्टिम्स ऑफ् मेडिसिन, मुंबई" यासाठीं सभासदांची निवडणूक होईल. मतदार वैद्यबंधूंना विनंति कीं, मागील निवडणुकीप्रमाणच चारहि प्रांतीय संस्थांचे अधिकृत प्रतिनिधि निवडणुकीस उभे करावयाच आहेत. तरी मतदार वैद्यांनीं आतांच कोणास आश्वासन देऊं नये. पुढील कार्य कोणत्या पद्धतीनें करावयाचें याच धोरण मुंबईराज्य फेडरेशन व प्रांतिक संमेलन ठरवितील.

—मंत्री, महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ

टायफॉइड फीव्हरवर रामबाण औषध

(२४ ते ३६ तासांच्या आंत ज्वरमोक्ष होतो)

(लेखकः— वैद्य इंदुभूषण भिंगारे, महाल नागपूर)

माझ्या लेखनाचा मथळा मीं टायफॉइड फीव्हर हा दिल्यामुळें आमच्या वैद्यबंधूंना आश्चर्य वाटून कदाचित् रागहि येईल. पण त्याला माझा नाईलाज आहे.

निश्चित नामाभिधान नाहीं

टायफॉइड फीव्हरचे निश्चित नामाभिधान करण्यांत आमच्या वैद्यबंधूंत इतके मतभेद आहेत कीं, त्यांतून मला बाहेर पडण्याचा कोणताहि मार्ग दिसत नाहीं. स्वर्गीय महामहोपाध्याय गणनाथ सेन या ज्वराला आंत्रिक ज्वर असें नवीन नांव देतात, व सिद्धांतनिदान नांवाच्या ग्रन्थांत पाश्चात्य ग्रन्थाप्रमाणें त्याच्या तीन आठवड्यांतील लक्षणांचें वर्गीकरण करून लक्षणें लिहितात. पुण्याच्या महाविद्यालयाचे अधिपति वैद्य भा. वि. गोखले हे पांच विषम ज्वरापैकीं संतत ज्वराला टायफॉइड फीव्हर म्हणतात. सोलापूरचे वैद्य नागेवाडीकर हे वातपित्तोल्बण सन्निपात असें टायफॉइड फीव्हरला नांव देतात. उत्तर हिंदुस्तानांतील वैद्यसांप्रदायी टायफॉइड फीव्हरला योगरत्नाकरांतील ज्वराधिकारांतील मंथर ज्वर असें म्हणतात.

क्लोरोमायसेटिनचे दुष्परिणाम

वरील सर्व नमूद केलेल्या रोगाचें निदान पूर्वरूप, व सम्प्राप्ति इतकी भिन्न आहे कीं, त्यापासून निश्चित असा एकच रोग आपल्या डोळ्यासमोर उभा राहत नाहीं. म्हणुन ह्या मतमतांतरांच्या गलबल्यांतून बाहेर पडण्याच्या हेतूनें पाश्चात्य रोगनिदानांत वर्णन केलेल्या टायफॉइड फीव्हर ह्या रोगावर निश्चित गुण देणारी औषधी योजना, हाच माझा प्रमुख विषय असल्यामुळें माझ्या लेखाला वरीलप्रमाणें नांव पसन्त केलें आहे, ह्याबद्दल वैद्यबंधु मला क्षमा करतील.

सन १९५१ सालीं मी टॉयफॉइड फीव्हरनें आजारी झालो. एक आठवड्यानन्तर मला नागपूर येथील मेयो हॉस्पिटलमध्यें भरती करण्यांत आलें. पाश्चात्य पद्धतीप्रमाणें रक्त, मल, मूत्र वगैरेची तपासणी झाल्यानन्तर टायफॉइड फीव्हर हें निदान निश्चित ठरलें. टायफॉइड फीव्हरच्या उपचारांत निश्चित गुणकारी असलेलें औषध क्लोरोमायसेटीन हे दर तीन तासांनी अेक कॅपसूल ह्याप्रमाणें देण्यास सुरुवात झाली. बारातासानन्तर घाम घेऊन ज्वर उतरू लागला. तीन तासांत ज्वर पूर्ण उतरला. परन्तु अस्वस्थता, शिरःशूल, कोष्ठबद्धता व शक्तिपात हीं लक्षणें पूर्ववत् चालू होती. १४ दिवस संपल्यावर माझी हॉस्पिटलमधून सुटका करण्यात आली. परन्तु हॉस्पिटलच्या बाहेरच्या दाराजवळ येताच पुन्हां शिरःशूल वाढल्यामुळें थर्मामीटरनें ताप मोजण्यांत आला. थर्मामीटरप्रमाणें १०१ डिग्री ताप दिसल्यावर पुन्हां ७ दिवस दवाखान्यांत भरती व्हावें लागलें. डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणें पुन्हा ताप उलटला असें सांगून दर तीन दिवसांनीं क्लोरोमायसेटीन देण्यास सुरुवात झाली. ७ दिवसानन्तर पुन्हां घरीं आलो. आज ह्या घटनेला जवळजवळ तीन वर्षें पूर्ण झालीं आहेत. अजून माझें वजन आजाराचे पूर्वीचें भरून आलें नाहीं. अग्निमांद्य कायमचेंच ठाणें धरून बसलें. कोणत्याहि कामांत उत्साह नसणें हा तर स्वभावच होऊन बसला आहे.

डॉक्टर दुष्परिणाम सांगत नाहींत

क्लोरोमायसेटीन हें औषध टायफॉइड फीव्हरवर रामबाण म्हणून सांगण्यांत येतें, परन्तु ह्या औषधाचा दुष्परिणाम शरीरावर किती वाईट होतो, हे कोणीच सांगत नाहीं. ज्या औषधामुळें शरीरावर

दुष्परिणाम हाणार नाहींत परन्तु रोगमुक्ती मात्र होईल, अशाच औषधाला श्रेष्ठ औषध मानण्यांत येते. ह्या कसोटीला क्लोरोमायसेटीन मुळींच उतरत नाहीं. ह्या मुख्य बाबीकडे आपल्या देशांतील डॉक्टर वर्ग लक्ष देऊ इच्छित नाहीं. ह्या घटनेनंतर क्लोरोमायटीन न वापरण्याचा मीं निश्चय केला. व त्याबरोबरच २४ तासांचे आंत ज्वरमोक्षाचीं लक्षणें दिसतीलच असें आयुर्वेदीय औषध शोधून काढण्याच्या मार्गास लागलो.

सुवर्णसूतशेखर, लक्ष्मीनारायणरस, चंद्रकलारस संजीवनीवटी, बृहत्कस्तुरीभैरव, मधुरांतकवटी, वगैरे अनेक औषधांचा उपयोग करून पाहिला. परंतु मुदतीच्या आंत ज्वरमोक्ष झालेला आढळला नाहीं. वरील औषधांचा उपचारानें ज्वराची तीव्रता कमी होऊन उपद्रव निर्माण होत नाहींत, ही गोष्ट खरी. परंतु मुदतीच्या आंत ज्वरमोक्ष झालेला आढळला नाहीं, ह्या एकाच कारणामुळें एखादा नवीन योग काढण्याकडे माझें लक्ष गेलें. व मला तो योग शोधून काढण्यांत यश मिळालें, हें प्रसिद्ध करण्यांत आनंद होत आहे.

गुप्तता ठेवणें पसंत नाहीं

कोणत्याहि औषधी सांप्रदायांतील योग अगर प्रक्रिया गुप्त राहावी, ह्या मताचा मीं नाहीं. व म्हणूनच माझ्या अनुभवाला असें औषध आल्याबरोबर हें औषध सर्व वैद्यबंधूंना सांगून मोकळें व्हावें, असें मला वाटलें. ह्या औषधाचा शोध मला कसा लागला, ह्याचा वृत्तांत सविस्तर प्रसिद्ध करणें मीं माझें कर्तव्य समजतो.

वैद्य हरिरामजी वाघवानी, नागपूर

सन १९५२ सालीं आमच्या औषधालयांत काम करणारे श्री. गुलाबरावजी पवार यांची मुलगी कु. मन्दा पवार ही टायफॉइड फीव्हरनें आजारी झाली. ज्वर येण्याच्या ४ थ्या दिवशींच टॉयफाइड फीव्हरचें निदान निश्चित करून सुवर्णसूतशेखर, लक्ष्मीनारायणरस, प्रवाळ, गुळवेल, व सितोपलादि ह्या औषधाचें वयोमानाप्रमाणें मिश्रण करून देण्यांत आलें. ज्वराचा दहाव्या दिवशीं ताप १०३ डिग्री गेला. प्रलाप व अस्वस्थता हे उपद्रव जास्त दिसूं लागले. प्रलापाकरितां महावातविध्वंस वापरण्यांत आला. परन्तु विशेष फरक दिसून आला नाहीं. ह्या अवस्थेंत आमच्या येथील सुप्रसिद्ध वैद्य हरिरामजी वाघवानी यांना हा रोगी दाखविण्यांत आला. त्यांनीं लवंगांच्या काढ्यांतून मुक्तादिवटीच्या चार गोळ्या देण्यास सांगितलें. मुक्तादिवटीच्या चार गोळ्या दिल्यावर प्रलाप व अस्वस्थता एकदम कमी झाली, व तापाचें प्रमाणहि कमी झालें. या वेळेपासून मुक्तादिवटी या औषधाकडे माझें लक्ष वेधलें. मुक्तादिवटीचा पाठ मी वैद्य हरिरामजी वाघवानी, नागपूर यांचेकडून मिळविला. तो खालीलप्रमाणें आहे:—

मुक्तादिवटीचा पाठ

मुक्तापिष्टी १ तोळा, जहरमोहराखताई पिष्टी ४ तोळे, जद्वारखताई ९ मासे, पांढरें चन्दन २ तोळे,

सांडू ब्रदर्सचीं
शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.
वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.
पत्रव्यवहाराचा पत्ता:—
दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
चेंबूर लि.
फॅक्टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

बाभळीचा डींग १॥ मासा, कस्तुरी १॥ मासा, चांदीचा वर्ख ४ रत्ती, हीं सर्व द्रव्यें श्री. वैद्य यादवजी-कृत चंदनादि अर्कांत ७ दिवस घोटून १ रत्तीच्या गोळ्या तयार कराव्यात. ह्या अकेरी औषधानें तापाचें प्रमाण, अस्वस्थता, प्रलाप वगैरे लक्षणें कमी होतात. मात्र मुदतीच्या आंत ज्वरमोक्ष होत नाहीं. ह्या मुक्तादिवटीबरोबर, खालील औषधांचा संयोग केल्यास २४ तासांचे आंत ज्वर उतरतो. औषधाचें प्रमाण खालीलप्रमाणें आहे.

मुक्तादिवटी मिश्रण

मुक्तादिवटी- १ मासा, चंद्रकलारस- १ मासा, अभ्रपुटीप्रवाळ- १ मासा, शृंगभस्म- १ मासा, सितोपलादिचूर्ण- ६ मासे, एकत्र करून ९ पुड्या बांधाव्या. दर तीन तासानंतर एकेक पुडी जीवनामृत अर्कांतून घेण्यास द्यावी. चन्द्रकला हें औषध योगरत्नाकरांतील दाहाधिकारांतून घेणें आवश्यक आहे. जीवनामृतार्काचा पाठ खालीलप्रमाणें आहे.

जीवनामृतार्काचा पाठ

धने--अर्धा शेर, पांढरें चंदन--अर्धा शेर, छोर--अर्धा शेर, पांढऱ्या कमळाचीं फुलें--अर्धा शेर खस--अर्धा सेर, कापूरकाचरी--एक पाव, विलायची अर्धा पाव. हीं सर्व द्रव्यें बारीक कुटून ह्याची भरड ८ पट पाण्यांत रात्रीं भिजत घालावी. दुसरे दिवशीं सकाळीं अर्कपातनयंत्रांतून अर्धा अर्क ओढून घ्यावा. ह्याला आम्ही जीवनामृतअर्क असें म्हणतो. ह्या अर्कांतील १ तोळा औषध प्रत्येक पुडीबरोबर द्यावें.

वरील औषधाचा उपयोग गेल्या तीन वर्षांत मी अनेक टायफॉइडच्या रोग्यावर केला आहे. २४ तासांच्या आंत ज्वरमोक्ष होतो, असा आमचा निश्चित अनुभव आहे. खाजगी वैद्यकीय व्यवसायांत रुग्णालयाप्रमाणें रोग्याचे यथायोग्य वृत्तांत ठेवतां येत नाहीं, ह्याचा सर्वांना अनुभव आहेच. असें असूनसुद्धां अनेक रोग्यांचें रोगनिदान निश्चित करूनच मी ह्या औषधाचा उपयोग केला आहे. मला कोठेंहि अपयश आलें नाहीं. ह्या औषधापासून माझ्या कोणत्याहि रोग्याला अपाय झालेला माझ्या पाहण्यांत आला नाहीं. क्लोरोमायसेटीन सारख्या विषारी व प्राणघातक द्रव्याचा उपयोग न करतां वरील औषधांचा उपयोग करणें अत्यंत श्रेयस्कर आहे.

वैद्यबंधूंनीं अनुभव घ्यावा

माझ्या अनुभवाप्रमाणें माझ्या वैद्यबंधूनाहि असाच निश्चित अनुभव आला तर आयुर्वेदीय चिकित्साक्षेत्रांत फारच मोठी क्रांति घडून येईल, व आयुर्वेदांत व्याधिप्रत्यनीक अशी तावडतोब गुण देणारीं निश्चित गुणाचीं औषधें आहेत, असें पाश्चात्य डॉक्टरांनादेखील वाटेल. मी माझा अनुभव स्पष्ट शब्दांत दिला आहे. वैद्यबंधूंनीं आपले अनुभव प्रसिद्ध करावेत, एवढीच विनंति आहे.

मिश्र आयुर्वेदीय संस्थांना

सरकारी मदत

१९५४-५५ सालासाठीं मुंबई सरकारनें राज्यांतील ५ सरकारमान्य मिश्र आयुर्वेद शिक्षणसंस्थांना पुढील देणग्या दिल्या असल्याचें ता. १८।३।५५ रोजी जाहीर केलें आहे.

आयुर्वेद	महाविद्यालय	पुणें	८६,३२८
,,	,,	सुरत	९६,२२९
,,	,,	सातारा	४२,५५६
,,	,,	नडियाद	४१,८७६
,,	,,	अहमदनगर	१८,९७१
		एकूण	२८६०००

एकूण रुपये दोन लक्ष शाऐंशी हजार फक्त

" फक्त वैद्यासाठीं "

इंजेक्शन ट्रेनिंग क्लास मे महिन्याचे सेशन साठीं प्रवेश देणें सुरू आहे. विशेष माहितीसाठीं २ आणे पोस्टेज पाठवा.

डॉ. जिलेदार, C. T. S. यवतमाळ (म.प्र.)

बोर्ड ऑफ रिसर्च इन आयुर्वेद, मुंबई

चेअरमन, डॉ. के. एस्. म्हसकर
एम्. ए. एम्. डी.
ऑनररी सेक्रेटरी, डॉ. एस्. ए. हकीम
एम्. बी. बी. एम्.

नं. १० बी. डी. डी. चाळ, डिलाईल रोड
पो. जेकब सर्कल मुंबई ११
टेलिफोन नंबर ४११९४
जावक नं. ७।१३।५१०

संपादक, आयुर्वेद पत्रिका नाशिक यांस सा. न. वि. वि.–

श्री. वैद्य डेग्वेकर यांचे लेखाविषयीं पुढील माहिती आपले पत्रिकेंत छापावी ही विनंति–

वैद्य डेग्वकर यांच्या ‘ त्रिदोष ’ या विषयावर लिहिलेल्या लेखांत आधुनिक शास्त्रांतील आधार बरेच असल्यामुळें तो लेख बोर्डानें पसंत केला नाहीं. कळावें.

आपला

(सही) कृ. श्री. म्हसकर

डॉ. म्हसकरांच्या कडून आलेल्या या खुलाशाची प्रतिलिपि वैद्यराज डेग्वेकरशास्त्री बबरा यांना पाठविली होती. त्यांच्याकडून पुढील उत्तर आलें आहे.

मागाहून सुचलेली कल्पना

आपलें क्रमांक ६७ ता. ५-४-५५ चें पत्र पावलें. माझे लेख बोर्डानें पसंत केले नाहींत असें जें डॉ. म्हसकर म्हणतात तर त्याप्रकारचें पत्र त्यांनीं मला कधीं लिहिलें व कळविलें तें त्यांना प्रसिद्ध करण्यास सांगा

सध्यां तरी मला असेंच वाटतें कीं ही त्यांना मागाहून सुचलेली कल्पना [After thought आहे. १ मार्चच्या अंकांत प्रसिद्ध झालेला पत्रव्यवहार पहावा.

आपला

(सही)—भि. वि. डेग्वेक

हा दैवदुर्विलास आहे

[मुंबई सरकारनें आयुर्वेदाच्या संशोधनासाठीं डॉ. म्हसकर व डॉ. हकीम यांची समिति नेमावयाची व त्यांनीं वैद्यांच्या आयुर्वेदाविषयक लिखाणाचें परीक्षण करावयाचें; तज्ञ वैद्यापर्यंत त्यांचें लिख पोहोचावयाचें सुद्धां नाहीं, ही सरकारी योजना किती घातक आहे !

संस्कृत पाठशाळेंत संस्कृत शिकविण्यासाठीं एखादा युरोपियन अगर पर्शियन मनुष्य नेमण्याइतकें हें विचित्र आहे. पण डॉ. लागू, डॉ. घोष यासारखे विद्वान् जेव्हां मुंबई सरकारचे सल्लागार होते, त्यांच यापेक्षां अधिक हितकर सल्ल्याची अपेक्षा करणेंच अशक्य आहे. मंत्रिमंडळ बदलून ३ ३॥ वर्षे झालीं तरी त्याचे दुष्परिणाम आपणास भोगावे लागत आहेत. हें धोरण बदलण्यास अजून किती वर्षे लाग आहेत याची कल्पनाच करवत नाहीं !

चालू मंत्रिमंडळानें आपली मुदत संपण्यापूर्वी आयुर्वेदाच्या गळयांत बांधली गेलेली ही डॉक्टर मंडळींची धोंड दूर करण्याचें श्रेय घ्यावें एवढेंच वैद्य मंडळींची अपेक्षा आहे. --संपादक]

…. मी रशियांत काय पाहिलें ? ….

(व्याख्यातेः- वैद्य त्र्यं. म. गोगटे, अमरावती)

[आयुर्वेद पत्रिका पान ६०८ वरून पुढें चालू]

अब्रह्मचर्य– तिसरा मुद्दा अब्रह्मचर्यांचा. सोज्वल परंपरेच्या ह्या भारतदेशामध्यें आज अग्नि आणि शुक्र यांच्या संरक्षणाच्या दंडकाला पार काळिमा फांसली गेली आहे. जसें खाण्यापिण्याच्या बाबतींत धरबंध सुटले म्हणजे वैश्वानराला ठायींठायीं अपमान सोसावा लागतो, तसेंच विषयोपभोगाच्या बाबतींत शुक्राचीहि अवहेलना झालेली आहे. कोणत्याहि उपायानें अर्थ हा पुरुषार्थ (!) साधावा, तसा विषयोपभोगच नव्हे तर एकूण काम हा पुरुषार्थहि कसाहि भागवावा, अशी स्थिति सध्यां आपण आपल्याकडे पाहातो. मनुष्याला स्वास्थ्य लाभायला गृहस्थाश्रमाची बरीच मदत असते. या दृष्टीनें पाहातां गृहस्थाश्रमाला 'धन्यो गृहस्थाश्रमः' हे म्हटलें तें उगाच नाहीं. विषयोपभोगाची खरी तयारी पूर्वीच्या आश्रमांतच, लग्न करण्यापूर्वीपासूनच, होत असते. सोव्हिएट सरकारनें नोकरीची, पगाराची, रजेची, विकासाची हमी देऊनच लग्न न करणावर कर सुरूं केला आहे. कारण, केवळ तो लग्न करीत नाहीं म्हणून "कर दे" असें कायद्यानें म्हणण्याची हिंमत कोणत्याहि सरकारच्या अंगीं येत नसते. कुटुंबसंस्थेला जास्तींतजास्त स्थिर करण्याचा हा पवित्र मार्ग आहे. लहानपणापासून पद्धतशीरपणें वाढविलेल्या तरुणांना देशाचें हें आव्हान आनंदानें स्वीकारता येतें. उत्कृष्ट संतति हा त्याचा परिणाम होत असतो. शुक्राच्या बाबतींत वेगोदीरण आणि वेगरोधहि होण्याचें टळतें. वेळेवर लग्न करण्याच्या व्यवस्थेनें मनःस्वास्थ्य तर लाभेंतच पण संस्कृतीला काळिमा फासणारे वेश्याव्यवसाय, गर्मी, परमा यासारखे रोग समूळ नाहींसे करण्यांत सो. सरकारनें जगांतील अद्वितीय यश मिळविलें आहे.

गर्मी, परम्यासारखे रोग केवळ पुस्तकांत मिळतात

मास्कोच्या मेडिकल कॉलेजांतील पाहाणींत गर्मीचे रोगी विद्यार्थ्यांना केवळ चित्रांतून नि पुस्तकांतूनच पाहावयास मिळतात हें प्रत्यक्ष समजल्यावर आम्हांस एक विलक्षण आनंदाश्चर्याचा धक्का बसला. घटस्फोटासाहि कायदा सोव्हिएटनें फारच कडक ठेविला आहे. कुटुंबसंस्था स्थिर करणें आणि स्वेच्छाचाराला पायबन्द घालणें हा त्यांतील मुख्य उद्देश आहे. केवळ लग्नाच्या कायद्यानें सो. रशिया हा तिसरा स्तंभ पक्का करण्याची अपेक्षा करून बसलेला नाहीं. पहिल्या दोन संततीनन्तर तिसऱ्या संततीपासून आईला एक मोठी रक्कम सुरवातीस, आणि प्रत्येक महिन्याला मुलाच्या संगोपनासाठीं पगारांत वाढ, अगर कांहीं रक्कम देण्यांत येते. पुढच्या पुढच्या संततीला ह्या रकमा वाढत जातात. 'अष्टपुत्रा' होण्याच्या आशिर्वादांत केवळ समाजधारणेचा उद्देश नव्हता तर वैद्यशास्त्राच्या महान् तत्त्वाला त्यांत श्रद्धांजली होती. अधिक संतति हें वैभवाचें लक्षण, आणि तसें तें सो. रशियांत प्रत्यक्षांत वीरमाता (Mother Heroine) हा किताब देऊन व्यक्त केलें जातें. स्त्रीच्या जीवनांत मूल हें महान् क्रांतिकारक आणि सौभाग्यनिदर्शक असतें. अधिक मुलें झाल्यास त्यांच्या संगोपनाची आणि सर्वांगीण विकासाची जबाबदारी सरकारनें घ्यावी लागते. संततिनिरोधन पाप असो कीं नसो पण वैद्यशास्त्र फार मोठा विचार करूनच त्यास संमतिदर्शक मान डोलाविल, अशा एकूण व्यवस्थेंत तेथील जननसंख्या वाढत आहे, मृत्युसंख्या घटत आहे, आणि तेथील जनता दीर्घायुष्याचा आनंद लुटीत आहे. तर आमचे देशांत आर्थिक बाबतींत चिंता, विषयोपभोगाचे बाबतींत

चिंता, सर्वत्र चिंताच चिंता. चिंता ही स्वास्थ्याला विघातक आहे. केवळ स्वास्थ्याची व्याख्या तालावर म्हणून कार्यभाग होणार नाहीं. मन प्रसन्न राहाण्यावर स्वास्थ्याचा भाग फार अवलंबून स्वास्थ्य संभाळण्यास शरीरधातूंचें संगोपन आणि त्याहि अगोदर म्हणजे आहारविहारापासून संभाळावे लागतात.

येथें रात्रींचीं चिकित्सागृहें आहेत

स्वास्थ्य-संरक्षणाकडे इतकें लक्ष असल्यानें सर्वच रोगराईचें प्रमाण खालीं घसरलें आहे. साधारण दवाखान्यांतून थंडीच्या कडाक्यानें होणारे लहान सहान सर्दीसारखे विकार उपचारास स्वास्थ्यामुळें जसें रोगांचें प्रमाण कमी होतें तसें रोगांतूनहि पुनः स्वास्थ्याकडे शरीर लौकर येतें. कर्मांच्या तडाख्यांतहि मनुष्य फारसा सांपडत नाहीं. प्रतिश्यायांतून खोकला आणि खोकल्यांतून क्षयाची आपत्ति, ही घातक परंपरा टाळण्यासाठीं स्वास्थ्य-संरक्षणाच्या योजनेंतच रात्रीचें चिकित्सागृह(Night Sanatoria) यासारख्या योजना आहेत. या योजनांच्या योगानेंच या अवस्थेंतच दोष जिंकण्यांत येतो. विशिष्ट वातावरणांत राहिलेला मनुष्य सकाळपर्यंत पुष्कळसा बरा होतो. पुनः तो कामावर जातो. रात्रीं चिकित्सागृहांत येतो. पुनः सकाळपर्यंत आणखी सुधारतो. अशा रीतीनें ‘व्यथा असुनी उपाय न असें मूर्खत्व तेथें अंगावर पडत नाहीं, उपचार करून न घेणें हा तेथें गुन्हा ठरतो. वेळेवर केलेल्या रुग्णाची शक्ति खर्चीं पडत नाहीं, ओजक्षय होत नाहीं. सरकारचा म्हणजे परंपरेनें जनतेचा खर्च अशा सारख्या अनेक अवाढव्य योजना मुळांतच रोग नाहींसा करण्यासाठीं नेहमीं सुसज्ज असतात. अशा रात्रींच्या चिकित्सागृहांत आम्हीं दिवसां गेलो तेव्हां “हें काय आहे” असें विचारून तें चिकित्सागृहच आहे ह्याची खात्री करून घ्यावी लागली, एवढा तेथें थाटमाट होता.

धूळ नाहींशी करणारीं यंत्रें बसविलीं आहेत

सर्वसाधारण स्वच्छता, चांगल्या संवयी, यासारख्या सुधारणांमुळें स्वास्थ्याची पातळी किती गेली आहे, या संबंधींच्या अनेक योजना सांगतां येतील. मास्कोसारख्या शहरांत धूळ नाहींशी करणारीं ठिकठिकाणीं लावल्यामुळें धूळ अजिबात नाहींशी झाली आहे. ही कल्पनाहि न करतां येण्यासारखी पण ही स्थिति भूतलावर प्रत्यक्ष चक्षुरिंद्रियांनीं वास्तव स्थितींत पाहावयास मिळाल्यावर माणसानें इंद्रपद मिळविल्यासारखें वाटूं लागतें.

रोग होऊं नये यासाठीं देशव्यापी उपाय

मलेरियासारखा रोग होऊंच नये यासाठीं प्रांतव्यापि, देशव्यापि, स्वास्थ्यानुवृत्तिकर उपाय सरकारनें केले आहेत. एकंदरींत रोगोपचाराची वेळच तेथें कमी प्रसंगीं येते. आज मलेरिया समूळ होऊन त्याच दलदलीच्या प्रांतांत दुर्बलाला जिंकून शेतीसाठीं सुपीक जमिनी तयार झाल्या आहेत. नांतून डी. डी. टी.नें प्रान्तोप्रान्त, जंगलेच्या जंगलें, शिंपून टाकून मलेरियाला मूठमाती देण्याची कोणत्या सरकारला येते ?

समाजशास्त्राचें औषध अधिक गुणकारी आहे

सो. रशियांत रोग नाहींतच असें नाहीं. हृदयाचे रोग, कॅन्सर, यासारखे रोग अजूनहि शास्त्रज्ञांना डोकें खाजवावयास लावीत आहेत, पण प्रमाण फार कमी आहे. सर्वेऽपि सुखिनः संतु सर्वे निरामयाः । या आर्यांच्या घोषणेची नौबत आपल्या पूर्वजांनीं उंच स्वरांत वाजविण्याची हिंमत धरली

ही हिंमत केवळ वैद्यशास्त्राच्या प्रगतीवर अवलबून राहात नसते. आपले पूर्वज अभ्युदय आणि निःश्रेयस यांच्या सुपीक प्रदेशामधील ठसठशीत वैद्यशास्त्राच्या टेकाडावर उभे राहून ही नौबत झडवीत होते. क्षय, हृद्रोग या रोगांचीं कारणेंहि सोव्हियत शास्त्रज्ञ केवळ वैद्यशास्त्राच्या खोलीत बसून शोधित नाहींत. 'समाजशास्त्राचें औषध अधिक गुणकारी करून त्यांना या बाबतींत यश येणार आहे. सो. रशियांतील मानस रोगांचेंहि प्रमाण इतर प्रगत (!) देशांच्यापेक्षां कल्पनातीतपणें खालीं घसरलें आहे, याचें इंगित हेंच आहे.

सरकार तान्ह्या मुलांना जपत असतें

तान्ह्या मुलांना जपण्याची, त्या वयापासून त्यांच्यावर स्वास्थ्याकरितां लोखंडी स्नायू आणि पोलादी नस होण्यासाठीं सरकार करण्याचा तेथील वैद्यक फार कटाक्ष पाळितें. कोणाला मरू द्यावयाचें नाहीं हा तेथील समाजाचा मोठा बाणा. अपुऱ्या दिवसाच्या जन्मलेल्या मुलांना आटोकाट प्रयत्न करून ते वाढवितात व लौकरच स्वास्थ्याला आणतात. अशापैकीं कांहीं मुलें वयांत आल्यावर कोणी किती मोठ्या हुद्यावर चढलीं आहेत हें त्या हॉस्पिटलच्या भेटींत आम्हांस दिसून आलें. लहान मुलांची मालिश जणूं आपल्याकडील आजीबाई जशा करतील त्याचप्रमाणें करीत असतांना दिसलें. मुलांना मानवी दूध शक्यतोंवर आईचेंच एक वर्षपर्यंत पाजण्याची त्यांची प्रथा आहे. एकंदरींत बालोपचारणीय पद्धति स्वास्थ्यानुकूल, सात्म्याचा विचार करून ठरविलेली अशी आहे.

ज्ञानेंद्रियाची जोपासना केली जाते

असात्म्येंद्रियार्थसंयोग टाळण्यासाठींहि शास्त्रीय पद्धतीचा पुरेपूर उपयोग येथें करतात. सूर्याकडे कधींच पाहूं नये म्हणणाऱ्या आयुर्वेदाच्या देशांत आजकाल विजेच्या दिव्याचे ठायीं ठायीं सूर्य निर्माण होत आहेत, आणि दृष्टीला अपाय करणारा प्रकाशाचा अतियोग मिथ्यायोग सरसहा चालू आहेत. दिव्यांची व्यवस्था कशी असावी, ते डोळ्यांवर येऊं नयेत, ज्योत लपलेली असावी (Consealed Lights) उजेड सौम्य पण सोईचा असावा अशा अनेक तऱ्हांनीं इंद्रियांच्या शक्तींची जोपासना कसोशीनें करता येते.

म्हाताऱ्यासाठीं आश्रम आहेत

स्वास्थ्याच्या दृष्टीनें विचार फार मोठा आहे. सर्वच सांगत राहिलें तर वेळ पुरणार नाहीं. आतां जसें बालपणाविषयीं सांगितल तसें म्हातारपणाबद्दलहि थोडें सांगतो. सो. सरकारनें वृद्धांसाठीं वानप्रस्थाश्रम काढलेले आहेत. 'वृद्धस्तावत् चिंतामग्नः' या गोष्टीला बराचसा शह या आश्रमांच्या योजनेनें बसला आहे. आजकाल सर्वसामान्य हलाखीच्या स्थितीमुळें इतरत्र तरुणपणींच चिंतामग्न व्हावें लागतें.

सो. सरकारनें मात्र ज्यांना ह्या आश्रमांत प्रवेश हवा असेल त्यांना तो देण्याची व्यवस्था ५५ वर्षें वयानंतरच्या माणसांसाठीं केली आहे. अशा एका Old peoples' House मध्यें आम्ही गेलो. तेथील व्यवस्था पाहिल्यावर एकदां लवकर म्हातारे होऊन येथें येऊन राहावें आणि मरण मात्र कधींच येऊ नये असें वाटूं लागलें. एका म्हाताऱ्या चित्रकाराशीं मुद्दाम मी परिचय करून घेतला. त्यानें त्याचा अनुभव सांगतांना असें सांगितलें कीं, येथें येतांना मी फार विवंचनेंत पडलो होतो; कारण ह्या सर्व म्हाताऱ्यांत आपला निभाव कसा लागणार ? पण मेल्यावर मी ह्या सर्व सुखांना अंतरणार अशी चिंता लागली आहे.

लूटबाजीचें वातावरण गेलें पाहिजे

सो. रशियाचा समाज, आहार, शयन आणि ब्रह्मचर्य-जीवनाचा आस्वाद ज्या श्रेणीनें अनुभवतो हे सर्व पाहिल्यावर वाटतें कीं, आपल्यांकडील सर्व शास्त्रें खरोखरी महान् संस्कृतीच्या वटवृक्षाला फार चांगलें

खत म्हणून मानवेल. पण त्या वृक्षाचें बीज एखाद्या खडकावर पडावें तसें सध्यां झालें आहे. त्या वृक्षा वादीला ह्या शास्त्रांचा उपयोग होत नाहीं. शास्त्रवादीला आणखी एका शास्त्राची जरूरी लागते तें शा म्हणजे समाजशास्त्र. लौकरांत लोकर हें लूटबाजीचें भोंदूपणाचें वातावरण नाहींसें होईल तितकें लौ संस्कृतीची वाढ होईल आणि शास्त्रांचा विकास होईल.

यशाचें इंगित कशांत आहे ?

सो. शास्त्रज्ञांच्या मृतसंजीवनासारख्या [Rescuscitation] प्रयोगाला, स्थानिक संमोहन [Local anaesthesia] अन्ननलिकेच्या कॅन्सरच्या शस्त्रकर्माला, बिनावेदना प्रसूतीला (Painle Labour)सुयश येण्याचें इंगितहि तेथील केवळ वैद्यशास्त्राच्या प्रगतींत नाहीं, तर एकंदर समाज व्यवस्थेंत आहे. तेथील मानवांची शारिरिक नि मानसिक प्रकृति वैद्यशास्त्राच्या यशाला फार अनुकूल आ उदाहरणादाखल सुलभ प्रसूतीचें शास्त्र थोडक्यांत पाहूं.

समाजशास्त्रांत याचें उत्तर आहे

सुलभ प्रसूतीचा शोध पाहिल्यावर अखेर असें वाटतें कीं, हा कांहीं वैद्यशास्त्रांतील शोध नव्हे बाईला तिच्या जन्मापासून मिळणारें अन्न, उत्साही वातावरण, वेळेवर लग्न, जीविताची शाश्वती, मूल झाल्या बाक्षिस, मुलाच्या संगोपनासाठीं नियमित मदत, प्रकृतीची व्यवस्था, सूतिकासदनांतील प्रेमभावाचें वातावर ह्या आणि अशा सारख्या शारीरिक स्वास्थ्याच्या आणि मनाला प्रसन्न, उत्साही ठेवणाऱ्या वातावरणानें ति सुखानें प्रसूति होते. विचार करा की, सुलभ प्रसूति हा वैद्यकीय शोध आहे कीं समाजशास्त्रीय आ सोव्हिएटच्या सर्वच क्षेत्रांतील यश तेथील समतावादाच्या वातावरणावर अवलंबून आहे. सर्वसामान्य अनुकू परिस्थितीबरोबरच बाईला प्रसूतिसंबंधीं शिक्षण, कांहीं व्यायाम वगैरे शिकविण्यांत येतात, नाहीं असें नाहीं, प तेथील डॉक्टरांच्या मुलाखतींत आणि सुलभ प्रसूतीच्या प्रात्यक्षिकामध्यें त्यांनीं ही गोष्ट स्पष्ट केली कीं, या वैद्यकीय शास्त्राच्या भागापेक्षां समाजस्थिति–सोशियालिझमचा भाग अधिक आहे.

सध्याचें वातावरण अनुकूल नाहीं

आयुर्वेदासंबंधीं मीं मास्को येथें जें जाहीर व्याख्यान दिलें त्यांत मी हा मुद्दा स्पष्ट केला आ कीं, आयुर्वेदाची प्रगति समाजवादामध्येंच होऊं शकेल. कारण त्याला सध्यांचें वातावरण अनुकूल नाहीं स्वास्थ्याचे नियम जेव्हां सर्व समाजांत बिनबोभाट पाळले जाऊन अंगवळणीं पडतील तेव्हांच आयुर्वेद उपचारहि लोकांना चांगले लागू पडतील. व्याख्यानांतील आयुर्वेदासंबंधीचे मुद्दे तेथील डॉक्टरांना फार प पडले. हा वरील मुद्दा सर्वांत अधिक पटला कीं, समाजांतील पिळवणूक बंद झाली, तरच संस्कृति आणि शा आपलीं खरीं स्वरूपें प्रगट करूं शकतात.

मास्को येथें झालेलें व्याख्यान पाठविणार

(व्याख्यात्यांनीं व्याख्यानाच्या ओघांत, विषयाच्या सप्रसंग–संगतीनें अनेक उदाहरणें देऊन विष खुसखुशीत, पण त्याचबरोबर उद्‌बोधकपणें स्पष्टीकरण करून सांगितला. व्याख्यानाचा सर्वच वृत्तांत ह्या वा देतां आला नाहीं याबद्दल वाचक क्षमा करतील अशी आशा आहे. मास्को येथें त्यांचें झालेलें आयुर्वेदाव व्याख्यान, आयुर्वेद पत्रिकेंसाठीं ते प्रसिद्धीला देणार आहेत. व्याख्यानाच्या शेवटीं वैद्यकीय विषयाव आणि इतर सामाजिक जीवनासंबंधीं प्रश्नोत्तरांचाहि कार्यक्रम फार करमणुकीचा आणि माहितीपूर्ण अ झाला.)

बॉम्बे मेडिकल असोसिएशन-आयुर्वेदिक-चें

-- द्वितीय वार्षिक स्नेह संमेलन --

बॉम्बे मेडिकल असोसिएशन-आयुर्वेदिक - या संस्थेचें द्वितीय वार्षिक स्नेहसंमेलन रविवार दिनांक १३।३।५५रोजीं सायंकाळीं मुंबईतील ब्राह्मण-सभेच्या हॉलमध्यें अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणांत पार पडलें. ही संस्था बॉम्बे स्टेट फॅकल्टी ऑफ् आयुर्वेद-च्या पदवीधरांची (डी. ए. एस्. एफ्.) प्रातिनिधिस्वरूप प्रबळ संघटना आहे. मुंबईतील स्थानिक तसेंच मुंबई प्रांतांतील विविध गांवाहून आलेल्या वैद्यबंधूंनीं या संमेलनांत मोठ्या संख्येनें आणि उत्साहानें भाग घेऊन संमेलन यशस्वी केलें.

आयुर्वेदाची अधिकाधिक सेवा

सभेचे नियोजित अध्यक्ष वद्य पंडित हरिदत्तजी-शास्त्री यांना अचानकपणें आयुर्वेदक्षेत्रांतीलच महत्वाच्या कामासाठीं बनारसला जावें लागल्यानें, ते उपस्थित राहूं शकले नाहींत. संमेलनासाठीं आलेला त्यांचा शुभसन्देश मंत्र्यांनीं वाचून दाखविला. आपल्या असमर्थतेबद्दल त्यांनीं दिलगिरी व्यक्त केली, व वैद्यबंधूंचें हें सम्मेलन यशस्वी होऊन या संघटनेद्वारा आयुर्वेदाची अधिकाधिक सेवा होईल, असा विश्वास प्रकट केला.

विश्वसनीय औषधें मिळत नाहींत

तदनंतर वैद्यबंधूंच्या अनुभवांतील आयुर्वेदिक चिकित्सेनें बऱ्या झालेल्या कांहीं विशेष रोग्यांबद्दलची अभ्यासपत्रें वाचण्यांत आलीं. नंतर असोसिएशनचे अध्यक्ष वैद्य नवनीतलाल शहा, डी. ए. एस्. एफ्. यांनीं आपल्या भाषणांत या वैद्यांसमोरील विविध समस्यांचा परामर्श घेतला. ते म्हणाले, “सरकारी दवाखान्यांत नोकरी मिळण्याचा असंभव, मिळाल्यास योग्य मासिक वेतनाचा अभाव इत्यादींनीं वैद्य सदैव आर्थिक चिंतेनें ग्रासलेले असतात. आधुनिक वैद्यकाचा किंवा आयुर्वेदाचा सखोल अभ्यास करण्याची योग्य संधि आम्हांला मिळत नाहीं. आयुर्वेदाच्या उच्च शिक्षणासाठीं योग्य असा शिक्षणक्रम नाहीं. खाजगी व्यवसायांत योग्य किंमतींत विश्वसनीय आयुर्वेदिक औषधें मिळूं शकत नाहींत. अशा विचित्र अडचणींनीं वैद्यबंधू गांजलेले आहेत. या सर्व अडचणींचें त्वरित निवारण झालें पाहिजे. स्टॅण्डर्ड आयुर्वेदिक औषधांच्या निर्मितीची जबाबदारी सरकारनेंच घ्यावी आणि वैद्यांना किमान दरांत विश्वसनीय औषधें पुरवावीं, अशी त्यांनीं सरकारला आग्रहाची विनंति केली. शेवटीं ते म्हणाले, डायरेक्टर ऑफ आयुर्वेदच्या नवानिर्मित स्थानावर नियुक्त पंडित हरिदत्तजी, हे सर्व प्रश्न कौशल्यानें सोडविण्यांत यशस्वी होतील, असा आम्हांस विश्वास वाटतो.”

एका विज्ञानाच्या पदवीधराशीं तुलना

वार्षिक अहवाल वाचतांना वैद्य पूर्णानन्द अवस्थी यांनीं, सरकार आणि अन्य संस्थांबरोबर गेल्या वर्षांत झालेला पत्रव्यवहार वाचून दाखविला. ते म्हणाले, “डी. ए. एस्. एफ्. वैद्यांना आयुर्वेद व ॲलोपाथी या दोन्ही विज्ञानाचें ज्ञान असल्यामुळें आमची तुलना कोणत्याहि निव्वळ एका विज्ञानाच्या ग्रॅज्युअेटस्शीं करणें अन्यायाचें आहे. सरकारला हें आम्ही वारंवार सांगितलें, तरीही याचा विचार न करतां एल्. सी. पी. एस्. डॉक्टरांच्या तुलनेनें आमच्या वैद्यांना बी. एम्. एस्. वर्ग ३ (आ.) मध्यें अत्यंत कमी पगारावर नेमलें जातें. आम्हाला दोन्ही विज्ञानांचें पर्याप्त ज्ञान आहे, आणि आमच्या नेमणुका अत्यन्त गैरसोयीच्या खेड्यांत केल्या जातात याचा विचार करून सरकारनें वेतनांत वाढ करावी. अशी अनेकवारे मागणी केली गेली. परन्तु याचा सहानुभूतिपूर्वक विचार न करतां शेवटीं सरकारकडून हेंच उत्तर मिळालें कीं, डी. ए. एस्. एफ्. वैद्यांचें ज्ञान एल्. सी. पी. एस्. डॉक्टरांपेक्षां कमी असल्यामुळें वेतनांत वाढ करतां येणार नाहीं.

भेदभावानें वागविण्यांत येतें

हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे कीं, बी. एम्. एस्. वर्ग ३ मध्यें एल्. सी. पी. एस्. डॉक्टराला १२० रु. पासून मासिक वेतन सुरूं होतें. तालुक्याच्या शहरांत नेमणूक होत असल्यानें खाजगी व्यवसायालाहि चांगला वाव असतो. उलट त्याच जागेवर डी. ए. एस्. एफ्. वैद्याला ८० रु. वेतन सुरूं होतें आणि त्याला गैरसोयीच्या छोट्या खेड्यांत पाठविण्यांत येतें.

आपल्या भाषणाच्या शेवटीं त्यांनीं या सर्व अन्यायांची दाद लावून घेण्यासाठीं आपणाला अखिल भारतीय स्वरूपांत एकच सामर्थ्यशील संघटना उभारण्याची आवश्यकता आहे, असें सांगितलें.

डॉक्टरांच्या नादी लागूं नका

नियोजित अध्यक्षांच्या अनुपस्थितींत वैद्य श्री. मो. य. लेले, डी. ए. एस्. एफ्. आयुर्विद्यापारंगत प्रिन्सिपाल पोदार आयुर्वेदिक कॉलेज आणि सुपरिंटेंडंट पोदार हॉस्पिटल-मुंबई, यांनीं अध्यक्षस्थान विभूषित केलें. आपल्या अध्यक्षीय भाषणांत ते म्हणाले, "वैद्यांनीं आधुनिक डॉक्टरांच्या नादीं न लागतां, आयुर्वेदाचें अधिकाधिक सखोल अध्ययन आणि उपयोग केला पाहिजे. भारताच्या आरोग्यासाठीं आयुर्वेद हेंच अत्यंत उपयुक्त आणि गंभीर शास्त्र आहे आणि त्याद्वारां समाजसेवा करण्यासाठीं वैद्यबंधूंना सतत अध्ययनशील राहिले पाहिजे."

नवीन वर्षासाठीं कार्यकारी मंडळ

तदनंतर वैद्यांची सर्वसाधारण सभा होऊन नवीन वर्षासाठीं कार्यकारी मंडळाचे सदस्य निवडण्यांत आले. शेवटीं राष्ट्रगीत झाल्यानंतर हें उत्साहपूर्ण द्वितीय संमेलन समाप्त झालें.

* * *

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं
आयुर्वेदिक व युनानी वनौषधि
तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण !

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार, गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राह्मी, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य ! विशेष माहितीसाठीं आमचे साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६
टेलिग्रॅम-आयुर्वेद

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी
२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

निम्ब-पीयूष, माझे अनुभव

[लेखकः — वैद्य मुकुंदराव अंबादास गायकवाड, १११ उत्तर कसबा, सोलापूर]

कडुनिंबाचे वृक्षांतून कांहीं कांहीं वेळीं जो जलस्राव होतो त्यास निम्बपियूष, हें नांव सार्थ वाटतें. प्रचारांत यास कडुनिंबाची गंगा, झाड रडूं लागलें, निंबमदस्राव, निंबनीरा असेंहि म्हणतात. नारळी, शिंदी वगैरेपासून ज्याप्रमाणें नीरा मिळते तद्वतच कडुनिंबापासून स्रवणारा हा द्रव मिळवितां येतो. फरक इतकाच कीं, सिंदी वगैरेचीं झाडें नीरा काढून घेण्यालायक मोठीं होऊन तीं भरास आलीं म्हणजे त्यापासून सतत कांहीं दिवस नीरा काढून घेतां येते, तसें कडुनिंबापासून सध्यांतरी शक्य दिसत नाहीं. पण शिंदी-नारळी-प्रमाणेंच हीहि गोष्ट शक्य कोटींतील आहेसें वाटतें. यासंबंधीं प्रयत्न व संशोधन होणें जरूर आहे.

कोणतीं झाडें स्रवतात?

सर्वसाधारणतः पहाण्यांत असें आलें आहे कीं, कडुनिंबाचें ५ वर्षांपुढचें वाढ झालेलें झाड म्हणजे सुमारें एक फूट व्यासाचा बुंधा किंवा खोड असलेलें झाडांतून हा स्राव झालेला आढळून आलेला आहे, तर केव्हां केव्हां जुन्या ३० वर्षांचें पुढें झाडांतून म्हणजे ज्याचा बुंधा सुमारें अडीच तीन फूट व्यासाचा आहे अशांतूनहि हा स्राव झालेला बघण्यांत आहे. यांत एक मात्र असें दिसून येतें कीं, जीं झाडें पाण्याचे जवळपास किंवा जमिनींतील मोठे झरे जेथें अगदीं नजीक ज्या निंबवृक्षास आहेत, तींच झाडें बहुतेक अशी स्रवलेलीं आढळलीं आहेत.

स्राव कोठून होतो? केव्हां होतो?

निंबाचे मोठे फांदीस तडा गेल्याप्रमाणें होऊन तेथून हा स्राव होत असलेला आढळतो. शिवाय हा स्राव बहुधा थंडीचे दिवसांत होत असलेला पहाण्यांत येतो. थंडीचे दिवसांत निसर्गनियमाप्रमाणें झाडांच्या शाखी व काष्ठभाग तडकतात. आकुंचनामुळें झाडांमधील द्रवभागावर दाब जास्त होऊन जवळपासच्या काष्ठचिरणीमधून किंवा मऊ झालेल्या काष्ठभागांस भेदून छिद्र पाडून बाहेर येतो.

या स्रावाची चव मधुर, थोडीशी कडवट आणि कडुनिंबाचा ठराविक वास येत असलेली असते. अर्थातच पिण्यास हा द्रव रुचकर व गोड असतो. पहाटे किंवा सूर्योदयापूर्वी हा प्याल्यास फारच उत्कृष्ट लागतो. याची थंडगार व मधुर रुचि ज्यानें एकदां कां चाखली असेल त्यास त्याची पुनः पुनः आठवण होईल अशा तऱ्हेची लज्जतदार असते.

या द्रवाचें पृथःकरण

रसायनशास्त्र- कोविदांनी या द्रवाचें पृथःकरण करून पुढील निष्कर्ष काढला आहे. या पाण्यांत ग्लूकोज, सुक्रोज, डिंक आणि रंजक पदार्थ आहेत. ही माहिती आयुर्वेद पत्रिकेच्या १६ एप्रिल १९४९ चे अंकांत कडुनिंबाचे लेखांत मी मागेंच प्रसिद्ध केलेली वाचकांना आठवत असेलच. याशिवाय या द्रवांत कॅल्शियम, लोखंड, फास्फेटस् हेंहि सूक्ष्म प्रमाणांत आढळले आहेत. कडुनिंबांतील रसायनधर्माचें द्रव्यहि यांत विद्रुत स्थितींत भरपूर आहे.

द्रवाचा टिकाऊपणा

हा कडुनिंबस्राव टिकाऊ आहे. नासत सडत नाहीं, पण काढून घेतल्यानंतर ३ ते ६ तासांनीं रूपांतर पावतो. नारळी, सिंदीचे नीरेप्रमाणेंच यांतील शर्करेचें रूपांतर होऊन हें निंबपीयूष आंबट चवीचें होतें. त्याचा मधुरपणा लोप पावतो.

या सर्व गुणधर्मावरून असें वाटतें कीं, नारळी, सिंदीचे नीरेप्रमाणेंच कोणत्याहि कडुनिंबाचे झाडापासून आपणांस हें पीयूष मिळवितां येईल. अर्थात् नीरा काढण्याच्या पद्धतीप्रमाणेंच झाडाची वाढ, वय, जलसान्निध्य इत्यादि गोष्टी लक्षांत घेणें जरूर आहे.

निम्बपीयूष मिळवण्याचा प्रयोग

सन १९५० सालीं कांहीं सहकारी बरोबर घेऊन मी सोलापूरचे जवळच असलेल्या खेड्यानजीकचे रानांत स्रवत असलेल्या कडुनिंबापासून द्रव मिळवण्याची खटपट केली होती. अर्थात् हें झाड स्रवत असल्याची बातमी 'सोलापूर समाचारांत' प्रसिद्ध झालेली होती. रात्रीं ८-८॥ चे सुमारास या झाडाजवळ जाऊन बुंध्यास जेथून स्राव होत होता तेथें थोडीशी खांच घेऊन एक टिनपॉट बांधून टाकलें आणि पहाटे पुनः जाऊन पहातां डबडें भरून द्रव गळत होता. वस्त्रगाळीत करून मेजरग्लासनें मोजून पहातां द्रव सुमारें २ शेर भरला. आम्हीं चौघेजण होतो प्रत्येकीं पावशेर द्रव घेतला. थंडगार, गोड असा तो द्रव घेऊन सुमारें अर्ध्यापाउण तासानें आम्हांस अतिशय हुशारी, तरतरी व श्रमपरिहार वाटला. हा उत्साह दिवसभर टिकला. अशाप्रकारें सतत चौदा पंधरा दिवस आम्हांला या अमृताचा लाभ झाला. खरोखर नवजीवन मिळाल्याप्रमाणें झालें. आम्हां सर्वांच्या किरकोळ शारीरिक तक्रारी तर केव्हांच पळाल्या, पण रोग्यावर प्रयोग करून पहातां त्याचे पुढील गुणधर्म प्रकट झाले.

उरःक्षत-क्षयघ्न धर्म

खोकल्यानंतर बेडका घट्ट व तांबडालाल, छातींत पोळल्याप्रमाणें तीव्र वेदना, दम लागणें, कृशपणा, ज्वर, मंदाग्नि अशा लक्षणांचा क्षतक्षीण रोगी, त्यास हा द्रव सकाळीं एकच वेळ सुरवातीस १० तोळे व आठवडा झाल्यावर पाव शेर या प्रमाणानें दिला. या २ आठवड्याचे प्रयोगानें क्रमाक्रमानें त्यास बरें वाटून, व्याधिलक्षणें लुप्त झालीं, पण रक्त पडणें एकदम कमी झालें नाहीं. बेडक्यांतून कधींमधीं रक्त दिसत असे. पण रोग्याचा वर्ण सुधारला, उत्साह वाढला, मन्दाग्नित्व गेलें, कास-श्वासहि कमी झाला. पुढें त्यास खेड्यांत पाठविलें व ३ महिन्यांनीं कांहींहि औषध न घेतां उरःक्षत भरून आलें. रोगी आरोग्यसंपन्न बनून परत आला.

जीर्णज्वरावर प्रभाव

जीर्णज्वर, हाडीताप तर एकच सप्ताहांत चुटकीसारखा पळून गेला. हातापायाची रखरस, झोप नाहीं, भूक न लागणें, गळाठा, डोळ्याची आग, खोकला, दुपारीं व रात्रीं ज्वर भरणें, तहान वगैरे लक्षणें एक आठवडाभर रोज सकाळीं एकच वेळ निंबपीयूष दिल्यानें नाहींशीं झालीं.

नाळगूद (सर्वांगशोफ)

लघवी तांबडी व फार कमी होणें, तोंड, हात, पाय, पोट, कुल्ले यावर सुजेचा टोपसा फार व रोगी फिक्कट; सकाळचे वेळींतर भप्प सूज जिकडे तिकडे, शौचास खडा, थोडें जेवलें तरी पोट डांबरणें या विकारांतहि सकाळीं एकच वेळ निंबपीयूष दिलें, यासहि १५ दिवसांनीं गुण आला. सूज गेली, लघवी सुधारली.

प्रत्येकास १० ते १५ तोळे द्रव व जास्तीत जास्त २० तोळे द्रव दिला गेला आहे. इतका द्रव देऊन कांहींहि त्रास होत नाहीं.

अम्लपित्त व पोटदुखी

कडू आंबट जळजळीत व दांत कळकून जाणाऱ्या वांत्या जेवणानंतर होणें, सायंकाळीं ठसा गेल्याप्रमाणें पोटांत तीव्र वेदना, शौचास चिकट व रक्तामिश्रित आंव पडणें, अशक्तता, भ्रम, भोंवळ, घेऱ्या, कसेंहि अन्न खाल्लें तरी त्याचें अम्लपित्तांत रूपांतर, अशा स्त्रीरोगिणीसहि सकाळीं एकच वेळ निंबपीयूष दिलें. पोटदुखी तर तिसरे दिवशींच बंद झाली व वांती होणें, आंव पडणें आस्ते आस्ते १४-१५ दिवसांत थांबलें. या बाईस पोटांत गुबारा भरून छातींत कळा वेदना होत असत त्याहि कमी झाल्या.

बाळंतरोग

प्रसूतीनंतर एक महिन्यानीं एका बाईस फिकटपणा, ज्वर, मुखपाक, अतिसार, आमांशाप्रमाणें आंवरक्त पडणें इ० संग्रहणीसारखा दिसणारा आजार सुरूं झाला. तीस हें पीयूष १५।२० दिवस दिलें व त्यानें सर्व लक्षणें कमी झालीं.

वाळलेला निंबस्राव

पुढें माझ्याजवळचा निम्बपीयूषाचा सांठा संपुष्टांत आला, आणि झाडाचें स्रवणेंहि बन्द झालें. तेव्हां स्रवत होतें त्या झाडाजवळ जाऊन त्याचे खोडावर जे द्रवाचे ओघळ आले होते ते घट्ट होऊन पांढरा डिंकासारखा थर बसला होता व त्यास मुंग्या माशा लागलेल्या होत्या, तो डिंकासारखा भाग खरवडून आणला; पण त्याचा उपयोग करावयास मन धजेना व किळस वाटू लागली म्हणून त्याचा उपयोग केला नाहीं.

निंबसोमरस

एकंदरींत वेदकालीन सोमरसाप्रमाणें हा निंबसोम उत्साहवर्धक, रसायन, वाजीकर, बलपुष्टिदायक हृद्य, पांडु, संग्रहणी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मुखपाक, रक्तस्रावीरोग, अतिसार, प्रवाहिका, शूल, अम्लपित्त, सर्वांगशोफादि विकार घालविणारा असून आयुष्य वाढवणारा आहे. रसतः मधुर, तिक्त, शीतवीर्य, मधुरविपाकी आहे, अस माझा अनुभव आहे.

वैद्य जायदे प्रवासनिधि

हुबळीचे दन्तवैद्य जायदे यांच्या अमेरिका-प्रवासनिधीस नाशिक शहर वैद्य मंडळानें ५१ रु. व वैद्य-मण्डळाच्या सदस्यांनीं व्यक्तिशः ५० रु. मिळून १०१ रु. देणगी दिली आहे. याशिवाय नाशिक येथील आयुर्वेद सेवा संघानें १०० रु. दिले आहेत. याप्रमाणें नासिकमधून या निधीस २०१ रुपये देणगी मिळाली आहे. वैयक्तिक देणगीदारांचीं नांवें पुढें दिली आहेत.:—

१० रु. वै. वि. म. गोगटे	नासिक
५ ,, ,, बिंदुमाधव पंडित	,,
२ ,, ,, वि. ग. केळकर	,,
२ ,, ,, श्री. द. जळूकर	,,
२ ,, ,, मो. दा. पाटणकर	,,
१ ,, ,, वा. स. मराठे	,,
१ ,, ,, पु. न. पाटणकर	नासिकरोड
१ ,, ,, व. ना. रानडे	नासिक
१ रु. वै. के. वि. मुळे	नासिक
१ ,, ,, वि. मो. दाते	,,
१ ,, ,, शं. सी. परचुरे	,,
१ ,, ,, श. शं. परचुरे	,,
१ ,, ,, त्र्यं. व. दाते	,,
१ ,, ,, दातारबंधु	,,
१ ,, ,, दि. कृ. देवधर	,,
१ ,, ,, पी. पी. टापर	,,
१ ,, ,, का. ह. कुळकर्णी	,,
१ ,, ,, शं. ज. कमोद	,,
१ ,, ,, ना. गो. गुणे	,,
१ ,, ,, श्री. कृ. करमरकर	,,
१ ,, ,, भा. भा. शुक्ल	,,
१ ,, ,, लुला परशराम	,,
१ ,, ,, पां. प्र. दाणी	,,
१ ,, ,, जे. एल्. रामैय्या	,,
१ ,, ,, शा. धों. कुलकर्णी	,,
१ ,, ,, वा. ना. आंबडेंकर	,,
१ ,, ,, लालचन्द बदलाणी	,,
१ ,, ,, मोहनलाल पंडित	,,
१ ,, ,, गो. गं. तरटे	,,
१ ,, ,, मथुराप्रसाद अग्रवाल	,,
१ ,, ,, न. शा. दाणी	,,
१ ,, ,, शं. य. मंगरूळकर	,,
१ ,, ,, ल. भा. काळे	,,
१ ,, ,, स. का. लवाटेशास्त्री	,,

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक या संस्थेचीं अत्यंत
गुणकारी औषधें दादर (मध्य रेल्वे) येथें
मिळण्याचें एक विक्रीकेंद्र
" गणेश औषधालय "
अबदुल कादर बिल्डिंग, दुकान नं. १३
हिंदमाता सिनेमासमोर, मुंबई १४

व्याख्यान देणाऱ्या वैद्यांना विनंति

सुमारें २।३ वर्षांपासून युनिव्हर्सिटी पुणें, या संस्थेनें वेगवेगळ्या विषयांचे तज्ञ आपल्या आवडीच्या अगर शास्त्रीय विषयावर व्याख्यानें देण्यासाठीं संस्थेच्या खर्चानें ठिकठिकाणीं पाठविण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें २ वर्षें झालीं. बऱ्याच ठिकाणीं बहिःशाल शिक्षणमंडळें स्थापन झालीं आहेत व युनिव्हर्सिटीचे खर्चानें त्या त्या ठिकाणीं व्याख्यानें होत आहेत. आतांपर्यंत झालेल्या व्याख्यानाच्या विषयांत आयुर्वेदीय वैद्यक हा विषय कोणीहि कोठें मांडलेला ऐकिवांत नाहीं.

या कार्याची पद्धति अशी आहे.:— व्याख्याते आपलीं नांवें, दर्जा, पुणें युनिव्हार्सिटीकडे कळवितात. आपण कोणत्या विषयावर व्याख्यान देणार तो विषय व विषयाची थोडक्यांत मांडणी, राहण्याचें ठिकाण, व्यवसाय वगैरे माहिती कळवून बाहेर गांवीं कोठेंहि व्याख्यान देण्यास तयारी आहे असें कळवितात. त्याप्रमाणें व्याख्यात्यांची विषयवार यादी ठिकठिकाणच्या बहिःशाल शिक्षणमंडळाकडे जाते. त्यावरून निवड करून व्याख्यात्यांना विनंति करतात. त्यांचा सर्व खर्च युनिव्हर्सिटी देते. तरी व्याख्यान देणाऱ्या वैद्यराजांनीं वरीलप्रमाणें आपलीं नांवें पुणें युनिव्हर्सिटीकडे लौकर सविस्तर माहितीसह कळवावीं व त्याची प्रत स्थानिक बहिःशाल मंडळाकडे पाठवावी.

वाचकांचा पत्रव्यवहार

१९५४ ची दिनदर्शिका

साधी परंतु उपयुक्त

“१९५४ ची आयुर्वेद सेवा संघाची दिनदर्शिका मला एका आयुर्वेदीय औषधी-विक्रेत्याकडून मिळाली व ती मला अनेक कारणास्तव आवडली. अजून ती माझ्या संग्रहीं आहे.

आजकाल एखाद्या नटीचें किंवा काल्पनिक स्त्रीचें उत्तानचित्र असलेल्या दिनदर्शिकाच सहसा दिसतात. आयुर्वेद सेवासंघानें साधी परन्तु अतिशय उपयुक्त दिनदर्शिका काढल्याबद्दल तो अभिनंदनास पात्र आहे.

या दिनदर्शिकेंत आयुर्वेद सेवा संघाच्या विविध कार्याविषयी माहिती, तारखाबरोबरच तिथी व सणवार दिल्यामुळें दिनदर्शिका उपयुक्त झाली आहेच, परन्तु वातप्रकृति लोकांचीं लक्षणें, त्यांनीं पाळावयाचे आरोग्यविषयक नियम व करावयाचे उपचार असल्यामुळें सामान्य माणसाच्या ज्ञानांत अवश्य भर पडली.

जागेच्या अभावीं कफ व पित्त प्रकृति लोकांची माहिती आपण दिनदर्शिकेंत देऊं शकला नाहीं, तरी आरोग्य--शालेचें माहितीपत्रक व १९५५ची दिनदर्शिका पाठविल्यास मी आपला आभारी होईन. ”

— म. रा. भावे, नागपूर

सेवा संघाची दिनदर्शिका

‘मला चालू सालची सेवा संघाची मराठी दिनदर्शिका त्यांत तिर्थांची माहिती असलेली पाहिजे. मराठी शाळांत त्यांचा फार उपयोग होतो.’

— सावंत, असनोटी [कारवार]

अचकूर ?

मी बारा वर्षांपासून ताम्रभस्म श्वेत एका पुटांत करण्याच्या प्रयत्नांत आहे. एक प्रयोग ऐकण्यांत आहे. त्यांत अचकूर नांवाची वस्तु लागते. मु. निलगिरी येथें १ तोळयास १॥ रुपयाप्रमाणें ती एकानें घेतली होती.

तिचे ३ प्रकार आहेत—पांढरी, तांबडी, आणि जांभळी. पांढरी पीठस्वरूपाची, बाकी दोन्ही खडे आहेत.

याची परीक्षा — शेणांत तो खडा ठेवला तर तो फुगतो व शेणांतून वाफा निघतात. सोलापूर, पंढरपूर, हैद्राबाद, गुलबर्गा येथें तपास केला पण वरील नांवाची वस्तु मिळाली नाहीं. नांव कानडी आहे कीं तेलंगी कळत नाहीं.

—ग. शं. वैद्य

आयुर्वेद की वर्तमान शिक्षणपद्धति

(लेखकः- वैद्य यादवजी त्रिकमजी आचार्य, मुंबई)

इस समय वैद्य-समाज में आयुर्वेद की शिक्षण-पद्धति (अध्ययन, अध्यापन-विधि) को लेकर खूब ऊहापोह —चर्चा चल रही है। कई वैद्यों का मत है कि शुद्ध (वर्तमान समय में उपलब्ध प्राचीन) आयुर्वेद का ही अध्ययन-अध्यापन होना चाहिए। इस प्रकार के शिक्षण को शुद्धायुर्वेद शिक्षण कहा जाता है। इस मतवालों में भी दो वर्ग-पक्ष हैं। एक वर्ग यह मानता है कि शिक्षण ग्रंथ-प्रधान ही होना चाहिए। अर्थात् चरक-सुश्रुत आदि संहिताग्रंथों को आद्यन्त जैसे हैं, वैसे ही पढ़ायें जायँ। वे कहते हैं कि विषय-प्रधान शिक्षण-पद्धति रखने से संहिता-ग्रंथों के कुछ विषय छूट जायँगे। दूसरे पक्ष का कहना है कि शिक्षण विषय-प्रधान होना चाहिए; क्योंकि चरक-सुश्रुत जैसे संहिता-ग्रंथों में विषय-क्रम ठीक नहीं सम्हाला गया है। एक ही अध्याय में ऐसे अनेक विषयों का संग्रह-सन्निवेश किया गया है, जिसका परस्पर सम्बन्ध नहीं है। उदाहरणार्थः- चरक विमानस्थान का ७ वा अध्याय। अतः विषयानुसार संहिता-ग्रंथों के वचनों का संग्रह करके विषय-प्रधान ग्रंथ बनने चाहिए और उसका अध्ययन-अध्यापन होना चाहिए। यह कार्य प्राचीन समय में भी हुआ है; उदाहरणार्थः— आयुर्वेद में माधवनिदान, व्याकरण में सिद्धान्त-कौमुदी आदि। नि० भा० आयुर्वेद विद्यापीठ ने कलकत्ते के छठे वार्षिक अधिवेशन में विषय-प्रधान पाठ्यक्रम बनाया और उसी के अनुसार अभीतक नि० भा० आयुर्वेद विद्यापीठ की परीक्षाएँ होती हैं। और वह इतना लोकप्रिय हुआ कि उसके अनन्तर भारत में जितने आयुर्वेद के विद्यालय-महाविद्यालय निकले, उनमें विषय-प्रधान शिक्षण ही रखा गया है; परन्तु इस पाठ्यक्रम के अनुसार विषय-प्रधान पाठ्य-ग्रंथ तैयार करने की ओर, नि० भा० आयुर्वेद विद्यापीठ ने या अन्य संस्थाओं ने कोई ध्यान नहीं दिया है। विषय-प्रधान पाठ्यग्रंथ तैयार न होने से अध्यापकों और विद्यार्थियों को बड़ी कठिनाइयों का अनुभव हो रहा है। गत कुछ वर्षों में कुछ विद्वानों ने कुछ विषय-प्रधान ग्रंथ लिखे हैं, परन्तु उनका यथेष्ट प्रचार नहीं हुआ है। मेरा मत है कि पाठ्यक्रम विषय-प्रधान रहना ही समयानुकूल है और विषय-प्रधान पाठ्यग्रंथ यथाशक्य शीघ्र बनाने चाहिए, जिससे अध्ययन-अध्यापन सुकर हो। शुद्धायुर्वेद और मिश्रशिक्षण दोनों के पक्षपातियों को अपना-अपना मत प्रतिपादन करने का अधिकार है। परन्तु अपना मत प्रतिपादन करते हुए दूसरे पक्ष पर आक्षेप या दूसरे पक्ष का उपहास करना अनुचित है। आयुर्वेद के अध्ययन-अध्यापन के विषय में मैं अपने कुछ विचार वैद्य-समाज के सामने रखता हूँ। आशा है कि दोनों पक्ष पूर्वग्रह-रहित होकर इस पर विचार करेंगे।

क्या हमारे वैद्य ऐसे है।

यह तो सब को स्वीकार करना पडेगा कि चिकित्सक वैद्य को अपने पास आये हुए सब प्रकार के साध्य रोगिओं की चिकित्सा करने में, उन्हें रोग मुक्त करने में, समर्थ होना चाहिए। क्या आज कल के हमारे वैद्य ऐसे है? यदि उनके पास मूढगर्भ, अवरुद्ध अन्त्रवृद्धि (Strangulated Hernia) जैसे शस्त्रसाध्य रोगी आएँ, तो उन्हें वे रोगमुक्त कर सकते हैं? इसका विचार सबको अवश्य करना चाहिए। इस समय शस्त्र-चिकित्सा तथा प्रसूति-कर्म का प्रचार वैद्यों में उठ-सा गया है। इसके अतिरिक्त वर्तमान समय में उपलब्ध संहिता-ग्रन्थों में जो शारीर उपलब्ध होता है, वह प्रसूतितंत्र और शल्य-शालाक्य पढाने के

लिए अपर्याप्त है। चरक-सुश्रुत और वाग्भट के टीका-ग्रन्थों तथा भावप्रकाश-टोडरानन्द आदि संग्रह-ग्रंथों को देखते ही मालूम होता है कि उनके समय में (इसवी सन १००० से १७०० तक में) पच्चीस-तीस संहिता-ग्रन्थ उपलब्ध थे। उन संग्रह-ग्रन्थों और टीकाग्रंथों में उद्धृत आर्ष वचनों में अनेक ऐसे विषय मिलते है जो चरकसुश्रुत और अष्टांगसंग्रह में देखने में नहीं आते। वर्तमान समय में उपलब्ध और मुद्रित भेलसंहिता और काश्यप-संहिता, जो दोनों खण्डित हैं, उनमें कई ऐसे नवीन विषय मिलते हैं, जो चरक-सुश्रुत में पाये नहीं जाते। कहने का तात्पर्य यह है कि वर्तमान समय में उपलब्ध आयुर्वेदीय साहित्य को संपूर्ण आयुर्वेद मान लेना ठीक नहीं है। इस समय ऐसा साहित्य तैयार करना चाहिए जिसके अध्ययन-अध्यापन से आयुर्वेदिक चिकित्सक सर्वप्रकार का चिकित्सा कार्य करने में क्षमता प्राप्त कर सकें। अर्थात् वर्तमान आयुर्वेद का प्रतिसंस्कार और बृंहण (न्यून विषयों की पूर्ति) करके आयुर्वेद का समयोपयोगी स्वरूप बनाना परम आवश्यक है। यह किये बिना आयुर्वेद और आयुर्वेदिक चिकित्सा को जीवित रखना कठिन कार्य है। संसार में वही प्राणी जीवित रह सकता है, जो नया खाता है और खाकर उसको हजम-आत्मसात्-कर लेता है।

आयुर्वेद का प्रतिसंस्कार और बृंहण—पूर्ति कैसे किया जाय, इस बारे में मैं कुछ विषयों पर अपने विचार दिग्दर्शनार्थ वैद्य-समाज के सामने रखता हूँ।

आयुर्वेदीय पदार्थविज्ञान

जैसे आधुनिक चिकित्साशास्त्र को ठीक समझने के लिए आधुनिक पदार्थ-विज्ञान (फिजिक्स और केमिस्ट्री) का ज्ञान आवश्यक है, उसी प्रकार आयुर्वेदीय दोष-धातु-मल-विज्ञान [शारीरक्रियाविज्ञान-फिजिओलॉजी], रोगविज्ञान (विकृतिविज्ञान-पॅथोलॉजी), द्रव्यगुणविज्ञान और-चिकित्साविज्ञान को ठीक समझने के लिये आयुर्वेदीय पदार्थ-विज्ञान का अच्छा ज्ञान होना आवश्यक है। चरकसुश्रुत में पदार्थविज्ञान के विषय का वर्णन किसी एक स्थान में स्वतंत्ररूप से नहीं आया है; परन्तु चरक में प्रधानतः सूत्रस्थान, विमानस्थान तथा शारीरस्थान में और सुश्रुत में प्रधानतया शारीरस्थान के प्रथम अध्याय में, पदार्थविज्ञान वर्णित है। संहिताकारों ने पदार्थविज्ञान विशेषतः वैशेषिक, न्याय और सांख्यदर्शन से लिया है। परन्तु उसको उन दर्शनों से अविकल न लेकर अपने आयुर्वेद के ढाँचे में बैठाकर और आयुर्वेदोपयुक्त बनाकर लिया है। इस विषय पर स्वतन्त्र ग्रंथ लिखनेवालों को यह बात अवश्य ध्यान में रखना चाहिये कि आयुर्वेदोक्त विषय को ही (विषय के आयुर्वेदोक्त स्वरूप को ही) मूल में स्थान देना चाहिए। अन्य दर्शनोक्त विचारों को नीचे टिप्पणी, अपने वक्तव्य, परिशिष्ट या उपोद्घात में स्थान दें। जब तक ऐसा ग्रंथ तैयार न हो, तब तक गत दस वर्षों में आयुर्वेदाचार्य पं. रामरक्षजी पाठक, आयुर्वेदालंकार पं. रणजितरायजी देसाई, वैद्यराज पं. बलवन्त शर्मा दीक्षित तथा श्री. काशीकरजी एम. ए. इन चार विद्वानों ने इस विषय पर जो ग्रन्थ लिखे हैं, उनमें से किसी एक का पाठ्यक्रमग्रन्थ और अन्यों को आलोच्य ग्रंथ के रूप में रखकर इस विषय को पढाना चाहिए। इस विषय के अध्ययन-अध्यापनार्थ सांख्यकारिका-तर्कसंग्रह जैसे ग्रंथ, जब तक इस विषय पर स्वतंत्र ग्रंथ नहीं बने थे, (उपलब्ध नहीं थे), तब तक पाठ्यग्रंथों में भले रखे गए हों, परंतु अब इनको पाठ्यग्रंथ में रखना उचित नहीं है। आधुनिक पदार्थविज्ञान में विस्तृत रूप से वर्णित प्रकाश ध्वनि, उष्णता, विद्युत् आदि विषयों से आयुर्वेदोपयुक्त अंश लेकर इस विषय की पूर्ति कर लेनी चाहिए।

शारीर

शारीर के इस समय दो विभाग किए जाते हैं–रचना–शारीर (एनेटॉमी) और क्रिया–शारीर (फ़िज़ियोलॉजी)। आयुर्वेद में (शारीर शब्द से प्रधानतः रचना–शारीर विवक्षित है) क्रिया–शारीर का वर्णन दोष-धातु-मल विज्ञान के रूप में किया गया है। चरक–सुश्रुत के शारीरस्थान में पदार्थविज्ञान, गर्भशारीर (एम्ब्रियोलॉजी), रचना–शारीर, कौमारभृत्य, प्रसूतितंत्र का कुछ अंश आदि कई विषयों का संग्रह किया गया है। इस समय संहिता–ग्रन्थों और संग्रह–ग्रन्थों में उपलब्ध रचना–शारीर, शल्य–शालाक्य और प्रसूतिकर्म के लिए पर्याप्त नहीं है। इस त्रुटि को दूर करने के लिए स्व० कविराज श्री गणनाथ सेनजी ने प्रत्यक्ष–शारीर तथा स्व० पी. एस. वारियर ने अष्टांगशारीर और बृहच्छारीर ये दो ग्रन्थ लिखे हैं। प्रत्यक्ष–शारीर का भारतवर्ष के अधिकांश वैद्यों ने पठन पाठन में उपयोग किया है, परन्तु महाराष्ट्र के कुछ वैद्यों ने इसके विरोध में आन्दोलन शुरू किया था। रचनाशारीर पढ़ाने के लिए जबतक इन दो ग्रन्थों से अच्छा ग्रन्थ तैयार न हो तबतक इन दो ग्रन्थों में से किसी एक को पाठ्यग्रन्थतया नियत करना चाहिए।

यह तो सब को सुविदित है और मानना पड़ेगा कि संहिताग्रन्थों में सिरा, धमनी, नाडी आदि शब्दों का अनेकार्थ में (एक से अधिक अर्थों में) प्रयोग हुआ है, तथा हृदय, नाभि, त्रिक आदि शब्दों कहीं मुख्यार्थ में तो कहीं अन्य अवयवों के उपलक्षणार्थ में भी प्रयोग हुआ है। इस त्रुटि को दूर करना परम आवश्यक है। इसका सही उपाय यही है कि वर्तमान संहिता – ग्रन्थों में जहाँ जहाँ ये शब्द आए हैं वहाँ-इस स्थल पर इस शब्द का यह अर्थ लेना चाहिए तथा भविष्य में लेखकों को इस शब्द का इस निश्चित अर्थ में प्रयोग करना चाहिए, यह निश्चय कर देना चाहिए। यह कार्य परम आवश्यक और प्रथम करने का है। शारीर संज्ञाओं के अर्थ निश्चय के विना नव साहित्य निर्माण में बड़ी कठिनाइयाँ उपस्थित होना तथा विभिन्न लेखकों के ग्रन्थों में विशृंखलता (असामञ्जस्य, एकता न रहना) आने की सम्भावना है।

दोष-धातु-मल-विज्ञान

आयुर्वेद में जीवित शरीर में होनेवाली सब क्रियाओं का वर्णन दोषों, धातुओं और मलों की क्रियाओं के रूप में किया गया है। अतएव आयुर्वेद में हृदय, मस्तिष्क, यकृत, फुफ्फुस, वृक्क आदि शरीरावयवों की क्रियाओं का विस्तृत वर्णन नहीं मिलता। आधुनिक चिकित्सा-शास्त्र में शरीर-परमाणुओं (सेल) से लेकर हृदय–मस्तिष्क प्रभृति प्रधान बड़े अवयवों की क्रियाओं का वर्णन विस्तार से किया गया है। आयुर्वेदोक्त दोषों, धातुओं और मलों की क्रियाओं के साथ समन्वय करके (अर्थात् हृदय, मस्तिष्क, यकृत आदि की यह क्रिया इस दोष द्वारा होती है यह बताकर), शारीर के स्थूल-सूक्ष्म अवयवों की क्रियाओं का वर्णन जिसमें हो, ऐसे नवीन ग्रन्थों के निर्माण की आवश्यकता है। अर्थात् आधुनिक क्रिया-शारीर में स्थूल-सूक्ष्म अवयवों की जो क्रियाएँ वर्णित हैं, वे अमुक दोष, धातु या मल द्वारा होती है, इनका विवरण इन ग्रन्थों में होना चाहिए और वे ग्रन्थ ही विद्यालयों में पढ़ाने चाहिए। (दोष-धातु मल विज्ञान और फ़िज़ियोलॉजी अलग-अलग पढ़ाना इष्ट नहीं है।) लेखकों और अध्यापकों को यह बात अवश्य ध्यान में रखनी चाहिए कि आयुर्वेद में वर्णित दोष, धातु और मल ये एक-एक स्वतंत्र द्रव्य नहीं है, किन्तु समान गुणकर्मवाले अनेक द्रव्यों के वर्ग (ग्रुप) है। सजीव मानव शरीर में उस समय के आयुर्वेद-प्रणेताओं ने जिन-जिन द्रव्यों का अनुभव किया था, उनका उन्होंने दोष, धातु और मल इन तीन प्रधान वर्गों में विभाग कर तथा प्रत्येक वर्ग के अनेक उपवर्ग बनाकर प्रत्येक वर्गोपवर्ग का पृथक्

वर्णन किया है। यथा—आयुर्वेद में वात-पित्त-कफ के जो पाँच-पाँच भेद वर्णित हैं, वे उनके उपवर्ग है। उपवर्ग भी समान गुण-कर्म करनेवाले अनेक द्रव्यों के वर्ग है। यथा—पाचक पित्त, आमाशयगत स्रा याकृत पित्त, अग्न्याशय (पॅंक्रियास) का स्राव और अन्त्ररस, इन चार का एक उपवर्ग है। अर्थात् चार द्रव्यों के समुदाय को आयुर्वेद में पाचक-पित्त नाम दिया गया है। इसी प्रकार रस-रक्तादि आर्तव आदि उपधातु और मूत्र-स्वेद आदि मलों के विषय में भी जानना चाहिए।

हमारे कई वैद्य भाई कहते हैं कि वात-पित्त-कफ, ये कोई टेस्ट-ट्यूब में डालकर प्रत्यक्ष दिखला की वस्तु नहीं, किन्तु शास्त्रगम्य और कर्मानुमेय वस्तु है। मैं कहता हूँ कि ये कालेजों में फिजियोलॉ पढ़ाते समय टेस्ट ट्यूब में डालकर विद्यार्थीयों को नित्य भिन्न-भिन्न नामों से दिखलाई जाती हैं। इन्हें का उसके समान गुणकर्मानुसार, 'आधिक्याद् व्यपदेशा भवन्ति' इस न्याय से दोष, धातु और मल तीन वर्गों में समन्वय—अन्तर्गत करके उनका आयुर्वेद में समावेश कर लेना चाहिए और आधुनि फिजियोलॉजी को इस प्रकार आत्मसात् कर लेना चाहिए। आयुर्वेदालंकार पंडित रणजितरायजी देसाई ने इस विषय पर आ० क्रिया-शारीर नाम का समन्वयात्मक ग्रन्थ लिखा है। उसका पाठ्य या आलोच्य ग्र के रूप में उपयोग किया जाए और इससे अच्छा कोई ग्रन्थ प्रकाशित हो, तब उसपर विचार किया जाए

द्रव्य-गुण-विज्ञान

आयुर्वेद में द्रव्यों के गुणधर्मों का वर्णन उनके पाञ्चभौतिक संगठन, गुण, रस, विपाक, वीर्य प्रभाव और कर्म द्वारा किया गया है। शरीर के विभिन्न अवयवों पर होनेवाली उनकी क्रियाओं का व नहीं के समान हुआ है। आधुनिक वैद्यक में शरीर के विभिन्न अवयवों पर होनेवाली द्रव्यों की क्रिया का वर्णन और तदनुसार द्रव्यों का वर्गीकरण किया गया है। इस विषय में भी ये क्रियाएँ द्रव्यगत कि किन रस, गुण, विपाक, वीर्य आदि के कारण होती हैं, इसका समन्वयात्मक उल्लेख करके आयुर्वेद उसका समावेश कर इस विषय की पूर्त्ति कर लेनी चाहिए। इसी प्रकार उद्भिज्ज द्रव्यों के स्वरूप—परि के लिए आधुनिक वनस्पति-शास्त्र [बोटेनी] में उद्भिज्ज द्रव्यों का जो रचनानुसार वर्गीकरण किया गया तथा उद्भिज्ज द्रव्यों के अङ्ग-प्रत्यङ्गों की जो व्याख्या की गई है, उसका आयुर्वेद में समावेश कर चाहिए। इस प्रकार के वर्गीकरण और उद्भिज्ज द्रव्यों के अङ्ग-प्रत्यङ्गों की रचना के वर्णन से स्वरूप-परिचय में बडा सौकर्य होता है।

जो द्रव्य अभीतक संदिग्ध है, उनको पाठ्यग्रन्थों से हटा देना चाहिए और यूनानी, एलोपै होमियोपेथी आदि अन्य चिकित्सा पद्धतियों में जिन उद्भिज्ज, प्राणिज और खानिज द्रव्यों का सफलतासे प्र होता है, उनका आयुर्वेद में समावेश कर लेना चाहिए। औषध द्रव्यों के निघण्टुओं में जो अनेक पर्याय दिए उसमें से जिनका संहिता-ग्रन्थों में द्रव्यगुण के प्रकरणों में या योगों में विशेषरूप से प्रयोग हुआ उन्हीं को रखकर शेष पर्यायों को पाठ्य-ग्रन्थों से हटा देना चाहिए। आयुर्वेदोक्त कई द्रव्यों के गुण- यूनानी वैद्यक आदि में अधिक वर्णित हैं, उनका भी परीक्षणपूर्वक आयुर्वेद में समावेश कर लेना चाहिए

रोगविज्ञान विकृतिविज्ञान

आयुर्वेद में वर्णित ज्वर, कास, श्वास, प्रमेह, कुष्ठ, विसर्प, शोथ आदि अनेक रोग एक-एक नहीं किन्तु समान प्रत्यात्म (खास) लक्षणवाले अनेक रोगों के वर्ग (ग्रूप) है। आयुर्वेद में प्रत्येक की संप्राप्ति का वर्णन करते समय स्थान-संश्रय (स्थान-अवयव-विकृति) का वर्णन अति संक्षेप में

रूप से किया गया है। आधुनिक चिकित्सा–शास्त्र में स्थान-विकृति का वर्णन विस्तृतरूप से पाया जात है। उदाहरणार्थ आयुर्वेद में 'कसन–खाँसना' इस प्रधान लक्षण से जिन रोगों में खाँसी आती हो ऐसे रोगों का एक कासरोग (कासवर्ग) में समावेश किया गया है। आधुनिक चिकित्सा शास्त्र में एलोंगेटेड युव्युला, फ़ेरिंजाइटिस, लेरिंजाइटिस, टॉन्सिलाइटिस, ब्रॉंकाइटिस, ब्रॉंकोन्यूमोनिया, निमोनिया आदि कसन-लक्षण-प्रधान रोगों का स्थान–विकृति के अनुसार स्वतंत्र वर्णन किया गया है। इन रोगों का स्थान-विकृति के साथ दोष लक्षणानुसार इन के वातिक, पैत्तिक, श्लैष्मिक आदि भेद बताकर रोगविनिश्चय (निदान) फिर से लिखना चाहिए। ऐसा करने से रोगनिदान और चिकित्सा करने में बड़ा सौकर्य होगा।

आधुनिक वैद्यक में अनेक रोगों के उत्पादक कारण विभिन्न जीवाणु माने गए है। रोगोत्पत्ति में बीजरूप से जीवाणुओं की प्रधानता माननेवाले तथा क्षेत्ररूप में रोगोत्पत्ति के अनुकूल शरीर कि प्रधानता माननेवाले ऐसे दो पक्ष (दो प्रकार की विचारधारा) आधुनिक विद्वानों में भी प्रचलित है। आयुर्वेद क्षेत्र-प्राधान्य को विशेष महत्त्व देता है। जीवाणुओं के कर्मानुसार उनके वातप्रकोपक, पित्तप्रकोपक तथा कफप्रकोपक, ऐसे भेद बनाकर उनका आयुर्वेद में समावेश कर लेना चाहिए।

इस समय अनेक नवीन रोगों का आविष्कार हुआ है, जिनका वर्णन आयुर्वेद में नहीं मिलता। इन रोगों का आयुर्वेदानुसार स्थान-संश्रय, दोषदूष्यविकृति, दोषलक्षणानुसार उनके भेद तथा चिकित्सा निश्चित करके उनका आयुर्वेद में समावेश कर लेना चाहिए। नवाविष्कृत रोगों की आयुर्वेदानुसार चिकित्सा निश्चित करनी होगी। यह कार्य कठिन अवश्य है, परन्तु असंभव नहीं है।

चिकित्सासूत्र

चिकित्सासूत्र– चिकित्साक्रम [इस रोगकी इस अवस्था और दोष-दूष्य विकृति में इस प्रकार की चिकित्सा करनी चाहिए, ये सिद्धांत] आयुर्वेद में विशेषरूप से वर्णित आहे है। आधुनिक वैद्यक में भी अनेक नवाविष्कृत चिकित्साएँ वर्णित हैं; उदाहरणार्थ- हैजे में लवण-जल की सिराबस्ति आदि। इनका भी परीक्षणपूर्वक आयुर्वेद में समावेश कर लेना चाहिए।

पञ्चकर्म

पञ्चकर्म चिकित्सा इस समय मलाबार में प्रचलित है। भारत के विभिन्न प्रदेशों में जहाँ आयुर्वेदिक कॉलेजों के साथ अस्पताल हो वहाँ मलाबार से इस चिकित्सा के विशेषज्ञ वैद्य को बुलाकर पञ्चकर्म–चिकित्सा-अनुभव लेना और प्रचार करना चाहिए।

शस्त्रकर्म और प्रसूति-कर्म

शस्त्रकर्म और प्रसूति कर्म के मुख्य मुख्य सिद्धांतों का और यंत्र-शस्त्रादि उपकरणों का आयुर्वेद में सुंदर वर्णन किया है। भारत में अंग्रेजी राज्य स्थापित होने और आधुनिक शस्त्र-चिकित्सा प्रचलित होने तक यहाँ शस्त्र-चिकित्सा होती थी। अंग्रेजी राज्य सम्पूर्ण स्थापित होने तक देश के किसी न किसी स्थान में छोटी-मोटी लडाइयाँ होती रहतीं थी और उन में जख्मी हुए लोगों की शस्त्र–चिकित्सा भी होती थी। वे बिना चिकित्सा के तड़फड़ाकर मरने के लिए नहीं छोड दिए जाते थे। उस समय शस्त्रचिकित्सा प्रायः वैद्यों के हाथों में थी, परन्तु आयुर्वेदिक और युनानी दोनों चिकित्सा पद्धतियों से काम करनेवाले जर्राह नामक और बंगाल में चांदसीर चिकित्सक नामक संप्रदाय के हाथ में प्रचलित थी। इस समय शस्त्र-चिकित्सा के प्रधान कर्म (ओपरेटिव सर्जरी) में बहुत कुछ प्रगति हुई है, अनेक सम्मोहन और संज्ञाहर औषधों का आविष्कार हुआ है। उन का आयुर्वेद में समावेश कर लेना तथा इस विषयके पठन-

पाठन के लिए नवीन ग्रंथ निर्माण करना भी आवश्यक है। साथ में आयुर्वेद में वर्णित पूर्वकर्म और पश्चात्तकर्म का प्रचार होना और आयुर्वेद में कहे हुए व्रग--चिकित्सा में काम में आनेवाले अनेक फलप्रद योगों का उपयोग भी कर लेना चाहिए। इस समय आधुनिक वैद्यक ने अपनी शस्त्र-चिकित्सा के प्रभाव के कारण ही जनता को अपनी ओर विशेष आकर्षित किया है। वैद्यों को भी शस्त्र-चिकित्सा को आत्मसात् करके आगे बढना चाहिए।

नवाविष्कृत औषध

इस समय यूरोप, अमेरिका, जापान आदि देशों में प्रतिदिन एक-एक नये-नये विशेषतः जीवाणु-नाशक औषधी का आविष्कार हो रहा है। इन आविष्कारों में विशेष हाथ तो वहाँ कि बडी फार्मेसियों वाले व्यापारियों का है। उनके अतिरञ्जित विज्ञापनों को देख कर यहाँ के परप्रत्यनेय--बुद्धि डॉक्टर लोग और कुछ वैद्य लोग भी उसका उपयोग—दुरुपयोग कर रहे हैं। हमारा वैद्य-समाज भी जब प्रगतिशील था तब उसने भी अनेक औषधों का, जिनका आर्षसंहिताओं में उल्लेख भी नहीं हैं, जैसे रससिंदूर, स्वर्ण-सिंदूर [मकरध्वज--चंद्रोदय], मल्लसिंदूर आदि सिंदूरकल्प, पर्पटीकल्प, वसंतमालती, वातचिंतामणि आदि अनेक सद्यः फलप्रद औषधों का आविष्कार किया था। आयुर्वेद का यह सिद्धांत है कि 'नानौषधिभूतं जगति किंचिद् द्रव्यमस्ति। तदेव युक्तं भैषज्यं यदारोग्याय कल्पते'। इस सिद्धांतानुसार किसी भी लाभप्रद द्रव्य या औषध के व्यवहार का आयुर्वेद निषेध नहीं करता। नवाविकृत औषधों की केवल निंदा करने या उनके दोष बताने मात्र से काम नहीं चलेगा। या तो उनके प्रतिनिधि—प्रतिस्पर्धी औषध अपने यहाँ तैयार करने [आविष्कृत करने] चाहिये और यही उत्तम तरीका है, या उनका आयुवर्दे सिद्धान्तानुसार दोषदूष्य प्रकृति आदि के विचार के साथ समयोग करके उपयोग कर लेना चाहिये और अपने शास्त्र में उनका समावेश कर लेना चाहिये। अन्यथा चिकित्सा-स्पर्धा में हमारा टिकना कठिन है। आशा है, वैद्य समाज इस पर अवश्य ध्यान देगा।

नवीन साहित्य किस प्रकार निर्मित हो?

ऊपर मैने दिग्दर्शन के रूप में वैद्यक के कुछ विषयों पर विवेचन कर के यह दिखलाने का यत्न किया है कि वर्तमान समय में प्राचीन उपलब्ध साहित्य मात्र के अध्ययन अध्यापन से सर्वकार्यक्षम वैद्य तैयार नही हो सकते। वैसे वैद्य तैयार करने क लिए प्राचीन आयुर्वेद का प्रतिसंस्कार और उसमें नये विषयों का समावेश और न्यून विषयों की पूर्ति करके आयुर्वेदिक साहित्य को समयोपयोगी बनाना परम आवश्यक है। मेरे विचार में नवसाहित्य निर्माण इस प्रकार संपन्न हो सकता है—जिस विषय पर ग्रन्थ लिखना हो, उस ग्रन्थ में किन-किन विषयों का समावेश होना आवश्यक है। उसकी एक विषय-सूची सर्वप्रथम तैयार करनी चाहिए। पश्चात् उस विषय में जितना साहित्य वर्तमान समय में उपलब्ध, प्राचीन ग्रंथों में हो और समयोपयोगी हो, उस को प्राचीन ग्रंथो से पुनरुक्ति-दोष बचाकर संग्रह कर लेना चाहिए। अनन्तर उस विषय में जिन नवीन विषयों का समावेश करना हो वे लिखे जाने चाहिए। ग्रन्थ का कलेवर इतना होना चाहिए कि पाठ्यक्रम में उस विषय के लिए निश्चित किए गए समय और व्याख्यानों में उसका अध्ययन--अध्यापन पूरा हो सके। नए विषय जो लिखे जाएँ, उनके लिए नवीन संज्ञा-शब्दों (पारिभाषिकशब्दों) को तैयार करना आवश्यक होगा। वे शब्द ऐसे तैयार होने चाहिए जो प्राचीन पद्धति के अनुरूप एवं सार्थक अन्वर्थक हों। निरर्थक मनगढन्त शब्दों का प्रयोग करना अनुचित है। जो नव

ग्रंथ बनें, वे क्षीरनीर-न्याय से ऐसे बनें कि जिसमें प्राचीन या पीछे से लिए हुए विषयों का भेद सहसा पहचाना न जा सके और वे ग्रंथ ही हमारे आयुर्वेद विद्यालयों में पाठ्यग्रंथतया नियुक्त हों। एक विषयका एक ही पाठ्य ग्रन्थ हो, जिसमें अवश्य ज्ञातव्य प्राचीन अर्वाचीन सब विषयों का संग्रह समावेश हो और एक विषय का एक ही अध्यापक हो। एक विषय को प्राचीन पद्धति से वैद्य भिन्न परिभाषा में पढाए और डॉक्टर भिन्न परिभाषा में पढाए, यह अध्यापन-पद्धति ठीक नहीं है। वह पद्धति जबतक प्रचलित रहेगी तब तक शुद्ध-मिश्र का झगडा दूर नहीं हो सकता।

जो नए ग्रंथ लिखें जाएँ वे संस्कृत भाषा में लिखे जाने चाहिए। संस्कृत भाषा में ग्रंथ बनाने से वे नेपाल से कन्याकुमारी तक तथा मणिपुर से पंजाब तक समानरूप से प्रचलित हो सकेंगे और वह साहित्य चिरस्थायी होगा। भारत की राष्ट्रभाषा भले हिंदी हो, परंतु भारतवर्ष की शास्त्रीय-भाषा संस्कृत थी, है और रहेगी। पहिले संस्कृत भाषा में ग्रंथ लिखे जाने के अनंतर उनके विशेष प्रचार के लिये उन का भिन्न-भिन्न प्रादेशिक भाषा में अनुवाद हो तो अच्छा हो है।

इस समय मिश्र शिक्षण पद्धति के विद्यालयों में आधुनिक विषयको ठीक समझने में उपयुक्त हो सके इस दृष्टि से विद्यार्थी का अंग्रेजी भाषा का ज्ञान इंटर सायन्स तक [कमसे कम मॅट्रिक तक का] होना आवश्यक माना जाता है और उसके लिये आग्रह रखा जाता है। परन्तु आयुर्वेदको ठीक समझने के लिये संस्कृत भाषा का ज्ञान संस्कृत मध्यमा तक होना चाहिए, यह आवश्यक नहीं समझा जाता है, न उसके लिये आग्रह रखा जाता है और ऐसे विद्यार्थी भरती किये जाते है कि जिन का संस्कृत भाषा का ज्ञान स्वल्पमात्र-नगण्य-सा होता है। परिणाम यह होता है कि आयुर्वेदका ज्ञान उसका कच्चा रहता है।

रसतंत्र

रसतन्त्र में भी इस समय प्राचीन रसग्रंथों में जिसका वर्णन नहीं पाया जाता है ऐसे अनेक यौगिकों-कल्पों का आविष्कार हुआ है। स्व० वा० वैद्यराज पं. सदानन्द शास्त्री घिल्डियाल ने स्वविरचित रसतरङ्गिणी नामक ग्रन्थों में गंधक द्रावक [गंधकाम्ल], निंबूकाम्लीयरजत, टङ्कणाम्ल, सोरकद्रावक, लवणद्रावक, सुवर्णद्रवण सोरकाम्लीयरजत, आरनालीयसीसक, गंधकाम्लीय रजत, गंधकाम्लीय यशद, मुग्धरस आदि अनेक आधुनिक वैद्यकमें प्रचलित कल्पों को संस्कृत भाषा में पद्यबद्ध करके समावेश किया है। इस प्रकार उपयुक्त अन्य आधुनिक कल्पों का तथा बिस्मथ, मेंगेनीज आदि चिकित्सोपयुक्त धातुओं का रसतंत्र में समावेश कर लेना चाहिये।

प्रसूतितंत्र

प्रसूति तंत्र में भी आधुनिक प्रसूतितंत्र के उपयुक्त विषय का समावेश करके प्राचीन और आधुनिक दोनों विषयों के समन्वयात्मक नवीन ग्रंथ तयार करनेकी आवश्यकता है। इस प्रकार का यत्न आयुर्वेदाचार्य पं. दामोदर शर्मा गौड़ ने अभिनव प्रसूतितंत्र नामक ग्रंथ लिखकर किया है।

ऊपर मैंने संक्षेप में यह बताने का यत्न किया है कि इस समय जो आयुर्वेदिक ग्रंथ-साहित्य उपलब्ध है उसके अध्ययन-अध्यापन से हम कार्यक्षम [सब प्रकार के चिकित्सा या कार्य कर सके ऐसा] वैद्य तैयार नहीं कर सकते। अतः वर्तमान आयुर्वेदिक साहित्य का पुनः प्रतिसंस्कार और अनुक्त विषयोंका नवीन तंत्रान्तरों से संग्रह कर के न्यून विषयों की पूर्ति करके समयोपयोगी साहित्य निर्माण करना चाहिए। आयुर्वेद और उसके सिद्धांत इतने व्यापक हैं कि उसमें हम नवीन विचारोंका का समावेश आयुर्वेद के मूलभूत सिद्धांतों को अक्षुण्ण रखकर कर सकते हैं।

नवसाहित्य-निर्माण का कार्य काशी हिन्दुविश्वविद्यालय, अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन, साधनसंपन्न अन्य आयुर्वेद महाविद्यालय जैसी संस्थाओं को करना [अपने हाथों में लेना] चाहिए और राज्य तथा वैद्यों एवं आयुर्वेदप्रेमी धनी दाताओं को इस कार्य में यथाशक्ति सहायता देनी चाहिए। यह कार्य दत्तचित्त होकर तत्परता से किया जाय तो पाँच वर्षों में सम्पन्न हो सकता है।

आयुर्वेद पढ़ाने के लिये इस समय अच्छे अध्यापकों का मिलना कठिन हो रहा है, अतः काशी-विश्वविद्यालय जैसी साधनसंपन्न संस्थाओं को अध्यापक तैयार करने के लिये स्नातकोत्तर कोर्स जैसा कोर्स तैयार करना और चलाना चाहिए।

इस समय हमारे आयुर्वेद महाविद्यालयों से जो स्नातक निकलते है उनमें कुछ अपवाद छोड़कर अधिकांश स्नातक आयुर्वेद के विषय में कच्चे, अनुभवहीन और आयुर्वेद में श्रद्धा न रखनेवाले निकले (निकलते) हैं. उसके कारणोंमें अध्यापनोपयोगी ग्रन्थसाहित्य की अपूर्णता, एक ही विषय का दो भिन्न पद्धति के अध्यापकों द्वारा पढ़ाया जाना, संस्कृत के अत्यल्प ज्ञानवाले विद्यार्थियों का भरती होना, आयुर्वेदाध्यापकों का विद्यार्थियों को पढाने में और प्रत्यक्ष चिकित्सानुभव कराने में उचित परिश्रम न करना ये प्रधान कारण हैं। महाविद्यालय के संचालको और विद्वान् अध्यापकों से मेरी प्रार्थना है कि वे इन त्रुटियों का परिमार्जन करें।

आज तक के मेरे दीर्घकाल के अवलोकन और अनुभव में वर्तमान आयुर्वेद की अध्ययन-अध्यापन शैली में जो त्रुटियाँ देखने में आई और उनके परिमार्जन के जो उपाय मेरी समझ में आये वे मैंने वैद्य समाज के सामने रखा। आशा है कि वैद्यसमाज, हमारे आयुर्वेद के नेता और संस्थाओं के कर्णधार इस विषय पर अवश्य ध्यान देंगे।

—: उपयुक्त वैद्यकीय ग्रंथ :—

गृहवैद्य अथवा क्षार चिकित्सा		डॉ. र. कृ. गर्दे	३ रु.
होमिओपाथिक चिकित्सापद्धति	—	डॉ. काणे	२॥ रु.
दंतरोग विज्ञान चिकित्सा	—	वै. पां. वि. जायदे	३ रु.
वैद्य-सन्मित्र (हिंदी)	—	,,	२ .
श्री नाळ यांचें आरोग्य त्यांचे रोग व चिकित्साशास्त्र		वै. दि. वि. साठे	२॥ रु.
क्षयरोगाची आयुर्वेदीय चिकित्सा व आयुर्वेदिक इंजेक्शनें		वै. ना. बा. कुळकर्णी	४ रु.

कामशास्त्रावरील कांहीं ग्रंथ

कामसूत्र वात्स्यायन (कामसूत्राचा मराठी अनुवाद)		५ रु.
प्रश्नोत्तररूपी कामशास्त्र भाग १	श्री. पं ज. कुलकर्णी	३ रु.
वैवाहिक जीवन	श्री. के. पी. भागवत	४॥ रु.

मिळण्याचें ठिकाण:— **वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक**

अधिकारी परिषदेंत आरोग्यमंत्र्यांचे विचार

‘देशांतील ग्रामीण रोग प्रतिबंधक व औषधोपचार योग्य प्रकारें पुरविण्यावर पुढील पंचवार्षिक योजनेंत अधिक भर दिला पाहिजे” असे उद्गार आरोग्यमंत्री राजकुमारी अमृत कौर यांनीं दिल्ली येथें भरलेल्या वैद्यकीय अधिकारी परिषदेचें उद्घाटन करतांना काढले.

ही परिषद आरोग्य खात्यातर्फे बोलाविण्यांत आली होती व तिला सर्व राज्यांतील वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आरोग्यविषयक कोणत्या योजना दाखल करण्यांत याव्यांत याबद्दल या परिषदेंत चर्चा झाली.

रोगप्रतिबंधक उपाय

त्या म्हणाल्याः- भारतातील एकूण लोकसंख्येपैकीं ८५ टक्के लोक ग्रामीण भागांत रहात असून त्यांना रोगप्रतिबंधक उपाय उपलब्ध करून दिले पाहिजेत. विकासाच्या चालू अवस्थेंत अधिकारीवर्गाचें हें कर्तव्यच होय. सर्वत्र आरोग्य-केंद्रें उघडून औषधोपचार योजना सुरू झाली पाहिजे. माता व बालकांच्या आरोग्याची काळजी नीट घेतली पाहिजे. शाळेंत आरोग्य व सकस आहार यांवर भर दिला पाहिजे.

खेड्यांत छोटीं इस्पितळें

मध्यवर्ति आरोग्य मंडळानें त्रिवेंद्रम् येथील बैठकींत औषधोपचारांची सोय ग्रामीण विभागांत वाढविल्याचें सांगून राजकुमारी पुढें म्हणाल्या, “लवकरच सर्व खेड्यांत छोटीं इस्पितळें निघतील अशी आशा आहे. हें काम कोणत्याहि सबबीवर मन्दावतां कामा नये”

आरोग्यविषयक शिक्षणाची व्यवस्था

या आरोग्यविषयक योजनेंत काम करणाऱ्यांना योग्य शिक्षण दिलें पाहिजे व तिचा दुसरा पंचवार्षिक योजनेच्या कालांत विकास होत असतांना लायक इसमांचा पुरवठा सतत चालू राहील अशी व्यवस्था झाली पाहिजे. त्यांचा शिक्षणक्रम तसा ठेवला पाहिजे.

केंद्रीय आरोग्यखात्याची राज्यांस सर्व प्रकारें मदत होईलच. मात्र चालू योजनेंत काहीं राज्यांनीं मिळालेल्या मदतीचा संपूर्ण फायदा उठविलेला दिसत नाहीं असे दिसून आलें. त्याचें कारण कदाचित् त्या कामीं एकसूत्रीपणाचा अभाव असावा. राज्यांनींहि योग्य आर्थिक मदत पुरविल्यास ही सुसूत्रता साधता येईल.

आरोग्य योजनांचा फायदा

नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी यांनीं आपल्या भाषणांत ग्रामीण आरोग्ययोजना इतर उत्पादन कार्याइतकीच महत्वाची असून तिलाहि तितकाच अग्रहक्क दिला दिला पाहिजे असें सांगितलें. ते म्हणालेः- पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील विकास योजनांचा फायदा ८० हजार खेड्यांना मिळेल. दुसऱ्या योजनेच्या अखेरीस १ लाख २० हजार खेड्यांस त्याचा फायदा मिळेल. तेव्हा त्यांतील प्रत्येक गटाला एक आरोग्य-केन्द्र ठेवण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

१५ लाख तरुण हवेत

श्री कृष्णम्माचारी पुढें म्हणालेः- १५ लाख तरी सुशिक्षित तरुण खेड्यांत गेले पाहिजेत. पण त्याहून कितीतरी पट लोकांना खेड्यांत जावयास पाहिजे खेड्यांत गेल्यावर ग्रामीण जीवनांत हे लोक अधिक उत्साहानें भाग घेतात असा अनुभव आहे.

ले. क. लक्ष्मण म्हणालेः- पुढील योजनेचे ती प्रकार पडतात. कांहींना केंद्राचेंच संपूर्ण आर्थिक सहा मिळेल. कांहीं पूर्णपणें राज्यांच्याच मदतीनें चालतील व कांहींना दोघांची मदत मिळेल.

भुसावळ संमेलनांत अवश्य भाग घ्या !

भुसावळ येथें ता. २२।२३।२४ मे रो म. प्रा. वैद्य सम्मेलन, मुंबई राज्य वैद्य संमेलन व अध्यापक चर्चा परिषद यामध्यें अवश्य भाग घ अशी म. प्रां. वैद्य मंडळाची आग्रहाची विनंति आ

आयुर्वेदीय आरोग्यशाला, नाशिक

नाशिक येथील चांदवडकर रस्त्यावरील चांदवडकर वाड्यांत पहिल्या मजल्यावर शुद्ध आयुर्वेद विद्यालयातर्फे आयुर्वेदीय आरोग्यशाला सुरूं करण्यांत आली आहे. ता. २४।३।५५ या जागेस शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीच्या दोन सभासदांनीं (अध्यक्ष वैद्य वामनरावजी दीनानाथ बऱ्हाणपूरकर, व वैद्य लक्ष्मीशंकरशास्त्री-अहमदाबाद) भेट दिली. स्वास्थ्यशाला व रुग्णालयासाठीं भरपूर व सोईची जागा मिळाल्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें.

या जागेंत गायधनी गल्लींत पूर्वी चालू असलेला संस्थेचा धर्मार्थ दवाखाना आणला आहे. व संस्थेतर्फे आरोग्याचा सल्ला देण्याची व्यवस्थाहि येथें केली आहे.

अम्लपित्त (Hypercidity)

या विकारावर चरक साप्ताहिकाच्या संपादकांनीं पुढील काढा घेण्यास सुचविलें आहे.

काडेचिराइत, कडुनिंबाची अंतर्साल, हिरडे, बेहेडे, आवळा, अडुळसा, गुळवेल, कडुपडवळ, पित्तपापडा, माका, या १० वनस्पती समप्रमाणांत घेऊन त्यापैकीं रोज ५ तोळे भरडचूर्ण १ शेर पाण्यांत उकळून पावशेर पाणी शिल्लक राहील तें गाळून प्यावें.

सुप्रसिद्ध दंतवैद्य पां. वि. जायदे, आयुर्वेदतीर्थ, हुबळी यांचीं विद्वान् वैद्य आणि डॉक्टर यांनीं प्रशंसिलेलीं दोन उपयुक्त पुस्तकें

१) दंतरोगविज्ञान आणि चिकित्सा
किंमत ३ रु.

२) वैद्यसन्मित्र (हिंदी) भाग १ ला
किंमत २ रु.

मिळण्याचीं ठिकाणें:—
१ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक
२ पां. वि. जायदे, नारायण चौक, हुबळी

धर्मार्थ दंतयज्ञ

' हिंदु सेवा संघाच्या ३१ व्या वाढदिवसानिमित्त अ. भा. आ. डेंटल मिशनच्या संमतीनें वैद्य मा. ग. शेंड्ये व वैद्य भा. पु. नानल यांच्या सहकार्यानें डॉ. गणेश विनायक फडके यांच्या नेतृत्वाखालीं पुणें येथें रास्तापेठ एज्युकेशन सोसायटीचे शाळेंत धर्मार्थ दंतयज्ञ झाला.

वर्गणी कमी करूं नका

श्री. रा. संपादक, आयुर्वेद पत्रिका यांस—

आयुर्वेद पत्रिकेची वर्गणी पुढील वर्षापासून ४ रुपये करणार आहात असें वाचलें परंतु वर्गणी कमी न करतां पत्रिकेचीं पानें वाढवावीत व सदर पानें अप्रकाशित ग्रंथ प्रकाशनाकडे खर्च करावीत, असें मला वाटतें. क. ही. विनंती

१-४-५५ — वैद्य त्र्यंबकशास्त्री दाते

.... उत्तम धर्म ....

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधेंच वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान-

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

महाराष्ट्र प्रांतीय दशम वैद्य संमेलन, भुसावळ

स्वागत मंडळाची सभा

भुसावळ येथें होणाऱ्या दशम वैद्य-संमेलनाच्या स्वागत सभासदांची प्रथम सभा नवशक्ति आयुर्वेदालयाचे जागेंत स्वागत कार्याध्यक्ष वै. ब्रह्मदत्त शर्माजी यांचे अध्यक्षतेखालीं दि. २ एप्रिल १९५५ शनिवारी दुपारीं झाली होती.

या सभेचें संमेलन.- कार्यांच्या सोईच्या दृष्टीनें - १ कार्यकारी मंडळ २ प्रदर्शन समिति ३ भोजन समिति ४ निधि समिति ५ प्रचार समिति ६ सभामंडप समिति ७ स्वयंसेवक समिति ८ समारंभ समिति ९ निवास समिति या ९ समित्यांची नियुक्ति करण्यांत आली तसेंच कोषाध्यक्ष व हिशेब तपासनीसहि नियुक्त करण्यांत आले.

कार्याध्यक्षांनीं आतांपर्यंत झालेल्या कार्याचा अहवाल निवेदन करून संमेलनास आतां अवधि फार थोडा उरला असल्यानें निधि संकलनाचें कार्य अधिक नेटानें होण्याची आवश्यकता प्रतिपादन केली व स्वतः लौकरच दक्षिण महाराष्ट्रांत प्रचारास जाण्याचा हेतु निवेदन केला.

सम्मेलन-तिथि-निश्चय

दि. २२।२३।२४ मे १९५५ रवि. सोम. मंगळवार (ज्येष्ठ शु।। १ ते ३) हे ३ दिवस संमेलनाच्या तिथि म्हणून निश्चित झाले. ६।७ तारखेस गुजराथ वैद्य-सभेचें अधिवेशन गुजराथेंत होणार असल्यानें पूर्वीचे ८ ते १० मे हे दिवस बदलावे लागले. एप्रिलचे शेवटीं संमेलन घ्यावें असा स्वागत मंडळाचा फार हेतु होता, पण २९-३० एप्रिल व १ मे हे दिवस अखिल भारतीय संमेलनाचे निश्चित झाल्याचें कळलें व तेथील प्रमुख पुढारी वैद्यवर्गांच ह्या संमेलनास उपस्थित होणार असल्यानें हा बदल करणें भाग पडलें.

उन्हाळ्याची भीति नाहीं

या वर्षी उन्हाळा बराच लौकर म्हणजे मार्च मध्यापासूनच तीव्र भासूं लागल्यामुळें सम्मेलनावधीपर्यंत त्याची तीव्रता बरीच कमी होण्याची शक्यता आहे. शिवाय संमेलन स्थानीं व आसपास भरपूर झाडी असल्यामुळें उन्हाळ्याची भीति न बाळगतां प्रतिनिधींनीं बहु संख्येनें उपस्थित रहावें अशी स्वागत सभेची आग्रहाची विनंति आहे.

प्रदर्शनासाठीं स्टॉल

प्रदर्शनामध्यें निरनिराळ्या कारखानदारांना आपलीं औषधें व इतर आरोग्यास उपयुक्त अशा वस्तूंचें प्रदर्शन स्वागत समितीनें मुद्दाम केलेल्या स्टॉल्समधून उत्कृष्ट तऱ्हेनें मांडता येईल. सर्व साधारणपणें असे स्टॉल २५ रु. भाड्यानें देण्याची व्यवस्था स्वागत सभेनें करण्याचें योजिले आहे. ह्या योजनेचाहि फायदा घेऊन परंपरेनें संमेलनासहि मदत करणे कारखानदारांस शक्य आहे व तसें त्यांनीं करावें अशी विनंति आहे.

वै. ब्रह्मदत्त शर्मा
कार्याध्यक्ष

अरविंद आयुर्वेदिक इंजेक्शनांच्या
किंमती अतिशय कमी केल्या
ग्राहकांना विशेष सवलत

ता. १।२।१९५५ पासून नवीन नियम लागूं. 'सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन चिकित्सा' या पुस्तकाची किंमत ३ रु. ऐवजीं १॥ रु. केली आहे. पोस्टेज १० आणे निराळे. पुस्तक व्ही. पी. नें पाठविलें जाणार नाहीं. २ रु. २ आणे म. ऑ. नें आगाऊ आल्यावर पुस्तक रजिस्टर्ड पोस्टानें पाठविलें जाईल.

पत्ता- अरविंद केमिकल वर्क्स
छिंदवाडा [म. प्र.]

मुंबईचे कार्यसिंह नेते दे. भ. स. का. पाटील यांचा

वै. जायदे अमेरिका प्रवासनिधीस सद्रव्य पुरस्कार

१००० रु. ची देणगी

वै. जायदे निधिकार्यास आतां वेगानें प्रारम्भ झाला असून चोहोंकडून द्रव्यासह पाठिंबा देणारीं पत्रें येऊं लागलीं आहेत. गेलीं दोन तपें मुंबईच्या नागरिकांची जिवाभावानें सेवा करून सर्वतोमुखी असलेले नामवन्त दे. भ. स. का. पाटील यांनीं वैद्यराज जायदे यांची दन्तोत्पाटन-कुशलता पाहून सहर्ष पाठिंबा दिला आहे, व स्वतःचे १००० रुपये या कार्यास देणगी म्हणून दिले आहेत. अशा प्रकारचे श्री. पाटील यांनीं स्वतःची एवढी मोठी देणगी दिलेले केवळ मुंबई बाहेरचें हें पहिलेंच शुभ कार्य असावें असें वाटतें. या दृष्टीनें या देणगीचें महत्त्व मोठें आहे.

"माझ्या ठिकाणीं असलेली सर्व कर्तव्यशक्ति श्री. जायदे यांच्या पाठीशीं उभी आहे" असे उद्गार श्री. पाटील यांनीं त्यांच्या स्नेही मंडळींत काढले असें कळतें.

नि. भा. आयुर्वेद कॉंग्रेसचा शी र्द

नि. भा. आयुर्वेद महासंमेलन (कॉंग्रेस) चे अध्यक्ष वैद्यरत्न पंडित शिवशर्माजी यांनीं कॉंग्रेसतर्फे १०१ रुपयांची देणगी जाहीर केली असून शिवाय एक जोरदार शिफारस पत्राहि दिलें आहे.

म. प्रां. वैद्य संमेलनाचे अध्यक्ष पां. ह. देशपांडे यांचा सत्कार

गुणगौरवपर भाषणें

भुसावळ येथें भरावयाच्या दहाव्या म० प्रां० वैद्य संमेलनाचे अध्यक्ष आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे (पुणें) हे दि. १२ रोजीं मुंबई येथें आले असतां म० प्रां० वैद्य मंडळाच्या मुंबई शाखेनें मुगभाट मधील आयुर्वेदीय रुग्णालयांत रात्रीं ९ वाजतां सत्कार केला. कार्पोरेशन सदस्य वै. दे. ल. आनन्दे जे. पी. हे अध्यक्षस्थानीं होते. त्यावेळीं वै. रामभाऊ भोगे, वै. कृ. के. कानिटकर, वै. ना. ह. जोशी, प्रांताध्यक्ष रशास्त्री, वै. बिंदुमाधव, वै. वेदपाठक, वै. वामनरावजी, वै. लक्ष्मीबाई बोरवणकर, वै. अभ्यंकरशास्त्री, आदि वक्त्यांचीं भाषणें झालीं. योग्य वेळीं योग्य अध्यक्ष लाभला याबद्दल सर्वांनीं त्यांचे मनःपूर्वक अभिनन्दन केलें. म० प्रां० वैद्य-मंडळ, महागुजरात प्रां० वैद्यमण्डळ, शुद्ध आयुर्वेद विद्यालय, शीव, धन्वन्तरी सेवा मण्डळ, आरोग्य सेवा मंडळ आदि संस्थातर्फे अनेक उंची हार घालण्यांत आले.

उत्तरादाखल भाषण करतांना आचार्य देशपांडे म्हणालेः- मला या मुंबईनें लहानाचा मोठा केलें आहे व मजजवळ जे आहे ते मुंबईचें आहे. म. प्रां. वैद्य मंडळाची जोपासना आजवरच्या अध्यक्षांनीं केली तशीच मीहि शरीरानें दुबळा असलो तरी माझ्या शक्तिबुद्धीप्रमाणें पण कुरकूर न करतां व तक्रार न सांगतां करीन असें मी या प्रसंगीं आश्वासन देतो.

अभिनंदनीय भेट

"मी आजरोजीं आपणाकडे ६ रु. आयुर्वेद पत्रिकेची वर्गणी म्हणून पाठविले आहेत. माझ्या वैद्य मित्रांस त्याच्या विवाहाची भेट म्हणून आपण एक वर्षभर आयुर्वेद पत्रिका पाठवावी अशी विनंति आहे."

१९-३-५५ श्री. द. जूळ

पत्रिका पाठविण्याचा पत्ताः-

वैद्य आण्णासाहेब पारिसा चौगुले
मेडिकल ऑफिसर, कोकिसरे
फोंडाघाट, जि. रत्नागिरी

म. प्रां. वैद्य संमेलन, -भुसावळ

१० पेक्षां आधिक देणगीदारांचीं नांवें

१०१	शे. गुलाबचंद पन्नालाल बंब	भुसावळ
५१	,, नथमल सागरमल	जळगांव
३५	मे. अशोक कॉटन प्रे. अॅ. जि. फॅक्टरी	बोदवड
३१	वै. ज्वालाप्रसाद शर्मा भिषगाचार्य	,,
३१	,, शंकर सोमा बऱ्हाटे	भुसावळ
२५	शे. उत्तमचंद दानमल जैन	बोदवड
२५	,, हिरालाल नानकरण अग्रवाल	,,
२५	,, कन्हैयालाल चांदमल कोटेचा	,,
२५	वै. आसराजजी नेत्रवैद्य	भुसावळ
२१	,, हनुमानदास नारायणदास अग्रवाल	बोदवड
२१	श्री. अण्णासाहेब नाईक वकील	भुसावळ
२१	शे. लक्ष्मीनारायण जैनारायण	,,
२१	,, जी. के. चौधरी	सावदा
१६	श्री. गंगाराम पुंजु महाजन	भुसावळ
१५	,, होरमसजी दादाभाई	बोदवड
११	,, मांगिलाल कुन्दनमल अग्रवाल	,,
११	प्रिन्सिपॉल महाजन	जळगांव
११	श्री. हरीसिंग हिंमतसिंग	भुसावळ
११	,, इच्छाराम बाळू चौधरी	,,
११	,, बाबूसिंग बल्लूसिंग	,,
११	वै. विठ्ठल दामोदर पांडव	नेरी
११	शे. जे. बी. बत्तीवाला	भुसावळ
११	,, चंपकलाल माणिलाल	,,
११	मे. ऑल इंडिया किराणा स्टोअर्स	मुंबई
११	श्री. रामभाऊ पुंजो भंगाळे	सावदा
११	,, रामभाऊ विठ्ठल पाटील	
१०	,, दादासाहेब चारसोडे	भुसावळ

पवित्र नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

....अनुक्रमणिका....

तुकडोजी महाराजांची आयुर्वेदभक्ति ६३१
टायफॉइड फीव्हरवर रामबाण औषध ६३६
बोर्ड ऑफ रिसर्च इन आयुर्वेद, मुंबई ६३६
मी रशियांत काय पाहिलें ! ६३७
बॉम्बे मेडि. ॲसो. आयु स्नेहसंमेलन ६४१
निम्बपीयूष, माझे अनुभव ६४३
वैद्य जायदे प्रवासनिधि देणग्या ६४५
व्याख्यान देणाऱ्या वैद्यांना विनंति ६४६
आयुर्वेद की वर्तमान शिक्षणपद्धति ६४७
अधिकारी परिषदेंत आरोग्यमंत्र्यांचे विचार ६५५
आयुर्वेदीय आरोग्यशाला, नाशिक ६५६
म. प्रां. दशम स्वागत मंडळाची सभा ६५७
स. का. पाटील यांचा सद्व्य पुरस्कार ६५८

——————

डी. ए. एस्. एफ् असोसियेशनची

स्तुत्य देणगी

महाराष्ट्र प्रां. वैद्य, संमेलनाचे दशम अधिवेशन, भुसावळ येथें मे १९५५ च्या शेवटच्या आठवड्यांत भरणार आहे. या अधिवेशनांस खर्चासाठीं धुळें येथील डी. ए. एस्. एफ् ॲसोसिएशन तर्फे ॲसोसिएशन सेक्रेटरी डॉ. जी. एम्. भंडारी यांनीं १२१ रुपयांची देणगी दिली. याबद्दल आम्ही सदर संस्थेचे व संस्थेचे सेक्रेटरी डॉ. भंडारी यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

मंत्री, ब्रम्हदत्तशर्मा शास्त्री
म. प्रां. वैद्य संमेलन, भुसावळ

थंडगार
नेत्रांजन
डोळ्याचे विकारावर उत्कृष्ट
कृष्णशास्त्री बिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

अत्यंत अभिमानास्पद उद्योग

" आयुर्वेद सेवा संघाचा औषधी निर्माण विभाग मी आज पाहिला. यंत्रसाहाय्याशिवाय औषधी तयार करण्याचा हा प्रयत्न वैशिष्ट्यपूर्ण आहे.

प्रत्येक शास्त्रीय औषध शास्त्राच्या कसोटीला गुणधर्माच्या दृष्टीनें उतरविण्याचा उद्योग महाराष्ट्रांत आयुर्वेद सेवा संघांत होत आहे. ही गोष्ट अत्यंत अभिमानास्पद आहे.

उत्तरोत्तर आयुर्वेद सेवा संघाचा उत्कर्ष होवो एवढीच शुभेच्छा —

१७-३-५५ इंदुभूषण म. भिंगारे
नागपूर

शुद्ध आयुर्वेद शास्त्राच्या अध्यापनाच्या विविध सोई असलेली
मुंबई राज्यांतील नमुनेदार शिक्षण-संस्था

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नासिक

या संस्थेस शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीचे अध्यक्ष वैद्य वामनराव दीनानाथ बऱ्हाणपूरकर व सभासद वै. लक्ष्मीशंकरशास्त्री (अहमदाबाद) यांनीं नुकतीच भेट दिली. विद्यालयाचे नवीन वर्ग १० जून १९५५ पासून सुरू होणार आहेत. यंदा विद्यालयांत फक्त ३० योग्य विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येणार आहे.

संस्कृत विषयांत शेकडा ५० अगर अधिक गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांनीं वेळीच अर्ज पाठवून प्रवेश मिळवावा.

(विद्यार्थ्यांच्या सामुदायिक राहण्या-जेवण्याची व्यवस्था करण्याचा विचार आहे.)

पत्रव्यवहाराचा पत्ता — **प्रधान अध्यापक, शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नासिक.**

संपादक व प्रकाशक:— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विठ्ठलकर कारंजा, नासि
मुद्रक: — श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, नासिक.

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

गुरुकुल पत्रिका

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वर्ष ८ वें) नासिक, ता. १ मे १९५५ (अंक २१ वा

भुसावळ येथें भरणारीं संमेलनें व परिषदा

या महिन्याच्या १६।१७।१८ तारखांस खानदेशांत भुसावळ येथें आयुर्वेदाच्या इतिहासांतील अत्यंत महत्वाचीं संमेलनें भरत आहेत. लातूर येथें वैद्यराज जळूकरशास्त्री यांच्या अध्यक्षतेखालीं मे १९५३ मध्यें भरलेल्या ९ व्या अधिवेशनानंतर दोन वर्षांनीं हें दहावें प्रांतिक संमेलन भरत आहे. मुंबई राज्य सरकारनें शुद्ध आयुर्वेदाला मान्यता दिल्यानंतर १९५४च्या मे महिन्यांत मुंबईस सरदारगृहांत एक दिवसाचें विशेष अधिवेशन भरविण्यांत आलें होतें. शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम सुरू होऊन आतां एक वर्ष पार पडलें असल्यामुळें त्यासंबंधीं विचार करण्याचीं संधि सर्व अध्यापक, मान्य गुरु व इतर विचारवंत वैद्य मंडळी यांना भुसावळ येथें भरणाऱ्या संमेलनांत लाभत आहे.

मुंबई राज्य वैद्य संमेलन

अध्यक्ष — वैद्य गं. वि. पुराणिक

१९५४ मध्यें घडून आलेली दुसरी विशेष घटना म्हणजे मुंबई राज्य वैद्य संमेलनाची स्थापना ! मुंबई राज्यांत महाराष्ट्र प्रांतीय, अखिल कर्नाटक, महागुजरात व मुंबई उपनगर अशी चार संमेलनें भरतात व त्यांच्या अलग संघटना आहेत. त्या सर्व संघटनांनीं संघटनेच्या बळावर एक मुखानें मुंबई राज्य सरकारकडे मागणी करावी यासाठीं मुंबई राज्यांतील या सर्व प्रांतीय संघटनांनीं या राज्य संमेलनाची (फेडरेशन) स्थापना केली आहे. या राज्य वैद्यसंमेलनाचें दुसरें अधिवेशन भुसावळ येथें पनवेलचे सुप्रसिद्ध श्रीमंत वैद्य नानासाहेब पुराणिक यांच्या अध्यक्षतेखालीं याच कालांत भरणार आहे. ही ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची घटना आहे. या राज्य वैद्य संमेलनाचें उद्घाटनहि मुंबई-राज्याचे आरोग्यमंत्री श्री. शांतिलालजी शहा हे करणार आहेत.

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद

नाशिक येथें गेल्या आक्टोबर मध्यें जी आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद झाली तिचें पुढील ३।४ दिवसांचें अधिवेशन भुसावळ येथें भरत आहे रोज ६ तास या परिषदेचें काम चालणार असून अध्यापन-विषयक महत्त्वाचे निर्णय या परिषदेंत घेतले जाणार आहेत. सबब सर्व आयुर्वेद महाविद्यालयांतील त्या त्या आयुर्वेदीय विषयाचे अध्यापक व मान्य गुरु यांनीं उपस्थित राहून ही परिषद यशस्वी करावी अशी चालकांची विनंति आहे.

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, भुसावळ

सर्व अध्यापकांना जाहिर निमंत्रण

महाराष्ट्र प्रांतिक वैद्य संमेलनाच्या तारखा १६-१७ व १८ मे १९५५ या निश्चित झाल्या आहेत. आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेची दुसरी बैठकहि याचवेळीं होणार आहे. संमेलनाध्यक्ष आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे हेच चर्चापरिषदेचे अध्यक्ष रहाणार आहेत. चर्चा परिषदेचें उद्घाटन आयुर्वेदाचे डायरेक्टर आयुर्वेदाचार्य पं. हरिदत्तशास्त्री हे करणार आहेत.

अध्यापक चर्चा परिषदेचा कार्यक्रम पुढील-प्रमाणें राहील.

रविवार दि. १५-५-५५ रोजीं रात्रीं अध्यापक चर्चा परिषदेच्या कार्यकारी मंडळाची बैठक.

सोमवार दि. १६-५-५५ सकाळीं ६ ते ९ 'द्रव्यगुण' या विषयावर चर्चा. दुपारीं २ ते ५ 'रसशास्त्र' या विषयावर चर्चा.

मंगळवार दि. १७-५-५५, सकाळीं ६ ते ९ 'शारीर.' दुपारी २ ते ५ 'दोषधातुमलविज्ञान.'

बुधवार दि. १८।५।५५ सकाळीं ६ ते ९ न्याय, सांख्य, मीमांसा, संस्कृत. दुपारीं २ ते ५ सटीक अष्टांगहृदय, स्वस्थवृत्त व समारोप.

प्रवेशशुल्क नाहीं

चर्चा परिषदेच्या प्रवेशाकरिता प्रवेशशुल्क नाहीं. आपण या कार्यक्रमास उपस्थित राहून आपआपल्या विषयांच्या चर्चेचे वेळीं वैचारिक सहकार्य द्यावें, अशी विनंति आहे.

शंका इ. पाठवाव्या

त्या त्या विषयाच्या शंका, अडचणी इ. दि. १० मे १९५५ पर्यंत वैद्य वि. म. गोगटे, नाशिक यांचेकडे पोचवाव्यात.

आजी माजी सर्व अध्यापकांनीं यावें

आज अध्यापकाचें काम करीत नसणाऱ्या विद्वान् वैद्यांनींहि उपस्थित राहून सहकार्य द्यावें व परिषदेचा उद्देश सफल करावा अशी आग्रहपूर्वक नम्र विनंति आहे.

परिषदेचा वृत्तांत इ. लिहिला जाणार असल्यामुळें आपलें म्हणणें, विचार, इ. सर्व लेखी लिहून आणावें.

सोमवारीं पहाटेच कार्यक्रमास सुरवात होणार असल्यामुळें रविवारीं रात्रींपर्यंत भुसावळला पोहचण्याची आवश्यकता आहे.

वैद्य वि. म. गोगटे, निमंत्रक
आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद

कटू रस बलदायक कसा ?

रसाः स्वाद्वम्ललवणतिक्तोषणकषायकाः ।
षट् द्रव्यमाश्रितास्तेहि यथापूर्वं बलावहाः ॥ वाग्भट

या श्लोकाप्रमाणें कषाय रस हा कमींत कमी बलावह आहे हें सिद्ध होतें. व तिक्त रस त्या (कषाय) रसाहून अधिक बलावह आहे असें सिद्ध होतें.

परन्तु तिक्त रसाचीं महाभूतें आकाश आणि वायु हीं बाहुल्यानें असूनहि, पृथ्वी व वायु हीं महाभूतें ज्यांत बाहुल्यानें आहेत अशा कषाय रसापेक्षा तिक्त रस अधिक बलावह कसा ?

—आशा साने

— महाराष्ट्र प्रांतीय दशम वैद्य संमेलन, भुसावळ —

संमेलनाच्या तारखा १५-१६-१७ मे १९५५

नि. भा. आ. महासंमेलनाध्यक्षांचे (पं. शिवशर्मांजीचें) पत्र आल्यावरून " महामंडळाचें मे महिन्याचे शेवटीं व्हावयाचें ठरलेलें संमेलन, त्रिवेंद्रम् येथें २२ मे पासून सुरूं व्हावयाचें आहे. ह्या संमेलनाचें उद्घाटन ना. मुरारजीभाई देसाई, मुंबई राज्याचे पंतप्रधान यांच्या हस्तें होणार असल्यानें त्यांच्या सोयीचा दिवस म्हणून महासंमेलनाच्या तारखांमध्यें हें परिवर्तन करावें लागत आहे " असें कळलें. अर्थातच भुसावळला होणाऱ्या आपल्या महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनांत प्रामुख्यानें उपस्थित राहणारी कांहीं महाराष्ट्रीय पुढारी वैद्यमंडळीहि महासंमेलनास त्रिवेंद्रम् येथें जाणारी असल्यानें, संकेतानुसार आपलें २२ मे पासूनच सुरूं व्हावयाचें प्रांतीय संमेलन ह्या प्रमुखांच्या उपस्थितीवांचून पार पडणें शक्य व इष्ट नाहीं हें लक्षांत घेऊन महाराष्ट्र प्रांतीय संमेलनाच्या तारखा एक आठवडा अलिकडे घेणें अपरिहार्य आहे व म्हणून आतां महाराष्ट्रीय प्रांतीय वैद्य संमेलनाचें अधिवेशन दि. १५-१६-१७ मे १९५५ रवि.-सोम.-मंगळवार असें तीन दिवस घेण्याचें निश्चित झालें आहे.

स्वागत मंडळाचें धोरण

त्या प्रांतीय संमेलनांत अत्यंत मोजके व प्रत्यक्ष कार्यवाहींत आणतां येण्याजोगे असे सुटसुटित प्रस्ताव संमत केले जावेत; कंठाळी ठरावांना मुळींच वाव दिला जाऊं नये असें स्वागत समितीचें धोरण राहील. तरी प्रांतीय मंडळाच्या सदस्यांनीं आपापले उपयुक्त असे प्रस्ताव दिनांक १० मे १९५५ पर्यंत संमेलन कार्यालयांत पोंचतील अशा बेतानें पाठवावेत. त्या नंतर येणाऱ्या ठरावांचा विचार करण्याची शक्यता क्वचितच रहाणार आहे. संमेलनाध्यक्षांचे अनुमतीवरच तें अवलंबून राहील.

निबंध

संमेलनांत 'आयुर्वेदाची सद्यःस्थिति' ह्या विषयावर निबंध वाचला जावा; उत्कृष्ट ठरेल त्याच निबंधाचें वाचन होऊन त्यास १०० रु. पारितोषिक दिलें जावें अशी मुंबईचे वै. पेंडसे यांनीं स्वतःची इच्छा व्यक्त करून पारितोषकाची रक्कम म. प्रां वै. मं. च्या स्थायी कार्यालयाकडे पाठविली आहे. त्याबाबत विशेष माहिती वै. बिंदुमाधवशास्त्री पंडित, मंत्री, म. प्रां. वै. मं. स्थायी कार्यालय, नासिक हे देतील.

प्रदर्शन

प्रदर्शनांत निरनिराळया औषधी कारखान्यांचे स्टॉल ठेवण्यासाठीं १०×१० च्या जागेचें संमेलनावधीचें भाडें पंचवीस रुपये ठेवण्यांत आलें आहे.

'आमवात' विकारावर चर्चा

संमेलनांत आरोग्यविषयक उपयुक्त अशा निरनिराळया चित्रपट दाखवणेचीहि योजना होत आहे. योगासनांचे साहाय्यानें रोग बरे करण्याचे दृष्टीनें प्रात्यक्षिक व व्याख्यान ठेवण्यांत आलें असून 'आमवात' या विषयावर विद्वान् वैद्यांचीं चर्चात्मक भाषणेंहि व्हावयाचीं आहेत. वैद्यराज वेणीमाधवशास्त्री, साताराचे गो. आ. फडके, नाशिकचे वैद्यराज गोगटे इत्यादि विद्वान् मंडळी या चर्चेत भाग घेणार आहेत. अशा सर्व दृष्टीनें हें संमेलन वैद्यवर्गाप्रमाणेंच सामान्य जनतेस अत्यंत उपयुक्त असें होणार असल्यानें प्रांतीय वैद्यबंधु आणि आयुर्वेदप्रेमी व आरोग्यविषयाची आवड असणाऱ्या सज्जनांनीं ह्या संमेलनांत बहुसंख्येनें उपस्थित राहावें अशी नम्र प्रार्थना आहे. प्रतिनिधि शुल्क ५ रु. व संमेलनाचें स्वागत सभासद शुल्क ३ रु. आहे.

—वैद्य ब्रह्मदत्त शर्मा
कार्याध्यक्ष

देशभक्त स. का. पाटील यांचें शिफारस-पत्र

एस्. के. पाटील, एम. पी.
अध्यक्ष— मुंबई प्रदेश कॅांग्रेस कमिटी

कॅांग्रेस हाउस, मुंबई
४ एप्रिल १९५५

प्रिय मित्र,

हुबळी येथील वैद्यराज पां. वि. जायदे प्रसिद्ध दंतशास्त्रज्ञ यांचें नांव आपण ऐकलेंच असेल. योग व आयुर्वेदाधिष्ठित, शूल वा संमोहन-विरहित दंतोत्पाटनाच्या तंत्रशास्त्राचा आविष्कार त्यांनीं केला आहे. हृदयविकार, पक्षाघात वगैरे व्याधिपीडित लोकांचेंहि दंतोत्पाटन ते अत्यंत कौशल्यानें करतात, व दांत काढल्यानंतर अशा लोकांना त्यापासून पुढें कांहींहि नवा उपद्रव होत नाहीं मी त्यांना दंतोत्पाटन करतांना अनेक वेळां पाहिलें आहे व आतांपर्यंत त्यांनीं अखिल भारतांत ३०००० वर दंतोत्पाटन केलीं आहेत. श्री. जायदे हे देशभक्त आहेत. गरीबांना विनामूल्य वैद्यकीय मदत मिळावी, व स्वतःच्या शास्त्रीय दंतविज्ञान-पद्धतीचा प्रसार व्हावा ह्या हेतूनें ते दंतचिकित्सेचें कार्य मोफत करीत आहेत.

वैद्यराज जायदे ह्यांच्या ह्या अभिनव दंतोत्पाटन पद्धतीचें सुप्रसिद्ध दंत-वैद्यांनीं ‘ दंत-शल्यतंत्रांतील वैशिष्ट्यपूर्ण कला ’ म्हणून कौतुकानें स्वागत केलें आहे. त्यांच्या ह्या अभिनव दन्तोत्पाटन पद्धतीचें प्रात्यक्षिक अमेरिकेंतील वैद्यकीय कॉलेजातून व हॉस्पिटल्सूमधून दाखविण्याकरितां त्यांना अमेरिकेंतून निमंत्रणें आलीं आहेत. श्री. जायदे यांची ही कला म्हणजे दन्त-वैद्यकास एक भारतीय देणगी असून त्यांच्या ह्या अभिनव दंतचिकित्सातंत्राचा स्वदेशीं तसेंच परदेशीं प्रसार करण्यासाठीं आर्थिक मदत मिळण्यास ते सर्वथैव पात्र आहेत.

आणि म्हणून जर तुम्हास अगर तुमच्या संस्थेस त्यांना ह्या अमेरिकेंतील प्रचार दौऱ्याकरितां कांहीं मदत करता येणें शक्य असेल तर ती जरूर करा. अशी तुम्ही केलेली मदत ही एका उत्साही व महत्वाकांक्षी युवकाच्या ध्येयपूर्तिपेक्षाहि आयुर्वेदोन्नतिकारितांच केल्याचें श्रेय प्राधान्यानें तुम्हास मिळेल. वैद्य श्री. जायदे यांना आपण जी कांहीं मदत कराल याबद्दल मी आपला आभारी राहीन. आपलें हार्दिक अभिनंदन.

आपला विश्वासू
(सही) एस्. के. पाटील

महा. प्रां. सर्व वैद्यांस विनंति

वृद्ध वैद्यांची माहिती पाठवा

भुसावळेस होणाऱ्या प्रांतीय वैद्य संमेलनाच्या अधिवेशनास महाराष्ट्र प्रांतातील साठी उलटलेल्या वृद्ध वैद्यांचा सत्कार करून त्यांच्या आशीर्वादानें आजपर्यंत प्रांतीय संमेलनास लाभलेल्या यशाबाबत व त्यांनीं केलेल्या आयुर्वेदाचे सेवेबद्दल कृतकृयता व्यक्त करावी असा हेतु आहे. त्यासाठीं आपले भागांतील वृद्ध व विद्वान् वैद्यांची सविस्तर माहिती संकलित करून ती त्वरीत संमेलन कार्यालयाकडे पाठवावी अशी नम्र विनंति आहे.

या माहितीमध्यें पूर्ण नांव, संक्षिप्त चरित्र व चिकित्साकार्यातील वैशिष्ट्य या गोष्टींचा प्रामुख्यानें उल्लेख करावा.

विशेष सुचनाः- ही सर्व माहिती ५-५-५५ चे आंत इकडे पाठवावी अशी नम्र प्रार्थना आहे.

वै. ब्रह्मदत्त शर्मा, कार्याध्यक्ष
महाराष्ट्र प्रांतीय दशम वैद्य संमेलन, भुसावळ

म. प्रां. वैद्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष

— आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे —

यांच्या आयुष्यांतील ठळक घटना

वैद्यवर्य पांडुरंग हरि देशपांडे, आयुर्वेदाचार्य, याचा जन्म ता. ४।८।१९०२ रोजीं शिरवळ (ता. भोर, जि. पुणें) येथें झाला. त्यांचें प्राथमिक शिक्षण मराठी सहावीपर्यंत, व इंग्रजी मॅट्रिकपर्यंत शिरवळ, सातारा, व न्यू इंग्लिश स्कूल पुणें, येथें झालें. १९२० सालीं ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले, व कॉंग्रेसप्रणीत कॉलेज-बहिष्कारामुळें त्यांचें पुढील शिक्षण स्थगित झालें.

वैद्यक अभ्यासास प्रारंभ

मुंबईस प्राणाचार्य वासुदेवशास्त्री ऐनापुरे यांच्याकडे वारंवार जाण्यानें व अधूनमधून राहण्यानें त्यांच्या विद्वत्तेचा व प्रतिष्ठेचा परिणाम वैद्य पांडुरंगशास्त्री यांच्या मनावर बराच झाला. इतक्यांत प्राणाचार्य ऐनापुरे अध्यापक असलेल्या आयुर्वेद विद्यालयाची (मराठी वैद्यक वर्ग) जाहिरात त्यांच्या वाचण्यांत आली. लगेच जून १९२१ मध्यें ते सदर वैद्यक विद्यालयांत दाखल झाले. सुरुवातीला त्या विद्यालयांत कांहीं ग्रॅज्युएट १।२ डबल ग्रॅज्युएट व बहुतेक मॅट्रिक झालेले असे मिळून ५५ विद्यार्थी दाखल झाले होते, परन्तु शेवटपर्यंत मात्र २५ च विद्यार्थी टिकून राहिले.

वैद्यक-वर्गाचा शिकविण्याचा काल रात्रीं ८॥ ते १०॥ व पुढें सकाळींहि ७ ते ८ असा होता. नंतर सकाळीं ८ ते १० प्राणाचार्य ऐनापुरे यांचे दवाखान्यांत ते काम करीत. मधून मधून वैद्यभूषण हिर्लेकरशास्त्री यांच्याकडेहि प्रात्यक्षिकासाठीं जात. यांतच त्यांचेबरोबर घरीं जाऊन रोगी पाहणें, वर्गाच्या वनस्पती-दर्शनार्थ सहली, ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें वर्गाबरोबर शवविच्छेदन इ० गोष्टींचा अन्तर्भाव होता.

अध्यापक वर्ग

वर्गांत (१) प्रा. ऐनापुरे (२) वैद्यतीर्थ आप्पाशास्त्री साठे (३) वै. गुर्जर व (४) वै. भू. हिर्लेकरशास्त्री (५) वै. पाध्ये (६) वै. व्यास इ. अध्यापकवर्ग होता. पैकीं वै. अप्पाशास्त्री, वै. ऐनापुरे, वै. गुर्जर, व वै. हिर्लेकरशास्त्री यांनीं अनुक्रमें १-२-३-४ वर्षें शिकविलें. सकाळचा वर्ग दोन वर्षें नियमित एकटे वै. हिर्लेकरशास्त्रीच चालवीत होते. त्यांत अष्टांगहृदय व परीक्षेचा अभ्यास ते शिकवीत. पुढें पुढें रात्रींही तेच एकटे सर्व विषय शिकवूं लागले. त्यांनीं कांहीं औषधेंहि करवून घेतलीं. पण अनेक औषधें व प्रत्यक्ष दवाखान्यांत रोज सकाळीं २ तास काम (सन १९२२ ते १९२७ अशीं पाच वर्षें) कै. प्रा. ऐनापुरे यांच्याकडे फक्त वै. पांडुरंगशास्त्री देशपांडे यांचेंच झालें. त्यानंतर १९२७ सालीं ते अमरावतीस वै. हिर्लेकरशास्त्री याच्याकडे आचार्य पदवी परीक्षेचा अभ्यास करण्यास राहिले.

उत्तीर्ण परीक्षा

कै. प्रा. ऐनापुरे यांच्या वर्गांत शिकत असतांना ते १९२४ सालीं 'भिषग्', व १९२५ सालीं आयुर्वेदविशारद झाले. 'भिषग्' मध्यें निखिल भारतांतील सर्व विद्यार्थ्यांत तिसऱ्या क्रमांकानें व आयुर्वेदविशारद मध्यें द्वितीय श्रेणींत ते उत्तीर्ण झाले. त्यानंतर १९२८ सालीं 'आयुर्वेदाचार्य' परीक्षा ते पहिल्या श्रेणींत उत्तीर्ण झाले. (मुंबईच्या वर्गांतील हा एकच विद्यार्थी 'आचार्य' पर्यंत गेला.)

अभ्यासाव्यतिरिक्त उद्योग

वैद्यक-वर्गाव्यतिरिक्त दिवसां १०॥ ते ५॥ ह्या वेळांत त्यांनीं टाटा इंजिनिआरिंग कं. लि. मध्यें २ वर्षें व बॉटलिबॉय ॲण्ड पुरोहित या कंपनीमध्यें

६ वर्षे (टायपिस्ट व कॉरेस्पॉन्डन्स क्लार्क म्हणून) काम केलें. सायंकाळीं ६ तें ७ पर्यंत ते गायनवादनाचा अभ्यास करीत. तरीपण जातां-येतां, पहाटे व कार्यात्यांत मधल्या वेळीं ते वैद्यकाचा अभ्यास करीत.

पाठांतर

आयुर्वेदविशारद परीक्षा उत्तीर्ण झाल्यानन्तर प्रकृतिस्वास्थ्यासाठीं ते शिरवळ येथें हवापालटीसाठीं ६ महिने गेले. तेथें असतांना रोज ४ तास ते पाठांतर करीत. त्यांत १) माधवनिदान संपूर्ण] २) मदनपालनिघंटु [संपूर्ण] ३) रसरत्नसमुच्चय [महत्त्वाचा भाग] ४) आयुर्वेदप्रकाश [महत्त्वाचा भाग] ५) वैद्यजीवन [संपूर्ण] ६) अष्टांगहृदय [सूत्र-शारीर] ७) चरक-सुश्रुत [महत्त्वाचा भाग] एवढें पाठांतर केलें.

वक्तृत्वाभ्यास

स्वतः वै. हिर्लेकरशास्त्री मूर्तिमन्त वक्ते. तसेंच विद्यार्थ्यांनाहि वक्तृत्व यावें ही त्यांना हौस. विद्यार्थी चर्चामंडळ काढून त्यांनीं सतत ४ वर्षे दर आठवड्यांत एकेका विद्यार्थ्याचें एखाद्या प्रसिद्ध वैद्यराजाच्या अध्यक्षतेखालीं भाषण व त्यावर चर्चा चालविली. त्यांतील २।३ अग्रेसर वक्त्यांतील वैद्य पांडुरंगशास्त्री हे एक होते. वै. हिर्लेकरशास्त्री दरवेळीं सर्व चर्चेचा सविस्तर परामर्श घेत. त्यांत वक्तृत्वाचें शिक्षण पांडुरंगशास्त्री यांना मिळालें. त्याशिवाय वैद्य हिर्लेकरशास्त्रीबरोबर ते वेळोवेळीं सभासंमेलनास जात, व तेथें होणारीं त्यांचीं भाषणें व चर्चा यांचें जणूं त्यांना प्रात्याक्षिकच मिळे. मराठीखेरीज ते संस्कृत, गुजराथी व हिन्दीमध्येंहि जाहीर भाषण (वेळ मागून नेण्यापुरतें तरी) करूं शकतात. १९३६ सालच्या काशीच्या पंचमहाभूत-त्रिदोषचर्चा परिषदेंत वैद्य पांडुरंगशास्त्रींनीं दोन दिवस १५।१५ मिनिटें संस्कृत मधुर हिन्दीमध्यें अनेक पंडितांसमोर भाषण केलें. व ते सर्वांनीं शांतपणें ऐकून घेतलें. १९४४ सालीं बेळगाव्यांत वै. भू. हिर्लेकरशास्त्री यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या त्रिदोषचर्चापरिषदेंत एकेकच भाषा जाणणाऱ्या पंडितांकरितां वक्त्याच्या भाषणाचा हिंदी, संस्कृत वा इंग्रजी भाषेंतून अनुवाद करून सांगण्याचें बहुभाष्याचें काम वै. पांडुरंगशास्त्री यांनीं यशस्वी रीतीनें केलें.

लेखन

वै. भू. हिर्लेकरशास्त्री यांनीं विद्यार्थ्यांचे जणूं लेखनाभ्यासासाठींच 'आयुर्वेदचिकित्सक' मासिक सुरू केलें. आठ अंकांतच मासिक विराम पावलें खरें, परंतु लेखनाचा श्रीगणेशा त्यांतच सुरू झाला. नंतर 'आयुर्वेद' नियतकालिकानें त्यांना हात दिला. त्यांत कै. अप्पाशास्त्रींनीं त्यांचेकडून लेखन करवून घेतलेंच, परन्तु पुढेंहि मासिक बन्द पडेपर्यंत मधून मधून त्यांचें लिखाण त्यांत चालूं होतेंच. १९३८ सालीं 'आरोग्यमन्दिर' सुरू झाल्यावर त्यांत त्यांचें लेखन ५।६ वर्षें झालें. मधून मधून 'आयुर्विद्या', 'आर्यवैद्य' व 'संमेलन-पत्रिका' यांतून व अलिकडे 'आयुर्वेद पत्रिका' यांतून मधून मधून त्यांचें

- प्रमाणपत्र -

आपण जें जें औषध बनवितो व जनतेस देतो, तें तें प्रत्येक औषध सचोटीचें व गुण देणारें असलें पाहिजे; तरच त्याचें प्रमाणपत्र जनतेकडून आपणास मिळेल. तर अशा गुण देणाऱ्या खऱ्या, अस्सल व ताज्या औषधी खरेदी करण्यास विश्वासपात्र ठिकाण पाहिजे. त्याकरितां आपण

दि आल इंडिया करियाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

लिखाण चालूंच आहे. याशिवाय केसरी आदि वृत्तपत्रांतून त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत.

आतापर्यंत वैद्यकावर त्यांचें बरेचसें लिखाण झालें असून त्यांत टीकात्मक लेखनच विशेष आहे. त्रिदोष, शुद्धमिश्रशिक्षण व अलिकडे दोषक्षाणितावाद यांवरच टीकावाङ्मयाचा भर आहे. के. कविराज ज्योतिषचन्द्र सरस्वतींच्या 'आयुर्वेदशारीरे शारीरविनिश्चयः' यावर म्हणजे शारीर विषयावर थोडेसें टीकात्मक लेखन. पण बरेचसें समालोचनात्मक व गुणग्रहणात्मकहि आहे. वैद्यकावर लिहिलेल्या स्वतंत्र लेखनांत क्षय, श्वेतकुष्ठ, मधुमेह, निवडुंग, तमाखु, मोतिबिंदु, गिलायू, विषमज्वर, गंडमाळा इत्यादिवर स्वानुभूत-चिकित्साद्वारें रोगविवेचन करण्याचाहि प्रयत्न केला आहे. 'संगीत व वैद्यक' ही स्वतंत्र लेखमाला आयुर्वेदपत्रिकेंत छापून प्रसिद्ध झाली.

प्रसिद्ध अप्रसिद्ध ग्रंथ

१) स्वास्थ्य व २) वै. भू. हिर्लेकरशास्त्री यांचें संक्षिप्त चरित्र हीं त्यांनीं लिहिलेलीं दोन छोटीं पुस्तकें छापून निघालीं. तसाच विचार संगीत व वैद्यक या लेखमालेबाबतहि त्यांचा आहे. अष्टांगसंग्रह (के. किंजवडेकरकृत) ग्रंथाच्या स्वस्थवृत्ताला २० पानांचा संस्कृत उपोद्घात त्यांनीं स्वतंत्ररीत्या लिहिला. 'आयुर्वेद पत्रिके'च्या १) प्राणाचार्य ऐनापुरे २) वैद्यतीर्थ अप्पाशास्त्री साठे व ३) वै. त्र्यंबकशास्त्री या विशेषांकात त्यांचें लेखनबाहुल्य आहे. डॉ. हुपकरांच्या आयुर्वेदिक रिसर्च बोर्डातर्फे त्याचें स्वस्थवृत्त ग्रंथलेखनाचें (संस्कृत) काम पुरें होऊन व मान्यता मिळूनहि छापलें गेलें नाहीं.

संगीतावर हजार पृष्ठांचें लेखन

संगीत व तदितर विषयावरहि सुमारें हजार पृष्ठांचें त्यांचें वाङ्मय प्रसिद्ध झालें आहे. त्यांत टीकात्मक लेखन बरेंच. संगीताचें मराठीकरण, संगीतांतील नवमतवाद, निषादाचा तंबोरा, व संगीतांतील रसविचार यावर बरा टीकात्मक व राग-स्वर-लय-गायकी घराणी, यांवर व 'कलावंतांचें आरोग्य' यावर त्यांचें स्वतंत्र लेखनहि झालें आहे. 'गोविंद-गुण-गौरव' व 'सवाई गंधर्व' हे इतरांच्या लेखांसह पण स्वतःचें लेखन भूयिष्ठ असलेले दोन संगीत ग्रंथ (११५-१२५ पृष्ठांचे) स्वतंत्रपणें प्रसिद्ध झाले आहेत. तसेंच 'केसरी, लोकशक्ति, माधुरी, संगीतकला-विहार' इत्यादींतून त्यांनीं गायकांची शब्दचित्रें रेखाटलीं आहेत.

तेलगु-समाचार या मासिकाच्या मराठी विभागाचें संपादकत्व त्यांनीं पांच वर्षें केलें. वैद्यकांतील सुभाषितें हें त्यांचें अपुरें राहिलेलें लेखन या मासिकांत बरेच दिवस चालूं होतें.

अध्यापन-कार्य

१९३४ ते १९४२ पर्यंत त्यांनीं स्वतःचे वर्गांत भिषग्, विशारद व आचार्य परीक्षेचें अध्यापनकार्य केलें. ह्या त्यांच्या वर्गांतून ८-१० भिषग्, २-३ विशारद व एक आचार्य अशी मंडळी शिकून उत्तीर्ण होऊन बाहेर पडली. दरम्यान १९३७-३८ या दोन वर्षी अष्टांग आयुर्वेद महाविद्यालयांत त्यांनीं 'त्रिदोष' या विषयाचें अध्यापन केलें. १९४४ ते ४८ व १९५१ अशीं ६ वर्षें पुणें आयुर्वेद महाविद्यालयांत द्रव्यगुण व रसशास्त्र यांचें प्रात्यक्षिकाचें त्यांनीं अध्यापन केलें. त्याशिवाय एकेकटे चार विद्यार्थी स्वतंत्रहि त्यांनीं शिकविले. त्यांत (१) डॉ. शकुंतला भडकमकर, एम्. बी. बी. एस्. (२) प्रा. डाके, आयुर्वेदविशारद (३) वै. शांतिलाल शहा, बी. ए. एल्एल्. बी. (आयुर्वेदविशारद) व (४) आयुर्वेदाचार्य वि. आ. वेडेकर, एम्. ए. हे होत.

परीक्षकत्व

(१) पुणें येथील वेदशास्त्रोत्तेजक सभा [दोनदा]
(२) भारत आ. म. विद्यालय, अमरावती [एकदा]
(३) आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय सातारा [चारदा]
(४) नि. भा. आ. विद्यापीठ [१०-१२ वेळां] व
(५) स्टेट फॅकल्टी ऑफ आयुर्वेद, मुंबई [दोनदा]
याप्रमाणें त्यांनीं परीक्षकाचें काम केलें आहे.

वैद्यकेतर व्यासंग

संगीत, धर्मशास्त्र, समाजशास्त्र, न्याय, वेदांत व इतिहास या विषयांचा अभ्यास त्यांनीं कमीअधिक प्रमाणांत केला असून अजूनहि त्या विषयांचा त्यांचा व्यासंग चालूच आहे. भगवद्गीता १८ अध्याय मुखोद्गत असून तिचा शांकरभाष्य व गीतारहस्य यांच्याशीं तौलनिक अभ्यास, मनु-याज्ञवल्क्य स्मृतींतील श्लोकांचें पाठांतर व त्यांचें सटीक वाचन. संगीत पिढीजात असल्यानें त्याचा विशेष व्यासंग व त्यांत लहानपणापासूनच प्रवेश. ती. वडील, वे. नरहरभट वाळिंबे, यादवराव जोशी, बापुराव गोखले, के. सुरेशबाबु, बसवराज राजगुरु व इनायतखां हे त्यांचे गायनातील गुरु. तसेंच के. शंकरराव गोखले तबल्यांतील, व गणपतबुवा पुरोहित हे पेटींतील (हार्मोनियम) त्यांचे गुरु होत. प्रचारांतील बहुतेक रागांची व तालांची तालीम त्यांना मिळाली असून, चर्चा-संभाषणांतून व स्वतंत्र वाचनानें त्या विषयांतील अधिक तात्त्विक माहितीहि त्यांनीं करून घेतली आहे.

भारत नाट्यशास्त्र, संगीतरत्नाकर, नारदी शिक्षा, राग-विबोध या मूळ ग्रंथांचाहि बराच अभ्यास त्यांचा झाला आहे. शिवाय महत्वाच्या पंक्तींचें पाठांतर व भातखंडे, पोपले, पिंगळे इत्यादींचे इंग्रजी मराठी आधुनिक ग्रंथहि त्यांनीं वाचले आहेत. २-३ विद्यार्थ्यांना गायनाची तालीम दिली. संगीतावर प्रयोगासहित संशोधन करून कांहीं स्वतंत्र सिद्धांत त्यांनीं प्रस्थापित केले, व जुने सिद्ध केले. निषादाचा तंबोरा, ठासून व जोरकस पण मृदु स्वर लावण्याची पद्धति, रसमय गायन, यावरचे जुने सिद्धांत संयुक्तिक प्रतिपादणें व वैद्यकाला संगीताचा उपयोग हा नवीन सिद्धांत प्रस्थापित करणें ह्या गोष्टीहि त्यांनीं आपल्या वैद्यकेतर व्यासंगांत केल्या.

रोजचें परिशीलन

अगदीं सकाळीं थोडा वेळ पाठांतराची आवृत्ति तशीच सायंकाळीं गाण्याची. दुपारीं २।३ तास लेखन वा वाचन [या वेळांत रोगी न आल्यास] व भोजनोत्तर दोन्ही वेळेस प्रायः ललित व वैद्यकेतर वाचन.

शुद्ध आयुर्वेदीय चिकित्सा-व्यवसाय

१९२७-२८ मुंबईस दवाखाना चालविला, व १९२९ सालीं फैजपूर म्यु. दवाखान्यांत नोकरी केली. त्यानंतर १९३० पासून आजतागायत पुण्यास शुक्रवार पेठेंत स्वतःचें शुद्धायुर्वेदीय चिकित्सालय चालवित आहेत. आधुनिक साधनें क्वचित् वापरल्यास समन्वय करून दोषांचे भाषेंत त्यांची भाषा बसवितात. औषधें घरींच आपल्या देखरेखीखालीं तयार करतात. आरंभीं काढे रोग्यास घरीं करण्यास सांगत. पण अलीकडे कांहीं काढ्यांची अरिष्टें बनवून व इतर १०-१२ ग्रंथोक्त, असीं १८-२० आसवारिष्टें तयार करून ठेवून तीं वापरतात. त्यांचे जोडीला चूर्णें, भस्में, कुपीस्थ रसायनें, गुटिका, अवलेह इ. देतात. अनुभवानें स्थिर झालेलीं सिद्धौषधींचीं मिश्रणें स्वतंत्र नांवानें हल्लीं वापरतात. सायंकाळीं श्रीधूतपापेश्वरचे पुणें केन्द्रांत सन्मान्य वैद्य म्हणून सल्ला देण्याचें काम १९३६ पासून नियमित--पणें करीत आहेत.

अरविंद आयुर्वेदिक इंजेक्शनांच्या
किंमती अतिशय कमी केल्या
ग्राहकांना विशेष सवलत

ता. १।३।१९५५ पासून नवीन नियम लागू. 'सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन चिकित्सा या पुस्तकाची किंमत ३ रु. ऐवजीं १॥ रु. केली आहे. पोस्टेज १० आणे निराळे. पुस्तक व्ही. पी. नें पाठविलें जाणार नाहीं. २ रु. २ आणे म. ऑ. नें आगाऊ आल्यावर पुस्तक रजिस्टर्ड पोस्टानें पाठविलें जाईल.

पत्ता- अरविंद केमिकल वर्कर्स
छिंदवाडा [म. प्र.]

विषमानें प्रकृति ढांसळली

मुंबईस नोकरी करून वैद्यक-गायनादि अभ्यासाचे अविश्रांत श्रम, त्यांतच खानावळींत जेवण व कशीतरी स्नानशयनाची सोय, झोंपण्याची जागाहि सर्द, यामुळें १९२३-२४ सालांत त्यांना विषमानें पछाडलें. थोडें बरें वाटलें कीं काम. यामुळें त्यांची प्रकृति चांगलीच ढासळली. ताप गेल्यावर पुन्हां पांच वर्षें हाच कार्यक्रम. त्यामुळें वडिलार्जित अग्निमांद्याचा विकार त्यांना जडला. पुन्हां १९३२-३३ सालीं प्लेगामुळें झोंपडींत राहिले व त्यांत दुसरा विषमाचा झपाटा त्यांना आला. १९४८-४९ सालीं तर सान्निपातिक ग्रहणी व त्यासाठीं शस्त्रक्रिया यांनीं त्यांची प्रकृति अगदींच निकृष्टावस्थेस गेली. पण त्यांतहि त्यांचा मानसिक उत्साह केव्हांच ढळला नाहीं, व त्याचेच जोरावर आजवर त्यांचीं कामें चालू आहेत. त्यांच्या मानसिक उत्साहाचा ठेवा 'गुरुदत्त,' आहे. व त्याच श्रद्धेवर अत्यंत प्रतिकूल प्रकृतीहि कार्यक्षमता देते असा त्यांचा स्वानुभव आहे.

स्वभाव

त्यांचा स्वभाव अपमान व अन्याय सहन न करणारा आहे पण चिरकोपी नाहीं. वरिष्ठांशीहि निर्भिड वागतात. अन्यायाची व लबाडीची इतकी चीड आहे कीं, धंद्यांतहि रोग्याकडून अन्यायानें कांहीं घेत नाहींना याकडे जरूर लक्ष्य असतें. कुटुंबीयांनीं ठराविक शिस्तीनें वागण्याकडे कटाक्ष त्यामुळें मुलांचें वळण व अभ्यास बरा बहुतेकांना शिष्यवृत्त्या मिळून त्यांचे अभ्यास चालू असतात.

"केवळ भारतातच नव्हे तर युरोप अमेरिकेतहि ज्यांच्या कौशल्याबद्दल औत्सुक्य निर्माण झालें आहे, अशा सुप्रसिद्ध दंतवैद्य पां. वि. जायदे यांचीं दोन संग्राह्य पुस्तकें:-
१) दंतरोग विज्ञान आणि चिकित्सा ३ रु.
२) वैद्यसन्मित्र (हिंदी) भाग १ ला २ रु.
मिळण्याचीं ठिकाणें:-
१) वैद्यक ग्रंथ भांडार- नाशिक
२) पां. वि. जायदे, नारायण चौक-हुबळी

आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे यांचें अल्प चरित्र वर दिलें आहे. अशा थोर योग्यतेचे कार्यक्षम अध्यक्ष म. प्रां. वैद्य संमेलनास लाभले हें प्रां. वैद्य मंडळाचें भाग्यच समजलें पाहिजे.

वर्गणी कमी करूं नये!

आयुर्वेद पत्रिकेची वर्गणी (रु. ६) कमी न करता पत्रिकेचीं पानें वाढवून त्यांत ११ अप्रसिद्ध ग्रंथ सार्थ प्रसिद्ध करण्याची व्यवस्था व्हावी.

याशिवाय पूजनीय यादवजी यांनीं मूळ संस्कृत ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. त्यापैकीं कांहींची मराठी भाषान्तरें होणें राहिलीं आहेत. त्याकडेहि लक्ष देणें जरूर आहे.

आज जें अगदीं जरूर व लोकप्रियता पावेल तेंच आधी प्रसिद्ध करण्याचे ठरवावें.

किन्हई —ग. कृ. पाटणकर

वाचकांचा पत्रव्यवहार

तृणज्योतीचे संशोधक

(श्री. नाना बापट यांचें पत्र)

तृणज्योतीचे संशोधक श्री. जगत् महाराज यांना आपलेकडे पाठवीत आहे. त्यांना जंगलांतील वनस्पतींचीं चांगली ओळख व माहिती आहे. आमचेकडील जंगलांत सांपडणारी परन्तु आपलेकडे दुर्मिळ असलेली कच्ची औषधी द्रव्यें कोणतीं आहेत याची चर्चा त्यांचेशीं करावी. वनवासी सेवा मंडळातर्फे जंगलांत सहकारी दुकानें चालू करण्यांत आली आहेत. त्यांचे मार्फत आम्हीं आपलेकडे माल पाठवूं शकूं! तृणज्योतिहि धाडता येईल.

जडीबुटीचे त्यांचे ज्ञानासंबंधीं आपण आपला अभिप्राय कळविल्यास पुढील कामाचें दृष्टीनें बरें होईल.

आपला
नाना बापट

छिंदवाडा,

नाशिकच्या अनाथ विद्यार्थीगृहांत आयुर्वेदाचे विद्यार्थ्यांना प्रवेश

अनाथ विद्यार्थी गृहाच्या नाशिक शाखेंत थोडे नवीन विद्यार्थी घ्यावयाचे आहेत. त्यांत शुद्ध आयुर्वेदाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकेल. चार आणे पाठवून छापील अर्जनमुना भरून पाठवावा.

मध्यम स्थितींतील कांहीं अर्धअनाथ विद्यार्थी पण घ्यावयाचे आहेत. त्यास भोजन राहणेस जागा दिवाबत्ती व देखरेख ही संस्थेकडून मिळतील. त्याचा अंशतः खर्च रु. २० दरमहा पडेल. असें कळते.

वैद्य जगन्नाथराव माने नागपूर

मध्यप्रदेश रजिस्टर्ड वैद्य-हकीम संघाचे मंत्री पं. व्यासनारायण शुक्ल आयुर्वेदाचार्य कळवितात कीः- 'नागपूरचे सुप्रसिद्ध वैद्य जगन्नाथराव माने (इंदूरकर) यांच्या निधनाची बातमी वाचून अत्यंत दुःख झालें. वैद्यराज माने हे खरोखरच राजवैद्य होते. त्यांनी श्रीमंताप्रमाणेंच या प्रांताच्या गरीबजनतेचीहि मनःपूर्वक सेवा केली. आयुर्वेदाच्या क्षेत्रांत त्यांनी केलेली कामगिरी खरोखरच भूषणास्पद आहे. वै. माने यांच्या निधनानें प्रांतांतील वैद्यसमाजाची आणि वैद्यक क्षेत्राची कधीं न भरून निघणारी हानी झाली आहे. ते वैद्यकाच्या क्षेत्रांत निरनिराळया प्रचलित उपचार पद्धतींचा चांगुलपणा एकत्र करून त्यावर नव्या भारतीय वैद्यक शास्त्राच्या उभारणीचे पुरस्कर्ते होते व कार्यास सक्रीय हटल्या त्यांनी आपणास वाहून घेतलें होतें.'

म. प्रां. वैद्य संमेलन भुसावळ

देणगी देणाऱ्यांची यादी (पुढें चालू)

झंडू फार्मसी	मुंबई	१०१	रु.
श्री. वि. नार्वेकर	,,	५१	,,
श्री. रतिलाल सुंदरलाल	,,	२५	,,
श्री. पर्ल कम्पनी	,,	२५	,,
आयुर्वेदीय औ. भांडार	,,	२५	,,
वै. रामगोपालजी आयुर्वेदाचार्य,	मुंबई	२१	,,
डॉ. एस. एम्. गुजराती,	निजामपूर	२१	रु.
शेठ भेरुलाल मेघराज	भुसावळ	२१	,,
श्री. दत्तात्रय लक्ष्मण रिसबूड	,,	२०	,,
श्री. जयन्तीलाल ठाकूर	मुंबई	११	,,
वै. बी. बी. जोशी चांगदेव		११	,,
श्री. चि. ना. गर्गे,	साक्री	११	,,
श्री. मा. या. रोहडे,	साक्री	११	,,
श्री. के. एस. जोशी	पाडळदे	११	,,
श्री. शा. दा. जोशी	विरदेल	११	,,
श्री. भाऊसाहेब शिंदे	मुम्बई	१०	,,
श्री. बी. आर. पवार	,,	१०	,,
हकीम आबासअली	नामपूर	१०	,,

स्वाध्याय मंडळ [पारडी] चीं नवीन पुस्तकें
अथर्ववेदका सुबोध भाष्य कांड १ ते ३१ २६ रु.
सूर्यभेदन व्यायाम ०।।। रु.
एकादशीचा उपवास ०।० रु.
वैदिक सर्पविद्या १।।।= रु.
आसन २।। रु.
सूर्यनमस्कार १ रु.
आरोग्यासाठीं योगसाधन (भाग १,२) ४ रु.
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

राजकारणांतील अभिनिवेशन ?

वैद्यराज डेग्वेकर यांचें आयुर्विद्येस पत्र

देसाई चिकित्सालय, गोलबाजार, जबलपूर दि. १५-२-१९५५

श्रीयुत संपादक, 'आयुर्विद्या' पुणें यांस कृ. सा. न. वि. वि.

'आयुर्विद्ये'च्या जानेवारी १९५५ च्या अंकांत पृ. २३३ वर आपण माझें पत्र व त्यावरील आपला खुलासा प्रसिद्ध केला आहे.

ता. १ ऑक्टोबर १९५४ च्या 'आयुर्वेद पत्रिके'च्या अंकांत 'वैद्य बागेवाडीकर यांचीं विधानें' या लेखांत २२१ पानावर शुद्ध आयुर्वेदवाल्यांची भूमिका असें शीर्षक आहे. व त्या शीर्षकाखालीं (वाक्य नं. १) "आम्हा शुद्धायुर्वेदीय वैद्यांस केवळ शुद्ध आयुर्वेदवाल्यांशींच विचारविनिमय करावयाचा आहे" असें म्हणून पुढें (वाक्य नं. २) "शुद्धायुर्वेदीयांची भूमिका अशी कीं, ग्रंथचतुष्टयांत जे जे विषय प्रतिपादन केले आहेत ते तसेच आहेत असा त्यांचा आत्मविश्वास आहे" असें म्हटलें आहे.

याच दोन वाक्यांवरून 'वैद्य डेग्वेकर हे राजकारणांतल्या अभिनिवेशापासून अलिप्त आहेत, असें कसें म्हणावयाचें' असा प्रश्न आपण केला आहे. अर्थात् हीं दोन वाक्येंच माझा राजकारणांतील अभिनिवेश सिद्ध करितात असें आपलें मत आहे.

आतां प्रश्न असा कीं, या दोनहि वाक्यांत वापरलेला (१) 'शुद्ध आयुर्वेदीय' हा शब्दच 'राजकारणांतील अभिनिवेश' सिद्ध करतो किंवा (२) 'शुद्धायुर्वेदीयांशींच विचारविनिमय करावयाचा, अर्थात् मिश्र आयुर्वेदीयांशीं तो करावयाचा नाहीं ही वृत्ति' तो राजकारणांतील अभिनिवेश सिद्ध करतो हें पहावयाचें.

पैकीं (१) 'शुद्धायुर्वेदीय' हा शब्दच जर तो 'राजकारणांतील अभिनिवेश' सिद्ध करीत असेल तर, तो शब्द आपणहि आपल्या संपादकीय स्फुटांत अनेक जागीं वापरलेला आहे. पैकीं-फक्त नमुन्यादाखल-एक वाक्य 'आयुर्विद्या' नोव्हेंबर १९५३ च्या अंकांत पान १६० वर 'आत्मचिंतन' सदराखालीं असलेलें उद्‍धृत करितो, तें असें :- "गतांकीं गुरुपरंपरा व शुद्धायुर्वेद या बाबतींतलीं कठोर सत्यें आम्हाला जनतेपुढें दुःखानें मांडावीं लागलीं" या स्फुटात 'शुद्धवादी मंडळी,' 'शुद्ध वैद्य' 'शुद्ध आयुर्वेदीयांची चळवळ', गुरुपरंपरावाले' इ० शेलके शब्द अनेक वेळा वापरले गेले आहेत. तेव्हां मी वापरलेला तो 'शुद्धायुर्वेदीय' शब्द जर माझा 'राजकारणांतील अभिनिवेश' सिद्ध करीत असेल, तर तो कित्ता प्रथम 'आयुर्विद्या' संपादकांनींच घालून दिलेला आहे. मग तो गिरविण्यांत माझ्यावर दोष प्रस्थापित होत नाहीं. उलट 'महाजनो येन गतः स पन्थाः' या उक्तीप्रमाणें तो गुणच ठरतो.

(२) आतां 'शुद्धायुर्वेदीयांशींच विचारविनिमय करावयाचा' ही वृत्तिच जर तो 'राजकारणांतील अभिनिवेश' सिद्ध करीत असेल, तर ती वृत्ति नैसर्गिक आहे. कारण 'समानशीलव्यसनेषु सख्यम्' किंवा 'Birds of the same feather flock together' हा नैसर्गिक नियम, शास्त्रीय विनिमयास देखील लागू पडतो. कारण तसें न झालें तर, किंवा न केलें गेलें तर, वादाचा कधींच अंत होणार नाहीं.

आपापला मार्ग चोखाळूं द्यावा

एक व्यक्ति जर पूर्वेकडेस जाऊं लागली आणि दुसरी पश्चिमेकडे, तर पृथ्वी गोल असल्याखेरीज ते कधींहि भेटूं शकत नाहींत. आणि पृथ्वी गोल आहे, म्हणून ते पुढील पांच-पंचवीस वर्षांनंतर भेटतील ही

नक्की परन्तु सध्यांतरी त्याला वेळ लागेल. आयुर्वेदाची उन्नति एका मार्गानें होईल असें एकास वाटतें, तर दुसऱ्यास दुसऱ्या मार्गानें होईल असें वाटतें. ह्मणून प्रत्येकास आपापला मार्ग चोखाळूं द्यावा. अन्तिम परिणामावरून कोणाचा मार्ग शुद्ध होता तें ठरेल. त्यांत 'शुद्धायुर्वेदीय' व्यक्तींना आपल्या मताचे लोक गोळा करून कार्य करूं द्यावें. त्यांना शिव्याशाप दिल्यानें ते कधींच परावृत्त होणार नाहींत, असो.

ज्या 'वैद्य बागेवाडीकर यांचीं विधानें' या विषयावर आयुर्वेद-पत्रिकेच्या अंकांत मी टीका केली त्या वैद्य बागेवाडीकरांना मी शुद्ध आयुर्वेदाचेच अभिमानी असें मानीत आलों आहे. कारण पनवेलला झालेल्या महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनांत ते संमिलित झाले होते, आणि मुंबईतील शुद्धायुर्वेदीयांच्या परिषदेंतहि ते उपस्थित होते. तसें नसतें तर मी त्यांच्या लिखाणास कधीं उत्तरच दिलें नसतें. असें करण्यांत कोणतेंहि राजकारण नसून, फक्त विचार परंपरांत मूलतः विरोध असणाऱ्या व्यक्तीमध्यें झालेला शास्त्रीय वादहि निरुपयोगी ठरतो हें होय.

थोडें विचारपूर्वक लिहिलें याबद्दल क्षमा करावी, व विरोध टाळणें हा जो माझा उद्देश तो लक्षांत घ्यावा ही विनति.

आपला

[सही] भि. वि. डेग्वेकर वैद्य

आयुर्वेद उपचारांनीं वजन कमी केलें

संत तुकडोजी महाराजांच्या प्रकृतींत आयुर्वेदीय उपचारानें बराच फरक घडून आला आहे. तीन वर्षांपूर्वी त्यांचें शरीर बरेंच स्थूल झालेलें अनेकांनीं पाहिलेलें आहे. त्यावेळीं त्यांचें वजन २१५ पौंड झाले होतें, व जणु दुसऱ्याचा हात धरून चालावें लागत होतें. चेहेराहि धुंद असा दिसे.

स्थूलपणानें कार्यक्षमता कमी होते

अशा प्रकृतींत आपण कांहीं कार्य करू शकणार नाहीं हें महाराजांनीं जाणलें व पंढरपुर येथील एक भजनसांप्रदायी वैद्य म्हैसूरकर यांच्या देखरेखीखालीं त्यांनीं लंघन-चिकित्सा घेतली.

१८ दिवस फक्त जलसेवन

सुमारें १८ दिवस ते पाण्यावर राहिले, त्यावेळीं ७ दिवस मधून मधून जुलाब पण घेत असत. रोज १०-२० जुलाब होत. पण थकवा येत नसे, उत्साह वाटे. नंतर ४५ दिवस गाईचे दुधावर ठेवले, एक वेळ दूध घेणें सुरूं केलें, व एक वेळ अन्न. यानंतर नेति धौति व जलबस्ति चालूं ठेवला. अशा क्रमानें त्यांनी आपलें वजन ६० पौंड कमी केलें. सध्या वजन १५५ पौंडाच्या आसपास आहे. अजूनहि १० पौंड वजन कमी करण्याचा त्यांचा मानस आहे.

योगाचीं आसनें व नेति धौति बस्ति या क्रियाहि ते शुद्धीसाठीं अवलंबित आहेत असें कळतें.

ही चिकित्सा त्यांनीं ३ वर्षां पूर्वी कार्तिक महिन्यांत घेतली. अतिस्थूल माणसांत दीर्घकालपर्यंत लंघन चिकित्सा कालज बलप्राप्त होण्याच्या कालांत घेणें योग्य, हीहि गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे.

चुकीची दुरुस्ती

भुसावळ येथें भरणाऱ्या म. प्रां. वैद्य संमेलनास आयुर्वेदाश्रम फार्मसी अहमदनगरकडून मिळालेल्या देणगीची रक्कम १५१ रुपये आहे. चुकीनें तो आकडा १२१ असा छापला गेला होता.

पुणें येथें
'आयुर्वेद सेवा संघ, नासिक' चीं
सर्व औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें २

वाचकांचा पत्रव्यवहार

स्वराज्यांतील गुन्हा ?

मी मलठण ता. शिरूर जि. पुणें येथें रहात असून आमचे घराण्यांत परम्परागत वैद्यकीचा धन्दा चालत आलेला आहे. आमचें घराणें गिरी गोसाव्याचें आहे. माझे वडील भीमगीर चिमणगीर हे या भागांत नामांकित वैद्य होऊन गेले. माझें वय ६५।६६ वर्षांचें असून मीहि वैद्यकीचा व्यवसाय करीत आलेलो आहे. नोंदणीसाठीं मी रु. ११ भरून ट्रायब्यूनलकडे अर्ज पाठविला होता. त्यांनीं काय चौकशी केली ईश्वर जाणें, परन्तु मला लायसेंस मिळालें नाहीं. कारण मी शेतीचाहि व्यवसाय करीत आहे. शेती करून वैद्यकीय मदत देणें हा या राज्यांत गुन्हा होतो हें नवल होय ! खेड्यात कोणत्याहि पद्धतीची वैद्यकीय मदत मिळण्याची पंचाईत असते. घरची शेती संभाळून जें कांहीं सेवाकार्य आम्ही करीत होतो व त्यामुळें जी रुग्णसेवा होत होती ती आतां आम्हांस देतां येणार नाहीं असें दिसतें.

सरकारचें मिशनऱ्याकडे दुर्लक्ष

देशी वैद्यव्यवसायी माणसांनाच हा नोंदणी कायदा जाचक ठरत आहे. घोडनदीस अमेरिकन मुक्ति फौजेचा दवाखाना आहे, त्या दवाखान्यावर श्री. रमणलाल कापडीया नांवाचे, कोणतीहि सरकार-मान्य पदवी नसलेले अनूरजिस्टर्ड गृहस्थ डॉ. म्हणून रोगी तपासतात, गांवोगावीं जाऊन इंजेक्शनें व औषधें देतात. अशाबद्दल काळ आदि वर्तमान पत्रांत लिहूनहि आलेलें आहे. सरकारचें तिकडे दुर्लक्ष आहे. कारण ते मिशनरी आहेत व आम्ही देशी लोक आहोत.

पुनर्नोंदणीचा फार्स

माझ्या वैद्यकीय व्यवसायांतील लौकिकाबद्दल शिदिजातपणाबद्दल या वैद्यकीय ट्रायब्यूनलनें कांहीं चौकशी केली असती व मग निर्णय घेतला असता तर तक्रारीस जागा नव्हती ! पण पुनर्नोंदणीचा हा फार्स करून सरकारनें पैशाच्या प्राप्ति व्यतिरिक्त अन्य कांहीं साधल्याचें दिसत नाहीं.

आम्ही काय करावें ?

अशा स्थितींत आम्ही काय करावें? आम्हांस व्यवसाय चालूं ठेवतां येईल काय? धर्मार्थ अगर अयाचित-वृत्तीनें जें कांहीं मिळेल तें घेऊन रुग्णसेवा स्वधर्मास राहून करतां येईल काय?

आपला विश्वासु

लालगीर भीमगीर गोसावी

[शेती करून वैद्यकी करण्याला बंदी घालण्याचा सरकारचा उद्देश कायदा करतांना नव्हता, पण कायदा पास झाल्यानंतर त्याचा अमल करण्यासंबंधी जे नियम बनविण्यांत आले, त्यांत हा अडथळा डॉ. जागू. प्रभृति त्यावेळेच्या सरकारच्या सल्लागारांनी घातला असें कळतें. या अडथळयामुळें कायदा करण्याचा मूळ उद्देश एकदम रसातळाला गेला व खेड्यांतील जनता-सेवक हे गुन्हेगार ठरण्यास लागले. कायदा गाढव आहे, असें जें म्हटलें जातें तें यालाच !

झाल्या गोष्टीला इलाज नाहीं, आतां कायद्यांत पुनः दुरुस्ती करणें ही गोष्ट कायदेमंडळाच्या आधीनची आहे, वैद्यांच्या स्वाधीनची नाहीं. वैद्यांना इतःपर करतां येण्यासारखी गोष्ट एवढीच आहे की, त्यांनीं त्यांना चांगलें कळतें तेवढ्याच बाबतींत आयुर्वेदीय उपचार करावेत. सर्व रोगाच्या सर्वांवस्थेंत आम्हीं उपचार करू शकतो असें म्हणू नये. लोकांना झुलवू नये व त्यांच्या कडून पैसे उकळण्याचा प्रयत्न करू नये.

जेथें वैद्यडॉक्टर नाहींत तेथें उपचार करणारास अनूरजिस्टर्ड वैद्य-डॉक्टरास कायद्यानें बंदी नाहीं, त्यांना व वृद्ध वैद्यांना भिण्याचें कारणच नाहीं. खेड्यांत उपचार केल्याबद्दल शिक्षा होणार नाहीं.

सरकार आतां फिरत्या प्रचारकाद्वारें पण खेड्यांत औषधें वाटणार आहे. अशावेळीं वद्य-डॉक्टर नाहींत अशागांवीं योग्य उपचार करून त्याची वाजवी फी घेण्यास कायदा प्रतिबन्ध करणार नाहीं, करीत नाहीं. —संपादक]

ग्रामीण भागांत वैद्यकीय मदत

यापुढें जिल्हा प्रसिद्धि अधिकारी आपल्या दौऱ्याचे वेळीं विशेष आजारी ग्रामस्थांना सर्वसाधारण आजारांवरील औषधें देतील. खेडेगांवांतील पोट-दवाखान्यांच्या योजनेखालीं समाजसेवकांकडे जीं औषधें देण्यांत येतील तीं जिल्हा प्रसिद्धि अधिकाऱ्यांनाहि पुरविण्याचें सरकारनें ठरविलें आहे. यासाठीं जिल्हा प्रसिद्धि अधिकाऱ्यांना सिव्हिल हॉस्पिटलांत १५ दिवसाचें शिक्षण देण्यांत येईल. [सरकारी पत्रक]

[योग्य रीतीनें शिक्षण घेऊन व निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठासारख्या संस्थेच्या परीक्षा देऊन तयार झालेल्या वैद्यहकीमांना व्यवसाय करण्यास मुंबई राज्यांत बंदी आहे. अशा वेळीं झटपट १५ दिवसांत तयार होणाऱ्या चिकित्सकाकडे आयुर्वेद व युनानी बोर्ड व सर्जन जनरलचें ऑफिस कशा रीतीनें लक्ष पुरविणार आहे तें कळल्यास बरें होईल.

खेडेगांवांतील जाणत्या लोकांनीं अशा आजारी लोकांना औषधें दिलीं व ते बरे झाल्यावर या लोकांना [पगार नसल्यामुळें] अल्पस्वल्प मोबदला मिळाला तर तो गुन्हा होईल काय ? असा प्रश्न विचारला जाईल.

याचें उत्तर हेंच आहे कीं जेथें रजिस्टर्ड वैद्य रजिस्टर नाहीं तेथें कोणासहि वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा आहे. — संपादक]

——

भुसावळच्या वैद्यसंमेलनांत

भूनाग-पारदबंधन

पूर्वी आयुर्वेदपत्रिकेंत वैद्यगुरु श्री. दा. अ. हुबळीकर यांनीं पारदप्रयोग, पोतविधि इ. प्रयोग करून दाखविले जातील व शिकविले जातील असें प्रसिद्ध झालें होतें. त्याप्रमाणें मी वरील प्रयोग शिकण्यासाठीं हुबळी येथें आलो आहे.

सदर भूनाग + पारदबंधन प्रयोग भुसावळच्या वैद्यसंमेलनांत करून दाखवावा अशी माझी इच्छा आहे.

—बा. वि. नलावडे

———

शुद्ध आयुर्वेद विद्यालयास सटाणें येथें मिळालेल्या देणग्या

श्री डॉ. द. श्री. खरे,	सटाणा	३ रु.
,, केशव गोपाळ मोरे	,,	१ ,,
,, शिवराम नारायण पंडित	,,	१ ,,
,, बापुशेट जाधव	,,	१ ,,
,, वै. त्र्यं. म. मोडक	,,	१ ,,
,, व्यंकटेश पांडुरंग नगरकर	,,	१ ,,

———

आयुर्वेद पत्रिकेची वर्गणी ६ रु.

१ एप्रिल १९५५ पासून भारत सरकारनें वर्तमानपत्री कागदावर एक्साइज कर बसविल्यामुळें कागदाच्या किंमती पुनः वाढूं लागल्या आहेत. त्यामुळें पत्रिकेची वर्गणी कमी करण्याचा विचार स्थगित करावा लागत आहे.

मात्र ज्यांना ६ रु. वर्गणी भरणें परवडत नाहीं त्यांनीं पाठविलेली ४ रु. वर्गणी स्वीकारण्याचें धोरण ठेवण्यांत येणार आहे. आयुर्वेद पत्रिकेची वर्गणी ६ रु. आहे असेंच समजावें.

— व्यवस्थापक

औषधी-भवनाचीं नागपुरांत ३ विक्री-केन्द्रें

कळविण्यात आनन्द वाटतो कीं नागपूर येथें नासिकच्या आयुर्वेद औषधी भवनाचीं शास्त्रशुद्ध औषधें मिळण्यासाठीं ३ केंद्रें सुरू करण्यांत आलीं आहेत.

महाल केन्द्र— श्री. माधव गंगाधर परांडे
चितारओळ केंद्र-- वैद्य गोविंद गंगाधर परांडे
सिताबर्डी केंद्र-- वैद्य त्र्यंबक विष्णु गाडगीळ

आयुर्वेद सेवासंघ औषधीभवन, नाशिक

मुंबई कायदेमंडळांतील प्रश्नोत्तरें

घरीं जाण्यास नाकबूल रुग्ण

कांहीं रुग्ण बरे झाल्यामुळें त्यांना चिकित्सेची जरूर नसतांहि मुंबईच्या सरकारी रुग्णालयांतून आपले घरीं जाण्यास नाकबूल असतात, ह्याची माहिती सरकारला आहे. असे रुग्ण मुंबईतील असल्यास त्यांना हॉस्पिटलच्या ॲम्बुलन्स गाडीमधून त्यांच्या घरीं पोहोंचविण्यांत येते. व बाहेरगांवचे असल्यास वैद्यकीय व सामाजिक कार्यकर्त्यांचे मदतीनें त्यांना त्यांच्या गांवीं घरीं नेऊन पोहोंचविण्यांत येतें.

त्याचप्रमाणें असाध्य स्थितींतील रुग्णहि मुंबईतील कांहीं सरकारी हॉस्पिटलमधून दीर्घ कालपर्यंत ठेवण्यांत येतात व त्यामुळें नवीन प्रवेशेच्छु अन्तर्रुग्णास कांहीं वेळां प्रवेश देण्यास जागेच्या अभावीं अडचण पडते याचीहि सरकारला खबर आहे.

जीर्ण रोगांवर चिकित्सा करण्याकरितां एखादें 'दुर्बल रुग्णालय' सुरूं करण्याबाबत सरकार विचार करीत आहे.

मोफत औषधें कोणाला ?

मुंबई, बडोदा, अहमदाबाद, पुणें आणि सोलापूर येथील सरकारी रुग्णालयांत अन्तःप्रविष्ट रुग्णास, ज्याचें कौटुंबिक मासिक उत्पन्न १८० रु. पेक्षां कमी आहे व अन्यत्र ठिकाणच्या रुग्णालयांत ज्याचें कौटुंबिक मासिक उत्पन्न १५० रु. पेक्षां कमी आहे, अशा रुग्णास मोफत औषधोपचार व चिकित्सा करण्यांत येते.

सेन्ट जॉर्जेस हॉस्पिटल, मुंबई येथें मात्र ज्याचें वैयक्तिक मासिक उत्पन्न ६५ रु. पेक्षां कमी आहे अशा रुग्णास मोफत चिकित्सा करण्यांत येतें. त्याचप्रमाणें वरीलप्रमाणें उत्पन्न असणाऱ्या बाह्य रुग्णास प्रत्येक वेळच्या औषधास १ आणा फी पडते; परन्तु रुग्ण अगदीं गरीब असल्यास संबंधित वैद्याधिकारी १ आणा फी न घेतांहि अशा रुग्णास मोफत औषधोपचार करतो.

फी देणाऱ्या रुग्णांपासून कोणत्या दरानें फी घेण्यांत येते यासंबंधीं सविस्तर माहिती दि. १९।११ १९५३ च्या बॉम्बे गव्हर्नमेंट गॅझेटमध्यें पान नंबर ११९९८ ते १२००३ वर दिली आहे.

हुबळी येथें मेडिकल कॉलेज

हुबळी येथें मेडिकल कॉलेज बांधण्याकरितां मुंबई सरकारनें जागा खरेदी केली आहे. बांधकामाची योजना व खर्चाचा अंदाज याची निश्चिति अद्याप झालेली नाहीं. हें कॉलेजचें काम द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्याचा सरकारचा मानस आहे. ह्या कामाचा ठोकळ अंदाज १। कोट रुपयाचा आहे. सविस्तर योजना व खर्चाचा अंदाज एक्झिक्युटिव्ह इंजिनियर सध्यां करीत आहेत.

उष्णोदकाचे झरे

ठाणे जिल्ह्यांत अकलोली व वज्रेश्वरी या गांवीं उष्णोदकाचे पुष्कळ झरे आहेत व त्या झऱ्यांच्या कुंडांत निरोगी तसेंच संसर्गजन्यरोगदूषित लोक एकाच वेळीं स्नान करतात व त्यामुळें संसर्गजन्य रोगांचा निरोगी माणसांत फैलाव होण्याचा संभव असतो याची सरकारला जाणीव आहे. ही अनिष्टापत्ति टाळण्याकरितां ह्या झऱ्यांचा उष्णोदकस्नानस्थान व खनिज उष्णोदकचिकित्सा-स्थान म्हणून स्वतंत्र रीत्या उपयोग करण्यांत यावा, या योजनेचा सरकार विचार करीत आहे.

कामगार विमा योजना

मुंबई राज्यांतील ज्या भागांना कामगार-विमा-योजना लागू करण्यांत आली आहे त्या सर्व भागांतून ता. २८ फेब्रुवारी १९५५ पर्यंत ४६४४८६ कामगारांनीं आपलीं नांवें ह्या योजनेखालीं नोंदविलीं आहेत.

मुंबईराज्यांत औद्योगिक कामगारांची संख्या साधारणपणें ७२२००० इतकी आहे; व ह्या विमायोजनेखालीं येण्यास पात्र असलेल्या बदली कामगारांची

संख्या जमेस धरून साधारणपणें ७७०००० औद्योगिक कामगार मुंबईराज्यांत आहेत.

विमा योजनेचें कार्य एकंदरींत समाधानकारकपणें चाललें आहे; परंतु ज्या कांहीं तक्रारी व अडचणी सरकारकडे व कामगार विमा-योजनेच्या कार्पोरेशनकडे आल्या आहेत त्यांतील खऱ्याखुऱ्या अडचणींचें निराकरण करण्यांत आलें आहे व केलें जात आहे.

रोगप्रतिबंधक योजनेसाठीं २॥ कोटी रुपये

राज्यांतील सार्वजानिक रोगप्रतिबंधक योजनेंत खालील गोष्टींचा अंतर्भाव होतो.

(१) सार्वजनिक आरोग्य खात्याची स्थापना, या खात्याचा मुख्याधिकारी ' डायरेक्टर ' असून त्याच्या मदतीस आठ असिस्टंट डायरेक्टर्स आहेत. जिल्हानिहाय एक सार्वजनिक आरोग्यपथक असून त्याचा मुख्याधिकारी डिस्ट्रिक्ट हेल्थ ऑफिसर असतो व त्याच्या मदतीस एक सांथीचे रोगप्रतिबंधक वैद्याधिकारी, ४ अगर ५ सॅनिटरी इन्स्पेक्टर्स, व तालुकानिहाय २ देवी डॉक्टर्स (अगर १ देवीडॉक्टर व १ सॅनिटरी सब-इन्स्पेक्टर) व सार्वजानिक आरोग्याचीं कामें करण्यासाठीं एक कामगार-पथक.

(२) पाणी पुरवठा व गटर बांधणीकरतां ग्रामीण भागांस आर्थिक मदत.

(३) खालीं निर्देशित केलेल्या रोगप्रातिबंधक योजना.

(अ) देवीप्रतिबंधक लस टोंचणें.

(ब) क्षयरोगप्रतिबंधक 'बी.सी.जी' लस टोंचणें.

(क) मलेरिया व प्लेग यांचा प्रादुर्भाव होऊं नये म्हणून 'डी.डी.टी' ची प्रतिबंधक योजना करणें.

(ड) इनॉक्युलेशन्स, रोगजन्तुनाश, क्वारंटाइन-पद्धति व प्रामुख्यानें कॉलरा प्रतिबंधक योजना करणें.

(इ) नारूचा प्रसार होऊ नये म्हणून पायऱ्याच्या विहिरींचें रहाटाच्या विहिरींत रूपांतर करणें.

(फ) रक्तपिती व उपदंशजन्य रोगांस वैद्यकीय चिकित्सा करणें.

(४) सौतिक व बालारोग्य योजना चालविणें.

(५) आहार-निरीक्षण करणें व त्यासंबंधांत स्थानिक उपलब्ध असलेले आरोग्यदायक पदार्थ आहारांत उपयोगांत आणण्याविषयीं सल्ला देणें.

(६) सर्वांत मुख्य गोष्ट म्हणजे सर्वांना स्वास्थ्यरक्षक व संवर्धक जीवन कसें ठेवावें याचें शिक्षण देणें.

सार्वजानिक आरोग्यखात्याकरितां अन्दाजपत्रकांत जी रक्कम मंजूर केली जाते तींतील मोठा भाग सार्वजनिक रोगप्रातिबंधाकडेच खर्च केला जातो. १९५४/५५ सालाकरितां सार्वजानिक आरोग्यखात्यास २१०८६००० रुपयांची रक्कम राज्याच्या अन्दाजपत्रकांत मंजूर केली आहे व १९५५-५६ सालाकरितां २६३०८००० रुपयांची रक्कम अन्दाजपत्रकांत सुचित केली गेली आहे.

दुर्मिळ वनस्पती

वैद्य, डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, यांना, आमचेकडे सर्व प्रकारची ताजी वनस्पती व वनस्पतीपासून तयार केलेलीं तेलें, डुक्करकन्द, काळी टाकळतेल, सफेद पळस फुलें, वाकेरी भाते, मालकांगोणी तेल, सफेद रिंगणी बीज, गुळवेल सत्व, महावातविध्वंसक तेल, सफेद गुंजा, उंबराचे मुळाचें पाणी, कासवाच्या पाठी, भुईकोहळा, आघाडा क्षार, इ० मिळतात. सविस्तर माहिती मिळविण्यासाठीं

पत्रव्यवहाराचा पत्ता

भारत वनस्पती फार्मसी

C/o भिमाजी सखाराम राजगुरव

पो. मंचर, जि. पुणें

आयुर्वेदाची सद्य स्थिति-- निबंध

गिरगांव मुंबई येथील होमिओ लॅबोरेटरीजचे चालक वै. स. म पेंडसे यांनी वरील विषयावरील निबंधाकरितां १०० रु चें बक्षिस जाहीर केलें असून सदरहू रक्कम आमचेकडे त्यांनी सपूर्त केली आहे. तरी ज्या कुणा वैद्यवर्यास यांत भाग घ्यावायचा असेल (निबंध पाठवावयाचे असतील) त्यांनी खालील नियमास अनुसरून निबंध पाठवावेत.

१) निबंध अर्ध्या कागदावर एकाच बाजूस सुवाच्य अक्षरांत लिहिलेला असावा.

२) पाठपोट लिहिलेल्या निबंधाचा विचार केला जाणार नाहीं.

३) निबंध आयुर्वेद पत्रिकेचीं पानें ६ यापेक्षा मोठा नसावा.

४) निबंध स्वीकारण्याची शेवटची ता. ११ मे ही आहे.

५) परीक्षकांचा निर्णय सर्वास बंधनकारक राहील.

६) पहिल्या बक्षिसास पात्र ठरलेला निबंध भुसावळ येथील दहाव्या महाराष्ट्र प्रां० वैद्यसंमेलनांत वाचून दाखविला जाईल.

७) व त्यानन्तर सदरहू निबंध इतर वाचकांच्या माहितीसाठीं आयुर्वेद-पत्रिकेंत सवडीनें छापण्यांत येईल.

८) निबंध, वै. विंदुमाधव पंडित, स्थायी मंत्री म० प्रां० वैद्य मंडळ C/o आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विवलकर कारंजा, नाशिक या पत्त्यावर पाठवावेत.

९) बक्षिसास अपात्र ठरलेले इतर निबंध पुरेसे टपाल हंशील आल्यास परत पाठविण्यांत येतील, अगर योग्य वाटल्यास आयुर्वेद-पत्रिकेंत प्रसिद्ध केले जातील.

१०) लेखकानें आपलें नांव व पत्ता सुवाच्य अक्षरांत लेखासोबत स्वतंत्र कागदावर लिहून पाठवावा. इतर मजकूर लिहूं नये.

— मंत्री, म. प्रां. वैद्य मंडळ, नाशिक

सूक्ष्मौषधींचा गुण कसा येतो ?

ले. आयु-रत्न सुंदरराव भास्करराव वैद्य, मुं. २

सन १९५४ च्या ऑक्टोबरच्या होमिओ-पॅथीच्या अंकांत सूक्ष्मौषधीसंबंधीं इंग्रजींत मजकूर आला आहे. आयुर्वेद-जगत् ह्या गुजराथी मासिकानें माझ्या सूक्ष्मौषधिसंबंधींच्या लेखाला पूरक म्हणून तो छापला आहे.

त्याचा सारांश असा:— १५ वर्षें संशोधन करून व शास्त्रीय दृष्टया प्रयोग करून पदार्थविज्ञान शास्त्रांतील अेक भाग शोधून काढण्यांत आला आहे. वैद्यक शास्त्राला हा नवीनच आहे. असें सिद्ध करण्यांत आलें आहे कीं, अेकादें औषधि द्रव्य अत्यन्त विरळ केलें असतां, [इतकें कीं, त्यांत मूळ द्रव्याचा अणुहि रहात नाहीं, अशा स्थितींत] त्यांत अशी शक्ति आलेली असते कीं, तिचा परिणाम जिवंत पेशींवर होतो. ही शक्ति विरळपणावर अवलंबून नसून तें करण्याच्या रीतीवर अवलंबून आहे. औषधी द्रव्यांतलि जी शक्ति बाहेर पडते ती विरळ करताना प्रवाही द्रव्य जोरानें हलवण्यानें बाहेर पडतें.

औषधि द्रव्य घेऊन अनेकपट प्रवाही द्रव्यांत घालून हलविलें असतांना ही शक्ति त्यांत येते. ग्लासगो रॉअिड रिचर्ड अिन्स्टिटयटमध्यें हे प्रयोग केले, अेक हृद्य द्रव्य घेऊन त्याचें सूक्ष्म औषध तयार केलें व तें बेडकाच्या हृदयांत टोचलें; तेव्हां त्याचा उत्तम परिणाम दिसून आला.

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक या संस्थेचीं अत्यंत गुणकारी औषधें दादर (मध्य रेल्वे) येथें मिळण्याचें एक विक्रीकेंद्र
" गणेश औषधालय "
अब्दुल कादर बिल्डिंग, दुकान नं. १३
हिंदमाता सिनेमासमोर, मुंबई १४

रक्तदाबावर सोळा सोमवार

(निवेदकः- वैद्य खटावकर, देवळाली कँप)

आयुर्वेदानें लंघन-चिकित्सा ही अर्धी चिकित्सा मानली आहे. एक स्त्रीरुग्ण प्रत्येक वेळीं गर्भावस्थेत रक्तदाबानें व्यथित असे. मागील प्रसूतीनन्तर बालकास कंप येऊन तें मृत झालें होतें. त्यावेळीं संपूर्ण गर्भावस्थेत [९ महिने] इंग्रजी वैद्यकानुसार चिकित्सा घेऊनहि वरील प्रकार घडला होता.

कोणतेंहि औषध घेतलें नाहीं

यावेळीं गर्भिणी असताहि तिनें सोळा सोमवार व्रत केलें व कोणतेहि औषधोपचार घेतले नाहींत, म्हणुन प्रसूतिसमयीं तुम्ही आमच्याकडे येऊं नका असें डॉक्टर यांनीं सांगितलेलें. परन्तु बाळन्तपणासाठीं रुग्ण प्रसूतिगृहांत गेलीच. प्रसूतीच्या वेणा सुरू झाल्या. प्रसूतिगृहांत सर्व खबरदारी घेण्यांत आली, पण रक्तदाब मोजून पहातात तो १२० Hg.; तो पाहून डॉ. व नर्सेस आश्चर्यचकित झाल्या व म्हणाल्या, ' तुम्ही तर आमची चागलीच फसवणूक केली. गर्भावस्थेत उपचारार्थ आल्या नाहींत म्हणून मागच्या अनुभवावरून धांवाधांव केली आम्हीं ! आणि आतां पहातो तों प्राकृत रक्तदाब ! "

लंघनचिकित्सेचें धवल यश

" प्रसवन्ती स्त्री म्हणाली:— हें माझ्या लंघनचिकित्सेचें धवल यश आहे. " माझें वाटतें स्थैर्य, गर्भिणीअवस्थेतील वाढणारा रक्तदाब व मागील प्रसूत बालकाची स्थिति लक्षांत घेऊन गर्भिणीअवस्थेतहि मी कडकडीत १६ सोमवार केले. त्याचा हा परिणाम आहे !"

लवकरच प्रसूति झाली, माता बालक सुखरूप आहेत. प्रसूति होऊन १ मास पूर्ण झाला. अजूनहि कांहीं विकृति नाहीं. [संग्राहक-वै. करमरकर]

संतर्पणजन्य व्याधि

[रक्तदाब हा संतर्पणजन्य व्याधि आहे. त्यावर अपतर्पण चिकित्सा हवी असते. वैद्य-डॉक्टर पाचनदीपन चिकित्सा करतात, विरेचनें देतात, व्यायाम हवा खाणें इ॰ उपाय करतात. पण युक्तीनें क्षुत्तृट् लंघन कोणीच देत नाहीं. लंघनचिकित्सेंत उपवासाला बल न जातां केलेल्या उपवासाला-फार महत्त्व आहे. असें लंघन आठवड्यांतून एक दिवस निराहारी राहिल्यानें घडतें. लागोपाठ ५।७ दिवस लंघन करण्यापेक्षां हें चार महिन्यात १६ दिवसांचें लंघन गुणकारी ठरतें. असा अनुभव आहे.

अन्न नाहीं व पाणीहि नाहीं

या लंघनात अन्न घ्यावयाचें नाहीं व पाणीहि तहान लागेल तरच व जरूर तेवढेंच घ्यावयाचें असतें. अन्न न खातां (तहान नसतांना) जास्त पाणी प्यालें तर त्यानेंहि पचन बिघडत असतें. शरीर म्हणजें गटार नव्हे कीं त्यांत वाटेल तेवढें पाणी ओतावें !

महत्वाचीं चिकित्सासूत्रें

आयुर्वेदांत वाग्भट ग्रन्थांत सूत्रस्थानांत १४ व्या (द्विविधोपक्रमणीय) अध्यायांत याविषयीं उत्तम माहिती दिली आहे. रक्तदाब, मधुमेह, निद्रानाश, बद्धकोष्ठ, पां. कोड या विकारांवर औषधें शोधणाऱ्यांनीं व या विकारांवर उपचार करूं इच्छिणाऱ्यांनीं या अध्यायांत सांगितलेले सिद्धांत प्रथम अंमलांत आणावेत —संपादक]

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व औषधें
मुंबईत मिळण्याचें आणखी एक नवें केंद्र
रामकृष्ण एजन्सी
आनंदजी लद्धा बिल्डिंग
लालबाग, मुंबई १२
* मागणी रोज वाढत आहे. *

निवडक रुग्ण चिकित्सा—

जुनाट पडसें (जीर्ण प्रतिश्याय)

(आयुर्वेद सेवा संघ, चिकित्सा-विभाग)

सतत पडसें येणें, सारखें पडसें असणें, अशा तक्रारीकडे आयुर्वेद सेवा संघाचा चिकित्सा-विभाग बारकाईनें लक्ष पुरवितो. कारण प्रतिश्याय-पडसें, हें क्षयाला कारणीभूत होणारें आहे. 'प्रतिश्यायादथो कासः, कासात्संजायते क्षयः' व क्षय झाल्यावर त्याचा प्रतिकार करण्यापेक्षां, क्षय होऊं न देणें हीच गोष्ट महत्वाची असें सेवा संघ समजतो.

निराळ्याच विकारासाठीं आलेले रुग्ण

या रोग्यांपैकीं कांहीं रोगी 'दमा' झाला म्हणून आलेले, कांहीं डोकें-दुखीच्या तक्रारीसाठीं, कांहीं खोकल्याचे औषधार्थ, कांहीं कान फुटतो म्हणून, कांहीं गिळतां येत नाहीं म्हणून, तर कांहीं शक्ति क्षीण असून वाढ कमी म्हणून आलेले होते. परन्तु रुग्णपरीक्षेंत बहुतेक जणांत अनेक वर्षांपासून पडशाची तक्रार असल्याचें आढळून आलें.

रुग्णपरीक्षेंत मिळालेलीं लक्षणें

बहुतेक रुग्ण ६ ते १२ वर्षें वयाचे 'बाल' होते. कफपित्तप्रकृतीचे, मांस असार, किंवा मेदसार, रक्तसार (नाजुक), मज्जासार असे होते. दांत किडके होते. गिलायुवृद्धि असलेले किंवा त्यावर शस्त्रकर्म करवून घेतलेले. नाकाचें पुढचें टोंक तांबडे-लाल. सतत शेंबूड गळत असणारे, पुरीषग्रह लक्षण असलेलें किंवा पुरीषावरोध करणारे. बहुतेकांत कर्ण-मलाचेंहि प्रमाणाधिक्य असलेलें असें होतें.

रोगपरीक्षेंत आढळलेलीं कारणें

लहान मुलांत सर्वसाधारण आढळणारीं कारणें म्हणजे मातींत खेळणें, पाण्याशीं खेळणें, सकाळीं-कफकालीं-मधुरान्नपान सेवन, व वेगावरोध हीं होतीं. लहानपणीं 'गोंवर' बहुतेकांना आलेला होता. व डोक्यावर टोपी न घालण्याची प्रथा, किंवा मुलींत ज्या दिवशीं डोक्यावरून स्नान त्या दिवशीं नेमका खोकला पडसें सुरूं! पावसाळा हिवाळा यांत श्राव. अति झोंप, सर्द किंवा काळोख्या घरांत वस्ति। किंवा अतिशय हवेंत (वाऱ्यांत) तिसऱ्या मजल्यावर रहाणें, अति वाऱ्यांत रहाणें. संप्राप्तीच्या विचारांत वेगावरोध, जीर्णज्वर इ० कारणांनीं कफपित्तदोष वातोल्बण होत असलेले आढळले.

पूर्वीच्या चिकित्सकांनीं केलेले उपचार

दीर्घकालीन पडसें त्यांच्या विकाराचें कारण आहे असें न समजतां गिलायु (टॉन्सिल्स) काढणें, कृमिदन्त काढणें, पेनिसिलीनचीं इंजेक्शन्स देणें, खोकल्यासाठीं टॉनिकसच्या बाटल्या देणें, श्वासघ्न औषधें, दम्याचीं इंजेक्शन्स-औषधें देणें, नाकांत जन्तुघ्न औषधें, घालणें इ० विविध उपचार केले होते. सहाजिकच १०-१२ वर्षांत योग्य गुण आलेला नव्हता.

केलेली सर्वसाधारण चिकित्सा

(१) निदान परिवर्जन—

१) स्नान दर ४ दिवसांनीं व दुपारीं करणें. रोज स्नान नाहीं. (२) डोक्यावरून स्नान नाहीं. (३) पाणी जेवणानन्तर प्यावयाचें नाहीं. माठांतलें प्यावयाचें नाहीं. प्यावयाचें झाल्यास त्यांत भल्लातकासव १ चमचा टाकून तें पिणें (संस्कारित जल पिणें) (४) सकाळचा चहा, दूधसाखर, गोडपदार्थ इ. सकाळीं खाणेंपिणें बंद. (५) वेळच्यावेळीं मलांचें (पुरीषमूत्र) विसर्जन.

(२) विपरीत द्रव्यांनीं संस्कार—

(१) पावसाळ्यांत भस्मस्नान. (२) डोक्याला गरम मफलर बांधणें किंवा काळी टोपी घालणें (३) उष्णजलपान.

१) शोधन लंघन-चिकित्सा

(१) 'वमन' कफदोषासाठीं. (२) कृमिहर कित्सा. (३) हरीतकीनें विरेचन.

(४) लंघन-शमन चिकित्सा

(१) दीपनपाचनार्थ— सितोपलादि चूर्ण किंवा शादि चूर्ण. (२) आठवड्यांतून एकवेळ उपास घुतृड्लंघन) (३) उन्हांत बसणें किंवा उन्हांत फिरायास जाणें ४) महामृत्युंजय, त्रिभुवनकीर्ति, त्रिकटु, विडंग इ. द्रव्येंहि दीपन पाचन कफघ्न म्हणून वापरलीं. कांहीं रोग्यांत यष्टिमधु, शतावरी, वेखंड, असें मिश्रण वापरलें.

(५) बृंहणशमन चिकित्सा

'बृंहणं शमनं त्वेव वायोः पित्तानिलस्य च ।'

(१) चंदनबलालाक्षादि तेल नस्य,

(२) अगस्तिप्राश रात्रीं निजतांना

(६) आहारासंबंधीं सूचना

१) सकाळीं न खाणें. २) भात वर्ज्य किंवा ंदूळ भाजून केलेला भात. ३) मुगाचें वरण घेणें.) सितोपलादि चूर्ण + अश्वगन्धा + वावडिंगासिद्ध ध घेणें. ५) फुटाणे लसूण [थोडा] खाणें किंवा वडा खाणें. ६) आल्याची चटणी खाणें. ७) तळभाज्या वर्ज्य करणें.

(१) पाणी ऊन पिणें किंवा भल्लातकासव घालून पिणें. कुळीथ उकळून त्याचें कढण वा पाणी पिणें.

(७) विहारासंबंधीं सूचना

(१) थंडींत न खेळणें. २) दिवसां न झोपणें. रात्रीहि थोडें कमी झोपणें. ३) वेळच्यावेळीं मलमूत्र-विसर्जन करणें.

विचारांत घेतलेलीं वचनें

वृद्धाः वातोल्बणाः दोषाः नासायां स्थानसंगताः । नयन्ति प्रतिश्यायं वर्धमानं क्षयप्रदम् ॥ वाग्भट

वेषु कृच्छ्रोच्छ्वसनं पीनसः प्रततं क्षुतिः। सानुनासिकवादित्वं पूतिनासः शिरोव्यथा ॥

स्वेदस्नानं गुरुं क्रोधं भृशं शय्या हिमं जलम् । कामिक्रमं कुर्वन् यापयेत् दुष्टपीनसम् । वालमूलकजो यूषः कुलत्थोत्थश्च पूजितः । कवोष्णं दशमूलाम्बु जीर्णो वा वारुणीं पिबेत् ॥ क्षीरे दशगुणे तैलं नावनं सानिशं पचेत् ॥

आयुर्वेदीय विचारप्रणाली

पडसें हा नाक या अवयवाशीं संबंधित विकार असला तरी त्यांचें प्रतिबिंब मुख, गळ, कर्ण, नेत्र इ० आजुबाजूच्या अवयवांवर पडतें. नासा हें कफस्थान त्यामुळें कफदोषाची विकृति होणार! कफदोषाची चिकित्सा केल्याशिवाय हे कोणतेहि विकार बरे करणें कठीण. व नासाविकृति होण्यासाठीं वातोल्बणत्व निर्माण व्हावें लागतें. म्हणून वातवृद्ध करणारीं कारणेंहि नाहींशीं करावीं लागतात. व नंतरहि वाताची चिकित्सा केली तर विकार कायमचा बरा होतो. वातकफनाशक असें तैल नस्य म्हणून उपयोगी पडते. कफनिर्मिती होऊं नये म्हणून प्रथम प्रमुख स्थानांतून कफ वमनानें काढावयाचा. शेंबूड हा मांसमल आहे. मांसमेदमलांना विरेचनद्वारें हरीतकी बाहेर काढते. हरीतकी विरेचन व अगस्तिप्राश त्याकरितां. भल्लातकासवानें अग्निदीपन कफसंशोषण, हें होतें. कुळथाचें कढणहि असेंच!

कायमचा गुण देणारी चिकित्सा

वात कफ हे शीत असल्यानें शीत काल व शीत द्रव्यें सर्व वर्ज्य! म्हणून स्नानादि वर्ज्य. निदान परिवर्जन म्हणून कफवर्धक मधुरद्रव्यें कफकालीं न खाण्यानें नवीन कफाची परंपरा नाहींशी झाली. यामुळें अनेक वर्षें सतत टिकून राहिलेले विकार व त्यांचें मूळच नाहींसें झालें. अशा रीतीनें शोधन व नस्यादि आयुर्वेदीय चिकित्सा ही हळुवारपणें रोगहरण करणाऱ्या मंत्रचिकित्सेप्रमाणें आहे. कायमचा गुण देणारी, पुढचे विकार टाळणारी व कोणी कोणती जीवनपद्धति कां ठेवावी हें शिकवणारी आहे. कफप्रकृतींच्या व्यक्तींनीं कफवर्धक आहारविहार चालू ठेवल्यामुळें निर्माण होत राहिलेली परंपरा नाहींशी करणारी आहारविहार व औषधें वरील चिकित्सेनें वैद्येतर वाचकांनाहि समजतील.

—आयुर्वेदाचार्य श्री. कृ. करमरकर

आयुर्वेदाची वर्तमान शिक्षणपद्धति

[लेखकः– वै. श्रीनिवास जळूकर डी. ए. एस्. एफ्. नासिक]

वरील विषयावर वैद्य यादवजी त्रिकमजी आचार्य यांचे कांहीं विचार एकत्रित केलेला निबंध प्रसिद्ध झाला आहे. तो वाचण्यांत आला व त्यावरून मनांत आलेले कांहीं विचार या ठिकाणीं प्रसिद्ध करणें आवश्यक आहे असें वाटल्यावरून हा लेख लिहिला आहे.

आचार्य यादवजींचा पूर्वपक्ष

पूज्य माननीय विद्वान् व वृद्धवैद्य यादवजींनीं शुद्ध आयुर्वेद व मिश्र आयुर्वेद, ग्रंथप्रधान वा विषयप्रधान शिक्षणप्रणाली, शुद्ध आयुर्वेदीय शिक्षणाचें व्यवहारांत वैफल्य कसें ठरेल व शारीरांत काय काय अडचणी येतात, एंब्रिऑलजी, फिजिऑलजी, यकृत्पित्त, पाचकपित्त, पँक्रियास [अग्न्याशय] इ. द्धांचा वापर व वनस्पतीशास्त्रांत बॉटनींतील संज्ञादि वापरण्याची आवश्यकता, रोगविज्ञानांत कायाचे दृष्टीनें विभक्तिकरण केलें असतां इलॉंगेटेडयुव्युला, फॅरिंजायटिस, टॉन्सिलायटिस्... इ. स्थानविकृतीनुसार स्वतंत्र वर्णनांची जरुरी, जंतुशास्त्राची आवश्यकता व त्यांचा वातपित्तकफामध्यें समावेश करणें, चिकित्साशास्त्रांत कॉलऱ्यामध्यें लवणजलाचा सिराबस्ति इ. क्रियांचा समावेश, पंचकर्माचा अनुभव आणि प्रचार, शस्त्रकर्मांतील ऑपरेटिव्ह सर्जरीची प्रगति, संमोहन आणि संज्ञाहर औषधांचा आविष्कार, नवीन ग्रंथांची आवश्यकता व यांत वैद्यांना करावयाची प्रगति, जीवाणुनाशक औषधांची जरुरी इ. विवेचन केलें असून सर्वांनीं त्या गोष्टीकडे निःपक्षपातिवृत्तीनें पहावें म्हणून विनंति केली आहे व ती योग्यहि आहे. पण वरील सर्व विवेचन ई आचार्यांनीं पक्षपाती वृत्तीनें [पूर्वग्रहजुष्ट विचारसरणीनें] केलें असेल असें मात्र त्या लेखांवरून वाटतें. सर्वसाधारण मनुष्य हा निःपक्षपाती बुद्धीनें लिहूं शकतो कीं काय याबद्दल शंका वाटते, तरीपण मी शुद्ध निःपक्षपाती वृत्तीनें म्हणजेच पूर्वग्रहजुष्टता सोडून कांहीं विवेचन करण्याचा येथें प्रयत्न करीत आहे.

हा संवयीचा व कलेचा प्रश्न आहे

याच ठिकाणीं ग्रंथप्रधान वा विषयप्रधान हा वाद विचारांत न घेतां शुद्ध आणि मिश्र वादच जरा लक्षांत घेऊं. आज आमचे वैद्य [Strangulated hernia] सारखे रोगी आले तर त्यांची चिकित्सा करूं शकतात कां ? हा प्रश्न आचार्यांनीं विचारला आहे. त्यावर मी सविस्तर उत्तर देण्यापेक्षा असा दुसरा प्रश्न विचारूं इच्छितो कीं किती पाश्चात्य शास्त्रविशारद [M. B. B. S.] हे शस्त्रकर्म करतात ? वा करूं शकतात ? लहान लहान शस्त्रकर्में करण्याकरितां [M. S., F. R. C. S.] अथवा मुंबईच्या नांवाजलेल्या शस्त्रवैद्याकडे जावें लागतें असेंहि व्यवहारांत दिसतें. दुसरें असें कीं साधा L. C. P. S. झालेला मनुष्य हा सर्व प्रकारचीं शस्त्रकर्में यशस्वीरीत्या करीत असतो असेंहि आढळलें आहे. मुद्दा एवढाच कीं हा संवयीचा व कलेचा प्रश्न आहे; तो कुणास साध्य होईल, कुणास होणारहि नाहीं.

याला जबाबदार कोण

हल्लीं उपलब्ध शारीरभाग हा अपर्याप्त आहे व प्रसूतितंत्रादि व शस्त्रकर्मक्रिया वैद्यांतून गेलेली दिसते हें म्हणणें खरें असलें तरी मला एक गोष्ट सांगावीशी वाटते कीं, याला जबाबदार कोण ? ती कला गेली म्हणजे तिचें पुनरुज्जीवन करूं नये काय ? व हें जर आचार्य यादवजींसारख्यांनीं मनावर न घेतां त्याकडे उपहासबुद्धीनें पाहिलें तर आयुर्वेदाचा उत्कर्ष कसा होणार ? सरकारचें कर्तव्य आहे कीं, या थोर लोकांना

याकरितां मदत करावी. चरक, सुश्रुत वा वाग्भट येवढेंच शारीर आहे अशी संकुचित कल्पना ठेवूं नये. नवीन ग्रंथांचें संशोधन व जुन्यांचें परिशीलन हें कार्य चालूं राहिलें तर खचित चांगलें शारीर त्यांतून निर्माण होईल. काश्यपमुनींनीं काश्यपसंहितेंत अशा अनेक गोष्टींचा उल्लेख केलेला आहे व ती संहिता प्रकाशित वा संशोधित करण्यांत आचार्य यादवजींचा हात प्रमुख असतां त्यांच्या तें कां लक्षांत येऊं नये ?

शरीराचे निर्मितींतील अनेक घटना पाश्चात्य वैद्यकानें उल्लेखिल्या आहेत. इतर संहितांपेक्षां काश्यपमुनींनीं ‘ प्राणः हि बीजधातुं अस्थिसंख्यानं विभजति ’ असा उल्लेख करून एक निराळीच पण अविरोधी दृष्टि निर्माण केली आहे ती विचारांत घ्यावयास हवी. या नंतर दुसरा एक उल्लेख आहे.

कर्णास्याभ्यंतरतः धमनीनां शतम् शतम्, तत्र नित्योऽनिलः तिष्ठति, अग्निषोमौ व्यभर्त्यापि । या सूत्राचे विस्तारांतून वा अर्थांतून Internal Ear ची रचना व तेथील Semi circular canals व Nerve endings इ० कल्पना येत नाहीं कां ? आयुर्वेद हा वेद आहे व त्याचा अर्थहि असा शब्दशः पाहूं नये. तो अर्थ लावण्याची पद्धति अभ्यासली जावी असेंहि त्याबरोबर वाटतें. आचार्य म्हणतात “ संसारमें वही प्राणी जीवित रह सकता है जो नया खाता है और खाकर उसको हजम (आत्मसात्) कर लेता है ” । पण मला एवढीच सूचना द्यावी अशी इच्छा आहे कीं, ती गोष्ट प्रज्ञापराध होऊं नये अथवा असात्म्येंद्रियार्थसंयोग होऊन बाधक ठरूं नये. नाहींतर भूत प्रसन्न झाल्यानन्तर जी आपत्ती ओढवते तसली आमचेवर ओढवेल.

आयुर्वेदीय पदार्थविज्ञान

याचे जोडीला आधुनिक फिजिक्स केमिस्ट्री इ. मधून आयुर्वेदोपयुक्त तत्त्वें घ्यावीं. ही विचारसरणी ठीक आहे. पण ती घेण्यापूर्वी त्या शास्त्रांतील संशोधकांनीं आपले डोळे व डोके आयुर्वेदीय बनवून घेतलें पाहिजे. सायंकाळचें दूध गुरु आहे. हें गुरुत्व Specific Gravity नें घेतां यावयास पाहिजे. अभ्रकभस्म यांतील रासायनिक घटकांचा शोध लावला पाहिजे; अन्यथा नाहीं.

हल्लीं S.S.C. पर्यंत शिकविलें जाणारें किंवा इंटरसायन्सपर्यंत शिकविलें जाणारें, फिजिक्स, केमिस्ट्री वा बायॉलजी इ० विषयांचें ज्ञान आयुर्वेदीय दृष्टिकोन समजावून घेण्यास पुरेसें नाहीं, असें त्यांतील शास्त्रांशीं चर्चा करतांना आम्हांस कळलें.

शारीर

स्व० गणनाथसेन व स्व० वारियर यांनीं लिहिलेल्या ग्रंथांबद्दल अधिक न बोलतां मला असें सुचवावेंसें वाटतें कीं, शुद्ध आयुर्वेदीय अध्यापक-चर्चा-परिषदेंत जे निर्णय होत आहेत तेच निर्णय यापुढें आपण प्रमाण मानून त्याप्रमाणें ग्रन्थांतील शाब्दिक घोटाळा दूर करावा. व आचार्य यादवजी व शिवशर्मा इ० यांचे सारखे विद्वान् व अधिकारी वैद्य जर अशा चर्चांना उपस्थित राहून व शुद्ध दृष्टिकोनांतून मार्गदर्शन करतील तर आयुर्वेदाचा उन्नतिकाळ अधिक जवळ आला असें होईल. शास्त्रसेवा, परस्पर मोकळी चर्चा यांतूनच आयुर्वेदोद्धार होईल यांत शंका वाटत नाहीं. कांहीं लोक म्हणतात अशा चर्चा इ० पूर्वी पुष्कळ झाल्या. पण तो काळ वेगळा होता. आजचा काळ व लोकांची दृष्टि बदलली आहे. व ते कांहीं कार्य सहकार्यानें करूं शकतात असें आज शुद्ध आयुर्वेदाचे चाललेल्या प्रगतीशील कार्यांवरून म्हणतां येईल.

दोषधातुमलविज्ञान

आयुर्वेदांतील फिजिऑलजी [शारीर क्रिया] दोषधातुमलात्मक व चांगली आहे. आधुनिक शास्त्रांत वर्णित केल्याप्रमाणें अणु [सेल] पासून हृदय व मेंदूपर्यंत सर्व क्रियांचें जें वर्णन आलें आहे तें

विद्यार्थी घेणें आहेत

नाशिक येथील शुद्ध आयुर्वेद विद्या-
लयाचें नवें वर्ष १० जून पासून सुरूं होणार
आहे. दरसाल ३० विद्यार्थी घेण्याची परवानगी
कारकडून मिळाली आहे. संस्कृत विषयांत ५०
क्यावे वर गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश
दिला जाईल. येऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनीं
आगाऊ पत्र पाठवून माहितीपत्रक मागवावें व
प्रवेश फी भरून प्रवेश मिळवावा.

वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित
प्रधानाध्यापक
शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नाशिक

शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार
केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें
व ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस
व प्रदर्शनाकडून प्रशंसित
सहस्रपुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें
प्राइस लिस्ट मागवा.
श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर
मिराशी चोळ, पो. इचलकरंजी S. M. C.

अनुक्रमणिका

भुसावळ येथें भरणारीं संमेलनें व परिषदा	६६१
आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, भुसावळ	६६२
म. प्रां. दशम वै. संमेलन, भुसावळ	६६३
दे. भ. स. का. पटील यांचें शिफारस-पत्र	६६४
वै. पां. ह. देशपांडे- चरित्रांतील ठळक घटना	६६५
तृणज्योतीचे संशोधक	६६९
राजकारणांतील अभिनिवेश	६७१
आयुर्वेद उपचारांनीं वजन कमी केलें	६७२
स्वराज्यांतील गुन्हा !	६७३
मुंबई कायदेमंडळांतील प्रश्नोत्तरें	६७५
आयुर्वेदाची सद्यः स्थिति-निबंध	६७७
सूक्ष्मौषधींचा गुण कसा येतो !	६७७
रक्तदानावर सोळा सोमवार	६७८
जुनाट पडसें (जीर्ण प्रतिश्याय)	६७९
आयुर्वेदाची वर्तमान शिक्षणपद्धति	६८१
संगीतानें रोगपरिहार	६८४
आयुर्वेदाचें ध्वजवंदन गीत पाहिजे	६८५
वैद्यासाठीं उजळणी-वर्ग	६८६
मंत्रतंत्र—चिकित्सा	६७७
पंधरा मिनिटांत पाऱ्याचें भस्म	६८९

-०- प्राध्यापक पाहिजे -०-

अमरावती येथील विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयांत कांहीं विषय शिकविण्याकरितां प्राध्यापक पाहिजेत. खालील पत्त्यावर विशेष माहितीसाठीं गरजूंनीं अर्ज करावेत.

प्रिन्सिपाल, विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय
अमरावती

ता. १६-१७-१८ मे रोजीं

भुसावळ येथील आयुर्वेदीय प्रदर्शनांत

आयुर्वेद औषधी भवनाचीं विशेष औषधें, पुस्तकें वगैरे पाहण्यासाठीं व विक्रीसाठीं ठेवण्याची खास व्यवस्था केली आहे. याचा लाभ संमेलनास येणाऱ्या वैद्य-मंडळींनीं अवश्य घ्यावा.

सेवा संघाचीं- तेलिया असाणा, अश्विनीप्राश, अगस्तिप्राश, बृहत्वातचिंतामणी, चिंतामणिरस, पूर्णप्रमाण सुवर्णमालिनीवसंत, रौप्यसुवर्णसूतशेखर, कंदर्पवृष्यपाक, कंदर्पवृष्यवटी, नयनामृतप्राश इ. औषधें आतां सर्वत्र वैद्यमान्य झालीं आहेत.

विशेष सूचनाः— ज्यांना संमेलनांत औषधें अगर पुस्तकें पसंत पडल्यास खरेदी करावयाचीं असतील त्यांनीं नासिक येथें आगाऊ पत्र पाठवून आपणास काय लागण्याची शक्यता आहे तें कळवून ठेवावें, म्हणजे भुसावळ येथें निराश होण्याची पाळी येणार नाहीं. पत्र पाठविलें तरी त्या वस्तू खरेदी केल्या पाहिजेत असें कोणासही बंधन नाहीं.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

औषधी भवनानें तयार केलेलें नवीन मूल्यवान् व गुणकारी सिद्धौषध

बृहत् वातचिंतामणी

हें निखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाचे अध्यक्ष वैद्य पं. शिवशर्माजी यांच्या औषधी योजनेतील एक प्रमुख औषध आहे. याचा पाठ अनुभविक औषधें (लेखकः— यादवजी त्रिकमजी आचार्य) या ग्रंथांत दिला आहे तो असा—

सुवर्णभस्म १ तोळा, रौप्यभस्म २ तोळे, अभ्रकभस्म २ तोळे, मौक्तिकभस्म ३ तोळे, लोहभस्म ३ तोळे, प्रवाळपिष्टी ३ तोळे, काकोलीचूर्ण १ भाग, अंबर १ भाग व चंद्रोदय ७ भाग, भावना कोरफडीचा रस. प्रमाण — १ गुंज. अनुपान— मध.

हा रस हृदय व मेंदू याला बलदायक, वातकफनाशक व वाजीकरण आहे. सर्व प्रकारच्या वातरोगांत उपयुक्त. किंमत ·|· तोळा ८ रु.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

संपादक व प्रकाशक— वैद्य विंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विवलकर कारंजा, नासिक
मुद्रक [illegible] प्रेस, नासिक

तीय संमेलन विशेषांक —
५-५५ —

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजी प्रसिद्ध होतें.)
ार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. एक अंकाची किंमत ४ आणे
र्ष ८ वें) नासिक, ता. १६ मे १९५५ (अंक २२ वा

भारतांत भारतीयांचें वैद्यक हेंच राष्ट्रवैद्यक

म. प्रां. संमेलनाचे अध्यक्ष



आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे

"भारतांत भारतीयांचें वैद्यक, राष्ट्रवैद्यक नसण्यांत मोठेपणा नाहीं, भारतीयत्व नाहीं, व त्याच्या स्वातंत्र्यालाहि शोभा नाहीं. अर्थात् हें ध्येय साध्य करण्यासाठीं फार मजल मारावी लागेल. त्यावेळीं या शुद्धमिश्रवादाला मूठमाती द्यावी लागेल व दोघेहि एका पातळीवर यावे लागतील. यासाठीं परस्पर विचारविनिमय व सहकार्य अवश्य व्हावें लागेल. ही बुद्धि आतांपासूनच परस्परांत वागूं लागली तर बरें नव्हे काय?

आयुर्वेदाच्या प्रावीण्याची सोय

जेवढा आयुर्वेद मिश्रपक्षीयांना शिकवावयाचा आहे, तेवढाहि प्रवीण वैद्यांकडून शिकविला जावयास हवा असेल, तर अशा प्रावीण्याची सोय म्हणून तरी शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमाकडे त्यांनीं आज पहाण्यास काय हरकत आहे?"

— पां. ह. देशपांडे

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन, भुसावळ

[दशम अधिवेशन]

महाराष्ट्र प्रांतीय दशम वैद्य संमेलन भुसावळ येथें दि. १६-१७-१८ मे १९५५ सोम-मंगळ-बुधवारीं व्हावयाचें निश्चित झालें आहे. पुण्याचे सुप्रसिद्ध वै. आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे हे अध्यक्षस्थान मंडित करतील. या संमेलनास जोडूनच आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेचें दुसरें अधिवेशन आणि मुंबई राज्य वैद्य परिषदेचें प्रथम् अधिवेशनाहि व्हावयाचें आहे. सविस्तर कार्यक्रम पुढें दिला आहे.

—आपले नम्र—

वै. भगवन्त त्र्यंबक वैद्य	कविराज ब्रह्मदत्त शर्मा
अध्यक्ष,	आयुर्वेदाचार्य
संयुक्त खानदेश वै.मंडळ	स्वागताध्यक्ष.
वै.चूडामणी खंडेराव चौधरी	कविराज का.सी. भावे
मंत्री,	भिषगाचार्य-धन्वतरी
संयुक्त खानदेश वै.मंडळ	स्वागत प्रधान मंत्री

संमेलन स्थानः- वै. पं. गंगाधरशास्त्री गुणे मंडप
[डी. एस्. हायस्कूल, भुसावळ]

—संमेलन कार्यक्रम—

ता. १६-५-५५ सोमवार

प्रदर्शन व अध्यापक चर्चा परिषद

प्रातः ६॥वा. ध्वजवंदन:- वैद्यरत्न पं.शिवशर्माजी.
,, ७वा. प्रदर्शनोद्घाटनः- दे. भ.देवकीनंदनजी एम्. पी.,
,, ७॥वा. कुष्ठरोग-निवारण-विषयक व्याख्यान वक्ते-दे.भ.डॉ.शिवाजीराव पटवर्धन.
,, ९वा. अध्यापक चर्चा परिषद उद्घाटक-आयुर्वेदाचार्य पं. हरिदत्त-शास्त्री,डायरेक्टर ऑफ आयुर्वेद,मुंबई
,, ९॥वा. स्वागतपर भाषण- वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर, आयुर्वेदविशारद-प्रव
,, ९॥।वा. अध्यक्षीय भाषणः- आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे, पुणें.
,, १०ते११॥ परिषदकार्य चर्चा, विषय-द्रव्यगुण
मध्याह्न २ते५ रसशास्त्र विषयावर चर्चा आणि पारद प्रक्रियाचें प्रात्यक्षि
सायं ६॥ते८ आरोग्य संवर्धक आसन व्यायाम (सप्रयोग) वै. श्री. गोविंदशास्त्री परांडे नागपू
रात्रौ ९॥वा. वृद्ध वैद्य सत्कार

१७-५-५५ मंगळवार

प्रातः ५ते७॥ अध्यापक परिषद कार्य-चर्चाविषयः-शरी
,, ८ **म. प्रांतिय वैद्य संमेलनारंभ**
ईशस्तवन व स्वागत पद्य
,, ८॥ते९ संमेलन उद्घाटनः- ना. कन्नमवार, स्वास्थ्यमंत्री [मध्यप्रदेश]
,, ९ते९॥ स्वागताध्यक्ष भाषण- आयुर्वेदाचार्य ब्रह्मदत्तशर्मा शास्त्री
,, ९॥ते९॥। अध्यक्ष नियुक्ति व सत्कार
,, ९॥।ते१० संदेश वाचनः- कविराज का.सी. भावे
,, १०ते११ अध्यक्षीय भाषण- आचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे
,, ११ते११॥ खुलें अधिवेशन
मध्यान्ह २ते४॥ अध्यापक परिषदः- चर्चा विषय- दोषधातुमलविज्ञान
सायं. ५॥ते८ ‘ आमवात ’ रोगविषयक चर्चात्मक - व्याख्यानें

(पुढील मजकूर पान नं. ७१५ वर पहा)

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन, भुसावळ

अधिवेशन दहावें

आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे यांचें अध्यक्षीय भाषण

नत्वा धन्वन्तरिं चैवात्रेयं सुश्रुतवाग्भटान् ।
निदानकृन्माधवादींश्चक्रपाण्यादिकांस्तथा ॥
लागवनकरान्परमगुरून्गुरून्हिर्लेकरांश्च मे ।
पुनापुरेऽभिधानप्याशास्त्रिणश्च भिषग्वरान् ॥
गुरुकल्पांश्च विदुषो सौभाग्याज्जीवतोऽधुना ।
गणेशशास्त्रिभिषजो भिषजां सुधुरन्धरान् ॥
सानेशास्त्रिप्रभृतिकान्स्तथा चान्यान्भिषग्वरान् ।
बाडीकरान्न्यायगुरून्गोमजोशीमहाशयान् ॥
नैकभौतिकशास्त्राणां ज्ञापकान्बहुमानितान् ।
सादरं प्रणतिं कृत्वा भाषणं मे समारभे ॥

१ प्रास्ताविक

वैद्यवृन्दहो ! खरोखर महाराष्ट्राचें हें दशम वैद्यसंमेलन आमच्या पुण्यपत्तनींच भरण्याचें ठरलें होतें. पण सर्व चळवळींत पुढें असलेल्या पुण्यानें याबाबतींत हातपाय गाळले. तरीहि तेथल्याच एका वैद्याला अध्यक्ष करून आपण जो मनाचा मोठेपणा दाखविलात त्याला तोड नाहीं. तो वैद्यहि अल्पमूर्ती वामन आणि त्यालाहि प्रांशुलभ्यफलवृक्षावर आरोहून आपण मोठेपणाच चढविलेत. कै. वै. पं. गंगाधरशास्त्री गुणे यांनीं लावलेलें महाराष्ट्र प्रान्तीय वैद्यसंमेलनाचें रोपटें आठ ख्यातनाम विद्वान् वैद्यवर्यांनीं खतपाणी घालून वाढीस लावलें व पुष्पफलभारानें संपन्न केलें. अशा स्थितींतल्याच या प्रांशुलभ्य वृक्षावर आरोहून मला आपण उचावलेत. पण केवळ त्याच्या रसदार फळांचा आस्वाद घेणाराच मी ! आपल्या अपेक्षा पुरविण्यास माझा किती उपयोग होईल ? मला तर या खानदेशांतच मोठमोठे वैद्य दिसत आहेत. या जिल्ह्यांतील संयुक्त खानदेश वैद्यमंडळ ही निरंतर कार्यप्रवण असलेली अग्रेसर संघटना आज दोन अडीचशें सदस्यांचे जोरावर आणि कविराज का. सी. भावे, वैद्यराज दत्तात्रेयशास्त्री जळूकर आणि आयुर्वेदाचार्य ब्रह्मदत्तशास्त्री यांचे सारख्या धडाडीच्या कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखालीं, आणि वैद्यराज मोकाशी यांचे सारख्या दानशूरांच्या पाठिंब्यावर अनेकविध कार्ये करून सर्व महाराष्ट्राला आदर्श झालेली आहे. येथील कार्य जवळून पाहण्याची लाभलेली संधि अविस्मरणीय आहे. १९४४ सालचें सातोद-कोळवदें श्रीमंत नानासाहेब पुराणिक यांचे अध्यक्षतेखालीं या मण्डळानें भरविलेलें भव्य संमेलन, त्यांतलीं विषमज्वरावरची अभूतपूर्व चर्चा, विशेषें कै. गुरुवर्य हिर्लेकरशास्त्री यांचें याच विषयावरचें सतत अडीच तास चाललेलें नानाधारसम्पन्न, युक्तियुक्त व वक्तृत्वपूर्ण भाषण आजहि जसेंचें तसेंच माझ्या मनश्चक्षूपुढें उभें आहे. अशीं महत्त्वाचीं कामें घडवून आणलेल्या येथील आणि इतरत्रहि प्रांतांतील माझ्यापेक्षां ज्ञानानें, वयानें, आणि कर्तबगारीनें श्रेष्ठ असणाऱ्या वैद्यांना डावलून मला अध्यक्षपदीं बसविण्यांत आपण काय साधलें समजत नाहीं. आपल्या अपेक्षेप्रमाणें माझेकडून काम झालें नाहीं तर आपण अपेक्षाच अस्थानीं ठेवलीत असें मी तरी म्हणेन.

२. खानदेश ही माझी उपकारकर्ती भूमि

आपल्या खानदेशला मी अपरिचित नाहीं. सव्वीस वर्षांपूर्वी आपल्या नगरापासून नजिक असलेल्या फैजपूर नगरपालिकेचा वैद्य म्हणून मी वर्षभर सेवा केली आहे, व प्रत्यहीं शताधिक रुग्णांच्या संख्येत चिकित्सानुभव घेऊन येथेंच मी पुढल्या व्यवसायाचा पाया भरला आहे. त्यामुळें ही भूमि माझी उपकारकर्तीच झाली आहे. खेटक-खर्वटांतून व्यवसाय करण्यास लागणारे गुण माझ्रेंत अपुरे पडल्यानें व शहरांत आबाल्य वाढल्यानें, मी व्यवसायासाठीं शहराचा मार्ग धरला.

३. लिहिणें-बोलण्याचा षोक

शहरीं राहणींत व्यवसायाबरोबर लेखन-भाषणाचे पोषाकी उद्योगच करण्यासारखे, व तेच मी आजवर थोडे फार केलेले. त्रिदोष-द्रव्यगुण-रोगविज्ञान इ० वर लेखन भाषणें करणें हा जणूं माझा षौकच झाला. याच विषयांत अजून किती तरी गूढ ज्ञान भरलेलें आहे; यांवरच कितीतरी वाचावें, कितीतरी लिहावें, किती तरी बोलावें, असें अजूनहि वाटतें.

४. वातादि दोष हीं सूक्ष्म व शक्त्युत्कर्षसंपन्न द्रव्यें

कारण अजून त्रिदोषांवर द्रव्य कीं शक्ती, स्थूल कीं सूक्ष्म, हे वाद चालूंच आहेत. पनवेलला दृश्य व स्थूल द्रव्यें ठरलेल्या वायु, पित्त कफ या तीन दोषांतील वायु बनारसला सूक्ष्म व अदृश्य बनला, तर पाटण्याला पित्त हा दुसरा दोष किंचितसा सूक्ष्म झाला. आणखी एखाद दुसऱ्या चर्चापरिषदेंत तीनहि दोष सूक्ष्म व शक्ति शाली द्रव्यें ठरलीं जातील असा मला भरंवसा वाटतो. खरोखर दोषांचें ग्रंथोक्त वर्णन रौक्ष्यं लाघवं इ० गुणात्मकच असतांना, व त्याच गुणांना वीर्य ही अपर-संज्ञा असतांना, आणि वीर्य म्हणजे शक्ति असा अर्थ असतांना, वातादि दोष हे सूक्ष्म व शक्तिशाली आहेत असें म्हणण्यास कां प्रत्यवाय असावा ? मीमांसादि शास्त्रांनीं शक्ति निराळा पदार्थ मानला नसेल, वा न्यायादिकांनीं ईश्वरीच्छासंकेतानें शब्दाला आलेल्या अर्थालाच शक्ति मानून द्रव्याच्या शक्तीचा उल्लेख केला नसेल, पण आयुर्वेदानें गुणसंज्ञक वीर्यानें कार्यकारी शक्ति मानली आहेच कीं ? शक्तीचा उत्कर्षापकर्षहि आयुर्वेद मानतो. वाग्भटानें समग्रगुणसारांतील वीर्यगुणांपैकीं गुर्वादि आठ गुण शक्त्युत्कर्षविवर्ति म्हणून स्पष्टच सांगितले आहेत. वातादि दोष हे धातूंहून व मलांहून शक्त्युत्कर्षशाली आहेतच मुळीं. पचनेंद्रियांत अन्नाचें आहरण, पचन व सारकिट्टविभजन करून सारभाग रसधातूकडे पोचविणें, रसांतून रक्तादिक्रमानें धातुपोषणपरंपरा चालविणें, कामीं आलेल्या धातुघटकांचे मलभाग उत्सर्जित करणें, व असेंच उपधातूंचें व शिरास्नाय्वादिकांचें पोषण करणें इत्यादींनीं निरंतर देहव्यापार चालविण्याचें सर्वातिशायी कार्य वायुपित्तकफाचेंच आहे. " वातपित्तश्लेष्माण एव देहसंभवहेतवः । तैरेवेदं शरीरं धार्यते । " इ. नें सुश्रुतानें हें शक्तिशालित्व सांगितलें आहे. ' दोषाणामेव सा शक्तिर्लंघने या सहिष्णुता ' यांत वाग्भटानें दोषांचें शक्तिमत्त्व स्पष्ट दाखविलें आहे. दोषांना सूक्ष्म द्रव्यें न मानणारेहि विद्वान् वैद्य, ते बलशाली व मुख्य कार्यकर्ते आहेत असेंच म्हणतात. " त्रिधातु (वात, पित्त व कफ) हेच जिवंत शरीरांत फार बलवान् मुख्य कार्यकारी होत. " असें कै. वै. पं. गंगाधरशास्त्री गुणे यांनीं निःसंदिग्ध म्हटलें आहे. (पहा " आयुर्वेदाचें सामान्य स्वरूप " हा " वेदशास्त्रदीपिका " या ग्रंथांतील त्यांचा लेख, पृ. २२३) या वाक्यांतील " फार बलवान् " हे शब्दच " शक्तीचा उत्कर्ष असलेले " या भाषेनें दुसरे विद्वान् वापरीत नाहींत कां ? मग वायुपित्तकफांच्या शक्तिशालित्वाबद्दल वाद कशासाठीं ? सूक्ष्मत्वाबाबतहि असेंच. शरीरावयव हे सूक्ष्म परमाणुमय असल्याचें चरकानें सांगितलें असल्यानें व्यापित्वानें सर्व धातूंच्या सूक्ष्म घटकांत राहणारे वातादि दोष हेहि सूक्ष्मच असावयास हवेत, हें सहज समजण्यासारखें आहे.

५. दोषांना दोष हीच संज्ञा योग्य

अशीं हीं महाशक्तिशालीं द्रव्यें अविकृतावस्थेंतच शरीराचें धारण करतात, तर त्यांना दोषापेक्षां धातु या संज्ञेनें कां संबोधूं नये ? प्रश्न सरळ आहे. “ डुधाञ् धारणपोषणयोः ” या पाणिनीच्या सूत्राप्रमाणें पोषण देणारे वातादि, धातुसंज्ञेला पात्र होतीलहि. पण एकदां धारण करणारे म्हणून आयुर्वेदानें रसादि हेच धातु स्पष्ट सांगितले असतांना तीच संज्ञा वातादींना कशासाठीं द्यावयाची ? रसादि हे एका बाजूनें (आंतून) तत्पोषक दोषांचें व दुसऱ्या बाजूनें (बाहेरून) तदुत्सृष्ट मलांचें व एकूण सर्व देहाचें धारण करतात हें स्पष्ट आहे. अर्थात् त्यांनाच योग्य असलेली धातु ही संज्ञा विकल्पानें क्वचित् दोषांना लावलेली दिसली तरी आपण तशीच कशासाठीं वापरावयाची व संज्ञांचा घोटाळा करावयाचा ? सप्त धातूंबरोबर त्रिधातूंचें हें सारें लचांड निष्कारण कां बाळगावयाचें ?

६. आमाशयादि भागांतील स्थूल दोष

मग वातादिकांच्या गुणांचीं आमाशयादि भागीं असलेलीं स्थूल द्रव्यें तीं काय आहेत असा प्रश्न येतो. पण याचें उत्तर “ एषु संचीयन्ते दोषाः ” या सूत्रांत सुश्रुतानें देऊन टाकलें आहे. ‘ कफः पित्तं ’ या क्रमानें रस-रक्तांतून निघणारीं हीं खरोखर धातुमलरूपीं द्रव्यें आहेत. त्याना कार्यकारी व देहधारी दोष कसे म्हणावयाचे ? धातुमलरूपी व संचित झाल्यावर रोगोत्पत्तीचें मूळ असलेलें हे दृश्य स्रावरूपी पदार्थ, स्थायित्वानें सूक्ष्मातिसूक्ष्म धातुघटकांमध्यें राहून शरीराचें जीवन चालविणारे दोष म्हणून कसे मानता येतील ? शिवाय या दृश्यस्वरूपी द्रव्यांचेंहि स्रवण (खरोखर उदीरण) कोण करतात हा प्रश्न यानें सुटत नाहींच. त्या आमाशयांत क्लेदक कफाचें अधिष्ठान असतें त्याचे दोन भाग अन्नानें व एक पाण्यानें भरावा व चवथा वातादिदोषांसाठीं मोकळा सोडावा, या वर्णनांत क्लेदक कफाव्यतिरिक्त आणखी निराळे वातादि दोष आहेत याची कल्पना वाग्भटानें स्पष्टच दिली आहे. अर्थात् वायु, पित्त, कफ हे तीन दोष सूक्ष्म, शक्त्युत्कर्ष-संपन्न व व्यापी म्हणजे सर्व देहभर पसरलेले आहेत; म्हणजेच ते पचनेंद्रियांतील स्थूल द्रव्यांहून निराळे आहेत, हेंच सिद्ध होत नाहीं कां ?

७. व्यापी म्हणजे निरंतर देहभर असणारे

वातादि दोष हे व्यापी आहेत म्हणजेहि केव्हांतरी स्वस्थानीं असतात व केव्हांतरी नसतात असाहि त्याचा अर्थ करतां येणार नाहीं. नसतील तेव्हां शरीर तेवढ्यापुरतें अकर्मण्यच व्हावयास हवें !

८. वीस गुणांचे वीस दोष मानतां येणार नाहींत

पोषण, पचन व अभिसरण अशा तीन क्रियांनीं निरंतर आपलीं कार्यें करणारे हे दोषहि फक्त तीनच आहेत. त्यांच्या स्निग्धादि, तीक्ष्णादि व रूक्षादि गुणांची होणारी २० ही बेरीज त्यांच्या या त्रिविध कार्यांचाच उठाव होतांना लागणारे वीस गुण आहेत. हीं वीस निरनिराळीं द्रव्यें असें म्हणतां येणार नाहीं. वीस गुणांप्रमाणें वीस दोष असा उल्लेख कोठेंच नाहीं. वाग्भटानें “ वायुः पित्तं कफश्चेति त्रयो दोषाः ” असें त्यांचें त्रित्व ढळढळीत निर्देशिलेलें आहे. सुश्रुतानेंहि ‘ तैरेवाव्यापन्नः शोणितचतुर्थैः शरीरमिदं धार्यते” असें त्यांचें त्रित्व दाखविलें आहे. एका क्रियेला एकच गुण वा ती क्रिया करणाऱ्या द्रव्यावर एकच गुण असावा असा आग्रहच कां ? आणि कफपित्तांचें प्रत्यक्ष दाखवितां येतें म्हणणारे, आमाशय-पच्यमानाशयांतलें कफपित्त हे एकेक द्रव्य न मानतां सात सात द्रव्यांचा समुच्चय म्हणूं शकतात काय ?

९. रोग हे दोषवृद्धिजन्यच; क्षयकल्पना ही तारतम्यनिदर्शक

वर म्हटलेंच आहे कीं विकृति ही आमाशयादि अवयवांतील स्थूल कफादींतून होते. मिथ्याहारा-

दोनीं प्रथम त्यांचा चय अगर संचय होतो; म्हणजे मूळ द्रव्याची वाढ होते. यालाच वृद्धि म्हणतात. या वेळीं स्तब्धकोष्ठतादि भावी रोगांचीं अंधुक चिन्हें दिसूं लागतात. शोधनानें संचित द्रव्य काढून टाकल्यास या आपत्ती टळतात. पण उलट स्निग्धाम्लादि तत्तद्दोषवर्धक आहारच चलूं राहिले तर या द्रव्याचा (दोषाचा) प्रकोप होतो. प्रकोप ही वृद्धीच्या पुढची व खरी रोगोत्पादक अवस्था. केवळ वृद्धीनेंहि रोग होत नाहींत. वाग्भटानें 'वृद्धस्तु कुरुतेऽनिलः' इ० हीं वृद्धीचीं व 'स्रंसव्यासव्यधस्वाप' इ० हीं प्रकोपाचीं लक्षणें पृथक् दिलीं आहेतच. वृद्धि हा प्रकोप नव्हे; प्रकोप ही त्यापुढची अवस्था. प्रकोपावस्थेंत गेलेलेहि दोष काढून टाकले नाहींत, उलट तद्वर्धकच उपचार होत राहिले, तर(पर्युषित-किण्वोदक-पिष्टसमवायाप्रमाणें) हे दोष फसफसून शरीरभर पसरतात व मग ज्या शरीरभागीं जास्त प्रकोप झाला असेल, म्हणजे जो भाग आधींचाच विगुण झाला असेल तेथें सांठून ते रोगोत्पत्ती करतात. याहि वेळीं त्यांचें निर्हरण केलें नाहीं तर एखाद्या आणखी मर्यादित स्थानीं आश्रय घेऊन ते दृढमूल होतात. उदरांत प्रसार पावलेले दोष गुल्मादि, बस्तिस्थानीं गेलेले प्रमेहाश्मर्यादि, वृषणगत झालेले वृध्यादि इ. स्पष्ट रोग प्रत्ययाला आणतात. यावरून कोणत्याहि रोगाला दोषांची वृद्धि हीच कारण होते, क्षय नव्हे; हेंच सिद्ध होतें. रोगोत्पत्तीच्या या क्रमचक्रांत क्षीण दोषाला वाव कोठें आहे? क्षीणदोष ही भाषा मुळांत वाढलेल्या (विशिष्ट रोगोत्पादक) दोषांच्या तारतम्यासाठीं आहे. उदाहरणार्थ- पित्तानेंच ज्वरोत्पत्ति होते. (ऊष्मा पित्तादृते नास्ति।). पण ज्वरोत्पादक कारणांतच स्निग्धाहार जास्त झालेला असेल तर कफवृद्धि होऊन ज्वरकारक पित्त क्षीण संज्ञेला पात्र होईल व लक्षणेंहि मग मन्दज्वर-कासादिक हीं कफज्वराचीं होतील. तसेंच रूक्षशीतादि आहार ज्वरोत्पादक कारणांत अधिक झाल्यास विषमवेगी व गाढविट्कादि लक्षणांचा वातज्वर उत्पन्न होईल. केवळ या प्रकारांचा बोध व्हावा यासाठींच क्षीण-वृद्धीच्या तारतम्याचें ज्ञान हवें असतें. त्यावरून मूळचा रोगकारक दोष (जसें ज्वरांत पित्त) रोगस्थानीं वाढलेलाच असतो, हें विसरून चालणार नाहीं. कफवातज्वरांत कफवातांच्या अपेक्षेनें पित्त क्षीण असतें. पित्ताच्या क्षीणतेनें म्हणजे मूळापेक्षां त्याच्या कमी प्रमाणानें नव्हे. तसें झाल्यास ज्वराचें अंग तापणें हें लक्षणच होणार नाहीं. आतां जीवन चालविणारे दोष (म्हणजे शक्तिशाली सूक्ष्म द्रव्यें) वर खरोखरच कमी पडले तर शरीर झिजूं लागेल व क्षयाचेच विकार जडतील. त्यावर मग बृंहणोपचारच आवश्यक ठरतील. क्षयेतर सर्वच निज रोगांवर मात्र लंघनात्मकच उपचार करावे लागतात, ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

१०. निदानचिकित्सेला निश्चित शारीरज्ञान व प्रभावविज्ञान यांची आवश्यकता

वरील व्याख्येप्रमाणें प्रकुपित दोष ज्या विवक्षित स्थानाचा आश्रय घेतात तेथेंच रोगोत्पत्ति होते हें स्पष्ट आहे. त्या स्थानावर उपचार करणें, म्हणजे व्याधिप्रत्यनीक उपचारांनाच प्राधान्य येतें. अर्थात् प्रकुपित दोष बलवान् असून सर्व शरीरभर त्यांची व्याप्ति कायम असली तर जोडीला दोषप्रत्यनीक उपचारहि करावे लागतील. केवळ दोषांच्या वृद्धावस्थेंत साक्षात् रोगोद्भव नसल्यानें त्या स्थितींत कमीच उपचार करून घेण्याकडे रोग्यांची प्रवृत्ति असते. म्हणून वैद्याला दोषप्रत्यनीक आणि व्याधिप्रत्यनीक असे जोड अगर केवळ व्याधिप्रत्यनीक असेच उपचार फार करावे लागतात. यांनाच प्रभावी व खास रोगनाशक उपचार म्हणतात. निदानांत रोगाचें निश्चित शारीरज्ञान व चिकित्सेंत औषधी द्रव्यांचें निश्चित प्रभावविज्ञान महत्वाचें ठरतें तें यामुळेंच.

११. निदानचिकित्सोपयोगी शारीरज्ञान

शारीरज्ञानाची "शरीरं सर्वदा सर्वं सर्वथा वेद यो भिषक्। आयुर्वेदं स कार्त्स्न्येन वेद लोकसुखप्रदम्॥" अशी चरकानें महती गायिलीच आहे. अर्थात् हें शारीरज्ञान निदानचिकित्सोपयोगी असावयास

हवें, शारीरवर्णनांत असलेल्या संदिग्धतेवर निरनिराळे अभ्यासी वैद्य प्रकाश पाडून त्यांचें त्या त्या आधुनिक शारीरावयवाशीं समीकरण करूं लागले आहेत. हे प्रयत्न अजून व्हावयास हवेत. व ग्रहणी, हृदय इ. अवयवांची निश्चिति करून टाकली पाहिजे.

१२. प्रभावी द्रव्यांची निवड

चिकित्सा यशस्वी होण्यासाठीं औषधींचें प्रभावज्ञान नीट व्हावयास हवें हें वर म्हटलेंच आहे. रसादींहून प्रभावच अधिक प्रभावी. प्रभावी गुणांचीं एकाधिक द्रव्यें सन्निध असल्यास वातादिपैकीं ज्या दोषाचा रोग असेल तत्प्रत्यनीक वीर्याचें, विपाकाचें व रसाचें द्रव्य त्या रोगासाठीं वापरणें उत्कृष्ट म्हणून प्रभावाबरोबरच त्याचे रसविपाकवीर्यहि माहिती असावे लागतात. यानें रोगनाश होतांना होणारा दुष्परिणामहि टळतो. एखाद्या रोगांत पूर्वींच्या एखाद्या रोगाचा अवशेष असल्यास त्यालाहि मग पीडा होत नाहीं. तमकश्वासावर उपचार करतांना, मुखपाक, रक्तार्श यासारख्या इतर रोगांचा अवशेष असल्यास रुई, पिंपळी, मिरी इ. कफवातनाशक व विदाही औषधांचा उपयोग न करतां बेहडा, जेष्ठमध, अडुळसा, कोरफड यापैकीं वापरावे लागतील. त्यांतूनहि कफाला कोरडेपणा व मलावरोध असेल तर मधुयष्टी, बेहडा, व कफाधिक्य असेल तर अडुळसा-कोरफड यांची निवड करावी लागेल. त्यांतहि अग्निमांद्य असेल तर बेहडा, व थकवा अधिक असेल तर मधुयष्टी; कफ जाड घट्ट असेल तर कोरफड, व पातळ विदग्ध असेल तर अडुळसा, असा विवेक करावा लागेल.

१३. प्रभावाची निश्चिति

पण यासाठीं प्रत्येक द्रव्याचें रसादिविज्ञान आधीं निश्चित व्हावयास हवें. दीडदोन हजार उपलब्ध वनस्पतींतील २००।२५० च काय त्या आपण आज वापरतो. पण त्यांचेहि निघंटांतून रस, विपाक, वीर्य व प्रभाव हे चारी स्पष्ट सांगितलेले नाहींत व गुण मात्र बरेच सांगितलेले आढळतात. त्यांतहि प्रधान-गौणांचें तारतम्य नाहीं. निघंटांतून कांहींचे रस, कांहींचीं वीर्यें, तर कांहीं थोड्यांचे विपाक, व अगदींच थोड्यांचे प्रभाव सांगितलेले आहेत. अर्थात् समन्वयानें, व मधुररसाचा मधुर विपाक, त्याचेंच वीर्यहि शीत व मग तेंच द्रव्य हृद्य, बल्य असें आपण केवळ मधुर रसाच्या निर्देशानें सामान्य नियमान्वयें समजूं शकतों. पण असे सरळ रस-वीर्य-विपाक सर्वांचे असत नाहींत. आणि असले तरी त्यांतहि एखादें विशेषें हृद्य, वृष्य, चक्षुष्य असें असूं शकतेंच. एकापेक्षां अधिक रसांचींहि द्रव्यें असतात. व मग विपाक, वीर्य, वरील पद्धतीनें ठरविणें सोपें होत नाहीं. एकाधिक रसांचीं द्रव्येंच औषधोपयोगी जास्त. त्यांतच प्रभावी गुण अधिक. केवळ मधुर रसाचीं पौष्टिक, व अम्लादि रसांचीं तत्तद्दोषनाशक, म्हणजे दोषप्रत्यनीक, म्हणून वापरण्यासारखीं पण जेव्हां व्याधिप्रत्यनीक म्हणून उपचार करण्याची आवश्यकता असते, व तीच फार, तेव्हां अनेक रसमय द्रव्यांतील रसवीर्यविपाकांच्या विनिश्चयाची फार आवश्यकता असते. प्रभावी गुण त्यांतच असतात आणि अशा प्रभावी द्रव्यांवरच चिकित्सेंतील यश अवलंबून असतें.

१४. गुळवेलीची गुणनिश्चिति

गुळवेलीसारख्या थोड्याच द्रव्यांचे निघंटांतून चारहि रसादिक मिळतात. गुळवेल ही वनस्पति कटु-तिक्त-कषाय रसाची स्वादुविपाकी, उष्णवीर्य व ज्वरनाशक या प्रभावाची वर्णिली आहे. पण त्याचबरोबर तिचे इतरहि अनेक गुण निर्दिष्ट केले गेले आहेत. बल्य, रसायन, अग्निदीपन, लघु, हृद्य व आयुष्य असून कामला, कुष्ठ, वातरक्त, पित्त, कृमि, दाह, तृष्णा, वांती, भ्रम, पांडु, प्रमेह, आम, कास, कुष्ठ, रक्तार्श, कंडू, विसर्प यांची नाशक, इतके तिचे गुण निरनिराळ्या निघंटांतून दिलेले आहेत. हे सर्व तुल्यबल कसे

मानावयाचे ? त्यांत प्रधान-गौणत्व ठरविलें पाहिजे. यांतील लघु हा गुण तर वीर्यांतलाच व इतर सर्व गु कडू-तुरट-तिखट या रससंयोगाचे, मधुर विपाकाचे व उष्ण-लघु या वीर्यांचेच होत. म्हणजे यांतले कांहीं रसानुगामी, कांहीं विपाकानुगामी, तर कांहीं वीर्यानुगामी, असा त्यांत विवेक करावयास हवा. आमनाशन अग्निदीपन, कासनाशन हे आमाशयांत काम करणाऱ्या कटु -तिक्त-कषाय रसांचेच. गुळवेलीच्या या रसांचा सामान्य नियमाप्रमाणें कटु विपाक न होतां मधुर विपाक होतो. या विपाकांतच गुळवेलीची गुणवत्ता आहे. ग्राही हा गुण या विपाकाचाच परिणाम. दाहनाशन, तृष्णाशमन, वांती–पित्त-भ्रमनाशन हेहि या विपाकामुळेंच संभवतात. गुळवेल कट्वादि रसांची व उष्णवीर्याची आहे हें ध्यानीं घेतां दाहादिनाशन हें ज्वरांपुरतेंच मर्यादित समजावयास हवें. कट्वादि गुणांनीं आमनाशन व शोधन होणारी गुळवेल, विपाकानें स्वादु असल्यानें धातुघटक शुद्ध करण्याचे तिचें कार्य होतांनाहि दाह होऊं न देणें एवढाच याचा अर्थ घ्यावयास हवा. अशाच अवस्थेंत गुळवेलीचें पौष्टिक कार्य घडतें.

गुळवेलींत असलेल्या सत्त्वाचाच हा परिणाम हें स्पष्ट आहे. हें सत्त्व मधुररसविपाकी, शीतवीर्य, दाहशामक व पौष्टिक म्हणून प्रसिद्ध आहे. ‘ सामान्यं वृद्धिकारणं ’ या नियमाप्रमाणें अस्थिद्रव्यांशी या सत्त्वाचें साधर्म्य असल्यानें अस्थिगत दाहनाशन व अस्थिपोषण यानें होणें जास्त स्वाभाविक. दाहनाशन म्हणूनच हें सत्त्व जीर्णज्वर, प्रदर, मूत्रकृच्छ्र इ. वर चालतें. कट्वादि रसाची गुळवेल बल्य, आयुष्य, रसायन, हृद्य होण्यास तिच्या कट्वादि रसांच्या शोधनानंतरच्या कार्यास या सत्वाच्या दाहनाशक व पौष्टिक गुणांनींच मदत होते. गुळवेल कुष्ठ, वातरक्त, विसर्प या विकारांवर काम करणारी म्हटली आहे. साम विदग्ध पित्त त्वग्गत होऊन त्वग्रोगांना कारण होत असल्यानें थोड्या गौणत्वानेंच पण गुळवेल यावर काम करते. प्रमेहाला क्लेदाधिक्य व वृक्क-बस्तीचें दौर्बल्य कारण असतें. गुळवेल आपल्या कट्वादि रसांनीं क्लेदोत्पत्तीच कमी करते व उष्णवीर्यानें वृक्कगत मेदोनाश करून प्रमेह बरा करते. गुळवेलीचें हें कार्य बऱ्याच वरच्या दर्जाचें आहे. तथापि ज्वरनाशनाहून इतर सर्व गुळवेलीचे गुण दुय्यमच समजावयास हवेत. ती धान्यवालकाइतकी दाहशामक, चित्रकपिप्पल्यादीप्रमाणें अग्निदीपक व आमनाशक, पुनर्नव्याप्रमाणें पांडुनाशक, माक्याप्रमाणें वांतिभ्रांतिनाशक, अर्जुनाप्रमाणें हृद्य, आंवळ्याप्रमाणें पौष्टिक-रसायन, खदिराप्रमाणें कुष्ठविसर्पनाशक, हिरड्याप्रमाणें शोधक वा हळदीप्रमाणें प्रमेहनाशकहि होणार नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पित्तकफजन्य ज्वरनाशन या गुणासाठींच गुळवेल अधिक वापरली जाते व हाच तिचा प्रभावी गुण. ज्यावेळीं द्विदोषजन्य वा त्रिदोषजन्य व्याधि असतात वा मुख्य रोगाबरोबर अनेक उपद्रव अथवा तत्सदृश इतर व्याधींचा संकर असतो, तेव्हां गुळवेलीसारख्या बहुगुणी द्रव्याचा उपयोग होतो. गुळवेलीचें असें गुणवर्णन पुढीलप्रमाणें श्लोकबद्ध करतां येईल.

गुडूची कटुका तिक्ता कषाया स्वादुपाकिनी ।
लघुरुष्णा ग्राहिणी च कफपित्तज्वरं जयेत् ॥
रसत्रयादग्निमांद्यमामं चैव विनाशयेत् ।
स्वादुपाकात्पित्तवृद्धिं दाहं तृष्णां च कामलाम् ॥
रसत्रयादुष्णवीर्याद्धातून्संशोध्य पोषयेत् ।
स्वादुपाकात्तत्त्वगन्तर्गतसत्त्वस्य संभवात् ॥
तच्च सत्त्वं स्वादु शीतं दाहजिच्चास्थिपोषकम् ।
अतश्च जीर्णज्वराजित्कृच्छ्रासृग्ज्वरनाशनम् ।

आर्य प्रतिनिधि सभा मध्यप्रदेश के
अधिकारियों की सूची
१९५५-५६

प्रधान	श्रीयुत	घनश्यामसिंह जी गुप्त	दुर्ग
उपप्रधान	,,	विलायतीराम जी कौशल (विश्वबन्धु जी कौशल)	नागपुर
,,	,,	पन्नालालजी व्यास	खामगांव
,,	,,	हरीसिंह जी दरबार	रायपुर
,,	,,	दीनानाथ जी चड्ढा	जबलपुर
मन्त्री	,,	प्रो० इन्द्रदेवसिंह जी आर्य	नागपुर
उपमन्त्री	,,	विश्वम्भर प्रसाद जी शर्मा	नागपुर
,,	,,	दुर्गाप्रसाद जी आर्य	कारंजा
,,	,,	बाबूलाल जी बरोरे	रायपुर
,,	,,	जयसिंह जी आर्य	जबलपुर
कोषाध्यक्ष	,,	विश्रामभाई जी पटेल	नागपुर
पुस्तकाध्यक्ष	,,	ज्ञानप्रकाश दत्त जी	नागपुर
अन्तरंग सदस्य	,,	नरदेव जी आर्य	नागपुर
,,	,,	कृष्णराव जी नाइक	इटारसी
,,	,,	दीनानाथ जी	रायपुर
,,	,,	झब्बूलाल जी आर्य	बिलासपूर
,,	,,	दुर्गाप्रसाद जी भार्गव	सागर
,,	,,	मनोहरलाल जी भाटिया	नागपुर
,,	,,	स्वामी दिव्यानन्द जी महाराज	नागपुर
,,	,,	सत्यव्रत जी शास्त्री	जबलपुर
,,	,,	मक्खनलाल जी वर्मा	कटनी
,,	,,	पानाचन्द जी डायाभाई	अकोला
,,		श्रीमती यशोदा देवी जी	धमतरी

विदग्धपित्तशमनाद्गुडूची कुष्ठहृन्मता ॥
एवं वातास्रवीसर्पौ, क्लेदनाशात्प्रमेहकम् ।
तथापि पित्तकफजं ज्वरं छिन्ना जयेत्खलु ॥
रसायनादिगुणतोऽमृताऽपि ज्वरनाशिनी ।
कषायेण ज्वरं चूर्णात्ग्राही दाहं रसाज्जयेत् ॥
आम्रनिम्बादि वृक्षस्था ह्यार्द्रा छिन्ना प्रशस्यते ।
जीर्णा शुष्का च सा हीनवीर्याऽतो निन्द्यते बुधैः ॥

ाव पद्धतीवर एकेका वनस्पतीचा गुणविनिश्चय करून समन्वित तऱ्हेनें इतरहि वनस्पतींचें पुनर्लेखन करणें ह ठरेल. विद्वानांनीं याचा विचार करावा.

ॲलोपाथिक सिद्धौषधें वापरणें आयुर्वेदाला घातक

द्रव्यांच्या प्रभावी गुणविनिश्चयाभावीं कित्येक वैद्य ॲलोपाथिक औषधें वापरूं लागले आहेत. अशा वैद्यांनीं ग्रंथ काळजीपूर्वक वाचून प्रभावी औषधें शोधून काढून वापरावींत. आयुर्वेदांत असंख्य प्रभावी औषधें आहेत. उगाच ॲलोपाथींतलीं विषारीं व उपद्रवकारक औषधें वापरून ॲलोपाथीचा बडेजाव वाढविण्यास व आयुर्वेदाचें नांव बदु करण्यास त्यांनीं कारण होऊं नये. वैद्यांनीं ॲलोपाथिक सिद्धौषधें वापरणें हा आयुर्वेदाच्या मुळावर खासा कुठाराघात आहे. क्षणभर या तोडीचीं औषधें आयुर्वेदांत नाहींत असें मानलें व ॲलोपाथिक औषधाप्रमाणें एखादें त्वरित गुणकारी औषध नसलें तर बिघडलें काय! डॉक्टर नाहीं कां कित्येक रोग सोडून देत! आज आयुर्वेदाचा व्यवहार शुद्ध राखणेंच अगत्याचें आहे. त्यासाठीं कांहीं अडचण सोसली पाहिजे हळूहळू डोळस पणानें चिकित्साव्यवसाय करीत गेल्यास अनेक प्रभावी औषधांची आपल्यालाच भर घालतां येईल. गेल्या हजार वर्षांत, कीं ज्यावेळीं आयुर्वेदाचा अगदीं पूर्ण अधःपात झाला असें आमचे मित्र कंठरवानें म्हणतात, त्याच काळांत अनेक खल्वी व कुपीपक्व रसायनें सिद्ध झालीं. त्रिभुवनकीर्ति, सूतशेखर, लक्ष्मीविलास, हेमगर्भ, सुवर्णपर्पटी, समीरपन्नग, चन्द्रोदय इ० याच काळांत सिद्ध झालेलीं व आज वैद्यांच्या चिकित्सेंत यश देणारीं औषधें या काळांतलीच आहेत. यांना ॲलोपाथींतहि तोड नाहीं. याच काळांतील बेरी, मायफळ, जितसाया, नारळाचा कोका, सर्पगन्धा हीं प्रभावीं औषधें, वैद्य लोक या काळांत शोध घेत नव्हते, हेंच दाखवितात. आतां तर अनेक सोयीसाधनांचे आनुकूल्यांत आपण कितीतरी प्रभावी औषधांची भर घालूं शकूं. हिंदी डॉक्टरांनीं ॲलोपाथीचीहि प्रगति करण्यास मदत केली नाहीं, ते आयुर्वेदाची काय करतात! ॲलोपॅथिक औषधें वापरणारे वैद्यहि तीं, औषधें त्यामागलें शास्त्र समजून न घेतां धंद्याचे मोहानें आंधळेपणानें वापरतात व डॉक्टरांपेक्षाहि रोग्यांना अपाय करतात. ॲलोपाथींतील मूलौषधें वापरलीं तरीहि तीं जन्तुनाशाचे तत्वावर वापरणें आयुर्वेदाला विरुद्ध आहे. वेदांत जन्तुविज्ञान आहे, आयुर्वेदांतहि " रक्तवाहि-शिरास्थानरक्तजा जन्तवोऽणवः । सौक्ष्म्यात्केचिदद्दर्शनाः । ", असले तुकडे आधार दाखवून त्याला जन्तुशास्त्र मान्य आहे असें म्हणणें आयुर्वेदीय तत्वप्रणालीचें विरुद्ध आहे. रक्तवाहि सूक्ष्म जन्तूंचें कुष्ठापुरतेंच वर्णन असल्याचें " षट् ते कुष्ठैककर्माणः " या वचनानें दाखविलेंच आहे. कुष्ठचिकित्सेंतील क्रिमिनाशन उपचारही गौणच आहेत. तेथेंहि दोषदूष्यविवेकानेंच चिकित्सा सांगितली आहे. वेदांत जन्तुविज्ञान असेल तरी आयुर्वेदानें दोषविज्ञानाचे तत्त्वज्ञानावरच आपली पद्धति बसवून जन्तुविज्ञानाला बगल दिली व फक्त आगन्तु व्याधीपुरतेंच त्याचा व्यवहार मर्यादित केला. आजचे डॉक्टर जन्तुविज्ञानानें इतके भारून गेले आहेत कीं, ार्ड शॉ म्हणतो त्याप्रमाणें " The whole art of healing could be summed up in the formula – " Find out the microbe and kill it. (Introduction to Doctor's Dilemma pp. 21). आज जन्तुविज्ञानानें भारून गेलेले डॉक्टर त्वरित गुणासाठीं जन्तुनाशकांच्या भडिमाराखालीं रोग्यांच्या पैशाइतकीच शरीराचीहि नासाडी करीत आहेत. याची जाणीव आतां ॲलेक्सिस कॅरेलसारख्या अनेक मोठ्या पाश्चात्य डॉक्टरांना झाली आहे. मनुष्य हा केवळ हाडामासांचा पुतळा हि ॲलोपॅथीची दृष्टि चूक असून आयुर्वेद सांगतो त्याप्रमाणेंच तो शरीर, मन व आत्मा यांच्या समवायानें बनलेला आहे, असें आतां हे डॉक्टर म्हणूं लागले आहेत. पण त्यांचे येथील भाईबंद याची जाणीव ठेवतील तेव्हां खरें ! त्यांतच त्यांचा फायदा तर नसावा ? बर्नार्ड शॉ स्पष्टच म्हणतो; " ......The poor doctor (that is, the average doctor) defends ordinary vaccination frantically as it means to him the bread of his children " (Ibid p. 26) आपल्या पंतप्रधानांनींहि परवा या वृत्तीबद्दल डॉक्टरांना खडखडित इषारा दिला आहे. धंद्यांतील लोभीपणांतून वैद्यहि सुटत नाहींत. " नात्मार्थं नाऽपि कामार्थमथ भूतदयां प्रति " हें चरकवचन कितीजण पाळतात? "वैद्या इमे वंचितरुग्णवर्गाः पिचण्डभाण्डं परिपूरयन्ति" हें वेंकटाध्वरीचें वर्णन जुनेंच आहे. कित्येक वैद्य, डॉक्टरी औषधें व इंजेक्शनें धडकावून वापरूं लागले आहेत. पैशाचा नसला तरी त्वरित गुण दाखविण्याचा मोह अशा वैद्यांना असतोच. रोग्याला अगदीं विमानाच्या वेगानें आराम देतां आला नाहीं तर एवढें मोठें काय बिघडणार आहे? बहुधा हीं त्वरीत गुणकारीं औषधें जन्तुनाशक असतात. डॉक्टरांच्या जन्तुनाशक औषधांच्या धूमधडाक्यानें जंतुजन्य रोग नाहींसे झालेसे दिसले तरी दुसरे तितकेच किंबहुना त्यापेक्षां रोग भयंकर त्यांची जागा घेतात हे डॉक्टर ॲलेक्सिस् कॅरेलच विदारक शब्दांत सांगतात, " Tuberculocis is being vanquished. Deaths from infantile diarrhoea diphtheria, typhoid fever, etc. are being elimuinated. Indeed the number of deaths from infections diseases has greatly diminished. But we still die, & we die in a much larger proportion from degenrative diseases. The years of life which we have gained by the suppression of diphtheria, smallpox, typhoid fever, etc. are paid for by the long sufferings and the lingering deaths caused by chronic affections and especially by cancer, diabetes, and heart-disease......Diseases have not been mastered. They have simply changed in nature, " (Ibid pp. 112–113) आपलेकडेहि अनेक पाश्चात्य डॉक्टरांचे व जीव-वंशप्रजाजननादि शास्त्रज्ञांचे भरपूर आधार देऊन पुण्याचे प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ श्री. गो. म. जोशी यांनीं हेंच मत अनेक व्याख्यानमाला गुंफून सांगितलें आहे. हीं व्याख्यानें प्रसिद्ध झाल्यास ते एक पाश्चात्य वैद्यकाच्या तथाकथित शास्त्रीयतेवर प्रकाश पाडणारें महत्वाचें वाङ्मय होईल. संमेलनानें हें काम करण्यासारखें आहे.

१६ ॲलोपाथी हें पेटण्ट औषधें वापरणारें चिकित्साशास्त्र

जन्तू हे रोगकारण मानणाऱ्या ॲलोपाथीला एकाच साच्याचीं औषधें सर्वच रोग्यावर वापरावयाचीं असतात. म्हणजे एका अर्थानें हें पेटण्ट औषधें वापरणारें वैद्यशास्त्र, असाच त्याचा अर्थ होतो! आयुर्वेदात दूष्य, देश, बल, काल, अग्नि, वय, मनोवृत्ति, संवयी, व संवयीचा आहार यांचा विचार केल्याशिवाय औषध देतांच येत नाहीं. यांतलें शास्त्रशुद्ध कोणतें याचा जाणत्यांनींच विचार करावा. डॉ. ॲलेक्सिस कॅरेल म्हणतात, " In the diagnosis and prognosis of diseases ancient physicians quite rightly attributed great importance to temperament, idiosyncracies and diathesis. Each man bears on his face the description of his body, mind and soul" (Ibid pp. 69). केंद्र उपमंत्री श्रीमती चंद्रशेखरं यांना "मानवी शरीरांत होत असणाऱ्या क्रिया या सर्व जगतांत सारख्याच असणार" असें वाटलें तरी वैद्याला वाटत नाहीं. थंडींत व थंड प्रदेशांत भूक जास्त लागते, आहार अधिक लागतो व शक्तीहि जास्त असते, या एका उदाहरणावरून ही देशकालानुरूप क्रिया बदलतात व मग आहार-विहार-उपचारहि बदलतात हें दिसून येईल.

१७ सत्त्वरूपानें (active principle काढून) औषधें वापरण्याची अनिष्टता

कित्येक आयुर्वेदोद्धारकांना सत्त्वस्वरूपांतील औषधें (active principles) वापरण्याचा अॅलोपाथींचा प्रघात आयुर्वेदीयांनीं अवलंबावा असें वाटतें. पण कर्नल चोप्रासारख्या विचारी डॉक्टरांना हें चूक वाटत असून शेकडों वर्षांच्या अनुभवान्तीं गुणावह ठरलेल्या वनस्पती मूळस्वरूपांत वापरणें त्यांना योग्य वाटतें. त्यांनीं हें मत मांडतांना तत्समर्थनार्थ करण्ट सायन्सच्या जुलै १९४६ च्या अंकांतला एक उताराच दिला आहे. "Looking at the matter from a chemical point of view, one is struck by the large number and variety of natural products employed successfully as curative materials by the Ayurvedic practitioners as a result of the immensity of valuable therapeutic knowledge of these, accumulated by centuries of observation. It has been the practice among advocates of indigenous drugs for use in the Western system of Medicine to extract some of these drugs for what are known as active principles with a view to employ the latter for the same purposes as the crude drug. As has been shown resently by Miss Irani in the case of kurchi seeds, the constituents of a crude drug responsible for its curative action may be different and much more complex stage of combination than the substances usually isolated from them in the form of the socalled active principles. The question, therefore, of a substitution of Ayurvedic drugs by their socalled active principles may be frought with dangerous consequences." (Report on the Indigenous systems of Medicine pp. 156).

१८ परकीय मूलौषधांच्या गुणधर्मांची आवश्यकता

तथापि परकीय पण शताधिक वर्षांचे काळांत स्थिर झालेलीं, व उपद्रव (Reactions) न करणारीं पण आयुर्वेदीय तत्त्वावर (म्हणजे केवळ जन्तुनाशक नव्हे तर दोषप्रत्यनीक म्हणून) वापरतां येणारीं द्रव्यें मात्र आतां वैद्यांनीं रसवीर्यादिकांच्या पद्धतीवर गुणधर्मनिश्चयाला घ्यावयाला हवींत. अशी औषधें आतां घरोघर पसरूं लागलीं आहेत. चोपाचिनी, अफू हीं परकीय द्रव्यें, रसवैद्यक, विशेषें त्यांतील पारागंधक हीं मात्र याच तत्त्वावर आयुर्वेदानें आपल्या चिकित्सेंत सामील करून घेतलीं. हीं आयुर्वेदानें परकीयांपासून स्वीकारली म्हणण्यापेक्षां या चिरंजीव द्रव्यावर सर्वच वैद्यकांची मालकी आहे. हीं जन्तुनाशनाचे तत्त्वावर आयुर्वेदानें घेतलीं नाहींत. जन्तुनाशकें नित्य वापरून त्या जंतूंना तीं संवयीचीं होतात व त्यांच्यांत त्याविरुद्ध प्रतिकारशक्ती उत्पन्न होऊन पुढें पुढें तीं काम करीतनाशीं होतात व मग दुसरीं जन्तुनाशकें शोधावीं लागतात. प्रसिद्ध वंग डॉक्टर जी. एन्. मुखोपाध्याय यांनीं हेंच मत स्पष्टपणें मांडलें आहे.

" New antiseptic agents appear from time to time upon the scene. They are pursued, are vaunted as perfect, employed, and then not a few of them fade away, some very gradually, others with the suddenness of the South Sea Bubble " (History of Indian Medicine *Vol.* I,pp. 66). मलेरियाचें जन्तुनाशक क्विनाईन आज मागें पडून त्याची जागा पॅलुड्रिन, प्लॅस्मोक्विन् , अटेब्रिन् यांनीं घेतली आहे. उद्यां हींहि मागें पडून नवीन निघतील. पेनिसिलिन, स्ट्रेप्टोमायसिन, क्लोरोमायसेटिनची हीच स्थिति होईल. आयुर्वेदानें असल्या अस्थिर औषधांचा संग्रह करण्याच्या भानगडींत पडूंच नये. आतां स्थिर झालेल्या मूळ द्रव्यांचा मात्र अवश्य विचार करावा व संमेलनांनीं चर्चेअंतीं त्यांचीं गुणवर्णनें लिहून काढावींत. नको म्हटलें तरी वैद्य ॲलोपाथिक औषध चोरून मारून वापरूं लागले आहेत. त्यांनीं निदान त्यांचे रसविपाकादि तरी नीट ध्यानीं घेऊन तीं वापरणें इष्ट आहे. यासाठीं असें गुणवर्णन आवश्यक ठरेल.

१९. चहाकॉफीसारख्या घरोघरीं पसरलेल्या जिनसांचे गुणधर्म

पण त्याहिपेक्षां मूळ द्रव्यांहून घरोघरीं पसरलेले, उपवासालाहि चालणारे व देवघरांतहि शिरलेले जिन्नस तर आतां अटळ झाले आहेत. पथ्यासाठींहि ते वापरले जाऊं लागले आहेत. चहा, कॉफी, कोको, सोडा, लेमन, पाव, बिस्किटें, टोमॅटो, साबुदाणा, ॲरोरूट, बर्फ इ. पदार्थ आतां वैद्याचें औषध घेणारे आधींच वापरून जरूर तर त्यांची इष्टनिष्टता त्याला विचारतात. अर्थात् वैद्याजवळ त्यांचीं गुणवर्णनें असणें आतां अनिवार्य आहे. संमेलनानें याचा अवश्य विचार करावयास हवा. मी नुसतेंच परोपदेशे पांडित्य करीत नाहीं. थोडाफार विचार करून या द्रव्यांचें गुणवर्णन मी लिहिलें आहे. नमुन्यादाखल सर्वांचा आवश्यक पक्ष पुढें ठेवीत आहेः—

चाहगुणाः ।

चहा चाहश्च च्याय् टी वेत्येतैः शब्दैः प्रचालितम् ।
अधुनातानिकं द्रव्यं फाण्टस्तस्य प्ररोचकः ॥
चाहवृक्षाश्च लंकाग्रामासामे नीलपर्वते ।
वर्धन्ते, तस्य पत्राणि चाग्नितप्तानि कारयेत् ॥
चूर्णितानीषदिव च फाण्टस्तेषां विधीयते ।
चतुष्पलं जलं तोलकार्धचूर्णेन फाण्टयेत् ॥
यदाऽच्छो जायते फाण्टस्तदा तं गालयेत्सुधीः ।
फाण्टे दुग्धं पंचमांशं शर्करां दशमांशतः ॥
क्षिप्त्वा पिबेदुष्णमुष्णं सोऽतीव रुचिरो मतः ।
चाहपानं सकृत्द्विर्वा शीतकाले प्रशस्यते ॥
लघ्वाहारान्तरं पीतो न चाहो दोषकृद् भवेत् ।
चाहपेयं रसे स्वादु तिक्तं चैव कषायकम् ॥
विपाकेऽम्लं चोष्णवीर्यं रूक्षं तीक्ष्णं लघु स्मृतम् ।
रुचिरत्वाल्लघुत्वाच्च चाहो रुग्णाय शस्यते ॥
कासश्वासप्रतिश्यायपीडिताय विशेषतः ।

नान्नाभिनन्दनं यत्र चाहस्तत्राभिनन्द्यते ॥
पित्तदोषे न सः शस्तः पित्तजे प्रकृतौ तथा ।
अतीवोत्काथितश्चाहश्चूर्णाधिक्ययुतः पुनः ॥
हीनदुग्धो विशेषात्तु न सेव्यो हितकांक्षिणा ।
नोचेद्वृद्धेनोष्मणा च निद्राहानिर्भवेद्ध्रुवम् ॥
हस्तपादौ मूत्रमार्गः शिरोभागो विदह्यते ।
सात्म्यीभूतेन चाहेन नैतेऽपायाः सुदुःसहाः ॥
तथापि पित्तं वृद्धं सच्छनैस्तद्रोगदं भवेत् ॥
अम्लपित्तं पाण्डुरोगस्त्वग्रोगा नेत्रकर्णजाः ॥
शिरोनाशादिजा रोगाश्चाग्निमान्द्यादिजाः पुनः ।
जायन्तेऽतश्च चाहस्य मितं पानं चरेद्बुधः ॥

२०. हिऱ्याच्या मोलाचीं रसरसायनादि औषधें

खनिजांबाबतहि गुणविनिश्चयाची गरज आहे. तशीच त्यांची रसायनप्रक्रियाहि निश्चित होणें जरूर आहे. सुवर्णराजवंगेश्वरला गाहिरेदार चमक असावी कां नाहीं ? त्यांत सोन्यासारखा क्षार घालावा कां नाहीं ? रसिंदूर समगंध कज्जलीचा कीं विषम प्रमाणांचा चांगला ? समीरपन्नग तलस्थ कीं कंठस्थ प्रशस्त ? कुपीपक्व रसायनें चुलीवर करावींत कीं मोठ्या आंचेच्या स्टोव्हवर झटपट करून टाकावींत ? प्रवाळ, शंख इ० चीं अग्निपुटी भस्में जिभेला चरचरणें हा दोष कीं त्यांतच त्यांची गुणवत्ता आहे ? इ. इ. अनेक प्रश्न संमेलनांनीं चर्चापूर्वक व प्रायोगिकांचें साहाय्यानें अवश्य सोडवावेत. थोडक्यांत, संशोधनकार्यालाच संमेलनानें आतां जोरानें लागावें. आपल्या जवळ पूर्वजांच्या पुण्याईचा फार मोठा निधि आहे. एकेक औषध हिऱ्याच्या मोलाचें आहे. केवळ अनुभवी (empirical) म्हणून त्यांची किंमत कमी होत नाहीं. विचारी डॉक्टरांनीं ती ओळखली आहे. कर्नल चोप्रा म्हणतात, “the fact remains as Sir Pardy Lukis (The then Director General of the Indian Medical Service, Government of India) has pointed out (that) ‘Many of the empirical methods of the treatment adopted by Hakims are of the greatest value, and there is no doubt, whatever that their ancestors, ages ago, knew many things which are now-a-days being brought forward as new discoveries.” (Report of the com. on Indigenous Systems of Medicine pp. 78). डॉक्टरी उपायांचीच तरफदारी करणाऱ्या आपल्यांतील आयुर्वेदोद्धारकांची स्थिति मात्र “ घरीं कामधेनू पुढें ताक मागें ” या समर्थोक्तीप्रमाणें झाली आहे !

२१ नागपूर विद्यापीठांतील संशोधन

या ठिकाणीं नागपूर विद्यापीठांतील व इतरत्र चाललेलीं सरकारी संशोधनकार्ये डोळ्यापुढें येतात. नागपूरचें काम नुकतेंच पाहण्यास मिळालें. श्री. आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री हे आपलेच भूतपूर्व विद्वान् अध्यक्ष तेथें उत्साहानें कार्य करीत आहेत. त्यांनीं इतके दिवसांत ई मर्कच्या व हिंगुलोत्थित पारदावर दीपनान्त संस्कार करून बरीच मजल मारली आहे. श्री. वेणीमाधवशास्त्रीजींनीं नवीन कल्पनेनें पातनयंत्रें बनवून घेतलीं. पण त्यांनीं, त्यांचें–म्हणणें, पारद थोडा अधिक उडून गेला. तरीहि ग्रंथोक्त अष्टमांशापेक्षां

या अष्टसंस्कारांतीं बराच जास्त म्हणजे निम्म्याइतका पारद शिल्लक राहिला. तप्तखल्वांतील शुद्धि व हा पारद संस्कार मायक्रोॲनॅलिसिसनें परीक्षून काय फरक पडतो तें पाहण्याचा ते प्रयत्न करणार आहेत. तथापि त्यांच्या संशोधनाबाबत व्यावहारिक दृष्ट्या वैद्यांच्या बऱ्याच अपेक्षा आहेत. (१) अष्टसंस्कारांतीं “ अतः शुनी वाहेऽज्ज्वलो यो मध्याह्नसूर्यप्रतिमप्रकाशः ।” असा पारा उपलब्ध व्हावयास हवा. कां हें आयुर्वेदप्रकाशोक्त वर्णन अतिशयोक्त आहे ? (२) षड्गुणगन्धजारित रससिन्दुरांत व समगन्धकज्जलीच्या साध्या रससिन्दुरांत किती गुणान्तर संभवतें ? (३) अशा रससिंदुरानें केलेला चन्द्रोदय (मकरध्वज) सुवर्ण शोषून घेईल काय ? (पं. श्रीनिवासशास्त्रींनीं असा सिद्ध केल्याचें प्रा. द. अ. कुलकर्णी सांगतातहि (४) १० पुटांचेंच काय, विनपुटांचें, वारितर झालेलें म्हणून स्वयमग्निलोहहि वापरावें कीं शतधिक पुटांनींच बनलेलें लोह प्रशस्त मानावें ? इ.इ. अनेक प्रश्न सुटले तर आपल्याला हवे आहेत. त्यांना हल्लींपेक्षांहि बहुगुण रसायनें उपलब्ध होऊन आयुर्वेदाची उपयुक्तता दशगुणित, शतगुणित होईल यांत काय शंका आहे ?

२२. मुंबई रिसर्च बोर्डाचे उपक्रम

मुंबईच्या आयुर्वेदिक रिसर्च बोर्डातर्फे विविध उपक्रम चालू आहेत. पुण्यास मुख्यतः आयुर्वेदिक कोषाचें कार्य श्री. चिं. ग. काशीकर, वाङ्मयपारंगत, यांचे सारख्या वैदिक कोषरचनेचा अनुभव घेतलेल्या संशोधन व आयुर्वेदाशीं पूर्ण परिचित अशा पंडितांचे नेतृत्वाखालीं चाललेलें काम मी जवळून पाहिलें आहे. गेलीं तीन वर्षे हें काम पद्धतशीर व नियमित चालू असून आज सहा वैद्य आयुर्वेदीय संहितांतील पारिभाषिक शब्दन् शब्द टिपून काढून त्यांचा संस्कृतांत अर्थ लिहून काढित आहेत. संस्कृत इंग्रजी कोषांचा जरूर तेथें उपयोग करून व टीकांतील समन्वित अर्थाशीं ताडून पाहून अर्थ दिल्यानें हा कोश प्रामाणिक होईल असें मानावयास हरकत नाहीं. तथापि खर्चाच्या मर्यादेमुळें हें काम आतां समाप्त होणारें दिसतें. चरक, सुश्रुत, वाग्भट व रसरत्नसमुच्चय एवढ्याच ग्रंथापुरतेंच हें काम व्हावयाचें असून धन्वन्तरी व राजनिघंटू घेतले जाण्याचा संभव आहे. पण भावप्रकाशादि संग्रह ग्रंथ, आयुर्वेदप्रकाशादि रसग्रंथ आणि मदनपालादि निघंटु ग्रंथ हाताळण्याचें राहून जाणार असून त्यांतली विपुल पारिभाषिक शब्दसंपदा या कोषांत दिसणार नाहीं. सोरा, समुद्रफेन, गोदंती, मृगशृंग-भस्म इ. खनिजविषयक, मायफळ, चोपचीनी, अहिफेन, नाडीहिंगु, (डिकेमाली), खसखस, परिपाठ, सुगंध-तृण (पुदिना), वोळ, युगंधर, (जोंधळे) क्षुरजमरिच (मिरची), भेंडी, तमाखु इ.प्रचारांतील वनस्पतींच्या, पर्पट, भारिंथ सार, इ. खास महाराष्ट्रीय कृतानांच्या आणि कितीतरी सिद्धौषधींच्या कीं ज्यांत जंबूफलासव, नारायणज्वरांकुश, त्रिभुवनकीर्ति, सूतशेखर, महामृत्युंजय, सुवर्णमालिनीवसंत, सुवर्णपर्पटी, शंखवटी, त्रैलोक्यचिंतामणि, लवंगादिवटी, श्वासकुठार, समीरपन्नग, सिंहनादगुग्गुळ, प्रवाळपंचामृत, गोक्षुरादिगुग्गुळ, चन्द्रप्रभा (गुग्गुळ), नाराचरस, इच्छाभेदी, गण्डमालाकण्डन, पारदादि लेप (मलम), मकरध्वज इ. प्रसिद्ध व हरकामीं औषधें आहेत अशा शब्दांना हा कोष मुकणार आहे. विद्यार्थ्यांसाठीं म्हणून होणाऱ्या या कोषांत हे नित्याचे शब्द न सापडल्याने त्यांचीहि निराशा होणार आहे. एकदांच होणारें हें काम केवळ पैशासाठीं संपूर्ण व बृहत्कोषाच्या स्वरूपाचें झाल्याशिवाय राहूं नये असेंच कोणालाहि वाटेल.

२३ मुंबई संशोधन बोर्डाचे ग्रंथ

सदर बोर्डातर्फे क्रमिक ग्रंथप्रकाशनाचीं कामें चालू आहेत. पहिला ‘ आयुर्वेद पदार्थविज्ञान ’ ग्रंथ श्री. चिं. ग. काशीकर व वै. शं. ग. वर्तक यांनीं किरकोळ मतभेद सोडल्यास व्यवस्थित लिहिल्याचें मी केसरींत परीक्षण करतांना म्हटलें होतें. पण असेच पुढचे ग्रंथ निघतील ही अपेक्षा मात्र ‘ स्वस्थवृ

' ग्रंथानें फलद्रूप होत नाहीं असें खेदानें म्हणावें लागतें. स्वस्थवृत्ताचे, डॉ. म्हसकर व डॉ. वाटवे यांचे नांवावर दोन खण्ड प्रसिद्ध झाले आहेत. संस्कृत, इंग्रजी व हिन्दी असा हा एकच ग्रंथ तिहेरी विकत घेण्याची ग्राहकावर सक्ती आहे. मूळ योजनेंत या तिहींपैकीं कोणती तरी एक भाषा निर्देशिलेली होती. विषयहि या ग्रंथांत या योजनेप्रमाणें केवळ पौर्वात्य यावयास हवा होता. तसा तो नसून आधुनिक उतारेहि त्यांत आहेत. डॉ. म्हसकरांची मूळची योजना पुढीलप्रमाणें होती. "या बोर्डाकडे आयुर्वेदिक फार्माकोपिया (निघंटू) व पुढें दिलेल्या १२ विषयावरील क्रमिक पुस्तकें निर्माण करण्याचें काम नियुक्त केलें आहे. वरील विषयावरील क्रमिक पुस्तकें तयार करतांना तीं पूर्णपणें चरक, सुश्रुत व वाग्भट या आयुर्वेदाच्या प्रमुख ग्रंथावर आधारलेलीं असावीं. इतर कांहींहि मजकूर त्यांत येऊं नये असें बोर्डाच्या सभासदांचें मत आहे." ('आयुर्विद्या' सप्टेंबर १९५१, पृ. १३२). याच अंकाच्या पृ. १३३ वर पुढीलप्रमाणें आणखी माहिती आहे. "मुंबई रिसर्च बोर्डाचे अध्यक्ष डॉ. के. एस्. म्हसकर यांनीं आयुर्वेद महाविद्यालयांतील अध्यापकवर्गापुढें बोर्डातर्फें निर्माण करावयाच्या क्रमिक पुस्तकांच्या रूपरेखेसंबंधीं खुलासेवार चर्चा केली. ते म्हणाले कीं 'क्रमिक पुस्तकें विद्यार्थ्यांसाठीं आहेत व त्या पुस्तकांचे दोन भाग राहतील. पहिल्या भागांत चरक, सुश्रुत, वाग्भट इ. प्रसिद्ध संहितांमधील सूत्ररूपाचा विषय संकलित करून मांडला जाईल. भिन्न भिन्न मतेंहि संकलित केलीं जातील. शेपें संस्कृत, हिन्दी किंवा इंग्रजी यामध्यें अनुवाद करून विषयांची शृंखला कायम राहील. यासाठीं अलग विवेचन, विशिष्टमतप्रतिपादन, तुलनात्मक विवरण इ. दुसऱ्या भागांत येईल.

तो भाग संशोधनासाठीं वापरला जावा. प्रथम पहिला भाग तयार झाला पाहिजे. त्याची निकड आहे......" "The conditions for writing text-books are that they should contain a translation in English and Hindi (आयुर्विद्या डिसें. १९५४) ही मात्र अलिकडची सुधारणा दिसते. पण या तीन भाषा कशासाठीं ? डॉ. वाटवे व श्री. एन्. एस्. म्हसकर या दोघांचे नांवावर दोन खंडांतील स्वस्थवृत्ताचा ग्रंथ संस्कृत, हिंदी आणि इंग्रजी असा तिहेरी छापून बारा आणि सोळा—म्हणजे अठ्ठावीस रुपयांच्या किंमतीचा ग्राहकाला नाहक तिप्पट भुर्दंड बसविण्यांत आला आहे. वर अलिकडची सुधारणा म्हटलें तें कांहीं अंशीं खरें आहे. कारण पहिल्या खण्डांत हिन्दी नव्हतें तें या दुसऱ्या खण्डांत दिलें आहे. विद्यार्थ्यांसाठींच हे ग्रंथ असल्यास त्याला प्रवेशासाठीं संस्कृत येणें आवश्यक आहे. विद्यालयांतून मुद्दाम संस्कृतचे आणखी तासहि घेतात. मग या तिन्ही भाषांचे एकाच ग्रंथांत लटांबर कशासाठीं ? वैद्यासाठीं ग्रंथ असल्यास त्याला नुसता संस्कृत ग्रंथ पुरेसा आहे. त्याचें इंग्रजी भाषांतर कशासाठीं ? गंमतीची गोष्ट इंग्रजी भाषांतर मूळ विषय चांगला समजण्यासाठीं व संस्कृत न येणारासाठीं आहे, असें डॉ. म्हसकर आपल्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत त्याचें कारण म्हणून देतात ! (The English Translation of the above sanskrit text helps one to understand the subject better, when aid is needed and is useful for those not so conversant with the Sanskrit language. पण मग दुसऱ्या खण्डांतील हिंदीचें आणखी काय कारण ? कां आणखी चांगला ग्रंथ समजावा म्हणून ?

आतां मूळ ग्रंथ इंग्रजीवरून चांगला समजेल हें डॉ. म्हसकर यांचें म्हणणें मात्र खरें आहे. खरोखर संस्कृतावरून ग्रंथ मुळींच समजत नाहीं, निदान माझ्यासारख्याला तरी ! मी वैद्यक शिकण्यापूर्वीपासून संस्कृतच्या क्षेत्रांत आहे. पण मला हें स्वस्थवृत्ताचें संस्कृत अनाकलनीय आहे. त्याचें प्रमाणभूत व्याकरण व

कोष निराळेच दिताताात ! चरक–सुश्रुत–वाग्भटांतील उतारे देणाऱ्या या लेखकाला त्यांचीहि भाषा प्रमाण दिसत नाहीं. योगरत्नाकराची ढिली म्हटली जाणारी भाषाहि संस्कृत जाणणारांना जातिवंत वाटते. पण ही स्वस्थवृत्ताची संस्कृत भाषा कांहीं न्यारीच आहे ! यांतले कांहीं नमुनेच देतो. यांतला ' वर्तमानकाळ ' या अर्थी 'सद्यःकाल' हा प्रयोग नवीन वाटेल. 'सद्यः सपदि तत्क्षणे' या अमरोक्तीप्रमाणें तावडतोब असाच 'सद्यः' याचा अर्थ आहे. 'साहाय्यक'या अर्थी सहाय्यक हा प्रयोग यांत आहे. 'कृपा दयानुकम्पा स्यात्' या अमरोक्ती-प्रमाणें कृपेचा अर्थ दया असतांना या संस्कृतांत तो कृतज्ञता असा आहे! 'हि हेतोऽवधारणे' व तु हि च स्म ह वै पादपूरणे पूजने स्वति' या अर्थी असलेल्या 'हि' चा प्रयोग या ग्रंथांत याशिवाय केलेला वाक्यगणिक दिसेल, 'लौकिक' या अर्थी यांत 'वैश्विक' हा शब्दप्रयोग आढळेल ! आतां यांतली वाक्यरचना पाहूं या. या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत ' इदं गद्यं सरलसंस्कुते विरचनीयम् ' अशी प्रतिज्ञा आहे. त्यांतले दोन तीन नमुने दाखवितो. “आयुर्वेदीयैरवितथं विचारितं यद्यस्मान्नरो विश्वनिर्मितप्रयोगवस्तुजातानां सारभूतो वर्तते तस्मात्तेन न केवल-मस्य जगतः किंतु निखिलस्य विश्वस्य मध्ये यद्यत्सर्वोत्कृष्टं विद्यते तत्तत्सर्वं स्वस्मिन् धारयमाणेन भवितव्यमेव। याचा अर्थ बराच विचार केला तरी लागेचना मला! मग डॉ. म्हसकरांचें पुढील इंग्रजी भाषांतर वाचलें व अर्थ ध्यानीं आला. “ The Aurvedists rightly conceived that since man was the quintescence of the construction products of the Universe,he must be containing everything of the best, not only of this world,but of the Universe.' दुसरा नमुना– “ अनया संशोधनसमित्या ये ग्रन्थाः प्रसिद्धं प्राप्यमाना विद्यन्ते तेषां प्रयत्नो हि सद्यःकालीने वैद्यकशास्त्रविषयके वाङ्मये ह्यायुर्वेदस्य मानार्हं स्थानं प्रापयितुम् ।” यांतील ' तेषां प्रयत्नः ' व 'प्रापयितुम्' या पदांचा व एकूण वाक्याचा अर्थ डॉक्टर म्हसकरांचें पुढील भाषांतर वाचूनच उलगडला:– “ The books that are published by the Board of Research are an attempt to accord Ayurveda its due place in the medical literature of the present day. ” तिसरा नमुना– “ अमुं ग्रंथं सुसंग्राह्य सीमायां रक्षितुमिच्छद्भिरतीव सूक्ष्मदृष्टिपूर्णतया सावधानतया लेखनं कुर्वद्भिरस्माभिर्न शक्यमभूत् तं चतुःशतपृष्ठेभ्योऽल्पतरं संहर्तुम् ” यांतलें 'अल्पतरं संहर्तुम्' हें पदद्वय अजब वाटलें. अर्थ तर लागेचना. डॉ. म्हसकरांचें भाषांतर वाचलें व मग डोक्यांत प्रकाश पडला कीं, त्याचा अर्थ “ ग्रथ चारशें पृष्ठापेक्षां कमी करणें शक्य झालें नाहीं असा आहे ! डॉ. म्हसकरांचें वाक्य स्पष्टच आहे. “ Inspite of the meticulous care exercised to keep this book within comprehensive limits, it has already extended to, etc. ” असे हे नमुने शतशः सहस्रशः आहेत. प्रत्येक वाक्यच या नमुन्याचें आहे म्हणानां ! इंग्रजी वाचल्यावर ग्रंथ चांगलाच समजतो हें डॉ. म्हसकराचे म्हणणें खरें आहे तर! पण ते स्वतः मूळ ग्रंथ संस्कृत व हें इंग्रजी त्यांचें भाषांतर असें म्हणतात. बहुतेकांना मात्र डॉ. म्हसकरांच्या इंग्रजी ग्रंथाचें श्री. वाटवे यांनीं संस्कृत भाषांतर केलें असें वाटतें, आणि माझें म्हणणें म्हसकरांच्या डौलदार व व्यावहारिक इंग्रजीचें वाटवे यांचें हें अजब व अलौकिक संस्कृत भाषांतर ! डॉ. म्हसकरांचें इंग्रजी लेखनच मूळ धरलें तर त्यांची भाषा चांगली आहे व ग्रन्थ रचनेंत पद्धती व धोरण आहे यांत शंका नाहीं. पण त्यांचे पुढील शोध विलक्षण आहेत. (i) In their (Ayurvedists) opinion, Rakta was even superior to the Doshas as well as Bhutas (pp.17). (ii) Ojas is considered to be the Rakta (blood) existing in the heart (pp. 18). (iii) The Ojas is considered a Deputy Bhutam by Ayurveda. (pp. 18). (iv) Although the three Doshas are desribed as functioning quite differently from each other, the Vata plays a ubsidiary role in the company of the other two (pp. 31).

या स्वस्थवृत्ताच्या द्विखण्डात्मक ग्रन्थांत त्रिदोष, पंचमहाभूतें, गुणविज्ञान इ० नें ग्रन्थाचा र्धापेक्षां अधिक भाग व्यापला आहे. खोलांत जाऊन परिशीलन करावयास वेळ झाला नाहीं. नाहींतर ली कित्येक चमत्कार यांत सांपडले असते. असेच इतर ग्रन्थ होणार असले तर आयुर्वेदीय ग्रन्थ– र्देत भर पडण्याऐवजीं विसंगतींच्या, भाषादुष्टींच्या व अपसिद्धांतांच्या कथा हातीं पडतील असें मला ल दिसतें.

२४ शंख प्रवाळादींचें संशोधन

या संशोधन मंडळातर्फे शंखप्रवाळादि भस्मांचें, रससिंदुरादि कुपिपक्व रसायनांचें, कुटजारिष्टादि सवारिष्टांचें व पारदसंस्कारांचें संशोधन चालू असून इतरत्र सूतशेखरादि संयुक्त खल्वी कल्पांचेंहि संशोधन लू आहे. डॉ. म्हसकरांनीं आयुर्विद्येच्या डिसेंबरच्या अंकांत शंखादिकांच्या संशोधनांची त्रोटक फलितें तांना यांत कॅल्शम कार्बोनेट, कॅल्शम सल्फेट अगर कल्शम फॉस्फेट हीं विविध प्रमाणांत मुख्यतः सांपडलीं सून शंख, शुक्ति व कपर्दिकेंत रेसभर लोह सांपडलें असें म्हटलें आहे. इतरांचीं फलितें अजून त्यांनीं द्धीं नाहींत. संशोधनाचे हे प्रयत्न औषधांचें सामान्यीकरण (Standardization) करण्यासाठीं करल्याचें सांगण्यांत येतें. पण सूतशेखरासारखे संयुक्त कल्प यानें कसे ठरवितां येणार हा प्रश्नच आहे. ताम्र, र्ण, शंख, टंकण, धोतरा-बीं, बचनाग इ० द्रव्यें सूतशेखरांत आहेत एवढें सांगतां आलें तरी सुवर्णाचें म कीं त्याचा वर्ख, धोतराबीं कांटे धोतऱ्याचें कीं काळयाचें, बचनाग गोमूत्रांतच शुद्ध केला होता कां हीं, माक्याच्या भावना सांप्रदायिक पद्धतीवर एकवीस दिल्या होत्या कीं २|४ कमीच होत्या, हें कसें रवितां येणार ? प्रवाळ-शंखांतूनहि ठराविक प्रमाणांत कॅल्शम सांपडतें म्हटल्यानें वैद्याला त्याचा काय पयोग ? यांत कॅल्शम् म्हणजे चुना असतो, हें ज्ञानहि वैद्याला नवीन नाहीं. निघंट-रत्नाकरानें "अर्जुनो- द्भवं कुटजो मौक्तिकं च शिलाभवम् । कारञ्जं स्फाटिकं शुक्तश्चूर्णमष्टविधं मतम् ॥" या आठ प्रकारांत मोती- शिवाय, अर्जुनादि वृक्षांतीलहि चुना साध्या चुन्याबरोबर निर्दिष्ट करून त्यांचे पृथक् गुणहि सांगितले आहेत. चालू संशोधनांत प्रवाळादींत कॅल्शम् अगर चुना आहे एवढें समजलें तरी वैद्य कांहीं प्रवाळाऐवजीं शंखभस्म वापरूं शकत नाहीं. हे सुधाक्षार पित्तप्रत्यनीक असले तरी त्या त्या स्थानीं गेलेल्या पित्ताप्रमाणेंच ांचा उपयोग वैद्य करतो. आमाशयगत पित्तावर शंखभस्म, ग्रहणीगत पित्तावर कपर्दिक, पक्वाशयगतावर शौक्तिक, हृद्गतावर व रसधातुगतावर मौक्तिक, व सामान्यतः कोठल्याहि स्थानच्या पित्तावर तो प्रवाळ वापरतो. असा विवेक न करतां हीं भस्में वापरल्यास अपायच होईल. आमाशयगतावर [कीं ज्यानें अन्न- द्रवशूल हा विकार होतो त्यांत] प्रवाळ वापरल्यास मळमळ वाढेल; पक्वाशयगत पित्तावर (कीं ज्यांत रेचक गुल्म होतो) शंख वापरल्यास मलावरोध होईल, गुदगतावर [कीं ज्यांत मूळव्याध होऊन रक्तस्राव होतो त्यांवर) शंखभस्म दिल्यास रक्तस्राव अधिकच वाढेल; बस्तिगतावर (कीं ज्यांत मूत्रकृच्छ्र होतें त्यांत) शंख दिल्यास मूत्रावरोध अधिकच होईल. म्हणून अपल्या पृथक्करणात्मक संशोधनाचा आयुर्वेदीयाला कांहीं उपयोग नाहीं. कै. डॉ. भडकमकर यांनीं शंखप्रवाळादींच्या भस्माबाबत हेंच मत १९२२ सालीं आमच्या वैद्यक वर्गात एका वार्षिक समारंभांत स्पष्ट बोलून दाखविलें होतें. खरोखर पृथक्कृत द्रव्यें त्यांच्या संयुक्तावस्थेंतील गुण कधींच देऊं शकणार नाहींत. चरकानें सांगितलेलें समुदायप्रभवत्वाचेंच त्त्व या ठिकाणीं आहे. मूळ द्रव्यापेक्षां या तत्त्वामुळें संयुक्त कल्पांतहि कांहीं निराळेच गुण येतात हें चरकानें

सांगितलें आहे. अर्थात् या तऱ्हेच्या संशोधनांनीं ॲलोपॅथीचे द्रव्यगुण-विज्ञानाचे ग्रंथ (फार्माकोपिया) भरतील असें म्हटल्यास काय चूक ? ही भीति मिश्र शिक्षणाचा पुरस्कार करणारांपैकींहि कांहीं विद्वानांना वाटतें. "...... पाश्चात्य पदवीधर वैद्य कुछ औषधियोंका परीक्षण पाश्चात्य पद्धतीसे करेंगे जिससे पाश्चात्य निघण्टूमें इन् औषधियोंका समावेश होगा। आयुर्वेदीय तत्वोंका संशोधन इनसे अणुमात्र भी न होगा। आयुर्वेदीय संशोधनके बारेमें अगर उनकी सद्भावना हो तो मौन धारणहि उनके लिये (अच्छी) सेवा है" (बम्बई-राज्य आयुर्वेद परिषद पूना, अध्यक्ष वैद्य नृसिंहाचार्य बागेवाडीकरजींका भाषण पृ. १५।१६). 'आयुर्विद्येच्या' संपादकांना मात्र "संशोधनामध्यें प्राचीन व अर्वाचीन पद्धति असा भेद करणें... अप्रबुद्धपणाचें लक्षण आहे." असें वाटतें. (मार्च १९५५ पृ. ३५८) या अप्रबुध्दपणाचे वाटेक त्यांच्या घरांतच आहेत त्याची वाट काय ?

२५ संगीत आणि वैद्यक

आयुर्वेदीय दृष्टिकोणातून केलेलें व त्याला उपयोगी संशोधन पुष्कळच करण्यासारखें आहे. या ठिकाणीं मी माझें अल्प संशोधन निर्दिष्ट करतो. माझ्या संगीत संशोधनाबद्दल बऱ्याच ठिकाणीं उल्लेख झाला. पनवेलच्या संमेलनांतील व्याख्यानापर्यंत केवळ तात्विक असलेली माझी भूमिका प्रत्यक्षांत उतरविण्याचे दृष्टीनें मी प्रयोगाचे मार्गे लागलों. रुग्णालयीन प्रयोगच आवश्यक होते व तेच मी करण्याचे ठरविलें होतें. पण कोणतें नक्की संगीत, विशेषें कोणत्या ध्वनिमुद्रिका रोग्यांना ऐकवाव्या याबद्दल निश्चय झाल्याशिवाय हें करणें इष्ट वाटेना. मुद्दाम ऐकलेल्या ४।५०० ध्वनिमुद्रिकांतील अनेक रागांतील व अनेक मोठ्या कलावानांच्या गाण्यांतील सरस निरस ठरविणें जबाबदारीचें काम होतें. शेवटीं आमचे स्नेही प्रसिद्ध कलावान् श्री. गोविंदराव टेंबे यांनीं एकाच रागावर प्रयोग करण्यास सांगितलें. शेतकी कॉलेजचे सेवा-निवृत्त प्राध्यापक श्री. स. रा. गोडबोले यांचाहि सल्ला मला वेळोवेळीं फार उपयोगी पडला. मग भैरवी या सर्वमान्य रागाच्या मिळाल्या त्या म्हणजे नऊ ध्वनिमुद्रिका मी आणवल्या व त्यांचें गायन ठराविक वेळीं बाजाळूच्या कुंड्यांना ऐकविण्याचा महिनाभर कार्यक्रम केला. दहावी कुंडी गाणें न ऐकवितां (कन्ट्रोल म्हणून) तशीच ठेवली. सर्व रोपें एकाच वेळीं लावलेलीं व सर्वांना ऊन, हवा, पाणी, सारखेंच दिलेलें. एक महिन्यांत नवांपैकीं आठी कुंड्यांतील रोपांची १०० ते ४५० पटीनें वाढ दिसली. एक रोपटें मागें आहे, मागें येण्यापासून ४५० पटींची सर्वांगानीं वाढ हा त्या त्या गाण्याचा निरनिराळा परिणाम हें खास. एकूण या ध्वनिमुद्रिकांच्या गायनाचा या वनस्पतीवरचा परिणाम स्पष्ट दिसला. भैरवी रागाचा शांत रस व सकाळची वेळ गायकांत सर्वमान्य आहे. हाच कफाचा भाव व हीच कफाची वेळ. म्हणजे भैरवी हा राग कफ वर्धक समजला पाहिजे. याचे श्रवणानें रुग्णांना बृंहण देणें तसेंच दाहाचे व क्षोभाचे विकार नाहींसे करणें शक्य होईल, असें अनुमान काढतां येणारें आहे. मी हा प्रयोग पंचवीस तरी वैद्य, डॉक्टर, पदार्थशास्त्रज्ञ, जीवशास्त्रज्ञ, वनस्पतिशास्त्रज्ञ, पत्रसंपादक, व गायक-वादक यांना मुद्दाम बोलावून दाखविला. बहुतेकांचीं लेखीं मतें उत्तेजनपर आलीं असून हे प्रयोग, प्रयोगशालेयपद्धतीवर व नंतर रुग्णालयांत करावेत असें त्यांचें म्हणणें पडलें. प्रत्यक्ष गायक अगर त्यांच्या तारोत्क्षिप्त ध्वनिमुद्रिका यांनीं अनेक निरनिराळ्या अंगांनीं गायनवादन, असा हा फार मोठ्या प्रमाणावरचा पुढचा प्रयोग आहे. दोन वर्षांपूर्वी अन्नमलाई विद्यापीठांत या नमुन्याचे झालेले प्रयोग मला प्रचोदक वाटले. म्हणून माझे प्रयोगहि यशस्वी होतील असा भरंवसा वाटतो. पुढें मला करावयाचे अनेकविध प्रयोग अर्थात् धनिक, सरकार अगर विद्यापीठ यांचे सारख्यांचे मनावर घेतल्यासच होणार. हें एक आयुर्वेदीय संशोधनाचें मोठेंच अंग होऊन यशस्वी झाल्यास त्यांचें

आयुर्वेदीय चिकित्सेंत तशीच वनस्पतींचे पोषणमूल्यांत भर पडेल. संगीतांतल्या बऱ्याच समस्या सुटण्यास यानें मदत होईल, हा तर त्या कलेचे दृष्टीनेंहि मोठाच लाभ आहे.

२६. पुणें विद्यापीठाची आयुर्वेदाला मान्यता

आयुर्वेदाच्या अभ्युदयाचे दृष्टीनें मुद्दाम नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे पुणें विद्यापीठाची आयुर्वेदाच्या पदवी अभ्यासक्रमाला मान्यता. बी. ए. एम्. एस्. या पदवीच्या अभ्यासक्रमाला आतां जून-पासून सुरवातच होणार असें समजतें. याबद्दल पुणें विद्यापीठाचें अभिनंदन करणें अवश्य आहे. अर्थात् हा पाठ्यक्रम मिश्र म्हणजे फॅकल्टीनें मान्य केलेला बहुशः बी. एफ्. ए. एम्. चाच असणार. तरीपण आपल्या प्रांतांत तरी आजवर विद्यापीठांत न झालेला आयुर्वेदाचा शिरकाव ही निःसंशय प्रगतिपर गोष्ट आहे. शुद्धायुर्वेदीयांनीं सतत खटपट केली तर या पाठ्यक्रमांत सुधारणा होऊन तो केवळ आयुर्वेदीय होऊं शकेल व तसें झाल्यास आज मिश्रस्थितींतहि त्याला मान्यता मिळाली याला महत्त्व आहे. भावी काळांत आहे या स्वरूपांत मिश्रायुर्वेद राहणार नाहीं. आतां ॲनाटमी आणि शरीररचना, फिजिऑलजी आणि दोषादिविज्ञान, मटिरिया-मेडिका आणि द्रव्यगुणविज्ञान, मेडिसिन आणि रोगविज्ञान, हायजिन आणि स्वस्थवृत्त, सर्जरी आणि शल्यतंत्र, गायनेकॉलजी आणि सौतिक हे विषय कोठीबंद निराळे शिकविण्याचा उद्योग बंद करून एकेकच शरीररचना इ. विषय आयुर्वेदाच्या बैठकीवर बसवून शिकविण्याचा उपक्रम करावयास हवा. एम्. बी. बी. एस्. हून बी. ए. एम्. एस. ही पदवी खरोखरीची निराळी यानेंच सिद्ध होईल.

२७. आतां शुद्धमिश्रवाद बंद करावा

आतां शुद्धमिश्रवादाच्या शिळया कढीला उगाच ऊत न आणणेंच योग्य होईल. मिश्रवादीयांनीं आपल्या मार्गानें अवश्य जावें. त्यांनाहि आयुर्वेदाचें भलें व्हावें, तो मागें पडूं नये, असेंच वाटतें तर त्यांचेवर शुद्धायुर्वेदीयांनीं टीका करूं नये. मिश्रायुर्वेदीयांनींहि शुद्धायुर्वेदीयांना आपल्या मार्गानें जाऊं द्यावें. त्यांचेवर टीका करून त्यांचा स्वतःचा मोठेपणा थोडाच वाढणार आहे! मी तर म्हणेन, दोघांचें आयुर्वेदोद्धाराचेंच ध्येय असल्यानें जमेल तेथें दोन्ही पक्षांनीं सहकार्यच करावें. व आयुर्वेद हा भारताचें राष्ट्रीय वैद्यक होईपर्यंत एकजुटीनें झगडावें. दोघांचेंहि ध्येय हेंच आहे; निदान असावें, असें मला वाटतें. भारतांत भारतीयांचें वैद्यक राष्ट्रवैद्यक नसण्यांत मोठेपणा नाहीं, भारतीयत्व नाहीं व त्याच्या स्वातंत्र्यालाहि शोभा नाहीं. अर्थात् हें ध्येय साध्य करण्यासाठीं फार मजल मारावी लागेल. त्या वेळीं शुद्धमिश्रवादाला मूठमाती द्यावी लागेल. व दोघेहि एका पातळींत यावे लागतील. यासाठीं परस्पर विचारविनिमय व सहकार्य अवश्य व्हावें लागेल. ही बुद्धी आतांपासूनच परस्परांत वागूं लागली तर बरें नव्हे! जेवढा आयुर्वेद मिश्रपक्षीयांना शिकवावयाचा आहे तेवढाहि प्रवीण वैद्याचें हातून शिकविला जावयास हवा असेल तर अशा प्रावीण्याची सोय म्हणून तरी आयुर्वेदीय पाठ्यक्रमाकडे त्यांनीं आज पाहण्यास काय हरकत आहे! आतां विद्यापीठांत त्यांची पदवी प्रविष्ट झाली आहे. समन्वय साधून तिचा पाठ्यक्रम एकाच आयुर्वेदीय विषयाखालीं घडवून आणण्याचें ध्येय त्यांनीं पुढें ठेवणें अगत्याचें आहे, आणि तें सिद्ध करावयाचें तर पाङ्क्त अध्ययन केलेल्या आयुर्वेदीयांच्या सहकार्यानें आयुर्वेदाच्या भाषेनेंच त्यांना हें करावें लागेल. ही गोष्ट ध्यानीं घेतली तर आजचा शुद्धायुर्वेदाविषयींचा आपला विरोधभाव टाकून तेथें स्नेहाचा, सहानुभूतीचा आणि सहकार्याचा हातच त्यांना पुढें करणें जरूर आहे असें दिसून येईल. श्रीधन्वन्तरीनें त्यांना अशी बुद्धि द्यावी अशी त्याला माझी प्रार्थना आहे.

२८ शुद्धायुर्वेदीयांवरची जबाबदारी

शुद्धायुर्वेदीयांनींहि आतां आपल्यापुरतें आपलें मनोगत प्राप्त झालें यानें हुरळून न जातां आपणास अजून पुष्कळच मजल मारावयाची आहे याची जाणिव ठेवावयास हवी. त्यांचे मनांत याचेपुढें पदवीचा पाठ्यक्रम आंखावयाचा आहे. पण तत्पूर्वी चालू पाठ्यक्रमच अजून कितीतरी सुधारावयास हवा आहे. मुख्यतः संस्कृत शिकविण्याचा उद्योग करण्यापेक्षां अपेक्षित संस्कृत शिकलेलेच विद्यार्थी प्रविष्ट करण्याचा नवा नियम त्यांनीं करावयास हवा आहे. मेडिकल कॉलेजांतून इंग्रजीचे तास ठेवीत नाहींत. कांहीं वर्षांपूर्वी तेथें रसायनपदार्थादि मूलशास्त्रें शिकवीत, व प्रिलिमिनरी सायन्टिफिक नांवाची परीक्षा घेत; तीहि अलिकडे बंद करून त्यांनीं हे विषय असलेली इंटर सायन्स बी-ग्रुपची परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांनाच प्रवेश देऊन आपल्या कॉलेजांतील व्याप कमी केला आहे. आपल्याहि पाठ्यक्रमांत न्यायसांख्यांत गति असलेले संस्कृतज्ञ विद्यार्थी घेतल्यास त्याप्रीत्यर्थ खर्ची पडणारा वेळ वैद्यकाला लावतां येईल. इतकें संस्कृत स्वतःच शिकविण्याची तयारी असलेले मान्य अध्यापकांत किती असतील ! पाठ्यक्रमांतील तपशीलहि सुधारून तो जास्त ठाकठीक करावयास हवा आहे. याबाबतच्या सूचना मी गेल्या वर्षीच्या मुंबईच्या विद्वत्परिषदेला केल्या होत्या. तत्पूर्वी त्या ' आयुर्वेदपत्रिकेंतहि ' प्रसिद्ध केल्या होत्या. अध्यापकहि निव्वळ आयुर्वेदाचा, म्हणजे त्रिदोषैक दृष्टीनेंच, व्यवसाय करणारे असावयास हवेत. हेच विद्यार्थ्यांना शास्त्ररहस्य सांगूं शकतील आणि त्यांचेजवळ तयार झालेले विद्यार्थीच आयुर्वेदाचा बोज ठेवतील. असे विद्यार्थी बाहेर पडण्यावरच शुद्धायुर्वेदाचें भवितव्य अवलंबून आहे. एकेका अध्यापकाकडून चांगले विद्यार्थी तयार झाले तरच गुरुपरंपरापद्धति यशस्वी होईल. तक्षशीला, नालंदा येथील विद्यापीठें मुसलमानांनीं नष्ट करून टाकल्यानेंच शालेय शिक्षण बंद झालें व मग घरीं शिक्षण देण्याची पद्धती वैद्यांनीं सुरूं केली, असें कांहींजण म्हणतात. तक्षशीलेचें विद्यापीठ हूणांनीं (पांचव्या शतकांत) व नालंदा विद्यापीठ बख्त्यार खिलजीनें [इ. स. चे तेरावें शतकांत] धुळीला मिळविलें हें खरें आहे. पण तें चालूं होतें त्या काळींहि एवढ्या लांबवर सर्व भारतांतील विद्यार्थी जाऊन त्याचा लाभ घेऊं शकत नसत; व घरोघरींच पुष्कळसे वैद्य, दोनचार विद्यार्थी ठेवून घेऊन त्यांना शिकवून काढीत. या विद्यापीठापूर्वींहि गुरुपरंपरा चालूं होतीच. तक्षशीला विद्यापीठ चरकानंतरचें आहे. त्यांतले प्रधानाध्यापक आत्रेय हे अग्निवेशाचे गुरु जे आत्रेय ते नव्हत. चरकसंहितेंतील वर्णनावरून आत्रेय ऋषि हे अग्निवेशादि शिष्यांना आपल्या आश्रमांत एकटेच गुरूपरंपरा पद्धतीनें शिकवीत असें स्पष्ट दिसतें. सुश्रुतादि शिष्यांना श्रीधन्वतरीनेंहि असेंच शिकविल्याचें सुश्रुतसंहितेवरून दिसतें. अर्थात् गुरुपरंपरा ही या दोघांइतकीच म्हणजे तीन हजार वर्षांइतकी जुनी आहे. इतकी जुनी परंपरा शुद्धायुर्वेदीय आतां चालवूं लागले आहेत यांत चूक कांहींच नाहीं. ती चांगली चालली नाहीं तर मात्र चूक होईल. गुरुपरंपरा प्रतिष्ठा पावणें वा बदनाम होणें हें आतां सर्वस्वी शुद्धायुर्वेदाध्यापकांचेच हातीं आहे.

२९ आयुर्वेदाचा उज्ज्वल भाविष्य काळ

आयुर्वेदाला आता सर्वच दृष्टीनें बरे दिवस येत आहेत. युक्तप्रांतानें प्रथम आयुर्वेदाचार्य द. अ. कुळकर्णी यांची डेप्युटी डायरेक्टर म्हणून नेमणूक केली. लगोलग राजस्थाननें व मध्यभारतानें डायरेक्टर्स नेमले व आतां मुंबईसहि डायरेक्टरची नेमणूक झाली असून आयुर्वेदाचार्य हरिदत्तशास्त्री यांची डायरेक्टर ऑफ आयुर्वेद म्हणून नियुक्ति झाली आहे, याबद्दल मी या संमेलनातर्फे त्यांचें व मुंबई सरकारचेंहि अभिनंदन करतो. आतां आयुर्वेदाबाबतचे सर्व प्रश्न, त्याच्या दृष्टिकोनांतून व व आत्मीयतेनें सोडविण्याचें हें खास स्थान झालें. या डायरेक्टरांना शाळा, रुग्णालयें, पाठ्य-

ड, व अन्सिडाइज्ड दवाखाने तपासून त्यांत खरोखर आयुर्वेद किती आहे. कां त्याचे नांवाखाली डॉक्टरी व डॉक्टरी उपचारच अवलंबिले जातात हें पाहतां येईल. आयुर्वेदाच्या नांवाखालीं अनायुर्वेदीय व्यवहार न देणें हें मला वाटतें डायरेक्टरांचें मुख्य काम राहील. श्री. आयुर्वेदाचार्य हरिदत्तशास्त्री हे आयुर्वेदांत असून त्याच्या शुद्ध प्रणालीचे ते अभिमानी आहेत असें समजतें. त्यांनीं यापूर्वींहि मोठालीं कामें असल्यानें हेंहि काम ते नीट पार पाडून आयुर्वेदीयांचा भलेपणा घेतील असा भरंवसा वाटतो.

३० निर्वेदन दन्तनिष्कासन

आयुर्वेदीय जगतांत दुसरी एक उत्साहजनक गोष्ट घडत आहे. मुंबईचे दन्तवैद्य श्री. किशोरीदास यांनीं निर्वेदन दन्तोत्पाटनाचें कौशल्य संपादन केलें असून वै. जायदे, शेण्डे, फडके, नानल, यासारखे शिष्यहि शिकवून व ठिकठिकाणीं दन्तयज्ञांतून हजारोंचे सुखानें दांत काढून आयुर्वेदीय शालाक्य-तन्त्राचें असलेलें दालन त्यांनीं खोलून दाखविलें आहे. वैद्य जायदे यांनीं तर दोन्ही हातांनीं दोघा-दोघांचे वेळीं दांत काढणें, हृद्रोग्यांचेंहि सुखानें दन्तोत्पाटन करणें, असलें कौशल्य प्रकट करून याचेपुढें मजल आहे, व शास्त्रज्ञांना चकित केलें आहे. आतां ते अमेरिकेंत सुधारलेल्या जगाला आपली विद्या विण्यास जात आहेत. या संमेलनातर्फे मी त्यांना ‘ शुभास्ते पन्थानः’ म्हणतो. वैद्य जायदे यांचा अमेरिदौरा भारत व आयुर्वेद या दोहोंचा मोठेपणा वाढविण्यास कारण होणारा असल्यानें सर्व वैद्यांनीं सढळ हातानें मदत करावयास हवी आहे.

३१ कुष्ठाचा भेसूर प्रश्न

वैद्यकांत फारशी जाणीव नसलेले अनेक प्रश्न अलिकडे भेडसावूं लागले आहेत. आजकाल सांथीचे मागें पडल्यासारखे वाटत आहेत. तो खरोखर प्रतिबंधक उपायांचा परिणाम कीं ते रोगच हळुंहळूं संबयीचे हा शास्त्रज्ञांनीं विचार करण्यासारखा प्रश्न आहे. कसेंहि असो, ते मागें पडले आहेत खरे. पण कुष्ठासारखे दुर्लक्षिलेले प्रश्न आपलें भेसूर स्वरूप पुढें करून आ वासून बसले आहेत. भारतांतील कुष्ठ इतर तील कुष्ठांपेक्षां कमी भयंकर आहे असें म्हणतात, पण जगांतील कुष्ठरोग्यांची निम्मी संख्या म्हणजे ते २५ लाख रोगी भारतांतच आहेत. म्हणजे १५० लोकसंख्येंत एक महारोगी ही केवढी भयंकर गोष्ट आहे! अमरावतीच्या तपोवनांतील विदर्भ महारोगी सेवा मंडळानें निःस्वार्थी कार्यकर्त्यांच्या साहाय्यानें हा प्रश्न उजेडांत आणला आहे. त्यांनीं ठरविलेलें काळकुष्ठ आयुर्वेदीय भार्षेतील काकण-कुष्ठच असेल तर नैव सिध्यति ’ या वचनाप्रमाणें असाध्या रोग्यांवर डी. डी. एस्. या सल्फोन जातीच्या औषधाचा प्रयोग चालूं ठेवून व त्याची होणारी प्रतिक्रिया भोगूं देऊन या दुर्दैवी रोग्यांच्या दुःखांत भर काय याचा विचार व्हावयास हवा. अमेरिकन लेप्रसी मिशनच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे अध्यक्ष रॉव यांनीं गतवर्षींच्या अहवालांत सल्फोन औषधानें ४·७ % रोगी लक्षणमुक्त झाल्याचें निर्दिष्ट होतें. पण ह्या चिकित्सेसंबंधीं म्यूरसारखे अनुभवी व तौलनिक विचारसरणीचे कुष्ठविशेषज्ञ म्हणतात कीं, मध्यें अम्लास्थिर बिंदुकण (acidfast dust) निर्माण होतात. ही गोष्ट श्री. खानोलकर यांनीं प्रयोगावरून सिद्ध झाली आहे. अमेरिकेचे मे. डायरेक्टर यांनीं सल्फोन चिकित्सेनें बाह्य सुधारणा व अभाव दिसून आला तरी पुढेंमागें गंभीर स्वरूपाचा उपद्रव (serious complication) होण्याचा संभव असतो. या महारोगी सेवा मंडळानें सौम्य म्हणून ठरविलेलें कुष्ठ (खरोखर निदा- (पुण्डरीकादि कुष्ठ) यांतून या सल्फोन औषधापेक्षां खदिर, तुवरक, भल्लातक यांचा प्रयोग कां यशस्वी

होऊं नये ! चौल-मोगरातेल (Oil Hidno corpus) (तुवरक तेलच हें) पंचकर्मे केल्याशिवाय गेल्यामुळें तर तें मार्गे पडलें नसेल ना ! शोधनाशिवाय इतरहि रोग वळणावर येत नाहींत, मग कोपन ज्याचें स्वरूप व 'सर्वं कुष्णाति तद्वपुः' हें ज्याचें आन्तिम, तें महाकुष्ठ शोधनाशिवाय कसें बरें होईल वमन, विरेचन आणि शिरावेध..जलूकावचारण यांनीं वेळोवेळीं रक्तमोक्ष झाल्यानंतरच केलेल्या उपचारा हा रोग वळणावर येईल व मग खदिर, तुवरक यांनींहि बरा होईल हें कुष्ठसेवकांना दाखवून दिलें तर त्यां प्रयत्न अधिक कारणीं लागतील नव्हें कां! वैद्यांनीं या प्रश्नाकडे एक सामाजिक कर्तव्य म्हणून पहावय हवें आहे.ही एक संशोधनाचीहि बाब होईल. कुष्ठसेवकांना वैद्याचें साहाय्य लाभल्यास त्यांचें काम सोपें हो व एवढ्या राष्ट्रीय प्रश्नांत आपण व आपला आयुर्वेद उपयोगी पडला हें दाखविण्याचें श्रेय वैद्यांना मिळे

३२ मुंबई राज्य आयुर्वेद संमेलन

गेल्या वर्षी आपले पंतप्रधान ना. मुरारजीभाई यांच्या, मुंबईस वैद्यमंडळींनीं केलेल्या सत्कार प्रसंगीं, वैद्यांनीं आपलीं निवेदनें एकाच प्रातिनिधिक मंडळातर्फे मांडावींत म्हणजे सरकार त्याला मान्य देईल असें त्यांनीं उद्घोषित केलें. निखिल मुंबई राज्यांतील वैद्यांच्या संघटनेचे दृष्टीनें अत्यन्त आवश्यक अ ही ना. मुरारजीभाईंची घोषणा अभिनन्दनीय होती. लगेच आम्हां वैद्यमंडळीचे मोठेच आधार पनवेले श्रीमंत नानासाहेब पुराणिक यांनीं ती उचलून धरून संघटनेच्या उभारणीच्या मागें ते लागले. चर्चा वाया करून आज ही संघटना कार्यवाहींतहि आली आहे. एवढेंच नव्हे तर तिचें पहिलें अधिवेशन याच नगरींत भरत आहे. तिचे अध्यक्षहि श्रीमन्त नानासाहेबच निवडले जाणें हें ओघानेंच आलें, त्यां नेतृत्वाखालीं ही संघटना वैद्यांचें एकमुखी प्रतिनिधित्व करील, व सरकारदरबारीं मान्यता मिळवून आयु र्वेदाला अत्युन्नत दशेला नेईल अशी खात्री वाटते.

३३ आभार

मित्रहो ! माझें भाषण फार लांबलें. आतां भर नको म्हणून आणखी सुचणारे कांहीं विचार आवरतें घेतो. हेंच आपण शांतपणें ऐकून घेतलें याबद्दल आपले आभार मानून व त्यांचा नीटपणें वि करावा अशी विनंती करून मी आपली रजा घेतो.

सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

सेवा संघाचीं सर्व औषधें, तसेंच खालीचीं सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर, गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर, अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाबळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—

देशी सर्वौषधी संग्रहालय
पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

शृंगार
नेत्रांजन
डोळ्यांचे विकारावर उपाय
कृष्णशास्त्री बिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

श्रीधन्वन्तरयेनमः ।

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन

(दशम अधिवेशन) भुसावळ

स्वागताध्यक्ष वै. ब्रह्मदत्त शर्मा, आयुर्वेदाचार्य

यांचें स्वागतपर भाषण

आविर्बभूव कलशं दधदर्णवाद्यः
पीयूषपूर्णममरत्व-कृते सुराणाम् ।
रुग्रागजीर्णजनताजनितप्रशंसो-
धन्वतरिः स भगवान् भविकाय भूयात् ॥

महाराष्ट्र प्रान्तीय वैद्य सम्मेलनाच्या दशम अधिवेशनाचे सन्माननीय उद्घाटक श्रीमान् ममवारजीमहोदय, मध्यप्रदेश आरोग्यमंत्री, समादरणीय महर्षितुल्य जेष्ठ श्रेष्ठ वैद्यावतंसमहोदय, आणि उपस्थित प्रतिनिधि वैद्य व आयुर्वेदाभिमानी नागरिक बन्धुभगिनींनो—

सुमारें दीड तपानंतर म्हणजे चाळीसगांवीं झालेल्या महाराष्ट्र प्रान्तीय प्रथम वैद्य-संमेलनानन्तर पुन्हा खानदेशच्याच एक भुसावळसारख्या सामान्य गांवांत त्याच प्रान्तीय संमेलनाचें दशम अधिवेशन संपन्न करण्याचें भाग्य आम्हांस लाभत आहे याचा विशेष आनंद होतो.

भुसावळ हें पूर्व खानदेश जिल्ह्याचे दुसऱ्या नंबरचें शहर असून खानदेशचे उत्तर भागाला मध्यभारत, पूर्व भागाला मध्यप्रदेश, व दाक्षिण भागाला हैद्राबाद राज्याची सीमा आहे. लोकसंख्येच्या दृष्टीनें भुसावळ हें जरी शहरांत मोडत असलें तरी मध्यरेल्वेचें मोठें जंक्शन असल्यामुळें येथें अनेक प्रांताचे व अनेक वर्गांचे रेल्वे-कर्मचाऱ्यांचीच अधिक संख्या आहे. मुंबईपासून कलकत्ता किंवा दिल्लीला जाणाऱ्या रेल्वेमार्गांचें हें मोठें स्टेशन असल्यामुळें येथें देशाच्या महान् व्यक्तींचे आगमनाचा योग सतत आला आहे. रेल्वे आणि आर. एम्. एस्. चें पोस्ट ऑफिस असल्यामुळें भुसावळ हें अगदींच अपरिचित आहे असें म्हणतां येणार नाहीं.

खानदेश उन्हाळ्याच्या दृष्टीनें प्रसिद्ध आहे. अशा परिस्थितींत जर खरोखर हें संमेलन पुण्यासारख्या थंड प्रदेशांत झालें असतें तर फार बरें झालें असतें. पण तो योग नव्हता. तरीपण आपण सर्व केवळ कर्तव्य पालनाच्या पवित्र भावनेनें व आयुर्वेदकार्याच्या तळमळीनें ह्या प्रखर उन्हाळ्याचाहि त्रास सहन करण्यास तयार झालांत व येथें उपस्थित झालांत ह्याबद्दल मी आपले आभार मानतो व आपलें हार्दिक स्वागत करतो.

संयुक्त खानदेश वैद्य मंडळ ही प्ररक शक्ति

म. प्रान्तीय वैद्य मण्डळाचें प्रथम अधिवेशन सं. खा. वैद्य मण्डळातर्फे भरविण्यांत आलें होतें आणि हें दहावें अधिवेशनहि. संयुक्त खानदेश वैद्य मंडळानें वैद्यसमाजांत संघटन व सुसूत्रता आणण्यांत बरेंच यश मिळविलें आहे, आणि संपूर्ण महाराष्ट्रांत जिल्हा वैद्यमण्डळ म्हणून सतत कार्य करणारी ही एकमेव संस्था आहे असे प्रशंसोद्गार महाराष्ट्र प्रांतीय वैद्य-मण्डळाचे भूतपूर्व अध्यक्षांनीं ठिकठिकाणीं काढले आहेत. महाराष्ट्र प्रान्तीय वैद्यमण्डळाची प्रेरक व सहाय्यक शक्ति म्हणून संयुक्त खानदेश वैद्यमण्डळाचा उल्लेख करतां येईल हें आत्मस्तुतीचा दोष पत्करूनहि सांगावेसें वाटतें.

गेल्या २० वर्षांपूर्वीचा काल आपण आज आपल्या दृष्टीपुढें उभा केला तर आज स्वतंत्र भारताच्या राजवटींत आयुर्वेदाकडे आम्ही, आमचे लोक आणि आमचें सरकार ज्या दृष्टिकोनांतून पहात आहे, ज्या आशा-आकांक्षांचें सुखस्वप्न रेखाटूं शकत आहोंत व कांहीं अल्पस्वल्प समाधानाचे श्वास सोडूं शकत आहों त्या सर्व गोष्टी त्या काळीं " असम्भवं हेममृगस्य जन्म " स्वरूपाच्या आमच्यांतीलच कांहीं जाणत्यांनासुद्धां वाटत होत्या हें ध्यानीं येईल. आज काळ बदलला आहे. आयुर्वेदाविषयीं उत्सुकता, आत्मीयता, आशा व आकांक्षांचें चिन्हं दिसूं लागलें आहे; आयुर्वेद हेंच भारताचें आरोग्यरक्षक शास्त्र असावें अशी श्रद्धा व आत्मविश्वास वाटूं लागला आहे.

आरोग्यदृष्ट्या आम्हीं गुलामच आहोत

आज राजकीय क्षेत्रांत भारतानें स्वातंत्र्य मिळविलें आहे. शैक्षणिक क्षेत्रांत हिंदीला राष्ट्रभाषेची मान्यता देऊन देशानें भाषा-स्वातंत्र्याचे मार्गावर एक पाऊल पुढें टाकलें आहे. सारे जगांत अंतर्राष्ट्रीय कीर्ति पावलेली, विपुल साहित्यानें भरलेली, इंग्रजी भाषा असतांना हिंदीला राष्ट्रभाषेचा मान देतांना केंद्रीय सरकारनें जो स्वाभिमान, दूरदर्शिता व आत्मीयता दाखविली आहे, तशी आरोग्यक्षेत्रांत अजून दाखविलेली नाहीं, असें खेदानें म्हणावेंसे वाटतें. आज आरोग्यदृष्ट्या आम्ही गुलामच आहोंत. आम्हांला आमच्या दृष्टीनें पहातां येत नाहीं, आमच्या बुद्धीनें विचार करतां येत नाहीं, ही आमची आजची स्थिति आहे. आयुर्वेद ही देशाची " राष्ट्रीय चिकित्सा " असावी अशी आमची निःसंदिग्ध व निर्विवाद मागणी आहे.

जसें स्वतंत्र भारताची पुनर्रचना करण्यांत देशाला अधिक विकासयोजनांची व अधिक श्रमाची आवश्यकता आहे, तसेंच शेंकडों वर्षें उपेक्षित झालेल्या ह्या प्राचीन वैज्ञानिक भारतीय चिकित्सापद्धतीची सेवा, विकास, प्रसार व प्रचाराकरितां संघटित वैद्यवर्गाचीहि अत्यंत आवश्यकता आहे, हें नाकारतां येणार नाहीं.

प्रान्तीय संमेलनाविषयीं आजची अपेक्षा

आजपर्यंत झालेलीं नऊ प्रांतीय संमेलनें शुद्ध आयुर्वेदाचा पुरस्कार सरकारनें करावा ह्या कामीं खर्चीं पडलीं. त्या बहुतेक संमेलनांतून सरकारला सूचना, विनंती व प्रसंगीं सरकारी प्रतिकूल धोरणाचा निषेध, अशा स्वरूपाचेंच कार्य होत आलें. आतां ती परिस्थिति पालटली असून ह्यापुढें अधिकाधिक पालटत जाण्याची शक्यता निर्माण झाली असल्यानें आज एकप्रकारें प्रांतीय मंडळानें आपली कर्तबगारी दाखविण्याचीच वेळ येऊन ठेपली आहे.

मुंबई राज्य वैद्य संमेलन

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचें सम्मेलनाबरोबर मुंबई राज्य वैद्य परिषद भरवून राजकीय व प्रांतीय संघटनेचे दृष्टीनें मोठें कार्य होत आहे; इतकेंच नव्हे तर ह्या संमेलनांत निखिल भारतीय विद्यापीठाचे व निखिल भारतीय महामंडळाचे अध्यक्ष आम्हाला मार्गदर्शन करण्याकरितां मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित झाले आहेत हें ह्या संमेलनाचें मोठें वैशिष्ट्य होय. ह्याबरोबर अध्यापक चर्चा परिषद भरविण्याचीहि विस्तृत योजना आखण्यांत आली आहे. त्यायोगे सरकार व जनतेलाहि विश्वास वाटला पाहिजे कीं खरोखर आयुर्वेद हेंच एकमेव शास्त्र आमचें आरोग्यरक्षण करण्यास सर्वांशीं समर्थ असें शास्त्र आहे. त्यासाठीं आम्ही काय करावयाचे, आमचा आयुर्वेदविषयक शिक्षणक्रम, चिकित्सापद्धति, शास्त्रीयविवेचन पद्धति इत्यादि सर्व कशी असावयास पाहिजे ह्या संबंधींचे विचार व विधायक सूचनांचें दिग्दर्शन अध्यापक चर्चा परिषद करणार अशी आमची पूर्ण खात्री आहे.

अमलांत आणण्याजोगे प्रस्ताव करावेत

प्रान्तीय संमेलनांतच नव्हे तर इतरहि मोठमोठया संमेलनांतून निरनिराळया उपयुक्त विषयावर अनेकानेक प्रस्ताव संमत करणें व तें संमत करतांना शब्दांच्या कसरतीसाठीं रणधुमाळी माजणें हेंच जणूं कित्येक वेळां संमेलनाचें वैशिष्ट्य होऊन बसतें. पण शेवटीं अशा संमत प्रस्तावांतून प्रत्यक्ष कार्यक्षमतेचा बारा व योज्यांना लागतो. माझ्या कल्पनेप्रमाणें आजचा काळ तसा राहिला नाहीं. थोडेच कां होइना पण महत्वपूर्ण आणि शक्य कोटींत आणतां येतील असेच प्रस्ताव संमेलनांत व्हावेत व त्यासाठींच पुढील वेळ, शक्ति, बुद्धि, संस्थेनें पणास लावावयास हवी अशी खरी गरज आहे.

दारूबन्दी यशस्वी करण्याच्या नांवाखालीं आयुर्वेदीय आसवारिष्टांचा गळा घोटण्याचें सतत चालू असलेलें कार्य, अफू, भांग, गांजायुक्त आयुर्वेदीय औषधांमागें असलेला अबकारी खात्याचा ससेमिरा, आयुर्वेदीय औषधी करण्यास परदेशांतून येणारीं औषधीं द्रव्यें सहज सुलभतेनें व भरपूर प्रमाणांत मिळण्याचे वरील जकात कराचे भयानक विघ्न, ह्यासारख्या महत्वपूर्ण गोष्टींकडे सरकारचें लक्ष वेधून सरकारला ह्या गोष्टी करण्याचे बाबतींत वाटणाऱ्या भीती व शंकांचें निवारण करून सरकारची खात्री पटवून साठीं झालेल्यापेक्षांहि अधिक प्रयत्न होणें इष्ट आहे आणि संमेलनाकडून अशी अपेक्षा करणें अस्थानीं नाहीं असें वाटतें.

बंधु-भगिनींनो, स्वागताध्यक्षाचें भाषण वस्तुतः उपस्थितांचे स्वागत-वचनानेंच व्हावयाचें, ही था आहे. पण मी मात्र त्याबरोबर स्वतःचें गाऱ्हाणें संमेलनापुढें मांडून जणूं आपल्या सहनशक्तीचीच कसोटी लावूं लागलो, आज वैद्यवर्ग संमेलनाकडून काय अपेक्षा करीत आहे, हें मी मांडण्याचें साहस केलें, आशा आहे कीं, संमेलनांत उपस्थित आपण सर्वांहि अधिकारी व तळमळीचे कार्यकर्ते आयुर्वेदशास्त्र व जनता यांचे हिताचे दृष्टीनें उपयुक्त असे निर्णय घ्याल व कार्याची रूपरेषा आंखून मार्गदर्शन कराल. आपणासारख्या श्रेष्ठ जनांचें आतिथ्य यथाशक्ति करण्याचे प्रयत्न आमचें स्वागतमंडळ करील हें निश्चित लें तरी तें आपल्या योग्यतेस साजेसें कसें होईल ह्याची स्वागत मंडळास धास्ती वाटत आहे. परन्तु राहणारी न्यूनता ही आपल्या क्षमापूर्ण उदारतेनेंच दूर होणार आहे म्हणून होणाऱ्या चुकांची आपण क्षमा करावी अशी विनंति करून पुनः एकदां आपलें हार्दिक स्वागत करतो. व ह्या संमेलनकार्यारंभासाठीं आपण सर्वांनीं नियुक्त केलेले अध्यक्ष श्री. आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी आपणां सर्वांचे वतीनें मी त्यांना विनंति करतो.

‘आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार’
शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्व-प्रकारची सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.
विस्तृत माहितीकरितां लिहाः—
आयुर्वेदीय औषधी भांडार
२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

“ केवळ भारतातच नव्हे तर युरोप अमेरिकेतहि ज्यांच्या कौशल्याबद्दल औत्सुक्य निर्माण झालें आहे, अशा सुप्रसिद्ध दंतवैद्य पां. वि. जायदे यांचीं दोन संग्राह्य पुस्तकें:-
१) दंतरोग विज्ञान आणि चिकित्सा २ रु.
२) वैद्यसन्मित्र (हिंदी) भाग १ ला २ रु.
मिळण्याचीं ठिकाणें:-
१) वैद्यक ग्रंथ भांडार— नाशिक
२) पां. वि. जायदे, नारायण चौक-हुबळी

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन (दशम अधिवेशन) भुसावळ

स्वागत समिति सदस्य

स्वागताध्यक्ष प्रमुख– कविराज ब्रह्मदत्त शर्मा
आयुर्वेदाचार्य
स्वागताध्यक्ष– वैद्य दत्तात्रयशास्त्री जळूकर
आ. विशारद प्रवर
स्वागताध्यक्ष– वैद्य ज. वा. मोकाशी
उपाध्यक्ष– ,, बा. न. भगरे
,, गदाधर गोविंद वैद्य
,, दत्तात्रेय सिताराम पाटील
सेठ मेरुलाल गुलाबचन्द बम्ब
,, फकीरचन्द जैन
कोषाध्यक्ष– श्री. सदाशिव दामोदर पत्की वकील
प्रधानमंत्री– कविराज का. सि. भावे
भिषगाचार्य धन्वन्तरि

मंत्री– वैद्य भगवन्त त्र्यंबक वैद्य
,, ज्वालाप्रसाद शर्मा भिषगाचार्य
,, चूडामणी खंडेराव चौधरी
,, ज. रा. नाईक
,, हरी रामजी बऱ्हाटे
,, द. ब. कुलकर्णी
,, गो. स. जोग
,, एल. पी. व्यास
कार्यकारी मंडळ– वैद्य स. म. उपासनी
,, रामविलास गुप्ता
,, मो. वा. सन्त
,, श्रीधर रावजी करंजीकर
,, यशवन्त विनायक प्रधान

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं
आयुर्वेदिक व युनानी वनौषधि
तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण !

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक साका, माणिक, अकीक, सुवर्ण–वर्ख, रौप्य–वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार, गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राह्मी, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य ! विशेष माहितीसाठीं आमचे साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम–आयुर्वेद

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी
२४५ काळबादेवी रोड, मुंबई

—वैद्य ही देवता आहे—

(राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचें प्रवचन)

"आमच्या देशानें औषधींवर वेद लिहिण्यापर्यंत प्रगति केली होती. देशांत हें शास्त्र फार पुढें गेलें होतें. रामाच्या बाणाइतकेंच गुणकारी औषध या देशांत दिलें जात असे. 'रामबाण' शब्दाचें शेपूट औषधांच्या मागें उगीच कां लागतें? 'संजीवनी' ही दन्तकथा नाहीं. कोरी विकल्पना नाहीं. 'संजीवनी' वास्तवांतील वस्तु होती. आमच्या देशांतील जीवनदान देणारी सर्वांत मोठी चीज 'संजीवनी' होती. सर्वांत मोठें असें औषध होतें. परन्तु अशा गोष्टींचें संशोधन अजून झालें नाहीं. आमचें तिकडे लक्षच गेलें नाहीं. पानबिडीकडे आमचें लक्ष गेलें. सिग्रेटीकडे गेलें. ऋषींचें लक्ष मात्र संजीवनीच्या संशोधनाकडे गेलें होतें.

आमचे डोळे पश्चिमेकडे

दवाखाने वाढावे, असें आमचें म्हणणें नाहीं. ते कमी व्हावे ही आमची इच्छा! व्यायाम, नियम इत्यादि साधनांनींच स्वास्थ्य संतुलित असायला हवें हें अमान्य करतां येणार नाहीं. परन्तु देहव्याधि ह्या येणारच! देवदेवता किंवा साधुसन्तहि देहव्याधींतून मुक्त नाहींत म्हणून औषधांची आवश्यकता. औषधें हीं दुःखिताला सुख देण्यासाठीं असतात. संसार सुखाचा व्हावा व जग आनंदानें मरावें, भारावें हा सृष्टीचा संकेत आहे. परंतु व्यापारी वृत्तीनें कुणास सुख पोहोंचेल? उलट दुःखें वाढतील. तृपांत वनस्पतींचा वापर प्रमाणाबाहेर होऊं लागला. पवित्र कामांतहि काळ्या कल्पना निघूं लागल्या. तेणेंकरून आमचें जीवनच मुळीं विसकटून गेलें. आमचे डोळे पश्चिमेकडे लागले, तेथील तडकभडक आम्हाला आवडं लागली. मोठमोठे दवाखाने आम्हास प्यार झाले व पाश्चात्य पद्धतीचे डॉक्टर आम्हांस जवळचे वाटूं लागले. जास्त फी घेणारा डॉक्टर सर्वांत चांगला हा समज अधिक दृढमूल झाला.

परंतु आमच्याच घरांत होतें त्याचा आम्हांस उपयोग करून घेतां आला नाहीं. पंढरपूरकडचे म्हैसूरकर महाराज अनेक वर्षें प्रयोग करीत राहिले व त्यांनीं आयुर्वेदांतील कित्येक कठीण गोष्टी व्यवहारांत उतरवून दाखविल्या. इतर 'पॅथीं'चा मी प्रेमी असूनहि मला आयुर्वेदाचा अभिमान वाटतो. नेती, धौती, लंघन, योगविद्या, कायाकल्प इत्यादि गोष्टी आयुर्वेदाच्या कक्षेंत येत असून त्या शतपटीनें चांगल्या आहेत असें अनुभवानें म्हणायला हरकत नाहीं.

रानावनांतील दवाखाने

दवाखान्यांत जावयाची आपणास हौस नको. ती प्रवृत्ति चांगली नाहीं. खेड्यापाड्यांतील रानावनांत दवाखाने आहेत. जरा बाजूला जाऊन जडीबूटी पाहावी. रोज नुसत्या एक आण्यांत पंधरा बाटल्यांच्या बरोबरीचा गुण मिळतो. परंतु ह्या गोष्टी अंग मोडून करावयाच्या असतात. आळशाच्या घरीं गंगा येऊनहि उपयोग होत नसतो. मेहनत करावी कुणी?

आमच्या आजीबाईंचा झोळणा

आमच्या भारतांतील आजीबाई म्हणजे डॉक्टरांच्यावरहि ताण! त्यांच्या घरीं झोळणा राहील. बटवा राहील. हरेक रोगावर त्यांत जडीबूटी, लहानशी मुळी किंवा गोळी सांपडेलच सांपडेल. बाळंतिणींना त्रास झाल्याचें त्या समाजांत ऐकायला यायचें नाहीं. आतांच्या शिकलेल्या मुलींना झोळणा, बटवा 'छीः' वाटेल आणि सूतिकागृहाशिवाय त्यांना गरोदरपणीं कुठेंच स्थान उरणार नाहीं. एका बाळंतपणांत आजच्या मुली अर्ध्या आयुष्याच्या होऊन जातात.

वैद्यशास्त्र दुसऱ्यास शिकवा

ज्यांना जें येतें ते त्यानें दुसऱ्याला शिकवावें, असें आमची संस्कृति सांगत आली आहे. ज्ञानदान पवित्र असतें. परन्तु सापाचें औषध जाणणारा कधींच

दुसऱ्याला आपली विद्या देणार नाहीं. विंचू उतरविणारा दुसऱ्यास ती कला शिकवायला राजी नसतो. भारत नाना वनस्पतींचा कारखाना आहे. त्यांतील अनेक वनस्पतींची माहिती अनेकांना असली तरी ते ती दुसऱ्याला सांगत नाहींत. त्यांच्याबरोबरच ती विद्या, नामशेष होण्याची भीति असते. अशा लोकांनीं ती इतरांना शिकविली पाहिजे. ईश्वर नामाइतकेंच हें काम पवित्र समजलें पाहिजे. अनेकांच्या आत्म्यांना शांति प्रदान करणारें हें विद्यादान आहे. हें महत्पुण्य आहे. पैसा न घेतां हें शिकविलें पाहिजे. त्यासाठीं शाळा निघाल्या पाहिजेत. प्रचार झाला पाहिजे.

स्वार्थाचें बाजारूपण

व्यापारी वृत्ति मात्र अशा बाबींत येऊं नये. व्यापारी वृत्तीनें कार्याचें प्रेम सरतें व स्वार्थाचेंच बाजारूपण मागें उरतें. रामनामाची किंमत उथळ कीर्तनांनीं कमी केली. तशीच आयुर्वेदाची गत झाली आहे. मरीआईची साथ आली कीं हंगाम पिकला म्हणून आनन्द मानणारा डॉक्टरांचा वर्ग पाहिला कीं, या क्षेत्रांतील पतनाच्या पातळीची कल्पना येऊं शकते.

दुष्कृत्यामुळें देवांचें पतन

वस्तुतः वैद्य महान् देवता आहे. ह्या देवतेनें आपले देवपण अबाधित राखण्यासाठीं जपलें पाहिजे. देवहि देवपणाला विसरायला लागेल तर मग सामान्य माणसें कोणत्या कोटींत जाऊन पोहचतील ! देवदेखील आपल्या दुष्कृत्यांनीं पतनाकडे जात असतात हें नव्यानें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

आदिवासियांची सेवा साधा

भारतांत हजारों आदिवासी आहेत. गोंड आहेत, भिल्ल आहेत, कोळी आहेत, वारली आहेत. त्यांच्यांत मिशनऱ्यांनीं, परदेशीयांनीं जावें मिसळावें व औषधें देऊन त्यांना सुखी करावें व आम्ही या क्षेत्रांत बाजारू धुडगूस घालावा हें ठीक नाहीं. सरकार व जनता यांनीं सहकार्यानें या क्षेत्रांतील चांगल्या वाईट बाबींची छाननी करावी आणि वाईटाचा त्याग व चांगल्याचा प्रचार करावा हेंच उचित ! ”

[गतवर्षीं नागपूरला अ० भा० युवक कॉंग्रेसतर्फे महर्षि बालराजांचा गौरव करून औषधी वितरणाचा कार्यक्रम म. प्र. चे आरोग्यमंत्री श्री. कन्नमवार यांचे अध्यक्षतेखालीं केला, त्यावेळीं राष्ट्रसन्त तुकडोजी महाराजांनीं केलेलें भाषण.]

संकलक— भाऊ मांडवकर ‘ विशारद ’

नि. भा. आयुर्वेद विद्यापीठ

त्रिवेन्द्रम येथें ता. २२।२३।२४ रोजीं भरणाऱ्या अ० भा० आयुर्वेद महासंमेलनाबरोबरच नि० भा० आयुर्वेद विद्यापीठाचें अधिवेशन भिषगाचार्य भि. वि. देग्वेकरजी जबलपूर यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार आहे. या संमेलनात आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी (नागपूर) हे नागपूर विद्यापीठांतील औषधी-संशोधन या विषयावर संस्कृतमध्यें निबंध वाचन करणार आहेत.

सांडू ब्रदर्सचीं

शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.

वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.

पत्रव्यवहाराचा पत्ता:—

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
चेंबूर लि.
फॅक्टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

दोन अनुभव पत्रें

कृष्ण मालिनी वसन्त

[आक्टोबर महिन्यांत अध्यापक चर्चा परिषद व म. प्रां. वैद्य मण्डळाच्या स्थायी समितीची बैठक यासाठीं ठाण्याहून सुप्रसिद्ध रसवैद्य दत्तोपन्त व. वैद्य हे आले असतां त्यांनीं वरील औषधाची माहिती पत्रिकेस सांगितली. व नन्तर पत्रानें त्याचा पाठ लिहून कळविला. —संपादक]

मुदतीच्या ज्वरांतील ताप कमी होण्यासाठीं कृष्णमालिनीवसंत पाठः—

॥ एक भागं च कनकं द्विभागं मौक्तिकं तथा ॥
॥ त्रिभागं ताम्रभूतिं च निष्कभागं च लोहजं ॥
॥ पंचभागं प्रवालं च षड्भागं हंस पादकम् ॥
॥ रसकं चाष्टभागं च वाल्लिनं निष्कभागकम् ॥
॥ एकी कृत्यं च तत् सर्वं नवनीतं तदा भवेत् ॥
॥ लिंबूरसेन संमर्द्य मृक्षणं चाधिगच्छति ॥
॥ एतद् रसायनं वरं वलीपलीत नाशनम् ॥

तो पाठ असाः— २० तोळे स्वच्छ पाणी घेऊन त्यांत २॥ तोळे खडीसाखर विरवावी. त्याचे ६ भाग करावेत, प्रत्येक भागांत १ गुंज वरील कृष्णमालिनीवसंताची मात्रा उगाळून द्यावी. याप्रमाणें मुदतीच्या तापांत एका दिवसांतून (१२ तासांत) सहा वेळां द्यावें. १ गुंज (दिवसांतून ६ गुंजा) हें प्रमाण मोठ्या (तरुण) माणसाचें प्रत्येक वेळाचें आहे.

वरील औषधांत ताम्रभस्म सोमनाथी वापरावें. लोहभस्म स्वयमाग्निलोह वापरावें. प्रवाळभस्म सूर्यपुटी वापरावें. लोणी गाईचें एक तोळा वापरावें. वरील पाठ आमचे पूर्वजांचे पाठांतील आहे.

या वसंताचा उपयोग आम्ही मुदतीच्या ज्वरांवर करतो. कारण त्यांत त्रिदोषनाशक व शक्तिवर्धक औषधें आहेत. त्यामुळें तापाचें प्रमाण वाढत नाहीं, सन्निपात होत नाहीं व इतर उपद्रवाह होत नाहींत. वरील औषधाचा उपयोग सूतशेखर (सुवर्णयुक्त) मात्रेबरोबर ब्लड्प्रेशरकरितां फार चांगला होतो. मुदतीचे तापाकरितांहि वरील (सहा गुंजा) औषधाबरोबर सुवर्णयुक्त सूतशेखर सहा गुंजा यासह ब्राम्हीअर्क दोन चमचे लहान, पत्री खडीसाखर ३ तोळे, पाणी ८ औंस असे मिश्रण भाग सहा करून दर तीन तासांनीं सहा वेळां घेण्यास सांगतो. यांनीं टायफाइड-मधील ताप २४ ते ४८ तासांत खालीं येतो.

आयुर्वेदभूषण दत्तात्रय बळवन्त वैद्य
श्रीदत्तमहौषधालय, स्टेशनरोड, ठाणें.

रक्तदाबावर कृष्णमालिनीवसंत

“ माझ्या छातींत धडधडत असे, व कधींतरी रक्तदाबाचा त्रास होत असे. व न्युरस्थेनियाहि मधून-मधून त्रास देत असे. त्यावर आपणाकडून औषध-योजना घेतली. आपण मला कृष्णमालिनीवसंत व सूतशेखरच्या मात्रा दिल्या. त्यामुळें मला पुष्कळच फायदा झाला आहे. धडधडणें पुष्कळसें कमी झालें व अंगांत ताकद व तरतरीपणा आला. माझ्या वयाला पाऊणशें वर्षें होऊन गेलीं, तरी मी माझा वकिलीचा धंदा चालविला आहे. त्याचें पुष्कळसें श्रेय आपल्या या औषधयोजनेस दिलें पाहिजे. मात्रांमुळें मनहि उल्हासित राहतें.

वयमानपरत्वें जो थकवा वाटला पाहिजे तो वाटत नाहीं व मात्रांचे गुण चिरकाल आहेत. मी त्या मात्रा सतत घेतो व मधून मधून सोडतो. माझ्या कांहीं मित्रांना या औषधयोजनेपासून हाच परिणाम दिसून आला आहे. कृष्णमालिनीवसंत मात्रेचा तापावरहि उपयोग होतो. असा माझा अनुभव आहे.

वरील मात्राशिवाय आपणाकडून मी क्रव्यादि-रस गोळ्या घेतल्या होत्या. त्या अन्नपचनावर उत्कृष्ट गोळ्या आहेत. वरील औषधें पुनः स्वस्त आहेत.

आयुर्वेदाचा उत्कर्ष व्हावा असें इच्छितो.

आपला स्नेहांकित

ठाणें, मो. श. रांगणेकर, वकील

अशक्तपणावर कृष्णमालिनीवसंत

मला मधुमेहाचा विकार गेलीं सहा वर्षे आहे. दोन वर्षांपूर्वी थोडा अशक्तपणा वाटत असल्यामुळें मी आमचे शेजारी श्री. दत्तोपंत वैद्य यांना त्यावर कांहीं औषध असल्यास द्यावें, अशी विनंती केली.

त्यांनीं मला कृष्णमालिनीवसंत व सुवर्णयुक्त सूतशेखर अशा दोन मात्रा दिल्या. त्या मी आज दोन वर्षे घेत आहे.

त्या औषधापासून माझा अशक्तपणा कमी झाला आहे. काम करण्यानें थकवा येत नाहीं व तरतरी वाटते. त्या औषधांनीं मला फायदा झाला आहे व तीं औषधें मीं चालू ठेवणार आहे.

माझें वय ६१ आहे व धंदा वकिलीचा आहे.

ठाणें. —माधव विनायक हेगडे

अस्सल वनस्पतींसाठीं सरकारी समिति

जनतेला आयुर्वेदिक अस्सल वनस्पती व औषधी द्रव्यें योग्य किंमतीस उपलब्ध व्हावींत या हेतूनें एक यंत्रणा निर्माण करण्यासाठीं विचारविनिमयात्मक समिति मुंबई सरकारनें नेमली आहे. या समितींत खालील सदस्य असतील. —

(१) वैद्य बापालाल जी. शाह, सुरत, चेअरमन.
(२) ,, जी.एन्. पटवर्धन, शिरसी(कारवार)सद
(३) ,, मोतीराम नारायणजी जोशी
(४) ,, व्ही.एस्.मराठे, आयुर्वेद सेवा संघ नाशि ,, सदस
(५) दि कॉन्झरव्हेटर ऑफ फॉरेस्ट्स्, (रिसर्च अँड वर्किंग प्लॅन्स सर्कल) ,,
(६) श्रीयुत ए. एन्. नामजोशी एम्. एस्सी. (बॉटनी) मुंबई, सेक्रे

२) ही समिति-- १) मुंबई राज्यांत उपल होणाऱ्या आयुर्वेदिक वनस्पतींच्या व औषधी द्रव्यांच उपलब्धीविषयीं विचार करील; २) त्यांची लागव व भरपूर प्रमाणांत निर्मिति, त्यांचें संरक्षण व सं व तसेंच त्यांचा जनतेला व कारखानदारांना पुरव व विक्रीविषयीं योजना व साधनें सुचवील.

त्याचप्रमाणें संदिग्ध वनस्पतींचें निश्चितीकर प्रांतपरत्वें व स्थानपरत्वें अशा वनस्पतींचीं निश्च नांवें, त्यांच्या भावी संशोधनाविषयीं व संग्रहावि कार्य करण्यास अडचण पडूं नये या दृष्टीनें कूट प्रश्नांचा विचार समिति करील.

३) समितीनें योग्य कालांत बैठक घेऊन वरील प्रश्नांचा साकल्यानें आणि सर्वांगीण विचा करून आपल्या तत्संबंधीं निर्णायक शिफारसी सरकारकडे सादर करावयाच्या आहेत.

———

प्राध्यापक पाहिजेत

अमरावती येथील विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयांत कांहीं विषय शिकविण्याकरितां प्राध्यापक पाहिजेत. खालील पत्त्यावर विशेष माहितीसाठीं गरजूंनीं अर्ज करावेत.

प्रिन्सिपाल, विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय
अमरावती (म. प्र.)

सिरावेधकर्म : आयुर्वेद सेवा संघ, चिकित्सा विभाग

आयुर्वेदीय चिकित्सेचें प्रधान अंग जें पंचकर्म त्यापैकीं सिरावेधकर्म तथा 'रक्तस्रुति' या एका कर्माचें पुनरुज्जीवन आयुर्वेद सेवा संघाच्या चिकित्सा-विभागांत झालें आहे. निरनिराळ्या प्रकृतीच्या व्यक्तींत निरनिराळ्या विकारांसाठीं 'सिरांचा' वेध करण्याचा प्रयत्न यशस्वी होऊन सिरावेध हें कर्म प्रत्येक वैद्यानें करावयास कांहींच हरकत नाहीं असें सेवा संघास वाटतें. व येथें येणाऱ्या वैद्यव्यक्तीस त्याचें सर्व तंत्र त्याला माहित नसल्यास शिकविलें जातें.

संख्या व प्रमाण

आतांपर्यंत ४० वेळां सिरावेध येथें केला असून एकेका वेळीं ५ तोळ्यांपासून ३० तोळ्यांपर्यंत रक्तस्रुति केली आहे.

विद्धसिरा-परिणाम

दोन्ही शाखांमधील (हातापायांमधील) व डोक्यांतील सिरांचा वेध केला आहे.

हात, पाय, गालाचीं हाडें दुखणें, पाठीचीं हाडें दुखणें, इ० विविध प्रकारच्या, शीत वा उष्ण उपायांनीं न थांबणाऱ्या वेदना, सिरावेधानें कमी झाल्या. दातांतून रक्त येणें, हिरड्या सळसळणें इ. कमी झालें. सर्वांगावर विस्फोटक, विचर्चिका, इ. विविध विकार सिरावेधानें आटोक्यांत आणून नंतर ते इतर शमन-शोधन चिकित्सेनें बरे करतां आले.

ऊर्ध्वग रक्तपित्त, कास, श्वास, हे विकार पुष्कळच प्रमाणांत कमी झाले.

कुष्ठविकाराच्या विविध पूर्वरूपावस्थेंत केलेल्या रक्तस्रुतीमुळें पुढच्या अवस्था टळल्या.

दंतविकार, कर्णविकार, मुखावरील विविध विकार सहज चिकित्सितां आले.

अनुभवांचा दोषतः विचार

कफप्रकृतींत सिरावेधाचा कांहींहि त्रास होत नाहीं. वातपित्तप्रकृतींत सिरावेधानंतर कांहीं वेळेला संततज्वर सुरू झाला आहे, व तो वृंहण-चिकित्सेनें याष्टिमधुजल + घृत यामुळें बरा झाला आहे.

वातपित्त प्रकृतीच्या व्यक्तींत क्षीणता भासली व क्वचित् वातज मृदुज्वर कांहीं दिवस आला.

कफपित्त प्रकृतींत वा पित्तदोषज दुष्टींत मात्र रक्तस्रुती हें एक वरदान वाटत आहे. उन्हाळ्याचा दरवर्षी त्रास होणाऱ्या व्यक्तीस यंदा उन्हाळा भासत नाहीं. इतकेंच नव्हे हवेंत किंचित् गारवा आला तर पांघरूण घ्यावेंसें वाटतें (पित्तक्षीणता).

वयतः विचार

वयाच्या १७ व्या वर्षी वा सत्तराच्या आसपास रक्तस्रुति केल्यास चक्कर येणें हें लक्षण कांहीं दिवस चालू राहिलें. हृदयाची विकृति आढळली नाहीं.

अग्नितः विचार

प्रथम अग्निमांद्य थोडेंसें निर्माण होतें. पण कांहीं दिवसांनीं तें नाहींसें होतें.

स्थूल पण अबल अशा व्यक्तींत केलेला सिरावेध हा शोधन बृंहणाप्रमाणें बलदायक झाला.

धातुतः विचार

(१) प्रामुख्यानें रसगत व रक्तगत कफपित्तज दुष्टी बरी होते. शुक्र असार व्यक्तींत अधिक अग्निमांद्य व क्षीणता वाटली.(२) मांस मेद असार व्यक्तींत सिरावेध नको. (३)मेदस्वी व्यक्तींत सिरावेध चालतो.

मलतः विचार—

अत्यार्तव कमी झालें

याप्रमाणें रक्तस्रुतीचें विविध व्यवहारिक अनुभव मिळाले आहेत. ग्रंथोक्त विकार, ग्रंथोक्त अवस्था ग्रंथोक्त सिरांचा वेध इ. बरहुकुम सिरावेध करण्याचा प्रयत्न व सिरावेधांच्या साधनामध्यें यावच्छक्य संशोधन, सेवा संघ करूं पहात आहे.

— आयुर्वेदाचार्य श्री. कृ. करमरकर

कफपित्तदोषावरील लंघन उपचार

[सिरावेध ही लंघन चिकित्सा आहे. म्हणून वातप्रकृति वा वातदुष्टींत, वातपित्तावस्थेंत ती उपयुक्त ठरली नाहीं. कफ, कफपित्त हे दोन दोष मात्र लंघन सहन करणारे आहेत. 'कफपित्ते द्रवे धातू सहेते लंघनं महत्।' म्हणून त्यांच्यांत तो उपचार उपयुक्त ठरला आहे. व लंघनांतील शोधन उपचारहि परिणामीं बृंहणीय होऊं शकतो हेंहि दिसलें आहे. वाग्भटाच्या टीकाकारानें 'शोधनबृंहण' म्हणून चिकित्साप्रकार दिलेला आहे, त्याची प्रचीति या ठिकाणीं येते. —संपादक]

पदव्या कशा मिळतात ?

अयोध्या संस्कृत कार्यालय, शाखा औरैया, इटावा (उ. प्र.) येथून निघणारें एक संस्कृत मासिक पत्र अहमदनगरच्या पत्त्यावर जाऊन तेथून पत्ता बदलून नाशिक येथें आलें आहे. त्यांत वैद्य विंदुमाधवजी यांच्या नांवें छापील चिठ्ठी आहे.

त्यांत 'आपणास 'आयुर्वेदभूषण' ही पदवी कार्यालयाच्या सव्वीसाव्या वाढदिवसानिमित्त देण्याचें ठरविलें आहे. त्यावर शंकराचार्यांची सही झालेली आहे. कार्यालय साहाय्यार्थ ५ रु. शुल्क पाठवून ती पदवी मागवून घ्यावी' असें म्हटलें आहे. खालीं सही पं. कालीशरण त्रिपाठी साहित्यरत्न अशी आहे.

अनेक ग्राहकांच्या सूचनेवरून
परतवाडा येथें आयुर्वेद सेवासंघ नासिकचीं
सर्व अनुभविक व गुणकारी औषधें
मिळण्याची सोय आम्हीं केली आहे.
श्रीसमर्थ स्टोअर्स
परतवाडा (मध्यप्रदेश)

आयुर्वेदाचार्य देशपांडे यांचा पुणें येथें सत्कार

भुसावळ येथें भरणाऱ्या महाराष्ट्र प्रांतिक वै संमेलनाचे नियोजित अध्यक्ष आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे यांचा अष्टांग आयुर्वेद महाविद्याल पुणें २ तर्फे दि. ८-५-५५ रोजीं सायंकाळीं महाविद्यालयाचे भव्य दिवाणखान्यांत आदर-सत्का करण्यांत आला. समारंभास स्थानिक वैद्यवर्गांती बरेचसे वैद्य व विद्यालयांतील अध्यापकवर्ग उपस्थि होता. अध्यक्षस्थान पं. तांबेशास्त्री सेक्रेटरी, मीमांस विद्यालय पुणें, यांनीं मंडित केलें होतें.

प्रथमतः वै. परांजपे, प्रधानाध्यापक, अष्टां आयुर्वेद महाविद्यालय, पुणें, यांनीं वै. पांडुरंगशास्त्री देशपांडे यांची ओळख करून दिली व त्यांच्या आयुष्यांतील ठळक घटना निवेदन केल्या. अष्टां आयुर्वेद महाविद्यालयाशीं त्यांचा कनिष्ट संबं सुरवातीपासूनच असल्याचें त्यांनीं सांगितलें. महाराष्ट्र प्रांतिक वैद्य संमेलनाचे अध्यक्षपदीं त्यांची निव झाल्यानें आपणास व आपल्या इतर सहकाऱ्यां आनन्द होत असून त्याबद्दल अभिमानहि वाटतो अ ते म्हणाले.

तारेचा पत्ताः—Newbottle
के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुचें, कॅपसुल्स
[हेअर आईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाची सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

(पान नं. ६९४ वरून चालू)

मुंबई राज्य वैद्य संमेलन

ता. १८/५/५५ बुधवार

५ते७ अध्यापक परिषद
विषय- न्याय-सांख्य-मीमांसा
मुंबईराज्य परिषद उद्घाटन
७॥वा. ना. शांतिलालजी शाह स्वास्थ्यमंत्री
[मुंबई राज्य]
स्वागताध्यक्ष भाषण
८वा. वै. ज. वा. मोकाशी
अध्यक्षीय भाषण
८ते९ वै. श्रीमंत गं. वि. (नानासो) पुराणिक
९ते११ मुंबई राज्य परिषद कार्य व समारोप
३ते६ महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन कार्य
व समारोप, राष्ट्रगीत.
८ते११ अध्यापक परिषद
अष्टांगहृदय-स्वस्थवृत्त
११॥ समारोप

ष निवेदन —

प्रतिनिधि निवास—डी.एस्.हायस्कूल, भुसावळ.

प्रदर्शन स्थान—महिला समाज हॉल व कॉरोनेशन क्लब भुसावळ

भोजन शुल्क—दोन्ही वेळचे भोजन व दोन्ही वेळचे चहासह १॥ रु. प्रत्येक दिवसासाठीं राहील.

भुसावळ स्टेशनवर स्वयंसेवक राहातील.

आपलें आगमन पत्रानें सूचित करावें.

नित्य रात्रौ आरोग्य विषयक फिल्मदर्शन.

फक ५ रुपयांच्या अल्प भांडवलावर
महिना १०० रुपये मिळवा.
माहितीपत्रकांसाठीं ४ आणे पाठवा.
त्ता:- एस्. देशपांडे C/o
सोमण लॉज, पुणें ४

....अनुक्रमणिका....

भारतांत भारतीयांचें वैद्यक हेंच राष्ट्रवैद्यक ६९३
म. प्रां. दशम अधिवेशन कार्यक्रम ६९४
म. प्रां. दशम वैद्य संमेलन
अध्यक्षीय भाषण ६९५-७१४
स्वागताध्यक्षांचें भाषण ७१५
वैद्य ही देवता आहे ७११
कृष्णमालिनीवसंत ७२१
शिरावेधकर्म ७२३
आयुर्वेदचार्य देशपांडे यांचा सत्कार ७२४

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद

द्वितीयाधिवेशन, भुसावळ

निमंत्रक- वै. वि. म. गोगटे
व संयुक्त खान्देश वैद्य मंडळ
उद्घाटक- आयुर्वेदाचार्य पं. हरिदत्तशास्त्री
डायरेक्टर ऑफ आयुर्वेद, मुंबई.
स्वागताध्यक्ष- वैद्य दत्तात्रयशास्त्री जळूकर,
आ. विशारद, प्रवर
अध्यक्ष- वै. पां. ह. देशपांडे, आयुर्वेदाचार्य

विषय-	विषयाध्यक्ष
१ द्रव्यगुणविज्ञान	वै. का. शं. करंदीकर
२ रसशास्त्र	वै. नृसिंहाचार्य बागेवाडीकर आयुर्वेदचिकित्सक (सातारा)
३ शारीर	वै. पुरोहित आयुर्विद्याविशारद (पुणें)
४ दोषधातुमलविज्ञान	वै. रणजितराय देसाई
५ न्यायसांख्य मीमांसा	वै. भास्करशास्त्री गोडबोले आयुर्वेदाचार्य (पनवेल)
६ अष्टांगहृदय-	वै. भिषग्वर्य-डेग्वेकरशास्त्री (जबलपूर)
७ स्वस्थवृत्त-	वै. पां. ह. देशपांडे

---

१) पारदप्रक्रियांचें प्रात्यक्षिक
२) 'आमवात' रोगविषयक चर्चात्मक व्याख्यानें—
  १ वै. वेणीमाधवशास्त्री जोशी
  २ वै. वि. म. गोगटे
  ३ वै. बिंदुमाधवशास्त्री पण्डित
  ४ वै. श्री. कृ. करमरकर

एस्. एस्. सी. नंतर—

वैद्यकीय शिक्षणाची उत्कृष्ट सोय

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नासिक

नवीन वर्ग १० जून १९५५ पासून सुरू

एस्. एस्. सी. परीक्षेंत संस्कृत विषयांत शेंकडा ५० अगर ५० पेक्षा अधिक गुण असणारांना फक्त प्रवेश मिळेल.

(संस्कृत खेरीज इतर विषयांत नापास असला तरी प्रवेश मिळूं शकतो.)

नासिक येथील शिक्षणाच्या विशेष सोयी:—

१ संस्थेची स्वतःची आरोग्यशाला (स्वास्थ्यशाळा व रुग्णालय)
२ धर्मार्थ औषधालय व प्रकाश औषधालय
३ आयुर्वेदीय ग्रंथालय व वाचनालय
४ यंत्रविरहित औषधीकरण, गृहगत औषधीकरण प्रात्यक्षिकाची व्यवस्था
५ आयुर्वेदाचे तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक
६ वनस्पति प्रात्यक्षिकासाठीं जवळ वणी-त्र्यंबकचे डोंगर व तपोवन, नासिक

प्रवेश फी १० रु. व वार्षिक एकूण फी (प्रात्यक्षिक शिक्षणादि फीसह) १२० रु.

(अर्धसनाथ विद्यार्थ्यांसाठीं मासिक २० रु. खर्च घेऊन नासिक अनाथ विद्यार्थी-गृहांत राहण्या-जेवण्याची व्यवस्था पत्रव्यवहारानें होऊं शकेल.)

पत्रव्यवहाराचा पत्ता: — प्रमुख अध्यापक

शुद्ध आयुर्वेद विद्यालय

वैद्य बिवलकर कारंजाजवळ, नासिक

संपादक व प्रकाशक — वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य बिवलकर कारंजा, नाशि
मुद्रक — श्री चिं. ओक, सर्कल प्रेस, नाशिक.

GURUKUL KANGRI DELY. 20 MAY 55 9—45 SAHARANPUR

, ता. १ जून १९

वैद्य संमेलन

ग्रंथ आणि कार्यक्र

व. वि. १

इत्यादींतून

राळेच

(दरमहा ता. १ व १६ रोजी प्रसिद्ध होतें.)

र्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. एक अंकाची किंमत ४ आणे

र्ष ८ वें) नासिक, ता. १ जून १९५५ (अंक २३ वा

शुद्ध आयुर्वेदाच्या प्रसाराबाबत महत्त्वाच्या घोषणा

आरोग्यमंत्री शांतिलालजी शहा यांचें भाषण

भुसावळ येथें भरलेल्या मुंबई राज्य वैद्य संमेलनाचें उद्घाटन करतांना मुंबई राज्याचे आरोग्य- त्री श्री. शांतिलालजी शहा यांनीं कांहीं महत्त्वाच्या घोषणा केल्या. ते म्हणाले 'शुद्ध आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमानुसार आयुर्वेदाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आपलें भवितव्य काय? अशी काळजी वाटत आहे. त्यांना सरकारी मान्यता मिळणार असून त्याबाबत तयार केलेलें सरकारी बिल पुण्याच्या येत्या अधिवेशनांत विधानसभेपुढें मांडण्यांत येणार आहे.

(आरोग्यमंत्री)

केवळ स्वस्त वैद्यक म्हणून मुंबई सरकारने आयुर्वेदाला मान्यता दिलेली नाहीं. आयुर्वेदाची निदानपद्धति सोपी आहे व आयुर्वेदाचीं औषधें प्रभावी आहेत. दरसाल अवघे ३५० डॉक्टर पदवीधर तयार होतात. क्ष-किरण यंत्राशिवाय त्यांना रोगनिदान करतां येत नाहीं. सरकार या डॉक्टरांना ३५० क्ष-किरण यंत्रें पुरवूं शकत नाहीं व त्यांचीं औषधेंहि महाग आहेत. त्यामुळें डॉक्टराकडून खेडेगांवांची सेवा होऊं शकत नाहीं. म्हणून आयुर्वेद हाच या देशांतील जनतेला उपकारक या निर्णयावर आम्ही आलो. आम्हीं राज्यांत आयुर्वेदाच्या अध्ययन-अध्यापनासाठीं भरपूर सोयी उपलब्ध करण्याचें ठरविलें आहे. साठीं आम्हास वैद्यवर्गाचें सहाय्य अपेक्षित आहे. आयुर्वेदीय औषधीकरणासाठीं लागणाऱ्या औषधी जंगलांतून गोळा करण्याची व त्या योग्य भावानें विकण्याची व्यवस्था करावी यासाठीं , व खोट्या औषधांना आळा घालण्यासाठीं दुसरी, अशा दोन समित्या सरकारनें नेमल्या आहेत.

दारूबंदीच्या

देतां येतील याबाबत ९..

हें चूकच. खऱ्या अर्थानें शंभरातील

होतील ते सर्जरीकडे धाडूं नयेत.”

मुंबई राज्यांतील आयुर्वेदाच्या संस्थांनीं संघटन करून मुंबईराज्य वैद्य संमेलन (फेडरेशन) स्थापन केलें हें पाहून मुंबई सरकारला समाधान वाटत आहे. मुंबई सरकारचे आरोग्य-खातें या संमेलनाच्या ठरावाकडे जरूर लक्ष पुरवील.

नाशिक येथें सुरूं झालेली आयुर्वेद अध्यापक चर्चापरिषद व तिचे ठराव याकडे मुंबई सरकारचें लक्ष असून आयुर्वेदीय अध्यापन व शास्त्रीय संज्ञानिश्चिति या दृष्टीनें त्या परिषदेच्या कार्याला सरकार अधिकृत महत्व देईल. हें कार्य अवश्य चालू रहावें असें सरकारला वाटते.

आयुर्वेदीय पाठ्यपुस्तकें तयार करणें व तीं प्रकाशित करणें यासाठीं सरकार आर्थिक मदत देईल.

आयुर्वेदीय औषधांचे पाठ निश्चित ठरविण्यासाठीं मुंबई सरकार एक आयुर्वेदीय औषधि पाठनिश्चिति समिति नेमणार आहे.

मरणोत्तर तपास करून आयुर्वेदीय पद्धतीनें त्याची नोंद करण्याची व्यवस्था आयुर्वेदीयांनी संशोधनपूर्वक निश्चित केल्यास त्यासहि सरकार मान्यता देऊं शकेल.” आरोग्यमंत्र्याच्या या आश्वासनांचा शुद्ध आयुर्वेदाच्या चळवळीवर अनुकूल परिणाम होणार आहे.

COUGH CURE TABLETS
KASPHO

अपुरें संरक्षण

धूळ, जंतू व श्वसनाच्या इतर विकारांपासून संरक्षण मिळविण्यासाठीं कास्फो औषधि गोळ्या वापरणें इष्ट आहे. खोकला, पडसें, घशाची खवखव, ब्राँकायटिस इ. विकारांमध्यें कास्फो उपयुक्त आहे. आजच एक बाटली खरेदी करा. सर्वत्र मिळूं शकते.

कास्फो

खोकल्यावरील अचूक उपाय

योजना यशस्वी करा
राष्ट्र बलशाली बना

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड,
अहमदनगर.

EVEREST APK. 54-3 MAR

, ता. १ जून १९

ग्रंथ आणि कार्य

वैद्य संमेलन

च. वि. १

इत्यादींतून

वश्यकता आहे !

(लेखक – आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे)

मागील आयुर्वेद पत्रिकेंत श्री. वैद्यराज बिन्दुमाधवशास्त्रीजी यांचें आयुर्वेदीय पाठ्यक्रमांत मीमांसेची आवश्यकता यावर अध्यापक परिषदेंत झालेलें भाषण आलें आहे. मला तें फार आवडलें. चरकसुश्रुत हे ग्रंथ लावण्याचें दृष्टीनें आयुर्वेदाचे विद्यार्थ्याला मीमांसापरिभाषादि प्राथमिक ग्रंथ यावयास हवेत. पण न्यायसांख्याचे विषय खास वैद्यकाशींच संबद्ध आहेत. त्यांचे ज्ञानाभावीं द्रव्यगुणविज्ञान, त्रिदोषविज्ञान व शरीराचीं मूलतत्वें समजणारच नाहींत. थोडक्यांत या दोन विषयांवर आयुर्वेदीय तत्वज्ञानाची सबंध बैठकच असल्यानें या विषयांची आयुर्वेदीय विद्यार्थ्यांना चांगली समज व्हावयास हवी. कोणी असें म्हणणारे आहेत कीं, हा विषय आयुर्वेदांत असून तोच पुरा आहे. परंतु हें म्हणणें वाटतें तेवढें खरें नाहीं. न्यायसांख्य हा विषय आयुर्वेदांत थोडया निराळ्या दृष्टिकोनांतून पण आला आहे. न्यायसांख्यांतीलच पुष्कळशी परिभाषा थोड्या फरकानें चरकानें वापरली आहे, म्हणूनहि कोणी चरकावरूनच हा विषय शिकवावा म्हणतील. परंतु एक तर तो त्यांत पुरेसा नाहीं; न्यायांतील विषय अगदीं धांवत्या स्वरूपांत वादपद्धतीच्या मिषानें चरकाच्या विमानस्थानाच्या आठव्या अध्यायांत मांडलेला आहे. सूत्रस्थानाच्या पहिल्या अध्यायांतहि तो थोडासा आलेला आहे. पण त्यांतील द्रव्यादि सप्त पदार्थ आणि द्रव्यगुणकर्म यांचें वर्णन बरेचसें चक्रपाणीनेंच स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु ज्यानें तर्कसंग्रहसुद्धां वाचलेला नाहीं, त्याला हा विषय कळण्याची फार कमी शक्यता आहे. चक्रपाणीचे टीकेवर तर स्पष्टीकरणासाठीं आणखी एक टीका हवी. एरवी तें सुबोध नाहीं. आर्षी हा विषय मुळांतून पाहिलेल्यासाठींच चरकाचा हा विषय व चक्रदत्ताची टीका आहे, असें स्पष्ट दिसतें. तरीहि कांहीं गोष्टी चरकापेक्षां न्यायांत अधिक असून त्यांचें स्पष्टीकरण न्यायतंत्रांतून समजून घ्यावयास हवें. क्वचित् चरकांत त्यांचा उल्लेख आहे. पण स्पष्टीकरण नाहीं. म्हणून तर त्यांची मुळांतील माहिती जरूर आहेच; पण ज्याठिकाणीं दोन्ही आहेत, त्याठिकाणीं निराळ्या दृष्टिकोनानें तें स्पष्टीकरण आलेलें आहे. मुळांतील दृष्टिकोन समजून घेतला नाहीं तर कांहीं ठिकाणीं आयुर्वेदाच्या दृष्टीनें फारसें बिघडलें नाहीं, असें जरी कोणी म्हटलें तरी आयुर्वेदीयेतर पौरस्त्य शास्त्रज्ञांत न्यायाचीच परिभाषा गृहीत धरल्यामुळें तिच्याशीं परिचय नसल्यास आयुर्वेदीयाला आयुर्वेदीयेतर विद्वानांत स्थान मिळणें कठीण जातें. कांहीं स्पष्टीकरण तर चरकाच्या स्पष्टीकरणाला सहाय्यकहि होतें, त्यापासूनहि तो वंचित होतो. एतावता न्यायाची आवश्यकता सरळ आहे. पुढें दिलेल्या उदाहरणांनीं हें विधान सिद्ध होईल.

१) चरकानें यथार्थानुभव प्रत्यक्षादि न्यायोक्त प्रमाणांनींच जवळजवळ सांगितला आहे. विमानस्थानांत (८ / ३३) 'हेतु' या संज्ञेखालीं तीं मांडलीं आहेत. तिस्रैषणीय अध्यायांत मात्र उपमानाऐवजीं 'युक्ति' हें निराळें प्रमाण चरकानें सांगितलें आहे. (सू. ११।१७) पण या यथार्थानुभवाचें स्पष्टीकरण रजतशुक्तीच्या दृष्टांतानें व 'प्रमा' 'अप्रमा' या संज्ञांनीं न्यायानें सांगितलें असून त्यांतील 'प्रमा' म्हणजे यथार्थानुभव हें न्यायांतील वर्णन चरकापेक्षां अधिक आहे; तसेंच स्मृति आणि अनुभव हे बुद्धीचे दोन प्रकार, हेंहि वर्णन त्यांत अधिक आहे.

२) प्रत्यक्षप्रमाणाबाबत चरकानें "मनासहित इंद्रियांनीं जें उपलब्ध होतें तें, (प्रत्यक्षं तु खलु तद्यत्स्वयमिन्द्रियैर्मनसा चोपलभ्यते । वि. ४।४") असें चरकानें म्हटलें असून चक्रदत्तानें 'अव्यवधानेन' असें

विशेषण करून प्रत्यक्षाच।

अगर आंतःप्रत्यक्ष असेंहि त्यानें अंतर—

आत्माहि घेतले असले तरी आत्मेंद्रियम . पू. ११।११). शा

जन्यं ज्ञानम्' हें न्यायोक्त प्रत्यक्षाचें लक्षण सुटसुटीत आहे. त्याशिवाय त्यांत केलेलें सविकल्प अगर सप्रकारक आणि निर्विकल्प अगर निष्प्रकारक हें सोदाहरण सांगितलेलें अधिक आहे. तसेंच न्यायांत इंद्रियार्थसन्निकर्ष हा (अ) संयोग, (आ) संयुक्तसमवाय, (इ) संयुक्तसमवेतसमवाय, (ई) समवाय, (उ) समवेतसमवाय व (ऊ) विशेषणविशेष्यभाव असा षड्विध सांगितला आहे. अर्थात् प्रत्यक्षसुद्धां त्याच्या रूप-गुण आणि अभावासह असावयास हवें आहे. चक्रदत्तानें केवळ या साहींचा उल्लेख केला आहे.

३) पंचज्ञानेंद्रियांच्या लक्षणांत(अ) पृथिव्यादींचें गंध, रस, रूप, स्पर्श, शब्द यांचा शारीरस्थानांत चरकानें केवळ गुणाखालीं उल्लेख केला आहे. (च. शा. १।२५) व सूत्रस्थानांत (८-१४) घ्राणादि इन्द्रियांत पृथिव्यादि महाभूतच आहेत, एवढेंच म्हटलें आहे. पण न्यायांत प्रत्येकाचे नित्यानित्य भेद करून नित्य हें परमाणुरूप आणि अनित्य हें कार्यरूप हें त्याचें विशेष वर्णन आहे. शरीर, इंद्रिय, विषय असा त्रिविध भेद स्पष्ट नसला तरी चरकांत त्या अर्थाचा भेद पुढेंमागें आलेला आहे. परन्तु त्याचें एकत्र वर्णन न्यायांतच आहे.(आ) त्यांतहि रूपवर्णनांत कृष्णताराग्रवर्ति चक्षु व रूपाचा चतुर्विध विषय भौम, दिव्य, औदर्य आणि आकरज असा चार प्रकारचा सांगितला आहे.भौम हा बाहेरचा अग्नि व औदर्य म्हणजे जठराग्नि, हे दोन आयुर्वेदांत सांगितलें असले तरी ' अविंधनं दिव्यं विद्युतादि ' व ' आकरजं सुवर्णादि ' हे दोन आग्नेय पदार्थ आयुर्वेदांत नाहींत. सुश्रुतांत विद्युद्दग्धाचें थोडेसें वर्णन असलें तरी ' इन्द्रवज्राग्निदग्धेऽ जीवति प्रकारयेत् '। (सु. सू. १३।३९) अविंधन हें त्याचें विशेष वर्णन पदार्थविज्ञानाचे दृष्टीनें महत्वाचें आहे. व तें न्यायांतच आहे. (ई) तसेंच सुवर्णाचें आग्नेयत्व आयुर्वेदांत कोठेंहि सांगितलेलें नाहीं. सुवर्ण चरकादिकांनीं विषनाशन सांगितलेलें असून रसग्रन्थांतून तें शीत-वीर्य, मधुररसविपाकी व आयुवर्धन सांगितलें आहे. परन्तु एतदितर सुवर्णाचा तेजस अगर आग्नेय हा गुण न्यायानेंच सांगितला आहे. ते आयुर्वेदीयाला अवश्य माहिती हवा. सुवर्णभस्म अगर पर्पट्यादि सुवर्णकल्प हे शीतवीर्य नाहींत; ते चांगले अग्निदीपक आणि विदाहि आहेत. शामकपथ्याभावीं त्यांचा दुष्परिणामच होईल, हें समजून घेण्यासाठी सोन्याचें आग्नेयत्व आयुर्वेदीयाला माहिती असावयास हवें, आणि हें आयुर्वेदांत नसून न्यायांतच वर्णिलेलें आहे. तेजःसंयोगानें होणारा द्विविधपाक (पीलुपाक व पिठर) हाहि न्याय-वैशेषिकांतच पहावयास मिळतो.

ई) वायु हा सूक्ष्म असा चरकानें सांगितला असून चक्रदत्तानें त्याचा अर्थ अदृश्य असा केला आहे. पण तो रूपरहित आहे हें ढळढळीत वर्णन न्यायांतच आहे. तसेंच न्यायानें केवळ ' स्पर्शवान् ' असेंच वायूचें वर्णन केलेलें आहे. आणि वायूचा स्पर्श त्यानें अनुष्णाशीत असाच दिला आहे. या ठिकाणीं शैत्य उष्णोपचारानें वायु कमी होतो अशा उपपत्तीनें सिद्ध करण्याचा प्रयत्न चक्रदत्तानें केला आहे. विकृत वायूचें स्पष्टीकरण होतें हें त्या टीकाकारांच्या लक्षांत आलें नाहीं. व त्याचा परिणाम विकृत आणि प्राकृत वायु यांचा घोंटाळा होण्यांत झाला आहे.

उ) गंधाचें सुरभि आणि असुरभि असें द्विविध वर्णन न्यायांत अधिक आहे.

ऊ) रसाचें षाड्विध्य पृथ्वीसापेक्ष असून केवळ जलांत मधुरच रस आहे हें न्यायोक्त वर्णन अवबोधक आहे.

ऋ) रूपाचें शुक्लनीलादि सप्तविधत्व सांगून तें सर्व पृथ्वीवरच असतें. जलांत अभास्वर शुक्ल

प्रंथ आणि कार्य

[illegible] वैद्य संमेलन [illegible] र. [illegible] च. वि. १[illegible] द्विविध वर्णन; त्यांतील [illegible] इत्यादींतून [illegible] राळेच [illegible]त्मक) असून ध्वनि हा वीचि-[illegible] न्यायानें आणि कर्द[illegible]यायानें खाली-वर-मागें-पुढें [illegible] चौफेर व एकसमयावच्छेदानें पसरतो [illegible] सर्वदूर वाहविला जातो. ‘तत्र शब्दसन्तानवदित्यनेन’ हें, पदार्थविज्ञानांतील अद्ययावत् वर्णनाबरहुकूम [illegible]केलें, वर्णन न्यायांतच आहे. सुश्रुतांत रसविक्षेपणाच्या दृष्टांतांत शब्दाचा केवळ उल्लेख आहे. स शब्दा-[illegible]सन्तानवदणुना विशेषेणानुधावत्येव शरीरं केवलम् । सु. सू १४।१६ ‘तीर्यग्गामित्वं रसस्योक्तं आर्चिः [illegible]सन्तानवदित्यनेनोर्ध्वंगामित्वं जलसन्तानवदित्यनेनाधोगामित्वामिति’ यावर टीका करतांना डल्हणानें शब्द हा [illegible]गामी आहे, व रसधातूच्या ऊर्ध्वाधोगामित्वासाठीं जल आणि आर्चि यांचाच क्रमानें दृष्टांत आद्य [illegible]हे असें स्पष्ट म्हटलें आहे. न्यायांतील वर्णन या दोन्हींप्रमाणें शब्दहि खालींवर जाणारा आहे असें आहे.

ल) मनाचें चित्यार्थत्व चरकानें सांगितलें आहे व सुखदुःखांच्या वेदनांचें प्रवर्तक कसें आहे तें [illegible]गितलें आहे, पण त्यांच्या उपलब्धीचेंहि तें साधन असल्याचें न्यायांतच वर्णन आहे.

ए) अनुमानाचें व्याप्ति-विशिष्ट-परामर्शासह पंचावयवी वाक्यांचे स्पष्टीकरणानें वर्तविलेलें अनु-[illegible] न्यायांतच अधिक आहे. चरकांत प्रतिज्ञादि पंचावयवाचें स्थापना या संज्ञेच्या स्पष्टीकरणांत वर्णन [illegible] आहे. (च. वि. ८ / ३१) तसेंच अनुमान म्हणजे ‘युक्त्यपेक्षी तर्कः’ हा विशेषहि त्यांत केला आहे. [illegible] प्रतिज्ञादिकांची स्पष्टता न्यायावरूनच येणारी. ती त्यावरून न शिकविल्यास चरकांतील त्यांच्या वाद-[illegible] केलेला वापर नीट समजणार नाहीं. स्वार्थानुमान आणि परार्थानुमान या रूपानें हें स्पष्टीकरण [illegible] केलें असून तें आयुर्वेदाला माहिती असणें जरूर आहे.

ऐ) चरकानें अहेतु या नांवाखालीं प्रकरणसम, संशयसम आणि वर्ण्यसम असे तीन हेत्वाभास दिले [illegible]. (च. वि. ८ /५७) परंतु न्यायानें दिलेले सव्यभिचार, विरुद्ध, सत्प्रतिपक्ष, असिद्ध आणि [illegible] हे मुख्य पांच, त्यांतीलच सव्यभिचाराचे पुन्हां साधारण, असाधारण व अनुपसंहारी असे तीन प्रकार, [illegible] असिद्धाचे आश्रयासिद्ध, स्वरूपासिद्ध आणि व्याप्यत्वासिद्ध हे तीन, असे एकूण न्यायानें नऊ हेत्वा-[illegible] सांगितले आहेत. त्यांची आयुर्वेदाला गरज आहे. एका उदाहरणानें हा मुद्दा सिद्ध करूं या. सव्यभि-[illegible] नांवाच्या हेत्वाभासाचा एक प्रकार जो साधारण अगर अनैकांतिक त्याचेंच उदाहरण येथें देतो, म्हणजे [illegible] वापरावा कशासाठीं हवा तें समजेल. मागें एका वैद्यानें “कफपित्तवाताद्रव्याणि गुणवत्त्वात् । [illegible]वादिवत् ।” असा पक्ष मांडला. पण यांतला ‘गुणवत्त्वात्’ हा हेतु, दोषाभाव जे धातु व मल त्यांवरहि [illegible], म्हणजे मागें म्हटल्याप्रमाणें तो अतिव्याप्त अगर Universal होतो. शरीरापुरतें बोलावयाचें तर धातु [illegible] मल हींहि द्रव्यें होतात. म्हणून बुध्द्या दुसरा हेत्वाभास मांडला. ‘कफपित्तवाता महिषमेषमर्कटाः । [illegible]वादिपृत्यादिचेष्टादिगुणवत्त्वात् । ’. वायुपित्तकफांना द्रव्यें म्हणतांना तीं कसलीं द्रव्यें म्हणजे त्यांचा [illegible]रांतील विशेष काय हें दाखविण्यासाठीं त्यांच्यामागें विशेषण लावलें नाहीं तर “पर्वतो वह्निमान्प्रमेय-[illegible]त् । प्रमेयत्वस्य वन्ह्यभाववर्तिन्हृदे विद्यमानत्वात् ॥ ” यासारखा हा साधारण अगर अनैकांतिक नांवाचा [illegible]भास होतो.

उपमानप्रमाणाचें चरकांतील वर्णन

ओ) उपमानाचें ‘ औपम्य ’ या नांवाखालीं चरकानें वर्णन केलें आहे, व तेथें दंडासारखा दंडक, [illegible]सारखा धनुस्तंभ, असा दृष्टांत दिला आहे. (च. वि. ८/४२) आणि ‘औपम्यं ’ नाम यदन्येनान्यस्य

साहचर्यमविकृत्य ।

पदपदार्थांसंबंधींचें ज्ञान तें नंतर—

त्याच्या स्मरणानें इतरांकडून माहि

औ) शक्तीचें वर्णन तर चरकादिग्रंथांत कोठेंहि नाहीं. केवळ एका ठिकाणीं चक्रदत्तानें 'वा

शक्तिः' व डह्लणानें 'वीर्यं शक्तिरुत्पत्तिविशेषः प्रभावः सामर्थ्यमित्यनर्थान्तरम् ।' असें म्हणून वीर्य

शक्ति अशी कल्पना दिली आहे. आयुर्वेदीय दोषविज्ञानाला आणि रसादिविज्ञानाला एवढीहि मा

पुष्कळच उपयोगी आहे. पण शक्ति ही नैसर्गिकाबरोबर अधिष्ठापित असते व त्यामुळें व्यवहारांतील संके

रूढ संज्ञा समजून घेतां येतात. हें "अस्मात्पदार्थादयमर्थो बोद्धव्यः इति ईश्वरेच्छासंकेतः शक्तिः"

न्यायोक्त वर्णनावरून समजतें.

अं) चरकानें वादपद्धतींत अनेक वादस्थळें दिलीं आहेत. त्यांत वाक्यदोष याखालीं न्यून

अनर्थक-अपार्थक-विरुद्ध, असे ५ प्रकार सांगितले आहेत. पण लक्षणा म्हणून जो एक विशिष्ट प्रकार न्या

सांगितला आहे व जो साहित्यांतहि वारंवार येतो तो चरकांत नाहीं. आकांक्षा, योग्यता, आणि सं

यांचे अभावामुळें खरें सद्वाक्यहि अप्रमाण होतें, तसेंच लक्षणा न समजल्यास वाक्यार्थच समजत

'गंगायां घोषः' (गंगेच्या कांठावर गौळवाडा आहे, गंगेंत नाहीं.) हें त्याचें प्रसिद्ध उदाहरण आहे.

जहल्लक्षणा आणि अजहल्लक्षणा हे दोन प्रकार आणि त्यांचीं क्रमानें 'मंचाः क्रोशन्ति' आणि 'छ

गच्छान्ति' हीं उदाहरणें, तसेंच 'अग्निर्माणवकः' अशी गौणी लक्षणा आणि लक्षणेंत अंतर्भूत असलेली

हें सर्व आयुर्वेदीयालाहि, आयुर्वेदाचें कां होईना साहित्य काळजीपूर्वक वाचण्यासाठीं, समज

अगत्याचें आहे.

लोहभस्म (वारितर) २४ रु. सेर

	भाव प्रति सेर		भाव प्रति सेर
शुद्ध शिलाजीत	३२ रु.	मण्डूरभस्म	२० रु.
वंगभस्म	३६ ,,	शंखभस्म	६ ,,
प्रवाळभस्म	३२ ,,	शृंगभस्म	१४ ,,
अभ्रकभस्म [वज्र] भस्म	४६ ,,	कपर्दिकाभस्म	८ ,,
कांतलोहभस्म	२८ ,,	मुक्ताशुक्तीभस्म	१० ,,
स्वर्णमाक्षिक भस्म	२८ ,,	गोदंतीभस्म	३॥ ,,
रससिंदूर	८० ,,	चन्द्रप्रभावटी	२८ ,,
स्वर्णराजवंगेश्वर	८८ ,,	स्वर्णसिंदूर	३ रु. तोळा

हमारे कारखाने में २०० मन शिलाजीत प्रति वर्ष शास्त्रोक्त पद्धति से शुद्ध की जाती है । अशुद्ध शिलाजीत पत्थर का भाव ८० रु. प्रति मन है ।

सूचना:— उपरोक्त भावों पर कोई भी औषधि २० तोला से कम न भेजी जावेगी ।

हमारा सेर ८० तोला का है ।

काश्मीर आयुर्वेदिक वर्क्स, नं. १ —अमृतसर

[illegible] ग्रंथ आणि कार्यग्रंथ असे भेद करून [illegible] च. वि. १।५२) उलट विमानस्थानांत [illegible] कारण, [illegible] इत्यांदींतून [illegible] राळेच वर्णन आहे. तेथें कारण म्हणजे हेतु [illegible] सांगून जें करतें तें कर्ता व हेतु तें कारण (तत्र कारणं नाम तद्यत्करोति, स एव हेतुः कर्ता) (च.वि.८।६९) असें लक्षण दिलें आहे. परंतु समवायी, असमवायी आणि निमित्त असे कारणांचे सोदाहरण तीन प्रकार न्यायांतच दिलेले आहेत. चरकानें समवायी शब्दाचा उपयोगहि करून घेतला आहे. (समवायी तु निश्चेष्टः कारणं गुणः। सू. १।५०) परंतु त्याचा अर्थ त्यानें सांगितला नाहीं. चक्रदत्तानेंच तो स्पष्ट केला आहे. पण ('समवायि कारणं यद् द्रव्यमेव हि द्रव्यगुणकर्मांणां समवायि कारणम्। समवायि कारणं च तद्यत्स्वसमवेतं कार्यं जनयति। गुणकर्मणी तु न स्वसमवेतं कार्यं कुरुतः। अतो न ते समवायिकारणें') समवायी, असमवायी व निमित्तकारण या प्रकारांसह चरकानें सांगितले नाहींत. अयुतसिद्धत्व म्हणजे एक असलें तरच दुसरें असतें हें त्यांत नाहीं. अर्थात् चरकानें द्रव्याचा गुणांशीं अपृथक्भाव या रूपानें तो सांगितला आहे. पण त्यांत तंतु–पटसंयोगाच्या अगर मृत्तिकाघटाच्या दृष्टांतांत न्यायाप्रमाणें स्पष्टता आलेली नाहीं. चक्रदत्तानें तर वैशेषिकांच्या 'अयुतसिद्धाचाच' हवाला दिला आहे.

(क) कार्याबाबतहि आरंभादिवाद समजून घेणें अगत्याचें आहे. त्यांतील आरंभवाद हा न्यायवैशेषिकांचा व सत्कार्यवाद सांख्यांचा हे दोन तरी आयुर्वेदीयाला माहित असावयास हवेत. आरंभवाद म्हणजे सतापासून असत् उत्पन्न होतें, आणि सत्कार्यवाद अगर परिणामवाद म्हणजे सतापासून सत् उत्पन्न होतें तें. हे दोन्ही वाद द्रव्यगुणाला पोषक आहेत. ते न्यायसांख्यांतूनच पहावयास हवेत.

(ख) द्रव्यांचें वर्णन करतांना तें कर्म व गुण यांचें आश्रयस्थान व त्यांचें समवायी कारण असतें असें (च. सू. १।...) सांगितलें.

(ग) परत्वापरत्वादींचें चरकानें आणि चक्रदत्तानेंहि स्पष्टीकरण दिलेलें आहे. पण तसें करतांना त्यानें पर्याय म्हणून वैशेषिकांचाहि अर्थ दिला आहे. (किंवा परत्वापरत्वें वैशेषिकोक्ते ज्ञेये।) तो अर्थात् वैशेषिक तंत्राशिवाय नीट समजणार नाहीं.

चरकानें एकंदर ४१ गुण सांगितले आहेत. त्यांत द्रव्यविज्ञानाचे गुर्वादि वीस, पंचमहाभूतांचे रूपादि पांच अर्थ, बुद्धि, इच्छा, द्वेष, सुख, दुःख, प्रयत्न, परत्व, अपरत्व, युक्ति, संख्या, संयोग, विभाग, पृथक्त्व, परिमाण, संस्कार आणि अभ्यास हे नैय्यायिकांचे असे दिले आहेत. (च. सू. १।४९ व २६।२९–३५, पण 'द्रव्यत्वजातिमत्वं गुणवत्वं वा 'द्रव्यसामान्यलक्षणम्' हें न्यायोक्त वर्णन फार समर्पक आहे. विशिष्ट जातिमत्व ज्यावर नसेल तर तें द्रव्य म्हणतां येणार नाहीं. भेसळीचें वा कृत्रिम द्रव्य खरें द्रव्य नव्हे हें समजण्यास याचा उपयोग आहे. तसेंच द्रव्याचें द्रव्यत्व त्याच्या गुणांवर अवलंबून आहे. निर्गुण वा हीनगुण द्रव्य निरुपयोगी ही माहितीहि एरवी समजणार नाहीं. तसेंच एखाद्या द्रव्याची वा त्याच्या संज्ञेची व्याख्या करतांना अतिव्याप्ति, अव्याप्ति व असंभव हें त्रिदोषत्रय वगळून ती करावी लागते हें न्यायावरूनच समजतें. त्रिदोष हीं द्रव्यें आहेत हें विधान अतिव्याप्त आहे. कारण धातु व मळ हींहि द्रव्येंच आहेत. दृश्य ते दोष हें अव्याप्त विधान आहे. कारण दोष शरीरांतील सूक्ष्म देहावयवांत व्यापी आहेत. दोषांना अविकृतावस्थेंत धातु म्हणावें हें असंभनीय आहे. कारण शास्त्रांत तसें सांगितलेलें नाहीं.

गुर्वादिगुणांबाबतहि कांहींसें अ

१) एकापासुन नवापर्यंतची ल

हें अनित्य ही माहिती आयुर्वेदांत नाहीं. चरक ज्या म्हणजे फ... गाणत' अथा म्हटलें आहे. (च. सू. २६।३२) संयोग आणि विभागांचें विभागशः वर्णन चरकांत दिलें आहे. पर त्याला आकुंचन व प्रसरण या क्रिया कारण असतात, ही स्पष्टता चरकांत दिलेली नाहीं.

२) खालीं जाणारा भाव तो गुरुत्व व वर जाणारा तो लघु व त्यांना अनुक्रमें पृथिवी-अप् आणि आग्नि-वायू ही कारण असतात हें वैद्यकाचें वर्णन ठीक आहे. पण खालीं जात असतांना अनेक पात घे गुरुद्रव्य जातें हें वर्णन न्यायावरूनच समजतें. (द्वितीयादिपतनस्य वेगासमवायिकारणत्वाद्वेगेऽतिव्याप्ति-वारणाय आद्येति। (त. दी.)

३) गुरुत्वाचें जसें आद्यपतनत्व तसेंच द्रवत्वाचेंहि आद्यस्यंदनत्व. त्यांतहि विशेषतः द्रवत्व जलाचेंच केवळ नाहीं, तर पृथ्वी आणि तेज यांनाहि द्रवत्व येतें हें घृतादि व सुवर्णादि यांच्या उदाहरणांनी न्यायांत सांगितलेलें आहे. हीं नैमित्तिक द्रवत्वें असलीं तरी घनद्रव्याचें द्रवीभवन व द्रव द्रव्याचें बाष्पीभवन या अवस्था समजण्यास यांचा उपयोग आहे.

४) स्नेह हा गुण चूर्णाला पिंडीभाव आणण्यास कारण असतो, आणि त्याचें अप् हें महाभूत अधिष्ठान असतें, ही माहिती आयुर्वेदीयाला अवश्य हवी. एरवी कफाचें कार्य जें संघातोपचय इ० तसेंच इतर स्नेहन आणि संयोगी कार्य तें सुखानें समजूं शकणार नाहीं.

(घ) चरकानें कर्म हें संयोग व विभाग या क्रियेचें कारण असतें असें सांगितलेलें ठीक आहे. प हा वस्तुतः कर्माचा परिणाम आहे. कर्म ज्या क्रियेनें घडतें ती क्रिया म्हणजे हालचाल, व ती संकोचविक अशी उभयविध असते हें 'चलनात्मकं कर्म' व उत्क्षेपणाक्षेपणाकुंचनप्रसारणगमनानि पंचकर्माणि' न्यायोक्त वर्णनानेंच स्पष्ट समजतें. नुसत्या कर्मांचेंच काय पण वायूचें स्वरूप समजून घेण्याचें दृष्टीनेंहि फार उपयोगी आहे.

(ङ) चरकानें अभाव हा पदार्थ मानला नाहीं. वैद्यक हें भाववाचक शास्त्र असल्याचा त्याचा नि निश्चय हें त्याचें कारण दिसतें. परन्तु एखादि गोष्ट नाहीं असें सांगावयाचें झालें तर तिच्या नसण्याचें प परत्व व सापेक्षत्व हें वैद्यकालाहि नको आहे काय? उदा० एखादा रोग एखाद्या रोग्याला नाहीं म्हणतांना तो आतां नाहीं, तरी पूर्वी नव्हतां कां? व पुढें होणार नाहीं कां? तसाच झालेला नाहींसा झाले आहे कां? कां अजिबात' त्याला होणार नाहीं? अथवा एक रोग झालेला म्हणतांना तो दुसरा नव्हे भाषा ज्या ठाकठिकीनें वैद्याला मांडावी लागते ती अभाव ज्ञानानेंच होणारी म्हणून न्यायोक्त प्रागभ अत्यंताभाव, प्रध्वंसाभाव आणि अन्योन्याभाव या प्रकारांसह अभाव त्याला समजणें जरूर आहे.

[च] द्रव्याची उत्पत्ति परमाणूपासून द्व्यणुकादि क्रमानें होते व त्याच क्रमानें अणूंत लय त्याचा नाश होतो. पण अणु मात्र [विशेषतः पृथ्वी-अप्-तेज-वायूंचे] नित्य असतात, हें वैशेषिकां ज्ञान आयुर्वेदीय द्रव्यगुणविज्ञानाला साहाय्यक आहे.

[छ] दिशा हें द्रव्य चरकानें सूत्रस्थानांत नुसतें उल्लेखिलेलें आहे. प्राच्यादि दिशांच्या गुणवर्णन द्रव्यसंग्रहांत सुश्रुतानें केलेलें आहे. परंतु दशदिशांची सिद्धि कशी होते हें चरकसुश्रुतांत ती वैशेषिकावरूनच समजून घ्यावी लागते. (वै. प्रशस्तपाद)

म [illegible] वैद्य संमेलन [illegible] र. [illegible] ल्या त [illegible] णिरसाचे मानला आहे.

[illegible] न्तर्विच फुरते [illegible] सावेसें वाटते [illegible] पु सांख्यांच्या स [illegible] असत. हें

[illegible] सांख्यातसंख्येयैः सहासीनं पुनर्वसुः [illegible] प्रच्छ वह्निवेशः स्वसंशयं संवाद की कांहीं १३।३)

[सांख्यैः सहावस्थाननिदर्शनमात्रियस्यकर्तृत्वांच्या नियमनःसमाधानोपदर्शनार्थम् । ( ) मुंबईस यावरून सिद्ध होतें. पण एवढेंच नाहीं, त्यांनीं आपल्या तत्त्वज्ञानाला सांख्य तत्त्वज्ञान किती सहाय्यक आहे हें स्पष्टच म्हटलें आहे. [अ] दृष्टांत या संज्ञेच्या स्पष्टीकरणांत ' यथा आदित्यः प्रकाशकस्तथा सांख्यज्ञानं प्रकाशकमिति । [च. वि. ८।३४] असें म्हटलें आहे.

आ] सांख्यांचीं २५ तत्वें जशींच्या तशींच चरकसुश्रुतांनीं घेतलेलीं आहेत. फक्त सांख्यांचा पुरुष हा जसा उदासीन तसा त्यांनीं मानलेला नाहीं. तर तो प्रकृत्यादिकांना सहाय्यक होतो व पंचमहाभूतें आणि आत्मा मिळून पुरुष ही संज्ञा पावतो, हा त्यांचा सिद्धांत निराळा आहे. यालाच त्यांनीं कर्मपुरुष असें म्हटलें आहे. (च. सू. १।१६।१७) यामुळें त्यांनीं पंचविंशऐवजीं चोवीस नत्त्वें सांगितलीं. तथापि दोहींचें तत्वज्ञान दोहोंचें एकच आहे. पुरुषाच्या मोक्षासाठीं प्रकृतीची स्वाभाविक प्रवृत्ति असते. याला सुश्रुतानें वत्सदर्शनाबरोबर मातेच्या स्तनाच्या उत्पत्तीचा दृष्टांत दिलेला आहे. [सत्यपि अचैतन्ये प्रधानस्य पुरुषकैवल्यार्थं प्रवृत्तिमुपादिशन्ति क्षीरादींश्चात्र हेतुनुदाहरन्ति । (सु. शा. १।८). पण त्यांच्या स्पष्टीकरणासाठीं ' वत्सविवृद्धिनिमित्तं क्षीरस्य यथा प्रवृत्तिरज्ञस्य । पुरुषविमोक्षनिमित्तं तथा प्रवृत्तिः प्रधानस्य । (सां. का. ५७) या सांख्यकारिकेकडेच वळावें लागतें.

इ] सत्व-रज-तमाचा आयुर्वेदांत अनेक ठिकाणीं उल्लेख आहे. पण त्यांच्या व्याख्येसाठीं सत्वं लघु प्रकाशकमिष्टमुपष्टम्भकं चलं च रजः । गुरु वरणकमेव तमः प्रदीपवच्चार्थतो वृत्तिः ' ॥ [सां. का. १३।१३] या सांख्यकारिकेकडेच नजर टाकावी लागते.

ई]मनाचे व्यापार सांगतांना अंतःकरणाचें बुद्धि व अहंकार आणि मन असें त्रिविध वर्णन, दशेंद्रिय तत्त्वानें त्याचें बाह्य स्वरूप तसेंच तें वर्तमानकाळीं असतें पण अंतःकरण मात्र भूत भविष्य वर्तमान या तिन्ही काळीं असतें. तथापि बुद्धि, अहंकार, मन, आणि इंद्रिय यांची एकसमयावच्छेदानें प्रवृत्ति होते. ही माहिती समजून घेण्यासाठीं सांख्यकारिकेकडे (३० आणि ३३) वळावें लागतें.

गंडमाळेवर सरडातेल *

चार वर्षांचा एक मुलगा. त्याच्या एका बाजूच्या गंडमाळा कांहीं सुजल्या, कांहीं पिकून फुटून वाहात होत्या. मुलाला ताप नव्हता तरी आजारी, अशक्त, चिडचिडा व दिसण्यांतहि विद्रूप, काळवणलेला व रोगट. त्या मुलास २ वर्षानन्तर पाहण्यांत आलें. तेव्हां तब्येत चांगली, गौरवर्ण झालेला व पूर्वीचाच तो मुलगा, असें न ओळखतां येण्याजोगा फरक झालेला.

त्याचे पालकानें हिरवा सरडा [रंग बदलणारा मोठा सरडा] मारून त्याचें तेल तयार करून त्या गंडमाळेस लावलें. इतर कांहींहि औषध केलें नव्हतें.

(सही) वै. पु. स. वाघमारे

एस्. एम्. पी. सेंटर, गिरगांव

---

* आयुर्वेद-औषधी-भवनांत असें सरडातेल तयार मिळूं शकतें. भाव १० तोळे रू. २ असा आहे.

—व्यवस्थापक

चिंतामा

मुंबईच्या एका औषधी दुकानांत पुढील चालला होता. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (वाई) आपल्या कन्येच्या विवाहाचें निमंत्रण देण्यासाठीं सहकुटुंब तेथें आले होते. बरोबर श्री. साठे (वाई) हेहि होते.

पाहुण्याचें आदरातिथ्य करण्याच्या उद्देशानें दुकानदार त्यांना म्हणाला 'उन्हाची वेळ आहे, तेंव्हा रस मागवतो.'

दुसरा रस नको

तर्कतीर्थ म्हणाले "आम्हाला दुसरा कोणताच रस नको, फक्त चिंतामणीरस पाहिजे."

दुकानदारास आश्चर्य वाटलें. तो म्हणाला "आमच्या जवळ त्रैलोक्यचिन्तामणी आहे तो देऊं कां ?" तर्कतीर्थ म्हणालेः- "आपल्या या औषधांत 'त्रैलोक्य' शब्द अधिक आहे. व रस हा शब्द कमी आहे सबब त्यांत दोन दोष आहेत. आम्हाला 'चिन्तामणी रस' हवा आहे. त्यांतला 'रस' कमी नको व्हावयास, किंवा त्यांत 'त्रैलोक्य' वाढावयास नको. मीमांसेप्रमाणें पाहतां शब्दाला एखादें विशेषण लागलें अगर कमी झालें तरी ती वस्तु बदलते."

घडलेली हकीकत सांगितली

मग त्यांनीं घडलेली हकीगत सांगितली ती अशी– "वाई येथें स्वामी केवलानन्दसरस्वती हृदयविकारानें आजारी होते. त्यांच्या प्रकृतीला 'चिंतामणीरस' मानवेल, तो आणावा असें आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री यांनीं प्रकृति पाहून सुचविलें होतें. वाई, सातारा, पुणें, मुंबई येथील औषधी दुकानांत चौकशी केली, पण चिंतामणीरस मिळाला नाहीं म्हणून नाशिकला आयुर्वेद सेवा संघाकडे मागणी केली.

तार मिळाली नाहीं

मध्यंतरीं प्रकृति जरा बरी होती म्हणून रंगूनला भरणाऱ्या धर्मपरिषदेला जाण्यासाठीं मीं मुंबईस गेलो व इकडे स्वामीजींची प्रकृति एकाएकीं इतकी बिघडली ल ध्या म्हणजे ? भरंवसा उरला नाहा. च लोगांचें विभ केलेली तार मला मिळाली प्रवासाला निघून गेलो.

चिंतामणि रस आला

स्वामीजींना काय उपाय करावा अशा वि रांत वाईची मंडळी असतां नेमके त्याच वेळीं चि मणीरसाचें पार्सल आलें. लगेच तें घेऊन म देण्यांत आली व मात्रा दिल्यापासून १० मिनि प्रकृतीस आराम पडूं लागला. त्यानंतर १५ दिव पर्यंत स्वामीजींची प्रकृति बरी राहिली. सर्वांना चिन्तामणीरसाचा प्रभाव पाहून आश्चर्य वाटलें.

"रस आणूं कां ?" असें विचारतांच पं. लक्ष्मण यांनीं चिन्तामणीरस मागितला याचें कारण गुरुदेव स्वामी केवलानन्दजी यांची शेवटची भे रसामुळेंच घडली अशी त्यांची भावना आहे. याचे विकारी लोकांनीं चिन्तामणीरसाचा करून अनुभव घ्यावा अशी त्यांची सूचना आ

चिन्तामणिरसाचा पाठ पुढीलप्रमाणें आहे.

रौप्यभस्म २ भाग, सुवर्णभस्म १ भाग, भस्म २ भाग, अंबर ४ भाग, शिलाजतु ४ भाग, भस्म ४ भाग, लोहभस्म ४ भाग, अभ्रकभस्म ४ पारा, गंधक ४।४ भाग.

भावना-- चित्रकमूळ काढा, माकास्वरस अर्जुनवृक्षसालीचा काढा.

१।१ गुंजेची गोळी सकाळ सायंकाळ

अनुपान—मध, बलामूळ काढा.

पवित्र
नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोळा
हिमालय कस्तुरी रु. ४२ तो
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तो
लिहाः-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

वैद्य संमेलन

मेलन, भुसावळ

म्हणावेसें वाटते

ले ठराव

सूचक

ठराव १- १) ही सभा खालील सद्वैद्यांच्या निधनाबद्दल शोक प्रदर्शित करीत आहे.:—

१ वैद्यभूषण पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर, उमरावती; २ वैद्यराज माने इन्दूरकर नागपूर

३ वैद्यराज ना. ह. ऊर्फ बापू जोशी, ठाणे

—अध्यक्षाकडून

२) मुंबईराज्य सरकारनें आपल्या राज्यांत सुरू केलेल्या आयुर्वेदाच्या स्वतंत्र विभागावर आयुर्वेदाचार्य पंडित हरदत्तशास्त्री यांची नियुक्ती केल्याबद्दल आजचें हें संमेलन पंडित हरदत्तशास्त्री यांचें अभिनंदन करीत असून त्यांचे राजवटींत आयुर्वेदशास्त्र व तदुपजीवी वैद्यवर्ग यांची सर्वांगीण उन्नति होईल अशी आशा व्यक्त करीत आहे.

—अध्यक्षाकडून

३) शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांना कमींत कमी १९३८ च्या वैद्यकाय कायद्यान्वयें रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर समजले जावें व तत्संबंधीं सर्व अधिकार देण्यांत यावेत आणि ही व्यवस्था केली असल्याची अधिकृत सरकारी घोषणा शीघ्रातिशीघ्र करावी, म्हणजे लौकरच सुरू होणाऱ्या नव्या वर्षी विद्यार्थ्यांना हा शिक्षणक्रम घेण्यास उत्तेजन मिळेल.

—अध्यक्षाकडून

म. प्रां वै. मंडळाच्या घटनेंतील सुधारणा

४) म. प्रां. वैद्यमंडळाचें घटनेमध्यें खालील दुरुस्त्या व सुधारणा करण्यांत आलेल्या आहेत.

१) म. प्रां. वैद्य मंडळाची वार्षिक वर्गणी रुपये दोन देणारा वैद्य, मंडळाचा सभासद होईल.

२) रु. १०१ व रु. ५१ एकदम देणारा सभासद हा अनुक्रमें ' आश्रयदाता सदस्य ' व ' आजीव सदस्य ' समजला जावा.

३) म. प्रां. वैद्य मंडळाचें भूतपूर्व अध्यक्ष हे म. प्रां. वैद्य मंडळाचे आजीव सदस्य समजले जावेत व ते स्थायी समितीचे पदसिद्ध सदस्य समजावेत.

४) संमेलनापूर्वी स्वागतमंडळाचे व प्रांतीय मंडळाचे कमीतकमी दोन महिने सभासद झाले असतील त्या वैद्य स्वागत सभासद व प्रांतीय सभासदांना अध्यक्षपदाकरितां मत देण्याचा अधिकार राहील.

५) ज्या सालीं संमेलन होण्याची शक्यता नसेल त्या सालीं म. प्रां. वैद्य मंडळाच्या सर्वसाधारण सभासदांनीं सभा भरवून अध्यक्ष निवडावा, हें कार्य ३१ मार्चपूर्वी सभासदांचे साहाय्यानें करावें.

६) संमेलनांत ठराव पाठविणारांनीं त्यासंबंधीं योग्य व पूर्ण माहितीचें टांचण पुराव्याचे कागदासह कार्याध्यक्षाकडे संमेलनापूर्वी शक्य तितक्य लौकर पाठविले पाहिजे. प्रस्ताव पाठविणारांनीं संमेलनांत स्वतः उपस्थित असावे व ते ठराव मांडावे; परन्तु ते उपस्थित नसले तरी त्या ठरावांशीं सहमत असणारांनाहि असे ठराव मांडतां येतील. मात्र त्यासंबंधीं पूर्ण माहितीसह ते ठराव मांडण्याची जबाबदारी त्यांचेवर राहील.

७) स्थायीमंत्री हे

८) म. प्रां. वैद्य ल ाभ्य
असतील, त्या जिल्ह
त्या जिल्हाशाखांना ख ल्या म्हणजे ए भरंव

९) म. प्रां. वै. मंडळाचा निधि, बँक ऑफ महाराष्ट्र, नासिक शाखा, यांत म. प्रां. वैद्यमंडळ या संस्थेच्या नांवें ठेवून अध्यक्ष, कोषाध्यक्ष व स्थायीमंत्री यापैकीं कोणाहि दोघांच्या सहीनें पैशांचा व्यवहार व्हावा.

१०) म.प्रां. वै. मंडळ ही संस्था नि. भारत आयुर्वेद महामण्डळाप्रमाणेंच मुंबई राज्य वैद्य संमेलन या संस्थेशींहि संबद्ध राहील.

११) प्रां. वै. मंडळाचें कार्यालयस्थान म. प्रां. वै. मंडळाचे चलमंत्री जेथें राहत असतील तेथें राहील. व स्थायी कार्यालय, संमेलनानें एकदा ठरविलेल्या ठिकाणीं निदान पांच वर्षें राहील.

१२) १९३८ च्या कायद्याखालीं ३७ साव्या कलमाप्रमाणें व्यवसाय करणाऱ्या तसेंच रजिस्टर होण्यास व वैद्यक व्यवसायास पात्र असलेल्या वैद्यास या मंडळाचे सभासद होतां येईल.

ठराव नं. ५– हुबळीचे वैद्य पां. वि. जायदे आयुर्वेदतीर्थ हे दंतोत्पाटन क्रियेंतील आपलें कौशल्य दाखविण्यासाठीं अमेरिकेस जात आहेत, याबद्दल या संमेलनास फार आनंद होत आहे. वैद्यराज जायदे यांचा प्रवास सुखाचा होऊन ते आपल्या कार्यांत यशस्वी होऊन सुखरूप परत यावेत अशी शुभकामना ही सभा व्यक्त करीत आहे. त्यांना अल्पसें साहाय्य म्हणून २५ रुपयांची प्रतीकात्मक देणगी ही सभा देत आहे.

सूचक— वैद्य ना. ह. जोशी अनुमोदक—दत्तात्रेयशास्त्री जळूकर

ठराव नं. ६– आयुर्वेदीय सिद्ध औषधींच्या नांवानें विक्रीस येणाऱ्या नकली औषधाना आळा बसावा म्हणून मुंबई सरकारनें पं. शिवशर्माजी (अध्यक्ष), वैद्य गं. वि. पुराणिक, वैद्य वल्लभराम वै.प्रधानभाई हंसराज व मुंबई राज्याचे ड्रग्जकंट्रोलर यांची एक समिति नेमली आहे; तसेंच शुद्ध वनस्पतींचा पुरवठा वैद्यांना व आयुर्वेदीय औषधी कारखानदारांना योग्य किंमतींत व्हावा म्हणून वै. बापालाल (अध्यक्ष) वै. ग. नी. पटवर्धन, वै. मोतीराम नारायण जोशी, वै. वा. स. मराठे, कॉन्झर्वेटर ऑफ् फारेस्टरिसर्च व ए. एन्. नामजोशी (सेक्रेटरी) यांची एक समिति नेमली आहे. सरकारच्या या धोरणाबद्दल आजचें संमेलन सरकारचें अभिनंदन करतें. व वैद्यांनीं या समितीना सहकार्य द्यावें अशी शिफारस करीत आहे.

—अध्यक्षाकडून

ठराव नं. ७– मुंबई राज्यांतील बोर्ड ऑफ आयुर्वेद आणि युनानी सिस्टिम्स ऑफ मेडिसिन या संस्थेची नवीन निवडणूक जवळच आली आहे. अशा वेळीं या निवडणुकींत योग्य उमेदवार उभे करण्यासाठीं सर्व प्रांतीय मंडळांसह विचारविनिमय करून योजना आखण्याकरितां खालीलप्रमाणें समिति नियुक्त करण्यांत येत आहे. व त्या समितीस २ अधिक सभासद घेण्याचा अधिकार देत आहे.

(१) वै. वेणीमाधवशास्त्री जोशी, (२) वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित, (३) वै. ना. ह. जोशी, (४) वै. वि. म. गोगटे— निमंत्रक (५) वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर.

या कार्यास लागणाऱ्या खर्चासाठीं १०१ रुपयापर्यंत खर्च करण्याची सत्ता ह्या समितीला देण्यांत येत आहे.

सूचकः— विष्णुशास्त्री दाते अनुमोदकः— ह. वा. परांजपे

…ालेलें विश्लेषणात्मक संशोधनाचें काम … वैद्य संमेलन… र. … असें झाल्याशिवाय त्याचा कांहीं उपयोग … …ण्या उन्नती… संमेलनास म्हणावेसें वाटते … अ… श्री.

सूचक– माध…शास्त्री जोशी अनुमोदक– ना. ह. जोशी

ठराव ९–मुंबई राज्य आयुर्वेद संशोधन मंडळातर्फे चाललेल्या आयुर्वेद कोशाचें काम आवश्यक व …द्ध असलें तरी त्यांत हजार वर्षांपूर्वीच्याच ग्रंथांतील शब्दांचा समावेश आहे, नंतरच्या मदनपालादि …ंटु, भावप्रकाश, आयुर्वेदप्रकाश इत्यादि वैद्यांच्या रोजच्या उपयोगांत येणाऱ्या ग्रंथांतील शब्दांचाहि …वेश ह्या कोशांत व्हावा अशी या अधिवेशनाची मुंबई सरकारला विनंति आहे.

सूचक– माधवशास्त्री जोशी अनुमोदक– एस्. आर्. देशपांडे

ठराव १०– म. प्रां. वैद्य मंडळाची मुंबई सरकारला अशी विनंती आहे कीं, मुंबई राज्य आयुर्वेद …धन मंडळातर्फे आयुर्वेद पाठ्यक्रमानुसार बनलेल्या स्वस्थवृत्त या ग्रंथाची संस्कृत भाषा व आशय …ंड स्खलितप्रचुर, गैरसमज निर्माण करणारा, पाठ्यपुस्तकास न शोभणारा, अनधिकारी व अतज्ञ अशा …कडून लिहिला गेला असावा असें त्या ग्रंथाच्या अवलोकनावरून स्पष्टपणें कळून येतें. अशा ग्रंथावर …रेदीय म्हणविल्या जाणाऱ्या संशोधनसंस्थेतर्फे होणारा खर्च अस्थानीं व आयुर्वेदाच्या प्रतिष्ठेला न …णारा आहे, असें या सभेचें स्पष्ट मत आहे.

सूचक– माधवशास्त्री जोशी अनुमोदक– वेणीमाधवशास्त्री जोशी

ठराव ११– शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत प्रवेश मिळण्यासाठीं मान्य केलेल्या परीक्षांपैकीं कांहीं …सरकारी पत्रकांतून कमी केलेल्या आहेत. त्यामुळें केवळ शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत प्रवेश मिळविण्याचे …र्ने संस्कृत परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे शारीरिक, आर्थिक व मानसिक श्रम तसेंच आयुष्य- …चें एक वर्ष नुकसान होणार आहे. तेव्हां सरकारनें नवीन जाहीर केलेलें पत्रक Appendix G. हें एक …तर अमलांत आणावें. व आनन्दाश्रम किल्लापार्डी यासारख्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशास …ता द्यावी व त्यांची सोय करावी अशी विनंति आहे.

कलकत्ता संस्कृत असोसिएशनतर्फे झालेल्या काव्य– प्रथमेचा निकाल ३० मे १९५५ पूर्वी जाहीर …म्हणजे विद्यार्थ्यांना शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत प्रवेश मिळण्याचें दृष्टीनें सोईचें होईल अशी या …ाची विनंति आहे.

सूचक– वै. श्री. द. जळूकर अनुमोदक– वै. भगवंत त्र्यंबक वैद्य,

ठराव १२– बोर्ड ऑफ आयुर्वेद आणि युनानी सिस्टिम्स ऑफ मेडिसिनच्या आजपर्यंत झालेल्या …णुकीत बोर्डाच्या रजिस्ट्रारला रिटर्निंग ऑफीसर म्हणून नेमण्याची प्रथा चालू आहे. परन्तु भूतकालीं …ा निवडणुकींचें वेळीं नेमलेल्या रिटर्निंग ऑफीसरची कारकीर्द लक्षांत घेतां लौकरच होणाऱ्या …या निवडणुकीचे वेळीं विश्वासू, निःपक्षपाती वृत्तीचा रिटर्निंग ऑफीसर नेमण्याची जरूरी आहे ही …हें संमेलन सरकारचें ध्यानीं आणीत आहे.

सूचक– भगवंतराव वैद्य अनुमोदक– श्री. रा. करंजीकर

ठराव १३–शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रम सर्वत्र सारखा व सुसूत्र होण्याचे दृष्टीनें पाठ्यग्रंथ निर्माण …ासाठीं शुद्ध आयुर्वेद समितीनें एक उप समिति नेमली आहे. हें कार्य त्वरित घडून आणणेसाठीं …हाय्य सरकारनें करावें अशी ह्या संमेलनाची सरकारला विनंती आहे.

सूचक– वैद्य वाटवेशास्त्री, बेळगांव अनुमोदक– बिंदुमाधव पंडित

ठराव १४- कामगार आरो [illegible] करणें, सर्वमान्य औषधी सहज व सुल [illegible] योग्य औषधांचा पुरवठा करणें, आणि इ [illegible] ल्या, त्या सर्वहि मागण्या शीघ्र [illegible] सरकारनें सहानुभूतीनें लक्ष्य द्यावें अशी हें [illegible] सरकारला विनंती करीत आहे.

सूचक-रामभाऊ भोगे अनुमोदक- माऊ

ठराव १५- म. प्रां. वै. मंडळानें एक समिति नेमून सरकारच्या एस्. एम्. पी. ये त्यावरील वैद्यांची सद्यः स्थिति काय आहे व डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड दवाखान्यावर काम करणाऱ्या सद्यःस्थिति व फलश्रुति काय आहे याची चौकशी करावी व त्याचा रिपोर्ट डॉयरेक्टर आयुर्वेद याजकडे सहानुभूतिसाठीं पाठवावा. या समितीचे निमंत्रक वैद्य वि. म. गोगटे हे असून वै ह. जोशी व बिंदुमाधवशास्त्री पंडित हे दोन सभासद आहेत.

सूचक-- श्री. ना. फाटक अनुमोदक भा. श्री. देशपं

ठराव १६- जे औषधी कारखानदार आपले औषधी कारखान्यांत कोठल्याहि कारणा अल्कोहोल घेतात, त्या कारखान्याखेरीज इतर औषधी कारखानदारांवरील सरकारनें घातलेले आसवारिष्टा सर्व निर्बंध रद्द करण्यांत यावें असें या सभेचें मत आहे.

सूचक- ना. धों. नाटेकीकर अनुमोदक- विष्णुशा

ठराव १७- शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमाच्या अध्ययनकार्यासाठीं अनुभवी व निष्णात अ तयार करण्याची फार आवश्यकता आहे. त्यासाठीं आजचें हें संमेलन असे अध्यापक तयार करण् त्रैमासिक अभ्यासवर्ग सुरूं करावेत अशी मुंबईच्या शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीस विनंती करीत आणि अशा या त्रैमासिक अभ्यासवर्गासाठीं अभ्यासक्रम ठरविणें व तो प्रत्यक्षांत आणणें याकरितां लिखित सदस्यांची नियुक्ति करीत आहे व त्यासाठीं रु. २५१ पर्यंत आवश्यकतेप्रमाणें खर्च करण्याचा करीत आहे.

समितीचे सदस्य — १ वैद्य पां. ह. देशपांडे, २ वैद्य वेणीमाधवशास्त्री, ३ वैद्य वि. म.

सूचक- रा. गो. जोग. अनुमोदक- ना. धों.

ठराव १८ म. प्रां. वै. संमेलनाचें पुढील वर्षाचें अधिवेशन अहमदनगर येथें भरवि अहमदनगर जिल्ह्यातर्फे नगर वैद्य मंडळ आमंत्रण देत आहे त्याला या सभेची मान्यता आहे.

सूचक— वाग्भट शंकरराव वैद्य अनुमोदक- वै. भा. श्री. दे

ठराव १९- शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमांचा अधिक प्रचार व्हावा आणि आयुर्वेदास उत्तेजन सरकारचें धोरण यशस्वी व्हावें म्हणून सरकारनें ह्या शुद्ध आयुर्वेदीय शिक्षण संस्थांना व मान्य भरपूर आर्थिक सहाय्य द्यावें. आणि सर्व साधनसंपन्न असें शुद्ध आयुर्वेदाचें विद्यालय रुग्णालयास सरकारनें सुरूं करावें अशी या संमेलनाची मुंबई सरकारला प्रार्थना आहे.

सूचक-- जे. एल. रामय्या अनुमोदक-- का.

ठराव २०- मुंबई राज्य वैद्य संमेलनाच्या प्राथमिक सभेत संमेलनाची जी घटना व निय केले आहेत त्यास हें संमेलन मान्यता देत आहे.

सूचक- ना. ह. जोशी अनुमोदक- वैद्य द. वि.

मह... वैद्य संमेलन... ...र्वेदिक औषधाच्या टॅब्लेट्स् केल्यास त्याला ... ड्रग ॲक्ट लागू होत नाहीं. तरी आयुर्वेदिक ...च्या उन्नतीचें ... संमेलनाचें मत आहे.

सू... . वा. जोशी अनुमोदक- य. प्र. उपासनी

ठराव २२- मुंबई राज्य सरकारनें रिसर्च ऑफ आयुर्वेद या समितीवर केवळ तज्ज्ञ वैद्यांचीच नेमणूक करावी अशी आजचें हें संमेलन सरकारला विनंती करीत आहे.

सूचक- वैद्य श्री. रा. करंजीकर अनुमोदक- पुराणिक

ठराव २३-सृष्टी व मानवी जीवन यांचे संबंध दाखविणारे धडे प्राथमिक क्रमिक पुस्तकांत असावे असा आदेश शिक्षणखात्यानें दिलेला आहे. तदनुसार वनस्पतीपरिचय व आयुर्वेदीय सूत्रांची सुलभ माहिती नवीन समाजाला करून देणारे धडे अधिकृत वैद्याकडून लिहून घेऊन ते मंडळामार्फत शिक्षणखात्याकडे पाठवावे. या कामासाठीं हें संमेलन वै. भोगे, वै. पां. ह. देशपांडे, वै. श्री. द. जळूकर यांची समिति नेमित आहे. या समितीनें तीन महिन्याचे आंत हें कार्य प्रत्यक्षांत आणावें.

सूचक- सातभाई अनुमोदक— वि. दा. एकतारे

ठराव २४-- डी. ए. एस. एफ्. वैद्यांना थर्ड असिस्टंट म्हणून सरकारी रुग्णालयांत नेमण्यांत आल्यावर जें पगाराचें मान सरकारनें दिलें आहे, तें त्याच परीक्षा पास झालेल्या लोकांना लोकलबोर्ड किंवा म्युनिसिपल दवाखान्यावर नेमल्यावर मिळत नाहीं; तरी ही पगारांतील विषमता सरकारनें त्वरित दूर करावी अशी या संमेलनाची मुंबई सरकारला विनंती आहे.

सूचक-द. ब.कुळकर्णी अनुमोदक- श्री. द. जळूकर

ठराव २५- औषधीकरणास लागणारी अफू, भांग या द्रव्यांवरील असलेले निर्बंध सरकार लवकरात दूर करावेत असें या संमेलनाचें निश्चित मत आहे. या बाबतींत सरकारशीं विचारविनिमय करण्याकरितां खालील तीन वैद्यांची एक उपसमिति आणखी दोन सदस्य घेण्याचा अधिकार देऊन नेमण्यांत यावी. अध्यक्ष प्रांतीय वैद्य मंडळ, वै. बिंदुमाधव पंडित, वै. विष्णुशास्त्री दाते.

सूचक- वै. विष्णुशास्त्री दाते अनुमोदक- वै. जे. एल्. रामैया

ठराव २६— महारोग हा महाराष्ट्र प्रांतांत एक फार मोठ्या प्रमाणावर पसरत असलेला असा रोग आहे. याची वाढती लोकसंख्या लक्षांत घेतां त्यांचे उत्पत्तीस व प्रसारास आळा घालण्याचे दृष्टीनें सरकार, जनता व वैद्यकीय संस्था यांनीं विशेष लक्ष घालणें जरूर आहे. म. प्रां. वै. मंडळानें देखील हा प्रश्न विचारांत घेऊन या रोगाचें खाणेपिणें, पथ्य व प्रतिबंधक उपाय सर्व जनतेस कळविण्यासाठीं आपल्या प्रचारकार्यांतील एक कार्यक्रम म्हणून ठेवावा असें या संमेलनाचें मत आहे.

सू.- मोतीराम लक्ष्मण ठोंबरे अ.- चूडामणि खंडेराव चौधरी

ठराव २७—पुढील वर्षासाठीं खालील सभासदांची स्थायी समिति निवडण्यास हें संमेलन मान्यता देत आहे.

नगर जिल्हा- वै. वि. दा. एकतारे, नगर. वै. देसवंडीकर, अस्वी. वै. वा. शं. वैद्य, नगर.
नाशिक जिल्हा- वि. मो. दाते, नाशिक. वि. म. गोगटे, नाशिक., जे. एल. रामैय्या, नाशिक.
रत्नागिरी- वै. द. का. थत्ते, चिपळूण. पां. म. भिडे, रत्नागिरी. वि. वा. नेने, वाडे.
सोलापूर- वै. ग. म. लवंगे टेंभुर्णी, वै. फुलचंद दोशी मादे, वै. नृ.ना. बागेवाडीकर, सोलापूर

बृहन्‌मुंबई (२ जिल्हे) ना.

ॲंटरोड. वामनराव दिनानाथ, भुलेश्व

पू. खानदेश– का. सी. भावे ... ल. ठोंबरे, चिना

प. खानदेश – भगवंत त्रिंबक वैद्य, ... श्री.रा. करंजीकर, रनाळे. द. अ. फुलंब्रीकर, सारंगखेडे.

बेळगांव– म. भा. वाटवे, बेळगांव. अ. वा. जोशी, बेळगांव. वि. भि. मुजुमदार, खानापूर.

ठाणे– द. ब. वैद्य, ठाणे. शं. वा. सांडू, चेंबूर. श्री. जोगळेकर, आगाशी.

पुणें– ह. वा. भिडे, पुणे. ह. बा. परांजपे, पुणें. द. वा. शेंड्ये, पुणे.

कुलाबा– श्री. म. वि. पुराणिक, पनवेल. अनंतराव फडके, शिरढोण. न. पु. जोशी, रोहे.

कोल्हापूर– ग. य. गुणे, कोल्हापूर. वै. उपाध्ये, कोल्हापूर. य. गो. नाटोलीकर, कागल.

मराठवाडा– वै. तात्या महाजन, पैठण. वैद्य झंवर, लातूर. भा. खं. कसरेकर, बीड.

(सातारा जिल्ह्यांतील नांवें मागाहून जाहीर करण्यांत येतील.)

कार्यकारी मंडळ

पुढील वर्षासाठीं अध्यक्षांनीं पुढील कार्यकारी-मंडळ नियुक्त केलें आहे.

अध्यक्ष— वै. पां. ह. देशपांडे, पुणे. चलमंत्री— माधवशास्त्री जोशी, पुणें.

स्थायीमंत्री— बिंदुमाधव पंडित, नासिक. खजिनदार— काकासाहेब पुराणिक, पनवेल.

सभासद— नृ. ना. बागेवाडीकर, सोलापूर. लक्ष्मीबाई वोरवणकर, मुंबई. ब्रह्मदत्त श भुसावळ. म. भा. वाटवे, बेळगांव. शं. वा. उर्फ भाऊसाहेब सांडू, चेंबूर. ह. बा. परांजपे, पु वि. म. गोगटे, नासिक.

(अध्यक्षाकडून)

ठराव २८— मागील संमेलनाचे अध्यक्ष श्री. दत्तात्रेयशास्त्री जळूकर व मंत्री श्री. ब्रह्मदत्तशा भुसावळ आणि बिंदुमाधव पंडित नाशिक यांनीं दोन वर्षें अविश्रांत मेहनत घेऊन म. प्रां. वैद्य मंडळा कार्य नेटानें चालविलें व प्रचार मोठ्या प्रमाणांत करून आर्य वैद्यकाची ध्वजा महाराष्ट्रांत सतत फड ठेविली त्याबद्दल हें अधिवेशन त्यांना हार्दिक धन्यवाद गौरवपूर्वक देत आहे. त्यांचें साहाय्य मंडळा यापुढेंहि लाभेल अशी आशा संमेलन करीत आहे.

[अध्यक्षाकडू

ठराव २९— भुसावळ येथील मंडळाचें १० वें अधिवेशन यशस्वी रीत्या व निर्विघ्नपणें पार पा याचें श्रेय अधिवेशन भरविणाऱ्या स्वागत मंडळालाच आहे. म्हणून हें मंडळ १० व्या अधिवेशना स्वागत मंडळास धन्यवाद देत आहे.

[अध्यक्षाकडू

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक या संस्थेचीं अत्यंत
गुणकारी औषधें दादर (मध्य रेल्वे) येथें
मिळण्याचें एक विक्रीकेंद्र
" गणेश औषधालय "
अबदुल कादर बिल्डिंग, दुकान नं. १३
हिंदमाता सिनेमासमोर, मुंबई १४

शेगांव (मध्य-प्रदेश) येथें
आयुर्वेद सेवा संघ नाशिक या संस्थे
अनेक ग्राहकांकडून प्रशंसिलेली सर्व
प्रकारचीं औषधें मिळण्याचें ठिकाणः—
खेतान मेडिकल स्टोअर्स
शेगांव (म. प्र.)

ा, ता. १ जून १९

वैद्य संमेलनात [illegible]

हरीतकी अवलेह

(लेखक:— वैद्य नवनीतलाल [illegible] . एम्., डी.,ए. एस्. एफ्. मुंबई २८)

[मुंबई येथें १९५३ साली डिसेंबर महिन्यांत आयुर्वेद विद्वत् परिषद भरली त्यावेळीं या लेखाचे लेखक वैद्य नवनीतलालजी पंड्या यांनीं आपला अगस्ति–हरीतकीचा परिचय करून देतांना आपणास अगस्ति–हरीतकी अवलेहानें जीवदान कसें प्राप्त झालें याची माहिती सांगितली होती. खास आग्रह केल्यावरून आयुर्वेद पत्रिकेच्या वैद्य वाचकांसाठीं त्यांनीं ती गुजराती मध्यें लिहून पाठविली, तिचा अनुवाद पुढें दिला आहे. वैद्य पंड्या हे मुंबई येथें झंडु फार्मसीमध्यें वैद्य असून 'आयुर्वेद विज्ञान' मासिकाचें संपादन करतात.

— संपादक]

जीर्णज्वर, कास, श्वास

इसवी सन १९३४ साली अंदाजें माझें वय ११ वर्षांचें होतें, त्यावेळीं मला अचानक जीर्णज्वर, कास, श्वास आदि लक्षणांनीं युक्त एक रोग झाला. वैद्य-डॉक्टरांच्या मताप्रमाणें मला क्षय झाला होता असें सांगण्यांत आलें. मी आहार विशेष घेऊं शकत नव्हतो. माझें शरीर दिवसेंदिवस सुकत जात होतें. व त्यावेळीं माझें वजन ५० पौण्ड होतें. माझ्या मातुल घराण्यांत कोणासहि क्षय झाला नव्हता, पण माझी प्रकृति बिघडण्यापूर्वी एकच वर्ष आगाऊ माझ्या मोठ्या बहिणीला क्षयरोग झाला होता. व ती क्षयानें मृत्यु पावली होती. त्यामुळें माझ्या बऱ्याच नातेवाईकांना त्याचप्रमाणें वैद्य–डॉक्टरांना शंका आली कीं मलाहि क्षय झालेला आहे.

पाटणची सुकी हवा

मी त्यावेळीं सुरत येथें रहात होतो. माझ्या वडिलांनीं माझ्या रोगाचें निदान व चिकित्सा करण्यासाठीं सुरतमधील बहुतेक सर्व नामांकित वैद्य डॉक्टरांचा सल्ला घेतला होता. माझ्या कुटुंबाचे नावाजलेले गृहवैद्य डॉ. परमानन्द अध्वर्यु D.A.M. (पाटण) यांचा पण असाच अभिप्राय होता कीं, मला क्षयरोग झालेला आहे. तो अजून पहिल्या अवस्थेंत आहे म्हणून त्यावर तात्काळ उपचार केला पाहिजे. आमचें मूळ गांव पाटण (उत्तर गुजरात) आहे. पाटणची हवापाणी सुकी आहे म्हणून सर्वांचें मत पडलें कीं, मला पाटणला न्यावें व त्याच ठिकाणीं उपचार करावेत.

डॉ. तळवलकरांचें निदान

पाटणला जातांना आम्ही अहमदाबाद येथें उतरलो होतो. अहमदाबादमध्यें त्यावेळीं खाडिया चाररस्त्याजवळ एक क्षयरोगतज्ञ डॉ. तळवलकर नांवाचे प्रॅक्टिशनर रहात होते. त्यांच्या मतें मला क्षयरोग झालेला आहे, असें त्यांनीं निदान केलें होतें. एक्स-रे घेणें त्याकाळीं एवढें सुलभ नव्हतें. म्हणून 'क्ष'किरण फोटो काढून निदान केलें नव्हतें.

अद्याप क्षय झालेला नाहीं

पाटण येथें मी १९३४ च्या नोव्हेंबर महिन्यांत पोंहोचलो. पाटणमध्यें उ. पी. आयुर्वेद महाविद्यालयातर्फे आयुर्वेदीय दवाखाना पण चालत होता. तेथील प्रधान वैद्य श्री. नागरदास पाठक हे होते. (जे हल्लीं उ. पा. आयुर्वेद रीसर्च युनिट बडोदा मध्यें संशोधनाचें काम करीत आहेत.) त्यांच्याकडे माझी चिकित्सा सोंपविण्यांत आली. त्यांनीं माझ्या पिताजींना असें सांगितलें होतें कीं, क्षयाप्रमाणें लक्षणें आहेत पण मला अद्याप क्षयरोग मात्र झालेला नाहीं; व आतांच चिकित्सा कराल तर मी हें दुखणें मिटवून टाकीन.

आम्हाला हिंमत आली

याप्रमाणें ज्यावेळीं कोणीहि वैद्य-डॉक्टर माझा रोग बरा करण्याची खात्री देत नव्हता त्यावेळीं या वैद्यराजांनीं माझ्या वडिलांना हिंमत दिली. यामुळें

आम्हालाहि हिंमत आली व त्यांच्या सूचने औषधोपचार सुरू केले. त्यावेळीं पाटणच्या च लेश्व हॉस्पिटलमध्यें माझी प्रकृति दाखविण्यांत आली हो व त्यांनींहि मला क्षय झाल्याचें निश्चित केलें होतें.

होत असलेलीं लक्षणें

त्यावेळीं मला पुढीलप्रमाणें शारीरिक लक्षणें होत होतीं.

१) ताप ९८ पेक्षां केव्हांहि कमी होत नव्हता. दररोज संध्याकाळीं तापमान वाढून तें जवळ जवळ ९९-१००-१०१ होत होतें.

२) अन्न घेऊं शकत नव्हतो. तोंड बेचव पडत होतें. जर कधीं आहार जास्त घेण्यांत आला तर उलटी होऊन निघून जात होता.

३) वजन दिवसेंदिवस कमी होत होतें. शरीर सुकत होतें. वजन ५० पौंड झालें होतें.

४) डोळे, जीभ व नखें पांढरीं झालीं होतीं. नखांवर पांढऱ्या रंगाचे डाग वारंवार पडत होते.

५) खोकला केव्हां कोरडा तर केव्हां कफयुक्त विशेष होत असे. छातींत कफ भरला असावा असा आवाज ऐकूं येत होता.

६) थोडेंसुद्धां काम करूं गेलें असतां थकवा लागत होता. त्याचप्रमाणें श्वास पण लागत होता.

७) मलमूत्र नियमितपणें होत होते.

८) कफामधून अगर खोकल्यानें केव्हांहि रक्त पडत नव्हतें.

चिकित्सा व उपचार

वैद्यराजांनीं केलेली चिकित्सा पुढीलप्रमाणें होती.

१] गुळवेलसत्व- २ गुंजा, सीतोपलादि चूर्ण २ वाल, चौसष्ठी पिंपळी- १ वाल, सुवर्णवसंत-मालिनी- १ रत्ती, अभ्रकभस्म- १ रत्ती. सकाळीं सायंकाळीं मधाबरोबर चाटणें.

२] लाक्षादि तेलाचें मालिश शरीराला रोज करण्याचें नक्की केलें होतें.

३] खोकला जास्त येईल त्यावेळीं मरिचादि गुटी [शारंगधर] तोंडांत ठेवून रस गिळावयाचा.

तोळे [illegible]न वर [illegible] येत [illegible]

आहार- बाजरीची भाकरी व लोणी खावें असें वैद्यांनीं मुद्दाम सुचविलें होतें.

सहा महिने एकच उपचार चालूं

याप्रमाणें चिकित्सा सुमारें ६ महिने चालली. प्रसंगोपात्त कदाचित् औषधांत फेरफार झाला असेल पण मुख्य उपचार वरीलप्रमाणेंच होते.

वैद्यराजांनीं अगस्तिहरीतकी अवलेह चालूं ठेवण्याबाबत खास आग्रह ठेवला होता. त्याचप्रमाणें सुवर्णमालिनीवसन्ताचा उपयोग चालूं होता म्हणून त्याचें अनुपान म्हणून आहारांत लोणी घेणेंहि आवश्यक ठरविलें होतें. व त्यांच्या सल्ल्याप्रमाणें चिकित्सा चालू होती.

अगस्तिहरीतकी अवलेह आम्ही घरीं तयार करीत होतो. अवलेहाचा पाठ (फार्म्युला) चरक-

.... गौरव ....

आपण आयुर्वेदिक औषधांचा गौरव वाढविला पाहिजे. ती एक आपल्या हिताची गोष्ट आहे. आपण प्रत्येक औषधी द्रव्य अस्सल-पैकीं व ताजें वापरून सिद्ध औषधें बनविलीं पाहिजेत. अशीं उत्कृष्ट औषधीं द्रव्यें मिळवण्याकरितां आपणः—

दि ऑल इंडिया करीयाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात,
माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

...ी: वैद्य संमेलनांत अ...

...० हिरडे वापरावयास सांगितलें आहे, त्याऐवं वैद्यराजांनी हिरड्याचें चूर्ण वापरण्यास सांगित गेलें ...मांत तेल व तूप दोन्ही टाकण्यास सांगितलें आहे. ...न वैद्यराज फक्त तूपच टाकत असत. अवलेह दर ...वेळ सुमारें १० पौण्ड बनत असे व याप्रमाणें सहा महिन्यांत आम्ही हा तीन वेळ तयार केला होता.

या चिकित्सेचा परिणाम

ज्वर हळूंहळूं नॉर्मल झाला. खोकला कमी झाला आणि वजन दर महिन्याला २ते३ पौंड वाढत गेलें. ...वर्षानन्तर माझें वजन सुमारें ९० पौण्ड झालें. याप्रमाणें माझी संपूर्ण रुग्ण-हकीगत दवाखान्याच्या रेकार्ड पुस्तकांत नोंदण्यांत आली होती. सुमारें एक वर्षभर चिकित्सा केल्यानन्तर या वैद्यराजांचे उपचार आम्ही बंद केले. पण त्यानन्तर दुखणें उलटलें नाहीं.

माझ्या भावाचें दुखणें

याप्रमाणें मला माझ्या आजारीपणांत अगस्तिहरीतकी अवलेहाचा फायदा झाला आहे. त्यानन्तर माझा धाकटा भाऊ १९४१ सालीं आजारी झाला व त्याला माझ्याप्रमाणेंच लक्षणें दिसत होतीं. ताप, अरुचि, खोकला, दुर्बलता वगैरे झाले होते. त्यावेळीं ...च्या वैद्य-डॉक्टरांचें सांगणें होतें कीं, क्षयरोगाची सुरुवात आहे. मी त्यावेळीं आयुर्वेदाची परीक्षा पास होऊन वैद्य झालो होतो. मी त्याला तपासलें असतां त्याला क्षयरोग झाल्याची शंका मला आली. मी त्याला तावडतोब अहमदाबाद येथें नेलें व फोटो काढला, त्यांत क्षय नाहीं असें नक्की ठरलें.

त्यानन्तर सुरत येथें येऊन रक्त तपासलें तेव्हां रक्तांतील पांढरे कणांत इओसिनोफिलची वृद्धि झालेली सांपडली. सामान्यतः ४% इओसिनोफिल असतें तें त्या रक्तांत ६०% आढळले. इंग्रजीत फुफ्फुसांत इओसिनोफिल मोठ्या प्रमाणांत होणे ...खोटा क्षयरोग (Pseudo Pthysis) असेंच आहे. त्याची मुख्य अलोपॅथिक चिकित्सा ...ण्यांत आली व त्याला सोमलचें सूचिकाभरण Acteylarson देण्यांत आलें. त्याचा कोर्स पुरा केला. इओसिनोफिल नार्मल झालें पण पुनः २ महिन्यांनीं गाडी पूर्वपदावर आली.

इओसिनोफिलियावर अगस्तिहरीतकी

शेवटीं मी त्याला अगस्तिहरीतकी अवलेह देणें सुरू केलें. त्यानें त्याचा इओसिनोफिलिया स्वस्थ झाला. ताप, श्वास, खोकला इत्यादि सर्व लक्षणें दूर झाली व शरीर सशक्त बनूं लागलें.

क्षयज कास

माझ्या मतें मी या रोगाचें निदान क्षयज कास केलें होतें. व इओसिनोफिलिया [फुप्फुसाचा] म्हणजे क्षयज कास म्हणावयास हरकत नाहीं. वरील प्रमाणें अगस्तिहरीतकी अवलेहाचें सेवन केल्यानें रोग बरा झाला. त्याचप्रमाणें जन्तुशास्त्राच्या दृष्टीनें वाढलेला इओसिनोफिल नार्मल झाला, हाच याचा पुरावा आहे. माझ्या भावाला सुमारें ५ पौंड अगस्तिहरीतकी अवलेह दिला त्यानें गुण आला.

अरविंद आयुर्वेदिक इंजेक्शनांच्या
किंमती अतिशय कमी केल्या
ग्राहकांना विशेष सवलत

ता. १।३।१९५५ पासून नवीन नियम लागू. 'सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन चिकित्सा या पुस्तकाची किंमत ३ रु. ऐवजीं १॥ रु. केली आहे. पोस्टेज १० आणे निराळें. पुस्तक व्ही. पी. नें पाठविलें जाणार नाहीं. २ रु. २ आणे म. ऑ. नें आगाऊ आल्यावर पुस्तक रजिस्टर्ड पोस्टानें पाठविलें जाईल.

पत्ता- अरविंद केमिकल वर्क्स
छिंदवाडा [म. प्र.]

ॲलोपॅथींतील

"आतां उपसर्गामुळें होणाऱ्या रोगांच्या युगातून शरीरांतील प्रत्येक तंतू क्षीण करणाऱ्या रोगाच्या युगांत आपण प्रवेश करीत आहों. (इरा ऑफ् डिसीझेस ऑफ् डीजनरेशन) उपसर्गाचे रोग निर्माण करणाऱ्या जंतूना ठार करण्यासाठीं महाभयंकर विषारी औषधें निर्माण होत आहेत. पण त्याचबरोबर तीं शरीरांतील प्रत्येक तंतूंची प्रतिकारक्षमताहि कमी कमी करीत आहेत. ॲन्टि-बायोटिक औषधांची संख्या एका बाजूनें वाढत आहे आणि माणसाची रोग-प्रतिकारक्षमता मात्र झपाट्यानें घसरत आहे.

साध्या निरुपद्रवी पण गुणकारी औषधीं ॲलोपॅथीच्या क्षेत्रांतून लुप्तच होत आहेत. साधी डोकें दुखी, खोकला किंवा कणकण वाटली कीं रोग्याच्या पोटात, तीव्र जंतुनाशक ॲन्टिबायोटिकें ढकलण्यांत येतात आणि मग खिन्नमनस्कता, नाडीदौर्बल्य, मनोविकृति या फेऱ्यांत रोगी सापडतो. अमेरिकेंतील आंकडेवारी पाहिली तर इतर कोणत्याहि रोगापेक्षां या विकृतींनीं पछाडलेल्या रोग्यांची संख्या अधिक आहे असें प्रत्ययास येतें.

या औषधामुळें किडनी, यकृत्, रक्तवाहिन्या, नाड्या या क्षीणशक्ति होतात. कृपा करा आणि मानवजातीला सल्फोनोमाईड, सेलिसिलेट, बार्बिट्यूरेट या औषधांपासून वांचवा. त्यांना साधीं आयुर्वेदिक औषधें द्या," असे उद्‌गार वैद्यरत्न पं. शिवशर्मा यांनीं अ. भा. आयुर्वेद कॉन्ग्रेसच्या अध्यक्षपदावरून बोलतांना काढले.

आयुर्वेदाचा उपहास करणाऱ्यांना शेवटीं आयुर्वेदांतील सिद्धांतच खरे म्हणण्याची पाळी कशी येते हें सांगतांना ते म्हणाले 'कलकत्ता मेडिकल कॉलेजचे प्रिन्सिपॉल, सर हॅवलॉक चार्लस यांनीं आयुर्वेदाचा असाच उपहास केला. शोथ अथवा जलोदर झाला त्यांनीं मीठ वर्ज्य करावें असें आयुर्वेदांत आहे. हॅवलॉक चार्लसनीं यावरून थट्टा केली. पुढें कांहीं

त

तोळे, वायडल आणि जॅव्हेल या दोन पाश्चा-

रांनींच शोथ व जलोदर रोगांवर रोग्यास मीठ खाऊ दिल्यानें घातक परिणाम होतात असें नमूद केले.

रोग्याची प्रतिकारक्षमता वाढते

आयुर्वेदीय पद्धतीनें दिलेल्या औषधामुळें रोग्याची प्रतिकारक्षमता वाढते हें सांगून ते म्हणाले, कितीतरी रोगी असें म्हणतांना मी ऐकतो कीं, पेनिसिलिनची गोळी घेतली कीं (हें ॲलोपॅथ डॉक्टरांचें औषध आहे) आपली शक्ति खचते व आपण अस्वस्थ होतो. न घेतली तर दमा जोर करतो. जी ॲलोपॅथी आपल्या प्रत्येक औषधामुळें मूळच्या रोगापेक्षाहि भयंकर अशा प्रतिक्रिया निर्माण करते ती भारतांतील खेडूतांना काय उपयोगाची ?"

भारतीयांचें आरोग्य आयुर्वेदच राखू शकेल

"या देशांतील जनतेचें आरोग्य राखावयाचें असेल आणि तें सुस्थितींत ठेवावयाचें असेल तर आयुर्वेद आणि आयुर्वेदीय पद्धतीनें औषधें देणारे यांचाच जास्तींत जास्त उपयोग करावा लागेल याबद्दल मला मुळीच संशय नाहीं" असे उद्‌गार मुंबईचे मुख्य मंत्री श्री. मुरारजी देसाई यांनीं आयुर्वेदिक कॉंग्रेसच्या चाळीसाव्या अधिवेशनाचें उद्‌घाटन करतांना काढले. या उद्‌घाटनासाठीं खास विमानानें ते मुंबईहून त्रिवेंद्रम येथें गेले होते.

पाश्चात्य रामबाण औषधें
लेखकः-डॉ. डी. ए. घाटगे, कागल
किंमत २॥ रु.
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

ळनें व परिषदा

मह [illegible] वैद्य संमेलन

पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणें भुसावळ ता. १६।१७।१८ सोमवार, मंगळवार, बुधवार रो[illegible] म. प्रां. वैद्य संमेलन, मुंबई राज्य वैद्य संमेलन, व युर्वेद अध्यापक चर्चा परिषद यांचीं अधिवेशनें ली होतीं. संमेलनाची जागा चाळकांच्या हातीं नेक दिवस पूर्वी आली होती, व तेथें सर्व व्यवस्था पूर्वीच प्रतिनिधि मोठ्या प्रमाणावर येऊं लागले ते, रविवारीं रात्रीं म. प्रां. वैद्य मंडळाच्या स्थायी मितीची बैठक व अध्यापक चर्चा परिषदेच्या कार्य-री मंडळाची सभा होती. व त्यासाठीं सोईस्कर हीनें रविवार सकाळपासूनच सभासद येऊं लागले. आचार्य वेणीमाधवशास्त्री, श्रीमती लक्ष्मीबाई बोर-कर, वैद्यराज वि. म. गोगटे, विंदुमाधव पांडित, वे, विष्णुशास्त्री दाते, भा. श्री. देसवंडीकर, चिपळूणचे त्ते आदि मंडळींच्या आगमनामुळें रविवारीं सायं-काळींच संमेलनाचें वातावरण निर्माण झालें.

ब्रह्मा विष्णु महेश व भगवंत

संमेलनाच्या व्यवस्थेसाठीं खानदेशचे ब्रह्मा-विष्णु-महेश वैद्य ब्रह्मदत्त शर्मा, वै. द. वि. जळूकर-शास्त्री व वै. का. सी. भावे हे त्रिमूर्ति जातीनें हजर होते. खानदेशचे अध्यक्ष 'भगवंत' (भ. व्यं. वैद्य) इतर वैद्यांसह स्वतःच्या कष्टानें "वै. पं. गंगाधरशास्त्री गुणे सभामंडप उभारण्याचें" काम करीत होते, त्यांना जळगांवचे गोपाळ शंकर आदि मंडळी र उत्साहांत साथ देत होती. धुळ्याचे आयुर्वेदाचार्य शास्त्री यांची गौरवर्ण मूर्ति खणखणीत वाणी सर्वांचें चित्त वेधून घेत होती.

स्वागताध्यक्षांची कार्यक्षमता

स्टेशनवर स्वागतासाठीं मोटार घेऊन स्वागता-ध्यक्ष ब्रह्मदत्तशर्मा हजर होते. संमेलनासाठीं जागा , मांडी, आदि साहित्य मिळविण्याचें काम तील जोरदार लग्नसराईमुळें फारच जड जात [illegible]तें. तथापि आयुर्वेदाचार्य ब्रह्मदत्तजींच्या सर्व समाजावरील वजनामुळें डी. एस्. हायस्कूल, कॉरोनेशन हॉल, क्लब, महिला समाज, नगरपालिका इत्यादि संस्थांच्या जागा व समारंभोपयोगी साहित्य वेळेवर मिळू शकलें व सर्व कार्यक्रम निर्विघ्नपणें पार पडला.

भोजनाकडील व्यवस्था

अशा समारंभांतून भोजनादीची व्यवस्था ठेवणें हें काम फार जिकीरीचें असतें. जेवावयास किती लोक आहेत याचा आधीं पत्ता लागत नाहीं. कारण प्रतिनिधिनिवासांत उतरलेले सर्व लोक तेथें भोजन-चहापाणी करतात असें नाहीं. त्यामुळें आयतेवेळीं पानावर येऊन बसणाऱ्याची व्यवस्था ठेवणें हें फारच कठीण काम श्री. नाईक व श्री. राव आदि मंडळींनीं पार पाडलें. रात्रंदिवस जागृत राहून पैशाचा उत्तम हिशेब (देणें घेणें) आदि कामें श्री. फडके आदि जबाब-दार कार्यकर्त्या नागरिक मंडळींनीं अंगावर घेऊन पार पाडलीं म्हणूनच सर्व संमेलन निर्दोषपणें शेवटास गेलें. भुसावळचा उन्हाळा जोरदार व आलेली सर्व मंडळी पाणी पाणी करीत होती, त्या सर्वांना डेऱ्यांतील गार पाणी देण्याची व्यवस्था झाल्यामुळें भुसावळ हें कोणा-लाच विशेष बाधाकर झालें नाहीं.

अध्यापक-चर्चा-परिषदेच्या कार्यकारी मण्डळाची सभा रविवारीं रात्रीं झाली व नन्तर म. प्रां. वैद्य मंडळाची स्थायी समितीची सभा झाली. अह-वाल व जमाखर्च वाचून ते मंजूर करण्यांत आले व स्थायी कार्यालयाकडे आयुर्वेदाची सद्यःस्थिति या विषयावरील निबंध तपासण्यासाठीं श्री. द. का. थत्ते आ. चि. श्री. लक्ष्मीबाई बोरसणकर आयुर्वेद विशारद, व नारायणशास्त्री भगरे आयुर्वेदाचार्य या तिघांची एक समिति नेमण्यांत आली. संमेलनांत मांडण्यासाठीं आलेले ठराव वाचून ते मांडण्यासाठीं नीटनेटक्या भाषेंत लिहून काढण्याचें काम एका समितीकडे देण्यांत आलें.

कुष्ठरोग समस्या

सोमवारीं सकाळीं ध्वजावन्दनाच्या मंग समारंभानें कार्यास प्रारम्भ झाला. त्यावेळीं वृद्धवैद्य डेग्वेकरशास्त्री यांचें भाषण झालें. मुंबईचे वैद्य रामभाऊ भोगे यांनीं स्वरचित व मुद्रित मराठी ध्वजवन्दन गीत गाऊन समारंभाला शोभा आणली. त्यानन्तर डॉक्टर शिवाजीराव पटवर्धन यांचें कुष्ठरोग समस्या व वैद्यांचें कर्तव्य या विषयावर श्री. आण्णासाहेब दास्ताने यांचे अध्यक्षतेखालीं व्याख्यान झालें. हा विकार कां होतो व त्याचें निर्मूलन कसें करावें याबाबतींत आयुर्वेदानें मूलभूत असें संशोधनकार्य करावें, व स्वातंत्र्याचा लाभ सर्व कुष्ठरोग्यांना पण प्राप्त करून द्यावा असें त्यांनीं सुचविलें.

अध्यापक चर्चा-परिषद

संमेलनाचें कार्य वेळेवर होण्यासाठीं रेल्वेच्या गाड्या वेळेवर येणें आवश्यक असतें. भुसावळला पहाटें येणारी नागपूर एक्सप्रेस त्यावेळीं बंद झाल्यामुळें व पठाणकोट गाडी १।१॥ तास उशीरा आल्यामुळें उद्घाटक व अध्यक्ष वेळेवर येऊं शकले नाहींत व त्यामुळें रोजचे सकाळचे कार्यक्रम जरा उशीराच सुरू होत गेले. अर्थात् हा वेळ अध्यापक परिषदेकडे उपयोगांत आणून कार्यकर्त्यांनीं प्रतिनिधींचा वेळ वाया जाऊं दिला नाहीं.

संमेलनांचे उद्घाटक

अध्यापक परिषदेसाठीं मुंबई सरकारनें नेमलेले डायरेक्टर पं. हरदत्तशास्त्री उद्घाटक म्हणून आले होते. व प्रांतीय व मुंबईराज्य संमेलनाचे उद्घाटनासाठीं मध्यप्रदेशचे मंत्री श्री. कन्नमवार व मुं. चे स्वास्थ्य - मंत्री शांतिलालजी शहा उपस्थित होते. त्यामुळें परिषदेचें कार्य सरकारच्या धोरणाला शक्य तेथें पूरक व जरूर तेथें वळण लावणारें असें उभयविध होत होतें. डायरेक्टर हरदत्तशास्त्री व दोन्ही स्वास्थ्य मंत्री यांनीं आयुर्वेदाच्या बाबतींतील आपले आजवरचे अनुभव सांगितले व पुढें पावलें कोणत्या मार्गानें

आलेली कांहीं विशेष मंडळी

या संमेलनासाठीं सुरतेहून सुरत आयुर्वे महाविद्यालयाचे उपाचार्य पं. रणजितराय देशा पनवेलचे वैद्य भा. द. गोडबोले व हर्षे, पुण्याचे वैद्य ग. वि. पुरोहित, नगरचे वैद्य एकतारे, याशिवा बऱ्हाणपूरचे वैद्य शिवनाथशास्त्री, अमरावतीहू आचार्य त्र्यंबक गुरुजी सहस्रबुद्धे, अकोल्याहून शहा, समुद्र व पराडकर, बडोद्याहून प्रकाशकर, ललित, बेळगांवहून वाटवे, गोकाकहून एस्. आर. देशपांडे, सोलापूरहून बागेवाडीकर, नागपूरहून वैद्यराज व योगी गोविंदरावजी परांडे आदि त्या त्या क्षेत्रांतील प्रमुख मंडळी आल्यामुळें संमेलनाचे सर्व कार्यक्रम व चर्चा भरगच्च झाली. थोड्या वेळांत सर्व कार्यक्रम कसे उ कावयाचे हाच प्रश्न सर्वांसमोर होता.

———

(अपूर्ण)

सांडू
डायाबेटॉल
मधुमेहावर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगां
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

म[illegible]. वैद्य संमेलन

“ वर्गणीबाबत खुलासा

म. प्रां. वैद्य मंडळाची सभासद वर्गणी गेलीं प्रत्येक वर्षी वार्षिक १ रुपया होती. पण मुंबई सरकारनें शुद्ध आयुर्वेदाला मान्यता दिल्यामुळें प्रांतीय वैद्य मंडळाच्या कामकाजांत वाढ झाली आहे. शिवाय जिल्हा वैद्यमंडळें व मुंबई राज्य वैद्यमंडळ यांची स्थापना, व निखिल भारतीय आयुर्वेद कॉंग्रेस यांच्याशीं संलग्न होऊन काम करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे. निखिल भारतीय आयुर्वेद कॉंग्रेसच्या अधिवेशनास जाण्यासाठीं रेल्वेची सवलत मिळण्यास यंदापासून प्रारम्भ झाला आहे अशा सवलती मिळण्यासाठीं प्रांतीय मंडळास संबद्ध शुल्क आदि खर्चहि करावे लागणार आहेत. देशी वैद्यक बोर्डाची निवडणूकहि जवळच आलेली आहे. हा वैद्य-समाजासाठीं करावा लागणारा सामुदायिक खर्च अंशतः तरी वसूल व्हावा यासाठीं भुसावळ येथें भरलेल्या संमेलनानें दरसाल २ रु. वर्गणी घ्यावी असा ठराव केला आहे. त्याप्रमाणें वर्गणी भरून म. प्रां. वैद्यमंडळाचे सभासद व्हावे, अशी वैद्यवर्गास विनंति आहे.

— वैद्य बिंदुमाधव पंडित
स्थायी मंत्री, म. प्रां. वैद्यमंडळ.

“ आयुर्वेदाची सद्यःस्थिति ”

निबंधपरीक्षा

मुंबईचे वैद्य स. म. पेंडसे यांनीं वरील विषयावर निबंध मागविले होते. मुदत थोडी होती तरी त्या अवधींत एकूण १३ लहान मोठे निबंध स्थायी कार्यालयाकडे आले. भुसावळ येथें भरलेल्या स्थायी मंडळाच्या सभेंत या निबंधपरीक्षणासाठीं तीन सभासदांची एक समिति नेमण्यांत आली. त्या समितीनें दोन दिवस रात्रंदिवस वाचन करून त्या निबंधांचें परीक्षण केलें व एकमतानें अहवाल संमेलनास सादर केला आहे.

(१) वैद्य गणेश बाळकृष्ण कामत, आयुर्विद्याविशारद, राहणार संगमेश्वर जि. रत्नागिरी (२) आचार्य दि. शं. सहस्रबुद्धे, प्राध्यापक विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय अमरावती, व (३) वै. देवराव बऱ्हाटे मु. पाडळसें (पूर्व खानदेश) या तीन निबंधांना अनुक्रमें पहिले तीन क्रमांक मिळाले आहेत. व या तिघांना श्री. पेंडसे यांनीं जाहीर केलेलें बक्षिस वांटून देण्यांत येणार आहे.

हे सर्व निबंध वाचून निर्णय देण्याचें काम केल्याबद्दल म. प्रां. वैद्यमंडळ परीक्षक-समितीस धन्यवाद देत आहे.

या समितीनें मंडळास अशी सूचना केली आहे कीं, संमेलनाच्या वेळीं निबंध मागविण्यांत येऊं नयेत व मागविले तरी त्यांचें परीक्षण करण्याचें काम संमेलनाच्या वेळीं ठेवूं नये. त्यामुळें निबंधपरीक्षक-मंडळींना संमेलनांत भाग घेतां येत नाहीं व त्यांना संमेलनाच्या लाभापासून वंचित व्हावें लागतें.

भुसावळ येथें आधींच इतके कार्यक्रम भरगच्च होते कीं, निबंधवाचनाचा कार्यक्रम करण्यास वेळच नव्हता.

आलेले निबंध एवढे मोठे आहेत कीं, तें पत्रिकेंतून छापूं म्हटलें तरी जमण्यासारखें नाहीं. तथापि शक्य झाल्यास त्यांतील कांहीं भाग प्रसिद्ध करण्यांत येईल.

— वैद्य बिंदुमाधव पंडित
नासिक स्थायी मंत्री, म. प्रां. वैद्यमंडळ

मान्य गुरु

गिरगाव मुंबई येथें देशमुख गल्लींत राहणारे आयुर्वेदाचार्य पुरुषोत्तम वासुदेवशास्त्री ऐनापुरे, एम्. ए. यांना शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीनें आयुर्वेदाचे “ गुरु ” म्हणून मान्यता दिली आहे.

आयुर्वेदीय द्रव्यें व सिद्ध औषधी

मुंबई सरकारनें नेमलेली दुसरी समिति

आयुर्वेदीय सिद्धौषधें व कच्ची द्रव्यें विकण्यासंबंधीं जी गोलमाल चालू आहे ती नाहींशीं करण्याच्या उद्देशानें वैद्य व जनता यांना खरी औषधी द्रव्यें व सिद्धौषधें योग्य किंमतीस मिळावीत यासाठीं एक योग्य तत्र निर्माण करावें म्हणून या समितीची स्थापना सरकारनें केली आहे.

वै. पं. शिवशर्मा (अध्यक्ष), सभासद- वै. गं. वि. पुराणिक (मुंबई), वैद्य वल्लभराम (अहमदाबाद), वै. प्रधानभाई हंसराज तन्ना (मुंबई) व मुंबई राज्याचे ड्रग-कंट्रोलर श्री. भाईलाल पटेल.

या समितीकडे पुढील कामें दिलीं आहेत—

(१) सामान्यतः जीं कच्ची द्रव्यें व औषधें यांत भेसळ करून नकली तयार करण्यांत येतात त्यांची यादी करणें.

२) या वस्तूंत भेसळ क[illegible] जाणाऱ्या वस्तुं व त्याऐवजीं दिल्या जाणाऱ्या यांची यादी करावी.

(३) खऱ्या वस्तूची परीक्षा करण्यासाठीं प्रायोगिक पारख नक्की करणें.

(४) खऱ्या औषधींची परीक्षा जनता व वैद्य यांना सहज होईल अशा परीक्षांची माहिती देणें.

(५) खरी औषधी कोणती याची माहिती होण्यासाठीं त्याचे एक स्थायी प्रदर्शन निर्माण करणें.

(६) नकली द्रव्याच्या प्रसारावर नियंत्रण घालून खरीं द्रव्यें जनता व वैद्य यांना मिळण्याची खात्रीची व्यवस्था करण्याचे मार्ग सुचविणें.

या समितीची कचेरी शुद्ध आयुर्वेद समितीच्या कचेरींतच राहील असें कळतें. तो पत्ता असा—

बॉम्बे म्यूच्युअल अनेक्सी, गनबो स्ट्रीट,
दादाभाई रोड, मुंबई १

मध्यप्रदेश सरकारमान्य (Recognised)

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती

[आयुर्वेदाचें सर्वांगपूर्ण शिक्षण देणारी संस्था]

१) शवच्छेदन, रुग्णपरीक्षा, नेत्ररोग, स्त्रीरोग, पॅथॉलॉजिकल परीक्षा, चिकित्सा आदींचें प्रत्यक्षासहित ज्ञान
२) सरकारी इर्विन हास्पिटलमध्यें ऑपरेशन्स पाहण्याची सोय
३) सरकारमान्य बी. ए. एम्. एस्. (बॅचेलर ऑफ् आयुर्वेद वुइथ मॉडर्न मेडिसिन ॲंड सर्जरी) हा चार वर्षांचा डिग्री कोर्स
४) सरकारी आयुर्वेद बोर्डामार्फत परीक्षा. ५) उत्तम अध्यापक वर्ग
६) बोर्डिंगची व्यवस्था. विद्यार्थिनी राहाण्याची स्वतंत्र व्यवस्था
७) मॅट्रिक व इंटर पास विद्यार्थ्यांना प्रवेश
८) महाविद्यालय २० जून पासून सुरू होतें. माहितीपत्रक मागवा.

— वैद्य पं. दा. मुळे, प्रिन्सिपॉल

म[illegible]ाची उत्तम सेवा

“नाशिक येथें वसंत व्याख्यानमालेंत व्याख्यानें देण्याकरितां आलो असतां आयुर्वेद सेवा संघ ही संस्था चालकांनीं दाखविली, ती पाहून फार आनंद झाला. जागाहि प्रशस्त व स्वच्छ वाटली. चालक-मंडळीशीं चर्चा करण्याचीहि संधि मिळाली. त्यांचें अध्ययन व अगत्य पाहून आदर वाटला. ही संस्था आयुर्वेदाची व महाराष्ट्राची उत्तम सेवा चालवील असा विश्वास वाटतो.

— श्री. के. क्षीरसागर.

१।५।५५

वाखाणण्यासारखी तळमळ

“खल नियमितपणें पूर्व पद्धतीस अनुसरून चालू असल्याचें पाहून संतोष झाला. आसवें व्यवस्थितपणें ती न बिघडतील अशा तऱ्हेनें बंद करण्याची पद्धत चांगली आहे. अशा संस्था ठिकठिकाणीं हव्या आहेत. कार्यकर्त्यांची आयुर्वेदाविषयींची तळमळ वाखाणण्यासारखी आहे.

— विश्वासराव डावरे, उपाध्यक्ष
म. प्रां. वर्णाश्रम स्वराज्य संघ, पुणें

रजत जयंति महोत्सव

कृष्णगोपाल आयुर्वोदिक धर्मार्थ औषधालय (स्थापना १९३०) कालेडा कृष्ण गोपाळ (अजमेर) या संस्थेच्या स्थापनेस २५ वर्षें पूर्ण होऊन गेलीं. त्या निमित्त त्या संस्थेचे संस्थापक पूज्य स्वामी कृष्णानंदजी महाराज व संस्थेचें विश्वस्तमडळ यांनीं संस्थेचा रजत-महोत्सव २१-५-५५ रोजीं थाटानें साजरा केला.

फिरतें आयुर्वेदीय चिकित्सालय

अध्यक्षस्थानीं भारत सरकारचे नियोजन, पाणी पुरवठा व वीज मंत्री श्रीयुत गुलजारीलाल नंदा हे होते, या संस्थेनें आतांपर्यंत १७ हिंदी वैद्यक ग्रंथ लिहून प्रसिद्ध केले आहेत. संस्थेनें एक फिरतें चिकित्सालय चालविलेलें आहे. त्यासाठीं एक जीप मोटार संस्थेनें घेतली आहे.

या संस्थेच्या उभारणीसाठीं आजवर ३ लाख ९० हजार रुपये लागले आहेत. त्यापैकीं ४५००० रुपये उधार आणले आहेत. बाकीची औषधालयाची स्वतःची संपत्ति आहे.

संस्थेचा चालूं खर्च

संस्थेचा सालीना चालूं खर्च १५००० रुपयांचा आहे. संस्थेनें स्वतःचा एक छापखाना सुरू केला आहे. संस्थेचा विचार आयुर्वेदाचें विश्वविद्यालय काढण्याचा आहे. ही संस्था प्रजावैद्य (ग्रामवैद्य) व निष्काम वैद्य तयार करण्याची व्यवस्था करणार आहे असें कळतें.

शेगांव (मध्य-प्रदेश) येथें
आयुर्वेद सेवा संघ नाशिक या संस्थेचीं
अनेक ग्राहकांकडून प्रशंसिलेलीं सर्व
प्रकारचीं औषधें मिळण्याचें ठिकाणः—
खेतान मेडिकल स्टोअर्स
शेगांव (म. प्र.)

विद्वान् वैद्य आणि डॉक्टर यांनीं
प्रशंसिलेलीं दोन उपयुक्त पुस्तकें
१) दंतरोगविज्ञान आणि चिकित्सा
किंमत ३.
२) वैद्यसन्मित्र (हिंदी) भाग १ ला
किंमत २ रु.
मिळण्याचीं ठिकाणें:—
१ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक
२ पां. वि. जायदे, नारायण चौक, हुबळी

अनूरजिस्टर्ड वैद्यांसाठीं

भारत सरकारनें समिति नेमली

भारतांतील अनूरजिस्टर्ड वैद्य, हकीम, होमिओपाथ, बारा क्षारवाले इ. लोकांचें शिक्षण व सर्व राज्यांतून नियंत्रण विषयक समान धोरण आंखण्यासाठीं राष्ट्रपति राजेंद्र प्रसाद यांनीं एक खास समिति नेमली असून तिचा अहवाल ६ महिन्यांत तयार करावा अशी आज्ञा केली आहे.

या समितींत पुढील सभासद आहेतः—

१) श्री. दयाशंकर दवे सौराष्ट्र स्वास्थ्यमंत्री (अध्यक्ष)
२) श्री. शांतिलालजी शाह मुंबई ,, सभासद
३) डॉ. बिधनचंद्र राय प. बंगाल ,, ,,
४) नवाब मेहदी जंग. हैद्राबाद ,, ,,
५) श्री. ए. ए. रहिम त्रावणकोर ,, ,,
६) डॉ. स्विफ्ट पूर्व पंजाब आरोग्य डा. मंत्रीं
७) डॉ. प्राणजीवन मेहता डा. जामनगर सं. संस्था सहमंत्री

समितीसाठीं पुरसे कारकून देण्यांत आले आहेत.

समिती बाबतचा प्रवास खर्च ज्या त्या राज्य सरकारनें करावयाचा आहे चालू सालीं त्रिवेंद्रम् येथें आरोग्यखात्याच्या मंत्र्यांची परिषद झाली त्यांतील एका ठरावानुरोधानें ही समिति नेमली गेली आहे.

अनूरजिस्टर्ड वैद्यांस सूचना

ज्यांना मुंबई अगर सौराष्ट्र येथील रजिस्ट्रेश अगर एन्लिस्टमेंट मिळालेलें नाहीं, मात्र ज्यां योग्यता ते मिळविण्याची आहे. त्यांच्यासाठीं पुन: एकवार प्रयत्न करण्याची संधि राष्ट्रपतींच्या समितीनेमणुकीमुळें आली आहे.

खेड्यांना आयुर्वेदीय औषधें

भारतांतील निम्म्या खेड्यांना आयुर्वेदीय पद्धतीनें दवापाणी पुरविण्याची व्यवस्था करणारी ए विस्तृत योजना द्वितीय पंचवार्षिक योजनेंत समावि करण्यासाठीं राष्ट्रीय नियोजन समितीकडे पाठविण्याचा निर्णय त्रिवेंद्रम येथें भरलेल्या ४० व आयुर्वेदिक कॉंग्रेसनें घेतला आहे.

चित्रांचे साचे (मोल्ड)

हत्ती, उंट, वाघ, ज्ञानेश्वर, साईबाबा वगैरे ४० प्रकार. या साच्यांतून घरबसल्या चित्रांचा व्यवसाय सुरू करतां येतो. हा एक अभिनव धंदा आहे.

एम्. देशपांडे C/o सोमण लॉज पुणें ४

सार्थ माधव निदान वै. द.ब.बोरकर ५ रु.
चिकित्साप्रभाकर श्री. प्र.बा. ओगले २० रु.
वनौषधी गुणादर्श वै. पदेशास्त्री १० रु.
कामसूत्र (मराठी अनुवाद) ५ रु.
न्यायवैद्यक डॉ. मा.पु. जोशी ८ रु.
औषधें किंवा शस्त्रप्रयोगावाचून रोग बरे करण्याचें शास्त्र डॉ. कुन्हे ४ रु
जनावरांचे रोग, श्री. त्रिं. रं. खळदकर -।।।- रु.
पाश्चात्य रामबाण औषधें डॉ. डी. ए. घाटगे २।। रु.

वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

वैद्यराज पं. शंकर दाजीशास्त्री पदे अ
र समिती'कडे गेल्यावर्षी ७ पुस्तकें आली
क्षक समितीनें बहुमतानें नाडीतत्त्वदर्शन या
चे लेखक पं. सत्यदेव वासिष्ठ यांना गतवर्षीचें
स्मारक-वक्षिस देण्याचें निश्चित केलें आहे. हें
५०० रु. चें आहे.

आयुर्वेद महासंमेलनाचे व विद्यापीठाचे आद्य
पदेशास्त्री यांचें स्मारक म्हणून एक समिति
झाली असून उत्तम लेखकांना पुरस्कार,
न आयुर्वेदीय पुस्तकांचा शोध, नवीन पुस्त-
ची निर्मिति व प्रकाशन हें कार्य या समितीमार्फत
असतें.

समितीचे प्रमुख वै. पं. जगन्नाथप्रसाद
शी हे असून कार्यालयाचा पत्ता ३ संमेलन मार्ग,
[अलाहाबाद] असा आहे.

ांध्र समितीचा महत्त्वाचा निर्णय

आंध्र सरकारनें आसवारिष्टाबाबत विचार
न सरकारला शिफारस करण्यासाठी डॉक्टर ए.
वींच्या अध्यक्षतेखालीं समिति नेमली होती.
सारिष्टें हीं मद्यप्रतिबंधक योजनेंतून मुक्त केलीं
वेत, कारण तीं (शास्त्रोक्त आसवें) कितीहि
त प्याली तरी मादक होत नाहींत अशी त्या समि-
नें शिफारस केली आहे असें समजते. या शिफारशी-
ंचा आपला निर्णय आंध्र सरकार लवकरच
र करील.

ी बातमी

मुंबई सरकारचा ठराव

एस्. एस्. सी. परीक्षेत (पास अगर नापास)
गुण असणाऱ्या विद्यार्थ्यास शुद्ध आयुर्वेद
र्यात प्रवेश द्यावा. कॉलेज परीक्षेंत संस्कृत
त केवळ पास असलेल्यांनाहि प्रवेश द्यावा.
ठराव मुंबई सरकारनें ता. ३० मे रोजीं
आहे.

अनुक्रमणिका

सारावाबत महत्वाच्या घोषणा ७२७
पाठ्यक्रमांत न्यायसांख्य-दर्शनांची स्वतंत्र आवश्यकता आहे ? ७२९
चिंतामणीरसाचा चमत्कार ७३६
म. प्रां. वैद्य संमेलन, संमत झालेले ठराव ७३७
माझा क्षय व अगस्तिहरीतकी अवलेह ७४३
ॲलोपॅथींतील भयंकर औषधें ! ७४६
भुसावळ येथील संमेलनें व परिषदा ७४७
प्रांतीय वर्गणी बाबत खुलासा ७४९
सरकारने नेमलेली दुसरी समिति ७५०
महाराष्ट्राची उत्तम सेवा ७५१
रजत जयंति महोत्सव ७५१
अन् रजिस्टर्ड वैद्यासाठीं ७५२

कामगार विमा योजना

मुंबई राज्य कामगार विमा योजनेखालीं सरकारनें वैद्यक व्यवसायींच्या प्रतिनिधींची आणखी एक कमिटी स्थापन केली आहे.

ही कमिटी विमा योजनेखालील वैद्यक-व्यवसायी आणि विमेदार-कामगार अथवा तो मयत झाला असल्यास त्याचा प्रतिनिधि, यांच्यामध्यें उत्पन्न होणाऱ्या कोणत्याहि प्रश्नाची चौकशी करील. तसेंच वैद्यक व्यवसायींनें केलेलें औषधोपचार व त्याबाबतींत त्यानें आपल्या कर्तव्यांत कसूर केली असल्यास त्याची व विमेदार-कामगाराची वागणूक वगैरेविषयींहि ही कमिटी चौकशी करील.

या कमिटीच्या अध्यक्षस्थानीं पं. हरदत्तशास्त्री व महेंद्रकुमारशास्त्री हे डेप्युटी म्हणून नियुक्त केलें आहेत. समितीचे आणखीं ९ सभासद आहेत.

जामनगर मध्यवर्ति संशोधन संस्था

केंद्र सरकार तर्फे जामनगर येथें डॉ. प्राणजीवन मेहता यांच्या अध्यक्षतेखालीं चालू असलेल्या संशोधन संस्थेसाठी सिद्ध पद्धतीचे तीन वैद्य नेमणेआहेत. असें त्यांच्याकडून आलेल्या जाहिरातीवरून समजते.

आयुर्वेद पत्रिका व पत्रिका, नाशि

ंसाठीं ांची पहिली सभा १९।५।५

मुरारजीभाईंची घोषण। ी

अ

भारतीयांचें आरोग्य आयुर्वेदच राखूं शकेल!

पण त्यासाठीं शुद्ध आयुर्वेदीय पद्धतीनें औषधोपचार करणारे वैद्य तयार झाले पाहिजेत. हेंच कार्य

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नाशिक

ही संस्था करीत आहे. एस्. एस्. सी. परीक्षेंत (पास अगर नापास) संस्कृत विषयांत ५० टक्के गुण मिळविणाऱ्यास प्रवेश दिला जातो.

प्रवेश शुल्क १० रु. वार्षिक शुल्क (प्रात्यक्षिक शिक्षणासह) १२० रु.

.... प्रधानाध्यापक

आयुर्वेद सेवा संघानें मोठ्या प्रमाणावर तयार करून
रूढ केलेलें शास्त्रीय पौष्टिक औषध

अगस्ति प्राश (अगस्तिहरीतकी अवलेह)

वाग्भटांत क्षयजकास चिकित्सेंत हें औषध सांगण्यांत आलें आहे. पडसें, खोकला, ज्वर, बद्धकोष्ठ, अकालीं वार्धक्य, केंस पांढरे होणें, स्थूलपणा, श्वास, उचकी, पाळीचा ताप, जास्त लघवी होणें, छातींत दुखणें, अरुचि, क्षय इत्यादि "रोगावर" हें पौष्टिक खाद्य गुणकारी आहे. अगस्त्यविहितं धन्यं इदं श्रेष्ठ रसायनम्।

किंमत ४० तोळे ४ रु. २० तोळे २ रु.

आयुर्वेद औषधी भवन, नासिक

संपादक व प्रकाशक— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य बिवलकर कारंजा, नाशि
मुद्रक — श्री चिं. ओक, सर्कल प्रेस, नासिक.

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक मुखपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता १ व १६ रोजी प्रसिद्ध होते.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. एक अंकाची किंमत ४ आणे

वर्ष ८ वें) नासिक, ता. १६ जुन १९५५ (अंक २४ वा

-- मुंबई आयुर्वेद बोर्डाची निवडणूक --

उमेदवारांचीं नांवें निश्चित झालीं

आयुर्वेद पत्रिकेचा १ जूनचा अंक प्रसिद्ध झाल्यानन्तर आयुर्वेद युनानी बोर्डाकडून आगामी निवडणुकीची जाहिरात प्रसिद्धीसाठीं आली. ती या अंकांत अन्यत्र दिली आहे. त्यांत दिलेली सर्व मुदत इतकी अपुरी आहे कीं, मुंबई राज्यांत गुजरातपासून खालीं कारवारापर्यंत मतदारांना माहिती मिळून त्याप्रमाणें विचार करण्यास अवसरच लाभत नाहीं. ही विपरीत परिस्थिति तारेनें मुंबई सरकारच्या अनेक जबाबदार अधिकाऱ्यांच्या कानीं घातली आहे. तथापि आरोग्यमंत्री परदेशांत गेले असल्यामुळें दाद लागण्याची शक्यता नाहीं. म्हणुन महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळानें व मुंबई राज्य वैद्य मंडळानें निवडणुकीसाठीं उमेदवार म्हणून पुढील नांवें निश्चित केलीं आहेत.

५७१ सनाढ्य ब्रह्मदत्तशर्मा प्रभुदयाळ भुसावळ (पू. खा.)
१७६५ नाटोलीकर यशवन्त धोंडो कागल (कोल्हापूर)

गुजराथ व कर्नाटकची नांवें निश्चित समजल्यानंतर तीं पुढील अंकीं जाहीर करण्यात येतील. महाराष्ट्राच्या या उमेदवारांचा परिचय याच अंकांत अन्यत्र दिला आहे. (पान ७८३ पहा)

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन
दशम अधिवेशन.
वै. गंगाधर शास्त्री गुणे सभामंडप

धूतपापेश्वर प्रकाशन लि. यांजकडून—

आयुर्वेदीय पाठ्यक्रमांत आयुर्वेद-बाह्य विषयांचें स्थान

(लेखक- वै. रणजितराय देसाई सुरत)

आयुर्वेदीय वृत्तपत्र व नियतकालिकांमधून आयुर्वेदीय पाठ्यक्रम व तत्संबंधीं विषयावर माननीय वैद्य यादवजी त्रिकमजी आचार्य यांनीं आपले मननीय विचार वेळोवेळीं व्यक्त केले आहेत. हें त्यांचें कार्य पाहून कोणत्या आयुर्वेदप्रेमीयास त्यांच्या ह्या कर्तव्यपरायणतेबद्दल व आयुर्वेदाच्या पुनरुज्जीवनाबद्दल त्यांना वाटत असलेली तळमळ व त्याकरितां त्यांची वृद्धावस्थेंतहि चाललेली खटपट व धडपड पाहून आनन्द वाटणार नाहीं! या विषयासंबंधांत मीहि माझे विचार थोड्याफार प्रमाणांत व्यक्त करूं इच्छितो.

महत्वाचा प्रश्न

आयुर्वेद-भिन्न विषयांचा समावेश आयुर्वेदीय पाठ्यक्रमांत असावा अगर नसावा हा एक महत्वाचा प्रश्न आहे. हा प्रश्न केवळ मिश्र-शिक्षण-पद्धतीबाबतच आहे असें नसून तो शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमाशींहि अंशतः निगडित आहे.

विद्यार्थ्यांची ग्रहणशक्ति लक्षांत घ्या

मिश्र वा शुद्ध कोणत्याहि पाठ्यक्रमांत बाह्य विषयांना स्थान देण्याबाबत विचार करतांना दोन गोष्टींकडे प्रामुख्यानें लक्ष देणें जरूर आहे. पहिली गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांची बुद्धि, ग्रहणशक्ति, स्मृति यांचा विचार लक्षांत घेणें व दुसरी गोष्ट म्हणजे ज्या बाह्य विषयांना आयुर्वेदीय पाठ्यक्रमांत स्थान द्यावयाचें आहे त्या विषयांमुळें विद्यार्थ्याला आयुर्वेदीय पाठ्यक्रमाकरितां लागणारी बौद्धिक शक्ति आणि काल ह्यांचा अपहार होतो किंवा काय ही गोष्ट विचारांत घेणें.

दुय्यम दर्जाची बुद्धि

मिश्र शिक्षण घेण्यास जे विद्यार्थी येतात ते प्रायः विज्ञान-मध्यमा (Inter-Science) परीक्षेमध्यें बेताचेच मार्क मिळालेले असतात. याचा अर्थ असा कीं, एम् बी. बी. एस्. च्या कोर्सला जाणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षां मिश्र-शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची बौद्धिक शक्ति ही दुय्यम दर्जाची असते. परिणामतः असें होतें कीं, मिश्र-शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन्ही पद्धतींच्या अभ्यासाचा बोजा जड होतो व त्यांतहि ॲलोपाथीच्या विषयांचा उच्च अभ्यास ठेवणें हें तर अगदींच अव्यवहार्य ठरतें. ही गोष्ट अनुभवानें सिद्ध झाली आहे. ॲनाटमी, सर्जरी आदि विषयांचे कांहीं शैक्षणिक भाग नुकसान न होतां कमी करतां येण्यासारखे आहेत कीं जे भाग एम्. बी. बी. एस. डॉक्टरलाहि व्यवसायाचे दृष्टीनें उपयोगी पडत नाहींत.

शुद्ध आयुर्वेदाचा अभिमानी

मी स्वतः शुद्ध आयुर्वेदाचा अभिमानी आहे. परन्तु जे महानुभव आयुर्वेद व ॲलोपथी यांचें मिश्र शिक्षण चाहतात त्यांच्याहि मतांस आदर दिला पाहिजे. परंतु त्यांनींहि लक्षांत घेतलें कीं, आयुर्वेद-बाह्य विषय अभ्यासक्रमांत समाविष्ट करतांना तंत्रकार व आयुर्वेदीय या उभयतांनीं ह्या गोष्टीचा विचार एकदिलानें व दृष्टीनें करावयास पाहिजे. ह्या मार्गाचा अवलंब करणें हें विशेष व्यवहारक्षम होईल. शुद्धायुर्वेद शिक्षणामध्यें आयुर्वेद-बाह्य विषय कोणते घ्यावयाचे याचा उल्लेख ते तसे समाविष्ट करण्यापूर्वी करणें योग्य होईल. मुंबई राज्यांत शुद्धायुर्वेदाचा पाठ्यक्रम तयार केला गेला आहे. व त्यास लागणारी कमींतकमी प्रवेश-योग्यता मॅट्रिक अनुत्तीर्ण असली तरी संस्कृत विषयांत शेंकडा ४५ टक्के गुण असावयास पाहिजेत, अशी ठेवली आहे. यावरून विद्यार्थ्यांची मेधा व परिश्रमशीलता याची सामान्य कल्पना आपणास येईलच. शुद्धायुर्वेदाचा पाठ्यक्रम निश्चित करतेसमयीं तंत्रवाहकांनीं ह्या सामान्य बुद्धीच्या विद्यार्थ्यांना आपल्या दृष्टिआड करतां उपयोगी नाहीं.

बाह्य विषयांचा विचार

शुद्ध आयुर्वेदीय शिक्षणक्रमांतील आयुर्वेदीय पाठ्य विषय ही बाबहि जरी विचार करण्यासारखी असली तरी त्या बाबीचा विचार सध्यां येथें करीत नाहीं. तूर्त फक्त आयुर्वेद-बाह्य पाठ्य विषयांचाच विचार मी करूं इच्छितो.

स्वतंत्र संस्कृत ग्रंथ नकोत

आयुर्वेद-बाह्य विषयांसंबंधीं विचार करतांना प्रथम मी संस्कृत विषयांत समाविष्ट झालेले रघुवंश, दशकुमारचरित, शाकुंतल, तर्कसंग्रह, सांख्यकारिका, व्याकरण आदि विषयांसंबंधीं विचार करणार आहे. या विषयांचा समावेश पाठ्यक्रमांत करतेवेळीं विद्यार्थ्यांच्या बुद्धीची कुवत जरूर लक्षांत घ्यावयास पाहिजे. ज्यांना शुद्ध आयुर्वेदाच्या अध्यापनाचा अनुभव असेल त्यांनीं पाठ्यक्रम-तंत्रवाहकांच्या पुढें आपले अनुभव व विचार जरूर मांडावेत. माझें नम्र मत या विषयांत असें आहे कीं, पाठ्यक्रमांत संपूर्ण अष्टांगहृदय असावें, ह्याच्या योगानें आयुर्वेदीय ग्रंथांची मूळ भाषा समजण्यास विद्यार्थ्यांना सोपें जाईल. संस्कृत विषय स्वतंत्र ठेवून त्याकरितां विद्यार्थ्यांची शक्ति व अभ्यासकाल खर्ची करणें हें योग्य वाटत नाहीं.

तर्कसंग्रह, सांख्यकारिका नको

आयुर्वेदीय अध्यापनांत वैशेषिक व सांख्य ह्या विषयांचा समावेश केला असल्यामुळें पाठ्यक्रमांत तर्कसंग्रह व सांख्यकारिका ह्यांचा अभ्यास गोंवला आहे. परन्तु मला स्वतःला ह्या विषयांची इतकी उपयुक्तता आहे असें वाटत नाहीं. स्नातक परीक्षेपर्यंत तरी ह्या विषयांना स्थान असूं नये; व जर हे विषय शिकवावयाचे असतील तर ते स्नातकोत्तर परीक्षेसाठीं ठेवावेत, असें मी नम्रपणें सुचवूं इच्छितो. कारण, असे उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी हे प्रज्ञावन्त व स्वाध्यायप्रेमी असूं शकतील, व त्यांचेकरितां हे विषय ठेविल्यास अयोग्य होणार नाहीं.

अध्यापकांना हें ज्ञान आवश्यक

मात्र स्नातक परीक्षेचा अभ्यास शिकविणारे अध्यापक असतील त्यांना ह्या विषयांचा परिचय असणें आवश्यक होईल. कांहीं महानुभवांच्या मतें स्नातक परीक्षेलाच हे विषय (सांख्य, वैशेषिक) असावे असें असेल तर त्यांच्याहि मताचा आपण अनादर करणें इष्ट होणार नाहीं; व त्याकरितां स्नातकाभ्यासी आयुर्वेदीय विद्यार्थ्यांस ह्या विषयांचा थोडाफार परिचय करून देणें ही गोष्ट आपणांस स्वीकारावी लागेल.

मग ज्योतिष कां नको ?

तसें तर आयुर्वेदोपयोगी समजले जाणारे परन्तु आयुर्वेद-बाह्य असे विषय अनेक आहेत. संस्कृत, सांख्य, वैशेषिक, थोडेंफार व्याकरण हे तर पहिल्यांदा आहेतच. परन्तु वैद्य बिंदुमाधव पंडितजी तर मीमांसा हा विषयहि आवश्यक मानतात. तसेंच ज्योतिषशास्त्र हा विषयसुद्धां आयुर्वेदाशीं निगडित आहे व ह्या विषयाचाहि आयुर्वेदाभ्यासांत समावेश व्हावा असा पुरस्कार करणारेहि कांहीं लोक आहेतच. एक महाशय तर गीतेलाहि आयुर्वेदाभ्यासांत स्थान द्यावें असें म्हणणारे आहेत. परन्तु बिचाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुवतीकडे मात्र कोणीच फारसें लक्ष देत नाहींत.

आचार्यांचें म्हणणें

माझें अल्पस्वल्प मत असें आहे कीं, वरील विषयांना जर आयुर्वेदाभ्यासांत स्थान द्यावयाचेंच असेल तर तें स्नातकोत्तर अभ्यासक्रमांतच द्यावें. आयुर्वेदाच्या आचार्यांनीं आयुर्वेद-बाह्य विषयांना अध्ययन व परीक्षा ह्यांत स्थान द्यावें असें विधान केलेलें नाहीं. त्यांच्या मतें शुद्ध आयुर्वेदीय विषयांचेंच अध्ययन करणें आवश्यक आहे. आयुर्वेद-बाह्य विषयाचें ज्ञान केवळ त्या त्या विषयाच्या तज्ज्ञांचें प्रवचन ऐकून मिळविणें, इतकेंच स्थान त्यास देणें युक्त होईल.

स्पष्ट व थोडक्यांत निवेदन

स्पष्ट व थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास आयुर्वेदीय अभ्यासक्रमांत शुद्धआयुर्वेदीय विषयांनाच स्थान देणें इष्ट व योग्य होईल. आयुर्वेदीय विषय, आयुर्वेद-भिन्न विषयांच्या आधारें व मदतीनें अधिक स्पष्ट व ग्रहणशील करावयाचा असेल तर त्या भिन्न विषयांच्या पारंगतांचें जरूर त्या त्या वेळीं विद्यार्थ्यांपुढें प्रवचन करवावें व ह्या मार्गें त्या विषयाचें अधिक स्पष्टीकरण करावें. शुद्धायुर्वेदीय पाठ्यक्रमांत आयुर्वेद-बाह्य विषयांना स्थान असू नये व त्या विषयांच्या परीक्षाहि घेण्यांत येऊं नयेत. मिश्र-शिक्षण पाठ्यक्रम बनवितांना ॲलोपॅथी विषयासंबंधीं तंत्रकारांनीं हीच दृष्टि कायम ठेवावी. हें धोरण अंगिकारल्यास आयुर्वेदीय विद्यार्थ्यांना आयुर्वेदीय विषयांचा अभ्यास करण्यास भरपूर वेळ व उत्साह मिळूं शकेल.

सुश्रुतांतील कांहीं वचनें

विद्वानांच्या विचारार्थ सुश्रुतांतील ह्या विषयासंबंधीं कांहीं वचनें खालीं देत आहे.

सुश्रुताचार्यांनीं आयुर्वेद-बाह्य विषयासंबंधीं बोलतांना गद्य व पद्य या दोहोंतहि 'श्रू' या श्रवणार्थक धातूचाच ठिकठिकाणीं उपयोग केला आहे. यावरून माझ्या वरील विधानांना पुष्टीच येते.

अन्यशास्त्रोपपन्नानां च अर्थानाम् इह उपनीतानाम् अर्थवशात् तेषां तद्विद्येभ्य एव व्याख्यानं अनुश्रोतव्यम्। कस्मात्? नहि एकस्मिन् शास्त्रे शक्यः सर्वशास्त्राणां अवरोधः कर्तुम्।

भवन्ति चात्र—

एकं शास्त्रं अधीयानो न विद्यात् शास्त्रनिश्चयम्।
तस्मात् बहुश्रुतः शास्त्रं विजानीयात् चिकित्सकः॥

आमच्या कर्णधारांनीं ह्या वचनांचा जरूर विचार करावा. भगवान् धन्वतरी सर्वांना सुबुद्धि देवो.

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं
आयुर्वेदिक व युनानी वनौषधि
तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण !

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार, गंधक, दगडीवेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राह्मी, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य ! विशेष माहितीसाठीं आमचे साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६
टेलिग्रॅम—आयुर्वेद

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी
२४५ काळबादेवी रोड, मुंबई

समान दृष्टिकोन ठेवा

त्रिवेंद्रम् येथील आयुर्वेद महासम्मेलनाचें उद्घाटन करतांना मुंबई राज्याचे प्रधानमंत्री श्री. मोरारजीभाई देसाई म्हणाले "भारतांतील प्रचलित सर्व वैद्यक पद्धतींबाबत समान दृष्टिकोन जनतेनें व सरकारनें ठेवणें आवश्यक आहे. एकाच वैद्यकाला सर्व प्रकारची अनुकूलता प्राप्त करून देणें व अन्य वैद्यक पद्धतींबाबत पक्षपात करणें हें सर्वथैव अनुचित आहे.

वानप्रस्थाश्रमी वैद्यकार्यकर्ते

भुसावळ येथें भरलेल्या प्रांतीय वैद्यसंमेलनाचें उद्घाटन करतांना मध्यप्रदेशचे आरोग्यमंत्री श्री. कन्नमवार म्हणाले, "स्वातंत्र्यप्राप्तीनन्तर अन्नधान्याचे व इतर अनेक बाबतींत आपण स्वावलंबी बनत चाललों आहोत पण औषधांच्या बाबतींत मात्र आपण परावलंबी आहोत. आयुर्वेदीय औषधें व आयुर्वेदीय चिकित्सा याबाबत मागणी जनतेकडून आली पाहिजे. वैद्यांनीं जनतेंत आयुर्वेदाचा प्रचार करून विश्वास वृद्धिंगत केला पाहिजे. आज राष्ट्रसंवर्धनासाठीं पूज्य विनोबाजी भावे प्रचारकार्य करीत आहेत त्याप्रमाणें आयुर्वेदाच्या कार्याला वाहिलेले वैद्य कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत. वानप्रस्थाश्रमी अनुभवी वैद्यांनीं ही जबाबदारी उचलली पाहिजे.

मुंबई प्रान्तामध्यें शुद्ध आयुर्वेद शिक्षणाचा जो प्रयोग चालू आहे त्याकडे मध्यप्रदेश सरकारचें लक्ष आहे. तो प्रयोग यशस्वी झाला तर म. प्रदेश सरकार त्यांचें जरूर अनुकरण करील."

फिरत्या आयुर्वेदीय पथकाची योजना

"खेड्यापाड्यांतील २ लाख वैद्यांचा देशहितार्थ उपयोग करून घेणें आपलें कर्तव्य आहे. भारत सरकारच्या नियोजन मंडळाला मी एक फिरत्या आयुर्वेदीय पथकाची योजना सुचविली आहे. एक मोटार, एक चांगला वैद्य व पुरेसा औषधिसांठा असें हें पथक राहील. खेडोपाडीं जाऊन हें पथक ग्रामीण वैद्यमंडळींना साहाय्यकारी होईल.

घातपात करणारी मंडळी

आयुर्वेद संशोधनसमित्या व शिक्षणसंस्था यांच्या प्रमुखपदीं डॉक्टरांची नेमणूक केल्यानें आयुर्वेदाचें अनहित झालें आहे. आयुर्वेदाच्या समित्यांत जाऊन आयुर्वेदाचा घात करणारी मंडळी ही रेल्वे-कारखानें इत्यादि ठिकाणीं घातपात करण्याइतकीच अपराधी मानली पाहिजे.

शिक्षणाची नवी योजना

प्रथम ३॥ वर्षें शुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण घेऊन ज्याला व्यवहारिक ज्ञान घ्यावयाचें असेल त्याला ६ महिने ॲलोपॅथीतील आवश्यक तेवढें व्यवहारोपयोगी ज्ञान दिलें जाईल. ज्याला केवळ आयुर्वेदाचेंच ज्ञान वाढवावयाचें असेल त्यासाठीं आणखी १॥ वर्षांचा अभ्यसक्रम ठेवण्यांत यावयाचा आहे."

त्रिवेंद्रम् येथें भरलेल्या नि.भा. आयुर्वेद महासंमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांत वरील विचार अध्यक्ष पं. शिवशर्माजी यांनीं मांडले.

तारेचा पत्ता:-Newbottle
के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुचें, कॅपसुल्स
[हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाची सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

औषधी व अद्भुत इलाज (आक्षेपार्ह जाहिराती) बाबत भारतसरकारचा १९५४ चा २१ वा कायदा

(१) लघुशीर्षक, व्याप्ति व प्रारंभ

१) ह्या कायद्यास ' औषधी व अद्भुत इलाज (आक्षेपार्ह जाहिराती) बाबतचा कायदा १९५४ ' असें संबोधावें.

२) ह्या कायद्याची व्याप्ति जम्मू व काश्मीर खेरीज सर्व भारतास लागू आहे व अशा भारताचा नागरिक मग तो अन्य देशांत असला तरी त्यासहि लागू आहे.

३) केंद्र सरकार सरकारी गॅझेटमधून ह्या कायद्याच्या अंमलबजावणीची जी तारीख जाहीर करील त्या तारखेपासून हा कायदा सुरूं होईल.

शब्दांच्या व्याख्या

(२) व्याख्या:- ह्या कायद्यांतील विशेष संदर्भाखेरीज —

जाहिरात

(अ) 'जाहिरात' ह्या शब्दांत नोटीस, सरक्युलर, लेबल, रॅपर (वेष्टन), व इतर दस्तैवज, तसेंच तोंडानें ओरडून, प्रकाशाच्या साह्यानें अगर धुराच्या साह्यानें केलेली जाहिरात इतक्या गोष्टींचा अंतर्भाव होतो.

औषधी

(ब) औषधी ह्या शब्दांत —

१) मनुष्य वा पशु ह्यांना पोटांत दिलेलें अगर बाहेरुन लाविलेलें औषध;

२) मनुष्य वा पशु ह्यांच्या रोगनिदानाकरितां, रोग बरा होण्याकरितां, रोग शमण्याकरितां, रोगचिकित्सेकरितां अगर रोग–प्रातिबंधाकरितां उपयोगांत आणलेली वस्तु अगर पदार्थ;

३) मनुष्य अगर पशु ह्यांच्या शरीरावर अगर इंद्रिय–व्यापारावर परिणाम करणारी खाद्य वस्तूंखेरीज कोणतीहि वस्तु अगर पदार्थ;

४) वरील पोट कलमें १ ते ३ ह्यांतील औषध, वस्तु अगर पदार्थ ह्यास साहाय्यक म्हणून वापरण्याचा इरादा असलेली पूरक वस्तु.

अद्भुत इलाज

(क) अद्भुत इलाज (' Magic Remedy') ह्यांत ताईत, यंत्र, मंत्र, कवच अगर अशाच प्रकारचें कोणतेहि अद्भुत साधन कीं ज्यानें मनुष्य वा पशु यांचे रोगनिदान, सुकृति, शमन अगर प्रतिबंध होईल असें सांगितलें जातें अगर ज्यानें मनुष्य वा पशु यांच्या शरीरावर अगर इंद्रिय-व्यापारावर परिणाम होईल असें म्हटलें जातें अशा सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो.

जाहिरातींत भाग घेणें

(ड) ' औषधी जाहिरात प्रकाशित करण्यांत भाग घेणें, ह्यांत खालील गोष्टींचा समावेश होतो—

१) अशी जाहिरात छापणें अगर छापविणें.

२) अशी जाहिरात सदरचा कायदा लागू असलेल्या प्रदेशांत अगर बाह्य प्रदेशांत प्रकाशित करणें.

(इ) ' उपदंश रोग ' — ह्यांत गरमी, परमा, (Soft chancre), (Venereal granuloma), (Lympho granuloma) ह्यांचा समावेश होतो.

(३) विशिष्ट रोग व विकृति ह्यांच्यावरील विशिष्ट औषधांच्या जाहिरातीस प्रतिबंध

ह्या कायद्यांतील तरतुदीस अनुसरून कोणीहि व्यक्ति खालीं दर्शविलेल्या रोगांच्या बाबतींत असलेल्या अगर तद्भावी स्वरूपाच्या कोणत्याहि औषधाच्या जाहिरातीच्या प्रकाशनांत भाग घेऊं शकणार नाहीं.

अ) स्त्रियांचे बाबतींत गर्भ उमळविणारीं अगर गर्भप्रतिबंधक औषधें;

ब) स्त्री अगर पुरुषाची कामेच्छा टिकविणारीं अगर वाढविणारीं औषधें;

क) स्त्रियांचा मासिकस्राव नियमित सुरूं करणारीं औषधें;

ड) कोणत्याहि उपदंश रोगाचें निदान, चिकित्सा, तंदुरुस्ती, शमन अगर प्रतिबंध करणारीं औषधें व तसेंच ह्या कायद्यास अनुसरून केलेल्या कानूंत निर्दिष्ट केलेले रोग व अवस्था यांवरील अगर संबंधीं औषधें.

(४) दिशाभूल करणाऱ्या औषधींच्या जाहिरातींस मनाई

सदर कायद्यांतील तरतुदीस अनुसरून कोणीहि व्यक्ति कोणत्याहि औषधाचे बाबतींत कोणतीहि जाहिरात त्यांत खालील गोष्टी असल्यास प्रसिद्ध करूं शकणार नाहीं.

अ) प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या जी जाहिरात औषधीचें सत्य स्वरूपाबाबत विपर्यस्त कल्पना निर्माण करते; किंवा

(ब) औषधीबाबत खोटी ग्वाही देते; किंवा

(क) जाहिरातींतील एकादा विशिष्ट भाग हा खोटा अगर दिशाभूल करणारा असा प्रकाशित करते.

(५) विशिष्ट रोग व विकृतींचे बाबतींत अद्भुत इलाज प्रसिद्ध करणाऱ्या जाहिरातींना मनाई

कोणीहि व्यक्ति सेक्शन ३ मध्यें नमूद केलेल्या बाबतींत अद्भुत इलाजांची चिकित्सा करणारी अगर करूं इच्छिणारी असेल, तर अशा कोणत्याहि व्यक्तीनें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या अशा कोणत्याहि अद्भुत इलाजाविषयीं जाहिरात प्रसिद्ध करतां कामा नये.

(६) विशिष्ट जाहिराती भारतांत आयात अगर भारतांतून निर्यात करण्यास प्रतिबंध

कोणीहि व्यक्ति सेक्शन ३, ४, व ५ ह्यांत निर्देशित केलेल्या स्वरूपाची कोणतीहि जाहिरात कोणत्याहि दस्तखतांतून अगर पत्रकांतून सदरहू कायदा लागू असलेल्या प्रदेशांतून निर्यात अगर प्रदेशांत आयात करूं शकणार नाहीं. आणि कोणत्याहि दस्तखतांत अगर पत्रकांत अशा जाहिराती असल्यास अशीं दस्तखतें अगर पत्रकें हीं ‘ सी कस्टम्स् ॲक्ट १८७८ ’ (१८७८ चा ८ वा कायदा) चा सेक्शन १९ अन्वयें आयातीस अगर निर्यातसि प्रतिबंधित माल म्हणून समजण्यांत येईल; व त्या कायद्यांतील सेक्शन १८३ मध्यें ‘ Shall ’ या विध्यर्थी शब्दाऐवजीं ‘ May ’ हा संकेतार्थी शब्द आहे असें समजून सर्व तरतुदी लागू होतील.

(७) दंड

जो कोणी सदर कायद्यांतील कोणत्याहि तरतुदीचा भंग करील तो खालीलप्रमाणें शिक्षेस पात्र होईल.

अ) पहिल्यां गुन्ह्याचे वेळीं ६ महिनेपर्यंत कारावास अगर दंड अगर दोन्ही.

ब) पुढील गुन्ह्यास १२ महिनेपर्यंत कारावास अगर दंड अगर दोन्ही.

(८) सदर कायद्यानें मनाई केलेले दस्तऐवज, वाङ्मय वगैरे जप्त करणें

ह्या कामाकरितां प्रांतीय सरकारनें जो अधिकारी नेमला असेल अशा अधिकाऱ्यास जर कोणताहि दस्तैवज, वाङ्मय अगर वस्तु ह्यांत आक्षेपार्ह जाहिरात आहे असें वाटण्यास कारण असेल तर सदर अधिकारी अशी कोणतीहि वस्तु, वाङ्मय अगर दस्तैवज स्थगित करूं शकेल अगर आपल्या ताब्यांत घेऊं शकेल. आणि अशा गुन्ह्याची चौकशी ज्या कोर्टापुढें चालू असेल ते कोर्ट असा दस्तैवज अगर वाङ्मय (सर्व प्रति) अगर वस्तु सरकारकडे जप्त करण्याविषयीं हुकूम काढूं शकेल.

(९) कंपन्याकडून होणारे गुन्हे

१) सदर कायद्यांतील तरतुदींचा भंग करणारी व्यक्ति ही जर कंपनी असेल तर असा गुन्हा घडतेवेळीं ज्या व्यक्ती कार्याधीन होत्या व ज्या कंपनीच्या कामास जबाबदार होत्या त्या सर्व व्यक्ती व खुद्द कंपनी हे सर्व अशा गुन्ह्याबाबंत अपराधी समजले

ले, व अशा सर्वांविरुद्ध अभियोगाचें काम न ते दोषी ठरल्यास त्यांना शिक्षा होतील. ह्या पोट सेक्शनमधील तरतुदींमुळें जर एखादी ने अशा गुन्ह्याची त्यास दखल नव्हती असें अगर नें असा गुन्हा न होण्याविषयीं जरूर ती सर्व घेतली होती, असें सिद्ध करील तर अशा शिक्षा होणार नाहीं.

२) वरील पोट सेक्शन १ मधील तरतुदी न घेतां, जर एकाद्या कंपनीकडून सदर याखालीं गुन्हा घडला असेल व सदरहु गुन्हा हा कंपनीच्या डायरेक्टर, मॅनेजर, सेक्रेटरी अगर एकाद्या अधिकाऱ्याच्या संमतीनें, जाणून-डोळेझांकीमुळें अगर हलगर्जीपणामुळें घडला तर असा डायरेक्टर, मॅनेजर, सेक्रेटरी अगर दुसरा अधिकारी हा गुन्हेगार समजला जाऊन विरुद्ध अभियोग होण्यास तो पात्र समजला व तो गुन्हेगार म्हणून सिद्ध झाल्यास कायद्या-नें त्यास शिक्षा होईल.

स्पष्टीकरण— ह्या सेक्शनच्या अर्थाकरितां—

(अ) 'कंपनी' ह्या शब्दानें कोणताहि कायदेशीर समजावा व त्यांत फर्म अगर अनेक व्यक्तींनीं लेला संघ ह्याचा समावेश होतो.

(ब) 'डायरेक्टर'— फर्मचा डायरेक्टर म्हणजे चा भागीदार.

(१०) कोर्टाचें अधिकारक्षेत्र

ह्या कायद्याखालील खटले प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट गर मॅजिस्ट्रेट वर्ग १ हेच चालवूं शकतील.

(११) अधिकारी सार्वजनिक नोकर समजण्यांत येतील

ह्या कायद्याच्या सेक्शन ८ खालीं नेमलेली नेक व्यक्ति, भारतीय दंड संहितेच्या सेक्शन २१ माणें सार्वजनिक नोकर समजली जाईल. १८६० चा ४५ वा कायदा).

(१२) नुकसानभरपाई

कोणत्याहि अधिकारी व्यक्तीनें ह्या कायद्याखालीं सादिच्छापूर्वक केलेल्या अगर करावयाच्या कारवाई-बद्दल त्याचे विरुद्ध कोणतेहि कायदेशीर इलाज चालणार नाहींत.

(१३) दुसऱ्या कायद्यावर ह्या कायद्याचा परिणाम होणार नाहीं

प्रचलित असलेल्या कोणत्याहि कायद्यावर ह्या कायद्यामुळें अनिष्ट परिणाम होणार नाहीं, तर हा कायदा त्यांना पोषक म्हणूनच समजला जाईल.

(१४) कायदा बाधक होणार नाहीं !

ह्या कायद्यांतील कोणतीहि तरतूद खालील गोष्टींना लागूं होणार नाहीं

अ) रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनरनें आपल्या चिकित्सा व्यवसायाचे हद्दींत सेक्शन ३ मध्यें नमूद केलेल्या कोणत्याहि रोगावर अगर विकृतीवर येथें चिकित्सा केली जाते असा फलक अगर जाहिरात लावल्यास; किंवा

ब) सेक्शन ३ मध्यें नमूद केलेल्या कोणत्याहि बाबीवर एखादें शास्त्रीय अगर सामाजिक दृष्ट्या लिहिलेलें अधिकृत निवेदन अगर पुस्तक; किंवा

क) नमूद केलेल्या पद्धतीनुसार कोणत्याहि औषधीसंबंधीं खाजगत जाहिरात कीं जी रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनरला पाठविली असेल किंवा घाऊक अगर किरकोळ केमिस्टला (औषधी विक्रेत्यास), हॉस्पिटलला अगर लॅबॉरेटरीला वाटण्याकरितां पाठविली असेल; किंवा

(ड) जी जाहिरात सरकारतर्फे छापून प्रसिद्ध झाली असेल अगर ज्या जाहिरातीस सरकारची पूर्व परवानगी घेऊन ती कोणीहि प्रसिद्ध केली असेल; किंवा

(इ) कोणतीहि जाहिरात, लेबल किंवा विधायक सूचना कीं ज्या 'ड्रग्ज ॲक्ट, १९४०' (१९४० चा २३ वा) अगर त्यावरील कानूअन्वयें प्रसिद्ध करण्यास परवानगी आहे.

(२) ह्या सेक्शनमध्यें—–

(अ) ‘ रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर ’ म्हणजे

१) ‘इंडियन मेडिकल डिग्रीज ॲक्ट, १९१६’ (१९१६ चा ७ वा कायदा) च्या सेक्शन ३ अन्वयें अधिकृत असलेल्या अधिकाऱ्याकडून मान्य केलेली शैक्षणिक लायकी धारण करणारे इसम, किंवा ‘ इंडियन मेडिकल कौन्सिल ॲक्ट, १९३३ ’ (१९३३ चा २६ वा कायदा) च्या कोणत्याहि परिशिष्टांत निर्देशित केलेल्या अधिकाऱ्यानें मान्य केलेली शैक्षणिक लायकी धारण करणारे इसम, किंवा

२) जो इसम ह्या कायद्याची व्याप्ति असलेल्या कोणत्याहि राज्यांत रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर म्हणून नोंदविला जाण्यास कायद्यानें पात्र असेल असा इसम.

(ब) ‘ हॉस्पिटल ’ ह्या संज्ञेंत दवाखाना, औषध मिळण्याचें स्थान अगर संस्था कीं जींत अंतःप्रविष्ट अगर बाह्य रुग्णास औषधोपचार केला जातो, ह्या गोष्टींचा समावेश होतो.

(१५) सदर कायद्याची माफी देण्याचा अधिकार

जर केंद्रसरकारला एखादी औषधी जाहिरात ही सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें बंधमुक्त असावी असें वाटत असेल तर केंद्रसरकार अशा विशिष्ट औषधी-संबंधीं अगर औषधी प्रकारांसंबंधीं सरकारी गॅझेटांतून नोटीस प्रसिद्ध करून सेक्शन ३, ४, ५ व ६ ह्यांतील सर्व अगर कांहीं तरतुदी ह्यां अशा विशिष्ट औषधीस अगर औषधी प्रकारांस लागू असतील किंवा नसतील हें त्यावरील शर्तीअटीसह जाहीर करील.

(१६) नियम व कानू करण्याचा अधिकार

१. सदर कायद्याचे हेतुसिद्धीकरितां केंद्र सरकार जरूर वाटल्यास नियम व कानू करून ते सरकारी गॅझेटमध्यें प्रसिद्ध करील.

२) विशेषतः अशा नियम व कानूंनीं, सदर कायद्यांतील सर्वसाधारण अधिकारक्षेत्रास बाध न आणतां—

(अ) सेक्शन ३ मध्यें नमूद असलेल्या ता ह्या इतर कांहीं रोगांस व अवस्थांस लागू अस निर्देशीकरण करणें; व

(ब) सेक्शन १४ चा पोट-सेक्शन १ चें ‘ सी ’ यांत समाविष्ट असलेल्या वस्तूबद्दल, पदा बद्दल अगर औषधीबद्दल खाजगत जाहिरात को पद्धतीनें पाठवावयाची ती पद्धत नमूद करणें.

सांडू ब्रदर्सचीं
शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.

वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.

पत्रव्यवहाराचा पत्ताः—
दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
चेंबूर लि.
फॅक्टरी व हेड ऑफिस— चेंबूर (मुंबई)

थंडगार
नेत्रांजन
डोळ्यांचे विकारावर उत्कृष्ट
कृष्णशास्त्री बिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

मला भेटलेले श्रेष्ठ वैद्यः—१

वैद्यभूषण कै. पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर

(लेखकः— माधव गणेश जोशी आयुर्वेदाचार्य २८ शुक्रवार पुणें २)

सन १९४५ च्या डिसेंबरमधील गोष्ट. सदर्न मराठा रेल्वेची गाडी आम्हाला हुबळीकडे नेत होती. मेल असल्यामुळें गाडी बऱ्याच वेगानें जात होती.

कै. पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर

मणिपाळ येथें भरणाऱ्या नि. भा. वर्षीय महासम्मेलनाचे अधिवेशनाला आम्ही तीन व्यक्ती दुसऱ्या वर्गानें प्रवास करीत होतो. सर्वांनीं आपापल्या पथाऱ्या घालून झोपण्याची तयारी केली होतीच. त्याप्रमाणें तिसरे गृहस्थ झोपीं गेलेहि. मी वरील बर्थवर झोपावयास जाणार इतक्यांत “ बापूराव, इतक्यांत कसले झोपतां ! जरा वेळ बसून बोलूं या, ” अशी वैद्यराजांनीं सूचना केली. मला थोडेंसें आश्चर्यच वाटलें. कारण त्यांच्या स्वभावाविषयीं मी जें ऐकलें होतें त्याच्याशीं हा प्रकार जुळणारा नव्हता. शिवाय ह्या वेळेपर्यंत त्यांचा माझा प्रत्यक्ष परिचय झालेलाच नव्हता. एक दोन वेळां मी त्यांना पाहिलें होतें. व शास्त्रीबुवाहि कदाचित् आपल्या सहाध्यायाचा— वै. भू. गणेशशास्त्री जोशी यांचा – मुलगा म्हणून मला अप्रत्यक्षपणें ओळखीत असतील.

जणुं जुना परिचित मित्र

थोंड्याशा साशंक मनानें व भीतभीतच मी त्यांच्या बर्थवर येऊन बसलो. गाडी वेगांत असल्यामुळें एकमेकांचें बोलणें ऐकावयास त्रास होत असला तरी तब्बल दोन तास त्या सद्गृहस्थानीं माझेजवळ जणुंकांहीं मी अत्यंत जुना परिचित असल्यासारखें संभाषण केलें. शास्त्रीय चर्चा, पुण्याच्या वैद्यमंडळींची सार्वजनिक काम करण्याची आस्था, वैद्यक चळवळीशीं संबंध असलेल्या बृहन्महाराष्ट्रांतील व इतर नामवंत व्यक्ती वगैरे सर्व विषय त्यांत येऊन गेले. पूर्ण आठ दिवस आम्ही एकत्र प्रवास करीत होतो. त्यावेळीं आपलें वय, विद्वत्ता व स्थळ यांचा विचार न करतां आम्हां सर्वांशीं ते समरस झाले होते. मणिपाळला ते विद्यापीठसम्मेलनाचे अध्यक्ष म्हणून जात होते. तेथें पोंचल्यावरदेखील आमच्याशीं बऱ्याच मोकळेपणानें थट्टामस्करी करीत होते.

तिखट जिभेचे व शीघ्रकोपी ?

तिसऱ्या दिवशीं दुपारीं जेवायला जात असतांना मागाहून येऊन पाठीवर हलूंच थाप मारून म्हणाले ‘काय बापूजी, कसं काय? खरंच किती मोकळेपणा वाटतो आहे. तुमच्या वडिलांशींहि मी इतका समरस झालो नाहीं.’ मलाहि जरा विचित्रच वाटलें. तिखट जिभेचे व शीघ्रकोपी म्हणून ऐकलेले शास्त्रीबुवा ते हेच काय ? असा संशय पडला. त्यानंतर त्यांची जसजशी ओळख वाढत गेली तसा ह्या विरोधाचा उलगडा झाला. त्यांची वृत्ति खेळाडू आहे. शास्त्रीय चर्चेंत कोणी कितीहि विरोधी बोलले अगर लिहिले तरी त्याच्यावर न रागावतां उलट त्याची कदर करतात व प्रसंगीं त्याचे असलेले गैरसमज दूर करतात. पण त्यांना कोणी अस्थानीं डिवचलें अगर त्यांच्या एखाद्या व्यंगावर टीका केली तर मात्र ते कोणाची भीड

मुर्वत न ठेवतां त्याच्यावर तुटून पडत असत किंवा निरुपयोगी शब्दप्रयोगहि करीत. परन्तु असा प्रसंग मी एकच पाहिला असल्यामुळें मला त्यांच्या त्या अवस्थेची कल्पना नाहीं. मी मात्र त्यांना शेवटपर्यंत खिळाडुवृत्तीचे व विनोदी असेच पाहिले.

शारीरं तत्त्वदर्शनम्

त्यांचें शास्त्रीय लिखाण पुष्कळ आहे. तें सर्व माझ्याकडून वाचलें गेलें नाहीं. पण जें कांहीं थोडेंसें मी वाचलें आहे त्यांत आयुर्वेदाच्या सर्व अंगोपांगाचें सूक्ष्म वर्णन पहावयाला मिळतें. पुष्कळ विचार, चर्चा व चिंतनानें त्यांनीं ‘ शारीरं तत्त्वदर्शनम् ’ हें पुस्तक लिहिलें आहे. तें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर त्याच्यावर बरीच टीका लेखरूपानें प्रसिद्ध झाली, त्याचप्रमाणें बऱ्याच लोकांनीं पुस्तकाची स्तुतीहि केली आहे. सन १९२९ पासून दोषांच्या वादाला सुरुवात झाली असें म्हणावयाला हरकत नाहीं. त्यावेळीं श्री. हिर्लेकर यांनीं एक विशिष्ट दृष्टिकोन मांडून त्रिदोष–विचारांना चालना दिली. त्यानंतर झालेल्या पनवेल येथील त्रिदोष चर्चा परिषदेंत त्यांनीं आपला विचार मांडला. (त्यालाच पुढें शक्ति–पक्ष असें संबोधण्यांत येऊं लागलें.) तो विचार तेथें जमलेल्या मंडळींना पटला नाहीं व बहुमतानें त्यांनीं दोषद्रव्यांचे बाबतींत मांडलेला ठराव नापास झाला. (यावेळीं त्यांच्या ठरावाला ते स्वतः व त्यांचे शिष्य श्री देशपांडे हे दोघेच अनुकूल होते.) तथापि आपलें मत त्यांनीं सोडलें नाहीं. उलट जास्त विचार करून आपलें मत प्रभावी कसें होईल याचा प्रयत्न ते करूं लागले. त्या प्रयत्नाचें फळ म्हणूनच ‘ शारीरं तत्त्वदर्शनम् ’ ह्या अत्युत्तम पुस्तकाचा जन्म झाला.

प्रत्येक वेळीं नवीन ज्ञान

आपण विचार करून प्रस्थापित केलेलें मत पटवून देतांना--मग तें भाषणाचे स्वरूपांत असो अगर लेखाचे स्वरूपांत असो–त्यांचा तोल कधींहि सुटत नसे. सात आठ वर्षांचे अवधींत शास्त्रीय विषयावरील त्यांचीं पांच सहा व्याख्यानें ऐकण्याची संधि मिळाली होती. त्यांचा विषय एकच असे व ते काय सिद्धा पुढें मांडणार आहेत याचीहि कल्पना पुढें पु आगाऊ येत असे. पण ते विचार मांडतांना मांडलेलें युक्ति किंवा विचारपद्धति वेगवेगळी असे व त्यामुळें प्रत्येक वेळेला कांहींतरी नवीन ज्ञान मिळाल्यासारखें वाटे. चर्चेच्या वेळीं [अर्थात् ती योग्य तऱ्हेनें चालली असेल तर] कितीतरी नवीन गोष्टी ऐकावयास मिळत. मग शास्त्रीय चर्चेबरोबरच वैद्यक चळवळींतील पद्धती, दोष, त्यांत काम करणाऱ्या व्यक्ती आणि त्यांचीं असलेलीं मतमतांतरें या विषयांचीहि भर पडे. संभाषणाच्या भरांत कोणता विषय कोठें जाईल याचा नेम नसे. एकदां बोलायला बसले म्हणजे किती वेळ झाला याची दखल घेतलेली कधींच आढळली नाहीं.

संभाषणासाठीं जागरण

श्री. हिर्लेकरशास्त्री यांचेकडे जावयाचें म्हणजे जितके दिवस राहूं त्या सर्व रात्री संभाषणाकरितां किंवा चर्चेकरितां जागूनच काढल्या पाहिजेत असा त्यांच्या शिष्यांचा अनुभव आहे. ह्यांत अतिशयोक्ति कदाचित् असेल किंवा नसेल, पण पुणें येथें आल्या वेळीं त्यांच्याबरोबर बोलत असतांना जो वेळ गेला त्यावरून त्यांत पुष्कळच सत्याचा अंश असावा असें वाटतें.

अवर्णनीय तळमळ

एखादें सुरू केलेलें काम--मग तें शास्त्रीय लेखन असो अगर वैद्यकाच्या चळवळीविषयीं असो–तें पर्यंत विश्रांति म्हणून घ्यावयाची नाहीं असा त्यांचा बाणा असे. त्याकरितां स्वतःचा व्यवसाय अगर अन्य कार्य राहून गेलें तरी त्याची पर्वा मुळींच ते करीत नसत. ह्याचा अनुभव त्यांचेशीं ज्यांचा नित्याचा घनिष्ट संबंध आला त्यांना पुरेपूर आला असल्याचें त्यांच्याकडून सांगण्यांत येतें. त्यांच्या जीवनांतील इतर गोष्टी अगर वागण्याची पद्धत परिचयाची नसली तरी आयुर्वेदशास्त्राबद्दल दिसणारी त्यांची तळमळ अवर्णनीय होती.

मृत्युपूर्वी तीन महिने रुग्णशय्येवर असतांना त्यांना भेटीला गेलो होतो. इतर कोणतेहि विवाद्य विषयांवी चर्चा करणें हा हेतु नव्हताच, पण भेट झाल्यावर शास्त्रीबुवांना राहवेना. इतर कोणतीहि गोष्ट बोलतां आयुर्वेदशास्त्रावरील चर्चाच त्यांनीं सुरूं केली, सतत दीड तास ते त्या क्षीण आवाजांत बोलत होते. 'आपल्याला त्रास होईल, फार बोलूं नका' असें मी सांगितलें, तेव्हां ते म्हणाले 'मुळींच त्रास होत नाहीं. उलट गप्प बसूनच फार त्रास होतो. तुमच्याशीं बोलण्यांत माझा वेळ केव्हां गेला हें कळलें नाहीं.' पण मग मीच तेथून उठून गेलो.

आर्ष ग्रंथांचें त्यांचें वाचन सूक्ष्म होतें. ग्रंथांचे टीकाकारांनीं प्रतिपादन केलेलें अनेक विस्तार मूळ ग्रंथांशीं विसंगत असल्याचें त्यांना आढळून आले त्यावेळीं त्या टीकाकारांचा परामर्श घेतल्याशिवाय ते राहत नसत. किंबहुना मरणापूर्वीं दहा वर्षें त्यांच्या लेख व व्याख्यानांतून ह्याच मुद्याचा विस्तार जास्त केलेला दिसून येईल. मणिपाल येथील विद्यापीठ–अध्यक्षीय भाषणांत त्यांनीं हा मुद्दा बराच विस्तारानें मांडला आहे. ग्रंथ वाचतांना चौकस बुद्धीनें वाचा. टीकाकार चुकत असेल तर त्याच्याबद्दल आदर असूनहि त्याला दूर सारा. प्रतिपाद्य विषयाचा अनुभव जर उलटा आला तर मूळ ग्रंथकारदेखील बाजूला सारा, असा एकंदर त्यांच्या प्रतिपादनाचा सूर होता.

सन १९४७ पासून त्यांच्याकडून आयुर्वेदोन्नतीची निराळीच कल्पना पुढें येऊं लागली. औरंगाबाद येथें भरलेल्या मराठवाडा वैद्यसम्मेलनांत प्रथम ती कल्पना ऐकूं आली. आयुर्वेदामध्यें नसलेल्या अगर कमी असलेल्या विभागांचें संशोधन करून व प्रसंगाविशेषीं अन्य शास्त्रांतून ते घेऊन अष्टांग संपूर्ण आयुर्वेद करावयाचा ही ती कल्पना होय. ह्या कल्पनेला ते समन्वयपद्धति म्हणूं लागले. ह्या कल्पनेचें जनकत्व कोणाकडे आहे हें माहित नसलें तरी त्याचे प्रोत्साहक त्यावेळचे मध्यप्रदेशाचे आरोग्यमंत्री डॉ. बारलिंगे हे होते हें स्पष्ट झालें होतें. त्यांच्या प्रेरणेनें समन्वय–परिषद नागपूर येथें भरली होती. त्यांत पुष्कळ निरनिराळ्या शास्त्रज्ञांनीं व वैद्यांनींहि भाग घेतला होता. मात्र साध्याच्या बाबतींत शास्त्रीबुवांचा व पाश्चात्यविद्याविभूषितांचा दृष्टिकोन मात्र भिन्न होता. आयुर्वेदाचा लुप्त अंग व इतस्ततः विखुरलेलें त्रोटक ज्ञान त्यांना इतर शास्त्रांच्या सहाय्यानें परिबृंहित करावयाचें होतें, तर पाश्चात्यविद्याविभूषितांना आयुर्वेदांतलि विज्ञान पाश्चात्य वैद्यकाच्या सिद्धांताच्या निकषावर घासून तें टिकूं शकतें कीं काय हें बघावयाचें होतें. सारांश, एकीकडे शास्त्रवादीविषयीं तळमळ व दुसरीकडे आयुर्वेदसिद्धांताविषयीं जबरदस्त संशय अशा दुहेरी वातावरणांत समन्वय कल्पना हेलकावे खात होती. कांहीं झालें तरी ह्या पद्धतीनें काम करून बघावयाचेच असा कृतसंकल्प केलेल्या शास्त्रीबुवांनीं इतर कोणाच्याहि बोलण्याकडे दुर्लक्ष केलें. त्या वेळच्या राज्यपालांच्या (श्री. मंगळदास पक्वासा) सहाय्यानें निघालेल्या नागपूर येथील समन्वय रुग्णालयांत त्यांनीं काम करण्याचें ठरविलें व आठवड्यांतून कांहीं दिवस आपल्या व्यवसायाकडे दुर्लक्ष करूनहि नागपूर येथें राहावयाचे ठरविलें. त्या समन्वय कल्पनेची जोपासना पुढें कशी झाली व हल्लीं त्याचें काम काय स्वरूपाचें चालूं आहे ह्याची माहिती निदान मला तरी उपलब्ध नाहीं. पण ज्या अर्थी त्या कल्पनेचा डंका त्यावेळीं समन्वयाचा पुरस्कार करणाऱ्या मंडळींच्या वैद्यकीय मासिकांतून वा पत्रिकांतून येत नाहीं त्या अर्थी याचें काम यथातथाच चाललें असावें असें अनुमान काढणें भाग आहे. त्या कल्पनेचे कांहीं झालें असलें तरी शास्त्रीबुवांनीं आपल्याला पटलेल्या कामांत दाखविलेली तत्परता व उत्सुकता गौरवास्पद होती यांत शंका नाहीं.

मुंबईराज्य वैद्य-संमेलन, भुसावळ

अधिवेशन २ रें (दि. १८-५-५५,) स्वीकृत झालेले ठराव

[१] मुंबई-राज्य वैद्यसंमेलनाचें हें अधिवेशन, महागुजरात वैद्यमंडळ, महाराष्ट्र वैद्यमंडळ, निखिल कर्नाटक वैद्यमंडळ आणि बृहन् मुंबई वैद्यसंमेलन या संस्थांचे आभार मानतें; व ह्या संस्थांनींच मुंबईराज्य वैद्य-संमेलनाची स्थापना केली असल्यानें त्या सर्वांचें ह्या संमेलनास सदैव सहकार्य लाभावें अशी त्यांना विनंति करतें.

प्रस्तावक– श्री. वामनराव दीनानाथ व्यास.
अनुमोदक– श्री. पं. शिवशर्मा

सर्वानुमतें मंजूर

[२] प्रधान-मंत्री यांनीं संमेलनाची नियमावली वाचून दाखविली व ती सर्वानुमतें मंजूर करण्यांत आली.

[३] हें संमेलन, ह्या संमेलनांच्या वर्तमान कार्यकारी सदस्यांचा पुढील वर्षाकरितां अधिकृत कार्यकारी सदस्य म्हणून स्वीकार करीत आहे. ह्या सदस्यांनीं आपणामध्यें आगखी आठ सदस्य मनोनीत [नॉमिनेट] करावेत. कार्यकारिणीचे पदाधिकारी खालीलप्रमाणें नियुक्त करण्यांत येत आहेत.—

(१) श्री. गं. वि. [नानासाहेब] पुराणिक— अध्यक्ष
(२) ,, वामनराव दीनानाथ व्यास— उपाध्यक्ष
(३) ,, दत्तात्रेयशास्त्री जळूकर— ,,
(४) ,, मरुलाराध्यशास्त्री— ,,
(५) ,, गजानन शर्मा— ,,
(६) ,, आबासाहेब सांडू— कोषाध्यक्ष
(७) ,, श्रीराम शर्मा— प्रधानमंत्री
(८) ,, सोमेश्वर म. भट्ट— सहमंत्री
(९) ,, ब्रह्मदत्त शर्मा ,,
(१०) ,, व्ही. एस्. हिरेमठ— ,,
(११) ,, माधवप्रसाद ना. शास्त्री —आयव्ययनिरीक्षक
(१२) ,, का. सी. भावे— ,,
(१३) ,, बिन्दुमाधव पंडित— सदस्य
(१४) ,, प्रतापकुमार पोपटभाई वैद्य— ,,
(१५) ,, पां. वि. जायदे— ,,
(१६) ,, ना. ह. जोशी— ,,
(१७) श्री. अ. वि. गदग सदस्य

अध्यक्षाकडून

[४] ही संमेलन संस्था आजच्या ह्या अधि वेशनाचा मुंबईराज्य वैद्यसंमेलनाचें द्वितीय अधि वेशन म्हणून स्वीकार करीत आहे.

प्रस्तावक– श्री. सोमेश्वर म. भट्ट मुंबई
अनु.– ,, म. भा. वाटवे बेळगाव (सर्वसंम

[५] हें संमेलन, मुंबई सरकारच्या आयु वेंदोन्नतिकार्याबद्दल तसेंच १) शुद्धायुर्वेद पाठ्यक्र स्वीकृति २) डायरेक्टर ऑफ् आयुर्वेद यांची निर्यु ३) कृत्रिम औषध प्रतिबंधक समितीची स्थापना, ४) वनस्पतिसंशोधन समितीची स्थापना, ह्या गो बद्दल सरकारचें अभिनंदन करीत आहे. त्याचप्र वरील स्थानांवर एकाहि ॲलोपाथिक डॉक्टर नियुक्ति न केल्याबद्दल संतोष व्यक्त करीत आ तसेंच आयुर्वेदीय कार्य, समित्या वगैरेवर सरक भावी कालांत केवळ वैद्यांचीच नियुक्ति करावी, ज्या वर्तमान आयुर्वेदीय समित्या वगैरेवर डॉक्टर नियुक्ति झालेली आहे त्या जागेवरून त्यांना त तितक्या लवकर निवृत्त करून त्यांचे जागीं आयुर्वे वैद्यांची नियुक्ति करावी अशी विनंति हें संमे सरकारला करीत आहे.

प्रस्तावक– श्री. ना. ह. जोशी, मुंबई
अनु.– ,, रणजितराय देसाई, सूरत. सर्वसंम

६] हें 'मुंबई राज्य वैद्य संमेलन' मुंब राज्यांतील वैद्यांची प्रातिनिधिक संस्था म्हणून मुं सरकारनें तिचा स्वीकार करावा व राज्यांत होणाऱ्या सर्व आयुर्वेदीय कार्यांत ह्या संमेलनां विचारविनिमय करावा व ह्या संस्थेशीं सतत संब ठेवावा अशी विनंति हें संमेलन मुंबई राज्य सरका करीत आहे.

प्रस्तावक– श्री. नाटोलीकर, कागल
अनु. ,, रामभाऊ भोगे मुंबई (सर्वसंम

(सही) श्रीराम शर्मा, मं

महाराष्ट्र प्रां. वैद्य संमेलन, भुसावळ

प्रचार कार्य

वैद्य ब्रह्मदत्त शर्मा, कविराज का. सी. भावे, वै. भगवंत त्र्यंबक वैद्य, वै. मो. ल. ठोंबरे, वै. चूडामणी खंडेराव, वै. रामविलासजी गुप्ता, वै. ज. रा. नाईक, वै. रामदासशास्त्री पाठक, वै. सुपड्डू वाणी, वै. ना. न. भगरेशास्त्री, वै. श्री. रा. करंजीकर, वै. शं गो. गुर्जे, वै. गो. शं. जोशी, वै. मा. ब्रा. जोशी, वै. ज. वा. मोकाशी, वै. गो. स. जोग, वै. पी. एल्. व्यास, वै. जळूकरशास्त्री, वै. रामदास वैद्य साक्री, वै. जहागिरदार, वै. धामणे, वै. द. ब. कुळकर्णी प्रभृतींनीं आपापल्या गांवीं व लगतच्या कार्यक्षेत्रांत हिंडून प्रचार व वर्गणी जमविण्याचें कार्य केलें. जिल्हानिहाय प्रचारकार्यासाठीं वै. ब्रह्मदत्त शर्मा, वै. जळूकरशास्त्री, कविराज भावे हे हिंडत असतांना त्या त्या ठिकाणच्या वैद्यबंधूंनींहि निरपेक्ष साह्य केलें. त्यांत नगर जिल्ह्यांत श्री. गुणे बंधू, वै. एकतारे, वै. जोग, वै. वाग्भट्ट, मुंबई उपनगर जिल्ह्यांत वै. ना. ह. जोशी, वै. प्रतापकुमार, वै. कृ. के. कानिटकर, वै. श्रीराम शर्मा, वै. रा. ना. आंब्रे, वै. दे. ल. आनंदे, वै. भुरे, व वै. भोगे प्रभृति मुंबई जिल्हा वैद्यमंडळाच्या कार्यकर्त्यांचीं नांवें उल्लेखनीय आहेत. पुणें येथील वै. माधवशास्त्री जोशी, कोल्हापूरला वै. गुणे, कागलचे वै. नाटोलीकर, बेळगांवीं वै. वाटवेशास्त्री, चेंबूर येथें भाऊसाहेब सांड्ू यांनींहि बहुमोल साह्य केलें.

वृत्तपत्रांचे विशेषांक

प्रचाराचे कामीं व्यक्तीप्रमाणेंच वृत्तपत्रकर्त्यांनींहि फार मोठें साह्य झालें. केसरी, दैनिक भारत, लोकमान्य, गांवकरी व नागपूरचे आयुर्वेद (हिंदी) या पत्रांचा उल्लेख करण्याजोगा आहे. विशेषतः पुण्याचा दैनिक भारत, मुंबई लोकमान्य, नासिकचा गांवकरी, नागपूरचा आयुर्वेद, भुसावळचा लोकशाही व अंगार ह्या पत्रांच्या संपादकांनीं आयुर्वेद पुरवणी विशेष अंक–काढून प्रचाराचे कामीं फारच मोठा हातभार लावला यांत शंका नाहीं. मुंबईच्या लोकमान्य पत्रानें तर आपला खास बातमीदारच येथें पाठवून ह्या प्रांतीय दशम वैद्यसंमेलन वृत्तसंकलनाचें फार मोठें कार्य केलें हें गौरवानें नमूद करावेंसें वाटतें. तसेंच- निरनिराळ्या वृत्तपत्राचे व बातमीदार संस्थांचे भुसावळचे स्थानिक प्रतिनिधि श्री. देसाई, साटे, दामले, देशपांडे यांनींहि यथेष्ट साह्य केलें हें नमूद केलेंच पाहिजे.

आयुर्वेदीय नियत कालिके

महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळाचे प्रचारकार्याची संपूर्ण जबाबदारी गेलीं दोन वर्षे सांभाळणाऱ्या 'आयुर्वेद पत्रिका ' ह्या पाक्षिकाचाहि या प्रचारकार्यांत फार मोठा अंश आहे. शिवाय पनवेलचें ' आरोग्य-मंदिर', नगरचें 'भिषग्विलास', मुंबईचे 'आरोग्यमित्र' या आयुर्वेद–नियतकालिकांचेंही बहुमोल साह्य या प्रचारकार्यांत झालें आहे.

संमेलनांत त्रिवेणसिंगम

म. प्रां. च्या ह्या दशम वैद्यसंमेलनांतील वैशिष्ट्य म्हणजे या संमेलनांत आयुर्वेदीय अध्यापक चर्चा परिषद व मुंबईराज्य वैद्यसंमेलनाचें अधिवेशनहि घेण्यांत आलें हें होय. शिवाय उमरावतीचे डॉ. शिवाजीराव पटवर्धन आणि दे. भ. आण्णासाहेब दास्ताने यांचीं कुष्ठरोगानिवारण विषयांवर झालेलीं भाषणें, 'आमवात' विषयावर निरनिराळ्या तज्ज्ञ वैद्यांचीं झालेलीं चर्चात्मक व्याख्यानें, नागपूरचे वै. परांडेशास्त्री यांचें

आरोग्यास उपयुक्त योगासनांचें प्रयोगावरील प्रात्यक्षिकासह व्याख्यान, व त्यांतच वै. वि. म. गोगटे यां केलेलें आसनादिकांचे तात्त्विक स्पष्टीकरण, रोज रात्रीं आरोग्यविषयक दाखविण्यांत आलेलें चित्रपटदर्शन सर्वहि कार्यक्रमांमुळें तीनहि दिवसांच्या कार्यक्रमाचा तासन् तास भरून निघाला यांत शंका नाहीं.

तथापि अध्यापक–चर्चा–परिषदेसारख्या शास्त्रीय विषयास वाहिलेल्या परिषदेला भरपूर अव न मिळाल्यामुळें त्या बाबतींत व्हावें तसें समाधान परिषदेच्या संयोजकांना, उपस्थित श्रोत्यांना व च विषयांत प्रत्यक्ष भाग घेणारांना लाभलें नाहीं, ही गोष्ट नमूद करावीशी वाटतें. व या दृष्टीनें ही परिषद यापु संमेलनास जोडून न ठेवतां तिचें अधिवेशन दर सहामाहीस स्वतंत्रच भरविलें जावें ही सूचना ह्या परिषदे संयोजक वै. गोगटे यांनीं केली ती विचार करण्यासारखी आहे.

संमेलन कार्यारंभ

ध्वजवंदन— दिनांक १६-५-५५ सोमवारीं सकाळीं जबलपूरचे भिषग्वर पंडित भि. वि. डेग्वेकरशास्त्री यांचे द्वारा ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला. या प्रसंगीं पं. डेग्वेकरशास्त्रीजींचें प्रभु धन्वंतरीच्या अवतारकार्यावर महत्त्वपूर्ण भाषण झालें. संमेलनासाठीं कै. वै. पं. गंगाधरशास्त्री गुणे यांचे नांवानें विशाल मंड उभारला असून कै. गुणेशास्त्रीबुवांचें भव्य तैलचित्र व्यासपीठाचे मध्यभागीं भिंतीवर विराजमान झालें होतें. त्याचेच शेजारीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळानें मुद्दाम तयार करविलेला खादीचे शुभ्र वस्त्रावर सुवर्णमय अमृत कलशावर स्वास्तिक चिन्हांकित असा हा ध्वज लावण्यांत आला होता. मुंबईचे वैद्य भोगे यांनीं रचलेलें ध्वजवंदन मराठी गीत म्हटलें.

प्रदर्शनोद्घाटन— आयुर्वेदीय वस्तु, वचनें, वाङ्मय, वनस्पतीचे ओलेसुके नमुने, संग्रहणी विकाराचे दोष परत्वें, संप्राप्तिदर्शक कोष्ठांतर्गत वस्तुस्थिति व लक्षणदर्शक तक्ते, गर्भाची मासिक वाढ दाखविणारे प्रत्यक्ष नमुने, दूर केलेले कोष्ठस्थ व गर्भाशयस्थ विद्रधींचे स्पिरिटमध्यें ठेवलेले नमुने, आयुर्वेदीय ग्रंथ, सेवा संघानें ठेवलेले स्वास्थ्य विषयक फोटो व त्यांचे वर्णनात्मक तक्ते! महारोग विषय वाङ्मयसाहित्य व सिद्धौषधी विभागांत कारखान्यांचे औषध विक्रीविभाग यामुळें प्रदर्शन खरोखरीच उद्बोधक व प्रेक्षणीय झालें होतें. वै. मो. ल. ठोंबरे यांनीं प्रदर्शन उद्घाटन करण्यास विनंति केल्यावर जळगांवचे दे. भ. देवकीनंदनजी यांचे हस्तें प्रदर्शनोद्घाटनाचा कार्यक्रम झाला. वैद्यवर्गानें देशांतील गोरगरिबांच्या आरोग्य रक्षणाची सोय त्यांना त्यासंबंधीं माहिती पुरवून व अल्पमोली बहुगुणी औषधें पुरवून करावयास हवी अशा अर्थाचें भाषण करून देवकीनंदनजींनीं उद्घाटन केलें. वै. चूडामणी खंडेरा यांनीं आभारप्रदर्शन केलें.

अभिनव उपक्रम, वृद्ध वैद्यांचा सत्कार

केवळ आयुर्वेदीय तत्त्वांचा चिकित्सा कार्यांत अवलंब करून त्याचप्रमाणें वैयक्तिक शिष्यपरंपरा निर्माण करुन ज्या विद्वान् वृद्ध वैद्यांनी आयुर्वेदाची जोपासना केली; परंतु ज्यांनीं आजपर्यंत प्रसिद्धि पराङ्मुखवृत्ति धारण केली अशा, साठी उलटलेल्या वृद्ध विद्वान् वैद्याचें दर्शन घ्यावें व त्याचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करावी या उद्देशानें एक छोटासा समारंभ भुसावळच्या ह्या दशम वैद्य संमेलनामध्यें उरकण्यांत आला. नासिकचे वृद्ध वैद्य श्री. विष्णुशास्त्री केळकर यांचे अध्यक्षतेखालीं हा समारंभ झाला. यावेळीं वै. केळकरशास्त्री यांचे अत्यंत उद्बोधक असें भाषण झाले. वृद्ध वैद्यांनीं आपलें ज्ञान भावी पिढीस निःसंकोचपणें न दिल्यामुळें आयुर्वेदाची फार मोठी हानि झाली आतां तरी पुन्हां तसें होऊं नये. आपले ज्ञान पुढील पिढीस मिळाल्यावाचून या वृद्ध वैद्यांनीं इहलोक सोडूंच नये असे वै. केळकरशास्त्री म्हणाले.

प्रांतीय संमेलनाधिवेशन

मध्यप्रदेश सरकारचे स्वास्थ्यमंत्री माननीय कन्नमवार महोदयांनीं म. प्र. प्रांतीय दशम वैद्य संमेलनाचें उद्घाटन केलें. संमेलनासाठीं म्हणून मुद्दाम नागपूरहून वृद्धवैद्य श्री. भिषक् केसरी गोवर्धनशर्मा छांगाणीजी तसेंच मध्यप्रदेश अग्रगामी वैद्यमंडळाध्यक्ष वैद्यश्री गुलराज शर्मा हेही श्री. आरोग्यमंत्रीमहोदयांबरोबरच आले होते. ना. कन्नमवार यांनीं आपले भाषणांत मुंबई सरकारनें स्वीकारलेल्या आयुर्वेदविषयक धोरणाची प्रशंसा करून मध्यप्रदेशांतही ह्याचेच अनुकरण करण्याची आपली इच्छा व्यक्त केली. यानंतर संमेलन स्वागताध्यक्ष वै. ब्रह्मदत्त शर्मा यांनीं स्वागतपर भाषणांत आयुर्वेद कार्यांच्या प्रगतीचा आढावा घेऊन अजूनहि अपेक्षित गोष्टींचा निर्देश केला व त्यासाठीं संमेलनाकडून प्रयत्न होणें इष्ट आहे असें सांगितलें; आणि अध्यक्षस्थान स्वीकृतीसाठीं आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे यांना विनंति केली. आतांपर्यंतच्या आपल्या प्रांतीय अध्यक्षपदाच्या अधिकारांचे दान करतांना वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर यांनीं वै. देशपांडेशास्त्री यांच्या गुणांचा गौरव करून यापुढें सर्वांनीं नूतन अध्यक्षांना तनमनधनानें साह्य करावें, सहकार्य द्यावें अशी कळकळीची विनंति केली आणि स्वागताध्यक्षांच्या सूचनेस पाठिंबा दिला. यानंतर महाराष्ट्र प्रांतांतील प्रत्येक जिल्ह्यांतील उपस्थित प्रतिनिधीनें या सूचनेस अनुमोदन दिल्यावर टाळ्यांच्या गजरांत अध्यक्ष स्थानापन्न झाले. त्यांच्या व स्वागताध्यक्ष भाषणाच्या प्रती संमेलनांत वाटण्यांत आल्या.

अहवाल व संदेशवाचन

प्रांतीय मंडळाचे स्थायी मंत्री वै. बिंदुमाधव पंडित यांनीं गत २ वर्षांच्या प्रांतीय मंडळाच्या कामाचा अहवाल व जमाखर्च वाचून दाखविल्यावर संमेलन मंत्री कविराज का. सी. भावे यांनीं संमेलनास आलेले शुभ संदेश वाचून दाखविले.

गोड समारंभ

म. प्रांतीय मंडळाच्या कार्य क्षेत्रांतील दोन प्रमुख व्यक्ति पनवेल संमेलनाध्यक्ष वै. बिंदुमाधवशास्त्री पंडित यांची कन्या चि. विद्यादेवी आणि लातूर संमेलनाध्यक्ष वै. दत्तात्रयशास्त्री जळूकर, यांचे जेष्ठ सुपुत्र चिरंजीव वैद्य श्रीनिवास जळूकर आयुर्वेदविशारद डी. ए. एस्. एफ्. यांचा गेल्या मार्च महिन्यांत विवाह झाला. त्याप्रीत्यर्थ दोघां व्याह्यांनीं १७।५।५५ या संमेलन दिवशीं संमेलन प्रतिनिधींचा एक भोजन समारंभ घडवून आणला.

मुंबई राज्य वैद्य संमेलन

दि. १८।५ हा भुसावळच्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस! या दिवशीं मुख्यतः मुंबई राज्य वैद्य संमेलनाचें अधिवेशन व सर्व संमेलन कार्यांचा समारोप हें कार्य घडलें.

उद्घाटन– मुंबई-राज्य-वैद्यसम्मेलनाचें उद्घाटन मुंबईराज्य आरोग्यमंत्री माननीय शांतिलालजी शाह यांचे हस्तें झालें. उद्घाटनाचेवेळीं केलेल्या आपल्या भाषणांत ना. शाह यांनीं मुंबई-सरकार आतां आयुर्वेदाला आधिकाधिक साह्य करणार आहे. शुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन इ. च्या सर्व सवलती मिळण्याबद्दलहि विचार चालू असून लौकरच कौन्सिलमध्यें आयुर्वेदविषयक कायदाच संमत करण्यांत येगार आहे. वैद्यांनींही आपले ज्ञान व शास्त्र संशोधून वाढविण्याकडे लक्ष देऊन पाश्चात्य वैद्यकाचे तोडीस आपलें शास्त्र तोड देऊं शकतें हें दाखवलें पाहिजे. आसवारिष्टें व औषधें इ. गैरसोयीही लौकरच दूर होतील असें मुख्यतः प्रतिपादन केलें. स्वागताध्यक्ष वै. ज. बा. मोकाशी यांनीं आपलें

स्वागत भाषण वांचून दाखविलें त्यांत आयुर्वेदाची चिकित्साकार्यातील श्रेष्ठता वर्णन करुन नवीन व संकीर्ण रोगांवर आयुर्वेदीय उपचारांचा उहापोह परिषदेंत व्हावा, नवनवीन निघणाऱ्या बायोटिक्स औषधांकडील जनतेचा ओढा लक्षांत घेऊन तशी प्रभावी परन्तु अनपायी औषधें आ प्रचारांत आणलीं पाहिजेत असा आपला अभिप्राय व्यक्त केला. व परिषदे अध्यक्षस्थान श्री. वैद्य नानासाहेब पुराणीक यांनीं स्वीकारावें अशी विनान्ति अनुमोदन मिळून अध्यक्ष स्थानापन्न झाल्यावर परिषदेच्या कामास प्रारंभ झाला. त्या परिषदेचे वै. श्रीराम शर्मा यांनीं गत सभेचा अहवाल व शुभ संदेश वांचून दाखविले. नंतर अध्यक्षांचें भाषण बरेंचसे प्रस्ताव संमत करण्यांत आल्यावर अध्यक्षांनीं समारोपात्मक भाषण केल्यावर आभारप्रदर्शन व हा समपर्ण होऊन हें मुंबईराज्य वैद्य संमेलनाचें अधिवेशन समाप्त झालें. या संमेलनांत थोडा पं. शिवशर्मांचें उद्बोधक भाषण झालें.

प्रांतीय संमेलनाचा समारोप

लागलींच म. प्रां. वै. संमेलनाचें प्रस्ताव कार्य होऊन शेवटीं अध्यक्षांनीं समारोपात्मक केल्यावर स्वागताध्यक्ष ब्रह्मदत्त शर्मांचे उपस्थित पाहुण्यांचे व संमेलनास साह्य करणाऱ्या आभार प्रदर्शन भाषण केलें. वैद्य जळूकरशास्त्री यांनींहि अध्यक्षांचे व स्वयंसेवकांचे आभार मानल्या वंदेमातरम् गीत होऊन प्रभु धन्वंतरीचे जयजय करीत हें संमेलनकार्य यशस्वीपणें समाप्त झालें.

आगामी निमंत्रण

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाच्या अकराव्या अधिवेशनासाठीं अहमदनगर येथील वैद्य मंडळा वै. वाग्भटशास्त्री वैद्य यांनीं निमंत्रण दिलें. त्याला वै. देसवंडीकर शास्त्री यांनीं पुष्टि दिल्यावर तें निमं सहर्ष स्वीकारण्यांत आले.

प्रदर्शन विभाग

संमेलनास जोडूनच भव्य असें आयुर्वेदीय प्रदर्शनहि भरविण्यांत आलें होतें. ओल्या व सुक वनस्पतींचे नमुने खनिज प्राणिज औषधी द्रव्यें, शारीरविषयक विकृत अविकृत आसवांचे नमुने, विषयक तसेच स्वस्थवृत्त विषयक माहितीचे तक्ते, चित्रें सुभाषितें व म्हणी महारोग विषयक वाङ्मय इ. तसेच श्री धूतपापेश्वर, उंझा, सांडू आयुर्वेदाश्रम नगर जे. डिशेन, नवशक्ती आयुर्वेदालय भुसावळ कारखान्यांनीं आपापले स्टाल ठेवून प्रदर्शनास खूपच शोभा आणली होती.

मध्यप्रदेश अग्रगामी वैद्यमंडळ, विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय अमरावती, धूतपापेश्वर सेंट्रल रेल्वे हॉस्पिटल भुसावळ, आयुर्वेद सेवा संघ नासिक ह्या संस्थांनीं आपापले कार्यकर्ते बरोबर ह्या प्रदर्शन विभागांत वर वर्णन केल्याप्रमाणें अपूर्व साह्य केलें. तसेंच वर्ध्यांचे कुळ आरोग्यधाम नागपूरचे वै. परांडेशास्त्री यांचे योग संस्थेचेही माहिती व प्रयोगद्वारा फार मोठें साह्य झालें.

भोजन व्यवस्था

यावलचे श्री. यशवन्त गोपाळ नाईक व भुसावळचें श्री. हुकुमीचन्दशेट या दोघां सुप्रसि कॉंग्रेस कार्यकर्त्यांनीं भोजन व्यवस्थेचें कार्य अंगिकारून ते फारच व्यवस्थितपणें पार पाडलें हें गौरवानें न करावेसें वाटतें.

* * *

आयुर्वेद अध्यापक चर्चापरिषद वृत्तान्त, भुसावळ

रविवार ता. १५।५।५५ रोजीं रात्रीं ९ वाजतां संमेलनाच्या कार्यालयांत आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेच्या गतवर्षीच्या कार्यकारी मंडळाची सभा झाली. वै. वेणीमाधवशास्त्री, वै. बिंदुमाधवशास्त्री व वै. वि. म. गोगटे हे उपस्थित होते.

सभेंत नासिक येथें झालेल्या आ. अ. चर्चा परिषदेच्या अहवालास व जमाखर्चास मान्यता देण्यांत आली व ज्यांनीं ज्यांनीं ही परिषद सफल करण्यास मदत केली त्या देणगीदारांचे, सेवा संघाचे, वै. डेग्वेकरजी व वै. वेणीमाधव यांचे आणि वै. श्री. कृ. करमरकर यांचे आभार मानण्यांत आले. भुसावळ संमेलनाचे वेळीं होणाऱ्या परिषदेच्या कार्यपद्धतीला मान्यता देण्यांत आली.

पहिल्या दिवशीं

सोमवार ता. १६।५।५५ रोजीं सकाळीं सुरवातीस वै. वि. म. गोगटे यांनीं गतवर्षीच्या कार्याचा आढावा वाचून दाखविला. या कार्याची उपयुक्तता सांगितली. यावेळीं कोणत्या कार्यपद्धतीनें काम होईल याची कल्पना देऊन उपस्थितांचें स्वागत केलें.

प्रास्ताविक भाषणांत वै. वि. म. गोगटे यांनीं या वेळच्या परिषदेंत प्रत्येक विषयाकरितां त्या त्या विषयाचा तज्ञ निरनिराळा अध्यक्ष नियुक्त केला असल्याचें प्रतिपादिलें. या विषयाध्यक्षानें आपल्या भाषणाच्या सुरवातीस विषयाची मांडणी, अध्यापनाची पद्धति कशी असावी, विषयाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन कसा असावा, यासंबंधीं विवेचन करावयाचें व नंतर आलेल्या लेखी शंकांचें क्रमानें निरसन करावयाचें अशी कार्यपद्धति निवेदिली. तसेंच गेल्या वर्षी अनुभवानें ठरविलेल्या व परिषदेनें स्वीकृत केलेल्या--एकावेळीं एकानेंच बोलावयाचें, शंका लेखी द्यावयाच्या, उभे राहून बोलावयाचें इत्यादि गोष्टीहि सूचनेदाखल सांगितल्या. वेळेचा काटेकोरपणा राखण्यास व गेल्या वर्षी घेतलेले निर्णय गृहीत धरून पुढचें पाऊल टाकण्यास विनंति केली.

श्रीधन्वन्तरी-पूजन

उद्घाटक श्री. हरिदत्तशास्त्री यांना येण्यास वेळ असल्याकारणानें वैद्यराज वि. दा. एकतारे यांना धन्वतरीपूजनास व द्रव्यगुण या विषयाच्या प्रतिपादनास सुरवात करावयाची विनंति कार्यवाह वि. म. गोगटे यांनीं केली.

श्री. हरिदत्तशास्त्री

वैद्यराज वि. दा. एकतारे यांनीं धन्वतरीपूजन केलें व देवे वगैरे म्हणून झाल्यावर आपल्या विषयाच्या मांडणीस सुरवात केली. थोड्याच वेळांत उद्घाटक श्री. हरिदत्तशास्त्री व अध्यक्ष वैद्य पांडुरंगशास्त्री देशपांडे यांचें आगमन झालें. उद्घाटकांनीं आपल्या भाषणांत तद्विद्य संभाषा परिषदेची आवश्यकता प्रतिपादिली. विस्कळित व लुप्त झालेल्या शास्त्रांचें संकलन करावयाचें आहे, आयुर्वेदाचा समुत्थान-समय आला आहे, अशा वेळीं आयुर्वेदाच्या अष्टांग-वाढीचे प्रयत्न आपण करावयास पाहिजेत या गोष्टींवर भर दिला.

श्री. पांडुरंगशास्त्री

अध्यक्ष पांडुरंगशास्त्री देशपांडे यांचें अध्यक्षीय भाषण झालें, त्यांत त्यांनीं आयुर्वेदांतील कांहीं दुर्बोध स्थळें सांगितलीं व अध्यापकांनीं आयुर्वेदीय परिभाषेचाच अवलंब विषय शिकवितांना करावा असें सांगितलें. या कार्यक्रमानन्तर संमेलनाच्या अन्य कार्यक्रमास सुरुवात झाली.

वैद्यराज हिरामणजी

सोमवार दुपारीं २ वाजतां द्रव्यगुणाची चर्चा सुरू झाली--या वेळीं वनस्पतितज्ञ वैद्यराज हिरामणजी जंगले यांनीं वनस्पतिनिर्णयाची आवश्यकता कां आहे ते सांगितलें.

श्री. नृसिंहाचार्य

वैद्यराज वाघ, वाटवे, बागेवाडीकर व प्रकाशकर यांनीं द्रव्यगुणचर्चेंत भाग घेतला. वैद्यराज एकतारे यांनीं चर्चासमारोप केला व निमंत्रक वैद्य गोगटे यांनीं श्री. एकतारे यांचे आभार मानले व रसशास्त्र विषयावर प्रास्ताविक करण्यास वैद्यराज बागेवाडीकर, सोलापूर, यांना विनंति केली. श्री. बागेवाडीकरजींनीं रसशास्त्र या विषयाची व्याप्ति, थोडक्यांत इतिहास, चरक-कालापासूनहि कसा आहे इत्यादींचें साधार विवेचन केलें.

या चर्चेंत वैद्यराज वाटवे, गोगटे, ना. ह. जोशी, जंगले, तळेले, गोडबोले, श्रीराम शर्मा, सुभानराव पाटील, शाह (अकोला) नाटोलीकर, बिंदुमाधव पंडित यांनीं भाग घेतला. अध्यक्षांनीं समारोप केल्यावर त्यांचे आभार मानण्यांत येऊन हा कार्यक्रम संपला.

श्री. भास्करशास्त्री

सोमवार ता. १६-५-५५ ला रात्रीं १० वा. न्याय सांख्य मीमांसा व संस्कृत या विषयाच्या चर्चेस सुरवात झाली. प्रारंभीं वैद्य गोगटे यांनीं वैद्यराज गोडबोले (पनवेल) यांचा या विषयावरील अधिकार किती मोठा आहे तें सांगितलें व त्यांना विषय-प्रस्तावनेला विनंति केली. वैद्यराज गोडबोले यांनीं आयुर्वेद समजण्यास या विषयांची आवश्यकता प्रमाणें देऊन सांगितली. या चर्चेंत रात्रीं वै. वाटवे व ना. ह. जोशी यांनीं भाग घेतला. वेळ बराच झाल्यामुळें ही चर्चा तहकूब ठेवण्यांत आली.

श्री. पुरोहित

मंगळवार ता. १७।५।५५ ला सकाळीं ठीक ६॥ वाजतां चर्चा–परिषदेस सुरुवात झाली. वैद्य गोगटे यांनीं शारीर या विषयाची चर्चा करण्यास आवश्यक अशा गोष्टींची त्रुटि असल्याची जाणीव असल्याचें सांगितलें. जेवढी जमेल तेवढी चर्चा करूं व प्रत्यक्ष शवच्छेदनाचे वेळीं याचें प्रात्याक्षिक घेऊं या, हें सांगून वैद्यराज ग. वि. पुरोहित यांना या विषयाच्या चर्चेचें अध्यक्षस्थान घेण्यास सुचविलें. वैद्यराज पुरोहितानीं प्रस्तावनेंत शारीरसंज्ञांच्या निश्चितीची आवश्यकता सांगून प्रत्यक्ष शवच्छेदनाचे वेळीं बोट ठेवून आवरण या संज्ञा निश्चित केल्या पाहिजेत असें सांगितलें. हृदयादि संज्ञाबद्दल कांहीं प्रमाणें दिलीं.

चर्चेंत वैद्यराज ह. वा. परांजपे, वै. ना. ह. जोशी, वैद्यराज डेग्वेकरजी, वै. बागेवाडीकरजी, वै. माधवशास्त्री जोशी, वै. सहस्रबुद्धे इत्यादिकांनीं भाग घतला. ही चर्चा फारच उद्बोधक झाली. तथापि वेळेच्या व साधनांच्या अभावीं अर्धवट राहिल्या कारणानें सर्वांनाच हळहळ वाटली. वैद्यराज पुरोहितांचे आभार मानण्यांत आले व ही चर्चा संपली.

प्रत्यक्ष शवच्छेदन करून लवकरच या संज्ञानिश्चितीला मदत करण्याचें आश्वासन वैद्यराज पुरोहितांनीं दिलें.

उज्वल कीर्ति

आयुर्वेदीय औषधांची उज्वल कीर्ति बनविलेल्या सिद्ध औषधांच्या गुणावर आहे. औषधें गुण देणारीं असतील तर कीर्ति नेहमीं उज्वल राहील. तरी अशीं गुण देणारीं औषधें, अस्सल ताजीं व स्वच्छ घटक औषधी द्रव्यें खरेदी करण्यावर अवलंबून आहे. औषधी द्रव्यासाठीं आपण

दि ऑल इंडिया कारियाणा स्टोर्स
पायधुनी, मुंबई नं. ३
फोन नं. (३१८५८) यांचेकडे मागणी करा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात.
अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवा.

एक निर्णय

ता. १६।५।५५ रोजीं रात्रीं अपुऱ्या राहिलेल्या न्याय, सांख्य, मीमांसा व संस्कृत या विषयाला रीं २॥ वाजतां सुरवात झाली. वैद्यराज वाटवे नीं चर्चेस सुरवात केली. ब्ऱ्हाणपूरचे विद्वान् मांसक पंडित हरिशंकरशास्त्री यांनीं संस्कृतमधून मीमांसाशास्त्र शिकण्याची उपयुक्तता सांगितली. या नंतरच्या चर्चेत सुरतेचे वै. रणजितराय, वै. बागेवाडीकर, वै. गोगटे, वै. ना. ह. जोशी, वै. पंडित, वै. वाटवे, वै. शिवनाथशास्त्री, वै. श्रीराम शर्मा, वै. नगोलेकर, वै. दयानंदशास्त्री यांनीं भाग घेतला. सर्वांच्या निर्णयांत व्यवहारतः सरल अशा संस्कृतला स्थान असावें, पदार्थविज्ञाच्या टेक्स्ट बुकावरून शिकवावें व सांख्यकारिका, तर्कसंग्रह अशीं पुस्तकें शिकविण्याची जरूरी नाहीं असें ठरलें.

नंतरच्या वेळांत शारीर विषयाची राहिलेली चर्चा घेण्यांत आली. वै. गोगटे यांनीं वै. गोडबोले व वैद्य पुरोहितांचे आभार मानले व ता. १७।५।५५ चा कार्यक्रम संपला.

ता. १८-५-५५ ला सकाळीं ठीक ६॥ वाजतां दोषधातुमलविज्ञान या विषयावरील चर्चेस सुरुवात झाली. सुरतेच्या आयुर्वेद महाविद्यालयांतील विद्वान् अध्यापक, खिलाडु वृत्तीचे वैद्य, आयुर्वेदावरील प्रचंड लेखन करणारे वैद्य रणजितराय देसाई यांची, निमंत्रक वैद्य गोगटे यांनीं प्रस्तावना करून त्यांना विषयाचे प्रतिपादनास विनंति केली. वैद्य रणजितराय यांनीं या विषयाची व्याप्ति व त्रुटि संपूर्ण विषयाचें स्वरूप शुद्ध राखण्याची आवश्यकता सांगितली. अध्यक्ष श्री. देशपांडे यांच्या विनंतीवरून वैद्यराज डेग्वेकरजी यांनीं दोषधातुमलासंबंधीं आपल्या कल्पना मांडल्या. वेळेच्या अभावीं हें महत्वाचें विवरण थांबवावें लागलें.

या चर्चेंत वै. ह. बा. परांजपे, वै. वाटवे, रायपुरचे वै. वाघ, वै. वेणीमाधव जोशी, वै. तारे (अमरावती), वै. शं. रं. देशपांडे (गोकाक), वै. माधवशास्त्री जोशी वै. ना. ह. जोशी यांनीं भाग घेतला.

वैद्यराज पांडुरंगशास्त्री देशपांडे यांनीं अध्यापक-चर्चा–परिषदेबाबत आपले विचार मांडले, त्याची उपयुक्तता सांगितली, हें कार्य करणाऱ्या मंडळीचे आभार त्यांनीं मानले व नवीन वर्षाकरितां अध्यापक चर्चा–परिषदेसंबंधींचें कार्य करणारें १५ वैद्यांचें एक कार्यकारीमंडळहि जाहीर करण्यांत आलें. यांत कर्नाटकचे व गुजरातचेहि प्रतिनिधी आहेत. वै. पांडुरंगशास्त्री हे अध्यक्ष, वैद्य वि. म. गोगटे नासिक हे या समितीचे कार्यवाह म्हणून नियुक्त करण्यांत आले.

पुढील अध्यापक परिषदेसाठीं निमंत्रणें

वैद्य गोगटे यांनीं निमंत्रक या नात्यानें उपसंहारात्मक भाषण करून दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. अनुभवावरून संमेलन व चर्चा–परिषदा एकावेळीं न घेण्याचें ठरवावे व सायन्स कॉंग्रेसप्रमाणेंच वैद्यकांतील निरनिराळ्या विषयांच्या तज्ञांच्या एकाच वेळीं निरनिराळ्या अध्यक्षांच्या नेतृत्वाखालीं ३ दिवस बैठकी करून त्यांनीं आपापले निर्णय घ्यावेत व शेवटच्या दिवशीं सर्वांचा साकल्यानें विचार करून जेवढी वैचारिक एकरूपता आणतां येईल तेवढी आणण्याचा प्रयत्न करावा, असें सुचविलें. तसेंच येती अध्यापक–चर्चा–परिषद बेळगांव येथें घेण्यास श्री. वैद्य वाटवे यांनीं निमंत्रण दिलें. वैद्य गोगटे यांनीं नासिककरांतर्फे नासिक येथें ही अध्यापकचर्चापरिषद घेण्याकरितां कायमचें निमंत्रण देऊन ठेवलें.

मदनकांती व केशवर्धनाकरितां औषधीयुक्त
मीलन सुगंधी शिकेकाई व तेल
सर्व लोक पसंत करतात
आपण अवश्य वापरा !!
विक्री प्रमुख : एन्. जी. एस्., शीव.
मुंबई नं. २२

वाचकांचा पत्रव्यवहार—

आयुर्वेद बोर्डाचा कारभार

१९५२ सालीं आयुर्वेदिक बोर्डाकडे मी माझें नांव वैद्यांच्या रजिस्टरांत चालू राहाण्याकरितां पुनर्नोंदणी फी मुदतींत म. आ. नें पाठविली होती व बोर्डानेंहि तिचा स्वीकार ताबडतोब केला होता. परंतु त्यानंतर नं. ए२१९२।१०२०५।५२ ता. १९।१२।५२ च्या नोटीशीनें मला कळविण्यांत आलें कीं, ' तुमचें नांव रजिस्टर मधून कमी करण्यांत आलें आहे. या नोटीशीस मी ता. २७।·।·३ ला उत्तर पाठविलें व त्याला प्रतिउत्तर म्हणून नं. ए२१९२।४६५।५३ ता. १०।३।५३ नें मला बोर्डाकडून कळविण्यांत आलें कीं, ' तुम्हास दिलेली वरील ता. १९।१२।५४ ची नोटीस रद्द समजावी. '

त्यानंतर १९५५ सालीं मी पुन्हां माझी पुनर्नोंदणी फी म. ऑ. नें पाठविली व त्यास उत्तर म्हणून मला (विन तारखेच्या) ता. ७।२।५५ रोजीं मिळालेल्या पत्रानें ' तुमचें नांव रजिस्टरमध्यें आढळत नाहीं ' असें बोर्डाकडून कळविण्यांत आलें. त्यानंतर ता. १०।·।५५ ला मी बोर्डाच्या रजिस्ट्रारला पत्र पाठवून ऑफिसची झालेली चूक त्यांना कळविली व त्यांना झालेली चूक दुरुस्त करून तसें मला कळविण्याविषयीं लिहिलें, म्हणजे पुढील पत्रव्यवहारांत मला त्या उत्तराचा उल्लेख करतां येईल. बोर्डाच्या नं. १४६।·५ ता. १५।·।५५ च्या पत्रानें हें प्रकरण विराम पावलें.

परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं, मल तारीख २०।४।५५ रोजीं बोर्डानें फिरून पत्र पाठवून कळविलें कीं, ' तुमचें नांव रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर्सच्या रजिस्टरमध्यें आढळत नाहीं. ' सदरचें उत्तर हें मला पूर्वीं ता. ७।·।५५ ला मिळालेल्या पत्राचीच पुनरुक्ति होती.

त्यानंतर मी रजिस्ट्रारला जरा कडक भाषेंत लिहून विनन्तीपूर्वक कळविलें कीं, अशा प्रकारच्या दसरी चुका आपल्या कार्यालयाकडून न होण्याविषयीं जरा अधिक दक्षता घेणें जरूरीचें आहे. त्याच मला माझ्या प्रकरणांत वस्तुस्थितिनिष्ठ अखेरचें नि यात्मक उत्तर मिळावें म्हणजे पुढील पत्रव्यव जरूर पडल्यास मला त्याचा उल्लेख करतां येईल.

बोर्डाच्या दप्तरकार्याचा नमुना म्हणून व माहिती मुद्दाम प्रसिद्ध करीत आहे.

(सही) विनायकराव बापट, आयुर्वेद-वि
दसनकोप्पा

अभिनंदन

अहमदनगर आयुर्वेद महाविद्यालयाचे स्ना व माजी प्राध्यापक वैद्य व. र. अंदुरकर यांची है बाद येथील सरकारी आयुर्वेद महाविद्याल प्राचार्यपदीं नेमणूक झाली आहे. अभिनंदनीय.

त्यांचा पत्ताः— २२८/३ नाईक बिल्डिंग,
सुन्दरभुवन, जामबाग, हैद्रा

शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार
केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें
व ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस
व प्रदर्शनाकडून प्रशंसित
सहस्रपुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें
प्राइस लिस्ट मागवा.
श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर
मिराची बोळ, पो. इचलकरंजी S. M. C.

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व औषधें
मुंबईंत मिळण्याचें आणखी एक नवें केंद्र
रामकृष्ण एजन्सी
आनंदजी लद्धा बिल्डिंग
लालबाग, मुंबई १२
* मागणी रोज वाढत आहे. *

फॅकल्टी ऑफ् आयुर्वेदिक ॲंड युनानी सिस्टीम्स् ऑफ् मेडिसिन, मुंबई

एप्रिल १९५५ च्या डी. ए. एस्. एफ्. परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचीं नांवें:—

द्वितीय परीक्षा

बसलेले उमेदवार— ५ उत्तीर्ण उमेदवार— ४

मुंबई केंद्र

पारकर आ. आ., शेलाट न. र.

पुणें केंद्र

शाह ध. त., वैद्य अ. श्री.

तृतीय परीक्षा

बसलेले उमेदवार— ६२ उत्तीर्ण उमेदवार— ५८

मुंबई केंद्र

ब्रडे र. वा., बारगळे भू. दा., भट्ट श. बा., चौधरी र. उं., चित्तळ मुक्ता अ., दुड्डू पा. रा., गुगले चां. सा., जयवंत वि. रा., जिनराळकर शा. वा., जोशी रा. वा., जोशी श. मो., केळकर लीला दा. कुळकर्णी प्र. शं., लाझरस लीला रो., नगरकर द. शि., पटणी मो. क., रणदिवे प्रे. वि., सुराणा राजकुवर मो., वैद्य म. रा., वैद्य न. क., वैद्य तारेश्वरी क., वनकुद्री ने. भो., भट्ट अ. गि., दवे त. गि., दोशी अ. ज., जोशी चं. रा., पटेल न. आ., शास्त्री छे. भा., तोलिया प्र. दु., त्रिवेदी ज. र.

पुणें केंद्र

बुर्से श्री. भा., घोगरे ज. न., घोग्रे व. पां., गोळवलकर कुमुद पु., काकडे व. वि., केस्तिकर र. बा., कुळकर्णी द. व्यं., नातू रा. ग., पाठक वि. मो., पटवर्धन दि. म., फाळके इंदु अ., फाटक पुष्पावती श्री., पोळ वि. द.

सुरत केंद्र

अजमेरी न. म., भट्ट इं. सो., मेहेता व. चि., पंड्या प्र. भा., पंड्या प्र. म., पटेल भ. खु. पटेल रा. मा., पटेल शां. ना., शाह प्रि. शां., शाह र. र., शाह मु. त्रि., शाह उ. सो., शास्त्री वि. म., सोळंकी ग. व., सोनी सो. म.

चतुर्थ परीक्षा

बसलेले उमेदवार—३१२ उत्तीर्ण उमेदवार— १३८

मुंबई केंद्र

अलमौला स. न., बहेटी रा.मु., बारेट्टो मर्सी हेलेन, बस्ती भू. श्री., भाटिया ह. बा., भावसार श्री. हि., भोमज ने. दा., बोंडे का. भि., छाया कुमुदबाला न., चौगुले स. रा., दैठणकर म. द., दलाल नि. कां., डांगे ना. पां., देवचके गो. मा., देसाई अ. अ., देशिंगकर शरयु गि., एकसांबेकर रा. द., गांधी कां. पू., जैन ध. हि., जोशी भा. ह., कोकाटे विमल स., कोल्हटकर ग. चिं., कोठारी धी. क.,

मनूरकर चं. भी., मर्जे रा. दे., मेहता चं. छ., मेहता दे. शि., नादपुरोहित ना. भि., नान्सी पुष्पाव पो., परांजपे स. य., पटेल च. धो., पटेल वि. पु., पाटील ए. औं., पाटील का. स., पाटील श्री. मा., पेटिगारा दि. ज., पेटिगारा किशोरी ज., फाळे गो. भा., रांगणेकर शीला र., शाह भो. भ., शाह दा. वा., टन्ना हि. प्र., ठक्कर न. गो., ठोसर द. ग., वैद्य प्र. प्र., वेलणकर भागिरथी रा., व्यास भा. ना., याज्ञि सरोजिनी ह.

जामनगर केंद्र

अग्रवात धी. वि., भारद्वाज के. ना., भट्ट चं. मो., भावे भा. य., कानरा जु. जॉ., देसा कि. ब., धोलकिया श. दि., गोधानी हि. रा., झवेरी क. मो., जोशी र. आ., मनानी हि. जी., मेहता मधु ज., मेहता मु. स., मेहता प्र. क., मेहता प्र. बा., मेहता र. रा., मोदी ह. व., ओझा र. वे., पंड्या सु. रा., पारीख ज. म., पोपट म. ज., राठोड मू. के., रावळ ज. म., शाह धी. दि., शाह कि. बा., शाह म., सु., शाह र. मो., शेठ विमल ठा., त्रिवेदी र. द., उपाध्याय दि. लि., वसवाडा ह. दि., वसवडा न. रु., विभाकर म. व., व्यास गु. दु.

पुणें केंद्र

भिडे उषा भि., चौधरी य. भो., देशमुख श्री. द., देशपांडे भा. अ., देशपांडे चं. प्र., दीक्षित दि. य., दुगल वा. श्री., गवसणे ष. ए., गोळे स्नेहलता पां., गोवंडे गो. कृ., गुजराथी प. गो., गुणे गो. रं., हुकेरी शांता द. जाबदे मालती द., जोशी विमल श्री., कड्डू ज. अ., केळकर सुनीति अ., कोनकर वि. दा., कुळकर्णी शां. वा., लाहोटी शि. रा., महाजन ना. सो., पाध्ये शं. भा., परांजपे ज. भा., परांजे सुधा वि., पाटणकर य. बा., पाटील शं. ना., पुरोहित शांता ग., रेंघे द. म., साठये मे. भा., शाह त्रि. शा., शाह सुधा मा., शेट्टी भू. रु., सोनवणे अं. मा., वैद्य र. य., वाळे हेमंती रा., वाणी द. ता., येलगुडकर भा. अ.

सुरत केंद्र

आचार्य चि. र., दावडा चं. पु., देसाई वि. चि., देसाई वि. कुं., मंग्रोला प्र. प्र., मेहता लीला र., मोदी लीला सू., परमार ठा. न., पटेल मधुकांता मं., रावळ ज. भा., शाह चं. भि., शाह चं. त्र., शाह ज. रं. शर्मा भा. बे., ठाकर रं. जे., वामदत्त मालविका वै., वनसादिया रं. क., व्यास द. ग., व्यास प्र. चिं.

सार्थ माधव निदान वै द.ब.बोरकर ५ रु. न्यायवैद्यक डॉ. मा.पु. जोशी ८ रु.
चिकित्साप्रभाकर श्री. प्र.बा. ओगले २० रु. औषधें किंवा शस्त्रप्रयोगावाचून रोग
वनौषधी गुणादर्श वै. पदेशास्त्री १० रु. बरे करण्याचें शास्त्र डॉ. कुन्टे ४ रु
कामसूत्र (मराठी अनुवाद) ५ रु.
जनावरांचे रोग, श्री. त्रि रं. खळदकर -।।।- रु.
पाश्चात्य रामबाण औषधें डॉ. डी. ए. घाटगे २।। रु.
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

समन्वय चिकित्सा

लेखकः— डॉ. भोसेकर,

हैद्र बाद)

१६ मार्च १९५५ च्या आयुर्वेद पत्रिकेंत या-बद्दल लिहिलें गेलें आहे. व या प्रकारची पद्धत सध्यांच्या काळांत रूढ व्हावी अशी इच्छा प्रदर्शित केली गेली आहे. पण हें व्हावें कसें ?

चिकित्सांचें एकीकरण

समन्वय चिकित्सा म्हणजे आयुर्वेदिक व ॲलो-पॅथिक चिकित्सेचें एकत्रीकरण. आजकाल व्यवहारांत पूर्व व पश्चिम एकत्र व्हावीत असे प्रयत्न चालू आहेत. पण हें व्यवहारांत कितपत जुळत आहे ! तत्वतः तर मुळींच नाहीं. कारण आपण पाहातोच कीं, दोघांनींहि हात पुढें केल्याशिवाय मैत्री होत नाहीं. पण पहिल्यांदा हात पुढें कोणी करावा ? इथेंच अडतें. इंग्रजींत एक म्हण आहे कीं, “ महंमद तरी पर्वताकडे गेला पाहिजे किंवा पर्वतानें तरी महंमदाकडे आलें पाहिजे. ” ही समस्या सध्यांच्या अहंकारमय जगांत त्याहूनहि दुर्घट आहे. व्यवहारतः जंगमानें स्थावराकडेच जाणें योग्य. पण जंगमानें स्थावराला आपल्याकडे यावयाला लावणें कसें शक्य आहे ?

समन्वय म्हणजे वर्णसंकर

याचा दुसऱ्या दृष्टीनें विचार केला तर चिकित्सा-समन्वय म्हणजे शुद्ध वर्णसंकर आहे. ह्यानें शुद्ध जातीचा नाशच ठरलेला आहे. पण सध्यांच्या काळांत हा मार्ग रूढ व्हावा असा पर्याय काढणें योग्य होणार नाहीं. अशा प्रकारची चिकित्सा उत्तर हिंदुस्थानांत सध्यां चालू आहे. कांहीं मर्यादेपर्यंत ॲलोपॅथी व तदनंतरचा शेष रोग आयुर्वेद पद्धतीनें नीट करावा असा तिकडील सिद्धांत आहे. आज इकडेहि तोच प्रकार चालू आहे. ॲलोपॅथिक औषधानें पित्ताची तीव्रता वाढली तर सूतशेखरची मात्रा घ्या असें डॉक्टरसाहेब हळूंच सुचवतात. किंवा ज्वरांकुश, आनंदभैरव ह्यानें रोग नीट न झाल्यास वैद्यराज ॲटेब्रीन (Atebrine) वापरतात. म्हणजे काय ? आयुर्वेदीयांना त्रिदोष सिद्धान्ताप्रमाणें चिकित्सा करतां येत नाहीं व पाश्चात्य वैद्यकांना त्रिदोष समजत नाहीं. एकूण काय, दोघे आंधळे “ आपण भाऊ भाऊ ” म्हणून गळ्यांत हात टाकून भर रस्त्यानें चालल्याप्रमाणें होत आहे. हें सारें कागदावर ठीक आहे. पण व्यवहारांत दोघेहि दिङ्मूढ आहेत, असें दिसत आहे.

अशा प्रकारची चिकित्सा म्हणजे “ यस्य कस्य तरोर्मूलं येन केनाऽपि मिश्रितं। यस्मै कस्मै प्रदातव्यं यद्वा तद्वा भविष्यति ॥ ’ अशा प्रकारें होत आहे. ही कां चिकित्सा झाली? ह्यानें रोग नीट होण्याऐवजीं मृत्यूंची संख्या मात्र वाढणार. कारण आत्मस्वरूपानें मुळांत बाप व बेटा एक असला तरी व्यवहारांत त्यांची पातळी वेगळी आहे. त्यांना एका कुटुंबांत एकाच पातळीवर समजणें किती अनावस्था प्रसंग निर्माण करील! व्यवहारांत बाप तो बाप व बेटा तो बेटाच राहणार. जरी एकापासून एकाची उत्पत्ति झाली तरी ते दोघे भिन्नच.

बाह्य वायु व शरीरस्थ वायु

परवां एका संमेलनांत ठराव पास झाला. तो असा कीं, बाहेरचा वारा व शरीरांतर्गत वात दोन्ही एक आहेत. पण जगांत तुफानी वादळ झाल्यावर सर्वच चैतन्यमय जगत् हवेंत लटकत नाहीं, किंवा मनुष्यशरीरांत वाताचा जोर झाला, बाह्य स्थितींत हवा जरी स्तब्ध असली तरी वातरोगी पलंगावरून किंवा जिन्यावरून उडी घेतोच. हें असें कां व्हावें ? आतां समन्वय घडावयाचा तो मुळांत घडणें शक्य आहे.

प्रकृतीचे तीन प्रकार

परब्रह्म तर दिसत नाहीं, प्रकृति तीन प्रकारें नटली आहे, ती अशी--१ मूळमाया २ गुणमाया ३ अविद्यामाया. (मागील “ माझे त्रिदोष विचार ” हा लेख पहा). मूळमाया कृत्रिम यंत्रसाधनांनीं किंवा

डोळ्यांनीं दिसणें शक्य नाहीं. गुणमाया दिसल्यासारखी भासते पण दिसत नाहीं. अविद्यामाया ही दृश्य पृथ्वी आहे. जरी एकीपासून एकीची उत्पत्ति झाली तरी गुणमाया व अविद्यामायामध्यें थोडासा भेद आहेच. गुणमाया हेंच त्रिदोषाचें खरें स्वरूप. येथेंच तीन गुण बंधुभावानें एकत्रित राहतात व जीवाची वाढ व उत्कर्ष करतात. त्यांच्यांत कटुता निर्माण झाली कीं ते विभक्त होतात. त्यांच्यांतील बिघाड रोग–स्वरूपानें चव्हाट्यावर येतो. त्यांच्यांत पुन्हां समता आणणें हा आयुर्वेदाचा मूळ सिद्धांत. इतर पॅथीजहि नकळत तेंच करतात. मात्र त्यांच्या तऱ्हा भिन्न आहेत. म्हणजे आयुर्वेद व पाश्चात्य वैद्यक दोघेहि दृश्य, जड, अचेतन अशा पदार्थांनीं चिकित्सा करतात.

आयुर्वेद जरी पदार्थानें चिकित्सा करीत असला तरी पदार्थांचें चैतन्यांत रूपांतर साधून शक्तीला प्रतिशक्ति निर्माण करून किंवा तीव्रतेला विरोधक अशा सौम्य प्रकारच्या शक्तीनेंच इलाज करतो, असा त्याचा दृष्टिकोन. ॲलोपॅथी औषधाचा मोठा डोस वापरते. होमिओपॅथी त्याच शक्तीचा कमी डोस देऊन प्रतिरोधक शक्ति निर्माण करून काम करते. पण हा विचार बाह्य दृष्टिकोनांतूनच असतो. एकूण शक्तीनेंच शक्तीचा इलाज करणें योग्य. म्हणजे “ जड पदार्थांचें चैतन्यांत रूपांतर करणें ” हा सिद्धांत.

दोन प्रकार

हें दोन प्रकारांनीं साधतें.(१) पदार्थांचें भस्मीकरण करणें म्हणजे धातूस वारितर बनविणें, (धातु पाण्यावर तरंगेल इतका हलका करणें), किंवा पारदासारख्या चंचल धातूला विस्तवांत स्थिर करणें. ही क्रिया आयुर्वेदानें शोधून काढली. (२) वनौषधिसमूहांच्या कच्च्या रसापासून एकमार्गी द्रव्य तयार करणें. कै. अण्णासाहेब पटवर्धन ह्याच (नं. २) पद्धतीचें अनुकरण करीत होते. त्यांनीं ह्या पद्धतीचा पुरेपूर अवलंब केला. त्यांचे काढे प्रसिद्ध आहेतच. नागार्जुनासारख्यांनीं पहिली पद्धत अमलांत आणली. (भस्मीकरण)

यंत्राचा वापर नसावा

तेव्हां पाश्चात्यांचा पूर्वपाश्चिम मिलाफ करणें असे तर आयुर्वेदाचेंच अनुकरण करणें योग्य ठरेल; पण यंत्रामधून तयार झालेल्या गुटिका व मात्रा योग्य नव्हेत. कारण सडीक तांदूळ व गिरणीचे तांदूळ, किंवा गिरणीचें पीठ व जात्यांतून निघालेलें पीठ ह्यांच्यापासून तयार होणाऱ्या पदार्थांत जो रुचिभेद असतो किंवा आरोग्याच्या दृष्टीनें हिताहिताचा फरक असतो ते लक्षांत घेणें जरूर आहे.

मुळावर उपाय करा

एकंदरींत खनिज पदार्थांचें भस्मीकरण आयुर्वेदीय पद्धतीनें खलामधून (यंत्रामधून नव्हे) तयार होणें इष्ट आहे. तरच “ मर्दनं गुणवर्धनं ” प्रचितीस येईल. आज मर्दन केलेल्या मिऱ्याच्या अतिसूक्ष्म मात्रेनें मलेरियासारखा ताप नाहींसा होतो असें एका वैद्यानें आयुर्वेद—पत्रिकेंत लिहिलें आहे. मर्दनानें अणूंचे (Atoms) निगेटिव्ह (Negative) व पॉझिटिव्ह (Positive) आयॉन्स (Ions) मध्यें रूपांतर होतें, किंवा त्यांचे (Negative) व (Positive) इलेक्ट्रॉन्स (Electrons) बनतात. म्हणजे पदार्थांचें शक्तींत रूपांतर होतें तेव्हांच कोठें चिकित्सा सफल होते. “ बिघाड मुळांत होतो व सुधारणाहि मुळांतच घडवून आणल्यास शरीरहि सुधारतें ” असा मूळ सिद्धान्त आहे. फांद्या तोडल्यानें कां मुळांतील कीड जाणार आहे ? मुळावर उपाय करणें हाच खरा उपाय. तो आयुर्वेदानें साधतो व हीच खरी समन्वय चिकित्सा.

———

पुणें येथें
‘ आयुर्वेद सेवा संघ, नासिक ’ चीं
सर्व औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें २

धर्मार्थ दंतयज्ञ, बँगळूर

दि. १|६|५५ रोजीं सकाळीं जयचामराजेंद्र सरकारी हॉस्पिटलमध्यें बिहारचे गव्हर्नर श्री. दिवाकर यांनीं वैद्य पां. वि. जायदे यांच्या दंतयज्ञाचें उद्घाटन केलें. आयुर्वेदाच्या गौरवपर त्यांनीं भाषण केलें, व शूलरहित दंतोत्पाटनकला ही परदेशीयांना भारताकडून शिकावी लागेल असा अभिप्राय व्यक्त केला.

मान्य रामचंद्रराव [चीफ् मिनिस्टर इन् चार्ज] यांनींहि समयोचित भाषण करून शूलरहित दंतोत्पाटन पद्धतीची फारच स्तुति केली व म्हैसूर सरकार अशा कलेला अवश्य प्रोत्साहन देईल असें सरकारतर्फे जाहीर केलें.

वैद्यराज पार्थनारायण पंडित–अध्यक्ष निखिल भारतीय आयुर्वेदीय काँग्रेस–यांच्या दंतोत्पाटनानें दंतयज्ञाच्या कार्यास सुरवात झाली. त्यानंतर मान्य मुख्यमंत्र्यांनीं आपले दांत तपासून घेतले. एका महिलेचे एकाच वेळीं २–२ दांत काढलेले पाहून मान्य अतिथींनां फारच आश्चर्य वाटलें.

श्री. जायदे यांनीं सर्वांचे आभार मानल्यावर कार्यक्रम समाप्त झाला.

हा दंतयज्ञ एक आठवडा चालणार असून म्हैसूर सरकार यथाशक्य सर्व सहाय्य करीत आहे.

डॉ. डी. ए. घाटगे

.... यांचे प्रासि. वैद्यक ग्रंथ ....

इंजेक्शन विज्ञान	६	रु.
इंजेक्शन चिकित्सा	६	,,
सचित्र श्रवणपरीक्षा यंत्र	२।	,
सचित्र उरनेत्रविज्ञान	१॥	,,
पाश्चात्य रामबाण औषधें	२॥	,,

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

१९३८ चा कायदा

कलम ३२ चा कडक अंमल

मुंबई सरकारनें वैद्यकीय कायद्याच्या कलम ३२ चा अंमल कडक रीतीनें करण्याचा इरादा वेळोवेळीं जाहीर केला आहे. अहमदाबाद येथें हिराभाई पटेल नांवाचा गृहस्थ रजिस्ट्रेशन–एन्लिस्टमेंट मिळालेलें नसतांना वैद्यकीय व्यवसाय करीत होता. त्याला तेथील न्यायकोर्टानें २०० रुपये दंड व ४० दिवसांचा तुरुंगवास अशी शिक्षा दिली. हा पटेल आपल्या नांवापुढें आर. एम्. पी. हे शब्द लावत असे.

मुंबई येथील एका वृद्ध पारशी स्त्री हाडवैद्यावर ३२ कलमान्वयें खटला चालू आहे.

'सुश्रुत' मासिक (गुजराथी भाषेंत)

वडोदा येथील दि अपोलो फार्मास्युटिकल वर्क्स द्वारा गुजराथी भाषेंत एक मासिक १५ जूनपासून सुरू होणार आहे असें कळतें.

दुर्मिळ वैद्यक ग्रंथ

वनौषधी गुणादर्श	वै. पदेशास्त्री	१०	रु.
सार्थ माधवनिदान	वै. बोरकर	५	,,
सार्थ रसचंडांशु	,,	३	,,
सचित्र वनस्पति गुणादर्श (हिंदी)	वैद्य जंगले	२	रु.
स्टेथॉस्कोप छातीची तपासणी	डॉ. वा. कृ. जोशी	६	रु.
सिद्धौषधीप्रकाश	वै. गणेशशास्त्री जोशी	६	,,
चिकित्सा प्रभाकर	श्री. प्र बा. ओगले	२०	रु.
संमोहनशास्त्र	डॉ. मा. पु. जोशी	२॥	,,
न्यायवैद्यक	,,	८	,,

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

एक सत्यकथा

(लेखकः—श्री. सुं भा. वैद्य, मुंबई २)

२ काळ्या मिऱ्याच्या दाण्यांची किं. ५३ रु.

माझ्या ओळखीचें अक कुटुंब आहे. त्या कुटुंबांत ८ माणसें आहेत. अक गृहस्थ, त्यांची पत्नी व सहा मुलें. पहिला मुलगा वय वर्षें १२, पुढील मुली चार व अक लहान मुलगा वय वर्षें दोन. कोणाचें कांहीं दुखलें खुपलें तर मला विचारून औषधें करीत. अकदां लहान मुलाला ताप आला. मला विचारलें कीं औषध काय देऊं? मी सांगितलें, काळ्या मिऱ्याचा अक दाणा वाटून बाटलीभर पाण्यांत घालून हलवून द्या. त्याप्रमाणें दिल्यावर मुलगा अका दिवसांत बरा झाला.

चार दिवसांनीं मोठ्या मुलाला थंडी वाजून ताप आला. तो मुलगा मला विचारावयास आला कीं, औषध काय घेऊं? मी सांगितलें कीं, काळ्या मिऱ्याचे दोन दाणे वाटून बाटलीभर पाण्यांत घालून हलवून घे. तो मुलगा मला म्हणतो कीं, काळ्या मिऱ्याच्या दाण्यांनीं काय होतें? मी त्यास सांगितलें कीं, तूं घेऊं नको. बाप रात्रीं घरीं आला व पहातो तो मोठ्या मुलास ताप आला आहे. तो डॉक्टरकडे जाऊन त्यास घेऊन आला. त्याचें औषध चालू झालें.

ताप अकंदर २४ दिवस होता. डॉक्टर चार वेळ पहाण्यास आला. दर खेपेस फी ५ रुपये. तीन वेळ औषध टोचलें. प्रत्येक टोंचणीचे तीन रुपये. रोजच्या औषधाचा अक रु. असे एकदर ५३ रुपये खर्च केल्यावर ताप २४ व्या दिवशीं गेला.

माझ्या मुलाला थंडी वाजून ताप आला. त्यास मी काळ्या मिऱ्याचे दोन दाणे घ्यावयास सांगितलें. त्यानें तें घेऊन त्याचा ताप अेका दिवसांत गेला. तिसऱ्या दिवशीं तो ऑफिसांत गेला.

वरील मुलगा बरा झाल्यावर त्यास सौ. कोल्हटकर यांचें पत्र दाखविलें व तें त्यास वाचावयास सांगितलें. तेव्हां त्यानें वाचलें कीं, दुसऱ्या माणसास काळ्या मिऱ्याचे ४ दाणे दिले व त्याचाहि ताप अेका दिवसांत गेला.

चालूं वर्षी १ रु. वर्गणी

म. प्रां. वैद्य संमेलनाचा वर्गणीबाबतचा ठराव याची माहिती पत्रिकेच्या गेल्या अंकांत आली आहे. त्याबाबतींत त्या ठरावाची अंमलबजावणी १९५६ सालच्या जानेवारीपासून व्हावी असें म. प्रां. वैद्य-संमेलनाच्या अध्यक्षांनीं सुचविलें आहे. सबब चालू वर्षी फक्त एक रुपयाप्रमाणें वर्गणी घेण्याची आहे असें समजावें व सर्वांनीं आपली चालू वर्षाची वर्गणी पाठवावी.

— वै. बिंदुमाधव पंडित

स्थायी मंत्री, म. प्रां. वै. मंडळ, नाशिक

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ

— कार्यालयाचे पत्ते

(१) आयुर्वेदाचार्य पांडुरंग हरी देशपांडे

अध्यक्ष म. प्रां. वैद्य मंडळ

६३७ शुक्रवार, नाईक गणपतीसमोर, पुणें २

(२) आयुर्वेदाचार्य माधवशास्त्री जोशी

प्रधान-मंत्री म. प्रां. वैद्यमंडळ;

C/o आयुर्वेदीय औषधीभांडार

२८ शुक्रवार, फुले मार्केट रस्ता, पुणें २

शेगांव (मध्य-प्रदेश) येथें

आयुर्वेद सेवा संघ नाशिक या संस्थेचीं अनेक ग्राहकांकडून प्रशंसिलेलीं सर्व प्रकारचीं औषधें मिळण्याचें ठिकाणः—

खेतान मेडिकल स्टोअर्स

शेगांव (म. प्र.)

मुंबई आयुर्वेद बोर्डाची निवडणूक

उमेदवारांचा परिचय

सनाढ्य ब्रह्मदत्तशर्मा प्रभुदयाळ

म. प्रां. वैद्यमंडळाचे १० वें अधिवेशन भुसावळ येथें भरलें त्यांची आठवण अद्याप ताजी आहे. संमेलनाचे कार्याध्यक्ष आयुर्वेदाचार्य ब्रह्मदत्तशर्माजी यांचें नांव म. प्रां. वैद्य मंडळाच्या निवडणूक मंडळानें उमेदवारीसाठीं मंजूर केलें आहे. पांच वर्षापूर्वींच ते या निवडणुकीसाठीं उभे राहणार होते पण त्यावेळीं म. प्रां. वैद्यमंडळाच्या सूचनेवरून त्यांनीं आपलें नांव मागें घेतलें होतें. मात्र गेलीं ५ वर्षे त्यांनीं मंडळाची सेवा तितक्याच तत्परतेनें केली आहे. गेलीं २ वर्षे ते महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचे प्रधान मंत्री होते व निखिल आयुर्वेद महामंडळाचे ते सहमंत्री आहेत. संयुक्त खानदेश वैद्य मंडळाच्या सुप्रसिद्ध वैमूर्ती- ते ब्रह्मदेव आहेत. ते स्वतः निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठाचे आयुर्वेदाचार्य आहेत व त्या परीक्षेंत त्यांना धूतपापेश्वर आयुर्वेद विश्वस्त मंडळानें ठेवलेलें पहिल्या नंबरचें बक्षिस १९३५ सालीं मिळालेलें आहे. त्याचें शिक्षण जयपूर येथें (भिषग्वर १९३६) झालें आहे.

नाटोलीकर यशवंत धोंडो

कागल [जि. कोल्हापूर] येथील पुनर्वसु चिकित्सालयाचे संचालक वैद्य य. धों. नाटोलीकर यांचें नांव कोल्हापूर येथें १९४९ सालीं भरलेल्या म. प्रां. वैद्य संमेलनाच्या ५ व्या अधिवेशनापासून वैद्यवर्गासमोर आहे. त्यावर्षी संमेलनाला आलेल्या वैद्यांना खास मोटारीनें कागल येथें नेऊन त्यांनीं स्वतः रोग्यासाठीं बांधलेलें रुग्णालय दाखविलें. रुग्णालयाचें उद्घाटन त्याचवेळीं वै. पं. गंगाधरशास्त्री गुणे यांच्या हस्तें झालें. वैद्यानें खाजगी व्यवसायासाठीं बांधलेलें व चालविलेलें असें हें एकच रुग्णालय आमच्या माहितींत आहे.

वैद्य य. धों. नाटोलीकर हे कासेगांव (जिल्हा उत्तर सातारा) येथील सुप्रसिद्ध वृद्धवैद्य कुलकर्णी ग. रा. यांचे शिष्योत्तम आहेत. बेळगांव, पनवेल, सांगली येथें भरलेल्या वैद्य संमेलनांत तसेंच नाशिक व भुसावळ येथील अध्यापक चर्चा परिषदेंत भाग घेऊन त्यांनीं आपली सेवा महाराष्ट्रीय वैद्यवर्गासमोर रुजू केली आहे. शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीनें त्यांना आयुर्वेदाचे गुरु म्हणून मान्यता दिली असून त्यांनीं अध्यापनाचे कार्य कागलसारख्या दक्षिण महाराष्ट्राच्या भागांत उत्साहानें चालविलेलें आहे. म. प्रां. वैद्यमंडळानें अशा कर्तबगार व्यक्तीची निवड करून त्यांच्या गुणांचा गौरव केला आहे, याबद्दल ते मंडळ व वैद्य नाटोलीकर या उभयतांचें आम्ही अभिनंदन करतो.

आयुर्वेद पत्रिकेंतील हा मजकूर जे जे वैद्य अगर इतर लोक वाचतील त्यांनीं पत्रद्वारें व समक्ष आपल्या वैद्यबंधूंना या दोन उमेदवारांच्या नांवाचा परिचय करून द्यावा व येत्या निवडणुकींत या दोन उमेदवारांना मत देऊन निवडून आणावे अशी विनंति करावी. हें त्यांचें आवश्यक कर्तव्य आहे. वेळ महत्वाची आहे. दिरंगाई करून भागणार नाहीं. समजूतदार लोकांनीं तातडीनें हें काम केलें पाहिजे.

आयुर्वेद युनानी बोर्डातर्फे रजिस्टर्ड वैद्य हकीमांच्या नांवें मतपत्रिका येईल त्यावेळीं वरील दोन नांवा समोरच्या चौकटींत × गुणाकार चिन्ह करून मतपत्रिका पाकिटांत घालून पोस्टांत टाकावी.

कर्नाटकातर्फे बेळगांवचे ए. व्ही. गदग व एस. आर. हिरेमठ विजापूर, यापैकीं एखादे नांव येईल असा अन्दाज आहे. पुढील अंकीं संपूर्ण वाचावयास मिळेल.

८ व्या वर्षाचा शेवटचा अंक

आज आपणाकडे आठव्या वर्षाचा शेवटचा अंक पाठविण्यांत आला आहे. बहुतेक वर्गणीदारांची वर्गणी या वर्षा अखेर (म्हणजे १६ जून ५५ च्या अंका अखेर) संपली आहे. व्यक्तिशः त्यांना स्मरणपत्रें पाठविली जाणार आहेतच. तरी त्यांनीं नवीन वर्षाची वार्षिक वर्गणी (१ जुलै ५५ ते जून ५६ अखेरची) रुपये सहा शक्य तितक्या लौकर पाठविण्याची कृपा करावी. गेलीं ८ वर्षें आयुर्वेद–पत्रिकेनें चालविलेलें आयुर्वेदाचें कार्य आपणास ज्ञात आहेच. या कार्यास आपणहि हातभार लावून आयुर्वेद प्रसाराचें कार्यांत मदत केली याबद्दल संस्था आभारी आहे.

सवलतीची वर्गणी ४ रुपये

ज्या वर्गणीदारास ६ रु. पाठविणें अशक्य आहे पण पत्रिका वाचनाची आवड आहे, अशा गरीब वैद्यांनीं ४ रु. सवलतीची वा. वर्गणी पाठविल्यास तिचा आनंदानें स्वीकार केला जाईल. सहामाही वर्गणी पाठविल्यासहि चालेल.

ज्या ग्राहकांना व्ही. पी. नें अंक हवा असेल त्यांनीं पत्र द्वारें तसें आपलें मत कळविल्यास वा. वर्गणी व व्ही. पी. खर्च १३ आणे आकारून व्ही. पी. नें अंक पाठवूं. पत्र आल्याशिवाय कोणासहि व्ही. पी. पाठविली जाणार नाहीं.

जाहिरातदारांनींहि आपल्या पुढील वर्षात छापावयाच्या जाहिरातींचा कार्यक्रम आगाऊ कळवून ठेवावा.

— व्यवस्थापक

नागपूर येथें
' आयुर्वेद सेवा संघाचीं ' सर्व प्रकारचीं गुणकारी औषधें मिळण्याचें ठिकाण–
श्री. माधवराव परांडे
आयुर्वेदीय औषधांचे व्यापारी
. महाल रोड, नागपूर

कार्यक्षम हिशेबनीस पाहिजे

आयुर्वेद सेवा संघाच्या कार्यांचा व्याप वाढत आहे. शुद्ध आयुर्वेद विद्यालय, आयुर्वेदीय आरोग्य-शाळा इत्यादि विभाग नवीन सुरूं झाले आहेत. अशा सर्व वाढत्या कार्यांची हिशेबी व्यवस्था कार्यक्षमतेनें व तत्परतेनें ठेवूं शकेल अशा योग्यतेचा हिशेबनीस सेवा संघास नेमावयाचा आहे. तरी तशी योग्यता असलेल्या व्यक्तींनीं फक्त अर्ज करावेत.

— व्यवस्थापक, आयुर्वेद सेवा संघ, नासिक

चित्रांचे साचे (मोल्ड)
हत्ती, उंट, वाघ, ज्ञानेश्वर, साईबाबा वगैरे ४० प्रकार. या साच्यांतून घरबसल्या चित्रांचा व्यवसाय सुरूं करतां येतो. हा एक अभिनव धंदा आहे.
प्र. देशपांडे C/o सोमण लॉज, पुणें ४

दुर्मिळ वनस्पती
वैद्य, डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, यांना, आमचेकडे सर्व प्रकारची ताजी वनस्पती व वनस्पतीपासून तयार केलेलीं तेलें, डुक्करकन्द, काळी टाहकळतेल, सफेद पळस फुलें, वाकेरी भाते, माळकांगोणी तेल, सफेद रिंगणी बीज, गुळवेल सत्व, महावातविध्वंसक तेल, सफेद गुंजा, उंबराचे मुळाचें पाणी, कासवाच्या पाठी, भुईकोहळा, आघाडा क्षार, इ० मिळतात. सविस्तर माहिती मिळविण्यासाठीं
पत्रव्यवहाराचा पत्ता —
भारत वनस्पती फार्मसी
C/o भिमाजी सखाराम राजगुरव
पो. मंचर, जि. पुणें

संस्कृत अभिप्राय

मादितांतःकरणेनाभिप्रायं दातुमुत्सहते चेतः यत्
युर्वेद सेवा संघ ’ संस्थया कृतं ओषधानिर्माणकार्यं
शास्त्रसमयमधिकृत्य कल्पनाविलासान् ऊहापोहांश्च
तारतम्यविनिश्चयमधिकृत्य भेषजसंस्कारांश्चावलोक्य
सानंदं धन्यवादार्हान् मन्यामहे कार्यकारिसदस्याः
ते।

प्र. दा. ळलीत, (सही) वै. दत्तात्रेय बाळकृष्ण
बडोदे प्रकाशकर, बडोदे
वा. वा. प्रकाशकर, बडोदे
वैशाख व॥ १२ गुरुवार शके १८७७

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाची
र्षिक १ रु. वर्गणी भरून सभासद व्हा.
व संघटना बळवान् करा

अनुक्रमणिका

मुंबई आयुर्वेद बोर्डाची निवडणूक ७५५
आयुर्वेदीय पाठ्यक्रमांत आयुर्वेद–बाह्य विषयांचें स्थान ७५७
औषधी व अद्‌भुत इलाजाबाबत भारत सरकारचा कायदा ७६१
कै. पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर ७६५
मुंबई राज्य वैद्य संमेलन, ठराव ७६८
महाराष्ट्र प्रां. वैद्य संमेलन, वृत्त ७६९
आयुर्वेद अध्यापक चर्चा वृत्त ७७३
आयुर्वेद बोर्डाचा कारभार ७७६
डी. ए. एस्. एफ्. परीक्षोदर्क ७७७
समन्वय चिकित्सा ७७९
धर्मार्थ दंतयज्ञ, बेंगळूर ७८१
एक सत्यकथा ७८२

मध्यप्रदेश सरकारमान्य (Recognised)

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती

[आयुर्वेदाचें सर्वांगपूर्ण शिक्षण देणारी संस्था]

१) शवच्छेदन, रुग्णपरीक्षा, नेत्ररोग, स्त्रीरोग, पॅथॉलॉजिकल परीक्षा, चिकित्सा आदींचें प्रत्यक्षासहित ज्ञान
२ सरकारी इर्विन हॉस्पिटलमध्यें ऑपरेशन्स पाहण्याची सोय
३) सरकारमान्य बी. ए. एम्. एस्. (बॅचेलर ऑफ् आयुर्वेद वुइथ मॉडर्न मेडिसिन अँड सर्जरी) हा चार वर्षांचा डिग्री कोर्स
४) सरकारी आयुर्वेद बोर्डामार्फत परीक्षा. ५) उत्तम अध्यापक वर्ग
६) बोर्डिंगची व्यवस्था. विद्यार्थिनी राहण्याची स्वतंत्र व्यवस्था
७) मॅट्रिक व इंटर पास विद्यार्थ्यांना प्रवेश
८) महाविद्यालय २० जून पासून सुरूं होतें. माहितीपत्रक मागवा.

– वैद्य पं. दा. मुळे, प्रिन्सिपॉल

बोर्ड ऑफ् आयुर्वेदिक अँड युनानी सिस्टिम्स ऑफ् मेडिसिन, मुंबई

नोटीस

बोर्ड ऑफ् आयुर्वेदिक अँड युनानी सिस्टिम्स् ऑफ् मेडिसिन, मुंबई, यावर ये निवडणुकींत निवडून यावयाच्या सहा सदस्यांच्या निवडणुकींबाबत बॉंबे गव्हर्नमेंट् गॅझेट, भाग तारीख २।६।१९५५ मध्यें जें सूचना-पत्रक (नोटिफिकेशन) प्रसिद्ध करण्यांत आलें आहे त्याक सरकारी देशी वैद्यक व्यवसायींचे रजिस्टरांत ज्यांचीं नांवें दाखल आहेत अशा मुंबई राज्यांतील देशी वैद्यक व्यवसायींचें लक्ष वेधण्यांत येत आहे.

उमेदवारांचें नॉमिनेशन पत्रक २५० रुपये डिपॉझिटसह बोर्डाच्या रिटर्निंग ऑफिसरकडे तारीख १८ जून १९५५ (दुपारीं १२ वाजेपर्यंत) अगर तत्पूर्वीं दाखल झालें पाहिजे.

नॉमिनेशन पत्रकांची तपासणी तारीख २० जून १९५५ रोजीं होईल. ज्या उमेदवारास आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल ती त्यास ता. २२।६।१९५५ दुपारीं १२ वाजेपर्यंत परत घेतां येईल. मतदारांस मतपत्रिका ता. ८ जुलै १९५५ अगर तत्पूर्वीं देण्यांत येतील. व मतदारांनी त्या ता. १ ऑगस्ट १९५५ रोजीं दुपारीं १२ वाजेपर्यंत अगर तत्पूर्वीं मे. रिटर्निंग ऑफिसर यांना मिळतील अशा बेतानें पाठविल्या पाहिजेत. मतमोजणीस ता. १ ऑगस्ट १९५५ रोजीं दुपारीं एक वाजेपासून सुरुवात होईल.

एस्प्लनेड मॅन्शन्स्
१४४ महात्मा गांधी रोड
फोर्ट, मुंबई १-६-१९५५

[सही] पी. आर्. गोडबोले
रिटर्निंग ऑफिसर
बोर्ड ऑफ आयुर्वेदिक अँड युनानी सिस्टिस् ऑफ् मेडिसिन, मुंबई

शुद्ध आयुर्वेदीय उपचारासाठीं, नाशिक येथें

आयुर्वेदीय आरोग्यशाला

सुरू करण्यांत आली आहे. या आरोग्यशाळेंत मन, शिरोविरेचन, रक्तस्रुति, कषाय व स्नेहबस्ति इत्यादि शोधन उपचारपूर्वक चिकित्सा केली जाते.

पत्ता:- चांदवडकर वाडा, चांदवडकर रस्ता, नाशिक

संपादक व प्रकाशक— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विवलकर कारंजा, नाशिक
मुद्रक — श्री. चिं. आंक, सर्कल प्रेस, नाशिक.

2260
३०.13172
गुरुकुल पत्रिका

आयुर्वेद तथा सर्वांचे पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता १ व १६ रोजीं प्रसिद्ध होते.)

वर्ष ९ वें) नासिक, ता. १ जुलै १९५५ (अंक १ ला

मुंबई राज्य वैद्य संमेलनाचा अपूर्व विजय

आयुर्वेद युनानी बोर्डाची बिनविरोध निवडणूक

मुंबई राज्यांत महाराष्ट्र प्रांतीय, महागुजरात, निखिल कर्नाटक व मुंबई उपनगर अशा ४ वैद्य-संघटना स्वतंत्र रीत्या कार्य करीत होत्या. त्यांनीं संघटित होऊन मुंबई व भुसावळ येथें २ राज्य संमेळनें भरविलीं व सरकारदरबारीं संघटित स्वरूपांत वागण्याचें ठरविलें.

यशवंत धोंडोपंत नाटोलीकर

भुसावळ येथें भरलेल्या संमेळनानंतर लगेच गेल्या महिन्यांत सरकारी आयुर्वेद युनानी बोर्डाची पंचवार्षिक निवडणूक जाहीर झाली. मुंबई राज्य वैद्य संमेलनानें ता. १२ जून रोजीं मुंबई येथें सभा घेऊन ५ वैद्य उमेदवार ता. १८ जून १९५५ पर्यंत उभे केले. याशिवाय आणखी ४ वैद्यांचे अर्ज राखीव म्हणून भरून ठेवले होते. हकीमाच्या एका जागेसाठीं हकीम देवासिंग व गोपाळसिंग हे उभे राहिले होते.

या सर्व उमेदवारांच्या अर्जाची तपासणी ता. २०-५-५५ रोजीं होऊन सर्व अर्ज मंजूर झाले. यानंतर राखीव ४ वैद्यांनीं व हकीम देवासिंग रामसिंग यांनीं ता. २२ पूर्वीं आपले अर्ज मागें घेतले. त्यामुळें ही निवडणूक बिनविरोध झाल्याचें आयुर्वेद व युनानी बोर्डानें जाहीर केलें आहे.

आयुर्वेद युनानी वैद्यक बोर्डाचे पुढील ५ वर्षासाठीं बिनविरोध निवडून आलेले ६ सभासदः—

[१] आयुर्वेदाचार्य वैद्य **ब्रह्मदत्तशर्मा प्रभुदयाळ सनाढ्य**, ... भुसावळ [पू. खा.]
[२] वैद्य **यशवंत धोंडोपंत नाटोलीकर**, ... कागल [कोल्हापूर]
[३] आयुर्वेदभिषक् वैद्य **अमरप्पा वीरप्पा**, गदग, कर्नाटक आयुर्वेद विद्यापीठ, बेळगांव
[४] आयुर्वेदभिषक् वैद्य **गोविंदप्रसाद हरिप्रसाद**, ... गोमतीपुरा, अहमदाबाद १०
[५] भिषग्वर वैद्य **प्रतापकुमार पोपटभाई**, ... ९२ आत्मारामरोड, भुलेश्वर, मुंबई २
६] हकीम **गोपाळसिंग रामसिंग कालरा**, ... ३८८ सँडहर्स्टरोड, मुंबई ४

निवडून आलेल्या मागील सदस्यांचें आम्ही अभिनंदन करतो व मुंबई राज्य संमेलनानें पुनर घेऊन मुंबई राज्यांत आदर्श संघटना निर्माण करण्याचा भक्कम पाया घातला याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

राखीव उमेदवारांना धन्यवाद

निवडणुकीच्या कार्यपद्धतींत कांहीं राखीव उमेदवार लागतात. पुणें येथील वैद्य ग. वि. पुरोहि आयुर्विद्याविशारद व वैद्य भा. पु. नानल आयुर्विद्याविशारद, वैद्य सोमेश्वर भट्ट भुलेश्वर मुंबई, व वैद्य च. यड्डूर, बेळगांव व हकीम देवासिंग यांनीं प्रथम राखीव उमेदवार म्हणून उभे राहण्यास व नंतर आप उमेदवारीचे अर्ज मंजूर झाल्यानन्तर मागें घेण्यास आगाऊ संमति दिली याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत. पुढील निवडणुकीपर्यंत ही तरुण मंडळी अधिक जोमानें वैद्यसंघटनेचें काम करतील व वैद्यजनते अधिकाधिक विश्वास संपादन करतील अशी आम्हास खात्री वाटते.

* * *

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नासिक

सोमवार ता. १३।६।५५ रोजीं दुपारीं २ वा. शुद्ध आयुर्वेद विद्यालयाच्या दुसऱ्या वर्षाच्या अध्यापनकार्यास प्रारम्भ झाला. त्या प्रसंगीं वैद्य वि. म. गोगटे, वैद्यरत्न केळकरशास्त्री व प्रधान अध्यापक वैद्य बिंदुमाधव पंडित यांचीं विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यानें झालीं.

विद्यालयाच्या नव्या वर्षांत यन्दा २१ विद्यार्थी उपस्थित झाले आहेत व अद्याप कांहीं येत आहे १५ जुलैपर्यंत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येणार आहे

आरोग्यशाला

विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष शिक्षणासाठीं आरोग्यशा (स्वास्थ्यशाला व रुग्णालय) चांदवडकर र चांदवडकर वाडा येथें सुरूं करण्यांत आली आहे आयुर्वेदीय उपचाराचें एक उपयुक्त स्थान या दृष्टी जनतेंत त्या संबंधीं कुतूहल व आकर्षण वाढत आहे

लोहभस्म (वारितर) २४ रु. सेर

	भाव प्रति सेर		भाव प्रति सेर		भाव प्रति सेर
शुद्ध शिलाजीत	३२ रु.	मण्डूरभस्म	२० रु	वंगभस्म	३६ रु.
शंखभस्म	७ ,,	प्रवाळभस्म	३२ ,,	शृंगभस्म	१४ ,,
अभ्रकभस्म [वज्र] भस्म	४६ ,,	कपर्दिकाभस्म	८ ,,	कांतलोहभस्म	२८ ,,
मुक्ताशुक्तीभस्म	१० ,,	स्वर्णमाक्षिक भस्म	२८ ,,	गोदंतीभस्म	३॥। ,,
रससिंदूर	८० ,,	चन्द्रप्रभावटी	२८ ,,	स्वर्णराजवंगेश्वर	८८ ,,
स्वर्णसिंदूर	३ रु. तोळा				

हमारे कारखाने में २०० मन शिलाजीत प्रति वर्ष शास्त्रोक्त पद्धति से शुद्ध की जाती है। अशुद्ध शिलाजीत पत्थर का भाव ८० रु. प्रति मन है।

सूचना: - उपरोक्त भावों पर कोई भी औषधि २० तोला से कम न भेजी जावेगी।

हमारा सेर ८० तोला का है।

काश्मीर आयुर्वेदिक वर्कर्स, नं. १ — अमृतसर

आयुर्वेदांतील उदक-विचार

(लेखकः— वैद्य बिंदुमाधव पंडित, नाशिक)

अन्न व पाणी

मनुष्याला रोजच्या रोज लागणाऱ्या वस्तूंत अन्न व पाणी या प्रमुख वस्तु आहेत. त्यांतहि अन्नापेक्षां पाण्याची आवश्यकता अधिक आहे. मनुष्य अन्नाशिवाय कांहीं दिवस काढूं शकेल, पण पाण्यावांचून अधिक दिवस राहूं शकणार नाहीं. पाण्याला 'जीवन' अशी संज्ञा आहे. पाणी ही इतकी महत्त्वाची वस्तु असल्यामुळें मनुष्य आजारी न पडण्यासाठीं, व आजारी झाला तर तें आजारीपण युक्तीनें पण स्वाभाविक रीतीनें घालविण्यासाठीं आयुर्वेद-शास्त्रानें 'पाणी' या द्रव्याचा विशेष उपयोग केला आहे, विशेष विचार केला आहे.

संस्कृत पाणी वापरावें

मनुष्याला भूक लागते त्यासाठीं तो अन्न खातो, व तहान लागते त्यासाठीं तो पाणी पितो. अन्न खातांना आपल्या प्रकृतीचा विचार करून ज्याप्रमाणें त्यानें तळलेलें (वातासाठीं), उकडलेलें (पित्तासाठीं), व भाजलेलें (कफासाठीं) खाल्लें पाहिजे, त्याचप्रमाणें तें पाणी पितांना देखील त्यानें तिलोदक (वातासाठीं), दर्भोदक (पित्तासाठीं), व यवोदक (कफासाठीं) वापरलें पाहिजे. तिलोदक, दर्भोदक, यवोदक या श्राद्ध-प्रयोगांतील संज्ञा आहेत. तीळ, दर्भ व यव यांचे गुण आपल्याला माहित आहेत. आपण अन्न कच्चें न खातां शिजवून त्यांत तेल, मीठ, तिखट, हळद, घालून खातो, त्याचप्रमाणें पाणी वापरतांना सुद्धां तें कच्चें वापरतां कामा नये. तें संस्कृत करूनच वापरलें पाहिजे असा आयुर्वेदाचा कटाक्ष आयुर्वेदाच्या शास्त्रीय ग्रन्थांतून सर्वत्र दिसतो. निरोगी माणसानें दिनचर्या, ऋतुचर्या, पालन करतांना कालस्वभाव व देहदोष लक्षांत घेऊन 'संस्कृत उदक' त्या त्या कालीं वापरलें पाहिजे.

हीच संस्कृति आहे

माझें हें विधान अनेकांना खटकेल हें मला माहित आहे. पाणी ही नैसर्गिक वस्तु आहे. नैसर्गिक वस्तु ही स्वाभाविक स्थितींत वापरणें हें निसर्गाला धरून आहे, असें त्यांचें म्हणणें असतें. पण आपण असा विचार करावयास पाहिजे कीं, कोणती वस्तु आपण नैसर्गिक स्थितींत त्यावर कांहींहि संस्कार न करतां वापरतो ? तसें पाहिलें तर असें आढळून येईल कीं, आपण देशकालाचा विचार करून वस्तु वापरतो, तेव्हांच ती आरोग्यदायी होते. अन्यथा त्यापासून अपाय झाल्याशिवाय रहात नाहीं. वापरावयाची वस्तु योग्य संस्कारयुक्त वापरणें हेंच सुसंस्कृतपणाचें लक्षण आहे. हीच संस्कृति आहे असें मला म्हणावयाचें आहे.

नैसर्गिक पाण्यामुळें हिताहित

पाण्याविषयीं वाग्भटाचार्यांनीं असें म्हटलें आहे कीं, आकाशांतून पाणी जमिनीवर पडतें. पडतांना व पुढेंहि त्यावर सूर्यकिरण, चंद्रकिरण व निरनिराळे वायु (व भूमिगत द्रव्यें) यांचे संस्कार घडतात. अशा संस्काराचें हें पाणीहि सर्वांना सर्वकालीं स्वाभाविक स्थितींत मानवेल हें शक्य नाहीं. देशकाल-भेदानें तें नफानुकसान (हिताहित) करतेंच.

मडक्यांतील संस्कृत पाणी

आज आपण पाणी पितांना इतका बारकावा करीत नाहीं. तरीपण कांहीं लेकांना मडक्यांतील पाणीच हवें असतें, तर कांहीं लेक कटाक्षानें माठांचें पाणी टाळतात. मातीच्या पात्रांत पाणी ठेवणें हा संस्कारच आहे. तें पाणी संस्कृतच आहे. तो संस्कार सर्वांना सर्व प्रकृतीच्या लेकांना मानवेल असें नाहीं. कांहींना मानवेल, कांहींना बाधेल. कोणाला मानवेल व कोणाला बाधेल यासंबंधींचा निर्णय आयुर्वेद करूं

शकतो. कफप्रकृतीच्या व वातप्रकृतीच्या लोकांना मातीचा शीत संस्कार बाधतो. उलट पित्तप्रकृति लेकांना तो संस्कार आरोग्यदायी होतो. सबब निरोगी अवस्थेंत सुध्दां पाणी वापरतांना तें विचारपूर्वक संस्कार करून वापरलें पाहिजे असा आयुर्वेदाचा सिद्धांत आहे. आपण आयुर्वेदीय वैद्य शास्त्राच्या या सूचनांकडे दुर्लक्ष करतो व म्हणून कित्येक वेळां अपयशाचे भागी होतो.

ऋतुचर्येतील उदक–विचार

तसें पाहिलें तर आयुर्वेदांत हा उदकविचार पावलेंपावलीं दिला आहे. ऋतुचर्याध्यायांत हेमंत-शिशिर ऋतूंत शौचशुद्धीसाठीं सुखदायी ऊन पाणी (सुखोदकम्) सांगितलें आहे.वसन्तऋतूंत सुंठीचें पाणी, असनादिसाराचें पाणी, मधपाणी, नागरमोथ्याचें पांणी [शृंगवेरांबु सारांबु मध्वंबु जलदांबु वा] सुचविलें आहे.

माठाचें पाणी कोणी प्यावें ?

वसन्तऋतु म्हणजे उन्हाळयाचा प्रारंभ. या दिवसांत कफाचा प्रकोप उन्हामुळें होत असतो. अशा वेळीं माठांतील पाणी पिऊ नये हें किती लोकांना कळतें ?

उन्हाळा सुरूं झालारे झाला कीं, सर्व लोक माठाचें पाणी वापरूं लागतात पण तें सर्वांना मानवत नाहीं. ग्रीष्मऋतूंत मात्र बहुतेकांना माठाचें पाणी सोसतें, मानवतें.पण त्याहि वेळीं तें न मानवणारे कांहीं असतातच. पण एकंदरींत नंतरच्या उन्हाळयांत गार पाण्याचें स्नान व गुलाबाचें, कापुराचें, वाळयाचें, सुगंधी पाणी बहुतेकांनाच सुखदायी होतें. ग्रीष्मऋतूंत पाण्याचीं कारंजीं असलेल्या ग्रहांत झोंप घ्यावी असें सांगितलें आहे.

पावसाळयांत पाणी उकळून प्यावें

याच्या उलट पावसाळयांत पाणी उकळून वापरावें (शृतं अंभः) मलिनपाणी वापरूं नये. पाऊस पडल्यावर नळालासुद्धां गढूळ पाणी येतें तें उकळून वापरण्याकडे आपलें लक्ष हवें. स्टोव्ह, पेट्रोमॅक्स यांत तेल गाळून न भरलें तर तें यंत्र चोंदतें, तसेंच आपलें शरीर अशा मलिन पाण्यानें विकार पावेल असा विचार संस्कृत मनुष्याच्या मनांत आला पाहिजे. ज्या पा वर सूर्यकिरण व चंद्रकिरण पडतात असें निर्मळ वापरलें पाहिजे. घरांत भरून ठेवलेल्या पाण्या हा संस्कार जातो म्हणून शिळें पाणी न वापरण्या माणसाचा कटाक्ष असतो.

अवेळीं पाणी प्याल्यानें रोग

वेळींच अन्न न खाल्लें वा अवेळीं अन्न खा तर पचनशक्ति बिघडते. त्याचप्रमाणें वेळींच पाणी न प्यालें वा अवेळीं पाणी प्यालें तरीहि पचन विकार सार्वदेहिक विकार संभवतात [तृष्णानिग्रहज व्याधि] यांत बहिरेपणासारखा रोगहि आहे.

अत्यंत उपयुक्त माहिती

अष्टांगहृदयांत सू. ५ वा अध्याय द्रवद्रव्यविज्ञानीय नांवाचा आहे. त्यांत सर्व द्रवद्रव्यांतील मुख्य पाणी त्याचा विचार सविस्तर मांडला आहे. अधांतरी धरलेलें पाणी, पात्र, भूमि, [विहीर, तलाव, सरोवर] देशभेदानें पाण्याचे गुणधर्म, पाणी कोणी पिऊं नये, कोणी कमी प्यावें, कोणी थंड पाणी प्यावें, नित्य ऊ

सांडू
टोमॅटो कम्पाउन्ड
• व्हिटॅमिनयुक्त टॉनिक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्सः—
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते—मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

पाणी कोणी प्यावें, ताववून निवालेलें कोणी प्यावें, ऋतुभेदानें बाधक पाणी कोणतें व हितकर पाणी कोणतें यासंबंधीं माहिती तेथें आली आहे. ती अत्यन्त महत्वाची आहे. आयुर्वेदीय पद्धतीनें निदान-चिकित्सा करण्यासाठीं ती अत्यन्त उपयुक्त आहे.

पाणी केव्हां प्यावें ?

पाणी पिण्याच्या वेळां कोणत्या असाव्यात हा विचाराहि महत्त्वाचा आहे. जेवणापूर्वी पाणी पिणें, जेवणामध्यें पाणी पिणें, जेवणानंतर पाणी पिणें यामुळें निरनिराळें नफानुकसान होतें. कोणत्या अन्नानंतर कोणतें अनुपान हांहि विचार महत्त्वाचा आहे. कान, नाक, घसा, डोळे यांचे रोग, दमा, खोकला, पडसें, आवाज बसणें इत्यादि विकाराला चुकीच्या संस्काराचें पाणी पिणें हेंच कारण आहे. बिलकूल पाणी न प्यावें असेहि कांहीं रोग आहेत.

पाणी शरीरांत पुढील गुणकर्में वाढवितें. हीं गुणकर्में नको असतील तेव्हां माणसानें पाणी पिऊं नये, वापरूं नये. द्रवशीतगुरुस्निग्धमंदसांद्ररसोल्बणम् । आप्यं स्नेहन– विष्यंद –क्लेद– प्रल्हाद– बंधकृत् ॥ पित्तदोषाच्या विकारांत पाणी हें द्रव्य अत्यंत आवश्यक आहे. शरीरांत व शरीराबाहेरूनहि त्याचा भरपूर वापर सांगितलेला आहे. (शीतांबुधारागर्भाणि गृहाणि उद्यानदीर्घिकाः । सुतीर्थविपुलस्वच्छसलिलाशयसैकते । नांभोजजलतीरान्ते कायमाने द्रुमाकुले ॥

स्नेहपानानन्तर ऊन पाणी

आपण स्नेहपान केलें असेल तर त्याच्या पचनासाठीं नंतर ऊन पाणी पिणें अवश्य असतें. यामुळें स्नेहद्रव्यें लवकर पचतात. ऊन पाण्यानें तोंडाचा चिकटा लवकर जातो. [तुवरक तेल व बिब्याचें तेल हीं उष्ण तेलें आहेत; यावर थंड पाणीच वापरावें.]

कालचें जेवण पचलें कीं नाहीं अशी शंका आली तर सकाळीं ऊन पाणी प्यावें. त्यानें पचन चांगलें होऊन स्वच्छ ढेंकर येईल व हलकें वाटेल.

उष्णवनस्पतिसंस्कारानें उष्णवीर्य

उष्णवीर्य वनस्पतीचे व मांसाचे पाण्यांत अगर दुधांत केलेले काढे हे घाम आणण्यासाठीं वापरण्याचा उपाय वाग्भटानें सांगितला आहे. पाणी हें मूळचें शीतवीर्य असलें तरी संस्कारानें त्याचा शीत गुण कमी करतां येतो. अशा उष्ण संस्काराच्या पाण्यांत बसूनहि मूळव्याध, मूत्रकृच्छ्र आदींच्या वेदना कमी करतां येतात.

ऐस्क्रीम कोणी खाऊं नये

जुलाब चांगला लागू होण्यास ऊन पाणी पिणें अवश्य आहे. कोठा थंड पडून ज्यांना शौचास लौकर होत नाहीं, त्यांनीं रोज थंड पाणी न पितां ऊन पाणीच प्यावें. (अप्रवृत्ते तु पाययेत् उष्णांबु). विटाळ साफ जात नसेल त्या स्त्रियांनीं ऊन पाणी पिणें हितावह आहे. त्यांनीं आइस्क्रिम खाऊं नये.

बस्ति घेत असतांनाहि पाणी कोणत्या संस्काराचें व गुणाचें वापरलें पाहिजे हा विचार आयुर्वेदानेंच केला आहे. वातावर स्निग्ध अम्ल उष्ण गुणाचा व मांसरसयुक्त, १ बस्ति द्यावा. पित्तावर साखर घालून गोड केलेलें थंड तूप दूध उसाचा रस यांनीं युक्त २ बस्ति द्यावेत तर कफावर रूक्ष गोमूत्रयुक्त तीक्ष्ण तिखट रसाचे ३ बस्ति द्यावेत. हा एनिमा घेतांना करावयाचा विचार आजच्या काळांत महत्त्वाचा आहे.

मूर्च्छा आली असतां थंडपाणी डोक्यावर शिंपडावें हा प्रयोग सध्यांच्या युगांतहि रक्तदावाच्या रोग्यावर केला जातो.

धूम्रपानानंतर कंठशुद्धीसाठीं कोमट पाण्याचे गुळणे करावेत. तोंडांतील श्लेष्मसंचय कमी करण्यासाठीं क्षारोदकाचे गुळणे करावेत. कोमट पाण्याच्या गुळण्या केल्यानें तोंड हलकें होतें.

डोळे शेकण्यासाठीं धुण्यासाठीं ऊन पाणी वापरावें. कोमट पाण्याच्या बोळ्यानें डोळे शेकावेत. कानांत किडा गेला असतां मीठपाणी कानांत घालावें. (कर्णपूरण)

वाग्भटाच्या सूत्रस्थानांत ठिकठिकाणीं आलेल्या या वचनावरून निरनिराळ्या संस्काराचें पाणी

निरानिराळया उपयोगाचें होतें हें लक्षांत येतें. शारीरस्थानांत सूतिकेला स्नेहपान करवून त्यावर गूळपाणी गुळवणी (उष्णं गुडोदकं) द्यावयास सांगितलें आहे.

ज्वराचा जलविचार

चिकित्सास्थानांत प्रत्येक अध्यायांत संस्कृत जलपानाचा विचार आला आहे. ज्वरचिकित्सेंत 'वातकफज्वरी मनुष्यानें तहान लागली तर थोडें थोडें ऊन पाणी प्यावें. ऊन पाण्यानें कफाचें विलयन होतें व तहान कमी होते. अग्नीचें उदीरण होतें. स्रोतसें मृदु होतात. शरीरांतील लीन पित्त व वात हे दोष, व स्वेद, शकृत् व मूत्र हे मल अनुलोमगतीनें जातात. निद्रा कमी येते, जाड्य कमी होतें, असें सांगितलें आहे. व वातकफज्वरी मनुष्य जर साधें भांड्यातलें थंड पाणी पिईल तर त्याचा दोषसंघात वृद्ध पावेल असें स्पष्ट बजावलें आहे.

एकांत पित्तज ज्वर

याच्या उलट एकांत पित्तल ज्वरावर ऊन पाणी देण्यानें होणारें नुकसान स्पष्ट शब्दांत दर्शविलें आहे. दाह, मोह, आतिसार असणाऱ्या व्यक्तीस तसेंच उन्हाळ्यांत ऊन पाण्याचा निषेध केला आहे. याच ठिकाणीं सुप्रसिद्ध षडंगोदकाची महती गायली आहे. नागरमोथा, चंदन, वाळा, सुंठ, काळा वाळा, पित्तपापडा हें षट्क दोष पाचन करून तहान व ज्वर घालविणारें आहे.

आयुर्वेदाचा सूक्ष्म विचार

पित्तज्वरांत फलरस (द्राक्षें, मुसुंब्री) योग्य पण वातकफज्वरांत तीं उपयोगी नाहींत. हा विचाराचा बारकावा आयुर्वेदाखेरीज अन्यत्र न सांपडणारा आहे.

स्नानाचा निषेध

स्नानासाठीं पाण्याचा केलेला उपयोग बाधक होतो हें बल येईपर्यंत ज्वरी मनुष्यानें स्नान वर्ज करावें असें सांगून स्नानाचा निषेधच केला आहे.

पिण्यासाठीं अन्नाचे तीन काल

रक्तपित्तविकारांतहि निःशुंठीषडंगोदक प्यावें. याचा अर्थ साधें पाणी पिऊं नये. संस्कृत पाणी प्यावें असाच आहे. लघुपंचमूलश्रृत पाणी, मधपाणी, फलरस ही सर्व संस्कृत जलेंच होत. खोकला (कास) विकारा दशमूलांबु, घर्मांबु (वाफेचें पाणी), मधपाणी, पुष्करमूल, बाहावामूळ, पटोलमूळ या वनस्पीता रा पाण्यांत ठेवून सकाळीं मध घालून अन्नापूर्वी अन्नाबरोबर व अन्नानंतर प्यावें. (पिबेत् वारि स क्षौद्रं कालेष्वन्नस्य वा त्रिषु)

उचकी:– दशमूलजल, देवदारुजल, वारुणीमंड (हिक्काश्वासी पिपासितः)

क्षयरोग्याचें पाणी कोणतें ?

राजयक्ष्माः— जीर्ण मद्य (स्रोतोविशोधक) प्यावें. (पिबेच्च सुतरां मद्यं जीर्णं स्रोतोविशोधनम्) साधें पाणी पिऊं नये या सूचनेकडे वैद्यांचें लक्ष आहे काय ? पित्तज राजयक्ष्मी रोग्यानें मद्याचा मधुकल्प, कफज रोग्यानें अरिष्टकल्प व वातज राजयक्ष्मी रोग्यानें वारुणीकल्प, पाण्याऐवजीं प्यावा. निदान तें पाण्यांत मिळवून तरी प्यावें. त्या शिवाय तें साधें पाणी पिऊं नये. पंचमूलजल, तामलकीजल, धणेसुंठ घातलेलें जल हें प्यावें.

.... उत्तम धर्म ....

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधेंच वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान-

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

आपण दुर्लक्ष करतो

क्षयी माणसानें जेवतांना संस्कृत पाणीच प्यालें हिजे अशा स्पष्ट आदेश असतां आपण तिकडे क्ष करतो. व आयुर्वेदीय उपचारानें गुण कां येत ही अशी तक्रार करतो हें बरें नव्हे. क्षयी माणसा-नीं मांसाचे कल्प व अनुपानासाठीं मार्द्वीक, अरिष्ट, धु, माघव, समंड सुरा हीं अवश्य वापरलीं पाहिजेत. मुळें स्रोतोविबंध दूर होऊन बल ओज पुष्टी होईल.

वान्तिः— भाजलेल्या मातीचें ढेंकूळ विरवून थंड झालेलें पाणी प्यावें. मूग, वाळा, पिंपळी, धणे री भिजत घालून, गुळवेल भिजत घालून तें पाणी ावें.

हृद्रोग्यासाठीं उपयुक्त पाणी

हृद्रोगः— लघुपंचमूल—जल, सुंठ टाकलेलें पाणी गीमंड, दाधिमंड, धान्याम्ल (कांजी) द्यावें.

तृष्णाः— मधपाणी, भाजलेल्या मातीच्या ढेंक-चें, तापलेल्या खापरीचें, तापलेल्या वाळूंत टाकलेलें णी निवळून पिण्यास द्यावें. पंचमूल—जल + थोडी खर. वातज तृष्णेवर दहीगूळ, विदार्यादिगणांबु वें. पित्तज तृष्णेवर पिकलेल्या उंबराचा रस, वाळ-ल्या उंबराचें कढवून पाणी, सारिवादिगणाचें पाणी, लगणांबु प्यावें.

गूळपाणी कोणास द्याव

कफज तृष्णेवर— हळदपाणी + साखर मध. ड पाण्याचें स्नान केल्यामुळें झालेल्या तहानेवर — ळपाणी, मद्यपाणी. उन्हांतून आल्यानंतर लागलेल्या हानेवर गूळपाणी देण्याची प्रथा आहेच. (यावेळीं खरपाणी दिल्यास तें बाधतें.)

स्नेहपानानें अत्यग्नि निर्माण झाला तर स्वभाव-शिरपाणी. स्निग्ध अन्न खाल्यानंतर लागणाऱ्या हानेवर थंडगार गुडोदक प्यावें. रोगोपसर्गानें झालेल्या हानेवर धणे—साखर, मध—पाणी प्यावें.

उदकवह स्रोतसें दुष्ट राहतात

वाग्भट, चरक, सुश्रुत यांतील चिकित्साविभाग चतांना अन्नाच्या पथ्याप्रमाणेंच पाण्याचें पथ्य (पथ्यकारक पाणी कोणतें तें) सांगितलेलें सांपडतें. तें पथ्यकारक पाणी न देतां दुसरें म्हणजेच अपथ्यकारक पाणी दिलें त्यामुळें उदकवह स्रोतसें दुष्ट राहिलीं तर त्यांत नवल तें काय ?

मदात्यय चिकित्सेंत बहूदकमद्य, नागरमोथे, डाळिंब, लाह्या यांचें पाणी, शालिपर्णी—चतुष्टय यांचे पाणी, पटोलमूळजल, कमळकन्दजल, चांदण्यांत वाऱ्यावर ठेवलेलें पाणी द्यावें.

मूळव्याधीवर ताकाचें पाणी, संस्कृत ताक, रिंगणीचीं फळें वाटून तीं भांड्यास आंतून लिंपून त्यात ठेवलेलें ताकाचें पाणी द्यावें.

अतिसारावर— वेखंड, अतिविष, नागर-मोथा, पित्तपापडा, वाळा, सुंठ याचें पाणी द्यावें.

अतिसारी माणसास भूनिंबाचें पाणी व सारिवेचें पाणी द्यावें.

ग्रहणी— अतिसार विकारांत सांगितलेलेंच वारि (पाणी), ताक व सुरा वगैरे द्यावें.

शिंगाड्याचें पाणी द्यावें

मूत्राघात (लघवी साफ न होणें) — या विकारावर काळेमीठ घातलेली मादिरा, शतावरी, गोखरू, विदारीकंद चूर्ण, शिंगाडे चूर्ण यांचें पाणी, तृणपंचमूळ घातलेलें पाणी साखर मध घालून द्यावें. हल्लीं लघवी अडली अगर कमी होऊं लागली, उन्हाळे लागले कीं, लोक बार्ली—जल करून पितात. त्याऐवजीं शिंगाड्याच्या चूर्णाचें पाणी घेणें सोईचें व स्वस्त आहे. अडुळसा, काकडी यांचें बी द्राक्षाच्या पाण्याबरोबर प्याल्यानें मूत्राघात कमी होतो. शिळ्या पाण्यांत काळीं द्राक्षें कोळून देणें, तसेंच तांदूळ भिजत घातलेल्या पाण्यांत (तांदळाचें धुवण) काकडीचें बी, जेष्टमध, दारुहळद-चूर्ण भिजत घालून तें देणें हें मूत्रघात दूर करणारें आहे.

असाण्याच्या पाण्यानें स्नान

प्रमेह, मधुमेह, या विकाराच्या लोकांनीं स्नाना-साठीं जें पाणी वापरावयाचें तें असाण्याच्या साराचें असावें (परिषेको असनाद्येन) व पिण्यासाठीं व

अन्न शिजविण्यासाठीं जें पाणी वापरावयाचे तें कुडा वगैरे [वत्सकादि] वर्गाच्या वनस्पतींचें चूर्ण घातलेलें असावें. मधुमेही लोकांनीं टिकाऊ गुणासाठीं ही जलाची सर्वव्यापी चिकित्सा अवलंबिणें हिताचें आहे.

अंगावर बेंडें (विद्रधी) उठणाऱ्या लोकांनीं गोड शेवग्याचें (पाला अगर बी भिजत टाकून केलेलें) पाणी प्यावें.

गुल्म [पोटांतील वायगोळा, ढेंकर फार येणें इ.] बोरे, डाळिंब यांचें पाणी, ताक, मद्य, आंबट कांजी यांचा औषधाला अनुपान म्हणून जेवणापूर्वी उपयोग करावा.

उदरी रोग्यानें पाणी पिऊं नयें. दूध प्यावें, ताक प्यावें, गोमूत्र प्यावें.

पाण्डुरोगी– लघुंपंचमूळाचें पाणी, आवळयाच्या रसाच पाणी, मनुकाचें पाणी.

सूज— स्नानासाठीं पाणी कडुनिंब, पुनर्नवा, करंज, रुई यांचें पाणी वापरावें. पाणी न पितां दूध प्यावें. उंटणीचें दूध प्यावें. आसव, अरिष्ट, मूत्र, तक्र प्यावें. ाधें पाणी पिऊं नये.

धावरी सूज (विसर्प) — यावर धमासा, पित्तपापडा, गुळवेल, सुंठ यांचें पाणी तहान लागली असतां प्यावें.

त्वचाविकार (कुष्ठ)—असलेल्या लोकांनीं खैराचें पाणी प्यावें.

वातव्याधि— यावर स्नेहपान, तिलोदक.

वातरक्तावर— जुनें तूप, मनुकांचें पाणी, जेष्ठमधाचें पाणी.

पाण्यासंबंधीं माहिती सांगतांनाच पुढील रोग्यांना साधें पाणी वर्ज सांगितलें आहे. अल्पाग्नि, गुल्मी, पांडुरोगी, उदरी, आतिसारी, मूळव्याधी, ग्रहणीदोषी, सूज असलेले, ह्या रोग्यांनीं साधें पाणी पिऊं नये. संस्कृत (सिद्ध) जलच प्यावें.

चहा कोणी वर्ज समजावा ?

ज्या रोगाला साधें पाणी सुद्धां गुरु म्हणून वर्ज सांगितलें आहे, तेथें दूधसाखर घातलेलें चहा सारखें पाणी (गुरु पेय) त्या विकारांत वर्ज करावया हवें हें न सांगतां समजण्यासारखें आहे.

संस्कृत उदक कसें तयार करावें ?

६४ तोळे (अंदाजें ३ पावशेर ते १ शेर) पा व त्यांत १ तोळा (अगर त्याहूनहि कमी) अ चूर्ण (त्या त्या वनस्पतीचें) टाकून तें रात्रीं झांकून ठेवावें. सकाळीं वर तरंगत आलेला व तळाला बसलेला भाग अलग काढून मधलें पाणी पिण्यासाठीं वापरावें.

वैद्य एल. टी. शाहा, अकोला

अहमदनगर आयुर्वेद महाविद्यालयाचे मा पदवीधर व आकोला (वऱ्हाड) येथील वैद्यकीय व्यवसायी वै. ल. ठा. शाह आयुर्वेदतीर्थ ता. १४-६-५५ रोजीं फिनलंडला गेले असें कळतें. महिन्याचें २१ तारखेस फिनलंडची राजधानी हेलेसिन्की येथें जागतिक शांततापरिषद आहे. वैद्य शाहा हें नंतर रशियास भेट देणार आहेत.

दुर्मिळ वनस्पती

वैद्य, डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, यांना, आमचेकडे सर्व प्रकारची ताजी वनस्पती व वनस्पतीपासून तयार केलेलीं तेलें, डुक्करकन्द, काळी टाहकळतेल, सफेद पळस फुलें, वाकेरी भाते, माळकांगोणी तेल, सफेद रिंगणी बीज, गुळवेल सत्व, महावातविध्वंसक तेल, सफेद गुंजा, उंबराचे मुळाचें पाणी, कासवाच्या पाठी, भुईकोहळा, आघाडा क्षार, इ० मिळतात.

सविस्तर माहिती मिळविण्यासाठीं

पत्रव्यवहाराचा पत्ता—

भारत वनस्पती फार्मसी

C/o भिमाजी सखाराम राजगुरव

पो. मंचर, जि. पुणें

निवडक रुग्णाचिकित्सा

कफज ज्वर—

.(लेः— वै. श्री. कृ. करमरकर आयुर्वेदाचार्य
चिकित्सा विभाग, आयुर्वेद सेवा संघ)

—वय ११ वर्षे कफपित्तप्रकृतीची मुलगी. मांसमेद असार, तार, त्यामुळें नाजूक. उन्हांत भटकण्यानें पित्तप्रकोप चहा पिणें इ. कारणांनीं कफपित्तवृद्धि. मांसधातु धातु असार, त्यामुळें वृद्धदोषांचा मांसमेद या धातु-स्थानांवर परिणाम.

मांसमेदोघटित गिलायु

कफाच्या स्थानांतच (कंठांत) कफप्रकोप चिन्हें. कंठ हें कफस्थान. त्यामुळें कंठस्थ मांसमेदघटित गिलायूंची वाढ झाली. व त्या ठिकाणीं पाक सुरूं होऊन एक पांढरट जाड थर त्यावर आला.

रोग्यांत ज्वर १०२° (संतत). गिळतां न येणें, अत्यंत मुखदुर्गंध, कमालीची क्षीणता हीं चिन्हें निर्माण झालीं.

दोषदूष्यादिविवेकानें पुढील उपचार केले

१) लंघनम् (क्षुध्) २) गरम पाणी पिणें (तृट्)
३) औदुंबरसारानें गलप्रतिसारण.
४) शुद्धबचनाग -॥- गुंज + बेहेडा ४ गुंज.
३ पुड्या मधांतून सकाळीं, संध्याकाळीं रात्रीं निजतांना.
५) मुद्गयूष १ वेळा.

चिकित्सेची मीमांसा

'कफपित्ते द्रवे धातू सेहेते लंघनम् ।' या र्यांनें व सर्व मुखरोगांवर वमन व लंघन हे प्रधान उपाय असल्यानें रोग्याची क्षीणता लक्षांत घेऊन क्षुध् लंघनाचा शमनोपाय सांगितला. (शोधन केलें नाहीं.)

औदुंबरसारांतील घटक

औदुंबरसारांतील प्रथम द्रव्यें औदुंबराच्या नांचा दाट लेह व टंकण हीं असल्यानें, उदुंबर पित्तनाशक व टंकण कफविलयन करणारा असा हा पित्तकफनाशक कल्प असल्यानें त्याचा कंठस्थ विकृतींत स्थानिक उपचार म्हणजे (त्वग्गत उपचार) प्रतिसारण म्हणून उपयोग केला.

बचनाग हें द्रव्य आमकफपाचक, बेहेडा हें द्रव्य रक्तशोधक, पीडन करणारें, मेदोविशोषण करणारें व विशेषतः कंठस्थानावर कार्य करणारें असल्यामुळें वापरलें. 'कफपित्तहरः मुद्गयूषः ।' म्हणून दिला.

चिकित्साकाल

एकूण तीन दिवस चिकित्सा दिली. प्रथम दिवशीं १०२°, ज्वर, दुसऱ्या दिवशीं १००° सकाळीं संध्याकाळीं ९९॥°, तिसऱ्या दिवशीं ९८॥° व ९७° अशा रीतीनें क्रमशः ज्वर कमी झाला व गिळतां येऊं लागलें.

चिकित्सेंतील वैशिष्ट्य

वरील चिकित्सेंत सर्व एकेरी द्रव्यें वापरलीं आहेत. दोषादिकांचा विचार करून वापरलेल्या या द्रव्यांमुळें अल्प कालांतच दोषांचें पचन होऊन साम्य प्रस्थापित झालें.

गिलायूंवर आलेला पांढरा थर व रोग्याची क्षीणता इ. लक्षांत घेतां अत्यंत अल्पमोली व बहुगुणी अशी ही चिकित्सा झाली.

सुप्रसिध्द दंतवैद्य पां. त्रि. जायदे
यांचीं दोन पुस्तकें
दंतरोगविज्ञान व चिकित्सा ३ रु.
वैद्यसन्मित्र २ ,,

कामशास्त्रावरील पुस्तकें
प्रश्नोत्तररूपी कामशास्त्र भाग १
(श्री. पं. ज. कुळकर्णी) ३ रु.
कामसूत्र भाग १
वात्स्यायन ग्रंथाचा मराठी अनुवाद ५ ,,
पांच वर्षांचा पाळणा डॉ. शं. ह. मराठे १॥ ,,
वद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय अमरावती

वार्षिक परीक्षा १९५५ चा निकाल

प्रथम वर्ष—प्रथम श्रेणी

ग. बा. शेरकर, (प्राविण्य शारीर) सु. तु. झापर्डे, द. व्यं. नारखेडे, भा. मा. फूके, आ. दे. जुमडे,

प्रथम वर्ष द्वितीय-श्रेणी

श्री. प. कान्त, म. मु. जमादार वा. गो. देशमुख, सु. ग. पाटील, शा. अ. नाथे, श्री. दे. पंढरपूकर, वि. पुं. गोल्हर, मा. ह. पांडे, मो. हि. सानुने, द. को. वैद्य, रा. ग. उमक, श्री. वि. नागराज, चं. तु. शिंगलकर, रं. ना. पांडव., ल. तु. पांडव, शा. वि. मुजुमदार, का. म. कानडे, ल. खु. सोनटक्के, र. वा. चौधरी, हो. ना. धांडे, म. प्र. जोशी, रा. शं फाटक (प्राविण्य शारीर), का. मो. तळेले, द. मा. जोशी, शं. ए. राजहंस, भुं. पुं. विधळे, गु. ला. पुरोहित, व. चा. घाटे, प. रा. कापडी, ना. स. जैसिंगपुरे, ना. पां. गुंडे, के. मा. वैद्य, मु. ना. कुलकर्णी, मा रा. दुगड, अ. वि. डोंगरे, भी. न. कड्डु, प्र. मो. देशपांडे, कृ. बा. वाटोकर, यो. मु. शर्मा, सु. दि. सदावर्ते, सु. आ. किटे, इ. ल. पूर्णपात्रे, भीं. शि. तडस, जो. हे. बेंडाळे. ल. ग. घड्याळजी (प्राविण्य-- संस्कृत, तर्क सांख्य)

* * *

द्वितीय वर्ष-प्रथम श्रेणी

कु. लीला जोशी

द्वितिय वर्ष-द्वितिय श्रेणी

कु. सुमन रायटे, सुदाम वेडू पाटील, श्री. शं. ढवळे, श्री. वि. चिरडे, ह. ल. भुसारी, अ. जी. होरा, म. न. टिळक, चन्द्रकांत ग. घैसास, मु. दे. भोलाणे, अ. का. आपटे, ब. दि. भागवत, ह. शं. तांदळे, पां. ल. आरु.

द्वितिय वर्ष-पास वर्ग

शांतीलाल मुथा, म. न. कोटे, बा. भावसार, ना. शं. सोवनी, द. रा. देव

तृतिय वर्ष-प्रथम श्रेणी

कु. उषा पोतदार (प्राविण्य शल्य शालाक्य, निदान, चिकित्सा), भो. स. शेटे (प्राविण्य चिकित्सा), चं. बा. गुजराथी, भा. गुं. जोशी, वा. गो. वेलसरे, कृ. स. मालसे, ह. खं. सावर, पी. एम्. राजपूत.

तृतिय वर्ष-द्वितिय श्रेणी

सु. सो. पटेल, ना. ग. देशमुख, भा. ह. तायडे, पां. ना. मिरजकर.

चतुर्थ वर्ष द्वितिय श्रेणी

म. ज्ञा. कुलकर्णी, श्री. के. पोंक्षे, तनवानी बाधूमल, ब. कृ. कुलकर्णी.

चतुर्थ वर्ष-पास वर्ग

रा. कृ. परब, शि. गि. चौधरी, ए. ल. नेमाडे, म. ना. आठवले, श्री. ग. गाजरे.

औषधी-भवनाचीं
नागपुरांत ३ विक्री-केन्द्रें

कळविण्यात आनन्द वाटतो कीं नागपूर येथें नासिकच्या आयुर्वेद औषधी भवनाचीं शास्त्रशुद्ध औषधें मिळण्यासाठीं ३ केंद्रें सुरू करण्यात आलीं आहेत.

महाल केन्द्र — श्री. माधव गंगाधर पराडे
चितारओळ केंद्र-- वैद्य गोविंद गंगाधर पराडे
सिताबर्डी केंद्र-- वैद्य त्र्यंबक विष्णु गाडगीळ

आयुर्वेद सेवासंघ औषधीभवन, नाशिक

'लेप्रसी' रोगावरील एक रामबाण

— निर्गुण्डीमूलकल्प —

(लेखकः— वैद्य इन्दुभूषण भिंगारे, महाळ, नागपूर)

आजच्या लेखाच्या प्रारंभीं मला मुद्दाम 'लेप्रसी' ह्या शब्दाचा उच्चार करावा लागला. कारण पाश्चात्य रोगविज्ञानांत लेप्रसी ह्या विकाराचें वर्णन अत्यंत विस्तृत असें आलें आहे. एवढेंच नव्हें तर ह्या रोगावर अनेक संशोधकांनीं मोठमोठे ग्रंथहि लिहिले आहेत. परन्तु ह्या 'लेप्रसी' रोगाला आयुर्वेदीय रोगनिदानांतील कोणतें निश्चित नांव द्यावें ह्या संबंधीं वैद्यवर्गांत बरेच मतभेद आहेत.

महाकुष्ठाचा प्रकार

कित्येक विद्वान् वैद्य, लेप्रसीला कुष्ठरोगांतील महाकुष्ठाचा प्रकार मानतात. दुसरा एक वैद्यांचा वर्ग लेप्रसीला 'वातरक्त' असें नांव देतो. ह्या दोन रोगांचें निदान पूर्वरूप, रूप, संप्राप्ति व लक्षणें इतकीं भिन्न आहेत कीं, त्यापासून लेप्रसी ह्या रोगाला कोणतें नांव द्यावें याचा अर्थबोध होत नाहीं. हा गोंधळ टाळण्याचे दृष्टीनें मी माझ्या लेखाला लेप्रसी हें पाश्चात्य रोगविज्ञानांतील नांव दिलें आहे, त्याबद्दल माझे वैद्यबन्धु क्षमा करतील अशी उमेद बाळगतो.

थोडा पूर्व इतिहास

निर्गुंडीमूलकल्पाचा थोडा पूर्व इतिहास अत्यंत आवश्यक वाटल्यावरून मी तो येथें देण्याचें योजिलें आहे. आमच्या मध्यप्रांतांत काश्मिरी महाराज नांवाचे एक संन्याशी आहेत. त्यांचें जन्मस्थान काश्मिर असून ते अलिकडे मध्यप्रदेशांत वास्तव्य करतात. त्यांचा आश्रम चार वर्षांचे पूर्वी राजनांदगांव ह्या शहरीं होता. त्या शहरांत त्यांनीं लेप्रसीच्या रोग्यांकरितां एक आश्रम उघडला होता. या आश्रमांत अनेक लेप्रसीच्या रोग्यांवर त्यांनीं निर्गुंडीमूलकल्पाचा अत्यंत यशस्वी प्रयोग करून दाखविला. पाश्चात्य रोगविज्ञानाप्रमाणें कित्येक असाध्य ठरलेल्या रोग्यांना त्यांनीं रोगमुक्त करून नवीन जीवदान दिलें. त्यांची ख्याति आमच्या प्रांतांत सर्वत्र पसरलेली आहे. त्यांच्या आश्रमांत अनेक ठिकाणाहून रोगी गोळा होऊं लागले. गांवांतील प्रतिष्ठित लोकांना त्या गांवांत आलेल्या लेप्रसी रोग्यांचें तें बीभत्स दृश्य पाहवेना, म्हणून काश्मिरी महाराजांना त्यांचा तेथील आश्रम बंद करण्यास त्यांनीं भाग पाडलें.

विनामूल्य औषध द्यावें ही अट

महाराजांच्या कित्येक मित्रांनीं त्यांना नागपूर-सारख्या राजधानीचे शहरीं येऊन आश्रम उघडण्याचा सल्ला दिला. ह्या सल्ल्याबरहुकूम महाराजांनीं नागपूरच्या स्मशानघाटांत गंगाबाईचे घाटावर सरदार गुजर ह्यांचे भूतेश्वराचे देवळांत आपला आश्रम थाटला. ह्या आश्रमांत सुरुवातीला वीस पंचवीस रोगी होते. ह्या रोग्यावर महाराजांनीं आपल्या औषाधिकल्पाचा प्रयोग चालू केला. ह्या वीस पंचवीस रोग्यांत माझे तीन चार अत्यंत जवळचे मित्रहि होते. दोन महिन्याच्या औषधि प्रयोगानंतर मला वरील तीनचार रोग्यांत फारच मोठा फरक दिसून आला. तीन चारहि रोग्यांत अर्धी अधिक लक्षणें कमी झालीं असून त्यांच्या जीवनांत त्यांना नवीन प्रकाश दिसू लागला होता. ह्या रोग्यांची अवस्था पाहून ह्या औषधिकल्पासंबंधीं अधिक माहिती मिळविण्याचे दृष्टीनें मी महाराजांची भेट घेतली. महाराजांनीं कल्पाची माहिती देण्याचें कबूल केलें, परंतु प्रत्येक रोग्याला हा कल्प विनामूल्य देण्यांत यावा अशी त्यांनीं अट घातली. अर्थात्‌च ही अट माझ्यासारख्या खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या माणसाला मानवणारी नसल्यानें मी हा कल्प स्वतः माझ्या रोग्यांवर वापरून पाहिला

नाहीं. महाराजांच्या रोग्यांवर होणारा परिणाम मात्र वेळोवेळीं पाहिला व ह्या निरीक्षणावरून हा कल्प लेप्रसीच्या एका निश्चित अवस्थेंत अत्यंत गुणकारी असें दिसून आल्यावरून हें सर्व निरीक्षण वैद्यवर्गा-समोर मांडण्याच्या दृष्टीनें हा लेख लिहिला आहे.

निर्गुंडी, निर्गुडी महाराष्ट्रांत प्रसिध्द

निर्गुंडी ह्या वनस्पतीची ओळख महाराष्ट्रां-तील वैद्यवर्गाला आहेच. 'वैद्यकशब्दसिंधु' ह्या नांवाच्या ग्रंथांत चार प्रकारच्या निर्गुंडीचें वर्णन आलें आहे. पण ही चार प्रकारची निर्गुंडी ओळख-णारा वैद्य मात्र मला अजून आढळला नाहीं. बंगाली वैद्य पारिजातकाच्या झाडालाहि निर्गुंडीचा एक भेद मानतात. परंतु हें मत वैद्यकशब्दसिंधूतील वर्णनावरून ग्राह्य असें वाटत नाहीं. माझ्या ह्या लेखांत मला फक्त महाराष्ट्रांत निर्गुंडी ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या वनस्पतीच्याच गुणधर्मांशीं कर्तव्य असल्यामुळें मी फक्त ह्याच निर्गुंडीचे वर्णन केलें आहे असें समजावें.

चक्रदत्ताचे ४ कल्प

ह्या निर्गुंडीचे निरनिराळे कल्प चक्रदत्त नांवाच्या चिकित्साग्रंथांत मला अनेक ठिकाणीं आढ-ळले. ह्या कल्पांचे अनुभव मात्र मी घेतलेले नाहींत. ह्या कल्पांची माहिती वैद्यवर्गाला करून देण्याच्या दृष्टीनें निरनिराळ्या रोगाधिकारांत जे कल्प आलेले आहेत त्यांची माहिती खालीं दिलेली आहे.

(१) समूलफलपत्राया निर्गुण्ड्याः स्वरसैर्घृतम् ।
सिद्धं पीत्वा क्षयक्षीणो निर्व्याधिर्भाति देववत् ।
— "चक्रदत्त यक्ष्माचिकित्सा"

(२) सिन्दुवारदलक्वाथः सोषणः कफजे ज्वरे ।
जङ्घयोश्च बले क्षीणे कर्णे वा पिहिते पिबेत् ॥
चक्रदत्त— ज्वराधिकार

(३ समूलपत्रां निर्गुण्डीं पीडयित्वा रसेन तु ।
तेन सिद्धं समं तैलं नाडीदुष्टव्रणापहम् ॥
हितं पामापचीनां तु पानाभ्यंजननावनैः ।
विविधेषु च स्फोटेषु तथा सर्वव्रणेषु च ॥
चक्रदत्त— गण्डमालाधिकार

(४) गण्डमालामयार्तानां नस्यकर्मणि योजयेत् ।
निर्गुंड्याश्च शिफां सम्यग्वारिणा परिपेषिताम् ।
चक्रदत्त— गण्डमालाधिकार

निर्गुंडीतेलाचा अनुभव

वरील कल्पापैकीं निर्गुंडीतेलाचा अनुभव उत्त हिंदुस्थानांतील एका प्रख्यात वैद्यानीं दिला आहे, तो अत्यन्त उद्बोधक व उपयोग करून पाहण्या-सारखा असल्यामुळें त्याचा तो अनुभव जसाच्या तसाच मी खालीं त्यांच्याच शब्दांत दिला आहे. "रसतंत्र-सार व सिद्धयोगसंग्रह" द्वितीयखण्ड व्रणविद्रधि-अर्बुद ह्या प्रकरणांत श्री. पंडित राधाकृष्णजी द्विवेदी लिहितात "इस तैलके बाह्य और आभ्यंतर प्रयोगसे नाडीव्रणका शोधन होता है। कुष्ठ, पामा, अपची, विविध प्रकारके स्फोट और सब प्रकारके व्रण दूर होते हैं। तथा वातविकारभी निवारण होता है। इस तैलका उपयोग पान मर्दन वर्ति बस्ति और नस्य आदि विविध रूपसे होता है। यह तैल गण्डमाला, कानका नासूर, कफप्रकोपज व्याधियों और विविध वात-रोगोंपर लाभ पहुँचाता है।

कानमें पूय होनेपर जल्दी योग्य सम्भाल न ली जाय तो रोग दृढ हो जाता है। फिर वर्षोंतक अच्छा नही होता। ऐसे पुराने कर्णरोगोंपर इस तैलका प्रयोग करनेसे १-२ मासमें दूर होते हैं।

वातरोगावर तेलाची मालिश

वातरोगपर इकी मालिश करायी जाती है। कम्प-वात, सांधोंकी पीडा, वातजशूल आदिमें इस तैलको निवाया कर मालिश करने तथा एक एक मात्रा दिनमें दो बार पिलाते रहनेसे थोडे ही दिनोंमें वात-विकार दूर हो जाता है। फुप्फुसशोथ, फुप्फुसावरण-शोथ, उदर्या कलाका शोथ, तीव्र आमवातसे संधिशोथ, सुजाकजनित वृषणशोथ, इन सब स्थानोंके शोथोंमें निर्गुंडीके क्वाथका पान और इस तैलको निवाया कर बाह्य उपयोगमें लेते रहनेसे सब प्रकारके शोथ दूर होते हैं।

अनुभवः– यह तैल वातके अनेक रोगोंको दूर ता है। वंध्या स्त्रीको गर्भधारण कराता है। तथा प्रकोपके कारण जिन इंद्रियोंकी शक्ति नष्ट हुयी उसका व्यापार पुनः संचालन करता है। यह दाक्षिण हाथमें रहनेयोग्य सफल योग है। तरह डॉक्टरीमें टिंचर आयोडिनसे विविध कार्य दन होते है, उस तरह इस तैलका उपयोग व्यापक रूपसें अनेक रोगोंपर होता है। यह तैल जंगम विष और वैकृत विषोंको शमन कर नवजीवनका संचार कराता है। यह सहस्रानु- सिद्ध और दिव्य प्रयोग है। ”

कष्टसाध्य रोगावर उपयुक्त

वरील वर्णनावरून निर्गुडीचा उपयोग राज- , गण्डमाला, नाडीव्रण, वगैरे कष्टसाध्य सम- जाणाऱ्या रोगावरही होतो हें निश्चित समजलें. म्हणूनच लेप्रसीवर देखील निर्गुडीकल्पाचा उपयोग शक्य आहे हें दिसल्यावरूनच मी ह्या शोधा- वळलों.

निर्गुडीचे हळदीसारखे कन्द

लेप्रसी ह्या रोगावर निर्गुडीच्या कोणत्या उपयोग होतो ह्याचा विचार करावयाचा हे. ज्या जंगलांत निर्गुडीच्या झाडाचीं वनें आहेत वनांत पावसाळ्यांत जुन्या झाडाच्या बुंध्याशीं झाडांचीं रोपटीं उगवतात. ह्या रोपट्यांच्या पावसाळा संपल्यानंतर कार्तिक–मार्गशीर्ष या महिन्यांत हळदीच्या कन्दासारखे कन्द निघतात. ह्याच कन्दांचा उपयोग लेप्रसीवर होतो.

लेप्रसीचा न्यूरॉल प्रकार

पाश्चात्य रोगविज्ञानांत लेप्रसी ह्या विकाराच्या अवस्थांचें वर्णन आहे. ह्या वर्णनांत लेप्रसीचा न्यूरॉल टाईप आहे, अर्थात् ज्या लेप्रसीच्या शरीरांतील फक्त वातवाहिन्यावरच परिणाम शरीराच्या निरनिराळ्या अवयवांत विकृति , त्याच एका विवाक्षित अवस्थेंत वरील निर्गुडीकल्पाचा उपयोग निश्चितपणें होतो. नॉड्यूलर टाइप अर्थात् चामडीवर गांठी येऊन चामडीच विकृत होणाऱ्या अवस्थेवर ह्या कंदाचा उपयोग होत नाहीं. म्हणूनच निर्गुडीकंदाचा उपयोग करतांना वरील न्यूरॉल टाईपच्या रोग्यावरच प्रयोग केल्यास निश्चित उपयोग दिसून येईल.

१ तोळ्याची मात्रा, नंतर गोमूत्र

निर्गुडीकल्पाची मात्रा काश्मिरी महाराजांच्या पद्धतीप्रमाणें एक तोळ्याची आहे. एक तोळा कन्द रोग्यास सकाळीं व संध्याकाळीं देतात. अर्थात् दिवसांतून दोन तोळे प्रमाण द्यावें लागतें. ही मात्रा दिल्यानंतर अर्धा तासानें ५ ते १० तोळे ताजें गोमूत्र पिण्याला देण्याचा महाराजांचा परिपाठ आहे. पथ्य म्हणून रोग्याचा आहार फक्त भिजविलेले चणे हाच ठेवावा लागतो. चण्याशिवाय कोणताहि पदार्थ रोग्यास खायला देऊं नये. ज्या पाण्यांत चणे भिजवितात तें पाणीहि रोग्यास पिण्यास द्यावें.

कल्प रोग्याला दिल्यानंतर पहिल्या दिवसापासूनच पातळ जुलाब होण्यास सुरुवात होते. ३ते४ दिवस हे जुलाब चालू राहतात. या जुलाबांचें वैशिष्ट्य हें आहे कीं, ह्या जुलाबानंतर रोग्याला विशेष अशक्तता वाटत नाहीं. जुलाब बंद करण्याचें कोणतेंहि औषध मध्यें देतां कामा नये. ३।४ दिवसानंतर जुलाब आपोआप बंद होतात. अर्थात् कुष्ठीरोग्याला हवी असलेली शरीरशुद्धि प्रथमच घडून येते. रोगमुक्ति पावेतों अर्थात् ३ ते ६ महिने पावेतों हा कल्प चालू ठेवावा लागतो. रोगमुक्तिपर्यंत कल्पाची मुदत अवस्थेनुसार वाढवावी लागते.

सल्फोन कल्पांचा अनिष्ट परिणाम

ह्या कल्पाचा उपयोग काश्मिरी महाराजांनीं माझे समक्ष अनेक रोग्यावर केलेला मी पाहिला आहे. अनेक रोग्यांना नवजीवन प्राप्त झालेलें मी प्रत्यक्ष पाहिल्यामुळें ह्या कल्पाचा वृत्तान्त मी येथें सविस्तर लिहिला आहे. लेप्रसी रोगावर नवीन निघालेल्या सल्फोन कल्पांचा उपयोग अत्यन्त अनिष्ट असा होतो असें दिसून आलें आहे. अशा वेळीं

निर्गुडीकल्पाचा उपयोग केल्यास कोणताहि विषारी परिणाम न होतां निश्चितपणें ह्या औषधाचा उपयोग झाल्याशिवाय राहात नाहीं.

शास्त्रीय ग्रंथांतील प्रयोग

काश्मिरी महाराजांचा हा प्रयोग आमच्या शास्त्रीय ग्रंथांत आलेला आहे. परन्तु त्याचा निश्चित उपयोग वैद्यवर्गाच्या अनुभवांत नसल्यामुळें ह्या कल्पाकडे कोणाचेंहि लक्ष गेलें नाहीं. भैज्यषरत्नावलीच्या रसायनाधिकारांत ह्या कल्पाचें वर्णन खालील प्रमाणें आलें आहे. वैद्यवर्गीनीं हें औषध वापरून आपले अनुभव प्रसिद्ध केल्यास आयुर्वेदांत एका निश्चित अशा रोगप्रत्यनिक कल्पाची भर पडल्याशिवाय राहणार नाहीं.

निर्गुडीकल्प

निर्गुण्डीमूलचूर्णमष्टपलं ग्रहित्वा षोडशपलं मधुमिश्रितं मर्दयित्वा घृतभाण्डे कृत्वा शरावेण आच्छाद्य निबिडलेपनं दत्वा मासमेकं धान्यमध्ये स्थापयेत् । तन्मासमेकं भक्षितं मात्रेण नरः कनकवर्णो गृध्रदृष्टिः सर्वरोगविवर्जितः वलिपलितहीन : । संवत्सरं खादितं चन्द्रार्कं यावज्जीवेत् बद्धशुक्रः स्त्रीशतं कामयितुक्षमो भवति । शाकाम्लं विहाय यथेच्छया भोज्यम् । तच्चूर्णं गोमूत्रेणसह यः पिबति हन्त्यष्टादशकुष्ठानि पामाविचर्चिकादीनि नाडीव्रणगुल्मशूलप्लीहोदराणि च । तच्चूर्णं तक्रेण यः पिबति सर्वरोगाविवर्जितो गृध्रदृष्टिर्वराहबलो भवति, वलिपलितवर्जितः दिव्यमूर्तिर्भवति । मासद्वयप्रयोगेण पंडितश्च न संशयः ।

हस्तलिखित ग्रंथ

विज्ञानविद्येवरील हस्तलिखित ग्रंथ कोणाजवळ आहेत काय ? प्रयोगासाठीं हवे आहेत, अशी एक वाचक पृच्छा करतात.

अस्सल काळा अभ्रक

श्वेत पुनर्नवा (खरा), व अस्सल काळा अभ्रक या वस्तु डॉ. वि. वि. गोरे, प्राध्यापक महाकोशल महाविद्यालय, जबलपूर यांना हव्या आहेत.

वाचकांचा पत्रव्यवहार

अणूचे दुष्परिणाम

आयुर्वेदविज्ञानशास्त्रज्ञांचें शिष्टमंडळ

नुकतेच टोकीयो (जपान) येथें आंतरराष्ट्रीय विज्ञानशास्त्रज्ञ जमले होते. हिरोशिमा व नागासकी येथे गेल्या १० वर्षांपूर्वी जे अणु–बॉम्बस्फोट केले गेले त्याचे व हायड्रोजन बॉम्बस्फोटामुळें कांहीं कोळ्यांवर काय काय दुष्परिणाम झाले आहेत, हें अवलोकन करण्यास जमले होते.

आतां अणु–युग सुरू झालें आहे. त्यांच्यामुळें ह्यापुढें अणूर्जाचा उपयोग पुष्कळशा गोष्टींत होणार आहेच, मग शांतता असो अगर युद्धकाळ असो. तेव्हां ह्या अणूचे परिणाम–दुष्परिणाम मनुष्यमात्रावर आयुर्वेद दृष्ट्या काय होतात हें नक्की व्हावयास पाहिजेच. नाहीं कां? त्याकरतां एखादें आयुर्वेद–विज्ञान शास्त्रज्ञांचें एक मंडळ पाठवून त्यांचें आयुर्वेदिक दृष्ट्या अवलोकन झाल्यास पुढच्या काळांत फार उपयुक्त होईल. म्हणून ही सूचना करावीशी वाटली, सहमत असल्यास ह्या बाबतींत आपण जरूर ती हालचाल कराल अशी आशा आहे. कळावें.

पारोळा
पूर्व खानदेश

आपला विश्वासू
के. के. भाटीया

बिद्वान् वैद्य आणि डॉक्टर यांनीं
प्रशंसिलेलीं दोन उपयुक्त पुस्तकें

१) दंतरोगविज्ञान आणि चिकित्सा
किंमत ३.

२) वैद्यसन्मित्र (हिंदी) भाग १ ला
किंमत २ रु.

मिळण्याचीं ठिकाणें:—

१ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक
२ पां. वि. जायदे, नारायण चौक, हुबळी

आयुर्वेदीय आरोग्यशाला, नासिक

— अनौपचारिक उद्घाटन —

नासिक येथें आयुर्वेद सेवा संघातर्फे शुध्द आयुर्वेद विद्यालयांतील विद्यार्थ्यांना निदान-चिकित्सेंचें उपरुग्ण शिक्षण मिळावें या उद्देशानें आयुर्वेदीय आरोग्यशाला सुरू करण्यांत आली आहे. या आरोग्यशालेचें उद्घाटन मंगळवार तारीख १० मे रोजीं निखिल भारतीय कस्तुरबा निधीच्या महाविदर्भांच्या प्रतिनिधि श्रीमती ताराबेन मश्रूवाला यांच्या प्रवेशानें अनौपचारिक रीत्या झालें. कस्तुरबा निधीचें वऱ्हाडांतील मुख्य केंद्र उमरावती जिल्ह्यांत माधान या खेडेगांवीं आहे. श्रीमती मश्रूवाला या सुप्रसिध्द गांधीसहकारी श्री. किशोरलालजी मश्रूवाला यांच्या पुतणी, व म. गांधींचे आफ्रिकेंतील पुत्र श्री. मणिलालजी यांच्या मेव्हणी आहेत. म. गांधीजींच्या सहवासांत त्यांचें कांहीं आयुष्य गेलें आहे व खुद्द त्यांच्या कुटुंबांत अनेक डॉक्टरमंडळी आहेत. असें असतांहि आयुर्वेदाच्या शास्त्रीय उपचारांचा श्रद्धापूर्वक पण डोळस बुद्धीनें अवलंब त्या करीत असतात.

मुहूर्त, उद्घाटक व रुग्ण

अपस्मार व अत्यार्तव या विकारांनीं पीडित अशा दोन निकटवर्तीय व्यक्तींना आयुर्वेदीय उपचार देण्याच्या उद्देशानें त्या सेवासंघाकडे आल्या व त्याच वेळीं आरोग्यशालेची जागा उपलब्ध झाल्यामुळें त्यांनीं आरोग्यशालेंतच राहणें पसंत केलें. त्यामुळें सेवासंघाला उद्घाटनासाठीं मुहूर्त, उद्घाटक व्यक्ति, अगर रुग्ण यांपैकीं कुणाचीच शोधाशोध करावी लागली नाहीं, हें आरोग्यशालेंचें भाग्यच समजलें पाहिजे.

कफज व अपस्मारावर वमन

आरोग्यशालेंतील उपचार हे शोधनपूर्वक करावयाचे. कारण शमन उपचार हे मूलगामी नसतात. या दृष्टीनें आलेल्या अपस्मारी रोग्यास (तो कफज अपस्मार आहे हें लक्षांत घेऊन) चालकांनीं वमन द्यावयाचें ठरविलें. व ता. १३ मे रोजीं पहिला वमन–प्रयोग केला. तो चांगला यशस्वी झाला. कफदोषाच्या उत्क्लेशासाठीं उसाचा रस सुमारें दीड शेर प्रथम पाजून नंतर उसाच्या रसांतच मदनकल्प (गेळफळांतील संस्कृत बियांचें औषधी भावना दिलेलें चूर्ण) कालवून तें पाजलें. या योगानें रोग्यास १५ वमनाचे वेग आले व रोग्यास त्यामुळें चांगलेंच हलकें वाटलें.

कुष्ठरोगावर वमन, नस्य व रक्तस्रुति

अमरावतीचे सुप्रसिद्ध कुष्ठरोग–कार्यकर्ते डॉ. शिवाजीराव पटवर्धन हे भुसावळ येथें म. प्रां. वैद्य–संमेलनासाठीं व नंतर नासिक येथें वसंत व्याख्यान–मालेसाठीं आले होते. कुष्ठरोगाच्या बाबतींत शुद्ध आयुर्वेदीय उपचार कोणते असा प्रश्न पूर्वीं सेवा संघास भेट दिली असतां व आतांहि त्यांनीं चालकांना केला होता. म्हणून गुरुवार दि. १९।५।५५ रोजीं सकाळीं आरोग्यशाळेंत त्यांना वमन व रक्त–स्रुति हे प्रयोग करून दाखविण्यांत आले. कफदोषाचा उत्क्लेश होत असूनहि ज्या व्यक्तींना वमन कधींच होत नाहीं अशा प्रकारच्या लोकांनाच कुष्ठरोगसंसर्ग होण्याची शक्यता राहते. सबब वमन (पक्षात् पक्षात् छर्दनान्यभ्युपेयात्), विरेचन, नस्य (शुद्धिर्मूर्ध्नि स्यात् त्रिरात्रात् त्रिरात्रात्) व रक्तस्रुति (षष्ठे षष्ठे मासि असृक्मोक्षणानि) हे आयुर्वेदाचे कुष्ठरोगा–वरील मूलगामी दोषोपचार आहेत व त्यांचा अवलंब कुष्ठरोगनिवारण व प्रतिबंध या दृष्टीनें करण्यांत यावा असें त्यांना सप्रयोग सांगण्यांत आलें.

डॉ. पटवर्धनांचा अभिप्राय

हे प्रयोग पाहिल्यानंतर आरोग्यशालेच्या वहींत डॉ. पटवर्धन यांनीं पुढीलप्रमाणें लिहून ठेवलें आहे.

तसा पाहिलाच प्रयत्न

“आज नाशिक येथें आयुर्वेद सेवा संघानें

चालविलेली आरोग्यशाला पाहण्याचा सुयोग आला ह्याबद्दल समाधान झालें. रोगप्रतिकार करण्याचें सामर्थ्य समाजांत निर्माण करण्याचा प्रयत्न करणें हे राष्ट्रविकासाच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे. तसा हा पहिलाच प्रयत्न आहे असें मला वाटतें.

या सेवासंघाचें हें कार्य यशस्वी होवो व याच्या शाखा सर्वत्र पहावयास मिळोत, अशी आशा आहे.

विनीत

अमरावती शि. ग. पटवर्धन

कफप्रकृति व्यक्तींना वमनोपचार

स्वतः ताराबेन मश्रूवाला या कफप्रकृति आहेत. त्यांनींहि एकवेळ रसपान करून व नन्तर १५ दिवसानीं दूध पिऊन असें २ वेळ वमनकर्म आचरिलें. शरीरांत लघुता उत्पन्न करण्याच्या दृष्टीनें या स्रोतस्–शुद्धीचा अनुभव त्यांनीं घेतला. यानन्तर गेल्या महिन्यांत आणखी सुमारें १५ वमन प्रयोग व १० रक्तस्रुतिकर्मैं करण्यांत आलीं. नेत्र–नासा–मुख–कंठ–उर या भागांत कफदोषानें उपसर्ग पोंचविल्यामुळें अनेक प्रकारचीं शस्त्रकर्में पूर्वी ज्यांच्यावर झालेलीं आहेत व तरीहि मुखव्रणादि उपद्रव चालूंच होते अशा व्यक्तींना पण वमनोपचार व रक्तस्रुतीचे प्रयोग करण्यांत आले व ते यशस्वी झाले. श्रीमती मश्रूवाला यांचा अभिप्राय पुढीलप्रमाणें आहे.

आयु. स्वास्थ्यविज्ञानाचें आकर्षण

“या आयुर्वेदीय आरोग्यशालेंत आम्ही जवळपास महिना सव्वा महिना राहिलो. संचालक श्री. वैद्यराज × × यांच्या बोलण्यांतून व लिखाणांतून आयुर्वेदासंबंधीं मला जी अल्पस्वल्प माहिती गेलीं कित्येक वर्षें मिळत होती, त्यामुळें आयुर्वेदचिकित्सेचें व विशेषतः त्यांतील स्वास्थ्यविज्ञानाचें मला बरेंच आकर्षण वाटत असे.

क्रांतिकारक दर्शन

आरोग्यशालेंतील महिनाभराच्या निवासांत मी या संबंधीं जें पाहिलें व ऐकलें तें तर मला क्रांतिकारकच वाटलें. व्यक्ति तितक्या प्रकृति ही म्हण स्वास्थ्याच्या बाबतींतहि तितकीच सत्य आहे जितकी ती स्वभावाच्या बाबतींत आहे; आजच्या यांत्रिक युगांत स्वास्थ्यविज्ञानाला यांत्रिक रूप दिलें गेलें आहे तें अस्वाभाविक व अशास्त्रीय वाटतें.

अभिनव व मौलिक पद्धत

या आरोग्यशालेंत मात्र प्रत्येक रोग्याच्या प्रकृतीचा विचार सूक्ष्मतेनें व व्यक्तिपरत्वें केला जातो. ही पद्धत आयुर्वेदीय असल्यामुळें पुरातन असली तरी आभिनव व मौलिक आहे असें मला वाटतें. आहारविहारासंबंधींहि जे विचार आरोग्यशालेंत ऐकावयास मिळाले ते मला मूलगामी व सयुक्तिक तर वाटेलच, पण स्वानुभवानेंहि त्याची सत्यता माझ्या प्रत्ययाला आली.

आयुर्वेदाचें सोपें वाङ्मय व्हावें

अशा स्वास्थ्यविज्ञानाचा समाजांत व विशेषतः उगवत्या पिढींत प्रसार व्हावा म्हणून सोपें वाङ्मय तयार होणें अत्यंत आवश्यक आहे. अर्थात् जनतेनें व सरकारनेंहि त्यास उचलून धरलें पाहिजे.

वमन, बास्ति, रक्तस्रुति

याशिवाय आयुर्वेदीय जगांतहि विस्मृत झालेल्या वमन, बास्ति, रक्तस्रुति वगैरे सारख्या शोधनपद्धतींचाहि या आरोग्यशाळेंत उपयोग केला जातो. त्याचे सुपरिणामाहि कांहीं रोग्यांच्या बाबतींत मला पहावयास सांपडले.

वैद्यकीय जगतांत क्रांति

या सर्वांमुळें ही आरोग्यशाला अशीच शास्त्रीय चिकाटीनें प्रगति करीत गेली तर वैद्यकीय जगतांत क्रांति घडवून आणून दिवसानुदिवस अस्वास्थ्यानें कंटाळलेल्या भारतीय समाजास अमूल्य स्वास्थ्यसुखाचा लाभ अवश्य करून देईल अशी आशा वाटते.”

१८–६–५५ — तारा मश्रूवाला

या आरोग्यशालेंत तूर्त १५ रुग्णांची आरोग्यव्यवस्था ठेवण्यांत येत आहे. त्यांपैकीं तीन शय्या प्रसूतीसाठीं आहेत.

अर्शावर बिब्बा

(लेखकः- वैद्य भा. म. जोशी,
डि. लो. बोर्ड दवाखाना, चांगदेव)

खेड्यांतून जे रोग प्रामुख्यानें दिसून येतात त्यांत 'अर्श' रोगाची प्रामुख्यानें गणना करण्यास हरकत नाहीं, असें गेल्या १३-१४ वर्षांच्या अनुभवानें आढळून आलें आहे. कारण अगदीं उघड आहे. आपलेकडील खेड्यांतून बहुसंख्य लोकांचा आहार रूक्ष, शीत दिसून येतो. त्यांत त्यांना आणखी उन्हांतून शेतांत काम करावें लागतें. जेवणखाण वगैरे त्यांच्याहि आहारविहारांत नियमितपणा नसतो, व त्याचा पचनव्यवस्थेवर वातप्रकोपक परिणाम होऊन शेवटची जी मलविसर्जनाची क्रिया होते ती मळाच्या गांठी बांधल्या गेल्यामुळें सहजासहजीं होत, नाहीं. कुंथावें लागतें, व वातादि ५ प्रकारच्या अर्शविकारास अनुकूल स्थिति प्राप्त होते.

खेड्यांतून बहुसंख्य जनता गरीबी स्थितींतील असल्यामुळें थोड्या वेळांत कमी खर्चांत पण गुणकारी चिकित्सा या विकाराची शोधून काढण्याकडे माझें लक्ष लागलें. त्यांत मला यश येऊन पांच प्रकारच्या मूळव्याधीवर पुढील औषध गुणकारी आढळलें आहे. त्यांतून एक उदाहरण पुढें देत आहे.:—

रुग्ण वयः— ३८ वर्षें, धंदाः— शिक्षकाचा

लक्षणें:— कोरडे तांबूस काळसर वेडेवांकडे अणकुचीदार मोड, ठणका, कमरेंत पीडा, श्वास, कुंथून थोडें थोडें शौचाला होणें, त्वचेवर व नखांवर किंचित् काळसरपणा (वातज अर्श) अशा तऱ्हेची रोग्याची स्थिति होती.

वातज अर्शावरील उपचार

सुरवातीस २॥ तोळे एरंडेल सुंठीच्या काढ्यांतून देऊन खालीलप्रमाणें वातनाशक व आमपाचक औषधीयोजना करण्यांत आली.

वरधारा, बिब्बा व सुंठ हीं तीन औषधें समान घेऊन त्यांचे दुप्पट गूळ घालून २ गुंज प्रमाणाच्या गोळ्या केल्या व सकाळ सायंकाळ ४-४ गोळ्या ताकाबरोबर घेण्यास सांगितल्या. व रात्रीं झोपतांना त्रिफळाचूर्ण तीन मासे कोमट पाण्याबरोबर दिलें. त्यामुळें मूळ कारण जें मलावरोध तें नाहींसें झालें.

पथ्य— रोग्यास केवळ ताक भात, लोणी व ज्वारीची भाकरी एवढेंच खाण्यास परवानगी दिली.

रोग्यानें नियमित औषध घेतल्यानें व कडक पथ्य पाळल्यानें तीन आठवड्यांतच पूर्णपणें फायदा झाला.

ताकाच्या पथ्यानें लाभ

ताकाच्या पथ्याचा मला विशेष अनुभव आलेला आहे व त्याला शास्त्रवचनहि तसेंच अनुकूल आहे.

न तक्रसेवी व्यथते कदाचित् ।
न तक्रदग्धाः प्रभवंति रोगाः ॥
यथा सुराणाममृतं हिताय ।
तथा नराणां भुवि तक्रमाहुः ॥

वर सांगितलेला औषधी पाठ हा वातज, कफज, त्रिदोषज व रक्तज अशा पांच प्रकारच्या मूळव्याधीवर वापरून गुणकारी असल्याचें आढळून आलेलें आहे.

सहज मूळव्याधीचा रोगी न आढळल्यामुळें उपयोग करतां आला नाहीं. तरी कोणास तसा रोगी आढळल्यास उपयोग करून पहावा. फायदा होईल असें पूर्वाचार्यांनीं म्हटलेलें आहे.

वृद्धदारुकभल्लातशुंठीचूर्णेन योजितः ।
मोदकः सगुडो हन्यात् षड्विधार्शकृतां रुजम् ॥

विशेष सूचनाः— औषधांत भिलावा असल्यामुळें उष्णोदक (विशेषतः चहाचे बाबतींत), स्नान, पान बंद ठेवावें. शेक घेऊं नये.

पवित्र
नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोळा.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोळा.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोळा.
लिहाः—नेपाळ हिमाळय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

गोव्यासाठीं वैद्यांचें पथक

"महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संघटनेतर्फे वैद्यांचें एक पथक आजारी लोकांना आयुर्वेदीय पद्धतीनें उपचार करण्यासाठीं व सेवा शुश्रुषा करण्यासाठीं बेळगांव येथें पाठविण्यांत येईल तर बरें. गोवें येथें सत्याग्रह करण्यासाठीं गेलेल्यांना या पथकानें उपचार करावेत. तीन वैद्य व एक शिपाई असें हें पथक असावें. महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संघटनेचें तें एक भूषणावह कर्तव्य ठरेल. खर्च प्रांतीय निधींतून करावा. यामुळें आयुर्वेदीय उपचारांची योग्यता जनतेच्या व सरकारच्या निदर्शनास येईल. ही एक संधि आहे. कर्तव्य पार पाडण्यास वाव आहे. तरी विचार व्हावा.

वरीलप्रमाणेंच एक सूचना मी होमिओपॅथिक असोसिएशन मुंबईकडे पाठविली आहे. होमिओपद्धतींत Arnica mont, Ledum व Echinacea हीं औषधें अशाप्रसंगीं अतिशय गुणकारी आहेत अ अनुभव मी घेतला आहे. हें जखमावर व शस्त्र घा फार श्रेष्ठ आहे." —ना. य. देशमुख, तळे (कु

वैद्यक वर्गाची भूमिका

" आधुनिक कल्याणकारी राज्याच्या उभार डॉक्टर हा केवळ आपल्या विषयांतील तज्ञच नव्हे तर राष्ट्रीय कल्याणाशीं निगडित असलेल्या विवि बाबींवरील सल्लागार असणें आवश्यक आहे. याम त्यानें माणसाच्या जीवनांतील व सामाजिक परिस्थि मुळें निर्माण झालेल्या अनेक अडचणींचा सहानुभू पूर्वक विचार करावयास शिकलें पाहिजे." अ उद्गार मध्यवर्ति आरोग्यखात्याच्या उपमंत्री श्रीम एन्. चंद्रशेखर यांनीं २० जून रोजीं जामनगर येथे श्री. मेघजी पेठराज शहा मेडिकल कॉलेजच्या उद्घाट प्रसंगीं केलेल्या भाषणांत काढले.

४० वर्षांवरील **अनुभव** आणि सर्व देशभर
पसरलेल्या नऊ वैद्यकीय प्रयोग शाळांतील वैद्यक
शास्त्रीय पंडितांचें कार्य हा जम्मींच्या
कीर्तीचा पाया होय.

* जम्मींचा आंकडेवारी-दर्शक रिपोर्ट मागवा



जम्मींचें लिव्हरक्युअर
दरवर्षी हजारों मुलांचें यकृताच्या
विकृतिपासून संरक्षण करून
त्यांना पुनः आरोग्य
प्राप्ति करून देतें.

आतां सोयीस्कर
आकाराच्या बाट्या
मिळतात

जम्मी वेंकटरमणय्या अँन्ड सन्स

"जम्मी बिल्डिंग", मयलापूर, मद्रास ४ मुंबई शाखाः 'पारेख मॅन्शन', सॅन्डहर्स्ट रोड (पश्चिम)

मधुमेहाचा झपाट्यानें प्रसार ....

.... भारतांत मधुमेह रोगाचा प्रसार फार वेगानें त आहे. याचें कारण शरीरास कफकालीं नको असतांहि केवळ गोड लागतो म्हणून चहा आदि र्करायुक्त पेय व अन्न द्रव्यांचा वाढता वापर हें आहे. मुंबई येथें नुकतीच मधुमेही लोकांनीं एक संस्था पन केली आहे. तिचें नांव ' डायबेटिक असोसिएशन ऑफ इंडिया ' असें आहे.

मधुमेहाचीं कारणें

मधुमेह रोगाचीं कारणें— आस्यासुखं स्वप्नसुख धीनि। ग्राम्यं तथानूपरसाः पयांसि । नवान्नपानं डवैकृतं च प्रमेहहेतुः कफकृत् च सर्वं । ही जाहीर आहेत. फारवेळ आरामशीर बसून राहणें, आरामशीर र घेणें, दही नेहमीं खाणें, मांसाचा–दुधाचा जास्त रं, नवा तांदूळ,नवा गहूं, ओला वाटाणा अशीं नी धान्यें खाणें, गूळसाखर खाणें, सरबतें पिणें हीं सर्व मेहाचीं–मधुमेहाचीं कारणें आहेत. खाण्यापिण्याच्या ार्थापेक्षांहि, हातापायांच्या व्यायामाचा अभाव, धिक झोंप, जेवणानंतर झोंप हीं कारणें विशेष लक्ष न्यासारखीं आहेत.

मधुमेहविरोधी आयुर्वेदीय आचार

या कारणांमुळें मनुष्याचा अग्नि मंद होतो. न्याशय (पॅंक्रिआस) क्षीण होतो. व तो पुनः स्वस्थ ण्यासाठीं आयुर्वेदीय आचार–विचार व आहार अधिक टिकाऊ गुण देणारे आहेत. ' गोशकृन्मूत्र-क्ति' व्हावें असाहि एक उपाय आयुर्वेदानें दिला आहे. खणणें, खूप खूप चालणें, छत्री, पादत्राण न रणें, साधें श्रमी जीवन घालवणें या गोष्टी महत्वाच्या आहेत. औषधें शोधण्यापेक्षां याकडे जनतेची प्रवृत्ति णें ही गोष्ट जर शक्य झाली तरच मधुमेहाचा र थांबेल. इन्शुलीनच्या सूचिभरणांनें तात्पुरतें ोग्य लाभेल व नित्याचा खर्च पाठीमागें लागेल. मंतांना तो परवडेल. गरीबांनीं व मध्यमवर्गीयांनीं मात्र आयुर्वेदीय मार्गाकडे अधिक लक्ष पुरवावें व मधुमेहापासून आपणास व आपल्या परिचयांतील व्यक्तींना वेळींच वाचवावें. यासंबंधींचा एक ताजा स्वानुभव याच अंकांत दिला आहे तिकडे वरील असोसिएशनच्या सभासदांनीं लक्ष पुरवावें.

संयुक्त खानदेश वैद्य मंडळ

महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसम्मेसनाचें दशम अधिवेशन भुसावळ, या ठिकाणीं संयुक्त खानदेश वैद्यमंडळाची सर्वसाधारण सभा दि. १८।५।५५ दुपारीं १ वाजतां झाली असतांना खालील ठराव संमत करण्यांत आले.

पदाधिकारी

१] खालील पदाधिकारी नियुक्त करण्यांत येत आहेत.

अध्यक्षः– वै. भगवंत त्र्यंबक वैद्य, धुळें प. खा.
उपाध्यक्षः– वै. श्रीधर रावजी करंजीकर रनाळे, प. खा.
,, वै. सौ. गिरजाबाई झोपे, न्हावी पू. खा.
मंत्रीः– वै. चूडामणी खंडेराव चौधरी, फैजपूर ,,
उपमंत्रीः– वै. द. अ. फुलंब्रीकर, सारंगखेडे प. खा.
कोषाध्यक्षः– वै. मो. ल. ठोंबरे, चिनावळ पू. खा.
आयव्यय निरीक्षकः– वै. ब्रह्मदत्त शर्मा भुसावळ ,,

२] घटनेंत फेरफार

संयुक्त खान्देश वैद्यमंडळाचे घटनेमध्यें फेर–बदल करणेंकरितां खालील समिति नियुक्त करण्यांत येत आहे.

वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर, वै. ना. न. भगरेशास्त्री, वै. ज. रा. नाईक, वै. भगवंत त्र्यंबक वैद्य, वै. चूडामणी खंडेराव चौधरी.

वार्षिक वर्गणी १ रु.

३] सं. खा. वैद्यमंडळाची वार्षिक वर्गणी दोन रुपये आहे. ती इ. स. १९५६ सालापासून एक रुपया करण्यांत यावी.

प्रत्येक प्रांतांत अध्यापक परिषदा

त्रिवेंद्रम् येथें भरलेल्या नि. भा. आयुर्वेद महासंमेलनांत देशांतील प्रत्येक प्रांतानें अध्यापक चर्चा परिषद भरविण्याचा प्रस्ताव मंजूर झाला. या परिषदांनीं आपले निर्णय प्रसिद्ध करावेत व अखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठानें ते मागवून त्यांचे संकलन करावें. बहुमतानें संज्ञानिश्चिति करावी व ती देशभर प्रचलित करावी. असा त्या प्रस्तावाचा आशय आहे. हा प्रस्ताव आचार्य वेणीमाधवशा यांनीं मांडला.

पुढील अध्यापक परिषदेनें आयुर्वेदांतील सं अर्थ निश्चित करण्याकडे अधिक लक्ष्य पुरवावें वनस्पति गुणधर्म आयुर्वेदीय पद्धतीनें, दोषधातु रस वीर्य विपाक प्रभाव पद्धतीनें शिकवावेत. त्यां प्रात्याक्षिक देण्यात यावें. अध्यापक परिषदेचा अध्य स्वतंत्र आसावा इत्यादि सूचना आल्या आहेत.

यूनि-डाइज (टॅब्लेट्स)

यूनि-डाइज औषधि वड्या ह्या आंत्रिक आणि यकृतविकृतिजन्य आमांश व अतिसार यावर रामबाण गुणकारी आहेत. ह्यांत 'ब' जीवनसत्व मिश्र केलें असल्यानें आंत्रिक तंदुरुस्ती राखण्यास ह्यानें अतिशय मदत होते.

यूनि-डाइज टॅब्लेटमधील घटकद्रव्यें

क्लोरोक्विन सल्फेट— ७'१ मि. ग्रॅ. डाय्-आयोडोहायड्रोक्झिक्विनोलिन २०० मि. ग्रॅ.
आयोडोक्लोरोहायड्रोक्झिक्विनोलिन— ७'१ मि. ग्रॅ. जीवनसत्व 'ब'--१, १ मि. ग्रॅ.,
जीवनसत्व 'ब' २, १ मि. ग्रॅ., निआसिन १२'५ मि. ग्रॅ.
मात्रा-- दररोज ४ ते ६ वड्या. मुदत २० दिवस.

यूनि-क्विन (टॅब्लेट्स)

प्रत्येक वडींत २५० मि. ग्रॅ. क्लोरोक्विन डायफॉस्फेट असतें.

क्लोरोक्विन उत्कृष्ट मलेरिया प्रतिबंधक असून त्याचें अवसादक परिणाम होत नाहींत.

सन्निविष्ट यकृत-विकृतीमध्यें यूनि-डाइज औषधि चिकित्सा चालू असतां त्याच्या जोडीस यूनि--क्विन औषधाची चिकित्सा यकृतविकृतिजन्य आमांश, अतिसार यावर अधिक गुणावह ठरते.

यूनि-एमिटिन

घटक द्रव्यें:– एमिटिन हायड्रोक्लोर (Emetine Hcl) १/२ अगर १ ग्रेन. जीवनसत्व 'ब'१ २० मि.ग्रॅ. स्ट्रिकनिन हायड्रोक्लोर (Strychnine Hcl) १ सी. सी.मध्यें १/१००ग्रेन.

ह्या औषधांत 'ब'१ जीवन-सत्व मिश्र केलें असल्यामुळें एमिटिनमुळें हृदय व नाडींवर होणाऱ्या अवसादक परिणामास बराच प्रतिबंध होतो. ह्यांत कुचला-सत्व अल्प मात्रेंत मिश्र केलें असल्यामुळें ह्यापासून उत्साह व तरतरी वाटते.

वरील घटनेमुळें यूनि-एमिटिनची त्वचांतर्गत सूचिकाभरण चिकित्सा ही तीव्र आमांश, अतिसारावर व यकृत्दाहावर बिनधोक झाली आहे.

मात्राः-- प्रौढास दररोज १ ग्रेन यूनि-एमिटीन. मुदत ६ ते १२ दिवस.

युनिकेम लॅबोरेटरीज

२२ भुलाभाई देसाई-रोड, मुंबई २६

मधुमेहासंबंधीं माझा अनुभव

[लेखकः– श्री. पी. एस्. भालेराव एम्. ए., बी. टी.,
माजी प्रिंसिपाल, ट्रेनिंग कॉलेज, नासिक, नांदगांव]

३१ ऑक्टोबर १९५४ रोजीं दुपारीं तीन वाजतां नांदगांव येथें मी नदीचा चढ चढून स्टेशनकडे चाललो होतो. इतक्यांत हाताला मुंग्या आल्या व छातींत कळ निघून घाम सुटला. असें कां झालें ? तें मला कळेना. त्यापूर्वीं १० वर्षांत मी कधींच आजारी पडलो नव्हतो. ५ मिनिटांनीं स्टेशनवर पोहोंचल्यावर हें सर्व नाहींसें झालें व मी तो प्रसंग विसरून गेलो. ता. ११ नोव्हेंबर रोजीं संध्याकाळीं ७॥ वाजतां पिंपळगांव येथें आग्रारोडनें गांवांतून कोर्टाकडे जात असतां पुनः तोच प्रकार झाला. पण थोड्या वेळांत लगेच नाहींसा झाला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी मोटारनें नासिक येथें आलो. स्टँडवरून घरीं जातांना तसाच प्रकार झाला व घरीं पोहोंचल्यावर बरेंचसें पाणी प्यालो. संध्याकाळीं डॉक्टर ××× यांना प्रकृति दाखविली. त्यांनीं प्रकृति तपासून लघवी फार होते कीं काय असा प्रश्न विचारला. तेव्हां, गेले सहा महिने दिवसांतून १५।२० वेळां लघवीस जावे लागते असें मी सांगितलें. त्यांनीं तपासण्याकरितां लघवी पाठवून द्या असें सांगितलें. मी लघवी पाठवून दिली व लगेच दुसरे दिवशीं नांदगांव येथें गेलो.

एक आठवड्यानें परत आल्यावर पुनः डॉक्टर ××× यांना भेटलो. त्यांनीं लघवींतून साखर जात असल्यामुळें इन्शुलिनचीं इंजेक्शनें ताबडतोब घेतलीं पाहिजेत असें सांगितलें. २।३ दिवसांनीं इंजेक्शनें सुरू केलीं. दररोज सकाळची व दुपारची व वाजेची लघवी तपासून इंजेक्शनें देण्यांत येऊं लागलीं. खाण्यापिण्यावर पुष्कळ बंधनें घातलीं व डॉक्टरचे सल्ल्यानुसार विश्रांति घेऊं लागलो.

महिनाभर इंजेक्शनें घेतलीं परंतु साखर जाण्याचें थांबेना. अशक्तपणाहि वाढतच होता. नुसता रविवार कारंजाचा चढ चढतांना अगर घराचा जिना चढतांना सुद्धां थकवा येऊन छातींत कळा निघूं लागत. म्हणून डॉक्टर ××× यांची चिठ्ठी घेऊन मुंबईस गेलो. तेथें सायन जनरल हॉस्पिटलमध्यें "इन डोअर पेशंट" म्हणून दाखल झालो. प्रारंभींच्या तपासणींत हॉस्पिटलमध्यें दोन महिने रहावे लागेल असें सांगण्यांत आलें. दुसरे दिवशीं लघवी, विष्ठा, रक्त, व अेक्सरेनें छाती तपासण्यांत आली. त्याच प्रमाणें इतर शारीरिक तपासणीहि झाली. तपासणींत साखरचें प्रमाण २ टक्के आल्याचें आढळून आलें.

जेवणावरील बंधनें उठलीं

तिसरे दिवसापासून दररोज दुपारीं व संध्याकाळीं जेवणाचे अगोदर इन्शुलिनचीं इंजेक्शनें सुरू करण्यांत आलीं. जेवणावरचीं सर्व बंधनें उठलीं. दररोज लघवी व दर सोमवारीं गुरुवारीं रक्त तपासण्यांत येऊं लागलें. इन्शुलिनचें प्रमाण वीस युनिट वरून ५० युनिट पर्यंत वाढविण्यांत आलें. त्यामुळें रक्तांतील व लघवींतील साखरचें प्रमाण २१ व्या दिवशीं "नार्मलवर" आलें. २४ व्या दिवशीं हॉस्पिटलमधून माझी सुटका झाली.

फिरण्यावर निर्बंध आले

इंजेक्शन कसें घ्यावें ? व इन्शुलिनचें प्रमाण काय असावें ? हें मला हॉस्पिटलमध्यें शिकविलें होतें. व त्याप्रमाणें कांहीं इंजेक्शनें मीं स्वतः घेतलीं होतीं. हॉस्पिटलमध्यें फारसें इकडे तिकडे फिरूं देत नसत. वेळ जाण्याकरितां दिवसां मीं सारखें वाचन करीत असे. रात्रीं वार्डमधील रोग्यांना गोष्टी सांगून त्यांची करमणूक करीत असे. हॉस्पिटलमधून बाहेर पडतांना माझी प्रकृति थोडी सुधारली होती. पण सारखे ढेंकर येण्याचें मात्र बंद झालें नव्हतें. आहार, वजन व झोंप यांची बरीच वाढ झालेली होती.

घरीं आल्यावर एक महिनाभर स्वतःच इंजेक्शन घेत असे. पण इंजेक्शन घेणें फार खर्चाचें व त्रासदायक वाटूं लागल्यानें कांहीं दुसरा उपाय सांपडतो कीं काय ? याचा शोध करूं लागलो. माझे एक मित्र व विद्यार्थी श्री. माणिकराव सोमवंशी रा. मोहाडी, ता. दिंडोरी यांचा सल्ला घेतला. (श्री. माणिकराव सोमवंशी यांना मधुमेह झाला आहे.) त्यांच्या सूचनेवरून २२ जानेवारी १९५५ रोजीं मीं आयुर्वेद सेवा संघांत गेलो. तेथें अनायासें तेथील चिकित्सक वैद्यमंडळींची भेट झाली. त्यांना मी माझी सर्व हकीगत सांगितली.

निदानाशिवाय चिकित्सा नाहीं

त्यांनीं संध्याकाळीं दवाखान्यांत यावयास सांगितलें. कारण प्रकृति तपासून रोगाचें निश्चित मूळ ठरविल्याशिवाय उपाययोजना करतां येणार नाहीं, असें त्यांचें मत पडलें. संध्याकाळीं दवाखाखान्यांत गेल्याव वैद्य जळूकर, वैद्य करमरकर यांनीं प्रकृतीची कसून तपासणी केली व लहानपणापासूनची सर्व हकीकत विचारून चिकित्सा केली.

चिकित्सेंत दोन गोष्टी आढळून आल्या. एक लहानपणीं मला असलेली गोड खाण्याची अतिशय आवड व दुसरी नुकताच झालेला मानसिक त्रास. रोगनिदान निश्चित झाल्यावर लगेच उपाययोजना सुरूं झाली. सर्व प्रकारचे गोड पदार्थ, डाळींचे पदार्थ, भात, बटाटे, दूध व दूधाचे पदार्थ, तेल, फळें वगैरे पदार्थ वर्ज केले. फक्त पालेभाज्या, ताक व गाईच्या ताजे शेणांत संस्कारित केलेल्या जुन्या गव्हाच्या पोळ्या व बाजरीच्या भाकरी खाऊं लागलो.

क्रमानें इन्शुलिन बंद केलें

हंगामांत केळीं, आवळे व जांभळें खूप खाल्लीं. संध्याकाळीं ५।६ वाजतां भूक लागे. त्यावेळीं कुरमुरे खात असे. तेल, मीठ, मिरची कमी केल्यानें प्रारंभीं अन्न बेचव लागत असें. पण पुढें हळूंहळूं संवय झाली. चहा मात्र बंद होईना. म्हणून आरंभीं मधांतील साखर घालून व पुढें सॅकरीनच्या गोळ्या घालून घेऊं लागलो. उपाययोजना चालूं असतांना वैद्यांचे सल्ल्यानें इन्शुलिनचें प्रमाण कमी करीत आणलें व एक महिन्यानंतर तें कायमचें बंद केलें.

मी घेत असलेलीं औषधें

पथ्याबरोबरच पुढील औषधें घेत होतो. आदल्यादिवशीं संध्याकाळीं भिजत घातलेलें १ तो. असनाचें १ पावशेर पाणी दुसऱ्या दिवशीं पिणें, शिलाजित्वादिवटी या गोळया सकाळ, दुपार व संध्याकाळ प्रत्येक वेळीं २।२ याप्रमाणें घेणें.

मधून मधून लघवी तपाशीत होतो. इन्शुलिन बंद केल्यामुळें साखरेचें प्रमाण वाढतें कीं काय ! अशी सारखी भीति वाटत होती. पण प्रमाण फारसें वाढलें नाहीं. दररोज थोडी थोडी शक्ति वाढू लागली, म्हणून संध्याकाळीं फिरावयास जाऊं लागलो. वैद्यांनीं विश्रांति घेण्यास बन्दी घातली होती. फिरणें हळूं हळुं वाढवीत ४।५ मैलपर्यंत नेलें. झोंप कमी कमी करीत नेली; कारण झोंपेवरहि वैद्यांनीं निर्बंध घातला होता. वजनहि हळू हळू कमी होत चाललें. थोडा थोडा नेहमींचा उद्योग सुरूं केला.

मार्चमध्यें एस्. एस्. सी.चे पेपर तपासण्याचें काम आलें. त्यामुळे फिरणें बंद होऊन बैठक वाढली. त्याबरोबर लघवीचें व तिच्यातील साखरेचें प्रमाण वाढलें. शेवटीं शेवटीं तें पूर्वपदावरच आलें. प पुनः फिरणें सुरूं करतांच तें हळू हळू कमी होत गेलें.

—: वैद्यांस प्रॅक्टिसमध्यें उपयुक्त ग्रंथ :—
" ॲलोपॅथिक चिकित्सासंग्रह "
यांत सुमारें ७० रोगांची पाश्चात्य चिकित्सा थोडक्यांत दिली असून त्यांत ३४० प्रिस्क्रिप्शनें व इंजेक्शनेंहि दिलीं आहेत. ॲलोपॅथिक ज्ञानांत वाढ होण्यासाठीं अत्यंत आवश्यक ग्रंथ. आजच मागवा. किं. ४॥ रु. ट. खर्च निराळा.
प्राप्तिस्थळें:— १ वैद्यक ग्रंथ भांडार - नाशिक
२ डॉ. मोकाशी जे. बी - ठाणे

तीन महिन्यांत पूर्ण गुण

सुमारें तीन महिन्यांनीं हाताला मुंग्या येणें, घाम येणें, थकवा येणें हें प्रकार पूर्णपणें थांबले. अंगांत चांगला उत्साह आल्यासारखें वाटूं लागलें. एक दिवस तर नासिकरोडला ५।६ मैल सायकलनें जाऊन परत आलो. या गोष्टी व्यवस्थित झाल्या तरी ढेकरांचें प्रमाण मात्र कमी होईना. मध्यंतरीं दोन वेळां ओकारीचें व रेचकांचें औषध घेतलें, परंतु फारसा उपयोग झाला नाहीं. प्लीहोदरादिवटी, पाचकवटी या गोळ्या घेतल्या. डॉक्टरांचें सांगण्यावरून सोडामिंटच्या गोळ्याहि बरेंच दिवस घेतल्या. संपूर्ण लंघन करून पाहिलें. पण अद्यापहि मधून मधून ढेकर येतातच. अगदीं कडकडीत भूक लागली असली तरी ढेकर येतातच. मग त्याचा इतर काहीं त्रास होत नसल्यानें मी अलीकडे त्याकडे दुर्लक्ष केलें आहे.

श्रम केल्यानें लघवी कमी होते

बाहेरगांवीं गेलो असतां खाण्यापिण्याचे निर्बंध पाळणें कठीण जातें. जें मिळेल तें खावें लागतें. पण त्याबरोबर कामानिमित्त मला खूप फिरावें लागतें. म्हणून त्यामुळें प्रकृतीवर फारसा प्रातिकूल परिणाम होत नाहीं, असें मला आढळून आल आहे. जितकी धडपड, जितके कष्ट अधिक, तितकें लघवीचें प्रमाण कमी, हा सिद्धांत मला तंतोतंत पटला आहे. भरपूर शारीरिक श्रम, साधा आहार, नियमितपणा, कडक मनोस्वास्थ व वैद्यांचें सल्ल्यानुसार तंतोतंत औषधोपचार या उपायांनीं या रोगावर सहज विजय मिळवितां येईल असें वाटतें.

डॉक्टरांनीं मला घाबरून सोडलें

डॉक्टर लोकांनीं आरंभीं मला खूपच घाबरून सोडलें होतें. त्यामुळें मी बराच पैसा खर्च केला. थोडाफार गुण येत असला तरी दररोज इन्शुलीनचीं इन्जक्शनें घेणें फार त्रासाचें, अडचणांचें व खर्चाचें होतें. शिवाय थोडीशी जरी चूक झाली तरी सेप्टिक होण्याची धास्ती असते. कित्येक वेळीं कामाचे अगर प्रवासाचे अडचणींमुळें इन्जेक्शन घेण्यांत खंड पडतो. त्याचा दुष्परिणाम लगेच भोगावा लागतो. म्हणून शेवटीं इन्जक्शनें घेणें ही कधींहि न सुटणारी अक संवय होऊन बसते, बहुतेकांचा अनुभव हाच आहे.

खर्च व त्रास फारच थोडा

आयुर्वेदिक उपायांत खर्च व त्रास फारच कमी आहे. फक्त कडक पथ्य पाळणें आरंभीं जड जाते, पण हळूहळू सवयीनें त सुलभ होतें. माझी व आयुर्वेद सेवा संघांतील चिकित्सक वैद्य मंडळींची जर नोव्हेंबर १९५४ मध्येंच गांठ पडली असती तर मी यापेक्षां लवकरच बरा झालो असतों. व सर्व खर्चहि बराचसा वाचला असता अशी माझी मनोदेवता मला सांगत आहे.

[प्रिन्सिपाल मालेराव यांचा स्वानुभव वर दिला आहे. कमी शारीरिक श्रमाचें जीवन, गोड खाण्याची आवड [उसाचा रस] व मानासिक आघात यामुळें त्यांना हा विकार झाला. त्यांना पुढील पथ्यें सांगण्यांत आलीं. रोज ६।७ तासापेक्षां अधिक झोप न घेणें, सकाळीं दहा वाजेपर्यंत आहार अगर पेय न घेणें, आहारांत दूध, डाळी, रसाळ फळें, हे पदार्थ वर्ज करणें. शेगदाण्यांचें तेल न वापरणें, जुनें धान्य वापरणें नवीन धान्य ओलें धान्य (दाणे) न वापरणें.

गोमय–संस्कृत धान्य

आयुर्वेदांत जनावरांना धान्य खाऊं घालून त्याच्या शेणांत सांपडणाऱ्या धान्याचे दाणे जमा करून त्याची भाकरी खाण्याचा प्रयोग या रोगावर सांगितला आहे.सध्यां जनावरांना असें धान्य खाऊं घालणें परवडणारें नाहीं. म्हणून गाईबैलांच्या ताज्या शेणांत रात्रीं ज्वारी बाजरी हें भिजत घालून सकाळीं तें काढून उन्हांत वाळवावयाचे, व तें वाळलेलें धान्य भाकरी करतां वापरावयाचें. श्री. मालेराव यांनीं हा प्रयोग श्रद्धापूर्वक केला व त्यांना त्याचें फल लौकरच लाभलें.

आयुर्वेद सेवा संघांत उत्तम गाय आहे तेथें असें गोमयसंस्कृत धान्य मिळण्याची व्यवस्था केली आहे.

— चिकित्सक व व्यवस्थापक]

व्रतबंधानिमित्त देणगी

कसेब सुकेणें येथील लोकलबोर्ड दवाखान्यांतील अधिकारी वैद्य ग. सो. जोशी यांनीं आपल्या मुलाचे व्रतबंधानिमित्त नाशिक येथील शुद्ध आयुर्वेद विद्यालयास अल्प सेवा म्हणून ११ रुपये पाठविले आहेत. त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

चालू वर्षी अनेक वैद्यांचे घरीं मंगलकार्यें झालीं आहेत. त्यांनींहि वरील उदाहरणाचें अनुकरण करून शुद्ध आयुर्वेद विद्यालय, म. प्रां. वैद्य मंडळ या सारख्या संघटित संस्थांना मदत पाठवून उपकृत करावें.

---

३ वर्षांत बरीच प्रगति

' म. प्रां. वैद्य संमेलनाच्या भुसावळ येथील अधिवेशनास उपस्थित राहून परत जातेवेळीं नाशिक येथें उतरल्यामुळें आयुर्वेद सेवा संघाचें कार्यालय पाहण्याचा योग आला. सुमारें ३ वर्षांपूर्वी प्रथमच संघाच्या कारखान्याचें कार्य पाहिलें होतें. त्यापेक्षां आतां कारखान्यांची बरीच प्रगति झालेली दिसत आहे.

सेवा संघ आजच्या रुग्णांच्या परिस्थितीचा विचार करून त्यांना गुणकारी व घेण्यास सुलभ होतील अशा निरनिराळ्या औषधी कल्पांची निर्मिति करून एका दृष्टीनें रोगी जनतेची जी सेवा करीत आहे त्याबद्दल सर्वथा धन्यवादार्ह आहे.

बेळगांव १९।५।५५ —म. भा. वाझे

या संस्थेचा हेतु

" आयुर्वेद सेवा संघ या संस्थेचें सर्व कार्य जवळून पाहणेचा आज सुयोग आला. संस्थेचे बरेच जुने सदस्य नगर येथें पूर्वी कार्य करीत असल्यानें अगोदरपासून परिचयाचे आहेत. संस्थेचा हेतु, सद्यःस्थितींत एकंदर व्यावहारिक जगाचे मार्ग पाहतां केवळ सेवा वृत्तीचा आहे, हें या संस्थेचें विशेष वैशिष्ट्य आहे. अशा वृत्तीची आजच्या नव्या भारतांत खरी आवश्यकता आहे. आयुर्वेदाचें संशोधन म्हणून केंद्र–संस्था व्हावी हा हेतु अत्यंत स्तुत्य आहे. संस्थेची संपूर्ण भरभराट होवो ही सदिच्छा."

नासिक ९।५।५५ (सही) बा. न. देशमुख

एक्ट्रा, असि. अँड आडि. डि. जज

श्री

आयुर्वेद छात्रों को वृत्तियां

श्री. वैद्यनाथ आयुर्वेद भवन लि. के मालकों के जन्मस्थान में स्थापित आयुर्वेद विद्यालय के १० छात्रों को १० प्रतिमास की छात्रवृत्ति मिलेगी।

छात्र संस्कृत की मध्यमा या संस्कृत की विशारद पास हो व सच्चरित हों। जैपुर राज्यवासी गौड ब्राह्मणों को प्राथमिकता दी जावेगी। विद्यालय में निवास और शिक्षा निःशुल्क है। विद्यालय ३० वर्ष से स्थापित है। निम्न पतेपर प्रार्थना पत्र लिखें –

पं. शिवनारायणजी जोशी विद्यालय

मु. पो. कांसली (व्हाया कोटपुतली) जि. जयपुर

आयुर्वेदिक शल्यचिकित्सेला विजयश्री प्राप्त करून देणारा
धर्मार्थ दंतयज्ञ, इंदूर

मध्यभारत सरकारद्वारा इंदूर येथें ता. ४।५।५५ सतत एक आठवडाभर आयुर्वेदिक धर्मार्थ दंतयज्ञ समारंभ साजरा करण्यांत आला. त्याकरितां 'अखिल भारतवर्षीय आयुर्वेदिक डेंटल मिशन, मुंबई' या संस्थेस १००० रुपयापर्यंत खर्च करण्याची म. भा. सरकारकडून अनुमति मिळाली होती. इंदूर येथें हा दंतयज्ञ समारंभ 'महाराजा तुकोजीराव हॉस्पिटल' मध्यें साजरा करण्यांत आला. सदर हॉस्पिटलमधील दंतचिकित्सा विभागाजवळील एका निंब–वृक्षाच्या छायेखालील विस्तीर्ण मैदान या कामीं उपयोगांत आणण्यांत आलें.

उद्घाटन समारंभ

दंतयज्ञाचा उद्घाटन समारंभ मध्यभारत सरकारचे व्यापार–मंत्री माननीय श्री. सीतारामजी जाजू यांच्या हस्तें ता. ४।५।५५ रोजीं सकाळीं करण्यांत आला. उद्घाटन समारंभास इंदूर शहर वैद्यसभेचे अध्यक्ष वैद्यराज पं. ख्यालिरामजी द्विवेदी, प्रांतीय वैद्यसभेचे अध्यक्ष वै. पं. रामनारायणजी शास्त्री, मंत्री कविराज सीतारामजी अजमेरा आदि प्रथितयश वैद्यवर्ग, तसेंच श्रीमान् शेठ राजकुमारसिंहजी व शहरांतील इतर मान्यवर सज्जन आणि उपरिनिर्दिष्ट हॉस्पिटलचे सुपरिंटेंडंट आपल्या कार्यकारी मंडळीसह उपस्थित होते.

इंदूर ही जन्मभूमि, मुंबई ही कर्मभूमि

प्रारंभीं वैद्यराज पं. रामनारायणजींनीं दंतयज्ञाचे आद्य प्रवर्तक मुंबईचे वैद्यराज किशोरदास भी. गुप्ता (डॉ. गुप्ताजी) यांचा परिचय करून देतेवेळीं, इंदूर ही त्यांची जन्मभूमि व मुंबई ही त्यांची कर्मभूमि आहे असें सांगून, जन्मभूमीच्या राज्य–शासकांनीं वैद्यराज गुप्ताजींना दंतयज्ञाची ही जी सुवर्णसंधि उपलब्ध करून दिली त्याबद्दल प्रशंसोद्गार काढले.

श्री. डॉ. गुप्ताजींनीं अ. भा. आ. डेंटल मिशन या संस्थेच्या स्थापनेचें उद्देश व दंतयज्ञाच्या महत्त्वाचें प्रतिपादन करतांना आपल्या भाषणांत खालील गोष्टी सुस्पष्ट केल्याः—

संवेदनानाशक कोणतेंहि सूचिकाभरण न देतां भारतीय शास्त्रपद्धतीनें शूल व संवेदना–रहित दंतोत्पाटन हें एक भारतीय वैद्यशास्त्रांतील वैशिष्ट्य आहे. पाश्चात्य विज्ञान–संशोधकांनाहि ही कला अद्याप अज्ञात आहे. परंतु केवळ एवढ्यावरच न थांबतां प्रत्यक्ष विज्ञानाधिष्ठित प्रयोगांवर ही कला अधिक प्रगत करण्याचे आमचे प्रयत्न सध्यांहि चालूच आहेत.

केवळ हातानीं दंतोत्पाटन

माननीय व्यापार-मंत्री श्री. जाजूजींनीं आपल्या प्रसंगोचित भाषणांत डॉक्टर आणि वैद्य यांना स्वार्थ–निरपेक्ष जनसेवा करण्याचा आदेश देऊन डॉ. गुप्ता यांना त्यांच्या दंतचिकित्सा–संशोधन कार्यांत यश येवो अशी आपली मनीषा प्रगट केली. शेवटीं वैद्यराज पं. ख्यालिरामजींनीं म. भा. सरकारचे मुख्य मंत्री माननीय श्री. गंगावालजी व इतर संस्था आणि व्यक्ती कीं ज्यांच्या सहकार्यानीं सदर दंतयज्ञ समारंभ घडून आला त्या सर्वांचे हार्दिक आभार मानले. आभार प्रदर्शनानंतर डॉ. गुप्तानीं दोघा दंतरुग्णांचे दोनदोन दांत वेदनारहित रीतीनें केवळ हातानीं उपटून दाखवून जमलेल्या शेंकडों लोकांना आश्चर्यचकित करून टाकिलें. अशा रीतीनें हा दंतयज्ञ–उद्घाटनाचा समारंभ यशस्वी रीत्या पार पडला.

सदर समारंभ ता. ४।५।५५ ते ११।५।५५ पर्यंत चालू होता. दररोज सकाळ संध्याकाळ मिळून सुमारें पांच तास काम चालत असे. डॉ. गुप्तांनीं गेल्या वीस वर्षांत असे अनेक दंतयज्ञ-समारंभ साजरे

केले, परंतु स्वातंत्र्योत्तर कालांत व सरकारद्वारां नियोजित असा हा पहिलाच समारंभ झाला. सुमारें १००० स्त्री-पुरुषांनीं ह्या दंतयज्ञाचा फायदा घेतला, व सप्ताहांत २५०० च्या वर दंतोत्पाटनें करण्यांत आलीं.

सहकार्याचें आश्वासन

दंतयज्ञाच्या समाप्तीचा कार्यक्रम नगर-वैद्य-सभाअध्यक्ष वैद्यराज पं. ख्यालिरामजी यांच्या अध्यक्षतेखालीं ता. ११।५।५५ रोजीं सायंकाळीं पार पडला. कार्यक्रमास उपस्थित असलेल्या श्रीमान् व सज्जन लोकांनीं, "सरकारनें एखादी चिरस्थायी दंत-चिकित्सा व संशोधन योजना हातीं घेतल्यास आपण तीस सहकार्य देऊं, अशी आपली मनीषा व्यक्त केली. अन्य वक्त्यांमध्यें श्रीमान् सरदार रामचंद्र मुकुंद किबे यांचें नांव उल्लेखनीय आहे. त्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें कीं, "मी गेल्या तीन दिवसांत दांत व दाढा मिळून एकंदर ८ दांत उपटून घेतले आहेत, पैकीं ३ दांत आजच सकाळीं उपटले आहेत. परंतु त्यापासून मला कोणत्याहि प्रकारें वेदना न होतां आज मी तुमच्यापुढें स्पष्टपणें वक्तव्य करूं शकत आहे." शेवटीं डेंटल मिशनच्या सर्व प्रोत्साहन-दात्यांचे आभार मानल्यावर हा समाप्ति-कार्यक्रम समाप्त झाला.

शिक्षणाचें प्रबल साधन

डॉ. गुप्ताजींनीं आपल्या बहुसंख्य शिष्यांना दंताविज्ञानाचें शिक्षण दंतयज्ञाचे सहाय्यानेंच दिलें आहे. कारण ह्यायोगें थोड्या कालांत अनेकविध दंतरुग्णांची चिकित्सा अभ्यासकांना प्रत्यक्षपणें पाहावयास मिळतें आणि म्हणून दंतयज्ञ हें शिक्षा-प्रदानाचें श्रेष्ठ साधन समजण्यांत येतें. सौराष्ट्र, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक या भागांत डॉ. गुप्तांचे अनेक शिष्य आयुर्वेदिक दंतचिकित्सा यशस्वीपणें करीत आहेत. व त्यांनीं जनतेचें व सरकारचें लक्ष ह्या कलेकडे वेधलें आहे. मुंबई-राज्य सरकारनें तर ह्या चिकित्सेचें कलात्मक शिक्षण डेंटिस्ट्री कॉलेजांतून देण्याचें ठरविलें आहे. परन्तु शास्त्रीय शिक्षण मात्र 'कीटाणुवाद' विरुद्ध 'त्रिदोषवाद' ह्या बाबतीं मूलगामी सिद्धांत सिद्ध झाल्याशिवाय देणें उचि होणार नाहीं असें ठरविलें आहे.

मध्यभारत शासन आयोजित उपर्युक्त दंतयज्ञ प्रचाराचे दृष्टीनें महत्वपूर्ण असाच झाला. मुंबई, पु वगैरे ठिकाणच्या आयुर्वेदिक व ॲलोपॅथिक डेंटि कॉलेजांतील विद्यार्थी, रजिस्टर्ड डेंटिस्टस्, वैद्य व अनेक जिज्ञासू व्यक्तींनीं ह्या दंतयज्ञांत प्रयोगि शिक्षणार्थ भाग घेतला होता.

सौ. इंदुमति नेने
मंत्री अ. भा. आ. डें. मिशन, मुंबई

वाचकांचा पत्रव्यवहार—

टि. म. वि. ची संस्कृतची चौथी परीक्षा

शुद्धायुर्वेद कोर्सचा बोलबाला चहूंकडे झाल्या-पासून बरचसे लोक ठिकठिकाणीं टि. म. विद्यापीठाचा संस्कृतचा अभ्यासक्रम शिकूं लागले आहेत. टि. म. विद्यापीठाची संस्कृत चतुर्थ परीक्षा वर्षांतून एकदा ऑगस्ट महिन्यांत होत असते व शुद्धायुर्वेद विद्या-लयांत वर्षांतून एक वेळ जूनमध्यें प्रवेश दिला जातो. म्हणजे ऑगस्टमध्यें (चतुर्थ परीक्षा) पास झालेला विद्यार्थी ८।१० महिने स्वस्थ बसून काढणार आहे.

चौथी परीक्षा दोन वेळ घ्यावी

टि. म. विद्यापीठाच्या इतर परीक्षा जशा वर्षांतून दोन वेळां घेतल्या जातात, तशीच चतुर्थ परीक्षा पण वर्षांतून दोन वेळां घेतली जावी, म्हणजे येत्या ऑगस्टला तिसऱ्या परीक्षेस बसणारा विद्यार्थी फेब्रुवारीमध्यें चतुर्थ परीक्षेस बसून जून ५६ ला शुद्धायुर्वेद विद्यालयांत प्रवेश करील. फेब्रुवारींत चतुर्थ परीक्षा न घेतल्यास या विद्यार्थ्यांचें एक वर्ष फुकट जाते. याचा विचार करून टि. म. विद्यापीठानें इतर परीक्षेप्रमाणें चतुर्थ परीक्षाहि वर्षांतून दोन वेळा घ्यावी, ही विनंति.

आपला
कोडोली (कोल्हापूर) व. म. जोशी

वेखंडाचा बुद्धिवर्धक प्रयोग ....

(लेखकः — वैद्यरत्न अ. वा. ऐनापुरे, मान्य गुरु, मुंबई ४)

आमच्या विद्यार्थ्यांस वेखंडाचे गुणधर्म शिकवित असतांना शालिग्राम–निघण्टुमध्यें असा आधार सांपडला कीं, एक महिनापर्यंत रोज थोडी थोडी वेखंडाची पूड तूप अगर दुधाबरोबर घेतली असतां किंवा एक 'पल' प्रमाणांत चंद्रग्रहण अगर सूर्य–ग्रहणाचे वेळीं दुधाबरोबर घेतली असतां तत्काल बुद्धिवर्धक होऊन ऐकलेलें लक्षांत राहतें.

सूर्यग्रहणाचे वेळीं प्रयोग

हा प्रयोग गेल्या सूर्यग्रहणाचे वेळीं मी स्वतः, माझे विद्यार्थी व माझे घरांतील मुलांनीं करून पाहिला. त्यामध्यें जे दुधांत उगाळून प्याले त्यांना वमन–विरेचन कांहीं झालें नाहीं. एक दिवस किंचित् पित्त वाढल्यासारखें झालें. परंतु त्यांचा स्वर स्वच्छ व खणखणीत झाल्याचें माझे निदर्शनास आलें आहे. बुद्धीच्या बाबतींत अनुभव येण्यास थोडा अवधि लागेल.

पित्तप्रकृतीच्या मुलींना उलट्या

मी स्वतः, व माझे घरांतील दोन मुलींनीं वेखंडाची पूडच दुधांत मिसळून घेतली होती. मुलींनीं २ चमचे घट्ट मिश्रण प्रत्येकीनें घेतलें होतें. त्यापैकीं पित्तप्रकृतीच्या मुलीला २-३ उलट्या झाल्या, यापेक्षां जास्त त्रास झाला नाहीं. कफप्रकृतीच्या मुलीला थोडेसें गरगरल्यासारखें वाटलें. यापेक्षां कांहीं त्रास झाला नाहीं.

१ तोळा चूर्ण दुधांत घेतलें

मी स्वतः एक तोळा चूर्ण दुधांतून घेतलें होतें. चूर्ण घेतल्यानंतर २ तासांनीं मला वांत्या होण्यास सुरुवात झाली. त्या सकाळीं १० वाजल्यापासून सायंकाळीं ६॥ वाजेपर्यंत सुमारें १८ वेळां वांती झाली होती. त्यानंतर थोडा सूतशेखर व सुवर्ण–माक्षिक, साखर व मधांतून चाटल्यानंतर ओकारी येण्याचें थांबलें. रात्रीं अर्धा पावशेर दूध हळूं हळूं घेऊन पचविलें. झोंपतेवेळीं लाह्याचा मंड १ पेला घेण्यापलीकडे कांहीं घेण्याची इच्छा राहिली नव्हती.

माझा स्वर स्वच्छ झाला

दुसरे दिवशीं अशक्तपणाखेरीज कांहीं वाटलें नाहीं. माझा स्वर स्वच्छ झाला आहे असें वाटलें. ढेंकर येणें, वात सरणें, ठसका लागणें हे कमी झाले आहे. शरीर हलकें हलकें वाटत आहे. माझ्या विद्यार्थ्याला आपली निरीक्षणशक्ति वाढत आहे असें वाटलें. दुसऱ्या विद्यार्थ्याला २५ वांत्या झाल्या, पण पुढें कांहीं त्रास झाला नाहीं.

कार्तिक मासीं चंद्रग्रहण

आतां कार्तिक मासीं चंद्रग्रहणाचे वेळीं पंचकर्म-शुद्धीकरून नंतर प्रयोग करावयाचें ठरविलें आहे. त्यावेळीं बल, काल, अग्नि, देश, वय व सात्म्य यांचा विचार करून प्रत्येकाची मात्रा ठरविण्यांत येणार आहे.

या प्रयोगास योग्य ती प्रसिद्धि द्यावी, कारण सीलोनमध्यें या प्रयोगानें हाःहाःकार उडाल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें आहे.

वैद्य शंकर गणेश नानल

कै. आयुर्वेदाचार्य पु. ग. नानल यांचे धाकटे बंधु वै. शं. ग. नानल [पुणें] हे दि. ७।६।५५ रोजी पहाटे ५॥ वाजतां स्वर्गवासी झाले. गेलीं १० वर्षे ते मधुमेह विकारानें आजारी होते. त्यांना संगीताची विशेष आवड होती. भगवत् गीतेचा एक अध्याय म्हटल्याशिवाय ते झोपत नसत. प्रसन्न चर्या, गोड वाणी, मधुर हास्य इ. मुळें ते सर्वांस हवेसे वाटत. मृत्युसमयीं त्यांचें वय ५४ वर्षांचें होतें.

त्याचे वडील चिरंजीव आयुर्वेद महाविद्यालयांतून आयुर्वेदविशारद झाले आहेत, व त्यांचा वैद्यकीय व्यवसाय पुढें चालवित आहेत.

मुंबई राज्य वैद्य संमेलन

पार्लमेंटरी बोर्डाची स्थापना

आयुर्वेद व युनानी वैद्यक बोर्ड मुंबई याची नवीन पांच वर्षांकरितां झालेली निवडणूक बिनविरोध झाली व मुंबई राज्य वैद्य संघटनेचे अधिकृत उमेदवार त्यांत यशस्वी झाले हें वाचून समाधान वाटणार यांत शंकाच नाहीं.

चालूं बोर्डाचें काम

व्यवसायाच्या दृष्टीनें तयार करूं घातलेल्या वैद्यांकरितां फॅकल्टी व शुद्धायुर्वेद समिति ह्या अस्तित्वांत आहेतच. पण जे वैद्य हकीम आज व्यवसाय करीत आहेत त्यांचें सुखदुःख पाहाणें हें काम चालूं बोर्डाचें आहे. तें काम हे निवडून आलेले सदस्य व सरकारनें निवडून दिलेले सदस्य यांनीं एकोप्यानें करावयाचें आहे.

एकसूत्रीपणा रहावा यासाठीं

तथापि संघटनेच्या उमेदवारांत या कार्या एकसूत्रीपणा राहावा याकरितां मुंबई राज्य संघटनेनें एक पार्लमेंटरी बोर्ड अस्तित्वांत आणिलें आहे. ह्या बोर्डानें निवडून आलेल्या सदस्यांना वेळोवेळीं सल्ला द्यावयाचा आहे. अनेक वैद्य--हकीमांना आपल्या रास्त तक्रारी बोर्डापर्यंत पोंचवावयाच्या असतात व न्याय मिळवून घ्यावयाचा असतो. ह्या तक्रारी पद्धतशीर मांडल्या जाव्यात ह्याकरितां सरळ मार्ग म्हणजे त्या पार्लमेंटरी बोर्डाकडे पाठविणें हा आहे. हे बोर्ड त्या तक्रारी वैद्यक बोर्डाच्या सभासदांमार्फत योग्य त्या ठिकाणीं पाठवून त्याबाबत दाद लावून घेत जाईल.

पार्लमेंटरी बोर्डाचा पत्रव्यवहाराचा पत्ता—

वैद्य – वि. म. गोगटे, चिटणीस
पार्लमेंटरी बोर्ड
C/o आयुर्वेद सेवा संघ, नासिक

अपुरें संरक्षण

धूळ, जंतू व श्वसनाच्या इतर विकारांपासून संरक्षण मिळविण्यासाठीं कास्फो औषधि गोळ्या वापरणें इष्ट आहे. खोकला, पडसें, घशाची खवखव, ब्रॉन्कायटिस इ. विकारांमध्यें कास्फो उपयुक्त आहे. आजच एक बाटली खरेदी करा. सर्वत्र मिळूं शकतो.

कास्फो
खोकल्यावरील अचूक उपाय

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड,
अहमदनगर.

SUGGEST APK. 54-3 MAR

हिरड्यांतून रक्त येणें, दांत दुखणें इ. विकारांवर

बिल्व–दंतमंजन

दंतमंजनासंबंधीं माझा अनुभव पत्रिकेच्या वाचकांना अनुभवासाठीं निवेदन करीत आहे. या दंतमंजनाची कृति खालीलप्रमाणें आहेः—

चांगलें पिकलेलें बिल्वफळ (बेलफळ) घेऊन तें पूर्णपणें सुकूं द्यावें. सुकल्यानंतर फोडून वरील कवच काढून टाकून आंतील सुकलेल्या मगजाची चांगली वस्त्रगाळ पूड करावी. नंतर खालीं दिलेल्या द्रव्यांचें मिश्रण तयार करावें.

खडूची भुकटी १६ तोळे, बिल्वफळाची पूड ४ तोळे, असानतारा (पेपरमिंट क्रिस्टलस्) १ तोळा,* [illegible] साखर (सॅकरीन) अत्यल्प प्रमाणांत (मधुरता येण्यापुरती).

वरील सर्व द्रव्यें चांगलीं एकत्र मिसळावींत म्हणजे दंतमंजन तयार झालें.

बिल्व दंतमंजनाचे उपयोग

दररोज सकाळ, संध्याकाळ ह्या दंतमंजनानें दांत घासावेत व त्याच्या पाण्यानें गुळण्या कराव्यात. असें केल्यानें हिरड्यांतून येणारें रक्त व पू ह्यांचें प्रमाण दोनच दिवसांत पुष्कळसें कमी होतें. कोणत्याहि कारणानें दांत दुखत असल्यास त्याचाहि उपशम होतो. तसेंच हिरड्यांवरील व्रण व मुखपाक यांसहि फायदा होतो. दांत मजबूत होतात.

गार पाण्यानें दांतास ठणका

कित्येक लोकांच्या दांतांना गार अगर ऊन पाण्याचा स्पर्शहि सहन करवत नाहीं. अशा लोकांनीं ह्या दंतमंजनाचा नित्योपयोग केल्यास त्यांच्या हिरड्या दुरुस्त होऊन त्यांना थंड अगर उष्ण पदार्थांपासून वेदना होणार नाहींत. ह्यानें मुखदुर्गंधीहि नाहींशी होते. थोडक्यांत ह्या दंतमंजनाच्या नित्योपयोगानें दांतांचें दुखणें, ठणकणें, किडणें, हिरड्यांचें सुजणें, झडणें, त्यांतून रक्त व पू येणें व त्यावर व्रण होणें तसेंच मुखपाक ह्या सर्व विकारांना थोड्याच दिवसांत खात्रीनें गुण येतो.

वैद्यांनीं मुख व घसा यांत आंतून लावण्याजोगा याचा आलेप बनवितां आल्यास प्रयत्न करून पहावा. असा प्रयत्न यशस्वी होईल असें मला वाटतें.

कल्पना कशी सुचली ?

बिल्व हें अतिसार व आमांश यावरील उत्तम औषध आहे. ओकाऱ्या, आमाशयव्रण व आंत्रव्रण हे विकार त्यामुळें चांगल्या रीतीनें दूर होतात. यामुळें हें औषध मुख व दंत या स्थानांतील विकारहि सहज दूर करील असें मला वाटलें व माझा हा अंदाज खरा ठरला. बिल्व हें उत्तम जन्तुनाशक व वेदनाहारक आहे.

वरील दंतमंजनासंबंधीं कोणास कांहीं शंका अगर पृच्छा असल्यास त्यांनीं त्या खालील पत्त्यावर जरूर विचाराव्यात. त्यांचें यावच्छक्य समाधानकारक उत्तर देण्याचा मी प्रयत्न करीन.

मु. पो.–रबकवी (विजापूर) वैद्य एस्. जी. जोशी

---

* असानतारा तिखट आहे. तो जरूरी पाहून योग्य त्या कमी प्रमाणांत वापरावा. —संपादक

उद्योग

विद्यार्थी–पेन्शनर व बेकारांना फावल्या वेळांतील, सर्वत्र चालणारा फायदेशीर मातीच्या चित्रांचा उद्योग, माहिती फुकट.

लिहा:–एम्. देशपांडे
C/o सोमण लॉज, पुणें ४

शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम :

लेखक—
वैद्य वि. म. गोगटे, ना

शुद्ध आयुर्वेदाची " गंगा "

बऱ्याच वर्षांच्या भगीरथ प्रयत्नानंतर शुद्धायुर्वेदाची "गंगा" मुंबई राज्यांत अवतरली. अनेकांना हायसें वाटलें, कृतकृत्य झाल्याप्रमाणें त्यांना वाटलें, त्यांचा जीव भांड्यांत पडला तर अनेकांना पोटदुखी निर्माण झाली व त्यांनीं भगीरथाला जे कांहीं आहेर करावयाचे होते ते मुक्त कंठानें केल्याचें समजलें. झाली ही गोष्ट बरी कीं वाईट हें काल ठरवील.

लोकशाही सरकारचें कर्तव्य

कोणत्याहि चांगल्या गोष्टीला वाव देण्याचें काम लोकशाही सरकारचें आहे, त्यांनी तें केलें त्याबद्दल धन्यवाद. पण हें काम ज्यांनीं पुढें चालविण्याची जबाबदारी पत्करली त्यांचें अभिनंदनच करावयास पाहिजे. कारण गेल्या वर्षांचा अनुभव घेतां हा अभ्यासक्रम चालवितांना 'दत्त' म्हणून अनेक समस्या पुढें उभ्या राहिल्या व त्यांच्याशीं अनेक परीनें मुकाबला करावयाचा प्रसंग अनेकांना आला. कांहींजण त्यांत धारातीर्थीं पडले.

सध्यांची परिस्थिति

तथापि 'बुध्याची वाण धरिलें करीं हें सतीचें' या निष्ठेनें कांहीं कार्यकर्त्यांनीं ही धुरा अंगावर घेतली व कार्य नेटानें पुढें चालू ठेवलें आहे. आशानिराशेचे हेलकावे क्षणाक्षणाला बसत आहेत. पूर्वीची परंपरा साफ तुटली, मध्यंतरीच्या कालांतील निर्माण झालेली परंपरा यांना निरुपयोगी ठरणार, अशावेळीं नव्या दृष्टिकोनांतून नवी परंपरा निर्माण करावयाची, जवळ पैसा नाहीं, इतर शास्त्रावर कोटी कोटी रुपये खर्च होतात अशा अवस्थेंत एकादां "लक्ष" इकडे फेंकण्याकडे लक्ष दिसत नाहीं, पुरेसा अध्यापक वर्ग नाहीं, पुरेशीं पुस्तकें तयार नाहींत, व पूर्वीं मिळत होतीं तींहि दुर्मिळ झालीं, पुरेशीं काय पण एकहि पुस्तक अद्याप तयार नाहीं, वेळहि ३॥ वर्षां म्हणजेच अपुरा पडणार, समाजांतूनहि जसा सहानु भूतीचा ओलावा पाहिजे तसा मिळत नाहीं, शिष्य वृत्त्या नाहींत, कांहीं नाहीं. कांहीं जर असेल तर कांहीं लोकांची तळमळ व खटपट. हेंच आमचें भांडवल. हेंच आमचें आयुर्वेदसृष्टीचें बीज. य आतां वृक्षविस्तार व्हावयाचा आहे.

दोन तत्त्वांचा झगडा

चित्र भेसूर असलें तरी वस्तुस्थिति आहे त अशी आहे. कार्यकर्त्यांची खरी कसोटी यांतच लाग असते. स्वांजलीनें पाणी प्यावयाचें ठरविल्यानं असे प्रसंग व अशा आपत्ति यावयाच्याच. तथ दोन तत्त्वांचा हा झगडा सुरूं झालेला आहे आ आज जर यांत कोणी हरला, विशेषतः केवल आयुर्वे हरला तर त्याला पुन्हां डोकें वर काढावयास कि वर्षांचा कालखंड लागेल हें सांगतां येत नाहीं.

ग्रंथ निर्मितीची आवश्यकता

आणि म्हणून शुद्धायुर्वेदवाद्यांनीं 'परंप्रकल व तेहि सर्वांगीण दृष्ट्या करावयास पाहिजे अभ्यासक्रम पूर्ण केलेला विद्यार्थी, शास्त्र तर निश्चि शिकेल पण व्यवहारतःहि तो समर्थ ठरेल असा प्रय करावयास पाहिजे. या दृष्टीनें शुद्ध आयुर्वेद-समिती नजिकच्या कालांत कोणती गोष्ट प्रथम हातीं घ्याव पाहिजे आहे ती शुद्ध आयुर्वेद-अभ्यासक्रमास उपयो पडणाऱ्या ग्रंथनिर्मितीची होय.

अभ्यासक्रमांत बदल हवा

गेल्या वर्षांचा ठिकठिकाणचा अनुभव घेत अभ्यासक्रमांत बदल करावयास पाहिजे व या दृष्टी सर्व ठिकाणच्या अडचणीहि विचारांत घ्याव पाहिजेत. वर्गपद्धतीनें दिलें जाणारें शिक्षण व गुरु दिलेलें शिक्षण यांमधील पडणारें अंतर कमींत क

हेंहि पाहिलें पाहिजे. आजच सर्वांच्यावर जाणाऱ्या अटींचा भडिमार न करतां, पण च्या सोयींत फार अंतर पडणार नाहीं साधीत साधीत व अंदाज घेत पुढें पाऊलें पाहिजेत.

आतांपासूनच धोरण ठरवा

निक सरकारी सोयीसाधनांतून शुद्ध आयुर्वेद यांच्या उपयोगी अशा जागा, दवाखाने गोष्टींचा फायदा विद्यालयांना मिळावयास विशेषतः चार भाषांतून व दोन प्रणालींतून होणाऱ्या समितीच्या परीक्षांबाबतचें धोरण हें सूनच तयार ठेवावयास पाहिजे आहे.

पं. डेग्वेकरजींचें भाषण

निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठाच्या येथें भरलेल्या ४० व्या अधिवेशन प्रसंगीं -संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेलें वैद्यराज डेग्वेकरजी (जबलपूर) यांचें भाषण आयुर्वेद पत्रिके- आलें आहे. संस्कृत व इंग्रजी भाषेत जवळजवळ यांत आलें आहे. त्यामुळें वैद्य-डॉक्टर मंडळींना यास सोईचें झालें आहे. पृष्ठ संख्या ६० आहे. जा असलेलें हें भाषण म्हणजे त्रिदोषावरील महत्वाचा निबंध आहे. भाषणाची ४ प्रकरणें आहेत. आयुर्वेदाचीं मूलाधार सूत्रें, हीं पांच भौतिक द्रव्यें आहेत, त्रिदोषाचें प्रत्यक्षत्व, व शुक्रांत अन्नपरिणमन हे यांतील महत्वाचे भाग आहेत. या भाषणांत धातुविचार व मलविचार दिलेला नाहीं.

ज्यांना ज्यांना संस्कृत व इंग्रजी चांगलें समजत असेल व एका जबाबदार सुशिक्षित वैद्यानें मांडलेली त्रिदोषविचारसरणी समजून घ्यावयाची असेल त्यांनीं पत्र पाठवून या भाषणाची एक प्रत शास्त्रीबुवांच्या कडून मागवून घ्यावी.

पत्ताः– वैद्यराज भि. वि. डेग्वेकरशास्त्री
गोल बाजार, जबलपूर [मध्यप्रदेश]

अनुक्रमणिका

मुंबई राज्य वैद्य संमेलनाचा अपूर्व विजय	१
आयुर्वेदांतील उदक–विचार	३
कफज ज्वर—	९
'लेप्रसी' रोगावर निर्गुंडीमूलकल्प	११
आयुर्वेदीय आरोग्यशाला, नासिक	१५
अर्शावर बिब्बा	१७
मधुमेहाचा झपाट्यानें प्रसार	१९
मधुमेहासंबंधीं माझा अनुभव	२१
धर्मार्थ दंतयज्ञ, इंदूर	२५
वेखंडाचा बुद्धिवर्धक प्रयोग	२७
मुंबई राज्य वैद्य संमेलन–पार्लमेंटरी बोर्ड	२८
बिल्व–दंतमंजन	२९
शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम	३०

शुद्ध आयुर्वेदीय पद्धतीचे औषधोपचार मिळण्याचें एक नवीन स्थान

आयुर्वेदीय आरोग्यशाला, नासिक

(चांदवडकरवाडा, चांदवडकर रस्ता, नासिक)

या आरोग्यशाळेंत वमन, नस्य रक्तस्रुति, बस्ति हे आयुर्वेदीय पद्धतीचे शोधन-उपक्रम नित्य व्यवहारांत आणले जात आहेत. हा या आरोग्यशालेचा विशेष आहे. वैद्य व रुग्ण यांनीं त्याचा लाभ घेऊन आरोग्यशालेचा उद्देश यशस्वी केला पाहिजे. हे सर्वांचें कर्तव्य आहे.

—व्यवस्थापक

पावसाळ्यांत जोर करणारे

अग्निमांद्य, आमांश, अतिसार, पोटदुखी, अपचन इत्यादि विकारांवर

आयुर्वेद सेवा संघाचें नवें उपयुक्त औषध

भल्लातकासव

वापरून अनुभव घ्या. वातकफात्मक आमविकारावर भल्लातक (बिब्बा) व वातपित्तात्मक आमविकारावर कुटज हीं प्रसिद्ध आहेत. भल्लातकासवास सर्वत्र जोरदार मागणी आहे.

किंमत ४० तो. २॥ रु., टपाल खर्च निराळा.

मधुमेहावरील उपयुक्त औषधें

१ **तेलिया असाणा** (भरड)	६० तोळे ३॥। रु.
२ **शिलाजत्वादिवटी** (गोळ्या)	१ तोळा ६ रु.
३ **असनादि अयस्कृति** (पातळ औषध)	४० तो. ३ रु.
४ **वसंत--कुसुमाकर**	(गोळ्या) -।- तो. ७॥ रु.
५ **धात्री-निशावटी**	(गोळ्या) १ तो. १। रु.

याशिवाय गोमयसंस्कृत धान्य इ. मिळण्याची व्यवस्था केली आहे.

विशेष माहितीसाठीं लिह .—

आयुर्वेद औषधी भवन, नासिक

संपादक व प्रकाशक— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विवलकर कारंजा, नाशिक
मुद्रक — श्री. चिं. आर्के, सकल प्रेस, नाशिक.

ायुर्वेद सेवा संघाचे पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

ार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

(दरमहा ता १ व १६ रोजी प्रसिद्ध होते.)

र्ष ९ वें) नासिक, ता. १६ जुलै १९५५ (अंक २ रा

गुरुकुल कांगड़ी

ायुर्वेद संशोधन-केंद्राची सरकारी योजना

ठाण्याजवळ ५०० एकर जागेंत सुरूं होणार !

टाइम्स ऑफ इंडियाच्या अंकांत पुढील अर्थाची बातमी प्रसिद्ध झाली आहे- असें कळतें ी, मुंबई सरकार लवकरच आयुर्वेदाच्या क्षेत्रांतील एक प्रचंड संशोधन केंद्र निर्माण करण्याची ोजना हातीं घेणार आहे.

ॲलोपॅथी पध्दतीनुसार कार्य करणारी हाफकिन संशोधन संस्था मुंबईस आहे, त्याचप्रमाणें ायुर्वेदाच्या क्षेत्रांत ही नवीन संस्था आयुर्वेदीय मान्य पध्दतीनुसार संशोधन कार्य करील. आयु-ेंदीय औषधांचे पाठ निश्चित करणें व त्या पाठाप्रमाणें औषधें निर्माण करून त्यांचा दर्जा वाढविणें हे कार्य येथें होईल. त्यामुळें मोठ्या नांवाखालीं विकल्या जाणाऱ्या खोट्या औषधांना आळा बसेल.

आयुर्वेद बोर्डाचे नवे सदस्य

वैद्य गोविंदप्रसाद हरिदास

या संशोधन केंद्र योजनेंत एक आयुर्वेदीय औषधी ाळा, एक द्रव्यगुणविज्ञान शाळा, एक वनस्पति उद्यान व क औषधि वनस्पति संग्रहालय इत्यादि गोष्टी येतील. ठाण्या-ासून ३ मैलावर असलेल्या ५०० एकर जागेंत हीं कार्यें ुरू होतील. यासाठीं उपयुक्त जागा निवडण्यांत आली आहे. ा कामाला लवकरच सुरवात होणार असली तरी एकूण ्उभारणीसाठीं ७ वर्षांपेक्षां अधिक काल लागणार आहे.

पोदार मेडिकल कॉलेजमधील एक माजी प्राध्यापक ी. नामजोशी हे ज्याचे मंत्री आहेत अशी ६ जणांची एक मिति मुंबई सरकारनें या कार्यासाठीं नेमली आहे. आयुर्वेद ेवा संघाचे जीवसदस्य वैद्य बा. स. मराठे (नाशिक) हे या मितीचे एक सभासद आहेत. वैद्य मराठे यांना औषधी-निर्मिती कार्याचा चांगला पूर्वानुभव आहे.

आयुर्वेदीय औषधीकरणांत सध्यां ज्या सुमारें २५० वनस्पती कमी जास्त वापर आहेत, त्या देशांत सर्वत्र विखुरलेल्या आढळतात. त्यांच्या गुणाबद्दलहि पूर्वीपासून वैद्यकीय प्रसिद्धि आहे. खेड्यापाड्यांतून सर्वत्र त्यांचा वापरहि चालू आहे. तरीपण या क्षेत्रांत संशो झाले नसल्यामुळें त्याच्या गुणावगुणाबद्दल निश्चित माहिती आज नाहीं. ठाण्याजवळ निर्माण हो केंद्र हें संशोधनाचें कार्य हातीं घेणार आहे.

१५ ऑगस्टचा सत्याग्रह

१५ ऑगस्ट १९५५ रोजीं गोव्यांतील सत्याग्रह फार मोठ्या प्रमाणावर होणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. आतांपर्यंत आलेल्या बातम्यांवरून सत्याग्रहीं फार मोठ्या प्रमाणावर जखमी होऊन परत येतात व त्यांची शुश्रूषा बेळगांव किंवा सावंतवाडी येथें केली जाते असें दिसतें. १५ ऑगस्ट रोजीं होणाऱ्या सत्याग्रहांत जखमी लोकांना लागणारी मदत फार मोठ्या प्रमाणावर लागेल. डॉक्टरवर्ग उपस्थित राहून त्यांची सेवा करील असा संभव आहे. वैद्यांनींहि मागें न रहातां त्यावेळीं आपलें अस्तित्व दाखविलें पाहिजे.

बेळगांव येथें अल्पमुदतीचा शुश्रूषा करणारा कँप काढावा असा म. प्रां. वैद्य मण्डळाचा विचार आहे. त्याचा तपशील लौकरच जाहीर होईल. आपले खर्चानें येऊन बेळगांव येथें कांहीं दिवस रहाण्याची तयारी असलेल्या वैद्यांनीं आपलीं नांवें पुणें कार्यालयाकडे (मंत्री, म. प्रां. वैद्य मंडळ, २८ शुक्रवार पुणें २) कळविण्याची कृपा करावी.

कँपमधील काळांत वैद्यांच्या जेवण्यारहाण्याची सोय करण्याविषयीं इतर लोकांशीं विचारविनिमय चालू आहे. तरी वैद्यबंधूंनीं ह्या संधीचा अवश्य लाभ घ्यावा व सेवाभावांत वैद्यवर्ग मागें नाहीं हें सर्वांना दाखवून द्यावें, ही विनंति.

माधवशास्त्री जोशी,
प्रधान मंत्री
महाराष्ट्र प्रान्तीय वैद्य-मंडळ

आयुर्वेद सेवा संघ अभ्यासवृत्ति

आयुर्वेद सेवा संघानें शुद्ध आयुर्वेद वि व आयुर्वेदीय आरोग्यशाला हे विभाग सुरू आहेत व सेवासंघाचें इतर विभागहि प्रगतिप आहेत. या चालू विविध कार्यासाठीं तरुण, बुद्धिमा अभ्यासू व अध्यापनक्षम पदवीधर वैद्यां आवश्यकता आहे.

ज्यांना आयुर्वेद सेवा संघानें चालविलेलें पसंत असेल, व त्या सर्व कार्यास आपण कांहीं अगर आजीव सहभागी होऊन हातभार ला असें वाटत असेल, अशा तरुण अभ्यासी पदवी वैद्यांना २ वर्षेपर्यंत अभ्यासवृत्ति देण्याचा संघाचा विचार आहे. ही अभ्यासवृत्ति पहिल वर्षासाठीं दरमहा १०० रु. व दुसऱ्या वर्षी दर १२५ रु. प्रमाणें मिळेल.

ज्या पदवीधर वैद्यांना या संधीचा ला घ्यावयाचा असेल त्यांनीं ' प्रधानाध्यापक, आयुर्वेद विद्यालय, आयुर्वेद सेवा संघ, नासिक पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

भैषज्य रत्नावलींतील खोकल्याचें औषध
भार्गोत्तर गुटिका
३ पिंपळी, ४ हिरडा, ५ बेहडा,
६ अडुळसामूळ, साल व फुलें, ७ भारंगमूळ
८ जेष्टमध, पारा, गंधक बाभळीच्या भावना
आयुर्वेद सेवा संघ, नासिक

टायफाइड फिव्हर व त्यावर रामबाण औषध

(लेखकः— डॉ सी. व्ही. जोगी, न्यू इतवारा रोड, नागपूर)

डॉ. भिंगारे यांच्या ‘ टायफाइड फिव्हरवर रामबाण औषध ’ हा लेख वाचून मला जे कांहीं विचार सुचले ते मी सर्व विद्वान् वैद्यासमोर मांडावे एवढाच या लेखाचा हेतु आहे. व्यक्तिशः टीका किंवा दोष दाखविणें हा हेतु नसून शंकासमाधानाचा, शिकवणीचा व खेळीमेळीच्या वातावरणांत ज्याप्रमाणें क्लिनिकल मीटिंग्ज होतात व त्यामध्यें ज्याप्रमाणें चर्चा होते तसलाच हेतु हा लेख लिहितांना माझा पण आहे.

हें निश्चितपणें समजूं शकेल

पहिला मुद्दा डॉ. भिंगारे यांनीं जो उपस्थित केला आहे तो असा कीं, ॲलोपॅथी ज्याला टायफाइड म्हणते त्याला आयुर्वेदांत निश्चित असें नामाभिधान नाहीं, व त्या विषयीं वैद्यवर्गात बरेच मतभेद आहेत. परन्तु ॲलोपाथी ज्याला टायफाइड समजते त्या विषयीं ॲलोपाथींत निश्चित लक्षणवर्णन तर आहे ना! आणि हें जर निश्चित आहे तर त्या लक्षणावरून टायफाइड ज्वर कोणत्या दोषात्मक आहे हें तर निश्चित ठरूं शकतें. म्हणजे टायफाइड ज्वर डॉक्टर भिंगारे ज्याला समजतात तो ज्वर ज्या रोग्याला असेल तो रोगी कांहीं लक्षणें सांगेल व कांहीं लक्षणें डॉ.ला तपासणी करून कळतील व या सर्व लक्षणसमुच्चयावरून कोणता दोष प्रधान आहे व कोणता दोष गौण आहे व रसरक्तादि धातूंपैकीं कोणत्या धातूची दुष्टि आहे हें निश्चितपणें समजूं शकेल. यालाच आपण दूष्य कोणतें आहे असें म्हणतो. व असेंच आयुर्वेदिक दृष्टीनें या ज्वराकडे पाहावयाचें झाल्यास हा ज्वर साम आहे कीं निराम आहे हें ठरवावें लागेल व एवढें सर्व ठरविल्यानन्तरच आयुर्वेदिक वैद्य या ज्वराची चिकित्सा करूं शकेल. कारण कोणत्याहि चिकित्साप्रणालीच्या मागें कांहींतरी तत्वयोजना असते. व ती जर नसेल तर ती चिकित्साप्रणाली शास्त्री ठरूं शकणार नाहीं.

वाग्भटाचार्यांचें सूत्र

नामाभिधानांत जरी मतभेद असला तरी दोष, दूष्य व स्थानसंश्रय याबाबतींत मतभेद राहण्याचें कारण नाहीं. कारण पित्तप्रधान ज्वराचीं लक्षणें काय व वातप्रधान ज्वराचीं लक्षणें काय तसेंच कफप्रधान ज्वराचीं लक्षणें काय, हें वाग्भटानें स्पष्ट सांगितलें आहे; आणि हें पण सूत्र लिहून ठेवलें आहेः—

वाग्भट, सूत्रस्थान अ. १२ वा, सूत्र नं. ६४
विकारनामाकुशलो न जिन्हियात्कदाचन ।
न हि सर्व विकाराणां नामोऽस्ति ध्रुवा स्थितिः॥
स एव कुपितो दोषः समुत्थानविशेषतः ।
स्थानांतराणि च प्राप्य विकारान् कुरुते बहून् ॥

नामाभिधानानें चिकित्सा होत नाहीं

तसेंच याच अध्यायांत पुढें सांगितलें आहे कीं,

दूष्यं देशं बलं कालमनलं प्रकृतिं वयः ।
सत्वं सात्म्यं तथाहारमवस्थाश्च पृथिग्वाः ॥
सूक्ष्मसूक्ष्माः समीक्ष्यैषां दोषौषधनिरूपणे ।
यो वर्तते चिकित्सायां न स स्खलति जातुचित् ॥

वरील श्लोकाच्या अर्थावरून एक गोष्ट स्पष्ट आहे, आणि ती म्हणजे ही कीं, ज्याला डॉ. भिंगारे किंवा इतर ॲलोपाथ टायफाइड ज्वर समजतात त्या ज्वराची चिकित्सा केवळ त्याचें नामाभिधान करून करतां येणार नाहीं.

दोषदूष्यांचा विचार महत्त्वाचा

उलट मी तर असें म्हणेन कीं, वैद्यवर्गाला नामाभिधान करतां आलें नाहीं हें एका दृष्टीनें बरें झालें. नामाभिधान करतां आलें नाहीं म्हणून तरी तुम्हाला दोष, दूष्य, बल, काल, या दृष्टीनें विचार करावयाला जागा झाली. दोषबलांचें सूक्ष्मातिसूक्ष्म निदान करून मगच चिकित्सा करावयाला हवी. नाहींतर अमक्या रोगावर अमकें औषध ही चिकित्सापद्धति आयुर्वेदाच्या दृष्टीनें तरी योग्य नव्हे.

वैद्यवर्गाला अमक्या रोगावर अमकें हमखास औषध अशी जर संवय झाली तर मग तो दोष, दूष्य व स्थानसंश्रय या अपेक्षेनें विचारच करीत नाहीं.

आतां आपण ॲलोपाथी या रोगाविषयीं काय म्हणते तें पाहूं.

नक्कल करणें चूक आहे

ॲलोपाथिक ग्रंथाप्रमाणें लक्षणें 'Bed side medicine by Majumdar page No 103 ninth edition मध्यें पाहून घ्यावीं. येथें विस्तारभयास्तव इंग्लिश वर्णन टाळलें आहे. ॲलोपाथीच्या पुस्तकांत जें वर्णन दिलें आहे त्याची छाननी जर आयुर्वेदिक दृष्टीनें करून पाहिली तर दोष, दूष्य व अवस्थाभेद स्पष्ट दिसून येतात. तसेंच त्याचे निरनिराळे प्रकार पाहिल्यास असें स्पष्टच म्हणावें लागेल कीं, एकच औषध निरनिराळ्या अवस्थेमध्यें लागू होणार नाहीं. आणि म्हणूनच ॲलोपाथिक पद्धतीची, निदान आयुर्वेदियांनीं तरी नक्कल करण्याचा प्रयत्न करणें चूक आहे.

लक्षणांचा आयुर्वेददृष्ट्या विचार

प्रथम आठवड्यांतील लक्षणें व त्याचा आयुर्वेदिक दृष्ट्या विचारः—

पूर्वरूप— (Malaise) बरें न वाटणें. वातप्रधानलक्षण.

Headache, pains & aches in body डोकेंदुखी, हात पाय ठणकणें- वातप्रधान लक्षण.

Anorexia— भूक न लागणें— वातप्रधान.

Ehsistaxis— नाकांतून रक्त वाहणें— वातपित्तप्रधान. दूष्य-रक्त.

पहिल्या आठवड्यांतील लक्षणें

टायफॉइडचीं पहिल्या आठवड्यांतील लक्षणें पुढीलप्रमाणें आहेतः—

१ Gradual rise of temperature पित्तप्रधानता. वातलक्षणांना पित्ताची जोड हळूहळू मिळावयास लागते.

२ Face flushed and appearanc is dull looking — चेहरा आरक्त पण निस्ते वातपित्तप्रधानता.

३ Mouth & tongue dry, coated with creamy fur - Tip & margin red and angry looking— जीभेवर पिवळस थर. आमाचें लक्षण. जीभेचा शेंडा व कडा ल पित्तप्रधानता.

४ Anorexia— अन्नावर इच्छा न होणें, सामता दर्शविते.

५ Typanitis & coecal gurgling, constipation & less commonly diarrhoea— पोट फुगणें, किंवा आध्मान, उजव्या कुशी किंवा ओटीपोटांत गडगड व शौचास न होणें.

दोषांचा स्थानसंश्रय

ह्या गोष्टी स्थानसंश्रय दाखवितात व ह्या स्थानां म्हणजे आंतडींत असणारा वातप्रकोप दाखवितात, व जर पातळ परसाकडे होत असेल तर वातपित्तप्रधानता दाखवितात.

६ Epistaxis—नाकांतून रक्तस्राव—ऊर्ध्वग पित्त, दूष्य रक्त

७ Headache डोकेंदुखी— वातामुळें किंवा वातपित्तामुळें.

८ Pulse relatively slow than the temp. ज्वरवेगापेक्षां नाडीचा वेग प्रमाणतः कमी. मला असें वाटतें कीं, हें लक्षण सामावस्था दाखवितें, किंवा याला कफाचें लक्षण मानतां येईल.

९ Certain amount of Bronchitis कोरडा खोकला, शुष्क वातजन्य कास.

१० अंगावर पुरळ ७ ते १० व्या दिवशीं:— पित्तप्रधानतेचें लक्षण व तें त्वक्गत होत आहे.

वातप्रधानता पित्तानुबंध

एकंदरींत पाहतां दोषांच्या दृष्टीनें वातप्रधान

प्रथम दिसून येते व त्याला हळूंहळूं पित्ताची जोड मिळत जाते व वातपित्तप्रधान लक्षणें पहिल्या आठवड्यांत दिसून येतात.

दुसऱ्या आठवड्यांतील लक्षणें

दुसऱ्या आठवड्यांतील लक्षणाकडे नजर फेंकल्यास असें दिसून येईल कीं,

१) Temperature Constant— ताप सारखा राहातो. उतरचढ फार कमी—कफ प्रधानता

२) Mental Condition more dull, semicomatose, low muttering delirium मन व बुद्धीचें जडत्व, किंचित् अचेतन अवस्था व थोडी बडबड—कफप्रधानता

३) Tongue more dry. lips cracked वातपित्तप्रधानता

४) Diarrhoe — yellow Liquid offensive पातळ पिवळी परसाकडे, व घाण येते वातपित्तप्रधानता.

५) Lungs show diffuse bronchial Catarrh, incrased Cough and hypostatic Congestion—फुप्फुसांत कफ संचय कफप्रधानता.

६) Pulse quickens & is of low Tension नाडीची गति जास्त पण जोर कमी. वातपित्तप्रधान किंवा सान्निपातिक नाडी.

७) Spleen & liver palpable— प्लिहा व पानथरी हाताला लागते— पित्तजन्य विकृति व दूष्य रक्त (रक्तं विसर्प—प्लीह—विद्रधीन् ।)

८) लघवी लाल—पित्तप्रधानता.

पहिल्या आठवड्यांत वातपित्तप्रधानता व दुसऱ्या आठवड्यांत वातपित्ताच्या जोडीला कफ येऊन मिळतो.

तिसऱ्या आठवड्यांतील लक्षणें

१ Temperature now takes up a remittant character—ताप जो स्थिर राहात असे, तो आतां थोडा कमी होतो; व सकाळ संध्याकाळच्या तापांत जास्त जास्त फरक पडावयाला लागतो.

2 Tongue clears up—जीभ साफ होत जाते.

3 Typanitis gets less आध्मान कमी कमी होत जातें.

4 Appetite tends to return—भूक लागावयास लागते व रोग्याला जरा बरें वाटावयाला लागतें.

तिन्ही दोष पच्यमानावस्थेंत

वरील सर्व लक्षणांवरून असें म्हणतां येईल कीं, वात पित्त व कफ हे तिन्ही दोष तिसऱ्या आठवड्यांत पच्यमान अवस्थेंत येतात. व सामता कमी कमी होत जाते, म्हणून सर्व लक्षणें हळूंहळूं कमी व्हावयास लागतात.

तीव्र अवस्थेंतील लक्षणें

परन्तु याच तिसऱ्या आठवड्यांत जर ही पच्यमान अवस्था आली नाहीं तर

In severe Case

(१) Patient is more prostrated- रोगी जास्त जास्त अशक्त होत जातो.

(२) He is markedly in typhoid state (low muttering delirium, Coma Vegil, Corpholgia, and subsultus tendimum) पडून पडून बडबड करणें, शून्यदृष्टीनें पाहाणें, हात चिवडणें व हाताला झटके देणें कफावृतवातजन्य लक्षणें किंवा सान्निपातिक लक्षणें.

३) Pulse & respiration quickens and hypostatis congestion of lungs may pass into Bronchopneumonia नाडीची गती जास्त जास्त होत जाते व फुफ्फुसांतील जलसंचयाचें कफसंचयांत परिवर्तन होऊन न्युमोनियाचीं लक्षणें दिसूं लागतात. नाडी ही वात-पित्तात्मक किंवा सान्निपातिक, व स्थानसंश्रयाच्या दृष्टीनें फुफ्फुसांत वातकफप्रकोप. एकंदरींत सान्निपातिक लक्षणें दृग्गोचर होतात.

४ Tympanitis often increases occasionly leading to hoemorrhage and perforation— आध्मान वाढत जाते व आंतडीला छिद्रें पडण्याचा संभव वाढतो. आंतडीला पडलेल्या भेदांतून रक्त वाहाण्याचा संभव असतो— हीं लक्षणें वातपित्तप्रकोपाचींच आहेत.

चौथा आठवडा

चौथा हप्ताः—वर जीं पहिल्या, दुसऱ्या अगर तिसऱ्या हप्त्यांत लक्षणें दिसून येतात तीं सर्व हळूंहळूं कमी होऊं लागतात. आयुर्वेदीय दृष्ट्या सर्व दोष पच्यमान होतात व हळूंहळूं निराम अवस्था येऊन साम्यावस्था उत्पन्न होते.

विशेष प्रकारचे रुग्ण

अशा तऱ्हेनें लक्षणांची छाननी केल्यानंतर हें जें ॲलोपॅथीच्या पुस्तकांत वर्णन केलें आहे तें सर्वसामान्य वर्णन आहे, व प्रत्यक्ष व्यवहारांत दिसून येणाऱ्या निरनिराळया रोग्यांना अशींच लक्षणें राहातील असें नाहीं. म्हणून ज्या Atypical cases म्हणजे विशेष अशा निरनिराळया केसेस आढळून येतात, त्याविषयीं थोडा विचार करणें वावगें होणार नाहीं.

दोषांची वृध्दि कमी

(१) इंग्लिश वर्णन येथें लिहिण्याची जरूरी नाहीं. त्या वर्णनाकडे नजर फेंकल्यास असें दिसून येतें कीं, रोगी टायफाइडचा व तो पण सान्निपातिक ज्वराचा, परंतु दोषांची द्रव्यतः वृद्धि तसेंच गुणतः वृद्धि कमी प्रमाणांत.

दुसऱ्या आठवड्यांत गंभीर लक्षणें

(२) कधीं कधीं रोगी पहिल्या आठवड्यांत खाटेवर पडून राहात नाहीं, परन्तु एकदमच दुसऱ्या आठवड्यांतील गंभीर लक्षणें दिसूं लागतात. आयुर्वेदिक दृष्ट्या पहिल्या आठवड्यांत दोषप्रकोप फार जोराचा नसतो व त्यामुळें बिमाराला आपण फार बिमार आहों असें वाटत नाहीं व मग एकदमच सान्निपातिक लक्षणें दिसून येतात. याचें का[रण] म्हणजे पहिल्या आठवड्यांत केलेला मिथ्या आ[हार] व विहार.

जोराची सुरुवात

(३) कधीं कधीं सुरुवातच फार जोराची अ[से] व एकदम लक्षणें सुरू होतात व रोगी सुधार[ण्या]याला बरेच दिवस लागतात. आयुर्वेदिक दृ[ष्ट्या] सुरुवात सान्निपातिक, दोषांची सामता फार जोरा[ची] त्यामुळें दोष लवकर पच्यमान होत नाहींत म्ह[णून] सुधारावयाला उशीर लागतो.

एकदम सान्निपातिक अवस्था

४.— अ) कधीं कधीं एकदमच सान्निपातिक अवस्थेस सुरवात होते. पहिल्याच आठवड्यांत मेंदू[च्या] लक्षणें दिसून येतात एवढेंच नव्हें तर ज्या[ला] Lobar pneumonia म्हणतात म्हणजे फुप्फु[साच्या] साऱ्या फक्त एका भागांत कफसंचय जास्त व त्यामु[ळें] पहिल्याच आठवड्यांत ताप फार जास्त [...] थंडी वाजून येणें, पार्श्वशूल वगैरे वातकफजन्य कि[ंवा] वातकफपित्तजन्य लक्षणें एकदम सुरूं होतात. वा[त] लक्षणाबरोबर पित्तजन्य उलटी किंवा पित्तजन्य पात[ळ] परसाकडे होते.

दोषदृष्ट्या विचार

कधीं कधीं कफप्रकोप मेंदूच्या स्थानसंश्रयानें राहिल्यास मेंदुगत लक्षणें व मेनिंजायटिसचीं लक्षणें पहिल्याच आठवड्यांत आढळून येतात. मस्तिष्कावरणांत जलसंचय आढळून येतो व हें जल जास्त झाल्यामुळें जर बाहेर काढलें तर जोरानें बाहेर येतें. कधीं कधीं या जलसंचयांत टायफाइडचे जंतु आढळून येतात. याला मेनिंगो-टायफाइड म्हटलें आहे. या प्रकाराचा आयुर्वेदिक दृष्ट्या विचार करावयाचा झाल्यास वात, पित्त व कफ हे तिन्ही साम दोष शरीरांत जोरानें संचार करावयाला लागले म्हणजे ते पुढें स्थानसंश्रय घेतात व जेथें खवैगुण्य सांपडे तेथें ते थांबतात. त्याप्रमाणें वात व कफ हे मेंदूमध्ये

नसंश्रय घेतात व वात पित्त हे आंतडींत संचित तात, स्थानसंश्रयाच्या भेदामुळें असले भेद पडतात त्यामुळें 'मेनिंगो' टायफाईड हा प्रकार नजरेस पडतो.

रक्तपित्तयुक्त टायफाइड

ब) प्रकारांत शरीराच्या निरनिराळ्या ांत रक्तस्राव आढळून येतो म्हणून या प्रकाराला त पित्त प्रधान व दूष्य रक्त, किंवा रक्तपित्त प्रधान न्निपातिक टायफाइड असें म्हणतां येईल.

सान्निपातिक सामदोषवृध्दि

क) कोणंत्याहि तऱ्हेचा स्थानसंश्रय दिसून त नाहीं. एकदम एकाएकीं जोराचा सान्निपातिक ज्वर येतो. (Highly Toxaemic). बडबड, न्य दृष्टीनें पाहाणें, हातापायाचे चाळे, कपडे विरडणें वगैरे जीं लक्षणें दुसऱ्या आठवड्यांत आढळून येतात तीं पहिल्याच आठवड्यांत एकदम सुरु होतात. लघवी व परसाकडे बिछान्यांतच होऊन जाते, नाडी मंद व क्षीण अशी सर्व गंभीर लक्षणें सुरवातीपासूनच आढळून येतात व रोगी बहुधा पहिल्याच आठवड्यांत मरतो. या प्रकाराला सान्निपातिक न सामता फार व द्रव्यतः दोषांची वृद्धि फार असा प्रकार म्हणतां येईल.

ड) एकूण किती काळांत ज्वर मोक्ष होईल हे सांगतां येत नाहीं. ५ ते ६ आठवडे पण ज्वर चालू रहतो. आयुर्वेदिक दृष्ट्या दोष लवकर निराम होत नाहींत म्हणून असें होतें असें म्हणतां येईल.

लहान मुलांचा टायफाइड

५) लहान मुलांतः—सर्वसाधारणतः सर्व लक्षणें मी असतात. परंतु लहान मूल प्रायशः कफ प्रकृतीचे असल्यानें Broncho--pneumonia किंवा श्वसनक सन्निपात तसेंच तांद्रिक संन्निपात म्हणजे **Meningitis** ची लक्षणें जास्त प्रमाणांत आढळून येतात व नाडीचा वेग कमी रहात नाहीं.

उतार वयांतील टायफाइड

या उलट उतार वयांत हृदय कमजोर होत असल्यामुळें फुप्फुसांत जलसंचय जास्त [Passive Congestion] व हृदयाची कमजोरी जास्त आढळून येते.

हा सान्निपातिक ज्वर आहे

एकंदरींत वरील सर्व विवेचनवरून असें दिसून येतें कीं, टायफाइड हा सान्निपातिक ज्वर आहे. प्रथमतः वातप्रधान लक्षणांनीं सुरुवात होते. पुढें हळूहळू पित्त पण वाढत जातें व वात पित्तप्रधान कफ गौण ही परिस्थिति पहिल्या आठवड्यांत आढळून येतें. दुसऱ्या आठवड्यांत वातपित्तप्रधान अशा लक्षणांना कफाची जोड मिळते व तिन्ही-दोषप्रधान किंवा सान्निपातिक लक्षणें दुसऱ्या आठवड्याच्या शेवटीं चांगलीच जोराची आढळून येतात.

रस-रक्त दूष्यें, आंत्र फूप्फुसें मेंदू स्थानें

आंत्र हें या विकृतीचें प्रमुख स्थान असल्यामुळें दुसऱ्या आठवड्याचे शेवटीं आंत्र फुटून अन्न अगर हवा आंत्रावरणाच्या पोकळींत जाऊन आंत्रावरणदाह निर्माण होण्याचा संभव असतो किंवा झालेल्या भेदांतून रक्तस्राव होण्याचा संभव असतो. तिसऱ्या आठवड्यांत हीं सर्व सान्निपातिक लक्षणें हळूहळू ओसरूं लागतात व चौथ्या आठवड्यांत रोगी निराम होतो व दोष पण साम्यावस्थेंत येतात. हें वर्णन साधारणतः झालें व व्यक्तिवैशिष्ट्यांनीं दोष, दूष्य व स्थानसंश्रय या वैशिष्ट्यांनीं त्याचे इतर प्रकार जे वर वर्णन केले आहेत ते पडतात. सर्वसाधारणतः दूष्य, रसधातु व रक्तधातु हे होत, व स्थानसंश्रय आंत्र, फुप्फुस, मेंदू, मस्तिकावरण, हृदय व कधीं कधीं वृक्क (Kidney) यापैकीं कांहीं ठिकाणीं होतो.

एक औषध लागू होईल कां ?

इतक्या विविध प्रकारानें व विविध तऱ्हेनें दृश्य होणारा टायफाइड ज्वर व त्याच्या इतक्या विविध अवस्था, या सर्व अवस्थेंत एकच औषध लागू होईल कां ?

साम–निराम विचार आवश्यक

याशिवाय साम व निराम हा विचार करणें आवश्यक आहे.

स्रोतोरोध–बलभ्रंश–गौरवानिलमूढताः ।
आलस्यापक्ति– निष्ठीवमलसंगारुचिक्लमाः ॥
लिंगं मलानां सामानां निरामाणां विपर्ययः ।

स्रोतसांचा अवरोध, बलहानि, गुरुता । अनिलमूढता (वायूचा विपरीत संचार), आळस, अपचन, तोंडास पाणी सुटणें, मलबद्धता, अरुचि, ग्लानि हीं लक्षणें सामदोषांचीं व याच्या विपरीत लक्षणें तीं निराम दोषांचीं होत.

पाश्चात्य वैद्यकांत हा विचार नाहीं

यापैकीं बहुतेक लक्षणें टायफाइड या ज्वरांत आढळून येतात. त्यावरून सर्व दोषांची सामता असते ही गोष्ट नक्कीच–साम किंवा निराम ह्या अवस्थांची कल्पना–पाश्चात्य वैद्यकांत नाहीं असा माझा समज आहे. तसेंच स्रोतोरोध ही पण कल्पना पाश्चात्य वैद्यकांत नाहीं असें मला वाटतें.

उपपत्ति लावली पाहिजे

डॉ. भिंगारे यांचे योग यापैकीं कोणत्या अवस्थेंत व कसे काम करतात ह्याची उपपत्ति लावली पाहिजे. तसेंच एकदम ज्वर कमी करणें एवढेंच चिकित्सेचें ध्येय नसावें. निदान आयुर्वेदीयांना तरी हें पसंत पडणार नाहीं.

हें जंतुघ्न औषध आहे

क्लोरोमायसेटीन हें औषध जंतुघ्न आहे. बाहेर तसेंच शरीराच्या आंत (in vivo) हें औषध टायफाइडचे जंतु मारतें किंवा त्याच्या वाढीला प्रतिबंध करतें (Bacteriostatic) एवढेंच नव्हें तर शिवाय निमोकॉकस्, मेनिंगोकॉकस्, स्ट्रेप्टोकॉकस् वगैरे सर्व प्रकारच्या जंतूंची नाशक शक्ती या औषधांत असल्यामुळें जंतूंची वाढ जास्त होऊं शकत नाहीं. व रोगाच्या सर्व अवस्थेमध्यें व सर्व उपाधीमध्यें हें औषध लागू पडतें व लवकर ताप उतरतो. तसें, डॉ. भिंगारे यांचें औषध जंतुघ्न नाहीं हें एकदमच मान्य करावें लागेल.

दोष – दूष्य – संयोग निश्चित कारण

आयुर्वेद जंतु हें रोगाचें निमित्त कारण मानतो व दोष–दूष्य–संयोग हें निश्चित कारण मानतो. मग डॉ. भिंगारे यांचा योग जर निश्चित काम करीत असेल तर दोष–दूष्य–संयोग दूर करूनच काम करीत असला पाहिजे व हें जर त्यांना मान्य असेल तर औषध व त्याच्या गुणांची उपपत्ति ही आयुर्वेदीयांनीं लावावयाला नको काय ?

जंतुनाशक कां वापरतात ?

रोगाचें कारण अॅलोपाथी जसें टायफाइडचे जंतु मानते व म्हणून ते जंतु मारावे म्हणजे रोग जाईल असा त्यांचा समज असतो व म्हणून त्याप्रमाणें ते जंतुनाशक औषध वापरतात.

दोन्ही उपाय करावेत

परंतु आयुर्वेदीय जंतु हें निमित्त कारण आहे व दोष–दूष्य–संयोग हें प्रमुख कारण आहे असें मानतात; म्हणून दोन्ही कारणें दूर केल्याशिवाय रोग पूर्णपणें बरा होणार नाहीं. तात्कालिक कारण जर मानलें तर जंतूचा पण नाश झाला पाहिजे व हें लवकर साधलें पाहिजे म्हणून क्लोरोमायसेटिनचा वापर करावयास हरकत नाहीं, व दोष–दूष्य–संयोग घालविण्याकरितां आयुर्वेदीय औषध वापरावें. अशा रीतीनें दोन्ही साधलें तर उत्तम गुण येईल असा माझा समज आहे.

सहा रोग्यावरील अनुभव

मी या दृष्टीनें आतापर्यंत सहा रोग्यावर प्रयोग केले आहेत व मला अनुभव फार चांगला आला. क्लोरोमायसेटिन हें जंतूघ्न औषध आहे व योग्य प्रमाणांत वापरल्यास त्याचे विषारी परिणाम दिसून येत नाहींत. तसेंच याच क्लोरोमायसेटिन बरोबर रसवह स्रोतसांचा विबंध दूर करण्याकरितां दीपक व पाचक काढा अंगर औषध वापरलें तर फार उत्तम उपयोग होतो असा माझा अल्प अनुभव आहे. क्लोरोमायसेटिन हें औषध फक्त स्वेदवह स्रोतसांचा विबंध दूर करतें

उत्तम जंतुघ्न आहे म्हणून संप्राप्तीच्या दृष्टीनें स्रोतसें जीं आमांनीं रुध्द झालीं असतात तीं दूर करण्याचें सोबत औषध दिलें तर ताप व पुन्हां उलटून येत नाहीं व जास्त प्रमाणांत मायसेटीन न वापरल्यामुळें कोणत्याहि तऱ्हेचा परिणाम होत नाहीं. अर्थात् माझा अनुभव अल्प आहे, फक्त सहा केसेस मध्यें मीं असा करून पाहिला आहे, पण अनुभवामागें एक तात्विक योजना आहे ती जर इतर वैद्यांना असेल तर त्यांनीं त्या प्रमाणें अनुभव घ्यावे व सिद्ध करावेत अशी माझी इच्छा आहे; कारण तात्कालिक कारण जंतुनाशक, दीपक, पाचक स्रोतसांचा अवरोध दूर करणारी व स्वेदवह स्रोतसांचा अवरोध दूर करणारी अशी चिकित्सा साधतां येते व अशी चिकित्सा केल्यास गुण येईल असा माझा समज आहे.

विडाल टेस्ट केली कां ?

डॉ. भिंगारे यांना एक प्रश्न विचारावासा वाटतो. त्याला आपण टायफाइड समजतां त्याचें निश्चित निदान करावयाला ॲलोपाथी ज्या प्रमाणें विडाल टेस्टचा उपयोग करते त्या प्रमाणें आपण ज्या केसेस बऱ्या केल्या त्यापैकीं किती रोग्यांची विडाल टेस्ट केली होती ?

विडाल टेस्ट पॉझीटिव्ह आली नाहीं तर त्याला टायफाइड समजावयाचा कीं नाहीं ?

अभिनंदनीय उपक्रम

एक गोष्ट डॉ. भिंगारे यांनीं केली व त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करावेसें वाटतें. व ती ही कीं, त्यांनीं आपल्या औषधाची गुप्तता उघड केली· डॉ· भिंगारे यांचें औषध आयुर्वेदिक व ॲलोपॅथिक अशा मिश्र दवाखान्यांत रोग्यावर अनुभवून पाहिलें पाहिजे व अनुभव लिहितांना खालील गोष्टींचा तपशीलवार विचार केला पाहिजे·

तपशीलवार विचार

१) रोगी दवाखान्यांत भरती केला तेव्हां त्याची अवस्था काय होती व कोणत्या दिवशीं म्हणजे बिमारीच्या कोणत्या दिवशीं भरती करण्यांत आला ?

२) त्याचीं लक्षणें संपूर्णपणें नोंद करण्यांत आलीं पाहिजेत· Subjective व Objective

३) ॲलोपॅथिक निदान काय ? विडाल टेस्ट पॉझीटिव्ह कीं निगेटिव्ह ?

४) दोष–दूष्य–स्थानसंश्रय यांचा आयुर्वेदिक दृष्ट्या विचार व त्याची नोंद–साम कीं निराम वगैरे विचार·

उपचाराची छाननी झाली पाहिजे

व हें सर्व झाल्यानन्तर त्याला करण्यांत आलेला इलाज.

५) कांहीं टेस्ट केसेस कीं ज्यांच्याशीं तुलना करतां येईल.

नंतर आंकडेवारी काढावी

रोगी बरा झाल्यानन्तर पुढें त्याला कांहीं विकार तर झाला नाहीं ना ? जसें डॉ. भिंगारे यांना अग्निमांद्य वगैरे झालें तसें आयुर्वेदिक औषधांनें होतें कीं काय ? याची पण छाननी झाली पाहिजे· व जे रोगी दवाखान्यांतून बरे झाले त्यांच्याशीं पुढें संबंध ठेवावा लागेल· हें सर्व पूर्ण झाल्यानंतर आंकडेवारी काढावी लागेल व ती प्रसिद्ध केली पाहिजे· व हें सर्व झाल्याशिवाय डॉ. भिंगारे यांचें औषध खरोखरच रामबाण आहे असें म्हणतां येणार नाहीं.

मी स्वतः आयुर्वेदाचा अल्पज्ञ आहे, तरीपण लेख लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. यांत कांहीं चुका असल्यास विद्वान् वैद्य त्या दुरुस्त करतील अशी आशा आहे.

मिरज येथें
आयुर्वेद सेवा संघाचीं औषधें
मिळण्याचें ठिकाण
आयुर्वेदिक मेडिकल स्टोअर्स
सराफकट्टा, मिरज

धर्मार्थ दंतयज्ञ, बंगलोर

नोबेल प्राइझ

दि. २१ जून रोजीं सकाळीं सुप्रसिद्ध पदार्थ-विज्ञानशास्त्रज्ञ श्री. सी. व्ही. रामन् यांनीं वैद्य जायदे यांनीं चालविलेल्या धर्मार्थ दंतचिकित्सायज्ञास भेट दिली व दंतोत्पाटनाचें कौशल्य पाहून कौतुक केलें.

डॉ. रामन् यांची सूचना

डॉ. रामन् म्हणाले 'वैद्य जायदे यांना फिजिऑलॉजी विषयासंबंधींचें नोबेल बक्षीस दिलें पाहिजे. त्रासदायक दांत काढणें हा कांहीं सुखदायक प्रयोग नव्हे. पण वैद्य जायदे हा प्रयोग लीलेनें करतात. या प्रयोगांत वातवाहिन्या तात्पुरत्या झोंपी जातात व मग जादूनें दांत बाहेर येतो. व मनुष्य हंसतच घरीं जातो. खरोखरीच आश्चर्य आहे. "

वैद्य जायदे यांनीं ३०० विद्यार्थ्यांचे दांत तपासले. ५७ टक्के विद्यार्थ्यांचे दांत त्यांना बिघडलेले आढळले. सर्व हिंदुस्थानांत हीच परिस्थिति आहे असा त्यांचा अनुभव आहे.

उद्योगधंद्यांतील आरोग्य

३ महिन्याचा शिक्षणक्रम

येत्या १ आक्टोबरपासून मुंबई येथील ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें एक अल्पमुदतीचा उद्योग–धंद्यांतील आरोग्यविषयक कोर्स सुरू करण्यांत येणार आहे. हा कोर्स तीन महिन्यांचा असून या मुदतीच्या अखेरीस परीक्षा घेतली जाईल. यशस्वी विद्यार्थ्यांना प्राविण्याबद्दल प्रमाणपत्रें देण्यांत येतील.

औद्योगिक संघटनेतील अथवा स्थानिक संस्थांतील अथवा सार्वजनिक आरोग्यखात्याच्या इंडस्ट्रियल ब्यूरोमधील वैद्यकीय खात्यांत ज्यांना नौकरी करावयाची असेल अशा वैद्यकीय पात्रता असलेल्या इसमांना ट्रेनिंग देणें हा या कोर्सचा हेतु आहे.

कोर्सची फी १५० रु.

एम्. बी. बी. एस्. अथवा एल सी. पी. एस. परिक्षा पास झालेल्या १० वैद्यकीय इसमांना या कोर्ससाठीं प्रवेश देण्यांत येईल, व प्रत्येकाला १५० रु. कोर्सची फी द्यावी लागेल. प्रवेश देण्याच्या बाबतींत औद्योगिक कंपन्या, रेल्वे, राज्य सरकारें वगैरेंनीं शिफारस केलेल्या उमेदवारांना प्रथम पसंती देण्यांत येईल.

डॉ. वि. वि. गोरे यांचें पुस्तक

जबलपूर येथील महाकोशल महाविद्यालयांतील प्राध्यापक श्री. वि. वि. गोरे, डी. एस्सी. यांचा एक लेख मागें १६-२-५५ च्या आयुर्वेद पत्रिकेंत प्रसिद्ध झाला आहे. त्या लेखांत ज्याचा उल्लेख आलेला आहे तें 'Modern Sciences Vindicate Ayurved' या नांवाचें इंग्रजी पुस्तक आयुर्वेद पत्रिकेंकडे आलें आहे. त्रिदोष हीं भौतिक द्रव्यें आहेत, हाच विचार त्यांत आधुनिक परिभाषेंत मांडला आहे. आधुनिक शास्त्रज्ञांनीं आयुर्वेदाचा विचार करून दोन्ही शास्त्रांतील चांगल्या गोष्टींचा समन्वय साधावा असें जे म्हणतात वा इच्छितात, त्यांनीं हा प्रयत्न विचारांत घेण्यासारखा आहे व त्यासाठीं हें पुस्तक उपयुक्त आहे. किंमत १॥ रु. ट. ख. निराळा.

वै. दुर्गाबाई आंबर्डेकर

नाशिक येथील वैद्य वा. ना. आंबर्डेकर यांची कन्या वैद्य कु. दुर्गाबाई आंबर्डेकर आयुर्वेदविशारद D. A. S. F. यांची जामनगर येथील सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ् रीसर्च इन् इंडिजिनस् सिस्टिम्स ऑफ् मेडिसिन या संस्थेंत गृहवैद्य या स्थानावर नेमणूक झाली आहे. या मुंबईच्या पोदार आयुर्वेदिक कॉलेजांतून १९५१सालीं उत्तम प्रकारें उत्तीर्ण झाल्या व तेथें त्यांनीं पुढें कांहीं काल काम केलें. अभिनंदन

उद्योग

विद्यार्थी, पेन्शनर व बेकारांना फावल्या वेळांतील, सर्वत्र चालणारा फायदेशीर मातीच्या चित्रांचा उद्योग, माहिती फुकट.

एम्. देशपांडे C/o सोमण लॉज, पुणें ४

त्रिदोष-विचार म्हणजेच आयुर्वेद

(लेखकः—वैद्य कि. भा. गुप्ता, मुंबई ४)

"शुद्ध व मिश्र" ह्या दोन्हीं विशेषणामुळें जनता, वैद्य, आणि डॉक्टर्स ह्या सर्व लोकांची आयुर्वेदाविषयीं दिशाभूलच होत चालली आहे. कोणतेंहि द्रव्य, पदार्थ, औषधीप्रयोग, क्रिया किंवा कला हे आयुर्वेदीय आहे कीं ॲलोपाथिक हें ठरविण्याचें काम दिवसानुदिवस कठीण बनत चाललें आहे. एखादें औषध वैद्याकडून दिलें गेलें किंवा आयुर्वेदांत असलें म्हणजेच तें आयुर्वेदिक किंवा डॉक्टरकडून दिलें गेलें आणि ॲलोपॅथीच्या शास्त्रांत असलें म्हणजेच तें ॲलोपॅथिक आहे असें ठरविणें सरास चुकीचें—भ्रामक आहे. कारण त्याच्या उपाययोजनेच्या मागें असलेली विचारसरणीच मुख्य आहे.

आयुर्वेदाच्या इमारतीचा पाया

आयुर्वेदाची सर्वच इमारत "त्रिदोष" सिद्धांतावर आधारलेली आहे तर ॲलोपॅथीची 'जंतुवादावर'. ह्या दोन्हीं शास्त्रांतील मौलिक सिद्धांतांमधील मतभेदामुळेंच प्रत्येक प्रश्न सोडविणें आज डोईजड बनत चाललें आहे. तथापि ह्या मुख्य विषयाकडे न वळतां, त्याच्या निर्णयाचे प्रयत्न न करतां केवळ कॉलेजांतील शिक्षण म्हणजेच मिश्र पद्धतीचें तर पाठशाळेंतील शिक्षण म्हणजेच शुद्ध असें म्हणण्यांत कांहींहि अर्थ नाहीं. कारण आयुर्वेदाचे आद्य पुरस्कारकर्ते "चरकाचार्य" यांचे मताप्रमाणें जर जगांतील कोणताहि पदार्थ औषधीरूप आहे व असूं शकतो तर ॲलोपॅथिक औषधीप्रयोग किंवा शस्त्रचिकित्सा यांचेकडे बोट दाखविणें हें चुकीचें नव्हें काय ?

विचारसरणींतील भेद

औषधीप्रयोग किंवा अन्य प्रकारच्या चिकित्सेचा प्रश्न तर एखादें आजारपण आल्यानन्तरच उद्भवत असतो. अन्यथा त्या प्रश्नाकडे बघण्याची गरजसुद्धां कोणास केव्हांहि वाटत नाहीं. कोणत्याहि आजाराला शरीर केव्हांहि बळी पडूं नये, तें नेहमीं स्वस्थ आणि क्रियाशील रहावें म्हणून, आहार घेण्याची धडपड तर नित्य चालूच असते. तो प्रश्न तर सर्व लोकांचे समोर नित्याचा आणि निकडीचा बनून उभाच असतो. त्याकरितां घेतले जाणारे पदार्थहि आपल्या परिचयांतले व नेहमीं उपयोगांत येणारे असतात. तरी पण ॲलोपॅथिक विचारसरणीप्रमाणें त्यांच्या उपयोगाची जी रीति शरीरास बलप्रद, पौष्टिक आणि रोगप्रातिकारक्षम ठरणारी मानली गेली आहे, तीच आयुर्वेदशास्त्राच्या मताप्रमाणें त्याच्या अगदींच उलट म्हटली गेली आहे. कारण त्याचा नेहमीं किंवा प्रसंगोपात अधिक उपयोग केल्यानें त्यामुळें भयंकर रोग निर्माण होत असतात.

रोगकारक आहार पदार्थ

उदाहरणार्थ–(१) दही (२) मोड आलेलें धान्य (३) मैदा किंवा त्याचे बनविलेले पाव आदि पदार्थ, (४) खवा किंवा दूध फाडून तयार केलेलें पदार्थ, (५) क्षार, सोडा बाय कार्ब आदि (६) सुकविलेलें मांस किंवा मेंढी, गाय–बैल, मासे इ. चें ताजें मांस, ह्या एकाकी पदार्थांचा उपयोग अहितकारक आहे. तसेंच दुधाबरोबर एकाच वेळच्या जेवणांत किंवा त्यांत मिश्रण करून घेतलेले खालीं नमूद केलेले पदार्थसुद्धां अपायकारक आहेत.

रोगकारक मिश्रणें

(१) दूध आणि लताफळ— काकडी, खरबूज, दुध्याभोपळा; (२) दूध आणि कोणतेहि आंबट पदार्थ; (३) दूध आणि मीठ व मीठवाले पदार्थ; (४) दूध आणि दही; (५) दूध आणि मोड आलेलें धान्य; (६)दूध आणि पाव; (७· दूध आणि केळीं; (८) दूध आणि मासे; (९) दूध आणि मेंढीचें मांस; (१०) दूध आणि गाईबैलाचें मांस; (११) दूध आणि खिचडी.

दोन शास्त्रांच्या दोन स्वतंत्र भूमिका

अशा तऱ्हेनें दोन स्वतंत्र भूमिकेवर दोन्हीं शास्त्रांचें अवलंबन असल्यामुळें त्यांच्या विचारसरणीचा नित्य नैमित्तिक आहारासारख्या जिव्हाळ्याच्या विषयावर एक दुसऱ्याचा अगदीं उलट परिणाम कसा घडून आलेला आहे कीं, अॅलोपथी ज्याला उत्कृष्ट अन्न म्हणून त्याच्या उपयोगाविषयीं भर देत आहे तर त्याच्याच बाबतींत आयुर्वेद हा निषेधात्मक सूचना देत आहे. इतकेंच नव्हें तर त्याचा वर्षानुवर्ष सतत उपयोग केल्यामुळें जे जे भयंकर रोग निर्माण होऊं शकतात, त्यापैकीं कित्येकांच्या नांवांचा खालीं दर्शविल्याप्रमाणें निर्देशहि केला आहे. त्यांत कॅन्सर व क्षय यासारख्या अनेक रोगांचा समावेश झालेला आहे.

भेद कोठें आहे ?

म्हणून हा मतभेद शुद्ध आणि मिश्र ह्या दोन्हीं शिक्षणांतला नव्हे, किंवा डॉक्टर्स अथवा वैद्य म्हणून मिरवून घेणाऱ्या लोकांतला नव्हे, तर तो दोन्हीं शास्त्रें व त्यांच्या विचारसरणीचा आहे. तरीपण त्याच्यामुळें आज वाढत चाललेल्या कॅन्सर, स्नायुविकार व मस्तिष्कविकार ह्यासारख्या भयंकर रोगांच्या उत्पत्तीचे कारणांवर बराच प्रकाश पाडणारा आहे. पर्यायानें दिशासूचन करणाराहि आहे.

वाढत असलेले रोग

१) नपुसकत्व २) अन्धपणा ३) विसर्प ४) उदर ५) विस्फोटक ६) उन्माद ७) भगंदर ८) घेरी--चक्कर येणें ९) पोटफुगी १०) गळयांतील कॅन्सर इ. रोग ११) कावीळ १२) विषयुक्त आंव १३) कोड १४) संग्रहणी १५) क्षय १६) रक्त--पित्त १७ ताप १८) पीनस व तत्सम अन्य अनेक रोग किंवा हृदय बंद पडून मृत्यु सुद्धां घडूं शकतो.

सखोल दृष्टिकोनाची गरज

म्हणून आहारासारख्या साधारण समजल्या जाणाऱ्या विषयांच्या संशोधनाकरितां सुद्धां जेव्हां सखोल आयुर्वेदीय दृष्टिकोनाचीच गरज आहे तेव्हां इतर विषयांच्या संशोधनाच्या मागें अॅलोपॅथिक दृष्टिकोन ठेवल्यानें त्यांतून आयुर्वेदाच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें कांहींहि घडून येण्याची शक्यता निव्वळ भ्रामक आहे. ती कल्पनाच चुकीची आहे. म्हणून वैद्य पं. शिवशर्माजीनें मुंबई सरकारला जें कांहीं मार्गदर्शन केलें आहे तें योग्यच नव्हे तर मानव-आरोग्य-सेवेच्या दृष्टीनें बहुमोलात्मकहि आहे. सबब सरकारनें शक्य होईल तितकें लवकरच त्याची अमलबजावणी करणें हेंच इष्ट आहे. कारण दोन्हीं शास्त्रांमधील हें दुर्भेद्य अन्तर सोडविण्यांतच आयुर्वेदशास्त्र व आयुर्वेदीयांचें समुज्वल भवितव्य ठरलेलें आहे.

भ्रामक वाद

म्हणजे "त्रिदोष सिद्धांत" हाच आयुर्वेदाचा पाया आहे, आणि म्हणूनच त्या केन्द्रबिंदूला धरून त्याच्या भोंवतालीं जें जें घडून येणें शक्य आहे तें सर्वच आयुर्वेदीय आहे. अशा तऱ्हेनें शुद्ध आणि मिश्र ह्यामध्यें जो वाद आहे, तो भ्रामक वाद आहे. अर्थातच जेथें त्रिदोषाची कल्पना आहे तोच आयुर्वेद आहे, जेथें ती कल्पना नाहीं तेथें तो नाहीं, असें म्हटल्यास कांहींच हरकत नाहीं.

* * *

सेवा संघाचीं सर्व औषधें
तसेंच सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर गोरोचन, बाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाबळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—
देशी सर्वौषधी संग्रहालय
पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

पाश्चात्य रामबाण औषधें
लेखकः- डॉ. डी. ए. घाटगे, कागल
किंमत २॥ रु.
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

रुग्ण चिकित्सा —

सक्थि-शूल (मांड्या-पाय-दुखणें)

(लेखक-आयुर्वेदाचार्य **श्री. कृ. करमरकर**, चिकित्सा विभाग, आयुर्वेद सेवा संघ, नासिक)

रुग्ण क्रमांक ×××, वय १९ वर्षे, विवाहित.

प्रमुख तक्रार – (१) कंबरेपासून खालीं पाय ी, विशेषतः डावा जास्त, (२) कष्टार्तव.

इतिहास – गेल्या ४ महिन्यापासून ह्या तक्रारी सुरू झाल्या. गेल्या वर्षी तीन महिन्याचा स्राव झाला. त्या वेळेपासून तक्रारी सुरू. लग्न न दोन वर्षे झालीं. विवाहापूर्वी प्रकृति बरी. आतां क्षीणता येत आहे.

रुग्णपरीक्षण – काळेभोर कुरळे केस; ताम्र तांबडे) ओठ – तळहात – तळपाय – नखादि; कृश र, मांडींत, कंबरेंत कोणत्याहि प्रकारची विकृति नाहीं. ओठांवर लव, दंत विरळ व विषम (वात-प्रकृति, मांसमेद क्षीण व शुक्र असार) मलप्रवृत्ति नाहीं. विटाळहि कष्टानें व अल्प. योनि अत्यंत संकुचित व वक्र झालेली. तपासतांना सस्नेह बोटामुळेंहि वेदना. (पति – शुक्रक्षीण, वातप्रकृतीचाच.)

रोगपरीक्षण – शुक्रअसार व मांसमेदक्षीण अशा च्या शुक्रक्षीण व्यक्तीशीं संबंध आल्यामुळें अतिशय ानें संभोग. संभोग रडतच होई. सुख वाटत नाहीं. गर्भधारणाहि होऊं शकली नाहीं. झाली तीहि स्थिर नाहीं. मलप्रवृत्ति साफ नाहीं व पाय दुखण्यास सुरुवात झाली. यावरून शुक्रार्तवशकृन्मूत्रगर्भनिष्क्रमण क्रियः असा जो अपान तो प्रकुपित आहे व त्याला कारण शुक्रअसारत्व व वातप्रकृति.

वातसंचयकाल चिकित्सा

१) स्नेहन – योनीमध्यें नारायणतैलाचा पिचु णें व सर्वांगास तिळतैलाची मालीश (अभ्यंग)

२) मृदुविरेचन – स्वादिष्ट विरेचनचूर्ण अर्धा तोळा रोज गरम पाण्याबरोबर ४ दिवस.

३) अश्वगंधारिष्ट – १। तोळा प्रत्येक वेळीं जेवणापूर्वी दुप्पट पाण्याबरोबर (अपानकालीं) शुक्र-वर्धक म्हणून.

चिकित्सालय

ग्रीष्म ऋतूचा उत्तरभाग (वातसंचयकाल) चिकित्सा १५ दिवस झाली.

परिणाम

पायाचें दुखणें संपूर्णपणें थांबलें. पाळी कमी कष्टानें व विटाळ थोडा बरा गेला. योनींत पिचु ठेवतांना किंवा परीक्षणाचे वेळचा त्रासहि कमी कमी झाला. (संभोगहि कमी दुःखदायक). योनिवक्रता कमी झाली.

चिकित्सेचा विशेष

(१) निदान चिकित्सेंतील धातुसारासार परीक्षणाचें महत्त्व. (२) अपानाच्या विविध क्रिया दुष्ट झाल्या असतां त्याच्या भागांत स्नेहनानें उपशय. आयुर्वेदानें सर्व प्रकारच्या योनिरोगांत स्थानिक वातशामक चिकित्सा करावयास सांगितली आहे. त्या दृष्टीनें साध्या पिचु ठेवण्याच्या उपचारानें व बल्य असें अश्वगंधारिष्ट अपानकालीं दिल्यामुळें चिकित्सा सफल झाली.

शेगांव (मध्य-प्रदेश) येथें
आयुर्वेद सेवा संघ नाशिक या संस्थेचीं
अनेक ग्राहकांकडून प्रशंसिलेली सर्व
प्रकारचीं औषधें मिळण्याचें ठिकाणः—
खेतान मेडिकल स्टोअर्स
शेगांव (म. प्र.)

' कर्नल अमीरचंद ट्रस्ट ' तर्फे

वैद्यकीय संशोधनास पारितोषिकें

लेडी हार्डिंज मेडिकल कॉलेज, न्यू दिल्ली या वैद्यकीय शिक्षण संस्थेंतील माजी प्रधान–अध्यापक ले. क. अमीरचन्द यांनीं ' इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रीसर्च ' ह्या संस्थेस वैद्यकशास्त्रांतील संशोधनाबाबत सर्वोत्कृष्ट लेखन लिहून प्रकाशित करणारांस पारितोषिकें देण्याकरितां ५०००० रुपयांची देणगी दिली आहे. कौन्सिलच्या गव्हर्निंग बॉडीनें सदर रकमेच्या नियोजित व्यवस्थेकरितां ' कर्नल अमीरचन्द ट्रस्ट ' नांवाचा विश्वस्तनिधि स्थापन केला आहे.

सहा बक्षिसें दिलीं जातील

दरसाल अखिल भारतीय स्वरूपाचीं व साधारतः सारख्या किंमतीचीं (ज्यांत कांहीं पदकेंहि असूं शकतील) अशीं सहा बक्षिसें, ज्यांचें कोणत्याहि वैद्यकशास्त्रांतील व त्यांच्या कोणत्याहि क्षेत्रांतील (क्लिनिकल रिसर्चसहित) उत्कृष्ट लेखन प्रकाशित होईल अशा प्रथम सहा नंबरांना दिलीं जातील. ' क्लिनिकल रिसर्च ' ह्या संज्ञेंत रोगाचें कारण, त्याची संप्राप्ति व त्याचा प्रतिबन्ध आणि तंदुरुस्ती ह्या गोष्टी अभिप्रेत आहेत. त्याचप्रमाणें ह्या संज्ञेंत केवळ रुग्णालयांतील रुग्ण-चिकित्सा, त्याचें परीक्षण एवढीच अर्थव्याप्ति गृहीत नसून त्यांत सांथीचे रोग, सामाजिक स्वरूपाची चिकित्सा व त्या दृष्टीनें निरीक्षण ह्या गोष्टींचाहि समावेश होतो.

विगर वैद्यकीय स्नातक चालतील

उपरिनिर्दिष्ट सहा बक्षिसांपैकीं दोन बक्षिसें १० वर्षांपेक्षां कमी मुदतीच्या स्नातकांना दिलीं जातील; मात्र अशा स्नातकांचें प्रकाशन हें गुणमान्य ठरलें पाहिजे. असे स्नातक हे वैद्यकीय अगर विगर–वैद्यकीय असले तरी चालतील.

बक्षिसार्ह उमेदवारांची निवड ह्या कार्यकारि नेमलेलें सिलेक्शन बोर्ड करील.

संयुक्त प्रकाशनांत सहकारी लेखकांत बक्षिसा रक्कम सिलेक्शन बोर्ड ठरवील त्या प्रमाणांत वांट येईल.

प्रत्येकीं बाक्षिस ३०० रुपये

१९५४ सालांत ज्यांचें वैद्यकीय संशोधनात्म लेखन प्रकाशित झालें आहे व जें गुणवत्तेनें पहिल क्रमांकांत येईल अशा लेखकांना १९५५ साल प्रत्येकीं ३०० रुपयांचें बाक्षीस देण्याचें ठरविलें आ

' साएंटिफिक ॲडव्हायसरी बोर्ड ' व ' ॲ व्हायसरी कमिटीज ऑफ् दी इंडियन कौन्सिल ऑ मेडिकल रीसर्च ' ह्या संस्थांच्या नोव्हेंबर-डिसें १९५५ मध्यें भरणाऱ्या वार्षिक सभेच्या वेळीं देण्य येणारीं सहा बाक्षिसें जाहीर करण्यांत येतील.

निबंध पाठविण्याचा पत्ता

बाक्षिसेच्छु उमेदवारांनीं आपल्या १९५४ मधे प्रकाशित झालेल्या लेखनाच्या १५ छापील प्र सेक्रेटरी, इंडियन कौन्सिल ऑफ् मेडिकल रीसर्च ' पी ' ब्लॉक, रेझिना रोड, न्यू दिल्ली, ह्या पत्त्याव तारीख १ सप्टेंबर १९५५ च्या पूर्वी मिळतील अ बेतानें पाठविल्या पाहिजेत.

छोटें चरित्र व फोटो

लेखक अगर संयुक्त लेखकांनीं आपल्या प्रकाशनासोबत आपलें संक्षिप्त चरित्र व दोन ल फोटोहि (पासपोर्ट साइझचे) पाठवावेत.

पुणें येथें
' आयुर्वेद सेवा संघ, नासिक ' चीं
सर्व औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें २

“आयुर्वेदाचे ज्ञान प्रत्येक घरांत पोंचवा”

मंत्री श्री. नन्दा यांचा आयुर्वेदीयांना संदेश

“आयुर्वेद ही नित्य व सत्य वस्तु आहे. व या ठीं ती आवश्यक आहे. आज आपणास हें करावयाचें आहे कीं, आयुर्वेदांत सत्यता आहे. गुण आहेत. आधुनिक पद्धतीच्या कसोटीवर व प्रयोगांनीं सिद्ध करून दाखवावें लागेल कीं, द्धति निर्दोष आहे.

तुरुंगांत आयुर्वेदाचा अभ्यास

माझा आयुर्वेदाशीं परिचय बऱ्याच दीर्घ चा आहे. मी १९३२ मध्यें चरकाच्या आयु-र्वेदीय उपचार पद्धतीचें अध्ययन जेलमध्यें केलें हे. माझी अशी धारणा आहे कीं, रोगापासून मुक्त ण्यापेक्षां रोगी न होणें अधिक चांगलें आहे. त्या द्धांतामुळें आयुर्वेद आम्हांस निःस्वार्थ सेवेकडे न जातो.

आयुर्वेदांतलि मन विचार

माझा स्वतःचा अनुभव आयुर्वेदाचे बाबतींत सदा कूल असा आहे. सर्व देशभर हिंडून व लोकांना पाहून नन्तर माझें मत असें बनलें आहे कीं, सर्व शांत अधिक आकर्षण आयुर्वेदास आहे. आमच्या चार्यांनीं शरीराबरोबरच मनाचा विचार केला हे. व आत्म्याच्या आधारावर या शास्त्राची रचना ली आहे. या शास्त्रांत रोग्याला बरें करण्याचेच नव्हे र लोक आजारी पडूं नयेत या गोष्टीकडे पूर्ण ध्यान लें आहे. हजारों वर्षांपूर्वीं आमच्या आचार्यांनीं आपल्या ग्रंथांत लिहून ठेवलें आहे, व तीच गोष्ट आज डॉक्टर सांगूं लागले आहेत, ती अशी कीं, रीरापेक्षां मनाचा रोगावर अधिक प्रभाव पडतो.

नवीन संशोधन करावें

परंतु आजकाल आयुर्वेदाच्या नांवावर जे लोक म करीत आहेत ते खरोखर जनतेला तचि गोष्ट त आहेत काय ? आज तर काम थोडें व दाम अधिक या वृत्तीचे लोकच अधिक मिळतात. सबब आवश्यकता या गोष्टीची आहे कीं, आयुर्वेदाचें महत्व समजून परस्पर सहकार्यानें नवीन नवीन संशोधन करावें.

खेडेगांवांत सेवाभावी औषधालयें

आज आयुर्वेदाला अशा गोष्टींची आवश्यकता आहे कीं, जे विशेषतः खेडेगांवांतील लोकांत जाऊन आयुर्वेदाची सेवा करतील. आज मोठमोठीं साधनें शहरांत आहेत; परंतु यापैकीं कांहीं सामान्य गांवांतून सुद्धां असलीं पाहिजेत. आज खेडेगांवांतून सेवाभावी औषधालयांची अत्यंत आवश्यकता आहे.

व्यापारी संस्था कोणती ?

जी संस्था देशाच्या सेवेसाठीं पूर्ण शास्त्रीय पद्धतीनें खरीं औषधें तयार करून योग्य किंमतीला जनतेस देते व त्या व्यवहारापासून जो लाभ होतो तोहि जनतेच्या सेवेंतच खर्च करते, त्या संस्थेस व्यापारी संस्था कसें म्हणतां येईल ? संस्थेला स्वावलंबी बनविण्यासाठीं औषधविक्री, पुस्तकविक्री आदि सहायक साधनांचा उपयोग करून घेणें हिताचें आहे.

पंचवार्षिक योजनेंत व्यवस्था

अशा संस्थांना केंद्रीय सरकार सहायता देईल असा मला विश्वास वाटतो. यासाठीं पंचवार्षिक योजनेंत व्यवस्था आहे.

पूर्वीं घरांतील प्रत्येक व्यक्ति आयुर्वेदाचे नियम जाणत होती व त्याचें पालन करीत होती. आज सुद्धां आपण आयुर्वेदाचें ज्ञान घरोघर पोचविलें पाहिजे.

वरील विचार केंद्रीय नियोजन–मंत्री श्री. गुलझारीलाल नंदा यांनीं कालेराबोगडा (अजमेर) येथील आयुर्वेद भवनाच्या रजतजयन्ति उत्सवानिमित्त भाषण करतांना अध्यक्षस्थानावरून काढले.

दोन विचारसणीचे लोक

[आज राज्यकर्त्या मंत्रि–मंडळींतहि दोन विचारसरणीचे लोक आढळतात. केन्द्रीय मंत्रि-मण्डळ आयुर्वेदास प्रतिकूल आहे असा अनुभव वेळोवेळीं प्रसिद्ध होणाऱ्या सरकारी निवेदनावरून येत आहे. प्रान्तीय सरकारांतहि सरकारी मदत मिश्र आयुर्वेदास, व तोंड-देखली स्तुति शुद्ध आयुर्वेदाच्या वाट्यास असें दृश्य दिसत आहे. तथापि प्रादेशिक राज्य मंत्रिमडळांत व केंद्रीय मंत्रिमडळांत अल्पसंख्येंत कां होईना शुद्ध आयुर्वेदाला अत्यन्त अनुकूल असे कांहीं मंत्रि आहेत हें श्री. नंदा, श्री. मुरारजी या सारख्या कांहीं निर्भिड मंत्र्यांच्या वक्तव्यावरून दिसून येते. अशा वेळीं शुद्ध आयुर्वेदाच्या कार्यकारी मंडळींचें हें कर्तव्य आहे कीं, त्यांनीं आपल्या निर्दोष कार्यपद्धतीनें अशा मंत्र्यांचे हात बळकट करावेत व आगामी ५–१० वर्षांच्या कालांत भारतांत आयुर्वेदालाच राष्ट्रीय वैद्यकाचा मान मिळवून द्यावा. —संपादक]

पारडीची चौथी परीक्षा

शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमांत प्रवेश मिळविण्या–साठीं स्वाध्यायमंडळ पारडी (जि. सुरत) ची संस्कृतची चौथी परीक्षा प्रथम मान्य धरण्यांत आली होती. तिची मान्यता काढून टाकल्याचा ठराव नंतर पाठ्यक्रम समितीनें केला. त्यामुळें गतवर्षीं ज्यांनीं ती परीक्षा देऊन प्रवेश मिळविण्याची तयारी केली त्यांना अन्याय होणार होता.

भुसावळ येथें भरलेल्या म. प्रां. वैद्य संमेलनांत या संबंधीं एक ठराव (नंबर ११) आला होता व त्यावर एक तासाहून अधिक काळ चर्चा झाली होती. मंजूर झालेला ठराव शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीकडे पाठविण्यांत आला होता. त्याला आलेलें उत्तर पुढीलप्रमाणें आहे.

“ परिशिष्ट ‘जी’ हें १९५६ सालीं जूनपासून लागू करण्यांत येईल. १९५५ सालासाठीं तें लागू होणार नाहीं. ”

या उत्तरान्वयें यंदा पारडीसारख्या संस्कृतच्या चौथ्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांना आयुर्वेद प्रवेश मिळूं शकत आहे.

वाचकांचा पत्रव्यवहार —

ॲस्प्रोचे हानिकारक परिणाम

‘ ॲलोपॅथींतील भयंकर औषधें ’ हा लेख मी वाचला. माझ्या आढळण्यांत आलेल्या अस्प्रोच्या दुष्परिणामाची एक हकिगत पुढें देत आहे.

जमखंडी तालुक्यांत बनहट्टी या गांवीं माझे एक स्नेही × × × × सोडा वॉटरचा धंदा करतात. मार्च, एप्रिल, मे हे तीन महिने या धंद्याचा हंगाम असून त्यांचे दुकानांत या दिवसांत गिऱ्हाईकांची अतिशय गर्दी असते. दुर्दैवानें एप्रील महिन्यांत त्यांची प्रकृति पडसें, खोकला, डोकेदुखी व थोडासा ताप यांनीं बिघडली. धंद्याचा हंगाम असल्यामुळें त्यांनीं प्रकृतीकडे दुर्लक्ष करून तसेंच काम करणें चालूं ठेविलें.

ॲस्प्रोच्या तीन वड्या

दुसऱ्या दिवशीं तब्येतीस बरें वाटण्याकरितां त्यांनीं ॲस्प्रोच्या तीन वड्या एकाच वेळीं घेतल्या, व त्यावर ते कपभर चहा प्याले. त्यापासून त्यांना १० मिनिटांतच आराम वाटला व ते फिरून कामाव लागले. फिरून दुसऱ्या दिवशीं त्यांचें डोकें दुखूं लागलें, शैत्य वाटूं लागलें व थोडीशी तापाची कसरहि आली. म्हणून फिरून यांनीं ॲस्प्रोच्या ३ वड्या घेऊन वर एक कपभर चहा प्याले.

त्याचा परिणाम असा झाला कीं, थोड्याच वेळांत त्यांचे हातपाय गार पडले, पोटांत क्षोभ झाला व हृदयाची क्रिया फार जलद चालूं लागली. अशी स्थिति होतांच त्यांच्या मुलानीं ताबडतोब डॉक्टरला आणलें. डॉक्टरनीं त्यांची तब्येत पाहून त्यांना एक इंजेक्शन दिलें. त्यामुळें २ तासांनीं त्यांच्या हातापायांत उष्णता आली. परंतु पुढें दिवसेंदिवस त्यांची तब्येत अशक्त होत चालली.

अजूनहि कांहीं कांहीं वेळां त्यांच्या छातींत धडधड सुरूं होते व त्यांना ग्लानि येते. त्यांची पचनक्रिया बिघडली असून पोटांत वायूचा गुब्बारा होतो व पित्तांशहि फार वाढतो. तब्येत बरी होण्याकरितां ते गेल्या दोन महिन्यापासून औषधोपचार करीत आहेत.

अशा प्रकारें ॲस्प्रोचे हानिकारक परिणाम होऊन रुग्ण दुःखांत दिवस कंठित आहे.

वैद्य एस्. जी. जोशी, रबकवी

वैद्यांच्या विचारार्थ एक सत्य घटना

वातज पोटदुखीवर

हिंग--सागरगोटा (शङ्खहिंगुवटी)

आमच्या रबकवी गांवाजवळ आसंगी नांवाचें एक खेडें आहे. ह्या खेड्यांतील कोष्ट्याचा धंदा करणारा एक मनुष्य, वय सुमारें ३५ वर्षें. सुमारें ६ महिन्यापूर्वी त्याच्या पोटांतील डाव्या बाजूस शेवटच्या बरगडीच्या सुमारें एक इंच खालीं दुखूं लागलें, चावूं लागलें. ह्या दुःखामुळें त्यास काम करतां येईना व मनहि अतिशय बेचैन झालें. दुसऱ्या बरोबर बोलणेंहि त्यास दुःसह होई, व तो सारखा पालथा निजून राही.

त्यास खालील विकार होते. (१) तीव्र पोटदुखी (२) तीव्र बद्धकोष्ठ (३) भूक लागत नसे व अरुचि (४) वांती बिल्कुल नाहीं. (५) लघवी गरम व पिवळी.

बनहट्टी व रबकवी या गांवच्या बऱ्याच वैद्य-डॉक्टरांचें औषधोपचार व इंजेक्शनेंहि त्यानीं घेतलीं परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. नंतर तो रुग्ण आमच्या भागांतील मिरज येथील प्रसिद्ध हॉस्पिटलमध्यें औषधोपचारासाठीं गेला. तेथील ख्यातनाम डॉक्टरनीं त्याची प्रकृति तपासली व औषधोपचार सुरूं केला.

त्यांनीं रुग्णाचे खारट व गोड पदार्थ खाण्याचे बंद केले, रुग्णास पोटांत औषध व बाहेरून इंजेक्शन्स देण्यांत आलीं. पंधरा दिवसांत रुग्णास रुपयांत आठ आणे गुण आला. परंतु रुग्ण गरीब असल्यामुळें त्यास पथ्य व औषधोपचाराचा खर्च झेपेना म्हणून तो मधूनच आपल्या खेडगांवीं परत आला.

४ तो. सागरगोटा + १ तो. हिंग

परत आल्यावर फिरून त्याचें दुखणें वाढलें. या वेळीं तेथीलच एका वैद्यानें त्यास खालील औषध घेण्यास सांगितलें. सागरगोट्याचें बी ४ तोळे चांगलें लालसर भाजलेलें व १ तोळा चांगला हिंग. दोन्ही चांगलें कुटून त्याचें चूर्ण मधांत खलून त्याच्या बोराच्या बी एवढाल्या गोळ्या करावयाच्या व दररोज सकाळीं ह्या दोन गोळ्या ऊन पाण्याबरोबर घ्यावयाच्या. ही चिकित्सा त्यानें कांहीं दिवस केल्यावर त्याचा पोटदुखीचा आजार नाहींसा झाला व त्यास चांगलें बरें वाटलें.

हें औषध घेण्यास सुरुवात केल्यावर त्यास खालीलप्रमाणें त्याचे परिणाम दिसून आले. (१) पहिल्या दिवशीं त्यास बराच अपानवायु सरून गेला. (२) ३।४ दिवसांत त्यास चांगली भूक लागूं लागली. (३) त्याचें बध्दकोष्ठ नाहींसें झालें व त्यास रोज सकाळीं एकदांच शौचास साफ होऊं लागलें. आतां त्याची प्रकृति अगदीं उत्तम आहे. वैद्यांनीं हा प्रयोग अग्निमांद्य व बद्धकोष्ठ असलेल्या रुग्णांच्या बाबतींत जरूर करून पाहावा.

रबकवी — वैद्य एस्. जी. जोशी

थंडगार
नेत्रांजन
डोळ्यांचे विकारावर उत्कृष्ट
कृष्णशास्त्री बिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

प्रत्यक्ष रस व अनुमित रस

लेखकः— **वैद्य श्रीनिवास जळूकर** D. A. S. F. आयुर्वेद सेवा संघ, नासिक.

आयुर्वेदशास्त्रांत औषधाचा उपयोग करण्यापूर्वी तें कोणत्या रसाचें आहे, कोणत्या वीर्याचें आहे त्याचा विपाक कोणता, इत्यादि विचार करावा लागतो. वीर्य, विपाक, प्रभाव हे जरी शक्तीनें रसापेक्षां प्रभावी असले व त्यामुळें अधिक कार्यकारी असले तरीं त्यामुळें रसाचें महत्त्व कमी होत नाहीं.

शरीर हें पंचमहाभूतांपासून निर्माण झालें आहे, व औषधेंहि पंचमहाभूतांपासून निर्माण झालीं आहेत, म्हणून शरीरावर द्रव्याचें कार्य घडतें. शरीरावर कार्य घडण्यापूर्वी बहुधा त्याचें रसज्ञान होतें. जिभेवर पडलेलें द्रव्य बोधक कफाशीं संयुक्त होतें, व हा संयोग घडविण्यांत सर्व देहांत असणारा व म्हणून जिव्हेंद्रियाचे ठिकाणींहि कार्य करणारा अग्नि कारण होतो, व त्यामुळें बोधक कफ व तें द्रव्य यांचा सूक्ष्म द्राव तयार केला जातो. त्या द्रावाचें वहन प्राणवायूचे योगानें घडतें व तो संयोग (इंद्रिय व अर्थ यांचा संयोग) मन, बुद्धि व आत्मा यांचेपर्यंत पोंचविला जातो, त्यामुळें आपणांस रसाचें ज्ञान होतें.

हें रसज्ञान झाल्यानंतर शरीराकडून त्या रसाची प्रक्रिया 'ल्हादनोऽक्षप्रसादनः' वा हर्षणो रोमदंतानां अक्षिभ्रुवविकोचनः। कषायो जडयेत् जिव्हां इ. प्रकारें प्रकट केली जाते. आणि तें बघून दुसऱ्यासहि समोरची व्यक्ति कोणता रस सेवन करीत आहे याची अनुमिति होते.

रसांची निर्मिति

पंचमहाभूतांचे गुण पाहिले म्हणजे असें आढळून येतें कीं, रस हा जलाचा गुण आहे. व जल-महाभूत हें रसाच्या निर्मितींत व रसाच्या व्यक्तीसाठीं अत्यंत जरूर असलेलें महाभूत आहे. आकाशांत मूलतः असलेलें अव्यक्त रसाचें जल, हें आकाशांतून खालीं येत असतां, व द्रव्यांच्या घटनेंत रसव्यक्तीसाठीं भाग घेत असतां निरनिराळ्या प्रमाणांत निरनिराळ्या महाभूतांचें त्यांत मिश्रण होतें व त्या जलांत निरनिराळे रस उत्पन्न होतात. असे जल जेव्हां द्रव्याशीं संयुक्त होतें तेव्हां द्रव्यांत निरनिराळे रस निर्माण होतात. रस हा द्रव्याचा गुण आहे व हा गुण द्रव्याचें आश्रयानें असतो वा द्रव्य व गुण यांचा समवाय संबंध असतो. यावरून द्रव्य आश्रय व रस आश्रित आहेत. आणि म्हणून समवाय संबंधानें असले तरी ते गुण गौण [दुय्यम] आहेत व द्रव्याच्या नंतर निर्माण झालेले आहेत हें सिद्ध होतें. तर्कशास्त्रदृष्ट्याहि एक क्षण कां होईना पण द्रव्य हें निर्गुण असतें हें मान्य केलेले आहे. अर्थात् पंचमहाभूतांचा विशिष्ट निर्गुण संयोग म्हणजे द्रव्य व त्यांत नंतर निर्माण होणारा गुण रस हा होय. वरील सर्व विवेचनावरून द्रव्याचीं घटक महाभूतें व रसाचीं घटक महाभूतें वेगळीं असूं शकतात हें सिद्ध होतें आणि म्हणून 'विचित्र प्रत्यारब्ध' द्रव्यांचें वर्णनावरूनहि तीच गोष्ट स्पष्ट दिसते.

रसाच्या दोन व्याख्या

(१) रसनाग्राह्यो गुणो रसः। (२) रसो निपाते द्रव्याणाम्॥ या दोन व्याख्यांवरून रस कोठें व्यक्त होतो हें स्पष्ट होतें. पण आयुर्वेदशास्त्रांत सुवर्णादि धातूंचे वा धातुभस्मांचेंहि रसवर्णन केलें आहे. त्यांचा प्रत्यय रसनेंद्रियामुळें येत नाहीं. अर्थात् त्यांचे रस हे कार्यानुमेय आहेत व यावरून ते रस 'रसनाग्राह्य गुण' नाहींत, तर त्यांच्या कार्यावरून ही रसानुमिति केलेली आहे.

यावरून रस हे प्रामुख्यानें दोन प्रकारचे मानावे लागतातः— [१] इन्द्रियग्राह्य [२] अनुमित रस. अर्थात् धातु, भस्में इत्यादि सर्वांच्या रसांचा समावेश, कार्यावरून त्यांची अनुमिति होते म्हणून अनुमित रसांत करावा.

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नासिक

जनताजनार्दनाचें उदार साहाय्य

शुद्ध आयुर्वेदास सरकारी मान्यता जाहीर झाल्यानंतर लोकांची अशी समजूत (गैर) झाली आहे कीं, सरकार या शिक्षण–पद्धतीस आर्थिक मदतहि करीत आहे. पण ही गोष्ट खरी नाहीं. शुद्ध आयुर्वेदास मुंबई सरकारचा पाठिंबा जाहीर होऊन दोन वर्षें झालीं. तथापि या शिक्षणासाठीं, अगर अशा प्रकारच्या शिक्षणासाठीं लागणाऱ्या आरोग्यशालांसाठीं मुंबई सरकारनें अद्याप एक दिडकीहि खर्च केलेली नाहीं. इतकेंच नव्हें तर पुढें एवढी रक्कम देऊं, अशा पद्धतीनें देऊं, असें आश्वासनसुद्धां दिलेलें नाहीं.

स्वार्थत्यागपूर्वक शिक्षण

आज मुंबई राज्यांत ३०० हून अधिक विद्यार्थी शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यास करीत आहेत. या सर्वांचें शिक्षण वैद्यमंडळींच्या स्वार्थत्यागावर व अशा कार्यासाठीं जनतेकडून मिळणाऱ्या निःस्वार्थ अशा देणग्यावर चाललें आहे. ज्यांना शुद्ध आयुर्वेदाची गोडी आहे अशी मंडळी त्याच्या प्रचारार्थ आपला देह, आपली वाणी, आपलें मन, आपलें अल्पस्वल्प धन देत आहेत. व या त्यांच्या त्यागाच्या जोरावरच शुद्ध आयुर्वेदाचा पाया घातला जात आहे व इमारत उभारली जात आहे.

हें श्रमदानाचें युग आहे. आयुर्वेदाच्या क्षेत्रांतहि श्रमदान चालूं आहे. जनताजनार्दन हें द्रव्यदान देऊन त्यांत भागीदार होत आहे त्याबद्दल शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचा अध्यापकवर्ग त्यांचा ऋणी आहे.

१ रु. देणगी देणारे

सर्व श्री. सटाण्याचे सु. कृ सोनवणे, द. त्र्यं. कुलकर्णी, बा. गो. चंद्रात्रे, उस्मान काळूभाई, पी. आर. पाठक, लोहणेरचे गो. वि. देशमुख, पां. उ. धामने, श्री. वि. देशपांडे, चिं. पां. महाजन, भी. मो. परदेशी, र. ग. यार्दी, बा. सा. धामने, मु. पी. गोगड, मुंजवाडचे द. र. चंद्रात्रे, ना. पा. पाटील,

रु. २ देणगी देणारे

लोहणेरचे सर्व श्री. रावतमाल रूपचंद मारवाडी, सटाण्याचे श्रीनिवास श्रीधर कानडे.

जून महिन्याचे दुसऱ्या पंधरवाड्यांत सटाणा भागांत शुद्ध आयुर्वेद विद्यालयाच्या कार्याचा प्रचार वै. ग. म. लोखंडे यांनीं सटाणा, लोहणेर, मुंजवाड या गांवीं केला, त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

श्री. प्र. वा. खेर यांचें प्रचारकार्य

शुद्ध आयुर्वेद विद्यालय व आरोग्यशाला यांचे प्रचारक श्री. प्र. वा. खेर यांनीं मे व जून महिन्यांत मिळविलेल्या देणग्या पुढीलप्रमाणें आहेत :—

देणगी देणारांचीं नांवें (ता. ७-५-५५ ते ६-७-५५)

रुपये ११

श्री. वसंतसा क्षत्रीय, भिकुसा प्रेस, नासिक

रुपये १०

श्री. म. श्री. आपटे, असि. जज्ज, नासिक

रुपये ५

श्री. रा. अ. मिरजकर, अध्यक्ष नाशिक नगरपालिका; श्री. द. अ. थत्ते; श्री. वि. पं. साठे वकील; श्री. स. मं. लाड (Deputy Director of Industries), कार्यवाह राष्ट्रसेविका समिति; श्री. माधवराव शुक्ल (नाशिक मेडिकल स्टोअर).

रुपये २

वैद्य ना. ज. पाध्ये, कोल्हापूर;

श्री. न. गो. पंडित, R. T. O., नासिक

रुपया १

सर्व श्री. वि. वा. चांदोरकर, विश्वासराव डावरे (पुणें), आबासाहेब अष्टपुत्रे, पेन्टर क्षेमकल्याणी, बाळासाहेब चांदोरकर, पां. ना. गाडगीळ (दादर),

अंधोर बंधु, श्री. गो. राजपाठक, पुणें (१। रु. दे गी) सौ. यशोदाबाई विंझे (पुणें), बा. य. धारप, भा. वि. पटवर्धन, रामभाऊ साठे, क. वि. कुलकर्णी, श्री. सं. निंबोरकर, डॉ. बापूसाहेब गुत्ते, त्र्यं. गो. प्रधान, त्र्यं. ना. राजेबहाद्दर, श्रीमती युगंधराबाई घाटे, श्री. सरोजिनीबाई देशपांडे, पं. शं. सातपूरकर, बाळासाहेब सुकेणकर, गो. दा. आगरकर, बा. अ. दाते, न. शा. दाणी, ना. गो. वांद्रेकर, ग. वि. लोंधे, प्रभाकरपंत मोडक, माणिलाल जे. देसाई, ल. रा. बापट, श्री. र. वर्तक, श्री. वि. केळकर, ग. गो. माटे, नानासाहेब बालाजीवाले.

एक रुपयापेक्षां कमी देणग्यांची जमा झालेली एकूण रक्कम रु. १५। रुपये आहे.

गुरुपूर्णिमेनिमित्त वैद्यराज वि. म. गोगटे यांनीं बैठक (सतरंजी इ.) खरेदीसाठीं १५ रु. रोख दिले आहेत.

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नाशिक.

मंगळवार ता. ५ जुलै रोजीं सायंकाळीं ४ वाजतां शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत गुरुपूर्णिमेचा उत्सव वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. त्याप्रसंगीं हं. प्रां. ठाकरसी कॉलेजचे प्राध्यापक राजदेरकर यांचें व्याख्यान झालें. प्रारंभीं प्रार्थना व पूजा झाल्यानंतर वै. वि. म. गोगटे, वै. ल. भा. काळे, वै. पां. प्र. दाणी, वै. वा. स. मराठे, वै. शा. धों. कुळकर्णी, वै. श्री. कृ. करमरकर, वै. श्री. द. जळूकर व वै. बिंदुमाधव पंडित यांचीं व्याख्यानें झालीं.

प्रसाद वाटल्यानंतर हाताच्या बोटांनीं पडद्यावर पशुपक्ष्यादिकांचीं छायाचित्रें दाखविण्याचा करमणुकीचा कार्यक्रम श्री. ना. रा. शुक्ल यांनीं करून दाखविला. सर्वांना तें कौशल्य फारच वैशिष्ट्यपूर्ण वाटलें.

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं
आयुर्वेदिक व युनानी वनौषधि
तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण !

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार, गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राह्मी, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य ! विशेष माहितीसाठीं आमचे साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६
टेलिग्रॅम–आयुर्वेद

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी
२४५ काळबादेवी रोड, मुंबई

सिक जिल्हा—

कुष्ठरोग निवारण मंडळ, नासिक

नाशिक हें भारतांतील महान् क्षेत्र आहे. येथें यात्रेकरूं आपले पदरीं पुण्य जोडण्याकारितां असतात. त्यामुळें येथें भिक्षेकऱ्यांची गर्दी फार त्यांतील शेंकडा ७५ टक्के भिक्षेकरी कुष्ठरोगी त. त्यांनीं वाघाडी, गणेशवाडी व इतरत्र वस्ती केली आहे. नातलगाकडून व समाजा- तिरस्कृत झालेनें हे हीन, दीन व पंगू कुष्ठरोगी क्षेत्रांत येऊन राहिले आहेत, व येथेंच त्यांनीं ले संसार थाटले आहेत. त्यांचीं जवळ जवळ मुलें आहेत. ह्या मुलांस संसर्गानें रोगाची बाधा ल्याशिवाय रहाणार नाहीं, व तीं रोगी झालीं कीं, प्रत्येकापासून दहा जणांना तरी रोगाची बाधा णारच. ह्या मुलांची काळजी त्यांचे आईवडील घेऊं त नाहींत.

रोगाचा फैलाव थांबण्याच्या दृष्टीनें मंडळानें तील निरोगी मुलांस रोगापासून वांचविणेसाठीं शुविहार काढण्याचें ठरविलें आहे. ह्या सर्व मुलांची सिव्हिल सर्जनकडून तपासणी झाली असून त्यांतील फक्त १५ ते २० मुलें शिशुविहारांत घेण्यास योग्य आहेत असें आढळून आलें व बाकीच्यास रोग झालेला आढळला.

मुलांसाठीं शिशुविहार

शिशुविहारासाठीं आग्रारोडवरील वैद्यरत्न करशास्त्री यांचा बंगला भाड्यानें घेतला असून तो दुरुस्त केला आहे व तेथें लवकरच "शिशुविहार" सुरू होणार आहे. त्यासाठीं मंडळास सर्व प्रकारच्या मदतीची अपेक्षा आहे. दर मुलाप्रत द. म. रु. २५ ते ३० खर्च येणार आहे. जनतेनें ह्या कामीं मंडळास सढळ हातानें मदत करावी, हीं विनंति.

अपंग रोग्यांना दूध

मंडळाचे प्रयत्नानें आज वरील सर्व मुलांस व कांहीं अपंग कुष्ठरोग्यांस दररोज पावशेर दूध दिलें जात आहे. सदर दूध हें येथील रेड क्रॉस संस्थेतर्फें मोफत दिलें जातें, त्याबद्दल सदर संस्था अभिनंदनास पात्र आहे.

३२ लाचार कुष्ठरोगी

कुष्ठरोग्यांपैकीं ३२ रोगी लाचार असून त्यांना भिक्षा मागणेंहि अशक्य झालें आहे. मार्च महिन्यांत एका लाचार कुष्ठरोग्याचा भूकबळी पडला. नासिककरांना ही गोष्ट कमीपणा आणणारी होती. श्री. मधुकरपंत यार्दी, कलेक्टर, जिल्हा नासिक व सौ. अनुसूयाबाई यार्दी यांचे व इतरांचे प्रयत्नानें वरील ३२ लाचार रोग्यांसाठीं ता. १४-३-१९५५ पासून दर सोमवारीं एक पायली ज्वारी किंवा बाजरी वांटण्यांत येत आहे. त्यासाठीं २५ सद्गृहस्थ द. म. रु. २ ते २० पर्यंत मदत देत असतात, व कांहींनीं वर्षासाठीं रु. ५० पर्यंत मदत दिली आहे. असे आणखी दरमहा मदत देणारे सहृदय महाभागांची मंडळास आज जरूरी आहे.

मंडळातर्फें उपचारकेंद्रांत उपचार करण्याकरितां एक मदतनीस श्री. गोडबोले यांची नेमणूक १ जूनपासून केली आहे. त्यामुळें कुष्ठरोग्यांस उपचार मिळणेस मदत झाली आहे. कार्यकारी मंडळाचे उत्साही कार्यकर्ते वैद्य वि. म. गोगटे हे दर शुक्रवारीं वरील उपचार—केंद्रांत तपासणीसाठीं जात असतात, हें त्यांस भूषणावह आहे.

मंडळाचे सर्व सभासदांस व सर्व जनतेस विनंति कीं, मंडळाचे कामीं शक्य ती मदत करावी.

—डॉ. य. स. शुक्ल, चिटणीस

बिनविरोध निवडणुकीचें फल

आयुर्वेद युनानी बोर्डाची निवडणूक बिन–विरोध झाल्यामुळें बोर्ड, उमेदवार व वैद्य मंडळें यांचे एकंदर ८ ते १० हजार रुपये खर्च होण्याचे वाचले. शिवाय संभाव्य मनोवेदना, संताप, दौडादौड ज्या ज्या खऱ्या खोट्या गोष्टी ऐकविल्या गेल्या असत्या त्यापासून ही आपली बचत झाली.

तेन त्यक्तेन भुंजीथाः

गृहस्थाश्रमासाठीं, नव्हें सर्वांसाठींच, वरील नियम सांगितला आहे. जो स्वतःसाठीं अन्न शिजवितो व खातो तो चोर होय असेंहि म्हटलें आहे. अन्न शिजविल्यानंतर योग्य गरजू व्यक्तींना देऊन मग आपण सेवन करावें हा धर्म आहे. आजच्या काळांत रोज जेवणापूर्वी अशी गरजू व्यक्ति शोधणें व त्याला आपणास शक्य असें अल्पस्वल्प देणें कठीण आहे. अन्न सेवन करण्यापूर्वी चित्राहुती द्याव्यात व मगच प्राणहुती सेवन कराव्यात हा क्रम आहे. त्यांतहि त्यागाची हीच कल्पना आचरणांत आणली आहे.

वर्षाच्या ३६५० आहुती

वर्षाचे दिवस ३६५. व रोज २ वेळां भोजन म्हणजे वर्षाचीं ७३० भोजनें. प्रत्येक भोजनाच्या वेळीं ५ चित्राहुती द्यावयाच्या म्हणजे एकूण आहुती ३६५० होतात. अलीकडे बऱ्याच लोकांना पानाबाहेर जमिनीवर अशा भाताच्या आहुती घालून त्या खरकट्यांतून उकीरड्यावर जाणें प्रशस्त वाटत नाहीं. (पूर्वीच्या काळीं निदान खरकटें गाई–म्हशींच्या पोटांत तरी जात असें; तशीहि आज शक्यता नाहीं.)

प्रत्येक भोजनापूर्वी १ पै

प्रत्येक भोजनापूर्वी १ पै एवढ्या किंमतीचें अन्न(आहुती दुसऱ्यास द्यावयाचें ठरविलें तरी वर्षाच्या ७३०पया म्हणजे ३रु. १२ आणे १०पै अथवा ३ रु. १३ आणे होतात. एखाद्या योग्य संस्थेस दरसाल ३ अगर ४ रु. देण्याचा [अगर दरमहा ४।५ आणे] नियम करून व तो पाळून आपणास हें भोजनापूर्वी अल्प स्वल्प त्यागाचें व्रत आचरतां येतें असें मला वाटतें. पात्रावर जेवणास बसल्यानंतर अन्न ग्रहण करण्यापूर्वी त्या संस्थेचें व आपण केलेल्या स्वल्प दानाचें स्मरण करावें म्हणजे झालें.

एक संस्था निवडावी

ज्या संस्थांना दान करणें आपणास पसंत पडेल अशा अनेक संस्था देशांत आहेत. त्यांतून आपणास कोणतीहि एक निवडतां येईल. वा दरसाल नवीन संस्थेलाहि ही अल्प देणगी येतां आयुर्वेदशास्त्र हें भरभराटीस यावें असें ज्यांना असेल त्यांनीं अशी देणगी आपणास पसंत एखाद्या आयुर्वेद विद्यालयास वा आयुर्वेदीय रुग्णालयास [आरोग्यशालेस] द्यावी.

सत्पात्रीं दान

आज देशांत दुसरा महत्वाचा प्रश्न कुष्ठरोग निवारणाचा आहे. कुष्ठरोग्यांना भीक मागावयास लागू नये व त्यांनीं रोगमुक्त होऊन इतरांना होणारा सर्संग टाळावा यासाठीं ठिकठिकाणीं कुष्ठनिवास, शिशुविहार निघत आहेत. त्यांना मदत करणें हें सत्पात्रीं दान केल्यासारखें आहे. अमरावती येथें दे. भ. शिवाजीराव पटवर्धन यांनीं श्रीजगदंबा कुष्ठनिवास नांवाचा मोठा आश्रम सुरूं केला असून ते स्वतः सपत्नीक कुष्ठरोग्याच्या सेवेसाठीं २४ तास तेथें जाऊन राहिले आहेत. या संस्थेला मदत करण्याचा एक मार्ग म्हणून त्यांनीं महारोगी–मित्र–संघ स्थापन केला आहे. त्याचे सभासद होण्याची वर्गणी वार्षिक ३ रु. आहे. आजवर त्याचे ४५० चे वर सभासद झाले आहेत.

आर्यांचा विवेकपूर्ण आचार

नाशिक येथें स्थापन झालेल्या जिल्हा रोग-निवारण मंडळाचें पत्रक यांच अंकांत इतरत्र छापलें आहे. त्याचेहि सभासद आपणास होतां येईल. मासिक अगर वार्षिक मदत पाठवून त्यागपूर्वक भोजन करण्याचा आर्यांचा आचार आपण विवेकपूर्वक आचरणांत आणण्यांतच व्यक्तीचें व राष्ट्राचें कल्याण आहे.

जळगांव (पू. खा.) येथें
आयुर्वेद सेवा संघाचीं प्रभावी औषधें
मिळण्याचें प्रमुख ठिकाण
शहाणे मेडिकल स्टोअर्स, जळगांव

चहा-पेयाचे गुणदोष कोणते ?

(लेखकः— वैद्य बिंदुमाधव पंडित, नासिक)

भुसावळ येथें भरलेल्या वैद्यसंमेलनाचे अध्यक्ष आयुर्वेदाचार्य पांडुरंग हरी देशपांडे यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत 'चाहगुणाः' संस्कृत श्लोकांत ग्रथित करून आपली चहाभक्ति व तदनुषंगानें ज्ञात झालेले गुणावगुण निवेदन केले आहेत. अध्यक्षीय भाषणांत हा 'चहाचा' विषय गोवल्याबद्दल त्यांना धन्यवाद देणारे लोक आहेत, तसेच कांहीं नाकें मुरडणारेहि आहेत, हें आम्हास माहीत आहे. कांहीं कां होईना स्थानीं वा अस्थानीं पण या विषयाचा उपन्यास केल्याबद्दल मीं श्री. देशपांडेशास्त्री यांना धन्यवाद देतो, व अशाच प्रकारें कॉफी, कोको, सोडा, लेमन आदि पदार्थांचे त्यांनीं कल्पिलेले वा अनुभविलेले गुणधर्म लिहून प्रसिद्ध करावेत अशी मी त्यांना वाचकांतर्फे नम्र विनंति करतो.

तेरा श्लोकांत वर्णन

श्री. वैद्यराज देशपांडे यांनीं चहाचे गुणधर्म १३ श्लोकांत वर्णिले आहेत. ते केवळ चहाच्या पानांचे नसून पेय चहाकल्पाचे आहेत. बहुतेक श्लोकांतील वर्णन मतभेदातीत आहे. चहापेयाचा रस स्वादु, तिक्त, कषाय असा सांगितला असून विपाक अम्ल सांगितला आहे, वीर्य उष्ण सांगितलें आहे, हें सर्व ठीक आहे.

लेखनाची सामुग्री

मी स्वतः आयुष्यांत एकदांहि चहापान केलेलें नाहीं. त्यामुळें स्वानुभवानें चहापेयाचे गुणधर्म मला माहित नाहींत. पण गेलीं ३० वर्षें वैद्यकीय व्यवसायांत जें निरीक्षण मीं केलें आहे त्याच्या अनुरोधानें चहासंबंधींची माझी माहिती मी वाचकांना सादर करणार आहे. हा लेख लिहितांना कोणावरहि आक्षेप घेण्याचा माझा हेतु नाहीं. श्री. पां. ह. देशपांडे यांनीं ज्या शुद्ध बुद्धीनें चहापेयाचे गुणधर्म सांगितले त्याच बुद्धीनें मी हा लेख लिहित आहे. चहासंबंधीं माहिती घेण्यासाठीं मी ब्रुक बॉण्ड कंपनीच्या फिरत्या एजंटाशींहि थोडी चर्चा केली असून वैद्यराज वेणीमाधवशास्त्री आदि वैद्य मंडळीशींहि प्रसंगोपात्त विचारविनिमय केला आहे. पुढें दिलेल्या माहितींत त्या सर्वांचा निष्कर्ष आला आहे असें वाचकांना दिसून येईल.

माझा हा लेख लेखकांना चहासंबंधीं आपले विचार प्रगट करण्यास स्फूर्ति देईल असें मला वाटतें.

मूळद्रव्याचे गुणधर्म

आयुर्वेदांत एखाद्या द्रव्याचें गुणधर्मवर्णन देतात तें त्याच्या मूळ स्थितींतील असतें. उदाहरणार्थ, तांदळाचे, नारळाचे, गुळाचे गुण हे त्याच्या मूळ स्थितींतील द्रव्याचे असतात, मोदकाचे नसतात. तद्वत् मला असें म्हणावेसें वाटतें कीं, जर आपणास चहासंबंधींचा निघंटु लिहावयाचा असेल तर चहाची पूड अगर चहाचा फांट पाणी। याचे ते गुणधर्म असावेत. आयुर्वेदांत कृतान्नवर्ग स्वतंत्र दिला आहेच, त्या सदरांत मग चहा-दूध-साखर-पाणी या मिश्रित अन्नपदार्थांचा विचार घालतां येईल.

चहाची चव, कडु तुरट

हा लेख लिहिण्याच्या वेळींच मी चहाचा ताजा फांट तयार करून त्याची चव घेतली आहे. मला ती कडु तुरट अशी लागली. कडु तुरट हे दोनहि रस कफपित्तशामक व वातप्रकोपक आहेत. त्यामुळें चहा हें द्रव्य कफपित्तशामक व वातप्रकोपक आहे असें माझें मत झालें. वातप्रकोपामुळें झोंप घालविणें हा परिणाम होणें स्वाभाविक आहे. जे पित्तप्रकृति लोक आहेत त्या लोकांनीं कांहीं खाऊन चहाचा फांट पाणीं घेतला असतां त्यांना लाभ होणें शक्य आहे. तसेंच तिक्त व कषाय हे रस कफनाशकहि आहेत, त्यामुळें कफप्रकृति वा कफविकारी लोकांनाहि चहाचा फांट (पाणी) लाभदायक होणार आहे. ते तर कांहीं न खातांहि कफकाळीं

चहाचा नुसता फांट घेऊन कफकालाचा परिणाम घालवूं शकतील. वातप्रकृति लोकांना चहापासून नुकसानच होईल. माझ्या मतें चहाचे गुणधर्म हे अशा पद्धतीनें वर्णन केले पाहिजेत; अर्थात् ग्रंथांत प्रकृतिभेदानें गुणधर्म सांगण्याची पद्धति नसली तरी जी पद्धति आहे त्यावरूनहि कोणत्या प्रकृतीस हें द्रव्य मानवेल व कोणत्या प्रकृतीस हें द्रव्य निश्चित बाधेल हें कळूं शकतें.

संयोग-विशेषानें गुणधर्मांत बदल

चहाचें गुणधर्म सांगतांना प्रथम त्याचे रस, वीर्य, विपाक, प्रभाव सांगावेत, व मग त्याच्या निरनिराळ्या संयोग--विशेषांचे विशेष गुणधर्म मांहित असल्यास द्यावेत. चहा दूध साखर घालून पितात, तसाच लिंबू साखर बर्फ घालूनहि पितात. दूध साखर घालण्याचें प्रमाणहि पुष्कळांचे बरेंच कमी अधिक असतें व त्यामुळें त्याचे गुणधर्म बदलतात. उदाहरणार्थ, कांहीं मंडळी दूध साखर फारच कमी वापरतात व कडक चहा पितात, तर कांहीं मंडळी दूध जास्त वापरून चहाची पूड नांवालाच टाकतात. अर्थात् अशा भिन्न मिश्रणाच्या चहाचे गुणधर्म एकाच प्रकारचे येणें शक्यच नाहीं. समजा, असें मानलें कीं बै. देशपांडे यांनीं जें प्रमाण दिलें आहे [१६ तोळे पाणी, अर्धा तोळा चहा, पंचमांश म्हणजे ३। तोळे दूध, व १॥ तोळा साखर] तें सुद्धां सर्व प्रकृतीच्या लोकांवर एकच प्रकारचा परिणाम करील असें नाहीं.

चहाचा फांट रुचकर नाहीं

चहागुणाचे जे तेरा श्लोक दिले आहेत त्यांचें आपण क्रमानें परीक्षण करूं. पहिल्या श्लोकांत पर्याय शब्द दिले आहेत. शेवटचें फांटस्तस्य प्ररोचकः । हें विधान बरोबर वाटत नाहीं. चहाचा फांट म्हणजे उकळत्या पाण्यांत पूड टाकून गाळून घेतलेलें पाणी. हें रुचकर नाहीं, प्ररोचक तर नाहींच नाहीं; उलट कडु [व तुरट] म्हणजे अरोचिष्णुः (तिक्तः स्वयं अरोचिष्णुः) असें आहे. अर्थात् त्याचा अर्थ पुढें रुचि उत्पन्न करणारा असा घ्यावयाचा असेल तर गोष्ट निराळी.

चहा परिणामी शीतवीर्य व्हावा

चहा कोठें तयार होतो? तो कसा तयार होतो इत्यादि, हें श्लोक २।३ मधील वर्णन भारतापुरतें तरी वादातीत आहे. पेयँचहाचे जे घटक आहेत त्या प्रत्येक घटकाचे रस, वीर्य, विपाक आपण लक्षांत घेतले पाहिजेत. चहा करतांना प्रथम पाणी व साखर उकळत ठेवतात. हीं दोनहि द्रव्यें मधुर रसाचीं व शीतवीर्य आहेत. त्यानंतर त्यांत चहाची पूड टाकतात. ती कडु तुरट रसाची आहे. व शेवटीं दूध घालतात. तें मधुर रसाचें व शीतवीर्य आहे. कडु तुरट रसांचें वीर्यहि शीत आहे. अर्थात् या सर्व पेयाचें परिणामी वीर्य हें शीतच असावयास पाहिजे असें त्यांतील घटक द्रव्यांवरून वाटतें.

थंडीच्या दिवसांत चहा

थंडीच्या दिवसांत चहा एक वेळ वा दोन वेळ घ्यावा असें म्हटलें आहे. पण चहाचा नुसता फांट रिकाम्या पोटीं घेण्यानें थंडींत लाभ होणार नाहीं. त्यासाठीं पूर्वी कांहीं खावें लागेल व त्या फांटांतहि दूधसाखर घालावी लागेल. थंडीच्या दिवसांत भूक जास्त लागते. थंडीच्या प्रतिकारार्थ (मधुर) अन्नद्रव्य अधिक लागतें.

आयुर्वेद सेवा संघ औषधी भवनांत
तयार मिळणारें अनुभविक सिध्द औषध
रौप्यसुवर्णसूतशेखर
सुवर्णसूतशेखर औषधांत सुवर्णासहित १७ औषधी घटक द्रव्यें असतात. त्यापैकीं शुद्ध बचनाग हें एक द्रव्य आहे. तें स्वेदल आहे. आधींच घाम येत असलेल्या व्यक्तींना बचनागविरहित औषध हितावह देणें असतें. रौप्यभस्म हें वातशामक आहे. कोणत्याहि जीर्ण विकारांतील वातपित्तात्मक दोष दूर करण्यासाठीं रौप्यसुवर्णसूतशेखर ही मात्रा उपयुक्त आहे. किंमत पावतोळा २॥ रु.

अनुपान म्हणून कोरा चहा

लघु वा गुरु आहारानन्तर (वा आहारामध्यें अनुपान म्हणूनसुद्धां) कोरा (बिन दूधसाखरेचा) चहा हितावहच होईल. दूध साखर घातल्यामुळें तो एक आहार द्रव्यच बनला आहे. मग त्याचें स्वरूप अनुपानाचें राहत नाहीं.

विपाक अम्ल कां ?

चहाचा विपाक अम्ल कां, व वीर्य उष्ण कां याचा विचार करावयास हवा. चहाचा फांट हा कडु तुरट रसाचा असल्यामुळें त्याचें वीर्य शीत असावयास हवें, व विपाक फार तर कडु (वातप्रकोपक) व्हावयास हवा; त्याऐवजीं अम्ल पाक होण्याचें माझ्या लक्षांत येणारें कारण म्हणजे त्यांतील दूध व साखर या गोष्टी होत. पोटांत गेल्यावर दूध आंबतें. व साखरहि आंबतें. रोज कमींत कमी दोन वेळ असें साखरयुक्त दूध पोटांत घेतल्यानें अम्लपित्त होण्याची संवय जडणें शक्य आहे. ज्यांच्या चहांत दूध व साखर यांचें प्रमाण कमी असेल त्यांना अम्लपित्ताचा विकार जडण्याची शक्यता नाहीं. व ज्यांचा विपाक अम्ल वा कटु होणार नाहीं त्यांना उष्णवीर्याचीहि बाधा होणार नाहीं. दूध, साखर हीं दोनहि द्रव्यें स्निग्ध, मंद, गुरु असतां रुक्षता वा तीक्ष्णता वा लघुता येण्याची शक्यता कमी वाटते. उलट भरपूर दुधाचा चहा पिणारीं माणसें मेदस्वी, बहुमूत्रविकारी किंवा कफरोगीच आढळतात. कमी दूध साखरेचा चहा हा लघु आहार म्हणून उपयोगी आहे. व तसाच तो खोकला, दमा, पडसें या रोगांवर काम देईल. शक्यतों बिन दूध साखरेचा चहाच खोकला, दमा व पडसें होणाऱ्या लोकांनीं वापरावा हें हिताचें आहे.

खरी भूक चहानें भरते

अन्न हें जेथें नकोसें वाटतें तेथें चहा घेणें आवडतें; याचें कारण त्याचा कडुतुरट रस व तात्कालिक उष्ण गुणच आहे; नाहींतर क्षुधित माणसाला नुसती दूधसाखर आवडावयास पाहिजे. चहाचा कडुतुरटपणा दूधसाखरेची गोडी बदलवितो. तसेंच त्यांत पाण्याचें प्रमाण जास्त असतें, त्यामुळें तो लघु आहार बनतो व भूक नसल्या वेळीं घ्यावासा वाटतो. ज्याला खरी भूक लागली आहे, तो त्यावेळीं चहा घेणार नाहीं व घेतलाच तर तो त्याला बाधल्याशिवाय रहाणार नाहीं. भुकेच्या वेळीं चहा घेतल्यानें अग्नीवर द्रव ओतल्याप्रमाणें होतें व भूक मंदावते.

पित्तदोषाचे तीन रस

पित्तदोषाचे रस तीन आहेत. अम्ल, लवण व कटु. त्यापैकीं ज्यांना अम्ल रसानें त्रास होतो त्यांना पेय चहा बाधतो. लवण व कटु रसानें ज्यांचे अग्नि दुष्ट असतील त्यांना चहा हें पेय पित्तशामक ठरेल असा आमचा अंदाज आहे. वैद्यराज वेणीमाधवशास्त्री यांची पित्तप्रकृति आहे. उन्हाचा व तिखटाचा त्यांना त्रास होतो. कडु व तुरटरस हे पित्ताच्या अम्ल लवण व कटु ह्या रसाचे परिणाम घालवणारेच आहेत. पण चहांतील अधिक दूधसाखर पोटांत आंबल्यामुळें अम्लपित्त होते व त्याचा आळ मात्र चहावर घेतला जातो. जे लोक नुसतें दूध साखर घेतात व तें त्यांना पचत नाहीं त्यांनाहि हा अम्लपित्ताचा त्रास होतोच.त्यासाठीं दूधसाखरेंत चहाची पत्ती असण्याचें कारण नाहीं.

चहाचा फांट हितकारक

सबब अम्लपित्तदोषावर चहाची खीर जरी बाधक असली तरी चहाचा नुसता फांट अम्लपित्तदोष घालविणारा आहे हें अनुभवांतीं लक्षांत येण्यासारखें आहे.

अवश्य पण कमी वापरावयाचे रस

तिक्त व कषाय रस आपल्या प्रकृतिभेदानुरूप पण कमीच प्रमाणांत वापरावेत (कारण ते वातप्रकोपक आहेत), म्हणून अधिक चहाची पूड घातलेलें पाणी पिऊं नये हें म्हणणें सयुक्तिक आहे. तसेंच अति उकळल्यामुळेंहि त्यांत तिक्त कषाय रस जास्त येतात, म्हणूनहि तो अति उकळूं नये, केवळ त्याचें उदक (जल) करून घ्यावें. काढा करू नये. ‘ यः कषायः कषायःस्यात् स वर्जः तरुणज्वरे ’ म्हणजे कषायरसाचा काढा हा स्रोतोरोधक होतो म्हणून

शक्यतों जेथें रोध नको त्या सर्व ठिकाणीं, व कषाय रसाच्या गुणकर्मांची स्वल्प गरज असेल त्यावेळीं कषाय उदकच वापरावें.

चहाची खीर कफपित्तकारक

आपल्याकडे चहाचें नुसतें पाणी न पितां चहाची दूध साखर घालून खीर (क्षीर) करून पिण्याची पद्धत आहे ती चांगली आहे असें लेखकांनीं दाखविलें आहे. कमी दुधाचा चहा पिऊं नये, हित–कांक्षी मनुष्यानें पिऊ नये, हें विधान त्यांनीं केलें आहे. अर्थात् त्यांच्या डोळ्यासमोर उपाशी पोटीं चहा पिणारा मनुष्य आहे. माझी चहाकडे पाहण्याची दृष्टि, चहाचें पाणी हें एक असनादि जलप्रमाणें तिक्तकषाय रसाचें अनुपान जल अशी आहे. त्यामुळें दूध साखर कमीचें काय पण अजिबात नसलेला चहा मनुष्यानें प्रकृतीचा विचार करून कांहीं खाऊन अगर कफदोषछेदनासाठीं नुसतासुद्धां प्यावा असें माझें मत आहे.

चहानें झोंप कां जाते ?

कमी दुधाचा चहा प्याल्यानें जी निद्राहानि होते ती चहाच्या वातवर्धक गुणानीं (तिक्त कषाय रसामुळें) आहे, उष्मावृद्धि होऊन नव्हे. चहाच्या जास्त सेवनामुळें हातापायाची जळजळ, मूत्रमार्गांत जळजळ अगर डोक्यांत दाह हीं जीं लक्षणें होतात ती अम्लपाकी दूधसाखरेचीं आहेत. चहाच्या फांटाचीं नव्हेत.

चहाचें सात्म्य

'चहाचें सात्म्य' याचाहि करावयास हवा. केव्हांहि चहा न घेतां शौचास योग्य वेळीं झालें पाहिजे व चहामुळें स्रोतोरोध (बद्धकोष्ठ), फार वेळां लघ्वीला जावें लागणें, कफदोष (उरः कंठ शिर या प्रदेशांत कफ विकृति) वा लठ्ठपणा उत्पन्न होतां कामा नये. अशा प्रमाणांत जें चहापान असेल तें युक्त मानतां येईल. शीत देशांत दोन वेळ जेवण व दोन वेळ चहा (कांहीं खाऊन) घेतात म्हणून आपण उष्ण देशांतहि सकाळ संध्याकाळ नुसती (अगर कांहीं खाऊन) चहाची खीर पिणें शहाणपणाचें नाहीं – वेडेपणाचें आहे. त्यांचा परिणाम पान खाणें, तंबाखू खाणें–तपकीर ओढणें इत्यादि व्यसनांच्या वाढींत स्पष्ट दिसून येत आहे. पचनशक्ति, समधातु, कोष्ठ इ. ठिकाणीं विकृति घडून येते. कांहीं आज तर कांहीं उद्यां या पेयामुळें रोगाला बळी पडत आहेत.

दूधसाखरेनें रोग होतात

आज ज्याला चहापानानें झालेले रोग असें मानलें जात आहे ते वस्तुतः दूधसाखरेच्या अनवश्यक व अकालीं सेवनामुळें होणारे रोग आहेत असें आम्हांस वाटतें. चहाचा फांट हा नुसता सौम्य कडुतुरट रसाचा आहे व असा सौम्य कडुतुरट रस नित्य सेवन करणें हें 'नित्यं सर्वरसाभ्यासः' या नियमान्वयें आरोग्यदायकच आहे. अर्थात् कडुतुरट रसासाठीं चहाचें पाणीच हवें असें आमचें म्हणणें नाहीं. दुसरींहि अनेक द्रव्यें मिळण्यासारखीं आहेत. चहाचें व्यसन न सुटण्याला शरीराची ही कडुतुरट रसाची मागणी हेंच कारण आहे. ती गरज अन्य प्रयोगानें भागविल्यास माणसास चहाची आवश्यकता पडूं नये.

एक उद्बोधक लेख

चहासंबंधीं एक उद्बोधक लेख नुकताच एका मासिकांत प्रसिद्ध झाला असल्याचें आमच्या एका वाचकानीं आमच्या निदर्शनास आणलें आहे. आयुर्वेद-पत्रिकेच्या पुढील अंकीं तो लेख प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

शुद्ध आयुर्वेदीय पद्धतीचे
औषधोपचार व पंचकर्म चिकित्सा मिळण्याचें
एक नवीन चिकित्सा-स्थान
आयुर्वेदीय आरोग्यशाला
पत्ता—चांदवडकर वाडा,
चांदवडकर रस्ता, नासिक

नवीन उद्भिज्जांचें दर्शन

(लेखिका:— सौ. विद्या जळूकर, द्वितीय वर्ष, शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नासिक.)

या सत्रांत वनस्पति दर्शनासाठीं जाण्याचें र्थीचें मनांत होतें. शिवाय पाऊस थोडासा तरी डल्यामुळें नव्यानेंच जगाचें दर्शन घेणाऱ्या उद्भिज्जांचें दर्शन घेण्याची आमची इच्छा अधिक ावली. गेले २।३ दिवस वरुणराजानें फारशी अवकृपा न केल्यामुळें शनिवार ता. ९-७-५५ हा सुटीचा दिवस आम्हीं मुक्रर केला.

तपोवनाच्या दिशेनें प्रयाण

ठरल्याप्रमाणें प्रातःकालीं ठीक ५॥ वाजतां वैद्य विल्लकर कारंजाजवळ जमून तपोवनाच्या दिशेनें आम्ही कूच केलें. साधारणपणें पांजरापोळच्या शेवच्या हद्दीपासून आमच्या प्रात्यक्षिकास सुरुवात झाली. विद्यार्थ्यांचें आवडते शिक्षक वैद्यराज अण्णासाहेब गोगटे यांचीं ओघवती वाणी सांगू लागली.:—

हा कुडईचा वृक्ष

"हा कुडईचा वृक्ष—कुड्याप्रमाणेंच आतिसारावर उपयोगी पडतो. ९।१० इंच लांबीच्या शेंगा जोडीनें येतात. फुलें पांढरी. अमांशांत वापरतात. वीतभर लांब व १ अंगुळ रुंद पानें असलेलें हें युकॅलिप्टस्चें झाड. यापासून निलगिरी तेल काढतात.

सागरगोटा—लताकरंज

हा सागरगोटा किंवा लताकरन्ज--बोटाच्या पेराएवढालीं पानें आहेत· जोडीनें येणाऱ्या दर दोन पानांमध्यें कांटा आहे· या सागरगोट्याच्या आंतील मगज बाळंतपणांत देतात. गर्भाशयाचा संकोच करणारें हें द्रव्य आहे.

हा अरिष्टक.–'रिठा' इति लोके। पानें साधारणतः उंबराच्या पानासारखीं आहेत. औषधी म्हणून त्याचें टरफल वापरतात. त्रिदोषघ्न असूनहि गर्भपातकारक आहे. शिवाय वामकहि आहे·

ही नाड पण गुळगुळीत पानें 'धन्वन्तरी' चीं, म्हणजेच पानफुटी किंवा हाडसांधीचीं; हिचे पानाचा कल्क उत्तम व्रणरोपक आहे.

निळा लिटमस्पेपर

'ही घंटीसारखी फुलें कशाचीं बरें'?

'गुरुजी, ही तर जास्वन्द.'

बरोबर. याची फुलें सुन्दर असली तरी कळयांचाच प्रमुख उपयोग आहे. आर्तवस्तंभन म्हणून वापरतात. लाल पाकळयांच्या रसांत पांढरा टीपकागद भिजवून वाळवावा. तोच निळा लिटमस. रक्तजपा रक्त-प्रदरावर, व श्वेतजपा श्वेत प्रदरावर गुणकारी आहे. कफशोधनासाठीं हा ५.ज्या आणि काटे निवडुंग उपयोगी पडतो.

कावळ्याची छत्री– अर्गट

पाहिल्याबरोबर घाणेरडी वाटणारी ही 'कावळ्याची छत्री' सडक्या कुजक्या जागेंतच उगवते. प्रकार दोन. सविष आणि निर्विष यांत अर्गट नांवाचें द्रव्य असतें. तें गर्भाशयसंकोचक व शुद्धिकर आहे.

बलाचतुष्टय

बलाचतुष्टयांतील ही पहिली बला किंवा पेटारी. चारी बलांचीं क्षुपें असतात सर्वांनाच पिवळी फुलें येतात. सर्वांचे पंचांग पिच्छिल व म्हणूनच कफकर असतें. क्षुपें वर्षायु वा बहुवर्षायुसुद्धां असतात. बला नांवाप्रमाणेंच बलदा आहे. इ.

मोगली एरंड

एरंडासारखेंच कार्य करणारा हा 'मोगली एरंड.' सुकलेल्या फळांतून काळ्या टरफलाच्या ३–२ बिया निघाल्या ना? त्या तीव्र विरेचक पण आहेत. त्यांनीं मळमळतेंसुद्धां.

हें बिनपानाचें झाड— 'शेर' याचा चीक अत्यन्त तीव्र विरेचक आहे. चण्याच्या पिठांत याचे चिकाचे १-२ थेंब टाकून गोळी बनवावी व गिळावी. विषारी द्रव्यासारखें आहे सहसा वापरू नये.

उत्कटारी— पाथरीसारखी जामिनीसपाट वाढलेली दिसते, पण कांटे आहेत. वातव्याधी व मूत्र--दोषनाशक आहे."

आमच्याबरोबर एक सिंधी गृहस्थ कुतूहलानें सारे ऐकत होते त्यांनींहि हिचा प्रभाव सांगितला व हृषिकेशाच्या कुंभमेळयांतील वैद्यपरिषदेंत सर्वांच्या कौतुकाचा विषय ही वनस्पती बनली होती असें सांगितलें.

पुनर्नवा लाल व पांढरी

प्राध्यापकांनीं पुढें सुरुवात केली——

" रानांत तरारून उगवलेल्या घोळीशीं साम्य दर्शविणारी ही पुनर्नवा. प्रकार २ – रक्त व श्वेत, रक्त अधिक गुणकारी, पानें वा मूळ चघळल्यास जिभेवर विरविरतें, मूळ शोथघ्न म्हणून वापरतात. या ५–५० पावलांच्या परिसांत पसरलेली वनस्पति परिचयाची आहे कां ?

आरग्वधगणांतील स्रुव (वेहेंकळ)

" नाहीं. पण तिला कांटे दिसतात त्यावरून कफनाशक गणांतील असावी असें वाटतें. " —विद्यार्थी

" छान – आरग्वधादि गणांतील आठवी वनस्पति कोणती ? "

" स्रुववृक्ष " —विद्यार्थिनी द्वितीय वर्ष

" हं. तोच हा. अजून क्षुपस्वरूपांतच आहे, याला वेहेंकळसुद्धां म्हणतात. जलोदर, प्लीहा इ. त वापरतात.

शरपुंखा – उन्हाळी

" बरं आतां पुढें. ही वनस्पति मागच्या सहलींत तुमच्या माहितीची झाली आहे, होय ना ?

" हों. ही तर शरपुंखा किंवा उन्हाळी. यकृत्-प्लीहा– वृद्धीवर याचा क्षार वापरतात. "

वा. बरेंच लक्षांत आहे तुमच्या. ही हाताच्या पंजापेक्षांहि मोठी पानें आहेत ना ? ती रानसुरणाचीं. कंद वापरतात, पण फार खाजरा असतो.

भूस्तृण - रोहिस गवत

हें गवत जरा हातावर चोळा, नि मग वास घ्या. सुगंधी आहे ना ? हें रोहिस गवत किंवा भूस्तृण, यापासूनच रोशेल तेल काढतात. व्रणशोधक व कृमिनाशक आहे.

बेल–दूर्वा–तुळस

हा बेल, ह्या दूर्वा, नि ही रानतुळस, कुंडीतल्या तुळशीची सख्खी बहिण. " हीं तिन्हीं द्रव्यें अनुक्रमें वातघ्न, पित्तघ्न व कफघ्न असें कार्य करतात ना ? " – विद्यार्थी

" हो, हीं तीन द्रव्यें त्रिदोषांवर उत्तम कार्य करतात. ही 'नाय'– मूर्ति लहान पण कीर्ति मोठी. थंडीतापावर कोयनेलइतकीच तात्काल गुणकारी आहे.

शाकुंतलांतील श्लोक

हे हिंगणबेट किंवा इंगुदी. ही जरा जपून तोडा हं. कांटे खूप आहेत. बियांचें तेल काढतात. मगज व मुळाची साल वापरतात. याच्या फळाचा गीर भाकरीच्या पिठांत मिसळून दुष्काळांत खातात. हें मह-

दुर्मिळ वनस्पती

वैद्य, डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, यांना, आमचेकडे सर्व प्रकारची ताजी वनस्पती व वनस्पतीपासून तयार केलेलीं तेलें, डुक्करकन्द, काळी टाहकळतेल, सफेद पळस फुलें, वाकेरी भाते, माळकांगोणी तेल, सफेद रिंगणी बीज, गुळवेल सत्व, महावातविध्वंसक तेल, सफेद गुंजा, उंबराचे मुळाचें पाणी, कासवाच्या पाठी, भुईकोहळा, आघाडा क्षार, इ० मिळतात. सविस्तर माहिती मिळविण्यासाठीं

पत्रव्यवहाराचा पत्ता —

भारत वनस्पती फार्मसी
C/o भिमाजी सखाराम राजगुरव
पो. मंचर, जि. पुणें

शुद्धि करणारें द्रव्य आहे. व्रण्य आहे. शाकुन्तलांतला श्लोक आठवतो कां ? बोचून दर्भ वदनीं व्रण जाहले ते। त्याचे (हरिणाचें) बरें करिशी इंगुदीतैलपातें ॥.

जाई जाई, तोंड जाई

ही जातिका—मालती किंवा जाई, तोंड आलें असतां याचीं पानें चघळतात. म्हणच आहे – जाई जाई, तोंड जाई. त्या लांब दांड्याला एकच फूल आहे नां ? ती राणी किंवा टणटणी. सद्योव्रणावर घट्ट करून बांधतात. रक्तस्राव लगेच थांबतो.

गुंद्रा गवत

अरे, अरे— तुडवतोस काय तें ?

"नाहीं गुरुजी, इथें कांहीं नाहीं."

"तें काय तुझ्यापायाखालीं. हं तोच काळसर गुंदरका गड्डा. आण इकडे. हें गुंद्रा तृण. वातपित्तघ्न आहे.

चित्रक, अडुळसा

हं आतां इकडे लक्ष द्या. हें झुडुप चित्रकाचें. अग्नीची जेवढीं नांवे तेवढीं सारी चित्रकाला आहेत. त्याच्यावर बारीक फुलें तुऱ्यानें येतात. त्यांच्या मागील कोषांत अत्यंत चिकट द्रव असतो. फुलें गळल्यावर सुद्धां दांडा चिकट लागतो.

रक्तपित्ती क्षयी कासी किमर्थमवसीदति असें त्याच्या बद्दल म्हणतात तो हा अडुळसा –वासा इत्यर्थः।

अशा रीतीनें कोरफड, रुअी, गिरिकर्णिका, गुळवेल, रिंगणी, आमलकी, चंदनचारोळी, खारीक कवठ, करवंद, वासनवेल, बकुळ इ. सुमारें ५०-५५ वनस्पति आम्ही पाहिल्या.

ज्ञानप्राप्तीचा आनंद

नऊ वाजून गेले होते. ऊन किंचित् जाणवूं लागलें होते, म्हणून परतलो. शनिवार हा न कर्त्याचा वार असूनहि निश्चय तडीला गेल्याचें व नवीन ज्ञान मिळाल्याचें समाधान सगळ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. गांवातील रस्त्याला लागल्यावर कोठल्या तरी रम्य तंद्रीतून जागें झाल्यासारखें वाटलें.

या सहलीसाठीं द्रव्यगुणविज्ञानाचे अध्यापक वै. श्रीनिवास जळूकर व वै. श्यामराव कुलकर्णी, याशिवाय वैद्य ल्हाटेशास्त्री व श्री. महाबळगुरुजी ही मंडळी आली होती.

शुद्ध आयुर्वेद विद्यालय

शींव, मुंबई २२.

आयुर्विद्या प्रसारक मंडळाच्या शीव, मुंबई, येथील शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचा गुरुपौर्णिमेचा उत्सव मुंबईचे नगराध्यक्ष मान्यवर श्री. नरसिंगराव पुप्पाला यांचे अध्यक्षतेखालीं मंगळवार दि. ५-७-५५ रोजीं सायंकाळीं ४-३० वाजतां पार पडला.

याप्रसंगीं मंडळाचे प्रमुख डॉ. त्रि. रा. नरवणे व मंडळाचे अध्यक्ष श्री. नानासाहेब पुराणिक यांनीं मंडळाच्या एकंदर केलेल्या व होऊं घातलेल्या कार्यांची रूपरेषा समजावून सांगितली. अध्यक्षीय भाषणांत बोलतांना मान्यवर नगरपिते श्री. पुप्पाल यांनीं आयुर्वेदाच्या चाललेल्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करून आयुर्वेदाची आवश्यकता मुंबईसारख्या शहराला फारच आहे व सरकार आणि नगरपालिका यांनीं भरपूर मदत देऊन हें कार्य करावें असें सांगितलें.

उपस्थित मंडळी

या प्रसंगीं मुंबई कामगार विमा योजनेचे रजिस्टर्ड वैद्य हजर होते. तसेंच मंडळाच्या ट्रस्टीचे अध्यक्ष श्री. शेठ मनोहरदास, आयुर्वेदाचे डायरेक्टर श्री. हरिदत्तशास्त्री, वै. ना. ह. जोशी आदि मान्यवर मंडळी हजर होती.

श्रीमति मणिबेन देसाई यांनीं आभार मानल्यावर वंदेमातरम् व प्रसाद होऊन समारंभ संपला.

पवित्र
नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

हिंदु विश्वविद्यालय, बनारस

आयुर्वेद विभागाची सुधारणा

बनारस हिंदु विश्वविद्यालयाचे कुलपति हल्लीं सर सी.पी.रामस्वामी अय्यर हे आहेत. ते पूर्वी म्हैसूर राज्याचे यशस्वी दिवाण म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनीं विश्वविद्यालयाचा आयुर्वेदविभाग सुधारण्याच्या दृष्टीनें एक समिति नेमली आहे. पुढील व्यक्ती त्या समितींत आहेत.

समितीचे सभासद

कॅप्टन श्रीनिवासमूर्ति (मद्रास), कर्नल आर्. एन्. चोपरा (काश्मीर), श्री. यादवजी त्रिकमजी (मुंबई), श्री. शिवशर्मा (मुंबई), श्री. द. अ. कुलकर्णी (लखनौ), श्री. राजेश्वरशास्त्री (बनारस), श्री. सत्यनारायणशास्त्री (बनारस), श्री. हरिदत्तशास्त्री (मुंबई), श्री. बलदेवशर्मा शास्त्री (बनारस).

या सदस्यांची सभा १४–१५ जानेवारी १९५५ रोजीं झाली. अध्यक्षस्थानीं सर सी. पी. रामस्वामी होते. या सभेसाठीं बनारसच्या आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राध्यापक यांनाहि निमंत्रण दिलें होतें.

वरील समितीनें बहुमतानें पुढील विचार व्यक्त केले आहेत.

मिश्र पाठ्यक्रम अहितकारक

" गेल्या २५–३० वर्षांच्या अनुभवानें आम्ही या निश्चयाप्रत पोंहोचलों आहोत कीं, सरकारनें निश्चित केलेला आयुर्वेद महाविद्यालयांचा पाठ्यक्रम हा आयुर्वेदाच्या हिताच्या दृष्टीनें प्रतिकूल सिद्ध झाला आहे. या पाठ्यक्रमांतील ॲलोपॅथीचें मिश्रण विद्यार्थ्यांच्या बुद्धीला भ्रांत करीत आहे व दोन शास्त्रांचा विरोधी दृष्टिकोन त्यांना योग्य चिकित्सक निर्माण करण्यांत बाधक ठरला आहे. परिणामीं या संस्थांचे पदवीधर आयुर्वेदांत अनभिज्ञ व आयुर्वेदाचें मस्तक खालीं करणारे असे सिद्ध झाले आहेत. आयुर्वेद महाविद्यालयांचा प्रचालित पाठ्यक्रम आयुर्वेदाचा सर्वनाश करण्यास मदत करीत आहे.

वैद्येतरांनीं पसरविलेलें जाळें

इतक्या दीर्घकालीन कटु अनुभवानंतर आम्ही या पाठ्यक्रमांत सुधारणा केली नाहीं तर वैद्येत व्यक्तींनीं पसरलेल्या जाळ्यांत आम्ही फसून जाऊं व आयुर्वेदाचा सर्वनाश करण्याला साहाय्यभूत होऊं.

४ वर्षेपर्यंत शुध्द आयुर्वेद

आमचें असें मत आहे कीं, आयुर्वेदमहाविद्यालयांतून पहिलीं ४ वर्षेपर्यंत विशुद्ध आयुर्वेदाचेंच शिक्षण दिलें जावें. त्यानंतर सरकारी नोकरी करूं इच्छिणार लोकांसाठीं १ वर्षभर ॲलोपॅथीपैकीं तेवढे व आवश्यक विषय शिकवावेत कीं जे आयुर्वेदविज्ञानाच्या विरोधी नसतील. सध्यां चालू असलेल्या अभ्यासक्रमांत ॲलोपॅथीपैकी कित्येक असे विषय आहेत कीं, ज्यांची बिलकूल आवश्यकता नाहीं.

व्यापारी दृष्टि ठेवू नये

या समितीनें आयुर्वेदीय औषधी निर्माण करण्यासंबंधीं पुढील विचार व्यक्त केला आहे. आयुर्वेदीय औषधें निर्माण करतांना व्यापारी दृष्टि ठेवूं नये. शास्त्रीय दृष्टि ठेवून उत्तमोत्तम औषधें निर्माण करावींत व जनतेला उपलब्ध करून द्यावींत. असें केल्यानेंच आयुर्वेदाची प्रगति होऊं शकेल.

तारेचा पत्ता:- Newbottle
के. के. शहा ॲंड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुचें, कॅपसुल्स
[हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाची सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

१५०१ रु. थैली अर्पण

बँगलूर येथें दिनांक ९-६-५५ पासून चालू ल्या दन्तयज्ञाचा समारोप समारंभ म्हैसूर सर– ते आरोग्यमंत्री मान्यवर श्री. चन्नय्या यांच्या तेखालीं शुक्रवार दिनांक ८--७--५५ रोजीं ळीं कन्नड-साहित्य परिषदेच्या भव्य दिवाण– तांत यथासांगपणें पार पडला. समारंभास मंत्री, , सुप्रसिद्ध नेत्रसर्जन डॉ. एस. सी. मोदी टोरिया गव्हर्नमेन्ट हॉस्पिटल, मिंटो ऑप्थाल्मिक टलमधील अनेक सर्जन व नगरांतील हजारों ष्ठित स्त्री–पुरुष हजर होते. सुप्रसिद्ध दंतवैद्य दे यांच्या गुणवर्णनपर मंत्र्यांची व इतर प्रतिष्ठित ची भाषणें झालीं. दंतवैद्य जायदे यांना नाग– तर्फे १५०१ रु. ची थैली त्यांच्या अमेरिका करितां अर्पण करण्यांत आली. दन्तवैद्य जायदे केस जाण्याकरितां दिनांक १७-७-५५ रोजीं हून मुंबईस जाणार आहेत.

अनुक्रमणिका

आयुर्वेद संशोधन केंद्राची सरकारी योजना ३३
टायफाइड फिव्हर व त्यावर रामबाण औषध ३५
त्रिदोष–विचार म्हणजेच आयुर्वेद ४३
सक्थि-शूल [मांड्या-पाय-दुखणें] ४५
वैद्यकीय संशोधनास पारितोषिकें ४६
“ आयुर्वेदाचे ज्ञान प्रत्येक घरांत पोंचवा ” ४७
ॲस्प्रोचे हानिकारक परिणाम ४८
प्रत्यक्ष रस व अनुमित रस ५०
शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नाशिक ५१
कुष्ठरोग निवारण मंडळ, नाशिक ५३
तेन त्यक्तेन भुंजीथाः ५४
चहा-पेयाचे गुणदोष कोणते ? ५५
नवीन उद्भिज्जांचें दर्शन ५९
हिंदु विश्वविद्यालय, बनारस ६२

सांडू ब्रदर्सचीं

शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी डतात.

वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.

व्यवहाराचा पत्ता:—

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
चेंबूर लि.
टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

– प्रमाणपत्र –

आपण जें जें औषध बनवितो व जनतेस देतो, तें तें प्रत्येक औषध सचोटीचें व गुण देणारें असलें पाहिजे; तरच त्याचें प्रमाणपत्र जनतेकडून आपणास मिळेल. तर अशा गुण देणाऱ्या खऱ्या, अस्सल व ताज्या औषधी खरेदी करण्यास विश्वासपात्र ठिकाण पाहिजे. त्याकरितां आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

नेहमीच उपयोगी येणारी ही औषधें

— सवलतीच्या दरांत —

मंडूरभस्म	१६ रु.	शेर		५ तोळे	२० तोळे
कपर्दिकभस्म	८ रु.	,,	अकीकभस्म	३ रु.	११ रु.
शंखभस्म	८ रु	,,	अग्निकुमार गोळ्या	३ रु.	९ रु.
ताम्रशृंगभस्म	१२ रु.	,,	कामदुधा (मौ. वि.)	७ रु.	२५ रु.
स्वर्णमाक्षिकभस्म	२२ रु.	,,	,, (आवळ्याचे रसांतील)	२॥ रु.	८ रु.
संगजराहतभस्म	१४ रु.	,,	गोक्षुरादिगुग्गुळ	१। रु.	४ रु.
तालिसादिचूर्ण	११ रु.	,,	त्रिफळामंडूर	३ रु.	११ रु.
सितोपलादिचूर्ण	११ रु.	,,	महायोगराजगुग्गुळ	५ रु.	१६ रु.
शुद्ध शिलाजीत सूर्यतापी	३१ रु.	,,	शंखवटी	२ रु.	६ रु.

त्रिफळाचूर्ण (वस्त्रगाळ) १ शेरास (८० तो.) १ रु. फक्त. शेराच्या दरांतील औषधी भरे २० तोळ्यापेक्षां कमी, वरील दरांत पाठवितां येणार नाहींत.

मिश्रा महाराष्ट्र फार्मसी (रजिस्टर्ड) ब्रह्मपुरी (चांदा म. प्र.)

भारतीय प्राचीन कला व शास्त्र

भारतीय शिल्पकलेचा नमुना प्राचीन लेण्यामध्यें सांपडतो.

भारतीय प्राचीन औषधी विद्येचा उपकारक अनुभव धूतपापेश्वर औषधांमध्यें प्रत्ययास येतो.

— आमचे बल-पुष्टिवर्धक कल्प —

- शिलाप्रवंग
- अभ्रलोह
- सुवर्णमालिनीवसंत

धूतपापेश्वर इंडस्ट्रीज् लि.

पनवेल – मुंबई

संपादक व प्रकाशक – वैद्य विंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य बिवलकर कारंजा, नाशि
मुद्रक — श्री. चिं. आक, सकल प्रेस, नाशिक.

आयुर्वेद पत्रिका

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु.   १ अंकाची किंमत ४ आणे
(दरमहा ता १ व १६ रोजी प्रसिद्ध होते.)
वर्ष ९ वें)   नासिक, ता. १ ऑगस्ट १९५५   (अंक ३ रा

दन्तवैद्य जायदे यांना 'शुभास्ते पंथानः'

" अमेरिकेंत मी कसल्याहि प्रलोभनाला बळी पडणार नाहीं, भारताच्या लौकिकाला धा आणणारें कांहीं करणार नाहीं, मात्र पैसा अपुरा पडल्यास बूटपॉलिशसारखा हलका धंदाहि रीन, पण दौरा यशस्वी करून येईन. परत आल्यावर आयुर्वेदीय दन्तवैद्यकाचें एखादें विद्यालय [illegible] " असे उद्गार वै. पां. वि. जायदे यांनीं पुणें वैद्यमंडळांतील निरोप समारंभाचे वेळीं काढले.

दन्तवैद्य जायदे, आयुर्वेदतीर्थ

सदर समारंभ अमेरिकेस जातांना वै. जायदे पुण्यास उतरत आहेत असें पाहून ठरविण्यांत आला. महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळ व पुणें शहर वैद्य मंडळ या उभय संस्थातर्फे ता. १८।७।५५ ला तो साजरा करण्यांत आला. अध्यक्षस्थानीं वै. भा. वि. (मामा) गोखले हे होते. सदर प्रसंगीं भि. त्र्यंबकशास्त्री आपटे, दन्तवैद्य डॉ. फडके, वै. ग. वि. पुरोहित, वै. आठवले, वै. गणेशशास्त्री शेंडे व वै. पां. ह. देशपांडे यांचीं अभिष्टचिंतनपर भाषणें झालीं. वैद्य शेंडेशास्त्री यांनीं संस्कृतांत भाषण केलें. व बाप जाऊन आला तरी मुलानें, नातवानें पुनः जावयाचें व इंग्लंड-अमेरिकेकडून तीच विद्या शिकून यायचें हा पायंडा मोडून वै. जायदे हे आपली विद्या शिकविण्यास अमेरिकेस जात आहेत ही अत्यंत श्लाघनीय गोष्ट असल्याचें सांगितलें. वै. पुरोहित यांनीं डॉ. मथुराप्रसाद यांच्या नेत्रचिकित्सेप्रमाणें वै. जायदे यांचें दन्तोत्पाटनाचेंहि पाश्चात्यांतच कौतुक होईल असें सांगितलें. एका वैद्यानीं मात्र वै. जायदे यांचे दन्तोत्पाटन हें केवळ हस्तकौशल्य आहे; त्याचें मागें शास्त्रबिस्त्र कांहीं नाहीं; तें आयुर्वेदीय तरी आहे कीं नाहीं शंका आहे, असलें अप्रस्तुत भाषण केलें. त्याला वै. देशपांडे यांनीं रोखठोक व साधार उत्तर देऊन वै. जायदे यांचें दन्तोत्पाटन पूर्ण शास्त्रीय एवढेंच नव्हें, तर तें निखालस आयुर्वेदीयच आहे असें प्रतिपादन केलें.

वैद्यराज जायदे यांचे बाणेदार उद्गार

एका डॉक्टरनें वैद्यराज जायदे अमेरिकेसारख्या अग्रेसर देशाला जात आहेत; त्यांना सर्वत्र य आलें तर ठीकच आहे; कांहींतरी भानगड गळयांत घेऊन आले तर मात्र ती आम्हांस निस्तरावी लागेल असले अप्रस्तुत उद्गार काढले! त्याला वै. जायदे यांनीं तितक्याच जोरांत "तुम्हांला निस्तारावी लागणारी भानगड तरी खास घेऊन येणार नाहीं" असें सांगितलें व प्रारंभीचे उद्गार मोठ्या आत्मविश्वासानें काढले.

वैद्य भा. वि. गोखले यांनीं यथोचित समारोप केल्यावर वैद्य मंडळातर्फे त्यांनीं व म. प्रां. वैद्य मंडळातर्फे वै. देशपांडे यांनीं वै. जायदे यांना पुष्पहार अर्पण केले. या प्रसंगीं पुणें येथील एक अधिकारी अिंजिनिअर श्री. विनायक विश्वनाथ गोखले एम् एस्सी. [टेक.] यांनीं कसलाहि पूर्वसंबंध नसतां वैद्य जायदे यांना अमेरिकन डॉलर्समध्यें ४०० रु. ची देणगी दिल्याचें त्यांच्या पत्नीसमक्ष वै. देशपांडे यांनी जाहीर केलें. वै. जायदे यांना बऱ्याच आश्वासित देणग्या मिळाल्या नाहींत. जेमतेम तीन हजार रुपये जमले, ते घेऊन व कांहीं उचापत करून [उसनवारी करून] ते अमेरिकेस जाण्याचें धाडस करीत आहेत; पैसे मिळविण्यासाठीं वै. जायदे यांना हलकें काम करावें लागें यांत त्यांच्याप्रमाणें आयुर्वेदाचीहि अब्रू जाणार आहे. ती बचावणें आपल्या हातीं आहे, असें वै. देशपांडे यांनीं सांगितलें. वै मा. ग. जोशी यांनी आभारप्रदर्शन केल्यावर समारंभ समाप्त झाला.

वैद्यराज जायदे मुंबईहून ता. २ ऑगस्ट १९५५ रोजीं निघून लंडनमार्गे न्यूयार्कला जाणार आहेत. (त्यांचा मुंबअीचा पत्ता:— श्री. गो. द. ढवळे बी. ए. लक्ष्मीबाग सायन मुंबअी २२ असा आहे.) आयुर्वेद पत्रिका वैद्यवर्गातर्फे त्यांचें यशचिन्तन करीत आहे.

COUGH CURE TABLETS
KASPHO

अपुरें संरक्षण

धूळ, जंतू व श्वसनाच्या इतर विकारांपासून संरक्षण मिळविण्यासाठीं कास्फो औषधि गोळ्या वापरणें इष्ट आहे. खोकला, पडसें, घशाची खवखव, ब्रॉंकायटिस इ. विकारांमध्यें कास्फो उपयुक्त आहे. आजच एक बाटली खरेदी करा. सर्वत्र मिळूं शकते.

कास्फो
खोकल्यावरील अचूक उपाय

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड,
अहमदनगर.

योजना यशस्वी करा
राष्ट्र बलशाली करा

EVEREST APK. 54-3 MAR

मुलें माती कां खातात ?

लेखक—
वैद्य बिंदुमाधव पंडित, नाशिक

'मुलें माती कां खातात' हा प्रश्न जुनाच हे, त्याला आजवर अनेकांनीं उत्तरें दिलीं आहेत. हि आज या लेखांत एका स्वतंत्र दृष्टिकोनांतून ला उत्तर देण्याचा प्रयत्न करणार आहे. तो कितपत ली झाला हें वाचकांनीं ठरवावें. इतरांनींहि या यावर विचार प्रगट करावेत अशी विनंति आहे.

आज या विषयावर लेख लिहिण्याचें कारण ोग्यशाळेकडे आलेलें एक पत्र हें आहे. पत्र ा गुजराती भगिनीनें लिहिलेलें आहे. तें कुटुंब ग, सुशिक्षित, उद्योगी, घरीं आहाराची व चारांची आबाळ नसलेलें असें आहे. त्यांच्या तच एम्. बी. बी. एस्. डॉक्टर भगिनी आहे. स करणारी आहे. असें असतां त्या घरांत वरील श्न निर्माण झालेला आहे. पत्रांतील मजकूर असा—

माती, सीमेंट, धूळ

'बीजु खास लखवानुं के शास्त्रीजीने पूछी जो के + + + माटी, सीमेंट, धूळ खूप हदउपरांत य छे, तो तेने शुं आपवुं. तमे पुछवानुं भूलता नही दे पूछीने तरत लख जो. + + + नी दवानु जरूर पूछ जो. ट्टी पण सारी नथी थती.—,

वरील गुजराथी पत्रांतील मजकूर सरळ समज-ारा असा आहे. 'मुलगी माती, सीमेंट, धूळ खूपच ाते, त्यावर काय उपाय करावा,–, असा प्रश्न केला आहे. मुलींचें वय २ वर्षांच्या आंतलें आहे.

प्रत्येकाच्या घरीं हा प्रश्न

हा प्रश्न पत्रानें विचारण्याची पण आवश्यकता नाहीं. जवळ जवळ प्रत्येकाच्या घरीं हा प्रश्न निर्माण होतो, झालेला असतो. अशी आजकाल स्थिति आहे. या प्रश्नाचें नीटसें उत्तर पालकांना व डॉक्टर–वैद्यां-नाहि माहित नसल्यामुळें मुलावर रागावणें इ० उपाय केले जातात. पण त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. याचें कारण असें आहे. चोराला सुद्धां चोरी करणें वाईट आहे ही गोष्ट माहित असते. पण त्यापेक्षां अधिक चांगला द्रव्य–वस्तु–प्राप्तीचा मार्ग माहित नसतो म्हणून तो देवाला स्मरून साक्षी ठेवून चोरी करीत असतो. चोर देवीचे–देवाचे भक्त असतात. चोरून आणलेल्या वस्तूपैकीं कांहीं वस्तु ते देवाला अर्पण करतात हें आपल्यापैकीं कांहींनीं पाहिलें ऐकलें असेल.

आवड कां उत्पन्न होते ?

लहान मुलाची गोष्ट अगदीं तशीच आहे. सीमेंट माती, चुना, धूळ हे आहे त्या स्थितींत खाण्याचे पदार्थ नाहींत हें त्यांना माहित आहे. परंतु ते जो आहार घेतात त्या आहारांतून त्यांच्या शरीराला अत्यंत आवश्यक असलेले घटक मिळत नाहींत. त्यामुळें ते आवश्यक टक आ बाजूच्या ज्या वस्तूंत स्वाभाविकपणें मिळतील त्या पदार्थां–विषयीं त्यांना रुचि उत्पन्न होते. वडील मंडळींनीं कितीहि समजावून सांगितलें तरी त्यांची आवड नष्ट होऊं शकत नाहीं. आपणाला नक्की काय हवें आहे हें त्यांनाहि शब्दानें सांगतां येत नाहीं. कांहीं थोड्या शब्दांत ते आपली मागणी क्वचित् व्यक्त करतांना आढळतात पण तिकडे पालकांचें लक्ष नसतें, त्यामुळें माती खाण्याची संवय निसर्गानेंच बन्द होते तेव्हांच होते. उपदेशाचा तेथें कांहींहि उपयोग होत नाहीं.

माती कोण कोण खातात ?

लहान मुलें माती खातात, त्याचप्रमाणें गरोदर स्त्रिया माती खातांना आढळतात. १५ ते २५ वयां-तील रुग्ण अविवाहित मुलीं व मुलें माती खातात असें पाहण्यांत आहे. आणखीहि कांहीं अवस्था (स्वस्थांच्या अगर आजाऱ्याच्या) माती खाण्याच्या असतील त्या वाचकांनीं लक्षांत आणून दिल्यास आभारी होईन.

ग्रंथांत स्पष्ट वर्णन नाहीं

ही मंडळी माती कां खातात या विषयींचें

स्पष्ट विवेचन प्राचीन वैद्यक ग्रंथांतून मला आढळलें नाहीं. मृत्तिकादन (माती खाणें) हें पांडुरोगाचें (ॲनिमियाचें) कारण सांगितलें आहे. तेथें मातीचे ३ प्रकार, कषाय (तुरट), उखीर (उकिरडा–खारट) व मधुर (गोड) असे मातीचे ३ रस दिले आहेत. (या तीन जातीवरून माती ही आंबट,) कडु व तिखट या बाकीच्या रसांची नसते असें समजावयाचें कीं काय अशी एक शंका डोकावते.)

मातीपासून होणारे दोष

तुरट मातीमुळें वातज पांडुरोग, उखीर मातीमुळें पित्तज पांडुरोग, व मधुर मातीमुळें कफज पांडुरोग हे विकार उद्भवतात असें ग्रंथकारांनीं सांगितलेलें असून ते ते विकार घालविण्यासाठीं ग्रंथातरीं उपाय दिले आहेत. पण माती खाण्याची इच्छा न व्हावी यासाठीं काय उपाय करावेत याची स्वतंत्र माहिती दिलेली कोठें सांपडत नाहीं. आपणास ती अनुमानानें शोधून काढावयास हवी आहे.

मुलाच्या भोंवतालची परिस्थिति

माती खाण्याचा मुख्य प्रश्न लहान मुलांचे बाबतींतच विशेष संभवतो सबब त्याच्या भोंवतालची परिस्थिति आपण प्रथम विचारांत घेऊं व त्यावरून जे सिद्धांत निघतील ते आपण इतरत्र लागू करूं म्हणजे हा विषय समजण्यास तें सोईचें होईल.

आहार तपासला पाहिजे

माती खाणें हा आहाराचा विषय आहे. सबब आपण बालकाचा आहार तपासला पाहिजे. लहान मुलें आईच्या अंगावरचें दूध पितात. तें कमी पडलें तर व परवडलें तर म्हशीचें (गाईचें वा शेळीचें) दूध पितात. पुढें पुढें थोडा भात-भाकरी-पोळीहि खाऊं लागतात.

मधुर, द्रव आहार

बालकाचा हा आहार मधुररस-प्रधान आहे व द्रव-प्रधान आहे. मधुररसाचीं महाभूतें पृथिवी व जल हीं आहेत. मधुर रसांतील या दोन महाभूतांमुळें लहान बालकांचीं वजनें सुरवातीला भराभर वाढतात व त्यांना बाळसें (बलास = कफ) येतें. मुलांचें शरीर मांसल व मेदानें पुष्ट असें दिसतें. मुलाचीं हाडेंहि वाढत असतातच. मात्र दांत प्रगट होण्याचें आरंभ सुरूं होतांच बहुतेक मुलांच्या प्रकृतींत फेरफार होऊं लागतात. कांहींना ताप येतो, कांहींना जुलाब होतात, क्वचित् खोकलाहि होतो.

घडामोडीचा काळ

हा दांत येण्याचा काळ आयुर्वेदाच्या विचारसरणीप्रमाणें अस्थिधातूंतील घडामोडीचा आहे. या वेळीं मुलांना त्यांच्या आहारांतून मिळणारा अस्थि-पोषक धातु कमी पडतो व तो धातु योग्य प्रमाणांत मिळण्यासाठीं मुलें भिंतीचा चुना, माती, सीमेंट वगैरे मिळेल ते खातात.

नित्यं सर्वरसाभ्यासः ।

आयुर्वेदाच्या सिद्धांताप्रमाणें मानवी शरीराची वाढ केवळ एक रसाचीं द्रव्यें खाऊन चांगली होत

भारत वनस्पति फार्मसी, पो. मंचर (जि. पुणें) यांचेकडील आयुर्वेद वनस्पतिपासून शास्त्रोक्त पद्धतीनें तयार केलेलीं तेलें, संधिवात-पक्षवात वगैरे सर्वप्रकारच्या वातावर उपयोगी. काळी टाहाकळ तेल, मालकांगोणी तेल, नारायण तेल, निर्गुंडयादि तेल, वातावर मिश्रण तेल, महावातविध्वंसक तेल. याशिवाय दुसरीं वातावरील तेलें विकत मिळतील. "झनाना" औषधी तेल डोकेंदुखी, अर्धशिशी, विंचूदंश, नारूवर बाहेरून लावण्यासाठीं उपयोगी आहे. या शिवाय सर्व प्रकारच्या ताज्या वनस्पती विकत मिळण्याचें एकच ठिकाण— श्री. भिमाजी सखाराम राजगुरव

भारत वनस्पति फार्मसी
पो. मंचर (जि. पुणें)

नाहीं. त्यांना अन्य रसांच्या द्रव्यांची जोड अवश्य लागते. पचनक्रिया व शरीराची योग्य वाढ यासाठीं 'नित्यं सर्वरसाभ्यासः स्वस्वाधिक्यं ऋतौ ऋतौ'। हा नियम सांगितला आहे. आई सर्व रसांचे पदार्थ खात असेल व मूल फक्त अंगावरच पीत असेल (व आईच्या आहारांतून सर्व रसाचीं द्रव्यें बालकाला पोहोंचत असतील) तर मुलाला दांत येण्याचे वेळीं माती खाण्याची जरूरच पडणार नाहीं. पण मूल जर गाईच्या (गवताच्या) दुधावर पोसलें जात असेल तर मात्र मधुराखेरीज अन्य रस न मिळाल्यामुळें वा मधुर रसाचीं द्रव्यें आधिक प्रमाणांत सेवनांत आल्यामुळें मुलांना अस्थिविकृति निर्माण होतात. दांत येण्यास विलंब होतो अगर उपजत दांत किडके येतात. अगर कांहींना कांहीं तक्रारी उद्भवतात.

दांत येण्यास प्रारंभ

असें म्हटलें आहे कीं दंतोद्भवे च बालानां नहि किंचित्र दूयते।' दांत येण्याच्या वेळीं मुलाचें कांहींना कांहीं दुखत राहतेंच. मुलांना साधारणपणें ६।७ महिने वयापासून दांत येण्यास सुरवात होते व मुलें माती खाण्याचा कालहि त्याच सुमारास सुरूं होतो. दांत येण्याचें काम व ते वाढवण्याचें काम पुढें बरीच वर्षे चालतें. पण पुढें जेवणांत निरनिराळे रस येत गेल्यामुळें व सुका आहारहि घेणें शक्य होत असल्यामुळें पुढें माती खाण्याची आवश्यकता रहात नाहीं.

गरोदरपणीं व तरुणपणीं

माती खाण्याची ही अवस्था पुढच्या वयांतहि उत्पन्न होते. ती एक गरोदरपणीं अगर तरुणपणीं. त्यावेळीं ती कां उत्पन्न होते तेंहि पाहिलें पाहिजे. शरीराच्या वाढीला जे रस आवश्यक आहेत त्यांत सहावा रस, तुरट रस हा आहे. आपण नित्याच्या आहारांत गोड (भात, भाकरी, पोळी, साखर, गूळ, वगैरे), आंबट (ताक, दही, लिंबू, चिंच, संत्रीं, मोसंबी, बोरें, कैऱ्या), खारट (मीठ, खार), तिखट (मिरची, आलें, मोहरी) व कडु (हळद, मेथी) वगैरे पदार्थ घेतो. हे पांच रस झाले. सहावा रस हा तुरट आहे. तो तुरट फळांतून मिळतो. कच्च्या कैऱ्या, कच्च्या चिंचा, कच्चीं कवठें, कच्चीं बोरें, खारीक, केळफूल, हिरडे, बेहेडे, कच्चे आवळे, तुरट ताक यांतून आपणास तुरट रस मिळूं शकतो. विड्याच्या पानांत आपण काथ, चुना वापरतो तोहि तुरट रसाचाच असतो. तुरट रसाच्या सेवनानें तोंड चरबरीत होत असतें. त्यानें तोंडाचा ओशटपणा जातो.

पित्तकफप्रकृति मुलें

ज्या मुलांची कफ प्रकृति असते व ज्यांच्या आहारांत क्लेदकारक पदार्थ अधिक येतात (दूध, भात वगैरे) त्यांना तुरट रसाचे क्लेदहारक पदार्थ खाण्याची आवश्यकता जास्त भासते. त्यामुळें तीं मुलें धूळ, केर, माती, चुना सीमेंट इत्यादि आर्द्रताशोषक पदार्थ खातात. त्यांना नुसत्या दुधाचा तिटकारा येतो. ते चहा कॉफी या सारख्या कडु, तुरट रसयुक्त आहाराची मागणी करतात. कोरडे पदार्थ त्यांना विशेष पसंत पडतात.

सबब लहान मुलांच्या आहाराकडे आपण विशेष लक्ष दिलें पाहिजे. अशा मुलांना थोड्या प्रमाणांत पण नियमितपणें तुरट पदार्थ मिळतील अशी व्यवस्था केली पाहिजे व ते पदार्थ अशा तुरट संस्काराचे दिले पाहिजेत.

पोटांत जाणारे तुरट पदार्थ

जुन्या काळीं बालकांच्या पोटांत तुरट पदार्थ पुष्कळ जात असत ते हल्लीं बंद झाले आहेत. सालीसकट द्विदल धान्याच्या उसळी वापरण्याची प्रथा कमी झाली आहे. सबंध मूग, सबंध हरभरे, चवळ्या यांचा वापर कमी झाला आहे. पूर्वी तुरीच्या डाळींत थोडे तरी डोळ (सालीसकट डाळ) असत. आतां अगदीं पिवळी धमक डाळ मिळते. पूर्वी जे मीठ वापरीत त्यांत मातीचा अंश असे. आतां अगदीं पांढरे सफेत मीठ वापरतात. पूर्वी मातीच्या भांड्यांचा वापर जस्त होता. मातीचा तवा, घागरी वापरीत असत. पिण्याच्या पाण्यांत पण कांहीं प्रमाणांत मातीचा अंश असे. आतां स्वच्छ पाणी पिण्यांत येतें.

खेड्यांतील राहणी

खेड्यांतील राहणींत फळें हीं सर्व अवस्थेंत खाल्लीं जात. तुरट अवस्थेंत झाडावर दगड मारून फळे पाडून ती चिकाळ फळें खाण्यांत येत. सध्या ती अवस्था गेल्यावर फळें वापरण्यांत येतात. हल्लीं कच्चा आहार फारच कमी घेतला जातो. प्रत्येक वस्तु शिजविलेली, व खानावळींतून तर सारखी ऊन ठेवण्याच्या पद्धतीमुळें अति-शिजविलेली, खाण्यांत येते. जास्त स्वच्छ (पॉलिश) केलेलें धान्य हेंहि तुरट रसविरहित होतें. बहुधा प्रत्येक धान्यावर-फळावर त्वचा ही तुरट–कडु अशा रसाचीच असते. त्यामुळेंच त्या धान्याचें फळांचें रक्षण होत असतें. कच्च्या केळांची सालीसकट भाजी करणें, केळफुलाची भाजी खाणें हे प्रकार आतां कमी झाले आहेत. दोडके, भोपळे वगैरेंच्या सालींच्या चटण्या पूर्वी करीत असत.

वातप्रकृति मुलें

ज्या स्त्रिया, मुलें, मूळतःच वातप्रकृतीचीं असतील त्यांना माती, चुना खाण्याची इच्छा होणार नाहीं. पण जीं मुलें व स्त्रिया प्रकृतीमुळें वा स्निग्ध मधुर आहारामुळें क्लिन्न शरीराचीं झालेलीं असतील तीं केव्हांना केव्हां माती, चुना, काथ, गेरू, सुपारी इत्यादि पदार्थांची मागणी करणारच. ती खाण्यावांचून त्यांना गतिच राहणार नाहीं. हा दोष कफपित्तात्मक स्वरूपाचा आहे. कांहीं व्यक्तींत कफाचा जोर अधिक असेल, त्या व्यक्ती तुरट पदार्थांबरोबर तिखट वस्तुहि खातील. उदारणार्थः-पानाचे विडे लवंगासह खातील; व ज्या प्रकृतींत पित्ताचा जोर अधिक असेल त्या व्यक्ती तुरट रसाबरोबर कडु अगर मधुर द्रव्येंपण घेतील. ते चुना व तंबाखु खातील, काळी माती खातील. प्रवाळपंचामृतानें त्यांना लाभ होईल. गेरूहि त्यांना आवडेल.

स्वस्थांचा त्रिविध आहार

आयुर्वेदांत स्वस्थांच्या स्वास्थ्यासाठीं जीं द्रव्यें सांगितलीं आहेत ती त्रिविध प्रकारचीं आहेत. एक प्राणिज, उदाहरणार्थः– दूध, मध, तूप (चरबी, मांस);दुसरीं उंद्भिज्ज (एकदल, द्विदल, वृक्ष, वेली, झुडपें व गवतें यांचीं मुळें, फळें, फुलें इत्यादि उद्भिज्ज द्रव्याचे प्रकार ४ आहेत.) तिसरी पार्थिव द्रव्यें हींहि स्वस्थासाठीं उपयुक्त आहेत असें चरकाचार्यांनीं सांगितलें आहे व त्यांचा वापर अगदीं बालपणापासून सांगितला आहे. बालकांला सोनें उगाळून व दुधांत पाण्यांत उकळून देणें हा उपाय पार्थिव आहाराचा निदर्शक आहे. लोखंडाच्या भांड्यांत केलेलें पिठलें आदि पदार्थ शरीराला लोहाचा अंश सूक्ष्म प्रमाणांत देऊन उपकारक ठरतात. वाळू व चुना ह्या गोष्टी स्वस्थ जीवनाला आवश्यक आहेत. बाळंतिणीला भरपूर पानें खाऊ देऊन त्याबरोबर खाल्लीं जाणारा चुना हा आईला व बालकाला चुन्याचा पुरवठा करणाराच आहे. असा पुरवठा बालकांना केल्यास माती खाण्याचे कारणच उरणार नाहीं अशी आम्हांस खात्री वाटते.

पोपडे कां खातात ?

मुलांची आवड निरनिराळ्या प्रकारची असते व त्याच्या अनुरोधानें त्यांचे दोष लक्षांत घ्यावेत. जी मुलें जमिनीचे पोपडे खातात त्यांची मागणी यकृत् पित्ताचा आहे असें समजलें पाहिजे. अर्थात् मुलांच्या खाण्यांत येणारे हे पदार्थ मधुराम्ललवणरसाच्या अतिरेकानें उत्पन्न झालेला क्लेद नाश करण्यासाठींच असतात हें लक्षांत घेऊन अशा बालकांच्या आहारांतील या रसाच्या पदार्थांचें प्रमाण कमी केलें पाहिजे व तुरट, कडु व क्वचित् तिखट रसाच्या पदार्थांचें प्रमाण वाढविलें पाहिजे.

सेवा संघाचीं सर्व औषधें
तसेंच सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती
आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर
गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर
अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाबळेश्वरी मध
वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—
देशी सर्वौषधी संग्रहालय
पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

तस्य माता हरीतकी

लहान (कफ पित्त प्रकृति) मुलांच्या जीवनांत असलेली ही तुरट रसाची व क्लेदशोषक द्रव्याची गरज लक्षांत घेऊनच वैद्यकीय सुभाषितकारांनीं पुढील वचन लिहिलें आहे.

यस्य नास्ति गृहे माता । तस्य माता हरीतकी ॥

ज्या मुलांला आईचें षड्रस आहारांतून निर्माण झालेलें दूध मिळत नसेल त्या मुलाला हिरडा उगाळून दिला गेला पाहिजे. आईला जेवणा नंतर विडे खावयास दिले पाहिजेत. त्रिफळाचूर्ण दिलें पाहिजे. अशा मुलांना दिवसांतून २।४ वेळा चुना काथ सुपारी युक्त थोडेसें विड्याचें पान अवश्य दिलें पाहिजे. अन्न द्यावयाचें असल्यास सालीसकट द्विदलधान्ययुक्त दिलें पाहिजे. पाणी द्यावयाचे तें त्यांत भाजलेलें मडक्या अगर लाल मातीचें ढेकूळ विझवून तें दिलें पाहिजे. दूध साखर विशेष न घातलेलें चहाचे पाणी सुद्धां ही तुरट रसाची गरज भागवील, पण त्यामुळें मलकोष्ठ न होईल अशी काळजी घेतली पाहिजे. ही काळजी हिरडा या फळाचे बाबतींत निसर्गानें घेतलेली आहे म्हणून नियमानें हिरडा उगाळून गुटी पाजणें हा माती, चुना, सीमेंट खाणाऱ्या मुलांना स्वस्थ करण्याचा उत्तम उपाय आहे असें आमचें मत आहे. हिरड्यापासून बनविलेलें अगस्तिप्राशासारखे कल्पहि मुलें आवडीनें खातात व ते नियमितपणें देत गेल्यास माती खाण्याची संवय मोडते.

या सर्व विवेचनाचें तात्पर्य

एकंदर विवेचनाचें तात्पर्य हेंच कीं मुलें, स्त्रिया व तरुण माती खाऊ लागतात तेव्हां ती तुरट रसाची मागणी आहे हें लक्षांत घ्यावें व ती न्याय्य रीतीनें पुरी पाडण्यासाठीं खारीक, हिरडे, बेहेडे, आवळकंठी तुरट ताक, तुरट कच्ची फळें, सालीसकट डाळी, चहाचें पाणी, असाण्याचें पाणी, काथ, चुना, सुपारी, बाभळीच्या शेंगा, शुद्ध गेरू, शुद्ध खापरी, शिलाजित यापैकीं मानवणाऱ्या वस्तु थोड्या प्रमाणांत पण नित्य वापरण्यांत येतील इकडे आपण लक्ष पुरवावें.

खऱ्याखुऱ्या आयुर्वेदिक

वनस्पतींचा व औषधांचा पुरवठा

सरकारी समिति

जनतेस प्रमाणभूत दर्जाच्या खऱ्याखुऱ्या आयुर्वेदिक वनस्पती व औषधें वाजवी किंमतीनें मिळावी म्हणून अेक यंत्रणा उभारण्यासाठीं मुंबई सरकारनें अेका समितीची नेमणूक केली आहे. या समितीनें आर. ए. पोदार कॉलेज (आयुर्वेदिक), वरळी, मुंबई येथील आपल्या कचेरींत कामास सुरुवात केली आहे.

या समितीचे सभासद पुढीलप्रमाणें आहेत. बापालाल जी. शहा (अध्यक्ष), श्री. जे. एन्. नामजोशी (सेक्रेटरी), वैद्य जी. एन्. पटवर्धन शिरशी, वैद्य मोतीराम नारायणजी जोशी, वैद्य व्ही. एस्. मराठे, आयुर्वेद सेवा-संघ, नासिक आणि कॉन्झरवेटर ऑफ फॉरेस्टस् रीसर्च अॅण्ड वर्किंग प्लॅन्स सर्कल, पुणें.

या समितींची कामें

ही समिति राज्यांत उपलब्ध असलेल्या वनस्पतींचा विशेषतः आयुर्वेदिक वनस्पतींचा अभ्यास करील व अशा वनस्पतींची लागवड करणें, ती गोळा करणें, तिचा संग्रह करणें, तिचा पुरवठा व विक्री करणें यास उत्तेजन देण्याच्या दृष्टीनें उपाय सुचवील. तसेंच या वनस्पतींच्या प्रादेशिक नांवांची यादी तयार करणें व वादग्रस्त औषधी वनस्पती ओळखणें हें कामहि ही समिति करील.

समितीचा पत्ताः— श्री. ए. एन्. नामजोशी
सेक्रेटरी, वनस्पति व औषधी समिति
आर. ए. पोदार कॉलेज (आयुर्वेदिक)
वरळी, मुंबई

पवित्र
नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

नवीन सरकारमान्य गुरु

शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीनें शिफारस केलेल्या पुढील ६ वैद्यांना आयुर्वेदाचे गुरु म्हणून सरकारी मान्यता मिळाली आहे.

१ वै. पु. वा. ऐनापुरे, मुंबई ४
२ वै. ज. पां. लोंढे, पेण
३ वै. विष्णुप्रसाद दामोदर वैद्य, डाकोर
४ वै. हरीप्रसाद चुनिलाल भट, बडोदा
५ वै. नानालाल महादेव पाठक, झाडेश्वर
६ वै. प्रभुभाई मकनजी भक्त, सूरत

यापुढें चालू वर्षासाठीं गुरु म्हणून मान्यता मिळणार नाहीं. १९५६।५७ मध्यें 'गुरु' म्हणून मान्यता मिळवू इच्छिणाऱ्यांनीं आतांपासूनच शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीशीं पत्रव्यवहार करून अर्ज-नमुना, अटी वगैरे माहिति करून घेणें युक्त होईल.

अरविंद आयुर्वेदिक इंजेक्शनांच्या
किंमती अतिशय कमी केल्या
ग्राहकांना विशेष सवलत

ता. १।३।१९५५ पासून नवीन नियम, लागूं. 'सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन चिकित्सा' या पुस्तकाची किंमत ३ रु. ऐवजीं १॥ रु. केली आहे. पोस्टेज १० आणे निराळे. पुस्तक व्ही. पी. नें पाठविलें जाणार नाहीं. २ रु. २ आणे म. ऑ. नें आगाऊ आल्यावर पुस्तक रजिस्टर्ड पोस्टानें पाठविलें जाईल.

पत्ता- अरविंद केमिकल वर्क्स
छिंदवाडा [म. प्र.]

अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाचे

आपण सभासद आहांत कां?

जर नसाल तर आजच वर्गणी पाठवून सभासद व्हा, व जी संस्था गेलीं ४७ वर्षे आयुर्वेदाचा प्रचार, प्रसार, उन्नति व संरक्षणार्थ सतत झटत आहे अशा ह्या वैद्यसमाजाच्या एकमेव अखिल भारतीय प्रातिनिधिक संस्थेला बलशाली करा. जे वैद्यवर्य या पूर्वींच संस्थेचे सभासद झाले असतील अशांनींहि संस्थेला अधिकाधिक सभासद प्राप्त करून देणें हें त्यांचें कर्तव्य आहे.

लक्षांत असूं द्या कीं आज हीच एक संस्था आपलें आयुर्वेदाचें हित-संरक्षण करूं शकेल व आयुर्वेदाला 'राष्ट्रीय चिकित्सा पद्धति' ह्या गौरवपूर्ण पदावर अधिष्ठित करील; आणि म्हणून ह्या संस्थेला सामर्थ्यसंपन्न करणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे.

सभासद वर्गणी वार्षिक ५ रुपये आहे. संस्थेचें मासिक मुख-पत्र 'आयुर्वेद महासंमेलन पत्रिका' हें निःशुल्क पाठविलें जातें. सभासदानें करावयाच्या अर्जाच्या नमुन्याकरितां अथवा विशेष माहिति हवी असल्यास खालील पत्त्यावर लिहावें.

पत्ताः-
अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन
महालक्ष्मी मार्केट, चांदणी चौक, दिल्ली ६

भवदीय
प्रधान-मंत्री
अ. भा. आ. महासंमेलन

आयुर्वेदीय यात्रा

(लेखक-वैद्य **प्रतापकुमार वैद्य**, मुंबई २)

अलीकडे रेल्वेच्या भाड्यांत सरकारनें ज्या …ती देण्यास प्रारंभ केला आहे त्याचे प्रकार …ले म्हणजे एकाच स्थितींतील लोकांना प्रवास …ाची हौस होणें स्वाभाविक आहे. त्याचप्रमाणें …ला देश पाहण्याची अभिलाषा पण पूर्ण होण्याची …ता आहे. प्रवासाच्या योजना करणाऱ्या संस्था …ेष सवलती देत आहेत. ज्या गांवीं जावयाचें … गांवींच रेल्वेचा डबा थांबतो, त्यामुळें गांवांत …ण्यासाठीं जागा शोधावी लागत नाहीं व त्याचा …डेखर्च पण पडत नाहीं. त्यामुळें फक्त पहावयाची …ळें पाहून परत येतां येते इतर चिंता करावी लागत …ही. मात्र हा प्रवास जलदीनें होतो त्यामुळें कोठेंहि …४ दिवस आरामशीर राहाणें घडत नाहीं. प्रत्येक …ीं एखाद दुसरा दिवसच मुक्काम घडतो.

पण मला असें वाटतें कीं, आपण वैद्यांनीं …युर्वेदीय यात्रा कां काढूं नये? ज्याप्रमाणें धार्मिक …ीनें देशांत पवित्र स्थळें आहेत, ऐतिहासिक दृष्टीनें …णीय स्थळें आहेत, त्याचप्रमाणें आयुर्वेदाच्या दृष्टीनें …त्वाचीं अशींहि स्थळें या देशांत आहेत. अशीं स्थळें …ण्यासाठीं एकट्या दुकट्यानें जाण्यानें संतोष लाभत …हीं. पहावयाचें बरेंच राहून जातें व त्याची बरोबर …हिती पण मिळत नाहीं. म्हणून वैद्यांसाठीं आयुर्वेदीय …त्रा हा एक उपयुक्त व आवश्यक प्रवास आहे.

या यात्रेंत आपण कोणकोणतीं स्थळें घेऊं शकूं? …बाबत वैद्यमित्रांनीं आपलें मत व अभिप्राय …र द्यावा. कारण मला एकट्याला सर्व माहित …ेल हें शक्य नाहीं. स्थळांची पसंति अनेक दृष्टीनें …ऊं शकेल. जसें पौराणिक स्थळें (उदा. काशी) …ान कालीन स्थळें (उदा. नासिक, जामनगर, …) आयुर्वेदीय राजकारण आणि शैक्षणिक महत्त्व …. राजकोट, भावनगर, मुंबई, नासिक, अहमद…), व्यक्तिविशेषामुळें महत्व (उ. जादवजीभाई, …; गणेशशास्त्री, पुणें; वेणीमाधवशास्त्री, नागपूर; अनंताचार्य आद्य, विजापूर). काठेवाडांत धन्वन्तरी मन्दिर आहे. कोल्हापुरांत धन्वन्तरीची मूर्ति आहे. थोडक्यांत तात्पर्य असें कीं, आयुर्वेदाच्या दृष्टीनें रसप्रद व महत्वाचीं जीं स्थळें असतील तीं आपण पहाणें योग्य होईल.

विशिष्ट चिकित्सा पाहण्यासाठीं ४।४ दिवस मुक्काम करण्याचा बेतहि करतां येईल. सामुदायिक रीत्या ठिकठिकाणच्या जाणत्या विद्वानांशीं आपणास विचारविनिमय करता येईल. अशा अनेक गोष्टी शक्य आहेत. वर जीं नांवें गांवांची व व्यक्तींची दिलीं आहेत तीं मनांत येईल तशीं दिलीं आहेत. एक गोष्ट खरी कीं, एकाच वेळीं चार धाम यात्रा, वेळ व पैसा या दृष्टीनें महाग पडेल. सबब एकदां उत्तर एकदां दक्षिण व एकदां पूर्व अशा तीन यात्रा करणें योग्य होईल. पुढें शक्य झालेंतर पश्चिमेस दर्यापारहि जाण्याचा विचार करूं.

ही योजना पुढें सरकविण्यासाठीं २ गोष्टीं प्रथम आवश्यक आहेत. एकबर यात्रेंत किती लोक जाऊं इच्छितात तें कळलें पाहिजे. व त्याची कोणीकडे जाण्याची इच्छा आहे तें नक्की झालें पाहिजे. म्हणजे मग प्रवासाची योजना ठरविणें सोईचें होईल.

प्राथमिक तयारीसाठीं ६ महिने

पहिल्या वेळीं प्राथमिक सर्व तयारीसाठीं ६ महिन्याचा अवधी लागेल. प्राथमिक खर्चासाठीं २ अगर ३ रुपये पाठवावेत व इतर सर्व खटपट करण्याचें काम लेखकावर सोपवावें (लेखक इतर ४।६ मित्रांचा सल्ला घेईलच.) ज्या ठिकाणीं जावयाचें त्याला योग्य काल कोणता हेंहि पहावें लागेल.

प्रवासांत आयुर्वेदीय वातावरण निर्माण होईल अशा चर्चा, प्रवचनें अि० चालू प्रवासांत ठेवण्याचा प्रयत्न होईल.

खर्चाची व्यवस्था काय? अंदाज काय? याची आज मला कल्पना नाहीं. पण सर्व मिळून खर्च प्रत्येकीं रु. २५० ते ३०० पर्यंत येईल व २० ते २५ दिवसांचा काल लागेल असा माझा अंदाज आहे.

१५।२० मित्र याप्रमाणें प्रवासास जाण्याची अिच्छा दाखवितील तरच या विषयीं कामाला लागणें योग्य होअील, नाहींतर आलेली रक्कम परत पाठविली जाअील. मित्रांनीं आपापला अभिप्राय कळवावा. पत्रव्यवहाराचा पत्ताः—

वैद्य प्रतापकुमार पोपटभाई
९१ आत्माराम रस्ता, अनंतवाडी नाका
भुलेश्वर, मुंबअी २

दंताहरण-कलेचें शिक्षण

वैद्यवर्गांत सुप्रसिद्ध झालेल्या प्राचीन दंतहरण कलेच्या अल्पावधि शिक्षणसंबंधानें गेलीं कांहीं वर्षें जी विचारपूस होत आहे त्यांत मध्यभारत शासनायोजित धर्मार्थ दंतयज्ञाचे अहवाल प्रसिद्ध झाल्यानें आणखी भर पडली आहे. या कलेचें शिक्षण घेण्याकरितां वैद्यातिरिक्त डेन्टिस्ट्स् व डेन्टल कॉलेजांतील विद्यार्थी आणि मोठमोठाले डॉक्टर्स यांचेकडून विचारणा होत आहे. त्यांत किंग एडवर्ड हॉस्पिटल, इंदूरचे ३० वर्षांची जुनी प्रॅक्टिस असलेले माजी डेन्टल सर्जन या सारख्या लोकांचा सुद्धां समावेश होतो; इतकेंच नव्हे तर मध्यभारत शासनानें सुद्धां त्या विषयीं विचार चालविला आहे; कारण दंतयज्ञ चालू असतांना शासन संचालित डेंटिस्ट्रीच्या विभागांत नवीन ९ रुग्णसुद्धां प्रविष्ट झालेले नाहींत. तरी सुद्धां सदरहू दंतयज्ञाचा लाभ घेण्यासाठीं ९०० च्या वर रोगी कां आले ?

निकडीची गरज

या प्रत्यक्ष प्रयोगानें सिद्ध झालेल्या प्रश्नानें तसेंच जनसंख्येच्या मानानें देशांत दन्तवैद्यांची मोठ्या प्रमाणांत जी उणीव आहे त्याला तोंड देण्यासाठीं या पद्धतीचा उपयोग कां करूं नये इत्यादि प्रश्नामुळेंहि या कलेसह आयुर्वेदीय दन्तविज्ञानाचे शिक्षणाकरितां निकडीची गरज उभी झाली आहे, म्हणून मध्यभारत डॉयरेक्टरकडून खालीलप्रमाणें विचारणाहि झालेली आहे.

मध्यभारताच्या डायरेक्टरचें पत्र

Please send detailed repo regarding total number of patient treated, number of patients to who advice is given, and in what manne the teeth were extracted, very earl as it is urgently to be submitlted t the Govt.

मुंबई राज्याच्या डायरेक्टरशीं वातचीत

अशा तऱ्हेनें ह्या सर्वच बाबतींत स. मे. डाये क्टर ऑफ आयुर्वेद, मुंबई राज्य ह्यांच्याशीं ता. २ ७।५५ रोजीं विचारविनिमय करण्यांत आल कारण अल्पावधींत शिक्षण देणें म्हणजेच वैद्य विद्य र्थ्यांना जास्तींत जास्त रुग्णांच्या परिचयांत आ हेंच होय. आणि त्यासाठीं मुंबईसारख्या मो शहरांतल्या मध्य वस्तींत राज्य संचालित धर्म रुग्णालय दवाखाना असणें ही प्राथमिक आवश्यक आहे. तूर्त तरी ती आवश्यकता येथील पो मेडिकल कॉलेजमध्यें किंवा एखाद्या शुद्धायुर्वेदी पाठशाळेंतून भागवितां येणें शक्य आहे, असें वि रांतीं उभयतांमध्यें ठरलें असल्यामुळें त्या दिशेनें डायरेक्टर ह्यांनीं पाऊल टाकण्याचें स्वीकारलें आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता

तरी आतां ज्या ज्या गरजू वैद्यबांधवांची मनीषा वर्षानुवर्षं तिष्ठत राहिलेली आहे, ति पूर्तीसाठीं त्यांनीं त्या विषयीं आपलें वैद्यकीय व अ शिक्षण, धंदा इ. सविस्तृत खुलाशासह अर्ज लिहू मे. डायरेक्टर ऑफ आयुर्वेद मुंबई राज्य, नि रोड, बेलार्ड एस्टेट, फोर्ट मुंबअी, यांचेकडे पाठवा असें केल्यानें त्यांना वैद्यवर्गाच्या मागणीसह आ स्वतःचा दृष्टिकोन राज्य सरकारपुढें मांडून कार्या करणें सोपें होईल.

सौ. अिंदुमती नेने
सहमंत्री, अ. भा. आ. डे. मिशन, मुंबअी

चहा संपला :

(लेखक— मौ. अबदुल कलाम आझाद)

प्रिय सिद्दिक साहेब

वेळ तीच आहे, परन्तु मनाला तृप्त करून चिंतनामध्यें मनाला तल्लीन करणारा तो चहा मात्र आज नाहीं. अरेरे! मला ज्या खास चिनी चहाची संवय होती तो चहा आतां संपून गेला आहे आणि अहमदनगर व पुणें येथील बाजारांत या मौल्यवान् वस्तूची कुणाला माहितीहि नाहीं. तेव्हां नाइलाजानें 'हबशी माणसाचें नांव कापूर ठेवावें' या न्यायानें हिंदुस्थानांतील ज्या काळ्या कुट्ट पानांच्या काढ्यास लोक चहा असें म्हणतात आणि त्यांत दूध घालून त्याचें सरबत करून पितात असा तो 'नाममात्र चहा' मी सध्यां पीत आहे.

नफ्यातोट्याच्या या कर्मभूमीमध्यें ज्यांत हळहळ अथवा दुःख नाहीं असा कोणताच ऐषआराम नाहीं. या जगामध्यें तळाशीं दुर्भावनेचा गाळ नसलेला स्वच्छ पाण्याचा पेला दिसत नाहीं. विजयाचा पाठलाग करणाऱ्यासाठीं पराभवाची झांपड धडपडत असते, वसन्तऋतूच्या हास्यामागून नेहमीं पानझडीचें रडणें ऐकूं येत असतें. प्रत्येक भरलेला प्याला रिकामा होत असतो. पुस्तकाचें पान वाचून संपलें कीं, तें उलटून आपण पुढें जातो.

आपली कोणतीहि अभिलाषा पुरी होणें बरी नव्हे. कारण पृष्ठ पूर्ण झालें कीं तें उलटलें जातें.

चहाच्या प्रश्नांतील बारकावे

मागें एकदां रमजानच्या दिवसांत तुम्ही आपल्या 'अंबरी' चहाचा उल्लेख केला होता, तो तुमचा चहा अजून तुम्हाला मिळत असेल अशी मी आशा करतो.

ह्या चहाच्या प्रश्नांतील बारकावे समजून घेऊन त्याचा तुम्ही विचार केला आहे कीं नाहीं कोण जाणें! मी माझ्या स्थितीचें काय वर्णन करूं? वस्तुस्थिति अशी आहे कीं, आजकालच्या इतर अनेक प्रश्नांप्रमाणें या बाबतींतहि मी इतरांशीं सहमत होऊं शकलेलों नाहीं. जगाच्या मार्गभ्रष्टतेबद्दल शोक करीत राहाण्याची पाळी याहि प्रश्नाच्या बाबतींत माझ्यावर आलेली आहे.

माझा मार्ग अलग आहे

जगरहाटीचें अनुकरण करणें म्हणजे वाट चुकणें होय, म्हणून ज्या रस्त्यानें एखादा कापिला गेलेला असेल त्या रस्त्यानें मी कधीं जात नाहीं.

चहाच्या बाबतींत मतभेद

चहाच्या बाबतींत जगांतील इतर लोकांशीं जो माझा मतभेद आहे तो फक्त पानें आणि फांद्या यांच्यापुरता मर्यादित नसून मुळापासून शेंड्यापर्यंत म्हणजेच मूलभूत, सैद्धांतिक आहे. यामुळें तडजोडीची कांहीं आशा नाहीं. चहाच्या बाबतींत सर्वांत पहिला प्रश्न चहापासूनच सुरू होतो. मी केवळ चहासाठीं चहा पीत असतो. इतर लोक दूध व साखर यासाठीं चहा पीत असतात. म्हणजे चहा हें माझें साध्य आहे. इतरांचें तें साधन आहे. पहा, माझी दृष्टि काय आहे नि जग कुणीकडे चाललें आहे!

दुधांतील स्थूल तत्त्व

चहाचें मूळ ठिकाण चीन देश आहे. आणि चिनी लोकांच्या म्हणण्याप्रमाणें गेलीं दीड हजार वर्षें ते चहा वापरीत आहेत. परंतु तेथें कोणाच्या स्वप्नांतहि असें आलें नाहीं कीं, या सूक्ष्म तत्त्वांमध्यें दुधाच्या स्थूल तत्त्वाची भेसळ करून तें बिघडवून टाकावें! रशिया, तुर्कस्थान, इराण वगैरे ज्या ज्या देशांत सरळ चीनमधून चहा गेला, तेथें देखील कोणाला ही कल्पना सुचली नाहीं.

दूध घालण्याची पध्दत इंग्रजांची

परंतु सतराव्या शतकांत जेव्हां इंग्रजांना ही चीज माहित झाली तेव्हां त्यांच्या डोक्यांत काय खूळ

शिरलें देव जाणें, त्यांनीं त्यांत दूध मिसळण्याची अजब चाल शोधून काढली आणि हिंदुस्थानांत त्यांच्या मार्फतच चहाचें आगमन झाल्यामुळें ही काळी कुट्ट पद्धत येथेंहि प्रचलित झाली. हळूंहळूं अशी स्थिति येऊन ठेपली कीं, लोक चहामध्यें दूध घालण्याऐवजीं दुधांत चहा घालूं लागले.

जुलमाचा पाया या जगामध्यें फार थोडा होता, परंतु जो कोणी आला तो हा पाया वाढवीतच गेला.

चहाची कांजी किंवा बासुंदि

आतां इंग्रज लोक असें सांगून मोकळे झाले कीं, चहामध्यें जास्त दूध घालतां कामा नये. परन्तु त्यांनीं पेरलेल्या कुप्रथेचें बीज या भूमींत रुजून त्यानें आपलीं पानें व फळें देशभर पसरून टाकलीं आहेत, तीं कोण तोडून काढणार? आतां लोक चहाच्या ऐवजीं जणूं एक प्रकारची कांजी किंवा बासुंदी करतात आणि आपण चहा पीत आहोंत अशी स्वतःची समजूत करून घेऊन खूष होतात. या नादान लोकांना कोणीतरी सांगितलें पाहिजे कीं, 'हाय कम्बख्त तूने पी ही नहीं!' (अरे अभाग्या, तूं कधीं चाखलीच नाहींस!")

एक गैरसमज

शिवाय चहाच्या प्रकारासंबंधींहि एक मूलभूत प्रश्न आहे आणि या बाबतींतहि जगभर एक गैरसमज पसरलेला आहे. कुणा–कुणाशीं भांडावें नि कुणा-कुणाला समजावून सांगावें? अहोरात्र जगाशीं झगडत राहाणें कुणाला शक्य आहे?

कोणता चहा चांगला?

हिंदुस्थानांत व सिलोनमध्यें उत्पन्न होणाऱ्या एका विशेष प्रकारच्या पानांना सामान्यतः लोक चहा असें समजतात आणि त्याचे निरनिराळे प्रकार करून अमुक प्रकारचीं पानें दुसऱ्या प्रकारच्या पानांपेक्षां श्रेष्ठ व चांगली आहेत असें ठरवितात व त्या बाबतींत आपापसामध्यें भांडण करतात. एक पक्ष म्हणतो कीं, सिलोनचा चहा उत्कृष्ट असतो, तर 'दुसरा गट' म्हणतो, दार्जिलिंगचा चहा सर्वोत्कृष्ट असतो. प्रेमाच्या बाबतींत कोणीतरी म्हटल आहे ना, कीं–

तो चहाच नव्हे

प्रीतीच्या मार्गामध्यें कोणीहि खात्रीपूर्वक अ सांगूं शकत नाहीं कीं मला प्रेमाचें रहस्य सम आहे. प्रत्येक व्यक्तीला तिच्या बुद्धीप्रमाणें थोडें ज्ञान झालेलें असतें. त्यांतलीच गत झाली. परन्तु गं व वास यामुळें फसगत झालेल्या या लोकांना कु समजावून सांगावें कीं, बाबांनों, ज्या वस्तूसंबं तुम्ही वादविवाद करीत आहांत ती मुळांत चहा नाहीं म्हणून!

भारतांतील काळा चहा

हा जागतिक गैरसमज कसा निर्माण झाला! त्याचें असें झालें, एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस जेव्हां चोंहोंकडून चहाची मागणी वाढूं लागली तेव्हां हिंदुस्थानांतील कांहीं इंग्रज मळेवाल्यांना अशी कल्पना सुचली कीं, सिलोन व हिन्दुस्थान येथील उंच व दमट ठिकाणीं चहाची शेती करण्याचे प्रयोग आपण करून पहावेत. त्यांनीं चीनहून चहाचे रोपें मागविलीं आणि येथें त्यांची शेती सुरूं केली. येथील मातीनें चहा उत्पन्न करण्याचें साफ नाकारलें, परन्तु जवळ जवळ अगदीं त्याच रंगरूपाची दुसरी एक वस्तु निर्माण केली. त्या करंट्यांनीं तिलाच चहा असं नांव दिलें. आणि खऱ्या चहाप्रमाणेंच ती लोकांना वाटावी म्हणून त्यांनीं तिला 'काळा चहा' असें म्हणण्यास सुरवात केली

लोकांच्या चुकासंबंधीं कांहीं विचारूं नका. ते निःश्वासांना दोरीनें बांधूं पहातात.

ही दुर्मिळ वस्तु कशी स्वस्त मिळे या शोधामध्यें जग गुंतलें होतें. यामुळें ते अडाणीपणानें या नव्या वस्तूवर तुटून पडले आणि मग जणूं सा मानव जातमध्यें अशा प्रकारें फसगत करून घेण्याची अहमहमिका सुरूं झाली. आतां तुम्हीं कितीहि फोड केलीत तरी कोण ऐकतो!

सर्वांत दुःखदायक गोष्ट

या बाबतींतील सर्वांत दुःखदायक गोष्ट अशी आहे कीं, खुद्द चीनच्या किनाऱ्यावरील कांहीं रहिवा

[illegible] या जागतिक प्रतारणेच्या तडाख्यांत सांपडले आणि याच पानांना चहा समजून त्यांचा काढा करूं लागले. म्हणतात ना, कीं बदख्शान देशाचे लोक तांबड्या दगडाला लाल रत्न समजूं लागले आणि काश्मिरच्या लोकांनीं रंगीत गवताला केशर समजून त्यानें आपल्या पगड्या रंगाविण्यास सुरवात केली— त्यांतलीच गत.

मनुष्यजातीच्या बहुमतानें निर्णय नेहमीं [illegible]तेच लागत आले आहेत. मानवसमाजाचा हा स्वभावधर्मच आहे कीं, नेहमीं शहाणा माणूस एखाद-दुसराच असतो, बाकी सगळी गर्दी मूर्खांचीच असते. ते श्रद्धा करूं लागले तर गाईलाहि देव मानतील, नाहींतर प्रेषिताला-येशूला-सुळावर चढावितील. हकीम सनाई जन्मभर आक्रोश करीत होते:— "सर्वसामान्य लोक गाईला देव मानतात परन्तु मूढ प्रेषिताला पैगंबर मानीत नाहींत." म्हणून सत्याचें ज्ञान असलेल्यांना म्हणावें लागलें, "जगाचा विरोध करणें म्हणजे जणूं सत्याचें समर्थन करणें होय. स्वतःला जाणून घेणें आणि अंतरात्म्याचा आवाज ऐकणें, मान्य करणें, सर्वांत अधिक श्रेष्ठ होय. सत्याच्या जोरावर लोकांचें असत्य खोडून काढणें, अंधानुकरणाचा त्याग करणें म्हणजेच सत्य मार्गानें चालूं लागणें होय."

साखरेची समस्या

ही सर्व सिद्धांताची चर्चा झाली. आतां आपण प्रत्यक्ष व्यवहाराकडे वळूं. येथेंहि सरळ सपाट जमीन असलेला थोडाहि भाग नाहीं. सगळीकडे उंच–सखल व खडबडीत स्थितीच आहे. सर्वांत महत्त्वाची समस्या साखरेची आहे. तिचीं प्रमाणें आणि तिची प्रत या दोन्ही बाबतींत ठणठणाटच आहे. ' अरेरे ! वैद्यराज संयम बाळगण्यास सांगत आहेत आणि या आधाशी मनाला साखरेची जरूर आहे !' परिमाण किंवा प्रमाण याच्या दृष्टीनें बोलावयाचें म्हणजे मला स्वतःला गोडाविषयी फारशी आसक्ति नाहीं. चहामध्येंच नव्हे तर इतर कोणत्याहि वस्तूमध्यें वाजवीपेक्षां जास्त साखर घातलेली मला आवडत नाहीं.

गोडाचा परिणाम काय होतो ?

जगाला ज्या वस्तूची गोडी वाटते तिचाच मला तिटकारा येतो. गोड वस्तु खाल्ली कीं तोंडाची चव निघून जाते. लोकांना गोडपणामध्यें जी लज्जत मिळते ती मला खारटपणमध्यें मिळते. मला गोऱ्या रंगाचें वेड नाहीं, सांवळ्या रंगाबद्दल विशेष आकर्षण आहे. लहान मुलांना गोड वस्तु आवडतात असें जणूं ठरून गेल्यासारखें आहे, परन्तु तुम्हाला आश्चर्य वाटेल कीं मला लहानपणींहि गोड वस्तु आवडत नसत. सवंगडी मला चिडवीत असत कीं, ' तूं कडुनिंबाचीं पानेंच खात जा. ' आणि एकदां खरोखरीच त्यांनीं कडुनिंबाचीं वाटलेलीं पानें मला खाऊं घातलीं होतीं. गोडधोड खाण्याची संवय नसणें हा एक दोष समजण्यांत येतो हें पाहून मी कित्येकदां निःसंकोचपणें गोडाची गोडी लावून घेण्याचा प्रयत्न केला, परन्तु दर खेपेस अयशस्वीच झालें.

साखरेची प्रत

तें असो. साखरेच्या परिमाणांसंबंधींच येथवर विवेचन झालें. परंतु एवढ्यानें हा प्रश्न सुटत नाहीं. दुसरा अत्यंत गंभीर प्रश्न तिच्या प्रतीसंबंधींचा आहे. सामान्यतः असें समजण्यांत येतें कीं, जी साखर इतर पदार्थांत घातली जाते तीच चहामध्येंहि वापरली पाहिजे. त्यासाठीं दुसऱ्या एखाद्या खास प्रकारच्या साखरेची जरूर नाहीं. यामुळें पूर्वीं जावा व मॉरिशसहून येणारी आणि हल्लीं हिंदुस्थानांतहि तयार होणारी बारीक दाणेदार साखर चहासाठींहि वापरण्यांत येते. परंतु वस्तुतः चहाची गोष्ट इतर वस्तूंपेक्षां वेगळी आहे. चहा म्हणजे कांजी किंवा बासुंदी असें समजतां कामा नये. त्याची प्रकृति इतकी नाजुक व सुकुमार आहे कीं, जी वस्तु त्याच्यासारखीच कोमल व स्वच्छ नसेल ती त्याच्यांत मिसळल्यास तो बिघडून जाईल. कुणीतरी म्हटलें आहे:— ' प्रातःकालीन सुगंधित वायूनें जर त्याला स्पर्श केला तर त्याचा स्वादहि मलिन होईल. '

कोणती साखर वापरावी ?

ही बारीक साखर स्वच्छ केलेल्या रसापासून बनत असली तरी ती पूर्णपणें स्वच्छ होत नाहीं. साखर कमी निर्माण होईल म्हणून स्वच्छतेच्या शेवटच्या क्रिया सोडून देण्यांत येतात. याचा परिणाम असा होतो कीं, तुम्ही साखर चहांत टाकली रे टाकली कीं ती चहाचा स्वाद बदलून टाकते आणि त्याची मज़ा नाहींशीं होते. साखरेचा हा प्रभाव नेहमींच पडत असतो. पण जर तुम्ही ती दुधांत घातली तर मात्र तिचा विपरीत परिणाम दिसून येत नाहीं. कारण दुधाचा स्वाद चहाच्या स्वादावर कुरघोडी करतो, आणि तो फरक लक्षांत येत नाहीं. परन्तु कोरा चहा प्या कीं तो तावडतोब लक्षांत येतो. म्हणून चहासाठीं अशी साखर पाहिजे कीं जी बर्फासारखी निर्भेळ व बिलोरी कांचेसारखी स्वच्छ पारदर्शक असेल. अशी साखर स्फटिकांच्या (ब्लॉक्स) स्वरूपांतहि मिळते आणि मोठी कणी असलेलीहि मिळते. मी नेहमीं मोठी कणीदार स्वच्छ साखरच वापरतो.

नाज़ुकपणा व सुक्ष्मता

ज्याप्रमाणें सरबत पिणाऱ्याला साखर आणि गूळ यांतील फरक चटकन् जाणवतो त्याप्रमाणें साखरेच्या प्रकारांतील हा फरक मला चटकन् जाणवतो. पण मोठी विचित्र आणि अडचणीची गोष्ट अशी आहे कीं मी हा फरक इतरांना समजावून किंवा जाणवून देऊं शकत नाहीं. ज्यांना ज्यांना मी यासंबंधीं सांगितलें त्यांना त्यांत अतिशयोक्ति तरी वाटली किंवा हा माझ्या मनांतीलच कांहींतरी भ्रम अथवा कल्पना असावी असें वाटलें. त्यामुळें मला असें वाटूं लागलें आहे कीं, जगामध्यें माझ्यातरी तोंडाची चव गेली असावी किंवा इतर कोणाच्याच तोंडाला चव नसावी. येथें चहाच्या शिष्टाचाराची चर्चा चालली नसून नाज़ुकपणा व सूक्ष्मता यांच्या अनुभूतीसंबंधीं आपलें बोलणें चाललें आहे हें विसरूं नका. पुष्कळसे लोक चहासाठीं साखरेचे पांढरे स्वच्छ खडे (ब्लॉक्स) आणि जाडा साखऱ्या वापरतात. युरोपमध्यें तर पांढरे खडेच वापरण्याचा प्रघात विशेष आहे. पण चहाच्या रुचीसाठीं त्यांची जरूर असते म्हणून ते वापरले जात नाहींत, तर त्यांत केवळ औपचारिकपणा असतो. कारण अशा प्रकारची साखर जास्त महाग असते. अशा लोकांना तुम्हीं साधी साखर घालून चहा दिला तर ते निमूटपणें तो पिऊन टाकतील आणि त्याच्या चवीमध्यें कांहीं फरक पडला असें त्यांना वाटणारहि नाहीं.

साखरेच्या बाबतींत जर कोणी खरे पारखी असतील तर ते इराणी लोक. चहाच्या प्रकारांची त्यांना फारशी माहिती नसते हें खरें; परन्तु हा साखरेचा मुद्दा मात्र त्यांच्या नीट ध्यानांत आलेला आहे. इराक व इराण देशांत प्रवास करीत असतां मला असें दिसून आलें कीं, त्या ठिकाणीं लोक चहासाठीं कंद नांवाच्या विशिष्ट साखरेच्या शोधांत असतात आणि मामुली साखरेपेक्षां तिला अधिक पसंत करतात. कारण ही कंद साखर स्वच्छ असते आणि जाडा साखऱ्या ज्या कामासाठीं वापरला जातो त्याच कामासाठीं ही साखर वापरण्यांत येते.

स्वादभ्रष्ट रुचिहीन लोक

वस्तूंचा खरा परिचय त्यांच्या विपर्ययावरून होत असतो या न्यायानें जर तुम्ही विचाराल कीं चहाच्या बाबतींत सर्वांत अधिक स्वादभ्रष्ट किंवा रुचिहीन लोक कोणते ? तर मी निःसंकोचपणें इंग्रजांचें नांव घेईन. युरोपांत व अमेरिकेंत इंग्लंडच्या मार्फतच चहा गेला आणि त्याचा जगभर प्रसार करण्याचें श्रेयहि बहुतांशीं इंग्रजांनाच आहे. पण असें असूनहि सत्य स्थितीच्या बाबतींत जवळ अज्ञानांत असणारे हे लोक इतक्या लांब जाऊन पडले आहेत कीं, चहाचा नाज़ुकपणा व सूक्ष्मता यांचा स्पर्शहि त्यांना झालेला नाहीं. या पंथांतील पुढाऱ्यांची जर ही स्थिति तर त्यांच्या अनुयायांची काय दशा असेल याची कल्पना केलेली बरी!

चीनकडून चहा पिणें तेवढें ते शिकले, त्यांना इतर क़ांहीं शिकतां आलें नाहीं. हिंदुस्थान

सिलोन येथील काळी पत्ती ही त्यांच्या चहाषोकाची हद्द झाली! त्यांत पुन्हां ते चहामध्यें गार दूध घालून त्याचें अगदीं धूणच करून टाकतात, आणि या सर्वांवर कळस म्हणजे असल्या या घाणेरड्या त्याचें रहस्य लोकांना समजावून सांगण्यासाठीं ज्ञाची एक फौजच्या फौज नेहमीं तयार असते. या भाग्यांना कुणी विचारावें कीं, चहापान म्हणजे हीं काळीं पानें गरम पाण्यांत घालून पिणें एवढाच उद्देश असेल तर शास्त्रज्ञांच्या सूक्ष्म ज्ञानाची येथें काय जरूर आहे? जीं कोणतीं पानें पाण्याला काळसर रंग आणतील आणि उग्र वास निर्माण करतील तीं म्हणजेच चहा, आणि त्यांत एक चमचाभर गार दूध घालून तो बिघडवून टाकणें म्हणजेच चहाचा षोक असेल तर त्यासाठीं चहा–विशारदांची काय जरूर?

दुधाशिवाय चहा पितात

फ्रान्समध्यें व युरोपखंडांतील कॉफीचा प्रचार जास्त झाला. परंतु तेथें उच्च वर्गीय लोकांना चहाचाहि शोक आहे आणि त्यांचा षोक इंग्रजापेक्षां कितीतरी अधिक सुसंस्कृत आहे. ते बहुधा चिनी चहाच पितील, आणि जरी काळा चहा प्याले तरी नेहमीं दुधाशिवाय; फार तर लिंबाच्या एका फोडीबरोबर पितील. लिंबाच्या रसामुळें चहाची चव बिघडत नाहीं, उलट त्याची लज्जत जास्तच वाढते. लिंबू वापरण्याची ही प्रथा मुख्यतः रशिया, तुर्कस्थान व इराण या देशांतून सुरू झाली. समरकंद आणि बुखारा या शहरांत अशी सार्वत्रिक प्रथा आहे कीं, चहाचा तिसरा कप लिंबाच्या रसानें युक्त असतो. ही दुधाची पीडा मात्र इंग्रजांनींच आणली आहे.

गुळाचा चहा

आतां कांहीं दिवसांपासून नवीनच एक आफत येऊन पडली आहे. आतांपर्यंत चहासाठीं सामान्य जातीची साखर वापरण्याचेंच रडगाणें चाललें होतें, पण आतां चक्क गुळापर्यंत परिस्थिति येऊन ठेपली आहे. हिंदुस्थानांत जुन्या काळीं जेव्हां लोकांनीं गुळाचा पुढील टप्पा गांठण्याचा विचार केला तेव्हां त्यांनीं गूळ स्वच्छ करून प्रथम त्याची 'लाल साखर' बनविली. स्वच्छतेच्या बाबतींत ही गुळीसाखर साखऱ्याच्या कितीतरी मागें, पण तिनें गुळाच्या पुढें एक पाऊल टाकलें. पुढें जेव्हां साखऱ्या तयार होऊं लागला तेव्हां ही गुळीसाखर बहुतेक खेड्यांपुरतीच मर्यादित राहिली.

गुळाची मागणी वाढेल

पण आतां जगाची अवनति सुरूं झाली आहे आणि शेंकडों वर्षांपूर्वी तें जेथून निघालें होतें तेथेंच परत चाललें आहे. यामुळें अमेरिकेमध्यें सध्यां या गुळीसाखरेला खूप मागणी आहे म्हणे! तेथील षौकीन लोक असें म्हणूं लागले आहेत कीं, या तांबड्या साखरेशिवाय कॉफीला कांहीं चवच येत नाहीं आणि नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्यांचें अन्धानुकरण करणारे येथील काळे साहेबहि या 'ब्राऊन शुगर' चीं स्तुति–स्तोत्रें गाऊं लागले आहेत. माझी ही भविष्यवाणी तुम्ही लिहून ठेवा कीं, लवकरच 'ब्राऊन शुगर' चा हा पातळ पडदाहि दूर होईल आणि सगळीकडे चक्क गुळाची मागणी सुरूं होईल. आधुनिक रुचि असणारे मित्र म्हणूं लागतील कीं गुळाचे खडे घातल्याशिवाय चहालाहि लज्जत येत नाहीं अथवा कॉफीलाहि मजा येत नाहीं.

अशा या 'आज' नंतर, अशीच 'उद्यां' येणार असेल तर दुर्दैवच म्हणावयाचें!

जवाहरलालजी गूळहि खातात

साखर आणि गूळ यांचीं जगें इतकीं भिन्न आहेत कीं, माणसानें एकाचा स्वीकार केला कीं दुसऱ्याशीं त्याचा कांहींच संबंध उरत नाहीं. मी असें पाहिलें आहे कीं ज्या लोकांनीं आयुष्यांत दोन–चारदां कां होईना, गूळ खाल्ला असेल त्यांच्यामध्यें साखरेच्या स्वादाचें सूक्ष्म ज्ञान शिल्लक राहात नाहीं. जवाहरलालजींना गोडाचा फार षोक आहे,

यामुळें ते गूळहि खातात. साखरेच्या अनेक प्रकारांतील जे सूक्ष्म भेद मला अगदीं स्पष्ट दिसतात त्यांची कल्पना जवाहरलालजींना आणून द्यावी म्हणून मी जंग जंग पछाडलें, पण मला मुळींच यश आलें नाहीं. जगाच्या अडाणीपणाबद्दल किती शोक करावा ?

जाऊं द्या झालें. हा प्रश्न इतका मोठा आहे कीं तो थोडक्यांत आटोपावयाचें ठरविलें तरी संपणार नाहीं. आतां मी तुम्हाला स्वतःविषयीं थोडी माहिती सांगतो. रसिक लोकांचें असें म्हणणें आहे कीं, सौंदर्य व कला यांच्या बाबतींत देशभक्तीचा अडसर उत्पन्न होऊं देतां कामा नये. म्हणून चहाच्या बाबतींत मी हिंदुस्थानच्या बाजूचा नसून चीनचा पुरस्कर्ता आहे. माझ्या भूगोलामध्यें चीनचा जो उल्लेख आलेला आहे त्याचें कारण ज. चँग कै शेक व मॅडम चँग कै शेक हे चीनहून येथें आले होते हें नसून तेथून इकडे चहा येत असतो हें आहे.

चहाचा रंग कोणता ?

कित्येक वर्षांपासून मला ज्या चिनी चहाची संवय लागलेली आहे, त्याला ‘ व्हाइट जस्मीन ’ किंवा ‘ गोरी चमेली ’ असें म्हणतात. या चहाचा सुगंध जितका उत्कृष्ट आहे तितकीच त्याची लज्जत मस्त आहे. रंगाच्या बाबतींत मी काय सांगूं ? लोकांनीं त्याला ‘ प्रवाही आग ’ अशी उपमा दिलेली आहे. परन्तु आगीची उपमा अगदींच ढोबळ आहे. या चहाची श्रेष्ठता व्यक्त करण्यासाठीं याहून वेगळी उपमा शोधावी लागेल. सूर्याचे किरण मुठींत पकडून कांचेच्या पेल्यांत भरून ठेवले तर जो रंग निर्माण होईल तो या चहाचा रंग असेल.

महायुद्धामुळें जहाजांचें येणें-जाणें बंद झालें. त्याचा परिणाम चहावरहि झाला. कलकत्त्याच्या ज्या चिनी स्टोअरमधून मी चिनी चहा आणवीत असे त्याचा सांठाहि संपुष्टांत येऊं लागला होता. परंतु तरीहि कांहीं डबे मला मिळाले होते आणि कांहीं चिनी मित्रांनीं भेट म्हणून दिले होते. मी कलकत्त्याहून मुंबईस आलो तेव्हां मजबरोबर एक डबा होता. एक डबा घरीं ठेवून आलो होतो. मला मुंबईला प येथें आणण्यांत आलें तेव्हां इतर सामानाबरोबर डबाहि आला. तो संपतो न संपतो इतक्यांत घर डबा येऊन पोंचला. अशाप्रकारें येथें इतर कि गोष्टींचा अभाव जाणवला तरी चहाचा अभाव नाहीं. याचा अर्थच असा कीं, इतर कोणत्या गोष्टींचा अभाव नाहीं. या ठिकाणीं कैद्यांच्या समु दायांत या वस्तूची पारख असलेला कोणी नाहीं. बहुतेक महाशयांना दूध व दही यांचाच शोक आहे आणि दुधा-दह्याचें हें जग चहाच्या जगाहून किती दूर आहे हें तुम्ही जाणतांच. शेंकडों वर्षें व अनेक पिढ्या होऊन गेल्या तरी हें अंतर कमी होणें शक्य नाहीं. कुठें चहाच्या नाजुक व सूक्ष्म स्वादाची काव्यमय मस्ती, अन् कुठें दह्यादुधाची पोटभर गद्य अभिरुचि;

बिनदुधाचा चहा पितात

जवाहरलालना चहाची संवय आहे यांत मुळींच शंका नाहीं. आणि युरोपांतील उच्च वर्गीय लोकांप्रमाणें तेहि बिनदुधाचा चहा पितात. परंतु चहाच्या जातीचा प्रश्न निघाला कीं, ते सर्वसामान्य चाकोरीच्या बाहेर जाण्यास तयार होत नाहींत.आणि आपल्या मामुली चहावरच ते संतुष्ट असतात. अशा स्थितींत या लोकांना माझा उत्कृष्ट चहा देण्याच्या भानगडीत पडणें व्यर्थ होतें.

“ बरा आहे ” चहा

या महाशयांपैकीं फक्त एक गृहस्थ असे निघाले कीं, ज्यांनीं एकदां प्रवासामध्यें हा चहा पिऊन पाहिला होता आणि त्यांना असें वाटलें होतें कीं, जरी हा चहा बिनदुधाचा असला तरी ‘ बरा आहे. ’ याचा अर्थ असा कीं, ते रोज दूध घालून जे गरम सरबत पीत असत तोच खरा ‘ चांगला चहा ’ होता. पण माझा हा चहाहि अगदींच वाईट नव्हता. जगांतील लोकांची सर्वसामान्य उथळ अभिरुचि पाहतां त्यांनीं ‘ बरा आहे ’ असें म्हणून

चहाची जी कदर केली त्यामुळें मला इतका नंद झाला कीं, मी त्यांना अधूनमधून बोलावीत आणि म्हणत असे-- “ या, ‘ बरा आहे ’ चहा- एक कप घ्या ना जरा ! ”

त्यांच्या मतें हा चहा फक्त ‘ बरा आहे. ’ अस्मादिकाची स्थिति अशी आहे कीं, हा आहे ’ चहा जर कां संपून गेला तर सगळा च खतम झाला. गालिबनीं काय सुंदर वर्णन आहे— ‘ हे कर्मठा, आम्ही तुला फक्त द्राक्षांचा घोंस देत आहोंत; परंतु ही देणगी लहानसहान असें तूं समजूं नकोस. कारण तुला एक घोस आमचे एका प्याल्याचें नुकसान होणार ’ एक ढब्बा असा किती दिवस पुरणार? अखेर संपुष्टांत आलाच. चीताखानानें येथें चौकशी , पुण्यासहि पत्र लिहिलें, पण अशा प्रकारच्या सुगावा कांहीं लागला नाहीं. आतां मुंबईला कत्याला पत्रें लिहिलीं आहेत. पहावें काय उत्तर तें. गेल्या आठवड्यापासून तोच काळ्या पानांचा खानी चहा पीत आहे आणि भविष्यकाळाच्या वर जगत आहे.

चिनी रेस्टारंटमध्यें चौकशी

सध्यां हिंदुस्थानांतील सर्व शहरांमध्यें चिनी वसलेले आहेत आणि प्रत्येक ठिकाणीं चिनी रांस् आहेत. अहमदनगरमध्यें इंग्रजी फौजेची छावणी असल्यामुळें तेथेंहि एक चिनी रेस्टॉरंट . जेलरला वाटलें कीं, या लोकांजवळ हा चहा मिळेल. म्हणून त्यानें रिकामा डबा पाठवून केली. चिनी लोकांनीं तो डबा पाहातांच तलें – “हा चहा आतां कुठला मिळायला गेला ! तुम्हाला हा डबा कोठून मिळाला, अन् या शी इथं काय जरूर ? चीनहून एकादा बडा येथें येणार आहे कीं काय ?” झालें ! डबा गेलेल्या वॉर्डरानें अिकडच्या तिकडच्या गप्पा पण त्यांचा त्यावर विश्वास बसला नाहीं. दुसऱ्या दिवशीं संबंध शहरांत अशी अफवा पसरली कीं, मॅडम चँग कै शेक किल्ल्यांतील राजबंद्यांना भेटावयास येणार आहेत आणि त्याच्यासाठीं चिनी चहाची व्यवस्था करण्याचा प्रयत्न चालला आहे !

तळाशीं राहिलेला चुरा

चहाच्या डब्याच्या तळाशीं पानांचा थोडाबहुत चुरा राहून जातोच आणि तो डब्याबरोबर फेकून देण्यांत येतो. हा शेवटचा डबा खतम झाला तेव्हां त्याच्या बुडाशीं थोडा चुरा राहिला. मनाशीं म्हणालों– ‘ एवढ्याशा भुकटीनें काय होणार ? आणि म्हणून मी तो तसाच राहूं दिला. परंतु चीताखानानें तो पाहिला व तो म्हणाला— “ सध्यां लढाईमुळें ‘ वस्तू वाया घालवूं नका ’ ही घोषणा प्रत्येकाच्या जिभेवर आहे. तेव्हां हा चुराहि आपण कां वापरीत नाहीं ? ” म्हणून मग ती भुकटीहि वापरून टाकली. तिचा कणन् कण जपून वापरला, आणि घोट घोट करून पिऊन टाकला. चहा उकळल्यानंतर कपांत ओततांना हे कण मला म्हणूं लागले— ‘ माझ्यामध्यें त्याचा रंग, सुगंध नाहीं हें खरं, परंतु तरीहि मी त्याच्याच बागेंतील एक काडी नाहीं काय ! ’

या साखऱ्याला मागणी नाहीं

साखरेच्या प्रश्नानेंहि येथें येतांच डोकें वर काढलें होतें, परंतु मला ताबडतोब त्याचें उत्तर मिळालें, आणि आतां त्याबाबतींत मी निश्चिंत आहे. माझ्या सामानामध्यें जाडा साखऱ्या होता तो कांहीं दिवस पुरला. तो संपला तेव्हां मला असें वाटलें कीं, असला साखऱ्या येथें मिळेल, आणि जरी तो मिळाला नाहीं तरी ब्लॉक निश्चितच मिळतील. परंतु बाजारांत चौकशी करविली तेव्हां असें समजलें कीं नेहमींच्या दिवसांतहि या वस्तूंना येथें मागणी नव्हती; तेव्हां आतां युद्धाच्या अडथळयामुळें आयात–निर्यात बंद झाल्यानंतर या वस्तूंचें दर्शन कोठून होणार ?

अखेर नाईलाजानें मी खडीसाखर मागवून घेतली आणि ती बारीक करून साखरेप्रमाणें वापरावी असा विचार केला. पण ती कुटावयाची म्हणजे खलबत्ता

पाहिजे. जेलरला सांगितलें कीं, खलबत्ता मागवून घ्या. पण दुसऱ्या दिवशीं समजलें कीं येथें खलहि मिळत नाहीं नि बत्ताहि मिळत नाहीं. मी अगदीं थक्क झालों. या गांवामध्यें कुणाला आपलें डोकें फोडून घेण्याचीहि जरूर भासत नाहीं काय ? अखेर लोक जगतात तरी कसें ? ' ज्यानें आपल्या सबंध आयु- कोणाच्या दरवाज्यावर आपलें डोकें फोडून घेतलेलें नाहीं त्याला प्रेमाच्या गोष्टी काय कळणार ?

खलबत्त्याऐवजीं दगड

नाईलाजानें मी दुसरा एक उपाय शोधून काढला. एका स्वच्छ कापडामध्यें खडीसाखरेचे खडे ठेवलें आणि त्यांच्या वर–खालीं पुष्कळशी रद्दी गुंडाळली. नंतर येथें कामासाठीं आणलेल्या एका कैद्याच्या हातांत एक भला मोठा दगड दिला आणि त्याला म्हटलें— "स्वतःच्या डोक्याऐवजीं तूं हा दगड या खडीसाखरेवर आपट." परंतु तो यंत्राचा गुलाम इतका कांहीं भोंगळ होता कीं, त्याला एकहि घाव नीट घालतां आला नाहीं. खडीसाखरेची पूड होणें दूरच राहिलें, कागदाच्या मात्र फाटून चिंध्या झाल्या आणि कापडानेंहि खडीसाखरेच्या सुंदर मुखड्यावरील बुरखा बनून राहण्याचें साफ नाकारलें.

असो, अखेर कित्येक दिवसानंतर एक कुरूप खल खास दृष्टीस पडला. कुरूप कशासाठीं म्हणतो कीं, आजपर्यंत असला ओबडधोबड खल मी कधीं पाहिला नव्हता. टाटा कंपनीनें नुकतीच एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. तिच्यावरून असें समजतें कीं, हजारों वर्षांपूर्वीं मध्यभारतांतील एका जमातीनें देशाला लोखंड व लोहारकाम यांचा परिचय करून दिला होता. हा खलदेखील त्याच टोळीवाल्या जमातीच्या हस्तकौशल्याचा अवशेष असल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं ! तो जणूं रात्रं-दिवस याचीच वाट पहात होता कीं केव्हां एकदां अहमदनगरच्या किल्ल्यांत कैद्यांची टोळी येते आणि केव्हां त्यांना आपलें डोकें फोडून घेण्यासाठीं सुताराच्या वाकस या अवजाराऐवजीं खलबत्त्याची जरूर लागते.' वेडामुळें माझें डोकें हें धडावर नुसतें ओझें होऊन बसलें आहे. मी हें फोडून टाकलें असतें. परंतु अरे देवा, या जंगलामध्यें ए भिंतहि नाहीं.'जाऊं द्या! खडीसाखर कुटण्याचा तरी सांपडला पण आतां कुटलेली खडीसाखर आहे जिच्यांत जी घालावयाची ती मुख्य वस्तूच जवळ नाहीं

पाहिलेंत ? फक्त 'चहा संपला आहे' ए साधी गोष्ट मला तुम्हाला सांगावयाची होती; प वहींची बावीस पानें संपून गेलीं तरी अजून म म्हणणें कांहीं संपलें नाहीं.

प्रेमाची एकूण कथा एका शब्दाहून अधि नाहीं. परन्तु गंमत अशी कीं ती कधीं संपतच नाहीं

[१९४३ सालीं अहमदनगरच्या किल्ल्यांत जवाहरलालजी आदि वर्किंग कमिटीच्या सभासदा-बरोबर तुरुंगांत असतांना हें पत्र मौ. आझाद यांनीं लिहिलेलें आहे. त्यांची भाषा सुन्दर आहे. चहाच्या स्वरूपावर त्यांनीं चांगला प्रकाश पाडला आहे. हे मौ. आझाद आज भारताचे शिक्षणमंत्री आहेत.

मौलाना आझाद यांनीं या पत्रांत चहा सं-धींचे, दुधासंबंधींचे व गूळसाखर–खडिसाखर इत्या विषयींचे विचार ग्रथित केले आहेत. मौ. आझा कोणी डॉक्टर--वैद्य नाहींत, ते एक जनतेचे ध आहेत, विचारी गृहस्थ आहेत. त्यांनीं गतानुगति पद्धतीनें आपले विचार मांडलेले नाहींत; स्वतं बुद्धीनें विचार करून आपलें म्हणणें निर्भीड मांडलें आहे. पत्रांतील विचारसरणीवरून ते क प्रकृतीचे असावेत असें स्पष्ट दिसतें. दूध हें स्थू द्रव्य आहे. त्यांशीं तुलना करतां चहाचें पाणी हें सूक्ष्म (वातगुणाचें) तत्त्व आहे. हें त्यांनीं स्व दाखविलें आहे. चहाचें पाणी व त्याला स्वच्छ खा रेची अल्पशी जोड हें त्यांनीं आपल्या प्रकृतीच्या दृष्टीनें उपयुक्त ठरविलेलें पेय आहे. हा चहा विषय लेख वाचून विचारी वाचकांनीं आपण कोणता च प्यावा, तो कशा मिश्रणांत प्यावा ? केव्हां प्यावा प्यावा किंवा पिऊं नये या गोष्टींचा विचार ठरवा व तो आचरणांत आणून अनुभव प्रसिद्ध करा अशी विनंति आहे. गतानुगातिक वृत्ति मात्र त्या समजावी.— संपादक]

अ. भा. आयुर्वेद महासंमेलन, अधिवेशन ४० वें, त्रिवेंद्रम्

कांहीं महत्वाचे ठराव

(त्रिवेंद्रम् येथें भरलेल्या अ. भा. आयुर्वेद महासंमेलनांत एकूण ४३ प्रस्ताव मंजूर झाले; त्यांपैकीं कांहीं महत्त्वाच्या ठरावांचा आशय पुढें दिला आहे.)

प्रस्ताव नं. ३— अ. भा. आयुर्वेद महासंमेलनाचें हें अधिवेशन असें ठरवीत आहे कीं, 'शुद्ध आयुर्वेद' या शब्दाचा अर्थ 'अष्टांगायुर्वेद' असा मानून त्याचें क्षेत्र विशाल करीत आहे. आणि म्हणून महासंमेलन केंद्र सरकारला तसेंच राज्य सरकारांना आग्रहाची विनंति करीत आहे कीं, त्यांनीं शुद्ध आयुर्वेदाचे शिक्षण व प्रसार यांना तावडतोब चालना देऊन आयुर्वेदाचें व त्याचबरोबर जनतेचें हित साधावें. शुद्ध आयुर्वेद अध्यापकांची योग्यता शिक्षणद्वारा वाढविण्याचे कामीं महासंमेलन सरकारला साहाय्य करील व आपल्या प्रांतीय शाखांनाहि याप्रमाणें आदेश देईल.

विक्रीकराची माफी द्यावी

प्रस्ताव नं. ४- हें अधिवेशन सरकारला अशी सविनय विनंति करीत आहे कीं, सरकारनें धर्मार्थ संस्थांना विक्रीकराची (सेल्सटॅक्सची) माफी द्यावी. ह्यायोगें अशा संस्थांच्या समाजसेवाकार्याला व प्रवृत्तीला अधिकाधिक प्रोत्साहनच मिळेल.

पाठ्यक्रमांत एकसूत्रीपणा

प्रस्ताव नं. ५-- देशांतील निरनिराळ्या राज्य सरकारांकडून आयुर्वेदिक बोर्डांची स्थापना झाली आहे, व त्यांच्याकडून राज्यांतील वैद्य, हकीमांचें रजिस्ट्रेशन केलें जातें, त्याचप्रमाणें आयुर्वेदिक शिक्षण संस्थांतील पाठ्यक्रमाचेबाबत मार्गदर्शनहि केलें जातें; म्हणून हें अधिवेशन केंद्रीय सरकारला अशी विनंति करीत आहे कीं, सर्व राज्यांतील आयुर्वेदीय पाठ्यक्रमांत एकसूत्रीपणा राखण्याचे दृष्टीनें एक केन्द्रीय पाठ्यक्रम समिति केंद्र सरकारनें स्थापावी व ह्या समितींत प्रत्येक राज्यांतील आयुर्वेदिक बोर्डांमधील दोन दोन सदस्य घ्यावेत.

रिसर्च बोर्डाबाबत असंतोष

प्रस्ताव नं. ६-हें अधिवेशन मुंबअी सरकारच्या आयुर्वेदिक रिसर्च बोर्डाबद्दल असंतोष प्रकट करीत आहे. ह्या बोर्डाचें कार्य सरकारनें आयुर्वेद विद्वानांच्या आधीन केल्यास त्याचें कार्य अधिक उज्ज्वल होअील.

ॲलोपॅथीवर सरकारी खर्च

प्रस्ताव नं. ७– 'सरकारी नोकरानें केवळ ॲलोपॅथिक चिकित्सा घेतल्यास त्याचा खर्च सरकार सोशील,' ह्या सरकारी आदेशाविरुद्ध हें अधिवेशन तीव्र असंतोष व्यक्त करीत आहे. यानें आयुर्वेदाची उपेक्षा व्यक्त होत आहे. म्हणून हें अधिवेशन केंद्रीय व प्रांतीय सरकारांना अशी विनंति करीत आहे कीं, त्यांनीं आपला हा आदेश दुरुस्त करून ॲलोपॅथी व आयुर्वेद या दोहोंनाहि समान नीति लागू करावी.

मलबारांत शिक्षणसंस्था काढा

प्रस्ताव नं. १०–मलबार प्रांत हा आयुर्वेदीय चिकित्सेचें माहेरघर आहे. त्यांत १००००आयुर्वेदीय वैद्य आहेत. आणि म्हणून हें अधिवेशन मद्रास सरकारला अशी विनंति करीत आहे कीं, त्यांनीं मलबार प्रांतांत योग्य अशा ठिकाणीं एक आयुर्वेद महाविद्यालय व त्यास जोडून एक सुसज्ज आयुर्वेदिक आरोग्यशाला, वनस्पति–उद्यान व वनस्पति–संशोधन केंद्र काढावें. ह्यायोगें आयुर्वेदाच्या प्रगतीला साहाय्य व प्रोत्साहन मिळेल.

रजिस्ट्रेशनची संधि द्या

प्रस्ताव नं. ११–सध्यां रजिस्टर्ड वैद्यांचे तीन वर्ग केले आहेत. त्यास तात्त्विक भूमिका नसल्यानें

ते ताबडतोब रद्द करण्यांत यावेत अशी विनंति हें अधिवेशन संबंधित राज्य सरकारांना करीत आहे.

त्याचप्रमाणें हें अधिवेशन सर्व राज्य सरकारांना अशीहि विनंति करीत आहे कीं, ज्या राज्यांत वैद्यांचें रजिस्ट्रेशन सध्यां बंद केलें असेल तें त्यांनीं फिरून सुरूं करावें. यामुळें लायक असलेल्या वैद्यांना रजिस्टर्ड होण्याची संधि मिळेल व अपात्र असलेले वैद्य रजिस्टर मधून कमी होतील.

तालुका रुग्णालयाला आयुर्वेद विभाग

प्रस्ताव नं. १३– हें अधिवेशन मद्रास व त्रावणकोर–कोचीन राज्य सरकारांना अशी विनंति करीत आहे कीं, त्यांनीं आपल्या राज्यांतील प्रत्येक तालुका रुग्णाल्याला एक आयुर्वेदीय चिकित्सा-विभाग जोडावा. ह्यानें आयुर्वेदाला प्रोत्साहन मिळेल.

दवाखान्यांना आर्थिक साहाय्य

प्रस्ताव नं. १४–हें अधिवेशन मद्रास सरकारला अशी विनंति करीत आहे कीं, त्यांनीं मद्रास राज्यांतील आयुर्वेदिक दवाखाने व औषधीभुवनें कीं जीं ग्रामीण जनतेस विनामूल्य औषधोपचार करीत आहेत व त्याचबरोबर संशोधनाचेंहि कार्य करीत आहेत अशा संस्थांना देणगी रूपानें आर्थिक मदत देण्यांत यावी.

आसवारिष्टें कायद्यांतून वगळा

प्रस्ताव नं. १५–हें अधिवेशन मद्रास सरकारला अशी विनंति करीत आहे कीं, त्यांनीं आसवें, अरिष्टें वगैरेसारख्या आयुर्वेदिक औषधांना दारुबंदी कायद्यांतून वगळून टाकावें.

मद्रास विद्यालयाचें रूपांतर

प्रस्ताव नं. १६-१७ — अ. भा. आयुर्वेद महासंमेलनाचें हें ४० वें अधिवेशन मद्रास येथील देशी वैद्यक कॉलेजाचें रूपांतर आयुर्वेद विरोधकांच्या नेतृत्वाखालीं व वर्चस्वाखालीं ॲलोपॅथिक संस्थेमध्यें होत आहे याबद्दल आत्यंतिक खेद व्यक्त करीत आहे. ह्या कॉलेजच्या एकन्दर व्यवस्थेंत अितकी भ्रष्टता निर्माण झाली आहे कीं, देशांतील आयुर्वेदप्रेमियांना व व्यवसायींना व विशेषतः मद्रासमधील आयुर्वेदीय चिकित्सकांना हा प्रश्न अतिशय गंभीर स्वरूपाचा होऊन बसला आहे. आणि म्हणून हें आयुर्वेदिक महासंमेलन मद्रास सरकारला असें सुचवूं अिच्छितें आहे कीं, त्यांनीं ह्या कामीं चौकशी करण्याकरितां व ज्या आयुर्वेदिक शिक्षणाच्या मूळ हेतूनें हें कॉलेज स्थापन केलें गेलें आहे तो पुनः प्रस्थापित करण्याकरितां व कॉलेजांतील आयुर्वेदीय अभ्यासक्रम निश्चित करण्याकरितां एक आयुर्वेदीय विद्वानांची समिति

शुद्ध लोहभस्म (वारितर) २४) सेर

काश्मीरी शिलाजित, हमारे कारखाने में प्रतिवर्ष करीब २०० मन शास्त्रविधि अनुसार शुद्ध की जाती है। भाव-शुद्ध ३२) सेर. अशुद्ध पत्थर ८०) प्रति मन, वंगभस्म ३६), प्रवाळभस्म ३१), अभ्रक वज्रभस्म ४६), कांत लोहभस्म २०), स्वर्णमाक्षिकभस्म २८), रससिंदूर ८०), स्वर्णराज बंगेश्वर ८८), मंडूरभस्म २०), शंखभस्म ७), शृंगभस्म १४), कपर्दिकभस्म ८), मुक्ता शुक्तीभस्म १०), गेदंती भस्म ३|||), चंद्रप्रभावटी २८ त्रिवंगभस्म ८) कसीसभस्म १०) प्रतिसेर। स्वर्णसिंदूर ३) प्रतितोला।

नोटः— इन भावोंपर २० तोला से कम कोई वस्तुं न भेजी जावेगी, सूचिपत्र मुफ्त।

च्यवनप्राशः– ५ सेर का २१), १० सेर का ३८), २० सेर का ६५), रु.।

काश्मीर आयुर्वेदिक वर्क्स, अमृतसर।

रनें नेमावी. ह्या कामीं अ. भा. महासंमेलन र ते सर्व सहकार्य सरकारला देअील.

शिष्टमंडळाची नेमणूक

हें अधिवेशन खालील सद्गृहस्थांचें एक शिष्टमंडळ मद्रासच्या मुख्य मंत्र्यांची व आरोग्यमंत्र्यांची मुलाखत घेण्याकरितां व त्यांना मद्रासच्या देशी वैद्यक कॉलेजची सांप्रतची सर्व परिस्थिति समजावून ण्याकरितां व त्यांतील आयुर्वेदीय शिक्षणाचा र्जा सुधारण्याकरितां योग्य असें मार्ग सुचवील.

ष्टमंडळाचे सभासद—

(१) डॉ. ए. लक्ष्मीपति, मद्रास
(२) डॉ. दुराइस्वामी अय्यंगार, मद्रास
(३) वै. श्री. व्ही. बी. नटराजशास्त्री, त्रिचनापल्ली
(४) श्री. व्ही. सुब्रम्हण्यम् अय्यर, श्रीरंगम्
(५) पांचवा सदस्य नियुक्त करून घ्यावयाचा.

नागपूर विद्यापीठाचें अभिनंदन

प्रस्ताव नं. १९—नागपूर विश्वविद्यालयानें आयुर्वेद संशोधनाचा स्वतंत्र विभाग स्थापन केला त्याबद्दल अ. भा. आ. महासंमेलनाचें हें अधिवेशन नागपूर विश्वविद्यालयाला धन्यवाद देत आहे. इतर विश्वविद्यालयांनींहि आयुर्वेद संशोधनाकरितां स्वतंत्र विभाग स्थापन करावेत अशी विनंति हें अधिवेशन त्यांना करीत आहे.

अध्यापक चर्चा परिषद

प्रस्ताव नं. २०—अ. भा. आ. महासंमेलनाचें असें मत आहे कीं, ज्याप्रमाणें महाराष्ट्र प्रान्तीय वैद्य संमेलनाच्या कार्यप्रणालीत अध्यापक चर्चा परिषद—द्वारा आयुर्वेदीय ग्रंथांतील असंदिग्ध संज्ञा निश्चित करणें व पाठ्यक्रमोपयोगी शास्त्रीय विवेचनपूर्ण ग्रंथ निर्माण करणें ही कार्यवाही संचालित करण्यांत आली आहे त्याचप्रमाणें इतर प्रांतांतूनहि अध्यापक चर्चा परिषदांचें ओयोजन केले जावें व त्या सर्वांचें निर्णय एकत्र संकलित करून प्रत्येक विषयावर स्वतंत्र ग्रंथ निर्माण करावेत म्हणजे त्यांचा फायदा अ. भारतवर्षीय अध्यापकवर्गाला व विद्यार्थीवर्गाला होईल. प्रथम दोष-धातु-मल विज्ञान या विषयावर प्रयत्न केला जावा.

वैद्य-हकीम, आयुर्वेद-युनानी

प्रस्ताव नं. २१—हें अधिवेशन असें निश्चित करीत आहे कीं, महासंमेलनाच्या नियमावलीमध्यें जेथें जेथें 'वैद्य' अथवा 'आयुर्वेद' हे शब्द आले आहेत तेथें तेथें अनुक्रमें 'हकीम' अगर 'युनानी' ह्या शब्दांचा भावार्थहि अंतर्भूत झालेला आहे असें समजावें. जे हकीम सध्यां अ. भा. आ. महासंमेलनाचे सभासद आहेत अगर भावी कालांत होतील त्यांना, ते जोंपर्यंत महासंमेलनाचे सभासद असतील तोंपर्यंत आपणांस वैद्य अगर हकीम यापैकीं कांहींहि संबोधणें अगर लिहिणें हें ऐच्छिक राहील.

ही दुरुस्ती महासंमेलनाच्या नियमावलीच्या शेवटीं परिशिष्ट रूपानें छापण्यांत येअील.

अध्यापक शिक्षणास साहाय्य

प्रस्ताव नं. २२—मुंबई राज्यांतील विशुद्ध आयुर्वेदिक अध्यापक कोर्सच्या सहाय्यार्थ ५०० रुपये मंजूर करण्याचें हें अधिवेशन ठरवीत आहे.

चतुर्भुजरसाचें संशोधन

प्रस्ताव नं २३—श्रीस्वामी गोपाल चैतन्यदेव, मुंबअी यांनीं 'चतुर्भुज-रस' हें औषध विशेष पद्धतीनें तयार केलें आहे, तरी त्यांना २५१ रुपये महासंमेलनानें देऊन त्या किंमतीचें करील औषध त्यांच्याकडून बनवून घेऊन त्याचें 'युनिव्हर्सल हेल्थ अिन्स्टिट्यूट,' मुंबई या संस्थेकडून परीक्षण करून घ्यावें.

'स्वामी गोपाल चैतन्यदेव हे जर पेप्सूमध्यें येऊन औषधि-परीक्षण वगैरे कामीं साहाय्य करतील तर त्यांना प्रवासखर्चाव्यतिरिक्त २००० रुपये देऊं' अशी जी पेप्सूचे आयुर्वेद डायरेक्टर श्री. पं. कान्तिनारायण मिश्र यांनीं घोषणा केली आहे तिचें स्वागत करून त्यांना हें अधिवेशन त्याबद्दल धन्यवाद देतें.

प्रचार विभागाची स्थापना

प्रस्ताव नं. २४ – हें अधिवेशन असा ठराव करीत आहे कीं, अ. भा. आ. महासंमेलनातर्फे एक प्रचार-विभाग स्थापन करण्यांत यावा. या विभागानें भारतांतील सर्व वैद्यांना व प्रांतीय वैद्य-संघटनांना जागृत करून त्या सर्वांची एक बलशाली संघटना निर्माण करावी· त्या शिवाय ज्या ठिकाणीं महासंमेलनाच्या शाखा नसतील त्या ठिकाणीं शाखा अगर संबद्ध संस्था स्थापन कराव्यात· केंद्रीय आणि राज्य सरकारांतर्फे जें आयुर्वेदीय कार्य झालें असेल त्याचा आयुर्वेद जगताला परिचय करून द्यावा, त्याचप्रमाणें महासंमेलनाच्या उद्देशपूर्तीसाठीं सतत प्रयत्नशील राहावें व आपल्या कार्याचा वार्षिक अहवाल दरसाल महासंमेलनाच्या अधिवेशनापुढें ठेवावा.

हें महासंमेलन असेंहि निश्चित करीत आहे कीं, वैद्य श्री. गुलराज शर्मा मिश्र, नागपूर यांना प्रचारमंत्री म्हणून नियुक्त करण्यांत येत आहे व त्यांचें नांव पदाधिकाऱ्यांच्या यादींत समाविष्ट करण्यांत येत आहे.

विद्यापीठ कार्यालय दिल्ली येथें

प्रस्ताव नं. ३१–ज्याअर्थीं ऋषिकेश येथें आयुर्वेद विश्वविद्यालय स्थापित करण्याचा विचार स्थगित झाला आहे त्याअर्थीं नि. भा. आयुर्वेद विद्यापीठाचें कार्यालय, परीक्षेचा निकाल जाहीर केल्यानन्तर ऋषिकेशहून दिल्लीला नेण्यांत यावें. कार्यालयाचें स्थलांतर करण्याचा व तें फिरून सुव्यवस्थित प्रस्थापित करण्याचा अधिकार विद्यापीठमंत्री यांना देण्यांत येत आहे. या कामाकरितां ३०० रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत येत आहे.

दंतवैद्य जायदे प्रवास मदत

प्रस्ताव नं· ३९ – दंतवैद्य श्री. पी. व्ही. जायदे, हुबळी हे आपलें दंतोत्पाटन–कौशल्य विदेशीयांना दाखविण्याकरितां लवकरच अमेरिकेस जात आहेत, त्याकरितां त्यांना अ. भा. आ. महासंमेलनातर्फे १०१ रुपयांची देणगी दिली जावी.

औषधांच्या आक्षेपार्ह जाहिराती

मुंबई राज्यांत कायद्याची अम्मलबजावणी

१९५४ च्या ड्रग्ज अॅण्ड मॅजिक रेमि (आक्षेपार्ह जाहिरातीसंबंधीच्या) कायद्याची मुं राज्यांत अम्मलबजावणी करण्यासाठीं मुंबई सरका अनेक अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. अधिकारी पुढीलप्रमाणें आहेत:— (१) मुंबई राज्य ड्रग्ज कंट्रोलर, (२) असिस्टंट ड्रग्ज कंट्रोलर, १९४० च्या ड्रग्ज अॅक्टाच्या २१ व्या कलमाखा नेमलेलें सर्व अिन्स्पेक्टर (आपापल्या अधिक क्षेत्रांत), (४) जिल्ह्यांचे सिव्हिल सर्जन, चीफ मेडिकल ऑफिसर आणि अमेरलीचे मेडिकल ऑफिसर (आपापल्या अधिकार क्षेत्रांत) (५) सह–अिन्स्पेक्टर व त्याच्या वरच्या श्रेणीचे पोलिस अधिकारी, (६ डायरेक्टर ऑफ अेक्साइ अॅण्ड प्रोहिबिशन, (७ डायरेक्टर ऑफ अेक्साइ अॅण्ड प्रोहिबिशन यांचे पर्सनल आसिस्टंट, (८) सह अिन्स्पेक्टर ऑफ प्रोहिबिशन अॅण्ड अेक्साइ आणि त्यांच्या वरच्या श्रेणीचे इतर सर्व प्रोहिबि अॅण्ड अेक्साइज् ऑफिसर (आपापल्या अधिक क्षेत्रांत).

जप्त करण्याचा अधिकार

वरील कायदा गेल्या १ एप्रिलपासून मुंबई राज्यांत अंमलांत आला असून सदरहू कायद्या ८ व्या कलमाखालीं वरील सर्व अधिकाऱ्यांना अेकाद्या कागदपत्रांत किंवा लेखांत सहरहू कायद्या ज्यायोगें भंग होईल अशी जाहिरात आहे वाटल्यास, ते कागदपत्र किंवा लेख किंवा वस्तु करण्याचा अधिकार मिळाला आहे.

६ महिने कैद व दंड

या कायद्याखालील पहिल्या गुन्ह्याच्या बाब सहा महिनेपर्यंत कैद किंवा दंड अगर दोन्ही शिक्षा होऊं शकेल आणि त्यानंतरच्या गुन्ह्यां बाबतींत एक वर्षपर्यंत कैद किंवा दंड किंवा दो अशी शिक्षा होऊं शकेल.

शुद्ध आयुर्वेदीय विद्यार्थ्यांपुढील अडचणी

[लेखकः— श्री. नरसिंगराव पाटील Int-Arts.
विद्यार्थी प्रथम वर्ष कर्नाटक आयुर्वेद विद्यापीठ, बेळगांव]

आ. पत्रिका १ जुलैच्या अंकांत वैद्यराज गोगटे च्या पाठ्यक्रमाबाबत एक लेख आलेला आहे. त्या- र्वे त्यांनीं अध्यापकांच्या अडचणी मांडलेल्या हेत. त्या अडचणी विचारांत घेऊनहि आयुर्वेदभक्त सरकार यांचे पुढें, विद्यार्थीवर्गापुढील कांहीं त्काळ अडचणींची कल्पना देणें जरूर आहे म्हणून ईं दोन शब्द लिहिणें भाग पडत आहे.

पुस्तकाशिवाय दीड वर्ष गेलें

शुद्ध आयुर्वेद कोर्स सुरूं होऊन दीड एक वर्ष त आलें. लवकरच प्रथम प्रमाणपत्र परीक्षा होणार हे. क्रमिक पुस्तकें अजून तयार नाहींत. जुने ग्रंथ र्मिळ झालेले आहेत. मग यांतून विद्यार्थ्यांनीं मार्ग ग काढावा? जुने वैद्य यांचे जवळ बरेच ग्रंथ ईं शकतील, पण तेवढें औदार्य तरी पाहिजेना त्यांचे ळ्या मंडूकवृत्तीनें त्यांनीं शास्त्रालाच मारलें आहे विद्यार्थ्यांना काय तारणार? अर्थात् याला अपवाद हेत त्यांना वंदन असो.

ग्रंथ हे अर्धे गुरु आहेत

गुरुजींच्या बद्दल आदर बाळगूनहि, मला माणिकपणानें सांगणें भाग आहे कीं, २० व्या तकांत ग्रंथ हे अर्धे गुरु आहेत. पुस्तकाशिवाय कणाऱ्याला तसेंच शिकविणाऱ्यालाहि योग्य पाऊल क्तां यावयाचें नाहीं. पुस्तकें नसतील तर काय टाळा होतो याचा दाखला सध्यां मुंबई राज्यांत थमिक शिक्षणांत दिसून येत आहे. तीच गत युर्वेदीय विद्यार्थ्यांची गेलें दीड वर्ष चालू आहे; पुढें किती दिवस राहाणार आहे अल्ला जाने!

ग्रंथ दुर्मिळ आहेत म्हणून आम्हां विद्यार्थ्यांच्या डाला मातकापड करण्यांत येत आहे. पण या वस्थेंतून निर्माण होणाऱ्या परिस्थितीची झळ कोणाला बसणार आहे? अर्थात् विद्यार्थ्यांना, व पर्यायानें विद्यालयांनाहि! विद्यार्थ्यांना सध्यां तरी क्लासमधील नोट्सवर अवलंबून राहावें लागणार आहे. फक्त नोट्सवरच अवलंबून जर उद्यां उत्तरपत्रिका लिहिली तर प्रश्नांना गुण कितपत मिळणार आहेत याचा अन्दाज करणें कठिण आहे. ही परिस्थिति सध्यां सर्व विद्यार्थीवर्गास भेडसावत असणारच!

योग्य मार्गदर्शन करा

क्रमिक पुस्तकांशिवाय गेलें वर्ष मारून मुटकून अभ्यासक्रम चालू आहे. असेंच फार दिवस चालणें हिताचें होणार नाहीं. याचा विचार पाठ्यक्रम-समितीनें तत्काळ करावा. गेलीं दोन वर्षें पाठ्यक्रम समिति अस्तित्वांत आहे म्हणें! पण अद्याप एकहि क्रमिक पुस्तक तयार नाहीं याचेंच आश्चर्य वाटतें. निदान वाग्भट, चरक व सुश्रुत हे तिन्ही ग्रंथ तरी भाषांतरासह उपलब्ध करण्याची जबाबदारी पार पाडली असती तर निम्मे अधिक काम निभावलें असतें! आतांतरी तत्काळ व्यवस्था व्हावी. अशा या गंभीर समस्येंत विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन सूज्ञ वैद्यवर्गानें आयुर्वेद पत्रिकेमार्फत करण्याची जबाबदारी घ्यावी. तसेंच प्रत्येक गांवीं जेथें वैद्यकीय कोर्स सुरूं आहे तेथें वैद्यवर्गानें आपल्याकडील ग्रंथांचें ग्रंथालय उघडून तसेंच वरचेवर एकत्र जमून मार्ग-दर्शन करावें.

घोषणा पुरेत, कृति हवी

वैद्यकीय शिक्षण हें प्राथमिक किंवा हायस्कूल शिक्षणाहून भिन्न आहे. येथें केवळ पोपटपंची चालावयाची नाहीं. तें प्रयोगसाध्य आहे. त्या दृष्टीनें अनुकूलता प्राप्त करून देणें सरकारचें कर्तव्य आहे. प्रथम प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांना, सरकारी

हॉस्पिटलमध्यें आयुर्वेदीय वॉर्ड उघडून चिकित्सेसंबंधीं व्यवस्था व्हावयाला हवी, तरच नवोदित वैद्य अनुभविक व चांगले चिकित्सक निपजतील. याबाबत मंत्र्यांच्या घोषणा आम्ही बरेच दिवस ऐकत आहोत पण त्याला कृतीचा पाठपुरावा अद्याप मिळालेला नाहीं.

याहि सवलती सुरूं करा

शुद्ध आयुर्वेद कोर्सची फी थोडी कमी आहे म्हणून इतर सवलती प्राप्त करून देण्याची टाळाटाळ नको. वरचेवर सहलीला जाऊन वनौषधी स्वरूपदर्शन अित्यादींची माहिती घेणें जरूर असतें. त्याकरितां एस्. टी., रेल्वे व फॉरेस्टखातें यांचेकडून सहकार्य व सवलती हव्यात. शिष्यवृत्त्या व मदत यानें विद्याभ्यासांत चढाओढ लागून अभ्यास व संशोधनास मदत होअील. तसेंच आयुर्वेदीय संमेलनाच्या अधिवेशनांना हजर राहण्यास व औषधी कारखाने आणि प्रदर्शनें अित्यादि पाहण्यास प्रोत्साहन व सवलत मिळाल्यास विद्यार्थ्यांच्या ज्ञानांत भर पडल्याशिवाय राहाणार नाहीं.

राष्ट्रपतिनियुक्त समिति

वैद्यक व्यवसायाचें नियंत्रण व शिक्षण

त्रिवेंद्रम् येथें ता. २३ ते २५ जानेवारी रोजीं भरलेल्या आरोग्यमंत्र्यांच्या स्वास्थ्य परिषदेंत झालेल्या ठरावान्वयें भारताचे राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं एक समिति नेमली आहे. तिचें काम भारतांत वैद्यक व्यवसाय करणाऱ्या वैद्य, हकीम व होमिओपाथ यांच्या व्यवसायाचें नियंत्रण व शिक्षण याबाबतींत समान दर्जा निश्चित करणें हें आहे. या कमिटी सभासदांचीं नांवें आयुर्वेद पत्रिकेच्या मागील एका अंकांत प्रसिद्ध झालीं आहेत. सौराष्ट्राचे आरोग्यमंत्री हे या समितीचे अध्यक्ष असून पंजाबचे डायरेक्टर ऑफ हेल्थ हे सेक्रेटरी आहेत.

या समितीनें ६ महिन्याच्या आंत अहवाल सादर करावयाचा आहे.

[या समितीच्या सूचनानुसार भारतांत सर्वत्र एकपद्धतीचें रजिस्ट्रेशन व आयुर्वेदाचें सरकारमान्य शिक्षण(व परीक्षा) सुरूं होण्याची शक्यता आहे.]

शुद्ध आयुर्वेदाची

गुरुपरंपरा शिक्षणसंस्था, त्र्यंबक

दिनांक २।७।५५ रोजीं त्र्यंबकेश्वर [जि. नाशिक] येथील शुद्ध आयुर्वेद गुरु--परंपरा शिक्षण-संस्थेचा पाहिला वाढदिवस नाशिकचे वृद्ध वैद्य श्री. विष्णुशास्त्री केळकर वैद्यरत्न यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. सकाळीं धन्वतरी पूजन झालें. सायंकाळीं ४ ते ६ ईशस्तवन, भाषणें इ० कार्यक्रम झाला. संस्थेचे चिटणीस श्री. आ. पु. चांदवडकर व श्री. जोगळेकर, श्री. चिंतामण शुक्ल, वै. लासलगांवकर, श्री. विश्वेश्वरशास्त्री शुक्ल, वै. वसंतराव जाईल यांचीं भाषण झालीं. विद्यार्थ्यांनीं अभ्यास कसा करावा याबद्दल अध्यक्षांनीं मार्गदर्शन केलें व संस्थाचालकांना धन्यवाद दिले. संस्थेचे चालक पू. भाऊशास्त्री जाईल वैद्य यांनीं पुढील वर्षी कांहीं प्रयोग करून दाखविण्याचें आश्वासन दिलें. कॉफीपान होऊन समारंभ संपला.

सुप्रसिद्द दंतवैद्य पां. वि. जायदे
यांचीं दोन पुस्तकें
दंतरोगविज्ञान व चिकित्सा ३ रु.
वैद्यसन्मित्र २ ,,
कामशास्त्रावरील पुस्तकें
प्रश्नोत्तररूपी कामशास्त्र भाग १
(श्री. पं. ज. कुलकर्णी) ३ रु.
कामसूत्र भाग १
(वात्स्यायन ग्रंथाचा मराठी अनुवाद) ५ ,,
पांच वर्षांचा पाळणा डॉ. श्री. ह. मराठे १॥ ,,
वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

दांत पाडूं नका !

– आयुर्वेदरत्न सुंदरराव भास्करराव वैद्य,
मुंबई २.

देवाच्या योजनेप्रमाणें आपले पहिले दुधाचे त येतात. नंतर ते कांहीं काळानें आपोआप पडतात नंतर कायमचे दांत येतात. हे जर रोज स्वच्छ टून घेतले नाहींत तर त्यांस अनेक दुखणीं होतात. कांहींकांच्या दांतांतून पूं येऊं लागतो. कांहींकांचे वयास लागतात. कांहींकांच्या दांतांस थंड पाणी वत नाहीं. कांहींकांचे दांत किडतात. अशा तीत तुम्ही जर दंतवैद्याकडे गेलात तर तो सर्व त पाडून घ्यावयास सांगतो. तो नंतर कांचेचे त बसवून घ्यावयास सांगतो. दोन कवळ्यांचा ार सुमारें शंभर ते तीनशे रुपये होतो.

एकदां माझी दाढ दुखून हलावयास लागली. वैद्यानें उपटून टाकावयास सांगितली. त्यानें ती टून काढली. त्या ठिकाणांतून रक्त निघूं लागलें. तें त दिवस थांबलें नाहीं. तेव्हांपासून मी निश्चय ला कीं, दांत म्हणून पुनः उपटून घ्यावयाचा नाहीं. माझे दांत एकेक हलून आपोआप पडले.

जेवणापूर्वीं लिंबाचा रस

माझ्या दांतांतून ज्यावेळीं पूं येत होता, त्यावेळीं नी कागदी लिंबाचा रस पाण्यांत घालून दर जेवणाच्या र्वीं घेत असें. त्यानें पूं येण्याचें बंद झालें. दांत र हालत असले तर बकुळीच्या सालीची पूड घेऊन नें घासावे म्हणजे घट्ट होतील. रोज दांत घांसण्यास ळा चूर्ण घ्यावें.

रोज चहा प्याल्यानंतर किंवा दर जेवणानंतर त पाण्यानें स्वच्छ धुऊन टाकावे. अशा रीतीनें त स्वच्छ राहतील व त्यास कांहीं अपाय होणार नाहीं. सोन्याची सुरी झाली म्हणून काय उरांत खावी ? दुःखाशिवाय डॉक्टर दांत उपटूं लागले न काय दांत उपटून घ्यावे ?

म्हणून माझी सर्वांस विनंति कीं, कोणीहि दांत उपटून घेऊं नयेत. पूं येत असल्यास किंवा दुखत असल्यास त्यावर उपचार करावा. दुखत असल्यास अक्कलकाऱ्याची पूड तेथें ठेवावी. नाहींतर टूथ ड्रॉप्स लावावे म्हणजे दुःख नाहींसें होतें.

इसबावर सागाचें तेल

आ. रत्न सुं. भा. वैद्य यांस–

आपणांस मुद्दाम कळविण्यास आनंद वाटतो कीं, सुमारें ६।७ महिन्यापूर्वीं आपण मला इसबावर ७।८ निरनिराळीं औषधें सुचविलीं होतीं. त्यापैकीं सागवानाचे तेलानें मला गुण आला आहे. आतां माझ्या हातापायास कांहीं दोष राहिला नाहीं. आपण अत्यंत तत्परतेनें मला उत्तर पाठवून निरनिराळीं औषधें सुचविलीं व त्यापैकीं एकानें मला गुण आला याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

६–७–५५ —हरी दत्तात्रय कुलकर्णी

सांडू ब्रदर्सचीं

शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.

वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.

पत्रव्यवहाराचा पत्ताः—

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
चेंबूर लि.
फॅक्टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

बालरोगावरील होमिओपॅथिक औषधें

— नित्योपयोगी व गुणास उत्तम —

(१) **वर्म पिल्सः**— वरचेवर पोटात कृमि अगर जंत होणाऱ्या मुलांना गुणकारी बाटली किं. ०—१२—०

(२) **स्लीप पिल्सः**— चिरचिऱ्या व स्वस्थ झोंप न येणाऱ्या मुलांना हितावह. मूल उत्तम झोंपूं लागतें व औषधाची संवय लागत नाहीं. बाटली किं. ०—१२—०

(३) **डायरिया पिल्सः**— पुष्कळ वेळां शौचास होणें, पुष्कळ दुग्धयुक्त, कधीं पातळ कधीं घट्ट, अगर फेसाळ असें शौचास होत असल्यास उत्तम उपयोग होतो, बाटली किं. ०—१२—०

(४) **ईअर पिल्सः**— कान फुटणें, दुखणें, लाल होणें, सुजणें, पूं अगर पाणी येणें इ. विकारावर. बाटली किं. ०—१२—०

(५) **स्किनो पिल्सः**— सर्व तऱ्हेच्या त्वचारोगावर उपयुक्त व प्रभावी औषध. बाटली किं. ०—१२—०

(६) **कफ पिल्सः**— सर्दी, पडसें, खोकला वरचेवर शिंक येणें, डांग्या खोकला यांवर उत्तम औषध. बाटली किं. ०—१२—०

(७) **टॉनिक पिल्सः**— शारीरिक व बौद्धिक वाढ प्रमाणशीर न होणाऱ्या मुलांना उत्तम भूक व झोंप चांगली लागून मूल बाळसेदार होऊं लागतें. बाटली किं. १—०—०

(८) **रिकेट्सः**— हा रोग साधारणपणें मूल सहा महिन्यांचें झाल्यानंतर लक्षांत येतो. हाडें बारीक व मऊ, डोकें मोठें, शरीराच्या मानानें पोट मोठें, हाडाचीं टोकें मोठीं झालेलीं, टाळू नीट भरत नाहीं, डोक्यास घाम येतो, इत्यादि लक्षणें दिसूं लागतात. ह्या औषधानें असें मूल चांगलें सुधारतें. बाटली किं. १—०—०

तज्ज्ञ डॉक्टरकडून काळजीपूर्वक चिकित्सा केली जाते. चिकित्सा वेळः- दु. १ ते ४॥

होमिओ लॅबोरेटरी १७८ न्यू चर्नीरोड, प्रार्थनासमाज, **मुंबई नं. ४**

६ संततज्वरी रोग्यांवरील आयुर्वेदीय उपचार

(लेखकः — डॉ. सी. व्ही. जोगी, नागपूर)

मी ज्या सहा रोग्यांवर उपचार केले ते येणेंप्रमाणें—

आयुर्वेदिक उपचार—

१) सूतशेखर २ रत्ती सकाळ संध्याकाळ सहदा (मध) बरोबर चाटण.

२) रक्तचन्दन, धने, वाळा, काळा वाळा, पित्त- पडा, सुंठ व नागरमोथा, प्रत्येकीं अर्धा तोळा घेऊन ४० तोळे पाणी घालून अष्टमांश काढा तयार करून रोज एक औंसाचा एक खुराक (डोस) याप्रमाणें रोज तीन खुराक (डोस) बाटलींतून मिक्श्चर * दिलें.

३) क्लोरोमायसेटिन— रोज चार गोळ्या सहा तासानें एक गोळी या प्रमाणांत दिलें व प्रत्येक क्लोरोमायसेटिनच्या एका गोळीनंतर 'बी' कॉम्प्लेक्स सरबत एक चमचा वरून दिलें. याप्रमाणें मिश्र उपचार केला.

क्लोरोमायसेटिन बंद, काढा चालूं

क्लोरोमायसेटिनचें प्रमाण यापेक्षां जास्त वाढविलें नाहीं. ज्वर उतरल्याबरोबर प्रमाण अगदींच कमी म्हणजे तीन गोळ्या दिवसांतून, म्हणजे ८ तासाला एक गोळी व पुढें ११ तासांतून एक गोळी व पुढें अजिबात बंद केलें. पण काढा व सूतशेखर रोगी पूर्ण बरा होईपर्यंत चालूं ठेवलें म्हणजे टायफाईड ज्वराची ची मुदत साधारणतः तीन आठवडे किंवा चार आठवडे तोंपर्यंत चालूं ठेवले.

क्लोरोमायसेटिन हें औषध महाग आहे म्हणून त्याचा अगदीं कमी वापर कसा करावा या दृष्टीनें मी विचार करावयाला लागलो. अलोपॅथीमध्यें असें सांगितलें आहे कीं, एकदां क्लोरोमायसेटिन सुरूं केलें तर तें शेवटपर्यंत म्हणजे रोगाची २१ दिवसांची मुदत पर्यंत चालूं ठेवावें व जर असें चालूं ठेवलें नाहीं तर रोग उलटून येतो तसेंच क्लोरोमायसेटिनमुळें पॅथॉलॉजी किंवा इंद्रियांत झालेली विकृति बदलत नाहीं. फक्त ज्वर उतरतो, जंतूंची वाढ थांबते, म्हणून २१ किंवा २८ दिवसपर्यंत चालूंच ठेवावें लागतें. व जर बंद केलें तर जंतु पुन्हां वाढावयाला लागतात व फिरून ज्वर येतो. परंतु अशी मिश्र चिकित्सा केल्यामुळें रोगाची संप्राप्ति दूर होऊन फिरून ज्वर उलटत नाहीं, व रोग कमी क्लोरोमायसेटिन वापरूनसुद्धां दुरुस्त होतो. जंतूंची वाढ झपाट्यानें होत असते ती थांबून जाते.

वर सांगितलेला काढा हा वातपित्त–ज्वरावरच चालूं शकेल. व माझ्या जेवढ्या केसेस होत्या त्या बहुतांशीं वातपित्तप्रधानच होत्या. परंतु जोडीला क्लोरोमायसेटिन असल्यामुळें व हें द्रव्य माझ्या दृष्टीनें दोषांच्या दृष्टीनें कफपित्तनाशक असें आहे. तसेंच स्वेदवह स्रोतसांचा रोध नाहींसें करणारें आहे. परंतु तें द्रव्य रसवह स्रोतसांचा नाश करीत नाहीं व आमपाचन करत नाहीं म्हणून काढ्याची योजना केली व सूतशेखर वातपित्तशामक व हृद्य म्हणून योजना केली. अशा रीतीनें मिश्र चिकित्सा या तात्विक योजनेनें केली.

क्लोरोमायसेटिन कमी वापरलें

क्लोरोमायसेटिन जंतुवाढ प्रतिबंधक (bacteri stetic म्हणून योजना केली. व ॲलोपाथिक डॉक्टर ज्या जास्त प्रमाणांत तें वापरतात त्या जास्त प्रमाणांत वापर केला नाहीं. रोज ४ गोळ्या म्हणजे १००० मिलिग्राम क्लोरोमायसेटिन व आपल्या कडील साधारण रोग्याचें वजन १०० ते १२० पौंड जर धरलें तर दर एक पौंडाला १० मिलिग्रामपेक्षांहि कमी डोस पडतो व दोन पौंडाला २० मिलिग्राम पडतो. ॲलोपाथीची ठरीव मात्रा (50 Mg. per Kilogram of body weight) अशी आहे. दर दोन पौंडाला १० किंवा १२ मिलिग्राम या प्रमाणांत

[* ज्या काळांत वैद्यांनीं काढे वापरण्याचें सोडलें त्या काळांत डॉक्टर घरीं काढे बनवून रोग्यांना बाटलींतून देऊं लागले आहेत. — संपादक]

क्लोरोमायसेटिन देण्यांत आलें. व पुष्कळसे खाजगी ॲलोपाथीचे चिकित्सक याच प्रमाणांत क्लोरोमायसेटिन वापरतात. तसेंच ताप उतरतांना क्लोरोमायसेटिन बंद करावें. म्हणजे एकदम उतरत नाहीं व शिवाय क्लोरोमायसेटिन बरोबर प्रत्येक कॅपसूल नंतर 'बी' कॉम्प्लेक्स चा एक डोस दिला तर कोणताहि वाईट परिणाम होत नाहीं. ताप उतरल्यानंतर दोन तीन दिवस चालूं ठेवावें व नंतर वर सांगितलेला काढा रोज ३ औंस या मात्रेनें द्यावा. ही जी मात्रा आहे ती मोठ्या माणसाची (Adult ची) आहे. वयानुसार या मात्रेंत फेरबदल करावा. येवढ्या सूचना जर लक्षांत ठेवल्या तर कोणताहि वाईट परिणाम होत नाहीं.

प्रत्यक्ष रुग्णाची माहिती ध्यावयास थोडा उशीर लागेल, कारण संकलित अशी तयार नाहीं. तरी सर्व केसेस मध्यें उपचाराची पद्धत हीच आहे.

यूनि-डाइज (टॅब्लेट्स)

यूनि-डाइज औषधि वड्या ह्या आंत्रिक आणि यकृतविकृतिजन्य आमांश व अतिसार यावर रामबाण गुणकारी आहेत. ह्यांत 'ब' जीवनसत्व मिश्र केलें असल्यानें आंत्रिक तंदुरुस्ती राखण्यास ह्यानें अतिशय मदत होते.

यूनि-डाइज टॅब्लेटमधील घटकद्रव्यें

क्लोरोक्विन सल्फेट— ७ मि. ग्रॅ. डाय्-आयोडोहायड्रोक्झिक्विनोलिन २०० मि. ग्रॅ.
आयोडोक्लोरोहायड्रोक्झिक्विनोलिन— ७५ मि. ग्रॅ. जीवनसत्व 'ब'--१, १ मि. ग्रॅ.,
जीवनसत्व 'ब' २, १ मि. ग्रॅ., निआसिन १२.५ मि. ग्रॅ.
मात्रा-- दररोज ४ ते ६ वड्या. मुदत २० दिवस.

यूनि-क्विन (टॅब्लेट्स)

प्रत्येक वडींत २५० मि. ग्रॅ. क्लोरोक्विन डायफॉस्फेट असतें.

क्लोरोक्विन उत्कृष्ट मलेरिया प्रतिबंधक असून त्याचें अवसादक परिणाम होत नाहींत.

सन्निविष्ट यकृत-विकृतीमध्यें यूनि-डाइज औषधि चिकित्सा चालू असतां त्याच्या जोडीस यूनि--क्विन औषधाची चिकित्सा यकृतविकृतिजन्य आमांश, अतिसार यावर अधिक गुणावह ठरते.

यूनि-एमिटिन

घटक द्रव्यें:— एमिटिन हायड्रोक्लोर (Emetine Hcl) १/२ अगर १ ग्रेन. जीवन-सत्व 'ब'१ २० मि.ग्रॅ. स्ट्रिकनिन हायड्रोक्लोर (Strychnine Hcl.) १ सी. सी.मध्यें १/१००ग्रेन.

ह्या औषधांत 'ब'१ जीवन-सत्व मिश्र केलें असल्यामुळें एमिटिनमुळें हृदय व नाडींवर होणाऱ्या अवसादक परिणामास बराच प्रतिबंध होतो. ह्यांत कुचला-सत्व अल्प मात्रेंत मिश्र केलें असल्यामुळें ह्यापासून उत्साह व तरतरी वाटते.

वरील घटनेमुळें यूनि-एमिटिनची त्वचांतर्गत सूचिकाभरण चिकित्सा ही तीव्र आमांश, अतिसारावर व यकृत्दाहावर बिनधोक झाली आहे.

मात्राः--प्रौढास दररोज १ ग्रेन यूनि-एमिटीन. मुदत ६ ते १२ दिवस.

यूनिकेम लॅबोरेटरीज

२२ भुलाभाई देसाई-रोड, मुंबई २६

फॅकल्टी ऑफ आयुर्वेदिक अँड युनानी सिस्टिम्स ऑफ मेडिसिन, मुंबई

स्नातकोत्तर आयुर्वेदीय शिक्षणाबाबत पोट-नियम

[मुंबई सरकारच्या आयुर्वेद-युनानी स्टेट फॅकल्टीनें सरकारमान्य पदवीधरांना स्नातकोत्तर शिक्षणासंबंधीचे पुढील नियम तयार केले आहेत. ते पुढें दिले आहेत. हा अभ्यासक्रम उत्तीर्ण करणाऱ्या व्यक्तीस आयुर्वेद-पारंगत ही उपाधि देण्यांत येणार आहे. —संपादक]

१) स्नातकोत्तर शिक्षणक्रमाचा कालावधि २ वर्षांचा राहील.

२) 'मुंबईराज्य वैद्यक व्यवसायीबाबत कायदा,' १९३८ यांतील परिशिष्टांत नमूद असलेल्या प्रवेशपात्र परीक्षांपैकीं कोणतीहि एखादी परीक्षा पास असणाराला त्या अभ्यासक्रमासाठीं प्रवेश मिळेल.

३) शिक्षणक्रमाच्या दुसऱ्या वर्षाअखेर एकदांच परीक्षा घेण्यांत येईल.

४ सदर परीक्षेकरितां खालीलप्रमाणें विषय व विषयवार गुण [मार्क] ठेवण्यांत आले आहेत—

विषय	गुण–संख्या	
	सैद्धांतिक	प्रात्यक्षिक
१) आयुर्वेद–तत्त्वविज्ञान	१००	५०
२) द्रव्यगुण, औषधिनिर्माण आणि रसशास्त्र	१००	१००
३) रोगविज्ञान	१००	१००
४ रोगचिकित्सा	१००	१००

५) परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारानें दोन वर्षांच्या शैक्षणिक कालांत खालील गोष्टींची पूर्णता केली असली पाहिजे.

अ) मान्य स्नातकोत्तर–शिक्षकाच्या नेतृत्वाखालीं उमेदवारानें अखंडितपणें २ वर्षे वैद्यकीय अभ्यास [गुरुचें समाधान होईल अशा रीतीनें] केला असला पाहिजे.

ब) सदरहू अभ्यासक्रमासाठीं मान्यता असलेल्या एखाद्या आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या प्रमुखाकडून खालील गोष्टींबद्दल त्यानें प्रमाणपत्र मिळविलें असलें पाहिजे.

१) या शिक्षणक्रमहेत्वर्थ मान्यता असलेल्या एखाद्या औषधीकरण संस्थेंत तो एक सहामाही [एक टर्म] उपस्थित असल्याबद्दल,

२) या शिक्षणक्रमहेत्वर्थ मान्यता असलेल्या एखाद्या आयुर्वेदिक महाविद्यालयांत त्यानें विद्यार्थ्यांना वर्गांत व रुग्णालयांत एक सहामाही [एक टर्म] शिकविल्याबद्दल, आणि

३) या शिक्षणक्रमासाठीं मान्यता असलेल्या एखाद्या आयुर्वेदिक रुग्णालयांत सतत २ वर्षे उपस्थित राहून विशेषत्वानें दोन सहामाही [२ टर्म] अन्तर–रुग्ण विभागांत एक सहामाही [१ टर्म] बाह्य–रुग्ण विभागांत उपस्थित असल्याबद्दल;

क) त्यानें ह्या अभ्यासक्रमासाठीं मान्यता असलेल्या एखाद्या आयुर्वेदिक रुग्णालयांत कमींत कमी ६ महिनेपर्यंत अधिकृतपणें अध्यापक, रजिस्ट्रार अगर गृह–चिकित्सक म्हणून काम केलें असलें पाहिजे.

६) ह्या परीक्षेंत उत्तीर्ण होण्याकरितां उमेदवारानें लेखी परीक्षेंत शेकडा ५० टक्के व प्रात्यक्षिकांत शेंकडा ५० टक्के गुण स्वतंत्ररीत्या मिळविलें पाहिजेत. उमेदवारास ज्या विषयांत शेंकडा ६० टक्के गुण मिळाले असतील त्या विषयांत त्यास परीक्षा–माफी मिळेल, परंतु अशी माफी २ वर्षांनंतर रद्द होईल.

(७) अभ्यासक्रमः—

१) आयुर्वेद तत्त्वविज्ञान— १) सांख्य व न्याय शास्त्र यांचें आयुर्वेदांत महत्त्व २) पंचमहाभूत सिद्धांत ३) आयुर्वेदशास्त्राच्या प्रगतीचा इतिहास ४) त्रिदोष-सिद्धांतासंबंधीं भिन्नमतवादित्व ५)

त्रिदोषसिद्धांत विचार व उपपत्ति ६ धातु व मल ७ स्थूल-पचन व सूक्ष्म-पचन ८ संप्राप्ति ९) निदान व चिकित्सेचीं मूलतत्त्वें १० आयुर्वेदीय संज्ञा.

२) द्रव्यगुण, औषधिनिर्माण व रसशास्त्रः—

१) औषधींचे गुणधर्म निश्चित करण्याच्या पद्धति. २) औषधीकरणाच्या निरनिराळ्या प्रकारांतील तत्त्वें. ३) तयार केलेल्या औषधींचे गुणधर्म ठरविण्याच्या पद्धति. ४) औषधींच्या भौतिक प्रक्रिया. ५) औषधी निश्चितिकरण. ६) एकेरी व संयुक्त औषधीकरण पद्धति. ७) आयुर्वेदीय सर्व औषधींचे गुणधर्म व शक्य तेथें त्या औषधींची आधुनिक औषधीकरणाशीं गुणधर्मांचें दृष्टीनें तुलना.

३ रोगविज्ञानः— १] निदान--पंचक. २] रुग्ण तपासणीच्या पद्धति ३] निदानाच्या वैद्यकीय पद्धति. ४] आयुर्वेदीय ग्रंथांतील सर्व जुन्या रोगांची माहिती व अलिकडे दिसणाऱ्या तद्व्यतिरिक्त रोगांची माहिती ५] निदान व चिकित्सा यांचे अन्योक्त संबंध ६] रोगनिदान करण्याकरितां आवश्यक असलेलीं आधुनिक उपकरणीं, साहित्य व शस्त्रें यांची माहिती व ती वापरण्याची माहिती.

४) रोगचिकित्साः— १] आयुर्वेदीय चिकित्सेच्या पद्धति व त्यांतील तत्त्व. २] पंचकर्म ३] समान—चिकित्सा ४] चिकित्सा—पद्धति व सैद्धांतिक तत्त्वें यांचा परस्पर संबंध. ५] आयुर्वेदीय ग्रंथांत उल्लेखित असलेल्या रोगांची चिकित्सा व तद्व्यतिरिक्त अलिकडील नव्या रोगांची चिकित्सा.

८) या अभ्यासक्रमाकरितां खालील संदर्भ ग्रंथ मुक्रर केले आहेत.

१] चरकसंहिता चक्रदत्त टीका व जल्पकल्पतरु टीका गंगाधर कृत २] सुश्रुतसंहिता [डल्हण टीका] ३] अष्टांग—हृदय ४] रसरत्न-समुच्चय ५] मदनपाल-निघंटु (वनस्पतिशास्त्राच्या प्रात्याक्षिकासहित) ६] माधवनिदान (मधुकोश टीका) ७] शार्ङ्गधर-मध्यम खंड.

९) या परीक्षेनंतर 'आयुर्वेद पारंगत' अशी उपाधि दिली जाईल.

१०) परीक्षा-शुल्क ६०रु. ठेवण्यांत आलें आहे.

स्नातकोत्तर अभ्यासक्रमासाठीं अध्यापक, रुग्णालयें इत्यादींच्या मान्यतेसाठीं पोट नियमः—

१) स्नातकोत्तर वैद्यकीय शैक्षणिक लायकी धारण करणाऱ्या व वैद्यकीय अध्यापनाचा पूर्वानुभव अगर वैद्यकीय संशोधन--कार्यांची पूर्वीची जोड असणाऱ्या व्यक्तींना अथवा वैयक्तिक प्रचुर गुणवत्तेमुळें लायक असणाऱ्या व्यक्तींना फॅकल्टी ह्या स्नातकोत्तर अभ्यासक्रमासाठीं अधिकृत अध्यापक म्हणून मान्यता देईल.

२) ह्या अभ्यासक्रमासाठीं तयार केलेल्या अभ्यासपत्रकांत नमूद असलेल्या विषयांचा अभ्यास करण्यास सुसज्ज व साधनसामुग्रीसंपन्न अशा आयुर्वेदिक महाविद्यालयास रुग्णालयास व व्यक्तींच्या तेथील कार्यकारी नेमणूकीस फॅकल्टी मान्यता देईल.

●●●● गौरव ●●●●

आपण आयुर्वेदिक औषधांचा गौरव वाढविला पाहिजे. ती एक आपल्या हिताची गोष्ट आहे. आपण प्रत्येक औषधी द्रव्य अस्सलपैकीं व ताजें वापरून सिद्ध औषधें बनविलीं पाहिजेत. अशीं उत्कृष्ट औषधीं द्रव्यें मिळवण्याकरितां आपणः—

दि ऑल इंडिया करीयाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात
माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

कारी बंगाल संस्कृत शिक्षा परिषद
संस्कृत परीक्षा १९५५

परिषदेच्या मुंबई केंद्रांत ‘काव्य प्रथमा’ परी- येथील आयुर्वेद-विद्यालयांतील अध्यापक प्र. दाणी व विद्यार्थी श्रीमती लक्ष्मीबाई व चि. भास्कर करमरकर हे बसले होते. ते श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

———

कांचा पत्रव्यवहार

पगारवाढीविरुद्ध आक्षेप

नासिक जिल्ह्यांतील वैद्यांच्या पगारवाढीबद्दल लोकल सेल्फ गव्हर्मेंटकडून आक्षेप घेण्यांत असून दिलेली पगारवाढ रद्द होण्याचा संभव झाला आहे.

पूर्वींची पगारश्रेणी

१९५० सालीं ही पगार वाढ देण्यांत आली पूर्वींचा पगार रु. ५५ ते १३० असा आहे. द्याकरितां कांहीं सरकारमान्य पगारश्रेणी ठर-- न आलेली आहे काय ? नगर, पुणें, सातारा, येथील सरकारमान्य विद्यालयांच्या माजी व पदवीधरांचें स्केल काय ठरविण्यांत आलें आहे? भारतीय आयुर्वेद विद्यापीठाचे भिषक् व विशारद यांचे स्केल काय आहे ?

होणाऱ्या अन्यायावर उपाय करण्याचा हीं आहे काय ? आयुर्वेद युनानी बोर्ड व म. प्रां. मंडळ याबाबतींत कांहीं करूं शकेल काय ? काय करणें जरूर आहे ?

— एक लोकल बोर्ड वैद्य

प्रांतीय मंडळाचे सभासद व्हा

महाराष्ट्र वैद्य मण्डळाचे सभासद सर्व लोकल र्यांनीं होऊन एक सामुदायिक अर्ज मण्डळाचे वै. पां. ह. देशपांडे, ६३७ शुक्रवार पेठ, पुणें २ पाठवावा व दाद मागावी. —संपादक]

———

अनुक्रमणिका

दंतवैद्य जायदे यांना ‘शुभास्ते पंथानः’ ६५
मुलें माती का खातात? ६७
खऱ्याखुऱ्या आयुर्वेदिक वनस्पतींचा व औषधांचा पुरवठा समिति ७१
नवीन सरकारमान्य गुरु ७२
आयुर्वेदीय यात्रा ७३
दंताहरण--कलेचें शिक्षण ७४
चहा संपला ७५
अ. भा. आयुर्वेद महासंमेलन, महत्वाचे ठराव ८३
औषधांच्या आक्षेपार्ह जाहिराती ८६
शुद्ध आयुर्वेदीय विद्यार्थ्यांपुढील अडचणी ८७
राष्ट्रपतिनियुक्त समिती ८८
दांत पाडूं नका. इसबावर सागाचें तेल ८९
६ संततज्वरी रोग्यांवरील आयुर्वेदीय उपचार ९१
स्नातकोत्तर आयुर्वेदीय शिक्षणाबाबत पोट-नियम ९३

वै. जायदे प्रवासनिधि

वै. रामभाऊ भोगे, मुंबई — रु. १०
वै. वि. गं. हिर्लेकर, अमरावती रु. १०

—: वैद्यांस प्रॅक्टिसमध्यें उपयुक्त ग्रंथ :—
“ ॲलोपॅथिक चिकित्सासंग्रह ”
यांत सुमारें ७० रोगांची पाश्चात्य चिकित्सा थोडक्यांत दिली असून त्यांत ३४० प्रिस्क्रिप्शनें व इंजेक्शनेंहि दिलीं आहेत. ॲलोपॅथिक ज्ञानांत वाढ होण्यासाठीं अत्यंत आवश्यक ग्रंथ. आजच मागवा. किं. ४॥ रु. ट. खर्च निराळा.
प्राप्तिस्थळें:— १ वैद्यक ग्रंथ भांडार – नाशिक
२ डॉ. मोकाशी जे. बी – ठाणे

महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळाचे सभासद होऊन संघटना बलवान् करा.

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नासिक

वनस्पति-परिचयासाठीं तपोवनांतील सहल

द्रव्यगुणविज्ञान विषयाचे अध्यापक वैद्य वि. म. गोगटे व वै. श्री. द. जळूक यांच्यासह शुद्ध आयुर्वेद विद्यालयांतील विद्यार्थी नाशिक जवळील तपोवनात गेले होते. वरील चित्रांत केतकीच्या बनांत विद्यार्थी एकाग्रतेनें माहिती घेत आहेत.

अतिबला, नागबला आदि बला-प्रकारांची माहिती विद्यार्थ्यांना समजून दिली जात आहे. ही वनस्पति सहल विद्यार्थ्यांना फारच उद्‌बोधक झाली.

छाया— नौलखा मा. पु. — विद्यार्थी प्रथम

9 AUG 55

संपादक व प्रकाशक — वैद्य चिंतामण [illegible] पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विवलकर कारंजा, ना
मुद्रक — श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, नाशिक.

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

पुस्तकालय

आयुर्वेद पत्रिका

र्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु.   १ अंकाची किंमत ४ आणे

(दरमहा ता १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

र्ष ९ वें)   नासिक, ता. १६ ऑगस्ट १९५५   (अंक ४ था

१५ ऑगस्टचा गोवा स्वातंत्र्य संग्राम

म. प्रांतीय वैद्य मंडळाचें कर्तव्य

दक्षिण महाराष्ट्राचा गोमांतक हा पोर्तुगीज अमलाखालीं असलेला भू-प्रदेश भारता-गांच स्वतंत्र करण्याचा लढा आतां निकराला आला असून काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत सर्व प्रांतांतील जनतेचें लक्ष आज त्या लढ्याकडे आकृष्ट झालें आहे. या अहिंसक सत्याग्रहाच्या लढ्यांत सत्याग्रहींना मारहाण करून जंगलांत सोडून दिलें जात आहे. या सत्याग्रह्यांना ताबडतोब वैद्यकीय मदत मिळावी म्हणून देशांतील सर्व भागांतून वैद्यकीय पथकें पाठविण्याची व्यवस्था सुरू आहे. महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचें कर्तव्यदक्ष अध्यक्ष आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे यांनींहि म. प्रां. वैद्यमंडळातर्फे आयुर्वेदीय चिकित्सकांचें पथक पाठविण्याची तयारी केली असून त्या पथकांत ते स्वतः व मंत्री श्री. माधवरावशास्त्री जोशी हें दोघेहि जाण्यास उत्सुक आहेत.



आयुर्वेदाचार्य पां ह. देशपांडे

अधिक महत्वाचें कार्य

या पथकांत सुमारें १५ वैद्य मंडळींनीं भाग घ्यावा व ज्या वैद्यांना स्वतःचा प्रवास वगैरे खर्च करणें शक्य नसेल त्यांचा खर्च प्रांतीय वैद्यमंडळातर्फे करण्यांत यावा अशी योजना आखण्यांत आली आहे. नाशिक येथील सेवाभावी व कार्यतत्पर वैद्य वि. म. गोगटे यांनीं 'मी आयुर्वेदीय शुश्रूषापथकांत येण्यास तयार आहे, व सर्व खर्च स्वतःच करणार आहे.' असें प्रांतीय वैद्य मंडळास कळविलें आहे. इतकेंच नव्हे तर ता. ११ रोजीं रात्रींच्या गाडीनें जाणाऱ्या नाशिकच्या

पथकाबरोबर ते पुण्याकडे रवानाहि झाले आहेत. ‘ १०० वैद्य संमेलनापेक्षांहि अशा प्रसंगीं कार्य करणें हें अधिक महत्वाचें आहे ’ अशी वैद्यराज देशपांडे व मंत्री वै. जोशी यांची भावना आहे व म्हणून गोव्याच्या या स्वातंत्र्य संग्रामात वैद्य बंधूंनीं अहमहमिकेनें भाग घ्यावा अशी त्यांची अंतःकरणपूर्वक खटपट सुरू आहे. त्यांच्या या प्रयत्नाला वैद्य मंडळींनीं सर्वतोपरी सहाय्य अवश्य करावें, यांतच आयुर्वेदाचा भाग्योदय आहे.

नोकर वैद्यांच्या अडचणी

आयुर्वेदीय एस्. एम्. पी. केंद्रें, लोकल बोर्ड आयु. दवाखाने व म्युनिसिपल आयु. दवाखानें यांत काम करणाऱ्या वैद्यांना आपलीं कामें करीत असतांना अनेक प्रकारच्या अडचणी उद्भवतात. त्या पैकीं कांहीं ते स्वतः सोडवू शकतात. व कांहीं साठीं त्यांना इतरांची मदत आवश्यक असते. सध्याच अशा प्रकारच्या कांहीं तक्रारी आमच्याकडे आल्या आहेत. मुंबई सरकारनें आतां आयुर्वेदासाठीं स्वतंत्र डायरेक्टर नेमलेले असल्यामुळें वैद्यांना संघटितपणें आपलें म्हणणें त्यांच्याकडे मांडतां येणें आतां शक्य झाले आहे.

सर्वांच्या तक्रारी संघटितपणें व व्यवस्थितरीतीनें मांडता याव्यात यासाठीं विनंति कीं वरील नोकर पेशांतील वैद्यांनीं आपल्या अडचणी, शंका, अपेक्षा व सद्यः स्थिती इ. बाबतचें आपलें म्हणणें खालील पत्त्यावर लिहून कळवावें म्हणजें त्याबाबत शक्य ते प्रयत्न अवश्य करण्यांत येतील. —वि. म. गोगटे

वैद्य बिवलकर कारंजा नाशिक


थंडगार
नेत्रांजन
डोळ्यांचे विकारावर उत्कृष्ट
कृष्णशास्त्री बिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

माझे कर्तव्य

म. प्रां. वैद्य मंडळाचे अध्यक्षांनीं वैद्यापासून अशी अपेक्षा बाळगली आहे कीं त्यांनीं गोवा विमोचन कार्यांत भाग घ्यावा. त्या उद्देशास अनुसरून मी १५ ऑगस्टच्या सत्याग्रहांत भाग घेण्याचें ठरविले आहे. गोव्यांत आयुर्वेदाला व मराठीं भाषेला पू मज्जाव आहे. भारताच्या एका भागांत निर्माण झालेली ही परिस्थिति दूर करण्याचा भारतवासीयांनीं निश्चय केला आहे तो पूर्ण करणें आपलें कर्तव्य आहे.

आपला
बिंदुमाधव पंडित

मंचर येथें दन्तोत्पाटन

श्री. भि. स. राजगुरव यांच्या विनंतीवरून पुणें येथील दंतवैद्य मा. ग. शेंडे आयुर्विद्यापारंगत यांनीं मंचर येथें जाऊन विनावेदना दन्तोत्पाटन केले व दांत टिकविण्याच्या दृष्टीनें आहार व उपचार सांगितले. वैद्य शेंडे हे एकाच वेळीं दोन्ही हातानें दन्तोत्पाटन करतात हे पाहून लोकांना आश्चर्य वाटलें. अशा पद्धतीने दन्तोत्पाटन केल्यास खेड्यांतील जनता वैद्यांना धन्यवाद देईल असें श्री. राजगुरव कळवितात.

वैद्यबंधूंना विनंति

पुढील आयुर्वेद अध्यापकचर्चा परिषद येत्या ऑक्टोबर महिन्यांत भरवावी किंवा कसे? तसेंच त्याबाबतच्या विधायक सूचना, योजना आणि अपेक्षा वैद्य-बंधूंनीं कृपया शक्य तितक्या लवकर पाठवाव्या ही विनंति. वै. वि. म. गोगटे, नाशिक

आयुर्वेदाची सद्यःस्थिति

(लेखक:-वै. ग. वा. कामत, आयुर्विद्याविशारद (पुणें), संगमेश्वर जि. रत्नागिरी)

(भुसावळ येथें भरलेल्या वैद्यसंमेलनाचे पूर्वी आयुर्वेदाची सद्यःस्थिति या विषयावर निबंध विण्यांत आले होते. वेळ अपुरा असल्यामुळें विशेष निबंध आले नाहींत. आलेल्या निबंधांत प्रथम ांचा निबंध येथें देण्यांत येत आहे. ——संपादक)

विषयाची पार्श्वभूमि

आयुर्वेदाच्या दृष्टीनें आजचा काल हा क्रांतिकाल आहे. इंग्रज अमदानीपर्यंत आयुर्वेदाला श्रय व राजाश्रयहि होता. परंतु चरक–सुश्रुतांच्या कालानंतर आयुर्वेदाची प्रगति खुंटली होती असें वें लागतें. आणि त्याचें कारण असें कीं, बौद्धधर्म व जैनधर्म ह्यांच्या वर्चस्वाचा परिणाम म्हणून च्या संस्कृतीमध्यें अहिंसेचा फाजील व अप्रस्तुत शिरकाव झाला होता. परिणामतः शवच्छेदन व शालाक्य ह्या दोन विषयांच्या बाबतींत किंचित्‌हि प्रगति होऊं शकली नाहीं. व ह्या अंगांचे बाबतींत युर्वेद पांगळा राहिला. ह्या वाईटाबरोबरच एक चांगली गोष्ट झाली आणि ती म्हणजे रसशास्त्राची प्रगति होय. किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं, अहिंसेच्या अवास्तव कल्पनेमुळेंच तत्कालीन वैद्यांना क्तीसाठीं आपलें लक्ष कायचिकित्सेवर केंद्रीभूत करण्याशिवाय गत्यंतर नव्हतें व म्हणूनच ह्या अंगाची शी प्रगति झाली, व आयुर्वेदालाच नव्हे तर सबंध वैद्यकशास्त्राला भूषणभूत असलेलीं व अमृतोपम धें आयुर्वेदांत निर्माण झालीं.

मुसलमानांच्या काळांत आयुर्वेदाची तशी विशेष प्रगति झाली नाहीं. पण राष्ट्राचें आरोग्य भाळण्याचें कार्य आयुर्वेद व युनानी हीं दोन भारतीय शास्त्रेंच मुख्यतः करीत होतीं. इंग्रज अमदानींत त्य वैद्यकाचा भारतांत शिरकाव झाला व उत्तरोत्तर आयुर्वेद अंधारांत जाऊं लागला. खरोखरच युर्वेदाच्या दृष्टीनें इंग्रज अमदानी हा निशाकाळ होता. ह्या काळांत आयुर्वेदाला राजाश्रय तर नव्हताच; राजसत्तेचा विरोध व हीन लेखण्याकडे कल होता. बहुजनसमाजसुद्धां पाश्चात्य विद्या आणि संस्कृति च्या झगझगाटानें दिपून गेला होता, आणि आपलें तेवढें सर्वच त्याज्य आणि गर्हणीय असें मानीत ता. हाच दृष्टिकोन वैद्यकाचें बाबतींतहि जनतेचा होता. सामान्यपणें नाइलाज म्हणून वैद्यकीचें अध्ययन व्यवसाय केला जात असे. “ न मिळे भीक तर वैद्यकी शीक ” ही तत्कालीन रूढ असलेली म्हण हेंच वितें कीं, भीकंहि मागण्याची पात्रता नसणारांनींच वैद्यकीचा व्यवसाय करावा. ” “ विमल विपुल ऽपि बुद्धिमाकुलीकुर्युः । ” असें ज्या शास्त्राबद्दल प्राचीन शास्त्रकार गौरवपर उद्गार काढीत असत, त्याच स्त्राबद्दल ह्या काळांत सामान्य लोकांची सुद्धां वरीलप्रमाणें हीनत्वाची भावना होती.

परन्तु चिखलांत कमळें उगवतात किंवा अंधाऱ्या रात्रींच चांदण्या विशेष तेजानें चमकतात, प्रमाणें ज्यांनीं आजच्या क्रांतिकाळाला जन्म दिला किंबहुना आयुर्वेदाच्या बाबतींतलें कालचक्र उलटें रवून आयुर्वेदाला अभ्युदयाची दिशा दाखविली ते वै. बाळशास्त्री लागवणकर, वै. पं. गंगाधरशास्त्री णे, गुरुवर्य नानलशास्त्री, वै. वामनशास्त्री दातार, वै. अण्णासाहेब पटवर्धन, वै. गंगाधरशास्त्री जोशी, इ. र थोर वैद्य ह्याच काळांत जन्माला आले. त्यांनीं आयुर्वेद हें मूर्खांचें शास्त्र अगर वैदूंची भोंदूगिरी सून शास्त्राच्या कोणत्याहि निकषावर टिकणारें अनुभवसिध्द व दृक्प्रत्यय शास्त्र आहे हें लोकांना पटवून

दिलें. ह्यामुळें जनतेचा व राजसत्तेचाहि ह्या शास्त्राकडे पाहाण्याचा दृष्टिकोन बदलला. वरील वैद्यांनी चिकित्सेनें रोगमुक्त झाल्यामुळें जनता त्यांचें गुणगान करूं लागली.

परंतु हे वैद्यवर स्वार्थाच्या मोहपाशांत गुंगून जाऊन नुसतें अर्थोत्पादन करीत राहिले नाहींत, तर जनतेला असें सांगत होते कीं, "ज्या चिकित्साशास्त्राच्या अध्ययनानें आणि व्यासंगानें आम्ही तुम्हांला रोगमुक्त केलें, त्या शास्त्राच्या उद्धाराला हातभार लावून अंशतः तरी त्या ऋषिॠणांतून मुक्त व्हा." हे वैद्यवर नुसते वाचिवीर्य नव्हते. ते नुसतीं व्याख्यानें आणि प्रवचनें देऊन थांबले नाहींत, तर आयुर्वेदाच्या अध्ययनाची सोय व्हावी म्हणून रुग्णालयाशीं संलग्न अशीं आधुनिक पद्धतीचीं विद्यालयें सुरूं करून "आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः।" हें सूत्र आचरणांत आणण्यासारखी परिस्थिति निर्माण केली. अनेक तऱ्हेच्या आणि अनेक वर्षांच्या संकटांमुळें आयुर्वेदाची परंपरा तुटली होती. त्यामुळें आयुर्वेदाच्या सिद्धांताबद्दल आणि परिभाषेबद्दल वैद्यावैद्यांमध्यें मतभेद होते. आणि पाश्चात्य वैद्यक विद्याविभूषित तर त्याचा दुरुपयोग करून घेत होते. म्हणून वरील वैद्यांनीं अनेक सभा व परिषदा भरवून ह्या बाबतींत निश्चितता आणण्याचा प्रयत्न केला. ह्या सर्व चळवळीचा परिणाम म्हणून आयुर्वेदालाहि जनतेची सहानुभूति मिळूं लागली. जनता व वैद्य यांच्या संमिश्र वजनाचा परिणाम होऊन सरकारलाहि आयुर्वेदाकडे लक्ष देणें भाग पडलें. इतकें होऊनसुद्धां १९३७ पर्यंत सरकारनें आपलें सापत्न–भावाचें धोरण कायम ठेवलें. तें धोरण ह्याच काळीं अधिकाररूढ झालेल्या काँग्रेस सरकारनें बदललें; व आयुर्वेदाला सरकारमान्यता कशी द्यावी या संबंधीं विचार–विनिमय करून १९३८ सालांत **The Board of Indian Systems of Medicine** या नांवाच्या बोर्डाची स्थापना केली व आयुर्वेदासंबंधींचें सर्व कार्य या बोर्डाकडे सोंपविलें. त्याचप्रमाणें १९३८ चा वैद्य–नोंदणीचा कायदा म्हणून ओळखला जाणारा कायदा करून बरींच वर्षेंपर्यंत नसलेली राज्यमान्यता मिळवून दिली. अशा रीतींनें आयुर्वेदाला लोकमान्यता व राजमान्यता आज मिळाली आहे. आयुर्वेदाची सद्यः परिस्थिती या विषयाचें विवेचन करावयाचें म्हणजे १९३८ सालानंतरचेंच विवेचन करणें अवश्य आहे. कारण याच सालापासून आजच्या कालखंडाला सुरुवात झाली आहे व तोच प्रस्तुत निबंधाचा विषय आहे. परन्तु आजचा काल स्पष्टपणें लक्षांत यावा म्हणून इतक्या पाल्हाळिकपणें या कालाच्या पार्श्वभूमीचें वर्णन केलें आहे.

पुढील ५ मुद्यांचा उहापोह केला पाहिजे

आयुर्वेदाच्या सद्यःस्थितीचें वर्णन करावयाचें म्हणजे पुढील पांच मुद्यांचा सांगोपांग उहापोह करणें अवश्य आहे.— १] आजच्या जनतेचा आयुर्वेदाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन.
२] आजच्या राजसत्तेचा आयुर्वेदाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन.
३] आजची अध्यापन व्यवस्था, विद्यार्थी व वाङ्मय.
४] आजचा वैद्यवर्ग. ५] आजचे औषधी कारखाने.

[१] जनतेचा दृष्टिकोनः—

आजच्या जनतेची आयुर्वेदाकडे पाहाण्याची दृष्टि सहानुभूतीची आहे. वर लिहिल्याप्रमाणें मागच्या पिढींत असे कांहीं वैद्य निर्माण झाले कीं ज्यांची चिकित्सा सद्यःफलदायी होती. तत्कालीन श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या डॉक्टरानीं हताश होऊन सोडलेले रुग्ण हे वैद्य बरे करीत, आणि ते सुद्धां अगदीं अल्पखर्चांत, म्हणून सामान्य लोक कुतुहलानें आणि कौतुकानें आयुर्वेदाकडे पाहूं लागले. तशांतच महा-

र्वा परिणाम म्हणून महाग पाश्चात्य चिकित्सा आर्थिक दृष्ट्या न झेपण्यासारखी झाली होती. अशा कारणांनीं आज जनता आपुलकीच्या दृष्टीनें आयुर्वेदाकडे पाहात आहे. Blood pressure, ओ, व्हिटॅमिन इ. सकृत्दर्शनी आधुनिक वाटणाऱ्या वैद्यक विषयाबद्दल आयुर्वेदाचा दृष्टिकोन काय आहे समजाऊन घेण्यास ती उत्सुक असून ह्या बाबतींत होणारे प्रयोग व वर्तमानपत्रांतून होणारी चर्चा कडे जनतेचें लक्ष आहे. जनतेला आज असा विश्वास आहे व तो उत्तरोत्तर वाढत आहे कीं आपलें ग्य पाश्चात्य वैद्यकाच्या पदवीधराइतक्याच जबाबदारीनें आयुर्वेदाचा पदवीधरहि सांभाळू शकेल.

जमाना बदलला आहे

माझ्या ह्या विधानाच्या पुष्ट्यर्थ मी असें दाखवू शकेन कीं, पाश्चात्य वैद्यकाच्या पदवीधराइतकें यश व्यवसायामध्यें अनेक ठिकाणीं आयुर्वेदाचे पदवीधर मिळवीत आहेत. एक काल असा होता कीं, वेळीं मधांतून अगर कसल्यातरी रसांतून औषधाच्या पुड्या अगर गोळ्या घेणें किंवा काढा ह्याची कांना लाज वाटत असे. वैद्याच्या पथ्याची तर लोकांच्या अंतःकरणांत भीतीच बसली होती व ती इतकी बरदस्त होती की आयुर्वेदामध्यें पथ्यविचार विशेष असल्यामुळें रुग्णापैकीं अनेक अज्ञानी लोक युर्वेदाची चिकित्सा टाळीत असत. पण आज तो जमाना बदलला आहे. आयुर्वेदीय औषधांच्या गुणा- बद्दल लोकांची खात्री पटली असून अनुपानांतून औषध घेणें अगर काढा करणें ह्या गोष्टीचा लोकांना कंटाळा नाहीं. आर्थिक परिस्थिति सर्वोतोपरी अनुकूल असून सुद्धां वैद्यांचीं औषधें मोठ्या अभिमानानें घेणारे आणि ज्ञानसंपन्न लोक आज दिसत आहेत.

निसर्गोपचाराचें महत्व

एका पिढीपूर्वी हें चित्र दुर्मिळ होतें. पथ्यविचाराचा सुद्धां लोकांना आंता तितका बाऊ वाटत नाहीं. उलट त्याबद्दल एक प्रकारचा अभिमान बाळगणारे लोक सामान्य लोकांतून अधिक प्रमाणांत आढळत आहेत. आज पुष्कळ लोक सुधारणेचे अग्रणी ह्या दृष्टीनें अमेरिकेकडे पाहात असून अमेरिकेमध्यें दिवसें-दिवस निसर्गोपचाराचें माहात्म्य वाढत आहे. आयुर्वेदांतील पथ्यविचार हा ह्या पद्धतीला धरूनच असल्यामुळें पथ्य करणें हें आरोग्याच्या व रोगमुक्तीच्या दृष्टीनें अवश्य आहे हें आतां लोकांना पटलें असून त्यापथ्य विचार आयुर्वेदामध्यें प्रथमपासूनच असल्यामुळें ह्या विचाराबद्दल आज अनेक विचारवंत लोकांना आयुर्वेदाबद्दल कौतुक व अभिमान वाटत असून एका काळचें दूषण आज भूषण ठरत आहे. हा ळ महिमा तर आहेच; पण आयुर्वेद हें दृक्प्रत्यय शास्त्र असल्याचा हा पुरावा आहे.

तिटकारा कमी झाला

आयुर्वेदीय औषधाबद्दल पूर्वी लोकांना तिटकारा वाटत असे. आणि त्याचें एक कारण असें कीं औषधें घ्यायला सुटसुटीत नसतात. आणि असलीं खटपटीचीं औषधें दुसरी पाश्चात्य सुटसुटीत औषधें असतांना घेणें आजच्या धांवपळीच्या जीवनांत लोकांना पटत नसे. पण आज सामान्य लोकहि आरोग्याचा विशेष आस्थेनें विचार करीत असून "सुखार्थी च त्यजेत् विद्यां। विद्यार्थी च त्यजेत् सुखम् ।" हें विद्येच्या बाबतींतील सूत्र आरोग्यालाहि लागू पडतें हें तिला पटलें असून गुणावह आयुर्वेदीय चिकित्सा स्वीकारण्यास जनता आनंदानें तयार झाली आहे.

दुधारी औषधें

शिवाय सल्फा ड्रग्ज्, ॲन्टी बायोटिक्स्, हे जे पाश्चात्य चिकित्सेतले भात्यातले बाण हेहि दुधारी असल्याचें आतां जनतेला कळून चुकलें आहे. ह्या औषधांनीं रोग बरा होतो किंबहुना तावडतोब प्रशम

पावल्यासारखा वाटतो. परंतु या औषधांनीं शरीरामध्यें नवीनच एखादी विकृति कायम स्वरूपाचें रोग मांडून बसते असें तज्ज्ञाप्रमाणें सामान्य लोकांनाहि आढळून आलें आहे. रुग्णांना रोगमुक्ती हवी असते, रोगांत नुसता बदल नको असतो. पाश्चात्य वैद्यकांतला हा दोष आयुर्वेदाला पोषक ठरला आहे. अशा तऱ्हेची चिकित्सा सकृद्दर्शनीं कितीहि लाभदायक वाटली तरी आयुर्वेद ती चिकित्सा त्याज्यच मानतो.

विशुध्द प्रयोग

प्रयोगः शमयेद्व्याधिं योऽन्यमन्यमुदीरयेत् । नासौ विशुद्धः शुद्धस्तु शमयेद्यो न कोपयेत् ॥

ह्या सूत्रानें असल्या दडपशाहीच्या चिकित्सेचा आयुर्वेदानें स्पष्ट शब्दांत निषेध केला असून कायम स्वरूपाची रोगमुक्ति करण्याच्या चिकित्सेचा गौरव केला आहे. आणि म्हणूनच आजच्या समजूतदार जनतेनें आयुर्वेदाच्या ह्या सूत्राचें सक्रीय स्वागत केलें आहे. आयुर्वेदीय औषधानें गुण येण्यास वेळ लागतो औषध घेणें खटपटीचें असतें, पथ्य करावें लागतें हें जरी खरें असलें तरी कायम स्वरूपाची रोगमुक्ती करण्याचें सामर्थ्य आयुर्वेदीय चिकित्सेंतच आहे हेंहि तिनें ओळखलें आहे. आयुर्वेदीय चिकित्सा स्वल्प खर्चात तर होतेच पण चिकित्सेमुळेंच विकृति निर्माण होणें हा चिकित्सेचा मोठा उणेपणा आयुर्वेदांत नसल्यामुळें आज आयुर्वेदाला एक विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे.

लोकमान्यतेचा एक पुरावा, आरोग्याचीं सदरें

आयुर्वेदाबद्दल प्रेम वाढत आहे. ह्याला अेक पुरावा असा कीं, अनेक वृत्तपत्रांनीं आरोग्याचीं सदरें सुरू केली असून ह्या सदरामधून मुख्यतः आयुर्वेदीय चिकित्सेचीच चर्चा केली जाते. जर जनतेला आयुर्वेदीय चिकित्सेबद्दल आस्था नसती तर हीं सदरें बन्दच करावीं लागलीं असतीं. पण तसें न होतां ह्या सदरामुळें वर्तमानपत्रांच्या खपावर अनुकूल परिणाम झाला असून अनेक लोक त्याचा उपयोग करून घेत आहेत. ह्याचा अर्थ इतकाच कीं एक भारतीय शास्त्र म्हणून उत्पन्न होणारी आपली जबाबदारी, आपुलकी, जिव्हाळा आणि आस्था दाखवून, जनता योग्य तऱ्हेनें पार पाडीत आहे.

(२) राजसत्तेचा दृष्टिकोनः —

१९३८ सालपर्यंत आयुर्वेदाला सरकारी मान्यता नव्हती. क्वचित् ठिकाणीं लोकल बोर्ड अगर लहानसहान म्युनिसिपालट्यासारख्या निमसरकारी संस्था आयुर्वेदीय दवाखाने चालवीत असत. ह्यापलिकडे सरकारचें आयुर्वेदाकडे लक्ष नव्हतें. पण ३८ च्या कायद्यापासून मात्र ही परिस्थिति बदलली आहे. वैद्यांना रजिस्टर्ड करण्यांत आलें असून त्यांना सर्टिफिकेट्स् देणें, प्रेतें तपासणें, तज्ज्ञ म्हणून कोर्टांत साक्षी देणें, वगैरे बाबतींत डॉक्टरांच्या इतके अधिकार देण्यांत आले आहेत. ह्याचाहि उपयोग लोकमान्यता मिळण्याकडे बराच झाला आहे. पूर्वीं वैद्याचें औषध घेतलें तरी रजा मिळविण्याकरितां नोकर लोकांना डॉक्टरांचें सर्टिफिकेट घ्यावें लागत असें. तशी परिस्थिति आतां राहिली नसून नोंदलेला वैद्य, डॉक्टर इतक्याच अधिकारानें सर्टिफिकेट देऊं शकतो. त्यामुळें ह्या अडचणीमुळें आयुर्वेदीय चिकित्सा न घेणारा नोकरवर्ग आज ती घेऊं लागला आहे. “आपल्याला सरकार हीन लेखतें हा वैद्यवर्गाच्या मनांतला न्यूनगंड या कायद्यामुळें कमी झाला असून आजचा वैद्य राजमान्यतेच्या एक प्रकारच्या विशेष आत्मविश्वासानें चिकित्सा करूं लागला आहे.

शिक्षणसंस्थांना आर्थिक मदती

सरकार नुसता कायदा करूनच स्वस्थ बसलें नाहीं तर आयुर्वेदीय महाविद्यालयें व रुग्णालयें यांना आर्थिक मदती देत आहे. प्रत्येक जिल्ह्यांतून मदत देऊन पाश्चात्य वैद्यकाबरोबरच आयुर्वेदीय दवाखानेहि

केले आहेत. सरकार स्वतःच्या जबाबदारीवर आज मुंबईत एक महाविद्यालय व रुग्णालयहि चालवीत हे, आयुर्वेदांत चांगलीं औषधें आहेत ह्याबद्दल पाश्चात्य वैद्यकविद्या–विभूषितांचेंहि दुमत नाहीं, म्हणून च्या संशोधनाचें काम या रुग्णालयांतून करून घेतलें जात आहे. पण सरकार इतक्यावरच संतुष्ट नाहीं तर अहमदाबाद व पुणें ह्या दोन ठिकाणच्या सिव्हिल हॉस्पिटलमधून २० रुग्णांची सोय करण्यांत येणार असून त्या ठिकाणीं आयुर्वेदाच्या संशोधनाचें कार्य सुरूं करणार आहे. थोडक्यांत म्हणजे आजचें सरकार आयुर्वेदाची शास्त्रीयता जगाला पटविण्यासाठीं दृक्प्रत्ययाचा निकष लावून दाखवीत आहे.

डायरेक्टर ऑफ आयुर्वेदची नेमणूक

सरकारी मान्यता व उत्तेजन ह्यामुळें सरकारी कारभारांतहि आयुर्वेदाचें माहात्म्य वाढत आहे. आजपर्यंत आयुर्वेदाला यद्यपि सरकारी मान्यता होती तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीचें काम सर्जन–जनरलच्या म्हणजे ॲलोपॅथिक पदवीधराच्या हातांत होतें. अशा गृहस्थांना आयुर्वेदाची माहिती नसल्यामुळें कळत न कळत त्यांच्या हातून आयुर्वेदाची गळचेपी होण्याचा संभव आहे तो टळावा, आयुर्वेदाच्या सर्वांगीण विकासाला संपूर्ण अवसर मिळावा, अन्यायाला अगर तक्रारीला जागा राहूं नये ह्या न्याय्य हेतूनें सरकारनें चालूं सालपासून आयुर्वेदाचें अगदीं स्वतंत्र खातें निर्माण केलें असून त्यावर डायरेक्टर ऑफ् आयुर्वेद ह्या हुद्याच्या अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. आयुर्वेदाच्या प्रगतीवर ह्याचा फारच अनुकूल परिणाम होणार आहे. आयुर्वेदाला आपलें तेज दाखविण्याची संधि मिळेल त्याप्रमाणें दोष घालविण्यासहि मिळेल. म्हणून सरकारी मान्यतेमध्यें वरील अधिकाऱ्याची नेमणूक ही अत्यंत विशेष गोष्ट आहे. ह्यामुळेंच राजकीय दृष्ट्या आजचा काळ हा आयुर्वेदाला अत्यन्त अनुकूल असा आहे. किंबहुना पाश्चात्य वैद्यकाच्या शिरकावानंतर असा काळ येईल आणि तोहि इतक्या लवकर अशी कोणाचीहि अपेक्षा नव्हती. हा काळ आणण्याचें श्रेय माजी मुख्य मंत्री बाळासाहेब खेर, विद्यमान् मुख्य मंत्री मुरारजीभाई देसाई, व आरोग्यमंत्री शांतिलालजी शाह ह्यांच्या आयुर्वेदाभिमानाला आहे. त्यांचा आयुर्वेदाभिमान इतका दुर्दम्य आहे कीं, कांहीं असंतुष्ट वैद्याप्रमाणेंच आपल्या सहकाऱ्यांचाहि विरोध सहन करून त्यांनीं आयुर्वेदाला प्रगतिपथावर आणून ठेवला आहे. आतां यशस्वी रीतीनें मार्गाक्रमण करणें हें मुख्यतः वैद्यांचेंच कर्तव्य आहे.

राजमान्यतेंतील उणीवा

आजच्या राजमान्यतेंतहि कांहीं उणीवा आहेत असें अनेकांना वाटतें. आणि त्यापैकीं मुख्य म्हणजे पगाराच्या बाबतींतली होय. डॉक्टरलोकांच्या इतकें वैद्यांचें पगाराचें प्रमाण नाहीं अशी मुख्यतः ह्या वर्गाची तक्रार आहे. परंतु सर्वच गोष्टी एकदम होणें शक्य नाहीं व योग्य नाहीं. वैद्यांनाहि अधिक पगाराची गरज आहे हें जरी सत्य असलें तरी आजच्या वैद्यांच्या शिक्षणासाठीं डॉक्टरलोकांच्या इतका पैसा व वेळ खर्च झालेला नसतो ही गोष्ट कोणालाहि नाकारतां येत नाहीं. आज मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन आपलें महत्त्व जनतेला पटवून दिलें पाहिजे, म्हणजे ही व असल्या अन्य तक्रारीहि आपोआप दूर होतील. कारण प्रचलित सरकारची आयुर्वेदाला मान्यता तर आहेच पण सक्रिय सहानुभूतिहि आहे. आणि तिचा फायदा वैद्यवर्गाला निश्चितपणें मिळूं शकेल.

दारुबंदी कायदा

दारुबंदीच्या कायद्याच्या कक्षेंत कांहीं आसवें व अरिष्टें आलीं असल्यामुळें ती एक तक्रारीची बाब झाली आहे. पण सुक्याबरोबर ओलेंहि जळतें त्याचप्रमाणें ती गोष्ट झालेली असून अशा तऱ्हेचे निर्बंध लवकरच दूर होतलि.

रिन्युअल फी

दर तीन वर्षांनीं Renewal फी द्यावी लागते हाहि कांहीं वैद्यांना तक्रार करण्यासारखा नियम वाटतो. पण वैद्यांकडून घेतली जाणारी फी आयुर्वेदाच्याच कार्याला खर्च होत असल्यामुळें तक्रारीला जागा असू नये. पण डॉक्टर लोकांना ती नसल्यामुळें वैद्यांनाहि ती नसणें न्याय्य आहे व त्याकरितां वैद्यांनीं संघटित प्रयत्न करणें चुकीचें नाहीं.

वरील सर्व मुद्यांचा विचार करून असें आत्मविश्वासानें म्हणतां येईल कीं, आजचे सरकारहि आयुर्वेदाच्या बाबतींतली आपली जबाबदारी बऱ्याच अंशानीं पार पाडीत आहे. आयुर्वेदाच्या अध्ययनाची व संशोधनाची संधि तर आजच्या सरकारनें बऱ्याच प्रमाणांत दिली आहे. आणि सरकारी मान्यतेची अडचण बऱ्याच काळानन्तर दूर केली आहे. आतां वैद्यांच्या पगाराच्या प्रमाणांतील विषमता ही निश्चितपणें खटकते. पण तीहि लवकर कमी होईल असें मानावयास भरपूर जागा आहे.

(अपूर्ण)

नि. भारतवर्षीय आयुर्वेदीय विद्यापीठाचें कार्यालय, ऋषिकेशहून दिल्ली येथें आणण्यांत आलें!

समस्त वैद्यसमाजाच्या व आयुर्वेद जगताच्या खास माहितीकरितां प्रसिद्ध करण्यांत येत आहे कीं, अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन, त्रिवेंद्रम्, अधिवेशन ४० वें यांत मंजूर झालेल्या प्रस्तावानुसार नि. भा. आयुर्वेद विद्यापीठाचें कार्यालय ऋषिकेशहून दिल्ली येथें आणण्यांत आलें आहे. विद्यापीठाच्या कार्यालयाचा पत्ता यापुढें खालीलप्रमाणें राहील:—

पत्ता:—नि. भा. आयुर्वेद विद्यापीठ,
महालक्ष्मी मार्केट, चांदणी चौक, दिल्ली—६

श्रीदत्त शर्मा
(विद्यापीठ मंत्री)

आयुर्वेद सेवा संघ औषधी भवनांत
तयार मिळणारें अनुभविक सिध्द औषध
रौप्यसुवर्णसूतशेखर

सुवर्णसूतशेखर औषधांत सुवर्णासहित १७ औषधी घटक द्रव्यें असतात. त्यापैकीं शुद्ध बचनाग हें एक द्रव्य आहे. तें स्वेदल आहे. आधींच घाम येत असलेल्या व्यक्तींना बचनागविरहित औषध देणें हितावह असतें. रौप्यभस्म हें वातशामक आहे. कोणत्याहि जीर्ण विकारांतील वातपित्तात्मक दोष दूर करण्यासाठीं रौप्यसुवर्णसूतशेखर ही मात्रा उपयुक्त आहे. किंमत पावतोळा २॥ रु.

१०८ दंतयज्ञाचा संकल्प

पुणें येथील डॉ. ग. वि. फडके (रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर व रजिस्टर्ड डेंटल सर्जन) यांनीं गांवोगांवीं हिंडून वाढत्या दन्तरोगांचा अभ्यास करण्याचें ठरविलें आहे. ते विना--इंजेक्शन दांत काढतात. गांवोगांवच्या लोकहितवादी कार्यकर्त्यांनीं पुढाकार घेऊन दंतयज्ञ करण्याचे कामीं सहकार्य द्यावें अशी त्यांची विनंति आहे. त्यांचा पत्ता:— ९६४ रास्तापेठ पुणें २ असा आहे.

आपल्या शास्त्राच्या व कलेच्या आधारें तज्ञ व्यक्तीनें दांत काढल्यास इंजेक्शनची गरज बहुधा उरतच नाहीं आणि दांत काढतांना व दांत काढून झालेवरहि वेदना होत नाहींत (No after pain) व रक्तहि कमी जातें असा अनुभव या दंतयज्ञांत हजारो दन्तरुग्णांनीं घेतला आहे.

उत्साहवर्धन योग

— वैद्य य. प्र. उपासनी आयुर्वेदाचार्य

एकदां मी माझ्या मामांच्या (तर्कतीर्थ लक्ष्मण- जोशी, वाई, यांच्या) घरीं गेलो असतां ते एक त असल्याचें माझ्या निदर्शनास आलें. त्यावेळीं ला संवाद पुढें दिला आहे.

काय मामा, काय चाललें आहे ? कोणतें पेय आहां हें ?

अरे, तुझ्या गुरुजींनीं मला हा योग घ्यावयास तला आहे.

कोण हो माझे गुरुजी ?

अरे, माझ्या वडिल बंधूंनीं (वैद्य वेणीमाधव- जोशी आयुर्वेदाचार्य , यांनीं.

माझ्या मोठ्या मामांनीं होय; बरं, कोणचा तो योग?

शंखपुष्पी, शतावरी, अश्वगंधा

हा पहा ! शंखपुष्पी, शतावरी, अश्वगंधा, हीं षधें वस्त्रगाळ स्वरूपांत व सम प्रमाणांत एकत्र न गाईच्या दुधांत घेत असतो. फारच स्वस्तहि आहेत या वनस्पति. यांची चूर्णेंहि तयार विकत मिळतात.

आपण हें केव्हां घेतां ?

सकाळीं व संध्याकाळीं.

काय वाटलें ते घेऊन ? कांहीं उपयोग झाला कां ?

मेंदुला थकवा येत नाहीं

अरे, वा ! उपयोग काय विचारतोस ? मी ंडसाराचीं व यकृत्साराचीं ७–८ सूचिकाभरणें घेतलीं तरीहि मला इतका उत्साह व बौद्धिक कार्य करण्यासाठीं जोम आला नव्हतां; पण हा योग घेऊन ८–१० दिवस झाले असतील. ६–७ तास सारखें वाचन, मनन, व लेखन केलें तरी उत्साह टिकतो व मेंदूला थकवा म्हणून माहितच नाहीं. नाहींतर पूर्वी २-३ तास वाचले कीं पुरे वाटावयाचें किंवा कांहीं तरी उत्तेजक पेय घ्यावेंसें वाटत असे. परन्तु आतां इंजेक्शनच्या पेक्षांहि फार बरें वाटतें. सांग, बरं असं कां वाटत असावं ?”

वाग्भटोक्त गुणधर्म

“अहो, वाग्भटाच्या उत्तर तंत्रांत रसायनाध्यायांत एकत्र दिले आहेत त्यांचे गुण. ते पहा म्हणजे कां चांगलें वाटतें तें कळेल.

(मंडूकी) शंखकुसुमा-वाजिगंधा-शतावरीः ।
उपयुंजीत धीमेधावयःस्थैर्यबलप्रदाः ॥

वा. उ. अ. ३९ श्लो. ६१

हा फारच चांगला योग आहे. ज्यांना बौद्धिक काम फार करावे लागते व ज्यांचें वय ४० च्या पेक्षां अधिक झालें आहे, अशा गृहस्थांनीं हा योग नियमानें सकाळ, संध्याकाळ घेतला तर त्यांची स्मृति, बुद्धि, मननसामर्थ्य व उत्साह हे सतत चिरकाल चांगले राहतील असा माझा दृढ विश्वास आहे.

गैरसमज दूर करा

[सर्व साधारण लोकांचीं अशी समजूत आहे कीं २ वेळ वरणभात, पोळी, भाजी व २ वेळ चहा एवढें नित्य सेवन केलें कीं आपली प्रकृति बालपणापासून वृद्धपणापर्यंत चांगली राहिली पाहिजे. पण अनुभव मात्र असा आहे कीं एवढ्या आहारानें बाल, वृद्ध व तरुण स्त्री--पुरुष यांपैकीं कोणाचेंच आरोग्य टिकत नाहीं. त्यासाठीं त्यांनीं आपलें वय व उद्योग यास अनुसरून रसायन (वनस्पति, भस्में वा प्राणिज) द्रव्यें यांचें रोग होण्यापूर्वींच सेवन केलें पाहिजे. रोग झाल्यावर औषधींचें सेवन करणें यांत कांहींच शहाणपणा नाहीं. रोग होण्यापूर्वींच तो पूर्वरूपांत जाणून आगाऊ उपाय करणें हेंच समंजसपणाचें आहे, आयुर्वेदानें रसायन प्रकरणांत सांगितलेलीं द्रव्यें हीं प्रकृति चांगली असतांनाच सेवन करण्यासाठीं आहेत. वैद्यांनीं आपल्या परिचयांत येणाऱ्या स्वस्थ लोकांना या गोष्टीची माहिती वेळींच दिली पाहिजे. रसायनचिकित्सेचा प्रचार केला पाहिजे. —संपादक]

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नासिक

साभार पोंच (ता. ६-७-५५ ते ७-८-५५पर्यंत)

१) श्री. नारायण गोपाळ वाद्रेकर बी. ए. (सेवानिवृत्त चीफ इन्स्पेक्टर करन्सी नोट प्रेस) नासिक यांनीं आपल्या दिवंगत भगिनीच्या स्मरणार्थ आयुर्वेदीय आरोग्यशाळेस नवीन बाक (३५ रु. किंमतीचा) तयार करून देणगीदाखल दिला आहे.

१० रुपये

१] श्री. शिवराम वेडू पाटील

अध्यक्ष डि. लो. बोर्ड, नासिक

६ रुपये

१] मेसर्स अंबादास मार्तंड जगदाने

भांड्यांचे व्यापारी, नासिक

५ रुपये प्रत्येकीं

१] श्री. ग. का. बापट, [२] श्री. स. ग. रहाळकर [३] श्रीमती गोदूमाई खरे [४] श्री. शि. ने. शर्मा, [५] श्री. ब. के. लाड

२ रुपये प्रत्येकीं

१] वि. ग. नेने, [२] मो. दा. सुगंधी, [३] हिरालाल लक्ष्मीदास, [४] चांगदेव स. ढाके, [५] सौ. शालिनीबाई चांदवडकर, [६] कि. पुं. नाथ [७] एल. फजलअल्ली

१ रुपया प्रत्येकीं

१] वि. गो. वैद्य, [२] रा. सं. खिवरे, [३] सौ. विमलाबाई पंडित, [४] ए. ना. काजळे, [५] श्री. रा. करकरे, [६] बा. वि. नेने, [७] आण्णाशास्त्री पंडित (तळोंदे) [८] त्र्यं. मो. वाड [९] डॉ. नी. रा. माऊस्कर [१०] वि. अ. परांजपे [११] बाबासाहेब पाराशरे [१२] प्र. रा. माचवे [१३] ग. वि. भट [१४] गं. दा. सुगंधी [१५] का. गं. गलगले [१६] बा. दि. पालकर (पुणें) [१७] सौ. वत्सलाबाई संत [१८] वि. रा. संत [१९] वि. गो. भट [२०] पां. जि. सबनीस [२१] म. शि. भिडे [२२] सौ. सुलभाबाई चांदवडकर [२३] म. वैशंपायन.

८ आणे

(१) र. ना. पद्मनाभी

एकूण ११३॥

संस्था वरील देणगीदारांची आभारी आहे.

—प्रधान अध्या

शास्त्रीय विचारणा

शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीचे सद श्री. त्र्यंबकलाल दे. जोशी, भडोचहून लिहितात:—

"आयुर्वेद पत्रिकेच्या जुलैच्या अंकांतील 'उद विचार' ह्या नांवाचा लेख मला अत्यंत आवड आयुर्वेदाच्या उपदेशाबाबत वैद्याकडून जी मं अवहेलना होतें त्यासंबंधीं आपण जी शा विचारणा रुजूं करतां ती फारच आदरणीय आहे"

उज्वल कीर्ति

आयुर्वेदीय औषधांची उज्वल कीर्ति बनविलेल्या सिद्ध औषधांच्या गुणावर आहे. औषधें गुण देणारीं असतील तर कीर्ति नेहमीं उज्व राहील. तरी अशीं गुण देणारीं औषधें, अस ताजीं व स्वच्छ घटक औषधी द्रव्यें खरेदी करण्या वर अवलंबून आहे. औषधी द्रव्यासाठीं आप

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स
पायधुनी, मुंबई नं. ३

फोन नं. (३१८५८) यांचेकडे मागणी करा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात.
अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवा.

चहा वनस्पति आणि चहा-पेय

(लेखकः — आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे)

श्री. वैद्यराज बिंदुमाधव पंडित यांनीं माझ्या वळ संमेलनांतील अध्यक्षीय भाषणापैकीं 'चहाचा' केल्या' दि. १६।७।५५ च्या अंकांत परामर्श आहे. अध्यक्षीय भाषणाची या रूपानें घेतली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

समाधानाची गोष्ट

श्री. वैद्यराज पंडित यांचे माझ्या 'चहा-गुणवर्णना-त' बरेच आक्षेप दिसतात. पण त्यांना 'पेय' चहाचे दिलेले रसवीर्यविपाक मान्य आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. त्यांतले गुण केवळ 'कल्पिलेले' हीत असें त्यांना वाटतें असेंहि धरून चालावयास रकत नाहीं. पण दूधसाखर घालून केलेल्या या हून चहा या मूल द्रव्याचे अथवा त्याच्या चे रसादि अगदीं उलट आहेत असें त्यांना गावयाचें आहे. ते एक चहाबाबत उद्बोधक लेख सिद्ध करणार आहेत. तो प्रसिद्ध झाल्यावर मगच हाच्या गुणांची चर्चा करणें अिष्ट ठरेल. आजच्या अंकांत त्यांनीं उत्पन्न केलेल्या कांहीं आनुषंगिक गोष्टींबद्दल खुलासा करावयाचा आहे.

माझी चहाभक्ती !

श्री. बिंदुमाधवजींचें म्हणणें, मी या गुणवर्णनाचे मिषानें "चहाभक्ती" प्रकट केली असून खरोखर गुणवर्णन हें 'तदनुषंगानें' केलें आहे. आपल्या लाडक्या चहाचें कोडकौतुक करतांना, म्हणजेच आत्मीय भावनावशतेनें, मी हें गुणवर्णन केलें आहे; एरवीं अध्यक्षीय भाषणासारख्या अत्यंत गंभीर व सोज्ज्वल अशा लेखनांत चहासारख्या क्षुद्र व थिल्लर (?) विषयाचा उपन्यास मी केला नसतां असेंच त्यांना म्हणावयाचें आहे.

क्षुद्र विषय राहिला नाहीं

चहा हा विषय आजतरी एवढा क्षुद्र व थिल्लर राहिला आहे काय? गौतमबुध्दानें ध्यानधारणेला अन्तराय आणणारी झोंप दूर करणारी वल्ली म्हणून ज्याचा उपयोग केला, पं. जवाहरलाल नेहरूसारख्या भारताच्या अत्यंत आदरणीय व कर्तबगार पन्तप्रधानांच्या परदेशी मसलती ज्याचे भोंवतीं घोंटाळतात व म्हणून वार्तापत्रांतून रोचक वृत्तांत पण्डितजींचें चहापानहि वाचक आतुरतेनें वाचतात, एवढ्यामुळेंच नव्हें तर जो आजीबाआींच्या उपासापासून कॉलेज-कुमारांच्या अभ्यासिकेपर्यंत व श्रमजीव्याचे तकव्या--पासून तों रुग्णशय्यास्थिताचे पथ्यापर्यंत निरंकुश प्रविष्ट होऊन अन्नापेक्षांहि हरघटकीं जीवनांत खोलवर प्रविष्ट झाला. त्या चहाला गुणधर्मीतीं दुष्परिणामी असला तरी वैद्याला चर्चेतून आतां तरी टाळतां येणार नाहीं.

वाचकांतर्फे विनंति

श्री. पण्डितांचाहि चहाचें गुणवर्णन करण्याबद्दल मतभेद दिसत नाहीं. उलट "या विषयाचा उपन्यास केल्याबद्दल" त्यांनीं मला "धन्यवादच" दिले आहेत. मी त्याबद्दल त्यांचे आभारहि मानतो. त्यांना फक्त हें गुणवर्णन 'स्थानीं कीं अस्थानीं' एवढीच शंका आहे. एरवीं चहाचेच काय "कॉफी, कोको, सोडा, लेमन आदि पदार्थांचे" मी "कल्पिलेले वा अनुभविलेले गुणधर्म लिहून प्रसिध्द करावेत अशी" ते मला वाचकांतर्फे विनंति करीत आहेत. मी त्याबद्दलहि त्यांचा आभारी असून असें गुणवर्णन लवकरच प्रसिध्द करण्याचें त्यांना आश्वासन देतो. [अितक्यांतच प्रसिध्द करणार होतो. पण या लेखाचें पुडकें कोठें गहाळ झालें. पुनर्लेखन करून पण तें मी सवडीनें प्रसिध्द करणारच आहे.]

अध्यक्षीय भाषणांत सोडावॉटर

त्यांचा माझा मतभेद, मी हें चहागुणवर्णन अध्यक्षीय भाषणांत केलें हा प्रामुख्यानें, व नंतर मूल-

द्रव्याहून पेयाचे गुण निराळे आहेत यांत आहे. पुढील बाबतींत मी पुढील अंकीं लिहिणारच आहे. पहिल्याबाबत, मला हा विषय अितका क्षुद्र वाटत नाहीं व माझें अध्यक्षीय भाषण त्यामुळें भ्रष्ट झालें असें मला तरी वाटत नाहीं, एवढें म्हणावेसें वाटतें· याबाबत एक बोट दाखविण्यासारखा समानाधारहि मला आढळल्यानें माझें वाटणेंत एक मोठे वैद्यराज वांटेकरी असल्याचें दाखवितां येअील. नागपूरला फेब्रुवारींत झालेल्या अग्रगामी वैद्यसंमेलनांत पं· शिवशर्माजी यांनींहि असाच नित्य द्रव्याचे गुणवर्णनाचा उपन्यास केला असून त्यांत स्वतःचें नसलें तरी स्व. पं. लक्ष्मीरामस्वामी यांनीं केलेल्या अशा प्रयत्नाचा उल्लेख करून त्यांच्या "सोडावारि दाहतृष्णापहारि" या गुणवर्णनाचें उद्धरणहि केलें होतें. मी सोडा वॉटर ऐवजीं चहाचे व स्वकृत वर्णन केलें एवढाच फरक !

मी चहाभक्त नाहीं

मी चहाचा एकेकाळीं भक्त होतो. पण आतां भक्तहि नाहीं व द्वेष्टाहि नाहीं. लहानपणीं कदाचित् भक्तिभावाने चहा घेत असेन, पण त्याच वयांत कांहीं दिवसांनीं एका कर्मनिष्ठ गृहस्थांच्या शेजारांत सोडला. तो पथ्यासाठीं घेतलाच पाहिजे असें एका आजारांत मला चिकित्सकानें सांगेपर्यंत म्हणजे सुमारें १५ वर्षे घेतला नाहीं. पुढेंहि मानवेपर्यंत घेतला पण आठवर्षांपूर्वीच्या आजारांत औषधासाठींच कुपथ्य होतोसा वाटल्याबरोबर चहा सोडला. अलीकडे क्वचित् घेत असलो तरी नियमित नाहीं. आवडतो खरा (आणि तो कोणालाहि आवडेलच) पण स्नेह्यासोबत्याबरोबर व प्रासंगिक गरज असेल तेव्हांच तो घेतो.

बैठत शास्त्रीय नसते

खरोखर चहाबाजानें चहा घेण्याच्या वा चहा निषेधकानें तो बहिष्कृत करण्याच्या सूचनेची बैठक शास्त्रीय नसते. मी शास्त्रीयतेचा अभिनिवेश बाळगित नसलो तरी दोन्ही भावनेपासून अलिप्त राहूनच शास्त्रीय विचार करावयास हवा असें मला वाटतें.

शास्त्रज्ञांची भावनावशता

पुण्यास एक सेवानिवृत्त सिव्हिल सर्जन आहे ते चहाचे अितके कट्टे निषेधक आहेत कीं, चह अपेंडिसायटिस् होतो इथपर्यंत ते म्हणूं लागता त्यांनीं एकदां असें जाहीर विधान केल्यावर च घेणारांतच अपेंडिसायटिस हा रोग सांपडतो व घेणारांना हा अजिबात होत नाहीं असें आंकडेवारी नें आपण दाखवूं शकतां कां ? असें मी त्यां तेथेंच रोखून विचारल्यावर डॉक्टरमहाशय थंडावले शास्त्रज्ञ म्हणविणारेहि किती भावनावश होतात या नमुना म्हणून मी ही गोष्ट सांगितली. मी त्या भावनेनें चहागुण वर्णिले नाहींत एवढेंच मला सांगावयाचें आहे.

चहा मादक व सत्त्वदूषक नाहीं

श्री. विंदुमाधवजी यांनींहि "आयुष्यांत एकदांहि चहापान केलेलें नाहीं" या भूमिकेवरून चहा पाहूं नये असें मला त्यांना विनवावयाचें आहे. मद्यपानाइतकाच चहाचा निषेध करणारे लोक आहेत मला त्यांची सद्भावना पूज्य वाटते. मद्याचे गुणव ठरविण्यासाठीं स्वतःच तें प्यावें लागत नाहीं. प मद्याइतका खरोखरच चहा निषिद्ध नाहीं, नसावा, असें मात्र मला वाटतें. कारण तो मादक वा सत्त्वदूषक नाहीं हें कोणीहि मान्य करील. श्री. विंदुमाधवजींनीं या वादासाठीं कांहीं दिवस चहा घेऊन पाहावाच. त्यांनीं केवळ फांट चाखून पाहिलाच असल्यानें चहापेय पिऊन व्रतभंग झाला असें मानण्याइतके ते मनाचे हलके खास नाहींत हें स्पष्ट दिसतें.

पवित्र
नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहा:–नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

सुवर्णोदकाचा चिकित्सेंतील अनुभव

लेखकः — **वैद्य माधवाचार्य मणूरकर**, आयुर्वेदविशारद, बार्शी.)

आयुर्वेद पत्रिकेच्या एका अंकांत ज्वराच्या सान्निपातिक अवस्थेंत सुवर्ण एकवीस वेळां लालसर तापवून तें रोग्याच्या पिण्याच्या पाण्यांत प्रत्येक वेळां बुडवावें, तें पाणी रोग्यास पिण्यास द्यावें, असें एका लेखकानें लिहिलेलें वाचलें. असें पाणी पिण्यास दिल्यानें रोग्यास झालेला भ्रम कमी होतो, असें लेखकानें त्या पाण्याच्या गुणधर्मांचें वर्णन केलें होतें.

उपचाराचा साधेपणा

हा उपचार अगदीं साधा आहे. टायफॉइड, न्युमोनिया झालेल्या रोग्यास जें पाणी पिण्यास दिलें जातें तें उकळलेलें असतेंच. त्याच पाण्यांत सोनें तापवून विझविण्याची ही क्रिया करावयाची आहे. हा प्रकार चिकित्सकाला करावयाचा नाहीं हा खटाटोप शुश्रूषा करणारी रोग्याची नातेवाईक मंडळी सहज रीत्या करतात. सोनें वजनांत घटत नसल्यानें त्यांनाहि आर्थिक तोटा नाहीं. तेव्हां अशा या बिनखर्चीं व विनासायास चिकित्सेचा अनुभव घेतां आला तर कां सोडा, असा विचार त्यावेळीं माझ्या मनांत आला.

रोग्यांची अवस्था

टायफॉइड, न्युमोनिया या सारख्या आशुकारी विकारांत, त्या विकारांचे दोष म्हणा, अगर आयुर्वेदाप्रमाणें त्रिदोषप्रकोपाचा परिणाम म्हणा, ज्या वेळीं मेंदूची तरतम (सारासार) शक्ति नाहींशी होते व "शिरसि च इंद्रियाणि इंद्रियप्राणवाहीनि स्रोतांसि" या उक्तीप्रमाणें प्राणवह स्रोतसांचें कार्य प्रकुपित दोषांच्या हातांत जातें, त्या वेळीं या चिकित्सेचा अनुभव घ्यावयाचा असतो. रोगी विचाराधीन नसून विकारवश असतो. भ्रम, तंद्रा, ग्लानि, यापैकीं एक वा अनेक अवस्थेप्रत तो गेलेला असतो.

या रोगाचीं कारणें

रोग्याची अशी अवस्था होण्यास कदाचित् या विकाराची चिकित्सा योग्य तऱ्हेनें केली गेली नसेल. चिकित्सकाकडे रोग्यास चिकित्सेकरितां घरच्या मंडळीच्या परिस्थितीनुसार त्यांना लवकर नेतां आलें नसेल. प्रथमपासून योग्य चिकित्सा चालू असून रोगाचा जोर रोग्याच्या प्रतिकारशक्तीच्या मर्यादेपेक्षां अधिक तीव्रतर असेल. हीं वा अशाच स्वरूपाचीं नानाविध कारणें असू शकतील.

झोंपेच्या औषधांचा उपयोग

अशा अवस्थेंत पाश्चात्य शास्त्रदृष्ट्या झोंपेच्या औषधांचाच उपयोग केला जातो. बडबड, गडबड, करणाऱ्या रोग्याला झोंपून ठेवणें ही एकच कला आंग्ल-वैद्यक-विशारद जाणतात. आयुर्वेदीय दृष्ट्या सर्वसामान्य तऱ्हेनें अशा अवस्थेंत रोगविषें रक्तगत होऊन एक प्रकारचा मद रक्तांत तयार करतात. मदाचे गुण पित्तप्रधान असतात, अशी कल्पना करून माझ्यासारखा चिकित्सक सुवर्णसूतशेखर वापरेल. सुवर्ण असलेल्या सूतशेखरांतील सुवर्णाचे अशा अवस्थेंत कांहींतरी उपयुक्त कार्य होत असलें पाहिजेच. तेव्हां सुवर्णसंस्कारित अशा या जलाचा या अवस्थेंत उपयोग करण्यास प्रत्यवाय नसावा असा विचार मनांत आला

मनांत डोकावलेली शंका

शुद्ध सोन्याचा पाटलीसारखा डागिना लालसर तापवून तो पाण्यांत विझवून तें पाणी पिण्यास दिल्यानें त्या पाण्यांत सोन्याचा अंश कांहीं जात असेल कां ? अशी शंका आली. तेव्हां अशा तऱ्हेनें डागिना तापवून तो २१ वेळां पाण्यांत विझविला. ही क्रिया करण्यापूर्वी व नंतर त्या डागिन्याचें सूक्ष्म काट्यानें वजन केलें. वजनांत कांहीं फरक पडला नाहीं. तेव्हां पाण्यांत

विरघळणारा सोन्याचा अंश बाह्य साधनांनीं न जाणतां केवळ कल्पनाशक्तीनेंच जाणण्याइतका सूक्ष्म असावा असा विचार केला. पण या विचारानें मनाचें पूर्णतया समाधान होईना.

शंकानिरसन करून घेतलें

तेव्हां शंकेचें निरसन करण्याकरितां एक युक्ति सुचली, ती अशी– लोहाचा सूक्ष्म, सूक्ष्मतर अंश जरी पोटांत गेला किंवा सतत अत्यल्प प्रमाणांत सेवन केला तर मलाला काळपट रंग येतो. एक लोखंडी कांब घेतली. एका कांहींहि न होणाऱ्या रोग्यास सांगितलें कीं, ही कांब रोज सात वेळां लाल तापवून ती प्रत्येक वेळीं पिण्याच्या पाण्यांत विझवून तेंच पाणी रोज पीत जा. तिसरे दिवशीं त्या रोग्यास शौचाचा रंग विचारला असतां त्यानें शौचास पिवळें न होतां काळपट होत असल्याची तक्रार केली. त्याची ती तक्रार म्हणजे माझें एक मोठें आशास्थान किंवा समाधानस्थान ठरलें.

सुवर्णजलाचा प्रयोग

याच सुमारास ता. २७।१।५५ रोजीं तुकाराम गुंडी भिसे नांवाचा एक रुग्ण मजकडे उपचारार्थ आला. वय ६ वर्षें. तक्रार– चार-पांच दिवसांपासून ताप. ता. २९।१।५५ रोजीं टायफॉइड हें निदान केलें, उपचार चालू होते. ता. १।२।५५ रोजीं खोकला चालू झाला. पुन्हां तापाचें प्रमाण व खोकल्याचें प्रमाण वाढूं लागलें. ता. ३।२।५५ रोजीं दुपारपासून रोग्याची बडबड चालू झाली. त्या दिवशीं रोग्यानें रात्रभर बडबड, हाताचे चाळे करून त्रास दिल्याचें ता. ४। २।५५ ला रोग्याच्या नातेवाईकांनीं सांगितलें. इतर औषधाबरोबर त्याच दिवशीं त्या मुलाच्या मातो–श्रीला शुद्ध सोन्याची पाटली लाल तापवून पाण्यांत बुडवण्यास सांगितलें. हा क्रम फक्त सात वेळां करणेचा असें सांगितलें.

स्मृतिनाश लौकर कमी झाला

या चिकित्सेनें माझ्या कल्पनेप्रमाणें (व आतां--पर्यंतचा अनुभव जमेस धरतां) गुण येण्यास या सुवर्ण-संस्कारित जलाचा खास उपयोग झाला. कारण रोग्यास झालेला स्मृतिनाश अपेक्षेपेक्षां लवकर कमी झाला व रोग्याच्या प्रकृतींत द्रुत गतीनें सुधारणा होत गेली.

प्रयोगाचा निष्कर्ष

१) या चिकित्सेनें मी एक निष्कर्ष काढला कीं, औषधी मात्रा अत्यल्प प्रमाणांत जरी दिली तरी तिचें कार्य होण्यास तिचा प्रभावी गुण समर्थ ठरतो.

२) औषधाचे कण जितके तरल वा वितळ होतील तितका औषधाचा प्रभाव अधिक.

३) जितकें औषध जास्त खललें जाईल तितकें तें अधिक कार्यक्षम बनतें.

कारण पाण्यांत विरघळणारे सुवर्णाचे कण सूक्ष्म नव्हे तर सूक्ष्मतम आहेत. ते आजच्या सूक्ष्मदर्शक यंत्राच्या कक्षेच्याहि बाहेरचे आहेत.

सुवर्णाचें कार्य कसें घडलें ?

या सुवर्ण--संस्कारित जलाचें कार्य कसें झालें असेल याचा विचार करतां मी पुढील उपपत्ति लावली. सुवर्णाचा मुख्य गुण निरनिराळ्या अवयव समूहाला बल देणें. वातवहमंडल, सहस्रार, नाडीचक्रें येथपासून तो अगदीं सर्व लहान अवयव समूहापर्यंत सर्वांना बल देणें हा विशेष गुण. रोगाबरोबर झगडतां झगडतां सर्व शरीरज धातु क्षीण झालेले असतात, बलहि क्षीण होतें. या सूक्ष्मतर सुवर्णजलानें बलप्राप्ति होते. वातादि त्रिधातूंनाहि बलप्राप्ति होते. त्रिधातूंच्या साम्यावर शारीरिक घटकांचें व मंडलांचें बल अवलंबून असतें. त्रिधातु बलवान् व सम असले कीं, वातवह मंडलादिकहि बलवान् व सकस बनतात. अशा प्रकारें वातवहमंडलावर शक्तिदायक परिणाम घडून प्रस्तुत रुग्णांत त्वरित सुधारणा दिसली.

दुसरा प्रयोग

ता ७।३।५५ ला मजकडे दुसरा एक रुग्ण आला. नांव मंदा शिंदे, वय २॥ वर्षें. तक्रारः–मुलगी सारखी किरकिर करते. जेवणाकडे, खाण्याकडे, पिण्याकडे लक्ष नाहीं. पूर्व-अितिहासः- ३।४ डॉक्टरांनी

ौषधें झालीं. प्रत्येकानें सांगितलें मुलीला कांहींहि ार नाहीं. माझ्याहि तपासणींत मुलीच्या प्रकृतींत आढळला नाहीं.

१५ दिवसांत सुधारणा

या रुग्णांत अितर औषधयोजनेबरोबर सुवर्ण--ाचा उपयोग केला. पंधरा दिवसानन्तर रुग्णांत त्यानें सुधारणा दिसूं लागली. सातत्यानें दोन ने सुवर्णजल दिलें. मुलीची प्रकृति पूर्ण सुधारली हे. या रुग्णांत सुवर्णाचा बलदायक गुण लक्षांत न व प्रयोग करण्याची जिज्ञासा बाळगूनच ही चिकित्सा केली.

प्रयोगाचें वैशिष्ट्य

या प्रयोगाचें वैशिष्ट्य म्हणजे सुवर्णाचा गुण ळतो, पण सोनें कमी होत नाहीं. “ सहज पडे वत घडे ” या म्हणींतील भावार्थाची सहजता या गांत आहे.सोनें न झिजतां सोन्याचा गुण मिळतो डॉ. चोप्रासारख्या आंग्लवैद्यकविशारदांनीं मकरध्वजाच्या बाबतींत सिद्ध केलें आहे. मकरध्वज करतां सोनें जितकें वापरलें असेल तितकें परत मिळतें. डॉ. चोप्रानीं सुवर्णयुक्त मकरध्वज व सुवर्णविराहित मकरध्वज यांच्या कार्यांत भेद आहे हें प्रयोगांतीं सिद्ध ले. मकरध्वजांतील सोन्याचें कार्य संस्कारांचें महत्व ठविणारें असलें तरी प्रत्यक्ष सोन्याची झीज न होतां सोन्याचा गुण मिळूं शकतो.

सूक्ष्मतम औषधांचा अधिक गुण

अतएव औषधाची मात्रा अत्यल्प असली तरी ती कार्य करू शकते. औषधी घटकांचें वितरण जितकें सूक्ष्म, सूक्ष्मतर व सूक्ष्मतम तितका औषधाचा प्रभाव अधिक. परिमाणूंचें पृथःकरण केलें तर तो परिमाणु अधिक कार्य करूं शकतो हें पूर्वाचार्यांनीं अभ्रकाला सहस्रपुटें द्यावीत म्हणजे तें भस्म अधिक कार्यशाली व प्रभावी होतें हें गुणधर्मांत सांगितलें यावरून सिद्ध आहे.

एवंच या सहजसाध्य सुवर्णाचिकित्सेचा अनुभव सर्व वैद्यबंधूंना घेतां यावा म्हणून याची साधक बाधक प्रगट चर्चा येथें केली आहे.

सुवर्णाचें महत्व

[वरील लेखांत सुवर्णोदकाचा उपयोग स्पष्ट शब्दांत मांडलेला आहे. वैद्यकांत वापरावयाच्या वस्तूपैकीं खनिज सुवर्ण ही अत्यंत महत्वाची वस्तु आहे. मनुष्याला आहारार्थ वनस्पति व प्राणिज द्रव्यें आवश्यक आहेत, त्याप्रमाणें खनिजद्रव्येंहि अल्प-अत्यल्प प्रमाणांत पण अत्यंत आवश्यक आहेत. चरकाचार्यांनीं ‘ सुवर्ण समलाः पंचलोहाः ससिकताः सुधा। भौममौषधमुद्दिष्टम् ॥ ” असें सूत्रस्थानांत पहिल्याच अध्यायांत सांगितलें आहे (७०।१) तसेंच लहान बालकांना लेहांतून सुवर्ण हें स्वास्थ्यहि टिकविण्यासाठीं वयाच्या पाहिल्या वर्षीं चाटवावें असें सुचविलें आहे.

विषनाशक कार्य

विरुद्ध अन्न सेवनानें जे रोग होतात, अगर विषभक्षणाचा जो अनिष्ट परिणाम शरीरावर होतो तो घालविण्यासाठींहि सुवर्णाचा उपयोग वाग्भटसूत्रस्थानांत अध्याय ७ मध्यें वर्णिला आहे. (न सज्जते हेमपांगे पद्मपत्रेऽम्बुवत् विषम् । (२७-२८।१)

सुवर्णसंस्कृतजल मिळण्याची व्यवस्था

अशा रीतीनें सुवर्णाचा उपयोग विविध अवस्थेंत नित्य करतां येण्यासारखा आहे. मात्र त्यासाठीं असें सुवर्णजल नित्य उपलब्ध होण्याची व्यवस्था होणें जरूर आहे. रोगी लोकांची शुश्रुषा करणारी नातेवाईक मंडळी हा खटाटोप सहजरीत्या करतात असें लेखकानें म्हटलें आहे. पण सर्वच रोग्यांच्या घरीं अशा पाटल्या अगर शुद्ध सोन्याच्या बांगड्या आजच्या काळांत सांपडणें कठीण वाटतें व त्यासाठीं पुढील उपाय सुचवावासा वाटतो.

यकृतोदकाप्रमाणें हें विकत मिळावें

आज अनेक शहरांतून ताजें यकृतोदक (लिव्हर सूप) विकत मिळण्याची सोय वैद्य-डॉक्टर व इतर उद्योगी लोक यांनीं केलेली आढळून येते. त्याचप्रमाणें मोठ्या शहरांतून असें सुवर्णोदक रोज ताजें तयार करून विकत देण्या–घेण्याची व्यवस्था करणें अशक्य

वाटत नाहीं. अशा उदकाचे गुणधर्म समजून सांगणारें एखादें पत्रक छापावें व त्या सोबत कांहीं अनुभवहि द्यावेत. असें पत्रक गांवांतील वैद्य-डॉक्टर यांच्याकडे मधून मधून वाटण्याची व्यवस्था केल्यास या सुवर्णो--दकाचा वापर वाढूं शकेल व हा व्यवसाय परवडूं शकेल असें आम्हांस वाटतें

असा व्यवसाय सुरूं होईपर्यंत शुश्रूषक मंडळींना असें सुवर्णोदक करावयास वैद्यमंडळींनीं अवश्य सांगावें, व संस्कृत जलाचें महत्व जनतेला अधिक पटेल असा प्रचार चालूं ठेवावा.

सुवर्णोदकाचा एक पर्याय

सुवर्णोदकाचे गुण हवेत पण तापवून विझविण्यासाठीं शुद्ध सुवर्णाचा तुकडा अगर पाटली जवळ नाहीं, अशा लोकांनीं काय करावें ? ज्या औषधांत केवळ सुवर्ण पूर्ण प्रमाणांत वापरलें आहे अशा सुवर्ण-मालिनी वसन्ताचा एक वळसा तापविलेल्या पाण्याला उगाळून लावावा व तें पाणी दिवसभर वापरावें. अलिकडे सुवर्णसूतशेखर, सुवर्णमालिनीवसन्त या औषधांतून केवळ सुवर्ण न वापरतां त्यांची भस्में वापरतात, क्वचित् वर्ख वापरतात. सुवर्णाचा वर्ख नुसता वरून दिसण्यासाठीं न लावतां पूर्ण प्रमाणांत घातलेला असेल तरीहि चालेल. अर्थात् असा वसन्त कल्प स्वस्त दरानें मिळूं शकणार नाहीं हें उघड आहे.

पूर्ण प्रमाण सुवर्ण मालिनी वसन्त

आयुर्वेद सेवा संघानें पूर्णप्रमाण सुवर्ण मालिनी वसन्त हें औषध तयार केलें आहे. त्याचा भाव ३२ रु. तो. आहे. ३ गुंजांची किं. १ रु. आहे. १।१ गुंजेची गोळी असते. एका रोग्यासाठीं हें औषध पुष्कळ दिवस पुरूं शकेल व शक्तिवर्धक असा गुणहि देईल. सुवर्णाचें सूक्ष्म तरल, तरल तम कार्य या पूर्णप्रमाण सुवर्ण मालिनी वसन्तानें येईल असा आमचा कयास आहे. वैद्यांनीं अनुभव घेऊन पहावा.

पूर्ण प्रमाण सुवर्ण-मालिनी-वसंतांत १८ तोळ्यामध्यें १ तोळा शुद्ध सुवर्ण असते. अर्थात् १ गुंजेच्या गोळींत १/१८ गुंज सुवर्ण, व २/१८ गुंज मौक्तिक येणार. हीं दोनहि द्रव्यें मेंदू, हृदय, बस्ति आदि शरीरांतील महत्वाच्या अवयवांना बल्य अशीं आहेत. उकळलेल्या अर्धाशेर पाण्यास ही गोळी थोडीशी उगाळून लावावी. व तें पाणी एका रत्तली बाटलीत भरून बूच लावून बराच वेळ हलवावें. त्यायोगें तो वसंताचा अंश सर्व पाण्यांत सारखा विद्रुत होण्यास मदत होईल. मग तें पाणी दिवसांतून ३।४ वेळ भाग करून घ्यावें. या पद्धतीनें १८।२० दिवस १ गोळी वापरल्यास ३ गोळ्या मिळून ५४ ते ६० दिवस म्हणजे सुमारें २ महिने ३ गोळ्या पुरतील. १ रु. किंमतींत याप्रमाणें आपणास सुवर्ण-मौक्तिकाच्या सूक्ष्म प्रमाणांतील बल्य उपयोगाचा अनुभव येईल.

ज्यांना शुद्ध सोन्याची पाटली उपलब्ध नाहीं त्यांच्यासाठीं हा पर्याय आहे. बल्य पर्याय आहे. ज्यांच्याजवळ सोन्याचा पाट असेल त्यांनीं सुवर्णोदकच तयार करावें, व अनुभव प्रसिद्ध करावा.

वैद्यराज मणूरकर यांनीं संस्कृतउदकासंबंधींचा अनुभवासिद्ध लेख पाठविल्याबद्दल पत्रिका अत्यंत आभारी आहे. —संपादक]

सेवा संघानें तयार करून विक्रीस ठेवलेलें

अनुभविक औषध

पूर्णप्रमाण सुवर्ण-मालिनी-वसंत

(यासंबंधीं अधिक माहिती आयुर्वेद--पत्रिका १६ एप्रिल १९५३ मध्यें आली आहे)

१ तोळा सुवर्ण, २ तोळे शुद्ध मोत्याचा चुना, ३ तोळे हिंगुळ, ४ तोळे पांढरी मिरी, ८ तोळे कल्खपरी [शुद्ध], ४ तोळे लोणी व ४२ दिवस लिंबाच्या रसांत खल असा याचा पाठ आहे. क्षयावर सुवर्णाचे योग हे फुफ्फुसांतील व्रणात भरून काढणारे, शुद्ध करणारे आहेत. सुवर्ण योगांपैकीं सुवर्ण-मालिनी-वसंत हा अग्रगण्य योग आहे.

किंमत ३२ रु. तोळा. ३ गुंजांची किंमत १ रु.

आयुर्वेद औषधी भवन, नासिक

कांचा पत्रव्यवहार

जखमेवर आयुर्वेदीय उपाय

१ जुलै व १६ जुलैचे अंकांत गोवा सत्याग्रहा- उल्लेख आहे. १ जुलैचे अंकांत सत्याग्रही ना मारहाण झाली असतां त्यांवर करण्याची जी व होमिओपॉथिक उपाययोजना आलेली हे. कोणत्याहि प्रकारची जखम धुण्याकरितां आम्ही त असलेल्या औषधांचा पाठ सोबत आपणांस वीत आहे. व वर लावण्याचें औषधहि कळवीत हे. तसेंच नुसता मार लागलेल्या सुजेवरीलहि माहित असलेला उपाय कळवीत आहे. आणि प्रयोग मी स्वतः पुष्कळ वर्षें करीत आहे, म्हणून आपणांस कळवीत आहे. आपणांस योग्य वाटल्यास चा उपयोग करावा अगर आयुर्वेदपत्रिकेंत त्यांस द्धि द्यावी.

स्त्रियांच्या धुपणीवर गुणकारी आहे

सोबतच्या काढ्याचा उपयोग स्त्रियांची दोन्ही ची धुपणी अगर अितर योनिविकार यांवरहि ति देण्यास फार चांगला होतो. उपदंश विकाराच्या जखमाहि या काढ्यानें धुतल्यास फार उपयोग तो. बस्तीकरितां २० तोळे [पावशेर] काढा व एक र कोमट पाणी असें वापरावें. व अितर जखमां– रितां जखम असेल त्याप्रमाणें अर्धा कप काढा व र्धा कप गरम पाणी असें आम्ही वापरतो.

सुजेसाठीं मोगली एरंड

सुजेकरितां घणसोलीची मुळी अगर मोगरी एरं- चा पाला वाटून गरम करून लावतो. मोगरी रंडाचे मी स्वतः अनुभव घेतलेले प्रयोग खालीं देत आहे. हें लिहिण्याचें कारण सौ. विद्या जळूकर यांचा १६ जुलैच्या अंकांतील "नवीन उद्भिजांचें दर्शन" हा लेख वाचला. त्यांस वनस्पतींची माहिती वैद्यराज अण्णासाहेब गोगटे हे देत आहेत, व त्यांत मोगरी एरंडाचें थोडेसें वर्णन आलेलें आहे, म्हणून मी आपली विशेष माहिती येथें देत आहे.

पाला लावण्याची पद्धत

कोणत्याहि तऱ्हेचे सुजेवर [स्तनशोथ, गळवें, अितर शोथ, मार लागून आलेले शोथ वगैरेवर] या झाडाचे पाल्याचा चटणी सारखा बारीक वाटून, गरम करून रोज बांधला म्हणजे चांगला उपयोग होतो.

चिकाच्या उपयोगाची पध्दति

याचा चीक व्रणरोपण व व्रण भरून आणणें [विशेषतः उपदंशाचे] यांस फार उपयोग होतो. याचा लावण्याचा प्रकार असाः— एक चमचाभर चीक घेऊन तो खलबत्त्यांत घालून घोटावा म्हणजे १० मिनिटांनीं त्याचा साबणासारखा घट्ट फेंस तयार होतो, तो लावावा. याच्या बिया जशा रेचक व वांतिकारक आहेत, सें याचें मूळ ताकांत उगाळून दिलें असतां जुलाब व वांत्या थांबतात.

जखमा धुण्याचा काढा

१ पतंगाचें लांकूड	२० तोळे
२) हरडा	२० ,,
३ बेहडा	२० ,,
४) आवळकांठी	२० ,,
५) पुनर्नवा	१० ,,
६) पंचपल्लव वृक्षांची साल प्रत्येकीं ४०	,,

या सगळया औषधांच्या १६ पट पाणी घालून काढा करावा. १/४ शिल्लक ठेवून गाळावा व तो उपयोगांत आणावा. हा तयार केलेला काढा १५ दिवस तरी चांगल्या स्थितींत रहातो. या काढ्यानें जखमा धुवून त्यावर घोरपडीचें तेल व पिंगवेल तेल समभाग मिश्रण करून, अगर दोहोंपैकीं एक घेऊन, त्याची पट्टी जखमेवर ठेवावी. जखम ज्याप्रमाणें जास्त कमी असेल त्याप्रमाणें दिवसांतून २ अगर ३ वेळां पट्टी बदलावी. २४ तासांत जखमेंत रोपणक्रिया झालेली दिसून येईल. वर पट्टा वगैरे बांधूं नये.

आयुर्वेदभूषण
दत्तात्रय बळवन्त वैद्य, ठाणें.

एक अनुभव

शतावरी-घृत कल्कानें जुलाब

“मी शतावरी-घृत सिद्ध कलें. घृताचा कल्क (चोथा) हा शतावरीरस दुधातुपांत उकळून सिद्ध झालेला असल्यामुळें त्याचा खव्याप्रमाणें उपयोग केला. त्या खव्यांत साखर घालून पेढे तयार केले व ते निरनिराळया लोकांना दिले. त्यामुळें ढाळ झाले पण पोट बिलकुल न दुखतां. कित्येकांना थोडे झाले, कित्येकांना फार झाले.

मी स्वतः तो पेढा खाल्ला व माझे पत्नीलाहि दिला. दोघांनाहीं तसाच अनुभव आला.

जीवनीय गणांतील या वनस्पतीचा अनुभव विपरीत कसा आला? अशी शंका आहे. तज्ञांनीं उत्तर द्यावें. —निवेदक हि. मो. जंगले

वाचकांचा पत्रव्यवहारः—

मुलांचें माती खाणें

मुलें माती कां खातात हा आपला लेख वाचून आनंद झाला. अस्थिधातु बनण्यास लागणारा माल-मसाला कमी पडतो, तो भरून येण्यासाठीं मुलें माती खातात हें खरें असल्यास दांत सुलभ व चांगले येण्यास क्षार-चिकित्सेंत दोन क्षार सांगितले आहेत. ते म्हणजे कल्केरिया फॉस् व कल्केरिया फ्लूअर.

परदेशी कंपन्यांचे महागडे कॅल्शियम् गरोदरपणीं टनावारी खाऊनहि मुलें माती खाण्याचें सोडत नाहींत. कारण त्यांतील अंशमात्रच सात्म्य [शोषण] होऊन बाकीचें तसेंच बाहेर पडतें.

याउलट अणुरूपी पेशींना (ॲटॉमिक सेल्स) सूक्ष्मांशी क्षार पूर्णतया सात्म्य होत.

वरील दोन्ही क्षार ६×शक्तीचे मातेला गरोदरपणीं व अर्भकाला अधून मधून पहिली २।३ वर्षें देण्यानें मुलांची माती खाण्याची प्रवृत्ति सुटेल. प्रयोग करून पहावा. —डॉ. र. कृ. गर्दे

रबराचें उत्पादन

भारतांत त्रावणकोर—कोचीनमध्यें रबराचें जास्त उत्पादन होतें. रबराच्या मळ्यांखालीं असे भारतांतील एकूण क्षेत्रांपैकीं ८५ टक्के क्षेत्र राज्यांत आहेत. त्यानंतर मद्रासचा क्रम लागतो. राज्यांत लागवडीखालील एकूण क्षेत्रापैकीं १२. क्षेत्र आहेत. म्हैसूर व कूर्ग या दोन्ही राज्यांत २.५ टक्के क्षेत्र आहे.

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, विजापुर

विजापुर येथील शुद्ध आयुर्वेद विद्यालय संस्थेस शुद्ध आयुर्वेदाच्या ज्यूनिअर कोर्सचें शिक्ष जास्तींत जास्त १५ विद्यार्थ्यांना देण्याचे मुंबई सरकारनें मान्यता दिली आहे.

सांडू ब्रदर्सचीं

शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.

वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.

पत्रव्यवहाराचा पत्ताः—

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
चेंबूर लि.
फॅक्टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

निखिल कर्नाटक आयुर्वेद संमेलन

अधिवेशन २० वें, बंगलोर

दिनांक २५/२६/२७ जून १९५५ या तीन वशीं वरील अधिवेशन मंगलोर येथील प्रसिद्ध युर्वेद-कार्यकर्ते डॉ. श्रीयुत एम्. गोपाळराव एल्. एम्. एस्., संपादक— 'कालियुग' यांच्या ध्यक्षतेखालीं अत्यंत यशस्वी रीत्या पार पडलें.

सदर अधिवेशनाच्या शास्त्रीय चर्चा समितीचें द्घाटन करतांना बंगलोर कॉर्पोरेशनचे मेयर श्री. नदयाळ नायडू यांनीं आपलें भारदस्त, हृदयस्पर्शी वैद्यवर्गांच्या हृदयांत चैतन्य उत्पन्न करणारें स्ताविक भाषण केलें. या शास्त्रीय चर्चा बैठकीचें ध्यक्षस्थान हुबळीचे वैद्यराज श्री. गुंडाचार्य सावनूर नीं मंडित केलें होतें.

उद्घाटक वै. नानासाहेब पुराणिक

'योजन व परिशोधन' सामितीचें उद्घाटन द्यराज श्री. नानासाहेब पुराणिक, पनवेल यांनीं केलें, व अध्यक्षस्थान प्रो. कलादि परमेश्वरन् पिल्ले, वेंद्रम् यांनीं मंडित केलें.

अडथळे दूर करा

ह्या अधिवेशनानें आयुर्वेदाचा देशव्यापी सार व प्रचार करण्यावर असलेलीं सर्व बंधनें व डथळे दूर करण्याविषयीं ठराव करून सर्व संबंधित प्रान्तीय राज्य सरकारांना त्याप्रमाणें हार्दिक िनंति केली, त्याशिवाय इतरहि अनेक महत्वाचे राव मंजूर केले.

डॉ. सावनूर यांचें स्मारक

स्वर्गीय डॉ. एच. व्ही. सावनूर व आयुर्वेद-विद्वान् शेषशास्त्री यांचीं स्मारकें उभारण्याचेंहि अधिवेशनानें ठरविलें.

स्वागत-समितीनें अधिवेशनास आलेल्या सर्व तिनिधि मंडळींची व्यवस्था फारच चोख ठेविली होती. अ. भा. आ. महासंमेलनाचे अध्यक्ष वैद्य पार्थनारायण पंडित यांनीं अविश्रांत परिश्रम घेऊन व स्वतः अधिवेशनाचे कामांत दक्षता ठेवून हें अधिवेशन अत्यंत यशस्वी केलें. तसेंच ह्या उदात्त कार्यांत अितरहि अनेक बंधूंनीं अतिशय साहाय्य केलें.

कांहीं महत्त्वाचे ठराव

ठराव नं. २ :- कूर्ग राज्य सरकारनें प्रांतांतील फक्त आयुर्वेदिकच तीन दवाखाने बंद केले. ह्या त्यांच्या धोरणाबद्दल हें अधिवेशन तीव्र खेद व्यक्त करीत आहे, व कूर्ग सरकारला अशीहि विनंति करीत आहे कीं, त्यांनीं राज्यांत आयुर्वेदाला प्रोत्साहन मिळेल अशी योजना आंखावी व ती कार्यान्वित करावी.

म्हैसूर पदवीस मान्यता द्या

ठराव नं. ४ :— म्हैसूर राज्य सरकारच्या आयुर्वेदिक उपाधीस मुंबअी राज्य सरकारनें मान्यता द्यावी अशी मुंबअी राज्य सरकारला विनंति करण्यांत येत आहे; व म्हैसूर राज्य सरकारला अशी विनंति करण्यांत येत आहे कीं, त्यांनीं मुंबअी राज्यांतील विद्यार्थ्यांनीं म्हैसूर राज्यांतील आयुर्वेदिक उपाधि धारण करण्यांत ज्या अडचणी त्यांच्यावर लादल्या आहेत त्या दूर कराव्यात.

म्हैसूरमध्यें आयुर्वेदाचा डायरेक्टर नेमा

ठराव नं. ५ – म्हैसूर राज्य सरकारनें आयुर्वेद शाखेकरितां स्वतंत्र आयुर्वेद डायरेक्टर नेमावा अशी त्या सरकारास विनंति करण्यांत येत आहे. व ह्या डायरेक्टरच्या जागेवर केवळ आयुर्वेदिक वैद्याचीच नेमणूक व्हावी कीं जो राज्यांतील आयुर्वेदिक दवाखाने, रुग्णालयें व शिक्षणसंस्था यांचें नियमन करील, आयुर्वेदीयांच्या सध्यां असलेल्या अडीअडचणी दूर

करील आणि निरनिराळया आयुर्वेदीय संस्थांना मार्गदर्शन करील कीं जें सध्यांच्या शासनाला पुरेशा आयुर्वेदज्ञानाच्या अभावीं करतां येत नाहीं.

समानतेनें वागवा

ठराव नं. ८ :– म्हैसूर सरकारला अशी विनंति करण्यांत येत आहे कीं, त्यांनीं ह्या राज्यांतील सरकारी आयुर्वेदिक कॉलेजांत शिक्षणाकरितां जे विद्यार्थी मुंबई कर्नाटक, हैद्राबाद कर्नाटक, कूर्ग, मंगलोर व कर्नाटकांतील इतर भागांतून येतात त्यांना प्रवेशाबाबत व इतर सुविधाबाबत राज्यांतील विद्यार्थ्यांच्या समानतेनें वागवावें.

संस्कृत सक्तीचें करावें

ठराव नं. ९ :– म्हैसूर राज्य सरकारला अशी विनंति करण्यांत येत आहे कीं, म्हैसूर राज्यांतील सरकारी आयुर्वेदिक कॉलेजांत प्रवेश मिळण्याकरितां संस्कृत भाषा हा विषय सक्तीचा केला जावा; कारण कीं, मूळ आयुर्वेदिक ग्रंथ हे संस्कृत भाषेतून लिहिले गेले आहेत व आयुर्वेदीय विषय नीट समजण्याकरितां संस्कृत भाषा येणें ही गोष्ट अत्यावश्यक आहे.

वैद्य एस्. आर्. हिरेमठ
सन्मान्य मंत्री, नि. क. आ. मंडळ

अभ्यंगशास्त्राचा अभ्यास

वैद्य दा. धों. पाठक आयुर्वेदविशारद हे स्टॉकहोम (स्वीडन) येथें अभ्यंगाचा उच्च शिक्षणक्रम संपवून ता. १३।८।५५ रोजीं परत आले आहेत. तिकडील मसाज संस्थांचा अभ्यासक्रम, हवापाणी, शिक्षणास येणारा व जाण्यायेण्याचा खर्च वगैरे संबंधींची माहिती पत्रिकेंत देण्यांत येणार आहे.

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं
आयुर्वेदिक व युनानी वनौषधि
तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण !

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार, गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राह्मी, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारचीं वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य ! विशेष माहितीसाठीं आमचे साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम–आयुर्वेद

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी
२४५ काळबादेवी रोड, मुंबई

दंतवैद्य जायदे यांचें पत्र

परमपूज्य लोकमान्यांना सादर वन्दन

मुंबई १।८।५५

प्रिय गुरुवर्य पंडितजी—सा. न. वि. वि.

१ ऑगस्टची आयुर्वेद पत्रिका पावली. तसेंच ीची रक्कमहि पावली. आपण मजकारितां केलेल्या य्य-सहकार्याबद्दल अत्यंत आभारी आहे.

स्वतंत्र भारताचा एक दरिद्री दन्तवैद्य कुबे-ना आपली कला सादर करण्यास जात आहे. अमे-कें सर्वच मूल्यमापन पैशावर केलें जातें. मी विश्व-मन केले. माझ्या कुटुंबीयांच्या भावी जीवनाचा नहि बरोबर घेतला. तरीहि पुरेसें काम झालेलें नाहीं.

मला यश मिळालें तर तें आयुर्वेदाचें समजावें व अपयश आल्यास (तें येणार नाहीं, मी पराकाष्ठा ीन) माझ्या दारिद्र्याला वैद्यबंधूंनीं क्षमा करावी.

महाराष्ट्र टिळक विश्वस्ताकडून फक्त १०० रु. ले. मी उद्यां (ता. २) रात्रीं विमानानें प्रयाण णार!

आपणां सर्वांचे आशीर्वाद माझ्या पाठीशीं हेतच. सवडीनें पत्रिकेला पत्र पाठवीन. कळावें.

जयहिंद! — पां. वि. जायदे

महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळाचे

आजीव सदस्य

भुसावळ येथें भरलेल्या म. प्रां. वैद्यसंमेलनांत मंडळाच्या घटनेंत सुधारणा करण्यांत आली आहे.

१] १ जानेवारी १९५६ पासून मंडळाची सभासद वर्गणी वार्षिक २ रु. ठरविण्यांत आली आहे.

२] म. प्रां. वैद्यमंडळास एक-रकमी ५१ रु. देणारा वैद्य हा आजीव सभासद समजला जाईल.

या नियमानुसार पुढील २ वैद्यवर्यांनीं ५१ रु. पाठवून म. प्रां. वैद्यमंडळाचे आजीव सभासदत्व स्वीकारलें आहे.

१) वै. वि. म. गोगटे आयुर्वेदतीर्थ, नासिक
२) वै. प्र. ल. समुद्र आयुर्वेदतीर्थ, अकोला

आजीवन सदस्य अधिक असणें हें संस्थेच्या स्थैर्याचें बोधक आहे. सबब आर्थिकदृष्ट्या सुस्थितींत असलेल्या वैद्यवर्यांनीं व शक्य त्या इतरांनींहि म. प्रां. वैद्यमंडळाकडे ५१ रु. पाठवून आजीव सभासद व्हावे, अशी विनंति आहे.

"म. प्र. वैद्यमंडळाचे भूतपूर्व अध्यक्ष हे म. प्रां. वैद्यमंडळाचे आजीव सदस्य समजण्यांत यावेत" या नियमानुसार

१) वै. वेणीमाधव बा. जोशी आयुर्वेदाचार्य,	नागपूर
२) वै. भि. वि. डेग्वेकर	जबलपूर
३) वै. भू. गणेशशास्त्री जोशी	पुणें
४) श्रीमंत नानासाहेब पुराणिक	पनवेल
५) वै. पु. वि. धामणकर, ग्रहीतायुर्वेद	पनवेल
६) वै. ग. म. अभ्यंकर	मुंबई
७) वै. बिंदुमाधव ग. पंडित आयुर्वेदतीर्थ	नासिक
८) वै. दत्तात्रयशास्त्री जळूकर	नासिराबाद

हीं मंडळी म. प्रां. वैद्यमंडळाचे आजीव सदस्य आहेत.

वै. बिंदुमाधव पंडित
स्थायी मंत्री
म. प्रां. वैद्य मंडळ, नाशिक

निबडक रुग्णचिकित्सा—

विषमज्वर

(कफप्रधान, मांसगत)

[ले.–वैद्य श्री. कृ. करमरकर, आयुर्वेदाचार्य
चिकित्साविभाग, आयुर्वेद सेवा संघ]

दूष्यदेशादि

स्त्रीरुग्ण, वय ५५, सत्वसार, कफवातप्रकृति, जांगलप्रदेशनिवासिनी, बलवती, अग्नि मन्द, चहा, कोरडे पदार्थ व कटुसात्म्यवती. कफसंचयाच्या, अवस्थेंत चिकित्सेला आली.

नित्य उपवास करणारी, ईश्वराकडे सारखें लक्ष, मानवाची सेवा करणारी अत्यंत कष्टाळू.

पूर्वआजार-प्लेग, श्वास, कफज मांसगत विषमज्वर, पार्श्वशूल (मांसगत), व टाचरूं इ.

आयुर्वेदीय निदान

एक दिवसाआड जेवल्यावर थंडी वाजून येणारा ताप, ताप मृदु पण गुंगी जास्त, यावरून कफप्रधान विषमज्वर असें निदान केलें.

दम्याचा त्रास होऊं नये म्हणून कफकालीं चहा घेण्याची प्रथा, गंगेचें स्नान, दिवास्वाप, इ. कारणें कफसंचयाचीं झालीं. वर्षाऋतूंतील शीत गुणांनीं युक्त स्निग्धादि गुण शरीरांत वाढले. पण वातप्रकोपकालामुळें कफसंचय अल्प प्रमाणांत झाला.

शोधनपूर्वक शमनचिकित्सा

— कफावर वमन —

ज्वर यायच्या दिवशीं मिठाचे पाण्यानें वांति करविली. साधारण २ फुलपात्रभर पाण्यानेंच वमनाचे २ वेग आले व कफ पडला.

चातुर्मास्यनियमाची सांगड

तुळशीच्या पानांचा व मंजिऱ्यांचा ' लक्ष ' देवास वहाण्याचा नियम तिनें केलेला पाहून, या निर्माल्यांतील तुळशीचा रसच १ तोळाभर घे म्हणून सांगितलें, व तिनें घेतला.

चिकित्साफल

ज्वर त्या दिवशींसुद्धां आला नाहीं. मग पु
इतर दिवशीं कोठून येणार ? खोकल्याचा व श्वास-
चाहि त्रास कमी होऊं लागला.

निष्कर्ष

विषमज्वरावर तुळशी रामबाण असली तरी
ज्वरागमादिनीं शोधन उपचार केल्यास, अल्प शक्तीच्या
शमनउपायांनीं सुद्धां उत्तम व शीघ्र अशी यशस्वी
चिकित्सा होऊं शकते. शोधनपूर्वक शमन उपचार
हीच खरी आयुर्वेदीय चिकित्सा! ती जितक्या प्रमा-
णांत होईल तितक्या प्रमाणांत आयुर्वेदीय चिकि-
त्सेचें धवल यश जनतेला दिसेल.

———

बाधिर्यदोषहर कर्णयंत्र

पायधुणी विभागांतील एक व्यापारी श्री.टी.
शाह यांनीं हिंदी जनतेच्या सोईचें, टिकाऊ, सु-
सुटीत, अल्पमोली व वजनानें हलकें (अल्युमीनियमचें
कर्णयंत्र तयार केलें आहे. त्यानें सर्वसाधारण श्रवणाची
गरज भागू शकते. (सभासंमेलनांत त्याचा उपयोग हो
नाहीं.) वैद्यबंधूच्या माहितीसाठीं ही गोष्ट वै. र.
कुलकर्णी, फणसवाडी, मुंबई यांनीं कळविली आहे.
किंमत अंदाजें ५ रु. ट. ख. २ रु.

तारेचा पत्ता:–Newbottle
के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुचें, कॅपसुल्स
[हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाची सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

टायफॉइड व त्यावर रामबाण उपाय

— शंका समाधान —

(लेखकः — **वैद्य इंदुभूषण भिंगारे**, महाल, नागपूर)

वरील मथळ्याचा लेख 'आयुर्वेद पत्रिका' व ीय मासिकांतून प्रसिद्ध झाल्यापासून या विष- एक नवीनच चालना मिळाली आहे. माझ्या मित्रांकडून व चाहत्यांकडून अनेक अभिनंदनपर आलीं असून कांहींनीं आपल्या शंकाहि विचा- आहेत. वरील सर्व मित्रांचा व चाहत्यांचा मी असून सर्वांचें यथाशक्ति शंकासमाधान करणें माझें कर्तव्य समजतो. म्हणूनच या विषयाची चर्चा अजूनहि व्हावयास पाहिजे असें माझें मत आहे.

मर्यादा व दिशा

माझ्या लेखाची मर्यादा व दिशा मी प्रथमच निश्चित केली आहे. माझ्या प्रत्यक्ष अनुभवाला जो योग उतरला तो प्रयोग निश्चित स्वरूपाचा अर्थात् निश्चित गुणधर्मांचा आहे काय ? हाच प्रथम मुद्दा आपल्याला ठरवावयाचा आहे. हा मुद्दा निश्चित झाल्यावर मग ह्या प्रयोगासंबंधीं 'आयुर्वेदीय शास्त्राच्या सर्व बाजूंनीं त्याची उपपत्ति लावण्याचा प्रयत्न करतां येईल. प्रयोगाकडून उपपत्तीकडे जाणें हा मार्ग शास्त्रसंशोधनाच्या दृष्टीनें अधिक सोईचा आहे, असें मला वाटतें. ह्याच मार्गाचा अवलंब मी माझ्या लेखांत केला आहे. वैद्यशास्त्र हें प्रत्यक्षानुगामी शास्त्र आहे, असें माझें मत आहे. जी गोष्ट प्रत्यक्ष अनुभवाला येईल त्याचीच उपपत्ति लावणें अधिक सोईचें असते. कारणः— 'प्रयोगज्ञस्य वैद्यस्य सिद्धिर्भवति नित्यशः।' [सुश्रुत सूत्रस्थान–अध्याय ९] अर्थात् प्रयोग जाणणाऱ्या वैद्यालाच सफलता मिळते, असा शास्त्राचा ठाम सिद्धांत आहे. व म्हणूनच,

प्रत्यक्षतो हि यद्दृष्टं शास्त्रदृष्टं च यद्भवेत् ॥
समासतस्तदुभयं भूयो ज्ञानविवर्धनम् ॥४८॥सु.शा.५

माझ्या लेखाची मर्यादा जमेस धरूनच संपूर्ण चर्चा व्हावयास पाहिजे, असें मला वाटतें.

माझे मित्र श्री. डॉ. जोगी यांनीं जो आयुर्वेद पत्रिकेंत लेख लिहिला आहे तो व त्यांतील प्रतिपाद्य विषय माझ्या लेखाच्या मर्यादेच्या बाहेरचा आहे, असें मला वाटतें. तरी देखील त्यांचें शंकासमाधान न झाल्यास माझे लेखासंबंधीं गैरसमज होणें स्वाभाविक असल्यामुळें मी कांहीं बाबतींत स्पष्टीकरण करण्याचें निश्चित केलें आहे.

निश्चित रोगासंबंधीं मतभेद कां ?

पाश्चात्य रोगनिदानांत टायफॉइड फिव्हरचें निदान, पूर्वरूप, रूप, उपशय, सम्प्राप्ति व चिकित्सा, अत्यंत विस्तृतपणें वर्णन केलेली आढळते. एवढेंच नव्हें तर प्रत्यक्ष रोगस्थानांत होणाऱ्या विकृतीचें वर्णन अत्यंत सूक्ष्मपणें केलेलें आहे. अशा स्थितींत सर्व आयुर्वेदीय वैद्यांना मान्य होईल असें आयुर्वेदीय दृष्टिकोनांतून केलेलें वर्णन व ह्या रोगाची निश्चित चिकित्सा अजून कां आढळत नाहीं ? निरानिराळ्या वैद्यांच्या गटांत ह्या निश्चित रोगासंबंधीं मतभेद कां असावेत ? असें सहाजिकच वाटतें

आयुर्वेदीय रोग–निदान म्हणजे केवळ प्रकुपित दोषांच्या लक्षणांची जंत्री नव्हे. आयुर्वेदीय रोगनिदानांत रोग ह्या शब्दांची व्याख्या दिलेली आहे. त्यांत ' विशिष्टलक्षणसमष्टिभूतास्तद्बोधिताभ्यन्तरविकृति–विशेषरूपा भावा रोगाः ' असें व्याधीचें लक्षण कै. महामहोपाध्याय गणनाथ सेन ह्यांनीं 'सिद्धांतनिदान' ह्या ग्रंथांत केलें आहे, 'येन दोष एव हि दूष्यविशेष। संमूर्छितो व्याधिः । अशी चक्रपाणीदत्तानीं व्याधीची व्याख्या केलेली आहे व

संचयं च प्रकोपं च प्रसरं स्थानसंश्रयम् ।
व्यक्तिं भेदं च यो वेत्ति दोषाणां स भवेद्भिषक् ॥
निदानं पूर्वरूपाणि रूपाण्युपशयस्तथा ।
संप्राप्तिश्चेति विज्ञानं रोगाणां पचधा स्मृतम् ॥
कुपितानां हि दोषाणां शरीरे परिधावताम् ।
यत्र संङ्ग खवैगुण्याद्व्याधिस्तत्रोपजायते ॥
एवं प्रकुपितास्तांस्तान् शरीरप्रदेशानागम्य व्याधीन्
जनयान्ति ।

आयुर्वेदीय शास्त्रदृष्ट्या रोग वर्णनाची निश्चिति चौकट वरच्या शास्त्रीय वचनांत दिलेली आहे. ह्या चौकटींत बसणारें वर्णन जों पावेतो सर्वांना मान्य होत नाहीं तो पावेतो प्रकुपित वात पित्त कफांच्या लक्षणांची जंत्री देऊन काय उपयोग ? वरील चौकटींत बसणारें वर्णन व त्याची दोषप्रत्यनीक व व्याधी-प्रत्यनीक निश्चित चिकित्सा वर्णन केल्यावरच रोग-वर्णन मान्य होईल.

भारत वनस्पति फार्मसी
पो. मंचर (जि. पुणें)
यांचेकडील आयुर्वेद वनस्पतींपासून शास्त्रोक्त पद्धतीनें तयार केलेलीं संधिवात, पक्षघात वगैरे सर्व वातावर चोळण्याकरतां उपयोगी
काळीटाहाकळ तेल **मालकांगोणी तेल**
नारायण तेल **निर्गुंड्यादि तेल**
वातावर मिश्रणतेल **महावात वि वंसकतेल**
याशिवाय दुसरी वातावरील तेलें विकत मिळतील. "झनाना" औषधी तेल.
डोकेंदुखी, अर्धशिशी, विंचूदंश, नारूवर बाहेरून लावण्यासाठीं उपयोगी. याशिवाय ताज्या वनस्पति मिळण्याचें ठिकाण —
श्री. भिमाजी सखाराम राजगुरव
पो. मंचर (जि. पुणें)

सान्निपातिक ज्वराची दोषदूष्यसंमूर्च्छना व विषमज्वरांतील संततज्वरांची दोषदूष्यसंमूर्च्छना वेगळी आहे. हे श्री. डॉक्टर जोशी मान्य करतीलच. ह्या दोन दोषदूष्यसंमूर्च्छना वेगळ्या असल्यावर ह्यांची व्याधि-प्रात्याक्षिक चिकित्सा ही भिन्न असणारच. अशा वेळीं हा वाद केवळ शाब्दिक तर्कांनीं कसा मिटावा ! पुण्याचा साम्प्रदाय विषमज्वरवादी आहे. तर नगरचा साम्प्रदाय सन्निपातज्वरवादी आहे. ह्या दोन्ही गटांनी डॉ. जोगी प्रत्यक्ष-अनुभव-सिद्ध प्रयोगांनीं कांही तडजोड अगर समेट घडून आणतील तर मी त्यांचा अत्यंत आभारी होईन. तोपावेतो शास्त्रवचनच्या गलबल्यांनीं हा वाद मिटवू पाहणें मला व्यर्थ वाटें. दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे एकच औषध ह्या अवस्थेला लागू होईल काय ? दोषदूष्यसंमूर्च्छना व तिचें स्वरूप निश्चिति कळल्यावर त्या अवस्थेवरचें औषधहि निश्चितच असावयास पाहिजे. हे औषध एखाद्या दोषदूष्यसंमूर्च्छनेवर निश्चित स्वरूपानें का म्हणून लागू पडते ? ह्याची कार्यकारणपरम्परा पुष्कळ वेळा लावतां येत नाहीं. शास्त्रांत देखील ह्या संबंधीं एक प्रासिद्ध वचन आलें आहे.

अमीमांयास्याचिन्त्यानि प्रसिध्दानि स्वभावतः ॥
आगमेनोपयोज्यानि भेषजानि विचक्षणैः ॥१९॥
प्रत्यक्षलक्षणफलाः प्रसिध्दाश्च स्वभावतः ॥
नौषधीर्हेतुभिर्विद्वान् परीक्षेत् कदाचन ॥२०॥
सहस्रेणापि हेतूनां नाम्बष्ठादिर्विरेचयेत् ॥
तस्मात्तिष्ठेत्तु मतिमानागमे न तु हेतुषु ॥२१॥

ह्या वचनावरून प्रत्येक औषधाचे गुणधर्म कार्यकारणपरम्परेंतच बसविता येतील, असें नाहीं. प्रत्यक्ष लक्षणफल पाहूनहि व्यवहार करावा लागतो. हें औषध जंतुघ्न आहे काय ? असा डॉ. जोगी ह्यांचा एक प्रश्न आहे. रोगांचीं कारणें दोन प्रकारचीं आयु-शास्त्रानें ठरविलीं आहेत. एक रोगाचे निमित्त कारण व दुसरें रोगाचें समवायी कारण. निमित्त कारणांत विप्रकृष्ट अर्थात् मिथ्याहारविहारादि कारणांचा सम-वेश होतो. समावायीकारणांत दोषदूष्यसमूर्च्छनेचा

नेच होतो. समवायी कारण नाहींसें झाल्याशिवाय नाश होत नाहीं व म्हणूनच माझ्या औषधी- चा निश्चित परिणाम दोषदूष्यसंमूर्च्छनेवर होतो. निश्चित आहे. हा परिणाम झाल्याशिवाय ज्वर- होणारच नाहीं.

टायफाइड केव्हां होतो ?

ह्या औषधाचा परिणाम रोगजंतूवर होतो कीं, हा प्रश्न मुळींच आम्ही गौण स्वरूपाचा सम- ते, पाश्चात्य रोगनिदानाच्या दृष्टिकोनांतून माझ्या धी कल्पाचा विचार करावयाचा असल्यास औषधीकल्प जंतुनाशक आहे किंवा नाहीं हें . जोगी यांनीं जरूर तपासून पाहावें. हा परिणाम आल्यास आयुर्वेदशास्त्राला उपकारकच ठरेल. रोगाला निमित्त कारण असलेले रोगजंतु देखील औषधानें मरतात असें सिद्ध होईल. शरद् व या ऋतूंतच टायफॉइड फिव्हरच्या साथी येतात महामहोपाध्याय गणनाथसेन म्हणतातः—

र्तुषु तु ग्रीष्मे शरदि वार्षिके ।
आन्त्रिकाख्यो ज्वरः कृच्छ्रो दृश्यते घोरलक्षणः ॥

चंद्रकलेची अवस्था

अर्थात् शरद् व ग्रीष्म या ऋतूंत वातपित्तोल्बण पातिक ज्वराची दोषदूष्यसंमूर्च्छना आढळून ल्यास या अवस्थेवर चंद्रकला हेंच औषध व्याधी- नीक म्हणून अत्यंत उपयोगी आहे, असें प्रत्यक्ष नुभवानें म्हणावें लागतें. चन्द्रकलेच्या गुणवर्णनांत तऱ्हेचा स्पष्ट उल्लेख आलेला आहे.

सर्वपित्तगदध्वंसी वातपित्तगदापहः ।
अन्तर्बाह्यमहादाहविध्वंसनमहाघनः ॥
ग्रीष्मकाले शरत्काले विशेषेण प्रशस्यते ।
कुरुते नाग्निमान्द्यं च महातापज्वरं हरेत् ॥

ज्वर-मोक्षाचीं लक्षणें

ह्या वर्णनावरून माझ्या औषधी कल्पाचा उपयोग व कोठें होतो ह्याची स्पष्ट कल्पना श्री. डॉ. जोगी ना येईलच. ज्वर एकदम उतरविणें अगर कमी करणें चिकित्सेचें ध्येय असूं शकतें काय ? असा सवाल श्री. डॉ. जोगी ह्यांनें केला आहे. तापुरता ज्वर कमी करणें व ज्वर मोक्ष होणें ह्यांतील भेद श्री. डॉ. जोगी ह्यांना कळला असेलच. मी ज्वरमोक्ष म्हटल्याबरोबर

स्वेदो लघुत्वं शिरसः कण्डुः पाको मुखस्य च ।
क्षवथुश्चान्नलिप्सा च ज्वरमुक्तस्य लक्षणम् ॥

ही अवस्था माझ्या डोळ्यासमोर उभी राहते. व ही अवस्था डॉ. जोगी ह्यांना ताबडतोब एखाद्या प्रभावी औषधानें येऊ शकत असल्यास नको काय? दोषदूष्यसंमूर्च्छनेचा उपशम करून ज्वरमोक्ष झाल्यास कोणताहि आयुर्वेदीय शास्त्रज्ञ ह्या अवस्थेचा स्वीकारच करील.

परिणाम निश्चित आहे

मी माझ्या औषधीकल्पाचा उपयोग गेल्या ३ वर्षांत अनेक ठिकाणीं केला आहे. अनेक ठिकाणीं विडाल टेस्ट करूनहि उपयोग केला आहे. मला सर्व आयुर्वेदीय औषधी कल्पांत ह्या औषधी कल्पाचा परिणाम निश्चित आढळला आहे. म्हणून मी डाक्टर जोगी ह्यांना अशी विनंति करतो कीं एखाद्या व्याकरणपंडिताप्रमाणें आपण शब्दाच्या उपपत्त्या लावण्याचा प्रयत्न करू नका. शास्त्रवचनांचा व शब्दांच्या उपपत्त्यांचा भडिमार करण्यापेक्षां आपण ही औषधें तयार करून वापरून पहा. आयुर्वेदीय शास्त्र- दृष्ट्या ह्याचा परिणाम इष्ट असा दिसून आल्यास आपण सर्व एकत्र येऊन प्रत्यक्ष प्रयोग करून सर्व उपपत्त्यांचा शोध लावू. प्रथमच शब्दपंडितांच्या घोळक्यांत सामील होऊ नका. प्रयोगाकडून उप- पत्तीकडे चला.

लोकमान्य पुण्यस्मरण

१ ऑगस्ट रोजीं लोकमान्य पुण्यतिथीबद्दल शुद्ध आयुर्वेद विद्यालयास सुटी देण्यांत आली होती. ४ ऑगस्ट रोजीं दुपारीं प्रा. सबनीस यांचें लोकमान्य चरित्रावर विद्यार्थ्यांना उद्बोधक व्याख्यान झालें.

---

१० वें महाराष्ट्र प्रां. वैद्य संमेलन

स्वागत मंडळाचें विसर्जन

भुसावळ येथें दि. ६।८।१९५५ शनिवारीं सायंकाळीं ४ वा. नवशक्ति आयुर्वेदाच्या जागेंत म. प्रां. दशम वैद्य संमेलनाच्या स्वागत मंडळाची सभा स्वागत व कार्याध्यक्ष आयुर्वेदाचार्य ब्रह्मदत्त शर्मा यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. सभेला संयुक्त खानदेशांतील वैद्य स्वागत सभासद बहुसंख्येनें उपस्थित होते. तसेच स्थानिक निमंत्रित स्वागत सदस्यहि उपास्थित होते.

उपस्थित सदस्य

१ वै. दत्तात्रेयशास्त्री जळुकर, २ कविराज का. सि. भावे, ३ वै. शां. य. मांडळकर, ४ सय्यद अ. गफ्फार, ५ वै. ज्वाला प्रसादशर्मा, ६ वै. भा. शं. जहागीरदार, ७ वै. मा. बा. जोशी, ८ वै. श्री. रा. करंजीकर, ९ वै. शंकरसिंह नारायणसिंह, १० वै. भगवन्त त्र्यिंबक वैद्य, ११ वै. कृ. वि. पिसे, १२ वै. रामेश्वर पुष्करण दत्त. १३ वै. द. मो. पंचाक्षरी, १४ वै. आसराज नेत्रवैद्य, १५ वै. टी. एम्. महाजन, १६ वै. चूडामणी खंडेराव चौधरी, १७ मो. स. तळेले, १८ वै. ना. ग. जोजी, १९ वै. कन्हैयालाल शिवनाश वर्मा, २० वै. वि दा. पांडव, २१ वै. वा. वि. भारंबे, २२ वै. य. प्र. उपासनी, २३ वै. ब्रह्मदत्त शर्मा, २४ वै. शं. गो. गुणे, २५ वै. आर. एस्. मगदे, २६ वै. द. ब. कुलकर्णी, २७ वै. द. अ. फुलंब्रीकर २८ वै. गो. शं. जोशी, २९ वै. रामदास आबाजी वैद्य, ३० वै. गंगराम पुंजो महाजन, ३१ श्री. कन्हयालाल बेहरा, ३२ वै. रा. रा. चौधरी, ३३ वै. रामविलास गुप्ता, ३४ वै. लक्ष्मीनारायण लाठी.

अध्यक्ष श्री. ब्रह्मदत्तशर्माजींनीं सर्वहि उपास्थितांचे हार्दिक स्वागत करून सभाकार्यास प्रारंभ केला. आजच्या सभेचा मुख्य उद्देश म. प्रां. दशम वैद्य संमेलनाच्या कार्याचा अहवाल व संमेलन कार्याप्रीत्यर्थ झालेला जमाखर्च मंजूर करणें हा होता. त्याप्रमाणें आतांपर्यंत झालेला सर्वहि जमाखर्च वै. ब्रह्मदत्तशर्माजी यांनीं सविस्तर वांचून दाखविला, व अजूनहि कांहीं गोष्टींसाठीं व्हावयाच्या खर्चाचीहि कल्पना सभेपुढें मांडली. तसेंच संमेलन–कार्यासाठीं आश्वासित रकमा अजून येणें आहेत, तर विश्वासानें पावत्या दिलेल्या कांहीं व्यक्तींकडून रकमा येण्याची शक्यता वाटेनाशी झाली आहे; तेव्हां अशा रकमांबद्दल काय करावें हाहि प्रश्न सभेपुढें मांडला. त्यानंतर सर्वहि खर्चवेच वजा जातां उर्वरित निधीची काय व्यवस्था करावयाची हेंहि आजच्या सभेनें ठरवावें असें सुचविलें. अशा या सर्वहि प्रश्नांचा विचार होऊन आजच्या सभेनें खालीं लिहिलेल्या प्रमाणें प्रस्ताव समंत केले.

प्र. १–स्वागताध्यक्ष वै. ब्रह्मदत्त शर्माजी यांनीं म. प्रां. दशम वैद्य-संमेलनाचा जो अहवाल निवेदन केला आणि जमाखर्च वांचून दाखविला त्यास आजची ही स्वागत मंडळ सभा संमत करीत आहे.
सू.— वै. भ. त्र्यं. वैद्य, अ.— वै. मा. बा. जोशी

सर्वसंमत

आश्वासित रकमांची व्यवस्था

प्र. २– म. प्रां. दशम वैद्य संमेलनासाठीं ज्या आश्वासित रकमा अजूनहि येणें आहेत त्या कार्यकर्त्यांनीं आतां अगदीं त्वरित वसूल करून कार्यालयांत भराव्यात अशी आजची ही स्वागत मंडळ सभा त्या त्या कार्यकर्त्यांना विनंति करीत आहे. आणि देणगीदारांच्या आश्वासनावर विश्वासून ज्या कार्यकर्त्यांनीं निरनिराळ्या रकमांच्या पावत्या देणगीदारांना दिल्या; परंतु अनेक प्रयत्नांनंतरहि आतां त्या रकमा

(१२६ पानवर पहा)

दुग्धसंस्कार :

(लेखकः— वैद्य बिंदुमाधव पंडित, नाशिक)

वर्तमानपत्रें वाचावीत तर त्यांत रोज साखर-त्पादन-वाढीच्या योजना वाचावयास मिळतात. नाला साखर ही फार आवश्यक वस्तु आहे असें सर्वत्र झालेलें दिसतें. जुन्या काळीं अनेक युगें न गेलीं. एक पाषाण युग (Stone age) ले, दुसरें लोहयुग (Iron age) तिसरें वस्त्रयुग loth age). त्याप्रमाणेंच सध्या शर्करायुग निर्माण ऊ घातलें आहे. धान्य नाहीं मिळालें तरी चालेल, न रोज उठून सकाळीं साखर–दूध पाहिजेच. तें न ळालें तर डोकें दुखूं लागते, अशी आमची स्थिति ली आहे. देशांत तयार होणारीं धान्यें व साखर त नाहीं. त्या साखरेसाठीं दरसाल कोट्यावधी रुपये देशी पाठवावे लागत आहेत.

साखरेचे पौष्टिक गुण

साखरेचे पौष्टिक गुण सर्वमान्य आहेत. पण थें गुण तेथेंच दुर्गुणहि वास करतात. केतकीच्या नांत सर्प राहतात असें म्हणतात. तशीच गोष्ट येथें आहे. पौष्टिकपणाबरोबरच साखरेंत दुसरे दुर्गुण आहेत, ते असेः– साखर थंड आहे, कफकारक आहे अम्लपित्तकारक आहे. जुनाट पडसें निर्माण करणारी आहे. तिच्या फसफसण्यामुळें गॅसिस निर्माण होतात. रीरांत चरबी वाढते, जडपणा वाढतो इ. इ.

वारंवार पडसें कां येतें ?

हल्ली वैद्यकशास्त्राला एक प्रश्न अत्यन्त भेडसावित आहे. तो म्हणजे वारंवार पडसें कां येतें ? आमच्या मतें थंड गुणाची साखर हीच याला कारण आहे. कफप्रकृति व वातप्रकृति (शीतप्रकृति) लोकांना साखर बाधून पडसें येतें, खोकला, दमा इ कफात विकार ती निर्माण करते. आमचें हें नित्याचें निरीक्षण आहे व वारकाईनें पहाणाऱ्या आजीबाईंच्या हें लक्षांत आलेलें आहे. नातवाला साखरेनें पडसें होतें, खोकला येतो, छाती भरते, व ताप येतो असे सांगणाऱ्या किती तरी वृद्ध स्त्रिया सांपडतील.

पानतंबाखूचा प्रसार कां वाढला ?

पूर्वी पडसें येण्याचा प्रकार आजच्या इतका नव्हता, तसेंच साखरेचा वापरहि एवढा नव्हता. आज घरोघरीं सकाळीं उठून शर्करायुक्त पेय घेतल्याशिवाय लहान-थोर-वृद्ध यांचें पान हलत नाहीं व त्यामुळेंच घरोघर दुखणीं पण वाढलीं आहेत, पानतंबाखूचा वापर म्हणूनच व्यापारहि वाढला आहे.

सध्यां वाढणारीं दुखणीं

आमच्या मतें सध्यां वाढत असलेलीं दुखणीं हीं ५० टक्केतरी सकाळीं (कफकालीं) घेतल्या जाणाऱ्या दूध-साखरयुक्त पेयामुळें आहेत. पूर्वी व्यायाम करणाऱ्या लोकांखेरीज इतर लोक सकाळीं दूध घेत नसत. सकाळीं शिळी भाकरी-तुकडा, फुटाणे हे कोरडे अन्न खाणें निराळें व दूध-चहा हें द्रवान्न पिणें निराळें. श्रमजीवी लोक न्याहारी करीत ती पिठले--भाकरी, डाळ फुटाणे यांची. हा कोरडा आहार कफवर्धक होत नाहीं, उलट कफनाशक होऊन बलवर्धक होतो.

दूधसाखर हा बृंहण आहार

आमच्या लक्षांत ही गोष्ट आल्यापासून आम्ही रुग्णास सकाळीं (कफकालीं) दूध–साखर इ. युक्त कफकारक आहार–पेय वर्ज करावयास सांगतो व ज्यांना दूध घेणें अत्यवश्यक वाटतें उदा. दुग्धाशीं मुलें यांना संस्कृत दूध देण्याची शिफारस करतो. दूध--साखर हा बृंहण आहार आहे. वाग्भटानें सूत्र-स्थानाच्या १४ व्या अध्यायांत मांसाच्या खालोखाल दुधाचा व साखरेचा बृंहण क्रम लावला आहे. मांस क्षीर सिता सर्पि.........। सबब अशी दूध--साखर, व्यायाम नसणाऱ्या कफप्रकृति बालकांना अगर तरुणांना बाधक आहे असें आमचें मत झालें आहे. अशी दूध-साखर दिवसांतून २।३ वेळां घेऊन प्रकृति बिघडवावयाची व मग त्यासाठीं औषधें खावयाची, यापेक्षां आधींच दुधावर कफनाशक संस्कार

करावा असे आम्ही ३ वर्षांपूर्वीं ठरविलें, व संस्कार-द्रव्यें निवडून त्यांचा वापर सुरू केला.

दुधांत तिखट कडु द्रव्यें घालावींत

लहान बालकांना दूध बाधत असेल, पचत नसेल, मानवत नसेल तर त्यांत वावडिंग टाकून तयार केलेलें दूध अगर पाणी द्यावें हा व्यवहार लोकांत सर्वत्र आहे. मात्र हीं वावडिंगें किती टाकावींत याची लोकांना कल्पना नाहीं, त्यामुळें ते १०।५ दाणे त्याचें टाकतात, व मग त्याचा परिणाम दिसत नाहीं, म्हणून तक्रार करतात. वावडिंग हें पोकळ व वजनानें अत्यंत हलकें बी आहे. तें घेण्याचें प्रमाण बरेंच मोठें लागतें, तेव्हांच त्याचा गुण होतो. दुधांत गोड, खारट, तुरट द्रव्यें असतात. गोड रस पोटांत आंबतो. त्यामुळें या चार रसाखेरीज राहणाऱ्या रसांचेच संस्कार त्यावर आवश्यक असतात. ते केले म्हणजे दूध हें सर्व रसाचें अन्न होतें. तिखट व कडू या दोन रसांचा संस्कार दुधावर करावयास हवा असतो. त्या पैकीं वावडिंग हा तिखट रसाचा संस्कार आहे. वावडिंग प्रत्यक्ष तिखट लागत नाहीं. पण त्याचें कार्य तिखट रसाचें आहे, हें कटुको हिंगुमरिच कृमिजित् (वावडिंग) पंचकोलकम् । या श्लोकांत वाग्भटानें दर्शविलें आहे. गाई-म्हशींच्या आहारांत तिखट रसांच्या वस्तु येत नाहींत. त्यामुळें तें दूध मातेच्या दुधापेक्षां जास्त गोड असते व हा गोडपणा मुलांना व मोठ्या माणसांनासुद्धां बाधतो.

रसायनवस्पतींची जोड

केवळ वावडिंगाचा संस्कार सर्वांना पुरेसा होत नाहीं त्यांत आणखी कांहीं रसायन व दीपन वनस्पतींची जोड हितावह ठरते. नुसती आहार द्रव्यें न वापरतां त्याबरोबर आहारयोगी (उदाहरणार्थ मसाले) द्रव्येंहि द्यावींत व त्यांच्या मदतीनें शरीरांतील पाचकाग्नि व धात्वंतराग्नि स्वस्थ ठेवावेत असं आयुर्वेदांत सांगितलें आहे, म्हणून वावडिंगाबरोबरच सीतोपलादिचूर्ण व जेष्ठमधचूर्ण यांचाहि संस्कार करण्याची प्रथा आयुर्वेद सेवा संघानें सुरू केली आहे. प्रथम प्रथम आम्ही रोग्यास ही तीन चूर्णे मिसळून देत असूं. अनुभवानें आम्हीं तीं चूर्णें मिसळून त्याचें दुग्धसंस्कार नांवाचें मिश्रण तयार केलें व तें रोग्यांना व स्वस्थांना द्यावयास प्रारंभ केला. आज तीन वर्षांच्या अनुभवानन्तर आम्हीं तें चूर्ण जनतेच्या माहितीकरितां प्रसिद्ध करीत आहोत. ज्यांना दूध चांगल्या रीतीनें पचत नाहीं, त्यांना हें संस्कृत दूध चांगलें मानवते असा अनुभव आहे.

श्री. प्रवीणचंद्र यांचा अनुभव त्यांच्याच शब्दांत पुढें दिला आहे. तो वाचल्यानन्तर दूध संस्कृत करून वापरण्याची उपयुक्तता वैद्य व रुग्ण यांच्या लक्षांत येईल.

श्री. प्रवीणचंद्र यांचा अनुभव

दुग्धसंस्कारचूर्णानें दूधसंस्कारित करून देण्याचा खालींलप्रमाणें अनुभव मला आला आहे. माझ्या २ वर्षें वयाच्या मुलाला नेहमीं खोकला व पडसें होत असें. पडसें वाढून त्यांतून न्यूमोनियाहि जन्मानंतरच्या पहिल्या एक वर्षांत तीनचार वेळां झाला. त्याचा मुख्य खुराक दूध आहे. व तें संस्कारित करून देण्याची गेल्या चार पांच महिन्यांपासून संवय केली आहे. दुग्धसंस्कारानें संस्कारित केलेलें दूध मुलांना आवडतें, असा अनुभव तर झालाच; त्याच बरोबर खोकला व पडसेंहि कमी होतें. असा अनुभव झाला आहे. ज्याप्रमाणें ओव्हलटिन वगैरे लहान मुलांना देण्याची पद्धत आहे, त्याप्रमाणें दमट व ओल्या हवेच्या प्रदेशांत दुग्धसंस्कारानें संस्कारित केलेलें दूध देण्याची पद्धत पडली तर कांहींच वाईट नाहीं असें मला वाटतें. ज्या मुलांना साधे दूध पचत नाहीं व घेतल्यावर सरदी-खोकला वगैरे होतो त्यांना दुग्धसंस्कारानें संस्कारित केलेलें दूध देऊन प्रयोग करून पाहिलें पाहिजेत.

संस्कार करण्याची पद्धति

आम्हीं नेहमीं साधारणपणें तीन वेळां दूध संस्कारित करून देत असतो. दूध संस्कारित न करतां

होईल तो देतच नाहीं पावशेर दुधामध्यें गें १ चमचा (Tea spoon) दुग्धसंस्कार, चमचे साखर व अर्धा चमचा हळद टाकून घेतो. दूध वेळच्या वेळेलाच तयार करीत . तीनहि वेळचें एकत्र तयार करीत नाहीं. दुधांत त्याच्या एक चतुर्थांश (१/४) पाणी व हें सर्व उकळून तयार झालेलें दूधच ला देतो. थंड दुधांत किंवा गरम दुधांत चूर्ण एकरूप होत नाहीं असा आमचा अनुभव आहे. म्हणून चूर्ण टाकल्यानंतर ते दूध शक्यतो चें उकळून घेतल्यानें चूर्ण दूधांत व्यवस्थितपणें जातें.

२०० ते ३०० वावडिंग

दुग्धसंस्कार चूर्णांची ही कल्पना प्रथम क्षय-चिकित्सेंतील रसोनक्षीर योगावरून सुचली. तेथें बरोबर २०० ते ५०० पर्यंत वावडिंगाचे दाणे तोळे दूध सिद्ध करण्यासाठीं वापरण्यास सांगितलें . हा प्रयोग सुश्रुत संहिता उत्तरस्थानांत आहे. व वावडिंग ह्या दोन्हीहि तिखट रसाच्याच आहेत. लहान मुलांना लसूण तीव्र पडेल त्यांनीं वावडिंग वापरणें युक्त आहे. वावडिंगाचें चूर्ण वापरावें हेंहि त्यामुळें कळून येतें.

सीतोपलादि चूर्ण

सौम्य कटु रसाची द्रव्यें असलेला दुसरा च्या वापरांतील कल्प सीतोपलादि चूर्ण हा . त्यांत दालचिनी, वेलदोडे, पिंपळी, वंशलोचन साखर हीं द्रव्यें आहेत. लहान मुलांना हा कल्प मानवतो असा सर्वांचा अनुभव आहे. क्षय-चिकित्सेंत त्यांचे गुण खोकला, क्षय, श्वास, झांत दुखणें, कफदोष यांना दूर करणारा व स्वर्य सांगितले आहेत. वाढत्या वयांत मुलांना हें चूर्ण त उकळून देण्यानें अत्यंत लाभ होतो असा भव आहे.

जेष्टमध हें गोड कफनाशक

दुग्धसंस्कार चूर्णांतील तिसरें द्रव्य जेष्टमधचूर्ण हें आहे. या मुळ्या पौष्टिक, रसायन व गोड असून कफनाशक आहेत. त्रिदोषनाशक असें हें द्रव्य आहे. जगांतील सर्व द्रव्यांत जेष्ठमध हा सर्वांत गोड पदार्थ आहे असें अर्थशास्त्रज्ञ म्हणतात. अशा द्रव्याचा उपयोग केल्यामुळें विशेष साखरेचा वापर करण्याची आवश्यकता पडणार नाहीं.

दुग्धसंस्कार चूर्णाचा पाठ

दुग्धसंस्कार चूर्णाचा सध्याचा पाठ पुढील-प्रमाणें आहे. जरूरीप्रमाणें त्यांत वैद्यांना फेर फार करता येईल. सितोपलादि चूर्ण ५ तोळे + जेष्टमध २॥ तो. + वावडिंग २॥ तो. या चूर्णांस पौष्टिक द्रव्यांची जोड देणें असेल त्यावेळीं अश्वगंधा २॥ तो. + शतावरी २॥ तोळे + शंखपुष्पी २॥ तो. यांची जोड देता येईल. शतावरी व अश्वगंधा या वनस्पति थोड्या कडू आहेतच. त्यापेक्षां अधिक कडुरस अपेक्षित असेल तर थोडे गुळवेल चूर्ण वापरावें.

दूध संस्कृत करून वापरावें

या लेखाचा मुख्य उद्देश असा आहे कीं दूध वापरावयाचें तें नुसतेच अगर साखर घालून न वापरतां संस्कृत करून वापरावें हाच मुद्दा ज्वर चिकित्सेंत दूध देण्याविषयींचे जीर्ण ज्वरांचें प्रकरण आले असतां वाग्भटाचार्यांनीं मांडला आहे.

संस्कृतं शीतं उष्णं वा तस्मात् धारोष्णं एव वा।
विभज्य काले युजीत ज्वरिणं हन्ति अतोऽन्यथा॥

दूध संस्कृत न करतां वापरलें तर तें ज्वरी माणसास मारक होतें असें वाग्भटाचार्यांनीं सांगितलें आहे.

तिसरे आणि विसरे

कांहीं लहान मुलें वयाच्या तिसऱ्या वर्षी बुद्धि-मांद्याचीं लक्षणें दाखवितात. दुसऱ्या वर्षी शहाणपणानें शौच-लघवी हीं योग्य ठिकाणीं करणारीं मुलें तिसऱ्या वर्षीं अंथरुणांत, स्वयंपाक घरांत शौचविधि करतांना व अंगावर लघवी करतांना आढळतात. अशा मुलांच्या बुद्धीचें मांद्य दूर करण्याऱ्या वनस्पति दुधाबरोबर दिल्या पाहिजेत. अश्वगंधा, शतावरी, शंखपुष्पी या वनस्पतींचें चूर्ण याकालीं उपयुक्त ठरेल.

वसूल होण्याची शक्यता नाहीं असें ज्या ज्या देणगीदारांच्या रकमांबद्दल त्यांना पावती देणाऱ्या कार्यकर्त्यांकडून निर्णयात्मक कळेल त्या सर्वहि रकमा बुडीत खातीं खर्च लिहिण्यांत याव्यात असें आजची ही स्वागत सभा ठरवित आहे.

सू.—वै. गो. शं. जोशी

अ.—श्री. कन्हैयालालजी बेहरा, सर्वसंमत

शिल्लक रकमेचा विनियोग

प्र. ३— म. प्रां. दशम वैद्य संमेलन कार्याप्रीत्यर्थ जमलेल्या निधींतून आतांपर्यंत झालेला व कांहीं अजूनहि आवश्यक कार्यासाठीं होणारा खर्च वजा जाता जो निधि शिल्लक राहील तो संयुक्त खानदेश वैद्य मंडळाच्याच उपयुक्त कार्यासाठीं खर्च करण्यांत यावा. सू.— श्री. कन्हयालालजी बेहरा

अ.— वै. य. प्र. उपासनी, सर्वसंमत

निधी व्यवस्थेसाठीं समिति

प्र. ४— म. प्रां. दशम वैद्य संमेलनाच्या ऊर्वरित निधीचा विनियोग सं. खा. वैद्यमंडळाच्याच कार्यासाठीं व्हावा या दृष्टीनें आजची ही स्वागतमंडळसभा स्वागतमंडळाचे वतीनें ३ व सं. खा. वै. मंडळाचे २ अशा ५ सदस्यांचें विश्वस्तमंडळ नियुक्त करीत आहे.

स्वागतमंडळाच्या वतीने ३ सभासद —

१ वै. ब्रह्मदत्तशर्मा २ कविराज का. स. भावे आणि ३ वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर

संयुक्तखानदेश वैद्यमंडळाचे २ सभासदांत—

१ सं. खा. वै. मंडळाचे अध्यक्ष

२ ,, ,, ,, , मंत्री

सूचक— वै. ज्वालाप्रसादशर्मा

अ— वै. द. ब. कुलकर्णी, सर्वसंमत

अहवाल संजुरी समिति

प्र.५— म. प्रां. दशम वैद्य संमेलनाची जीं कामं अजूनहि अवशिष्ट आहेत तीं समाप्त झाल्यावर संमेलनाचा संपूर्ण अहवाल व जमाखर्च स्वागत सभेनें मंजूर करावयाचा असतो. त्यासाठीं सर्व स्वागत सदस्यांची पुन्हां सभा घेण्यापेक्षां कार्याच्या सोयीसाठीं आजची ही स्वागतसभा (१) वै. ब्रह्मदत्तशर्मा, (२) कविराज का. सी. भावे, (३) वै. ज्वालाप्रसाद शर्मा, (४) वै. भगवंत त्र्यंबक (५) वै. चूडामणी खंडेराव, (६) वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर, ७) वै. मा. बा. जोशी. ह्या ७ सदस्यांची उपसमिति नियुक्त करीत आहे. या उपसमितीपुढें स्वागताध्यक्षांनीं संमेलन कार्याचा अहवाल व जमाखर्च मांडावा आणि तो संमत झाल्यानंतर छापून प्रसिद्ध करावा. असे ही सभा सुचवित आहे. व हें कार्य आतां ह्या उपसमितीच्या द्वारेंच होणार असल्यानें म. प्रां. वैद्य संमेलनाच्या पूर्वनियुक्त स्वागत सभेचें आज विसर्जन झालें आहे असें घोषित करीत आहे. सू.— वै. शं. गो. गुणे

अ.— वै. रामनिवास गुप्ता

शेवटीं कविराज भावेजी संमेलन महामंत्र्यांनी अध्यक्षांचे व उपस्थित स्वागत सदस्यांचे आभार मानल्यावर अल्पोपहार होऊन सभाकार्य संपलें.

सभाकार्यानंतर उपस्थित सदस्यांचें छायाचित्र घेण्यांत आलें.

श्री. शर्माजींचा सत्कार

म. प्रां. दशम वैद्य संमेलनाच्या स्वागत सभेचें कार्य संपल्यानंतर त्याच ठिकाणीं ४० गांवचे वै. शं. गो. गुणे यांचे अध्यक्षतेखालीं वै. ब्रह्मदत्त शर्माजी हे मुंबईच्या देशी वैद्यक बोर्डांत अविरोध निवडून आल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यांत आला. या प्रसंगास अनुसरून वै. कविराज भावे, वै. भगवंतराव, वै. करंजीकर, वै. गुप्ता, वै. जळूकरशास्त्री यांचीं समयोचित व शर्माजींच्या गुणवर्णनपर भाषणें झालीं. नंतर वै. शर्माजींना अध्यक्षांचे हस्तें सुताचा हार अर्पण करून सत्कार करण्यांत आला. प्रत्युत्तरादाखल आभारदर्शक व आश्वासनपर असें वै. शर्माजींचें भाषण झालें. शेवटीं अध्यक्षांनीं समारोपांत शुभचिंतन केलें. वै. भगवंतराव यांनीं आभार मानल्यावर हा गोड समारंभ समाप्त झाला.

वैद्य जायदे यांना निरोप

समारंभ मुंबई राज्य वैद्य मंडळातर्फे १९५५ रोजीं दुपारीं ४ वाजतां दादीशेट मधील सिंघाणिया हॉलमध्यें मुंबई श्री हुकेरीकर यांचे अध्यक्षतेखालीं समारंभासाठीं वै. पं. शिवशर्मा, राव दिनानाथ, वै. गं. वि. पुराणिक, वैद्य जोशी, व मुंबईतील इतर वैद्यवर्ग हजर होता. सेवा संघ (नाशिक)चे मंत्री वैद्य वा.स.मराठे उपस्थित राहिले होते. सुरवातीस वै. शिवशर्मा वै. जायदे यांना अमेरिकेसारख्या ठिकाणीं दंतोत्पाटन ही आयुर्वेदीय कला तेथील लोकांना देण्याची कोशीस करावी तसेंच या कलेची च्या दृष्टीनें तिकडील दंतोत्पाटन पद्धतीचा करून आपल्या कलेला अधिक उजळा द्यावा. उदात्त कार्यासाठीं वै.जायदे जात आहेत त्यांना आशिर्वाद आहेतच. त्यांनीं आतांपर्यंत कार्यानें नुसत्या वैद्यांचेच आशिर्वाद त्यांचे त्यांचें दंतोत्पाटनाचें कार्य ज्या आम– पाहिलें आहे त्यांचेहि आशिर्वाद त्यांच्या आहेत असें त्यांनीं समजावें. ”

जायदे यांचे दुर्दम्य प्रयत्न

नंतर वै. गं. वि. पुराणिक, वै. वामनराव नाथ, वै. ना. ह जोशी, वै. वा. स. मराठे, के. शास्त्रीजी [पोदार कॉलेज] आदि वैद्य नीं त्यांच्या कार्यास यश चिंतून त्यांना दिलें.

अध्यक्ष हुकेरीकर यांनीं वैद्य जायदे यांच्या कलेविषयीं प्रशंसोद्गार काढून शिवाय या त्यांना दुर्दम्य प्रयत्न कसा करावा लागला माहिती सांगितली. त्यांनीं अंगिकृत केलेल्या यश चिंतून त्यांना शुभाशिर्वाद दिला.

अधिक अभ्यास करीन

त्यानंतर वै. जायदे यांनीं उत्तरादाखल भाषण त्यांनीं या कलेसाठीं आपली तळमळ व्यक्त करून परदेशांतहि ही कला मिळविण्यासाठीं जे जे क्लेश सोसावे लागतील ते सोशीन व ही भारतीय कला परदेशाच्या लोकांना पटवून देईन. या कलेची अधिक वाढ होण्याच्या दृष्टीनें जो अभ्यास करावा लागेल तो करून माझ्या देशी परत देईन. आपल्या सर्वांच्या आशिर्वादाच्या बलावरच हें कार्य मी पार पाडीन असा विश्वास व्यक्त करून त्यांनीं आपलें भाषण संपविले

त्यानंतर दुग्ध पानाचा कार्यक्रम झाला.

अनुक्रमणिका

१५ ऑगस्टचा गोवा स्वातंत्र्य संग्राम ९७
आयुर्वेदाची सद्यःस्थिति ९९
उत्साहवर्धक योग १०५
चहा वनस्पति आणि चहा–पेय १०७
सुवर्णोदकाचा चिकित्सेंतील अनुभव १०९
जखमेवर आयुर्वेदाय उपाय ११३
निखिल कर्नाटक आयुर्वेद संमेलन, बंगलोर ११५
दंतवैद्य जायदे यांचें पत्र ११७
विषमज्वर ११८
टायफॉइड व त्यावरील रामबाण उपाय ११९
१०वें म.प्रां.वै.संमेलन स्वागत मंडळाचें विसर्जन १२२
दुग्धसंस्कार १२३

चुकीची दुरुस्ति

याच अंकांतील पान ९९ वरील 'आयुर्वेदाची सद्यः स्थिति' या लेखकांचें नांव वै. ग. वा. कामत छापलें गेलें आहे ते गणेश बाळकृष्ण कामत असें वाचावें.

" छोटे धंदे "
अर्थात अल्प भांडवली ग्रामोद्योग, सेंटेड सुपारी, पानविड्याचे मसाले, जर्दे, दंतमंजनें साबण या नित्योपयोगी मालाचें उत्पादन करून शेंकडो रुपये मिळवा. माहितीपत्रकास फक्त ८ आणे पाठवा.
एम्. देशपांडे C/o सोमण लॉज, पुणें ४

दोन वेळ चहा, व दोन वेळ जेवण

हा आहार कोणाचीहि प्रकृति स्वस्थ राहाण्यासाठीं पुरेसा नाहीं, असा सर्वांचा अनुभव आहे. त्यासाठीं आपलें वय, आपला व्यवसाय, आपला देश, काल व प्रकृतिदोष यांचा विचार करून एखादा रसायनकल्प नित्य सेवन करणें अवश्य आहे.

आयुर्वेद सेवा संघानें हा विचार करून निरनिराळ्या प्रकृतीसाठीं निरनिराळे प्राश व कल्प तयार केले आहेत, व करण्यांत येत आहेत.

वातासाठीं **च्यवनप्राश** पित्तासाठीं **अश्विनीप्राश**

कफदोषासाठीं **अगस्तिप्राश** उर्ध्वजत्रुविकारासाठीं **नयनामृतप्राश**

इ. प्राश याशिवाय **दुग्धसंस्कार, दुग्धामृत, विदार्यादि, शतावरीकल्प, भल्लातकासव, पूर्णप्रमाण सुवर्णमालिनीवसंत, महास्नेह, महानारायणतेल,** इ. कल्प तयार आहेत व नवीन तयार होत आहेत. स्वस्थ लोकांना यचा उपयोग करण्याची माहिती देऊन जनतेची प्रतिकारशक्ति वाढविणें व त्यांना आरोग्याचा लाभ मिळवून देणें.

हें आपलें कर्तव्य आहे.

मधुमेहावरील उपयुक्त औषधें

१ **तेलिया अक्षाणा** (भरड)	६० तोळे ३॥ रु.
२ **शिलाजत्वादिवटी** (गोळ्या)	१ तोळा ६ रु.
३ **असनादि अयस्कृति** (पातळ औषध)	४० तो. ३ रु.
४ **वसंत-कुसुमाकर** (गोळ्या)	-।- तो. ७॥ रु.
५ **धात्री-निशावटी** (गोळ्या)	१ तो. १। रु.

याशिवाय गोमयसंस्कृत धान्य इ. मिळण्याची व्यवस्था केली आहे. माहितीसाठीं लिहा.—

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नाशिक

संपादक व प्रकाशक — वैद्य [illegible] आयुर्वेद सेवा संघ, [illegible] विठ्ठलकर कारंजा, नाशिक
मुद्रक—श्री. चिं. ओक, [illegible]कंठ प्रेस, नाशिक.

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

(दरमहा ता. १ व १६ रोजी प्रसिद्ध होते.)

नासिक, ता. १ सप्टेंबर १९५५ (अंक ५ वा

९ वें)

तर प्र. सरकारचें आयुर्वेदास प्रोत्साहन

राज्यपाल मुनशी यांचें भाषण

लखनौ येथें भरलेल्या आयुर्वेदीय परिषदेचें उद्घाटन करतांना उत्तरप्रदेश राज्याचे पाल (गव्हर्नर) श्री. कन्हैयालालजी मुनशी यांनीं आपल्या राज्यांत आयुर्वेदासाठीं सरकार काय करीत आहे याची माहिती दिली. ते म्हणाले:—

"उत्तर-प्रदेश राज्यसरकार आयुर्वेद व युनानी या ना भरपूर-उत्तेजन देत आहे. या विभागाच्या प्रमुख र वैद्यक व आरोग्यखात्यासाठीं एका आयुर्वेदीय डेप्युटी क्टरची नेमणूक सरकारनें केली आहे. राज्यांत एकूण (४६१ आयुर्वेदीय व ८६ युनानी) दवाखाने सर- चालविले आहेत, व त्यांची वेळोवेळीं तपासणी कर- साठीं तपासनीस वैद्य नेमले आहेत. लौकरच प्रांतीय र्वेदीय गॅझेटेड नोकऱ्यांची पद्धत (गॅझेटेड प्रॉव्हिन्शियल र्वेदिक सर्व्हिस) सुरूं करण्यांत येणार आहे.

उत्तर-प्रदेश राज्यसरकारची औषधीनिर्माणशाळा सुमारें ४ लाख रुपयांची आयुर्वेदीय व युनानी चें निर्माण करते.



राज्यपाल श्री. के. एम्. मुनशी

राज्यांत एकूण ५ आयुर्वेदीय व २ युनानी कॉलेजें आहेत. तेथील विद्यार्थी बी आय्. एस्. परीक्षा उत्तीर्ण होतात. शिवाय बनारस हिंदु विश्वविद्यालयाचें आयुर्वेदीय महाविद्यालय व गड मुस्लिम विद्यापीठाचें तिब्बिया कॉलेज ह्या स्वतंत्र शिक्षणसंस्था आहेत. १९५४ च्या ऑगस्टपासून . राज्यसरकारनें लखनौ येथें लखनौ विद्यापीठास जोडलेलें आयुर्वेद महाविद्यालय सुरूं केलें आहे.

उत्तेजनार्थ आर्थिक मदत

खाजगी आयुर्वेदीय वा युनानी व्यवसाय करणाऱ्या वैद्य–हकीमांना आर्थिक मदत देण्या सरकारी योजना सुरू आहे. स्त्री–वैद्य व हकीम यांनीं खेड्यांतून व छोट्या नगरांतून व्यवस करावा यासाठीं सरकारतर्फें उत्तेजन देण्यांत येत आहे.

आयुर्वेदासाठीं ४१ लक्ष रुपये

सरकारची आयुर्वेद व युनानी विद्याशाखा (ॲकॅडमी) आयुर्वेद व युनानीचे अभ्यास-ग्रंथ लिहून प्रसिद्ध करण्याचें कार्य नेटानें करीत आहे. उत्तर–प्रदेश राज्यसरकार आयुर्वेद व युना वैद्यकाची प्रगति करण्याचें कार्य अधिक लक्षपूर्वक करीत आहे ही गोष्ट पुढील घटनेवरून स्पष्ट लक्षांत येईल. १९४७-४८ सालीं उत्तर–प्रदेश सरकार या विभागावर फक्त १ लक्ष २१ हजा सहाशें नव्वद (१२१६९०) रु. खर्च करीत असे. तेंच आतां १९५५-५६ सालीं ४१ ल ७६ हजार आठशें (४१७६८००) रु. खर्च करीत आहे. ८ वर्षांतील ही प्रगति निःसंशय उल्लेखनीय आहे.

सांडू
गोल्ड टॅब्लेटस्
क्षयाच्या प्राथमिक अवस्थेवर
अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्सः —
बी. पी. बर्वे ॲंड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते–मे. पेंढारकर ॲंड को.
मेनरोड, नाशिक शहर

'आयुर्वेदाची सद्यःस्थिति' या निबंधाचे लेख

वै. ग. बा. कामत, आयुर्विद्याविशारद

सवलतीची वर्गणी

आयुर्वेद पत्रिकेची वार्षिक वर्गणी ६ रु. आहे. आर्थिक असमर्थतेमुळें कांहीं लोकांना ती भरणें जड जाते पण पत्रिका मागविणेची त्यांची मनापासून इच्छा आहे, अशा लोकांसाठीं वार्षिक ४ रुपये वर्गणी पाठविण्याची सवलत आयुर्वेद सेवा संघानें ठेवली आहे. गरजू लोकांनीं त्याचा लाभ घ्यावा. —व्यवस्थापक

रसायन-शास्त्राचा अभ्यास

[सोलापूर येथील मान्य गुरु वैद्यराज बागेवाडीकर यांचें नासिक येथील शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत ३/८/५५ रोजीं व्याख्यान झालें. त्याचा विद्यार्थी अ. वि. बाक्रे यांनीं लिहिलेला सारांश.]

विद्यार्थीवर्ग व शिक्षक मित्रहो, खरोखर आज तुमच्या या विद्यालयास भेट देण्याचा प्रसंग म्हणून अतिशय आनंद होत आहे. मुख्या- ांनीं मला द्रव्यगुण वा रसशास्त्र या विषयासंबंधीं यास सूचना केली. पण हे दोन्ही विषय एक- गीं इतके निगडित आहेत कीं, एकासंबंधीं ांना दोन्ही विषयावर बोलल्याचें श्रेय मला र आहे.



व्याख्याते

नऊ द्रव्यांची सृष्टि

'खादीन्यात्मा मनः कालो दिशश्च द्रव्यसंग्रहः। नऊ द्रव्यें मानलीं जातात, व ह्या नऊ द्रव्यां- न जङ्गम अशी सृष्टि निर्माण झाली आहे. ीं पृथिव्यादि पंचमहाभूतांचें द्रव्यत्व आपणांस ें. त्यांचे गौरवादि गुण प्रत्यक्ष दिसूं शकतात. न मनाचें द्रव्यत्वहि सिद्ध करतां येतें. परन्तु र्वेदानें दिक् व काल हीं जीं द्रव्यें मानलीं आहेत तीं द्रव्यें म्हणून पटण्यास व पटविण्यास वेळ लागतो.

काल दिक् हीं महत्त्वाचीं द्रव्यें

रसायनशास्त्रांत काल दिक् हीं अत्यंत महत्वाचीं द्रव्यें आहेत. रसायन तयार करतांनाच काय पण आपल्याला कोणताहि व्यवहार करतांना काल दिक् विचारांत घ्यावींच लागतात. 'यत्राश्रिताः कर्मगुणाः कारणं समवायि यत्।' ही द्रव्याची व्याख्या लक्षांत घेतां काल दिक्चें द्रव्यत्व सिद्ध होतें. काल ही जरी वस्तुरूप स्थिति नसली तरी त्याचा परिणाम कार्य--द्रव्यांत आढळतो. उदा. एक वर्षाचें जुनें आसव व २ वर्षांचें जुनें आसव यांच्या गुणांत फरक पडतो. कित्येक वेळां द्रव्याचा विचार करतांना आपण त्याचे मूल घटक पाहातो व त्याचें एकधेय पाहातो. कालाचा मूल घटक क्षण होय व त्याचें एकधेयहि क्षणच मानलें आहे. क्षणाच्या सातत्यानें काल तयार होतो. व परमाणूंच्या सापेक्ष संबंधामुळें वस्तुरूप द्रव्य निर्माण होतें. काल व दिक् यांना द्रव्य मानून त्याचें महत्त्व ओळखण्यांत आयुर्वेदानें आपलें एक वैशिष्ट्य प्रकट केलें आहे. (एकधेय=युनिट)

दिक् द्रव्याचा विचार

आतां दिक्चा विचार करूं. अमुक दिशेला अमुक ठिकाणीं असा उल्लेख व्यवहारांत अनेक वेळां आपण करतो. तरी आपली दिक्ची कल्पना अगदींच संकुचित असते. दिक् ही स्थानदर्शक व सापेक्ष संबंधदर्शक असते. आतां स्थानाचें महत्त्व काय सांगावयास पाहिजे? स्थानाशिवाय द्रव्य नाहीं. स्थानामुळेंच सजीव--निर्जीव वस्तूंचें मूल्यमापन घडतें. कोणतेंहि रसायन तयार करतांना तें कुपींत करावयाचें कीं खलांत करावयाचें याला जितकें महत्त्व असतें तितकेंच महत्व तें दगडी खलांत करावयाचें कीं लोखंडी खलांत

झालाहि असतें. द्रव्याच्या दिशेवरून, दिशाभेदावरून त्याचें परत्वापरत्व ठरवितां येतें. कज्जली कुपींत द्रवरूप होऊं लागली म्हणजे ती कुपींत वरवर चढूं लागते व तिचे कांहीं कण वर तोंडावर बसूं लागतात, कांहीं कण इतर ठिकाणीं बसतात. अशा रीतीनें अधोगामी, उर्ध्वगामी अशा परमाणूंच्या सहा गति अथवा दिशा असतात. पण कुपीचे तोंडावर जे कण बसतात ते सर्व एकाच तऱ्हेचे असतात. यावरून परमाणु हे सजातीय परमाणूंशीं मिसळतात असेंहि आढळून येईल.

परत्व--अपरत्व विचार

रसायनें तयार करतांना नुसत्या काल--दिकूला महत्त्व देऊन भागत नाहीं, तर परत्वापरत्व यांचाहि विचार करावा लागतो. उदा. सूतशेखर तयार करतांना पारा, सुवर्णभस्म, टाकणखार इ. १७ द्रव्यें वापरावीं लागतात. पण ज्यानें हा पाठ सांगितला त्यानें हींच १७ द्रव्यें कां वापरलीं असावीं ? अर्थात् ह्या ठिकाणीं परत्वाचा (श्रेष्ठत्वाचा) विचार केला गेला असला पाहिजे. उदा.-- ह्या ठिकाणीं प्रथम पारा घेण्यास सांगितला आहे. आतां पारा श्रेष्ठ कां ? पारा प्रत्येक रसायनांत वापरला आहे तो कां ? कारण त्यानें इतर कोठच्याहि द्रव्यापेक्षां उत्तम प्रकारें देहसिद्धि होते. सर्व पार्थिव द्रव्यांत पाऱ्यामध्यें विकृति थांबविण्याचें सामर्थ्य अधिक आहे. निरीक्षण करणारानें बघितलें कीं, वनस्पतीचें, फळांचें, त्याचप्रमाणें इतर प्राण्यांचें पतन होत असतां (वृद्धिक्षय होत असतां) पारा स्थिर राहातो. जशेच्यातसे कायम राखण्यास मदत करतो, व म्हणूनच पाऱ्याला एवढा मान मिळाला. त्याचप्रमाणें इतर द्रव्यांचाहि विचार झाला असला पाहिजे.

सूतशेखरांतील द्रव्यें

द्रव्याच्या परत्वाचा विचार करतांना साहजिकच द्रव्याचे ठिकाणीं असलेल्या पंचमहाभूतांचे संयोगी--वियोगी--करण्याचा विचार करावा लागतो. तसेंच द्रव्यावर संयोग संस्कारांचाहि परिणाम घडत असतो उदा. सूतशेखरमध्यें १७ द्रव्यें सांगितलीं आहेत. पण आपण जर त्यांतील प्रत्येक द्रव्य घेऊन त्याचे वर्ग पाहून लागलो तर निम्याहून अधिक द्रव्यें उष्णवीर्य दिसतात. परन्तु सूतशेखरची मात्रा मात्र आम्लपित्तावर देतात.

द्रव्यांतर होत नाहीं

असें जरी असलें तरी द्रव्य आपली मूळ जाति सोडत नाहीं असें दिसून येतें. पार्थिव द्रव्य कधींहि आप्य होत नाहीं. लाह्या तयार होतांना जरी द्रव्य-घटना बदलली असें वाटलें तरी ते संस्कारामुळें गुणांतर होत असतें.

रूपरसजनक पाक

रससिंदूर तयार होत असतां अग्नि कमीअधिक झाल्यास त्याचे गुणधर्म योग्य ते मिळत नाहींत. कित्येक वेळां रूपजनक पाक योग्य दिसला तरी रसजनक पाक मात्र बरोबर नसतो. उदा० एकादां कच्चा आंबा आढींत घातल्यास त्याला पिवळा रंग येतो पण त्याची चव मात्र आंबटच राहाते. कारण ह्या ठिकाणीं रसाचा पाक झालेला नसतो.

कार्यावरून गुणांचें अनुमान

सुवर्ण हें मधुर रसाचें म्हणून सांगितलें जातें पण त्याचा तुकडा कधींहि गोड लागत नाहीं. तर

-: वैद्यांस प्रॅक्टिसमध्यें उपयुक्त ग्रंथ :-
" ॲलोपॅथिक चिकित्सासंग्रह "
यांत सुमारें ७० रोगांची पाश्चात्य चिकित्सा थोडक्यांत दिली असून त्यांत ३४० प्रिस्क्रिप्शनें व इंजेक्शनेंहि दिलीं आहेत. ॲलोपॅथिक ज्ञानांत वाढ होण्यासाठीं अत्यंत आवश्यक ग्रंथ. आजच मागवा. किं. ४॥ रु. ट. खर्च निराळा.
प्राप्तिस्थळें:- १ वैद्यक ग्रंथ भांडार - नाशिक
२ डॉ. मोकाशी जे. बी - ठाणे

…पोटांत घेतल्यानंतर, गोड खाल्ल्यावर जसे सृष्ट-…वादि परिणाम होतात तसे परिणाम होतात …न तें मधुर रसाचें मानलें आहे.

रसायनानें जीवनमुक्ति

आतांपर्यंत आपण रसायनशास्त्रांत ज्या गोष्टींना …त असतें त्यापैकीं कांहीं गोष्टींचा विचार केला. …यनशास्त्र हें बौद्ध काळानंतर निर्माण झालें असावें. …वेळच्या समजुतीप्रमाणें मोक्ष हा मेल्यानंतर मिळतो …र जीवन सुखानें घालवयाचें असेल म्हणजे …वरची ' जीवनमुक्ति ' हवी असेल तर त्यावर …सेवन हाच उपाय आहे. व आज रसायना…ने आयुर्वेदाला महत्त्व प्राप्त झालें आहे. असो. …त्राचा विचार करतांना अजून बऱ्याच गोष्टी …ल्या आहेत त्यांचा विचार पुढें केव्हांतरी करूं.

आरोग्य आघाडीवरील प्रगति

भारत सरकार काय करीत आहे ?

जुन्या परंपरांस आणि अितिहासास धरून भारत …सरकारनें राष्ट्रीय आरोग्याची बाजू आपल्या दृष्टी-…समोर ठेवली असून सामान्य नागरिकांस आरोग्य-…रक्षण करण्यासाठीं निरनिराळ्या रोगांविरुद्ध अनेक …योजना व मोहिमा सुरूं केल्या आहेत.

याशिवाय पाश्चात्य पद्धतीनुसार चालणाऱ्या संशोधनसंस्था, पाणी-पुरवठा, स्वच्छता, मलेरिया-नियंत्रण कार्यक्रम, क्षयरोग आघाडी, हत्तीरोग हा डांसांपासून उद्भवतो व मलेरियाचे खालोखाल …चाहि प्रसार देशांत आहे म्हणून त्याबद्दलची संशोधनकेंद्रें सुरूं केलीं आहेत. कुष्ठरोग्यांबद्दलची योजना पहिल्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करून त्यासाठीं ३० लाख रु. खर्च करण्याचें ठरविलें आहे.

देशी औषधीपद्धतींबाबत संशोधन

देशी औषधीपद्धतींत संशोधन करण्यासाठीं भारत सरकारनें जामनगर येथें अेका मध्यवर्ति संस्थेची स्थापना केली आहे. ही संस्था आयुर्वेदाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत संशोधन करण्याबरोबरच वेद, उपनिषदें, पुराणें इ.तून रक्तक्षयासंबंधींच्या उल्लेखांसाठीं वाङ्मयीन संशोधनहि करते. तसेंच या संस्थेंत रक्तक्षयावर उपचार करण्यांत कोणत्या वनस्पती वापराव्यांत ह्यासंबंधींहि संशोधन चालू आहे.

आरोग्य केन्द्रांची स्थापना

पहिल्या पंचवार्षिक योजनेनुसार निरनिराळ्या राज्यांतील निवडक राष्ट्रीय विस्तार विकास गटांत ८४ आरोग्य-केन्द्रें उघडण्याची अेक योजना आंखण्यांत आली आहे. या योजनेस ५० लाख रु. खर्च येईल.

एक सूचना

सदर योजनेनुसार उपरोक्त गटांतील जनतेस आरोग्याच्या सोयी करून देण्यासाठीं अनेक केन्द्रांची स्थापना होत आहे. त्यांतहि सरकार आयुर्वेदीय पद्धतीनुसार चालणारीं अशीं कांहीं केन्द्रें उघडण्याची योजना जर हातीं घेईल तर त्यापासून जनतेचा व आयुर्वेदशास्त्राचाहि विकास करण्याचें श्रेय पदरीं पडेल.

अभ्रकभस्माचा नवीन उत्कृष्ट
पर्पटी कल्प
गगनपर्पटी

या औषधाचा पाठ ' अनुभविक औषधें ' [लेखकः– यादवजी त्रिकमजी आचार्य] या पुस्तकांत अतिसार-ग्रहणी चिकित्सेंत दिला आहे. [पृष्ठ ४५]

अनुपानः– मध, दूध, ताक, डाळिंबाचा रस

पावसाळ्यांत त्रास देणाऱ्या अग्निमांद्य, जुनाट संग्रहणी, खोकला, दमा, राजयक्ष्मा यावर उपयोगी पडते. अनुभव घेऊन खात्री करा.

किंमत १ तो. ४ रु., ।।· तो. २ रु.

आयुर्वेद औषधीभवन, नासिक

बालरोगावरील होमिओपॅथिक औषधें

— नित्योपयोगी व गुणास उत्तम —

(१) **वर्म पिल्सः**— वरचेवर पोटांत कृमि अगर जंत होणाऱ्या मुलांना गुणकारी. बाटली किं. ०–१२–०

२) **स्लीप पिल्सः**— चिरचिऱ्या व स्वस्थ झोंप न येणाऱ्या मुलांना हितावह. मूल उत्तम झोंपूं लागतें व औषधाची संवय लागत नाहीं. बाटली किं. ०–१२–०

(३) **डायरिया पिल्सः**— पुष्कळ वेळां शौचास होणें, पुष्कळ दुग्धयुक्त, कधीं पातळ कधीं घट्ट, अगर फेसाळ असें शौचास होत असल्यास उत्तम उपयोग होतो. बाटली किं. ०–१२–०

(४) **ईअर पिल्सः**— कान फुटणें, दुखणें, लाल होणें, सुजणें, पूं अगर पाणी येणें इ. विकारावर. बाटली किं. ०–१२–०

(५) **स्किनो पिल्सः**— सर्व तऱ्हेच्या त्वचारोगावर उपयुक्त व प्रभावी औषध. बाटली किं. ०–१२–०

(६) **कफ पिल्सः**— सर्दी, पडसें, खोकला, वरचेवर शिंक येणें, डांग्या खोकला यांवर उत्तम औषध. बाटली किं. ०–१२–०

(७) **टॉनिक पिल्सः**— शारीरिक व बौद्धिक वाढ प्रमाणशीर न होणाऱ्या मुलांना उत्तम भूक व झोंप चांगली लागून मूल बाळसेदार होऊं लागतें. बाटली किं. १–०–०

(८) **रिकेट्स्ः**— हा रोग साधारणपणें मूल सहा महिन्यांचें झाल्यानंतर लक्षांत येतो. हाडें बारीक व मऊ, डोकें मोठें, शरीराच्या मानानें पोट मोठें, हाडाचीं टोकें मोठीं झालेलीं, टाळू नीट भरत नाहीं, डोक्यास घाम येतो, इत्यादि लक्षणें दिसूं लागतात. ह्या औषधानें असें मूल, चांगलें सुधारतें बाटली किं. १–०–०

तज्ज्ञ डॉक्टरकडून काळजीपूर्वक चिकित्सा केली जाते.

चिकित्सा वेळः– दु. १ ते ४॥

होमिओ लॅबोरेटरी

१७८ न्यू चर्नीरोड,
प्रार्थनासमाज,
मुंबई नं. ४

दंतवैद्य जायदे यांचीं पत्रें–१

दर सहामहिन्यांनीं दांतांची तपासणी

इंडियन टूरिस्ट ऑफिस
न्यू यार्क

सा. न. वि. वि.

पत्रिकेचा प्रेमळ निरोप ' शुभास्ते पंथानःसन्तु ' मुंबईहून दि. २ रोजीं रात्रीं विमानानें निघालो दि. ५ रोजीं रात्रीं १।३० वाजतां सुखरूप लो.

विमान सकाळीं ८ च्या सुमारास कैरोंत लें. कैरोविमानतळावर कैरो निवासीयांनीं आम्हाला ळी पौर्णिमेनिमित्त ?] मेजवानी (Break st) दिली. त्यानंतर ९ वा. पुनः उड्डाण सुरूं कैरो शहर व आसपासचा प्रदेश विशेषतः नदीचें खोरें फारच रमणीय दिसलें. इतरत्र मरुप्रदेश (वालुकारण्य) व त्यांतून तेल वाहून नळ दृष्टीस पडले.

एक वाजण्याच्या सुमारास विमान भूमध्य ओलांडून रोमशहरावरून विमानतळावर लें. रोम शहराचा विहंगम देखावा फारच मनोहर तेथें रोमन थाटाचें भोजन होतें.

२।३० वा. विमान पुनः घरघरूं लागलें. अनेक प्रदेशावरून, जंगलावरून पर्वत–राजीवरून मान ५।३० वा. जिनेव्हाला पोंचलें. जिनेव्हास तरराष्ट्रीय (International) विमानतळ सून तेथें सर्व राष्ट्रांतील विमानें व लोक आढळले. थोडा फराळ करून पुनः विमानांत बसलो.

लंडन येथें २ दिवस मुक्काम

रात्रीं ७ वा. विमान लंडन शहरावर आलें राचा विस्तार संध्या–प्रकाशांत स्पष्टपणें व भव्य दिसून आला. विमानतळ फारच विस्तीर्ण व णीय वाटला. हॉटेल रसेल मध्यें २ दिवस मुक्काम वा लागला. लंडन शहर अफाट वाटलें. थेम्स-झुलता पूल, भव्य प्रार्थनालयें, लंडन विद्यापीठ, मिनिस्टर अॅबे, पार्लमेंट, बकिंगहॅम राजवाडा इ. प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं. इंडिया हाऊसमध्यें अनेक भारतीयांना भेटलो. कांहीं अधिकारी मंडळीबरोबर दंतवैद्यकावर चर्चा केली.

दि. ५ रोजीं सकाळीं P. A. A. विमानानें लंडन सोडलें. व रात्रीं ९ वा. न्यूयार्क गाठलें. रात्रीं ११ वा. विजेच्या दिव्यांच्या झगझगाटानें न्यूयार्क शहरची शोभा व विस्तार पाहातां आला.

येथील भारतीय श्री. मराठे, श्री. वाजपेय, रामकृष्ण मिशनमधील मंडळी, न्यू इंडिया हाऊस–कॉन्सलेट जनरल फॉर इंडिया, इंडियन ऑफीसमधील मंडळी इत्यादींना भेटलो. व कार्यारम्भ कसा करावा त्याची चर्चा केली.

कडक वैद्यकीय नीतिनियम

येथें वैद्यकीय नीतिनियम फारच कडक आहेत. त्यांत अमेरिकन डेन्टल सर्जन्सशीं गांठ. म्हणून अत्यंत सावधपणें पुढें पावलें टाकली पाहिजेत, असाच सर्वांनीं अभिप्राय (हितोपदेश) व्यक्त केला.

अमेरिकेंतील भारतीय वकील मान्य मेहता (वाशिंग्टन)यांच्या भेटीचा निश्चय(Appointment) ट्रंककॉलनें करून घेतला. कारण ते पुढें कॅलिफोर्नियोला जाणार आहेत.

मी उद्या वाशिंग्टनला जाईन. तेथें त्यांना भेटून त्यांच्या सल्ल्यानुसार पुढील कार्यक्रम ठरवीन.

अमेरिकन लोक (सामान्य जनता) फारच सौजन्यानें वागत असल्याचा आतांपर्यंत अनुभव आला. अनेक गोष्टी आपणांस त्यांच्याकडून शिकण्यासारख्या आहेत. विशेषतः कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, दक्षता, चिकाटी, औदार्य, सौजन्य इ. गुण–अर्थात् हा चिमकुलाच अनुभव आहे.

दर सहामहिन्यांनीं दंतपरीक्षण

श्री. ••• हे भारतीय गृहस्थ येथें उत्तमपणें

स्थाईक झाले आहेत. त्यांनीं आपला अनुभव खालील-प्रमाणें सांगितला.

"अमेरिकेंत दंतरोग वाढत चालले आहेत. प्रतिवर्षी डेंटिस्टचें डोईजड बिल भरावें लागतें. मध्यमवर्गीयांना तें असह्य आहे" वगैरे.

प्रत्येक माणसाला विशेषतः विद्यार्थ्यांना दर सहा महिन्याला दंतवैद्याकडून तपासणी करून घ्यावी लागते. त्याच्या सर्टिफिकेटशिवाय विद्यार्थी पुढील वर्गी जाऊं शकत नाहीं. मला सामान्यतः प्रत्येक मुलामागें ५० डॉलर वार्षिक खर्च दांतांकरितां येतो"

तपासणी(check up)चा खर्चः– तपासणी फी २ ते ५ डॉलर्स, एक्सरे (आवश्यक) ५ डॉलर्स, दंतोत्पाटन २ते५ डॉलर्स, दांत बसविण्यास१००–५०० डॉलर्स अशी फी आकारतात. 'इति श्रूयते' नमस्ते.

—पां. वि. जायदे

ता. १० ऑगस्ट रोजीं वैद्य जायदे वाशिंग्टनला पोचले. भारताचे अमेरिकेंतील वकील श्री. गगनविहारी मेहता यांची त्यांनीं भेट घेतली. श्री. मेहता यांनीं वैद्य जायदे यांना जरूर तें मार्गदर्शन व साहाय्य देण्याचें आश्वासन दिलें आहे.

वाशिंग्टनमधील स्वातंत्र्योत्सव

दि. १५ ऑगस्ट रोजीं सायंकाळीं श्रीमान् गगनविहारी मेहता यांनीं स्वातंत्र्योत्सवानिमित्त भारती-यांना मेजवानी दिली. सुमारें २००-२५० मंडळी उपस्थित होती.. श्री. मेहता यांनी एक छोटेंसें भाषण केले. त्यानंतर "पांडित नेहरूंची रशियास भेट" ही फिल्म दाखविण्यांत आली. विशेष आमंत्रणावरून वैद्य जायदे सदर समारंभास हजर होते.

वैद्य जायदे यांनीं डॉ. प्राईस व ब्रिंडले यांना भेटून विचाराविनिमय केला य जार्ज-टाऊन युनिव्हर्सिटीत काम करण्यास प्रारंभ केला आहे.


४० वर्षांवरील अनुभव आणि सर्व देशभर पसरलेल्या नऊ वैद्यकीय प्रयोग शाळांतील वैद्यक शास्त्रीय पंडितांचें कार्य हा जम्मींच्या कीर्तीचा पाया होय.

* जम्मीचा [illegible] रिपोर्ट मागवा

JAMMI'S Livercure SIMPLE
जम्मीज लिव्हरक्युअर

जम्मींचें लिव्हरक्युअर दरवर्षी हजारों मुलांचें यकृताच्या विकृतिपासून संरक्षण करून त्यांना पुनः आरोग्य प्राप्ति करून देतें.

आतां सोयीस्कर आकाराच्या बाटल्या मिळतात

जम्मी वेंकटरमणय्या ॲन्ड सन्स
"जम्मी बिल्डिंग", मयलापूर, मद्रास ४ मुंबई शाखा: 'पारेख मॅन्शन', हॉर्नबाई रोड (पश्चिम)

कांचा पत्रव्यवहार

माती कां खातात ?

(लेखकः-आ. र. सुं. भा. वैद्य मुंबई २)

मुलांच्या अन्नांत तुरट रस कमी म्हणून तीं ती खातात असा आपण निष्कर्ष काढला आहे. र्वे भडभुंज्यांच्या दुकानांत चणेकुरमुऱ्यांबरोबर लेली माती विकावयास ठेवलेली असते. चौकशी ावर समजलें कीं, स्त्रिया ती माती विकत नेऊन तात. हा धंदा मुंबईंत चांगला चालला आहे. स्त्रियांस माती खाण्याचे डोहाळे लागतात. षतः गुजराथी स्त्रिया ही माती जास्त खातात.

मीठ खाणारी मुलगी

आमच्या घरीं एक लहान मुलगी होती विकत आणलेलें व सुपांत ठेवलेलें मीठ मुठींत खात असे. डॉक्टरांना विचारितां ते सांगत गा कमी असल्यामुळें तिच्या शरीरास त्याची लागत असावी. पूर्वी अशी रीत होती कीं, चें लग्न झाल्याशिवाय हिरवी चिंच खावयाची . परंतु आतां पहावें तो हिरव्या चिंचा तयार यास लागल्यापासून विकावयास येऊं लागतात. ाळेंत जाणारीं मुलें विशेषतः मुली त्या विकत खातात. कधीं कधीं मोठ्या स्त्रियासुद्धां हिरव्या चा मोठ्या आवडीनें खात असतांना दिसतात. च आंब्याच्या कैऱ्याहि खातात.

तोंडाला पाणी कां सुटतें ?

णीं हिरवी चिंच किंवा कैरी खात असतांना पाहिलें म्हणजे आपल्या तोंडाला पाणी सुटतें. ळें असें समजावयाचें नाहीं कीं, त्या पदार्थांची ांस जरुरी आहे. परंतु नुसत्या विचारामुळें ्या शरीरावर असा परिणाम होतो ही गोष्ट खरी! दें सुंदर मूल पाहिलें म्हणजे त्यास आपणांस घ्यावेंसें , तसाच हा प्रकार आहे. एकाद्या दगडी वर एक भाताचा दाणा घेऊन घांसतांना पाहिलें आपल्या अंगावर कांटा उभा रहातो. अितर्केंच नव्हे तर नुसतां विचार मनांत आला तरी तसाच परिणाम होतो. विचाराचा परिणाम असा आहे.

तेलतुपाचे पदार्थ

[मुंबईंस व इतर गांवांतहि भाजलेली माती विकत मिळते व ती खाण्याकरितां वापरली जाते हें आम्हांस माहीत आहे. गुजराती स्त्रिया तेलतुपाचे पदार्थ जास्त खातात त्यामुळें तुरट रसाची त्यांची मागणी वाढणें स्वाभाविक आहे.]

मिठाचे गुणदोष

लहानपणीं कांहीं मुलें मीठ खातात हें आम्हीं पाहिलें आहे. खारट हा एक पौष्टिक रस आहे. बालपणींच्या वाढत्या वयांत गोड आंबट खारट हे पौष्टिक रस विशेष आवडतात, अर्थात् प्रमाणाबाहेर माती खाण्यानें ज्याप्रमाणें विकृति संभवते त्याप्रमाणेंच मिठानेंहि होते. पूर्वीचें जीवन श्रमप्रधान होतें, कष्टाचे होतें. म्हशीच्या दुधाचा वापरहि कमी होता. आईचें, शेळीचें दूध पुरेसें मिळे. आतां तें तर नाहींच पण गाईचें सुद्धां मिळत नाहीं. त्यामुळें तुरट रसाची मागणी वाढली आहे. म्हणून हिरव्या चिंचा खपूं लागल्या आहेत.

आपणाला मुलें कां आवडतात

कुर्वते हि रुचिं दोषाः। हा आयुर्वेदीय सिद्धांत आहे. तोंडाला पाणी सुटतें त्याअर्थी ती शरीराची मागणी आहे हें स्पष्ट आहे. सुंदर मूल आवडतें यालाहि शास्त्रीय अर्थ आहे. बालकांचा सहवास हा स्निग्ध व पौष्टिक आहे. त्यामुळें आपली प्रकृति दूधतूप खाल्याप्रमाणें सुधारते. याच्या उलट ताप आला असतां प्राथमिक अवस्थेंत मुलें नकोशीं वाटतात. उ. ज्वराच्या पूर्व स्वरूपांत, 'द्वेषः स्वादुषु भक्ष्येषु तथा बालेषु।' असें लक्षण दिलें आहे. त्याचा अर्थ असा कीं, तापाच्या पूर्वरूपांत गोड पदार्थ नकोसे होतात, तशींच मुलेंहि नकोशीं होतात.

शब्दांची आवड-निवड

कर्कश शब्द न आवडणें हाहि निसर्गच आहे. त्यांत विचाराचा भाग नाहीं. शरीराचें पोषण

मनोहारी गाण्यानें होतें व कर्षण कर्कश शब्दानें होतें. कर्कश शब्दानें शरीरांतील वात प्रकुपित होतो म्हणून अंगावर कांटा उभा रहातो. कर्कश शब्द मुलांना आवडतात म्हणूनच तीं पाटीवर ओरखडे काढीत आवाज करीत बसतात. आयुर्वेदीय विचारसरणी-प्रमाणें शरीरांच्या प्रत्येक आवडीनिवडीला अर्थ आहे. मनाच्या प्रवृत्तींचें सुद्धां वर्गीकरण आयुर्वेदानें ७ सात्विक, ६ राजस, व ३ तामस अशा १६ प्रकारांत केलें आहे. त्याचें शिक्षण जनतेला मिळणें अवश्य आहे. — संपादक]

वाचकांचा पत्रव्यवहार

नळगुदावर शतावरीचा प्रयोग

ता. १६।८।५५ च्या आयुर्वेद पात्रिकेंत एक अनुभव प्रसिद्ध झाला आहे तो वाचल्यानंतर मला जुन्या गोष्टींची आठवण झाली.

काडेचिराईत, शतावरी, पानपिंपळी जल

माझ्याकडे एक जलोदराचा रुग्ण-चिकित्सेकरितां होता. त्यावेळीं सहजासहजीं एक वृद्ध साधु मजकडे आला. त्यानेंहि त्या रुग्णास पाहिलें. त्यानें मला सांगितलें कीं, ‘तुम्ही तुमचें औषध चालूं ठेवा, फक्त मी सांगतो तें औषध रात्रीं एकदां देत जा.’ औषध येणेंप्रमाणें:— काडीचिराईत अर्धा तोळा, शतावरी अर्धा तोळा, पानपिंपळी एक मासा ह्या तिन्ही द्रव्यांचें भरड चूर्ण करून तें रात्रीं २० तोळे पाण्यांत भिजत घालावयाचें व दुसऱ्या दिवशीं सकाळीं तें संस्कृत जल गाळून सदर रुग्णास पिण्यास द्यावयाचें. याप्रमाणें चिकित्सा केली गेली.

१०-१२ जुलाब झाले

त्याचा परिणाम असा दिसून आला कीं, जेथें जयपाळ (जेपाळ) मिश्रित औषधानेंहि २-३ जुलाब मोठ्या मुष्किलीनें होत, तेथें हें वरील औषध दिल्यानें १०-१२ जुलाब मोठ्या सुखानें झाले. जुलाबांत पाण्याचा भाग बराच जात असे. हें औषध मी आणखी दोन दिवस दिलें व वरीलप्रमाणें १०-१२ जुलाब सुखानें झाले. जोडीला दुसरें औषध चालूंच होतें. वरील चिकित्सेनें रोगी बिलकूल चांगला झाला व अद्याप तो हयात आहे.

मी स्वतः अनुभव घेतला नाहीं, परन्तु एक वैद्य महोदयानें मला सांगितलें कीं, नळगुदावर शतावरी हें एक उत्तम औषध आहे. जर कोणी वैद्य महोदयानें शतावरीचा नळगुदावर चिकित्सात्मक अनुभव घेतला असेल तर कृपा करून त्यानें तो आयुर्वेद पात्रिकेंत प्रसिद्धीकरितां जरूर पाठवावा.

र. दास, पाचोरा

तापवून पाण्यांत बुडविल्यानें सुवर्ण हिणकस होतें काय ?

ता. १६ ऑ. १९५५ च्या अंकांत आयुर्वेद पत्रिकेमध्यें वै. श्री. मणूरकर यांचा सुवर्णजला संबंधींचा चिकित्सानुभव वाचला. कल्पना ठीक आहे व हरएक चिकित्सकाला सदरचा प्रयोग करून पाहाण्यालायक आहे.

परन्तु लेखकानें सदर लेखांत एका गोष्टीचा खुलासा केला नाहीं. ती गोष्ट अशी कीं, सोनें वारंवार तापवून पाण्यांत बुडविल्यानें हीनकस होतें किंवा काय ? ह्या गोष्टीचा अनुभव लेखकानें घेतला असल्यास त्याचा खुलासा करावा. र. दास, पाचोरा

पित्त विकार

चालूं शरद्ऋतूमध्यें पित्ताचे विकारांचा उपद्रव होऊं नये म्हणून व गरीबांनाहि भरपूर प्रमाणांत पित्तशामक द्रव्य वापरतां यावें या उद्देशानें आयुर्वेद सेवा संघानें मुद्दाम तयार केलेलें

मुक्ताशुक्ति भस्म

आजच मागवून घ्या. किंमत २ रु. तोळा

आयुर्वेद औषधीभवन, नाशिक

चहा :

लेखकः—

वैद्य य. प्र. उपासनी आयुर्वेदाचार्य

हा हें द्रव्य प्रामुख्यानें शीत व उंच प्रदेशांत होणारें आहे. थंड व उंच प्रदेश अनूप तो. "अनूपं तु कफोल्बणम्"। वाग्भट. 'तत्र शीनिम्नोन्नतनदीवर्षगहनो मृदुशीतानिलो बहु–र्वतवृक्षो……कफवातरोगभूयिष्ठश्चानूपः। सुश्रुत. ल्बण अशी प्रकृति असणारें असें चहा हें द्रव्य आहे.

चहाचें स्वरूप

ह्याचीं पानें व फुलें या स्वरूपांत तो मिळतो. सेंट्रल बोर्डाच्या जाहिरातींत स्पष्ट असें दिलेलें असतें कीं, म्हणजे दोन पानें व एक कळी. ह्याचा अर्थ कीं, पानें व फुलाच्या नाजूक कळया ह्या मिश्र- असतात. अर्थात् पानें व कळया एका विशिष्ट तोडून, त्याच्यावर संस्कारयुक्त पाणी मारून, ठिकाणीं वाळवून, नंतर त्यावर निरनिराळ्या रितां निरनिराळे वासदर्प देण्याची क्रिया होत ते, व ह्या क्रियेनंतर त्या द्रव्याला निरनिराळीं लावलीं जातात.

हें सर्व लिहिण्याचा अर्थ हा कीं, पानें व कळया जे पुष्पें) स्वरूपांत एकत्रित असें हें द्रव्य मिळूं . पान व कुसुम हें द्रव्य पचावयास हलकें तें. कारण पानें व पुष्पें, हीं फल व कंद ह्यांच्या– कितीतरी हलकीं सांगितलीं आहेत.

चहा करण्याची प्रचलित पद्धत

फांट ह्या स्वरूपांत चहा केला जातो. म्हणजे ळत्या पाण्यांत चहाची पत्ती किंवा भुकटी टाकून ५-७ मिनिटें झांकण घालून मग गाळण्यानें फडक्यानें गाळून नंतर त्यांत दूध साखर टाकून ची रीत आहे. ही शास्त्रीय रीत मानली गेली हे. पण सामान्य कोट्यवधि जनतेला असा पद्धत- र चहा कधींच मिळत नाहीं. आपल्या देशांत री चहा करण्याची विकृत पद्धत आहे. मजूर शेतकरी ह्या लोकांत चहाचा कषाय (काढा) केला जातो. तो असाः– भरपूर साखर, दूध, चहा (पावडर किंवा पत्ती) व पाणी उकळून नंतरच त्यांचें पान केलें जातें ही सत्य गोष्ट आहे. ही विकृत पद्धत दोषकारक आहे. चहांतील दोष ह्या कषायकृतीमुळें त्या पेयांत उतरून शरीरावर अनिष्ट परिणाम करणारे आहेत. बहुतेक "आरोग्यभुवनामध्यें" वरील कषाय पेयच मिळतें.

चिनी पध्दत

निरनिराळ्या देशांत चहा करण्याच्या पद्धतींत फरक असावा. चीन सारख्या अफाट देशांत चहा हें पेय कोरें (दुग्धशर्कराविरहित) घेतलें जातें. त्याचा कषाय केला जातो. पिढ्यान् पिढ्या असाच चहा पितात. परंतु चहामुळें तेथील जनतेवर अपायकारक परिणाम झालेला दिसत नाहीं. चहा, मासे, व भात खाऊन सर्व जगांत काटक असा चिनी गृहस्थ ओळखला जातो. ह्या काटकपणाचें कारण निराळें असेलहि, त्याचा विचार करण्याचें हें स्थान नाहीं. तथापि चहा अत्याधिक्यानें पिणारे हे लोक आहेत म्हणून येथें उल्लेख केला.

रस–विचार

पर्णपुष्पयुक्त चहाचा रस कडू (तिक्त), अनुरस मधुर व कषाय असावा. तिक्त रस हा पत्ती भुकटीचा आहे. जर ही खाल्ली तर त्यामुळें वमन होईल पण त्याचा फांट करून घेतला तर तो रोचक होतो, हें अनुभवसिद्ध आहे. रोचक हें कार्य मधुर अनुरसाचें आहे. मधुमेही लोक साखरेशिवाय चहा घेतात. त्यांना तो मधुर व रोचक असा वाटतो. (वैद्यराज श्रीमान् डेग्वेकरशास्त्री कोरा चहा मोठे दोन कप घेऊन "वा, छान, चांगला झाला!" असे उद्गार काढतात. म्हणजे चहांतील तिक्तता व मधुरता ही रोचक आहेच;) साखर–दूध ह्यामुळेंच चहांत माधुर्य येत नसून चहाच्या स्वरसाचा रोचकपणा असल्यामुळें तो प्रिय वाटतो.

रसनाग्राही तिक्त मधुर कषाय हे रस आपल्या गुणाप्रमाणें कार्यकारी आहेत. ते चहांत असोत किंवा कोणत्याहि द्रव्यांत असोत, त्यांचीं कार्यें हीं होत राहातात. ह्या रसांचीं कार्यें मुखांतर्गत सर्व अवयवांवर होतात. जिव्हा, दंत, बोधक कफ, कंठ ह्यांतील कफ, पित्तरक्त विकृति नाहींशी करणारें हें द्रव्य आहे. अरोचक, मुखपाक, दंतचाल वगैरे रोगांवर हें उपयुक्त ठरतें. अर्थात् प्रकृतिभेदानें हें द्रव्य कार्य करीत असावें.

तिक्त रसानें चहा हा कफपित्तज्वरांत उपयोगी पडतो. ज्वराच्या प्रथम अवस्थेंत चहा कॉफी वगैरेवर आमज्वरी *रोग्यास ठेवतात हें आपण नेहमीं पाहतो. ह्याचें कारण कीं, चहाचें लघु व सात्म्य द्रव्य हल्लींच्या युगांत झालें असल्यामुळें वाईट परिणामहि होत नाहीं.

वीर्य–विचार

चहाचें वीर्य शीत असावें. चहाचें (पिर्णें) पान इषत् उष्ण केलें जातें व चहापानाचा काल बहुधा कफवात काल असतो. साधारणतः तिक्त, मधुर, कषाय रसांच वीर्य शीतच असतें. परंतु चहा हें द्रव्य उष्ण वीर्य वाटण्याचा संभव आहे. कारण हें उष्ण पेय आपल्या देशांत घेतलें जातें व चहा घेतल्यानंतर सर्व शरीरभर उष्ण असा अनुभव, कान चेहरा वगैरे लाल झाल्यासारखें वाटतें. शरीर उत्तेजित झाल्यासारखें वाटतें. घर्मपिडांवराहि चहाचें इषत् उष्णत्व प्रतीत होतें. तरी तो शीतच आहे. चहाची उत्पत्ति शीत प्रदेशांत व जलीय द्रव्योद्भव असल्यामुळें शीतवीर्यच संभवते.

असाहि विरोधाभास दिसून येतो कीं थंड प्रदेशांतील लोक एकाच वेळीं ७/८ कप चहा पितात असें कळलें आहे. व असा नेहमीं घ्यावा लागतो त्या शिवाय त्यांना बल वाटत नाहीं, उत्साह येत नाहीं काम करवत नाहीं असाहि अनुभव आहे. बल टिकविण्यांकरितां शीतवीर्याची जरूरी असते. म्हणून शिशिर वीर्यच मानावें लागतें.

विपाक विचार

चहा पेय आमाशयांत गेल्यावर जें रसांत होतें त्याला चहाचा विपाक म्हणावा लागेल. हें रसांतर आमाशयांत होतें व तिक्त होतें. ह्यांत थोडा विशेष वाटेल, पण जर चहा घेतल्याबरोबर वमन झालें किंवा करविलें तर तिक्त असा विपाक अनुभवास येतो. कारण आमाशयांतील पाचक रसांचें कार्य चहावर होणार आणि तें तिक्तरसात्मक असल्यामुळें तिक्त पदार्थ बाहेर येणार म्हणून तिक्त असाच विपाक संभवतो.

दुसरें असें कीं, फांट स्वरूपांतील चहा द्रव्य आमाशयांतूनच विवेचित केलें जातें. तें द्रव्य अधःकोष्ठांत जात नसावें. ह्या विवेचनामुळें मधुर अम्ल कटु असा विपाक संभवत नाहीं. जर द्रव्य अधःकोष्टांत जातच नाहीं तर त्याचा विपाक तिक्त स्वरूपांत शरीरांत जात असावा. जल व शर्करा हीं आमाशयांतून स्रोतसें वेंचून घेतात. त्याबरोबर चहाचे जलरूप सूक्ष्म परिमाणु आमाशयांत शोषले जात असावेत.

अशीं विवेचित द्रव्यें आमाशय ह्या अवयवांवर बल्य व प्रसादक कार्य करीत असतात व अवयवांचें कार्य चांगलें ठेवीत असतात. आमाशयोद्भव क्लेदक कफ आधिक्यानें कार्यकारी करणारें हें द्रव्य ठरतें, ह्याकरितां हें द्रव्य दीपकपाचक आहे.

आधिक्यानें हें द्रव्य घेतलें गेलें तर त्याचा परिणाम ह्या आमाशयावर वाईट होईल, परन्तु नियमानें घेतलें तर व चहापानाबरोबर लघु आहार केला तर ह्याचें कार्य दीपकपाचक असेंच होतें.

प्रभाव विचार

चहाचा प्रभाव सर्व जनतेवर फार मोठा आहे. लहान शेतकऱ्याच्या झोपडीपासून तो श्रीमंताच्या बंगल्यापर्यंत हा प्रभावी व प्रतापी ठरला आहे. तरी

---

* पण हा व्यवहार अशास्त्रीय आहे यामुळें ज्वर दीर्घ काल चालतो व आमविकार निर्माण होतो. संपादक)

हे रसायन, प्रकृतिसम ठेवणारें, त्रिदोष जिंकणारें
आहे. विशेषतः मास्तिष्कशैथिल्यावर बल्य असा
होतो. साधारणतः वातकाळीं ह्याचें पान केलें
त्यामुळें उत्साह–जोम येतो, व कार्य--शैथिल्य
होतें. ज्ञानेन्द्रियें व मन ह्यांचा संयोग चांगला
तर कार्य चांगलें होतें. हा संयोग उत्तम घड-
आणणारें द्रव्य " चहा " समजलें जातें म्हणून
गांतील " अमृत " असावें कीं काय अशी
येते. शिष्टाचार व सभासंमेलनें ह्यामध्यें चहा-
अग्रस्थान आहे. पंतप्रधानापासून तो झोपडींत
अतिथी (पाहुणा) पर्यंत आदरसत्कारांत
उपयोग सर्रास केलेला आढळतो.

सप्त धातूवरील परिणाम

रसधातूवर चहाचें कार्य काय होत असावें हें
हें द्रव्य जलीय असल्यामुळें व तिक्तमधुर असले-
रसधातूचा धात्वग्नि प्रज्वलित करण्याचें कार्य
असावें. म्हणजे रसधातूचें पोषण व वर्धन
शक्य आहे. धात्वग्नि चांगला असला कीं,
धातूची क्रिया व पोषण उत्तम झालेलें
. ह्यास्तव रसविकृतीवर उपयुक्त ठरणारें हें
आहे. रसाचा आम (धात्वग्नि क्षीण) असला तर
उज्ज्वल (संधुक्षण) करणारें हे ठरेल. रसाशेषा-
आमजन्य रोग, आमपाचन वगैरे नाहींसे
चहा द्रव्य ठरावें. रसांतून रक्तनिर्मिति चांगल्या
बनविणारें चहा हें द्रव्य ठरेल. ह्यांत साखर
ज्या प्रमाणांत असेल तसें कार्य रसधातूवर

रक्ताच्याहि विकृति नाहींशा करून बल्य कार्य

मांसभेदः–ह्यांतील क्लेदविकृति नाहींशीं होऊन
ठरेल.

अस्थीवरः अण्वस्थींतील रक्तनिर्मिति होत
तेव्हां जीवनीय रक्त हें द्रव्य निर्माण करील.
मकहि ठरेल.

मज्जा:-- मेंदूला उत्तेजन, सर्व शरीरावर उत्साहवर्धक, इंद्रियें कार्यप्रवण करणारें द्रव्य ह्यांत आहे, म्हणून चहा घेतल्यावर कार्यशैथिल्य नाहींसें झालेलें दिसते.

शुक्र:- पुष्पांतील पराग चहांत असतात. पराग हें वनस्पति शुक्र आहे. परागामुळेंच फळें निर्माण झालेलीं असतात. तर हें वृष्य व शुक्रवर्धक असावें कीं काय ह्याची शंका येते.

साधारणतः हें द्रव्य सर्व धात्वाग्निवर्धनाचें कार्य करणारें ओळखलें जाणें शक्य आहे.

[चहा या द्रव्याच्या गुणकर्माविषयीं अधिक साधक–बाधक चर्चा व्हावी या उद्देशानें हा लेख छापण्यांत आला आहे. या लेखांत अनेक पूर्वपक्ष करण्यांत आले आहेत. त्यांना अनुभवाच्या आधारावर उत्तरें देऊन चहाचे गुणधर्म आपण निश्चित करावयाचे आहेत. अनूप देशांत होणारीं सर्वच द्रव्यें कफवातवर्धक असतात असें नाहीं. मासे हे पाण्यांत होतात पण ते उष्णवीर्य आहेत. उष्णाः मत्स्याः। चहाचे रस प्रसिद्ध आहेत पण त्यांचें वीर्य कोणतें या विषयीं तीव्र मतभेद आहेत. चहा हा उष्णवीर्य आहे असा सार्वत्रिक समज आहे. पण त्याचे कषाय तिक्त हे रस व दूधसाखर हीं संयोगी द्रव्यें शीतवीर्यत्व सुचवितात. तरी याविषयीं निर्णय होणें जरूर आहे. बर्फ घालूनहि चहा पिण्याची पद्धति आहेच. सबब चहाचें कार्य उष्णता अगर शीतता देण्याचें नसून कषाय तिक्त रसाची जोड देणें हें असावें.

चहाबरोबर दूध साखर हीं द्रव्यें वापरावयाचीं ती तितक्याच प्रमाणांत असावीत कीं, त्यामुळें उरः, कंठ शिर या कफस्थानांत कफसंचय होण्याची प्रवृत्ति निर्माण होऊं नये. ज्या चहा पिणाऱ्या लोकांना तपकीर, सिगारेट (विडी), वा पान यांचा बारंवार उपयोग करण्याची आवश्यकता भासते त्यांचे चहापान हें स्वास्थप्रद नाहीं असेंच मानावें लागेल. चहा कॉफी, आदि पेयाविषयीं शास्त्रीय चर्चा करणारे लेख अभ्यासू लोकांनीं अवश्य लिहावेत. त्यांना पत्रिकेंत जरूर प्रसिद्धि मिळेल.

संपादक]

ठिकठिकाणीं स्वास्थ्य–केंद्रें निर्माण करा

नागपूर येथील मध्यप्रदेश अग्रगामी वैद्य-मंडळाचे अध्यक्ष आयुर्वेदाचार्य पं. गुलराज शर्मा मिश्र यांनीं मध्य-प्रदेश सरकार आयुर्वेदाला प्रोत्साहन देत असल्याबद्दल त्यांचे आभार मानते समयीं एक विशेष व महत्वपूर्ण सूचना करून सरकारकडे कांहीं मागण्या केल्या आहेत. तत्संबंधीं त्यांनीं केलेल्या निवेदनाचा सारांश खालीं दिला आहे.

नागपूर हें मध्यप्रदेशाच्या राजधानीचें शहर आहे. मध्यप्रदेश सरकार गेल्या कांहीं वर्षांपासून आयुर्वेदाच्या उन्नतीकरितां आस्थेवाईकपणें झटत आहे व ह्यामुळें आयुर्वेदाचें भवितव्य उज्ज्वल झाल्याशिवाय राहणार नाहीं. प्रांतीय सरकार आयुर्वेदाकरितां जें कांहीं करीत राहील त्यास आयुर्वेद–विद्वानांचा सहयोग अत्यावश्यक आहे. मध्यप्रदेश अग्रगामी वैद्य मण्डळाच्या संमेलनानें नागपूरमध्यें एक आयुर्वेद महाविद्यालय स्थापन व्हावें असा ठराव केला आहे. प्रांत सरकार जर ह्या कामीं शीघ्रतेनें पाऊल टाकील तर प्रांताची एक मोठीच उणीव दूर होईल.

त्याचबरोबर त्यांनीं सरकारचें लक्ष 'प्रांतीय वैद्यांनीं प्रांतांत आयुर्वेदीय चिकित्सालयें असावीं' अशी जी मागणी संमेलनांतील एका ठरावान्वयें सरकारकडे केली त्याकडे वेधलें आहे. अशा चिकित्सालयांमध्यें अंतःप्रविष्ट व बाह्य रुग्णचिकित्सा अशा दोन्ही सोयी असाव्यात व प्रत्येक चिकित्सालयांत कमींत कमी १०० रुग्ण–शय्यांची तरी सोय असावी. प्रथमतः अशीं चिकित्सालयें प्रांतांतील नागपूर, अमरावती, जबलपूर व अकोला ह्या चार प्रमुख शहरीं काढावीं व नंतर त्यांची वाढ क्रमशः करावी.

अग्र. वैद्य मंडळाच्या संमेलनांतील दुसऱ्या एका ठरावान्वयें सरकारतर्फे प्रांतांत कामगार-विमायोजनेनुसार चालू होणाऱ्या चिकित्सालयांमध्यें आयुर्वेदीय चिकित्सेलाहि स्थान मिळावें अशी मागणी करण्यांत आली आहे. आशा आहे कीं, सरकार समयोचित पाऊल टाकून जनतेला आयुर्वेदीय चिकित्सेचा लाभ मिळण्याची संधि प्राप्त करून देईल.

आवश्यक व इष्ट चिकित्सापद्धति

" आयुर्वेदीय चिकित्सापद्धति ही ह्या देशांतील जनतेस अत्यंत आवश्यक व इष्ट अशी आहे, ह्या वस्तुस्थितिनिष्ठ गोष्टीची जाणीव वैद्यवर्गानें जेव्हां जेव्हां त्यांना तशी संधि मिळेल त्या त्या वेळीं जनतेला प्रखरतेनें करून देण्याचा प्रयत्न करावा."

" आयुर्वेद ही भारतीयांची पुरातन चिकित्साप्रणाली आहे. अन्य चिकित्सापद्धतींचें ज्ञान दुर्बोध व अतिशय खर्चाचें आहे, परंतु त्याच्या उलट आयुर्वेदांत विशाल ज्ञान–संपत्ति असून ती सामान्य बुद्धीच्या माणसालाहि सहज प्राप्त करून घेऊन उपयोगांत आणण्यासारखी आहे. माझी समस्त वैद्यवर्गास अशी हार्दिक विनंति आहे कीं, त्यांनीं आपसांतील द्वेषभाव विसरून जाऊन जनतेच्या सार्वत्रिक आरोग्यरक्षणाच्या ध्येयदृष्टीनें एकत्र येऊन आपली संघटना बलवान् करावी व प्रांतांत ठिकठिकाणीं सार्वजनिक स्वास्थ्य-केंद्रें उघडावींत. अशीं स्वास्थ्य–केंद्रें प्रांतीय संघटनेच्या सल्ल्यानुसार जिल्हा, तालुका व ग्राम निहाय स्थानिक वैद्य मंडळाच्या साहाय्यानीं सुरूं करण्यांत यावींत."

" वरील स्वास्थ्यकेंद्रयोजनेबाबत म. प्रां. वैद्य-मंडळानें एक योजना आंखली असून ती लवकर कार्यान्वित कशी करावी ह्याबाबत सध्यां प्रांतीय वैद्य-वर्गात विचार विनिमय चालूं आहे. मला आशा आहे कीं, सर्व वैद्य–संघटना व स्वास्थ्येच्छु जनतेचें ह्या कामीं जरूर सहकार्य मिळेल. मी प्रांतातील सर्व वैद्यबंधूंना फिरून एकदां आग्रहाची विनंति करतो कीं, त्यांनीं आपल्या शारीरिक व मानसिक उत्साहाचा व वैद्यकीय ज्ञानाचा जनतेला अधिकाधिक लाभ मिळवून देण्याच्या हेतूनें पुढें यावें.

आयुर्वेदाची सद्यःस्थिति

[लेखकः- वै. ग. बा. कामत आयुर्विद्याविशारद (पुणें), संगमेश्वर जि. रत्नागिरी]

[मागील अंकाचें पान १०४ वरून पुढें चालू]

३) आजची अध्यापन व्यवस्था

कोणत्याहि शास्त्राच्या परिस्थितीचें विवेचन करतांना त्याच्या अध्ययनाच्या व्यवस्थेचा विचार विशेष महत्वाचें असतें. किंबहुना त्या शास्त्राच्या महत्वाचें खरें मूल्यमापन यावरून होत असतें. शास्त्राचा टिकाऊपणा आणि जनतेची आस्था या दोन गोष्टी अध्यापनाच्या व्यवस्थेवरूनच लक्षांत पूर्वींच्या काळीं आयुर्वेदाचीं मोठमोठीं विद्यालयें होतीं, हें इतिहासावरून समजून येतें. पण अलीफार मोठ्या कालखंडांत तीं तशीं असल्याचें आढळत नाहीं. आयुर्वेदाचें शिक्षण गुरुमुखांतूनच असें आणि हें सुद्धां अगदीं स्वतंत्रपणें न होतां, न्याय, मीमांसा, व्याकरण अि० शास्त्राबरोबरच आयुग्रंथ पाठ केले जात असत. व त्यानंतर अगर त्याच काळांत गुरुच्याच घरीं येणारे रुग्ण पाहून तयार होणारीं औषधें पाहून प्रत्यक्षाचें शिक्षण घेतलें जात असें. परन्तु या काळांत मुख्यतः वैद्यकाचे ग्रंथच पाठ करून घेण्यापलिकडे फारशी मजल जात नसे. हें गुरुपरंपरेचें जसें वैगुण्य तसाच गुरुएक मोठा गुणहि आहे. आणि तो म्हणजे गुरुपरंपरेंत आजच्या विद्यालयांतील अध्यापनाच्या प्रमाणें भाडोत्रीपणा नसे. गुरु आपल्या शिष्याला अपत्यानिर्विशेष मानून आपलें ज्ञानसर्वस्व स्वाधीन करीत असे. गुरुपरंपरेंतील ह्या एका चांगुलपणामुळेंच अध्यापनाची अितकी तुटपुंजी असूनसुद्धां उत्तमोत्तम वैद्य निर्माण झाले. म्हणून गुरुपरंपरेच्या ह्या चांगुलपणाकडे दुर्लक्ष करून नाहीं. मध्यन्तरीच्या काळांत ही गुरुपरंपरा सुटली होती, व सामान्यपणें आयुर्वेदाचें शिक्षण सरकारी प्रमाणें पुणें, मुंबअी, नगर, सातारा, अमरावती, दिल्ली अि० ठिकाणच्या वैद्यक विद्यालयांतून घेतलें असें. सदरहू विद्यालयांतून नुसतें आयुर्वेदाचें शिक्षण न देतां जरूर तेथें व जरूर तितका पाश्चात्य चाहि समावेश करण्यांत आला होता. हें मिश्रण अनेक वैद्यांना रुचलें नाहीं, व त्यांतूनच आजचा दाचा शुद्ध-मिश्र वाद निर्माण झाला. या वादाला आजच्या काळांत विशेष महत्व असल्यामुळें त्याचें विस्तारानें विवेचन करणें अप्रस्तुत होणार नाहीं.

आयुर्वेद विद्यालयांतून आयुर्वेदीय विषयाबरोबरच पाश्चात्य वैद्यकाचेंहि शिक्षण देण्यांत येऊं आयुर्वेदांत वैद्यकाचीं सर्व अंगें आहेत परन्तु बरींच वर्षें कायचिकित्सेखेरीज इतर अंगांचा व्यवहार मुळें जुने पढीक वैद्य हे एकांगींच ठरत. ही स्थिति आजच्या वैद्यांना सर्वथैव अहितावह वाटल्यापाश्चात्य वैद्यकाचें विशेषतः इंद्रियाविज्ञान, शारीरविज्ञान, रोगनिदान व चिकित्सा, प्रसूतितंत्र आणि लाक्य या विषयांचें शिक्षण पाश्चात्य पद्धतीप्रमाणें देणें विचारवन्त वैद्यांना अपरिहार्य वाटूं लागलें. ह्या शिक्षणाचा सुपरिणाम असा झाला कीं, या पद्धतीप्रमाणें शिकलेला वैद्य जरूर तेव्हां उभय चिकित्सांचा समन्वय करून रोगमुक्तीचें कार्य कोणाहि एकांगी पद्धतीनें शिकलेल्या वैद्यापेक्षां अधिक यशस्वी करूं शकत असे.

पण याबरोबरच एक मोठा तोटाहि झाला आहे. आणि तो म्हणजे उभय शास्त्रें शिकलेल्या रांचा कल व्यवहारामध्यें आयुर्वेदापेक्षां पाश्चात्य वैद्यकाकडे जास्त झुकूं लागला. पाश्चात्य वैद्यक-

पद्धति ही प्रायोगिक व अद्ययावत् असल्यामुळें सामान्यपणें मिश्रशिक्षणामुळें तिकडे क सहाजिकच होतो. शिवाय दोषांचा अंशांश विचार करून चिकित्सा करणें हें इतर कोणत्याहि पॅथीच्या व्यवहारापेक्षां निश्चित कठीण आहे. पण तेंच तर आयुर्वेदाचें वैशिष्ट्य आहे. आणि मिश्रशिक्षणपद्धतीमुळें तेंच वैशिष्ट्य नाहींसें होण्याचा धोका आहे. मिश्रशिक्षण घेतलेले लोक आयुर्वेदीय औषधें वापरतात, प सामान्यपणें आयुर्वेदीय दृष्टिकोन ठेवतातच असें नाहीं. आणि जर आयुर्वेदीय दृष्टिकोन नसेल तर आयुर्वेदीय औषधें वापरण्यांत कांहींच अर्थ नाहीं. “दोषविचार हें आयुर्वेदाचें सारसर्वस्व आहे” आणि तेंच ज नष्ट होणार असेल तर आयुर्वेद लवकरच नामशेष झाल्याशिवाय राहाणार नाहीं, असें मिश्रवैद्यकाच्या विरोधकांना वाटतें. त्यांचें हें वाटणें अगदींच खोटें आहे असें आजच्या आयुर्वेदाच्या विद्यार्थ्यांकडे आणि पदवीधरांकडे पाहिल्यानंतर म्हणावें असें वाटत नाहीं.

आज आयुर्वेद विद्यालयांत प्रवेश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांपैकीं बरेचसे विद्यार्थी मेडिकल् कॉलेज-मध्यें प्रवेश न मिळाल्यामुळें येणारे असतात. तिकडे प्रवेश मिळण्याची शक्यता असूनहि उभय शास्त्रांचा विशेषतः आयुर्वेदाचा अभ्यास करावा अशा जिज्ञासेनें जर विद्यार्थी आयुर्वेद विद्यालयांत येत असते त तो मिश्रशिक्षणाचा विजय आहे असें मानतां आलें असतें, व तें यशस्वी होईल असें म्हणतां आलें असतें पण आयुर्वेद शिकण्यासाठीं जर प्रवेशच करीत नाहींत तर आयुर्वेदाचा अभ्यास हे विद्यार्थी कां करतील! आणि पदवी घेतल्यावर व्यवहारांत तरी उपयोग कां करतील ? ही अध्यापनांतील परिस्थिति अत्यंत धोक्याची आहे, हें कटु सत्य नाकारतां येत नाहीं. व त्यांच्याच हातांत आयुर्वेद राहिला तर आजच्या कांहीं वैद्यांच्या पश्चात् आयुर्वेद नाममात्र राहील. भिषग्‌गुरुव राहातील पण त्यांचा व्यवहार मात्र पाश्चात्य वैद्यकाचा असेल

हें सत्य ओळखणारे जे विरोधक आहेत ते आज शुद्ध आयुर्वेदाची मागणी व पुरस्कार करीत आहेत. त्याच्या मागणीला यश आलें असून सरकारनें आपल्या नियंत्रणाखालीं शुद्ध आयुर्वेदाच्या शिक्षणाची सोय केली आहे. शुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण देण्याचें सरकारनें मान्य केलेल्या विद्यालयांतून कार्य होत आहे. त्याचप्रमाणें सरकारनें गुरुपरंपरा सुरूं केली आहे. ह्यामुळें आयुर्वेद शिकण्याची आव सर्वोत्कृष्ट सोय झाली आहे. पण असें दिसतें कीं, पाश्चात्य वैद्यकापेक्षां मिश्र वैद्यकाकडे आणि मिश्र वैद्यकाशीं शुद्ध आयुर्वेदाकडे विद्यार्थ्यांचा कल कमी; ह्या वस्तुस्थितीवरून एक निष्कर्ष निघतो कीं, आज विद्यार्थ्यांना वैद्यक व्यवसाय करावयाचा असला तरी शुद्ध आयुर्वेदाचा नको आहे, कारण त्यानें अपेक्षित अर्थोत्पादन होईल असा त्यांना विश्वास नाहीं. हा विश्वास निर्माण होणें शुद्ध आयुर्वेदाचे दृष्टीनें अवश्य आहे. पूर्वीच्या पिढीमध्यें व आजहि असे अनेक शुद्ध आयुर्वेदाचे व्यवसायी वैद्य आहेत कीं ज्यांचें अर्थोत्पादन त्यांच्या शहरांतल्या चांगल्या डॉक्टराइतकें आहे. पण सद्वैद्यांचें हें प्रमाण अगदींच अल्प आहे. तें वाढलें तर विद्यार्थ्यांच्या समोर अेक चांगला आदर्श निर्माण होईल.

शुद्ध आयुर्वेदीयांची मतप्रणाली खरोखरच आयुर्वेदाच्या दृष्टीनें विचारांत घेण्यासारखी आहे व ती विचारांत घेऊन आयुर्वेदाचे विद्यार्थी आणि पदवीधर जास्तींत जास्त आयुर्वेदीय दृष्टिकोन आचरणांत आणतील अशी परिस्थिति आज निर्माण करणें अवश्य आहे. वैद्य एकांगी असूं नये, उभयच नव्हे तर अनेक शास्त्रांचा समन्वय करण्याची पात्रता आणि कुवत त्याचे ठिकाणीं असावी, हें मिश्रवाद्यांचें तत्व निश्चित गोड आणि परिणामीं हितावह आहे. पण त्याबरोबरच हें तत्व आचरणांत येण्यासाठीं शुद्ध आयुर्वेदाचे पुरस्कर्ते करीत असलेली ओरड लक्षांत घेणें अत्यंत अवश्य आहे. ते निरर्थक कूपमंडुकवृत्तीनें ओरड करीत नाहींत, तर आयुर्वेदाचा प्रगतिपथ निर्विघ्न असावा म्हणून धोक्याचा लाल कंदील दाखवि

त, त्याची दखल घेणें आजच अवश्य आहे. आणि म्हणूनच मी ह्या वादाला ह्या कालांतील विशेष मानतो. दोन्ही बाजूंच्या मतांचा समन्वय करून जर भूमिका ठरली नाहीं तर आयुर्वेदाचें भवितव्य निश्चितपणें चें आहे हें आज अगदीं स्पष्ट दिसत आहे.

पदव्युत्तर अभ्यासाची व्यवस्था हवी

वर सांगितल्याप्रमाणें दोन्ही तऱ्हेनें आयुर्वेदाच्या पदवीपर्यंतच्या शिक्षणाची सोय समाधान--क झाली आहे. पण पदव्युत्तर शिक्षणाची सोय अद्याप अपेक्षेइतकी नाहीं. नाही म्हणायला पुण्याच्या ुर्वेद महाविद्यालयांत पारंगत पदवीच्या शिक्षणाची सोय आहे. पण तिचा फायदा फारसे लोक घेत ल्याचें दिसत नाहीं आणि जे फायदा घेतात ते तेथेंच असणारे लोक घेतात. शास्त्राच्या प्रगतीच्या नें ही परिस्थिति बदलणें अत्यंत अवश्य आहे. उच्च परीक्षेसाठीं अधिवेशनाचें (Terms) बंधन नये, फक्त विषय जाहीर करावेत व त्यानंतर त्या विषयांची तयारी विद्यार्थ्यांना बाहेरूनहि करण्याची अवश्य असावी. म्हणजे व्यवसायी वैद्यसुद्धां आयुर्वेदाचा अभ्यास सुरू ठेवतील व अभ्यास सुरू असला सहाजिकच शास्त्राचा अभ्युदय होईल. म्हणून अभ्यास करण्याच्या जास्तींत जास्त सवलती असणें आहे. विशिष्ट ठिकाणीं येऊन शिकण्याची सक्ति असल्यानें विद्यार्थी पंगु बनतील व व्यवसायी ना अभ्यास करून पदवी मिळविण्याची संधीच राहाणार नाहीं. “पदव्युत्तर शिक्षणक्रम बाहेरून पुरा ाची अन्य शास्त्रामध्यें सुद्धां सोय नाहीं” असें विधान कदाचित् माझ्या विचाराशीं सहमत नसणारे करतील पण आज आयुर्वेदाचा अभ्यास फार कसोशीनें होणें अवश्य आहे. कारण बरींच वर्षे त्या सांत खंड पडला होता म्हणून तो तसा व्हावा ह्या दृष्टीनें अभ्यास करणारांना जास्तींत जास्त सवलती आहेत. मात्र परीक्षेंत बिलकूल सवलती असूं नयेत. सरकारसुद्धां आयुर्वेदाच्या पदव्युत्तर अभ्यास-चा विचार करीत असल्याचें समजतें. सरकारनें हें हातीं घेतलें तर निश्चितपणें ती एक चांगली गोष्ट ईल, उपरनिर्दिष्ट विद्यालयाप्रमाणें पुणें विद्यापीठानेंहि आयुर्वेदाची फॅकल्टी सुरू करण्याचें निश्चित आहे. सारांश आज आयुर्वेदाच्या शिक्षणाची सोय चांगली झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

आज अध्यापनासाठीं मुख्यतः जुनेच ग्रंथ वापरले जातात. नवीन पुस्तकें व्हावींत हें केव्हांहि आहे पण त्याबाबतींत नवीन करण्याच्या दृष्टीनें घिसाडघाई मात्र होऊं नये. कारण विषय उथळपणें वेचन केलेल्या पुस्तकापेक्षां जुन्या ग्रंथावरच तूर्त काम चालवावें. कारण तसा विचार केला तर अनुकूल तावरणांत अशी आयुर्वेदाच्या अभ्यासाला नुकतीच सुरुवात झाली आहे. परिभाषेसंबंधीं व सिद्धांता--धीं अनेक अडचणी उपस्थित होत आहेत. अशा वेळीं जुन्या ग्रंथाचाच अभ्यास आणि संशोधन अवश्य हे.

वाङ्मयाचा परामर्श

अध्यापनाच्याच सदरांत आयुर्वेदीय वाङ्मयाचा परामर्श घेणें अप्रस्तुत होणार नाहीं. आजचें ङ्मय मासिकांचेंच म्हणजे पुष्कळसें फुटकळ स्वरूपाचें आहे. भारदस्त ग्रंथ क्वचितच पहावयास मिळतात. मासिकांतूनहि अभ्यासपूर्ण व शास्त्रीय लेखांपेक्षा वितंडवादी वाङ्मय कमी आढळत नाहीं. आजचा काळ क्रांतिकाळ आहे, म्हणून एक क्षणहि फुकट न घालवितां आयुर्वेदाभिमानी लोकांनीं सर्व लक्ष केंद्रीभूत न शास्त्रीय चर्चाच केली पाहिजे. आज आयुर्वेदामध्यें अनेक वादग्रस्त मुद्दे आहेत. त्यांचा उहापोह, न आढळणाऱ्या विकृतिसंबंधीं आयुर्वेदाचा दृष्टिकोन, ह्यासारखे अनेक विषय आहेत कीं, ज्यांची चर्चा ल्या मासिकांतून होणें अवश्य आहे. पण तें होत असल्याचें आढळत नाहीं, असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें.

कोणत्याहि शास्त्राच्या प्रगतीचें आणि परिस्थितीचें मूल्यमापन त्या शास्त्राच्या तत्कालीन वाङ्मयावरून करतां येतें. या दृष्टीनें पाहातां आजचें आयुर्वेदीय वाङ्मय समाधानकारक नाहीं. जिकडे पाहावें तिकडे गुडघाभरच पाणी आढळतें. कांहीं जुन्या ग्रंथांचीं भाषातरें व संस्करण या काळांत करण्यांत आलें आहे प त्याला विशेष महत्त्व नाहीं.

आजचा वैद्यवर्ग

आजच्या वैद्यवर्गामध्यें दोन स्पष्ट भेद आहेत. एक जुन्या पद्धतीनें म्हणजे गुरुपरम्परेनें शिकलेला व दुसरा विद्यालयांतून शिक्षण घेतलेला. जुन्या परंपरेंतून शिकलेल्यांची संख्या सध्यां फारच कमी आहे. ते उत्तरोत्तर घटत जाणार. जुन्या परंपरेंतून शिकलेले हे वैद्य शुद्ध आयुर्वेदीय चिकित्साच मुख्यतः करतात, आणि आयुर्वेदाचें पुष्कळसें खरें स्वरूप त्यांच्या जवळच पाहण्यास मिळतें. ह्यापैकीं अनेक वैद्यांचें व्यवसायांतहि उत्तम बस्तान बसलें असून कायचिकित्सेच्या बाबतींत ते पाश्चात्य वैद्यक-विद्या-विभूषितांच्या बरोबरीनें यश मिळवीत आहेत. हे वैद्य आयुर्वेदाचा अभिमान बाळगतात व आज तरी आयुर्वेदाला मुख्य आधार त्यांचाच आहे, हें नाकारतां येत नाहीं.

पदवीधरांची चमत्कारिक स्थिति

विद्यालयांतून शिकलेल्या म्हणजे पदवीधर वैद्यांची संख्या आज पुष्कळच असून ती उत्तरोत्तर वाढती आहे. ह्या पदवीधरांची स्थिति मात्र आयुर्वेदाच्या दृष्टीनें फारच चमत्कारिक आहे. आयुर्वेदीय रुग्णालयांतून अगर विद्यालयांतून काम करणारे सोडले तर पदवीधरांपैकीं बरचसे वैद्य व्यवसाय व व्यासंग पाश्चात्य वैद्यकाचाच करतात. वर सांगितल्याप्रमाणें केवळ व्यवसायाचा परवाना मिळावा म्हणूनच ते विद्यालयांत शिरतात. अशा विद्यार्थ्यांचा ओढा आयुर्वेदाकडे कितपत असणार हें स्पष्टच आहे. ह्यापैकीं अनेकजण परीक्षा संपतांच आयुर्वेदाशीं असलेला आपला संबंध तोडून टाकतात. ते आयुर्वेदीय कांहीं औषधें वापरतात पण त्यांचा मुख्य भर पाश्चात्य चिकित्सेवरच असतो. व्यवसायांत आयुर्वेदाचा संबंधच नाहीं मग हे वैद्य आयुर्वेदाचा व्यासंग कशाला ठेवतील ? ही परिस्थिति आयुर्वेदाच्या दृष्टीनें खरोखरच भीषण आहे. पदवी आयुर्वेदाची आणि प्रॅक्टिस ॲलोपॅथीची हें खरोखरच लांच्छन आहे. व हीच परिस्थिति टिकली तर शास्त्र ह्या दृष्टीनें आयुर्वेदाचें भवितव्य धोक्यांत आहे. कदाचित् हे वैद्य कांहीं औषधें आयुर्वेदीय वापरतात म्हणजे आयुर्वेदीय औषधें वापरणारांची एकूण संख्या वाढल्यामुळें जर कोणी समाधान मानीत असतील तर ते आपली दिशाभूल करून घेत आहेत. इतर वैद्यकशास्त्राप्रमाणेंच शास्त्र ह्या दृष्टीनें आयुर्वेदाजवळ निश्चित आणि महत्वाचा असा दृष्टिकोन आहे. तो दृष्टिकोन जर हे वैद्य व्यवहारांत पाळीत नसतील तर त्यांनीं आयुर्वेदीय औषधें वापरून आयुर्वेदाचें फारसें हित होणार नाहीं. आयुर्वेद, रोगाचा त्याचप्रमाणें औषधांचाहि विचार दोषांच्या दृष्टीनें करतो. रोग्याचा विचार करतांना ‘ दूष्यं देशं बलं कालमनलं प्रकृतिं वय : । सत्यं सात्म्यं तथाऽऽहारमवस्थाश्च पृथग्विधाः । ’ इतक्या गोष्टींचा विचार करतो. नुसत्या दोषांचाहि स्थूलपणें विचार करून थांबत नाहीं, त्यांच्या अंशांश कल्पनेचाहि विचार करतो व चिकित्सा करतांना कोणत्या दोषांचा कोणता गुण वाढला अगर कमी झाला ह्याचाहि विचार करतो, थोडक्यांत म्हणजे हा विचार म्हणजेच आयुर्वेदीय दृष्टिकोन आहे व चिकित्सा करतांना त्याचा वापर करणें आयुर्वेदशास्त्राच्या प्रगतीच्या दृष्टीनें महत्वाचें आहे. पाश्चात्य वैद्यकामध्यें नुसत्या रोगाचा स्थूलपणें विचार करून सल्फाड्रग्ज, ॲन्टिबायोटिक्स् व इतरहि औषधें वापरलीं जातात. आजचे पदवीधर वैद्यसुद्धां सूतशेखर, त्रिभुवनकीर्ति,

ळ, शृंग, पर्पटी, कल्प ह्यासारखीं औषधें वापरतात. परंतु हीं औषधें वापरतांना दोषांचा विचार न तां नुसत्या रोगाचा विचार करून वापरतात. अर्थात् दोषांचा विचार न करतां वरील औषधें वापरणें जे आयुर्वेदीय चिकित्सा करणें नव्हे हें कोणीहि विचारवंत कबूल करील. पण आज बहुतेक पदवीधर वर्ग असाच व्यवहार करीत आहे. आयुर्वेदाच्या हिताच्या दृष्टीनें तें थांबणें अवश्य आहे. ह्या बाबतींत असें म्हणेन की, वैद्यांनीं पेनिसिलिन, स्ट्रेप्टोमायासिन ह्या सारखीं औषधें जर अधिक गुणावह असतील तर अवश्य वापरावींत, पण तीं सुद्धां आयुर्वेदीय दृष्टिकोनांतूनच वापरावीं म्हणजे ह्या प्रमाणेंच आयुर्वेदाचें व पाश्चात्य वैद्यकांचेंहि हित होईल. आज त्या औषधांचे दुष्परिणाम पाश्चात्यांना ळे आहेत. परंतु व्यवहारांत ते कसे दूर करावेत हें त्यांना समजत नाहीं. कदाचित् ते ह्या औषधांचें र्वेदीय दृष्टिकोनांतून संशोधन, शुद्धि, भावना अगर पुटें देणें इत्यादि प्रकारांनीं निर्दोष करूं शकण्याची ता आहे. आजच्या पदवीधरांपैकीं अनेकांमध्यें ही कुवत दिसत नाहीं असें मोठ्या खेदानें म्हणावें तें, उलट आयुर्वेदीय औषधेंच पाश्चात्य पद्धतीनें वापरण्याकडे त्यांची प्रवृत्ति दिसते. “ शिव शिव न तुं नं यवनः ” अशी पदवीधरांपैकीं अनेकांची आज स्थिति आहे.

आजच्या अनेक वैद्यांमध्यें आपल्या इकडील डॉक्टरांप्रमाणेंच व्यवसाय करीत असतांना शास्त्राचा ंग ठेवण्याची प्रवृत्ति नाहीं. कोणताहि वाद निघाला तर त्यावरील चर्चेंत ठराविक व्यक्तीच भाग घेतांना ढळतात. आयुर्वेदाला चांगले दिवस येण्याच्या दृष्टीनें वैद्यांची अभ्यासाची प्रवृत्ति वाढणें अवश्य आहे.

आजचे औषधी कारखाने

पूर्वीच्या काळीं वैद्य घरीं स्वतःच औषधें करीत असत. आजचा काल हा श्रमविभागाचा आहे त्याचा परिणाम वैद्यक व्यवसायावरहि होत आहे. आज पुष्कळसे वैद्य घरीं औषधें करीत नाहींत. याचीं रणें दोन आहेत. एक वैद्यशास्त्राचा अभ्यास करीत असतांना रसशास्त्र हा विषयच थोडा रूक्ष असल्या-ळे ह्या विषयाच्या अभ्यासाकडे तितकें लक्ष दिलें जात नाहीं, व दिलें तरी अनुभव घेणें हें तर फारच कीरीचें असतें म्हणून तेंहि टाळलें जातें. दुसरें कारण असें कीं, आजच्या धांदलीच्या नागरी जीवनांत यार मिळणारीं आयुर्वेदीय कारख़ान्यांतील औषधें वापरणें बरें वाटतें. ह्या उभयविध कारणामुळें आजचा बहुसंख्य वैद्यवर्ग औषधांच्या बाबतींत परावलंबी आहे. तो कारखान्यांच्या औषधावर अवलंबून आहे. ह्यामुळें आयुर्वेदाची आजची परिस्थिति घडविण्यांत कारखान्यांचाहि भाग आहे व म्हणून त्यांचाहि थोडा विस्तृतपणें विचार करणें अवश्य आहे.

मोठ्या कारखान्यांच्या औषधांवर वैद्यांचा विश्वास नाहीं

आज अनेक ठिकाणीं आयुर्वेदीय औषधांचे कारखाने आहेत. ह्या प्रत्येक कारखान्यांतील औषधांचें स्वरूप भिन्न भिन्न असतें. आणि गुणकारित्वहि अगदींच बेभरंवशी असतें. आयुर्वेदिय सिद्धौषधें स्वस्त नें परवडणार नाहीं हें कोणीहि मान्य करील. ह्या कंपन्यांनीं रास्त किमतींनें औषधें दिलीं तर आयुर्वेदाच्या दृष्टीनें निश्चित हितावह होईल. स्पष्ट शब्दांत सांगावयाचें म्हणजे मोठ्या आयुर्वेदीय कारखान्यांतील औषधां-र जनतेचा त्याप्रमाणें पदवीधर वैद्यांचाहि असावा तितका विश्वास नाहीं. पदवीधर वैद्य आयुर्वेदीय औषधें वापरण्याचें टाळतात त्याला हेंहि एक प्रमुख कारण आहे. केंद्रीय सरकार आयुर्वेदीय औषधांचें स्टँडर्डायझेशन करण्याचा विचार करीत आहे. सुदैवानें तो विचार अस्तित्वांत आला तर आयुर्वेदीय औषधीकरणांत सुधारणा होईल.

या कारखान्यांचें लक्ष

ह्या कारखान्यांचें लक्ष आयुर्वेदीय औषधांपेक्षांहि पाश्चात्य पद्धतीचीं औषधें करण्याकडे अधिक आहे असें वाटतें. थोडक्यांत म्हणजे आयुर्वेदीय कारखान्यांची अवस्थासुद्धां बहुसंख्य पदवीधरांप्रमाणेंच आहे.

आयुर्वेदामध्यें वनौषधींचें फार महत्व आहे. परंतु खात्रीचीं असली औषधें मिळणें फारच दुरापास्त झालें आहे. बरींच वर्षेंपर्यंत प्रचार सुटल्यामुळें वनस्पतींची ओळख पटत नाहीं, व ज्यांची ओळख पटून जीं मुबलक मिळणें शक्य आहेत त्या औषधांतसुद्धां भेसळ अधिक आढळते. सहाजिकच असलीं बेभरंवशी औषधें वापरणें मनुष्य टाळूं लागतो.

उपसंहार

आयुर्वेदाच्या सद्यःस्थितीचें मूल्यमापन वरील पांच मुद्यांवर शक्य तों करण्याचा प्रयत्न केला आहे. आणि सद्यःस्थिति किंवा आजचा काल हा आयुर्वेदाच्या इतिहासांत क्रांतिकाल ठरणार आहे. बरेच दिवसांत न मिळालेली लोकांची सहानुभूति, आस्था व आपुलकी आज आयुर्वेदाला मिळाली आहे. राजमान्यता तर मिळालीच आहे पण आयुर्वेदाला आपला उत्कर्ष करून घ्यायला मिळावें असा राजसत्तेचा हार्दिक प्रयत्न आहे.

आयुर्वेदाच्या अध्यापनाची व्यवस्था समाधानकारक आहे. पाश्चात्य व आयुर्वेदाचें शिक्षण घेऊन समन्वय करण्याची संधि आज उपलब्ध आहे. पण त्याचा दुष्परिणाम होणार नाहीं ना? अशी साधार भीतीहि वाटते व असेंहि वाटतें कीं, अधिक दक्षता घेतली तर शुद्ध आयुर्वेदाचेंच शिक्षण पोषक होईल.

आजच्या वैद्यांमध्यें विशेषतः नवीन पदवीधरांमध्यें आयुर्वेदाचा व्यासंग ठेवण्याची व अभ्यास करण्याची प्रवृत्ति कमी दिसते.

आज निर्माण होणारें आयुर्वेदीय वाङ्मयहि तितकें भारदस्त वाटत नाहीं. आजच्या पदवीधर वैद्यांचा आयुर्वेदापेक्षां पाश्चात्य वैद्यकाकडे ओढा अधिक आहे. ही प्रवृत्ति आयुर्वेदाच्या दृष्टीनें भीषण असून तिला वेळींच आळा घालणें अवश्य आहे. आजचे आयुर्वेदीय कारखानेहि आयुर्वेदीय औषधें समाधानकारक तयार करीत नाहींत.

एकूण आयुर्वेदाची सद्यःस्थिति शेक्सपीअरच्या हॅम्लेटनें म्हटल्याप्रमाणें 'To be or not to be' अशी आहे. म्हणूनच आजच्या काळाला मीं क्रांतिकाल म्हटलें आहे. हा क्रांतिकाल आयुर्वेदाच्या दृष्टीनें अनुकूल क्रांतीचा ठरो अशी प्रभू धन्वंतरीजवळ प्रार्थना करून हा निबंध संपावितो.

पवित्र
नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहा:—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

पुणें येथें
'आयुर्वेद सेवा संघ, नासिक' चीं
सर्व औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें २

प्राणवायु

(लेखकः ...वैद्य श्रीनिवास जळूकर D.A.S.F.
आयुर्वेद सेवा संघ, नासिक)

'प्राणवायु' शब्द उच्चारतांच आपोआप जाणीव होते कीं, ही शरीरांतील अत्यंत एक मह- ी अशी बाब आहे, आणि यावरच आपलें शरीर , जर कां त्यांत व्यत्यय आला तर जगणें शक्यच शरीर हें दोष, धातु व मल यांवर चालतें, , पण त्यांतहि सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे ायु होय. शरीरांतील इतर वायु व्यान, अपान, , समान यापेक्षां तो निराळा आहे असें नाहीं, ार्यतः व स्थानतः एकाच वायूचे ते अनेक आहेत आणि म्हणून तो स्थानतः असलेला भेद करण्यासाठीं त्याचें स्वतंत्र वर्णन केलें जातें.

प्राणवायु म्हणजे ऑक्सिजन नव्हे

ाळेंतील मुलांना व इतर सुशिक्षितांचे मना- पाश्चात्य वैद्यक ग्रंथ, आधुनिक आरोग्यशास्त्र ा ग्रंथांचीं केलेलीं मराठी भाषांतरें इ. वाचून कल्पना झालेली असते कीं, प्राणवायु म्हणजे आवश्यक असा ऑक्सिजन होय. पण ीय विचारसरणींतून (आयुर्वेदीय तर्क–मीमांसा ास्त्राचे दृष्टींतून) पाहिलें असतां असें भाषांतर फक्त ऑक्सिजन म्हणजे प्राणवायु म्हणणें हें रास्त नाहीं. कारण केवळ ऑक्सिजनमध्यें आपण वा प्राणिमात्र हे जगूं शकत नाहीं आपलें प्राणन ुळें होऊं शकत नाहीं.

हवेंतील नैसर्गिक मिश्रण

व्यापक अर्थानें शरीर जीवंत राहण्यास ज्या गोष्टींची आवश्यकता आहे तें तें सर्व आयु- ेदीय व्यापक परिभाषेंत प्राण होत, प्राणवायु–स्वरूप . निराळ्या भाषेंत बोलावयाचें झालें तर हवेचें नेहमींचें विशिष्ट मिश्रण संबोधिलें जातें [२० % ॉक्सिजन, ७० % नैट्रोजन, ४% कार्बन इत्यादि] हेंच मिश्रण म्हणजे खरा प्राणवायु होय. व ही आमचे गुरुजींनींसुद्धां आमचे लक्षांत आणून दिली होती. आयुर्वेदानें 'अग्निः सोमो वायुः सत्त्वं रजस्तमः पंचेन्द्रियाणि भूतात्मेति प्राणाः । सु. शा. ४।३. हें शरीरांतील शारीरिक व मानसिक रीत्या प्राणाचें स्वरूप वर्णन केलें आहे. आणि आयुर्वेद असेंहि म्हणतो, 'प्राणो ह्यभ्यंतरो नृणां बाह्यप्राणगुणान्वितः'। हवेंत शरीरबाह्य प्रदेशांत असलेलें प्राणांचें स्वरूपहि आंतील प्राणासारखेंच आहे, आणि म्हणून मनुष्य बाह्य प्राण(अन्न हवा पाणी इ.) घेऊन जगूं शकतो.

आणि शरीरांतील प्रत्येक अणूअणूंचे ठिकाणीं हें कार्य सातत्यानें चालूं असतें आणि म्हणूनच प्राणादि पंच वायु, पंच पित्त, पंच कफ आणि मल हे प्रत्येक अणूचे ठिकाणीं आपापल्या परीनें कार्य करीत असतातच.

प्राणाचीं कर्में

प्राणोऽत्र मूर्धगः उरः कंठचरो बुद्धिहृदयें- द्रियचित्तधृक् । असें त्यांचें कार्यहि सांगितलें जातें. याशिवाय थुंकणें, शिंकणें, ढेंकर देणें निःश्वास टाकणें व अन्न आंत घेणें हीं कार्येंहि त्याच वायूचे आधीन असल्याचेंहि वर्णन केलें आहे.

एक चांगलें रूपक

बृहत्योगतरंगिणींत एक चांगलें रूपक योजून प्राणाचें कार्य व महत्त्व वर्णन केल्याचें आढळलें. 'हंसरूपस्थितः प्राणः प्रीणनं वपुशो हृदि,'। आणि तें यथार्थहि आहे.

प्राणाय स्वाहा

हंसाचें विशुद्ध पवित्र स्वरूप, शुक्लवर्ण, नीरक्षीर,-विवेक करण्याचा गुण. डौलदार गति, मोत्यांचा चारा (आहार), मानस सरोवरीं कमळांत वास्ति इ. विचारांत घेतां असें दिसतें कीं शरीरांतील प्राणहि असेच विशुद्ध पवित्र व [शुक्लत्व] पावित्र्याचें निदर्शन करणारे असे असतात, आणि म्हणून भोजनापूर्वी 'प्राणाय स्वाहा' म्हटलें जातें. नीरक्षीरविका-

प्रमाणेंच हा शरीरस्थ प्राणवायु आपणांस हवें तें ग्रहण करतो आणि त्यांतील अहितकर अनावश्यक भाग बाहेर टाकला जातो. अंबरपीयूष (विष्णुपदामृत) पिण्याची त्याची प्रवृत्ति असते व बाह्य हवेंतून तो तें पितो व इतर द्रव्य बाहेर टाकतो.

प्राणाची डौलदार गति

हंसाचे डौलदार गतिप्रमाणेंच शरीरांतहि त्याची डौलदार गति असते. शरीरांत प्रवेश करणें व बाहेर जाणें हें सम व स्थिर गतीनें कार्य होतें, त्याशीं हें साम्य सहज जोडतां येईल.

नाडीविज्ञानांतील हंस नाडी पहा

मोत्याचा चारा

मोत्यांचा चारा म्हणजे अंबरपीयूष होय. पण या मोत्यांचे चाऱ्याची किंमत स्वस्थ लोकांना येत नाहीं. पण जेव्हां त्यांत कांहीं विकृति घडते त्यावेळीं प्राण कासावीस होऊं लागतात आणि मग तो कासावीसपणा थांबविण्यासाठीं मनुष्य खूप पैसे खर्च करून वैद्य--डॉक्टर अि० बोलावून म्हणतो, “ कांहींहि करा पण श्वास मोकळा करून द्या. ”

दमेकऱ्यांचा अनुभव

मोत्यांचा चारा लागतो याची जाणीव पुरेपूर म्हटली तर श्वास--रोगी (दमेकरी) यांनाच विचार म्हणजे ते स्वानुभवानें त्याचें मोल सांगती “ आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ” म्हटलें आहे स्वतःचे प्राणरक्षणाचे उद्देशानेंच म्हटलें आहे यावरून वाटतें.

प्राण वायूचें स्थान

हंस पक्षी जसा प्रामुख्यानें कमलाचे सहवास व मानस सरोवराचे ठिकाणीं राहतो, तसेंच हा प्रा वायुसुद्धां ‘ हृदि ’ म्हणजे हृदयरूपी कमलांत कमलाकार हृदयाचे ठिकाणीं विशेषतः राहात असतो व या हृदयकमलापासून शिरकमलापर्यंत त्याचा प्रवा होत असतो. नाभि ही त्या हृदयरूपी कमला नालाप्रमाणें असते आणि म्हणूनच प्राणाचें स्था नाभि असेंहि कांहीं ठिकाणीं संबोधिलें जातें. आ म्हणून तें अतिशयोक्तीचें अथवा विसंगत आहे अ म्हणणें योग्य वाटत नाहीं.

नाभिस्थः प्राणपवनः स्पृष्ट्वा हृत्कमलांतरम्।
कंठात् बहिर्विनिर्याति पातुं विष्णुपदामृतम्।
पीत्वा च अंबरपीयूषं पुनरायाति वेगतः।
प्रीणयन् देहमखिलं जीवयन् जठरानलम्॥

— शार्ङ्गधर पूर्वखंड अ. ५ श्लो. ४९।५०

शुद्ध लोहभस्म (वारितर) २४) सेर

काश्मीरी शिलाजित, हमारे कारखाने में प्रतिवर्ष करीब २०० मन शास्त्रविधि अनुसार शुद्ध की जाती है। भाव-शुद्ध ३२) सेर अशुद्ध पत्थर ८०) प्रति मन, वंगभस्म ३६), प्रवाळभस्म ३२), अभ्रक बज्रभस्म ४६), कांत लोहभस्म २८), स्वर्णमाक्षिकभस्म २८), रससिंदूर ८०), स्वर्णराज बंगेश्वर ८८), मंडूरभस्म २०), शंखभस्म ७), श्रृंगभस्म १४), कपर्दिकभस्म ८), मुक्ता शुक्तीभस्म १०), गोदंती भस्म ३।।।), चंद्रप्रभावटी २८) त्रिवंगभस्म ४८) कसीसभस्म १०) प्रतिसेर। स्वर्णसिंदूर ३) प्रतितोला।

नोटः— इन भावोंपर २० तोला से कम कोई वस्तु न भेजी जावेगी, सूचिपत्र मुफ्त।

च्यवनप्राशः— ५ सेर का २१), १० सेर का ३८), २० सेर का ६५) रु.।

काश्मीर आयुर्वेदिक वर्क्स, अमृतसर।

६ रुग्णांची साद्यंत हकीकत

(लेखकः—डॉ. सी. व्ही. जोशी, इतवारी नागपूर)

मी ज्या सहा रुग्णांचा उपचार केला त्यांची साद्यंत कीगत लिहून पाठवीत आहे. ही हकीगत वाचून ल्पना येईलच कीं, इलाजाची पद्धत सर्वसाधारण रखीच आहे. कोणत्याहि केसची विडाल स्टेट ली नाहीं, परन्तु लक्षणावरून टायफाइडचें निदान ठविलें, व क्लोरोमायसेटीन सुरू केलें. शिवाय डीला आयुर्वेदिक चिकित्सा केली. मिश्र उपचारा-सून कोणतेंहि नुकसान दिसून आलें नाहीं. रुग्णाची कीगत क्रमानें पुढें दिली आहे.

ग्ण नं. १

व—शामाबाओ, वय २०, जात हिंदू, लग्न झालेलें.

ता. २७।९।५४ रोजीं रुग्ण तपासण्याकरितां ला बोलाविलें. रुग्ण तपासला तेव्हां तिला खालील क्षणें होतीं. ज्वर १०४ डिग्री, नाडीचा वेग १४०, भ कोरडी, पण जीभेवर पांढरा थर, कडा लाल व क लाल. पोटांत दाबून पाहिलें असतां उजव्या जूला गडबड आवाज व किंचित् दुःख, पोटाला चित् आध्मान, पान्थरी किंचित् वाढ वाढलेली, पाचा ९वा दिवस, फुफ्फुसपरीक्षा, दोन्ही फुफ्फुसांत ओले व कोरडे आवाज (रॉल्स् अॅण्ड रॉंकाय्) खोकला तो पण ठसे वाहेर पडत नाहींत. किंचित् बेहोशी. गवण मल पातळ पिवळसर.

रोगाचा पूर्वेतिहास

आठ ते नऊ दिवसापासून ताप येत आहे. थंडी जून येत नाहीं. रोज चढतो पण पूर्णपणें उतरत नाहीं. थर्मामिटरनें रेकार्ड ठेवला नाहीं, कोणी वैद्याचा लाज चालू होता, त्यानें मलेरिया समजून वैद्यनाथ दा दिलें. परन्तु आराम नाहीं, उलट ताप वाढ-ले आहे. व या औषधामुळें कीं काय रोग्यास ळ परसाकडे व्हावयाला लागली. एकंदरींत लक्ष-वरून 'टायफाइड ज्वर' चें निदान केलें. विडाल ट केली नाहीं.

दिलेला उपचार

ता. २७।९।५४ (१) क्लोरोमायसेटीन २ गोळ्या प्रथम व नंतर चार तासानें एक एक गोळी घ्यावयास सांगितलें.

(२) सूतशेखर २ गुंज— सकाळ संध्याकाळ सहदाबरोबर चाटावयास दिलें.

(३) नागरमोथा, रक्तचंदन, सुंठ, वाळा, पित्तपापडा यांचा काढा रोज ३ औंस. १ औंसाची एक मात्रा याप्रमाणें दिवसांतून ३ वेळां.

(४) प्रत्येक वेळीं क्लोरोमायसेटिननंतर 'सिरप बी कॉम्प्लेक्स' एक चमचा घ्यावयास सांगितलें.

ता. २८।९।५४ तपासल्याचा रिपोर्ट, सकाळ ९ वा. हागवण बंद झाली. ज्वर १०३ फॅ. नाडी एका मिनिटाला १४०, रोगी किंचित् बेहोष, खोकला सारखाच. विशेष फरक नाहीं.

उपचार—तोच पुढें चालू.

रात्रीं ९ चे नंतर ज्वर उतरावयाला लागला. रात्रीं १० वा. १०० चा रिपोर्ट आला. क्लोरोमायसेटीन बंद करावयास सांगितलें.

ता. २९।९।५४ सकाळीं ९ वा.—ज्वर ९८, नाडी १००. हागवण बंद. बेहोशी नाहीं. खोकला सारखाच. सायंकाळीं ज्वर ९९. क्लोरोमायसेटीन पुनः सुरू व फक्त ३ कॅप्सूल्स् दिल्या.

ता. ३०।९।५४ सकाळीं ९ वा. ज्वर ९७.५. दिवसभर इतकाच राहिला. झोप येत नाहीं. खोकला कमी. श्रवणपरीक्षेनें फुफ्फुसांतील आवाज कमी. प्रकृतींत एकंदर सुधारणा.

उपचार—४ गुंजा सूतशेखराबरोबर सुवर्ण-माक्षिक ४ गुंजा झोपेकरितां मिसळून दिलें. (२) काढा तोच, ३) क्लोरोमायसेटीन फक्त २ गोळ्या.

ता. ७।१०।५४ प्रकृतींत चांगली सुधारणा. रोग्याला हुशारी वाटायाला लागली. आर्थिक परि-

स्थितीमुळें क्लोरोमायसेटीन रोग्यानें आणलें नाहीं, उपचार-- (१) काढा (२) सूतशेखर चालू.

ता. ८।१०।५४ हाच उपचार चालू राहिला. प्रकृति अगदीं ठीक. भूक सपाटून लागावयाला लागली, तरी पण अन्न खाण्याची परवानगी दिली नाहीं.

ता. १०।१०।५४ सूतशेखर बंद केलें. काढा चालू. हळुहळु अन्न द्यावयाला परवानगी दिली.

सुरवातीपासून- अन्न बंद केलें पातळ द्रव्य- चहा कॉफी दूध बार्ली, फळाचा रस येवढेंच चालू होतें.

ता. १२।१०।५४ उपचार बंद. प्रकृति ठीक फक्त कमजोरी.

निष्कर्ष-(१) क्लोरोमायसेटीन अगदीं कमी लागलें,(२ मिश्र उपचार केला. ३) ज्वर उलटून आला नाहीं. (४) ज्वर गेल्यानन्तर अग्निमांद्य वगैरे विकार जडले नाहींत (५) क्लोरोमायसेटीन बरोबर बी. कॉम्प्लेक्स दिलें. ६ विडाल टेस्ट केली नाहीं.

—×—

रुग्ण नं. २

नाव काकूभाई – वय ३७ जात हिंदु लग्न झालेलें.

ता २।३।५५ रोजीं तपासण्याकरितां बोलाविलें. सकाळीं ९ ची परिस्थिति. ज्वर १०१, नाडी दर मिनिटाला ९८, जीभ पांढरी किंचित् पिवळसर थर कडा व टोक लाल, पोटांत उजव्या ओटीपोटींत किंचित् दुखते अध्मान नाहीं. ज्वराचा चौथा दिवस. ज्वर सकाळीं १०० ते १०१ व सायंकाळीं १०३ पर्यंत जातो. थंडी वाजून येत नाहीं. इतर कोणताहि त्रास नाहीं. परसाकडे दोन दिवसापासून झाली नाहीं. अंदाजें पॅराटायफाइड असावा असें ठरविलें, व सात किंवा आठ दिवसाचे वर जर ज्वर टिकला तर क्लोरोमायसेटीन सुरूं करावें नाहींतर नाहीं, असा विचार ठरवून काढा व सूतशेखर सुरू केलें.

ता. ३।३।५५ ज्वर वेग तेवढाच, विशेष फरक नाहीं. तीन दिवसापासून परसाकडे झाली नाहीं म्हणून ग्लिसरिनची पिचकारी दिली. परसाकडे झाली, उपचार तोच सुरूं.

ता. ४।३।५५ विशेष फरक नाहीं. उपचार तोच.

ता. ५।३।५५ "

ता. ६।३।५५ उपचार तोच "

ता. ७।३।५५ ज्वर वेग थोडा कमी, संध्याकाळचें ज्वरमान १०१ वर गेलें नाहीं. सकाळीं ९९, विशेष असा त्रास नाहीं.

ता. ८।३।५५ विशेष फरक नाहीं, उपचार तोच.

ता. ११।३।५५ ज्वरमान कमी, सकाळीं ९८, संध्याकाळीं ९९. बाकी सर्व ठीक, परसाकडे आपोआप थोडी झाली.

ता. १४।३।५५ ज्वर सकाळीं ९७.५, सायं. ९८

ता. १६।३।५५ ज्वर सकाळीं ९७ सायं. ९७.५

ता. १८।३।५५ प्रकृति ठीक. भूक सुटावयाला लागली. परसाकडे आपोआप व्हावयाला लागली.

.... उत्तम धर्म ....

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधेंच वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान-

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

साफ झाली. औषध बंद झालें. रोग्यानें हलुहलु याश सुरुवात केली.

निष्कर्ष–(१ क्लोरोमायसेटीन वापरलें नाहीं. (२ व सूतशेखर एवढाच इलाज (३ रुग्ण सौम्य याचा पॅराटायफाइड असावा. (४ विडॉल टेस्ट नाहीं.

रुग्ण नं. ३

नांवः— मधुकर शहाणे वय १९ जात हिन्दू झालेलें नाहीं.

ता. ३।३।५५ ला मला तपासण्याकरितां बोलाविले. तापाचा ७ वा दिवस ताप थंडी वाजून येत नाहीं. ताप एकदा चढला तो उतरला नाहीं, सारखा राहातो. सकाळीं ८॥ वाजतां १०३ रोगी सुस्त फार, डोकेदुखी फार किंचित् कोरडा खोकला, नाडीचा वेग दर मिनिटाला १००, जीभेवर पिवळसर थर टोक व कडा लाल, कोरडी, सायंकाळीं ज्वर १०३.५ खोकला जास्त, पोटांत गडबड, किंचित् आध्मान.

पूर्वेतिहास

हाच रोगी ६ महिन्यापूर्वी माझ्याकडे शुष्ककासाकरितां आला होता व त्यावेळीं रक्त तपासून इओसिनोफिलिक फुफ्फुस हा रोग ठरवून सहा आर्सेनिकची इंजेक्शनें दिलीं होतीं व त्यापासून फायदा झाला होता. परन्तु यावेळीं त्याच्या फुफ्फुसांत तेच कोरडे आवाज श्रवणपरीक्षेनें ऐकूं येत होते.

लक्षणावरून–टायफाइडचें निदान निश्चित केलें उपचार सुरूं केले.

ता. ३।३।५५ काढा– ३ औंस.

ता. ४।३।५५ लक्षणें तीच, काढा– ३ औंस.

ता. ५।३।५५ लक्षणांत कांहींच फरक नाहीं. ज्वर सायं. जास्त म्हणजे १०४ पर्यंत गेला. उपचार तेच.

ता. ६।३।५५ डोकेदुखी फार, झोप येत नाहीं. ज्वर सकाळीं १०३. सायं. १०४. किंचित् आध्मान, परसाकडे २ दिवसापासून झाली नाहीं. रोगाचा ९ वा दिवस. खोकला तसाच. नाडीचा वेग – १००

उपचार– १] सूतशेखर २ गुंजा सुवर्णमाक्षिक २ गुंजा मिश्रण सहदाबरोबर २] काढा – ३ औंस. ३] क्लोरोमायसेटीन दिवसांतून ४ गोळया.

ता. ७।३।५५ लक्षणें तीच उपचार तोच. रात्रीं १० ला ताप उतरावयाला लागला – क्लोरोमायसेटीन बंद केलें.

ता. ८।३।५५ सकाळीं ताप ९९. डोकेदुखी कमी. नाडी वेग १००. ताप सायं. १०० पर्यंत गेला. उपचार तोच.

पुन्हा क्लोरोमायसेटीन सुरूं केले. दिवसांतून चार गोळया दिल्या.

ता. ९।३।५५ प्रकृति तशीच, ज्वर वेग कमी, उपचार तोच.

ता. १०।३।५५ ज्वर ९८ सकाळीं, इतर लक्षणें कमी, परन्तु पातळ परसाकडे सुरू झाली म्हणून थोडा बदल केला.

१) सूतशेखर २ रत्ती, सुवर्णमाक्षिक २ रत्ती, बिल्वचूर्ण ८ रत्ती, अशी एक पुडी दिवसांतून तीन वेळा. २) काढा तोच, ३) क्लोरोमायसेटीन ३ गोळ्या ८ तासांनीं अेक याप्रमाणें.

ता. ११।३।५५ पातळ परसाकडे बन्द. टेंपरेचर ९७.५ सकाळीं सायंकाळीं ज्वरमान वाढलें नाहीं. प्रकृति ठीक. बिल्वचूर्ण बन्द केलें. बाकी तेच, क्लोरोमायसेटीन फक्त ३ गोळया २४ तासांत.

ता. १२।३।५५ ज्वर सकाळीं ९७.५, सायंकाळीं ९८, प्रकृति ठीक. झोप येते, उपचार तोच, क्लोरोमायसेटीन २ गोळया.

ता. १३-७-५५ प्रकृति ठीक. तोच उपचार क्लोरोमायसेटीन बन्द, काढा चालू, सुवर्णमाक्षिक बन्द. हा उपचार १८ तारखेपर्यंत चालू राहिला. पुढें रोग्यानें प्रकृति ठीक, म्हणून औषध बन्द केलें. हा रोगी अजून माझ्या परिचयांत आहे. त्याला इओसिनोफिलिया आधीं झाला होता. पण टायफाइड नंतर तो वाढला नाहीं किंवा त्याच्या प्रकृतींत सध्यां तरी कोणताच अपाय झाला नाहीं.

रुग्ण नं. ४

नांवः— किशोर, जात हिंदू, वय १८, प्रथमतः रुग्ण एका M. B. B. S. डॉक्टरकडे गेला होता. डॉक्टरनें टायफाइडचें निदान निश्चित केलें व क्लोरोमायसेटीन सुरूं केलें, परन्तु क्लोरोमायसेटीनचें प्रमाण जास्त असल्यामुळें कीं काय पातळ परसाकडे सुरू झाली, टायफाइडचें निश्चित निदान करण्याचें आधीं मलेरियाचें निदान करून क्विनीनचें इंजेक्शन दिलें होतें. तो रोगी फिरून माझेकडे आला तेव्हां मध्यें क्लोरोमायसेटीननें कमी झालेला ताप पुन्हां यावयाला सुरुवात झाली होती, व हागवण होती. क्लोरोमायसेटीननें जंतुप्रतिबंधक काम केलें, परन्तु हागवण वगैरे लक्षणें पित्तप्रधानता दाखवीत होतीं. रुग्ण माझेकडे १९-३-५५ ला आला.

उपचारः- १) सूतशेखर-- २ गुंजा बिल्वचूर्ण- ४ गुंजा. अशा चार पुड्या चार चार तासांनीं. २) काढा- प्रथम सांगितलेला दिवसांतून ३ औंस. ३) क्लोरोमायसेटीन बंद केलें.

ता. २०।३।५५ हागवण कमी, ताप सकाळीं ९९° सायंकाळीं १००°, एकंदर प्रकृति थोडी बरी, उपचारः- तोच.

ता. ३१।३।५५ हागवण बंद, ताप ९७° सकाळीं सायंकाळीं ९८, प्रकृति ठीक.

ता. १।४।५५ पासून पुढें हाच उपचार १४ दिवस चालू ठेवला. प्रकृति अगदीं ठीक झाली.

रुग्ण नं. ५

नांवः— करीम, जात मुसलमान, वय १६.

ता. १।५।५५ ला मला तपासावयास बोलावलें खालील लक्षणें आढळून आलीं.

ज्वर येऊन चार दिवस झाले. ज्वर हळुहळु वाढत गेला. रोज सायंकाळीं जास्त जास्त होत आहे आज सकाळीं ताप १०१° F. नाडी ९० दर मिनिटाला, जीभ कोरडी पांढुरकी कडा व टोक ला बुरशी बऱ्याच प्रमाणांत, किंचित् कोरडा खोकला, पोटाला किंचित् आध्मान, उजव्या कोष्ठांत दाबले असतां गडगड आवाज व किंचित् दुःख, फुप्फु



अपुरें संरक्षण

धूळ, जंतू व श्वसनाच्या इतर विकारांपासून संरक्षण मिळविण्यासाठीं कास्फो औषधि गोळ्या वापरवें इष्ट आहे. खोकला, पडसें, घशाची खवखव, ब्रॉंकायटिस इ. विकारांमध्यें कास्फो उपयुक्त आहे. आजच एक बाटली खरेदी करा. सर्वत्र मिळूं शकते.

कास्फो
खोकल्यावरील अचूक उपाय

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड,
अहमदनगर.

रीक्षेंत किंचित् कोठें कोठें दोन्ही फुफ्फुसांत कोरडे आवाज, ज्वरांचा पहिला आठवडा असल्यामुळें नक्की निदान ठरविलें नाहीं. बहुतांशीं टायफाइड असावा असें ठरविलें.

ता. २।५।५५ ज्वर वेग जास्त, सकाळीं १०२. सायंकाळीं १०३˙ घबराट जास्त, डोकेदुखी फार. सूतशेखर व काढा सुरूं केला.

ता. ३।५।५५ ज्वरवेग जास्त, सकाळीं १०२, तर सायंकाळीं १०४ पर्यंत गेला. घबराट फार, डोके-दुखी फार, परसाकडे तीन दिवसापासून झाली नाहीं. सूतशेखर व काढा चालू.

ता. ४।५।५५ सकाळीं ज्वरवेगांत कांहीं बदल नाहीं. सकाळीं १०३, धमनी वेग १००, आज कदाचित् ज्वर सायंकाळीं जास्त जाईल म्हणून सूतशेखर, काढा व क्लोरोमायसेटीन चार गोळ्या सुरूं केल्या व प्रत्येक गोळीनंतर ' सिरप बी काम्प्लेक्स ' घ्यावयास सांगितलें.

ता. ५।५।५५ ज्वर सकाळीं १०१ सायंकाळीं १०१ धमनीवेग १०० डोकेंदुखी व घबराट कमी.

उपचार–१)सूतशेखर-२रत्ती,सुवर्णमाक्षिक २रत्ती, २] काढा – ३ खुराक, एक औंसाची एक खुराक. ३] क्लोरोमायसेटीन– ४ गोळ्या व वर 'सिरप बी काॅम्प्लेक्स'.

रात्रीं बारानंतर ज्वर उतरावयास सुरुवात झाली व घाम खूप यावयाला लागला. क्लोरोमायसेटीन बंद केलें.

ता. ६।५।५५ ताप सकाळीं ९८. दिवसभर९८. धमनी वेग ९९. डोकेंदुखी कमी. झोप साधारण बरी आली. एकंदर सर्वच लक्षणें कमी.

उपचार— तोच, क्लोरोमायसेटीन बंद.

ता. ७।५।५५ ताप सकाळीं९७ सायं. ९८. धमनीवेग ९०. बाकी सर्व ठीक. उपचार तोच.

सुवर्णमाक्षिक बंद, फक्त सूतशेखर व काढा चालूं. खालील लक्षणें आढळून आलीं.

ता. ८।५।५५ प्रकृति ठीक. ताप ९७.५ सायं. ९८.

उपचार — १] सूतशेखर २] काढा ३] क्लोरोमायसेटीन बंद.

ता. ९।५।५५ प्रकृति ठीक. ताप नाहीं. उपचार तोच.

ता. १०।५।५५ पासून हाच उपचार २० तारखेपर्यंत चालू होता.

अजून ह्या बिमाराशीं माझा संबंध आहे. प्रकृति अगदीं ठीक आहे. व कोणताहि अन्य उपद्रव झालेला नाहीं.

रुग्ण नं. ६

नांवः– शामराव प्रचंड, वय २२– जात हिंदू. हा रुग्ण तापाचे ८ वे दिवशीं माझेकडे ता.२४।१०-५४ रोजीं आला. ताप हळूंहळूं वाढत गेला व त्या दिवशीं सकाळीं तापाचें प्रमाण १०२ होतें. नाडीचा वेग १००, सर्व पोटांत गडगड, पातळ परसाकडे होत होती. परसाकडचा रंग पिवळा काळसर दुर्गंधी, पोटाला किंचित् आध्मान, ताप थंडी वाजून येत नाहीं. पानथरी किंचित् हाताला लागते. फुफ्फुसांत दोन्ही कोरडे आवाज. बेचैनी फार, घाम नाहीं. सायं. ज्वर १०३.५ पर्यंत गेला. एकंदरींत लक्षणांवरून व पूर्वेतिहासावरून टाइफाइड ज्वर असावा असें ठरविलें, व चिकित्सा सुरूं केली.

१) सूतशेखर १ रत्ती, बिल्वचूर्ण ४ रत्ती, दिवसांतून चार पुड्या सहदाबरोबर. २) काढा दिवसांतून तीन वेळां. ३) क्लोरोमायसेटीन दिवसांतून चार गोळ्या वर ' सिरप बी काम्प्लेक्स '.

ता. २५।१।५४ हागवण कमी ज्वर सकाळीं १०० सायंकाळीं १०२, नाडीचा वेग १००, प्रकृति तशीच, उपचार तोच.

ता. २६।१।५४ ताप सकाळीं ९८, हगवण बंद, नाडीचा वेग ९०, सायंकाळीं ज्वर ९९, उपचार तोच, बिल्वचूर्ण बंद केलें, बाकी तेंच.

ता. २७।१।५४ ला ताप सकाळीं ९७˙५ F. सायंकाळीं ९८. हगवण बंद. प्रकृति ठीक. हुशारी वाटते. क्लोरोमायसेटीन बंद केलें. बाकी तेंच.

२८।९।५४ प्रकृति ठीक, उपचार तोच.

ता. २९।९।५४ प्रकृति ठीक, उपचार तोच. हाच उपचार अजून पुढें १५ दिवस चालूं होता. प्रकृति अगदीं ठीक.

एकंदर हकीकतीचा निष्कर्ष

वरील सहा रुग्णांच्या हकीकतीवर नजर फेंकल्यासः—

१ सर्व रुग्णांची विडाल टेस्ट केली नाहीं. रोगनिदान लक्षणावरून ठरविलें होतें.

२ सर्व रुग्णांत उपचार मिश्र पद्धतीनें केला.

३ प्रमुख उपचार सूतशेखर, ज्वरघ्न–काढा व क्लोरोमायसेटीन

झोंप न येण्यावर सुवर्णमाक्षिक +सू. शे.

हागवण झाली असतां बिल्वचूर्ण त्यांत घातलें व झोंप येत नाहीं ही तक्रार असतां सुवर्णमाक्षिक घातलें. सुवर्णमाक्षिक व सूतशेखराची जोडी डोकेंदुखी व झोंप न येणें यावर फार चांगलें काम करते. क्लोरोमायसेटीनचा जंतुप्रतिबंधक म्हणून थोडा उपयोग केला.

४ ज्या रोग्यांना मलविबंध होता त्यांना दोन दिवसा आड ग्लिसरीनची पिचकारी देऊन मळ करवून घेतला.

५ एका रोग्याला क्लोरोमायसेटीन अजिबात दिलें नाहीं.

माझ्या मागील लेखावर कोणाच्या शंका असल्यास त्यांचें निरसन व्हावें म्हणून ही संपूर्ण हकीकत कळविली आहे.

या उपयोगावरून क्लोरोमायसेटीन हें द्रव्य कफ–पित्तनाशक आहे, व स्वेदरोध नाहींसा करतें. परंतु रसवह स्रोतसांचा रोध नाहींसा करीत नाहीं असें अनुमान निघतें. नुकतांच एक रोगी माझ्या इलाजाखालीं आहे. त्याची हीच मिश्र चिकित्सा चालूं आहे. तीन दिवसापासून त्याचें पण टेंपरेचर नार्मल झालें आहे.

———

दन्तवैद्य जायदे प्रवासनिधि

रु. ५१ मुंबई राज्य वैद्य संमेलन मुंबई,
रु. ५०१ इंडियन फार्मासिस्ट ॲसोसिएशन मुंबई,
रु. २१ आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री नागपूर,

माननीय वैद्य-वर्गांचे पत्ते

वै. वेणीमाधवशास्त्री जोशी आयुर्वेदाचार्य
कार्णिक बंगला, नवाबवाडी
गोकुळपेठ नागपूर १

वैद्यरत्न पं. शिवशर्मा आयुर्वेदाचार्य
बहरेस्तान बोमजी पेटिट रोड
खंबाळा हिल, मुंबई, फोन नं. ४१९७६

वैद्य पां. ह. देशपांडे आयुर्वेदाचार्य
अध्यक्ष म. प्रां. वैद्य मंडळ
६१७ शुक्रवार पेठ पुणें २

वैद्य श्रीराम शर्मा आयुर्वेदाचार्य
मंत्री, मुंबई-राज्य वैद्य-संमेलन
अग्रवालनगर, व्हिन्सेंट रोड, माटुंगा मुंबई १९

अरविंद आयुर्वेदिक इंजेक्शनांच्या
किंमती अतिशय कमी केल्या
ग्राहकांना विशेष सवलत
ता. १।३।१९५५ पासून नवीन नियम, लागूं. 'सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन चिकित्सा या पुस्तकाची किंमत ३ रु. ऐवजीं १॥ रु. केली आहे. पोस्टेज १० आणे निराळें. पुस्तक व्ही. पी. नें पाठविलें जाणार नाहीं. २ रु. २ आणे म. ऑ. नें आगाऊ आल्यावर पुस्तक रजिस्टर्ड पोस्टानें पाठविलें जाईल.
पत्ता– अरविंद केमिकल वर्क्स
छिंदवाडा [म. प्र.]

गोवासत्याग्रह वृत्त

निफाड (जि. नासिक) येथील वैद्य द. नी. जोशी (र.मे.प्र.)हे ४६ जणांच्या तुकडींत आरोंद्याहून ता. १४ रोजीं रात्रीं १०--११ वाजतां निघाले व ता. १५ रोजीं सकाळीं गोवा हद्दींत गेले. जातांना त्यांना अनेक वाहनांतून व पायीं अवघड प्रवास करावा लागला. पहाटे ५ वाजतां कोरेगांव येथें (गोवा हद्दींत) त्यांनीं हस्तपत्रकें निशाणें व इतर प्रचार पत्रकें घरांत व देवळांत वाटली. प्रभात- फेरी काढली व परत देवळाजवळ भाषणें व ध्वजवन्दन केलें.

इतक्यांत लष्करी मोटार येऊन तिनें निशाण हिसकून घेतलें व ४।५ जणांच्या छातींत व डोक्यावर मार दिला. वैद्य जोशी यांना हनुवटीखालीं ठोसा मिळाला. लगेच फोटोग्राफर आले. त्यांनीं फोटो घेतले. त्यांच्या १८ मोटारी होत्या. १॥ मैलावर ख्रिश्चन शाळा होती. तेथें या सर्वांना नेऊन पुनः त्यांचे फोटो काढले. सायंकाळपर्यंत अन्न-पाणी मिळालें नाहीं. लघवीस जातांना बरोबर शिपाअी असत. सत्याग्रहींचे डोक्यांत काठ्यां मारून गणति करण्यांत येअी

नंतर त्यांना पेंडणे येथें नेण्यांत आलें. व तेथें मार दिला. नंतर किरणपाणी नाक्यावर नेलें, तेथेंहि मार दिला, व तेथून नांवेंत घालून तेरेखोल किल्ल्याजवळ आणून सोडलें. तेथेंहि मार मिळाला. तेथून आरोंदामार्गें सत्याग्रही पुण्यास परतले. ४६ पैकीं ३२ जण जखमी असून तिघांना बरीच दुखापत झाली.

नासिक सत्याग्रहींचें प्रयाण

नाशिक येथील ३९ जणांच्या सत्याग्रहतुकडीबरोबर वैद्य बिंदुमाधव पंडित व वैद्य वि. म. गोगटे हे ता. ११ रोजीं निघून ता. १२ रोजीं पुण्यास पोंचले. तेथें वै. वि. म. गोगटे यांना वैद्यकीय पथकांत प्रवेश मिळाला. पुणें येथील प्रांतीय वैद्य मंडळाच्या कार्यालयातर्फे उभयतांना प्रेमाचा निरोप देण्यांत आला.ता.१३रोजीं सकाळीं सत्याग्रहीसह उभयतां बेळगांव येथें पोहोंचले. वाहनांच्या अडचणीमुळें महाराष्ट्र व कर्नाटकांतील सत्याग्रहींना न पाठवितां उत्तरभारताच्या आलेल्या सत्याग्रही मंडळींना एस्. टी. मोटारनें रवाना करण्यांत आलें. बाकीच्यांनीं परत जावें अगर पायीं पुढें जावें असा निर्णय गो. वि. सा. समितीनें दिला.

शुश्रूषा पथकाची कामगिरी

वैद्यराज वि. म. गोगटे हे वैद्यकीय शुश्रूषा--पथकाबरोबर ता. १४ रोजीं सकाळींच मोटारनें सावंतवाडीस रवाना झाले. त्यांची नेमणूक सावंत--वाडी रुग्णालयांत झाली. पुणें, मुंबई येथून आलेल्या डी.ए.एस्.एफ्. वैद्य,चतुर्थ वर्ष विद्यार्थी, एम्.बी.बी.एस्. चे विद्यार्थी यांच्या तुकड्या पाडून त्या जरूर तेथें पाठविण्याचें काम त्यांनीं केलें. तसेंच ता. १५ सायं--काळपासून ता.१७तिसऱ्या प्रहरअखेर आलेल्या जखमी सत्याग्रहींचे वैद्यकीय उपचार सावंतवाडी रुग्णालयांत निरलसपणें व शुश्रूषकांचें नेतृत्व पत्करून त्यांनीं केलें. ता. १७ रोजीं कळसुलकर हायस्कूलांत त्यांचें शारीरिक शिक्षणावर व्याख्यान झालें. तेथील विद्यार्थीवर्गांत ते प्रिय झाले. तसेंच रुग्णालयांतील सर्व लहानथोर कार्यकर्ते त्यांच्या ज्ञानपूर्वक शुश्रूषेनें

वैद्य वि. म. गोगटे

सेवासुग्ध झाले.ता.१९ रोजीं सकाळीं त्यांचा आवाज बसला व छातींतहि दुखूं लागलें त्यामुळें त्यांनीं ता.१९च्या सत्याग्रहीसाठीं उपचारार्थ न थांबतां परत येण्याचें ठरविलें. व ता. २० रोजीं रात्रीं ते नाशिक येथें पोहोंचले.

वैद्य बिंदुमाधव पंडित हे नाशिक, मुंबई, हैद्राबाद, आंध्र मराठवाडा, खानदेश, इ. ठिकाणच्या १५०० सत्याग्रहीबरोबर ता. १५ रोजीं सकाळीं पायीं ठळकवाडी येथील राणी पार्वतीदेवी कॉलेजपासून निघाले.त्यांचा पहिला मुक्काम कान्हूरखुर्द येथील धर्मशाळेंत झाला. अंगावरील कपडे अर्धवट भिजलेले. अंथरण्या -- पांघरण्यास कांहीं नाहीं. पावसाची संततधार चालू. खाण्यासाठीं फक्त चुरमुरे अशा स्थितींत ती रात्र सर्वांनीं काढली. बरीच मंडळी चंदगड गांवीं डाकबंगल्यांत थांबली. ता. १६ रोजीं सकाळीं सर्वांना लाल चटणी व २ भाकरी पिठले खावयास मिळालें. पुन्हां चाल सुरू झाली व तो मुक्काम आंबोली घाटांत झाला. तेथें तर पाऊस धुकें रात्रंदिवस चालू होतें. तेथील रामाच्या देवळांत प्रदक्षणेच्या निरुंद वाटेवर भिंतीला पाय टेकून सर्व रात्र अंधारांत सत्याग्रही झोपले. खाली दगडी फरशी होती. व ती ओली झालेली होती. ता. १७ रोजीं २० मैल चालतजाऊन सत्याग्रही सायंकाळीं ६ वाजतां सावंतवाडीस पोहोचले. घाटातील वनश्री, पाण्याचे प्रवाह प्रेक्षणीय होते. पण तिकडे लक्ष देण्यांस कोणासच फुरसत नव्हती.

फिरभी गोवा जायेंगे।

गोवा वि. सा. समितीचे कार्यकर्ते प्रवासांत सत्याग्रहींना भेटून, भाकऱ्या पोहोंचविणें, आजारी माणसास गाडींत घालून रुग्णालयांत पोचविणें व गोवा सरहद्दीवर घडणारें वृत्त सांगून माघारी जाण्यास सांगणें इ. कामें करीत होते. तथापि सत्याग्रहींचा एकच मंत्र होता, ‘ लाठी--गोली खायेंगे, फिर भी गोवा जायेंगे. ’

लढ्याच्या स्वरूपांत बदल

सावंतवाडींत केसरीचे वार्ताहर वैद्य ह. भा. भिडे आ. वि. वि. दोन वेळ भेटले. [illegible] आतां जाण्याची आवश्यकता नाहीं असें त्यांनीं सांगितलें. पायीं आलेल्या व सांवतवाडींत उपस्थित असलेल्या सत्याग्रहींच्या नेत्यांची व गो. वि. स.च्या प्रमुखांची एक सभा ता. १८ रोजीं दुपारीं १२ पासून ४ वा. पर्यंत झाली. दर १०० सत्याग्रहींपैकीं फक्त १५ सत्याग्रहींना जाऊं देण्याचा निर्णय समितीनें घेतला आहे, व त्यांनीं प्रा. मधु दंडवते यांच्या नेतृत्वाखालीं जावयाचें आहे असें सांगितलें. प्रा. दंडवते यांनीं आम्हीं दिवसां प्रवेश करणार नसून रात्रीं अज्ञात मार्गानें जाणार आहोत असें सभेंत जाहीर केलें. ही पद्धति वैद्य बिंदुमाधव यांना स्वतःसाठीं आचरावी असें वाटत नसल्यामुळें त्यांनीं त्या पद्धतीनें जाऊं इच्छिणाऱ्या नासिकच्या १० सत्याग्रहींना त्या तुकडींत पाठवून बाकीचे नासिकचे सत्याग्रही व वैद्य गोगटे यांच्यासह ते परत आले.

वैद्य फुलचंद दोशी, माढें

मु. पो. माढे जि. सोलापूर येथील वैद्य फु. शी. दोशी आयुर्वेदतीर्थ ह्यांनीं पुणें येथील म. प्रां. वैद्यमंडळाच्या कार्यालयाकडे पत्र पाठविले होते, परंतु बेळगांवच्या लोकांना सध्यां कांहीं वैद्यकीय उपचारकांची बाहेरील लोकांकडून जरुरी नाहीं असें उत्तर आलें. त्यांनीं बेळगांवच्या गो.वि.समितीस स्वखर्चानें वैद्यकीय शुश्रूषा पथकांत येण्यास व राहण्यास तयार आहे असें कळविलें व ८ सत्याग्रही घेऊन ते बेळगांव येथें ता. १४ रोजीं सायंकाळीं पोहोचले. बेळगांव स्टेशनवर त्यांची व वै. बिंदुमाधव यांची भेट झाली होती. ते २ दिवस बेळगाव येथें राहून परत गांवीं गेले.

रतलामचे वैद्य जोशी ए. एम्. एस्.

रतलाम येथील वैद्य रा. म. जोशी ए. एम. एस. (बनारस) हे १९ जुलै पासून सावंतवाडी येथें जाऊन राहिले होते त्यांनीं अनेक सत्याग्रहींना चांगली वैद्यकीय मदत १ महिनाभर दिली.

आरोंद्याचे वैद्य निराळ्ये व बांद्याचे वैद्य दवे यांनीं पूर्वीच्या सत्याग्रहींना वेळोवेळीं चांगली वैद्यकीय मदत केल्याचें कळतें.

पुण्याहून पुढील वैद्य व आयुर्वेदाचे विद्यार्थी सावंतवाडीस आले होते. त्यांनीं तेथें चांगल्या प्रकारें शुश्रूषाकार्य केलें.

षि. तु. गुजर, भी. कृ. तडस, मा. शं. पाटील, दत्त. जी. चनगुंडी, शि. शि. अळगुंडगी, वा. ना. वेतळे, श्री. वा. बुरसे, नी. ब. साठे, खु.गु. पहाडे, द.ब.कुलकर्णी, ब.रा.देसाई, म.भी. बोंडे, स.गो वाणी, द. दे. पाटील, दा. ना. पाटील, मामा पलंगे, अ. प. परिचारक, ब. बा. काकडे, रबडे, शं. द. जोशी, न. शि. ओझर्डे, ना. आ. पोरे, शि. गु. अमणमी.

डी. ए. एस. एफ. पदवीधर वैद्य

वैद्य बाबा आढाव, वैद्य शांताराम कुळकर्णी, वैद्य झिराळे, वैद्य वा. सु. दुगुल, वैद्य डी. वाय्. दीक्षित वैद्य तांबे.

पुणें येथें सत्कार

गोवा सत्याग्रहांत भाग घेण्याकरितां श्री. बिंदुमाधवशास्त्री पंडित नासिकच्या तुकडीचें नेतृत्व करून पुण्यांत आले. त्यांचेबरोबरच वैद्य वि. म. गोगटे होते. त्यांचा समावेश शुश्रूषा-पथकांत मोठ्या शिकस्तीच्या प्रयत्नानें करण्यांत आला म्हणून ह्या दोघांचाहि सत्कार शुक्रवार ता. १२-८-५५ रोजीं म. प्रां. वैद्यमण्डळाचे वतीनें श्री. वैद्यभूषण गणेशशास्त्री यांचे दिवाणखान्यांत करण्यांत आला. समारंभ आयत्या वेळेला ठरूनहि बरेच वैद्य उपस्थित राहिले.

प्रथम मण्डळाचें चिटणीस श्री. माधवशास्त्री यांनीं शुश्रूषापथकासंबंधीं थोडा पूर्वेइतिहास सांगून स्वांचें स्वागत केलें व अध्यक्षस्थान श्री. वै. भू. गणेशशास्त्री जोशी यांनीं स्वीकारावें अशी विनंति केली. त्याला मण्डळाचे अध्यक्ष श्री. देशपांडेशास्त्री यांनीं अनुमोदन दिल्यावर सभेच्या कामास सुरुवात झाली. 'गोव्यामध्यें मराठी भाषा, संस्कृति व आर्यवैद्यक ह्यांना संपूर्ण बन्दी आहे. म्हणून राजकारणाशिवाय वरील कारणाकरितां वैद्यांनीं ह्या लढ्यांत भाग घेणें जरूर आहे' असें अध्यक्षांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत सांगितलें.

आशीर्वादात्मक भाषणें

तदनन्तर वै. त्र्यंबकशास्त्री आपटे, वै. पुरोहित, वै. पं. कृष्णशास्त्री कवडे; वै. ह. बा. परांजपे, वै. दत्तात्रयशास्त्री शेंड्ये यांचीं भाषणें झालीं. सर्वांनीं दोघांचें अभीष्टचिंतन केलें. श्री. गणेशशास्त्री शेंड्ये यांनी संस्कृतांत आशीर्वाद दिला. मण्डळाचे अध्यक्ष श्री. पांडुरंगशास्त्री देशपांडे म्हणाले, "स्वखर्चानें औषधसामुग्री घेऊन १०।१५ वैद्यांनीं जागेवर हजर राहाण्याचें आश्वासन दिलें. मण्डळामार्फत देऊं केलेली ही मदत गोवा विमोचन समितीनें नाकारली ह्याबद्दल मला खेद वाटतो. आमची इच्छा असूनहि आम्हांला कांहीं करतां येत नव्हतें, ह्याबद्दल हळहळ वाटत होती. पण आज सुदैवानें वैद्यराज गोगटे व बिंदुमाधवजी येथें अचानक येऊन दाखल झाले, त्यामुळें पुनः एकदां प्रयत्न करून पहाण्याचें दृष्टीनें गोवा विमोचन समितीचे दारांत जवळजवळ धरणें धरून बसलो. त्या खटपटीला यश येऊन वैद्यराज गोगटे यांची शुश्रूषापथकांत नेमणूक झाली. शुश्रूषा पथकांत ते एकटेच म. प्रां. वैद्य मंडळातर्फे वैद्य म्हणून जात आहेत. ह्यांत आम्हाला समाधान आहे. मी मण्डळाचे वतीनें त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो व त्यांचे अभीष्टचिंतन करतो. त्यांच्या तेथील कामानें म. प्रां. वैद्य मण्डळाची प्रतिष्ठा वाढणार आहे"

मी एक आयुर्वेदाचा सैनिक

त्यानंतर अध्यक्षांच्या हस्ते दोघांनाहि हार घालून सत्कार करण्यांत आला. सत्काराला उत्तर देतांना वै. गोगटे म्हणाले, 'मी एक पाईक - किंवा आयुर्वेदाचा सैनिक ' म्हणा – म्हणून आजपर्यंत वागत आलो आहे. मंत्र्यांचें पत्र आल्यावर मी स्तब्धच राहिलो. परन्तु अंतरीची तळमळ मला स्वस्थ बसूं देईना. एका रात्रींत सर्व निर्णय ठरविला. व तो प्रिय सुहृद् बिंदुमाधव यांनाच कळविला. 'वाटेल त्या नात्यानें तुम्ही घुसा, असा त्यांनीं मला सल्ला

दिल्यावर मीं जावयाचें ठरविलेंच. येथें आल्यावर आपल्या प्रयत्नानें मला शुश्रूषा– पथकांत प्रवेश मिळाला आहे त्याचें मला समाधान वाटतें. मी आपलें काम चोख बजावीन ही खात्री बाळगा.”

श्री. बिंदुमाधवशास्त्री म्हणाले ‘आतांच अध्यक्षांनीं सांगितल्याप्रमाणें खरोखरच गोव्याची परिस्थिति आहे. मी प्रांतीय अध्यक्ष असतांना गोव्यांत दौरा काढला होता. त्यावेळीं परिस्थिति प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिली आहे. धोब्याला देखील आपली पाटी पोर्तुगीज भाषेत रंगवावी लागते इतकें तेथें पारतंत्र्य आहे. विद्यालयाचें काम अंगावर घेतल्यानें प्रथम मी ह्यापासून अलिप्त होतो. पण माझा पिंड सत्याग्रह्याचा असल्यानें दिवसेंदिवस वाढत चाललेलें संतप्त वातावरण मला स्वस्थ बसूं देईना. श्री. गोगटे यांचें जेव्हां जावयाचें ठरलें, त्या वेळेला मला देखील एका कल्पनेनें त्रस्त केलें. मी भावनाप्रधान नसून देखील भावनाविवश झालो व एक सत्याग्रही म्हणून त्यांत प्रवेश केला. त्यानंतर नासिक तुकडीचें नेतृत्व अनपेक्षितपणें माझेकडे आलें. कॉंग्रेसच्या सत्याग्रहाचें स्वरूप राजकीय होते तेव्हां मी सेवा संघाचा राजिनामा देऊन बाहेर पडलो होतो. पण ह्यावेळीं मी राजिनामा दिलेला नाहीं. कारण गोव्यांत वैद्यकाला आयुर्वेदाला बंदी आहे. त्याचा निषेध म्हणूनच मी सत्याग्रहाला उतरलो आहे. हें आयुर्वेदाचेंच काम असल्यानें सेवा संघाचें कामाला त्यानें बाधा येणार नाहीं. आपले आशीर्वाद हेंच आम्हाला नैतिक पाठबळ पुरेसें आहे.

शेवटीं मंत्र्यांनीं सर्वांचे आभार मानल्यावर कॉफीपान होऊन अडीच तास चाललेला हा कार्यक्रम समाप्त झाला.

तृणज्योतिष्मति

— : विकत मिळण्याची व्यवस्था :—

कि. १ तोळ्यास १ रुपया. टपालखर्च निराळा.

आयुर्वेद सेवा संघ, नासिक

अभिनंदनपर पत्रें

‘श्री. बिंदुमाधवशास्त्री सत्याग्रहास गेले आहे श्री. गोगटे वैद्यकीय पथकाचे कार्यकर्ते म्हणून आहेत. दोघांनीं वैद्यांचें आयुर्वेदाचें आणि नाशिक नांव राखलें. या त्यागाचें अनुकरण होणें जरूर आ हा त्याग बहुमोल आहे.’ - आचार्य वेणीमाधवशा

‘म. प्रां. वै. मंडळातर्फे एक तरी वैद्य (वि. गोगटे) गोवा सत्याग्रहींच्या दुःखविमोचनाला आणि ते स्वतः हुशार शस्त्रक्रियाकुशल असल्या प्राणघाती हल्ल्याच्या सत्याग्रहांत त्यांचा फार उपयो झाला ही अत्यंत आनन्दाची गोष्ट आहे.

वैद्य बिंदुमाधव हे ७० मैल पावसापाण्यां भिजत चालून गेले, वांटेंत ओल्याचिंब जागेत गा ठ्यांत झोंपले व इतरहि सत्याग्रही खडतर जीव अनुभवून आले, त्यांची सेवा मातृभूमीला रुजूं झाल यांत शंका नाहीं. आपण उभयतः सोसलेल्या कष्ट बद्दल व त्यागाबद्दल मी आपलें अभिनंदन करतो.’

पां. ह. देशपांडे, —अध्यक्ष

सेवा संघाचीं सर्व औषधें

तसेंच सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाबळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—

देशी सर्वौषधी संग्रहालय

पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

“ छोटे धंदे ”

अर्थात अल्प भांडवली ग्रामोद्योग, सेंटेड सुपारी, पानविड्याचे मसाले, जर्दे, दतमंजनें साबण या नित्योपयोगी मालाचें उत्पादन करून शेंकडो रुपये मिळवा. माहितीपत्रकास फक्त ८ आणे पाठवा.

एम्. देशपांडे C/o सोमण लॉज, पुणें ४

शुश्रूषा--पथकाबद्दल खुलासा

त्री म. प्रां. वैद्य मंडळ पुणें, यांजकडून)

गोंवा विभागांत सत्याग्रह दि. १५।८ ला प्रमाणावर होणार असल्याचें बरेच दिवस र झालें होतें. त्याला अनुसरून म. प्रां. वैद्य-चे वतीनें एक शुश्रूषा-पथक न्यावें अशी कल्पना निघाली. त्यानंतर आयुर्वेद पत्रिकेंतहि अर्थाची सूचना प्रसिद्ध झाली. त्यामुळें सदर जास्त चालना मिळून १५ जुलैचे आयुर्वेद मध्यें मण्डळातर्फे एक निवेदन पाठविण्यांत , त्याच्या प्रति निरनिराळ्या वैद्यकीय मासिकां-व स्थानिक वृत्तपत्रांकडे प्रासिद्धीकरितां पाठ-आल्या. त्यावरून निरनिराळया ठिकाणाहून १०१२ लोकांचीं स्वयंस्फूर्तीनें पत्रें आलीं.

सत्याग्रहाचीं सर्व सूत्रें गोवा विमोचन समिती-असल्यानें व त्यांच्या सहकार्याशिवाय आपली उत्तम रीतीनें होऊं शकणार नसल्यानें समितीचे कार्यवाह श्री. जयवंतराव टिळक यांचेशीं आम्ही सुरू केलें. प्रथम त्यांनीं आमच्या मदतीचा र केला. स्वखर्चानें सत्याग्रहाचे जागेपर्यंत मदत देणाऱ्या वैद्यांची त्या काळांतील राहाण्या-ची व्यवस्था करण्याचें त्यांनीं मान्य केलें. त्यांच्या वैद्यकीय समितीची बैठक झाल्या-देण्याचें ठरलें.

श्री. टिळक यांचा खुलासा

त्या समितीची बैठक झाल्यावर श्री. टिळक पुढीलप्रमाणें खुलासा केला. "सत्याग्रह्यांच्या च्या मानानें जखमी लोकांचे शुश्रूषेकरितां लाग-चिकित्सकांची संख्या २० पेक्षां जास्त अस-नाहीं. बेळगांव येथील स्थानिक चिकित्सकांनीं ग्रहाचे जागेवर जाऊन जखमी लोकांची सुश्रूषा चें ठरविलें असलेनें परठिकाणहून इतर कोणाहि कित्सकाला आणूं नये असें समितीचें मत आहे. तुम्ही देऊं केलेली मदत सध्यांतरी स्वीकारतां येणार नाहीं. इतर ठिकाणहून जाण्याची इच्छा करणाऱ्या चिकित्सकांनाहि आम्ही असेंच कळवीत आहो."

वरीलप्रमाणेंच त्यांनीं खुलासा केल्यावर आमची निराशा झाली. सत्याग्रहाचे मार्गाची गुप्तता, केंद्र व प्रांतिक सरकारांचें त्याबद्दलचें धोरण व त्या--मुद्याबद्दलची नाविन्यता ह्या सर्व बाबतींत आम्ही नवखे असलेनें स्वतंत्र रीतीनें सर्व खर्च करून जाग्या-वर जाण्याचें धाडस करणें हितावह नाहीं असें वाटलें, आणि म्हणून मोठ्या नाखुषीनें व नाइलाजानें शुश्रूषापथकाचा कार्यक्रम रहित करावा लागला.

ज्यांनीं कार्यालयाकडे वैयक्तिक पत्रें पाठविलीं त्यांना त्याप्रमाणें उत्तर धाडण्यांत आलें आहेच. परंतु सर्व वैद्यसमाजाला आम्ही केलेल्या खटपटीची माहिती व्हावी म्हणून हा खुलासा प्रसिद्ध करीत आहो. आम्ही अजून प्रयत्न न सोडतां निदान एक तरी वैद्य बेळगांवचे पथकाबरोबर जावा अशी खटपट करीत आहोत. वैद्यांचा गैरसमज (जर झाला असेल तर) ह्या खुलाशानें दूर होईल अशी आशा आहे.

अनुक्रमणिका

उत्तर प्रदेश सरकारचे आयु. प्रोत्साहन	१२९
रसायन–शास्त्राचा अभ्यास	१३१
आरोग्य आघाडीवरील प्रगति	१३३
दंतवैद्य जायदे यांची पत्रें–१	१३५
माती कां खातात ?	१३७
नळगुदावर शतावरीचा प्रयोग	१३८
चहा :	१३९
ठिकठिकाणीं स्वास्थ्य–केंद्रें निर्माण करा	१४२
आयुर्वेदाची सद्यःस्थिति	१४३
प्राणवायु	१४९
६ रुग्णांची साद्यंत हकीकत	१५१
गोवासत्याग्रह वृत्त	१५७

हरीतकीची थोरवी

— यस्य नास्ति गृहे माता तस्य माता हरीतकी । —

ज्यांच्या घरीं आई नाहीं त्याची आई हिरडा ही आहे. आयुर्वेदीय सुभाषितकारानें या वचनांत आयुर्वेदाचें एक श्रेष्ठ तत्त्व गोविलें आहे. लहान मुलें, तरुण व वृद्ध जो आहार घेतात, जो विहार करतात त्यामुळें निर्माण होणारे कफवातात्मक दोष दूर करून शरीरास स्वस्थ करण्याची शक्ति एकट्या हिरड्यांत आहे, हें कोणीहि कबूल करील. पण हा तुरट हिरडा खावा कसा हा प्रश्न आयुर्वेद सेवा संघानें फारच कुशलतेनें सोडविला आहे, हें ज्यांनीं ज्यांनीं आयुर्वेद सेवा संघाचा

अगस्तिप्राश

सेवन केला आहे त्यांचें अनुभवपूर्वक मत बनलें आहे. टमाटो, लिंबू, संत्रीं, मुसंबीं, च्यवनप्राश खाऊनहि ज्यांची प्रकृति सुधारत नाहीं, उलट कफ होतो, पाय सुजतात, डोळे सुजतात, रक्तक्षीणता येते, अशा लोकांनीं अगस्तिप्राश अवश्य सेवन करावा. त्यांना लाभ झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

पावसाळा व हिंवाळा

ज्यांची प्रकृति थंड आहे व अग्नि मंद आहे, त्यांना पावसाळा व हिंवाळा हे ऋतु जड जातात. त्यांना फक्त उन्हाळ्यांत बरें वाटतें. पावसाळ्यांत भूक लागत नाहीं. अंग दुखतें. पोळी–भाकरी पचत नाहीं, आमांश होतो, पोट दुखतें, फुगतें, हिंवाळ्यांतहि गारठा बाधतो, अशा लोकांसाठीं आयुर्वेद सेवा संघाचें

भल्लातकासव

हें सौम्य पण नामी औषध आहे. उन्हाळा वगळून बाकीच्या दिवसांत हें औषध नियमानें जेवतांना (अर्ध्या जेवणांत) घेण्यानें सर्व तक्रारी दूर होतात असा अनुभव आहे. आपणहि हें वापरा व सेवा संघास आपले अनुभव अवश्य कळवा.

आयुर्वेद औषधीभवन, नासिक

संपादक व प्रकाशक— वैद्य विदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य बिवलकर कारंजा, नाशि
मुद्रक—श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, नाशिक.

गुरुकुल पत्रिका

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

वाचनालय, गुरुकुल कांगड़ी

र्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

र्ष ९ वें) नासिक, ता. १६ सप्टेंबर १९५५ (अंक ६ वा

औषधीकरणांतील शास्त्रीय प्रामाणिकता

वैद्यरत्न पं. शिवशर्माजी हे भारतांतील वैद्यांचे मुकुटमणी आहेत. आयुर्वेद सेवा संघास दिल्यानंतर त्यांनीं आपला अभिप्राय पुढीलप्रमाणें लिहून पाठविला आहे:—



" आयुर्वेद सेवा संघाचें कार्य पाहून मला फार संतोष व प्रसन्नता वाटली. ही संस्था आयुर्वेदाची खरीखुरी करीत आहे. आयुर्वेदीय प्रचारकार्य व विद्यालय ह्या तर सनीय गोष्टी आहेतच, परंतु औषधीकरणांतील शास्त्रीय माणिकता व स्वच्छता ह्या गोष्टींचा माझ्या मनावर विशेष पडला.

शुध्द भावानें आयुर्वेदाची सेवा

माझा असा विश्वास आहे कीं, ज्या गांवामध्यें वैद्यसमाज शुद्ध भावानें व योग्यतेनें आयुर्वेदाची सेवा करील त्या ांतील नागरिक आयुर्वेदाकडे आदरपूर्ण भावनेनें पाहातील आयुर्वेदाची श्रेष्ठता व प्रचार वाढवितील. ह्या संबंधांत वैद्यसमाजाचे आदर्शाकरितां आयुर्वेद सेवा घाचे प्रयत्न विशेष प्रशंसनीय व अनुकरणीय असे आहेत, असें माझें मत झालें आहे."

१८।८।५५

बाला हिल, मुंबई

भवदीय

शिवशर्म्मा

म. प्रां. वैद्य मंडळाचें प्रचारकार्य

म. प्रां. वैद्य मंडळाचे अध्यक्ष व मंत्री यांनीं आपल्या प्रांतांत निरानिराळ्या ठिकाणीं फिरून मंडळाच्या कार्याचा प्रचार करावा व त्यासाठीं होणारा खर्च म. प्रां. वैद्य मंडळाच्या निधींतून करावा असा ठराव पुणें येथें भरलेल्या स्थायी समितीचे सभेंत मंजूर झाला आहे. त्याला अनुसरून गत वर्षीच्या अध्यक्षाप्रमाणेंच चालू अध्यक्ष व प्रधानमंत्री म. प्रां. वैद्य मंडळाचे कक्षेंत येणाऱ्या जिल्ह्यांत प्रचारार्थ दौरा करू इच्छितात.

दौऱ्याला येणारा खर्च म. प्रां. वैद्य मंडळातर्फेंच करावयाचा असतो. तथापि मागील असा अनुभव आहे कीं प्रचारांत जमा होणारी सभासद वर्गणी, रोगी परिक्षा शुल्क इ. तून तो खर्च होऊन कांहीं रक्कम शिल्लकच पडते.

मंडळाचे कार्य वाढतें आहे व तें यशस्वी होत चाललें आहे. अशावेळीं प्रत्येक जिल्ह्यांतील वैद्यवर्यांस, विशेषतः स्थायी समितीच्या सभासदास विनंति कीं त्यांनीं आपल्या जिल्ह्यांत अध्यक्षीय दौरा घडवून आणावा. आपल्या जिल्ह्यांतील दौऱ्याच्या कार्यक्रमाची स्थूल रूपरेषा पत्रानें खालील पत्त्यावर कळवावी. म्हणजे मंत्री अगर अध्यक्ष अगर दोघेहि प्रचारकार्याकरितां दौरा काढतील.

दौऱ्यास प्रारंभ दसरा ते दिवाळी या दरम्यान करण्यांत येईल. नंतर सोईप्रमाणें संमेलन भरेपर्यंत दौऱ्याचें काम चालू राहील.

आपापल्या ठिकाणच्या व जिल्ह्यांतील वैद्यबंधूंना मंडळाच्या चालू कार्यपद्धतीची माहिती व वैद्यकीय जगांत चाललेल्या घडामोडींचें ज्ञान करून देण्याची ही संधी स्थायी समितीचे सभासदांनीं गमवू नये.

पत्रव्यवहाराचा पत्ता :—

वैद्य माधवशास्त्री जोशी
प्रधानमंत्री, म. प्रां. वैद्य मंडळ
२८ शुक्रवार तुळशीबागेसमोर पुणें २.

———

नगर आयुर्वेद महाविद्यालयाचे, पदवीधर
व मध्यप्रदेश आयुर्वेद बोर्डाचे माजी सभासद



वैद्य ल. ठा. शहा, अकोला

दररोज भोजनोत्तर
अन्ननलिकेंत व आमाशयांत दाह

एका आयुर्वेदाचार्य वैद्यांचा स्वानुभवः- गेलीं ३ वर्षें मृग ते हस्त नक्षत्रां अखेर दररोज भोजनोत्तर अन्ननलिका व आमाशेय यांत दाह होत असे. अन्न या ३।४ महिन्यांत विषवत् वाटे. पुष्कळ उपचार केले पण विदाह बंद होऊ शकला नाहीं.

या वर्षी पावसाळ्यांत हा त्रास सुरु होतांच मी ' भल्लातकासव ' समानकालीं घेणें सुरु केलें त्यामुळें विदाह हळुहळु कमी झाला मी आतां सुखानें भोजन करूं शकतो. ”

पवित्र
नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोळा.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोळा.
लिहाः–नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१-नेपाळ

वैद्य ल. ठा. शाह (अकोला) यांचें प्रचार कार्य

(लेखकः— वै. ह. रा. पिंपळे, आ. वि. वि. अकोला)

मध्यप्रदेशाचे प्रतिनिधि म्हणून अकोला येथील श्री. शाह, हे हेलसिंकी (फिनलंड) येथें भरलेल्या जागतिक शांतता परिषदेला ' उपस्थित होते. वैद्य यांचेप्रमाणेंच जगांतील सुमारें ६८ राष्ट्रांतील १२५ डॉक्टर्स या परिषदेला उपस्थित होते. या १२५ डॉक्टरांच्या एका सब् कमिटीसमोर वै. शाह नी आयुर्वेदशास्त्रावर माहितीपूर्ण असें भाषण ले, आणि जगांतील बहुसंख्य राष्ट्रांचे प्रतिनिधी स्थित असलेल्या या सभेंत आयुर्वेद चिकित्सा-द्धतीचा प्रचार केला. अशा प्रकारें व्यापक प्रमाणावर आयुर्वेदाचा प्रचार परराष्ट्रामध्यें होण्याची ही हिलीच वेळ होय.

आयुर्वेदाविषयीं औत्सुक्य

वै. शाहांच्या भाषणाचा उपस्थितांवर बराच भाव पडला. भाषणाचे दुसरे दिवशीं अनेक राष्ट्रां- डॉक्टर्स त्यांना येऊन भेटले. वै. शहांच्या षणानें त्यांचे मनांत आयुर्वेदाविषयीं औत्सुक्य र्माण केलेलें दिसलें. वैद्य शाहांना त्यांनीं नाना कारचे प्रश्न विचारले, आणि आयुर्वेदाविषयीं स्तींत जास्त माहिती मिळण्याचा प्रयत्न केला.

या डॉक्टरांबरोबर बसून वै. शाहजींनीं जी चर्चा ली त्याबद्दल वै. शाह सांगतात " जगांतील नेक राष्ट्रांना आयुर्वेदाचें नांवहि माहित नाहीं, णि त्याविषयीं त्यांना माहिती असणें तर दुरा-स्तच! त्यामुळेंच कीं काय, आयुर्वेदावरील माझें षण ऐकून त्यांची जिज्ञासा जागृत झाली आणि अनेकविध प्रश्नांचा माझ्यावर भडिमार करून त्यांना ज्ञात असलेल्या या भारतीय आरोग्यशास्त्रासंबंधीं तां येईल तेवढी माहिती त्यांनीं मिळविली. आयुर्वेदांतील ' स्वस्थवृत्त ' सारख्या विभागाबद्दल ना विशेष उत्सुकता वाटली. आयुर्वेदाचा जर नेटानें प्रचार केला, तर इतर कोणत्याहि उपचार-प्रणालीपेक्षां जगांत आयुर्वेदाला प्राधान्य मिळेल, असें माझें मत आहे. "

संशोधन संस्थांना भेट

हेलसिंकी येथील जागतिक शांतता परिषदेच्या समाप्तीनंतर वै. शाह यांनीं फिनलंड, रशिया व झेकोस्लोव्हाकिया यामधील अनेक संशोधन संस्थांना भेटी दिल्या, व अनेक मोठमोठ्या दवाखान्यांचें कामकाज अभ्यासकाच्या दृष्टीनें पाहिलें. निरनिराळ्या दवाखान्यांच्या प्रमुख डॉक्टरांशीं वै. शाहांनीं चर्चा केली व आयुर्वेदाचीं मूलतत्त्वें त्यांचे मनावर बिंबविण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

विविध चिकित्सा प्रकार

सदरहू देशांतील मातीच्या चिकित्सेचे मोठमोठे दवाखाने, वाफेच्या चिकित्सेचे मोठमोठे दवाखाने, गंधक स्प्रिंगचा दवाखाना इत्यादींची पाहाणी वै. शाहांनीं अत्यंत बारकाईनें केली. या दवाखान्यांतील डॉक्टर लोकांशीं बोलतांना " ही तुमची चिकित्सा-पद्धति आमच्या आयुर्वेदांतील शोधन चिकित्सेचेंच एक अंग असून तुमच्याकडील या चिकित्सेला जर आमचेकडील पद्धतीची जोड दिली, तर आजची तुमची ही चिकित्सापद्धति अधिक प्रभावशाली होईल " असें वै. शाहांनीं त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला, व कांहीं डॉक्टरांना त्यांचें हें म्हणणें पटलें देखील !

आरोग्यखात्याला ' शार्ङ्गधर संहिता ' भेट

मास्कोच्या आरोग्यखात्याच्या मंत्र्यांशींहि (हेल्थमिनिस्ट्री) वै. शाह यांनीं चर्चा केली व " आयुर्वेदाच्या दृष्टीनें रशियांत काय केलें जात आहे ? " अशी स्पष्ट विचारणा तेथें केली, आणि ' शार्ङ्गधर संहिते ' ची एक प्रत भेट म्हणून दिली. आयुर्वेदाचीं मूलतत्त्वें विशद करणारा एक लेखहि

वै. शाहांनीं लिहून दिला. आयुर्वेदाबाबत वैद्य शाहांच्या प्रयत्नानें त्या भागांत बरीच जिज्ञासा निर्माण झाली असून त्या संबंधींचें लिखाण आपणास मिळावें, असा अनेक तज्ज्ञ डॉक्टरांनीं वै. शाहांना आग्रह केला. परन्तु त्यांची मागणी पूर्ण करणें वै. शाहांना शक्य झालें नाहीं.

वै. शाह यांना काय वाटतें ?

युरोपीय देशांमध्यें तेथील चिकित्सकांच्या न कळत कां होईना, पण आयुर्वेदाचीं पुष्कळ तत्त्वें उपयोगांत आणलीं जातात. हीं तत्त्वें जर सुसंगत रीत्या त्यांच्या उपयोगांत आणलीं गेलीं, व आयुर्वेदाच्या तत्वप्रणालीनुसार त्यांच्या चिकित्सेंत जर विशिष्ट-प्रकारें भर घालण्यांत आली, तर आयुर्वेदाचा प्रचार जगभर होईलच; परन्तु त्याचबरोबर जगाच्या अरोग्यसिद्धीच्या ध्येयपूर्तीचा एक नवीन मार्ग खुला होईल, " असें आपल्या अनुभवांवरून वै. शाह यांना वाटतें.

जागतिक शांतता परिषदेच्या निमित्तानें परदेशांत जाऊन वै. शाहांनीं आयुर्वेदाची प्रतिष्ठा प्रस्थापित करण्याचा जो आपल्यापरीनें प्रयत्न केला, त्याबद्दल त्यांना कोणीहि हार्दिक धन्यवादच देईल !

तारेचा पत्ता:-Newbottle

के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुचें, कॅपसुल्स
[हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाची सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

वाचकांचा पत्रव्यवहार:—

वैद्य सरकारी नोकर असावेत

लोकलबोर्ड व म्यु. चे वैद्य हे नोकर आहेत, तसे एस्. एम्. पी. हे नोकर नाहींत त्या प्रत्येकांच्या नोकरींचे नियम निरनिराळे आहेत. दवाखाने कोणत्याहि संस्थेतर्फे असले तरी वैद्य हे सरकारी नोकर असावेत. म्हणजे खेड्यातील वैद्य शहरांत व शहरांतील खेड्यांत बदलून जाऊ शकतील.

गुणी व अवगुणी वैद्य

सरकारनें हल्ली वैद्यांत गुणी [क्वालिफाइड] व अवगुणी [अन्क्वालिफाइड] असे भेद ठेवल्यानें पगारांत विषमता आहे. सध्यां डी. ए. एस्. एफ्. वैद्य निर्माण होत असले तरी पूर्वींचे विशारद-आचार्य नोकरींत आहेतच, त्यांना कमी लेखण्यापेक्षां एखादा अल्पकालीन शिक्षणक्रम काढून डी. ए. एस्. एफ. च्या बरोबरीनें आणून ठेवावे.

प्रश्नपत्रिका पाठवावी

या सर्व गोष्टी मे. डायरेक्टर ऑफ् आयुर्वेद यांच्या कानीं आपण घालाव्या प्रत्येक नोकर वैद्याची माहिती मिळण्यासाठीं एक प्रश्नमालिका प्रत्येकाकडे पाठवावी. येणाऱ्या उत्तरांचा आपणास मार्गदर्शक उपयोग होईल. — का. सी. पुराणिक, मेंढवड

'प्राणदावटी'चा पाठ

कैलासवासी वैद्य नारायणशास्त्री मराठे, सातारा, यांचें सर्वरोगनाशक 'प्राणदा गुटी' नांवांचें औषध होतें. त्याचा पाठ कोणास माहित असल्यास तो त्यांनीं आयुर्वेद पत्रिकेंत प्रसिद्ध करावा.

ह्या गोळ्या लहान सुपारी एवढ्या होत्या. त्यांना कोणत्याहि प्रकारची चव नव्हती. जिभेस मातीसारख्या लागत, परतु फार गुणकारी होत्या. शिष्यवर्गांत सदर गोळ्यांचा पाठ माहित असण्याची शक्यता आहे. — वै. ह. रा. बराटे, भुसावळ

महाडुंग : : :

[लेखकः– वैद्य मुकुंद कृष्ण जोशी, वाई]

महाडुंग हा एक वृक्ष आहे· याचें झाड कडु-ादिकाप्रमाणें मोठें असतें. फांद्याहि लांब लांब हि मोठीं [विड्याच्या पानाएवढालीं] पण र्निंबाच्या पानाप्रमाणेंच बाजूनें कात्रेदार, रंग ा, दोन्ही बाजूला बारीक दाट लव. [फूल फळ लेलें नाहीं.]

पानाच्या रसाची चवः– कडवट तुरट.

विशेष माहिती

सुमारें १५ वर्षांपूर्वी वाई येथील एक इसमाच्या ला बाळंतपणानंतर ताप व आतिसार झाला. डॉक्टर वैद्यांचीं औषधें इंजेक्शनें दिलीं पण ग झाला नाहीं· रोग वाढूं लागला. सर्व अंगावर आली. हालणें, बोलणें, खाणें, पिणें इ० सर्व आले. डोळे सुजेनें उघडेनासे झाले व त्यामुळें नासें झालें. शेवटीं आसन्नमरण स्थिति आली न धार्मिक विधि केले. गोप्रदानादि विधि, वेदो-गांचें चरणतीर्थ इ० विधि केले. बोलाविलेल्या नारायणांपैकीं एकानें बाओीची अवस्था पाहून तलें कीं, माझें कुटुंबाची हीच अवस्था झाली , त्यावळीं एका कुणब्यानें मला औषध सांगि- त्या औषधानें माझी बायको सुधारली. इच्छा ल्यास तुम्ही देऊन पहा.

रस कसा काढावा ?

हें ऐकून ‘करून पाहूं’ असें मालकानीं ठरवून झाडाचा पाला आणला. त्याचा रस– मध व हातांना लावून पाला हातांवर कुसकरून ना लागलेला रस चमच्यानें निपटून घेऊन तो चमचे रस व तितकेंच गाईचें तूप मिसळून ळ व संध्याकाळ असें दोन्ही वेळां देण्यास प्रारंभ . पथ्य भूक लागेल त्या मानानें, गव्हाचा फुल काढून त्याचा भरपूर तूप व साखर घालून सांना खावयास देत असत. संध्याकाळपासून जुलाब थांबले. दुसरेच दिवसापासून बाओी बोलूं लागली व खाण्याला मागूं लागली. ३।४ दिवसांत सूज कमी होऊं लागली, डोळे उघडले व त्यामुळें दिसूं लागलें, आणि क्रमाक्रमानें सूज ओसरली व जुलाब बन्द झाले. भूक उत्तम लागूं लागली. दिवसांत २।३ वेळां शिरा पोटभर खाऊं लागली व तो पचूंहि लागला.

२१ दिवसांनीं गुण

एकूण एकवीस दिवस औषध दिलें. रोग संपूर्ण बरा झाला पण पथ्य मात्र आणखी २१ दिवस चालूं ठेवलें व नंतर नेहमींचें जेवण देऊं लागले. बाई उत्तम बरी होऊन पुढें १२।१५ वर्षें जगली व तिनें संसारहि केला.

गुरांचा ढेंढाळ्या रोग

गुरांना ढेंढाळ्या रोग होतो व त्यामुळें गुरें सारखी हगूं लागतात व थकून मरतात. ह्या रोगावर गुरांचे वयोमानाप्रमाणें २ ते ८।१० पर्यंत पानें वाटून, पावशेर ताकांत कालवून तें ताक गुरांना पाजतात. यानें २।३ दिवसांत रोग थांबतो व गुरें सुधारतात असा अनुभव मी प्रत्यक्ष येथें पहात आहे.

इतकें विस्तृत लिहिण्याचा हेतु असा कीं, अशा प्रकारचें झाड कोणाला माहित असल्यास त्याचें निघंटूंतील नांव, गुणकर्म आणि उपयोग वगैरे जी माहिती त्याला असेल ती त्यानें कृपया प्रसिद्ध करावी.

कफवातजन्य अतिसार-संग्रहणी

सदर वनस्पति ही कफवातजन्य अतिसार व संग्रहणी या विकारावर अत्युत्तम गुणकारक असावी; औषधी ताजी, ओली न मिळाली तरी पानांचें चूर्ण करून किंवा कज्जलीसारख्या औषधाला ताज्या पानांच्या कल्कांत घोटून पुटें देऊन (पानांचा रस निघत नाहीं अत्यंत चिकट व बुळबुळीत हात होतात म्हणून) किंवा पानांच्या चूर्णाबरोबर अल्प प्रमाणांत कज्जली मिश्र करून घोटून कल्प बनवून ठेवल्यास जरूरीचे वेळीं सदर कल्पाचा उपयोग

करून पाहाणें शक्य होईल. तरी आ. से. संघानें चालविलेल्या चिकित्सालयांत सदर कल्प वापरून त्याचा अनुभव कळविण्याची तयारी असल्यास औषधी पुरवठा कांहीं प्रमाणांत मी करीन. तसेंच आ. पत्रिकेच्या वाचक वैद्यबंधूंनाहि अनुभवाकरितां औषधी पुरवठा, मजुरी व ट. खर्च पाठविल्यास (अजमासें १२ आणे ते १ रु. पर्यंत) करणें शक्य होईल. सदर वृक्ष येथून १०।१२ मैलांवर आहे. समक्ष पाहण्याची इच्छा असणाऱ्यांनीं पत्रद्वारें आगाऊ कळवून मगच यावें.

सदर वर्णनाचीं झाडें आणखी कोठें कुणाला माहिती आहेत काय ? त्यांचीं वेगवेगळीं नांवें, गुणधर्म, वापरून आलेला अनुभव अि॰ सर्व माहिती प्रसिद्ध झाल्यास त्याचा उपयोग वैद्यबंधूंना व रुग्णांना होअील.

मूळव्याधीवर गुप्त औषध

अशा अनेक रोगांवर अनेक रामबाण वनस्पति ठिकठिकाणीं आहेत. उदा:—येथें एक मराठा जातीचा इसम मूळव्याधीकरितां पोटांत घेण्याला व मोडांना लावण्याला फक्त ७ च दिवस औषध देतो. तेवढ्यानें मूळव्याधीचें मोड झडून जातात व रोगी रोगमुक्त होतो. मूळव्याध कसलीहि असो – चुंबळीची, मोडांची, रक्ति, नवी, जुनी कसलीहि मूळव्याध जाते, असें अनुभव घेतलेले अिसम येथें आहेत.

पण अशा लोकांकडे रोगी गेला म्हणजे या लोकांचा भाव अितका चढूं लागतो कीं, त्याला मर्यादाच राहात नाहीं. ४।८ आण्याच्या औषधाची किंमत५।५०।१००रु.देखील मागण्याला हे लोक कमी करीत नाहींत. औषध तर कितीहि पैसे दिले तरी प्राणांतिक सांगावयाचे नाहींत. याचा परिणाम काय ? तर रोग्याला हमखास गुणकारी औषध मिळत नाहीं व अशा लोकांना पैसाहि नाहीं. शेवटीं त्यांचे बरोबरच त्यांचें औषध जावयाचें. असो.

[पूर्व खानदेशांत महाडुंग या वृक्षाला अडु, अरळ असें म्हणतात, असें कळतें. —संपादक]

शॉर्ट् सर्व्हिस रेग्युलर कमिशनें

सेनेच्या वैद्यकीय विभागांत ३ वर्षें मुदतीच्या शॉर्ट सर्व्हिस रेग्युलर कमिशनांसाठीं संरक्षण खात्यांतील डायरेक्टर जनरल ऑफ आर्म्ड फोर्सेस, मेडिकल सर्व्हिसेस, यांनीं नागरी पुरुष डॉक्टरांकडून अर्ज मागविले आहेत. या कमिशनांची मुदत ७ वर्षांपर्यंत वाढवितां येईल.

या कमिशनांसाठीं करावयाच्या अर्जांचे नमुने व अटी यासंबंधींची माहिती, आंपली जन्म तारीख, वैद्यकीय पात्रता, विद्यापीठाचें नांव इ. देऊन डायरेक्टर जनरल, आर्म्ड, मेडिकल सर्व्हिसेस, मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स, 'एफ्' ब्लॉक, न्यू दिल्ली यांजकडून मिळवितां येईल.

भारतांत क्वायनेल होतें

क्विनाइनचें भारतांतील अन्दाजीं वार्षिक उत्पादन १,४०,००० रत्तल आहे.

सांडू ब्रदर्सचीं

शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.

वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.

पत्रव्यवहाराचा पत्ता:—

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
चेंबूर लि.

फॅक्टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

महारोगासंबंधींचा एक उपेक्षित दृष्टिकोन

का:- वै. त्र्यं. म. गोगटे, आयुर्वेदतीर्थ ऑ. ॲनेस्थेटिस्ट इर्विन व डफरीन हॉस्पिटल, अमरावती
आणि डॉ. सौ. ईशदया गोगटे, एल. एम. पी. (म. प्र.) डी. जी. ओ. (मुंबई),
ऑ. लेडी डॉक्टर, जगदंबा कुष्टनिवास, अमरावती.

महारोगाचा प्रसार आजकाल फार वाढत ला आहे. हा रोग संसर्गी आहे. महारोगाचा र्गी दुसऱ्या माणसांना पोंचूं शकतो. अनेक महा- नीं आणि शास्त्रज्ञांनीं ह्या रोग्यांसाठीं पराकाष्ठेचे न केले आहेत. जिवन्तपणीं मरणयातना सोसल्या हेत. अनेक रुग्णालयें व औषधालयें निघत आहेत. नवे शोध, सिद्धांत यांचा जणूं यज्ञ चालू आहे. तु अद्याप मानवाला विश्वास वाटेल अशा प्रकारची ती निर्माण झालेली नाहीं. सर्वसाधारण तील भीति कायम आहे. आणि शास्त्रज्ञ या संबंधींच्या ज्ञानाचें अपूर्णत्व जाणून आहेत.

कांहीं औषधें, कांहीं उपचारपद्धती, कांहीं ना विशिष्ट मर्यादेपर्यंत आशादायक वाटतात. तु ह्या रोगाचें स्वरूप अितकें व्यापक नि भेसूर हे कीं, त्याला चारी मुंड्या चीत करण्याचा भावी उपाय अद्याप सांपडलेला नाहीं. विचार तां करतां कांहीं गोष्टींचा खुलासा झाल्यासारखें न सर्व बाजूंची उपपत्ति लावून पहावें, तों पहिले द्धांत अपुरे नि विसंगत वाटूं लागतात. सर्वांगीण चार करून सुसंगत शास्त्र पुढें मांडायला अद्याप स्त्रज्ञांची तयारी नाहीं. अखेर शास्त्रज्ञ हात टेकून रणागति कबूल करतात, आणि पुष्कळ संशोधन यास हवें, आपलें सांप्रतचें ज्ञान फार अपुरें णि अशाश्वत आहे, अशी विनम्रपणाची भूमिका न्य करतात.

आज महारोगी बहिष्कृत आहे

"ह्या रोगाच्या जंतूंचें पूर्णपणें संशोधन व्हाव- स पाहिजे. त्याच्या संसर्गाची उपपत्ति लागावयास हिजे. त्यांची प्रकृति, स्वभाव, वातावरण हीं सर्व अवगत व्हावयास पाहिजेत. त्यासाठीं लागणारी साधनसामुग्री आपल्या देशांत फारच तुटपुंजी आहे. पाश्चात्यांकडून मार्गदर्शनाची फार जरूरी आहे. रुग्णालयें व औषधें भरपूर पाहिजेत. पोषक खाद्यपेयें आपल्या दरिद्री देशांत कमी पडतात. लोक अडाणी आहेत, कार्यकर्ते नाहींत." असल्या सर्व गोष्टींची हाकाटी सर्वत्र ऐकूं येते. शास्त्रीय आघाडी- वर आणि राजकीय आघाडीवर हीच हाकाटी. शास्त्रज्ञ अद्याप संशोधन व्हावयास पाहिजे म्हणून दुर्बिणींत डोकें घालून व जंतूकडे डोळे लावून बसतात. समाज- सेवक देश अडाणी म्हणून हातपाय गाळतात. नि सरकार पैसा नाहीं म्हणून सक्रिय लक्ष घालवयास कचरतें. एकूण महारोग्यांवर बहिष्कार घालण्यापलि- कडे फारसें कार्य होत नाहीं. नाहीं म्हणतां या कार्याची आज कशीबशी कां होईना, पण मुहूर्तमेढ रोवली गेलेली आहे हेंच भाग्य.

निश्चित योजना पाहिजे

'कशांत काय नि फाटक्यांत पाय' अशा एकंदर परिस्थितींत आपल्याला प्रत्यक्ष काय व्हायला हवें आहे, आपलें उद्दिष्ट काय, मुख्यतः हल्ला कोणत्या गोष्टीवर व्हावयास पाहिजे, कोणत्या गोष्टींकडे भरीव- पणें लक्ष द्यावयास पाहिजे, तें साध्य करण्यासाठीं व्यावहारिक मार्ग कोणता, त्यासाठीं करावा लागणारा आटापिटा सर्वसामान्य व्यक्तीच्या आटोक्यांतील आहे कीं नाहीं, तसें करीत असतांना काय अडचणी येतील, वगैरे गोष्टींची निश्चित योजना व आराखडा आपल्यासमोर तयार पाहिजे. योजना, तिचें प्रत्यक्ष स्वरूप धारण करीपर्यंत, कितीहि कालावधि लागणार असला तरी चालेल, पण त्या योजनेबरहुकूम पडणारें

आपलें पहिलें पाऊल निश्चितपणें त्या ध्येयाच्या दिशेनेंच पडलें आहे, असा आत्मविश्वास पाहिजे. आपण आतां अशी कांहीं योजना तयार करतां येईल काय तें पाहूं.

महारोगाचा संसर्ग

महारोगासंबंधीं विचार करतांना संसर्ग हा फार महत्वाचा मुद्दा आहे.त्या संबंधींची माहितीहि पुष्कळ जमलेली आहे. असे रोग एका माणसापासून दुसऱ्या माणसाला होतात. यासंबंधींची माहिती आधुनिक शास्त्रज्ञांनीं लोकांपुढें मांडली. संसर्ग हा रोगाला कारणीभूत असतो, ही शास्त्रीय समजूत समाजांत प्राचीन काळापासूनच दृढमूल झालेली आहे. संसर्गाबद्दलच्या शास्त्रज्ञांनीं मांडलेल्या माहितीची छाननी करतां, गोळाबेरजेनें प्रत्यक्ष व्यवहाराच्या सोयीचा निष्कर्ष पुढीलप्रमाणें निघतो. हा रोग एका माणसापासून दुसऱ्या माणसाला होतो, याबद्दल दुमत नाहीं. केवळ संसर्गाचाच विचार केला तर तो संसर्ग अगदीं निकटचा आणि दीर्घ काळाचा असावा लागतो. निकटचा आणि दीर्घ काळाचा संसर्ग नसतांनाहि हा रोग झाल्याचीं उदाहरणें सांपडतात. कांहीं रोग्यामध्यें या रोगाचीं लक्षणें दिसत असतांनाहि जंतुशास्त्राच्या दृष्टीनें हे रोगी संसर्गी नसल्याचें [Non-infectious] मानतात.

सांप्रतचें संशोधन

समाजाच्या स्वास्थ्यरक्षणाच्या दृष्टीनें स्वास्थ्यानुवृत्तिकर आणि रोगोच्छेदकर [Curative] अशा दोन्ही तऱ्हेच्या उपायांची आपल्याला निकडीची गरज आहे. इतर कोणत्याहि रोगाप्रमाणें महारोगाचे बाबतींतहि या गोष्टींचा विचार करणें क्रमप्राप्त आहे. या रोगासंबंधीं मूळ कारणें, प्रतिबंध, संसर्ग, प्रचार आणि रोगमुक्ति इत्यादि संबंधानें सांप्रतचें संशोधन आपणांस पुढील गोष्टी सुचवितें.

(अ) प्रतिबन्धाच्या बाबतींत कॉलरा किंवा मलेरिया या रोगांच्या प्रतिबन्धक उपायांप्रमाणें महारोगाबाबत प्रतिबन्धक उपाय चालत नाहींत, आणि बी. सी. जी. लस टोंचण्यासारखे जे प्रतिबन्धक उपाय आहेत, तेहि खात्रीचे नाहींत.

(ब) मूळ कारणांच्या बाबतींतसुद्धां केवळ संसर्गावर भिस्त ठेवून भागत नाहीं. ज्या रोग्याच्या तपासणींत जन्तु सांपडत नाहींत त्याच्या शरीरांत रोग कसा उद्भवला, रोगाचा शरीरांत संचार कसा झाला, याचा नीटसा खुलासा अजून झालेला नाहीं.

कारणांचा प्रतिकार करणें महत्त्वाचें

संसर्गाशिवायहि (ट्रान्समिशन) जर महारोगाचीं दुसरीं कांहीं कारणें असतील, तर तीं सांप्रतच्या विज्ञानाला अजून निश्चितपणें माहित झालेलीं नसल्यानें तीं भोंवतालीं घडत असतांना त्यांची आपल्याला दखल घेऊन तीं टाळतां येत नाहींत. कारणें घडत असतांना कारणांचा प्रतिकार करणें हें उपचाराच्या दृष्टीनें, रोग्याला पूर्वावस्थेंत उपचार करण्यापेक्षांहि फार महत्त्वाचें आहे. उदा० क्षयाच्या बाबतींत, जन्तूचें कारण जमेस धरूनहि त्याच्या प्रतिबन्धाची योजना विशिष्ट आहारविहारामधून होऊं शकते. रोग्याला स्वतःला रोगाची जाणीव झाल्यावर त्याच्या मनाची पूर्ण तयारी होऊन त्यानें स्वतः होऊन वैद्यकीय सल्ला घेऊन, उपचार सुरुं होईपर्यंत मध्यंतरीं बराच काळ जातो. ह्या काळांत माहित असूनहि रोगी स्वतः आपल्या रोगाच्या अटकावाची कांहींहि योजना करू शकत नाहीं. उदा० क्षयावर विश्रांति, पौष्टिक अन्न वगैरे सुरूं करून तात्पुरता आपल्या हातीं असलेला रोगनिवारणाचा प्रयत्न सुरूं होऊं शकतो. संशोधनाची दौड एखाद्या रोगाचीं कारणें शोधून काढण्याकडे जितकी जास्त असेल तितका रोगाचा प्रतिबन्ध चांगला करतां येईल. जसें, धूम्रपान, जहाल मसाले, गरमीसारखे रोग वगैरे गोष्टी कॅन्सरला कारणीभूत होतात हें समजल्यानें मनुष्य त्या कारणांपासून मुळांतच दूर राहूं शकेल. मूळ कारणें समजल्यानें प्रत्येक व्यक्तीला ती रोजच्या वागणुकींतून टाळतां येतात. ही रोगप्रतिकाराच्या दृष्टीनें फार महत्वाची बाब आहे.

गुरुकुल पत्रिका

(क) एकदां महारोग होऊन व त्याचा सर्व र होऊन रोगी निगेटिव्ह ठरला तरी तो त्या रोगमुक्त झाला, असें होत नाहीं. रोगाची ची तलवार त्याच्या डोक्यावर सतत राहणारच.

एक जबरदस्त संयुक्त लढा

(ड) ऐहिक सुखाची रतिमात्र तमा न बाळगतां णीं यमयातना सोसत राहून आणि आपल्या वी प्रत्यक्ष आहुति देऊन या रोगासंबंधीं महाभागांनीं जें संशोधन केलें त्याला पृथ्वी- र तोड नाहीं. यापासून मानवजातीला जे कांहीं हे होणार आहेत, ते करून घेतलेच पाहिजेत. केवळ या संशोधनावरच अवलंबून न राहतां याचा प्रश्न पुरा तडीस लगेपर्यंत, महारोगी, , वैद्यकीय जग आणि महारोगाचें कार्य कर- कांहीं संस्था आणि सरकार या सर्वांनीं जणू जबरदस्त संयुक्त लढाच द्यावयास हवा. पेक्षां हें कार्य निष्ठेनेंच अधिक होतें, म्हणून त प्रयत्न झाले पाहिजेत. प्रत्येक व्यक्तीनें, त्याला रोग झालेला असो कीं नसो, निदान पुरता, आपल्या घरापुरताच, पद्धतशीर सुरूं करावयास पाहिजे. दुसऱ्याच्या मदतीची न करतां जेवढें आपल्या हातीं आहे तें प्रत्यक्ष तत्यानें आणि तपश्चर्येनें सुरूं ठेवलें पाहिजे. व्यक्तीला या बाबतींत काय करतां येण्या- आहे याचा आपण या लेखांतच पुढें विचार र आहोत.

आधुनिक उपचारांतील अडचणी

या रोगावरील आधुनिक उपचारामध्यें पुढील णी येतात. सध्यां या रोगावर निघालेलीं नवीं हीं आदर्श औषधें आहेत, असा शास्त्रज्ञ देत नाहींत. कारण तीं बरींच वर्षें घ्यावीं त. रोगाची वाढ थांबविल्यानन्तरहि औषध द्यावें लागतें. कांहीं रोग्यांना तीं सहन होत न. रिॲक्शन्स् येतात. हीं सर्व औषधें रोग वरच घ्यायचीं असतात. प्रतिबन्धक म्हणून त्यांचा उपयोग नाहीं. आधुनिक उपचारपद्धतीप्रमाणें या रोगाविरुद्ध द्यावयाचा लढा हा सर्वस्वी समाज, सरकार आणि या रोगाचें कार्य करणाऱ्या कांहीं संस्था या सर्वांच्या सहकार्यानें होणाऱ्या प्रयत्नावरच अवलंबून आहे. एखाद्या व्यक्तीला या रोगाच्या भयानकतेची जाणीव असली तरीहि एक व्यक्ति या लढ्यांत कांहींच करूं शकत नाहीं. एकटी व्यक्ति काय करूं शकेल ? फार तर आपल्या राहणीचें मान सुधारणें ! पण तें सुद्धां सवसामान्य माणसाच्या हाता-बाहेरचें आहे. त्यासाठीं आर्थिक परिस्थितीची त्याला जोड असावी लागते.

आहारविहाराचें विशिष्ट शास्त्र

ज्यांना आर्थिक परिस्थिती अनुकूल आहे, त्यांनींसुद्धां आहारविहाराचे नियम नीट पाळले नाहींत तर घातक परिणाम होणें शक्य आहे. ऐपत आहे म्हणून रोज रात्रीचें दही खाल्लें किंवा दूध पौष्टिक आणि मासेही पौष्टिक आहेत म्हणून जर कोणी ते रोज एके वेळीं खाल्ले, किंवा आरोग्यासाठीं विश्रान्ती पाहिजे म्हणून जर कोणी सुखवस्तु माणसानें रोज जेवणानन्तर झोंप घेतली, तर या वागणुकीनें घातुक परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहींत. त्यामुळें केवळ राहणीचें मान वाढवून आरोग्यसंपन्न जीवन जगतां येईल असें नाहीं. श्रीमंतांनाहि कुष्ठ-क्षयासारखे रोग होतच राहतील. आरोग्यसम्पन्न जीवन जगण्यास आहार-विहाराचें विशिष्ट शास्त्र अवगत असावयास पाहिजे.

मननीय दृष्टिकोन

अशा एकंदर परिस्थितींत विचारवंतांना अत्यन्त कळकळीची नम्र विनंति आहे कीं, त्यांनीं आधुनिक पद्धतीच्या उपचाराप्रमाणें ज्या ज्या गोष्टी करावयाच्या त्यांचा यथायोग्य उपयोग आणि प्रसार करावाच, पण त्याबरोबरच महारोगाच्या निर्मूलनासाठीं, तसेंच महारोग होऊंच नये म्हणून जे जे नियम प्राचीन वैद्यकांत सांगितले आहेत त्यांची छाननी करावी व त्यांनाहि

संशोधनाच्या कसावर घासून मानवतेच्या हिताकरितां अवश्य उपयोगांत आणावे.

पक्के झालेले सिध्दांत

आयुर्वेदशास्त्रामध्यें स्वास्थ्यानुवृत्ती (प्रोफिलॅक्सिस) आणि रोगोच्छेदकर उपचारशास्त्र या दोनहि संबंधीं शतकानुशतकांच्या प्रयोगानन्तर आणि अभ्यासानन्तर पक्के झालेले सिद्धांत मांडलेले आहेत. आयुर्वेदाप्रमाणें स्वास्थ्यानुवृत्तीचें शास्त्र म्हणजे कोणतेच रोग होऊं न देण्याचें आणि शरीर निरोगी राखून खणखणीत दीर्घायुष्य मिळवण्याचें शास्त्र. विशिष्ट रोगांची शरीरांत उत्पत्ति होऊं नये यासंबंधींची ही वागणूक आयुर्वेदानें निश्चित केलेली आहे. आयुर्वेदशास्त्राप्रमाणें वागणूक म्हटली म्हणजे आहार, विहार आणि त्याशिवाय भोवतालची परिस्थिती यासंबंधींचा विचार यांत येतो.

हा अट्टाहास धरूं नये

आयुर्वेदांतील सिद्धांतांचा उहापोह करण्याचें हें स्थान नव्हे. या ठिकाणीं फक्त आयुर्वेद आणि महारोग इतकेंच मार्यादित क्षेत्र चर्चेंत घेण्याचें ठरविलें आहे. येथें एक विनंति करावीशी वाटते कीं, आयुर्वेदीय सिद्धांत हे पाश्चात्य वैद्यकाच्या कसोटीवर घासून ते त्या कसोटीस उतरले तरच ते खरे मानावयाचे असा अट्टाहास विचारवंतांनीं धरूं नये. तें एक स्वतंत्र भूमिका असलेलें शास्त्र आहे. त्याचे सिद्धांत ताडून पाहण्याची पद्धतहि निराळीच आहे. या सिद्धांतांची कसोटी त्यांना प्रत्यक्ष आचरणांत आणूनच आपण पाहूं शकूं. आयुर्वेदीय सिद्धांतांच्या कसोटीच्या संशोधनशाळा म्हणजे निसर्ग आणि प्रत्येक मानवी पिंडच आहे.

स्वास्थ्यसंरक्षण

स्वास्थ्यानुवृत्तीच्या म्हणजे प्रोफिलॅक्सिसच्या दृष्टीनें विचार करतां पुढील गोष्टी आपणास विचारांत घ्याव्या लागतील. महारोग होऊं नये म्हणून वागणूक कशी ठेवावी, यावर आयुर्वेदाचा फार कटाक्ष आहे. वागणूक म्हटली कीं, त्यामध्यें आहार, विहार आणि भोंवतालची परिस्थिति या गोष्टी महत्वाच्या ठरता रोजची वागणूक, ऋतुमानाप्रमाणें ठेवावयाची वागणूक, या रोगाच्या संसर्गासंबंधींचें शास्त्र आ शरीरशुद्धि इत्यादि संबंधींचा विचार यांत येतो. सर्व मुद्यांचा एकैकशः विचार करूं. या ले प्रत्येक मुद्याचा सूचक निर्देश करण्यापलीकडे जास् विस्तार करणें शक्य नाहीं. जिज्ञासु विचारवंतां जास्त माहितीसाठीं चरकसंहिता, सुश्रुतसंहि अष्टांगसंग्रह किंवा थोडक्यांत पण मुद्देसूद माहिती साठीं अष्टांगहृदय नांवाच्या ग्रंथाचें आस्थेनें वाच करावें अशी विनंति आहे.

शरीराची रोगानुकूल भूमिका

प्रथम आपण आहार – विहारासंबंधानें विच करूं. विशिष्ट आहार – विहाराच्या सतत सेवनानें महारोग उद्भवण्यास योग्य अशी शरीरघटकां भूमिका तयार होते, असा आयुर्वेदाचा सिद्धांत आ हा विशिष्ट आहार-विहार म्हणजे मिथ्या आहार विहार आणि विशेषतः विरुद्ध आहार–विहार हो मिथ्या आहाराचें उदाहरण म्हणजे– वेळीं अवे जेवणें, वेळीं अवेळीं झोंपणें किंवा जागणें, जेवणानं स्नान करणें हीं होत. विरुद्ध आहाराचें उदाहर म्हणजे दूध आणि मीठ किंवा मीठ असलेले पदा एकत्र सेवन करणें. ऋतुमानाप्रमाणें अंमलांत आ वयाचे आहार–विहाराचे जे विधिनिषेध आहे त्यांच्या विपरीत वागणूक करणें. उदा० शरद्, वसं ग्रीष्म या ऋतूंत दही वर्ज्य असतांनाहि त्याचें नि सेवन करणें हेंहि मिथ्या आहाराचें उदाहरण आ दोन स्वतंत्रपणें निर्दोष असलेल्या पदार्थांच्या सं गानें शरीराला घातक असा तिसरा पदार्थ निर्मा होऊं शकतो. अशा पदार्थांच्या आहाराला संयोगा विरुद्ध झालेला आहार असें म्हणतात. दोन पदार्थांच्या संयोगानें तिसराच एक विचित्र पदार्थ उत्पन्न हो असल्याचा चमत्कार पहाणें हें रसायनशास्त्रा अभ्यासकांना कांहीं नवीन नाहीं.

(अपूर्ण)

– महाचन्द्रकला रस –

शरद् व ग्रीष्म ऋतूंतील वातपित्तोल्बण रोगावर व्याधिप्रत्यनीक औषध

[लेखकः- वैद्य इंदुभूषण भिंगारे, महाल, नागपूर]

यफॉइड फिव्हरवर रामबाण औषध' हा माझा प्रसिद्ध झाल्यापासून महाचन्द्रकलारसाकडे र्यांची पुनः दृष्टि वळली आहे. अनेक वैद्यां- महाचन्द्रकलेच्या निश्चित पाठासंबंधीं माहिती ण्यांत येत आहे. म्हणूनच महाचन्द्रकलारसा- आज लिहिण्याचें ठरविलें आहे. ज्यांना ह्या निश्चित अनुभव असतील, त्यांनीं आपले व परम्परा प्रसिद्ध केल्यास महाचन्द्रकला- बाबतींत असणारे घोंटाळे टाळतां येतील.

शास्त्रीय वेगळें नांव आहे

आयुर्वेदीय रसग्रंथांतून चन्द्रकलारसाचे बरेच आहेत. ह्या सर्व पाठांतून नित्योपयोगी असा रांतील चन्द्रकलारसाचा पाठ वेगळा काढून बंधीं चर्चा करणें अधिक उपयुक्त होईल. ह्या ह्या पाठासंबंधीं चर्चा व पाठनिश्चिति करा- ची आहे, त्याला शास्त्रीय वेगळें नांव देऊन करण्याचें ठरविलें आहे. व्यवहारांतील चन्द्रकला- चे शास्त्रीय नांव महाचन्द्रकलारसच आहे. व माझ्या लेखाचा मथळा ' महाचन्द्रकलारस ' दिला आहे.

कोणीच निर्णयात्मक लिहिलें नाहीं

आयुर्वेद पत्रिकेच्या दि. १६ ऑगस्ट १९५३ अंकांत श्री. वैद्य पु. वि. धामणकर, (धूतपापेश्वर,) ह्यांनीं महाचंद्रकलेवर एक लेख लिहिला . हा लेख प्रसिद्ध झाल्यानन्तर १ ऑक्टोबर ३ ला आयुर्वेद पत्रिकेंतच वैद्य श्री. मुकुंद- गायकवाड, सोलापूर ह्यांनीं महाचन्द्रकलेवर लेख लिहिला आहे. ह्या दोन्ही लेखानन्तर मात्र त्मक असा कोणीच लेख लिहिला नसल्यामुळें महाचन्द्रकलारसाचे बाबतींत पूर्वीपासून चालू असलेले घोंटाळे अजून तसेच कायम आहेत.

पाठनिश्चिति, द्रव्यनिश्चिति, गुणनिश्चिति

आयुर्वेदीय वाङ्मयांत एकाच औषधाचे पाठांत अनेक पाठभेद आढळून येतात. ह्या पाठभेदां-मुळें एकच औषध पण निरनिराळ्या द्रव्यांनीं घटित असल्यामुळें कोणतें निवडावें ह्याबाबतींत फारच घोंटाळा होतो. म्हणून पाठनिश्चिति, द्रव्यानीश्चिति व गुणानिश्चिति हें त्रिविध कार्य साधल्याशिवाय ग्रंथांत वर्णन केलेले गुणधर्म प्रत्ययास येत नाहींत, व म्हणूनच महाचन्द्रकलारसाचा पाठ व त्यांत असलेलीं द्रव्यें निश्चित ठरविण्याची वेळ आलेली आहे, असें मला वाटतें.

रसयोगसागर ह्या ग्रंथांत महाचन्द्रकलेचा पाठ खालीलप्रमाणें दिला आहे. हा पाठ १८ रसग्रंथांवरून घेतला आहे असें ग्रंथकाराचें म्हणणें आहे.

महाचन्द्रकलेचा पाठः–

प्रत्येकं तोलमादाय सूतं ताम्रं तथाभ्रकम् ।
द्विगुणं गंधकं चैव कृत्वा कज्जलिकां शुभाम् ॥
मुस्तादाडिमतोयेन केतकीमूलवारिणा ।
सहदेव्याः कुमार्याश्च पर्पटोशीरमागधीः ॥
श्रीखण्डं सारिवा चैषां समानं चूर्णकं क्षिपेत् ।
द्राक्षाफलकषायेण सप्तधा परिभावयेत् ॥
छायाशुष्कं विधायाथ वटी कार्या चणोपमा ।
महाचन्द्रकला नाम्ना रसेन्द्रोऽयं निरूपितः ॥
अम्लपित्तप्रशमनः प्रदरध्वंसकारकः ।
अन्तर्बाह्य--महादाह–विध्वंसन-महाघनः ॥
ग्रीष्मकाले शरत्काले विशेषेण प्रशस्यते ।
रक्तमूर्च्छारक्तपित्तज्वरदवानलः १ ॥

मूत्रकृच्छ्राणि सर्वाणि प्रमेहानापि दुस्तरान् ।
हरत्येष रसो नूनं देहे चन्द्रकलाप्रदः ॥

— रसयोगसागर–४२

एका पाठांत गंधक ६ तोळे आहे

वरील रसयोगसागरांतील महाचन्द्रकलेच्या पाठांत जे घोटाळे आहेत, त्याचा आपल्याला निश्चित निर्णय लावावयाचा आहे.

(१) पारा, ताम्रभस्म, अभ्रकभस्म, प्रत्येक एकएक तोळा व गंधक दोन तोळे, असा अर्थ कांहीं भाषान्तरकार करतात. परन्तु ‘ भारतभैषज्य–रत्नाकर’ ह्या ग्रंथांत मात्र वैद्य श्री. नगीनदास छगनलाल शहा, हे गंधक ६ तोळे घ्यावें, असें म्हणतात. अर्थात् पारा, ताम्र व अभ्रक यांचे दुप्पट गंधक घ्यावें, असें त्यांचें म्हणणें आहे.

एका पाठांत अभ्रक नाहीं

रसरत्नसमुच्चय, या ग्रंथातील चन्द्रकलेच्या पाठांत पारा व ताम्र ह्यांचे बरोबर गंधक घ्यावें, असें लिहिलें आहे. रसरत्नसमुच्चयांतील चन्द्रकलेच्या पाठांत अभ्रकभस्म घातलेलें नाहीं. ह्या बाबतींत निश्चित निर्णय होणें आवश्यक आहे.

डाळिंबाच्या फळांचा रस कीं पानांचा

(२) मुस्तादाडिमतोयेन असा रसयोगसागरांतील पाठ आहे. व ह्या पाठाचा अर्थ श्री. धामणकरशास्त्री यांनीं नागरमोथ्याचा काढा व पिकलेल्या डाळिम्बाचा रस (फळांचा रस) असा केला आहे. भारतभैषज्य-रत्नाकराचे पाठांत मुस्तादाडिमदूर्वोत्थैः असा पाठ असून नागरमोथ्याचा काढा, डाळिंबाच्या झाडाच्या पानांचा रस व दूर्वा अर्थात् हरळीचा रस असा केला आहे. यांत डाळिंबाच्या फळांचा रस अथवा पानांचा रस घ्यावा हा घोंटाळा आहे. ह्या बाबतींत निश्चित निर्णय होणें आवश्यक आहे. रसयोगसागराच्या पाठांत दूर्वा नाहींत. भारतभैषज्यरत्नाकरांच्या पाठांत दूर्वा आहेत.

कोणत्या दूर्वेंची भावना द्यावी?

ह्यांत महाचन्द्रकलेला दूर्वेंची भावना आवश्यक आहे काय ? व ती भावना आवश्यक असल्यास दूर्वा पांढरी घ्यावी किंवा निळ्या रंगाची घ्यावी हाहि निर्णय होणें आवश्यक आहे.

केतकीमूल कोणतें?

३) ‘ केतकीमूलवारिणा ’ ह्या पाठाचा अर्थ वैद्य श्री. धामणकरशास्त्रींनीं केवड्याचें कणीस व पान ह्यांचा हिम–कषाय घेण्यास सांगितलें आहे. कित्येकांनीं केतकीच्या मुळाचा काढा असा अर्थ केला आहे. ह्यापैकीं ग्राह्य अर्थ कोणाचा ? हें निश्चित ठरविलें पाहिजे. भारत-भैषज्य-रत्नाकरांत ‘केतकीस्तनजद्रवैः’ असा पाठ आहे. व ह्या पाठाचा अर्थ केवड्याच्या कणसाचा अर्क असा केला आहे. रसचिंतामणी ह्या ग्रंथांत ‘केतकीस्तन्यवारिजैः’ असा पाठ आहे. ह्या पाठाचा अर्थ वैद्य श्री. मुकुंदराव गायकवाड, केवड्याच्या मुळांचा रस, स्त्रीदुग्ध व कमळपाकळीचा रस असा करतात. वरील रसचिंतामणींतील पाठ व वैद्य गायकवाड ह्यांनीं केलेला त्याचा अर्थ योग्य आहे काय ? श्री. धामणकर, श्री. गायकवाड व श्री. शहा ह्यांच्यांतील मतभेद कसे मिटवितां येतील, ह्याबद्दल विचार होणें आवश्यक आहे.

सहदेवी कोणती ?

४) सहदेवी या वनस्पतीची भावना चन्द्रकलेला देण्यास सांगितली आहे. सहदेवी ही वनस्पति बलाचतुष्टयापैकीं बला अर्थात् चिकना मुळाचा काढा घ्यावा काय ? बलेचा पर्याय शब्द म्हणून सहदेवी हा शब्द ‘निघंटूंत’ आलेला आहे. सहदेवी वेगळी वनस्पति असल्यास, तिचा निर्णय होणें आवश्यक आहे.

पित्तपापड्याची भावना

‘ पर्पटस्यापि वारिणा ’ हा पाठ श्री. धामणकरशास्त्रांच्या वरील पाठांत नाहीं. त्यामुळें पित्तपापड्याची भावना चन्द्रकलेला देणें आवश्यक आहे काय ? हा निर्णय होणें आवश्यक आहे. ‘ पर्पटस्यापि

' ह्या ठिकाणीं पित्तपापड्याचा काढा घ्यावा किंवा पित्तपापड्याचा रस घ्यावा ? 'वारिणा' दाचा अर्थ वेगळा करावा काय ? रसरत्नसमु- ल पाठांत 'वारि' शब्दाचा अर्थ 'पर्युषित जल' केला आहे.

रामशीतलिकातोय

वरील दोन अर्थांतून कोणता अर्थ घेतला चन्द्रकलेचें गुणधर्म वाढतील हा विचार होणें आहे. ' रामशीतालिकातोयैः शतावर्या च। ' ही ओळच रसयोगसागर ह्या ग्रंथांतील धामणकरांच्या पाठांत नाहीं. भारतभैषज्य-रांच्या पाठांत मात्र ही ओळ आहे. रामशीत- ह्या शब्दाचा अर्थ ' रसचंडाशु ' ह्या ग्रंथाचे कार वैद्य श्री. दत्तो बल्लाळ बोरकर हे राम- चें पान असा करतात. रामशीतालिका ह्या चा अर्थ वैद्यराज श्री. गोवर्धनशर्मा छांगाणीजी हे गंगावतीचें पान असा करतात. वैद्य श्री. शर्मा छांगाणी, नागपूर ह्यांनीं ' वसवराजी- ' ह्या ग्रंथाच्या चंद्रकलेच्या भाषान्तरांत राम- केचा अर्थ ' चिराईत ' असा केला आहे. श्री. मुकुंदराव गायकवाड ह्यांनीं रामशीतलिकेचा काळ्या मुसळीचे कंदाचा रस असा केला आहे. भारतभैषज्यरत्नाकरांत ' महाराष्ट्र देशमें रामशीली नामसे प्रासिद्ध सुगंधित साक ' असा आहे. वरील चार अर्थांपैकीं चंद्रकलेच्या दृष्टीनें अर्थ कोणता हें ठरविणें आवश्यक आहे. महा- कलेचे गुणधर्म वाढविण्याच्या दृष्टीनें रामशीत- व शतावरी ह्या दोन द्रव्यांच्या भावनेची आहे काय ?

भावना किती? १।१ कीं ७।७

भावयित्वा प्रयत्नेन दिवसे दिवसे पृथक् ॥

ओळीप्रमाणें वरील सर्व रसांची प्रत्येकी एक भावना द्यावी काय ? किंवा शास्त्रोक्त भावना-- प्रमाणें प्रत्येक रसांच्या सात भावना द्याव्या, हें ठरविणें आवश्यक आहे. शास्त्रांत प्रत्येक रसाच्या सातच भावना द्यावयाला पाहिजेत, असा स्पष्ट निर्देश आहे.

दिवा दिवातपे शुष्कं रात्रौ रात्रौ च वासयेत् ।
श्लक्ष्णं चूर्णीकृतं द्रव्यं सप्ताहं भावनाविधिः ॥

भावनेसाठीं स्वरस कीं उदक?

भावनेला स्वरस घेतांना संपूर्ण स्वरस घ्यावा किंवा निथळलेलें वरचें पाणी घेऊन खालीं बसलेला चोथा फेंकून द्यावा, हाहि निर्णय होणें आवश्यक आहे.

तिक्ता गुडूचिकासत्त्वं पर्पटोशीर माधवी ॥
श्रीगंधं सारिवा चैषां समानं श्लक्ष्णचूर्णितम् ॥

तिक्ता ह्या शब्दाचा अर्थ ' कुटकी ' असा केला आहे. रसरत्नसमुच्चयांत तिक्तम् असा शब्द आहे. व ह्या शब्दाचा अर्थ ' चिरायता या पटोलपत्र ' असा केला आहे.

वरील दोन अर्थांपैकीं चंद्रकलेच्या दृष्टीनें कोणता अर्थ ग्राह्य समजावा हाहि निर्णय होणें आवश्यक आहे.

गुळवेल सत्व कीं घन

६) गुडूचिकासत्वम् ह्या शब्दाचा अर्थ गुळ--वेलीचें घनसत्व कीं गुळवेलीचें श्वेत सत्व घ्यावा हेंहि ठरविलें पाहिजे.

माधवी कीं मागधी

७) माधवी शब्दाचा अर्थ मधुमालवी लता असा वैद्य बोरकर ह्यांनीं केला आहे. अर्थात् मधु-माधवी ह्या वनस्पतीचीं पानें, फळें अगर पंचांग, ह्यापैकीं काय द्यावें हा स्पष्ट निर्देश नाहीं. माधवी ह्या शब्दाच्या ऐवजीं रसरत्नसमुच्चयांत मागधी असा पाठ आहे. व मागधी शब्दाचा अर्थ पिंपळी असा केला आहे. वरील दोन पाठभेदांपैकीं कोणता पाठ स्वीकारल्यास महाचन्द्रकलेचे गुणधर्म वाढतील हें ठरविलें पाहिजे.

चन्दन कोणतें वापरावें?

८) श्रीगन्धम् ह्या शब्दाचा अर्थ चन्दन असा केला आहे. मात्र त्यांत पांढरें चन्दन कीं रक्तचन्दन

घ्यावें, हा निर्देश नाहीं. शास्त्रांत चंदने रक्तचंदनम्, अर्थात् रक्तचन्दनच घ्यावें, असा स्पष्ट उल्लेख आहे.

श्रीगंध या शब्दाचा अर्थ कित्येक भाषांतरकार कापूर असा करतात. महाचन्द्रकलेच्या दृष्टीनें चंदन घ्यावें कीं कापूर घ्यावा ? हें ठरविणें अत्यंत अगत्याचें आहे. श्रीगंध ह्या शब्दाऐवजी श्रृंगाटम् असा असा पाठभेद आला आहे. श्रृंगाटम् या शब्दाचा अर्थ शिंगाडा असा केला आहे. वरील पाठभेदापैकीं कोणता तरी एक पाठ निश्चित केला पाहिजे.

द्राक्षादिगण कीं द्राक्षाफल

९) द्राक्षादिककषायेन— ह्या शब्दाचा अर्थ कित्येक भाषांतरकारानीं वाग्भटोक्त द्राक्षादिगण असा केला असून तो गण खालीलप्रमाणें आहे.

द्राक्षामधूकमधुक- रोध्रकाश्मर्य सारिवाः । मुस्तामलकन्हीवेरपद्मकेसरपद्मकम् । मृणालचन्दनोशीरनीलोत्पलपरूषकम् ॥ इति वाग्भटोक्त द्राक्षादिगणः ॥

ह्या द्रव्यांचा काढा करून सात भावना देण्याकरितां कांहीं ग्रंथकारानीं लिहिलें आहे. रसयोगसागरातील पाठांत ‘ द्राक्षाफल कषायेण ’ असा पाठ असून, काळ्या मनुक्याचा काढा, असा अर्थ केला आहे.

वरील दोन पाठभेदांतून कोणता पाठ घ्यावा, हें ठरविलें पाहिजे.

धान्यराशींत ७ दिवस ठेवावा

ततो धान्याश्रयं कृत्वा वस्यः कार्याश्वणोपमाः ॥

वरील ओळ, कांहीं महाचंद्रकलेच्या पाठांत नाहीं, कांहीं पाठांत आहे. औषध तयार झाल्यानंतर एरंडाच्या पानांत औषधांचा गोळा गुंडाळून कच्च्या सूतानें बांधून तो गोळा धान्याच्या राशींत अर्थात् ढोलींत सात दिवस दाबून ठेवण्याची परम्परा कांहीं औषधांच्यां बाबतींत वैद्यवर्गांत आहे. ह्या परंपरेप्रमाणें चंद्रकलेलाहि सात दिवस दाबून ठेवणें आवश्यक आहे काय ? हेंहि ठरविलें पाहिजे.

महाचंद्रकलेसारख्या प्रसिद्ध व नित्योपयोगी औषधाचे बाबतींत एवढे अर्थभेद, पाठभेद व घोंटाळे असणें योग्य नव्हे असें मला वाटतें. महाचंद्रकलेचा निश्चित पाठ ठरविणें आवश्यक आहे. ह्या दृष्टीनें या औषधाची प्रत्यक्ष परंपरा व अनुभव प्रसिद्ध करून तावडतोब पाठनिश्चिति व्हावी अशी विनंती आहे.

सागाचें तेल कोठें मिळेल ?

एका वाचकानें सागाचें तेल कोठें मिळेल अशी चौकशी केल्यावरून श्री. सुं. भा. वैद्य यांना पत्र पाठविलें होतें. त्यांचें उत्तर पुढें दिलें आहे.

“ तेलिया सागाच्या लाकडाचा भुसा किंवा सालपा घेऊन पाणी घालून उकळावा म्हणजे वर तेल येईल. मुंबईंत सागाचें तेल कोठें मिळतें कीं काय माहित नाहीं. ”

— सुं. भा. वैद्य

(तेलिया— असाण्याप्रमाणेंच प्रयोग करावा. असनादि वर्गांत सागाचा उल्लेख आहेच. —संपादक)

– प्रमाणपत्र –

आपण जें जें औषध बनवितो व जनतेस देतो, तें तें प्रत्येक औषध सचोटीचें व गुण देणारें असलें पाहिजे; तरच त्याचें प्रमाणपत्र जनतेकडून आपणास मिळेल. तर अशा गुण देणाऱ्या खऱ्या, अस्सल व ताज्या औषधी खरेदी करण्यास विश्वासपात्र ठिकाण पाहिजे. त्याकरितां आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

धातुस्पृष्ट जलौषधि

[ले.:- आयुर्वेदरत्न
सुंदरराव भास्करराव वैद्य, मुंबई २]

आम्ही एके ठिकाणीं वाचलें कीं, लोखंडाचा एक लहानसा तुकडा घेऊन तो तापवून लाल करावा व तो पाण्यांत बुडवावा; हें पाणी सर्व रोगांवर चालतें. ह्यां मनांत विचार आला कीं, हें अनुभव घेऊन ...वें, दुसरा विचार आला कीं, सर्व धातूंचें असें औषध तयार करून सर्व रोगांवर उपयोग करून ...वा.

सुवर्णजलानें भ्रम कमी होतो

दि. १६ ऑगस्टच्या आ. पत्रिकेंत वैद्य माधवाचार्य मणूरकर यांचा ‘ सुवर्णोदकाचा चिकित्सेंतील अनुभव ’ हा लेख आला आहे. त्यांत सुवर्ण एकवीस ...ळां लालसर तापवून तें रोग्याच्या पिण्याच्या पाण्यांत ...के वेळीं बुडवावें. तें पाणी रोग्यास पिण्यास ...वें, असें एका लेखकानें लिहिलेलें त्यांनीं वाचलें. ...सें पाणी पिण्यास दिल्यानें ज्वराच्या सान्निपातिक अवस्थेंतील रोग्यास झालेला भ्रम कमी होतो.

स्मृतिनाश कमी झाला

त्यांनीं अनुभव घेतला त्यांत सोन्याची पाटली सात वेळां तापवून ती प्रत्येक वेळीं पाण्यांत बुडविण्यास सांगितली. त्यानें रोग्यास झालेला स्मृतिनाश अपेक्षेपेक्षां लवकर कमी झाला. त्या प्रयोगाचा निष्कर्ष असा काढलां कीं, औषधिमात्रा अत्यल्प प्रमाणांत जरी दिली तरी तिचें कार्य होण्यास तिचा प्रभावी गुण समर्थ ठरतो. हीच गोष्ट आम्ही आपल्या सूक्ष्म औषधींवरील लेखांत सिद्ध केली आहे. आतां पुष्कळ लोक एक वर्षानंतर कळवीत आहेत कीं तुमच्या सूक्ष्म औषधींनीं लवकर गुण येतो.

धातु तापविण्याची आवश्यकता नाहीं

आम्हांला वाटतें कीं, सुवर्ण किंवा इतर कोणतेही धातु तापविण्याची मुळींच जरूर नाहीं. आयुर्वेदपत्रिका वर्ष ८ अंक १२ यांतील ४०६ पानावरील आमच्या लेखांत ज्या प्रयोगाची माहिती दिली आहे त्यांत “ विलियन करतांना औषधाची शक्ति कमी न होतां उलट वाढत जाते. प्रकृतींत आत्मतत्त्व आहे म्हणून त्यानें त्याचा विकास होतो. ” तसेंच वर्ष ८ अंक २१ यांतील ६७७ पानावर “ औषधी द्रव्यातील जी शक्ति बाहेर पडते ती विरळ करतांना प्रवाही द्रव्य जोरानें हलवल्यानें बाहेर पडते. ” मूळ द्रव्याचा अंश शिल्लक न रहातां नुसती शक्ति सूक्ष्म औषध तयार करतांना बाहेर पडते व या शक्तीचा रुग्णाला उपयोग होतो रुप्याच्या भांड्यांत जर दूध ठेवलें तर रुप्याच्या स्पर्शानें त्याचें दही होतें.

सुवर्णस्पृष्टजल देण्याची रीत

सुवर्णाचा जर उपयोग करावयाचा तर सुवर्णाची अंगठी किंवा मणी घेऊन एका थंड पाण्याच्या बाटलींत घालावा व ती बाटली पांच दहा मिनिटें एकसारखी हलवावी म्हणजे त्या सुवर्णांतील शक्ति बाहेर पडून त्या जलांत ती शक्ति मिश्रित होईल. अशा रीतीनें आपलें सुवर्णस्पृष्टजल तयार होईल. हें आपलें औषध तयार झालें. हें औषध रुग्णाला लहान चमच्यांत मावेल इतकें देऊन नंतर १, २, ३ असे १० अंक मोजावे व दुसरा चमचा द्यावा. असें १०।१५ वेळ करावें. पुन्हां १५ मिनिटांनीं असेंच करावें. असें औषध देत जावें. थोडें औषध दिल्यानें औषध टोंचल्याप्रमाणें रक्तवाहिन्यांत भिनतें व शरीरभर चालू होतें. एकदम पुष्कळ औषध दिलें तर तें पोटांत जाऊन अन्नांत भिनेल व त्याचें जेव्हां रक्त होईल तेव्हां त्या रक्ताबरोबर तें शरीरभर पसरेल.

धातु तापविल्यानें काय होतें ?

सुवर्ण तापविलें म्हणजे त्याचें काय होते ! त्यांत इतकी उष्णता तयार होते कीं, तें थंड पाण्यांत टाकलें म्हणजे ज्या पाण्याचा त्याला पहिल्यानें स्पर्श होतो तें पाणी वाफ होऊन वर जातें. त्याच्या जागीं दुसरें थंड पाणी येतें व हा क्रम थोडा वेळ चालतो. नंतर वाफ

होण्याची थांबून धातूला स्पर्श करणारें पाणी गरम होतें व अशा रीतीनें सर्व पाणी गरम होतें. नंतर तें थंड होतें. त्यांत सुवर्णाचा कांहींहि अंश येत नाहीं, हें अनुभव घेणारांनीं दागिन्याचें वजन करून ठरविलें आहे. पाणी उष्णतेनें हलल्यामुळें सुवर्णांतील शक्ति मात्र बाहेर पडून सर्व पाण्यास व्यापते. तीच गोष्ट पाणी हलविण्यामुळें आपणांस साध्य होते.

भस्माऐवजीं स्पृष्टजल

वाग्भटानें क्षयावर सोन्याचा वर्ख व लोणी सांगितलें आहे. धातुस्पृष्ट जलौषधि तयार करून ज्या ज्या ठिकाणीं धातूंचीं भस्में देण्यांत येतात त्या त्या रोगांवर आपणांस धातुस्पृष्ट जलौषधि देतां येतील.

सप्त धातूंचीं ७ जलें

सुवर्णः- क्षय, उन्माद, जरा व मृत्यु.

रुपें- वातप्रकोप, मूढवात, अजीर्ण, दीर्घरोग.

ताम्र- कफक्षय, पित्तक्षय, पांडुरोग, कुष्ठरोग, शूळ, मूळव्याध, जीर्णज्वर, खोकला, रक्तपित्त, वातरक्त, प्रमेह.

वंग [कथिल]— कृमि, मोह, कफरोग, खोकला, दमा, गुल्म, पीनस, उरःक्षत, प्रमेह.

लोह– मूत्रकृच्छ्र, सूज, शूल, मूळव्याध, कुष्ठ, पांडु, प्रमेह, क्षय, मेद, वातविकार, सर्व प्रकारचे रोग. हें वृष्य, दीर्घायुष्य देणारें, कामवृद्धि करणारें, बल वाढविणारें आहे.

नाग [शिसें]– हत्तीबल, वीर्यकर, क्षय, मूळव्याध, कुष्ठ, भ्रम, नपुंसकत्व, बालपक्षघात.

हीं औषधें तयार करण्याकारितां धातूंचे तुकडे लहान म्हणजे बाटलींत जाण्यासारखे घ्यावे. आपल् वाचकांनीं ह्या नवीन शोधाचा उपयोग करून अनुभव घेऊन पाहावा अशी आमची सर्वांस विनंति आहे.

(श्री. वैद्य यांची सूचना स्तुत्य आहे पण धातूंचे तुकडे बाटलीवर आघात न करतील एवढे लहान असावेत व अणकुचीदार नसावेत.

तसेंच या धातु शुद्ध असाव्यात. आयुर्वेदी पद्धतीनें शुद्ध केलेल्या धातु वापरल्यास अधिक गुण होईल. —संपादक)

———

आयुर्वेद सेवा संघाचीं बहुमोल प्रकाशनें

अनुभविक औषधें	वै. यादवजी त्रिकमजी आचार्य	४ रु.
अनुभविक चिकित्सा	वृद्ध वैद्य (मध्य-प्रदेश)	१ रु.
आयुर्वेदीय औषधी संशोधन हिंदी–मराठी	वै. पु. वि. धामणकर	१ रु.
औषधी गुणधर्मशास्त्र भाग १ (हिंदी)	वै. पं. गुणेशास्त्री	१॥ रु.
उपयुक्त ॲलोपॅथिक औषधें	डॉ. प्र. शं. गुप्ते	१॥ रु.
घरगुती औषधोपचार	सेवासंघ प्रकाशन	-।- रु.
निवडक रुग्ण चिकित्सा	संग्राहक वैद्य बिंदुमाधव पंडित	४॥ रु.
रोगविज्ञान भाग १, २ एकत्र	डॉ. वि. म. भट	१२ रु.
क्षयरोग चिकित्सा	सेवा संघ प्रकाशन	२॥ रु.

—: वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक :—

समान वैद्यकीय शैक्षणिक योग्यता व व्यावसायिक नियमन यासाठीं

दवे कमिटी, जामनगर

दि. २३, २४, २५ जानेवारी १९५५ रोजीं नगर येथें भरलेल्या ' सेंट्रल कौन्सिल ऑफ हेल्थ ' च्या तृतीय बैठकींत मंजूर झालेल्या ठरावानुसार तसरकारनें एक समिति नेमली आहे. या समितीनें देशांत सर्वत्र वैद्य, हकीम व होमिओपॅथिक क व्यवसायी यांची अनुक्रमें, समान शैक्षणिक ता ठरविण्याकरितां व त्यांचें समान व्यावसायिक यमन ठरविण्याकरितां, तत्संबंधीं एकंदर परिस्थितीचा आढावा घेऊन व तो काळजीपूर्वक अभ्यासून चा अहवाल सादर करावयाचा आहे. सौराष्ट्र चे आरोग्य–मंत्री हे सदर समितीचे अध्यक्ष स, मुंबई राज्य, प. बंगाल, हैद्राबाद (दक्षिण), त्रावणकोर-कोचीन ह्या राज्याचे आरोग्य-मंत्री हे सद म्हणून नियुक्त केले आहेत. तसेंच पंजाब चे आरोग्य-खात्याचे डायरेक्टर हे सेक्रेटरी म्हणून 'सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रीसर्च इन् इंडिजिनस स्टिम्स् ऑफ मेडिसिन, जामनगर ' या संस्थेचे रेक्टर हे संयुक्त सेक्रेटरी म्हणून नियुक्त करण्यांत ले आहेत.

समितीची पहिली सभा

ता. २५ जुलै १९५५ रोजीं वरील समितीची हिली बैठ झाली. ह्या बैठकींत असा निर्णय घेण्यांत ला कीं, देशांतील सर्व राज्यांतून, वैद्यकीय शिक्षणसंस्थांतून व त्यांना जोडलेल्या रुग्णालयांतून, निवडक तिनिधिक वैद्यकीय संस्थांतून व निवडक व्यक्तींकडून जास्तींत जास्त जरूर ती माहिती मिळवावयाची व सूचना मागवावयाच्या. या उद्देशानें समितीनें तयार केलेली प्रश्नावली उपरोक्त संबंधित संस्था व व्यक्ति याकडे पाठविण्यांत आली आहे.

प्रश्नपत्रिका मागवा

ज्यांना आयुर्वेद, युनानी अगर होमिओपाथी चिकित्साशास्त्रांच्या व्यवहारांत विशेष जिज्ञासा असेल व अशा जिज्ञासूंना जर कांहीं सूचना करावयाच्या असतील तर त्यांनीं समितीचे अध्यक्ष श्री. दयाशंकरभाई टी. दवे–सन्मान्य आरोग्य-मंत्री, सौराष्ट्र राज्य यांचेकडून या संबंधांत तयार केलेली प्रश्नपत्रिका राजकोट येथून मागवावी.ती त्यांना पाठविण्यांत येईल.

[सही] पी. एम्. मेहता
संयुक्त मंत्री, दवे कमिटी, जामनगर

शतावरी सारक आहे

१६ ऑगस्टच्या पत्रिकेंत ' शतावरी कल्पानें जुलाब ' झाले वगैरे निवेदन वाचलें. त्याबाबत माझ्या वाचनांत आलेलें मी कळवीत आहे.

राजवल्लभ या ग्रंथांत शतावरी ही सर सांगितली आहे. ' शतावरी वातपित्तमेहरक्तहरा सरा '। असें वचन आहे. तेव्हां मूळ शतावरी सारक आहे हें निश्चितच.

शतावरी घृत सिद्ध करतांना सारक अशा दुधाचेहि संस्कार शतावरी कल्पावर झाल्यानें तिच्या सर गुणाचें वर्धन झालें. त्यामुळें तो कल्क सेवन केल्यानें जुलाब होणें शक्य आहे. त्यास घृतसंयोग नसतां तर पोट दुखूनहि जुलाब झाले असते.

या जुलाबासाठीं याशिवाय आगंतुक कारणें घडलेलीं नसावींत अशी निवेदक वैद्यांनी खात्री करून घेतली असेलच.

वै. वा. का. जोशी
अहमदनगर

आयुर्वेदावर विश्वास

कोणत्याहि पद्धतीनें आयुर्वेदाचें शिक्षण द्या, पण एक उद्देश अवश्य दृष्टीसमोर ठेवा. विद्यार्थ्यांचा आयुर्वेदावर विश्वास बसेल, असें तें शिक्षण असलें पाहिजे. त्याचें शिक्षण आयुर्वेदाच्या मूळ संस्कृत ग्रंथाधारें झालें पाहिजे. आणि ज्याच्यामुळें त्याच्या मनांत ॲलोपॅथीविषयीं न्यूनगंड निर्माण होणार नाहीं असें एकंदर वातावरण असलें पाहिजे. —के. एम्. मुनशी

पशुवैद्यांचा तुटवडा

देशांतील पशुवैद्यांचा तुटवडा भरून काढण्यासाठीं नियोजन मंडळानें आंध्र ओरिसा, मध्यभारत व त्रावणकोर-कोचीन राज्यांत एकूण ४ नवीं पशुवैद्यक विद्यालयें सुरूं करण्याचें ठरविलें आहे.

या विद्यालयांसाठीं येणाऱ्या अनावर्तक खर्चापैकीं ७५ टक्के खर्च मध्यवर्ति सरकार व बाकीचा २५ टक्के खर्च संबंधित राज्य-सरकारें करणार आहेत. एकाद्या राज्यास हा खर्च देतां न आल्यास मध्य सरकार त्यास तेवढें कर्ज देईल.

परिस्थितीची जाणीव

"वैद्य बिंदुमाधव पण्डित परिस्थितीची जाणीव होऊन गोवा सत्याग्रहास गेले याबद्दल कौतुक करावें तेवढें थोडेंच." — भि. स. राजगुरव, मंचर

२० सप्टेंबर १९५५

या तारखेपासून नासिक येथें सिंहस्थ प सुरूं होत आहे. या निमित्त अगर अन्य कांहीं कार स्तव आपलें येणें नासिक येथें झाल्यास आ त्यावेळीं स्मरणपूर्वक आयुर्वेद सेवा संघ या संस्थेच् (१) आयुर्वेद औषधी भवन, (२) शुद्ध आयु विद्यालय व (३) आयुर्वेदीय आरोग्यशाला इत्या विभागांना अवश्य भेट द्यावी व देणगी देऊन संस् चालकांना उपकृत करावें.

व्यवस्थापक

आयुर्वेद सेवा संघ, नासि

तृणज्योतिष्मति

—: विकत मिळण्याची व्यवस्था :—

किं. १ तोळ्यास १ रुपया. टपालखर्च निराळा.

आयुर्वेद सेवा संघ, नासिक

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं
आयुर्वेदिक व युनानी वनौषधि
तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण !

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार, गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राह्मी, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्टय ! विशेष माहितीसाठीं आमचे साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें

टे. फो. नं. ३१७९६

टेलिग्रॅम-आयुर्वेद

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी

२४५ काळबादेवी रोड, मुंबई

मध्यप्रदेश अग्रगामी वैद्यमंडळ

(कार्यालय- नवी शुक्रवारी, नागपूर)

म.प्र. अग्रगामी वैद्यमंडळाच्या कार्यकारिणीची ता. २८ आगस्ट १९५५ रोजीं दुपारीं ३ तां मंडळाच्या कार्यालयांत श्री. गुलराज शर्मा यांच्या अध्यक्षतेखालीं सुरूं झाली. स्थानीय तांतील इतर सदस्य मिळून अधिकांश सदस्य स्थित होते.

कै. वै. पाठक, अमरावती

प्रथम अमरावती येथील “ जोग धर्मार्थ ालयाचे ” प्रमुख वैद्य श्री. पाठक यांच्या स्मिक निधनाबद्दल शोकाचा प्रस्ताव करण्यांत ला.

गोवा सत्याग्रह

गोवा येथें सुरूं झालेल्या सत्याग्रहाचें पूर्णपणें न करण्यांत येऊन पोतुगीजांनीं निःशस्त्र सत्या- र केलेल्या अमानुष अत्याचाराचा कडक त निषेध करण्यांत आला. त्याचप्रमाणें गोवा करण्याकरितां ज्यांनीं आपले प्राण अर्पण केले वीरांच्या आत्म्याला सुखशांति मिळो व त्यांच्या यांना शक्ति मिळो अशी इच्छा प्रगट करून देशवासीयांनाहि त्या वीरांचे आत्मे शक्तिप्रदान त अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करण्यांत आली.

वैद्यकीय पथक

मागील कार्यकारी-मंडळाच्या सभेंत गोवा- ग्रहींच्या वैद्यकीय मदतीकरितां वैद्यांचें एक पाठविण्याचें निश्चित झालें होतें, व अनेक या पथकांत सामील होण्यास तयार आहेत. परंतु वाडीहून सत्याग्रह तूर्त स्थगित झाल्याचें व मुळें पथक गेलें नाहीं. पुन्हां सत्याग्रह सुरूं ास म. अ. वै. मंडळ वैद्यकीय पथक पाठ- चा उपक्रम करील.

स्वास्थ्यसंवर्धक उपाय

एका प्रस्तावानें असा निश्चय करण्यांत आला कीं, जनस्वास्थ्याच्या दृष्टीनें आयुर्वेदीय सिद्धांतांना धरून जनतेला जास्तींत जास्त उपयोगी होईल असा कार्यक्रम चालू करावा. मंडळाच्या प्रांतांतील सर्व शाखा व संबद्ध संस्था यांच्या द्वारें आयुर्वेदीय स्वास्थ्य-संरक्षक उपायांचे जनतेला ज्ञान देण्यांत यावें. दिन-चर्या, रात्रिचर्या, सद्वृत्त यासंबंधींची आयुर्वेदीय माहिती जनतेला देण्यांत येऊन त्यांचा रोगां-पासून बचाव करण्यांत यावा.

शाळांतून स्वस्थवृत्त शिकवावें

एक ठराव असा पास झाला कीं, “ सरकारनें नार्मल स्कूल या संस्थांमधून आयुर्वेदीय स्वस्थवृत्त शिकण्याची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणें असेंहि ठरलें कीं, मंडळातर्फे निरनिराळीं पत्रकें प्रसिद्ध करून त्यांतून व्यावहारिक उपचारांची जनतेला माहिती देण्यांत यावी. त्यामुळें सर्वसामान्य रोगांवर लोकांना घरगुती उपचार करणें सोपें जाईल. मण्डळाच्या स्वास्थ्यसंबंधी योजनेंत प्रान्तीय शासन, कार्पोरेशन, म्युनिसिपालिटी व जनपद इत्यादि कडूनहि सहकार्याची अपेक्षा करण्यांत आली.

शास्त्रचर्चा-समिति

म. प्र. अ. वै. मंडळाच्या शास्त्रचर्चा समितीच्या कार्याबद्दल कार्यकारिणीनें समाधान व्यक्त केलें व आजपर्यंतच्या कार्याबद्दल स्वीकृति दिली. चर्चा समितीच्या पुढील कार्याची रूपरेषा व उद्देश मान्य करण्यांत आले. चर्चासमितीचे उद्देशः—

(१) शास्त्रचर्चा-समितींत आयुर्वेदांतील गूढ व जटिल सिद्धांतांवर चर्चा होऊन ती आयुर्वेदीय मासिकांमधून प्रसिद्ध करण्यांत यावी. यामुळें बाहेरील विद्वान् लोकांच्याहि मतांचा फायदा मिळेल.

(२) बाहेरील जिज्ञासूंनीं चर्चा-समितीकडे पाठविलेल्या शास्त्रीय प्रश्नांवर चर्चा होऊन समाधानकारक निर्णय लावण्याचा, चर्चासमितींत प्रयत्न व्हावा.

चर्चासमितींत एखाद्या चिकित्सकानें रोगनिदानाकरितां एखादा रोगी पाठविल्यास चर्चासमितीनें रोगनिश्चिति करून त्याच्या औषधोपचाराची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणें अखाद्या रुग्णानें चर्चासमितीशीं पत्रव्यवहार केल्यास चर्चासमितिकडून त्याला सर्व प्रकारचें वैद्यकीय साहाय्य देण्यांत यावें.

चर्चासमितीची बैठक दर रविवारीं दुपारीं ३ वाजतां नवीशुक्रवारी, नागपूर, येथें मंडळाच्या कार्यालयांत भरते. या समितींत विद्वान् वैद्य, डॉक्टर, दर्शनशास्त्री, साहित्य व व्याकरण शास्त्रांचे विशेषतज्ञ उपस्थित राहतात.

वैद्य गं. बा. वझे
मंत्री
मध्यप्रदेश अग्रगामी वैद्यमंडळ

भारत वनस्पति फार्मसी
पो. मंचर (जि. पुणें)
यांचेकडील आयुर्वेद वनस्पतीपासून शास्त्रोक्त पद्धतीनें तयार केलेलीं संधिवात, पक्षवात वगैरे सर्व वातावर चोळण्याकरतां उपयोगी
काळीटाहाकळ तेल मालकांगोणी तेल
नारायण तेल निर्गुंड्यादि तेल
वातावर मिश्रणतेल महावात विध्वंसकतेल
याशिवाय दुसरी वातावरील तेलें विकत मिळतील. "झनाना" औषधी तेल.
डोकेंदुखी, अर्धशिशी, विंचूदंश, नारूवर बाहेरून लावण्यासाठीं उपयोगी. याशिवाय ताज्या वनस्पति मिळण्याचें ठिकाण —
श्री. भिमाजी सखाराम राजगुरव
पो. मंचर (जि. पुणें)

लिंबाच्या सालींतील रसायनें

सर्दीवर रामबाण आहेत

लिंबें आणि संत्रीं यांच्या सालींच्या आंतील भागांत जीवनसत्वांसारखीं "व्हिटामिन" असणारीं कांहीं रसायनें सर्दी बरी करतात. त्याचप्रमाणें हीं रसायनें संसर्गामुळें होणारे विकार आणि डोळ्यांतील एका विशिष्ट प्रकारचा मोतीबिंदु बरा करतात. "अमेरिकन जर्नल ऑफ् डायजेस्टिव्ह डिसीजीस्" या नियतकालिकांतून चार अमेरिकन डॉक्टरांनीं अलिकडेच हा शोध प्रसिद्ध केला आहे.

व्हिटॅमिन 'पी'

हीं रसायनें "बायोफ्लेवोनॉइड्स" किंवा "व्हिटॅमिन-पी" या नांवानें ओळखलीं जातात. हीं रसायनें शरीरांतील छोट्या छोट्या रक्तपेशींची शक्ति वाढवितात. त्यामुळें शरीराच्या कोणत्याहि भागाला येणाऱ्या सूजेला प्रतिकार केला जातो.

लिंबाच्या सालींतलि जीवनसत्त्वें

दीपकवटींत आहेत

रोज जेवणांत अगर अन्य वेळीं लिंबाचा आंबट रस सेवन करण्यानें कफ पित्त दोषाचे रोग जडण्याचा संभव असतो. असे रोग होऊ नयेत यासाठीं उत्तम उपाय म्हणजे लिंबाचें लोणचें खाणें हा आहे. सतत लिंबाचा रस बाराहि महिने सेवन करणें हें वात [रूक्ष, रोड] प्रकृति खेरीज इतर [पित्त व स्थूल प्रकृतींना बाधक आहे असें आमचें अनुभवपूर्वक मत झालें आहे. आंबट पदार्थ [टमाटो, लिंबू, ताक, आंबे] दीर्घकाल सेवन केल्यामुळें झालेल्या विकारांवर

लिंबाच्या सालीचें लोणचें

हा शास्त्रशुद्ध उपाय आहे. या लोणच्यापासून 'दीपकवटी' नांवाच्या गोळ्या आयुर्वेद सेवासंघानें तयार केल्या आहेत. रोज अल्प प्रमाणांत कडूरस घेण्यासाठीं जेवणापूर्वी-मध्यें - अगर नंतर या [दीपकवटी] गोळ्या सेवन करणें आरोग्यदायक आहे. आपल्या औषधी विक्रेत्याकडे सेवा संघाच्या दीपक वटी गोळ्यांची मागणी करा.

शिकची सिंहस्थ यात्रा

आरोग्यविषयक दक्षता

येती सिंहस्थ यात्रा नासिक व त्र्यंबक या शहरांत ता. २० सप्टेंबर १९५५ पासून होत असून भारताच्या सर्व भागांतून यात्रेकरू हणार आहेत व नासिक बरो म्युनिसिपल , त्र्यंबक म्युनिसिपल विभाग व नासिकरोड - ली म्यु०विभाग या तिन्ही नगरपालिकांच्या या सर्व यात्रेकरूंची वस्ति होणार आहे. अशा तेथील पाणीपुरवठा स्वच्छ ठेवून अेकंदर सार्व- आरोग्य टिकविणें व कोणत्याहि संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होऊं न देण्याची दक्षता आवश्यक आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन नासिक- जिल्हाधिकाऱ्यांनीं १९५१ च्या मुंबई पोलीस न्वयें नुकताच अेक हुकूम काढून खालील जाहीर केल्या आहेत.

कॉलरा प्रतिबन्धक लस

वरील तिन्ही नगरपालिकांच्या हद्दींत राहणाऱ्या व्यक्तीनें कॉलरा प्रतिबंधक लस टोंचून घेतली , किंवा ता. २०-९-१९५५ पूर्वी सहा महि- आंत ती लस टोंचून घेतली असल्याचा हजर केला पाहिजे.

टोंचून घेतलें पाहिजे

तसेंच या तिन्ही ठिकाणच्या म्युनिसिपल हद्दींत येऊं अिच्छिणाऱ्या किंवा येणाऱ्या व्यक्तीनें प्रतिबन्धक लस टोंचून घेतली पाहिजे, किंवा २०-९-१९५५ पूर्वी सहा महिन्याच्या आंत ती घेतली असल्याचा दाखला हजर केला पाहिजे. प्रमाणें लस टोंचून घेतल्याखेरीज अगर तसा दाखविल्याखेरीज कोणाहि व्यक्तीस या ठिकाणीं मिळणार नाहीं. रेल्वे स्टेशन, अेस. टी. बस व जकात नाकीं या ठिकाणीं लस टोंचण्याची व्यवस्था केलेली असली तरी येथें येऊं इच्छिणाऱ्या नीं अगर प्रवाशांनीं आपापल्या गांवींच हीं टोंचून घेऊन त्यासंबंधींचा दाखला जवळ ठेव- ते त्यांच्या सोईचें होईल.

संडास व मुताऱ्याखेरीज अितर कोठेंहि शौच अगर लघवी करण्यास बन्दी करण्यांत आली आहे.

कुजकीं नासकीं फळें, शिळे किंवा आंबलेले अन्नपदार्थ उघड्या जागेवर टाकू नये, ते वापरू नये किंवा त्यांची विक्री करूं नये, असेंहि या हुकुमांत म्हटलें आहे.

सर्व हॉटेलें, विश्रांतिगृहें व खाद्य पेयांचीं दुकानें तपासण्याचे अधिकार आरोग्यखात्याच्या अधिकाऱ्यांना देण्यांत आले असून त्या अधिकाऱ्यांना ही दुकानांची तपासणी केव्हांहि करूं दिली पाहिजे.

वर उल्लेखिलेल्या तिन्ही म्युनिसिपल विभागांत येणाऱ्या कोणाहि माणसाची वैद्यकीय तपासणी केली जाअील, आणि कोणी मनुष्य प्लेग, कॉलरा, देवी किंवा अन्यत्र सांसर्गिक रोगानें आजारी असल्याचें आढळून आल्यास त्यास ताबडतोब संसर्गजन्य रोग्याच्या रुग्णालयांत पोंचविलें जाईल.

वरील हुकुमांचा भंग करणारी व्यक्ती जास्तींत जास्त ३ महिने कैद अगर २०० रु. दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

यात्राकर प्रत्येकीं ८।८ आणे

सिंहस्थ यात्रेनिमित्त नाशिक व त्र्यंबक या ठिकाणीं बाहेरून येणाऱ्या प्रत्येक यात्रेकरूस नाशिक व त्र्यंबक या दोन्ही नगर पालिकांस प्रत्येकीं ८ आणे प्रमाणें यात्रा कर द्यावा लागेल. हा यात्राकर ता. १६ सप्टेंबर १९५५ ते ३० जून १९५७ पर्यंत चालू राहणार आहे.

परप्रांतीय यात्रेकरूंना सूचना

मुंबई राज्यांत चालू असलेल्या मद्यपान व मादक पदार्थ बंदीच्या कायद्याखालील सर्व नियम सिंहस्थ यात्रेस येणाऱ्या परप्रांतीय यात्रेकरूसहि पाळावे लागतील. या नियमाखालीं यात्रेस येणाऱ्या लोकांना जरूर त्या परवान्याखेरीज देशी अगर विलायती दारू किंवा भांग, चरस, अफू वगैरेसारखे मादक पदार्थ जवळ ठेवतां येत नाहींत अगर त्यांचा वापर करतां येत नाहीं.

आयुर्वेदिक औषधें व आक्षेपार्ह प्रसिद्धिकरण

१ एप्रिल १९५५ पासून केंद्रीय सरकारनें जाहिरातीबाबत एक कायदा भारतास लागूं केला आहे. कायद्याचें नांव 'औषधें व चमत्कारिक उपाय यासंबंधींच्या अतिशयोक्तिपूर्ण जाहिरातीचा कायदा' [दि ड्रग्ज अँड मॅजिक रेमिडीज (आब्जेक्शनेबल ॲडव्हटाईजमेंट्स्) ॲक्ट] असें आहे. जाहिरात या शब्दांत लेबल, परिपत्र, वर्तमानपत्रांतील जाहिरात वगैरेंचा समावेश आहे. ३२ रोगांवरील जाहिरातींना प्रतिबंध घालण्यांत आला आहे.

ड्रग कन्ट्रोलरची मुलाखत

या कायद्याच्या अम्मलबजावणीचें काम मुंबई राज्यांत ड्रग कन्ट्रोलर श्री. भूपेंद्र पटेल बी. एस्सी. यांच्याकडे आहे, म्हणून मुंबई राज्यांतील इंडियन फार्मासिस्ट असोसिएशनचे प्रतिनिधि, श्री. पटेल यांना भेटले. हा कायदा आयुर्वेदीय औषधांनाहि लागू आहे असें श्री. पटेल यांनीं चर्चेच्या वेळीं सांगितलें.

श्री. पटेल यांनीं असें आश्वासन दिलें आहे कीं, आपणास आयुर्वेद व आयुर्वेदीय औषधें यासंबंधीं फारच कमी माहिती आहे सबब त्यामुळें ज्या अडचणी येतील त्या दूर करण्यासाठीं आपण मुंबई सरकारनें नेमलेल्या डायरेक्टर [ऑफ् आयुर्वेद] चा सल्ला घेणार आहो. श्री. पटेल यांनीं फार्मासिस्ट ॲसोसिएशनला असें सुचविलें होतें कीं, ज्या रोगावरील औषधांवर प्रतिबंध घालण्यांत आला आहे, त्या रोगांची एक आयुर्वेदीय परिभाषेंतील यादी तयार करून ती केंद्र सरकारकडे लक्ष खेचण्यासाठीं पाठवावी.

चर्चा प्रसंगीं श्री. पटेल यांनीं असें सांगितलें कीं, औषधांचीं जीं ग्रंथोक्त नांवें प्रदररिपु, क्षयांतक-रस वगैरे आहेत त्यांत प्रतिबंधित रोगांचीं नांवें असतील तर तीं नांवें पुढें चालू ठेवतां येणार नाहींत, त्या नांवांत बदल करावा लागेल. कारण या नांवामुळें जनतेला औषधांचा गुण समजतो. अशा प्रकारच्या खुलाशामुळें, औषधें निर्माण करणाऱ्या मंडळीसमोर बरीच बिकट समस्या उभी झाली आहे.

वैद्यकीय नियतकालिकांत प्रसिद्ध होणाऱ्या औषधी जाहिरातींना कायद्याचे नियम लागूं करण्यांत येणार नाहींत. तथापि वैद्यकीय पत्र कोणास म्हणावें याबाबत अद्याप विचार चालूं आहे. आक्षेपार्ह, लेबल, परिपत्र (सर्क्युलर), जाहिराती वगैरे छापणें हा गुन्हा आहे. याबाबत इतःपर कोणतीच सूचना देण्यांत येणार नाहीं. जे कायदा मोडत आहेत किंवा पुढें मोडतील त्यांच्या विरुद्ध सरळ काम चालूं करण्यांत येईल.

— आरोग्यसिंधुवरून

पित्त-विकार

चालूं शरद्ऋतूमध्यें पित्ताचे विकारांचा उपद्रव होऊं नये म्हणून व गरिबांनाहि भरपूर प्रमाणांत पित्तशामक द्रव्य वापरतां यावें या उद्देशानें सेवा संघानें मुद्दाम तयार केलेलें

मुक्ताशुक्ति भस्म

आजच मागवून घ्या. किंमत २ रु. तोळा

आयुर्वेद औषधीभवन, नासिक

थंडगार
नेत्रांजन
डोळ्याचे विकारावर
कृष्णशास्त्री चिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

आयुर्वेदीय पाठ्यक्रमाचें संशोधन

(लेखकः —आयुर्वेदबृहस्पति **जगन्नाथप्रसादजी शुक्ल** संपादक, सुधानिधि, प्रयाग)

वैद्यककालांत आयुर्वेदाची शिक्षणव्यवस्था कशी-होती याची निश्चित माहिती आज मिळूं शकत परन्तु वेदकालानन्तर ऋषिकालांत जेव्हां आयु-र्वें पठन-पाठन सुरूं झालें तेव्हां प्रथम भरद्वाज- इंद्रापासून ‘त्रिस्कंध’ आयुर्वेदाचें शिक्षण लें व त्यानन्तर भरद्वाजापासून आत्रेयादि मह- त्याचें शिक्षण प्राप्त झालें. त्यानन्तर पुढें कांहीं नें काशिराज धन्वन्तरीनें आयुर्वेदाचें विभाजन, येच्या दृष्टीनें आठ विभागांत करून अष्टांग-र्वेद-शिक्षणपद्धति चालू झाली. परन्तु देशाच्या हासिक घडामोडींत अनेक ग्रंथांचा लोप झाला क्रांत्यामुळें शिक्षणाची सुलभताहि नष्ट झाली. च आयुर्वेदीय संहिताद्वारां गुरु-शिष्य-शिक्षण-अस्तित्वांत आली. ह्यावेळीं ग्रंथप्रधान शिक्षण-ति चालू होती.

नि. भा. आयुर्वेद महासंमेलन व आयुर्वेद द्यापीठ यांची स्थापना झाल्यानन्तर प्रयाग येथें वैद्य-संमेलन भरलें त्यावेळीं आयुर्वेदाचा शोधित पाठ्यक्रम निश्चित करण्याची आवश्यकता ल्याचें सदर संमेलनांत घोषित करण्यांत आलें. नन्तर मथुरा येथें भरलेल्या वैद्य-संमेलनांत ह्या र्याकरितां एक समिति नेमण्यांत आली. समितीं- प्रमुख कविराज महामहोपाध्याय गणनाथ सेन नीं समितीतील सदस्यांच्या सहकार्यानें विषय-धान स्वरूपाचा आयुर्वेदीय पाठ्यक्रम आंखून यार केला. आधुनिक विज्ञानशास्त्राच्या ज्ञानपरिपूर्ती-रितां गुरुजवळ शिक्षण घ्यावें याचाहि उल्लेख ह्या ठ्यक्रमांत करण्यांत आला आहे.

समन्वयाला विकृत स्वरूप

परन्तु पुढें ह्या समन्वयाला विकृत स्वरूप प्राप्त होऊं लागलें व ॲलोपाथीचे विषय स्वतंत्र रीत्या ह्या पाठ्यक्रमांत गोंवले गेले. त्यामुळें आयुर्वेदीय पाठ्यक्रमाला आवश्यक असलेल्या संस्कृत भाषेच्या ज्ञानाची विद्यार्थ्यांची प्रवेशपात्रता कमी करण्यांत येऊन इंग्रजी भाषा व आधुनिक विज्ञानशास्त्र ह्यांची प्रवेशपात्रता वाढविण्यांत आली. ह्या परिस्थितीमुळें विद्यार्थ्यांना खरें आयुर्वेदीय विज्ञान समजेनासें होऊं लागलें व त्यांचा कल पाश्चात्य विज्ञान व वैद्यकशास्त्र ह्याकडे अधिक होऊं लागला. त्यांना स्वतःस वैद्य म्हणवून घेण्याचीहि लाज वाटूं लागली व ते स्वतःस डॉक्टर म्हणून संबोधूं लागले. ही घातक परिस्थिति आयुर्वेदाभिमान्यांच्या लक्षांत येऊन त्यांनीं शुद्ध आयुर्वेदाचा आवाज उठविण्यास सुरुवात केली.

विश्वसंपर्क आवश्यक

आयुर्वेद ही भारताची राष्ट्रीय चिकित्सा-पद्धति व्हावी व सर्वत्र सिव्हिल सर्जन, हेल्थ ऑफिसर वगैरे पदाधिकारीहि या राष्ट्रीय चिकित्सा--पद्धतीचे असावेत असें जर आपणांस वाटत असेल तर विज्ञानाकडे आपण डोळेझांक करून चालणार नाहीं. त्याचेंहि ज्ञान अत्यावश्यक राहील. व अशा स्थितींत कोणताहि एखादा प्रान्त केवळ शुद्ध आयुर्वेद पाहिजे म्हणून देशापासून अलग राहूं शकणार नाहीं. शिवाय स्वास्थ्यविज्ञान व चिकित्साविज्ञान ह्यांचें व्यापक ज्ञान होण्यास विश्वसंपर्क ठेवणेंही जरूरीचें राहील. आतां मुख्य प्रश्न राहिला तो म्हणजे पाठ्यक्रमनिश्चिति व अभ्यास-ग्रंथांची निवड यांचा. ह्याहि बाबतींत आम्ही व्यापक दृष्टिकोन ठेवणेंच जरूरीचें आहे. पं. यादवजी त्रिकमजी यांनीं ह्या बाबतींत ज्या कांहीं सूचना केल्या आहेत त्या लक्षांत घेण्यासारख्या आहेत.

ग्रंथप्रधान शिक्षणपद्धति हीं पूर्वीहि उपयुक्त मानली जात नसे व आज तर ती सर्वमान्य नाहींच. आयुर्वेदाचें विभाजन ज्यावेळीं आठ अंगांत झालें

त्यावेळीं लोकांना हें कळून चुकलें होतें कीं, कोणत्याहि एका ग्रंथाच्या आधारें सर्वांगीण आयुर्वेद शिकविणें शक्य होत नाहीं. संहिता ग्रंथ हें पठनपाठनच्या बाबतींत आपद्कालांतील एक तात्पुरती व्यवस्था होती. आणि म्हणून प्रत्येक विषय विस्तारानें शिकविण्याकरितां भिन्न भिन्न ग्रंथांची निर्मिति होणें आवश्यक आहे. देशव्यापी पाठ्यक्रमाकरितां हिन्दी व संस्कृत भाषेंत ग्रंथ प्रसिद्ध व्हावेत व सहाय्यक ग्रंथ प्रांतीय भाषेंतून प्रसिद्ध व्हावेत हेंच योग्य होईल.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट

आणखी एक महत्त्वाची गोष्ट आहे ती अशी:-- आतां केवळ पूर्वींच्या आयुर्वेदीय आठ अंगावरच विसंबून चालणार नाहीं, तर आणखीहि कांहीं महत्त्वाचीं अंगें त्यांत समाविष्ठ करून घेतलीं पाहिजेत. उदा० स्वस्थवृत्त हें एक महत्त्वाचें अंग विशेष व्यापक स्वरूपांत अंगिकारिलें पाहिजे आणि म्हणून तें एक नवीन अंगच म्हणावयास हरकत नाहीं. त्यांत व्यक्तिगत आरोग्य, सार्वजनिक आरोग्य, प्राकृतिक आरोग्य, संसर्गजन्य व सांथीचे रोग ह्यांचा प्रतिबंध इत्यादि गोष्टींचा अंतर्भाव होईल.

तसेंच शारीरशास्त्राचेंहि विशेष महत्त्व अंगिकारून त्याचें एक दहावें अंग म्हणून मानावें लागेल. त्यांत शरीर-रचना, शरीरक्रियाविज्ञान व शरीर-विकृतिविज्ञान ह्या विषयांचा अंतर्भाव होईल. त्याचप्रमाणें चिकित्सेच्या बाबतीत द्रव्यगुणांचें असलेलें वर्णन पुरेसें समजलें जाणार नाहीं, आणि म्हणून त्याचें अेक अकरावें अंग मानावें लागेल, व त्यांत पदार्थ-विज्ञान, द्रव्याविज्ञान, द्रव्यगुणविज्ञान, द्रव्यांचे रस--वीर्य-विपाक व प्रभाव ह्यांचें वर्णन ह्या विषयांचा समावेश होईल.

संमोहन, संमूर्च्छन, मानसचिकित्साशास्त्र

प्राचीन आयुर्वेदाचार्यांनीं रसतंत्रशास्त्रांत महत्वपूर्ण क्रांति व परिवर्धन केलें, परंतु त्यावेळीं त्यांना संमोहन, संमूर्च्छन ह्या गोष्टी ग्रहण झाल्या नाहींत व चिकित्सेंतहि ह्या गोष्टींचा उपयोग केल्याचें दिसत नाहीं. आणि म्हणून एक जादा अंग म्हणून आम्ही प्राचीन व अर्वाचीन रसायनशास्त्राचा समन्वय करून रसतंत्रशास्त्रांतील बारावें अंग स्वीकारलें पाहिजे. चिकित्साशास्त्राच्या विस्ताराकरितां पूर्वीं ज्याप्रमाणें कायचिकित्सा, उर्ध्वांगचिकित्सा, रसायन, वाजीकरण व कौमारभृत्य ह्या विभागांचा अलग रीत्या स्वीकार केला गेला त्याचप्रमाणें शास्त्रीय दृष्ट्या आम्ही मानसचिकित्सा शास्त्राचा तेरावें अंग म्हणून स्वीकार करण्यास हयगय करतां कामा नये. उर्ध्वांग-चिकित्सेंत मानसचिकित्सा समाविष्ट करावी असें म्हटल्यास ती जबरदस्ती ठरेल. कारण मानसचिकित्सा शास्त्रांत आत्मा, जीव, प्रकृति, बुद्धि, मन, मनाचे अधिकार क्षेत्र शिवाय पृथ्वी, आप्, तेज, वायु, आकाश ह्या पंचमहाभूतांचें वर्णन व मानस रोगाचें वर्णन व चिकित्सा इत्यादि गोष्टींचा अंतर्भाव करावा लागेल.

अितकेंच नव्हे तर अगदतंत्राच्या अद्यावत् विस्ताराच्या दृष्टीनें विष-द्रव्य, उपविष-द्रव्य,. परीशिष्ट विषद्रव्य, शवच्छेद द्वारा विष-निर्णय, विषांचा प्रभाव विस्तार ह्यांचें चौदावें अंग करावें लागेल.

पंधरावें अंग

संहिताकालीन प्राचीन आयुर्वेदाचार्यांनीं ज्याप्रमाणें आरम्भीं सूत्रस्थानांत आयुर्वेदीय सिद्धांतांची कल्पना व वर्णन दिलें आहे त्याप्रमाणें आम्ही पंचतत्त्व– विवेचनाबरोबर त्रिदोष–सिद्धांत, यूनानी-चिकित्साशास्त्राचे मूलभूत सिद्धांत व अॅलोपॅथिक विज्ञानाचा भाग ह्यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हें एक पंधरावें विस्तार अंग होअील. परीक्षेच्या दृष्टीनें हा एक स्वतंत्र विषयच ठेवावा लागेल. अशाप्रकारें आपल्या आयुर्वेदीय पाठ्यक्रमाचा व परीक्ष्य विषयांचा विस्तार वाढवून तो चिकित्सा-जगतापुढें आभिनव व ग्राह्यस्वरूपांत ठेवून त्याचा प्रभाव आपण पाडला पाहिजे.

इतकें विवेचन केल्यानंतर मी आतां श्री. यादवजी यांच्या विचार–विमर्शांचा परामर्श घेतो. माझ्या मतें शुद्ध आयुर्वेद व मिश्र आयुर्वेदाचें आंदोलन हे

त्मरक्षणार्थ अथवा सरकारी दृष्टिकोनांत परिवर्तन त्याकरितां आणि आयुर्वेदिक विद्यार्थ्यांच्या प्रवृ-ला योग्य वळण देण्याच्या दृष्टीनें प्रचलित काळांत तुप्रदर्शनाकरितां उचित म्हणून समजलें जातें; तु ह्या हेतुप्रदर्शनांत स्थायी यथार्थता नाहीं. मच्या विद्यार्थ्यांना आयुर्वेदाचें ज्ञान यथार्थ व्हावें त्यांच्या मनांत आयुर्वेदाविषयीं अलोट श्रद्धा उत्पन्न वी ह्या गोष्टी ठीक आहेत. आणि ह्याकरितां रंभीं त्यांना आयुर्वेदीय विषयांचें शिक्षण प्राधा-न्यानें देणें उचित आहे. परंतु त्याचबरोबर त्यांना धुनिक विषयांच्या ज्ञानापासून दूर ठेवून एकांगी (मोंडू) बनविणें ही गोष्टहि योग्य होणार नाहीं.

आंदोलन पंगु राहील !

तीन चार वर्षें आयुर्वेदप्रधान वैद्यकीय शिक्षण ल्यानंतर विद्यार्थ्यांस जगाच्या वैद्यकीय क्षेत्रांत निर्बंध संचार असावा. जर आधुनिक दृष्टिकोनांतून युर्वेदीय विद्यार्थी आमच्या देशाचें स्वास्थ्यरक्षण चिकित्सा हे भाग सांभाळूं शकला नाहीं तर हे सध्यांप्रमाणेंच पुढेंहि पाश्चात्य वैद्यविद्याविभूषि-तें हातीं राहातील व आमचें आयुर्वेदीय आंदोलन गू राहील. म्हणून आरंभीं ३।४ वर्षें आयुर्वेद-ान शिक्षण दिल्यानंतर पुढें २ वर्षें आयुर्वेद-ान्य कायम राखून समन्वयात्मक शिक्षण मिळ--ची सोय जरूर असली पाहिजे. शिक्षण व परीक्षा यप्रधान असाव्यात परंतु संहिताग्रंथांतील जो भाग यप्रधान शिक्षणांत येऊं शकणार नाहीं, त्याकरितां िताग्रंथाची स्वतंत्र प्रश्नपत्रिका ठेवतां येईल.

आयुर्वेदीय पदार्थविज्ञान

आयुर्वेदीय पदार्थविज्ञानाचें शिक्षण आणि सा अत्यावश्यक आहेत. ह्या विभागांत पदार्थ-ज्ञान, द्रव्याविज्ञान, द्रव्यगुणविज्ञान, पुरुषविज्ञान, दोषविज्ञान, धातु व मल विज्ञान ह्या गोष्टींचा वेश झाला पाहिजे. कारण कीं, आमच्या आयु-र्वेद चिकित्सकाला चिकित्साशास्त्रांतील सर्व विषय समजण्याची कुवत असली पाहिजे. ह्या हेतूसाठीं चरक–सुश्रुतांतील निर्देशात्मक भाग अपुरा आहे व सांख्यकारिका आणि तर्कसंग्रह हेहि अपुरेच आहेत. आधुनिक विज्ञानवर्णित विषयांचाहि निर्देश आणि समावेश आमच्या विज्ञानग्रंथांतून असला पाहिजे. पदार्थविज्ञानावर पं. रामरक्ष पाठक, पं. रणजीतराय देसाई, पं. बलवन्त शर्मा दीक्षित व श्री. काशीकर यांनीं लिहिलेल्या पुस्तकांची चर्चा श्री. यादवजीभाई यांनीं केलीहि आहे. मीहि पदार्थविज्ञानावर पांच भागांत पांच पुस्तकें लिहिलीं आहेत. त्यांत अनुक्रमें (१) प्रमाण-विज्ञान, (२) पदार्थविज्ञान (३) द्रव्य-विज्ञान (४) गुण-विज्ञान व (५) पुरुष-विज्ञान ह्यांचें समन्वयात्मक विवेचन केलेलें आहे. ह्या सर्व पुस्तकांचा जरूर तेथें अवश्य उपयोग करावा.

शरीर शास्त्राचें स्पष्टीकरण जसें प्रत्यक्ष दर्शनानें होतें त्यानुसार तें चरक--सुश्रुत–वाग्भट ह्यांतील विवेचनावर कसें आधारित आहेत हें सांगून समन्वयात्मक दृष्टीनें शरीर-रचना-विज्ञान, शरीर-क्रिया--विज्ञान व शरीर-विकृति--विज्ञान ह्यांचें वर्णन करणें जरूर आहे. असें करतांना मतभेद व शंका यांचें निराकरण करण्यांत यावें.

दोषधातुमलविज्ञान

दोषधातुमलविज्ञान यासंबंधीं आचार्य यादवजी यांनीं यथार्थ प्रकाश पाडला आहे. या बाबतींत प्रत्यक्ष परीक्षण व अनुसंधान या दृष्टीनें कसें कार्य केलें जातें या विषयावर प्रकाश पाडणें जरूर आहे. ह्या कार्याकरितां उभय (आयुर्वेदिक व ॲलोपॅथिक) शास्त्रज्ञ एकत्र येऊन त्यांनीं निर्णय घेणे हिताचें होईल.

द्रव्यगुणविज्ञान व रोगविज्ञान

द्रव्यगुणविज्ञानासंबंधीं पं. यादवजींनीं कांहीं पुस्तकें लिहून मार्गदर्शन केलें आहे. मीहि रस-वीर्य--विपाक-प्रभाव यावर " रसादिपरिज्ञान " नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. रोगविज्ञानाचे बाबतींत स्वतंत्र विषय करण्याची आवश्यकता आहे असें मला वाटत

नाहीं. निदानाचे सिद्धांत आयुर्वेदाच्या मूल सिद्धांतांबरोबर ठेवतां येतील. त्रिदोषविज्ञानविचाराबरोबर निदानसापेक्ष वर्णन, कीटाणुसंभव–परिस्थिति, नाडी, मूत्र, मल, जिव्हा, शब्द, स्पर्श, नेत्रदर्शन इत्यादींची परीक्षा, प्रयोग व साहित्यासहित विकृतिविज्ञान आणि निदानाकरितां स्वतंत्र पुस्तक असावें कीं नाहीं, या गोष्टींचा निर्णय होऊं शकेल. माधवनिदान आधारग्रंथ म्हणून स्वीकारतां येईल. प्रत्येक रोगाच्या वर्णनाबरोबर त्याच्या निदानाचेंहि वर्णन असावें. कांहीं नवीन रोग आधुनिक नांवानें संबोधले जातात ते जुन्या कोणत्या रोगाबरोबर मेळ खातात किंवा काय हें पाहून त्यांचें विवेचन केलें पाहिजे. आणि जे रोग नवे समजले जातात त्यांचें आयुर्वेदीय पद्धतीनें वर्णन होणें आवश्यक आहे. प्रत्येक रोगांत शारीरिक विकृति कशीकाय होते, त्याचप्रमाणें त्याचें साध्यासाध्य स्वरूप आणि पथ्यापथ्य-निरूपण जाणणेंहि आवश्यक आहे. तसेंच चिकित्सासूत्र आणि प्रत्येक रोगाची शमन व शोधन चिकित्सा जाणणेंहि जरूर आहे. शोधनचिकित्सेच्या अंतर्गत धारास्नानाचें ज्ञान असावें. रसायन आणि वाजीकरण या अंगांबरोबरहि शोधनक्रियेचा व श्रृंगारशास्त्राचा समावेश होतो.

शस्त्रक्रियेबाबत विशेष दक्षता

शस्त्रक्रियेच्या शिक्षणांत विशेष दक्षता घेणें आवश्यक आहे. शस्त्रक्रियेसंबंधीं पुष्कळसें वाङ्मय आपल्याकडे उपलब्ध आहे, परंतु ज्याप्रमाणें बिनवापरल्या हत्याराला उजळा देणें जरूर असतें त्याप्रमाणें या आपल्या वाङ्मयाला अभिनव स्वरूप देण्याकरितां उजळा देणें जरूर आहे. जरूर तेथें नवीन आविष्कारसंवर्धित स्वरूपाचा उपयोग केला जावा, परंतु मूलाधारामध्यें विकृति निर्माण होऊं नये. शल्यतंत्रांत आरंभीं डॉक्टरांचें साहाय्य घ्यावें परंतु पुढें आपण स्वावलंबी बनून त्यामध्यें आपणच प्रगति केली पाहिजे. नवीन साधन, औषधी अगर द्रव्य स्वीकृत करतांना शक्य असल्यास त्याच्या प्रतिनिधींचीहि योजना करून ठेवावी. व अशा नवीन स्वीकृत साधन, औषधी अगर द्रव्याचें विवेचन आयुर्वेदीय पद्धतिप्रमाणेंच द्यावें म्हणजे आयुर्वेदीय तत्त्वप्रणालींत विसंगति निर्माण होणार नाहीं.

रसायनशास्त्राचा समावेश

रसतंत्राच्या अंतर्गत आधुनिक रसायनशास्त्राचा (केमिस्ट्री) समावेश कुशलतेनें करण्यांत यावा. एखाद्या द्रव्याचें शोधन अगर मारण केल्यानंतर त्यांत जें परिवर्तन निर्माण होतें त्यांचें स्पष्टीकरण आधुनिक विज्ञानदृष्टीनेंहि करून घ्यावें, व रसतंत्राची अद्यावतता कायम राखण्याची परम्परा चालू ठेवावी.

प्रसूतितंत्र व दाईकर्म

कौमारभृत्याच्या अंगांत कांहीं आधुनिक ज्ञान व यंत्रादिकांचा समावेश करणें जरूर आहे; कारण कीं, रुग्णालयांतून प्रसूतितंत्र व दाईकर्म ह्यांच्या बाबतींत या ज्ञानाचा व साधनसामुग्रीचा उपयोग सुलभतेनें होऊं शकेल. या कार्याकरितां नवीन ग्रंथनिर्मिति करावी लागेल. अशा ग्रंथांत प्रसूतिशास्त्र दाईकर्म, शिशुसंगोपन तसेंच बाळंतिणींच्या व ल्हान मुलांच्या रोगांचें निदान व चिकित्सा या गोष्टींचा समावेश करावा लागेल. पं. दामोदर स्वरूप व पं. रमानाथ यांनीं या दिशेनें केलेले प्रयत्न प्रशंसनीय आहेत. परंतु अशा प्रयत्नांत या कार्याचें आयुर्वेदीय स्वरूप कायम राहील, या बाबतींत अधिक दक्षता घेणें आवश्यक आहे.

साहित्यनिर्मिति कोणा करावी?

नवीन साहित्यनिर्मितीच्या (ग्रंथ व वाङ्मय) बाबतींत माझें स्पष्ट मत आहे कीं, हें कार्य विद्वान् अनुभवी व कुशल लेखकांचें द्वारांच झालें पाहिजे, कारण कीं, असें साहित्य निर्माण करतांना त्यांतील आयुर्वेदाचा प्रभाव व महत्त्व यांचें वर्चस्व आधिक्यानें कायम राहिलें पाहिजे. हें संपादनकार्य एखाद्या केवल आयुर्वेदप्रधान उद्योग करणाऱ्या संस्थेच्या देखरेखीखालीं व जिल्हा आयुर्वेदीय पाठ्यक्रमाचें बाबतींत आयुर्वेद महासंमेलनानें व आयुर्वेद विद्यापीठानें

दर्शन केलें असेल अशा संस्थेच्या मार्फत झाल्यास क वरें. अशा संस्थेला या बाबतींत अग्रेसरत्व त यावें. झांशी आयुर्वेद विश्वविद्यालयहि आपल्या र्वेदिक कॉलेजच्या व स्नातकोत्तर आयुर्वेदीय क्रमाच्या परिपूर्तीकरितां ह्या कामांत प्रवृत्त शकेल. या प्रयत्नामुळें ह्या संस्थेस आपलें ध्येय ण्यास मदतच होईल. शुद्ध आयुर्वेदीय ध्येय णारी व कार्य करणारी एक अगर अनेक संस्था र्यानें हें कार्य उत्तम रीतीनें संचालित करूं तील.

आयुर्वेदाचा विश्वव्यापक प्रताप

लक्षांत असूं द्या कीं, आयुर्वेदाला प्रमुख ट्रीय चिकित्साशास्त्र बनविण्याबरोबरच त्याचा व्यापक प्रभाव प्रस्थापित करणें व चिकित्सा–तांत स्वास्थ्य आणि चिकित्सा हीं दोन्ही अंगें युर्वेद-प्रणालीप्रणीत संचालित करणें हें उद्दिष्ट ील व त्या दृष्टीनें आपले प्रयत्न सतत चालू हातील.

———

वनस्पति प्रात्यक्षिक सहल

मंगळवार ता. ३०।८ रोजीं रात्रीं नगर आयुर्वेद हाविद्यालयांतील जी.एफ्.ए.एम्. अभ्यासक्रमांतील हीं विद्यार्थी उपप्रमुख श्री. रा. गो.जोग यांच्या ह नासिकमार्गे त्र्यंबकेश्वर येथें वनस्पति प्रात्यक्षि–साठीं गेले. त्यांच्या बरोबर नासिकच्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयांतील द्वितीय वर्षांचे विद्यार्थी, ध्यापक वैद्य वि. म. गोगटे व वैद्य श्या. धों. कुलकर्णी यांच्या सह गेले होते. रात्रीं तेथें मुक्काम रहून सकाळीं वृद्धवैद्य भाऊशास्त्री जाईल यांच्यासह र्वांनीं पुढील ओल्या ताज्या वनस्पति पाहिल्या.

" वनस्पतींची यादी "

१] अर्जुनसादडा, २] क्षुद्र गोखरू, ३] शाल्मली, ४] अडुळसा, ५] कचोरा; ६] कुर्डु, ७] बेहेडा, ८] पारोसा पिंपळ, ९] शतावरी, १०] भुईकोहळा, ११] कळलावी, १२] नागरमोथा, १३] शालिपर्णी, १४] पृश्नीपर्णी, १५] एरंड, १६] रास्ना, १७] बाहवा, १८] आपटा, १९] अपामार्ग, २०] उदुंबर, २१] काकमाची, २२] कांचनार, २३] कासविंद, २४] तालीमखाना, २५] सारिवा, २६] बला, असिबला, २७] चंपक, २८] टेंटु, २९] देवदार, ३०] धोतरा, ३१] धामार्गव, ३२] निर्गुंडी, ३३] पर्पट, ३४] ब्राह्मी, ३५] वट, ३६] वंश, ३७] विडंग, ३८] बांडगूळ, ३९] देवडांगरी, ४०] शेवगा, ४१] स्वर्णक्षीरी, ४२] हरीतकी, ४३] हंसपदी, ४४] भृंगराज, ४५] जलजम्नी, ४६] करमर्द, ४८] चक्रमर्द, ४९] रानसुरण, ५०] रिंगणी, ५१] डोरली, ५२] भारंगमूळ. येतांना त्यांनीं बऱ्याच वनस्पतींचे नमुने बरोबर आणले होते.

———

गोवा सत्याग्रह

चरीचे अन्‌रजिस्टर्ड वैद्य प्रभाकर गजानन कळवितात कीं "मी कायद्यामुळें धंदा बंद केला आहे. मी कॅंग्रेसमधून पण वैयक्तिक रीत्या गोवा सत्याग्रहांत भाग घेतला होता. माझ्याबरोबर चरीचे नामदेव पाटील होते. आम्ही हिरवे गुरुजींच्या तुकडींत होतो. तेरेखोल किल्ल्यावर गेलो होतो. गोळीबारानंतर आम्हांस पकडून ठोकून बाहेर काढून दिले. ता. १९ रोजीं आम्हीं परत चरीस आलो."

———

वैद्य ऑ. मॅजिस्ट्रेट झाले

कुलाबा जिल्ह्यांतील रोहे येथील वैद्य नरहर पुरुषोत्तम जोशी, आयुर्वेदतीर्थ (नगर) व पोलादपूर येथील वै. करमरकर आ. वि. विशारद यांची मुंबई-सरकारनें ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक केली आहे. — अभिनंदनीय

नगरपालिकेंत वैद्य

ग्वालेर येथील म्युनिसिपल कमिटींत वैद्य र. द. पापरीकर आयुर्वेदतीर्थ (नगर) हे सभासद निवडून आले आहेत. —अभिनंदनीय

दंतवैद्य जायदे यांची पत्रें-२

वॉशिंग्टन् ता. ४।९।५५

स. न. वि. वि.—

ऑगस्टच्या दि. १० रोजीं वॉशिंग्टन् येथें आलों व जॉर्ज टाऊन युनिव्हर्सिटींत कार्याला प्रारंभ केला.

दि. ११ ला नामदार श्री. मेहता (भारताचे अमेरिकेंतील वकील) यांना भेटलो. त्यांनीं मला मार्गदर्शन करण्याचें आश्वासन दिलें.

येथील अमेरिकन डेंटल ॲसोसिएशनच्या कार्यदर्शींना भेटलो. त्यांच्या मतें व भारतीय वकीलातीमधील कांहीं तज्ञांच्या मतें मी शिकॅगो व सानफ्रान्सिस्को येथें जावें. तेथील मध्यवर्ती व अखिल अमेरिकन डेन्टल ॲसोशिएशनच्या आगामी संमेलनांत भाग घेऊन तेथें प्रात्यक्षिक व व्याख्यानद्वारा प्रचार करावा.



अमेरिकेंत मध्यभागीं दंतवैद्य पां. वि. जायदे

सानफ्रान्सिस्को येथून सुमारें ३५०० मैल आहे. तेथें जाऊन येण्यास सुमारें ३०० डॉलर्स (भारतीय चलन १५०० रुपये) खर्च येईल. येथील राहणी फारच खर्चाची आहे. शिवाय उपरोक्त खर्च, तरीपण जाऊन यावें असें वाटूं लागलें आहे. कारण तेथें जाण्यानें शास्त्रीय दृष्ट्या भरीव कामगिरी होईल व तेथें मान्यता मिळाल्यास अखिल जागतिक मान्यता मिळूं शकेल. कसेंकाय जमतें पाहतो. कार्य सफल करण्यास श्रीभगवान् धन्वतरी समर्थ आहे. कळावें, जयहिंद

आपला कृपाकांक्षी

पां. वि. जायदे

पत्ताः—

Indian Embassy Chancery
Washington D. C.
U. S. A.

साहाय्यक पदवीधर वैद्य (रजिस्टर्ड)

पाहिजेत

आयुर्वेद सेवा संघाच्या शुद्ध आयुर्वेद महाविद्यालय, आयुर्वेद आरोग्यशाला (रुग्णालय) व आयुर्वेद औषधी भवन या विभागांत साहाय्यक वैद्याचें काम करूं इच्छिणारे ३ पदवीधर वैद्य नेमावयाचे आहेत. आयुर्वेदीय विषयांचा चांगला अभ्यास, चांगलें हस्ताक्षर, शुद्धलेखन व दक्षता या गोष्टी अपेक्षित आहेत. पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा—

मंत्री

आयुर्वेद सेवा संघ, नासिक

.... विधान-सभेतील प्रश्नोत्तरें ....

भारतांत परराष्ट्रीय रुग्णालयें

विधान-सभा मुंबई–अधिवेशन दुसरें १९५५
सभासदांनीं ना. आरोग्यमंत्री यांना विचारलेल्या
प्रश्नांचीं उत्तरें व माहितीः—

श्री. एल्. एम्. पटेल (नवसरी) यांनीं विचार-
प्रश्नांचीं उत्तरें:—

भारतांत परराष्ट्रांकडून चालविलेलीं एकूण ४६ यें (Hospitals) आहेत. त्यापैकीं २४ अमे- मिशनकडून चालविलेलीं व १९ ब्रिटिश कडून चालविलेलीं आहेत. ह्या हॉस्पिटल्स्पैकीं हॉस्पिटल्स्ना भारत सरकार आर्थिक मदत देते. ह्या मदतीची वार्षिक रक्कम साधारणपणें ६२९२७ रु. होते. त्याशिवाय कांहीं रुग्णालयांना अनावर्तक आर्थिक मदत देण्यांत येते. मदतीसंबंधीं खुलासेवार माहिती खालीं देण्यांत आली आहे.

परराष्ट्रीय रुग्णालयांचा खर्च त्यांच्या मिशन फंडांतून करण्यांत येतो. ह्या फंडांना त्यांच्या देशांतील धर्मादाय फंडांतून, चर्चकडून, सार्वजनिक संस्था व व्यक्तिगत देणग्या आणि रुग्णांकडून मिळणारी चिकित्सेची फी ह्या मार्गांनीं पैसा मिळतो.

हॉस्पिटलचें नांव	देणगीची रक्कम
१) एस्. पी. जी. मिशन हॉस्पिटल, कागल, जि. कोल्हापूर	औषधांच्या स्वरूपांत दरसाल २०६० रु. ची देणगी
२) सर विल्यम वॉन्लेस टी. बी. सॅनिटोरिअम, वॉन्लेसवाडी जि. द. सातारा,	सन १९५४–५५ सालांत ६००० रु. ची अनावर्तक देणगी
३) वॉन्लेस हॉस्पिटल, मिरज, जि. द. सातारा	रु. १५००० ची देणगी [बहुतेक दरसाल देण्यांत येते]
४) लुडिंगटन डिस्पेन्सरी, विटा, जि. द. सातारा	रु. ८८० ची देणगी [बहुतेक दरसाल देण्यांत येते]
५) ऑस्टिन डिस्पेन्सरी, अष्टा, जि. द. सातारा	रु. ८८० ची देणगी [बहुतेक दरसाल देण्यांत येते]
६) रिचर्डसन लेप्रसी हॉस्पिटल, मिरज	रु. १९६५० ची वार्षिक देणगी [दर रुग्णामागें रु. २० या प्रमाणांत]
७) सॅल्व्हेशन आर्मी एमरी हॉस्पिटल, आनंद, जि. खेडा.	दरसाल रु. २०००
८) एस्. पी. जी. मिशन डिस्पेन्सरी, अहमदनगर.	दरसाल रु. ७००
९) बेळगांव लेप्रसी हॉस्पिटल, हिंडलगा, जि. बेळगांव	दरसाल रु. ८१६०
१०) लेप्रसी हॉस्पिटल, पोलादपूर, जि. कुलाबा	रु. २१६९३-१२-७ [१९५३-५४ सालीं फक्त]
११) इव्हॅंजिलाइन बूथ हॉस्पिटल, अहमदनगर	रु. ३०२४ (१९५३-५४) सालीं
१२) नासिक लेप्रसी हॉस्पिटल	दरमहा मोठ्या माणसास १० रु. व मुलास ५ रु. याप्रमाणें १९५४ सालीं दिलेली देणगी रु. १३५९७

कुत्रा-विषहारक चिकित्सा

श्री. एस्. जी. वर्दी (वसई) यांनीं विचारलेल्या
ांचीं उत्तरें:—

मुंबई राज्यांतील सरकारी व निमसरकारी जीं रुग्णालयें व दवाखाने पिसाळलेल्या कुत्र्याच्या विष-चिकित्सेकरितां मान्य केंद्रें म्हणून ठरविलीं आहेत

तेथेंच फक्त पिसाळलेल्या कुत्र्याच्या विषावर चिकित्सा केली जाते. सर्व सरकारी व निमसरकारी दवाखान्यांतून अशी चिकित्सा केली जात नाहीं. मान्य चिकित्सा केंद्रांत १ महिना पुरेल अशा बेतानें लशीचा पुरवठा नेहमीं ठेवला जातो.

पिसाळलेल्या कुत्र्याची विषप्रतिबंधक लस वेळेवर मिळाली नाहीं म्हणून एकहि केस दगावल्याचा रिपोर्ट सरकारी हॉस्पिटलकडून आला नाहीं. त्याचप्रमाणें इतरहि मान्य केंद्रांकडून लशीचा पुरवठा वेळेवर नसल्यामुळें एकादी केस दगावल्याचा रिपोर्ट आलेला नाहीं.

राज्यांतील सर्व सरकारी व निमसरकारी रुग्णालयें व दवाखाने यांना या लशीचा पुरवठा करून कुत्र्याचें विष प्रातिबंधक चिकित्सा सुरूं करण्यास लस सुस्थितींत ठेवण्याकरितां शीत-पेटिकांची जरुरी असते. तशी सोय अद्याप सर्वत्र झालेली नाहीं. तथापि सर्व तालुक्यांच्या ठिकाणीं कुत्र्याचे विषाची चिकित्सा मिळण्याची सोय उपलब्ध व्हावी ह्या दृष्टीनें सरकार या प्रश्नाचा विचार करीत आहे. सध्यां मुंबई राज्यांत कुत्राविष प्रतिबंधक ६९ नागरी चिकित्साकेंद्रें, ७ लष्करी चिकित्साकेंद्रें व ९ रेल्वे चिकित्साकेंद्रें मिळून एकंदर ८५ चिकित्साकेंद्रें आहेत.

मानसविकृतीचे रोगी

श्री. एन. टी. देशमुख (उत्तर बार्शी) यानीं विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें:—

१९४९ ते १९५३ पर्यंत पांच वर्षांत मुंबई राज्यांतील मानसविकृति रुग्णालयांत खालीं दर्शविल्याप्रमाणें मानस-रुग्ण दाखल करून घेण्यांत आले. त्याचप्रमाणें वरील मुदतींत सालवार किती रुग्ण बरे झाले तेंहि पुढें आलें आहे.

रुग्णालयाचें नांव	१९४९		१९५०		१९५१		१९५२		१९५३	
	दाखल,	बरे झाले	दा.,	बरे झाले	दा.,	बरे झाले	दा.,	बरे झाले	दा.,	बरे झाले
दि एन्. एम्. मेंटल हॉस्पिटल, ठाणा	६५८	२०३	७४८	१५८	८४७	१७५	८९६	२१५	१०४७	१५५
दि मेंटल हॉस्पिटल, रत्नागिरी	६१	३६	७९	४०	९३	५०	१०४	२९	१०९	६१
दि सेंट्रल मेंटल हॉस्पिटल, येरवडा	९३०	१६१	९२७	१८१	१०३६	१७७	१०४५	१३६	१०१३	१८४
दि मेंटल हॉस्पिटल, धारवाड	११२	५५	१३५	६३	११९	५३	११२	५१	१०७	४२
दि मेंटल हॉस्पिटल, अहमदाबाद	३१८	४४	२५६	५७	२८१	१७३	३३६	११५	४३१	१२२
दि मेंटल हॉस्पिटल, बडोदा	आंकडे मिळाले नाहींत.		२७	११	२२	८	३६	९	५१	२६

वैद्यराज धामणकर यांची प्रकृति

आयुर्वेद सेवा संघाचे सेवानिवृत्त जीवसदस्य वैद्य पु. वि. धामणकर (संशोधन खाते धूतपापेश्वर, पनवेल) हे एक वर्षापासून मुंबईस युनिव्हर्सल हेल्थ इस्टिट्यटच्या आयुर्वेद विभागांत प्लॅस्टरमध्यें आहेत. ता. ८।९।५५ पासून त्यांनीं पट्टा घालून बसण्यास प्रारंभ केला आहे. एक आठवडा सकाळ-संध्याकाळ अर्धातास तक्क्याला टेकून बसावयाचे. दुसऱ्या आठवड्यांत एक-एक तास बसावयाचे, तिसऱ्या आठवड्यांत खुर्चीवर बसावयाचे व पाय खालीं सोडून जमिनीस टेकावयाचे व चौथ्या आठवड्यांत चालण्याचा प्रयत्न करावयाचा. या क्रमानें आक्टोबरच्या पहिल्या आठवड्यांत ते पनवेल येथें जातील असा अंदाज आहे. त्यांची प्रकृति चांगली आहे.

नांवाचा जीवनासी संबंध

वनस्पतींना निरनिराळी नांवें दिलेलीं असतात. त्या नांवाचा वनस्पतीच्या जीवनाशीं संबंध असतो. तो द्रव्य प्रात्यक्षिक देतांना उघड करून सांगतां आला तर अवश्य करावा अशी वै. पु. वि. धामणकर यांनीं अध्यापकांना सूचना केली आहे. त्यांनीं असा संबंध दर्शविणारें वाङ्मय (हस्तलिखित) तयार केलें आहे.

अन्‌रजिस्टर्ड वैद्यक व्यवसायी

विधान सभेंत श्री. के. एस्. चावडा यांनीं विचारलेल्या प्रश्नांचीं आरोग्यमंत्री यांनीं दिलेलीं उत्तरें व माहितीः—

मेहसाणा जिल्ह्यांत अन्‌रजिस्टर्ड वैद्यक व्यवसायी फार आहेत याची सरकारला कल्पना नाहीं व त्याकरितां सरकारनें प्रतिबंधक कायद्याची विशेषत्वानें तेथें अंमलबजावणी केलेली नाहीं. परन्तु सर्वधारणपणें असे अन्‌रजिस्टर्ड वैद्यक व्यवसायी सर्व जिल्ह्यांतून आहेत. व त्यांच्या ह्या बेकायदेशीर व्यवसायाला आळा घालण्याकरितां सरकारनें खालील उपाययोजना अमलांत आणल्या आहेत.

(अ) १९५३ सालीं अन्‌रजिस्टर्ड वैद्यक व्यवसायाच्या कमाल दंडाच्या रकमेंत वाढ करण्यांत आली.

(ब) १९५४ सालीं बॉम्बे मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट १९३८ या कायद्याचे सेक्शन ३२ मध्यें दुरुस्ती करून ‘ Practise any System of medicine ’ या शब्दयोजनेची निर्णायक व्याख्या करण्यांत आली.

(क) संबंधित अधिकाऱ्यांना जर अन्‌रजिस्टर्ड वैद्यांच्या जाहिराती [बोर्ड वगैरे] आढळण्यांत आल्या तर त्यांच्या विरुद्ध कायदेशीर उपाययोजना करण्यासंबंधीं सूचना देण्यांत आल्या आहेत.

(ड) जनतेकडूनहि सरकारला याबाबतींत सहकार्य मिळावें अशी सरकारनें विनंति केली आहे.

सरकारनें याबाबतींत प्रसिद्ध केलेलें एक जाहीर वृत्त खालीं दिलें आहे.

डायरेक्टर ऑफ् पब्लिसिटी, मुंबई-राज्य, मुंबई

अन्‌रजिस्टर्ड वैद्यकांविरुद्ध वैद्यक-व्यवहार प्रतिबंधक चालना

कायदेशीर उपाययोजना करणें व जनतेच्या सहकार्याची अपेक्षा.

जे अन्‌राजिस्टर्ड वैद्य स्वतःच्या वैद्यक व्यवसायाबाबत जाहिरात [बोर्ड वगैरे] प्रासिद्ध करतील व लोकांच्या अंधश्रद्धेचा फायदा घेऊन वैद्यक व्यवसाय करतील अशा वैद्यांविरुद्ध सरकारनें कडक उपाययोजना करण्याचें ठरविलें आहे. व त्यानुसार ज्या अन्‌रजिस्टर्ड वैद्यांच्या वैद्यकीसंबंधीं जाहिराती [बोर्ड वगैरे] सिव्हिल सर्जन अगर डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंड्न्स् ऑफ पोलीस यांच्या अवलोकनांत येतील तेव्हां त्यांनीं बॉम्बे मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्टाच्या सेक्शन ३२ प्रमाणें अन्‌रजिस्टर्ड वैद्यांविरुद्ध कायदेशीर उपाययोजना कराव्यात अशा त्यांना सूचना देण्यांत आल्या आहेत. त्याचप्रमाणें सरकारनें जनतेलाहि अशी सूचना दिली आहे कीं, जर त्यांच्या अवलोकनांत वरील प्रकारच्या जाहिराती आल्या तर त्यांनीं अशा जाहिरातींची खबर सिव्हिल सर्जन्स व डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट्स ऑफ् पोलीस यांना द्यावी.

बॉम्बे मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्टाच्या दुरुस्त केलेल्या सेक्शन ३२ प्रमाणें कोणीहि व्यक्ति सरकारी रजिस्टरांत रजिस्टर्ड झाल्याशिवाय अगर एन्‌लिस्ट झाल्याशिवाय, अगर कोणीहि व्यक्ति बॉम्बे मेडिकल ॲक्ट १९१२ प्रमाणें अगर बॉम्बे होमिओपॅथिक ॲक्ट १९५१ प्रमाणें रजिस्टर्ड झाल्याशिवाय वैद्यक व्यवसाय करूं शकणार नाहीं.

धंदा करतो हें कसें समजावें ?

एकादी व्यक्ति कोणत्याहि पद्धतीचा वैद्यक व्यवसाय करीत आहे असें केव्हां गृहित धरावें अगर मानावें ? जर ती व्यक्ति स्वतःस तशी विशिष्ट चिकित्सापद्धति येते असें मानीत असेल, अगर जी व्यक्ति जाहिरात द्वारें, निदर्शना द्वारें, माहिती अगर सल्लाद्वारें कोणत्याहि साधनांचा अगर पद्धतीचा उपयोग करून निदान, चिकित्सा, शस्त्रकर्म, औषधियोजना अगर अन्य इलाज करीत असेल अगर मनुष्याच्या कोणत्याहि रोगास, दुखापतीस, दुःखास, अपंगतेस अगर शारीरिक अवस्थेस औषधियोजना करीत असेल तर ती व्यक्ति वैद्यक व्यवसाय करते असें मानलें जाईल.

वैद्यकीय कायद्याच्या दुरुस्तीचा परिणाम असा झाला आहे कीं, कोणीहि व्यक्ति वैद्यकीय व्यवसायासंबंधीं जाहिरात देईल तर त्यावर कायदेशीर इलाज होऊं शकेल.

सौम्य वनस्पतींचें
रोज निष्ठापूर्वक सेवन करावें

भिषग्भारती या गुजराथी मासिकांत आयुर्वेद पत्रिकेंतील एका लघुलेखाचें भाषांतर प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. (एक उत्साहवर्धन प्रयोग ता. १६ ऑगस्ट १९५५) त्या लेखावर संपादकीय अभिप्राय व्यक्त करतांना वैद्य बापालाल लिहितात—

चरकांतील सद्वृत्त (सद्वर्तन) विषयक अतिशय बोधक अध्यायांत एक अत्यंत सारगर्भित सूत्र दिलें आहे. “ओषधीः प्रशस्ताः धारयेत्।” अर्थात् प्रत्येक मनुष्यानें स्वतःला योग्य होईल अशी कोणती तरी वनस्पति रोज सेवन करण्याची व्यवस्था केली पाहिजे. श्वास,खोकला होणाऱ्या रोग्यानें रोज अगस्तिहरीतकी अवलेह (अगस्तिप्राश) सेवन करावा. रक्तक्षयवाल्या (पांडु) रोग्यानें रोज लोहाचें एखादें औषध धात्रीलोह, नवायसलोह अथवा वाग्भटानें पांडुरोग चिकित्सेंत सांगितलेला धात्रीलोह घ्यावा. वाजीकरण प्रयोग म्हणून रोज विदारीकंद किंवा रसायन चूर्णाचें सेवन करावें व मानसिक काम करणाऱ्या लोकांनीं वरील (पत्रिकेंतील लेखांतील) उत्साहवर्धन प्रयोग रोज सेवन करावा किंवा पुढील मेध्यरसायनाचा उपयोग करावा.

[ब्राह्मीचा स्वरस रोज घ्यावा. रोज ज्येष्ठमध चूर्ण दुधाबरोबर घ्यावें अथवा गुळवेलीचा रस घ्यावा. अथवा मुळें व फुलें यासह शंखपुष्पीची चटणी बनवून रोज खावी. हें मेध्यरसायन चरकानें सांगितलें आहे. (चि. स्था. अ. १ पा. ३)]

आयुर्वेदांतील अशा सौम्य औषधी वनस्पतींचें ोज निष्ठापूर्वक सेवन केल्यानें जरूर उत्तम लाभ होईल.

संस्कृत जीवनपध्दति

[व्यवहारांत नेहमीं औषध घेणें हें अयोग्य ानलें जातें ती समजूत वैद्यांनीं जनतेच्या मनांतून ाढून टाकली पाहिजे. उपयुक्त औषधी सेवन करणें ंत कमीपणा नसून तें एक संस्कृत जीवन आहे हा धडा जनतेला शिकविला पाहिजे. आयुर्वेद सेवा संघानें हा धडा जनतेला शिकविण्यांत पुढाकार घेतला आहे.

— वै. बिंदुमाधव पंडित]

वैद्याला अभिनयाची आवश्यकता

अमरावती येथें दिनांक ४-९-१९५५ रोजीं झालेल्या नाट्यस्पर्धेत “कीचक वधाचा” शेवटचा प्रवेश विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय संस्थेनें अत्यंत रसपरिपूर्ण व उत्तम अभिनय करून विदर्भ नाट्य मंदिराच्या रंगभूमीवर सादर केला. त्यांत ‘कीचक वध’ या प्रवेशाला पहिला क्रमांक मिळून विदर्भ नाट्य मंदिरानें ठेवलेला रौप्य करंडक विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयानें मिळविला.

या अपूर्व यशाबद्दल कीचक वधांतील नटसंचाचा व दिग्दर्शकांचा सत्कार समारंभ करण्यांत आला. आपल्या उपदेशपर भाषणांत श्री. बामणगांवकर संपादक ‘उदय’, यांनीं वैद्याला अभिनयाची फार आवश्यकता आहे असें सांगितलें व असेंच यश विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाला आयुर्वेद क्षेत्रांत मिळावें अशी इच्छा प्रगट केली.

---

१५ ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन

नासिक येथील शुद्ध आयुर्वेद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीं १५ ऑगस्ट १९५५ च्या स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम विद्यालयांत ध्वजवंदन करून साजरा केला. याप्रसंगीं गोवा विमोचन साहाय्यकनिधीसाठीं ३५ रु. जमवून ते कार्यालयाकडे पाठविण्यांत आले.

पांढरा पळस

पांढऱ्या फुलांचा पळस हें झाड आयुर्वेदांत औषधोपयोगी गणलेलें आहे असें आढळतें. तरी पांढऱ्या पळसाचीं झाडें कोणत्या भागांत आहेत याची माहिती कोणास असल्यास त्यांनीं आयुर्वेद पत्रिकेकडे आपला पत्ता कळवून माहिती पाठवावी म्हणजे गरजूंना त्याचा लाभ घेतां येईल. —ए. व्ही. जकल

आयुर्वेद युनानी बोर्डांचे कर्नाटक विभागांतील सदस्य
अमरप्पा वीरप्पा गदग यांचा अल्प परिचय

श्री. ए. व्ही. गदग यांचा जन्म मौजे मंडल· ता. यलबुर्गी जिल्हा रायचूर येथें सन १९११ झाला. प्राथमिक शिक्षण याच गांवीं झालें.

आयुर्वेदभिषक **वै. अ. वी. गदग**, बेळगांव

येथें त्यांचें पुढील शिक्षण झालें. एस.एल.सी. अभ्यास करीत असतां १९३० सालीं काँग्रेसची सत्याग्रहाची चळवळ सुरूं होतांच त्यामध्यें भाग घेतला. त्यावेळीं त्यांना तीन वेळां शिक्षा लागली. १९३३ सालीं हरिजन शाळेमध्यें शिक्षक म्हणून कार्य केलें. पुढें १९३४ मध्यें येथील ‘ कर्नाटक आयुर्वेद -विद्यापीठा’मध्यें र्वेदाचें शिक्षण घेऊन “ भिषग्वर ” ही पदवी विली. याच संस्थेमध्यें शिक्षक म्हणून काम कांहीं वर्षें याच संस्थेचे प्रिन्सिपॉल म्हणूनहि केलें. कर्नाटक आयुर्वेद विद्यापीठास सरकारी मिळाली त्यावेळीं टिळक महाराष्ट्र विद्या-च्या परीक्षक मंडळाचे सदस्य म्हणूनहि काम केलें . निखिल भारतायुर्वेद विद्यापीठानें मान्य केलेल्या मध्यें हे असून बेळगांव केंद्राचे केंद्राध्यक्ष म्हणून वर्षें काम करीत होते. निखिल कर्नाटक आयुर्वेद मंडळाचे प्रधानकार्यदर्शी (मंत्री) म्हणून ३ वर्षें काम केलें आहे.

बेळगांव शहर काँग्रेस कमिटीचें हे सध्यां सभासद आहेत. बेळगांव येथें कर्नाटक आयुर्वेद विद्यापीठ सोसायटीतर्फे शुद्ध आयुर्वेद विद्यालय चालूं आहे त्याचे हे संचालक आहेत.

अनुक्रमणिका

औषधीकरणांतील शास्त्रीय प्रामाणिकता १६३
म. प्रां. वैद्यमंडळ प्रचार १६४
वै. ल. ठा. शाह [अकोला] यांचें प्रचारकार्य १६५
महाडुंग १६७
महारोगासंबंधींचा एक उपेक्षित दृष्टिकोन १६९
महाचंद्रकला रस १७३
धातुस्पृष्ट जलौषधि १७७
दवे कमिटी, जामनगर १७९
मध्यप्रदेश अग्रगामी वैद्य मंडळ १८१
नाशिकची सिंहस्थ यात्रा १८३
आयुर्वेदीय पाठ्यक्रमाचें संशोधन १८५
वनस्पति प्रात्यक्षिक सहल १८९
दंतवैद्य जायदे यांचीं पत्रें–२ १९०
विधान सभेंतील प्रश्नोत्तरें १९१
अनूरजिस्टर्ड वैद्यक व्यवसायी १९३
सौम्य वनस्पतींचें रोज निष्ठापूर्वक सेवन १९४
वैद्याला अभिनयाची आवश्यकता १९४

“ छोटे धंदे ”

अर्थात् अल्प भांडवली ग्रामोद्योग, सेंटेड सुपारी, पानविड्याचे मसाले, जर्दे, दंतमंजनें, साबण या नित्योपयोगी मालाचें उत्पादन करून शेंकडो रुपये मिळवा. माहितीपत्रकास फक्त ८ आणे पाठवा.

एम्. देशपांडे C/o सोमण लॉज, पुणें ४

एक इंग्रजी सुभाषित

— One onion a day, keeps the doctor away —

(रोज १ कांदा खा व डॉक्टरला रजा द्या) असें इंग्रजी सुभाषित आहे. उष्ण प्रकृतीच्या लोकांना कांदा अमृताप्रमाणें आहे. (कफ व वात प्रकृतीच्या लोकांना कांदा सोसत नाहीं. त्यांनीं लसूण वापरावा.) आपली कांदा वापरण्याची लौकिक पद्धति भाजी करून, भाजून अगर कच्चा खाण्याची आहे. आयुर्वेदानें शक्तीसाठीं त्याचा दूध, तूप, साखरेसहित पाक बनविण्याची व्यवस्था केली आहे. आयुर्वेद सेवा संघाचा

गुरुकुल पत्रिका

कंदर्प–वृष्य–पाक

शक्तिवर्धक म्हणून प्रसिद्ध आहे. सेवेत कामतः कामं तृप्तो वाजीकृतां हिमे। असें शास्त्रवचन आहे. येत्या हिवाळ्यांत शक्तीसाठीं हा पाक अवश्य सेवन करा.

किं. २० तोळे ३ रु. – ट. ख. निराळा

आयुर्वेद औषधी-भवन, नासिक

नवीन हृद्य व वातशामक औषध

चिकित्सक वैद्य–डॉक्टरांना हृद्य औषधाची गरज नेहेमींच लागते. शारीरिक व मानसिक बलदायक भस्में असलेलें

बृहत्--वात--चिंतामणी

हें औषध रोग्यास दिल्यास रोग्याची नाडी त्वरित सुधारते. या औषधांत सुवर्ण-रौप्य, अभ्रक, मुक्ता, लोह हीं भस्में काकोली, अंबर व पूर्णचंद्रोदय हीं उंचीं द्रव्यें आहेत. आयुर्वेद सेवा संघानें हें औषध तयार करून त्याचा अनुभव घेतला आहे. -।- तोळा किं. ९ रु.

आयुर्वेद औषधीभवन, नासिक.

संपादक व प्रकाशक— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विवलकर कारंजा, नासिक
मुद्रक — श्री. [illegible], [illegible], नासिक.

गुरुकुल कांगड़ी

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे
(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

र्ष ९ वें) नासिक, ता. १ ऑक्टोबर १९५५ (अंक ७ वा

५ वर्षांचा आयुर्वेदप्रधान अभ्यासक्रम

असें समजतें कीं मध्यप्रदेश (नागपूर) सरकारनें आयुर्वेदाचा ५ वर्षांचा अभ्यासक्रम न्य केला आहे व येत्या २ ऑक्टोबरपासून रायपूर येथें हा अभ्यासक्रम मध्यप्रदेशाचे ुख्यमंत्री ना. रविशंकरजी शुक्ल यांच्या हस्तें सुरू होणार आहे. या अभ्यासक्रमाचे दोन ाग आहेत. पहिला भाग ३॥ वर्षांचा आहे. या कालांत ुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण दिलें जाईल व दुसरा भाग १॥ वर्षांचा आहे. या कालांत आधुनिक शोधासहित आयुर्वेदाचें उच्च शिक्षण देण्यांत येणार आहे.



चालू शिक्षणपद्धतीचे अनिष्ट परिणाम

मध्यप्रदेश सरकारच्या या निर्णयाचें वैद्यजनता संतोषपूर्वक स्वागत करीत आहे. आयुर्वेद व अॅलोपॅथी या दोन वैद्यकांचें शिक्षण एकाच वेळीं देण्याची पद्धति आज-चा अनेक ठिकाणीं चालू आहे व तिचे अनिष्ट परिणाम दिसून आले आहेत. आधीं आयुर्वेदाचें पूर्ण शिक्षण देण्यानें असे दुष्परिणाम होणार नाहींत अशी आशा आहे.

मध्यप्रदेशांतील अन्य आयुर्वेद महाविद्यालयें हाच अभ्यासक्रम चालू करणार आहेत. भारतांतील अन्य प्रांतांतूनहि याच अभ्यासक्रमाचें अनुकरण केलें जाईल अशी शक्यता आहे. वैद्यरत्न पं. शिवशर्माजी यांनीं त्रिवेंद्रम् येथील अध्यक्षीय भाषणांत या अभ्यासक्रमास पाठिंबा दिला आहे. ज्यांना ५ वर्षांचा अभ्यासकाल अधिक वाटत असेल त्यांना ३॥ वर्षानंतर ६ महिनेपर्यंत फक्त नवीन वैद्यकांतील शल्य–प्रसूति–सूचिवेध आदि संबंधीं व्यावहारिक ज्ञान घेतां येईल व ज्यांना आयुर्वेदाचें उच्चतर ज्ञान घ्यावयाचें असेल त्यांना १॥ वर्ष खर्च करून तें संपादन करतां येईल.

मुंबई सरकारची

शुद्धायुर्वेद पाठ्यक्रम समिति, मुंबई

बुधवार ता. १२ ऑक्टोबर १९५५ रोजीं सुरूं होणाऱ्या लेखी परीक्षेचा निकाल

परीक्षा-केंद्रें

१ शुद्ध आयुर्वेद विद्यालय, शीव, मुंबई २२ [मराठी माध्यम]
२ ओ.एच. नाझर आयुर्वेदिक कॉलेज, स्टेशनरोड, सुरत. [गुजराथी माध्यम]
३ राणी पार्वतीदेवी कॉलेज, बेळगांव. [कर्नाटकी माध्यम]

आयुर्वेदप्रवीण-प्रथम परीक्षा

विषय	वेळ	विषय	वेळ
	बुधवार ता. १२ ऑक्टोबर १९५५		
शारीर	सकाळीं ११ ते ५	दोषधातुमलविज्ञान	दुपारीं ३ ते ६
	गुरुवार ता. १३।१०।१९५५		
वनस्पतिपारिचय आणि द्रव्यगुण	११ ते २	रसशास्त्र	३ ते ६
	शुक्रवार ता. १४।१०।१९५५		
स्वस्थवृत्त, रोगानुत्पादन आणि जनपदोध्वंसप्रतिकार	११ ते २	संस्कृत	३ ते ६
	शनिवार ता. १५।१०।१९५५		
अष्टांग हृदय [१]	सकाळीं ११ ते २		

ना. ह. जोशी
सेक्रेटरी, शुद्धायुर्वेद पाठ्यक्रम समिति,
मुंबई-राज्य, मुंबई

ओरिसांत महापूर व वैद्यांचें कर्तव्य

चालूं वर्षी ओरिसांत प्रथम अवर्षण व नंतर ३ दिवस महापूर यांनीं १५ ते २० लाख लोक गृहहीन झाले आहेत. पुराचा परिणाम म्हणून साथीचे होण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे व त्यांतून बचावण्यासाठीं आर्थिक सहाय्य व औषधी मदत यांची आवश्यकता उत्पन्न झाली आहे. ओरिसा प्रांतीय वैद्य मंडळाचे मंत्री वैद्य बी. दास यांनीं पत्रक काढून सर्व वैद्य व औषधी कारखाने याजकडे ताप, आमांश अतिसार, कालेरा, न्युमोनिया, कफ व थंडी इ. रोगावरील औषधें व द्रव्य यांच्या मदतीची याचना केली आहे.

मदत पाठविण्याचा पत्ता:- कविराज श्री. लक्ष्मीनारायण आचार्य, आयुर्वेदिक मेडिकल रिलीफ कमिटी, नयासरक, कटक २ (ओरिसा प्रदेश)

४१ वें नि. भा. आयुर्वेद महासंमेलन

निखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाचें (कॉंग्रेसचे) ४१ वें अधिवेशन चालूं वर्षी डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत आंध्रची राजधानी कुर्नूल येथें भरावयाचें आहे.

आंध्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. अलुरी सत्यनारायण राजगुरु यांनीं स्वागताध्यक्षपद स्वीकारण्याचें मान्य केलें आहे.

आंध्र प्रांतीय वैद्य मंडळाच्या अध्यक्षपदीं श्री. वैद्यराज वस्ताद वैंकटस्वामी नायडू गुरु यांची पुनः निवड झाली आहे.

मद्रासचे डॉ. ए. लक्ष्मीपती यांनीं एक पत्रक काढून ४१ वें अधिवेशन यशस्वी करण्यासाठीं आयुर्वेदाभ्यासी, आयुर्वेदरक्षक व आयुर्वेदप्रेमी यांनीं [illegible] नांव [illegible]वें अशी विनंति केली आहे.

आयुर्वेदांतील अमोल पारदौषधींचें संशोधन

नागपूर विद्यापीठांतील कार्यांचें समालोचन

[लेखकः—आयुर्वेदाचार्य श्री. **वेणीमाधवशास्त्री जोशी**, नागपूर]

मुंबईच्या इंडियन फार्मासिस्ट असोसिएशननें नागपूर विश्वविद्यालयाला दरमहा ९०० रुपये प्रमाणें १ वर्षें देणगी देण्याचें आश्वासन दिलें आणि या रकमेंतून पारद व लोह या दोन विषयांवर संशोधन व्हावें अशी इच्छा व्यक्त केली. विश्वविद्यालयानें ती देणगी स्वीकारून हे दोन विषय संशोधनाकरितां निश्चित केले आहेत; शिवाय मध्यप्रदेश सरकारनें तृणज्योति हाहि एक विषय संशोधनार्थ दिला आहे.

जगांतील सर्व वनस्पति, प्राणी व खनिज द्रव्यें औषध म्हणून उपयुक्त होऊं शकतात. जगांत असें द्रव्य नाहीं कीं, ज्याचा औषध म्हणून उपयोग होऊं शकत नाहीं, असा आयुर्वेदाचा सिद्धांत आहे. “जगत्येवमनौषधम् न किंचिद्विद्यते द्रव्यम्।” प्राचीन कालांत खनिज द्रव्यांच्या मानानें प्राणिज व वनस्पति द्रव्यांचा औषध म्हणून उपयोग फार केला होत असे, पण नाथसांप्रदायिकांनीं खनिज द्रव्यांचा उपयोग करण्याचें ठरवून त्यांतल्या त्यांत पारदावर फार भर दिला. त्याचा औषध म्हणून उपयोग व्हावा, शरीरावर त्याचे अनिष्ट परिणाम मुळींच होऊं नयेत, यासाठीं त्यांनीं अमर्यादित परिश्रम केले. जणूं काय पारदानें त्यांना वेड लावलें होतें असें दिसतें. शरीरांतील रोग नाहींसा करून, तें निरोगी व दीर्घायुषी राहावें म्हणून पारदाचा उपयोग करून घेण्याचा जसा त्यांना ध्यास लागला होता, तसा किमया करण्याचा नादहि त्यांना अतोनात लागला होता. भगीरथ प्रयत्नांनीं त्या दोन्ही बाबतींत त्यांनीं सिद्धि मिळविली होती, असें त्यांच्या ग्रंथांवरून दिसतें. त्यांनीं सांगितलेल्या संपूर्ण प्रक्रिया न करतां, केलेल्या सिद्ध औषधी, मात्रा, भस्में यांचे जे उपयोग आजचा वैद्यवर्ग करतो, आणि असाध्य ठरलेल्या रोगांनीं जर्जर झालेल्या कांहीं रोग्यांना आरोग्य मिळवून देतो, त्यावरूनहि त्यांना मिळालेल्या सिद्धीची कल्पना आपणांस येऊं शकते. म्हणून संशोधनासाठीं पारद हा विषय प्रथम हातांत घेतला आहे.

उत्कृष्ट संशोधित द्रव्यें

प्राचीन काळीं प्राणिज औषधि द्रव्यांत गाईचें तूप, नन्तरच्या कालांत वनस्पतिकल्पांत आसवकल्पना, आणि त्याहि नन्तरच्या कालांत खनिजद्रव्यांत पारद, हीं द्रव्यें उत्कृष्ट औषधी म्हणून उपयोगांत आणून सिद्ध केलीं. सर्व विकारांवर, त्या त्या विकारावर उपयुक्त होणाऱ्या औषधींच्या संयोगानें सिद्ध केलेलें तूप, आसवें आणि पारद हीं उपयुक्त ठरलीं आहेत. यांत औषधींचें प्रमाण कमी पुरतें, तीं दीर्घकाल टिकतात, जीर्ण अवस्थांवरहि उपयुक्त ठरतात. तूप कफबहुल अवस्थेंत आणि आसव पित्त-

आयुर्वेदाचार्य **वेणीमाधवशास्त्री जोशी**

बहुल अवस्थेंत देतांना विचार करावा लागतो, पुष्कळदां तीं टाळावीं लागतात. पण पारदाबद्दल अशी स्थिति नाहीं. पारद हा कोणत्याहि रोगाच्या, कोणत्याहि दोषाच्या आणि कोणत्याहि अवस्थेंत देतां येतो. पारदघटित सिद्ध औषधियोग आयुर्वेदीय वाङ्मयांत हजारों आहेत. असा रोग नाहीं कीं, त्यावर पारदघटित औषध नाहीं. एक पारद सिद्ध झाला कीं, वैद्यकीय सिद्धि प्राप्त झालीच असें अभ्यासकांना वाटतें. नाथसांप्रदायिकांनीं महान् प्रयत्नांनीं पारदावर केलेल्या प्रक्रिया साध्य झाल्या तर खरोखरच रोगांची असाध्यता ही मानवाच्या पुष्कळच आटोक्यांत येईल असें अभ्यासकांना वाटतें.

पायाशुध्द संशोधनाचा उपक्रम

पाऱ्यावरील ग्रंथोक्त प्रक्रिया करण्याच्या परम्परा राहिल्या नाहींत. वैद्यांना व आयुर्वेदीय औषधिकारखानदारांना पारदप्रक्रिया व्यवहारांत पुनः प्रचलित व्हाव्यात, असें वाटत होतें. इंडियन फॉर्मसिस्ट असोसिएशननें नागपूर विश्वविद्यालयाला सहकार्य देऊन, पारा हा विषय संशोधनाकरितां निश्चित करून, आयुर्वेदीय संशोधनक्षेत्रांत एका शाखेचा अत्यंत महत्त्वाचा पायाभूत उपक्रम सुरूं केला आहे.

अडचणींचें दिग्दर्शन

ग्रंथ सूत्रबद्ध आहेत, पाठभेदहि आढळतात व अपुरेपणाहि दिसतो. द्रव्याचा उल्लेख ज्या शब्दांनीं केलेला असतो, त्या शब्दांनीं अनेक द्रव्यें डोळ्यांपुढें येतात. एका नांवाच्या अनेक वनस्पति असतात. तेव्हां उल्लेखिलेल्या शब्दानें कोणतें द्रव्य किंवा वनस्पति घ्यावयाची याबद्दल पुष्कळ वेळां निर्णय करतां येत नाहीं. परम्परा तुटल्या आहेत आणि ज्या आहेत त्यांत मतभेद आहेत. या प्रक्रिया जाणणारे कोणी आढळत नाहींत. जे 'जाणतो' असें म्हणतात त्यांना कांहीं माहित नसतें. जे जाणत असतील ते प्रकट करूं इच्छित नाहींत. असे लोक अत्यल्पच असतील. यामुळें संशोधनाच्या कार्यांत अशा अनेक अडचणी आहेत. पण विषय अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें त्यावर परिश्रम केलेच पाहिजेत. अडचणींचा परिहार होत जाईल.

आधुनिक शास्त्राची मदत

आयुर्वेदीय शास्त्रकारांचे प्रयोग सिद्धच आहेत, त्याकारितां आधुनिक शास्त्रांच्या मदतीची जरूरी आहे असें नाहीं. या युगांतील प्रत्येक सुशिक्षिताला प्राथमिक शिक्षणापासून आधुनिक शास्त्रांची ओळख करून दिलेली असते. आधुनिक शास्त्रानें केलेल्या सुधारणांनीं भोंवतालची परिस्थिति व्यापली आहे. तिच्यांत रात्रंदिवस वावरतांना त्या शास्त्रांचा, त्यांच्या पारिभाषिक शब्दांचा परिचय होत असतो. कोणत्याहि विषयाचें ग्रहणहि त्या परिभाषेनें होत असतें. आयुर्वेदीय औषधींचा उपयोग करून घेणारे व उपयोग करणारे नव्यशास्त्रपरिचित व त्यांचा कस ठरविणारे नव्यशास्त्रपारंगत असल्यामुळें त्यांची जिज्ञासापूर्ति करण्याकरितां व सत्यता पटण्याकरितां नव्यशास्त्र-

भारत वनस्पति फार्मसी
पो. मंचर (जि. पुणें)
यांचेकडील आयुर्वेदीय वनस्पतीपासून शास्त्रोक्त पद्धतीनें तयार केलेलीं संधिवात, पक्षवात वगैरे सर्व वातावर चोळण्याकरतां उपयोगी
काळीटाहाकळ तेल मालकांगोणी तेल
नारायण तेल निर्गुंड्यादि तेल
वातावर मिश्रणतेल, महावातविध्वंसकतेल
याशिवाय दुसरी वातावरील तेलें विकत मिळतील. "झनाना" औषधी तेल.
डोकेंदुखी, अर्धशिशी, विंचूदंश, नारूवर बाहेरून लावण्यासाठीं उपयोगी. याशिवाय ताज्या वनस्पति मिळण्याचें ठिकाण—
श्री. भिमाजी सखाराम राजगुरव
पो. मंचर (जि. पुणें)

न आपल्या पारदप्रक्रियांचा अर्थ पहाणें आहे. आयुर्वेदीयांना आपल्या शास्त्रीय तांचा अर्थ व त्यांचें मूल्यमापन अधिक सूक्ष्म श्चित स्वरूपाचें होऊन तीं बोधक होतील.

कांहीं उदाहरणें

अशुद्ध पारा व कांहीं वनस्पति घेऊन तिचा खरला लगदा करून त्यांत तो ठेवून कांजीमध्यें वावा लागतो. याला स्वेदन संस्कार म्हणतात. स्वेदनानें पाऱ्यांतले मळ शिथिल होतात. ‘ पाचनं नाख्यं स्यान्मलशैथिल्यकारकम् ’ याचा मला अर्थ असा वाटतो कीं, पाऱ्याच्या अणूशीं क्युल. व पाऱ्यांत असलेल्या मलरूप द्रव्याच्या शिसें) अणूचा संयोग स्वेदनापूर्वी जितका होता, त्यापेक्षां स्वेदनानंतर कमी दृढ झाला. न अणूंमध्यें स्वेदनापूर्वी जितका अवकाश त्यापेक्षां स्वेदनानंतर अधिक निर्माण झाला, एक्स-रे डिफ्रॅक्शननें पहातां येणें शक्य आहे. या तज्ज्ञ सुचवितील त्या साधनांनीं हें पाहून अर्थ बरोबर आहे कीं नाहीं हें कळेल आणि कांहीं अर्थ आहे काय हेंहि समजण्यास सोपें

नियमन संस्कारानंतर पारा स्थिर होतो

नियमन या नांवाचा संस्कार केल्यावर पारा होतो, त्याचें चंचलत्व कमी होतें. ‘सूतो (पारा) स्थिरतां व्रजेत् ’। ‘ चपलत्वनिवृत्तये । पारदे स्वेदः प्रोक्तं नियमनं हि तत् ’। चंच- खूप कमी झालें तर तें डोळयांना समजेल; थोडें झालें तर समजणार नाहीं. मतभेद आढळतील. व्हिस्कॉमिटरनें नियमनसंस्कारापूर्वी व नंतरच्या तील फरक स्पष्टपणें मोजून आपणाला मिळेल.

शुद्धाशुद्धतेचें अंतरमापन

शुद्ध पारा तेजस्वी होतो. अशुद्ध व शुद्ध पाऱ्याचे स्वीपणांतील अंतर ‘ रिफ्लेक्टॉमिटर ’ नें मोजतां उदाहरणाकरितां मी वरील तीन प्रकार ठेवले. शेकडों गोष्टी आहेत कीं, आधुनिक शास्त्रांच्या अनेक शाखांतील ज्ञानाचा, साधनांचा व द्रव्यांचा-सुद्धां उपयोग करून घेतां येईल. तिर्यक्पातन संस्कारांत अभ्रकाचा उपयोग करावा लागतो. अभ्रकाचें अणु ह्या प्रक्रियेंत फुटून त्यांच्यांतील पोटॅश व मँगनीज हे घटक पाऱ्यांत मिसळतात व ते पाऱ्याबरोबर अभ्रकाच्या इतर घटकांपासून पृथक् होतात. हे अर्थात् रसायनशास्त्राच्या मदतीनें कळूं शकलें. पाऱ्यांतील शिसें काढण्यास निर्गुंडी, लसूण इ० द्रव्यांचा उपयोग होतो असें दिसून आलें आहे. कांहीं बाबतींत बायोकेमिस्ट्रीची मदत घ्यावी लागेल.

पाऱ्यांतील वन्हिदोष

पाऱ्यांत वन्हिदोष असतो असें शास्त्रकारांचें म्हणणें आहे. तो कसा काढावयाचा हेंहि त्यांनीं सांगितलें आहे. इतर दोष काढून फक्त वन्हिदोष असलेला पारा आणि वन्हिदोषांसह सर्व दोष काढलेला पारा याचा उपयोग प्राण्यावर करून होणारे परिणाम पाहून शास्त्रकारांच्या म्हणण्याचा पडताळा पहातां येईल. सारांश आधुनिक अनेक शास्त्रांची मदत या संशोधनकार्याला घ्यावी लागणार आहे.

चालू असलेलें कार्य

रुग्णालयांत उपयोगांत आणण्याला हाताशीं असावा म्हणून ई मर्कचा डबल डिस्टिल्ड व हिंगुलोत्थपारदावर अष्टसंस्कार प्रथम केले. हिंगुलोत्थपाऱ्यावर अनुवासन संस्कार चालू आहे. तप्तखल्वांत लसूण व निर्गुंडीचे रसांत पारदशुद्धि केली. कच्छपयंत्रानें अंतर्धूम गंधकजारणा चालू आहे. त्यांतहि थोड्या निराळ्या कल्पनांनीं प्रकार करून जारण चालू आहे. लोहकुपींत अंतर्धूम गंधकजारणानें हिंगुलाचा दशगुण गंधकजारित रससिंदूरहि तयार होत आला आहे. अनुवासन संस्कारानन्तर सुवर्णादि जारणाकरितां शंखबिडाची पूर्व तयारी झाली आहे. रुईच्या चिकाच्या १०० भावना झाल्या, फक्त ३ गज-पुटें द्यावयाचीं आहेत. नील-ज्योतींत मूर्छित पारद, स्वेदित पारदहि परीक्षणाकरितां तयार आहे. या कार्याला एक वैद्य मदतीला आहे.

आधुनिक शास्त्रदृष्ट्या चालू कार्य

इनूऑर्‌गॅनिक केमिस्ट्रीचे एम्. एस्‌सी. उत्तीर्ण झालेले एक फेलो रासायनिक परीक्षणाचें कार्य करतात. येथल्या लॅबोरेटरींत पारदाचें विशिष्टघनत्व आणि शेंकडा प्रमाण या दृष्टीनें परीक्षण करून पारद शुद्ध आहे कीं नाहीं हें पाहिलें जातें. अधिक सूक्ष्म परीक्षणाचीं साधनें येथें नाहींत. मायक्रोॲनॅलिसिसनेंच पारदांतील सूक्ष्म फरक कळू शकतात. तें परीक्षण कोठें करून मिळेल त्याबद्दल तपास चालू आहे.

संशोधनशालांच्या कार्याचा गाभा

आयुर्वेदोक्त प्रक्रिया आणि त्यांचें परीक्षण अशा द्विविध कार्याचा उल्लेख वर आला आहे. कांहीं प्रयोगहि चालू आहेत. प्रयोग हा संशोधन व अन्वेषण शालांच्या कार्याचा गाभा आहे. ई. मर्कच्या पाऱ्यांत शिसें '००००२% प्रमाणांत असतें. आमच्या संस्कारांनीं तें निघून गेलें कीं नाहीं हें समजण्यास मार्ग नाहीं. मायक्रो-ॲनॅलिसिसची सोय नाहीं, म्हणून पाऱ्यांत मुद्दाम शिसें, कथील इ. घालून तें संस्कारांनीं निघतें कीं नाहीं याचे प्रयोगहि सुरू केले आहेत. या प्रयोगांमध्यें शिशाचे बाबतींत तर असें दिसून आलें आहे कीं, गरम पाणी, नुसत्या हवेनें-सुद्धां पाऱ्यापासून कांहीं प्रमाणांत सुटे होत असतें.

निरनिराळ्या अवस्थांतील पारदाचे, प्राण्यावर प्रयोग करून शास्त्रोक्त परिणाम आणि अन्य परिणाम काय घडून येतात, कोणते घडून येत नाहींत हें पहाण्याच्या दृष्टीनें बायोकेमिस्ट्रीचें सहाय्य कसें घेतां येईल याबद्दल व्यवस्था चालू आहे.

पारदाचे जे कल्प तयार होतील, त्यांच्या शास्त्रोक्त गुणधर्मांचें प्रत्यंतर (व्हेरिफिकेशन) रोग्यावर पहाण्याकरितां मेयो रुग्णालयांत व्यवस्था होत आहे. श्री पक्वासा समन्वय रुग्णालयांतील संशोधनाच्या १० खाटा या संशोधनकार्याला मिळाल्या आहेत. येथें प्रयोग (एक्सपेरिमेंट्स्) सध्यांतरी होणार नाहींत. इतर कार्यें सारखीं पुढें चालू राहतील.

तृणज्योति

ही वनस्पति मध्यप्रदेशांत मंडला जिल्ह्यां होते. हिच्याबद्दल पुष्कळसें वाङ्मय प्रसिद्ध झालें पण तें या वनस्पतीला लागू पडेल असें नव्हतें. तृणज्योतीबद्दल 'ज्वलन्ति पर्वतास्तैस्तु' असें वर्णन आहे. ज्या वनस्पतीमुळें रात्रीं पर्वत जळताहेत असें दिसें त्या वनस्पतीचें जमिनीवरचें तृण चमकणारें असें पाहिजे. या उपलब्ध वनस्पतीचीं मुळेंच चमकणारीं आहेत व मुळें जमिनींत असल्यामुळें 'पर्वत जळताहेत' असें दृश्य या वनस्पतीनें दिसत नाहीं व दिसें शक्यहि नाहीं. यावरून ही वनस्पति तृणज्योति नाहीं, असें म्हणावें लागतें. अशीं आणखी प्रमाणें आहेत. तृणज्योतीचा प्रकाश हिरण्यसदृश सांगितला आहे. तो सोन्यासारखा लाल व पिवळ्या रंगाच्या मिश्रणाचा मुळींच नाहीं. पण चांदीसारखा पांढराहि

.... गौरव ....

आपण आयुर्वेदिक औषधांचा गौरव वाढविला पाहिजे. ती एक आपल्या हिताची गोष्ट आहे. आपण प्रत्येक औषधी द्रव्य असलपैकीं व ताजें वापरून सिद्ध औषधें बनविलीं पाहिजेत. अशीं उत्कृष्ट औषधीं द्रव्यें मिळवण्याकरितां आम्हांः—

दि ऑल इंडिया करीयाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधींचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात
माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

ली तर अल्ट्राव्हायोलेट किरण देतांना मशीन चालूं वितांना जो प्रकाश पडतो त्या रंगासारखा नील (निळ्या) रंगाच्या छटेनें युक्त पांढरा रंग आहे. शास्त्रांत तृणज्योतीच्या ', बरोबर नव्हे पण 'प्रथम' या वनस्पतीचा उल्लेख शास्त्रकारांनीं केलेलें वचन आम्हांला आढळलें. 'नीलज्योतिः तृणज्योतिः उर्वरा वनल्लिका' ह्या चार निरनिराळ्या वनस्पती सांगितल्या आहेत. 'ही नीलज्योति आहे' अशा शीर्षकाखाली पूर्वी आयुर्वेद पत्रिकेंत एक लेख प्रसिद्ध केला आहे, त्यांत साधक प्रमाणांचा विचार केला आहे.

ही वनस्पति उपयुक्त आहे

या वनस्पतीचा पारद–कार्यांत स्वतंत्रपणें उपयोग करून गुणांचें प्रत्यंतर पाहिलें जाईल. ही वनस्पति कांहीं लोकांनीं उपयोगांत आणली आहे. त्यांच्या मुलाखती आम्ही घेतल्या, त्यांत ही वनस्पती उपयुक्त आहे अशी कल्पना आली आहे.

अहवाल-निबंध-वाचन

आयुर्वेदीयांना नवीन वनस्पतींचे गुणधर्म ठरवितांना किती मुद्यांचा विचार करावा लागतो, याचें संक्षेपात्मक दिग्दर्शन 'वनस्पतींचें गुणधर्मविज्ञान' या निबंधांत केलें आहे. हा निबंध गेल्या मे महिन्यांत त्रिवेंद्रमला भरलेल्या निखिल भारतीय आयुर्वेदिक काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनांत वाचला. नागपूर विश्वविद्यालयांतील कार्याचा अहवालहि त्या संमेलनांत मांडण्यांत आला आहे. संशोधनावर युगधर्म, नवभारत, केसरी इ. मध्यें प्रासंगिक विचार व्यक्त करणारे लेख दिले आहेत. 'ही नीलजोति आहे' या लेखाचा उल्लेख वर आलाच आहे.

प्रदर्शनी तयार होत आहे

पारा व लोह या विषयाला अनुसरून एक प्रदर्शनी बनाविली जात आहे. या धातूंचीं व यांच्याशीं संबंध धातूंचीं निरनिराळ्या प्रकारचीं जितकीं उपलब्ध होतील तितकीं खनिजें मिळाविण्याचा प्रयत्न चालूं आहे. जवळ जवळ शंभर खनिजें आम्हांस मिळालीं आहेत.

कामाची नोंद केली जाते

दररोज केलेल्या कामाची नोंद केली जाते. त्यांत विशेष अनुभवांची नोंद केलीच पाहिजे असा नियम आहे. होणाऱ्या चुकांचीहि नोंद झालीच पाहिजे असा कटाक्ष आहे. या नोंदींचा उपयोग भविष्यांत अभ्यासकास होऊन, त्याला चांगल्या प्रतीचें मार्गदर्शन व्हावें हा मुख्य हेतु आहे.

शेवटीं

दृष्टीपुढें कामाच्या व्यापाचें विस्तृत क्षेत्र आहे. अनेक शाखोपशाखा निर्माण होऊन कार्याच्या साखळ्या निर्माण झाल्या पाहिजेत, आयुर्वेदीय रसशास्त्राचा वाङ्मयीन अभ्यास, आधुनिक शास्त्राचा तौलनिक अभ्यास इत्यादि वाङ्मयीन संशोधनात्मक शाखा आणि या योगिक इतर शाखाहि निघणें जरूर आहे.

कार्याची रूपरेखा थोडक्यांत मांडली आहे. प्रयत्न कसोशीनें चालू आहेत. कोणाहि वैद्यांला वा इतर जिज्ञासूंना केंव्हाहि कार्य दाखविलें जातें, त्यांच्या सूचना घेतल्या जातात, युनिव्हर्सिटी आयुर्वेद रीसर्च बोर्डापुढें कार्याची आंखणी व केलेल्या कार्याचा अहवाल मांडला जातो. धनिक व केंद्र सरकार यांच्या सक्रिय सहानुभूतीची अत्यंत आवश्यता आहे.

वाचकांचा पत्रव्यवहार

मधुमेही व व्यसनें

नाशिकच्या गांवकरी साप्ताहिकांत प्रसिद्ध झालेले आपले मधुमेहावरील तीन्ही लेख वाचले व संग्रहित केले आहेत. मधुमेहावरील इतकी विवेचनात्मक माहिती प्रथमच पहावयास मिळाली. मी स्वतः मधुमेही आहे. व आपले तिसरे लेखांत सांगितलेली औषधयोजनाच मी करीत आहे. समाधान वाटतें.

आतां 'मधुमेह व व्यसनें' यांचा परस्पर संबंध या लेखाची मी आपल्ेकडून अपेक्षा करीत आहे. त्यांतल्या त्यांत मधुमेही लोकांनीं तंबाखू खावी काय, विडी सिगारेट ओढावी काय व तपकीर वापरावी कांय, याचें सविस्तर विवेचन करावें. —प. ग. तिडके

मक्याच्या कणसाची शेंडी
मुतखड्यावर गुणकारी आहे

"एका डॉक्टरानें सांगितलेली ही हकीगत आहे. त्याच्याकडे येणाऱ्या एका रोग्याचें दोन वेळा ऑपरेशन करून मुतखडे काढण्यांत आले होते. तिसरे वेळां त्याला मूतखडा झाला त्यावेळीं त्याची स्थिति ऑपरेशन करण्याजोगी नव्हती.

त्याचें दुखणें वाढत चाललें. एक दिवस तो रोगी भाजी आणण्यासाठीं गेला असतां बाजारांतच त्याचें दुखणें खूप वाढलें व तो त्या दुकानांतच बसला. तेथें एक जाणता म्हातारा होता त्यानें रोगाची माहिती विचारून त्यावर पुढील उपाय सुचविला. जवळच पडलेल्या मक्याच्या कणसाचीं पानें काढून आंतील रेशमासारखे केसर काढून त्याच्या हातीं दिले व याचा काढा करून पी असें सांगितलें. काढा रोज ताजा करावा. ७ महिन्यांत तुझा विकार समूळ नष्ट होईल व पुन्हा केव्हांहि होणार नाहीं अशी खात्री त्यानें दिली.

त्या रुग्णानें तो काढा घेतला व थोड्याच महिन्यांत त्याचा मूतखडा गेला. या रोग्याचे मूतखडा असतांना व तो गेल्यावर असे दोन्ही फोटो घेतलेले आहेत व डॉक्टरांनीं मूतखडा नाहींसा झाल्याचा व औषधाची आवश्यकता नाहीं असा निर्णय दिला आहे. —'सुश्रुत (गुजराती) बडोदा' वरून उद्धृत

इसबावर धान्यतैल

इसबाकरितां आयुर्वेदांत धान्य तैलाचा वापर अति–उपयुक्त ठरलेला आहे. आमचे वडील कै. वैद्यपंचानन वाळिंबेशास्त्री (ते घरीं तयार करून) त्याचा वापर फार करीत होते.

त्यांत करडई, अंबाडी, उडीद तीळ, बाजरी वगैरे धान्य वापरीत असत. परंतु नक्की क्रिया लक्षांत नाहीं. पत्रिकेच्या वाचकांपैकीं कोणास त्याची कृति माहित असल्यास ती कळवावी. आभारी होईन.

—डॉ. वाळिंबे, नंदुरबार

आयुर्वेद सेवा संघाचीं बहुमोल प्रकाशनें

अनुभविक औषधें	वै. यादवजी त्रिकमजी आचार्य	४ रु.
अनुभविक चिकित्सा	वृद्ध वैद्य (मध्य-प्रदेश)	१ रु.
आयुर्वेदीय औषधी संशोधन हिंदी–मराठी	वै. पु. वि. धामणकर	१ रु.
औषधी गुणधर्मशास्त्र भाग १ (हिंदी)	वै. पं. गुणेशास्त्री	१॥ रु.
उपयुक्त ॲलोपॅथिक औषधें	डॉ. प्र. शं. गुप्ते	१॥ रु.
घरगुती औषधोपचार	सेवासंघ प्रकाशन	-।- रु.
निवडक रुग्ण चिकित्सा	संग्राहक वैद्य बिंदुमाधव पंडित	४॥ रु.
रोगविज्ञान भाग १, २ एकत्र	डॉ. वि. म. भट	१२ रु.
क्षयरोग चिकित्सा	सेवा संघ प्रकाशन	२॥ रु.

सर्व प्रकारच्या वैद्यक ग्रंथांसाठीं

— वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक —

ंतरोगावरील गुप्त औषध —

महारुख

दि. १६।९।५५ च्या आयुर्वेद पत्रिकेंत वाईचे ी. मुकुंद कृष्ण जोशी यांनीं ' महाडुंग ' षयीं कांहीं उपयुक्त माहिती प्रसिद्ध करून माहितीची अपेक्षा व्यक्त केली आहे, म्हणून असलेली थोडी माहिती कळवीत आहे.

लेखक

सिंहगडाच्या पायथ्याशीं

वै. जोशी यांनीं कळविलेला ' महाडुंग ' वृक्ष या नांवानें मला परिचित झाला. १९१८। लीं पुण्यास मी महाराष्ट्र वैद्यक पाठशाळेंत असतां द्रव्यगुणशास्त्राचे अध्यापक - गुरुवर्य रत्न गंगाधरशास्त्री जोशी ह्यांनीं आम्हां ना सिंहगडाचे पदयात्रेस नेलें होतें. पुण्याहून डोणजे गांव सिंहगडाच्या पायथ्याशीं व मैल चढण गडापर्यंत, असा हा आमचा प्रवास या पायीं यात्रेचा हेतु वनस्पतिपरिचय हाच होता हें सांगणें नकोच.

लेखक — आयुर्वेदप्रवर

वैद्य **दत्तात्रेयशास्त्री जळूकर**, नशिराबाद

ज्वरातिसारयुक्त बाळंतरोग

यावेळीं अगदीं प्रथम ' महारुख ' नांवाचा वृक्ष गुरुजींनीं आम्हां विद्यार्थ्यांस दाखवून सोपद्रव ज्वरातिसारयुक्त बाळंतरोगांत ह्या वृक्षाचे पानांचा रस १ तोळा व तूप १ तोळा, रोज १ किंवा २ वेळां द्यावा अशा माहिती सांगितली. त्यानंतर एकदां गणेशखिंड-गार्डन मध्येंहि वनस्पतिपरिचयासाठीं आम्ही गेलों असतां ह्याच झाडाचें क्षुप साधारण कमरेएवढें उंच पहाण्यास मिळालें होतें.

दरिद्री कुटुंबांतील बाळंतरोगी

शिक्षण संपवून मी खानदेशांत व्यवसायानिमित्त १९२२ सालीं आलो असतां इकडे हीं झाडें खूपच असल्याचें आढळलें. नवीन वैद्य या नात्यानें बाळंत विकारासारख्या जबाबदारी पत्करून चिकित्सेस घ्यावयाच्या रुग्णाशीं माझी गांठ पडण्यास २।३ वर्षें गेलीं व त्यामुळें ह्या वृक्षाच्या प्रभावाचा प्रत्यय घेतां आला नव्हता. परंतु शेवटीं एका अत्यंत दरिद्री इसमाच्या पत्नीला झालेला बाळंतरोग ज्यांत ज्वर, अतिसार, मुखपाक व शोथ अशीं दुःसाध्य लक्षणें उत्पन्न झालीं होतीं, तो एवीं तेवीं रोगी मरणार, म्हणून कांहींतरी औषध द्यावयाचें तें नवीन वैद्याचा अनुभव घेण्याचे दृष्टीनें द्यावें असाच जणूं हेतु धारण करून माझेकडे चिकित्सेसाठीं देण्यांत आला. व मीहि तो भीतभीतच कां होईना पण गुरुकृपेनें जर ह्या वृक्षाच्या प्रभावाचा अनुकूल प्रत्यय आला तर (चिकित्सा नास्ति निष्फला) केलेली ही चिकित्सा केव्हांना केव्हांतरी आपणास लोकांच्या दृष्टीपुढें उभें करीलच करील ह्या भावनेनें चिकित्सेसाठीं घेतला.

झाडाचें नांव माहित नव्हतें

रोगी शेतकरी असल्यामुळें त्याला ह्या वृक्षाची

ओळख जरूर असणार ह्या कल्पनेनें "महारुखाच्या झाडाच्या पानांचा रस १ तोळा व तूप १ तोळा यांतून निमित्तमात्र असें कांहींतरी औषध घेण्यासाठीं दिलें." परन्तु महारुख हें ह्या झाडाचें नांव त्या शेतकऱ्यास माहित नव्हतें व तो ह्या झाडाला कोणत्या नांवानें ओळखतो ह्याची मला कल्पना नव्हती, म्हणून स्वतःच त्याचेबरोबर जाऊन तो वृक्ष गांवाबाहेरच असलेला त्यास दाखविला.

बाळंतरोगाचें गुप्त औषध

तो वृक्ष दाखवितांच "शास्त्रीबुवा! याला इकडे 'अड्डु' चें झाड" या नांवानें ओळखतात, कांहीं लोक 'अरळ' असेंहि म्हणतात. तुम्ही येण्याचे अगोदर येथें एक वैद्य होते ते बाळंतरोगावर पेटंट औषध देत होते, पण रस कोणता हें त्यांनीं कधीं कोणाला सांगितलें नाहीं. त्यांनीं स्वतःच तो रस द्यावा व तुपांतून घेण्यास सांगावा. ते पैसे वगैरे कांहीं घेत नसत. त्यांच्या पश्चात् आतां कोणी नाहीं पण मरतांनाहि त्यांनीं हें औषध कोणाला सांगितलें नाहीं. पण आज आतां वाटूं लागलें कीं, हेंच तें औषध असेल. ईश्वराच्या दयेनें तुमच्या हाताला यश आलें तर मी जन्मभर उपकार विसरणार नाहीं," असें म्हणून त्या गृहस्थानें तो रस व तूप एकत्र करून सकाळीं व रात्रीं देण्यास सुरुवात केली.

पथ्य—दूध, तूप, गहू, साखर

वैद्याची पुडी त्यांतून चालूं होतीच. दूध, तूप, गहू, साखर या चार वस्तूंचा कोणताहि पदार्थ करून खावा. पाणी उकळून गार केलेलें प्यावें. इतर कांहींहि खाऊं पिऊं नये. अशी सक्त ताकीद दिली. व 'यांत थोडाहि बदल झाला तर रोगी ताबडतोब दगावेल' असेंहि सुचवून दिलें. त्याबरोबरच रोग्याची परिस्थिति कठीण आहे, यश आलें तर किंमत नाहीं, पण अपयश आलें तर माझा दुर्लौकिक मात्र तुम्ही कराल आणि माझ्यासारख्या नव्या वैद्याला धंद्याचें दृष्टीनें तो पुढें एक अपशकुनच ठरेल असेंहि बोलून टाकलें. तेव्हां 'तुम्ही काय करणार! स्थिति आम्हाला दिसतेच आहे. झाली जर ईश्वराची कृपा, आले तुमच्या हाताला यश, तर माझा गरिबाचा संसार ठिकाणीं बसेल. तुमचा आमचा कांहीं हेवादावा नाहीं. व वैद्य कधीं रोग्याला मुद्दाम वाईट औषध देऊन मारील काय? हें मी जाणतों." असें त्यानें म्हटलें व ईश्वरावर भरंवसा ठेवून औषध सुरूं केलें.

'देवाची करणी व नारळांत पाणी' म्हणतात तशी गत झाली. तिसऱ्याच दिवसापासून बाईला बरें वाटूं लागलें. ज्वरातिसार कमी झाला व ७ दिवसांत शोथहि साफ गेला. पुढें मग शक्ती वगैरे येण्यासाठीं योग्य ती औषधें दिल्यावर बाई ठणठणीत बरी झाली. मग काय विचारतां? बाळंतरोगावरील औषधाची ती जिवंत जाहिरातच तयार झाली.

पित्तात्मक लक्षणें असतांना मात्र याचा उपयोग होत नाहीं. वातकफात्मक किंवा पित्तानुबंध व कफाधिक्य असतांनाच याचा विशेष गुण प्रत्ययास येतो. यावरून हा उष्णवीर्य आहे हें निश्चित ठरलें.

पुढें मग कै. शंकरदाजीशास्त्री पदे यांच्या वनौषधिगुणादर्श पुस्तकाच्या चवथ्या भागांत 'महारुख' नांवानेंच या वृक्षाचे गुणधर्म दिलेले वाचण्यांत आले. त्यांत बाळंतविकाराशिवाय आमातिसार, संग्रहणी, विषमज्वर, कफ, पटकी, गुरांचा मुसळ्यारोग, विषार, मुखपाक, धनुर्वात यावर याचा उपयोग होत असल्यानें लिहिलें आहे, पण ह्या विकारांवर अनुभव अजून तरी घेतला गेला नाहीं. प्रसंगविशेषीं चिकित्सकांनीं अवश्य प्रचीति घ्यावी व ती प्रसिद्ध करावी म्हणजे बरें होईल. सह्याद्री व खानदेशमध्यें हे वृक्ष आहेत असें वर्णन पदेशास्त्रीबुवांनीं केलेलें आहे.

महारुख याला गुजरातींत मोटोअर्डुसो व पंजाबींत अरुअ अशीं नांवें आहेत. ही खानदेशी अड्डु व अरक ह्या दोन्ही नांवांशीं जुळतीं आहेत. बाळंतपणांत या वृक्षाच्या सालीची पेज देतात व उत्तम उपयोग होतो असें वर्णन कै. डॉ. वामनराव देसाई कृत औषधीसंग्रह पुस्तकांत (पान १८८) वर आहे तेंहि वाचकांनीं अवश्य पहावें.

महारोगासंबंधींचा एक उपेक्षित दृष्टिकोन

[मागील अंकांतील पान नं. १७२ वरून समाप्त]

का- वै. त्र्यं. म. गोगटे, आयुर्वेदतीर्थ ऑनररी ॲनेस्थेटिस्ट, इर्विन व डफरिन हॉस्पिटल अमरावती, आणि डॉ. सौ. ईशदया गोगटे एल्.एम. पी. [म.प्र.], डी.जी.ओ. (मुंबई), ऑनररी लेडी डॉक्टर, जगदंबा कुष्टनिवास, अमरावती.

संसर्ग टाळण्यापेक्षां हें पथ्यपालन आवश्यक आहे

केवळ संसर्गाच्या भीतीमुळें भयभीत आणि साशंक होऊन राहण्यापेक्षां संसर्ग आपल्याला बाधूं े किंवा तो रोग स्वतंत्रपणें आपल्या शरीरांत उद्‌भवूं नये, यासाठीं आपल्या शरीराची योग्य भूमिका र व्हावी म्हणून जरूर ती वागणूक ठेवणें हें फार महत्त्वाचें आहे. ही वागणूक म्हणजे मिथ्याहार–विहार णि विशेषतः विरुद्ध आहार-विहार टाळणें, ही होय. शरीरशुद्धीच्या प्रक्रिया करून घेणें जरी आज सहज य नसलें, तरी तशी शक्यता निर्माण होईपर्यंत शरीर या रोगाविरुध्द प्रतिकारक्षम करण्यासाठीं ठेवावयाची णुक ही प्रत्येक व्यक्तीच्या आणि प्रत्येक कुटुंबाच्या हातांतली गोष्ट आहे.

महारोगानिवारणाचें कार्य सरकार आणि कांहीं संस्था करीतच आहेत. पण केवळ त्यांच्याच मदती- र सर्व भिस्त ठेवून भागणार नाहीं. या सर्व योजनेंत व्यक्तीव्यक्तीला आणि कुटुंबाकुटुंबाला हातभार णें शक्य आहे.

मिथ्याहार–विहार आणि विरुध्द आहार–विहार टाळणें ही कांहीं निराळया खर्चाची बाब नाहीं. हारविहाराच्या रोज होणाऱ्या खर्चांतच याहि गोष्टी साधणें शक्य आहे.

मिथ्या आहार–विहार आणि विशेषतः विरुद्ध हार-विहारानें रोग उद्‌भवण्यास योग्य अशी मिका शरीरांत कशी तयार होते, हें थोडक्यांत ूं. मिथ्या आहार-विहार आणि विशेषतः विरुद्ध हार-विहार यांच्या नित्य सेवनानें शरीरांत उत्क्ले- ची स्थिति निर्माण होऊन, शरीरांतील त्वचा, लस, आणि मांस हीं दूषित आणि शिथिल होऊन ण्याच्या मार्गास लागतात. हीच ती कुष्ठ किंवा रोग यास अनुकूल भूमिका होय. कुष्ठ हा शब्द कृतांतील कुष् म्हणजे कुजणें या धातूपासून झालेला हे. आयुर्वेदानें ऋतुमानाप्रमाणें आंखून दिलेला नाबद्ध आहार–विहार जर कसोशीनें आपल्या चरणांत आणलेला असेल, तर मिथ्या आहार–विहार णि विरुद्ध आहार–विहार यांचा संभव कमीच ील आणि वरील रोगकारक भूमिका शरीरांत र्माण होणार नाहीं.

आयुर्वेदाचें स्पष्ट मत

महारोगासारखे रोग एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीमध्यें संक्रमण पावतात असें आयुर्वेदानें स्पष्ट मत दिलेलें आहे. आयुर्वेदशास्त्राप्रमाणें महारोगाची उत्पत्ति ही जशी एका बाजूनें संसर्गामुळें, तशीच आणि त्याहिपेक्षां महत्त्वाची अशी दुसऱ्या बाजूनें म्हणजे शारीरिक भूमिकेमुळें होते. आणि ही भूमिका मिथ्या आहार–विहार आणि विरुद्ध आहार–विहार यांच्या सतत सेवनानें तयार होते. अशा रीतीनें एका व्यक्तीला महारोग झाला असतां दुसरी एकादी व्यक्ति त्याच्या संसर्गांत आल्यास आणि त्या व्यक्तीच्या शरीरांत रोगानुकूल भूमिका तयार असल्यास, त्या व्यक्तीमध्यें या रोगाचें संक्रमण होईल. असे अनेक महान् कार्यकर्ते आपण पहातो कीं, जे महारोग्यांची सतत सेवा करीत असूनहि त्यांना संसर्ग बाधलेला दिसत नाहीं. त्यांच्या शरीरांतील घटकांची स्थिति

रोगानुकूल नसल्यास संसर्ग त्यांस बाधत नाहीं असा निष्कर्ष निघतो. इतर रोगांच्या बाबतींतहि हें विधान सिद्ध झालेलें आहे.

संसर्ग टाळण्याचे मूलग्राही उपाय

महारोग हा अनुवंशिक असो किंवा नसो, पण आईच्या मिथ्याहार-विहारानें आणि विशेषतः विरुद्ध आहार–विहारानें तिच्या शरीरांतील घटकांची जी भूमिका असेल, तिचा वारसा तिच्या अपत्याकडेहि जातो. आयुर्वेद संसर्गाचें महत्त्व मानतो. एवढेंच नव्हे, तर तो टाळण्यासाठीं त्यानें मूलग्राही उपाय सांगितले आहेत. आयुर्वेदप्रणीत वागणुकीचे नियम आणि भारतीय संस्कृतीच्या आदेशाप्रमाणें वैयक्तिक वागणुकीचे नियम हे मिळते जुळतेच आहेत. एका निरोगी व्यक्तीनें दुसऱ्या निरोगी व्यक्तीचे सुद्धां कपडे किंवा जोडे यासारख्या वस्तु वापरूं नयेत, हा आणि असेच दुसरे साधे नियम फक्त महारोगाच्या संसर्गा-पासूनच नव्हे, तर इतर अनेक रोगांपासून मनुष्यास दूर ठेवतील.

शरीरशुध्दीचें महत्त्व

विशुद्ध, सकस, तेजस्वी, ओजस्वी आहार शास्त्रशुद्ध पद्धतीनें केल्यास तसेंच आहाराचे नियम पाळल्यास शरीरांतील रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा आणि शुक्र हे सप्तधातु आणि ओज शुद्ध आणि बलवान् होतात. उपनिषत्कालापासून तो आधुनिक वैज्ञानिक युगापर्यंत आहारावर शरीराची स्थिति अवलंबून असते, या विषयीं दोन मतें नाहींत. एवढेंच नव्हे, तर 'आहारशुद्धौ चित्तशुद्धिः' या दाखल्याप्रमाणें आहाराचा परिणाम थेट मनाच्या शुद्धीपर्यंत पोंचतो, असा प्राचीन शास्त्रामध्यें निर्वाळा दिला आहे.

त्वचा कशी तयार होते?

एखाद्या पदार्थाला तापविल्यानन्तर त्यावर जशी साय येते त्याचप्रमाणें शरीराची त्वचा उत्पन्न होते, असें आयुर्वेदीय शरीरव्यापारशास्त्र (फिजिऑलॉजी) सांगतें. त्यांत सात त्वचा वर्णिल्या आहेत. या सात त्वचा सप्तधातूंच्या प्रतिनिधिस्वरूप आहेत. अंतर्गत स्थितीचा परिणाम त्या त्या विशिष्ट त्वचेवर उमटत असतो. त्या त्या धातूंतील रोगकारक स्थिति त्या त्या त्वचेवर आपलीं लक्षणें दाखवितात. पृथ्वीच्या पोटांतील खळबळीचे परिणाम जसे तिच्या पृष्ठभागावर दिसतात, तद्वतच या शरीरांतील दोषदुष्टीचें स्वरूप शरीराच्या पृष्ठभागावर म्हणजे त्वचेवर दिसतें.

ऋतुमानाप्रमाणें वागणूक

आहार हें शास्त्र अत्यंत महत्त्वाचें आहे, हें निर्विवाद आहे. आधुनिक विज्ञानाप्रमाणें 'ॲलर्जी' या विकारस्थितीमध्यें आपल्याला औषधापेक्षां आहार-विहाराची बारकाईनें छाननी करावी लागते. डिफिशियन्सी डिसीझेस्‌मध्यें औषधोपचाराबरोबरच आहार–विहार सुधारला तरच खरा गुण येतो. अशी आणखी कांहीं उदाहरणें देतां येतील. मिथ्याहार–विहार आणि विरुद्ध आहार-विहार यांतच आयुर्वेदानें अनेक प्रकारच्या विकृतींच्या कारणांचा शोध

सांडू
गोल्ड टॅब्लेटस्
क्षयाच्या प्राथमिक अवस्थेवर
अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं, लिहा
द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्सः—
बी. पी. बर्वे ॲंड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते–मे. पेंढारकर ॲंड को.
मेनरोड, नाशिक शहर

आहे. शरीरघटक तेजस्वी राहावे आणि रोगांना वयास वाव मिळूं नये, यासाठीं दैनंदिन व शिवाय ऋतुमानाप्रमाणें वागणूक कशी , हें मोठ्या शास्त्रशुद्ध पद्धतीनें आणि आत्मतानें आंखून दिलेलें आहे.

शरीरशुध्दीवर फार कटाक्ष

आयुर्वेदाचा शरीरशुद्धीवर फार कटाक्ष आहे. च्या शुद्धीशिवाय घटकांच्या पोषणाला गति नाहीं, म्हणून शरीराच्या निरनिराळ्या द्वारांरांतील निरनिराळ्या भागांची शुद्धि करण्या- निरनिराळ्या प्रक्रिया आहेत. या शुद्धीच्या रोग उत्पन्न झाल्यानंतरच करावयाच्या असें निरोगी माणसानेंहि दीर्घायुष्य, आरोग्य, बल त्साह इत्यादींची वाढ शरीरांत व्हावी यासाठीं च्या असतात. या शुद्धीच्या प्रक्रिया वमन, , बस्ति, नस्य आणि अस्रविस्रुति म्हणजेच या नांवानें ओळखल्या जातात.

पंचकर्म योगशास्त्राशीं जुळतें आहे

ही पंचकर्मं म्हणजे साधीसुधी ओकारीचीं किंवा चीं औषधें देणें नव्हे. ही प्रत्येक क्रिया एकेक शास्त्रशुद्ध विधि आहे. यासाठीं हॉस्पिटल (गृहा) ची जरूर असते. रोग्याला पंचर्में निष्णात वैद्याच्या देखरेखीखालीं कांहीं राहावें लागतें. शरीराची शक्ति यत्किंचितहि होऊं न देतां शरीर शुद्ध आणि तेजस्वी करण्या- एक उपचारप्रकार आहे. शास्त्रीय पद्धतीच्या विहारांनीं आणि शुद्धीच्या प्रक्रियांनीं शरीर रणें हें धर्माच्या दहा लक्षणांपैकीं पहिलें लक्षण द्धि तिचा पाया होय. योगशास्त्राप्रमाणें शरीर- जे धौती, नौली, नेती वगैरे प्रकार आहेत, आयुर्वेदीय पंचकर्मांशीं मिळते जुळते आहेत. मध्यें महारोगासारख्या दुष्ट रोगांचा प्रादुर्भाव साठीं आणि शरीर सकस आणि तेजस्वी साठीं शुद्धीसारखा दुसरा मूलग्राही उपाय नाहीं.

या मूलग्राही विचारसरणीचीं वैशिष्ट्यें

(अ) आजच्या परिस्थितींत रोगाच्या संसर्गापासून आपण दूर राहूं शकूं, याची मुळींच खात्री नाहीं. केवळ संसर्गाच्या भीतीमुळें भयभीत आणि साशंक होऊन राहण्यापेक्षां, संसर्ग आपल्याला बाधूं नये किंवा तो रोग स्वतंत्रपणें आपल्या शरीरांत उद्भवूं नये, यासाठीं आपल्या शरीराची योग्य ती भूमिका तयार व्हावी म्हणून जरूर तशी वागणूक ठेवणें हें फार महत्त्वाचें आहे. ही वागणूक म्हणजे मिथ्याहार–विहार आणि विशेषतः विरुद्ध आहार–विहार टाळणें ही होय.

प्रत्येकाच्या स्वाधीनची गोष्ट

(आ) शुद्धीच्या प्रक्रिया करून घेणें जरी आज सहज शक्य नसलें, तरी शक्यता निर्माण होईपर्यंत शरीर या रोगाविरुद्ध प्रतिकारक्षम करण्यासाठीं ठेवावयाची वागणूक ही प्रत्येक व्यक्तीच्या आणि कुटुंबाच्या हातांतली गोष्ट आहे. त्या वागणुकीला लागणारी वृत्तीची कणखरता मात्र अंगीं असली म्हणजे झालें. अशी वागणूक ठेवावयाला निराळा कांहीं आटापिटा करण्याची जरूरी नाहीं. फक्त रोजच्या वागणुकींतील चालू असलेल्या कांहीं गोष्टींची अदल–बदल करावी लागेल आणि कांहीं बंधनें पाळावीं लागतील.

महारोगनिवारणाचें कार्य सरकार आणि कांहीं संस्था करीतच आहेत. पण केवळ त्यांच्याच मदतीवर सर्व भिस्त ठेवून भागणार नाहीं. या सर्व योजनेंत व्यक्तीव्यक्तीला किंवा कुटुंबाकुटुंबाला हातभार लावणें शक्य आहे. तो हातभार लावण्याची योजना वरील वागणुकींत आहे. व्यक्तीव्यक्तीनें, मग तो रोगी असो कीं निरोगी असो, आपापला वांटा उचलल्यास महान् कार्य साधणार आहे.

खर्चाची बाब नाहीं

(इ) मिथ्याहार–विहार आणि विरुद्ध आहार–विहार टाळणें ही कांहीं निराळी खर्चाची बाब नाहीं. आहार–विहाराच्या रोज होणाऱ्या खर्चांतच याहि

गोष्टी साधणें शक्य आहे. यासाठीं मिथ्याहार-विहार आणि विशेषतः विरुद्ध आहार-विहार यांचे नियम समजावून घेतले पाहिजेत आणि आचरणांत उतरविले पाहिजेत.

रागोच्छेदन कसें करावें ?

हा झाला स्वास्थ्यरक्षणासंबंधींचा [प्रॉफिलॅक्सिस्] विचार. आतां प्रत्यक्ष रोग उद्भल्यावर करावयाच्या उपचारांचा विचार थोडक्यांत करूं.

प्रत्यक्ष रोगोपचारांतहि वरीलप्रमाणेंच मिथ्याहार-विहार आणि विरुद्ध आहार-विहार यांचें महत्त्व आहे. शरीर रोगानुकूल होण्यास मिथ्याहार-विहार कारण झालेला असल्यानें तो टाळणें हा तर उपचारांतील महत्त्वाचा भाग आहेच. कोणत्याहि गोष्टीचें मूळ कारण नाहींसें करणें हा मूलग्राही उपाय असतो. याशिवाय शरीरांतील निगडित झालेले दोष काढण्यासाठीं वमन, विरेचन, बस्ति, नस्य आणि रक्त काढणें इत्यादींनीं शुद्धि करणें जरूर असतें. पंधरा पंधरा दिवसांनीं वमन, महिन्या-महिन्यानें रेचक, सहा सहा महिन्यांनीं रक्त काढणें आणि विशेषतः शिरोविरेचन म्हणजे नस्य 'नाकांतून शुद्धि' तर दर तीन तीन दिवसांनीं करण्यावर विशेष भर दिला आहे. यानन्तर शरीराची पुनर्घटना आणि पुनर्रचना होण्यासाठीं आणखीहि निरनिराळे उपचार आहेतच.

महारोग-उपचाराचें नवें दालन

आहार-विहाराचे नियम पाळणें ही गोष्ट आज जितकी आटोक्यांत येण्यासारखी आहे, तितकें पंचकर्मांनीं शरीर शुद्ध करण्याचे उपचार एकेका व्यक्तीच्या किंवा कुटुंबाच्या आटोक्यांतले नाहींत. तरीपण शास्त्रज्ञांनीं आणि विचारवन्त कार्यकर्त्यांनीं श्रद्धेनें आणि निष्ठेनें हें कार्य मनावर घेतल्यास महारोगाच्या उपचाराचें एक नवें दालन उघडलें जाईल.

कळकळीची विनंति

एकीकडे शास्त्रशुद्ध स्वास्थ्यरक्षक आणि निरामय अशा आहार-विहाराचा समाजांत प्रचार चालू ठेवून आधुनिक विज्ञानानें शोधून काढलेल्या नव्या औषधांचा आणि योजनांचा उपयोग करून रोगाच्या वाढीला जितका आळा घालतां येईल तेवढा घालीत राहणें, हें सर्वांचें आद्य कर्तव्यच आहे. त्या बरोबरच पंचकर्मचिकित्सेचें तंत्र आत्मसात् करून घेतल्यावर महारोगाचा एक मूलग्राही, संपूर्ण आणि शाश्वत असा उपाय आपल्या हातीं येईल. म्हणून महारोगासंबंधींच्या निष्ठावन्त कार्यकर्त्यांना आणि शास्त्रज्ञांना एक कळकळीची विनंति करावीशी वाटे कीं, आजवर उपेक्षिल्या गेलेल्या प्राचीन शास्त्रांतील या मूलग्राही उपायांचे अनुभव घेऊन समाजाच्या स्वास्थ्यासाठीं आणि रुग्णांच्या पीडा नाहींशा करण्यासाठीं त्यांनीं या विचारसरणीचा उपयोग करून घ्यावा.

स्थिररंगैस्तुष्टुवांसस्तनुभिः

या मंत्राच्या जयघोषानें, आरोग्यानें मुसमुसलेल्या, तेजस्वी आणि ओजस्वी मानवांचा समाज निर्माण करावयाच्या मूलग्राही प्रयत्नास आपण सुरुवात करूं या !

अरविंद आयुर्वेदिक इंजेक्शनांच्या
किंमती अतिशय कमी केल्या
ग्राहकांना विशेष सवलत

ता. १।३।१९५५ पासून नवीन नियम, लागूं. 'सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन चिकित्सा' या पुस्तकाची किंमत ३ रु. ऐवजीं १॥ रु. केली आहे. पोस्टेज १० आणे निराळें. पुस्तक व्ही. पी. नें पाठविलें जाणार नाहीं. १ रु. २ आणे म. ऑ. नें आगाऊ आल्यावर पुस्तक रजिस्टर्ड पोस्टानें पाठविलें जाईल.

पत्ता- अरविंद केमिकल वर्क्स
छिंदवाडा [म. प्र.]

सुवर्ण जलविद्राव्य आहे कां ?

(लेखकः-वैद्य चंद्रकांत भी. मणूरकर, डी. ए. एस्. एफ्., सोलापूर)

आयुर्वेद-पत्रिकेच्या दि. १६ ऑगस्टच्या ंतील वैद्य माधवाचार्य मणूरकर यांचा “ सुवर्णो- चा चिकित्सेंतील अनुभव ” हा लेख व दि. १६ ंबर १९५५ च्या अंकातील आयुर्वेदरत्न सुंदरराव यांचा “ धातुस्पृष्ट जलौषधी ” या शीर्षकाखालील असे दोन्ही लेख वाचले. त्या दोन्ही लेखांतून द्वयांनीं लोखंडाची कांब घेऊन ती तापवून पाण्यांत वून तें जल रोग्यास दिलें असतां लोह रोग्याच्या रांत जातो असा प्रयोग केल्याचें लिहिलें आहे. धुनिक रसायनशास्त्राच्या मताप्रमाणें हें मत बरोबर हे. लोह या धातूवर हवेंतील ऑक्सिजनवायूचा णाम होऊन त्याच्याशीं लोह संयोग पावून त्या- ून आयर्न ऑक्साइड तयार होतें. वरील प्रयोगांत ची प्रचिती दिसून आलीच आहे.

हें म्हणणें अशास्त्रीय आहे

वरील प्रयोगावरून लोखंड ज्याअर्थी पाण्यांत ळतें, त्याअर्थी इतर धातुहि पाण्यांत मिसळतात ा निष्कर्ष वरील वैद्यद्वयांनीं काढलेला दिसतो. तु त्यांचा हा निष्कर्ष आधुनिक रसायनशास्त्राला न्य नाहीं. त्यांचें तें म्हणणें अशास्त्रीय आहे. माझें खालीं देत आहे.

सुवर्ण इतर धातूंहून भिन्न आहे

सुवर्ण या धातूचे गुणधर्म इतर धातूंहून भिन्न हेत. सुवर्णाला आधुनिक रसायनशास्त्रांत ‘नोबल ’ म्हटलेलें आहे. सुवर्णावर पाण्याचा किंवा हवेचा ंच परिणाम होत नाहीं.

"Gold is a noble metal and it emains unchanged in the air, and ater has no action on it, it is in- luble in the common acids."

Chemistry by Whitten.

असे त्याचे स्पष्ट गुणधर्म दिलेले असतांना वैद्यद्वय म्हणतात कीं सुवर्ण हें पाण्यांत मिसळतें. वरील रसायनशास्त्राच्या वर्णनावरून सुवर्ण पाण्यांत विद्राव्य नसल्याचें आपल्याला दिसून येईल.

स्वतंत्र वापरून गुणधर्म पहावेत

वैद्य माधवाचार्य मणूरकर यांनीं स्मृतिनाश होतो असा प्रयोग केल्याचें लिहिलें आहे. परन्तु ते लिहितांना म्हणतात कीं, “इतर औषधाबरोबर देण्यास रोग्याच्या नातेवाइकांना सांगितलें.” मला तर या बाबतींत असें म्हणावयाचें आहे कीं, हा गेलेला स्मृतिनाश मानसिक (सायकॉलॉजिकल) असेल किंवा इतर औषधांचा परिणामहि असूं शकेल. आपणास सुवर्णोदकांचा प्रयोग करावयाचा असेल तर रोग्यास तें सुवर्णोदक आहे हें न सांगतां व त्याबरोबर कोणतेंहि औषध न वापरतां त्याचे गुणधर्म पाहिले पाहिजेत. त्यासाठीं स्वतंत्र प्रयोग करावयास पाहिजेत, त्यावेळेसच आपण आपला प्रयोग खरा आहे असें प्रतिपादन करूं शकूं.

सुवर्णाची शक्ति म्हणजे काय ?

श्री. आयुर्वेदरत्न सुंदरराव वैद्य यांनीं आपल्या लेखांत “सुवर्णाची शक्ति जलांत मिश्रित होते” असें म्हटलें आहे. शक्ति म्हणजे काय ? एका द्रव्यांतील शक्ति दुसऱ्या द्रव्यांत जात असेल तर मग पहिलें द्रव्य निःशक्त व्हावयास हवें. परन्तु वरील वैद्य सुवर्ण जसेंच्या तसें राहातें असें म्हणतात. शक्ति ही एका द्रव्यांत असतांना ती परत दुसऱ्या द्रव्यांत कशी राहाते ? शक्ति ही एकावेळीं एकाच द्रव्याचा आश्रय करूं शकते. वरील सर्वच विवेचन अशास्त्रीय वाटते.

वरील सर्व गोष्टी सप्रयोग व रसायनशास्त्राच्या चौकटींत बसवून मांडतां आल्या पाहिजेत, नाहींतर लोक आयुर्वेदाकडे शास्त्र म्हणून पाहणार नाहींत

आयुर्वेद-पत्रिकेसारख्या शास्त्रीय मासिकांतून यापुढें अशास्त्रीय लेखांना जागा दिली जाऊं नये अशी संपादकांना माझी विनंति आहे.

प्रत्यक्ष प्रयोग करून पहा

[वरील लेख आधुनिक तरुण शिक्षित वैद्यांची विचारसरणी लक्षांत यावी एवढ्यासाठींच दिला आहे. लेखकानें आधुनिक केमिस्ट्री वाचली तसेच जर आयुर्वेदीय वाङ्मंय बारकाईनें वाचलें असतें, तर सुवर्णाच्या केवळ साक्षित्वानें औषधी गुणांत झालेले फरक लक्षांत आले असते. रससिंदूर व मकरध्वज यांतील फरक हें एक प्रसिद्ध उदाहरण आहे. आधुनिक रसायनशास्त्र हें वर्धिष्णु आहे. कांहीं दिवसांनीं आपणास त्यांत फरक घडलेले दिसून येतील. तरुण वैद्यांनीं उताविळपणानें अशी विधानें न करतां स्वतः अभ्यास व प्रयोग करण्याची प्रवृत्ति ठेवावी. अशा शंभर शाब्दिक चर्चेपेक्षां एक प्रत्यक्ष प्रयोग अधिक ज्ञान देईल. –संपादक]

वाचकांचा पत्रव्यवहार—

सुवर्ण हिणकस होतें काय?

ता. १६ ऑगस्ट १९५५ च्या आयुर्वेद पत्रिकेच्या अंकांत सुवर्ण जलासंबंधीचा जो लेख आहे. त्या लेखासंबंधीं श्री. " रा. दास पाचोरा " यांनीं ता. १ सप्टेंबर १९५५ च्या अंकांत पुढील शंका प्रसिद्ध केली आहे ती अशीः–सोनें वारंवार तापवून पाण्यांत बुडविल्यानें तें हीन कस होतें किंवा काय ?

माझें उत्तर– माझ्या लेखांत मी असें म्हटलें आहे कीं, सुवर्णजलाकरितां जें सोनें घ्यावयाचें तें शुद्ध सोनें असावें. याचाच अर्थ सराफी भाषेंत शंभर नंबरी सोनें असावें. रा. दास यांच्याहि लक्षांतून हा मुद्दा सुटलेला नाहीं. कारण त्यांनीं असें विचारलें आहे कीं, सोनें हीन कस होतें कां? सोन्याचा कस सराफ लोक एका ठराविक दगडावर लावतात. वारंवार तापलेल्या सोन्याचा कस सराफ लोकांच्या या दगडावर लावून पाहिला. कस कमी न होतां सोन्याचें तेज वाढलेलेंच दिसलें.

वाङ्मयीन पुरावा

या माझ्या म्हणण्यास वरचा व्यवहारांतला पुरावा जसा दिला, तसाच वाङ्मयीन पुरावा म्हणून एक संस्कृत सुभाषित देत आहे.

" दग्धं दग्धं पुनरपि पुनः काचनं कांतवर्णम् "।

तिसरा भौतिक शास्त्राचा पुरावा म्हणजे सोनें हा धातु बाकीच्या धातूसारखा ज्वलनक्षम oxidise होणारा नाहीं. अग्नीनें सोन्याच्या मूळ रूपांत बदल घडवला जात नाहीं.

Refining of Gold

Metals like copper are removed by melting in a crucible with borax and nitre. Copper and the baser metals are oxidised and the oxides dissolve in borax and are removed as a scum.

Inorganic Chemistry by
G.B. Kolhatkar chapter XXIII

वरील उताऱ्यावरून सोन्याचें ऑक्साइड तयार होत नाहीं हें स्पष्ट आहे.

रा. दास यांनीं शंका विचारली त्याअर्थीं त्यांनीं माझा लेख काळजीपूर्वक वाचला आहे. आणि त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

वै. माधवाचार्य मणूरकर, बार्शी

सोन्याचें पाणी

विषमज्वराच्या रुग्णांत वातवृद्धि असतां शुद्ध सोनें पाण्यांत उकळून तें पाणी थोडें थोडें दिलें तर वात कमी होतो असा माझाहि अनुभव आहे.

माढे जि. सोलापूर वै. फु. शि. दोशी, आयुर्वेदतीर्थ

पवित्र
नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोळा.
हिमालय कस्तुरी रु. ४१ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोळा.
लिहाः–नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

वैद्य जायदे यांचीं पत्रें—३

हान मुलांत दांत किडण्याचें प्रमाण अधिक

१०-९-५५

टन येथें येऊन आज महिना झाला. या अवधींत तांत अनेक घटना घडल्याचें वाचलें. गोवा, अह गोळीबार, महापूर, विद्यार्थ्यांचीं निदर्शनें कार वाचून फारच वाईट वाटलें. येथें बातम्या आठवड्यानें उशीरा वाचावयास मिळतात. त्या- हुरहुर वाटते.

गु. बिंदुमाधवजी सध्यां कोठें आहेत ? श्रीमंत साहेबांनीं ते सत्याग्रहाकरतां गेल्याचें कळविलें परंतु पुढें कांहींच कळलें नाहीं.

अमेरिकन दंतरुग्ण सत्त्वभूयिष्ठ आढळले

येथील दंतरोग चिकित्सालयांत पुरुषापेक्षां स्त्रियांची अधिक दिसून येते. लहान मुलांत दांत किडण्याचें प्रमाण फार आढळतें. म्हणून हल्लीं बालक ग (Childrens Department) नांवाचें न स्वतंत्र खातें निर्मिलें असून त्यांत स्वतंत्रपणें ांच्या दांतांची चिकित्सा केला जाते.

" स्त्रियांत दंतरोगांचें प्रमाण क कां ? असा प्रश्न तेथील रांना केला असतां त्यांनीं नोदात्मक उत्तर दिलें:— यांना घरीं रिकामटेकडपणा— कांहीं उद्योग नसतो म्हणून हॉस्पिटलकडे धांव घेतात.

यांना विचारा

" वाटल्यास या डॉक्टरांना रे डॉक्टरसमोर होते त्यांना) विचारा, त्यांचें नुक- लग्न झालें आहे. " या रानें सर्वत्र हंशा पिकला.

आढ्यो रोगी भिषग्वश्यो ज्ञापकः सत्ववानपि । हें अष्टांगहृदयकारांचें रोग्याचें लक्षण अमेरिकन दंत-रुग्णांस तंतोतंत लागू पडतें. बहुतेक रुग्ण श्रीमंत, ते वाटेल तेवढा पैसा खर्च करतात. ७ दांतांची कवळी Crown & Bridge बसविण्यास १५० डॉलर बिल झालें. रुग्णानें ताबडतोब चेक दिला. हें बिल विद्यार्थ्यांनीं केलेल्या कामावर आकारलें. खासगी डेंटिस्ट याहूनहि अधिक आकारतात ' इति श्रूयते। '

रोगी भिषग्वश्य असतो. सांगितलेल्या वेळीं हजर. कधीं तक्रार नाहीं. वाईट, वेडेवाकडे, बोलत नाहीं. अत्यंत हंसतमुख आणि कमालीचा सोशिक असतो. स्त्रिया व विशेषतः मुलें डेंटल चेअरवर किती सोशिकपणानें समाधानानें बसतात तें पाहून आश्चर्य वाटतें. इंजेक्शनें देऊन दांत काढणें किंवा दांत पोखरणें [ऑपरेशन] यावेळीं क्वचित् रुग्णांस अत्यंत वेदना होतात. डोळयांतून अश्रु गळत असतात, परंतु तोंडांतून एक शब्दहि निघत नाहीं. धन्य

अमेरिकन दंतरुग्णालयांत वै. जायदे निरीक्षण करीत आहेत.

मुळांतही केवढा संयम व शिस्त आढळते ! मुलें एकटीच (आईबापाविना) येतात व शांतपणें सर्व काम पार पडतात. अमेरिकन रुग्णांत सत्त्वभूयिष्ठता अधिक आढळतें. आपल्याकडे हीनसत्व व्यक्तीच अधिक आढळतात.

' ज्ञापकः सत्ववान् अपि ' असें म्हटलें आहे तें येथें यथार्थ वाटतें. दंतोत्पाटन कितीहि दुःखद झालें, चक्कर आली, रक्तस्राव झाला तरी रोगी शेवटीं "Thank you, very much, doctor. I am a bad patient, Excuse me " असें कृतज्ञतापूर्वक म्हणतो. "You are a very good patient " असें डॉक्टर नम्रतापूर्वक म्हणतो.

इन्जेक्शनचे दुष्परिणाम

(२) हेलन् नांवाच्या एका डॉक्टरांनीं—"Fatal Haemorrhage" नांवाचा लेख दंतवैद्यक मासिकांत [जर्नल] लिहिला असून त्यांत त्यांनीं क्वचित् इंजेक्शन देऊन दांत काढणें किती धोक्याचें असतें तें यथार्थ वर्णिलें आहे. ते म्हणतात—

" Hematomata caused by injection occur often enough to prove they are not uncommon. Then certainly anaesthetic injection becomes a serious condition, since deep tissues are enterd. " एका रुग्णास किडलेली दाढ साफ करण्याच्या तयारीकरतां इंजेक्शन देण्यांत आलें. परंतु अंतर्गत रक्तस्राव होऊन मृत्यु संभवल्याचें वृत्त नमूद करण्यांत आलें आहे. "

आपला
पां. वि. जायदे

पत्ता—
C/o Indian Embassy Chancery
Washington, D.C. U.S.A.

तृणज्योतिष्मति (नीलज्योति)
—: विकत मिळण्याची व्यवस्था :—
किं. १ तोळ्यास १ रुपया. टपालखर्च निराळा.
आयुर्वेद सेवा संघ, नासिक

जिल्हा वैद्यक अधिकाऱ्यांची भेट

रविवार ता. ११ रोजीं सकाळीं १०॥ वाजतां नाशिक जिल्ह्याचे वैद्यक अधिकारी (सिव्हिलसर्जन) डॉ. थत्ते यांनीं आयुर्वेद सेवा संघाच्या आयुर्वेद आरोग्यशाला, शुद्ध आयुर्वेद महाविद्यालय व आयुर्वेद औषधी भवन या विभागांना भेटी दिल्या बरोबर त्यांचे बंधु श्री. थत्ते वकील, येवले, हेहि होते.

सिंहस्थ कालांत येणाऱ्या रुग्णांना आयुर्वेदीय उपचार घेण्याची संधि या आरोग्यशालेमार्फत सरकारनें द्यावी, अशी विनंति सेवा संघानें या प्रसंगीं केली.

पशुवैद्यकासाठीं रिफ्रेशर कोर्स

भारत सरकारचे शेतकी मंत्री डॉ. पंजाबरा देशमुख यांनीं मुंबईत व्हेटरिनरी कॉलेजमध्यें पशु वैद्यकाच्या रिफ्रेशर कोर्सचें उद्‌घाटन केलें. अन्न शेतकी संघटनेच्या विद्यमानें हा कोर्स सुरूं करण्यां आला आहे. युरोप व अमेरिकेतले पशुवैद्यक तज् आठवडाभर चालणाऱ्या या परिसंवादांत भाग घेतील

१४ पशुवैद्यक महाविद्यालयं

डॉ. देशमुख म्हणाले कीं भारतांत सध्यां १ व्हेटरिनरी कॉलेजें असून आणखी चार लवकर सुरूं करण्यांत येतील. या कॉलेजांतून दरसाल सुमा १,००० विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यांत येते. तथा भारताला आणखी कितीतरी पशुवैद्यांची गरज आहे

पित्त-विकार (नीलज्योति)
चालूं शरद्‌ऋतूमध्यें पित्ताचे विकारांचा उपद्रव होऊं नये म्हणून व गरिबांनाहि भरपूर प्रमाणांत पित्तशामक द्रव्य वापरतां यावें या उद्देशानें सेवा संघानें मुद्दाम तयार केलेलें
उत्तम मुक्ताशुक्ति भस्म
आजच मागवून घ्या. किंमत २ रु. तोळा
आयुर्वेद औषधीभवन, नासिक

गावर पुरेसें दूध येण्यासाठीं

बाजरीची लापशी

[निवेदक-सौ. मामी ताह्मनकर, नाशिक]

माझ्या सूनबाईला पहिल्या बाळंतपणांत अंगावर फारच थोडें येत होतें. मुळींच येत नव्हतें म्हटलें चालेल.

सुनेला डोहाळ्यांचा त्रास

तिला दिवस गेल्याचें प्रकट झाल्यापासून तिला ळ्यांचा त्रास होऊं लागला व तो अगदीं प्रसूति- त चालू होता. कांहींहि पोटांत ठरत नव्हतें. ती तिशय अशक्त झाली होती. इतकी कीं तिची रूपपणें सुटका कशी होईल अशी मला काळजी ली होती. पण दोन दिवस थोडासा त्रास झाल्या- ती सुखरूपपणें प्रसूत झाली. मुलगा झाला. त्याचे काळीं साडे आठ रत्तल वजन भरलें.

मुलाचें वरच्या दुधावर पोषण

सूनबाईच्या डोहाळ्यांचा आणि त्यामुळें ल्या अशक्तपणाचा परिणाम मुलावर मुळींच झाला तरी तिच्या दुधावर झाला. मुलाचें पोषण या दुधावरच चालू होतें.

आजेसासूबाईची सूचना

यावर कांहींतरी उपाय करणें अवश्यच होतें. या सासूबाईंनीं एक उपाय करावयास सांगितलें. उपाय करून पहायला हरकत नाहीं असें डॉक्टर- बाईंनींहि सांगितलें. तो उपाय असाः—

सोपा प्रयोग

पावशेर दुधांत एक दीड चमचा बाजरीचें उकळून त्याची लापशी करायची. चवीपुरती साखर घालायची एवढेंच.

३० दिवसांत गुण

दहा बारा दिवस हें पौष्टिक दिल्यावर बाळं- स थोडें थोडें दूध येऊं लागलें. महिनाभरांत सर्व न्य आयांप्रमाणें ती मुलाला अंगावर पाजवूं लागली. सांतून एखादे वेळीं वरचें दूध घालावें लागे.

बाळंपणांतील एकुलतें एक पौष्टिक

एक गोष्ट सांगितली पाहिजे. आमच्या सूनबाईस गोड मनापासून नको. त्यामुळें इतर बाळंतिणीसारखे डिंकाचे लाडू ती खाईना. ही बाजरीच्या पिठाची लापशी हें एकुलतें एक पौष्टिक दिलें जात होतें.

चार वर्षांनंतरचा परिणाम

पुढें चार वर्षांनीं आलेल्या दुसऱ्या खेपेस सूनबाईस डोहाळे विशेष त्रासदायक झाले नाहींत. पण थोडा अशक्तपणा आलाच. पण प्रसूति विनासायास झाली आणि दूध प्रारंभापासून पुरेसें आलें. दुसरें पौष्टिक देण्याची गरज पडली नाहीं.

शुद्ध आयुर्वेद विद्यालय वृत्त

रविवार ता. ११ रोजीं सकाळीं ७॥ वाजतां शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत वैद्यराज विनायकरावजी एकतारे यांचें प्रश्नोत्तररूपानें प्रवचन झालें. विद्यार्थ्यांनीं आपल्या अभ्यासांतील शंका विचारल्या व त्यांचीं त्यांनीं उत्तरें दिलीं. 'नापृष्टः कस्यचित् ब्रुयात्' असें सुभाषित आहे, व चरकसंहितेंत हीच पद्धति आचरणांत आणलेली आढळून येते. केदारकुल्या– खलेकपोत– क्षीरदधि– न्याय, दोषांची कर्मे, अन्नरपीयूष प्राण, चय एव जयेत् दोषम् । इत्यादि प्रश्नावर त्यांनीं आपले विचार मांडले.

निदानाचीकित्सेचे प्राध्यापक

आयुर्वेद सेवा संघाच्या नियामक मंडळाच्या सभेसाठीं ते नासिक येथें आले होते. अहमदनगर आयुर्वेद महाविद्यालयांत जी. एफ्. ए. एम्. अभ्यासक्रमांतील निदान चिकित्सेचे ते प्राध्यापक आहेत.

पुणें येथें
' आयुर्वेद सेवा संघ, नासिक ' चीं
सर्व औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें २

आयुर्वेद सेवासंघाचें शुद्ध आयुर्वेद विद्यालय व आरोग्यशाला, नासिक

देणगीदारांचीं नांवें

(तारीखः— ९-८-५५ ते २१-९-५५)

१० रुपये–डॉ. बापुसाहेब थत्ते, एम. बी. बी. एस., एम्. एस्. सिव्हिल सर्जन, नासिक.

श्री. दासुभाई माजिठिया (नेहरु क्लॉथ स्टोअर्स) मातोश्रीच्या स्मरणार्थ २ पलंगपोस (किंमत १० रु.)

५ रुपये–श्री. वसंत वि. गोखले मॅनेजर महाराष्ट्र बँक नासिक. श्री. बेदमुथा वकील. श्री. अनंतराव जाखडी, श्री. मो. रा. काळे. श्री. राजाभाऊ वेलदे.

श्री. ग्यानु तुकाराम आंबेकर, नवीन लोटीभांडें (किं. ४ रु.)

३ रुपये–श्री. गंगाधर भास्कर पुजारी.

२ रुपये–श्री. द. म. जोशी, श्री. मु. ग्यानु आंबेकर, श्री; वि. का कुंभकर्ण, श्री. र. का. डांगे, श्री. वि. ह. फाळके.

१ रुपया–भैयासाहेब पांडे, श्री. रा. वा. कुलकर्णी, श्री. वि. स. देशपांडे, श्री. बा कृ. आगाशे, श्री. त्र्यं. अ. वाड, श्री. बापुसाहेब चांडवडकर.

कै. माईसाहेब बेदरकर यांचे स्मरणार्थ रु. ५० ची देणगी

यवतमाळ येथील डॉ. श्री. लीलावतीबाई लांडगे एम्. बी. बी. एस्. यांनीं आयुर्वेद सेवा संघाकडे रु. ५० चा चेक पाठविला आहे. आपल्या भगिनी कै. माईसाहेब बेदरकर यांच्या स्मरणार्थ ही देणगी दिली आहे. या पैशांतून उपयुक्त व सेवासंघाची कचेरी आहे तोवर टिकेल अशी वस्तु द्यावी व त्यावर त्यांचे नांव घालावें असें त्यांनीं सुचविलें आहे. स्तुत्य.

—व्यवस्थापक

नेत्रोपचार पथक

मुंबई सरकारचें दाक्षिण विभागांतील फिरतें नेत्रोपचार पथक येत्या आक्टोबर मध्यें कोल्हापूर जिल्हांतील पूर्व भागांत दौरा काढणार आहे.

त्यावेळीं पुढील दिवशीं त्या त्या ठिकाणीं नेत्ररोग्यांची तपासणी करण्यांत येईल. कुरुंदवाड ता. ११ शिरोळ, ता. १२, जयसिंगपूर ता. १३, हातकणंगले ता. १४, इचलकरंजी ता. १५, आणि वडगांव ता. १७.

कुरुंदवाड येथील सरकारी इस्पितळांत ता. १८ ते २५ आक्टोबर पर्यंत नेत्रोपचार शिबिर भरविण्यांत येईल.

शुद्ध लोहभस्म (वारितर) २४) सेर

काश्मीरी शिलाजित, हमारे कारखाने में प्रतिवर्ष करीब २०० मन शास्त्रविधि अनुसार शुद्ध की जाती है। भाव-शुद्ध ३२) सेर. अशुद्ध पत्थर ८०) प्रति मन, वंगभस्म ३६), प्रवाळभस्म ३२), अभ्रक बज्रभस्म ४६), कांत लोहभस्म २८), स्वर्णमाक्षिकभस्म २८), रससिंदूर ८०), स्वर्णराज बंगेश्वर ८८), मंडूरभस्म २०), शंखभस्म ७), श्रृंगभस्म १४), कपर्दिकभस्म ८), मुक्ताशुक्तीभस्म १०), गोदंतीभस्म ३।।।), चंद्रप्रभावटी २८) त्रिवंगभस्म ४८) कसीसभस्म १०) प्रतिसेर। स्वर्णसिंदूर ३) प्रतितोला।

नोटः— इन भावोंपर २० तोला से कम कोई वस्तु न भेजी जावेगी, सूचिपत्र मुफ्त।

च्यवनप्राशः– ५ सेर का २१), १० सेर का ३८), २० सेर का ६५) रु.।

काश्मीर आयुर्वेदिक वर्क्स, अमृतसर।

कांचा पत्रव्यवहार

वैद्यांसाठीं स्वस्त औषधें

“वैद्यवर्गाला लागणारी सिद्ध औषधें सवलतीनें ची आयुर्वेद सेवा संघानें योजना केली आहे ल फार आनंद वाटतो. परंतु त्याबरोबरच अशी वी सूचना करावीशी वाटते कीं सवलतीनें औषधें ावीं म्हणून कशीतरी लादावर्दी औषधें केलीं र नाहींत इकडे अवश्य लक्ष पुरवावें.

औषधांच्या किंमती

आजकाल आयुर्वेदिक औषधें तयार करणाऱ्या निराळ्या कारखान्यांच्या औषधांचीं किंमतीपत्रकें लीं आणि एकाच औषधाचे अनेक दर पाहिले जे मनांत भयंकर गोंधळ उत्पन्न होतो. उदा. र्वेद पत्रिकेच्या ता. १ जून १९५५ चे अंकांत ७३२ वर लोहभस्म [वारितर] २४ रु. शेर न जाहिरात आहे. तर सेवासंघाकडील लोहभस्म रु. तोळा म्हणजेच ८०×४=३२० रु. शेर हीच गत आणखीहि अनेक औषधांची आहे. तां यांत खरें कोणतें व किती प्रमाणांत हें ठरवावें तरी कसें ?

दरांचा गोंधळ

आयुर्वेदीय औषधांवरील जनतेची व वैद्यांचीसुद्धां श्रद्धा उडाली, त्याला जीं अनेक कारणें हेत, त्यांतील वरीलप्रमाणें दरांचा गोंधळ हें एक त्वाचें कारण आहे. सर्वसाधारण खऱ्या–खोट्याची ल ही मोलवरून केली जाते आणि वरीलप्रमाणें त जमीन-अस्मानाचें अन्तर असल्यामुळें जनताच र पण वैद्यवर्गाचीसुद्धां मति गुंग होते.

याला उपाय काय ?

याला उपाय म्हणजे दवाखान्यांत लागणारीं षधें वैद्यानें स्वतःच तयार करावीत हा होय. परंतु नानाच तें शक्य नसतें; इतकेंच नव्हे तर अशक्यच आहे. याकरितां औषधें विकत घेण्याशिवाय मार्गच उरत नाहीं.

चहा-दारूसारखीं व्यसनें

खेड्यांतील जनता आधींच दरिद्री, तशांत चहा–दारूसारखीं व्यसनें यानें अगदीं पोखरली गेली आहे. त्यामुळें पूर्णप्रमाण सुवर्ण–मालिनी–वसन्त, चतुमुर्ख, मौक्तिक भस्म, वसन्त कुसुमाकर इ० महाग औषधें ग्रामीण वैद्यवर्गाला घेतां येणें कठीण आहे. कारण तीं गरीब जनतेस देण्यास परवडत नाहींत. अर्थात् अशा वैद्यांना स्वस्त औषधें घेण्याचा मोह उत्पन्न होणें स्वाभाविक आहे.

पाठाप्रमाणें शास्त्रशुध्द औषधें

लिहिण्याचा हेतु असा कीं, पाठाप्रमाणें अगदीं शास्त्रशुद्ध औषधें तयार करून तीं शक्य तितकीं स्वस्त द्यावयाची असा हेतु असेल तर तो अभिनंदनीय ठरेल यांत शंकाच नाहीं.”

— के. व्ही. देसाई, सागवे (रत्नागिरी)

आयुर्वेद सेवा संघाचा जन्म

[१९२० सालच्या असहकारितेच्या आंदोलनांत सरकारी शिक्षण सोडून राष्ट्रीय शिक्षणाकडे आलेल्या कांहीं त्यागी विद्यार्थ्यांनीं आयुर्वेदाचें अध्ययन करून ‘आयुर्वेदाला भारताची राष्ट्रीय चिकित्सा’ हें मानाचें स्थान प्राप्त करून देण्याच्या उद्देशानें आयुर्वेद सेवा संघाची स्थापना १९२४ सालीं केली व गेलीं ३० वर्षें त्या भूमिकेवरून अखंड कार्य चालू आहे.

व्यक्तिगत स्वार्थाला स्थान नाहीं

या संस्थेंत कोणाचेंहि व्यक्तिगत भांडवल नाहीं व संस्था पब्लिक ट्रस्ट कायद्याखालीं सरकारांत नोंदलेली आहे. त्यामुळें व्यक्तिगत स्वार्थाला तेथें स्थान नाहीं. औषधांच्या ग्राहकांना औषधीकरणांतील दोष दाखविण्याचा पूर्ण अधिकार आहे. समाजांतील जाणत्या वैद्यांच्या सहकार्यानें संस्थेस आयुर्वेदाचें कार्य करण्याची उमेद आहे. —व्यवस्थापक]

बालरोगावरील होमिओपॅथिक औषधें

— नित्योपयोगी व गुणास उत्तम —

(१) **वर्म पिल्सः**— वरचेवर पोटांत कृमि अगर जंत होणाऱ्या मुलांना गुणकारी. बाटली किं. ०—१२—०

२) **स्लीप पिल्सः**— चिरचिऱ्या व स्वस्थ झोंप न येणाऱ्या मुलांना हितावह. मूल उत्तम झोंपूं लागतें व औषधाची संवय लागत नाहीं. बाटली किं. ०—१२—०

(३) **डायरीया पिल्सः**— पुष्कळ वेळां शौचास होणें, पुष्कळ दुग्धयुक्त, कधीं पातळ कधीं घट्ट, अगर फेसाळ असें शौचास होत असल्यास उत्तम उपयोग होतो. बाटली किं. ०—१२—०

(४) **ईअर पिल्सः**— कान फुटणें, दुखणें, लाल होणें, सुजणें, पूं अगर पाणी येणें इ. विकारावर. बाटली किं. ०—१२—०

(५) **स्किनो पिल्सः**— सर्व तऱ्हेच्या त्वचारोगावर उपयुक्त व प्रभावी औषध. बाटली किं. ०—१२—०

(६) **कफ पिल्सः**— सर्दी, पडसें, खोकला, वरचेवर शिंक येणें, डांग्या खोकला यांवर उत्तम औषध. बाटली किं. ०—१२—०

(७) **टॉनिक पिल्सः**— शारीरिक व बौद्धिक वाढ प्रमाणशीर न होणाऱ्या मुलांना उत्तम भूक व झोंप चांगली लागून मूल बाळसेदार होऊं लागतें. बाटली किं. १—०—०

(८) **रिकेट्स्ः**— हा रोग साधारणपणें मूल सहा महिन्यांचें झाल्यनंतर लक्षांत येतो. हाडें बारीक व मऊ, डोकें मोठें, शरीराच्या मानानें पोट मोठें, हाडांचीं टोकें मोठीं झालेलीं, टाळू नीट भरत नाहीं, डोक्यास घाम येतो, इत्यादि लक्षणें दिसूं लागतात. ह्या औषधानें असें मूल, चांगलें सुधारतें. बाटली किं. १—०—०

तज्ज्ञ डॉक्टरकडून काळजीपूर्वक चिकित्सा केली जाते.

चिकित्सा वेळः- दु. १ ते ४॥

होमिओ लॅबोरेटरी १७८ न्यू चर्निरोड,
प्रार्थनासमाज, **मुंबई नं. ४**

चहा–कांहीं शंका

लेखकः– वैद्य गणेश बाळकृष्ण कामत,
आयुर्वेदविशारद, संगमेश्वर.

साहित्याची समृद्धि अज्ञात शब्दांच्या संग्रहानें असते. त्याचप्रमाणें वैद्यकाची समृद्धि औषधां– संग्रहानें होत असते. मात्र हा संग्रह करतांना औषधाला स्वशास्त्राचा साजशृंगार देणें अवश्य तें, त्या दृष्टीनें आयुर्वेद पत्रिकेंतील वैद्य उपासनी ‘चहा’ वरील लेख चाह करण्यासारखा असून दक-महाशयांनीं वैद्यवर्गाच्या संशोधक वृत्तीला लेलें आवाहनहि अभिनन्दनीय आहे.

वैद्य गणेश बाळकृष्ण कामत

बऱ्याच अंशीं सहमत

चहासंबंधीं भुसावळ वैद्यसंमेलनांत अध्यक्ष युर्वेदाचार्य वैद्य पांडुरंगशास्त्री देशपांडे ह्यांनींहि केला होता, आणि बऱ्याच अंशीं मी च्याशीं सहमत होतो. परन्तु वै. उपासनी ह्यांच्या चनांत अनेक शंकास्थानें आढळतात.

चीनमध्यें अफूचें व्यसन

चीनमध्यें चहाबाजीचा अतिरेक असूनहि तेथील लोक जगांत काटक समजले जातात; ह्यावरून चहामुळें अपाय होत नाहीं असा निष्कर्ष जर वैद्य उपासनी काढीत असतील तर तो तर्कशुद्ध नव्हे असें मला वाटतें. कारण चहाप्रमाणेंच चीनमध्यें अफूचेंहि व्यसन आहे. मग तें व्यसनहि निर्दोष म्हणावयाचें काय ? सिद्धांत म्हणून कोणताहि निष्कर्ष स्वीकारण्यापूर्वी त्याची उलट सुलट तपासणी होणें जरूर असते. चहा सोडूनहि जर चिनी लोकांच्या काटकपणांत वाढ दिसली नसती तरच चहाच्या अत्यधिक सेवनानें अपाय होत नाहीं असा निष्कर्ष काढतां आला असता.

विधान अस्पष्ट आहे

“अरोचक, मुखपाक, दंतचाल वगैरे रोगांवर हें उपयुक्त ठरतें” हें विधानहि अस्पष्ट आहे. ह्या रोगांवर चहाचे गंडूष करावयाचे कीं चहाचा कषाय घ्यावयाचा ? ह्याचा खुलासा पाहिजे होता. त्याचप्रमाणें वरील विकारांमध्यें कोणत्या दोषांचें प्राधान्य असतांना चहाचा उपयोग होतो ह्याचाहि स्पष्ट खुलासा अवश्य होता.

गिलायुरोगावर चहाचे गंडूष

गिलायु रोगावर विशेषतः– कफपित्ताचें प्राधान्य असतांना मी चहाचे गंडूष सुचवितो व मिठाच्या पाण्यापेक्षां त्याचा उपयोग अधिक होतो असा माझा अनुभव आहे. पण तेथें फक्त रसतःच कार्य व्हावें अशी अपेक्षा असते व होतेंहि.

चहाचें वीर्य ?

चहाचें वीर्य शीत असावें हा वैद्य उपासनी ह्यांचा तर्क आयुर्वेदाच्या वीर्यकल्पनेला धक्का देणारा वाटतो. शीतवीर्य मानण्यास पुरावा म्हणून ते असें म्हणतात कीं, बल टिकविण्यासाठीं थंड देशामध्यें चहापान अवश्य असतें आणि बल टिकविणें हें शीतवीर्याचें कार्य आहे.

चहाच्या बाबतींतील वै. उपासनी ह्यांच्या वरील विधानाप्रमाणेंच मद्यपानाच्या बाबतींताहि विधान केलें जातें म्हणून मद्यहि शीतवीर्यच आहे असें मानावें लागेल.

चहा बल्य नव्हे, उत्तेजक आहे

" बलं व्यायामशक्त्या " असें सांगून चरकाचार्यांनीं बल अजमावण्याचें एक माप दिलें आहे. ह्या दृष्टीनें विचार करतांना चहाला बल्य म्हणतां येईल काय ? व्यायाम करणाऱ्या माणसाला दूध अगर मांसरस बल्य म्हणून आपण घ्यायला सांगतो. त्याचप्रमाणें चहा घ्यायला सांगतां येईल काय ? माझ्या कल्पनेप्रमाणें कोणीहि तज्ञ मनुष्य अशा परिस्थितींत चहाचा निषेधच करील. चहा बल्य नसून उत्तेजक आहे. बल्य आणि उत्तेजक ह्या दोहोंतील फरक सांगण्याची आवश्यकता वाटत नाहीं.

शीतवीर्याचे गुण कोणते ?

ल्हादनं जीवनं स्तंभं प्रसादं रक्तपित्तयोः।

हे शीतवीर्याचे गुण चहांत आढळतात काय ? उलट उष्णवीर्याचाच अनुभव येतो अशी कबुली वैद्य उपासनी ह्यांनीं दिली आहे. मग ओढून ताणून चहावर शीतवीर्य लादण्याचा हेतु काय ? शीतप्रदेशांत होतो म्हणून शीतवीर्य मानावें ह्या उपासनी ह्यांच्या मताचे निराकरण संपादकमहाशयांनीं केलेंच आहे. पण मधुर आणि कषाय रस व दूधसाखर हीं संयोगी द्रव्यें शीतवीर्यत्व सुचवितात असें म्हटलें आहे. परन्तु चहापानानन्तर शरीरांत उष्णत्वाचा अनुभव येतो ह्याबद्दल त्यांचा मतभेद नाहीं. फक्त संयोगी द्रव्यांमुळें व रसामुळें तें शीत असावें असें त्यांचें म्हणणें आहे. पण संयोगी द्रव्यावरून वीर्य ठरवीत बसलो तर अनवस्था प्रसंग येईल. कारण मग वीर्य, संयोगी द्रव्य व त्याचें प्रमाण ह्यावर अवलंबून राहील. चहामध्यें दूध, साखर, सुंठ, गवतीचहा, गुलाबकळी व मसाल्याचे विशिष्ट पदार्थांचा उपयोग केला जातो, म्हणून चहाचें वीर्य ठरवितांना चहाच्या पावडरचाच विचार करणें अवश्य आहे, सिद्ध चहाचा नव्हे.

उष्णत्वाचे निदर्शक गुण

वैद्य उपासनी ह्यांनीं चहाचें दीपन पाचन व अग्निवर्धक (धात्वग्नि) असे जे गुण दिले आहेत ते सुद्धां शीतापेक्षां उष्णत्वाचेच निदर्शक आहेत.

वातकालीं व कफकालीं उपयोग

चहाचा उपयोग वातकफाचे कालीं केला जातो. व त्याचवेळीं तो बरा वाटतो. ह्यावरूनहि त्याचें वीर्य उष्णच असावें असें वाटतें.

चहानें भूक मरते

चहाचा दीपनपाचन गुणहि शंकास्पदच आहे. जेवणापूर्वी थोडा वेळ चहा घेतला तर भूक मरते, इतकेंच नव्हे तर खूप वेळां चहा पिणाराचा अग्नि मंद असतो व चहाचें प्रमाण कमी केल्यावर अग्नि सुधारतो. ह्यावरून चहामध्यें दीपनपाचन हे गुण नसावेत. उलट तो अग्नि मंद करणाराच असावा.

चहाला अन्नमूल्य नाहीं

सप्तधातूवरील चहाचें कार्य सांगतांनाहि तो बल्य व पोषक असल्याचे वै. उपासनी म्हणतात. माझ्या कल्पनेप्रमाणें चहाला अन्नमूल्य (food value) नाहीं. मग तो पोषक कसा असूं शकेल ? तो उत्तेजक व मादक असल्यामुळें बल्य व पोषक असल्याचा भ्रम होतो.

दूधसाखरेमुळें पोषककार्य

चहाच्या पोषकत्वावर खुद्द वै. उपासनी ह्यांचाहि विश्वास नाहीं. कारण " ह्यांत साखर व दूध ज्या प्रमाणांत असेल तसें कार्य रसधातूवर होईल. " ह्यावरून वै. उपासनी ह्यांचेंहि मत असेंच असावें. असें वाटतें कीं, जर चहानें फायदा होत असला तर तो त्यांतील दूधसाखरेमुळेंच होत असावा, चहानेंच नव्हे. कारण कोणत्याहि काढ्यांत आपण साखर अगर मध घालतो. पण काढ्याच्या कार्यासाठीं ह्या प्रयोजक द्रव्यावर कधींहि अवलंबून राहात नाहीं. किंबहुना त्या काढ्याच्या गुणधर्मांचा विचार करतांना ह्या प्रयोजक द्रव्यांचा विचारच प्रामुख्यानें करावा लागत नाहीं.

दूधसाखर किती घालावी ?

मी मात्र चहामध्यें दूधसाखर अधिक घात- तें फारसा फायदा होतो असें मानीत नाहीं. ळें फार तर चहाचे दोष कमी होत असतील. दूधसाखरेच्या गुणांचा लाभ होत असेल असें त नाहीं.

रक्ताच्या विकृति ?

“रक्ताच्या विकृति नाहींशा करील.” हें विधान ष्ट आहे. विकृतींचे दोष व स्वरूप स्पष्ट होणें श्य आहे.

मांसमेदामधील क्लेदविकृति नाहींशी करील हेंहि ान अस्पष्टच आहे. आमाशयांतील क्लेदक चें कार्य चहा वाढवितो असें वै. उपासनी म्हण- , त्याप्रमाणेंच मांसमेदावर कार्य होईल काय ? द वाढवील काय ? चहाचा रस व विपाक हे क्लेद विण्यास अनुकूल आहेत काय ?

मज्जाधातूवरील कार्य

मज्जाधातूवरील चहाच्या कार्याशीं मी संपूर्णपणें त आहे.

ऊन पाणी पुंस्त्वोपघातक

चहा हा वृष्य व शुक्रवर्धक असावा ही वैद्य सनी ह्यांची शंका निरर्थकच आहे. ही शंका चें कारणहि चहाचा उत्तेजक धर्मच असावा. उपासनी ह्यांच्या मताप्रमाणें चहा वातशामकहि े, तर मग क्षीणशुक्र रोग्याला वै. उपासनी भरपूर घेण्याचा सल्ला देऊं शकतील काय ? चहाच पण नुसतें गरम .पाणीहि पुंस्त्वोपघातक अस- ची माहिती मला एका गृहस्थानीं दिली आहे. मस्तीला आला तर त्याची मस्ती कमी करण्यासाठीं सकाळच्या वेळीं गरम पाणी पाजण्याचा प्रघात असेंहि त्या गृहस्थानीं मला सांगितलें. ही माहिती ची असेल तर चहाचाहि माणसावर अनिष्ट परिणाम नसेल काय ? निदान वै. उपासनी म्हणतात त्या- इष्ट परिणाम माझ्या पाहाण्यांत तरी नाहीं.

वै. उपासनी ह्यांच्या लेखावरील माझ्या शंका मी मांडल्या आहेत. त्यांचें त्यांनीं निराकरण करावें अशी अपेक्षा आहे.

चहा उष्णवीर्य व वातकफघ्न

माझ्या कल्पनेप्रमाणें चहा हें उष्णवीर्य व वातकफघ्न द्रव्य असावें. उत्तेजकता हा त्याचा विशेष प्रभाव आहे. तथापि अग्निमांद्य करणें व पोषणमूल्य नसणें हे त्याचे दोन प्रधान दोष आहेत. चहाचा नित्योपयोग वैद्यकशास्त्राप्रमाणें निषिद्धच असावा. मात्र आयुर्वेदीय दृष्टीकोनांतून त्याचे वरीलप्रमाणें गुणधर्म निश्चित करून नैमित्तिक उपयोग अवश्य करावा.

‘ अयुक्तियुक्तः रोगाय ’ व

‘विश्रामः जीवलोकस्य चहा युक्त्या निषेवितः’।

हीं दोन सूत्रें चहाच्या बाबतींतहि लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत.

माजी विद्यार्थी संघ

महाराष्ट्र आयुर्वेद महाविद्यालय (८७ मुगभाट मुंबई नं. ४) या संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनीं संघ स्थापन केला आहे. या संघांतील वैद्य दर गुरुवारीं रात्रीं ९ वाजतां एकत्र जमून आयुर्वेदीय संहिताचें वाचन करतात. — स्तुत्य उपक्रम

पांढऱ्या चाफ्याची शेंग

सर्पविषाकरितां पांढऱ्या चाफ्याची शेंग उपयोगांत आणतात. शेंगा क्वचित् मिळतात. त्या दुधांत उकळून ठेवतात म्हणजे किडत नाहींत, टिकतात असें म्हणतात. प्रत्यक्ष प्रयोग पाहिलेला नाहीं.

पारद—बंधन

“आपण तपोवनांत राहणारी वैद्य मंडळी आहात,” तेव्हां पारद—बंधनास उपयुक्त वनस्पति अवश्य मिळवाव्या. वनस्पतीनें पारदबंधन झाल्यास भस्म करण्यास फार उपयुक्त होईल. या विज्ञानयुगांत एकादातरी रस सिद्ध होऊन पारदाची श्रेष्ठतां जगासमोर मांडली जावी अशी अपेक्षा आहे. -अ.रा. मासोदकर

आयुर्वेदाचा उद्धार कां गंडांतर ?

[१] मुंबई सरकारनें ता. ७ एप्रिल १९५५ च्या गॅझेटांत पान४४४ वर प्रसिद्धि देऊन जो कायदा ता. १ एप्रिल १९५५ पासून लागू केला आहे, त्या कायद्याचें नांव " दी ड्रग्ज ॲन्ड मॅजिक रेमिडीज ॲक्ट नं. २१।१९५४ कानूसह " असें आहे. या कायद्यांत औषधाची व्याख्या व जाहिरातीची व्याख्या दिली आहे, ती पाहतां कोणतेंहि आयुर्वेदिक औषध या कायद्यांतून सुटणार नाही. या कायद्याप्रमाणें औषधाचे गुणधर्माची जाहिरात सरकारी परवानगी वाचून करतां येणार नाहीं. तसें केल्यास तो गुन्हा घडेल व त्यास दंड व शिक्षा आहे. (कलम ७ व कानू ३ पहा).

ड्रग्ज-कन्ट्रोलरची मुलाखत

आयुर्वेद पत्रिका ता. १६।९।५५ चा अंक पान १८४ वर मे. ड्रग्ज--कन्ट्रोलर मुंबई—राज्य यांची मुलाखत दिली आहे, त्याचा विचार केल्यास प्रदररिपु, क्षयांतक अशासारख्या नांवांवरून गुणधर्म प्रगट करणारीं औषधें प्रसिद्ध करण्यासहि अडचण उत्पन्न होणार आहे.

रोगांची यादी वाढेल !

[२] सध्यां बत्तीस रोगांची यादी शेड्यूलमध्यें प्रसिद्ध झाली आहे खरी पण ही व्याप्ति अधिक वाढत जाणार नाहीं, असें नव्हे.

इंडियन फार्मासिस्ट ॲसोसिएशन—मुंबई या संस्थेनें या कायद्याबाबत सरकारशीं विचारविनिमय केली आहे. पण ही संस्था सदरची माहिती प्रसिद्ध करून वैद्यांना उपकृत करण्यास पुढें येत नाहीं. रुपये बारा देऊन संस्थेचे मेंबर झाल्यास त्या व्यक्तीला ही संस्था माहिती पुरविणार आहे.

मुंबई प्रांतिक वैद्य-मंडळ याबाबत अद्यापि स्वस्थ आहे. आयुर्वेदाचा प्रसार करून हित पाहणारीं वृत्तपत्रें व मासिकें या कायद्याबाबत विशेष विचार करीत नाहींत.

माहिती प्रसिध्द करा

[३] या कायद्यामुळें आयुर्वेदाचा उद्धार वा प्रगति होणार असेल तर अधिकृत अधिकाऱ्यांकडे अर्ज करणेचा नमुना, त्यास लागणारा स्टांप, औषधांचा नमुना व गुणदोषवर्णन शास्त्रीय आधारांसह कसें करावें ? वगैरे माहिती मुंबई प्रां. वैद्य-मंडळानें व इतर पत्रकारांनीं प्रसिद्ध करावी.

[४] या कायद्याचे कानू ७ मध्यें— अधिकृत अधिकाऱ्याकडे अर्ज करून परवानगी घ्यावी, असें आहे. या अधिकाऱ्यांमध्यें आयुर्वेदाचे तज्ञ सरकारनें नेमावें, अशी व्यवस्था व्हावयास पाहिजे; तशी व्यवस्था अद्यापि झालेली नाहीं.

आयुर्वेदीय औषधें वगळावींत

मध्यवर्ति सरकारनें १९४० सालीं नं. २३ चा ड्रग्ज-ॲक्ट मंजूर केला पण त्यांतून आयुर्वेदिक व युनानी औषधें वगळलीं आहेत. त्याचप्रमाणें या कायद्यांतूनहि आयुर्वेदिक औषधें वगळलीं जावीत, अशी खटपट वैद्य—मंडळानें व तज्ज्ञांनीं जरूर करावी.

याकडे कोणीहि लक्ष न दिल्यास हा कायदा म्हणजे आयुर्वेदावर गंडांतरच होय.

‘ आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार ’

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटीका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदीय औषधी भांडार
२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

मीं परदेशांत काय पाहिलें ?

मध्य प्रदेश अग्रगामी वैद्यमंडळ चर्चा समितींत

वैद्य श्री. एल्. टी. शाह यांचें भाषण

नागपूर येथें म. प्र. अग्रगामी वैद्य मंडळ चर्चा मितीची बैठक दिनांक २८।८।५५ रोजीं वैद्यराज गुलराजशर्मा मिश्र यांच्या अध्यक्षतेखालीं भरली . बैठकीस अनेक स्थानिक व परस्थ विद्वान् उपस्थित होते. हेलसिंकी येथें भरलेल्या जागतिक ता काँग्रेसला प्रतिनिधि म्हणून हजर राहिलेले व पली परदेशीय सफर संपवून नुकतेच भारतांत परत लेले अकोला येथील वैद्यराज श्री. एल्. टी. शाह युर्वेदतीर्थ (नगर) हे खास निमंत्रणावरून सदर

वैद्य **एल्. टी. शाह** [अकोला]

कीस हजर होते. ते इंग्लंड, राशिया, फिन्लंड, झेकोस्लोव्हाकिया इत्यादि देशांत फिरून तेथील स्वास्थ्य वैद्यकीय व्यवस्था यांच्याशीं आपला परिचय त्यांनीं न घेतला आहे. तसेंच त्यांनीं अनेक विदेशीय धन-संस्था, रुग्णालयें व स्वास्थ-केंद्रें यांना भेटी न तेथील कार्य व व्यवस्था यांचेंहि अवलोकन आहे, व त्यांत काम कारणाऱ्या कार्यकर्त्यांशीं व कान्यांशीं विचारविनिमय केला आहे. ह्या च्या माहितीचा व ज्ञानाचा लाभ उपस्थित वैद्यवर्गाला व्हावा हा त्यांना खास निमंत्रण देण्यामधील मुख्य हेतु होता. अग्रगामी वैद्यमंडळाच्या शास्त्रचर्चासमितीतर्फे वै. श्री. एल्. टी. शाह यांचें स्वागत करण्यांत आलें. उत्तरदायी भाषणांत त्यांनीं जी माहिती सांगितली तिचा सारांश खालीं दिला आहेः—

राशियामधील वैद्यकीय व्यवस्था

" राशियामध्यें ज्या प्रकारची वैद्यकीय व्यवस्था पाहण्यांत आली तशा प्रकारची व्यवस्था अन्यत्र कोठेंहि माझ्या पाहण्यांत आली नाहीं. तेथील वैद्यकीय व्यवस्था अद्ययावत्, सुसज्ज व अत्यंत तत्पर असून तिचा लाभ लहानांतील लहान खेड्यांतील माणसासहि मिळूं शकतो. खेड्यांतील एखादा रुग्ण जर शस्त्रकर्मयोग्य आढळला तर त्याची तीहि व्यवस्था ताबडतोब करण्यांत येते कीं जी व्यवस्था भारतांतील मोठ्या हॉस्पिटलमध्येंहि वेळेवर होऊं शकत नाहीं. अशा रुग्णास ताबडतोब विमानानें जिल्ह्याच्या हॉस्पिटलमध्यें नेण्यांत येतें व तेथें ह्यांच्या शस्त्रक्रियेची व्यवस्था त्वरित करण्यांत येते.

'आपण जनसेवक आहोत' ही भावना

मास्को येथील हॉस्पिटल इतकें भव्य व व्यवस्थापूर्ण आहे कीं, ज्याच्या तोडीचें हॉस्पिटल जगांत अन्यत्र क्वचितच असेल. तेथील डॉक्टर लोक आपण जनसेवक आहोत या स्वयंस्फूर्त भावनेनें वागत असतात व रुग्णांची जास्तींत जास्त व्यवस्था व शुश्रूषा व्हावी या कामीं जातीनें लक्ष देत असतात.

आयुर्वेदीय पद्धतीचें स्वेदनकर्म पाहिलें

तेथें मी एका आयुर्वेदीय अंगाची विशेष व्यवस्था पाहिली, ती म्हणजे स्वेदनकर्माची होय. आयुर्वेदशास्त्राशीं ह्या लोकांचा यत्किंचित्‌हि परिचय नसतां तेथें जें स्वेदनकर्म केलें जातें तें अगदीं आयु-

वैदीय स्वरूपाचेंच केलें जातें. तेथील अनेक रुग्णालयांत स्वेदनकर्म ही प्रमुख चिकित्सा आहे. स्वेदनाचे अनेक प्रकार मी तेथें पाहिले. कोणत्या रुग्णाला कोणतें स्वेदनकर्म करावयाचें हें प्रथम तेथें ठरविलें जातें. तेथें स्वेदनकर्म परिष्कृत स्वरूपांत होत असल्यानें त्याच्या प्रयोगांत क्लिष्टता भासत नाहीं. परन्तु हे स्वेदनकर्मप्रयोग पाहून आयुर्वेदज्ञ वैद्याला असें आश्चर्य वाटतें कीं, हे इतके स्वेदनकर्मविधि या लोकांना कोठून प्राप्त झाले? कारण कीं, त्यांतील प्रत्येक विधि हा आयुर्वेद तत्त्वप्रणालीनुसारच केलेला आढळून येतो.

‘ सर्पगंधा ’ वर संशोधन

त्यानंतर मी लेनिनग्राड येथें संशोधन–शाला पहाण्यास गेलो. त्यावेळीं तेथें सर्पगंधा वनस्पतीवर संशोधन चालू होतें. तेथील कार्यकर्त्या अधिकाऱ्यांशीं मी थोडेसें संभाषण केलें, त्यांत त्यांनीं मला असें सांगितलें कीं, ‘ सर्पगंधा वनस्पति ही मूळ प्राकृतिक स्वरूपांत अगर तिच्या भिन्न भिन्न घटकद्रव्य स्वरूपांत औषधि गुण, पूर्णपणें देते, ह्यासंबंधीं संशोधनात्मक अनुभव घेण्याचें कार्य चालू आहे. ’ ही त्यांची जिज्ञासा पाहून मी त्यांना सांगितलें कीं, आमच्या भारतीय आयुर्वेदिक चिकित्साशास्त्रांत ह्या वनस्पतीचा चिकित्साप्रयोग आज हजारों वर्षें चालत आला आहे, व जो सर्वथैव उपयुक्त आणि सुरक्षित असाच आहे. अलग काढलेलें कार्यकारी घटकद्रव्य हें थोडेंफार तरी आपत्कर होतेंच, परंतु तेंच प्राकृतिक सर्वांगामध्यें आपत्तिकर होत नाहीं. हें माझें म्हणणें त्यांनीं अत्यंत लक्षपूर्वक ऐकून घेतलें.

मातीच्या प्रयोगांनीं चिकित्सा

याशिवाय तेथें मातीच्या प्रयोगांनीं रुग्ण चिकित्सा व स्वेदनकर्महि केलें जातें अशा प्रकारचें मृत्तिका–चिकित्सा करणारें एक फार मोठें हॉस्पिटल तेथें आहे, व त्यांत अनेक प्रकारच्या रोग्यांना मृत्तिका–चिकित्सा करून पूर्ण बरें केलें जातें. विज्ञान–प्रगतीच्या बाबतींत तेथील जनता व सरकार जगाच्या मागें राहूं इच्छित नाहींत.

रशियांत धारा–कल्प

आपल्याकडे केरळ वगैरे प्रांतांत धारा-कल्प चिकित्सा विशेषत्वानें पहाण्यांत येते; परंतु रशियांत ही चिकित्सा फार मोठ्या प्रमाणांत चालू आहे. अशा चिकित्सेची फार मोठमोठीं स्वतंत्र हॉस्पिटलें तेथें आहेत व त्यांत स्वेदनकर्महि धाराकल्प–चिकित्सेनेंच केलें जातें.

संस्कृत जलांत अवगाहन

एके ठिकाणीं माझ्या असेंहि पाहाण्यांत आलें कीं, निरनिराळीं औषधें घालून संस्कृत जल तयार करण्यांत येतें व त्यांत रुग्णाला बसविण्यांत येते अगर त्या जलानें त्याच्यावर धाराकल्प करण्यांत येतो.

सांबरशिंगाचा उपयोग

सांबरशिंगाचाहि औषधि म्हणून तेथें फार मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यांत येतो.

स्वेदापूर्वी स्नेहनाची माहिती नाहीं

फिन्लंडमध्यें ‘ सावना बाथ ’ नांवाचा स्वेदन-संस्कार सर्वत्र प्रसिद्ध आहे व त्याची उपयोगिता तेथील बहुतेक सर्व लोकांना माहित आहे. परन्तु पाश्चात्य देशांत स्नेहनानन्तर स्वेदन–संस्कार केल्यास तो अधिक फलदायी होतो ही गोष्ट अद्याप ज्ञात झालेली दिसत नाहीं.

शोध कसे सुरूं करतात ?

इंग्लंड, फरान्स, रशिया इत्यादि देशांत चाललेले प्रयोग पाहिले म्हणजे असें प्रतीत होतें कीं, असे अनेक प्रयोग आमच्या आयुर्वेदाला ज्ञात आहेत परंतु त्यांचें ज्ञान अद्याप पाश्चात्य देशांना झालेलें दिसत नाहीं. तिकडील लोक वाचलेल्या अगर ऐकलेल्या गोष्टींच्या आधारावर आपले प्रयोग सुरु करतात व त्यांत यश प्राप्त झालें म्हणजे तो आपला स्वतःचा शोध म्हणून जाहीर करतात. ”

———

प्रमाणित व खऱ्या आयुर्वेदीय वनस्पति व औषधें समिति, मुंबई

[१] वैद्यांना व जनतेला प्रमाणित व खऱ्या युर्वेदीय वनस्पति व द्रव्यें मिळूं शकावीत म्हणून ठीं एखादी यंत्रणा उभारण्याचे बाबतींत विचार याकरितां व [२] अशा वनस्पति व द्रव्यें ह्यांची वड, संग्रह, संरक्षण, पुरवठा व विक्री ह्या गोष्टींना य चालना मिळावी म्हणून त्यासाठीं मार्ग व नें सुचविण्याकरितां, मुंबई-राज्य सरकारनें एक मिति नेमली आहे.

या समितीचे मंत्री

अ. ना. नामजोशी

एम्. एस्सी.

ह्या समितीनें वैद्य, आयुर्वेदयि औषधी निर्माते कारखानदार व व्यक्ती, आयुर्वेदीय वनस्पति व द्रव्यें ह्यांचे व्यापारी व जंगल अधिकारी ह्यांच्याकरितां प्रश्नपत्रिका तयार केल्या असून त्यांत वैद्यांना लागणाऱ्या औषधी वनस्पति व द्रव्यें त्यांच्या, उपलब्धीचीं ठिकाणें वगैरे बाबींच्या माहितीची पृच्छा ली आहे. संबंधित व्यक्ती व संस्थांना सदर प्रश्नपत्रिका पाठविण्यांत आल्या आहेत.

समितीचा पत्ता

ह्या प्रश्नपत्रिका इंग्लिश, मराठी, गुजराथी व नडी भार्षेत असून त्यांच्या प्रति, सेक्रेटरी, कमिटी र स्टँडर्ड ॲन्ड जेन्युइन आयुर्वेदिक हर्ब्ज ॲन्ड ग्ज, आर. ए. पोदार कॉलेज (आयुर्वेदिक), वरळी, १८ या पत्त्यावर अर्ज केल्यास मिळूं शकतील.

समितीची प्रश्नावली

[वैद्यांकरितां]

१] तुम्ही आयुर्वेदीय चिकित्सक आहा काय ?

२] आपणास लागणारीं औषधें आपण स्वतःच यार करतां काय ? (अ) सर्व (ब) अगर त्यापैकीं कांहीं.

३] आपणास लागणारीं औषधें तुम्हीच बनवीत असाल तर,

अ] [१] आपणास लागणारीं वनस्पति द्रव्यें आपण कोठून मिळवितां ?

[२] आपण राहातां त्या भागांत कोणतीं आयुर्वेदिक वनस्पति द्रव्यें विपुलतेनें मिळूं शकतील ? कृपया त्यांचीं नांवें द्या.

३] आपल्या वास्तव्यस्थानाजवळ एखादें जंगल आहे काय ? जर असेल तर कृपया त्याचें नांव व स्थान आणि त्यांत प्रभूत प्रमाणांत उगवणाऱ्या औषधी वनस्पतींचीं नांवें द्या.

ब] [१] आपणास लागणारीं अशोधित औषधी द्रव्यें आपण कांहीं काष्ठौषधी व्यापाऱ्यांकडून अगर एजंटकडून घेत असाल तर कृपया त्यांचीं नांवें व पत्ते द्या.

२] वरील इसमांकडून मिळणाऱ्या सर्व औषधी द्रव्यांच्या दर्जाबद्दल तुम्हांस समाधान वाटतें काय ?

३] ते आपणास (अ)– ताजीं व (ब)– ओलीं (अशुष्क) औषधीं द्रव्यें पुरवूं शकतात काय ?

४] सरकारनें आयुर्वेदिक वनस्पती व द्रव्यें यांची निश्चिति करून त्यांची लागवड, संग्रह व विक्री चालूं केल्यास तुम्ही त्या वनस्पती व तीं द्रव्यें सरकार पासून विकत घेण्यास अग्रमान द्याल कां ?

५] संदिग्ध अगर विवाद्य अशा आयुर्वेदीय औषधी आपल्या आढळांत आल्या काय ? आल्या असल्यास त्यांचीं नांवें द्या.

[६] संक्षिप्त वर्णनासह नैसर्गिक रंगांत आयुर्वेदीय वनस्पतींच्या चित्रांचें पुस्तक छापल्यास तें वैद्यांना वनस्पतिनिश्चितीचे कामीं उपयोगीं पडेल असें आपणास वाटतें काय ?

[७] वैद्यांना प्रमाणित व आयुर्वेदीय वनस्पती, औषधी द्रव्यें व तयार खरीं औषधें मिळण्याचें बाबतींत आपण दुसरा एखादा मार्ग अगर पद्धति सुचवूं शकता काय ?

[८] ह्या विषयासंबंधीं उपयुक्त माहिती पुरवूं शकतील अशा जिज्ञासू व्यक्तींचीं नांवें आपण सुचवूं शकता काय ? सुचवूं शकत असल्यास अशा व्यक्तींचीं नांवें व पत्ते द्या.

[९] वरील व्यतिरिक्त कांहीं सूचना करावयाच्या असल्यास त्या कराव्या.

कृपया सुवाच्य लिहा:—

आपलें नांव व शैक्षणिक योग्यता············

पत्ता············

सही·· ·········

[या विषयांतील जाणत्या मंडळींनीं आपली भाषा कळवून प्रश्नपत्रिका मागवून ध्यावी व ती भरून पाठवून समितीशीं सहकार्य करावें. संपादक]

महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळाचे सभासद व्हा आणि वैद्य संघटना बळवान् करा.

स्थायी कार्यालय—म. प्रां. वैद्य मंडळ

वैद्य बिवलकर कारंजा, नाशिक

वाचकांचा पत्रव्यवहार—

शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत प्रवेश

शुद्धायुर्वेद विद्यालयामध्यें प्रवेशाबाबत सरकारनें बऱ्याच संस्कृत परीक्षांना मान्यता दिली आहे. त्यामध्यें एस्.एस्.सी. पास अगर नापास विद्यार्थ्यांस संस्कृतमध्यें शेंकडा ४५ मार्क्स असल्यास चालतें असें पूर्वींच प्रसिद्ध केलें आहे. नवीन नियमाप्रमाणें बऱ्याच प्रौढाना 'क्ष' म्हणून एस्.एस्.सी. परीक्षेस बसतां येते.

फक्त संस्कृतचा अभ्यास

ज्याला शुद्धायुर्वेद विद्यालयामध्यें प्रवेश पाहिजे अशा विद्यार्थ्यांनें फक्त संस्कृतचा अभ्यास करून एस्. एस्. सी. च्या फक्त संस्कृतच्या पेपरला बसून चांगले मार्क्स मिळविले तर त्या विद्यार्थ्यांस नियमाप्रमाणें विद्यालयामध्यें प्रवेश दिला जातो काय ? कां इतर कांहीं विषयांचे मार्क्स पहाण्याची अट आहे.

— व. म. जोशी, कोडोलीकर



अपुरें संरक्षण

धूळ, जंतू व श्वसनाच्या इतर विकारांपासून संरक्षण मिळविण्यासाठीं कास्फो औषधि गोळ्या वापरणें इष्ट आहे. खोकला, पडसें, घशाची खवखव, ब्रॉंकायटिस इ. विकारांमध्यें कास्फो उपयुक्त आहे. आजच एक बाटली खरेदी करा. सर्वत्र मिळूं शकते.

कास्फो
खोकल्यावरील अचूक उपाय

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड,
अहमदनगर.

योजना यशस्वी करा
राष्ट्र बलशाली करा

APK. 54-3 MAB

चकांचा पत्रव्यवहार—

मुळव्याधींचे मोड

“पत्रिका ता. १६।९।५५ पान १६८ वर मुळ—धींचे मोड ‘ झडून जातात ’ असें लिहिलें आहे. वाक्प्रचार प्रचारांत असला तरी त्याला शास्त्रीय धार नाहीं. पूर्वाचार्यांनीं अष्ट महारोगांत मूळव्याध लेखून त्या रोगाचें गांभिर्य दर्शविलें आहे. धुपणी स्युकोरिया) प्रमाणें हा स्वतंत्र रोग किंवा दुसऱ्या ाद्या रोगाचें लक्षण होऊं शकतो.

नीलेचें वक्रीभवन व फुगवटी

गुदकांडांतील नीलेचें वक्रीभवन व फुगवटी णजे मूळव्याध (व्हेरिकोज हिमोऱ्हायडल व्हेन . धिराभिसरण संस्थेतील कच्चा दुवा म्हणजे नीला-मूह त्यांतील झडपांची संख्या व शक्ति बेताचीच. ा थोड्याशा कारणानें त्या जटिल होतात व स्रवू गतात. नलिा (व्हेन्स) सशक्त करून स्राव बंद रणारीं औषधें आहेत त्यानें नीला प्राकृतिक अव—स्थेंत परत येतात (क्षार चिकित्सेतील कल्केरिया लुअर व आयुर्वेदीय औषधांत बृहत्सूरण कषाय हीं औषधें गुणकारी आहेत.)

तेव्हां शास्त्रीय बैठकीवरून मोड झडणें हा ब्दप्रयोग दुष्ट असून गैरसमज करणारा वाटतो. खोखरच मोड झडले तर अतिरिक्तस्राव होऊन रोगी रणोन्मुखच होईल.” —डॉ. र. कृ. गर्दे

[डॉ. गर्दे यांनीं वरील निवेदनांत २ महत्वाची विधानें केलीं आहेत. मुळव्याधींचे मोड काढण्याचे प्रयोग त्यांनीं पाहिलेले दिसत नाहींत. मद्रासी वैद्य हे प्रयोग करतात. उमरावती-मूर्तिझापूर येथील सहस्रबुद्धे आडनांवाचे कांहीं गृहस्थहि या कामांत वाकबगार म्हणून प्रसिद्ध होते असे आम्हांस माहित आहे. अलिकडे असले प्रयोग मुंबई--पुण्यासारख्या शहरांतून दिसत नसले तरी हैद्राबाद सारख्या राज्यांत सांपडतात. पत्रिकेच्या वाचकांपैकीं ज्यांना मुळव्याधींचे मोड काढण्याचे तंत्र माहित असेल त्यांनीं ते पत्रिकेकडे लिहून पाठवावें. अगर पाहिलेली माहिती निवेदन करावी.

रुधिराभिसरणांतील कच्चा दुवा हा शब्दप्रयोगहि अयोग्य वाटतो. तो दुवा जर पक्का केला तर मेंदूवर त्यापासून अनेक वाईट परिणाम घडण्याची शक्यता आहे. कच्चा या शब्दाऐवजी नाजूक पण महत्वाचा असा शब्दप्रयोग इष्ट होईल. विजेच्या व्यवहारांत ज्याप्रमाणें फ्यूज वायरचें महत्व त्याचप्रमाणें या नाजुक वाहिन्यांचें महत्व शरीरास आहे.

—संपादक]

बोर्ड व फॅकल्टी सभा

नव्या आयुर्वेद व युनानी वैद्यक बोर्ड व फॅकल्टीच्या सभा ता. २९।९।५५ रोजीं मुंबई येथें वै. पं. शिवशर्मा यांच्या अध्यक्षतेखालीं भरल्या होत्या.

नव्या बोर्डांत अगर फॅकल्टींत एकहि डॉक्टर नाहीं याबद्दल सरकारचें सर्वत्र अभिनंदन होत आहे. मुंबई राज्य वैद्य मंडळाच्या चळवळीचा हा १००टक्के विजय आहे.

रुग्णालयांतील रजिस्ट्रार

नवीन पास झालेल्या हुषार वैद्यांना रुग्णालयांत अधिक अनुभवासाठीं साहाय्यक वैद्य म्हणून वर्ष-सहा महिन्यासाठीं नेमतात, त्यांना रुग्णालयीन परिभाषेंत ‘साहाय्यक वैद्य’ (रजिस्ट्रार) म्हणतात. यांना मासिक ५० रु. अभ्यासवृत्ति मिळते. सेवा संघाच्या रुग्णालयांत असे रजिस्ट्रार नेमावयाचे आहेत.

साहाय्यक हिशेबी कारकून

सेवा संघाच्या वाढत्या हिशेबी कामासाठीं एका साहाय्यक हिशेब कारकूनाची आवश्यकता आहे. योग्य पदवीधर उत्साहि हिशेबनीसाचा अर्ज आल्यास त्याचाही विचार होईल. —मंत्री, आयुर्वेद सेवा संघ

मुंबई राज्य वैद्य मंडळ (फेडरेशन)

मुंबई राज्य वैद्य मंडळाच्या कार्यकारी मंडळाची सभा बुधवार ता. २८।९।५५ रोजीं दुपारीं ठीक ३॥ वाजतां श्रीधूतपापेश्वर प्रासादांत भरली होती. सभेस बोर्डाचे-फॅकल्टीचे सरकारनियुक्त व वैद्य-निर्वाचित कांहीं सदस्य खास निमंत्रणावरून उपस्थित होते. या सभेंत आसवारिष्टावरील निर्बंध, अंदाजपत्रकांत आयुर्वेदावर खर्च, अध्यापक शिक्षण योजना, दवे कमिटी प्रश्नावली, इत्यादि अनेक प्रश्नांवर चर्चा झाली. सभेचा विस्तृत अहवाल पुढील अंकीं.

आयुर्वेद पार्लमेंटरी बोर्ड

आयुर्वेद–युनानी बोर्ड व फॅकल्टीच्या सदस्यांना वेळोवेळीं मार्गदर्शन करण्यासाठीं मुंबई राज्य वैद्य संमेलनानें नेमलेल्या पार्लमेंटरी बोर्डाची सभा दुपारीं २ वाजतां श्रीधूतपापेश्वर प्रासादांत भरली होती.

अंदाजपत्रक समिति

मुंबई राज्याच्या येत्या अंदाजपत्रकांत आयुर्वेदावरील आवश्यक खर्चाबद्दल योग्य ती तरतूद व्हावी या दृष्टीनें विचारविनिमय करून सरकारला तशी कल्पना देणारी एक योजना सादर करण्याकरितां मुंबई राज्य वैद्य संमेलनाच्या कार्यकारी मंडळानें एक समिति नेमिली आहे.

या समितींत सर्व वैद्य प्रतापकुमार, माधवशास्त्री जोशी, नाटोलीकर, अ. वि. गदग, सोमेश्वर भट्ट, श्रीरामशर्मा व वि. म. गोगटे हे सदस्य असून वैद्य गोगटे नाशिक हे तिचे निमंत्रक आहेत.

या समितीनें आपला अहवाल एक पंधरवड्यांतच सादर करावयाचा असल्यानें सर्व आयुर्वेदीय संस्था, मान्य गुरु आदि सर्वांनीं आपापल्या सविस्तर योजना वै. वि.म. गोगटे स्फूर्ति वकीलवाडी, नाशिक यांचेकडे आठ दिवसांत पोंचतील अशा बेतानें पाठवाव्यात.

मधुमेहावरील उपयुक्त वनौषधी
तेलिया असाणा
यापासून तयार केलेलें शास्त्रोक्त सिध्द औषध
असनादि अयस्कृति (असनासव)
(वाग्भट चिकित्सा अध्याय १२, श्लोक २९-३२ पहा)
आतां सर्वत्र मिळू लागलें आहे व तें गुणकारी आहे असा अनुभव आला आहे. ज्यांना रोजच्या रोज असाणा भिजविणें जमत नाहीं त्यांच्यासाठीं हें अधिक सोईस्कर आहे. शिवाय त्यांत असनादि गणांतील बऱ्याच वनस्पति व लोह असल्यामुळें अधिक गुणकारी आहे. मधुमेह, मूळव्याध, पांढरेकोड, त्वचारोग, अरुचि, कृमि, पांडुरोग, ग्रहणीरोग व लठ्ठपणा यावर याचा उपयोग ग्रंथांत दिला आहे. २० तो. १॥ रु.
आयुर्वेद औषधी भवन, नासिक

युर्वेद व युनानी-बोर्ड मुंबई

सरकारनियुक्त अध्यक्ष व सभासद

अध्यक्ष

पं. शिवशर्मा आयुर्वेदाचार्य, मुंबई २६

सरकारनियुक्त सभासद

दत्त जादवजी आचार्य, डी. ए. एस्. एफ्.
[वै. यादवजी त्रिकमजींचे चिरंजीव] मुंबई २
रय्या राचैया हिरेमठ भिषग्वर, विजापूर
वशास्त्री जोशी आयुर्वेदाचार्य, पुणें २
शास्त्रींचे चिरंजीव] मंत्री.म.प्रां.वैद्यमंडळ पुणें
रिदत्तशास्त्री) डॉयरेक्टर ऑफ् आयुर्वेद, मुंबई
मिर्झा हैदर बेग, मुंबई ३

निवडून आलेले सभासद

गाप्पा वीरप्पा गदग भिषग्वर, बेळगांव
दप्रसाद हरिदास आयुर्वेदाभिषक् ,अहमदाबाद
गोपालसिंग रामासिंग कलेरा, मुंबई ४
वंत धोंडो नाटोलीकर, कागल, जि. कोल्हापूर
पकुमार पोपटभाई, मुंबई २
ल्य ब्रम्हदत्तशर्मा प्रभुदयाळ आयुर्वेदाचार्य
भुसावळ, पू. खा.

— — — —

ुर्वेद व युनानी फॅकल्टी, मुंबई

सरकारनियुक्त अध्यक्ष व सभासद

अध्यक्ष

पं. शिवशर्मा, आयुर्वेदाचार्य, मुंबई २६

सरकारनियुक्त सभासद

नंताचार्य आद्य, विजापूर
मो. य. लेले) प्रि. पोदार,
मेडिकल कॉलेज [आयुर्वेदिक] मुंबई १८
रायण हरी जोशी आयुर्वेदविशारद, मुंबई ४
रिदत्तशास्त्री) डायरेक्टर ऑफ् आयुर्वेद, मुंबई
देवसिंग रामासिंग, मुंबई ४
भराम
अहमदाबाद ७

अनुक्रमणिका

५ वर्षांचा आयुर्वेदप्रधान अभ्यासक्रम १९७
आयुर्वेदांतील अमोल पारदौषधींचें संशोधन १९९
मक्याच्या कणसाची शेंडी २०४
महारुख २०५
महारोगासंबंधींचा एक उपेक्षित दृष्टिकोन २०७
सुवर्ण जलविद्राव्य आहे कां ? २११
सुवर्ण हिणकस होतें काय ? ११२
लहान मुलांत दांत किडण्याचें प्रमाण अधिक २१३
दंतवैद्य जायदे यांचीं पत्रें २१३
वैद्यांसाठीं स्वस्त औषधें २१७
चहा-कांहीं शंका २१९
आयुर्वेदाचा उद्धार कां गंडांतर ? २२२
मी परदेशांत काय पाहिलें ? २२३
प्रमाणित औषधें समिति-प्रश्नावली २२५
मुळव्याधीचे मोड २२७

निवडून आलेले सभासद

वै. धोंडो सदाशिव अंतरकर डी. ए. एस्. एफ्.
मुंबई १८
वै. भास्कर विश्वनाथ गोखले आयुर्विद्यापारंगत पुणें२
वै. काशिनाथ शंकर करंदीकर आयुर्वेदतीर्थ,
अहमदनगर.
वै. कृष्णाजी वामन कुलकर्णी आयुर्विद्यापारंगत पुणें २

याशिवाय बोर्डाच्या सभासदांनीं आपल्यातील २ सभासद निवडून फॅकल्टींत पाठवावयाचे व फॅकल्टीनें आपल्यातील २ सभासद निवडून बोर्डांत पाठवावयाचे आहेत. म्हणजे दोन्हींतहि एकूण १४।१४ सभासद (अध्यक्षासह) होतील.

ताज्या वनस्पति

आमच्याकडे सर्व ताज्या औषधी वनस्पति व ब्राह्मी मिळेल.

काशिनाथ नथुराम टावरी
८१२ उमामहेश्वर गल्ली, नाशिक

सिव्हिलसर्जन यांचा अभिप्राय

“ आज नासिक येथील आयुर्वेद आरोग्यशाला, आयुर्वेद औषधीभवन व शुद्ध आयुर्वेद विद्यालय या आयुर्वेद सेवा संघानें चालविलेल्या संस्थांना भेट दिली. आयुर्वेद सेवा संघ ही संस्था रजिस्टर्ड पब्लिक ट्रस्ट असून त्यांतील कार्यकर्ते वैद्य अत्यंत त्यागपूर्वक काम करीत आहेत. आयुर्वेदीय औषधें अतिशय शुद्ध व उत्तम रीतीनें तयार करण्याकडे संस्थेची दृष्टि पाहून समाधान वाटलें. आयुर्वेद संशोधन करण्याकडेहि संस्थेचें विशेष लक्ष आहे ही गोष्ट फार चांगली आहे.

३० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत

आयुर्वेद विद्यालयांत सध्यां ३० विद्यार्थी शुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण घत आहेत. रुग्णालयांत १५ इन्डोअर पेशण्ट्सची व्यवस्था आहे. त्यांतच ३ बाळंतपणांची सोय आहे.

सर्व संस्थांचें काम पाहून समाधान वाटलें. अशा संस्थेस सर्वांकडून उत्तेजन मिळावें व सर्वांनीं सक्रिय सहानुभूति दाखवावी अशी विनंति आहे.

सही — (डॉ) ल. ग. थत्ते

११-९-५५

सिव्हिलसर्जन, नासिक

आपण कोणतें शक्ति-स्फूर्तिवर्धक घ्यावें ?

च्यवनप्राश, सुवर्णमालिनीवसंत हीं पौष्टिक औषधें सोसत नाहींत, म्हणून लोक प्रवाळभस्म (चंद्रपुटी), गुलकंद, मौक्तिकभस्म इ. घेतात; पण त्यांहिपेक्षां गुणकारी असा पित्तप्रकृति लोकांनीं घेण्याजोगा अवलेह आयुर्वेद सेवा संघानें तयार केला आहे. त्याचें नांव

अश्विनीप्राश

[ज्यांना अवलेह पसंत नसेल त्यांनीं
दुधांतून कूष्मांडशर्करा घ्यावी]

शरद् ऋतूंत पित्तदोषामुळें माणसाचें बल कमी होतें. व दुर्बलतेनें अनेक विकार उद्भवतात. ते विकार होऊं नयेत व बल टिकावें यासाठीं रोज सकाळीं अगर रात्रीं १ तोळा अश्विनीप्राश घ्यावा, व वर थोडें दूध घ्यावें, हें हिताचें आहे. क्षयरोग जडू नये यासाठीं अश्विनीप्राश हा एक शक्तिवर्धक प्रतिबंधक उपाय आहे. किं. २० तो. २ रु.

आयुर्वेद औषधी भवन, नासिक

संपादक व प्रकाशक — वैद्य [illegible] पंडित, आयुर्वेद [illegible], वैद्य विवलकर कारंजा, नाशिक
मुद्रक — श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, नाशिक.

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

12 [illegible] ल पत्रिका

गुरुकुल कांगड़ी पुस्तकालय

आयुर्वेद पत्रिका

वर्गणी (२४ अंक) ६ रु.
१ अंकाची किंमत ४ आणे
(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

९ वें) नासिक, ता. १६ ऑक्टोबर १९५५ (अंक ८ वा

"ॲलोपॅथिक हॉस्पिटल्स फार खर्चाचीं!"

— ना. मुरारजी देसाई

मंगळवार दि. २७-९-५५ रोजीं सकाळीं ८ वाजतां पुणें येथील अष्टांग आयुर्वेद विद्यालय, पुणें, या संस्थेस मुख्य मंत्री ना. मुरारजीभाई देसाई यांनीं भेट दिली. याप्रसंगीं संस्थेला मार्गदर्शन करतांना ते म्हणाले "ॲलोपॅथिक हॉस्पिटल्स फार खर्चाचीं होतात. त्यामुळें सरकारला जनतेच्या गरजेइतकीं हॉस्पिटल्स काढणें कठीण जातें. उलट आयुर्वेदाचीं हॉस्पिटल्स अल्प खर्चांत चालूं शकतात. कारण चांगला वैद्य त्याच्या जवळपास मिळणाऱ्या वनस्पतींचाच रोगपरिहाराकडे उपयोग थोड्या पैशांत करूं शकतो.

एखाद्या साध्याचीं अनेक साधनें असूं शकतात. रोग-परिहार हें साध्य धरल्यास त्याचींहि साधनें, मार्ग, आयुर्वेद, ॲलोपॅथी वगैरे अनेक आहेत. इंग्रजांचें राज्य असतांना त्यांनीं ॲलोपॅथीला फारच महत्व दिलें, तिला उत्तेजन दिलें. ॲलोपॅथीचा अभ्यास केलेले लोक त्यांना आयुर्वेदाचें ज्ञान नसल्यामुळें ॲलोपॅथीशिवाय रोगपरिहाराचा दुसरा मार्गच ही असें म्हणूं लागले. तसेंच कांहीं वैद्य लोकहि आयुर्वेदाशिवाय रोगपरिहाराचें दुसरें साधनच ही, असें त्यास ॲलोपॅथीचें ज्ञान नसल्यामुळें म्हणूं लागले. पण खरें पाहतां या दोन्ही विचार-णींत अज्ञान हेंच खरें कारण आहे.

मला कोणाला दोष द्यावयाचा नाहीं. पण आयुर्वेद हें शास्त्र नाहीं असें म्हणणारे लोक युर्वेद' शब्दाचाच विचार करीत नाहींत. आयुर्वेद पॅथी (पंथ) नसून तें सांगोपांग (संपूर्ण) शास्त्र हे. इतर वेदाप्रमाणेंच आयुर्वेदाचा ज्यांना साक्षात्कार झाला, ते ऋषी होते. त्यांनीं अनेक

अध्ययन केलें, संशोधन केलें व मोठी तपश्चर्याहि केली. त्याचें फळ म्हणजेच आयुर्वेदशास्त्र होय. तें परिपूर्ण आहे. प्राणिमात्राला दीर्घ जीवित व आरोग्य देण्याला समर्थ आहे.

प्राचीन पध्दतीनें विद्यादान करा

खरा गुरु तोच कीं, जो आपल्या विषयाच्या अभ्यासांत आमूलाग्र प्रवेश करून देतो. आपल्या विषयाचें अध्ययन अगर अध्यापन करीत असतांना द्रव्यप्राप्ति किती होईल इकडे तो लक्ष कधींच देत नाहीं. शास्त्रसेवा हाच धर्म समजून विषयाचें चिंतन आणि प्रतिपादन तो करीत जातो. ह्या गुरूंना विद्यार्थ्यांची वाण कधींच पडणार नाहीं. व असेच गुरु आयुर्वेदाला त्याचें पूर्वीचें स्थान प्राप्त करून देतील.

सरकारनें हा शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम सुरू केल्यानंतर गुरुकडून पैशाची मागणी सुरू झाली. पण मला आश्चर्य वाटतें कीं, यांना पैशाची जरूरी काय ? आपला व्यवसाय करून शिष्यांना ज्ञान देणें, चांगले समाजोपयोगी वैद्य निर्माण करणें हें प्राचीन पद्धतीप्रमाणें सहजशक्य आहे. कार्य चांगल्या पद्धतीनें सुरू झालें म्हणजे सरकार पैसा खर्च करणार नाहीं असें नाहीं. पण मला असें सुचवायचें आहे कीं, पैशाकरितां कामें न करतां समाजोपयोगी कार्य करा, म्हणजे पैसा आपोआप प्राप्त होईल.

शारीरिक व्यायाम व बौद्धिक परिश्रम

विद्यार्थ्यांना उपदेश करतांना प्रधानमंत्री म्हणाले कीं, तेंच खरें सुख कीं, जें भावी आयुष्यांत जीवन सुखकर करतें. तुम्हीं यावेळीं व्यायाम करून शरीरसंपदा मिळविलीत व अभ्यास करून ज्ञानप्राप्ति करून घेतलीत तर तुमचें भावी जीवन सुखकर होईल. पण सुखाच्या राजस कल्पनेनें यावेळीं शारीरिक श्रम अगर विद्याभ्यासाचे कष्ट दुःखकारक समजून वागलांत तर सर्व आयुष्य उभय दृष्टीनें दुःखप्रदच होईल.”

२४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत

प्रारंभीं आयुर्वेद शिक्षण मंडळाच्या कार्यकारी मंडळाचे व्हाईस चेअरमन श्री. एस. एम्. ऊर्फ नानासाहेब दातार व महाविद्यालयाचे प्रधानाध्यापक वैद्यराज हरिभाऊ परांजपे यांनीं संस्थेतर्फे त्यांचे पुष्पहार व पुष्पगुच्छ समर्पण करून स्वागत केलें. या प्रसंगीं अन्न उपमंत्री श्री, वि. कृ. साठे, मंडळाच्या कमिटीचे सदस्य श्री. वि. ना. दाते, रुग्णालयाचे सल्लागार गुरुवर्य हरिशास्त्री साने, डॉ. आर. जी. भिडे, तसेंच श्री. कर्डिले, पटवर्धन वगैरे सद्‌गृहस्थ, अध्यापक वर्ग व विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.

वैद्य परांजपे यांनीं आ. शि. मंडळाचे कार्याचें निवेदन केलें. शुद्ध व आयुर्वेद शिक्षणक्रमाच्या तात्त्विक व प्रत्यक्ष शिक्षणाच्या सोयी दाखविल्या. जून १९५४ मध्यें ११ विद्यार्थ्यांना व जून १९५५ मध्यें १३ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत आला. अध्यापनाचें कार्य ८ विद्वान् वैद्य व तीन पंडित निर्वेतन करीत असतात.

आयुर्वेदीय रुग्णालयाची आवश्यकता

१० नोव्हेंबर १९५५ रोजीं सुरू होणाऱ्या शुद्ध आयुर्वेद कोर्सच्या सीनिअर वर्गाकरितां –आयुर्वेदीय रुग्णालयाची अत्यंत आवश्यकता आहे व ती योजना मंडळाकडून ताबडतोब २२९ सदाशिव पेठ वैद्य बिल्डिंग, येथें करण्यांत येत आहे. तसेंच ८१४ सदाशिव पेठ, पुणें येथें भिडे मेमोरियल राधाकृष्ण आयुर्वेदिक हॉस्पिटल ट्रस्ट मध्यें या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनीं रुग्णालयीन प्रत्यक्ष शिक्षण देण्याची तरतूद केली आहे. अलिकडे दि. २१ मार्च १९५५ रोजीं सरकारकडे संस्थेतर्फे आर्थिक सहाय्यासंबंधीं निवेदन करण्यांत आलेलें आहे. व त्याचा सहानुभूतिपूर्वक विचार चालू असल्याचें सरकारकडून कळविण्यांत आलें आहे.

अथर्ववेदांतील कांहीं ऋचांचा इंद्रियविज्ञानाच्या दृष्टीनें विचार

[लेखकः- वै. **गोविंद हरी मराठे,** आयुर्वेदतीर्थ, ग्वाल्हेर]

जगांत वंदनीय ठरलेल्या चार वेदांत अथर्ववेदाची चतुर्थ वेद म्हणून गणना होते. ब्रह्मापासून वेदाची उत्पत्ति झालेली आहे असा महर्षि व्यास प्रभृतींचा सिद्धांत आहे. आणि ब्रह्माचें यथावत् ज्ञान होण्यास वेद हेंच एक साधन होय, ह्याविषयीं सर्व ऋषींचें एकमत आहे. ब्रह्मदेवानेंहि सर्व जगत् वेदांपासून निर्माण केलेलें आहे आणि वेदच अभ्युदय व मोक्ष प्राप्त होण्याचें मुख्य साधन आहेत. असो. (१) मुण्डकोपनिषदामध्येंहि ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद असा क्रम आहे. बृहदारण्यकामध्यें 'अस्य महतो भूतस्य निश्वसितमेतद् यद् ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्वांगिरसः इति। असेंच म्हटलें आहे.

—लेखक—

(२) तस्मात् यज्ञात् सर्वहुतः ऋचः सामानि जज्ञिरे। छन्दांसि जज्ञिरे तस्मात् यजुस्तस्माद् अजायत ॥

(३) 'यस्मादृचोऽपातक्षन् यजुर्यस्मादपाकषन् । सामानि यस्य लोमानि अथर्वाङ्गिरसो मुखम् स्कम्भं तं ब्रुहि कतमः स्विदेवसः ॥ [अथर्ववेद १०-७-२०]. उपरोक्त तिन्ही मंत्रांत घातलेल्या छन्दस किंवा अथर्वाङ्गिरस या पदानीं अथर्ववेदाचाच बोध होतो. 'ऋग्वेदादयः प्रायः परलोकहितार्थं वदन्ति तेन पुण्याः' इ. असें जरी म्हटलें असलें, तरी पंचमहाभूतात्मक जो शरीरि-पुरुष त्याचें धातुसाम्य इहलोकांत राहिलें पाहिजे. या दृष्टीनें, पुण्यतमश्चायुर्वेदो यद् यस्मान्मनुष्याणाम् उभयोरपि लोकयोर्यहितम् आयुरारोग्यसाधन धर्मसाधनं च वक्ष्यते,' आणि म्हणून 'तेनातिशयेन पुण्यतमस्तथा वेदविदां पूजित इति।' त्याचप्रमाणें 'जीवितप्रदातृत्वादायुर्वेदस्य पुण्यतमत्वं बोद्धव्यं, अत्रायत्तम् ऐहिकम् आमुष्मिकं च श्रेयः'। वरील उताऱ्यावरून अथर्ववेदाचें उपाङ्ग असलेल्या आयुर्वेदाचें महत्त्व लक्षांत येतें. व्यवहारांत अथर्ववेदाचीं सात नांवें ऐकूं येतात, त्यांचीं नांवें यथाक्रम आहेत. अस्य श्रीमतोऽथर्ववेदस्य १ अथर्ववेदः (२) ब्रह्मवेदः (३) अङ्गिरोवेदः इति शतपथे, १३।४।३।८, (४) अथर्वांगिरस वेदः, २०।७।२०, (५) भृग्वंगिरसो वेदः इति गोपथे. (६) क्षत्रवेद इति शतपथे १४।८, भैषज्यवेद इत्यथर्ववेदे ऋचः सामानि भेषजा। यजूंषि होत्राब्रूम [११।६।१४] इत्यत्र.

अमीषां ह्यथर्वादीनां नामधेयानां निर्वचनानि गोपथादि ब्राह्मणग्रन्थेषु निरुक्तादिषु च बहुशः उपलभ्यन्ते। यथा "अथर्वाणोऽथर्वणवन्तः। थर्वतिश्चरातिकर्मा तत्प्रातिषेधः।" इति निरुक्ते.

तपःसामर्थ्यानें अतींद्रियत्व प्राप्त होतें

यास्कीयनिर्वचनेन चित्तवृत्तिनिरोधात्मकः समाधिरूपश्चित्तस्थैर्यसाधको योगो लक्ष्यते। गोपथीय व्युत्पत्त्या तु समीपस्थास्यात्मनोऽर्वागेवान्वेषणं भवितुं योग्यमिति सूच्यते। श्रूयन्ते चैतयोर्निरुक्त्योरनुगतार्थतापर्यायकाः केचिन्मंत्राः अस्मिन्वेदे यथा—श्रेष्ठो हि वेदस्तपसोऽधिजातो ब्रम्हज्ञानां हृदये संबभूव ॥ [गो.ब्रा.१।९] एतद्वै भूयिष्टं ब्रह्म यद्भृग्वंगिरसः। योंऽगिरसः स रसः। येऽथर्वाणस्तद्भेषजम्। यद्भेषजं तदमृतम्।

यदमृतं तद्ब्रह्मं इ. (गो. ब्रा. ३।४). वेदाची–ज्ञानाची प्राप्ति ब्रह्मवेत्यांना झाली ती केवळ [तपसा आधिजातः] achieved through meditation or contemplation & experiments. तपःसामर्थ्यानें हृदयगव्हरांत किंवा मस्तिष्कांत प्रकाश पडून झाली. योगसूत्रांत तपाचें फल स्पष्टच सांगितलेलें आहे. ‘ तपः समभ्यस्यमानं चेतसः क्लेशादि लक्षणो शुद्धिक्षयद्वारेण कायेन्द्रियाणां सिद्धिमुत्कर्षमादधाति । “ चान्द्रायणादिना चित्तक्लेशक्षयस्तत्क्षयादिन्द्रियाणां सूक्ष्म–व्यवहित - विप्रकृष्ट–दर्शनादि सामर्थ्यमाविर्भवति । कायस्य यथेच्छमणुत्त्व - महत्वादीनि ॥४३॥ अशा प्रकारें तपःसामर्थ्यानें अतीन्द्रियत्व प्राप्त होतें. अतीन्द्रियत्व प्राप्त होण्याकरितां आवश्यक असलेल्या चित्तवृत्ति–निरोधाला योग म्हणतात. ‘ योगः कर्मसु कौशलम् । ’ हें योगाचें कर्मकुशलत्व ज्या महर्षींना प्राप्त झालें त्यांनीं पुढील मन्त्रांत आजच्या अद्ययावत् उपकरणसंपन्न शास्त्रज्ञांनाहि थोडे विचार करावयास लावून स्तम्भित करणारें इन्द्रियविज्ञान सांगितलें आहे, तें असें:—

हृदय व मास्तिष्क यांचें सामंजस्य

मूर्धानमस्य संसीव्य अथर्व हृदयं च यत् । मस्तिष्कादूर्ध्वः प्रैरयत् पवमानोऽधिशीर्षतः ॥ २६ ॥ तद्वाथर्वणः शिरो देवकोशः समुब्जितः । तत्प्राणो अभिरक्षति शिरो अन्नमथो मनः ॥ २७॥ उर्ध्वो नु सृष्टास्तिर्यङ् नु सृष्टाः सर्वा दिशः पुरुष आबभूव पुरं यो ब्रह्मणो वेद यस्याः पुरुष उच्यते ॥२८॥ अथर्व, (१०।२।२६–२८) इत्यादिषु मन्त्रेषु प्राणनिरोधपूर्वकेण हृदयमास्तिष्क-सामञ्जस्यानुष्ठानेन ब्रह्मपुरःप्रवेशनं सुस्पष्टं समाम्नातम् ।

अर्थ आणि मूळ आशयः —(अथर्वा) प्रजापति किंवा परमेश्वरानें (अस्य) या पंचमहाभूत शरीरि समवायी–पुरुषाचे (entity–human being) (मूर्धानम्) शिरोब्रह्मास - मास्तिष्कास आणि (हृदयं च) हृदयास (संसीव्य) शिवून–संबंध जोडून (यत्) जेव्हां (मास्तिष्काद्) मस्तिष्कापासून (ऊर्ध्वः) वर आणि (शीर्षतः) सर्वांच्या वर होऊन म्हणजे वरिष्ठत्वानें–वर्चस्वानें (पवमानः) प्राणवायु स्वरूपानें, स्वयं समस्त देहाला (प्रैरयत्) गति दिली आहे.

सारांश — त्या परमेश्वरानें हृदय आणि मस्तिष्क यांच्यांत विशिष्ट प्रकारचें सामञ्जस्य ठेवून सर्व शरीराचीं सूत्रें प्राणाकडून चालविलीं आहेत.

मस्तिष्कांतील पाण्याचें कार्य

(२) [वा] त्याचप्रमाणें (अथर्वणः) प्रजापतीनें (अस्य) या पुरुषाचें तयार केलेलें (तत्) तें (शिरः) मस्तिष्क (encephelon) (च) (देवकोशः) देवकोश=इंद्रियांचें मूल आवरण किंवा उगमस्थान (समुब्जितः) शरीराच्या बरोबरच क्रमशः उत्पन्न झालेलें आहे–केलेलें आहे. (तत्) त्या (शिरः) मस्तिष्काला (प्राणः) प्राणवायु–प्राणोऽमूर्धगः प्राणाकडून (अभिरक्षति) सर्व प्रकारें - सर्व दृष्टीनें रक्षण करतो आणि [अन्नम् अथो मनः) त्याचप्रमाणें अन्न=Nutriment आणि मन Self Consciousness= विवेक हे देखील त्याचें रक्षण करतात.

सारांश — परमेश्वरानें सर्व इंद्रियांचें नियमन करणारें हें मस्तिष्क सर्व शरीराबरोबरच निर्माण केलें आहे. त्या इंद्रियाच्या संचालन करणाऱ्या केन्द्रास प्राणवायूची फार आवश्यकता असते, आणि तो भरपूर मिळावा म्हणून तो तेथें पाणी या स्वरूपांत असतो. कारण सर्व धातूंचें तर्पण करणारा जो आद्य रस त्याच्याशीं तद्रूप होऊन राहाणें त्याला सोपें जातें. मस्तिष्कांत असलेला हा जलाशय अगदीं स्वच्छ, पारदर्शक आणि क्षारस्वभावी असतो, आणि जीवनीय म्हणण्याचें कारण तो स्नेहन, तर्पण आणि धारण, हीं कार्यें अविरत करीत असतो. त्यांच्यांत विकृति आली असतां सर्व इंद्रियें व्याकूळ [विकल] होतात.

सकल ब्रह्माचें यथार्थ ज्ञान

[३] (पुरुषः) पुरुष— पञ्चमहाभूतात्मक आत्मा–शरीरं च (नु) काय (ऊर्ध्वः) उच्च म्हणजे ुष्ययोनीपेक्षां श्रेष्ठ अशा योनींत [सृष्टः] उत्पन्न केला - झाला किंवा [तिर्यङ्ङ नु] इतर योनींत [सृष्टः] न्न झाला किंवा [सर्वादिशः] सर्व दिशांत सगळीकडे, सर्व योनींत [पुरुषः] पुरुष [आ–बभूव] प्रकट ा–उत्पन्न झाला, या संबंधीं जे तर्कवितर्क मनांत येतात ते [यः] जो विद्वान् [ब्रह्मणः] प्रजापतीच्या ं] पुरीस, निवासस्थानास, ज्यामुळें–ज्या पुरींत राहिल्यामुळें आत्म्यास [पुरुष] पुरुष म्हणतात हें जो तो तोच या तर्काचें समाधान करूं शकतो.

सारांश—मनुष्ययोनीपेक्षां श्रेष्ठ योनींत हा आत्मा–पुरुष रूपानें उत्पन्न होतो आणि त्यानंतर ुष्ययोनींत जन्मास येतो किंवा विश्वतश्चक्षुरुत विश्वतो मुखो विश्वतो बाहुरुत विश्वतस्पात् ॥ सं बाहुभ्यां ति संपतत्रैर्द्यावा भूमी जनयन्देव एकः ' ऋग्वेद, विश्वांत सगळीकडे व्याप्य होऊन सर्व योनींतून नाना नें विचरतो ही गोष्ट," किंवा हें एक सत्य सकल ब्रह्माचें यथार्थ ज्ञान झालेला ' ब्रह्मविद् । ' तद्रूप ेला Scientist ब्रह्मैव भवंति सांगू शकतो.

शरीरपोषणक्षम आद्य रसधातु

[४] यो वै तां ब्रह्मणो वेदामृते नावृतां पुरम् ॥
तस्मै ब्रह्म च ब्राह्माश्च चक्षुः प्राणं प्रजां ददुः ॥२९॥ अथर्व १०–सू. २

[यः] जो [वै] निश्चयानें [ब्रह्मणः] ब्रह्मदेवाच्या [अमृतेन] परमानन्दरसानें अथवा अनंत जीवनीय नें [आवृतां] व्याप्त असलेल्या–परिपूर्ण असलेल्या [ताम्] त्या [पुरम् वा पुरीम्] पुरीला–निवास–ास [वेद] जाणतो–तिचें सम्यग् ज्ञान करून घेतो. [तस्मै] त्याला [ब्रह्म च] तो जगन्नियन्ता प्रजापति ाह्माश्च] त्या ब्राह्मरूपाचे उपासकांना किंवा त्यानें उत्पन्न केलेल्या लोकांना [चक्षुः] पाहाण्याकरितां े–किंवा इतर इंद्रियें [प्राणम्] जीवन आणि [प्रजाम्] संतति [ददुः] देतो--देत असतो.

सारांश—सर्व शरीरपोषणक्षम असा आद्य रसधातूच असूं शकतो याबद्दल वाद नाहीं. तो रसधातु ं शरीरव्यापी आहे ही गोष्ट 'अमृतेनावृतां पुरीम्' यावरून स्पष्ट होते. 'सर्वधातूनामन्नपानरसःप्रीणायिता' ुत)' रसजं पुरुषं विद्याद्रसं रक्षेत्प्रयत्नतः। अन्नात्पानाच्च मतिमानाचाराच्चाप्यतन्द्रितः। सुश्रुत) त्याचप्रमाणें ंचमहाभूतात्मक शरीरि आत्मा ज्याला 'पुरुष' म्हणतात त्याचें वर्णन करतांना 'अकामो धीरो अमृतः ्भू रसेन तृप्तो न कुतश्चनेनः। तमेव विद्वान्न बिभाय मृत्योरात्मानं धीरमजरं युवानम् [अथर्व १० सू ८–४४]

तो [स्वयंभूः] स्वतःच्या बलासंबंधीं पूर्णरूपानें सामर्थ्यसंपन्न असा [अकामः] कर्मफलाची ेला नसलेला (धीरः) धारणावान्, ज्ञानवान् ध्यानवान्, संयतेन्द्रिय (अमृतः) अमृतस्वरूप, आविनाशी, ेन) आनन्दरसानें युक्त सर्वधातूंचा प्रीणयिता (तृप्तः) तृप्त करणारा (कुतश्च न ऊनः) कोणत्याहि ारें ज्याच्यांत कमी नाहीं, सर्वैश्वर्ययुक्त--संपन्न असलेला (तम्) त्याला [धीरम्, अजरम्] धीर, अजर-ीर्ण न होणारा, अमर–न मरणारा [युवानम्] नित्य तरुण [आत्मानं] आत्म्याला [एव] केवळ विद्वान] ज्ञानी लोक जाणतात. [मृत्योः] मृत्यूला [न बिभाय] भीत नाहींत. अशा प्रकारचा हा पुरुष

सनातनमेनमाहुरुताद्य स्यात्पुनर्नवः। अहो रात्रे प्रजायेते अन्यो अन्यस्य रूपयोः ॥२३॥

वर दिलेल्या गुणांनीं युक्त असलेल्या [एनम्] त्या परमपुरुषास [सनातनम्] सनातन पुरुष [आहुः] ्हणतात, परन्तु [उत अद्य] तो तर आज देखील [पुनर्, नवः] पुनः नवीनच उत्पन्न झालेला भासतो. े [अहोरात्रे प्रजायेते] दिवस आणि रात्र नित्य नवीन होत असतात, तरी एक दुसऱ्यासारखे [रूपयोः]

रूपानें असतात, किंवा हा पुरुष नित्य रात्रंदिवस आपल्या शरीरांत [अन्यो अन्यस्य रूपयोः] एक दुसऱ्या सारखे रूपगुणसंपन्न असलेलीं अनेक रूपें निर्माण करीत असतो. त्यांची गणना पुढें केली आहे. ' शतं सहस्रमयुतं न्यर्बुदमसंख्येयंस्वमस्मिन्निविष्टम् । तदस्य घ्नन्त्याभिपश्यत एव तस्माद्देवो रोचत एष एतत् ॥४२॥

तो सनातन पुरुष आपल्यांत आपणासारखे [शतं] शेंकडों [सहस्रम्] हजारों [अयुतम्] दहाहजार [न्यर्बुदम्] लक्षावधि [असंख्येयम्] असंख्य गणनातीत, [स्वम्] धनैश्वर्ययुक्त रूपें (निविष्टम्) ठेवितो. [अस्य] याच्याकडे (अभिपश्यतःएव, नुसतें पाहिलें असतां सर्व लोक त्याच्या [तत्] ऐश्वर्याला [घ्नन्ति] प्राप्त करून घेण्याची इच्छा करतात. [तस्मात्] याकरितां [एषः देवः] तो महान्, सर्व प्रकाशक परमदेव (एतत्) या संसाराला (रोचते) सुंदर रूप देऊन आपणाजवळ तसें रूप असावें अशी जिज्ञासा प्रत्येकास देतो.

जीवाचें परिमाण

बालादेकयणीयस्कमुतैकं नेव दृश्यते । ततः परिष्वजीयसी देवता सा मम प्रिया ॥२५॥

(एकम्) एक वस्तु जी (बालात्) बाल केसापेक्षांहि (अणीयस्कम्) अत्यन्त सूक्ष्म (उत एकम्) आणि ती एक आहे किंवा अनेक (न इव दृश्यते) किंवा नाहीं अशीच या चर्मचक्षूंना (ततः) दिसत नाहीं, म्हणून नाहींच अशी भासते तेव्हां अशा त्यापासूनाह सक्ष्म असलेल्या वस्तूस (परि–ष्वजीयसी) आंत व्याप्त असलेली आणि त्याचप्रमाणें सूक्ष्म असलेली : देवता) देवाची जी सत्ता आहे (सा) ती (मम) माझ्या (प्रिया) हृदयास तृप्त करते, आवडते. मी तिचा भक्त आहे. वर वर्णन केलेल्या या पुरुषाच्या (Environments) सामुग्रींतील रस या धातूचें रूप तसेंच त्याचें महत्व वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. श्वेताश्वेतर उपनिषदांतहि जीवाचे म्हणजे धात्वंतरगत जीवाणूंचे परिणाम आणि प्रमाण वर्णिलें आहे त्याचें केवळ दिग्दर्शन करतो.

बालाग्रशतभागस्य शतधा कल्पितस्य च । भावो जीवः सविज्ञेयः स चानन्त्याय कल्पते ॥५।७
बुद्धेर्गुणेनात्मगुणेन चैव आराग्रमात्रोऽप्यपरोऽपि दृष्टः। न सदृशे तिष्ठति रूपमस्य न चक्षुषा पश्यति कश्चनैनम्।
क.उप. ५।८. २।६।७

नैव वाचा न तपसा प्राप्तुं शक्यो न चक्षुषा ॥
अस्तीति ब्रुवतोऽन्यत्र कथं तदुपलभ्यते ॥ क. उप. २।६।१२

वरील मंत्राचा आशय जर लक्षांत घेतला तर असें दिसून येईल कीं, केवळ सूक्ष्मदर्शकानेंच शरिरांतील जीवाणूंचें आज जें प्रमाण किंवा परिमाण सांगतां येतें तें मनाच्या अतींद्रियत्वानेंहि साध्य होऊं शकतें, अर्थात् कर्मसिद्धिप्रकाशिनी दृष्टि अभ्यासाशिवाय कशी प्राप्त होणार ? ' चांद्रायणादिना चित्तक्लेशक्षयस्तत्क्षयादिन्द्रियाणां सूक्ष्म व्यवहित ।विप्रकृष्ट दर्शनादि सामर्थ्यमाविर्भवति कायस्य यथेच्छमणुत्व-महत्त्वादीनि इ. । ' या योगसूत्राप्रमाणें आचरण करूनच तें साध्य होऊं शकतें. एका केसाग्राच्या शंभराव्या अंशांत आणि त्याच्या एकशतांश भागास जीवाचें प्रमाण मानावें लागेल इतका तो सूक्ष्म आहे.

त्याचें रूप सुईच्या अग्रासमान आहे, आणि त्याचें ज्ञान, बुद्धि आणि आत्म्याच्या साक्षात्कारानें होऊं शकतें, आणि त्याचप्रमाणें त्या सूक्ष्म आत्मतत्वाचें रूप सामान्य माणसाच्या चर्मचक्षूस दृगोचर होत नाहीं.

सामान्य माणसास वाणीनें त्याचें वर्णन करून सांगतां येत नाहीं आणि मनानें त्यासंबंधीं विचार करतां येत नाहीं, केवळ त्याचें असणें येवढ्यानेंच त्याचें अस्तित्व ओळखलें जातें.

वेदविहित मार्गानें कर्माचें आचरण

न वै तं चक्षुर्जहाति न प्राणो जरसः पुरा । पुरं यो ब्रह्मणो वेद यस्याः पुरुष उच्यते ॥ ३० ॥

[यः] जो [ब्रह्मणः पुरं वेद] ब्रह्माच्या त्या पुरीस जाणतो [यस्याः] ज्याच्या अध्यक्षास (पुरुष उच्यते) म्हणतात. (तम्) त्याला (चक्षुः) चक्षु आणि ज्ञानेन्द्रियें न जहाति) सोडीत नाहींत. (न प्राणः) आणि हि [जरसः पुरा] वार्धक्याच्या पूर्वी सोडून जात नाहींत.

सारांश — ब्रह्मज्ञानी ज्यास आत्म्याचा साक्षात्कार झाला आणि हें पंचमहाभूतात्मक शरीर आणि त्मा यांचा संबंध काय आहे याचें ज्ञान ज्यास झालें तो कर्मफलाची अपेक्षा न करतांहि वेदविहित र्गानीं आचरण करून शंभर वर्षें जगतो. [शंभर वर्षें ही एक सामान्य आयुर्मर्यादा धरली आहे.] ापल्या कर्मविपाकाप्रमाणें कमीजास्तहि तो जगूं शकतो, पण सामान्यतः त्याला हीं सर्व इंद्रियें आणि प्राण र्धक्याच्या पूर्वी सोडून जात नाहींत. त्याच्या भोक्तृत्वाप्रमाणें एवढी वर म्हटलेली आयुर्मर्यादा तो गांठतोच.

प्राणवायूचें महत्त्व

[अ] आतांपर्यंत पुरुषाचें वर्णन झालें. त्याच्या मास्तिष्काचें आणि हृदयाचें सामञ्जस्य सांगितलें, वायु त्या देवकोशांत राहून सर्व शरीरावर नियंत्रण करतो याचा निर्देश झाला. त्याचें महत्त्व त्यामुळें ूत आलें.

[ब] हा पुरुष आपापल्या कर्माप्रमाणें सर्व योनींत जन्मास जातो. ‘उर्ध्वं गच्छन्ति सत्वस्थाः मध्ये न्ति राजसाः। जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥ इ. हें सांगितलें. (श्रीमद्भगवद्गीता १४अ. १८)

[क–१] हें सर्व शरीर अमृतमय रसानें व्याप्त आहे. त्याच्याशिवाय शरीराचा कण-कण जिवंत राहूं त नाहीं. त्या रसांत ओतप्रोत जीवन भरलेलें असतें. त्या रसांत असलेल्या जीवाचे प्रमाण आणि परिणाम ितलें.

[क-२] ज्ञानाची पुढील मजल या दृष्टीनें जीवाणूंचें प्रमाण किंवा परिणाम एक-तीनशें अंश ते एक-हजार अंश मासा असतें हें सूक्ष्मदर्शकाच्या साह्यानें निश्चित करतां आलें. पण केवळ आत्मसाक्षात्कारानें ांगणें जास्त महत्वाचें नाहीं काय ?

अष्टाचक्रा नवद्वारा देवानां पूरयोध्या । तस्या हिरण्मयः कोशः स्वर्गो ज्योतिषावृतः ॥३१॥

अर्थ— (यस्याः) ज्या पुरीच्या अंतरांत (अष्टाचक्रा) सतत फिरणारीं आठ चाकें प्रणाली हेत, (नवद्वारा) त्याच पुरीला नऊ द्वारें आहेत, जी (देवानाम्) देव–इन्द्रियसमूहाची (अयोध्या) ाच्यानींहि न जिंकली जाणारी (पूः) ही पुरी आहे. [तस्यां] तिच्यांत (हिरण्मयः) तेजस्वरूप-दैदीप्य–न, ज्ञानरूपी प्रकाश देणारा (कोशः) प्राणांचा एकमात्र आश्रय असलेला परमनिधि रस (स्वर्गः) मय, सुखस्वरूप (ज्योतिषा) परम तेजानें, तें तेजाहि ज्ञानयुक्त अशा स्वरूपाचें असून ती (आवृतः) बाजूंनीं रसानें व्याप्त आहे.

सारांश— या मंत्रांत या शरीराला एका पुरीची उपमा दिलेली आहे, आणि त्या पुरीच्या अंतः-स्थितीकरितां आठ प्रणाली सतत चाकाप्रमाणें अहोरात्र कार्य करीत असतात. ह्या पुरीस नऊ द्वारें आहेत नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥ श्रीमद्भगवद्गीता) आणि ह्या पुरीस देवासहित म्हणजे इंद्रियासहित ागाऱ्या आत्म्यानें स्वतेजानें, स्वपराक्रमानें कोणासहि हार न जाणारी अशी पुरी (well protected) विली आहे. त्या पुरींत तेजःस्वरूप, दैदीप्यमान प्राणांचा एकमात्र आश्रय असलेला परमानिधि रस आहे, चें अस्तित्व सर्व इंद्रियांना अत्यंत सुखमय वाटतें आणि त्या पुरीचें आवरण देखील परमतेजानें युक्त

असून त्यानेंच सर्व बाजूंनीं वेढलेलें आहे. या वर उल्लेखिलेल्या आठ प्रणाली म्हणजे रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा, शुक्र आणि आठवें ओज होय. ओज हा धातु जरी नसला तरी त्याचें अस्तित्व हें 'देहस्थितिनिबंधन' करणारें असल्यानें सातत्यानें संतानवत् त्याचें कार्य सर्वशरीरव्यापि आहे म्हणून त्याचा इतर धातूबरोबर उल्लेख आहे.

तीन तत्त्वें, तीन आवरणें

तस्मिन् हिरण्यकोशेत्र्यऽरे त्रिपतिष्ठिते । तस्मिन् यद् यक्षमात्मन्वत् तद्वै ब्रह्मविदो विदुः ॥३२॥

अर्थ— (तस्मिन्) त्या (हिरण्मये) तेजोमय, सुवर्णासारख्या तेजस्वी [त्रि-अरे] चाकाच्या तीन अन्याइतकें महत्व असलेल्या [त्रिपतिष्ठिते] तीन चरणावर -तीन पायावर [वात, पित्त. कफ] स्थित असलेल्या, आश्रित असलेल्या परमनिधानरूप कोशांत [यत्-यक्षम्] जें परमपूजनीय तत्व [आत्मन् वत्] आत्मस्वरूप आहे [तत् व] त्याचाच निश्चयानें श्रद्धेनें [ब्रह्मविदः] ब्रह्मज्ञानी लोक [विदुः] ज्ञानानें साक्षात्कार करीत असतात.

सारांश—ज्या ब्रह्मपुरींत आत्मस्वरूप हा यक्ष राहातो ती पुरी तीन आवरणांनीं वेष्टित आहे. ती तीन तत्वावर प्रतिष्ठित आहे. तीं तीन तत्वें वात, पित्त, कफ हीं होत. हीं वरील तीन आवरणें **Durameter, Piameter, Arachnoid** होत. पैकीं पहिलें आवरण सर्व मस्तिष्क आणि पृष्ठवंशांतील संपूर्ण नाड्यांत सर्व बाजूंनीं व्यापतें. दुसरें आवरण रस आणि रक्ताच्या सिरांनीं युक्त असून मस्तिष्क आणि पृष्ठवंशांतील सुषुम्ना इत्यादींना व्यापून आहे, आणि तिसरें आवरण रसानें परिपूर्ण असून मस्तिष्क आणि पृष्ठवंशास पूर्णपणें व्यापतें.

प्रभ्राजमानां हरिणीं यशसा संपरिवृताम् । पुरं हिरण्मयी ब्रह्मा विवेशापराजिताम् ॥३३॥

अर्थ— [प्रभ्राजमानां] अतिशय तेजानें दीप्तिमान् (हरिणीम्) अतिमनोहारिणी, चित्ताला वेधणारी (यशसा) यशोरूपतेजानें [सं-परिवृताम्] चहूकडून व्यापलेली [हिरण्मयाम्] सोन्याप्रमाणें तेजस्वि [अपराजिताम्] कोणालाहि हार न गेलेली आजिंक्य अशा ब्रह्मपुरीमध्यें (ब्रह्मा) ब्राह्मणाचा उपासक ज्ञानी पुरुष (विवेश) प्रवेश करतो.

सारांश— हें निसर्गनिर्मित निरोगी शरीर, धातुसाम्य असतांना, त्यांच्यातील सर्व प्रणाली सम्यक् स्थितींत कार्य करीत असतां, अत्यंत तेजस्वि असतें आणि सुंदर-शरीरावयवसुष्ठुतेनें-प्रेक्षणीय-आकर्षित करणारें असतें. अत्यंत तेजोमय कल्याणकारी, स्वसंरक्षणक्षम अशा त्वगिन्द्रियानें वेष्टित असतें. आघातप्रत्याघातास प्रतिरोध करण्याची त्याची सिद्धता असते अशा प्रकारच्या तेजःपुंज शरीरांत आत्मा जीवरूपानें प्रवेश करतो.

———

....सवलतीची वर्गणी....

आयुर्वेद पत्रिकेची वार्षिक वर्गणी ६ रु. आहे. आर्थिक असमर्थतेमुळें कांहीं लोकांना ती भरणें जड जाते, पण पत्रिका मागविणेची त्यांची मनापासून इच्छा आहे, अशा लोकांसाठीं वार्षिक ४ रुपये वर्गणी पाठविण्याची सवलत आयुर्वेद सेवा संघानें ठेवली आहे. गरजू लोकांनीं त्याचा लाभ घ्यावा. --व्यवस्थापक, आयुर्वेद पत्रिका, नाशिक

न-सभेंतलि प्रश्नोत्तरें—

ुंबई राज्यांतील महारोग्यांची व्यवस्था

(श्री. होमी तल्यारखान यांनीं विचारलेल्या महारोग्यासंबंधीं प्रश्नांचीं उत्तरें)

मुंबई–राज्यांत एकंदर किती महारोगी आहेत, ी अधिकृत नोंद घेतलेली नाहीं· तथापि ते सुमारें ,००० असावेत असा अन्दाज आहे. यापैकीं ी महारोगी भीक मागण्याचा धंदा करतात तें ेत नाहीं.

वरील महारोग्यांच्या संख्येपैकीं स्थूल मानानें ,००० महारोगी बृहन् मुंबईंत असावेत.

भीक मागणाऱ्या महारोग्यांसाठीं १२५ रोग्यांची होईल असें एक वसतिस्थान केडगांव, जिल्हा ापूर, येथें तेथील वसति–गृहाची जरूर ती दुरुस्ती ्यावर लवकरच सुरूं करण्यांत येईल. त्याशिवाय -राज्यांत असलेल्या महारोग–चिकित्सालयांपैकीं ी चिकित्सालयांच्या रुग्णसंख्येंत जागेची सोय न वाढ करण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे.

महारोग चिकित्सालय पुई, महारोगी वसाहत - गांव व ई. एफ्. ए. महारोग चिकित्सालय ट्रॉंबे तीन ठिकाणें भीक मागणाऱ्या महारोग्यांकरितां ुल्यानें उपयोगिली जातात.

महारोग चिकित्सालयें

मुंबई राज्यांत खालीं दिल्याप्रमाणें महारोग–कित्सालयें असून प्रत्येकांपुढें दर्शविल्याप्रमाणें ग्णशय्यांची सोय आहे.

कारी महारोग-चिकित्सालयें	रुग्णशय्यांची सोय
ंढवा लेप्रसी हॉस्पिटल, पुणें	२००
र डी. एम. पेटिट लेप्रसी हॉ., रत्नागिरी	१००
प्रसी हॉस्पिटल, पुई	२००
्रापेठ लेप्रसी हॉस्पिटल, अहमदाबाद	१५०
ंडा पार्क लेप्रसी कॉलनी, कोल्हापूर	१५०
नुसूया लेप्रसी हॉस्पिटल, बडोदें	७५
सी कॉलनी, केडगांव, जि. सोलापूर	१२५
लेप्रसी असायलम, धरमपूर, जि. सुरत	६५
	एकूण १०६५

खाजगी व म्युनिसिपल महारोग चिकित्सालयें	रुग्णशय्यांची सोय
ई. एफ. ए. लेप्रसी होम, ट्रॉंबे	२५
लेप्रसी हॉस्पिटल, नासिक	१००
सिव्हर ज्युबिली लेप्रसी हॉस्पिटल, संकेश्वर, जि. बेळगांव	६४
लेप्रसी हॉस्पिटल हिंदलगा, जि. बेळगांव	८०
लेप्रसी हॉस्पिटल, मिरज	१४०
लेप्रसी हॉस्पिटल, पोलादपूर	१८०
लेप्रसी हॉस्पिटल, सोलापूर	७५
लेप्रसी हॉस्पिटल, विजापूर	४५
पार्वतीबाई लेप्रसी हॉस्पिटल, सूरत	११५
ॲक्वर्थ लेप्रसी होम, वडाळा, मुंबई	३९६
[शिवाय स्वावलंबी रुग्णांसाठीं ३ निवास कुटी]	
लेप्रसी हॉस्पिटल, अहमदनगर	२५
एकंदर	२३१३

१००० रुग्णशय्यांची सोय असलेली एक स्वतंत्र महारोगी वसाहत स्थापन करण्याची योजना पहिल्या पंच--वार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यांत आली आहे. परंतु त्यासाठीं सोयीस्कर जागा वगैरे अद्याप न मिळाल्यानें त्या योजनेस अद्याप चालना प्राप्त झालेली नाहीं.

नासिकचें सिव्हिल रुग्णालय

श्री. पी. एम्. मुरकुटे (नासिक–इगतपुरी) यांनीं नासिक सिव्हिल हॉस्पिटलसंबंधीं विचारलेल्या प्रश्नांची माहितीः—

नासिकचें सिव्हिल हॉस्पिटल प्रथम कोणत्या वर्षी सुरूं झालें ती माहिती उपलब्ध नाहीं; तथापि

सध्यां असलेली हॉस्पिटलची इमारत इ. स. १८९१ सालीं बांधली गेली. नासिक शहराची त्यावेळीं एकूण लोकसंख्या २४४२९ होती.

उपलब्ध असलेल्या अगदीं जुन्या माहितीप्रमाणें म्हणजे १९१० सालीं ह्या हॉस्पिटलमध्यें ४८ रुग्णशय्यांची सोय होती; व सध्यां तेथें १०० रुग्णशय्यांची व्यवस्था आहे.

व्यवस्था अपुरी पडत आहे

वाढलेल्या लोकसंख्येच्या मानानें ही सोय अपुरी पडत आहे, आणि म्हणून कांहीं रोग्यांना हॉस्पिटलमध्यें प्रवेश मिळूं शकत नाहीं; तथापि अगदीं तातडीच्या रोग्यांना जागा नाहीं ह्या कारणाकरितां प्रवेश सहसा नाकरण्यांत येत नाहीं.

नवीन बांधावयाच्या नासिक सिव्हिल हॉस्पिटलकरितां सरकारनें गोल्फ कोर्सवरील जागा निश्चित केली आहे. नासिकच्या डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट बोर्डानें ह्या नवीन बांधावयाच्या हॉस्पिटलच्या इमारतीची योजना दुसऱ्या पंच-वार्षिक योजनेंत समाविष्ट केली आहे. दुसऱ्या पंच-वार्षिक योजनेंतील कामांसंबंधीं सरकारचा विचार अद्याप चालू आहे.

जन्मभर औषधें !

“ तुम्ही तेथें औषधांची माहिती तर मिळवावीच, पण मूळापासून चिकित्सा करण्याची पद्धति व विचारसरणी यथायोग्य जाणून घेण्याचा प्रयत्न करावा.

औषधोपचार शक्य तितके स्वस्त व शरीराची मूळापासून सुधारणा करणारे असावेत, तरच समाजांत आरोग्यवर्धनाचें काम सिद्ध होईल.

नाहींतर जन्मभर आपण औषधें द्यावयाचीं व लोकांनीं तीं घ्यावयाचीं हाच उद्योग होईल. ”

— ताराबेन मश्रूवाला

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं

आयुर्वेदिक व युनानी वनौषधि

तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण !

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार, गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राह्मी, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माळ हेंच आमचें वैशिष्टय ! विशेष माहितीसाठीं आमचे साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम-आयुर्वेद

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी

२४५ काळबादेवी रोड, मुंबई

दंतवैद्य जायदे यांचीं पत्रें ४-५

सुश्रुत हाच पहिला दंतशस्त्रवैद्य

॥ श्री ॥ दि. २२।९।५५ रात्रौ ८ वा. शिंगटन्

मान्य श्री. बाळासाहेब खेर, मान्य श्री. हुकेरी-जी, मान्य श्री. हनुमंतय्या (Chief Minister-ysore Government), श्रीमंत नानासाहेब चीं पत्रें आलीं असून त्यांनीं माझ्या कार्यास सुयश तिलें आहे. मी या सर्वांचा ऋणी आहे.

येतेवेळीं मान्य स. का. पाटील यांनीं रोख रु. १००० दिले. श्रीमंत नानासाहेबांनीं ५०१ रु. दिले. मंडळ मुंबई ५१ व श्री. गुरुवर्य वेणीमाधवशास्त्री नीं २१, तसेंच टिळक ट्रस्ट पुणें १०१ रु. मिळाले. या सर्वांचें मनःपूर्वक आभार मानतो.

'अमेरिकन् दंतवैद्यक पद्धतीचें तुलनात्मक रीक्षण व अध्ययन संशोधन चालू आहे. नवनवीन ष्टींवर प्रकाश पडतो व जुन्या विचारांना जोराचा चित धक्का बसतो. Operative, Bridge, lay & Crowns, Prosthetics, Ortho-ntics, Periodontics, Entodontics, rgical Oral diagnosis, Childrens' ept. इत्यादि दंतवैद्यकाच्या शाखोपशाखा व चा विस्तृत विस्तार येथें पहावयास मिळतो.

'ज्ञानकण'

इटालियन्-अमेरिकन् डॉक्टर्स आपसांत बोल-ना 'एन्तो-दान्तिक्स्', पेरिओदान्तिक्स् (Ento-ntics-Periodontics) इ. शब्दप्रयोग करीत . चटकन् त्यांतील 'दन्त' शब्दानें माझें मन र्षिलें. प्रकाश पडला. Ento + dontics= तो+दान्तिक हा मूळ अंतर्+दान्तिक= दातांच्या तील विकार हा अर्थबोध झाला. Perio + ntic= पेरि[ओ] दान्तिक हा 'परिदन्तिक' या चा अपभ्रंश असावा. परिदंतक म्हणजे दांता-तीं हिरड्यांत होणारे विकार आणि त्यांची त्सा. तसेंच अंतर्दन्तिक म्हणजे दांतांत होणारे रोग [कृमिदंत-Caries & cavities] व त्यांची चिकित्सा याच अर्थानें इंग्रजींतहि या शब्दांचा उपयोग केला जातो.

पितृ-पिता-पिटर् फादर्, मातृ-माता-मदर, भातृ-भ्रातर-ब्रदर यासारखे वरील शब्द वाटतात. तसेंच Healthy, Vesicular, Murmur= अरुग्ण फुफ्फुस, मर्मर इ. शब्द वैद्यांच्या चिर परिचयाचे आहेत.

भारत हा दंतवैद्यकाचें जन्मस्थान अगर पाळणा आहे. सुश्रुत हा पहिला दंतवैद्य आहे ही गोष्ट सिद्ध करण्यास इतर पुराव्याबरोबर अंतर्दंत, परिदन्त इ. शब्द फारच उपयुक्त ठरतील. Dental college यांतील प्रथम शब्द 'Dent' हा दंत शब्दाचा अपभ्रंश असावा.

"Ortho-dontics" यांतील "ऑर्थो" शब्दाची उपपत्ति मात्र लागली नाहीं. भाषाशास्त्रज्ञांनीं यावर कृपया प्रकाश टाकावा. मी सध्या विनोदानें अर्थ=द्रव्य+दन्तिक म्हणजे Orthodontic, म्हणजे भरपूर द्रव्य मिळविण्याचे दांतासंबंधीं तंत्र असा अर्थ लावला. आणि खरोखरच या विषयाचे तज्ञ भरपूर द्रव्य संपादन करतात, इति श्रूयते।

वाकडे दांत सरळ करण्याचें शास्त्र

Orthodontics म्हणजे वेडेवांकडे दांत सरळ करण्याचें शास्त्र. गेल्या सुमारें २ शतकांत युरोपांतील जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स, इटली, स्वित्झर्लंड रशिया इ. राष्ट्रांनीं या विषयाचे फारच बारकाईनें संशोधन करून आज तें शास्त्र पुष्कळच प्रगत केलें आहे. २० व्या शतकांत अमेरिकेनेंहि त्यांत महत्वाची भर घातली आहे.

स्वित्झर्लंडमध्यें २३ डॉक्टर, जपानमध्यें १६ डॉक्टर, जर्मनींत ६५ डॉक्टर, इंग्लंडमध्यें १४५

नांवाजलेले डॉक्टर्स 'Orthodontics'चें काम करतात. अमेरिकेंत हीं संख्या फारच मोठी आहे. केवळ न्यूयॉर्कमध्यें शंभराहून अधिक डॉक्टर हा व्यवसाय करतात. यावरून या शास्त्राचें महत्व व पाश्चात्यांनीं केलेली प्रगति लक्षांत येईल.

अलिकडे ' पेनिसिलिन ' मुळें मृत्यु आल्याची अनेक उदाहरणें युरोप व अमेरिकन वैद्यकीय नियतकालिकांतून नमूद होत आहेत. भारतांत नागपूर येथें श्रीमती बलराम सूर यांना पेनिसिलिनच्या विषबाधेमुळें मृत्यु आल्याचें सर्वांना विदित आहेच. जयहिंद

पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांसाठीं व्याख्यान

वॉशिंग्टन ता. २९।९।५५ रात्रौ ९-४०वा.

आजचा दिवस भारतीय दंतवैद्यकशास्त्रांत फार महत्त्वाचा गणला जाईल असें मला वाटतें. आज वॉशिंग्टन येथील युनिव्हर्सिटीच्या पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांकरतां (Seminar) माझें व्याख्यान ठरविण्यांत आलें. डॉ. क्रूगर [मुख्य सर्जन] डॉ. मॉरिन् (अ. सर्जन) डॉ. सी. व्ही. रैलट (डीन) आर्मी नेव्हीचे दोन सर्जन आणि कांहीं पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थी सदर समारंभास हजर होते. परवानगी घेऊन फिलिपाईनमधील एक पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थिनीहि हजर होती.

सायंकाळीं ५-३० वाजतां डॉ. ऋगर यांनीं प्रास्ताविक भाषण करून परस्पर परिचय करून दिला. त्यानंतर ठरल्याप्रमाणें मला अर्धा तास देण्यांत आला. भारतीय शूलरहित दंतोत्पाटनांतील सव्यसाचित्व, त्याचें महत्व, आयुर्वेदांतर्गत दंतविज्ञान, सुश्रुताचार्यांचा अधिकार इ. विषयावर मी थोडक्यांत विवेचन केलें. त्यानंतर डॉक्टर-मंडळींनीं प्रश्न विचारले; त्यांचीं मी यथामति उत्तरें दिलीं. विषय असा रंगांत आला कीं, १ तास केव्हां निघून गेला तें कोणालाच कळलें नाहीं. शेवटीं डॉ. क्रूगरनीं विषय आवरतां घेतला व आभार प्रदर्शनानंतर सभेचें काम संपलें.

फिलिपाईनमधील विद्यार्थिनीला हा विषय फारच आवडलेला दिसून आला. ही कला शिकण्याकरतां ती भारतांत येणार असल्याचें तिनें मला बोलून दाखविलें.

या कार्यक्रमाच्या प्रतिक्रिया काय काय होतात त्या पाहूं. परंतु हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी झाला असें मला वाटतें. सध्यां येथें थंडी फारच वाढत आहे. मधून मधून पाऊस पडतो वादळ होतें. जयहिंद

पां. वि. जायदे

वैद्यमंडळांना तातडीची विनंति

दंतवैद्य जायदे हे अमेरिकेंत गेले आहेत व भारताला पोषक अशा रीतीनें ते तेथें दंतविज्ञानाचा अभ्यास करीत आहेत. ते आपल्या कार्यांत यशस्वी होऊन आले तर भारतांतील तज्ञ आयुर्वेदीय दंतवैद्य म्हणून त्यांचा जनतेला व सरकारलाहि उपयोग होणार आहे. आज परदेशी सरकारें व भारत सरकार अनेकांना परदेशी जाण्यासाठीं अभ्यासवृत्त्या देत आहे. पण दंतवैद्य जायदे यांच्यासारख्या हुषार वैद्याला केवळ तो वैद्य आहे, डॉक्टर नाहीं, म्हणून शिष्यवृत्ति दिली जात नाहीं. म्हणून भिक्षांदेहि करून त्यांना आपला अभ्यास करावा लागत आहे अशा वेळीं वैद्यांनीं देणग्या अगर बिनव्याजी कर्ज म्हणून जरी कांहीं रकमा वेळींच पाठविल्या तरी त्याचा बहुमोल उपयोग होणार आहे.

गांवोगांवीं अनेक वैद्यमंडळें आहेत व वैद्य जायदे यशस्वी होऊन परत यावेत अशी त्यांची मनापासून इच्छा आहे, त्या वैद्यमंडळांनीं वेळींच वै. जायदे यांना आर्थिक मदत करावी व त्यांच्या पत्त्यावर पत्र पाठवून त्यांना प्रोत्साहन द्यावें.

नाशिक शहर वैद्य मंडळ १०१ रु. व आयुर्वेद सेवा संघ १०१ रुपये अशा देणग्या नाशिकतर्फे पूर्वींच देण्यांत आल्या आहेत.

—मंत्री, म. प्रां. वैद्य मंडळ, नाशिक

कुंभकामला अर्थात् नाळकोट

दुग्धवटीचा प्रयोग

[लेखकः—वैद्य सुखणदास दे. व्यास, सुरत]

कुंभकामला अर्थात् नाळकोट हा रोग वैद्यांना चित आहे. सबब त्याचें पिष्टपेषण करण्याचें नाहीं. त्याच्या चिकित्सेसंबंधीं अनुभव येथें आहे.

माझे पूज्य गुरुदेव स्व. वैद्यराज तिलकचंद चंद शहा यांच्या दवाखान्यांत एक ९ वर्षाच्या ची नाळगूद रोगाची मुलगी आली होती. तिला यांनीं निदान करून नळबंध, सौराष्ट्री व मार्क- दि चूर्ण यांच्या ३ पुड्या बांधून सकाळ दुपार मध--पाण्याबरोबर घेण्यास दिल्या.

जैनसाधूचें औषध

त्यावेळीं तेथें एक जैन यतिमहाराज भिक्षेसाठीं होते. त्यांनीं त्या मुलीची अवस्था पाहून एक नम्रतापूर्वक सुचविलें, तें असेंः— कच्ची लाही केलेली] तुरटी ४० तोळे व बाभळीचा ळा (पाण्याशिवाय विझवलेला) २ तोळे. हें वस्त्रगाळ चूर्ण करावें व वयाच्या हिशेबानें मासा प्रमाणापासून १॥ मासा प्रमाणापर्यंत १।१ दिवसांतून ३ वेळां द्यावी. अनुपान ४ तोळे [२१ वेळां गाळलेलें]. अपथ्य—तेल, मिरची, मीठ. पथ्य— दूध भात.

३ आठवड्यांत गुण

याप्रमाणें औषध तयार करून त्या नाळगूद मुलीला पथ्यपूर्वक दिलें असतां ती ३ आठ- पूर्ण रोगमुक्त झाली. पायाची, पोटाची, ची व तोंडाची सर्व सूज ओसरली. शौच, व वायु चांगल्या रीतीनें होऊं लागलें. मुलगी प्रसन्नचित्त दिसूं लागली व रुचिकर अन्न लागली. ३ आठवड्यानंतर तिला वैद्यनाथवटी रत्नावली) ३।३ गोळया ३ वेळां मधांत घेण्यास दिल्या व हलकें अन्न, पातळ भात, ज्वारीची भाकरी, पालेभाजी, दूध, फळें देणें सुरूं केलें. ३।४ आठवड्यांत मुलगी निरोगी व सशक्त झाली.

अहिंदू गोमूत्र घेत नाहींत

हिंदू लोक गोमूत्र खुषीनें घेतात पण बोहरी, पारसी, मुसलमान, खिस्ती धार्मिक कारणांवरून घेत नाहींत. त्यामुळें नाळगूद, उदर, पांडु व कावीळ या विकारांत उपचार करणें जड जाते. अशा ठिकाणीं मी दुग्धवटी (भैषज्यरत्नावली शोथाधिकार) वापरतो.

दुग्धवटीची कृति व उपयोग

दुग्धवटीचा पाठ व उपयोग पुढीलप्रमाणें आहे.— शुद्ध हिंगूळ, शुद्ध बचनाग, शुद्ध धोतराबी, हीं तीन सारख्या प्रमाणांत घ्यावी. प्रथम धोतरा व बचनाग यांचीं सूक्ष्म चूर्णें करावीत. नंतर प्रथम ३ दिवस हिंगूळ घोटून मग त्यांत एक एक चमचा तें चूर्ण घालून ते घोटावें याप्रमाणें सर्व चूर्ण मिसळावें. एक दिवसांत हें काम होतें.

नंतर त्यांत धोतऱ्याच्या पानांचा रस घालावा. शक्यतो काळ्या दांडीचा, तो न मिळाल्यास पांढऱ्या दांडीचा धोतरा घ्यावा. चासुंदीसारखें दाट मिश्रण करावें व घोटावें घोटतां घोंटतां गोळी वळण्यासारखें मिश्रण झालें कीं मुगाएवढ्या गोळया कराव्या व छायेंत वाळवाव्या.

सर्व प्रकारच्या सुजेवर, काविळीवर, नाळगूद, पाण्डुरोग, उदर [खास करून जलोदर] व संग्रहणी रोगावर रोज सकाळीं, दुपारीं, संध्याकाळीं फक्त २।२ गोळया रुचिप्रमाणें दुधाबरोबर घ्याव्यात.

पाणी व मीठ अपथ्य

पथ्यापथ्य--पाणी व मीठ पूर्णपणें बंद ठेवावें व तहान लागेल व पाण्याशिवाय भागणार नसेल तर

संत्रे, मोसबें अथवा पाण्याचा नारळ [शहाळे] यांतील पाणी रुचिप्रमाणें द्यावें.

आहार— शक्य तोंवर दुधावरच ठेवावें. माझ्या अनुभवाप्रमाणें रोगी दुसऱ्या आठवड्यांत रोज ६ ते १० रत्तल (३ ते ५ शेर) दूध सहज घेऊं शकतो. आणि क्रमानें वाढवीत १५ ते २० रत्तल [७॥ ते १० शेर] पर्यंत घेऊं शकतो. पण केवळ दुधावर राहण्यास तो नाराज असेल तर दुधाबरोबर थोडासा भात खाण्याची सवलत द्यावी.

वजन वाढतें

गोमूत्र घेऊं न शकणाऱ्या शेंकडों रोग्यांवर या औषधाचा अनुभव मी घेतला आहे व त्यांत मला पुष्कळच सफलता, धन व यश यांची प्राप्ति झाली आहे. जो रोगी केवळ दुधावर रहातो व भात खात नाहीं तो दूध जास्त घेऊं शकतो असा माझा अनुभव आहे, व त्याच्या वजनांत १० ते ४० पौंड वाढ होऊं शकते.

हें औषध जरूर पडेल तोंपर्यंत अर्थात् रोग निर्मूल होईपर्यंत चालूं ठेवतां येतें. पण कमींत कमी एक कल्प म्हणजेच ४०-४१ दिवस या औषधाचें सेवन करविलेंच पाहिजे, असा माझा अनुभव आहे.

—[आयुर्वेदविज्ञान (मुंबई) वरून]

हिंदी मध्यप्रदेशांतील पहिलें आयुर्वेदीय कॉलेज

मध्यप्रदेशांतील पहिल्या आयुर्वेदिक कॉलेजचें उद्घाटन मुख्यमंत्री पं. रविशंकरजी शुक्ल यांच्या हस्ते रायपूर येथें झालें. विद्यार्थ्यांनीं मानव्याची दृष्टि ठेवून आयुर्वेदाचा अभ्यास करावा आणि खेड्यापाड्यांतील जनतेची सेवा करण्याच्या दृष्टीनें आपल्या ज्ञानाचा उपयोग करावा असा पं. शुक्ल यांनीं विद्यार्थ्यांना उपदेश केला.

आयुर्वेद संशोधन केंद्र

या कॉलेजांत संशोधन केंद्र लौकरच सुरू करण्यांत येईल असें आरोग्यमंत्री कन्नमवार यांनीं जाहीर केलें.

५॥ वर्षांचा अभ्यासक्रम

या कॉलेजचा अभ्यासक्रम साडेपांच वर्षांचा असून कॉलेजला दवाखाना, एक्सरे, पॅथॉलॉजी, सर्जरी इत्यादि विभाग जोडलेले आहेत. कॉलेजांत आयुर्वेदाचें संपूर्ण आणि ॲलोपॅथी व होमिओपॅथी यांच्या प्राथमिक शिक्षणाची सोय करण्यांत आलेली आहे.

कॉलेजला जोडावयाच्या हॉस्पिटलच्या इमारतीची कोनशिलाहि पं. शुक्ल यांनीं बसविली. या हॉस्पिटलांत १०० रुग्णांची सोय होणार आहे.

फलटणनजिक साबण कारखाना

कडूलिंबाच्या लिंबोण्या व करंजाच्या बिया यांच्यापासून साबण तयार करण्याचा कारखाना फलटणहून १५ मैल दूर असलेल्या मौजे जावळी येथें येत्या दिपवाळीपर्यंत सुरू होईल. या कारखान्यासाठीं अ. भा. खादी ग्रामोद्योग बोर्डानें १७०००रु. मंजूर केलेले आहेत. या कारखान्यांस लागणारी लिंबोळी १२ आणे पोते याप्रमाणें घेतली जाणार आहे.

सांडू ब्रदर्सचीं

शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.

वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.

पत्रव्यवहाराचा पत्ता:—

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
चेंबूर लि.
फॅक्टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

आनंद-रस (र. चं.) एक उपयुक्त रसायन कल्प

पाठ

शुद्धं रसं समविषं प्रहरं विमर्द्य ।
तद्गोलकं कनकचारुफले निधाय ॥
दोलागतं पञ्चदिनं विषमुष्टितोये ।
प्रक्षाल्य तं पुनरपीह तथा द्विवारम् ॥७०९॥
तत्सूतकं गिरिशलोचनयुग्मगन्धम् ।
युक्त्याऽवतार्य कुरु भस्म समे च तस्य ॥
वैक्रान्तभस्म जयपालनवांशकार्धम् ।
सर्वैर्विषं द्विगुणितं मृदितं च खल्वे ॥७१०॥
घस्रत्रयं कनकभृंगरसेन गाढ– ।
मावेश्य भाजनतले विषधूपभाजी ॥
भृंगद्रवेण शिथिलं लघुकाचकूप्या– ।
मापूर्य बद्धवदनं सिकताख्ययंत्रे ॥७११॥
तां वासरार्धमुपदीप्य निसर्गशीतम् ।
दृष्ट्वा विचूर्ण्य गदशालिषु शालिमात्रम् ॥
आनंदसूतमखिलामयकुंभसिंहम् ।
गद्याणकार्धं सितया सह देहि पश्चात् ॥७१२॥
रोगानुरूपमनुपानमपि प्रशस्तम् ।
क्षोणीभुजां प्रचुरपूजनमाप्नुहि त्वम् ॥
कीर्त्या दिशोऽभिवलयस्फुरदिन्दुतुल्यो ।
वैद्येश्वरेति बिरुदं भज वैद्यराज ॥७१३॥

अर्थ

“शुद्ध पारा व बचनाग समभाग घेऊन त्यांचा क प्रहरपर्यंत सारखा खल करावा, आणि त्याचा ळा करून तो धोतऱ्याच्या चांगल्या फळांत भरावा. ग तो कुचल्याच्या काढ्यांत दोलयंत्रानें पांच दिवस चन करावा. नंतर काढून तो पारा स्वच्छ धुऊन नः दुसऱ्यांदा त्याच काढ्यांत पूर्ववत् पचन करून ो धुऊन घ्यावा. नंतर तो पारा एक भाग व शुद्ध क सहा भाग घेऊन कांचेच्या कुपींत वालुकायंत्रा- ्या पाऱ्याचें भस्म करावें. नंतर त्या पाऱ्याच्या स्माच्या समान त्यांत वैक्रांताचें भस्म मिळवावें, आणि जेपाळ नववा हिस्सा व सर्वांच्या दुप्पट शुद्ध बचनाग घालून खलामध्यें त्याचा खल करावा. मग धोत्र्याच्या व माक्याच्या रसांत ३।३ दिवस घोटावें. नंतर तें औषध माक्याच्या रसांत कालवून बचनागाची धुरी दिलेल्या कांचेच्या कुपींत भरावें. पुढें त्या कुपीचें तोंड बंद करून वालुकायंत्रांत ठेवून चार प्रहर तीस अग्नि द्यावा. मग स्वांगशीत झाल्यावर तें काढून, चूर्ण करून त्यांतून तांदुळाइतकें चूर्ण तीन मासे साखरेंतून घ्यावें. अथवा रोगानुरूप अन्य अनुपानहि योजावें.

अहो वैद्यराज, आपण ह्या औषधाच्या प्रसादानें राजाकडून मान मिळवा या योगें तुमच्या कीर्तीनें चंद्रप्रकाशाप्रमाणें दिशावलय प्रफुल्लित होईल, आणि तुम्ही, वैद्येश्वर ही पदवी संपादन कराल.”

औषधाचें स्वरूप

रस–चंडांशु या ग्रंथातील श्लोक व त्याचा तेथें दिलेला अर्थ वर उद्धृत केला आहे. या औषधांत बचनाग, कुचला, जेपाळ, धोत्रा हीं विषद्रव्यें आहेत व पारा गंधकाहि आहेच. विशेषतः पारा गंधकावर या सर्व विषांचा संस्कार आहे. औषध देण्याचें प्रमाण १ तांदूळ (अर्धी गुंज) आहे.

विषसंस्कृत पारद

ज्या रोग्याच्या शरीरांत दोष धातुगत लीन झालेले आहेत, ते काढण्यासाठीं या औषधाचा उपयोग येत्या हिवाळ्यांत करावा. त्यामुळें शरीर निर्दोष बनून तें इतर पौष्टिक औषधें व अन्नें पचन करण्यास समर्थ होईल, असें या पाठरचनेवरून वाटतें. रसायन-वाजीकरण अध्यायांत हें औषध आलें आहे. या पाठांत मात्र प्रत्यक्ष धातुवर्धक असें कोणतेंच द्रव्य नाहीं. बरींच विषें व पारद (विषसंस्कृत पारद) असें या औषधाचें स्वरूप आहे. फक्त वैक्रांत भस्माची जोड आहे.

गुरुकुल पत्रिका

या औषधाचा सूचिपत्रांतील भाव २५रु. तोळा आहे. तथापि तूर्त वैद्यांना प्रयोगाच्या सोईसाठीं तें १५ रु. तोळ्यानें देण्याचें ठरविलें आहे. मात्र आपण घेतलेले अनुभव शक्य झाल्यास पत्रानें कळवावे अशी विनंति औषधासोबत करण्यांत येईल.

हें औषध एका चिकित्सक वैद्याच्या मागणीवरूनच तयार करण्यांत आलें आहे. सध्यां फक्त १४ तोळे औषध तयार आहे. वारंवार अशीं औषधें केलीं जात नाहींत. सबब वैद्यांनीं आपल्या संग्रहीं अर्धा एक तोळा औषध ठेवून योग्य रुग्णावर त्याचा अनुभव घ्यावा. —व्यवस्थापक, आयुर्वेद सेवा संघ

— — — —

वाचकांचा पत्रव्यवहार

धातु व जल यांचें प्रमाण

ता. १६।९।५५ चा पत्रिकेचा अंक वाचला. धातुस्पृष्ट जल लेखांत धातु व जल यांचे काय प्रमाण ठेवावें हें दिलेलें नाहीं. लेखकानें तें ठरविलें असल्यास प्रसिद्ध करावें.

धातूचा पत्रा घेतल्यास शक्ति अधिक येते कीं गोळा घेतल्यास हें लेखकानें अनुभविलें आहे काय?

लेंगरे (द. सातारा) —ना. ह. देशपांडे

डी.ए.एस्.एफ.

[१ रत्तली बाटलींत पाणी थोडें कमी भरून त्यांत १–२ गुंजा प्रमाणांत धातूचा पत्रा टाकून बाटली खूपवेळ (१५ते३० मिनिटें) सतत हलविली म्हणजे शक्ति येईल.

कापूर हिंग वगैरे उडणारीं द्रव्यें पाण्यांत सहज मिसळतात व कर्पूरोदक, हिंग्वोदक तयार होतें. अर्थात् त्यालाहि कांहीं काल लागतोच. धातुघटक हे स्वतः गतिशील नसल्यामुळें पाणी हालवून धातूचा संस्कार करावा लागतो. न हालवितां तांब्याच्या भांड्यांत रात्रभर पाणी ठेवून ते सकाळीं पिण्याचा व्यवहार आहेच. तो धातूचा कालानें संस्कार दर्शवितो. हालविण्याचें काम कमी लागावें असें वाटत असेल तर धातूचे पत्रे अधिक घ्यावेत. तथापि कांहीं हलविणें अगर तापविणें वा काल जाऊं देणें हें आवश्यक राहीलच. — संपादक]

महाराष्ट्रीय संस्था

"मुंबई राज्याचा गव्हर्नर झाल्यापासून महाराष्ट्रांत फिरण्याची मला जी संधि लाभली तीवरून महाराष्ट्रीय लोक, त्यांचें मन आणि त्यांचीं कार्यें यांची मला चांगली माहिती झाली आहे. गांधीजींच्या धोरणानुसार चालणाऱ्या संस्था स्थापून गाजावाजा न करतां कार्य करीत राहणारीं मंडळी जर कोठें असलींच तर तीं महाराष्ट्रांतच आहेत, असें मी बिनधोक सांगू शकतो. इतर प्रांतांतल्या लोकापेक्षां महाराष्ट्रीयांनाच गांधीजी चांगले समजले, आणि गांधीजींच्या शिकवणीचा अंमल महाराष्ट्रीयांनींच जास्त प्रमाणांत केला असें माझें ठाम मत झालें आहे."

—डॉ. हरेकृष्ण मेहताब

तारेचा पत्ता:-Newbottle
के. के. शहा ॲंड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुचें, कॅपसुल्स
[हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाची सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

पवित्र
नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोळा.
हिमालय कस्तुरी रु. ४१ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोळा.
लिहा:-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

आयुर्वेद युनानी बोर्ड, मुंबई

पूर्वीं जाहीर झाल्याप्रमाणें नव्या आयुर्वेद
नी बोर्डाची पहिली सभा २९ सप्टेंबर रोजीं झाली.
भेंत पुढील दोन सभासद ५ वर्षांसाठीं आयुर्वेद
नी फॅकल्टीवर निवडून पाठविण्यांत आले.

द्य ब्रह्मदत्त शर्मा सनाढ्य, भुसावळ
कीम गोपालसिंग रामसिंग, मुंबई

या बोर्डावर फॅकल्टींतून पुढील दोन वैद्य निव-
आले आहेत.

मो. य. लेले (प्रिं. पोदार कॉलेज), मुंबई
ना. ह. जोशी, मुंबई

* * *

बोर्डाच्या कार्यकारी मंडळाची निवड पुढील–
णें झाली आहे. या कार्यकारी मंडळाची मुदत
१ वर्ष ही आहे.

द्य रुद्रदत्त जादवजी आचार्य, मुंबई
द्य माधवशास्त्री जोशी, पुणें
३ वैद्य गोविंदप्रसाद हरिदास, अहमदाबाद
४ वैद्य य. धों. नाटेलीकर, कागल
५ वैद्य अमरप्पा वीरप्पा गदग, बेळगांव
६ वैद्य ना. ह. जोशी, मुंबई
अध्यक्षः — वैद्यरत्न पं. शिवशर्मा, मुंबई

* * *

आयुर्वेद युनानी फॅकल्टी, मुंबई

या फॅकल्टीच्या कार्यकारी मंडळावर पुढील सदस्य निवडले गेले आहेत.

वैद्य हरिदत्तशास्त्री.	वैद्य वल्लभराम विश्वनाथ
वैद्य ना. ह. जोशी.	वैद्य डॉ. एस्. अंतरकर

अध्यक्षः— वैद्य पं. शिवशर्माजी, मुंबई

* * *

आयुर्वेद युनानी फॅकल्टीच्या सरकारनियुक्त सभासदांचीं नांवें आयुर्वेद पत्रिकेच्या पान २२९ वर छापलीं आहेत त्यांत वै. बापालाल वैद्य, सुरत यांचें नांव चुकीनें राहून गेलें आहे तें तेथें लिहावें.

* * *

भारतीय प्राचीन कला व शास्त्र

भारतीय शिल्पकलेचा नमुना प्राचीन लेण्यामध्यें सांपडतो.

भारतीय प्राचीन औषधी विद्येचा उपकारक अनुभव धूतपापेश्वर औषधांमध्यें प्रत्ययास येतो.

— आमचे बलपुष्टिवर्धक कल्प —

१ शिलाप्रवंग
१ अभ्रलोह
१ सुवर्णमालिनीवसंत

धूतपापेश्वर इंडस्ट्रीज् लि.

पनवेल—मुंबई

वाचकांचा पत्रव्यवहार —

औषधांच्या गोळ्या १ गुंजेच्या असाव्या

माझी अशी प्रमुख तक्रार आहे कीं, आपलेकडील औषधांच्या गोळ्या फारच बारीक असतात. उदा० महामृत्यंजय, आरोग्यवर्धिनी वगैरे. गोळी साधारणपणें निदान १ गुंजेची तरी नको काय?

बारीक गोळी उगाळणें कठीण जातें

मग तुम्ही म्हणाल कीं, "दोन किंवा तीन गोळ्या एकदम द्याव्या". परन्तु बारीक गोळी उगाळण्यास फारच त्रास पडतो. आधींच गोळ्या उगाळण्यास जनता कंटाळली आहे. त्यांतल्यात्यांत मोठी गोळी असेल तर ती उगाळण्यास सुलभ जातें. बारीक गोळी हातांत नीट सांपडत नाहीं व त्यामुळें उगाळणें कठीण जातें.

आतां या गोळयांची पूड करून पुड्या बांधणें शक्य आहे; परन्तु इकडील वैद्यांनीं पूर्वीपासूनच गोळ्या देण्याची व गोळीला १ आणा, १॥ आणा, २ आणे घेण्याची परम्परा चालविली आहे; ती मोडून काढणें कठीण जाते. गोळ्याची पूड करून त्यांच्या पुड्या बांधून देण्यांत निष्कारण वेळ जातो.

पूड देण्याची पद्धत

तरी रसायन गोळ्या, कमींत कमी प्रत्येक गोळी १ गुंज वजनाची तरी भरेल, अशा प्रकारें बनवाव्या. अलीकडे गोळयांची पूड करून पुड्या बांधून देण्याची पद्धतसुद्धां रूढ आहे. परन्तु त्यासाठीं बारीक गोळ्या पाहिजेत असें नाहीं. मोठ्या गोळयांचीसुद्धां पूड करतां येईलच. सबब बारीक गोळ्या नसाव्या अशी विनंति आहे.

—वै. के. व्हीं. देसाई, सागवे

[वाचकांची सूचना योग्य आहे व ओल्या असतांना ५ गुंजा वजनांत ४ गोळ्या बसतील या प्रमाणांत गोळी करण्याची पद्धत आयुर्वेद सेवा संघानें सुरू केली आहे.

तथापि मधून मधून बारीक गोळयांची मागणी करणारे वैद्य आढळतातच. नुकतीच एका वैद्यानीं रौप्यसुवर्णसूतशेखराच्या एक गुंजेत ४ गोळ्या [-।· गुंजेची १ गोळी] करून १ तोळा रौप्यसुवर्णसूतशेखर पाठवा अशी मागणी केली आहे. एक तोळ्याची एक गोळी पाठवा, अशी मागणीहि बाळगोळ्यासारख्या औषधाबाबत येते. तात्पर्य हेंच कीं, रोग, रोगी, देश, काळ व चिकित्सकाचा दृष्टिकोन यांच्या भेदामुळें मात्राप्रमाण बदलतें. आधींच औषधांची संख्या भरमसाट वाढत चालली आहे, त्यांत लहान मोठ्या गोळ्या मात्रा या प्रकारांमुळें औषधीकरण व विक्रेते यांना बऱ्याच अडचणी येतात. औषधांची पूडच मागणारे वैद्यहि आहेत. ते चमच्यानें आपलें औषध देण्याचें प्रमाण बसवितात. ही पद्धत अधिक चांगली आहे. कारण त्यामुळें फार प्रकार संभवत नाहींत. मात्र कडु, तुरट गोळ्या गिळावयास सोप्या पडतात व औषध म्हणजे कांहीं कडु, तुरट असावयाचेंच. —संपादक]

उज्वल कीर्ति

आयुर्वेदीय औषधांची उज्वल कीर्ति बनविलेल्या सिद्ध औषधांच्या गुणावर आहे. औषधें गुण देणारीं असतील तर कीर्ति नेहमीं उज्वल राहील. तरी अशीं गुण देणारीं औषधें, अस्सल ताजीं व स्वच्छ घटक औषधी द्रव्यें खरेदी करण्यावर अवलंबून आहे. औषधी द्रव्यासाठीं आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स
पायधुनी, मुंबई नं. ३
फोन नं. (३१८५८) यांचेकडे मागणी करा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात.
अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवा.

कृमिनाशक औषध 'सँटोनाईन'

(लेखक – श्री. रमेश बेदी व श्री. अनुकूलचंद्र दे)

सँटोनाईन हें एक प्रसिद्ध कृमिघ्न औषध आहे. आर्टिमीजिया जातीच्या एका लहान रोपटाच्या …ीं पोट प्रकारांच्या न उमललेल्या (कोंवळ्या) …ीपासून तयार करतात. हीं रोपटीं रुसो–तुर्कस्तान …ांत विपुल प्रमाणांत उगवतात. ह्या वनस्पतीचें …द्रिदीय नांव आर्टिमीजिया सीना असें आहे. …रतामध्यें ह्याच जातीपैकीं आर्टिमीजिया ब्रेवीफोलिया … नांवाची वनस्पति उगवते व हिच्यापासूनहि …टोनाईन मिळूं शकते. ही वनस्पति गढवालपासून … उत्तरेस काश्मीरपर्यंत ४००० ते १२००० फूट …चीच्या प्रदेशांत, तसेंच हिमालयामधील सदर …चीच्या प्रदेशांत उगवते.

जरी ही वनस्पति विपुल प्रमाणांत उपलब्ध होत …सली तरी तिच्या सर्व भेदोपभेदांमध्यें सँटोनाईन …त्व असत नाहीं. काश्मीर व जम्मूचा चन्द्रभागा …दीच्या कांठावर असलेला किश्तवाड प्रदेश ह्यांत …गवणाऱ्या सर्व भेदोपभेदांमध्यें हें सँटोनाईन तत्त्व …याशीलं स्वरूपांत मिळूं शकतें. चंबा–पांगी प्रदेशांत …हीं कांहीं ठिकाणच्या फक्त हिरवा रंग असलेल्या … वनस्पतींत सँटोनाईन मिळतें; परंतु लव असलेल्या …तवर्ण वनस्पतींत तें मिळत नाहीं. लाहौल प्रदेशां– …हि हें तत्त्व फक्त हिरव्या रंगाच्या वनस्पतींतच …पडतें. बुशहर प्रदेशांतील आर्टिमीजियाच्या कोण– …ाहि प्रकारांत सँटोनाईन तत्त्व अद्यापपर्यंत उपलब्ध …ऊं शकलें नाहीं. गढवाल जिल्ह्यांतील मलौरी गांवा– …ळच्या कांहीं प्रकारांतच सँटोनाईन मिळालें.

सँटोनाईन कोठें काढतात ?

ह्या कारणास्तव वनस्पतीपासून सँटोनाईन काढ…ण्याचें काम जम्मूमधील किश्तवाड प्रदेशांत व काश्मीर …मधील गुरेज जिल्ह्यांतच होतें; अन्य ठिकाणीं सँटो–नाईनच्या निष्कासनाचें काम होत नाहीं.

हिमाचल प्रदेशांत ह्या वनस्पतीची लागवड मुद्दाम केल्यास ती होणार नाहीं; फक्त हिमालयाच्या आंतल्या भागांत जेथें हिमवृष्टि होत नाहीं व जेथें पाऊसहि नाहीं तेथेंच ही वनस्पति आपोआप उगवते.

वर्णन

आर्टिमीजियात ब्रेवीफोलिया हें एक लहानसें रोपटें आहे व त्याची उंची साधारणतः १॥फूट ते ३ फूटापर्यंत असते. हें रोपटें पांढरी लवयुक्त अगर धुसरलवयुक्त असतें. पानें पांढरी अगर हिरवी असतात, व त्यांना कापूरासारखा तीव्र दर्प येतो. हिमपातामुळें जमिनीवरील रोपटाचा भाग वाळून जातो, परंतु वसंतऋतूमध्यें रोपटांच्या मुळांना नवीन कोंब व धुमारे फुटूं लागतात, शरद–ऋतूमध्यें फुलें येतात व शिशिर-ऋतूमध्यें बीजें पक्व होण्यास प्रारंभ होतो. ह्या रोपटांचीं पानें नागदौन (नागदवणा) रोपटाप्रमाणें असतात, व फुलें हिरवीं अगर पिवळीं अगर दोन्ही रंगाच्या मिश्र रंगाचीं असतात.

प्रांतपरत्वें भिन्नभिन्न नांवें

अफसन्तीन (अरब), मुरीन (काश्मीर), सेस्की (जम्मू चंबा, लाहौल), बिऊर (चिनी, बुशहर), पर्चा (गढवाल).

उपयोगी भाग

कोंवळ्या मंजऱ्या (कलिका घोंस) व कोंवळीं पानें. पूर्ण वाढ झालेल्या पानांमध्यें भेषजीय अंश शिल्लक राहात नाहीं. वनस्पतिसंग्रहकाल जूनच्या मध्यापासून तो ऑगस्ट अखेर असतो.

रसायनिक संघटन

भारतीय वनस्पतीपासून १ ते २ टक्के सँटो–नाईन मिळतें व उडणारें तेल ०·५ ते १ टक्का मिळतें. ह्या तेलाचा वास कापूराच्या व वेलचीच्या तेलासारखा येतो. सँटोनाईन रंगविहीन, अभ्रका-

सारखें शुभ्र कणमय व तिक्तरसाचें आहे. सूर्यप्रकाशानें याचा रंग पिवळा होतो, म्हणून हें काळ्या रंगाच्या बाटलींत ठेवतात. हें देण्याचें प्रमाणः— १ वर्षापर्यंतच्या मुलांस ।॰ ते ।।॰ ग्रेन, पांच वर्षापर्यंतच्या मुलास १ ते १।। ग्रेन व त्यापुढें वयोमानाप्रमाणें १ ते ३ ग्रेन पर्यंत द्यावें.

उपयोग

सॅन्टोनाईनचा उपयोग गोल क्रुमि (जंत) गुंगविण्याकरितां करतात. तंतु-क्रुमीवर (किरीम) ह्याचा परिणाम कमी प्रमाणांत होतो. अन्य क्रुमि जसें चापट क्रुमि, अंकुशमुख-क्रुमि ह्यांच्यावर सॅन्टोनाईनचा परिणाम होत नाहीं. हें रात्रीं झोंपण्याचें वेळीं देतात व दुसऱ्या दिवशीं सकाळीं एखादा जुलाब देतात.

अतिउपयोगाचे दुष्परिणाम

ह्याचें प्रमाण जास्त दिलें गेल्यास त्यानें वमन, अतिसार, कंप, शिरःशूल, अरुचि, स्वेदाधिक्य ह्यासारखे उपद्रव निर्माण होतात, म्हणून हें देतांना प्रमाणाबाबत दक्षता घेतली पाहिजे.

निष्कासन पध्दति

पूर्णपणें न उमललेल्या फुलांच्या कळ्या व कोंवळीं पानें वाळवून त्यांचें चूर्ण करतात. नन्तर या चूर्णांतील उडून जाणारें तेल बाष्पीभवनक्रियेनें काढून टाकतात. तेल काढल्यानंतर चूर्णाची लुगदी चुन्याच्या पाण्यांत घालून उकळतात. उकळल्यानंतर चूर्णाच्या लुगदीचें पाणी गाळून घेऊन त्यांत थोडा कॉस्टिक सोडा टाकतात. नंतर त्या पाण्यांत कार्बन डायऑक्साइड गॅस [कर्बिल वायु] सोडतात. या क्रियेनें त्या पाण्यांतील सर्व चुना जमून येतो. नंतर तें पाणी गाळून घेऊन चुना काढून टाकतात. गाळून घेतलेल्या पाण्यास नंतर ऊन करून त्यांत थोडें तेजाब टाकतात. कांहीं वेळानें हें पाणी थंड झाल्यावर तळाशीं सॅन्टोनाईन जमून बसतें. नंतर त्या पाण्यांत मद्यार्क घालून ढवळतात व कोळशाच्या संस्कारानें त्यास रंगरहित करून त्याचे स्फटिक कण बनवितात. अशा प्रकारें शुद्ध सॅन्टोनाईन तयार करतात.

व्यापारी महत्त्व

सँटोनाईजच्या निर्मितींत रशिया अग्रेसर आहे; व ह्याची निर्मिति मुख्यतः रुसो--तुर्कस्थानांत विशेष होते. पाकिस्तानांतहि सँटोनाईन तयार होतें व भारतांत फक्त काश्मीरमध्येंच तें बनविण्यांत येतें. भारताची वार्षिक गरज दोन हजार पौंड सँटोनाईनची आहे, परंतु सध्यां भारतांत फक्त एक हजार पौंडच सँटोनाईन तयार होतें व उरलेली गरज पाकिस्तान आणि रुसो--तुर्कस्तानमधून पुरी केली जाते.

सँटोनाईनचा चालू भाव ४०० रु. पौंड असा आहे. व त्या दृष्टीनें जर भारतांत सँटोनाईनच्या वनस्पतीची (आर्टिमीजिया ब्रेवीफोलिया) पद्धतशीर लागवड केली गेली व त्यापासून सँटोनाईन काढण्याचे कारखाने काढण्यांत आले तर हा एक भारतीय जनतेला उत्तम लाभदायी व्यवसाय होऊं शकेल.

आधार ग्रंथ

'वेल्थ ऑफ इंडिया,' प्रथम भाग; 'दि इंडियन फार्मास्युटिकल कोडेक्स,' १९५३; 'दि ब्रिटिश फार्मास्युटिकल कोडेक्स,' १९५४; 'मेडिसिनल प्लँट्स् ऑफ् इंडिया अँड् पाकिस्तान,' [जे. एफ्. दस्तूर कृत]; 'इंडिजिनस ड्रग्ज ऑफ् इंडिया,' [श्री. रामनाथ चोपडा कृत]; 'भारतीय भेषजतत्त्व,' [कार्तिक बसु कृत].

—'गुरुकुल पत्रिके' च्या अनुज्ञेनें

थंडगार
नेत्रांजन
डोळ्यांचे विकारावर उत्कृष्ट
कृष्णशास्त्री बिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

गट्–४०० (Gut-400) [लेखकः— एम्. पोपोव्हस्की]

'गट्-४००' हें रशिया संशोधित नवीन ीय चिकित्सोपयोगी उपकरण आहे. 'गामा– ,' चिकित्सेकरितां, पूर्वी रशियामध्यें रेडियम- ारित उपकरणांचा उपयोग केला जात असे, परंतु आतां सुधारणा करून ह्या नवीन संशोधित 'गट्– ४००' उपकरणांत रेडिओ-ॲक्टिव्ह कोबाल्टचा उपयोग करण्यांत येतो. रेडियमपेक्षां रेडिओ-ॲक्टिव्ह-कोबाल्ट हें विशेष कार्यक्षम व अधिक प्रभावशाली आहे. थोडक्यांत कल्पना द्यावयाची झाल्यास ह्या नवीन 'गट्– ४००' उपकरणांतील



डॉ. व्ही. सेलिखोव्हा, गट् ४०० चा उपयोग करीत आहेत.

कोबाल्टची किरणोत्सर्गशक्ति ४००ग्रॅम रेडियमशक्तिबरोबर आहे. गेल्या यूरोपीय महायुद्धापूर्वी प्रचारांत असलेल्या मोठ्यांत मोठ्या रेडियम–किरण–चिकित्सा-उपकरणाची शक्ति फक्त १२ ग्रॅम रेडियम इतकीच होती.

हें अणुशक्तीनें रोग बरे करतें

'गट्'मध्यें स्फुटित अणूचा (Split Atom) उपयोग करून रेडियम–किरणचिकित्सा केली जाते. रेडियम–किरणचिकित्सा ही विशिष्ट मर्यादेंतच माणसास हितावह आहे, तिचा अतिरेक झाल्यास ती हानिकारक होते, म्हणून ह्या 'गट्' उपकरणाच्या सान्निध्यांत काम करणाऱ्यांना रेडिओ–ॲक्टिव्ह कोबाल्टच्या किरणापासून उपसर्ग होऊं नये म्हणून ह्या उपकरणाचा बराचसा भाग शिशाचाच केलेला असतो.

एक्स्-रे फिल्म

रेडिओ–चिकित्सा विभागांत काम करणाऱ्या डॉक्टरांजवळ एक आगपेटीच्या आकाराची धातूची डबी असते, व त्या डबींत एक्स–रे फिल्म ठेवलेली असते. गामा किरणप्रवेशाला ह्या डबीच्या धातूचा अडथळा होऊं शकत नाहीं· त्यामुळें प्रत्येक वेळीं ही फिल्म डेव्हलप् केल्यावर रेडिओ-चिकित्सा विभागांत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यावर सुरक्षित मर्यादेपेक्षां अधिक परिणाम झाला आहे किंवा काय याची नोंद मिळते.

शेजारच्या खोलींत डॉक्टर

डॉक्टर्स 'गट्' यंत्र, यंत्राच्या शेजारीं असलेल्या स्वतंत्र खोलींतून चालवितात. ह्या खोलींत एक नियंत्रक मेज असतें व त्यावर हिरव्या प्रकाशांत 'सांठा' (Storage) असा शब्द दिसतो. ह्याचा अर्थ असा कीं, रेडिओॲक्टिव्ह कोबाल्टचें ॲम्पूल यंत्राच्या शिशाच्या गोलकांत मध्यभागीं सुरक्षित आहे. परन्तु रुग्ण ज्यावेळीं किरणचिकित्सा घेण्यास सिद्ध होतो व ह्या यंत्राची सोंड [चित्र पहा] जरूर त्या स्थितींत ठेविली जाते, त्यावेळीं नियंत्रक मेजावर तांबडा प्रकाश पडतो; ह्याचा अर्थ असा कीं, कोबाल्ट गट् यंत्राच्या सोंडेंत आलें आहे व त्याची रेडिओचिकित्सा सुरू झाली आहे.

सदर यंत्रांत अशीहि सोय केली आहे कीं, रुग्णावर चिकित्सा जितकीं मिनिटें व सेकंद करावयाची असेल तितकीं मिनिटें व सेकंद झाल्याबरोबर यंत्र किरणचिकित्सा करण्याचें काम आपोआप बंद करतें. त्याचप्रमाणें चिकित्सा चालूं असतांना रुग्णाजवळ डॉक्टर अगर नर्स नसतांहि रुग्ण जर कांहीं बोलला तरी तें त्याचें बोलणें शेजारच्या खोलींत जेथें डॉक्टर नियंत्रक मेजाजवळ (Control desk) काम करीत असतो तेथें त्यास ऐकूं येतें; त्याचप्रमाणें डॉक्टरनें जर कांहीं रुग्णास कांहीं सूचना केल्या तर त्या त्याला रेडिओटेलिफोन द्वारा ऐकूं जातात.

सबळ आशा

निरनिराळ्या अर्बुद प्रकारांत (Tumours) शल्य चिकित्सा, औषधि-चिकित्सा ज्याप्रमाणें केली जाते त्याचप्रमाणें किरण-चिकित्सा (iradiation) हीहि एक त्या बाबतींत बहुमोल अशी चिकित्सा ठरली आहे. किरणचिकित्सा केल्यामुळें पुष्कळ वेळां शस्त्रकर्म करण्याचें टळूं शकतें. परंतु प्रत्येक रुग्णाचे बाबतींत ही चिकित्सा यशस्वी होईलच असें मात्र नाहीं. तथापि ह्या चिकित्सेमुळें निरनिराळे रोग विशेषतः अर्बुद प्रकार बरे करण्याच्या बाबतींत आमची आशा बळावत आहे.

रशियांतील काझखस्तान या गांवीं राहणारा व यांत्रिक दुरस्ती वगैरे कामें करून उपजिविका करणारा एक गृहस्थ इ. स. १९५१ सालीं आजारी झाला. डॉक्टरांनीं त्याच्या प्रकृतीची तपासणी करून त्यास एक प्रकारचा अर्बुद रोग (Tumour of nasopharynr) झाल्याचें निदान केलें. तो रोग शस्त्रकर्म करूनहिं बरा होण्यासारखा नाहीं असें त्यांचें मत पडलें. त्यामुळें तो रुग्ण मॉस्को येथील ' फर्स्ट मेडिकल इन्स्टिटयूट ' ह्या हॉस्पिटलमध्यें चिकित्सेसाठीं दाखल झाला. तेथें त्याच्यावर रेडिओकोबाल्ट किरणचिकित्सा करण्यांत आली. दोन महिने

त्सा घेतल्यानंतर सदर रुग्णास पुनरुज्जीवन झालें, व त्यानें आपल्या कामधंद्यास सुरुवात . मॉस्को येथें सदर गृहस्थ दरसाल प्रतिबंधक तेसाठीं (check-up) येत असे. तिसऱ्या वर्षी ऱ्यानें त्याच्या रुग्ण-पत्रकावर ‘पूर्ण बरा (well,)’ आत्मविश्वासपूर्ण शेरा लिहिला.

वरील रुग्णासारखीच एक असाध्य स्थितींत ली मास्कोजवळील एका खेड्यांत राहणाऱ्या नांवाच्या एका शाळकरी मुलीची गोष्ट अनुभवास . ही मुलगी ज्यावेळीं हॉस्पिटलमध्यें दाखल त्यावेळीं ती वांचेल असें मुळींच वाटत नव्हतें. हिच्याहि बाबतींत किरणाचिकित्सा (irradia-n) यशस्वी ठरली. स्फुट-अणु किरणाचिकित्सेचा ह्याहि वेळेस उत्तम प्रकारें प्रत्ययास आला.

— सोव्हिएट लॅन्ड

मांसवृद्धिजन्य रोगावरील उपचार

[मांसवृद्धिभवान् रोगान् शस्त्रक्षाराग्निकर्मभिः। ातुवृद्धि झाली असतां गलगंड, अर्बुद, ग्रंथि, ला, ऊरुवृद्धि, उदरवृद्धि, व कंठ, नासा, गल, योनि, गुद व त्वचा इत्यादि ठिकाणीं अधिमांस ग होतें. तें घालविण्यासाठीं आयुर्वेदानें शस्त्रकर्म र्म व अग्निकर्म हीं एकापेक्षां एक श्रेष्ठ सांगितलीं त. वरील लेखांत वर्णन केलेला गट्-४०० हा अग्निकर्मांमध्यें मोडतो. नाक व गळा यांच्या ान झालेलें अर्बुद या उपायानें बरें केल्याचें हरण वर दिलें आहे. अग्निकर्माचे विविध आधुनिक र आयुर्वेदांत अंतर्भूत करतां येण्यासारखे आहेत.

ही मूलग्राही चिकित्सा नव्हे

तथापि मांसधातुवृद्धिजन्य रोग्यांची ही मूलग्राही त्सा नव्हे, असें आयुर्वेदाचें स्पष्ट सांगणें आहे. झालेला रोग कापून काढणें, क्षरण करणें, किर-णीं जाळून टाकणें हा त्या चिकित्सेचा एक भाग . पण त्या रोग्यास हा रोग होण्याचीं कारणें-ातुवृद्धीचीं कारणें-शोधून काढून तीं नाहींशी करणें हा दुसरा भागहि त्याचबरोबर विचारांत घेतला पाहिजे.

कारणें दूर केलीं पाहिजेत

‘सामान्यं वृद्धिकारणम्’ या नियमानुसार मांस-धातुसमान आहारद्रव्यें आहांतून कमी केलीं पाहिजेत, अगर योग्य संस्कार करून तीं वापरलीं पाहिजेत. शिवाय दोषाचिकित्सापद्धतीनुसार मांस हा कफदोष-संबद्ध धातु आहे हें लक्षांत घेऊन कफदोष वेळींच (काले) शोधनानें स्वस्थ ठेवण्याचें तंत्रहि अमलांत आणलें पाहिजे. तरच मांसधातुवृद्धीवरील मूलग्राही चिकित्सा केली गेली असें होईल. कारण नाहींसे झालें नाहीं तर एका ठिकाणची वृद्धि घालविल्यानंतर दुसऱ्या स्थानीं अन्य स्वरूपांत तें दुखणें प्रगट होण्याची शक्यता राहील. ही शक्यता दूर करण्याची शक्ति आयुर्वेदीय विचारसरणींत आहे. —संपादक]

वाचकांचा पत्रव्यवहार—

“संशय खरा आहे!”

मुळव्याधीचे मोड ‘झडून’ जातात यावर गेल्या अंकांतील संपादकीय तळटीपेंत दर्शविलेला संशय— कीं मी मुळव्याध-मोड काढण्याचे प्रयोग पाहिले नाहींत—खरा आहे. ज्यांनीं पाहिला त्यांचेकडून वर्णन यथावकाश येईलच. पण तत्संबंधीं एक मुद्दा असून वस्तुतः त्याचवेळेस तो लिहिणें अवश्य होतें. पण नजरचुकीनें राहिलें.

मुळव्याधीचे २ प्रकार

मुळव्याध दोन प्रकारची— एक ‘रक्ती’ म्हणजे नीलेचें जटिलत्व-यांत रक्तस्राव असून दुखणें नसतें दुसरा प्रकार म्हणजे शौचाच्या ‘खड्या’ मुळें गुद-मार्गाचे आस्तर गुंडाळत मुखाशीं (गुदद्वारीं) जमून त्याची गुंडाळी होते. अर्थात नीलेशीं याचा संबंध नसल्यानें यांत रक्तस्राव झाल्यास नांवापुरताच, पण पण वेदना मात्र जास्त असतात. तेव्हां मद्रासी वैद्य मोड काढतात ते रक्ती का “चौकीदार” (Sentinel Piles) याचा खुलासा व्हावा.

नीला – संघ (व्हेनस सिस्टिम) हा रुधिराभिसरणातील “ कच्चा दुवा ”- हे विधान सापेक्ष (Relative) असून खड्यांची (valves) संख्या व शक्ति बेताची हें त्याचें कारण दिलेंच आहे. फ्युज वायरशीं त्याचें साम्य पटत नाहीं. योगासनांतील शीर्षादि “ उर्ध्वमूलमधःशाखम् ” आसनें या कच्चा दुव्यास सुधारतात. ” —र. कृ. गर्दे

‘कॉफी’ तयार आहे

‘ आतां शास्त्रीय चर्चेलाहि‘पत्रिका म्हणजे चहाप्रचार पत्रिका झाली आहे ’ अशी लोकांची तक्रार येऊं लागली म्हणालात, तर अशी साधक बाधक चर्चा होणार तरी केव्हां व कशी ? चहाचे आयुर्वेदीय गुणधर्म निश्चित व्हावयास हवेत, तर अशी चर्चा सर्वांगांनीं होणें जरूर नव्हें कां ?

नुसत्या चहाच्या पेल्याच्या वादळाचा एवढा बाऊ केला तर पुढें कॉफी, कोको, इ० पंचवीस तरी नव्य खाद्यपेयांचें काय करावयाचें ?

‘कॉफी’ तयार आहे. चहा इतकेच १०।१२ श्लोक. इतकी संक्षिप्तताहि पुढें अधिक चर्चेला कारण होतेच. पण ती व्हावीच असें मलाहि वाटतें. आपल्या पत्रिकेचा अशा चर्चांनीं दर्जा कमी होण्याची मला तरी भीति वाटत नाहीं. — पां. ह. देशपांडे

हिपोक्रॅटिसची गीता

हिपोक्रॅटिस (इ० स० पूर्व ४६० ते ३५७) हा अथेन्समध्यें वैद्यक–व्यवसास करीत असें. त्याचा शिष्यपरिवार मोठा होता. पाश्चिमात्य लोक याला “ वैद्यकांचा पिता ” समजतात. अद्यापिहि त्याच्या सूक्तींचे वगैरे उतारे वैद्यक–संबंधींच्या इंग्रजी ग्रंथांत घेतात. आपल्या शिष्यांना तो एक शपथ घ्यावयास लावीत असे, ती अजूनहि डॉक्टर लोक आपलें ‘ब्रीद वाक्य’ मानतात. ती शपथ अशी:—

“ माझ्या रोग्याच्या हिताचें असेल तेंच मी करीन व हानिकारक अगर खोडसाळ असेल तें टाळीन. जहर विष कोणीं मागितलें तर मी देणार नाहीं. किंवा असा अन्य मार्गहि सुचविणार नाहीं. कोणत्याहि बाईला गर्भपात करायला मी मदत करणार नाहीं. आपलें जीवन व व्यवसाय मी निर्मल व पुण्यशील रीतीनेंच चालवीन. कुठल्याहि घरांत मी शिरेन, तो रोग्याच्या कल्याणाकरितांच. आणि चावटपणा व लांच–लुचपत मी टाळीन, त्यांतल्या त्यांत फितवेगिरी. व्यवसायिक अगर इतर संबंधामुळें कळलेलें रहस्य–चारचौघांत बोलूं नये तें–मी फोडणार नाहीं.

या शपथा पाळून माझें जीवित व माझी उदात्त व्यवसाय–वृत्ति सुखानें जावो, परन्तु प्रतिज्ञेपासून मी ढळलो तर त्याच्या उलट होवो ! ” – गो. गं. लिमये

हावर्ड विद्यापीठांत व्याख्यान

ता. ३ १०–५५ रोजीं सायंकाळीं ३॥ वाजतां दंतवैद्य जायदे यांनीं जादूच्या दिव्याच्या (मॅजिक लॅटर्न) साहाय्यानें सुप्रासिद्ध हावर्ड विश्वविद्यालयाच्या दंत महाविद्यालयांत पोस्टग्रॅज्युएट विद्यार्थी व मुखशल्यज्ञ (ओरल सर्जन्स) यांच्यासमोर ‘ योगायुर्वेदाधिष्ठित शूलरहित दंतोत्पाटन व सव्यसाचित्व ’ या विषयावर व्याख्यान दिलें. नंतर प्रश्नोत्तरें झालीं. कार्यक्रम अत्यंत यशस्वी झाला. विद्यार्थ्यांनीं या विषयावरील पुस्तकांची मागणी केली आहे. विद्यापीठाचे डीन डॉ. नेल्सन यांच्याबरोबर दंतवैद्य जायदे यांची चर्चा झाली. त्यांनीं अनेक उपयुक्त सूचना श्री. जायदे यांना केल्या.

भैषज्यरत्नावलींतील खोकल्याचें औषध
भागोत्तर गुटिका
३ पिपळा, ४ हिरडा, ५ बेहडा,
६ अडुळसामूळ, साल व फुलें, ७ मारंगमूळ
८ जेष्टमध, पारा, गंधक बाभळीच्या भावना
आयुर्वेद सेवा संघ, नासिक

महारुख — (वनस्पति परिचय)

लेखक—
वैद्य निहालचंद मिश्र, ब्रह्मपुरी

महारूख हे नांव देऊन लिहिलेला, आयुर्वेद-केंतील १ ऑक्टोबरच्या वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर ा लेख ' वनस्पतीची ओळख ' या दृष्टीनें थोडा ासा वाटतो. तरीपण वनस्पति गुणांचे दृष्टीनें तसा हे वाटला. परंतु वैद्य मुकुंद कृष्ण जोशी यांनीं लेल्या लेखांतील या झाडाचें " महाडुंग " हें संदिग्ध आहेसें वाटतें ! तरीपण या झाडास चे दृष्टोत्पत्तीस आणण्याचें काम वैद्य मुकुंद शी यांनीं केलें असून वैद्यवर्गांत या झाडांबद्दल ज्ञासाहि त्यांनींच उत्पन्न केली याबद्दल ते स्तुतीस आहेत.

महारुख—हें झाड माझ्या चांगल्या ओळखीचें . माझें बालपण ज्या खेड्यांतील घरांत गेलें, त्या ्या समोरच हीं झाडें ५–५० हल्लींहि आहेत. त् हें झाड माझ्या चांगल्या परिचयाचें आहे.

याचीं झाडें—मऊ अथवा जळालेल्या पोकळ नींत फारच लवकर वाढतात व तेथेंच हीं झाडें असतात. याचें लांकूड फारच ठिसूळ असतें. ३ फूट व्यासाची फांदी वानरांच्या जोराच्या नें सहज तुटून पडते, मग मनुष्यांचे ओझें सांभा-कठीणच !

हें झाड लौकर वाढतें

या झाडाची साल जाडी, पांढरी असते. झाड ते ५० फुटापर्यंत वाढत जातें, व तेंहि ४–५ तच; परंतु तितक्या लवकर मरतेंहि ! याच्या ंतर डाहाळ्या येतात त्या १ ते ३ फुटापर्यंत असून त्यांच्या दोन्ही बाजूला पानें येतात. कांहीं ांनीं पानें पिकून गळूं लागलीं म्हणजे त्या डाहा-ि आपोआप गळून पडतात व पुढें पुढें नवीन ्या येऊन ती फांदी वाढत जाते. पानाचा र हुबेहुब सालईच्या पानासारखा, हें पान कात्रे-ग मोठें असतें. सालईचीं पानें १॥ ते २ इंच तर हीं पानें ४ ते ५ इंच लांब. सालईचें पान अर्धा ते पाऊण इंच रुंद, तर हें १॥ ते २–२॥ इंच रुंद. याला उन्हाळ्यांत फुलें येतात तीं गुच्छच्या गुच्छ राहतात. एका गुच्छांत कमींतकमी दोनशें ते चारशें-पर्यंत फुलें असतात व तितक्याच एका गुच्छांत याला पातळ पातळ अर्धा इंच रुंद आणि एकदीड इंच लांब अशा चपट्या शेंगा येतात. त्या शेंगेंत मध्य-भागीं फक्त एकच बीं असते. आणि ह्या शेंगा वाळल्या म्हणजे हवेनें पानासारख्या तुटून दूर दूर जाऊन पडतात तेथेंच योग्य जमीन व हवापाणी मिळाल्यास हें झाड तयार होतें.

या लांकडाचा धूरहि कडू असतो

या झाडांचे सालीचा उपयोग गुरांचे व मेंढ्यांचे रोगावर पातळ परसाकडे होत असल्यास ताकांत हीं साल वाटून देतात. या सालीचा वास उग्रगंधी व कडवट असतो. हा वास इतका टिकाऊ असतो कीं, याचें वाळलेलें लांकूड जाळल्यास त्यापासूनहि धूर कडू निघतो. म्हणून या झाडाचें लांकूड स्वयंपाकाचे उपयोगीच काय पण नुसतें पाणी तापविण्यास देखील कोणी घेत नाहींत. हें झाड प्रथम फार सरळ व उंच जातें. यांत्र बुंध्याचा आकारहि ४–६ फुटाचा व्यास असल्यामुळें हीं ओलीं झाडें तोडून बगीच्यास पाणी देण्याकरितां त्याच्या डोंग्या तयार करतात; ह्या वजनानीं फार हलक्या असतात.

कागद करण्यासाठीं उपयुक्त लाकूड

या वनस्पतीचा उपयोग मी आपल्या रेडिओ-वर ३।४ महिन्यापूर्वी "नेपा मिलची भेट व माहिती" नांवाखालीं ऐकला तो असाः– " सालईच्या झाडांपासून जो कागद तयार होत आहे [नेपामिलमध्यें] त्यापेक्षां महारुखाच्या झाडापासून तयार केलेला कागद फारच वरच्या दर्जाचा तयार होतो. परन्तु हीं झाडें इतकीं जास्त मिळत नाहींत म्हणून भारत सरकार या झाडांची जंगलें लावण्याच्या विचारांत (किंवा तयारींत) आहे.

अशा या [सध्यांतरी] बहुगुणी झाडांची माहिती मला जी बालपणापासून आहे ती वैद्य बांधवांच्या उपयोगी पडावी, या हेतूनें लिहिली आहे.

कोणासहि या झाडाचें-खोड, साल, पानें, फुलें, शेंगा [जें पाहिजे असेल तें] फक्त दोन आण्याची तिकिटें पाठविल्यास पाठविण्यांत येईल.

अध्यापक चर्चा परिषद

येत्या अध्यापक चर्चेकरितां 'प्रत्यक्ष शवच्छेदनपूर्वक – शारीर संज्ञा – विनिश्चय' अशी व्यवस्था करण्याचा विचार चालू आहे. ही बैठक बहुधा मुंबईस होईल. तरी शारीर विषयाच्या अध्यापकांनीं या बाबतींत तयारी ठेवावी व कृपया मार्गदर्शनहि करावें. चालू महिन्याच्या आंत बाहेर ही व्यवस्था व्हावी असा अंदाज आहे. काय पध्दतीनें ही चर्चा व्हावी या बाबतींतील आपले विचार कृपा करून खालील पत्त्यावर पाठवावेत.

—वैद्य वि. म. गोगटे (निमंत्रक)
(अध्यापक चर्चा परिषद) नासिक

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नासिक

आयुर्वेदप्रवीण परीक्षा–प्रथम विभाग

शुद्ध आयुर्वेद विद्यालयाच्या दुसऱ्या वर्षांतील विद्यार्थी आयुर्वेद प्रवीण पदवीपरीक्षेच्या प्रथम विभागाच्या परीक्षेसाठीं सोमवार ता. १० रोजीं सायंकाळीं मुंबईस रवाना झाले. ह्या परीक्षेस ७ विषय आहेत. लेखी परीक्षा ता. १२ पासून सुरूं होऊन १५ रोजीं संपते. प्रात्यक्षिक परीक्षा ता. २० ते २३ अखेर (मुंबई येथें) होईल.

धन्वन्तरी उत्सव, अमरावती

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती या संस्थेच्या धन्वन्तरी विद्यार्थी मंडळातर्फे शनिवार ता. १५–१०–५५ रोजी धन्वन्तरी उत्सव साजरा करण्यांत येत आहे. त्या दिवशीं रात्रीं विद्यार्थी महाविद्यालयाच्या मदतीकरितां 'साष्टांग नमस्कार' नाटकाचा प्रयोग करून दाखविणार आहेत. समारंभाचे अध्यक्ष म्हणून वैद्य बिंदुमाधव पंडित (नासिक) यांना बोलाविण्यांत आलें आहे.

मधुमेहावरील उपयुक्त वनौषधी
तेलिया असाणा
यापासून तयार केलेलें शास्त्रोक्त सिध्द औषध
असनादि अयस्कृति (असनासव)
(वाग्भट चिकित्सा अध्याय १२, श्लोक २९-३२ पहा)

आतां सर्वत्र मिळूं लागलें आहे व तें गुणकारी आहे असा अनुभव आला आहे. ज्यांना रोजच्या रोज असाणा भिजविणें जमत नाहीं त्यांच्यासाठीं हें अधिक सोईस्कर आहे. शिवाय त्यांत असनादि गणांतील बऱ्याच वनस्पति व लोह असल्यामुळें अधिक गुणकारी आहे. मधुमेह, मूळव्याध, पांढरेकोड, त्वचारोग, अरुचि, कृमि, पांडुरोग, ग्रहणीरोग व लठ्ठपणा यावर याचा उपयोग ग्रंथांत दिला आहे. २० तो. १॥ रु.

आयुर्वेद औषधी भवन, नासिक

चंद्रकलारस-निर्णय

लेखकः- वैद्य मुकुन्दराव अं. गायकवाड
१११, उत्तरकसबा सोलापूर

ता. १६।९।५५ चें आयुर्वेद पत्रिकेंत वैद्य श्री. इंदुभूषण भिंगारे, नागपूर यांनीं, 'महाचन्द्रकला रस' शीर्षकाखालीं चर्चात्मक लेख लिहिला आहे. आणी लेखाचे शेवटीं पाठनिश्चितीबद्दल वैद्यवर्गास कळकळीची विनंति केली आहे.

लेखांत अनेक शंका मांडल्या आहेत. त्या शंकांचें निरसन पुढीलप्रमाणें करीत आहे.

गंधक ६ तोळे घ्यावा काय ?

ही शंका भारतभैषज्यरत्नाकराचे भाषांतर करणारे वैद्य श्री. नगीनदास छगनदास शहा यांनीं चन्द्रकलेंत गंधक ६ तोळे घ्यावा असें लिहिलें आहे म्हणून मांडली आहे.

मूळ पाठांत मग तो रसयोगसागरकर्ते हरिप्रपन्नजी यांनीं निर्देशिलेल्या ग्रंथांपैकीं कुटल्याहि ग्रंथांतील असो, त्यांत " द्विगुणं गंधकं चैव " हा जो उल्लेख आहे त्याचा वास्तविक अर्थ पहातां, दोन भाग गंधक घ्यावा असाच आहे. रसशास्त्र-पीठिका अशी असते कीं, जो कल्प सांगावयाचा असतो त्यांतील पहिलें द्रव्य बहुधा पारद हेंच असतें, आणि पारदास अनुलक्षून बाकीच्या द्रव्यांचें प्रमाण निर्धारित केलेलें असतें. जसें हाच चन्द्रकलारस सांगतांना, " प्रत्येकं तोल्ममादाय सूतं ताम्रं तथाऽभ्रकम् । द्विगुणं गंधकं चैव ...... ॥ " यांत पारा, ताम्रभस्म, अभ्रकभस्म हीं प्रत्येकीं तोळा तोळा घ्यावींत व गंधक पाऱ्याचे दुप्पट म्हणजे दोन तोळे घ्यावा असेंच अभिप्रेत असतें.

आरोग्यवर्धिनीचें उदाहरण

हें म्हणणें स्पष्ट करण्याकरितां आरोग्यवर्धिनीचें उदाहरण घेतोः—

रसगंधकलोहाभ्रशुल्बभस्म समांशकम्
त्रिफला द्विगुणा प्रोक्ता त्रिगुणं च शिलाजतु ॥ इ०

येथें 'त्रिफला द्विगुणा' म्हणून जें लिहिलें आहे, त्याचा अर्थ त्रिफळा हा पाऱ्याचे दुप्पट आणि शिलाजतु पाऱ्याचे तिप्पट घ्यावा हेंच गृहीत असतें.

आतां याच आरोग्यवर्धिनीचें गुजराथी व काठीयावाडी कांहीं वैद्यांनीं आणि औषधी कारखानदारांनीं कसें चुकीचें व विचित्र रूपांतर करून ठेवलें आहे पहा. त्यांनीं केलेला अर्थ—रसादि शुल्बान्त पांच द्रव्यें १।१ भाग, त्रिफळा द्विगुणा म्हणजे रसादि पांच द्रव्यांचे द्विगुण (५×२=१०) आणि शिलाजतु त्रिगुण म्हणजे रसादि पांच द्रव्यांचे तिप्पट (५×३=१५) घ्यावा वगैरे अज्ञानमूलक चुकीचें भाषांतर केलें आहे.

याच चुकीच्या विचारसरणीप्रमाणें चंद्रकलेचेंहि भाषांतर केलें गेलें आहे. पहा—

प्रत्येकं तोल्ममादाय सूतं ताम्रं तथाभ्रकम् ।
द्विगुणं गंधकं चैव......इत्यादि ॥

पारदादि अभ्रकान्त तीन द्रव्यें प्रत्येकीं १।१ तोळा व गंधक द्विगुण म्हणजे पारदादि तिन्हींचे द्विगुण म्हणजे सहा तोळे घ्यावा, इत्यादि. अशा भाषांतरामुळें इतर पुष्कळशा पाठांचा विचका होऊन जाईल. तेव्हां ही भ्रममूलक विचारसरणी सोडून ग्रंथाभिप्राय जाणून त्याप्रमाणें निर्णय घ्यावा.

अभ्रक घ्यावा कीं नको ?

रसयोगसागर—कर्त्यांनीं निर्देशिलेल्या १८ संदर्भ ग्रंथांसह आणखी इतरहि ग्रंथ ज्यांत चंद्रकलेचा उल्लेख आला आहे त्यांची छाननी करतां बहुतेक सर्वांतून अभ्रक घेण्याबद्दलचा उल्लेख स्पष्टतया आहे. आणि उपयुक्ततेच्या दृष्टीनें अभ्रक घालणें हितकरच आहे, हें सांगणें नकोच. वैद्यपरंपरा अभ्रकयुक्तच पाठ करीत आली आहे. याचा पुरावा पहाणें असेल तर कै. वैद्य-पं. गुणेशास्त्री यांचा औषधीगुणधर्मशास्त्र ग्रंथ, कै. भाटवडेकरांचा वैद्यसारसंग्रह, कै. बाळाचार्यांचा औषधीसंग्रह, आर्यवैद्यकलानिधि, अनंतरंग–रसकल्पसंग्रह, निघंटरत्नाकर इत्यादि जुन्या

पिढींतील वैद्यांनीं लिहिलेले ग्रंथ व कांहीं वैद्यांच्या मुलाखती घेतां अभ्रकभस्म चंद्रकलेंत घेतलेलें आहे असेंच आढळतें.

डाळिंबफळरस कीं पानांचा रस ?

कोणताहि निघंट काढून पहा, अथवा हल्लींचे प्रचारांतील घरगुती ओषधें [वै. अप्पाशास्त्री साठे कृत], डॉ. देसाईंचा औषधीसंग्रह इत्यादि ग्रंथ पहा. डाळिंबाचे पानांचा औषधी उपयोग केल्याचा कोठेंहि उल्लेख नाहीं. सर्वकडे डाळिंबफळांतील बियांचा रस, फळावरील साल, कळी, मुळाची साल एवढ्याच अंगांचा औषधीकार्यार्थ उपयोग केलेला आढळतो. अनेक ग्रंथ उघडून पाहिले पण पानांचा उपयोग आढळला नाहीं. फक्त हारितसंहितेंत मात्र अपवादात्मक असा उल्लेख चलित गर्भांवर इतर औषधांसह डाळिंबपानांचा उपयोग केलेला आढळला. तेंव्हां तो न गण्यच समजावा. डाळिंबबीजरसच जास्त करून प्रचारांतला आहे. कल्पकार नेहमीं प्रचारांतील द्रव्यांचा व अंगोपांगांचाच उपयोग करून घेत असतो. शिवाय गुणधर्मांचे दृष्टीनें डाळिंबबीज रसाचे गुणधर्म पहातां तृष्णा, दाह, भ्रम, क्लम, मूर्च्छा, अरुचि, पित्त, वांति, व्यामोह, ज्वरादि नाशक, रक्तापित्तघ्न बल्य गुणधर्म चंद्रकलेसारख्या दाह, पित्त, रक्तस्राव, तृष्णा, ज्वरहर कल्पास भावना देण्यास हितकरच आहेत. आणि डाळिंबें तर आतां केंव्हांहि उपलब्ध असतात. त्यांचा अभाव आढळत नाहीं. म्हणून डाळिंबपानांचा रस न घेतां फळांतील बियांचा रस भावनेकरितां घेणें अत्यंत श्रेयस्कर होय.

कोणत्या दूर्वेची भावना द्यावी ?

दूर्वेच्या म्हणजे हरळीच्या अनेक प्रकारांपैकीं श्वेत दूर्वा व नील दूर्वा हे दोन प्रकार जास्त प्रचारांत आहेत. दोन्हींचे गुणधर्महि सारखेच आहेत लोकांत पांढरे हरळीबद्दल जास्त ओढा आढळतो. वास्तविक पहातां पांढरे हरळींत गुणधर्मदृष्ट्या विशेषत्व कांहींच आढळत नाहीं. शिवाय पांढरी हरळी पाहिजे तेवढी आयत्या वेळीं उपलब्ध होतहि नाहीं म्हणून नीलदूर्वाच सर्व दृष्टीनें विचार करतां योग्य समजावी. दुर्वेची मुळासहित पानें घेण्याची वहिवाट आहे. दूर्वेचा रस काढून त्याची भावना चंद्रकलेस द्यावी. हरळीच्या मुळ्या जास्त प्रमाणांत घ्याव्यात म्हणजे रस चांगला निघतो.

केतकी मूळ-रस

केवड्याच्या मुळांचा रस गुणधर्मांचे दृष्टीनें, केवड्याचे कणसाचा काढा, हिम, फांटापेक्षांहि श्रेष्ठ आहे. याबद्दलची माहिती आयुर्वेद पत्रिकेच्या १।१०-५३ चे अंकांतील ' चन्द्रकलेचा पाठ ' नामक लेखांत दिलेली आहे.

स्त्रीदुग्ध-भावना

आरोग्य व दीर्घायुष्य मिळविण्याकरितां आधुनिकांनीं स्त्री--दुग्धासंबंधीं पुष्कळ संशोधन केलें आहे. आपल्या पूर्वजांनीं देखील स्त्रीदुग्धाचें महत्त्व जाणून त्याचा योग्य ठिकाणीं उपयोगहि करून दाखविला आहे. निघण्टु ग्रंथांतून—तसेंच योगरत्नाकर, वृहद्योगतरंगिणी आदि ग्रंथांमधून स्त्रीदुग्धाचे गुणधर्म उत्तम वर्णिले आहेत. चन्द्रकलेच्या दृष्टीनें स्त्री–दुधांत, दाह, तृष्णा, रक्तस्रावी रोगघ्न, पित्तशामक, ज्वरवेगघ्न गुणधर्म आहेत. म्हणूनच वैद्यपरम्परेनें स्त्रीदुग्ध भावना देण्याची वहिवाट पडली आहे. स्त्रीदुग्ध-भावनेची औषधें दाक्षिणात्यांत विशेषंकरून वापरण्यांत आहेत. एवढेंच नाहींतर तिकडे मात्रादि औषधें स्त्रीदुग्धांत उगाळून देण्याची पद्धत सर्रास उपयोगांत आहे. स्त्रीदुग्ध भावना चन्द्रकलेस आहे याचा उहापोह आयुर्वेद-पत्रिंकेच्या १।१०।५३ चे 'चन्द्रकला' लेखांत केलेलाच आहे.

सहदेवी कोणती ?

सहदेवी, शतपत्रीवर्गात म्हणजे नॅचरल ऑर्डरप्रमाणें "कांपोझिटी"वर्गात मोडणारी 'ओसाडी' नामक क्षुपजातीय वनस्पति आहे. हीस पांढरीं फुलें येतात. झुडुपाचें सर्वांगास उग्र सुगंधी वास असतो. पण हा वास मनास किळसवाणा वाटतो. बारमाही हें झुडूप पाण्याचे आसपास दिसतें. पण विशेषंकरून

ळ्याचे शेवटीं अश्विन–कार्तिकांत हीं झुडुपें ा फुलांनीं बहरलेलीं जास्त आढळतात. हिचें वी भावना चन्द्रकलेस देणें अनेक दृष्टीनें ावें आहे.

कारवारांतील लोक हीस 'घायमारी' म्हणतात. कसलाहि मार, ठेंच, मुरगळा, शस्त्राघातीव्रण हिची लुगदी करून बांधल्यानें जलदी आराम ो. रक्त बंद होतें व व्रण न पुवाळतां लौकर येतो.

ही सहदेवी उत्तम ज्वरघ्न, कृमिघ्न, स्वेदल, न, व्रण–शोधन–रोपण, निद्राप्रद, श्लेष्मल त्वचेचें ुचन करणारी असल्यामुळें नेत्रलाली, गुदभ्रंश, भ्रंश-नाशक आहे. आमाशयास अम्लपित्तांतील ाहामुळें जे व्रण होतात ते रुजवणारी आहे. खानिज ांचें विषार नाहींशी करणारी आहे.

तीव्र ज्वरवेग असतां तसेंच बरेच दिवस त खिळून राहिलेल्या ज्वरावर हिचा रस अंगास ल्याबरोबर तो उतरतो व उत्तम झोंप लागते. प्रभाणें निद्रानाशांतहि डोकीस ताळवेवर व ाचे तळव्यांस हिचा रस चोळल्यानें झोंप येते हिचा विलक्षण प्रभाव आहे.

अभ्रकाचें रंगदार भस्म

खेड्यांतून सहदेवीचे क्षुपाचा मुकट करून तो आलेल्या ाणसाचे डोकीस घालतात. ज्वर तो. वैद्यमनोरमेतं हिचे रसानें तेल सिद्ध करून तें ताचे अंगास चोळण्यास सांगितलें आहे.

हिचे योगानें अभ्रकाचें लौकर व रंगदार, ळें भस्म होतें.

हे सर्व गुणधर्म श्वेतपुष्प सहदेवीचे आहेत. हिचें नांव [Argeratum Conyzoides] हे.

पित्तपापड्याची वना

बहुतेक पाठांतून पित्तपापड्याचे भावनेचा आहे. पित्तपापडा-रस उपलब्ध होत नसेल तर करून घेण्यास हरकत नाहीं. बहुतेक काढ्याचे पाठांतून पित्तपापड्याचा उल्लेख असतोच. तेव्हां पित्त-पापडा हें क्वाथ्य द्रव्यच आहे. त्याचा काढा चंद्रकलेस भावना देण्यास घ्यावा.

काढ्याबद्दलचा रसशास्त्र–संकेत

भाव्यद्रव्यसमं द्रव्यं क्वाथ्यमष्टगुणे जले।
अष्टांशशिष्टं तद्योज्यं सुपूतं भावनाविधौ॥
(रसराजशंकर)

ज्यास भावना द्यावयाची त्यांचे समान, ज्याची भावना देणें आहे, तें द्रव्य घ्यावें; व त्या भावना-द्रव्याचे आठ पट पाणी घालून एक अष्टमांश काढा करावा. हा गाळून घेऊन भावना देण्यास वापरावा.

रामशीतलिका कोणती ?

रामशीतलिका म्हणजे काळी मुसळी होय, असा अर्थ मी माझे "चंद्रकलेचा पाठ" या लेखांत केलेला नाहीं. वैद्य भिंगारे यांनीं माझा तो लेख गडबडीनें घाईत वाचून काढलेला दिसतो, किंवा संपूर्ण वाचून काढलेला दिसत नाहीं. रामशीतलिका संदिग्ध वनस्पति असल्यामुळें तिचे ऐवजीं तालमूली म्हणजे काळ्या मुसळीचा वापर वैद्य करूं लागले, अशा तऱ्हेचा मजकूर सदर लेखांत लिहिलेला आहे. तो लेख लिहिल्यापासून माझे मनांत ही रामशीतलिका एकसारखी खटकत होती. तेव्हांपासून मी हिचे शोधांत होतो.

शेवटीं रामशीतलिका सांपडली !

शेवटीं रामशीतलिकेचा संदिग्धपणा संपुष्टांत आला! कसा तो पहा. निघण्ट-शिरोमणींत रामशीतलेचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे. हा निघंट-शिरोमणि के. शंकर दाजीशास्त्री पदे यांनीं संपादून प्रसिद्धिलेला आहे. हा सुमारें सव्वाशें दीडशें वर्षांपूर्वी लिहिला गेलेला संग्रह आहे.

आरामशीतला, मराठी–रामशाली, सुगधपत्रा.

आरामशीतलाऽऽनन्दा शीतला सा सुनंदिनी।
रामा चैव महानंदा गंधाढ्या रामशीतला॥
'नृपे' प्रोक्ता तथा 'केये' देवगंधा तु भूरिका।
चिटिका भक्तिका भूरिः प्रोक्ता वैद्यविशारदैः॥ इ.

मराठींतील 'रामशाली' आणि 'सुगंधपत्रा'

हीं नांवें आणि श्लोकांतील १३ नांवें अन्वर्थकच आहेत. रामशाली आणि 'भक्तिका' हीं नांवें साळीचे म्हणजे टरफलासह असलेल्या तांदुळाचें — भाताचें साद्दश्य दाखवितात. सुगंधपत्रा नांवानें हिचीं पानें सुगंधी असल्याचें द्योतक आहे. यावरून सुगंधी पानें असलेली व साळीप्रमाणें बिया असलेली वनस्पति म्हणजेच रामशीतालिका. तेव्हां या दोन्ही गोष्टी बरोबर जमणारे सुगंधी क्षुप म्हणजे हल्लीं जीस ' पांच ' पानडी,पादंडी नांवानें ओळखतात तीच वनस्पति होय.

पाच=रामशीतालिका

पांचेच्या पानापासून अत्तर काढतात. सुगंधी बाष्पजल गुलाबपाण्याप्रमाणें काढतात. आतां पांच म्हणजेच रामशीतालिका या माझे म्हणण्यास दुजोरा देणारें आणखी एक प्रमाण दाखवितो.

रसरत्नसमुच्चयावर ' सरलार्थप्रकाशिनी ' नामक संस्कृत टीका पुण्याचे आनन्दाश्रम संस्थेनें १९४१ सालीं छापली आहे. तींत चन्द्रकलेवर टीका लिहितांना टीकाकारानें रामशीतलिकेचा पुढील उल्लेख केला आहे.

" रामशीतलिका सुगंधपत्रः मृदुलमंजरी विशिष्टः क्षुपः ' पांच ' इति महाराष्ट्रभाषायाम् । "

ही पांच वनस्पति बारमाही पाणथळ जागीं कोठेंहि मिळूं शकते. शंकरास जशी बेलपत्ती, गणपतीस जशी हरळी दूर्वा, विष्णूस जशी तुळशीची पानें, तद्वत् तुळजाभवानी-पार्वतीस या पांचेची आवड असते. आराधी लोकांच्या देवीचे गुणवर्णनपर देशी पद्यांमधून खारीक, दवण, पांच वाहूं जगदंबेला असा उल्लेख केलेला आढळतो. असो.

या पांचेच्या पानांची म्हणजे आरामशीलेचे रसाची भावना चन्द्रकलेला द्यावी. पांचेला लॅटिन भाषेत, Pogostemon Pachouli म्हणतात. हिन्दींत व गुजराथींत आरामशीली म्हणतात. डॉक्टर देसाईंचे औषधी संग्रहांत हिचें नांव तुळसवर्गांत घेतलें आहे. नॅचरल ऑर्डर प्रमाणें ओष्ट्रपुष्पवर्गांत (Labiatae) हीची गणना होते. (अपूर्ण)

१ नोव्हेंबरपर्यंत मुदत वाढली

भारतांतील आयुर्वेद युनानी व होमिओ वैद्य व्यवसायिकांची किमान वैद्यक शिक्षणाची योग्यत ठरविण्यासाठीं भारत सरकारनें एक कमेटी आरोग्य मंत्री दवे(सौराष्ट्र)यांच्या अध्यक्षतेखालीं नेमली आहे त्या समितीनें एक प्रश्नपत्रिका इंग्रजींत काढू भारतांत सर्वत्र प्रमुख चिकित्सकवर्गाकडे उत्तरा पाठविली आहे.

या प्रश्नावलीचे उत्तर पाठविण्याची मुदत आक्टोबर ही होती. ती आतां १ नोव्हेंबर ही. क ण्यांत आली आहे असें डॉ. मेहेता कळवितात.

— भारताच्या नामवंत विद्वानांनीं प्रशंसिलेला —
आयुर्वेद, ॲलोपॅथी, होमिओपॅथी, बायोकेमिक औषधोपचारांची एकत्र माहिती असलेला विद्यार्थी व वैद्याकरितां उपयोगी
अद्वितीय ग्रंथ
" भारतीय चिकित्सा रहस्य "
(सचित्र मराठी)
(ले.—पं. व्यास नारायण शुक्ल, आयुर्वेदाचार्य)
स्टेथॉस्कोप, थर्मामीटर, रक्तपरीक्षा, 'क्ष' किरण, ब्लडप्रेशर वगैरे आधुनिक व जुन्या रोगनिदानासह, इंजेक्शनें व मिक्श्चरांच्या माहितीनें युक्त.
पृष्ठसंख्या ५२५ किंमत ६॥ रु. [ट. खर्च निराळा]
२ रु. आगाऊ म. ऑ. नें पाठवावेत.
आजच मागवा.
... श्रीदुर्गा आरोग्य मंदिर ...
मेनरोड, सीताबर्डी व न्यू इतवारीरोड, नागपूर

तृणज्योतिष्मति (नीलज्योति)
—ः विकत मिळण्याची व्यवस्था :—
किं. १ तोळ्यास १ रुपया. टपालखर्च निराळा.
आयुर्वेद सेवा संघ, नासिक

आयुर्वेदिक रीसर्च बोर्ड, मुंबई

मागील मुंबईराज्य मंत्री मंडळानें एक आयु- वें संशोधन मंडळ नेमलें होतें. त्यांत डॉ. कृ. म्हसकर अध्यक्ष, डॉ. योध, वै. यादवजी त्रिक- आचार्य वै. पं. शिवशर्मा हे सभासद व हकीम सेक्रेटरी असे सदस्य होते.

त्यापैकीं वैद्यराज पं. यादवजी व पं. शिवशर्मा राजीनामा दिला व त्या जागीं वै. बापालाल व भा. वि. गोखले हे सभासद नेमले गेले होते. कडे अध्यक्ष डॉ. म्हसकर व डॉ. योध यांनींहि नामा दिला होता. वै. मामा गोखले हे त्याचे कारी अध्यक्ष बनले होते. व वैद्य बापालाल हे सद एवढे लोक राहिले होतें, असें कळतें.

सप्टेंबर ता. २९ पासून या संशोधन बोर्डाची चना मुंबई सरकारनें केली आहे. या बोर्डाच्या क्षस्थानीं श्रीमंत नानासाहेब (गं. वि.) पुराणिक , व मंत्री म्हणून श्री. ए. एन्. नामजोशी एम्. डी. मुंबई यांची नेमणूक केली आहे. (त्या दोघां- आयुर्वेदीय औषधांचें स्टँडर्डायझेशन सोंप- ांत आलें आहे.)

नवीन बोर्डाचे एकूण सभासद सहा आहेत. वैद्य ना. ह. जोशी मुंबई व (४) वैद्य रणजितराय ई, सूरत (या दोघांकडे पाठ्य पुस्तकें तयार चें काम देण्यांत आलें आहे.)

(५) आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे (पुणें) (६) श्री. रामाशिरोमणी द्विवेदी (उपरुग्ण वैद्यक धनाचें काम या दोघांकडे देण्यांत आलें आहे.)

या संशोधन बोर्डाचे सल्लागार म्हणून पुढील व्यक्तींची एक सल्लागार समिति नेमली आहे.

वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी पुणें, वै. जीवराम दासशास्त्री [गोंडल], वै. जादवजी त्रिकमजी ार्य, मुंबई.

मुंबई राज्यांतील आयुर्वेदसंशोधन विषयक सर्व न या रिसर्च बोर्डाकडून इतःपर व्हावयाचें आहे.

— — — —

पदवीधर वैद्य नेमणें आहेत

डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड रत्नागिरीच्या एस्. एम्. पी. केंद्रांमध्यें वैद्यकीय काम करण्याकरितां मान्य आयुर्वेदीय पदवी धारण करणारे (डी. ए. एस्. एफ्. डिप्लोमा असणारे अगर टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणें याची आयुर्वेद्या--विशारद ही पदवी सन १९४२ आणि १९४३ सालची धारण करणारे, अगर बनारस हिंदु युनिव्हर्सिटीची आयुर्वेदाचार्य ही पदवी धारण करणारे) अशा रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर्सकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत.

पसंत केलेल्या उमेदवारांना खालीलप्रमाणें वेतन मिळेल. :—

सन्मान्य वेतन	......दरमहा	१२० रुपये
कायम प्रवास भत्ता	... ,,	३७॥ रुपये
औषधें व उपकरणा- करितां अनुदान	...... वार्षिक	३००रु.
सादिलवार	............दरमहा	५ रुपये

अर्जदारानें आपल्या अर्जांत जन्म तारीख, शैक्षणिक लायकी, राहण्याचें ठिकाण, पूर्वानुभव असल्यास, रजिस्टर नं. व रजिस्ट्रेशन झाल्याचें वर्ष ह्या बाबी नमूद कराव्यात. तसेंच सोबत दाखले जोडावेत. अर्ज खालीं सही करणारास तारीख २५ आक्टोबर १९५५ अगर तत्पूर्वी मिळाले पाहिजेत.

(सही) एस्. व्ही. सावन्त
प्रेसिडेंट डि. लो. बोर्ड, रत्नागिरी

‘ आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार ’

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्व-प्रकारचीं सिद्धौषधें [गुटीका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदीय औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

….. महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ …..

कार्यकारी व स्थायी समितीची संयुक्त सभा

सा. न. वि. वि.

म. प्रां. वैद्य मंडळाच्या कार्यकारी व स्थायी समितीची संयुक्त सभा शनिवार दि. २९।१०।५ रोजीं रात्रौ नऊ वाजतां महाराष्ट्र आयुर्वेद विद्यालय ८७ मुगभाट मुंबई ४ येथें खालील कामांचा वि करण्याकरितां भरणार आहे.

(१) सम्मेलनापासून आजपर्यंत झालेल्या कार्याचें समालोचन (२) बम्बई राज्य संम्मेलनाला असलेल्या द्रव्याचे बाबतींत विचार (३) द्रव्यगुणसामिती व दवे समिती यांजकडून आलेल्या प्रश्नावली देण्याचीं उत्तरें निश्चित करणें. (४) सन १९३८ सालीं मंडळाची स्थापना झाली तेव्हांपासून आतांप मंडळानें केलेल्या कार्याचें इतिवृत्त छापून प्रसिद्ध करावें, अशा अर्थाच्या आलेल्या सूचनेचा विचार क (५) अध्यक्षांच्या परवानगीनें आयत्या वेळीं येणारीं कामें.

सर्व सभासदांनीं जरूर हजर राहून आपल्या बहुमूल्य सल्ल्याचा लाभ द्यावा. कांहीं कारणा उपस्थितींत राहतां न आल्यास आपली लेखी संमति जरूर पाठवावी' कांहीं सूचना, ठराव वगैरे पाठवि झाल्यास त्या दि. २७।१० पर्यंत कायलयांत पोंचतील अशा बेतानें पाठवाव्या. कळावें. ता. १२।१०।५

प्रधान कार्यालय
२८ शुक्रवार पेठ, फुले मार्केट रस्ता
तुळशीबागेसमोर, पुणें २

आपला
माधवशास्त्री जोशी
(चल) प्रधानमंत्री, म.प्रां. वैद्य मंडळ

दांतांवरील उपचारासाठीं शिबिरें

दांतांवर उपचार करण्याची सोय नसेल अशा भागांतील लोकांच्या सोयीसाठीं मुंबई राज्यांत ग्रामीण भागांत दरसाल दांतावर उपचार करण्यासंबंधींचीं दोन शिबिरें भरविण्यांत येणार आहेत.

यापैकीं पहिलें शिबिर साबरकांठा जिल्ह्यांत मोडासा येथें ता. २४ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबरपर्यंत भरविण्यांत येईल. हें शिबिर चालविण्यासाठीं २५ ते ३० दंतवैद्य पाठविण्यांत येतील.

१९४८ सालापासून मुंबई राज्यांत जीं नेत्रोपचार शिबिरें भरविण्यांत येत आहेत त्याच धर्तीवर हीं दांतांबाबतचीं शिबिरें भरविण्यांत येतील. किंबहुना नेत्रोपचार शिबिराच्या बाबतींत आलेलें यश पाहूनच दांतांवरील उपचारासाठीं अशीं शिबिरें सुरू करण्याची योजना हातीं घेण्यांत आली.

या शिबिरांत किडलेले दांत काढणें, किडलेल्या दांतांतील पोकळी भरून काढणें, हिरड्यांवर औष पचार करणें वगैरे उपचार करण्यांत येतील.

संस्कृतमध्यें ४५ टक्के गुण

वैद्य व. म. जोशी कोडोलीकर यांचें पत्र ता. ऑक्टोबर च्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे. तसेंच प त्यांनीं शु. आ. पाठ्यक्रम समितीस पाठविलें होतें. फ संस्कृत या विषयास, एस्. एस्. सी. परीक्षेंत, व तर चालेल काय ? असा प्रश्न त्यांत विचारला आ 'एस्. एस्. सी. परीक्षेंत संस्कृतमध्यें ४५ टक्के गु एवढीच गोष्ट समिति पाहते व पाहील, असें उत्त शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीकडून वै. व. म जोशी यांना आलें आहे असें ते कळवितात.

भारत वनस्पति फार्मसी
पो. मंचर (जि. पुणें)
ांचेकडील आयुर्वेदीय वनस्पतीपासून शास्त्रोक्त
द्धतीनें तयार केलेलीं संधिवात, पक्षवात
गैरे सर्व वातावर चोळण्याकरतां उपयोगी
ाळीटाहाकळ तेल मालकांगोणी तेल
ारायण तेल निर्गुड्यादि तेल
ातावर मिश्रणतेल, महावातविध्वंसकतेल
याशिवाय दुसरी वातावरील तेलें विकत
ळतील. “झनाना” औषधी तेल.
डोकेंदुखी, अर्धशिशी, विंचूदंश, नारूवर
हेरून लावण्यासाठीं उपयोगी. याशिवाय
ज्या वनस्पति मिळण्याचें ठिकाण—
श्री. भिमाजी सखाराम राजगुरव
पो. मंचर (जि. पुणें)

....अनुक्रमणिका....

“ॲलोपॅथिक हॉस्पिटल्स फार खर्चाचीं!” २३१
अथर्ववेदांतील कांहीं ऋचांचा इंद्रियविज्ञानाच्या दृष्टीनें विचार २३३
मुंबई राज्यांतील महारोग्यांची व्यवस्था २३९
सुश्रुत हाच पहिला दंतशस्त्रवैद्य २४१
कुंभकामला अर्थात् नाळकोट २४३
आनंद-रस २४४
कृमिनाशक औषध ‘ सँटोनाईन ’ २४९
गट्-४०० २५१
महारुख २५५
चंद्रकलारस-निर्णय २५७
आयुर्वेदिक रिसर्च बोर्ड, मुंबई २६१

ससून रुग्णालयांत २० आयुर्वेदीय बिछाने

मुंबई राज्य सरकारनें पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें पुणें येथें ससून रुग्णालयांत २० आयुर्वेदीय खाटा सुरू करण्यांत आल्या असून त्यावर अधिकारी व सल्लागार वैद्य म्हणून अनुक्रमें वैद्य श. मा. वसेकर आ.वि.वि. व वैद्य ना. व्यं. जोशी आयुर्विद्याविशारद यांची नेमणूक झाली आहे असें कळतें. अभिनंदनीय

युनिव्हाइट कोलीन

हें औषध वृद्ध, दुर्बल, दाल्युदरी व मधुमेही यांना उपयुक्त आहे.

युनिव्हाइट कोलीननें कोलीन मिथिओनिनची उच्च दर्जाची चिकित्सा मिळत असून, यकृत्-कार्य सुधारण्याला आवश्यक अशा जीवनसत्व ‘क’ चा पुरवठा होऊन शरीरांतील मेदवृद्धि नाहींशी होते व तिच्या वाढीस प्रतिबंध होतो.

घटक-द्रव्यें

१ द्रव औंसांत खालीलप्रमाणें द्रव्यें आहेतः—

ट्राय-कोलीन सायट्रेट	४०००	मिलिग्रॅम
मिथिओनिन	५००	,,
आयनोसिटॉल	५००	,,
जीवनसत्व ब-१	१२·५	,,
,, ब-२	७·५	,,
निआसिन	१००	,,
पँथेनॉल	५	,,
जीवनसत्व अ	१६०००	आय्. यू.
,, ड	५०००	,,
,, क	२५०	मिलिग्रॅम

युनिकेम लॅबॉरेटरीज, मुंबई २६

येत्या हिवाळ्यांत

कोणता सुवर्णमालिनीवसंत वापरणार?

सुवर्णमालिनीवसंतांत औषधें आहेत तीं अशीं:—सुवर्ण, मुक्ता, हिंगुळ, मिरी, खर्पर व लोणी हीं सर्वच द्रव्यें महत्त्वाचीं आहेत. तथापि त्यांतील सुवर्ण व मोती हीं फारच मूल्यवान् आहेत. मोत्याऐवजीं मोतीचुरा व सुवर्णाऐवजीं सुवर्णभस्म वापरून स्वस्त सुवर्णमालिनीवसंत बनविला जातो. त्यामुळें त्यांत सुवर्णाचें प्रमाण अल्प असतें.

पूर्णप्रमाण सुवर्णमालिनीवसन्त

सुवर्णाचें पूर्णप्रमाण घालून केलेला सुवर्णमालिनीवसंत अधिक लाभदायक होतो असा चिकित्सकांचा अनुभव आहे. आपणहि या हिंवाळ्यांत पूर्णप्रमाण सुवर्णमालिनीवसंत वापरून अनुभव प्रसिद्ध करा.

आयुर्वेद औषधी भवन, नाशिक

अनुभवांच्या कसोटीवर पारखून तयार केलेलीं

खात्रीचीं औषधें सवलतीच्या दरांत देण्यांत येत आहेत.

सांबरशृंगभस्म	१२ रु. शेर
कासवपृष्ठभस्म	२२ रु. ,,
खेकडाभस्म (क्षतकासावर)	२२ रु. ,,
कपर्दिकभस्म	८ रु. ,,
शंखभस्म (निंबूरसांत)	८ रु. ,,
संगेजराहतभस्म (दाह, गोवर)	१४ रु. ,,
स्वर्णमाक्षिकभस्म	३२ रु. ,,
तालिसादिचूर्ण	११ रु. ,,
सितोपलादिचूर्ण	११ रु. ,,
शुद्ध शिलाजित	३१ रु. ,,
मंडूरभस्म	१६ रु. ,,
अकीकभस्म	५ तो. ३ रु., २० तो. ११रु.

औषधाचें प्रमाण	५तो.	२०तो.
अग्निकुमार गोळ्या	३ रु.	९ रु.
कामदुघा	७ रु.	२५ रु.
कामदुघा (आवळयाचे रसांत)	२॥ रु.	८ रु.
गोक्षुरादिगुग्गुळ	१। रु.	४ रु.
त्रिफळामंडूर	३ रु.	११ रु.
महायोगराजगुग्गुळ	५ रु.	१६ रु.
शंखवटी	२ रु.	६ रु.
हजरतबेरभस्म	२। रु.	७ रु.
प्रवाळभस्म अग्निपुटी सूर्यपुटी, चंद्रपुटी	३। रु.	१२॥ रु.
त्रिफळाचूर्ण [वस्त्रगाळ]	१ शेरास १ रु.	

शेराच्या दरांतील औषधीभस्में २० तोळ्यापेक्षां कमी, वरील दरांत पाठवितां येणार नाहींत.

मिश्र महाराष्ट्र फार्मसी (रजि.) ब्रह्मपुरी (चांदा म. प्र.)

संपादक व प्रकाशक — [illegible] बिंदुमाधव पा[illegible], आयुर्वेद सेवा संघ, [illegible] चित्रकर कारंजा, नाशिक
मुद्रक—श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, नाशिक.

210772
गुरुकुल पत्रिका

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

र्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे
(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

र्ष ९ वें) नासिक, ता. १ नोव्हेंबर १९५५ (अंक ९ वा

आयुर्वेद सेवा संघास

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची भेट

नाशिक येथील मुक्कामांत सुप्रसिद्ध राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनीं आयुर्वेद सेवा संघास दिली, त्या प्रसंगीं श्री. कंकाळे यांनीं घेतलेलें छायाचित्र पत्रिकेसाठीं त्यांनीं पाठवून दिलें आहे.



आयुर्वेद सेवा संघाच्या औषधी भवनांतून राष्ट्रसंत बाहेर पडतांना हें चित्र घेण्यांत आलें आहे. यावेळीं उपस्थित असलेली मंडळी (१) वै. वासुदेव सखाराम मराठे मंत्री, आयुर्वेद सेवा संघ (२) . श्यामराव धोंडो कुलकर्णी आयुर्विद्याविशारद, जीवसदस्य, (३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (४) वै. विंदुमाधव पंडित, (५) वै. श्रीनिवास दत्तात्रेय जव्हकर, डी. ए. एस्. एफ्. (७) महाराजांचे सहचारी.

वैद्य श्रीमती लक्ष्मीबाई ठुसे यांनीं चालविलेलें

कै. वासुकाका जोशी आरोग्यकेंद्र, खडकवासलें

पुण्याजवळ खडकवासलें येथें २ नोव्हेंबर १९४३ रोजीं सुप्रसिद्ध कार्यकर्त्या श्रीमती लक्ष्मीबाई ठुसे यांनीं जाऊन ग्रामीण जीवनाला प्रारंभ केला. गेल्या १२ वर्षांत सुमारें ३०००० लोकांच्या शारिरिक मानसिक आरोग्य विषयक सेवा त्यांनीं केली. आज त्या ६५ वर्षांच्या आहेत, शरीरानें वृद्ध पण मनानें तरुण आहेत. कांहीं गरीब मुलाच्या विद्यासंपादनासहि त्यांनीं मदत केली आहे. " मेहतर (भंगी), दाई, साविका (मिडवाइफ), वैद्य (र. मे. प्रॅक्टिशनर) व सन्मार्गदर्शक या सर्व रूपांत श्रीराम आपल्याकडून जनताजनार्दनाची सेवा करून घेत आहे " अशी त्यांची भावना आहे.

या केंद्राची कल्पना पुणें येथील बी बियाणें व्यापारी श्री. एफ्.पी. पोचा यांची आहे. १५-११-४५ रोजीं म. गांधी यांनीं या केंद्रास भेट दिली व तेथील जनतेनें श्रमदानानें केलेल्या रस्त्याचें उद्घाटन केलें. सरकारकडून जागा मिळाली व त्यावर ५ ऑक्टोबर १९४६ रोजीं विजयादशमीस कै. वासुकाका जोशी आरोग्यकेंद्र असा फलक येथें लागला. २४-१०-४७ ला भूमिपूजन होऊन ता. २२-४-४८ ला इमारतीचें उद्घाटन झालें. या इमारतीच्या आर्थिक बोजाची थाळी श्री. मामासाहेब देवगिरीकरांच्या मित्रमंडळींनीं उचलली. हें केंद्र स्वतंत्रपणें चालविण्यामध्यें चित्रशाळा व तिचे ट्रस्टी यांचा मुख्य भाग आहे. दरसाल १०००रु. पर्यंत आर्थिक मदत चित्रशाळेच्या ट्रस्टीकडून होते.

येथील सेवा कार्याचा प्रभाव मानतां येईल अशी गोष्ट म्हणजे म. गांधी वधाच्या वेळीं इतरत्र जाळपोळ झाली तशी येथें झाली नाहीं. परगांवाहून आलेल्या जाळपोळवाल्यांना श्री.लक्ष्मीबाईंनीं आवरलें. गांवांतील सर्व लोकांची या केंद्राबद्दल आदर भावना आहे. राष्ट्रीय व सार्वजनिक कार्यक्रम शाळाखातें व स्थानिक महिलामंडळ यांच्या सहकार्यानें होतात.

ज्या वयांत भारतांतील स्त्री-पुरुष सेवानिवृत्त होतात व हरीहरी करीत जीवन कंठतात. त्या वयांत १२ वर्षेपर्यंत सतत वैद्य श्री. लक्ष्मीबाई ठुसे यांनीं पुण्यासारख्या सुखसोईच्या शहरांतून खेड्यांत जाऊन जनताजनार्दनाची सेवा केली, हें त्यांना निःसंशय भूषणावह आहे. म.प्रां. वैद्यसंमेलनाच्या अधिवेशनास उपस्थित राहून, स्त्रियांनीं आयुर्वेदाचें अध्ययन करून समाजसेवाप्रवृत्त व्हावें यासाठीं, त्या बंधुभगिनींना कार्याची स्फूर्ति देत असतात. त्यांनीं आजवर केलेल्या राष्ट्रीय, सामाजिक व आरोग्यविषयक सेवेबद्दल आयुर्वेद पत्रिका त्यांना धन्यवाद देत आहे. त्यांचा हा आदर्श ' इतरांना वृद्धावस्थेंतहि समाज-सेवा करण्याची स्फूर्ति देवो. '

स्नेहसंमेलनाचें आमंत्रण

माझ्या ग्रामीण जीवनाला ता. २।११।१९५ रोजीं १२ वर्षें पुरी होतात. त्या निमित्तानें कै. वासुकाका जोशी आरोग्यकेंद्राबद्दल व माझ्याबद्दल ज्यांनीं आपलेपणा दाखविला त्या सर्वांचें विशेषतः ग्रामस्थ बंधुभागिनींचे स्नेहसंमेलन त्या दिवशीं दुपारीं ३ ते ५ यावेळीं आरोग्यकेंद्रांत भराविण्याचे योजिलें आहे. त्यावेळीं आपण अगत्य येण्याची विनंति आहे.

आपली

खडकवासलें [पुणें]

लक्ष्मीबाई ठुसे

पाश्चात्य रामबाण औषधें
लेखकः- डॉ. डी. ए. घाटगे, कागल
किंमत २॥ रु.
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

त्रिदोषांच्या विविध गति (लेखांक १ ला)

[लेखकः वै. वा. स. अंदनकर, आयुर्वेदतीर्थ, चांदा (म. प्र.)]

चरकसंहितेच्या सूत्रस्थानाच्या ' कियन्तः त्तीय ' या शीर्षकाच्या १७ व्या अध्यायाचे रंभीं महर्षि आत्रेय यांना त्यांचे शिष्य अग्निवेश नीं कांहीं प्रश्न विचारले आहेत, त्यापैकीं ६ वा ' गतिः कतिविधा चोक्ता दोषाणां दोषसूदन । ' ता आहे. ह्यांत अग्निवेशानें दोषांची गति किती रची आहे असा प्रश्न गुरूंना विचारला आहे. थम आत्रेय महर्षींनीं संक्षिप्त उत्तर असें दिलें आहे 'दोषाणां त्रिविधा चोक्ता गतिः।' दोषांची गति न प्रकारची आहे. असें उत्तर देऊन अग्निवेशानें ल्या सर्व प्रश्नांचें प्रथम अशाच प्रकारें संक्षिप्त तर देऊन नंतर प्रत्येकाचें विस्तरतः उत्तर द्यावयास ांत केली आहे. ' विस्तरतः शृणु '। प्रत्येक ाचें विस्तरशः उत्तर देतां देतां दोषांची गति ी प्रकारची ह्याचेंहि उत्तर खालीलप्रमाणें दिलें हेः—

' गति ' हें पद ६ वेळा

क्षयः स्थानं च वृद्धिश्च दोषाणां त्रिविधा गतिः।
र्वं चांधश्च तिर्यक् च विज्ञेयां त्रिविधाऽपरा ॥११२॥
विधा चापरा कोष्ठशाखामर्मास्थिसंधिषु। इत्युक्ता
धिभेदेन दोषाणां त्रिविधा गतिः ॥११३॥ चय–
प्रशमाः पित्तादीनां यथाक्रमम्। भवन्त्येकैकशः
तु कालेष्वभ्रागमादिषु ॥११४॥ गीतः कालकृता
या चयाद्याः पुनरुच्यते। गतिश्च द्विविधा दृष्टा
ति वैकृति च या ॥११५॥

या वरील श्लोकांच्या पहिल्या चरणांत 'गतिः' एक पद आहे. त्यानंतर दुसऱ्या चरणांत अपरा विशेषण पदापुढें गतिः हें विशेष्यपद अध्याहृत हे. तिसऱ्याहि चरणांत 'अपरा' ह्या विशेषणापुढें ः हें पद विशेष्यरूपानेंच आहे. पण तेंहि पद दुसऱ्या तील गतिः ह्या पदाप्रमाणें गुप्तच आहे. ४ थ्या, ७ व्या व ८ व्या चरणांपैकीं प्रत्येक चरणांत ' गतिः ' हें पद स्पष्टतया प्रत्येक वेळीं आलें आहे. ह्याप्रमाणें वरील चार श्लोकांच्या एकंदर आठ चरणांत ' स्पष्टा-स्पष्टतया गतिः ' हें पद एकंदर सहा वेळा आलें आहे.

तिसऱ्या गतीचे तीन प्रकार

पहिल्या चरणांत दोषांची तीन प्रकारची गति सांगितली व ती म्हणजे दोषांचा क्षय, स्थान व वृद्धि होय. दुसऱ्या चरणांत आचार्य म्हणतात कीं, पहिल्या चरणांत आम्ही एक गति सांगितली. आतां आणखी अपरा म्हणजे दुसरी गति सांगतो व ती म्हणजे दोषांची ऊर्ध्व, अधः व तिर्यक् अशा तीन प्रकारची दुसरी गति होय. तिसऱ्या चरणांत अपरा ह्या पदानें आणखी दुसरी गति सांगतों असें म्हणतात. अर्थात् पहिल्या व दुसऱ्या चरणांच्या सापेक्षतेनें तिसऱ्या चरणांतील ही गति तिसरी होय, व हीहि तिसरी गति तीन प्रकारची आहे, व ती म्हणजे दोषांची कोष्ठांत गति, शाखेंत गति व आचार्य ज्याला मध्यम मार्ग म्हणतात त्या मध्यममार्गांत दोषांची गति होय.

त्रयो रोगमार्गा इति–शाखा, मर्मास्थिसंधयः, कोष्ठश्च। तत्र शाखा रक्तादयो धातवस्त्वक् च स बाह्यो रोगमार्गः मर्माणि पुनर्बस्तिहृदयमूर्धादीनि, अस्थिसन्धयोऽस्थिसंयोगास्तत्रोपनिबद्धाश्च स्नायुकण्डराः, स मध्यमो रोगमार्गः। कोष्ठः पुनरुच्यते महास्रोतः शरीरमध्यं महानिम्नमामपक्वाशयश्चेति पर्यायशब्दैस्तंत्रे स रोगमार्ग आभ्यन्तरः ॥४६॥ चरक सू. अ. ११

विधिभेद म्हणजे काय ?

चवथ्या चरणांत इत्युक्ता विधिभेदेन...। असें म्हणून मागील तीनहि चरणांचें सिंहावलोकन (Recapitulation) करून चरकाचार्य म्हणतात कीं, आम्हीं पूर्व तीन चरणांत विधिभेदानें दोषांच्या तीन गति सांगितल्या. आतां विधिभेद म्हणजे काय ? हें पाहूं.

विधि म्हणजे प्रकार

संप्राप्तिर्जातिरागतिरित्यनर्थान्तरं व्याधेः, सा संख्याप्राधान्यविधि-विकल्पबलकालविशेषैर्भिद्यते।

विधिर्नाम द्विविधा व्याधयो निजागन्तुभेदेन, त्रिविधाः त्रिदोषभेदेन, चतुर्विधाः साध्यासाध्य-मृदुदारुणभेदेन ..।

[चरकसंहिता निदानस्थान अ. १]

चक्रपाणि टीकाः– विधिश्च प्रकारो भेद इत्यर्थः।

दोषगतींचे ९ प्रकार

इत्युक्ता विधिभेदेन दोषाणां त्रिविधा गतिः। ह्याचा अर्थ हा कीं, पहिल्या चरणांत क्षय, स्थान व वृद्धि असा दोषांच्या गतीचा एक विधिभेद म्हणजे दोषगतीचा एक प्रकार. अर्थात् पहिला दोषगतीचा एक गट सांगितला.

दुसऱ्या चरणांत ऊर्ध्व, अधः व तिर्यक् असा दोषगतीचा दुसरा विधिभेद म्हणजे दुसऱ्या प्रकाराची दोषगति होय. व तिसऱ्या चरणांतील शाखादि मार्गांतील दोषगतीचा तिसरा विधिभेद म्हणजे तिसरा दोषगतीचा प्रकार होय. अशा प्रकारचा प्रत्येक चरणाचा विचार केल्यास दोषगति तीन प्रकारची आहे असें चरकाचार्य सांगतात, व सर्व बेरीज केली तर एकंदर दोषगतीचे नऊ प्रकार होतात. तेव्हां स्पष्ट सांगावयाचें म्हणजे 'क्षय' ही दोषांची १ली गति, अर्थात् दोषांच्या गतीचा पहिला प्रकार; ' स्थान ' दोषांच्या गतीचा २रा प्रकार; 'वृद्धि' दोषांच्या गतीचा ३ रा प्रकार; 'ऊर्ध्व' हा दोषांच्या गतीचा ४ था प्रकार; 'अधः' हा दोषांच्या गतीचा ५ वा प्रकार; तिर्यक् हा दोषांच्या गतीचा ६ वा प्रकार. त्याचप्रमाणें शाखामार्ग, कोष्ठमार्ग व मध्यममार्ग हे क्रमानें दोषांच्या गतीचा ७ वा, ८ वा व ९ वा प्रकार होय. अशा प्रकारची एकूण ९ प्रकारची दोषगति आहे, असा स्पष्ट व अतिस्पष्ट अर्थ आहे.

कालकृत ६ गति

त्याचप्रमाणें दोषांचे चय, प्रकोप व प्रशम यांना जेव्हां वर्षादि काल हा कारण असतो, तेव्हां त्या चयादिकांना कालकृत असें विशेषण प्राप्त होतें. ह्या कालकृत चय, प्रकोप व प्रशमांना चरकाचार्य कालकृत गति म्हणून, असा एक दोषांचा गतिभेद सांगतात, व पुनः ह्या कालकृत गतिभेदाचे प्राकृत व वैकृत असे पुनः दोन पोटभेद केलेले आहेत. वस्तुतः हे दोषांचे जे कालकृत चय, प्रकोप व प्रशम आहेत त्यांचा अंतर्भाव, स्थान व वृद्धि या दोन पदांतच होतो हें पुढें आम्ही प्रसंगानें पुढील लेखांकांत दाखविणार आहो. तेव्हां कालसापेक्षानें प्राकृत व वैकृत असे चय, प्रकोप व प्रशम ह्यांचें गणित केल्यास पुनः दोषांचे कालकृत ६ भेद होऊन ह्या दोषांच्या ६ गति अधिक होतात, एवढेंच सध्यां लक्षांत ठेवावें.

दोषांचें अधिकरण

तत्र यमर्थमाधिकृत्योच्यते वदधिकरणं यथा-रसं दोषं वा ॥८॥ [सुश्रुत उत्तरतंत्र अ. ६५]

या सुश्रुतोक्त अधिकरणतंत्रयुक्तीप्रमाणें 'क्षयः स्थानं'। हे चार श्लोक ' दोषगति ' चें अधिकरण होय.

दोषाणां स्थानम्

आदौ षड्रसमप्यन्नं मधुरीभूतमीरयेत्।
फेनीभूतं कफं यातं विदाहादम्लतां ततः ॥५७॥
पित्तमामाशयात्कुर्याच्च्यवमानं च्युतं पुनः।
अग्निना शोषितं पक्वं पिण्डितं कटु मारुतम् ॥५८॥

[अष्टांगहृदय शारीरस्थान अ.३]

संप्रवक्ष्याम्यतश्चोर्ध्वमाहारगतिनिश्चयम्।
पंचभूतात्मके देहे ह्याहारः पांचभौतिकः॥
विपक्वः पञ्चधा सम्यग्गुणान् स्वानभिवर्धयेत् ॥५२४॥
अविदग्धः कफं पित्तं विदग्धः पवनं पुनः।
सम्यग्विपक्वो निःसार आहारः परिबृंहयेत् ॥५२५॥

[सुश्रुत सूत्रस्थान अ. ४६]

माधुर्यात् पिच्छिलत्वाच्च प्रक्लेदित्वात्तथैव च।
आमाशये संभवति श्लेष्मा मधुरशीतलः ॥१३॥
स तत्रस्थ एव स्वशक्त्या शेषाणां श्लेष्मस्थानानां शरीरस्य चोदककर्मणाऽनुग्रहं करोति।

[सुश्रुत सूत्रस्थान अ.२१]

तच्चादृष्टहेतुकेन विशेषेण पक्कामाशयमध्यस्थं तं चतुर्विधमन्नपानं पचति, विवेचयति च दोषमूत्रपुरीषाणि; तत्रस्थमेव चात्मशक्त्या शेषाणां तत्स्थानानां शरीरस्य चाग्निकर्मणाऽनुग्रहं करोति, स्मिन् पित्ते पाचकोऽग्निरिति संज्ञा ।

(सुश्रुत सूत्रस्थान अ. २१)

तत्र प्रस्पन्दनोद्वहनपूरणविवेकधारणलक्षणो वायुः ञ्चधा प्रविभक्तः शरीरं धारयति ॥ १ ॥

रागपक्त्योजस्तेजोमेधोष्मकृत्पित्तं पञ्चधा प्रविकमाग्निकर्मणाऽनुग्रहं करोति ॥ २ ॥

सन्धिसंश्लेषणस्नेहनरोपणपूरणबलस्थैर्यकृच्छ्लेष्मा ञ्चधा प्रविभक्त उदककर्मणाऽनुग्रहं करोति ॥ ४ ॥

(सुश्रुत सूत्रस्थान अ. १५)

धन्वन्तरिं धर्मभृतां वरिष्ठममृतोद्भवम् ।
चरणावुपसंगृह्य सुश्रुतः परिपृच्छति ॥ ३ ॥
वायोः प्रकृतिभूतस्य व्यापन्नस्य च कोपनैः ॥
स्थानं कर्म च रोगांश्च वद मे वदतां वर ॥ ४ ॥
तस्य तद्वचनं श्रुत्वा प्राब्रवीद्भिषजां वरः ॥
स्वयंभूरेष भगवान् वायुरित्यभिशब्दितः ॥ ५ ॥
स्वातंत्र्यान्नित्यभावाच्च सर्वगत्वात्तथैव च ॥
सर्वेषामेव सर्वात्मा सर्वलोकनमस्कृतः ॥ ६ ॥
स्थित्युत्पत्तिविनाशेषु भूतानामेष कारणम् ॥
अव्यक्तो व्यक्तकर्मा च रूक्षः शीतोः लघुः खरः ७॥
तिर्यग्गो द्विगुणश्चैव रजोबहुल एव च ॥
अचिन्त्यवीर्यो दोषाणां नेता रोगसमूहराट् ॥८॥
आशुकारी मुहुश्चारी पक्वाधानगुदालयः ॥
देहे विचरतस्तस्य लक्षणानि निबोध मे ॥९॥
दोषधात्वग्निसमतां संप्राप्तिं विषयेषु च ॥
क्रियाणामानुलोम्यं च करोत्यकुपितोऽनिलः ॥१०॥
यथाग्निः पंचधा भिन्नो नामस्थानात्मकर्मभिः ॥
भिन्नोऽनिलस्तथा ह्येको नामस्थानक्रियामये ॥११॥
प्राणोदानौ समानश्च व्यानश्चापान एव च ।
स्थानस्था मारुताः पंच यापयन्ति शरीरिणम् ॥१२॥

(सुश्रुत निदानस्थान अ. १)

ः पुनरग्नेराहारस्य च बहल्पतया तस्मात्तस्मान्मूर्छनाविशेषादमूर्तः शब्दवानीषच्छब्दः प्रचुरोऽल्पो वा पंचात्मा कोष्ठे प्रादुर्भवति । एवं च कृत्वाऽन्नमया एव देहे सर्वे भावाः ।

[अष्टांगसंग्रह शारीरस्थान अ. ६]

कफदोषाची स्थान गति

या वरील सर्व आप्तवाक्यांचा विचार केल्यास असें सिद्ध होतें की या मानवी शरीरांत दररोज आपण जो षड्रसात्मक आहार घेतो त्या आहारद्रव्यापासून आमाशयांत स्निग्धादि गुणांचा कफदोष निर्माण होतो व ह्याच आमाशयोत्पन्न कफद्रव्यानें म्हणजे ज्याला क्लेदक कफ अशी शास्त्रीय संज्ञा आहे अशा द्रव्यानें बाकीच्या अवलंबक, बोधक, तर्पक व श्लेषक अशा चार कफद्रव्यांचें पोषण होतें; म्हणजे आहारोद्भव क्लेदक कफ आपल्या आमाशय या स्थानांतून गमनकर्म करून व अवलंबकादि इतर चार कफदोषांच्या त्या त्या स्थानांत जाऊन त्यांचें पोषण करतो व हेंच ह्या मुख्य क्लेदक कफाचें स्थानचरत्व अर्थात् दोषगति होय. व तेहि अवलंबकादि कफदोष आपआपल्या स्थानांत स्वकर्म करण्याकरितां संचार करितात. किंबहुना थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हाच आमाशयोद्भव क्लेदक कफ शरीराच्या इतर स्थानांत जाऊन त्याचे इतर चार भेद मानले जातात व त्या त्या स्थान व कर्माप्रमाणें तीं तीं नांवें त्याला प्राप्त झालीं आहेत; म्हणजे एकच हा क्लेदक कफ सर्व कफस्थानांत किंबहुना सर्व देहात संचार करतो, अर्थात् गमन करितो. म्हणजेच याला कफदोषाची स्थानगति म्हणतात. यालाच कफदोषाची साम्यावस्थेची गति म्हणतात.

पित्त व वायु या दोषांची उत्पत्ति

ह्याचप्रमाणें षड्रसात्मक आहारापासून ग्रहणींत व पक्वाशयांत पित्तदोष व वातदोष हीं दोन द्रव्यें उत्पन्न होतात व बाकीच्या चार पित्तांचें व शेष प्राणादि वायूंचें पोषण होतें.

तत्रस्थमेव पित्तानां शेषाणामप्यनुग्रहम् ।
करोति बलदानेन पाचकं नाम तत्स्मृतम् ॥ १२ ॥

(अष्टांगहृदय सूत्रस्थान अ० १२)

अष्टांगसंग्रहकार स्पष्ट सांगतात कीं, पञ्चात्मा कोष्ठे प्रादुर्भवति (वायुः) । सुश्रुताचार्य स्पष्ट सांगतात कीं, ' पक्वाधानगुदालयः ' असा आहारोद्भव वायुच अेकंदर पांच प्रकारचा झाला आहे.

यथाग्निः पञ्चधा भिन्नो नामस्थानात्मकर्मभिः ।
भिन्नोऽनिलस्तथा ह्येको नामस्थानक्रियामयैः ॥ १॥

(सूत्रस्थान निदान अ० १)

साम्यावस्थेंतील पित्तदोषाचें गमन

तेव्हां स्पष्ट भावार्थ असा कीं, पित्तदोष हा ग्रहणींत आहारद्रव्यांपासून उत्पन्न होतो, त्याला पाचकपित्त म्हणतात, व हेंच पाचकपित्तसंज्ञक द्रव्य अखिलदेहसंचारी होऊन त्या त्या भ्राजकादि शेष पित्तद्रव्यांचें पोषण करितें. ग्रहणींत उत्पन्न झालेल्या पित्तद्रव्याला गमनकर्म केल्याशिवाय म्हणजे सर्व देहांत संचार केल्याशिवाय त्या त्या पित्तांचें पोषण करणें शक्य नाहीं. अर्थात् ह्या विशिष्ट प्रमाणांत उत्पन्न होणाऱ्या व ग्रहणींत वसंत असलेल्या मुख्य पित्तद्रव्याला गमन करावें लागतें. ह्यालाच साम्यावस्थेंतील पित्तदोषाचें गमन अर्थात् पित्तदोषगति म्हणतात. व हीच पित्तदोषस्थानगति होय.

" तत्रस्थमेव चात्मशक्त्या शेषाणां पित्तस्थानानां शरीरस्य चाग्निकर्मणाऽनुग्रहं करोति, तस्मिन् पित्ते पाचकोऽग्निरिति संज्ञा । "

वायूचें स्थानगमन

सुश्रुत निदानस्थान अ. १ यांतील मागें उद्धृत केलेल्या श्लोकांत वातदोषाचें अर्थात् प्रकृतिभूत वाताचें स्थान सांगतांना ' पक्वाधानगुदालयः ' असें सांगितलें आहे. ' पक्वाधानं विशेषतः ' असें अष्टांगहृदयकारहि आपल्या सूत्रस्थाच्या १२ व्या अध्यायांत म्हणतात; व ' अतःकोष्ठो महास्रोतः '(अष्टांगहृदय सूत्र. अ. १२) ह्या व्याख्येप्रमाणें आमाशय हें क्लेदककफाचें व ग्रहणी हें पित्ताचें स्थान झाल्यानंतर वायु...पंचात्मा कोष्ठे प्रादुर्भवति। ह्या अष्टांगसंग्रहकाराचें वचनाप्रमाणेंहि बाकी राहिलेला कोष्ठशेष म्हणजे पक्वाधानच होय, अर्थात् वातदोषसंज्ञक द्रव्य दररोज आहाराच्या कटुविपाकावस्थेंत पक्वाशयांतच उत्पन्न होतें व ' मुहुश्चारी ' व ' देहे विचरतस्तस्य ' या पदावरून हें वातद्रव्य पक्वाधानांतून सर्वत्र शरीरभर संचरण करितें असें सिद्ध होतें.

देहे विचरतस्तस्य लक्षणानि निबोध मे ।९॥
दोषधात्वग्निसमतां संप्राप्तिं विषयेषु च ।
क्रियाणामानुलोम्यं च करोत्यऽकुपितोऽनिलः ॥१०॥

[सुश्रुत निदानस्थान अ. १]

अव्याहतगतिर्यस्य स्थानस्थः प्रकृतिस्थितः ।
वायु स्यात्सोऽधिकं जीवेद्वितरोगः समाः शतम् ।४।
प्राणोदानसमानाख्यव्यानापानैः स पंचधा ।

शुद्ध लोहभस्म (वारितर) २४) सेर

काश्मीरी शिलाजित, हमारे कारखाने में प्रतिवर्ष करीब २०० मन शास्त्रविधि अनुसार शुद्ध की जाती है। भाव-शुद्ध ३२) सेर. अशुद्ध पत्थर ८०) प्रति मन, वंगभस्म ३६), प्रवाळभस्म ३२), अभ्रक बज्रभस्म ४६), कांत लोहभस्म २ :), स्वर्णमाक्षिकभस्म २८), रससिंदूर ८०), स्वर्णराज बंगेश्वर ८८), मंडूरभस्म २०), शंखभस्म ७), शृंगभस्म १४), कपर्दिकभस्म ८ , मुक्ताशुक्तीभस्म १०), गोदंतीभस्म ३।।।), चंद्रप्रभावटी २८) त्रिवंगभस्म ४८) कसीसभस्म १०) प्रतिसेर। स्वर्णसिंदूर ३) प्रतितोला।

नोटः— इन भावोंपर २० तोला से कम कोई वस्तु न भेजी जावेगी, सूचिपत्र मुफ्त।

च्यवनप्राशः– ५ सेर का २१), १० सेर का ३८), २० सेर का ६५) रु.।

काश्मीर आयुर्वेदिक वर्क्स, अमृतसर।

देहं तन्त्रयते सम्यक् स्थानेष्वव्याहतश्चरन् ॥३॥

[चरक चिकित्सा अ. २८]

या वातदोषाचें मूलस्थान पक्काधानांत असून म्यावस्थेंत विशिष्ट प्रमाणांत तेथेंच हें द्रव्य निर्माण तें, व यालाच आम्ही प्रकृतिभूत किंवा स्थानस्थ यु म्हणतो, व ह्या वातदोषाची वृद्धि व क्षय ह्याच ाधानांत म्हणजे स्वस्थानांत होतो व ह्याच सिद्धाास धरून चिकित्सेंत बस्तीला अत्यंत महत्व आहे. पक्काधानांत वातदोष निर्माण होऊनच तो सर्वदेहवार करतो. असें न मानल्यास बस्तिविधीचा र्यकारणभाव सिद्ध करणाऱ्या खालील चरकोक्त वनास वैय्यर्थ्य येईल. तेव्हां वातदोष पक्काधानांच सर्वदेहभर गमनकार्य करितो व प्राणादि सर्व पूंचें पोषण करतो हें सिद्ध होतें.

तदादित एव पक्काशयमनुप्रविश्य केवलं वैकारिकं वातमूलं छिनात्ति । तत्रावजिते वातेऽपि शरीरान्तर्गता वातविकाराः प्रशान्तिमापद्यन्ते यथा वनस्पतेर्मूले छिन्ने स्कन्धशाखाप्ररोहकुसुमफलपलाशादीनां नियतो विनाशस्तद्वत् ॥ १३ ॥

(चरकसंहिता सूत्रस्थान अ० २०)

र्वाङ्गगतमेकाङ्गगतं वाऽपि समीरणम् ।
णाद्धि केवलो बास्तिर्वायुवेगमिवाचलः ॥ २० ॥

ोंहि सुश्रुताचार्यांचें वातव्याधिचिकित्सेंत वचन हे. (अध्याय ४)

याशिवाय साम्यावस्थेंत, म्हणजे अकुपितास्थेंत वातादि सर्व दोषद्रव्यांचें सर्वदेहचरत्व असतें ह्याकरितां पुढील चरकाचार्यांचीं वचनें पुरस्कृत करतो.

यानि तु खलु वायोः कुपिताऽकुपितस्य शरीराशरीरचरस्य शरीरेषु चरतः कर्माणि बहिः शरीरेभ्यो वा भवन्ति... । [चरक सूत्र अ. १२]

सर्व शरीरचरास्तु वातपित्तश्लेष्माणः सर्वस्मिंच्छरीरे कुपिताकुपिताः शुभाशुभानि कुर्वन्ति ।

[चरक सूत्र अ. २०]

......वातपित्तश्लेष्मणां पुनः सर्वशरीरचराणां सर्वस्रोतांस्ययनभूतानि । [चरकविमानस्थान अ. ५]

स्थानस्थ (सम) दोषांचें शरीरभर भ्रमण

ह्या सर्व विवेचनावरून असें सिद्ध होतें कीं वातादि दोषांचें त्यांच्या साम्यावस्थेंत म्हणजे हे तीन दोष स्थानस्थ असतांना सर्व देहांत गमनकर्म (गति) असतें. चरकाचार्यांनीं व वाग्भटाचार्योंनीं आपापल्या सूत्रस्थानाच्या १८ वे व ११ वे अध्यायांत उत्साहोच्छ्वासनिश्वासचेष्टा...। इत्यादि श्लोकांत जीं प्राकृतकर्में सांगितलीं आहेत तीं घडवून आणण्याकरितांच ह्या स्थानस्थ दोषांना अखिल देहांत संचार किंवा गति घ्यावी लागते. हीं प्राकृतकर्में असल्या प्रकारच्या दोषगतिशिवाय होणेंच शक्य नाहीं. ह्यालाच चरकाचार्य दोषांच्या स्थानावस्थेंतील गतीचा म्हणजे गमनकार्याचा एक प्रकार म्हणतात. सोप्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे स्वस्थ शरीराचे सम असलेले दोष सर्व शरीरभर फिरत असतात. ”

" आयुर्वेदाचें जवळून दर्शन "
नासिक येथील सुप्रसिध्द सोन्या-चांदीचे व्यापारी व नगरपालिकेचे सदस्य
श्रीमंत अण्णासाहेब वैशंपायन यांचा अभिप्राय
" आयुर्वेद सेवा संघानें चालविलेल्या सर्व संस्था पाहिल्या. कांहीं चित्रें दुरून चांगलीं दिसतात व वळ गेल्यास वेडीवाकडीं असतात. सेवा संघाचा लौकिक बाहेर जसा मोठा आहे, तसेंच जवळून पाहिल्यावरहि समाधान वाटावें असाच आहे. निष्ठा, त्याग, प्रामाणिक मेहनत, नीटनेटकेपणा वगैरे गुणसमुच्चय सलेले कार्यकर्ते असल्यानें येथील कार्य वाढेल; व्यापार-उद्योगधंद्यांत महाराष्ट्राला आदर्श असा हा औषधी रखाना होईल अशी खात्री आहे. जनतेनें सर्व बाजूनें सहकार्य द्यावें अशी विनंति आहे.
नासिक ता. १७-१०-५५
— काशिनाथ पुरुषोत्तम वैशंपायन

बालरोगावरील होमिओपॅथिक औषधें

— नित्योपयोगी व गुणास उत्तम —

(१) **वर्म पिल्सः** — वरचेवर पोटांत कृमि अगर जंत होणाऱ्या मुलांना गुणकारी. बाटली किं. ०–१२–०

२) **स्लीप पिल्सः**— चिरचिऱ्या व स्वस्थ झोंप न येणाऱ्या मुलांना हितावह. मूल उत्तम झोंपूं लागतें व औषधाची संवय लागत नाहीं. बाटली किं. ०–१२–०

(३) **डायरिया पिल्सः**— पुष्कळ वेळां शौचास होणें, पुष्कळ दुग्धयुक्त, कधीं पातळ कधीं घट्ट, अगर फेसाळ असें शौचास होत असल्यास उत्तम उपयोग होतो. बाटली किं. ०–१२–०

(४) **ईअर पिल्सः**— कान फुटणें, दुखणें, लाल होणें, सुजणें, पूं अगर पाणी येणें इ. विकारावर. बाटली किं. ०–१२–०

५) **स्किनो पिल्सः**— सर्व तऱ्हेच्या त्वचारोगावर उपयुक्त व प्रभावी औषध. बाटली किं. ०–१२–०

(६) **कफ पिल्सः**— सर्दी, पडसें, खोकला, वरचेवर शिंक येणें, डांग्या खोकला यांवर उत्तम औषध. बाटली किं. ०–१२–०

(७) **टॉनिक पिल्सः**— शारिरिक व बौद्धिक वाढ प्रमाणशीर न होणाऱ्या मुलांना उत्तम भूक व झोंप चांगली लागून मूल बाळसेदार होऊं लागतें. बाटली किं. १–०–०

(८) **रिकेट्सः**— हा रोग साधारणपणें मूल सहा महिन्यांचें झाल्यनंतर लक्षांत येतो. हाडें बारीक व मऊ, डोकें मोठें, शरीराच्या मानानें पोट मोठें, हाडाचीं टोकें मोठीं झालेलीं, टाळू नीट भरत नाहीं, डोक्यास घाम येतो, इत्यादि लक्षणें दिसूं लागतात. ह्या औषधानें असें मूल, चांगलें सुधारतें. बाटली किं. १–०–०

तज्ज्ञ डॉक्टरकडून काळजीपूर्वक चिकित्सा केली जाते.

चिकित्सा वेळः- दु. १ ते ४॥

होमिआ लॅबोरेटरी १७८ न्यू चर्निरोड,
प्रार्थनासमाज, **मुंबई नं. ४**

डक रुग्ण चिकित्सा—

औदुंबर कुष्ठ

लेखक-वैद्य श्री. द. जळूकर

डी. ए. एस. एफ., नासिक

पुढील तक्रारी घेऊन पुढील रुग्ण शुद्ध आयुर्वेद ल्याच्या आयुर्वेदीय आरोग्यशालेंत आला.

-वय ४५ वर्षें. व्यवसाय–वृत्तपत्रसंपादन

राहणार–नाशिक

प्रमुख तक्रारी–१) तोंडावर पित्त आल्याप्रमाणें ी उठणें, वर्ण किंचित लालसर. २) तोंडाप्रमाणेंच वरहि गांधी उठल्या. ३) कंडू फार होती. ४) विल्यानंतर गांधींतून स्राव येई. ५) वरीलप्रमाणेंच लीचे ठिकाणीं सुद्धां सूज आल्यासारखें झालें व कानांचे आंत व बाहेरील बाजूस स्राव होत . स्रावाचा वर्ण पांढरवट तांबडा, कधीं कधीं त्या ांतून तार सुटत असे, व कानानें घड्याळाची टिक ऐकूं येत नव्हती.

पूर्वेतिहासः—पूर्वीपासून विशेष आजार असा ुष्यांत नाहीं. वृत्ति स्वतंत्र, धाडसी व थोडी छंदी.

प्रकृति पित्तप्रधान—केस लवकर पांढरे, नेत्र डे, स्वभाव संतापी, बहुभुक्, मधुर आणि तळलेलें फार तिखट नाहीं, अशा पदार्थांची आवड. ास पडसें हा विकार गेल्या १० वर्षांत झालेला त नाहीं.

कुष्ठरोगाचीं घडलेलीं कारणें

निदान (हेतु)—१ दिवास्वाप, २) दही निर-ाळे वेळीं, ३) वाटेल तेवढें खाणें, ४) घरांत वांग्याची ी वारंवार होई व त्याची आवड निर्माण झाली ी, ५) खाण्यांत करडईचें तेल कच्चें व पक्कें मधून येई. स्वभावानुस व धंद्यामुळें चहा क वेळां पिण्यांत येई.

पूर्वरूपांतील तक्रारी—अंगाला थोडी खाज येई जविल्यानंतर जागा लाल पडत असे. मधूनमधून र रोमांच येत असत. कान अथवा तळपाय, तळहात अकस्मात् गरम होत असत. एकाद्या वेळीं घाम येई, एकादे वेळीं घाम मुळींच येत नसे. मलावष्टंभाची संवय जडली होती.

रूपें— कांहीं पूर्वरूपासह प्रमुख तक्रारींतीलच

उपशयानुपशय— भोजन न केलें तर तेवढ्यापुरतें बरें वाटे. वातूळ व पित्तकर पदार्थ खाण्यांत आल्यानें घशाशी जळजळ वाटे. कानांत ऑक्रिफ्लेविन घातल्यानें अनुपशय.

थोडक्यांत संप्राप्ति—आहार हा कफपित्तदुष्टि करणारा असल्यामुळें ते दोष रसाश्रयी बनून यांनीं कुष्ठाचीं पूर्वरूपें निर्माण केलीं, व त्यानंतर कफपित्तदोषात्मक कुष्ठविकार प्रकट होत होता.

रोगनिदान— औदुंबर कुष्ठाची सुरवात.

चिकित्सा— कुष्ठहेतुपरिहार व रक्तविस्रुति

रक्तस्रुति व वमन प्रयोग

रक्तविस्रुतीनंतर सर्व लक्षणें एकदम कमी झालीं पण त्यानंतर बरेच दिवस रुग्ण परगांवीं गेल्यानें व इतर कांहीं कारणानें रुग्णालयांत आला नाहीं. पण पुन्हां ४ महिन्यानंतर पूर्वीसारखें होऊं लागलें म्हणून रुग्णालयांत आला, तेव्हां त्यास कुष्ठघ्न व स्नेहनावश्यक असें करंज-तैल रोज ७ थेंब एका वेळीं असें ३ वेळ बत्ताशांतून दिलें. तसेंच महासुदर्शनवटी ४ गोळ्या व प्लीहोदरारी चूर्ण रात्रीं विरेचनार्थ रुग्णानें घेतलें. करंज-तैलाचा अभ्यंगहि करावयास सांगितलें होतें. व कानांतहि घालण्यास सांगितलें होतें. ४-६ दिवसानंतर वमन कल्प नं. २ [पित्तप्रकृति लोकांसाठीं मुद्दाम तयार केलेला] दिला गेला, व आपित्तदर्शन वमन घडविलें गेलें व वमनानंतर श्रीवाग्भटांचे आदेशानुसार वमनोत्तर पथ्य करण्यास सांगितलें. त्यानंतर २ दिवसांनीं रुग्ण पुन्हां आला तेव्हां त्याचे तोंडावर डाग नव्हते, अंग खाजवीत नव्हतें, व भूक चांगली होती,

कानांतून पाणी निघत नव्हतें, व स्वतःचे चालण्याचा ध्वनि व घड्याळाचा ध्वनि सुद्धां त्यास चांगला ऐकूं येऊं लागला.

शरदृतूची चिकित्सा

आतां शरद--ऋतु लागला आहे तेव्हां त्यानुसार पित्ताची चिकित्साहि करण्याचें त्यास सुचविलें असून अद्याप विरेचन व अस्रविस्रुति हे दोन्ही शोधनोपचार पुन्हां करण्याचें ठरविलें आहे, व रुग्णहि त्यास आनंदानें तयार आहे.

तांदळाच्या कोंड्यांतून गोडें तेल

‘ भात (साळी) भरडून तूस काढल्यानंतर करड तयार होते. करड सडली म्हणजे कोंडा निघतो. या कोंड्यांत गोडें तेल, मेण, व जीवनसत्त्व इ. घटक असतात. जपान, अमेरिका इ. देशांत हें गोडें तेल कोंड्यातून अलग करून खाण्यासाठीं वापरतात. भारतांत सध्यां तयार होणाऱ्या करडीपासून २२ कोटी रुपये किंमतीचें गोडें तेल निघू शकेल असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे.

१ लाख लोकांना काम

साळीच्या करडीचा कोंडा शास्त्रीय रीत्या उपयोगांत आणावयाचे योजल्यास अंदाजें १ लाख लोकांना काम मिळेल व सरकारला कराच्या रुपानें ५-६ कोटी रुपये मिळतील. ”

—उद्योग—व्यापार, वार्षिक १९५५

वाचकांचा पत्रव्यवहार—

समानवायूचा विचार

आपले गांवकरीमधील मधुमेहावरील लेख वाचले. रसधातु व समानवायु यांचाहि विचार या निदान-चिकित्सेंत व्हावयास पाहिजे असें वाटतें. गलत्कुष्ठारि-रस समानकाळीं मधांतून दिल्यास उत्तम उपयोग होतो असा अनुभव आहे.

मुंबई २ —वै. र. गो. कुलकर्णी



अपुरें संरक्षण

धूळ, जंतू व श्वसनाच्या इतर विकारांपासून संरक्षण मिळविण्यासाठीं कास्फो औषधि गोळ्या वापरणें इष्ट आहे. खोकला, पडसें, घशाची खवखव, ब्रॉंकायटिस इ. विकारांमध्यें कास्फो उपयुक्त आहे. आजच एक बाटली खरेदी करा. सर्वत्र मिळूं शकते.

कास्फो
खोकल्यावरील १ उपाय

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड,
अहमदनगर.

खोकला
यशस्वी दवा

BUSBEOT APK. 54-3 MAR

चंद्रकलारस-निर्णय :

लेखकः- वैद्य मुकुन्दराव अं. गायकवाड
१११ उत्तरकसबा, सोलापूर

(मागील अंकावरून समाप्त)

भावना १।१ कीं ७।७ द्याव्या ?

चन्द्रकलेंतील ‘ दिवसे दिवसे पृथक् ’ या म्हणण्यामाणें १।१ भावना देणेंच श्रेयस्कर होईल. दिवस ब्दानें एक भावनेचाच निर्देश आहे. कारण जरी आपण औषधास एखादें द्रवद्रव्याची भावना देण्यारितां मिश्रण केलें तर तें शुष्क होईपर्यंत दुसरें द्रव–व्य घालावयाचें नाहीं, व हा जो कालावधि मध्यें ाईल तो किती दिवसांचा कां असेना, तो एक भावनो द्योतकच समजावयाचा असतो. एखादा म्हणेल ीं, द्रव द्रव्य मोजकेंच टाकलें तर अर्ध्या तासांतच ावना होऊन जाईल कीं ! पण तसें नाहीं. द्रव द्रव्य ती घालावयाचें याचाहि नियम शास्त्रकारांनीं ंगितला आहे.

> द्रवेण यावता द्रव्यं एकीभूयाऽऽर्द्रतां व्रजेत् ।
> तावत्प्रमाणं निर्दिष्टं भिषग्भिर्भावनाविधौ ॥
> — रसपद्धति टीका ॥

भाव्य द्रव्यांत भावना देण्याचें द्रव द्रव्य इतकें ावें कीं सर्व मिश्रण एकजीव होऊन चांगलें पातळ ळें पाहिजे. अस्तु. भावना ७।७ द्याव्यात, असा साधारण नियम आहे. पण तो नियम ज्या कल्पांत ती भावना द्याव्यात याचा उल्लेख नाहीं तेथें ल्यास उपयोगावा. किंवा गुणवर्धनाचे दृष्टीनें व ळ असेल त्यानें हा नियम जरूर पाळावा. याबद्दल ोगाचा विरोध आहे ?

भावनेसाठीं निवळलेला रस द्यावा

भावनेसाठीं स्वरस कांहीं वेळ स्थिर ठेवून ारी निवळी उपयोगांत आणावयाची असते. या निवळलेल्या रसांतच वनस्पतींतील महत्वाचीं द्रव्यें दूषत स्थितींत असतात. ‘आयुर्वेदीय औषधी संशोन’ नामक निबंध आयुर्वेद सेवा संघानें प्रकाशित ला आहे, त्यांत याबद्दल माहिती दिली आहे, ती ल्यास पहावी.

गुळवेलसत्व घ्यावें, घनसत्व नको

गुळवेलसत्व शब्दानें घनसत्वाचा बोध होत नाहीं. गुळवेलसत्व म्हणजे पांढरें पिष्टमय सत्वच घेण्याचा संप्रदाय आहे. शिवाय घनसत्व शब्द जो जास्त प्रचारांत आला तो अलीकडेच या दहावीस वर्षांत आला आहे. गुणधर्मांचे दृष्टीनें विचार करतां अनग्निसिद्ध गुळवेलसत्व सहजसुलभरीत्या शरीरांत शोषलें जातें. तें शीतवीर्य, दाह-शोषघ्न, ज्वरघ्न, पित्त-रक्तापित्तघ्न इत्यादि गुणधर्मांनें संपन्न आहे. पण गुळवेलीचा घन–अग्निसंस्कारामुळें गुळवेलसत्वापेक्षां शरीरांत पचावयास जड असून मूळचे गुळवेल–स्वरस चूर्णापेक्षां सरस असें कार्यहि करूं शकत नाहीं. केवळ सौकर्यार्थच म्हणजे ताजी गुळवेल पाहिजे तेव्हां मिळत नाहीं म्हणूनच गुळवेलीचा घन वापर करण्याचा प्रघात पडलेला आहे.

माधवीचीं फुलें घ्यावींत

मधुमालतीचीं फुलें चंद्रकलेंत घ्यावयाची परंपरा आहे. आणि मधुमालतीचे पंचांगांचे गुणधर्मांतून फक्त फुलांचे गुणधर्मच चन्द्रकलेसारख्या दाहतृष्णापित्तमेह–ज्वररक्तापित्तनाशक कल्पास उपयोगी पडणारे असे आहेत. माधवीबद्दलचा निर्णय १।१०।५३ चे आयुर्वेद पत्रिकेंतील ‘चन्द्रकला’ लेखांत केलेलाच आहे. माधवी म्हणजे मधुमालतीची वेली हल्लीं बहुतेक उद्यानांतून अगत्यानें लावलेली असते. फुलें येतात तेव्हां घेऊन वाळवून संग्रह करावा. मधुमालतीस कोणी हळदवेलहि म्हणतात. पण प्रचारांत सध्यां ‘ मधुमालती ’ हेंच नांव जास्तकरून आहे.

चंद्रकलेंत शीतवीर्यात्मक द्रव्यें

चंद्रकलेमध्यें प्राधान्यानें शीतवीर्यात्मक द्रव्यें मिश्र केलीं आहेत. पिंपळी ही उष्णवीर्य आहे. आधींच खनिज द्रव्यांतील तीक्ष्णोष्णत्व सौम्य करण्याकरितां

व कल्पाचें वीर्य 'शीत' व्हावें म्हणूनच मुस्तादि भावनाद्रव्यें जीं शीतवीर्यात्मक आहेत तीं घेऊन भावना देण्याचा उपक्रम केलेला आहे. तेव्हां पिंपळी–सारखें उष्ण द्रव्य, मुस्तादाडिंमादि शीतवीर्यात्मक द्रव्यांच्या भावना दिल्यानंतरहि पुनः मिश्र करणें योग्य दिसत नाहीं.

कोणी म्हणतील कीं शीतवीर्याचा अतिरेक होऊन अग्निमांद्य नाहीं कां होणार? पण ही शंकाच फोल ठरणार आहे. कारण ताम्र-अभ्रकासारखी जोडी चंद्रकलेंत असतां अग्निमांद्य समोर येईल तरी कसें?

तेव्हां भ्रमांत व मतमतांतराच्या गलबल्यांत न पडतां पूर्वाचार्यांनीं योजिल्याप्रमाणें व परंपरेनें, संप्रदायानें टिकवून ठेवलेले पाठाप्रमाणें मधुमालतीचीं फुलेंच घालून चंद्रकला बनवावी. मधुमालती शीत–वीर्यात्मक असल्यामुळें ती चंद्रकलेच्या गुणधर्मांत वाढच करणारी आहे.

पांढरें चंदन घ्यावें

'श्रीगंध' शब्दानें पांढरा चंदनच घ्यावा. गुणांचे दृष्टीनें तोच श्रेष्ठ आहे. शिवाय शार्ङ्गधरानीं कोणता चंदन कुठें घ्यावा याचा निर्णय केलेला आहे. पहा—

चूर्णस्नेहासवालेहाः प्रायशश्चंदनान्विताः।
कषायलेपयोः प्रायो युज्यते रक्तचंदनम्॥

चूर्णे, तैलें, आसवालेहादींमध्यें बहुतकरून पांढरा चंदन योजावा. काढे–लेपादींतून बहुधा रक्त-चंदन वापरावें.

झालें! संशयच फिटला! चंद्रकलेंत, घालाव-याच्या तिक्तादि चूर्णीत अर्थातच पांढरें चंदन घातलें पाहिजे हें सिद्धच झालें.

शिवाय, रक्तचंदन सध्यां खरा मिळत नाहीं. हल्लीं आपणांस मिळणारा रक्तचंदन म्हणजे सागर–गोटा वर्गांतील [म्हणजे नॅचरल ऑर्डर caesalpinea] पतंगाचें लांकूड–पतंग नामक झाडाचें लांकूड होय.

रक्तचंदनास निघंटांतून श्रीगंध हें नांवहि नाहीं. तेव्हां सुगंधी व शीतवीर्य असें पांढरें चंदनच घेणें हितकर आहे.

श्रीगंध शब्दाचा 'कापूर' असाहि अर्थ होत नाहीं. कापुराचे नामावलींत श्रीगंध नांव आढळत नाहीं. कापुराचीं एकंदर ६० नांवें निघंटांत दिलीं आहेत. शिवाय चिनी कापुराचीं ८ नांवें वेगळीं दिलीं आहेत. एवढ्या नांवांतूनहि श्रीगंध शब्द आलेला नाहीं. तेव्हां श्रीगंध म्हणजे कापूर नव्हे हें आपोआपच सिद्ध झालें. बृहद्योगतरंगिणींत तर श्रीगंध शब्दाचे ऐवजीं 'श्रीखंड' असा स्पष्ट पाठभेद आहे. आणि श्रीखंड हा पांढरें चंदनाचाच पर्याय आहे.

श्रीगंधाचे जागीं 'शृंगाट' शब्द फक्त रसरत्न-समुच्चयांतच आला आहे. इतर कोणत्याहि वर उल्लेखित ग्रंथांतून नाहीं. पण रसरत्नसमुच्चयाच्या हस्तलिखित पोथ्या पहातां विंचूरकरांचे पोथींत श्रीगंध हाच शब्द आहे. आणि या पोथीचा स्पष्ट उल्लेख रसरत्नसमुच्चयाचे आनंदाश्रमस्थ प्रतींत आहे. असें असतां शृंगाट शब्दाचा आग्रह धरणें व्यर्थ आहे.

'तिक्ता' शब्दानें कुटकीच घ्यावी

'तिक्ता' शब्दच बहुतेक सर्व पाठांतून आढळतो. व संप्रदायहि कुटकीच घेऊन पाठ बनवितो. मागें लिहिलेले वैद्यसारसंग्रहादि ग्रंथांतून कुटकीच घेतलेली आहे. गुणधर्मांचे दृष्टीनेंहि कुटकी घेणेंच ठीक आहे.

द्राक्षादि गण नको

फक्त बसवराजीयम् ग्रंथ व रसरत्नसमुच्चय या दोन ग्रंथांतील पाठांत "द्राक्षाफलकषायेण" या ऐवजीं 'द्राक्षादिक कषायेण' हा पाठभेद लिहिला आहे. पण तेथें हा द्राक्षादिक गण कोणता हें मात्र लिहिलेलें नाहीं. तो कोठला घ्यावा हेंहि लिहिलेलें नाहीं. हे दोन ग्रंथ सोडले तर बाकीचे सर्व म्हणजे बृहद्योगतरंगिणी, वैद्यरहस्य, योगरत्नाकर, रसचिंतामणी, रसकौमुदी आदि १८-२० ग्रंथांतून 'द्राक्षाफलकषायेण' हाच पाठ आहे. बरें, वाग्भटांतलि 'द्राक्षादि गण' च घ्यावा याला आधार काय? वाग्भटांतलि

नादि गण–संग्रहांत हा गण नाहीं. वाग्भट ज्वर- त्साध्यायांत हा द्राक्षादि कषाय सांगितला आहे. तोच कषाय घ्यावा असा बसवराजीयांतहि उल्लेख ं, बसवराजीयांत चंद्रकला पाठ दोन ठिकाणीं-- हे, पित्तरोग) आला आहे. व हा पाठ 'आयुर्वेद' क ग्रंथांतून उद्धृत केल्याचा उल्लेख आहे. हा र्वेद ग्रंथ कोणता हें सध्यां अज्ञात आहे. त्यामुळें ादिकषाय कोणता याचा निर्णय लागत नाहीं.

द्राक्षाफलकषाय घ्यावा

दुसरें असें कीं, अष्टांगहृदयकार वाग्भट व त्नसमुच्चयकार वाग्भट एक नव्हेत व दोघांच्या ानांतहि अंतर आहे, असें विद्वानांचें ठाम मत े, तेव्हां दोन्ही ग्रंथांचा ग्रंथकार एकच असतां कदाचित् तसा ग्रंथकाराचा अभिप्राय असावा गृहीत धरतां आलें असतें. अशा तऱ्हेचें कोडें तरंगिणी–योगरत्नाकरादि ग्रंथकारांस पडून त्यांनीं ाक्षाफलकषायेण ' असाच सुटसुटीत पाठ स्वीकार ा असावा. कांहींहि असो, बहुमताकडे आपणांस ं करितां येत नाहीं. बहुतेकांनीं ' द्राक्षाफलकषा- ' हाच पाठ स्वीकारला आहे. तेव्हां आपणहि ा स्वीकारला पाहिजे. अलीकडच्या मराठी वैद्यक ंतूनहि उदा. वैद्यसारसंग्रह, वैद्यकलानिधि, औषधी ह, रसचंडांशु, निघंटरत्नाकर, गुणधर्मशास्त्र आदि ंतूनहि द्राक्षाफलकषाय म्हणजे काळ्या--मनुका- ाचीच भावना देण्याचा आदेश आहे, म्हणून ा पाठ योग्य धरून चालावें.

धान्यराशींत ठेवणेंचा कल्पप्रकार

वरीलप्रमाणेंच धान्यराशींत ठेवण्याचे बाबतींतहि हे. वर उल्लेखित बहुतेक सर्व ग्रंथांतून धान्य- ींत औषध ठेवण्यास सांगितलें आहे. व हें योग्य ेंसें मला वाटतें. परंपराहि हेच अनुभवाचे बोल ा आहे.

रसशास्त्रांत मृगांककल्प, पर्पटीकल्प, पोटलीकल्प, कल्प इत्यादि विशिष्ट कल्पप्रकार सांगितले आहेत. ात्र हा धान्यराशींत ठेवण्याचाहि विशिष्ट कल्पप्रकार आहे. उदा० चिंतामणि–चतुर्मुख (रसयोग--सागर २८ पहा) स्वयमग्निलोह, पूज्यपादीय वैद्य–शास्त्रांतील अग्निरस, उत्तरेकडे प्रसिद्ध असलेला रत्नगिरीसाधूचा महाशक्तिदाता प्रयोग, चन्द्रकला इत्यादि. तेव्हां या क्रियेमुळें जो कांहीं अनुकूल बदल किंवा विशिष्ट परिवर्तन घडतें त्याचा फायदा आपण कां बुडवावा ! रसशास्त्रकारांनीं कांहीं हेतु धरूनच असे निरनिराळे संस्कार, रसकल्पावर करण्यास सांगितलेले आहेत. त्यांचा हेतु काय असावा याचा छडा आपण अनुभव घेऊन लावला पाहिजे. रसशास्त्रांत अशा कितीतरी अज्ञात गोष्टी आज आहेत!

चन्द्रकला कीं महाचन्द्रकला ?

महाचन्द्रकला असें नामाभिधान बृहद्योगतरंगिणी विद्यापतिकृत वैद्यरहस्य या ग्रंथांतून दिलेलें आहे. बसवराजीय ग्रंथांतील पित्तरोग-विवरण–प्रकरणांत महाचन्द्रकला असें म्हटलें आहे, पण पुढें प्रमेह--प्रकरणांत हाच पाठ असून त्यास तेथें मात्र चन्द्रकलाच नांव दिलें आहे. बाकी सर्व ग्रंथांतून [मागें दिलेली रसयोगसागरस्थ यादी] चन्द्रकला हेंच नांव आहे. तेव्हां महाचन्द्रकला म्हटलें काय किंवा चन्द्रकला म्हटलें काय, वेगळा पाठ डोळ्यापुढें उभा राहातच नाहीं.

-- जसें, नुसतें सूतशेखर म्हटल्याबरोबर वाचणाऱ्याचे दृष्टीपुढें संभ्रम उत्पन्न होतो; तो असा कीं, हा साधा सूतशेखर आहे कीं सुवर्णसूतशेखर; कां सुंठकांवेचा लघुसूतशेखर ! आतां तर रौप्यस्वर्णसूतशेखरहि प्रचारांत आला आहे. पण चंद्रकलेचें अजुनी तसें झालें नाहीं. म्हणून ' चंद्रकला ' हें सुटसुटीत नांवच बरें. उच्चारावयासहि बरें.

७।७ भावना दिल्यास महाचंद्रकला म्हणावें

या चंद्रकलेसच जर एकेक भावनेऐवजीं कोणी ७।७ भावना देण्याची खटपट करील, तर मात्र ती महाचंद्रकला नामाभिधानास पात्र होईल, यांत संशय नाहीं. अशा रीतीनें द्रव्यनिश्चिति केलेला चंद्रकलेचा पाठ पुढीलप्रमाणें होतोः—

चंद्रकलारसाचा पाठ

प्रत्येकं तोलमादाय सूतं ताम्रं तथाभ्रकम् ।
द्विगुणं गंधक चैव कृत्वा कज्जलिकां शुभाम् ॥
मुस्तादाडिमदूर्वोत्थैः केतकीस्तन्यवारिजैः ।
सहदेव्याः कुमार्याश्च पर्पटस्य च वारिणा ॥
रामशीतालिकातोयैः शतावर्या रसेन च ।
भावयित्वा प्रयत्नेन दिवसे दिवसे पृथक् ॥
तिक्ता गुडूचिकासत्वं पर्पटोशीरमाधवीः ।
श्रीगंधं सारिवा चैषां समानं सूक्ष्मचूर्णितम् ॥
द्राक्षाफलकषायेण सप्तधा परिभावयेत् ।
ततः पोताश्रयं कृत्वा वट्यः कार्याश्चणोपमाः ॥

चंद्रकलारसाचे गुणधर्म

वातं पित्तं भ्रमं दाहं बाह्यान्तःसंज्ञितं हरेत् ।
महातापज्वरं मूर्च्छां ह्यूर्ध्वाधो रक्तपित्तकम् ॥
मूत्रकृच्छ्रं संग्रहणीं प्रमेहं सर्वजं हरेत् ।
बहुप्रवाहं हन्त्येव यत् स्रवद्रक्तमर्शसाम् ॥

अपि च—

अम्लपित्तप्रशमनः प्रदरध्वंसकारकः ।
ग्रीष्मकाले शरत्काले विशेषेण प्रशस्यते ॥
कुरुते नाग्निमांद्यं च रसश्चंद्रकलाभिधः ।
(रसचिंतामणी आदि ग्रंथोक्त)

किंवा संशयविरहित पाठ पाहिजे असेल तर तो पुढीलप्रमाणें —

सूतं ताम्रं तथाभ्रं च प्रत्येकं कर्षमात्रकम् ।
कर्षद्वयं गंधकं च मेलयित्वा विभावयेत् ॥
मुस्तकस्य कषायेन दाडिमीबीजवारिणा ।
दूर्वामूलरसैश्चापि केतकीमूलवारिणा ॥
स्तन्येन कमलेनापि सहदेव्याश्च कन्यया ।
पर्पटस्य कषायेण रामशीतलिकारसैः ॥
शतावर्या रसेनापि दिवसे दिवसे पृथक ।
ततः तिक्तामृतासत्वं पर्पटं वालकं तथा ॥
माधवीपुष्पचूर्णं च सितचंदनसारिवे ।
कर्षं कर्षं पृथक् चैषां मेलयित्वा पुनः भिषक् ॥
मृद्वीकायाः कषायेन सप्तधा परिभावयेत् ।
शोषयित्वा च सप्ताहं स्थापयेद् धान्यसंग्रहे ॥
पश्चान्मृद्वीकषायेन वट्यःकार्याश्चणोपमाः ।
एष श्चंद्रकला नाम्ना रसः सर्वरसोत्तमः ॥
ज्वरं मेहं च प्रदरं दाहं शोषं भ्रमाश्मरीम् ।
मूत्रकृच्छ्रं चाम्लपित्तं मूर्च्छांसृक्पित्तनुत्परम् ॥
ग्रीष्मकाले शरत्काले विशेषेण प्रशस्यते ।

अर्थ–पारा१, गंधक२ यांची कज्जली करून तीं अभ्रकभस्म१, ताम्रभस्म१, मिळवून घोटून झाल्यावर या मिश्रणास नागरमोथ्याचा काढा, डाळिंब बियांचा रस, दूर्वांचे मुळांचा रस, केवड्याचे मुळांचा रस, स्त्रीदूध, कमळपाकळीचा रस-म्हणजे तांबडे कमळफुलाचे पाकळीचा रस, पांढऱ्या फुलांच्या सहदेवीचे पानांचा रस, कोरफडीचे गाभ्याचा रस, पित्तपापड्याचा काढा, रामशीतलिकेचे म्हणजे पांचेचे पानांचा रस, शतावरी-मुळांचा रस, यांचेमध्यें वेगवेगळी १।१ वेळ क्रमानें भावना द्यावी. सुकल्यावर कुटकीचें वस्त्रगाळ चूर्ण, गुळवेलीचें सत्व, पित्तपापडाचूर्ण, सुगंधी वाळ्याचे चूर्ण, मधुमालतीच्या फुलांचें चूर्ण, पांढरे चंदनाचे खोडाचें चूर्ण–सुवासिक चंदनाचें चूर्ण, सारिवा-अनंतमुळाच्या सालीचें सुवासिक चूर्ण, हीं औषधें प्रत्येकीं १।१ तोळा घेऊन वरील पारदादि मिश्रणांत मिळवून घोटून एकजीव करून त्यास काळ्या मनुकांच्या काढ्याच्या ७ भावना द्याव्या. नंतर वड्या बांधून सावलींत वाळवाव्या आणि एरंडाचे अथवा नागवेलीचे पानांत त्या वड्या गुंडाळून कच्च्या सुतानें लपेटून तांदूळ, गहूं, ज्वारी आदि धान्याचें कोठारांत अथवा धान्याच्या पोत्यांत तो गोळा ७दिवस ठेवून द्यावा. नंतर काढून घेऊन खलांत चूर्ण करावें. (अर्थातच वरील एरंडाचीं किंवा खाती पानें काढून टाकावीं). आणि काळ्यामनुका काढ्याचे सहाय्यानें हरभऱ्याएवढ्या गोळ्या बांधून सावलींत सुकवाव्यात व कुपींत भरून ठेवाव्यात.

पवित्र
नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोळा.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोळा.
लिहाः–नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

वैद्यांसाठीं स्वस्त औषधें

(लेखकः—वैद्य सुंदरराव भास्करराव वैद्य, आयुर्वेदरत्न, मुंबई २)

आपल्या ता. १ ऑक्टोबरच्या अंकांत श्री. के. देसाई यांनीं लिहिलें आहे कीं, खेड्यांतील ांना स्वस्त सिद्ध औषधें पाहिजेत.

वैद्य आप्पाशास्त्री साठे हे रासायनिक विद्येंत वे गुरुप्रमाणें निष्णात होते. असें असून सुद्धां वै. प्पांनीं महाराष्ट्रांत विशेषतः मुंबईमधल्या एकंदर परिस्थितीचा नीट विचार केला. महाराष्ट्रा–ल्या दरिद्री देशांत महागडीं रासायनिक औषधें डणें शक्य नाहीं; त्याऐवजीं काष्ठऔषधें बहु-ी व अल्पमोली असतात; म्हणून काष्ठऔषधीच आप्पा जास्त वापरीत असत. सुंठ, मिरे, तुळशी, त्यांच्या काढ्याला भिऊन हिमज्वर पळूं लागला. ठऔषधी कोठेंहि खेड्यांत मिळूं शकतात. तीं धें वापरणारांस कसल्याहि तऱ्हेचा धोका नसतो. त्याचेविरुद्ध रासायनिक औषधांचें आहे.

अण्णासाहेब पटवर्धनांचे काढे

“रसौषधी म्हणजे धातूंचीं भस्में, रसायनें. हीं स्त्रोक्त पद्धतीनें केलेलीं खात्रीचीं अशीं औषधें ळालीं तरच उपयोगी; नाहींतर उपायाऐवजीं ायच व्हावयाचा. शिवाय गरीबांना घेण्यास हीं ागच. यासाठीं अण्णासाहेब पटवर्धन यांचा सर्व वनौषधींवर असे. या मिळण्यास सोप्या व स्वस्त, रोज काढा ताजा करावयाचा म्हणून गुणानें श्रेष्ठ. ौषधि धातूंपासून बनविल्या असल्यामुळें त्या ेय शरीराशीं लवकर समरस होत नाहींत, व शरी-र फार वेळ राहूंहि शकत नाहींत; मूत्रावाटें अगर वाटें लवकर बाहेर पडतात. रसायनें शुद्ध वनौ-षधींपेक्षां जास्त तीव्र असतात व त्यांचा गुणहि कायम रूपाचा नसतो. यामुळें तीं लहान मुलांस किंवा तान्या माणसांस किंवा नाजुक प्रकृतीच्या बायकांस क पडतात.

रसौषधें महाग पडतात

पाश्चात्यांना सुद्धां हें हल्लीं पटूं लागलें आहे, त्यामुळें त्यांचे औषधीसंग्रहांतून निरिंद्रिय औषधें दिवसेंदिवस कमी होत असून सेंद्रिय औषधांचा भरणा वाढत आहे. जुन्या आयुर्वेदीय ग्रंथांतून दिलेलीं औषधें सर्व वनौषधींचींच आहेत. रसौषधींचा प्रघात मागाहून पडला. वनौषधींचीं औषधें सौम्य असतात, निर्धास्तपणें घेतां येतात; गुण हळुंहळुं येतो, पण कायम टिकणारा असतो व अति स्वस्त मिळतात. रसौषधींनीं गुण झटपट येतो खरा, पण कायम टिकणारा नसतो. त्या खेड्यापाड्यांतून मिळण्यास कठीण. त्यांच्या गुणाची खात्री नसते. एवढेंच काय, पण कृतींत दोष असेल तर तीं अपायकारक होतात. शिवाय तीं वनौषधींपेक्षां महाग असतात. ”

काढ्यांत, ठरलेलीं ५-६ औषधें

अण्णासाहेबांनीं दिलेले हजारों काढे जरी तपासून पाहिले तरी ठरलेलीं ५–६ औषधें (गुळवेल, ज्येष्ठमध, धमासा, पांढरी वसुमूळ, कडुनिंब, अेरंडमूळ) प्रत्येक काढ्यांतून असावयाचींच. हीं औषधें तिन्ही दोषांवर उपयोगी अशा स्वरूपाचीं असत. शिवाय तीं शामक, दीपक, पाचक, सारक, कृमिनाशक अशीं गुणवान् असल्यामुळें कोणत्याहि रोगावर परिणाम करणारीं असत. “रानांतून जर ताजीं औषधें मिळालीं तर जास्त औषधांचीं मुळींच जरूर पडणार नाहीं” असें ते म्हणत. (पटवर्धन चरित्र)

सूक्ष्म औषधी प्रयोग

अण्णासाहेबांना सर्व काढ्यांत ५।६ औषधें घालावीं लागत त्याचें कारण सारीं ताजीं मिळणें शक्य नाहीं म्हणून. म्हणून आम्ही म्हणतो कीं, अण्णासाहेबांच्या ५।६ औषधांपैकीं अेकच ताजें औषध घेऊन त्या रोगावर द्यावें. कारण तें त्रिदोषशामक असतें. तें सूक्ष्म

म्हणजे दोन वाल घेऊन; योग्य त्या रोगावर द्यावें. तें वाटून थंड पाण्याच्या मोठ्या बाटलींत घालावें व चमचा चमचा द्यावें म्हणजे सूक्ष्म पद्धतीचा गुण समजेल. सूक्ष्म पद्धतीनें ताप एका दिवसांत जातो. नाहींतर डॉक्टराला तोच ताप घालविण्यास २४दिवस लागतात. [पहा, आ. प. वर्ष ८ अं.२४ पान७८२] प्रत्येक वैद्यानें ह्याचा अनुभव घेऊन पाहिला पाहिजे.

४० औषधांच्या पत्रिका

मीं ४० औषधांच्या पत्रिका छापल्या आहेत.एकानें त्यांतील२०विकत घेतल्या व त्यांतील१९पत्रिका लोकांस वाटल्या. " त्यांचा कांहीं उपयोग खेड्यांतील अडाणी जनतेला होत नाहीं. समजा, आर्तव (साफ येण्यास) १२,१४,२७,३० ह्यांचें अनुपान व औषध कसें घ्यावें हें समजत नाहीं. तरी कृपा करून वहीवर टिपण करून लिहून देण्याची कृपा कराल काय ? रोगी स्त्री,वर्ष२२, सडपातळ. पाळीची तक्रार. पाळीचे अगोदर पोट दुखतें. संतति झालेली नाहीं. " अशीं पत्रें येतात.

हें शिकलेल्यांचें काम आहे

खेड्यांतील अडाणी जनतेला पत्रिकेचा उपयोग होत नाहीं, तर हें शिकलेल्या माणसांचें काम आहे. पत्रिका नीट वाचून त्यांस ती नीट समजावून सांगितली पाहिजे. औषधांचा अनुभव घेतला पाहिजे. इलेक्ट्रो-होमिओपॅथींत वनस्पतींचें केलेलें सूक्ष्म औषध एकच देतात. त्यांना त्याचा गुण येतो तर आमच्या सूक्ष्म औषधांनीं गुण कां येणार नाहीं ? वैद्य अप्पाशास्त्री यांनीं खारकेचे गुण असे दिले आहेत:— खारकेचा अत्यंत मोठा उपयोग पोट दुखून मासिक धर्म साफ न होणाऱ्या बायांस, प्रत्येक महिन्यास आर्तव साफ होऊन प्रकृति निरोगी रहाण्यासाठीं खारकांइतकें मोठें औषध नाहीं. अशा बायांस संततीहि होते.

आम्हांस पत्रिका जितकी स्पष्ट लिहितां आली तितकी स्पष्ट लिहिली आहे. त्याप्रमाणें अनुभव घेतला पाहिजे. विनाकारण पत्रव्यवहार करण्यांत कांहीं उपयोग नाहीं.

गांठीवर शंखाचा उपयोग



आमच्याकडे पुष्कळ रोगी औषधें विचारण्यास येतात. त्यांना आम्ही औषधें सुचवितो. कांहींजण आपलाहि अनुभव आम्हांस सांगतात. एकानें आम्हांस सांगितलें कीं, मी गांठ मोठी होऊन आजारी पडले. डॉक्टरांचे सर्व उपाय झाले. तेव्हां एका माळ्यानें मी औषध देतो म्हणून सांगितलें. त्यानें सोबतच्या चित्रांत दाखविला आहे असा पांढरा शंख पाठवून दिला. तो थंड पाण्यांत सहाणेवर उगाळून त्या सुजलेल्या गांठीवर लावला. तीन दिवसांत गांठ बरी झाली. हें औषध कोठलीहि गांठ सुजली म्हणजे हिचा उपयोग करतां येईल. उदा० तोंडांतील गांठी, गळ्याच्या गांठी, प्लेगच्या गांठी वगैरे.

ऊन पाणी, गार पाणी

दुसऱ्यानें सांगितलें कीं, सांधेदुखीवर व विशेषतः गुढघ्यावर आधीं गरम पाणी ओतावें व नंतर थंड पाणी ओतावें. असें तीन चार वेळ करावें. तात्काळ दुःख कमी होतें. परंतु कायमचें बरें होण्यास पुष्कळ दिवस हा उपाय केला पाहिजे.

मूळव्याधीवर अंजिरें

डॉ. गणपति वर्मा यांनीं आपल्या इंग्रजींतील 'मिरॅकल्स ऑफ् फ्रुट्स' या पुस्तकांत मुळव्याधीवर पुढील उपाय सुचविला आहे.- मूळव्याध हा यकृताचा विकार आहे. मोड कापून तो विकार जाणार नाहीं. ह्यावर उत्तम औषध म्हणजे ३।४ सुकीं अंजिरें घ्यावीं. तीं चांगलीं धुवावीं व कल्हईच्या भांड्यांत भिजत घालावीं. सकाळीं तें पाणी प्यावें व तीं अंजिरें खावीं. असेंच संध्याकाळीं करावें. अंजिरानें शौचास साफ होतें. २।३ आठवड्यांत विकार नाहींसा होतो. शौचास साफ होण्यास जरूर तर ॲनेमाहि घ्यावा. मुळव्याधीच्या रोग्यांनीं याचा अनुभव घेऊन पहावा.

राज्य विधानसभेंतील प्रश्नोत्तरें—

मगार-विमायोजनेतील चिकित्सक.... का. वि. योजनेतील अडचणी.... का. वि. यो. स्वच्छताविषयक शिक्षण.... औषधी पुरवठा.... मुंबई राज्यांतील क्षयरोगी.... बी. सी. जी. लस.

श्री. के. जी. पंडित (दाक्षिण विभाग-शिक्षकवर्ग) विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें:—

कामगार-आरोग्य-विमा योजना (मुंबई-राज्य) काम करण्याकरितां ता. २५।८।५५ पर्यंत लप्रमाणें ॲलोपॅथिक, आयुर्वेदिक व युनानी त्सक, रजिस्टर्ड करण्यांत आले आहेत.

ॲलोपॅथिक — ८३५ चिकित्सक
आयुर्वेदिक — १३३ ,,
युनानी — ६ ,,

होमिओपॅथिक चिकित्सकांचे सरकारी रजिस्टर च तयार झालें असल्यामुळें वरील योजनेंत वा समावेश केला नाहीं. तथापि आरोग्यविमा लेल्या कामगारांकडून जर होमिओपॅथिक त्सकांची मागणी केली गेली तर सरकार त्यांचाहि वेश ह्या योजनेंत करण्याचा विचार करील.

कामगार विमा-योजनेंतील अडचणी

कामगार–आरोग्य–विमा--योजना तारीख ३ टोबर १९५४ पासून अमलांत आली, व सदर नेची व्याप्ति बृहन् मुंबई व ठाणें जिल्ह्यांतील वली, कल्याण आणि भिवंडी एथपर्यंत आहे.

ह्या योजनेंत आतांपर्यंत सुमारें ४५०००० गारांचा समावेश झालेला आहे. ह्या योजनेसाठीं १९५५–५६ सालाकरितां मुंबईराज्याच्या अंदाजकांत बृहन्मुंबई व त्याच्या सभोंवारच्या प्रदेशाकरितां ,९३,८७० रुपये खर्चाची तरतूद केली आहे.

या योजनेचा फायदा कामगारांच्या कुटुंबांतील माणसांना मिळत नाहीं, तो फक्त कामगारांनाच तो. या योजनेच्या कार्यवाहींत सरकारला अद्याप ल गोष्टीबाबत अडचणी भासत आहेत.—

(१) रोगनिदान–चिकित्सा–केंद्रें (२) दांत, त्वचारोग व उपदंश रोग या रोगांची चिकित्सा करण्याबाबत (३) अपघातांत त्वरित चिकित्सा देण्याबाबत (४) रुग्णालयांतील रुग्णशय्यांची तरतूद, विशेषतः क्षयरोगी रुग्णशय्यांच्या बाबतींतील अडचण (५) कांहीं योजनामान्य वैद्यक चिकित्सांकडून रुग्णास योग्य चिकित्सा मिळण्याबाबत आणि (६) कांहीं प्रसंगीं अधिकृत औषधीविक्रेत्याकडून लागणारीं औषधें पुरविण्याबाबत नकार मिळाल्यामुळें निर्माण होणारी अडचण.

या योजनेपासून कामगारांना काय फायदे मिळूं शकतात ह्या संबंधीं सरकारनें तसेंच स्टेट इन्शुअरन्स कॉर्पोरेशननें छापील माहितीपत्रकें प्रसिद्ध केलीं आहेत. डायरेक्टर ऑफ् पब्लिसिटी यांचेकडून वेळोवेळीं जाहीर रीत्या वृत्तपत्रें वगैरेंतून या योजनेसंबंधीं खुलासे व माहिती प्रसिद्ध होत असते. त्याशिवाय या योजनेचे हेतु व फायदे कामगारांना कळावेत म्हणून जाहीर सभा घेणें, ऑल इंडिया रेडिओवरून या योजनेसंबंधीं माहिती देणें वगैरे गोष्टीहि केल्या जातात.

स्वच्छताविषयक शिक्षण

कामगार–विमायोजनेखालीं मुंबईत ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें ता. १ ऑक्टोबरपासून कारखान्यांतील स्वच्छताविषयक शिक्षणाबाबतचा अल्प मुदतीचा एक शिक्षणक्रम सुरू करण्यांत आला आहे. हा शिक्षणक्रम तीन महिन्यांचा आहे. त्यासाठीं पाहिल्या प्रथम १० डॉक्टरांच्या एका तुकडीची निवड करण्यांत आली आहे. या विषयांतील तज्ज्ञ अशा वैद्यक व्यवसायींची कमतरता भासल्यामुळें वरील शिक्षणक्रम चालू करणें आवश्यक वाटलें.

विमायोजनेस औषधी पुरवठा

विमेदार कामगारांना औषधोपचार करण्यासाठीं पुरवावयाच्या औषधांच्या यादींतहि वाढ करण्यांत आली असून त्यांत आणखी पुष्कळ औषधांची भर घालण्यांत आली आहे. त्यापैकीं कांहीं पुढीलप्रमाणें आहेत. (१) आयोडोक्लोरोहायड्रोक्सी क्विनोलाईन टॅब्लेटस् (२) बेंझाथाईन पेनिसिलिन (३) टिटॅनस् अँटिटॉक्सीन, आणि ४) प्लॅस्टर ऑफ पॅरिस– बॅंडेजेस.

गेल्या ऑगस्ट महिन्यांत, वरील योजनेखालीं बृहन्मुंबईंत २,१४३ प्रकरणांत ५७,४५१ रुपये तात्पुरत्या अपंगत्वाबद्दल वाटण्यांत आले. अशा प्रकारें गेल्या ऑक्टोबरमध्यें सदरहू योजना अंमलांत आल्यापासून आतांपर्यंत १८,७३४ प्रकरणांत मिळून एकूण ५,६०,४९१ रुपये तात्पुरत्या अपंगत्वाबद्दल वाटण्यांत आले.

याच महिन्यांत ३,२३,०८० रुपये आजारीपणाबद्दल, १,७१८ रुपये आजारी विमेदार कामगारांवर अवलंबून राहणाऱ्यांना, १,७८७ रुपये कायम स्वरूपाच्या अपंगत्वाबद्दल आणि ८,४९७ रुपये प्रसूतिबाबत वाटण्यांत आले.

मुंबई राज्यांतील क्षयरोगी

श्री. होमी जे. एच. तल्यारखान यांनीं विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें:—

भारत सरकारच्या आंकड्यांच्या आधारें मुंबई राज्यांत साधारणपणें २,५१,००० क्षयरोगी असावेत व त्यांच्या वार्षिक मृत्यूची संख्या ५०,००० असावी असें स्थूल मानानें दिसतें.

त्याचप्रमाणें साधारणतः क्षयरोगग्रस्तांचें प्रमाण शेंकडा ०·७ व त्यांच्या मृत्यूचें प्रमाण शेंकडा ०·१४ असें आहे. भोर कमेटीच्या अहवालांत क्षयरोग्यांच्या मृत्यूचें प्रमाण खालीलप्रमाणें दिलें आहे.

शहरीं लोकवस्तींत १ लक्ष लोकसंख्येंत हें मृत्यूचें प्रमाण २०० पासून ४५० पर्यंत असें आहे. ग्रामीण भागांतून विशेष माहिती मिळत नसल्यानें हें प्रमाण सांगतां येत नाहीं.

अद्याप प्रयत्न झाला नाहीं

क्षयरोगसंसर्गाचें व क्षयामुळें होणाऱ्या मृत्यूचें प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे किंवा कसें हें अजमाविण्यासाठीं सरकारकडून त्या दिशेनें अद्याप प्रयत्न केला गेला नाहीं.

क्षयरोग–प्रतिबंधक म्हणून बी. सी. जी. लस टोंचण्याचें कार्य मोठ्या प्रमाणावर मुंबई राज्यांत चालू आहे. तसेंच क्षयरोगनिवारक म्हणून रुग्णालयांतील क्षयरोग्यांच्या रुग्णशय्येंत वाढ व नवीन क्षयरोग–रुग्णालयें बांधणें वगैरे योजना चालू आहेत. शिवाय कामगार-आरोग्य-विमा योजनेमुळेंहि क्षयरोगनिवारणाचें कार्यांत वाढ झालेली आहे.

१९४६ सालीं सर्व मुंबई राज्यांत सरकारी व सरकारी मदत मिळणाऱ्या रुग्णालयांत व आरोग्यालयांत ८६६ क्षयरोगी रुग्णशय्यांची सोय होती. सध्यां ही सोय १२२१ रुग्णांकरितां झालेली आहे.

बी. सी. जी. व्हॅक्सिनेशन

बी. सी. जी. व्हॅक्सिनेशन योजनेला ता. २१ फेब्रुवारी १९४९ पासून सुरुवात झाली. व तिची व्याप्ति सर्व मुंबई राज्यांत सन १९५४ सालीं झाली. योजनेला सुरुवात झाल्यापासून जून १९५५ पर्यंत १४ वर्षांखालील किती मुलांवर बी. सी.जी. चिकित्सा दरसाल केली गेली तें खालीं दर्शविलें आहे

वर्ष	पूर्वपरीक्षण केलें (Tested)	लस टोंचली (Vaccinated)
१९४९ ……	८८५५०	२२७४७
१९५० ……	११९७४१	२२५१५
१९५१ ……	१२५०१५	३४१६५
१९५२ … ..	१२७२००	३८९७८
१९५३ ……	२१९४८५	५३९११
१९५४ ……	७७४६००	२८९३३७
१९५५[जूनपर्यंत]	६८८५७४	३१०८६५
एकंदर	२१४३१६५	७७२५२६

कांहीं थोड्या मुलांचे पालक आपल्या मुलाला बी. सी. जी. लसीबाबत पूर्वपरीक्षण करण्यास अगर बी.सी.जी. लसीचें सूचिकाभरण देण्यास विरुद्ध होते.

अभ्यंगशास्त्री वै. दा. धों. पाठक आयुर्वेदविशारद याची, आयुर्वेदपत्रिकेसाठीं घेतलेली, मुलाखत

[लेखक : वै. र. गो. कुलकर्णी आयुर्वेदविशारद]

प्रश्न– आपले वैद्यकीय शिक्षण तसेंच मसाजचे क्षण कोठें झालें ?

उत्तर- माझे वैद्यकीय शिक्षण बडोद्यास झालें. बडोदा संस्थानचा आयुर्वेदविशारद आहे. माझे ाज शिक्षण गु. माणिकराव यांजपाशीं झालें.

अभ्यंगाचें शिक्षण देणाऱ्या संस्था

प्रश्न– मसाजचें शिक्षण देणाऱ्या संस्था हिंदु-- ्थानांत आहेत काय ?

उत्तर-अभ्यंगशास्त्राचें शिक्षण देणाऱ्या संस्था इकडे हींत. मद्रास भागांत या विषयाचें खाजगी शिक्षण ळूं शकते. पूर्वी बडोद्यास गु. माणिकराव व पुण्यास लिमये महाराज अभ्यंगशास्त्र शिकवीत असत.

प्रश्न- स्टॉकहोमला आपण पदवी घेण्यासाठीं त होता काय ?

उत्तर— नाहीं. मी केवळ तिकडील संस्थांचें ाग कसें चालतें, ते कसें शिकवतात, व रुग्णावर ात्यक्षिक) प्रयोग कसे करतात तें पाहण्यासाठीं ो होतो.

प्रश्न— आपण तेथें किती दिवस होतां व किती तास पाहाण्यासाठीं जावें लागत असे ?

उत्तर – मी आठ महिने तेथें होतो. रोज ाळीं ८ ते १ विद्यालयांत, व दुपारीं २ ते ३।। िस्टलमध्यें जात असे.

तिकडील अभ्यंग पद्धति

प्रश्न— आपलेकडील व तिकडील अभ्यंगशास्त्र द्दल आपणास विशेष काय वाटलें ?

उत्तर–आपलेकडील अभ्यंगशास्त्र तिकडील अभ्यंग त्रापेक्षां निश्चित श्रेष्ठ आहे. आपलेकडे निरनिराळीं औषधी वाफारे, लेप ह्यांचे साह्यानें मालीश जाते. तसें तिकडे नाहीं. तिकडे कोरडे मालीश, र् पावडरचा उपयोग केला जातो. आपणाकडे ज्याप्रमाणें शेक करतात त्याप्रमाणें तिकडे विजेच्या साह्यानें उपचार करतात.

परदेशांतील विकार

प्रश्न— तिकडे विशेष कोणते विकार आढळले ?

उत्तर— संधिवात, आमवात, हृद्रोग, न्युमोनिया यांचें प्रमाण जास्त आहे. तिकडे औषधोपचार सरकारी खर्चानें होत असल्यामुळें रोग्यास विशेष त्रास होत नाहीं. तिकडील हॉस्पिटलें ८००ते१६०० रुग्ण राहतील एवढीं मोठीं व एका रोग्यापासून दुसऱ्यास त्रास होणार नाहीं अशा पद्धतीचीं आहेत.

शिक्षणासाठीं खर्च येत नाहीं

प्रश्न— तिकडे शिक्षणासाठीं खर्च काय येतो ?

उत्तर— प्राथमिक शिक्षणापासून तो थेट विश्वविद्यालयीन उच्च शिक्षण सुद्धां [मग तें कोणत्याहि शाखेचें असो] सर्व सरकारी खर्चानें चालतें त्यामुळें तेथील स्थानिक अगर परदेशस्थ नागरिकास शिक्षणासाठीं खर्च नाहीं.

प्रश्न— कुटुंबसंस्थेबद्दल तिकडील परिस्थिति कशी आहे ?

उत्तर— मी फारसा तेथें राहिलो नाहीं. १६ वर्षांवरील सर्वांस स्वातंत्र्य; कुटुंबांत दोन मुलें झालीं कीं पुरे असा त्यांचा विचार. हिंदुस्थानांत दारिद्र्य व कुटुंबांत ५।६ मुलें ह्याबद्दल त्यांस आश्चर्य वाटतें. तिकडे मुलीचें लग्नाचें वय १८ ते २१ व मुलाचें २३।२६ असें असतें. मुलीचें लग्न २१ व्या वर्षा-- पूर्वी करणें झाल्यास पालकांची संमति असावी लागते. परदेशस्थांना वागणूक प्रेमाची मिळते.

प्रश्न— हवामान कसें काय् आहे ?

उत्तर – मी उन्हाळ्यांत गेलो होतो. तिकडील उन्हाळा म्हणजे पुण्याचा हिंवाळा यावरून आपणास हवामानाची कल्पना येईल.

आहाराच्या वेळा

प्रश्न— तिकडील आहाराच्या वेळा कोण कोणत्या ?

उत्तर—आपलेकडे पूर्वी जशी दुपारी जेवणाची वेळ असे तशी १२ते२ चे दरम्यान ही तिकडील आहाराची वेळ आहे. सकाळी ७ वाजतां चहापान व न्याहारी, १२ ते २ जेवण, ३ ते ६ पुन्हां चहा, रात्रीं ७ ते ९ दरम्यान पुन्हां जेवण. सर्व प्रकारचे आहार घेण्याची संवय जाणारास पाहिजे, नाहींतर शाकाहारी मनुष्याची तिकडे अडचणच होते. तिकडील आहारांत दुधाचा वापर जास्त व पाण्याचा उपयोग कमी असतो. १।१ शेर दूध घेतलें जातें [माणशी] सरकार सर्व प्रकारची काळजी घेत असल्यानें व आहारांत दूध व मांसल द्रव्यें यांचें प्रमाण भरपूर असल्यामुळें आयुर्मान सरासरी ६९वर्षें असें आहे. तरुणतरुणींची तब्येत दृष्ट लागण्यासारखी असते.

खर्चाचा अंदाज

प्रश्न— जाण्यायेण्याचा व राहण्याचा खर्च किती आला ?

उत्तर — राहण्याचा जेवण्याचा तसेंच जाण्यायेण्याचा मिळून एकंदर ८००० रु. खर्च आला. तिकडे शिक्षण खर्च नाहीं पण महागाई असल्यामुळें परदेशस्थास फार खर्च येतो. मसाजचें पूर्ण शिक्षण घेण्यास सुमारें २०,००० रु. खर्च येतो. यामानानें इतर वैद्यकीय उच्च शिक्षणास खर्च येणार. तेथें राहण्याचा व जेवणाचा खर्च महिना ७००।८०० रु. तरी येतो. शिवाय पुस्तकें, कपडे, प्रवास खर्च आहेच.

प्रवासाचा मार्ग

प्रश्न - आपण जातां येतांना कोणत्या मार्गानें गेला आलात ?

उत्तर— जातांना मुंबई ते साऊथम्पटन (लंडन), नंतर लंडन ते गोथेबर्ग ३६ तासांचा बोटीचा प्रवास, व नंतर गोथेबर्ग ते स्टॉकहोम ८ तासांचा रेल्वेप्रवास, व येतांना कोपन्‌हेगन् (डेन्मार्क), हॅम्बुर्ग (जर्मनी), बाझल्स (स्वीट्झर्लंड) आणि जीनोओ व नेपल्स् (इटली) रेल्वेप्रवास व जीनेओ ते मुंबई बोट. प्रवासांत बोट, कंपन्या व रेल्वे कंपन्या प्रवाश्यांची काळजी घेत असल्यामुळें प्रवास त्रासदायक झाला नाहीं.

पत्रिकेतर्फे वैद्य पाठक यांचे आभार मानून मुलाखत संपविली.

[पुस्तकी शिक्षणापेक्षां रुग्णालयीन शिक्षणास प्राधान्य ही पद्धति चांगली आहे. अभ्यंगाच्या आयुर्वेदीय पद्धतींचें वैशिष्ट्य लक्षांत येतें. अर्थात् कफ (दुग्ध-मांस) प्रधान आहार असलेल्या देशांत तेलापेक्षां कोरडी मालीश व रूक्ष चूर्णानें मालीश अधिक उपयुक्त असणारच ! विकारांचें स्वरूप स्पष्टपणें कफप्रधान आहेच. आहार द्रव्यें कमी मिळाल्यामुळें रोग, तसेंच भरपूर आहारद्रव्यें मिळतात, त्या देशांतहि १६०० रुग्णांचीं रुग्णालयें आवश्यक होतात यावरून संतर्पणजन्य रोगांचें स्वरूप लक्षांत येईल.

पूर्वी 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद देत. हल्लीं कांहीं लोकांना बिलकूल संतति होत

.... उत्तम धर्म ....

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधेंच वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान-

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

तांहि दरसाल ५० लक्षानें प्रजा वाढत आहे, शा वेळीं जोडप्यांना तुम्हांस २ पेक्षां अधिक रतें न व्हावीत असा आशीर्वाद अत्यंत आवश्यक नला पाहिजे.

स्वस्थाने कमी पाणी प्यावें

तिकडील हवामान शीत असल्यामुळेंहि आहार थें जास्त लागतात हें स्वाभाविक आहे. पण पाणी मी पिण्याची प्रथा शास्त्रीय आहे. 'पिबेत् स्वस्थोऽपि न अल्पशः' असें वाग्भटानें स्पष्ट सांगितलें आहे. आहार द्रवप्राय असावा. क्षीर, यूष, मांसरस अशा तीनें संस्कृत पाणी घेणें हें साध्या पाणी पिण्यापेक्षां अधिक चांगलें. साधें पाणीहि संस्कृतच वापरावें.

समाजांतील व्यक्तींची प्रकृति दृष्ट लागण्याइतकी स्वस्थ करणें हें सरकारचें जसें कर्तव्य तसेंच तें जनतेचेंहि आहे. कारण आतां जनताच सरकार आहे (लोकराज्य). ाजगी व्यावसायिकांनीं हीच दृष्टि ठेवण्यास शिकलें हिजे. परदेशांत राहाणींचे मान वाढलें आहे त्यामुळें र्व महागाई आहे. तिकडे एक जेवणास २० रु. ३५ रु. पडतात असें कळतें.

अभ्यंगकर वैद्य दा. धों. पाठक यांनीं आपले भ्यंग-चिकित्सालय मुंबई येथें क्राफर्ड बाजाराजवळ त्या विजयादशमीस सुरूं केलें आहे. त्यांचा पत्ताः- ॉ. डी. डी. पाठक, फिजिको थेरपी व मसाज क्लिनिक ८ न्यू सिटिझन बँक हौस, कर्नाकरोड, मुंबई १ असा आहे — संपादक]

अमेरिकेंत गांधी जयंती

रविवार २-१०-५५ रोजी वाशिंग्टन येथील ारतीय वकिलातींत गांधी जयंती समारंभ झाला ावेळीं 'स्थितप्रज्ञस्त का भाषा' इ. गीतापठण झालें. घुपति राघव राजाराम' हें भजन होऊन कार्यक्रम ला. भारतीय व अमेरिकन स्त्री-पुरुषांनीं दिवाणखाना गच्च भरला होता. डॉ ग्रॅहॅम, डॉ. अमिया क्रवर्ति व डॉ. नेल्सन यांचीं भाषणें झाली. या मारंभास वैद्यराज जायदे उपस्थित होते

अष्टांगहृदय सूत्रस्थान पाठांतर

नाशिक येथें शहर वैद्य मंडळातर्फे श्रीधन्वन्तरीचा उत्सव ता. ११ ११-५५ रोजीं साजरा केला जाणार आहे. त्यावेळीं अष्टांगहृदयाचे सूत्रस्थान शुद्ध व स्पष्ट उच्चारांत तोंडपाठ म्हणून दाखविणारास वैद्य त्र्यंबकशास्त्री दाते हे रु. २५ चें रोख बक्षिस देणार आहेत. पाठ म्हणणाऱ्या अधिक व्यक्ति निघाल्यास बक्षिस विभागून दिले जाईल असें वै. विष्णुशास्त्री दाते, अध्यक्ष शहर वैद्य मंडळ, नासिक हे कळवितात.

वाचकांचा पत्रव्यवहार—

धातुस्पृष्ट जलाविषयीं

कोणत्या प्रकारच्या उदा० आकाशांतून आलेलें परंतु जमिनीवर न सांडलेलें जल, नदीचें, डोहाचें वा समुद्राचे—जल या प्रयोगाकरता घेतल्यास कोणत्या प्रकारच्या जलांत गुणधर्म अधिक येतात किंवा कोणत्या वनस्पतींनें वगैरे जल संस्कृत केल्यास त्यांत अधिक गुणधर्म येण्याची शक्यता आहे. तीच गोष्ट सुवर्ण किंवा इतर धातुंचे बाबत. उदा. खनिज शुद्ध सुवर्ण घेतल्यास गुणधर्मांत कमी अधिकपणा येतो ? कोणी अनुभव घेतला असल्यास कळवावें. वैद्य ना.ह.देशपांडे

आंबाडीचें तेल

ओल्या इसबावर मलम कसा तयार करितात ह्याबद्दल पाठ माहिती सविस्तर कळवावी. त्याच प्रमाणें आंबाडीचे तेल कसें तयार करतात हें कळवावें.

एका इसमाच्या हातास इसब झाला. त्यानें आंबाडीचें तेल लावल्याबरोबर बरा झाला. सदर इसमास तेलाची कृती विचारली. परंतु त्यानें असें सांगितलें कीं मी १ शेर आंबाडीचें बी एका माणसास दिलें त्यानें १ तोळा तेल दिले भट्टीतून तेल कसें तयार केले हें मला मला सांगितलें नाहीं. तेलानें हंमखास गुण त्याला आला —एक वाचक

दोन ग्रामीण औषधें —

धोतरा व रुई

धोतरा [पांढऱ्या अगर काळ्या दांडीचा मिळेल तो]—त्याचीं पानें काढून टाकून फांद्या व बुंधा सुकवावा व त्याचें वस्त्रगाळ चूर्ण करून बाटलींत भरून ठेवावें.

जास्तींत जास्त जोरदार दमा सुरूं असेल त्यावेळीं कागदाच्या पुंगळींत धोतऱ्याच्या दांडीचें चूर्ण घालून विडीप्रमाणें वळून त्याचा धूर ओढण्यास द्यावा, म्हणजे वेग कमी होतो.

फारच जोरदार सरदी झाली असेल त्यावेळीं [इतर वेळीं देऊं नयें] हें चूर्ण [१ ते ३ गुंजा] गरम पाण्याबरोबर पिण्यास द्यावें. सरदी २ तासांत सुकून जाईल व पाण्याचा भयंकर शोष पडूं लागेल [ह्याचसाठीं हें चूर्ण फारच विचारपूर्वक द्यावें]

पोटांत चिरकालीन बारीक दुखणें चालूं असेल तर १ गुंज चूर्ण मधाबरोबर द्यावें. दुखणें कमी होईल.

गर्भाशयाला सूज असेल व त्यामुळें पोटांत दुखत असेल तर मधाबरोबर १ गुंज चूर्ण सकाळीं सायंकाळीं घेण्यास दिल्यानें वेदना कमी होतील.

कोणत्याहि जागीं लागलें असेल व तेथील सूज पिकवून फोडावयाची असेल तर १ तोळा गूळ गरम करून त्यांत अर्धा तोळा धोतरा [दांडी] चूर्ण मिसळून ती ऊन पट्टी लावल्यानें कोणतीहि गांठ फुटून आंतील दुःख बाहेर काढलें जाईल.

कोणत्याहि कारणानें शरीराच्या कोणत्याहि भागांत दुखत असेल तर वरीलप्रमाणेंच गूळ मिसळून धोतऱ्याचें मलम करून लावावें व वर कापूस बसवून दुखरा भाग झाकून ठेवावा. यामुळें दुखवा कमी होईल.

[दमा, सरदी व शरीरांतील कोणत्याहि भागांतील वेदना यासाठीं धोतरा उपयुक्त आहे. त्यानें शोष पडतो हा त्याचा दोष आहे. तो दोष उत्पन्न होईल तर धोतरा बंद ठेवावा व अम्मल पदार्थ द्यावेत. — संपादक]

अर्कलवण [रुईमीठ]

(रुईचीं फुलें ५ तोळे व मीठ ५ तोळे एकत्र मिसळून तें मिश्रण जाळावें व त्याची बारीक पूड करून ती एका बाटलींत भरून ठेवावी.)

जास्तींत जास्त जोरदार दम चढला असेल तर प्रत्येक १० मिनिटांनीं यापैकीं ५ गुंजा अर्कलवण ऊन पाण्याबरोबर याप्रमाणें ३ वेळां द्यावें. दम्याचा जोर कमी होतो.

फार जुनी कोरड्या दम्याची व्याधि असेल तर हें अर्कलवण १ गुंज प्रमाणांत १ चमचा मधाबरोबर नियमितपणें २ महिने सेवन करावें फायदा होईल.

कोरडा खोकला येत असेल तर मधाबरोबर दिवसांतून २ वेळां १।१ गुंज अर्कलवण द्यावें. आराम वाटेल.

जुलाब होत असतील तर ४।४ गुंजा अर्कलवण लिंबाच्या रसांत देण्यानें फायदा होईल.

ओव्याच्या काढ्यांत अर्कलवण

पोटांत वायु भरून वर चढला असेल व त्यामुळें श्वास घेण्यास त्रास पडत असेल तर त्यावेळीं ३ गुंजा रुईमीठचूर्ण ओव्याच्या काढ्याबरोबर घेतल्यास जादूप्रमाणें गुण येतो.

मूत्रपिंडांत अगर मूत्राशयांत कोणत्याहि कारणामुळें पीडा होत असेल तर गोमूत्राबरोबर हें औषध ३ गुंजा दिवसांतून २ वेळां द्यावें.

पोटांत आम सांठल्यामुळें थोडी कळ येत असेल व त्यामुळें ताप व सरदी वगैरे व्याधि त्रास देत असतील तर सुंठीच्या काढ्यांत हें चूर्ण दिवसांतून २ वेळां २ गुंजा प्रत्येक वेळीं याप्रमाणें दिल्यानें ताप हटेल, सरदी व मंद कळा येणें थांबून जाईल.

['रमकडुं प्रकाशन' या गुजराती पुस्तकमालेच्या 'घरमां राखजो' या नांवाच्या (किं. १ रु.) गुजराती प्रकाशनामधून वरील माहिती येथें दिली आहे. या पुस्तकाचे लेखक श्री. अंतुभाई वैद्य हे आहेत. ११२ पानांच्या या पुस्तकांत १०० औषधीमिश्रणाविषयीं माहिती दिली आहे. —संपादक]

आयुर्वेद सेवा संघाचें शुद्ध आयुर्वेद विद्यालय व आरोग्यशाला, नाशिक

देणगीदारांचीं नांवें

१०रुपये-वैद्यराज र.ह. आफळे, मिरी, यांनीं आपले डील बंधु कै. वै. बाळकृष्ण हरी आफळे यांच्या पुण्य- नानिमित्त शुद्ध आयुर्वेद विद्यालयाच्या आयुर्वेदीय ारोग्यशाळेस मनिऑर्डरनें १० रु. देणगी पाठविली ाहे. आपल्या घरील अशा श्राद्धप्रसंगीं संस्थेचें रण ठेवल्याबद्दल संस्था आभारी आहे.

५रुपये-श्रीमती कमलाबाई अभ्यंकर, श्री. अण्णा- ाहेब वैशंपायन पंडित बी.आर.त्रिवेदी गायनाचार्य.

३रुपये-श्री. बी. एम्. पठाण मामलेदार नाशिक. , रा.गो. जोग. आयुर्वेद महाविद्यालय (अहमदनगर)

२॥ रुपये-श्री ह. ज. कामदार.

२रुपये-श्री. गुरुदयाळसिंग हुगन, सौ. लिलाबाई ध्ये, सौ. सुलभाबाई पुजारी.

१रुपया-श्री. म.श्री. मराठे, श्री. पं.भा. मानकर, ी. र. ब. कुकडे, श्री. के. अ. गरूड, श्री. मा. दा. पासनी, श्री. नानालाल जोशी, श्री. ना. अ. भट, ी. अ. वा. नेर, सौ. सुशिलाबाई कोकजे, श्री. ळासाहेब नांदुरकर, श्री. पां.ना. तांबोळी, श्री. वि. . ठाकूर, श्री. य. र. प्रभुणे, श्री. पं. शं. सातपुरकर ी. ल. दा. उपासनी, श्री. न. गो. मनोहर, श्री. . गो. मनोहर, श्री. सावित्रीबाई गोखले मनमाड, ी. स.द. गोखले (पुणें), श्री. द.ब. परांजपे, डॉ. सी. म्. पटवा. श्री. दा. वि. नगरकर, सौ. नवसाबाई सुथा, श्रीमती विठाबाई गायकवाड, सौ. विमला- ई वाड, सौ. इन्दुमती रत्नपारखी, श्री. वेलजीभाई रसनजी, सौ.सरस्वतीबाई वेलजीभाई, सौ. इन्दुमती गळेकर, सौ. इन्दिराबाई जाखडी, श्री. व. र. कार, सौ. लिलाबाई ठकार,आचार्य श्रीराम गोसावी, ी. र.म. सरोदे, सौ. सुधा धारप (भोपाळ), श्री. द. . देसाई (मुंबई), सौ. सुलभा देसाई (मुंबई), सौ. मिला देशपांडे, श्री. म. वा. नरवाडकर [मिरज] श्री, ग. ना. परदेशी, श्री. मो.दा. पाटणकर [नाशिक-रोड] श्री. दि.पु. लेले, सौ. इंदिराबाई लोंढे [नागांव] श्री. मा. वि. देशपांडे.

वरील देणगीदार मंडळीची संस्था आभारी आहे.

वाचकांचा पत्रव्यवहार—

इसबावर अंबाडी तेल

ता. १ आक्टोबरचें अंकांत ‘ इसबावर धान्य-तैल ’ यासंबंधीं माहिती डॉ. वाळिंबे यांनीं विचारली आहे. माझ्या माहितीप्रमाणें ‘ अंबाडी धान्याचें तैल ’ इसबावर हमखास गुणकारी आहे. सदर अंबाडी तैलाचा व्यवसायबंधूंनीं अवश्य वापर करावा अशी विनंति आहे. इसबावर गाजराचें पोटीस लावून नंतर अंबाडीतैल लावावें.

मु. रामपूर पो. रबकवी वैद्य वा. नि. दातार

इसबावर सागाचें तेल

कोकण प्रांतांतील सागाचें जुनाट झाडाच्या मुळयांचें तेल भट्टी लावून काढावें लागतें. तें तेल म्हणजे सुकलेल्या लाकडांतला घनरसच असतो. पण त्यांत पाण्याचा संबंध नसून केवळ सुकलेल्या लांकडांतला रस खालीं तो जळतांना पाघळतो तेंच तेल म्हणतात. तें तेल कोणत्याहि जखमेवर, इसब, गजकर्ण, नायटे वगैरेवर, गुरांच्या खरकुतावर उत्तम उपयोगी आहे. तसेंच निर्गुंडीच्या मुळांना ४ महिने सुकवून त्यांतून भट्टीनें अर्क काढतात तें निर्गुंडीचें तेल, आमवात, संधिवात वगैरे वातविकारांवर पोटांतून व बाहेरून उपयोगाला येतें. याप्रमाणें कोणत्याहि जुनाट झाडाच्या सुखलेल्या लाकडापासून तेल काढतात.

धान्यतेलहि याप्रमाणेंच काढून मिळेल. निर्गुडीचे तेलाचा भाव ५ तो. ट. ख. सह ५ रुपये आहे. सागाचे तेलाचा भाव तूर्त ५ तोळे ट. ख. सह ५ रु. आहे. असें वैद्य मुकुंद कृष्ण जोशी, (गंगापुरी, वाई जि. सातारा) कळवितात.

आनंदसूतरसाचा अनुभव

आनंदसूतरसायनासंबंधीं पत्रिकेंत वाचलें. दोन वर्षांपूर्वी १ तोळा आनंदसूत विकत घेऊन मी एका कफप्रधान रुग्णांस रोज अर्धा गुंजा प्रमाणांत, २ मासे सीतोपलादि चूर्णांतून सतत ६ महिने देत होतो. पण १० गुंजा आनंदरस पोटांत जाऊनहि कांहीं परिणाम झाला नाहीं. —वै. र. गो. कुलकर्णी

[आनंदसूतरसायनाबद्दल वैद्य र. गो. कुलकर्णी यांनीं आपला अनुभव कळविल्याबद्दल सेवासंघ आभारी आहे. कफप्रधान रुग्णास अल्प मात्रेनें उपयोग झाला नाहीं, यावरून तो रोगी वमनशोधनार्ह असावा असें वाटतें. श्री. र. गो. कुलकर्णी यांचा हा अनुभव जमेस धरून आनंदसूतरसायनाचा उपयोग योग्य मात्रेंत व योग्य अनुपानासह चिकित्सकांनीं करावा अशी विनंति आहे. -व्यवस्थापक]

दंतोपचार शिबिर तहकूब

सावरकांठा जिल्ह्यांत मोडासा येथें ता. २४ आक्टोबरपासून ३ आठवडे जें दंतोपचार शिबिर भरविण्यांत येणार होतें तें आतां पुढें ढकलण्यांत आलें आहे. शिबिराच्या नव्या तारखा अजून निश्चित करण्यांत आलेल्या नाहींत.

वैद्यराज पु. वि. धामणकर

पनवेल — गेले सबंध वर्षभर वैद्यराज पु. वि. धामणकर हे मुंबईस युनिव्हर्सल हेल्थ इन्स्टिट्यूटच्या आरोग्यशालेंत निजून होते. मंगळवार ता. २५।१०।५५ रोजीं ते पनवेल येथें परत आले आहेत. आतां ते सकाळ सायंकाळ कांहीं तास बसतात व कांहीं मिनिटें चालतात. पाठीच्या मणक्यांतील कांहीं हाडाचा भाग झिजल्यामुळें त्यांना असा निजून पूर्ण आराम घ्यावा लागला.

रोगावर जादूप्रमाणें तत्काल परिणाम करणारीं

'मार्तण्ड'चीं आयुर्वेदिक इंजेक्शनें

मार्तण्ड कंपनीच्या पूर्ण वैज्ञानिक साधनसंपन्न व आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज अशा प्रयोगशाळेंत, विद्वान् आयुर्वेदज्ञ व पाश्चात्य रसायनशास्त्रज्ञांच्या संपूर्ण देखरेखीखालीं तयार केलेलीं आयुर्वेदिक इंजक्शनें आपला प्रभाव तत्काळ व कायम स्वरूपाचा करतात. दीर्घकाल राहिल्यासहि तीं कधीं बिघडत नाहीत. त्यांच्या तात्काल गुणदायित्वाबद्दल हमी देण्यांत येते. कृपया हिंदी अगर इंग्रजींतच पत्रव्यवहार करावा.

सूचिपत्र व आकर्षक वाङ्मय मोफत मिळेल. आजच मागवा.

मार्तण्ड फार्मास्युटिकल्स्, बडौत S. S. Rly. यू. पी.
(रिसर्च इन्स्टिटयूट ऑफ इंडियन मेडिसिन्स)

मधुमेहासंबंधीं आणखी कांहीं अनुभव

[लेखकः— श्री. पी. एम्. भालेराव एम्. ए., बी. टी.,
माजी प्रिंसिपाल, ट्रेनिंग कॉलेज, नासिक, नांदगांव]

आयुर्वेद पत्रिकेच्या ता. १ जुलै १९५५ च्या कांत मी माझे कांहीं अनुभव प्रसिद्ध केले होते. ते ाचून अनेक मधुमेहपीडित गृहस्थांनीं माझ्याकडे त्रें पाठवून किंवा समक्ष भेटून चौकशी केली. त्यांना ी व्यक्तिशः उत्तरें दिलींच आहेत, पण मला आलेले आणखी कांहीं अनुभव सर्वांनाच उपयुक्त होतील असें वाटल्याने तें पुढें देत आहे.

पाय गार पडत

गेल्या एप्रिल व मे महिन्यांत मी दररोज संध्या- ळीं फिरावयास जात असे. पण फिरून परत आल्यावर लचे पाय गार पडत असत. एक दिवस शरीर ासतांना सेवा संघातील चिकित्सक मंडळांच्या लक्षांत गोष्ट आली. व त्यांनीं लगेच उपाययोजना * केली ामुळें पाय गार पडण्याचें प्रमाण कमी होत गेलें. तां क्वचित् पाय गार पडतात. (*महायोगराजगुग्गुळ)

पोटऱ्या दुखणें थांबलें

फेब्रुवारी महिन्यांत एक मधुमेही गृहस्थ . गंगाराम सेट यांची सहज गांठ पडली. आपल्या ऱ्या खूप चावतात म्हणून त्यांनीं कुरकुर केली. ा तसला त्रास होत नसल्यामुळें मनांतल्या मनांत ाधान वाटलें. पण एक आठवडा जात नाहीं तोंच ाझ्याहि पोटऱ्या दुखूं लागल्या, पण पूर्वीच्या लेखांत लेलीं मधुमेहावरील आयुर्वेदिक औषधें सुरूं ल्यावर एक महिन्यांचें आंत त्या दुखण्याचें बंद लें. त्यानंतर तो त्रास पुनः झाला नाहीं.

झोपेंतून उठल्यावर थकवा

सकाळीं झोपेंतून उठल्यावर ताजेतवाने वाटण्या- ऐवजीं खूप थकल्यासारखें वाटत असें. व बिछान्या- न उठण्याची इच्छा होत नसे. पण मधुमेहावरील धयोजना सुरूं केल्यावर हा थकवा कमी होत व पुढें नाहींसा झाला.

पाठदुखी गेली

सन १९४७ सालीं रेल्वे प्लॅटफार्मवरून खालीं रेल्वेच्या रूळावर पडल्यामुळें माझ्या पाठीच्या कण्यास खूप मार लागला होता. त्यावर अनेक उपाय करूनहि तो मधून मधून दुखत असे. पण मधुमेहाचा त्रास सुरू झाल्यावर तो नेहमींच दुखूं लागला. ताठ बसणेंहि कठीण होऊन लागलें. पण मधुमेह जसजसा हटत गेला तसतसा हाहि त्रास कमी कमी होत गेला.

न थकतां डोंगर चढलो

ध्वजपर्वानिमित्त ता. ३० सप्टेंबर १९५५ रोजीं मी त्र्यंबकेश्वर येथें गेलो होतो. बरोबरच्या मंडळींच्या आग्रहावरून गंगाद्वारला गेलो. वर चढतांना बराच त्रास होईल असें प्रथम वाटलें. पण प्रत्यक्ष अनुभव मात्र उलटा आला. त्यामुळें हुरूप वाढून दुसऱ्या दिवशीं सकाळीं नीलपर्वत व लगेच ब्रम्हागिरीवर चढून गेलो. चढतांना अगर उतरतांना कांहींच त्रास वाटला नाहीं. फक्त दुसरें दिवशीं इतराप्रमाणेंच थोडे पाय दुखले इतकेंच.

माझा कोरडा चहा

मागील लेखांत सांगितलेली सर्व उपाययोजना मी चालूं ठेवली आहे. फक्त गोमय संस्कृत धान्याच्या ऐवजीं मधून मधून साधें धान्य घेतो. मुरमुरे, फुटाणे वगैरे भाजलेलें धान्य व केळी यांचें प्रमाण वाढविलें आहे. मी खिशांत नेहमीं मुरमुरे—फुटाणे बाळगतो. व भूक लागली तर, अगर इतर लोक चहा पितात त्यावेळीं चहाऐवजीं मुरमुरे फुटाणे खातो. हा माझा 'कोरडा चहा' नेहमीं बरोबर असतो. पावसाळ्यामुळें संध्याकाळच्या फिरण्यांत अनियमितपणा आला होता. पण आतां पुनः नियमित फिरणें चालूं केलें आहे. सर्व पथ्य नियमितपणें पाळलें तर मधुमेहाचा त्रास पुनः होणार नाहीं असें वाटतें.

चालू आहार–विहार-औषध

मधुमेही रोग्याच्या स्मरणार्थ मी चालूं ठेवलेली आहार–विहार–औषधयोजना पुढें पुनः लिहून देत आहे. दररोज संध्याकाळीं एक तोळा असाण्याची भुकटी मी गरम पाण्यांत भिजत घालतो व दुसरें दिवशीं सकाळीं तें पाणी फडक्यानें गाळून पितो. या पाण्याला मोबिलाइलसारखा तेल्या रंग येतो. पण पितांना तें तितकेंसें कडसर लागत नाहीं. दुपारीं व संध्याकाळीं जेवण झाल्यावर एक एक तोळा असनादि अयस्कृति हें औषध घेतो. अधूनमधून शिलाजित्वादि वटी व पाचकगुटी घेतो. ही सर्व औषधें मी आयुर्वेद सेवा संघाकडून विकत घेतो. त्यांच्या किंमती अगदीं माफक असल्यामुळें खर्चाचा बोजा वाटत नाहीं शिवाय तीं जरूर लागल्याबरोबर सहज मिळूं शकतात.

मला मधुमेह झाला असल्याचें १९५४ च्या ऑक्टोबर महिन्यांत लक्षांत आलें. त्यानंतरच्या काळांत त्यावरील ॲलोपॅथिक उपायपद्धतीनें मी चांगलीच धास्ती घेतली. आयुर्वेदीय स्वाधीन उपाययोजनेमुळें मीं माझीं कामें आतां निर्धास्तपणें करूं शकत आहे. आयुर्वेद सेवा संघांतील वैद्य मंडळींच्या योग्य मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

हिंदी मध्यप्रदेशांतील

पहिलें आयुर्वेदिक कॉलेज

मध्यप्रदेशांतील पहिल्या आयुर्वेदिक कॉलेजचें उद्घाटन मुख्यमंत्री पं. रविशंकरजी शुक्ल यांच्या हस्तें रायपूर येथें झालें. विद्यार्थ्यांनीं मानव्याची दृष्टि ठेवून आयुर्वेदाचा अभ्यास करावा, आणि जनतेची सेवा करण्याच्या दृष्टीनें आपल्या ज्ञानाचा उपयोग करावा. असा पं. शुक्लजी यांनीं विद्यार्थ्यांना उपदेश केला.

आयुर्वेद संशोधन केंद्र

या कॉलेजांत आयुर्वेदाचें संशोधनकेंद्र लौकरच सुरूं होईल असें आरोग्यमंत्री कन्नमवार यांनीं जाहीर केलें.

५॥ वर्षांचा अभ्यासक्रम

या कॉलेजचा अभ्यासक्रम साडेपांच वर्षांचा असून कॉलेजला दवाखाना, एक्सरे, पॅथॉलॉजी, सर्जरी इत्यादि विभाग जोडलेले आहेत. कॉलेजांत आयुर्वेदाचें संपूर्ण आणि ॲलोपथी व होमिओपथी यांच्या प्राथमिक शिक्षणाची सोय करण्यांत आलेली आहे.

१०० बिछान्यांचें रुग्णालय

कॉलेजला जोडावयाच्या हॉस्पिटलच्या इमारतीची कोनशिलाहि पं. शुक्ल यांनीं बसविली. या हॉस्पिटलांत १०० रुग्णाची सोय होणार आहे.

फलटणनजिक साबण कारखाना

कडूनिंबाच्या लिंबोण्या व करंजाच्या बिया यांच्यापासून साबण तयार करण्याचा एक मोठा कारखाना फलटणहून १५ मैल दूर असलेल्या मौजे जावळी येथें येत्या दिपवाळीपर्यंत सुरूं होईल.

या कारखान्यांसाठीं अ. भा. खादी ग्रामोद्योग संघानें १७००० रुपये मंजूर केलेले आहेत. या साबण-कारखान्यास लागणारी लिंबोळी १२ आणे पोते या प्रमाणें घेतली जाणार आहे.

सेवा संघाचीं सर्व औषधें

तसेंच सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर गोरोचन, वाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाबळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—

देशी सर्वौषधी संग्रहालय

पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

तृणज्योतिष्मति (नीलज्योति)

(अंधारांत प्रकाश देणारी वनस्पति)

किं. १ तोळ्यास १ रुपया. टपालखर्च निराळा.

आयुर्वेद सेवा संघ, नासिक

आयुर्वेद यात्रा

धन्वन्तरी उत्सव अमरावती

अमरावती येथील विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाच्या धन्वन्तरी विद्यार्थी मंडळानें, शनिवारीं ता. १५ रोजीं सकाळीं धन्वन्तरी उत्सव साजरा केला. त्याप्रसंगीं अध्यक्ष या नात्यानें वैद्य बिंदुमाधवशास्त्री यांचें भाषण झालें. मुंबई राज्यांत आयुर्वेदाचें शिक्षण मिळणें अशक्य झालें म्हणून वऱ्हाडांत आलेल्या महाराष्ट्रांतील विद्यार्थ्यांच्या आयुर्वेद-शिक्षणाची सोय प्रयत्नपूर्वक केल्याबद्दल त्यांनीं वै. पं. दा. (तथा अप्पाजी) मुळे यांना धन्यवाद दिले. इतक्या उतार वयांत त्यांनीं उचलेल्या आयुर्वेदविषयक कार्याबद्दल समाजानें त्यांचे उतराई होणें अवश्य आहे. ज्या पालकांनीं आपलीं मुलें शिक्षणासाठीं इतक्या दूर पाठविलीं त्यांची आयुर्वेदनिष्ठाहि वाखाणण्यासारखी आहे. विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयांत आज सुमारें २०० विद्यार्थी आयुर्वेदाचें शिक्षण घेत आहेत. त्यापैकीं ८० टक्के (सुमारें १६०) विद्यार्थी सातारा आदि महाराष्ट्रीय जिल्ह्यातून गेलेले आहेत. मॅट्रिकनंतर आयुर्वेदाचें शिक्षण घेण्याचा मार्ग मुंबई राज्यांतून बंद झाल्यामुळें ही विषम परिस्थिति निर्माण झाली आहे.

कस्तुरबा विद्यालय, माधान (अमरावती)

माधान जि. अमरावती येथें महाविदर्भा-(८ मराठी जिल्हे) चे कस्तुरबा ट्रस्ट विद्यालय आहे. मध्यप्रदेशांतील महाराष्ट्रभाषी समाजसेविकांच्या शिक्षणाची व्यवस्था मध्यप्रदेश सरकारनें येथें केली आहे. अभ्यासक्रम ११ महिन्याचा आहे. या सेविकांना आयुर्वेदीय पद्धतीची आहार-विहार-निद्रा-विषयक नियमांची माहिती देण्यासाठीं वैद्य बिंदुमाधव ४ दिवस तेथें जाऊन राहिले होते. आयुर्वेदांतील "ऋतुविचार, षड्रसविचार, उदकविचार, अन्नविचार, बालोपचार, गर्भिणी व सूतिका-उपचार, ज्वर--कास--छर्दि--अतिसार यांतील प्रास्ताविक उपचार व स्वस्थोपचार इ. संबंधीं माहिती त्यांनीं तेथें दिली.

गुरुदेव आयुर्वेद मंदिर, मोझरी

अमरावतीहून २० मैलावर मोझरी हें खेडेगांव अमरावती-नागपूर रस्त्यावर आहे. या गांवीं सुप्रसिद्ध राष्ट्रसन्त तुकडोजी महाराजांचा गुरुकुंज आश्रम आहे. हा आश्रम व त्याचा आयुर्वेद विभाग, श्रीगुरुदेव आरोग्य--मंदिर हा वै. बिंदुमाधव यांनीं गुरुवार ता. २० रोजीं सकाळीं जाऊन पाहिला. खेडेगांवांत उपयोगी पडेल असा आरोग्यसेवक निर्माण करावा असा येथील चालकांचा मनोदय आहे. आयुर्वेद महाविद्यालयांतून शिक्षण घेतलेले वैद्य वा डॉक्टर खेडेगांवांत क्वचितच व्यवसाय करतात. व भारताची जनता खेड्यांत वास करते. सबब खेडेगांवीं असलेल्या लोकांना आयुर्वेदीय ग्रंथांच्या अभ्यासाची गोडी लावावी व त्यांच्या परीक्षा घेऊन आयुर्वेदसेवक, आयुर्वेदप्रसारक, आयुर्वेदसेवाअधिकारी व आयुर्वेदसेवापारंगत असे क्रमानें ४ वर्षांत तयार करावेत असा त्यांचा प्रयत्न सुरूं आहे. श्री. आ. जा. बोरखेडे नांवाचे सेवावृत्तीचे आयुर्वेदाभिषक् हा विभाग चालवितात. पुणें आयुर्वेद महाविद्यालयांत अभ्यास करून डी. ए. एस्. एफ्. झालेले वैद्य जयस्वाल हे संस्थेचा रुग्णालय-विभाग वाढविण्याच्या प्रयत्नांत आहेत. ते नेत्रविषयक शस्त्रकर्में करतात. आतांपर्यंत त्यांनीं पाऊण लाख रुपये या कार्यार्थ जमा केले असून एकूण २ लाख रुपये जमविण्याचा त्यांचा संकल्प आहे. ते वऱ्हाडचेच रहिवासी आहेत.

आयुर्वेदीय चिकित्सापध्दतीचा व्यवहार

अमरावती येथें वैद्यराज त्र्यं. म. गोगटे व त्यांच्या पत्नी डॉ. सौ. ईचदयाबाई गोगटे यांनीं आपल्या स्वतःच्या आचरणांत, व वैद्यकीय व्यवसायांत आयुर्वेदांतील स्नेहन, स्वेदन, अनुवासन, अभ्यंग वमन, रक्तस्रुति आदि कर्मांचा अवलंब करण्यास प्रारंभ केला आहे, व त्या सर्व प्रयोगांची त्यांनीं

नोंद ठेवली आहे. चन्दनबलालाक्षादितेल, महातिक्तक घृत, सहचर तेल, या स्नेहांचा ते वापर करतात. हरीतकी पंचरसा ते बऱ्याच विकारांत वापरतात. स्रंसनार्थ वापरावयाची हरीतकी ही फार बारीक (तोंडांत चिकटेल अशी) न वापरतां जरा जाडें चूर्णस्वरूपांत वापरावी म्हणजे पाण्याबरोबर सहज गिळली जाते. त्याचा तुरटपणा प्रतिबंधक होत नाहीं, असा त्यांचा अनुभव चूर्णांचे बाबतींत सर्वांना मार्गदर्शक होईल असा आहे. वाग्भटोक्त वचादि, हरिद्रादि गण [चूर्णें] ते आमपाचनार्थ देतात. आयुर्वेदीय उपचारांविषयीं अश्रद्धा बाळगणारांनीं त्यांच्या सहवासांत अवश्य कांहीं काळ घालवावा.

— स्तुत्य प्रयत्न —

शुद्ध आयुर्वेद विद्यालयास तारीख ३-१०-१९५५ रोजीं भेट दिली. तेथील सर्व कार्य पाहिलें. एकूण कामकाज पाहून समाधान वाटलें. सेवा संघानें शुद्ध आयुर्वेद विद्यालय, औषधी-भवन व रुग्णालय अशा एकमेकांना पूरक व सहाय्यक संस्था चालविल्या असून आयुर्वेद शिक्षणाच्या पुनरुज्जीवनाचा हा सर्व प्रयत्न स्तुत्य आहे.

नासिक
२८-१०-५५

उ. र. सेवलेकर
शिक्षणाधिकारी, नासिक

'आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार'

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटीका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदीय औषधी भांडार
२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

अरविंद आयुर्वेदिक इंजेक्शनांच्या
किंमती अतिशय कमी केल्या
ग्राहकांना विशेष सवलत

ता. १।३।१९५५ पासून नवीन नियम, लागूं. 'सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन चिकित्सा या पुस्तकाची किंमत ३ रु. ऐवजीं १॥ रु. केली आहे. पोस्टेज १० आणे निराळें. पुस्तक व्ही. पी. नें पाठविलें जाणार नाहीं. १ रु. २ आणे म. ऑ. नें आगाऊ आल्यावर पुस्तक रजिस्टर्ड पोस्टानें पाठविलें जाईल.

पत्ता **अरविंद केमिकल वर्क्स**
छिंदवाडा [म. प्र.]

भारत वनस्पति फार्मसी
पो. मंचर (जि. पुणें)

याचेकडील आयुर्वेदीय वनस्पतीपासून शास्त्रोक्त पद्धतीनें तयार केलेलीं संधिवात, पक्षवात वगैरे सर्व वातावर चोळण्याकरतां उपयोगी

काळीटाहाकळ तेल **मालकांगोणी तेल**
नारायण तेल **निर्गुंड्यादि तेल**
वातावर मिश्रणतेल, महावातविध्वंसकतेल

याशिवाय दुसरी वातावरील तेलें विकत मिळतील. "झनाना" औषधी तेल.

डोकेंदुखी, अर्धशिशी, विंचूदंश, नारूवर बाहेरून लावण्यासाठीं उपयोगी. याशिवाय ताज्या वनस्पति मिळण्याचें ठिकाण—

श्री. भिमाजी सखाराम राजगुरव
पो. मंचर (जि. पुणें)

ोपण तेलाचा पोटांतून उपयोग

निवेदक- श्री. बगाराम क्षीरसागर, नासिक)

प्रश्न- तुम्हांला रोपण तेल केव्हां माहित झालें ?

उत्तर— ३ वर्षांपूर्वी आंगठ्याला बुटापासून खम होऊ लागली त्यानंतर.

प्रश्न- तुमचे आंगठ्याचें दुखणें किती वर्षांचें ?

उत्तर— आंगठ्यांत खिळा घुसला व तो आंगठा षित झाला. डॉक्टरांनीं एक्सेर घेऊन आंगठा काढला ाहिजे असा सल्ला दिला. आंगठा काढल्याची जखम री झाली पण आंगठा नसल्यामुळें चालण्यासाठीं बूट परणें अवश्य झालें. व बूटामुळें त्या बोटाला वारंवार खम होऊ लागली. जखमेवर प्रथम ॲलोपॅथी पद्धतीनें टी बांधली जात असे. मर्क्युरीक्रोम लावण्यांत येत से.

प्रश्न— रोपणतेल लावण्याची कल्पना कशी चली ?

उत्तर— वारंवार ड्रेसिंग करणें शक्य होईना, हणून वैद्यांच्या सांगण्यामुळें रोपण तेल लावूं लागलो. पण तेलानें बोटाची जखम उत्तम रीतीनें बरी होते सा अनुभव आला.

प्रश्न— रोपण तेल इतर कोठें वापरलेलें आपण ाहिलें आहे काय ?

उत्तर— माझ्या अनुभवावरून मी ४०।४० ोळ्याच्या २।२ बाटल्या सर्वोदयाच्या बान्हे व ठ या दोन केंद्रावर जखमेवर वापरण्यासाठीं ठेवल्या आहेत. सूज असेल तेव्हां आयोडिन व जखम असेल थें रोपण तेल लावण्याची आमची पद्धति आहे व आम्हांस त्याचा १०० टक्के गुण आहे.

प्रश्न- रोपण तेल पोटांत घेण्याची कल्पना कशी ुचली? किती दिवस आपण तें पोटांत घेत आहात?

उत्तर— वारंवार बुटानें जखम होई व ती रोपण तेलानें बरी होई पण पुनः होण्याचें टळत नसे. वैद्य बिंदुमाधव यांनीं रोपण तेल हे पोटांत घेण्याचें औषध आहे, आंतून तें घेतल्यास जखम उत्पन्न होणारच नाहीं व मग वरून रोपण तेल लावण्याची जरूर पडणार नाहीं असें सांगितलें.

गेले ४ महिने रोपण तेलाचे ५।६ बिंदु दुधांत-कॉफीत टाकून सकाळीं घेत आहे. रोज एक वेळ. त्याचा परिणाम पायाची जखम बरी राहण्यांत तर झाला आहेच पण एकंदर प्रकृतींतहि सुधारणा दिसून येत आहे. रोपण तेलावर माझी १०० टक्के श्रद्धा बसली आहे.

[रोपण तेल (इरिमेदादि तेल)

ह्या तेलाचा पाठ शार्ङ्गधरांत आहे तो असाः—

खैरसाल २० शेर	पाणी १६ द्रोण
तेल तिळाचें १४ शेर	शेष ४ द्रोण

कल्क द्रव्यें:— खैरसाल, अगरुं, लौध्र, वडाचीसाल, जायफळ, धायटीफूल, कायफळ, लवंग, पद्मकाष्ठ, जेष्टमध, नागरमोथा, कंकोळ, वेलची, गेरू, मंजिष्ठा, पिंपळाची लाख, दालचिनी, काथ, नागकेशर हे प्रत्येकी ४ तोळे तेल तयार झाल्यावर कापूर ४ तोळे टाकावी. महारोगी णी लोकांनीं हें तेल अवश्य पोटांत घ्यावे.
—संपादक]

सांड
प्रेग-युटेरो
गर्भिणी-गर्भ-रक्षक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द.कृ.सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्सः —
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते—मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

दंतवैद्य जायदे यांचीं पत्रें–६

लंडन येथील मुलाखती

लंडन ॥श्री॥ दि. १४-१०-५५

अमेरिकेंतील शक्य तेवढीं कामें आवरून मी कालरोर्जी येथें आलों. न्यूयॉर्क येथें डॉ. पामर यांना भेटलो व त्यांच्याशीं विचार–विनिमय केला. तसेंच 'यूनो'च्या भारतीय सदस्यांनाहि भेटलों. विशेषतः फादर डिसोझा यांनीं फारच आस्था दाखविली.

दंतवैद्य जायदे

त्यानंतर श्री. आर्थर लाल Personal Representative of India to U. N. O. यांना भेटलों. नंतर मान्य श्री. कृष्ण मेनन यांना भेटलो. श्री. मेनन यांनींहि अत्यंत आस्थापूर्वक चौकशी केली.

आज श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांची भेट घेणार आहे. मान्य बाळासाहेब खेर यांनीं ह्यांना पत्र पाठविलें आहे. येथील कामें आटोपून दि. २० च्या सुमारास मी मुंबईला येईन. —पां. वि. जायदे

वैद्य जायदे हे मुंबईस आले असून नंतर हुबळी येथें आपल्या गांवीं गेले आहेत.

डॉ. सावनूर यांचा ग्रंथ

वैद्य बुर्ली यांनीं डॉ. सावनूर यांचे स्मरणार्थ एक लहानसें पुस्तक कानडींत लिहून प्रसिद्ध केलें आहे. डॉ. सावनूर यांच्या पहिल्या पुस्तकांस मुंबईच्या आयुर्वेद फॅकल्टीनें 'संदर्भ ग्रंथ' म्हणून मान्यता दिल्याचें नुकतेंच कळविलें आहे. तो ग्रंथ ॲलोपॅथिक कॉलेजांतून सुद्धा चालण्यासारखा आहे. त्याचें अध्ययन करविलें गेलें तर पुढें जे डॉक्टर होणार त्यांना आयुर्वेदाचें मूल तत्त्वज्ञान समजेल. त्या दृष्टीनें प्रयत्न होणें अवश्य आहे. —डॉ. सी. एल्. जठार

- उपयुक्त वैद्यकीय पुस्तकें -

सिद्धौषधीप्रकाश	वै. गणेशशास्त्री जोशी	६ रु.
स्टेथॉस्कोप व छातीची तपासणी	डॉ. वा. कृ. जोशी	६ रु.
सचित्र वनस्पति गुणादर्श (हिंदी)	वै. हि. मो. जंगले	२ रु.
घरगुती औषधें	वै. अप्पाशास्त्री साठे	५ रु.
दंतरोगविज्ञान व चिकित्सा	वै. पां. वि. जायदे	३ रु.
वैद्यसन्मित्र (हिंदी)	वै. पां. वि. जायदे	२ रु.

विविध प्रकारचे उपयुक्त वैद्यक ग्रंथ मिळण्याचें प्रमुख ठिकाण

वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

वकांचा पत्रव्यवहार

अध्यापक चर्चा परिषद

आपलें आयुर्वेद पत्रिकेंतील निवेदन वाचलें नंद वाटला. शारीर विषय येत्या अध्यापक चर्चा- षदेंत ठेवणार ही गोष्ट उत्तम आहे. याबाबतींत हे विचार मी भुसावळला माझ्या स्वागतपर षणांतून व्यक्त केलेले आपणांस आठवत व पटत ले तर चर्चेसाठीं प्रत्यक्ष भाग घेणारें व जिज्ञासु यांचा वेळ व अर्थ निरर्थक होऊं नये यासाठीं नेक विषय चर्चिले गेले पण निर्णय कांहींच नाहीं तें न व्हावें हें बरें ! व त्या दृष्टीनें ‘शारीर’ विष- तील विशिष्ट पारिभाषिक संज्ञांचाच निर्णय ह्या धिवेशनांत घ्यावयाचा व तो निर्णय झाल्यावांचून र कोणत्याहि विषयास हात घालावयाचाच नाहीं संकल्प करूनच बैठक मारावयाची असें धोरण लें गेलें तर बरें होईल असें मला वाटतें. ‘प्रारब्धस्य गमनम्’ च इष्ट १।२ गोष्टी जरी एकेका अधि- नांत आम्ही निःसंदिग्ध निर्णीत करूं शकलो हि इष्ट–साफल्य–समाधान पदरांत घेऊन घरीं तां येईल.

चर्चा विषयास आगाऊ प्रसिद्धि

न्याय्य, तर्क, सांख्य इ. शास्त्रांच्या साह्यानें र्णय घ्यावयाचा असतां तत्तत् शास्त्राधिकारी री अधिवेशनांत उपस्थित असलें तर अधिक लें व उपकारक होईल. तसेंच चर्चा–संविभागी कीं पूर्वनिश्चित व्हाव्यात. समयोत्स्फूर्त चर्चकांनीं पला आशय संक्षेपानें अध्यक्षांना लिहून कळवावा यावरून अध्यक्ष किंवा संयोजकांना वाटलें तरच नवचर्चकांस प्रतिपादनानुज्ञा मिळावी; त्यानेंहि आग्रह धरूं नये, अकांडतांडव करूं नये, विलें नाहीं तर स्थानांतर करावें. व १० अंक परत यावें अशी सूचना परिषद संयोजक अध्यक्षांनीं प्रारंभींच द्यावी. चर्चेच्या गोष्टी मात्र १५ दिवस तरी अगोदर प्रसिद्ध व्हाव्यात.

अनुक्रमणिका

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची भेट २६५
कै. वासुकाका जोशी आरोग्यकेंद्र २६६
त्रिदोषांच्या विविध गति २६७
औदुंबर कुष्ठ २७३
चंद्रकलारस निर्णय २७५
वैद्यांसाठीं स्वस्त औषधें २७९
विधान सभेतील प्रश्नोत्तरें २८१
वै. दा. धों. पाठक यांची मुलाखत २८३
दोन ग्रामीण औषधें २८६
मधुमेहासंबंधीं आणखी कांहीं अनुभव २८९
आयुर्वेद यात्रा २९१
रोपण तेलाचा पोटांतून उपयोग २९३
दंतवैद्य जायदे यांची पत्रें २९४

या खेपेस शवच्छेदनपूर्वक चर्चा होणार ही गोष्ट विशेष होय. आणि संभव आहे कीं आंगोपांग विशसक पाश्चात्य दृष्टिकोनांतून कांहीं गोष्टी निवेदन करतील. अशा वेळीं शक्य असेल तर आयुर्वेदीय शारीर दृष्टिकोन तज्ज्ञांनीं तात्काल व्यक्त करावा. पण जर तो विवाद्य वाटला तर तें टिपण संयोजक करून घेतील व कार्य पुढें चालू होईल. आणि विशसन संपल्यावर पुनः बैठक सुरू होऊन नंतर विवाद्य गोष्टी क्रमशः चर्चेस घेतल्या जातील.

बसण्याची व्यवस्था

शवच्छेदन कार्य चालू असतां तें गर्दींत डोकें वर काढून आपल्या शरीर संबंधानें इतर प्रेक्षकांना उपसर्ग पोंचूं नये ही दक्षता प्रेक्षकानें व्यावयास हवी हें तर खरेंच, पण त्यासाठीं चर्चक प्रेक्षक छेदक यांची बसण्याची वा उभें राहाण्याची सोय निर्बंध करतां आली तर अधिक उत्तम ! प्रेक्षक वर्तुळाकार माळ्या- वर बसवावेत, चर्चक वा प्रतिचालक (मुख्य) शवाचें भोंवती बसवावेत आणि प्रत्यक्ष विशसक व त्याचे साहाय्यक वर्तुळ मध्यस्थानीं असावेत. म्हणजे सोयीचें होईल.

— वैद्य दत्तात्रयशास्त्री जळूकर

इंडियन मेडिकल असोसियेशन, नासिक शाखा

" आयुर्वेद सेवा संघाच्या संचालकाकडून आलेल्या आमंत्रणानुसार आम्हीं खालीं सही करणार, इंडियन मेडिकल असोसिएशन नासिक शाखेच्या सभासदांनीं आज संस्थेनें चालविलेल्या औषधीशाळेस भेट दिली.

तेथील कार्यकर्त्यांनीं प्रथम संस्थेचे उद्देश व कार्याची माहिती सांगून नंतर औषधें तयार करण्याच्या निरनिराळ्या पद्धति दाखविल्या. कांहीं तयार औषधेंसुद्धां पाहिलीं. सभासदांनीं कांहीं औषधाच्या गुणधर्माविषयीं चौकशी केली व त्यांचीं समाधानकारक उत्तरें मिळालीं. एकंदरींत संस्था पाहून सर्व सभासदांनीं समाधान व्यक्त केलें.

त्यांतल्यात्यांत ही संस्था व्यापारी तत्त्वावर चालविली नसून, फक्त शास्त्र-सेवेचें ध्येय पुढें घेऊन चालविल्याबद्दल चालकवर्गाला धन्यवाद. "

(सही) सी. एम्. पटवा
प्रेसिडेंट
इंडियन मेडिकल असोसिएशन, नासिक ब्रँच

ता. १९-१०-५५
नासिक

उपस्थित डॉक्टर मंडळींच्या सह्या:—

डॉ. एच. एस. जोशी
डॉ. आर. के. गायधनी
डॉ. एम. जी. कुलकर्णी
डॉ. सी. एम. पटवा
डॉ. व्ही. पी. गुप्ते
डॉ. एस. के. किर्लोस्कर
डॉ. डी. आर. चौधरी
डॉ. आर. पी. कोरडे
डॉ. टी. व्ही. म्हसकर

यंदा पाऊस फार पडला, आतां थंडीहि जोराची पडेल !

अशा वेळीं थंडीनें अग्नि मंद होऊं नये, व कफसंचयास संधि मिळू नये, यासाठीं

.... आयुर्वेद औषधी भवनाचें नामवंत औषध ....

भल्लातकासव (२० तोळे १। रु.)

आपल्या घरीं आणून तयार ठेवा. थंडी पडूं लागतांच आपल्या मुलाबाळांना द्या व आपणहि स्वतःहि घ्या. या औषधाच्या गुणाविषयीं सर्व चिकित्सकांची खात्री पटली आहे. औषध अत्यंत सौम्य आहे. १० तोळे भल्लातकासवांत २ बिब्याचा अर्क येतो. यामुळें एक दिवसाच्या बालकांलाहि हें औषध देतां येते. औषधाची चवहि वाईट नाहीं.

आपल्या औषध विक्रेत्याकडे मागणी करा.

आयुर्वेद औषधी भवन, नासिक

संपादक व प्रकाशक—वैद्य विंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विवलकर कारंजा, नाशिक
मुद्रक—श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, नाशिक.

गुरुकुल पत्रिका

गुरुकुल

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

ार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

र्ष ९ वें) नासिक, ता. १६ नोव्हेंबर १९५५ (अंक १० वा

पं. नेहरूंचा कर्मयोगी जीवनक्रम

भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलालजी नेहरू यांच्या वयाला ता. १३ नोव्हेंबर १९५५ ीं ६६ वर्षें पूर्ण झालीं आहेत, व १४ नोव्हेंबरपासून ६७ वें वर्ष सुरूं झालें आहे. या कालांत नीं ९ वेळां तुरुंगवास भोगला व खूप खूप प्रवास केला. या ादगीच्या व कष्टमय जीवनानें ते वृद्ध न होतां तरुण व दुर्दम्य ाहीच राहिले. यावरून त्यांच्या प्रकृतीचा (कफ) प्रकार ांत येईल. पंडितजींना पूर्वायुष्यांत दम्याचा उपद्रव होताच.



पं. जवाहरलाल नेहरू

वृध्दपणींहि व्यायाम व आसनें करतात.

पं. जवाहरलालजींची प्रकृति उत्तम आहे त्याचें कारण ांचें खाणें, पिणें, झोपणें हें सर्व नियमित व नेमस्त असतें. ायाम तर ते सहसा चुकवीत नाहींत. तुरुंगांतहि शीर्षासन, ांगासन इ. आसनें ते करीत आणि पळण्याचा व्यायाम घेत.

आरोग्यरक्षणावर त्यांचा कटाक्ष आहे. ते बहुधा शाकाार करतात. परदेशांत क्वचित् मद्यपान करण्यास त्यांचा नकार सतो. धूम्रपान ते करतात पण संसदेमध्यें बसले असतां ५।५ ास त्यांना सिगारची आठवण होत नाहीं.

फुलांचा त्यांना मनस्वी शोक आहे. गुलाबाची कळी त्यांच्या कोटावर दररोज न चुकतां ेमत करीत असलेली सर्वांच्या दृष्टीस पडते.

भारत-भाग्यविधाते पं. जवाहरलालजी नेहरू शतायु होवोत !

सौजन्ययुक्त उत्साह

“ आयुर्वेद सेवा संघानें चालविलेल्या संस्थेच्या सर्व कार्यालयांना भेट देण्याचें भाग्य लाभलें, याबद्दल आम्हाला संतोष होत आहे. संस्थेमधील स्वच्छता टापटीप कार्यपद्धति व चालकांचा सौजन्ययुक्त उत्साह पाहून त्यांचें अभिनंदन केल्यावाचून राहवत नाहीं.

या स्पर्धेच्या काळांत

या स्पर्धेच्या काळांत आर्थिक अडचणींना तोंड देत ही संस्था लोकोपयुक्त कार्य नाममात्र मूल्य घेऊन करते हें ध्यानीं घेऊन तिला आपण सर्वांनीं मदत करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें आम्हांस वाटतें.

आम्ही अल्पस्वल्प मदत करीत आहोत. सर्वांनीं मदत करावी अशी विनंति आहे.

प. कृ. तांबे
अ.डे.ए.इ. नाशिक
K. P. Chaudhari

C. S. Mandlik
सिव्हिल जज्ज, नाशिक
२९।१०।५५

वैद्य ब्रह्मदत्तशर्मा यांचा सत्कार

संयुक्त खानदेश वैद्यमंडळाच्या कार्यकारिणीची सभा ३०–१०-५५ रोजीं दुपारीं माहेश्वरीभुवन धुळे येथें भरली होती. त्यानंतर सायंकाळीं नगराध्यक्ष श्री. रुणवाल यांच्या अध्यक्षतेखालीं बोर्डाचे सभासद वैद्य ब्रह्मदत्तशर्मा यांचा सत्कार करण्यांत आला. समारंभास प्रमुख नागरिक व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येनें उपस्थित होते.

महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळ, मुंबई

(बृहन्मुंबई जिल्हा शाखा)

[कार्यालय–वै. कृ. के. कानिटकर, भीमराव वाडा
ठाकुरद्वार मुंबई नं. २]

या संस्थेतर्फे ता. १२।११ रोजी श्री धन्वन्तरी उत्सव साजरा झाला. श्री. पुष्पाला महापौर बृहन्मुंबई नगरपालिका यांनीं अध्यक्षस्थान भूषविलें होतें. मुंबई सरकारचे आरोग्यखात्याचे उपमंत्री श्री. जत्ती हे उपस्थित होते. या शाखेचे अध्यक्ष वै. दे ल. आनंदे जे. पी. म्यु. कौ. हे असून वै. लक्ष्मीबाई बोरवणकर व वैद्य रा. ना. आंबे हे सं. कार्यवाह आहेत.

वैद्यक मंडळ, पुणें २

श्रीधन्वतरी–उत्सवानिमित्त या मंडळातर्फे ता ९ रोजीं डॉ. वि.म. भट यांचे ‘मंत्र-वैद्यक’ या विषयावर, ता. १० रोजीं वैद्यराज कन्हैयालालजी भेडा यांचें ‘आयुर्वेदाचें भवितव्य’ या विषयावर व ता. ११ रोजीं वैद्यराज बागेवाडीकर सोलापूर यांचें ‘आयुर्वेदीय रसशास्त्र’ या विषयावर याप्रमाणें व्याख्यानें ठेवण्यांत आलीं होतीं. या मंडळाचे अध्यक्ष वैद्यराज भा. वि. गोखले व मंत्री वै. अ. य. जोशी, आणि वै. वर्तक हे आहेत.



॥ श्री धन्वन्तरये नमः ॥

आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ।

ही दीपावली भारतवासीयांना आयुर्वेदाच्या हितकर उपदेशाप्रमाणें स्वास्थ्यसंवर्धक आहार-निद्रादि कर्में आचरणांत आणण्याची शक्ति–बुद्धि देवो !

चहा-गुणविशेष-विमर्श :

लेखक :—

आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे

भुसावळ संमेलनांतील माझ्या अध्यक्षीय भाषणांतील चहाच्या गुणवर्णनाबाबत मित्रवर्य श्री. बिंदुमाधव पंडित यांनीं केलेल्या चर्चेच्या कांहीं व्यावहारिक बाजूंवर मी १५ ऑगस्टच्या 'पत्रिकेंत' एक लेख लिहिला होता, व पुढें शास्त्रीय चर्चेला हात घालणार होतो. पण दरम्यान मौ. आझादांचा "उद्बोधक" लेख यावयाचा होता. तो आल्यावर आणखी 'व्यावहारिक'च लिहिलें पाहिजे असें वाटूं लागलें. बरीच वैय्यापारिक व इतर माहिती जमा करून लिहिलेंहि. पण यापेक्षां आतां शास्त्रीय चर्चा करणेंच इष्ट असें ठरवावें लागलें व तो विषय सोडून दिला !

वै. उपासनी व कामत यांनीं केलेली चर्चा

त्यानंतरच्या दोन अंकांतून श्री. वै. उपासनी व श्री. वै. कामत यांनीं बरीच चर्चा केली, त्यावर थोडेंफार संपादकीयहि आलें, व आतां मीच लिहिणें आवश्यक आहे.

वै. कामतांनीं माझें काम सोपें केलें

श्री. वै. कामत यांनीं माझें लिहिणें सोपें केलें आहे. त्यांनीं माझें चहागुणवर्णन बहुंशीं संमत केल्याबद्दल आनंद वाटतो. चहा हा उष्णवीर्य असून वातकफनाशक व उत्तेजक असल्याचें त्यांचें म्हणणें माझ्या वर्णनाला समर्थक आहे.

आतां मला लिहिणें जरूर आहे

वैद्यराज उपासनी यांनीं वैद्यराज बिंदुमाधव यांचेप्रमाणेंच चहा शीतवीर्य असतो असें म्हटलें आहे. वै. उपासनींचीं कारणें भिन्न असून त्यांचें खंडन वै. कामत यांनीं केलें आहे. पण वै. बिंदुमाधव यांचीं कारणें चर्चिलीं गेलीं पाहिजेत. त्यासाठीं व एकूण चहाच्या रसवीर्यविपाकांची अजून बरीच चर्चा व्हावयास हवी असें दिसल्यानें व मीच चर्चेचा प्रवर्तक झाल्यानें आतां मलाच लिहिणें आवश्यक आहे.

दुग्धशर्करा चहाचें गुणांतर ?

प्रथम वैद्यराज बिंदुमाधव यांनीं उपस्थित केलेल्या दुग्धशर्करासंयोगांतीं म्हणजे पेय चहाचे व मूळ चहाचे, म्हणजे केवळ त्याच्या फांटाचे, गुण यांत दाखविलेल्या भेदांविषयीं विचार करणें जरूर आहे. श्री. वै. कामत यांनीं याहिबाबत माझें काम सोपें केलें आहे. पण मी स्पष्टच विचारतो, मूळ द्रव्याच्या कषायादि कल्पांचे गुण त्यांत घातलेल्या प्रक्षेपांनीं बदलतात काय ? तसें असलें तर वै. कामत म्हणतात तसा 'अनवस्था प्रसंग येईल'! स्वरस, कल्क, क्वाथ, फांट व चूर्ण यांत आपण मध, साखर इ० चा प्रक्षेप करण्यास सांगतो. हें प्रक्षेप–द्रव्य खरोखर अनुपानच असतें, आणि तें थोडेंहि नसतें. स्वरसाची मात्रा अर्धा पल म्हणजे २ तोळे असते व त्यांत मध्वादि प्रक्षेप १ तोळा, क्वाथाची मात्रा ८ तोळे व त्यांत साखर चतुर्थांशापासून षोडशांशापर्यंत म्हणजे २ ते अर्धा तोळा [पित्त--वात- कफानुसार], फांटाची मात्रा १६ तोळे व त्यांत याच प्रमाणांत म्हणजे ४ ते १ तोळा साखर, कल्कांत साखर--गूळ यांचें समप्रमाण, तर चूर्णांत साखर दुप्पट घालावयास सांगितली आहे. (पहा, शाङ्गर्धर मध्यम खण्ड अ. १।२।३।४।५।६) दशमूळाचा काढा व त्रिफळाचूर्ण या सुप्रसिद्ध कफ–वातनाशक कल्पांचे गुण ग्रंथोक्त प्रमाणांत घातलेल्या त्यांतील साखरेनें उलटे पालटे होणार असें म्हणावयाचें काय ?

चहांतील प्रक्षेपांचें माझें प्रमाण

मी तर चहांत घालावयाच्या दूधसाखरेचें एकेकटें प्रमाण ग्रंथोक्त फांटांतील प्रक्षेपाहून बरेंच कमी म्हणजे निम्म्याहूनहि कमी दिलें आहे. दूध आणि साखर मिळून (३॥+१॥) पांच तोळे प्रक्षेपहि सोळा तोळ्याचे चहाचे फांटाला मी दिला, तो ग्रंथोक्त प्रमाणाहून फारसा जास्त नाहीं. मी दिलेलें हें प्रमाण सामान्यतः शिक्षितांतलें असून तें जास्तींत जास्त आहे.

प्रकृतिमानाप्रमाणें याहून कमी प्रमाणांत दूधसाखर घालणारेहि त्यांत बरेच आहेत. अर्थात् खूप दूध, साखर घालून चहा पिणारा वर्ग नाहीं असें मी म्हणत नाहीं. पण तो चहापेक्षां त्याचा पुसट वास असलेलें एक गोड पेय म्हणूनच ते पितात. चहाचे मी सांगितलेले गुण या पेयाचे नाहींत. वै. बिंदुमाधव यांनीं क्षीर अगर खीर हवी तर याला म्हणावी, पण माझ्या प्रमाणाच्या चहाला खीर म्हणणें म्हणजे खिरीचीच थट्टा केल्यासारखी होणार आहे!

चहाचा विपाक अम्ल व वीर्य उष्ण

वैद्य श्री. उपासनी यांनीं ते चहा शीतवीर्यच कां म्हणतात याचें दिलेलें कारण गमतीचें आहे. त्याचें परस्पर खंडन वैद्यराज बिंदुमाधव यांनीं केल्यानें मला त्यावर लिहिण्याची आवश्यकता नाहीं. पण वै. बिंदुमाधव चहा शीतवीर्य मानतात याची चर्चा करावयास हवी. त्यांनीं चहाचा रस तिक्त-कषाय असल्यानें तो शीतवीर्य असतो असें म्हटलें आहे. पण केवळ रसावरून वीर्य ठरवितां येत नाहीं. बेल, अडुळसा हे तिक्तकषाय असून त्यांचें वीर्य उष्णच आहे. कारण त्यांचा विपाक कटु आहे. चहाचेंहि असेंच आहे. माझे मतें चहाचा विपाक अम्ल आहे व म्हणून तो उष्णवीर्य व पित्तोत्पादक होतो. विपाकानें रसाच्या परिणामाचा परिहार होतो (रसं विपाकः... व्यपोहति). चहाचा फांट आणि दूधसाखर घातलेलें त्याचें पेय यांच्या रस विपाकांत फरक पडत नाहीं, हें मी वर दाखविलेंच आहे.

दूधसाखरेचा विपाकहि स्वादुच

घटकाभर मूळ चहाचा विपाक कटु असा वै. बिन्दुमाधव यांच्या म्हणण्याप्रमाणें मानला तरी दूधसाखरेनें त्याचें पेय अम्लविपाकी होण्याचें काय कारण समजत नाहीं. खरोखर दूध हें रस आणि विपाक या दोहोंनीं स्वादुच असून तें शीतवीर्य असल्याचें वाग्भटानें स्पष्टच म्हटलें आहे, स्वादुपाक-रसं स्निग्धं... शीतलम्। प्रायः पयः ..॥ अ. हृ. सू. अ. ५) साखरेचे गुणवर्णनांत ' दाहतृट्छर्दिमूर्च्छासृक्पित्तघ्न्यः सर्वशर्कराः, " (सदर). या सूत्रानें सर्वच साखर पित्तनाशक म्हटल्यानें ती शीतवीर्य अर्थात् स्वादुपाकीच असल्याचा त्याचा अभिप्राय आहे. मग हीं दोन्हीं स्वादुपाकी द्रव्यें घातलेला चहा अम्लविपाकी कां व्हावा? चहा मूळचाच खरोखर अम्लविपाकी; दूधसाखरेनेंच तो अम्लविपाकी होण्याचें कारण नाहीं. उलट दूधसाखरेनें त्याची अम्लता कमीच व्हावयास हवी व तशी होतेहि. उरोदाह होत असतांना जास्त दूध साखर घालून चहा घेतल्यास तो थांबतो. उलट कडक चहानें अम्लता व उरोदाहादि अम्लपित्तलक्षणें वाढतात. वर क्वाथादिकांत सांगितलेल्या शार्ङ्गधरोक्त प्रक्षेपांत, पित्तावर अष्टमांश व कफावर षोडशांश साखर सांगितली. (क्वाथे क्षिपेत्सितामंशैश्चतुर्थाष्टमषोडशैः। वातपित्तकफातङ्के विपरीतं मधु स्मृतम्॥(शा. सं. म. खं. २।४) कडू काढ्यांत साखर पित्तनाशक होते, मग कडू चहांत ती पित्तकारक का व्हावी?

श्लेष्मसंसृष्टांत दूधसाखरेचा अनुपशय

आतां ज्यांचा अग्नि कफपैत्तिक दोषदुष्ट आहे त्यांना दूध साखर न पचल्यास ती अम्लता पावेल. कोणताहि स्निग्ध व गुरु पदार्थ संचित झाल्यास न पचला तर अर्थात् तो कांहीं वेळानें विदग्ध होणें (आंबणें) हा पदार्थविज्ञानाचा नियमच आहे. पण म्हणून शीतवीर्य पदार्थ कांहीं उष्णवीर्य होत नाहींत. दुधांत साखर घालून तें पिऊं नये असा वृद्धादेश असतो त्याचें कारण तें जड पडतें, कफ करतें, असा आहे; तें अम्लविपाकी होतें असा मुळींच नाहीं. दमेकऱ्याइतकी अम्लपित्ताच्या रोग्यांची दूधसाखरेनें त्रास झाल्याची तक्रार येत नाहीं. अम्लपित्ताचा कफज प्रकार असेल; ज्याला श्लेष्मापित्त म्हणतात व ज्यांत चिकट व आंबटकडू वांती होते त्यांत मात्र दूधसाखरेचा अनुपशय येईल. पण ज्यांचे वातज अम्लपित्त आहे कीं ज्यांत कडू, तिखट व आंबट अशी वांती होते, त्यांत दूध साखरेचा उपशयच येईल. अशा रोग्यांना सूतशेखर दूधसाखरेंत देण्याचा

तहि आहे. श्लेष्मसंसृष्टांत तो आल्याचे रसांत घालून देतात.

(तिक्त) हा आयुर्वेदोक्त विपाकच नाहीं

वै. उपासनी हे, चहा हा रसानेंच कार्य करतो णि त्याचा विपाकहि मधुरच आहे, कां तर तो न ल्यास कडू होऊन पडतो, व हा कडुपणा [तिक्तता] माशयांत होतो, असें म्हणतात. दोन्ही गोष्टी, समजुतीनें आयुर्वेदाविरुद्ध आहेत. आयुर्वेदानें ग्नीच्या म्हणजे पाचकाग्नीच्या संयोगांतीं होणाऱ्या ांतराला विपाक म्हटलें आहे. (अ. हृ. सू. ९।२०) चकाग्नि आमाशयांत असत नाहीं, पक्काशयमध्यांत च्यमानाशयांत असतो. पित्ताच्या प्रकोपानें म्हणजे मार्गगामितेनें आमाशयांत तिक्तता (कडुपणा) डल्यास चहासारखें कडू द्रव्य न पचून वांतीवाटें डू होऊन बाहेर येईलहि. रसाचें कार्य आमाशयांत ावयाचेंच. पण म्हणून चहाचा कडू हा विपाक णतां येणार नाहीं, व त्रिधा विपाकांत 'कडू' गार तिक्त हा विपाक आयुर्वेदांत सांगितलाच नाहीं. त्रिधा विपाको द्रव्यस्य स्वाद्वम्लकटुकात्मकः। . हृ. सू. अ. १)

चहाचा अधःकोष्ठावर परिणाम नाहीं!

आतां वै. उपासनी यांचें म्हणणें आहे कीं, हा आमाशयांतूनच विवेचित होतो. मग याचा र्थ, त्याचा आमाशयाचे पुढील आंत्रभागावर रिणामच होत नाहीं असा करावयाचा काय? रक्ती दाहयुक्त (पैत्तिक) मूळव्याध, पित्तातिसार, रक्तातिार या रोगांत त्यांनीं चहा देऊन पहावा. खास नुपशय येईल. नुसता चहा सोडल्यानें अशा ोग्यांचें रक्त पडणें कमी होतें हा चिकित्सकांचा ेहमींचा अनुभव त्यांना नाहीं काय? हा अनुभव कदां तरी त्यांनीं घेऊन पाहावाच. म्हणजे चहा ीतवीर्य नसून उष्णवीर्यच आहे हेंहि त्यांना दिसून ेईल. उलट आमावर वा कफवातजन्य प्रवाहिकेंत हा उपशय देतो, आम पातळ होऊन शूल कमी होतो, याचाहि त्यांनीं अनुभव घेऊन पाहावा. वातिक परिणामशूळाच्या रोग्यांचें तर चहा हें औषधच आहे. तेव्हांच जोराचा शूल कमी वाटतो त्यांना. या अनुभवांतीं (तो घेतल्यासच अर्थात्) अधःकोष्ठांत आणि बृहदंत्रांतहि चहाचा परिणाम होतो हें त्यांना दिसून येईल.

वै. उपासनींचें हेत्वाभासयुक्त लेखन

अर्थात् चहाचा विपाक अम्लच आणि त्याचें वीर्य उष्ण हें सिद्ध होतें. शरीरभर उत्तेजन व हस्तपादादींचा दाह हा चहाच्या या उष्णवीर्याचाच परिणाम. पण हें एका बाजूनें मान्य असतांहि चहा शीतवीर्यच असल्याचा श्री. वै. उपासनी यांचा आग्रह आश्चर्यकारक आहे. "चहा घेतल्यानंतर सर्व शरीरभर उष्ण असा अनुभव, कान चेहरा वगैरे लाल झाल्यासारखें वाटतें. घर्मपिंडावरहि चहाचें ईषत् उष्णत्व प्रतीत होतें" असें म्हणूनहि "तरीहि तो शीतच आहे" असें ते म्हणतात. "तत्रोष्णं स्वेददाहाशुपाकिता।... करोति" हें उष्णकार्य आगम आणि प्रत्यक्ष प्रमाण म्हणून उभयतांसमोर असतांहि तद्विरुद्ध अनुमान हट्टानेंच काढावयाचें म्हणजे अग्नि हातांत घेऊन हात पोळला तरी बर्फासारखा थंडगार आहे असेंच म्हणण्यासारखें आहे हें! त्यांचें कोण समाधान करूं शकणार? "थंड प्रदेशांतील लोक एकाचवेळीं ७।८ कप चहा पितात" ही गोष्ट सांगून त्यांचें अनुमान चहा शीतवीर्य असतो असेंच. न्यायशास्त्रांत याला "बाधित हेत्वाभास" म्हणतात. (वह्निरनुष्णो द्रव्यत्वात्। अत्रानुष्णत्वं साध्यं, तदभाव--उष्णत्वं स्पार्शनप्रत्यक्षेण गृह्यते इति बाधितत्वम्। त. सं.) असल्या हेत्वाभासयुक्त लेखनानें शास्त्रीय चर्चा होऊं शकत नाहीं

म्हणे चहा शुक्रवर्धक!

श्री. वै. उपासनी यांचें चहाचें रसादि धातूवरचें, विशेषें शुक्रधातूवरचें, कार्यवर्णन वाचून तर

वाचक थक्कच होतो. चहाचे पराग असतात म्हणून तो "वृष्य व शुक्रवर्धक आहे" असें ते म्हणतात. ओवा बडिशेप हीं परागांतूनच बाहेर पडणारीं बीजें आहेत. तीं वृष्यच होतील नव्हें ? (अपूर्ण)

अनुपानानें गुणधर्मांत फरक

[अनुपानानें द्रव्याच्या गुणकर्मांत फरक पडतो हा नित्याचा अनुभव आहे. आल्याच्या रसांत दिलेला सूतशेखर व दूधसाखरेवर बरोबर दिलेला सूतशेखर यांचे भिन्न परिणाम स्पष्ट आहेत. अनुभवलेले आहेत. मूळ औषधी द्रव्याचे वीर्य व अनुपानाचे वीर्य यांतील फरकानुसार तो फरक स्पष्टास्पष्ट राहील एवढेंच. अनुपानानें मूळद्रव्याच्या गुणांचें नियंत्रण अवश्य होते. हें लेखकानें वर मान्य केलें आहेच.

चहा हें बृंहण पेय

कमी दूध, कमी साखर व चहाचा सौम्य संस्कार असें तें उदक (उष्ण . त्याचे परिणाम कर्षणात्मक कीं बृंहणात्मक ह्यासंबंधीं विचार होणें अवश्य आहे. माझ्या याचे परिणामहि दूधसाखरेच्या मिश्रणामुळें बृंहणात्मकच आहेत. उदक हें स्वतःच बृंहण द्रव्य आहे. आप्यद्रव्य आहे. त्यास दूधसाखरेची जोड मिळाली म्हणजे ते अधिकच बृंहण बनते, कफवर्धक बनते. केवळ रसावरून मी वीर्य निर्णय दिला आहे असें नाहीं वचनात् प्रवृत्तिः वचनात् निवृत्तिः। अशी माझी विचारपद्धतीहि नाहीं. शास्त्रकारांनीं तिक्तकषाय रसाच्या (म्हणजेच शीत गुणाच्या) द्रव्यांचे विपाक कटु सांगितले आहेत. पण ज्याचें विपाक कटु होत नसतील त्यासंबंधीं काय याचा विचार करावयास हवा (कट्वतिक्तकषायाणां विपाकः प्रायशः कटुः) यांतील 'प्रायशः' शब्द महत्वाचा आहे. हा प्रायशः शब्द स्वादुः पटुश्च मधुरः येथेंहि लागूं आहेच. सबब जे रस वीर्य विपाक अनुभवाला येतील तसे ते मानावेत हें योग्य होईल.

दूधसाखर आंबून वांति

ज्यांच्या घरीं पूर्वीं दूधदुभतें नव्हतें व पुढें आलें अशा कुटुंबांतून अम्लपित्ताचे विकार निर्माण झाल्याचे पुष्कळ दाखले आहेत. दूध साखर अगर चहा घेणारी कफप्रकृति मंडळी दुसरे दिवशीं सकाळीं पित्त [कफ] पाडणारीं आढळतात. चहा न मिळाला कीं डोकें दुखते याचा अर्थहि हाच आहे. चहा घेणाऱ्या व्यक्तीच्या शरीरांत कफपित्तात्मक दोष वाढतात यालाच वैद्यराज पां. ह. देशपांडे अम्लपाक म्हणतात. चहा पांट जर अम्लपाकी असेल तर दूध-साखर विरहित चहापानापासूनहि अम्लपित्तासारखे व्याधि निर्माण झाले पाहिजेत. पण तसें आढळत नाहीं चहापांटा व पेय चहा यांचे रस वीर्य विपाक एकच आहेत हें मानावयास माझें मन तयार नाहीं. असें मानावयाचें म्हणजे चहा पांट हा दूधसाखरे-प्रमाणेंच मधुर रसाचा आहे असें मानावें लागेल. —संपादक]

औषधी-भवनाचीं
नागपुरांत ३ विक्री-केन्द्रें
कळविण्यांत आनन्द वाटतो कीं नागपूर येथें नासिकच्या आयुर्वेद औषधी भवनाचीं शास्त्रशुद्ध औषधें मिळण्यासाठीं ३ केंद्रें सुरू करण्यांत आलीं आहेत.
महाल केन्द्र— श्री. माधव गंगाधर परांडे
चितारओळ केंद्र-- वैद्य गोविंद गंगाधर परांडे
सिताबर्डी केंद्र-- वैद्य त्र्यंबक विष्णु गाडगीळ
आयुर्वेद सेवासंघ औषधीभवन, नाशिक

पवित्र
नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

बहिऱ्यांसाठीं उपयुक्त कर्णयंत्रें

[लेखकः- वैद्य र. गो. कुलकर्णी आयुर्वेदविशारद, मुंबई २]

आजचा जीवनकलह चालविणें किती कठीण ऊन बसलें आहे हें सर्वांचें परिचयाचेंच आहे. ांत एकादें इंद्रिय विशेषतः कान वा डोळा अधू ल्यास काय प्रसंग येईल ह्याची कल्पना केलेलीच री. थोडीफार बधिरता असलेल्यांस माहिती व्हावी हणून कांहीं कर्णयंत्रांची माहिती दिली आहे. सोबत ांहीं यंत्राचीं चित्रें दिलीं आहेत.


१


३


४


६

१) बॅटरीवर चालणारीं कर्णयंत्रें :— ह्या ाची किंमत रु. ३०० ते ८०० पर्यंत असते. ाधारण लहान डायरी एवढी पेटी (२ इंच रुंद, ३ उभी), गंडयासारखी बारीक वायर व कानाला वण्याची लहान ट्यूब (नळी) ह्यांत आवाज लहान ठा करण्याची सोय असते. बॅटरीचा खर्च महिना ५।२० रुपये. वारंवार दुरुस्ती. वार्षिक दुरुस्ती- र्च १५०।२०० रु. वजन १०।१५ तोळे. नाजूक रून वापरण्याचें. यांस लागणाऱ्या बॅटऱ्या व दुरुस्ती-- ळें फक्त शहरांत उपयोगी, खेडयांत निरुपयोगी. हीं त्रें निरनिराळ्या रेडिओ कंपन्यांकडे मिळतात. ... ... नांवाचें जर्मन कर्णयंत्र चांगलें आहे व या मानानें बॅटरीचा खर्चहि कमी. किं. रु. ७५० से. . सह.

२) कानाला लावण्याचीं यंत्रें अर्धा इंच लांबी-पासून तो १ फूट लांबीपर्यंत, किं. ९ रु. पासून ९० रु. पर्यंत. नेहमीं मिळतात असें नाहीं. मे. ढगे कं. तसेंच इतर सर्जिकल कंपन्या यांजकडे मिळूं शकतात.

हिंदुस्थानांतील शहरीं व खेडेगांवचे जनतेची कर्णयंत्राची गैरसोय दूर करण्याचे दृष्टीनें श्री. टी. जी. शहा हे प्रयत्न करीत असून त्यांनीं बनविलेलीं कर्ण-यंत्रें खालीं दिलीं आहेत.

३) ५ फूट लांबीची नळी असलेलें कर्णयंत्र किं. रु. ५. एकाच माणसाशीं बोललेलें ऐकूं येतें. खेडयांत उपयुक्त. ज्यास अजिबात मोठा आवाजहि ऐकूं येत नाहीं त्यास निरुपयोगी. वजन ७ तोळे.

४) चिलमीच्या आकाराचें यंत्र. तोंडाजवळ-धरावें लागत नाहीं. वजन ६।७ तोळे किं. रु. १०.

५) स्टेथॉस्कोप पद्धतीचें कर्णयंत्र, तोंडाजवळ धरावें लागत नाहीं. वजन १०।१५ तोळे किं. रु. १५

६) १ फूट लांबीचें, खालील भाग बशीसारखा असलेलें यंत्र. वजन ३५।४० तोळे, जरा अवजड आहे. किं. रु. १५।२०. ह्यानें इलेक्ट्रिक मशिनप्रमाणें सभा, बैठकी, गाणें ह्यांत भाग घेतां येतो.

कर्णयंत्रें जरी दिसावयास सारखीं असलीं तरी उपनेत्राप्रमाणें कुठलें यंत्र वजन आपणास लागू पडतें तें पहाणें प्रत्येकास जरूर असतें.

बाधिर्यावर कांहीं उपयुक्त औषधें

कफदोषामुळें बाधिर्य असेल तरः-लक्ष्मीविलास-गुटी, गलत्कुष्ठारि, मकरध्वज, योगराजगुग्गुळ, अगस्ति-प्राश हीं औषधें पोटांत घेण्यासाठीं उपयुक्त.

इरिमेदादितेल, क्षारतेल, विषगर्भतेल कानांत टाकण्यासाठीं उपयुक्त.

पित्तदोषामुळें बाधिर्य असेल तेव्हांः—मुक्ताभस्म, अश्विनीप्राश, सारस्वतारिष्ट पोटांत, व चंदबला-लाक्षादितेल, लाक्षादितेल कर्णपूरणासाठीं.

वातदोषामुळें बाधिर्यः— च्यवनप्राशावलेह, नागभस्म, महालक्ष्मीविलास, बृहत्वाताचिंतामणि, चिंतामणि, महायोगराजगुग्गुळ [सुवर्णयुक्त], हीं औषधें पोटांत उपयोगीं पडतात.

कर्णपूरणासाठीं:— महानारायणतेल, महामाषतेल, अर्कपत्रतेल, निर्गुंड्यादितेल, पंचगुणतेल.

नस्योपचार अवश्य करावा

पोटांत व कर्णपूरणासाठीं दोषानुरूप औषधें दीर्घकाळ घ्यावीं लागतात. नस्य--चिकित्सेचाहि उपयोग बऱ्याच वेळां करावा लागतो. विशेषतः अणुतेल व षड्बिंदुतेल हीं--नस्य--चिकित्सेच्या दृष्टीनें उपयुक्त ठरतात. वरील सर्व उपचार वैद्याचे सल्ल्यानेंच करणें केव्हांहि योग्य. त्याचप्रमाणें जीवनसत्त्वांच्या गोळ्या, सूचिकाभरणें व बाराक्षारापैकीं कांहीं औषधें उपयुक्त आहेत. पण त्या त्या औषधांचा वापर त्या त्या शाखेंतील तज्ज्ञांचेच सल्ल्यानें करणें केव्हांहि योग्य ठरेल.

सरकारी पत्रव्यवहार

सरकारी पत्रव्यवहारांत इतःपर रजिस्टर्ड वैद्याच्या नांवापूर्वी 'वैद्य', व राजिस्टर्ड हकिमांच्या नांवापूर्वी 'हकीम' हा शब्द लावण्यांत यावा अशी मुंबई सरकारची आज्ञा प्रगट झाली आहे.

तारेचा पत्ता:-Newbottle
के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुचें, कॅपसुल्स [हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाची सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं
आयुर्वेदिक व युनानी वनौषधि
तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण !

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार, गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राह्मी, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य ! विशेष माहितीसाठीं आमचे साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम—आयुर्वेद

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी
२४५ काळबादेवी रोड, मुंबई

वाचकांचा पत्रव्यवहार

असाणा भरड व मधुमेह :

“ हल्लीं माझें असाणा (भरड) चें सेवन चालू आहे. बरोबर शिलाजत्वादिवटीहि घेतो. या सेवनानें शर्करा कमी झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. हुशारी वाटते. मज्जातंतूविषयक (Nervous System troubles) त्रास कमी वाटतो. असाणा औषध शर्करा कायमची बंद करून कायमचा फायदा देऊं शकेल काय ? पूर्ववत् आहार घेतां येईल काय ? हें कृपेनें आपल्या माहितीवरून कळवावें. “ इन्सुलिनचीं ” इंजेक्शनें घ्यावींत तोपर्यंत त्रास कमी अगर नाहीं. परंतु इंजेक्शनें बंद केल्यानंतर पुनः त्रास सुरूं, असेंच असाण्याचे बाबतींत होऊं शकेल काय तें कळवावें.

धान्य तेलासंबंधीं माहिती

धान्य-तैलाबाबत विचारलेली माहिती आली असल्यास कळवावी. स्मार्ट प्रॉडक्टस् ११० मेडोझ स्ट्रीट फोर्ट मुंबई, ही आयुर्वेदिक औषधाची कंपनी ग्लिमॅक्स हें औषध इसबाकरितां बनवते. परंतु त्यांतील द्रव्यें प्रतिनिधीसहि माहित नव्हतीं. त्याचा वास मी म्हणतो त्या धान्य-तेलाशीं पुष्कळसा जुळता आहे.

नंदुरबार. —डॉ. एस्. जी. वाळिंबे

मधुमेहविषयक आयुर्वेदीय तत्त्वज्ञान

[तेलिया असाणाजल मधुमेहनाशनार्थ वापरणाऱ्या रोग्यानें मधुमेहासंबंधींचें आयुर्वेदीय तत्त्वज्ञान माहीत करून घेतलें पाहिजे. तेलिया असाणा हें मधुमेहनाशक म्हणून आज आपण वापरत असलो तरी वैद्यकशास्त्रांत त्याचा उपयोग मधुमेह व तत्सदृश कफदोषविकार उत्पन्न न होण्यासाठीं सांगितलेला आहे. दरसाल सर्वच प्रकृतीच्या लोकांनीं ऋतुभेदाप्रमाणें संस्कृत पाणी वापरावें. उन्हाळ्यांत ज्याप्रमाणें वाळ्याचें–मोगऱ्याचें पाणी पितात, त्याप्रमाणें वसंत-ऋतूंत असाण्याचें पाणी अवश्य प्यावें असें आयुर्वेदाचें निक्षून सांगणें आहे.

कफकाळीं खात पीत नव्हतों

पूर्वींच्या काळीं आपण सकाळीं (कफकाळीं) गोड खातपीत नव्हतो. साखर-गुळाचा वापर सणावारीं असे. आज आपण रोज दोन वेळ साखर पितो. हा देश अन्य देशासारखा थंड नसल्यामुळें शीताचा प्रतिकार करण्यासाठीं शीत देशांत जेवढें आहारद्रव्य आवश्यक असतें तेवढें तें येथें नाहीं. सबब असाण्याचें पाणी पिणें हें साखर न खाणाऱ्याला सुद्धां जेथें आवश्यक सांगितलें आहे, तेथें गोड खाणाऱ्यासाठीं तर तें नितांत आवश्यक मानलें पाहिजे. आज मधुमेह नसलेल्या पण चहा पीत असलेल्या लोकांनीं आधींपासूनच आपल्या सेवनांतील साखरेचें प्रमाण कमी ठेवून नित्य (अगर वसंतऋतूंत तर अवश्य) असाण्याचें पाणी पिण्याची पद्धत सुरू केली पाहिजे. म्हणजे मधुमेह, मोतीबिंदु, इसब यासारख्या रोगांपासून त्यांना आपलें रक्षण करतां येईल .

पूर्वींचा आहारच मधुमेहकारक

पूर्ववत् आहार घेतां येईल काय ? असा प्रश्न आपण विचारलेला आहे. पूर्वींचा आहारच (आयुर्वेदाच्या पद्धतीप्रमाणें विचार करतां) रोगकारक होता. तो आपण चालू ठेवला तर रोग होणार हें निश्चित. आहारविहाराची पद्धति बदलली पाहिजे हाच आयुर्वेदाचा कटाक्ष आहे. निरनिराळ्या ऋतूंत आहारद्रव्यें हीं एकाच स्वरूपाचीं असणें घातक आहे. बैठा व्यवसाय, व्यायाम नसणें, दिवसा-रात्रीं जास्त झोंप, दहीं, मांसरस, भरपूर दूध, नवीं धान्यें, गूळसाखर यांच्या सेवनामुळें मधुमेहासारखे व्याधी होतात. हीं कारणें टाळलींच पाहिजेत; तरच मधुमेहापासून आपला बचाव होऊं शकेल

हा स्वस्थाचार आहे

तेलिया असाणाचें पाणी पिणें हा रोगोपचार नाहीं, कफदोषहारक स्वस्थाचार आहे. — संपादक]

हैद्राबाद राज्याचें अंदाजपत्रक

[हैद्राबाद विधानसभेच्या अंदाजपत्रक अधिवेशनाचे वेळीं आमदार वैद्य गोपाळशास्त्री देव एम्. एल्. ए. यांनीं केलेल्या भाषणाचा सारांश]

“इ. सन १९५५ सालच्या अंदाजपत्रकी अधिवेशनाचे वेळीं आयुर्वेद विषयावर बरीच चर्चा झाली. ह्या वर्षीं सादर केलेल्या अंदाजपत्रकांत आयुर्वेदाकरतां २०,००० रुपये जादा मंजूर करण्यांत आले ह्या गोष्टीचा बराच्च उदोउदो करण्यांत आला. परंतु वास्तविक पाहतां पाश्चात्य वैद्यक चिकित्सेवर जेथें कोट्यवधि रुपये दरसाल खर्च होतात तेथें आयुर्वेदावर केवळ २०,००० रु. जादा खर्च करणें म्हणजे तौलनिक दृष्ट्या भरल्या पोटीं ढेंकर देत एखादा भाकरीचा तुकडा भिकाऱ्यास देण्यासारखें आहे. अशा ह्या निंद्य प्रकारानें आम्हांस दुःख झाल्यावांचून राहात नाहीं. युनानी वैद्यकचिकित्सेकरितां दरसाल १५।१६ लाख रुपयांची तरतूद अंदाजपत्रकांत केली जाते, तर भारतीय तसेंच अन्य वैद्यक शास्त्राच्या पितृस्थानीं असलेल्या आयुर्वेदाच्या चिकित्सेसाठीं केवळ ३-३॥ लाख रुपये अंदाजपत्रकांत देण्यांत येतात. माझ्या दृष्टीनें आयुर्वेदाचा हा स्पष्ट अपमान आहे.

आयुर्वेदाची बुध्दिपुरःसर अवहेलना

निजामी शासनकालांत आयुर्वेदाची बुद्धिपुरःसर अवहेलना केली गेली, परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतरहि गेल्या सात वर्षांत आयुर्वेदाकरितां युनानीच्या बरोबरीनें रक्कम खर्च केली जाऊ नये ही गर्हणीय गोष्ट आहे. जनता आयुर्वेदासंबंधीं आपली इच्छा आपल्या प्रतिनिधिद्वारां वेळोवेळीं प्रकट करीत आली आहे, परंतु त्याची दखल अधिकारीवर्ग घेत नाहीं.

आयुर्वेदाची हीनदीन स्थिति

मुंबईराज्यांत ३॥ कोटि लोकसंख्या आहे व त्यांच्याकरितां तेथें उत्कृष्ट दर्जाचीं ७ आयुर्वेदीय महाविद्यालयें आहेत. परंतु हैद्राबाद–राज्याकरितां फक्त एकाच आयुर्वेदीय महाविद्यालयाची सोय आहे. त्याच्याकरितां इमारत नाहीं, प्रयोगशाळा नाहीं, योग्य अध्यापकवर्ग नाहीं वा त्यांच्याकरितां योग्य वेतनश्रेणीहि नाहीं. तसेंच विद्यार्थ्यांकरितां अभ्यासाच्या दृष्टीनें वनस्पतिउद्यानाहि नाहीं. अशा प्रकारची हीन दीन अवस्था येथें आयुर्वेदाची आहे. ही स्थिति सुधारण्यास आयुर्वेदाकरितां स्वतंत्र डायरेक्टर नेमणें आवश्यक आहे. आयुर्वेद–बोर्ड जनतेकडून निवडलें गेलें नाहीं, अगर त्यांतील सदस्य कोणाचेंहि प्रतिनिधित्व करीत नाहींत. आयुर्वेदाच्या अवनतीला हेच लोक प्रामुख्यानें जबाबदार व कारणीभूत आहेत. हैद्राबाद राज्यांतील वैद्यवर्ग जागृत असून त्याची आयुर्वेदावर मातृतुल्य श्रद्धा आहे. अशा प्रकाराची आयुर्वेदाची अवहेलना येथील वैद्यसमाज दीर्घ काल चालूं देणार नाहीं. सरकारला माझी एवढीच विनंति आहे कीं, त्यांनीं त्वरित दखल घेऊन आयुर्वेदोन्नतिकार्यप्रवण व्हावें ”

—‘आयुर्वेदसुधा’

* * *

अहमदाबादच्या सरकारी रुग्णालयांत आयुर्वेदीय उपचारासाठीं खाटा

अहमदाबाद येथील सरकारी सिव्हिल हॉस्पिटलमध्यें आयुर्वेदासाठीं २० खाटा राखून ठेवण्यांत आल्या असून त्यावर सन्मान्य सल्लागार म्हणून नडियाद आयुर्वेद महाविद्यालयाचे एक प्राध्यापक वैद्य माणिलाल कालीदास ब्रह्मभट्ट यांची नेमणूक झाली आहे. त्या हॉस्पिटलमध्यें आयुर्वेदाचा बाह्यरुग्ण चिकित्साविभागहि सुरूं झाला आहे. या सल्लागार चिकित्सकांना मासिक ८० रु. ऑनररियम देण्यांत येणार आहे असें कळतें.

* * *

तृणज्योतिष्मति (नीलज्योति)
(अंधारांत प्रकाश देणारी वनस्पति)
किं. १ तोळ्यास १ रुपया. टपालखर्च निराळा.
आयुर्वेद सेवा संघ, नासिक

निवडक रुग्ण चिकित्सा....

अपस्माराचे दोन रुग्ण

(लेखकः—वै. न. म. केतकर
आयुर्वेदतीर्थ, L. D. Sc., हैद्राबाद)

रुग्ण नं. १— स्त्री, वय २५, मध्यम वर्गीय, विवाहित, संतति २.

ओजक्षीण लक्षणें

रुग्णपरीक्षा —प्रथमतः रोगी पाहिला त्यावेळीं रोग बराच जीर्ण असल्याचें दिसून आलें. वर्ण फिकट, डोळे शुष्क निस्तेज, मज्जाक्षीणता. रुग्णास प्रश्न विचारला असतां बुद्धिभ्रंश व चित्तचांचल्य असल्याचें अनुभवास आलें. नाडी व हृदयाचें कार्य व्यवस्थित चालू होतें. सर्व अंगांत दुर्बलता आली होती. मन उदास व निराशायुक्त. स्त्रीला जगण्याची इच्छा तीव्र होती. ओजक्षीण लक्षणें व मनोदौर्बल्य विशेष स्वरूपांत निर्माण झालें होतें.

ऋतुकालीं शूल, नंतर झटका

पूर्वेतिहास— चार वर्षांपासून सदर स्त्रीला मासिक ऋतु—कालीं ओटीपोटांत शूल उत्पन्न होत असे, कंबर दुखे, क्षीणता वाटे, कंप होई, चक्कर येई अशीं लक्षणें होत असत, व ऋतु—कालाच्या शेवटीं तिला अपस्माराचा झटका येई. प्रथमतः ऋतुकालांत एकच दिवस एकदांच अपस्माराचा झटका तिला येई व त्यांत ती जास्तींत जास्त १।२ तासपर्यंत बेशुद्धींत राही. बेशुद्धीनंतर तिला आतिशय थकवा वाटे. स्मृतिभ्रंशहि तिला बराच झाला होता. सदर स्त्रीच्या पतीनें जवळ असलेली चीजवस्तु विकून मोठमोठ्या ॲलोपॅथिक डॉक्टरांकडून उपचार करविले परन्तु त्यांचा कांहींहि उपयोग झाला नाहीं.

नंतर त्याच गांवांत असलेल्या एका प्रसिद्ध होमिओपॅथिक—चिकित्सकाचे उपचार सुरू झाले. सदर चिकित्सकानें त्या स्त्रीला ६ महिन्यांत बरें करण्याचें आश्वासन दिलें व उपचार करण्यास सुरुवात केली. ६ महिने होऊन गेले तरी कांहींहि फायदा झाला नाहीं व अपस्माराचें झटके येणें चालूच राहिले. रोगाचें प्रमाण वाढतच चाललें.

लघवी बंद झाली

एक दिवस रुग्णाची लघवी रोखली गेली, पोट फुगलें व अंगावर सूज दिसूं लागली. पुरुष डॉक्टरां—कडून उपचार करविण्यास स्त्रीनें नकार दिला, त्यामुळें तिला तेथील सिव्हिल हॉस्पिटलमध्यें पोंच—विण्यांत आलें. तेथें लेडी डॉक्टरनें मूत्रशलाकेच्या (कॅथेटर) साह्यानें सदर स्त्रीस लघवी करविली. परंतु आतां तर तिला अधिकच क्षीणतां आली, हृदय—दौर्बल्य वाढलें व मूत्रपिंडदुष्टीहि वाढली. बेशुद्धीचा काल वाढला.

२४ तास बेशुद्धि

एकदां तर बेशुद्धि २४ तास टिकून राहिली. महिन्या ऐवजीं १५ दिवसांनींच अपस्माराचे झटके येऊं लागले, व दिवसांत एकदांच झटका येत असे तो आतां २।२ वेळांहि येऊं लागला. डॉक्टरी इलाज थकले परंतु गुण आला नाहीं.

रोगनाशक कल्पांचे प्रयोग

शेवटीं सदर स्त्रीच्या पतीनें तिला घरीं आणलें व आतां पुढें औषधोपचार करण्यास त्याच्याजवळ पैसाहि शिल्लक राहिला नाहीं. माझ्या नातेवाईकांना थोडीबहुत आयुर्वेदाची माहिती होती. त्यांनीं सदर स्त्रीस ब्राम्हीकल्प, शोधक नस्य, विरेचन, वातघ्न दशमूलकल्प व पंचगव्यघृत इत्यादींचे प्रयोग तिच्यावर केले. परंतु घृतकल्प पचविण्याइतकेंहि अग्निबल तिला नव्हतें. ती अत्यंत क्षीण व ओजक्षीण झाली होती. तिचा नवरा हताश झाला होता व आपली स्त्री वांचत नाहीं अशी त्याची खात्री झाली होती.

योगायोगानें मी माझ्या नातेवाईकांकडे याच वेळीं गेलो, तेव्हां त्यांनीं सदर रुग्ण स्त्रीची हकिगत मला सांगितली व कांहींतरी उपचार करण्याविषयीं मला विनंति केली. सदर स्त्रीच्या पतीजवळ खर्चण्यास

एक पैसाहि नाहीं याचीहि कल्पना त्यांनीं मला सुरुवातीसच दिली.

तौलनिक रोगविनिश्चय व दोषदूष्यविवेक

पूर्वेतिहासावरून मला ह्या रोगाचें कारण समजलें. ॲलोपॅथिक चिकित्सा असफल झाली होती. केवळ लाक्षणिक स्वरूपावरून डॉक्टरांनीं Idiopathic major epilepsy (अपस्माराचा एक प्रकार) हें निदान करून चिकित्सा केली. ॲलोपॅथींत अपस्माराचे बाबतींत व्याधिप्रत्यनीक अगर हेतु–प्रत्यनीक सुलभ चिकित्सा करण्याच्या दृष्टीनें स्पष्टि–करणात्मक विचार नाहींत. केवळ लाक्षणिक चिकित्साच केली जाते आणि म्हणून रोग–हेतूचें निवारण न झाल्यामुळें सदर रुग्णाचे बाबतींत केलेली चिकित्सा असफल झाली. ऋतुकालांत नियमितपणें अपस्माराचे झटके येतात यावरून स्थानदुष्टी व रोगाचा त्याच्याशीं असलेला परस्पर संबंध काय असेल या विषयांवर प्रकाश हारमोन्स थिअरी [Harmones theory] अगर अन्य विचारपद्धतीनें आधुनिक संप्रातिशास्त्र पाडूं शकत नाहीं. यामुळें सदर स्त्रीच्या बाबतींत रोगनिवारण दुर्लभ झालें.

होमिओपॅथिक चिकित्सेमध्येंहि मूळ रोगहेतु निवारण व स्थानबल्य चिकित्सेचा विचार न केला गेल्यामुळें समलक्षण द्रव्य-चिकित्सा असफल ठरली. जोंपर्यंत स्थानदुर्बलता राहील तोंपर्यंत रोगलक्षण-विरोधी औषधांचा परिणाम रोगहरण करण्यांत अयशस्वी ठरेल. यथायोग्य दोषदूष्यविवेक व स्थानविवेक न करतां केवळ शोधनचिकित्सा, दशमूलादि वातघ्न द्रव्याचिकित्सा ह्या परिणामकारक झाल्या नाहींत. स्त्री इतकी क्षीण व दुर्बल झाली होती कीं, पंचगव्यघृत पचविण्याइतकेंहि अग्निबल तिचे ठिकाणीं नव्हतें; आणि म्हणून पंचगव्यघृतानें फायदा होण्याऐवजीं सदरहू स्त्रीला अपायच झाला.

आर्तव (स्त्रीशुक्र) क्षीणता हें कारण

मासिक-स्राव अत्यंत कमी व तोहि पीडा व शूलयुक्त, कंप, चक्कर हीं सर्व लक्षणें ऋतुकालामध्यें व तत्पूर्वीं बीजोत्सर्ग कालामध्यें होत होतीं. ह्याचा स्पष्टार्थ असा कीं, स्त्रीमध्यें आर्तव (स्त्रीशुक्र) क्षीणता अतिशय निर्माण झाली होती, व ही क्षीणता दूर झाल्याशिवाय अपस्मार नाहींसा होणेंहि अशक्य होतें. स्त्रीशुक्रवृद्धि झाली कीं, मासिकस्रावहि आपोआप योग्य प्रमाणांत होऊं लागेल. व त्या दृष्टीनें मी त्या स्त्रीला आग्नि व रजोवर्धक औषधी काढा देण्याचा निर्णय घेतला.

ओजोवर्धक शतावरी काढा दिला

औषधीयोजनाः— शुक्रसंजननात्मक व ओजोवर्धक शतावरी प्रयोग सुरूं केला. तिन्ही वेळां [सकाळ, दुपार, संध्याकाळ] शतावरी काढा करून सदर स्त्रीस देण्यास सुरुवात केली. मात्रा प्रत्येक वेळीं ४ तोळे. दुसऱ्या सप्ताहांत काढ्यानंतर १ चमचा शुद्ध तूप व साखर देण्यास सुरुवात केली. १२।१४ दिवसानंतर जो मासिक ऋतुकाल आला त्यावेळीं अपस्माराचा झटका आला परंतु तो सौम्य स्वरूपाचा

सांडू ब्रदर्सचीं

शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.

वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.

पत्रव्यवहाराचा पत्ताः—

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
चेंबूर लि.
फॅक्टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

ळीं व ओटीशूलहि कमी प्रमाणांत झाला. हीच षधीयोजना पुढें चालूं ठेवली. पुढील ऋतुकालीं आली. नाहीं. मासिक स्त्रावहि विनावेदना होऊं ला. ६ महिनेपर्यंत औषध चालूं ठेवून नंतर बंद . आज १२ महिने झाले, सदरहू स्त्रीला फिट ली नाहीं अगर ऋतुकालीं शूलादि त्रासाहि झाला हीं. तिची प्रकृति स्वास्थ्यपूर्ण झाली आहे.

गरोदरपणीं झटका नसे

रुग्ण नं. २—स्त्री, वय ३० वर्षे; विवाहानंतर पस्माराचे झटके येऊं लागले विवाहापूर्वींहि पित्त-कृति असल्यामुळें सदर स्त्रीस पित्तज शिरःशूल व अम्लपित्ताची व्यथा होती. गरोदर--काल सोडल्यास ला महिना पंधरा दिवसांतून एखादें वेळीं फिट ई. गरोदरपणांत मात्र फिट येत नसे. वारंवार फिट त असल्यानें ती अतिशय क्षीण झाली होती, मृतिभ्रंश झाला होता व रक्तवाढ पुरेशी होत नव्हती.

दुष्टपित्तवृद्धीचीं लक्षणें

ज्या दिवशीं अपस्माराचा झटका यावयाचा सेल त्या दिवशीं सकाळपासून तिला चक्कर येई, ळ्यासमोर अंधेरी येई, पित्तयुक्त ओकारी होई, रःशूल उठे व अंग जड पडे. कधींकधीं जागरण, तिश्रम या कारणांमुळें दुष्टपित्तवृद्धि होऊन हटकून ट येत असे. फिट येण्याचा काल नेहमीं पित्तकाल गर वातपित्ताचा संधिकाल हा असे.

रोगनिदानः— पित्तज अपस्माराचीं सर्व लक्षणें तदनुषंगी पूर्वेतिहास सदर स्त्रीचा मिळाला. दोष--द्धीचीं स्थानें आमाशय, ग्रहणी व यकृत् हीं होती. स्थानांत उत्पन्न झालेलें दुष्टपित्त दोषाभिसरणांत न्मार्गगामी होऊन स्मृति व बुद्धि स्थानाप्रत होंचून तेथें आवश्यक अंशांत संचित झालें म्हणजे ज्ञानाश होऊन अपस्माराचा झटका उत्पन्न होत असे.

पित्तविरेचन व पित्तदोषशमन

औषधीयोजनाः— प्रथमतः पित्तविरेचक असें स्वादिष्टविरेचन चूर्ण त्या स्त्रीस दिलें. व नंतर आठवड्यांत दोन वेळां त्रिफळाचूर्ण, घृत, मधु यांचा योग चालूं केला. त्याशिवाय महामंजिष्ठादि कषाय -॥· तोळा रास्नादिकषाय -॥- तोळा रोहितकारिष्ट -॥- तोळा समभाग पाणी मिश्रकरून भोजनसमयीं (अर्ध्या जेवणांत). प्रवाळ २ गुंजा, कपर्दिक ४ गुंजा, शंख ३ गुंजा, कांतलोह १ गुंजा, सु. माक्षिक १ गुंज, फलशर्करा १ मासा. हीं सर्व औषधें २५ मिनिटें चांगली खलून त्याच्या २ पुड्या करून एक सकाळीं ११ वाजतां व दुसरी रात्रीं ८ वाजतां दाडिमपाकाबरोबर देत असे.

सात्त्विक व ओजोवर्धक आहार, दुपारचे जेवणांत दोन अंड्यांचा बलक दुधांतून १५ दिवसपर्यंत दिला. एकंदर १॥ महिना चिकित्सा चालूं ठेवली. पित्तज अपस्मार बंद होऊन आज २ वर्षे होऊन गेलीं.

अपस्माराच्या दोन निरनिराळ्या अवस्थेच्या रुग्णांत अशाप्रकारें केलेली हेतुविपरीत [दोषविपरीत) चिकित्सा फलद्रूप झाली. —“ आयुर्वेदसुधा ”

शतावरीचा प्रयोग

[शतावरीचा प्रयोग जीर्ण पित्तज अपस्मारावर अष्टांगहृदयांत दिला आहे तो असाः—शीलयेत् तैललशुनं (शुद्ध वातज अपस्मारासाठीं), पयसा वा शतावरीम् (शुद्ध पित्तज अपस्मारासाठीं)। ब्राम्हीरसं कुष्ठरसं वचां वा मधुसंयुताम् (कफज अपस्मारासाठीं).

अपस्मार विकारांत दोषांचा संबंध मूत्र या मलाशीं बऱ्याच अंशानें असतो. सबब मूत्रमार्गांतून व्यवस्थित दोषहरण करणाऱ्या दोषशामक औषधी विशेष कार्यकारी होतात असा अनुभव आहे. शतावरीचें कार्य शुक्रदोषाप्रमाणेंच पित्तज मूत्रदोषावरहि प्रसिद्ध आहे. —संपादक]

पुणें येथें
‘ आयुर्वेद सेवा संघ, नासिक ’ चीं
सर्व औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें २

शास्त्रशुध्द
पंचकर्मासाठीं आवश्यक गोष्टी

शुद्ध आयुर्वेद विद्यालयें आतां येत्या नोव्हेंबर–पासून उपरुग्ण वैद्यकाचें शिक्षण देतील त्यावेळीं पंचकर्मसाध्य व्याधीवर वमन–विरेचनादि शास्त्रोक्त प्रयोगांचें प्रात्यक्षिक द्यावें लागेल. त्यासाठीं योग्य समयीं झाडावरून काढलेलीं व पुढील आवश्यक संस्कार केलेलीं अशीं वमन–विरेचन द्रव्यें उपलब्ध असणें आवश्यक झालें आहे.

वमनासाठीं गेळफळ श्रेष्ठ

वमने मदनं श्रेष्ठं । असें शास्त्रवचन आहे व तीं फळें केव्हां आणावीत याची माहिती अष्टांगहृदयांत कल्पस्थानांत पहिल्या अध्यायांत दिली आहे. त्याप्रमाणें योग्य वेळीं गेळफळें काढून तीं पाठविणारे वैद्य अगर आयुर्वेदप्रेमी व्यापारी यांची आवश्यकता आहे सेवा संघ आजवर वाळेलेल्या गेळफळाचा उपयोग करीत आला आहे. पण यंदा तीं [फलानि तानि पांडूनि न चातिहरितान्यपि ।] हिरवट पांढरी फळें मिळवावीत अशा प्रयत्नांत आहे. तरी ज्या भागांत गेळफळाचीं विपुल झाडें असतील त्या भागांतील वाचकांनीं त्या संबंधीं सर्व माहिती आयुर्वेद सेवा संघास अवश्य पुरवावी.

विरेचनासाठीं निशोत्तर मूळ पाहिजे

वमनासाठीं चांगलीं गेळफळ मिळविणें कठीण असलें तरी तीं आतां मिळूं शकतील असा अंदाज आला आहे. पण [त्रिवृन्मूलं विरेचने] विरेचनासाठीं श्रेष्ठ असें त्रिवृत् [काळें निशोत्तर व पांढरें निशोत्तर] कोठें पैदा होतें याची चांगलीशी माहिती अद्याप मिळावयाची आहे. 'त्रिवृत् सुखविरेचनानां श्रेष्ठम्'। अशी या निशोत्तराचाची ख्याति आहे. विरेचनासाठीं आज सोनामुखीपानें, जेपाळबी, यांचा वापर चालू आहे. निशोत्तर त्या मानानें मागें पडलें आहे याचीं कारणें काय ? निशोत्तराच्या उपलब्धीविषयीं अधिक माहिती जाणत्या मंडळींना द्यावी अशीं विनंति आहे.

— बिंदुमाधव पंडित

सन्माननीय ॲनेस्थेटिस्ट

अमरावती येथील वै त्र्यं.म. गोगटे आयुर्वेदतीर्थ यांची ऑनररी अनेस्थेटिस्ट म्हणून नेमणूक मध्यप्रदेश सरकारनें तेथील इर्विन रुग्णालयांत पूर्वींच केली आहे. आतां तेथील सरकारी [डफरिन] रुग्णालयातहि त्यांची त्याच जागेवर नेमणूक झाली आहे.

मध्यप्रदेश राज्य टी. बी. असोसिएशनच्या कार्यकारी मंडळाचे ते सभासद आहेत, व अमरावती जिल्हा टी. बी. संघाचे ते संयुक्त मंत्री आहेत.

- प्रमाणपत्र -

आपण जें जें औषध बनवितो व जनतेस देतो, तें तें प्रत्येक औषध सचोटीचें व गुण देणारें असलें पाहिजे; तरच त्याचें प्रमाणपत्र जनतेकडून आपणास मिळेल. तर अशा गुण देणाऱ्या खऱ्या, अस्सल व ताज्या औषधी खरेदी करण्यास विश्वासपात्र ठिकाण पाहिजे. त्याकरितां आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

डॉ. डी ए. घाडगे लिखित उपयुक्त ग्रंथ

इंजेक्शन विज्ञान	६ रु.
इंजेक्शन चिकित्सा	६ रु.
पाश्चात्य रामबाण औषधें	२॥ रु.
सचित्र उपनेत्र विज्ञान	१। रु.

वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक
येथें मिळूं शकतील

कूट प्रश्न

लेखक—

वैद्य माधवाचार्य मणूरकर, बार्शी

पुष्कळशा गोष्टी आपण अशा श्रद्धेनें करतो हीं, त्याची कार्यकारणमीमांसा आपणास सांगतां येत नाहीं. उदाहरणार्थ जेवतांना ताटाभोंवतीं पाणी फिरवणें हें तंत्र मंत्रविहीन केलें तर अर्थशून्यच नाहीं कां ? अशाच पुष्कळशा सामाजिक चालीरूढीहि रूढी म्हणून किंवा घराण्याची परंपरा म्हणून आचरणांत आणिल्या जातात. या रूढिप्रणीत चालीरीती जशा रूढ आहेत तशाच स्वरूपांत कांहीं अंशीं वैद्यकशास्त्रालाहि बुचकुळ्यांत टाकणारे काल्पनिक तरंग प्रचारांत आहेत.

विशिष्ट काल्पनिक तरंग

मला आठवतें, माझ्या लहानपणीं माझे वडील [कै. परमपूज्य पंडिताचार्य] पपयी, शिताफळ, रामफळ हीं फळें ते स्वतः तर बाजारांतून आणीत नसतच, पण एखादें वेळीं बाजारांतून त्यांच्या पश्चात् तीं आणलीं तर तें त्यांना पसंत पडत नसे. स्नेही अगर शेजारी यांच्याकडून जरी हीं फळें घरीं आलेलीं असलीं तरी त्यांच्यासमोर तीं खाण्याची चोरीच असावयाची. याचें कारण त्यांच्या मतें हीं फळें खाल्ल्यानें नसत्या रोगांना आमंत्रण दिल्यासारखें होतें.

कल्पना काल्पनिक वाटूं लागल्या

त्यांच्या म्हणण्याचा दुसरा भावार्थ असा असावयाचा कीं, शरीरांत सुप्त स्थितींत जे विकार असतात ते व्यक्त रूप धारण करतात. त्यावेळीं रोग म्हणजे काय ? वगैरे सांगणारीं नागरिकशास्त्र, आरोग्यशास्त्र, अशा भारूड शास्त्रांचीं क्रमिक पुस्तकेंहि नव्हतीं. सुटसुटीत पचेल तेवढाच साधा अभ्यासक्रम होता. त्यामुळें आमच्या मनावर ते संस्कार कायम स्वरूपांत हा वैद्यक शिक्षणक्रम पूर्ण करीपर्यंत राहिले या अभ्यासक्रमांत पपयीसारख्या, शिताफळासारख्या फळांचा व शरीरपोषणाचा अन्योन्य संबंध आम्हीं पाहिला. पपयीचें पोषणमूल्य व त्यांतील घटकांचा अभ्यास केला. त्यानंतर आतां पपयीबद्दल पूर्वीं उराशीं बाळगलेल्या कल्पना काल्पनिक वाटूं लागल्या.

पपयीसारख्या अल्पमोली व बहुगुणी फळाबद्दल जर कांहीं जणांच्या मनांत किंतु असेल तर तो नाहींसा व्हावा याकरितां पपयीचें शरीरस्वास्थ्याच्या दृष्टीनें काय महत्त्व आहे तें पाहूं.

पपयी झाडाचीं "पानें"

पपयीच्या झाडाचीं पानें हीं देखील उपयुक्त आहेत. या पानांत कारपेन नांवाचें द्रव्य आहे. या द्रव्याचा उपयोग हृदयाची गति वाजवीपेक्षां जलद असेल व नाडीचे ठोके मोजतां ते अति द्रुत गतीनें पडत असून क्षीण लागतात त्यावेळीं होतो. हृदयास एक प्रकारची शक्ति (Tone) दिली जाते नाडीची गति योग्य मंद स्थितींत आणली जाते. नाडीचा जोर वाढतो. हातास नाडीचें स्पंदन चांगलें जाणवतें. तेव्हां या रसाचा उपयोग महालक्ष्मीविलाससारख्या औषधाबरोबर अनुपान म्हणून केला तर कार्याची सफलता अत्युत्तम दिसेल, असें वाटतें.

पपयीचा "चीक"

पपयीच्या झाडाचीं पानें अगर पपयी तोडल्यानंतर पांढरा चीक येतो. हा चीक सावलींत वाळवून पूड करून ठेवावी ही पूड १ ते ५ गुंजा प्रमाणांत वयोमानानें घ्यावी. अनुपान साधें पाणी. हें औषध घेण्याचा काल भोजनोत्तर हा आहे.

या चिकांत जठररसांत असणारें पेपसीनसारखें पपयोटिन (**Papayotin**) नामक पाचक द्रव्य आहे. जवळजवळ चार गुंजा चिकाची पूड, एक शेर दूध पचवूं शकते. आंत्रांतील जठररसांत असणारें पेपसीन शरीराची उष्णता वाढली म्हणजे कमी कार्यकारी ठरतें. पण या पपयीच्या चिकांत असणारें पपयोटिन हें द्रव्य मात्र शरीराची उष्णता वाढली तरी तितकेंच कार्यकारी ठरतें. ज्वरांत अपचनामुळें जुलाब, वांत्या, पोट फुगणें इत्यादि तक्रारी असतांना पेपसीनच्या ऐवजीं अगर इतर आयुर्वेदीय औषधयोजनेबरोबर ही चिकाची श्वेत भुकटी देण्यास हरकत

नाहीं. याचा उपयोग चांगला होतो. पेपसीनचें कार्य चांगलें होण्यास आम्ल (Acid) माध्यम लागते. तसें पपयोटीनच्या कार्यास आम्ल माध्यमच पाहिजे असें नाहीं. मांसमय पदार्थांतील प्रथिनांचें पचन करण्यांत पेपसिनसारख्या महाग औषधापेक्षां या चिकाचा उपयोग अत्युत्तम होतो.

जंत पडण्यास मदत होते

एक ते चार गुंजा चीक, अधिक एक चमचाभर मध, हें मिश्रण घेऊन नंतर एरंडेल तेल घेतलें तर जंत पडण्यास मदत होते.

या चिकानें डाळी सुखानें पचतात

ज्यांना प्रथिनयुक्त असा आहार घेऊन अपचन व जाड्य वाटत असेल अशा लोकांना हा चीक अगर याची वाळलेली पूड १ ते ४ गुंजा प्रमाणांत जेवणानंतर द्यावी. ज्या लोकांना हरबऱ्याची डाळ, गव्हाची पोळी अगर साधें दूध किंवा केव्हांतरी घेतलेलें कोंबडीचें कच्चे अंडें पचत नाहीं, अशा लोकांत हा आहार पचण्यास ही चिकाची पूड चांगली उपयोगी पडते.

घटसर्पांत लावण्यासाठीं

घटसर्पांत घशांत दोन्ही बाजूंनीं एक पांढरट रंगाचा थर सांठतो. हा थर एखाद्या पातळ पडद्यासारखा असतो. हा थर वेळींच नाहींसा करावा लागतो. त्याकरितां या चिकांत ग्लिसरीन घालून त्याचा द्रव तयार करून हा द्रव घशांत ५।५ मिनिटांनीं लावावा. याचा उपयोग चांगला होतो. टाकणखार + चीक + पाणी, असें द्रव तयार करून याचा उपयोग कुरुप, वांग, मस यावर लावण्यासाठीं करावा. कालांतरानें हीं हळूं हळूं नाहींशीं होतात.

कच्च्या फळाचा पाक करावा

पपयीचें कच्चें फळ घ्यावें. तें उभे चिरावें अगर चिरण्या पाडाव्यात. त्यांतून पांढरा चीक निघतो. हा चीक पातळ स्वच्छ कपड्यावर धरावा व सावलींत वाळवावा. याचा पोटांत देण्याकरितां उपयोग करावा. कच्च्या लहान लहान पपया झाडावरून पुष्कळ वेळां पडतात. त्या आपण फेंकून देतो. त्याऐवजीं आपण त्या किसाव्यात. तो कीस चांगला पिळून त्याचा रस काढावा. या रसांत साखर घालून पाक तयार करून ठेवावा. हा पाक लहान मुलें फार आवडीनें घेतात.

पपयीपाकाचा उपयोग

विशेषतः ज्या मुलांना आईच्या अंगावर प्याल्यानंतर लगेच वांती होते त्यांना हा पाक द्यावा. हा कल्प गोड आहे. वांती होणाऱ्या रोग्यांत जो औषधीकल्प वापरावयाचा तो हृद्य म्हणजे आवडणारा असावा लागतो. कडवट अगर अप्रिय वासाचें औषध दिलें तर तें वांतीची प्रवृत्ति वाढवते. एवढ्यानें मुलाची वांती थांबत नसेल तर चिकाची पूड अगर हा पाक रोज मातेसहि द्यावा. लहान मुलांच्या अग्निमांद्याचा परिणाम म्हणून आधूनमधून जुलाब होण्याची प्रवृत्ति असते. अशा वेळीं या औषधाचा चांगला उपयोग होतो. मुलांना शौचास पातळ व हिरवट होतें अशा अवस्थेंतहि वाळलेल्या चिकाच्या पुडीचा उपयोग चांगला होतो.

विटाळ साफ जातो, विंचू उतरतो

कच्च्या फळाचा रस अगर चीक गर्भाशयाचीं आकुंचनें वाढविण्याचें कार्य करतो. विटाळशीपणीं हें दिल्यास विटाळ साफ जाण्यास मदत होते. जास्त प्रमाणांत दिल्यास गर्भपात होतो, असें कांहीं तज्ञांचें मत आहे. गर्भाशयाच्या द्वारास (Cervix) हा चीक लावावा, अगर हा चीक थोडा घट्ट होऊं देऊन पेसरीच्या अगर मात्रेच्या आकाराची लांबट गोळी करून ती गर्भाशयविवरांत ठेवण्याचा प्रयत्न केल्यास गर्भपात होतो. फळाचा ताजा चीक विंचू चावल्या ठिकाणीं लावल्यास विंचू खात्रीनें उतरतो.

जंतावर पपयी बियांचें चूर्ण

कच्च्या फळाच्या बियांचें चूर्ण हें देखील लहान मुलांच्या जंतविकारांत फार उपयुक्त आहे. माती खाणाऱ्या मुलांत जंताचा उपद्रव असतोच. अशा वेळीं सँटोनिन दिल्यावर या बियांच्या चूर्णाचा उपयोग करावा. (बियांच्या चूर्णाचा उपयोग मी

तः केला नाहीं. पण करून मात्र खात्रीनें पाहाणार आहे.)

कच्ची पपयी खाण्याचे प्रकार

कच्ची पपयी भाजीच्या स्वरूपांत खातां येते. ची भाजी चांगली होते. महिना पंधरा दिवस केल अशा स्वरूपांत लोणचें करून ठेवूं शकतो. च्ची पपयी किसून त्याची कढी करून रोज दिली र मूल अंगावर पिणाऱ्या स्त्रियांत दूध जास्त येण्यास ांगलीच मदत होते. कच्ची पपयी चिरून त्याचें धारण-लहान लहान तुकडे करावेत. त्यांना मीठ वून सावलींत वाळवून ठेवावेत. चांगले वाळल्या- र त्याचें चूर्ण करून पोटांत द्यावें. या चूर्णानें ाढलेली लिव्हर व पांथरी कमी होते.

पपयी पचनास हलकी आहे

पिकलेली पपयी ही पचनास हलकी आहे. चनेंद्रियाच्या निरनिराळ्या तक्रारी याच्या नित्य व मित सेवनानें कमी होतात. पचनमूल्य सुधारतें. रीराचें पोषणमूल्य वाढतें. प्रकृतिस्वाथ्याच्या दृष्टीनें फळ म्हणजे अमृततुल्य आहे. नियमितपणें पिकल्या पयीचें सेवन केलें तर बद्धकोष्ठता नाहींशी होते. ौचास साफ होण्यास मदत होते.

पपयीच्या पानानें शेकावें

पपयीच्या झाडाचीं पानें गरम पाण्यांत बुचळून अगर विस्तवावर गरम करून बांधलीं असतां ातवह शिरांचें [Nerves] दुखणें कमी होते.

कल्पना दुरुस्त करून घ्या

एवंच पपयीच्या झाडाचीं पानें, झाडाचा, ळाचा व पानांचा चीक, कच्चें फळ, पिकलेली पपयी, एवढेंच काय, पण पपयींतील बिया हीं सर्वच शरीर-स्वास्थ्याच्या दृष्टीनें एकांत हितकर अशींच आहेत. अशा या अल्पमोली व बहुगुणी फळाबद्दल अद्याप देखील समाजांतील बऱ्याच लोकांत निरनिराळ्या शंका आहेत. बाजारांत पपयी विकत घेत असतां कित्येकजण विचारतात कीं, काय हो, पपयी उष्ण आहे ना ? तेव्हां तुम्ही ती कशी खातां ? आम्ही बुवा पपयी कधीं खात नाहीं. तेव्हां अशा कित्येक महाभागांना पपयीचें महत्त्व पटवून देऊन सांगावें लागतें कीं आपण हें फळ जरूर खात जा.

जिव्हाळा कां नाहीं ?

बरें, या फळाच्या उपयुक्ततेबद्दल वैद्य व डॉक्टर वर्गांत बाकीच्या मोसंबी, संत्री, या फळांइतका जिव्हाळा कां नसावा ? एक वेळ टायफॉइडसारख्या विकारांत जिथें केवळ द्रव पदार्थच हितकर आहेत असें वाटतें तिथें या पिकलेल्या फळाच्या मगजाचा उपयोग तुम्ही करूं नका. पण बाकीच्या इतर विकारांत साबुदाण्याच्या लापशीवर भर दिला जातो व ती रोग्याला आवडत नसली तरी त्याच्या घशांत केवळ वैद्यकीय सल्ला म्हणून कोंबण्यांत येते, तिथ पपयीच्या गोड व मधुर मगजाचा उपयोग कां करण्यास सांगितला जात नाहीं ? कां या पिकलेल्या फळांत रोग्यास देण्यास प्रत्यवाय असण्यासारखें कांहीं आहे ?

पपयीनें रोग उलटतात ?

गनोरिया (परमा) व सिफिलीस (गर्मी) झालेले कित्येक लोक या फळाबद्दल असें सांगतात कीं, डॉक्टर-साहेब, परवां मी पपयी खाल्ली त्यामुळें पुनः जनेंनाद्रियांवर चट्टा उठला आहे, अगर लघवीची आग होते, किंवा जननेंद्रियांतून पू येऊं लागला आहे. बरा झालेला रोग पुनः उद्भवण्यास आपण पुनः केलेला गाढवपणा

थंडगार
नेत्रांजन
डोळ्यांचे विकारावर उत्कृष्ट
कृष्णशास्त्री बिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

लपविण्याकरितां रोगी ह्या फळाचें नांव पुढें करतो असें म्हणावें तर एखादा अगर दुसरा रोगी तसा भेटेल. शिवाय कित्येक रोगी मी असे पाहिले आहेत कीं, हा रोग होण्यापूर्वी ते हें फळ आवडीनें खात असत, पण हा रोग बरा होऊन या फळाच्या सेवनानेंच तो पुनः थोडा उद्भवला. तेव्हां त्यांनीं ज्या वैद्यराजाचें औषध घेतलें त्यांनीं त्यांना कांहीं वस्तु वर्ज सांगितल्या आहेत, त्यांत हें फळ आहे. तेव्हां वैद्यवर्गांत देखील या फळाबद्दल अशी कांहीं शंका आहे कां ? किंवा हें केवळ रोग्याची समजूत घालण्याकरितां सांगितलें जातें ! कां रोग्यावर छाप पाडण्याची ही प्रवृत्ति आहे ? असाच अनुभव कित्येकांना वैद्यकीय धंद्यांत येत असेल असें मला वाटतें.

शिताफळाविषयींच्या समजुती

सिताफळाच्या बाबतींत तर हें फळ खाल्यानें गुप्त रोग व्यक्त होतात अशाच तऱ्हेची कांहींशी समजूत असल्याचें मला वैद्यकीय व्यवसायांत आढळून आलें आहे. पण या फळाच्या बाबतींतहि शास्त्रीय दृष्टीनें विचार करितां असें कांहींच दिसत नाहीं. उलट पिकलेल्या सिताफळाच्या मगजाचा उपयोग तापांत पेय म्हणून करावा. पिकलेल्या सिताफळाचा मगज घ्यावा, तो नीट कुसकरून एकजीव करावा. त्यांत यथा योग्य पाणी मिसळावें. नंतर तें मिश्रण थोडे थोडे बारीक चाळणीवर घालून फेसावें. चाळणींच्या खालीं उतरलेलें पेय घेऊन त्यांत चवीपुरती साखर अगर ग्लुकोज घालून रोग्याची अवस्था, काल, प्रकृति, याचा विचार करून उपयोग करावा. या पेयानें तापांत होणारा दाह, ऊष्मा, तृष्णा, यांची शांति होते.

दाहशामक पेय

प्रत्यक्ष ज्वराच्या अवस्थेंत देखील सिताफळाचा उपयोग केल्यास दाहयुक्त लक्षणांचें शमन होतें असा अनुभव येत असतांना या फळाचा उपयोग रोग्यास करण्यास सांगणें अगत्याचें नाहीं कां ?

लेखकाची विनंति

ज्वराच्या अवस्थेंत या फळांचा उपयोग कोणी चिकित्सकांनीं केला आहे कां ? केला असल्यास पपयी, सिताफळ, रामफळ या पैकीं कोणकोणचीं फळें कसल्या कसल्या विकारांत दिलीं गेलीं ? त्यांचे हितावह वा विपरीत कांहीं पारिणाम दिसले कां ? या पक्व फळांचा उपयोग रोग्याचा आहार म्हणून किती प्रमाणांत करतां येईल ? करितां येत असेल तर आतांपर्यंत मोसंबी, संत्री, या मोहऱ्यासारखे नसले तरी वैद्यकीय व्यवसायिकांच्या बुद्धिबलानें या फळांना बुद्धिबळाच्या डावांतील प्याद्यासारखें सामान्य स्थानहि कां मिळवून दिलें नाहीं ? यावरून कुठेंतरी कांहींतरी अडचण उत्पन्न होत असावी. तेव्हां या फळांची फुकट वकीली करण्याकरितां हा तक्रारी अर्ज सुज्ञांच्या पुढें विचारार्थ मांडला आहे. या कूटप्रश्नांतील गूढ विशद करण्याचा प्रयत्न वाचकांनीं अवश्य करावा.

[लेखकानें या लेखांत अनेक प्रश्न वाचकांनीं विचारले आहेत. मी मला सुचणारीं कांहीं उत्तरें येथें देत आहे. आहार घेतांना भूमि शुद्ध असावी अशी अपेक्षा आहे. त्यासाठींच नैवेद्याच्या ताटाखालीं मागाहून मंडल करतात व भोवतीं पाणी फिरवितात. सर्व प्रकारचे कृमि व अशुद्धि यापासून आहार शुद्ध राखण्याचा प्रयत्न यांत आहे. याच प्रकारच्या उद्देशानें जेवतांना उदबत्ती लावून ठेवतात. अर्थात् आपण हल्लीं आचार करतो तो त्या उद्देशपूर्तींच्या दृष्टीनें पुरेसा नाहीं हें स्पष्ट आहे.

पपई व सीताफल यांचे गुणधर्म लेखकानें या लेखांत निवेदन केले आहेत. त्यावरून पपई हें आग्नेय व सीताफळ हें आप्य फल आहे हें स्पष्ट होत आहे. हें गुणधर्म लक्षांत ठेवूनच या फळांचा वापर आपण केला पाहिजे. आयुर्वेदानें पित्तज ज्वरांत फलरस द्यावयास सांगितले आहेत. ज्वराच्या आमावस्थेंत फलें, फलरस, आहार देणें आयुर्वेदास मान्य नाहींच, निराम वातकफात्मक ज्वरांत पपई, व निराम पित्तज्वरांत सीताफल पेय देतां येईल. पित्तप्रकृतीच्या लोकांना पपई व कफवात प्रकृतीच्या लोकांना सीताफळें मानवत नाहींत हा सर्वांचा नित्याचा अनुभव आहे. —संपादक]

Replies to the Questionnaire of Dave Committee, Rajkot.

(Our answers refer to The Ayurvedic System.)

Q. No. 31] Are you in favour of any control over the teaching and practice of the systems of medicines on the lines of the control by the Indian Medical Council or on what other line ?

31) Yes. Broadly speaking, Ayurvedic teaching and practice should be controlled by a central council of physicians. The central council should be analogous to The Indian Medical Council in such a way that non-Ayurvedists may not interfere with the affairs, or influence the decisions of the Central Council.

Q. No. 32] Should there be post-graduate study in Ayurveda, Unani or Homeopath, for the graduate of Modern medicine ?

If so give details of method and period of study.

32) No. There will be no use in giving any higher training to students of other systems unless they have got clear insight into the fundamentals and peculiar terminology of Ayurved as used in all of its subjects such as Anatomy, Physiology, Hygiene, Diagnosis, Therapeutics, Pharmacology, Minerology and Treatment. Besides, there are as yet no trained Ayurvedic graduates to take in hand Post-graduate-training. Such of the students who are desirous of deeply getting the knowledge of Ayurveda, should first try to study the principles of Ayurveda and even if outwardly they find anything unagreeable to them according to their system they should go through the whole of Ayurveda line by line. Then only will they be able to integrate Ayurveda with their system.

Q. No [33] What measures can be taken to improve the facilities for training in these systems of Medicine ?

33) a] First of all the whole department of Ayurveda should strictly be in charge of Vaidyas.

b] The scale of pay of the workers in Ayurvedic institutions should be so up-graded as to enable highly talented persons from amongst these, to handle intricate problems affecting their system, efficiently do teaching-work or tackle responsible jobs in the Government or Public bodies.

c] The grants for Ayurvedic institutions should be raised to a level at par to those of Allopathic institutions.

d] The redundant and irrelevant mass of pre-clinical and clinical Allopathic subjects initially introduced by the teaching institutions with an overwhelming majority of non-Ayurvedic planners of the Ayurvedic education, should be drastically curtailed and the time thus saved be utilized for imparting intensive training in Ayurveda in order to enable the students to get mastery over the theory and practice of Ayurveda.

e] In order to bring the above scheme into effect, Govt. should start as many hospitals as possible in urban and rural areas. Cottage hospitals for villages and towns having a population of not exceeding ten thousand, should be given preference in medical and gynaecological wards, local herbs and finished Ayurvedic drugs such as Asawas, Rasayanas, Bhasmas etc. should be strictly used. In such well equipped hospitals intelligent local students with sufficient high-school education but without any compulsion of having passed S. S. C. or any college examination, but having received training in pre-clinical subjects Viz.—Nyaya, Sankhya and Mimansa should be admitted. These students should be given training through the local vernacular language in Ayurveda according to the Shudha Ayurvedic Course introduced by the Bombay State Govt. in 1953.

These students after completion of the course can best be appointed as assistant Vaidyas or should be allowed to practise as physicians. This will help solving the problem of getting medical aid in the rural area.

Q. No. [34] Should there be a uniform standard of teaching and examination of your system all over India ?

34) Yes. But this step should be taken after Ayurvedic teaching has completely come into the hands of purely Ayurvedic minded Vaidyas. Minor changes in the curricula may however be effected in different States according to the local needs.

Q. No. [39] Whom do you or your association represent ?

a) Local body
b) Provincial
c) All India

39) Our association viz:— The Maharashtra Prantiya Vaidya Mandal represents the registered vaidyas residing in the whole of Maharashtra including Marathawada. It has also been affiliated to the All India Ayurvedic Congress, the representative body of the all-India-Vaidyas.

Q. No. [40] Please give the no. of members of your association. (give a list of office-bearers.)

40) The number of members on the register of our body as on 28-10-55 is 956 approximately.

Q. No. [41] What are the main objects of the association?

41) The main objects of our Association in short are:- to get united under the banner of Prantiya Mandal and try to solve political, Social or scientific problems of the Vaidyas by means of holding periodical or special meetings and conferences and with a majority of opinions after systematic discussion to represent their cause by written appeals or personal deputations to the political, social or other leaders and get redressed their grievances whenever and wherever they arise.

Q. No. [42] Have you any control over
i] individual practitioners
ii] The teaching institutions
iii] Examinations ?

42) No. Such a control has strictly been vested by the State-Govt. in the hands of different bodies such as the Board and the Faculty of Ayurvedic Systems of Medicine, Bombay.

Q. No. [43] Have you any teaching or research institutes of your own ?

43) Of late, an institution has been started under the auspices of our Mandal by the name of " Ayurveda Adhyapaka Charcha Parishad " which has so far held two sessions to discuss and arrive at some decisions in the matter of Ayurvedic terminology.

Q. No. [44] Do you suggest any State control or co-ordination in the management of education and Practice ?

44) The answer to this is nearly the same as for No. 31 with the only addition that by the control of the Council suggested in the answer, co-ordination in the Ayurvedic education through-out India can be achieved.

Q. No. [45] Please suggest the type of council you would like and how the representation should be adjusted in the council of various associations.

45) The Council suggested in the answer to question No. 31 should consist of the following:— One member from each State, elected by State-Branch of the All India Ayurvedic Congress (half a century old, All-India representative body of the Ayurvedic profession) and one member from each State nominated by the respective State Govt. from amongst the State Ayurvedic Bodies or institutions, Boards, Faculties and Colleges.

आयुर्वेद

These members should elect their own chairman and the Central Govt. should appoint a Secretary to the Council. As the number of the States shall decrease after the recommendations of the S. R. Committee are put into effect, the total number of members of the Council shall be less than 40. The Council should elect an Executive Committee consisting of 7 members. If however, the view of the present Medical Council Viz. "The Election and nomination of the Council should be strictly restricted to the medical graduates passed from the recognised institutions, be accepted, no eminent learned Vaidyas will get any scope in it, and the Council will be deprived of their valuable help. Before this Act came into force in various States, majority of Vaidyas had had their training at the hands of learned Gurus. This system called the "Guru-Parampara" has been lately recognised by the Bombay State Govt. Questions to that effect have been asked in the questionnaire.

In such circumstances, elections and nominations may be effected from amongst practitioners and from the Provincial Vaidya Mandals with the consultation of the All India Ayurvedic Congress. The qualification of the candidates should not necessarily be academic, but the learned Vaidyas with sincerity in their profession and good reputation in the public, should be considered a sufficient qualification for standing for election. In short, every Registered medical practitioner must be eligible for election.

In future, students of Ayurved should be taught in such a way, that they will be proud of their own system and will be loyal to the Fundamentals of Ayurveda in their general practice. After getting the degree, graduates must be encouraged to be in close contact with some eminent Vaidya at least for 5 years.

There should be no distinction between graduates of any two systems as regards rights and privileges in their service such as pay, allowances leave of absence, etc.

[भारत सरकारनें आयुर्वेद युनानी व होमिओपॅथीच्या शिक्षण व व्यवसाय नियंत्रणासंबंधीं विचार करण्यासाठीं सौराष्ट्र आरोग्यमंत्री ना. दयाशंकरजी दवे यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति नेमली आहे. त्या समितीनें एक प्रश्नावली काढून ती भारतांतील राज्यसरकारें (२) आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथिक शिक्षणसंस्था (३) या संस्थांना जोडलेलीं रुग्णालयें (४) वैद्यकीय व्यवसायिकांच्या प्रातिनिधिक संस्था व (५) निवडक व्यक्ति यांना पाठविली आहे.

महाराष्ट्र प्रांतिक वैद्यमंडळाच्या स्थायी समितीच्या नुकत्याच मुंबई येथें भरलेल्या सभेनें त्या प्रश्नावलीला पाठविलेलीं उत्तरें वर दिलीं आहेत. प्रश्नावली इंग्रजींत असल्यामुळें उत्तरेंही इंग्रजींत दिलीं आहेत.]

एक उपयुक्त चिकित्सा-द्रव्य—

गोमय-स्वरस

[लेखकः– वैद्य बिंदुमाधव पंडित]

आयुर्वेदीय उपचारामध्यें गोमूत्राप्रमाणेंच गोमय–स्वरसाचा उपयोग ठिकठिकाणीं सांगितलेला आहे. परंतु त्याकडे वैद्यमंडळींचें दुर्लक्षच चालूं आहे.

गोरोचन दुर्मिळ झालें आहे

औषधीकल्पांतून पित्तद्रव्याचा उपयोग करण्यांत येतो. सिद्धौषधांत गोरोचन वापरण्यांत येत असें. अलिकडे गोरोचन हें द्रव्य महार्घ (महाग) झालें आहे. (४० रु. तोळा). पूर्वीं तें १६ रु. तोळा मिळत असे. यामुळें खरें गोरोचन मिळण्याऐवजीं नकली वस्तु मिळण्याचाच संभव अधिक. गंधगोळ्यांना गंधाचीं पुटें देऊन नकली गोरोचन बनवितात व व्यापारी तें महाग भावानें गोरोचन म्हणून विकतात अशी माहिती एका गोरोचन–व्यापाऱ्यानेंच दिली.

अशावेळीं पित्ताचा प्रयोग करण्यासाठीं गोमयस्वरस वापरणें हाच एक मार्ग उरतो.

गोमयस्वरसानें जेपाळाची शुद्धि

गोमयाचा आयुर्वेदानें औषधीकरणांत बराच महत्त्वाचा उपयोग केला आहे. विरेचक गोळ्यासाठीं जेपाळाची शुद्धि करतांना जेपाळबिया गाईच्या ताज्या शेणांत मिसळतात, भिजत ठेवतात व चांगल्या फुगल्या म्हणजे लगेच (सडण्यापूर्वीं) काढून सोलून वाटतात. या ठिकाणीं त्या बियावर गोमयस्वरसाचा संस्कार होतो व तो आंत्र–स्वास्थ्यासाठीं उपयुक्त आहे.

यानें बिब्यांचे दोष जातात

पुष्कळ लोकांना बिब्बा उभरतो. त्यामुळें त्याच्या ठिकाणीं अनेक उपयुक्त गुण असूनहि लोक त्याचे सेवन करूं शकत नाहींत. बिब्यामुळें खाज सुटते व फोड येतात. शरीर सुजते. बिब्याचा हा दोष जाण्यासाठीं बिब्बे शेणांत मिसळून ठेवावेत. व फुगले म्हणजे वाळवावेत. शेणाच्या रसांत १ तासभर शिजविले असतांहि बिब्बे निर्दोष होतात. बिब्बे शुद्ध करून वापरण्याची ही नामी युक्ति वैद्यमंडळींनीं अवश्य आचरणांत आणावी.

स्वरस कसा काढावा ?

शेण फडक्यांत घालून रस पिळून काढूं म्हटलें तर तें जमत नाहीं. त्याऐवजीं शेणावर कपडा टाकून तो ओला कपडा पिळून घेतला असतां शेणाचा रस मिळतो. असें वारंवार करावें लागतें. असा हा शेणाचा रस बहुगुणी आहे. आपल्या अंगाला कोरडी खाज येत असेल तर त्यावर हा रस लावावा. शीतपित्ताच्या खाजेवरहि हा रस लावतां येईल. चर्मरोगांवर अत्यंत उपयुक्त असलेल्या ‘ बृहन्मरिचादि ’ तेलांत गाईच्या शेणाचा रस वापरला आहेच.

गोमय तेल

रात्रीच्या वेळीं न दिसणें याला रातांधळेंपण म्हणतात. हा विकार डोळ्यांत ताज्या शेणाच्या रसाचे थेंब टाकले असतां जातो. या शेणाच्या रसापासून तेल सिद्ध करून ठेवतां येते व तेंहि गुणकारी आहे. १ भाग गोडे (तिळाचें) तेल व ४ भाग शेणाचा रस (चौपट) हें मिश्रण चुलीवर ठेवून रस आटवावा म्हणजे तेल शिल्लक राहील तेच गोमयतेल. हें तेल ऊन न करतां डोळ्यांत घालावें. यानें संपातीप्रमाणें दृष्टि प्राप्त होईल.

पर्पटीवर गोमयस्वरस संस्कार

पर्पटी तयार करतांना केळीचें पान ताज्या शेणावर ठेवून त्यावर गरम कज्जली ओतून ती दाबतात. पर्पटीच्या पाकांत शेणाच्या रसाचें साहाय्य होत असतें. पर्पटीचें कार्य आंत्र–भागांतच प्रामुख्यानें होतें व शेणाच्या रसाची उत्पत्ति आन्त्रांतच आहे.

कोष्ठस्थ व त्वचागत जंतूवर

ताज्या शेणाचा रस हें कॉलरानाशक उत्तम औषध आहे, असा वैद्यराज डेग्वेकरशास्त्री यांनीं

आपला अनुभव निवेदन केला होता. जगांत जितक्या प्रकारचे कीटाणु आहेत, त्या सर्वांवर ताज्या शेणाचा रस हें एक जालिम औषध आहे. यासाठीं सर्व अपवित्र जागा पवित्र करण्यासाठीं ताज्या शेणाचा उपयोग करण्याची व्यवस्था सनातन धर्मानें केली आहे. घर, अंगण, यज्ञमंडप, स्वयंपाकघर इ. ठिकाणें पवित्र करण्यासाठीं शेणाचा उपयोग शास्त्रानें सांगितला आहे. स्नानापूर्वी गरम शेणाचा रस अंगास लावल्यास शरीर स्वच्छ होण्यास उत्तम मदत होते. आजच्या शहरी जीवनांत ताज्या शेणाचा वापर कमी झाला आहे. म्हणून क्षणोक्षणीं अंतर्बाह्य जन्तुनाशक द्रव्यें वापरण्याची जरूरी पडत आहे.

रानगोवऱ्यांचा अग्नि

वाळलेल्या शेणाच्या गोवऱ्या मिळतात. रानगोवऱ्यांचा उपयोग औषधीकरणांत बराच करतात, तसाच दूध तापविणें, विट्या भाजणें यासाठींहि होतो. धातूंचीं भस्में करण्यासाठींहि रानशेणीचा अग्नि उत्तम मानला आहे.

गोमयवटी

वाळलेल्या रानगोवऱ्या कुटून त्याचें वस्त्रगाळ चूर्ण करावें. त्यांत थोडी कज्जली घालून १।२ गुंजेच्या गोळ्या करून वाळवाव्या. या गोळ्या पोटांत देण्यासाठीं वापराव्यात. शरीरांत पित्तकार्य सुधारण्यासाठीं या उपयुक्त होतील. गजकर्णांवर खाजविण्यासाठीं रानगोवऱ्यांचा उपयोग करतात. व मग मलमें औषधें लावतात.

पोटांतील वातावर चूर्ण

रानगोवऱ्या अर्धवट जाळून त्याचा कोळसा करतात तो दांत घासण्यासाठीं वापरतात. या कोळशाचें बारीक चूर्ण करून पोटांतील वातदोष घालविण्यासाठीं त्यांत थोडें काळें मीठ व हळद मिश्र करून द्यावें.

बाळंतरोगावर गोवराची राख

सूतिकारोग (बाळंतरोग) यावर देण्याचें जें आयुर्वेदीय प्रमुख औषध * आहे, त्यांत रानगोवरीची पांढरी राख हें प्रमुख द्रव्य आहे. शरीरांतील सडण्याचा स्वभाव दूर करून रक्त-व्रण शुद्ध करणें हा या राखेचा गुण आहे. श्वास, खोकला, उचकी इ० अनेक विकारांत स्रोतसें स्वच्छ करण्याचें कार्य या राखेमुळें होतें. शांतता निवारणासाठीं बरागी व इतरहि लोक स्नानानंतर भस्म म्हणून ही राख अंगाला लावतात. [* प्रतापलंकेश्वर]

बुध्दिवर्धन कार्य

'त्याचें शेण खा म्हणजे तरी तुला अक्कल येईल' असा वाक्प्रचार आहे. बुद्धिकार्य हें पित्तकार्य आहे व शेणांतून पित्तद्रव्य उपलब्ध होत असल्यामुळें बुद्धिविकारावर शेणाचा रस उपयोगी पडणें स्वाभाविक आहे. उन्माद–उपस्मारचिकित्सेंत गोरोचन नस्य, पंचगव्य घृत यासारखीं पित्तद्रव्यप्रधान औषधें वापरलेलीं आढळतात. (कपिलानां गवां पित्तं नावनं परमं हितम्) पंचगव्य करणें जमलें नाहीं तरी गोमयस्वरससंस्कृत घृत करणें व देणें शक्य आहे.

सर्वरोगनाशक अंगारा

कोल्हापूरची अंबाबाई आदि देवाल्यांतून 'अंगारा' म्हणून रानगोवरीची राख ठेवण्याची, भक्तांनें तो कपाळाला लावण्याची व चिमूटभर पोटांत घेण्याची प्रथा पहावयास सांपडते. नित्य नियमानें देवदर्शनास येऊन पुष्कळ दिवसपर्यंत अंगारा, अंतर्बाह्य वापरणाऱ्या वातकफात्मक प्रकृतीच्या लोकांना आरोग्याचा लाभ होणें शक्य आहे. या अंगाऱ्यानें वातकफात्मक रोग दूर होतात, असा अनुभव आहे.

एक उपयुक्त चिकित्सा द्रव्य

तात्पर्य असें कीं गोमयस्वरस ही एक उपयुक्त वस्तु आहे. निरोगी गाई–बैलाच्या शेणाचा रस चिकित्सेंत वापरण्याकडे चिकित्सक वैद्यांनीं लक्ष पुरविल्यास एक अल्पमोली पण बहुगुणी द्रव्य उपलब्ध झाल्याचा आनंद त्यांना मिळेल.

[जयआयुर्वेदांतील लेखाच्या आधारें]

वाचकांचा पत्रव्यवहार—

सुंदर आहार मिमांसा

" आयुर्वेद पत्रिकेंत बरेंच शिकण्यासारखें असतें. वैद्यांनाच नव्हे तर सामान्य जनांच्या दृष्टीनेंहि पत्रिका निश्चित वाचनीय आहे. वर्गणीहि माफक आहे. कांहीं औषधी अनुभूतयोग, उदाहरणार्थ नारूवर तुरटीसाखर, हिंगुलताकरंजवटी, बिल्वदंतमंजन, शिंगाडा सिद्धजलप्रयोग, धात्रीनिशावटी, खरोखरच सर्वांनीं वापरून पहाण्याजोगे वाटतात.

असे आयुर्वेदीय योग्य, सुटसुटीत नि स्वस्त योग आपण जनतेपुढें ठेवतां, आणि तेहि आयुर्वेद-भक्तीनें, ह्याबद्दल प्रसन्नता वाटते. त्याबरोबर तत्त्व-विवेचनहि दिल्यास अधिक सुंदर होईल.

मृद्रक्षणासंबंधींचा आपला लेख वाटला. धात्रीनिशावटी या लेखांतील आहारमीमांसा थोड-क्यांत असली तरी अत्यंत सुयोग्य वाटली. आहाराची आयुर्वेदानुसार मीमांसा करून त्यांतील उणीवा भरून काढण्याची कल्पना स्वागतार्ह वाटते "

पुणें, —वै. पु. श्री. भट डी.ए.एस.एफ.

सर्वांसाठीं एक लघु आहार

साबुदाण्याच्या लाह्या

ज्वरांत अगर इतर वेळीं लघु आहार म्हणून कोणते पदार्थ द्यावेत असा प्रश्न रोग्यास, चिकित्सकास व परिचारकास पडतो. साळीच्या लाह्या सर्वत्र सर्वकाळ चांगल्या मिळत नाहींत व नेहेमीं परवडतहि नाहींत. दूध–साखर हीं द्रव्यें आयुर्वेदाच्या विचारपद्धतीप्रमाणें गुरु बृंहण अशी आहेत (मांस-क्षीर सिता-सर्पि। वाग्भटसूत्र अ.१४।) जव हे सर्वत्र मिळत नाहींत व दक्षिणेंतील लोकांना ते सेवनीय वाटत नाहींत.

साबुदाण्याची खीर कफवर्धक

आजकाल साबूदाण्याचा वापर वाढला आहे. तो स्वस्तहि आहे. साबूदाण्याची खीर (क्षीर) दूध, साखर घालून दिली जाते. ती कफदोषाला बाधक होते. आमवर्धकाहि आहे, ताक घातलें तर ती खोकला, कफरोग्यांना मानवत नाहीं. पुष्कळांना शिजविलेला साबुदाणा खाण्यासच काय पण पहावयासाहि आवडत नाहीं.

साबुदाण्याच्या लाह्या कशा कराव्या ?

अशा लोकासाठीं राजगिऱ्याप्रमाणेंच पातेल्यांत भाजून साबूदाण्याच्या लाह्या करून दिल्या तर त्या अधिक उपयुक्त होतील व पसंतहि पडतील. यासाठीं साबुदाणा भिजवून तो आधल्या दिवशीं फडक्यावर पसरून वाळवावा लागतो. लाह्या नुसत्या, अगर मीठ, तिखट, हळद लावूनाहि खातां येतात. यांत दूधसाखर, ताकमीठ हेंहि घालतां येतें. —बिंदुमाधव पण्डित

कार्यक्षम पदवीधर वैद्य पाहिजे

डहाणू (पश्चिम रेल्वे) जि. ठाणें येथील ग्राम-पंचायतीच्या आयुर्वेदीय दवाखान्यावर शुद्ध आयुर्वेदीय औषधोपचार करू शकणारा तरुण डी. ए एस्. एफ्. वैद्य पाहिजे. हा दवाखाना २६ जानेवारी [अगर १ एप्रिल] १९५६ रोजीं सुरू होईल असा अंदाज आहे.

तेथें नोकरी करू इच्छिणाऱ्या वैद्यानें तत्पूर्वी नासिक येथील शुद्ध आयुर्वेद विद्यालयाच्या आरोग्य-शालेंत १।२ महिने राहून चिकित्सापद्धतीचा अनुभव घेणें अधिक उपयुक्त होईल. ग्रामपंचायतीच्या सभासदांची तशी अपेक्षा आहे असें दिसतें.

—बिंदुमाधव पण्डित

रुग्ण–परिचर्या
(ले.–डॉ. कृ. श्री. म्हसकर)
सदर पुस्तकाच्या प्रती आतां आमचेकडे मिळूं शकतील. तरी त्वरित मागणी करावी.
किं. ६ रु. ट. ख. अलग
पत्ता:-वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

वाचकांचा पत्रव्यवहार—

डॉक्टर लोकांत आयुर्वेदाचा प्रसार

शुद्ध आयुर्वेदाचा प्रचार आतां डॉक्टर लोकांत करण्याची वेळ आली आहे खास. ॲलोपॅथी घरोघरीं घुसण्याचें कारण त्यामागलि शास्त्रीय प्रचार-पद्धति. थोड्या कालापूर्वीं अपंक्त गणला गेलेला आयुर्वेद आजकाल डॉक्टरी संमेलना–परिषदांतून चर्चिला जात आहे.

जळगांव येथें भरलेल्या महाराष्ट्र कर्नाटक डॉक्टर परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणपतरावजी जोशी एम्.एस. हुबळी, यांनीं आयुर्वेदाबाबत पुढील प्रशंसोद्गार काढले:— " I am fascinated by that portion in Ayurveda which dealt with individual reactions and susceptibilities. It appears to establish that each individual patient has to be given due consideration primarily as a personality along with his symptoms ....

We have been tought about diseases and not persons suffering from diseases etc. "

माझ्या डॉक्टर–मित्रांत पूर्वी आयुर्वेदाला नाकें मुरडणारे होते पण आतां स्वतःच्या मुलाबाळांनाहि ते 'देशी' उपचार करून घेतात व स्वत.हि कांहीं औषधें वापरतात.

जबाबदार आयुर्वेदीय संस्थांनीं डॉक्टरवर्गांत आयुर्वेदाचा शास्त्रीय प्रचार करण्याची हीच वेळ आहे.

मुंबई —डॉ. र.कृ. गर्दे आय.एम्.एस. रिटायर्ड

———

युनिव्हाइट कोलीन

हें औषध वृध्द, दुर्बल, दाल्युदरी व मधुमेही यांना उपयुक्त आहे.

युनिव्हाइट कोलीननें कोलीन मिथिओनिनची उच्च दर्जाची चिकित्सा मिळत असून, यकृत्–कार्य सुधारण्याला आवश्यक अशा जीवनसत्व 'क' चा पुरवठा होतो. शरीरांतील मेदवृद्धि नाहींशी होते व तिच्या वाढीस प्रतिबंध होतो.

घटक-द्रव्यें

१ द्रव औंसांत खालीलप्रमाणें द्रव्यें आहेत:—

ट्राय–कोलीन सायट्रेट	४००० मिलिग्रॅम
मिथिओनिन	५०० ,,
आयनोसिटॉल	५०० ,,
जीवनसत्व ब-१	१२·५ ,,
,, ब-२	७·५ ,,
निआसिन	१०० ,,
पँथेनॉल	५ ,,
जीवनसत्व अ	१६००० आय्. यू.
,, ड	५००० ,,
,, क	२५० मिलिग्रॅम

युनिकेम लॅबॉरेटरीज, मुंबई--२६

— महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ —

स्थायी व कार्यकारिणी समितीची सभा

म. प्रां. वैद्य मंडळाच्या स्थायी व कार्यकारिणी समितीची संयुक्त सभा दि. २९।१०।५५ रोजीं रात्रौ ९ वाजतां महाराष्ट्र आयुर्वेद विद्यालय ८७ मुगभाट मुंबई ४ येथें खालील कामाचा विचार करणे-करितां भरली होती.

सभेपुढील कामें

(१) भुसावळ सम्मेलनापासून आजपर्यंत झालेल्या कार्याचें समालोचन (२) बम्बई राज्य सम्मेलनाला देणें असलेल्या द्रव्याचे बाबतींत विचार (३) द्रव्यगुणसमिती व दवे समिती यांजकडून आलेल्या प्रश्नावलींना देण्याचीं उत्तरें निश्चित करणें. (४) सन १९३८ सालीं मंडळाची स्थापना झाली तेव्हां-पासून आतांपर्यंत मंडळानें केलेल्या कार्याचें इतिवृत्त छापून प्रसिद्ध करावें, अशा अर्थाच्या आलेल्या सूचनेचा विचार करणें (५) अध्यक्षांच्या परवानगीनें आयत्या वेळीं येणारीं कामें.

उपस्थित सभासदांचीं नांवें

त्यावेळीं पुढील सभासद हजर होते. १] वै. पांडुरंगशास्त्री देशपांडे पुणें २] वै. गं. वि. उर्फ उर्फ नानासाहेब पुराणिक मुंबई ३) वै. बिंदुमाधव पंडित नाशिक ४) वै. न. पु. जोशी रोहें ५) वै. म. वि. उर्फ काकासाहेब पुराणीक पनवेल ६) वै. शं. वा. उर्फ भाऊसाहेब सांडू चेंबूर ७) वै. अ. वि. फडके शिर-ढोण ८) वै शं. द. कुलकर्णी सातारा ९) वै. रा. न. आंबे मुंबई १०) वै. वि. म. गोगटे नासिक ११) वै. ना. ह. जोशी मुंबई १२) वै. वामनराव दिनानाथ, मुंबई १३) वै. कृ. के. कानिटकर मुंबई १४) वै. द. वा. शैड्ये पुणें १५) वै. द. ब. वैद्य ठाणे १६) वै. रामभाऊ भोगे मुंबई १७) वै. माधव गणेश जोशी पुणें १८) वै. ह. बा. परांजपे पुणें १९) वै. वि. दा. एकतारे नगर.

पत्रद्वारें उपस्थिति

ज्यांना हजर रहातां आलें नाहीं त्या खालील गृहस्थांनीं कांहीं सूचनासह आपली संमती पाठविली होती.

१) वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर नशिराबाद, २) वै. ग. म. लवंगे टेंभुर्णी, ३) वै. द. का. थत्ते चिपळूण, ४) वै. ब्रह्मदत्तशर्मा, भुसावळ ५) वै. भा. खं. कसरेकर बीड (मराठवाडा) ६) वै. फुलचंद दोशी माढें ७) वै. श्री. रा. करंजीकर रनाळे ८) वै. म. भा. वाटवे बेळगांव ९) वै. य. धों. नाटेलींकर कागल १०) वै. विष्णुशास्त्री दाते नाशिक ११) वै. जे. एल. रामैय्या नाशिक १२) वै. दा. त्र्यं. जोगळेकर आगाशी १३) वै. नृसिंहाचार्य वागेवाडी-कर सोलापूर.

वैद्यराज भि. वि. डेग्वेकर जबलपूर व वैद्यराज शेंडे दमोह हे खास आमंत्रणावरून हजर होते.

अहवाल-निवेदन

रात्रीं बरोबर ८ वाजतां सभेच्या कामास सुरुवात झाली. अध्यक्ष स्थानापन्न झाल्यावर प्रधान-मंत्री श्री. माधवशास्त्री जोशी यांनीं निमंत्रणपत्रिका वाचून दाखविली. सभेला हजर राहूं न शकणाऱ्या सभासदांच्या पत्रांचा सारांश सांगण्यांत आला. श्री. विष्णुशास्त्री दाते नाशिक यांचें पत्र संपूर्ण वाचण्यांत आलें. नंतर) (१ भुसावळ संमेलनापासून आजपर्यंत-च्या झालेल्या कामाचें निवेदन प्रधानमंत्री यांनीं केलें. ते म्हणाले ‘ भुसावळ संमेलनांत पास झालेले ठराव खालीलप्रमाणें पाठविले गेले. ठराव नं. १— तीनहि व्यक्तींच्या नातेवाईकांचेकडे ठरावाच्या प्रति ता. १।६ ला रवाना झाल्या. ठराव नं. ३,६, ८ ते १४,१६,१७,१९,२१,२२,२४,२५ आरोग्यमंत्री यांचेकडे ता. २-६-५५ ला पाठविले. त्यांची फक्त

पोंच कार्यालयाकडे आलेली आहे. वरील ठराव ज्या निरनिराळ्या खात्यांच्या कामकाजाबद्दल होते त्या त्या खात्यांकडे त्यांबद्दलच्या ठरावाची एकेक प्रत पाठविण्यांत आली. त्यापैकीं ठराव नं. ११ शुद्ध आयुर्वेद समितीकडे पाठविला होता. त्याचें उत्तर त्यांचेकडून असें आलें कीं, Appendix G ची अंमल बजावणी १९५६ पासून होईल. यावर्षी होणार नाहीं. बाकीच्यांकडून उत्तरें आलीं नाहींत.

मंडळाचे उमेदवार निवडून आले

आयुर्वेद युनानी बोर्डाच्या निवडणुकी जवळ आल्या होत्या. राज्यसंमेलनाचें वतीनें त्या लढविण्याचे ठरलें होतें. त्याकरितां राज्य संमेलनाच्या कार्यकारिणीची सभा दि. १२।६।५५ ला भरली होती. त्यांत मंडळाचे वतीनें सुचविलेलीं दोन नांवें (श्री. ब्रम्हदत्तशर्मा भुसावळ व श्री. नाटोलीकर कागल) निवडणुकीकरितां पसंत केलीं गेलीं. पुढें राज्यसंमेलनानें उभे केलेल्या उमेदवाराव्यक्तिरिक्त इतर कोणीहि उमेदवार उभे न राहिल्यानें ही निवडणुक बिनविरोध झाली व मंडळाचे दोनहि सभासद निवडून आले, हा प्रांतीय संघटनेचा विजय होय.

गोवा सत्याग्रहांत प्रां. मंडळातर्फे भाग

१५ ऑगस्टचा गोवा सत्याग्रह व्यापक प्रमाणावर होणार व त्यांत अनेक लोक जखमी होणार असें स्पष्ट दिसत असल्यामुळें अध्यक्ष व प्रधानमंत्री यांनीं असें ठरविलें कीं, ह्यावेळीं जखमी लोकांची शुश्रुषा करण्याची संधि मिळाल्यास गमावूं नये. त्याप्रमाणें पहिलें पत्रक काढण्यांत आलें. त्याच्या प्रति इतर वर्तमानपत्रांकडे व वैद्यकीय मासिकांकडे पाठविण्यांत आल्या. वर्तमानपत्रांतून मजकूर प्रसिद्ध झालेवर बऱ्याच वैद्यांचीं पथकांत काम करण्यास तयार असलेबद्दलचीं पत्रें आलीं. त्याप्रमाणें आम्ही गोवा विमोचन समितीला कळविलें व साहाय्य स्वीकारण्याची विनंति केली. प्रथम त्यांनीं आमची मदत घेण्याचें कबूल केलें. परंतु शुश्रुषापथक पुणें अगर इतर ठिकाणाहून समितीनें पाठवूं नये. तेथील स्थानिक डॉक्टरांनीं तें काम अंगावर घेतलें आहे अशा अर्थाची सूचना मागाहून आम्हांला देण्यांत आली. ह्या बाबतींत सर्व खुलाशाचें पत्र मी आयुर्वेद पत्रिकेंत प्रसिद्ध केलें. त्यानंतर श्री. बिंदुमाधव पंडित व श्री. वि. म. गोगटे हे दोघेहि अनुक्रमें सत्याग्रही व शुश्रूषक म्हणून नांवें नोंदवून पुणें येथें आले. त्यापैकीं श्री वि. म. गोगटे यांचा शुश्रुषापथकांत प्रवेश मोठ्या मिनतवारीनें अध्यक्षांकडून करविला गेला. त्या दोघांचा सत्कार ता. १२-८-५५ रोजीं सायंकाळीं श्री. वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी यांचे अध्यक्षतेखालीं कार्यालयामध्यें करण्यांत आला. त्यानंतर ते आघाडीवर जाऊन सेवा बजावून परत आले.

बोर्डाच्या निवडणुकी

बोर्डाच्या निवडणुकीनंतर सरकारतर्फे बोर्डावर व फॅकल्टीवर नेमावयाचीं नांवें निश्चित झालीं व त्याप्रमाणें त्यांना प्रसिद्धीहि मिळाली. त्या नांवामध्यें

– भारताच्या नामवंत विद्वानांनीं प्रशंसिलेला –
आयुर्वेद, ॲलोपॅथी, होमिओपॅथी, बायोकेमिक औषधोपचाराची एकत्र माहिती असलेला विद्यार्थी व वैद्यांकरितां उपयोगी
अद्वितीय ग्रंथ
" भारतीय चिकित्सा रहस्य "
(सचित्र मराठी)
(ले.–पं. व्यासनारायण शुक्ल, आयुर्वेदाचार्य)
स्टेथॉस्कोप, थर्मामिटर, रक्तपरीक्षा, 'क्ष' किरण, ब्लडप्रेशर वगैरे आधुनिक व जुन्या रोगनिदानासह, इंजेक्शनें व मिक्श्चरांच्या माहितीनें युक्त.
पृष्ठसंख्या ५२५ किंमत ६॥ रु. [ट. खर्च निराळा]
२ रु. आगाऊ म. ऑ. नें पाठवावेत.
आजच मागवा.
... श्रीदुर्गा आरोग्य मंदिर ...
मेनरोड, सीताबर्डी, नागपूर

मण्डळाचे प्रधानमंत्री श्री. माधवशास्त्री जोशी यांचें नांव बोर्ड–सदस्य म्हणून जाहीर झालें. स्थायी समितीचे एक सदस्य श्री. नारायण हरी जोशी यांची नेमणूक फॅकल्टीवर झाली. आतां बनवलेलें बोर्ड व फॅकल्टी ह्या दोनहि संस्थामध्यें आयुर्वेद व युनानी चिकित्सकांचाच समावेश आहे व पं. शिवशर्मा यांच्यासारखे वैद्य अध्यक्षपदीं असलेंनें दोन्ही ठिकाणचें काम सुरळीत व समाधानकारक चाललें आहे. बोर्ड व फॅकल्टी यांच्या आतांपर्यंत दोन सभा झाल्या, बोर्डाच्या दोन्ही सभेस श्री. माधवशास्त्री हजर होते. सभेचें कामकाजांत ते दक्षतेनें भाग घेत आहेत. बोर्डातून फॅकल्टीवर ब्रम्हदत्तशर्मा [भूतपूर्व मंत्री] यांची एकमतानें निवड झाली. फॅकल्टीतून बोर्डावर श्री. नारायण हरी जोशी [भूतपूर्व मंत्री] यांना निवडण्यांत आले. सध्यां आपल्या मंडळाचे चार घटक बोर्डावर व दोन घटक फॅकल्टीवर आहेत.

आयुर्वेद-संशोधन समिति

आयुर्वेद–संशोधन समितीची सरकारनें पुनर्रचना केली त्यांत सभासद म्हणून मंडळाचे अध्यक्ष श्री. पांडुरंगशास्त्री देशपांडे व श्री. नारायण हरी जोशी यांचा समावेश करण्यांत आला. मंडळाचे भूतपूर्व अध्यक्ष श्री. नानासाहेब पुराणिक व श्री. गणेशशास्त्री जोशी यांचा अनुक्रमें अध्यक्ष व सल्लागार सभासद म्हणून समावेश करण्यांत आला. प्रमाणित व खऱ्या आयुर्वेदीय वनस्पती व औषधं समितींत अध्यक्ष श्री. नानासाहेब पुराणिक, आयुर्वेद सेवा संघाचे जीव-सदस्य श्री. वा. स. मराठे यांचा समावेश करण्यांत आला आहे. नकली औषधांना आळा घालण्याच्या समितींत श्री. नानासाहेब पुराणिक हे सभासद आहेत. अशा रीतीनें सरकार-दरबारीं व जनतेमध्यें प्रांतीय मंडळाविषयीं आदर वाढत आहे, व मंडळाच्या कार्याला वैद्यांकडून भरपूर पाठिंबा मिळत आहे.

मंडळाचें प्रचारकार्य

प्रचारकार्याकरितां दौरा, मंत्री व अध्यक्ष यांनीं वेगवेगळया ठिकाणीं स्वतंत्रपणें करण्याचें ठरविलें आहे. त्याप्रमाणें अध्यक्ष पुढील महिन्यांत (दिवाळीचे आधीं) कुलाबा जिल्ह्याचे दौऱ्यावर जाणार आहेत. इतर जिल्ह्यांतील वैद्यांनीं उत्साहानें पाठिंबा दिल्यास सर्व ठिकाणीं प्रचाराचें काम करणें सोपें जाईल; म्हणून सर्वांना विनंति आहे कीं, त्यांनीं आपआपले ठिकाणीं प्रचारकार्य घडवून आणावें व वैद्यमंडळाचे जास्तींत जास्त सभासद करून मंडळाचें बळ वाढवावें. वरील निवेदन सर्वसंमतीनें स्वीकृत झालें.

देण्याघेण्याबाबत विचार

(२) मुंबई राज्य संमेलनाला प्रांतीय मंडळानें देणें असलेल्या द्रव्याचे बाबतींत विचार झाला. मागील वर्षीचे अध्यक्ष श्री. दत्तात्रेयशास्त्री जळूकर यांनीं डायरेक्टर ऑफ आयुर्वेद श्री. हरदत्तशास्त्री यांच्या सत्कार–प्रसंगीं झालेल्या खर्चाचा हिस्सा रु. २५ राज्यमंडळाला देण्याचें कबूल केलें होतें त्यास मान्यता देण्यांत आली. त्याचप्रमाणें राज्यमंडळाची वर्गणी रु. ५१ भरावी असें ठरलें. प्रांतीय मंडळाचे निवडून आलेले उमेदवार म्हणजे श्री. ब्रम्हदत्तशर्मा व श्री. नाटोलीकर यांजकडून राज्यमंडळाकडे जमा झालेल्या प्रत्येकीं २५० रुपयांपैकीं १५० रु प्रांतीय मंडळाच्या खर्चाकरितां परत मागण्यांत यावेत व ह्या येणाऱ्या रु. ३०० चा विनियोग बोर्ड व फॅकल्टी यांच्याकरितां लागणाऱ्या जरुर त्या कामाकरितांच करण्यांत यावा. त्याबाबतींत पत्रव्यवहार करण्याचा अधिकार कार्यालयाला देण्यांत आला.

दवे कमिटीच्या प्रश्नावलींना उत्तरें

(३) द्रव्यगुण–समिति व दवे–समिति प्रश्नावली ह्यांच्यापैकीं दवे– समितीच्या प्रश्नांना देण्याचीं उत्तरें अध्यक्ष व प्रधानमंत्री यांनीं तयार करून तीं छापविलीं होतीं. सर्व सभासदांना तीं देण्यांत आल्यावर तीं उत्तरें जशीच्या तशीच पाठविण्यास सभेनें परवानगी दिली. प्रमाणित औषधि समितीला पाठविणेचीं उत्तरें तयार करून पाठविण्याविषयीं अधिकार अध्यक्ष व मंत्री यांना देण्यांत आला.

२० पृष्ठाचें सचित्र इतिवृत्त

(४) इतिवृत्त छापण्याविषयींची कल्पना खुद्द प्रधानमंत्र्यांचीच होती. त्यांनीं आपली कल्पना सभेपुढें मांडली. "एकअष्टमांश डेमी आकाराच्या २० पृष्ठाइतका मजकूर प्रसिद्ध करून तो पुढील संमेलनापर्यंत सर्व वैद्यांना मोफत वाटावा. त्याकरितां एक हजार प्रति काढाव्या लागतील व त्याला अंदाजें २॥ शें रु. खर्च येईल. आतांपर्यंतच्या अध्यक्ष व मंत्री यांचे फोटो शक्य तर छापावेत." ह्यावर झालेल्या चर्चेत बऱ्याच लोकांनीं भाग घेतला. संमतिदर्शक आलेल्या पत्रांत बहुतेक लोकांनीं या कल्पनेला संमति दिली होती. फक्त श्री. विष्णुशास्त्री दाते यांनीं विरोध नमूद केला होता. श्री. बिंदुमाधव पंडित, श्री.ना.ह. जोशी, श्री. रामभाऊ भोगे, श्री. आंबे, श्री. शं.द. कुलकर्णी सातारा यांनीं कल्पनेला पाठिंबा दिला, पण मंडळाची आर्थिक परिस्थिति लक्षांत घेतां एवढा खर्च करूं नये असें सुचावेलें.

इतिवृत्त तयार करण्यांत यावें

श्री. दत्तात्रेयशास्त्री शेंड्ये पुणें यांनीं असें सुचविलें कीं, मण्डळाचें प्रचारकार्य होण्याच्या दृष्टीनें असें इतिवृत्त छापणें जरूर आहे. मंडळाजवळ पैसा नसेल तर ह्या कामाकरितां वेगळा निधि, अध्यक्ष व मंत्री दौऱ्यावर जातील त्यावेळीं त्यांनीं गोळा करावा. त्याला सुरुवात म्हणून १ रुपयाची स्वतःची देणगी जागेवरच त्यांनीं दिली. त्यानंतर श्री. नानासाहेब पुराणिक यांनीं इतिवृत्त छापणें ऐवजीं त्याला लागणारें सर्व साहित्य तयार ठेवावें आणि तूर्त परिचयपत्रिका छापावी असा पर्याय सुचविला. त्या अनुरोधानें खालील ठराव पास करण्यांत आला. ' इतिवृत्त प्रसिद्ध करावयाचें तें पुरेसें सविस्तर असणें योग्य होईल. त्यासाठीं जो आर्थिक खर्च येईल तो आजच करणें संमेलन-संस्थेस कठीण वाटत असलेनें योग्य वेळीं छापून प्रसिद्धीस देणें सुकर व्हावें यासाठीं वेळोवेळची माहिती यापुढें संग्रहित करीत जावी व यापूर्वींचीहि लिहून तयार ठेवावी. '

परिचय-पत्रिका छापावी

संमेलन संस्थेचा परिचय सर्वांस व्हावा या दृष्टीनें एक लहानशी परिचय पत्रिका शंभर रुपयांचेपक्षां जास्त खर्च लागणार नाहीं अशा स्वरूपांत प्रसिद्ध करण्याचा अधिकार मंत्र्यांना देण्यांत येत आहे. ह्या कार्यासाठीं स्वतंत्र देणग्याहि मिळविण्याचा प्रयत्न करावा.

सूचक— गं. वि. उर्फ नानासाहेब पुराणिक
अनुमोदक— ना. ह. जोशी

आयत्या वेळेचीं कामें

५] आयत्या वेळच्या आलेल्या सूचना अगर ठराव यांचा खालीलप्रमाणें विचार झाला.

१] नि. भा. आ. महामंडळ व विद्यापीठ यांच्या कुनूल येथें होणाऱ्या संमेलनाकरितां अध्यक्षांचीं प्रत्येकीं ५।५ नांवें सुचविणेंविषयीं महामंडळाच्या प्रधान मंत्र्याचे आलेले पत्राचा विचार होऊन नांवें निश्चित झालीं.

रिन्युअल फी अटळ आहे

२] रजिस्टर्ड वैद्यांसाठीं रिन्युअल फी दर तीन वर्षांनीं बोर्ड वसूल करतें त्या विषयीं निषेध करण्याची आलेली सूचना नामंजूर झाली. कारण रिन्युअल फी आतां अटळ आहे असें कायद्यानेंच ठरविण्यांत आलें आहे.

'आयुर्वेदीय' शब्दाचा दुरुपयोग

३] 'आयुर्वेदीय' या शब्दाचा दुरुपयोग करून कांहीं लोक नकली औषधें काढतात, त्याला आळा बसावा, ही सूचना मान्य केली गेली. सरकारनें ह्याकरितां एक समिति श्री. पं. शिवशर्मा यांचे अध्यक्षतेखालीं नेमली आहे. त्या समितीकडे पत्र पाठवून अशा लोकांशीं वैद्यांचा संबंध कांहींहि नाहीं असें स्पष्टपणें कळविण्यांत यावें. त्याची एक प्रत सरकारकडे धाडावी.

बँकेंत खातें उघडण्यांत यावें

४] म. प्रां. वैद्यमंडळाच्या रकमेचा भरणा एकाच ठिकाणीं असावा ह्या दृष्टीनें स्थायी कचेरीचे गांवीं [नाशिक येथें] बँकेंत खातें उघडण्यांत यावें.

'आयुर्वेदप्रवीण' प्रथम परीक्षा–वृत्त

मुंबई राज्य सरकारनें मुंबई राज्यांत सुरूं केलेल्या शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमाची प्रथम परीक्षा १।। वर्षांनंतर गेल्या ऑक्टोबरमध्यें झाली. या परीक्षेस मुंबई राज्यांतून एकूण १३७ विद्यार्थी बसले त्यापैकीं ८१ पास झाले. परीक्षा–केंद्रें बेळगांव, मुंबई व सुरत अशीं ३ होतीं. एकूण निकाल ६० टक्के लागला. परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांत विद्यालयीन विद्यार्थी होते तसेंच मान्य गुरुजवळ राहून आयुर्वेदाचें शिक्षण घेणारे गुरुपरंपरेचे विद्यार्थीहि होते.मुंबइ राज्यांत शुद्ध आयुर्वेदाच्या शिक्षणसंस्था हुबळी, बेळगांव, पुणें, मुंबई (३), नाशिक मिळून७ आहेत. शिवाय २१ मान्य गुरुंचे विद्यार्थी या परीक्षेस बसले होते.

सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले

[या परीक्षेस नाशिक येथील आयुर्वेद सेवा संघाच्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयांतून एकूण७ विद्यार्थी बसले ते सर्व उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचीं नांवें– (१) सौ. सुनंदा आगाशे (२) चि. द. शां. देशपांडे (३) सौ. विद्या जळूकर (४) चि. न. पु. जोशी (५) कु. शालिनी जोशी (६) सौ. मंगला कुलकर्णी (७) कु. कुमुदिनी लोखंडे.

२१ नोव्हेंबर पासून शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचें चालू वर्षाचें दुसरें अधिवेशन सुरूं होत आहे. यंदापासून प्रत्यक्ष शिक्षणासाठीं आरोग्यशालेची व्यवस्था करण्यांत आली आहे. त्यांत प्रसूती–विभागहि सुरूं झाला आहे.]

बेळगांव केंद्र

नंबर	नांव	
१	रा. भु. ऐरणी	हुबळी
२	अं. वि.अन्कड	बेळगांव
४	वी. वी. बेलवडी	,,
५	रा. वा. भागवत	वै. मा.ग.जो.
६	ग. प. भट्ट	हुबळी
७	व्यं. शं. भट्ट	हु.
९	ई. चिं. चौधरी	बे.
१०	कृ. गि. देसाई	हुबळी
१३	प्रभावती शं. गोडबोले	वै. वाटवे
१५	व्यं. कृ. हेब्सूर	हु.
१७	शि. ब. हिरेमठ	बे.
१९	गु. वि. जोशी	बे.
२०	श्री. रं. जोशी	वै.आद्य
२१	सु. कृ. जोशी	हु.
२२	व्यं. ना. जोशी	,,
२४	पां. भ. कालेकर	वै.नाटोलीकर
२५	श. शां. कट्टीमठ	हु.
२७	गुं. कुलकर्णी	वै.कुलकर्णी

नं.	नांव	संस्था/गुरु
२८	श्री. अ. कुमासी	हु.
३३	क. शि. नाशी	वै.मरुलाराध्यशास्त्री
३५	पी. श्री. भट्ट	हु.
३६	पुं. शं. पै	,,
३७	स. शं. पै	,,
३८	चं. बा. पाटील	वै.नाटोलीकर
३९	दे. बा. पाटील	,,
४१	इ. बा. पाटील	,,
४२	शं. गुं. फडके	वै.फडके
४३	रा. धों. पोतदार	वै.नाटोलीकर
४५	व. रा. रायर	हु.
४६	रा. रा. रायी	,,
४९	रा. ग. शानभाग	,,
५२	सुमति ना. वाटवे	वै.वाटवे

मुंबई केंद्र

५३	सुनंदा के. आगाशे	नासिक
५५	बेबी श्री. भांसुशाली	पुनर्वसु मुं.

नंबर	नांव	संस्था/गुरु
५६	प्र. ह. भाटे	वै. गणेशशास्त्री जोशी
५८	द. शां. देशपांडे	नासिक
५९	प्रमिला त्र्यं. देशपांडे	पुणें
६०	शकुंतला दि. देवल	शीव मुं.
६१	द. ना. दीक्षित	,,
६२	पुं. गो. धाईतडक	शीव मुं.
६४	गो. का. गोखले	वै. ऐनापुरे
६५	प्र. वा. गोवंडे	पुणे
६६	सुशिला वि. हांडे	शीव मुं.
६७	श्रीकर द. जळूकर	वै. गणेशशास्त्री जोशी
६८	विद्या श्रीनिवास जळूकर	नासिक
७०	चं. ग. जोशी	वै. गणेशशास्त्री जोशी
७२	न. पु. जोशी	नासिक
७३	र. रा. जोशी	वै. बागेवाडीकर सो.
७४	शालिनी शि. जोशी	नासिक
७५	उमा चं. जोशी	वै. गणेशशास्त्री जोशी
७६	व. कृ. जोशी	शीव,मुं.
७७	स. दि. कामत	,,
८०	मंगला रा. कुलकर्णी	नाशिक
८३	न. पा. खत्री	पुनर्वसु मुं.
८४	कुमुदिनी ग. लोखंडे	नासिक
८७	सी. मो. मिश्रा	पुनर्वसु,मुं.
८९	मा. भी. नथ्थानी	,,
९०	अ. म. ओझा	,,
९१	रु. ज. ओझा	,,
९२	शे. ग. पै	वै.देशपांडे
९४	भि. के. पाध्ये गुर्जर	वै.पाध्ये गुर्जर
९५	किशोरी ज. परब	शीव,मुं.
९८	पु. दे. पाटील	पुणे
९९	विमल ह. पटवर्धन	शीव,मुं.
१००	ग. गं. पेंढारकर	वै.देशपांडे
१०१	रा. शं. राव	वै. ब्रम्हदत्तशर्मा मु.
१०२	कौसल्या ठा. रारा	पुनर्वसु मुं.
१०४	मा. द. साने	शीव मुं.
१०५	दि. स. सप्रे	,,
१०९	अ. ह. शर्मा	पुनर्वसु मुं.
११२	ना. वा. शेजवलकर	शीव मुं.
११३	शांता बा. शिंदे	,, ,,
११७	र. ति. त्रिपाठी	पुनर्वसु मुं.
१२३	श्री. रा. उदगिरी	वै. बागेवाडीकर सो.
१२४	वासंती का. झारापकर	शीव मुं.
१२५	शं. ल. झेमसे	शीव मुं.

सुरत केंद्र

नंबर	नांव	संस्था/गुरु
१२९	अ. तु. दवे	वै.मगनलाल जी.
१३०	बृ. सा. गोस्वामी	वै.मंगलेश्वर सो.
१३१	प्र. दा. लळित	वै. के.सी.बारोट
१३२	बा. रे. पंड्या	वै.मगनलाल जी.
१४०	र. अ. व्यास	वै.मगनलाल जी.

पं. वेणीमाधवशास्त्री यांचें भाषण

यवतमाळ नगर वैद्य मंडळातर्फे ता. ११-१०-५५ रोजीं नगरभवनांत नागपूर विद्यापीठांतील आयुर्वेद विभागाचे प्रवाचक आचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखालीं धन्वतरी उत्सव साजरा झाला. या मंडळाचे अध्यक्ष वै. सत्यप्रिय लचके व मंत्री वैद्य पद्मावार व पुट्टेवार हे आहेत.

पं. शिवशर्मा यांचा खुलासा

पं. शिवशर्मा यांच्या कार्यपद्धतीमुळें आयुर्वेदाची व आयुर्वेद महासंमेलन या संस्थेची फार हानि झाली आहे अशा अर्थाचे लेख गेल्या कांहीं महिन्यांत १।२ नियतकालिकांत आले आहेत. “ त्या लेखांना उत्तर देण्याची आपली इच्छा नाहीं. त्यापेक्षां पुष्कळ महत्त्वाचीं कार्यें आपल्यापुढें आहेत. लोकांनीं अंगावर चिखल फेकला तर आपण कपडे धोब्याकडे देतो त्याप्रमाणें मी याबाबतचा फैसला वकिलामार्फत न्यायालयांत करण्याचें ठरविलें आहे व ते लेख ॲडव्होकेटच्या स्वाधीन केले आहेत. ” असा खुलासा एक पत्रक काढून पं. शिवशर्म्मा यांनीं केला आहे.

(पान नं. ३२६ वरून पुढें चालू)

ा ठराव भुसावळ संमेलनांत झाला आहे. नुसार बँकेला लागणाऱ्या ठराविक भाषेंत तो व मंजूर करण्यांत आला. स्थायी मंत्र्यांनीं खातें डण्याची पुढील व्यवस्था करावी असें ठरलें.

संयुक्त महाराष्ट्रास पाठिंबा

६] नासिक संमेलनापासून आजपर्यंत मंडळानें पली भौगोलिक मर्यादा नागपूर, मुंबई, मराठवाडा सह बेळगांव व कारवार येथपर्यंत निश्चित केलेली हे. त्यामुळें संयुक्त महाराष्ट्राचे प्रश्नावर निराळें त देण्याची जरूर नाहीं. मंडळाचें मत प्रत्यक्ष तीनेंच अनुकूल असल्याचें सिद्ध झालें आहे.

प्रांतिय सरकारचें अभिनंदन

७) निरनिराळया संशोधन व चौकशी कमिटी- त्याचप्रमाणें बोर्ड व फॅकल्टी ह्याकरितां प्रांतांतील यांची सरकारनें नेमणूक केली त्याबद्दल अभिनंदनपर पाठविण्याचा अधिकार अध्यक्षांना देण्यांत आला.

८) आयुर्वेदपात्रिकेकडून आलेलें मदतीचें णीपत्र वाचण्यांत आलें. त्यावर थोडी चर्चा ऊन चालू वर्षापुरते रु. ३०० देण्याचें ठरलें.

प्रवासखर्चास मंजुरी

९) अध्यक्ष व मंत्री, कार्यकारिणीच्या अगर यी सामितीच्या सभेकरितां आपलें गांव सोडून य ठिकाणीं जातील त्यावेळीं त्यांना भाडेखर्च यांत यावा, या गोष्टीस सभा मंजुरी देत आहे.

गैरसमज पसरविणारा मजकूर

एका जबाबदार वैद्यकीय मासिकांत कांहीं यांचे बाबतींत विपर्यस्त व गैरसमज करणारा मजकूर सिद्ध झाला आहे, त्याकडे एका सभासदानीं मंचे लक्ष वेधलें. त्या आरोपाविषयीं श्री. वामनराव नाथ वैद्य यांनीं स्पष्टीकरण करून त्या आरोपांचें न केलें. अध्यक्षांनीं आपले समारोपाचे भाषणांतहि चा स्पष्ट शब्दांत निषेध केला.

म. प्रां. वैद्यमंडळाचे संरक्षक सभासद

स्थायी सामितीचे सदस्य श्री. रामभाऊ भोगे

अनुक्रमणिका

पं. नेहरूंचा कर्मयोगी जीवनक्रम २९७
चहा गुणविशेष–विमर्श २९९
बहिऱ्यांसाठीं उपयुक्त कर्णयंत्रें ३०३
असाणा भरड व मधुमेह ३०५
हैद्राबाद राज्याचें अंदाजपत्रक ३०६
अपस्माराचे दोन रुग्ण ३०७
शास्त्रशुद्ध पंचकर्मासाठीं आवश्यक गोष्टी ३१०
कूटप्रश्न–पपई व सिताफळ ३११
Replies to the Questionnaire of Dave Committee, Rajkot 315
गोमय—स्वरस ३१९
महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाची सभा ३२३

संपादक आरोग्यमित्र हे ५१ रु. देऊन प्रां. मंडळाचे संरक्षक सभासद झाले, त्याचा सभेनें सहर्ष व साभार स्वीकार केला.

महाराष्ट्र आयुर्वेद वि. संस्थेचे आभार

अध्यक्षांनीं समारोपाचें भाषण केलें व इतका वेळ सर्व सभासदांनीं उत्साहानें आणि हंसत खेळत भाग घेऊन सभा रात्रौ एक वाजेपर्यंत चालविली ह्याबद्दल सर्व सभासदांचें त्यांनीं कौतुक केलें. सभेसाठीं आयुर्वेद विद्यालयाची जागा दिल्याबद्दल मंत्र्यांनीं संस्थेचे आभार मानले. श्री.ना.ह.जोशी यांनीं अध्यक्षांसह सर्व उपास्थितांचे आभार मानल्यावर सभेचें काम संपलें. अशा रीतीनें रात्रौ सव्वानऊ वाजतां सुरू झालेली ही सभा रात्रौ एक वाजतां संपली.

माधवशास्त्री जोशी
मंत्री म. प्रां. वैद्यमंडळ

आयुर्वेद सेवा मंडळ, भुसावळ

या मंडळातर्फे ता.१० फैजपूर, ता१२ भुसावळ व ता. १३ नाशिराबाद येथें श्रीधन्वन्तरी उत्सव साजरा करण्यांत आला. यानिमित्त अनुक्रमें आयुर्वेदाचार्य शिवनाथशास्त्री ब्ऱ्हाणपूर, वै. का.सी. भावे व वै. य.प्र. उपासनी यांचीं कानांचें आरोग्य आमवात या विषयावर व्याख्यानें ठेवण्यांत आलीं होतीं.

आदर्शवत् कार्य-पद्धति

“ आयुर्वेद सेवा संघ या संस्थेनें चालविलेल्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयास, आयुर्वेदीय आरोग्यशालेस व औषधी भवनास वेळोवेळीं भेटी दिल्या. तेथील कार्यक्षमता व तत्परता पाहून अत्यंत समाधान झालें. या संस्थेचा चालकवर्ग निष्णात असून संस्थेचें कार्य अत्यंत आदर्शवत् पद्धतीनें चालू आहे. या बहुमोल कार्यास यच्चयावत् लोकांनीं सक्रीय मदत देऊन सहानुभूति दर्शवावयास हवी आहे.

अत्यंत भूषणास्पद गोष्ट

कष्टसाध्य अशा रोगांवर येथें उपचार करण्यांत आले आहेत व त्यांत संस्थेला सुयश प्राप्त झालें आहे, ही गोष्ट भूषणावह आहे. अशा उच्चतम संस्थेची सदैव भरभराट होवो व जनतेकडून उत्तरोत्तर सक्रीय सहानुभूति मिळो ही शुभेच्छा ! ”

नासिक
३०।१०।५५

(सही) ब. म. पठाण
मामलेदार, नासिक

अस्थिधातुक्षय कसा भरून काढावा ?

हा प्रश्न चिकित्सेंत अनेक वेळा वैद्य-डॉक्टरासमोर उभा राहतो. त्यासाठीं नाना प्रकारचे खनिज व प्राणिज सुधाकल्प वापरण्यांत येतात. खनिजकल्प हे मनुष्याला दूरचे पडतात व शंख-शौक्तिक हे जलस्थित प्राण्याचे अस्थि असल्यामुळें पित्तदोषशामक शीत असतात. मनुष्यशरीराशीं समान गुणात्मक धातु असलेला प्राणि अज [बकरा-शेळी] हा आहे. सबब मानवी अस्थिधातु बळवान् करण्यासाठीं आपण

.... अजास्थिभस्म ....

वापरावें व विविध प्रकारचे क्षयरोग, हाड्यात्रण, अस्थिक्षय, उरःक्षत, कफप्रधान राजयक्ष्मा व अन्य कफप्रधान व्याधींची चिकित्सा करावी हेंच उचित होईल. शरीर या यंत्राचा अस्थि हा मुख्य आधारभूत घटक आहे. रोग कोणताहि असो हा घटक बळकट ठेवणें आपलें कर्तव्य आहे. किंमत ३ तोळा, टपाल खर्च निराळा.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

संपादक व प्रकाशक — वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य बिवलकर कारंजा, नाशिक
मुद्रक—श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, आग्रारोड, नाशिक

आयुर्वेद सेवा संघाचे प

आयुर्वेद पत्रिका।

ार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

(दरमहा ता. १ व १६ रोजी प्रसिद्ध होते.)

र्ष ९ वें) नासिक, ता. १ डिसेंबर १९५५ (अंक ११ वा

आयुर्वेदानें आजवर

मानवतेची अपार सेवा केली आहे !

" आज आपल्या देशांत आयुर्वेदाला जी विपरीत स्थिति प्राप्त झाली आहे तिजकडे पाहून े मनाला प्रसन्नता वाटत नाहीं. ज्ञानाच्या क्षेत्रांत अनेक वर्षांच्या परीक्षणानंतरहि यशस्वी ठरलेल्या आयुर्वेदान्यतिरिक्त दुसरा कोणताहि विषय मला असा दिसत नाहीं कीं ज्याला, केवळ परकीय ज्यशासनामुळें, अनेक आपत्ति भोगाव्या लागल्या.



पाश्चात्य चिकित्सा-विज्ञानाच्या अभ्यासकांनीं ायुर्वेदाकडे पाहाण्याची जी विरोधी दृष्टि ठेवली आहे त्यामुळें ामच्या मूल्यांत इतकें परिवर्तन झालें आहे कीं, आज रतांत आयुर्वेदासंबंधीं असलेल्या सर्व मान्यता अस्त-व्यस्त ल्या आहेत.

आयुर्वेद म्हणजे एक ढोंग आहे ह्या म्हणण्यांत ांहीहि यथार्थता नाहीं. त्याचप्रमाणें हेंहि म्हणणें यथार्थ ाहीं कीं, आज आयुर्वेद ज्या विपरीत स्थितीमध्यें आहे तशाच रीत परिस्थितीमध्यें पाश्चात्य शल्यचिकित्सा व विज्ञान चिकित्सा ही प्रगति करू शकली.

आज भारतांत ५०,००० पेक्षां कमी ॲलोपाथिक चिकित्सक आहेत; तर शहरें व खेडीं यांमधून सुमारें १,८६,००० इतके आयुर्वेदीय चिकित्सक आहेत. ेक अडीअडचणी व आपत्ति आल्या असतांहि आयुर्वेद आज जिवंत आहे ह्याचें कारण ायुर्वेदानें आजवर मानवतेची अपरंपार सेवा केली आहे.

मला आशा आहे कीं, आयुर्वेदाच्या भावी विकासयोजना तयार करतांना वरील सर्व गोष्टी ात घेण्याची दक्षता ठेविली जाईल."

चित्र आयुर्वेद

के. एम. मुनशी राज्यपाल- उत्तरप्रदेश

भारत सेवक समाजाचीं बाऱ्हे पेठ येथील विद्यार्थी-शिबिरें

भारत सेवक समाज शिबिरं समिती (दिल्ली) च्या नाशिक शाखेतर्फे बाऱ्हे, पेठ व भिलवड या जंगली भागांत ता. २८ आक्टोबरपासून ११नोव्हेंबरपर्यंत ३शिबिरें भरविण्यांत आलीं होतीं. त्यापैकीं बाऱ्हे शिबिरांत ता. ३ व ४ नोव्हेंबर रोजीं वै. बिंदुमाधव पंडित यांनीं निरोगी लोकांनीं 'स्वास्थ्य–संवर्धनासाठीं पाळावयाचे आहाराचार' या विषयावर व्याख्यान दिलें व प्रश्नोत्तर-रूपानें चर्चा केली. या शिबिरांत एका शेतकी-शाळेचें बांधकाम श्रमदानानें करण्यांत आलें. जीवनाला श्रमांची आवश्यकता [खनेत् वा सलिलाशयान्] व ते करतांना पाळावयाचे नियम (अर्धशक्त्या निषेव्यः इ०), हीन–मिथ्या–अति-व्यायामाचे दुष्परिणाम इ० माहिती देण्यांत आली. वैद्य पंडित यांनींहि श्रमदानांत भाग घेतला.



पेठ येथें मुलींचें शिबिर भरलें होतें. तेथें ता. ५ रोजीं रात्रौ ९ ते १०॥ वै. पंडित यांचें व्याख्यान झालें. विद्यार्थिनी व अध्यापिका यांनीं विचारलेल्या प्रश्नांना उत्तरें देण्यांत आलीं. ता. ६ नोव्हेंबर रोजीं पेठच्या जंगलांत रेंजर श्री. मार्कंडेय यांच्यासह सर्वांनीं वनस्पतींची माहिती घेतली. या जंगलांत भूतकेशी, आवळा, असाणा, बिबळा, काळा कुडा, साग, गेळफळ इ० झाडें मोठ्या प्रमाणांत आढळलीं.

आवळी भोजनाचा आयुर्वेदीय अर्थ

सोबतच्या चित्रांत मुलीं आवळीच्या झाडाखालीं जमल्या आहेत. या निमित्तानें त्यांना आवळी-भोजन म्हणजे कांहीं दिवस रोज एकवेळ नुसता आमलकी कल्प खावयाचा, व दुसऱ्या वेळीं दूधभात जेवावयाचा, हा आयुर्वेदीय अर्थ समजावून सांगण्यांत आला. इतर वनस्पतींचा परिचय व गुणधर्मांची माहिती देण्यांत आली. यामुळें शिक्षक व विद्यार्थिनींमध्यें आयुर्वेदीय उपचारपद्धतीसंबंधीं श्रद्धा उत्पन्न झाली. अशा प्रकारें ठिकठिकाणीं नव्या पिढीमध्यें प्रत्यक्षपूर्वक आयुर्वेदासंबंधीं प्रचार होणें अवश्य आहे.

मध्यप्रदेश आयुर्वेद बोर्ड, नागपूर

आक्टोबर परीक्षेचा निकाल

मध्यप्रदेश आयुर्वेद बोर्डानें ऑक्टोबर १९५५ मध्यें घेतलेल्या पूरक परीक्षेंत आयुर्वेद महाविद्यालय अमरावती, येथील खालील विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

प्रथम वर्ष - उत्तीर्ण

१) वि. की. काळे २) प्र. स. वर्मा ३) प्र. वि. लोखंडे ४) सु. रा. शेगांवकर ५) व. रा. हंबर्डीकर ६) चं. द. वैद्य ७) य. बा. वैद्य. ८) दा. स. पानगोळे ९) सो. सं. पिंपरकर १०) म. दु. माधानकर ११) रा. शं. पाटील १२) यो गो. हांडे १३) म. ग. माहाकाळ १४) शं. म. कडीले १५) भा. त्र्. पाटील १६) गो. रा. नावडे १७) ह. उ. खडे.

प्रथम वर्ष [ॲनाटमी या विषयांत कंपार्टमेंट]

१) मु. वा. जोशी २) वि. गु. डाहाके ३) न. गु. गढेकर ४) मा. अ. पाटील.

(पान ३६५ पहा)

शुध्द आयुर्वेद अभ्यासक्रमांतील वनस्पतींचीं लॅटिन नांवें–

लखकः–श्री. चंद्रशेखर गणेश जोशी
एम्.एस्सी., पुणें २

शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीचे अभ्यासक्रमांत 'वनस्पतिपरिचय' या विषयांत समाविष्ट असलेल्याच वनस्पतींची यादी खालीं दिली आहे. सर्वच्या सर्व वनस्पति सर्वांना ओळखूं येतील असें नाहीं, यासाठीं त्या वनस्पतींची लॅटिन नांवें पुढें दिलेलीं आहेत. तीं आपणांस योग्य वाटल्यास पत्रिकेंत प्रसिद्ध करावीं. हेतु असा कीं शेवटीं दिलेल्या संदर्भ ग्रंथावरून त्या वनस्पतींचें सर्व प्रकारचें बाह्य वर्णन व चित्र मिळूं शकतें. व त्या वनस्पतींची निश्चिति करणें सहज सुलभ होतें. (यापैकीं अगदीं थोड्या उदाहरणांत वनस्पति-बद्दल व लॅटिन नांवाबाबत कांहींचा मतभेद होणें शक्य आहे.)

वनस्पतीचा प्रकार— (वेल, क्षुप, झाड, उंची, पसारा,) वनस्पतीच्या पानांचा आकार, पानें फुटण्याचा प्रकार, त्या त्या वनस्पतींचा देश, हंगाम, फुलें, फळें यावरून व विशेषतः फुलाचें वर्णन, फुलांच्या पाकळ्या, स्त्री--केसर, पुं-केसर यांची रचना (प्रत्येक वनस्पतिजातीची विशेष रचना असते) ह्यावरून वनस्पति ओळखतां येऊन त्याचा वनस्पति–परिचयास उपयोग होतो.

वनस्पतींच्या अवयवांचे उभे आडवे छेद घेऊन सूक्ष्मदर्शक यंत्राचे साहाय्यानें पाहणें, कांहीं विशिष्ट रासायनिक परीक्षा, व वनस्पतींचे जिभेला समजणारे रस देखील वनस्पतिपरिचयास साहाय्यभूत होतात. अशाप्रकारें निदान या वनस्पतींपुरतें बाह्य वर्णन (Morphological description) त्या वनस्पतींचें चित्रांसह उपलब्ध झालें तरी आयुर्वेदाच्या अभ्यासकांस तें खासच महत्वाचें व उपयोगी होईल.

१) अजमोदा	Apium involucrata
२) अगरू	Aquillaria agalochum
३) अग्निमंथ	Premna integrifolia
४) अतिबला	Ebutilon indica
५) अतिविष	Aconitum heterophyllum
६) अपामार्ग	Achyranthus aspera
७) अर्क	Calotropis gigentia
८) अर्जुन	Terminalia arjuna
९) अशोक	Polyalthea regia
१०) अश्मंतक	Bauhinia variegata
११) अश्वगंधा	Physalis somnifora
१२) अहिफेन	Papaver somnifera
१३) आमलकी	Phyllanthus embelica
१४) आरग्वध	Cassia fistula
१५) आर्द्रक	Zingiber officinale
१६) इक्षु	Saccharum officinarum
१७) उदुंबर	Ficus glomerata
१८) इंद्रवारुणी	Cucumis colocynthis
१९) उशीर	Andropogon muricatus
२०) एरंड	Ricinus communis
२१) कंटकारी	Solanum xanthocarpum
२२) कपिकच्छु	Mucuna pruriens
२३) कदली	Musa paradisica
२४) कट्फल	Myrica sapida
२५) कमल	Nelumbium Speciosum
२६) कंपिल्ल	Mallotus phillipinensis
२७) करंज	Pongamia glabra
२८) कर्कटश्रृंगी	Rhus succeedanens
२९) कोशातकी	Luffa amara
३०) कांचनार	Bauhinia recemosa
३१) कालमेघ	Ophelia angustifolia
३२) काश्मरी	Gmelina arborea
३३) कासमर्द	Cassia occidentalis
३४) कुंकुम	Crocus Sativus
३५) किराततिक्त	Andrographis paniculata
३६) कुटकी	Picrorrhiza kurroo
३७) कुटज	Hollarena antidysenterica
३८) कुमारी	Aloe vera

३९)	कूष्मांड	Benicasia cerifera
४०)	कोकिलाक्ष	Astercantha longifolia
४१)	कृष्णसारिवा	Hemidesmus indica
४२)	खदिर	Acacia catechu
४३)	गांगेरुकी	Zizyphus rugosa
४४)	गुग्गुल	Boswellia thurifera
४५)	गुडूचि	Tinospora cordifolia
४६)	गोक्षुर	Tribulus terrestris
४७)	चंदन	Santalum flavum
४८)	चंद्रशूर	Lepidium sativum
४९)	चौलमोग्रा	Hydnocarpus wightiana
५०)	चित्रक [रक्त]	Plumbago rosea
	„ (श्वेत)	„ Zeylancia
५१)	जटामांसी	Valeriana jatamansi
५२)	जम्बू	Eugenia jambolana
५३)	जयपाल	Croton tiglium
५४)	जातीफल	Myristica fragrans
५५)	ज्योतिष्मति	Cardiospermum helicacabum
५६)	तिल	Sesamum indicum
५७)	तालीसपत्र	Taxas bacata
५८)	तुलसी	Ocimum sanctum
५९)	तुवरक	Anacardium occilentale
६०)	त्रिवृत्	Ipomea turpethem
६१)	त्वक्	Cinnamomum sps.
६२)	दंती	Croton polyandra
६३)	दाडिम	Punica granatum
६४)	दारुहरिद्रा	Berberis lycia
६५)	देवदार	Pinus deodora
६६)	द्राक्ष	Vitis vinifera
६७)	दूर्वा	Cynodon dactylon
६८)	धत्तूर	Datura stramonium
६९)	धन्वयास	Alhagi maurorum
७०)	धातकी	Woodfordia floribunda
७१)	धान्यक	Coriandrum sativum
७२)	धामार्गव	Luffa acutangula
७३)	नागकेशर	Gloriosa superba
७४)	नाडिहिंगु	Gardenia gummifera
७५)	नागबला	Sida carpinifolia
७६)	नागवल्ली	Piper betle
७७)	निंब	azedirachta
७८)	निंबू	Citrus speciosum
७९)	निर्गुंडी	Vitex nirgunditrifolia
८०)	पटोल	Trichosanthes dioica
८१)	पर्पट	Fumaria parviflora
८२)	पलांडु	Allium sepa
८३)	पलाश	Butea frondosa
८४)	पाटला	Bignonia suaveolens
८५)	पाठा	Cissampelos pariera
८६)	पारसीकयवानी	Nigella sativa
८७)	पारिजातक	Nyctanthes arbortristis
८८)	पिप्पली	Piper longum
८९)	पाषाणभेद	Saxifraga ligulata
९०)	पुनर्नवा	Boerhavia diffusa
९१)	पूतिकरंज	Caesalpinia bonducella
९२)	पृश्निपर्णी	Uraria picata
९३)	प्लक्ष	Thespasia populnea
९४)	बकुल	Mimasops elengi
९५)	बला [चिकणा]	Sida cordifolia
९६)	वाकुची	Psoralea corrglifolia
९७)	विभीतक	Terminalia bellerica
९८)	विल्व	Ægle marmelos
९९)	बोळ [हिरावोळ]	Balsmodendron myrrha
१००)	बृहती	Solanum melongena
१०१)	ब्राह्मी	Hydrocotyl asiatica
१०२)	भंगा	Cannabis indica
१०३)	भल्लातक	Semicarpus anacardium
१०४)	भारंगी	Clerodendron ceratum
१०५)	भूम्यालकी	Phyllanthus urinaria
१०६)	मंजिष्ठा	Rubia cordifolia
१०७)	मदन	Randia dumetorum
१०८)	मधूक	Bassia latifolia
१०९)	मरीच	Piper nigrum
११०)	महाबला	Sida rhombifolia
१११)	महानिंब	Melia azedarach

११२) मातुलुंग	Citrus medica
११३) मिश्रेया	Pimpenella anisum
११४) मुंडी	Speranthus mollis
११५) मुसली	Asparagus ascendens
११६) मुस्ता	Cyperus rotundus
११७) मूर्वा	Clematis triloba
११८) मेथिका	Trigonella foenum groecum
११९) यवानी	Carum Copticum
१२०) याष्टिमधु	Glycyrrhiza glabra
१२१) रसोन	Allium Sativum
१२२) रोहितक	Amoora rohitaka
१२३) रोहिष	Andropogon schoenanthus
१२४) लज्जालु	Mimosa pudica
१२५) लवंग	Caryphyllus
१२६) लोध्र	Hoped odorata
१२७) वचा	Acorus calamus
१२८) वट	Ficus indica
१२९) वत्सनाभ	Aconitum napellus
१३०) वंश	Bambusa arundinacea
१३१) वासा	Adatoda vasaka
१३२) वाराही	Tacea aspera
१३३) विडंग	Embelia ribes
१३४) विषतिंदुक	Strychnos nux-vomica
१३५) विदारी	Hedysarum tuberosum
१३६) सप्तचक्रा	Cassiaria esculanta
१३७) सप्तपर्णा	Alstonia scholaris
१३८) सर्पगंधा	Rauwolfia serpentina
१३९] सारिवा	Hemidesmus indica
१४०] सताप	Ruta graveolens
१४१] सुरण	Amorphophallus canpanulatus
१४२] स्नुही	Euphorbia tirucalli
१४३] स्वर्णक्षीरी	Argemone mexicana
१४४] शंखपुष्पी	Conscora decussata
१४५] शरपुंखा	Tephrosia purpurea
१४६) शालिपर्णी	Desmodium gangetium
१४७] शाल्मली	Bombax malabaricum
१४८] शिंशपा	Dalbergia sisov
१४९] शुंठी	Zingiber officinale
१५०] शोभांजन	Moringa pterygosperma
१५१] श्योनाक	Oroxylum indicum
१५२] श्वेतजीरक	Cuminum cyminum
१५३] श्वेतमुसली	Apsaragus sps.
१५४] हरिद्रा	Cucurma longa
१५५] हरितकी	Terminalia chebula
१५६] हिंगु	Narthex assefoetida
१५७] हैमवतविचा	
१५८] हिज्जल	Barringtonia acutangula

संदर्भ ग्रंथ

[i] Indian Medicinal Plants., Vo I & II by Kirtikar & Basu B. D.

[ii] Cook's flora.

[iii] Indigeneous Drugs of India by Chopra R. N.

भारतवर्षीय वनौषधिसंग्रह, [इ. स. १८८६] Edited by Mantri P. G.

एक उपयुक्त प्राणिज सुधा-कल्प

कुक्कुटाण्डत्वक् भस्म

स्त्रियांच्या विकारावर, रक्तप्रदर, श्वेतप्रदर, बहुमूत्र व सोमरोग यावर, गुणकारी आहे. स्त्रियांनीं बाळंतपणानंतर याचें सेवन अवश्य करावें. प्रकृति पुनः सुदृढ, स्वरूपवान् व कुमारीप्रमाणें बळवान् बनते.

अनुपान व मात्रा—१ ते २ गुंजा हें भस्म लोणीखडीसाखर दूध, मलई, च्यवनप्राश, डाळिंबाचा रस यापैकीं एकाद्या अनुपानाबरोबर द्यावें.

आयुर्वेद औषधी भवन, नासिक

आयुर्वेदीय कॉलेज, डेहराडून

आयुर्वेदीय विज्ञानक्षेत्रांतील संशोधन, शिक्षण, रुग्णालय, औषधीनिर्मिति–संस्था, आरोग्यधाम, वनस्पति उद्यान, उत्तम हवापाणी इत्यादि समुचित अनुकूल कारणांमुळें अखिल भारतांत डेहराडून हें एकच अनुकूल स्थान असल्यामुळें सन १९४३ मध्यें येथें 'आयुर्वेद सेवा सदन' डेहराडून, या संस्थेची स्थापना केली गेली. या संस्थेद्वारा 'आयुर्डीन' ह्या महोषधीचें संशोधन केलें गेलें. यांस लागणारीं ७ घटक द्रव्यें ५० मैलाच्या आसमंतांत भारतांत कोठेंहि विपुल प्रमाणांत व सहजरीत्या मिळूं शकतात. सध्यां या संस्थेतर्फे दुष्टव्रणावर [Cancer] चिकित्सा–संशोधन चालूं असून त्यांत बऱ्याच अंशानें यश प्राप्त झालें आहे.

ह्या संस्थेच्या विद्यमानें आयुर्वेदाचें उच्चतम शिक्षण देण्यासाठीं सन १९४७ मध्यें डेहराडून येथें आयुर्वेदिक कॉलेजची स्थापना करण्यांत आली. ह्या कॉलेजची देशव्यापी उपयुक्तता लक्षांत घेऊन येथील म्युनिसिपल बोर्डानें हें कॉलेज आपल्या नियंत्रणाखालीं घेतलें आहे व तें मेडिकल कॉलेजच्या समान धर्तीवर चालविण्याचें त्यांनीं मान्य केलें आहे. वरील गोष्टीस सरकारची मान्यता मिळतांच म्यु. बोर्ड आपल्या कार्यास सुरुवात करील. दिनांक २९।१०।५५ रोजीं उत्तर-प्रदेशचे माननीय स्वास्थ्य--मंत्री यांचें आगमन डेहराडून येथें झालें असतां येथील प्रतिष्ठित नागरिकांनीं आयुर्वेदिक कॉलेजच्या कार्याला सत्वर मान्यता मिळावी व त्यास आर्थिक साहाय्य मिळावें म्हणून एक स्मृतिपत्र माननीय स्वास्थ्य-मंत्री यांना सादर केलें आहे.

४० वर्षांवरील **अनुभव** आणि सर्व देशभर पसरलेल्या नऊ वैद्यकीय प्रयोग शाळांतील वैद्यक शास्त्रीय पंडितांचें कार्य ह्या जम्मींच्या कीर्तीचा पाया होय.

* जम्मीचा आंकडेवारी-दर्शक रिपोर्ट मागवा



जम्मीचें लिव्हरक्युअर दरवर्षी हजारों मुलांचें यकृताच्या विकृतिपासून संरक्षण करून त्यांना पुनः आरोग्य प्राप्ति करून देतें.

आतां सोयीस्कर आकाराच्या वड्या मिळतात

जम्मी वेंकटरमणय्या अँन्ड सन्स

"जम्मी बिल्डिंग", मयलापूर, मद्रास ४ मुंबई शाखाः 'पारेख मॅन्शन', सॅन्डहर्स्ट रोड (पश्चिम)

धन्वन्तरी महोत्सव

.... फैजपूर, भुसावळ व नशिराबाद येथील व्याख्यानें ....

भुसावळ येथील आयुर्वेद सेवामंडळ ह्या संस्थेनें या वर्षीं श्रीधन्वन्तरी महोत्सव आपल्या निरनिराळ्या ३ विभागांचे गांवीं निरनिराळ्या दिवशीं साजरा करून एक अभिनव उपक्रम केला. सेवामंडळाचे हे ३ विभाग म्हणजे (१) फैजपूर येथील कविराज का. सी. भावे भिषगाचार्य-धन्वन्तरी, यांचे नेतृत्वाखालीं चालविलेलें अल्पमूल्यात्मक प्रायोगिक आयुर्वेदीय औषधालय. दुसरा विभाग वाङ्मयीन कार्यालयाचा होय. सेवामंडळामार्फत प्रसिद्ध होणारें सर्व प्रकारचें वाङ्मयकार्य नशिराबाद येथें सेवामंडळाचे मंत्री वै. दत्तात्रयशास्त्री जळूकर यांचे नेतृत्वाखालीं प्रसिद्ध होत असतें. तिसरा विभाग म्हणजे सेवामंडळाचे प्रधान कार्यालय, व त्याचे तंत्रानें चालूं असलेलें 'नवशक्ति आयुर्वेदालय लि. भुसावळ' या नांवाचें औषधि–निर्माण भवन होय. आयुर्वेदाचार्य ब्रह्मदत्त शर्माशास्त्री हे त्या विभागाचे अधिपति होत. अशा ह्या तीनहि ठिकाणीं या वर्षीं साजरा झालेल्या धन्वन्तरी महोत्सवाचें इतिवृत्त सारांशरूपानें देत आहों.

अल्पमूल्य प्रायोगिक दवाखाना

फैजपूर येथें दि. १० नोव्हेंबर १९५५ गुरुवारीं वै. ब्रह्मदत्त शर्मा आयुर्वेदाचार्य यांचे अध्यक्षतेखालीं ह्या उत्सवास प्रारंभ झाला. कविराज भावेजी यांच्या 'विश्वास औषधालयांत' दुपारीं ३ वाजतां प्रारंभीं श्रीधन्वन्तरी–पूजन, आरती व प्रसादवितरण झालें. नंतर कविराज भावेजींनीं ह्या उत्सवाचें वैशिष्ट्य सांगितलें. या प्रायोगिक औषधालयांत मोठ्या व्यक्तींना रोजीं ४ आणे व लहानांस रोजीं २ आणे मोबदल्यांत औषधें दिलीं जातात. गेल्या ४/५ वर्षांत हा उपक्रम चांगला यशस्वी होत आहे. प्रत्यहीं ६०/७५ मध्यम व कनिष्ठ आर्थिक स्थितींतील कुटुंबांना ह्या चिकित्साकार्याचा लाभ होत असून आसपासचीं खेडींहि आतां या योजनेकडे आकर्षित होत आहेत.

रोगांची संख्या घटली कां ?

आजचे नियुक्त व्याख्याते बऱ्हाणपूरचे आयुर्वेदाचार्य-धन्वंतरी काव्यतीर्थ वैद्यराज शिवनाथशास्त्री सन्माननीय पहिल्या वर्गाचे मॅजिस्ट्रेट हे येऊं शकले नाहींत म्हणून वै. जळूकरशास्त्री हे त्यांच्या व्याख्यानाची उणीव भरून काढतील व त्यासाठीं आचार्य ब्रह्मदत्त शर्माजींनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी सूचना केल्यावर वै. जळूकरशास्त्री यांचें सुमारें पाऊण तास व्याख्यान झालें. व्याख्यात्यांनीं आपल्या भाषणांत १५० वर्षांपूर्वींच्या व आजच्या भारतीय प्रजेच्या आरोग्याचें चित्र श्रोत्यांसमोर रेखाटून इंग्रजांच्या सुधारलेल्या राजवटींत व संशोधनपर प्रगतिपथारूढ वैद्यकशास्त्राच्या प्रभावानें 'शतायुर्वै पुरुषः' ही म्हण सार्थ करणाऱ्या व्यक्तींचीं संख्या वाढत आहे कीं घटत आहे ? त्याचप्रमाणें कधीं काळीं वैद्याची पायरी चढण्याचे पूर्वींचे प्रसंग आज साध्या पडशा–खोकल्यासारख्या क्षुल्लक आजारांसाठीं कां येत आहेत ? आणि रोग तरी संख्येनें पूर्वींपेक्षां किती घटले ? आयुष्याची सरासरी इंग्रजांचें राज्य येण्यापूर्वीं होती ती तरी कायम राहिली काय ? व जर ह्या सर्व प्रश्नांस नकारात्मक उत्तरें असतील तर आज आम्ही ज्या पाश्चात्य वैद्यकांचे पोवाडे गातो त्यानें आमच्यावर उपकारच केले कीं अपकार, हा प्रश्न श्रोतृवर्गापुढें मांडला.

स्वास्थ्य–संरक्षण–गृहें काढावींत

उत्तरोत्तर डॉक्टर वैद्यांचे दवाखाने वाढत जाणें व आरोग्याची सोय अपुरी पडत आहे ही हांकाटी वाढत्या प्रमाणावर प्रतिवर्षीं चालू राहाणें आणि त्यासाठीं त्याच पाश्चात्य वैद्यकाच्या निरनिराळ्या

गोष्टीस प्रोत्साहन देण्यासाठीं कोट्यवधि भारतीय धन खर्च होत राहाणें कितपत सुसंगत आहे हाहि विचार पुढें मांडून, आतां रुग्णालयें वा विशिष्ट रोगांच्यीं चिकित्सालयें किंवा इस्पितळें सुरूं करण्या-पेक्षांहि आज भारताला ‘ स्वास्थ्य-संरक्षण-गृहां ’ची फार जरुरी आहे. येणाऱ्या प्रत्येक रोग्याला त्याच्या प्रकृतिमानानुसार परिस्थिति व काळास अनुसरून कोणत्या प्रकारचा आहार-विहार करणें इष्ट आहे ? व निरोग्यांनींहि तें आरोग्य टिकवण्यासाठीं काय करा-वयास हवें हा सल्ला देणारीं हीं गृहें जितकीं निघतील तितकीं हवीं आहेत. हें कार्य आयुर्वेदशास्त्राधारेंच अधिक चांगलें होणें शक्य आहे. वैद्यवर्गानेंहि यापुढें आपलेकडे येणारे प्रत्येक रोग्यावर केवळ रोगोपचार करून बरें करण्याचें ध्येय न ठेवतां, रोगच कसा होणार नाहीं हा मार्ग दाखवावा. निरनिराळ्या ऋतूंत वैद्यांच्या संघटित संस्थांनीं आरोग्य-सप्ताह पाळून घरोघर हिंडून व व्याख्यान-प्रवचन-द्वारा जनतेस स्वास्थ्यसंवर्धनाचें मार्गदर्शन करावें. सरकारनेंहि या कामीं आपला धनव्यय करण्याचें मनावर घेऊन अशा संस्थांना प्रोत्साहित करावें; तरच भारतीय आरोग्याचा प्रश्न समाधानकारकपणें सुटेल. ”

नैसर्गिक शक्ति कमी होत आहे

यानंतर यावल येथील ‘ रमाबाई देशपांडे सूतिकागृहा ’च्या चिकित्सक वै. श्रीमती देव यांनींहि वरील विधानास पुष्टि देणारें भाषण करून आपल्या-कडे येणाऱ्या स्त्री-रुग्णांचे अनुभव निवेदन केले. स्त्रियांची नैसर्गिक प्रतिकारशक्ति कमी होत असल्याचा निर्वाळा दिला, व चिकित्सकहि फक्त रोग बरे कर-ण्यापुरती योजना करतात, ती यापुढें, रोग होऊं नये यासाठींहि करावयास हवी असें आपलें मत दिलें. दुग्धपान होऊन कार्यक्रम समाप्त झाला.

वैद्य हे राजसत्तेचे कान आहेत

भुसावळः— दि. १२।११।५५ शनिवारीं आयुर्वेद सेवामंडळाच्या प्रधान कार्यालयांत श्रीधन्वं-तरी पूजन आरती व प्रसादवितरण झाल्यावर वै. ह. रा. बऱ्हाटे यांचे अध्यक्षतेखालीं वै. जळूकरशास्त्री यांचेंच व्याख्यान झालें. नियुक्त व्याख्याते कविराज भावे हे येऊं न शकल्यामुळें ‘ कानांचें आरोग्य ’ हा त्यांचा विषय वैद्य जळूकरशास्त्री यांनीं प्रतिपादन केला. वैद्य हे राजसत्तेचे कान आहेत. प्रजेचें आरोग्य-वृत्त शासनसंस्थेला यांच्या द्वारेंच यथार्थ कळणें शक्य असतें व म्हणूनच ‘ राजा राजगृहासन्ने प्राणाचार्यं निवेशयेत् ’ अशी शास्त्राज्ञा आहे असें सांगितलें. आजचा काळ या दृष्टीनें अनुकूल आला आहे. त्याचा फायदा शासनसंस्थेनें व वैद्यवर्गानेंहि घेऊन पोट दुखल्यावर ओवा देण्यापेक्षां पोट दुखणार नाहीं व ओवाहि द्यावा लागणार नाहीं, अशीं म्हणजेच जनता रोगीच होणार नाहीं अशीं आरोग्यालयें काढावीं व तसाच वैद्यकीय आदेशहि रुग्णांना देत जावा असें सांगितलें.

नस्य, कर्णपूरणाचें महत्त्व

वै. श्रीनिवास जळूकर यांनीं कानाचें म्हणजेच कर्णेंद्रियाचें आरोग्य या विषयावर माहितीपूर्ण भाषण

अरविंद आयुर्वेदिक इंजेक्शनांच्या
किंमती अतिशय कमी केल्या
ग्राहकांना विशेष सवलत

ता. १।३।१९५५ पासून नवीन नियम, लागूं. ‘सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन चिकित्सा या पुस्तकाची किंमत ३ रु. ऐवजीं १॥ रु. केली आहे. पोस्टेज १० आणे निराळें. पुस्तक व्ही. पी. नें पाठविलें जाणार नाहीं. २ रु. २ आणे म. ऑ. नें आगाऊ आल्यावर पुस्तक रजिस्टर्ड पोस्टानें पाठविलें जाईल.

पत्ता-अरविंद केमिकल वर्क्स
छिंदवाडा [म. प्र.]

, कर्णेंद्रियें हीं ध्वनिवाहक स्रोतसांचीं द्वारें होत. तसें हीं त्या त्या विषयाचें वहन करणारीं असतात; णि वहन करणें हें गतिकार्य आहे. आयुर्वेद- त्राप्रमाणें गति हें वायूचें कार्य असलेमुळें कर्ण- ासंबंधीं होणाऱ्या रोगांत प्रामुख्यानें वायूचा संबंध हे हें निश्चित. अर्थातच त्या इंद्रियाचें आरोग्य यम ठेवण्यासाठीं वायु स्वस्थावस्थेंत राहील, त्यांत ादि गुणांची वृद्धि होणार नाहीं, अशी योजना रंभापासूनच करावयास हवी. व त्या दृष्टीनें कानांत ल घालणें ही गोष्ट महत्त्वाची आहे. रोज डोकें, पाय कान ह्यांना तरी निदान तेल घातलें पाहिजे अशी ास्त्राची आज्ञा आहे. शिवाय कर्णेंद्रिय हें ऊर्ध्वजत्रु- त इंद्रिय आहे. आणि मस्तक हें ऊर्ध्वजत्रुगत इंद्रि- चें केंद्र आहे. या दृष्टीनें त्याचेंहि तर्पण करण्यासाठीं ज प्रातर्विधीनंतर नाकांत तेलाचे थेंब सोडणें फार ावश्यक आहे. शिवाय ऊर्ध्वजत्रुगत सर्वहि इंद्रियांची ातसें घशांत एकत्र होतात. त्यांच्या शुद्धिसाठीं ाय-तिक्त-रसाचे गंडूष म्हणजे त्या रसाच्या वन- तींचे पाण्याच्या गुळण्या करणें हितावह होतें. ाधी धूर सेवन करणेंहि तसेंच इष्ट आहे. या येक विधीबद्दल स्वतंत्र माहिती शास्त्रांत आहे. पण ेे फक्त त्याचा निर्देशच करतो. तज्ज्ञ वैद्यांचें ल्ल्यानें ह्या गोष्टी समजून घेऊन रोज करीत गेल्यास ानांचें आरोग्य सुरक्षित राहील हें निश्चित. ”

या समारंभास गांवांतील प्रतिष्ठित नागरिक व ानिक वैद्यवर्ग उपस्थित असून फैजपूरचे वैद्य ूडामणी, सावदे येथील वै. तळेले वगैरे परस्थ डळींहि उपस्थित होती.

आमवात कसा होतो ?

आयुर्वेद सेवामंडळाचे नशिराबाद हें वाङ्मय ार्यालय वै. दत्तात्रयशास्त्री जळूकर यांचे नेतृत्वा- ाली चालू आहे. दि. १३।११।५५ रविवारीं ह्या ार्यालयांत श्रीधन्वन्तरी उत्सव, पूजन, आरती, प्रसाद ाल्यावर दुपारीं ३ वाजतां आ. से. मंडळाध्यक्ष ाचार्य ब्रम्हदत्त शर्माजींचें अध्यक्षतेखालीं पाडळसें येथील लो. बो. आयुर्वेदीय दवाखान्याचे नियुक्त चिकित्सक आयुर्वेदाचार्य य. प्र. उपासनीशास्त्री यांचें ‘आमवात’ विषयावर अगदीं माहितीपूर्ण व्याख्यान झालें. भुसावळ येथील प्रां. संमेलनाच्या-वेळीं हा विषय नीट चर्चिला गेला नव्हता म्हणून मुद्दाम आज ह्या निमित्त हें व्याख्यान ठेवलें गेलें होतें. वै. उपासनी यांनीं ‘आम’ म्हणजे, रसधातु हा पुढील धातूंत ‘परिणाममापद्यमान’ होण्यापूर्वी अपक्व राहून दुष्ट होतो व वातामुळें त्याचा शरीरांतील आमाचीं म्हणजे कफाचीं जीं स्थानें छाती, कंठ, सांधे, आमाशय व क्लोम म्हणजे पिपासा-स्थान ह्या सर्वहि किंवा कांहीं स्थानांत संचित होतो व त्या त्या ठिकाणीं जडत्व, विंचवानें नांगी मारल्यासारख्या वेदना, शूल होतो, अंगमोडे येतात, तहान लागते, सांध्यांची हालचाल नीट होत नाहीं, अशा लक्षणांनीं हा वात आपलें स्वरूप दाखवितो, असें सांगितलें.

या रोगाचें विशेष लक्षण

“शरीरांतील बारीक सांधे थोड्या प्रमाणांत पण बहुतेक मोठे सांधे व तेहि आलटून पालटून जखडणें हें याचें विशेष लक्षण होय. इतर रोगांत जेव्हां सांध्यांचें दुखणें असतें तेव्हां हीं लक्षणें व ह्या इतर रोगांचा पूर्वेतिहास यावरून व्यवच्छेदक निदान करतां येतें. पूयमेह, संधिवात, वातरक्त इ. विकार याच लक्षणांनीं युक्त दिसतात, पण त्यांचा पूर्वेतिहास व सांधे बदलून बदलून दुखणें, सुजणें व विशिष्ट प्रकारची वेदना आणि आमवातांत घामास येणारी आम्ल दुर्गंधि ह्यावरून सहज निदान व तदनुरोधें चिकित्सा केली तर हटकून यश मिळेल. चिकित्सेचा भाग स्वतंत्र व विस्तृत आहे. आज फक्त व्यवच्छेदक निदानदृष्टीनेंच हें विवेचन केलें आहे. ”

याप्रमाणें व्याख्यान झाल्यावर वै. भि. श्री. कुळकर्णी यांचें व कविराज भावेजी यांचें अशीं दोन अधिक स्पष्टीकरणात्मक भाषणें झालीं. आचार्य शर्माजींनीं यथोचित समारोप केल्यानंतर आभारप्रदर्शन व प्रसादवितरण होऊन हा समारंभ संपला.

बालरोगावरील होमिओपॅथिक औषधें

— नित्योपयोगी व गुणास उत्तम —

(१) **वर्म पिल्सः**— वरचेवर पोटांत कृमि अगर जंत होणाऱ्या मुलांना गुणकारी. बाटली किं. ०—१२—०

२) **स्लीप पिल्सः**— चिरचिऱ्या व स्वस्थ झोंप न येणाऱ्या मुलांना हितावह. मूल उत्तम झोपूं लागतें व औषधाची संवय लागत नाहीं. बाटली किं. ०-१२-०

(३) **डायरिया पिल्सः**— पुष्कळ वेळां शौचास होणें, पुष्कळ दुग्धयुक्त, कधीं पातळ कधीं घट्ट, अगर फेसाळ असे शौचास होत असल्यास उत्तम उपयोग होतो. बाटली किं. ०-१२-०

(४) **ईअर पिल्सः**— कान फुटणें, दुखणें, लाल होणें, सुजणें, पूं अगर पाणी येणें इ. विकारावर. बाटली किं. ०-१२-०

५) **स्किनो पिल्सः**— सर्व तऱ्हेच्या त्वचारोगावर उपयुक्त व प्रभावी औषध. बाटली किं. ०-१२-०

(६) **कफ पिल्सः**— सर्दी, पडसें, खोकला, वरचेवर शिंक येणें, डांग्या खोकला यांवर उत्तम औषध. बाटली किं. ०-१२-०

(७) **टॉनिक पिल्सः**— शारीरिक व बौद्धिक वाढ प्रमाणशीर न होणाऱ्या मुलांना उत्तम भूक व झोंप चांगली लागून मूल बाळसेदार होऊं लागतें. बाटली किं. १-०-०

(८) **रिकेट्स्ः**— हा रोग साधारणपणें मूल सहा महिन्यांचें झाल्यनंतर लक्षांत येतो हाडें बारीक व मऊ, डोकें मोठें, शरीराच्या मानानें पोट मोठें, हाडाचीं टोकें मोठीं झालेलीं, टाळू नीट भरत नाहीं, डोक्यास घाम येतो, इत्यादि लक्षणें दिसूं लागतात ह्या औषधानें असें मूल, चांगलें सुधारतें. बाटली किं. १-०-०

तज्ज्ञ डॉक्टरकडून काळजीपूर्वक चिकित्सा केली जाते.

।चिकित्सा वेळः- दु. १ त ४।।

होमिओ लॅबोरेटरी १७८ न्यू चर्निरोड, प्रार्थनासमाज, **मुंबई नं. ४**

चहा-गुणविशेष-विमर्श :

लेखकः—
आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे

[मागील अंकावरून समाप्त]

“पण चहाचे पराग असले तरी आणणार कोठून ते ? “दोन पानें व एक कळी हें वर्णन ज्या चहाला लागूं पडतें तो चायना अगर ‘ग्रीन टी’ आपल्या दुर्दैवानें बाजारांत मिळतच नाहीं. एखाद्याच महाभागाला स्वतंत्र प्रयत्नानें मिळाला तरच मिळावयाचा. कदाचित् खास चीनमध्यें गेल्यासच लाभावयाचा. कोणत्याहि परदेशी चहाची सरकारनें कायद्यानेंच आयात बंद केल्यानें अमृतासारखाच चहा हा कल्पनेचा विषय झाला आहे. बाजारांत मिळणारे चहा [ऑरेंज पीको, ब्रोकन पीको, पीको फॅनिंग इ०] कोवळ्या पानांचे नसून त्यांच्या खालचीं किंचित् निबरट व जून अशींच तीं पानें असतात. हीं पानें छायाशुष्क वा आतपशुष्क करतात अगर उष्णगृहांतून [इलेक्ट्रिक हार्थ हाउसेसमधून] सुकवितात व पुनः त्यांतून यंत्रानें पाणी शोषून घेऊन पूर्ण कोरडी झाल्यावर डबे भरतात. आपणांस याच चहाचे गुण पहावयाचे आहेत, आणि हा चहा तरी उष्णवीर्यच आहे.

चहाच्या उष्णवीर्याचा प्रत्यय

चहा उष्णवीर्य असल्याचा प्रत्यय सर्व पित्तस्थानांवर, विशेषें त्यांच्या विकृतींत दिसून येतो. पित्तप्रकृतीवर आणि चहापान प्रमाणाधिक झाल्यास हा प्रत्यय अवश्य येईल. आमाशय–त्वचा–नेत्र–मूत्र यांत दाह होणें, स्वेदोत्पत्ति जाणविणें, चक्कर येणें, यांनीं हा प्रत्यय स्पष्ट येईल. विकृतींत अग्निमांद्यापासून सुरुवात होईल. नाभि हें पाचक पित्ताचें ठिकाण. येथील प्राकृत पाचक पित्त अद्रव तिलमान असल्यानें व्यवहार याकृत पित्तानेंच [यकृतांतील मलपित्तानेंच] चालतो. पण हें पित्त प्रमाणाधिक वाढतें तेव्हां प्राकृत पाचक पित्ताचें सामर्थ्य कमीच झालेलें असतें. पित्तवृद्धींत पित्ताची द्रवता वाढते पण तदन्तर्गत आग्नेय व पाचकधर्म कमी होतो. हेंच पैत्तिक अग्निमांद्य. माझ्या संस्कृत चाहवर्णनांत अग्निमांद्यजन्य रोग चहा वाढवितो असें म्हटलेलें संदर्भानें पैत्तिक अग्निमांद्यजन्य रोग असें घेतलें पाहिजे. म्हणजे मग यच्चयावत् पित्तविकार चहा चाळवितो, वाढवितो वा उत्पन्न करतो असें म्हणतां येईल. मी दिलेल्या यादींतील अम्लपित्त, पांडुरोग, त्वग्रोग, नेत्ररोग, कर्णरोग, शिरोरोग, नासारोग हे पैत्तिकच असून त्याबरोबरच हृद्रोग, रक्तपित्त, प्रदर, पित्तार्श, रक्तार्श इ० हि पैत्तिक रोग चहानें होतात वा झालेले वाढतात असें म्हटलें पाहिजे. संक्षिप्त वर्णन करावयाचें म्हणून सर्वच रोगांचीं नांवें निर्दिष्ट केलीं नाहींत. अर्थात् “तथापि पित्तं वृद्धं सच्छनैस्तद्रोगदं भवेत्” या श्लोकार्धानें हे रोग सूचित होतातच.

चहानें निद्राहानि पित्तवृद्धीमुळेंच

चहानें होणारी निद्राहानि त्याच्या वातवर्धक गुणानें होते म्हणजे पित्तवृद्धीनें नव्हे असें वैद्यराज बिन्दुमाधवजींचें म्हणणें आहे. मी त्यांना माझा रूढ प्रयोग सांगतो. सायंकाळीं चहा थोडाहि घेतला तरी झोंप न येण्याची खोड अनेक नित्य दुक्त चहा पिणारांनाहि आहे. अशी झोंप न आल्यास दोन गुंजा प्रवाळ घेतलें कीं कांहीं वेळांत झोप लागते हा मी अनेकदां प्रत्यय घेतला आहे. कोणीहि तो घेण्यासारखा आहे. प्रवाळ हें शीतवीर्य व पित्तप्रत्यनीक आहे हें मी सांगावयास नको. वातरोगांवर प्रवाळ देत नाहींत. वातरोग्यांना तर तर चहानें उपशमच येतो हेंहि पहातां येणारें आहे.

प्रमाणबध्द चहापान व प्रमेह

आतां चहांत दूखसाखर जास्त घातल्यानें प्रमेह, बहुमूत्र होईल हें म्हणणें विचारांत घेण्यासारखें आहे. पण या ठिकाणीं चहापेक्षां दुधसाखरेचाच प्रभाव साहजिक दिसणारा. दूधसाखर भरपूर असली तर अशा वासापुरताहि चहा नसलेल्या ‘ चहा ’--पानाचे

अतिरिक्ततेनें पित्ताऐवजीं कफवृद्धिच होणें, व मग प्रमेह होणें अगदीं संभवनीय आहे. " गुडवैकृत " व " कफकृत् " हा उभयविध " प्रमेहहेतु " या ठिकाणीं असतो. अर्थात् मूत्रवह स्रोतसें दुष्ट झालेलीं असावयासच हवींतच. दूधसाखर प्रमाणांत असलेल्या चहानें, द्रवाधिक्यानें व स्वेदनानें मूत्र काय सुटेल तें. पण अशा चहानें प्रमेह होण्याचें कारणच नाहीं. प्रमेहोत्पत्तीला क्लेदोत्पत्ति होऊन बस्तिदुष्टी व्हावी लागते, व कफ हा दोष आणि मांस व मेद हे धातु दुष्ट व्हावे लागतात. ही दुष्टी प्रमाणबद्ध चहानें होणार नाहीं; एवढेंच काय, झालेलीहि वाढणार नाहीं. प्रमेही लोक साखर न घालतां चहा पितात यावरून ही गोष्ट सिद्ध होते. वैद्यराज पं. डेग्वे-करजींचें वै. उपासनी यांनीं उदाहरण दिलेंच आहे.

नामवंत वैद्यांचीं उलट उदाहरणें

पद्धतशीर म्हणजे प्रमाणयुक्त दूधसाखरेचा चहा पिण्यानें प्रमेह होत नाहीं हें कांहीं नामवंत वैद्यांच्या उदाहरणांनीं दाखवितां येईल. कै. गुरुवर्य अप्पाशास्त्री साठे व कै. गुरुवर्य हिर्लेकरशास्त्री हे दोघे चहा पिणारे असून त्यांना प्रमेह झाला नाहीं. कै. हिर्लेकरशास्त्री तर किती तरी चहा पीत. उलट कै. नानलशास्त्री मुळींच चहा न पिणारे, त्यांना प्रमेह होता. वै. भू. गणेशशास्त्री हे नुकतेच घोर प्रमेहोपद्रवांतून वाचले. शास्त्रिबुवांनीं अजून चहा चाखलेला नाहीं. अर्थात् आंकड्यांच्या भाषेनें सिद्ध करण्यासाठीं एवढीं उदाहरणें पुरेशीं नाहींत. शेंकडोंचे आंकड्यांनींच अन्वय-व्यतिरेकी पद्धतीनें सिद्धान्त काढावयास हवा.

बृहदंत्राचा संकोचविकास होतो

चहा हा कषाय–तिक्तरसात्मक असल्यानें व विपाकानेंहि तो कटु असल्यानें त्यानें शोधनाचें कार्य अवश्य घडणार. अन्नवह व महास्रोतसें यांतच रस व विपाक यांचे कार्य होत असल्यानें या भागांतील संचित कफ आणि कफयुक्त [चिकट] मलभाग चहानें शोधले जाणार यांत शंका नाहीं. चहाच्या गुळण्या करण्यानें वा वाफारा घेतल्यानें श्री. वै. कामत म्हणतात तसें, कंठशोधन होणें त्यामुळेंच सयुक्तिक वाटतें. ताट–वाट्यांचा ओषटपणा घालविण्यासाठीं चहाच्या चोथ्यानें घासण्याचा कोठें कोठें प्रघात दिसतो हें चहाच्या शोधनगुणाला धरूनच आहे. मात्र चहाच्या कषाय रसामुळें मागाहून वरील शरीर भागांचें, विशेषतः बृहदंत्राचें संकोचनहि होतें असें दिसतें. चहा घेतल्याशिवाय शौचाला होत नाहीं अशी तक्रार बऱ्याच चहा-पिणारांची असते. अशांचे उत्तर गुदभागाच्या स्नायूंचें संकोचन झालेलें असते. चहा प्यायला कीं, त्याच्या उष्णवीर्यत्वानें त्वरित हे स्नायु विकसित [उत्तेजित] होतात व शौचाला होते. पण चहाच्या कषायरसाचा परिणाम म्हणूनच कीं काय पुनः संकोचन होतें व मग पुनः शौचाला होण्यासाठीं चहा प्यावा लागतो. चहाचा विपाक तिक्त असला तरी त्यांत मूळच्या कषाय रसाचा थोडा परिणाम कायम राहणें साहाजिक आहे. रसाहून भिन्न विपाक होणाऱ्या द्रव्याबाबत असें नेहमींच होतें.

चहांत पोषणमूल्य नाहीं

चहांत अर्थातच अन्नमूल्य असणें शक्य नाहीं. मधुररसाशिवाय व स्निग्ध आणि बृंहण गुण असल्याविना द्रव्यांत अन्नमूल्य येणारच कसें? केवळ थोडी दूधसाखर असल्यानें तें चहांत येऊं शकत नाहीं. चहाचा मूळचा रसादीचा परिणाम यांनीं मर्यादित राहतो एवढेंच. चहाचे अगोदर कांहीं खाण्यानें चहाचा दुष्परिणाम टळतो म्हणजेच चहांत अन्नमूल्य नाहीं, असाच याचा अर्थ आहे. अर्थात् यामुळें चहा दीपक वाटण्याचा संभव आहे. रसवीर्यामुळें तो तसा तात्पुरता होतोहि. पण पित्तवृद्धि झाल्यास पैत्तिक अपचन होतें. त्यामुळेंच चहाचा दीपक वा पाचक हा गुण [चित्रकादिप्रमाणें] टिकाऊ होणारा नाहीं. चहा हें पेय म्हणून औषधापेक्षां पुष्कळच मोठ्या मात्रेंत घेतलें जातें; चित्रकादि द्रव्यें वीर्यमय असल्यानें त्यांची मात्रा लहान असते हेंहि याचें एक कारण आहेच. पण म्हणून अन्नमूल्य अगर

षणमूल्य चहांत असते असें म्हणतां येणार नाहीं. लट पित्ताधिक्यानें पैत्तिक अपचन करणारा म्हणून ीपन पाचन म्हणूनहि त्याला म्हणतां येत नाहीं.

शालिग्राम निघंटूंतील चहाचें गुणवर्णन

सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वी झालेल्या शालिग्राम-- निघंटूंत चहाचें प्रथम गुणवर्णन करण्याचा प्रयत्न ाला. पण त्यावेळीं आजच्या इतका चहाचा मोठ्या माणांत प्रचार नसावा, म्हणूनच कीं काय त्यांतलें गुणवर्णन बरोबर झालें नसावें. या निघण्टूंत

(तीक्ष्णोष्णा तुवरा चाहा दीपनी पाचनी लघुः ।
कफपित्तहरी चैव किंचिद्वातप्रकोपनी ॥)

आलेल्या या वर्णनांतील ‘दीपनी’ ‘पाचनी’ कफपित्तहरी’ व ‘वातप्रकोपनी’ हे गुण माझ्या रील विवेचनाचें नीट समालोचन केल्यास अयुक्त ाटले यांत शंका नाहीं.

माझेंच चहागुणवर्णन बरोबर

एतावता चहाचे मी दिलेले रस, वीर्य, विपाक तदनुगामी गुण चुकीच नाहींत, आणि दूध-साखर ातलेल्या चहाचें म्हणजे पेयचहाचें व मूळचहाचें गुणवर्णनहि एकच आहे असें मला म्हणावयाचें आहे.

चहासंबंधीं ८ लेख

[आयुर्वेद पत्रिकेंत आतापर्यंत ८ वेळां चहा संबंधीं लेख आले; त्यापैकीं ४ आयुर्वेदाचार्य पां. ह शपांडे यांचें आहेत. प्रथम त्यांनीं अध्यक्षीय भाषणांत या विषयाचा उपन्यास केला. त्यानंतर वै. बिंदुमाधव ंडित यांनीं लिहिलेल्या लेखाला उत्तर म्हणून एक लेख आला. गेल्या दोन अंकांत पुनः एक वेळ त्यांनीं आपलें म्हणणें मांडलें आहे. त्यामुळें त्यांच्याकडून वाचकांना भरपूर विचारसामुग्री मिळाली आहे. वाचकांनीं त्यांचे सर्व लेख पुनः एकदां एकत्र वाचावेत व त्यावरून चहाच्या रसवीर्यविपाकाबद्दलचे आपले मत बनवितां आल्यास बनवावें. त्यांच्यापासून आतां अधिक माहितीची अपेक्षा बाळगूं नये.

आमच्या लक्षांत आलेल्या गोष्टी पुढीलप्रमाणें आहेतः— रोज दोन वेळ नियमानें १।१ कप नुसतें ऊन पाणी बारा महिने पिईल त्याला आपल्या शरीरावर उष्ण परिणाम निर्माण झाल्याचा अनुभव येईल, त्यासाठीं त्यांत चहाचा संस्कार असण्याची आवश्यकता नाहीं. असें ऊनपाणी पिण्यानें सुद्धां एखाद्यास रक्त पडूं लागेल. मुळव्याध होईल.

रसक्षय व रसवृध्दि

पेयचहांत चहाचा अर्क अधिक प्रमाणांत असेल व दूध साखर कमी असतील तर वातप्रकृति मनुष्यांत रसक्षयाचीं लक्षणें जाणवतील, व दूधसाखरेचें प्रमाण जास्त असेल तर रसवृद्धीचीं वा श्लेष्मवृद्धीचीं लक्षणें संभवतील. दूधसाखर असलेल्या पेयास पोषणमूल्य असणारच. आचार्यांचे लेख वाचल्यानंतर आपल्या चहाविषयक विचारांत परिवर्तन करण्याची आवश्यकता आम्हांस वाटत नाहीं. — संपादक]

•••• गौरव ••••

आपण आयुर्वेदिक औषधांचा गौरव वाढविला पाहिजे. ती एक आपल्या हिताची गोष्ट आहे. आपण प्रत्येक औषधी द्रव्य अस्सलपैकीं व ताजें वापरून सिद्ध औषधें बनविलीं पाहिजेत. अशीं उत्कृष्ट औषधी द्रव्यें मिळवण्याकरितां आपणः—

दि ऑल इंडिया करीयाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात
माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

मांसवृद्धीवरील आयुर्वेदीय चिकित्सा

उपराज्यपाल राजा बजरंग बहादूरसिंग भंडारी यांचें भाषण

हिमाचल प्रादेशिक चतुर्थ आयुर्वेद संमेलनाचें उद्घाटन करतांना हिमाचल प्रदेशाचे उपराज्यपाल राजा बजरंग बहादूरसिंग म्हणालेः —“ मी आपल्यासमोर जो उभा आहे तो आयुर्वेदाच्या कृपेनेंच.

आपण जोंवर संघटित होणार नाहीं तोंवर आपण उत्तम असलात तरी मागें पडून जाल. आयुर्वेदाला राज्याश्रय नाहीं तरी तो ॲलोपॅथीसमोरं टिकून उभा आहे.

माझा एक अनुभव

आयुर्वेदासंबंधींचा माझा अनुभव मी आपणास सांगतो. हल्लीं फ्रान्समध्यें भारताचे वकील राजेसाहेब कालाकंकर हे आहेत. त्यांचे वडील लवकरच वारले. त्यामुळें बालपणापासून ते माझ्या देखरेखीखालीं होते. एकदां त्यांना नासार्शव्याधीनें ग्रस्त केलें. त्यावेळीं मी मसुरी येथें होतो. तेथील उत्तमोत्तम डॉक्टरांना त्यांचा रोग दाखविला. त्यांनीं ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला. नंतर मी त्या मुलाची प्रकृति क्रमानें लखनौ, अलाहाबाद व मुंबई येथील थोर थोर डॉक्टरांना दाखविली. त्यांनीं ताबडतोब ऑपरेशन करा, नाहींतर मुलगा दगावेल असें सांगितलें; म्हणून रुग्णालयांतील एक खोली घेतली व ऑपरेशनची फीहि ठरविली.

नासार्शावर आयुर्वेदीय उपचार

त्याच वेळीं माझ्या मित्रानें एका वैद्याजवळ ही गोष्ट काढली. त्या वैद्यांनें ८ दिवसांत औषधोप--चारानें हा रोग बरा करून देण्याची हमी दिली. मी त्या वैद्यांना भेटलो. परमेश्वर त्या वैद्याला दीर्घायुषी करो ! त्या वैद्यानें मला सांगितलें कीं, माझ्या औषधानें गुण न आल्यास ऑपरेशन करण्याचा मार्ग मोकळाच आहे. मी विचार केला, ठीक आहे; याचा पण अनुभव घेऊ या. मी वैद्यांना फी विचारली. ते म्हणाले जी डॉक्टरला देणार तीच मला द्या, मात्र लाभ झाल्यानंतर तीन महिन्यांनीं द्या. जर डॉक्टर म्हणाले कीं अजूनहि ऑपरेशनची जरुरी आहे तर फी बिल्कुल देऊं नका. ”

नाकामध्यें क्षारचिकित्सा केली

वैद्यांचा इलाज सुरूं झाला. त्यांनीं नाकांत औषध लावलें. थोड्या वेळानें नाकांतून पिवळ्या लाल रंगाचें पाणी पडूं लागलें. यामुळें त्या मुलास त्यावेळीं कष्ट तर झालेच, पण १६ तासानंतर वैद्यांनीं नाकांत गाईचें तूप टाकून त्रास थांबविला. दुसरे दिवसापासून मुलगा हिंडूं फिरूं लागला. मी तर चकितच झालो. कांहीं दिवसांनीं डॉक्टरांना त्याची प्रकृति दाखविली. त्या वेळीं ते म्हणाले ‘ऑपरेशन उत्तम झालें आहे. मी म्हटलें आपरेशन केलेलें नाहीं, फक्त औषधोपचारच केला. त्यावेळीं त्यांनीं मला मूर्खांत काढलें.

वास्तविक पाहतां तो शब्दप्रयोग त्या डॉक्टरांना लावला तर मला बिलकुल दुःख वाटणार नाहीं. त्या दिवसापासून तो मुलगा जगांत सर्वत्र प्रवास करीत आहे. पण आजवर त्याला दुखणेंच काय पण पडसेंसुद्धां आलेलें नाहीं.

प्रामाणिक औषधें हवींत

मी आयुर्वेदीय औषधांचे अनेक चमत्कारिक प्रयोग पाहिले आहेत. त्यांचें संशोधन होणें अवश्य आहे. या हिमाचल प्रदेशांत भरपूर वनस्पति असतां अमृतसरहून येथें वनस्पति मागविल्या जातात, हें पाहून मला अत्यंत दुःख होतें. शहरांत वनस्पति शुद्ध मिळत नाहींत, त्यांत भेसळ फार असते, त्यामुळें औषधें चांगलीं बनत नाहींत, व मग त्याचा दोष लोक आयुर्वेदशास्त्राला देतात. हा दोष वैद्यांचा नाहीं, सरकारचा आहे. सरकारनें या विषयांत लक्ष घालून प्रामाणिक औषधें मिळण्याची व्यवस्था केली पाहिजे.”

चंद्रकला-रस-निर्णय :

(कांहीं शंका)

लेखक:–
वैद्य इंदुभूषण भिंगारे, महाल, नागपूर

श्री. वैद्य मुकुंदरावजी गायकवाड, सोलापूर यांनीं ' चंद्रकला-रस–निर्णय ' ह्या मथळयाखालीं आयुर्वेदपत्रिकेंत दोन लेख लिहून वैद्यवर्गाला उपकृत केलें आहे. प्रत्यक्ष औषधीकरणाच्या क्षेत्रांत शास्त्र, परम्परा व अनुभव ह्यांचा समन्वय करून निश्चित निर्णय घेणें फारच कठीण काम झालें आहे. परंतु श्री. गायकवाड यांनीं जो प्रयत्न केला आहे तो खरोखरच अभिनंदनीय आहे, यांत शंका नाहीं. त्यांचे दोन्हीहि लेख वाचून मला ज्या कांहीं शंका आल्या त्यांचें समाधान करून घेणें अगत्याचें असल्यामुळें मी वैद्यवर्गापुढें त्या शंका मांडीत आहे. शास्त्रवचन, प्रत्यक्ष अनुभव व परम्परा ह्यांचा योग्य मेळ घालणें निर्णयाचे दृष्टीनें योग्य असा मार्ग आहे. व ह्याच दृष्टिकोनांतून मला जो अर्थ व निर्णय, शास्त्रवचनाशीं विरोधी वाटला तो नमूद करणें मीं माझें कर्तव्य समजतो.

केतकीस्तन-वारिणा

केतकीस्तन ह्या शब्दाचा अर्थ केतकीमूळ असा करणें योग्य नव्हे असें मला वाटतें. कारण केतकी–वृक्षाचीं जीं वनें आहेत त्या ठिकाणीं केतकीच्या झाडाला स्तनाच्या आकाराचीं फळें येतात असें प्रत्यक्ष श्री. वेणीमाधवशास्त्री जोशी ह्यांनीं पाहिलें आहे. ह्या केतकीस्तनाचे वेगळे गुणधर्म धन्वन्तरी–निघण्टु ह्या ग्रंथांत दिलेले आहेत, ते खालीलप्रमाणें आहेत.

केतकीकुसुमं वर्ण्यं केशदौर्गन्ध्यनाशनम् । हेमाभं मदनोन्मादवर्धनं सौख्यकारि च । तस्य स्तनोऽतिशिशिरः कटुः पित्तकफापहः । रसायनकरो बल्यो देहदार्ढ्यकरः परः ।

वरील श्लोकांत केतकीस्तन हा अवयव वेगळा सांगितला असून त्यांचे गुणधर्म सांगतांना तो अवयव अति थंड आहे असा स्पष्ट उल्लेख आहे. वरील वर्णनावरून केतकीस्तन ह्या द्रव्याची निश्चिती झाल्यावर निरनिराळे पाठभेद स्वीकारण्याचे कांहींहि प्रयोजन उरलें नाहीं. अर्थात् स्त्रीदुग्ध व कमळपाकळीच्या रसाची भावना देण्याचेंहि प्रयोजन उरलें नाहीं. वरील निर्णय माझे मित्र श्री. गायकवाड मान्य करतीलच अशी उमेद आहे.

सहदेवी

भावप्रकाश निघण्टु, धन्वन्तरी-निघण्टु, राजनिघंटु व मदनपालनिघण्टु ह्या चारहि ग्रंथांत सहदेवी ह्या वनस्पतीचें वेगळें वर्णन नाहीं. बलाचतुष्टयांतील महाबलेचा पर्याय शब्द म्हणून सहदेवी हा शब्द आला आहे. व ही सहदेवी पीतपुष्पा अर्थात् पिवळ्या फुलाची आहे असें वर्णन आहे. धन्वन्तरी–निघण्टूंत ' महाबलायां सम्प्रोक्ता सहदेवी इति स्मृता । असें स्पष्ट वर्णन असल्यामुळें महाबलेलाच सहदेवी असें मानण्यांत आलें आहे. भावप्रकाशनिघण्टूंत महाबला पीतपुष्पा सहदेवी च सा स्मृता । असें वर्णन आलें आहे. ह्या वर्णनावरून महाबला हीच सहदेवी आहे हें निश्चित आहे.

चंद्रकलेच्या वर्णनांत ' मूत्रकृच्छ्राणि सर्वाणि नाशयेन्नात्र संशयः । ' ही ओळ आहे. चंद्रकलेचा प्रभाव मूत्रकृच्छ्र ह्या रोगावर पडतो, ही गोष्ट निश्चित आहे. महाबलेच्या गुणधर्मांत 'हरेत् महाबला कृच्छ्रं भवेत् वातानुलोमनी । असा प्रभाव सांगितला आहे. वरील सर्व वर्णनावरून महाबला म्हणजेच सहदेवी असें स्पष्ट झालें. निदान चंद्रकलेच्या बाबतींत तरी आतां कोणताहि संशय उरलेला नाहीं. म्हणून आतां पांढऱ्या फुलाची सहदेवी वेगळी आहे असें मानणें योग्य होईल काय? माझे मित्र श्री. गायकवाड वरील निर्णय स्वीकारतीलच असें मला वाटतें. रसरत्नसमु-

चयाच्या चंद्रकलारसाच्या टीकेंत ' सहदेव्या बलायाः असाच अर्थ स्वीकारला आहे.

उत्तर हिंदुस्थानांतील सर्व औषध-विक्रेत्याकडे वेगळी सहदेवी वनस्पती नसून महाबलेलाच सहदेवी असें म्हणतात. आतां ह्या बाबतींत कोणताहि संशय बाकी उरला नाहीं.

रामशीतलिका

श्री. मुकुंदरावजी गायकवाड ह्यांनीं रामशीतलिकेचा जो शोध लावला आहे, तो अगदींच चुकीचा आहे. रामशीतलिका म्हणजे पाच हा अर्थ निघण्टुकारांना मान्य नाहीं. रामशीतलिका व पाच ह्या वनस्पतींचे गुणधर्म निघण्टुकारांनीं वेगळे सांगितले आहेत. त्यामुळें ह्या दोन्हीं वनस्पती वेगळ्या आहेत, ही गोष्ट सिद्ध होते. पाच ह्या वनस्पतींचे गुणधर्म राजनिघण्टूंत खालीलप्रमाणें आहेत.

पाची—पाची मरकतपत्री हरितलता पत्री ।
सुरभिर्मल्लीरिष्टा गारुत्मतपत्रिका चैव ॥
गुणाः-पाची कटुतिक्तोष्णा सकषाया वातदोषहन्त्री च।
ग्रहभूतविकारहारी त्वग्दोषप्रशमनी व्रणेषु हिता ॥

पाच उष्णवीर्य आहे

पाचेच्या गुणधर्मांत ही वनस्पती उष्णवीर्य आहे असें लिहिलें आहे. ह्यावरून पाच ही वनस्पती रामशीतलिका होऊच शकत नाहीं. राजनिघण्टूंत आरामशीतला ह्या वनस्पतीचे जे गुणधर्म दिलेले आहेत, त्यावरून हीच रामशीतलिका आहे हें निश्चित आहे. परन्तु ही वनस्पती अजून ओळखली जात नाहीं. अशा स्थितींत कोणताहि अर्थ करणें धोक्याचें ठरेल. आरामशीतलिकेचे गुणधर्म खालीलप्रमाणें आहेत.

। आरामशीतला ।

नांवें—आरामशीतला नंदा शीतला सा सुनंदिनी ।
रामा चैव महानंदा गन्धाढ्याऽरामशीतला ॥
गुणाः--आरामशीतला तिक्ता शीतला पित्तहारिणी ।
दाहशोषप्रशमनी विस्फोटव्रणरोपणी ॥

ह्या गुणधर्मांवरून चंद्रकलारसाला ह्या वनस्पतीची भावना देणें आवश्यक आहे, ही गोष्ट लक्षांत येईलच. परन्तु जों पावेतो ह्या वनस्पतीचा निश्चित परिचय मिळत नाहीं तों पावेतो रामशीतलिकेच्या ऐवजीं रामफळाच्या पानांचा रस काढून त्याची भावना देणें, गुणधर्मांच्या दृष्टीनें श्रेयस्कर आहे. कारण रामफळाच्या पानांचा रस अत्यंत शीतवीर्य असून रक्तपित्त व दाह याचा नाश करणारा आहे. म्हणून श्री. बोरकर वैद्यांचा हा पर्याय स्वीकारणें गुणधर्मांच्या दृष्टीनें योग्य आहे असें मला वाटतें.

पित्तपापडा

आयुर्वेदीय ज्वर-चिकित्सेंत पित्तपापडा ह्या वनस्पतीचें स्थान फारच वरच्या दर्जाचें आहे ही गोष्ट निश्चित आहे. पण पित्तपापडा ही वनस्पति कोणती ह्याबाबतींत अनेक मतभेद आहेत. बंगाल, पंजाब, महाराष्ट्र व मद्रास ह्या प्रांतांतून पित्तपापडा मागविला आहे. ह्या भिन्न प्रांतांतील चारहि वनस्पती इतक्या वेगळ्या आहेत कीं, त्यांत कोणतेंहि साम्य नाहीं. महाराष्ट्रांत घास पित्तपापडा ही वनस्पती पित्तपापड्याऐवजीं वापरण्यांत येते. आमच्या विदर्भांतील वैद्य घास पित्तपापड्यालाच पित्तपापडा मानतात. अशा वेळीं पित्तपापड्यासारख्या महत्वाच्या वनस्पतीचा निश्चित निर्णय होणें, अत्यंत आवश्यक आहे.

सहा तऱ्हेची चंद्रकला

चंद्रकला रसाचे बाबतींत आतांपावेतो जे लेख प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून चंद्रकलारसाची सिद्धी हें अत्यंत कठीण कार्य आहे. दोन वर्षांपासून आम्ही चंद्रकलारस करण्याच्या प्रयत्नांत आहोत. आयुर्वेदीय वाङ्मयांतील संपूर्ण पाठांची विभागणी सहा सदराखालीं करून सहा तऱ्हेची चंद्रकला आम्ही तयार करीत आहों. दोन महिन्याच्या अवधींत ह्या चंद्रकलांच्या वेगवेगळ्या तऱ्हा तयार झाल्यावर त्यांचा प्रत्यक्ष प्रयोग करून पाहण्याचें ठरविलें आहे. ह्या प्रयोगांतून जी फलनिश्चिती बाहेर येईल ती आयुर्वेदपत्रिकेंत प्रसिद्ध करण्यांत येईलच. तोंपावेतो आणखी कांहीं वैद्यबंधूंना ह्या बाबतींत स्पष्टीकरण करावयाचें असल्यास त्या स्पष्टीकरणाचें आम्ही स्वागतच करूं.

.... दंतारोग्य हें भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्य ....

(लेखकः—दंतवैद्य पां. वि. जायदे, हुबळी)

सुंदर व निरोगी दांत याबद्दल भारताची पुरातन लपासून प्रसिद्धी आहे. प्राचीन वाङ्मयांत दातांच्या दर्याचीं अनेक वर्णनें आढळतात. अजूनहि दांतांच्या रोग्याची सरासरी [Average] पाहिल्यास जगांत रताला उच्च क्रमांक मिळूं शकेल. अनेक पौर्वात्य पाश्चिमात्य तज्ञांनीं ही गोष्ट मान्य केली आहे. परवांच रताचा प्रवास करून गेलेल यूनोच्या जागतिक आरोग्य-स्थेचे World Health Organisation तशास्त्राचे प्रमुख सल्लागार डॉ. Knutson यांची जी मुलाखत प्रसिद्ध झाली आहे त्यावरूनहि हाच गोष्ट सिद्ध होते. सदर डॉक्टरमहोदयांनीं दिल्ली, मुंबई, मद्रास त्यादि ठिकाणच्या निरनिराळ्या दंतवैद्यक संस्थांची हाणी केली. कांहीं ग्रामीण भ तहि त्यांनीं दौरा केला. म्हणतात—

"The Dental diseases were uch less in India, compared to ther Europeon Countries." "The npression that he had gathered as that there was much less dental rouble in India, especially very low n Villages."

युरोप-अमेरिकेची परिस्थिति

युरोपांतील निरनिराळ्या देशांत व अमेरिकेंतहि तरोगांचें प्रमाण अधिक असल्याचें आढळून येतें. विशेषतः लहान मुलांचे दांत कोवळ्या वयांतच बिघडतात असें तेथील तज्ञांना आढळून आलें आहे. लिव्हरपूलमध्यें १९९० मुलांच्या दातांची कसून तपासणी करण्यांत आली. त्यांत असें आढळून आलें कीं तेथें सामान्यतः दुसऱ्या वर्षापासूनच दांत बिघडण्यास [Caries] सुरवात होते व पाचव्या वर्षीं हें प्रमाण अत्युच्च [Maximum] असलेलें आढळून येतें. त्यासंबंधीं एका निवेदनांत डॉ. स्लॅक म्हणतात— "Dental Caries start at two years – Children under five suffer more – with any foreseeable, available Dental man power in the next few years the task is too great to be dealt with, on a reparative basis."

धार्मिक संस्कारांचा परिणाम

भारतांत मुखशुद्धि Mouth Hygiene या विषयाकडे प्रामुख्यानें लक्ष देण्यांत येतें. तो एक धार्मिक भाग समजला जातो. प्रातःकाळीं लवकर उठून शौचमुखमार्जन करणें, स्नान करणें इ. विधि उरकल्या-शिवाय सामान्यतः मनुष्याची शुद्धी झाली असें मानलें जात नाहीं. तो एक धार्मिक विधीचा दंडकच मानला जातो. अनेक पिढ्यान् पिढ्या या गोष्टी चालत आल्या आहेत. [हल्लीं कांहीं अपवाद आढळतील] त्यामुळें तोंड स्वच्छ ठेवण्याकडे प्रवृत्ती अधिक आढळते, तसेंच जेवणापूर्वी व नंतरहि हातपाय व तोंड धुणें हाहि एक धर्माचा भाग म्हणून आचरला जातो. तसेंच जेवणा-नंतर तोंड धुणें, चूळ भरून टाकणें व दांत स्वच्छ करणें हाहि एक नित्यक्रम समजला जातो व त्यामुळें तोंड स्वच्छ राहते व अन्नाचे कण दांतांत कुजून त्यापासून दंतरोग उद्भवत नाहींत.

डॉक्टरांनीं सुचविलेले उपचार

मुलांचे दंतरोगापासून संरक्षण करण्याच्या उप-चारात प्रामुख्यानें खालील गोष्टी सांगितल्या आहेत.

१] अन्नपान सेवनानंतर चूळ भरून टाकणें. Rinsing of mouth with water]

२] शुद्ध जलपानः—[Habit of drinking plain water,] इत्यादि

भारतीयांना हसूं येईल

वरील उपचार वाचून भारतीयांना कदाचित हसूं येईल. कारण या गोष्टींचें आमच्या मुलांना 'बाळकडू' असतें. हेंच भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्य! तें आमच्या हाडामांसांत खिळून गेलें आहे. आमच्या अनेक पिढ्यांवर त्याचे दृढ संस्कार आहेत.

आयुर्वेदाची बहुमोल कामगिरी

ब्राह्मे मुहूर्ते उत्तिष्ठेत् । अथवा भक्षयेत् दंतधवनम् इत्यादि सूत्रें आरोग्यरक्षणाच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचीं आहेत. परंतु आमच्या सुधारकांना हें जेव्हां पटेल तो दिन सुवर्णदिन होय.

ही आश्चर्यकारक घटना आहे

ज्या समाजांत दंतरोग अधिक प्रमाणांत आहेत, त्यांच्याकडून आधुनिक भारत दंतसंरक्षण व दंतरोग-प्रतिबंध यांचे धडे घेऊं इच्छितो, याहून आश्चर्यकारक गोष्ट कोणती असूं शकेल ?

आयुर्वेदशिक्षणावरील खर्च

‘ अनाठायीं व अनवश्यक ’

“ सरकारनें आयुर्वेद कॉलेजें काढून पैसा व तरुणांची शक्ति नाहक वाया घालवूं नये ” असें मत जळगांव येथें भरलेल्या महाराष्ट्र व कर्नाटक प्रांतिक मेडिकल कॉन्फरन्सच्या १५ व्या अधिवेशनाचें उद्‌घाटन करतांना मुंबईचे सुप्रसिद्ध डॉ. शिरोडकर यांनीं व्यक्त केलें. ते पुढें म्हणाले “ आजचें आयुर्वेद-शास्त्र पूर्ण नाहीं. ४०० वर्षांपासून त्या शास्त्रावर अनेक आघात आल्यामुळें तें आपल्या हातीं पूर्णावस्थेंत पडलें नाहीं. अपूर्ण ज्ञान विनाशक असतें. तद्वतच आयुर्वेदाची गोष्ट आहे. तसेंच आज आयुर्वेदशास्त्र संपादन करणारे धंद्यांत आयुर्वेद न वापरतां ॲलोपथीशास्त्र वापरीत असतात. त्यामुळें ज्या कारणीं सरकार पैसा खर्च करते तो उद्देश सफल होत नाहीं.

डॉक्टरांना अधिक पगार हवा

“ सरकारनें हल्लींच्या डॉक्टरांच्या पगाराच्या श्रेणी वाढवून द्याव्यात. यामुळें सरकारला डॉक्टरांकडून जी जनसेवा करून घ्यावयाची आहे ती मिळू शकेल. खेड्यांतील डॉक्टर्सना चांगले पगार नसल्यामुळें डॉक्टर खेड्यांत जात नाहींत.”

रोगावर जादूप्रमाणें तत्काल परिणाम करणारीं

‘मार्तण्ड’चीं आयुर्वेदिक इंजेक्शनें

मार्तण्ड कंपनीच्या पूर्ण वैज्ञानिक साधनसंपन्न व आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज अशा प्रयोगशाळेंत, विद्वान् आयुर्वेदज्ञ व पाश्चात्य रसायनशास्त्रज्ञांच्या संपूर्ण देखरेखीखालीं तयार केलेलीं आयुर्वेदिक इंजक्शनें आपला प्रभाव तत्काळ व कायम स्वरूपाचा करतात. दीर्घकाल राहिल्यासहि तीं कधीं बिघडत नाहीत. त्यांच्या तात्काल गुणदायित्वाबद्दल हमी देण्यांत येते. पत्रव्यवहार हिंदी अगर इंग्रजींतच करावा.

सूचिपत्र व आकर्षक वङ्मय मोफत मिळेल. आजच मागवा.

मार्तण्ड फार्मास्युटिकल्स्, बडौत S. S. Rly. यू. पी.
(रिसर्च इन्स्टिटयूट ऑफ इंडियन मेडिसिन्स)

आयुर्वेद-प्रवीण, १ ली परीक्षा

गुरुपरंपरा शिक्षण पद्धतीनें प्राप्त झालेलें स्पृहणीय यश

गेल्या ऑक्टोबरमध्यें मुंबई राज्यांत झालेल्या शुद्ध आयुर्वेदाच्या परीक्षेंत पहिल्या १२ नंबरांत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचीं नांवें व नंबर पुढें दिले आहेत. गुरुपरंपरा पद्धतीनें शिक्षण घेतलेले विद्यार्थी यांत आहेत, इतकेंच नव्हें तर सर्व प्रथम क्रमांकाचा विद्यार्थी हा गुरुपरंपरा पद्धतीचा आहे. त्या पद्धतीचें श्रेष्ठत्व यामुळें सिद्ध झालें आहे.

वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी पुणें, वैद्यरत्न वाटवेशास्त्री बेळगांव, व वैद्यराज नाटोलीकर कागल, यांनीं आपले विद्यार्थी उत्तम रीतीनें तयार केल्याबद्दल पत्रिका त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करीत आहे. शीव [मुंबई] येथील तीन विद्यार्थ्यांनीं वरचे नंबर मिळविले हेंहि त्या संस्थेस भूषणावह आहे. मुलें मुली यांची संख्या पहिल्या बारामध्यें समसमान आहे. एकूण प्राप्तव्य गुणांची संख्या ८७५ ही आहे. गुणक्रमांकानें पहिले आलेल्या विद्यार्थ्यांचीं नांवें, नंबर, संस्था / गुरु इत्यादि पुढें दिले आहेत.

अ. नं.	गुण क्रमांक	गुण संख्या	नांव	संस्था / गुरु
१	५६	५७९	प्रल्हाद हरी भाटे	गु. वै. गणेशशास्त्री जोशी, पुणें
२	८४	५६५	कुमुदिनी गणेश लोखंडे	सं. नासिक
३	९९	५६५	विमल हरी पटवर्धन	सं. शीव, मुंबई
४	५२	५५५	सुमति नारायण वाटवे	गु. वै. वाटवे, बेळगांव
५	३९	५५४	देवकुमार बाबुगोंडा पाटील	गु. वै. नाटोलीकर, कागल
६	६२	५५१	पुंडलीक गोविंद धाईतडक	सं. शीव, मुंबई
७	३७	५४७	सदानन्द शंकर पै	सं. हुबळी
८	१३	५३७	प्रभावती शंकर गोडबोले	गु. वै. वाटवे, बेळगांव
९	८०	५३५	मंगला रामकृष्ण कुलकर्णी	सं. नासिक
१०	७७	५३१	सदानन्द दिगंबर कामत	सं. शीव, मुंबई
११	६८	५३०	विद्या श्रीनिवास जळूकर	सं. नासिक
१२	६५	५२७	प्रभाकर बाळकृष्ण गोवंडे	सं. पुणें

निरनिराळ्या विषयांत प्रथम आलेल्याचीं नांवें, नंबर, संस्था / गुरु इ. पुढें दिलीं आहेत.

शारीर

अ. नं.	गुण संख्या	नांव	संख्या / गुरु
१३	७०+३७=१०७	प्रभावती शं. गोडबोले, बेळगांव	वै. वाटवे

दोष-धातु-मल-विज्ञान

१३	७२+१५=८७	प्रभावती शं. गोडबोले, बेळगांव	वै. वाटवे

वनस्पति-परिचय व द्रव्यगुण-विज्ञान

११७	६५+३४=९९	रमापति तिलकधारी त्रिपाठी, मुंबई	पुनर्वसु संस्था

अनुक्रमांक	गुण लेखी+तोंडी	विषय	संस्था / गुरु
		रसशास्त्र	
३८	८३+३४=११७	चन्द्रकांत बाबुगोंडा पाटील, कागल	वै. नाटोलीकर
		स्वस्थवृत्त इ.	
१	७९	रामतीर्थ भुजंगराव ऐरणी	संस्था हुबळी
६	७९	णपति परमेश्वर भट्ट	,, हुबळी
७	७९	वेंकटरामन शंभू भट्ट	,, हुबळी
१५	७३	वें. कृ. हेबसूर	,, हुबळी
		संस्कृत	
९९	८४	विमल हरी पटवर्धन	सं. शीव, मुंबई
		अष्टांगहृदय	
३९	७३	देवकुमार बाबूगोंडा पाटील कागल	वै. नाटोलीकर

नासिकच्या शुध्द आयुर्वेद विद्यालयाचें

भूषणस्पद यश

"आयुर्वेदप्रवीण परीक्षेंत आपल्या विद्यालयाचा १०० टक्के निकाल लागल्याचें पाहून आनंद झाला. आयुर्वेद सेवा संघ व विद्यालयांतील अध्यापकवर्ग आणि विद्यार्थीवर्ग यांस भूषणास्पद असें यश मिळालें आहे. असाच संस्थेचा उत्कर्ष होवो."

२८ शुक्रवार पुणें २ —चंद्रशेखर जोशी
एम्. एस्सी.

अनुकरणका विषय

"आपके विद्यालयके सभी छात्र परीक्षामें उत्तीर्ण हुये इस के लिये आप, आपके सहयोगियों एवं सफल छात्रोंका हार्दिक अभिनंदन.

आपकी संस्थाकी यह सफलता सभी गुरुओं एवं विद्यार्थियोंके लिये सुखद ईर्षा एवं अनुकरण का विषय है।

आशा नही अपितु पूर्ण विश्वास है कि संस्था उत्तरोत्तर उन्नति करते हुये आयुर्वेदकी सफलतामें अत्यंत सहायक सिद्ध होगी। पुनः एक बार अभिनंदन करता हूं।"

अग्रवाल नगर
विन्सेंट रोड, माटुंगा
मुंबई १९

भवदीय
—श्रीरामशर्मा

वाचकांचा पत्रव्यवहार—

एक नवी वनस्पति—सूर्यतेजस्विनी

"आज एक नवी वनस्पति, परिचय व संशोधन याकरितां पाठवित आहे. या वनस्पतीचा विशेष असा गुण पहिल्यानेंच सांगतो. या वनस्पतीच्या अंतर्सालीचा तुकडा अथवा भुकटी सूर्यप्रकाशांत धरली असतां अभ्रकाच्या कणाप्रमाणें चमचम करते. सावलींतहि थोड्या प्रमाणांत चमकते. रात्रीं दिव्यापुढें धरली असतां चमकते."

वाघळी पू. खा. —वै. हि. मो. जंगले

[वरील वनस्पतीच्या सालीचे तुकडे पावले. साल लोध्राच्या सालीप्रमाणें जाड, हलकी व पांढरी आहे. वर लिहिल्याप्रमाणें त्यांत चमक आहे. वाचकांपैकीं कोणाला याविषयीं अधिक माहिती असल्यास कळवावी. ती प्रसिद्ध करण्यांत येईल. —संपादक]

डॉ. डी. ए. घाडगे लिखित उपयुक्त ग्रंथ

इंजेक्शन विज्ञान	६ रु.
इंजेक्शन चिकित्सा	६ रु.
पाश्चात्य रामबाण औषधें	२॥ रु.
सचित्र उपनेत्र विज्ञान	१। रु.

वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक
येथें मिळू शकतील

मिरचीचें 'कटु कर्तव्य' :

लेखक—
वैद्य बिंदुमाधव पंडित

आयुर्वेदांत रसांनीं दोषदुष्टि होते व दुष्ट दोष धातूंना दुष्ट करतात असा क्रम दिला आहे. त्याचप्रमाणें रस हेच दोषांचें शमन करतात असाहि विचार मांडला आहे. प्राचीन वाङ्मयांत तिखट रसाचीं द्रव्यें हिंग, मिरें, वावडिंग, पिंपळी, पिंपळीमूळ, चवक, चित्रक, सुंठ, कुठेरादि हरीतक (आहारांत घ्यावयाचे हिरवे पदार्थ) गोमूत्र, पित्त, बिब्बा हीं सांगितलीं आहेत. रोज व्यवहारांत यापैकीं हिंग येतो. मसाल्यांत मिरें वापरतात. सुंठ औषध म्हणून वापरली जाते. (यंदा तर ती बरीच महागली आहे.) हरीतकापैकीं आलें, मुळा, लसूण हीं मधूनमधून हवामान पाहून वापरलीं जातात.

नित्यं सर्वरसाभ्यासः

आहारशास्त्रांत 'नित्यं सर्वरसाभ्यासः' असें सांगितलें आहे, व वयांत आलेल्या माणसाची 'तिखट रस' ही नित्याची गरज आहे. गोडाशिवाय चालेल पण तिखटाशिवाय भागेल असा मनुष्य विरळा. आज या तिखटरसाची गरज भागविण्याचें कार्य भारतांत तरी मिरची [लाल व हिरवी] करीत आहे. हिरवी मिरची हरीतक वर्गांत मोडते. व तशी ती वापरलीहि जाते. वर्षाला पुरेल इतकें तिखट (लाल मिरचीचें) घरीं तयार करून तें काळजीपूर्वक संभाळलें जातें. सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, मिरचीनें भारतीय जीवनांत अढळ स्थान प्राप्त केलें आहे. तिचें सेवनाचा सतत अभ्यास (शीलन) चालू आहे.

औषध म्हणून मान्यता द्या

आहार म्हणून मिरचीला ही मान्यता मिळालेली आहे. अद्याप वैद्यवर्यांनीं तिजकडे एक उपयुक्त औषधी या दृष्टीनें पाहिलेलें फार कमी आढळतें. इतर कटु द्रव्यें निर्दोष, पण मिरची मात्र दोषप्रकोपक अशी कांहींशी गैरभावना लोकांत पसरलेली आहे. ती भावना आतां दूर व्हावयास हवी आहे. प्रत्येक द्रव्यांत कांहीं गुण व कांहीं दोष असावयाचेच, ते गुणदोष जाणूनच वैद्य त्याचा उपयोग करीत असतात. महाराष्ट्रीय वैद्यांनीं मिरचीकडे उपयुक्त औषधी द्रव्य म्हणून पहावें व पंचकोल, षडूषण अशा संयुक्त कटु द्रव्यांत तिला अवश्य स्थान द्यावें, असा काल आला आहे.

आंगणांत पिकूं शकते

आज चांगली पिंपळी, चांगली मिरीं मिळण्यास किती त्रास पडतो व किती खर्च येतो! चांगली मिरची मिळणें महाराष्ट्राला बिलकुल कठीण नाहीं, उलट सुलभ आहे. आपल्या परसांत-आंगणांत ती पिकूं शकतें. पिंपळीमूळ म्हणतात, पण तें काय असतें व कोठें बनतें हें फारच थोड्यांना माहिती असेल. चवक तर काय आहे हें मला अद्याप माहीत नाहीं. कोणी म्हणतात कीं ते मिऱ्याच्या वेलाचे तुकडे आहेत.

मिरची ही जबाबदारी पार पाडील

आधींच तिखट रसाच्या द्रव्यांची संख्या थोडी आहे. त्यांत जीं नित्य मिळतात व वापरण्यांत आहेत त्यावर दोषल द्रव्य म्हणून शिक्का मारून तीं अलग ठेवणें, हें आतां युक्त होणार नाहीं. भारतीय लोक ज्याप्रमाणें स्वराज्यांत जबाबदारीचीं कामें सांभाळूं शकतात त्याचप्रमाणें इतःपर मिरची ही आपलें 'कटु कर्तव्य' पार पाडीलच असा विश्वास बाळगून वैद्यांनीं तिचा वापर औषधांत अवश्य करावा.

खाजेवर मिरचीचें तेल

उत्तर हिंदुस्थानांत वैद्यांनीं मिरचीचा या दृष्टीनें वापर सुरू केला आहे, त्याचीं कांहीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत. आपल्या इकडेहि 'कटु तेल' म्हणून मिरचीसिद्ध तेल वापरणारे वैद्य आमच्या पाहण्यांत आहेत. आयुर्वेद सेवा संघातर्फे अनेकांना मिरचीचें सिद्धतेल करून देण्यांत आलेलें आहे. व खेडेगांवांत खरूज खाज या विकारांवर मिरचीच्या तेलाचा उत्तम

उपयोग होतो असा अनुभव अनेक ग्रामीण उपचारकांनीं आमच्या जवळ सांगितला आहे. कोठेंहि खाज येऊं लागली कीं, आपण करंज–तेल, कडुनिंब–तेल वापरतो व लौकर गुण आला नाहीं म्हणजे त्या औषधाला दोष देतो. वास्तविक खाज हा कफविकार आहे व त्यावर रामबाण औषध तिखट रस हेंच आहे. तिक्त (कडू) व कषाय (तुरट) हे पित्त-शामक (व कफनाशक) सौम्य रस आहेत, ते वात-कफात्मक (जोरानें येणारी व वेडेपिसें करणारी) खाज मिटवूं शकत नाहींत.

पुढें कांहीं मिरचीच्या औषधांचे पाठ व उपयोग दिले आहेत.

तीक्ष्णावटी

(उत्तेजक, बलवर्धक, उदररोगनाशक)

बीजसहित लालमिरची चूर्ण, रससिंदूर व शुद्ध कुचलाचूर्ण सर्व समभाग घ्यावींत. प्रथम रससिंदूर खलावा, नंतर त्यांत मिरचीचें चूर्ण खलावें, नंतर त्यांत कुचलाचूर्ण घालून खलावें. पाणी घालून ६ तास खल करावा. १।१ गुंजेची गोळी बनवावी.

या गोळया अजीर्णजन्य पोटदुखी तावडतोब बरी करतात. ह्या गोळया पाचक, बल्य, ग्रहणी, अजीर्ण, उदावर्त, कंपज्वर, अत्यंत अवसाद व मद्य पिण्याची इच्छा कमी करतात. अफू सुटण्यासाठीं यांचा उपयोग करावा. मलेरिया, जीर्णज्वर, वात, कॉलरा यांत उपयुक्त आहेत. मकरध्वजाप्रमाणें उत्तेजक, नाडीला बल देणारा, वृष्य, जननेंद्रिय उत्तेजक, ध्वजभंग, शुक्राशयाचे श्लेष्मिक विकार यांत उपयुक्त. लघवींतून मांसवर्धक [अल्ब्युमेन] पदार्थ जाणें थांबतें.

प्रयोग– रोज ३ वेळ १।१ द्यावी. उत्तेजना–साठीं रात्रीं ३ गोळया दुधाबरोबर द्याव्यात. मलेरिया थांबविण्यासाठीं ३ तास पूर्वी अगर कॉल्ऱ्यांत ३।३ गोळया एका मात्रेंत द्याव्यात. —धन्वन्तरी

लाल मिरचीचें तेल

मिरचीचे देठ व बीं काढून चूर्ण अगर कल्क तयार करावा. कल्काच्या चौपट तेल [गोडें, तिळाचें, जें मिळेल तें] घालून त्यांत तेलाच्या चौपट पाणी घालून मंद अग्नीवर तेल सिद्ध करावें. पाण्याऐवजी मिरचीचा काढा घेतल्यास अधिक तीव्र होईल. या मिरचीतेलांत मेण व कोकमतेल मिसळून मलम तयार करावें व तें खरजेवर लावावें. गोड्यातेलाऐवजी करंज, निंब असें कडू तेल वापरल्यास अधिक गुण येईल. काढ्यासाठीं खैर, बाभूळसाल वापरतां आल्यास अधिक गुणकारी. मुख्य गुण मिरचीचा आहे. मिरचीनें खाज मरते व खरूज बरी होते.

स्पिरिट मिरची

स्पिरिटमध्यें देठ बीं विरहित मिरचीची पूड घालून १५ दिवस ठेवावी व नंतर तें स्पिरिट आयोडिनप्रमाणें टिंक्चर वापरावें. —बिंदुमाधव

लाल मिरचीच्या गोळया

तिखट लाल मिरच्या घ्याव्या, त्याचे देठ व बिया काढाव्या. नुसत्या लाल सालीचें चूर्ण करावें व त्याच्या [मधांत अगर पाण्यांत] गोळया बनवाव्या व जेथें जेथें कटुरसाचे पदार्थ इष्ट सांगितले आहेत तेथें त्या द्याव्या. १–१ गुंजेची गोळी करावी. जरूरीप्रमाणें १ ते २ गुंजा मात्रा द्यावी. गोळी गिळून घ्यावी. कॉल्ऱ्यांत, बिब्बा, कांदा, लसूणाच्या गोळया वापरतात त्याप्रमाणें या गोळया वापराव्या.

—'स्वास्थ्यसंदेश'

पित्तविकार

पित्ताचे विकारांचा उपद्रव होऊं नये म्हणून व गरिबांनाहि भरपूर प्रमाणांत पित्त-शामक द्रव्य वापरतां यावें या उद्देशानें सेवा संघानें मुद्दाम तयार केलेलें

उत्तम मुक्ताशुक्ति भस्म

आजच मागवून घ्या. किंमत २ रु. तोळा

आयुर्वेद औषधीभवन, नासिक

दोषधातुमलांचे निरपेक्ष वृध्दि-क्षय (लेखांक २रा)

[लेखक—वै. वा. स. अंदनकर, आयुर्वेदतीर्थ, चांदा (म. प्र.)]

दोषधातुमला मूलं सदा देहस्य...।

(अष्टांगहृदय, सूत्र. अ. ११)

या सूत्रांत निर्दिष्ट केलेल्या वातादि तीन दोषांचें, रसादि सप्तधातूंचें व मूत्रादि मलांचें शरीरांत कांहीं प्रमाण आहे काय ? असा प्रश्न उपस्थित होतो. ज्याप्रमाणें आपण व्यवहारांत ४ शेर साखर किंवा ४ मण दूध असा वाग्व्यवहार करितो, त्याप्रमाणें शास्त्रांत दोष, धातु व मल याबद्दल सुद्धां असा मानत: उल्लेख आहे काय ?

परिमाण नांवाचा गुण

सार्था गुर्वादयो बुद्धिः प्रयत्नान्ताः परादयः।
गुणाः प्रोक्ताः ....।

चरकाचार्यांनीं आपल्या सूत्रस्थानाच्या पहिल्या अध्यायांत, आयुर्वेदतंत्रांत गुण ही संज्ञा कशा कशाला आहे, ह्याचें विवरण करतांना जे परादि गुण सांगितले आहेत त्यांत परिमाण नांवाचा एक गुण सांगितला आहे, व ‘ परिमाणं पुनर्मानं... । ’ असें स्पष्टीकरण आचार्यांनीं आपल्या सूत्रस्थानाच्या २६वे अध्यायांत केलें आहे. चक्रपाणि म्हणतात कीं, मानं प्रस्थाढकादि तुलादि मेयम्।’ तेव्हां शास्त्रांत मान आहे असें सिद्ध होतें. मान ही गुणात्मक संज्ञा दोष, धातु व मल या देहाच्या मूल द्रव्यांना लागू आहे काय ? तें आतां आपण पाहूं.

अग्निवेशांचा प्रश्न

चरकसंहितेच्या शारीरस्थानाच्या ७ व्या अध्यायांत भगवान् आत्रेयांना अग्निवेशानें पुढील प्रश्न विचारला आहे. शरीरसंख्यामवयवशः शरीरं प्रविभज्य सर्वशरीरसंख्याप्रमाण–ज्ञानहेतोर्भगवन्तमात्रेयमाग्निवेशः पप्रच्छ । व ह्या प्रश्नाचें. उत्तर श्रीआत्रेयांनीं पुढें सविस्तर दिलें आहे. त्यांत दोष, धातु, मलांचेंहि परिमाण निर्दिष्ट केलें आहे.

यत्त्वंजलिसंख्येयं तदुपदेक्ष्यामः, तत् परं प्रमाणमभिज्ञेयं, तच्च वृद्धिन्हासयोगि, तर्क्यमेव । तद्यथा–दशोदकस्यांजलयः शरीरे स्वेनांजलिप्रमाणेन, यत्तु प्रच्यवमानं पुरीषमनुबध्नात्यतियोगेन तथा मूत्रं रुधिरमन्यांश्च शरीरधातून्, यत्तु सर्वशरीरचरं बाह्या त्वग्बिभर्ति, यत्तु त्वगन्तरे व्रणगतं लसीकाशब्दं लभते, यच्चोष्मणाऽनुबध्दं लोमकूपेभ्यो निष्पतत् स्वेदशब्दमवाप्नोति, तदुदकं दशांजलिप्रमाणं; नवांजलयः पूर्वस्याहारपरिणामधातोर्यंरसमित्याचक्षते, अष्टौ शोणितस्य, सप्त पुरीषस्य, षट् श्लेष्मणः, पंच पित्तस्य, चत्वारो मूत्रस्य, त्रयो वसायाः, द्वौ मेदसः, एको मज्ज्ञः, मस्तिष्कस्यार्धांजलिः, शुक्रस्य तावदेव प्रमाणं, तावदेव श्लेष्मणश्चोजसः, इत्येतच्छरीरतत्त्वमुक्तम् ॥१७॥ ......इति शरीरावयवसंख्या यथास्थूलभेदेनावयवानां निर्दिष्टा ॥१८॥

काश्यपसंहितेंतील-प्रमाणें

ह्याचप्रमाणें काश्यपसंहितेंतहि हाच विषय खालीलप्रमाणें आला आहे:—

जातस्य वर्धमानस्य यूनो वृद्धस्य देहिनः ।
स्वेनांजलिप्रमाणेन द्रवाणि प्रमिमीमहे ॥
मज्जमेदोवसामूत्रपित्तश्लेष्माणि विट् तथा ।
एकद्वित्रिचतुष्पंचषट्सप्तांजलिकाः स्मृताः ॥
शोणितांजलयोऽष्टौ तु नैव पक्तिरसस्य तु ।
दशैवांजलयः प्रोक्ता उदकस्य त्वगाश्रयाः ॥
तेनोदकेन पुष्यन्ति धातवो लोहितादयः ।
अतिसारे पुरीषं च ततो मूत्रं प्रवर्तते ॥
व्रणं लसीका पूयं च पिच्छा चातः प्रवर्तते ।
भवन्ति तास्मिन् दुष्टे च दद्रुकण्डूविचर्चिकाः ॥
त्वगामयाः किलासानि पामा केशवधस्तथा ।
तदग्निमारुतोविद्धं कूपकैः स्वेद उच्यते ॥
श्लेष्मणस्तु प्रमाणेन प्रमाणं तुल्यमोजसः ।

शुक्रस्यार्धांजलिर्देहे मस्तिष्कस्य तथैव च ॥
एतत् प्रमाणमुद्दिष्टमुत्कृष्टं सर्वमेव तु ।
प्रज्ञाप्तपिशितीयस्य ततो मध्यं ततोऽधमम् ॥
शुक्रं तु षोडशे वर्षे संपूर्णं संप्रवर्तते ।
अन्योन्यसंश्रयाण्याहुरन्योन्यगुणवन्ति च ॥
महाभूतानि दृश्यानि दार्वग्नितिलतैलवत् ।
शरीरसंख्या निर्दिष्टा यथास्थूलं प्रकारतः ॥
देहावयवसूक्ष्मं तु भेदानन्त्यं सुदुर्वचम् ।
(काश्यपसंहिता, शरीरविचयशारीराध्यायः ।
शारीरस्थानम् ॥)

कफपित्तदोषांचें अंजलीमान

वरील चरकोक्त व कश्यपोक्त श्लोकांचें समीक्षण केल्यास असें दिसून येईल कीं वातादि त्रिदोषरूपी द्रव्यांपैकीं फक्त कफ व पित्त या दोन दोषांचें क्रमानें ६ व ५ अंजलीचें प्रमाण शास्त्रकारांनीं निदिष्ट केलें आहे. त्याचप्रमाणें सप्तधातुपैकीं रस, रक्त, मेद, मज्जा व शुक्र ह्या धातूंचे क्रमानें ९, ८, २, १ व अर्धा अंजली असें प्रमाण उल्लेखित केलें आहे. तसेंच मलापैकीं पुरीष व मूत्राचें प्रमाण क्रमानें ७ व ४ अंजली सांगितलें आहे. स्वेद या मलाचें पृथक् प्रमाण न सांगतां शरीरांत वसत असलेल्या उदकाचें प्रमाण दशांजलि सांगून त्यांतच स्वेदाचा अन्तर्भाव होतो, असा उल्लेख केलेला आहे. ह्यांत जीं शारीर द्रव्यें आलीं आहेत तीं द्रवगुणात्मक किंवा अर्ध द्रव गुणात्मक [Liquid and Semifluid] अशीं आहेत. कश्यपऋषि स्पष्टच सांगतात कीं 'द्रवाणि प्रमिमीमहे।' इंग्रजी भाषेंत सांगावयाचें म्हणजे हें परिमाण Measures of capacity [Volume] होय. आपल्या न्यायशास्त्रांत 'संख्यातः', परिमाणाच्च प्रचयादपि जायते...। असें तीन प्रकारचें जें परिणाम सांगितलें आहे, त्यापैकीं हें प्रस्तुत प्रमाण 'परिमाणात्' यापैकीं होय. परिमाणं भवेन्मानं व्यवहारस्य कारणम् । [कारिकावली]. आतां वरील श्लोकांत मांस व अस्थि व वातदोष ह्यांचें मान उल्लेखित दिसत नाहीं. मांस या धातूचें वर्णन चरकसंहिता व सुश्रुतसंहिता या दोन ग्रंथांत पंच पेशीशतानि या शब्दांत आहे. व सुश्रुतसंहितेंत अस्थि वेदवादी लोकांचे मताप्रमाणें ३६० व शल्यतंत्राचे मताप्रमाणें ३०० असा उल्लेख आहे. एवंच तीन दोषांपैकीं वातदोष सोडून कफ व पित्तदोषाचें, सातहि धातूंचें व मलांपैकीं मुख्य तीन मल पुरीष व मूत्र स्वेद यांचें परिमाण दिलें आहे.

वातदोषाचें मान दिलें नाहीं

तेव्हां वातदोषाचें मान कां दिलें नाहीं असा प्रश्न उपस्थित होतो. चरकाचार्य स्पष्ट म्हणतात कीं आम्ही ग्रंथांत अशाच शारीर द्रव्यांचें मान दिलें आहे. कीं जे भाव स्थूल आहेत व तोच अनुवाद कश्यपऋषींनेंहि केलेला आहे. इति शरीरावयवसंख्या यथास्थूलभेदेनावयवानां निर्दिष्टा। (चरक शारीर अ.७)

शरीरसंख्या निर्दिष्टा यथास्थूलं प्रकारतः ।
देहावयवसूक्ष्मं तु भेदानन्त्यं सुदुर्वचम् ।
[काश्यपसंहिता]

- भारताच्या नामवंत विद्वानांनीं प्रशंसिलेला -
आयुर्वेद, ॲलोपॅथी, होमिओपॅथी, बायोकेमिक औषधोपचारांची एकत्र माहिती असलेला विद्यार्थी व वैद्यांकरितां उपयोगी
अद्वितीय ग्रंथ
" भारतीय चिकित्सा--रहस्य "
(सचित्र मराठी)
(ले.–पं. व्यासनारायण शुक्ल, आयुर्वेदाचार्य)
स्टेथॉस्कोप, थर्मामीटर, रक्तपरीक्षा, 'क्ष' किरण, ब्लडप्रेशर वगैरे आधुनिक व जुन्या रोगनिदानासह, इंजेक्शनें व मिक्श्चरांच्या माहितीनें युक्त.
पृष्ठसंख्या ५२५ किंमत ६॥ रु. [ट. खर्च निराळा]
२ रु. आगाऊ म. ऑ. नें पाठवावेत.
आजच मागवा.
... श्रीदुर्गा आरोग्य मंदिर ...
मेनरोड, सीताबर्डी, नागपूर

अर्थात् देहाचे जे स्थूल भाव आहेत त्यांचें मान सांगणें सुकर असून सूक्ष्म भावांचा माननिर्देश दुष्कर आहे असा शास्त्रकारांचा अभिप्राय दिसतो. तेव्हां चरकाचार्य आपल्या सूत्रस्थानाचे पहिले अध्यायांत वातदोषाला ‘ सूक्ष्म ’ हें विशेषण लावतात.

रूक्षः शीतो लघुः सूक्ष्मश्चलोऽथ विशदः खरः।

याशिवाय सूत्रस्थानाच्या वातकलाकलीय अध्यायांत वाताचें ‘ असंघातवन्तमनवस्थितम्...।’ असें वर्णन केलें आहे. ‘ असंघातमिति पित्तश्लेष्मवदवयवसंघातरहितं, अनवस्थितमिति चलस्वभावम् ...’

[चक्रपाणि टीका]

प्रमाण कार्यानुमेय आहे

तेव्हां सूक्ष्म व चल असलेल्या वायूचें मान देणें अशक्य असल्यामुळें शास्त्रकारांनीं तें स्पष्ट सांगितलें नाहीं. वात हा अव्यक्त असल्यामुळें तो फक्त कार्यानुमेय आहे. अव्यक्तो व्यक्तकर्मा च [सुश्रुत निदान अ. १] उत्साहोच्छ्वासनिश्वासचेष्टावेगप्रवर्तनैः। सम्यग्गत्या च धातूनामक्षाणां पाटवेन च । अनुगृह्णात्यविकृतः ...। [वाग्भट सूत्र अ. ११] हीं जीं वातदोषाचीं प्राकृतकर्में सांगितलीं आहेत तीं जोंपर्यंत स्वस्थ शरीरांत चालू आहेत तोंपर्यंत त्या शरीरांतील रूक्षशीतादि गुण ज्यावर समवाय संबंधानें आहेत असें वातद्रव्य सम प्रमाणांत आहे असें अनुमानानें समजावयाचें; व त्याचे सम प्रमाणांत बदल होऊन तें प्रमाण वृद्ध किंवा क्षीण झाल्यास शास्त्रांत सांगितलेल्या त्याच्या वृद्ध व क्षीण कर्मांवरून अनुमान करून त्याची वृद्धि व क्षय याचा बोध करून घ्यावयाचा. म्हणजे वातदोषाचें मान सम असो किंवा विषम असो तें कार्यानुमेय आहे, असा याचा अर्थ होतो.

मान सांगणें कठिण आहे

इतकेंच काय तर दोष, धातु, मल या द्रव्यांपैकीं कोणतेंहि द्रव्य सूक्ष्म असो कीं स्थूल असो, प्रत्येक शरीराचा व्यक्तिशः विचार केल्यास त्या त्या शरीरांतील दोषधातुमलांचें नक्की मान सांगणेंहि कठिणच आहे. सारख्या वयाचीं शरीरें घेतल्यास एक वातप्रकृति, दुसरी पित्तप्रकृति व तिसरी कफप्रकृति अशा तीन व्यक्ति असावयाच्या, व प्रकृति या संज्ञेचाच अभिप्रेत भावार्थ असा आहे कीं, त्या त्या प्रकृतीच्या शरीरांत तें तें वातादि द्रव्य अधिक प्रमाणांत आहे; तेव्हां सारख्या वयाच्या तीन शरीरांत परस्पर भेद असल्यामुळें दोषांची माननिश्चिति नाहीं. त्याचप्रमाणें एकाच शरीराचा विचार केल्यासहि वातादि दोषांचें मान स्थिर रहात नाहीं.

वयोऽहोरात्रभुक्तानां तेऽन्तमध्यादिगाः क्रमात् ।
(वाग्भट सूत्र. अ० १)

तेव्हां दोषांचें मान स्थायि नसल्यामुळें त्यांचें परिमाण कसें काय ठरवावयाचें ? तेव्हां सुश्रुताचार्य म्हणतात कीं, ज्या ज्या शरीराचें स्वास्थ्य जितक्या दोषादिकांच्या प्रमाणानें राहील तें तें त्या त्या शरीराचें मान समजावें. त्या त्या राशिपुरुषाचा जो सुखात्मक आत्मगुण तो जितक्या दोषादिकांचे मानानें अप्रतिहत राहील तें त्या शरीराचें प्रमाण समजावें. व त्या राशिपुरुषाला दुःख या गुणाचा अनुभव यावयास लागला कीं, त्या शरीराचें दोषादिकांचें मान विषम झालें असें समजावें.

विकारो धातुवैषम्यं साम्यं प्रकृतिरुच्यते ।
सुखसंज्ञकमारोग्यं विकारो दुःखमेव च ॥
(चरक सूत्र. अ० ९)

तसेंच धातूंच्या व मलांचेहि दृष्टीनें सारख्या वयाच्या व्यक्तींच्या शरीरांचा विचार केल्यास त्या त्या शरीराचें धातुमान व मलमानहि निश्चित राहूं शकत नाहीं.

सारवान् धातूचें आधिक्य

साराण्यष्टौ पुरुषाणां... (चरक, विमान अ·८) याप्रमाणें एखादी व्यक्ति रक्तसारवान् तर दुसरी आस्थिसारवान् किंवा शुक्रसारवान् राहील. ह्याचा स्पष्ट अर्थ हाच होतो कीं, एकाचे शरीरांत रक्तधातूचें आधिक्य तर दुसऱ्याचें शरीरांत अस्थीचें व तिसऱ्याचें देहांत शुक्रधातूचें आधिक्य आहे. तेव्हां ह्या तीनहि शरीरांत सामान्यतः सप्तधातूंचें अस्तित्व

असून त्यांचें वय सारखें असलें तरी त्या त्या धातूंचें प्रमाण तारतम्यानें अधिक आहे. तेव्हां प्रत्येक शरीराचें धातुमान भिन्न भिन्न असल्यामुळें धातूंची मानानीश्चिति करितां येत नाहीं· त्याचप्रमाणें कफप्रकृतीचें शरीर म्हटल्यानंतर तें शरीर सामान्यतः पांचभौतिक असलें तरी त्या शरीरांत पृथिवी व आप् या दोन भूतांचा प्रकर्ष राहील. अम्भःपृथिवीभ्यां श्लेष्मा । (अष्टांगसंग्रह सूत्रस्थान अ० २०). तेव्हां ह्या शरीरांत पार्थिवभाव व आप्यभाव अधिक प्रमाणांत राहतील. त्यामुळें विष्ठा व मूत्र ह्यांचें आधिक्य राहील. तेच वातप्रकृतीच्या शरीरांत कमी राहतील. वाय्वाकाशधातुभ्यां वायुः । [अष्टांगसंग्रह सू. अ.२०]

पार्थिव व आप्य भाव

चरकसंहितेच्या शारीरस्थानाच्या ७ व्या अध्यायांत शरीराचे पार्थिव व आप्य भावांचें वर्णन दिलें आहे त्यांत पुरीष हे पार्थिव मूत्र व स्वेद हे आप्य आहेत असा उल्लेख आहे.

यत्रः यद्विशेषतःस्थूलं स्थिरं मूर्तिमद्गुरुखरकठिनमंगं नखास्थिदन्तमांसचर्मवर्चः केशस्मश्रुनखलोमकण्डरादि तत् पार्थिवं गन्धो घ्राणं च । यद्द्रवसरमन्द। स्निग्धमृदुपिच्छिलं रसरुधिरवसाकफपित्तमूत्रस्वेदादि तदाप्यं रसो रसनं च ।

साइ
डायाबेटॉल
मधुमेहावर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द.कृ.साइ ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्सः —
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते—मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

मलाधिक्य

त्याचप्रमाणें ज्यांचें शरीरांत मेदाधिक्य आहे तेथें स्वेद हा मेदोधातूचा मल असल्यामुळें स्वेदाधिक्य राहील. एवंच धातु व मल ह्यांचाहि विचार केल्यास प्रत्येक शरीरांत वैलक्षण्ण असल्यामुळें त्यांचेहि मान भिन्न भिन्न राहील.

सुश्रुताचार्यांचा मननीय श्लोक

सुश्रुताचार्यांचे पुढील श्लोक फार मननीय आहेत.

वैलक्षण्याच्छरीराणामस्थायित्वात्तथैव च ।
दोषधातुमलानां तु परिमाणं न विद्यते ॥
एषां समत्वं यच्चापि भिषग्भिरवधार्यते ।
न तत् स्वास्थ्यादृते शक्यं वक्तुमन्येन हेतुना ॥
दोषादीनां त्वसमतामनुमानेन लक्षयेत् ।
अप्रसन्नेन्द्रियं वीक्ष्य पुरुषं कुशलो भिषक् ॥
समदोषः समाग्निश्च समधातुमलक्रियः ।
प्रसन्नात्मेन्द्रियमनाः स्वस्थ इत्याभिधीयते ॥
(सूत्रस्थान अ. १५)

कोणी म्हणतील कीं परिमाणं न विद्यते । ह्याचा अर्थ असा कीं दोषादिकांना तोळे, शेर व पायल्या अशा प्रकारचें कोणतेंच माप नाहीं असें सुश्रुताचार्यांचें म्हणणें आहे. पण तें बरोबर नाहीं. सुश्रुताचार्यांचें म्हणण्याचा अभिप्राय हाच कीं दोषादिकांना मान आहेच फक्त तें निश्चितपणें मोजणें कठीण असल्यामुळें त्याचें स्वास्थ्यवस्थेंत व रुग्णावस्थेंत चिकित्सकाला मापन करण्याचें साधन म्हणजे अनुमान होय एवढाच त्यांचा म्हणण्याचा भाव आहे, शिवाय चरकाचार्य म्हणतात कीं हे जें आम्ही अंजलीप्रमाण दिलें आहे तें प्रत्येक शरीराचें निश्चित प्रमाण नसून एकंदर सर्व शरीरांचा विचार करून अधिकांत अधिक प्रमाण किती रहाणें शक्य आहे याचा विचार करून

हें प्रमाण आम्ही सांगितलें आहे. तत् परं प्रमाणमभिज्ञेयम् ।

हें जास्तींत जास्त प्रमाण आहे

कश्यपऋषि म्हणतात कीं ज्यांचें अंगावर भरपूर मांसपुष्टि आहे म्हणजे मांसादिक धातूंचा अन्तर्बाह्य उपचार ज्या शरीरांत आहे अशा शिरा पुरुषाचें अधिकांत आधिक हें मान आम्हीं दिलें आहे व त्या त्या देहाप्रमाणें कमी व त्यापेक्षांहि कमी असें मान राहूं शकतें.

एतत् प्रमाणमुद्दिष्टमुत्कृष्टं सर्वमेव तु ।
प्रज्ञातपिशितीयस्य ततो मध्यं ततोऽधमम् ।

या सर्व विवेचनाचा निष्कर्ष

ह्या सर्व विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो कीं देहाचे मूलधार असलेलीं, वातादि त्रिदोष, रसादि सप्त धातु व पुरीषादि मल हीं पृथक् पृथक् सत्ता असलेलीं व भिन्न भिन्न परिमाण असलेलीं द्रव्यें होत. अर्थात् हीं नित्य अशीं भाव द्रव्यें होत. अर्थात् ह्यापैकीं कोणीहि परस्परांचा पर्याय नव्हेत किंवा अभावहि नव्हेत. व या तेरा द्रव्यांपैकीं त्यांतल्या त्यांत प्राधान्यानें विचार करावयाचा म्हटल्यास वातादि तीन द्रव्यांना दोष ही संज्ञा आहे. ह्यांच्याच साम्यावर सप्तधातूंचें व मलांचें साम्य अवलंबून आहे व प्रथम हे दोष दुष्ट होऊनच इतराची नंतर दुष्टि होते. तेषां सर्वेषामेव वातपित्तश्लेष्माणो दुष्टा दूषायितारो भवन्ति दोषस्वभावात् [चरक शारीर अ. ६]. ह्या वातादि त्रिदोषांना त्यांच्या निर्मितीचीं आमाशय, ग्रहणी व पक्वाधान हीं स्थानें आहेत व त्याप्रमाणें त्यांना स्वतंत्र मानहि आहे. ते साम्यावस्थेंत असतांना म्हणजे विशिष्ट मानांत असतांना शरीराचें धारण होतें म्हणून त्यांचें मान राखण्याचा नेहमीं प्रयत्न केला पाहिजे.

तैरेवाव्यापन्नैरधोर्ध्वसन्निविष्टैः शरीरमिदं धार्यतेऽऽगारमिव स्थूणाभिस्तिसृभिश्च त्रिस्थूणमाहुरेके ।

[सुश्रुत, सूत्रस्थान, अ. २१]

समाः परिपाल्याः । (सुश्रुत चिकित्सा अ. ३३)

अशा स्थानस्थ व मानस्थ वातादि दोषांना प्राकृत कर्मे करण्याकरितांच आखिल देहांत संचार करावा लागतो ह्याचें दिग्दर्शन आम्ही मागील लेखांकांत केलें आहे.

पृथक् पृथक् अस्तित्व सिद्ध होतें

कोणी म्हणतील कीं वातादि त्रिदोष, रसादि सप्तधातु व पुरीषादि मल यांचें परिमाण सांगण्याचें प्रयोजन काय ? त्यावर उत्तर असें कीं ह्या सर्व नित्य भावांचे पृथक् पृथक् परिमाण सांगितल्यावर प्रत्येक भावाची पृथक् पृथक् सत्ता म्हणजे अस्तित्व (Entity) सिद्ध होत असल्यामुळें व विशेषतः वातादि त्रिदोषांचे पृथक् पृथक् स्थान, मान व गति सिद्ध झाल्यामुळें. त्यांचे वृद्धि व क्षय परस्पर निरपेक्ष सुद्धां होऊं शकतात हें आम्हांला शास्त्रकारांचें मत स्पष्ट करावयाचें आहे. दोषांचे वृद्धि व क्षय सापेक्षच असतात व ते निरपेक्ष होऊंच शकत नाहींत असें कोणी प्रतिपादन केल्यास तें मत शास्त्रसंमत नाहीं ह्याचें विशदीकरण आम्हांस पुढील लेखांकांत करावयाचें आहे. तत्पुष्ट्यर्थ ह्या लेखांत आम्ही आपली भूमिका तयार केली आहे, एवढें प्रांजलपणें सांगावेसें वाटतें.

कै. ग. कृ. पाटणकर, किन्हई

किन्हई [जि. उ. सातारा] येथील सुप्रसिद्ध वृद्धवैद्य भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर हे शनिवार ता. १९।११।५५ रोजीं सकाळीं ७ वाजतां कफविकारानें दिवंगत झाले.

आयुर्वेदपत्रिकेसाठीं त्यांनीं पूर्वी खूपच लेखन साहाय्य केलें आहे. आयुर्वेदपत्रिकेच्या यशाचे ते एक मानकरी आहेत.

पवित्र
नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

वैद्यकीय सल्ला-शुल्क

आपल्या प्रकृतीची हकीकत कळवून उपचारांची अपेक्षा ठेवणारीं पत्रें आयुर्वेद सेवा संघाकडे बहुधा रोजच्या टपालांत असतात. या सर्व पत्रांचें काळजीपूर्वक वाचन करून उत्तरें देण्यासाठीं स्वतंत्र चिकित्सक वैद्य नेमण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. पुष्कळशा पत्रांबरोबर तर उत्तरासाठीं कार्ड-पाकिटहि नसतें. अर्थात् तेवढ्यानें कार्यभाग होत नाहीं.

जबाबदारीची गोष्ट

वैद्यकीय सल्ला ही गोष्ट जबाबदारीची आहे व त्यासाठीं विचारपूर्वक सल्ला दिला जाणें आवश्यक आहे. आपल्या कारखान्याचीं विशेष औषधें विकलीं जावीत यासाठीं मोफत सल्ला देणें ही व्यापारी दृष्टि झाली. आयुर्वेद सेवा संघ ती दृष्टि ठेवूं इच्छित नाहीं. सबब ज्यांना आयुर्वेद सेवा संघाकडून सल्ला हवा असेल त्यांनीं आपल्या प्रकृतीच्या किचकट स्वरूपानुसार व आर्थिक परिस्थित्यनुसार पत्राबरोबर २ रु. पासून १० रुपये पर्यंत सल्ला-शुल्क अवश्य पाठवावें. त्यामुळें त्यांच्या पत्राचें समाधानकारक विचारपूर्वक उत्तर पाठविण्याची व्यवस्था करणें शक्य होईल.

सेवा संघाच्या कार्यालयांत असलेली चिकित्सक मंडळी व त्यांच्यापुढें नित्य कर्तव्य म्हणून असलेलीं अनेक जबाबदारीचीं कामें यामुळें आलेल्या सर्व पत्रांना समाधानकारक उत्तरें वेळोवेळीं पाठविणें, शक्य होत नाहीं याबद्दल पत्रलेखकांनीं क्षमा करावी.

—मंत्री, आयुर्वेद सेवा संघ, नासिक

सातपुड्यांत वनस्पति सहल

शुध्द आयुर्वेदाचें पुणें येथें शिक्षण घेणारे विद्यार्थी चि. तात्या जळूकर व भुसावळचे श्री. रा. शं. राव हे, चिनावलचे वैद्यराज ठोंबरे आणि त्यांचे चिरंजीव वैद्य माधवराव ठोंबरे यांच्या नेतृत्वाखालीं सातपुड्यांतील 'पाल' या डोंगरी भागांत व त्यानंतर जळगांव जवळील मेहरुण भागांत वनस्पति परिचयासाठीं गेले होते.

KASPHO
COUGH CURE
TABLETS

अपुरें संरक्षण

धूळ, जंतू व श्वसनाच्या इतर विकारांपासून संरक्षण मिळविण्यासाठीं कास्फो औषधि गोळ्या वापरणें इष्ट आहे. खोकला, पडसें, घशाची खवखव, ब्रॉंकायटिस इ. विकारांमध्यें कास्फो उपयुक्त आहे. आजच एक बाटली खरेदी करा. सर्वत्र मिळूं शकतें.

कास्फो
खोकल्यावरील १ उपाय

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड,
अहमदनगर.

योजना यशस्वी करा
राष्ट्र बलशाली करा

EVEREST APK. 54-3 MAR

महाराष्ट्र प्रां. वैद्य मंडळाध्यक्षांचें प्रचारकार्य

[लेखकः-आयुर्वेदाचार्य **पां. ह. देशपांडे**]

अलिकडे दोन तीन वर्षांत मंडळाचे अध्यक्षांवर टाकलेल्या जबाबदारीप्रमाणें यंदा मलाहि ती यावच्छक्य पार पाडण्यास हिंडणें भाग होतें. त्याप्रमाणें प्रकट निवेदन करून आलेल्या स्वीकृतींत कुलाबा जिल्हा प्रथम हिंडण्यास घेतला. ता. ९।१०।११ नोव्हेंबर या तीन दिवसांत अनुक्रमें रोहें, पेण, पनवेल हीं तीन शहरें हिंडलो. तीनहि ठिकाणीं व्याख्यानें झालीं, सर्वत्र वैद्यसमाज उत्साही व कार्योन्मुख दिसला. तिन्ही ठिकाणीं प्रचलित वैद्यक विषयांवर भरपूर चर्चाहि झाली. पेणला २-२॥ तास चर्चा फारच रंगली. तेथल्या जाहीर व्याख्यानाचेंहि चांगलें स्वागत झालें व तें वैद्यांइतकेंच वैद्यतरांकडूनहि. पुनः येण्याबद्दल लोकांनीं उत्सुकताहि बोलून दाखविली. रोह्याला ४।५ डॉक्टरहि उपस्थित होते. पेणला मात्र एकहि डॉक्टर नव्हते, पण सुशिक्षित समाज शंभरावर होता.

डॉ. शिरोडकरांचा शिरजोरपणा

आयुर्वेदाप्रीत्यर्थ सरकारनें कसलाहि खर्च करूं नये, असें डॉ. शिरोडकरांनीं जळगांवला डॉक्टरांच्या संमेलनांत म्हटल्याबद्दल रोह्याचे व्याख्यानाचे पूर्वी अध्यक्षांनीं उपन्यास केल्यामुळें त्यावर बरेंचसें बोलावें लागलें. आपल्या ॲलोपाथीचा एवढा बाऊ करून आयुर्वेदाला हीन लेखण्यांत केवढा वेडेपणा हे डॉक्टर करीत आहेत, ॲलोपाथीचे महागडे व अलिकडे वेळखाऊं होत चाललेले उपचार मागाहून कसे अपायकारक होतात; त्यामानानें ८०% भारतीय ज्याचा उपयोग करून घेतात असें 'चोप्रा व भोर' समितीनें म्हटलें त्या आयुर्वेदाचे उपचारच कसे अनपायी व निसर्गाला धरून आहेत हें सांगून डॉक्टरांनीं यापुढें असली अविचारी विधानें करूं नयेत असें मी बजाविलें. डी. डी. टी. चा फायदा मुळींच न होतां उलट ढेंकूण पिसाळणें, बी. सी. जी. ची बुवाबाजी ना. राजगोपालाचार्य यांनीं बाहेर काढून तिचेवर इंग्लंडमध्यें घातलेला निर्बंध, घटसर्पावरच्या साहक लशीनें होणारी नुकसानी व म्हणून तिचेबद्दलहि पाश्चात्य देशांत घेतलेली सावधगिरी इ. गोष्टींचा उल्लेख करून डॉक्टरांनीं व डॉक्टरांच्या तंत्रानें आरोग्यखातें चालविणाऱ्या नगरपालिकांनीं याबाबत नसता आग्रह धरूं नये व जनतेच्या पैशाची नासाडी करूं नये असें मी बजाविलें. त्याचबरोबर वैद्यांनींहि अंतर्मुख होऊन आपली चिकित्सापद्धति नीट न्याहाळावी, अवस्थाभेद नीट जाणून घेऊन एकैका रोगावरचीं औषधें वापरावींत, पण शस्त्रक्रिया आवश्यक असेल तेथें स्पष्टपणें रोग्यास तसा सल्ला द्यावा, असें सांगून मुळव्याधीवरच्या दहा प्रभावी समजल्या जाणाऱ्या औषधींचा अवस्थाभेदाप्रमाणें कसा उपयोग करावा लागेल याचें उदाहरण घेऊन मी आपलें म्हणणें विशद केलें.

डॉक्टरहि देशाच्या संपदेचा अपहारकच

पेणच्या व्याख्यानांत, आपला जिवलग स्नेही असणारा, व प्राणसंकटांतून वांचविणाराहि डॉक्टर उपयोगी पडला म्हणून त्याचेशीं कृतज्ञ राहतांनाहि राष्टीय संपत्ति परदेशाकडे पाठविणारा व भारतीय संस्कृतीपेक्षां परकीय संस्कृतीचे वैद्यकाचे रूपानें, संवर्धन करणारा म्हणून जाणत्या लोकांनीं पुनः प्रसंग आल्यास वैद्यकाचीच कास धरावी, तो चुकत असेल तर समज देऊनें त्याला सुधारावें आणि त्याचेकडूनच रोगनिवारण करून घ्यावें असें मला सांगावयाचें आहे, हळुंहळू तरी असें करीत गेल्याशिवाय डॉक्टरांच्या भरमसाट इंजेक्शनांच्या भडिमारांतून व त्यांच्या होणाऱ्या चिकित्सोत्तर उपद्रवांतून समाज सावरावयाचा नाहीं, व आपलें मागें पडलेलें वैद्यक पुढें यावयाचें नाहीं. असें सांगून सुशिक्षित समाजावर तरी ही जबाबदारी आहे, मात्र वैद्यांनींहि आत्मनिरीक्षण करावें, चर्चा-सभा सतत चालवून संघटितपणें

आजूबाजूच्या वनस्पतींचा व रोगांचा संशोधन-पुरःसर अभ्यास करावा असें सांगून भाषण संपविलें.

आरोग्यमंदिर दिवाळी अंक

पनवेलच्या श्रीधूतपापेश्वर वस्तु संग्रहालयाच्या [म्युझियमच्या] शोभिवंत सभागृहांत श्रीमद्धन्वन्तर्युत्सव साजरा करण्याचे निमित्तानें तिसरें व्याख्यान झालें. प्रारंभीं 'आरोग्य-मंदिर' मासिकाच्या दिवाळी अंकाचें प्रकाशन केलें, व तें करतांना म्हटलें, फटाक्यांच्या आवाजापेक्षांहि ज्यांच्या आरडाओरड्यांनीं रस्ते गर्जून जातील असे दिवाळी अंक आजपासून भराभर बाहेर पडतील, पण दिवाळीच्या मांगल्ययुक्त आनंदाचीं नासाडी करतील असलेंच उथळ व उच्छृंखल वाङ्मय त्यांत असेल; पण त्यांत आरोग्योपयोगी लेखनानें दिवाळीच्या गंभीर आनंदाला मदतच करून थोडीफार करमणूकहि करणारा आरोग्य-मंदिराचा दिवाळी अंक उठून दिसेल यांत शंका नाहीं.

आयुर्वेदच कां ?

पनवेलला हा विषय व्याख्यानासाठीं घ्यावयास सांगितलेला होता. माझें भाषण पुढीलप्रमाणें होतें:— 'आयुर्वेद हा आत्मा, इंद्रियें व मन यांचा समुचित विचार करून शरीराकडे पाहतो व रोगचिकित्सा सांगतो. भारतीय हवापाणी व राहाणी यांना अनुलक्षून ती चिकित्सा असते, ती रोगाचें कारण बाहेरलें [आगंतुक] न मानतां प्रज्ञापराध हेंच मुख्य मानून त्यायोगें रुग्णानें मिथ्याहार–विहारानें स्वतः करून घेतलेलें अग्निमांद्य हें मानते. अर्थात् प्रत्येक निज रोगावर तरी लंघन हाच मुख्य उपचार ठरतो; मोठा रोग झाला तरच त्याचे जोडीला औषध, आणि तो फारच वाढला तर विकृत दोष शरीराबाहेर साफ काढून टाकणारें शोधन, अशी ही मूळापासून रोग काढणारी म्हणून आयुर्वेदीय चिकित्साच श्रेष्ठ आहे. पथ्यापथ्यविवेक, विशेषें विरुद्धान्नविवेक व इतर स्वास्थ्याचे नियम आणि सदाचारोपदेश यामुळें रोगप्रतिबंधहि आयुर्वेदच चांगला करूं शकतो. सांथीच्या रोगांतहि हवाच मुख्यतः बिघडते, त्यामुळें पाणी, व मग त्यानें देश बिघडतो. म्हणून हवा सुधारणें हाच सांथीच्या प्रतिबंधावर महत्त्वाचा उपाय ठरतो. सुधारलेलें वैद्यक हवा सुधारण्यासाठीं कांहीं करीत नाहीं. माणसाला टोंचलें कीं हवा कशी सुधारते समजत नाहीं. या दृष्टीनें हा विभागहि आयुर्वेदाचा विशेषच आहे. आयुर्वेदाचीं अशीं अनेक वैशिष्ट्यें आहेत पण वेळाभावीं तूर्त एवढ्याचाच निर्देश करतो. पण त्यावरूनहि आयुर्वेदाचीच जनतेनें कास कां धरावयास हवी व सरकारनेंहि त्याचेवरच अधिक खर्च कां करावयास हवा हें समजेल.

पंचवार्षिक योजना व आयुर्वेद

येत्या पांच वर्षांच्या मध्यवर्ति सरकारच्या आरोग्यखातीं खर्चीं पडावयाच्या दोनशें आठ कोटि एकोणतीस लाख रुपयांपैकीं आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी व निसर्गोपचार या चारींना मिळून १। कोटच रुपये मिळावयाचे आहेत. गेल्या ५ वर्षांत एकूण वैद्यकाला मिळणाऱ्या एकोणचाळीस कोटींपैकीं सव्वीस कोटि दहा लाख सत्तर हजार रुपये ॲलोपॅथीनेंच आपलेकडे ओढले आहेत. आणि तरीहि तिनें देशाच्या आरोग्यांत किती भर टाकली समजेल नाहीं. माशा व मच्छरें मारण्यासाठीं म्हणून निरुपयोगी डी. डी. टी. वर व संशयास्पद उपयोगाच्या बी. सी. जी. वर मात्र भरमसाटपणें यांतले बरेच पैसे खर्च झाले आहेत. पंधरा लाख रुपये तर केवळ प्रचारार्थ हस्तपत्रकें छापण्यांतच खर्च झाले आहेत. यावरून हे पैसे कसे कारणीं लागले असतील तें समजणारें आहे. एकूण भारतांत चालू असलेल्या ३५ ॲलोपॅथिक कॉलेजावर रु. १,३६,००,००,००० सुरुवातीलाच खर्च झाला असून सालोसाल पुनः इतकेच रुपये खर्च होतात. त्यामानानें शंभरावर असलेल्या आयुर्वेदीय शिक्षणसंस्थांना काय मिळतें ?

महाराष्ट्रीय वैद्यकाचें वैशिष्ट्य

अखिल भारतांत आयुर्वेद हें एकाच जातीचें शास्त्र असलें तरी प्रांतभेदानें त्याच्या व्यवहारांत

थोडथोडा फरक पडला आहे. महाराष्ट्रांतहि तसा तो आहे. महाराष्ट्राचें हवापाणी निराळें आहे. येथील हवा समशीतोष्ण म्हणजे थंडी, ऊन व पाऊस यांच्या अतिरेकाची नाहीं. येथील लोकांचे खाण्यापिण्यांतहि तिखट, तेलकट, आंबट योग्य प्रमाणांत असतें. दक्षिणेंत थंडी नाहींच, व तिखट-आंबट भरमसाट खाल्लें जातें. उलट उत्तरेंत मिरची वर टांगतात, व गोड खूप खातात. उन्हाळा व थंडी यांचा तिकडे अतिरेक. तथापि महाराष्ट्राची हवा (समशीतोष्ण असूनहि) अस्थिर असते, थंडींतहि सतत थंडी वा पावसाळ्यांत सतत पाऊस पडत नाहीं; तर मध्येंच इतर ऋतूचा एकाएकीं भास होतो. दुपारीं वाढलेलें उष्णतामान सायंकाळीं एकदम कमी होते, व क्वचित् एकदम पाऊस पडतो. हे हवेचे एकदम होणारे बदल बाधूं नयेत म्हणून सर्वांग, विशेषें शिरोभाग, नेहमीं झांकून टाकण्याचा येथें प्रघात आहे. भोजनांत ‘ अद्याद्द्रव्यं गुरु स्निग्धं स्वादु मन्दं स्थिरं पुरः ’ हा वाग्भटोक्त व ‘ भोजनान्ते पिबेत्पयः ’ हा भावप्रकाशोक्त नियम बाजूला सारून आदौ सूपाज्यभक्तं......अन्ते...... आम्लमत्यन्तमिष्टम् । दध्यन्नं वा यथेष्टम् । ’ हाच भोजनाचा योगरत्नाकरोक्त प्रघात महाराष्ट्रांत चालूं आहे. भावप्रकाशांत व नंतर योगरत्नाकरांतच सांगितलेल्या अम्लपित्त या रोगावरचें सूतशेखर हें औषध खास महाराष्ट्राची निर्मिति आहे. ‘ न स्वेदयेत्...। गर्भिणीसूतिकाबालवृद्धान्......’ हा नियम बाजूला सारून आपण बाळंतिणींना घाम निघेतों दोन्ही वेळां शेकतों व त्याची जरूरीहि असते वगैरे अनेक गोष्टी ध्यानीं घेऊन महाराष्ट्रीय रुग्णांची वैद्यांनीं चिकित्सा करावयास हवी.

प्रभावी वनस्पतींचें प्रदर्शन

या दौऱ्यांत कांहीं प्रभावी वनस्पतींचें अवलोकन ही महत्त्वाची गोष्ट वाटली. रोह्याचे अलिकडे पांच मैलांवर डोंगरांत असलेल्या मेढें या गांवचे श्री. पटवर्धन यांनीं आपल्या बागेंतील ‘ जितसायेचें झाड ’ दाखविलें. सर्व बाह्य स्वरूप सागाचेंच फक्त उंची व जाडी कमी, पानें जरा आंखूड पण मऊ व शिरा सारख्या, त्या मानानें सागाचीं पानें अखिर–वखिर. याच डोंगरांत बरींच जितसायेचीं झाडें आहेत. वैद्यराज रिसबूड हे नव्या पदवीधर [आयुर्विद्या–विशारद] असून सात पिढ्यांचे वैद्य, त्यांनीं हेंच वर्णन सांगितलें. पेणला श्री. फडके या [वनस्पतींचा पुरवठा करणाऱ्या] गृहस्थांनीं कुडा व त्याचेच सारखीं पानें असलेली व म्हणून त्यांचे जातींतली म्हटली जाणारी ‘ सर्पगंधा ’ ही प्रसिद्ध वनस्पति, व डुकरकंद, अमरकंद, मदनमस्त, धायटी, इ. आणखी कांहीं ओल्या वनस्पतींनीं त्यांनीं आपल्याकडच्या छोट्याशा प्रदर्शनाचा कार्यक्रम उद्बोधक केला. श्री. जोशी वैद्य यांनीं फुरश्याचे विषावर वामक–रेचक कार्य न करतांहि उत्तम गुण देणारी ‘ विखमोगरी ’ ही कांहींशी मोगऱ्याच्या पानासारखीं पानें असणारी वेल दाखविली. त्यांनीं तिचा अनुभव घेतल्याचेंहि ते म्हणाले. भूतकेशी, ‘ गौरीचे केस ’ या कांहींशा ब्राह्मी–सारख्या दिसणाऱ्या पानांच्या पण दोन पानांना जोडणाऱ्या बारीक व काळ्या ताण्यांच्या वनस्पतींचा आमांशावर त्वरित होणाऱ्या परिमाणाचा चत्मकारिक अनुभव श्री. पटवर्धन यांनीं सांगितला. गुळांत सुपारी--एवढी गोळी करून खाल्ली कीं पीडा त्वरित कमी होते असें त्यांनीं सांगितलें. पेणला वैद्य श्री. टिळक हे ज्योतिष आणि वैद्यक यांत चांगला व्यवसाय करणारे समजल्यानें त्यांना ‘ ग्रष्वेहेनुगुणेषु ’ हें वाग्भटाचें सूत्र सिद्ध करणारा अनुभवी चिकित्सेचा पुरावा जमा करण्यास सांगितलें.

प्रवासाची सुव्यवस्था

दौऱ्याचा प्रवास सुखाचा झाला. पनवेलपर्यंत रेल्वे, व एस. टी. मोटार यांनीं प्रवास झाल्यावर पनवेलहून जातां येतांना रोहें व पेण येथील प्रवासाची व्यवस्था श्रीमंत काकासाहेब पुराणिक यांनीं भाड्याची टूरिंग व पेणहून कर्जतपर्यंत आपली टूरिंग देऊन उत्कृष्ट व्यवस्था केली. भाड्याच्या मोटारीच्या खर्चाचाहि बव्हंशीं वाटा त्यांनींच उचलला.

आदर्श घरंदाज श्री. मेहेंदळे

पेणला पूर्वपरिचय नसतां, तेथील खोत श्रीमंत बाळासाहेब मेहेंदळे यांनीं फारच थाटांत व्यवस्था ठेवली व आम्हा सर्वांना झालेला प्रवासाचा व इतर श्रमांचा शीण आपल्या, अलिकडे दुर्मिळ झालेल्या, घरंदाजी व औदार्यपूर्ण आतिथ्यानें नाहींसा केला. स्वतः श्री. बाळासाहेब अल्. अल्. बी. असूनहि चुन्या वळदार व शुचिर्भूत राहणीचा आदर्श नमुना वाटला. हल्लींच्या प्रतिकूल कुळकायद्यांत व सावकारी नियंत्रणांतहि आपला बोज कायम ठेवतांनाहि कुळांचा शंभर टक्के विश्वास संपादन करणारे म्हणून त्यांचा लौकिक अभिमानास्पद वाटला. श्री. वैद्यराज न. पु. जोशी, आयुर्वेदतीर्थ यांचा रोह्याच्या कार्यक्रमांत पुढाकार होता. आपल्या घरींहि बोलावून त्यांनीं फार अगत्य दाखविलें. तसेंच कार्यक्रम यशस्वी करण्यास त्यांनीं अत्यंत परिश्रम घेतले. पेणला वैद्यराज लेंढेशास्त्री हे पेण तालुका वैद्यमंडळाचे अध्यक्षच आहेत त्यांनीं पाहुण्याची उतरण्याची उत्तम व्यवस्था केली होती. पण त्याहूनहि त्यांची सौजन्यपूर्ण वागणूक व स्थानिक वैद्यांतील त्यांच्या विद्वतेबद्दल असलेला आदरभाव पाहून कौतुक वाटलें.

श्री. काकासाहेब पुराणीक व श्री. फडके

सर्वांत श्रीमंत काकासाहेब पुराणिक यांनीं मनापासून केलेल्या सर्व साहाय्यानें व श्रीमंती व्यवस्थेनेंच हा सर्व दौरा यशस्वी व सुखकारक झाला. माझ्यासारख्या दुबळ्या प्रकृतीच्या अध्यक्षाला त्रास न पडावा म्हणून त्यांनीं जातीनें घेतलेली काळजी निरंतर लक्षांत राहील. या सर्व दौऱ्यांत श्री. वै. अनंतराव फडके (कै. स्वातंत्र्यवीर वासुदेव बळवंतांचे नातू) मार्गदर्शक म्हणून फार उपयोगी पडले. आजोबांची देशभक्ती व स्वाभिमानी वृत्ती त्यांचेंतहि वारसाहक्कानें चांगलीच आलेली दिसली.

सभासदांची नोंद

रोह्यास आठ व पेणला दहा सभासद झाले. पनवेलीस आणखीहि बरेच व्हावेत अशी कल्पना आहे.

धन्वन्तरी उत्सव, अमळनेर

अमळनेर येथें नूतन वैद्यमंडळातर्फे 'धन्वन्तरी उत्सव' साजरा झाला. त्यानिमित्त संगीतरत्न नरहर गोपाळ व्यास यांचें शास्त्रोक्त गायनाचा कार्यक्रम यशस्वी रीत्या पार पडला.

धन्वन्तरी महोत्सव, धुळें

सालाबादप्रमाणें दि. १२-११-५५ रोजीं धुळें येथें श्रीधन्वन्तरीपूजन वै. बापूशास्त्री निझरकर यांचे अध्यक्षतेखालीं मोठ्या उत्साहानें वै. भगरेशास्त्री यांचे दवाखान्यांत साजरें झालें. सदर उत्सवाचे समारोप प्रसंगीं वैद्य बापूशास्त्री निझरकर यांचे आयुर्वेद व सद्यःपरिस्थिति या विषयावर उद्बोधक असें भाषण झालें. या समारंभासाठीं गांवांतील सर्व वैद्यवर्ग उपस्थित होता.

श्रीधन्वन्तरी उत्सव, कौंडोली

मु. पो. कोंडोली ता. मंगरूळनाथ जि. अकोला (म. प्र.) येथील विदर्भ औषधालयाचा २९ वा वाढदिवस व श्रीधन्वन्तरीउत्सव कार्तिक शुद्ध प्रतिपदा दि. १५-११-५५ रोजीं दुपारीं ४ वाजतां श्री. देवराव पाटील यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला. दीर्घायु कसें होता येईल या विषयावर व्याख्यानें व चर्चा झाली. वाढदिवसानिमित्त पं. नेहरूंना दीर्घायुरारोग्य प्राप्त व्हावें म्हणून प्रार्थना करण्यांत आली.

श्रीधन्वन्तरी उत्सव, नासिक

पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणें नासिक येथें नगरकर गल्लींत मान्य गुरु वैद्यराज त्र्यंबकशास्त्री दाते यांच्या घरीं श्रीधन्वन्तरी पूजनाचा व अष्टांगहृदय सूत्रस्थान [३० अध्याय] पठनाचा कार्यक्रम झाला. पांठांतरासाठीं कोणीच न आल्यामुळें ग्रंथ पाहूनच पठन करण्यांत आलें. त्यानंतर दुग्धपान होऊन समारम्भ संपला. शुद्ध आयुर्वेद विद्यालयांतील मुंबई येथें परीक्षेस बसलेले सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याचें वृत्त समजल्यामुळें अध्यापक, विद्यार्थी व इतर वैद्यवृंद यांनीं आनंदांत उत्सव साजरा केला.

मुंबई आयुर्वेदिक फॅकल्टीच्या परीक्षा

ऑक्टोबर १९५५ च्या डी. ए. एस. एफ. व जी. एफ. ए. एम. परीक्षेंत उत्तीर्ण उमेदवार

डी. ए. एस. एफ. द्वितीय परीक्षा

उपस्थित उमेदवार ४ उत्तीर्ण उमेदवार ४

मुंबई केंद्र– १] म. मो. अहिर २] अ. न. दाणी ३] मालती रा. गरवारे.

पुणें केंद्र– ४] सुमति ज. साठे

डी. ए. एस. एफ. तृतीय परीक्षा

उपस्थित उमेदवार १० उत्तीर्ण उमेदवार ९

मुंबई केंद्र– १] मधुबेन भा. आढीया ३] ज. गं. धारवाडकर, ४] क. ग. पंडित, ५] अ. रा. शेगुंशी.

पुणें केंद्र— ६] ध. पा. उपाध्ये, ७] ने. ब्र. उपाध्ये, ८] सु. म. झिर्पे.

डी. ए. एस. एफ. चतुर्थ परीक्षा

परीक्षेस बसलेले उमेदवार३२४ उत्तीर्ण उमेदवार१६०

मुंबई केंद्र–२) दा.ग.अहेर ४) अ.रा. अष्टेकर, ५) बा.ला. ब्रिजभुवनदास गोपाळदास, ६) र.वा.वडे, ८) प्र. पं. भागवत, ९) अ चं. भट्ट, ११) कमल कृ. भोसले, १३) रा. अ. बोरोळे, १४) यो.बा.बूच, १५) द. म. चांगडे, १६ मो. दु चौधरी, १९) र.प्रा. दलाल, २१) ना.न. दाल्वाडी, २२) रसिकमणि धि. देसाई, २३) द. रा. देशपांडे, २५) ई. म. ढबूवाला, २९) शां. फू. गांधी, ३०) वे ग. गोळेकर, ३७) कि. वि. जरीवाला, ३८) अ. दा जोगळेकर, ३९) व. शि. जोगळेकर, ४१) म. रा. काळे, ४३) मो. गो. कानडे, ४९) कृष्णाकुमारी ना. कुलकर्णी, ५४) तारामति द. लुब्री, ५५) रा. गो. मालपुरे, ५६) बा. रा. माणगावे, ५७) जं. न. मंगुडकर, ५८) गोदावरी जि. मारवाडी, ५९) रा. का. मश्रू, ६०) हि. के. मेथा, ६१) कुं. सि. मुळे, ६२) रा.द. मेहता, ६३) सू. चं. मेहता, ६४) दि. कुं. मोदी, ६६) शां. ग. ओझा, ६७) विद्युल्लता मो. पंडित, ७३) मो. मं. पटेल, ७४) ह. के. पाठक, ७६) रा. भा. पाठक, ७८) ज. जी. पाटील, ७९) म. वि. फडके, ८२) भा. म. राव, ८३) ला. चु. रावळ, ८५) वि.द. सामंत परुळेकर, ८६) द.ना. सप्तद्वीप, ८८) निर्मला दी. शाह, ९०) पुं. मं. शानभाग, ९१) नलिनी न्या. शेठ, ९२) मो. कि. शिंदे, ९३) धी. अं. शुक्ल, ९५) रा. चिं. ठाकरे, ९८) श. के. थोभ्राणी, ९९) मु. का. थोरात, १००) म. ओं. त्रिवेदी, १०२) वा. पु. उपाध्याय १०३) डा. का. वैद्य, १०९) वि. ह. वाघाणी.

पुणें केंद्र— १८९] शि. शि. अलगुंडगी, १९८] शशिकला ल. बोकील, १९९] सुमन द.

भारत वनस्पति फार्मसी
पो. मंचर (जि. पुणें)

यांचेकडील आयुर्वेदीय वनस्पतीपासून शास्त्रोक्त पद्धतीनें तयार केलेलीं संधिवात, पक्षवात वगैरे सर्व वातावर चोळण्याकरतां उपयोगी

काळीटाहाकळ तेल **मालकांगोणी तेल**
नारायण तेल **निर्गुंड्यादि तेल**
वातावर मिश्रणतेल, महावातविध्वंसकतेल

याशिवाय दुसरीं वातावरील तेलें विकत मिळतील. **"झनाना" औषधी तेल.**

डोकेंदुखी, अर्धशिशी, विंचूदंश, नारूवर बाहेरून लावण्यासाठीं उपयोगी. याशिवाय ताज्या वनस्पति मिळण्याचें ठिकाण —

श्री. भिमाजी सखाराम राजगुरव
पो. मंचर (जि. पुणें)

बोरकर, २०२] शशिकला ना. दाते, १०४] वा. रा. देवधर, २०६] म. कृ. डोळे, २०८] रा. दा. गणेशवाडे, २१३] सीमंतिनी ल. जाबडे, २१४] वि. मा. जाधव, २१५] क. पं. जोशी, २२२] श्री. रा. खंडकर, २२३] ए. दा. कोठावडे, २२९] कुसुम गो. मांडवगणे, २३१] श्री. प. नागांवकर, २३२] म. के. नाफडे, २३३] के. पां. नातु, २३५] सुमन नी. पाध्ये, २३७] अ. न. परिपत्यदार, २३८] च. दे. पाटील, २४१] म. द. पाठक; २४२] ज. सी, फुले, २४४] ना. आ. पेरे, २४६] सुधा गो. रणदिवे, २४८] श. दि. रायते, २४९] स. बा. सरदार, २५०] शांता शा. सरदेसाई, २५१] जयश्री मे. साठ्ये, २५३] कंकुबाई के. शहा, २५७] वि. ब. तिधये, २५८] म. मो. सिनकर, २६०] कि. रा. सोनी, २६१] रा. स. सुराळकर, २६३] कमल रा. ठोंबरे.

जी. एफ. ए. एम., प्रथम परीक्षा

उपस्थित उमेदवार ३४८ उत्तीर्ण उमेदवार १०२

मुंबई केंद्र– ९] अ. हि. भावसार, १०] गो. शा. भिडे, ११] पा. द. भुसारी, १७] मु. श्री. दार्वेकर, २१] व. मो. दवे, २९] श. वि. घुले, ३०] अ. सा. गिड्डे, ३३] ला. ग. गोर, ३५] सु. दा. गुजराथी, ४०] क. जं. हिरेमठ, ४२] ध. व. जैन, ४५] सुमित्रा वि. झवेरी, ४८] मु. प्रा. जोशी, ५०] सु. कां. जोशी, ५४] ललिता व. कामेरकर, ५६] भो. हिं. कापसी, ६०] अ. का. कोळवणकर ६१] न. प. कोठारी, ६७] तु. बं. लाड, ७२] प्रभातशोभा मजिठिया, ८१] र. दे. नाईक, ८६] प्र. हि. पारीख, ८७] का. वे. परमार, ८९] छो. मो. पटेल, ९०] सु. मो. पटेल ९३] अ. गि. पाटील, ९७] पु. वि. पटणी, ९९] रमा. रा. प्रभु, १०५] भा. दौ. साळवी, ११८] प्र. सा. शाह, ११९] र. वि. शाह, ११९] र. चु शहा, १३०] श. अ. शितुत, १३१] धी. ज. श्रॉफ, १३५] न. र. तांबवेकर, १३८] क. ज. त्रिवेदी, १४२] श. पां. वझे.

पुणें केंद्र– १५८] र. दि. चुरी, १६३] ज्ञा. गं. देशपांडे, १६४] भा. ग. धडफडे, १६५] मो. मो. डोसी, १६७] झुं. मो. गांधी, १७०] रा. ब. गोगटे, १८०] य. गो. जोशी, १८२] श. शां. कामत, १८३] हिरा द. कानडे, १८४] उ. छो. खटोड, १८९] विमल अ. कोरे, १९०] उषा गो. कोठावळे, १९२] व्यं. वा. कुळकर्णी, १९५] ग. ति. मगदूम, १९६] व. शं. माने, १९९] रा. भा. म्हेत्रे, २००] इ. म. मोकाशी, २०२] स. अ. मुल्ला, २०४] सिंधु दि. नाडकर्णी, २०५] द. रा. नाईक, २०९] ना. ग. परांजपे, २२२] शा. बं. राजोर, २२३] ज. हि. रजपूत, २२४] दि. पु. रानडे, २२७] जं. अ. सदलगे, २२८] श्री. शं. साने २३४] रा. ह. सोनार.

जी. एफ. ए. एम., द्वितीया परीक्षा

उपस्थित उमेदवार ४४ उत्तीर्ण उमेदवार २२

मुंबई केंद्र—१) सु. खे. बक्षी २) धों. दि. गानू ३) र. का. गुडे ४) अ. च. हुली ५) कुमुद रा. जोशी ७) द. मा. खिस्ती ८) इंदुकुमारी च. माल्कन १०) अ. व्यं. मुंजे ११) सं. इ. नागरळ १२) कस्तुर ज. परळकर १३ व. पां. परांजपे १५) चं. च. शाह १६) चि. म. शाह १८) ते. मा. शिवजियानी.

पुणें केंद्र—२२) ग. प. जोशी २४) सु. ना. खेरे २८) व. पु. निमकर ३२) श्री. पां. सावंत ३३) गो. दा. शाह

वनस्पती जमवून धन्वन्तरीपूजन

मंचर येथें धन्वन्तरीपूजनासाठीं ३५० ताज्या वनस्पति व निरनिराळ्या ठिकाणच्या जंगलांतून समक्ष फिरून आणलेलीं सर्पगंधा वनस्पतीचीं दोन रोपटीं कुंड्यांत लावून श्रीधन्वतरीपूजन करण्यांत आलें. भीमाशंकर येथील जंगलांत, तसेंच कोकण भागांतहि त्यासाठीं श्री. भिमाजी स. राजगुरव हे स्वतः फिरले. अभिनंदनीय उपक्रम.

म. प्रां. वैद्य मंडळाचे

सभासद व्हा !

आणि वैद्य संघटना बलवान् करा !

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नाशिक

या संस्थेच्या दुसऱ्या वर्षाच्या दुसऱ्या अधिवेशनास सोमवार ता. २१ पासून प्रारंभ झाला. त्याप्रसंगीं प्रधान अध्यापक वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित यांचाअध्यक्षतेखाली वै. वि. म. गोगटे, वै. श्री. कृ. करमरकर या अध्यापकांचीं, मुंबईस परीक्षेस गेलेल्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचीं व प्रथम वर्षातील कांहीं विद्यार्थ्यांचीं भाषणें झालीं. समितीच्या परीक्षापद्धतींत आलेले विविध अनुभव, विद्यार्थी व अध्यापक यांनीं मनमोकळेपणानें निवेदन केले. पुढील महिन्यांत विद्यार्थ्यांचें स्नेहसंमेलन घेण्याचा विचार आहे.

प्रसूतीचें प्रात्यक्षिक शिक्षण

आयुर्वेदप्रवीण दुसऱ्या परीक्षेच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक शिक्षणाची व्यवस्था ता. २२।११।५५ सुरूं झाली आहे. प्रात्यक्षिकाची वेळ ९॥ ते १०॥ व सायंकाळीं ४॥ ते ५॥ अशी ठेवण्यांत आली आहे. प्रात्यक्षिकाच्या पहिल्याच दिवशीं आरोग्यशालेंत एक प्रसूति संपूर्ण अभ्यावयास मिळाली हा सुयोग होय.

मानवाचें सच्चिदानंद स्वरूप

आरोग्यमंदिर, नागपूर या संस्थेचे संस्थापक वैद्य गोविंदराव परांडे, आयुर्वेदतीर्थ, त्यांचें गुरुवार ता. २४ रोजीं सायंकाळीं शु. आ. विद्यालयांत विद्यार्थ्यांसमोर वरील विषयावर उद्बोधक व्याख्यान झालें. ता. २५ रोजीं त्यांनीं आपल्या शिष्यासह ठे विद्यालयांत आसनें व नेति धौति आदि कांहीं क्रिया करून दाखविल्या.

शुध्द आयुर्वेदासाठीं शिष्यवृत्ति

मुंबई वैद्य सभेच्या वतीनें झालेल्या धन्वन्तरी उत्सवांत वैद्यराज प. हरदत्तशास्त्री [डायरेक्टर ऑफ आयुर्वेद] यांचें उत्तम भाषण झालें. अध्यक्षस्थानीं सुप्रसिद्ध कै. सूरजी वल्लभदास यांचे सुपुत्र श्री. प्रतापसिंहजी होते. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत मुंबई सरकारच्या शुद्ध आयुर्वेदविषयक प्रयत्नांची माहिती सांगितली व थोरवी वर्णन केली, व शुद्ध आयुर्वेदाचे अध्ययन करणाऱ्या योग्य विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ति देण्याचें अभि वचन दिलें.

...अनुक्रमणिका....

आयुर्वेदाची अपार सेवा केली आहे ३३१
भारत सेवक समाज विद्यार्थी–शिबिरें ३३२
वनस्पतींचीं लॅटिन नांवें ३३३
धन्वन्तरी महोत्सव ३३७
चहा–गुणविशेष विमर्श ३४१
मांसवृद्धीवरील आयुर्वेदीय चिकित्सा ३४४
चद्रकला–रस निर्णय ३४५
दंतारोग्य हें भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्य ३४७
आयुर्वेदप्रवीण–प्रथमपरीक्षा, मुंबई ३४९
मिरचीचें ‘ कटु कर्तव्य ’ ३५१
दोषधातुमलांचे निरपेक्ष वृद्धिक्षय ३५३
महाराष्ट्र प्रां. वैद्यमंडलाध्यक्षांचें प्रचारकार्य ३५९
मुंबई आयुर्वेदीय फॅकल्टीच्या परीक्षा ३६३

[पान ३३१ वरून पुढें चालू]

द्वितीय वर्ष, उत्तीर्ण

१) सु. सो. परदेशी २) भा. गो. खोंड ३) शे. ल. वाघमोरे ४) श्री. पा. जोशी ५) के. ज. बोठे ६) दा. ध. गुंजाळ ७) ब. गं. गर्गे ८) व. बा. देशपांडे ९) अ. तो. पवार १०) चं. कृ. पांकणीकर ११ के. ज. बेलोरकर.

द्वितीय वर्ष [दोषधातुमलविज्ञान या विषयांत कंपार्टमेंट] १] अ. चि. लाड.

तृतीय वर्ष, उत्तीर्ण

१] द. रा. देव, २] मो. ग. जोशी,

चतुर्थ वर्ष, उत्तीर्ण विद्यार्थी

१] व रा. ल्हेढे, २] ह. शि. चौधरी, ३] रा. ना फडके, ४] गि. ना. चौधरी, ५] प्र ना. कुळकर्णी ६] म. पा. चौधरी, ७] वि. न. व्यास, ८] द.स. माहाजन, ९] कृ ग. बिक्केवार, १०] ना. बा. कंचलीकर, ११] बा. ही. मेहेत्रे.

चतुर्थ वर्ष, कंपार्टमेंट

१] मो. ग. ठोंबरे [मेडिसिन, पॅथॉलॉजी] २] म. रा. पाठक [मेडिसिन, पॅथालॉजी] २] ज्ञा. गो. निचळ (सर्जरी).

नाशिक आयुर्वेद औषधी भवनाच्या

अगस्तिप्राश व असाणा (तेलिया)

या औषधांना कोल्हापूर, मुंबई, पुणें, नागपूर इ. भागांतून जोरदार मागण्या येत आहेत. सेवा संघानें चालू केलेली हीं नवीन औषधें जनतेंत आतां चांगलीं मान्यता पावलीं आहेत.

चालू हिवाळ्यांत कफवात प्रकृति लोकांनीं अगस्तिप्राश घेऊन आपली प्रकृति बलवान् करावी. दमा, खोकला, शौचास साफ न होणें, वारंवार लघवी होणें हे विकार समूळ जाण्यासाठीं अगस्तिप्राश उपयुक्त आहे. मधुमेहावर असाणा (तेलिया) चें पाणी गुणकारी सिध्द झालें आहे.

आयुर्वेद औषधी भवन, नासिक

आयुर्वेद सेवा संघाच्या औषधी भवनांत तयार झालेले

पौष्टिक शर्करा कल्प

(शतावरीकल्प, कंदर्पवृष्यशर्करा, कूष्मांडशर्करा वापरा.)

आयुर्वेदांत स्वेदक, सारक, मूत्रल, जीर्णज्वरघ्न अशीं विविध गुणकर्मांचीं औषधें पुष्कळ आहेत. परंतु पौष्टिक अन्न म्हणून सेवन करतां येतील अशीं अन्नें वा पेयें फार कमी आहेत अशी तक्रार आजकाल वारंवार ऐकू येते. आयुर्वेदांतील निरनिराळें प्राश व पाक हीं पौष्टिक अन्नेंच आहेत. पौष्टिक पेयांची गरज भागविण्यासाठीं औषधी भवनानें शतावरीकल्प, कंदर्पवृष्यकल्प, कूष्मांडकल्प हे शर्करा कल्प तयार केले आहेत. एक कप गरम दुधांत १।२ चमचे या शर्करा टाकून नियमानें घेतल्या असतां शक्ति येते, उत्साह वाढतो व मनुष्य अगदीं ताजातवाना होतो, स्त्रियांना दूध येते व पुरुष वीर्यवान होतात, असा अनेकांचा अनुभव आहे.

आयुर्वेद औषधी भवन, नासिक

संपादक व प्रकाशक — वैद्य [illegible] पंडित, आयुर्वेद सेवा संघ, [illegible] कारंजा, नाशिक
मुद्रक — श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, आग्रारोड, नाशिक

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका,

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वर्ष ९ वें) नासिक, ता. १६ डिसेंबर १९५५ (अंक १२ वा

कै. वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर, नाशिक

नाशिक येथील सुप्रसिद्ध वृद्धवैद्य व राष्ट्रसेवक वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर हे आत्रेय त्रयोदशीच्या शुभ तिथीस रात्रीं ८॥ वाजतां दिवंगत झाले. मृत्युसमयीं त्यांचें वय ७४ वर्षांचें होतें. त्यांचा मृत्यु हेवा करण्यासारखा होता. कांहींहि दुखणें अगर आजारीपण न भोगतां १० मिनिटांच्या आंत त्यांची प्राणज्योत, पंचमहाभूतांत विलीन झाली.

प्राणाचार्य देवधरांचे कार्यदक्ष शिष्यद्वय

सुप्रसिद्ध कै. वामनशास्त्री दातार यांचे वैद्यरत्न केळकरशास्त्री हे गुरुबंधु होत. सुप्रसिद्ध प्राणाचार्य देवधरशास्त्री यांच्या अनेक शिष्यांपैकीं दातार–केळकर ह्या जोडीनें महाराष्ट्राच्या राजकारणांत, धर्मकारणांत व आयुर्वेद प्रसारकार्यांत प्रामुख्यानें भाग घेतला व जनता–जनार्दनाची मनःपूर्वक सेवा केली. १९०८ च्या पूर्वीपासून अगदीं शेवटच्या क्षणापर्यंत ते शरीरानें, मनानें व विचारानें कार्यक्षम राहिले. १५ दिवसांपूर्वींच ते द्वारकेच्या यात्रेला जाऊन आले व गिरनार पर्वताच्या ७५०० पायऱ्या चढून ते वर गेले होते. ता. ११ डिसेंबर सायंकाळींहि ८ वाजतां रोग्यांच्या घरीं जाऊन प्रकृति तपासून आले होते. त्यांनीं अभ्यासपूर्वक ' वैद्यरत्न ' ही पदवी मिळविली व ४८ वर्षेपर्यंत उत्तम रीतीनें वैद्यकीय व्यवसाय केला. नाशिक कटांत त्यांना ३ वर्षांची शिक्षा झाली होती.

त्यांच्या औषधालयांत ' फक्त गरिबांना मोफत औषध मिळेल ' अशी पाटी लावलेली आहे, यामुळें गरीब–श्रीमंत सर्वांना त्यांच्या दवाखान्यांत जातांना संकोच होत नसे. त्यामुळें त्यांचा व्यवसाय अखंड चालू राहिला व आर्थिक दृष्टीनें कधींच अडचण भासली नाहीं; इतकेंच नव्हे तर

ते अनेक चळवळींचे व कार्यकर्त्यांचे आश्रयदाते होते. त्यांचें घर म्हणजे सर्व नव्या जुन्या कार्यकर्त्यांना आपलें घर असेंच वाटे.

त्यांच्या लोकप्रियतेचें प्रत्यक्ष प्रमाण

त्यांच्या मृत्यूची वार्ता समजतांच गांवातील हजारो स्त्री–पुरुष नागरिक त्यांचें अंत्य दर्शन घेऊन गेले. त्यांच्या स्मशानयात्रेला खूपच गर्दी झाली होती. त्यांच्या लोकप्रिय जीवनपद्धतींचें तें प्रत्यक्ष प्रमाणच होतें. यशवंतराव महाराजांच्या पटांगणावर त्यांना मंत्राग्नि देण्यांत आला त्या वेळीं वै. वि. म. गोगटे, महाबळ गुरुजी, वै. बिंदुमाधव पंडित आदि जनांचीं त्यांच्या जीवनांतील विविध अंगावर प्रकाश पाडणारीं भाषणें झालीं.

शुद्ध आयुर्वेदाच्या अभ्यासाचे ते कट्टर पाठीराखे होते. नाशिक येथील सर्व आयुर्वेदीय कार्याला त्यांचा मोठा आधार होता. त्याची उणीव भरून काढण्याची वृत्ति नवीन वैद्यांत उत्पन्न झाली पाहिजे.

शुध्द आयुर्वेद विद्यालय, नासिक

देणगीदारांचीं नांवें

'क्ष' यांचेकडून नवी सतरंजी व चादर (१०रु.) किं. ची) आरोग्यशाळेस देणगी.

५ रुपये:— सर्वश्री. डॉ. व. प्र. गुप्ते, ना.गो. वांद्रेकर, डॉ. वि. बा. पटवर्धन, डॉ. द. वि. कुलकर्णी, श्रीं. स. गं. भोरे.

३ रु.:–श्री. दे.ना. टिळक, वसुधाबाई गोखले.

२ रु.: सर्वश्री डॉ. मा. ग. कुलकर्णी, डॉ. त्र्यं. वि. म्हसकर, सुशिलाबाई म्हसकर, डॉ. ह.स. जोशी, भा. ल. पाटणकर, डॉ. ना. गं. चिटणीस, मेसर्स रसिक स्टोअर्स, लीलाबाई साठे, रा. का. साठे वकील, वि. ब. आठवले, (किर्लोस्करवाडी,) डॉ. म. क. दामले.

१ रु:– सर्वश्री डॉ. र. पा. कोरडे, दि. वि. सावरगावकर[लखनौ] डॉ. दि. ज. चौधरी, अनुसयाबाई चौधरी, बाबुराव पाटील, वा. गं. पुरोहित[ठाणे] कु. म. तांबे, कु. प्रे. चौधरी, विलासिनी वाघुळदे, [बामणोद पू.खा.] पु. द. देवधर, अर्जुनासिंग परदेशी [त्रिंबक]ल. पां. सोमण, बा. त्र्यं. भार्गवे, जानकीबाई कुकडे, सुं. बा. शाह, शा. अ. देशपांडे [साखरखेड] शि. भा. दांडेकर [सातारा] वि शं. साठे (शहादे,) रा. शं. खेर, म. मो. गायकवाड, म. र. कुकडे [दादर] व्यं. अ. ढेकणे.

वरील देणगीदारमंडळींची संस्था आभारी आहे.

उज्वल कीर्ति

आयुर्वेदीय औषधांची उज्वल कीर्ति बनविलेल्या सिद्ध औषधांच्या गुणावर आहे. औषधें गुण देणारीं असतील तर कीर्ति नेहमीं उज्वल राहील. तरी अशीं गुण देणारीं औषधें, अस्सल ताजीं व स्वच्छ घटक औषधी द्रव्यें खरेदी करण्यास वर अवलंबून आहे. औषधी द्रव्यासाठीं आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स
पायधुनी, मुंबई नं. ३
फोन नं. (३१८५८) यांचेकडे मागणी करा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात.
अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवा.

— सौतिक आणि आयुर्वेद —

शुद्ध आयुर्वेदाच्या शिक्षणांत सौतिकाचें प्रात्यक्षिक असलें पाहिजे.

(लेखकः—वैद्य **ज. रा. जोशी**, आयुर्विद्याविशारद [टिळक]
स्थायीवैद्य, मुगभाट आयुर्वेदीय रुग्णालय [व प्रसूतिशाला] मुंबई ४)

शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमामध्यें सौतिक हा विषय अंतिम परीक्षेसाठीं ठेवला आहे. हा विषय प्रत्यक्षपर असून दैनंदिन उपयोगाचा आहे. असें असूनहि सदर्हू पाठ्यक्रमामध्यें या विषयाच्या प्रात्याक्षिक शिक्षणाचीं व्याख्यानें ठेवलेलीं नाहींत. यावरून असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, हा विषय केवळ ग्रांथिक तेवढाच पढवावयाचा असें दिसतें. वास्तविक ह्या विषयाची सूत्रमय कां होईना पण उत्कृष्ट मांडणी चरक--सुश्रुतांत आहे. आणि त्यांतील सूचनांचा उपयोग केल्यास कष्टप्रसूति कमी होऊन बालकें व सूतिका आरोग्यमय होतात हा आमचा अनुभव आहे. म्हणून आजच्या संक्रमणकालाच्या अवस्थेंत जो अनुभव आम्हांस आला आहे, तो सादर करीत आहे.

२४०० सूतिकांचें निरीक्षण

आयुर्वेद प्रसारक मंडळाच्या मुगभाट येथील आयुर्वेदीय रुग्णालयांत सन १९४८ पासून प्रसूति-विभाग सुरूं करण्यांत आला आहे. येथें आतांपर्यंत २४०० प्रसूति झाल्या. त्यापैकीं १९५३ पासूनच्या गेल्या २॥ वर्षांतील ७१३ सूतिका घेऊन त्यांचें वर्गीकरणपूर्वक परीक्षण पुढें देण्यांत आलें आहे.

संक्रमणकालीन व्यवस्था

प्रथम ही गोष्ट लक्षांत ठेवणें अवश्यक आहे कीं, हा संक्रमणावस्थाकाल असल्यामुळें आणि लोकांचा विश्वासहि बसावा म्हणून येथील सौतिकविभागावर एम्. डी. डॉक्टर हे प्रमुख आहेत. हा विभाग सुरूं झाल्यावर, ज्या रुग्णावर जीवित-संकट येईल असे रुग्ण वगळून इतर रुग्णांवर पूर्ण आयुर्वेदीय चिकित्सा करण्याची मोकळीक या प्रमुखाकडून आगाऊच घेऊन ठेवण्यांत आली आहे. जेथें सूतिकाविभाग-प्रमुखांना आपल्यावरील जबाबदारीमुळें आपले नांवास कमीपणा येईल असें वाटलें तेथें त्यांचे सल्ल्याप्रमाणें औषधोपचार करण्यांत आले. असे उपचार कोणकोणत्या रोगावर व किती रुग्णांवर करण्यांत आले त्यांची माहिती पुढें दिली आहे.

येथील व्यवस्था २।३ वैद्यच पाहातात

या रुग्णालयांतील दैनंदिन कामें २।३ वैद्यच पाहातात. अगदींच अडेल तेव्हां विभागप्रमुख व अन्य साहाय्यक डॉक्टर यांचें साहाय्य घेण्यांत येतें. या विषयावरील वादांत दोन बाबी नेहमीं येत असतात. एक म्हणजे आयुर्वेदीय पदवीधर हें काम यशस्वीपणें करतात कीं नाहीं? आणि दुसरी बाब म्हणजे हा विभाग आयुर्वेदीय पद्धतीनें चालवितां येईल कीं नाहीं? पहिल्या प्रश्नाला 'होय' असें निश्चित उत्तर देतां येत असून दुसऱ्या प्रश्नाबाबत या लेखांतील माहितीकडे मी वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितो.

७१३ सूतिकांचें वर्गीकरण

	प्रसूति प्रकार	संख्या	शेंकडा प्रमाण
१	सुखप्रसूति Normal Delivery	६२६	८७·८
२	सुखप्रसूति पण सीवनीभेद Perineal Tear	७२	१०·१
३	प्रसूतीचे वेळीं हस्तक्षेप करण्याचे प्रसंग	१५	१·१
	एकूण	७१३	१००·००

वरील कोष्टकांतील क्रम २ मधील सूतिकांमध्यें हस्तक्षेप लागला नाहीं. पण सीवनीभेद झाला. त्या ठिकाणीं टांके (Sutures) घालावे लागले.

कोष्टक क्रम ३ मधील १५ सूतिकांमध्यें फॉर्सेप्स् ५, एपिसिऑटमी ७, हातानें अपरापातन, सीझेरियन १, क्रेनिऑटमी १ असे प्रकार होते.

प्रसूतींचे विकार व उपचार

प्रसूतीनंतरच्या दहा दिवसांच्या येथील वास्तव्यांत या ७१३ सूतिकांपैकीं खालील सूतिकांना पुढें निर्दिष्ट केलेले विकार झाले.:—

	संख्या
अ] प्रसूतिनंतर अथवा पहिल्या १ दिवसांतील 'रक्तस्रावाधिक्य'	२५
आ] 'ज्वर'स्तन्यवितरण वा अन्य क्षुल्लक कारणानें	२०
इ] 'मक्कलशूल' गर्भाशयगत शूल किंवा गभाशयंसंकोचन व्यवस्थित न झाल्यामुळें	१९
ई] स्तनगत शोथ– दुग्धग्रंथिगत	४
उ] प्रसूतीनंतर अतिशय थकवा ग्लानि	२
ऊ] संधिग्रह	१
ए] अपस्मार	१
ऐ] स्तन्याभाव	४२

आधुनिक उपचार कोठें केले ?

वरील विकारांपैकीं स्रावाधिक्यावर मागें कारण नमूद केल्याप्रमाणें आधुनिक उपाययोजना करण्यांत आली. बाकीच्यापैकीं २ ज्वर–रुग्ण व शूलाचे २ रुग्ण यांवर ॲलोपाथीचा अल्पसा अवलंब करण्यांत आला. आतांपर्यंत ७।८ वर्षांत सूतिकाज्वर [Puerpera sepsis] बिलकूल आला नाहीं, किंवा एकहि सूतिका मृत्यु पावली नाहीं.

गर्भिणी अवस्थेंतील विकार

या ७१३ गर्भिणींत गर्भिणीअवस्थेंतील विकार पुढीलप्रमाणें ४५ आढळून आले. त्यांतील बहुतेक विकार साधारण तीव्र स्वरूपाचे होते.

[१] पांडु २१ [२] ज्वर ३ [३] शोथ ११ [४] मूत्रविकार ४ [५] प्ल्यूरसी १ [६ कास–श्वास ४ [७] हृदयविकार १.

या विकारांच्या रुग्णांपैकीं तीव्र पांडु, कासश्वास, यांचे फक्त४।५ रुग्णांवर उपचार करतांना ॲलोपाथीची जोड देण्यांत आली.

बालोपचार

या ७१३ सूतिकांच्या ७१३ बालकांपैकीं पुढें दिलेल्या कोष्टकांत, ज्यांना आजार–मृत्यु इत्यादि आला, त्यांचें वर्गीकरण दिलें आहे.

अ] पहिल्या १० दिवसांतील आजार एकूण ११९ मुलांना झाला. वर्गवारी पुढीलप्रमाणें:–

१] ज्वर	२४ मुलांना
२] प्रतिश्याय	३
३] मुखपाक	२
४] अजीर्ण	२३
५] अतिसार	४०
६] कामला	२२
७] मलावरोध	३
५] अपस्मार	२
एकूण	११९

या ११९ पैकीं ११४ सुधारलीं

यापैकीं अपस्माराचीं २ व रक्तातिसाराचीं ३ अशीं ५ बालकें मृत्यु पावलीं. बाकीचीं पूर्ण बरी झालीं. उपचार आयुर्वेदीय पद्धतीनें झाले.

जन्मण्याचे वेळचे विकार

ब] १७ मुलांना श्वासावरोध Asphyexia झाला. त्याचीं कारणें:–

१] नाल अगोदर बाहेर येणें	१
२] विलंब प्रसूति	२
३] कंठगत नाल [नाळेचे वेढे]	३
४] गर्भोदक गिळण्यानें	११
	१७

वरील मुलांवर 'कृत्रिम श्वसन' इत्यादि पद्धतीनें उपचार करण्यांत आले. यापैकीं ४ मुलें मृत पावलीं.

जन्मानंतर लौकर मृत्यु

क] अपूर्ण वाढीमुळें व अकाल प्रसूतीमुळें ८ बालकें जन्मानंतर कांहीं तास किंवा १।२ दिवस या अंतरानें मृत्यु पावलीं.

मृतजन्म [Still births]

ड] खालीं दर्शविलेल्या कारणांनीं मृतजन्म झाले.

१] विचित्र वाढ	५
२] कंठगत नाल आणि नाल अगोदर बाहेर येणें	३
३] अकाल प्रसूति	९
४] जुळ्यांतील एक	१
५] कष्टप्रसूति, विलंब, फार्सेप्स्	४
६] फिरंग–उपदंश	४
एकूण	२६.

बालमृत्यूचें प्रमाण

वरील ब, क, ड, यांतील आकस्मिक कारणांचा विचार सोडतां आणि ती संख्या वगळून बाकी ६७५ बालकांपैकीं 'अ'मध्यें दाखविल्याप्रमाणें ११९ बालकांना विकार झाले. म्हणजे शेंकडा १७·५ लागण व त्यापैकीं ५ मुलें म्हणजे शें. ४·३ मृत्यु पावलीं. यावरून एकूण मुलांत विकारानें मृत्यूचें प्रमाण शें० ०·७ च पडलें.

कामाची पद्धत नि आमचे अनुभव

(अ) साधारणतः सातव्या महिन्यापासून गर्भिणीची नोंद करण्यांत येते. नोंदणीनंतर आवश्यक ती तपासणी केली जाते. आवश्यकतेप्रमाणें गर्भिणीला ४, ७, १५ दिवसांनीं पुनः पुनः तपासणीसाठीं बोलाविण्यांत येते. जरूर तर रुग्णालयांत दाखल करून घेण्यांत येतें. त्यांना औषध, आहार, विहार, सांगितला जातो. हा क्रम प्रसूतिपर्यंत चालतो. मागें गर्भिणीचे विकार उल्लेखिले आहेत – त्या प्रकारचे विकार असल्यास उपचार केले जातात. गर्भिणी अवस्थेंत प्रामुख्यानें पांडु [Anaemia] आणि शोथ हे विकार अधिक आढळून येतात. त्यास 'अपोषण' हेंच कारण आढळून आलें आहे. या गर्भिणीअवस्थेंत स्निग्ध, बल्य, जीवनीय द्रव्ययुक्त आहार तसेंच प्राणिज द्रव्यांचा आहार देण्याची आवश्यकता असते. प्राणिज द्रव्यांत 'यकृत्कल्प' व आमगर्भ म्हणजे अंडीं हीं मुख्य होत. त्यांचा गुण उत्तम येतो. चालू काळीं 'यकृत्कल्प' आयते मिळतात व ते स्वस्त पडतात. त्यांचा वापर करावा लागतो. याबाबत आयुर्वेदीय कारखानदारांनीं यकृत्कल्प, जीवनीय द्रव्ययुक्त कल्प तयार केल्यास हा प्रश्न स्वावलंबनपूर्वक सुटेल.

गर्भिणी दिनचर्या

गर्भिणी दिनचर्या व मासानुमासिक उपचारपद्धति चरक–सुश्रुतांत वर्णिलेली आहे. आजच्या कालानुरूप ती दिली गेल्यास गर्भिणी विकारांवर चांगला उपयोग होतो व कष्टप्रसूति वांचते, असा येथाल अनुभव आहे. येथें नोंदविलेल्या कांहीं गर्भिणींमध्यें या पद्धतीनें उपचार करून समाधानकारक अनुभव मिळालेला आहे. मात्र अशा संशोधक वृत्तीच्या माणसांकडे विश्वासानें हें काम सोंपवून त्यांच्या अडीअडचणी दूर करण्यास मदत पाहिजे.

अनुलोमक उपचार

(ब) प्रसूतीसाठीं रुग्ण आल्यावर बस्ति आदि देणें, 'आवींची' गति थांबू नये म्हणून अनुलोमक औषधें देणें, इ० क्रमें चालू होतात. तैलादिकांचाहि उपयोग करण्यांत येतो. मातांना प्रथम दिवसापासूनच साधें, माफक जेवण देण्यांत येतें.

दोन पध्दतींतील फरक

आधुनिक रुग्णालयीन पद्धत व चरक सुश्रुतांत आणि व्यवहारांत दिसून येणारी पद्धत यांत फरक आहे. येथील हवामान, आचारविचार पहातां चरकसुश्रुतोक्त पद्धतच स्वास्थ्यरक्षण व बालकांची वाढ होण्यास, तसेंच गर्भिणीविकार, सूतिकाविकार, बालविकार इ. टाळण्यास उपयुक्त आहे, असें अनुभवांतीं मत बनलें आहे. 'रुग्णालय पद्धत' ही आज तरी आपल्याकडे नवीन आहे. या ठिकाणीं मोठ्या प्रमाणावर काम होत असल्यामुळें जुन्या पद्धतींचा जास्तींत जास्त उपयोग योग्य तो फरक करून करण्यांत येतो.

या ७१३ सूतिकांपैकीं कांहीं सूतिका २-२ किंवा ३-३ वेळां येथेंच १९५३ पूर्वी येऊन गेल्या आहेत. त्यांची माहिती पहातां त्यांच्यामध्यें सूतिकाविकार फारसे आढळले नाहींत.

वापरण्यांत येणारीं औषधें

आतांपर्यंत वर्णन केलेल्या सौतिकाच्या गर्भिणीकाल, प्रसूतिकाल, सूतिकावस्था, बालकजन्म, बालचर्या, या अंगोपांगांसाठीं पुढील औषधांचा उपयोग करण्यांत येत असतोः— १) दशमूल, २) देवदार्व्यादि क्वाथ. ३) पिंपळमूळ, ४) पिंपळी ५) सागरगोटा, ६) प्रतापलंकेश्वर, ७) अतिविष, ८) समीरपन्नग, ९) हेमगर्भ, १०) शतावरी, ११) विदारी, १२) अश्वगंधा, १३) सर्पगंधा, १४) सिद्ध तेलें आणि प्रसंगोपात्त इतर कल्प.

सीवनकर्म

आतांपर्यंतच्या विवेचनावरून व आंकडेवारीनें असें दिसून येतें कीं, ज्यांत खरोखरीचा हस्तक्षेप करावा लागला असे शेंकडा फक्त २·१ रुग्ण होते. सीवनीभेद (Perineal Tear) हा कांहीं हस्तक्षेप नव्हे. अशा रुग्णांस सीवनकर्मानें काम भागतें म्हणून त्या व पूर्णपणें नॉर्मल सूतिका धरल्यास आणि आंकड्यांत आणखी सवलत दिल्यास शें.९५ रुग्णांत हस्तक्षेप लागत नाहीं. एका व्यक्तीकडून तें काम होतें. आणि हीच वस्तुस्थिति लक्षांत घेऊन १॥ वर्षांचा मिड्वाइफ कोर्स देऊन त्यांना सूतिकागृहावर नेमतात; आणि त्यांचें काम राजमान्य समजलें जातें.

प्रत्यक्ष शिक्षणाची जोड आवश्यक

त्या मानानें शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रमांत प्रवेशयोग्यता अधिक असूनसुद्धां, तसेंच शिक्षणास रुग्णालयाची जोड आवश्यक असतां ह्या शिक्षणक्रमांत सौतिकाचें प्रत्यक्ष शिक्षण कां ठेवूं नये? ह्या अभ्यासक्रमांत प्रवेशयोग्यतेबरोबरच शारीर, शारीरक्रीया, सर्वरोगनिदान, चिकित्सा, शल्यतंत्र हे विषय संपूर्ण शिकविले जातात. अशा वेळीं त्यांना सौतिकाचें प्रत्यक्ष शिक्षण दिल्यास हे वैद्य जास्त उपयुक्त होतील. फारतर प्रमाणपरीक्षेनंतर आणखी कांहीं महिने जास्त शिक्षण घेण्याची अट ठेवावी. पण या प्रात्यक्षिक शिक्षणापासून त्यांना वंचित करूं नये. हा मुद्दा वाचकांच्या मनावर ठसविणें हाच ह्या लेखाचा मुख्य हेतु आहे.

शेगांव (मध्य-प्रदेश) येथें

आयुर्वेद सेवा संघ नाशिक या संस्थेचा अनेक ग्राहकांकडून प्रशंसिलेली सर्व प्रकारचीं औषधें मिळण्याचें ठिकाण:—

खेतान मेडिकल स्टोअर्स

शेगांव (म. प्र.

क्रॉनिक डीसेंट्रीवरील आयुर्वेदीय उपचार

पोट दुखणें, चिकट परसाकडे होणें, पोळी न पचणें, जरा जास्त खाण्यांत आल्यास शौचास अधिक वेळा जावे लागणें अशा तक्रारी असलेली वातकफदुष्ट अग्नीची मंडळी पुष्कळ आढळतात. अशा लोकांनीं सकाळीं सायंकाळीं मधांतून **भल्लातकसिध्द हिंगूळ** घ्यावा व अर्ध्या जेवणामध्यें **भल्लातकासव** घ्यावें. त्यांची भूक वाढून त्यांना आपलें अन्नपचन सुधारलें असल्याचा अनुभव येईल व या हिवाळ्यांत निश्चित वजन वाढेल. पित्तकफात्मक विकृती असलेल्या लोकांना कुटजारिष्ट व कुडेपाक मानवतो.

आयुर्वेद औषधी भवन, नाशिक

वृद्धदोषांची गति लेखांक ३ रा :

लेखक–वै. वा. स. अंदनकर, आयुर्वेदतीर्थ
चांदा (म. प्र.)

तद्दुःखसंयोगा व्याधय उच्यन्ते ॥२३॥
(सुश्रुत सूत्रस्थान अ. १)

राशिपुरुषाला जो जो दुःखसंयोग होईल त्याला व्याधि ही संज्ञा सुश्रुताचार्यांनीं दिली आहे. क्षुधा–तृष्णादि व कामक्रोधादि स्वाभाविक व मानासिक भावांनाहि ह्या आचार्यांनीं व्याधि ही संज्ञा दिल्यामुळें त्यांचाहि अंतर्भाव करितां यावा व त्यावर व्याधिसंज्ञेची अव्याप्ति येऊं नये या उद्देशानें ही न्यायघटित अशी व्याधीची व्याख्या करण्यांत आली. व चरकाचार्यांनींहि शरीरं सत्वसंज्ञं च व्याधीनामाश्रयो मतः। (सूत्रस्थान अ. १) याप्रमाणें शारीर व मानस व्याधि मानले असले तरी आयुर्वेदतंत्र हें विशेषतः शारीर व्याधीचाच प्रपंच करणारें असल्यामुळें व या तंत्राचें 'भूतेभ्यो हि परं यस्मान्नास्ति चिंता चिकित्सिते।' [सुश्रुत शारीर अ. १] हेंच ध्येय प्रामुख्यानें असल्यामुळें ह्या ध्येयानुसार शरीरदृष्ट्या व्याधि म्हणजे वातादि त्रिदोषांचें मानतः क्षैण्य व वृद्धि होय, व ह्यांसच वैषम्य ही संज्ञा दिली आहे. 'दोषधातुमला मूलं सदा देहस्य।' या सूत्राप्रमाणें ह्या दोष, धातु व मल ह्या त्रिभावांच्या साम्याला आरोग्य व वैषम्याला व्याधि अशी संज्ञा असली तरी ह्या त्रिभावांपैकीं सर्वकर्तृत्व असलेल्या वात, पित्त व कफ या दोषांच्या साम्यावरच धातु व मलांचें साम्य व वैषम्य अवलंबून असल्यामुळें या दोषांच्या साम्याला आरोग्य व वैषम्याला व्याधि ही मूलगामी संज्ञा शास्त्रकारांनीं निश्चित केली आहे.

दोषा दुष्टा रसैर्धातून् दूषयन्त्युभये मलान्।
(अष्टांगहृदय, सूत्र. अ. ११)
रोगस्तु दोषवै म्यं दोषसाम्यमरोगता।
(अष्टांगहृदय सूत्र· अ. १)
विकारो धातुवैषम्यं साम्यं प्रकृतिरुच्यते।
सुखसंज्ञकमारोग्यं विकारो दुःखमेव च।
(चरक सूत्र. अ. ९)

वैषम्यगमनं हि पुनर्धातूनां वृद्धिऱ्हासगमनम्...।
(चरक शारीर अ. ६)

प्राकृत दोषांचें स्थान, मान व गति

आम्ही मागील लेखांकांत प्राकृत दोषांचें स्थान मान व गति हे भाव सिद्ध केले आहेत. मान म्हणजे गुंजा, मासे, तोळे, शेर ज्याला इंग्रजींत Measures of mass (Weight) म्हणतात तें, व पायली अंजली वगैरे ज्याला इंग्रजींत Measure of capacity (Volume) म्हणतात अशा प्रकारचें होय. दोष, धातु व मलांचा मानदृष्टीनें थोडा विचार मागील लेखांकांत केलाच आहे.

दोषादिकांचें आप्यायन

लिंगशरीरांत असलेले बीजभूत असे दोष, धातु व मल अतीन्द्रियकक्षेचे आहेत. ह्या सूक्ष्म दोषादिकांना गर्भाशयांत शुक्रशोणिताचा संयोग होऊन त्यांचें स्थूलमान तयार होण्यास आरंभ होतो व नंतर मातेच्या आहाररसापासून ह्या दोषादिकांना बृंहण–आप्यायन मिळतें.

भूतानि चत्वारि तु कर्मजानि यान्यात्मलीनानि
विशंति गर्भम्।

रसात्ममातापितृसंभवानि भूतानि विद्याद्दश षट् च देहे।
चत्वारि तत्रात्मनि संश्रितानि स्थितस्तथाऽऽत्मा च
चतुर्षु तेषु ।
भूतानि मातापितृसंभवानि रजश्च शुक्रं च वदंति गर्भे।
आप्यायते शुक्रमसृक्च भूतैर्यैस्तानि भूतानि
रसोद्भवानि । (चरक शारीर अ. २)

सर्व भावी भावांचें बीज

अशा प्रकारें सूक्ष्म लिंगशरीराला गर्भाशयांत गर्भसंज्ञा प्राप्त होऊन गर्भदेहाच्या दोषधातुमलांची क्रमशः वृद्धि होते. त्यांत सर्व भावी भावांचें बीज असतें, पण तें सूक्ष्म असल्यामुळें प्रत्ययास येत नाहीं. यथा हि पुष्पमुकुलस्थो गन्धो न शक्यमिहास्तीति वक्तुमथो नैवास्तीति । अथवाऽस्ति सतां भावानामभिव्यक्तिरिति कृत्वा केवलं सौक्ष्म्यान्नाभिव्यज्यते । स एव पुष्पे विवृतपत्रकेशरे कालान्तरेणाभिव्यक्तिं गच्छति ...।
(सुश्रूत सू. अ० १४)

दोषांचे सापेक्ष मान=दोषसाम्य

गर्भाशयांत आत्मसंश्रित दोषांना मातेच्या आर्तवांतील व पित्याच्या शुक्रातील दोष येऊन मिळतात आणि शुक्रशोणिताच्या संयोगानंतर गर्भाशयांत जो कलल बनतो त्या कललांत वात, पित्त व कफ या दोषांचें एक सापेक्ष मान (Relative proportion) तयार होतें. या सापेक्ष मानांत ज्या दोषाचें आधिक्य राहील त्या आधिक्यावरून त्या देहाची प्रकृति ठरते. ही प्रकृति या जन्मापासून तो मरणापर्यंत कायम राहते व ती कधींहि बदलूं शकत नाहीं. या दोषांच्या सापेक्षमानालांच त्या देहाचें दोषसाम्य म्हणतात, व हेंच त्या देहाचे आरोग्य किंवा स्वस्थावस्था होय. या सापेक्षमानापेक्षां दोष वाढले कीं त्याला वृद्धि व

युनिव्हाइट कोलीन

हें औषध वृध्द, दुर्बल, दाल्युदरी व मधुमेही यांना उपयुक्त आहे.

युनिव्हाइट कोलीननें कोलीन मिथिओनिनची उच्च दर्जाची चिकित्सा मिळत असून, यकृत्-कार्य सुधारण्याला आवश्यक अशा जीवनसत्व 'क' चा पुरवठा होतो. शरीरांतील मेदवृद्धि नाहींशी होते व तिच्या वाढीस प्रतिबंध होतो.

घटक द्रव्यें

१ द्रव औंसांत खालीलप्रमाणें द्रव्यें आहेतः—

ट्राय–कोलीन सायट्रेट	४०००	मिलिग्रॅम
मिथिओनिन	५००	,,
आयनोसिटॉल	५००	,,
जीवनसत्व ब-१	१२·५	,,
,, ब-२	७·५	,,
निआसिन	१००	,,
पॅंथेनॉल	५	,,
जीवनसत्व अ	१६०००	आयू. यू.
,, ड	५०००	,,
,, क	२५०	मिलिग्रॅम

युनिकेम लॅबॉरेटरीज, मुंबई--२६

कमी झाले कीं त्याला क्षय म्हणतात. ह्याच दोषांच्या क्षयाला व वृद्धीलं वैषम्य म्हणतात. अर्थात् हीच व्याधि ही संज्ञा होय.

शुक्रार्तवस्थैर्जन्मादौ विषेणेव विषक्रिमेः ।
तैश्च तिस्रः प्रकृतयो हीनमध्योत्तमाः पृथक् ।
[अष्टांगहृदय सूत्र. अ. १]

शुक्रशोणितसंयोगे यो भवेद्दोष उत्कटः ।
प्रकृतिर्जायते तेन......... ।
[सुश्रुत शारीर. अ. ४]

प्रकोपो वाऽन्यभावो वा क्षयो वा नोपजायते ।
प्रकृतीनां स्वभावेन जायते तु गतायुषः ॥
विषजातो यथा कीटो न विषेण विपद्यते ।
तद्वत्प्रकृतयो मर्त्यं शक्नुवन्ति न बाधितुम् ।
[सुश्रुत शारीर. अ. ४]

सातव्या महिन्यांत दोषधातूंची अभिवृध्दि

अर्थात् शुक्रशोणिताचा संयोग होऊन जो गर्भदेह बनतो त्यांत एक विशिष्ट दोषांचें साक्षेपमान राहून व त्या साक्षेप भावास कधींहि न सोडतां तो गर्भदेह क्रमानें गर्भाशयांत वाढतो; म्हणूनच खालीं उद्धृत केलेल्या काश्यपवचनांत गर्भाचे सातवे महिन्यांत पूर्व महिन्यापेक्षां गर्भस्थ देहाच्या दोषांची व धातूंची अभिवृद्धि स्पष्टपणें निर्दिष्ट केली आहे.

सर्वधात्वंगसंपूर्णो वातपित्तकफान्वितः ।
सप्तमे मासि......... ।
[काश्यपसंहिता, असमानगोत्रीय शारीराध्यायः]

तेव्हां हें सिद्ध होतें कीं, जसजसा गर्भाशयांत देह वाढतो तसतशी देहवृद्धीबरोबर दोष व धातूंची अभिवृद्धि क्रमानें होत असते, किंबहुना ह्या दोषधातुमलांची अभिव्यक्ति म्हणजेच देहवृद्धि होय.

गर्भाशयांत मातृरसांपासून देहाच्या दोषादिकांची निर्मिति किंवा परिबृंहण होतें, तर गर्भाशयबाह्य जीवनांत तें प्रत्यक्ष आहारद्रव्यांपासून होतें.

आहारसंभवं वस्तु रोगाश्चाहारसंभवाः। चरक सू.अ.२८

एवं च कृत्वा अन्नमया एव देहे सर्वे भावाः ।
[अष्टांगसंग्रह शारीर अ० ६]

दोष कोठें निर्माण होतात ?

ह्याप्रमाणें आदौ षड्समप्यन्नं..... । इत्यादि पहिल्या लेखांकांत उद्धृत केलेल्या वचनानुसार आमाशयांत विशिष्ट प्रमाणांत कफदोषद्रव्य, ग्रहणींत पित्तद्रव्य व पक्वाशयांत वातद्रव्य उत्पन्न होत असतें. कोणी म्हणतील कीं, अशा प्रकारच्या वाढलेल्या देहांत कफ, पित्त व वाताचें आद्य स्थानाचा निर्देश आपण करतां व त्यांच्या उत्पत्तीचाहि क्रम दाखवितां व स्थानस्थ दोषांची प्राकृतगतिहि वर्णन करतां, पण गर्भावस्थेंत दोषांचें प्राकृत मान, स्थान व गति हे असतात काय ? ह्याचें उत्तर हेंच कीं, शुक्रशोणितसंयोगात्म कललरूपी देह ज्या क्षणीं उत्पन्न झाला त्याच क्षणापासून हे स्थान, मान व गति हे भाव होतेच. ते ते दोषांचें स्थान परमाणुमय असेल, कांहीं परमाणूंच्या पुंजाचें तें तें स्थान त्यावेळीं बनलें असेल, विशिष्ट केंद्रमय स्थानांतच वातादि दोषांचें स्थान असेल, त्याच परमाणूंच्या संख्येची अभिवृद्धि व अभिव्यक्ति होऊनच आजची आमाशयादि स्थानें बनलीं आहेत.

सूक्ष्म स्थानांतून दोषांची गति

तत्र प्रथमे मासि कललं जायते । द्वितीये शीतोष्मानिलैरभिप्रपच्यमानानां महाभूतानां संघातो घनः संजायते...... । तृतीये हस्तपादशिरसां पंच पिण्डका निर्वर्तन्ते ऽङ्गप्रत्यङ्गविभागश्च सूक्ष्मो भवति । इत्यादि सुश्रुताचार्यांनीं आपल्या शारीरस्थानाचे तिसरे अध्यायांत जी गर्भावक्रांति वर्णित केली आहे ती गर्भाची अभिवृद्धि, अवक्रांति किंवा अभिव्यक्ति सूक्ष्म अशा दोषांनीं सूक्ष्म अशा स्थानांतून गति घेऊनच झालेली आहे. प्राथमिक कललाला दोन हाताच्या, दोन पायाच्या व एक शिराच्या ज्या पिण्डका तयार केल्या त्या आपोआपच झाल्या काय ? वातप्रधान अशा तीनहि दोषांनींच त्या प्रकारची गति घेऊन तसा टेंगळाचा आकार आणला, व खालील श्लोकावरूनहि या गतीचा बोध होतो.

असृजः श्लेष्मणश्चापि यः प्रसादः परो मतः ।
तं पच्यमानं पित्तेन वायुश्चाप्यनुधावति ।
ततोऽस्यांत्राणि जायन्ते गुदं बस्तिश्च देहिनः ।

यथार्थमूष्मणा युक्ता वायुः स्रोतांसि दारयेत् ।
अनुप्रविश्य पिशितं पेशीर्विभजते तथा ।
आशय्याभ्यासयोगेन करोत्याशयसंभवम् ।

कांच कारखान्याची उपमा

शास्त्रीय विनोद करून सांगावयाचें म्हणजे काचकारखान्यांत अग्नीच्या उष्णतेनें [पित्तदोषानें] तापलेला स्निग्धद्रवादि गुणात्मक काचेचा रस (कफ-दोष धातु) व त्या कारखान्यांतील कर्मचाऱ्याचें फुंकणें (वातदोष) ह्या एवढ्या सामुदायिक कारणामुळेंच काचेचा फुगा तयार होतो; तद्वतच वातादि दोष भिन्न भिन्न गति घेऊनच हे स्थूलदेहरूपी कार्य तयार करितात. तेव्हां दोषांचें स्थान, मान व गति हे स्थूलदेहाचे जन्मसिद्ध हक्क होत.

साक्षेप द्रव्यमान

असो, सांगावयाचें एवढेंच कीं प्रत्येक देहांत जन्मापासून तो मरणापर्यंत देहाचे स्थितिकालीं वातादि दोषांचें साक्षेप द्रव्यमान असतें. त्यालाच दोषांचें साम्य म्हणतात व या सापेक्ष मानापेक्षां अधिक मान झाल्यास त्याला दोषवृद्धि व त्या ठरलेल्या मानापेक्षां कमी प्रमाणांत झाल्यास त्याला दोषक्षय म्हणतात. अशा प्रकारचे वृद्धिक्षयात्मक दोन प्रकारचें वैषम्यच असतें. ह्या वैषम्यालाच रोग किंवा विकार म्हणतात व साम्यालाच आरोग्य म्हणतात.

दोषनिर्मितीच्या आद्य स्थानाचा विचार

ह्या वैषम्यावस्थेपैकीं जी एक दोषांची वृद्धावस्था यांत वातादि प्रत्येक दोष स्वभावापेक्षां द्रव्यतः आपआपल्या आमाशयादि स्थानांत अधिक वाढतो त्यालाच दोषांची चयावस्था म्हणतात. चयो वृद्धिः स्वधाम्न्येव । (अष्टांगहृदय सू० अ० १२) । आतां जर प्रत्येक दोषाची वृद्धि स्वस्थानांत होते तर त्याच नियमाप्रमाणें प्रत्येक दोषांचा क्षयहि स्वस्थानांतच झाला पाहिजे. एकंदर दोष साम्यावस्थेंत, वृद्धावस्थेंत किंवा क्षीणावस्थेंत असतात. त्या प्रत्येकांची ही अवस्था ठरवितांना त्या त्या दोषाच्या निर्मितीच्या आद्य स्थानाचा विचार करणें भाग आहे.

मागें आम्ही पहिल्या लेखांकांत स्वस्थानस्थ दोष स्वमानस्थ असतां त्यांचें सर्व देहचरत्व कसें असतें हें सांगितलें. आतां प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, दोषांच्या वृद्धावस्थेंत व क्षीणावस्थेंत दोषांची गति असते काय ?

संचयं च प्रकोपं च प्रसरं स्थानासंश्रयम् ।
व्यक्तिं भेदं च यो वेत्ति दोषाणां स भवेद्भिषक् ॥३६॥
संचयेऽपहृता दोषा लभन्ते नोन्तरा गतिः ।
ते तूत्तरासु गतिषु भवन्ति बलवत्तराः ॥ ३७ ॥
सर्वैर्भावैस्त्रिभिर्वाऽपि द्वाभ्यामेकेन वा पुनः ।
संसर्गे कुपितः क्रुद्धं दोषं दोषोऽनुधावति ॥
(सुश्रुत सू० अ० २१)

कुपितानां हि दोषाणां शरीरे परिधावताम् ।
यत्र संगः खवैगुण्याद् व्याधिस्तत्रोपजायते ।
[सुश्रुत, सूत्रस्थान अ. २४]

वृध्ददोषांची गति सिध्द आहे

इत्यादि श्लोकावरून वृद्धदोष स्वस्थानांतून गमन करितात, गति घेतात व जेथें खवैगुण्य असेल त्या स्थानांत स्थिर होऊन व्याधि उत्पन्न करितात हा मुद्दा सर्वसम्मतच असल्यामुळें त्याचा विशेष प्रपंच आम्हीं करित नाहीं. म्हणजे वृद्धदोषगति सिद्ध आहे. तेव्हां चरकसंहितेच्या सूत्रस्थानाच्या अ. १७ यांतील प्रथम उद्धृत केलेल्या क्षयः स्थानं च वृद्धिश्च दोषाणां त्रिविधा गतिः । ह्या चरणांत वृद्धिः या पदानें निर्दिष्ट केलेली वृद्ध दोषांची ही एक निराळ्या प्रकारची गति होय.

‘ आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार ’

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्व-प्रकारचीं सिद्धौषधें [गुटीका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदीय औषधी भांडार
२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

सुप्रसिद्ध वैद्य बापूसाहेब मेहेंदळे यांच्या
दोन हृद्य आठवणी

: लेखक :
श्री. रामकृष्ण बाकरे

बापूसाहेब मेहेंदळे, आप्पाशास्त्री वैद्य आणि बाळशास्त्री मोटे हे त्या काळांतील पुण्यांतील तीन मोठे वैद्य. पैकीं बाळशास्त्री हे केवळ शास्त्रज्ञ होते. अप्पाशास्त्री वैद्य यांना तर सिद्धरसायनी म्हणत; कारण औषधें बनविण्यांत त्यांच्या एवढा तज्ज्ञ कुणी नव्हता. आणि बापूसाहेब मेहेंदळे हे तर साक्षात् धन्वन्तरीच गणले जात. आपली वैद्यकी सुरूं करण्यापूर्वीं जवळ जवळ सारा देश त्यांनीं हिंडून पालथा घातला होता. आपल्या कर्तृत्वाबद्दल त्यांना वृथाभिमान मुळींच नव्हता. ते म्हणत ‘इतर वैद्य ९० टक्के चुकतात आणि मी ९० टक्के बरोबर येतो, एवढाच काय तो माझ्यांत आणि त्यांच्यांत फरक. मला कांहीं गुप्त विद्या अवगत आहे असें नाहीं.’

दवाखान्यांतील सरंजाम

रुग्ण-चिकित्सेपुरतें हें त्यांचें मत विनम्र असलें तरी वागण्यांत भलतीच नम्रता नव्हती. त्यांच्या रुग्णालयांतील शिस्तीपुढें अनेकांना कोपरापासून हात जोडण्याची वेळ येत होती. सकाळीं ८ वाजतां घराचा दरवाजा रोग्यांसाठीं उघडला जाई. १२ वाजेपर्यंत रोगी तपासण्याचें काम चाले. स्वतःला बसावयाला एक घोंगडी आणि रोग्याला बसावयाला एक घोंगडी याखेरीज दवाखान्यांत निराळा सरंजाम नाहीं. मग रोगी एखादां संस्थानिक असो कीं भिकारी असो.

रुपये नोटा धुऊन घेत

१२ वाजतां दवाखाना बंद केला कीं, रोग्यांनीं दिलेले रुपये, नोटा वगैरे सर्व गंगाळांत घालून धुऊन, साफ करून उन्हांत वाळत टाकण्यांत येत असत. रोज संध्याकाळीं रुपयाभराची मिठाई विकत आणून खाणें ही एक संवय त्यांना होती. त्यांना गाण्याचा– त्यांतल्यात्यांत वाजावण्याचा विशेष षोक होता. सतार, कछवा वगैरे वाद्यें माडीवरील त्यांच्या त्रिछायतीशीं नेहमीं टांगलेलीं असत.

त्यांचा विक्षिप्तपणा

त्यांच्या विक्षिप्तपणाच्या अनेक गोष्टी पुण्यांतील जुन्या लोकांना ठाऊक आहेत. रोग्यांची वाट पहात बसण्याचा प्रसंग त्यांच्या आयुष्यांत कधींच आला नाहीं. रोगीच दार उघडण्याची वाट पहात दाराजवळ बसलेले असत. अनुक्रमानें एकएक रोगी त्यांच्यापुढें अंथरलेल्या घोंगडीवर येऊन बसे, आणि तपासणी होऊन औषध मिळालें कीं चालूं लागे. एकदां ते यथाक्रम रोगी तपाशीत असतां कोणीसा अनोळखी इसम व्हिक्टोरियांतील बसावयाची गादी घेऊन थेट आंत आला व त्यानें ती रोग्याच्या घोंगडीशेजारीं अंथरली. बापूसाहेबांना या गादी अंथरण्याचा उलगडा होईना. त्यांनीं प्रश्नार्थक चेहरा करून त्या गृहस्थाकडे पाहिलें, तसा तो हात जोडून म्हणाला:–

इंदूरचे दिवाणसाहेब

“बाहेर इंदूरचे दिवाणसाहेब आलेत गाडी घेऊन; त्यांना औषध हवंय. आपल्या इथें रोग्यानें घोंगडीवर बसण्याची पद्धत. दिवाणसाहेब घोंगडीवर कसे बसतील? म्हणून त्यांच्यासाठीं ही व्हिक्टोरियांतील गादी घेऊन आलेय्. त्यांना आंत घेऊन या म्हणालांत कीं आणतों.”

माझ्याचं शिस्तीनें चाललें पाहिजे

संस्थानी वातावरणांत वाढलेल्या त्या इसमाला बापूसाहेबांच्या शिस्तीची काय कल्पना असणार! तो भडाभडा सारें बोलून गेला. त्याचें बोलणें संपतांच डोळे मोठे करून बापूसाहेब म्हणाले.–

“लाज नाहीं वाटत घोंगडीवर कसे बसतील म्हणून विचारायला? चल उचल ती गादी आधीं. दिवाणसाहेब असो, नाहींतर ब्रह्मदेव असो, माझ्याकडून औषध हवं असेल तर माझ्याच शिस्तीनें चाललं पाहिजे. उचल ती गादी आधीं.”

रोग असाध्य आहे

बिचारा मुकाट्यानं गादी उचलून बाहेर गेला अन् व्हिक्टोरियांत बसविलेल्या दिवाणसाहेबांना त्यानें सारी हकीकत सांगितली. दिवाणांना लगेच आपली चूक कळून आली, ते आंत आले. घोंगडीवर बसले. बापूसाहेबांनीं त्यांना तपासलं, पण आपल्या हातून दिवाण बरे होतील असं त्यांच मन त्यांना सांगेना. त्यांनीं लगेच दिवाणजींना सांगितलं; ‘ रोग असाध्य आहे. आपण दुसरीकडे कुठेंहि जा. मी औषध देऊं शकत नाहीं. ’

दिवाणजींची समजूत

दिवाणजींना वाटलें पैशाबाबत आधींच कांहीं न बोलल्यामुळें बापूसाहेबांनीं आपणास औषध देण्यास नकार दिला असावा. ते तसेच गेले आणि एका ताटांत मावतील एवढे रुपये भरून त्यावर रुमाल झांकून एका नोकरास बरोबर घेऊन पुनः बापूसाहेब मेहेंदळे यांच्याकडे आले.

अंगणांत रुपयेच रुपये!

रुपयांनीं भरलेलें ताट आणि आपण नाकारलेला रोगी पाहतांच बापूसाहेब क्रोधानें लाल झाले. पडवीच्या दरवाजांत उभ्या असलेल्या नोकराच्या हातांतील ताट हिसकावून घेऊन त्यांनीं ताड्कन् तें अंगणांत फेंकून दिलें. सगळ्या अंगणभर रुपयेच रुपये! दिवाणांना याचा कांहींच अर्थबोध होईना. संतापानें थरथरत बापूसाहेब दिवाणांना म्हणतात:—‘ श्रीमंतीची ऐट दाखवून माझा शब्द बदलूं पाहतोस! चालता हो इथून. इथें एकदां औषध नाहीं म्हणजे नाहीं. मग तूं सोन्यारुप्याची रास आणून ओतलीस तरी त्याचा कांहीं उपयोग नाहीं. ’

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं

आयुर्वेदिक व युनानी वनौषधि

तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण !

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार, गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाक्रेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलट-कंबल, नागकेशर (अस्सली), ब्राह्मी, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य ! विशेष माहितीसाठीं आमचे साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवा.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम-आयुर्वेद

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी

२४५ काळबादेवी रोड, मुंबई

पुण्यांतील त्यांचें स्मारक

अशा या विक्षिप्तपणाचे आणखी कितीतरी नमुने सांगतां येतील. आज बापूसाहेब कैलासवासी होऊन अनेक वर्षें झालीं असलीं तरी ते केवढ्या थोर योग्यतेचे वैद्य होते याची प्रचीति आजहि त्यांच्या नांवें पुण्यांतील ताराचंद रामनाथ रुग्णालयांत चालविलेला एक विभाग पाहून येईल. बंदेअली बीनवादनांत जेवढे निष्णात तेवढेच मेहेंदळे रुग्ण-चिकित्सेंत ! तथापि बंदेअली कोण ह्याविषयीं थोडें सांगितलें पाहिजे.

श्रेष्ठ बीनकार बंदेअली

बंदेअली हे एक सर्वश्रेष्ठ बीनकार १८३० ते १८९० मध्यें होऊन गेले, असें जाणकार सांगतात. यावरून आजमितीला त्यांच्या आठवणी किमान साठ वर्षांपूर्वींच्या होत. पुण्याच्या प्रसिद्ध तुळशीबागेंत त्यांची कबर आहे. हें वाचून कैकांना आश्चर्य वाटेल; पण तें खरें आहे. बापूसाहेबांइतकेच बंदेअली विक्षिप्तपणें वागणारे. निजामासारख्यांचीसुद्धां भीडमुर्वत न ठेवणारे. अशा ह्या दोन क्षेत्रांतील दोन कलावंतांचा परम स्नेहसंबंध एका चमत्कारिक रीतीनें आला, तो प्रसंग असाः —

चुन्नाच्या डोक्यांत व्रण

चुन्ना ही बंदेअलींची प्रियसखी आणि प्रियशिष्या. पण चुन्ना ऐनभरांत गात असतांनाच तिच्या डोक्यांत व्रण झाला. व्रण दिवसेंदिवस जास्त खोल होत चालला. इंदूर, ग्वाल्हेर, कलकत्ता, मुंबई इ. ठिकाणें त्यांनीं चुन्नाला बरोबर घेऊन पालथीं घातलीं. पण एकाहि डॉक्टराच्या औषधानें गुण येईना. आपली प्रियसखी आणि प्रियशिष्या व्रणानें आपल्याला कायमची मुकणार ही कल्पना त्यांना सहन होईना. तेवढ्यांत कोणीतरी त्यांना मेहेंदळ्यांचें नांव सुचवलें. जें दुखणें मुंबईपर्यंत कोणी बरें करूं शकलें नाहीं तें लहानशा पुण्यांत कोण कसचें बरें करतो असें वाटून बंदेअली स्वस्थ बसते तर... !

कळवळून विनंति

पण तसें घडलें नाहीं. चुन्नाला घेऊन बंदेअली बापूसाहेबांच्या घरीं आले. दरवाजांतूनच कुर्निसात करून रोग्यांसाठीं अंथरलेल्या घोंगडीवर त्यांनीं चुन्नाला बसविलें, आणि आपली सगळी हकीकत सांगून कसेंहि करून माझ्या चुन्नाला बरी करा अशी त्यांनीं कळवळून विनंति केली.

बापूसाहेब मेहेंदळे मोठे वस्ताद ! एवढा श्रेष्ठ कलावंत दाराशीं आलेला. पट्कन होय म्हणायचें कीं नाहीं, त्यांनीं बंदेअलीपुढें पेंच टाकला. ते म्हणाले:—

“ बदेअली, मी चुन्नाला बरी करीन पण त्याचा मोबदला ? ”

“ लागेल तो मोबदला द्यायची तयारी आहे माझी. आपण नुसता आंकडा सांगा. ”

“ आंकडा ? आंकडे खूप आहेत माझ्यापाशीं. तुझ्याकडून एकहि छदाम नको मला. ”

“ मग काय सेवा करूं मी आपली ? कसा उतराई होऊं ? ”

शंभर अटी कबूल

“ एक अट कबूल असेल तर पहा. ”

“ एक कां शंभर अटी कबूल आहेत मला. आपण सांगणार मी वागणार, बोला ?

“ पुण्यास आलास कीं मी बोलवीन त्यावेळीं बीन घेऊन आलं पाहिजे माझ्या घरीं वाजवायला. आहेस कबूल ? ”

“ कां नाहीं, एकदां सोडून शंभरदां कबूल !”

...आणि बापूसाहेबानीं तीन महिन्यांत चुन्नाला व्रणाच्या व्यथेंतून मुक्त केलें. बंदेअली बाहेर कुणाची मुर्वत ठेवीत नसत. इंदूरच्या दिवाणाचीहि त्यांनीं पर्वा केली नाहीं. पण बापूसाहेब मेहेंदळे यांच्याकडे मात्र अगदीं वेगळा प्रकार. दरवाजांत शिरल्यापासून कुर्निसात सुरू व्हायचे अन् बापूसाहेब सांगतील तेव्हां मैफल झडायची.

[लोकमान्य, दिवाळी अंक १९५५]

मोतिबिंदूवर आयुर्वेदीय उपचार

मोतीबिंदु हा विकार नेत्रगत कफदोषवृद्धीपासून होणारा आहे. त्यासाठीं कफदोषविकार निर्माण होऊं नये असें बदल आहार–विहारांत करणें हें प्रथम कर्तव्य आहे. शिवाय हा कफदोष डोळ्यांत संचित होऊं नये यासाठीं चुकीच्या पद्धतीनें निद्रा (भोजनोत्तर लगेच) व वमन घेऊं नये. वमन हा कफदोषावरचा महत्वाचा उपाय आहे सबब दरसाल वसंत ऋतूंत [कफप्रकोपकालीं] मोतीबिंदु न होण्यासाठीं वान्ती करावी. तसेंच कफप्रकृती लोकांनीं इतरहि ऋतूंत कफवृद्धी आढळून आल्यास वांतीचें औषध घ्यावें. तसेंच रोज झोपण्यापूर्वी त्रिफळाचूर्ण, नवायसचूर्ण, धात्रीनिशावटी यासारखी औषधें अवश्य नित्यसेवनीय म्हणून मधांत अगर मध-तुपांत घ्यावीत. एवढें केल्यानंतर मोतिबिंदु होणार नाहीं व झाला असला तरी तो क्रमानें कमीकमी होत जाईल व दृष्टि निवळेल.

आधीं अंतर्गत उपाय

अशा प्रकारें कफदोषाचें सार्वदेहिक शोधन व शमन केल्यानंतर मग डोळ्यांत औषध घालून मोतिबिंदु कमी करण्याचा स्थानिक उपाय करण्याचा विचार मनांत आणावा. बहुतेक वैद्यमंडळी इतका विचार याबाबत करीत नाहींत. या रोगावर औषध असेंच सांगत असतात.

वैद्य शेंदुर्णीकर यांचें औषध

निफाड (जि. नाशिक) येथील वैद्य सि. त्र्यं. मुळे आयुर्वेदतीर्थ यांच्या डोळ्यांत मोतिबिंदु वाढूं लागला, तेव्हां त्यांनीं शेंदुर्णी[पूर्व खानदेश] येथील वैद्य शेंदुर्णीकर यांनीं पुढील स्थानिक उपचार सांगितला व तो त्यांनीं मन लावून केला. त्याचा त्यांना लाभ झाला. पत्रिकेच्या वाचकासाठीं त्यांनीं त्याची माहिती दिली ती अशी:—

ताज्या आंवळ्यांचा रस

ताजे आवळे आणावेत, ते लोखंडी खलबत्त्यांत कुटून त्यांचा रस काढावा. तो रस कपड्यानें गाळून घ्यावा व लोखंडी खोलगट तव्यांत अगर कढईंत अग्नीवर ठेवून लोखंडी उलथन्यानें हलवावा. शक्यतो बोरीचें लाकूड अग्नीसाठीं वापरावें.

मात्रा वळाव्यात

रस दाट होत आला कीं खालीं उतरून त्याच्या लांबट गोळया (उगाळण्यास सोईच्या होतील अशा) बांधाव्या. हें काम तो दाट रस निवत असतांनाच करावें. कारण निवाल्यावर रस फारच कडक बनतो.

मात्रा उगाळून अंजन

ही गोळी पाण्यांत उगाळून त्याचें अंजन रोज १ अगर २ वेळ करावें. आवळ्याच्या रसाचा संस्कार झालेलें लोह हें या ठिकाणीं नेत्रगत कफदोष काढण्यासाठीं गुणकारी होत असतें.

[मोतीबिंदु दूर होण्यासाठीं अंतर्बाह्य असे दोन्हीही उपाय करणें हिताचें आहे. केवळ एकाच मार्गाच्या उपाय पद्धतीवर अवलंबून राहू नये.]

सांडू ब्रदर्सचीं

शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.

वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.

पत्रव्यवहाराचा पत्ताः—

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
चेंबूर लि.
फॅक्टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

अडुळसा कटुविपाकी व उष्णवीर्य नाहीं

आयुर्वेदं पत्रिकेच्या दि. १६-११-१९५५ चे अंकांत वैद्यराज आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे यांचा चहा–गुणविशेष–विमर्श ह्या शीर्षकाचा एक लेख आला आहे. त्यांत पृष्ठक्रमांक ३०० वर खालील विधान केलें आहे.

"पण केवळ रसावरून वीर्य ठरवितां येत नाहीं. बेल, अडुळसा हे तिक्तकषाय असून त्यांचें वीर्य उष्णच आहे. कारण त्यांचा विपाक कटु आहे...... ...विपाकानें रसाच्या परिणामाचा परिहार होतो. (रसं विपाकः ...व्यपोहति)"

यावरून श्री. देशपांडे यांचें म्हणणें असें दिसतें कीं, अडुळसा हें द्रव्य कटुविपाकी आहे. अतएव तें उष्णवीर्य आहे कारण त्यांच्या शीतवीर्य रसाचा कटु-विपाकानें अभिभव होतो.

अडुळसा शीतवीर्य आहे

भावप्रकाश निघण्टूचें समीक्षण केल्यास असें दिसून येते कीं अडुळसा हें द्रव्य शीतवीर्य आहे. त्याचा रस तिक्त व कषाय आहे असें सांगितलें असून तो अडुळसा 'विपाके कटुः'। असें विधान केलेलें नाहीं.

वासको वातकृत्स्वर्यः कफपित्तास्रनाशनः ।
तिक्तस्तुवरको हृद्यो लघुः शीतस्तृडर्तिहृत् ।

[भावप्रकाश]

तिक्त--कषाय--रसाचें द्रव्य

अष्टांगहृदयाच्या सूत्रस्थानाच्या १० वे अध्यायांत तिक्तरसात्मक द्रव्यांची जी सूची दिली आहे त्यांत अडुळसा अंतर्भूत आहे.

तिक्तः पटोली त्रायन्ती वालकोशीरचंदनम् ।
नक्तमालद्विरजनीमूस्तमूर्वाटरूषकम् ॥

तेव्हां अडुळसा हें द्रव्य मुख्यतः तिक्तरसात्मकच व कषाय हा अनुरस असून, तिक्तः कषायो मधुरस्तद्वदेव च शीतलाः । ह्या वचनाप्रमाणें तें शीतवीर्यच ठरतें. बरें, 'तिक्तोषणकषायाणां विपाकः प्रायशः कटुः । ह्या सूत्राप्रमाणें असें सरसकट विधान करतां येत नाहीं कीं जें जें तिक्त व कषाय द्रव्य असेल तें तें कटु विपाकीच असतें. कारण सूत्रांतील 'प्रायशः' हें पद विसरून चालणार नाहीं.

विपाक सबल कीं अबल

आणि दुसरा प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, अडुळशाचा कटुविपाक मान्य केल्यास मग हा कटुविपाक अडुळशाच्या तिक्तादि रसांशीं समबल आहे कीं अबल आहे हें ठरविलें पाहिजे. अबल असल्यास कटुविपाकाचा प्रबल अशा शीतवीर्य तिक्तादि रसांनीं अभिभव झाल्यानें अडुळसा उष्णवीर्य ठरत नाहीं. तो शीतवीर्यच ठरतो.

यद्यद्द्रव्ये रसादीनां बलवत्वेन वर्तते ।
अभिभूयेतरांस्तत्तत्कारणत्वं प्रपद्यते ।

(अष्टांगहृ. सू. अ. ९)

बरें, अडुळशाचा कटुविपाक त्याच्या शीतवीर्य असलेल्या तिक्तादिरसांशीं समबल आहे असें मानल्यास किंबहुना प्रबल आहे असेंहि गृहित धरल्यास अडुळशाच्या उष्णवीर्य अशा कटुविपाकानें त्याच्या तिक्तादि शीतगुणात्मक रसांचा अभिभव होऊन कटुविपाकच फलतः कार्यकारी झाल्यामुळें अडुळसा हें द्रव्य उष्णवीर्य ठरून तीक्ष्णोष्णादिगुणात्मक पित्तदोषाचें तें वर्धन करणारें आहे असें सिद्ध होतें.

रसं विपाकस्तौ वीर्यं प्रभावस्तान् व्यपोहति ।
बलसाम्ये रसादीनामिति नैसर्गिकं बलम् ।

(अष्टांगहृदय सूत्र. अ. ९)

मग निघण्टुकार अडुळसा पित्तघ्न असून शीतवीर्य आहे असें स्पष्ट सांगतात त्याची संगति कशी ? अर्थात् कार्यावरून कारणाचें अनुमान करावयाचें म्हणजे अडूळसा हें द्रव्य आपल्या तिक्तादि रसांनीं शीतवीर्यात्मक कार्य करीत असलें पाहिजे व

‘ त्रिधा विपाको द्रव्यस्य स्वाद्वम्लकटुकात्मकः ’। या सूत्राप्रमाणें प्रत्येक द्रव्याचे तीनच विपाक होतात असा दृढ शास्त्रसिद्धांत असल्यामुळें या तीन विपाकापैकीं अम्ल व कटु हे दोन विपाक ‘रसैरसौ तुल्यफलः।’ या तत्वाप्रमाणें अम्लरस व कटुरसाप्रमाणें पित्तजननाचेंच कार्य करतात व अर्थात् उष्णवीर्य ठरतात, तर मग अडुळशाचें शीतवीर्यात्मक फल सिद्ध करण्याकरितां एक तर त्या अडुळशाचा स्वादुविपाक मानणें प्राप्त आहे; पण शास्त्रकार या अडुळशाला वासको वातकृत्...। असें स्पष्ट म्हणतात, त्यामुळें व स्वादुविपाक वातघ्न असल्यामुळें अडुळशाचा स्वादुविपाक संभवत नाहीं व कोणी अडुळसा स्वादुविपाकी मानतच असल्यास इष्टापत्तिच आहे. त्यामुळें आम्ही असें म्हणूं कीं तो अडुळसा आपल्या तिक्त व कषाय या दोन रसांनीं व स्वादुविपाकानेंहि शीतवीर्यात्मकच कार्य करतो. कारण जगतांतील कोणतेंहि द्रव्य खालीलप्रमाणें कार्य करतें.

किंचिद्रसेन कुरुते कर्म पाकेन वा परम्।
गुणान्तरेण वीर्येण प्रभावेणैव किंचन।

[अष्टांगहृदय सू. अ. ९]

अर्थात् निघण्टुप्रमाणें अडुळशाच्या कार्यकारणभावाचा विचार केल्यास श्री. देशपांडे यांच्या कटुविपाकास कोठेंच स्थान नाहीं. कारण कटुविपाकानें अडुळशाच्या पित्तघ्नत्वाची व शीतवीर्याची सिद्धि होत नाहीं. असो.

रक्तपित्त पित्तप्रधान व्याधि

दुसरें असें कीं, रक्तपित्त हा व्याधि अगदीं पित्तप्रधान व्याधि होय. ऊर्ध्वग, अधोग व द्विमार्गग असे दोषगतिभेदाप्रमाणें रक्तपित्ताचे प्रकार असले तरी त्यांत कफ व वात या शीतगुणात्मक दोन दोषांचें फक्त अनुबंधित्व असतें. म्हणजे रक्तपित्त या व्यांधींत तीक्ष्णोष्णादिगुणात्मक पित्तदोषाचेंच सदैव प्राबल्य असतें.

ऊर्ध्वगं कफसंसृष्टमधोगं पवनानुगम्।
द्विमार्गं कफवाताभ्यामुभाभ्यामनुवर्तते।

म्हणूनच ह्या व्याधीच्या निदानांत तीक्ष्णोष्णादि व कट्वम्ललवणरसात्मक द्रव्येंच विशेषतः हेतुभूत असतात असा स्पष्ट उल्लेख आहे.

भृशोष्णतीक्ष्णकट्वम्ललवणादिविदाहिभिः।
कुपितं पित्तलैः पित्तं द्रवं रक्तं च मूर्च्छिते।

(रक्तपित्तनिदान, अष्टांगहृदय अ.३)

कटुरसविपाकाला स्थान नाहीं

अर्थात् चिकित्सादृष्टीनें अगदीं स्पष्ट सांगावयाचें म्हणजे ‘कषायतिक्तमधुराः पित्तं [घ्नन्ति]...। या अष्टांगहृदयकारांच्या सूत्राप्रमाणें सर्वतः पित्तघ्न असलेल्या फक्त तिक्त, कषाय व मधुर ह्याच रसांचें व त्रिविध विपाकापैकीं फक्त स्वादुविपाकाचेंच पित्तप्रधान अशा या रक्तपित्तव्याधींत आनुकूल्य असूं शकतें. या व्याधींत पित्तप्रकोप करणाऱ्या कटुरसाला किंवा कटुविपाकाला मुळींच स्थान नाहीं हें निर्विवाद आहे.

ऊर्ध्वे प्रवृत्ते शमनौ रसौ तिक्तकषायकौ।
अधोगे रक्तपित्ते तु बृंहणो मधुरो रसः।

[अष्टांगहृदय, चिकित्सा अ.२]

कटुपदार्थांची हकालपट्टी

इतकेंच काय पण ऊर्ध्वग रक्तपित्तांत रोग्याला पाणी द्यावयाचें तें घनचंदनशुण्ठ्यम्बुपर्पटोशीरसाधितम्। या पाठाप्रमाणें षडंगोदक द्यावें असें सांगतांना, षडंगोदकाचे पाठांत शुण्ठी या कटुरसात्मक द्रव्याचा अन्तर्भाव होत असल्यामुळें व शुण्ठी आपल्या कटुरसाचे ऊर्ध्वभागांवर पित्तप्रकोपाचे व आपल्या स्वादुविपाकानें अधोभागावर पित्तशमनाचें कार्य करीत असल्यामुळें शुण्ठी ह्या कटुरसात्मक द्रव्याची, हें षडंगोदक करतांना हकालपट्टी करावयास शास्त्रकारांनीं आज्ञा केली आहे. व अधोगरक्तपित्तावरील विहित असलेल्या पेया सिद्ध करतांना शुण्ठी ही स्वादुविपाकी अतएव पित्तघ्न असल्यामुळें वाळा वगैरे भृशंशीत द्रव्याबरोबर तिचा अंगिकार केला आहे. यावरून पित्तप्रधान असलेल्या या रक्तपित्तव्याधींत कटुरस व कटुविपाकाचें किती वावडें आहे हें शास्त्रीय चिकित्सकांना नव्यानें सांगावयास नको.

उपवासश्च निःशुण्ठीषडंगोदकपायिनः ।
उशीरं शाबरं रोध्रं श्रृंगेबरं कुचंदनम् ।
अर्धार्धैर्विहिताः पेया वक्ष्यन्ते पादयौगिकाः ॥

[अष्टांगहृदय, रक्तापित्तचिकित्सा अ. २]

पित्तप्रधान रक्तपित्ताचें प्रधान औषध

या सर्व विवेचनावरून हें सिद्ध होतें कीं, द्यराज श्री. देशपांडे म्हणतात त्याप्रमाणें अडुळसा द्रव्य कटुविपाकी व उष्णवीर्य मानल्यास पित्त–धान असलेल्या रक्तापित्तव्याधींत अडुळशाला पूर्णतः अयोग्यत्व येतें. पण ह्याचे उलट अडुळसा द्रव्य पित्तप्रधान अशा रक्तपित्तव्याधीचें परम औषध होय असें शास्त्रकार जोरानें सांगतात.

शर्करामधुसंयुक्तः केवलो वा श्रृतोऽपि वा ।
वृषः सद्यो जयत्यस्त्रं स ह्यस्य परमौषधम् ।

[अष्टांगहृदय चिकित्सा अ. २]

जीर्ण पित्तज्वरांत वासाघृत

ह्याशिवाय अडुळसा ह्या वनस्पतीचें पूर्ण पंचांग वापरून जें वासाघृत तयार केलें जातें त्याचा उपयोग पैत्तिक जीर्णज्वरांत, रूक्ष व उष्ण हेतु घडून झालेल्या पित्तगुल्मांत व दाहादि लक्षणें असलेल्या राजयक्ष्म्यांत केला जातो असें स्पष्ट सांगितलें आहे.

तिक्तकं वृषघृतं च पैत्तिके । [अ. हृ. चि. अ. १]

...... गुल्मे रूक्षोष्णजे पुनः ।
परं संशमनं सर्पिस्तिक्तं वासाघृतं...... ।

[अ. हृ. चि. अ. १४]

हस्तपादांगदाहेषु ज्वरे रक्ते तथोर्ध्वगे ।
वासासर्पिः शतावर्या सिद्धं वा परमं हितम् ॥१०५॥

[चरकसंहिता राजयक्ष्माचिकित्सा अ. ८]

शेवटीं आम्ही आचार्य देशपांडे यांना अशी सविनय पृच्छा करितो कीं, आपल्या मताप्रमाणें कटुविपाकी म्हणून उष्णवीर्य असलेलें अडुळसा हें द्रव्यच घेऊन बनविलेलें वासाघृत चरकाचार्य आपल्या संहितेच्या चिकित्सास्थानाच्या पांचवे अध्यायांत शीतवीर्य म्हणून संबोधितात त्याची वाट काय ?

वासाघृत शीतवीर्य आहे

वृषं समूलमापोथ्य पचेदष्टगुणे जले ।
शेषेऽष्टभागे तस्यैव पुष्पकल्कं प्रदापयेत् ।
तेन सिद्धं घृतं शीतं सक्षौद्रं पित्तगुल्मनुत् ।
रक्तपित्तज्वरश्वासकासहृद्रोगनाशनम् ।

वैद्य देशपांडे यांचें मत अग्राह्य

तेव्हां या शास्त्रप्रामाण्यावरून, कितीहि विचार केला तरी अडुळसा ही वनस्पति आपल्या कटु विपाकानें उष्णवीर्यात्मक कार्य करतें असें श्री. देशपांडे यांचें विधान अग्राह्य ठरतें.

——————

धन्वन्तरी महोत्सव, यवतमाळ

यवतमाळ नगर वैद्य मंडळातर्फे झालेल्या या उत्सवानिमित्त नागपूर विद्यापीठांतील आयुर्वेद विभागाचे प्रमुख आचार्य वेणीमाधवशास्त्री यांचे यवतमाळ येथें आगमन झालें होतें. नगरभवनांत त्यांचें व्याख्यान झालें. बारकाईनें पाहिल्यास सर्व चिकित्सापद्धति या आयुर्वेदांत अंतर्भूत होतील अशाच आहेत. सर्व जगाला स्वास्थ्याचा मार्ग दाखवण्यांस आयुर्वेदच समर्थ आहे असें त्यांनीं सांगितलें. या सभेंत वैद्य आर. यू. पद्मवार यांनीं आयुर्वेदावर एक इंग्रजी प्रबंध वाचला.

——————

तारेचा पत्ता:–Newbottle
के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट. मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुचें, कॅपसुल्स
[हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाची सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

वाचकांचा पत्रव्यवहार–

वैद्यांच्या पदव्या

लेखक– वैद्यरत्न अमृत वासुदेवशास्त्री ऐनापुरे

बी. एस्सी. एल्. एल्. बी. मुंबई ४

ज्या वेळेला सरकारचा १९३८चा वैद्यकीय व्यवसायाचा कायदा पास झालेला नव्हता तोपर्यंत खाजगी संस्था, शंकराचार्यांचीं प्रादेशिक पीठें, वैद्य संमेलनें वगैरेकडून वैद्यांचा सन्मान, पदव्या, शाली, दक्षिणा देऊन जाहीर रीतीनें केला जात असे. परंतु या कायद्यांतील ३५(१) या कलमाला अनुसरून, सरकारी अगर सरकारमान्य संस्थांनीं दिलेल्या पदव्याशिवाय, त्या अगर त्यासारख्या पदव्या (Colourable immitation) इतर कोणत्याहि संस्थांनीं अगर व्यक्तींनीं देतां कामा नये. आणि कलम ३५ (अ), जें १९५१ मध्यें अंमलांत आलें, त्याप्रमाणें उपरोक्त दिलेल्या पदव्या जो कोणी धारण करील तो ६ महिनेपर्यंत शिक्षा व ५०० रुपये पर्यंत दंडास पात्र होईल. अर्थात् या कायद्याप्रमाणें सरकारमान्य संस्थेनें किंवा सरकारनें दिलेल्या पदव्यासारख्या पदव्या देणें अगर आपल्या नांवांपुढें लावणें हें प्रतिबंधित झालें हें उघड आहे.

सर्जनजनरलकडून नोटीसा

ज्या वैद्यांना १९५१ किंवा १९४१ पूर्वींच निरानिराळया पदव्या मिळाल्या होत्या व जे त्या पदव्यामुळें प्रसिद्ध झाले होते, त्यांना त्या पदव्या न लावण्याबद्दल सर्जनजनरलच्या ऑफिसकडून नोटीसा मिळाल्या व ३५ [अ] चा बडगा दाखविण्यांत आला. त्याला भिऊन कोणी आपण होऊन पदव्या सोडून दिल्या व कोणी सरकारची इतराजी होऊं नये म्हणून वैद्यांना त्या पदव्यांनीं ओळखीनासे झाले. ही या कलमांची अतिव्याप्ति झाली, असें खेदानें म्हणावें लागतें.

सन्मान करण्यास कायद्यानें मुभा

या पदव्यांचे बाबतींत माझें स्पष्ट मत असें आहे कीं, कॉन्स्टिट्यूशन अॅक्ट [घटना कायदा] कल १८ व १९ याप्रमाणें कोणाहि खाजगी व्यक्ती अ संस्थांना, कोणाचाहि मान, सन्मान करणें, विशेष देणें वगैरे करण्यास संपूर्ण मुभा आहे; तेव्हां एखाद संस्थेनें अगर व्यक्तीनें एखाद्या वैद्याला एखादी पदव देऊन सन्मान केला असतां कोणत्याहि कायद्या उल्लंघन होत नाहीं, व अशी पदवी जर त्या वैद्या आपल्या नांवापुढें लावली तर तो गुन्हा होऊं शक नाहीं. फक्त अशी पदवी ३५ व ३५ अ कलमाच्य प्रमाणें सरकारमान्य ज्या ११ पदव्या दिलेल्या आहेत त्यापैकीं अगर तशी दिसणारी [Colourable immitation] असतां कामा नये.

कायद्याचें उल्लंघन होत नाहीं

एखाद्या वैद्यराजांना ' वैद्यपंचानन ' अगर ' प्राणाचार्य ' अशी पदवी मिळाली असेल किंवा आजहि कोणाची व्यक्तिशः अगर संस्थेमार्फत अशी पदवी देऊन त्यांचा बहुमान करण्याची इच्छा असेल तर १९३८ च्या वैद्यकीय व्यवसायाच्या कायद्याचे ३५--३५ अ कलमाचें मुळींच उल्लंघन होऊं शकत नाहीं. कारण उघड आहे कीं अशी पदवी शेड्यूलच्या पदव्यांपैकीं नाहीं, व घटना कायद्याप्रमाणें विशेषणें देऊन बहुमान करण्याचें स्वातंत्र्य कोणताहि कायदा हिरावून घेऊं शकत नाहीं. L M. (Rotunda,, Z. V. B. (Vienna), D. O. वगैरे भुस्कट पदव्यापेक्षां या पदव्या अस्थानीं नाहींत.

मिळालेल्या पदव्या सोडूं नये

१९५१ पूर्वी जे वैद्य त्यांना मिळालेल्या पदव्या लावीत होते त्यांना त्या पदव्या सोडून देण्याचें कांहींच कारण नाहीं, कारण या कलमांची व्याप्ति मागील कालावर [Retrospective] होत नाहीं. १९५१ साला नंतर सुद्धां शेड्यूलच्या ११ पदव्यापेक्षां इतर कोणत्याहि पदव्या लावण्यास हरकत नाहीं. खाजगी व सार्वजनिक संस्थांनीं वैद्यांचा अशाप्रकारें बहुमान करण्याचें बंद केलें आहे तें बंद करूं नये.

————

संशोधनाचे नांवाखालीं केवळ अडवणुक

[लेखकः– वैद्यराज इंदुभूषण भिंगारे महाळ नागपुर २]

जबलपूरचे सुप्रसिद्ध विद्वान् वैद्यराज डेग्वेकरजी ह्यांचा मुंबई आयुर्वेद संशोधन बोर्डाशीं झालेला व आयुर्वेदपत्रिकेंत प्रसिद्ध झालेला पत्रव्यवहार वाचकांना आठवत असेलच. कोणत्याहि बोर्डावर अगर संस्थेवर पाश्चात्य डॉक्टरांची नेमणुक झाल्यास त्यांची आयुर्वेदीय वैद्यांकडे पाहण्याची वृत्ति किती हिणकस व अडवणुकीची असते, ही गोष्ट त्या पत्रव्यवहारावरून स्पष्ट झाली आहे. माझे हें दुसरें उदाहरण आहे. अशीं पुष्कळच उदाहरणें आहेत. डॉ. म्हसकरांशीं झालेला माझा पत्रव्यवहार मीं प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. ह्या पत्रव्यवहारावरून ही गोष्ट स्पष्ट निदर्शनास येतें कीं आयुर्वेद संशोधनाच्या कोणत्याहि क्षेत्रांत पाश्चात्य डॉक्टरांचा प्रवेश होऊं देतां कामा नये. त्यांच्या प्रवेशामुळें कोणत्याहि कार्याची प्रगति तर होत नाहींच, पण अडवणुक मात्र होते. वैद्यांना प्रोत्साहन अगर सहानुभूति दाखविण्याचें कार्यहि ते करू शकत नाहींत. म्हणून शुद्ध अगर मिश्रवादी वैद्यांनीं ह्यापुढें जागरूक राहून पाश्चात्य डॉक्टरांना आयुर्वेदीय संशोधनकार्यांत प्रवेश मिळवून देऊ नये. सरकारकडून तो प्रवेश मिळालाच तर त्यांचा स्पष्ट निषेधच करावयास पाहिजे.

'टायफॉइड फिव्हरवर रामबाण औषध' ह्या मथळ्याखालीं आतां पावेतों माझें जें लिखाण प्रसिद्ध झालें आहे, त्यावरून वैद्यवर्गाला माझ्या संशोधनाची व कार्याची दिशा कळली आहेच. ह्यापुढें मीं एखाद्या सुसज्ज रुग्णालयांत जाऊन टायफाइड फिव्हरच्या रोग्यावर प्रत्यक्ष प्रयोग करून दाखवू इच्छितो.

नवीन निर्माण झालेले आयुर्वेदीय संशोधन बोर्ड शुद्ध आयुर्वेदीय वैद्यांचे असल्यामुळें माझ्या पत्रव्यवहाराचा काय निर्णय लावतात ह्याकडे माझें लक्ष वेधलें आहे. नवीन निर्माण झालेल्या बोर्डानें माझ्या पूर्वीच्या पत्रव्यवहाराचा सहानुभूतिपूर्वक विचार करावा, एवढीच विनंति आहे.

वैद्य भिंगारे यांचें १ लें पत्र

प्राणाचार्य डॉ. इंदुभूषण भिंगारे, एल्. ए. एम्. एस्.
भिषग्रत्न (कलकत्ता) भृंगो, लॅबोरेटरीज
महाल-नागपूर. ता. ७।७।१९५५ याजकडून

श्रीयुत डॉ. म्हसकर साहेब,

अध्यक्ष, आयुर्वेदिक रिसर्च बोर्ड, मुंबई. यांसी 'टायफाइड फिव्हरवर रामबाण औषध'ह्या मथळ्याखालीं प्रसिद्ध झालेला आयुर्वेदपत्रिकेंतील माझा लेख आपण वाचला असेलच. हा लेख ता. १६ एप्रिल १९५५ आयुर्वेद पत्रिकेंत प्रसिद्ध झाला आहे. चंद्रकला, सुक्तादिवटी वगैरे औषधांच्या मिश्रणानें टायफाइड फिव्हरचा ज्वरमोक्ष २४ ते ३६ तासांच्या आंत होतो असें माझ्या प्रत्यक्ष अनुभवाला आलें आहे. ह्या औषधाचा प्रयोग आपल्या रिसर्च बोर्डाच्या नियंत्रणाखालीं व्हावा अशी माझी इच्छा आहे. आपण ह्या बाबतींत ताबडतोब निर्णय घेऊन मला कळविण्याची कृपा करावी, कळावें.

आपला
इं. भू. भिंगारे

डॉ. म्हसकर यांचें उत्तर

आयुर्वेदीय संशोधन मंडळ, मुंबई

चेअरमन	ऑ. सेक्रेटरी
डॉ. के. एस. म्हसकर	डॉ. एस. ए. हकीम
एम्.ए, एम् डी.	एम्. बी.बी.एस.
सं. क्र. –७।१०८।१४७	मुंबई दि.–१७।७।५५

वै. इंदुभूषण भिंगारे, प्राणाचार्य
भृंगो लॅबॉरेटरीज, महाल, नागपूर
संदर्भ—तुमचें ता. ७।७।५५ चें पत्र

महाशय,

ता. १६।४।१९५५ च्या आयुर्वेद पत्रिकेमध्यें

प्रसिद्ध झालेला आंत्रिक ज्वरासंबंधीं (Typhoid fever) तुम्ही लिहिलेला लेख मी वाचला. कृपाकरून खालील मुद्यांसंबंधीं माहिती मला कळवावी.

१] चंद्रकला आणि मुक्तादिवटी हीं औषधें कोणत्या तत्त्वावर कार्य करतात असें तुम्हांस वाटतें ?

२] त्रिदोषाधिष्ठानाला अनुसरून या औषधांच्या गुणकर्माबद्दल तुमचें काय स्पष्टीकरण आहे ?

बोर्डाच्या विचारार्थ—टायफॉइड फिव्हरवर गुणकारी असलेल्या तुमच्या औषधाच्या चिकित्साकसोटीस लागणाऱ्या खर्चासह, तुमची एकंदर असलेली विधायक योजना, तुम्ही बोर्डास कळविल्यास बरें होईल.

सत्वर उत्तर पाठवावें ही विनंति.

[मूळपत्र इंग्रजींत] आपला विश्वासू

(सही) के. एस. म्हसकर, चेअरमन

वैद्य भिंगारे यांचें २ रें पत्र

ता. २०।७।१९५५

श्री. म्हसकरसाहेब यांस स. न.

आपलें ता. १७ जुलै चें पत्र मिळालें. आपण सहकार्याचें आश्वासन दिल्याबद्दल मी आपला फार आभारी आहे. आपण जे तीन प्रश्न विचारले त्या संबंधीं लिहिणें म्हणजे एक प्रबंधच लिहिणें होय. आपण त्रिदोषाविषयीं प्रृच्छता केली. आयुर्वेदांत त्रिदोषाविषयीं पुष्कळ सांप्रदाय व मतभेद आहेत, हें आपणास माहितच आहे. मी स्वतः बंगालमध्यें आयुर्वेदाचें शिक्षण घेतलें आहे. मी श्री. महामहोपाध्याय गणनाथ सेन यांच्या सांप्रदायाचा आहे. आपणास जर आमच्या सांप्रदायाच्या दृष्टिकोनांतून त्रिदोषाविषयीं माहिती पाहिजे असेल तर मी आपला प्रबंध लिहून पाठवितो. हा प्रबंध आपणास पटेलच असें सांगतां येत नाहीं.

टायफॉइडवर वैद्यवर्गात औषधांची उपाययोजना करण्यांत येते. त्यांना नक्की अशी योजना माहित नसल्यामुळें अंदाजानें औषध देतात, व ज्वर कमी होण्याची प्रतीक्षा करितात. परन्तु मी केलेल्या औषधी उपाययोजनेनें नक्कीच ज्वर कमी होतो, हे मी स्वतःच्या अनुभवानें सांगतो. प्रथम औषधी तयार करून त्यानें रोग्याचा नक्कीच ज्वर कमी होतो कीं नाहीं, याबद्दल आपणासमोर स्वतः प्रयोग करून दाखवूं व आपल्या शंकेचें निवारण करूं. जर त्या औषधाचा हमखास गुण आपल्या दृष्टोपत्तीस आला तर पुढें कोणते परिणाम कशानें होतात हे शास्त्रीय दृष्टीनें ठरवितां येईल. आपणास नंतर औषधांत असलेल्या प्रत्येक घटकाचे गुणधर्म कोणते कोणते कार्य करतात याचा आयुर्वेदशास्त्राच्या व आधुनिक शास्त्राच्या दृष्टिकोणांतून विचार करतां येईल.

मी मुंबईस येऊन आपणासमोर औषध तयार करून व त्याची टायफाइडच्या रोग्यावर उपाय योजना करून रोगी टाइफाइडच्या ज्वरापासून मुक्त होतो याची प्रथम सत्यता पटवून देतो. नंतर आपणासमोर शास्त्रीय दृष्टीनें त्रिदोषाविषयीं कल्पना मांडतां येईल.

आपणास या सर्व बाबतींत चंद्रकला, मुक्तादिवटी व त्रिदोष या विषयीं माझ्याशीं स्पष्टपणें बोलायचें व शंकाचें निवारण करावयाचें असल्यास मी स्वतः मुंबईस येतो. त्याप्रमाणें मला मुंबईस येण्याची तारीख कळवावी. आपला

इं भ. भिंगारे

चेअरमन	ऑ. सेक्रेटरी
वै. बी. व्ही. गोखले	डॉ. एस्. ए. हकीम
आयुर्विद्या–पारंगत	एम्. बी बी. एस्.
संदर्भ क्रमांक– ७।१०८।१६८	मुंबई

दि. ४।८।१९५५

वै. इंदुभूषण भिंगारे प्राणाचार्य
महाल, नागपूर

महाशय,

तुमचें ता. २० जुलै १९५५ चें पत्र मिळालें, त्याबद्दल मी तुमचा आभारी आहे.

टायफॉइड फिव्हरच्या तुमच्या चिकित्साप्रयोगासंबंधीं उहापोह अगर चर्चा करण्यास तुम्ही मुंबईला येणें जरूर आहे असें मला वाटत नाहीं. खालील विचारलेली माहिती तुम्ही बोर्डाला द्यावी

अशी विनंति आहे.

१] तुमचें औषध तयार करण्याची समग्र माहिती.

२] सदर औषधाची चिकित्सापद्धति

३] किती टाइफॉइड फिव्हरच्या रुग्णावर तुम्ही सदर औषधाचा प्रयोग केला व त्याचा परिणाम काय दिसून आला ?

४] रुग्ण टायफॉइड फिव्हरचेच होते ह्याचें निश्चित निदान तुम्ही कसें काय केलें ?

५] आयुर्वेदांतील शास्त्रीय औषधी पाठाव्यतिरिक्त हा तुमचा स्वतंत्र शोध आहे काय ? हा पाठ तुमच्या मनांत कसा काय आला ? आणि अशा प्रकारचा विशिष्ट औषधि पाठ निर्माण करण्यांत तुमच्या विचाराला कोणतें अधिष्ठान होतें ?

६] वरील तपशीलास अनुसरून भैषजीय कसोटी पाहण्याकरितां एक योजना तयार करून ती बोर्डाकडे विचारार्थ पाठविण्याची कृपा करावी.

७] तुमच्या औषधि-चिकित्सेची यशस्विता पारखण्यासाठीं लागणाऱ्या खर्चाची जबाबदारी तुम्ही घेऊं शकता काय तेंहि कृपया निदर्शित करावें.

[मूळ पत्र इंग्रजींत] आपला विश्वासू
(सही) सेक्रेटरी यांची

वैद्य भिंगारे यांचें ३ रें पत्र

डॉ. म्हसकर यांसी

आपलें मला ता. ४ ऑगस्टचें पत्र मिळालें माझ्या लेखानंतर आयुर्वेदपत्रिकेंत डॉ. जोगी यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. तो आपण वाचला असेल डॉ. जोगी यांचें लेखांत आपण विचारलेल्या प्रश्नांचा समावेश झालेला आहे. ह्या लेखाला उत्तर म्हणून आयुर्वेदपात्रिकेकडे आज पुन्हां एक लेख पाठविलेला आहे. तो पुढच्या अंकांत प्रसिद्ध होणार आहे. संपादकाकडून आजच कळलें आहे. आपण विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें थोडक्यांत ह्या लेखांत असल्यामुळें आपलें समाधान होईलच असें मला वाटतें. ह्याशिवाय आपल्याला अधिक स्पष्टिकरण पाहिजे असल्यास त्याप्रमाणें कळवावें. पत्राचें उत्तर ताबडतोब देण्याची कृपा करावी. कळावे. इ. भू. भिंगारे

वैद्य भिंगारे यांचें ४ थें पत्र

श्री. कार्यवाह, आयुर्वेद संशोधन बोर्ड, मुंबई

आपल ता. ४ ऑगस्ट १९५५ चें पत्र मिळालें. आपल्याला माझें पत्र व त्याबरोबर पाठविलेला लेख मिळाला असेलच. माझ्या दोन्ही लेखांत माझ्या संशोधनाची दिशा व मार्ग स्पष्ट केलेले आहेत. मी तयार केलेल्या औषधांचा गुणधर्म निश्चित रूपानें प्रत्यक्ष अनुभवाला आल्यावरच मी आपल्या संपूर्ण प्रश्नांची सविस्तर उत्तरें देण्यास तयार आहे. प्रत्यक्ष प्रयोग करण्याचें पूर्वी आपल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यांत कांहीं विशेष फलनिष्पत्ति होईल असें वाटत नाहीं. आपण हा प्रयोग करण्यासाठीं सर्व व्यवस्था करावी. ५० रोग्यांना लागणारी औषधें मी आपल्या संशोधन बोर्डाला विनामूल्य देण्यास तयार आहे. त्या औषधांचा गुणधर्म निश्चित अनुभवाला आल्यावर त्या औषधांचे पाठ व तयार करण्याची प्रक्रिया सविस्तर लिहून व करून दाखवून आपल्या बोर्डाच्या स्वाधीन करण्यास तयार आहे. हा प्रयोग सिद्ध झाल्यावर आपण माझ्याकरितां काय करण्यास तयार आहात, हें सविस्तर कळविण्याची कृपा करावी. आपला

इं. भू. भिंगारे

बोर्डातर्फे चेअरमन

वै. भा. वि. गोखले यांचें पत्र

वैद्य इंदुभूषण भिंगारे यांसी सा. न. वि. वि.

आपलें दिनांक १२-८-५५ चे पत्र पोहोचलें. रिसर्च बोर्डाकडे तुम्ही पाठविलेला पत्रव्यवहार वाचला. तुमच्या औषधाला थोडीशी ट्रायल मीं दिलेली आपणास माहितच आहे. विडाल टेस्ट [Widal test] पॉझिटिव्ह असलेल्या रोग्यास तुमच्या औषधाचा उपयोग झाला नाहीं.' तुमच्या लेखांत तसा

पुरावा तुम्ही जाहीर केलेला नाहीं. तरी तसा प्रत्यक्ष पुरावा असल्यास बोर्डाकडे त्याचें सविस्तर वृत्त पाठवावें. विडाल टेस्ट केव्हां, कोठें, व कोणी केली व त्यानंतर औषधाचा गुण काय आला तें सप्रमाण लिहावें म्हणजे बोर्डापुढें तुमचें म्हणणें मांडणें सोईचें होईल. कळावें.

आपला
भा. वि. गोखले
चेअरमन

वैद्य भिंगारे यांचें ५ वें पत्र

श्री. रा. रा. गोखले, स. न. वि. वि.

आपले ता. २१।८।५५ चें पत्र मिळालें. आपल्या पत्रांतील सूचनेप्रमाणें मी आपल्या बोर्डासमोर प्रत्यक्ष पुरावा म्हणून २० केसेसचा रिपोर्ट पाठवूं शकतो. Widal test ज्या पॅथॉलाजिस्टाकडून करण्यांत आल्या आहेत, त्यांचाहि पूर्ण रिपोर्ट आपणाकडे पाठवितो. हें सर्व केल्यानंतर मीं पुणें किंवा मुंबईस येऊन आपल्या निरीक्षणाखालीं औषधांचा प्रत्यक्ष प्रयोगहि करून दाखवूं शकतो. ह्या सर्व पुराव्यानिशीं आपली खात्री पटल्यास व माझा प्रयोग यशस्वी ठरल्यास आपलें बोर्ड त्या संशोधनाप्रीत्यर्थ काय निश्चित करण्यास तयार आहे, हे आपण कळविण्याची कृपा करावी. आपल्याकडून माझें समाधान झाल्यास मी सर्व पुराव्यानिशी आपणाकडे स्वखर्चानें येण्यास तयार आहे. आपण माझ्या पत्राचा सहानुभूतिपूर्वक विचार कराल अशी उमेद बाळगतो. कळावें.

आपला
इं. भू. भिंगारे

बोर्डातर्फे उत्तर

सा. न. वि. वि.

आपलें पत्र पोहोचलें मजकूर समजला. कारण आपण म्हणता त्याप्रमाणें पत्रकें भरून जरुर पाठवा. रिसर्च बोर्डाची पुनर्रचना होणार आहे. ती झाली म्हणजे तुमचें म्हणणें नवीन सभासदापुढें मांडीन व निर्णय आपणास कळवीन.

आपला
भा. वि. गोखले
चेअरमन

वैद्य भिंगारे यांचें ६ वें पत्र

श्री. भा. वि. गोखले यांसी

आपलें ता. २९-८-५५ चें पत्र मिळालें. रिसर्च बोर्डाची पुनर्रचना होणार आहे. हें वाचूनहि अत्यानंद झाला. आपल्या बोर्डाशीं झालेला पत्रव्यवहारांत मी माझी बाजू व म्हणणें स्पष्ट मांडलें आहे. आपण म्हणतां त्याप्रमाणें सर्व पुरावे मी सादर करण्यास तयार आहे. व मी माझ्या खर्चानें आपण म्हणाल त्या रुग्णालयांत येऊन आपल्याच निरीक्षणाखालीं सर्व प्रयोग करून दाखविण्यास तयार आहे. ही माझी बाजू बोर्डासमोर आपण स्पष्टपणें मांडून बोर्डाचा निर्णय तावडतोब कळविण्याची कृपा करावी. बोर्डाचा निर्णय मला समाधानकारक वाटल्यास मीं सर्व कागदपत्र आपल्यासमोर पेश करण्यास तयार आहे. आपण माझ्या पत्राचा सहानूभूतिपूर्वक विचार करावा एवढीच विनंति. कळावें.

आपला
इं. भू. भिंगारे

सुप्रसिध्द दंतवैद्य पां. वि. जायदे
यांचीं दोन पुस्तकें
दंतरोगविज्ञान व चिकित्सा ३ रु.
वैद्यसन्मित्र २ ,,
कामशास्त्रावरील पुस्तकें
प्रश्नोत्तररूपी कामशास्त्र भाग १
(श्री. पं. ज. कुलकर्णी) ३ रु.
कामसूत्र भाग १
(वात्स्यायन ग्रंथाचा मराठी अनुवाद) ५ ,,
पांच वर्षांचा पाळणा डॉ. शं. ह. मराठे १॥ ,,
वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

अत्यभ्यास (अतिसेवन)

लेखक–
वैद्य बिंदुमाधव पंडित

[लिंबूरस टमाटो इ. रसाळ आंबट फळांच्या नित्य सेवनाचे दुष्परिणाम]

सध्यां आयुर्वेदीय औषधांचा वापर सर्वत्र दिसत असला तरी आयुर्वेदीय पद्धतीनें निदान करण्याची पद्धति फार कमी ठिकाणीं दिसून येते. आयुर्वेद, व्याधीला महत्त्व न देतां विशेष कारणांना व दोषांना अधिक प्राधान्य देऊन निदान-चिकित्सा करण्यास सांगतो. 'विकार नामाऽकुशलो न जिन्हीयात् कदाचन' असें त्यांचें स्पष्ट सांगणें आहे.

सध्यांचीं औषधें व पथ्यें

सध्याची निदान चिकित्सापद्धति अशी आहे. रोगी आला कीं त्याला रोगलक्षणें विचारावयाचीं व त्या रोगावरील औषधें द्यावयाचीं. रोगलक्षणें उष्ण स्वभावी आहेत कीं शीत स्वरूपाचीं आहेत याचा अन्दाज घ्यावयाचा व त्याप्रमाणें औषध व पथ्य सांगावयाचें.

विकार जर उष्ण कारणांमुळें झाला असें लक्षांत आलें तर तेलकट, तिखट, आंबट खाऊं नको असें सांगावयाचें व शीत कारणांमुळें झाला असें वाटलें तर भात, बटाटे वर्ज करावयास सांगावयाचे, ऊन पाणी प्यावयास सांगावयाचें, असें केलें जाते. वांगी, गवार या भाज्या खाज करणाऱ्या म्हणून वर्ज केल्या जातात. बाकी फारसें पथ्य सांगितलेलें आढळून येत नाहीं.

विशेष कारणाकडे लक्ष द्यावें

आयुर्वेदानें दोषांचा विचार मांडला आहे त्याजबरोबर दोषोत्पादक कारणांचा सविस्तर विचार दिला आहे व तो फार महत्वाचा आहे. समुत्थान–विशेष (कारण- विशेष) यामुळें दोषाची नित्य निर्मिति होत रहाते, त्यासाठीं तें विशेष कारण शोधून तें वर्ज करावयास लावणें यांत आयुर्वेदाचें वैशिष्ट्य आहे. हें कारण वर्ज करतां आलें म्हणजे रोगनिवारणाची लढाई ३/४ यशस्वी झाली म्हणून समजण्यास हरकत नाहीं.

पथ्ये सति गदार्तस्य किं औषधनिषेवणम् ।
पथ्येऽसति गदार्तस्य किं औषधनिषेवणम् ॥

या वचनाचा भावार्थ हाच आहे. ज्या चुकीच्या वागणुकीमुळें रोग झाला ती अपथ्यकारक वागणूक बदल्यानंतर मग औषधाचें फारसें महत्त्व उरत नाहीं, व असें पथ्यपालन केलें नाहीं तर घेतलेल्या औषधाचा परिणाम टिकाऊ होत नाहीं.

नमुन्यादाखल एक उदाहरण

अशा संबंधींचीं उदाहरणें व्यवहारांत हरघडी सांपडतात. या ठिकाणीं एक उदाहरण नमुन्यादाखल देत आहे. आयुर्वेदाच्या पद्धतीप्रमाणें विचार केला असतां एका रसाचा पदार्थ, विविध प्रकृतीच्या लोकांना सारख्याच प्रमाणांत हितकर होत नाहीं. उलट कांहीं प्रकृतींना अहिकारकहि होतो. वातप्रकृतींना गोड, आंबट, खारट, कफप्रकृतींना तिखट, तुरट, कडू, व पित्तप्रकृतींना गोड, कडू, तुरट रसाचे पदार्थ हितावह होतात व त्याखेरीज बाकीचे रस बाधक होतात, असें आयुर्वेदांत स्पष्ट शब्दांत वारंवार सांगितलें आहे. पण वैद्यांकडून त्याकडे द्यावें तसें लक्ष दिलें जात नाहीं.

लिंबूरसाची गोष्ट

उदाहरणार्थ लिंबूरसाचीच गोष्ट घेऊं. लिंबूरस हा आंबट रस आहे. तो फक्त वातप्रकृतीला हितकारक आहे. तो कफदोष व पित्तदोष वर्धक आहे. त्याच्या सतत सेवनानें कफदोष विकृत होतो. त्यामुळें पडसें, खोकला येतो, कफ पडू लागतो. हें न झालें तर अंगांत चरबी वाढूं लागते. तेंहि न झालें तर अगर होऊन शिवाय लघवीचे दोष निर्माण होतात. बहुकफ, बहुमेद, बहुमूत्र हे विकार निर्माण करण्याचें सामर्थ्य लिंबूरसाच्या नित्य सेवनांत आहे. इतकेंच नव्हे तर आंबट रसाच्या अत्यभ्यासानें होणारे सर्वत्र व्याधि

लिंबूरस बारा महिने नित्य सेवनामुळें, कफप्रकृति व पित्तप्रकृति लोकांना होणें शक्य आहे, नव्हे होतात असा अनुभव आहे. वातप्रकृति व्यक्ति सोडून बाकीच्या लोकांनीं लिंबूरस नित्य घेऊं नये. असें आचरण केल्यानेंच आरोग्याचा लाभ होईल.

अनायुर्वेदीय जीवनक्रमाचा परिणाम

नेहमींच्या पाहाण्यांतल्या एक तरुण सुशिक्षित बाई दिवसेंदिवस जाड होतांना दिसूं लागल्या. प्रकृतीबाबत त्या हेळसांड करत असतील हें शक्य नव्हतें; कारण तें सर्व कुटुंब विचारी होतें. त्यांच्या उशा–पायथ्याला डॉक्टर--वैद्य होते. तथापि त्यांना मिळत असलेला सल्ला हा आयुर्वेदीय नसावा व आरोग्यासाठीं त्यांना पुढें–मागें आयुर्वेदीय विचारसरणीचा अवलंब करावा लागेल असें मला वाटू लागलें होतें.

रोगाचें निश्चित कारण शोधावें

आणि घडलेंहि तसेंच; एक दिवशीं संध्याकाळीं ७॥ वाजतां आपल्या पतिराजासह त्या बाई आयुर्वेद सेवा संघाच्या प्रकाश औषधालयांत आल्या, व त्यांनीं आपल्या दुखण्याचा इतिहास संक्षेपानें सांगितला. दवाखाना बंद होण्याची वेळ आली होती व रोगाचें निश्चित कारण शोधून काढण्यासाठीं वेळ लागण्याची शक्यता होती. म्हणून दुसरें दिवशीं सकाळीं अगर सायंकाळीं लौकर येऊन प्रकृति तपासून घेण्यास सुचविण्यांत आलें.

औदुंबरसाराचा लेप

तथापि त्यांच्याकडून कामामुळें तसें येणें जमलें नाहीं. ८ दिवसांनीं रविवारीं येऊं असा निरोप आला तेव्हां त्यांना अधिक न तपासतांच पहिले दिवशीं मिळालेल्या माहितीच्या आधारें औदुंबरसाराची १ तोळयाची बाटली दिलें व औषध पायाच्या घोट्याजवळील सुजलेल्या व दुखणाऱ्या जागेवर लावण्यास सांगितलें. त्यांनीं तें औषध नेलें, लावलें, व त्या औषधानें ती सूज व त्या वेदना बऱ्याच कमी झाल्याचें त्यांच्या अनुभवास आलें.

अम्ल रसाच्या अत्यभ्यासाचीं लक्षणें

त्यानंतर ८ दिवसांनीं त्या बाई प्रकृतीचें समग्र परीक्षण करण्यासाठीं आल्या. त्या सांगत असलेलीं लक्षणें वाग्भटांत अम्लरसाच्या अत्यभ्यासाचीं म्हणून सांगितलेल्या लक्षणाशीं मिळतीं जुळतीं होतीं, म्हणून त्यांना ते अम्लरसाच्या गुणकर्माचे श्लोक वाग्भटावरूनच दाखविण्यांत आले. त्यांना ते पूर्णपणें पटले.

सोऽत्यभ्यस्तस्तनोः कुर्यात् शैथिल्यं तिमिरं भ्रमम्।
कंडु-पांडुत्व-वीसर्प--शोफ–विस्फोट-तृट्–ज्वरान्॥

आंबट रसाचे पदार्थ दीर्घकाल सेवन केल्यास शिथिलता, अंधारी, चक्कर येणें, खाज, रक्तक्षीणता, वीसर्प, सूज, फोड, तहान व ताप हे विकार जडतात.

बाई उपचाराला आल्या त्यावेळीं त्यांचें वय ३५ वर्षांचें होतें. त्यापूर्वींच्या १० वर्षांचा इतिहास त्यांनीं सांगितला. त्यांना एक १२ वर्षांचा मुलगा आहे. त्यानंतर १९४८ सालीं त्यांना अत्यार्तवाचा विकार जडला व तापहि येऊ लागला. त्यासाठीं त्यांनीं आपल्या गांवच्या व मुंबईच्या अनेक तज्ज्ञांना प्रकृति दाखविली. सर्व प्रकारच्या रक्त-मूत्रादि परीक्षा करवून घेतल्या व अनेकांचा सल्लाहि घेतला. तापाचें व अत्यार्तवाचे कांहींहि कारण त्यांना सांपडलें नाहीं. पण कांहींतरी केले पाहिजे म्हणून व अत्यार्तव थांबण्याचा तो हमखास आधुनिक उपाय आहे असें सांगण्यांत आलें म्हणून शस्त्रकर्मानें गर्भाशय काढण्याचा डॉक्टरी सल्ला त्यांनीं त्यावेळीं आचरणांत आणला.

घोट्याजवळ पावलाचा भाग सुजला

या उपायामुळें कांहीं वर्षें बरें वाटलें. इकडे लठ्ठपणा वाढत चालला व एके दिवशीं आपल्या एका पाऊलाचा कांहीं भाग [घोट्याजवळचा २।३ इंच] ठणकत आहे असें त्यांच्या लक्षांत आलें. लगेच डॉक्टरी उपाय सुरू झाले. एक्सरे काढले, प्लॅस्टर घातलें, इलेस्टोप्लॅस्ट बॅंडेज बांधलें. नाना उपाय केले, पण त्यांनीं दुखणें कमी होण्याचें कांहींच चिन्ह दिसेना; उलट सर्जननें बोलता बोलतां कदाचित् पाय काढावा लागेल असें सुचविलें. तेव्हां त्यांना धक्काच

बसला. आपण काखेंत कुबड्या घालून रस्त्यानें लंगडते जात आहोत अशी स्वप्नें त्यांना पडूं लागलीं. व कांहीं झालें तरी पाय काढावयाचा नाहीं असा त्यांनीं निश्चय केला. गर्भाशय काढल्यामुळें होणारा स्त्री–विशिष्ट भावनांचा कोंडमारा त्यांना त्रास देत होताच.

सर्व अम्लरसाचे पदार्थ वर्ज

शैथिल्य हें अम्लरसाच्या अत्यभासानें होते असें आयुर्वेदांत दिलें आहे म्हणून त्यांना सर्व अम्ल पदार्थ वर्ज करावयास सांगण्यांत आले. ताक, दही, टमाटो, लिंबू, चिंच, आंबे वगैरे सर्व आंबट पदार्थ बंद केले व कषाय रसाच्या औषधांचा उपयोग केला. औदुंबरसाचे १०।१० थेंब पाण्यांत टाकून पिण्यासाठीं सुचविलें. गेरू, अग्निपुटी प्रवाळ, यांच्या पुड्या मध–पाण्यांत घेण्यासाठीं दिल्या. उन्हाळ्याचें औषध हे तयार औषध लघवी साफ होऊन कफपित्तदोष कमी होण्यासाठीं दिले. गो. गुगुळ, कौटजादिशिलाजतु होहि मधाबरोबर दिले. या कारणाविशेषावर कफदोष, मेदोदोष, मूत्रदोष दूर करणारी औषधें द्यावयाचीं. ऊन सहन होत नसल्यामुळें कटु रस वगळून कषाय व तिक्त रसांची द्रव्यें ज्यांत असतील अशीच योजना केली आणि त्याशिवाय २।३ वेळां रक्तस्रुतीहि केली. या उपायांनीं त्यांचे दुखणें गेलें. त्या आपले कामधंदे व्यवास्थित रीतीनें करूं शकल्या.

ही गोष्ट त्यांना पटली

आपल्या जीवनांत अम्ल रसाचा अत्यभ्यास झाला असणें शक्य आहे ही गोष्ट त्यांना पटली व त्यांनीं ज्ञानपूर्वक अम्ल व अम्लपरिणामी [दूध साखर सुद्धां] द्रव्यें आहारांतून कमी केलीं. आधुनिक घर–गुती व शालेय शिक्षणांत लिंबू हें आरोग्य फळ आहे असें शिकविलें जातें. त्या ज्ञानाच्या आधारावर त्या नित्य आहारांत व पिण्यांत लिंबूरस वापरीत असत. ज्या वेळीं त्यांना अत्यार्तवाचा व ज्वरांचा विकार होता त्या वेळीं तर त्या केवळ पातळ अन्न म्हणून दिवसांतून अनेकवार लिंबूरसपाणी घेत असत. रोज ४।६ लिंबे त्यावेळी खाण्यांस येत असें त्या सांगतात. त्यामुळेंच कितीहि प्रभावी औषधें घेऊनसुद्धां विटाळ वाहाणें व ताप हीं लक्षणें थांबू शकलीं नाहींत.

कारण–विशेषाकडे लक्ष द्या

आजवर झालें तें झालें. आतां शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यास सुरू झाला आहे अशा वेळीं अन्य वैद्यकांतील कल्पनांना निष्कारण थारा न देतां आयुर्वेदानें जी दोषोत्पादक कारणें दिनचर्या, न वेगान् धारणीय, रसभेदीय इ. अध्यायांत सांगितली आहेत, आहार निद्रा मैथुन या संबंधींचे जे नियम दिले आहेत, त्या सर्वांचा विचार शुद्ध आयुर्वेद पद्धतीच्या निदान–चिकित्सेंत अवश्य झाला पाहिजे. व पथ्यापथ्य म्हणून त्या ज्ञानाचा उपयोग अवश्य केला पाहिजे. आयुर्वेद हा आयुर्वेद म्हणून जगावयाचा असेल तर आयुर्वेदांतील सिद्धांत हे आचरणांत आणले गेले पाहिजेत. नांव आयुर्वेद व व्यवहार ॲलोपथी पद्धतीचा, अशी स्थिति शुद्ध आयुर्वेदाच्या अध्यापनांत नसावी. नुकतेच निदान–चिकित्सा या विषयाचें अध्ययन, संस्थांतून व गुरु–परंपरा पद्धतीनें सुरू झालें आहे. अशावेळीं पूर्वींच्या दीड वर्षांत जें स्वस्थवृत्त, शारीर व दोषधातुमल–विज्ञान शिकविलें त्याला अनुसरूनच पुढील निदान–चिकित्सेचें शिक्षण व्हावें. पूर्वींचें अनुभवाचें शास्त्रीय ज्ञान व्यवहारांत आणण्याची हीच वेळ आहे.

जाहीर विनंति

उच्च कोटीचें आयुर्वेदीय व तिब्बी (छापील वा हस्तलिखित) वाङ्मय संग्रहित करण्यासाठीं उत्तरप्रदेशसरकारनें एक समिति नेमली आहे. ज्यांच्याजवळ असें वाङ्मय असेल त्यांनीं पुढील पत्यावर १५ जानेवारी पूर्वीं माहितीं पाठवावी.

श्री. द. अ. कुलकर्णी, अध्यक्ष
आयुर्वेद आणि तिब्बी अकेडमी, उत्तरप्रदेश पो. लखनौ

कंबर व पाठ

आखडण्यावर लत्ताप्रहार

आयुर्वेदविज्ञान मासिकाचे संपादक लिहितात–

"माझी कंबर आखडण्याची तक्रार कित्येक वर्षांची आहे व ती अत्यंत त्रासदायक आहे. नेहमीं भीति वाटत राहते कीं कोठें खोलांत पाय पडला अगर बोजा इ. उचलला कीं कमरेची शीर एकावर एक चढेल कीं काय ? कारण केव्हां केव्हां कमरेंत विजेच्या प्रवाहाप्रमाणें झटके येत असतात. ज्यावेळीं मधूनमधून हें दुखणें जोर करते त्यावेळीं कित्येक दिवस कंबर सरळ होत नाही. मग चालणें फिरणें उठणें बसणें कठीण होऊन जाते. या दुखण्यांतून कशी सुटका होईल अशी चिंता सारखी वाटत असे. सारखे लक्ष दुखण्याकडे असल्यामुळें उपचारासंबंधीं विचार चालूच राही.

स्थिति-स्थापकता जाते

विचार करतांना असा मुद्दा लक्षांत आला कीं आपल्या दैनिक जीवनांत एकाच पद्धतींत फार वेळ बसणें होत असल्यामुळें मांसपेशीमधील स्थितिस्थापकता हा गुण कमी होऊन जात असावा व त्यामुळें काठिण्य येत असावें. ती स्थितिस्थापकता परत आणण्यासाठीं व काठिण्य घालविण्यासाठीं पुढील उपाय करण्याचें ठरविलें.

तुडवून घेण्याचा कार्यक्रम

आमच्या घरीं [illegible] एक (२ मण) वजनदार नोकर ठेवला. त्याच्याकडून रोज कंबर व पाठ तुडवून घेण्याचा कार्यक्रम सुरूं केला. एक महिनाभर हा कार्यक्रम चालूं ठेवतांच कमरेमध्यें स्थितिस्थापकता आली. त्यानंतर आतां दर १०-१२ दिवसांनीं कंबर पाठ तुडवून घेत आहे. आज १ वर्ष झालें. कंबर व पाठ दुखण्यापासून मी मुक्त झालो आहे पादाघात ही विनौषध चिकित्सा आहे."

आसनें व पादाघातं च युक्तितः

[आयुर्वेदांत वातावर मर्दन हा उपचार सांगितला आहे, व हेमंत-शिशिर या शीत ऋतूसाठीं खास, पादाघातं च युक्तितः अशी चर्या दिली आहे. कंबर पाठ दुखत नसणाऱ्या लोकांनींहि या उपायाचा अवलंब करावयाचा आहे. जे लोक आसनें करतात त्यांच्या स्नायूंची स्थितिस्थापकता जात नाहीं. हा लाभ लक्षांत घेऊन नित्य अगर मधूनमधून तरी आसनें करणें हितकारक होणार आहे. अर्थात् हे दुखू लागणें आखडणें, सुरूं होण्यापूर्वीचे उपाय आहेत. आखडल्यानंतर मर्दन, पादाघात हेच उपाय अंमलांत आणावेत. —संपादक]

अ. भा. आयुर्वेद महासंमेलन

रेल्वे प्रवास--भाड्यांत सवलत

अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाचें येतें अधिवेशन आंध्रप्रांताची राजधानी कुर्नूल येथें डिसेंबरच्या २९।३०।३१ रोजीं भरणार आहे. अध्यक्षस्थानीं बंगलोरचे डॉ. वाय् पार्थनारायण पंडित यांची निवडणूक झाली आहे.

विद्यापीठ संमेलनाध्यक्ष म्हणून वैद्यराज डग्वेकर शास्त्री यांची योजना झाली आहे.

या संमेलनासाठीं जाऊ इच्छिणाऱ्या सदस्यांना रेल्वेबोर्डातर्फे प्रवास खर्चाची सवलत मिळण्याची कायमची व्यवस्था झाली आहे. त्यासाठीं लागणारीं सभासदत्वाचीं प्रमाणपत्रें महासंमेलनाच्या कार्यालयातर्फे पाठवण्यांत आलीं आहेत.



थंडुगार
नेत्रांजन
डोळ्यांचे विकारावर उत्कृष्ट
कृष्णशास्त्री बिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

....अनुक्रमणिका....

वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर ३६७
सौतिक आणि आयुर्वेद ३६९
वृद्धदोषांची गति लेखांक ३ रा ३७३
वैद्य मेहेंदळे दान ह्य आठवणी ३७७
मोतिबिंदूवर आयुर्वेदीय उपचार ३८०
अडुळसा उष्णवीर्य नाहीं ३८१
वैद्यां[illegible] पदव्या ३८४
सं[illegible]च्या नांवाखालीं अडवणूक ६८५
अत्[illegible]ास [अतिसेवन] ३८९

आत्रेय महोत्सव, पुणें

ि. १०।१२।५५ रोजीं वै. भू. गणेशशास्त्री जोशी ...रीं सकाळीं श्रीआत्रेयमहोत्सव साजरा करण्यांत ला. वै. भू. गणेशशास्त्री यांनीं वैद्यवन्द्य आत्रेयऋषी-ल व कायचिकित्सेसंबंधी माहिती सांगितली.

— -००- —

अष्टांग आयुर्वेद महाविद्यालयांत हा उत्सव प्रां. वैद्य मंडळाचे अध्यक्ष वैद्यराज पाडुरंगशास्त्री पांडे यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. आपल्या षणांत त्यांनीं आत्रेय उत्सवाची आवश्यकता प्रतिपादन ी व धन्वतरी उत्सव विद्यालयांचे सुट्टीचे काळांत येत ल्यान तो विद्यार्थ्यांचे साजरा करतां येत नाहीं, ही ंत्ती देखील ह्या उत्सवानें टळतें, असें सांगितलें. णि आत्रेय ऋषींचें महत्व वर्णन केलें.

कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं उत्सव

नंतर मुख्यवक्ते गणेशशास्त्री शेण्ड्ये ह्यांनीं आपले षणांत, उत्सव हे आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं सतात. त्यासाठीं ते केले जाणें, आवश्यक आहे. त्रेयांनीं स्वतः उत्तम प्रकारची विद्या संपादन करून आपले शिष्यास दिली. त्यांचेंच अनुकरण आजच्या द्यार्थ्यांनींहि करावें असें सांगून सध्यांचे आयुर्वेदाचे द्यालयांतून आयुर्वेदासाठीं आजवर ज्यांनीं सतत त्न केले त्यांचे फोटो लावणें इष्ट आहे असेंहि तिपादन केलें.

युगाचेपूर्वी तपश्चर्येनें ज्यांनीं विविध विद्या प्रकट ल्या, त्यांत कृष्णात्रेयांनीं आयुर्वेदविद्या प्रकट केली बद्दलचा महाभारतांतील पुढील उतारा वाचून दाखविला. विद्यालयाला ५ रुपयाची देणगी दिली.

महाभारतांतील वचनें

ान्तेऽन्तर्हितान् वेदान् सेतिहासान् महर्षयः
भिरे तपसा पूर्वमनुज्ञाताः स्वयंभुवा ॥१॥
दविद्वेद भगवान् वेदाङ्गानि बृहस्पतिः ।
र्गवो नीतिशास्त्रं तु जगाद जगतो हितम् ॥२॥
न्धर्वं नारदो वेदं भरद्वाजो धनुर्ग्रहम् ।
र्षिचरितं गार्ग्यः कृष्णात्रेयश्चिकित्सितम् ॥३॥

—महाभारत मोक्षधर्मपद शांतिपर्व अध्याय २१०

यानंतर वैद्यराज श्री. लोंढेशास्त्री व रानडेशास्त्री यांचीं समयोचित भाषणें झालीं. नंतर प्रसादवितरण होऊन हा समारंभ संपला.

समारंभाचे प्रारंभीं विद्यार्थी मेहेंदळे यांनीं रचलेलें नमनपद्य गाऊन दाखविण्यांत आलें. नंतर सर्वांनीं उभे राहून आत्रेयांच्या नमनारा श्लोक म्हटले. आत्रेयांचा फोटो नसल्यामुळें चरकसंहितेच्या ग्रंथाला हार घालून पूजा केली.

मंगलाचरण पद

राग- भूप, त्रिताल

नमन प्रथम मुनि अत्रिसुतातें ।
अवतरला जो लोकसुखातें ॥ध्रु.॥
अंतरा — गुरुपदिं मघवा असे जयाला
आग्निवेश नत नित्य पदाल[illegible] ।
काय-शास्त्र उपदेशी त्यातें,
सकल वैद्यगण[illegible] पद्धातें ॥ २

रचायिता — विद्यार्थी स. भ. मेहेंदळे

श्री आत्रेय नमन

[illegible]दाप्तविद्यं सकलतनुभृतां
सानुकम्पं तपन्तम् ।
शिष्याणामग्निवेशादिकसुमतिमतां
षट्कम[illegible]पयन्तम् ॥१॥
आयुर्वेदस्य कायाङ्गमिह सकलं
ख्यापयन्तं विशेषात् ।
आत्रेयं वैद्यमाद्यं भुवि विमलम[illegible]
नौमि तं [illegible]द्यवन्द्यम् ॥२॥

(रचयिता— वैद्यराज पं. दत्तात्रेय[illegible]स्त्री शेंडये)

भारतीय परंपरेची प्रगति

आज रोजीं आयुर्वेद सेवा संघाच्या सर्व संस्थांना भेट दिली. सर्वत्र व्यवस्था, टापटीप व स्वच्छता दिसली. आपल्या भारतीय परंपरेची लवकरच उन्नती होऊन ती प्रगत व्हावी अशी सर्वांचीच इच्छा असणार! मी या संस्थेला त्वरित उच्च स्थिती यावी अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो.

स. द. गोखले
B. E. (civil)
सेवानिवृत्त इंजिनियर, पुणें

संस्कृत दूध घेण्यासाठीं

आजकाल साधें दूध घेणें परवडत नाहीं व मानवतहि नाहीं. अशा वेळीं आपल्या कुटुंबीयांना व मित्रमंडळींना संस्कृत दूध घेण्यासाठीं

प्रोत्साहन द्या.

चहा व कॉफी हा दुग्ध-शर्करा-संस्कार आरोग्याच्या दृष्टीनें पुरेसा नाहीं. प्रोत्साहन स्वतंत्र, तसेंच चहा कॉफीबरोबरहि वापरतां येतें.

कफप्रकृति लोकांनीं तें सकाळीं दूधसाखररहित उपःपानार्थ वापरावें. इतरांनीं जरूरीपुरती दूधसाखर घालावी.

आयुर्वेद औषधी भवन, नासिक

संपादक व प्रकाशक— वैद्य [illegible] पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विवलकर कारंजा, नासिक
मुद्रक—श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, आग्रारोड, नासिक

Compiled
1999-2000